१४म
२

❀ ओ३म ❀

पुस्तक-संख्या १४म/२

पंजिका-संख्या २०३५८

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई महाशय १५ दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

16 MAY 19[illegible]
५४५१९

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

ऋग्वेदाचें

संपूर्ण मराठी भाषांतर

CHECKED 1973
Initial

भाषांतरकार

विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

२०३५८
९.३.२००१

मुद्रक व प्रकाशक

शंकर रामचंद्र दाते, बी. ए.

चालक, वैदिक वाङ्मय प्रसारक मंडळ.

‘ लोकसंग्रह ’ छापखाना, २७ बुधवार पेठ, पुणें.

१४ म
२

शके १८५०

किंमत पंधरा रुपये

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर

मंडळ पहिलें.

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

भाषांतरकार

विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

मुद्रक व प्रकाशक
शंकर रामचंद्र दाते, बी. ए.
चिटणीस, वैदिक वाङ्मय प्रसारक मंडळ.
‘ लोकसंग्रह ’ छापखाना, २७ बुधवार पेठ, पुणें.

शके १८५०

किंमत अडीच रुपये.

निवेदन.

जो विषय गेलीं तीन वर्षें सारखा मनाला खिळून राहिला होता, तो आज हातानिराळा होत आहे हें पाहून मनाला समाधान वाटतें. ऋग्वेदाचें आपण मराठींत भाषांतर करावें ही कल्पना बरीच जुनी; परंतु तिला ता. २६।१२।२४ पर्यंत मूर्त स्वरूप आलें नव्हतें.त्या दिवशीं ती कल्पना निश्चित स्वरूपांत कागदावर आली. चित्रावशास्त्री व दाते यांनीं उभयतांनीं मिळून हें काम आपल्या परीनें कसें वाटून घ्यावें यासंबधानें निश्चित योजना जरी त्या दिवशीं ठरली, तरी पण तें कार्य ताबडतोब सुरू करण्यास अनुकूल परिस्थिति नव्हती. शिवाय या कार्यास एक आणखी अडचण होती. श्रुतिबोधकार श्री. रामभाऊ पटवर्धन यांनीं आपण सदर भाषांतर पुरें करीत असल्याचें आम्हांस सांगितलें होतें व ऋग्वेदाचीं दोन मराठी भाषांतरें खपण्यास अडचण पडेल हें आम्ही जाणून होतों, व म्हणून आम्ही त्या दिशेनें प्रयत्न करण्याचें थांबविलें होतें. परंतु दोन अडीच वर्षेंपर्यंत थांबून सुद्धां त्यांचा तें काम पुरें करण्याच्या मागें लागण्याचा रंग दिसेना, तेव्हां आम्ही अखेर भाषांतर प्रसिद्ध करण्याचें निश्चितपणें ठरविलें आणि त्याच्यामागें लागलों.

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर छापून प्रासिद्ध करण्याच्या बाबतींत आम्ही जी पद्धति अंगीकारिली ती तर अभूतपूर्वच होय. आम्ही ऋग्वेदाचें भाषांतर मंडळवार प्रसिद्ध करण्याचें ठरवून तें उलट्या क्रमानें करण्यास व छापण्यास सुरवात केली. व प्रथम दहावें, नंतर नववें अशा उलट्या क्रमानें अखेर पहिल्या मंडळापर्यंत येऊन भाषांतराचें काम संपविलें. हा उलटा क्रम स्वीकारण्याचें कारण ऋग्वेदाचें मराठी भाषान्तर करणारांचा आजपर्यंतचा इतिहास होय.कारण, आतांपर्यंत ऋग्वेदाचें मराठी भाषांतर करण्याचे चारपांच प्रयत्न झाले, पण ते सर्व अर्धवट राहिले कै.पंडित यांचा प्रयत्न पांचव्या मंडळापर्यंत येऊन ठेपला.कै. सोमयाजी भाऊशास्त्री लेले व नागपूरचे घुलेशास्त्री यांनींही हा प्रयत्न केला पण त्यांचें एकही मंडळ पुरें झालें नाहीं. सर्वांत मोठा प्रयत्न श्रुतिबोधकारांचा. त्यांनीं सातव्या मंडळाचा टप्पा गांठला होता व नंतर सुमारें बारा वर्षें त्याचें काम बंद पडलें.तथापि आम्ही भाषांतर करण्याचें निश्चित ठरवून,व ते करीत नाहींत असें ध्यानांत आल्यावर आम्ही करणार असल्याचें जाहीर करतांच त्यांनींही लगबगीनें आठवें व नववें मंडळ भाषांतरित करून छापलें. तथापि त्यांसही अद्यापपर्यंत अखेर गांठतां आली नाहीं वरील सर्व प्रयत्न आज पावेतों अपुरे झाले, ह्या कारणानें आपलाही प्रयत्न पुरा होईलच अशी खात्री आमच्यांच्यानें धरवेना; व जर आपलाही प्रयत्न मागच्यांप्रमाणें अपुरा झाला, तर भाषांतराचा नुसता दुहेरीपणा व्हावयाचा व एक धड ना भाराभर तुकडे होऊन जावयाचे, ही आपत्ति टाळावी व तुकडे तुकडे मिळून कां होईना, पण समग्र भाषांतर मराठींत उपलब्ध व्हावें, या हेतूनें आम्ही भाषांतराचा उलटा क्रम स्वीकारला, व ईश्वराच्या कृपेनें तो पूर्ण झाला असून आज आम्ही ऋग्वेद संहितेचें संपूर्ण मराठी भाषांतर वाचकांस देत आहोंत.

वास्तविक पाहतां आम्ही ठरविलेल्या योजनेप्रमाणें हें काम पूर्वींच व्हावयास पाहिजे होतें. परंतु छापखान्याची सोय, हिंदुसभेचे दौरे, इत्यादि अनेक कामामुळें ह्या कार्यास सारखा व्यत्यय येत होता. अपेक्षेपेक्षां थोड्या उशीरानें कां होईना, पण हें कार्य सिद्धीस गेलें याबद्दल आम्हांस समाधान वाटतें.

खुद्द भाषांतरासंबंधानेंही बरेंच लिहिण्यासारखें आहे. ऋग्वेदाचीं आजपर्यंत जीं भाषांतरें निरनिराळ्या भाषांतून झालीं, त्यांत ज्या पद्धती अनुसरलेल्या आहेत, त्यांचे तीन प्रकार आहेत. (१) शब्दशः भाषांतराचा; त्याच्या योगानें भाषांतरित विषय स्वतंत्रपणें जरी सुबोध झाला नाहीं, तरी मुळाशीं ताडतां तो बरोबर जमला पाहिजे. (२) अर्थशः भाषांतराचा; त्याच्या योगानें केवळ अर्थप्रतीति होत असली म्हणजे झालें. शब्दांच्या वैशिष्ट्याकडे पाहण्याचें कारण नाहीं. (३) अर्थाची हानि न होऊं देतां शक्य तोंवर भाषा मुळाशीं जुळती व भाषांतरित भाषेला शोभेशी शब्दरचना करणें; हा तिसरा प्रकारच आम्ही येथें अनुसरला आहे. हें भाषांतर करण्याच्या कामीं आम्हांस सायणाचार्य यांचा चष्मा तर होताच; किंबहुना त्यांच्याशिवाय ऋग्वेदकालाइतकें दूरचें वाङ्मय अर्थदृष्ट्या दिसतच नाहीं म्हटलें तरी चालेल. याशिवाय वेदार्थाला उपयोगी पडणाऱ्या प्राचीन व अर्वाचीन वाङ्मयाचाहि आम्ही प्रसंगानुसार उपयोग केला आहे. त्यांतल्या त्यांत कै. पंडित यांच्या पहिल्या चार मंडळांचा आम्हांस पुष्कळ उपयोग झाला हें येथें नमूद करणें आवश्यक होय. हें भाषांतर करण्याचें काम चित्रावशास्त्री यांनींच बहुतेक केलें आहे. तथापि पहिल्या मंडळांतलि १–१२१ व १७४ ते १८७ सूक्तें; आणि दुसऱ्या मंडळांतील १–२५ सूक्तें आणि तिसऱ्या मंडळांतलि २६–४७ सूक्तें यांचें म्हणजे सुमारें चतुर्थांश भागाचें भाषांतर रा. दाते यांनीं केलें आहे. तथापि अर्थाची जबाबदारी व टीपा देण्याची व्यवस्था चित्रावशास्त्री यांनींच पत्करलेली असल्यामुळें भाषांतरकारित्व त्यांच्याकडेसच आहे. प्रकाशकत्व मात्र रा. दाते यांनीं सांभाळिलें आहे.

या भाषांतराबरोबर आम्ही मूळ संहिता छापावयास हवी होती असा आमच्या कांहीं मित्रांनीं आम्हांवर आक्षेप घेतला आहे. पण आम्हांस त्यांत अर्थ दिसत नाहीं. कारण एक तर सबंध भाषांतर मूळासकट एक भागांत देणें अशक्य. शिवाय मूळ द्यावयाचें म्हटलें म्हणजे पदपाठाशिवाय अर्थ करण्याच्या किंवा समजण्याच्या दृष्टीनें उपयोगी नाहीं. तेव्हां मूळ संहितापाठ व पदपाठ आणि मराठी भाषांतर एवढ्यांसह ग्रंथ तयार करावयाचा म्हटलें म्हणजे तें काम आवाक्याबाहेर जातें. किंबहुना केवळ ह्याच कारणामुळें आजपर्यंतचे प्रयत्न अपुरे राहिले असा आमचा समज आहे. शिवाय सर्व सामान्य वाचकांस मूळसंहिता समजण्याच्या किंवा उपयोगाच्या दृष्टीनें शून्य. व अभ्यासकांस पदपाठाशिवाय मूळ शून्य. तेव्हां मूळ छापणें झाल्यास ते पदपाठासहच स्वतंत्रपणें छापलें पाहिजे. भाषांतर जर आमच्या अपेक्षेप्रमाणें लौकर खपलें किंवा संहितापाठ व पदपाठ यांस जर पांचशें तरी किमान पक्ष ग्राहक मिळाले तर आम्हीही तो स्वतंत्र भाग प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे.

ऋग्वेदाचा अर्थ अनेक ठिकाणीं अत्यंत दुर्बोध असून सायणाचार्यांसही अनेक स्थळीं केवळ वेळ मारून न्यावी लागली आहे. म्हणूनच पंडितांनीं आपल्या मोठ्या कसोशीनें केलेल्या

भाषांतरासही वेदार्थ न म्हणतां वेदार्थयत्न असें यथार्थ म्हटलें आहे. व आम्हीही ही आपत्ति जाणूनच आहोंत. आमचें हें भाषांतर निश्चयार्थक आहे असें आम्हीही आज खात्रीनें म्हणूं शकत नाहीं. किंबहुना जास्त संशोधनांतीं आम्हांला आमच्या अर्थांत सुधारणा करावी लागेल हें आम्ही जाणून आहोंत. तथापि आम्ही शक्य तितक्या कसोशीनें अर्थ बरोबर करण्याचा प्रयत्न केला आहे.

ऋग्वेदाचा सविस्तर उपसंहार लिहिण्याचें मात्र आम्ही निश्चित ठरविलें आहे. त्यासाठीं साधनसामुग्री आम्ही गोळा करीत आहों. या उपसंहारात्मक ग्रंथांत आजपर्यंत निरनिराळ्या भाषांत ऋग्वेदविषयक जो भाग किंवा जी चर्चा आलेली आहे त्यांचा शक्य तोंवर परामर्ष घेण्याचें आम्ही योजिलें आहे. या ग्रंथांत ऐतिहासिक, वाङ्मयात्मक, यज्ञविषयक, समाजास्थितीनिदर्शक इत्यादि अनेक विषयांचा समावेश होणार असून तो ग्रंथही शक्य तितक्या लौकर प्रसिद्ध करण्याचें आम्ही ठरविलें आहे.

असो. अशा प्रकारें हा केलेला प्रयत्न महाराष्ट्रजनतेच्या उपयोगी पडून त्यांची धर्मबुद्धि शुद्ध व प्रज्वलित होवो अशी अपेक्षा करून ज्या देवदेवतांना उद्देशून हवि आणि प्रार्थना ह्या ग्रंथांत समर्पण केल्या आहेत, त्यांना हा ग्रंथ अर्पण करून हें आत्मनिवेदन पुरें करतों.

आपले

ज्येष्ठ वद्य ११ शके १८५० } सिद्धेश्वरशास्त्री चित्राव
वैदिकवाङ्मयप्रसारक मंडळ, पुणें. } शंकर रामचंद्र दाते

प्रथममंडळपरिचय.

पहिल्या मंडळांत १९१ सूक्तें असून १९७६ ऋचा आहेत. दहाव्या मंडळाचीं सूक्तें इतकींच असून ऋचा मात्र १७५४ आहेत. सर्व मंडळांत पहिलें मंडळ मोठें आहे.

ऋषि.

ऋषि हा शब्द मंत्रद्रष्टा ह्या अर्थानें वापरण्यांत येतो. सामान्यदृष्टीनें मंत्रद्रष्टा आणि मंत्रकर्ता एकच होय. ‘ यस्य वाक्यं स ऋषिः’ ही व्याख्या त्यादृष्टीनें तंतोतंत जुळणार नाहीं. मंत्रकर्ता म्हणून कोणी मध्यस्थ नसून ज्याचें भाषण तोच मंत्रकर्ता होय. पण अशा स्थितींत देवतांचे संवाद ऋषींनें ग्रथित केले असें म्हणण्यास जागा नाहीं.

दोनपासून सातपर्यंत गोत्रमंडळें आहेत. पण पहिल्या मंडळाचें तसें नाहीं. वेगवेगळया अनेक कुलांतील अनेक ऋषींनीं पाहिलेलीं सूक्तें पहिल्या मंडळांत संग्रहित केलीं आहेत. त्यांचा विविधपणा व कुलनिर्देश शेवटच्या कोष्टकावरून स्पष्ट होणारा आहे.

पहिलें मंडळ शतार्चिसंज्ञक अनेक ऋषींनीं पाहिलें आहे. पहिल्या मंडळांतील १ ते १० सूक्तांतील १०२ ऋचा मधुच्छंदानें पाहिल्या आहेत. म्हणून त्याला शतार्चिन असें सामान्य नांव प्राप्त झालें व त्यावरून सर्व मंडळाला पाहणारे जे वेगवेगळे ऋषि त्यांनाहि शतार्चिन असें म्हणूं लागले. म्हणूनच आश्वलायन गृह्यसूत्रांत (३.४.२) पहिलें मंडळ करणाऱ्या ऋषींचें तर्पण करण्याकरतां ‘ शतार्चिनस्तृप्यन्तु ’ असा उल्लेख आला आहे. त्याच्या पुढें दुसऱ्या मंडळापासून नवव्या मंडळापर्यंत जीं सूक्तें त्यांच्या कर्त्याला माध्यम नामानें संबोधलें आहे व दहाव्या मंडळांत १ पासून १२९ पर्यंत महासूक्तें व त्यापुढील सर्व क्षुद्रसूक्तें असा एकंदर सांकेतिक नांवाचा थोडक्यांत खुलासा आहे. (वेदार्थदीपिका परिभाषा २.२ पहा)

देवता

अश्व, दान, रति आणि अन्नस्तुति हीं नांवें देवतांत पाहिल्यानंतर चमत्कार वाटण्याचा संभव आहे. पण सूक्तांत वर्णन केलेला विषय देवता म्हणून एकदां घेण्याचें ठरलें म्हणजे वरील देवता चमत्कारिक वाटणार नाहींत. ‘ यस्य वाक्यं स ऋषिः ’ आणि ‘ या तेनोच्यते सा देवता ’ अशी सर्वानुक्रमणीकारांनीं ऋषि आणि देवता ठरविण्याची व्याख्या ठरविली आहे. तीच पद्धति आपण अनुसरणें क्रमप्राप्तच आहे. याच दृष्टीनें प्रत्येक मंडलाच्या परिचयांत आम्ही माहिती दिली आहे. ती अवश्य नजरेखालीं घालणें इष्ट आहे.

ह्या मडंळांत ४५ इंद्राची, ३४ अग्नींचीं, १५ अश्वीचीं, ११ मरुतांचीं, ८ विश्वदेवांचीं, ५ उषा, ४ ऋभु, ३ इंद्राग्नी, ३ मित्रावरुण, आणि ३ द्यावापृथ्वी यांचीं, २ पूषन्, २ विष्णु, २ अश्व, आणि २ सूर्य यांचीं, व १ वरुण, १ इंद्रावरूण, १ ब्रह्मणस्पति, १ वायु, १ इंद्रामरुत, १ अग्निमरुत्, १ सोम, १ अग्नीषोम, १ रुद्र, १ दानस्तुति, १ बृहस्पति, १ अन्न, १ रति, अशीं देवतांचीं सूक्तें आहे. ३६ वेगवेगळय देवतांचीं आणि ३ आप्रीसूक्तें आहेत.

छंदः

छंदाच्या दृष्टीनें पाहिल्यास ५१ सूक्तें त्रिष्टुभछंदांतील, ३४ गायत्रीछंदांतील, १२ जगतीछंदांतील, ६ अत्यष्टिछंदांतील, ६ द्विपदाविराज, ५ अनुष्टुभ, ३ पंक्ति, १ अतिशक्वरी, १ उष्णिह् व १ विराज छंदांतील आहे व साधारणपणें ७१ सूक्तें वेगवेगळ्या छदांतील आहेत येथें दिलेल छंद सर्वानुक्रमणीवरूनच दिलेले आहेत.

पालुपद असलेलीं सूक्तें.

	पालुपद	सूक्ताङ्क
१.	मरुद्भिरग्न आ गहि	१९
२.	उलूखलसुतानामवेद्विंद्र जल्गुलः	२८ १-४

गुरुकुल कांगड़ी

३.	आ तू न इंद्र शंसय गोष्वश्वेषु शुभ्रिषु सहस्रेषु तुवीमघ	२९
४.	पूषन्निह क्रतुं विद:	४२.७–११
५.	द्युम्नैरभि प्र णोनुम:	७८
६.	अर्चन्ननु स्वराज्यम्	८०
७.	योजा न्विंद्र ते हरी	८२
८.	वस्वीरनु स्वराज्यम्	८४.१०–१२
९.	अग्ने सख्ये मा रिषामा वयं तव	९४
१०.	देवा अग्निं धारयन् द्रविणोदां	९६
११.	अप न: शोशुचदघम्	९७
१२.	मरुत्वान्नो भवत्विंद्र ऊती	१००.१–१५
१३.	मरुत्वन्तं सख्या हवामहे	१०१.१–१५
१४.	वित्तं मे अस्य रोदसी	१०५
१५.	रथं न दुर्गाद्वसव: सुदानवो विश्वस्मान्नो अंहसो निष्पिपर्तन	१०६.१–६
१६.	सोमस्य पिबतं सुतस्य	१०८.५–१२
१७.	ताभिरू षु ऊतिभिरश्विना गतम्	११२.१–२३
१७.	द्यावा रक्षतं पृथिवी नो अभ्वात्	१८५.२–८
१८.	हरिष्ठा मधु त्वा मधुला चकार	१९१.१०–१३

अशीं एकंदर पालुपदें असलेलीं सूक्तें ह्या मंडळांत आहेत.

रोग

वेगवेळया रोगांसबंधीं वैदिक महर्षींच्या काय कल्पना असत याची रुद्रसूक्तें, सूर्यसूक्तें, उदकसूक्तें, वायुसूक्तें व अश्वीसूक्तें वाचलीं असतां चांगली कल्पना येते. हवापाण्याच्या द्वारा रोगाचा प्रसार होतो आणि त्यांच्या द्वाराच आरोग्याचा लाभ होतो व त्यांच्या द्वारा शरीरपोषक द्रव्यें लाभतात हें स्पष्टपणें उल्लिखित आहे.

सूर्याच्या प्रकाशाची रोगप्रतिबंधक शक्ति त्यांनीं वर्णिली असून क्षयरोगासारख्या रोगालाहि सूर्य प्रतिबंध करूं शकतो हें सूर्याच्या सूक्तांत स्पष्टपणें आलें आहे. (५०.११–१२) रुद्राच्या सूक्तांत ह्याप्रमाणें पुढेंहि बरेच निर्देश आले आहेत. त्यासंबंधीं विशेष विचार करावयास हवा तो आम्ही उपसंहारांत करण्याचें ठरविलें आहे.

शस्त्रक्रियेसंबंधीं कांहीं महत्त्वाचे उल्लेख.

विश्पलेचा पाय तुटला असतां तिला लोखंडी पाय बसवुन दुसऱ्या दिवशीं युद्धाला सज्ज केली. (११६.१५) दधीचीचें डोकें तोडून घोड्याचें तोंड बसविलें व पुन: स्वत: त्याचें तोंड बसविलें. (११६.१२) याशिवाय शस्त्रविद्या व औषधी यांनीं घडलेल्या परिणामांचीं विशेष वर्णनें पुढें आलीं आहेत. तीं पाहून शस्त्रविद्या व औषधी यांच्या ज्ञानांतील प्रगति पहाण्यासारखी आहे.

संवाद सूक्तें.

ह्या मंडळांत रोमशाभावयव्यसंवाद (१२६), अग्निमरुत् संवाद (१६५), इंद्रागस्त्यसंवाद (१७०), अगस्त्यलोपामुद्रसंवाद (१७९). असे संवाद आलेले आहेत. नेहेमींप्रमाणें हेहि संवाद त्रुटित, संदर्भरहित आणि नेमकें उद्दिष्ट सांगतां येत नाहींत असें आहेत. तथापि अगस्त्यलोपामुद्रासंवादांत कांहीं तत्त्वें ग्रथित केलेलीं आढळतात.

वाचनीय सूक्तें.

इंद्राचे प्राय: सर्व पराक्रम एकत्र केलेले एक प्रासादिक सूक्त ह्या मंडळांत आलें आहे (३२). त्याच्या पुढील सूक्तहि इंद्राचें माहात्म्य विशद करण्याकरतांच आहे. येथील हिरण्यस्तूपानें केलेलीं जीं सूक्तें आहेत तीं सर्वच वाचनीय आणि संग्रहात्मक सूक्तें आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं.

उषेची सूक्तें काव्यमय, कल्पनारम्य, प्रासादिक आणि वर्ण्य विषयाशीं तादात्म्य, दाखविणारीं आहेत. (१२३, १२४) अश्वीदेवांचीं सूक्तें चमत्कारांनीं ओथंबलेलीं आणि शस्त्रक्रिया, ओषधी, भावना यांचे खेळ दाखविणारी आणि जणूं काय एकूणएक चमत्कारांचा संग्रह करण्याकरतांच केलेलीं आहेत असें वाटतें. पुढें जेथें जेथें अश्वींचीं सूक्तें आलीं आहेत तेथें तेथें ह्या सूक्तांत वर्णिलेल्या चमत्काराखेरीज चमत्कार नाहींत म्हटलें तरी चालेल (११२, ११६). मरुतांचीं सूक्तेंहि स्पष्ट वर्णन करणारी, उपमाप्रचुर आणि भीतिप्रद वाटतात (३७,३८,३९). यामध्यें वर्णन करण्याची स्पष्ट भावनाहि व्यक्त होते. याशिवाय अग्नीचीं, विश्वेदेवांचीं आणि मित्रावरुणांचीं सूक्तें वाचनीय आहेत.

तत्त्वज्ञान.

तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें अस्यवामीय सूक्त (१६४) फार महत्त्वाचें आहे. मात्र त्यांतील बरेच मंत्र अत्यंत गूढ असून त्यांचा उलगडा करणें दुर्घट होतें. वेदान्ताच्या परिभाषेशीं ज्यांचा अल्पस्वल्प संबंध लावतां येतो त्यांचा प्रकार वेगळा. अशा ठिकाणीं कल्पनेनें कांहींहि अर्थ बसवतां येत असला तरी तात्पर्यहीन शब्दार्थ देणेंच जास्त हितकर होय. अस्यवामीय हें गूढार्थक असणारें सूक्त स्फुट कवितांच्या संग्रहासारखे असून त्यांत संदर्भ फारसा नाहीं. अशा दृष्टीनें हें सूक्त व विश्वेदेवाचीं सूक्तें व ऋभूचीं सूक्तें फार महत्त्वाचीं आहेत. इतरहि सूक्तांत अनेक ठिकाणीं अशा प्रकारची विचारसरणी आहे हें आम्ही उपसंहारांत सविस्तर दाखविणार आहोंत.

आप्रीसूक्तें.

ह्या मंडळांत पुढीलप्रमाणें आप्रीसूक्तें आहेत. (१.१३; १.४२; १.८८) ह्यापैकीं पहिले बारा ऋचाचें असून, दुसरें १३ ऋचांचें व तिसरें ११ ऋचांचें आहे. यासंबंधीं १.१३ वर विस्तृत टीप देऊन बरीच माहिती दिली आहे.

आप्रीसूक्तांत नेहमीं ११ किंवा बारा ऋचा असतात पण एकशें बेचाळिव्या सूक्तांत तेरा ऋचा आहेत. त्यामध्यें शेवटली इंद्राची ऋचा आहे. इंद्र देवतेची ऋचा इतर कोणत्याहि आप्रीसूक्तांत नाहीं. फक्त येथेंच आहे. एकंदर आप्रीसूक्तें पुढीलप्रमाणें आहेत.

आप्रीसूक्तें—१.१३ (१२ ऋचा); १.१४२(१३ऋचा); १ १८८ (११ ऋचा); २.३ (११ ऋचा;)३.४ (११ ऋचा); ५.५ (११ ऋचा); ७.२ (११ ऋचा); ९.५ (११ ऋचा); १०.७० (११ ऋचा); १०.११० (११ ऋचा).

कथासूक्तें.

१. शुनःशेपकथा (२४–३०); २ गोतमकथा (८५); ३ त्रितकथा (१०५); ४ बारीक बारीक कथांनीं भरलेलीं सूक्तें (११२, ११९, १२०); स्वनयभावयव्यकथा (१२५).

ह्या कथाहि अपुऱ्या व अंशोल्लिखित अशाच आहेत. पण अत्यंत प्राचीन संपत्ति म्हणून जपून ठेवलेल्या भागांतील ते अवशेष असल्यामुळें त्यापासून पुष्कळच लाभ होण्यासारखा आहे. म्हणून त्या अनेक प्रकारें कसाला लावून त्याचें महत्त्व ओळखलें पाहिजे.

नष्ट झालेलीं सूक्तें.

वैदिक वाङ्मय जपण्याच्या अटोकाट प्रयत्न झाला असला तरी त्याच्यांतील पुष्कळच भाग काळाच्या उदरांत गडप झालेला असला पाहिजे. अशीं जागोजाग त्रुटित, संदर्भरहित असें भाग पाहिल्याबरोबर शंका आल्याशिवाय राहात नाहीं. एक हजार सूक्तें नष्ट झाल्याचा दाखला तर सर्वानुक्रमणीवरूनच आपणास मिळतो. (९९)

ज्येष्ठ वद्य ११ }
१८५०. }

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर

पहिलें मंडळ.

सूक्त पहिलें.

ऋषिः—विश्वामित्राचा पुत्र मधुच्छन्द; देवता–अग्नि; छंदः—गायत्री.

१. यज्ञात पुढें स्थापन केलेला, प्रज्वलित, देवांना बोलावणारा ऋत्विज व अत्यंत ऐश्वर्य संपन्न अग्नीची मी स्तुति करतों.

२. अग्नि हा पूर्वींच्या ऋषींना पूज्य होता, व तसाच नव्या ऋषींनाहि तो पूज्य आहे, तो येथें देवांना वाहून आणो.

३. अग्नीच्या योगानें यश देणारें वीर्यशाली बनवणारें व सर्वदा पुष्ट करणारें धन (यजमानाला) दररोज प्राप्त होतें.

४. हे अग्ने, ज्या यज्ञांत तूं सर्व बाजूंनीं परिवेष्टून असतोस, त्या यज्ञांत विघ्न उत्पन्न होत नाहीं. तोच यज्ञ देवाप्रत जाऊन पोंचतो.

५. अग्नि (हा यज्ञांत देवांना) बोलविणारा, निष्कपटी, बुद्धिमान, कर्तृत्ववान, सत्यनिष्ठ व अतिशय कीर्तिमान आहे. हा अग्निदेव इतर देवांसह येथें येवो.

६. हे अग्निदेवा, जो यजमान तुला हवि अर्पण करतो, त्याचें तूं कल्याण करतोस. हे अंगिरा अग्ने, तुझ्या संबंधानें हें म्हणणें अगदीं खरें आहे.

७. हे अग्ने, आम्ही दररोज सांजसकाळ तुला बुद्धिपूर्वक नमस्कार करीत तुझ्याजवळ येत असतों.

८. यज्ञांतील विघ्नें नाहींशीं करणारा यज्ञांचा राजा, सृष्टिनियमांचा रक्षणकर्ता, व प्रकाशमान असा हा अग्नि आमच्या घरांत वृद्धिंगत होत आहे, (त्यास आम्ही बुद्धिपूर्वक नमस्कार करतों.)

९. हे अग्ने, ज्याप्रमाणें बाप मुलाची हौस पुरवितो, त्याप्रमाणें तूं आम्हांला इष्ट पदार्थ दे. आणि आमच्या कल्याणाची तजवीज कर.

सूक्त दुसरें.

ऋषिः--विश्वामित्रपुत्र मधुच्छन्द; देवता–१–३ वायु, ४–६ इन्द्रवायु, ७–९ मित्रावरुणौ; छन्दः–गायत्री.

१. हे सुंदर वायो, इकडे ये. हा सोमरस (मसाला घालून) तयार केला आहे. त्याचें पान कर आणि आमची प्रार्थना ऐक.

२. हे वायो, स्तोते तुझी उत्कृष्ट स्तोत्रांनीं स्तुति करीत आहेत. त्यांनीं सोमरस पिळला असून ते यज्ञकाल जाणणारे आहेत.

३. हे वायो, तुझी प्रसरण पावणारी व समृद्ध अशी संपत्ति तुला सोमरस देऊन स्वतःहि पिणाऱ्या भक्ताकडे जाते.

४. हे इंद्रा व वायो, तुमच्याकरतां हा सोमरस काढून ठेवला आहे. तुम्ही आम्हांकरतां अन्न घेऊन इकडे या. हे सोमरस तुमची वाट पहात आहेत.

५. हे वायो, तूं आणि इंद्र असे तुम्ही दोघे सोमरस जाणता. हे अश्वयनहो, तुम्हीं जलदीनें इकडे या.

६. हे वायो, तूं आणि इंद्र असे दोघे सोम पिळणाऱ्या माझ्याकडे लौकर या. तुम्ही पराक्रमी आहां. तुमच्याकरतांच खरोखर मोठ्या काळजीपूर्वक हा सोम तयार केला आहे.

७. पवित्र आणि बलवान मित्राला आणि शत्रूंना खाऊन टाकणाऱ्या वरुणाला मी बोलावतों. ते दोघे, तुपानें मिश्रित असणाऱ्या पदार्थाप्रमाणें बुद्धीला बलिष्ठ करणारे आहेत.

८. सृष्टिनियमांचें धारण व पोषण करणारे हे मित्रावरुणहो, तुम्ही या अतिशय मोठ्या यज्ञाला सत्यधर्मानें वेष्टिलें आहे.

९. बुद्धिमान, पुष्कळ ठिकाणीं उत्पन्न होणारे आणि सर्वत्र निवास करणारे हे मित्रावरुण आम्हांला कौशल्ययुक्त बल देतात.

सूक्त तिसरें.

ऋषिः--विश्वामित्रपुत्र मधुच्छन्द, देवता-१-३ अश्विनौ, ४-६ इंद्र, ७-९ विश्वेदेव, १०-१२ सरस्वती; छंदः—गायत्री.

१. हे चपल घोडे असलेल्या अश्वीनो, तुम्ही शुभ कर्माचें संरक्षक आहां. व पुष्कळांचा उपभोग घेणारे आहां. ह्या यज्ञीय अन्नाचा तुम्ही तृप्त होईपर्यंत आस्वाद घ्या.

२. हे अश्वीनो,बहुत अद्भुत कर्मे करणारे, अप्रतिहत बुद्धि व पराक्रमी अशा तुम्ही, आमच्या प्रार्थना स्वीकाराव्यात.

३. हे शत्रूंचा नाश करणारे, भयंकर मार्गानें वावरणारे व सत्यनिष्ठ अश्वीहो सोमाचीं कांडीं तोडून तो पिळला आहे, करितां तुम्ही या.

४. हे चित्रविचित्र कान्तिमान इंद्रा, तुझ्याचकरतां हे सोम हाताच्या बोटांनीं पिळलेले असून पवित्र आहेत. करितां इकडे ये.

५. हे इन्द्रा, तुला आम्ही बुद्धिपूर्वक बोलाविलें आहे. म्हणून ऐकण्याकरतां ये. सोमरस पिळणाऱ्या विप्रांच्या बोलावण्यानें तूं त्यांच्याकडे जात असतोस.

६. हे हरिद्वर्ण अश्वयुक्त इंद्रा, तूं लौकर येऊन आमचीं स्तवनें ऐक. आणि आम्ही दिलेला हवि भक्षण कर.

७. हे विश्वेदेवहो, तुम्ही संरक्षक व मानवांना केवळ आधारभूत आहांत. तुम्ही विपुल दान देतां. तुम्हांस हवि अर्पण करणाऱ्या भक्तानें तुमच्यासाठीं सोम पिळून ठेविला आहे. त्यासाठीं यां.

८. हे विश्वेदेवहो, तुम्ही कुशल आणि चपल आहां. गाई ज्याप्रमाणें गोठ्याकडे धांवत येतात, त्याप्रमाणें तुम्ही ह्या पिळलेल्या सोमरसासाठीं धांवत या.

९. हे विश्वेदेवहो, तुम्ही कधींहि नाश न पावणारे, कोणाचाहि द्रोह न करणारे, आणि मोठे कुशल आहांत. तुम्ही रथारूढ असतां. तुम्ही आमचें हें हविरन्न भक्षण करावें.

१० शोधक, समृद्ध कर्मधन अशी सरस्वती अन्नांनीं आमचा यज्ञ (देवांकडे) पोंचवो.

११. सरस्वती चांगल्या गायनाची प्रेरणा करणारी व चांगली बुद्धि तरतरीत करणारी आहे. ती आमचा यज्ञ धारण करो. (चालवो.)

१२. सरस्वती आपल्या पराक्रमानें मोठ्या उदकप्रवाहाला जोरानें चालना देते. ती अखिल बुद्धिमत्तेची अधिष्ठात्री होय.

सूक्त चौथें.

ऋषि:--विश्वामित्रपुत्र मधुच्छन्द; देवता-इन्द्र; छन्दः-गायत्री.

१. गाईची धार काढतांना ज्याप्रमाणें तिला चुचकारतात, त्याप्रमाणें आमच्या रक्षणाकरतां आम्ही सुंदर कृत्यें करणाऱ्या इंद्राला दररोज बोलावितों.

२. हे इन्द्रा, तुं आमच्या यज्ञांत ये. आणि हे सोम पिणाऱ्या, सोम पी. म्हणजे तुला माद आल्यावर, धनवान असणाऱ्या तुझ्यापासून आम्हांस गाई खचित मिळतील.

३. नंतर आम्हांस तुझ्यांतील अगदीं गुह्य अशा युक्त्या समजाव्यात. आमच्याशिवाय इतरांस त्या त्वां सांगूं नयेत. आमच्याकडे त्वां यावें.

४. हे यजमान, जो इंद्र तुझ्या मित्रांना श्रेष्ठ संपत्ति देतो त्या इंद्राकडे थेट जा आणि बुद्धिमान झाल्या व दयाळु इंद्राला (स्तुति ठीक झाली कीं नाहीं तें) विचार.

५. आणि त्याला म्हणा कीं केवळ इंद्राची सेवा करणारे आम्ही, म्हणून आमच्या निंदकांनीं आम्हांला येथून चालते व्हा असें म्हणावें काय ?

६. उलट हे शत्रूंची रग जिरवणाऱ्या, आमच्या शत्रुपक्षीयांनीं आम्हांला मोठे भाग्यशाली समजलें पाहिजे. कारण आम्ही खास इंद्राच्याच आश्रयानें राहणें इच्छितों.

७ यज्ञाचें केवळ वैभव असणाऱ्या, लोकांना आनंदयुक्त करणाऱ्या सहज झेप टाकणाऱ्या आणि उन्माद उत्पन्न करणाऱ्या सोमाशीं मैत्री करणारा इंद्र शीघ्रगामी आहे. त्याला लौकर पोटभर सोम द्या.

८. आणि हे शतक्रतो, हा सोम पिऊन झाल्यावर त्वां वृत्रांचा निःपात केला आणि युद्धांत लढणाऱ्या भक्ताला राखिलें.

९. हे इन्द्रा, धन प्राप्त व्हावें म्हणून आम्ही युद्धामध्यें लढणाऱ्या त्या तुला लढवितों. (लढाईस पाठवितों.)

१०. त्या इन्द्राची स्तुति गा. तो सोम देणाऱ्या यजमानाचा सखा आहे. तो महान पराक्रमी कड पोचविणारा व धनाचा रक्षण करणारा आहे.

सूक्त पांचवें.

ऋषिः—विश्वामित्रपुत्र मधुच्छन्द; देवता-इन्द्र; छन्दः—गायत्री.

१. चला या हो मित्रमंडळी, या. बसा आणि स्तोत्रें तयार करून इंद्राची स्तुति गा.

२. अतिशय समृद्ध आणि जलाचा अधिपति असा जो इन्द्र, त्याची सोम पिळला असतांना स्तुति गा.

३. हाच तो इन्द्र आमच्याजवळ असो. तो संपत्ती देवो. तो बुद्धी देवो, तो आम्हांसाठीं धन घेऊन येवो.

४. लढाई चालू झाली असतांना शत्रू ज्याच्या हरिद्वर्ण घोड्यांवर झडप टाकूं शकत नाहींत, त्या इंद्राची स्तुति गा.

५. हे सोम येथें पिळले असून शुद्ध व दधिमिश्रित केले आहेत. ते सोमपी इन्द्राकडे त्याच्या तृप्त्यर्थ जात आहेत.

६. हे महान पराक्रमी इंद्रा, सोम आपल्याला प्रथम पिण्याला मिळावा म्हणून तूं सर्व देवांत मोठा ठरविण्यासाठीं एकदमच वृद्ध झालास.

७. हे इंद्रा हे ताबडतोब तयार केलेले सोम तुझ्यांत शिरोत. आणि बुद्धिमान अशा तुला ते सुखकारक होवोत.

८. हे शतक्रतो इंद्रा, गाण्यांनीं आणि स्तोत्रांनीं तुझी कीर्ति वाढविली आहे, आमचीहि वाणी तुझी कीर्ति वृद्धिंगत करो.

९. अखंड रक्षण करणारा इंद्र हजार प्रकारची शक्ति आम्हांस देवो, अशी कीं सर्व जगांतील सामर्थ्य तिच्यामध्यें राहील.

१०. हे स्तुतिप्रिय इंद्रा, लोक आमच्या शरीराचा द्रोह न करोत. सर्वांचा स्वामी असा तूं शत्रु दूर कर.

सूक्त सहावें.

ऋषिः—विश्वामित्रपुत्र मधुच्छन्द; देवता-१-३ इंद्र, ४.६.८.९ मरुत्, ५.७ इंद्र व मरुत, १० इंद्र; छंदः--गायत्री.

१. स्थिर अशा जगताच्या भोंवतीं फिरणाऱ्या अतिशय मोठ्या घोड्याला जोडतात;व नंतर आकाशांत तेजस्वी तारे अतिशय चकाकूं लागतात.

२. ह्याचे हरिद्वर्ण दोन घोडे रथाला जोडले जातात. ते आरक्त वर्णाचे, पंख नसलेले, बळकट व पराक्रमी इन्द्राला वाहून नेणारे आणि इच्छित पदार्थ देणारे आहेत.

३. अंधाराच्या ठिकाणीं उजेड करणारा आणि अरूपाचे ठिकाणीं रूप उत्पन्न करणारा असा हा हे मानवांनो, उषेच्या बरोबर उत्पन्न होतो.

४. आणि नंतर यज्ञीय नांव धारण करणारे मरुत पुन्हां गर्भत्वाप्रत जातात (मेघ बनतो.)

५. हे इंद्रा, पर्वत फोडणारे आणि गुहेमध्यें वाट दाखवून देणारे जे (मरुत) त्यांच्या साह्यानें तूं गाई मिळविल्यास.

६. देवभक्त स्तोत्यांनीं महान प्रख्यात आणि द्रव्य मिळवून देणाऱ्या मरुद्गणाची ज्ञात्या इंद्राप्रमाणें स्तुति केली.

७. हे मरुद्गणा, तूं निर्भय इंद्रासह मिळलेला असतोस. दोघे आनंदी आणि सारखे तेजस्वी आहांत.

८. यज्ञ निर्दोष,प्रिय आणि फलप्रद अशा गणांसह इंद्राला बलवान करीत पूजीत आहेत.

९. हे सर्वव्यापी मरुतांनो, तुम्ही द्युलोकाहून किंवा अन्तरिक्षातून इकडे या,कारण येथें तुम्हाला स्तोत्रें प्रसन्न करीत आहेत.

१० आम्ही इंद्राला ह्या पृथ्वीवरून, द्युलोकावरून आणि विस्तृत अन्तरिक्षांतून धनाची देणगी मागत आहोंत.

सूक्त सातवें.

ऋषिः—विश्वामित्रपुत्र मधुच्छन्द; देवता-इंद्र; छंदः-गायत्री.

१. गायक लोक इंद्राचीच स्तुति गात असतात; अर्कपाठक देखील त्या श्रेष्ठ इंद्राचीच स्तुति म्हणतात. इतर लोकहि त्या इंद्रांचीच स्तुति करतात.

२. इंद्र वज्रधारी असून सुवर्णमय कांतीनें युक्त आहे. त्याच्याच घोड्याची जोडी शब्द उच्चारल्याबरोबर जोडली जाते.

३. दूरवरचें दिसावें म्हणून इंद्रानेंच सूर्याला आकाशांत वर चढविलें. इंद्रानेंच आंत गाई असलेला पर्वत फोडून टाकला.

४. हे इंद्रा, हजारो वीर जेथें लढत आहेत, अशा लढाईंत तूं आमचें संरक्षण कर. इंद्र रक्षणासाठीं लागणाऱ्या प्रबल सामर्थ्यानें युक्त आहे.

५. लहानशी मारामारी असो किंवा मोठी लढाई असो, आम्ही इंद्रालाच बोलावतों. वज्र धारण करणाऱ्या इंद्रालाच आम्ही शत्रूवर पाठवितों.

६. हे श्रेष्ठ व सतत दान देणाऱ्या इंद्रा, आमच्याकरतां ह्या मेघावरील आच्छादन दूर कर. आमच्याकरतां तुला कांहींही करणें अशक्य नाहीं.

७. दानप्रसंगीं जीं एकापेक्षां एक उत्कृष्ट वज्रधारी इंद्राचीं स्तोत्रें केलीं आहेत त्यांत ह्याची उत्कृष्ट स्तुति आढळत नाहीं.

८. जसा एकादा पोळ गाईंच्या कळपाकडे धांवतो तसा हा कर्तुमकर्तुं समर्थ व सर्वेश्वर इंद्र आपल्या सामर्थ्यानें अनुकरणशील लोकांकडे येतो.

९. इंद्र हाच एकटा सर्व जंगम संपत्तीचा प्रभू आहे. सर्व लोकांचा राजा आहे.

१०. तुम्हा लोकांकरतां आम्ही सर्व ठिकाणाहून इंद्राला बोलावतों. तो केवळ आमचाच असो.

सूक्त आठवें.

ऋषिः—विश्वामित्रपुत्र मधुच्छद; देवता—इंद्र; छंदः—गायत्री.

१. हे इंद्रा, आमच्या रक्षणाकरतां तूं धन घेऊन ये. तें सुखदायक, शत्रूचा नाश करण्यास समर्थ असलेलें, पुरून उरणारें आणि वृद्धिंगत होणारें असो.

२. आणि त्या धनाच्या योगानें समर्थ झालेले आम्ही शत्रूंना चपराका लगावून हूसकून लावूं शकावें. आणि तुझ्या संरक्षणाखालीं असलेल्या आम्ही घोड्यावर स्वार झालेल्या शत्रूंनाहि पिटाळून लावावें.

३. हे इंद्रा, तुझ्या रक्षणाखालीं असलेल्या आम्ही शत्रूंना हत्यारानें एकदम ठार करावें. आणि आमच्याशी हेवादेवा करणाऱ्यांवर आम्हांला जय मिळावा.

४. हे इंद्रा, आम्हाला तुझी जोड असली, म्हणजे आम्ही शूर योध्यांच्या साह्यानें शत्रूंच्या सैन्यांना सहज टकर देऊं शकूं.

५. इन्द्र शरीरानें जसा विस्तीर्ण आहे, तसा गुणांनींहि तो अत्यंत श्रेष्ठ आहे. खरोखर त्या वज्रधारी इंद्राचें माहात्म्य सतत राहो. आकाशाप्रमाणें त्याचें बळ मोठें असो.

६. ज्याप्रमाणें बुद्धिमान श्रेष्ठ पुरुष पुत्रजन्माच्या वेळीं किंवा समरांगणात एकत्र जमतात.—

७. किंवा ज्याप्रमाणें अतिशय सोमपान करणाऱ्याचें पोट समुद्रासारखें तुडुंब भरून जातें, तलावांतल्या पाण्याप्रमाणें तोंड भरून जातें,—

८. त्याप्रमाणें ह्या इंद्राची अतिशय विपुल, गाईबैलांनीं युक्त, आणि श्रेष्ठ प्रकारची संपत्ति सर्वत्र भरून आहे. पिकलेल्या फळांनीं भारवलेली जशी फांदी असते, त्याप्रमाणें भक्ताला इंद्राची ही अपूर्व देणगी होय.

९. त्याप्रमाणेंच हे इंद्रा, तुला हविर्दान करणाऱ्या माझ्यासारख्या भक्ताच्या कल्याणाकरतांच केवळ तुझें ऐश्वर्य आहे.

१०. अशा प्रकारचें ह्या इंद्राचें चरित्र आणि स्तोत्र अतिशय गोड आणि प्रशंसनीय आहे. इंद्राला सोम पिण्यासाठीं आम्ही बोलावतों.

सूक्त नववें.

ऋषिः—विश्वामित्रपुत्र मधुच्छन्द; देवता—इन्द्र; छंदः—गायत्री.

१. हे इन्द्रा, तूं अतिशय श्रेष्ठ, सामर्थ्यसंपन्न व पूज्य आहेस. सोमयागाच्या वेळीं सर्वत्र तुला हविरन्न मिळाल्याकारणानें तूं अगदीं खूष होतोस. म्हणून हे इन्द्रा, तूं येथें ये.

२. सर्व जग उत्पन्न करणारा व आनंद पावणारा अशा इंद्राला सोमरस काढला असतां, कार्यसमर्थ करणारा आणि आनंद देणारा सोमरस द्या.

३. हे सुंदर हनुवटी असलेल्या रूपवान व सर्व पाहणाऱ्या इंद्रा, ह्या आमच्या यज्ञामध्यें सुंदर स्तोत्रांनीं स्तुति केलेला तूं आनंदित हो.

४. हे इंद्रा, मी तुझें स्तोत्र केलें आहे. अतृप्त असलेले भक्त श्रेष्ठ आणि सर्वाधीश अशा तुला स्तुति करून प्रार्थना करतात.

५. हे इंद्रा, तुझें सर्वत्र असलेलें आणि विशेष गुणयुक्त असें विविध प्रकारचें विपुल आणि श्रेष्ठ धन आम्हांकडे पाठवून दे.

६. किंवा हे अत्यंत तेजस्वी इंद्रा, उद्योग करणाऱ्या आणि यशस्वी होऊं इच्छिणाऱ्या आम्हांला जेथें धन आहे तिकडेच पाठव.

७. हे इंद्रा, गाईंनीं युक्त, घोड्यांनीं युक्त, नाश न पावणारें, सर्व प्रकारें आयुष्य वाढविणारें, विपुल आणि श्रेष्ठ प्रकारचें भाग्य आम्हांला दे.

८. हे इंद्रा, आम्हांला अत्यंत मोठें आणि तेजस्वी बनवणारें हजारो प्रकारचें धन दे. आम्हांला गाडे भरून अन्न दे.

९. आमच्या संपत्तीचें रक्षण व्हावें म्हणून यज्ञाकडे येणाऱ्या धनाधीश इंद्राला गाणीं म्हणत आम्ही बोलावतों.

१०. जेथें जेथें सोमरस काढतात, तेथें तेथें सर्वत्र उपासक लोक श्रेष्ठ आणि आनंद पावणाऱ्या इंद्राची स्तुति करतात.

सूक्त दहावें.

ऋषिः—विश्वामित्रपुत्र मधुच्छन्द; देवताः–इंद्र; छंदः––अनुष्टुभ.

१. हे शतक्रतो इंद्रा, गायक लोक तुझी स्तुति गातात. आणि अर्कपाठक म्हणणारे लोक तुझे पोवाडे म्हणतात. वेळू ज्याप्रमाणें उंच वाढतो त्याप्रमाणें ब्रह्मपाठक लोक तुझी कीर्ति श्रेष्ठ प्रकारची करतात.

२. जो यजमान ह्या शिखरावरून त्या शिखरावर चढतो आणि पुष्कळ कर्तृत्व करतो, त्याची इच्छा इंद्र जाणतो (आणि ती पूर्ण करण्याकरतां) तो बलशाली (मरुतांच्या) संघासह उद्युक्त होतो.

३. हे सोमपान करणाऱ्या इंद्रा, तुझे (मानेवर) सुंदर आयाळ असलेले, बळकट, आणि तंग बांधलेले असे हरी नांवाचे दोन घोडे जोड. आणि आमची प्रार्थना ऐकण्याकरतां ये.

४. हे संपत्तिमान इंद्रा, तूं आपल्या यज्ञांत ये. आम्ही केलेली स्तुति ऐक. तिचा स्वीकार कर आणि तिची प्रशंसा कर. आमच्या ब्रह्मरूप स्तोत्रांची आणि यज्ञाची वृद्धि कर.

५. पुष्कळ शत्रूंचा निःपात करणाऱ्या इंद्राचें वर्धिष्णु (तेजस्वी) असें स्तोत्र गावें. इंद्राला ज्याप्रमाणें सोमरसाबद्दल आनंद वाटतो, त्याप्रमाणें आमच्या सख्याबद्दलहि वाटतो.

६. त्याच्याचकडे आम्ही सख्यत्वाकरतां, संपत्तीकरतां आणि उत्कृष्ट पराक्रमाकरतां प्रार्थना करीत जातों. तो आम्हांला धन देणारा इंद्र या गोष्टी सहज करूं शकतो.

७. हे इंद्रा, त्वां दिलेलें किंवा शुद्ध केलेलें उदक सर्वत्र पसरतें आणि सहज सुलभ होतें. तूं गाईचा कळप मोकळा कर आणि हे वज्रधारी इंद्रा, तूं आम्हांस धनयुक्त कर.

८. हे शत्रुहन्त्या इंद्रा, द्यावापृथिवी दोन्हीहि तुला आपल्यांत समावूं शकत नाहींत. आकाशांतील उदकें जिंकून तीं व गाई तूं आम्हांस दे.

९. हे सर्व ऐकणाऱ्या इंद्रा, माझी हाक ऐक आणि माझ्या स्तुतीचा स्वीकार कर. आणि माझी ही स्तुति मित्रापेक्षांहि जवळची कर.

१०. हे इंद्रा, तूं संपत्तीचा वर्षाव करणारा आणि युद्धप्रसंगीं आमची हाक ऐकणारा आहेस. हें आम्ही जाणतों. हजारो प्रकारांनीं रक्षण करणाऱ्या आणि देणग्या देणाऱ्या इंद्राला आम्ही बोलावतों.

११. हे कौशिक इंद्रा, आनंद पावणारा तूं सोमरस पी. आणि नवें आयुष्य आम्हांस दे. आणि हजारो लाभ प्राप्त होणारें ऋषिपद मला दे.

१२. हे स्तुतिप्रिय इंद्रा, ह्या वाणी तुला सर्व बाजूंनीं वेढून असोत. तुझ्या म्हातारपणाबरोबर त्या म्हाताऱ्या होवात. त्वां उपभोगिलेल्या अशा त्या उपभोग्य बनोत.

सूक्त अकरावें.

ऋषिः—मधुच्छन्दाचा पुत्र जेता; देवता–इंद्र; छंदः—अनुष्टुभ.

१. समुद्राप्रमाणें अफाट पसरलेला, सकल रथींमध्यें श्रेष्ठ आणि सर्व बलवानांमध्यें श्रेष्ठ, चांगल्यांचा स्वामी अशा इंद्राचें श्रेष्ठत्व सर्व प्रकारच्या स्तुतींनीं वृद्धिंगत केलें आहे.

२. हे बलाधिपते इंद्रा, पराक्रमी अशा तुझ्याशीं सख्य करण्यास आम्हांस भीति वाटूं नये. आम्ही तुझी स्तुति करीत आहोंत. तूं कधींहि पराभव न पावलेला आणि सर्वांना जिंकणारा आहेस.

३. जर गाईंनीं युक्त आणि बलसंपन्न इंद्र भक्तांना (आणखी) धन देईल तर त्यानें पूर्वीं दिलेली संपत्ति आणि संरक्षण शत्रू हिरावून नेऊं शकणार नाहींत.

४. इंद्रानें पूर्वीं शत्रूंचीं नगरें फोडलीं, तो तरुण, ज्ञाता, अत्यंत ओजःसंपन्न, वज्र धारण करणारा आणि सकल विश्वाचा धारण करणारा आहे. त्याची सर्वत्र स्तुति चालू असते. अशा प्रकारें इंद्राची प्रसिद्धि झालेली आहे.

५. हे वज्रधारी इंद्रा, वलानें बिळांत लपविलेल्या गाईंना तूं मुक्त केलेंस. वलानें त्रासून सोडलेले पणि तुझ्या संरक्षणामुळें न भ्यालेले देव मदतीकरतां तुझ्याकडे आले

६. हे शूर इंद्रा, तुझ्या दातृत्वामुळें उदक प्राप्त झालें असें मी मोठ्यानें सांगत गेलों. तेव्हां हे गानप्रिय इंद्रा, सर्व भक्त उभे राहिले आणि त्यांनीं तुझा तो पराक्रम जाणला.

७. हे इंद्रा, कपटी शुष्णास तूं कपट करून खालीं पाडलेंस. बुद्धिमान भक्त तुझा तो पराक्रम जाणतात. त्यांच्या धनांची वृद्धि होवो.

८. आपल्या बलानें सर्वांचा प्रभु झालेल्या इंद्राची आमची हीं स्तोत्रें स्तुति करीत आहेत. इंद्राच्या देणग्या हजार प्रकारच्या किंबहुना अधिकच आहेत.

सूक्त बारावें.

ऋषिः—मेधातिथि कण्वपुत्र; देवता–६ व्याचा पहिलाचरण निर्मथ्य व आहवनीय अग्नि, अवशिष्ट अग्नि; छंदः—गायत्री.

१. देवांना बोलविणारा, सर्व संपत्तिमान, पराक्रमी अशा अग्नीनें आमच्या ह्या यज्ञाचें दौत्य करावें असें आम्ही इच्छितों.

२. अग्नीला, केवळ अग्नीलाच हविरन्नानें सर्वदा बोलवितात. तो सर्वांचा आवडता, देवांना हवि पोंचविणारा आणि सर्वाधीश आहे.

३. हे अग्ने, तूं उत्पन्न होतांच, दर्भासनावर बसलेल्या मज भक्ताकडे देवांना घेऊन ये. तूं आमचा देवांना बोलविणारा आणि आम्हांला पूज्य आहेस.

४. हे अग्ने, ज्यापेक्षां तूं आमचें दौत्य करण्यास जातोस, त्यापेक्षां येऊं इच्छिणाऱ्या उत्सुक अशा देवांना तूं जागृत कर. आणि त्यांच्यासह दर्भासनावर येऊन बैस.

५. हे तुपाची आहुति स्वीकारणाऱ्या, दीप्तिमान अग्ने, आमचा द्वेष करणाऱ्या राक्षसाला तूं जाळून टाक.

६. विद्वान, गृहपति, तरुण, हव्यवाह, आणि ज्वालामुख असा अग्नि अग्नीच्या योगानें पेटविला जातो.

७. विद्वान, रोगनाशक, सत्यधर्मांचा पालनकर्ता आणि यज्ञांतील विघ्नें नाहींशी करणारा अशा अग्निदेवाची स्तुति करा.

८. हे अग्निदेवा, दौत्य करणाऱ्या तुझी हविर्युक्त उपासक सेवा करतो. त्याचा तूं रक्षणकर्ता हो.

९. जो हविर्युक्त भक्त देवांच्या संतोषाकरतां अग्नीची मनःपूर्वक सेवा करतो, त्या उपासकाला, हे पवित्र अग्ने, तूं सुख दे.

१०. हे दीप्तिमान अग्ने, तो तूं देवांना आमच्या यज्ञार्थ व हविभक्षणार्थ इकडे घेऊन ये.

११. हे अग्ने, गायत्री छंदांत अगदीं नवीन स्तोत्र करून आम्ही तुझी स्तुति करीत आहोंत. तूं आम्हांला पराक्रमी पुत्रासह अन्न आणि ऐश्वर्य दे.

१२. हे अग्ने,शुद्ध तेजानें आणि सकल देवांच्या धाव्यासह तूं आमचें हें स्तोत्र स्वीकारावेस.

सूक्त तेरावें.

ऋषिः—मेधातिथि कण्वपुत्र; देवता–आप्रीसूक्त* (१ सुसमिद्ध, २ तनूनपात् , ३ नराशंस, ४ इळा, ५ बर्हि, ६ द्वार, ७ उषा आणि रात्र, ८ दैव्यौ होतारौ, ९ तीन देवी–सरस्वती इळा व भारती, (मही) १०त्वष्टा, ११ वनस्पति १२ स्वाहा; छन्दः—गायत्री.

---

*टीप—वर दिलेल्या बारा देवतांना अनुकूल करून घेण्याकरतां हें सूक्त असतें म्हणून याला आप्रीसूक्त असें म्हणतात. पुष्कळ ठिकाणीं तनूनपात किंवा नराशंस यापैकीं एकाचीच ऋचा असतें त्यामुळें अकरा ऋचा असतात.

पहिली चार अग्नीचीच वेगवेगळ्या वेळचीं नांवें आहेत. ३. २८. ११ मध्यें तनूनपात आणि नराशंस अग्नीची व्याख्या दिली आहे. आठवें दैव्यौ होतारौ हे ह्या नांवाचे दोन अग्नीच आहेत, असें सायणाचार्य म्हणतात. वायु आणि अग्नि असें दुर्गाचार्य म्हणतात.

१. हे अग्ने, उत्कृष्ट प्रज्वलित झालेला तूं हविर्युक्त यजमानाकडे देवांना घेऊन ये. हे हात्या आणि पवित्र अग्ने, त्यांना तूं हवि दे.

२. हे मेधावी, तनूनपात अग्ने, देवांच्या संतोषाकरतां आज तूं आमच्या यज्ञांतील मधुयुक्त हवि देवांच्याकडे पोंचीव.

३. प्रख्यात, प्रिय, हवि सिद्ध करणारा, गोड बोलणारा अशा ह्या अग्नीला मी यज्ञांत बोलावतों.

४. हे अग्ने, देवांना बोलविणारा, मनुष्यांचें हित करणारा, आणि आम्ही स्तविलेला असा तूं अत्यंत सुखकारक अशा रथांतून देवांना इकडे घेऊन ये.

५. हे बुद्धिमंतांनो, येथें अमर अशा देवांचें दर्शन व्हावें म्हणून तुपांनीं माखलेले दर्भ जवळ जवळ अंथरा.

६. सत्यधर्माचें वर्धन करणाऱ्या द्वार देवता आजच यज्ञ व्हावा म्हणून परस्पराशीं न चिटकलेल्या अशा राहोत (उघड्या राहोत.)

७. रूपवान अशा उषासानक्त देवतांना या यज्ञांत मी बोलावतों. त्या येथें दर्भांवर बसोत.

८. सुजिह्व, होतृ कर्म करणाऱ्या, मेधावी अशा देवींना मी बोलावतों. त्या आमचा हा यज्ञ स्वीकारोत.

९. इळा, सरस्वती आणि मही नांवाच्या सुखकारक अशा तीन देवांना (मी बोलावतों.) दुःख न देणाऱ्या त्या येथें दर्भांवर बसोत

१०. श्रेष्ठ आणि विश्वरूप त्वष्टृदेवाला मी येथें बोलावतों. तो केवळ आमचाच असो.

११. हे वनस्पति देवा, आम्ही दिलेला हवि देवाप्रत देऊन टाक. हविर्दात्याची भरभराट असो.

१२. यजमानाच्या घरीं इन्द्राय स्वाहा असें म्हणून यज्ञ करा. तेथें मी देवांना बोलावतों.

सूक्त चौदावें.

ऋषिः--मेधातिथि कण्वपुत्र; देवता--विश्वेदेव; छंदः--गायत्री.

१. हे अग्ने, आमची सेवा स्वीकारण्याकरतां आणि प्रार्थना ऐकण्याकरतां तूं ह्या सर्व देवांसहवर्तमान ये आणि यज्ञाचा स्वीकार कर.

२. हे विप्रा अग्ने. कण्वांनीं तुला बोलाविलें आहे. तुझें स्तोत्र ते म्हणत आहेत. करितां देवांसहवर्तमान तूं ये.

३. इंद्र, वायु, बृहस्पति, मित्र, अग्नि, पूषा, भग, आदित्यगण आणि मरुद्गण (यांना) मी बोलावितों.

४. हे चमस नामक पात्रांत ठेवलेले थेंब थेंब गळणारे, माद उत्पन्न करणारे, आनंददायक व मधुर सोमरस तुम्हास अर्पण केले आहेत.

५. रक्षणाची इच्छा करीत, दर्भासन तयार ठेवीत, हविर्युक्त, आणि बोटांनीं सोमरस पिळीत असलेले हे कण्व तुझी, हे अग्ने प्रार्थना करीत आहेत.

६. मनोवेगानें जोडले जाणारे, तुपानें माखलेले असे तुझें घोडे (ज्वाला) तुला सोमपानार्थ देवांना बोलाविण्याकरतां जेव्हां घेऊन जातात,—

७. तेव्हां, हे सुजिह्व अग्ने, तूं त्या यजनीय,

प्रचेतस असे सर्वानुक्रमणींत म्हटलें आहे तें दैव्या होतारौ यांचे ज्ञानी अशा अर्थाचें विशेषण असे त्यावरील टीकाकार षड्गुशिष्यानें वेदार्थदीपिकेंत म्हटलें आहे. तेथें 'दैव्यो होतारौ' म्हणजे अग्न्यादित्यौ, अग्नीवरुणौ किंवा वरुणादित्यौ असें सुचविलें आहे. बाकीच्या देवता स्पष्टच आहेत. एकंदर दहा आप्रीसूक्तें ऋग्वेदांत असून ती यज्ञाशीं प्रत्यक्ष संबद्ध अशी आहेत. त्यांचा क्रम ठरलेला आहे. व त्यांचीं कुलेंहि ठरलेली आहेत.

आप्रीसूक्तांतलि देवता व त्यांचा अर्थ.

१ सुसमिद्ध = प्रज्वालित आग्नि.
२ तनूनपात = अरणींत गर्भरूपानें असणारा आग्नि.
३. नराशंस = नुकताच उत्पन्न झालेला अग्नि.
४ इळा = (स्तुति चालूं असलेला) अग्नि.
५ बर्हिः = दर्भ.
६ द्वार = यज्ञद्वार.
७ उषासानक्त = उषा आणि रात्र.
८ दैव्या होतारौ = दोन अग्नि (सायण) वाय्वग्नी (दूर्गाचार्य), अग्न्यादित्यौ, अग्नीवरुणौ किंवा वरुणादित्यौ (षड्गुरु)
९ तिस्रो देवीः = सरस्वती (नदी), इळा (अन्न) भारती (वाणी) तीन अग्नीच्या मूर्ती (सायण) कांहीं ठिकाणीं भारती नसून मही आहे.
१० त्वष्टा = देवांचा सुतार विश्वकर्मा.
११ वनस्पति = यूप.
१२ स्वाहा = अग्नींत हवि अर्पण करण्याचा वेळचा शब्द.

१० टीपः—सायणाचार्य त्वष्टृ म्हणजे अग्नि असें म्हणतात.

सत्यधर्माच्या प्रवर्तक देवांना पत्नीसहित घेऊन ये. आणि त्यांना मधुर सोमरस प्यावयास दे.

८. हे अग्ने, जे यजनीय आणि जे पूज्य आहेत ते हा मधुर सोमरस तुझ्या जिव्हेनें वषट्कार झाल्याबरोबर पिवोत.

९. विद्वान होता तेजःपुंज सूर्यलोकांहून प्रातःकालीं जागृत होणाऱ्या सर्व देवांना येथें बोलावतो.

१०. हे अग्ने, तूं इंद्र, वायु, आणि मित्राच्या सर्व विभूति यांच्यासहवर्तमान मधुर सोमरस पी.

११. हे अग्ने, तूं देवांना बोलविणारा, मनुष्यांचें हित करणारा आहेस. तूं यज्ञांमध्यें बसतोस, तूं हा आमचा यज्ञ विघ्नरहित पार पाड.

१२. हे अग्ने, तूं रथाला आपल्या हरिद्वर्ण व तांबुस रंगाच्या घोड्या जोड, आणि त्यांच्या साह्यानें देवांना इकडे घेऊन ये.

सूक्त पंधरावें.

ऋषिः--मेधातिथि कण्वपुत्र; देवता-१ ऋतु, २ मरुत, ३ त्वष्टा, ४ अग्नि, ५ इंद्र, ६ मित्रावरुणौ, ७-१० द्रविणोदस, ११ अश्विनौ, १२ अग्नि, छंद-गायत्री.

१. हे इंद्रा, योग्यवेळीं तूं ऋतूंसह सोम पी. तेच स्थान असलेले आनंदकारक सोमरस तुझ्यांत प्रविष्ट होवोत.

२. हे मरुतांनो, पोतृनामक ऋषीच्या पात्रांतून तुम्ही ऋतूंसह सोमरस प्या. आणि यज्ञ पुनीत करा. हे अत्यंत दातृत्वशीलहो, तुम्ही येथें असा.

३. हे पत्नीसहित नेष्टृदेवा, तूं आमच्या यज्ञाचा स्वीकार कर. आणि ऋतूंसहित सोमरस पी. तूं संपत्ति देणारा आहेस.

४. हे अग्ने, देवांना येथें घेऊन ये. आणि तीन ठिकाणीं त्यांना बशीव. त्यांना अलंकृत कर आणि ऋतूंसह सोम पी.

५. हे इंद्रा, हविर्युक्त अशा ब्राह्मणाच्छंसीच्या पात्रांतून तूं ऋतूंबरोबर सोम पी. तुझेंच सख्य खरोखर कधींहि नाहींसें न होणारें आहे.

६. हे नियम पाळणाऱ्या मित्रावरुणांनो, ऋतूंसह तुम्ही या. आणि दुर्दम्य आणि प्रबल यज्ञाचा स्वीकार करा.

७. सोम कुटण्याकरतां हातांत ज्यांनीं दगड घेतले आहेस असे द्रव्यच्छु भक्त द्रव्य देणाऱ्या देवांची सोमयागांत आणि इतर यज्ञांतहि स्तुति करतात.

८. जें धन प्रसिद्ध आहे तें द्रविणोदस आम्हाला देवो. देवांनीं तें आम्हांस द्यावें असें आम्ही इच्छितों.

९. द्रविणोदस नेष्ट्याच्या पात्रांतून ऋतूंसह (सोम) पिऊं इच्छितो. तरी हे भक्तजनहो, जा तुम्ही त्याला हवि अर्पण करा आणि त्याच्या सन्मुख उभे राहा.

१०. हे द्रविणोदसा, ज्याअर्थी ऋतूंसह वर्तमान असणाऱ्या तुला आम्ही चवथा हविर्भाग देत आहोंत म्हणून हे अग्ने, तूं आम्हाला धनदाता हो.

११. हे दीप्तिमान अग्नीनें युक्त, यज्ञ वाहून नेणारे, आणि शुचिव्रत अश्विदेवांनो, ऋतूंसहवर्तमान मधुर सोमरस प्या.

१२. हे फलप्रद अग्ने, ऋतूंसहवर्तमान असा तूं गृहपति या नात्यानें यज्ञ देवांप्रत घेऊन जातोस. देवभक्ताकरतां तूं देवांना हविर्भाग दे.

सूक्त सोळावें.

ऋषिः—मेधातिथि कण्वपुत्र; देवता-इंद्र; छंदः—गायत्री.

१. सूर्याप्रमाणें दिसणारे, हरिद्वर्ण घोडे बलवान अशा तुला हे इंद्रा, सोमपानार्थ घेऊन येवोत.

२. तुपानें भिजविलेल्या अशा ह्या लाह्यांजवळ, अत्यंत सुखकर अशा रथांतून इंद्राला हरिद्वर्ण घोडे वाहून आणोत.

३. इंद्राला आम्ही प्रातःसवनाच्या वेळीं बोलावितों. त्याचप्रमाणें सोमयाग चालूं झाला असतां आम्ही बोलावितों. इंद्राला आम्ही सोमपानार्थ बोलावितों.

४. आयाळ असलेल्या घोड्यांनीं युक्त अशा रथांतून हे इंद्रा, तूं आमच्या सोमरसाकडे ये. सोमरस काढला असतांना तुला आम्ही बोलावतों.

५. तो तूं आमचें स्तोत्र ऐकण्याकरतां आणि यज्ञीय सोमरस पिण्याकरतां ये. तान्हेलेल्या गौरमृगाप्रमाणें तूं तो पी.

६. हे इंद्रा, दर्भावर हे थबथबणारे सोम गाळून ठेवले आहेत. सामर्थ्याकरता ते सोमरस तूं पी.

७. हें तुझें स्तोत्र श्रेष्ठ प्रकारचें, हृदयस्पर्शी आणि अत्यंत सुखकर आहे. तें ऐक आणि हा पिळलेला सोमरस पी.

---

३ टीपः—येथें नेष्टृ शब्द त्वष्ट्याला उद्देशून वापरला आहे.

८. मद उत्पन्न व्हावा म्हणून सर्व सोमयागांमध्यें शत्रूंना ठार करणारा इंद्र सोमपानार्थ जातो.

९. असा तूं, हे शतक्रतो इंद्रा, गाई आणि घोडे आम्हांला देऊन आमची इच्छा पूर्ण कर. आम्ही तुला बुद्धिपूर्वक स्तवितों.

सूक्त सतरावें.

ऋषिः—मेधातिथि, कण्वपुत्र; देवता–इंद्रावरुणौ; छंदः—१.२.६-९ गायत्री, ४–५ पादनिचृत्.

१. सम्राट अशा इंद्रावरुणांची मी रक्षणार्थ कृपा इच्छितों. त आम्हासारख्यांना सुख देवोत.

२. मनुष्याचें धारण करणाऱ्या देवांनो, माझ्या-सारख्या कवींची हाक ऐकून रक्षणार्थ तुम्ही जाणारे आहांत.

३. हे इंद्रावरुणांनों, आमच्या इच्छेप्रमाणें आम्हांला धन देऊन तृप्त करा. आम्ही तुमच्याशीं अगदीं संलग्न असावें असें आम्हीं इच्छितों.

४. तुमचे पराक्रम आम्हांसाठीं आणि तुमची धनदात्री सुबुद्धि आम्हांसाठीं असो.

५. सहस्रावधींनीं देणाऱ्यांत इंद्र (श्रेष्ठ) आहे. त्याचप्रमाणें स्तवनीयांमध्यें वरुण (श्रेष्ठ) आहे. त्यांचीं कृत्यें स्तवनीय आहेत.

६. त्यांच्या संरक्षणाखालीं आम्हांस धन प्राप्त व्हावें आणि तें सांठवून ठेवतां यावें. तसेंच त्याचा खर्चहि व्हावा.

७. हे इन्द्रावरुणांनो, नानाप्रकारच्या संपत्तीसाठीं मी तुमचा धांवा करीत आहें. आम्हांस यशस्विता द्या.

८. हे इंद्रावरुणांनो, तुम्हां दोघांची बुद्धिपूर्वक इच्छा करणाऱ्या आमचें कल्याण करा.

९. हे इंद्रावरुणांनो, मी जी तुमची स्तुति करीत आहे, तिचा तुम्ही स्वीकार करा. तुम्हां उभयतांची मिळून जी स्तुति केलेली आहे, ती तुम्ही सफल करा.

सूक्त आठरावें.

ऋषिः—मेधातिथि कण्वपुत्र; देवता–१–३ ब्रह्मणस्पति, ४ ब्रह्मणस्पति, इंद्र व सोम, ५ ब्रह्मणस्पति व दक्षिणा ६–८ सदसस्पति, ९ सदसस्पति, किंवा नराशंस. छंदः—गायत्री.

१. हे ब्रह्मणस्पते, औशिज कक्षीवानाप्रमाणें सोम-युक्त भक्ताला तूं तेजस्वी कर.

२. जो धनवान, रोगनाशक, संपत्तिमान, पुष्टि-कारक, आणि जो प्रबळ आहे तो (ब्रह्मणस्पति) आम्हांवर कृपा करो.

३. हे ब्रह्मणस्पते, आमचा दुष्टावा करणाऱ्या माण-सांचीं बोलणीं किंवा करणीं आम्हांस न बाधोत. तूं आमचें संरक्षण कर.

४. ज्या माणसावर इंद्र, ब्रह्मणस्पति आणि सोम हे लोभ करतात, तो वीर होतो. तो नाश पावत नाहीं.

५. हे ब्रह्मणस्पते, तूं, सोम, इंद्र आणि दक्षिणा हीं सर्व त्या माणसाचें संकटापासून रक्षण करोत.

६. आश्चर्यकारक, कामपूरक इंद्राचा आवडता, अशा सदसस्पतीजवळ (गृहदेवतेजवळ) मीं धन आणि बुद्धि यांची मागणी केली.

७. कोणाहि विद्वानाचा यज्ञ ज्याच्याशिवाय सिद्धीस जात नाहीं तो सदसस्पति बुद्धीची जोड इच्छितो (बुद्धिपूर्वक प्रार्थनेची अपेक्षा करतो.)

८. आणि नंतर हविरन्न तयार करतो आणि यज्ञाला प्रारंभ करतो. आणि होतृकर्म करण्याकरतां देवांकडे जातो.

९. अतिशय धैर्यवान, तेजस्वी आणि अत्यंत प्रख्यात अशा नराशंसाला, आकाशांतील तेजस्वी ताऱ्या-प्रमाणें मी पाहिलें.

सूक्त एकोणिसावें.

ऋषिः—मेधातिथि; देवता–अग्नि व मरुत; छंद;—गायत्री.

१. दरएक सुंदर सोमयागाचे वेळीं रसपानार्थ तूं बोलाविला जातोस. हे अग्ने, मरुतांसहवर्तमान तूं येथें ये.

२. तुझ्या पराक्रमापेक्षां श्रेष्ठ पराक्रमी असा कोणीहि देव नाहीं किंवा मनुष्य नाहीं. हे अग्ने, तूं मरुतांसह ये.

३. ज्यांना श्रेष्ठ प्रकारचें तेज प्राप्त झालें तें विश्वे-देव कोणाचाहि द्रोह करीत नाहींत. हे अग्ने, मरुतांसह तूं ये.

४. पराक्रमामुळें कोणालाहि हार न जाणारे असे जे भयंकर मरुत त्यांच्यासाठीं अर्कनामक स्तोत्र म्हटलें जातें. हे अग्ने, मरुतांसहवर्तमान तूं ये.

५. जे तेजस्वी, भयंकर रूप धारण करणारे, अतिशय पराक्रमी, आणि शत्रूंचे कर्दनकाळ आहेत अशा मरुतांसह, हे अग्ने, तूं ये.

६. जे देव, देदीप्यमान आकाशांत स्वर्गावर असतात, त्या मरुतांसह हे अग्ने, तूं ये.

७. जे पर्वतांस (मेघांस) खवळलेल्या समुद्राच्या पार उखडून फेकून टाकतात, त्या मरुतांसह हे अग्ने, तूं ये.

८. जे आपल्या ओजोबलानें समुद्राच्या पार किरण फेकतात, त्या मरुतांसह हे अग्ने, तूं ये.

९. हे अग्ने, सर्वांच्या अगोदर तुला पिण्यास मिळावें म्हणून मी तुला हा मधुर सोमरस देत आहें. तूं मरुतांसह येथें ये.

सूक्त विसावें.

ऋषिः—मेधातिथि कण्वपुत्र; देवता—ऋभु; छंदः—गायत्री.

१. हें अत्यंत रत्नासारखें तेजस्वी स्तोत्र ऋभूंना देवपद प्राप्त होण्याच्या वेळीं विद्वान लोकांनीं जागच्याजागीं केलेलें आहे.

२. म्हटल्याबरोबर जोडली जाणारी घोड्यांची जोडी ज्यांनीं केवळ मनानें इंद्राकरतां तयार केली ते ऋभू आपल्या कौशल्याच्या योगानें यज्ञयोग्य झाले.

३. (आसा) भोवती फिरणारा सुखकारक रथ त्यांनीं अश्वींकरतां तयार केला. दुभती गाय तयार केली.

४. सत्यवक्ते आणि सरळमार्गी ऋभु आपल्या विशेष कर्तबगारीनें पितरांना पुन्हां तरुण करते झाले.

५. त्या तुम्हांला, मरुतांसमवेत इंद्र आणि प्रकाशमान आदित्य यांच्यासहवर्तमान, मदकर सोमरस प्राप्त झाले.

६. त्वष्टृ देवानें एक नवा चमस तयार केला, त्याचे तुम्ही चार करून दाखवलेंत.

७. हे ऋभूंहो, त्या तुम्ही आमच्या यज्ञाच्यावेळीं सोमरस काढला असतां प्रत्येक उत्कृष्ट स्तुतीला एक एक याप्रमाणें एकवीस रत्नें द्या.

८. ऋभू अमर झाले. आणि देवामध्यें यज्ञीय भाग प्राप्त करून घेते झाले.

सूक्त एकविसावें.

ऋषिः—मेधातिथि कण्वपुव; देवता—इंद्र व अग्नि; छंदः—गायत्री.

१. मी इंद्र आणि अग्नि यांना बोलावतों. केवळ त्यांची स्तुति आम्हांला प्रिय आहे. ते दोघेहि सोमपान करण्यांत हातखंडे आहेत.

२. हें लोकहो, यज्ञामध्यें तुम्ही इंद्र व अग्नि यांची प्रशंसा करा आणि त्यांचें माहात्म्य वाढवा. गायत्री छंदांत त्यांचीं स्तोत्रें गा.

३ मित्राची प्रसन्नता प्राप्त व्हावी म्हणून व सोमपानाकरतां, सोमपी अशा इंद्राग्नींना आम्ही बोलावीत आहों.

४. हे इंद्राग्नीनो, येथें या. उग्र पण सज्जन असणाऱ्या तुम्हांला आम्ही बोलावीत आहों. येथें सोमरस काढून ठेवला आहे.

५. हे इन्द्राग्नी अतिशय श्रेष्ठ आणि गृहपति आहेत. हे इन्द्राग्नीनो, तुम्ही राक्षसांना चिरडून टाका. आम्हांस खाऊन टाकणाऱ्या शत्रूंचें निःसंतान व्हावें.

६. आणि जर तुम्ही शत्रूंचा नायनाट करतां हें खरें असेल, तर अतिशय महत्वाच्या ठिकाणीं तुम्ही अगदीं सावध राहावें. हे इन्द्राग्नीनो, आम्हांला सुख द्या.

सूक्त बाविसावें.

ऋषिः—मेधातिथि कण्वपुत्र; देवता—१–४ अश्विनौ, ५–८ सवितृ, ९–१० अग्नि; ११ देव्यः, १२ इंद्राणी, वरुणानी व अग्नायी, १३–१४ द्यावापृथिवी, १५ पृथिवी, १६ विष्णु किंवा सर्व देव, १७–२१ विष्णु; छन्दः—गायत्री.

१. सकाळच्या वेळीं आपला रथ जोडणाऱ्या अश्वीदेवांना जागृत करा. ते अश्वीदेव येथें हा सोमरस पिण्याकरतां येवोत.

२. अश्वीदेवांना आम्ही बोलावीत आहों. त्यांचे रथ चांगले असून ते उत्तम प्रकारचे रथी आहेत. अश्वीदेवांचा संचार आकाशमार्गानें होत असतो.

---

१ टीप:—ऋभूंच्या संबंधानें पुढील प्रकारची आख्यायिका प्रसिद्ध आहे. अंगिरस सुधन्वा याचे ऋभु, हे तिघे मुलग असून त्यांचीं नांवें ऋभु, विभु आणि वाज अशीं आहेत. प्रथम हे मनुष्य होते, परंतु पुढें देवतारूप बनले. हे देवांच कारागीर असून त्वष्टृ देवाचे ते शिष्य होत. इंद्रास रथ आणि घोडे यांनींच दिले होते. एकदां त्वष्टृ देवानें एक चमस पात्र तयार केलें असतां त्यांनीं त्या एकाचीं चार पात्रें करून दाखविलीं.

३. हे अश्वीनो, तुमचा जो सुंदर आणि आनंददायक चाबूक आहे, त्याच्या साह्यानें ह्या यज्ञावर सेचन करा.

४. हे अश्वीनो, रथांतून जाणाऱ्या तुम्हांला तर सोमयाग करणाऱ्या माझें घर मुळींच दूर नाहीं.

५. सुवर्णहस्त असलेल्या सवित्याला मी माझ्या रक्षणाकरतां बोलावीत आहें. तो देवांचें खरें स्थान दाखविणारा आहे.

६. जलशोषक अशा सवित्याची रक्षणार्थ स्तुति करा. त्याचीं व्रतें आम्हांस प्रिय आहेत.

७. मनुष्यांचा डोळा अशा सवितृदेवाला आम्ही बोलावतों. तो भिन्न भिन्न प्रकारची संपत्ति व धन यांची विभागणी करणारा आहे. (म्हणजे त्यांचा निरनिराळेपणा दाखविणारा आहे.)

८. हे मित्रांनो, या, बसा. आपण सर्वांनीं या सवित्याची स्तुति करावी. कारण तो दानशील सविता आपल्या धनाच्या दातृत्वानें फारच शोभतो.

९. हे अग्ने, उत्सुक अशा देवपत्नींना आणि त्वष्ट्याला सोमपानाकरतां इकडे घेऊन ये.

१०. हे अत्यंत तरुण अग्ने, होत्रा, भारती, वरुत्री, धिषणा इत्यादि देवपत्न्यांना रक्षणार्थ इकडे घेऊन ये.

११. लोकसंरक्षक साहाय्य व पुष्कळ सुखासह देवी अखंड पंखानीं आमच्याकडे येवोत.

१२. इन्द्राणी, वरुणानी व अग्नायी (इन्द्र, वरुण आणि अग्नि यांच्या पत्न्या) यांना सोमपानार्थ मी येथें बोलावीत आहें.

१३. विस्तीर्ण अशा द्यावापृथिवी ह्या आमच्या यज्ञावर सेचन करोत. आणि आम्हांला पुष्टिकर पदार्थ भरपूर देवोत.

१४. गंधर्वांच्या अढळ स्थानीं म्हणजे अन्तरिक्षांतील त्या द्यावापृथ्वींचेंच जें स्निग्ध दूध म्हणजे पाणी ते ज्ञाते कर्मांनीं आस्वादितात.

१५ हे पृथिवी, तूं आम्हांला सुखकारक, कंटकरहित आणि जागा देणारी हो. आम्हांला मोठें सुख दे.

१६. जेथून विष्णूनें पृथ्वीचें आक्रमण सात छंदांनीं केलें आहे, तेथून येऊन देव आमचें रक्षण करोत.

१७. विष्णूनें ह्या जगताचें आक्रमण केलें व तीन ठिकाणीं पाऊल टाकलें. तोंच त्याच्या धुलिमय तेजांत सर्व भरून गेलें.

१८. अविनाशी आणि रक्षण करणाऱ्या अशा विष्णूनें तीन पावलांनीं हें जगत आक्रमिलें. आणि तेंव्हांपासून तो (जागतिक) धर्मांचा धारण करणारा झाला आहे.

१९. हे मित्रांनो, ज्यायोगें विष्णू तुमचीं कृत्यें पाहतो, ते विष्णूचे पराक्रम पाहा. इंद्राचा तो अगदीं जिवलग सखा आहे.

२०. विष्णूचें तें अत्यंत श्रेष्ठ पाऊल विद्वान लोक सर्वदा पहात असतात. आकाशांत उघडलेला तो जणूं डोळाच होय.

२१. विष्णूचें जें अत्यंत श्रेष्ठ पद आहे, त्यास उद्देशून विद्वान, बुद्धिमान आणि जागरूक असणारे लोक हविरन्न देत असतात.

---

१०. टीपः—होत्रा, भारती, वरूत्री, धिषणा ह्या निरनिराळ्या स्त्रीदेवता किंवा देवपत्न्या होत्या असें दिसतें.

१३ टीपः—१३–१५ हे मंत्र कलशस्थापना व भूमिप्रार्थना याकरतां याज्ञिकांत उपयोगांत आणतात.

१६ टीपः—यज्ञ सप्तछंदात्मक वेदांनीं पार पडले, त्यामुळें इंद्र सामर्थ्यवान झाला व त्यानें सूर्य उत्पन्न केला व त्यानें आकाश आक्रमिलें.

१८ टीपः—तीन पावलांत भूमीचें आक्रमण करणाऱ्या वामनावताराच्या कथेचा उलगडा वरील सूक्तावरून होण्यासारखा आहे.

सूक्त तेविसावें.

ऋषिः—मेधातिथि कण्वपुत्र; देवता–१ वायु, २–३ इंद्रवायु; ४–६ मित्रावरुणौ, ७–९ इंद्र व मरुत, १०–१२ विश्वेदेव, १३–१५ पूषा, १६–२३ आपः, २३–२४ अग्नि; छंदः—१–१८ गायत्री, १९ पुरउष्णिह, २० अनुष्टुभ्; २१ प्रतिष्ठा, २२–२४ अनुष्टुभ्.

१. हे सोम तीक्ष्ण आहेत व ह्यांचा दुधादिपदार्थ मिश्रित करून रस तयार केला आहे. हे वायो, तुझ्याकरतां खास ठेवलेला हा सोमरस तूं पी.

२. आकाशांतून संचार करणाऱ्या इंद्र व वायू या उभय देवांना ह्या सोमरसपानाकरितां आम्ही बोलावीत आहों.

३. हजारो डोळे असलेले, बुद्धीचे स्वामी, आणि मनाप्रमाणें अत्यंत वेगवान अशा ह्या इंद्रवायूंना विद्वान लोक संरक्षणार्थ बोलावतात,

४. ज्ञानवान आणि शुद्ध मनाच्या मित्राला आणि वरुणाला सोमपानार्थ आम्हीं बोलावतों आहों.

५. निसर्गनियमांचें पालन व वर्धन करणारे आणि अत्यंत प्रकाशमान अशा मित्रावरुणांना मी बोलावतों.

६. वरुण संरक्षण करणारा आहे, तसाच मित्रहि सर्व संरक्षणप्रकारांनीं युक्त आहे, ते दोघे आम्हांला धनांनीं युक्त करोत.

७. मरुतासहित इंद्राला सोमपानार्थ आम्ही बोलावीत आहों. तो आपल्या परिवारासह तृप्त होवो.

८. ज्यांच्यांत इंद्र श्रेष्ठ आहे, जे मरुद्गणांनीं सहित आहेत. ज्यांच्यांत उत्कृष्टदाता पूषा आहे, असे हे सर्व देवहो, माझी हाक तुम्ही ऐका.

९. हे उत्कृष्ट दान देणाऱ्या मरुतांनों, इंद्राच्या मदतीनें युक्त असे तुम्ही मोठ्या पराक्रमानें शत्रूला ठार करा. त्या दुष्टाचा आमच्यावर अधिकार न चालो.

१०. पृश्नीचे उग्र पुत्र, विश्वेदेव व मरुत यांना सोमपानार्थ आम्ही बोलावतों आहों.

११. हे पराक्रमी मरुतांनों, जेव्हां तुम्ही यज्ञांकडे येतां त्यावेळीं तुम्ही जी गर्जना करतां, ती लढाई जिंकणाऱ्या सेनेनें मोठ्यानें केलेल्या गर्जनेप्रमाणें प्रचंड असते.

१२. आनंदकारक आणि देदीप्यमान अशा (अन्तरिक्षा) पासून ज्यांचा जन्म झाला आहे, असे मरुत आमचें संरक्षण करोत व आम्हांला सुख देवोत.

१३. हे अत्यंत देदीप्यमान पूषन, द्युलोकाला आधार असणाऱ्या व आश्चर्यकारक पानें असलेल्या सोमाला हरवलेल्या पशूप्रमाणें घेऊन ये.

१४. अत्यंत दीप्तिमान अशा पूषानें गुहेमध्यें दडवून ठेवलेल्या चित्रविचित्र रंगाचा पिसारा (किरण) असलेल्या राजाला शोधून काढिलें.

१५. तसेंच धान्याकरतां आम्ही बैलांच्या साह्यानें ज्याप्रमाणें नांगरटी करतों, त्याप्रमाणें तो माझ्याकरतां सोमरसानें युक्त असे सहा ऋतु पुनः पुनः उत्पन्न करतो.

१६. यज्ञ करणाऱ्या भक्तांच्या प्रिय व पूज्य माता (आपो देवता) आपलें पय मधुर पदार्थांनीं मिश्रित करीत मार्गानें जात आहेत.

१७. ज्या ह्या सूर्याजवळ असतात, किंवा सूर्य ज्या ह्यांच्या जवळ असतो, त्या ह्या आमच्या यज्ञांत साह्य करोत.

१८. जेथें आमच्या गाई पाणी पितात, त्या आपो देवींना म्हणजे जलदेवतांना मी बोलावतों.

१९. पाण्याच्यामध्यें अमृत आहे. पाण्यांत ओषधि आहे. करितां हे भक्तहो, अशा ह्या जलदेवतेच्या स्तुतीकरतां तुम्ही सामर्थ्यसंपन्न व्हावें.

२०. उदकामध्यें सर्व ओषधि आहेत. त्याचप्रमाणें सर्वांना सुख देणारा अग्निहि उदकामध्यें आहे. उदक हें सर्व औषधींनीं परिपूर्ण आहे असें सोमानें मला सांगितलें.

२१. हे उदकांनो, मी दीर्घायुषी होऊन चिरकाल सूर्यास पाहण्याला समर्थ होण्याकरतां माझ्या शरीरांत औषधीचा पुरवठा करा.

२२. हे उदकांनो, माझ्या ठिकाणीं जें कांहीं पाप असेल, त्याचप्रमाणें मी बुद्धिपूर्वक कोणाचा द्रोह केला असेल अथवा जे कांहीं व्यर्थ शिव्याशाप दिले असतील, ते सर्व वाहून धुवून टाका.

२३. हे उदकांनो, आज मी तुमची उपासना केली आहे आणि तुमच्या सारभूत अशा तत्त्वाशीं संयुक्त झालों आहे. हे अग्ने, जलदेवतेबरोबर असणारी तूं ये आणि मला तेजःसंपन्न कर.

२४. हे अग्ने, मला तेज दे. संतति दे. आयुष्य दे. तेजादिकांनीं संपन्न अशा मला देव जाणोत. (तेजादिकांनीं संपन्न करोत.) इन्द्र मला ऋषींच्या योग्यतेचा जाणो.

सूक्त चोविसावें.*

ऋषिः--शुनःशेप अजीगर्तपुत्र; देवता-१ प्रजापति, २ अग्नि, ३-५ सविता, ५ वीचा भगहि ६-१५ वरुण; छन्द--१.२.६-१५ त्रिष्टुभ, ३-५ गायत्री.

१. कोणाचें, कोणत्या बरें अमर देवाचें गोड नांव आम्ही मनामध्यें आणावें ? कोण बरें आम्हाला विस्तीर्ण पृथिवी देईल कीं तिच्या योगानें मला पित्याचें आणि मातेचें दर्शन घडेल ?

---

* वेधसपुत्र हरिश्चंद्राला शंभर बायका होत्या तरी मुलगा होईना. त्यानें नारदाला विचारलें असतां त्यानें पुत्राची आवश्यकता प्रतिपादून वरुणाकडे जाण्यास सांगितलें. आणि त्यानें सांगितलें मला पुत्र होऊं दे. मला पुत्र झाला कीं तो मी तुला बलि देईन. वरुणानें तें मान्य केलें. पुढें मुलगा झाला त्याचें नांव रोहित.

२. हो, अमर अशा देवांपैकीं पहिला देव जो अग्नि, त्याचेंच गोड नांव आम्ही मनामध्यें आणावें. कारण तोच आम्हाला विस्तीर्ण पृथिवी देईल कीं तिच्या योगानें आम्ही पित्याला व मातेला पहावें.

३. हे नित्य रक्षण रक्षण करणाऱ्या सवितृ देवा लोभनीय पदार्थांचा तूं अधिपति आहेस. आम्ही तुझ्यापासून धनाची इच्छा करतो.

४. हे सवितृदेवा, तुझें जें कोणतें अत्यंत वाखाणलेले, शत्रूंच्या आटोक्याच्या बाहेर असलेले, आणि द्वेषरहित सुख असेल, तें तूं आमच्या दोन्ही हातांत ठेवलें आहेस.

५. हे सवितृदेवा धनयुक्त अशा तुझें धन, तुझ्या संरक्षणाखालीं असलेल्या आम्हांला प्राप्त व्हावें आणि आम्ही संपत्तीच्या शिखरावर आरूढ व्हावें.

६. हे वरुणा, हे आकाशांत उडणारे पक्षी किंवा सदोदित वाहणारें उदक, किंबहुना, जे वायूलाहि दाद देत नाहींत, असेहि हे सर्व कोणीहि तुझ्या पराक्रमाची, तुझ्या सामर्थ्याची किंवा तुझ्या रागाची बरोबरी करूं शकत नाहींत.

७. ज्याचें अंतःकरण पवित्र आहे असा राजा वरुण अन्तराळामध्यें वरतीं बिनबुडाचा घुमट (मेघ) धारण करतो. त्याचे आंतमध्यें साठविलेले किरण (जलधारा) हे अधोमुख असतात व त्यांचे बूड वर असतें.

८. सूर्याला गमन करण्यासाठीं राजा वरुणानें रुंद रस्ता करून दिला आणि अन्तरिक्षांत जाण्याकरतां मार्ग केला. तो हृदय विदारण करणाऱ्या शत्रूपासूनहि संरक्षण करतो.

९. हे राजा वरुणा, तुझ्याजवळ शेकडो, हजारो प्रकारचीं औषधें असोत. तुझी सद्बुद्धि मोठी उदार आणि गंभीर असो. निर्ऋतीला आमच्यापासून ती अगदीं दूर जाईल अशी बाधा कर. आणि आमच्या हातून जें कांहीं पाप घडलें असेल त्यांतून तूं आम्हांस मुक्त कर.

१०. हे जे आकाशांत उंच ठिकाणीं स्थित असलेले ऋक्ष (नक्षत्रें) दिसत आहेत, ते दिवसास कोठें तरी जातात. आणि तेजपुंज असा चंद्रमा रात्रीच्यावेळीं येतो. सारांश, वरुणाचे नियम कोणी मोडीत नाहींत.

११. ब्रह्मस्तोत्रपूर्वक तुजला वंदन करीत मी तुजकडे ह्याचकरतां येतो, किंवा हविरन्न देऊन यजन करणारा भक्तहि तुजजवळ मागतो तें हेंच कीं, हे वरुणा, तूं आमचा अव्हेर न करतां आमची प्रार्थना ऐक. हे सर्वत्र विख्यात असणाऱ्या वरुणा, तूं आमचें आयुष्य हरण करूं नकोस.

वरुणानें मागणी केली, तेव्हां दरवेळीं तो कांहीं तरी निमित्त सांगून वेळ मारून नेऊं लागला. पण असें किती दिवस चालणार ? आतां रोहित कवच घालण्यासारखा झाला होता. वरुणाचा तगादा चालूं होताच. शेवटीं रोहितास राजानें हकीगत कळविल्याबरोबर तो धनुष्य घेऊन रानांत पळून गेला. वरुणानें हरिश्चंद्राला ग्रासलें. तेव्हां त्याला उदर रोग झाला. तेव्हां रोहित घरीं आला पण इंद्रानें त्याला घरांतून हुसकलें. अशी सात वर्षें गेलीं. एकदां तो अरण्यांत उपाशीतापाशीं फिरत असतां अजीगर्त ऋषीपाशीं आला. त्याला शुनःपुच्छ, शुनःशेप आणि शुनोलांगूल असे तिघे पुत्र होते. त्यांपैकीं मधला शुनःशेप त्यानें शंभर गाई देऊन विकत घेतला. घरीं जाऊन बापाला सर्व सांगितलें. बापानें म्हणजे हरिश्चंद्रानें वरुणाला सांगितलें. वरुणाला क्षत्रियापेक्षां ब्राह्मण बलि बराच वाटला. शुनःशेपाला घेऊन यज्ञभूमींकडे गेले, तेथें होता विश्वामित्र, अध्वर्यु जमदग्नि, ब्रह्मा वशिष्ठ आणि उद्गाता अयास्य होता.

शुनःशेपाला तयार करून आणल्यावर त्याला यूपास बांधण्यास कोणीच तयार होईना. शुनःशेपाचा बाप अजीगर्त शंभर गाई मिळाल्यास तयार होताच. त्याला शंभर गाई दिल्या. त्यानें आपल्या मुलाला अजीगर्ताला यूपाला बांधलें. त्याला मारण्यासहि शंभर गाई आणखी देऊन तयार केलें व बाप मुलाला मारण्यास सज्ज झाला. तेव्हां मात्र शुनःशेपानें देवाचा धांवा करावयास सुरवात केली. ती ह्या सूक्तांत आहे.

प्रजापतीपासून धांव्याला सुरवात केली. त्या देवतेनें सांगावें अमक्या देवतेचा धांवा कर, त्याबरोबर शुनःशेपानें त्या देवतेचा धांवा करावा. असें करतां करतां उषेच्या धाव्यानंतर त्याचे पाश तुटूं लागले आणि हरिश्चंद्राचें पोटहि ओसरूं लागलें.

नंतर विश्वामित्रानें शुनःशेपाच्या हातून यज्ञ पुरा केला. नंतर विश्वामित्रानें शुनःशेपाला दत्तक घेतलें. बापाकडे मुलगा गेला नाहीं. विश्वामित्रानें त्याचें नांव देवांनीं दिला म्हणून देवरात असें ठेवलें.

१२. रात्र काय किंवा दिवस काय, किंवा माझ्या हृदयांतील इच्छा काय, हीं सर्व मला हेंच सांगतात कीं बांधून टाकलेल्या शुनःशेपानें ज्याचा धांवा केला, तोच राजा वरुण आम्हांस मुक्त करो.

१३. विद्वान, आणि अनुल्लंघ्य असा राजा वरुण त्या मला सोडून देवो आणि पाशमुक्त करो. असा तीन यूपांना (खांबांना) बांधून टाकलेल्या शुनःशेपानें अदितिपुत्र वरुणाचा धांवा केला.

१४. हे वरुणा, तुझी आम्हांवर अवकृपा न व्हावी म्हणून आम्ही तुला नमस्कारांनीं आणि हविरन्नानें प्रार्थीत आहों. हे असुरा, हे बुद्धिमान राजा वरुणा, आम्ही केलेल्या पापांचा क्षय करून आम्हांस मुक्त कर.

१५. हे वरुणा, तूं आमचा वरचा, मधला आणि खालचा पाश सैल कर. म्हणजे हे अदितिपुत्रा वरुणा, निष्पाप झालेले असे आम्ही तुझें व्रत आचरून उन्नतीप्रत जाऊं.

सूक्त पंचविसावें.

ऋषिः—अजीगर्तपुत्र शुनःशेप; देवता—वरुण; छंद—गायत्री.

१. हे वरुण देवा, सामान्य मनुष्याप्रमाणें आमच्याकडून तुझ्या व्रताचा (नियमांचा) दररोज भंग होत आहे.

२. तरी पण आमच्यावर रागावून प्राणघातक शस्त्र तूं आमच्यावर चालवूं नकोस. तुझ्या रागाच्या तडाख्यांत आम्ही न सांपडावें.

३. ज्याप्रमाणें तंग बांधलेल्या घोड्याला रथवाला थोपटून खूष करतो, त्याप्रमाणें आम्ही आमच्या सुखाकरतां, हे वरुणा, तुझीं स्तोत्रें म्हणून तुझें मन आमच्याकडे आकर्षित करीत आहोंत.

४. ज्याप्रमाणें पक्षी आपल्या घरट्याकडे झाप टाकतात, त्याप्रमाणें माझ्या वासना धनेच्छेनें तुझ्याकडे धांवत आहेस.

५. त्या सामर्थ्यसंपन्न, शूर आणि दूरदृष्टि वरुणाला आम्हांवर त्यानें कृपा करावी म्हणून केव्हां बोलावणें करावें बरें ?

६. वरुणाचीं व्रतें (सृष्टिनियम) पाळणाऱ्या भक्तासाठीं प्रसन्न होत्साते मित्रावरुण जोडीनें एकच हवि ग्रहण करतात. अव्हेर करीत नाहींत.

७. ज्यानें आकाशांत उडणाऱ्या पक्ष्यांचा मार्ग जाणला आहे, ज्यानें समुद्रांत प्रवास करणाऱ्या नौकांचा मार्ग जाणला आहे.

८. ज्या नियमपालकानें वर्षाचे प्रजारूप बारा महिने जाणले आहेत, आणि त्यांना जवळून असणारे (अधिक मास) त्यांसहि ज्यानें जाणलें आहे.

९. ज्यानें विस्तीर्ण उंच आणि सर्वव्यापक वायूचा मार्ग जाणला आहे आणि जे बसून आहेत त्यांसहि ज्यानें जाणलें आहे,—

१०. असा तो सामर्थ्यसंपन्न आणि नियमशील वरुण स्वगृहीं बसून सर्व साम्राज्य चालवीत आहे.

११. आणि म्हणूनच विद्वान असा तो वरुण झालेलीं आणि होणारीं, कळत न कळत केलेली सर्व कृत्यें पाहातो.

१२. तो सामर्थ्यसंपन्न अदितिपुत्र वरुण आमच्याकरतां सर्वकाळ सर्व गोष्टी सुगम करो. तो आमचीं आयुष्यें वृद्धिंगत करो.

१३. वरुण सोन्याचें कवच धारण करतो आणि सोन्याचे अलंकार घालतो. त्याचे दूत त्याच्या भोवतालीं बसत असतात.

१४. हिंसक लोक त्याची हिंसा करीत नाहींत, किंवा मनुष्यद्रोहीहि त्याच्या वाटेला जात नाहींत, त्याचप्रमाणें साहसकर्म करणारे त्याचें वैर साधीत नाहींत.

१५. उलट ज्यानें मनुष्यांना विपुल अन्न दिलें आहे, आणि आमच्याहि पोटांत ज्यानें अन्न घातलें आहे,

१६. अशा त्या दूरदृष्टि वरुणाची इच्छा करीत, गाई गायरानाकडे जातात त्याप्रमाणें, माझी बुद्धि त्याच्याकडे जात आहे.

१७. (वरुण म्हणतो) ज्याअर्थीं तूं माझ्याकरतां मधुर सोमरस आणला आहेस, त्याअर्थीं आपण दोघे आणखी बोलत बसूं. (भक्त म्हणतो) होत्याप्रमाणें तूं जें प्रिय तें खावेंस.

---

८ टीपः—येथें अधिक महिन्याचा स्पष्ट उल्लेख असल्यामुळें ह्या मंत्राला फार महत्त्व आहे, इतकी अचुक कालगणनेची पद्धत अद्यापि सुधारलेल्या समजल्या जाणाऱ्या लोकांत नाहीं.

१८. आतांच सर्वद्रष्ट्या वरुणाला मी पाहिलें. जमीनीवर त्याचा रथ पाहिला. हे वरुणा, माझ्या ह्या प्रार्थनांचा तूं स्वीकार कर.

१९. हे वरुणा, आज माझी ही हांक तूं ऐक आणि मला सुखी कर. संरक्षणाची इच्छा धरून मी तुझा धांवा करीत आहें.

२०. हे बुद्धिमन्ता वरुणा, तूं द्युलोक आणि पृथ्वी ह्या सर्वांचा राजा आहेस. तो तूं आमची उपासना लक्षांत घे.

२१. हे वरुणा, तूं आमचे वरील पाश मुक्त कर, मधले आणि खालचेहि पाश सोडून टाक. आम्हांला जीवंत राहूं दे.

सूक्त सव्विसावें.

ऋषिः--अजीगर्तपुत्र शुनःशेप; देवता--अग्नि; छंदः--गायत्री.

१. हे यजनीय, बलाधिपते अग्ने, हीं वस्त्रें तूं नेस आणि नंतर आमचा हा यज्ञ पार पाड.

२. हे सद्योदित अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, आम्ही मनःपूर्वक आणि दिव्य वाणीनें तुझें स्तवन करीत आहोंत. तूं आमचा सर्वांत श्रेष्ठ होता (देवांना यज्ञांत बोलावणारा) हो.

३. बाप मुलाकरतां किंवा आप्त दुसऱ्या आप्ताकरतां ज्याप्रमाणें करतो, त्याच प्रेमानें माझा श्रेष्ठ मित्र अग्नि माझ्या सख्याकरतां तितक्याच आपुलकीनें यज्ञ संपादन करतों.

४. शत्रुघातक वरुण, मित्र, अर्यमा हे मनुष्याप्रमाणें आमच्या येथें दर्भासनावर बसोत.

५. हे पुरातन होत्या अग्ने, आमच्या यज्ञांत आणि सख्यांत आनंद मान आणि आमच्या प्रार्थना लक्षपूर्वक ऐक.

६. आम्ही वारंवार यज्ञ करीत असतांना निरनिराळ्या देवांना हविर्भाग देतों, ते सर्व तुझ्याच ठिकाणीं दिले जातात.

७. विश्वाचा अधिपति, आनंदी, श्रेष्ठ, आणि होता अग्नि आमचा प्रियकर असो. सुंदर अग्नींनीं युक्त असे आम्ही त्याला प्रिय होऊं.

८. सुंदर अग्नींनीं युक्त असे देव आम्हांस धन देते झाले. आम्ही सुंदर अग्नींनीं युक्त असण्याची इच्छा करतों.

९. हे अमर अग्ने, अमर तूं आणि मर्त्य आम्ही अशा आपणा उभयतांच्या परस्परांत प्रशंसा होवोत.

१०. हे शक्तिपुत्र अग्ने, सर्व अग्नींसह युक्त हा यज्ञ आहे आणि ही प्रार्थनाहि तशीच आहे. त्यांचा स्वीकार कर.

सूक्त सत्ताविसावें.

ऋषिः--अजीगर्तपुत्र शुनःशेप; देवता-१-१२ अग्नि १३ विश्वेदेव; छन्द-१-१२ गायत्री. १३ त्रिष्टुभ.

१. घोड्याच्या शेपटाप्रमाणें (लांब ज्वाला) असलेल्या, यज्ञांतील सम्राट अशा अग्नीला आम्ही नमस्कारपूर्वक वंदन करीत आहों.

२. सर्वत्र संचार करणारा, सामर्थ्यानें उत्पन्न केलेला, अतिशय शक्तिमान अग्नि आम्हांस दाता होवो.

३. हे अग्ने, सर्वत्र गमन करणाऱ्या त्वां, आमचा नाश करूं इच्छिणाऱ्यांपासून आमचें सदैव रक्षण करावें.

४ हे अग्ने, तूं हें आमचें हविरन्न आणि अगदीं नुकतेंच केलेलें गायत्री छन्दांतील स्तोत्र देवांप्रत पोंचीव.

५. वरिष्ठ प्रकारचें आणि मध्यम प्रकारचें अन्न तूं आम्हांस दे. त्याचप्रमाणें कनिष्ठ प्रकारची संपत्तीहि आम्हांस दे.

६. हे चित्रभानो अग्ने, सिंधू नदीच्या लाटाप्रमाणें आसपासच्यांना धन तूं देणारा आहेस. हविर्दान करणाऱ्या भक्ताला तूं ताबडतोब इच्छित फलप्राप्ति करून देतोस.

७ हे अग्ने, लढाई करण्यास ज्याला तूं प्रवृत्त केलेंस, त्या माणसाचें तूं युद्धांत संरक्षण करतोस. व तो अक्षय अन्नाचा स्वामी बनतो.

८. हे शस्त्रधारी अग्ने, हे फेकून मारणाऱ्या वीरा असा कोण आहे कीं ज्याचा पराक्रम तुझ्या वरचढ होईल ? तुझें बळ प्रख्यात आहे.

९. हा विश्वव्यापक अग्नि आपल्या घोड्याच्या साहाय्यानें लढाई जिंको आणि बुद्धिमान लोक याची स्तुति गावोत.

१०. हे स्तुतींनीं जागृत केलल्या अग्ने, भयंकर रूप धारण करणाऱ्या आणि यजनशील अशा तुला आवडेल असें स्तोत्र केलें जात आहे. त्याचा तूं स्वीकार कर.

११. तो श्रेष्ठ, अमर्याद धूम्रध्वज, ज्याच्या अग्रभागीं चन्द्र आहे असा (अग्नि) आम्हांला बुद्धि आणि अन्न यांच्यासाठीं प्रेरणा करो.

१२. तो अत्यंत कांतिमान, दैवी तेजानें युक्त व सर्वाधिपति अग्नि एकाद्या धनवानाप्रमाणें आमचीं स्तोत्रें ऐकत राहो.

१३. लहान, थोर, तरुण व म्हातारे, सर्वांना नमस्कार असो. देवांचें यजन करूं तर आम्हीं समर्थ होऊं. हे देवांनो, आह्मांकडून मोठ्यांच्या स्तुतीचा उच्छेद होऊं देऊं नका.

सूक्त अठ्ठाविसावें.

ऋषिः—अजीगर्तपुत्र शुनःशेप; देवता—१–४ इंद्र, ५–६ उलूखल, ७–८ उलूखल व मुसल, ९ हरिश्चन्द्र, किंवा अधिषवणचर्म किंवा सोमरस; छंदः—१–६ अनुष्टुभ् ७–९ गायत्री.

१. हे इन्द्रा, जेथें सोमरस काढण्याकरतां जाडबुडाचें (बत्त्यासारखे) दगड सोमरसासाठीं वर जातात तेथें उखळीच्या योगानें काढलेला सोमरस घेऊन तूं प्यावास.

२. जेथें दोन जघनभागाप्रमाणें अभिषवण फलक सोमरस काढण्याकरतां मांडले आहेत, तेथें हे इंद्रा, उखळीच्या योगानें काढलेला सोमरस स्वीकारून तूं प्यावास.

३. जेथें स्त्री पुढें लोटण्याचें व मागें ओढण्याचें काम करते, तेथें उखळीच्या योगानें काढलेला सोमरस हे इंद्रा, तूं भक्षण कर.

४. व्यवस्थित चालविण्याकरतां लगाम असतो त्याप्रमाणें जेथें रवीला दोरी बांधतात, तेथें, हे इंद्रा, उखळीच्या योगानें काढलेले सोमरस तूं स्वीकारून पी.

५. जरी हे उखळा, घरोघर तुझा उपयोग केला जातो, तरी विजयी सैन्याच्या नगाऱ्याप्रमाणें तूं येथें मोठा गंभीर आवाज कर.

६. हे वनस्पतीच्या (लाकडी) उखळा, तसेंच वायु, तुझ्यामुळें जोरानें वारा वहात आहे. पण आतां हे उखळा, इंद्राला पिण्याकरतां तूं सोमरस काढ.

७. हे उखळ मुसळ अतिशय सामर्थ्यवान असून यज्ञांत उपयोगिले जातात इंद्राचे घोडे ज्याप्रमाणें कडाकडा वैरण खातात, त्याप्रमाणें हे (उखळ मुसळ) सोमवल्लीचीं कांडीं कडाकड खातात.

८. हे वनस्पतींनो, लाकडाच्या बनविलेल्या उखळामुसळांनो, श्रेष्ठ असे तुम्ही आज सोमरस काढणाऱ्या श्रेष्ठ ऋत्विजाबरोबर इंद्राकरतां मधुर सोमरस काढा.

९. शिलकी सोम दोन्ही चमसपात्रांतून भरा. तीं दशापवित्रावर ठेवा आणि तें बैलाच्या कातड्यावर ठेवा.

---

९ टीपः—येथें मंत्रावरून सोम कसा काढीत असत याची क्रिया आपणास कळते.

सूक्त एकोणतिसावें.

ऋषिः -अजीगर्तपुत्र शुनःशेप; देवता—इंद्र; छंदः—पंक्ति.

१. हे सत्यस्वरूप, सोमपान करणाऱ्या इंद्रा, आम्ही जरी प्रसिद्ध नसल्याप्रमाणें आहों, तरी हे विपुल संपत्तिमान इंद्रा, तूं आम्हांला हजारो उत्तम गाई घोडे देऊन प्रख्यात कर.

२. हे रूपवान (सुंदर हनुवटी असलेल्या), विपुल संपत्तिमान आणि बलाधिपते इंद्रा, तूं आपल्या पराक्रमानें आम्हांला हजारो उत्तम गाई घोडे देऊन प्रख्यात कर.

३. परस्परांकडे पाहणाऱ्या अशा त्या दोघींना (यमदूती) तूं निजीव. पुन्हां जाग्या न होतील अशा निजीव. हे विपुल संपत्तिमान इंद्रा, तूं आम्हांला हजारो उत्तम गाई आणि घोडे देऊन प्रख्यात कर.

४. हवि न देणारे ते शत्रु निजोत आणि हे शूर इंद्रा हविर्दान करणारे भक्त जागे होवोत. हे विपुल संपत्तिमान इंद्रा, तूं आम्हांला उत्तम गाई व घोडे देऊन प्रख्यात कर.

५. हे इंद्रा, इतक्या वाईट रीतीनें तुझी निंदा करणाऱ्या गाढवाला मारून टाक. हे विपुल संपत्तिमान इंद्रा, तूं आम्हांला हजारो उत्तम गाई आणि घोडे देऊन प्रख्यात कर.

६. तुफान वारा दूर रानावनांत जाऊन पडो. हे विपुल संपत्तिमान इंद्रा, तूं आम्हांला हजारो उत्तम गाई आणि घोडे देऊन प्रख्यात कर.

---

* टीपः—हें आणि पुढलें सूक्त शुनःशेपाचें यूपाला बांधल्यावरचें भाषण आहे असें सर्वानुक्रमणीवरून दिसतें.

७. आक्रोश करीत राहणाऱ्या सर्व शत्रूंना ठार कर. तसेंच आमचें वाईट करणाऱ्या सर्वांना ठार कर आणि हे विपुलसंपत्तिमान इंद्रा, तूं आम्हांला हजारो उत्तम गाई आणि घोंडे देऊन प्रख्यात कर.

सूक्त तिसावें.

ऋषिः—अजीगर्तपुत्र शुनःशेप; देवता—१–१६ इंद्र, १७–१९ अश्विनौ, २०–२२ उषा; छंदः—११ पादनिचृद्गायत्री, १६ त्रिष्टुभ्, अवशिष्ट गायत्री.

१. धनाची इच्छा करणारे आम्ही तुमच्या शेकडो पराक्रम करणाऱ्या आणि सर्वांहून थोर अशा इंद्राला विहिर पाण्यानें भरावी, त्याप्रमाणें सोमरसानें भरून टाकतों (आकंठ सोमरस पाजतों.)

२. जो शुद्ध अशा सोमाकडे शंभरपट आवडीनें आणि गोड पदार्थ घालून केलेल्या सोमरसाकडे जो हजारपट आवडीनें, उतारावर धांवावें त्याप्रमाणें धांवत असतो.

३. बलवन्ताच्या आनंदाकरतां जे शेकडो आणि हजारोपट आवडीनें भाक्षिलेले सोमरस त्याच्या उदरांत एकत्र होतात; ते तेथें समुद्राप्रमाणें सर्वत्र व्यापून टाकतात.

४. हे इंद्रा, हा सोमहि तुझाच आहे. ज्याप्रमाणें गरोदर मादीजवळ कपोत पक्ष्याचें साहचर्य असतें, तसें तुझें ह्या सोमाजवळ साहचर्य आहे. व त्याच वेळीं तूं आमच्या प्रार्थनेचा विचार करतोस.

५. हे धनाधिपते, हे स्तुत्य वीरा, तुझें जो स्तवन करील, त्याला तुझा प्रसादहि तसाच श्रेष्ठ प्रकारचा लाभो.

६. हे शतक्रतो इंद्रा, आमच्या कल्याणाकरतां तूं या लढाईत अग्रभागीं उभा राहा. इतर प्रसंगीं आपण बोलूं.

७. प्रत्येक प्रसंगीं व प्रत्येक लढाईच्या वेळीं इंद्राचे मित्र जे आम्ही ते त्या अत्यंत बलशाली इंद्राला संरक्षणार्थ बोलावितों.

८. जर इंद्राला आमची हाक ऐकूं जाईल, तर तो ताबडतोब आमच्यासाठीं कल्याणकर अशीं हजारो सामर्थ्यें घेऊन धांवत येईल.

९. आमच्या ह्या कुलासाठीं पुरातन कालापासून अनेक प्रतिस्पर्ध्यांशीं लढणाऱ्या वीर इंद्राला मी बोलावीत आहें. माझ्या वडिलांनींहि त्यालाच पूर्वीं बोलाविलें होतें.

१०. हे सकलधनाधिपते, हे बहुस्तुता, हे स्तोत्यांजवळ बसणाऱ्या इंद्रा, आम्ही तुझी प्रार्थना करीत आहों.

११. हे सख्या, सोमपा, वज्रधरा, आम्ही सोमपान करणारे व सुंदर हनुवटीचे (रूपाचे) (तुझ्यासारखे) तुझे मित्र व्हावे.

१२. हे सख्या, सोमपा, वज्रधरा, आमचें अभीष्ट जेणेंकरून होईल तशासाठीं तुझी आम्ही इच्छा करतों. त्याप्रमाणें तें व्हावें. तूं तसें कर.

१३. इंद्र मदयुक्त झाला म्हणजे आम्हांला विपुल अन्न आणि संपत्ति प्राप्त होवो, कीं तिच्या योगानें संपन्न होत्साते आम्ही आनंदित व्हावें.

१४. हे धैर्यशाली इंद्रा, तुझी प्रार्थना केली असतां स्तोतृजनांचा अगदीं आप्तच असा तूं उपासकाकडे चाकाच्या आखाप्रमाणें जलदीनें जातोस.

१५. हे शतक्रतो, जेव्हां उपासकांची सेवा आणि त्यांची इच्छा तूं जाणतोस तेव्हां तूं चाकाच्या आखाप्रमाणें झपाट्यानें येतोस.

१६. इंद्रानें आपल्या फुरफुरणाऱ्या, खेंकाळणाऱ्या आणि धापा टाकणाऱ्या घोड्यांच्या योगानें वारंवार शत्रूंचें धन जिंकलें. त्या महान पराक्रमी इंद्रानें आम्हांला सोन्याचा रथ दिला. त्या दानशूरानें दान म्हणून आम्हांस तो रथ दिला.

१७. हे पराक्रमी अश्वीहो, घोडे, धन, गाई, आणि सोनें यांच्यासह तुम्ही या.

१८. हे पराक्रमी आश्विहो, तुम्हां दोघांचा मिळून एक असलेला व कधींहि नाश न पावणारा असा रथ अन्तरिक्षांतून चालतो.

१९. तुम्ही आपल्या रथाचें एक चाक पर्वतावर ठेविलें असून दुसरें आकाशांत परिभ्रमण करीत असतें.

२०. हे स्तुतिप्रिय व अमर उषे, कोण मर्त्य प्राणी तुझ्या उपभोगास योग्य आहे ? हे तेजस्विनि, तूं कोणाकडे जात आहेस ?

२१. हे घोडीप्रमाणें विचित्र कान्तिमान आणि

---

१७ टीप:—१७.१८.१९ ह्या मंत्रांत इंद्रानें शुनःशेपाला अश्वींची स्तुति करावयास सांगितली म्हणून तो अश्वींची स्तुति करीत आहे. (ऐ. ब्रा. ७.१६).

अरुणप्रभे उषे, आम्ही तुझें जवळून आणि दुरूनहि ध्यान करीत असतों.

२२. हे द्युचे कन्ये उषे, तूं त्या त्या सर्व अन्नासह ये. आणि आम्हांस धनयुक्त कर.

सूक्त एकतिसावें.

ऋषिः--आंगिरस हिरण्यस्तूप; देवता-अग्नि; छन्दः-८.१६.१८ त्रिष्टुभ, बाकी जगती.

१. हे अग्ने, तूं देवांचा देव, कल्याण करणारा, मित्र, असा पहिला अंगिरा ऋषि होय. तुझे नियमानुसार विद्वान, लखलखीत शस्त्र असलेले, आणि कुशल असे मरुत उत्पन्न झाले.

२. हे अग्ने, तूं अगदीं पहिला, अंगिरांतील अगदीं प्रथमचा आहेस. तूं कवि आहस. तूं देवांचे नियम सुशोभित करतोस. सर्वव्यापक बुद्धिमान, अरणीरूपी दोन माता असलेला असा तूं सर्व घरांतून पडून असतोस.

३. हे अग्ने, तूं सत्कर्म करण्यासाठीं पहिल्या प्रथम विवस्वत् मातरिश्वासाठीं प्रकट झालास. तुला जेव्हां होता निवडण्यांत आलें, तेव्हां द्यावापृथ्वी हादरूं लागली. तेव्हां हे धनयुक्ता, तूं त्यांचा भार सहन केलास आणि थोर देवांचा यज्ञ संपादिलास.

४. हे अग्ने, तूं मनूकरतां द्युलोकांत गर्जना करवलीस आणि सुकृती पुरूरव्यासाठीं अत्यंत चांगलीं कृत्यें केलींस. ज्या वेळीं तूं आपल्या पितरांपासून घर्षणाऱ्या योगानें बाहेर पडतोस, त्यावेळीं तुला मागें पुढें नेलें जातें.

५. हे अग्ने, बलसंपन्न आणि ऐश्वर्यवर्धक असा तूं तुपाची पळी भरून घेतली असतांना स्तवनीय होतोस. ज्या त्वां वषट्कारपूर्वक आहुति जाणली, तो तूं एकाच आहुतीनें घडाडणारा असा होत असतोस.

६. हे सर्वदर्शी अग्ने, (योग्य मार्ग अवगत नसल्यामुळें) चुकीच्या मार्गानें जाणाऱ्या मनुष्याला योग्य मार्ग दाखवून कठीण प्रसंगीं व युद्धांत तूं संरक्षण करतोस. त्याचप्रमाणें शूरांच्या संग्रामांत, हातघाईच्या लढाईमध्यें आणि बारीकसारीक संकटांच्या काळीं लहानांकडून देखील बेशक मोठ्यांचाहि निःपात करवितोस.

७. हे अग्ने, जो मर्त्य उभय प्रकारच्या (मनुष्य आणि मनुष्येतर) प्राणिमात्राविषयीं आतुर असतो, त्याला तूं उत्तम आणि अमर अशी कीर्ति प्राप्त करून देतोस. त्याप्रमाणें तूं त्याला सुख आणि संतोष देतोस.

८. हे अग्ने, यशदायक असें स्तोत्र करून स्तुति केलेला तूं आम्हांला धन मिळवून दे. ह्या नवीन केलेल्या स्तोत्राच्या साह्यानें आम्हांस सिद्धि प्राप्त व्हावी. हे द्यावापृथिवीनो, तुम्ही आमचें संरक्षण करा.

९. हे पवित्र अग्ने, देवांतील श्रेष्ठ देव तूं आपल्या पितरांच्या पोटांत आमच्यासाठीं उत्पन्न होतोस. शरीर धारण करणारा असा तूं, हे कल्याणा, अतिशय बुद्धिमान असा जागृत हो. तुझी स्तुति केली असतांना भक्ताला तूं सर्व संपत्ति देतोस.

१०. हे अग्ने, तूं अतिशय बुद्धिमान आहेस. तूं आमचा बाप, तूंच आमचा सखा आणि सोयरा आहेस. हे अप्रतिहत अग्ने, व्रत नियमांचें रक्षण करणारा अतिशय पराक्रमी असा जो तूं त्या तुझ्याकडे शेकडोनीं आणि हजारोंनीं धन येत असतें.

११. हे अग्ने, जेव्हां माझ्या पित्याला तूं पुत्र झालास, तेव्हां मनुष्यावर शासन चालविण्यासाठीं देवांनीं इळेला उत्पन्न केलें. आणि मनुष्यांनीं जगावें म्हणून मनुष्यांचा अधिराजा अशा तुला उत्पन्न केलें.

१२. हे वंद्य देवा, तूं हवि देणाऱ्या भक्ताचें शरीर आपल्या रक्षणांनीं रक्षण कर. तुझे नियम पाळणाराच्या मुलांबाळासाठीं त्याच्या गाईंचें तूं रक्षण करतोस आणि त्यांचेंहि पळभरहि न विसंबतां तूं रक्षण करतोस.

१३. हे अग्ने, अरक्षित अशा भक्तासाठीं त्याला प्रिय असणारा चार डोळ्यांचा (चारहि बाजूला पहाणारा) रक्षक असा तूं पेटविला जातोस. निरुपद्रवी आणि पोषणकर्ता अशा तुला जो स्तोता हवि अर्पण करितो, त्याच भक्ताचें स्तोत्र तुला मनःपूर्वक आवडतें.

१४. हे अग्ने, बहु प्रख्यात यजमानाला जें धन आवडतें तें तूं त्याला भरपूर देतोस, तुला दुर्बलांचाहि मार्गदर्शक म्हणतात. अत्यंत विद्वान असा तूं अज्ञ लोकांना मार्गाला लावितोस.

१५. हे अग्ने, जो मनुष्य तुला दक्षणा देतो, त्याचें बळकट कवचाप्रमाणें तूं सर्व बाजूंनीं रक्षण करतोस. जो मनुष्य गोड पक्वान्नांनीं आपल्या घरीं आलेल्या अतिथीला सुख देतो, आणि तुला हवि देतो त्याला स्वर्गलोक प्राप्त होतो.

१६. हे अग्ने, आम्ही ह्या मार्गानें दूर चाललों आहोंत, ह्या आमच्या अपराधाची तूं क्षमा कर. तुला सोम अर्पण करणाऱ्या मानवांचा तूं बांधव, पिता, सद्बुद्धि दाता, पोषणकर्ता आणि ऋषिपद देणारा आहेस.

१७. हे पवित्र अंगिरा अग्ने, तूं मनूच्या घरीं येत असस किंवा अंगिरांच्या येथें येत असस किंवा ययातीच्या येथें येत असस. किंवा आमच्या पूर्वजांच्या येथें येत असस. त्याप्रमाणें तूं आमच्या घरीं ये. येतांना देवांना घेऊन ये. येथें त्यांना दर्भावर बशीव आणि आमचा प्रिय हवि अर्पण कर.

१८. हे अग्ने, हें जें आम्ही आमच्या शक्तीप्रमाणें अथवा ज्ञानाप्रमाणें स्तोत्र तयार केलें आहे, त्यानें तुझी थोरवी वाढो. आणि आम्हांला तूं श्रेष्ठ प्रतीचें कल्याण प्राप्त करून दे. चांगली बुद्धि आणि संपत्ति यांनीं आम्ही युक्त होऊं असें कर.

सूक्त बत्तिसावें.

ऋषिः—हिरण्यस्तूप आंगिरस; देवताः—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. आतां वज्रधारी इंद्रानें जे पाहिले पराक्रम केले, त्याचें मी वर्णन करतों. त्यानें अहीला ठार मारलें, त्यानें पाणी मोकळें केलें. त्यानें मेघरूपी पर्वतांना फोडून नद्या वाहाविल्या.

२. त्यानें पर्वतांचा आश्रय करून राहणाऱ्या अहीला (मेघाला) मारलें. त्याच्याकरतां त्वष्ट्यानें मोठा आवाज करणारें वज्र तयार केलें. नंतर हंबरणाऱ्या गाईप्रमाणें उदकें खालीं गळत समुद्राकडे त्वरेनें वाहात गेलीं.

३. त्या बलशाली इंद्रानें सोमाची इच्छा केली आणि त्रिकुद्रुक नामक उत्सवांत तो सोमरस प्याला. संपात्तिमान् अशा त्यानें हातांत प्राणघातक वज्र घेऊन अहीमध्यें सर्वांत जो वडील त्याला ठार मारिलें.

४. हे इंद्रा, अहीपैकीं सर्वांत जो वडील त्यास तूं ठार मारिलेंस आणि त्या मायावीच्या मायाही तूं नष्ट केल्यास. नंतर तूं सूर्य, द्यु, आणि उषा यांना उत्पन्न केलेंस तेव्हां तुला कोणीहि शत्रू भेटलाच नाहीं.

५. इंद्रानें मोठ्या आणि मारक वज्रानें अतिशय कडवा शत्रू जो वृत्र त्याचे बाहू तोडून त्यास ठार मारलें. तेव्हां कुऱ्हाडीनें झाडाच्या फांद्या तोडाव्या त्याप्रमाणें वज्रानें खांदे तुटलेला असा तो अही पृथ्वीच्या पृष्ठभागांवर पडला.

६. आतां मला कोणीहि प्रतिपक्षी उरला नाहीं, असें मानणारा तो दुर्मति, महान् पराक्रमी, अनेकांना ठार मारणारा, आणि अहिंस्य अशा इंद्राला युद्धांत पाचारण करिता झाला. परंतु तो इंद्राचा शत्रू इंद्राच्या घावाचा मार सहन करूं शकला नाहीं. अखेर छिन्नविच्छिन्न झालेला तो इंद्राचा शत्रू आपटून फुटला.

७. नंतर हात तुटलेला, पाय तुटलेला, सेनाहीन अशा त्या वृत्रानें इंद्राला त्याच्या मानेवर वज्रानें मारलें. पण वीर्यवंताशीं नपुंसकानें बरोबरी करूं इच्छावी, त्या प्रमाणें वृत्रानें केल्यामुळें तो अनेक ठिकाणीं फेकला जाऊन जमीनदोस्त झाला.

८. अशा रीतीनें अनेक प्रवाहांत विभागलेल्या नदीप्रमाणें, पडलेल्या वृत्रावरून प्रसन्न मन झालेलीं उदकें जोरानें वाहूं लागलीं आणि ज्या उदकांना वृत्रानें आपल्या बळानें सर्व बाजूंनीं अडवून धरलें होतें, त्यांच्याच पायापाशीं आतां तो पडून राहिला.

९. नंतर वृत्राची माता मध्यें (वृत्र व इंद्र यांच्यामध्यें वृत्राच्या संरक्षणार्थ) आपल्या सामर्थ्यासह आडवी पडली. तेव्हां इंद्रानें तिच्यावरहि आपलें घातक वज्र टाकलें. तेव्हां खालीं मुलगा व त्याच्यावर त्याची माता याप्रमाणें वासरासह गाय निजते त्याप्रमाणें ती राक्षसी मरून पडली.

१०. न थांबणारे आणि न बसणारे जे उदकांचे प्रवाह त्याच्यामध्यें वृत्राचें शरीर पडलें. उदकें वृत्राच्या गुप्तस्थानांतून मोकळीं होऊन वाहूं लागलीं आणि तो इंद्राचा शत्रू दीर्घ अंधःकारांत पडून राहिला.

११. वृत्रानें ताब्यांत ठेवलेलीं आणि जपून ठेवलेलीं उदकें पणींनीं गाई आटकविल्या होत्या त्याप्रमाणें अडवून ठेविलीं होतीं. पाण्याचें जें द्वार बंद होतें तें इंद्रानें वृत्राला ठार मारून उघडें केलें.

१२. हे इंद्रा जेव्हां एकाकी व दीप्तिमान वृत्रानें तुला उलटून मारलें तेव्हां घोड्याची शेपटी (माशा झाडते) त्याप्रमाणें तूं सर्वांचा पराभव केलास. हे शूरा, तूं गाई जिंकल्यास, सोम जिंकलास आणि सात नद्यांना वाहाण्याकरतां खालीं सोडलेंस.

---

३ टीपः—त्रिकद्रुक म्हणजे ज्योतिः, गौः आणि आयु ह्या नांवाचे तीन याग.

१३. ह्याच्यावर (इंद्रावर) विजेचा प्रहार किंवा मेघाचा गडगडाट चालला नाहीं. त्यानें (वृत्रानें) इंद्रावर वृष्टी आणि वज्र फेंकलें. त्याचाहि उपयोग झाला नाहीं. जेव्हां इंद्र आणि वृत्र लढले, तेव्हां आणि तेव्हांपासून आतांपर्यंत एकटा इंद्रच विजयी झाला.

१४. हे इंद्रा, त्वां अहीला मारल्यावर तुझ्या हृदयांत भीति उत्पन्न झाली असा त्या अहीसाठीं सूड उगविणारा तूं कोण पाहिलास कीं, त्याला भिऊन श्येनाप्रमाणें नव्याण्णव नद्या आणि अंतरिक्ष ओलांडून तूं पलीकडे गेलास ?

१५. वज्रबाहु इंद्र, स्थावरजंगमाचा, आणि गरीब व शिंगें असलेल्यांचा राजा आहे. तोच मनुष्यांचाहि राजा आहे. धांव आसाला वेष्टून असते त्याप्रमाणें या सर्वांस वेष्टून त्यांचें तो संरक्षण करतो.

टीपः—ह्या सूक्तामध्यें इंद्राच्या सुप्रसिद्ध पराक्रमांचे सुविस्तृत वर्णन आलें आहे.

सूक्त तेहेतिसावें.

ऋषिः—हिरण्यस्तूप आंगिरस; देवता–इन्द्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे जनहो, या गुरांची इच्छा करणारे आम्ही इंद्राकडे जावें म्हणजे तो आम्हांवर मोठा अनुग्रह करील. अहिंस्य असा तो इंद्र गोसंपत्तीविषयीं आमचे मनोरथ पूर्ण करील कां ?

२. ज्याप्रमाणें ससा आपल्या घराकडे धांवतो, त्याप्रमाणें धन देणारा अप्रतिहत अशा इंद्राचा मी धांवा करतों. सुंदर स्तोत्रांनीं त्या इंद्राला मी नमस्कार करितों. तो इंद्र युद्धामध्यें भक्तांनीं बोलाविण्यास योग्य आहे.

३. सर्व सेनाधिपती इंद्रानें बाणांचा भाता चढविला. जो भक्त त्याला आवडतो त्याच्यासाठीं तो गाई घेऊन येतो. हे महान इंद्रा, तूं विपुल संपत्तीचा दाता आहेस म्हणून तूं आमच्या विषयीं कृपण होऊं नकोस.

४. हे इंद्रा, शक्तिमान साहाय्यकांनीं युक्त अशा तूं एकट्यानेंच चालून जाऊन धनवान अशा दस्यूला आपल्या वज्रानें ठार मारिलेंस तेव्हां ते वृत्राचें यज्ञहीन सनक नामक अनुयायी तुझ्या धनुष्यावर चढून तुटून पडले आणि मरण पावले.

५. हे हरिद्वर्ण अश्वयुक्त इंद्रा, हे स्थिर आणि उग्र इंद्रा, जेव्हां व्रतहीन वृत्रानुचरांना तूं आकाश, स्वर्ग आणि पृथ्वी यांतून फुंकून बाहेर काढलेंस, तेव्हां यज्ञशील लोकांबरोबर स्पर्धा करणारे ते यज्ञहीन वृत्रानुयायी तोंडें फिरवून नाहींसे झाले.

६. जेव्हां त्यांना (वृत्रानुयायांना) पवित्र इंद्रसेनेबरोबर युद्ध करण्याची इच्छा झाली, तेव्हां नवग्वांनीं इंद्राला युद्धाविषयीं प्रोत्साहित केलें, तेव्हां पौरुषयुक्त मनुष्याबरोबर नपुसकांनीं लढावें त्याप्रमाणें ते पराभव पावून आपला दुबळेपणा दर्शवीत इंद्रापासून दूर पळून गेले.

७. हे इंद्रा, तूं त्या रडणाऱ्या आणि भक्षण करणाऱ्या वृत्रानुयायांबरोबर लढून त्यांस अंतरिक्षाच्या पार हाकून देता झालास. तसेंच तूं दस्यूला जाळून टाकलेंस आणि स्वर्गातून जोरानें खालीं फेकून दिलेंस आणि स्तुति करणाऱ्या आणि सोमरस अर्पण करणाऱ्या भक्ताचें स्तोत्र उंच ठिकाणीं रक्षण करता झालास.

८. सुवर्णमय अलंकारांनीं सुशोभित असे ते वृत्राचे हेर पृथिवीच्या परिघाभोंवतीं फिरत आणि आवेशानें धांवत असतांहि इंद्राला जिंकू शकले नाहींत. उलट त्यानेंच सूर्यप्रकाशानें त्या हेरांना आच्छादून टाकलें.

९. हे इंद्रा, जेव्हां तूं आपल्या महिम्यानें दोन्ही द्यावा–पृथिवी सर्व बाजूंनीं एकदम परिवेष्टून टाकिता झालास, तेव्हां तुझ्या भक्तांच्या योगानें तुला न भजणाऱ्यांना तूं ठार केलेंस. आणि असुरांस फुंकून फेकून देतां झालास.

१०. ते द्युलोक किंवा पृथ्वी यांच्या शेवटापर्यंत जाऊं शकले नाहींत ते धनदात्या इंद्राला आपल्या कपटांनीं वेष्टूं शकले नाहींत. वीर्यवान इंद्र, वज्र धारण करून तेजानें अंधकारांतून गाईंना उजेडांत आणितां झाला.

११. तेव्हां त्याच्या (इंद्राच्या) अन्नाकरतां उदक वाहूं लागलें. त्यांतून नावा जाण्याजोग्या होत्या तरी त्यांच्यामध्यें वृत्र वृद्धिंगत झाला. नंतर सर्व बुद्धिचातुर्यानें व अत्यंत प्रबल वज्रानें कित्येक दिवसपर्यंत त्या वृत्राला इंद्रानें ठार मारिलें.

१२. इंद्रानें इलीबिशाचे भक्कम किल्ले फोडिले, त्यानें शिंगें असलेल्या शुष्णावर आघात केले. हे धनवंता, तूं शक्य त्या वेगानें आणि बलानें युद्धेच्छू शत्रूला ठार मारलेंस.

१३. ह्या इंद्राचें यशकारक वज्र शत्रूवर जाऊन

१४म/२ २०३५८

पडलें. इंद्रानें आपल्या तीक्ष्ण आणि घातक वज्रानें त्यांचीं नगरें फोडलीं. इंद्रानें वृत्रावर वज्र फेकलें. आणि विजयसूचक गर्जना करीत आपली इच्छा पूर्ण केली.

१४. हे इंद्रा, तुझें ज्या कुत्सावर प्रेम होतें, त्याचें तूं रक्षण केलेंस. बलशाली दशद्यु युद्ध करीत असतां त्याचें तूं रक्षण केलेंस. जेव्हां श्वैत्रेय लढाईस निघाला तेव्हां घोड्यांच्या खुरांनीं उडविलेली धूळ द्युलोकापर्यंत जाऊन पोहोंचली.

१५. हे धनवंता, तुम्यांची जमिनीसाठीं लढाइ चालली असतांना श्वित्रांच्या शांत आणि बलशाली गाईंचें तूं रक्षण केलेंस त्या युद्धांत उभय पक्ष फार वेळ उभे राहून लढले. परंतु तूं शत्रूंचीं धनें जिंकून घेतलींस.

सूक्त चवतिसावें.

ऋषिः—हिरण्यस्तूप आंगिरस; देवता–अश्विनौ; छन्दः—९-१२ त्रिष्टुभ, अवशिष्ट जगती.

१. हे सर्वज्ञानी अश्वीहो, आज तीन वेळां तुम्ही आमचे व्हा. तुमचा रथ विस्तीर्ण आणि धनसंपन्न आहे. तुमचा सहवास थंडीच्या रात्रीं वस्त्रासारखा सुखकारक होय. तुम्ही आम्हा भक्तांना सुलभ व्हा.

२. हे अश्वीहो, तुमच्या मधुर अन्न वाहून नेणाऱ्या रथास तीन चाकें आहेत. तुमची सोमरसविषयक आवड सर्व जाणतात. तुमच्या रथाला तीन खांब बसविलेले आहेत. तुम्ही रात्रीं आणि दिवसां तीनतीनदां रथांत बसून जात असतां.

३. हे दोष झाकून टाकणाऱ्या अश्वीहो, तुम्ही एकाच दिवशीं तीन वेळां आणि आजही तीन वेळां आमच्या यज्ञावर मधुसिंचन करा. तुम्ही दिवसां आणि रात्रीं तीन तीन वेळां आम्हांस पुष्टिकारक अन्नें द्या.

४. तुम्ही तीन वेळा आमच्या घरीं या. तुम्हांस अनुसरणाऱ्या माणसाकडे तीन वेळा या. सुरक्षणीय माणसाकडे तीनदां या आणि तीनदा शिकवा. हे अश्वीनो, तुम्ही तीन वेळा आम्हाकडे सुख घेऊन या आणि उदकाप्रमाणें तीनदां अन्नें द्या.

५. हे अश्विहो, तुम्ही आम्हाकरतां तीनदां संपत्ती घेऊन या. आणि देवकर्मांत तीन वेळां आमचें रक्षण करा. तीन वेळां आम्हांस भाग्य द्या. तिन्ही वेळां अन्नसंपत्ति द्या. तुमच्या तीन चाकी रथावर सूर्यकन्या चढून बसली.

६. हे अश्विहो, तुम्ही आम्हाला तिन्ही वेळां दिव्य आणि पार्थिव औषधें द्या. आणि तिन्ही वेळां अंतरिक्षांतील आषधें द्या. हे शुभाधिपतीहो, तुम्ही शंयूला जो प्रसाद दिलात, त्याच्या तिप्पट माझ्या मुलांकरतां घेऊन या.

७. हे अश्विहो, आम्ही दररोज तीन वेळां यज्ञ करतों. तुम्ही पृथ्वीला तीन वेळ वळसा घालता. हे रथगामी नासत्यहो, प्राणवायु ज्याप्रमाणें शरीरांत फिरतो त्याप्रमाणें तुम्ही तिन्हीं त्रैलोक्याभोंवतीं फिरा.

८. हे अश्विहो, तुम्हासाठीं सप्तमातृक सोमानें तीन कलश तीनदां भरले जातात. आणि तीनदा हवि सिद्ध केला जातो. तिन्ही पृथ्वीवर गमन करणारे तुम्ही द्युलोकाचें शिखर रात्रंदिवस रक्षण करता. आणि स्थिर ठेविता.

९. सत्यवान अश्विहो, ज्या रथानें तुम्हा यज्ञामध्यें येता तो रथ तिकोणी आणि तीन चाकांचा आहे. त्या तिकोणी रथाचीं तीन चाकें कोणतीं, बैठकीसकट तीन लांकडें कोणतीं, त्या रथाला तुम्ही आपला वेगवान गाढव केव्हां जोडाल ?

१०. हे सत्यवान् अश्विहो, तुम्ही या. तुमच्याकरितां हवि अर्पण केला जात आहे. मधूर पेय पिणाऱ्या मुखांनीं तुम्ही सोमरस प्या. सूर्य तुमचा रमणीय आणि तुपानें भरलेला रथ उषेच्या पूर्वींच पाठवितो.

११. हे सत्यवान् अश्विनो, तुम्ही तेहतीस देवांना येथें मधुर पेय पिण्याकरितां घेऊन या. तुम्ही आमचें आयुष्य वाढवा. रोग बरे करा. शत्रूंचा निःपात उडवा. आणि आमचे साहाय्यकर्ते व्हा.

१२. हे अश्विहो, तुम्ही आपल्या तिकोणी रथानें अत्यंत वीर्यशाली संपत्ति आम्हाकडे घेऊन या. आमची प्रार्थना ऐकणाऱ्या तुम्हाला मी रक्षणार्थ बोलावीत आहे. लढाईमध्यें तुम्ही आमची बाजू प्रबळ करा.

सूक्त पसतिसावें.

ऋषिः—हिरण्यस्तूप आंगिरस; देंवता–१ अग्नि व मित्रावरुण अवशिष्ट सविता; छंदः—१-९ जगती, २-८ त्रिष्टुभ्.

१. सर्वांत पहिला जो अग्नि, त्याला मी कल्याणाकरितां बोलावतों मित्रावरुणांना येथें मी रक्षणार्थ बोलावतों. जगाला विश्रांति देणाऱ्या रात्रीला मी बोलावतों. सवितृ देवाला मी रक्षणार्थ बोलावतों.

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

२. सवितृदेव अंधःकारानें भरलेल्या प्रदेशांतून फिरत फिरत अमर आणि मर्त्य यांना निजवीत निजवीत आपल्या सोन्याच्या रथांतून सर्व भुवनें पहात येत असतो.

३. तो देव उतारावरून जातो व चढावरून जातो, तो यज्ञार्ह देव पांढऱ्या आणि हविर्द्वर्ण घोड्यांनीं जातो. तो सवितृ देव सर्व पापें नाहींशीं करीत दूर अंतरावरून येत असतो.

४. मोत्यांनीं वेष्टिलेला, नानाविध रंगाचा, सोनेरी शिवळा असलेल्या, आणि मोठ्या अशा रथावर यज्ञार्ह, सुंदर तेजानें युक्त आणि अंधःकारमय प्रदेशाला आपल्या तेजानें प्रकाशित करणारा, असा तो सविता आरूढ झाला.

५. शुभ्र पायाचा, आणि सोन्याच्या आढ्याचा रथ वाहून आणणारे पिवळे घोडे सर्व जग प्रकाशित करतं झाले. सवितृ देवाच्या उदरांमध्यें सर्व लोक आणि सर्व भुवनें असतात.

६. द्युलोक तीन आहेत. पैकीं दोन सवित्याच्या जवळ असून तिसरा वीरांचें निवासस्थानभूत असा यमलोकीं आहे. रथाच्या आणीप्रमाणें अविनाशी असे ते आहेत. पण ज्या कोणी तें पाहिलें असेल त्याला येथें बोलून द्या.

७. गंभीर चालीचा, चांगल्या रस्त्यानें जाणारा, जीवन देणारा, चांगल्या पंखानें युक्त अशा ह्यानें अंतरिक्षें प्रकाशित केलीं. यावेळीं सूर्य कोठें आहे ? कोणास ठाऊक आहे ? त्याचा प्रकाश आतां कोणत्या द्युलोकांवर पसरला आहे ?

८. तो सुवर्णाक्ष सवितृ देव पृथ्वीच्या आठी दिशा प्रकाशित करतां झाला. त्यानें तीन योजनें, पृथिवी आणि सप्तसिंधु प्रकाशित केल्या आणि तो हवि देणाऱ्या भक्तासाठीं उत्तम रत्नें घेऊन आला.

९. तो सुवर्णहस्त सविता दोन्ही द्यावापृथ्वीमधून चालत जातो. तो रोग दूर करतो. सूर्याला चालवितो. आणि अंधःकारमय प्रदेशाकडे गमन करतो.

१०. तो सुवर्णहस्त, मार्गदर्शक, सुखकारक, आणि संपन्न असा सविता देव इकडे येवो. प्रत्येक रात्रीं स्तविला जाणारा तो देव त्रासदायक राक्षसांना हाकून देऊन राहातो.

११. हे सवित्या, तुझें जें पूर्वापार, धूलिरहित, चांगले केलेले, अंतरिक्षांतील मार्ग आहेत. त्या सुगम मार्गांनीं येऊन तूं आज आमचें रक्षण कर आणि हे देवा, आम्हांस तसें आश्वासन दे.

सूक्त छत्तिसावें.

ऋषिः—कण्व घोरपुत्र; देवताः—अग्नि (१३।१४ यूप) छन्दः—विषम बृहती; सम-सतोबृहती.

१. हे लोकहो, देवांची सेवा करूं इच्छिणाऱ्या तुम्हां पुष्कळांचा प्रिय असा तो महान अग्नि, कीं ज्याला इतरहि स्तवितात, त्याची आपण चांगल्या स्तोत्रांनीं प्रार्थना करूं.

२. लोकांनीं बलवर्धक अग्नीला स्थापन केला. हवि सिद्ध करणारे आम्ही तुला भजतों. तो तूं आज आम्हांवर प्रसन्न हो. आणि हे साधो, युद्धामध्यें तूं आमचा संरक्षक हो.

३. देवांना बोलविणाऱ्या सर्वज्ञ अशा तुला आम्ही दौत्य कर्मासाठीं योजितों. तो तूं फार मोठा आहेस. तुझ्या ज्वाला सर्वत्र पसतरतात. तुझे किरण द्यु लोकांपर्यंत पसरले आहेत.

४. पूर्वापार दौत्य करणाऱ्या तुला वरुण, मित्र, अर्यमा इत्यादि देव प्रदीप्त करीत आहेत. हे अग्ने, जो मानव तुला हवि देतो, तो तुझ्या कृपेनें सर्व धन जिंकतो.

५. हे अग्ने, तूं आनंददायक होता, गृहपति आणि सर्वांचा दूत आहेस. देवांनीं जे शाश्वत नियम केले ते सर्व तुझ्याच ठिकाणीं येऊन मिळाले आहेत.

६. हे भाग्यशाली तरुण अग्ने, सर्व हवि तुझ्याच ठिकाणीं अर्पण केला जातो. करितां तूं आज आम्हांवर प्रसन्न होऊन आम्हांला चांगले वीर्यशाली पुत्र प्राप्त व्हावेत म्हणून देवांना हवीनें तृप्त कर.

७. नमनशील लोक खरोखर त्याच स्वयंप्रकाशमान अग्नीला भजतात. शत्रूच्या तडाख्यांतून सुटलेलीं मनुष्यें हवींनीं अग्नीला प्रदीप्त करितात.

८. देव वृत्राला ठार मारून तरले त्यांनीं अंतरिक्ष व द्यावापृथ्वी निर्माण केलीं. गोविषयक संग्रामांत खिंकाळणारा जसा घोडा तसा हा तेजस्वी आणि बलशाली अग्नि, कण्वाच्या येथें हविरन्न स्वीकारून राहो.

---

४ टीपः—कृशन म्हणजे मोती असा पंडितांनीं अर्थ केला आहे.

९. तूं बस. तूं थोर आहेस. तूं तेजस्वी आहेस. तूं देवांना तृप्त करतोस. हे यज्ञार्ह आणि प्रशंसनीय अग्ने, तूं आरक्त आणि सुंदर धूर वर टाक.

१०. हे हव्यवाहना, उत्कृष्ट प्रकारें यज्ञ संपादन करणाऱ्या ज्या तुला देवांनीं येथें मानवाकरतां ठेविलें आहे, ज्याला वृषानें आणि उपस्तुतानेंहि स्थापिलें आहे. अशा धनदात्या तुला मेध्यातिथि कण्वहि स्थापन करीत आहेत.

११. ज्या अग्नीला मेध्यातिथि, कण्व यज्ञाकरितां प्रदीप्त करीत, अशा त्या अग्नीला हें अन्न द्यावें. त्याला उद्देशून ह्या ऋचा म्हणाव्या. आम्ही त्याच अग्नीची थोरवी गात आहों.

१२. हे स्वधासंपन्न अग्ने, तुझें आणि देवांचें आप्तपण आहे म्हणून तूं आम्हांस अशी संपत्ति दे कीं, ज्या प्रख्यात संपत्तीचा तूं राजा आहेस. तूं आम्हांस सुख दे. तूं थोर आहेस.

१३. सवितृ देवांप्रमाणें तूं आमच्या संरक्षणार्थ उभा राहा. आणि उभा राहून आम्हांस धन दे. कारण आम्ही घृतपूर्वक आणि ऋत्विजद्वारा तुला बोलावीत आहों.

१४. उन्नत असा तूं आमचें पापापासून रक्षण कर आणि आपल्या तेजानें सर्व शत्रूंना एकत्र जाळून टाक. येथें जगण्याकरतां आणि चालण्याकरतां तूं आम्हांस उन्नत कर आणि आमची सेवा देवाप्रत पोंचीव.

१५. हे अग्ने, तूं आमचें राक्षसापासून रक्षण कर. धूर्त शत्रूपासून रक्षण कर. आमचें द्वेष्ट्यापासून रक्षण कर. आणि हे अत्यंत तेजस्वी आणि तरुणा, आम्हांस ठार मारूं इच्छिणाऱ्यापासून आमचें रक्षण कर.

१६. हे ज्वालारूपी दाढा असलेल्या अग्ने, तूं आमच्या शत्रूस घनाप्रमाणें फोडून त्याचे तुकडे कर. जो आमचा द्वेष करतो, जो मर्त्य रात्रीच्या वेळीं आम्हांस मारतो, तो आमचा शत्रु आम्हांवर अधिकारी न होवो.

१७. अग्नीनें कण्वाला वीर्यशाली संतति दिली, अग्नीनें त्याला सौभाग्य दिलें, अग्नीनें मित्राचें आणि मेध्यातिथीचें रक्षण केलें. अग्नीनें उपस्तुताला युद्धांत रक्षिलें.

१८. अग्नीच्या द्वारें आम्ही तुर्वशाला, यदूला आणि उग्र देवाला दूर प्रदेशाहून येथें बोलावतों. दस्यूंचा संहार करणारा अग्नि, नववास्त्व, बृहद्रथ, तुर्वीति यांना येथें आणो.

१९. हे अग्ने, सर्व लोकांना प्रकाश मिळावा, म्हणुन मनूनें तुला येथें ठेवलें. यज्ञामध्यें उत्पन्न झालेला आणि वाढलेला असा तूं कण्वांच्या येथें प्रकाशत आहेस. लोक तुलाच नमस्कार करतात.

२०. अग्नीच्या ज्वाला बलिष्ठ आणि भयंकर असतात त्यांना कोणी आडवूं शकत नाहीं. म्हणून हे अग्ने, तूं बलवान राक्षसांना आणि सर्व शत्रूंना एकदम जाळून टाक.

सूक्त सदतिसावें.

ऋषिः—कण्व घोरपुत्र; देवता:—मरुत; छंदः–गायत्री.

१. हे कण्वांनो, चंचल, शत्रूरहित, रथारूढ असा जो तुमचा मरुद्गण त्याला उद्देशून तुम्ही गा.

२. जे स्वयंप्रकाशमान मरुत आपल्या हरिणी, आपले भाले आणि कुठार आणि अलंकार यांसह जन्मले.

३. त्यांचे चाबूक त्यांच्या हातांत वाजत आहेत. ते मला येथल्याप्रमाणें ऐकूं येत आहेत. मार्गामध्यें त्यांचे चाबूक त्यांस सुशोभित करीत आहेत.

४. शत्रूनाशक, देदीप्यमान आणि बलशाली अशा तुमच्या मरुद्गणांना उद्देशून देवांनीं दिलेलें स्तोत्र गा.

५. गाईंमध्यें वासरूं बागडते, त्याप्रमाणें बागडणाऱ्या मरुद्गणांची तुम्ही प्रशंसा करा. रस पिऊन तो पुष्ट झाला आहे.

६. हे शूरहो, हे द्यावापृथ्वींना कंपायमान करणारे हो, तुम्हांतून सर्वांत मोठा असा कोण आहे? कारण कीं तुम्ही द्यावापृथ्वींना वृक्षाच्या शेंड्याप्रमाणें हालवितां.

७. तुमच्या जाण्यानें मनुष्य खालीं बसतो. तुमच्या प्रबळ झंझावातानें महान् पर्वतहि खालीं वाकतो.

८. ज्यांच्या जाण्याच्या वेळीं पृथिवी म्हाताऱ्या माणसाप्रमाणें भीतीनें कांपत असते.—

९. ह्या मरुद्रूपी पक्ष्यांचें मातेच्या उदरांतून बाहेर पडण्याचें स्थान मात्र स्थिर आहे. कारण द्यावापृथिवीमध्यें यांचें बळ दुभागलें आहे.

१०. त्याचप्रमाणें ते वाचापुत्र मरुत आपल्या मार्गामध्यें गर्जना करीत इतकें पाणी पसरतात कीं, तें गुडघ्या इतकें वाहूं लागतें.

११. लांब रुंद आणि मारला जाण्यास कठीण अशा त्या मेघपुत्राला देखील ते आपल्या जाण्यासरशी हाकून लावितात.

१२. हे मरुतांनो, तुम्हांस बळ आहे म्हणून तुम्ही लोकांना हलविता आणि पर्वतांना हालविता.

१३. हे मरुत जेव्हां जात असतात तेव्हां रस्त्यांत परस्परांशीं बोलतात. तें त्यांचें भाषण कोणालाहि ऐकूं येतें.

१४. हे मरुतांनो, तुम्ही आपल्या वेगशाली वाहनांतून लवकर येण्यास निघा. आम्हां कण्वांच्या घरीं तुमच्या सेवेसाठीं हविरन्न सिद्ध आहे. तर तेथेंच तुम्ही तृप्त व्हा.

१५. हे मरुतांनो, तुमच्या तृप्तीसाठीं ज्याप्रमाणें हे हवि आहेत. त्याचप्रमाणें आम्हीहि आहोंत. जिवंत राहाण्याकरितां आम्हांला सर्व आयुष्य द्या.

टीपः—मरुतांचें सुंदर वर्णन ह्या सूक्तांत आहे.

सूक्त अडतिसावें.

ऋषिः—कण्व घोरपुत्र; देवताः—मरुत; छन्दः—गायत्री.

१. हे स्तुतिप्रिय दर्भासनावर बसलेल्या मरुतांनो, बाप मुलाला हातांत धरतो, त्याप्रमाणें तुम्ही आम्हाला केव्हां धराल ?

२. आतां तुम्ही कोठें आहांत ? कोणीकडे जात आहांत ? तुम्ही स्वर्गाहून निघा, पण पृथ्वीहून जाऊं नका. तुम्हासाठीं गाईप्रमाणें कोठून आवाज होत आहे?

३. हे मरुतांनो, तुमचें नवें धन कोठें आहे ? तुमचे प्रसाद कोठें आहेत ? तुमचीं सर्व वैभवें कोठें आहेत ?

४. हे पृश्निपुत्र मरुतांनो, जर तुम्ही मर्त्य असतां तर तुमचा स्तोता अमर झाला असता.

५. जनावर जसें कुरणास नावडतें असतें तसा तुमचा स्तोता तुम्हास नावडता न होवो. तो यमाच्या मार्गानें न जावो.

६. परात्पर आणि मारण्यास कठीण निर्ऋति आम्हांस न मारो. ती आमच्या तृष्णेसह नष्ट होवो.

७. खरोखर दीप्तिमान व बलवान असे हे रुद्रपुत्र मरु देशांतहि वायुरहित वृष्टि करतात.

८. जेव्हां यांची वृष्टि होते, तेव्हां पान्हा फुटलेल्या गाईप्रमाणें वीज कडाडते आणि माता वत्साला संभाळते, त्याप्रमाणें ती मेघाच्या सन्निध राहाते.

९. जेव्हां ते पृथ्वीला भिजवून टाकतात, तेव्हां ते जलपूर्ण मेघांच्या योगानें दिवसाही अंधःकार करितात.

१०. नंतर मरुतांच्या गर्जनेमुळें पृथ्वीवरील सर्व घरें आणि माणसें कापूं लागतात.

११. हे मरुतांनो, चालतांना न थकणाऱ्या आणि सुदृढ पायांच्या (घोड्या) वर बसून सुंदर नद्यांच्या मागोमाग जा.

१२. तुमच्या रथाचीं चाकें भक्कम असोत. रथ आणि घोडे बळकट असोत. वाद्या नीट कमावलेल्या असोत.

१३. हे स्तोत्या, ब्रह्मणस्पति, अग्नि आणि दर्शनीय मित्र यांना स्तवण्यासाठीं तुम्ही अस्खलित वाणीनें गा.

१४. तुम्ही तोंडांत श्लोकाची रचना करा. आणि त्याचा विस्तार करा. पाऊस गर्जना करतो, त्याप्रमाणें गायत्री छंदांत स्तुति गा.

१५. तुम्ही देदीप्यमान, स्तुत्य, तेजस्वी अशा मरुद्गणांला नमस्कार करा. येथें आमच्या कर्मांत ते प्रसन्न होवोत.

सूक्त एकूणचाळिसावें.

ऋषिः—कण्व घोरपुत्र; देवता—मरुत; छन्दः—सम सतोबृहती, विषम—बृहती.

१. हे कंपित करणाऱ्या मरुतांनो, सूर्याच्या किरणाप्रमाणें लांब अंतरावर पावलें टाकीत इतक्या दुरून जात आहा. ते कोणाच्या कृतीमुळें ? ते कोणाच्या स्तोत्रामुळें ? आणि कोणीकडे ?

२. तुमचीं आयुधें बळकट असोत. शत्रूला निवारण्यास आणि त्यास प्रतिबंध करण्यास ती सुदृढ असोत. तुमचें बळ प्रशंसनीय असो व मायावी माणसाला तसें प्राप्त न होवो.

३. हे शूरांनो, ज्याप्रमाणें तुम्ही स्थावर पदार्थांना भग्न करतां किंवा जड पदार्थाला हलविता, त्याप्रमाणें पृथ्वीवरील मोठमोठ्या झाडांना तुम्ही मोडून टाकता आणि पर्वतमय प्रदेश फोडून टाकता.

---

४. टीपः—अर्थ असा दिसतो कीं तुम्ही मर्त्य असतां तरी सुद्धां तुमच्या स्तोत्रानें आम्ही अमर झालों असतों. तुम्ही देव असून आणि आम्ही इतकी विनंति करीत असून आमच्यावर कां बरें कृपा करीत नाहीं.

४. हे रिपूंचा निःपात करणाऱ्यांनो, तुम्हांला भूमीवर किंवा द्यूलोकावरहि शत्रू नाहीं. हे रुद्रपुत्रांनो, तुमचें बल कधींही पराभव न पावणारें असो.

५. हे मरुतांनो, हे देवहो, तुम्ही पर्वतांचा थरकांप करून सोडतां आणि वृक्षांना मोडून टाकतां. मदोन्मत्तासारखे भेटेल त्या सर्वांसकट तुम्ही धांवत असतां.

६. तुम्ही आपल्या रथाला ठिपकेदार हरणें जोडलीं आहेत आणि तांबडा हरिण पुढें ओढीत आहे. तुम्ही येऊं लागला म्हणजे तुमचा आवाज पृथ्वीसुद्धां ऐकते आणि माणसें तर घाबरून जातात.

७. हे रुद्रपुत्रांनो, आम्ही मुलाबाळांकरितां तुमच्या कृपेची ताबडतोब इच्छा करीत आहों. पूर्वीं भ्यालेल्या कण्वाच्या रक्षणार्थ तुम्ही गेलात, तसें आमच्याहि कल्याणाकरितां या.

८. हे मरुतहो, जो कोणी शत्रु तुमच्या प्रेरणेनें किंवा मर्त्यांच्या प्रेरणेनें आम्हांवर चाल करून येतो, त्याचें बळ आणि तेज तुम्ही आपल्या रक्षणांच्या योगानें नाहींसें करा.

९. हे अत्यंत पूज्य आणि ज्ञानवान मरुतहो, तुम्ही कण्वाला ज्याअर्थीं सर्व कांहीं दिलें आहे. त्या अर्थीं आतां तुम्ही आपल्या सर्व रक्षणासह, वीज मेघाकडे जाते, त्याप्रमाणें आम्हांकडे या.

१०. हे दानशूरहो, सर्व ओजःसंपत्ति तुमची आहे. हे कांपविणाऱ्यांनो, सर्व बळ तुमचें आहे. हे मरुतांनो ऋषींचा द्वेष करणाऱ्यावर त्याच्या नाशासाठीं तुम्ही बाणाप्रमाणें द्वेष्टा धाडा.

सूक्त चाळिसावें.

ऋषिः—कण्व घोरपुत्र; देवताः–ब्रह्मणस्पति छंदः—बृहती.

१. हे ब्रह्मणस्पते, तूं ऊठ. भाविक बुद्धीनें आम्ही तुला प्रार्थीत आहोंत. ते दानशूर मरुतहि येवोत. आणि हे इंद्रा, तूंहि त्यांचेबरोबर येऊन (सोम) प्राशन कर.

२. कारण हे बलपुत्रा, युद्धप्रसंगीं मर्त्य लोक तुझाच धांवा कारितात. हे मरुतांनो, जो तुम्हांला प्रार्थना करतो, त्याला वीर्यशाली पुत्र आणि चांगले घोडे प्राप्त होवोत.

३. तो ब्रह्मणस्पति येवो आणि ती सत्यस्वरूपी वाग्देवता येवो. त्याचप्रमाणें इतर देवहि आमच्या ह्या पांच प्रकारच्या हवींनीं युक्त अशा यज्ञांत त्या मनुष्यांच्या कल्याणकारी वीरालाहि घेऊन येवोत.

४. जो ऋत्विजाला चांगलें धन देतो, त्याला अक्षय धन प्राप्त होतें. त्याच्यासाठीं आम्ही वीरसंपन्न, शत्रूंचा पराभव करणाऱ्या आणि अपराभूत अशा इळा देवीची उपासना करतों.

५. आतां ब्रह्मणस्पति प्रशंसनीय मंत्र म्हणोत कीं ज्या मंत्रांत इंद्र, वरुण, मित्र, अर्यमा आणि इतर देव यांना स्थान मिळेल.

६. हे देवहो, आम्हीहि यज्ञामध्यें तोच कल्याणकर आणि निर्दोष मंत्र म्हणणार आहोंत. हे शूरहो, तुम्हांला तें स्तोत्र आवडलें म्हणजे आम्हांला तुमची सर्व संपत्ति निःसंशय मिळेल.

७. देवभक्ताची कोण बरोबरी करूं शकेल? दर्भ तोडणाऱ्या माणसाची कोण बरोबरी करूं शकेल? कारण कीं, हवि अर्पण करणारा अनेक लोकांनीं वेष्टित असतो आणि त्याला भरलेलें घर प्राप्त होतें.

८. ब्रह्मणस्पति आपलें सर्व बळ एकत्रित करून राजांच्या साहाय्यानें शत्रूंना ठार करतो. संकटकालींहि तो आपली जागा धरून राहातो. त्या वज्रधारी ब्रह्मणस्पतीला लढाईमध्यें किंवा घनघोर संग्रामांत कोणीहि निवारूं शकत नाहीं किंवा पराजय करूं शकत नाहीं.

सूक्त एकेचाळिसावें.

ऋषिः—कण्व घोरपुत्र, देवता–४.५.६ आदित्य, अवशिष्ट मित्र, वरुण, अर्यमा, छन्दः—गायत्री.

१. ज्याला ज्ञानवान मित्र आणि अर्यमा रक्षण करतात तो मनुष्य कधींहि नाश पावत नाहीं.

२. ज्या मर्त्याला ते हातांत धरल्याप्रमाणें सांभाळतात आणि शत्रूपासून रक्षितात, तो प्रत्येक जण निर्भय होत्साता उत्कर्ष पावतो.

३. हे राजे ह्या भक्तांच्या शत्रूंचीं नगरें आणि किल्ले फोडतात आणि त्यांना संकटाच्या पार नेतात.

४. हे आदित्य हो, तुमचा यज्ञाला येण्याचा मार्ग निष्कंटक आणि सुगम आहे. येथें तुम्हांला उपास पडणार नाहीं.

५. हे शूर आदित्यांनो, ज्या यज्ञाला तुम्ही सरळ मार्गानें येतां, तो तुम्हाला सोमपानार्थ प्राप्त होवो.

६. उपद्रवरहित अशा त्या मर्त्याला सर्व संपत्ति (रत्नें) आणि संतति प्राप्त होते.

७. हे मित्रांनो, मित्रासाठीं आणि अर्यमासाठीं कसें स्तोत्र रचिलें पाहिजे बरें? आणि वरुणासाठीं कोणतें पक्कान्न करावें बरें?

८. आम्हांला घातकी कोण? शिव्या देणारा कोण? देवभक्त कोण? हें मी तुम्हांस सांगत नाहीं. केवळ स्तोत्रांनीं तुम्हांला भजतों.

९. चारहि (कपर्दिका) ज्याच्या हातांत आहेत त्याला त्या खालीं पडेपर्यंत भ्यावें. शिव्या देण्याची इच्छा करूं नये.

सूक्त बेचाळिसावें.

ऋषिः—कण्व घोरपुत्र; देवता-पूषन्, छंदः-गायत्री.

१. हे मेघपुत्रा पूषा, तूं आम्हांस मार्गांतून सुखरूपपणें ने आणि आम्हांस संकटांतून पार पाड. तूं आमच्या पुढें राहा.

२. हे पूषा, जो दुष्ट आणि विघ्नसंतोषी लांडगा आमचा घात करूं इच्छील, त्याला आमच्या मार्गांतून दूर करून ठार कर.

३. त्या वाटमाऱ्या दुष्ट चोराला आमच्या मार्गांतून दूर पिटाळून लाव.

४. त्या दुतोंड्या चोराच्या शरीरावर मग तो कोणीहि असो. त्याच्या उरावर पाय देऊन उभा राहा.

५. हे पराक्रमशाली आणि विचारवान पूषा, ज्या कृपेनें तूं आमच्या वाडवडिलांस पूर्वीं नेलेंस, ती तुझी कृपा आतां आम्ही तुझ्याजवळ मागत आहोंत.

६. हे सर्वसंपत्तिमान आणि सोनेरी शस्त्र धारण करणाऱ्या पूषा, तूं आम्हांस धनसंपत्ति सुलभ कर.

७ आमच्या शत्रूंना आम्हांपासून दूर कर. आमचे मार्ग चांगले आणि सुगम कर. हे पूषा, यासंबंधीं आम्हांस ज्ञान दे.

८. जिकडे पुष्कळ गवत आहे तिकडे आम्हांस घेऊन जा. वाटेंत नवा त्रास होऊं देऊं नकोस. हे पूषा, ह्या संबंधानें आम्हांस ज्ञान दे.

९. हे पूषा, तूं समर्थ हो. आम्हांस धन दे. इच्छित प्राप्त करून दे. समृद्ध कर. पोटभर दे. आणि ह्यासाठीं त्यासंबंधीं आम्हांस ज्ञान दे.

१०. आम्ही पूषाची निंदा करीत नाहीं. उलट चांगल्या स्तोत्रांनीं स्तुति करीत आहोत. ह्या पराक्रमी पूषाजवळ आम्ही धनाची याचना करतों.

सूक्त त्रेचाळिसावें.

ऋषिः—कण्व घोरपुत्र, देवता-३ रुद्र आणि मित्रावरुण ७-९ सोम, अवशिष्ट रुद्र; छंदः—१-८ गायत्री ९ अनुष्टुभ्.

१. महाज्ञानी, अत्यंत उदार आणि बलशाली रुद्रासाठीं कोणतें स्तोत्र गावें कीं, तें त्याच्या मनाला अत्यंत सुख देईल?

२. ज्या योगानें अदिति आम्हांला, आमच्या पशूंना, आमच्या माणसांना आणि गाईंना आणि मुलाबाळांना निरोगी करील?

३. ज्या योगानें मित्र, वरुण आणि रुद्र आणि समस्त देव आम्हाकडे कृपादृष्टीनें पहातील. (असें कोणतें स्तोत्र आम्ही म्हणावें.)

४. स्तोत्रपति, यज्ञपति, आणि सुखकारक औषधींनीं संपन्न अशा रुद्राजवळ शंयूचें जें सुख तें आम्ही मागतों.

५. जो रुद्र सूर्याप्रमाणें तेजःपुंज, व सुवर्णाप्रमाणें प्रकाशतो, तो देवामध्यें श्रेष्ठ व संपन्न आहे.

६. आमच्या घोड्यांना तो सुख देतो, आमच्या मेंढ्याला आणि मेंढीला, पुरुषांना आणि स्त्रियांना, आणि गाईंना तो सुख देतो.

७. हे सोमा, आम्हाला शंभर पुरुषांचें ऐश्वर्य आणि महापराक्रमी पुरुषांची कीर्ति दे.

८. सोमाला पीडा देणारे आम्हांला त्रास न देवोत. शत्रू आम्हांस उपद्रव न करोत. हे सोमा, तूं आम्हांस बल दे.

९. हे सोमा, जे लोक अमर अशा तुझ्या ऋताच्या परमस्थानीं, माथ्यावर आणि मध्यभागीं आहेत त्यांच्यावर तूं अनुग्रह कर.

सूक्त चव्वेचाळिसावें.

ऋषिः--कण्वपुत्र प्रस्कण्व देवता—१-२ अग्नि, अश्विनी आणि उषा, अवशिष्ट अग्नि; छंदः--सम सतोबृहती, विषम-बृहती.

१. हे अमर अग्ने, तूं उषेचें देदीप्यमान आणि सुंदर धन आहेस. हे जातवेदा, उषःकालीं जागृत होणाऱ्या देवांना तूं आज हविर्दात्या भक्ताकडे घेऊन ये.

२. हे अग्ने, तूं हव्य वाहून नेणारा, यज्ञ घेऊन जाणारा आणि प्रिय दूत आहेस. अश्वि आणि उषा

यांच्यासहवर्तमान तूं आम्हांला वीर्यसंपन्न आणि मोठी संपत्ति दे.

३. सर्वांचा आवडता, श्रेष्ठ धूम्रध्वज, तेजस्वी, यज्ञाची जणू संपत्तिच अशा अग्नीला आज प्रातःकाळीं मी दौत्यकर्म सांगतों.

४. श्रेष्ठ, अत्यंत तरुण, आनंदानें बोलविलेला, अतिथि, हविर्दात्या लोकांचा प्रिय अशा त्या जातवेद अग्नीला देवाकडे जाण्याकरतां मी प्रातःकाळीं प्रार्थना करतों.

५. हे अमर विश्वपालका, हे परमपवित्र हव्यवाहना अग्ने, अत्यंत तरुण, अमर, आणि यज्ञाचा संरक्षक अशा तुझी मी स्तुति करीन.

६. हे अत्यंत तरुणा, मधुरजिव्ह, आणि सुनिमंत्रित असा तूं मज स्तोत्रकर्त्यावर प्रसन्न हो. प्रस्कण्वाचें आयुष्य वाढवून त्यानें दीर्घ काल जगावें म्हणून तूं दैवी लोकांस नमस्कार कर.

७. सर्वज्ञ आणि होता अशा तुला सर्वलोक प्रदीप्त करतात. तरी हे बहुस्तुता अग्ने,सर्वज्ञ व ज्ञानसंपन्न देवांना तूं येथें लवकर घेऊन ये.

८. हे सुयज्ञ अग्ने, तूं सविता, उषा, अश्वि आणि भग यांना प्रातः कालीं आणि रात्रीं घेऊन ये. सोमरस तयार करून असलेला कण्व, हवि पोचविणाऱ्या तुला प्रदीप्त करीत आहेत.

९. हे अग्ने, तूं यज्ञांचा अधिपति आणि सर्वांचा दूत आहेस. प्रातःकाळीं जागृत होणाऱ्या, सूर्यसदृश देवांना सोमपानार्थ तूं आज घेऊन ये.

१०. हे तेजस्वी अग्ने, सर्वत्र दिसणारा तूं उषेच्या मागोमाग प्रकाशतोस. तूं ग्रामामध्यें संरक्षक आणि यज्ञामध्यें मनष्यांचा पुरोहित आहेस.

११. हे अग्निदेवा, यज्ञसंपादक, होता, ऋत्विज, ज्ञानवान, वेगशाली दूत आणि अमर अशा तुझी आम्ही मनूप्रमाणें स्थापना करितो.

१२. हे सूर्याप्रमाणें तेजस्वी अग्ने, जेव्हां देवांचा पुरोहित असा तूं यौत्य करण्यासाठीं त्यांच्यामध्यें जातोस, तेव्हां तुझ्या ज्वाला सिंधूच्या गर्जना करणाऱ्या लाटाप्रमाणें लखलखतात.

१३. हे सावधानचित्तानें ऐकणाऱ्या अग्ने, तुजबरोबर असणाऱ्या व आपापला हविर्भाग घेऊन जाणाऱ्या देवांसह आमची प्रार्थना ऐक. प्रातःकाळीं यज्ञार्थ येणारे मित्र आणि अर्यमा दर्भावर बसोत.

१४. (आणि) दानशूर, अग्निजिव्ह आणि सत्यधर्माचे पालनकर्ते मरुत आमचें स्तोत्र ऐकोत. अश्वि आणि उषा यांच्यासहवर्तमान नियमशील वरुण सोमपान करोत.

सूक्त पंचेचाळिसावें.

ऋषिः—कण्वपुत्र; प्रस्कण्व; देवताः–अग्नि (दहाव्या ऋचेचा उत्तरार्ध अनेक देवता व देव यांविषयक); छंदः—अनुष्टुभ.

१. हे अग्ने, तूं येथें वसूंना, रुद्रांना, आदित्यांना आणि घृताची वृष्टी करणारे, चांगले यज्ञ करणारे आणि मनूपासून झालेले जे लोक त्यांना यजन कर.

२. हे अग्ने, ज्ञानवान देव हविर्दात्या उपासकावर प्रसन्न होतात. हे रोहिदश्वा, हे स्तुतिप्रिया, त्या देवांना तूं घेऊन ये.

३. हे महाव्रता अग्ने, प्रियमेधाच्याप्रमाणें, अत्रीच्याप्रमाणें, विरूपाच्याप्रमाणें, अंगिराच्याप्रमाणें, जातवेद असा तूं प्रस्कण्वाची हांक ऐक.

४. मोठालीं कर्में करणारे जे प्रियमेध, ते देदीप्यमान कांतीनें युक्त आणि यज्ञांचा राजा अशा अग्नीला संरक्षणाकरितां बोलावितें झाले.

५. हे घृतहवना, हे साधो, तूंही आमची प्रार्थना ऐक, कीं तिच्या योगानें कण्वाचे मुलगे तुला रक्षणार्थ बोलावीत आहेत.

६. हे अत्यंत, कीर्तिमान आणि सर्वप्रिय अग्ने, हवि घेऊन जाण्यासाठीं ज्वालारूपी केस असणाऱ्या तुला मनुष्यें ह्या लोकीं बोलावतात.

७. हे अग्ने, सावधान चित्तानें ऐकणारा, अत्यंत धनप्रद, अत्यंत कीर्तिमान, ऋत्विज आणि होता अशा तुझी विप्र लोक यज्ञामध्यें स्थापना करतात.

८. हे अग्ने, विप्रलोक सोमरस काढून आणि हातांत आहुति घेऊन अत्यंत तेजस्वी अशा तुला मर्त्य यजमानासाठीं हविरन्नाकडे वळवितात.

९. हे बलोत्पन्ना, हे स्थानसंपन्ना, हे साधो, सोमपानार्थ सकाळीं येणाऱ्या देवांना घेऊन येऊन आज येथें यज्ञांत बशीव.

१०. हे अग्ने, तूं देवलोकांना चांगल्या प्रकारें निमंत्रण करून इकडे आण आणि त्यांना हवि दे. हे दानशूरहो, काल काढलेला हा सोमरस तुम्ही प्या.

सूक्त शेहेचाळिसावें.

ऋषिः-कण्वपुत्र प्रस्कण्व; देवता-अश्विनौ. छंदः-गायत्री.

१. ही पहा द्यूची प्रिया नूतन उषा फाकूं लागली आहे. तेव्हां हे अश्विहो, मला तुमची स्तुति करूं द्या.

२. जे पराक्रमी, सिंधूचे पुत्र, धनदाते, बुद्धिमान, संपत्तिमान असे आहेत,

३. त्या तुमचा रथ हे अश्विदेवहो, पक्ष्याप्रमाणें उडतो, तेव्हां तुमचे महान घोडे जीर्ण झालेल्या अंतरिक्षांत गमन करतात.

४. हे शूरहो, आपोदेवींना संतुष्ट करणारा त्यांचा जार (सूर्य?) हविरन्नानें देवांना तृप्त करतो. तो सर्व कर्मांचा अधिपति आणि द्रष्टा आहे.

५. हे स्तुतिप्रिय नासत्यांनो, तुमच्या कृपेचा प्रेरक आणि बलवर्धक असा हा सोम तुम्ही प्या.

६. हे अश्विहो, जी तेजस्वी संपत्ति आम्हांस अंधाराच्या पार पाडतील अशी संपत्ति आम्हांस द्या.

७. हे अश्वीहो, पैलतीरीं जाण्याकरतां तुम्ही आमच्या प्रार्थनारूपी नावेंतून या, आणि आपला रथ जोडा.

८. द्यूलोकाच्या विस्तीर्ण तीरावर तुमचें वल्हें आहे; आणि नदीच्या तीरावर तुमचा रथ आहे. आम्ही तुम्हांकरतां हविपूर्वक सोमरस तयार केले आहेत.

९. हे कण्वांनो, द्यूलोकांची सोमसंपत्ती सिंधूच्या ठिकाणींहि आहे. तर तुम्ही आपलें शरीर कोठें ठेवूं इच्छितां ?

१०. किरण उत्पन्न करण्याकारितां प्रभा फांकली आहे, सुवर्णासारखा सूर्यही आला आहे. अग्नी स्वतः काळा असूनही आपल्या जिव्हारूपी ज्वाळेनें प्रकाशला आहे.

११. अंधःकाराच्या पार जाण्याकरितां ऋतूंचा मार्ग चांगला साफ झाला आहे, द्यूलोकाचाहि मार्ग स्पष्ट दिसूं लागला आहे.

१२. सोमाच्या उत्साहाच्या भरांत तृप्त करणाऱ्या अश्वींच्या प्रत्येक संरक्षणाची स्तोता प्रशंसा करतो.

१३. हे कल्याणकारक आश्विहो, सोम पिऊन प्रसन्न झालेले आणि स्तुति केलेले तुम्ही मनूच्याप्रमाणें आमच्या येथें या.

१४. परिभ्रमण करणाऱ्या तुमच्या प्रकाशानंतर उषा येतात. तुम्हांस रात्रीं केलेली उपासना आवडते.

१५. हे आश्विहो, तुम्ही दोघे प्या आणि उभयतां आम्हांस अनिंदित संरक्षणपूर्वक सुख द्या.

सूक्त सत्तेचाळिसावें.

ऋषिः--कण्वपुत्र प्रस्कण्व; देवता-अश्विनौ छंदः-विषम बृहती, सम-सतोबृहती.

१. हे नियमशील आश्विहो, तुम्हाकरतां हा अत्यंत मधुर सोमरस काढला आहे. तो आधल्या दिवशीं काढलेला सोमरस तुम्ही प्या आणि भक्ताला रत्नें द्या.

२. हे आश्विहो, तुम्ही आपल्या तीन दांड्यांच्या तिकोणी सुंदर रथानें या. कण्वलोक यज्ञांत तुमचें स्तवन करीत आहेत. त्यांची प्रार्थना लक्षपूर्वक ऐका.

३. हे नियमशील आश्विहो, तुम्ही अत्यंत मधुर सोमरस प्या. आणि हे वीरहो, आज रथांत संपत्ति भरून भक्ताकडे जा.

४. हे सर्वज्ञ आश्विहो, तीन ठिकाणीं आंथरलेल्या दर्भावर बसून तुम्ही मधानें आमच्या यज्ञावर सिंचन करा. तेजस्वी कण्व सोमरस काढून तुम्हांस हाक मारीत आहेत.

५. हे आश्विहो, ज्या रक्षणांनीं तुम्ही कण्वाचें रक्षण केलें त्याच रक्षणांनीं, हे नियमशील आणि कल्याणाधिपति आश्विहो, तुम्ही आमचें संरक्षण करा. आणि सोमरस प्या.

६. हे पराक्रमी आश्विहो, तुम्ही सुदासासाठीं धनधान्यसंपत्ति रथांत भरून घेऊन आलां. तरी ज्याची सर्वांनीं इच्छा करावी, असें वैभव तुम्ही आम्हांला समुद्रावरून किंवा द्यू लोकावरून आणून द्या.

७. हे सत्यवंत आश्विहो, तुम्ही तुर्वशाजवळ असा कीं दूर असा. तेथून चांगल्या फिरणाऱ्या रथानें सूर्याच्या किरणाबरोबर आम्हांकडे या.

८. तुमचें यज्ञगामी अश्व तुम्हांला थेट आमच्या यज्ञाकडे घेऊन येवोत. हे शूरहो, सत्कृत्यें करणाऱ्या, आणि दानशूर भक्ताला धन देणारे तुम्ही येथें दर्भावर बसा.

९. हे सत्यवंतहो, ज्या रथानें तुम्ही उपासकासाठीं नित्य धन आणीत असतां, त्या सूर्याप्रमाणें तेजस्वी रथानें तुम्ही मधुर सोमरसपानार्थ इकडे या.

१०. आम्ही स्तोत्रांनीं आणि गायनांनीं विपुल संपत्तिमान अश्वींना आमच्या रक्षणार्थ मोठ्यानें बोलावीत आहोंत. हे आश्विहो, तुम्ही कण्वांच्या आवडत्या घरीं सदैव सोम पीत आला आहां, होय ना ?

सूक्त अठ्ठेचाळिसावें.

ऋषिः—कण्वपुत्र प्रस्कण्व; देवता–उषा; छंदः—विषम–बृहती, सम–सतोबृहती.

१. हे द्यूचे कन्ये उषे, तूं आम्हांसाठीं धनासहित प्रकाश दे. हे तेजस्विनी देवि, उदार अशी तूं मोठ्या संपत्तीनें आणि वैभवानें युक्त आहेस.

२. अश्वसमृद्ध, गोसमृद्ध आणि सकल संपत्ति मिळवून देणाऱ्या उषा, पुष्कळ वेळां प्रकाशल्या आहेत. तर हे उषे, तूंही मला उद्देशून गोड वाणी बोल आणि धनवंतांचें धन आम्हांकडे धाड.

३. उषा चांगली प्रकाशते.ती रथ हांकणारी देवी आंताही प्रकाशो. धनेच्छु लोक ज्याप्रमाणें समुद्रांत (नावा हाकरतात) त्याप्रमाणें ही चालून येत असतां रथ हाकारतात.

४. हे उषे, तुझ्या येण्याच्या वेळीं जे विद्वान लोक, हवि देण्याकडे आपलें मन गुंतवितात आणि कवनें करितात. तेंच स्तोत्र त्या कण्वांतला उत्तम कण्व त्याच वेळीं आज गात आहे.

५. विशेष प्रकारें भोग भोगणाऱ्या तरुण स्त्रीप्रमाणें उषा इकडे येत आहे. ती उगवतांच लोकांना प्रार्थना करण्यास लाविते. पादचाऱ्यांना चालविते आणि पक्ष्यांना उडविते.

६. जी उषा मनुष्यास आपापलीं कर्में करावयास लाविते आणि जी भक्ष्य शोधणाऱ्या प्राण्यांना इकडे तिकडे पाठविते, त्या सुंदर उषेला एके ठिकाणीं बसणें आवडत नाहीं. हे धनसंपन्न उषे, उडणारे पक्षी तुझा उदयकाल येतांच बसून राहात नाहींत.

७. ही उषा दूर अंतरावर सूर्योदयापूर्वीं आपला रथ जोडीत आहे. ही सौभाग्यशाली उषा शंभर रथांत बसून मनुष्याकडे वेगवेगळया ठिकाणीं जात आहे.

८. हिचें दर्शन होतांच सर्व जग तिला नमस्कार करतें. कारण ही सुंदरी प्रकाश पाडीत असते. द्युची ही धनसंपन्न कन्या उषा द्वेष्ट्यांना आणि हिंसक शत्रूंना हाकून लावीत असते.

९. हे द्यूचे कन्ये उषे, तूं आल्हादक प्रकाशानें शोभायमान हो आणि देवयजनकाळीं प्रकाशणारी तूं आम्हांला विपुल सौभाग्य घेऊन ये.

१०. हे सुंदरि तूं जी प्रकाशतेस त्या तुझ्या ठिकाणीं सर्वांचे प्राण आणि जीवन अवलंबून असतें. हे तेजस्वी आणि धनसंपन्न उषे, तूं आपल्या मोठ्या रथानें येऊन आमची प्रार्थना ऐक.

११. हे उषे, मनुष्य लोकांत जी नानाविध संपत्ति आहे, ती तुला प्रिय होवो. तिच्या योगानें, जे भक्त तुझी स्तुति करितात,त्यांच्या यज्ञांत कल्याणकारक देवांना घेऊन ये.

१२. हे उषे, तूं अंतरिक्षांतून सर्व देवांना सोमपानार्थ घेऊन ये. ती आम्हांला गोसमृद्ध, अश्वसमृद्ध, प्रशंसनीय अन्न आणि वीर्यशाली पुत्र देवो.

१३. जिचीं तेजस्वी आणि सुखकारक किरणें दिसूं लागलीं आहेत ती ही उषा, आम्हांस सुखकारक, उत्कृष्ट आणि सुंदर धन देवो.

१४. हे श्रेष्ठ उषे, तुला ज्या पूर्वींच्या ऋषींनीं संरक्षणार्थ आणि कल्याणाकरितां प्रार्थना केल्या, तीच प्रकाशयुक्त आणि धनसंपन्न अशी तूं आमच्या स्तोत्रांची प्रशंसा कर.

१५. हे उषे, ज्या अर्थीं आज तूं आपल्या प्रकाशानें द्युलोकाचीं दारें उघडलीं आहेस, त्या अर्थीं तूं आम्हांस निष्कंटक आणि विस्तीर्ण घर आणि गोधनसंपत्ति दे.

१६. हे धनसंपन्न आणि श्रेष्ठ उषे, तूं आम्हांला मोठीं आणि सर्व प्रकारचीं धनें आणि सुखें दे. सर्व विजयी धनानें तूं आम्हांस युक्त कर आणि अन्नसमृद्ध कर.

सूक्त एकूणपन्नासावें.

ऋषिः–कण्वपुत्र प्रस्कण्व; देवताः—उषा; छंदः–अनुष्टुभ.

१. हे उषे, तूं घोड्यांनीं द्युलोकाच्या देदीप्यमान भागांतून ये. सोमरस काढणाऱ्या भक्ताच्या घरीं तुला अरुणवर्ण घोडे घेऊन येवोत.

२. हे द्यूचे कन्ये उषे, तूं ज्या सुखकारक आणि सुंदर रथांत बसली आहेस त्याच्या योगानें तूं आज चांगले हवि देणाऱ्या मज भक्ताचें संरक्षण कर.

३. हे गौरवर्ण उषे, तूं आलीस म्हणजे उडणारे आणि द्विपाद व चतुष्पाद प्राणी सुद्धां द्युलोकाच्या कांटापर्यंत तुला सामोरे जातात.

४. कारण जेव्हां तूं उगवतेस, तेव्हां तूं आपल्या किरणांनीं सर्व आकाशभर प्रकाश पाडतेस. हे उषे, त्या तुला धनेच्छु कण्व स्तोत्रांनीं बोलावीत आहे.

सूक्त पंन्नासावें.

ऋषिः---कण्वपुत्र प्रस्कण्व; देवताः-सूर्य; छंदः-१-९ गायत्री, १०-१३ अनुष्टुभ.

१. सूर्याला सर्वांनीं पहावें म्हणून त्या सर्वज्ञ देवाला त्याचे किरणरूप घोडे घेऊन येत आहेत.

२. सर्वदर्शी सूर्य उगवल्याबरोबर चोराप्रमाणें नक्षत्रें आणि रात्र पळून जातात.

३. ह्याचे पताकाभूत अग्नीप्रमाणें लकलकणारे किरण लोकांना क्रमाक्रमानें दृष्टीस पडतात.

४ हे सूर्या, सर्वदर्शी आणि प्रकाशमान असा तूं महावेगानें जाणारा आहेस. तूं सर्व आकाशावर प्रकाश पाडतोस.

५. सर्वांना सूर्याचें दर्शन व्हावें म्हणून तूं देवासमोरून, माणसासमोरून आणि सर्वांसमोरून उगवतोस.

६. हे पावक वरुणा, डोळ्यानें कामकाजांत गुंतलेल्या लोकांना तूं पाहतोस.

७. हे सूर्या, तूं द्युलोकांतून आणि विस्तीर्ण अंतरिक्षांतून सर्व प्राण्यांना पहात आणि रात्र व दिवस निर्माण करीत संचार करतोस.

८. हे सर्वसाक्षी सूर्यदेवा, दीप्तिकेश, अशा तुला सात हरिद्वर्ण घोडे घेऊन जात असतात.

९. सूर्य रथाच्या कन्यका, ज्या दोषरहित अशा सात घोड्या आहेत त्यांस जोडतो.आपोआपच जोडल्या जाणाऱ्या त्यांच्या योगानें तो जोडला जात आहे.

१०. आम्ही अंधःकाराच्या वर श्रेष्ठ तेजाकरितां पाहात असतां सर्वांत श्रेष्ठ देव जो सूर्य त्याच्या परम श्रेष्ठ तेजाप्रत पावलों.

११. हे अनुकूलतेजों सूर्या, तूं आज उगवून आणि अत्यंत उंच द्यू लोकांवर चढून माझा क्षयरोग आणि शरीरास फिकट करणारा बाह्यरोग नाहींसा कर.

१२. आमचें शरीर फिकट करणारा रोग आम्ही शुक, आणि रोपणाका यांच्या ठिकाणीं ठेवितों आणि हरिद्रव वृक्षाच्या ठिकाणीं ठेवतों.

१३. हा आदित्य, आपल्या सर्व सामर्थ्यानिशीं उगवला आहे. आणि त्यानें आमचा द्वेष करणाऱ्या शत्रूंस माझ्या ताब्यांत दिलें आहे. मी शत्रूंच्या ताब्यांत कधींही न जावो.

सूक्त एकावन्नावें.

ऋषिः—आंगिरसपुत्र सव्य; देवता-इन्द; छंदः--१-१३ जगती. १४-१५ त्रिष्टुभ

१. मेघस्वरूप, बहुस्तुत, यज्ञार्ह, दयानिधि, अशा इंद्राला स्तोत्रांनीं आनंदित करा. ज्याचीं मनुष्यहितकारक कृत्यें सूर्यकिरणाप्रमाणें सर्वत्र पसरतात, त्या दानशूर आणि बुद्धिमान इंद्राला कल्याणार्थ भजा.

२. साह्यकर्ते, मरुत ह्या महाफलदात्या आणि अंतरिक्ष व्यापून टाकणाऱ्या अत्यंत बलवान इंद्रालाच भजले. चतुर, बलशाली, आणि प्रियभाषी असे ते मरुत, वीर्यसंपन्न इंद्राला स्तविते झाले.

३. तूंच अंगिरसासाठीं गाईचा गोठा उघडलास, आणि अत्रीला शंभर दरवाजे असलेल्या ठिकाणांतून मार्ग दाखविता झालास. विमदाला केवळ हविरन्नाच्या योगानेंच तूं धन दिलेंस आणि वावयानाच्या युद्धांत तूं आपलें वज्र चालवलेंस.

४. तूं उदकांचीं झांकणें उघडलींस, व पर्वतावर तूं विपुल धन ठेविलेंस. हे इंद्रा, जेव्हां तूं आपल्या सामर्थ्यानें वृत्राला ठार केलेंस आणि अहीला नाहींसें केलेंस. तेव्हां सर्वांना पाहाण्यासाठीं तूं सूर्याला द्यु लोकीं चढविलेंस.

५. जे आपल्याच तोंडांत हविरन्नांनीं हवन करीत होते अशा त्या कपट करणाऱ्यांना तूं कपटानें फुंकून लावलेंस. हे लोकहितचिंतका, तूं पिप्रूचीं नगरें फोडलींस, आणि दस्यूंना मारण्याच्या प्रसंगीं तूं ऋजिश्व्याचें संरक्षण केलेंस.

६. तूं शुष्णाला मारतांना कुत्साचें संरक्षण केलेंस. आणि शंबराला अतिथिग्वाच्या ताब्यांत दिलेंस मोठा पराक्रमी तो अर्बुध, पण त्याला सुद्धां तूं पायानें चिरडून टाकलेंस. पुरातन कालापासून दस्यूंचा नाश करण्यासाठीं तूंच जन्मला आहेस.

७. तुझ्या ठिकाणीं सर्व शक्ति एकत्रित झाल्या आहेत. तुझें मन सोमपानार्थ आनंदित होतें. तुझ्या खांद्यावर वज्र शोभतें. तूं शत्रूंच्या सर्व बळांचा नाश करून टाक.

८. आर्य कोण आणि दस्यू कोण, हें तूं लक्षांत घे. कर्महीन दस्यूंना शासन करून त्यांना यज्ञपरायण (आर्यांच्या) हस्तगत कर. यज्ञ करणाऱ्यांचा तूं सामर्थ्यसंपन्न नायक हो. तुझे ते सर्व पराक्रम यज्ञामध्यें गाणें मला आवडतें.

९. अधार्मिकांना धार्मिकांच्या स्वाधीन करणारा आणि अभक्तांचा भक्तांकडून संहार करणारा इंद्र श्रेष्ठ आहे. आधींच मोठा असूनही आणखी मोठा होणाऱ्या, आणि द्यू लोकाला पोंचणाऱ्या इंद्राची स्तुति करणारा वम्र संशयातीत झाला.

१०. जेव्हां उशनानें आपल्या सामर्थ्यानें तुझ्या सामर्थ्यास जोर आणला, तेव्हां त्या वाढलेल्या बळानें द्यावापृथ्वी एकमेकापासून दूर हटलीं. हे लोकहितचिंतका, मनांत येतांच जुंपले जाणारे वायूचे घोडे तुजप्रीत्यर्थ हविरन्नें तुजकड घेऊन गेले.

११. जेव्हां इंद्र उषना काव्यावर प्रसन्न झाला, तेव्हां वाकडे वाकडे चालणाऱ्या आणि अधिक वाकडे चालणाऱ्या घोड्यावर तो बसला आणि त्या प्रतापी इंद्रानें पळून जात असलेल्या मेघांतून, प्रवाहाच्या द्वारें उदकें खालीं सोडलीं. आणि शुष्णाचीं बळकट नगरें फोडलीं.

१२. हे इंद्रा, वीर्योत्पादक असा तूं येथें पिण्यासाठीं रथांत बसतोस आणि शार्यांताचे येथें अर्पण केलेले सोमरस पिऊन आनंदित होतोस. सोमरस काढला असतां तुला ज्याप्रमाणें आनंद होतो, त्याप्रमाणें श्लोकरूपी घोड्यावर बसून तूं द्यू लोकावर चढतोस.

१३. हे इंद्रा, तुझी स्तुती करण्याविषयीं तत्पर, सोमरस काढणारा आणि श्रेष्ठ अशा कक्षीवानाला तूं वृचया नामक तरुणी दिलीस. हे सत्कृत्यें करणाऱ्या इंद्रा, तूं वृषणश्व नामक भक्ताची मेना नांवाची स्त्री झालास. तुझीं हीं सर्व कृत्यें यज्ञामध्यें गाण्यास युक्त आहेत.

१४. दारिद्र्यावस्था प्राप्त झाली असतांही इंद्र चांगलीं कर्में करणाऱ्याच्या येथें जात असतो. पज्रांच्या येथें इंद्राची स्तुति दाराच्या खांबाप्रमाणें स्थिर असते. घोडे मिळविणारा, गाई मिळविणारा, रथ मिळविणारा, आणि धन मिळविणारा दानशूर इंद्र सर्व संपत्तीचा राजा होय.

१५. हें स्तोत्र बलशाली, स्वयंप्रकाशमान, सत्यपराक्रमी आणि प्रतापी इंद्राला उद्देशून म्हटलें आहे. हे इंद्रा, या संग्रामांत सर्ववीर आणि विद्वान यांच्यासहवर्तमान आम्ही तुझ्या आश्रयाखालीं रहावें.

सूक्त बावन्नावें.

ऋषिः---आंगिरस सव्य; देवता–इन्द्र; छन्दः— १३–१५ त्रिष्टुभ; अवशिष्ट जगती.

१. ज्याला उद्देशून एकाच वेळीं शेकडो स्तोते गात असतात अशा त्या मेषस्वरूप आणि स्वर्गप्राप्ती करून देणाऱ्या इंद्राची महती गा. वेगवान अश्व यज्ञगामी रथाला जोडावे, त्याप्रमाणें मी इंद्राला रक्षणार्थ चांगल्या स्तोत्रांनीं युक्त करीन.

२. सोमयुक्त अन्नानें अतिशय आनंदित झालेल्या इंद्रानें उदकांस अडवून धरणाऱ्या वृत्राला ठार मारून उदकें खालीं पाडलीं. तेव्हां हजारों संरक्षणांनीं युक्त असा तो, उदकांमध्यें पर्वत स्थिर राहातो, त्याप्रमाणें स्थिर राहिला आणि उलट बलिष्ठ झाला.

३. तो इंद्र शत्रूचा कट्टा शत्रू होय. तो अंतरिक्ष व्यापून असतो. आल्हादजनक अशा त्याला बुद्धिमान लोक सोमरसानें वृद्धिंगत करतात. अशा रीतीनें अत्यंत दानशूर झालेल्या इंद्राला मी चांगलें कर्म करण्याच्या इच्छेनें स्तुतिपूर्वक बोलावीत आहे. तो आम्हांला इष्टप्राप्ति देवो.

४. समुद्राकडे वाहात जाणाऱ्या सुंदर नद्या ज्याप्रमाणें समुद्राला भरून टाकतात, त्याप्रमाणें ज्या इंद्राला दर्भासनावर स्थापिलेले सोमरस भरून टाकतात, त्या इंद्राला बलशाली, अजातशत्रू, आणि सौंदर्यवान, (मरुत) वृत्रहननाच्या कामीं साह्यकर्ते झाले.

५. सोमानें बलशाली झालेल्या वज्रधारी इंद्रानें त्रितप्रमाणें बलाचीं आच्छादनें फोडलीं. तेव्हां मदयुक्त होऊन लढणाऱ्या ह्या इंद्राचे साह्यकर्ते मरुत, नद्या सखल प्रदेशाकडे वाहतात त्याप्रमाणें, आपल्या अंगापासून वृष्टि करणाऱ्या बलाच्या अंगावर तुटून पडले.

६. हे इंद्रा, जेव्हां तूं दुर्धर वृत्राच्या गालावर वज्रप्रहार करून त्यास खालीं पाडिलेंस, तेव्हां तुझी दीप्ति आसमंतांत पसरली. तुझा प्रताप चमकूं लागला आणि वृत्र अंतरिक्षाच्या तळाशीं मरून पडला.

७. हे इंद्रा, ज्याप्रमाणें जलप्रवाह जलाशयाल भरून टाकतात, त्याप्रमाणें तुझें बल वाढविणारीं हीं स्तोत्रें तुला भरून टाकतात. तुला योग्य असें बळ त्वष्ट्यानेंच वाढविलें. आणि पराभव करण्यास समर्थ असें वज्र त्यानेंच तयार केलें.

८. हे समस्तबलशाली इंद्रा, तूं मनुष्याकडे जाण्याला पाण्याला वाट मिळावी, म्हणून अश्वारूढ होऊन वृत्राला ठार मारिलेंस. आणि हातांत पोलादी

वज्र धरलेंस आणि सूर्य दिसावा म्हणून त्याला आकाशांत स्थापिलेंस.

९. जेव्हां लोकांनीं भयभीत होऊन मोठें आल्हादकारक, बलयुक्त आणि स्वर्गावर चढणारें स्तोत्र केलें, तेव्हां मनुष्यासाठीं लढणारे मित्रभूत आणि लोकसेवक मरुत स्वर्गीय इंद्राचें अभिनंदन करते झाले.

१०. सोमरसानें आनंदित होऊन द्यावापृथ्वींना उपद्रव देणाऱ्या वृत्राचें शिर जेव्हां तूं आपल्या सामर्थ्यानें तोडलेंस, तेव्हां अहीच्या गर्जनेनें भयभीत होऊन महाबलवान द्यूलोकसुद्धां कंपायनमान झाला.

११. हे इंद्रा, जर पृथ्वी दसपट होईल आणि सर्व मनुष्यें सतत जगतील, तर हे धनवंता, तुझ्या शक्तीच्या आणि पराक्रमाच्या योगानें तुझा तो प्रवाह द्यूलोकाइतका मोठा होईल.

१२. हे धीरचित्ता, आणि स्वसंरक्षणसमर्थ इंद्रा, तूं ह्या विस्तृत अंतरिक्षाच्या आणि द्यू लोकाच्या पार राहून पृथ्वीला आपल्या सामर्थ्याचें चिन्ह म्हणून आमच्या रक्षणार्थ निर्माण केलेंस. तूं स्वर्गलोक, अंतरिक्ष आणि द्यूलोक यांना वेष्टून असतोस.

१३ तूं या पृथिवीचें प्रतिमान आहेस. मोठमोठे वीर जेथें राहतात, त्या स्वर्गाचा तूं अधिपति आहेस. तूं आपल्या माहिम्यानें सर्व अंतरिक्ष भरून टाकलें आहेस. तुझ्यासारखा दुसरा कोणीहि नाहीं, हें खरें आहे.

१४. ज्यांच्या मोठेपणाचा अंतः द्यावापृथ्वींना, समुद्रांना आणि अंतरिक्षालाही लागला नाहीं किंवा मदयुक्त होऊन स्ततःच वृष्टी करणाऱ्या वृत्राशीं युद्ध करीत असतां ज्याच्या बळाचा अंत लागला नाहीं त्या एकट्याच इंद्रानें सर्व वस्तु अनुक्रमानें निर्माण केल्या.

१५. हे इंद्रा, त्या युद्धांत जेव्हां तूं आपल्या अत्यंत तीक्ष्णधारी वज्रानें वृत्राच्या तोंडावर प्रहार केलास, तेव्हां तेथेंच मरुतांनीं तुझें स्तोत्र केलें आणि सर्व देवांनीं तुझें अभिनंदन केलें.

सूक्त त्रेपन्नावें.

ऋषिः—आंगिरस सव्य; देवताः-इंद्र; छंद–१–९ जगती, १०-११ त्रिष्टुभ.

१. श्रेष्ठ इंद्राला चांगलें स्तोत्र अर्पण करूं या. आणि यजमानाच्या घरीं इंद्राची चांगली स्तुति करूं या. कारण इंद्र, निजलेल्यांच्याप्रमाणें (अगदीं अकल्पित रीतीनें) धन मिळवून देतो आणि जो धन देतो, त्याच्याबद्दल कोणीहि वाईट स्तुती बोलत नसतात.

२. हे इंद्रा, तूं अश्व देणारा, गाई देणारा, आणि धान्य देणारा आहेस. तूं संपत्तीचा अधिपति आहेस. तूं लोकशासक, पुरातन, आणि इच्छा पूर्ण करणारा, आणि मित्रांचा मित्र आहेस. म्हणून तुला आम्ही हें स्तोत्र गात आहोंत.

३. हे ज्ञानवान व अनेकांना पराभूत करणाऱ्या आणि देदीप्यमान इंद्रा, ही जिकडे तिकडे सर्वत्र तुझीच संपत्ति दिसत आहे. म्हणून हे जयशीला, ती सर्व एकत्र करून आम्हाकडे आण. तुझी आशा करणाऱ्याचे मनोरथ पूर्ण कर.

४. त्या तेजानें आणि त्या सोमरसानें प्रसन्न होत्सातां इंद्र गाई आणि घोडे यांच्या योगानें दारिद्र्य नाहींसें करतो. सोमरसांनीं इंद्राच्या साहाय्यानें आम्ही शत्रूंचा पराभव करून निःशत्रू होऊं आणि धन मिळवूं.

५. हे इंद्रा, आम्ही संपत्तीनें, धनानें आणि अतिशय आल्हादकारक आणि तेजस्वी घोड्यांनीं युक्त व्हावें. त्याचप्रमाणें वीर्यशाली पुत्रांनीं युक्त, गोसंपन्न, अश्वसंपन्न आणि तेजस्वी बुद्धीनें युक्त असें आम्ही व्हावें.

६. हे सत्कर्माच्या अधिपते, जेव्हां तूं स्तोत्रकर्त्या यजमानासाठीं दश सहस्रावधी, अनिवार्य शत्रू मारून टाकलेस त्या शत्रूहननाच्या प्रसंगीं ह्या सोमरसांनीं तुला माद आणला. आणि त्या हवींनीं तुला बलवान केलें.

७. हे इंद्रा, जेव्हां नमी नांवाच्या मित्राच्या साहाय्यानें नमूची नांवाच्या कपट्याला लांब नेऊन मारलेंस तेव्हां तूं अतिशय निकरानें युद्ध केलेंस. आणि आपल्या सामर्थ्यानें एकामागून एक नगरांचा विध्वंस केलास.

८. तूं अतिथिग्व राजाच्या अत्यंत तेजस्वी चक्रानें करंज्याला आणि पर्णयाला ठार केलेंस. तूं ऋजिश्वानें वेढा घातलेलीं वंगृदाचीं शंभर नगरें जमीनदोस्त केलींस.

९. तूं मदतीशिवाय सुश्रवसानें ज्यांच्यावर हल्ला केला होतास अशा वीस राजांना त्यांच्या साठ हजार नव्याण्णव रथासह दुर्धर चक्रानें विच्छिन्न केलेंस. त्यामुळें तुझी सर्वत्र ख्याति झाली.

१०. हे इंद्रा, तूं आपल्या रक्षणांनीं सुश्रावसाला रक्षिलेंस आणि तूं आपल्या संरक्षणांनीं तुर्वयाणाला

रक्षिलेंस. तूं कुत्साला, अतिथिग्वाला आणि आयूला, ह्या मोठ्या आणि तरुण राजाच्या ताब्यांत दिलेंस.

११. हे इंद्रा, देवांनीं यज्ञसमाप्तीपर्यंत रक्षिलेले जे आम्ही मित्र ह्या आमचें अत्यंत कल्याण असावें. तुझ्या कृपेनें आम्ही वीरपुत्रसंपन्न, आणि दीर्घायुष्यसंपन्न होत्साते तुझी स्तुति करूं.

सूक्त चोपन्नावें.

ऋषिः—आंगिरस सव्य; देवताः—इंद्र; छंदः—५. ६.८.९.११ त्रिष्टुभ, अवशिष्ट जगती.

१. हे धनवंता, तूं आम्हांला ह्या युद्धामध्यें आणि दुःखामध्यें ढकलूं नकोस. तुझ्या बलाचा अंत लागत नाहीं. तूं मोठी गर्जना करीत नद्या आणि वृक्ष यांना गर्जवितोस. तेव्हां लोक भयानें एकत्र झाल्यावांचून कसे राहतील ?

२. शक्तिवंत आणि बुद्धिमंत शक्राचें स्तोत्र म्हणा. स्तोत्र ऐकणाऱ्या इंद्राची मोठी स्तुति करा. तो आपल्या महान् वीर्याच्या योगानें, वीर्यशाली पुरुष स्त्रीला वश करतो त्याप्रमाणें उभय द्यावापृथिवींना वश करतो.

३. हे स्तोत्या, तेजस्वी आणि श्रेष्ठ इंद्राला सुखकर स्तोत्र म्हण. ह्या धैर्यशाली इंद्राचें मन धैर्ययुक्त आहे. अत्यंत कीर्तिमान, बुद्धिमान, व शत्रूनाशक असा त्या इंद्राचा हा घोडे पुढें जोडलेला रथ बलिष्ठ आहे.

४. सोमानें आवेशयुक्त होत्साता तूं जेव्हां आपल्या हातांत तीक्ष्ण वज्र घेऊन करटी सेनेशीं युद्ध केलेंस, तेव्हां तूं आपल्या शत्रुहिंसक बलानें महान द्यूलोकाचें शिखर हलविलेंस आणि शंबराला आपल्या पराक्रमानें विदारित केलेंस.

५. हे इंद्रा, तूं गर्जना करणाऱ्या आणि शोषून टाकणाऱ्या, शुष्णाच्या अनुयायांसकट त्याच्या डोक्यावर मेघोदकें फोडलींस. तेव्हांपासून तूं आपल्या उत्साही आणि प्रतापी मनानें आजहि तें कृत्य करतोस. तेव्हां तुझ्याहून श्रेष्ठ कोण आहे ?

६. तूं नर्याला, तुर्वशाला, यदूला, तुर्वीतीला आणि वय्याला रक्षिलेंस. युद्धप्रसंगीं तूं रथाला आणि एतशाला रक्षिलेंस. तूं नव्याण्णव नगरें फोडिलींस.

७. जो मनुष्य इंद्राला हवि अर्पण करून त्याची आज्ञा पाळतो, अथवा जो हविपूर्वक स्तोत्रें गातो तोच मनुष्य सज्जनपालक असा राजा होऊन उत्कर्ष पावतो. त्याच्यासाठींच द्यू लोकांतून पोषणकारक वृष्टि होत असते.

८. इंद्राच्या बळाला जोड नाहीं. त्याच्या बुद्धीला जोड नाहीं. हे सोमपान करणारे आपल्या कर्मांच्या योगानें उत्कर्ष पावोत. कारण हे इंद्रा, जे तुला हवि देतात, ते मोठें बळ आणि पौरुष प्राप्त करतात.

९. हे इंद्रा, हे विपुल, ग्राव्यांनीं काढिलेले, चमस पात्रांत ठेविलेले इंद्रपेय सोमरस तुझ्याकरतांच आहेत. तर ते तूं भक्षण कर आणि तृप्त हो. आणि आम्हांला संपत्ति देण्याचा निश्चय कर.

१०. उदकांच्या धारांना अडविणारा अंधःकार वृत्राच्या पोटामध्यें पर्वतरूपानें राहिला होता, त्याला ठार करून इंद्रानें वृत्रानें लपविलेलीं उदकें एकामागून एक खालीं नदीरूपानें वाहविलीं.

११. हे इंद्रा, तो तूं आम्हांस सुखवर्धक यश दे आणि मोठें विजयशाली आणि श्रेष्ठ प्रकारचें बल दे. त्याचप्रमाणें आम्हांस धनसंपन्न करून आणि विद्वान करून रक्षण कर. तूं आम्हांस धन, अन्न आणि संतति दे.

सूक्त पंचावन्नावें.

ऋषिः--आंगिरस सव्य; देवता-इंद्र; छंदः--जगती.

१. ह्या इंद्राचा महिमा द्युलोकांहूनहि मोठा आहे. पृथ्वीसुद्धां मोठेपणानें त्याच्या तोलाची नाहीं. तो भयंकर, बलवान, लोकांना देदीप्यमान दिसणारा इंद्र बैलाप्रमाणें आपलें वज्र तेजासाठीं तीक्ष्ण करीत असतो.

२. ज्याप्रमाणें नद्या समुद्राप्रत जातात, त्याप्रमाणें सर्वत्र पसरलेले समुद्राचें उदक तो शोषून घेतो. जेव्हां त्याला सोमपानाची इच्छा होते, तेव्हां तो योद्धा आपल्या बलानें नित्य स्तवनाची इच्छा करीत असतो.

३. हे इंद्रा, तूं त्या पर्वताला अन्नासाठीं नाहींसा करतोस. तूंच श्रेष्ठ प्रकारच्या धनांचा आणि धर्मांचा अधिपति आहेस. उग्र इंद्र सर्व कर्मांमध्यें पुढें आहे. तो आपल्या सामर्थ्यानें सर्व देवांमध्यें प्रतिष्ठितपणानें असतो.

४. लोकांमध्यें आपलें सुंदर बळ प्रकट करणाऱ्या इंद्राचीच स्तोते स्तुति करतात. जेव्हां धनवान इंद्राची स्तोते रक्षणेच्छेनें स्तुति करतात, तेव्हां तो वीर्यवान आणि रमणीय इंद्र प्रसन्न होतो.

५. तोच इंद्र योद्धा आहे. तो आपल्या सामर्थ्याच्या योगानें लोकहितार्थ मोठमोठीं युद्धें करतो; आणि म्हणून घातक वज्राचा वारंवार प्रहार करणाऱ्या दीप्तिमान इंद्रावर लोक श्रद्धा ठेवतात.

६. तो कीर्तीची इच्छा करणारा इंद्र, पृथ्वीएवढा मोठा होऊन आपल्या सामर्थ्याच्या जोरावर कृत्रिम घरांचा नाश करता झाला. भक्तासाठीं सूर्यासारखें अनाच्छादित तेज उत्पन्न करणारा आणि चांगलीं कृत्यें करणारा तो उदकांस खालीं सोडून वाहविता झाला

७. हे सोमपा इंद्रा, तुझें मन दानप्रवृत्त असो. हें स्तुति ऐकणाऱ्या तूं आपले घोडे आमच्याकडे वळीव. हे इंद्रा, तुझे जे सारथी आहेत ते घोड्यांना ताब्यांत ठेवणारे आहेत. तुला तुझे वेगवान घोडे दुखविणार नाहींत.

८. तूं आपल्या हातांमध्यें अक्षय धन धारण करतोस. कीर्तिमान असून तुझ्या अंगीं अजिंक्य बळ आहे. हे इंद्रा, पाणी काढणारे लोक विहिरीभोंवतीं जमतात, त्याप्रमाणें यज्ञकर्ते तुझ्या अनेक पराक्रमाभोंवतीं असतात.

सूक्त छपन्नावें.

ऋषिः--आंगिरस सव्य; देवता-इंद्र; छंदः--जगती.

१. घोडा जसा घोडीवर चढतो तसा हा सोमपी इंद्र, यजमानाच्या चमस पात्रांत खालीं ठेवलेल्या विपुल सोमरसावर ताव मारीत आहे. पिवळे घोडे जुंपलेल्या, सोनेरी रथांत बसून मोठ्या कार्यासाठीं तो बलकर सोम प्राशन करतो.

२. समुद्रावर संचार करावयाचा असला म्हणजे धनार्थी लोक ज्याप्रमाणें समुद्राकडे जातात, त्याप्रमाणें अनेक स्तोते हवि अर्पण करून त्या इंद्राला स्तवितात. करितां, स्त्रिया जशा पर्वतावर चढतात, त्याप्रमाणें बलशाली आणि महान यज्ञाचा अधिपति अशा इंद्रावर तूं स्तुतीनें चढ.

३. तो इंद्र, महान प्रतापी आणि पवित्र आहे. त्याचें शत्रुहिंसक बल युद्धामध्यें पर्वताच्या शिखराप्रमाणें प्रकाशतें. त्याच्या योगानें पोलादी आणि दुर्धर इंद्र सोमरसाच्या मदामध्यें कपटी शुष्णाला बिड्या घालून कारागृहांत ठेविता झाला.

४. हे स्तोत्या, जेव्हां त्वां वाढविलेली शक्तिदेवी, सूर्य उषेच्या बरोबर असतो त्याप्रमाणें इंद्राच्या साहाय्याकरतां त्याच्याबरोबर असते, तेव्हां तो शत्रूंना रडविणारा इंद्र आपल्या प्रतापी बलानें अंधःकाराला नाहींसा करतो आणि समूळ पाप नाहींसें करतो.

५. हे इंद्रा, शत्रूनाशक अशा त्वां जेव्हां द्यूलोकाच्या प्रांतावरून अविनाशी किरण पाडलेस, तेव्हां तूं सोमपानानें उत्साहित होत्साता युद्धामध्यें वृत्राला ठार मारलेंस आणि पाण्यांचा सांठा खालीं वाहविलास.

६. हे इंद्रा, महान अशा त्वां आपल्या पराक्रमानें द्यूलोकांतील उदकें पृथ्वीवर स्थापन केलींस. तूं सोमपानानें उत्साहित होऊन उदकांना वाट दिलीस आणि वृत्राच्चीं पाषाणमय आवारें आपल्या बलानें फोडलींस.

सूक्त सत्तावन्नावें.

ऋषिः--आंगिरस सव्य; देवता-इंद्र; छंदः--जगती.

१. अत्यंत दानशूर, मोठा, विपुलधनसंपन्न, सत्यपराक्रमी, आणि बलिष्ठ अशा इंद्रासाठीं मी ही स्तुति करीत आहें. त्याचें औदार्य उतारावरील उदकाप्रमाणें अनिवार्य व सर्वव्यापी असून तें उपासकाला बल येण्यासाठीं प्रकट होत असतें.

२. जेव्हां इंद्राचें सुंदर, शत्रूंना ठार मारणारें सोनेरी वज्र पर्वताच्या प्रमाणें वृत्रावर बिनचूक पडलें, तेव्हां सर्व जग तुझ्या प्रीत्यर्थ यज्ञ करण्यास प्रवृत्त झालें आणि उपासकांनीं अर्पिलेले सोम उताराकडे वाहाण्याप्रमाणें तुझ्याकडे वाहूं लागले.

३. हे उषेप्रमाणें सुंदर स्त्रिये, ह्या भयंकर आणि स्तुत्य इंद्राला यज्ञांत नमस्कारपूर्वक हवि अर्पण कर. कारण त्याचें तेज, कीर्ति, बळ, प्रकाश, हीं त्याच्या धावणाऱ्या घोड्याप्रमाणें हविरन्न घेण्याकरितां प्रकट झालीं आहेत.

४. हे बहुस्तुत आणि धनाधिपते इंद्रा, ज्याअर्थीं आम्ही तुजवर अवलंबून चालतों, त्याअर्थीं आम्ही तुझेच आहोंत. हे स्तुतिप्रिया, तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाहि स्तुति प्राप्त होत नाहीं, म्हणून पृथ्वीप्रमाणें आमच्या त्या स्तुतीची तूं इच्छा कर.

५. हे इंद्रा, तुझें वीर्य फार मोठें आहे. आम्ही तुझे आहोंत. हे धनवंता, तूं ह्या स्तोत्याची इच्छा पुरी कर. महान द्युलोकहि वीर्याच्या बाबतींत तुझ्या मागें आहेत आणि ही पृथ्वीसुद्धां तुझ्या बळापुढें नमली आहे.

६. हे वज्रधारी इंद्रा, तूं त्या मोठ्या आणि विस्तीर्ण पर्वताचे तुकडे तुकडे करता झालास. त्यानें

अडवून ठेवलेल्या उदकांना वाहाण्याकरतां तूं खालीं सोडितां झालास. खरोखर सर्व बळ केवळ तुझ्याच ठिकाणीं एकवटलें आहे.

सूक्त अठ्ठावन्नावें.

ऋषि:—नोधा गौतम; देवता-अग्नि; छन्द:—१-५ जगती, ६-९ त्रिष्टुभ.

१. बलानें उत्पन्न झालेला, अमर आणि होता अग्नि जेव्हां यजमानाचा दूत होतो, तेव्हां तो ताबडतोब अरणींतून बाहेर पडतो. तो अग्नि जवळच्या मार्गानें अंतरिक्षांतून जातो, आणि देवविषयक यज्ञांत हवि देऊन त्यांचें यजन करतो.

२. जरारहित अग्नि आपलें भक्ष्य ताबडतोब घेऊन मग भक्षण करण्याच्या इच्छेनें समिधावर उभा राहातो. घृतानें शिंपडलेल्या अग्नीची पाठ घोड्याच्या पाठीप्रमाणें शोभते. तो द्युलोकाच्या शिखरापर्यंत पोचणारा मोठा नाद करतो.

३. हवि नेणारा, रुद्र आणि वसु यांनीं पुढें केलेला, धन जिंकणारा, अमर आणि होता अग्नि स्थानापन्न झाला आहे. स्तुती केलेला हा देव उपासकाचे घरीं सतत धन आणून देतो.

४. वातप्रेरित अग्नि, ज्वालांनीं मोठा शब्द करीत उंच झाडावर सहज पसरतो. हे प्रदीप्तज्वाल व अमर अग्ने, जेव्हां तूं एकदम महावृक्षावर उडी घेतोस तेव्हां तुझा मार्ग काळा होत असतो.

५. गाईच्या कळपांत बळकट बैल फिरतो, त्याप्रमाणें ज्वालामुख आणि वातप्रेरित अग्नि वनांत फिरतो आणि आपल्या तेजानें सर्व अंतरिक्ष व्यापून टाकतो. अशा त्या अग्निरूप पक्ष्याला सर्व स्थावरजंगम संपत्ति मिळते.

६. हे अग्ने, होता, श्रेष्ठ, अतिथि, दिव्य जनांना (देवांना) सुखकारक, तेजाप्रमाणें सुंदर दिसणारा, सुलभतेनें बोलविला जाणारा अशा तुला भृगूंनें मनुष्यामध्यें स्थापिलें आहे.

७. उत्तम यजनकर्ता आणि होता म्हणून ज्याला सात ऋत्विज बोलावितात, आणि ज्याची यज्ञामध्यें योजना करतात अशा त्या सकल संपत्तीच्या अधिपति अग्नीला मी हविरन्न अर्पण करतों आणि धनाची याचना करतों.

८. हे बलपुत्रा, हे अनुकूलदीप्तिमान अग्ने, तूं आज आम्हा स्तोत्यांना अक्षय सुख दे. हे शक्तिपुत्रा अग्ने, तूं या स्तोत्याचें संकटापासून लोखंडाच्या किल्ल्यांनीं रक्षण कर.

९. हे प्रकाशमान अग्ने, तूं स्तोत्यांचें कवच हो. हे धनवन्ता धनसंपन्नाचें तूं रक्षण कर. हे अग्ने, तुझी स्तुति करणाऱ्याचें पापापासून रक्षण कर. बुद्धिसंपन्न अग्नि प्रातःकाळीं लवकर येत जावो.

सूक्त एकोणसाठावें.

ऋषि:—नोधा गौतम; देवता:—वैश्वानर अग्नि; छंद:– त्रिष्टुभ.

१. हे अग्ने, दुसरे अग्नि तुझ्या शाखा होत. सर्व अमरलोक तुझ्याच ठिकाणीं आनंद पावतात. हे वैश्वानरा, तूं मनुष्यांचा नाभि आहेस. तूं खांबाप्रमाणें लोकांना आधारभूत आहेस.

२. अग्नि हा द्युलोकाचा माथा आणि पृथ्वीचा नाभि आहे. तो द्यावापृथ्वीचा अधिपति झाला आहे. हे वैश्वानरा, त्या तुला देवांनीं आर्यलोकासाठीं ज्योतिरूपानें निर्माण केलें.

३. सूर्याच्या ठिकाणीं किरण आहेत, त्याप्रमाणें वैश्वानर अग्नीच्या ठिकाणीं अक्षय संपत्ति वास करते. पर्वतांवर औषधींमध्यें, पाण्यामध्यें किंवा मनुष्यामध्यें जें जें आहे त्या सर्वांचा तूं राजा आहेस.

४ द्यावापृथ्वी आपल्या पुत्राकरितांच जणूं विस्तीर्ण झाली. समर्थ स्तोता तेजस्वी, सत्यवान, अत्यंत पराक्रमी अशा वैश्वानर अग्नीला, मनुष्य दात्याची स्तुति करतो त्याप्रमाणें हीं पुरातन स्तोत्रें अर्पण करीत आहे.

५. हे सर्वज्ञ वैश्वानरा, मोठ्या द्युलोकापेक्षांसुद्धां तुझा महिमा मोठा आहे. मानवी सृष्टीचा तूं राजा आहेस. युद्धाच्या योगानें तूं देवासाठीं धन प्राप्त करतोस.

६. ज्या वृत्रहन्त्या वैश्वानराची मानव सेवा करतात त्या बलशाली वैश्वानराचें माहात्म्य आपण चांगलें गावें. वैश्वानर अग्नीनें दस्यूंनां ठार मारलें. उदकांचा वर्षाव केला आणि शंबराला ठार केलें.

७. सकल मनुष्यांचा अधिपति, अत्यंत प्रकाशमान असा वैश्वानर अग्नि आपल्या माहात्म्यानें भरद्वाजाच्या येथें हवन केला जातो. तो सत्यभाषी अग्नि शात-

वनेयाच्या आणि पुरुणीथाच्या येथें शेंकडों स्तुतींनीं स्तविला जातो.

सूक्त साठावें.

ऋषिः— नोधा गौतम; देवता--अग्नि; छंदः— त्रिष्टुभ.

१. हवी वाहून नेणारा, यज्ञाचा ध्वज, चांगल्या रीतीनें रक्षण करणारा, ताबडतोब हवि पोचविणारा, दूत, दोन मातांचा पुत्र, धनाप्रमाणें प्रख्यात, अशा अग्नीला मातरिश्व्यानें भृगूकरतां आणलें.

२. याची आज्ञा, हविर्भाग इच्छिणारे देव आणि मर्त्य माणसें दोघेहि मानतात. सूर्योदयाच्या पूर्वींच हा होता, पूज्य, बुद्धिमान, आणि सर्वाधिपति अग्नि स्थापन झाला आहे.

३. युद्धप्रसंगीं आयुष्य इच्छिणारे, यज्ञ करणारे आणि हविरत्नें अर्पण करणारे लोक ज्याला उत्पन्न करतात, त्या उत्पन्न झालेल्या मधुर हवि भक्षण करणाऱ्या अग्नीला अंतःकरणपूर्वक केलेली आणि कीर्तिकर स्तुति प्राप्त होवो.

४. इच्छा करणारा, पवित्र करणारा, संपन्न, श्रेष्ठ, होता, असा अग्नि मनुष्यामध्यें स्थापिला गेला. शत्रूंचें दमन करणारा गृहपति आणि संपत्तींचा अधिपति असा अग्नि घरोघर असतो.

५. हे धनाधिपते अग्ने, गोतम कुलोत्पन्न आम्ही तुझी स्तोत्रांनीं प्रशंसा करतों. अन्न वाहून नेणाऱ्या घोड्याप्रमाणें तुझी आम्ही सेवा करतों. बुद्धिधन अग्नि सकाळीं लौकर येत जावो.

सूक्त एकसष्टावें.

ऋषिः—नोधा गौतम; देवता–इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ.

१. बलवान, चलाख, श्रेष्ठ अशा इंद्राला अन्नाप्रमाणें मी हें स्तोत्र अर्पण करतों. स्तुतियोग्य आणि अप्रतिहत अशा इंद्राला सर्वोत्कृष्ट स्तोत्रें मी अर्पण करतों.

२. ह्याच इंद्राला मी अन्नाप्रमाणें शत्रूंना बाधक होणारी सुंदर स्तुति अर्पण करतों. इतरहि अंतःकरणपूर्वक, बुद्धिपूर्वक आणि ज्ञानपूर्वक स्तुतीनें पुरातन स्वामी जो इंद्र त्याची सेवा करोत.

३. त्या इंद्राला उत्तम आणि स्वर्गदायक स्तोत्र माझ्या तोंडानेंच म्हणून अर्पण करतों. सुसंस्कृत आणि सुंदर शब्दांनीं केलेली ही स्तुति दानशूर आणि विद्वान इंद्राची महती वाढवो.

४. धनवंताकडे ज्याप्रमाणें सुतार रथ घेऊन पाठवितो त्याप्रमाणें ह्या इंद्राकडे मी हें स्तोत्र पाठवितों. स्तुतिवाहन आणि बुद्धिमान इंद्रासाठीं विश्वव्यापी सुंदर स्तोत्र रचिलें आहे.

५. ह्या इंद्राकरितांच धनेच्छु घोडा जोडतो त्याप्रमाणें मी माझ्या जिव्हेनें स्तोत्र तयार केलें आहे. दानांचें माहेरघर व नगरांचा प्रसिद्ध भेत्ता अशा वीर इंद्राला मी नमस्कार करतों.

६. ह्या इंद्राकरतांच त्वष्ट्यानें उत्कृष्ट आणि तेजस्वी वज्र युद्धाकरतां तयार केलें. ह्याच घातक वज्रानें प्राणघातक, बलवान व अधिपति इंद्रानें वृत्राचें मर्म ओळखून त्यावर प्रहार केला.

७. ह्या लोकनिर्मात्या भव्य यज्ञांत सोम पिऊन आणि सुंदर अन्न भक्षण करून विष्णूनें (असुरांची) संपत्ति हरण केली आणि वज्र फेकणाऱ्या बलवान इंद्रानें वराहाला छेदलें.

८. ह्या इंद्राप्रीत्यर्थच वृत्रहननाच्या प्रसंगीं देवपत्नींनीं गाणीं रचलीं. हा इंद्र विस्तीर्ण द्यावापृथ्वी वेष्टून राहिला. त्या याचा मोठेपणा वेष्टूं शकल्या नाहींत.

९. ह्या इंद्राचा महिमा द्युलोकापेक्षां किंवा अंतरिक्षापेक्षांहि मोठा आहे. तो स्वयंप्रकाशमान आणि घरोघरीं स्तुति केला जाणारा, बलवान शत्रू असलेला, बलिष्ठ असा इंद्र युद्धासाठीं जातो.

१०. शोषण करणाऱ्या वृत्राला ह्याच इंद्रानें आपल्या बळानें वज्राच्या योगानें विच्छिन्न केलें. दयाळु इंद्रच हविर्दात्या उपासकाला अन्न देण्यासाठीं गाईप्रमाणें कोंडलेल्या उदकांस मुक्त करता झाला.

११. त्यानें आपल्या वज्रानें नद्यांना जी मर्यादा घालून दिली त्या मर्यादेंतच नद्या रममाण होतात, हें त्याच्याच पराक्रमामुळें होय. ऐश्वर्यवान इंद्र, भक्तावर अनुग्रह करतो. शत्रुहिंसक इंद्र, तुर्वीतीकरितां उताराचा प्रदेश करिता झाला.

१२. हे इंद्रा, बलवान, वेगवान आणि अधिपति असा तूं ह्याच वृत्रावर आपलें वज्र फेंक. आणि पशूंचें तुकडे करावेत त्याप्रमाणें वृत्राचे तुकडे कर आणि वृष्टि करून पाणी वाहावयास लाव.

---

७. टीपः— ८–७७–१० वरील टीप व सायणभाष्य पहा.

१३. त्याच वेगवान इंद्राचीं हीं पुरातन कर्मे नवीन स्तोत्रांनीं गा. कारण तो युद्धामध्यें शत्रूवर शस्त्रें फेकणारा आणि त्यांची हिंसा करणारा शत्रूंचा नाश करतो.

१४. ह्याच्याच भीतीनें निश्चल पर्वत आणि द्यावापृथ्वी कंपायमान होतात. म्हणून प्रियकराचें रक्षण करणाऱ्या इंद्राची पुनः पुनः स्तुति करणारा नोधा ताबडतोब वीर्यवान झाला.

१५. सर्वांचा एकच आधिपति जो इंद्र त्याला आवडणारें हें स्तोत्र त्यांस अर्पण केलें आहे. सोम अर्पण करणाऱ्या एतशाचें, सूर्यसौवश्वाशीं युद्ध करीत असतां इंद्रानें रक्षण केलें.

१६. हे हरिद्वर्ण घोडे असलेल्या इंद्रा, अशा प्रकारें गौतमांनीं छंदोबद्ध स्तोत्रें केलीं आहेत. तरी तूं आम्हांला सर्व प्रकारचें धन दे. आणि बुद्धिधनसंपन्न असा तूं दररोज सकाळीं येत जा.

सूक्त बासष्टावें.

ऋषिः—नोधा गौतम; देवताः–इंद्र; छंदः–त्रिष्टुभ.

१. बलवान आणि स्तुतिप्रिय इंद्राकरतां आपण अंगिरसाप्रमाणें सुखकर स्तोत्र तयार करूं. त्या विख्यात-पराक्रमी, पूज्य आणि स्तुत्य इंद्राची आपण चांगल्या छंदोबद्ध स्तोत्रांनीं स्तुति गाऊं.

२. हे स्तोतेहो, ज्याच्या योगानें आमचे पूर्वज पितर मार्ग जाणणारे आणि इंद्राची पूजा करणारे ते अंगिरस गाई मिळविते झाले, तशा प्रकारचें मोठें स्तोत्र तुम्ही महाबलवान इंद्राला नमस्कारपूर्वक गाऊन अर्पण करा.

३. इंद्राच्या आणि आंगिरसाच्या आज्ञेनुसार सरमेनें आपल्या मुलाकरितां दूध मिळविलें. बृहस्पतीनें पर्वत फोडिले आणि गाई मिळविल्या. तेव्हां त्या शूरांनीं गाईबरोबर जयघोष केला.

४. सुस्तुत अशा तुझी हे बलवान इंद्रा, सात विप्रांनीं स्तुति केली. तेव्हां स्तवनीय अशा तूं नवग्वासह आणि शिस्तशीर दशग्वासह मेघरूपी पर्वताला, त्या वलाला आपल्या गर्जनेनेंच फोडून टाकलेंस.

५. हे पराक्रमी इंद्रा, आंगिरसांनीं स्तुति केली असतां त्वां उषा, सूर्य आणि प्रकाश यांच्या योगानें अंधःकार नाहींसा केलास, भूप्रदेश प्रकट केलास व द्युलोकाच्या खालीं अंतरिक्ष स्थिर केलेंस.

६. ह्याचें तें कर्म अत्यंत स्तुत्य होय. ह्या पराक्रमी इंद्राचा तो पराक्रम फार सुंदर होय. ह्यानेंच खालीं वाहात जाणाऱ्या मधुर जलांनीं युक्त अशा चार नद्या पृथ्वीवर वाहविल्या.

७. उपासकांनीं स्तोत्रें म्हणून स्तुति केल्याप्रमाणें इंद्रानें सनातन आणि संलग्न द्यावापृथिवी दुभंगून टाकल्या. तो महान पराक्रमकारी इंद्र आकाशांत उच्च ठिकाणीं सूर्याप्रमाणें द्यावापृथिवींना धारण करीत असतो.

८. परस्परविरुद्ध अशीं रूपें असलेल्या, पुनः पुन्हा उत्पन्न होणाऱ्या तरुण अशा त्या दोघी (रात्र व उषा) आपल्या गतीनुसार द्यावापृथिवीभोंवतीं सारख्या फिरत असतात. रात्र ही काळ्या वर्णाची असून उषा मात्र प्रकाशमान रूपानें युक्त आहे.

९. बलपुत्र, महान पराक्रमी, आणि कार्यकुशल इंद्रानें भक्तांशीं अक्षय सख्य केलें आहे. त्यानेंच अपक्कांच्या ठिकाणीं पक्क दूध उत्पन्न केलें आणि काळ्या गाईच्या ठिकाणीं पांढरें दूध निर्माण केलें.

१०. एकाच ठिकाणीं राहणाऱ्या, वांकणाऱ्या आणि अक्षय अशा अंगुली आपल्या सामर्थ्यानें सदोदित इंद्राचे नियम पाळीत असतात. सहस्रावधि ज्या भगिनी त्या निर्भिड इंद्राला स्त्रियाप्रमाणें भजतात.

११. हे पराक्रमी इंद्रा, पुरातन कालच्या उपासकाप्रमाणें नवे, धनाची इच्छा करणारे, बुद्धिमान उपासक नमस्कारपूर्वक स्तोत्रें म्हणत तुजकडे धांवत आहेत. हे बलवान इंद्रा, कामी स्त्रिया, कामुक पुरुषांना ज्याप्रमाणें स्पर्श करतात, त्याप्रमाणें उपासकांच्या प्रार्थना तुजकडे जात असतात.

१२. हे पराक्रमी इंद्रा, पुरातन काळापासूनच तुझ्या हातांतील संपत्ति क्षय पावत नाहीं, किंवा नष्टहि होत नाहीं. हे इंद्रा, तूं तेजस्वी, पराक्रमी, धैर्यशाली आहेस. हे कर्मकर्त्या, तूं आपल्या पराक्रमांनीं आम्हांस धन दे.

१३. हे इंद्रा, हा गोतम नोधा पुरातन पद्धतीप्रमाणें वागत आहे. त्यानें हरिद्वर्ण घोडे जोडणाऱ्या इंद्रासाठीं नवें स्तोत्र तयार केलें आहे. हे बलवन्ता, आम्हांला चांगला मार्ग लाभावा म्हणून बुद्धिमान इंद्र रोज सकाळीं लौकर येत जावो.

सूक्त त्रेसष्टावें.

ऋषिः—नोधा गौतम; देवता-इंद्र; छंदः-त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, तूं मोठा आहेस. कारण कीं तूं उपजतांच आपल्या सामर्थ्यानें द्युलोक आणि पृथिवी यांना भीति उत्पन्न केलीस. तुझ्या भीतीनें प्रचंड पर्वत, फार काय सर्व वस्तुमात्र भीतीनें हदरून गेलें.

२. हे इंद्रा, जेव्हां तुझे घोडे भिन्न दिशांस धांवले, जेव्हां उपासकानें तुझें हातांत वज्र दिलें, तेव्हां त्याच्या योगानें, हे अजिंक्या, हे बहुस्तुता, तूं शत्रूंचा व त्यांच्या नगरांचा पाडाव केलास.

३. हे इंद्रा, तूं पक्का आहेस; झुंजणारा आहेस; शूर आणि कुशल आहेस. तूं पराक्रमी आणि अजिंक्य आहेस. तूं त्या लढाईत शत्रूंना मारलेंस. आणि दुसऱ्या लढाईत आपल्या तरुण, तेजस्वी कुत्सनामक भक्तासाठीं शुष्णाला ठार केलेंस.

४. हे वज्रधारी महान कर्में करणाऱ्या इंद्रा, हे शूरा, हे उदारमनस्का, तूं वृत्राला ठार केलेंस आणि अन्य युद्धामध्यें तूं शत्रूंना पिटाळून लावून त्यांची धुळधाण केलीस. हें सर्व तूंच म्हणून केलेंस.

५. हे इंद्रा, मानवांपैकीं कोणाचीहि खप्पा मर्जी झाली असतांहि केवळ तुझ्याचमुळें त्यांचा सांभाळ होतो. हे वज्रधरा, घणानें मारल्याप्रमाणें आमच्या शत्रूंना ठार कर आणि आमच्या घोड्यांना सर्व दिशा मोकळ्या कर.

६. हे इंद्रा, उदकनिमित्त किंवा उत्तम धनलाभार्थ जें युद्ध त्यांत शूर योद्धे केवळ तुझाच धांवा करतात. हे बलवन्ता, लढाईत आणि मोठ्या युद्धप्रसंगीं आम्हांला तुझें संरक्षण असो.

७. हे वज्रधरा इंद्रा, युद्ध करून पुरुकुत्सासाठीं सात नगरें विध्वंसून टाकलीस तीं तूंच. त्याचप्रमाणें सुदासासाठीं त्याच्या शत्रूचे, दर्भाचे तुकडे करावेत त्याप्रमाणें तूंच सहज तुकडे केलेस. हे राजा, पुरूचें दारिद्र्य नाहींसें करून त्यास धन दिलेंस तेंहि केवळ तूंच.

८. हे इंद्रदेवा, भूतलावर आम्हांला पाण्याप्रमाणें उत्तम अन्न पाजतोस तो तूंच. आणि हे शूरा, त्या अन्नाच्या योगानें सर्वत्र वाहणाऱ्या पाण्याप्रमाणें विपुल जीवन तूंच आम्हांस देत असतोस.

९. हे इंद्रा, अशा प्रकारें गोतमांनीं तुझ्याकरतां स्तोत्रमाला नमस्कारपूर्वक गुंफिली आहे. करितां तं आपल्या घोड्यांनीं आम्हांला सुंदर संपत्ति घेऊन ये. बुद्धिमान इंद्र रोज सकाळीं लौकर येत जावो.

सूक्त चौसष्टावें.

ऋषिः-नोधा गौतम; देवता-मरुत्; छंद—१-१४ जगती, १५ त्रिष्टुभ्.

१. हे नोधा, यज्ञार्ह, वीर्यवान्, बुद्धिमान आणि पराक्रमी अशा मरुद्गणासाठीं सुंदर स्तोत्र कर. ध्यानयुक्त आणि बद्धांजलि होऊन मी मनानें स्तोत्रें तयार करतों आणि यज्ञांत त्यांची पाण्याप्रमाणें वृष्टि करतों.

२. ते रुद्रपुत्र मरुत द्युलोकापासून महान वीर्यवान्, निर्दोष, पवित्र, सूर्याप्रमाणें तेजस्वी, वृष्टि करणारे आणि योध्याप्रमाणें भयंकर असे जन्मले आहेत.

३. रुद्रपुत्र तरुण, जराराहित, अधार्मिकांना ठार करणारे, अनिवार्य, आणि पर्वतासारखे विशाल झाले. ते आपल्या सामर्थ्याच्या योगानें पृथिवींतील आणि द्युलोकांतलि सर्व अचल वस्तुजात हलवून सोडतात.

४. ते आपल्या शरीरांवर निरनिराळे अलंकार घालून त्यांस भूषवितात आणि शोभेसाठीं वक्षःस्थलावर हार घालतात. त्यांच्या खांद्यावर भाले चकाकत असतात. हे शूर आपल्या बळासहच द्युलोकापासून जन्मले.

५. सर्वाधिपति, हदरून सोडणारे, शत्रूनाशक, असे मरुत आपल्या बळाच्या योगानें वारे आणि विजा उत्पन्न करतात. हे हदरून सोडणारे मरुत आकाशाच्या कासेचें दोहन करून दूध काढतात आणि त्यायोगें ते सर्वव्यापी मरुत पृथ्वीला पुष्ट करतात.

६. यज्ञांत ऋत्विज तूप ओततात, त्याप्रमाणें दानशूर मरुत स्निग्ध उदकांनीं पृथ्वीला पुष्ट करीत असतात. घोड्याला शिकवावें त्याप्रमाणें ते मेघाला वळण लावून पाऊस पाडतात. ते गर्जना करणाऱ्या व अक्षय मेघांचें दोहन करतात.

७. जेव्हां तुम्ही प्रकाशमान आणि तांबूस ज्वालांबरोबर सामर्थ्यवान होता, तेव्हां अत्यंत मोठे, मायावी, नानाविध तेजांनीं युक्त, पर्वताप्रमाणें स्वबलानें श्रेष्ठ आणि शीघ्रगामी होत्साते तुम्ही हत्तीप्रमाणें वनें खाऊन टाकतां.

८. ज्ञानवान, रुरुनामक हरणाप्रमाणें देखणे, सर्वज्ञ, आपल्या हरिणींच्या आणि भाल्यांच्या योगानें शत्रूंचा नाश करणारे, आपल्या बळानें सर्पासारखे रागीट असलेले ते मरुत सिंहाप्रमाणें गर्जना करतात.

९. हे समुदायरूपी संपत्तीनें युक्त मरुतहो, हे लोकहितकारी, शूर आणि सामर्थ्याच्या योगानें सर्पाप्रमाणें रागावणारे मरुतहो, तुम्ही आपल्या गर्जनेनें द्यावापृथ्वी भरून टाका. हे मरुतहो, तुमच्या रथाच्या बैठकीवर लकलकणारें तुमचें तेज रथांत विजेप्रमाणें आरूढ झालें आहे.

१०. सर्वज्ञ, संपत्तींनीं युक्त, सामर्थ्यसंपन्न, श्रेष्ठ, बाण सोडणारे, अत्यंत बलवान, सोमपान करणारे, असे हे शूर मरुत हातांत बाण धरते झाले.

११. पाण्यानें पुष्ट झालेले मरुत रथाप्रमाणें सोनेरी चक्रांनीं पर्वतांचे तुकडे करते झाले. हे मरुत यज्ञार्ह, नेहमीं येणारे, जड पदार्थांनाहि हालविणारे, पण स्वत: इतरांकडून न हलणारे आणि तेजस्वी भाले धारण करणारे आहेत.

१२. झुंजणारे, शोधक, जलयुक्त, सर्वद्रष्टे, अशा मरुतांना मी आवाहनपूर्वक स्तवितों. आकाशांतून गमन करणारे, पराक्रमी, सोमपी, प्रबल असा जो मरुद्गण त्याची तुम्ही सुखाकरतां उपासना करा.

१३. हे मरुतांनो, ज्याला तुम्ही आपला आश्रय देऊन रक्षीत असतां, तो मर्त्य लोकांपेक्षां बळानें श्रेष्ठ होतो. तो घोड्यांच्या योगानें अन्न प्राप्त करून घेतो आणि आपल्या लोकांच्या साह्यानें धन मिळवितो. तो प्रशंसनीय पराक्रम करतो आणि उत्कर्ष पावतो.

१४. हे मरुतांनो, तुम्ही धनवान उपासकांच्या अंगीं अत्यंत स्तुत्य, समरांगणांत अजिंक्य, तेजस्वी असें बळ स्थापित करा. धन प्राप्त करणारा, प्रशंसनीय आणि सर्वद्रष्टा असा पुत्र आणि नातू आम्हांस मिळो आणि शंभर वर्षें आमचा उत्कर्ष होवो.

१५. त्याचप्रमाणें हे मरुतांनो, तुम्ही आम्हांला स्थिर राहणारी, वीरयुक्त, शत्रूनाशक आणि शंभर पटीनें आणि हजार पटीनें वाढणारी संपत्ति द्या. बुद्धिमान मरुत दररोज सकाळीं लौकर येत जावोत.

सूक्त पासष्टावें.

ऋषिः—शक्तिपुत्र पराशर; देवता—अग्नि; छंदः—द्विपदा विराज.

१. हे अग्ने, पशूसह असलेल्या चोराप्रमाणें गूढ ठिकाणीं पडून राहिलेला, नमस्कार प्राप्त करून घेणारा, व नमस्कार पोचविणारा असा जो तूं, त्या तुझा शोध, सर्व एकविचाराच्या पूज्य उपासकांनीं पावलांच्या योगानें लावला आणि ते तुझ्याजवळ जाऊन बसले.

२. सत्यधर्म अग्नीचे नियम देवहि पाळतात. द्युलोक आणि पृथिवीहि त्याला (अग्नीला) आश्रयभूत झाली. यज्ञस्थानरूप गर्भांत जो उत्तम रीतीनें जन्मास आला, व स्तोत्रांच्या योगानें जो वृद्धिंगत झाला, त्या अग्नीला उदकेंहि वाढवितात.

३. संपन्नतेमुळें रमणीय, पृथिवीप्रमाणें मोठा, पर्वताप्रमाणें फलोत्पादक, उदकाप्रमाणें शांतिकारक, समरांगणांत घोड्याप्रमाणें चपळ, पाण्याला ओढ असणाऱ्या नदीप्रमाणें अनिवार्य, अशा अग्नीला निवारण्यास कोण समर्थ आहे ?

४. बहिणींचा जसा भाऊ, तसा अग्नि हा उदकांचा आप्त होय. राजा शत्रूंचा संहार करतो, त्याप्रमाणें अग्नि वनें खाऊन टाकतो. वायुप्रेरित अग्नि जेव्हां वनांत शिरतो, तेव्हां तो पृथिवीचे जणूं केसच कापतो.

५. तो पाण्यामध्यें बसून हंसाप्रमाणें फुसफुस आवाज करतो. पराक्रमानें अत्यंत तेजस्वी व प्रातःकाळीं जागृत करणारा तो सोमाप्रमाणें बुद्धिमान होय. तो गाभण गाईप्रमाणें पुष्ट आणि दूरपर्यंत प्रकाश पाडणारा असा आहे.

सूक्त सहासष्टावें.

ऋषिः—शक्तिपुत्र पराशर; देवता—अग्नि; छन्दः—द्विपदा विराज.

१. तेजाप्रमाणें प्रकाशमान, सूर्याप्रमाणें लकाकणारा, आयुष्याशीं प्राणाप्रमाणें संबद्ध, पुत्राप्रमाणें चिरंतन, चोराप्रमाणें सरपटत जाणारा, दूध देणाऱ्या गाईप्रमाणें पुष्टिकर, पवित्र आणि प्रकाशमान अग्नि वनें स्वाहा करतो.

२. घराप्रमाणें सुखदायक, शिजविलेल्या यवाप्रमाणें आनंदकारक, लोकांना जिंकणारा, ऋषीप्रमाणें स्तुति करणारा, लोकांत प्रशंसनीय, युद्धांतील घोड्याप्रमाणें हर्षयुक्त असा अग्नि आम्हांस संपत्ति देतो.

३. अत्यंत तेजस्वी, सर्वकाळ पराक्रम करणारा, आणि भोग्य स्त्रीप्रमाणें अग्नि सर्वांना सुखदायक होतो. कारण कान्तिमान आणि शुभ्रवर्णाच्या घोड्याप्रमाणें तो लोकांत प्रकाशतो आणि युद्धांमध्यें सोनेरी रथाप्रमाणें त्याची कान्ति दिसते.

४. चालून येणाऱ्या सेनेप्रमाणें किंवा धनुर्धाऱ्याच्या तेजस्वी टोंक असलेल्या बाणाप्रमाणें अग्नि भीति उत्पन्न करतो. जन्मलेला आणि जन्मणारा अग्नीच होय. तो कुमारींचा जार आणि विवाहित स्त्रियांचा पति होय.

५. गाई गोठ्याकडे धांवतात त्याप्रमाणें आम्ही तुला प्रदीप्त करून स्थावर जंगमासह तुझ्याकडे धांवत आहोंत. नदी ज्याप्रमाणें आपल्या पाण्याला (पूर आला असतां) सभोंवार पसरते, त्याप्रमाणें हा अग्नि आपल्या ज्वालारूपी गाई सर्वत्र पसरतो, तेव्हां त्या आवाज करीत आकाशाकडे जातात.

सूक्त सदुसष्टावें.

ऋषिः—शक्तिपुत्र पराशर; देवता–अग्नि; छंदः - द्विपदा विराज.

१. वनांवर विजय मिळवणारा, मर्त्यांचा मित्र अशा अग्नीला, राजाला तरुण चाकर आवडतो, त्याप्रमाणें तरुण उपासक प्रिय होय. चांगला रक्षक,पराक्रमी, बुद्धिमान आणि होता अग्नि आमचा हव्यवाहक होवो.

२. आपल्या सामर्थ्यानें सर्व विश्व आपल्या हातांत धारण करणारा, आणि गुहेंत बसलेला अग्नि देवांना भयभीत करता झाला. जेव्हां बुद्धिमान पुरुषांनीं मनःपूर्वक रचिलेले मंत्र म्हटले, तेव्हांच हा त्यांस प्राप्त झाला.

३. अनादि ईश्वराप्रमाणें अग्नि विस्तीर्ण पृथिवी धारण करतो. आणि सत्य मंत्रांच्या योगानें द्युलोकाला स्थिर करतो. हे अग्ने, सर्वांचा प्राणभूत असा तूं पशूंची प्रिय स्थानें रक्षण कर. आणि गूढ असणारा तूं गूढ स्थानीं अस.

४. जो कोणी गूढ असणाऱ्या अग्नीला जाणतो, जो सत्याच्या मार्गावर बसलेला असतो, जे कोणी भक्तिभावानें स्तोत्रें रचितात, त्यांना तो तात्काळ संपत्तीचा मार्ग दाखवितो.

५. जो अग्नि आपल्या मोठेपणाच्या योगानें वनस्पतींच्या पोटीं वाढतो, आणि तिच्याच पोटीं जन्मास येतो, आणि जन्मास येऊन तिच्याच ठिकाणीं अंतर्धान पावतो. त्या सर्वांचा प्राणभूत आणि ज्ञानवान अग्नि उदकांमध्यें असतो. बुद्धिमान देवांनीं तेथें त्याचें आसनच जणूं मोजून दिलें आहे.

सूक्त अडुसष्टावें.

ऋषिः—शक्तिपुत्र पराशर; देवता–अग्नि; छंदः—द्विपदा विराज.

१. हविर्वाहक अग्नि हविरन्न शिजवीत द्युलोकाकडे जातो. तो रात्रीच्या वेळीं स्थावरजंगम पदार्थ प्रकट करतो. कारण तो एकटाच आपल्या मोठेपणानें सर्व देवांमध्यें श्रेष्ठत्व पावला आहे.

२. हे देवा, जेव्हां वाळलेल्या लाकडापासून सजीव अशा तुझा जन्म झाला, तेव्हां तो तुझा पराक्रम पाहून सर्व लोक तुला भजूं लागले. सत्यभूत आणि मरणरहित अशा तुला आपापल्या कर्मानीं भजून सर्व लोक देवत्वाप्रत पावले.

३. सत्यभूत अग्नीसाठीं स्तुति आणि यज्ञ केले जात आहेत. तो सर्व विश्वाचा प्राणभूत होय. सर्व त्याच्याकरतां यज्ञयाग करतात. तरी जो कोणी तुला हवी देईल, किंवा तुझ्या उपासनेची इच्छा करील, त्याची बुद्धि जाणून तूं त्याला धन दे.

४. मनूची जी प्रजा, तिचें होतृकर्म करणारा अग्नि स्थापित झाला आहे. तोच सर्व संपत्तीचा अधिपति होय. त्या प्रजेनें परस्परांचें रेत एकत्र करण्याची इच्छा केली आणि त्यायोगानें पराक्रमी पुत्रांचा लाभ पावून बळवान झाले.

५. पित्याची आज्ञा पुत्र पाळतात, त्याप्रमाणें जे कोणी ह्याच्या आज्ञा तांबडतोब ऐकतात, ते पराक्रमी होतात. विपुलअन्नसंपन्न अग्नि उपासकांसाठीं संपत्तीचें द्वार उघडें टाकतो. गृहपति अग्नि नक्षत्रांच्या योगानें द्युलोक शोभविता झाला.

सूक्त एकोणसत्तरावें.

ऋषिः—शक्तिपुत्र पराशर; देवता–अग्नि; छंदः—द्विपदाविराज.

१. वीर्यवान, लकाकणारा, उषेच्या जाराप्रमाणें किंवा द्युलोकांतील सूर्याप्रमाणें, एकमेकींशीं संलग्न असलेल्या द्यावापृथिवींना अग्नि आपल्या तेजानें भरून टाकतो. जन्मल्याबरोबरच तेजस्वी असा तूं आपल्या पराक्रमानें सर्वत्र व्याप्त होतोस. तूं देवांचा पुत्र असूनहि त्यांच्या पितृस्थानीं आहेस.

२. अग्नि हा विद्वान, अप्रमत्त, आणि ज्ञानवान आहे. तो गाईच्या कासेप्रमाणें अन्नाला स्वाद आणणारा

आहे. लोकांमध्यें सुखकर मित्रासारखा, मध्यभागीं बसलेला आणि घरामध्यें रमणीय अमा आहे.

३. घरामध्यें पुत्रजन्माप्रमाणें आनंददायक, घोड्याप्रमाणें हर्षयुक्त असा अग्नि सर्व लोकांची अभिवृद्धि करतो. एकत्र राहणाऱ्या देवांना जेव्हां मी आपल्या ऋत्विजांसह बोलावीन तेव्हां सर्व देवांसाठीं अग्नीच हविर्भाग भक्षण करो.

४. ज्या अर्थीं तूं ह्या पुरुषांचें म्हणणें लक्षपूर्वक ऐकतोस, त्याअर्थीं तुझें नियम कोणीहि मोडीत नाहीं. तूं बरोबरीच्याशीं युक्त होऊन शत्रूंना ठार मारलेंस आणि दुष्टांना पिटाळून लावलेस. तो केवळ तुझाच पराक्रम होय.

५. उषेच्या जारासारखा, तेजस्वी, आधार व प्रत्यक्ष अग्नि उपासकाकडे कृपादृष्टीनें पाहो. स्वतः हवि वाहून नेणारे ह्याचे किरण दारें उघडते झाले आणि नंतर ते सर्व रमणीय आकाशांत व्यापले.

सूक्त सत्तरावें.

ऋषिः—शक्तिपुत्र पराशर; देवता–इंद्र; छन्दः—द्विपदा विराज.

१. पुरातन शत्रूंचा आम्ही नाश करूं. ज्या अग्नीनें दैवी नियम जाणले, आणि मानवी प्राण्यांचा जन्महि जाणला, तो प्रकाशमान अग्नि आमच्या इच्छा व्यापून टाको (पूर्ण करो.)

२. जो उदकांच्या पोटांत, वृक्षांच्या पोटांत, स्थावरांच्या आणि जंगमांच्या पोटांत असतो, जो पर्वतांतहि असतो, त्या अग्नीला सर्व लोकांच्या गृहामध्यें स्थापन करा. एकटाच सर्व लोकांच्या राजाप्रमाणें तो चांगलें करणारा व अमर आहे.

३. तो अग्नि रात्रीच्या वेळीं प्रकाशतो. जो कोणी ह्याची भरपूर व चांगली स्तुति करतो, त्याला तो धन देतो. हे ज्ञानवान अग्ने, तूं देवांचें जनन आणि मर्त्य लोक जाणतोस. तूं ह्या जीवसृष्टीचें संरक्षण कर.

४. सत्यधर्मानें वागणाऱ्या अग्नीला भिन्नरूपाच्या अनेक उषा व रात्री यांनीं व सर्व स्थावर जंगमांनीं वाढविलें आहे. त्या होत्या व प्रकाशमान अग्नीची स्थापना करून त्याची स्तुति करतात. तो सर्व कर्में सफल करतो.

५. हे अग्ने, तूं आमच्या गाईंच्या आणि वृक्षांच्या अंगीं भव्यपणा उत्पन्न कर. सर्व देव आम्हांला तेजोयुक्त सामर्थ्य देवोत. मनुष्य तुझी अनेक ठिकाणीं पूजा करतात. व वृद्ध पित्यापासून धन मिळवावें त्याप्रमाणें तुझ्यापासून धन घेऊन जातात.

६. साधकाप्रमाणें ग्रहण करणारा, बाण फेकणाऱ्याप्रमाणें शूर चाल करून येणाऱ्याप्रमाणें भयंकर; आणि लढाईमध्यें त्वेषपूर्वक लढणारा असा अग्नि आहे.

सूक्त एकाहत्तरावें.

ऋषिः—शक्तिपुत्र पराशर; देवता–अग्नि; छंदः–त्रिष्टुभ.

१. एकत्र राहणाऱ्या कामी स्त्रिया ज्याप्रमाणें आपल्या कामुक पतीची सेवा करतात, किंवा काळसर परंतु आरक्त वर्ण होऊं इच्छिणाऱ्या व नानाविध रंगाच्या उषेची किरणें ज्याप्रमाणें सेवा करतात, त्याप्रमाणें (अग्नीची सेवा) ह्या बहिणीरूप ज्वाला करीत असतात.

२. आमचे पितर अंगिरस, स्तोत्रांच्या योगानें प्रचंड दुर्गहि फोडीत असत, आणि मोठी गर्जना करून पर्वत फोडीत असत. त्यांनीं आमच्याकरितां विशाळ स्वर्गाचा मार्ग मोकळा केला. ते दिवस, प्रकाश, सूर्य आणि गाई यांस प्राप्त करिते झाले.

३. अंगिरसानें यज्ञीय अग्नीची स्थापना केली आणि त्याचें तेज प्राप्त केलें. तेव्हांपासून सेवातत्पर, द्रव्यसंपन्न, विस्तार पावणाऱ्या, कर्मकुशल अशा प्रजा लोकांसह देवांना हविरन्नानें तृप्त करूं लागल्या.

४. जेव्हां मातरिश्वानें याला मंथन करून जन्म दिला, तेव्हां तेजस्वी, अभिजात आणि भिन्नभिन्न ठिकाणीं विभागलेला अग्नि घरोघर झाला. त्या दिवसापासून किरणासारख्या चपल अग्नीनें एखाद्या बलवान राजाचें दूतपण पतकरावें त्याप्रमाणें यजमानाचें दूतपण पतकरिलें.

५. जेव्हां यजमानानें श्रेष्ठ पिता जो द्यु, त्यासाठीं रस तयार केला, तेव्हां तें ओळखून राक्षस पळून गेले. धनुर्धारी देवानें धनुष्यानें राक्षसांना बाण मारिला आणि आपल्या कन्येच्या ठिकाणीं तेज स्थापन केलें.

६. हे अग्ने, जो कोणी तुला आपल्या घरीं प्रदीप्त करितो किंवा जो हविरन्नाची इच्छा करणाऱ्या उभय लोकीं श्रेष्ठ अशा तुला भजतो, त्याची अन्नसंपत्ति वाढीव. ज्या योद्ध्याला तूं रणांत साह्य करशील त्याला धनप्राप्त होईल.

७. ज्याप्रमाणें सात महानद्या समुद्राकडे धांवतात त्याप्रमाणें सर्व अन्नसंपत्ति अग्नीकडे जात असते. आमच्या कुटुंबाला अन्न मुळींच माहीत नाहीं म्हणून सर्वज्ञ असा तूं आम्हांवर देवाची कृपा होईल असें कर.

८. जेव्हां लोकाधिपतीला (अग्नीला) तेजाची इच्छा झाली तेव्हां घर्षणांतून बाहेर पडलेलें अत्यंत शुद्ध व तेजस्वी रेत त्याला प्राप्त झालें. अग्नि हा बलवान, दोषरहित, तरुण आणि बुद्धिवान (अशा पुत्राला) उत्पन्न करितो आणि प्रेरणा करितो.

९. मनाप्रमाणें जो एकदम मार्ग आक्रमण करितो असा एकटाच सूर्य सर्व संपत्तीचा स्वामी आहे. सुहस्त, राजे मित्रावरुण गाईच्या ठिकाणीं प्रिय अमृत राक्षिणारे आहेत.

१०. हे अग्ने, वाडवडिलांपासून चालत आलेला तुझा आमचा स्नेह नष्ट करूं नकोस. उलट विद्वान असा तूं आमचा पाठीराखा हो. ज्याप्रमाणें नभ (धुकें) रूपाचा नाश करितें त्याप्रमाणें वृद्धपण रूप नाहींसें करितें, म्हणून असें दुर्भाग्य आम्हांवर येण्यापूर्वीच तूं आम्हांवर कृपा कर.

सूक्त बहात्तरावें.

ऋषिः—शक्तिपुत्र पराशर; देवता—अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ.

१. लोकहितकारक अनेक पदार्थ धारण करणारा अग्नि अनेक बुद्धिमान उपासकांचीं स्तोत्रें प्राप्त करून घेत असतो. तो धनांचा अधिपति होय. तो सकल आणि नाशरहित वस्तु देणारा होय.

२. अग्नीची इच्छा करणारे अमर आणि ज्ञानवान अशा देवांना, हा बाळ त्यांच्याजवळ होता तरी सांपडला नाहीं. तेव्हां त्यांनीं ध्यान केलें व मग पायांनीं चालून थकलेले देव अग्नीच्या अत्यंत सुंदर आणि श्रेष्ठ पदावर स्थिर झाले.

३. हे अग्ने,जेव्हां तेजस्वी मरुतांनीं तेजस्वी अशा तुझी तीन वर्षेपर्यंत घृतपूर्वक पूजा केली, तेव्हांच त्यांना यज्ञयोग्यत्व प्राप्त झालें. तेव्हांपासून ते अभिजात मरुत श्रेष्ठत्व पावले.

४. विस्तीर्ण द्यावापृथिवीमध्यें शोध करून पूजनीय मरुत अग्नीची स्तोत्रें करिते झाले. तेव्हां इंद्रासमवेत फिरणाऱ्या ज्ञानसपन्न मरुतांना अत्यंत श्रेष्ठ ठिकाणीं असणारा अग्नि ज्ञात झाला.

५. सर्व भक्त गुडघे टेकून आपल्या स्त्रियांसह पूजनीय अग्नीची पूजा करिते झाले. त्यानीं आपल्या शरीराचा बळी देऊन अग्नीला आपला मित्र केला. त्या सख्याचें दर्शन होतां क्षणींच ते तरले गेले.

६. तुझीं जीं एकवीस गुह्य स्थानें आहेत तीं भाविक भक्तांनीं शोधून काढलीं; त्यांच्या योगानें तुझें भक्त तुझें रक्षण करितात. तर तूं प्रसन्न होऊन स्थावरजंगमांचा आणि पशूंचा सांभाळ कर.

७. हे अग्ने, सर्व ज्ञान तुला ज्ञात आहे. तूं लोकांच्या जीवनाकरितां सदोदित अन्न उत्पन्न करितोस. देवाकडे जाणारे मार्ग पूर्णपणें जाणणारा निरलस असा तूं आमचा हवि वाहून नेणारा दूत आहेस.

८. सत्कर्में करणारे आणि सत्यमार्ग जाणणारे, पूर्वऋषि स्वर्गीच्या सात महानद्यांचे आणि संपत्तींच्या द्वारांचे ज्ञाते झाले. सरमेनें गाईचा प्रचंड गोठा शोधून काढिला. त्याच्या योगानें मानव लोक अजूनहि सुख भोगीत आहेत.

९. जे आदित्य अमरपणाचा मार्ग शोधणारे सर्व चांगलीं कर्में करीत असतात त्या थोर पुत्रांसह असणारी दैन्यरहित पृथ्वी जगाच्या संरक्षणाकरतां महत्वपूर्ण असतें आणि हे अग्ने, तूं हवि भक्षण करतोस. (म्हणून हें सर्व झालें आहे.)

१०. जेव्हां अमर देवांना दिव्य डोळे प्राप्त झाले, तेव्हां त्यांनीं अग्नीच्या ठिकाणीं सुंदर तेज स्थापन केलें. हे अग्ने, तुझ्यापासून निघालेल्या ज्वाला नद्याप्रमाणें वाहूं लागल्या आणि खालीं वाहणाऱ्या तुझ्या आरक्त ज्वाला त्यांना दिसूं लागल्या.

सूक्त त्र्याहत्तरावें.

ऋषिः—शक्तिपुत्र पराशर; देवता—अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ.

१. वडिलोपार्जित द्रव्याप्रमाणें अन्नसंपन्न आणि विद्वानांच्या उपदेशाप्रमाणें सन्मार्गास लावणारा व सुखानें बसणाऱ्या पाहुण्याप्रमाणें तृप्त होणारा असा अग्नि उपासकाच्या येथें होत्याप्रमाणें सर्वत्र फिरतो.

२. जो सवित्याप्रमाणें सत्य ज्ञान प्राप्त करून देतो व आपल्या पराक्रमानें सर्व सामर्थ्यांचें रक्षण करतो तो अनेकांनीं प्रशंसिलेला नित्य, प्रकाशरूप आणि सुखकारक अग्नि सर्वांस हवासा झाला.

३. जो सकलांचें पोषण करणारा अग्नि, राजा सावित्याप्रमाणें प्रिय मित्रांनीं युक्त असा पृथ्वीवर राज्य करीत असतो. त्याच्यापुढें बसणारे उपासक सुखानें बसलेल्या वीराप्रमाणें किंवा पतिप्रिय अशा पतिव्रता स्त्रीप्रमाणें सुरक्षित होत.

४. त्या तुला निश्चित स्थळीं आपल्या घरांमध्यें नित्य प्रदीप्त करून हे अग्ने, लोक तुझी सेवा करूं लागले. ह्या अग्नीच्या ठिकाणीं त्यांनीं विपल धन स्थापित केलें. सर्वांचा प्राणभूत असा तो अग्नि सर्व संपत्तीचा धारणकर्ता होय.

५. हे अग्ने, उपासकांना सर्वत्र अन्नप्राप्ति होवो. हविर्दान करणाऱ्या विद्वानांना सर्व आयुष्य प्राप्त होवो. आम्हांला संग्रामामध्यें शत्रूंचें धन प्राप्त होवो व त्या योगें आम्हांस यश मिळो. आम्हीं देवांना हविर्भाग देत जाऊं.

६. परम कारुणिक आणि नित्य भरलेल्या कांसेच्या तेजस्वी गाई त्या सत्यस्वरूप अग्नीला दूध पाजित्या झाल्या. अग्नीच्या प्रसादाची प्रार्थना करणाऱ्या नद्या दूर अंतरावरून पर्वताकडे वाहूं लागल्या.

७. हे अग्ने,तुझ्या प्रसन्नतेची इच्छा करणारे उपासक तेजस्वी अशा तुझ्यांत अन्न अर्पण करतात.भिन्नवर्ण रात्र आणि उषा यांस उत्पन्न करिते झाले व त्यायोगें कृष्णवर्ण आणि श्वेतवर्ण यांस एकत्र स्थापिते झाले.

८. हे अग्ने, जर तूं आम्हां मर्त्यांना धनप्राप्तीची प्रेरणा करशील तर आम्ही धनवान होऊं. भूलोक, द्युलोक आणि अंतरिक्ष यांना व्यापून राहणारा तूं सर्व जगताच्याबरोबर छायेप्रमाणें फिरत असतोस.

९. हे अग्ने, तूं रक्षण केलेले असे आम्ही, घोड्यास घोडा भिडवूं, माणसास माणूस भिडवूं आणि वीरास वीर भिडवून जिंकूं असें कर. आमचे विद्वान पुत्र वडिलार्जित संपत्तीचे स्वामी होऊन शंभर वर्षे तिचा उपभोग घेवोत.

१०. हे ज्ञानवान अग्ने, हीं स्तोत्रें तुझ्या मनाला आणि अंतःकरणाला प्रिय होवोत. देवप्रिय हवि अर्पण करणारे आम्ही तुझ्या संपत्तिरूप घोड्याला आंवरण्यास समर्थ होऊं असें कर.

सूक्त चवऱ्याहत्तरावें.

ऋषिः-रहुगणपुत्र गोतम; देवता-अग्नि; छन्दः— गायत्री.

१. यज्ञाची सर्व सिद्धता करून आपण दूर ठिकाणाहूनाहि स्तोत्र ऐकणाऱ्या अग्नीचें सूक्त म्हणूं.

२. या पुरातन अग्नीनें युद्धामध्यें वध करणारे लोक एकमेकांवर पडले असतां आपल्या भक्तांचें घरदार संभाळिलें.

३. हे लोकहो, तुम्ही अग्नीचें स्तोत्र म्हणा. अग्नि वृत्रनाश करण्याकरितां जन्मला आहे. तो युद्धामध्यें धन जिंकतो.

४. हे अग्ने, ज्याच्या घरचा तूं दूत होतोस, आणि ज्याच्या कल्याणाकरतां तूं हविरन्न घेऊन जातोस. तो तूं आमचा यज्ञ सुशोभित कर.

५. हे अंगिरा, बलपुत्रा अग्ने, तुला लोक सुहव्य; सुदेव आणि सुयज्ञ असें म्हणतात.

६. हे सुप्रकाशा अग्ने, हवि भक्षण करण्याकरतां आणि स्तोत्र ऐकण्याकरतां तूं येथें त्या देवांना घेऊन ये.

७. हे अग्ने, जेव्हां तूं दौत्य करण्याकरतां जातोस, तेव्हां तूं चालत असतां तुझ्या घोड्याचा आणि रथाचा आवाज कधींहि ऐकूं येत नाहीं.

८. हे अग्ने, जरी एखादा योद्धा प्रतिपक्षापेक्षां कमजोर असला, तरी तूं त्याचा रक्षक असल्यामुळें तो निर्भय होतो आणि तुला हवि अर्पण करून प्रसिद्ध होतो.

९. हे अग्निदेवा, देवांना हविरन्न देणाऱ्या भक्ताला तूं मोठे तेजस्वी आणि वीर्यशाली वैभव प्राप्त करून देतोस.

सूक्त पंचाहत्तरावें.

ऋषिः—रहुगणपुत्र गोतम; देवताः-अग्नि; छंदः-— गायत्री.

१. हे अग्ने, हविरन्नें आपल्या मुखांत घालीत अत्यंत कीर्तिकर आणि देवांना आवडणारें हें स्तोत्र तूं स्वीकार.

२. हे अंगिरश्रेष्ठा, हे अत्यंत बुद्धिमान अग्ने, तुला प्रिय व आवडणारे स्तोत्र आम्ही म्हणतों.

३, हे अग्ने, [illegible] लोकामध्यें तुझा बांधव कोण आहे? तुला हविर्भाग देणारा यज्ञ कोणता आहे? तूं कोण आहेस, आणि कोठें आश्रय करून आहेस ?

४. हे अग्ने, तूं लोकांचा बांधव आहेस. तूं मित्र आहेस. प्रिय आहेस.पूजनीय आहेस. जिवलग मित्राचा तूं मित्र आहेस.

५. हे अग्ने, तूं आमच्याकरतां मित्रावरुणांचें यजन कर. देवांचें यजन कर. मोठ्या यज्ञाचें यजन कर. तूं आपल्या मोठ्या वराचें यजन कर.

सूक्त शहात्तरावें

ऋषिः—रहूगणपुत्र गोतम; देवता–अग्नि; छंदः–त्रिष्टुभ.

१. हे अग्ने, कोणत्या उपासनेनें तुझें मन आमच्याकडे वळेल? कोणती स्तुति तुला अत्यंत सुखदायक होईल? किंवा यज्ञ करून कोणी तुझें मन प्राप्त करून घेतलें आहे? किंवा कशाप्रकारें आम्ही तुला हवि अर्पण करावें?

२. हे अग्ने, इकडे ये. आणि देवांना बोलावून येथें बैस. अहिंस्य असा तूं आमचा चांगला पुढारी हो. सर्वव्यापक द्यावापृथिवी तुझें रक्षण करोत. आम्हांला श्रेष्ठ प्रसाद मिळावा, म्हणून तूं देवांचें यजन कर.

३. हे अग्ने, तूं सर्व राक्षसांना जाळून खाक कर. आणि यज्ञांचा विघ्नहर्ता हो. आणि सोमपति (इंद्राला) हरिद्वर्ण घोड्यावरून घेऊन ये. त्या अत्यंत दानशूरासाठीं आम्ही आदरातिथ्याची तयारी केली आहे.

४. हे अग्ने, तूं आपल्या तोंडानें हवि वाहून नेणारा आहेस. मी तुला संततिदायक स्तोत्रानें बोलावीत आहे. बोलाविल्याबरोबर देवांसहवर्तमान येथें येऊन बैस. हे यज्ञार्हा, होत्यानें आणि पोत्यानें केलेली सेवा गोड करून घे. हे धनोत्पादका, हे दानशूरा, तूं आमची प्रार्थना समजून घे.

५. हे अग्ने, विद्वान असा तूं विद्वान ऋत्विजांबरोबर विद्वान मनुष्यांचे हविर्भागांनीं देवांचें यजन करतोस, त्याचप्रमाणें हे अधिक सत्यस्वरूप अग्ने, हे होत्या, आज तूं आमच्या येथें आल्हादक ज्वालांनीं देवांचें यजन कर.

सूक्त सत्याहत्तरावें

ऋषिः—रहुगणपुत्र गोतम; देवता–अग्नि; छंदः–त्रिष्टुभ.

१. आम्ही कशा प्रकारें अग्नीचें हवन करावें? त्या अत्यंत तेजस्वी अग्नीचें कोणतें देवप्रिय स्तोत्र आम्ही म्हणावें कीं त्यायोगें मर्त्यांमध्यें अमर असणारा सत्यस्वरूप होता आणि यज्ञार्ह अग्नि देवांचें यजन करील?

२. हे मित्रहो, जो यज्ञामध्यें अत्यंत सुखकारक, सत्यस्वरूप आणि देवांना बोलविणारा आहे त्या अग्नीला नमस्कारपूर्वक येथें स्थापन करा. कारण, तो अग्नि माणसासाठीं देवांना घेऊन येतो, त्यांस जागृत करतो आणि मनःपूर्वक त्यांचें यजन करतो.

३. कारण, तो शूर, पराक्रमी, विजयी आणि मित्रांप्रमाणें अकल्पित धन मिळवून देणारा होय. त्या शत्रुनाशक अग्नीची सर्व आर्यदेवोपासक जनता यज्ञामध्यें प्रथम स्तुति करते.

४. तो अग्नि, शूरांतला शूर आणि शत्रुभक्षक आहे. तो आमच्या प्रार्थना आणि हविरन्न गोड करून घेवो. जे अत्यंत धनवान, बलवान आणि हविर्दाते आहेत, ते आमचीं स्तोत्रें आणि हविरन्नें नित्य प्राप्त करून घेवोत.

५. अशा प्रकारें सत्यस्वरूप आणि ज्ञानवान अग्नीची गोतामांनीं स्तुति केली आहे. त्यांच्या घरीं तो तेज वाढवो, बल वाढवो. तो विद्वान अग्नि यथेष्ट हविर्भाग प्राप्त करो.

सूक्त अठ्याहत्तरावें.

ऋषिः—रहूगणपुत्र गोतम; देवता–अग्नि; छंदः–गायत्री.

१. हे सर्वज्ञ व सर्वसाक्षी अग्ने, आम्ही गोतम तुला स्तुतींनीं आणि स्तोत्रांनीं पुनः पुनः स्तवितों.

२. त्या तुलाच धनाची इच्छा करणारे आम्ही गोतम सेवीत आहोंत आणि स्तोत्रांनीं पुनः पुनः स्तवीत आहोंत.

३. त्या तुलाच आम्ही अंगिराप्रमाणें बोलावीत आहों. अत्यंत दानशूर अशा तुला आम्ही स्तोत्रांनीं पुनः पुनः स्तवीत आहोंत.

४. ज्या तूं दस्यूंचा विध्वंस केलास, त्या अत्यंत श्रेष्ठ शत्रुहन्त्या अशा तुझी आम्ही स्तोत्रांनीं पुनः पुनः स्तुति करीत आहों.

५. आम्ही रहुगणांनीं अग्नीला उद्देशून मधुर स्तोत्र म्हटलें आहे. आम्ही त्याला स्तोत्रांनीं पुनः पुनः स्तवितों.

सूक्त एकोणऐंशीवें

ऋषिः—रहूगणपुत्र गोतम; देवता–अग्नि, छंदः–१ ते ३ त्रिष्टुभ, ४ ते ६ उष्णिह्, ७ ते १२ गायत्री.

१. अन्तरिक्षांतून बाहेर पडण्याचें वेळीं सोनेरी केशरूपी ज्वाला असलेला, सर्पासारखा आणि गतिमान अग्नि वाऱ्याप्रमाणें शीघ्र गति होतो. तो उषेप्रमाणें शुद्ध तेजानें युक्त, ज्ञानवान, यशस्वी, गतिमान व सत्य होय.

२. हे अग्ने, तुझे सुपर्ण (घोडे) अशा प्रकारें सर्वत्र नाश करीत येतात, तव्हां तो काळा वृषभ (ढग) मोठ्यानें गर्जूं लागतो. आणि असें झालें म्हणजे तो (वैद्युत अग्नि) हंसतमुख आणि कल्याणकारक आपोदेवींसह खालीं येतो. (त्या वेळीं) पाऊस पडतो आणि मेघ गरजतात.

३. त्यावेळीं अत्यंत शुद्ध असें पाणी पिऊन पुष्ट होत्साता तो अग्नि अन्तरिक्षांतील मार्गानें तें शुद्ध पाणी खालीं आणतो. तव्हां अर्यमा, मित्र, वरुण आणि सर्वव्यापी मरुद्गण अन्तरिक्षाला भोंक पाडून जलसिंचन करतात.

४. हे बलपुत्र आणि ज्ञानवान अग्ने, अन्नाचा अधिपति आणि गोसंपन्न असा तूं आम्हांला विपुल अन्न दे.

५. हे बहुमुख अग्ने, तूं प्रज्वलित, स्थानसंपन्न, कवि आणि स्तुत्य आहेस. धनयुक्त असा तूं आम्हांला धन दे.

६. हे तीक्ष्णमुख अग्निराजा, तूं रात्रीच्या वेळीं, पहाटे आणि दिवसा राक्षसांना जाळून टाक.

७. हे सर्व बुद्धिवानांमध्यें वंद्य असणाऱ्या अग्ने, आम्ही तुला गायत्री छंदांतलें सूक्त अर्पण केलें असतां तूं आमचें रक्षण कर.

८. हे अग्ने, अनेकांचा पराभव करणारा आणि श्रेष्ठ असा तूं सर्व युद्धामध्यें दुष्प्राप्य असें धन आम्हांला दे.

९. हे अग्ने, जन्मभर भरपूर पुरणारें असें धन तूं आम्हांला कृपा करून दे. आम्ही जगावें म्हणून आम्हांला सुख दे.

१०. हे गोतमा, धनाची इच्छा करणारा तूं तीक्ष्ण ज्वाला असलेल्या अग्नीची शुद्ध स्तुति कर आणि त्यास स्तोत्रें अर्पण कर.

११. हे अग्ने, जो कोणी आम्हांस जवळून किंवा दुरुन त्रास देईल त्याचा नाश होवो. तूं केवळ आमचाच उत्कर्ष करणारा हो.

१२. सहस्राक्ष आणि सर्वदर्शी अग्नि राक्षसांचा नाश करतो. स्तुत्य आणि होता अशा अग्नीची स्तुति केली जात आहे.

सूक्त ऐशींवें.

ऋषिः—रहूगणपुत्र गोतम; देवता-इंद्र; छंदः-पंक्ति.

१. अशा प्रकारें सोमाच्या मदांत स्तोत्यानें हें प्रभावशाली स्तोत्र केलें आहे. हे अत्यंत बलशाली व वज्रधारी इंद्रा, तूं आपल्या सामर्थ्यानें अहीला पृथ्वीपासून दूर कर आणि आपलें आधिपत्य प्रकट कर.

२. हे वज्रधारी इंद्रा, तूं अत्यंत बलशाली, मदयुक्त, श्येन पक्षानें आणिलेला सोमरस पिऊन प्रसन्न झालास आणि त्यायोगें आपल्या सामर्थ्यानें वृत्राला पाण्यापासून दूर करून ठार केलेंस आणि आपलें अधिपत्य प्रकट केलेंस.

३. चल. मार. जिंक. तुझें वज्र कोणीहि निवारणार नाहीं. कारण, हे इंद्रा, तुझें बल मारक आहे म्हणून तूं वृत्राला ठार कर. आणि उदक हिसकावून घे आणि आपलें आधिपत्य प्रकट कर.

४. हे इंद्रा, तूं पृथ्वीवरून आणि द्युलोकावरून वृत्राला ठार करून नाहींसा कर आणि मरुतांसहित व जीवांना तृप्त करणारीं हीं उदकें खालीं सोड आणि आपलें आधिपत्य प्रकट कर.

५. क्रोधाविष्ट इंद्रानें थरकांप करून सोडणाऱ्या वृत्रावर चालून जाऊन त्याच्या तोंडावर वज्र मारून त्यास ठार केलें व उदक वहावयास लावलें आणि आपलें आधिपत्य प्रकट केलें.

६. आपल्या शंभर धारांनीं युक्त अशा वज्रानें तो (वृत्राच्या) तोंडावर प्रहार करून त्यास ठार करतो आणि मग सोमरस पिऊन आनंदित होत्साता गाण्याची इच्छा करतो आणि आपलें आधिपत्य प्रकट करतो.

७. पर्वतासारखें वज्र धारण करणाऱ्या हे इंद्रा, तुझें सामर्थ्य अजिंक्य आहे. आणि म्हणून त्या मायावी मृगाला तूं आपल्या मायेनें ठार केलेंस आणि आपलें आधिपत्य प्रकट केलेस.

८. हे इंद्रा, नावा ज्यांत चालतील अशा नव्वद नद्यांच्या जवळ तुझीं वज्रें पडून राहिलीं आहेत. हे इंद्रा, तुझें वीर्य मोठें आहे. तुझ्या बाहूंमध्यें मोठें सामर्थ्य आहे. तूं (सर्वांवर) आपलें आधिपत्य प्रकट करतोस.

९. ज्याचें हजारानीं एकत्र मिळून महत्त्व गाईलें, ज्याची वीस जणांनीं जमून प्रार्थना केली, ज्याची शेकडोंनीं स्तुति केली, अशा त्या इंद्राला हें स्तोत्र अर्पण असो. त्यानें (सर्वांवर) आपलें आधिपत्य प्रकट केलें.

१०. इंद्रानें वृत्राचें सामर्थ्य नाहींसें केलें आणि आपल्या आयुधानें त्याचें आयुध मोडून टाकिलें. इंद्रानें वृत्राला ठार करून पाणी मोकळें केलें, हा त्याचा मोठा पराक्रम होय. तो (सर्वांवर) आपलें आधिपत्य प्रकट करतो.

११. हे वज्रधारी इंद्रा, जेव्हां तूं मरुतांच्या साहाय्यानें मोठ्या बळानें वृत्राला ठार केलेंस, तेव्हां तुझ्या क्रोधाला भिऊन ह्या महान् द्यावापृथ्वी भीतीनें कांपूं लागल्या. अशा रीतीनें तूं (सर्वांवर) आपलें आधिपत्य प्रकट करतोस.

१२. वृत्र आपल्या क्षोभानें किंवा गर्जनेनेंहि इंद्राला भिववूं शकला नाहीं. उलट हजारो धारांचें पोलादी वज्रच त्याच्यावर पडलें. अशा रीतीनें हे इंद्रा, तूं आपलें आधिपत्य प्रकट करतोस.

१३. जेव्हां तुझ्या वज्रानें वृत्र आणि अशनियांची झुंज लाविली व जेव्हां हे इंद्रा, तूं अहीला ठार मारलेंस, तेव्हां तुझ्या पराक्रमानें द्युलोक भरून गेला. अशा रीतीनें तूं आपलें आधिपत्य प्रकट करतोस.

१४. हे वज्रधारी इंद्रा, तुझ्या गर्जनेबरोबर सर्व कांहीं स्थावरजंगम कंपायमान होतें. तूं रागावला असतांना त्वष्टासुद्धां भीतीनें कांपूं लागतो. अशा प्रकारें तूं आपलें आधिपत्य प्रकट करतोस.

१५. आतां पावेतों आम्हांस इंद्राचें बरोबर ज्ञान नाहीं, कारण त्याच्यापेक्षां अधिक पराक्रमी कोण आहे बरें? फार काय, देवांनींसुद्धां त्याच्याच ठिकाणीं पराक्रम, बुद्धि आणि बळ हीं स्थापित केलीं. अशा रीतीनें इंद्र आपलें आधिपत्य प्रकट करतो.

१६. ज्याला उद्देशून अथर्वा, पिता मनु आणि दध्यङ् (ऋषि) यांनीं स्तोत्र तयार केलें, त्या इंद्राला पूर्वींप्रमाणेंच स्तोत्रें आणि कथा हीं प्राप्त होवोत. अशा प्रकारें इंद्र आपलें आधिपत्य प्रकट करतो.

सूक्त एक्यांयशीवें.

ऋषिः—रहूगणपुत्र गोतम; देवता-इंद्र; छन्दः—पंक्ति.

१. वृत्रहन्त्या इंद्राला माणसांनीं बल प्राप्त व्हावें आणि हर्ष व्हावा म्हणून वाढविलें आहे. त्यालाच मोठ्या युद्धांत आणि संग्रामामध्यें आम्ही बोलावतों, तो आमचें लढाईंत संरक्षण करो.

२. हे वीरा, तूं एकटाच सेनेप्रमाणें आहेस. शत्रूंचा मोठा पराभव करणारा आहेस. लहान भक्ताला देखील तूं थोर करतोस. तुजकरितां सोमरस काढणाऱ्याला तूं बहुत संपत्ति मिळवून देतोस.

३. जेव्हां युद्धप्रसंग येतात तेव्हां बलवन्ताला धन प्राप्त होतें. तूं आपले सामर्थ्यसंपन्न घोडे जोड. हे इंद्रा, तूं कोणाला मारशील आणि कोणाला संपत्ति देशील? आम्हांला तूं संपत्ति दे.

४. बलवानाप्रमाणेंच महान, बुद्धिमान आणि भयंकर असा इंद्र आपलें बळ वृद्धिंगत करतो. उंच, सुरूप, हरिद्वर्ण घोडे असलेला असा इंद्र आपल्या पिळदार हातांमध्यें पोलादी वज्र शोभेकरितां धारण करतो.

५. इंद्रानें भूप्रदेश आणि अन्तरिक्षहि व्यापून टाकलीं आहेत. त्यानें द्युलोकांत तेजस्वी नक्षत्रें भरून टाकलीं आहेत. हे इंद्रा, तुझ्यासारखा कोणी नाहीं, कोणी झाला नाहीं व कोणी होणार नाहीं. तूं विश्वापेक्षांहि मोठा आहेस.

६. जो प्रभू हविर्दात्या उपासकाला मर्त्यभोग्य धन देतो, तो तें आम्हांला देवो. हे इंद्रा, तूं आपल्या विपुल संपत्तीचा भाग आम्हांस दे. मला तुझी संपत्ति मिळो.

७. तो सरळमार्गी इंद्र प्रसन्न झाला असतांना आम्हांला गाईचे कळप देतो. हे इंद्रा, तूं आपल्या दोन्ही हातांनीं शेकडों धनें आम्हांकरितां संग्रहित कर आणि आम्हांस धन दे व उत्साहित कर.

८. हे शूरा, सोम काढून तयार होतांच तो पिऊन तूं आम्हांला पराक्रम करण्याकरितां आणि धन देण्याकरितां तयार हो. कारण, तूं मोठा धनवान आहेस, हें आम्ही जाणतों आणि म्हणून आम्ही आमचे मनोरथ तुझ्यापुढें ठेवितो; तर तूं आमचा रक्षक हो.

९. हे इंद्रा, ते हे सर्व प्राणी सर्व श्रेष्ठ प्रकारचें धन प्राप्त करितात. हवि न देणाऱ्या लोकांचें धन तूं जाणतोस. तर हे प्रभो, त्यांचें धन तूं आम्हांला आणून दे.

सूक्त ब्यांयशीवें.

ऋषिः—रहूगणपुत्र गोतम; देवता-इंद्र; छन्दः-१-५ पंक्ति, ६ जगती.

१. हे धनवन्ता, तूं आमच्या प्रार्थना मनःपूर्वक ऐक. दुर्लक्ष करूं नकोस. तूं आम्हांला गोड आणि सत्य भाषण करणारी वाणी दिली आहेस; व म्हणूनच आम्ही तुझी प्रार्थना करीत आहोंत. करितां हे इंद्रा, तूं आपले घोडे सत्वर जोड.

२. हे इंद्रा, तूं दिलेलें अन्न खाणारे भक्तजन आनंद पावले आणि हर्षभरित होऊन नाचूं लागले. स्वतःच्या तेजानें प्रकाशमान असणारे विप्र नव्या

स्तोत्रानें स्तुति करूं लागले. करितां हे इंद्रा, तूं आपले घोडे सत्वर जोड.

३. हे धनवंता, आम्हांकडे कृपा दृष्टीनें पाहणाऱ्या तुला आम्ही वंदन करीत आहोंत. हे इंद्रा, स्तुति केलेला असा तं आम्हांसाठीं अन्नानें भरलेला गाडा घेऊन लौकर ये. व त्यासाठीं तूं आपले घोडे लौकर जोड.

४. तोच हा विशाल आणि गाई मिळवून देणारा रथ होय कीं जो हरिद्वर्ण घोडे असलेल्या इंद्राकरतां सोमरसानें पूर्ण असलेलें पात्र जाणतो. करितां हे इंद्रा, तूं आपले घोडे सत्वर जोड.

५. हे शतक्रतो इंद्रा, तुझा उजवा घोडा आणि डावाहि जोडलेला असो. त्याच्या योगानें तं आमच्या हविरन्नांनीं तृप्त होऊन त्या रथानें आपल्या प्रिय भार्येकडे जा. त्यासाठीं हे इंद्रा, तूं आपले घोडे सत्वर जोड.

६. मी स्तोत्र म्हणून तुझे आयाळ असलेले घोडे जोडतों. तर तूं इकडे निघून ये. हातांत (लगाम) धर. तुझ्याकरतांच काढलेले हे सोमरस तीक्ष्ण आणि मदकर असून ते तुला उत्साहित करतील. हे वज्रधारी इंद्रा, तूं पूषा देवाला बरोबर घेऊन पत्नीसहवर्तमान आनंदित हो.

सूक्त त्र्यांशीवें

ऋषिः—रहूगणपुत्र गोतम; देवता–इंद्र; छंदः—जगती.

१. हे इंद्रा, जो मर्त्य तुझ्या संरक्षणाखालीं सुरक्षित आहे, त्याला अश्वसंपत्ति आणि गाई प्रथम प्राप्त होतात. अत्यंत शुद्ध नद्या सर्व बाजूंनीं समुद्राला भरतात त्याप्रमाणें अतिविपुल धनानें त्यालाच तूं भरीत असतोस.

२. ज्याप्रमाणें जलदेवता (सखल प्रदेशाकडे) वाहतात, त्याप्रमाणें देव होत्यांनीं सिद्ध केलेल्या पात्राकडे धावतात. आणि अंतरिक्षाप्रमाणें आपली दृष्टि खालीं पसरतात. देवभक्त सोमपात्र पूर्वेकडे नेतात आणि स्तोत्रांच्या योगानें आनंद करणाऱ्या सोमपात्राची, एकाच कन्येची अनेक वर इच्छा करितात, त्याप्रमाणें ते इच्छा करतात.

३. जें जोडपें तूप भरलेली पळी पुढें करून तुझी पूजा करतें, त्यांना तूं चांगला आशीर्वाद देत असतोस. तो यजमान उपद्रवरहित होऊन तुझी भक्ति करतो आणि उत्कर्ष पावतो. त्या सोमरस काढणाऱ्या यजमानाला कल्याणकारक शक्ति प्राप्त होते.

४. अंगिरसांनीं आपल्या सत्कृत्यानें व उपासनेनें अग्नि सिद्ध केला व प्रथम हविरन्न अर्पण केलें. त्यामुळें पणींचें सर्व अन्न त्याच्या गाईघोड्यांसह आणि पशूंसह ह्या पराक्रमी अंगिरसांना प्राप्त झालें.

५. प्रथम अथर्वानें यज्ञांच्या योगानें मार्ग तयार केला. त्यानंतर नियमांचा पालक सूर्य जन्मास आला. उशनाकाव्य (नांवाचा ऋषि) त्याला साहाय्यक झाला. आणि त्यांनीं गाई हांकून आणिल्या. नियामक अशा अमर पुत्राला, आम्ही भजतों.

६. ज्या उपासकाच्या येथें सत्कर्मासाठीं दर्भ तोडले जातात अथवा जेथें स्तोता स्तोत्र म्हणून द्युलोकीं गाजवितो किंवा जेथें चांगल्या गायकाप्रमाणें ग्रावा ध्वनि करतो, त्याच उपासकाच्या उपासनेंत इंद्र रममाण होतो.

सूक्त चौऱ्यांयशीवें.

ऋषिः—रहुगणपुत्र गोतम; देवताः—इंद्र; छंदः—१ ते ६ अनुष्टुभ, ७ ते ९ उष्णिह, १० ते १२ पंक्ति, १३ ते १५ गायत्री, १६–१८ त्रिष्टुभ, १९ बृहती, २० सतोबृहती.

१. हे इंद्रा, तुझ्याकारितां सोमरस काढिला आहे. हे अत्यंत बलशाली आणि शूरा, तूं ये. ज्याप्रमाणें सूर्य आपल्या किरणांनीं अंतरिक्ष व्यापितो त्याप्रमाणें सोमरसपानानें आलेलें सामर्थ्य तुला व्यापो.

२. ऋषींच्या स्तोत्रांकडे आणि मनुष्यांच्या यज्ञांकडे अजिंक्य शक्तिमान इंद्राला हरिद्वर्ण घोडे घेऊन येतात.

३. हे वृत्रहंत्या, तूं आपल्या रथावर आरूढ हो. आमच्या स्तोत्रांच्या योगानें तुझ्या घोड्यांची जोडी जोडली जाते. सोम कुटण्याचा दगड आपल्या मधुर नादानें तुझें मन आम्हांविषयीं अनुकूल करो.

४. हे इंद्रा, हा अत्युत्तम, अमर आणि मद उत्पन्न करणारा सोमरस तूं पी. या यज्ञगृहामध्यें पवित्र सोमरसाच्या धारा तुजकडेच वाहात आहेत.

५. हे मित्रांनों. खरोखर इंद्राची स्तुति करा. त्यांचीं स्तोत्रें म्हणा; हे गाळून काढलेले सोमरस त्याला मत्त करोत. त्या सर्वोत्कृष्ट शक्तीला तुम्ही नमस्कार करा.

६. हे इंद्रा, जेव्हां तूं आपलें घोडे जोडतोस, तेव्हां तुझ्यापेक्षां अधिक चांगला रथी कोणीहि नसतो.

तुझ्या सामर्थ्याची बरोबरी करणारा कोणी नाहीं. तुझ्यासारखे घोडे कोणाचेहि नाहींत.

७. हवि अर्पण करणाऱ्या मानवाला जो एकटाच संपत्ति देतो, तो इंद्रच निष्कंटक प्रभु होय.

८ यज्ञ न करणाऱ्या माणसाला तूं आपल्या पायानें छत्रीच्या झाडाप्रमाणें केव्हां चिरडशील आणि बा इंद्रा, तूं आमच्या प्रार्थना केव्हां ऐकशील ?

९. हे इंद्रा, जो कोणी उपासक इतरांना सोडून सोम तयार करून केवळ तुलाच भजतो, त्याचें तें उग्र कृत्य केवळ तुझ्याच पराक्रमामुळें होय.

१०. गोड, सर्वव्यापी आणि मधुर असा सोमरस इंद्राच्या गाई पितात; त्या इंद्राबरोबर जाणाऱ्या असून त्या वीर्यवान वीराबरोबर मत्त होतात आणि शोभिवंत दिसतात. इंद्राच्या आज्ञेनुसार त्या कल्याणकारक होतात.

११. त्या त्याच्या निरनिराळ्या रंगांच्या गाई आपल्या दुधानें सोममिश्रित करतात. इंद्राच्या त्या प्रिय धेनु प्राणघातक वज्र फेकितात. इंद्राच्या आज्ञेनुसार त्या कल्याणकारक होतात.

१२. त्या ज्ञानवान गाई ह्याच्या बळाची नमस्कारपूर्वक पूजा करितात. ह्याच्या सर्व कार्यांत त्या त्याजबरोबर सर्वांच्या पूर्वीं असतात. त्या इंद्राच्या आज्ञेनुसार कल्याणकारक होतात.

१३. तो अजिंक्य इंद्र दध्यङ् ऋषीच्या हडकांनीं नव्याण्णव शत्रू ठार करिता झाला.

१४. पर्वतावर पडलेलें जें घोड्याचें शिर इंद्र शोधीत होता, तें त्याला शर्यणावतांत सांपडलें.

१५. येथें धावणाऱ्या चंद्राच्या मंडलांत सूर्याचे गुप्त किरण अशा प्रकारें ध्यानांत येतात.

१६. आज महापराक्रमी, तेजस्वी, दुर्धर्ष, बाण मारणारे, हृदयावर बाण फेकणारे आणि कल्याणकारक असे वृषभ कोण रथाला जोडील ? जो कोणी त्यांच्याकडून रथ ओढीलहि तो चिरायू होईल.

१७. पळतो कोण, पराभव कोणाचा होतो, भितो कोण, इंद्राचें साहाय्य कोण जाणतो, इंद्र आपल्याजवळ आहे हें कोण जाणतो ? आपल्या मुलाचा व हत्तीचा भार इंद्रावर कोण घालील ? आपल्या संपत्तीचा भार त्याजवर कोण घालील ? आपल्या स्वताचा आणि इतर लोकांचा भार इंद्रावर कोण घालील ?

१८. हवीनें आणि घृतानें अग्नीला कोण स्तवितो? सर्वकाळ सुचेनें कोण यज्ञ करूं शकतो ? कोणासाठीं देव यज्ञीय द्रव्य लवकर घेऊन येतील ? कोणाला यज्ञप्रिय आणि सुदेव असें समजतात.

१९. हे अत्यंत शक्तिमान इंद्रा, तूं श्रेष्ठ देव आहेस. तूं मर्त्यांवर राज्य करतोस. हे धनवंता, तुझ्याशिवाय आम्हांवर कृपा करणारा दुसरा कोणी नाहीं. म्हणून हे इंद्रा, आम्ही तुझीच स्तुति गातों.

२०. हे संपन्ना, तुझे प्रसाद आणि तुझी कृपा आम्हांला कधींहि उपद्रव न देवो. हे लोकहितकर्त्या, तूं आम्हां माणसांना सर्व संपत्ति दे.

सूक्त पंचायशीवें.

ऋषिः—रहूगणपुत्र गोतम; देवता–मरुत; छन्दः—५–१२ त्रिष्टुभ. अवशिष्ट–जगती.

१. शीघ्रगामी आणि महान पराक्रमी असे ते मरुत चालूं लागले म्हणजे स्त्रियाप्रमाणें आपणांस सुशोभित करतात. त्यांनींच द्यावापृथिवी वृद्धिंगत केली. ते बलाढ्य मरुत युद्धामध्यें आनंद पावतात.

२. ते रुद्रपुत्र मरुत आपल्या मोठेपणानें श्रेष्ठ पद पावले, आणि द्युलोकीं त्यांनीं घर तयार केलें. पृश्नीचे पुत्र मरुत इंद्राची स्तुति करून बल उत्पन्न करते झाले, आणि ऐश्वर्यवान बनले.

३. ते भूमिपुत्र मरुत जेव्हां आपणांस अलंकारानें शोभवितात तेव्हां ते तेजस्वी व लकाकणारीं शस्त्रें धारण करतात. ते सर्व शत्रूंचा पराभव करतात. त्यांच्या मार्गावर पाणी गळत असतें.

४. ते पूजनीय मरुत आपल्या भाल्यांच्या योगानें प्रकाशतात. ते आपल्या बलानें अचल पदार्थांना सुद्धां कांपवितात. हे मरुतांनो, तुम्ही वीर्यशाली समूहानें युक्त असें जेव्हां पांढऱ्या ठिपक्याच्या हरिणी आपल्या रथाला जोडता, तेव्हां तुम्ही मनाप्रमाणें वेगवान होता.

५. हे मरुतहो, जेव्हां तुम्ही आपल्या रथाला पांढऱ्या ठिपक्यांच्या हरिणी जोडतां आणि युद्धामध्यें मेघरूपी पर्वताशीं युद्ध करतां तेव्हां त्या आरक्त (वैद्युत अग्नीच्या योगानें तेजोयुक्त) धारा वाहवितात आणि चामडे भिजवावे त्याप्रमाणें सर्व पृथ्वी उदकानें भिजवून टाकतात.

६. हे मरुतांनो, बाहुरूप पक्ष्यांच्या योगानें तुमचें शीघ्रगामी घोडे तुम्हांला घेऊन येवोत. वेगानें उडत जाणारे तुम्ही इकडे या व दर्भावर बसा. तुम्हांसाठीं हे

प्रशस्त आसन घातलें आहे. हे मरुतहो, तुम्ही हा मधुर सोमरस पिऊन आनंदित व्हा.

७. ते आपल्या मोठेपणानें वाढून शक्तिमान झाले. ते स्वर्गावर चढले आणि तेथें आपलें मोठें घर तयार करिते झाले. जेव्हां विष्णूनें वीर्यशाली आणि मदयुक्त (इंद्राचें) रक्षण केलें, तेव्हांपासून मरुत पक्ष्याप्रमाणें येऊन आपल्या प्रिय दर्भासनावर बसूं लागले.

८. शूराप्रमाणें, धांवत जाणाऱ्या योध्याप्रमाणें, लूट मिळविण्याविषयीं झटणाऱ्या वीराप्रमाणें मरुत समरांगणांत युद्ध करतात. सर्व भुवनें मरुतांना भितात. ते राजाप्रमाणें दिसण्याला रागीट आहेत.

९. जेव्हां परमकुशल त्वष्टा चांगलें घडीव सुवर्णमय आणि सहस्रधारांचें वज्र तयार करिता झाला, तेव्हां इंद्रानें मनुष्यांना हितकारक कृत्यें करण्यासाठीं तें हातांत घेतलें आणि वृत्राला ठार मारिलें व उदकांचा संचय मोकळा केला.

१०. त्यांनीं आपल्या पराक्रमानें वर विहीर खणली. मोठमोठे पर्वत देखील फोडिले. वाण नांवाचे तंतुवाद्य वाजविणारे दानशूर मरुत सोमाच्या उत्साहांत मोठमोठीं कर्में कर्ते झाले.

११. त्यांनीं उदकांना खालीं वक्र गतीनें नेलें आणि तृषार्त गोतमाकरितां कूप वाहाविला. ते कांतिमान मरुत आपलें साह्य घेऊन त्यांजकडे येतात आणि स्तोत्यांचे मनोरथ पूर्ण करितात.

१२. हे मरुतांनों, तुमचीं जीं सुखें स्तोत्यांना प्राप्त होतात, तुम्ही आपल्या भक्ताला जीं तीन प्रकारचीं सुखें प्राप्त करून देतां, तीं तुम्ही आम्हांला प्राप्त करून द्या. हे शूरहो, वीर्यशाली आणि भरपूर संपत्ति तुम्ही आम्हांला द्या.

---

१०. टीप—तान्हेलेल्या गोतमानें मरुतांना उदक मागितलें. तेव्हां मरुतांनीं जवळच एक कूप खणून तो गोतमाच्या जवळ नेला आणि त्याला पाणी काढून तृप्त केलें. हें ह्या व पुढल्या ऋचेंत वर्णन केलें आहे.

सूक्त श्याहैंशीवें.

ऋषिः—रहूगणपुत्र गोतम; देवता–मरुत; छंदः–गायत्री.

१. हे अत्यंत तेजस्वी मरुतांनो, ज्याच्या घरीं द्युलोकाहून येऊन तुम्ही सोमरस पितां, तो तुमचा भक्त उत्तम प्रकारें सुरक्षित होय.

२. हे हविर्वाहक मरुतांनों, तुम्ही आमचा धांवा ऐका. मग तो हविर्दात्या यजमानानें यज्ञांच्या योगानें केलेला असो अथवा स्तोत्रांच्या योगानें केलेला असो.

३. हे मरुतांनो, ज्याचे ऋत्विज ज्ञात्या अशा तुमची सेवा करतात, तो गाईंनीं भरलेल्या गोठ्याचा अधिपति होतो.

४. यज्ञामध्यें ह्या वीरांकरितां सोमरस पिळून दर्भावर ठेविले आहेत आणि त्या सोमाची स्तुतिपूर्वक प्रसंशा केली जात आहे.

५. जो मरुद्गण सर्व लोकांचा पराभव करतो तो या उपासकाची स्तुति ऐकून घेवो आणि अन्नाचे प्रवाह स्तोत्याकडे धांवत येवोत.

६. हे मरुतांनो, आम्ही पुष्कळ वर्षांपासून सर्वज्ञ अशा तुमच्या संरक्षणामुळें तुम्हांला हवि देत आलों आहों.

७. हे परमपूज्य मरुतहो, ज्याचा हवि तुम्ही स्वीकारतां तो मर्त्य भाग्यशाली होय.

८. हे बलशाली आणि शूर मरुतहो, स्तुति करणाऱ्याच्या श्रमाकडे आणि प्रार्थना करणाऱ्याच्या मागणीकडे लक्ष द्या.

९. हे बलशाली व पराक्रमी मरुतहो, तुम्ही आपल्या मोठेपणानें तुमचें बल प्रकट करा आणि विद्युल्लतेनें राक्षसगणास ठार मारा.

१०. गुहेंत राहणारा अंधःकार गुहेंतच राहूं द्या. तुम्ही सर्व शत्रूंना ठार मारून टाका. आम्ही ज्या प्रकाशाची इच्छा करतों तो तुम्ही प्रकट करा.

सूक्त सत्यांयशीवें.

ऋषिः—रहूगणपुत्र गोतम; देवता–मरुत; छंदः–जगती.

१. अत्यंत बलवान, महाप्रतापी, श्रेष्ठ, अजिंक्य, संघभूत, सोमपी, अत्यंत प्रियकर आणि अत्यंत पराक्रमी असे मरुत, कित्येक किरण जसे नक्षत्रासह दृष्टीस पडतात, त्याप्रमाणें आपल्या अलंकारासह प्रकट होत आहेत.

२. मरुतांनों, जेव्हां तुम्ही आकाशांतलि प्रदेशांत पक्ष्याप्रमाणें कोणत्याहि मार्गानें आपला रथ हाकारतां तेव्हां तुमच्या रथावर मेघ वृष्टि करतात. तुम्ही आपल्या उपासकाकरतां तुपासारखें पाणी ओतीत असता.

३. जेव्हां मरुत आपले रथ जोडतात आणि सुशोभित करतात तेव्हां ह्यांच्या उड्या टाकीत जाण्यानें पृथ्वी भिऊन दीनवाणी होऊन थरथर कापते. ते मरुत

खेळाडू, वाहणारे, लखलखणारे, भाले धारण करणारे आणि आपलें मोठेंपण स्वत:च स्तवीत असतात.

४. कारण, तो मरुद्गण स्वत: गतिमान आहे, पांढऱ्या ठिपक्यांचे हरिण हेच ज्याचे घोडे होत, जो तरुण आहे, असा समर्थ मरुद्गण स्तुतीच्या योगानें सर्व बलांनीं युक्त झाला आहे. हे मरुद्गणा, तूं सत्य आहेस, ऋणहर्ता आहेस आणि अनिंद्य आहेस, तर वीर्यशाली असा तूं आमच्या कर्मांचा संरक्षक हो.

५. आम्ही पुरातन पित्याचे वंशज असें सांगतों कीं, सोम पाहिला असतां जिभेला पाणी सुटतें. जेव्हां मरुत वृत्रवधाच्या कामीं स्तुति करीत इंद्राला मिळाले तेव्हांपासून ते यज्ञार्ह कोटींत जाऊन बसले.

६. मरुत तेजस्वी आणि सुशोभित झाले. त्यांना किरणें प्राप्त झालीं. त्या सुंदर अलंकार धारण करणाऱ्यांना स्तोते मिळाले. ते कुऱ्हाड धारण करणारे गतिमान आणि निर्भय होत्साते प्रिय मरुत श्रेष्ठ पद प्राप्त करिते झाले.

सूक्त अठ्ठ्यांयशींवें.

ऋषि:—रहूगणपुत्र गौतम; देवता-मरुत; छन्द:—१.६ प्रस्तारपंक्ति, ५ विराड्रूप, अवशिष्ट–त्रिष्टुभ.

१. हे मरुतांनों, तुम्ही आपल्या विद्युत्पूर्ण, तेजःपुंज शस्त्रांनीं भरलेल्या आणि अश्वरूपी पक्ष असलेल्या रथामध्यें बसून या. हे बुद्धिवान मरुतहो, तुम्ही उत्कृष्ट अन्नसंपत्तीसह पक्ष्याप्रमाणें आम्हांकडे उडून या.

२. ते तांबड्या किंवा वाटल्यास पिवळ्या रंगाच्या रथवाहक अश्वांच्या योगानें येत असतात आणि सुशोभित होतात. ते शस्त्रधारी सोन्याप्रमाणें चकाकतात. ते रथाच्या चाकानें भूमीला फोडून टाकितात.

३. तुमच्या खांद्यावर असलेली कुऱ्हाड तुम्हांस शोभत आहे. यज्ञांतील खांबाप्रमाणें त्या उभ्या धारण केलेल्या असतात. हे अभिजात मरुतांनों, अत्यंत तेजस्वी उपासक तुम्हासाठीं ग्राव्यानें सोमरस काढीत असतात.

४. तुम्हांविषयीं उत्सुक गोतम दररोज गात असतात. ही प्रार्थना त्यांनीं आज गाइली आहे, आणि हें दिव्य पर्जन्यस्तोत्र म्हटलें आहे. स्तोत्र करणारे गोतम पिण्यासाठीं स्तोत्रांच्या योगानें विहिरींतून पाणी वर काढतात.

५. हे मरुतांनों, तुम्हाप्रीत्यर्थ जें अद्वितीय स्तोत्र रचिलें तें हें होय. हें स्तोत्र रचतांरचतां त्याला सुवर्णाचें चक्र असलेलें, लोखंडी दाढा असलेलें आणि धांवणारे वराह दृष्टीस पडले.

६. तर हे मरुतांनों, तुमची ही आवडती स्तुति उपासकाच्या वाणीप्रमाणें मी स्तवीत आहें. आमच्या हातांतील प्रत्येक आहुतीबरोबर गोतमांनीं या स्तुतींनींच तुम्हांला प्रसन्न केलें.

सूक्त एकूणनव्वदावें.

ऋषि:—रहूगणपुत्र गोतम; देवता–विश्वेदेव; छन्द:–१–५.७ जगती, ६ विराटस्थाना, ८–१० त्रिष्टुभ.

१. आम्हांला कल्याणकारक बुद्धि चहोंकडून प्राप्त होवो; त्यायोगें अहिंस्य, पराभव न पावणारे आणि शत्रुघातक विश्वेदेव आमची सदैव वृद्धि करतील आणि ते आमचे कायमचे रक्षण करणारे होतील.

२. सदाचरणी देवांची कल्याणकारक कृपा आणि त्यांची दानबुद्धि आम्हांकडे वळो. देवांची मैत्री आम्हांला प्राप्त होवो. आम्ही जगावें म्हणून देव आमचें आयुष्य वाढवोत.

३. आम्ही पूर्वापार पद्धतीप्रमाणें भग, मित्र, अदिति, पराभव न पावणारा दक्ष, अर्यमा, वरुण, सोम आणि अश्वी या देवांना बोलावितों. तसेंच ती भाग्यशाली सरस्वती आमचें कल्याण करो.

४. वायू कल्याणकारक औषध आम्हांकडे घेऊन येवो. तें माता पृथिवी, आणि पिता द्यू आणि सोमरस गाळणारे ग्रावे आम्हांस देवोत. हे अश्विहो, तुम्ही आमची प्रार्थना ऐकून आम्हांस तें औषध प्राप्त करून द्या.

५. स्थावरजंगमांचा अधिपति, बुद्धीला प्रेरणा देणारा, जो पूषा त्याला आम्ही बोलावितों. तो आमच्या संपत्तीची वाढ करो आणि अहिंस्य असा तो आमच्या कल्याणार्थ आमचें संरक्षण करो.

६. सर्वप्रसिद्ध इंद्र आमचें कल्याण करो. सर्वज्ञ पूषा आमचें कल्याण करो. अजिंक्य तार्क्ष्य आमचें कल्याण करो. बृहस्पति आमचें कल्याण करो

७. पांढऱ्या ठिपक्यांच्या हरिणीरूपी घोडे असलेले मरुत, चांगल्या चालीनें जाणारे आणि यज्ञाकडे येणारे पृश्नीपुत्र मरुत, तसेच अग्निजिव्ह आणि सोन्याप्रमाणें प्रकाशणारे विचारशील विश्वेदेव आपल्या रक्षणासहित येथें आमच्याकडे येवोत.

८. हे यज्ञार्ह देवहो, आम्हीं आमच्या कानांनीं चांगलें ऐकावें, आम्हीं आपल्या डोळ्यांनीं चांगलें पाहावें, आम्ही स्तुति करून सुदृढ अंगांनीं आणि शरीरांनीं युक्त व्हावें आणि देवांनीं दिलेलें आयुष्य उपभोगावें.

९ हे देवहो, तुम्ही आयुष्याची मर्यादा शंभर वर्षेंच केली आहे. तिच्या शेवटीं तुम्ही आमच्या शरीराला वृद्धपण प्राप्त करितां. त्यावेळीं मुलगे पिते होतात तर तुम्ही आमचें आयुष्य चाललें आहे तें मध्येंच खुंटवूं नका.

१०. अदिति हाच द्युलोक, अदिति हेंच अंतरिक्ष, तीच माता, तीच पिता, तीच पुत्र होय. सर्व देव तीं अदितिच होय. पंचजनहि तीच होय. भूत आणि भविष्य अदितीच होय.

सूक्त नव्वदावें.

ऋषिः—रहूगणपुत्र गोतम; देवता—विश्वेदेव; छंदः—१–८ गायत्री, ९ अनुष्टुभ.

१. सरळमार्गी वरुण आणि मित्र, त्याचप्रमाणें विद्वान अर्यमा इतर देवांसहवर्तमान आम्हांला सन्मार्ग दाखवो.

२. ते संपत्ति देणारे आणि ज्ञानवान देव आपल्या तेजानें सर्व काळ जगाचे नियम चालवीत असतात.

३. अमर असे ते मर्त्य अशा आम्हांला सुख देवोत आणि शत्रूंना हांकून लावोत.

४. वंद्य इंद्र, मरुत, उषा आणि भग आमच्या कल्याणार्थ आमचे मार्ग सुगम करोत.

५. तसेंच हे पूषा, हे विष्णो, हे अश्वगामी मरुतहो, तुम्ही आमचीं कर्में गोसंपन्न करा, आणि आम्हांस सुखी करा.

६. सरळगामी उपासकाकरितां वायू मधुर वाहतात, नद्या मधुररसपूर्ण वाहतात. आम्हांकरितां ओषधि मधुर होवोत.

७. आम्हांकरितां रात्र आणि उषा आल्हादक होवोत. आम्हांकरितां पृथ्वी आणि अंतरिक्ष आल्हादक होवोत. आम्हांकरितां पिता द्यू सुखकर होवो.

८. आम्हांकरितां पिता वृक्ष मधुर होवो, सूर्य मधुर होवो. आम्हांकरितांच गाई मधुर होवोत.

९. मित्र आमचें कल्याण करोत. वरुण कल्याण करो. अर्यमा आमचें कल्याण करो. इंद्र आणि बृहस्पति आमचें कल्याण करोत. आणि लांब लांब पावलें टाकणारा विष्णु आमचें कल्याण करो.

सूक्त एक्याण्णवावें.

ऋषिः—रहूगणपुत्र गोतम; देवता—सोम; छंदः—१–४ त्रिष्टुभ, ५–१६ गायत्री, १७ उष्णिह, १८–२३ त्रिष्टुभ.

१. हे सोमा, तूं आपल्या बुद्धीनें सर्व जाणतोस. तूं लोकांना अत्यंत सरळ मार्गानें नेतोस. हे इंद्रा, तुझ्याच कृपेनें आमच्या बुद्धिमान पितरांना देवांपासून धनप्राप्ति झाली.

२. हे सोमा, तूं कर्तृत्वानें श्रेष्ठ आहेस. तूं सर्वसंपत्तिमान आपल्या सामर्थ्यानें श्रेष्ठ आहेस. तूं उत्तम वीर्यशाली आहेस. तूं आपल्या तेजानें तेजस्वी झाला आहेस. तूं सर्वसाक्षी आहेस.

३. हे सोमा, तुझे नियम वरुणाच्या नियमाप्रमाणें होत. तुझें स्थानहि मोठें आणि गंभीर आहे. तूं प्रियमित्र देवाप्रमाणें तेजस्वी आहेस. हे सोमा, तूं अर्यमाप्रमाणेंच अभिवृद्धि करणारा आहेस.

४. हे राजा सोमा, तुझीं द्युलोकीं जीं स्थानें आहेत, जीं पृथ्वीवर आहेत, जीं पर्वतावर, वनस्पतींत व उदकांत आहेत त्या सर्वांसह तूं आम्हांविषयीं अनुकूल आणि प्रसन्न होऊन आमचीं हव्यें ग्रहण कर.

५. हे सोमा, तूं सज्जनांचा अधिपति आहेस. तूं राजा आहेस. तसाच शत्रुहंता आहेस. तूं कल्याणकारक आणि पराक्रमी आहेस.

६. हे सोमा, आम्हीं जगावें अशी तुझी इच्छा असली तर आम्हीं मरणार नाहीं. तूं स्तुतिप्रिय वनस्पति आहेस.

७. हे सोमा, तूं वृद्ध आणि सरळगामी तरुण उपासकाला जीवनार्थ बळ आणि भाग्य देत असतोस.

८. हे राजा सोमा, तूं आमचें सर्व शत्रूपासून रक्षण कर. तुझ्यासारख्याचा मित्र नाश पावणार नाहीं.

९. हे सोमा, हवि देणाऱ्या उपासकासाठीं जें जें तुझें साहाय्य आहे त्यांच्या योगानें तूं आमचें रक्षण कर.

१०. हे सोमा, हा यज्ञ, हें स्तोत्र गोड करून घे आणि आम्हांकडे ये. तूं आमचा उत्कर्ष कर.

११. हे सोमा, स्तोत्रकुशल आम्ही स्तुतींनीं

तुला वृद्धिंगत करत आहोंत. तरी तूं कृपाळू होऊन आम्हाकडे ये.

१२. हे सोमा, तूं आम्हांला गृह-वर्धक, रोगनाशक, धनदायक आणि वैभवकर असा सन्मित्र हो.

१३. हे सोमा, गाई कुरणांत रमतात किंवा मनुष्य आपल्या घरीं रमतो त्याप्रमाणें तूं आमच्या अंतःकरणांत रममाण हो.

१४. हे सोमदेवा, जो मर्त्य तुझ्या मैत्रींत रममाण होतो, त्याचें प्रबल आणि बुद्धिमान असा तूं रक्षण करितोस.

१५. हे सोमा, तूं आमचें शापापासून रक्षण कर, पापापासून रक्षण कर.आणि आमचा सुखकारक सखा हो.

१६. हे सोमा, तूं बलवान हो. तुला चोहोंकडून सामर्थ्य प्राप्त होवो. तूं संग्रामामध्यें अस.

१७. हे अत्यंत मदकर सोमा, तूं सर्व सोमवल्लीच्या योगानें बलवान हो. आमचा अत्यंत संपात्तिमान मित्र असा तूं आमचा उत्कर्ष कर.

१८. हे सोमा, तुला चोहोंकडून दूध आणि अन्न प्राप्त होवो. हे शत्रुनाशका, सर्व वीर्य तुला प्राप्त होवो. हे सोमा, तूं बलवान होऊन अमरत्वासाठीं द्युलोकांमध्यें उत्तम अन्नें धारण कर.

१९. हे सोमा, तुझ्या ज्या तेजांना हवि अर्पण करतात तीं सर्व तेजें आमच्या यज्ञाला वेष्टून असोत. हे सोमा, घरादारांची वृद्धि करणारा उत्तमप्रकारें रक्षण करणारा, वीर्यसंपन्न पुत्र देणारा, आणि वीर्यसंपन्न पुत्रांना न मारणारा असा तूं आमच्या घरीं ये.

२०. सोम भक्ताला धेनु देतो, चपल घोडे देतो, आणि पराक्रमी पुत्र देतो कीं, त्यायोगें तो पुत्र संसारिक, यज्ञ करणारा, सभ्य आणि पित्याची कीर्ति वाढविणारा असा होतो.

२१. हे सोमा, युद्धामध्यें अजिंक्य, लढाईमध्यें शत्रुसेनेच्या पार जाणारा, स्वर्गाची प्राप्ति करून देणारा, उदक देणारा, सामर्थ्याचें रक्षण करणारा, यज्ञामध्यें जन्मलेला, चांगल्या ठिकाणीं राहणारा, कीर्तिमान आणि विजयी अशा तुला पाहून आम्ही आनंदित होऊं.

२२. हे सोमा, तूं ह्या सर्व वनस्पति उत्पन्न केल्या आहेस. तूं उदकें आणि गाई उत्पन्न केल्या आहेस. तूं हें विस्तीर्ण अंतरिक्ष पसरिलें आहेस. तूं प्रकाशाच्या योगानें अंधःकार नाहींसा केला आहेस.

२३. हे बलाढ्य सोमदेवा, तूं दिव्य मनानें युद्ध करून आम्हांला संपत्तीचा भाग मिळवून दे. तुझा कोणीहि पाडाव न करोत. तूं वीर्याचा अधिपति आहेस. गोविषयक युद्धांत तूं उभयतांना उपाय सांगत जा.

सूक्त ब्याण्णवावें.

ऋषिः—रहूगणपुत्र गोतम; देवता—१–१५ उषा, १६–१८ अश्विनी; छंदः—१–४ जगती, ५–१२ त्रिष्टुभ्, १३–१८ उष्णिह्.

१. त्या ह्या उषा प्रकाश पाडीत आहेत. अंतरिक्षाच्या अर्ध्या पूर्व भागांत त्या तेज प्रकट करीत आहेत. योद्धे ज्याप्रमाणें आपलीं शस्त्रें लखलखीत करतात त्याप्रमाणें सर्व जगाला प्रकाशित करणाऱ्या त्या तांबड्या गोमाता दररोज येत असतात.

२. आरक्त प्रभा सहज वर फाकली आहे. सहज जोडतां येणाऱ्या, तांबड्या गाई त्यांनीं जोडिल्या आहेत. उषांनीं पूर्वीप्रमाणें सर्व वस्तु प्रकट केल्या आहेत. तांबड्या उषांनीं लकलकणारें तेज धारण केलें आहे.

३. ज्याप्रमाणें स्त्रिया अलंकारांनीं सुशोभित होतात त्याप्रमाणें त्या उषा एकच प्रकारचा कांतिरूप दागिना घालून प्रकाशतात. सत्कर्मशील, दानशूर आणि सोमरसयुक्त यजमानासाठीं त्या दररोज अन्न घेऊन येतात.

४. नटीप्रमाणें उषा वेगवेगळीं रूपें धारण करते. आणि गाईच्या कांसेप्रमाणें आपलें वक्षस्थळ उघडें करतें. सर्व जगाला प्रकाश देणारी उषा गोठ्यांतून गाई बाहेर पडाव्यांत त्याप्रमाणें अंधःकार फोडून बाहेर पडली आहे.

५. हिची तेजोयुक्त प्रभा रोज दिसत आहे. ती पसरते आणि कृष्ण अंधःकाराला दूर सारते. ज्याप्रमाणें यज्ञांतील खांब त्यास सुशोभित करतात, त्याप्रमाणें ही द्यूची कन्या आपलें रूप शोभवीत आहे. तीं रमणीय तेज धारण करतें.

६. आम्ही अंधःकाराच्या पार पडलों. अंधःकाराचा नाश करणारी उषा सर्व पदार्थ प्रकट करिती झाली. प्रकाशणारी उषा, वश करूं इच्छिणाऱ्याप्रमाणें मधुर हंसते. त्या सुस्वरूप उषेनें आम्हांस आमच्या प्रसन्नतेकरतां जागृत केलें आहे.

७. तीं तेजस्विनी आणि वाग्देवता द्यूची कन्या उषा गोतमांनीं स्तविली आहे. हे उषे, प्रजेनें युक्त,

मनुष्यांनीं युक्त, अश्वांनीं भरलेली, गाईनीं परिपूर्ण, अशी संपत्ति तूं आम्हांस दे.

८. हे उषे, यशस्कर वीरपुत्रयुक्त, दासगणानें युक्त, अश्वयुक्त अशी मोठी संपत्ति मला प्राप्त होवो. हे भाग्यशाली उषे, हे अन्नदान करणारे, तूं आपल्या पराक्रमानें आणि कीर्तीनें येथें प्रकाशतेस.

९. ही देवी सर्व भुवनें पाहून परत येते आणि आपल्या प्रकाशानें सर्वत्र प्रकाशते. ती सर्व प्राण्यांना जागे करून आपापल्या कामाला लाविते आणि सकल कविजनाला वाचा फोडते.

१०. पुन: पुन: जन्मास येणारी आणि पुरातन असूनहि एकाच रूपानें शोभणारी, अशी ही उषा देवी धूर्त व लुबाडणाऱ्या द्यूतकर्मकुशलाप्रमाणें मानवांचें आयुष्य हळूं हळूं हरण करणारी आहे.

११. द्युलोकाच्या प्रांतांतून अंधःकार नाहींसा करणारी उषा जागृत होत आहे. आणि ती आपल्या बहिणीला दूर पिटाळून लावीत आहे. मनुष्यांचें आयुष्य नाहींसें करणारी सूर्यरूप जाराची प्रिया उषा आपल्या प्रकाशानें प्रकाशत आहे.

१२. ज्याप्रमाणें मोकळे सोडलेले पशु जिकडे तिकडे पसरतात किंवा मोठी नदी पुरानें भरून जाऊन आपलें पाणी जिकडे तिकडे पसरवून देते त्याप्रमाणें ह्या उषेची प्रभा सर्वत्र पसरली आहे. देवसंबंधीं कर्माचा भंग न होऊं देणारी उषा सूर्याच्या किरणाबरोबर दृष्टिगोचर होत आहे.

१३. हे समृद्ध उषे, तूं आज आम्हांला असें सुंदर वैभव दे कीं, त्याच्या योगानें आम्ही पुत्रपौत्रांनीं संपन्न होऊं.

१४. हे गोसंपन्न, अश्वसंपन्न आणि तेज:संपन्न उषे, हे वाग्देवते, तूं आज येथें आम्हांस प्रकाश आणि धन दे.

१५. हे अन्नसंपन्न उषे, तूं आज आपले अरुणवर्ण घोडे जोड आणि आम्हांसाठीं सर्व सौभाग्य घेऊन ये.

१६. ह पराक्रमी अश्वीनों, तुम्ही उभयता एकमतानें तुमचा गाई आणि सोनें यांनीं भरलेला रथ आमच्याकडे वळवा आणि आम्हांस संपन्न करा.

१७. हे अश्वीहो, ज्या तुम्ही द्युलोकापर्यंत एवढा नाद केला आहे आणि लोकासाठीं प्रकाश पाडला आहे ते तुम्ही आम्हांसाठीं शक्तिवर्धक अन्न घेऊन या.

१८. कल्याणकारक, पराक्रमी, सोन्याच्या रथांत बसून जाणारे जे अश्वीदेव त्यांना प्रातःकाळीं जागृत होणारे (त्यांचे घोडे) सोमपानार्थ घेऊन येवोत.

सूक्त त्र्याण्णवावें.

ऋषि—रहूगणपुत्र गोतम; देवता–अग्नि व सोम; छंद– १–३ अनुष्टुभ, ४–७ त्रिष्टुभ, ८ जगती किंवा त्रिष्टुभ, ९–११ गायत्री, १२ त्रिष्टुभ.

१. हे वीर्यवान अग्निसोमांनो, तुम्ही माझी ही हांक लक्षपूर्वक ऐका. हीं सूक्तें गोड करून घ्या, आणि हविर्दात्या उपासकाचें कल्याण करा.

२. हे अग्निसोमांनो, जो मी आज तुह्मांला हें स्तोत्र अर्पण करीत आहें, त्याला तुह्मी उत्तम वीरांनीं युक्त, गाईनीं युक्त, उत्तम घोड्यांनीं युक्त आणि पुष्टिकर अशी संपत्ति द्या.

३. हे अग्निसोमानो, जो तुह्मांला आहुति देईल, जो तुह्मांसाठीं हवि सिद्ध करील, त्याला उत्तम वीरांनीं युक्त आणि पुत्रपौत्रासहित असें भरपूर आयुष्य लाभो.

४. हे अग्निसोमानो, तुम्ही पणीपासून गोरूपी अन्न हरण केलें, बृसयाच्या अवशिष्ट वंशजाला ठार केलेंत आणि अनेकांच्यासाठीं एकच प्रकाश प्राप्त केलात.

५. हे अग्ने, आणि हे सोमा, तुह्मीं दोघांनीं एकत्र मिळून आकाशामध्यें हीं नक्षत्रें स्थापिलीं. हे अग्निसोमानो, आडवून ठवलेलीं उदकें शत्रूच्या निंद्य संसर्गापासून तुम्हीच मुक्त केलींत.

६. मातरिश्वयानें तुम्हांपैकीं एकाला द्यूलोकांतून आणिलें आणि दुसऱ्याला श्येन पक्ष्यानें पर्वताचें मंथन करून बाहेर काढिलें. हे अग्निसोमानो, स्तोत्रांच्या योगानें वृद्धिंगत होणाऱ्या तुम्ही हा विस्तीर्ण लोक निर्माण केला.

७. हे वीर्यशाली अग्निसोमांनो, तुमच्या पुढें ठेविलेलें हविरन्न तुम्ही भक्षण करा आणि प्रसन्न व्हा. आमच्या सेवेचा स्वीकार करा. तुम्ही सुखकारक व स्वसंरक्षक आहां. यज्ञ करणाऱ्या यजमानाला तुम्ही शांति आणि सुख द्या.

८. हे अग्निसोमांनो, जो तुम्हांला हविपूर्वक भजेल, जो तुम्हांला आस्तिक बुद्धीनें घृताचा हवि देईल त्याच्या नियमांचें तुम्ही रक्षण करा. पातकापासून त्याचा सांभाळ करा. त्याच्या मुलाबाळांना आणि लोकांना मोठें सुख द्या.

९. हे अग्निसोमांनो, तुम्हांला एकदम प्रार्थना केली जाते व हवि अर्पण केला जातो. तुम्ही आमच्या प्रार्थना स्वीकारा. तुम्हांला देवपण बरोबरच प्राप्त झालें आहे.

१०. हे अग्निसोमांनो, तुम्हांला जो कोणी घृतपूर्वक हवि देतो त्याला तुम्ही मोठें वैभव द्या.

११. हे अग्निसोमांनो, तुम्ही आमचे हे हवि सेवन करा. तुम्ही जोडीनें आम्हांकडे या.

१२. हे अग्निसोमांनो, तुम्ही आमच्या घोड्यांचें रक्षण करा. हवि निर्माण करणाऱ्या आमच्या गाई पुष्ट करा. तुम्हाला हवि देणारे जे आम्ही त्या आम्हांला तुम्ही सामर्थ्य द्या आणि आमचा यज्ञ श्रवण करा.

सूक्त चौऱ्याण्णवावें.

ऋषिः--अंगिरस कुत्स; देवता—अग्नि (८ चे पहिले तीन चरण देवदेवताविषयक, १६ चा उत्तरार्ध मित्र, वरुण, अदिति, सिंधु, पृथिवी आणि द्युलोक याविषयीं); छंदः--१-१४ जगती, १५-१६ त्रिष्टुभ्.

१. रथ तयार करावा, त्याप्रमाणें हें स्तोत्र पूजनीय आणि ज्ञानवान अग्नीसाठीं तयार केलें आहे. कारण, ह्याच्या सहवासांत राहून आमच्या बुद्धीचा प्रकर्ष होईल. करितां हे अग्ने, आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

२. हे अग्ने, तूं ज्याचा यज्ञ संपादितोस त्याचे मनोरथ पूर्ण होतात. तो निष्कंटक होऊन सुखी राहतो. त्याला उत्तम आणि वीर्यशाली पुत्र प्राप्त होतात. त्याचा उत्कर्ष होतो. त्याला दारिद्र्य प्राप्त होत नाहीं. करितां हे अग्ने, आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

३. तुला प्रज्वलित करण्याचें सामर्थ्य आम्हांस दे, आणि आमचीं कर्मे पूर्ण कर. तुझ्या ठिकाणीं दिलेली आहुति देव भक्षण करितात. तूं आदित्यांना इकडे घेऊन ये. कारण, आम्ही त्यांची इच्छा करीत आहोंत. हे अग्ने आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

४. आम्ही तुझ्याकरितां समिधा गोळा कराव्या आणि तुझें चिंतन करीत दर दर्शपौर्णिमेला तुला हवि अर्पण करावे. आम्ही पुष्कळ दिवस जगावें म्हणून आमचीं कर्में उत्तम रीतीनें पूर्ण कर. हे अग्ने, आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

५. हा अग्नि लोकपालक आहे. ह्याच्या प्रकाशाच्या योगानें सर्व द्विपाद आणि चतुष्पाद प्राणी चालतात. तूं उषेचा सुंदर ध्वज आहेस. हे अग्ने, आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

६. तूं अध्वर्यु आणि पुरातन होता आहेस. तूं प्रशास्ता, पोता आणि जन्मतःच पुरोहित आहेस. हे बुद्धिवंता, तूं ऋत्विजांचीं सर्व कर्मे जाणतोस आणि फलद्रूप करतोस. करितां हे अग्ने, आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

७. तूं सर्व बाजूंनीं दिसण्याला सारखाच सुंदर आहेस. तूं दूर असूनहि जवळ असल्याप्रमाणें प्रकाशतोस. हे देवा, रात्रीच्या अंधःकारातहि तूं प्रकाशतोस. हे अग्ने, आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

८. हे देवहो, सोमरस काढणाऱ्या भक्ताचा रथ सर्वांत पुढें असो. आमचा शाप दुष्टांना बाधो. आमची ही प्रार्थना तुम्ही ऐका आणि फलद्रूप करा. हे अग्ने, आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

९. तूं शिव्या देणाऱ्या दुष्ट लोकांना शस्त्रांनीं ठार कर. मग ते शत्रू दूर असोत वा जवळ असोत आणि अशा रीतीनें यज्ञाकरितां प्रार्थना करणाऱ्या मज भक्ताचें कल्याण कर. हे अग्ने, आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

१०. जेव्हां तूं आपल्या रथाला तेजस्वी आणि वायुवेगानें धांवणाऱ्या तांबड्या घोड्यांची जोडी जोडतोस, तेव्हां तूं वीर्यवंताप्रमाणें गर्जना करतोस. तूं आपल्या धुरानें युक्त अशा ज्वालांनीं वनें व्यापून टाकतोस. करितां हे अग्ने, आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

११. जेव्हां तुझ्या गवत खाणाऱ्या ठिणग्या सर्वत्र पसरतात तेव्हां तुझा आवाज ऐकून पक्षीसुद्धां भीत असतात, तेव्हां तुझा व तुझ्या रथांचाहि मार्ग सुगम होतो. तर हे अग्ने.आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

१२. हा स्तोता मित्र आणि वरुण यांच्या रक्षणास योग्य होय. क्रोधाची शांति करणाऱ्या मरुतांचा क्रोध अद्भुत आहे. त्याचें मन आम्हांविषयीं पुनः अनुकूल होवो, आणि आम्हांस सुख होवो. हे अग्ने, आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

१३. तूं देवामध्यें श्रेष्ठ देव आहेस. तूं उत्तम मित्र

आहेस. तूं उत्तम प्रकारें संपन्न आहेस. यज्ञांत तूं उत्तम शोभतोस. तुझ्या अत्यंत विस्तीर्ण आश्रयाखालीं आम्ही राहावें. हे अग्ने, आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

१४. अत्यंत सुखकर अशा तुला जेव्हां भक्त स्वतांच्या घरीं प्रदीप्त करून सोमाची आहुति देऊन स्तवितात, तेव्हां तुला आनंद होतो. तूं हविर्दात्या उपासकाला संपत्ति आणि रत्नें देतोस. हे अग्ने, आमची तुझ्याशीं मैत्री असतां आम्ही नाश पावणार नाहीं.

१५. हे दानशूर आणि अमर अग्ने, तूं भक्ताकरितां सर्व वस्तूंची शुद्धि करीत असतोस. तूं त्याच्या अंगीं कल्याणकारक बळाची प्रेरणा करतोस. करितां आम्हांला संतत संपत दे.

१६. हे अग्निदेवा, आमचें कल्याण कशांत आहे हें जाणणारा तूं, आमचें इहलोकींचें आयुष्य वाढीव. मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी आणि द्यु हेंहि आम्हांला तें देवोत.

सूक्त पंच्याण्णवावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता-अग्नि (अथवा उषेसंबंधीं अग्नि); छन्दः—त्रिष्टुभ.

१. भिन्न भिन्न रूपांच्या रात्री आणि उषा या दोघी आपआपल्या कामाविषयीं तत्पर असणाऱ्या भ्रमण करीत असतात, त्या एकमेकींच्या बाळांना पाजतात. एकीच्याजवळ पीत वर्णाचा तेजस्वी बालक (सूर्य) असतो, तर दुसरीच्या जवळ सुंदर दिसणारा (चंद्र) बालक शोभतो.

२. त्वष्ट्याच्या दहा चतुर तरुणी चंचल बालाला जन्म देत्या झाल्या, प्रखर तेजाच्या आणि अत्यंत यशस्वी व प्रकाशमान अशा या अग्नीला लोक घरोघर नेतात.

३. ह्याचे तीन जन्म प्रख्यात आहेत. एक समुद्रांत, एक द्युलोकीं, आणि एक उदकांत (मेघांत). तो ऋतूंचें नियमन करणारा पृथ्वीची पूर्व दिशा आणि नंतर इतर दिशा क्रमाक्रमानें प्रकाशित करितो.

४. ह्या गूढ अग्नीला तुम्हांपैकीं कोणी पाहिलें आहे ? तो वत्स आपल्या प्रभावानें आपल्या मातांना उत्पन्न करतो. अनेक आयांचा बालक असा तो अग्नि, अतिशय विद्वान आणि महाबलवान आहे. तो आपल्या उदकरूप मातांच्या उदरांतून बाहेर पडला.

५. हा सुंदर अग्नि, आपल्या उदकरूप मातांच्या ठिकाणीं प्रकटपणें वाढत असतो. तो स्वयंप्रकाशमान अग्नि, आपल्या आडव्या असलेल्या मातांच्या पोटीं उभा जन्मास येतो. त्वष्ट्यापासून जन्म पावतांच द्यावापृथिवी त्याला भिऊन पळाल्या. पण त्या लगेच परत येऊन या सिंहाचे लाड करू लागल्या.

६. त्या दोघींनीं ममताळु स्त्रियाप्रमाणें त्याचे लाड केले. हंबरणाऱ्या गाईप्रमाणें त्यांनीं त्याला खेळविलें. तेव्हां तो अग्नि सर्व बलांचा अधिपति झाला. त्याच अग्नीला दक्षिणभागीं स्थापन करून हवींनीं तृप्त करतात.

७. सवित्याप्रमाणें तो आपले बाहू वर करतो. आणि भयंकर अग्नि पृथिवी आणि द्युलोक यांना संतुष्ट करण्याचा प्रयत्न करतो. तो सर्व वस्तूतून तेजस्वी रस काढून घेऊन आपल्या मातांना नवीं वस्त्रें देतो.

८. जेव्हां तो आपल्या घरामध्यें तेजोयुक्त उदकांनीं संलग्न होतो, तेव्हां त्याचें रूप अधिकच लकलकीत होतें. तो विद्वान व धीमान अग्नि आपल्या मूळस्थानाला स्वच्छ करतो. त्याचवेळीं त्याची व देवांची भेट होते.

९. हे अग्ने, श्रेष्ठ अशा तुझें विस्तीर्ण तेज तुझें जें प्रकाशमान मूळस्थान, त्यास वेष्टून असतें. प्रदीप्त केलेला असा तूं आपल्या सर्व कांतीनें युक्त होत्साता आमचें अप्रतिहत रक्षणांनीं रक्षण कर.

१०. तो अन्तरिक्षांत प्रवाह उत्पन्न करतो, आणि शुभ्र लाटांच्या योगानें पृथिवी व्यापून टाकतो. तो जठरामध्यें सर्व अन्न धारण करतो, आणि नव्या मातांच्या पोटांत संचार करतो.

११. हे पावक अग्ने, अशा प्रकारें समिधांच्या योगानें वृद्धिंगत झालेला तूं प्रकाशमान हो आणि आम्हांला वैभव व संपत्ति दे. त्याचप्रमाणें मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी व द्युलोक हे सर्व आम्हांला धन आणि वैभव देवोत.

सूक्त शहाण्णवावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता-द्रविणोदा अग्नि अथवा अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ.

१. बलानें निर्माण झालेला हा अग्नि उपजतांच प्रौढ असल्याप्रमाणें खरोखर सर्व चातुर्याच्या गोष्टी करूं लागला. आपांदेवी आणि धिषणा यांनीं त्याच्याशीं सख्य केलें, देवांनींहि दानशूर अग्नीला धारण केलें आहे.

२. तो अग्नि लोकांच्या पुरातन निवित्स्तोत्रानें मनूची ही प्रजा उत्पन्न करतां झाला. आणि आपल्या व्यापक तेजानें द्युलोक आणि अन्तरिक्ष व्यापलें. देवानींहि दानशूर अग्नीला धारण केलें आहे.

३. सर्व आर्य लोकांनीं यज्ञ संपादन करणाऱ्या ह्या अग्नीलाच प्रथम अलंकृत करून त्याची हविरन्नपूर्वक पूजा केली. तो बलपुत्र, दानशूर आणि पोषण करणारा आहे. देवांनींहि दानशूर अग्नीला धारण केलें आहे.

४. तो विपुलधनसंपन्न, स्वर्ग मिळविणारा, मातरिश्वा अग्नि संततिप्राप्तीचा मार्ग जाणता झाला. सर्वलोकपालक अग्नि द्यावापृथिवींना जन्म देणारा होय. देवांनींहि दानशूर अग्नीला धारण केलें आहे.

५. आपापलीं रूपें बदलणाऱ्या रात्र आणि उषा ह्या दोघी एकत्र होऊन एकाच बाळाला पाजतात. तो द्यावापृथिवीमध्यें प्रकाशतो. देवांनींहि दानशूर अग्नीला धारण केलें आहे.

६. अग्नि हा तेजाचें मूळ आहे. तो संपत्तीचें भांडार आहे. तो यज्ञाचा ध्वज आणि उपासकाला इष्टप्राप्ति करून देणारा आहे. ह्या अमर अग्नीचें रक्षण करण्याकरतां त्या दानशूराला देवांनीं धारण केलें आहे.

७. तो तेजानें पुरातन काळीं व आजहि श्रेष्ठ आहे. तो भूतकालीन आणि भविष्यकालीं उत्पन्न होणाऱ्यांचें आधारस्थान आहे. तो असंख्य, नित्य आणि उत्पन्न होत असलेल्या पदार्थांचा रक्षण करणारा आहे. अशा त्या दानशूर अग्नीला देवांनींहि धारण केलें आहे.

८. द्रविणोदा (द्रव्य देणारा) अग्नि आम्हांस जंगम संपत्ति देवो. तो दानशूर आम्हांस स्थावर संपत्ति देवो. तो दानकर्ता आम्हांला वीर्यशाली अन्न देवो. तो द्रव्यदाता आम्हांला दीर्घ आयुष्य देवो.

९. हे पावक अग्ने, अशा प्रकारें समिधांच्या योगानें वृद्धिंगत झालेला तूं प्रकाशमान हो, आणि आम्हांला वैभव व संपत्ति दे. त्याचप्रमाणें मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी व द्युलोक हे सर्व आम्हांला धन व वैभव देवोत.

सूक्त सत्याणवावें.

ऋषिः--आंगिरस कुत्स; देवता-शुचि अग्नि किंवा अग्नि; छंदः—गायत्री.

१. प्रकाशमान असा अग्नि आमचें पाप नाहींसें करो. हे अग्ने, आम्हांस तूं तेजानें शुद्ध कर. प्रकाशमान अग्नि आमचें पाप नाहींसें करो.

२. चांगलें क्षेत्र मिळावें, चांगली गति मिळावी, संपत्ति प्राप्त व्हावी, याकरतां आम्हीं यजन करतों. तरी तो प्रकाशमान अग्नि आमचें पाप नाहींसें करो.

३. ज्याअर्थीं ह्यांच्यांत अत्यंत उत्कृष्ट स्तोत्र करणारे आणि आमचें उपासकहि आहेत, त्याअर्थीं प्रकाशमान अग्नि आमचें पाप नाहींसें करो.

४. ज्याअर्थीं हे अग्ने, आम्ही तुझे उपासक आहों, आणि तुझ्यापासूनच जन्मलों आहों, त्याअर्थीं प्रकाशमान असा तूं आमचें पाप नाहींसें कर.

५. ज्याअर्थीं बलसंपन्न अग्नीची प्रभा सर्वत्र फाकत आहे, त्याअर्थीं प्रकाशमान असा तो आमचें पाप नाहींसें करो.

६. हे सर्वतोमुख अग्ने, जर करतां तूं सर्व बाजूंनीं परिवेष्टून आहेस, तरी प्रकाशमान असा तूं आमचें पाप नाहींसें कर.

७. हे सर्वतोमुख अग्ने, तूं आम्हांला आमच्या द्वेष्ट्यांपासून नावेनें पार न्यावें त्याप्रमाणें दूर ने. आणि प्रकाशमान असा तूं आमचें पाप नाहींसें कर.

८. नावेनें नदीच्या पार जावें त्याप्रमाणें तूं आम्हांस पार पाडून आमचें कल्याण कर. आणि प्रकाशमान असा तूं आमचें पाप नाहींसें कर.

सूक्त अठ्याणवावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता-वैश्वानर अग्नि; छंदः--त्रिष्टुभ.

१. आम्ही वैश्वानर अग्नीच्या कृपेंत असावें. तो खरोखर सर्व भुवनांचा आश्रयदाता राजा आहे. येथें (अरणीपासून) उत्पन्न झालेला तो वैश्वानर हें सर्व अवलोकन करता झाला व सूर्यरूपांत जाऊन मिळाला.

२. हा अग्नि द्युलोकांत पुसला जातो व पृथिवीवरहि पुसला जातो. सर्वप्रिय असा तो सर्व औषधींमध्यें व्यापून राहिला आहे. सर्वांचा प्रिय वैश्वानर अग्नि आपल्या शक्तीनें आमचें संरक्षण करो. तो आमचें दिवसां आणि रात्रीच्या वेळींहि शत्रूपासून रक्षण करो.

३. हे वैश्वानरा, तुझें तें सर्व सत्य आहे. आम्हांला धनवान अशा तुझी संपत्ति प्राप्त होवो. त्याचप्रमाणें मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी आणि द्युलोक हे सर्व आम्हांला ती संपत्ति देवोत.

सूक्त नव्याणवावें.

ऋषिः--मरीचिपुत्र कश्यप; देवता-जातवेद अग्नि, किंवा अग्नि; छन्दः--त्रिष्टुभ.

१. जातवेद अग्नीकरतां आपण सोमरस काढूं या. तो आमचा द्वेष करणाऱ्यांचें धन जाळून टाको. तो आम्हांला सर्व दुःखांच्या पार नेवो. नावेच्या योगानें सिंधूच्या पार जावें त्याप्रमाणें अग्नि आम्हांला पापापासून दूर नेवो.

सूक्त शंभरावें.

ऋषिः--वृषागिर महाराजाचे पांच पुत्र ऋज्राश्व, अंबरीष, सहदेव, भयमान आणि सुराधस हे सर्व मिळून; देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. जो बलशाली वीर्यांनें युक्त आहे, जो महान द्युलोकाचा आणि पृथिवीचा एकटाच सम्राट आहे, जो उदकांसंबंधानें पराक्रम करणारा इंद्र युद्धामध्यें बोलाविण्यास योग्य आहे, तो मरुतांसहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

२. ज्याचा मार्ग सूर्याच्याप्रमाणें अलभ्य होय, जो बलशाली प्रत्येक युद्धांत शत्रूला ठार करतो, जो आपल्या मित्रांच्या योगानें अत्यंत वीर्यशाली झाला आहे, असा तो मरुतांसहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

३. द्युलोकांतल्या मार्गाप्रमाणें ज्याचे मार्ग कोणीहि आपल्या बळानें आडवूं शकत नाहीं, आणि असें असूनहि जो उदकांची वृष्टि करतो, जो आपल्या बळाच्या योगानें शत्रूंना जिंकून विजयी होतो, तो मरुतासहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

४. तो अंगिरसाच्या योगानें अतिशय प्रसिद्ध झाला आहे. तो वीर्याच्या योगानें उत्तम वीर्यवान झाला आहे. तो मित्रांचा चांगला मित्र झाला आहे. तो स्तुतींच्या योगानें स्तुत्य, आणि गमन करणाऱ्या मरुतांत ज्येष्ठ आहे. तो मरुतासहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

५. तो महान इंद्र आपल्या पुत्रांस मदतीस घ्यावें त्याप्रमाणें रुद्रपुत्र मरुतांचें साहाय्य घेऊन युद्धांत बलवान शत्रूंचा पराभव करतो एकत्र राहणाऱ्या मरुद्गणाच्या साह्यानें तो धन जिंकतो. असा तो मरुतांसहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

६. तो शत्रूंचा गर्व हरण करणारा आणि युद्ध करणारा इंद्र आमच्या लोकांना सूर्याशीं युक्त करो. तो शोभनाधिपति, बहुस्तुत इंद्र मरुतांसहवर्तमान आज आमचा संरक्षक होवो.

७. शूरांच्या लढाईत त्याचे साहाय्यकर्ते त्यास उत्तेजित करतात. मनुष्यें त्याला आपल्या संपत्तीच संरक्षक करतात. तो एकटाच सर्व कर्मांचा अधिपति आहे. असा तो मरुतांसहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

८. बळाच्या प्रसंगीं (युद्धांत) लोक त्याची इच्छा करतात. शूर लोक धनाकरतां आणि रक्षणाकरतां त्याचीच इच्छा करतात. तो निबिड अंधःकारांतहि ज्योति प्राप्त करतो. असा तो मरुतांसहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

९ तो डाव्या हातानें मोठमोठ्या शत्रूंना मागें रेटतो. आणि तो उजव्या हातानें शत्रूंपासून हिसकावून घेतलेले धन ठेवतो. स्तुति केली असतां स्तोत्याला हि तो धन देतो. अशा मरुतांसहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

१०. तो आपल्या मरुद्गणांच्या साह्यानें आणि रथांच्या योगानें धन देतो, हें सर्व लोकांना आजहि ठाऊक आहे. तो आपल्या सामर्थ्याच्या योगानें शत्रूचा पराभव करतो. असा तो मरुतांसहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

११. तो बहुस्तुत इंद्र आपल्या धांवणाऱ्या मरुतांसह बांधवांबरोबर किंवा अबांधवांबरोबर युद्धांत लढतो, तेव्हां कर्म करणाऱ्या उपासकाच्या पुत्रपौत्रांचा जय होतो. असा तो मरुतांसहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

१२. तो वज्र धारण करणारा, दस्यूंना मारणारा, भयंकर, उग्र, सहस्रबुद्धि, शेंकडों मार्गांनीं युक्त आणि महान असा आहे. सोमाप्रमाणें तो आपल्या सामर्थ्याच्या योगानें पंचजनांचा अधिपति होतो. असा तो मरुतांसहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

१३. त्याचें स्वर्गप्राप्ति करून देणारें पराक्रमी वज्र द्युलोकाच्या गंभीर नादाप्रमाणें आवाज करतें. ऋद्धिसिद्धी त्याच्या सेवेंत तत्पर असतात. असा तो मरुतांसहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

---

१ टीप:—येथील हजार सूक्तें नष्ट झालीं आहेत असें अनुक्रमणीवरून दिसते.

१४. ज्याचें मोठेपण त्याच्या सामर्थ्याच्या योगानें प्रशंसनीय झालें आहे, जो द्यावापृथिवींना सर्व बाजूंनीं सर्वदा व्यापून असतो, तो आमच्या कर्मांच्या योगानें संतुष्ट होऊन आमचा उद्धार करो. तो मरुतांसहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

१५. ज्याच्या सामर्थ्याचा अंत देवांना, देवतांना माणसांना किंवा उदकांनाहि लागला नाहीं, तो आपल्या तेजानें द्यावापृथिवींना व्यापून टाकतो. तो मरुतांसहित इंद्र आमचा संरक्षक होवो.

१६. तांबूस आणि काळसर वर्णांची, अंगानें भरलेली आणि कपाळावर अलंकार असलेली, द्युलोकांत वास करणारी, आनंददायक, अशी घोड्यांची मालिका वीर्यशाली इंद्राला रथांत बसवून व त्या रथाच्या जुवांना आपल्या माना देऊन ऋज्राश्वाला संपत्ति देण्यासाठीं ओढून आणीत असतांना मनुष्य लोकांत दृष्टीस पडते.

१७. हे इंद्रा, वीर्यवान अशा तुला उद्देशून वृषागिराचें पुत्र ऋज्राश्व, अंबरीष, सहदेव, भयमान आणि सुराधस हे हविपूर्वक स्तोत्र अर्पण करीत आहेत.

१८. बहुस्तुत इंद्रानें मरुद्गणांच्या साह्यानें दुष्टांना आणि शत्रूंना आपल्या वज्राच्या योगानें ठार करून पृथ्वीवर पाडलें. चांगलें वज्र धारण करणाऱ्या इंद्रानें आपल्या तेजस्वी मित्रांच्या साहाय्यानें भूमि घेतली, सूर्य प्राप्त करून घेतला, आणि उदकें हरण केलीं.

१९. इंद्र नेहमीं आमची बाजू बोलणारा असो. (आमची वकीली करो.) आम्ही शत्रुरहित होऊन आम्हांस धन प्राप्त व्हावें. त्याचप्रमाणें मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी आणि द्युलोक हे सर्व आम्हांला संपत्ति देवोत.

सूक्त एकशें एकावें.

ऋषिः-—आंगिरस कुत्स; देवता—इंद्र; छन्द:—-१–८ जगती, ९–११ त्रिष्टुभ्.

१. हे मित्रहो, तुम्ही आनंदी इंद्राला हविपूर्वक स्तोत्र अर्पण करा. त्यानें ऋजिश्व्याच्या साह्यानें कृष्णाच्या बायका ठार मारल्या. रक्षणाची इच्छा करणारे आम्ही उजव्या हातांत वज्र धारण करणाऱ्या वीर्यशाली मरुद्गणयुक्त इंद्राला सख्याकरतां बोलावतों.

२. ज्यानें अत्यंत क्रोधयुक्त होऊन व्यंसाला ठार मारलें, ज्यानें शंबराला, ज्यानें धर्महीन पिप्रूलाहि ठार मारलें, ज्यानें सर्वभक्षक शुष्णालाहि ठार केलें, त्या मरुद्गणयुक्त इंद्राला आम्ही सख्याकरतां बोलावतों.

३. ज्याच्या मोठ्या बळाच्या नियमानुसार द्यावापृथ्वी वागतात, ज्याच्या नियमानुसार वरुण व सूर्य चालतात, ज्या इंद्राच्या नियमानुसार समुद्र वागतात, त्या मरुद्गणयुक्त इंद्राला आम्ही सख्याकरतां बोलावतों.

४. जो घोड्यांचा अधिपति आहे, जो गाईंचा स्वामी आहे, जो स्थिर आहे, जो निरनिराळ्या युद्धप्रसंगीं स्तुतिपूर्वक बोलाविला जातो, जो सोमरस अर्पण न करणाऱ्या प्रबळांचाहि वध करणारा आहे, त्या मरुद्गणयुक्त इंद्राला आम्ही सरव्याकरतां बोलावतों.

५. जो सर्व जंगम प्राण्यांचा अधिपति आहे, ज्यानें भक्ताकरतां प्रथम गाई शोधून काढल्या, ज्या इंद्रानें दस्यूंना रसातळाला पोचविलें, त्या मरुद्गणयुक्त इंद्राला आम्ही सख्याकरतां बोलावतों.

६. ज्याचा धांवा शूर करतात आणि भित्रेहि करतात, ज्याचा धांवा पळून जाणारे आणि विजयी वीरहि करतात, ज्या इंद्राला सर्व भुवनें आपल्यासमोर ठेवतात, त्या मरुद्गणयुक्त इंद्राला आम्ही सख्याकरतां बोलावतों.

७. जो तेजःपुंज इंद्र रुद्रपुत्र मरुतांच्या दिशांनीं जातो, जो रुद्रपुत्र मरुत आणि उषा यांच्या योगानें विस्तीर्ण तेज पसरतो, ज्या कीर्तिमान इंद्राला मानवी वाणी स्तविते, त्या मरुद्गणयुक्त इंद्राला आम्ही सख्याकरितां बोलावतों.

८. हे मरुद्युक्त इंद्रा, तूं उत्तम राजवाड्यांत किंवा अगदीं भिकार झोपडींत सोमरसांत तल्लीन असशील, तरी तेथून आमच्या ह्या यज्ञांत ये. हे सत्यधन इंद्रा, तुझ्याकरतां आम्ही हवि सिद्ध केले आहेत.

९. हे उत्तमबलयुक्त इंद्रा, तुझ्याकरतां आम्ही सोम पिळला आहे. हे स्तोत्रवाहना, तुझ्याकरतां हवि सिद्ध केला आहे. हे अश्वयुक्त इंद्रा, तूं आपल्या मरुद्गणांसह ह्या यज्ञांत येऊन दर्भासनावर बैस आणि (सोमरस पिऊन) प्रसन्न हो.

१०. हे इंद्रा, तूं आपल्या हरिद्वर्ण घोड्यांसह तृप्त हो. तूं आपलें तोंड उघड आणि जीभ बाहेर काढ. हे सुस्वरूप इंद्रा, तुझे घोडे तुला घेऊन येवोत. हविरन्नाची इच्छा करणारा तूं त्याचा प्रेमपूर्वक स्वीकार कर.

११. मरुतांची स्तुति करणाऱ्या समूहाचा इंद्र संरक्षक आहे. त्या इंद्राच्या योगानें आम्हांस धनप्राप्ति

व्हावी त्याचप्रमाणें मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथ्वी आणि द्युलोक हे सर्व आम्हांला संपत्ति देवोत.

सूक्त एकशें दोनावें.

ऋषिः -आंगिरस कुत्स; देवता-इंद्र; छन्दः--१-१० जगती, ११ त्रिष्टुभ.

१. श्रेष्ठ अशा इंद्राला मी हें उत्तम प्रकारचें स्तोत्र अर्पण करीत आहें. कारण ह्या भक्ताच्या स्तोत्राच्या ठिकाणीं तुझी बुद्धि चिकटून राहते. लहान मोठ्या लढाईमध्यें विजयशाली इंद्राला देव मोठ्या बळानें उत्तेजित करीत असतात.

२. ह्याची कीर्ति सात नद्यांपर्यंत पोंचली आहे. ह्याचें सुंदर शरीर द्यावापृथ्वीमध्यें प्रकाशतें. सूर्य आणि चंद्र ह्याला पहात असतात. तुझ्यावर श्रद्धा राहावी म्हणून हे इंद्रा, कोण बरें आळीपाळीनें फिरत असतात?

३. हे धनवन्ता, ज्या तुझ्या विजयी रथाला समरांगणांत पाहून आम्हीं त्याचें अभिनंदन करतों, त्या रथाला हे इंद्रा, तूं आम्हांला धनप्राप्ति व्हावी म्हणून घेऊन ये हे मनःपूर्वक अनेकांनीं स्तविलेल्या इंद्रा, हे धनवन्ता, तुझे जे आम्ही त्या आम्हांला युद्धांत जय दे.

४. तूं आमच्या साह्यास असल्यावर आम्ही जिंकूं. आणि तूं आमच्या बाजूनें प्रत्येक संग्रामांत संरक्षण कर. हे इंद्रा, तूं आम्हांला धन सुलभ कर. आणि हे धनवंता, आमच्या शत्रूंच्या वीर्याचा तूं नाश कर.

५. हे धनाधिपते, रक्षणेच्छेनें तुला स्तविणारे हे नाना प्रकारचे लोक तुला बोलावीत आहेत. परंतु तूं आम्हांलाच फक्त धन मिळवून देण्यासाठीं रथांत बैस. हे इंद्रा, तुझें स्थिर मन जयशाली होवो.

६. इंद्राचे बाहू गोधन जिंकणारे आहेत. त्याच्या पराक्रमाला सीमा नाहीं. तो श्रेष्ठ इंद्र प्रत्येक ठिकाणीं शेकडो उपायांनीं रक्षण करीत असतो. तो मोठा रणगाजी आहे. अद्वितीय इंद्र सामर्थ्याचें केवळ उपमेय झाला आहे. म्हणूनच धनाची इच्छा करणारे लोक ठिकठिकाणीं त्याला बोलावतात.

७. हे धनवन्ता, मनुष्यामध्यें तूं दिलेली संपत्ति शतगुणित किंबहुना अधिक, सहस्रगुणित होत असते. हे नगरभेत्त्या, अद्वितीय अशा तुला स्तुतीनें उत्साहित केलें म्हणजे तूं शत्रूंना ठार करतोस.

८. हे नृपते, शक्तीचें तिप्पट प्रमाण तुझ्या ठिकाणीं आहे. तूं तीनहि पृथिवीपेक्षां (द्यावापृथिवी व अंतरिक्ष) आणि तीनहि अग्नीपेक्षां मोठा आहेस. हे इंद्रा, तूं जन्मल्यापासूनच तुला कोणी शत्रू नाहीं.

९. आम्ही सर्व देवांतून तुलाच प्रथम हाक मारतों. तूंच शत्रुसैन्याशीं झुंज मारतोस. तरी असा तूं आमच्या ह्या कार्यकर्त्याला ज्ञानवान आणि शत्रुहंता कर. इंद्र युद्धप्रसंगीं आपला रथ सर्वांच्या पुढें ठेवो.

१०. हे धनवंता, लहान लढाईंत आणि मोठ्या संग्रामांतहि तूं धन जिंकतोस. परंतु तें तूं आपल्या जवळच अडवुन ठेवीत नाहींस. उग्र अशा तुला आम्ही रक्षणार्थ उत्तेजित करतों. तरी हे इंद्रा, तूं आम्हांला प्रार्थना करण्याची बुद्धि दे.

११. इंद्र नेहमीं आमची बाजू बोलणारा असो. आम्ही शत्रुरहित होऊन आम्हांला धन प्राप्त व्हावें. त्याचप्रमाणें मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी आणि द्युलोक हे सर्व आम्हांला संपत्ति देवोत.

सूक्त एकशें तिनावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता-इंद्र; छंदः-त्रिष्टुभ.

१. पुरातन कालापासूनच कवि लोक तुझ्या पराक्रमाची प्रशंसा करीत आले आहेत. तुझ्या पराक्रमांपैकीं एक पृथिवीवर असतो आणि दुसरा द्युलोकीं असतो. युद्धांतील ध्वजाप्रमाणें ते एकमेकांना भेटतात.

२. त्यानें पृथिवीला धारण करून विस्तीर्ण केली आणि वज्राचे प्रहार करून उदकें मोकळीं केलीं. त्यानें अहीला ठार केलें, रौहिणाचे तुकडे केले, त्या धनवंतानें आपल्या बळानें व्यंसाला ठार मारलें.

३. प्रजांचें पालन करणारा आणि आपल्या सामर्थ्यावर पुरेपूर विश्वास असणारा तो इंद्र दस्यूंचीं नगरें फोडीत चाल करून गेला. हे वज्रधरा इंद्रा, विद्वान असा तूं दस्यूंना ठार करण्यासाठीं वज्र फेक आणि आर्य लोकांचें सामर्थ्य व वैभव वाढीव.

४. अत्यंत बलपुत्र इंद्र हातांत वज्र धारण करून दस्यूंना ठार करण्यासाठीं धांवत गेला. त्यावेळीं त्यानें जें नांव धारण केलें तेंच मघवन हें नांव ह्या मनुष्य युगांत तो आपल्या भक्तांसाठीं धारण करीत असतो.

५. ह्या इंद्राचें हें विस्तीर्ण आणि अतिशय मोठें सामर्थ्य पाहा व त्याच्या त्या बळावर तुम्ही विश्वास ठेवा. त्यानें गाई मिळाविल्या, घोडे मिळविले, त्यानें औषधी व उदक मिळविलें, त्यानें वनेंहि मिळाविलीं.

६. अचाट कर्मे करणाऱ्या, वीर्यशाली, बलवान, सत्यपराक्रमी इंद्राकरतां आपण सोमरस काढूं या. कारण वाटमाऱ्या चोराप्रमाणें तो शूर अधार्मिकांना छेडतो आणि त्यांचे तुकडे तुकडे करतो· व त्यांचें धन लुबाडून घेतो.

७. हे इंद्रा, जेव्हां तूं निजलेल्या अहीला आपल्या वज्रानें जागें केलेस, त्याचवेळीं तुझ्या बळाची प्रचीति आली. त्यावेळीं हर्षभरित झालेल्या तुला उद्देशून देवपत्न्या,मरुत आणि सर्व देव यांनीं आनंद प्रदर्शित केला.

८. हे इंद्रा, जेव्हां तूं शुष्णाचा, पिप्रूचा, कुययाचा आणि वृत्राचा वध केलास, आणि शंबराचीं नगरें फोडलींस, त्याच वेळीं तुझ्या बळाची प्रचीति आली. मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथ्वी आणि द्युलोक हे सर्व आम्हांला (तुझ्याप्रमाणें) बल देवोत.

सूक्त एकशें चारावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता-इंद्र; छंदः-त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, तुला बसण्याकरतां हें आसन तयार केलें आहे. यावर खिंकाळणाऱ्या घोड्याप्रमाणें तूं येऊन बैस. लगाम सोड आणि रात्रीं, दिवसां आणि पहाटेस तुला जलदीनें घेऊन येणारे हे घोडे मोकळे सोड.

२. जे कोणी उपासक लोक रक्षणाच्या इच्छेनें इंद्राकडे येतात, त्यांना तो तत्क्षणींच सन्मार्गाला लावो. देव दस्यूंचा क्रोध नष्ट करोत. व आमच्या कल्याणाकरतां इंद्राला कुयव लोक इकडे घेऊन येवोत.

३. धन जाणणारा कुयव स्वतःच तें लुबाडतो. उदयोन्मुख होतांच तो फेसयुक्त तेवढें हरण करतो. कुयवाच्या दोन्ही बायका दुधाचें स्नान करतात, त्याचवेळीं त्या दोघी शिफेच्या डोहांत बुडून मरोत.

४. उदकाच्या खालीं लपून राहणाऱ्या त्या असुराचें निवासस्थान अदृश्य होय. तो मोठ्या पुरांताहि तरतो. तो शूर राजाच होय. अंजिसी, कुलिशी आणि वीरपत्नी ह्या (नद्या) त्याला दुधानें आनंदित करून आपल्या उदकावर तरंगवितात.

५. हे मघवन, ज्याअर्थीं दस्यूंचा मार्ग पाहतोस आणि वत्सोत्सुक गाई घरीं जातात त्याप्रमाणें त्यांच्यामागें जातोस त्याअर्थीं तूं आम्हांला त्यांच्या उपद्रवापासून रक्षण कर. विषयासक्त पुरुष आपलें धन देऊन टाकतो, त्याप्रमाणें तूं आम्हांस टाकून देऊं नकोस.

६. हे इंद्रा, आम्ही निरोगी राहून जगावें म्हणून तूं आम्हांला सूर्याची आणि उदकांची उपासना शिकीव. आमचें पोटचें पोर मारूं नकोस. तुझ्या महान सामर्थ्यावर आमचा विश्वास आहे.

७. अशा तुज इंद्रावर मी विश्वास ठेवला आहे. वीर्यशाली तूं आम्हांस श्रेष्ठ धनाची प्राप्ति करून दे. हे बहुस्तुत इंद्रा, तूं आम्हांला भिकारड्या घरांत घालूं नकोस. तूं भुकेलेल्यांना अन्नपाणी दे.

८. हे इंद्रा, तूं आम्हांस मारूं नकोस, टाकून देऊं नकोस, आमचे प्रिय भोज्य पदार्थ हरण करूं नकोस. हे धनवान आणि बलवान इंद्रा, तूं आमचीं अंडीं (गर्भ) फोडूं नकोस. तूं आमचीं भावंडें मारूं नकोस.

९. तूं आम्हांकडे ये. तुला सोमकामी असें म्हणतात. म्हणून तुजकरतां हा सोम तयार केला आहे. माद उत्पन्न व्हावा म्हणून तूं तो पी. सर्वव्यापी असा तूं आपल्या पोटांस तो ओत. व आमच्या प्रार्थना पित्याप्रमाणें ऐक.

सूक्त एकशें पांचावें.*

ऋषिः—त्रित आप्त्य अथवा कुत्स; देवता-विश्वेदेव; छंदः—८ यवमध्या बृहती, १९ त्रिष्टुभ्, अवशिष्ट पंक्ति.

१. मेघाच्या आंतून, उत्तम पंख असलेला चंद्रमा द्युलोकांत धांवत आहे. ज्याचे कडेचे प्रदेश सुवर्णासारखे तेजस्वी आहेत असे जे मेघ, त्याचें स्थान कोणालाहि ज्ञात होत नाहीं. तरीपण हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही माझें हें स्तोत्र लक्षांत ध्या.

२. इच्छा करणाऱ्याचे मनोरथ पूर्ण होतात. तरुणस्त्रीला पति मिळतो. तो वीर्ययुक्त रेताचा उत्सर्ग करतो.

---

* टीपः—शाट्यायन ब्राह्मणांत ह्या सूक्तासंबंधीं खालील इतिहास दिला आहे. एकत, द्वित आणि त्रित असे तीन ऋषि होते. ते निर्जल अरण्यांत असतां तान्हेनें व्याकूळ झाले. तेव्हां त्रित पाणी पिण्याकरतां एका विहिरींत शिरला. तो स्वतः पाणी प्याला आणि इतरांनाहि त्यानें पाणी दिलें ते पाणी प्याले पण त्रिताला विहिरींत ढकलून त्यांनीं त्याचें धन लुबाडलें व गाडीच्या चाकानें विहिर बंद करून चालते झाले. तेव्हां त्रितानें कूपाच्या बाहेर पडण्याकरतां प्रार्थना केली तें हें सूक्त होय.

ती तें घेऊन त्याला आपल्या अंगचे रक्तांत मिसळते. हे द्यावापृथ्वीनो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

३. हे देवांनो, हा सूर्य द्युलोकापासून खालीं न पडो. त्या आनंदकर आणि कल्याणकर सूर्याच्या शिवाय आम्ही कधींहि राहूं शकणार नाहीं, हे द्यावापृथ्वीनो, तुम्ही हें स्तोत्र लक्षांत घ्या.

४. अगदीं शेजारीं असलेल्या अग्नीला मी विचारतों. तो दूत अग्नि तें मला सांगेल कीं तें पुरातन ऋत कोठें गेलें. कोणत्या नवीन देवानें तें धारण केलें आहे? हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

५. हे देवहो, तुम्ही जे ह्या तीन दिव्य लोकांत आहांत, त्या तुम्हांला मी विचारतों कीं तुमचें ऋत कोठें आहे ? व अनृत कोठें आहे ? तुम्हांस अर्पण केलेली पुरातन आहुति कोठें आहे ? हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

६. तुमचें सत्याचरण कोठें गेलें ? वरुणाची दृष्टि कोठें आहे ? महान अर्यमाच्या मार्गानें आम्ही दुष्ट लोकांच्या तडाख्यांतून कसे पार पडूं ? हे द्यावापृथ्वीनो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

७. ज्यानें पूर्वीं सोमरस काढून कित्येक स्तोत्रें म्हटलीं तो हा मीच. लांडगा तान्हेलेल्या मृगाला खातो, त्याप्रमाणें व्यथा मला जर्जर करीत आहेत. हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

८. माझ्या पाठीमागच्या बरगड्या सवतीप्रमाणें मला छळीत आहेत. उंदीर विणकरांनीं खळवलेले दोरे खातात त्याप्रमाणें रोग मला खात आहेत. हे शतक्रतो, तुझ्या भक्ताची व्याधि नाहींशीं होवो. हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

९. हे जे सात दोर त्यांनीं माझा नाभि बांधला आहे. त्रित आप्त्य यानें तें जाणलें आहे. तो आपल्या बांधवाकरतां प्रार्थना करीत आहे. हे द्यावापृथिवीहो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

१०. हे जे पांच बलाढ्य देव विस्तीर्ण द्युलोकांत असतात, ते मी देवविषयक स्तोत्र रचल्याबरोबर सर्व एकदम येत असतात, पण आतां तर ते दिसत नाहींत. हे द्यावापृथिवीहो, तुम्हीं हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

११. हे जे द्युलोकाच्य मध्यें सुपर्ण असतात, ते अंतरिक्षांत पोहणाऱ्या लांडग्याला हाकून लावीत आहेत. हे द्यावापृथिवीहो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

१२. हे देवहो, नद्या सत्यस्वरूप उदकें वाहवितात. आणि सूर्य सत्याचा विस्तार करतो. हा स्तुत्य, वर्णनीय आणि प्रशंसा करण्यायोग्य पराक्रम तुमच्या अंगीं आहे. हे द्यावापृथिवीहो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

१३. हे अग्ने, तुझें देवांशीं आप्तपण प्रसिद्धच आहे. तरी मनूच्या येथें केल्याप्रमाणें आमच्या येथें अत्यंत विद्वान असा तूं देवांना घेऊन ये व त्यांचें यजन कर.हे द्यावापृथिवींनो, तुम्ही हें स्तोत्र लक्षांत घ्या.

१४. मोठा विद्वान होता, आणि सर्व देवांमध्यें बुद्धिमान असा अग्निदेव मनूच्या येथें केल्याप्रमाणें आमच्या येथें देवांना हवि अर्पण करो. हे द्यावापृथिवीहो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

१५. वरुणानें स्तोत्र तयार केलें. त्या गायनज्ञाची आम्ही स्तुति करतों. तो आमचें स्तोत्र रसभरित करो. आणि तें अगदीं नव्यासारखेंच तयार होवो. हे द्यावापृथिवीहो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

१६. हा जो आदित्यांचा द्युलोकांतील मार्ग, त्याची स्तुति चालू आहे. हे देवांनो, तुम्ही त्याचें अतिक्रमण करूं शकत नाहीं. आणि हे मर्त्यांनो, तुम्हांला तो दिसत नाहीं. हे द्यावापृथिवीहो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

१७. विहिरींत पडलेल्या त्रितानें रक्षणासाठीं देवांचा धांवा केला, बृहस्पतीनें तो ऐकला आणि त्यानें त्याला संकटापासून मुक्त केलें. हे द्यावापृथिवीनो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

१८. मी मार्गानें जात असतां मला अरुण वर्णाच्या लांडग्यानें ताबडतोब पाहिलें. तेव्हां पाठ भरून आलेल्या सुताराप्रमाणें तो उठून उभा राहिला. हे द्यावापृथिवीहो, तुम्ही हें माझें स्तोत्र लक्षांत घ्या.

१९. या घोषयुक्त स्तोत्राच्या योगानें इंद्राचें साहाय्य मिळवून आम्ही सर्व वीरांनीं युद्धांत विजयी व्हावें. मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी आणि द्युलोक आम्हांस हें प्राप्त करून देवोत.

सूक्त एकशें सहावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता–विश्वेदेव; छन्दः—
१–६ जगती, ७ त्रिष्टुभ.

१. आम्ही इंद्र, मित्र, वरुण, अग्नि, मरुद्गण आणि अदिति यांना रक्षणार्थ बोलावितों. हे संपन्न

आणि दानशूर देवहो, वाईट रस्त्यांतून रथ पार पाडावा, त्याप्रमाणें तुम्ही आम्हांला सर्व संकटांच्या पार न्या.

२. हे आदित्यहो, तुम्हीहि आम्हांला सर्व उपभोग देण्यासाठीं या. हे देवांनो, तुम्ही संग्रामांत आम्हांला विजय द्या. हे संपन्न आणि दानशूर देवहो, वाईट रस्त्यांतून रथ पार पाडावा, त्याप्रमाणें तुम्ही आम्हांला सर्व संकटांच्या पार न्या.

३. पुण्यश्लोक पितर आमचें रक्षण करोत. त्याचप्रमाणें यज्ञ वृद्धिंगत करणाऱ्या दोघी द्यावापृथिवी आमचें रक्षण करोत. हे संपन्न आणि दानशूर देवहो, वाईट रस्त्यांतून रथ पार पाडावा, त्याप्रमाणें तुम्ही सर्व संकटांतून आम्हांस पार न्या.

४. मनुष्यांनीं स्तविण्यास योग, बलवान, शत्रुनाशक, अशा पूषन देवाचा आम्ही स्तोत्रांनीं धांवा करून त्याला प्रार्थीत आहों. तर हे संपन्न आणि दानशूर देवहो, वाईट रस्त्यांतून रथ पार पाडावा, त्याप्रमाणें तुम्ही आम्हांला सर्व संकटांच्या पार न्या.

५. हे बृहस्पते, तूं आम्हांस सर्वदा सुख दे. तुझी आमच्यावर कृपा व्हावी आणि आमचें कल्याण व्हावें असें आम्ही इच्छितों. वाईट रस्त्यांतून रथ पार पाडावा त्याप्रमाणें तुम्ही आम्हांला सर्व संकटांच्या पार न्या.

६. विहिरींत पडलेल्या कुत्सानें वृत्रहन्त्या आणि पराक्रमी इंद्राचा रक्षणार्थ धांवा केला. हे संपन्न आणि दानशूर देवहो, वाईट रस्त्यांतून रथ पार पाडावा, त्याप्रमाणें तुम्ही आम्हांला सर्व संकटांच्या पार न्या.

७. देवांसहित अदिति देवी आमचें रक्षण करो. संरक्षक देव आमचें दुर्लक्ष न करतां संरक्षण करोत. त्याचप्रमाणें मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी आणि द्युलोक हे सर्व मला (हें दान) देवोत.

सूक्त एकशें सातावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता-विश्वेदेव; छन्दः—त्रिष्टुभ.

१. यज्ञ देवांना आनंदित करो. हे आदित्यहो, तुम्हीं आम्हांस सुख द्या. तुमची कृपादृष्टि आम्हांकडे वळो. कारण, दरिद्री मनुष्यालाहि ती अतिशय धन देणारी असते.

२. अंगिरसांच्या गायनांनीं स्तुति केलेले ते देव आपल्या रक्षणासह आमच्याकडे येवोत. इंद्र आपल्या परिवारासह, मरुत मरुतांसह आणि अदिति आदित्यांसह येऊन आम्हांस सुख देवोत.

३. इंद्र, वरुण, अग्नि, अर्यमा आणि सविता हे प्रत्येकजण आम्हांस तें अन्न देवोत. त्याचप्रमाणें मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी आणि द्युलोक हे सर्व मला तें दान देवोत.

सूक्त एकशें आठावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स, देवता-इंद्राग्नी; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्राग्नीहो, तुमचा जो अत्यंत सुंदर रथ सर्व भुवनें पहातो, त्या एकाच रथांत बसून तुम्ही दोघे या आणि आम्ही काढलेले हे सोमरस प्या.

२. हें सर्व जगत जेवढें विस्तीर्ण आणि खोल आहे, तेवढा हा सोमरस तुम्ही पिण्यासाठीं येथें आहे. हे इंद्राग्नीनो, तुमची इच्छा तो परिपूर्ण करील.

३. तुमचें जुळें नांव कल्याणकारक आहे. हे शत्रुनाशकहो, तुम्ही जोडीनें असतां. तरी हे वीर्यशाली इंद्राग्नीनो, तुम्ही जोडीनें बसा आणि हा वीर्यशाली सोमरस प्राशन करा.

४. प्रदीप्त केलेल्या अग्नीमध्यें घृतयुक्त हवि अर्पण केला आहे. तुम्हांकरतां ह्या पळ्या भरून ठेविल्या आहेत, आणि दर्भ अंथरले आहेत. ताब्डतोब मद उत्पन्न करणारे सोमरस आम्ही तुम्हांसाठीं ओतीत आहों; तरी हे इंद्राग्नीहो, तुम्ही या आणि आम्हांवर कृपा करा.

५. हे इंद्राग्नीहो, तुम्ही जे पराक्रम, चमत्कार किंवा जीं अद्भुत कृत्यें केलीं आहेत, त्याचप्रमाणें तुमचीं जीं पुरातन कल्याणकारक सख्यें आहेत, त्यांनीं युक्त असे तुम्ही येऊन सिद्ध केलेला हा सोमरस प्राशन करा.

६. तुम्हा दोघांना निवडून मी प्रथमच बोललों कीं हा सोमरस आमच्या ऋत्विजांनीं तुम्हांस अर्पण करण्यासाठीं ठेवला आहे त्या माझ्या तुमच्यावरील खऱ्या श्रद्धेला स्मरून तुम्ही दोघेहि या आणि हा सिद्ध केलेला सोमरस तुम्ही प्राशन करा.

७. हे इंद्राग्नीहो, जरी तुम्ही आपल्या घरीं आनंदांत असला, किंवा हे पूजनीयहो, स्तोत्रकर्त्यांच्या येथें किंवा राजाच्या येथें आनंदांत असाल, तथापि हे

वीर्यशालीहो, तेथून तुम्ही या आणि हा सिद्ध केलेला सोमरस तुम्ही प्राशन करा.

८. हे इंद्राग्नीहो, जरी तुम्ही यदूंच्या, तुर्वशांच्या येथें किंवा द्रुह्यूच्या, अनूच्या किंवा पुरूच्या येथें असला, तरी हे वीर्यशालीहो, तुम्ही तेथून या आणि हा सिद्ध केलेला सोमरस प्राशन करा.

९. हे इंद्राग्नीहो, तुम्हीं ह्या विस्तीर्ण भुवनाच्या अधोभागीं, मध्यभागीं, किंवा ऊर्ध्वभागीं असला, तरी तेथून, हे वीर्यशालीहो, येथें या आणि हा सिद्ध केलेला सोमरस प्राशन करा.

१०. हे इंद्राग्नीहो, तुम्ही जरी या भुवनाच्या ऊर्ध्वभागीं. मध्यभागीं किंवा अधोभागीं असला तरी हे वीर्यशालीहो, तेथून तुम्ही या, आणि हा सिद्ध केलेला सोमरस तुम्ही प्राशन करा.

११. हे इंद्राग्नीहो, तुम्ही द्युलोकीं असला किंवा पृथिवीवर असला, तुम्ही पर्वतांत, वनस्पतींत किंवा उदकांत असला, तरी तुम्ही तेथून या आणि हे वीर्यशालीहो, सिद्ध केलेला हा सोमरस प्राशन करा.

१२. हे इंद्राग्नीनो, तुम्ही सूर्योदय होतो तेथें किंवा द्युलोकाच्या मध्यभागीं हविरन्नाचा स्वीकार करून संतुष्ट झालेले असा. हे वीर्यशालीहो, तेथून तुम्ही या आणि हे सिद्ध केलेले सोमरस प्राशन करा.

१३. हे इंद्राग्नीनो, अशा प्रकारें सोमरस प्राशन करून तुम्ही आम्हांला सर्व प्रकारचें धन जिंकून द्या. मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी आणि द्युलोक हेहि आम्हांला तें धन देवोत.

सूक्त एकशें नवावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता–इंद्राग्नी; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्राग्नीहो, मला धनाची इच्छा झाली असतां मी माझ्या सजातीय किंबहुना नातलग अशा तुम्हांला प्रार्थना करतों. तुमच्यासारखा माझी काळजी घेणारा दुसरा कोणी नाहीं. म्हणून मी हें धन प्राप्त करून देणारें स्तोत्र तुम्हांसाठीं रचिलें आहे.

२. तुम्ही जावयापेक्षां किंवा मेहुण्यांपक्षांहि अधिक मोठें धन देता असें मी ऐकलें आहे. म्हणून हे इंद्राग्नीहो, तुम्हांस सोम अर्पण करून मी तुम्हांसाठीं हें स्तोत्र रचिलें आहे.

३. वाडवडिलांच्या शक्तीची (वंशाची) अखंडितता राखूं इच्छिणारे आणि आपणांकडून वंशाच्या दोऱ्या न तुटाव्यात अशी प्रार्थना करणारे इंद्राग्नीसाठीं वीर्यकर सोमरस काढून त्यांस आनंदित करीत आहेत. ते शत्रूनाशक दोघेहि सोमरसाच्या जवळ उभे असतात.

४. हे इंद्राग्नीहो, तुम्ही हर्षभरित व्हावें म्हणून सोमाची इच्छा करणाऱ्या धिषणा देवीनें सोमरस तयार केला. तरी हे वरदहस्त सुबाहू अश्वीहो, तुम्ही सोमरसांत मधुर पदार्थ आणून घाला.

५. हे इंद्राग्नीहो, तुम्ही संपत्ति मिळवून देण्याच्या कामीं आणि शत्रूला ठार मारण्याच्या कामीं अत्यंत शक्तिमान आहां असें आम्ही ऐकतों. तरी तुम्ही येथें आमच्या यज्ञांत दर्भासनावर बसा आणि सोमरस पिऊन हर्षभरित व्हा.

६. हे इंद्राग्नीहो, युद्धगर्जना झाली म्हणजे तुम्ही मनुष्यें किंवा पृथिवी त्याचप्रमाणें द्युलोक, समुद्र, पर्वत, किंबहुना सर्व भुवनें यांच्यापेक्षां अधिक सामर्थ्यवान होतां.

७. हे वज्रहस्त इंद्राग्नीहो, तुम्ही (धन) प्राप्त करून घ्या आणि आम्हांला द्या. व आपल्या पराक्रमानें आमचें संरक्षण करा. ज्यांच्यापाशीं आमचे पितर एकरूप होऊन बसले आहेत, ते हे सूर्याचे किरण येथें आहेत !

८. हे वज्रहस्त इंद्राग्नीहो, हे नगरभेत्तेहो, तुम्ही आम्हांस धन द्या. आणि युद्धांत आमचें संरक्षण करा. मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी, आणि द्युलोक हे सर्व आम्हांस तें (संरक्षण) देवोत.

सूक्त एकशें दहावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता–ऋभु; छंदः—५–९ त्रिष्टुभ्, अवशिष्ट जगती.

१. माझें कर्म पूर्ण झालें आहे, तरी पण मी तें पुन्हा करीत आहे. अत्यंत मधुर स्तोत्र म्हणून मी प्रशंसा करीत आहें. हा सोमसागर सर्व देवांना भरपूर पुरण्यासारखा आहे. तरी हे ऋभूंनो, स्वाहा म्हणून अर्पण केलेला हा सोमरस तुम्ही एकत्र पिऊन तृप्त व्हा.

२. माझे कोणी प्राचीन आप्तच असे तुम्ही हविरन्नाची इच्छा करून पराक्रम करते झाला, तेव्हां हे सुधन्व्याच्या पुत्रांनो, तुम्ही आपल्या पराक्रमाच्या बळावर दानशूर सवित्याच्या घरीं गेलांत.

३. तुम्ही जेव्हां सर्वदर्शी सूर्याची कीर्ति ऐकून त्याच्याकडे गेला, तेव्हां त्यानें तुम्हांला तें अमृत दिलें. तेव्हां प्रबल त्वष्ट्याचें भक्षण करण्याचें एकच चमस-पात्र असतांहि तुम्ही त्या एकाचे चार चार करून दाखविलेत.

४. मर्त्य उपासक असतांनाहि हे ऋभू आपल्या कौशल्याच्या योगानें लवकरच अमरत्व पावले. सुधन्वानाचे पुत्र ऋभु सूर्याप्रमाणें तेजस्वी झाले व एका वर्षाच्या आंतच त्यांना स्तोत्रें प्राप्त होऊं लागलीं.

५. सोमाची इच्छा करणारे आणि देवलोकांमध्यें बसून हविरन्न प्राप्त व्हावें अशी इच्छा करणारे ऋभू, शेजारच्यांनीं स्तुतीनें उत्साहित केलें असतां शेताचें मोजून विभाग करावेत, त्याप्रमाणें, तोंड उघडणारें एकच पात्र आपल्या तीक्ष्ण शस्त्रानें विभागते झाले.

६. स्रुचेनें घृत अर्पण करावें, त्याप्रमाणें अंतरिक्षांतील वीर ऋभूंना आपल्या ध्यानाच्या योगानें आपण स्तोत्र अर्पण करूं या. हे ऋभू आपल्या कौशल्याच्या योगानें जगत्पित्याचें सामर्थ्य प्राप्त करते झाले आणि दिव्य लोकांप्रत पावले.

७. ऋभू हे आपल्या सामर्थ्याच्या योगानें नवीन इंद्रच बनले. ऋभु धनांच्या आणि संपत्तीच्या योगानें संपन्न आणि दानशूर देव झाले, तरी हे देवहो, तुमच्या सामर्थ्याच्या जोरावर आम्ही शुभ दिवशीं अधार्मिकांच्या सेनांना टक्कर देऊन जिंकू असें करा.

८. हे ऋभूंनो, तुम्ही गाईना चामड्यापासून वेगळे करिता झाला, आणि तुम्ही वासराची आणि त्याच्या मातेची पुन्हा भेट करवलीत. हे सुधन्व्याचे शूर पुत्रहो, तुम्ही आपल्या कौशल्यानें वृद्ध मातापितरांना तरुण करिते झाला.

९. हे इंद्रा, ऋभूसहित असा तूं आपल्या घोड्यांच्या योगानें युद्धांत आमचें संरक्षण कर आणि आम्हांस सुंदर धन प्राप्त करून दे. मित्र, वरुण, आदिति, समुद्र, पृथिवी आणि द्युलोक हे सर्व आम्हांस धन देवोत.

सूक्त एकशें अकरावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता–ऋभु; छंदः—५ त्रिष्टुभ, अवशिष्ट जगती.

१. ज्ञानपूर्वक आणि कौशल्याचें काम करणारे ऋभु चांगला फिरणारा रथ तयार करते झाले. इंद्राला वाहून नेणारे वीर्ययुक्त दोन घोडे त्यांनीं निर्माण केले. त्यांनीं आपल्या पितरांना तारुण्य प्राप्त करून दिलें आणि वासरासाठीं जवळ असणारी माता निर्माण करते झाले.

२. ऋभूनों, आम्हांला यज्ञासाठीं तुमच्यासारखें तारुण्य द्या. व त्याचप्रमाणें आमच्या अंगीं पराक्रम व बळ उत्पन्न होण्याकरतां आम्हाला वीर्यशाली बनविणारें अन्न द्या. ज्या योगानें आम्ही आमच्या सर्व वीरांसह व सामान्य लोकांसह घरीं सुखानें राहूं, अशा प्रकारचें सामर्थ्य आमच्या सेनेच्या अंगीं घाला.

३. हे पराक्रमी ऋभूंनो, तुम्ही आम्हांस लूट मिळवून आणून द्या. आमच्या रथाला द्या, आणि घोड्यांना द्या. आम्हांला ते नित्य अशी लूट मिळवून देवोत. आमचा बांधव असो कीं नसो, तशा शत्रूलाहि मग तो मोठा विजयी असला तरी त्याचाहि आम्ही पराभव करूं शकूं.

४. माझ्या रक्षणासाठीं आणि सोम पिण्यासाठीं मी ऋभूंपेक्षांहि श्रेष्ठ इंद्र, ऋभू, विभ्वा, वाज आणि मरुत यांस बोलावतों. आणि दोघे मित्रावरुण आणि आश्विदेव यांसहि मी बोलावतों. ते आम्हांस धन, बुद्धि आणि जय प्राप्त करून देवोत.

५. ऋभु आम्हांला युद्धाकरतां धन प्राप्त करून देवो आणि युद्ध जिंकणारा वाज आमचें संरक्षण करो. मित्र, वरुण, आदिति, समुद्र, पृथिवी आणि द्युलोक हे सर्व मला हें (दान) देवोत.

सूक्त एकशें बारावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता–१ ल्या ऋचेचा पहिला चरण द्यावापृथिवी, दुसरा चरण अग्नि, अवशिष्ट सूक्ताची देवता अश्विन्; छंदः—२४–२५ त्रिष्टुभ्, अवशिष्ट जगती.

१. प्रथम चित्त लागावें म्हणून मी द्यावापृथिवीची स्तुति करतों. आणि देवयज्ञाचा प्रारंभ करण्यासाठीं म्हणून मी उष्ण व तेजस्वी अग्नीची प्रार्थना करतों. हे अश्वीनो, ज्याच्या योगानें तुम्ही आपल्या पक्षाकडून जयघोष करवितां, त्या तुमच्या संरक्षणांनीं युक्त असे तुम्ही येथें अवश्य या.

२. विचारशील माणसाकडे ज्याप्रमाणें (सल्लामसलतींसाठीं) विद्वानांची गर्दी जमते, त्याप्रमाणें तुम्हांपासून धन प्राप्त व्हावें म्हणून उपासक स्तोत्रें म्हणून

तुमच्या रथाजवळ गर्दी करतात. तरी हे अश्वीहो, ज्याच्या योगानें तुम्ही उपासकांना कर्मप्रवृत्त करतां, त्या तुमच्या रक्षणांसह तुम्ही आमच्या येथें अवश्य या.

३. हे अश्वीहो, ज्या दिव्य आणि अमर सोमाच्या बळाच्या योगानें तुम्ही त्या सर्व प्रजांवर राज्य करण्यास समर्थ होतां, ज्याच्या योगानें तुम्ही वांझ गाईच्या ठिकाणीं दूध उत्पन्न केलेंत, त्या तुमच्या प्रसादासह तुम्ही हे शूरहो, येथें अवश्य या.

४. ज्याच्या योगानें भ्रमण करणारा वायू दोन माता असलेल्या पुत्राच्या सामर्थ्यानें अधिक शीघ्रगामी झाला, आणि सर्व आकाश ज्यानें व्यापून टाकलें, त्याचप्रमाणें ज्याच्या योगानें त्रिमतुं विद्वान झाला, त्या तुमच्या प्रसादासह, हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

५. ज्याच्या योगानें जखडून बांधलेल्या रेभाला आणि वन्दनाला तुम्ही पाण्यांतून वर काढून सूर्यप्रकाश दाखविला, ज्यांच्या योगानें तुम्हीं धनेच्छु कण्वाचें रक्षण केलेंत, त्या तुमच्या प्रसादांसह, हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

६. ज्यांच्या योगानें तुम्ही डोहांत बुडून मरत असलेल्या अन्तकास वांचविलेंत आणि ज्या अश्रांत कृपेनें तुम्ही भुज्यूचें संरक्षण केलें, ज्या कृपेनें तुम्ही कर्कन्धुला आणि वय्याला सांभाळिलें त्या कृपेसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

७. ज्यांच्या योगानें तुम्ही धनाढ्य शुचन्तीला चांगलें घर दिलेंत, आणि अत्रीचा तापदायक ताप शांत केलांत, ज्यांच्या योगानें तुम्ही पृश्निगुस आणि पुरुकुत्सास रक्षिलेंत, त्या तुमच्या प्रसदासह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

८. हे वीर्यवन्तानो, ज्याच्या योगानें अंध आणि पंगु अशा परावृजाला तुम्ही पाहण्यास आणि चालण्यास समर्थ केलेंत, ज्याच्या योगानें तुम्ही ग्रासलेल्या वर्तिकेस सोडवलेंत, त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

९. हे जरारहित हो, ज्याच्यायोगानें तुम्ही मधुर सिंधूला वाहविलें, आणि (शत्रूस) जिंकून वसिष्ठाचें रक्षण केलेंत, त्याचप्रमाणें ज्याच्या योगानें तुह्मी कुत्स, श्रुतर्य आणि नर्य यांचें संरक्षण केलेंत, त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

---

३. टीप:––शंयूच्या वांझ गाईला अश्वीनीं दुभती केली. १६ वा मंत्र पहा.

४. टीप:––त्रिमन्तु आणि कक्षीवान एकच.

५. टीप:––रेभाला अश्वींनीं संकटांतून मुक्त केलें अशी कथा आहे. (सायणाचार्य) असुरांनीं बांधून त्याला विहिरींत टाकलें होते. गुहेंत ठेवल्यामुळें मरावयास टेकलेल्या रेभाचा उल्लेख आहे. (१०.३९.९). पाण्यांत पडलेल्या रेभाचा उद्धार केल्याचा उल्लेख आढळतो. (१.११७.४). रेभाला बांधून नऊ दिवस आणि दहा रात्रि पाण्यांत टाकलें होतें तेथून अश्वींनीं त्यास उद्धरिलें. (१.११६.२४).

वंदन वृद्ध झाला असतां अश्वींनीं त्याचें आयुष्य वाढविलें. (१.११६.६). एका ठिकाणीं फक्त त्याचा उद्धार केल्याचा उल्लेख आहे (१.११८.६). म्हातारपणानें पीडलेल्या वंदन ऋषीला अश्वीदेव जुन्या रथाला नीट केल्याप्रमाणें पुनः तरुण करते झाले असें सांगितलें आहे (१.११९.७). वंदनाला कूपांतून काढल्याचाहि उल्लेख आहे. (१.११६.११;११७.५).

६. टीप:––भुज्यु तौग्र्य या नांवाचा अश्वींच्या प्रीतींतला एक राजर्षि असे. त्याला दुसऱ्या द्वीपांतले शत्रु येऊन अतिशय उपद्रव करूं लागले. तेव्हां त्यांस जिंकण्याकरतां म्हणून त्यानें आपला पुत्र जो भुज्यु त्याला सेनेसहित जहाजांतून पाठवून दिले. तें जहाज समुद्रांमध्यें वादळानें फुटलें. त्यावेळीं भुज्यूनें अश्वींची सत्वर प्रार्थना केली. स्तोत्र होतांच अश्वीनीं भुज्यूला तीन दिवस आणि तीन रात्रींत तुग्राजवळ नेऊन पोंचविले. याचा अनेक ठिकाणीं उल्लेख आहे. परद्वीपावर पाठविण्याचें कारण, बापाचा राग हेंहि एक आहे.

टीप:–वय्य १.५४.६;२.१३.१२;४.१९.६ पहा.

७ टीप:––अत्रीला शंभर द्वारें असलेल्या एका यंत्रात घालून असुर भाजीत होते. त्याला अंधकारमय कारागृहांत टाकलें होतें आणि तेथून त्याला अश्वींनीं सोडविलें अशा एका कथेचा वारंवार उल्लेख आलेला आहे. अत्रीला कांहीं कारणानें कारागृहवास प्राप्त झाला होता आणि त्यांतून ईश्वरी कृपेनें त्याची सुटका झाली. ११७.३ पहा.

८. टीप:—परावृज २.१३.१२; २.१५.७. हे मंत्र व त्यावरील टीपा पहा.

१०. ज्याच्या योगानें तुम्ही घनघोर संग्रामांत जय मिळवून धनाढ्य अथर्वकुलोत्पन्न विश्पलेला संरक्षिलेंत, आणि ज्यांच्या योगानें वश अश्व्याला रक्षिलेत, त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

११. हे दानशूरहो, ज्याच्या योगानें तुम्ही औशिज दीर्घश्रवा नांवाच्या वाण्यासाठीं मेघांची वृष्टि केलीत, आणि ज्यांच्या योगानें तुम्ही स्तोत्रकर्त्या कक्षीवानाचें रक्षण केलेंत, त्या तुमच्या प्रसादांसह, हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

१२. ज्याच्या योगानें तुम्ही रसा नांवाची नदी पाण्यानें भरून टाकलीत, आणि अश्वरहित रथाचें रक्षण करून जय मिळविला, त्याचप्रमाणें ज्याच्या योगानें त्रिशोकानें दुभत्या गाई प्राप्त करून घेतल्या त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

१३. ज्याच्या योगानें तुम्ही सूर्याच्या सभोवार फिरतां, आणि शेतकीच्या कामांत मांधातृचें संरक्षण करतां, ज्यांच्या योगानें तुम्ही विद्वान भरद्वाजाचें संरक्षण केलें, त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

१४. ज्याच्या योगानें तुम्ही दिवोदास अतिथिग्व आणि दिवोदास कशोजू यांच्यावर शंबराला ठार मारण्याच्या वेळीं कृपा केलीत, आणि नगरें फोडीत असतां ज्या त्रसदस्यूंवर कृपा केलीत त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

१५. ज्याच्या योगानें तुम्हीं मोठा सोमपान करणारा वम्र आणि उपस्तुत यांच्यावर आणि बायको मिळालेल्या कलीवर कृपा केलीत, ज्याच्या योगानें तुम्ही व्यश्व आणि पृथि यांजवर अनुग्रह केला, त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या

१६. हे शूरहो, ज्यांच्या योगानें तुम्ही शयूचें, अत्राचे आणि पूर्वीं मनूचें संकट निवारलेंत आणि ज्यांच्या योगानें तुम्ही स्यूमरश्मीसाठीं बाण सोडलांत, त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

१७. ज्यांच्या योगानें, समिधांच्या योगानें प्रदीप्त केलेल्या अग्नीप्रमाणें पठर्वा आपल्या शरीरसामर्थ्यानें प्रसिद्धि पावला. आणि ज्यांच्या योगानें तुम्ही महायुद्धांत शर्यातावर कृपा केली, त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

१८. ज्यांच्या योगानें अंगिरसांच्या स्तुतीनें तुम्ही आनंदित झाला आणि गाईंच्या वरचें झाकण दूर करण्याकरितां सर्वांच्या पुढें धांवला, ज्यांच्या योगानें तुम्ही शूर मनूला अन्न देऊन रक्षिलें, त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

१९. ज्यांच्या योगानें तुम्ही विमदाला पत्नी मिळवून दिली, व तसेंच अरुणवर्ण गाई दिल्यात, ज्यांच्या योगानें तुम्ही सुदासाला दिव्य धन घेऊन आलांत, त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

२०. ज्यांच्या योगानें तुम्ही उपासकाला सुखकारक होता, ज्यांनीं भुज्यू आणि अध्रिगु यांचें रक्षण केलें, चांगलें स्तोत्र करणाऱ्या ऋतस्तुभेला ज्यांनीं सुख दिलें, त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

२१. ज्यांच्या योगानें तुम्ही बाण सोडण्याच्या वेळीं कृशानूवर कृपा केली, आणि धांवण्याच्या वेळीं तरुणांच्या घोड्याला साहाय्य केलें, ज्यांनीं मधमाशांना गोड मध मिळवून दिला, त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें लौकर या.

२२. ज्यांच्या योगानें तुम्ही गाईंसाठीं लढणाऱ्या शूर उपासकांचें लढाईंत संरक्षण करतां, आणि त्याला शेती आणि संतति देतां, ज्यांच्या योगानें तुम्ही घोडे

---

१०. टीपः—विश्पला १.११६.१५ वरील टीप पहा.

टीपः—वश अश्व्य याला ‘ पृथुश्रवा कानीत ’ या मनुष्यानें पुष्कळ दान दिल्याचा उल्लेख आहे. (८.४६ २१) त्याला प्रत्यहीं हजार धन मिळावें असें अश्वीनीं केलें होतें. (१.११६.२१) वश राजा होता असें सायणाचार्य म्हणतात. (१०.४०.७).

१९ टीपः—विमद नांवाचा ऋषि होता. तो देवांच्या कृपेंतील असे. तो इंद्राचा अथवा प्रजापतीचा पुत्र होय असें वर्णिलें आहे. त्यावरून त्याला ऐन्द्र व प्राजापत्य असें म्हणतात. स्वयंवर झालें तेव्हां विमदाला कमद्यूनें वरलें. नंतर कमद्यूनें वरावें म्हणून दुसरे राजे आले होते ते विमदाशीं लढूं लागले. तेव्हां अश्वीदेव त्याच्या साहाय्याकरतां आले. व त्यांनीं शत्रूस मारून कमद्यूस रथांत घालून विमदाच्या घरीं पोंचविली.

२०. टीपः—भुज्यु १.११२.६ टीप पहा.

आणि रथ यांचें संरक्षण करतां, त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

२३. हे शेकडो पराक्रम करणारेहो, ज्यांच्या योगानें तुम्हीं आर्जुनेय कुत्साचें, तुर्वीतीचें आणि दभीतीचें संरक्षण केलें ज्यांच्या योगानें तुम्ही ध्वसंतीचें आणि पुरुसंतीचें रक्षण केलें, त्या तुमच्या प्रसादांसह हे अश्वीहो, तुम्ही येथें अवश्य या.

२४. हे पराक्रमी आणि वीर्यवान अश्वीहो, आमची ही स्तुति आणि प्रार्थना तुम्ही परिपूर्ण करा, मी संरक्षणाकरतां पहाटेंस तुमचा धांवा करीत आहे. आमचा संग्रांमात विजय होईल असें करा.

२५. हे अश्वीहो, तुम्ही आम्हांस दुःखरहित सौभाग्य देऊन रात्रंदिवस आमचें संरक्षण करा. मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी आणि द्युलोक हे सर्व मला तें (संरक्षण) देवोत.

सूक्त एकशें तेरावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता- १ ल्या ऋचेचा उत्तरार्ध रात्रि, अवशिष्ट सूक्ताची देवता उषा; छंदः- त्रिष्टुभ.

१. हे सर्व तेजांत श्रेष्ठ तेज इकडे येत आहे पहा. हा सर्वत्र पसरणारा सुंदर प्रकाश निर्माण झाला आहे. ज्याप्रमाणें ही रात्र सूर्यापासून उत्पन्न झाली त्याचप्रमाणें उषेचा जन्म व्हावा म्हणून तिच्याकरतां तिनें (रात्रीनें) स्थान मोकळें केलें आहे.

२. जिचा वत्स देदीप्यमान आहे अशी ही श्वेतवर्ण उषा आली आहे व तिच्यासाठीं कृष्णवर्णाची रात्र स्थानें मोकळीं करीत आहे. त्या सख्या बहिणी अमर आहेत. आणि एकीमागून दुसरी गमन करीत असते अशा ह्या दिव्य रात्री आणि उषा विश्वाचें रूप बदलीत बदलीत भ्रमण करीत असतात.

३. ह्या दोघी बहिणींचा मार्ग एकच असून तो अनंत आहे व देवांच्या आज्ञेनुसार त्या एकीमागून दुसरी अशा क्रमानें भ्रमण करीत असतात. त्या एकमेकीस प्रतिबंध करीत नाहींत किंवा थांबतहि नाहींत. त्या सुंदर रात्र आणि उषा भिन्न रूपाच्या असूनहि एक मनानें चालत असतात.

४. तेजस्वी आणि मार्ग दाखवणारी उषा दिसूं लागली आहे. त्या सुंदर उषेनें आमचे दरवाजे उघडले आहेत. सर्व जगताला प्रेरित करणारी ही उषा आम्हासाठीं संपत्ति घेऊन येत आहे. उषेनें सर्व जगाला जागृत केलें आहे.

५. निजलेल्यांनीं उठून चालू लागावें म्हणून, कोणी भोग मिळावेत म्हणून, इष्टप्राप्ति व्हावी म्हणून, धन मिळावें म्हणून खटपट करण्याकरतां, ज्यांना अंधुक दिसत आहे त्यांना दूरचेंहि दिसावें म्हणून, धनवती उषेनें सर्व जगाला जागृत केलें आहे.

६. कोणी पराक्रम करावा, कोणी कीर्ति मिळवावी, कोणी मोठी इष्टसिद्धि प्राप्त करावी, तसेंच कोणी आपल्या उद्योगास जावें, कोणी भिन्न भिन्न चरितार्थ साधन करावें म्हणून ह्या उषेनें सर्व जगताला जागृत केलें आहे.

७. ही शुभ्र वस्त्रें परिधान केलेली आणि पृथिवीवरील सकल संपत्तीची स्वामिनी अशी द्युचीं कन्या उषा दररोज प्रकाश देत उजाडत असते. हे सुंदर उषे, तूं आज येथें प्रकाश.

८. ही उषा आजपर्यंत गेलेल्या उषांच्या मार्गानें जात आहे. यापुढें येणाऱ्या असंख्य उषांत ही पहिलीच आहे. ही जीवंत प्राण्यांना प्रकाशाच्या योगानें जागृत ठेवणारी आणि मेलेल्यांना (रात्रीं झोपी गेलेल्यांना) जागृत करणारी आहे.

९. हे उषे तूं अग्नि प्रदीप्त करावयास आम्हांस लावलेंस, आणि सूर्याच्या प्रकाशाच्या योगानें तूं हें जगत् प्रगट केलेंस. तूं यज्ञ करणाऱ्या माणसांना जागृत केलेस, त्या योगानें तूं देवांचें एक आवडतें कर्म केलें आहेस.

१०. ही उषा, येथें किती वेळ राहाते ? ज्या पूर्वीं प्रकाशून गेल्या आहेत किंवा ज्या पुढें प्रकाशणार आहेत, त्या तरी किती वेळ राहिल्या किंवा राहणार आहेत ? पूर्वीच्यांची आठवण करणारी ही उषा झुरणीस लागते आणि प्रकाशत दुसऱ्यांबरोबर निघून जाते.

११. ज्या मर्त्यांनीं उषेला प्राचीन काळीं पाहिली, ते आतां मरून गेलें आहेत. सांप्रत तिला आम्हीं पहात आहोंत. (ते आम्हींहि मरून जाणार आहोंत.) आणि जे तिला या पुढील काळांत पाहणारे होतील तेहि मरूनच जाणारे आहेत.

१२. हे उषे, द्वेष्टयांना दूर राखणारी, सत्यधर्मासाठींच जन्मलेली, सुखकारक, मधुर भाषण करवणारी, सुमंगल, देवांना अर्पण केलेले हवि धारण करणारी, अशी परमश्रेष्ठ जी तूं, ती आज येथें प्रकाश.

१३. ही उषा देवी पूर्वींपासून सर्वकाळ प्रकाशत आली आहे. व म्हणूनच ती धनवती आजहि हें जग प्रकट करीत आहे. व पुढेंहि दररोज प्रकाशत राहील. ती जरारहित आणि मरणरहित असून ती आपल्या प्रकाशरूपानें भ्रमण करीत असते.

१४. ही उषा देवी आपल्या तेजस्वी अलंकारांनीं युक्त अशी द्युलोकाच्या प्रांतभागावर चकाकत आहे. तिनें द्युलोकावरील काळा पडदा काढून टाकला आहे. अरुणवर्ण घोडे सुंदर रीतीनें जोडलेल्या रथांत बसून लोकांना जागृत करीत ही उषा येत आहे.

१५. पुष्टिकर आणि वीर्यकर धन घेऊन येणारी सर्वसाक्षी उषा प्रकाश पाडीत आहे. आजपर्यंत गेलल्या उषांपैकीं शेवटची आणि यापुढें प्रकाशणाऱ्यांपैकीं पहिली अशी ही उषा चमकत आहे.

१६. हे लोकहो, उठा. आपला हा प्रेरक प्राण आला आहे. अंधःकार दूर पळून गेला आहे. आणि तेज येत आहे. सूर्याला चालण्यासाठीं उषा त्याचा मार्ग मोकळा करीत आहे. जेथें आयुष्य वृद्धिंगत होतें, त्या ठिकाणीं आपण येऊन पोचलों आहों.

१७. स्तोत्र अर्पण करणारा हा उपासक उषेची स्तुति करीत स्तोत्रें तयार करून म्हणत असतो. तरी हे धनसंपन्न उषे, तूं या स्तोत्यासाठीं आज प्रकाश आणि आम्हांला संतति आणि दीर्घायुष्य दे.

१८. या गोसंपन्न आणि सर्ववीरांनीं युक्त अशा उषा हवि देणाऱ्या मर्त्य उपासकासाठीं प्रकाशतात. त्या सोमयाग करणाऱ्या उपासकाला, वाऱ्याच्या गर्जनेप्रमाणें स्तोत्रांची गर्जना होतांच प्राप्त होवोत.

१९. हे उषे, देवांची माता, अदितीचें मुख, यज्ञाचा ध्वज, अशी तूं विस्तीर्ण होत्साती प्रकाश. आमचें स्तोत्र ऐकून आम्हांस शाबासकी दे आणि प्रकाश. हे सर्वप्रिय उषे, तूं आम्हांला पुन्हा जग दाखीव.

२०. जें सुंदर आणि कल्याणकारक धन स्तोत्रकर्त्या भक्तासाठीं उषा घेऊन येतात, ते धन मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी आणि द्युलोक आम्हांस देवोत.

सूक्त एकशें चौदावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता–रुद्र; छंदः—१–९ जगती, १०–१२ त्रिष्टुभ्.

१. बलवान, जटाधारी आणि पराक्रमी पुत्रांनीं युक्त अशा रुद्राची आपण स्तुति करूं; कीं त्या योगानें ह्या गांवांत द्विपादाचें आणि चतुष्पादांचें कल्याण होईल आणि सर्वजण निरोगी आणि पुष्ट होतील.

२. हे रुद्रा, तूं आम्हांवर कृपा कर, आणि आम्हांला सुख दे. आम्ही वीरपुत्रयुक्त अशा तुला नमस्कार करतों. पिता मनूनें यज्ञ करून जें सुख व आरोग्य मिळविलें, तें हे रुद्रा, तुझ्या नियमानुसार वागणाऱ्या आम्हांला लाभो.

३. हे कृपावंत रुद्रा, वीरपुत्रयुक्त अशा तुझी कृपा आम्हांला देवोपासनेच्या योगानें प्राप्त होवो. आमच्या लोकांत तूं कल्याणकर असाच फिर. अजिंक्य पुत्रांनीं युक्त अशा तुला आम्ही हवि अर्पण करीत जाऊं.

४. देदीप्यमान, यज्ञ सिद्धीस नेणारा, वाकडा चालणारा व बुद्धिमान, अशा रुद्राला आम्ही संरक्षणाकरतां इकडे बोलावीत आहों. तो देवाचा क्रोध आम्हांपासून दूर फेंकून देवो. आम्ही याच्या कृपेचीच इच्छा करतों.

५. तो द्युलोकांतील वराह आहे. तो आरक्त जटाधारी व रागीट आहे. त्यास आम्ही नमस्कारपूर्वक येथें बोलावतों. उत्तम औषध हातांत धारण करणारा तो आम्हांस आश्रय, अभय आणि घर देवो.

६. हे मधुराहून मधुर आणि उत्साहित करणारे स्तोत्र मरुतांचा पिता जो रुद्र त्याच्या प्रीत्यर्थ आम्ही गात आहों. तरी हे अमर रुद्रा, मर्त्यांनीं उपभोगण्यास योग्य असें धन तूं आम्हांस दे व आमच्या पुत्रपौत्रावर कृपा कर.

७. हे रुद्रा, तूं आमच्यांतल्या मोठ्यांचा किंवा लहानांचा जीव घेऊं नकोस. आमच्यांतल्या वाढत असलेल्यांचा किंवा वाढलेल्यांचाहि तूं जीव घेऊं नकोस. तूं आमच्या पित्यास किंवा मातेस मारूं नकोस. किंवा आमच्या स्वतःच्या प्रिय शरीरासहि दुःख देऊं नकोस.

८. तूं आमच्या पुत्रांना किंवा पौत्रांना किंवा आमच्या नोकराचाकरांना ठार करूं नकोस. तूं आमच्या गाईंना किंवा घोड्यांना मारूं नकोस. हे रुद्रा, तूं रागावून आमच्या वीरांना मारूं नकोस. आम्ही हवि घेऊन तुझी सर्वकाळ प्रार्थना करीत असतों.

९. हे मरुतांच्या पित्या, गुराखी ज्याप्रमाणें गुरें देतो त्याप्रमाणें मी हीं तुझी स्तोत्रें तुला अर्पण करीत आहें; तरी तूं आम्हांस सुख दे. कारण, तुझी कृपा ही अत्यंत सुख देणारी आहे आणि म्हणून आम्ही कृपाच व्हावी म्हणुन तुला प्रार्थीत आहों.

१० हे वीरपुत्रयुक्ता, तुझें ते गाई मारणारे आणि माणसें मारणारें हत्यार जरा दूर ठेव. आणि तुझी कृपा आह्मांवर असू दे. हे देवा, तूं आम्हांवर कृपा कर आणि आमची बाजू घेऊन बोलत जा. आणि द्यावापृथिवीमध्यें असणारा तूं आम्हांस तुझा आश्रय दे.

११. रुद्राच्या कृपेची इच्छा करणाऱ्या आह्मी अशा प्रकारें त्याच्यासाठीं हें स्तोत्र नमस्कारपूर्वक म्हटलें आहे. तरी मरुतांनीं युक्त असा तो रुद्र आमची ही प्रार्थना ऐको. आणि मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी आणि द्युलोक हे सर्व आह्माला (सुख) देवोत.

सूक्त एकशें पंधरावें.

ऋषिः—आंगिरस कुत्स; देवता–सूर्य; छन्दः--त्रिष्टुभ.

१. देवांचें सुंदर मुख, मित्र, वरुण व अग्नि यांचा चक्षु, अशा सूर्यानें द्यावापृथिवी व अंतरिक्ष आपल्या तेजानें व्यापून टाकलें आहे. तो चराचर प्राण्यांचा आत्माच होय.

२. तरुण स्त्रीच्या मागें पुरुष जातो, त्याप्रमाणें सूर्य प्रकाशमान उषा देवीच्या मागून चालत आहे. या उदयकालीं देवोपासक भक्त कल्याणकारक सूर्याला सुख व्हावें म्हणून यज्ञयागाला आरंभ करतात.

३. कल्याणकारक, हरिद्वर्णयुक्त आणि चित्रविचित्र कांतीचे रमणीय असे सूर्याचे घोडे एकामागून एक सूर्याची स्तुति करीत द्युलोकाच्या पृष्ठावर चढत असतात. आणि एका दिवसांत द्यावापृथिवीला प्रदक्षिणा करतात.

४. सूर्याचें देवत्व किंवा थोरपणा यांवरूनच दिसून येतो कीं कर्म करीत असणाऱ्या माणसाचें काम अर्धवट असतांनाच तो एकदम आपले किरणजाल हरण करून नेतो, व रथापासून आपले हरिद्वर्ग घोडे सोडतो. व त्यासरशीं रात्र एकदम सर्व विश्वावर आपला पडदा टाकते.

५. तरी मित्र आणि वरुण यांचें दर्शन व्हावें म्हणून सूर्य द्युलोकाच्या जवळ राहून आपलें रूप प्रकट करतो त्याचे हरिद्वर्ण घोडे अनंत तेजस्वी रूप दिवसा धारण करितात, आणि दुसरें काळें रूप रात्रीं धारण करतात.

६. हे देवहो, आज सर्योदयसमयीं तुह्मी आम्हांस संकटापासून आणि पापापासून मुक्त करा; व मित्र, वरुण, अदिति, समुद्र, पृथिवी आणि द्युलोक हे सर्व मला तसें करोत.

सूक्त एकशें सोळावें.

ऋषिः—कक्षीवान्; देवता–अश्वी, छंदः—त्रिष्टुभ्.

१. दर्भासन तयार करतात, त्याप्रमाणें मी नासत्यांकरतां स्तोत्र तयार करतों. आणि वारा जशी मेघगर्जना करतो, त्याप्रमाणें मी स्तोत्रगर्जना करतों. या नासत्यांनीं आपल्या बाणाप्रमाणें वेगवान रथाच्या योगानें तरुण विमदाची बायको त्याच्या घरीं पोंचाविली.

२. जोरानें उडणारे आणि वेगानें धांवणारे अशा घोड्यांच्या योगानें किंवा देवांच्या साहाय्यानें तुम्ही विराजित झालेले असतांना हे नासत्यहो, तुमच्या त्या तुमुल युद्धांमध्यें गाढवानें हजारोंना जिंकलें.

३. हे अश्वीहो, मरणोन्मुख मनुष्य आपल्या धनाची आशा सोडून देतो, त्याप्रमाणें तुग्रानें भुज्यूला समुद्रांत सोडून दिलें. तथापि, तुम्ही त्याला अंतरिक्षांतून चालणाऱ्या आणि पाण्यावर तरंगणाऱ्या नावांच्या योगानें घरीं पोंचविलें.

४. हे नासत्यहो, तीन रात्री आणि तीन दिवसपर्यंत धांवत असणाऱ्या पक्ष्याच्या योगानें सहा घोडे, आणि शंभर पाय (वल्हीं) असलेल्या तीन रथांच्या योगानें तुम्ही भुज्यूला जलमय समुद्राच्या पार निर्जल प्रदेशावर नेऊन पोचविलेंत.

५. हे अश्वीहो, ज्याच्या ठाव लागत नाहीं, ज्याची कड सांपडत नाहीं किंवा ज्याची व्याप्ति समजत नाहीं अशा समुद्रांतून शंभर वल्ह्यांच्या नावेंत भुज्यूला बसवून त्याला घरीं नेऊन पोचाविलें. हा तुमचा मोठा पराक्रम हाय.

६. हे अश्वीहो, पेदूचा घोडा मार खात असे,

---

१. टीपः—विमद ११२.१९ वरील टीप पहा.

३.४.५. टीपः–भुज्यु ११२ ६ वरील टीप पहा.

६. टीपः—पेदु नांवाचा एक भक्त होता. त्याच्या घोड्यामुळें नेहमीं त्याला पराजय येत असे. त्याला अश्वीनीं सदैव जय देणारा शुभ्र घोडा दिला. त्यामुळें अश्वींची उदार म्हणून कीर्ति झाली. आणि पेदूच्या घोड्याचीहि फार कीर्ति झाली. त्यानंतरहि तो इतिहासप्रसिद्ध झाला आणि लोक त्याचा धांवा करूं लागले. (१.११७.९; ११८.९; ११९.१०).

त्याच्या ऐवजीं तुम्ही त्याला नित्य जय मिळविणारा पांढरा घोडा दिलांत. तुमचें हें दातृत्व प्रशंसनीय आहे. दुसऱ्यांनीं तसा घोडा आपल्याला मिळावा अशी प्रार्थना करण्याइतका तो पेदूचा घोडा सुंदर आहे.

७. हे शूरहो, तुमची स्तुति करणाऱ्या पज्रीय कक्षीवानाला तुम्ही मोठी बुद्धि दिलीत. आणि वीर्यवान घोड्यांच्या खुरापासून दारू ठेवण्याच्या पिपाप्रमाणें मद्याचे शंभर घडे भरलेत.

८. अत्रीचा ताप तुम्ही थंड उपचारांनीं नाहींसा केलात, आणि त्याला पुष्टिकारक अन्न दिलेंत. हे अश्वीहो, अग्निकुंडांत पडलेल्या अत्रीला तुम्ही बाहेर काढलेंत आणि त्याच्या कुटुंबाचें कल्याण केलेंत.

९. हे नासत्यहो, तुम्ही विहीर दूर होती ती जवळ आणली, आणि त्याचा तळ वर आणि तोंड खालीं केलें. त्या योगानें तृषाक्रांत गोतमाला पाण्याप्रमाणें हजारो प्रकारची संपत्ति मिळवितां आली.

१०. हे नासत्यहो, तुम्ही म्हाताऱ्या च्यवानाच्या अंगावरून कवचाप्रमाणें म्हातारपण काढून घेतलेंत, आणि हे पराक्रमीहो, तुम्ही अनाथ झालेल्या च्यवानाचें आयुष्य वाढविलेंत. व त्यास तरुण मुलीचा पति केलेंत.

११. हे शूर नासत्यहो, विद्वानांनीं निधि बाहेर काढावा, त्याप्रमाणें विहिरींत लपविलेल्या वंदनाला तुम्ही पाहतांच वर काढिलें हें तुमचें कृत्य प्रशंसनीय, अनुकरणीय आणि सदयतेचें होय.

१२. हे शूरहो, अथर्वकुलोत्पन्न दध्यङनें तुम्ही लाविलेल्या घोड्यांच्या डोक्यानें तुम्हांस मधुविद्या सांगितली. हा तुमचा मोठा पराक्रम, मेघनाद वृष्टि करतो त्याप्रमाणें मी धनप्राप्तीकरतां प्रकट करतों.

१३. हे बहुपालक अश्वीहो, पराक्रमी अशा तुमची महाबुद्धिमान वध्रिमतीनें मोठें स्तोत्र करून प्रार्थना केली. तें तिचें स्तोत्र ऐकून तुम्ही तिच्या आज्ञेप्रमाणें केलें. हे अश्वीहो, तुम्ही तिला हिरण्यहस्त पुत्र दिला.

१४. हे शूर नासत्यहो, तुम्ही चिमणीला लांडग्याच्या तोंडांतून सोडाविलेंत. आणि हे बहुपालक अश्वीहो, दृष्टि मिळावी म्हणून स्तोत्र करणाऱ्या कवीला दृष्टि दिलीत.

१५. पक्ष्याचा पंख तुटावा, त्याप्रमाणें लढाईत खेलाच्या विश्पलेचा पाय तोडला गेला, तेव्हां पाहाटेच तिला लोखंडाचा पाय बसवून तिला पुन्हा युद्धांत संचार करण्यासाठीं तयार केलीत.

---

८. टीप:—अत्रि ११२.७ वरील टीप पहा.

९. टीप:—गोतम—तान्हेलेल्या गोतमाकरतां अश्वीनीं लांबचा कूप जवळ आणला. त्याचा तळ वर केला आणि तोंड खालीं केलें. त्यामुळें गोतमाला पाणी सहज मिळालें.

११. टीप:—वंदन ११२.५ वरील टीप पहा.

१२. टीप—मधुविद्या—इंद्रानें दध्यङ ऋषीला प्रवर्ग्यविद्या आणि मधुविद्या अशा दोन विद्या शिकविल्या. आणि त्याला सांगितलें ह्या विद्या कोणास शिकवूं नकोस. शिकवशील तर तुझा शिरच्छेद करीन. मग अश्वीदेवांनीं दध्यङ् ऋषीचें शिर तोडून त्या धडावर एका घोड्याचें शिर जोडलें, आणि दध्यङ ऋषीचें लपवून ठेवलें. नंतर दध्यङ् ऋषीनें अश्वींस ऋग्, साम, यजु:, प्रवर्ग्यविद्या आणि मधुविद्या ही शिकवली. ते पाहून इंद्रानें दध्यङचें शिर तोडलें. तेव्हां अश्वीनीं दध्यङ ऋषीचें जें खरें मानवी शिर तें त्याला पुन: लावलें.

प्रवर्ग्यविद्या आणि मधुविद्या म्हणजे काय ? प्रवर्ग्यविद्या म्हणजे सोम तयार करण्याची विद्या होय. मधुविद्येचें स्पष्टीकरण मात्र कोठें आढळलें नाहीं. मधु म्हणजे मध. मधेचा संबंध अश्विदेवाशीं अनेक ठिकाणीं आलेला आहे. त्याच्याजवळ मधाच्या पिशव्या असतात. त्यांच्या रथांत मध असतो. त्यांच्या रथाच्या चाकांतून मध पाझरत असतो. फार काय त्यांच्या चाबकांतसुद्धा मध आहे. (२२. ३) मध तयार करणाऱ्या ज्या मधमाशा त्यांच्यावरहि अश्वींची कृपा असते असें म्हटलें आहे (११२.२१). यावरून मधुविद्या म्हणजे मध तयार करण्याची विद्या. सर्व ठिकाणीं मधु म्हणजे लौकिक मधच जर असेल तर त्यासंबंधी मधुविद्या शब्द असावा मधुविद्या अध्यात्मिक कांहीं असेल असें म्हणावें तर अश्वींच्या सूक्तांत आध्यात्मिकता कोठेंच आढळत नाहीं. (१०.४८.२ पहा).

१५. टीप:—विश्पला—खेल नांवाच्या राजाची विश्पला नांवाची शूर पत्नी होती. ती लढाईत लढत असतां शत्रूंनीं तिचा पाय पांखराचा पंख तोडल्याप्रमाणें तोडला. तेव्हां तिला लोखंडाचा पाय करून अश्वींनीं जोडला व दुसऱ्या दिवशीं तिला लढण्यास योग्य केलें. अशी कथा आहे.

१६. ऋज्राश्वानें लांडगीसाठीं शंभर मेंढ्या खाण्यासाठीं कापल्या तेव्हां त्याला त्याच्या पित्यानें आंधळा केलें. तेव्हां हे पराक्रमी नासत्यहो, तुम्ही त्याला पाहण्यासाठीं उत्तम डोळे दिलेत.

१७. हे अश्वीहो, घोड्यांच्या शर्यतींत जय मिळवून भोग्याला शिवावें, त्याप्रमाणें सूर्यकन्या तुमच्या रथावर बसली. सर्व देवांनीं त्याला मनापासून अनुमोदन दिलें व हे नासत्यहो, तुम्ही भाग्यशाली झालां.

१८. जेव्हां तुम्ही यज्ञ करणाऱ्या दिवोदासाच्या येथें प्रसन्न मनानें आलां, तेव्हां तुमच्या कृपावंत रथानें धन वाहून आणलें. त्या रथाला बैल व सुसर हीं दोन्ही जोडली होती.

१९. हे नासत्यहो, दिवसांतून तीन वेळां हवींच्या आहुति तुम्हांस देणारे जह्नूचें कुल, त्याच्यासाठीं तुम्ही उत्तम प्रकारची संपत्ति, उत्तम संतति, दीर्घायुष्य आणि शौर्य घेऊन येतां.

२०. सर्व बाजूंनीं परिवेष्टित असलेल्या जाहुषाला तुम्ही रात्रीच्या वेळीं चांगल्या मार्गांनीं बाहेर आणलात. हे जरारहित नासत्यहो, अतिशय भेदक अशा तुमच्या रथानें तुम्ही पर्वत फोडून पार गेलांत.

२१. हे अश्वीहो, तुम्ही एकाच दिवसांत वशाचें रक्षण केलेंत. आणि त्याला आनंदित करून सहस्रावधि धन दिलेंत. हे वीर्यवंतहो, तुम्ही इंद्राचें साहाय्य घेऊन पृथुश्रव्याचे उपद्रवकारक शत्रू ठार मारून टाकलेत.

२२. तुम्ही आर्चत्क शराला पिण्यासाठीं खोल विहिरींतून पाणी वर काढलेंत. आणि हे नासत्यहो, दमलेल्या शयूसाठीं तुम्ही आपल्या पराक्रमानें वांझ गाय दुभती केलींत.

२३. हे नासत्यहो, तुम्ही रक्षणाची इच्छा करणारा, स्तोत्र करणारा, आणि सन्मार्गानें जाणारा अशा कृष्णिय विश्वकाला, चुकलेला पशु परत सांपडावा त्याप्रमाणें आपल्या पराक्रमानें विष्णापूला आणून दिलेंत.

२४. रेभाला घातक दोरानें बांधून दहा रात्रीं आणि नऊ दिवसपर्यंत पाण्यांत बुडवून अत्यंत पीडित केलें असतां, पळीनें सोमरस (भांड्यांतून) वर काढावा त्याप्रमाणें तुम्ही त्याला बाहेर काढलेंत.

२५. हे अश्वीहो, अशा प्रकारें मी तुमचे पराक्रम वर्णन केले आहेत. व म्हणून मी उत्तम गाई आणि उत्तम वीर यांनीं युक्त होऊन राष्ट्राचा स्वामी होईन असें करा. मी डोळयांनी चांगले पहात असतां आणि दीर्घ आयुष्याचा उपभोग घेत असतां घरांत शिरावें त्याप्रमाणें म्हातारपणांत शिरेन असें करा.

---

१६. टीपः—ऋज्राश्व—वृषागिरपुत्र ऋज्राश्व त्याच्याजवळ अश्वींचा वाहन असणारा गाढव लांडगीच्या रूपानें आला असतां ऋज्राश्वानें तिला एकशें एक मेंढ्या खावयास घातल्या. तेव्हां नगरवासी जनाची हानि केली म्हणून वृषागिर राजानें ऋज्राश्वाचे डोळे फोडून टाकले. तेव्हां ऋज्राश्वानें अश्वी देवांची स्तुति केल्यावरून त्यांनीं त्यास दृष्टि दिली. ११७.१७ व १८ पहा.

१७. सविता आपली मुलगी सूर्या सोम राजाला देऊं इच्छित होता त्या सूर्येला सर्व वरूं इच्छीत होते. तेव्हां त्यानें त्याकरतां शर्यत लावण्याचें ठरविलें. जो सर्वांच्यापुढें धांवून जाईल त्यानें सूर्येला आपली स्त्री करावी. शर्यतींत अश्विदेव सर्वांच्यापुढें गेले तेव्हां सूर्या अश्वींच्या रथावर जाऊन बसली. या कथेला अनुलक्षून वरील ऋचा आहे.

२०. टीपः—'जाहूष' नांवाच्या राजाला शत्रूच्या वेढ्यांतून अश्वींनीं सुरक्षित बाहेर काढलें अशी कथा आहे. त्याला शत्रूंनीं राज्यभ्रष्ट केलें असतां अश्वीनीं पुनः त्यास राज्यारूढ केलें (७.७१.५).

२१. टीपः—वश ११२.१० वरील टीप पहा.

२२. टीपः—शयु ११३.१६ पहा.

२३. टीपः—कृष्णाचा मुलगा विश्वक आणि विश्वकाचा मुलगा विष्णापू. विश्वकानें प्रार्थना केल्यावरून विष्णापूला अश्वींनीं परत आणून दिलें.

२४. टीपः—रेभ ११२.५ पहा.

सूक्त एकशें सत्रावें.

ऋषिः—कक्षीवान्; देवता-अश्विन्; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे अश्वीहो, मधुर सोमरसाच्या योगानें तुम्हाला हर्ष व्हावा म्हणून हा पुरातन होता तुमची उपासना करीत आहे. तुम्हांकरतां हवि दर्भावर ठेवले असून स्तोत्रहि तयार केलें आहे. हे नासत्यहो, तुम्ही अन्न आणि बल घेऊन या.

२. हे अश्वीहो, तुमच्या मनापेक्षांहि अधिक वेगानें जाणाऱ्या रथाला चांगले घोडे जोडलेले असून

तो लोकवस्तींत शिरतो. ज्यांत बसून तुम्ही सदाचरणी भक्तांच्या घरीं जातां, त्याच रथानें, हे शूरहो, तुम्ही आमच्याकडे या.

३. हे वीर्यवान आणि शूर अश्वीहो, दुष्ट शत्रूंचीं एकामागून एक चाललेलीं कपटें तुम्ही निवारण करून लोकप्रिय अत्रिऋषीला त्याच्या परिवारासह अग्नि कुंडांतून मुक्त केलेंत.

४. हे वीर्यवान आणि शूर अश्वीहो, दुष्टांनीं रेभऋषीला घोड्याप्रमाणें पाण्यांत बुडवून त्याचे अवयव विच्छिन्न केले असतां तुम्ही त्याला आपल्या पराक्रमानें वर काढून पुन्हा सांधून पूर्ववत केलेंत. तुमचीं हीं पूर्वकृत्यें जुनीं होत नाहींत.

५. हे पराक्रमी अश्वींहो, निर्ऋतिच्या मांडीवर निजलेल्याप्रमाणें किंवा अंधःकारांत बुडून गेलेल्या सूर्याप्रमाणें किंवा जमीनींत पुरलेल्या सोन्याप्रमाणें, विहिरींत पडलेल्या वंदनाला तुम्ही बाहेर काढलेत.

६. हे शूर नासत्यहो, तुमचा पराक्रम पज्रिय कक्षीवानानें सर्वत्र वाखाणणी करण्यासारखा आहे. तुम्ही भक्ताकरतां वेगवान घोड्याच्या खुरापासून मद्याचे शंभर घडे वाहविलेत.

७. हे शूरहो, तुम्ही स्तुति करणाऱ्या कृष्णपुत्र विश्वकाला विष्णापूची प्राप्ति करून देते झालांत हे अश्वीहो, बापाच्या घरींच (अविवाहित) राहून म्हातारी होत चाललेल्या घोषेला तुम्ही पति मिळवून दिलात.

८. हे अश्वीहो, तुम्हीं श्यावीला गोरी स्त्री दिलीत, आणि घोर अंधारांत पडलेल्या कण्वाला प्रकाश देते झालात. हे वीर्यवंतहो, तुम्ही नृषदाच्या मुलाला कान दिलात, हें तुमचें कृत्य प्रशंसनीय आहे.

९. अश्वीहो, अनेक रूपें धारण करणारे तुम्ही पेदूला वेगवान घोडा दिलात. तो हजारोंच्या लढाईंत लढणारा, तोंड न फिरवणारा, शत्रूंचा नाश करणारा, वर्णनीय आणि तारक होता.

१०. हे दानशूरहो, अशा प्रकारचीं तुमचीं कृत्यें प्रशंसनीय आहत. व ह्या स्तोत्रांत तुमचा महिमा वर्णन केला आहे. तुमचें घर द्यावापृथिवींत आहे. हे अश्वीहो, तुम्हांला पज्र लोक ज्याअर्थीं बोलावीत आहेत, त्याअर्थीं, तुम्ही त्यांच्यासाठीं अन्नसंपत्ति व कवीसाठीं अन्न घेऊन या.

११. हे पोषण करणारे अश्वीहो, पुत्रानें केलेल्या स्तोत्राच्या योगानें मान ऋषीनें तुमची स्तुति केली तेव्हां तुम्ही त्याला अन्नसंपत्ति दिलीत. आणि अगस्त्याच्या स्तोत्रानें त्याच्यावर प्रसन्न होऊन तुम्ही विश्पलेला (लोखंडाचा पाय बसवून) बरी केलीत.

१२. हे द्यूचे वीर्यवंत पुत्र अश्वीहो, शयूचें रक्षण करणारे तुम्ही काव्याची सुंदर स्तुति ऐकून तिकडे जात असतां सोन्याचा पुरलेला हंडा बाहेर काढावा, त्याप्रमाणें दहाव्या दिवशीं (रेभाला) वर काढलेंत.

१३. हे अश्वीहो, च्यवान म्हातारा होत असतांना तुम्हीच त्याला पुन्हा आपल्या पराक्रमानीं तरुण केलेंत. हे नासत्यहो, सूर्यकन्या आपल्या वैभवासह (अलंकारासह) तुमच्या रथावर चढली.

१४. हे तरुण अश्वीहो, तुम्हीच तुग्राला आपल्या पूर्वीच्या पराक्रमामुळें अधिक स्तवनीय झालांत. तुम्हीच आपल्या वेगवान घोड्यांच्या योगानें भुज्यूला खवळलेल्या समुद्रांतून बाहेर काढलेंत.

१५. हे अश्वीहो, तुग्राचा पुत्र कांहीं कामानिमित्त पाठविण्यांत आला असतां तो समुद्रांत पडला, तेव्हां त्यानें धीर धरून तुमचा धांवा केला. तेव्हां त्याला हे वीर्यवंतहो, तुम्ही उत्तम घोडे जोडलेल्या आणि मनोवेगानें धावणाऱ्या रथांत घालून सुखरूपपणें बाहेर काढून आणलेंत.

---

३. टीपः—अत्रि ११२.७ वरील टीप पहा. येथें अत्रीला 'पांचजन्य' हें विशेषण दिलें आहे. यावरून अत्रि तुरुंगांत का पडला होता याचा उलगडा होण्याचा संभव आहे. पांचजन्य म्हणजे लोकप्रिय.

४. टीपः—रेभ ११२.५; ११६.२४ पहा.

५. टीपः—वंदन ११२.५; ११६.११ पहा.

७. टीपः—विश्वक ११६.२३ पहा.

८. टीपः—ब्राह्मण्याची परीक्षा पहाण्याकरतां असुरांनीं कण्वाला गाढ अंधारांत टाकलें. आणि सांगितलें तूं ब्राह्मण असशील तर उषःकाल केव्हां होतो ते ओळख. त्याला अश्वी येऊन म्हणाले, ज्यावेळीं उषःकाल होईल त्यावेळीं आम्ही वीणा वाजवीत येऊं. तो शब्द ऐकून तूं उषःकाल झाला असें सांग. क्षीणः—शब्दकारी विणाविशेष.

९. टीपः—पेदु ११६.६ वरील टीप पहा.

१२. टीपः—रेभ ११२.५ टीप पहा.

१३. टीपः—सूर्याविवाह ११६.१७ पहा.

१४.१५. टीपः—भुज्यु ११२.६ पहा.

१६. हे अश्वीहो, चिमणीनें तुमचा धांवा केला तेव्हां तुम्ही तिला लांडग्याच्या जबड्यांतून मुक्त केलीत. तुम्ही आपल्या विजयशाली रथाच्या योगानें पर्वताचें शिखर भेदून गेला. तुम्ही विष्वाच्च याच्या मुलाला विष घालून मारलेंत.

१७. ऋज्राश्वानें लांडगीला शंभर मेंढे खावयास दिल्यामुळें त्याच्या निर्दय बापानें त्याला आंधळा केलें. तेव्हां हे अश्वीहो, तुम्ही त्याला पुन्हा डोळे दिलेत. आणि आंधळयास प्रकाश दिसेल असें केलेंत.

१८. त्या लांडगीनें आंधळा झालेल्या ऋज्राश्वासाठीं तुमचा धांवा केला आणि प्रार्थना केली कीं ‘ हे शूर अश्वीहो, हे पराक्रमीहो, ह्या ऋज्राश्वानें तरुण कामी पुरुषाप्रमाणें मला एकशेएक मेंढे कापून घातले आहेत. ’

१९. हे अश्वीहो, तुमचा प्रसाद मोठा आणि कल्याणकारक होय. हे पूज्यहो, तुम्ही शरीराचे अवयव तुटले असतां ते पुन्हा जोडून नीट करतां. म्हणूनच त्या बुद्धिमती विश्पलेनें तुमचा धांवा केला. तेव्हां हे वीर्यवंतहो, तुम्ही आपल्या प्रसादांसह तिच्याकडे गेला.

२०. हे पराक्रमी अश्वीहो, तुम्ही शयूसाठीं दूध न देणारी वांझोटी आणि रोड झालेली गाय दुभती केलीत. तुम्ही आपल्या पराक्रमांनीं विमदाला पुरुमित्राची तरुण कन्या बायको करून दिलीत.

२१. हे पराक्रमी अश्वीहो, तुम्ही नांगराच्या योगानें धान्य पेरणारे आणि मनुष्यांच्याकरतां अन्न उत्पन्न करणारे आहां. तुम्ही दस्यूंना वज्रानें मारून आर्य लोकांकरतां विस्तीर्ण प्रकाश केला आहे.

२२. हे अश्वीहो, अथर्वणपुत्र दध्यंचाला तुम्ही घोड्याचें शिर जोडलेंत. तेव्हां त्यानें तुम्हांला मधुविद्या सांगितली. हे पराक्रमीहो, खरेपणाकरतां अवयव जोडण्याची ही त्वष्ट्याची युक्ति (प्रवर्ग्यविद्या) त्यानें तुम्हाला सांगितली.

२३. हे विद्वान अश्वीहो, तुमची कृपा मी नित्य भाकितों. तरी हे अश्वीहो, माझ्या सर्व कृत्यांचें तुम्ही कृपा करून रक्षण करा. हे नासत्यहो, तुम्ही आम्हांला वर्णनीय व विपुल संतत संपत द्या.

२४. हे शूर अश्वीहो, तुम्ही वध्रिमतीला हिरण्यहस्त पुत्र दिलात. हे दानशूर अश्वीहो, तीन ठिकाणीं तुकडे केलेल्या श्यावाला तुम्ही पुन्हा जिवंत करून उठविलेंत.

२५. हे अश्वीहो, याप्रमाणें तुमचे पराक्रम आम्ही भक्तांनीं वर्णन केले आहेत. हे शूरहो, तुमचें स्तोत्र करणारे आम्ही वीरपुत्रसंपन्न होऊं आणि यज्ञांत सूक्तें गाऊं असें करा.

सूक्त एकशें आठरावें.

ऋषिः—कक्षीवत्; देवता—अश्विन्; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे अश्वीहो, तुमचा श्येन पक्ष्यांनीं युक्त, कल्याणकारक आणि धनसंपन्न रथ इकडे खालीं येवो. हे वीर्यवंतहो, तो मानवी मनापेक्षांहि चपल, तीन दांड्यांचा आणि वायुवेगी आहे.

२. हे अश्वीहो, तुम्ही तीन दांड्यांच्या तिकोणी आणि तीन चाकी चांगला चालणाऱ्या रथांत बसून इकडे खालीं या. तुम्ही आमच्या गाई दुभत्या करा. आमचे घोडे चपल करा आणि आम्हांस वीरपुत्रसंपन्न करून आमचा उत्कर्ष करा.

३. हे पराक्रमी अश्वीहो, तुम्हीं आपल्या शीघ्रगामी आणि चांगल्या चालणाऱ्या रथांत बसून मज स्तोत्याचें स्तोत्र ऐका. अहो, तुम्ही उपासकांस दैन्य आलें असतां त्यांना उत्तम रीतीनें पावता, असें प्राचिन कवि म्हणाले आहेत ना ?

४. हे अश्वीहो, उडत जाणारे वेगवान आणि रथाला जोडलेले श्येन तुम्हाला इकडे घेऊन येवोत. हे नासत्यहो, दिव्य गृध्राप्रमाणें ते आकाशांत उडणारे, हविरन्नाकडे तुम्हांस घेऊन येतात.

५. हे शूरहो, तरुण सूर्यकन्या आनंदित होऊन तुमच्या रथावर चढून बसली. तुमचे सुंदर, उड्या मारणारे अरुणवर्ण घोडे, तुम्हांला त्या रथानें हविरन्नाकडे घेऊन येवोत.

६. हे शूर आणि वीर्यवंतहो, तुम्ही आपल्या अद्भूत कृत्यांनीं वंदनाचा उद्धार केलात. आणि आपल्या पराक्रमांनीं रेभाला वर काढलेंत. तुम्ही तुग्रपुत्राला समुद्रांतून बाहेर घेऊन आलांत आणि च्यवनाला पुन्हा तरुण केलेंत.

---

१७. टीपः—ऋज्राश्व ११६.१६ पहा.
१९. टीपः—विश्पला ११६.१५ पहा.
२०. टीपः—विमद ११२.१९; ११६.१ पहा.
२२. टीपः—दध्यच—११६.१२ पहा.

५. टीपः—सूर्याविवाह ११६.१७ पहा.

७. हे अश्वीहो, तुम्ही पीडायंत्रांत टाकिलेल्या तरुण अत्रीचा ताप नाहींसा केलात आणि त्याला अन्न व सुख दिलेंत. तुम्ही डोळे गेलेल्या कण्वाची उत्तम स्तुति ऐकून त्याला पुन्हा डोळे दिलेत.

८. हे अश्वीहो, तुम्ही प्रार्थना करणाऱ्या पुरातन शयूला गाय दुभती करून दिलीत. आणि वर्तिकेला संकटांतून मुक्त केलेंत. तुम्ही विश्पलेला दुसरी जंघा करून बसवलीत.

९. हे अश्वीहो, तुम्ही पेदूला शुभ्र वर्णाचा, इंद्रानें पाठविलेला, शत्रूंना ठार मारणारा, मोठ्यानें खिंकाळणारा, शत्रूचा पराभव करणारा, उग्र, धन मिळवून देणारा आणि धष्टपुष्ट घोडा दिलात.

१०. हे शूर आणि अभिजात अश्वीहो, अशा प्रकारच्या तुम्हांला आम्ही प्रार्थना करून संरक्षणासाठीं बोलावतों. तुम्हीं आमची स्तोत्रें गोड करून घ्या. आणि धनसंपन्न रथांत बसून आमच्या कल्याणाकरतां आम्हांकडे या.

११. हे नासत्यहो, श्येनाच्या ताज्या दमाच्या वेगानें तुम्हीं दोघेहि एकत्र आम्हांकडे या. कारण, हे अश्वीहो, मी सनातन उषेच्या उदयाबरोबर तुम्हांला हवि अर्पण करून बोलावीत आहें.

सूक्त एकशें एकोणिसावें.

ऋषिः-दीर्घतमसाचा पुत्र कक्षीवत्; देवता-अश्विन्; छंदः-जगती.

१. तुमचा अद्भुत कर्मे करणारा, मनोवेगानें धांवणारा, वेगवान घोडे जोडलेला, यज्ञाकडे येणारा, हजारो ध्वजांनीं युक्त, धनप्रद, सुखकर, धनसंपन्न, असा रथ मी जभावें म्हणून हविरन्नाकडे बोलावीत आहें.

२. हा तुमचा रथ निघाला असतांना आमची ही स्तुति त्याला सामोरी जाते. सर्व बाजूंनीं त्यास स्तोत्रें येऊन मिळतात. मी हवि मधुर करतों, तेव्हां साहाय्यक ऋत्विज आलेले असतात. हे अश्वीहो, (त्यावेळीं) सूर्या तुमच्या रथांत चढून बसते.

३. जेव्हां जय मिळविण्यासाठीं युद्धामध्यें असंख्य रणझुंजार एकमेकांशीं स्पर्धा करीत लढतात, तेव्हां तुमचा रथ खालीं येतांना दृष्टीस पडतो. हे अश्वीहो, त्यावेळीं तुम्हीं भक्तासाठीं इष्टसिद्धि घेऊन येतां.

४. हे धीरवंतहो. तुम्ही गडबडून गेलेल्या आणि पाण्यांत बुडालेल्या भुज्यूला आपोआप जोडले जाणाऱ्या व पक्ष्याप्रमाणें वेगवान घोड्यांच्या योगानें दूर असलेल्या घरीं वडिलाजवळ घेऊन गेलां. त्याचप्रमाणें तुम्ही दिवोदासाला केलेलें साहाय्य प्रसिद्धच आहे.

५. हे अश्वीहो, तुमचे सुंदर घोडे तुम्ही जोडलेल्या रथाला शर्यतीच्या भोग्यापर्यंत नेऊन थांबविते झाले. व तुमच्याच रथानें शर्यत जिंकली. तेव्हां तरुण आणि कुलवती सूर्या तुम्हांजवळ येऊन तुम्हांस पति वरून तुम्हांशी सख्य करती झाली. तुम्ही तिचें पतित्व जिंकलेंत.

६. तुम्ही रेभाचें उपद्रवापासून रक्षण केलेंत आणि अत्रीचा उष्णतेचा त्रास शीत उपचारांनीं नष्ट केलात. तुम्ही शयूची गाय दुभती केलीत. तुम्हीं वंदनाला दीर्घायुष्य देऊन तारलेंत.

७. हे पराक्रमी अश्वीहो, तुम्ही म्हातारपणामुळें मरूं घातलेल्या वंदनाला जुना रथ नीट करावा, त्याप्रमाणें पुन्हा तरुण केलेंत. तुम्ही कवीची स्तुति ऐकून त्याला क्षेत्रांतून (मातेच्या उदरांतून) बाहेर काढलेंत. तुमचा पराक्रम या उपासकाचा पाठीराखा असो.

८. आपल्या बापाच्या क्रोधामुळें अत्यंत पीडिलेल्या आणि दूरदेशीं तुमची करुणा भाकणाऱ्या भुज्यूला तुम्हीं पावलांत. म्हणून तुमचेच तेजःसंपन्न व उत्तम प्रसाद आपोआपच सर्वत्र अपेक्षिले जात आहेत.

९. त्या मधमाशीनें तुम्हांला मधासाठीं स्तविलें. उशिजेच्या पुत्रानें तुम्हांस सोमरसानें प्रसन्न होण्याकरतां

---

६. टीपः—वंदन ११२.५;११६.११;११७.५ पहा.

टीपः—रेभ ११२.५ व ११६.२४ पहा.

टीपः—तुग्रपुत्र भुज्यु ११६.३;११७.१४ पहा.

टीपः—च्यवान ११६.१०; ११७.१३ पहा.

७. टीपः—अत्रि ११२.७ पहा.

८. टीपः—विश्पला ११६.१५ पहा.

९. टीपः—पेदु ११६.६ पहा.

५. टीपः—सूर्याविवाह ११६.१७ पहा.

६. टीपः—रेभ ११२.५ पहा.

७. टीपः—अत्रि ११२.७ पहा.

टीपः—वंदन ११२.५ पहा.

८. टीपः—भुज्यु ११२.६ पहा.

९. टीपः—मधुविद्या ११६.१२ टीप पहा.

बोलावलें. तुम्ही दध्यङ्ङ ऋषीच्या मनाला संतोष दिला. तेव्हां त्यानें घोड्याच्या शिरानें तुम्हांस (मधुविद्या) सांगितली.

१०. हे अश्वीहो, तुम्ही पेदूला बहुप्रिय, श्वेतवर्ण, शत्रुनाशक, युद्धांत शत्रूंना अजिंक्य, अत्यंत शूर आणि इंद्राप्रमाणें रणझुंझार घोडा दिलात.

---

१०. टीप:—पेदु ११६.६ पहा.

१०. टीप:—ह्या मंत्रांत तरुतार शब्दानें तारायंत्राचा उल्लेख आहे असें दयानन्दस्वामी म्हणतात.

सूक्त एकशें विसावें.

ऋषिः—१उशिपुत्र कक्षीवान् ; देवता—अश्विन् ;छंदः—१ गायत्री, २ ककुभ, ३ काविराट, ४ नष्टरूपी, ५ तनुशिरा, ६ उष्णिह, ७ विष्टारबृहती, ८ कृति, ९ विराज; १०-१२ गायत्री.

१. हे अश्वीहो, तुम्हांला कोणती स्तुति प्रसन्न करूं शकेल ? तुम्हां उभयतांचा कोण संतोष करूं शकेल ? अज्ञानी मनुष्यानें तुमची कशी उपासना करावी ?

२. एक अज्ञानी आणि दुसरा बुद्धिहीन यांनीं ज्ञानी अश्वींनाच मार्ग विचारावा. ते मर्त्यांची अनास्था करणारे नव्हेतच.

३. म्हणून आम्ही ज्ञानवान अश्वीनांच बोलावतों आहो. विद्वान असे तुम्हीच आज आम्हांस स्तोत्र शिकवा. तुमचा भक्त तुम्हांला हवि अर्पण करून तुमची प्रार्थना करीत आहे.

४. मी अपक्व बुद्धी देवांना प्रार्थीत नाहीं. तरी हे अद्भुत पराक्रम करणारे अश्वीहो, वषटकारपूर्वक अर्पण केलेला हा बलकर सोमरस प्या. आणि तुम्ही आम्हांला कर्तबगार बनवा.

५. जी स्तुति घोषेला किंवा भृगुवाणाला शोभली, तिच्याच योगानें पज्रपुत्र तुमची स्तुति करीत आहेत. तरी ज्ञाता कक्षीवान समर्थ होवो.

६. हे शोभनाधिपती अश्वीहो, तुम्ही अन्ध झालेल्या ऋज्राश्वाचें स्तोत्र ऐकलेंत. आणि त्याला तुम्ही डोळे दिलेत. मीहि त्याचप्रमाणें स्तुति केली आहे.

७. तुम्ही ज्याप्रमाणें मोठें धन देतां, त्याचप्रमाणें घालवितांहि. तरी उत्तम संरक्षकहो, तुम्ही आमचें घातक दुष्टापासून रक्षण करा.

८. तुम्ही आम्हांला कोणत्याहि शत्रूशीं लढण्याचा प्रसंग आणूं नका. आमच्या दुभत्या गाई आपल्या वासरांस टाकून घरांतून बाहेर न जावोत.

९. तुमच्या मित्रत्वासाठीं आणि धनप्राप्तीसाठीं भक्तांनीं गोदोहन केलें आहे. तरी तुम्ही आम्हांला गाई आणि अन्न यांनीं युक्त असें धन द्या.

१०. मी अन्नसंपन्न अश्वींच्या अश्वरहित रथाची उपासना करतों. त्याच्या योगानें मला पुष्कळ धन मिळेल अशी आशा आहे.

११. तरी हे पूज्य रथा, तूं माझा उत्कर्ष कर. सुखकारक रथ सोमपानार्थ लोकांमध्यें ओढून आणला जावो.

१२. मला तर स्वप्नाचा आणि दान न करणाऱ्या धनवन्ताचा तिरस्कारच वाटतो. त्या दोघांचाहि ताबडतोब नाश होवो.

सूक्त एकशें एकविसावें.

ऋषिः—कक्षीवान् ; देवता—विश्वेदेव किंवा इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्.

१. लोकपालक इंद्राची सेवा करणाऱ्या अंगिरसाचीं स्तोत्रें तो ताबडतोब येऊन ऐकेल काय ? जेव्हां तो पूजनीय इंद्र घरांतील मंडळीमध्यें येतो, तेव्हां तो मोठीं पावलें टाकीत यज्ञभूमीकडे जातो.

२. त्यानें द्युलोक स्थिर केला. तेजस्वी आणि गोपालक अशा त्यानें अन्न उत्पन्न करण्याकरतां लोकाधार उदकांचा आणि गोरूप धनाचा वर्षाव केला. तो अतिशय श्रेष्ठ आपल्या कन्येच्या मागोमाग प्रकाशला. त्यानें घोडीची गोमाता बनविली.

३. अरुणवर्ण उषांच्या पूर्वीं प्रकाशून तो सत्वर येऊन दररोज आंगिरसांचें स्तोत्र ऐको. त्यानें द्विपाद आणि चतुष्पाद प्राण्यांसाठीं नियुत वज्र तयार केलें. आणि द्युलोकाचें धारण केलें.

४. ह्या हर्षाच्या भरांत तूं गाईचा लपवून ठेविलेला उत्तम समूह यज्ञासाठीं (अंगिरसांना) दिलास. जेव्हां संग्रामांत अतिश्रेष्ठ इंद्र चालून गेला, तेव्हां त्यानें मनुष्यांच्या शत्रूंचे दरवाजे फोडून टाकले.

५. तुझ्या आईबानांनीं तुला जें दूध आणि वीर्य-

---

५. टीप:—घोषा ११७.७.

६. टीप:—ऋज्राश्व ११६.१६ पहा.

कर अन्न दिलें, तसेंच शुद्ध दूध देणाऱ्या गाईचें शुद्ध दूध भक्तांनीं तुला अर्पण केलें आहे.

६. पहा तो विजयशाली इंद्र प्रकट झाला आहे. सूर्याप्रमाणें तो उषेजवळ प्रकाशत आहे. आम्ही ज्या मधुर हवीसह व प्रार्थनापूर्वक सोमरस पळीनें वेदीजवळ ओतून अर्पण केला आहे, त्याच्या योगानें तो आनंदित होवो.

७. जेव्हां लखलखीत मेघमाला सिद्ध होते तेव्हां अन्तरिक्षांत इंद्र पावसाचा प्रतिबंध दूर करतो. हे इंद्रा, सूर्यरूप असणारा तूं जेव्हां दिवस प्रकाशित करतोस तेव्हां गाडींत बसून हिंडणाऱ्याची, पशूंची इच्छा करणाऱ्या गोपालाची इच्छा पूर्ण होते.

८. तुला आनंद व्हावा म्हणून मदकर, गोरसानें पातळ केलेला, गार केलेला, सोमरस जेथें ग्राव्यांनीं काढला जात आहे, तेथें धनापहार करणाऱ्या शत्रूशीं लढणाऱ्या व महान द्युलोकाहून आलेल्या तुझ्या घोड्यांना सोमरस पाज.

९. हे बहुस्तुता, जेव्हां तूं कुत्साकरतां शुष्णाला अनंत शस्त्रांनीं मारीत जातोस तेव्हां श्रेष्ठ अशा त्वां द्युलोकाहून आणिलेलें लोहमय तेजस्वी वज्र त्याच्यावर मारलेंस.

१०. हे वज्रधरा, जेव्हा सूर्याला अंधकारांतून बाहेर काढावयाचा होता, तेव्हां तूं मेघावर शस्त्र टाकलेंस. आणि शुष्णाचें जें बळ द्युलोकभर व्यापून निश्चल होऊन राहिलें होतें तें तूं विदारून टाकिलेंस.

११. हे इंद्रा, महान, तेजस्वी आणि स्थिर अशा द्यावापृथिवींनीं तुझें अभिनंदन केलें. उदकांच्या वाटेवर आडवून पडलेल्या वराहरूपी वृत्राला तूं वज्रानें भूमीवर निजविलेंस.

१२. हे लोकहितकारक इंद्रा, ज्यांचें तूं रक्षण करतोस, त्या लोकांच्याकडे वायूच्या उत्तम रीतीनें जोडल्या जाणाऱ्या घोड्यावर बसून ये. उशना काव्यानें तुजकरतां उत्साहकारक, वृत्रघातक आणि पार पाडणारें विजयी वज्र तयार केलें आहे, तें तूं धारण कर.

१३. हे इंद्रा, तूं आपले हरिद्वर्ण आणि शूर घोडे थांबविलेस तेव्हां एतशानें (घोड्याचें नांव)त्याचें चाक ओढलें. तूं यजन न करणाऱ्या लोकांना नव्वद नद्यांच्या पार हाकून देऊन त्यांस खळग्यांत नेऊन टाकलेंस.

१४. हे इंद्रा, तूं आह्मांला ह्या दुस्तर अवस्थेंतून सोडीव. हे वज्रधरा, तूं आम्हांस पापापासूनच तार. तूं आम्हाला रथ आणि घोडे यांनीं युक्त अशी विपुल संपत्ति दे कीं तिच्या योगानें आम्हांस अन्न, कीर्ति आणि बल प्राप्त होईल.

१५. तरी हे धनसंपन्ना, तुझी कृपा आह्मांला न सोडो. अन्नसंपत्ति आम्हाजवळ असो. हे धनवंता, संपन्न असा तू आम्हांला गोसंपन्न कर. आम्ही तुला पुष्कळ हविरन्न देऊन पुत्रपौत्रासह तुझ्या सेवेस तत्पर राहूं.

सूक्त एकशें बाविसावें

ऋषिः—कक्षीवान् देवता–विश्वेदेव; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे शान्त ऋत्विजांनो, उदार रुद्राला हें पेय आणि यज्ञ अर्पण करा. भात्याप्रमाणें वीरांच्या साहाय्यानें स्वर्गातून शत्रूंना घालवून देणाऱ्या देवाला आणि द्यावापृथ्वींत असणाऱ्या मरुतांना मी स्तवितों.

२. पत्नीप्रमाणें पहिल्या स्तवनाचा उत्कर्ष करण्याकरतां अनेक स्तोत्रांनीं स्तविलेल्या अशा ह्या उषा आणि रात्र येवोत. चांगले विणलेल्या जरीच्या वस्त्राला पांघरणारी आणि सूर्याच्या शोभेनें सुंदर दिसणारी उषा येवो.

३. परिभ्रमण करणारा आणि अंधार नाहींसा करणारा सविता आम्हाला आनंदित करो. तसेंच जलांचा वर्षाव करणारा वायु मला आनंदित करो. हे इंद्रा व पर्जन्यहो, तुम्ही आम्हांला बुद्धिमान करा. सर्व देव आम्हांला समृद्ध करोत.

४. तसेंच कक्षीवान मी उषःकालीं अन्न भक्षण करणाऱ्या आणि सोम पिणाऱ्या त्या अश्वींना बोलावण्यास प्रवृत्त होतों. हे ऋत्विजांनो, तुम्ही अपांनपात् अग्नीची स्तुति करा. आणि फसफस करणाऱ्या उदकाच्या मातापितृभूत ज्या द्यावापृथ्वी त्यांची स्तुति करा.

५. हे देवांनो, घोषेनें कोड नष्ट व्हावें म्हणून ज्याप्रमाणें स्तुति केली त्याप्रमाणें औशिज मी तुम्हांला आवाहन करण्याकरतां मोठ्यांदा स्तोत्र करीत आहे. तुमच्यापैकीं दात्या पूषनलाहि मी स्तवितों. तसेंच अग्नीच्या धनसंपन्नतेची मी प्रशंसा करतों.

६. हे मित्रावरुणांनों, तुम्ही हा माझा धांवा ऐका तुम्ही यज्ञगृहांत सर्व बाजूंनीं चाललेलीं स्तोत्रें ऐका. संपत्तीनें प्रख्यात असणारा, उत्तम रीतीनें प्रार्थना ऐकून घेणारा सिंधु पाण्यांनीं शेतें चांगली करीत आमचा धांवा ऐको.

७. हे वरुणा, हे मित्रा, तुमची मी स्तुति करीत आहे. मला पज्राला पृक्षयामांच्या येथें शेकडो गाईंच्या

देणग्या मिळोत. श्रुतरथ आणि प्रियरथाच्या येथें संपन्नता देणारे आणि कायम ठेवणारे तुम्ही या.

८. मी ह्या महासंपन्न देवाचें धन स्तवितों. चांगल्या मुलाबाळांनीं युक्त असणारे आम्ही लोक तुझी एकदम स्तुति करीत आहों. जो देव पज्रांना संपत्ति देता झाला तो ज्ञाता आम्हांला अश्व व रथ यांनीं संपत्ति देवो.

९. हे मित्रावरुणांनो, जो मनुष्य तुमचा द्रोह करतो, जो तुमचा वाकड्या मार्गानें द्रोह करतो आणि तुम्हाकरतां सोमरस काढीत नाहीं तो सत्यनिष्ठ धार्मिक मनुष्य जें प्राप्त करतो त्यामुळें तो स्वतः आपल्या हृद्यांत रोग (दुःख) प्राप्त करतो.

१०. हे मित्रावरुणांनो, तो भक्त चांगल्या घोड्यावर बसून जातो. लोकांचा अत्यंत पराभव करणारा, कीर्ति गायलेला, देणग्या देणारा, शूर आणि सर्व युद्धांत नेहमींच तो निर्भयपणें चाल करून जात असतो.

११. हे अमरांच्या प्रिय राजांनो, तुम्ही स्तोतृजनांचा धांवा ऐका व या. कारण, आकाशांत व्यापून असणारे तुम्ही ज्याला कोणाचें साहाय्य नाहीं अशा आणि रथयुक्त असणाऱ्या भक्ताच्या हवीची प्रशंसा करावी.

१२. ‘ज्या उपासकाचें दशविध अन्न भक्षावयाला आम्ही आलों आहों त्या ह्या उपासकाला आपण प्रबळ करूं’ असें देव बोलोत. ज्यांच्याजवळ सर्व धन आणि अन्न आहे ते सकळ देव आमचें हविरन्न सेवन करोत.

१३. ज्या अर्थीं दशविध अन्न घेऊन ऋत्विज येत आहेत त्याअर्थीं दहा प्रकारच्या अन्नाकरतां आम्ही स्तुति करीत आहोंत. इष्टाश्व काय किंवा इष्टरश्मि काय, हे समर्थ असणारे संरक्षक आमच्या लोकांना काय त्रास देणार आहेत ?

१४. सर्व देव आम्हांला हिरण्यालंकारमंडित कर्ण आणि मणि (यजमान आणि भक्त) गळयांत घातलेले रूपवान मूल देवोत. देव आम्हा उभयतांची भराभर बाहेर पडणारी स्तुति आणि हवि इच्छोत.

१५. हे मित्रावरुणांनो, मशर्शाराचे चार आणि जयशाली आयवस राजाचे तीन मुलगे मला त्रास देतात. तुमची भव्य आणि आल्हादक कान्ति असलेला रथ आम्हाकरतां सूर्याप्रमाणें प्रकाशो.

सूक्त एकशें तेविसावें.

ऋषिः—दीर्घतमःपुत्र कक्षीवान् ; देवता—उषा ; छन्दः—त्रिष्टुभ.

१. कार्यतत्पर उषेचा भव्य रथ जोडला आहे. ह्यांत अमर देव बसले आहेत. थोर आणि पूज्य उषा लोकांच्या वसतीकरतां प्रकाशत अंधारातून वर आली.

२. संपत्ति जिंकणारी, थोर आणि उदार उषा सर्व जगाच्या आधीं जागी होते. तरुण व पुनः पुनः प्रादुर्भूत होणारी उषा उंचून सर्व जगाकडे पहाते. आणि पहिल्या बोलावण्याला प्रामुख्यानें येते.

३. हे चांगल्या प्रकारें उदयाला येणारे उषे, ज्याअर्थीं सर्व लोकांना तूं आपलें ऐश्वर्य देत आहेस, त्याअर्थीं उदार सवितृदेव आम्ही निष्पाप आहों हें सूर्याला सांगो.

४. सुंदर उषा दररोज वेगवेगळें रूप घेऊन घरोघर (प्रकाशत) जाते. ऐश्वर्यवान उषा सारखां येत असते. आणि हविरन्नाचा श्रेष्ठ भाग सेवन करीत असते.

५. हे मधुर भाषण करणारे उषे, भगाची (आदित्याची) स्वसा आणि वरुणाची बहिण असणारी तूं प्रथम स्तुति केली जा. जो त्रास देणारा आहे त्याची पिछेहाट होवो. त्याला आम्ही तुझ्या साहाय्यानें आणि रथानें जिंकूं.

६. मधुर स्तोत्रें म्हटलीं जावोत. हवि तयार होवोत. अग्नि प्रज्वलित केले जावोत. कारण, अंधारांत झाकलेली स्पृहणीय संपत्ति तेजस्वी उषा प्रगट करीत आहे.

७. (अहोरात्रींपैकीं) एक जाते आणि एक येते. वेगवेगळ्या रूपाच्या असणाऱ्या अहोरात्री एकत्र संचार करीत असतात. पर्यायानें फिरणाऱ्यापैकीं एक अंधारानें पदार्थ झाकून टाकते आणि उषा तेजस्वी रथानें प्रकाशते.

८. आज काय आणि उद्या काय उषा सारख्याच असतात. निर्दोष असणाऱ्या वरुणाच्या (सूर्याच्या) लांबलचक मार्गाचें त्या सेवन करतात. एकेक उषा तीस योजनें त्या समर्थाच्यापुढें प्रकाशतात.

---

१३ टीपः—दशविध अन्न म्हणजे दहा पात्रांत ठेवलेलें अन्न असें सायण म्हणतात.

३. टीपः—सवितृ व सूर्य भिन्न आहेत असें येथें दिसतें. अशा प्रकारें बऱ्याच ठिकाणीं उल्लेख आहे सवितृ व सूर्य यांच्या फरकाकरतां ५.८१.४ वरील टीप व मंत्र पहा.

८. टीपः—तीस योजनें याचें स्पष्टीकरण सायणाचार्य असें करतात कीं सूर्यापासून तीस योजनें उषा

९. दिवसाच्या प्रथम भागाचा उदय जाणणारी, शुद्ध आणि तेजस्वी उषा अंधारांतून जन्मते आहे. तरुण उषा सूर्याच्या तेजाचा नाश करीत नाहीं, तर उलट प्रकाश करते.

१०. हे देवि, तूं देवांना भजणाऱ्या मनुष्याकडे मुरका मारीत तरुण स्त्री येते त्याप्रमाणें येत असतेस. सुंदर व हसत येणारी तरुण अशी तूं आपलें स्तन व्यक्त करतेस.

११. आईनें न्हाऊ घातलेल्या आणि सुशोभित दिसणाऱ्या तरुणीप्रमाणें तूं आपलें शरीर लोकांना दिसावें म्हणून प्रगट करतेस. तर हे उषे, कल्याणकारक असणारी तूं दूरवर प्रकाश, कीं दुसऱ्या उषा जेथपर्यंत जाऊं शकत नाहींत.

१२. अश्वसंपन्न,गोसंपन्न, लोकप्रिय आणि सूर्यकिरणासह अंधार नष्ट करण्याचा प्रयत्न करणाऱ्या उषा शुभ रूप धारण करून जातात आणि पुनः परत येतात.

१३. यज्ञाचा लगाम धारण करणारी तूं अत्यंत चांगली कर्तृत्वबुद्धि आम्हांस दे. हे उषे, आव्हान—सुलभ असणारी तूं आज प्रकाश. आमचे घरीं आणि यजमानाचे घरीं संपत्ति राहूं दे.

सूक्त एकशें चोविसावें.

ऋषिः—कक्षीवान दैर्घतमस; देवता—उषाः छन्दः—त्रिष्टुभ..

१. उषा अग्नि प्रज्वलित झाल्यावर उगवत्या सूर्याप्रमाणें श्रेष्ठ तेज धारण करते. येथें सवितृदेव आमचे द्विपाद आणि चतुष्पाद प्राणिमात्रास जाण्यास मार्ग करो. (प्रकाशो.)

२. देवांचे नियम मोडूं न देणारी, लोकांचें आयुष्य हरण करणारी, येऊन गेलेल्या उषांतील शेवटची आणि येणाऱ्यांतील पहिली उषा प्रकाशत आहे.

३. ही तेजोरूप वस्त्र नेसलेली स्वर्गकन्या उषा पूर्वेस नेहमींप्रमाणें दिसूं लागली. ही आदित्याच्या मार्गानें मार्ग ठाऊक असलेल्या स्त्रीसारखी सरळ जाते. दिशांना बाध आणीत नाहीं.

४. उषा आदित्याच्या वक्षस्थलाप्रमाणें जवळ दिसत आहे. तिनें नोध्याप्रमाणें आपलें मनोरथ प्रगट केले आहेत. निजलेल्यास स्वयंपाकिणीप्रमाणें जागे करणारी आणि येणाऱ्यांत अत्यंत निश्चितपणें येणारी उषा आली आहे.

५. विस्तीर्ण अन्तरिक्षाच्या पूर्वभागांत उत्पन्न होऊन ती प्रकाशत आहे. द्यावापृथ्वींत राहून (तेजानें) दोन्ही व्यापून टाकणारी उषा सर्वत्र अत्यंत प्रकाशित होत आहे.

६. ह्याप्रमाणेंच अत्यंत भव्य असणारी उषा सुखानें पहाता यावें म्हणून प्रकाशते. आप्ताला वगळीत नाहीं आणि अनाप्तालाहि वगळीत नाहीं. निर्मळ शरीरानें प्रगट होणारी उषा प्रकाशत असतां लहानाला सोडीत नाहीं आणि मोठ्यालाहि टाळीत नाहीं.

७. धनप्राप्तीकरतां न्यायकचेरीची पायरी चढणाऱ्या भ्रातृहीन स्त्रीप्रमाणें किंवा कामुक स्त्री नवऱ्यापुढें सुंदर वस्त्र नेसून येते त्याप्रमाणें किंवा हंसणाऱ्या स्त्रीप्रमाणें ती उषा आपलें स्वरूप प्रगट करीत आहे.

८. हिला जाणून जणूं काय धाकटी बहीण थोरल्या बहिणीला जागा मोकळी करून देत आहे. सूर्याच्या किरणासह अंधार नाहींसा करणारी उषा विद्युत्संघाप्रमाणें प्रकट होत आहे.

९. या येऊन गेलेल्या भगिनींतून एक दुसरीच्या मागून येत असते. आतां ज्या नव्या उषा आहेत त्या पुराण उषाप्रमाणें मंगलकारक होऊन संपत्ति घेऊन येऊन प्रकाशोत.

१०. हे समृद्ध उषे, तूं दात्यांना जागे कर. पणि जागे न होतां तसेंच निजोत. हे समृद्ध उषे, उदारांना धनवान करीत तूं प्रकाशित हो. हे मधुर उषे, आयुष्याचा एक एक दिवस घालवणारी तूं स्तोत्याकरतां संपत्तीसह प्रकाशित हो.

११. ही तरुणी उषा पूर्व दिशेला प्रकाशत आहे. ती तांबूस गाईंचा समुदाय रथाला जोडीत आहे. आतां अंधार नाहींसा होईल. प्रकाश घरोघर पसरेल आणि अग्नि स्तविला जाईल.

पुढें असते. याला अनुसरून वरील ‘ तीस योजनें ’ हा शब्द आला आहे. सर्व ठिकाणीं उषा सारख्याच असतात अशी याच्या पोटांत कल्पना आहे. पण ती बरोबर नाहीं असें आतां सिद्ध झालें आहे. योजनें याचेंहि प्रमाण निश्चित सांगतां येत नाहीं.

७ टीपः—पहिल्या दोन उपमांच्या अर्थासंबंधानें बराच मतभेद आहे. चालीरीतीची निश्चित कल्पना येथें अशक्य असल्यामुळें कल्पना करणें भाग पडते.

१२. तूं प्रकाशल्यावर पक्षीहि घरट्यांतून उडून जातात. आणि अन्नार्थींहि जे आहेत ते उठून जातात. हे देवि उषे, घरीं राहाणाऱ्या उदार मर्त्याला तूं उत्कृष्ट संपत्ति देतेस.

१३. हे प्रशंसनीय उषांनो, माझ्या स्तोत्रानें तुम्ही स्तविल्या आहां. प्रेमानें माझा उत्कर्ष करा. हे देवीहो, तुमच्या प्रसादें करून आम्हांला हजारो आणि शेंकडो धन प्राप्त होवो.

सूक्त एकशें पंचविसावें.

ऋषिः—कक्षीवान, देवता-दान;* छंदः—४.५ जगती, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. सकाळीं येऊन त्यानें सगळीं संपत्ति दिली. ती तपासून घेऊन नीट ठेवली. त्या योगानें तो संतति आणि आयुष्य यांची वाढ करून मुलाबाळासकट समृद्ध होतो.

२. (कक्षीवानाचा बाप मिळालेल्या धनानें संतुष्ट होऊन दात्याला आशीर्वाद देत आहे) हे पहाटे येणाऱ्या, दोरीनें बांधावें त्याप्रमाणें येणाऱ्या तुला पांथस्थाला जो संपत्तीनें बांधून टाकतो तो गोसंपन्न, धनसंपन्न व अश्वसंपन्न होवो, त्याला इंद्र विपुल अन्न देवो.

३. मी आज प्रातःकाळीं यज्ञ करणाऱ्या तुझी इच्छा करून तुज पुण्यवन्ताप्रत धनानें भरलेल्या रथानें आलों आहे. तर मदकारक सोमाचा रस पाज आणि मुलाबाळांनीं युक्त असणाऱ्या मला मधुर भाषणांनीं संतुष्ट कर.

४. जो यज्ञ करील असें म्हणतो आणि जो यज्ञ करतो त्यांकरतां पान्हवलेल्या सुखकारक गाई दूध देऊं लागतात. दात्या आणि प्रेमळ भक्ताकडे सर्व बाजूंनीं समृद्धिकारक तुपाच्या धारा वाहूं लागतात.

५. जो दक्षिणा देतो, तो स्वर्गाच्या शिखरावर आरूढ होतो, तो देवांमध्यें जातो. त्यासाठीं वहाणाऱ्या नद्या बल वाहून आणतात. ही दक्षिणा त्याला सदा समृद्ध करते.

६. दक्षिणा देणारांचीच ही आश्चर्यकारक संपत्ति आहे. दक्षिणा देणारांचेच स्वर्गातील सूर्य होत. दक्षिणा देणारेच अमरत्व पावतात. आणि दक्षिणा देणारेच दीर्घायुषी होतात.

७. उदार लोक दुःख आणि पाप प्राप्त करीत नाहींत. सत्कर्म करणारे भक्त म्हातारे न होवोत (जरारहित होवोत). त्यांच्याहून दुसराच कोणी पापी होवो. सर्व दुखाचे प्रसंग न देणाऱ्यावर कोसळोत.

सूक्त एकशें सव्विसावें.

ऋषिः—१ ते ५ कक्षीवान्, ६ भावयव्यं, ७ रोमशा; देवता-१-६ भावयव्य, ७ रोमशा; छन्दः—१-५ त्रिष्टुभ, ६.७ अनुष्टुभ.

१. मी सिंधुतीरीं राहणाऱ्या भाव्याविषयीं मनःपूर्वक आणि सुंदर स्तोत्रें तयार करितों. कारण तो अजिंक्य राजा कीर्तीची इच्छा करून मजकरितां सहस्र यज्ञ करिता झाला.

२. राजानें आग्रहपूर्वक दिलेले शंभर निष्क आणि शंभर घोडे मी एकदम घेतले. म्यां कक्षीवानानें बलवान राजानें दिलेले शंभर बैल घेऊन त्याची अक्षय्य कीर्ति द्युलोकीं पसरविली.

३. स्वनयानें दिलेले आणि घोड्या जोडलेले दहा रथ मजजवळ येऊन उभे राहिले. नंतर साठ हजार गाईचें खिल्लार आलें. कक्षीवानानें दिवस संपण्याच्या वेळीं हें सर्व मिळविलें.

४. दहा रथांची आणि हजारों देणग्यांची माळ चाळीस तांबड्या घोड्यांनीं पुढें ओढून आणिली आहे. करितां अत्यंत चलाख आणि मोत्यांच्या माळा घातलेल्या घोड्यांना पज्र कुलांतलि कक्षीवानाचे लोक स्वच्छ करोत.

५. पूर्वींप्रमाणें उपासकांचें पोषण करणारे तीन जोडलेले आणि आठ साख्याला बांधलेले बैल मी तुम्हां-

---

* टीप: —कक्षिवान दैर्घतमस ब्रह्मचर्यानें गुरुकुलीं राहून वेदाभ्यास संपादन करून घरीं परत जात असतां रात्र झाल्यावर एके ठिकाणीं निजला. सकाळीं भावयव्याचा स्वनय नांवाचा मुलगा आपल्या मित्रमंडळीशीं क्रीडा करीत तेथें आला. त्यानें सहज कक्षिवानाला पाहिलें. तो एकदम जागा होऊन उभा राहिला. त्याचें सौंदर्य पाहून राजाला वाटलें आपली मुलगी याला द्यावी. म्हणून त्याला कोणाचा मुलगा वगैरे विचारून सर्व हकीगत समजावून घेतली. आणि घरीं आणून त्याचा सन्मान केला आणि दहा कन्या विपुल संपत्तिसुद्धा दिल्या. हे सर्व घेऊन कक्षिवान आपल्या बापाकडे निघून गेला. आणि त्यानें तें सर्व त्याला दाखविलें. स्वनयाचें औदार्य वर्णन करण्याकरतां हें सूक्त आहे म्हणून ह्या सूक्ताची देवता दान ही आहे.

कारितां घेतले. हे पज्रकुलोत्पन्न बंधूहो, घरच्या मायाळू माणसाप्रमाणें ह्यांनीं गाडींतून धान्य आणिलें आहे.

६. जिला धरिलें असतां आणि घट्ट मिठी मारिली असतां जी मुंगुसाप्रमाणें अगदीं चिकटून राहते. ती रेतानें बरबटलेली ही भोग्य स्त्री मला शेकडों भोग देत आहे.

७. मला अगदीं चिकट. माझे अवयव लहान आहेत असें समजूं नकोस. गंधारी लोकांच्या मेंढीप्रमाणें मी सर्वत्र केसांनीं भरली आहे.

सूक्त एकशें सत्ताविसावें.

ऋषिः–दिवोदासपुत्र परुच्छेप; देवता–अग्नि; छंदः–६ अतिधृति, अवशिष्ट अत्यष्टि.

१. दानशूर, कृपाळू, बलपुत्र कवीप्रमाणें ज्ञानसंपन्न असा जो अग्नि त्याला मी होता मानतों. तो सुयज्ञ देव आपल्या दिव्य तेजानें वितळणाऱ्या तुपाच्या तेजाची इच्छा करितो.

२. अत्यंत यज्ञार्ह अंगिरसांचा आदिपुरुष अशा तुला हे ज्ञानवान अग्ने, आम्ही यज्ञ करणारे स्तुतींनीं आणि स्तोत्रांनीं हांक मारीत आहोंत. अग्नि हा आकाशाला जाऊन भिडणारा आणि सर्वांना बोलावणारा आहे. ज्वालारूपी शिखा असलेला आणि प्रबल अशा अग्नीचें सर्व लोक रक्षण करोत.

३. आपल्या तेजस्वी सामर्थ्यानें अत्यंत प्रकाशणारा असा तो दुष्टांना मारक होतो. तरवारीप्रमाणें दुष्टांना तो मारतो. त्याची भेट होतांच दृढ आणि स्थिर जे पदार्थ असतात ते सुद्धां पाण्यासारखे वितळूं लागतात. तो शत्रूंचा संहार करून उभा राहतो, पळत नाहीं. धनुर्धाऱ्यांवर जय मिळविणारा अग्नि पळत नाहीं.

४. अग्नीला अत्यंत कठिण असें सुद्धां खाऊं घालतात. त्याची कृपा व्हावी म्हणून उपासक त्याला भजतात. जो अग्नि आपल्या तेजानें अनेक वस्तू लांकडांप्रमाणें तोडीत त्यांच्या मधून जातो आणि आपल्या सामर्थ्यानें अत्यंत कठिण अशीं अन्नें सुद्धां खाऊन टाकतो.

५. ह्या अग्नीसाठीं हें हविरन्न आपण वेदीजवळ ठेवावें. तो दिवसापेक्षां रात्रींच अधिक सुंदर दिसतो. दिवसांपेक्षां अधिक तेजस्वी असणाऱ्या अग्नीसाठीं हविरन्न द्यावें. पित्याचें घर ज्याप्रमाणें पुत्राचें रक्षण करतें त्याप्रमाणें भक्ताच्या आयुष्याचें अग्नि रक्षण करतो. हे अग्नि जरारहित आणि रक्षण करणारे होत.

६. तो मरुतांप्रमाणें प्रचंड गर्जना करणारा होय. धान्यानें भरलेल्या शेतांत आणि सैनिकांमध्येंहि तो नाद करितो. हविरन्नांचा स्वीकार करणारा आणि यज्ञांचा ध्वजभूत अग्नि पूजेसहित हविरन्न स्वीकारतो. आणि त्यायोगें प्रसन्न आणि आनंदी अग्नीच्या मार्गाचा सर्व लोक अंगीकार करितात.

७. ह्या अग्नीचीं स्तोत्रें करणारे, तेजस्वी, विनयशील, भृगुकुलोत्पन्न उपासक दोन प्रकारें उपासना करितात. उपासनेसाठीं भृगूनीं अग्नि मंथून उत्पन्न केला. तो हा तेजस्वी अग्नि धनाचा अधिपति होय. तोच सर्व दृश्य पदार्थांचा धारक होय. तो यज्ञार्ह अग्नि आपल्याला प्रिय असलेलीं हविरन्नें स्वीकारो. तो यज्ञार्ह अग्नि स्वीकारो.

८. सर्व लोकांचा अधिपति आणि सर्व लोकांचा सारखाच गृहपति अशा तुला भोजनार्थ आह्मी बोलावतों. तो मनुष्याचा पाहुणा आहे. हे सर्व अमर देव हविरन्नासाठीं बापाकडे मुलगे जातात त्याप्रमाणें अग्नीकडे जातात. हे उपासक देवासाठीं हविरन्नें अर्पीत आहेत.

९ हे अग्ने, तूं यज्ञासाठीं अत्यंत सामर्थ्यसंपन्न, झुंजणारा वीर आणि अत्यंत तेजस्वी असा निर्माण झाला आहेस. म्हणून हे जरारहित अग्ने, भक्त जन तुला सेवितात; तुला दूताप्रमाणें सेवितात.

१०. प्रातःकाळीं जागृत होणारा, सामर्थ्यसंपन्न आणि श्रेष्ठ अशा तुमच्या अग्नीला हें स्तोत्र पशु देणाऱ्याप्रमाणें प्राप्त होवो. कारण त्याला उद्देशून सर्व ठिकाणीं उपासक हविरन्न अर्पण करून स्तोत्रें म्हणत असतात. अग्नि स्तोत्यांच्या पुढें उभा राहून त्यांच्याप्रमाणें देवाचें स्तवन करितो. ऋषींमध्यें हा स्तोत्रकुशल होता होय.

११. हे अग्ने, अत्यंत जवळ दृष्टीस पडणारा आणि देवाबरोबर पूजा स्वीकारणारा तूं प्रसन्न मनानें मोठी संपत्ति आम्हाला आणून दे. हे अत्यंत प्रबळ अग्ने, आह्मी श्रेष्ठ धन प्राप्त करावें आणि त्याचा उपभोग घ्यावा. हे धनवन्ता, स्तोत्यांना उत्तम वीरांनीं युक्त अशी संपत्ति तूं प्राप्त करून दे. आणि उग्र असा तूं आपल्या सामर्थ्यानें शत्रूंचा नाश कर.

सूक्त एकशें अठ्ठाविसावें.

ऋषिः—दिवोदासपुत्र परुच्छेप; देवता–अग्नि; छंदः–अत्यष्टि.

१. हा अग्नि मनूच्या वेदीमध्यें उत्पन्न झाला. उत्तम यज्ञसंपादक आणि होता असा तो उपासकांच्या कर्मांसाठीं आणि स्वतः कार्य करण्यासाठीं निर्माण झाला. त्याचें सख्य इच्छिणाऱ्याला, सर्व देणारा आणि धनाची इच्छा करणाऱ्याला केवळ धनसागरच असा हा निर्भय होता अग्नि वेदीवर आरूढ झाला. ऋत्विजांनीं वेष्टिलेला आणि पूज्य अग्नि वेदीवर बसला.

२. त्या यज्ञसंपादक अशा अग्नीला आम्ही सरळ मार्गानें नमस्कारपूर्वक आणि हविरन्नपूर्वक भजतों. त्यास यज्ञांमध्यें हविरन्नपूर्वक भजतों. त्या देदीप्यमान अग्नीला मातरिश्वा दुरून आणून मनुष्यांसाठीं स्थापिता झाला. तो आमचीं हविरन्नें घेऊनहि त्याचें तेज क्षीण होत नाहीं.

३. एका खेपेंत, एकाच दिवसांत तो पृथ्वीला प्रदक्षिणा करितो. सर्वदा गमन करणारा, वीर्यवान असा तो रेताचा वर्षाव करीत ओरडतो. देदीप्यमान अग्नि शेंकडो डोळ्यांनीं पहात पहात अरण्यांमध्यें धांवतो. तो जवळच्या शिखरांवर आणि दूरच्या शिखरांवरहि आसन मांडून बसतो.

४. तो महापराक्रमी पुरोहित अग्नि यज्ञगृहांमध्यें घरोघर प्रज्वलित असतो. तो यज्ञासाठीं प्रज्वलित असतो. तो बुद्धिमान आणि कर्तृत्ववान अग्नि अन्नेच्छु उपासकांसाठीं सर्व वस्तुजात मिळवितो. तूप पिणारा हा अतिथि हविर्वाहक आणि बुद्धिमान असा जन्मला आहे.

५. ज्याअर्थीं उपासक मरुतांना अर्पण केल्याप्रमाणें या प्रबल अग्नीला बुद्धिपूर्वक आणि आदरपूर्वक द्रव्यें अर्पण करितात, याचकाला अर्पण केल्याप्रमाणें हवि अर्पण करितात, त्याअर्थीं तो उदार होऊन उपासकांना धन देतो. तो आम्हांला पापांपासून आणि शत्रूंच्या उपद्रवांपासून तारो. तो आम्हांला शापांपासून, दारिद्र्यापासून आणि उपद्रवांपासून तारो.

६. विश्वव्यापी, मोठा, संपन्न आणि दूत असा अग्नि आपल्या हातांत धन धरतो आणि दात्याप्रमाणें मूठ उघडतो. हविरन्नाच्या इच्छेनें जणुं उघडतो. हे अग्ने, हविरन्नाची इच्छा करणाऱ्या प्रत्येक देवांसाठीं तूं हवि वाहून नेतोस. तो प्रत्येक सदाचारी उपासकाला धन देतो. तो धनाचें द्वार उघडतो.

७. अत्यंत सुखकारक असा तो मनुष्यांच्या वसतीमध्यें स्थापिला आहे. यज्ञांमध्यें घरधन्याप्रमाणें तो स्थापिला जातो. मनुष्यांनीं वेदीवर ठेविलेल्या हविरन्नांचा तो अधिपति होय. तो आम्हांला वरुणाच्या, त्या महान देवाच्या उपद्रवांपासून तारो.

८. अग्नि हा धनदाता आणि होता आहे, अशी त्याची स्तुति करितात. अग्नीला सर्वांचा आवडता आणि सर्वज्ञाता समजून हव्यवाहनाच्या कामीं त्याची योजना करितात. सर्व संपत्तीनें युक्त, सर्वज्ञ, पूजनीय, बुद्धिमान अशा अग्नीची होतृकर्मार्थ योजना करतात. धनाची इच्छा करणारे देवभक्त लोक मधुर स्तुतींनीं त्याला सुखवितात.

सूक्त एकशें एकोणतिसावें.

ऋषिः—दिवोदासपुत्र परुच्छेप; देवता–इंद्र; छन्दः–अत्यष्टि.

१. हे यज्ञाकडे जाणाऱ्या इंद्रा, तूं दूर असलेल्या उपासकाकडे यज्ञासाठीं आपला रथ घेऊन जातोस. हे पवित्र इंद्रा, तूं रथ घेऊन जातोस. त्या उपासकाचे मनोरथ तूं ताबडतोब पूर्ण करतोस आणि त्याचें हविरन्न स्वीकारून त्याजवर प्रीति करतोस. तर हे पवित्र आणि शीघ्रगामी इंद्रा, तूं आमचें, आम्हां उपासकांचें हें स्तोत्र स्वीकार.

२. हे इंद्रा, ज्या तुला प्रत्येक लढाईंत शूर योद्धे शत्रूंचा पराजय करण्यासाठीं समर्थ म्हणून बोलावतात. योद्धे पराजय करण्यासाठीं बोलावतात, जो तूं शूरांना विजय संपादून देतोस, जो तूं विद्वान उपासकांना लूट मिळवून देतोस, त्या पराक्रमी आणि महाबलवान अशा तुझी लोक आराधना करतात. लूट मिळवून देणाऱ्या बलवान घोड्याप्रमाणें तूं हें आमचें म्हणणें ऐक.

सूक्त एकशें तिसावें.

ऋषिः—परुच्छेप; देवता–इंद्र; छन्दः– १–९ अत्यष्टि, १० त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, तूं दुरून आम्हाकडे ये. हा सज्जनसंरक्षक अग्नि यज्ञगृहांत जातो त्याप्रमाणें किंवा सज्जनसंरक्षक राजा घरांत जातो त्याप्रमाणें तूं ये. आम्ही सोम काढून आणि हवि घेऊन तुला बोलावतों.

पित्यास पुत्र जेवावयास बोलावतो त्याप्रमाणें थोर असणाऱ्या तुला हवि स्वीकारण्याकरतां आम्ही बोलावतों.

२. हे इंद्रा, ग्राव्यांच्या योगानें पिळून काढिला जात आहे तो हा सोम तूं पी. पोहऱ्यानें भरलेली टाकी बैल पितो, अतिशय तान्हेलेला बैल टाकी पितो तसा तूं सोम पी. हरिद्वर्ण घोडे सूर्याला आणतात किंवा दिवस सूर्याला आणितात तसें अत्यंत बलिष्ठ असणाऱ्या तुला अत्यंत आनंदित करण्याकरतां इकडे घेऊन येवोत.

३. दगडांत झाकलेला, पक्ष्यांच्या पिलाप्रमाणें गूढ स्थळीं ठेवलेला, निधीसारखा असलेला आणि स्वर्गावरून आणलेला सोम इंद्रानें प्राप्त केला. अंगिरसांना अत्यंत आवडणारा वज्रधारी इंद्र अपरिमित दगडांत असणाऱ्या गाईच्या समूहाला प्राप्त करतो, त्याप्रमाणें त्यानें सोम प्राप्त केला. आणि नंतर झाकलेल्या अन्नाचीं द्वारें मोकळीं केलीं, झाकलेल्या अन्नाचीं द्वारें मोकळीं केलीं.

४. इंद्रानें दोन्ही हातांत वज्र घट्ट धरून उदकाप्रमाणें शत्रूवर फेकण्याकरतां शस्त्र तीक्ष्ण केलें. हे इंद्रा, उत्साहशक्तीनें, सैन्याच्या सामर्थ्यानें आणि शरीर सामर्थ्यानें युक्त होत्साता वृत्राला ठार करण्याकरतां आपलें शस्त्र तीक्ष्ण करतोस. सुतार अरण्यांतील झाड तोडतो त्याप्रमाणें किंवा कुऱ्हाडीनें तोडावें त्याप्रमाणें तूं शत्रूंना छेदतोस.

५. हे इंद्रा, नद्यांनीं समुद्राकडे—रथाप्रमाणें शर्यत लागलेल्या रथाप्रमाणें—सहज जावें म्हणून तूं उत्पन्न केलेस. इकडे त्या वहाणाऱ्या नद्यांनीं आपल्याला अखंड उदक प्राप्त केलें. लोकांना कामधेनु पाहिजे तें देणाऱ्या झाल्या. लोकांना पाहिजे तें देणाऱ्या झाल्या

६. हे इंद्रा, हें तुझें स्तोत्र धनेच्छु भक्तांनीं कुशल कारागिरांनीं रथ तयार करावा त्याप्रमाणें तयार केलें आहे. तुला आनंदित करीत आहेत. हे मेधावी इंद्रा, शीघ्रगामी घोड्याला बळ यावें म्हणून त्यानें लुटी मिळवाव्या म्हणून जसा उत्साह उत्पन्न करावा तसा युद्धांत वेगशाली अशा तुला उत्साह उत्पन्न केला आहे.

७. हे विजयशील इंद्रा, तूं हवि देणाऱ्या थोर दिवोदासाकरतां नव्वद नगरें फोडलीस. स्वतःच्या सामर्थ्यानें दिवोदासाला विपुल संपत्ति देणारा, सामर्थ्यानें सर्व संपत्ति देणारा व उग्र असा तूं हे नर्तनशील इंद्रा, दात्या दिवोदासाकरतां वज्रानें शंबराला पर्वताच्या खालीं आणून ठार केलेस.

८. इंद्र युद्धांत आर्य भक्ताचें संरक्षण करीत असतो. शेंकडो प्रकारें संरक्षण करणारा सर्व युद्धांत संरक्षण करतो. तसेंच अत्यंत सुखदायक संग्रामांत संरक्षण करतो. तो कर्महीन लोकांना शिक्षा करून काळ्या कातडीच्या लोकांना ठार करतो. तसेंच सर्व हपापलेल्या लोकांना जाळून टाकतो. सर्व क्रूर शत्रूंना जाळून टाकतो.

९. बलिष्ठ झालेल्या इंद्रानें सूर्याच्या (रथाचें) चाक फेंकून दिलें. अरुण इंद्रानें पहांटे (चाकाचा) शब्द हरण केला. समर्थ इंद्रानें सर्व ताब्यांत घेतलें. हे ज्ञात्य इंद्रा, उशना आमच्या संरक्षणाकरतां दुरूनहि येतो. तो भाग्यशाली आम्हांला सर्व मानवी सुखें देवो. नेहमीं आह्मांला मानवी सुखें देवो.

१०. तर हे महापराक्रमी आणि नगरभेत्त्या इंद्रा, तूं ह्या नवीन स्तोत्रांनीं संतुष्ट होऊन आमचें सुखकारक साहाय्य करून रक्षण कर. दिवोदासाच्या वंशजांनीं स्तविलेला तूं, आदित्य दिवस समृद्ध होतो, त्याप्रमाणें समृद्ध हो.

---

८ टीप—अंशुमती नदीच्या तीरावर कृष्ण नांवाचा असुर होता आणि तो रंगानेंहि काळाच होता. तो आपल्या दहा हजार अनुयायांसह तेथील लोकांना त्रास देत होता. तेथें बृहस्पतीनें प्रेरणा दिलेला इंद्र मरुतांसह गेला आणि त्याचें कातडें काढून त्याच्या अनुयायांसह त्याला ठार केलें. याकरता ८.९६.१३ हा मंत्र व त्यावरील टीप पहा.

९ टीपः—कांहीं असुर इंद्राच्या वज्रानें आपला वध होऊं नये म्हणून ब्रह्म्यापासून वर मिळविते झाले. आणि उन्मत्तपणें वागूं लागले. त्यांना ठार करण्याकरतां इंद्रानें सूर्याच्या रथाचें चाक घेतलें आणि त्याला ठार केलें. अशी एक कथा आहे.त्या कथला उद्देशून अनेक ठिकाणीं उल्लेख आला आहे.

सूक्त एकशें एकतिसावें.

ऋषिः--परुच्छेपः; देवता-इंद्र; छन्दः--अत्यष्टिः.

१. बलवान द्युलोक इंद्रालाच नमला. विस्तीर्ण पृथ्वी स्तोत्रें म्हणून इंद्राला नमते. संपत्तीच्या प्राप्तीनें युक्त असणारे प्रेमळ सर्व देव इंद्राला पुढारी करतात. मनुष्यांचीं सर्व सवनें आणि देणग्या इंद्राकरतांच असोत.

२. हे इंद्रा, सर्वांना सारख्या असणाऱ्या तुला एकस्यालाच कामपूरक म्हणून सर्व यज्ञांत वेगवेगळे

भजतात. सुख इच्छिणारे भक्त वेगवेगळया तऱ्हेनें तुझ्याकडेच येतात. संकटाच्या पार नेणाऱ्या नावेप्रमाणें असणाऱ्या त्या तुलाच आम्ही बलाच्या मुख्य स्थानीं स्थापन करतों. आम्ही लोक यज्ञांनीं इंद्राला आळवतों आणि स्तोत्रांनीं इंद्राचें ध्यान करतां.

३. हे इंद्रा, हवि देणारे आणि साहाय्य इच्छिणारे नवगबायको तुला उद्देशून गाईंचे गौळवाडे मिळावेत म्हणून यज्ञ करतात. आहुति देऊन मनःपूर्वक तुझी सेवा करतात. कारण गाई इच्छिणाऱ्या आणि स्वर्गी जाणाऱ्या दोघा जणांना तूं योग्य ठिकाणीं नेतोस. हे इंद्रा, बळवान आणि तुझ्याबरोबर असणारें वज्र तूं प्रकट करतोस. तूं वज्र प्रकट करतोस.

४. हे इंद्रा, तूं जीं शरदाचीं नगरें फोडलींस तो तुझा पराक्रम सर्व लोक जाणतात. हे बलाधिपते इंद्रा, तूं तेथल्या लोकांचा पराभव केलास आणि यज्ञ न करणाऱ्या त्या माणसाला तूं शिक्षा केलीस. तूं विस्तीर्ण पृथ्वी आणि हें उदक हरण केलेंस, आनंदानें हरण केलेंस.

५. हे पराक्रमी इंद्रा, तूं सोमाच्या मदांत भक्तांचें रक्षण करतोस, तुझें मित्रत्व इच्छिणारांचें तूं संरक्षण करतोस म्हणूनच तुझे पराक्रम वरचेवर गायले जातात. तूं त्यांना युद्धांत जय मिळावा म्हणून सिंहनाद करतोस. तुझे लोक वेगवेगळया प्रकारची समृद्धि प्राप्त करतात. अन्न इच्छिणारे समृद्धि प्राप्त करतात.

६. इंद्र ह्या प्रभातकाळीं आमच्या यज्ञाचें सेवन करो. हे इंद्रा, ऋत्विजांनीं सत्कारानें दिलेल्या हवीचा तूं स्वीकार कर. द्रव्य मिळावें म्हणून आम्ही केलेला धावा तूं ध्यानांत घे. हे वज्रधरा इंद्रा, ज्याअर्थीं तूं शत्रूंना ठार करण्यास समर्थ आहेस असें दिसते त्यापेक्षा अत्यंत नवा कवि जो मी त्याचें स्तोत्र तूं ऐक, अगदीं नव्या कवींचें स्तोत्र ऐक.

७. तर हे अत्यंत प्रबळ झालेल्या इंद्रा, उत्कर्ष पावलेला आणि आमच्यावर प्रेम करणारा तूं त्या शत्रूभूत मनुष्याला वज्रानें ठार कर. जो आमच्याबद्दल वाईट वर्तन करतो त्याला तूं ठार कर. चांगल्या प्रकारें ऐकणारा तूं आमचें स्तोत्र ऐक. वाटेंतील दुष्ट लोकांच्या बुद्धीप्रमाणें सर्व दुर्बुद्धि आमच्यापासून दूर होवो.

सूक्त एकशें बत्तिसावें.

ऋषिः—परुच्छेप; देवता–इंद्र; छंदः—अत्यष्टि.

१. हे मघवन, तूं रक्षण केलेले आणि तुझें साहाय्य असलेले आम्ही सेनायुक्त शत्रूंचा ह्या युद्धांत पराभव करावा. जिंकण्याकरतां येणारांना आम्ही जिंकावें. ह्या नजीकच्या दिवशीं तूं सोमरस तयार करणाराच्या बाजून ऐस. लूट मिळवूं इच्छिणारे आम्ही युद्धांत यज्ञानें संपत्ति मिळवूं, आम्ही युद्धांत संपत्ति मिळवूं.

२. सुख मिळवून देणाऱ्या युद्धांत प्रातःकालीं जागृत होणाऱ्या शूरावर उघड रीतीनें चालून येणाऱ्या शत्रूंना तूं ठार करतोस, इंद्र भक्ताच्या चालून येणाऱ्या शत्रूंना जसा सापडेल तसा ठार करतो, म्हणून तो नमस्कारार्ह व प्रशंसनीय आहे. हे इंद्रा, तुझ्या देणग्या आमच्यापाशीं एकवटोत. तुज कल्याणकारकाचीं दानें कल्याणकारक होवोत.

३. हे इंद्रा, ज्या यज्ञांत ऋत्विज उत्तम स्थान तयार करतात, तेथें असलेले उज्ज्वल अन्न पूर्वीप्रमाणें तुझेंच आहे. यज्ञाचें उत्कृष्ट स्थान तूं स्वीकारीत असतोस यामुळेंच दोनहि लोकांत सूर्यकिरणांनीं तुला पहातात. तो गाई शोधणारा इंद्र बंधुपणा प्राप्त झालेल्या लोकांकरतां सर्व जाणतो. गाई शोधणारा (उदक शोधणारा) इंद्र सर्व जाणतो.

४. हे इंद्रा, हा तुझा पराक्रम पूर्वीप्रमाणें आतांहि वर्णनीय आहे, कीं तूं अंगिरसासाठीं गाईंचा गोठा उघडता झालास. हे इंद्रा, तूं गाईंचा गोठा उघडून गाई देता झालास. तूं ऋषींकरितां ज्या रीतीनें युद्ध करतोस आणि जिंकतोस त्याप्रमाणें आमच्याकरतां युद्ध कर आणि जिंक. उपासना न करणाऱ्या रागीट शत्रूला तूं माझ्या ताब्यांत आण, नास्तिकाला माझ्या ताब्यांत आण.

५. शूर इंद्र आपल्या बुद्धिमत्तेनें सर्व लोकांना पाहवितो म्हणून अन्नेच्छु भक्त युद्धप्रसंग आला असतां शत्रूंना ठार करतात. म्हणूनच लूट इच्छिणारे लोक यजन करतात. संकाटकाळीं त्यालाच सामर्थ्यानुसार मुलाबाळा सहित हवि देऊन पूजितात. भक्त इंद्राच्या लोकीं राहतात. भक्त देवलोकीं राहतात.

६. हे इंद्रापर्वत हो, पुढें होऊन लढणारे तुम्ही जो आमच्याशीं लढूं इच्छील त्याला त्याला तुम्ही ठार करा, त्याला त्याला वज्रानें मारा. जें वज्र नष्ट झालेल्यासाहि मारूं इच्छितें तें गहन स्थलींहि जातें. हे शूरा,

तुं आमच्या शत्रूंना सर्व बाजूंनीं विदारून टाक. सर्व बाजूंनीं विदारून टाक.

सूक्त एकशें तेहतिसावें.

ऋषिः—परुच्छेप; देवता—इंद्र; छंदः—१ त्रिष्टुभ,२–४ अनुष्टुभ, ५ गायत्री, ६ धृति, ७ अत्यष्टि.

१. हे इंद्रा, जेथें हुडकून शत्रूंना ठार करून स्मशानाच्या भोंवती फेकलें जातें तेथें मी दोन्ही द्यावापृथ्वींना यज्ञानें पावन करतों. आणि इंद्रद्रोही मोठ्या असुरांना जाळून टाकतों.

२. हे वज्रधरा इंद्रा, तूं हुडकून काढून मायावी शत्रूंचीं डोकीं पादत्राण घातलेल्या पायानें तूं ठार कर, मोठें पादत्राण घातलेल्या पायानें तूं ठार कर.

३. हे मघवन, तूं ह्या मायावी राक्षसांना वाईट मसणांत, मोठ्या वाईट मसणांत ठार कर.

४. हे इंद्रा, तूं यांच्यापैकीं दीडशे लोकांना हुडकून ठार केलेंस. तें तुझें कृत्य मोठें समजतात. लहान असूनहि मोठें समजतात.

५. हे इंद्रा, किंचित पिंगट रंगाचा आणि अतिशय ओरडणारा जो पिशाच त्याला तूं मारून टाक. सर्व राक्षसांना तूं मारून ठाक.

६. हे इंद्रा, तूं मोठ्या मेघाला फोड, आमची प्रार्थना ऐक. हे वज्रधरा इंद्रा, पृथ्वीप्रमाणें द्युलोकहि भीतीनें संतप्त झाला आहे. हे वज्रधरा, अग्नीमुळें जणूं भीतीनें संतप्त झाला आहे. अत्यंत बलवान असणारा तूं बळकट व उग्र शस्त्रें घेऊन धांवत असतोस, हे अप्रतिबद्ध शूरा, भक्तांचा वध न करणारा तूं एकवीस योध्यांसह धांवत असतोस. एकवीस योध्यासह तूं धांवत असतोस.

७. हे इंद्रा, सोम काढणारा भक्त घर प्राप्त करतो. सोमयाग करणारा भक्त अनेक द्वेष्ट्यांचा नाश करतो. देवांच्या द्वेष्ट्याला जिंकतो. सोम काढणारा भक्त वेढ्यांत न सांपडतां बलानें हजारांना जिंकतो, सोम काढणाऱ्या भक्तालाच इंद्र विपुल संपत्ति देतो, इंद्र विपुल संपत्ति देतो.

सूक्त एकशें चवातिसावें.

ऋषिः—परुच्छेप; देवता—वायु; छंदः—अत्यष्टि.

१. हे वायो, तुझे चपळ आणि वेगवान घोडे तुला प्रथम हविरन्नाकडे सोम पिण्याकरतां घेऊन येवोत. सोम प्रथम पिण्यासाठीं घेऊन येवोत. तुला जाणणारी आमची श्रेष्ठ व मधुर स्तुति तुझ्या मनापुढें असो. हे वायो, नियुत नांवाचे घोडे जोडलेल्या रथानें यज्ञ स्वीकारण्याकरतां ये. आम्हाला इष्ट देण्याकरतां ये.

२. हे वायो, मादक, आपलें कार्य करणारे, चांगले तयार केलेले, तेजस्वी गोरसांनीं मिसळून तयार केलेले तेजस्वी सोमरस तुला आनंदित करोत. कारण हे वायो, आमच्या यज्ञांत येण्याविषयीं उत्साहयुक्त अशा तुला हवि स्वीकारण्याकरतां यज्ञांत यावेस म्हणून नियुत नांवाचे घोडे येऊन मिळतात. आणि ऋत्विज तुझी प्रार्थना करतात. प्रार्थना करतात.

३. वायु तांबडे घोडे जोडतो, वायु आरक्तवर्णाचें घोडे जोडतो, वायु रथ ओढण्याकरतां धुरेला चपळ घोडे जोडतो. धुरा वहाण्याकरतां चांगले घोडे जोडतो. हे वायो, जार निजलेल्या स्त्रीस जागृत करतो त्याप्रमाणें तूं यजमानाला जागृत कर. अन्न प्राप्त होण्याकरतां उषा प्रकाशित कर आणि द्यावापृथ्वी दिसूं दे. उषा प्रकाशित कर.

४. हे वायो, तुजसाठीं सुंदर उषा दूर अंतरावर आपल्या आश्चर्यकारक किरणावर मनोहर वस्त्रें विणतात. आपल्या नव्या किरणावर विचित्र रंगाचीं वस्त्रें विणतात. तुझ्याकरतां अमृत उत्पन्न करणारी धेनु सर्व संपत्ति उत्पन्न करते. हे वायो, तूं नद्या वहाव्यात म्हणून द्युलोकांतून नद्यासाठीं मरुतांना उत्पन्न केलें.

५. हे वायो, तुझ्याकरतां स्वच्छ, तेजस्वी, वेगशाली आणि उग्र सोम तुला आनंद व्हावा म्हणून यज्ञांत जातात. पाण्याच्या मेघाची इच्छा करतात. हे वायो, भजनीय असणाऱ्या तुला अत्यंत भ्यालेला आणि क्षीण झालेला उपासक दुर्जन नष्ट व्हावेत म्हणून तुझी स्तुति करतो. हे वायो, तूं हवि घेऊन सर्व जगापासून आमचें संरक्षण कर. सर्व आसुरी सामर्थ्यापासून सहज आमचें संरक्षण कर.

६. हे वायो, मुख्य असणारा तूं ह्या सोमाचें पहिलें पान करण्यास योग्य आहेस, पिळून काढलेला सोम पिण्यास योग्य आहेस. तूं धांवा करणाऱ्या आणि निष्पाप लोकांचा हवि स्वीकारतोस. सर्वच गाई तुझ्याकरतां दूध देतात, घृतयुक्त दूध देतात.

सूक्त एकशें पसतिसावें.

ऋषिः—परुच्छेप; देवता—वायु; छंदः—अत्यष्टि.

१. हे वायो, तूं हजारो नियुत नांवाच्या घोड्यांनीं हविभक्षणाकरतां पसरलेल्या दर्भाकडे ये. शेकडो घोड्यांनीं तूं ये. नियुत घोड्यांसह असणाऱ्या तुज देवाला प्रथम पिण्याकरतां चांगले सोम तयार केले आहेत, हे सोमरस तुला माद यावा म्हणून तुझी वाट पहात आहेत, तुझी वाट पहात आहेत.

२. हे वायो, हा तुझ्यासाठीं ग्राव्यांनीं शुद्ध केलेला सोमरस स्पृहणीय तेज धारण करणारा भांड्यांत पडत आहे. स्पृहणीय तेजानें युक्त असा पडत आहे. मनुष्यांमध्यें आणि देवांमध्यें हा सोमाचा भाग अर्पण केला आहे. हे वायो, नियुत घोडे घे आणि ये. तूं आमची इच्छा करीत प्रेमानें ये, आमची इच्छा करीत ये.

३. हे वायो, तूं आपल्या शेंकडो घोड्यांनीं आणि हजारो घोड्यांनीं आमच्या यज्ञांत हवि भक्षण करण्याकरतां ये. हे वायो, हवि भक्षण करण्याकरतां ये. सूर्य उगवतांच तेजोयुक्त झालेला आणि वेळेवर अर्पण केलेला हा सोम तुझा भाग आहे. अध्वर्यूंनीं आणलेले सोम अर्पण केले आहेत. तेजस्वी सोम अर्पण केले आहेत.

४. हे वायो व इंद्रा, वायूचे घोडे जोडलेला रथ तुम्हाला आमचें रक्षण करण्याकरतां आणि चांगले तयार केलेले हवि भक्षण करण्याकरतां घेऊन येवो. हे वायो, हवि भक्षण करण्याकरतां घेऊन येवो. तुम्ही मधुर सोम प्या. तुम्हाला प्रथम पिण्यास दिला आहे. हे वायो, तूं आणि इंद्र आल्हादक संपत्ति घेऊन या. तुम्ही संपत्ति घेऊन या.

५. हे इंद्रवायूंनो, आमचीं स्तोत्रें तुम्हांला यज्ञाकडे वळवोत. ह्या बलशाली सोमाला, चपळ व बलवान घोड्याप्रमाणें अध्वर्यु स्वच्छ करीत आहेत. तरी आमच्यावर कृपा करणारे तुम्ही त्यांचा सोम प्या आणि आमचें रक्षण करण्याकरतां इकडे या. हे अन्नदात्यांनो, ग्राव्यांनीं काढलेलेला सोम प्या, मद येण्याकरतां सोम प्या

६. हे इंद्रावायूंनो, पाण्यांत काढलेले आणि अध्वर्यूंनीं तयार केलेले सोम तुमच्याकरतां ठेवले आहेत. हे वायो, तेजस्वी सोमरस तयार आहेत. सत्वर माद आणणारा सोम तुम्हाकरतां गाळण्यांत ओतला जात आहे. तुमची इच्छा करणारे सोमरस मेंढराच्या लोकरींतून ओतले जात आहेत, लोकरींतून ओतले जात आहेत.

७. हे वायो, निजून राहणाऱ्या अनेक लोकांना तूं सोडून ये. जेथें ग्राव्याचा शब्द होतो तेथें तुम्ही या. त्या घरीं तूं आणि इंद्र यांनीं यावें. जेथें तुमची स्तुति दृष्टीस पडत असेल आणि तूप वहात असेल त्या यज्ञांत सर्व घोडे जोडलेल्या रथानें या. त्या यज्ञांत या.

८. हे इंद्रवायूंनो, तुम्ही येथेंच सोमाची आहुति ग्रहण करा, कीं जेते पर्वतावर असणाऱ्या ज्या सोमाला प्राप्त करीत असतात. ते विजय मिळवणारे आमचे असोत. हे इंद्रवायूनो, गाई एकदम वितात. धान्य पक्व होतें. हे वायो, तुझ्या धेनु क्षीण होत नाहींत. तुझ्या धेनु नाश पावत नाहींत.

९. हे शुभ वायो, तुझे जे तरुण आणि बलवान् घोडे आहेत. ते तुला दोन्ही नद्यांमधून (द्यावापृथ्वीमधून) सहज उडवून नेतात. अतिशय मोठे, बळवान घोडे सहज उडवून नेतात. ते निर्जल प्रदेशांतहि नाश न पावणारे, शीघ्रगति आणि अनिंद्य होत. सूर्याच्या किरणाप्रमाणें थांबविण्यास कठिण, दोन्ही हातांनीं थांबाविण्यास कठिण होत.

सूक्त एकशें छत्तिसावें.

ऋषिः—परुच्छेप; देवता–१–५ मित्रावरूण, ६–७ मंत्रोक्त देवता; छंदः—१–६अत्यष्टि, ७ त्रिष्टुभ.

१. हे ऋत्विजांनो, नित्य आणि सुखदायक मित्रावरुणांना उत्कृष्ट आणि अतिशय मोठें स्तोत्र, हवि आणि बुद्धि अर्पण करा. ते संराट् उदकाचा वर्षाव करणारे आणि प्रत्येक यज्ञांत प्रशंसा केले जाणारे आहेत. ह्यांचें बळ कोणाकडूनहि हिरावलें जात नाहीं, देवत्वाहि हिरावून घेतलें जात नाहीं.

२. गमनशील श्रेष्ठ उषा विस्तीर्ण यज्ञाकरतां दिसूं लागली. सूर्याचा मार्ग किरणांनीं प्रकाशूं लागला. भगाच्या किरणांनीं डोळ्यांना दिसूं लागलें. मित्र, अर्यमन आणि वरुण यांचें घर प्रकाशित झालें. तर मित्रावरुण आम्हांला विपुल आणि प्रशंसनीय अन्न देवोत. प्रशंसनीय विपुल अन्न देवोत.

३. तेजस्वी, पृथ्वीला धारण करणारे आणि सुखयुक्त मित्रावरुण पृथ्वीवर दररोज प्राप्त होतात, जागृत करणारे ते दररोज प्राप्त होवोत. अदितिपुत्र आणि दानाधिपति मित्रावरुण उत्कट बळ प्राप्त करतात. त्यापैकीं मित्र आणि वरुण लोकांना कामाला लावतात, अर्यमा लोकांना कामाला लावतो.

४. हा सोम, मित्र आणि वरुण यांना अत्यंत सुखदायक होतो. चमसांमध्यें उपभोग्य होतो. देवांतला देव जो सोम तो उपभोग्य होतो. त्याला एक विचाराचे सर्व देव आज सेवन करोत. हे राजा मित्रावरुणांनो आम्ही जें इच्छितों तें तुम्ही करा. हे यज्ञयुक्तहो, आम्ही जें इच्छितों तें तुम्ही करा.

५. जो भक्त मित्रावरुणांची सेवा करतो, त्या शत्रुरहिताचें पातकापासून तुम्ही संरक्षण करा. हवि देऊन भजणाऱ्या मनुष्याला पापापासून ते रक्षितात. सरळपणानें वागणाऱ्या त्या माणसाचें कर्माला अनुसरून अर्यमा रक्षण करतो. जो मनुष्य यांची उपासना स्तोत्रांनीं अलंकृत करतो आणि जो गाण्यांनीं अलंकृत करतो, त्याचें रक्षण करतो.

६. महान सूर्याला आणि द्यावापृथ्वीला मी स्तवितों. मित्राला आणि उदार वरुणाला मी स्तवितों. सुखदायक आणि उदार अशा त्याला मी स्तवितों. हे स्तोत्या, तूं इंद्र, अग्नि, तेजस्वी अर्यमा आणि भग यांची स्तुति कर. आम्ही चिरकाल जिवंत राहून संततीनें युक्त होऊं. सोमाच्या साहाय्यानें युक्त होऊं.

७. इंद्रयुक्त असणारे आम्ही देवांच्या साहाय्यानें आणि मरुतांच्या योगानें कीर्तिमान मानले जाऊं. अग्नि मित्र आणि वरुण आम्हाला सुख देवोत. आम्ही धनवान होऊन त्या सुखाचा अनुभव घ्यावा.

सूक्त एकशें सदातिसावें.

ऋषिः—परुच्छेप; देवता-मित्रावरुण; छंदः-अतिशक्करी.

१. हे मित्रावरुणहो, तुम्ही या. हे मदकर सोमरस दगडांनीं काढून गाईच्या दुधांत मिसळले आहेत. हे सोमरस मदकारी आहेत. हे द्युलोकवासी राजा मित्रावरुणांनो, तुम्ही आमच्याकडे आमच्या यज्ञांत या. हे मित्रावरुणांनो, हे गोरसमिश्रित सोम तुमचे आहेत. हे गोरसयुक्त तेजस्वी सोम तुमचे आहेत.

२. हे मित्रावरुणांनो, तुम्ही या. सोमरस दह्यांत मिसळले आहेत. गाळलेले सोमरस दह्यांत मिसळले आहेत. सूर्याच्या किरणांबरोबर उषा प्रकाशल्यावर तुमच्याकरतां सोम पिळला आहे. मित्र व वरुण यांना पिण्याकरतां सोम पिळला आहे. सत्यस्वरूप देवाला पिण्याकरतां सोम पिळला आहे.

३. हे मित्रावरुणांनो, पुष्कळ दूध देणाऱ्या गाईची धार काढावी त्याप्रमाणें अध्वर्यु दगडांनीं तुमचा सोम कुटीत आहेत. सोमाला ग्राव्यांनीं कुटीत आहेत. तर येथें आमच्याकडे सोम पिण्याकरतां या. हा तुमच्याकरतां लोकांनीं पिळलेला सोम आहे. पिण्याकरतां पिळलेला सोमरस आहे.

सूक्त एकशें अडतिसावें.

ऋषिः—परुच्छेप; देवताः—पूषन; छन्दः—अत्यष्टि.

१. अनेकाकरतां उत्पन्न होणाऱ्या पूषनचें महत्व वर्णन केलें जात आहे. ह्या बलवानाचें स्तोत्र थांबत नाहीं, ह्याचें स्तोत्र थांबत नाहीं. सुखाची इच्छा करणारा मी सुखदायक आणि रक्षणाकरतां जवळ असणाऱ्या पूषनची स्तुति करतों. कीं जो पूजनीय पूषा सर्वांचें मन आपणाकडे ओढून घेतो, पूजनीय देव ओढून घेतो.

२. हे पूषन, धावण्याला चलाख घोड्याला उत्साहित करावें त्याप्रमाणें तूं आम्हाला संग्रामांतून पार पाडावेस म्हणून, उंटाप्रमाणें पार पाडावेस म्हणून आम्ही तुला स्तोत्रांनीं स्तवीत आहों. सुख देणाऱ्या देवाला मित्रत्वाकरतां मी बोलावीत आहें, तर आमच्या स्तोत्रांना तूं समृद्ध कर, युद्धांत समृद्ध कर.

३. हे पूषन, ज्या तुझ्या मैत्रींत कर्मानेंच प्रसन्न झालेले स्तोते तुझ्या साहाय्यानें उपभोग भोगतात. कर्मानें उपभोग घेतात, त्या अत्यंत नव्या लक्षावधि संपत्तीची आम्ही इच्छा करतों. हे बहुस्तुता, तूं न रागावतां आमचा पुढारी हो. प्रत्येकं युद्धांत पुढारी हो.

४. हे अजाश्व पूषन, तूं आम्हांला ह्या संपत्तीचा लाभ व्हावा म्हणून न रागावतां सरळ देणारा हो. अन्नेच्छु अशा आम्हाला हे अजाश्वा, देणारा हो. हे शत्रूंचा नाश करणाऱ्या, चांगल्या स्तोत्रांनीं तुला आम्ही आपणाकडे वळवीत आहों. तर हे तेजस्वी पूषन, तुझी मी अवहेलना करीत नाहीं. तुझें सख्य मी झाकीत नाहीं.

सूक्त एकशें एकुणचाळिसावें.

ऋषिः—परुच्छेप; देवता-१ विश्वेदेव, २ मित्रावरुण, ३–५ अश्वी, ६ इन्द्र, ७ अग्नि, ८मरुत, ९इन्द्राग्नी, १० बृहस्पति, ११ विश्वेदेव; छन्दः—५ बृहती, ११ त्रिष्टुभ, अवशिष्ठ अत्यष्टि.

१. मी विधीनें अग्नीला पुढें स्थापन केलें आहे. त्या मरुतांच्या दिव्य संघाला आम्ही भजतों. इंद्रवायूंना आम्ही भजतों. ज्याअर्थी तेजस्वी यज्ञांत आमची अत्यंत नवी स्तुति म्हटली जात आहे त्याअर्थी आमचीं स्तोत्रें देवांच्याजवळ जावोत. अगदीं जवळ जावोत आणि देव ऐकोत.

२. हे मित्रावरुणहो, आदित्याच्या द्वारा स्वतःच्या तेजानें तुम्ही तें नश्वर उदक सर्व ठिकाणातून शोषून घेतां. बलिष्ठाच्या स्वकीय तेजानें तुम्ही शोषून घेता. हे मित्रावरुणांनो, तुमचे हिरण्मय रूप यज्ञगृहांत कर्मांनीं, मनानें आणि स्वतःच्या इंद्रियांनीं आम्ही पहातों. सोमाला स्वतःच्या इंद्रियांनीं आम्ही पहातों.

३. हे अश्विहो, तुम्हाला बोलावणारे भक्त लोक जणूं काय तुमची कीर्ति ऐकवीत स्तोत्रांनीं तुम्हाला बोलावीत असतात. हे सर्वधन अश्विहो, लोक तुमचें सर्व धन आणि अन्न प्राप्त करतात. हे शत्रुनाशक अश्विहो, तुमच्या हिरण्मय रथाच्या धांवा पाझरत असतात.

४. हे दर्शनीय अश्विहो, सर्व जाणतात कीं तुम्ही स्वर्गाला उघडता. स्वर्गाला जाण्यासाठीं तुमचे रथाचे घोडे जोडले जातात. स्वर्गाला जाण्याकरतां सुरक्षित घोडे जोडले जातात. हे दर्शनीय अश्विहो, तुमच्या सारथ्याच्या तीन बैठकीच्या सोनेरी रथांत आकाशांतून जणूं मार्ग दाखवीत जाणाऱ्या, जोरानें लोकावर सत्ता चालवणाऱ्या तुम्हाला आम्ही बसवतों.

५. हे पराक्रमधन अश्विहो, तुम्ही आपल्या पराक्रमांनीं आम्हांला रात्रंदिवस द्या. तुमची देणगी कमी न पडो. आम्हांला तुमची देणगी कमी न पडो.

६. हे बलिष्ठ इंद्रा, त्वां वीरानें पिण्यास योग्य, पाऊस पाडणारे, दगडांनीं काढलेले हे सोमरस आहेत. तुझ्याकरतां वर्षाव करणारे सोमरस तयार केले आहेत. ते आम्हांला आश्चर्यकारक व विपुल धन देण्यासाठीं तुला उत्साहित करोत. हे स्तुतिप्रिया, आमच्या स्तोत्रांनीं स्तुति केलेला तूं ये. अत्यंत सुख देणारा तूं ये.

७. हे अग्ने, स्तुति केलेला तूं आमची स्तुति प्रामुख्यानें ऐक. आणि यज्ञार्ह देवांना तूं सांग. यज्ञार्ह तेजस्वी देवांना तूं सांग. हे देवहो, तुम्ही जी ती गाय अंगिरांना दिली आणि तिची धार अर्यमा आणि यजमान यांनीं मिळून काढली, त्या धेनूला मी आणि ह्या अर्यमानें जाणलें. (अशा धेनूची अग्नीकरतां धार काढली जात आहे.)

८. हे मरुतांनो, तुमचें नेहेमीं असणारें तें उज्ज्वल साहाय्य आम्हांपासून दूर न होवो, कधीं नष्ट न होवो. आम्ही मरण्यापूर्वीं नष्ट न होवो. जें तुमचें आश्चर्यकारक नवें व अमर धन दर युगांत गाजतें आणि जें अविनाशीं असतें, जें अविनाशी असतें, तें हे मरुतांनो, तुम्ही आम्हाला द्या.

९. दध्यङ्, पुरातन अंगिरा, प्रियमेध, कण्व, अत्रि आणि मनु हे माझा जन्म जाणतात. ते पूर्वीचे ऋषि आणि मनु माझा जन्म जाणतात. त्यांचा देवाशीं दीर्घकाल संबंध होता आणि आमचा त्यांच्याशीं संबंध आहे. त्यांच्या योग्यतेनुसार मी मोठी स्तुति करीत आहे. इंद्राग्नींना स्तोत्रानें मी स्तवीत आहें.

१०. होता यज्ञ करो. उदार देव उत्कृष्ट हवि स्वीकारतील. इच्छुक मंत्राधिपति सोमांनीं हवन करतो. सर्वांना हवेसे वाटणाऱ्या सोमांनीं यजन करतो. आम्ही कुटणाऱ्या दगडांचा आवाज आपणहून लांबपर्यंत ऐकतो. कर्तृत्ववान होता उदक प्राप्त करतो, पुष्कळ घरें प्राप्त करतो.

११. हे देवहो, तुम्ही द्युलोकांत अकरा जण राहात आहां आणि पृथ्वीवर अकरा जण राहात आहा आणि अन्तरिक्षांत महत्वानें अकरा जण राहत आहेत. ते हे देवहो, तुम्ही आमचा यज्ञ स्वीकारा.

सूक्त एकशें चाळिसावें.

ऋषिः—दीर्घतमस औचथ्य; देवता-अग्नि; छंदः—१-११ जगती, १२-१३ त्रिष्टुभ्, १० त्रिष्टुभ् किंवा जगती.

१. हे अध्वर्यो, वेदीवर बसणाऱ्या, स्थानप्रिय आणि चांगला प्रकाशणाऱ्या अग्नीला हविप्रमाणें आसन दे. शुद्ध, तेजोरथ, तेजस्वी आणि अंधकार नाहींसा करणाऱ्या अग्नीला वस्त्रानें झाकावें त्याप्रमाणें स्तोत्रानें व्यापून टाक.

२. दोन अरणीपासून जन्मलेल्या अग्नीला तीन प्रकारचें (चरु, पुरोडाश आणि सोम) अन्न प्राप्त होतें. तो खाल्लेलें अन्न एक वर्षांत पुनः वाढवितो. तो बल-

---

७. टीपः—अंगिरसांनीं देवांना प्रसन्न करून यज्ञाकरतां गाय मागितली. त्यांनीं प्रसन्न होऊन कामधेनु दिली. पण त्यांना धार काढतां येईना म्हणून त्यांनीं अर्यमनची प्रार्थना केली. तेव्हां त्यानें येऊन धार काढली. या कथेस उद्देशून वरील उल्लेख आहे.

शाली अग्नि एका जिव्हेनें आणि मुखानें प्रबळ होतो आणि दुसऱ्या रूपानें तो प्रबळ होत्साता अरण्यें जाळतो.

३. याचे काळें झालेले, एकत्र असणारें आईबाप हलूं लागतात आणि पूर्वेकडे ज्वाला टाकणाऱ्या, नाश करणाऱ्या, झटकन बाहेर पडणाऱ्या, थोड्या सहवासास योग्य, संरक्षणीय आणि पित्याचा उत्कर्ष करणाऱ्या मुलासारख्या अग्नीकडे आईबाप येतात.

४. मनन करणाऱ्या आणि मानवांची इच्छा करणाऱ्या भक्तांसाठीं मुक्त करूं इच्छिणारे, चलद् धावणारे, काळ्या मार्गानें चालणारे, वेगवान, भिन्न रंगाचे, गमनशील, चपळ आणि वातवेगी अग्नीच्या ज्वाला यज्ञाला जोडल्या आहेत.

५. जेव्हां तो पृथ्वीला चाटीत चाटीत, फुसफुसत, भुगुभुगु असा ध्वनि करीस आणि गर्जत जातो, तेव्हां त्याचें तमोनाशक स्फुलिंग कृष्णवर्ण, महान, आणि व्यापक असें रूप प्रकट करीत सहज इकडेतिकडे जात असतात.

६. जो अग्नि पिंगट रंगाच्या ओषधींत आणि लांकडांत जणूं काय त्यांना भूषित करीत प्रवेश करतो. खोंडाप्रमाणें पुनःपुनः ओरडत ओषधीकडे जातो. आणि प्रज्वालित होत शरीर प्रकाशित करतो. दुर्दम्य अशा भयंकर प्राण्याप्रमाणें शिंगें (ज्वाला) हलवूं लागतो—

७. तो एकत्र असुलेल्या आणि विस्तारलेल्या ज्वाला आपल्यांत घेतो. ज्ञात्या अग्नींत ज्वाला निजतात व त्या पुनः वाढतात. आणि अग्नींप्रत प्राप्त होतात. त्या ज्वाला द्यावापृथ्वींत अग्नीसह वेगळें रूप धारण करतात.

८. त्याला लांबलचक केश असलेल्या स्त्रिया (ज्वाला) आलिंगन देतात, मेलेल्या त्या अग्नीकरतां पुनः उठून उभ्या राहतात. त्यांचें म्हातारपण नाहींसें करून त्यांच्यांत श्रेष्ठ व अमर असा प्राण आणि प्राणधारणसामर्थ्य उत्पन्न करून अग्नि गर्जत येतो.

९. (दावाग्नीची स्तुति) मातृभूत पृथ्वीचें (तरुगुल्मादिक) प्रावरण चाटीत (जाळीत) मोठ्यांनीं शब्द करणाऱ्या प्राण्यांसह अरण्यांतून जातो. तो पादचारी प्राण्यांना अन्न देत आणि सारखा गवताचा आस्वाद घेत असतो. त्याच्या मागें त्याचा काळा मार्ग रहातो.

१०. हे अग्ने, तूं आमच्या समृद्ध यागांत प्रज्वलित हो. आणि फुसफुसणारा, बलवान आणि उदार असा हो. तूं बाल्यावस्था टाकून युद्धांत कवच धारण करून द्वेष्ट्यांचा नाश करणाऱ्याप्रमाणें प्रकाशित हो.

११. हे अग्ने, हें चांगलें रचलेलें स्तोत्र वाईट रचलेल्यापेक्षां आणि प्रिय स्तोत्रापेक्षांहि तुला आवडतें होवो. तुझ्या शरीराची जी उज्ज्वल कांति प्रकाशित होते आहे तिनें तूं आम्हांला उत्तम संपत्ति दे.

१२. हे अग्ने, आमच्या रथाला आणि घराला नित्य वल्हीं असलेलीं आणि पायांनीं चालणारी नौका दे. जी आमच्या पुत्रपौत्रादिकांना समृद्ध करते, जी लोकांना पार पाडते आणि जी सुख देते.

१३. हे अग्ने, आमच्याच स्तोत्रांची तूं प्रशंसा कर. स्वयंप्रसिद्ध द्यावाभूमि, नद्या, गोरस आणि पुरोडाश प्राप्त करणाऱ्या तुला उत्साहित करोत. उषा आणि सर्व दिवस अन्न आणि धन देवोत.

सूक्त एकशें एकेचाळिसावें.

ऋषिः—दीर्घतमस; देवता–अग्नि; छन्दः—१–११ जगती, १२–१३ त्रिष्टुभ.

१. तेजस्वी आदित्याचें दर्शनीय तेज अशा प्रकारें सर्वांनीं शरीराकरतां धारण केलें जातें, हें अगदीं बरोबर आहे. कारण, तें बलापासून उत्पन्न झालें आहे. म्हणूनच माझी बुद्धि तिकडे धावते आणि इष्ट साधते. स्तुति सर्व मिळून त्याच्याकडे जातात.

२. हा अन्नसाधक, शरीरपोषक आणि अन्नयुक्त होत्साता नित्य निजून राहतो. दुसरें रूप सात शुभ मातेंत होय. तिसरें रूप ह्या सूर्याचें, दोहन करण्याकरतां आहे. दाहीं दिशांना पूज्य मानलेल्या स्त्रिया ह्याला जन्म देतात.

३. जेव्हां विस्तृत अरणीच्या मूलस्थानापासून सर्व करण्यास समर्थ असणारे ज्ञाते अग्नीला सामर्थ्यानें उत्पन्न करतात आणि जेव्हां ह्या गूढ स्थलीं असलेल्या अग्नीला पूर्वींप्रमाणें सोमाची आहुति देण्याकरतां मातरिश्वा उत्पन्न करतो.—

४. जेव्हां हवीला उत्कृष्टत्व यावें म्हणून पर्यग्नीकरण केलें जातें, खाण्यायोग्य वनस्पति त्याच्या दाढांत जातात, आणि जेव्हां अग्नि दोन्ही अरणींत जन्म प्राप्त करतो, तेव्हां शुद्ध अग्नि तेजस्वी आणि अगदीं तरुण होतो.

५. जेव्हां तो प्राचीन काळापासून प्राप्त न झालेल्या पुरातन ओषधीवर चढतो आणि हलक्या अगदीं नवीन ओषधीवरहि धांवतो, तेव्हां ज्या दिशांना

अमर आणि शुद्ध अग्नि अत्यंत वृद्धिंगत होतो, लागलीच मातृभूत त्या दिशांना जातो.

६. लागलीच यज्ञांत होता म्हणून अग्नीला भजतात. आणि राजाप्रमाणें आराधना करून लोक त्याला प्रसन्न करतात. कारण बहुतांनीं स्तविलेला अग्नि कर्मानें आणि सामर्थ्यानें युक्त असणाऱ्या देवांना यजमानाकडे आणि स्तुतीकडे हवीकरतां नेहेमीं घेऊन येतो.

७. अनिर्बंध आणि वाकडे बोलणारा मनुष्य ज्याप्रमाणें सैराट बोलूं लागतो त्याप्रमाणें वायूनें प्रेरणा दिलेला यज्ञार्ह अग्नि पसरूं लागतो तेव्हां त्या जळणाऱ्या, कृष्णमार्ग, शुद्धजन्म आणि अनेक मार्गांनीं जाणाऱ्या अग्नीच्या मार्गांत सर्व बाजूंनीं लोक येतात.

८. समर्थ लोकांनीं तयार केलेला आणि चालविलेला रथ जातो त्याप्रमाणें आपल्या जळणाऱ्या ज्वालांनीं तो द्युलोकांत जातो. तेव्हां ह्या अग्नीचे ते मार्ग काळे होतात असें तूं जाळतोस. शूराच्या प्रतापाप्रमाणें त्याच्या तेजानें पक्षी पळून जातात.

९. हे अग्ने, तुझ्यामुळेंच वरुण कायदे करणारा आहे. मित्र अंधार नाहींसा करतो. आणि अर्यमा उदार होतो. कारण, तुझ्याच कर्तृत्वानें विश्वव्यापक असणारे तुम्ही धांव अरांचें नियमन करते त्याप्रमाणें नियमन करणारे उत्पन्न झाला आहांत.

१०. हे अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, तूं स्तुति करणाऱ्या आणि सोम काढणाऱ्या भक्ताकरतां हवि देवांकडे पोंचवितोस. हे बलपुत्र आणि रमणीयधन अग्ने, त्या प्रशंसनीय असणाऱ्या तुला आम्ही सूर्याप्रमाणें स्तोत्रांनीं स्तवितों.

११. हे अग्ने, तूं आम्हांला आवश्यक असणारीं गृहोपयोगी संपत्ति जशी देतोस तसेंच भाग्यशाली आणि समर्थ असा पुत्र देतोस. जो अग्नि आपलें किरण फाकतो त्याप्रमाणें दोन्ही लोकहि विस्तारतो. आणि कर्तृत्ववान असणारा हा यज्ञांत देवांच्या स्तोत्रावर सत्ता चालवतो.

१२. तो तेजस्वी, चलाख घोडे अललेला, देवांना बोलावणारा, आनंददायक, आल्हादक रथ असलेला अग्नि आमचा धांवा ऐकेल काय ? तो ज्ञाता आणि उदार अग्नि आम्हाला स्तोत्रांनीं सुंदर भाग्याप्रत नेईल काय ?

१३. उत्कृष्ट साम्राज्य धारण करणाऱ्या अग्नीची कर्मांसहित स्तोत्रांनीं आम्ही स्तुति करीत आहोंत. हे जे यजमान आणि आम्ही सूर्य मेघाला गर्जवितो त्याप्रमाणें गर्जना करावी.

सूक्त एकशें बेचाळिसावें.

ऋषिः-दीर्घतमस्; देवता-अप्रीसूक्त;* छंदः-अनुष्टुभ.

१. हे अग्ने, प्रज्वलित झालेला तूं स्रुचा पुढें केलेल्या भक्ताकडे आज देवांना घेऊन ये. तूं सोम काढून अर्पण करणाऱ्या भक्ताकरतां प्राचीन तन्तु विस्तार.

२. हे तनूनपात्, मजसारखा स्तोता, कवि आणि यजमान, त्याचा यज्ञ तूं घृतयुक्त आणि मधुयुक्त कर.

३. देदीप्यमान, पावक, अद्भुत आणि देवामधील यज्ञार्ह देव नराशंस यज्ञ दिवसातून तीन वेळां गोड करतो.

४. हे अग्ने, स्तुति केलेला तूं सुंदर आणि प्रिय इंद्राला इकडे घेऊन ये. कारण, हे सुजिह्व अग्नि, हें माझें स्तोत्र तुजप्रत गायलें जात आहे.

५. अत्यंत निर्विघ्न यज्ञांत उपासक पळ्या पुढें करून, दर्भ पसरून देवांना बसण्यास अत्यंत योग्य आणि विस्तीर्ण आसन इंद्राकरतां घालीत आहेत.

६. यज्ञाचा उत्कर्ष करणारीं, पावक आणि बहुतांस आवडणारी अशी जीं मोठालीं दिव्य द्वारें तीं देव येण्याकरतां अगदीं उघडीं असोत.

७. सर्वांनीं स्तविलेल्या, सन्निध असणाऱ्या, सुशोभित आणि यज्ञाच्या थोर माता अशा उषा आणि रात्र येऊन चांगल्या रीतीनें दर्भावर बसोत.

८. सुजिह्व, स्तुतिप्रिय आणि ज्ञानी असे जे दोघे दिव्य होते ते इष्टसाधक आणि स्वर्गीं जाणारा यज्ञ संपादोत.

९. शुद्ध, अमर देवांत स्थापन केलेली, होमसाधक भारती, इळा आणि थोर सरस्वती अशा यज्ञार्ह देवता दर्भावर बसोत.

१०. आमचें कल्याण करणारा त्वष्टा उत्तर वेदीवर बसून आमच्या पोषणाकरतां आणि धनप्राप्तीकरतां तें प्रसिद्ध वीर्य पुरेसें आपणहून आम्हाला देवो.

११. हे वनस्पते, तूं स्वतः हवि देऊन देवांचें यजन कर. देवांमध्यें जो बुद्धिमान अग्नि तो हवि पोंचवतो.

१२. हे मित्रहो, पूषन्युक्त, मरुद्युक्त, विश्वेदेवयुक्त

---

* टीपः—आप्रीसूक्त १-१३ वरील टीप पहा.

वायूला आणि गायत्ररूप इंद्राला स्वाहा म्हणून हवि अर्पा.

१३. हे इंद्रा, स्वाहा म्हणून अर्पण केलेलें हवि भक्षण करण्याकरतां तूं ये. हे इंद्रा, तूं ये आणि आमचें आव्हान ऐक. यज्ञांत लोक तुला बोलावीत आहेत.

सूक्त एकशें त्रेचाळिसावें.

ऋषिः—दीर्घतमस; देवता–अग्नि; छन्दः—१–७ जगती, ८ त्रिष्टुभ.

१. बलपुत्र अग्नीचें मी अत्यंत नवें आणि उत्कर्षकारक स्तोत्र आणि यज्ञ करतों, कीं जो अपांनपात अग्नि प्रेमळपणें होम पार पाडीत संपत्तीसह योग्यकालीं पृथ्वीवर बसला आहे.

२. तो अग्नि प्रगट झाल्याबरोबर उच्च स्थानीं प्रगट होतांच वायूच्या दृष्टीस पडला. प्रज्वलित झालेल्या अग्नीच्या सामर्थ्यानें आणि कर्तृत्वानें द्यावापृथ्वी प्रकाशित झाल्या.

३. ह्या सुंदर दिसणाऱ्या, तेजस्वी आणि सुमुख अग्नीचे किरण तेजस्वी आणि अखंड आहेत. तेजोबल सूर्याप्रमाणें अग्नीचे किरण क्षीण न होतां आणि न झोंप घेतां पसरत असतात.

४. ज्या सर्वधन अग्नीला वेदीच्या मध्यभागीं भृगूंनीं जगाच्या सामर्थ्यानें स्थापन केलें, त्या अग्नीला तूं आपल्या घरीं स्तुतींनीं प्रसन्न कर. कीं जो अग्नि वरुणाप्रमाणें एकटा संपत्तीचा राजा आहे.

५. मरुतांच्या गर्जनेप्रमाणें, चालून जाणाऱ्या सेनेप्रमाणें, किंवा दिव्य वज्राप्रमाणें जो अग्नि अनिवार्य आहे, तो अग्नि शूर शत्रूंचा फडशा पाडतो त्याप्रमाणें तीक्ष्ण दाढानीं (शत्रूंना) खातो आणि नष्ट करतो, तो अग्नि वन नष्ट करतो.

६. अग्नि आमच्या स्तोत्रांची अनेक वेळां इच्छा करो. उदार अग्नि संपत्तींनीं आमची इच्छा अत्यंत पूर्ण करो. प्रेरक अग्नि आमचीं कृत्यें नित्य लाभदायक करो. त्या शोभादायक अग्नीला ह्या स्तोत्रानें मी स्तवितों.

७. प्रज्वलित आणि यज्ञाच्या मुख्य स्थानीं आरूढ झालेल्या अग्नीला मित्राप्रमाणें प्रज्वलित करणारा मीं भजतों. प्रज्वलित होऊन पसरलेला यज्ञांतील प्रज्वलित अग्नि आमच्या निर्मल कर्मांचा उत्कर्ष करतो.

८. हे अग्ने, तूं न चुकतां अखंड, कल्याणकारक, आणि सुखकर रक्षणांनीं आमचें रक्षण कर. हे पूज्य अग्ने, अप्रतिहत, अपराभूत आणि जागरूक अशा साहाय्यानें मुलाबाळांसकट तूं आमचें संरक्षण कर.

सूक्त एकशें चव्वेचाळिसावें.

ऋषिः—दीर्घतमस; देवता–अग्नि; छन्दः—जगती.

१. उच्च आणि चांगल्या स्वरूपाची बुद्धि धारण करणारा होता ह्या अग्नीचें कर्म चातुर्यानें पार पाडतो. ज्या ह्याच्या स्थानास प्रथम भेटतात त्या पळ्या ह्याच्याकडे उजव्या बाजूनें येतात.

२. उदकाच्या धारा अग्नीचें जन्मस्थान जें देवाचें घर (आदित्य) तेथें त्याला वेष्टून त्या अग्नीची स्तुति करूं लागल्या. जेव्हां तो आपो देवतांच्या मांडीवर बसला आणि तेव्हां आतां त्यांच्याबरोबर राहून जगाला उदक पाजीत आहे.

३. समान सामर्थ्याचे दोघेजण परस्पर एकच काम करूं इच्छिणारे शरीर घासूं लागतात. त्याबरोबर भग पूजा घेतो किंवा सारथि घोड्याचे लगाम घेतो त्याप्रमाणें अग्नि हवीचा स्वीकार करतो.

४. ज्या अग्नीला एकाच वयाचे, एकाच स्थानीं राहणारें असें जोडपें एकाच ठिकाणीं दिवसा आणि रात्रि पूजितें. जरारहित असणारा तो अग्नि लोकांच्या अनेक पिढ्या जाऊनहि म्हाताऱ्याचा तरुण होत आहे.

५. त्यालाच दहा बोटें आणि भक्त सेवितात. मर्त्य साहाय्याकरतां अग्निदेवाचा धांवा करतात. तो अन्तरिक्षांतून खालीं धांव घेतो. तो स्तोत्यांनीं केलेलीं नवीं स्तोत्रें प्राप्त करतो.

६. हे अग्ने, तूं दिव्य संपत्तीचा धनी आहेस. आणि पशुपालाप्रमाणें पार्थिव संपत्तीचा स्वयंप्रभु आहेस. ह्या श्वेतवर्णाच्या, भव्य, शोभायमान, हिरण्मय आणि मधुर शब्द करणाऱ्या द्यावापृथ्वी तुझ्याकरतां दर्भ धारण करतात.

७. हे अग्ने, तूं प्रसन्न हो. हे प्रशंसनीय, हे अन्नसमृद्ध, यज्ञासाठीं निर्माण केलेल्या आणि कर्तृत्ववान अग्ने, ह्या मधुर स्तोत्राची तूं इच्छा कर. जो तूं सर्वांना अन्नसमृद्ध घराप्रमाणें अनुकूल, दर्शनीय व रमणीय आहेस.

सूक्त एकशें पंचेचाळिसावें.

ऋषिः—दीर्घतमस; देवता–अग्नि; छन्दः—१–४ जगती, ५ त्रिष्टुभ.

१. हे भक्तांनो, त्या अग्नीला विचारा. तो गेलेला आहे. तो जाणतो. ज्ञानी असणारा तो ज्ञातो. तोच जातो. त्याच्यांत सत्ता चालविण्याचें सामर्थ्य आहे. त्याला उद्देशून यज्ञ होत असतात. तो अन्नाचा, बलाचा आणि बलवंताचा धनी आहे.

२. त्यालाच लोक विचारीत असतात. पण त्याला कोणीहि पाहिजे तसें विचारीत नाहीं. बुद्धिमान मनुष्य स्वतःच्या मनांत जें असेल तेंच विचारतो. (प्रश्नाच्या) पुढें आणि मागें भाषण त्याला सहन होत नाहीं. गर्वहीन मनुष्य ह्याच्या कर्तृत्वाला प्राप्त करतो.

३. त्याच्या कडेसच जुहू जातात. त्याकडेच स्तुति जातात. तो एकटा माझीं सर्व स्तोत्रें ऐको. अनेकांनीं बोलाविलेला, संरक्षक, यज्ञसाधक, अखंड साहाय्य करणारा असा बाळ अग्नि यज्ञ स्वीकारो.

४. जेव्हां अग्नि प्रगट होतो तेव्हां तो भोंवतीं फिरूं लागतो. तो तात्काल उत्पन्न झाल्यावर ज्वालांनीं फिरावयास लागतो. जेव्हां आहुति प्रज्वलित अग्नीकडे जातात तेव्हां चांगलें कृत्य केलें म्हणून आनंदित करण्याकरतां तो त्यांना स्पर्श करतो.

५. तोच अन्तरिक्षांत आणि अरण्यांत संचार करणारा हरिणासारखा अग्नि वर्णनीय लांकडांत ठेवला जातो. तो मर्त्यांना अनेक प्रकारचें ज्ञान सांगत असतो. कारण, अग्नि विद्वान, यज्ञाला जाणणारा आणि खरा आहे.

सूक्त एकशें शेहेचाळिसावें.

ऋषिः—दीर्घतमस; देवता–अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ.

१. जो तीन मस्तकें असलेला, सात किरण असलेला, अविकल आणि द्यावापृथ्वींच्या पोटांत बसून राहिला आहे, ज्यानें स्थावरजंगम सृष्टीची आणि द्युलोकाचीं सर्व स्थानें व्यापून टाकलीं आहेत त्या अग्नीची मी स्तुति करतों.

२. बलवान् व महान् अग्नि ह्या द्यावापृथ्वींना व्यापून टाकीत आहे. अजर व महान् अग्नि संरक्षण करीत उभा आहे. तो पृथ्वीच्या शिखरावर (वेदीवर) पाय ठेवतो. ह्याच्या उज्ज्वल ज्वाला अन्तरिक्षाला चाटतात.

३. एका बालकाकडे जाणाऱ्या दोन सुंदर गाई विरुद्ध दिशेनें फिरत आहेत. त्या अशुद्ध मार्ग शुद्ध करतात आणि त्याची सर्व प्रकारें काळजी घेतात.

४. बुद्धिमान आणि ज्ञाते लोक अनेक प्रकारें संरक्षण करीत त्याला अक्षय्य स्थानीं (वेदीवर) नेतात. इच्छेप्रमाणें त्यांना पाणी दृष्टि पडलें आणि ह्या लोकाकरतां सूर्य प्रगट झाला.

५. अग्नि सर्व दिशांत पहाण्यासारखा, विजयी, स्तुत्य, देव आणि लोक जगण्याचें साधन आहे. कारण, सर्वत्र समृद्ध आणि सर्वांवर दृष्टि टाकणारा अग्नि ह्या सृष्टीचा उत्पादक आहे.

सूक्त एकशें सत्तेचाळिसावें.

ऋषिः—दीर्घतमस; देवता–अग्नि; छंदः–त्रिष्टुभ.

१. हे अग्ने, तुझ्या पसरणाऱ्या ज्वाला अन्नासहित आयुष्य कसें देतात? पुत्रपौत्र धारण करणारे भक्त यज्ञाच्या सामांत रमून गेलेले असतात.

२. हे अन्नसमृद्ध आणि अत्यंत तरुण अग्ने, तूं ह्या माझ्या पूज्य आणि प्रयत्नानें रचलेल्या स्तोत्राला ध्यानांत घे. हे अग्ने, लोकांत एक तुझा द्वेष करतो आणि एक तुझी स्तुति करतो. वंदनशील असणारा मी तुझ्या विभूतीला वंदन करीत आहें.

३. हे अग्ने, तुझ्या संरक्षक किरणांनीं, अंधळा आहे असें पाहून मामतेयाचें तूं दुरितापासून रक्षण केलें. सर्वज्ञ अग्नीनें त्या पुण्यवन्ताचें रक्षण केलें, पराभव करण्याची इच्छा करणाऱ्या शत्रूंनाहि त्याचा पराभव करतां येत नाहीं.

४. हे अग्ने, जो आमचा घात करूं इच्छिणारा मनुष्य आम्हाला देऊं देत नाहीं आणि स्वतःहि देत नाहीं अशा कपटानें आम्हांला त्रास देतो, त्याची ती

---

१. टीपः—१ तीन मस्तकें—तीन सवनें; सप्तरश्मि सात छंद.

३ टीपः—उचथ्य आणि बृहस्पति नांवाचे दोन ऋषि होते. त्यापैकीं उचथ्याच्या बायकोचें नांव ममता. ती गरोदर होती. बृहस्पतीनें तिच्याशीं संग केला. वीर्योत्सर्गाची वेळ आली तेव्हां पोटांतील गर्भ म्हणाला ‘ मीं येथें आहे, वीर्य टाकूं नकोस. ’ तें ऐकून बृहस्पतीनें वीर्यरोध केला आणि गर्भाला शाप दिला कीं ‘ तूं जन्मांध हो ’ त्याप्रमाणें ममतेला जन्मांध दीर्घतमा पुत्र झाला. त्यानें अग्नीची स्तुति केली तेव्हां त्याचें अंधत्व नष्ट झालें.

इच्छा त्यालाच घातक होवो. तो आपल्या निंदेनें आपल्या शरीराचा नाश करो.

५. हे बलोद्भव अग्ने, जो ज्ञाता मनुष्य कपटानें दुसऱ्या मर्त्याचा नाश करतो, त्यापासून हे स्तुति केल्या जाणाऱ्या अग्ने, मज स्तविणाऱ्याला तूं रक्षावेस. तूं आम्हांला दुःखाच्या तडाख्यांत देऊं नकोस.

सूक्त एकशें अठ्ठेचाळिसावें.

ऋषिः—दीर्घतमस् ; देवता–अग्नि; छंदः–त्रिष्टुभ.

१. देवांना बोलावणाऱ्या, विश्वरूप, सर्वदेवहितकारक, अशा ज्या अग्नीला सर्व व्यापक वायूनें वाढविलें आणि ज्यांना आश्चर्यकारक प्रकाशणाऱ्या सूर्याप्रमाणें मनुष्य लोकांत यज्ञ सिद्धीकरतां स्थापन केलें—

२. त्या अग्नीचें स्तोत्र करणाऱ्या माझा कोणी नाश करूं शकत नाहींत. कारण, त्या माझें स्तोत्र अग्नि इच्छीत असतो. स्तोत्र करणारा स्तोता मी, ह्या माझीं सर्व कर्मे देव सेवन करतात.

३. यज्ञ करणारे भक्त ज्या अग्नीला स्तुति करून अढळ स्थळीं धारण करते झाले, आणि रथाला जोडलेले धांवणारे घोडे इष्टस्थळीं नेतात त्याप्रमाणें ऋत्विजांनीं त्याला यज्ञांत नेलें.

४. सर्वभक्षक अग्नि पुष्कळ वस्तु दाढांनीं खाऊन टाकतो. नंतर अरण्यांत प्रज्वलित होऊन तळपूं लागतो. नंतर ज्वालानुकूल वायु दररोज धनुर्धाऱ्याच्या सुटलेल्या बाणाला घेतल्याप्रमाणें वाहूं लागतो.

५. (अरणीच्या) पोटांत असणाऱ्या ज्या अग्नीला दुष्ट व उपद्रव करणारे शत्रु दुःख देत नाहींत. ह्याचें तेज न पाहाणारे अतएव अंधळे असणारे ह्याचा नाश करूं शकत नाहींत. त्याला तृप्त करणारे शाश्वत भक्त ह्या अग्नीचें संरक्षण करतात.

सूक्त एकशें एकूणपन्नासावें.

ऋषिः—दीर्घतमस्; देवता–अग्नि; छंदः–विराज्.

१. तो उदार महान संपत्तीचा धनी आणि धन्याचा धनी संपत्तीच्या स्थानीं वेदीवर येत आहे. देणाऱ्या त्याची ग्रावे धारण करणारे भक्त सेवा करतातच.

२. जो वीर्यवान लोकांच्या प्रमाणें द्यावापृथ्वीचाहि उत्पादक आहे, जो अन्नांनीं जीवसृष्टि निर्माण करणारा आहे, जो अग्नि बाहेर पडला कीं आपल्या स्थानाचा आश्रय करतो तो अग्नि—

३. जो ज्ञाता अग्नि चपल आणि वायूसारख्या शीघ्रगामी घोड्याप्रमाणें नर्मणाच्या नगरावर प्रकाश पाडता झाला आणि जो दीप्तिमान शतजीवी सूर्याप्रमाणें आहे,—

४. जो द्विजन्मा अग्नि,यज्ञकुशल होता,तिन्हीं देदीप्यमान प्रदेश आणि सकल लोक प्रकाशांनीं भरून आपोदेवींच्या स्थानीं राहतो—

५. तो हा द्विजन्म होता होय. आणि जो अन्नेच्छेनें सर्व उत्कृष्ट हवि धारण करतो, जो मनुष्य ह्या अग्नीला हवि देतो, तो सुपुत्रयुक्त होतो.

सूक्त एकशें पन्नासावें.

ऋषिः—दीर्घतमस उचथ्यपुत्र; देवता–अग्नि; छंदः–उष्णिह.

१. हे अग्ने, तुला हवि अर्पण करून मी पुष्कळ वर मागतों. मोठ्या धन्याच्या घरीं नोकर असावा त्याप्रमाणें मी तुझा आहे.

२. हे अग्ने, तुला न मानणारा, श्रीमंत असूनहि हवि न देणारा, देवांची उपासना न करणारा आणि देवांवर प्रीति न करणारा जो मनुष्य, त्यानें तुला बोलावलें तरी तूं तिकडे जाऊं नकोस.

३. हे बुद्धिमान अग्ने, जो मनुष्य तुला भजतो, तो स्वर्गांत आल्हादक होतो. तो अत्यंत श्रेष्ठ होतो, म्हणून हे अग्ने, आम्ही तुझे उत्कृष्ट भक्त व्हावें.

सूक्त एकशें एकावन्नावें.

ऋषिः—दीर्घतमस् उचथ्यपुत्र; देवता– १ मित्र, अवशिष्ट मित्रावरुण; छंदः—जगती.

१. ज्या प्रिय आणि पूज्य अग्नीला लोकांच्या रक्षणाकरतां गाईची इच्छा करणाऱ्या कर्मपर लोकांनीं मित्राप्रमाणें अन्तरिक्षांत उत्पन्न केलें त्याच्या बलानें आणि गर्जनेनें द्यावापृथ्वी कंपायमान झाली.

२. हे मित्रावरुणहो, ज्याअर्थीं मित्राप्रमाणें अनुकूल असणाऱ्या उपासकांनीं सोमयाग करणाऱ्या पुरुमिळ्हाचें ते हवि तुम्हास अर्पण केले आहेत त्याअर्थीं स्तुति करणाऱ्या माझा यज्ञ आणि स्तोत्र ध्यानांत घ्या. हे बलवन्तांनो, तुम्ही गृहपतींचें स्तोत्र ऐका.

३. हे पराक्रमी मित्रावरुणांनो, तुमची द्यावापृथ्वींतील उत्पत्ति सर्व लोक महान सामर्थ्य प्राप्त व्हावें

म्हणून नेहेमीं वर्णन करीत असतात. कारण, तुम्ही खऱ्या मनुष्याला आणि उपासकाला बल देता. स्तुति आणि उपासना यांनीं तुम्ही यज्ञांत येता.

४. हे प्रबल मित्रावरुणांनो, जी यज्ञभूमि तुम्हाला अत्यंत प्रिय आहे ती आम्ही संपादन केली आहे. हे सत्ययुक्तहो, तर आमच्या ह्या यज्ञाची अत्यंत प्रशंसा करा. धुरेला बैल जोडावा त्याप्रमाणें थोर देवांकरतां केलेल्या कर्माचें मुख्य स्थान तुम्ही स्वीकारा.

५. हे मित्रावरुणांनो, तुम्ही विशाल पृथ्वीवर आपल्या थोरपणानें धन देता. निष्पाप आणि शीघ्रगामी गाई घरीं येतात. त्या धेनु अन्तरिक्ष मेघाच्छादित झाल्यावर सूर्याकरतां सकाळसंध्याकाळ चोराच्या मागें धांवणाऱ्या माणसाप्रमाणें ओरडत असतात.

६. हे मित्रावरुणांनो, जेथें तुमचीं स्तोत्रें चालूं असतात तेथें तुमच्या यज्ञाकरतां अग्नीच्या ज्वाला तुमची सेवा करीत असतात. तर (येऊन) आपणहून (पाऊस) पाडा आणि आमच्या कर्माचा उत्कर्ष करा. तुम्ही स्तोत्याच्या स्तोत्राचे राजे आहा.

७. जो भक्त यज्ञांनीं तुमची सेवा करून तुम्हांला हवि देतो आणि जो स्तुति करणारा ज्ञाता स्तोता तुमची पूजा करतो, त्याच्या जवळ तुम्ही जाता आणि त्याच्या यज्ञाची तुम्ही इच्छा करतां, तर आमची इच्छा करणारे तुम्ही आमच्या सद्बुद्धीकडे लक्ष देऊन आमच्या स्तोत्राकडे या.

८. हे यज्ञयुक्त मित्रावरुणांनो, कामाकडे मन प्रथम लावावें त्याप्रमाणें भक्त यज्ञ आणि गोरस यांनीं तुला प्रथम भजतात. भक्त तुमची नियमपूर्वक आणि मनन करून स्तोत्रें करतात. म्हणून तुम्ही प्राञ्जल मनानें संपत्ति देता.

९. हे शूर मित्रावरुणांनो, तुम्ही धनसमृद्ध अन्न धारण करता. तुम्ही बुद्धि चालवून आमचें रक्षण करीत महत्व प्राप्त करतां. तुमचें देवत्व आणि भाग्य अहोरात्रींना प्राप्त झालें नाहीं, नद्यांना प्राप्त झालें नाहीं आणि पर्णीनाहि प्राप्त झालें नाहीं.

सूक्त एकशें बावन्नावें.

ऋषिः—दीर्घतमस; देवता–मित्रावरुण; छन्दः–त्रिष्टुभ.

१. हे मित्रावरुणांनो, तुम्ही अखंड (तेजोरूप) वस्त्रें धारण करतां. तुमचे उद्योग आणि विचार अखंड आहेत. तुम्ही सर्व पापाचा नाश करतां आणि तुम्ही आम्हांला सत्याशीं युक्त करतां.

२. हे तो एकटाच जाणतो. ती सत्यस्वरूप, मननीय, शहाण्यांनीं वाखाणलेला आणि घातक आहे. तीन धाराच्या मनुष्याला चार धाराचा होऊन तो उग्र ठार करतो. देवनिंदक प्रथम क्षीण होतात.

३. हे मित्रावरुणांनो, पादयुक्त लोकांत प्रथम बिनपायाची उषा येते. ते तुमचें कृत्य कोण जाणतो ? ह्या लोकाचा भार शिशु (आदित्य) धारण करतो. तो ह्याच्या सत्याचें पोषण करतो आणि असत्याचा नाश करतो.

४. त्या उषांच्या जाराला आम्ही चालतांनाच पहातों, बसलेला पहात नाहीं. अखंड आणि विस्तीर्ण (तेजोरूप वस्त्र) पांघरणारा (आदित्य) मित्रावरुणाचें प्रिय घर होय.

५. हा सूर्य अश्वरहित आणि लगामरहित आहे तथापि उगवल्यावर गर्जना करीत वर शिखरावर जातो. मित्रावरुणाच्या तेजाचें वर्णन करणारे स्तोते अनाकलनीय स्तोत्र करते झाले.

६. उपासनाप्रिय मामतेयाला प्रेमळ गाई आपल्या कासेनें पुष्ट करोत. तुमची सेवा जाणणारा अन्न खाण्याकरतां तुमची प्रार्थना करो. आणि तुमची सेवा करून दारिद्र्यांतून पार पडो.

७. हे मित्रावरुण देवांनो, मी तुम्हांला हवीनें आणि स्तोत्रानें माझ्याकडे वळवितों. आमची प्रार्थना युद्धांत विजयी होवो आणि आम्हांकारणें दिव्य आणि कल्याणकारक वृष्टि होवो.

सूक्त एकशें त्रेपन्नावें.

ऋषिः—दीर्घतमस; देवता–मित्रावरुण; छन्दः–त्रिष्टुभ.

१. हे मित्रावरुणहो, प्रेमानें आम्ही थोर असणाऱ्या तुमचें हवीनीं आणि नमस्कारांनीं पूजन करीत आहोंत. म्हणून हे उदक वर्षाव करणाऱ्या मित्रावरुणांनो, आमचे अध्वर्यू तुमचे घृताहुतींनीं आणि यजन कर्मांनीं पूजन करतात.

२. हे मित्रावरुणांनो, तुमच्या यज्ञाचा आरंभ केला आहे. तुमचें ध्यान करीत आहें आणि घराप्रमाणें चांगलें स्तोत्र तुम्हांला अर्पण करीत आहे. हे पराक्रमी देवांनो, यज्ञांत हवन करूं इच्छिणारा ज्ञाता होता यज्ञांत तुम्हाला हवि अर्पण करीत आहे.

३. हे मित्रावरुणांनो, हवि देणाऱ्या सत्यनिष्ठ माणसाला समृद्ध धेनु पुष्ट करो. कारण, तो रातहव्य नांवाचा राजा मानवी होत्याप्रमाणें यज्ञांत तुम्हांला प्रसन्न करीत आहे.

४. हे मित्रावरुणांनो, तुमच्या आनंदी भक्तांच्या येथें गाई, अन्न आणि उदकाची समृद्धि करा. तसेंच ह्या यज्ञाचा पुरातन अधिपति अग्नि आम्हांला देणारा होवो. तुम्ही हवि खा आणि गाईचें दूध प्या.

सूक्त एकशें चोपन्नावें.

ऋषिः—दीर्घतमस; देवता–विष्णु; छन्दः–त्रिष्टुभ.

१. आतां मी विष्णूचे पराक्रम गातों, कीं ज्यानें पृथ्वीसंबंधीं सर्व लोक निर्माण केले, ज्यानें स्वर्गाला सावरून धरलें आहे आणि ज्या प्रशंसनीयानें तीन पावलांत सर्व आक्रमिलें.

२. ज्याच्या विस्तीर्ण तीन पावलांमध्यें सर्व लोक राहतात, भयंकर श्वापदाप्रमाणें बिकट स्थलीं संचार करणारा आणि पर्वतासारख्या उच्च स्थलीं राहणारा विष्णु त्याच्या पराक्रमाचें वर्णन केलें जातें.

३. पर्वतावर राहणाऱ्या, लांब पावलाच्या आणि समर्थ विष्णूला बल आणि स्तोत्र प्राप्त होवो, कीं जो विष्णु हें विस्तीर्ण पसरलेलें जग तीन पावलानें आक्रमितो.

४. ज्याचीं मधुरसानें भरलेलीं तीन पावलें अक्षय अन्नानें लोकांना आनंदित करतात आणि जो एकटा त्रिविभागात्मक पृथ्वीला, द्युलोकाला आणि सर्व जगाला धारण करतो.—

५. जेथें देवभक्त लोक आनंदांत असतात तें ह्याचें प्रिय स्थान मला प्राप्त होवो. तो सर्वांचा बांधव आहे. सर्व प्रसिद्ध विष्णूच्या श्रेष्ठ स्थानीं अमृताचा झरा आहे.

६. हे पत्नीयजमानहो, जेथें लांब शिंगाच्या चपलगामी गाई असतात त्या स्थळीं तुम्ही जावें अशी आम्ही इच्छा करीत आहों. तेथें तें लांब पावलाच्या वीर्यवान विष्णूचें अत्यंत श्रेष्ठ स्थान प्रकाशत असतें.

सूक्त एकशें पंचावन्नावें.

ऋषिः—दीर्घतमस; देवता–१–३ इंद्र व विष्णु, अवशिष्ट विष्णु; छन्दः—जगती.

१. हे ऋत्विजहो, तुमचें सोमरूपी अन्न स्तुतीची इच्छा करणाऱ्या, महान आणि शूर इंद्राला आणि विष्णूला अर्पण करा कीं जे दोघे थोर. सरळ जाणाऱ्या घोड्याप्रमाणें पर्वतांच्या शिखरावर सुरक्षितपणें उभे राहतात.

२. हे इंद्राविष्णूहो, सोम पिणारा भक्त पराक्रमी असणाऱ्या तुम्हा दोघांचें भयंकर युद्धांत संरक्षण करतो. कीं जे इंद्राविष्णू धनुर्धारी कृशानूच्या चढविलेल्या बाणाचें लोकाकरतां संरक्षण करतात.

३ त्या आहुति ह्या इंद्राचा मोठा पराक्रम वाढवतात. तो इंद्र प्रजोत्पादनाकरतां आणि उपभोगाकरतां तें सामर्थ्य द्यावापृथ्वींत पोंचवतो. पुत्र पित्याचें उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ प्रकारचें सामर्थ्य आहे तें आदित्याच्या तेजस्वी मंडळांत ठेवतो.

४. प्रभु, तारक, शत्रुरहित आणि उदार अशा ह्या विष्णूचे तेच तेच पराक्रम आम्ही गातों, कीं जो विस्तीर्ण जगाकरतां तीन पावलांनीं सर्व लोक आक्रमण करतो.

५. ह्या स्वर्गदर्शी विष्णूचीं दोनच पावलें मनुष्य पाहून भजतो. याचें तिसरें पाऊल कोणीहि जाणूं शकत नाहींत

६. विष्णु (आदित्य) चवऱ्याण्णव गतींनीं वाटोळ्या चाकाप्रमाणें वेगवेगळ्या प्रकारें फिरतो. हा (कालात्मक) विष्णु महाशरीर, वेगवेगळ्या स्वरूपांत असणारा, तरुण, अकुमार असा धांवा केला असता येतो.

---

६ टीपः—चवऱ्याण्णव गति—१ संवत्सर, २ अयनें, ५ ऋतु, १२ महिने, २४ पक्ष, ३० अहोरात्र, ८ प्रहर, १२ लग्नें, एकूण ९४.

सूक्त एकशें छप्पन्नावें.

ऋषिः—दीर्घतमस; देवता–विष्णु; छन्दः—जगती.

१. हे विष्णू, तूं आम्हांला मित्राप्रमाणें सुखदायक हो. तूं घृत पिणारा, मोठा भाग्यवान, सत्वर रक्षण करण्याकरतां धांवणारा आणि सर्वव्यापी आहेस. म्हणून हे विष्णो, तूं विद्वानांनीं वारंवार स्तवण्यास योग्य आहेस. आणि हविष्मान लोकांनीं तुझा यज्ञ करावा.

२. जो मनुष्य नित्य, जगत्कर्त्या, नित्य नव्या, स्वतःच उत्पन्न झालेल्या विष्णूला हवि देतो, तसेंच

जो ह्या थोराच्या पूज्य जन्माचें वर्णन करतो तोच मनुष्य कीर्तियुक्त होऊन श्रेष्ठ स्थान प्राप्त करतो.

३. हे स्तोत्यांनो, तुम्ही जाणतां त्याप्रमाणें ह्या सनातन यज्ञबालकाला स्वतःच तृप्त करा. याचें माहात्म्य जाणत आहां तेंच तुम्ही वर्णन करा. हे विष्णो, थोर असणाऱ्या तुझ्या सद्बुद्धीला आम्ही भजतों.

४. ऋत्विजांच्या संघानें युक्त असणाऱ्या त्या यज्ञकर्त्याच्या यज्ञाला राजा वरुण स्वीकारतो आणि त्याला अश्विदेव स्वीकारतात. विष्णु सर्वोत्पादक उत्कृष्ट बल धारण करतो आणि मित्रांच्या साहाय्यानें गाईचा गोठा उघडतो.

५. जो दैवी आणि महासुकृती विष्णु तो सुकृती यजमानाकडे यज्ञाला साहाय्य करण्याकरतां जातो त्रैलोक्यांत असणारा कर्ता विष्णु यजमानाला प्रसन्न करतो. आणि यज्ञाच्या भागांत यजमानाला भागीदार करतो.

सूक्त एकशें सत्तावन्नावें.

ऋषिः--दीर्घतमस; देवता-अश्विनौ; छन्दः—१-४ जगती, ५-६ त्रिष्टुभ.

१. अग्नि जागा झाला आहे. सूर्य पृथ्वीवर उगवत आहे. थोर आल्हादक उषा आपल्या कान्तीनें फाकली आहे. अश्वींनीं चालण्यासाठीं आपला रथ जोडला आहे. सवितृदेवानें जगत वेगवेगळे आपल्या कामाला लावलें आहे.

२. हे अश्विहो, ज्यापेक्षां तुम्ही आपला पराक्रमी रथ जोडला आहे त्यापेक्षां आमचा क्षत्रिय-समुदाय मधुर उदकानें भिजवा. तुम्ही आमचें स्तोत्र युद्धांत यशस्वी करा. आम्हीं युद्धांत लुटी मिळवाव्यात.

३. तीनचाकी, मधु वाहून नेणारा, चलाख घोडे जोडलेला असा प्रख्यात अश्वींचा रथ आमच्याकडे येवो. तो तीन (सारथ्याच्या) बैठकींचा, समृद्ध ऐश्वर्ययुक्त असा अश्वींचा रथ आमच्या द्विपाद आणि चतुष्पाद प्राण्यांना आणो.

४. हे अश्विहो, तुम्ही आम्हांला अन्न घेऊन या आणि मधानें भरलेल्या चाबकानें आम्हास भिजवा. तुम्ही आमचें आयुष्य वाढवा. आमचें पाप नाहींसें करा. शत्रूंचा नायनाट करा आणि आमचे साहाय्यक व्हा.

५. हे अश्विहो, तुम्ही गाईमध्यें गर्भ धारण करतां आणि तुम्ही सर्व प्राणिमात्रांत गर्भ धारण करता. हे बलशाली अश्विहो, तुम्ही अग्नि, उदक आणि वनस्पति यांना आम्हाकरतां पाठवून देता.

६. हे अश्विहो, तुम्ही औषधांमुळें वैद्य आहां, तुम्ही रथयोग्य अश्वांच्या योगानें कुशल रथ हाकणारे आहा हे प्रबळ अश्विहो, जो हविर्युक्त यजमान मनःपूर्वक हवि देतो, त्याला तुम्ही बळ देतां

सूक्त एकशें अठ्ठावन्नावें.

ऋषिः-दीर्घतमस, देवता-अश्विनौ; छंदः- त्रिष्टुभ.

१. हे वीर्यवंत अश्विहो, उदार, शूर, अतिशय बुद्धिमान व महान अशा तुम्हाप्रत आम्ही याचना केली म्हणजे आमची इच्छा पूर्ण करा. कारण, हे आश्चर्यकारक अश्विहो, उचथ्याचा पुत्र जेव्हां तुम्हापाशीं धन मागतो तेव्हां तुम्ही आपल्या उदार रक्षणासह धांवत येत असतां.

२. हे उदार अश्विहो, तुमच्या ह्या अनुग्रहासाठीं तरी तुम्हास कोण भजूं शकतो, कीं जो केवळ नमस्कारानें वेदीवर तुम्ही करीत असतां. मनःकामना पूर्ण करण्याच्या इच्छेनें जणूं काय फिरणारे तुम्ही आमचे ठिकाणीं धनसमृद्धि देणाऱ्या स्तुति जागृत करा.

३. हे अश्विहो, तुमचा अतिशय वेगवान आणि बलवान रथ तुग्रपुत्रासाठीं समुद्राच्या मध्यभागीं गेला, तरी धांवणाऱ्या घोड्यांनीं शूर शर्यत जिंकतो त्याप्रमाणें तुमच्या आश्रयाचें साहाय्य मिळवीन.

४. हे अश्विहो, ह्या स्तुतीनें औचथ्य जो मी त्या माझें तुम्ही संरक्षण करा. ह्या दोघी द्यावापृथ्वी मला पिळून न टाकोत. हा दहावेळा एकत्र केलेला लाकडाचा ढीग मला न जाळो. कारण, वध झालेला औचथ्य आपणहून माती खात आहे.

---

३. टीपः— तौग्र्य नांवाच्या राजाला युद्धांत शत्रूनीं जिंकलें आणि पाशांनीं घट्ट बांधून समुद्रांत फेकून दिलें. तो तेथून बाहेर निघण्यास असमर्थ होता. तेव्हां त्यानें अश्वींची स्तुति केली. तेव्हां अश्वींनीं येऊन त्याला बाहेर काढलें आणि त्याचें संरक्षण केलें. याविषयीं १. ११२. ६ पहा.

४. टीपः—म्हातारपणानें गलितदेह झालेल्या जन्मांध मामतेय दीर्घतमसला संभाळून त्याचे नोकर त्रासले तेव्हां त्यांनीं त्याला ठार करण्याकरतां अग्नींत टाकलें. अग्नींत टाकल्यावर त्यानें संरक्षणाकरतां

५. खळखळणाऱ्या मातृभूत उदकदेवता मला न गिळोत. जरी दासांनीं चांगलें बांधून ह्या दीर्घतमसला उलटें टाकलें आहे तरी न गिळोत. ह्या माझें त्रैतनानें जरी डोकें कापलें तरी त्यानें आपलेच उर आणि खांदे कापले आहेत. (म्हणजे दुसऱ्याचें कापावयास गेला पण स्वतःचेंच कापलें हें तुमचें माहात्म्य आहे.)

६. दीर्घतमा मामतेय दहावें युग गेल्यानंतर म्हातारा झाला. आणि कर्माचें फल प्राप्त करणाऱ्या लोकामध्यें सारथ्यासारखा श्रेष्ठ झाला.

सूक्त एकशें एकूणसाठावें.

ऋषिः—दीर्घतमस; देवता—द्यावापृथ्वी; छंदः—जगती.

१. यज्ञाची वृद्धि करणाऱ्या, थोर, यज्ञाविषयीं ज्ञात्या अशा द्यावापृथ्वी यज्ञाकरतां मी स्तवितों. देव पुत्र असलेल्या, आश्चर्यकारक कृत्य करणाऱ्या ज्या द्यावापृथ्वी त्या खऱ्या अन्तःकरणानें आम्हांस धन देतात.

२. प्रेमळ पित्याचें आणि मातेचें उदार आणि पराक्रमी मन मी स्तवतानें प्रसन्न करतों. अमोघवीर्य मातापितरांनीं प्रजेचें रक्षण करून मोठें कार्य केलें.

३. चांगलीं कर्मे करणारे आणि आश्चर्यकारक असे ते पुत्र (देव) थोर द्यावापृथ्वींना पहिल्या प्रार्थनेकरतां जाणतात. हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही स्थावरजंगम सृष्टीच्या संरक्षणासाठीं पुत्राच्या खऱ्या स्थानाचें (आदित्याचें) संरक्षण करीत असतां.

४. एका ठिकाणांतून उत्पन्न झालेल्या, एका ठिकाणीं असणाऱ्या, जोडीनें राहणाऱ्या अशा बहिणी द्यावापृथ्वी ते ज्ञानी आणि कुशल देव वेगळे करतात. ते प्रकाशणारे किरण अन्तरिक्षांत आणि द्युलोकांत नवे नवे तंतु विस्तारतात.

५. तर आम्ही आज सवितृदेवाच्या उदयकालीं श्रेष्ठ धन मागतों. तर हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही कृपा करून शेकडो प्रकारची निवासयोग्य संपत्ति द्या.

सूक्त एकशें साठावें.

ऋषिः—दीर्घतमस्; देवता—द्यावापृथ्वी; छंदः—जगती.

१. सकल विश्वाला सुखकारक, नियमबद्ध, उदकाधार, सुजन्म, प्रगल्भ आणि देदीप्यमान ज्या द्यावापृथ्वी त्यांच्यांतून तेजस्वी आणि शुद्ध सूर्य स्वभावतः जातो.

२. महाव्यापक, विस्तीर्ण, विभक्त, अत्यंत धैर्यशाली, आईबापाप्रमाणें शरीररक्षक अशा मातृपितृभूत द्यावापृथ्वी भुवनाचें रक्षण करतात. पिता सर्वांना अनेक रूपांनीं आच्छादित करतो.

३. मातृभूत द्यावाभूमीचा हविर्वाहक, पवित्र आणि बुद्धिमान पुत्र आदित्य आपल्या कौशल्यानें सर्व जग प्रकाशित करतो. तो पांढरी गाय आणि समर्थ वृषभ यांचें प्रत्यही शुद्ध दूध (पाणी) काढतो.

४. ज्यानें विश्वाला सुखदायक असणाऱ्या द्यावापृथ्वींना उत्पन्न केलें, ज्यानें दोन्ही लोकांस अत्यंत कौशल्यानें निर्माण केलें, ज्यानें द्यावापृथ्वीला घट्ट बंधनानें स्थापित केलें, तो हा देवामधील कुशलांतला कुशल होय.

५. हे द्यावापृथ्वीहो, अत्यंत प्रशंसनीय असणारे तुम्ही आम्हांला विपुल कीर्ति आणि बल द्या, ज्या योगें नेहमीं आमच्या प्रजा आम्ही वाढवूं असें आमच्या अंगांत वाखाणण्यास योग्य बल वाढवा.

सूक्त एकशें एकसष्टावें.

ऋषिः—दीर्घतमस्; देता—ऋभु; छंदः—१–१३ जगती, १४ त्रिष्टुभ.

१. काय सर्वांत श्रेष्ठ आहे तो आला आहे कां सर्वांत धाकटा आहे तो आला आहे ? कां दूत म्हणून आला आहे ? काय म्हणावें ? आम्ही चमसाची निंदा करीत नाहीं, कारण, तो महाकुलीन आहे. हे बंधो अग्ने, आम्ही चमसाचीच प्राप्ति वर्णीत आहोंत.

अश्वींचा धांवा केला. तेव्हां त्याचें अश्वींनीं संरक्षण केलें. हा मरत नाहीं असें पाहून त्यांनीं त्याला पाण्यांत टाकलें. तेव्हांहि त्यांनीं अश्वींची स्तुति करून आपलें संरक्षण करून घेतलें. तेव्हां त्रासून त्रैतन नांवाच्या दासानें त्याचें डोकें तोडलें आणि छाती फोडली तरी त्याचें संरक्षण केलें. हे दोन ऋचांत वर्णन केलें आहे.

१. टीपः—ऋभु हे सुधन्व्याचे तीन पुत्र होत. ऋभु, विभु आणि वाज हीं त्यांचीं नांवें होत. ते मनुष्य असून देव झाले होते. ते सोम पिऊं लागले असतां तेथें अग्नि आला. त्या तिघांना अगदीं सारख्या स्वरूपाचें पाहून अग्नीनेंहि तसेंच रूप घेऊन चवथा होऊन तेथें बसला. तेव्हां ऋभूंनाहि ओळखतां येईना. तेव्हां ते संशय प्रदर्शित करीत आहेत.

२. अग्नि ऋभूंना म्हणतो—हे ऋभूहो, तुम्ही एका चमसाचे चार चमस करा. हे देवांनीं तुम्हांला सांगितलें आहे. तें मी तुम्हाला सांगण्याकरतां आलों आहे. सुधन्व्याचे पुत्र असणारे तुम्ही जर असें कराल तर तुम्ही देवांसह यज्ञार्ह व्हाल.

३. हे ऋभूंनो, तुम्ही जे अग्नि दूताला बोलला, कीं, घोडा करावयाचा आहे, आणि रथ करावयाचा आहे, गाय करावयाची आणि दोघं मातापितर तरुण करावयाचे, तर हे भ्रात्या, हीं कृत्यें करून आम्ही येतों.

४. हे ऋभूंनो, तें तुम्ही केल्यावर विचारलेंत जो दूत आला होता तो कोठें आहे ? जेव्हां त्वष्ट्यानें केलेले चार चमस पाहिले, त्याबरोबर तो स्त्रियांत लपून बसला.

५. ज्यांनीं देवांना पिण्यास उपयोगी पडणाऱ्या चमसाची निंदा केली त्या ह्यांना आपण ठार करूं असें त्वष्टा म्हणाला. तेव्हांपासून लोक सोमपानाच्या वेळीं दुसरीं नांवें ठेवतात. ह्यांच्यावर माता दुसऱ्या नांवांनीं प्रेम करते.

६. इंद्रानें हरि नांवाचे घोडे रथाला जोडले, अश्वीनीं रथ जोडला. बृहस्पतीनें विश्वरूपा गाईला स्वीकारलें. (त्यामुळें) ऋभु, विभ्वा आणि वाज देव झाले. आणि कर्मकुशल असणारे ते यज्ञिय भाग प्राप्त करते झाले.

७. हे ऋभूहो, तुम्ही आपल्या बुद्धीनें चामड्यांतून गाय बाहेर काढता झाला. जे आईबाप म्हातारे होते त्यांना तरुण करते झालात. हे सौधन्वन ऋभूहो, तुम्ही घोड्यापासून घोडा उत्पन्न करतां झाला. आणि रथ जोडून देवांप्रत पोंचलात.

८. हे ऋभूहो, तुम्ही हें उदक प्या किंवा हें मुंज गवतानें शुद्ध केलेलें उदक प्या. हे सौधन्वनहो, जर तें तुम्हांला आवडत नसेल, तर तुम्ही तिसऱ्या सवनांत आनंदित व्हा असें तुम्ही आपणांस म्हणालात.

९. ‘ उदक श्रेष्ठ आहे ’ असें एकजण म्हणाला. ‘ अग्नि श्रेष्ठ आहे ’ असें दुसरा म्हणाला. ‘ भूमि सर्वांपेक्षां मोठी आहे ’ असें तिसरा बोलला. (असें) खरें बोलणाऱ्या तुम्ही चमसाचे (चार) विभाग केलेत.

१०. एक पांगळ्या गाईला पाण्याजवळ हाकून नेतो, दुसरा सुरीनें काढलेल्या मांसाचे तुकडे करतो. तिसरा आंतड्यांतील शेण बाहेर टाकतो. यापेक्षां पुत्रापासून आईबापास काय प्राप्त व्हावें ? (यापेक्षां ऋत्विजाकडून यजमान व पत्नी यांना काय अधिक मिळावें ?)

११. हे ऋभूंनो, तुम्ही ह्या जगाकरतां उन्नत प्रदेशावर गवत उत्पन्न केलें. हे नेत्यांनो, कौशल्यानें तुम्ही खोल प्रदेशांत पाणी उत्पन्न केलें. तुम्ही अग्राह्य सवित्याच्या घरीं निजून राहिला तसें तुम्ही आज करीत नाहीं.

१२. हे ऋभूहो, तुम्ही जेव्हां भुवनाला झांकून त्याच्या भोंवती पसरला, तेव्हां तुमचे तत्कालीन आईबाप (सूर्यचंद्र) कोठें होते ? ज्यानें तुमचा हात पकडला त्याला तुम्ही शाप दिला, ज्यानें तुमची स्तुति केली त्याची तुम्ही प्रशंसा केली.

१३. हे ऋभूंनो, तुम्ही झोंप घेत असतां त्याला (आदित्याला) विचारा. हे अगोपनीय सवित्या, आम्हाला ह्या कामांत कोण प्रेरणा करतो ? आदित्यानें प्रेरक कुत्रा (वायु) असें सांगितलें. हें जग आज वर्षाकालानंतर प्रकट केलें.

१४. हे बलपुत्र ऋभूहो, तुमची इच्छा करून मरुत् द्युलोकावरून जातात, अग्नि भूमीवरून जातो, हा वायु अन्तरिक्षांतून जातो, वरुण विपुल पाण्यावरून जातो.

---

११ टीपः—पुराणप्रसिद्ध सुधन्व्याच्या पुत्राची स्तुति करून वेदप्रसिद्ध सूर्यरश्मिरूप ऋभूची ११ व्या ऋचेपासून स्तुति आहे.

सूक्त एकशें बासष्टावें.

ऋषिः—दीर्घतमस्; छंदः—३–६ जगती, अवशिष्ट त्रिष्टुभ्; देवता–अश्व.

१. आमची मित्र, वरुण, अर्यमा, वायु, इंद्र, प्रजापति आणि मरुत हे निन्दा न करोत. कारण देवापासून झालेल्या प्रबल घोड्याचे पराक्रम आम्ही यज्ञांत वर्णन करणार आहों.

२ सुंदर वस्त्रें आणि अलंकार घातलेल्या घोड्याच्या पुढें जो बाळ धरून नेत आहेत तो सुंदर रीतीनें चालणारा, शब्द करणारा आणि अनेक रंगी बकरा इंद्र व पूषन (अग्नि) यांचा आवडतें खाद्य होवो.

३. पूषदेवाचा भाग पण सर्व देवांना योग्य असा हा बोकड बलवान् घोड्याबरोबर पुढें नेला जात

आहे. कारण याची कीर्ति व्हावी म्हणून ह्याला घोड्याबरोबर त्वष्ट्यानें आवडता बळी केलें आहे.

४. जेव्हां हविर्योग्य आणि देवाकडे जाणाऱ्या अशा घोड्याला योग्यवेळीं लोक तिनदां अग्नीभोंवती फिरवतात, तेव्हां पूषनचा प्रामुख्यानें भाग असणारा बोकड देवांना तो यज्ञ निवेदन करीत जातो.

५. होता, अध्वर्यु, प्रतिप्रस्थाता, अग्नीध्, ग्रावस्तुत, प्रशास्ता आणि ब्रह्मा असे तुम्ही चांगल्या रीतीनें संपादन केलेल्या आणि अर्पण केलेल्या त्या यज्ञानें प्रवाह भरून टाका.

६. जे यूप तोडणारे, जे यूपाला वाहून आणणारे, जे. अश्वयूपाला घालावयाचे वरचें कडें तयार करतात आणि जे घोडा शिजविण्याकरतां सामग्री मिळवतात, त्यांच्या संकल्पानें आम्हीं युक्त व्हावें.

७. घोडा येत आहे. मी चांगलें स्तोत्र रचलें आहे. सुंदर पाठीचा घोडा देवांच्याकडे जात आहे. मेधावी ऋषि याचें अभिनंदन करोत. देवांच्या पोषणाकरतां ह्याला आम्ही सुबंधु केलें आहे.

८. बलवान घोड्याची जी गळ्यांतली, पायांतली आणि ह्याची गळ्यांत बांधलेली दोरी आहे आणि याच्या तोंडांत भरलेलें जें गवत आहे, ती सर्व तुझी देवलोकांत वास करोत.

९. घोड्याच्या मांसाचा जो अंश माशीनें खाल्ला आहे, आणि जो यूपाला आणि सुरीला लागला आहे, जो कापणाऱ्याच्या हातांला किंवा नखाला लागला, ते तुझे सर्व भाग देवलोकीं वास करोत.

१०. पोटांत अर्धवट पचलेल्या गवताला दुर्गंधि येत असेल किंवा जो हिरव्या मांसाला वास असेल, तो सर्व कापणारे शुद्ध करोत आणि मांस यथायोग्य शिजवोत.

११. हे घोड्या, अग्नीनें तुझें शरीर शिजत असतांना जें तुझें मांस खालीं गळत असेल किंवा मारलेल्या तुझा भाग सुरीला लागेल तो भूमीला किंवा दर्भाला चिकटून न राहो. तो इच्छा करणाऱ्या देवांना दिला जावो.

१२. जे घोडा शिजविलेला पहातात, जे म्हणतात कीं ह्याला चांगला वास येतो, आम्हांला द्या, आणि जे घोड्याची मांसभिक्षा मिळेल म्हणून वाट पहात असतात, त्यांच्या इच्छेनें आम्ही युक्त व्हावें.

१३. मांस शिजविण्याच्या थाळींतील जी पळी, शिजविलेला मांसरस ओतण्याचीं जीं भांडीं, वाफ जाऊं नये म्हणून ठेवावयाचीं झाकणें, तसेंच आंकडे आणि सुऱ्या घोड्याला सिद्ध करतात.

१४. फिरण्याचें स्थान, बसण्याचें स्थान, लोळण्याचें ठिकाण, आणि घोड्याचें जें पादबंधन, प्यालेलें पाणी आणि गवत खाल्लें तें, हे अश्वा, तीं तुझीं सर्व देवांत असोत.

१५. हे अश्वा, धुरकट अग्नि तुला शब्द करावयास न लावो. तापलेली आणि गळणारी थाळी न फुटो. म्हणजे मग, अर्पण केलेला, आवडीनें घेतलेला, पुढें ठेवलेला आणि वषट असें म्हणून दिलेला अशा त्या त्या अश्वाला देव ग्रहण करतील.

१६. घोड्याला पांघरावयास जें वस्त्र (उपस्तरण) घालतात आणि ह्याला जे अलंकार घालतात, तसेंच घोड्याला बांधावयाची दोरी आणि पायबंद हीं प्रिय साधनें त्याला देवांत पोंचवतात.

१७. हे अश्वा, दमल्यावर जोरानें सुस्कारणाऱ्या तुला टाचेनें किंवा चाबकानें जर मारलें असेल तर तुझी तीं सर्व दुःखें यज्ञांतील मंत्रानें स्रुचेनें अर्पण केलेल्या हवीप्रमाणें नाहींशीं करून टाकतो.

१८. प्रबळ आणि देवबंधु अशा घोड्याच्या चवतीस बरगड्यांत सुरी घुसते. हे कापणाऱ्यांनो, लक्षपूर्वक अवयव अखंड काढा. प्रत्येक सांधा नांव घेऊन क्रमानें काढा.

१९. तेजस्वी घोड्याचा कापणारा एक ऋतु आहे. दोन दाबून धरणारे आहेत. हे अश्वा, तुझ्या अवयवांपैकीं जें-मी वेळोवेळीं तोडतों तें तें पिंड मी अग्नीचें ठिकाणीं हवन करतों.

२०. हे अश्वा, वर जाणाऱ्या तुला तुझें प्रिय शरीर त्रास न देवो. सुरी तुझ्या शरीरावर फार वेळ न राहो. तसेंच अडाणी आणि लोभी मनुष्य सुरीनें अवयव सोडून वांकडेंतिकडे व्यर्थ न कापो.

२१. हे अश्वा, तूं कांहीं आतां खरोखर मरत नाहींस किंवा नाश पावत नाहींस. तूं चांगल्या मार्गांनीं देवांकडेसच जात आहेस. तुला ओढण्याकरतां इंद्राचे दोन घोडे रथाला जोडले जातील, मरुतांच्या ठिपक्यांच्या हरिणी जोडल्या जातील किंवा रासभाच्या धुरेला बलवान गाढव जोडला जाईल.

---

५. टीपः--येथें सोळा ऋत्विजांपैकीं सात ऋत्विजांचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे.

२२. अश्व आम्हाला चांगल्या गाई, चांगले घोडे यांनीं युक्त विश्वपोषक संपत्ति आणि पुत्र देवो. अदिति आम्हाला पापापासून मुक्त करो. हविर्भूत घोडा आम्हाला बळ देवो.

सूक्त एकशें त्रेसष्टावें.

ऋषिः—दीर्घतमस् ; देवता- अश्व; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे अश्वा, तूं प्रथम जन्मताच अन्तरिक्षांतून किंवा पाण्यांतून एकदम वर येऊन ज्याअर्थी खिंकाळलास आणि तुला श्येनाचे पंख आणि हरिणाचे पाय होते, त्याअर्थी तुझा महान जन्म अत्यंत प्रशंसनीय आहे.

२. यमानें (अग्नीनें) हा दिला, त्रैलोक्यांत असणारा वायु ह्याला जोडता झाला, इंद्र ह्याजवर प्रथम बसला, आणि गंधर्वानें याचा लगाम धरला. हे देवहो, तुम्ही सूर्यापासून घोड्याला निर्माण केलें आहे.

३. हे अश्वा, तूं यम आहेस, तूं आदित्य आहेस. तूं गूढ कृत्यावरून वायु आहेस. तू सोमाशीं एकरूप झाला आहेस. तुझीं तीन बंधनें द्युलोकांत आहेत असें म्हणतात.

४. हे अश्वा, तुझीं तीन बंधनें, द्युलोकांत, तीन भूलोकांत आणि तीन अन्तरिक्षांत आहेत असें म्हणतात. तसेंच हे अश्वा, जेथें तुझा श्रेष्ठ जन्म आहे असें म्हणतात तें पापनिवारक असणारा तूं मला सांग.

५. हे अश्वा, हीं तुझीं अंग स्वच्छ करण्याचीं स्थळें आहेत. हीं उपभोग घेणाऱ्या तुझीं फिरण्याचीं स्थळें आहेत. येथें तुझ्या शुभ दोऱ्या मी पाहिल्या, कीं ज्यास यज्ञाचे रक्षक संरक्षीत असतात.

६. हे अश्वा, तुझा आत्मा मी पक्ष्याप्रमाणें द्युलोकाच्या खालीं अति दूर उडतांना पाहिला. मी तुझें उडणारें शिर चांगल्या आणि बिनधुळीच्या मार्गांनीं जातांना पाहिलें.

७. हे अश्वा, तुझें उत्कृष्ट रूप वेदीवर हविरन्न मिळवितांना मी येथें पाहिलें. आणि मर्त्य उपासकानें तुला अन्न अर्पण केलें तेव्हां तूं अत्यन्त बुभुक्षिताप्रमाणें खाऊन टाकलेंस.

८. हे अश्वा, रथ तुझ्या मागें जातो. मर्त्य तुझ्या खालीं, बैल तुझ्यापेक्षां कमी, स्त्रियांचें सौंदर्य तुझ्यापेक्षां कमी, संघात्मक देव तुझ्या सख्याला अनुसरतात, देवहि तुझ्याच पराक्रमाचें वर्णन करतात.

९. हा घोडा सोन्याच्या शिंगाचा होय. याचे पाय लोखंडाचे होत. मनोजव इंद्र त्यापेक्षां कमीच झाला कीं जो इंद्र प्रथम ह्या घोड्यावर चढला. ह्याचे हवि भक्षण करण्याकरतां देवहि आले होते.

१०. स्वर्गीचे अतिवेगवान घोडे जेव्हां दिव्य मार्गानें जातात तेव्हां ते पराक्रमी घोडे अन्तीं विशाळ आणि मध्यें बारीक अशा मालिकेनें हंस जसे जातात त्याप्रमाणें मिळून जातात.

११. हे अश्वा, तुझें शरीर उड्या मारणारें, तुझें मन वायूप्रमाणें वेगवान, तुझीं शिंगें (शृंगस्थानीय केश—सायण) विस्तारलेली, तीं मनोहर शिंगें (केश) अरण्यांत फिरत असतात.

१२. देवपरायण मनानें ध्यान करणारा बलवान घोडा कापण्याच्या स्थळीं आला. ह्याच्या बंधुभूत बोकडाला पुढें नेतात. स्तोते कवि मागून जातात.

१३. हा घोडा उत्कृष्ट स्थानीं आई व बाप यांना भेटण्याकरतां जात आहे. हे अश्वा, तूं अत्यंत आनंदानें देवांकडे जावेस. हविर्दात्याला उत्कृष्ट संपत्ति मिळो अशी मी प्रार्थना करतों.

सूक्त एकशें चवसष्टावें*

ऋषिः—दीर्घतमस; देवता–१–४१ विश्वेदेव, ४२ चा पूर्वार्ध आणि ४५ वाक्, ४२ चा उत्तरार्ध आप, ४३ चा पूर्वार्ध शकधूम, उत्तरार्ध सोम, ४४ अग्नि, सूर्य आणि वायु, ४६–४७ सूर्य, ४८ संवत्सरात्मक काल, ४९ सरस्वती, ५० साध्य, ५१ सूर्य अथवा पर्जन्य अथवा अग्नि, ५२ सरस्वान् अथवा सूर्य; छंदः—१२.१५.२३.२९.३६.४१ यांचे जगती, ४२ प्रस्तारपंक्ति, ५१ अनुष्टुभ, अवशिष्ट त्रिष्टुभ.

---

३. टीपः—तीन बंधनें वसु, आदित्य आणि द्युस्थान.

४. टीपः—पृथिवीवरील तीन बंधनें—अन्न, स्थान आणि बीज. अन्तरिक्षांतील तीन बंधनें—मेघ, विद्युत् आणि गर्जना.

८. टीपः—ह्या मंत्राचा अर्थ श्री. पंडितांचा पहाण्यासारखा आहे.

* टीपः—चुकीनें हातून चोरी घडल्यास तीन दिवस उपोषण करून हें सूक्त म्हणावें म्हणजे करणारा दोषमुक्त होतो, असें ऋग्विधानांत सांगितलें आहे.

१. ह्या मनोहर पांढऱ्या केशाच्या होत्याचा मधला भाऊ अधाशी, तिसरा भाऊ पाठीवर तूप वाहाणारा आहे. मी सात पुत्र असलेला राजा पाहिला.

२. एका एकचाकी रथाला सात घोडे जुंपतात. हा रथ सात घोड्यांकडून किंवा सात रूपांच्या एकाच घोड्याकडून ओढला जातो. या सतत फिरणाऱ्या अजर चक्राला तीन छिद्रें आहेत. त्यांच्या आधारावर हे सर्व प्राणी राहतात.

३. ज्या ह्या सातचाकी रथावर सातजण बसतात त्या रथाला सातजण वाहून नेतात. सात बहिणी खूप स्तुति करतात. जेथें गाईचीं सात स्वरूपें आहेत.

४. जो स्वतः आस्थिहीन असून आस्थियुक्तास जन्म देतों, त्याला प्रथम उप्तन्न होतांना कोणी पाहिलें? भूमीचा प्राण, तिचें रक्त आणि मन हीं तेव्हां कोठें होती ? विद्वानाला ही गोष्ट पुसण्यासाठीं कोण गेला ?

५. मूढ असा जो मी तो आपल्या बुद्धीनें अजाणता असल्यामुळें देवांचीं जीं गुप्त रूपें त्याविषयीं विचारतों. एक वर्षाच्या वत्साच्या अंगावर कविजन (वस्त्र) विणण्यासाठीं सात तंतु ताणीत असतात.

६. अजाणता आणि अज्ञानी असा जो मी तो जाणून घेण्यासाठीं ज्ञानी कवीला याविषयीं विचारतों कीं ज्या जन्मरहित देवानें हे सहा लोक धारण केले आहेत त्याच्या स्वरूपांत कांहीं एकात्मक आहे हें खरें कीं नाहीं ?

७. ज्या कोणाला ठाऊक असेल त्यानें सांगावें. ह्या सुंदर पक्ष्याचें रूप गुप्त आहे. ह्याच्या गाई शिरापासून दूध देतात. तेजःपुंज रूप धारण करणाऱ्या पायानें दूध पितात.

८. माता पृथिवी पिता द्यूला मनोभावेंकरून पूजा अर्पण करिती झाली. आणि तो मनांत तिच्याशी एकदम रममाण झाला. गर्भधारणाची इच्छा करणारी ती गरोदर केली. नंतर भाविक जन येऊन स्तुति करूं लागले.

९ दक्षिणेच्या धुरेला माता जोडिली गेली. गाईच्या पोटीं गर्भ राहिला. वत्स ओरडूं लागला आणि तो विश्वरूप गाईकडे तीन योजनापर्यंत पाहूं लागला.

१०. तीन माता व तीन बाप यांचें ओझें पाठीवर राहून हा एकटा ताठच्या ताठ उभा राहूं शकतो. या ओझ्याचा त्याला कधींच कंटाळा येत नाहीं. अंतरिक्षांत ते सर्वज्ञ असून सुद्धां सर्वव्यापी नसणाऱ्या अशा वाग्देवतेशीं वादविवाद करतात.

११. सत्यभृत आदित्याचें बारा अरे असलेले चक्र द्युलोकाभोंवतीं सदैव भ्रमण करीत असतें, तरीहि तें नाश पावत नाहीं. हे अग्ने, ह्या चक्रावर सातशेवीस पुत्रांची जोडपी आरूढ झालेलीं असतात.

१२. हा पिता द्यूच्या परार्धांत पांच पायांचा, बारा रूपांचा आणि वृष्टि करणारा होय असें म्हणतात. आणि दुसरे किती एक असें म्हणतात कीं द्यूच्या परार्धांत तो पिता सात चाकांच्या आणि सहा अरे असलेल्या रथावर स्थापिला असून तो तेथून सर्व पहातो.

१३. पांच अरे असलेले जें तें फिरणारें चक्र, त्याजवर सकळ भुवनें राहतात. त्याच्या अक्षावर जरी मोठा भार आहे तरी तो तापत नाहीं. सनातन काळापासून त्याचा एकच नाभि आहे. तो अक्ष मोडत नाहीं.

१४. नित्य ज्याला एकच वाट आहे, आणि जे अविनाशी आहे, तें चक्र फिरतच राहते. उताण्या जुवाला जुंपलेले दहा घोडे रथाला ओढतात. सूर्याचा डोळा मेघोदकानें व्यापून फिरत असतो. त्याजवर सर्व जग आधारून आहे.

१५. एकाच काळीं झालेले जे सातजण त्यापैकीं सातवा एकटाच जन्मला, एकेवेळीं झालेले सहाजणच ऋषि होत असें म्हणाले.

१६. त्या माझ्या स्त्रिया असतांहि त्यांस माझे पुरुष म्हणतात. डोळस पाहूं शकतो. आंधळा पाहूं शकत नाहीं. जो पुत्र बुद्धिमान आहे तोच हें जाणील. जो जाणील तो पित्याचा पिता होईल.

१७. एका पायानें वत्साला खालीं धरणारी आणि त्याला दुसऱ्या पायानें वर धारण करणारी गाय उगवली आहे. ती कुठें गेली ? कोणत्या अर्धाला गेली ? कोठें विते ? कळपांत नाहीं.

१८. खालीं असलेला या लोकांचा पिता दुसऱ्यामुळें आणि दुसरा वरती असलेला खालच्यामुळें जो जाणतो असा ज्ञाता व असें सांगणारा कोण ? दिव्य मन कोठून झालें ?

१९. जे अभिमुख आहेत त्यांनाच पराङ्मुख म्हणतात आणि जे पराङ्मुख आहेत त्यांस अभिमुख म्हणतात. हे इंद्रा आणि सोमा, तुम्ही जे फिरत असतां ते धुरीला जुंपलेल्या घोड्याप्रमाणें जगताला आधार आहां.

२०. एकमेकांचे जिवलग मित्र असे दोघे पक्षी

---

२०. टीपः—हा मंत्र वेदान्तांत फार प्रसिद्ध आहे.

एकाच वृक्षाचा आश्रय करतात. त्यांतून एक त्या वृक्षाचीं गोड फळें भक्षण करतो आणि दुसरा तीं भक्षण न करतां त्याजकडेस पहात राहातो.

२१. ज्याचे ठायीं पक्षी अमृताचा भाग ज्ञानपुरस्सर नित्य पोचवीत असतात आणि जो सर्व जगाचा प्रभु आणि रक्षणकर्ता आहे तो ज्ञानमय परमेश्वर माझ्या अन्तःकरणांत प्रवेश करून राहिला आहे.

२२. ज्या वृक्षावर गोड खाणारे पक्षी राहातात आणि ज्या जगांत प्रसवतात त्याचेंच फळ फार गोड असें म्हणतात. जो बापाला जाणत नाहीं त्याला तें फल मिळत नाहीं.

२३. पृथिवीवर अग्नीला जें स्थापिलें आहे तें कसें किंवा अन्तरिक्षापासून जो वायु निर्माण केला आहे तो कसा, अथवा अत्युच्च द्युलोकीं जो आदित्य परमेश्वर बसविला आहे तो कसा, हे ज्याला समजतें त्यालाच मृत्यूची भीति नाहीं आणि तोच अमरत्वाप्रत पावतो, दुसरा पावत नाहीं.

२४. गायत्रीछंदानें अर्क रचतात. अर्काच्या योगानें साम रचतात, त्रिष्टुभ छंदानें वाक करतात, द्विपाद आणि चतुष्पाद वाकानें अनुवाक तयार होतात आणि अक्षरांच्या योगानें सप्त वृत्तें निर्माण होतात.

२५. जगती छंदांतील सामानें सिंधूला द्युलोकीं धारण केलें, रथंतरावर सूर्याला पहाता झाला. गायत्र सामाच्या तीन समिधा आहेत असें म्हणतात. त्यामुळें त्यांचा मोठेपणा आणि बळ अधिक आहे.

२६. मी चांगलें दूध देणाऱ्या गाईची स्तुति करतों. चांगल्या हातानें लोक गाईची धार काढतात. सविता आम्हाकरतां उत्कृष्ट दूध उत्पन्न करो. म्हणून आह्मी दूधाची मनःपूर्वक स्तुति करतों.

२७. वासराच्या प्रेमानें हंबरणारी, आरोग्य संरक्षण करणारी, मनानें सदोदित मुलाची इच्छा करणारी अशी ही गाय असते. संरक्षणीय गाय अश्वींच्या कृपेनें सर्वौषधिपूर्ण दूध आह्मांस देते. ती गाय आमच्या महान ऐश्वर्यवृध्दीकरतां उत्कर्ष पावो.

२८. डोळे झांकलेल्या वत्साला पाहून गाय हंबरते आणि डोक्याला हंबरून चाटते. ती मोठ्यांदा हंबरडा फोडून पान्हा सोडविणाऱ्या वत्साकडे पाहून शब्द करते. तिला अत्यंत पान्हा येतो.

२९. हा तो वत्स ओरडत आहे, त्यानें वेष्टिलेली गाय गोठ्यांत उभी राहून हंबरते. ती ज्ञानानें सर्वांना मागें टाकते. वीज होऊन रूप प्रगट करते.

३०. चंचल, जिवंत आणि उगीच न बसणारी जी वस्तु आहे, ती घराच्या मध्यमार्गी श्वासोच्छ्वास करीत निश्चल पडून राहते. जिवंत पदार्थ मृताच्या सामर्थ्यानें चालतो. अमर्त्य आणि मर्त्य एकाच ठिकाणीं राहतात.

३१. न थकतां अनेक मार्गांनीं इकडे येणारा आणि तिकडे जाणारा जो रक्षक तो माझ्या दृष्टीस पडो. तो एकत्र जाणाऱ्या आणि वेगळ्या जाणाऱ्यांना जगांत झाकून असतो.

३२. ज्याला त्यानें उत्पन्न केलें त्याची त्याला माहिती नाहीं. ज्यानें त्याला पाहिलें त्यालाच तो दिसत नाहीं. तो आईच्या गर्भांत राहिलेला आहे. त्याला अनेक अपत्यें आहेत. तरी पण निर्ऋति याला मोहवश करते.

३३. अन्तरिक्ष हा माझा बाप, त्याच्या पोटीं मीं जन्म घेतला. माझें उत्पत्तिस्थान तें, ही मोठी पृथ्वी माझी आई होय. उताण्या धरलेल्या दोन सोमपात्राच्या मध्यें गर्भाशय आहे. त्यांत बाप आपल्या दुहितेचे ठिकाणीं गर्भाधान करतो.

३४. मी तुला पृथ्वीचा अगदीं शेवटचा भाग विचारतों. जगाचा मध्य जेथें आहे तें ठिकाण विचारतों. वळू घोड्याचें रेत कोणतें तें विचारतो, वाणीचें अत्यंत श्रेष्ठ स्थान कोणतें तें पुसतों.

३५. ही वेदि पृथ्वीची शेवट सीमा होय. हा जो यज्ञ (तोच) जगाचा मध्य, हा सोम वळू घोड्याचें रेत होय आणि हा ब्रह्मा वाचेचे परमोच्च स्थान होय.

३६. जगाचें रेत असलेलें अपूर्णगर्भधारी सात किरण विष्णूच्या आज्ञेनें अन्तरिक्षांत राहतात. बुद्धिमान असणारे ते मनानें आणि बुद्धीनें सर्व दिशांनीं सर्व जगाला व्यापून टाकतात.

३७. हें जें कांहीं आहे, तो मी आहे, हें मी जाणत नाहीं. मी गूढ आणि मनानें बांधलेला असा राहातो. जेव्हां सत्याचा प्रथमजात मजप्रत आला तेव्हांच मला त्या वाणीचा भाग प्राप्त झाला.

३८. अमर्त्य असून मर्त्याबरोबर राहाणारा तो शरीरानें ध्यानांत येतो. आणि उच्चनीच गति प्राप्त

---

३४. टीपः—अश्वमेधांतील ब्रह्मोद्य नांवाच्या भागांत ऋत्विजाकडून यजमानाला असे प्रश्न विचारीत. हा एक करमणूकीच्या सारखा भाग होय.

३५ टीपः—मागच्या ऋचेंतील उखाण्याची ह्या ऋचेंत उत्तरें आहेत.

करीत असतो. ते (देह व आत्मा) नित्यसंबद्ध, सर्वत्र जाणारे, विविध स्थलीं जाणारे आहेत. त्यापैकीं एकाला लोक पहातात आणि दुसऱ्याला पहात नाहींत.

३९. वेदाचें अक्षर म्हणजे जेथें सकळ देव राहातात असा अत्यंत उच्च स्वर्ग होय. ज्यानें तें अक्षर जाणलें नाहीं तो तें घेऊन काय करील ? ज्यानें तें जाणलें तेच सुखानें असतात.

४०. तूं चांगलें गवत खाऊन सुखी हो. म्हणजे मग आम्ही सुखी होऊ. हे गाई, तूं नित्य गवत खा. आणि जिकडे तिकडे संचार करणारी जी तूं ती निर्मळ पाणी पी.

४१. उदकें निर्माण करणारी गाय हंबरडा फोडते, ती एक पायाची, दोन पायांची, चार पायांची, आठ पायांची, नऊ पायांची, व हजार अक्षरांची होणारी अत्यंत उच्च स्वर्गी हंबरते.

४२. त्या गाईपासून समुद्र वाहतात. त्यामुळें चारहि दिशा आणि उपदिशा जगतात. तीपासून जें कधीहि क्षीण न होणारें पाझरतें त्यामुळें सर्व विश्वाचा निर्वाह चालतो.

४३. मी गोरीचा धूर दुरून पाहिला. त्याच्या पलीकडे सर्वत्र पसरणारा जो हा खालीं असलेला अग्नि, त्याच्या योगानें चित्रविचित्र बैलाला शूर पुरुष शिजवीत असत, तो पहिला धर्म असे.

४४. तिघे केंसाळ ऋतूप्रमाणें अवलोकन करतात. त्यांतुन एक प्रतिवर्षीं वपन करतो. दुसरा प्रकाश व वृष्ट्यादिकांनीं विश्वाला पहातो. तिसऱ्याची गति दिसते, रूप दिसत नाहीं.

४५. वाणीचीं चार रूपें गणिलीं आहेत. जे ब्राह्मण ज्ञानी आहेत त्यांना ती अवगत असतात. त्यांतून तीन गुप्त आहेत, तीं समजण्यांत येत नाहींत. वाणीचें जें चवथें रूप तें लोक बोलत असतात.

४६. कोणी इंद्र, मित्र, वरुण व अग्नि असे म्हणतात. हाच तो पक्षयुक्त दिव्य सुपर्ण होय. हा एकच असून शहाणे लोक ह्याला अनेक नांवांनीं संबोधितात. ते ह्याला अग्नि, यम आणि मातरिश्वन असें म्हणतात.

४७. उदक पांघरणारे आणि उत्तम पंख असलेले घोडे अंधारमय मार्गानें उडून स्वर्गाला जातात. ते सत्याच्या स्थानापासून परत येतात. आल्याबरोबर पृथ्वी घृतानें भरून टाकतात.

४८. बारा (महिने) प्रधि, एक (संवत्सर) चक्र, तीन (ऋतु) आखावरच्या फळ्या असा सूर्याचा रथ कोण जाणतो ? त्या चाकावर खुंट्याप्रमाणें तिनशें साठ (दिवस) चर अरा लावल्या आहेत.

४९. हे सरस्वति, जो तुझा स्तन पडलेला आहे, जो सुखदायक आहे, ज्यायोगें सर्व संपत्ति तूं वाढवतेस जो संपत्ति धारण करणारा आणि संपत्ति जाणणारा, जो उदार, तो येथें तूं आम्हांला पिण्याकरतां कर.

५०. देव यज्ञांनीं यज्ञ पूजीत होते, तो धर्म पूर्वीं मुख्य होता. जेथें पूर्वींचे यज्ञ केलेले लोक आहेत तेथें ते महिमायुक्त होऊन स्वर्ग प्राप्त करतात.

५१. हें उदक एकच. कांहीं दिवसांनीं तें वर जातें आणि पुन: खालीं येते. पर्जन्य भूमीला प्रसन्न करतात. अग्नि स्वर्गाला (आहुति पोंचवून) प्रसन्न करतात.

५२. स्वर्गीय, जोरानें जाणाऱ्या, गमनशील, महान, जलोत्पादक ओषधी उत्पन्न करणाऱ्या, पावसानें सहज जगाला तृप्त करणाऱ्या, उदकयुक्त अशा सूर्याला आम्ही साहाय्याकरतां बोलावतों.

सूक्त एकशें पासष्टावें.

ऋषि:—३.५.७.९. मरुत, १३-१५ अगस्त्य, १.२. ४.६.८.१०.११.१२. इन्द्र; देवता—मरुद्गण; छन्द:—त्रिष्टुभ.

१. इंद्र म्हणतो:—सारख्या वयाचे आणि एकत्र राहणारे मरुत कांहीं विशेष सारख्या शोभेनें युक्त होत्साते वर्षाव करतात. हे बलिष्ठ असणारे मरुत कोणत्या बुद्धीनें कोठून येऊन धनेच्छेनें माझें सामर्थ्य वाढवितात ?

२. तरुण असणारे तुम्ही कोणाचे हवि सेवन करतां ? आकाशांत उडणाऱ्या श्येनपक्ष्याप्रमाणें धावणाऱ्या मरुतांना यज्ञामध्यें कोण वळवतो ? कोणत्या महान मननीय स्तोत्रानें आम्ही आनंदित व्हावें ?

३. मरुत म्हणतात:——हे सज्जनसंरक्षका इंद्रा, थोर असणारा तूं एकटाच कुठें जातोस ? कां तुझें असेंच आहे ? हे अश्वयुक्ता, आम्ही तुझ्याकडे येत आहोंत, जें आम्हाला सांगण्यासारखें असेल तें चांगल्या भाषेनें बोल.

४. इंद्र म्हणतो—हे मरुतांनो, सर्व हवि माझे आहेत. सर्व स्तोत्रें मला सुखकारक आहेत. पिळून तयार केलेले सोम माझ्याकरतांच आहेत. (विघ्न निवारणाकरतां) माझें बळकट वज्र धारण केलेलें चालतें आहे.

---

१. टीप:——हा इंद्रमरुतांचा संवाद जीवात्मसंवादपर लावतात.

भक्त माझाचि प्रार्थना करतात. स्तोत्रें माझीच इच्छा करतात. आमचे हे घोडे हवीकडे मला वाहून नेतात.

५. मरुत म्हणतातः—हे इंद्रा, घोड्यांनीं युक्त होत्साते, स्वतच्या महान सामर्थ्यानें फुरफुरणारे आम्ही ह्या घोड्यांना जोडतो हे इंद्रा, तूंहि आमच्या सामर्थ्याचा अनुभव घेत असतोस.

६. इंद्र म्हणतोः—हे मरुतांनो, जें एकटा असणाऱ्या मला अहीच्या वधाच्या वेळीं प्राप्त झालें तें सामर्थ्य तुम्हांला होतें कधीं ? मी उग्र, बलवान आणि महान आहे. मी सर्व शत्रूंना हत्यारांनीं नमवलें आहे.

७. मरुत म्हणतातः—हे बलवान इंद्रा, तूं पुष्कळ पराक्रम केलेस. तथापि आमच्यासारख्या स्वरूपाच्या पराक्रमी सामर्थ्यांनींहि पुष्कळ केलें आहे. हे बलिष्ठा, आम्ही पुष्कळ पराक्रम केले आहेत. हे इंद्रा, कर्तृत्वानें आम्ही जें करूं इच्छितों ते तुझ्यापेक्षांहि जास्त आहे. कारण, आम्ही मरुत आहोंत.

८. इंद्र म्हणतोः—हे मरुतांनो, मी वृत्राचा वध केला. मी इंद्रियसामर्थ्यानें आणि स्वतःच्या क्रोधानें बलवान झालों आहे. मी हें सर्वाल्हादक आणि सहज वाहणारें पाणी मनूकरतां उत्पन्न केलें. कारण, मी वज्रबाहु आहे.

९. मरुत म्हणतात.—हो, हे भगवान, तुझ्या प्रेरणेशिवाय कांहींच नाहीं. तुझ्यासारखा ज्ञाता देव नाहीं. हे बलवन्ता, जन्माला आलेला किंवा जन्माला येत असलेला कोणी, जीं कर्में तूं केलींस तीं कर्में करूं शकत नाहीं.

१०. इंद्र म्हणतो.—मला एकट्यालाच व्यापक. सामर्थ्य असावें. कारण, इच्छेनें मीच पराक्रम करूं शकतों. हे मरुतांनो, उग्र असणारा मी इंद्रच मिळवणारा आहे. जिकडे मी जातों तिकडे इंद्रच ह्या सर्वांचा मालक होतो.

११. हे मरुतांनो, मला येथें स्तोत्र आनंदित करीत आहे. कारण, हे लोकहो, मीच तें महान कृत्य केलें आहे. तें ऐश्वर्ययुक्त, बलवान, चांगलें यज्ञ करणाऱ्या आणि अनेक शरीरांनीं युक्त असणाऱ्या मी केलें.

१२. हे मरुतांनो, असेंच हे माझ्यावर प्रेम करणारे विपुल अन्न व कीर्ति धारण करणारे आणि आल्हादक कान्तीचे तुम्ही माझ्याकडे लक्ष देऊन मलाच कीर्तियुक्त करतां.

१३. हे मरुतांनो, तुमची येथें कोण मनुष्य पूजा करतो ? हे मित्रांनो, मित्रभूत भक्ताकडे तुम्ही जा. हे आश्चर्यकारकहो, तुम्ही मनोहर संपत्ति प्राप्त करणारे व्हा. तसेंच तुम्ही माझ्या ह्या सत्याचे ज्ञाते व्हा.

१४. हे मरुतांनो, स्तोत्रानें स्तुति करण्याकरतां ज्ञात्याची स्तोत्र करणारी बुद्धि आम्हाकडे येवो. हे मरुतांनो, तुम्ही ज्ञात्या स्तोत्याकडे लवकर वळा. कारण, हीं स्तोत्रें स्तोता तुम्हाकरतां करीत आहे.

१५. हे मरुतांनो, हें स्तोत्र तुम्हाकरतां आहे. ही वाणी तुम्हाकरतां आहे. आनंद देणाऱ्या माननीय स्तोत्याच्या इच्छेनें त्याच्या शरीरपोषणाकरतां या. आम्ही अन्न, बल आणि जयशील देणगी प्राप्त करूं.

सूक्त एकशें सहासष्टावें.

ऋषिः—अगस्त्य; देवताः—मरुत्; छंदः—१-१३ जगती, १४-१५ त्रिष्टुभ.

१. हे मरुतांनो, पावसाचें निशाण अशा तुमचा वेगशाली अवतार व्हावा म्हणून तें तुमचें पुरातन माहात्म्य आम्ही वर्णन करीत आहोंत. हे गर्जना करणाऱ्या समर्थ मरुतांनो, तुम्ही जात असतां अंगाराप्रमाणें किंवा युद्धांतल्याप्रमाणें जे पराक्रम करतां ते वर्णन करतों.

२. स्वतःचा मुलगा (खाऊ घेतो) त्याप्रमाणें मधुर हवि धारण करणारे मरुत यज्ञांत उज्ज्वल अशा प्रकारें क्रीडा करीत बागडत असतात. मरुत नमस्कार करणाऱ्या आणि हवि देणाऱ्या भक्ताचें संरक्षण करतात. स्वयंसमर्थ असणारे मरुत भक्ताला त्रास देत नाहींत.

३. ज्या हवि देणाऱ्या भक्ताला संरक्षक आणि अमर मरुत धनसमृद्धि देतात, त्या भक्ताकरतां हितकारक मित्राप्रमाणें सुखदायक असणारे मरुत पाण्यानें लोक भिजून टाकतात.

४. हे मरुतांनो, तुमचे जे घोडे सामर्थ्यानें (पावसानें) जगाला व्यापून टाकतात ते तुमचे आपणहून चालणारे घोडे सर्वत्र जातात तुमचें गमन आश्चर्यकारक आहे. (जेव्हां तुम्ही येतां तेव्हां) हत्यारें उगारल्याप्रमाणें सर्व जग भयभीत होतें, सर्व घरेंदारें भययुक्त होतात.

५. जोरानें जाणारे मरुत जेव्हां पर्वतांना घुमवूं लागतात किंवा लोकहितकारक अन्तरिक्षाचा पृष्ठभाग ढासळवूं लागतात, तेव्हां तुम्ही जात असतां सर्व वनस्पति भितात आणि रथांत बसलेल्या स्त्रीप्रमाणें ओषधि हलूं लागतात.

६. हे उग्र मरुतांनो, जेव्हां तुमचें तीक्ष्ण दाताचें हत्यार धावूं लागतें आणि चांगले चालवलेल्या हत्याराप्रमाणें पशु मारले जातात तेव्हां चांगल्या अन्तःकरणानें संघाचा नाश न करणारे तुम्ही आम्हाला सद्बुद्धि पुरवा.

७. सतत दान देणारे, अन्नसमृद्ध, उदार, यज्ञांत स्तुति केलेले मरुत सोम पिण्याकरतां पूज्य इंद्राची पूजा करतात. ते मरुत वीर इंद्राचे प्रमुख पराक्रम जाणीत असतात.

८. हे मरुतांनो, ज्याचें तुम्ही रक्षण करतां त्याचें शेंकडां भोगयुक्त नगरांनीं पापापासून तुम्ही संरक्षण करा. हे उग्र, बलशाली आणि बहुस्तुत मरुतांनो, तुम्ही ज्या माणसाचें संरक्षण करतां त्याच्या मुलाबाळाचा उत्कर्ष करतां आणि निन्देपासून तारता.

९. हे मरुतांनो, तुमच्या खांद्यावर परस्पराशीं स्पर्धा करणारी आयुधें ज्याप्रमाणें आहेत त्याप्रमाणें तुमच्या रथांत कल्याणकारक सर्व संपत्तिहि भरलेली आहे. तुमच्या दंडांत आणि पायांत कडीं आहेत. आणि तुमचा आख चाकाच्या जवळ आहे.

१०. ते मरुत लोकहितकारक बाहूमध्यें विपुल कल्याणकारक संपत्ति धारण करतात. लखलखीत आणि ठसठशीत सुवर्णालंकार वक्षःस्थलावर धारण करतात. खांद्यावर पांढऱ्या माळा, आयुधावर धार धारण करतात. पक्षी पंख धारण करतात त्याप्रमाणें मरुत (सर्वांगावर) शोभा धारण करतात.

११. जे प्रभावानें मोठे, व्यापक, ऐश्वर्यवान, नक्षत्रांनीं देव दिसतात त्याप्रमाणें दुरून दिसणारे, आनंददायक, सुजिव्ह, तोंडांनीं शब्द करणारे, इंद्राच्या जवळ मिळून असणारे आणि स्तुतियुक्त आहेत ते येवोत.

१२. हे सुंदर रीतीनें जन्माला येणाऱ्या मरुतांनो, पृथ्वीच्या व्रताप्रमाणें तुमचें दान (पाऊस) अखंड आणि महत्त्वाचें आहे. ज्या पुण्यवानाला तुम्ही धन देतां इंद्रहि त्याला विरुद्ध जात नाहीं.

१३. हे अमर मरुतांनो, ज्या अर्थीं आमच्या स्तोत्राचें तुम्ही अत्यंत संरक्षण करतां त्या अर्थीं पुष्कळ काल गेला तरी तुमचा आमचा बांधवपणा प्रसिद्ध आहे. तुम्ही ह्या स्तोत्रानें लोकांच्या यशाचें संरक्षण करून लोकांचे पुढारी होऊन पराक्रमानें सर्व ध्यानांत घ्या

१४. हे वेगवान मरुतांनो, ज्या तुमच्या मोठेपणानें तुम्ही मोठाल्या कृत्यांची भरभराट करतां आणि ज्यामुळें लोक युद्धांत जय पावतात त्या यज्ञांनीं तें महत्व आम्ही प्राप्त करूं.

१५. हे मरुतांनो, हें स्तोत्र तुम्हाकरतां आहे. ही वाणी तुम्हाकरतां आहे. आनंद देणाऱ्या माननीय स्तोत्याच्या इच्छेनें त्याच्या शरिरपोषणाकरतां तुम्ही या. आम्ही अन्न, बल आणि जयशील देणगी प्राप्त करूं.

सूक्त एकशें सदुसष्टावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता– १ इंद्र, अवशिष्ट मरुत्; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, तुझे आम्हाला साहाय्य करण्याचे प्रकार हजारो आहेत. ते हे अश्वयुक्त इंद्रा, तुझें अत्यंत प्रशंसनीय असणारें अन्नहि हजारो प्रकारचें आहे. तुझें हजारो प्रकारचें आनंददायक धन आहे आणि जे हजारो प्रकारचे पशु आहेत, ते सर्व आम्हाला प्राप्त होवोत.

२. ज्याअर्थीं ह्या मरुतांचे नियुत् नांवाचे उत्कृष्ट घोडे समुद्राच्याहि पलीकडे धन वाहून नेतात तें मरुत आमचें रक्षण करण्याकरतां येवोत. कुशल नसणारे ते उत्कृष्ट संपत्तीसह आमच्याकडे येवोत.

३. धारण केलेली, उदक वर्षाव करणारी, सोनेरी वस्त्र पांघरलेली मेघमाला आणि वीज ह्याच्याप्रमाणें एकत्र असणारा, नवऱ्याच्या बायकोप्रमाणें गूढ संचार करणारा पण यज्ञांतील भाषेप्रमाणें सभेंत प्रगट असा हा मरुत्संघ आहे.

४. शुभ्र, धांवणारे मरुत साधारणस्त्रीप्रमाणें विद्युल्लतेशीं युक्त होऊन पाऊस पाडूं लागतात. भयंकर स्वरूपाचे मरुत द्यावापृथ्वीवर खूप पाऊस पाडतात. देव सख्याकरतां द्यावापृथ्वीचा उत्कर्ष करतात.

५. मरुत्पत्नी, केस विस्कटलेली, लोकांवर लक्ष असलेली रोदसी संघाकरतां मरुतांची इच्छा करते. अत्यंत तेजस्वी असणारी ती सूर्याच्या वेगानें यावें त्याप्रमाणें सूर्याच्या रथांत सूर्यपत्नी येऊन बसते त्याप्रमाणें येते.

६. जेव्हां हे मरुतांनो, हविर्युक्त, सोम तयार केलेला, सेवा करणारा, सेवा करीत तुमचें गाणें गात असतो तेव्हां यज्ञाकरतां सुंदर रथांत कामुक व बलवान तरुणीला—विजेला—घेऊन मरुत बसतात.

७. ज्याअर्थीं ही रोदसी पाऊस पाडूं इच्छिणारी अहंकारयुक्त, अविनाशी अशी भाग्यशाली लोकांना

धारण करते, त्याअर्थी ह्या मरुतांचा सत्य आणि प्रशंसनीय जो महिमा त्याचें मी स्तवन करतों.

८. मरुत, मित्रावरुण आणि अर्यमाहि दोषापासून यज्ञाचें संरक्षण करतात आणि अयोग्य गोष्टींचा नाश करतात. हे मरुतांनो, जल देणारा हा काल जसजसा येऊं लागतो तसतसें न पडणारें स्थिर उदकहि पडूं लागतें.

९. हे मरुतांनो, तुमच्या सामर्थ्याचा अन्त अत्यंत दुरूनहि आह्मांपैकीं एकालाहि प्राप्त झाला नाहीं. ते चढाईच्या सामर्थ्यानें वाढणारे मरुत पाण्याप्रमाणें शत्रूंना ताब्यांत घेतात.

१०. आज आम्ही इंद्राला अत्यंत प्रिय असावें. आम्ही उद्यां युद्धांत इंद्राचें महत्त्व गाऊं. आम्ही पूर्वी दररोज इंद्राचें महत्त्व गायलें आहे. तर इंद्र आम्हां लोकांना अनुकूल होवो.

११. हे मरुतांनो, हें स्तोत्र तुम्हाकरतां आहे. ही वाणी तुम्हाकरतां आहे. आनंद देणाऱ्या माननीय स्तोत्यांच्या इच्छेनें त्याच्या शरीरपोषणाकरतां तुम्ही या. आम्ही अन्न, बळ आणि जयशील देणगी प्राप्त करूं.

सूक्त एकशें अडुसष्टावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता–मरुत्; छंदः—१–७ जगती, ८–१० त्रिष्टुभ.

१. हे मरुतांनो, तुमच्या प्रत्येक यज्ञांत त्वरेनें सारखेपणा आणा. तुमचें सर्व कृत्य देवांना पोचणारें करा. म्हणून द्यावापृथ्वीला अत्यंत प्रसन्न करण्याकरतां व सुखाकरतां स्तोत्र म्हणुन तुम्हांला मी आमच्याकडे वळवीत आहें.

२. जे मरुत् रूपवानासारखे, स्वतः उत्पन्न झालेले आणि कंपनशील आहेत, ते अन्न आणि स्वर्गाकरतां उत्पन्न होतात. पाण्याच्या लाटाप्रमाणें, हजारो प्रशंसनीय गाईप्रमाणें वर्षाव करणारे मरुत उत्पन्न होतात.

३. जे मरुत् पिळलेल्या किंवा न पिळलेल्या सोमाप्रमाणें पिळणाऱ्याच्या अन्तःकरणांत जणूं काय सेवा करीत असतात, त्यांच्या खांद्यावर एखाद्या स्त्रीप्रमाणें शक्ति लोंबत असते आणि हातांत खादि (हस्तत्राण) व कात्री घेतलेली असते.

४. असे मरुत् धनयुक्त असे द्युलोकावरून सहज खालीं येतात. हे मरुतांनो, तुम्ही आपणहून स्तोत्याला बोलून उत्तेजन द्या. निष्पप, अनेक ठिकाणीं उत्पन्न होणारे आणि ज्यांचीं आयुधें चकाकत आहेत असे तुम्ही दृढ पर्वतांनाहि हलवता.

५. हे विद्युच्छस्त्र मरुतांनो, तुम्हापैकीं कोण तुम्हांला चालना देतो ? का जिव्हेनें जशी हनुवटीला सहज चालना मिळते तशी आपणहून तुम्हांला चालना मिळते ? अन्नसमृद्धीकरतां मेघोदकाप्रमाणें फलेच्छू यजमान सुशिक्षित घोड्याप्रमाणें तुम्हाला अनेक प्रकारें बोलावतो.

६. हे मरुतांनो, तुम्ही ज्याकरतां येतां त्या महान् लोकाचा अन्त कोठें आहे आणि आदि कोठें आहे ? जेव्हां तुम्ही वाळलेल्या गवताप्रमाणें एकत्र झालेलें उदक चळवता, तेव्हां तुम्ही विजेनें तेजस्वी असणाऱ्या जळपूर्ण मेघाला विशीर्ण करतां.

७. हे मरुतांनो, तुमच्या लुटीप्रमाणें, तुमची देणगी बलयुक्त, सुखयुक्त, तेजस्वी, सुफला आणि पोषक आहे. तसेंच दक्षिणेप्रमाणें कल्याणकारक आणि विद्युल्लतेप्रमाणें चपळ अशी तुमची देणगी आहे.

८. जेव्हां मरुत मेघगर्जना उत्पन्न करतात तेव्हां मरुतांच्या वज्रापासून नद्या वाहूं लागतात. जेव्हां मरुत पाण्याचा वर्षाव करतात तेव्हां पृथ्वीवर विजा चमकूं लागतात.

९. पृश्नीनें धांवत्या मरुतांचा तेजस्वी संघ महान संग्रामाकरतां उत्पन्न केला. ते सारख्या स्वरूपांचे मरुत मेघ उत्पन्न करते झाले आणि लागलींच लोकांनीं अन्नसमृद्धि पाहिली.

१०. हे मरुतांनो, हें स्तोत्र तुम्हाकरतां आहे. ही वाणी तुम्हाकरतां आहे. आनंद देणाऱ्या माननीय स्तोत्याच्या इच्छेनें त्याच्या शरीर-पोषणाकरतां तुम्ही या. आम्ही अन्न, बल आणि जयशील देणगी प्राप्त करूं.

सूक्त एकशें एकूणसत्तरावें.

ऋषिः -अगस्त्य; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, तूं खरोखर मोठा आहेस. कारण, तूं ह्या थोर मरुतांना सोडीत नाहींस. उलट रागापासून रक्षण करणारा आहेस. हे मरुतांना प्रेरणा देणाऱ्या, ज्ञाता असा तो तूं आम्हांला सुख दे. सुख तर अत्यंत प्रिय आहे.

२. हे इंद्रा, मरुत सर्व लोकांशीं संबंध असलेले, लोकांकरतां उदकवर्षाव करणारे आणि ज्ञानी असे

तुझ्यामुळें असतात. मरुतांची सेना लूट मिळणाऱ्या युद्धाची वेळ आली असतां आनंदित होते.

३. हे इंद्रा, तुझें तें आयुध आम्हाकरतां (मेघावर) पडो. म्हणजे मरुत पुरातन उदक सोडतील. मग कर्माकरतां अग्नीहि प्रज्वलित होतो. पाणी बेट बनवतें त्याप्रमाणें हवि त्याला धारण करतात.

४. हे इंद्रा, तूंच आम्हांला तें धन दे. विपुल दाक्षिणा देऊन ऋत्विजाला प्रसन्न करतात त्याप्रमाणें आम्ही दात्या अशा तुला प्रसन्न करूं. अन्नानें चांगलें दूध यावें म्हणून स्तनाला पुष्ट करतात त्याप्रमाणें जे स्तोते आहेत ते शीघ्र वर देणाऱ्या तुझीच स्तुति करतात आणि अन्नांनीं तुलाच समृद्ध करतात.

५. हे इंद्रा, तुझी संपत्ति अतिशय संतोषदायक आहे. कोणाहि यज्ञकर्त्याला ती मार्गदर्शक असते. जे देव जणूं काय प्रथम यज्ञांत जाऊं इच्छितात ते मरुत आम्हांला चांगले सुखी करोत.

६. हे इंद्रा, तूं हवि करणाऱ्या व नेत्या थोर यजमानाकडे जा. आणि यज्ञगृहांत (हविर्भक्षणाकरतां) झट. कारण, राजाचें सैन्य रस्त्यांत ज्याप्रमाणें उभें असतें त्याप्रमाणें ह्या मरुतांचे मोठाले मेघ उभे आहेत.

७. हे इंद्रा, तुझ्या भयानक, चित्रविचित्र, गमनशील आणि येणाऱ्या अशा ह्या मरुतांचा शब्द ऐकूं येत आहे. जे मरुत लढूं इच्छिणाऱ्या वैऱ्याला, कर्जबाजारी माणसाला व्यवस्थित तडाखे देऊन पाडावें, त्याप्रमाणें पाडतात.

८. हे इंद्रा, मानाकरतां लोकहितकारक शक्तीनें मरुताकडून प्रकाशरोधक व पाण्यानें भरलेले मेघ फोड. हे देवा, तुम्ही स्तुति करणाऱ्या ऋत्विजाकडून स्तुति केले जात आहां. हे इंद्रा, आम्ही अन्न, बळ आणि जयशाली संपत्ति प्राप्त करूं.

सूक्त एकशें सत्तरावें. *

ऋषिः—१-३-४ इंद्र, अवशिष्ट अगस्त्य; देवता–इन्द्र; छन्दः–१ बृहती, २-४ अनुष्टुभ, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. इंद्र म्हणतो—आतां आहे तें आतां नाहींसें होतें. आणि उद्या नाहींच. मग जें अद्भुत आहे तें कोण जाणतो? सर्वत्र संचार करणारें दुसऱ्याचें मन मी जाणतों, पण मनांत आणलेलें नष्ट होतें.

२. अगस्त्य म्हणतो:—हे इंद्रा, आम्हांला कां मारूं इच्छितोस? कारण, मरुत तुझे भाऊ आहेत. त्यांच्याशीं चांगल्या तऱ्हेनें वाग. आम्हांला युद्धांत ठार करूं नकोस.

३. इंद्र म्हणतो:—हे बंधो अगस्त्य, आमचा तूं सखा असून लबाडी कां करतोस? तुझें मन आम्ही बरोबर जाणतों कीं आमचेंच तूं आम्हांला देऊं इच्छित नाहींस!

४. हे ऋत्विजांनो, तुम्ही वेदी अलंकृत करावी. आणि पुढें अग्नि प्रज्वलित करावा. तेथें हे अगस्त्या, तुझा अमरपणाचा ज्ञापक असा यज्ञ आपण करूं या.

५. अगस्त्य म्हणतो:—हे धनाधिपते, तूं धनाचा ईश्वर आहेस. हे मित्रपते, तूं मित्रांचा आधार आहेस. हे इंद्रा तूं मरुतांसह संलाप कर. तसेंच तू यागकालीं हवि भक्षण कर.

सूक्त एकशें एकाहत्तरावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता–१-२ मरुत;.३-६ इन्द्रमरुत; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे मरुतांनो, तुमच्याकडे ह्या हवीनें आणि सूक्तानें मी येत आहे. त्वराशील असणाऱ्या तुम्हांला मी अनुग्रहबुद्धीची याचना करतों. हे मरुतांनो, स्तोत्रांनीं प्रसन्न झालेल्या मनानें तुम्ही क्रोध टाकून द्या आणि घोडे सोडा.

२. हे मरुतांनो, हें हविर्युक्त स्तोत्र तुमच्याकरतां आहे. हे देवांनो, आम्ही मनापासून केलेलें स्तोत्र तुम्ही मनापासून स्वीकारा. तर मनःपूर्वक हा हवि स्वीकारणारे तुम्ही याच. तुम्ही अन्नाची वृद्धि करणारे व्हा.

३. मरुन स्तुति केल्यावर आम्हांस सुख देवोत. धनवान इंद्र स्तुति केल्यावर आम्हांला अत्यंत सुखदायक होवो. हे मरुतांनो, आमचे येणारे सर्व दिवस एकापेक्षां एक उत्कृष्ट, स्पृहणीय आणि चांगले असोत.

४. हे मरुतांनो, ऐका. मी ह्या बलवान इंद्राच्या भीतीनें कापत आणि धांवत आहे. तुम्हाकरतां जे हवि

---

* टीप:—अगस्त्यानें इंद्राला हवि देऊन तोच मरुतांना देण्याची इच्छा करूं लागला. तेव्हां इंद्र येऊन दुःख करूं लागला.

४. टीप:—ही ऋचा इंद्राचें भाषण आहे कां अगस्त्याचें भाषण आहे याविषयीं मतभेद आहे.

तयार केले आहेत ते आम्ही (भीतीनें) दूर सारले आहेत. तर आम्हांला सुखी करा.

५. हे इंद्रा, ज्या सामर्थ्यानें तूं प्रकट केलेले किरण उषा उजाडल्यावर लोकांना जागृत करतात, त्यांनीं हे बलवान इंद्रा, उग्र, बलद आणि पुरातन असा तूं उग्र मरुतांसह आम्हांला अन्न दे.

६. हे इंद्रा, अत्यंत बलिष्ठ असणाऱ्या लोकांचें तूं संरक्षण कर. मरुतांसह तूं आमच्यावर क्रोधरहित हो. ज्ञात्या मरुतांसह शत्रूंचा पराभव करणारा आणि इष्ट धारण करणारा हो. हे इंद्रा, तूं आम्हांला अन्न, बल आणि जयशाली संपत्ति दे.

सूक्त एकशें बहात्तरावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता-मरुत; छन्दः—गायत्री.

१. हे मरुतांनो, तुमचें आगमन आश्चर्यकारक असो. हे उदार आणि अक्षीणप्रकाश मरुतांनो, तुमचें आगमन आमच्या संरक्षणाकरितां होवो.

२. हे उदार मरुतांनो, तुमचें तें लखलखीत आयुध आमच्यापासून दूर असो. जो तुम्ही फेकतां तो अश्मा आमच्यापासून दूर राहो.

३. हे मरुतांनो, उदार असणारे तुम्ही गवतासारख्या माझ्या प्रजा तात्काल (त्रासापासून) दूर करा. आम्हांला दीर्घायुषी करा.

सूक्त एकशें त्र्याहत्तरावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, आकाशांत घुमणारें सामगायन जसें तुला आवडेल तसें (उद्गाता) गातो. तें सर्वत्र पसरेल असें आम्ही गातों. दुध देणाऱ्या सुरक्षित गाई यज्ञांत बसलेल्या स्वर्गीय इंद्राची ज्या योगें सेवा करतील त्या रीतीनें आम्ही पूजन करूं.

२. बलवान इंद्र स्वतः हवि तयार करणाऱ्या ऋत्विजांकडून पूजिला जातो. कारण तो भुकेलेल्या हरिणाप्रमाणें हवीकरतां उद्युक्त असतो. हे प्रशंसनीय इंद्रा, स्तुति इच्छिणाऱ्या देवांची स्तुति करणारा मर्त्य होता यज्ञ करीत सहकुटुंब यज्ञ पार पाडीत असतो.

३. होमनिष्पादक अग्नि जाऊन तयार असलेलीं आपलीं स्थानें व्यापतो. आणि पृथ्वीवरचें वार्षिक अन्न स्वीकारतो आणि हवि नेतांना घोड्याप्रमाणें खिंकाळतो. बैलाप्रमाणें शब्द करतो आणि दूताप्रमाणें द्यावापृथ्वीभर स्तुति केलेला असा फिरत असतो.

४. ते विपुल हवि आम्ही त्या इंद्राकरतां तयार करतों. देवभक्त स्तोत्रें करतात. देखणा, अश्वीप्रमाणें सुलभ आणि रथांत बसलेला इंद्र आमचें स्तोत्र स्वीकारो.

५. जो प्रबल आहे, जो शूर आणि धनवान् आहे आणि जो रथांत बसलेला आहे, त्या इंद्राचीच हे स्तोत्या, तूं स्तुति कर. जो उत्कट बाजूच्या योध्याशींहि युद्ध करणारा, वज्रधारी, आवारक तमाचाहि नाश करणारा आहे त्याची तूं स्तुति कर.

६. जो इंद्र अशा प्रकारें महिम्यानें सर्व लोकांत समर्थ आहे, ज्याला दोन्ही बाजू सारखी असणारी द्यावापृथ्वी फिरण्यास पुरेशी नाहीं, तो इंद्र बल पृथ्वीला व्यापते त्याप्रमाणें सर्व जगाला व्यापून आहे. शिंग धारण करावें त्याप्रमाणें अन्नयुक्त इंद्र द्युलोकाला धारण करतो.

७. हे शूर इंद्रा, युद्धांत तुझ्या आश्रयावर असणाऱ्यांना सामर्थ्य देणारा, उत्कृष्ट मार्गभूत इंद्राला भूषित करण्याकरतां, जे बलांनीं तुला आनंदित करतात ते एक विचाराचे लोक ज्ञात्या इंद्राला आनंदित करण्याचा प्रयत्न करतात.

८. हे इंद्रा, जेव्हां उदकदेवता ह्या लोकांकरतां अन्तरिक्षांत तुला पाऊस पाडण्याकरतां आनंदित करतात, तेव्हां तुला सोमयाग सुखकारक होतात. हे इंद्रा, जेव्हां तूं बुद्धिपूर्वक स्तोतृजनाची इच्छा करतोस तेव्हां तुझीं सर्व स्तोत्रें तुला आनंददायक होतात.

९. हे ईश्वरा, राजादि लोकांचे स्तुति करून व्हावें त्याप्रमाणें तुझे चांगले मित्र आणि चांगली इच्छा करणारे आम्ही व्हावें. हे ऋत्विजांनो, स्तुति केलेला इंद्र स्तुतीनें प्रसन्न होऊन घाई केल्याप्रमाणें आम्हांला फल देणारा होईल असें करा.

१०. जगांत स्पर्धा करणाऱ्याला स्तुतीनें स्पर्धारहित करतात त्याप्रमाणें वज्रहस्त इंद्र आम्हाला स्तुतीनें अनुकूल होवो. चांगलें पालन करीत असतां हितैषी लोक नगराधिपतीचा सन्मान करतात त्याप्रमाणें आम्हांला ऐश्वर्यांत इच्छिणारे लोक यज्ञांनीं इंद्राची पूजा करतात.

११. वाटेंतील स्थान तान्हेलेल्याला प्रसन्न करतें त्याप्रमाणें कोणीहि यज्ञकर्ता मनुष्य इंद्राला प्रसन्न करतो.

लांब मार्ग फलापासून दूर नेतो त्याप्रमाणें कुटिल मनुष्य मनानें भटकत (इंद्रापासून) दूर जातो.

१२. हे इंद्रा, महायुद्धांत मरुतांसह असणारा तूं आम्हांला टाकूं नकोस. हे बलवान इंद्रा, तुझा हा हाविर्भाग आहे. माझी प्रशंसा करणारी वाणी बलवान व हविर्युक्त महान् मरुतांची स्तुति करीत आहे.

१३. हे मरुतांनो, हें स्तोत्र तुम्हाकरतां आहे. ही वाणी तुम्हाकरतां आहे. आनंद देणाऱ्या माननीय स्तोत्याच्या इच्छेनें त्याच्या शरीरपोषणाकरतां तुम्ही या. आम्ही अन्न, बल आणि जयशील देणगी प्राप्त करूं.

सूक्त एकशें चवऱ्याहत्तरावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता–इन्द्र; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, जे देव आहेत त्यांचा तूं राजा आहेस. हे बलवन्ता, तूं आम्हा लोकाचें रक्षण कर. तूं सज्जनसंरक्षक, धनवान, आमचें संरक्षण करणारा, सत्यस्वरूप, आवरण घालणारा आणि बलदाता आहेस.

२. हे इंद्रा, जेव्हां तूं शारद नगरें सहज फोडलींस तेव्हां बडबड्या शत्रूंना तुम्ही गप्प बसविलें. हे निर्दोष इंद्रा, तूं गमनशील पाणी वहावयास लावलेंस आणि तरुण पुरुकुत्साकरतां वृत्राला ठार केलेंस.

३. हे इंद्रा, शूरांनीं रक्षण केलेल्या आणि वेढा दिलेल्या नगरावर तूं चालून जा. हे बहुस्तुता, तूं ज्यांच्यासह असतोस त्यांच्यासह द्युलोकावर जा. प्रज्वलित आणि तल्लख अग्नीचें घरांत कर्माकरतां स्थापन करावयास अरण्यांतील सिंहाप्रमाणें तूं रक्षण कर.

४. हे इंद्रा, तुझें महत्व वाढविण्याकरतां वज्राच्या तडाख्यानें (फुटलेले मेघ) एका स्थानीं (अन्तरिक्षांत) पडून असोत. जेव्हां तूं हत्यार घेऊन पाण्यावर धांवून जातोस तेव्हां तें खालीं वाहूं लागतें. तूं घोड्यांवर बसतोस आणि धैर्यानें अन्न वाढवितोस.

५. हे इंद्रा, ज्याकरतां तूं कुत्साची इच्छा करतोस, त्याकरतां सुखाची इच्छा करणारे, सरळगामी आणि वायुवेगी अश्व जोड. त्याकरतां सूर्याच्यारथाचें चाक वर येवो. आणि वज्रबाहु इंद्र शत्रूवर चालून जावो.

६. हे अश्वयुक्त इंद्रा, प्रेरणेमुळें उत्साहित झालेला तूं दातृत्वहीन शत्रूंना ठार करतोस. जे अर्यमनला (तुला) भजतात, ते मानवाला साहाय्य करणारे सत्वर अपत्ययुक्त होतात.

७. हे इंद्रा, ज्ञाता अन्न प्राप्त झालें असतां तुला स्तवितो. तसेंच तूं दासाला भूमि अंथरूण केलेंस. धनवान इंद्र तिन्ही भूमि धनानें संग्रहणीय करता झाला तसेंच दुर्योणाकरतां कुयवाला तूं युद्धांत ठार केलेंस.

८. हे इंद्रा, तुझीं तीं पुरातन कृत्यें अलीकडचे लोक जाणतात. लोकांचें संरक्षणाकरतां तूं अनेक शत्रूंचा पराभव केलास. राक्षसांचीं घातक नगरेंहि फोडलींस आणि दुष्ट राक्षसांचें हत्यारहि नमवलेंस.

९. हे इंद्रा, तूं शत्रूंना कांपविणारा आहेस. वहाणाऱ्या नद्याप्रमाणें तूं तरंगयुक्त पाणी वाहवितोस. हे शूरा, जेव्हां तूं समुद्र भरून टाकतोस तेव्हां तूं तुर्वश आणि यदु यांचें सुखानें संरक्षण करतोस.

१०. हे इंद्रा, सर्वदा तूं आम्हाला अत्यंत देणारा हो. तसेंच लोकाचें संरक्षण करणारा हो. तसेंच प्रसिद्ध असणारा तूं आमच्या सर्व सेनांना बल देणारा हो. आम्ही अन्न, बल आणि जयशील देणगी प्राप्त करूं.

सूक्त एकशें पंचाहत्तरावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता–इंद्र; छंदः—१ स्कंधोग्रावी बृहती, २–५ अनुष्टुभ, ६ त्रिष्टुभ.

१. हे हरिद्वर्ण अश्वयुक्ता, श्रेष्ठ व मदकर सोम भांड्यांत ओतावा त्याप्रमाणें तूं आपल्या तोंडांत ओतून पितोस व हर्षयुक्त होतोस. वीर्यवान अशा तुला तो वीर्यकर आणि बलकर आणि हजारो फायदे देणारा सोम अर्पण केला आहे.

२. हे इंद्रा, मदकर, श्रेष्ठ, वीर्यकर, रणझुंझार विजयी, शत्रू जिंकणारा आणि अमर असा आमचा सोमरस तुला प्राप्त होवो.

३. तूं शूर आणि दानशील आहेस. मनुष्यांच्या रथाला तूं हाकारतोस. अधार्मिक शत्रूंना, लाकडाचें भांडें ज्वालेनें जाळावें त्याप्रमाणें तूं जाळून टाक.

४. हे ज्ञानवान इंद्रा, अधिपति अशा त्वां आपल्या सामर्थ्याच्या योगानें सूर्याचें चाक हरण केलेंस. तूं शुष्णाकरतां शस्त्र घेऊन वायूच्या घोड्यांनीं कुत्साकडे जा.

५. तुझा हर्ष अत्यंत पराक्रमकारी आहे आणि तुझा पराक्रम अत्यंत धनदायी आहे. तरी तुझा तो शत्रुघातक हर्ष आणि धनप्रद पराक्रम आहे, त्याच्या योगानें अश्वादिसंपत्ति देणारा असा तूं स्तुत्य आहेस.

६. हे इंद्रा, ज्या स्तोत्रांच्या योगानें तूं प्राचीन भक्तांना, तृषाक्रांतास पाण्यानें सुखवावें त्याप्रमाणें सुखी केलेंस, त्याच प्रकारच्या स्तोत्रांनीं मी तुझी अनन्यभावानें प्रार्थना करीत आहे. आम्हांला अन्न, बल आणि जयशाली संपत्ति दे.

सूक्त एकशें शहात्तरावें

ऋषिः—अगत्य; देवता-इंद्र; छंदः—१–५ अनुष्टुभ, ६ त्रिष्टुभ.

१. हे सोमा, आम्हाला धनप्राप्ति व्हावी म्हणून वीर्यकर असा तूं इंद्राच्या (उदरांत) प्रवेश कर आणि त्यास उत्साहित कर. शत्रूंचा नाश करणारा असा तूं शत्रूंना हाकलून देतोस. शत्रूंच्या आसपास तूं कोठें असत नाहींस.

२. सर्व चर सृष्टीला जो केवळ एकच (शास्ता) आहे त्या इंद्राकडे आमच्या ह्या प्रार्थना जावोत. नांगरणाऱ्या बैलाच्या मागून धान्य पेरावें त्याप्रमाणें ह्याच्या मागून हवि पेरले जातात (दिले जातात.)

३. ज्याच्या हातामध्यें सर्व जनतेचें धन आहे, जो आमचा द्वेष करतो, जो दिव्य वज्राप्रमाणें (बळकट) आहे त्यास तूं ठार कर.

४. जो तुला सुखकारक होत नाहीं, असा सोमरस न काढणारा सर्व दुष्टजन तूं मारून टाक. त्याचें धन आम्हांला दे. उपासकच केवळ धनप्राप्तीला योग्य होय.

५. उभय लोकामध्यें प्रसिद्ध असणाऱ्या इंद्राचीं स्तोत्रें जो सतत गातो, त्याचें तूं रक्षण करतोस. हे सोमा, युद्धामध्यें तूं प्रबलामध्यें प्रबळ अशा इंद्राचें संरक्षण करतोस.

६. हे इंद्रा, ज्या स्तोत्रांच्या योगानें तूं प्राचीन भक्तांना, तृषाक्रांतास पाण्यानें सुखवावें, त्याप्रमाणें सुखी केलेस त्याचप्रकारच्या स्तोत्रांनीं मी तुझी अनन्यभावानें प्रार्थना करीत आहें. तरी आम्हांला, अन्न बल व जयशील संपत्ति दे.

सूक्त एकशें सत्त्याहत्तरावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. सर्व मनुष्यांचे मनोरथ पूर्ण करणारा, लोकांचा अधिपति, मानवांचा राजा आणि बहुस्तुत असा इंद्र इकडे येवो. स्तुति केलेला आणि हविरन्नाची इच्छा करणारा असा तो इंद्र आपले बळकट घोडे रथाला जोडून आमच्या रक्षणार्थ इकडे येवो.

२. हे इंद्रा, तुझे ते वीर्यशाली, तरुण, स्तोत्रांच्या योगानें जोडले जाणारे, बलशाली व रथ ओढणारे घोडे आहेत, त्यांवर बसून त्यांच्यासह तूं इकडे ये. हे इंद्रा, आम्हीं सोमरस काढला असून तुला इकडे बोलावीत आहों.

३. श्रेष्ठ असा तूं आपल्या बळकट रथावर बैस. तुझ्याकरतां सोमरस काढला असून तो मधुर केला आहे. हे भूमिपालका, तूं आपल्या बलशाली हरिद्वर्ण घोड्यांना जोडून सखल मार्गानें मजकडे ये.

४. हे इंद्रा, हा तो देवगामी यज्ञ आणि हा तो पशु, हीं तीं स्तोत्रें आणि हा सोम. हे बलवंता, तुझ्याकरतां दर्भ अंथरले आहेत. तरी इकडे ये, त्यावर बैस, सोम पी, आणि येथें घोडे मोकळे सोड.

५. हे इंद्रा, अशा रीतीनें चांगल्या प्रकारें स्तुति केलेला तूं मान्य कवीच्या स्तोत्रांकडे ये. दिवसा स्तुति करणाऱ्या आम्हांला तुझ्या कृपेनें इष्टसिद्धि प्राप्त होवो. आम्हांला अन्न, बल आणि जयशाली संपत्ति मिळो.

सूक्त एकशें अठ्याहत्तरावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता-इन्द्र; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, जिच्या योगानें स्तोत्रपाठकांचें तूं संरक्षण केलेंस, अशी समृद्धि ज्याअर्थी तुजजवळ आहे, त्याअर्थी तूं आमच्या महत्त्वाकांक्षा जाळून टाकूं नकोस. तुझ्या प्रीत्यर्थ उपासकानें करावयाचीं सर्व कामें मज उपासकाकडून घडोत.

२. दोघीं बहिणींनीं (द्यावापृथिवी किंवा रात्र व उषा) आम्हांकरतां आपापल्या ठिकाणीं जें निर्माण केलें, त्याची हानि राजा इंद्र न करो. बलयुक्त ऋत्विज याला हवि अर्पण करोत. इंद्र आम्हांला आपलें सख्य व बळ देवो.

३. युद्धामध्यें शूर इंद्र आपल्या पराक्रमी वीरांच्यासह विजयी होतो. तो रक्षणाची इच्छा करणाऱ्या उपासकाचा धांवा ऐकतो. तो हविर्दान करणाऱ्या उपासकाचा रथ विजयाकडे नेतो. आणि त्याच्या इच्छेस आल्यास तो आपणहूनच स्तोत्रें म्हणण्याची प्रेरणा (उपासकास) करतो.

४. हविरन्नें भक्षण करणारा इंद्र हविरन्नाच्या इच्छेनें वीरासह आपल्या उपासकाकडे जातो. उपास-

कानें स्तविलेला आणि मनोरथ पूर्ण करणारा इंद्र गजबजून गेलेल्या यज्ञांत अन्नाची प्रशंसा करतो.

५. हे धनवान इंद्रा, तुझ्या योगानें आम्ही स्वत:ला मोठे मानणाऱ्या अहंमन्य शत्रूंना जिंकूं. तूं आमचा संरक्षक आहेस. आमचा उत्कर्षहि तूंच करतोस. तरी आम्हांला अन्न, बळ आणि जयशाली संपत्ति मिळो.

सूक्त एकशें एकोणऐंशीवें.

ऋषि:—१–२ लोपामुद्रा, ३–४ अगस्त्य, ५–६ अगस्त्यशिष्य; देवता–रति; छन्द:—५ बृहती, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. मी पुष्कळ वर्षें रात्रंदिवस आणि वृद्धपण आणणाऱ्या उष:कालींहि देवविषयक परिश्रम केले आहेत. आतां म्हातारपण गात्रांची शोभा नाहींशी करूं लागलें. तरी पण वीर्यशाली पुरुष स्त्रियांच्याकडे जातात ना ?

२. जे कोणी प्राचीन काळीं सत्यनिष्ठ राहून देवांबरोबर सत्यच बोलत असत, तेहि उत्सर्ग करीत असत. त्यांनाहि (ब्रह्मचर्य) कडेपर्यंत राखतां आलें नाहीं. स्त्रिया पुरुषांशीं संग करीतच असल्या पाहिजेत.

३. अगस्ति म्हणतो:—आपण कांहीं व्यर्थ श्रम केले नाहींत. कारण देवांनीं आपलें रक्षण केलें आहे. सर्व शत्रूंना आपण जिंकलें आहे. जर आपण मैथुनामध्यें परस्परसंगत झालों, तर त्याच्या योगानें (पुत्रलाभाच्या योगानें) आपण शेकडो धोके असलेल्या या संसारयुद्धांत जय पावूं.

४. अडवून धरलेलें पाणी ज्याप्रमाणें जोर करतें, त्याप्रमाणें माझा काम वाढला आहे. इकडून तिकडून सर्व ठिकाणांहून तो उत्पन्न झाला आहे. लोपामुद्रेनें मज वीर्ययुक्ताला स्ववश केलें आहे. चंचल झालेली ती मज दीर्घश्वसन करणाऱ्या धीराला भोगते.

५. आतां अंत:करणपूर्वक प्यालेल्या ह्या सोमरसाच्या जवळ जाऊन मी त्याची अशी प्रार्थना करतों कीं, आम्हीं जें पाप केलें आहे, त्याची तूं आम्हांस क्षमा कर. कारण मर्त्य बहुकाम आहे.

६. बलवान अगस्त्य ऋषीनें कुदळींनीं खाणिलें आणि अन्न, संतति आणि बळ यांची इच्छा केली. त्या उग्र ऋषीनें दोन्ही वर्णांचा उत्कर्ष केला. त्याला देवापासून निश्चित फलप्रद आशीर्वाद मिळाले.

सूक्त एकशें ऐंशीवें.

ऋषि:—अगस्त्य; देवता–अश्विनौ, छंद:–त्रिष्टुभ.

१. जेव्हां तुमचे उत्तम प्रकारें ताब्यांत असलेले घोडे अंतरिक्षाच्या सभोवार भ्रमण करतात, किंवा जेव्हां तुमचा रथ आकाशाभोंवतीं फिरतो, तेव्हां तुमच्या सुवर्णमय धांवापासून मधुररस थबथब गळतो. तो मधुर रस पीत पीत तुम्ही उषांबरोबर जाता.

२. जेव्हां तुम्ही सतत संचार करणाऱ्या, मनुष्यहितकारी आणि पूज्य अशा (घोड्यांच्या) पूर्वी येऊन धडकतां, तेव्हां तुमची ही सर्वस्तुतियोग्य बहीण तुम्हांस पुष्ट करते. आणि हे मधुररस प्राशन करणारेहो, ती तुम्हांजवळ अन्न आणि बळ यांची याचना करते.

३. तुम्ही गाईच्या ठिकाणीं दूध उत्पन्न केलें. तुम्ही गाईच्या कासेंत अपक्वाच्या ऐवजीं पक्व दूध निर्माण केलेंत. हे सत्यस्वरूप अश्वीहो, तेजस्वी उपासक चोराप्रमाणें (एकसारखें लक्ष ठेवून) तुमची मन:पूर्वक उपासना करतो.

४. तुम्ही हविर्दात्या अत्रीला पाण्याच्या प्रवाहाप्रमाणें मधुररस प्राप्त करून दिलांत. हे पराक्रमी अश्वीहो, म्हणूनच पशुयाग आणि सोम तुम्हांकडे रथाच्या चाकाप्रमाणें धांवत असतात.

५. हे पराक्रमी अश्वीहो, मी तुग्राच्या जयशील पुत्राप्रमाणें तुम्हांस स्तुतीच्या साहाय्यानें मजकडे मनोरथ पूर्ण करण्याकरतां वळवितों. विस्तीर्ण द्यावापृथिवी तुमच्या सेवेंत तत्पर असतात. हे पूजनीयहो, तुमच्या कृपेनें हा वृद्ध वृद्धपणांतून (मुक्त होऊन) दीर्घायुषी होईल.

६. हे दानशूरहो, जेव्हां तुम्हीं (रथाला) जोडलेल्या घोड्यांच्या योगानें जात असतां, तेव्हां तुम्ही हविरन्नानें तृप्त होऊन भक्ताला मोठी बुद्धि देतां. उपासकानें तुम्हांकडे वाऱ्याप्रमाणें जावें आणि प्रसन्न करावें. म्हणजे सदाचरणी माणसाप्रमाणें त्याला वैभव आणि बल प्राप्त होतें.

---

५ टीप:—अगस्त्य व लोपामुद्रा यांचा संभोगसंलाप ऐकून त्याबद्दल प्रायश्चित्त घेऊं इच्छिणारा शिष्य ५–६ ह्या ऋचांत बोलत आहे. ह्या दोन ऋचांचा जप करणारा पापमुक्त होतो असें ऋग्विधानांत सांगितलें आहे.

५. टीप:—तुग्रपुत्र भुज्यु १–११६–३ पहा.

७. आम्हीच तुमचे खरे स्तोत्रकर्ते तुमची स्तुति करीत आहोंत. आणि म्हणून हे व लोकांमध्यें प्रख्यात आणि श्रेष्ठ सोमाचें पात्र भरून ठेवलें आहे. आणि म्हणून हे बलशाली व अनिंद्य अश्वीहो, तुम्ही देवांच्या जवळ ठेवलेला सोम पिता.

८. अश्वीहो, लोकश्रेष्ठ आणि प्रख्यात अगस्त्य भव्यप्रद रीतीनें वर्षणाऱ्या मेघोदकासाठीं दररोज शंखनादाप्रमाणें तुम्हांला हजारो प्रकारांनीं जागृत करतो.

९. ज्याअर्थीं तुम्ही आपल्या मोठ्या रथांत बसून येता, किंवा हे सत्वरगामीहो, ज्याअर्थीं तुम्ही मानवी होत्याप्रमाणें येतां, त्याअर्थीं हे नासत्यहो, तुम्ही आम्हां यजमानाला उत्तम घोडे द्या. आम्ही धनाढ्य होऊं असें करा.

१०. हे अश्वीहो, तुमच्या नव्या आणि चांगल्या धांवा असलेल्या आणि द्युलोकावरतीं फिरणाऱ्या त्या रथाला आम्ही स्तोत्रांनीं आमच्या कल्याणाकरतां आज बोलावीत आहों. तरी आम्हांला अन्न, बळ आणि संपत्ति प्राप्त होवो.

सूक्त एकशें एक्यांयशीवें.

ऋषिः—अगस्त्य; देवता—अश्विनौ; छंदः—त्रिष्टुभ.

१. अत्यंत प्रिय आणि यज्ञ निर्विघ्नपणें पार पाडणारे असे तुम्ही अन्न, धन आणि उदकें घेऊन येतां, ते केव्हां? हे धनसंपन्न आणि लोकरक्षकहो, तुम्हांकरतां हा यज्ञ केला आहे.

२. तेजस्वी, उदकपान करणारे, वायुवेगानें जाणारे, दिव्य, नित्यगामी मनाप्रमाणें वेगवान, वीर्यशाली, धष्टपुष्ट व स्वयंप्रकाशमान असे तुमचे घोडे तुम्हां अश्वींना येथें घेऊन येवोत.

३. उतारावर वाहणाऱ्या प्रवाहाप्रमाणें वेगानें धांवणारा आणि सारथ्याची बैठक मोठी असलेला असा तुमचा रथ आमच्याकडे कल्याणासाठीं येवो. हे रथारूढ आणि पूजनीय अश्वीहो, तो तुमचा रथ भक्कम असून मनापेक्षांहि अधिक वेगवान आणि स्वाभिमानी आहे.

४. केवळ येथेंच जन्मलेल्या अशा ह्या दोघा (अश्वींची) आपापल्या नामांच्या योगानें आणि निष्पाप शरीरानें स्तुति केली जात आहे. तुम्हांपैकीं एकजण सुमखाचा नायक असून दुसरा द्युलोकाचा भाग्यशाली पुत्र होय.

५. तुमचा भरधांव जाणारा, शिखर असलेला सोनेरी वर्णाचा रथ आमच्या येथें जरूर येवो. हे अश्वीहो, तुम्हांपैकीं एकाच्या गरगर फिरणाऱ्या हरिद्वर्णयुक्त घोड्यांना हविरन्नें आणि स्तोत्रें यांच्या योगानें पुष्टि मिळो.

६. हे अश्वीहो, तुमचा धनधान्यसंपन्न, आणि वीर्यवंताप्रमाणें प्रतापी रथ मधुर अन्नें घेऊन येत असतो. तुम्हांपैकीं एकाच्या वेगवान अश्वांनीं उच्च प्रदेशांतून वाहणाऱ्या नद्या खालीं येत व पुष्ट होत आम्हांकडे येतात.

७. हे कुशाग्रबुद्धि अश्वीहो, तुमची तीन प्रकारानें प्रसार पावणारी स्तुति मोठ्यानें म्हटली जात आहे. तुमची स्तुति केली असतां रक्षणाची इच्छा करणाऱ्या भक्ताचें तुम्ही संरक्षण करा. आणि तुम्ही भ्रमण करीत असा किंवा नसा, तरी तुम्ही माझी ही प्रार्थना ऐका.

८. तुमच्या तेजस्वी स्वरूपाची स्तुति केली जात आहे. ती ज्या भक्ताच्या येथें तीन ठिकाणीं दर्भ अंथरले आहेत, त्यास समृद्ध करते. हे वीर्यवंत अश्वीहो, तुमचा वीर्ययुक्त मेघ गोरसाच्या वृष्टीप्रमाणें मनुष्यांच्या इच्छा तृप्त करून त्यांस समृद्ध करतो.

९. हे अश्वीहो, विद्वान पूषाप्रमाणें हविरन्नयुक्त यजमान तुमची. अग्नि आणि उषेप्रमाणें स्तुति करीत आहे. ज्याअर्थीं मी तुम्हांस स्तुतिपूर्वक आवाहन करीत आहें, त्याअर्थीं आम्ही अन्न, बळ आणि जयशाली संपत्ति मिळवावी.

सूक्त एकशें ब्यांयशीवें.

ऋषिः—अगस्त्य; देवता--अश्विन्; छंदः--जगती.

१. हें पहा उजाडलें. हे बुद्धिमान भक्तहो, हा तो वीर्यशाली घोड्यांनीं युक्त रथ आला. तुम्ही त्याला सुशोभित करा आणि प्रसन्न व्हा. बुद्धीला प्रेरणा देणारे, स्तुत्य, विश्पलेचें संरक्षण करणारे, द्युचे पुत्र, सदाचरणी लोकांचें कल्याण करणारे असे अश्वी (आले आहेत.)

२. तुम्ही इंद्राप्रमाणें अत्यंत बुद्धिमान, मरुतांप्रमाणें अत्यंत पराक्रमी, सामर्थ्यवान आणि उत्तम प्रकारचे रथी आहांत. तुम्ही मधानें भरलेल्या रथांत बसून जातां. हे अश्वीहो, त्या रथाच्या योगानें. तुम्ही हविर्दात्या उपासकाकडे या.

---

१. टीपः—विश्पला १.११६.१५. पहा.

३ हे पराक्रमी अश्वीहो, जो तुम्हांला हवि अर्पण न करतां स्वतःस मोठा मानतो, अशाच्या येथें तुम्ही काय करतां ? काय म्हणून तेथें राहतां ? त्याला टाकून इकडे या. त्या कृपणाचा जीव नष्ट करा व स्तोत्र करूं इच्छिणाऱ्या मज उपासकाला प्रकाश द्या.

४. हे अश्वीहो, भोंकणाऱ्या कुत्र्याला भोवतालच्या प्रदेशांतून हुसकून लावा. शत्रु ठार होवोत. हें कसें करावें हें तुम्ही जाणतां. स्तोत्याचें प्रत्येक स्तोत्र रत्नाप्रमाणें तेजस्वी करा. हे नासत्यहो, तुम्ही दोघेहि माझें स्तोत्र सफल करा.

५. तुम्ही तुग्रपुत्रासाठीं महासागरांत ती स्वतःच्या सामर्थ्यानें जाणारी आणि पंखयुक्त उडणारी नाव तयार करते झालां. आणि त्या नावेनें उत्तम प्रकारें उड्डाण करणारे तुम्ही सहज लीलेनें समुद्रांतून उडून देवलोकीं गेलां.

६. उदकांमध्यें टाकून दिलेला, आधाररहित, अंधकारांत जखडून फेकलेला, अशा तुग्रपुत्राला अफाट समुद्रांत लीलेनें हिंडणाऱ्या आणि अश्वीनीं चालविलेल्या चार नावा समुद्रापार नेत्या झाल्या.

७. कोणी एक वृक्षाप्रमाणें समद्रामध्यें निश्चल उभा राहिला होता. त्यालाच रक्षणाच्या इच्छेनें तुग्रपुत्रानें कवटाळलें. तेव्हां खालीं पडणाऱ्या मृगाला उडावयास पंख मिळावेत त्याप्रमाणें तुम्ही मिळालात. हे अश्वीहो, तुम्ही त्याला वर काढून प्रख्यात झाला.

८. हे शूर नासत्यहो, मान नामक उपासकांनीं तुमचें जें हें स्तोत्र केलें तें तुम्हांस आवडो. ह्या सोमयुक्त यज्ञगृहाच्या योगानें आह्मांस अन्न, बळ व जयशाली संपत्ति मिळो.

---

५. टीपः—तुग्रपुत्र भुज्यु १.११२.६ टीप पहा.

सूक्त एकशें त्र्यांयशीवें

ऋषिः--अगत्य; देवता–अश्विन्; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे वीर्यवान अश्वीहो, तुमचा जो मनापेक्षांहि वेगवान, तीन दांड्यांचा व तीन चाकें असलेला रथ आहे, तो तुम्ही जोडा. त्या रथाच्या योगानें तुम्ही सदाचरणी उपासकाच्या घरीं जातां. पंखांच्या योगानें ज्याप्रमाणें पक्षी उडतात त्याप्रमाणें तुमचा रथ तिन्ही लोकांत गमन करणारा आहे.

२. जेव्हां तुम्ही कोठें जावयाचें हें निश्चित ठरवून हविरन्नाची इच्छा धरून रथावर आरूढ होता तेव्हां तो रथ यज्ञभूमीकडे जातेवेळीं फार सुरळीतपणानें जातो. ही सुखकारक स्तुति तुम्हांकडे जावो. तुम्ही द्यूची कन्या उषा तिच्या बरोबर जात असतां.

३. हे शूर नासत्यहो, हवींनीं भरलेला जो तुमचा रथ नियमानुसार जात असतो, त्या सुरळीत चालणाऱ्या रथावर तुम्ही बसा. त्या योगानें तुम्ही स्वतःचे हविर्दात्या उपासकाचें व त्याच्या मुलाबाळाचें कल्याण करण्याकरतां त्याच्या घरीं जातां.

४. तुमचा लांडगा किंवा लांडगीहि आम्हांस उपद्रव न करोत. तुम्ही आम्हांस टाकून जाऊं नका किंवा आम्हांस वगळून इतरांवर कृपा करूं नका. हा तुमचा हविर्भाग येथें ठेवला आहे. ही तुम्हांस उद्देशून स्तुति केली आहे, आणि हे पराक्रमकारीहो, तुमच्याकरतां हे मधुर रसाचे डेरे भरून ठेवले आहेत.

५. हे पराक्रमी नासत्यहो, तुम्हाला गोतम, पुरुमीहळ आणि अत्रि हवि अर्पण करून संरक्षणार्थ प्रार्थीत असतात. ज्याप्रमाणें ठरलेल्या दिशेकडे रथ हाकणारा सरळ रथ नेतो, त्याप्रमाणें तुम्ही माझ्या प्रार्थनेकडे सरळ या.

६. आतां आम्ही अंधःकाराच्या पार पडलों. हे अश्वीहो, हें स्तोत्र आम्ही तुम्हांकरतां केलें आहे. ज्या मार्गांनीं देव चालतात, त्या मार्गांनीं इकडे या. आम्हांला अन्न, बल आणि जयशाली संपत्ति प्राप्त होवो.

सूक्त एकशें चौऱ्यांयशीवें.

ऋषिः–अगत्य; देवता–अश्विन्, छंदः--त्रिष्टुभ.

१. हे नासत्यहो, तुम्ही कोठेंहि असलां तरी उषा उगवतांच हवींनीं आणि स्तोत्रानीं आम्ही मनःपूर्वक उदार यजमानासाठीं तुम्हांला आज आवाहन करूं आणि उद्यांहि करूं.

२. हे वीर्यवन्त अश्वीहो, तुम्ही आमच्या येथें मदयुक्त व्हा आणि मदयुक्त होऊन पणींना ठार करा. हे शूर हो, तुम्हांला उद्देशून म्हटलेल्या स्तोत्रांच्या योगानें येथ आलेले तुम्ही आपल्या कानांनीं माझी प्रार्थना ऐका.

३. हे पूषा आणि हे नासत्य देवांनो, तुम्ही सूर्यकन्येशीं विवाह लावण्याकरितां बाणासारखे धांवत

---

३. टीपः—सूर्याविवाह टीप १.११६.१७. पहा.

गेला. तुमचे उदकापासून निर्माण झालेले घोडे वरुणाच्या प्राचीन घोड्याप्रमाणें तुम्हांला घेऊन भरधांव गेले.

४. हे मधुयुक्त अश्वीहो, तुमची मोठी कृपा आम्हांला प्राप्त होवो, मान्य कवीचें स्तोत्र तुम्ही गोड करून घ्या. कारण, हे दानशूरहो, मानव धनाच्या इच्छेनें आणि बळासाठीं तुम्हांला (सोमरसानें) मदयुक्त करतात.

५. हे धनसंपन्न अश्वीहो, मानपुत्रांनीं तुम्हासाठीं हें सुंदर छन्दोबद्ध स्तोत्र तयार केलें आहे. तरी हे नासत्यहो, तुम्ही अगस्त्याच्या येथें त्याच्या स्वतःच्या आणि मुलाबाळांच्या कल्याणाकरितां या व आनंदित व्हा.

६. आतां आम्ही अंधःकाराच्या पार पडलों. हे अश्वीहो, हें स्तोत्र आम्ही तुम्हांसाठीं केलें आहे. ज्या मार्गांनीं देव चालतात,त्या मार्गांनीं इकडे या. आम्हांला अन्न, बल आणि जयशाली संपत्ति प्राप्त होवो.

सूक्त एकशें पंच्यायशींवें.

ऋषि अगस्त्य; देवता—द्यावापृथ्वी; छंदः–त्रिष्टुभ.

१. हे कवीनो, ह्या दोघींपैकीं पहिली कोण आणि नंतरची कोण ? या दोघी कशा झाल्या हें कोण जाणतो ? ज्या ह्या स्वतःच्या योगानें विश्वाचें धारण करतात, त्या ह्या दिवस आणि रात्र ह्यांच्या चक्राप्रमाणें वेगवेगळ्या फिरतात.

२. ह्या दोघी स्वतः अचल आणि पदरहित असूनहि चालणाऱ्या आणि उडणाऱ्या सर्व प्राणिमात्रांचें धारण करितात. आईबापांच्या मांडीवर असलेल्या मुलाप्रमाणें हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही आमचें दुःखापासून सर्वकाळ रक्षण करा.

३. मी अदितीचें निष्पाप,क्षयरहित,तेजस्वी आणि अमर असें दान नमस्कारपूर्वक प्रार्थितों. हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही मज उपासकासाठीं तें प्राप्त करून द्या. हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही आमचें दुःखापासून रक्षण करा.

४. देवांना जन्म देणाऱ्या द्यावापृथ्वी स्वतः शान्त राहून लोकांचें रक्षण करितात. अशा त्या द्यावापृथ्वींचा आम्हांवर अनुग्रह होवो. तुम्ही दोघीहि दिवसा आणि रात्रीं हे द्यावापृथ्वीहो, आमचें दुःखापासून रक्षण करा.

५. ह्या द्यावापृथ्वी परस्परसंबद्ध आहेत. त्या तरुणी एकमेकींशीं भिडणाऱ्या असून परस्परबाहिणी आहेत. बांधवभूत अशा त्या आपल्या पित्याच्या मांडीवर बसून ह्या भुवनाची नाभि हुंगतात. अशा हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही आमचें दुःखापासून रक्षण करा.

६. विस्तीर्ण आणि विशाल घराप्रमाणें असणाऱ्या ह्या देवांना जन्म देणाऱ्या द्यावापृथ्वींना मी यज्ञानें प्रेमपूर्वक बोलावितों. ह्या सुरूप व अमृत धारण करणाऱ्या अशा, हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही आमचें दुःखापासून रक्षण करा.

७. विस्तीर्ण, विशाळ आणि अनंत अशा ह्या द्यावापृथ्वींना यज्ञामध्यें मी नमस्कारपूर्वक बोलावितों. ह्या भाग्यशाली व दानशील सर्वांचें धारण करितात.अशा हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही आमचें दुःखापासून रक्षण करा.

८. आम्ही जे कांहीं देवांचे अपराध केले असतील अथवा मित्रांचे किंवा कदाचित जावयाचेहि अपराध केले असतील त्यांचें हें स्तोत्र निरसन करो. हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही आमचें दुःखापासून रक्षण करा.

९. प्रशंसनीय आणि लोकहितकारक अशा ह्या माझें रक्षण करोत आणि रक्षण करणाऱ्या त्या माझ्या साहाय्यार्थ येवोत. हे देवहो, स्तोत्र करणारे आम्ही अन्नानें आनंद पावून दानशील यजमानाला संपत्तीनें हर्षभरित करूं असें करा.

१०. द्यावापृथ्वींनीं ऐकावें म्हणून मी सुमेधावीनें त्यांच्यासाठीं प्रथम हें स्तोत्र म्हटलें आहे. तरी त्या मातृपितृभूत द्यावापृथ्वी माझें दुःखापासून आणि पापांपासून रक्षण करोत आणि मजवर कृपा करोत.

११. हे मातृपितृभूत द्यावापृथ्वीहो, तुम्हांस उद्देशून मीं जें हें स्तोत्र म्हटलें आहे तें सफळ होवो. तुम्ही आपल्या संरक्षणाच्या योगानें आम्हांला देवांपेक्षांहि जवळच्या आहांत. आम्हांला अन्न, बल आणि जयशाली संपत्ति प्राप्त होवो.

सूक्त एकशें श्याहांयशीवें.

ऋषिः—अगस्त्य; देवता-विश्वेदेव; छन्दः--त्रिष्टुभ.

१. सर्वांचें कल्याण करणारा सवितृदेव आमच्या स्तुतीच्या योगानें यज्ञामध्यें अन्नासह येवो. हे तरुणहो, तुम्ही येतांच आपल्या कृपेनें आम्हांला आणि सर्व जगताला आनंदित कराल.

२. पराक्रमी मित्र, अर्यमा आणि वरुण हे सर्व आमच्याकडे येवोत आणि ते सर्व आमचा उत्कर्ष करोत. आणि आमचें बल क्षीण न करोत.

३. तुमचा अत्यंत प्रिय पाहुणा आणि शत्रूंना जिंकणारा असा जो अग्नि त्याची मी स्तोत्रांनीं प्रार्थना करितों. त्यायोगें पुण्यश्लोक आणि ज्ञानवान वरुण आमचा होवो आणि स्तोत्यांनीं स्तविला गेलेला असा तो आम्हांस पुष्कळ संपत्ति देवो.

४. ज्या उषा आणि रात्र दुभत्या गाईप्रमाणें आहेत त्यांस उद्देशून मी नमस्कारपूर्वक धनप्राप्तीच्या इच्छेनें जवळ जातो. एकाच कासेमध्यें नाना प्रकारच्या दुधांत नेहेमीं अन्न प्राप्त करणारा मी येत आहे.

५. अहिर्बुध्न्य आमचें कल्याण करो. दूध पाजणारी गाय वासराकडे जाते त्याप्रमाणें सिंधु आम्हांकडे येवो, कीं त्यायोगें आम्ही अपांनपातला प्राप्त करूं शकूं. मनासारखे वेगवान जवान घोडे त्याचा रथ ओढीत असतात.

६. त्वष्टा देखील आम्हांकडे येवो आणि येतांना ज्ञानवान देवांना घेऊन येवो. त्याचप्रमाणें वृत्राला ठार मारणारा, लोकांचे मनोरथ पूर्ण करणारा आणि सर्व लोकांमध्यें बलश्रेष्ठ असा इंद्र येथें आम्हांकडे येवो.

७. घोड्याप्रमाणें एकमेकांस जोडलेल्या इंद्राच्या कृपा गाई लहान वासरांस चाटतात त्याप्रमाणें आमचे लाड करोत आणि सर्व वीरांमध्यें अत्यंत प्रिय अशा इंद्राला कामुक पुरुष आपल्या पत्नींना आलिंगितात त्याप्रमाणें आमच्या स्तुति कवटाळोत.

८. अत्यंत बलवान मरुत एक मनानें द्यावापृथ्वींसह येऊन आम्हांजवळ बसोत. त्यांच्या रथास ठिपक्यांच्या हरणी जोडलेल्या असतात. उतारावर वाहणाऱ्या नद्यांप्रमाणें त्यांचे रथ भरधांव धांवतात. हे देव, शत्रूंना खाऊन टाकणारे आणि मित्रांचा उदय करणारे असतात.

९. ते चांगल्या छंदोबद्ध स्तोत्रानें प्रसन्न होऊन रथाला घोडे जोडतात आणि चांगल्या दिवशीं आपल्या वज्रानें आणि सेनेनें सर्व जग भरून टाकतात. त्यावेळीं त्यांची कीर्ति सर्वत्र पसरते.

१०. मित्रहो, रक्षणासाठीं अश्वींची प्रार्थना करा आणि पूषन देवाची स्तुति करा. द्वेषरहित विष्णु, वायु आणि श्रेष्ठ इंद्र हे बलसंपन्न आहेत. या देवांना मी सुखासाठीं येथें घेऊन यावें.

११. हे पूज्य देव हो, ही जी आम्ही तुम्हांस प्रार्थना केली आहे ती सफल करा आणि तुमचें लक्ष तिच्यावर असूं द्या. धनाची इच्छा करणारी अशी ती देवांकडे जाण्याचा प्रयत्न करीत आहे म्हणून आम्हांला अन्न, बल आणि जयशाली संपत्ति प्राप्त होवो.

सूक्त एकशें सत्यांयशीवें.

ऋषिः--अगस्त्य; देवता-पितु;* छंदः-१ त्रिष्टुब्गर्भा उष्णिह्, ३--५-६-७-११ अनुष्टुभ, अवशिष्ट गायत्री.

१. सर्वाधार आणि सामर्थ्यसंपन्न अशा श्रेष्ठ अन्नाची मी स्तुति करतों, कीं ज्याच्या सामर्थ्यानें त्रैलोक्यांत प्रसिद्ध असणाऱ्या इंद्रानें वृत्राला खांडोळी करून ठार केलें.

२. हे रुचिकर पितो, हे मधुर पितो, आम्ही तुझा आस्वाद घेतों. हे अन्ना, तूं आमचा संरक्षक हो.

३. हे पितो, मंगलकारक असणारा तूं मंगलकारक साहाय्यासह आमच्याकडे ये. सुखकारक, प्रिय सखा आणि प्रेमळ असणारा तूं अन्तर्बाह्य सारखा आहेस.

४. हे अन्ना, द्युलोकांतील वाऱ्याप्रमाणें तुझे ते रस सर्व जगांत व्यापलेले आहेत.

५. हे अत्यंत मधुर असणाऱ्या अन्ना, तुला जे देतात आणि रसांचा आस्वाद घेतात तेंच ताठ मान करून जगांत राहूं शकतात.

६. हे पितो, मोठाल्या देवांचें मन तुझ्यावर असतें, तुझ्या उत्कृष्ट साहाय्यामुळें इंद्रानें अहीला ठार केलें.

७. हे पितो, जेथें मेघांतील उदक येत असेल तेथें मधुर असणारा तूं आम्हांला पुरेसा प्राप्त हो.

८. उदकांचा आणि औषधींचा जो आम्ही अंश भक्षण करतों त्यानें हे शरीरा, तूं पुष्ट हो.

९. हे सोमा, तुझा जो भाग गाईच्या दुधांत मिसळलेला असेल आणि गव्हाचें पीठ मिसळलेला असेल, त्यानें हे शरीरा, तूं पुष्ट हो.

१०. हे ओषधे, तूं करंभ हो. तूं पोषक आणि रोगनाशक हो. तूं उत्तेजक हो. हे शरीरा, तूं पुष्ट हो.

११. हे पितो, गाई दूध देतात त्याप्रमाणें आम्ही स्तोत्रें म्हणून त्या तुझा रस काढीत आहोंत. तूं देवांना आनंद देणारा आणि आम्हांला आनंद देणारा आहेस.

---

* टीपः—पितु म्हणजे अन्न.

१० टीपः—दह्यांत सातूचें पीठ कालवून केलेला एक पिण्ड त्यास करंभ असें म्हणतात.

सूक्त एकशें अठ्यांयशीवें.

ऋषिः—अगस्ति; देवता–आप्रीसूक्त;* छंदः–गायत्री

१. हे अग्ने, प्रज्वलित झालेला व देवांसह असणारा तूं आज प्रज्वलित झाला आहेस. हे हजारांना जिंकणाऱ्या, ज्ञाता व दूत असणारा तूं आमचे हवि (देवांकडे) ने.

२. यज्ञ करणाऱ्या यजमानाला हजारो अन्नसंपत्ति देणाऱ्या अशा तनूनपात् अग्नीला मधुर अन्नानें तृप्त करा.

३. आम्ही बोलाविलेला स्तुत्य असा तूं पूज्य देवांना आम्हाकडे आण हे अग्ने, तूं हजारानें संपत्ति देणारा आहेस.

४. हे आदित्यहो, जेथें तुम्ही विराजता तेथें तुम्ही तेजानें हजारांना प्रेरणा देणारे प्रागग्र दर्भ पसरा.

५. विशेष प्रकारें राज्य करणारी, शोभणारी, अनेक प्रकारचीं, सुंदर द्वारें आहेत तीं घृत उत्पन्न करतात.

६. सुंदर अलंकार घातलेल्या आणि रूपवती अशा ज्या उषा आणि रात्र त्या सौंदर्यानें फार शोभतात. उषा आणि रात्र येथें येऊन बसोत.

७. प्रियवचन आणि बुद्धिमान असे जे दोघे दिव्य आदिहोते ते ह्या आमच्या यज्ञास संपादोत.

८. हे भारती, हे इळे, हे सरस्वती, ज्या तुम्हां सर्वांस मी स्तवितों, त्या तुह्मी आम्हांस संपत्तिमान करा.

९. त्वष्टा रूप निर्माण करण्याला समर्थ आहे. तोच सर्व पशूंना निर्माण करतो. त्यांचा तूं उत्कर्ष कर.

१०. हे वनस्पते, तूं आपणहून देवांकरतां अन्न उत्पन्न कर. अग्नि हवि मधुर करो.

११. देवांचा पुढारी अग्नि स्तोत्रानें अलंकृत केला आहे. स्वाहाकार होतांच तो अत्यंत प्रकाशतो.

सूक्त एकशें एकोणनव्वदावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता–अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे अग्निदेवा, सर्व जाणणारा तूं चांगल्या मार्गानें आम्हाला संपत्तीकडे पोंचीव. दुष्ट पाप आम्हापसून दूर कर. आम्ही तुझी अत्यंत स्तुति करूं.

२. हे अग्ने, प्रशंसनीय असणारा तूं सर्व प्रकारें कल्याण करून आम्हांला सर्व संकटांच्या पार ने. विस्तीर्ण आणि व्यापक असणारी पृथ्वी आम्हांला नगरीसारखी होवो आणि तूं आमच्या मुलाबाळांना सुखदायक हो.

३. हे अग्ने, तूं आम्हापासून रोग दूर कर, ज्यांचें अग्नि संरक्षण करीत नाहींत ते लोक रोगी व्हावेत. तर हे यज्ञार्ह देवा, आमचें कल्याण करण्याकरतां तूं सर्व अमरांसह पृथ्वीवर ये.

४. हे अग्ने, तूं आमचें सतत साहाय्य करून रक्षण करावेस. तूं प्रज्वलित होऊन प्रिय यज्ञगृहांत बैस. हे अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, तुझा स्तोता जो मी त्या मला आज भय प्राप्त न होवो, हे बलवन् उद्यांहि प्राप्त न होवो.

५. हे अग्ने, तूं आम्हांला क्रूर, खादाड आणि दुष्ट शत्रूंच्या ताब्यांत देऊं नकोस. तसेंच आम्हांला दांत असणाऱ्या, दंश करणाऱ्या आणि खादाडांच्या स्वाधीन करूं नकोस. हे बलवान अग्ने, तूं आम्हांला दुष्टांच्या स्वाधीन करूं नकोस.

६. हे यज्ञासाठीं निर्माण झालेल्या अग्ने, श्रेष्ठ असणाऱ्या तुझी शरीरसंरक्षणाकरतां स्तुति करणारा तुझा भक्त जो मी त्याचें तूं दुष्ट लोकांपासून आणि निंदकापासून संरक्षण करावेस. कारण हे देवा, तूं दुष्टांचा संहार करणारा आहेस.

७. हे पूजनीय अग्ने, देव आणि मनुष्य या दोघांना जाणणारा तूं सकाळीं लोकांच्या जवळ जाऊं इच्छितोस. तसेंच आक्रमणशील असणारा तूं ऋत्विज् यजमानाला शिकवतात त्याप्रमाणें योग्य वेळीं मनुष्याला शिक्षण देतोस.

८. मानाच्या पुत्रानें ह्या पराक्रमी अग्नीविषयीं अनेक स्तोत्रें म्हटलीं आहेत. आम्ही ऋषींच्या साहाय्यानें हजारो संपत्ति प्राप्त करूं. आम्ही अन्न, बल आणि संपत्ति प्राप्त करूं.

सूक्त एकशें नव्वदावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता–बृहस्पति; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे होत्या, प्रशंसनीय, स्थिर, मधुर भाषण करणाऱ्या आणि बलवान बृहस्पतीला तूं स्तोत्रांनीं वृद्धिंगत कर. त्या तेजस्वी आणि प्रशंसनीय बृहस्पतीची स्तुति देव आणि लोक ऐकत असतात.

---

* टीपः— आप्रीसूक्त १–१३ वरील टीप पहा.

३. तुमचा अत्यंत प्रिय पाहुणा आणि शत्रूंना जिंकणारा असा जो अग्नि त्याची मी स्तोत्रांनीं प्रार्थना करितों. त्यायोगें पुण्यश्लोक आणि ज्ञानवान वरुण आमचा होवो आणि स्तोत्यांनीं स्तविला गेलेला असा तो आम्हांस पुष्कळ संपत्ति देवो.

४. ज्या उषा आणि रात्र दुभत्या गाईप्रमाणें आहेत त्यांस उद्देशून मी नमस्कारपूर्वक धनप्राप्तीच्या इच्छेनें जवळ जातो. एकाच कासेमध्यें नाना प्रकारच्या दुधांत नेहेमीं अन्न प्राप्त करणारा मी येत आहे.

५. अहिर्बुध्न्य आमचें कल्याण करो. दूध पाजणारी गाय वासराकडे जाते त्याप्रमाणें सिंधु आम्हांकडे येवो, कीं त्यायोगें आम्ही अपांनपातला प्राप्त करूं शकूं. मनासारखे वेगवान जवान घोडे त्याचा रथ ओढीत असतात.

६. त्वष्टा देखील आम्हांकडे येवो आणि येतांना ज्ञानवान देवांना घेऊन येवो. त्याचप्रमाणें वृत्राला ठार मारणारा, लोकांचे मनोरथ पूर्ण करणारा आणि सर्व लोकांमध्यें बलश्रेष्ठ असा इंद्र येथें आम्हांकडे येवो.

७. घोड्याप्रमाणें एकमेकांस जोडलेल्या इंद्राच्या कृपा गाई लहान वासरांस चाटतात त्याप्रमाणें आमचे लाड करोत आणि सर्व वीरांमध्यें अत्यंत प्रिय अशा इंद्राला कामुक पुरुष आपल्या पत्नींना आलिंगितात त्याप्रमाणें आमच्या स्तुति कवटाळोत.

८. अत्यंत बलवान मरुत एक मनानें द्यावापृथ्वींसह येऊन आम्हांजवळ बसोत. त्यांच्या रथास ठिपक्यांच्या हरणी जोडलेल्या असतात. उतारावर वाहणाऱ्या नद्यांप्रमाणें त्यांचे रथ भरधांव धांवतात. हे देव, शत्रूंना खाऊन टाकणारे आणि मित्रांचा उदय करणारे असतात.

९. ते चांगल्या छंदोबद्ध स्तोत्रानें प्रसन्न होऊन रथाला घोडे जोडतात आणि चांगल्या दिवशीं आपल्या वज्रानें आणि सेनेनें सर्व जग भरून टाकतात. त्यावेळीं त्यांची कीर्ति सर्वत्र पसरते.

१०. मित्रहो, रक्षणासाठीं अश्वींची प्रार्थना करा आणि पूषन देवाची स्तुति करा. द्वेषरहित विष्णु, वायु आणि श्रेष्ठ इंद्र हे बलसंपन्न आहेत. या देवांना मी सुखासाठीं येथें घेऊन यावें.

११. हे पूज्य देव हो, ही जी आम्ही तुम्हांस प्रार्थना केली आहे ती सफल करा आणि तुमचें लक्ष तिच्यावर असूं द्या. धनाची इच्छा करणारी अशी ती देवांकडे जाण्याचा प्रयत्न करीत आहे म्हणून आम्हांला अन्न, बल आणि जयशाली संपत्ति प्राप्त होवो.

सूक्त एकशें सत्यांयशीवें.

ऋषि:--अगस्त्य; देवता-पितु;* छंद:-१ त्रिष्टुब्गर्भा उष्णिह्, ३-५-६-७-११ अनुष्टुभ, अवशिष्ट गायत्री.

१. सर्वाधार आणि सामर्थ्यसंपन्न अशा श्रेष्ठ अन्नाची मी स्तुति करतों, कीं ज्याच्या सामर्थ्यानें त्रैलोक्यांत प्रसिद्ध असणाऱ्या इंद्रानें वृत्राला खांडोळी करून ठार केलें.

२. हे रुचिकर पितो, हे मधुर पितो, आम्ही तुझा आस्वाद घेतों. हे अन्ना, तूं आमचा संरक्षक हो.

३. हे पितो, मंगलकारक असणारा तूं मंगलकारक साहाय्यासह आमच्याकडे ये. सुखकारक, प्रिय सखा आणि प्रेमळ असणारा तूं अन्तर्बाह्य सारखा आहेस.

४. हे अन्ना, द्युलोकांतील वाऱ्याप्रमाणें तुझे ते रस सर्व जगांत व्यापलेले आहेत.

५. हे अत्यंत मधुर असणाऱ्या अन्ना, तुला जे देतात आणि रसांचा आस्वाद घेतात तेंच ताठ मान करून जगांत राहूं शकतात.

६. हे पितो, मोठाल्या देवांचें मन तुझ्यावर असतें, तुझ्या उत्कृष्ट साहाय्यामुळें इंद्रानें अहीला ठार केलें.

७. हे पितो, जेथें मेघांतील उदक येत असेल तेथें मधुर असणारा तूं आम्हांला पुरेसा प्राप्त हो.

८. उदकांचा आणि औषधींचा जो आम्ही अंश भक्षण करतों त्यानें हे शरीरा, तूं पुष्ट हो.

९. हे सोमा, तुझा जो भाग गाईच्या दुधांत मिसळलेला असेल आणि गव्हाचें पीठ मिसळलेला असेल, त्यानें हे शरीरा, तूं पुष्ट हो.

१०. हे ओषधे, तूं करंभ हो. तूं पोषक आणि रोगनाशक हो. तूं उत्तेजक हो. हे शरीरा, तूं पुष्ट हो.

११. हे पितो, गाई दूध देतात त्याप्रमाणें आम्ही स्तोत्रें म्हणून त्या तुझा रस काढीत आहोंत. तूं देवांना आनंद देणारा आणि आम्हांला आनंद देणारा आहेस.

---

* टीप:—पितु म्हणजे अन्न.

१० टीप:—दह्यांत सातूचें पीठ कालवून केलेला एक पिण्ड त्यास करंभ असें म्हणतात.

सूक्त एकशें अठ्यांयशीवें.

ऋषिः—अगस्ति; देवता–आप्रीसूक्त;* छंदः–गायत्री

१. हे अग्ने, प्रज्वलित झालेला व देवांसह असणारा तूं आज प्रज्वालित झाला आहेस. हे हजारांना जिंकणाऱ्या, ज्ञाता व दूत असणारा तूं आमचे हवि (देवांकडे) ने.

२. यज्ञ करणाऱ्या यजमानाला हजारो अन्नसंपत्ति देणाऱ्या अशा तनूनपात् अग्नीला मधुर अन्नानें तृप्त करा.

३. आम्ही बोलाविलेला स्तुत्य असा तूं पूज्य देवांना आम्हाकडे आण हे अग्ने, तूं हजारानें संपत्ति देणारा आहेस.

४. हे आदित्यहो, जेथें तुम्ही विराजता तेथें तुम्ही तेजानें हजारांना प्रेरणा देणारे प्रागग्र दर्भ पसरा.

५. विशेष प्रकारें राज्य करणारी, शोभणारी, अनेक प्रकारचीं, सुंदर द्वारें आहेत तीं घृत उत्पन्न करतात.

६. सुंदर अलंकार घातलेल्या आणि रूपवती अशा ज्या उषा आणि रात्र त्या सौंदर्यानें फार शोभतात. उषा आणि रात्र येथें येऊन बसोत.

७. प्रियवचन आणि बुद्धिमान असे जे दोघे दिव्य आदिहोते ते ह्या आमच्या यज्ञास संपादोत.

८. हें भारती, हे इळे, हे सरस्वती, ज्या तुम्हां सर्वांस मी स्तवितों, त्या तुम्ही आम्हांस संपत्तिमान करा.

९. त्वष्टा रूप निर्माण करण्याला समर्थ आहे. तोच सर्व पशूंना निर्माण करतो. त्यांचा तूं उत्कर्ष कर.

१०. हे वनस्पते, तूं आपणहून देवांकरतां अन्न उत्पन्न कर. अग्नि हवि मधुर करो.

११. देवांचा पुढारी अग्नि स्तोत्रानें अलंकृत केला आहे. स्वाहाकार होतांच तो अत्यंत प्रकाशतो.

सूक्त एकशें एकोणनव्वदावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता–अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे अग्निदेवा, सर्व जाणणारा तूं चांगल्या मार्गानें आम्हाला संपत्तीकडे पोंचीव. दुष्ट पाप आम्हापसून दूर कर. आम्ही तुझी अत्यंत स्तुति करूं.

२. हे अग्ने, प्रशंसनीय असणारा तूं सर्व प्रकारें कल्याण करून आम्हांला सर्व संकटांच्या पार ने. विस्तीर्ण आणि व्यापक असणारी पृथ्वी आम्हांला नगरीसारखी होवो आणि तूं आमच्या मुलाबाळांना सुखदायक हो.

३. हे अग्ने, तूं आम्हापासून रोग दूर कर, ज्यांचें अग्नि संरक्षण करीत नाहींत ते लोक रोगी व्हावेत. तर हे यज्ञार्ह देवा, आमचें कल्याण करण्याकरतां तं सर्व अमरांसह पृथ्वीवर ये.

४. हे अग्ने, तूं आमचें सतत साहाय्य करून रक्षण करावेस. तूं प्रज्वलित होऊन प्रिय यज्ञगृहांत बैस. हे अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, तुझा स्तोता जो मी त्या मला आज भय प्राप्त न होवो, हे बलवन् उद्यांहि प्राप्त न होवो.

५. हे अग्ने, तूं आम्हांला क्रूर, खादाड आणि दुष्ट शत्रूंच्या ताब्यांत देऊं नकोस. तसेंच आम्हांला दांत असणाऱ्या, दंश करणाऱ्या आणि खादाडांच्या स्वाधीन करूं नकोस. हे बलवान अग्ने, तूं आम्हांला दुष्टांच्या स्वाधीन करूं नकोस.

६. हे यज्ञासाठीं निर्माण झालेल्या अग्ने, श्रेष्ठ असणाऱ्या तुझी शरीरसंरक्षणाकरतां स्तुति करणारा तुझा भक्त जो मी त्याचें तं दुष्ट लोकांपासून आणे निंदकापासून संरक्षण करावेस. कारण हे देवा, तूं दुष्टांचा संहार करणारा आहेस.

७. हे पूजनीय अग्ने, देव आणि मनुष्य या दोघांना जाणणारा तूं सकाळीं लोकांच्या जवळ जाऊं इच्छितोस. तसेंच आक्रमणशील असणारा तूं ऋत्विज् यजमानाला शिकवतात त्याप्रमाणें योग्य वेळीं मनुष्याला शिक्षण देतोस.

८. मानाच्या पुत्रानें ह्या पराक्रमी अग्नीविषयीं अनेक स्तोत्रें म्हटलीं आहेत. आम्ही ऋषींच्या साहाय्यानें हजारो संपत्ति प्राप्त करूं. आम्ही अन्न, बल आणि संपत्ति प्राप्त करूं.

सूक्त एकशें नव्वदावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता–बृहस्पति; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे होत्या, प्रशंसनीय, स्थिर, मधुर भाषण करणाऱ्या आणि बलवान बृहस्पतीला तूं स्तोत्रांनीं वृद्धिंगत कर. त्या तेजस्वी आणि प्रशंसनीय बृहस्पतीची स्तुति देव आणि लोक ऐकत असतात.

---

* टीपः—आप्रीसूक्त १–१३ वरील टीप पहा.

२. जो (उद्काला) उत्पन्न करतो आणि जो भक्तांना फल देतो, त्या, बृहस्पतीला वेळोवेळीं होणाऱ्या स्तुति सेवितात. बृहस्पतिच सर्व व्यक्त करणारा आहे. तो मातरिश्वा बृहस्पति चांगल्या गोष्टी निर्माण करीत यज्ञांत उत्पन्न झाला.

३. सूर्य आपले बाहू पसरतो त्याप्रमाणें (हात पसरून) बृहस्पति स्तुति, अन्न, उत्कर्ष आणि मंत्र स्वीकारो. दिनसंबंधीं जो अश्व आहे तो ह्या कल्याणकारक बृहस्पतीच्या पराक्रमानें भयंकर मृगाप्रमाणें बलवान होतो.

४. ह्या बृहस्पतीची कीर्ति स्वर्गांत आणि पृथ्वीवर जाते. ज्ञानप्रद आणि हवि धारण करणारें त्याचें स्तवन घोड्याप्रमाणें धांवतें. शिकारी लोकांच्या हत्याराप्रमाणें ह्या बृहस्पतीचीं आयुधें कपटी लोकांवर दिवसा जाऊन पडतात.

५. हे बृहस्पतिदेवा, जे समृद्ध असणारे पापी लोक कल्याणकारक असणाऱ्या तुला क्षुद्र असें समजून राहतात, त्या दुर्बुद्धींना तूं उत्कृष्ट संपत्ति देत नाहींस. हे बृहस्पते, तूं दुष्टाला शिक्षा करतोसच.

६. हे बृहस्पते, तूं चांगल्या मार्गानें जाणाऱ्या आणि समृद्ध लोकांच्या मार्गाप्रमाणें (सुखकर) हो. तूं आनिवार्य आणि प्रेमळ मित्राप्रमाणें आहेस. जे निष्पाप असणारे लोक आम्हांवर दृष्टि टाकतात, ते अज्ञानी असूनहि ज्ञानी होतात.

७. लोक राजाकडे जातात त्याप्रमाणें किंवा तीररूपी चाकें असलेल्या वहाणाऱ्या नद्या समुद्राकडे जातात त्याप्रमाणें ज्या बृहस्पतीकडे स्तोत्रें जात असतात, तो ज्ञाता आणि वृष्टीची आकांक्षा करणारा बृहस्पति जलाभिवृद्धि आणि उदक हे दोन्ही अन्तर्गत होऊन पहात असतो.

८. अशा प्रकारें थोर व अनेक कार्यांकरतां उत्पन्न झालेला बृहस्पति बळवान आहे. त्या समर्थ देवाची स्तुति चालूं आहे. तो स्तुति केलेला आम्हांला मुलें व गाई यांनीं युक्त फल देवो. आम्ही अन्न, बल आणि संपत्ति प्राप्त करूं.

सूक्त एकशें एक्याण्णवावें.

ऋषिः—अगस्त्य; देवता—आप, तृण, सूर्य; छंदः—१०-११-१२ महापंक्ति, १३ महाबृहती, अवशिष्ट अनुष्टुभ आहेत.

१. कंकत, अकंकत आणि जलकंकत अशा दोन प्रकारच्या जाळणाऱ्या विषारांनीं आणि अदृष्ट नांवांच्या प्राण्याच्या विषांनीं मला व्यापून टाकलें आहे.

२. येणारी औषधि अदृष्ट विषाराला मारून टाकते. आणि जाणारी औषधि मारून टाकते. आपटणारी औषधि मारून टाकते आणि चुरडणारी चुरडून टाकते.

३. शर, कुशर, दर्भ, सैर्य, मुंज आणि वैरिण यांतील सर्व अदृष्ट विषांनीं मला एकदम व्यापलें आहे.

४. गाई गोठ्यांत बसल्या आहेत. प्राणी आपआपल्या स्थानीं बसले आहेत. लोकांचें ज्ञान अन्तर्मुख झालें आहे. अशा वेळीं अदृष्ट विषांनीं मला व्यापलें आहे.

५. रात्रीं चोर दिसावेत त्याप्रमाणें सर्वांना पहाणारे ते हे अदृष्ट (साप) दिसूं लागले आहेत. तर हे लोकहो, तुम्ही जागे व्हा.

६. हे सर्पांनो, तुमचा पिता द्युलोक, पृथिवी तुमची माता, सोम भ्राता आणि अदिति तुमची बहीण होय. हे सर्वांना पहाणारे अदृष्ट विषारहो, तुम्ही रहा किंवा सुखानें जा.

७. जे भुजांनीं चालणारे, जे अंगानें चालणारे, जे नांगीं मारणारे, जे प्रकंकत आणि जे दुसऱ्या कोणत्याहि प्रकारचे असतील त्या तुमचें येथें काय आहे ? तुम्ही सर्व एकदम मला सोडा.

८. सर्व अदृष्टविषारांला आणि राक्षसीला नाहींशा करीत अदृष्ट विचाराचा हन्ता विश्वदर्शी सूर्य पूर्वेकडे उगवत आहे.

९. हा अदितीचा पुत्र सूर्य विश्वदर्शी आणि अदृष्ट विषांचा हन्ता असा सर्व विषांचा नाश करीत लोकांच्याकरतां वर येत आहे.

१०. कलालाच्या घरीं दारूची पखाल ठेवावी त्याप्रमाणें मी सूर्याच्या ठिकाणीं विष ठेवतों. तो तर

---

१. टीपः—ज्याला विषबाधा झाली आहे त्यानें ह्या सूक्ताच्या नियमानें जप करावा. म्हणजे सर्पाचें अथवा दृष्टींचें, किड्याचें किंवा कोळ्याचें दाढा असलेल्या प्राण्याचें अथवा विंचवाचें, मग तें मूळचे असो किंवा केलेलें असो, त्या विषापासून उपद्रव होणार नाहीं. ऋग्विधान १.२८

१०. टीपः—मधुविद्या १.११६.१२ टीप पहा.

मरत नाहीं. आम्हीहि मरणार नाहीं. कारण, पिवळ्या घोड्यावर बसलेल्या सूर्यानें ह्या विषाला दूर पोंचविलें. हे विषा, तुला तो मधुविद्येच्या योगानें मधुर करतां झाला.

११. छोट्या कपिंजलीनें तुझें विष खाऊन टाकलें, ती तर मरणार नाहीं, आम्हीहि मरणार नाहीं. पिवळ्या घोड्यावर बसलेल्या सूर्यानें विषाला दूर पोचविलें. हे विषा, तो मधुविद्येच्या योगानें तुला मधुर करतां झाला.

१२. एकवीस पाकोळ्या विषाची वृद्धि नाहींशी करोत. त्या मरणार नाहींत. आम्ही मरणार नाहीं. पिवळ्या घोड्यावर बसलेल्या सूर्यानें ह्या विषाला दूर पोंचविलें. हे विषा, तो तुला मधुविद्येच्या योगानें मधुर करतां झाला.

१३. विषाचा संहार करणाऱ्या ज्या नव्व्याण्णव नद्या त्या सर्वांचें नांव मी घेतों. पिवळ्या घोड्यावर बसलेल्या सूर्यानें ह्या विषाला दूर पोचविलें. हे विषा, तो तुला मधुविद्येच्या योगानें मधुर करतां झाला.

१४. एकवीस ज्या मयूरी आणि सात वाहणाऱ्या नद्या त्या तुझें विष कुंभवती स्त्रीनें उदक न्यावें त्याप्रमाणें नेवोत.

१५. एवढासा मुंगुस त्याला मी दगडानें मारतों. त्यापासून विष निघून सर्व दिशेला दूर जावो.

१६. मुंगुस पर्वतापासून येऊन असें म्हणाला कीं हें विष विंचवाचें दुर्बळ आहे. हे विंचवा, तुझें विष दुर्बळ आहे.

येथें पहिलें मंडळ संपलें.

---

१६. टीप:—यालाच विषनिर्हरिणी उपनिषद म्हटलें आहे. यांत अनेक महत्वाच्या गोष्टी आल्या आहेत. आणि सायणभाष्यांत बऱ्याच महत्त्वाची माहिती दिली आहे.

मंडळ पहिलें

कोष्टक

सूक्त	अ. अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१	१.१.१-२	मधुच्छंदस् विश्वामित्रपुत्र	गायत्री	अग्नि	
२	१.१.३-४	,,	,,	१–३ वायु ४–६ इंद्रवायु ७–९ मित्रावरुण	
३	१.१.५-६	,,	,,	१–३ अश्विनौ ४–६ इंद्र, ७--९विश्वेदव १०–१२ सरस्वती	
४	१.१.७-८	,,	,,	इंद्र	
५	१.१.९-१०	,,	,,	,,	
६	१.१.११-१२	,,	,,	१–३ इंद्र ४-९ मरुत् ५–७ इंद्र व मरुत् १० इंद्र	
७	१.१.१३-१४	,,	,,	इंद्र	
८	१.१.१५-१६	,,	,,	,,	
९	१.१.१७-१८	,,	,,	,,	
१०	१.१.१९-२०	,,	अनुष्टुभ्	,,	
११	१.१–२१	जैता मधुच्छंदस्पुत्र	,,	,,	
१२	१.१.२२-२३	मेधातिथि काण्वपुत्र	गायत्री	६ निर्मथ्य व आहवनीय अग्नि अवशिष्ट अग्नि	
१३	१.१.२४-२५	,,	,,	आप्रीसूक्त	
१४	१.१.२६–२७	,,	,,	विश्वेदेव	
१५	१.१.२८–२९	,,	,,	१ ऋतु २ मरुतः ३ त्वष्टृ ४अग्नि ५इंद्र ६ मित्रावरुणौ७-१० द्रविणोदस ११ अश्विनौ १२ अग्नि	
१६	१.१.३०–३१	,,	,,	इंद्र	
१७	१.१:३२-३३	,,	४–५ पादनिचृत	इंद्रावरुण	

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
			अवशिष्ट गायत्री.		
१८	१.१.३४–३५	,,	गायत्री	१–३ ब्रह्मणस्पति ४ ब्रह्मणस्पति व इंद्र व सोम ५ दक्षिणा व मागील व ६–८ सदसस्पति ९ सदसस्पति व नराशंस.	
१९	१.१.३६–३७	,,	,,	अग्निमारुत	
२०	१.२१–२	,,	,,	ऋभु	
२१	१.२.३	,,	,,	इंद्राग्नी	
२२	१.२.४–७	,,	,,	१- ४अश्वि, ५-८ सवितृ, ९.१० अग्नि, ११ देव्यः, १२ इंद्राणी, वरुणानी, अग्नायी. १३.१४ द्यावापृथिवी, १५ पार्थिवी, १६–२१ विष्णु किंवा १६ कृत्स्यदैवत्या	वामनावताराचें मूळ
२३	१.२.८–१२	मेधातिथि काण्व	१९ पुरउष्णिह २०.२२–२४ अनुष्टुभ् अवशिष्ट गायत्री	१ वायु २.३ इंद्रवायु ४.६ मित्रावरुण ७-९ मरुद्गण विशिष्ट इंद्र १०.१२ विश्वेदेव (पूषन) अवशिष्ट अप	
२४	१.२.१३–१५	शुनःशेप अजीगर्तपुत्र	३.५ त्रिष्टुभ् अवशिष्ट गायत्री	१ प्रजापति २ अग्नि ३–५ सविता ५ भगहि, अवशिष्ट वरुण	शुनःशेपसूक्त
२५	१.२.१६–१९	,,	गायत्री	वरुण	
२६	१.२.२०–२१	,,	,,	अग्नि	
२७	१.२.२२–२४	,,	१-१२ गायत्री १३ त्रिष्टुभ्	१.१२ अग्नि १३ विश्वेदेव	
२८	१.२.२५–२६	,,	१-६ अनुष्टुभ् ७ ९–गायत्री	१.३ इंद्र ५.६ उलूखल मुसल ९	सोम कुटण्याची माहिती

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
				हरिश्चंद्र अधिषवण चर्म अथवा मोम	
२९	१.२.२७	अजीगर्तपुत्र	पंक्ति	इंद्र	
३०	१.२.२८	,,	११ पादनिचृत गायत्री ६ त्रिष्टुभ् अवशिष्ट गायत्री	१-१६ इंद्र १७-१९ अश्वी २०-२२ उषा	
३१	१.२.२९-३२	हिरण्यस्तूप आंगिरस	८.१६.१८ त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती	अग्नि	
३२	१.२.३३-३६	,,	त्रिष्टुभ्	इंद्र	
३३	१.३.१-३	,,	,,	,,	
३४	१.३.४-५	,,	९-१२ त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती	अश्विनौ	
३५	१.३.६-७	,,	१-९ जगती अवशिष्ट त्रिष्टुभ्	१ अग्नि मित्रावरुण रात्रि व सवितृ अवशिष्ट सवितृ	सुंदर वर्णन
३६	१.३.८-११	कण्व घोरपुत्र	विषम-बृहती सम-सतोबृहती	१३-१४ यूप अवशिष्ट अग्नि	
३७	१.३.१२-१४	,,	गायत्री	मरुत्	
३८	१.३.१५-१७	,,	,,	,,	
३९	१.३.१८-१९	,,	विषम-बृहती सम-सतोबृहती	,,	
४०	१.३.२०-२१	,,	,,	ब्रह्मणस्पति	
४१	१.३.२२-२३	,,	गायत्री	१-३.७-९ वरुण, मित्र, अर्यमा ४-६ आदित्य	
४२	१.३.२४-२५	,,	,,	पूषन्	
४३	१.३.२६-२७	,,	९ अनुष्टुभ् अवशिष्ट गायत्री	३ मित्रावरुण ७-९ सोम अवशिष्ट रुद्र	
४४	१.३.२८-३०	प्रस्कण्व कण्वपुत्र	सम-सतोबृहती विषम-बृहती	१-२ अग्नि, उषा व अश्वी अवशिष्ट अग्नि	
४५	१.३.३१-३२	,,	अनुष्टुभ्	अग्नि, १० वीचा उत्तरार्ध देवाः	
४६	१.३.३३-३५	,,	गायत्री	अश्विनौ	
४७	१.४.१-२	,,	प्रागाथ	अश्विनौ	
४८	१.४.३-५	,,	,,	उषा	
४९	१.४.६	,,	अनुष्टुभ्	,,	

सूक्त	व. अ. वर्ग	ऋषि	छंदः	देवता	महत्त्व
५०	१.४.७–८	प्रस्कण्व कण्वपुत्र	१–९ गायत्री १०–१३ अनुष्टुभ्	सूर्य	सूर्याचें सुंदर वर्णन
५१	१.४.९–११	सव्य अंगिरःपुत्र	१–१३ जगती १४–१५ त्रिष्टुभ्	इंद्र	आर्य व दस्यु यांमधील भेद
५२	१.४.१२–१४	”	१–१२.१४ जगती १३.१५ त्रिष्टुभ	”	
५३	१.४.१५–१६	”	१–९ जगती १०–११ त्रिष्टुभ्	”	
५४	१.४.१७–१८	”	१-५.७–१०जगती ६.८.९.११ त्रिष्टुभ्	”	
५५	१.४.१९–२०	”	जगती	”	
५६	१.४.२१	”	”	”	
५७	१.४.२२	”	”	”	
५८	१.४.२३–२४	नोधा गौतमकुलोत्पन्न	१–५जगती अवशिष्ट त्रिष्टुभ्	अग्नि	
५९	१.४.२५	”	त्रिष्टुभ्	वैश्वानर अग्नि	
६०	१.४.२६	”	”	अग्नि	
६१	१.४.२७–२९	”	”	इंद्र	
६२	१.५.१–३	”	”	”	
६३	१.५.४–५	”	”	इंद्र	
६४	१.५.६–८	”	१–१४ जगती १५ त्रिष्टुभ्	मरुत	
६५	१.५.९	पराशर शक्तिपुत्र	द्विपदा विराज	अग्नि	६५ ते ७० पर्यंत सूक्तें पांच ऋचांची असून दहा ऋचांची धरण्याची पद्धत आहे.
६६	१.५.१०	”	”	”	
६७	१.५.११	”	”	”	
६८	१.५.१२	”	”	”	
६९	१.५.१३	”	”	”	
७०	१.५.१४	”	”	”	
७१	१.५.१५–१६	”	त्रिष्टुभ्	”	
७२	१.५.१७–१८	”	”	”	
७३	१.५.१९–२०	”	”	”	
७४	१.५.२१–२२	गोतम रहूगणपुत्र	गायत्री	”	
७५	१.५.२३	”	”	”	

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
७६	१.५.२४	,,	त्रिष्टुभ्	,,	
७७	१.५.२५	,,	,,	,,	
७८	१.५.२६	,,	गायत्री	,,	
७९	१.५.२७–२८	,,	१–३ त्रिष्टुभ् ४–६ उष्णिह ७–१२ गायत्री	अग्नि	
८०	१.५.२९–३१	,,	पंक्ति	इंद्र	वृत्रवध
८१	१.६.१–२	,,	,,	,,	
८२	१.६.३	,,	१–५ पंक्ति, ६ जगती.	,,	
८३	१.६.४	,,	जगती	इंद्र	अथर्वा प्रथम यज्ञ करतो आणि आंगिरस प्रथम अग्नि प्रज्वलित करतात.
८४	१.६.५–८	,,	१–६ अनुष्टुभ्, ७-९ उष्णिह, १०-१२ पंक्ति, १३-१५ गायत्री, १६ १८ त्रिष्टुभ्, १९ बृहती, २० सतोबृहती	,,	
८५	१.६.९–१०	,,	१-४.६–११ जगती ५.१२ त्रिष्टुभ्	मरुत	
८६	१.६.११–१२	,,	गायत्री	,,	
८७	१.६.१३	,,	जगती	,,	
८८	१.६.१४	,,	१.६ प्रस्तारपंक्ति ५ विराड्रूपा २-४ त्रिष्टुभ्	,,	
८९	१.६.१५–१६	,,	१-५.७ जगती ६ विराज ८-१० त्रिष्टुभ्	विश्वेदेव	आयुर्मर्यादा शंभरच आहे.
९०	१.६.१७–१८	,,	१-८ गायत्री ९ अनुष्टुभ्	,,	‘ मधुवाता ऋतायते ’ मंत्र
९१	१.६.१९–२३	,,	१-४.१८-२३ त्रिष्टुभ् ५-१६ गायत्री १७ उष्णिह	सोम	
९२	१.६.२४–२७	,,	१-४ जगती ५-१२ त्रिष्टुभ् १३-१८ उष्णिह	उषा	
९३	१.६.२८–२९	,,	१-३ अनुष्टुभ्, ९-११ गायत्री ४-७.	अग्नीषोमौ	

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
			९२ त्रिष्टुभ् ८ जगती किंवा त्रिष्टुभ्		
९४	१.६.३०-३२	कुत्स आंगिरस	१-१४ जगती१५-१६ त्रिष्टुभ्	अग्नि पण ८ वीचे पहिले तीन पाद देव १६वीचा उत्तरार्ध मित्र,वरुण,अदिती,सिन्धु, पृथिवी आणि द्युलोक यांच्याविषयींहि	
९५	१.७.१-२	”	त्रिष्टुभ्	अग्नि अथवा औषस्य अग्नि	
९६	१.७.३-४	”	”	अग्नि किंवा द्रविणोदस.	
९७	१.७.५	”	गायत्री	अग्नि शुचि किंवा अग्नि	
९८	१.७.६	”	त्रिष्टुभ्	वैश्वानर अग्नि	
९९	१.७.७	कश्यप मरीचिपुत्र	”	जातवेद अग्नि किंवा अग्नि	
१००	१.७.८-११	ऋज्राश्व, अम्बरीष, सहदेव भयमान व सुराधस,वृषागीरराजपुत्र	”	इंद्र	
१०१	१.७.१२-१३	कुत्स आंगिरस	१.७ जगती ८.११ त्रिष्टुभ्	”	
			१-१० जगती ११ त्रिष्टुभ्	”	
१०२	१.७.१४-१५	”	त्रिष्टुभ्	”	
१०३	१-७.१६-१७	”	”	”	
१०४	१.७.१८-१९	”	”	”	
१०५	१.७.२०-२३	त्रित आप्त्य किंवा कुत्स	१-७.९-१८ पंक्ति ८ महाबृहती यवमध्या १९ त्रिष्टुभ्	विश्वेदेव	**त्रित कूपांत पडला असतां त्यानें केलेली प्रार्थना व ‘वित्तं मे अस्य रोदसी’ हें पालुपद**
१०६	१.७.२४	कुत्स आंगिरस	१-६ जगती ७ त्रिष्टुभ्	विश्वेदेव	
१०७	१.७.२५	”	त्रिष्टुभ्	”	
१०८	१.७.२६-२७	”	”	इंद्राग्नी	

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१०९	१.७.२८–२९	”	”	”	
११०	१.७.३०–३१	”	५.९ त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती	ऋभु	
१११	१.७.३२	”	१–४ जगती ५ त्रिष्टुभ	”	
११२	१.७.३३-३७	”	१–२३ जगती २४–२५ त्रिष्टुभ्	१ चा पाद द्यावापृथ्वी २ रा पाद अग्नि	अनेक आख्यायिका असलेलें सूक्त
११३	१.८.१–४	”	त्रिष्टुभ्	१ चा उत्तरार्धाची देवता उषा-व रात्री बाकीउषा	सृष्टिचमत्काराचें सूक्त
११४	१.८.५–६	”	१-९ जगती १०.११ त्रिष्टुभ्	रुद्र	
११५	१.८.७	”	त्रिष्टुभ्	सूर्य	सुंदरवर्णन
११६	१.८.८–१२	कक्षीवान	”	अश्विनौ	अनेक महत्कृत्यांचें वर्णन.
११७	१.८.१३–१७	”	”	”	
११८	१.८.१८–१९	”	”	”	
११९	१.८.२०–२१	”	जगती	”	
१२०	१.८.२२–२३	”	१.१०-१२ गायत्री २ ककुभ् ३ काविराज ४ नष्टरूपी ५ तनुशिरा ६ उष्णिह ७ विष्टारबृहती ८ कृति ९ विराज	अश्विनौ	
१२१	१.८.२४–२६	कक्षीवान	त्रिष्टुभ्	विश्वेदेव किंवा इंद्र	
१२२	२.१.१–३	”	”	विश्वेदेव	
१२३	२.१.४–६	”	”	उषा	
१२४	२.१.७–९	”	”	”	
१२५	२.१.१०	”	४.५ जगती अवशिष्ट त्रिष्टुभ्	दानस्तुति	
१२६	२.१.११	१.५ कक्षीवान ६ भावयव्य ७ रोमशा ब्रह्मवादिनी	१-५ त्रिष्टुभ् ६.७ अनुष्टुभ्	१.५ भावयव्य ६.७ भावयव्य-रोमशासंवाद	गांधार देशाचा उल्लेख
१२७	२.१.१२–१३	परुच्छेप दिवो-	६ अतिधृति बाकी	अग्नि	

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
		दासपुत्र	अत्यष्टि		
१२८	२.१.१४–१५	,,	अत्यष्टि	,,	
१२९	२.१.१६–१७	,,	,,	इंद्र	
१३०	२.१.१८–१९	,,	१० त्रिष्टुभ् अवशिष्ट अत्यष्टि	,,	
१३१	२.१.२०	,,	अत्यष्टि	,,	
१३२	२.१.२१	,,	,,	६ वी अर्धी ऋचा इंद्रापर्वत बाकी इंद्र	
१३३	२.१.२२	,,	१त्रिष्टुभ्२-४अनुष्टुभ् ५ गायत्री ६ धृति ७ अत्यष्टि	इंद्र	शत्रुहनन करणाऱ्या ऋचा ऋग्वि १.२५
१३४	२.१.२३	,,	अत्यष्टि	वायु	
१३५	२.१.२४-२५	,,	७-८ अष्टि बाकी अत्यष्टि	४-८ इंद्र अवशिष्ट वायु	
१३६	२.१.२६	,,	१-६ अत्यष्टि ७ त्रिष्टुभ्	१-५ मित्रावरुण ६–७ लिंगोक्त	
१३७	२.२.१	,,	अतिशक्करी	मित्रावरुण	
१३८	२.२.२	,,	अत्यष्टि	पूषन	
१३९	२.२.३–४	,,	५ बहती ११ त्रिष्टुभ् अवशिष्ट अत्यष्टि	१ विश्वेदेव २मित्रावरुण ३-५ अश्वि ६ इंद्र ७ अग्नि ८ मरुत ९ इंद्राग्नि १० बृहस्पति ११ विश्वेदेव	
१४०	२.२.५-७	दीर्घतमस उचथ्यपुत्र	१-११ जगती १२-१३ जगती किंवा १० त्रिष्टुभ् किंवा जगती	अग्नि	
१४१	२.२.८–९	,,	१-११ जगती १२-१३ त्रिष्टुभ्	अग्नि	
१४२	२.२.१०-११	,,	अनुष्टुभ्	आप्रीसूक्त	
१४३	२.२.१२	,,	१-७ जगती ८ त्रिष्टुभ्	अग्नि	
१४४	२.२.१३	,,	जगती	,,	
१४५	२.२.१४	,,	१-४ जगती ५ त्रिष्टुभ्	,,	

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१४६	२.२.१५	दीर्घतमस	त्रिष्टुभ्	अग्नि	
१४७	२.२.१६	,,	त्रिष्टुभ्	,,	
१४८	२.२.१७	,,	,,	,,	
१४९	२.२.१८	,,	विराज	,,	
१५०	२.२.१९	,,	उष्णिह	,,	
१५१	२.२.२०	,,	जगती	१ मित्र बाकी मित्रावरुण	
१५२	२.२.२१-२२	,,	त्रिष्टुभ्	मित्रावरुण	
१५३	२.२.२३	,,	,,	विष्णु	
१५४	२.२.२४	,,	जगती	१-३ इंद्र व विष्णु अवशिष्ट विष्णु	
१५५	२.२.२५	,,	जगती	विष्णु	
१५६	२.२.२६	,,	,,	अश्विनौ	
१५७	२.२.२७	,,	१-५ त्रिष्टुभ् ६ अनुष्टुभ्	,,	
१५८	२.३.१	,,	जगती	द्यावापृथ्वी	
१५९	२.३.२	,,	,,	,,	
१६०	२.३.३-५	,,	,,	,,	
१६१	२.३.६	,,	१-१३ जगती १४ त्रिष्टुभ्	ऋभु	
१६२	२.३.७-१०	,,	३-६ जगती, अवशिष्ट त्रिष्टुभ्	अश्व	अश्वमेधांतील अश्वाचें विशसनस्थानीं गमन.
१६३	२.३.११-१३	,,	त्रिष्टुभ्	,,	,,
१६४	२.३.१४-२३	,,	१२.१५.२३.२९ ३६.४१ यांचें जगती, ४२ प्रस्तारपंक्ति, ५१ अनुष्टुभ् अवशिष्ट त्रिष्टुभ्	१-४१ विश्वेदेव, ४२ चा पूर्वार्ध आणि ४५ वाक ४२ चा उत्तरार्ध आपः ४३ चा पूर्वार्ध शकधूम, उत्तरार्धाची सोम ४४ अग्नि, सूर्य, आणि वायु, ४६. ४७ सूर्य ४८ संवत्सरात्मक काल, ४९ सरस्वती, ५० साध्य, ५१	कूटसूक्त

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
				सूर्य अथवा पर्जन्य आणि अग्नि,५२ सरस्वान् अथवा सूर्य	
१६५	२.३.२४	१.२.४.६.८ १०. ११.१२ इंद्र, ३.५.७. ९ मरुत् १३-१५ अगस्त्य	त्रिष्टुभ्	इंद्र आणि मरुत	
१६६	२.४.१–३	अगस्त्य	१–१३जगती १४-१५ त्रिष्टुभ्	मरुत	
१६७	२.४.४–५	”	त्रिष्टुभ्	१ इंद्र २–११ मरुत	
१६८	२.४.६–७	”	१–७ जगती ८–१० त्रिष्टुभ्	मरुत	
१६९	२.४.८–९	”	१.३–८ त्रिष्टुभ्, २ चतुष्पदाविराज	इंद्र	
१७०	२.४.१०	१.३.४ इंद्र, २.५ अगस्त्य	१ बृहती, २–४ अनुष्टुभ् ५त्रिष्टुभ्	”	
१७१	२.४.११	अगस्त्य	त्रिष्टुभ्	१.२ मरुत ३.६ इंद्र आणि मरुत	
१७२	२.४.१२	”	गायत्री	मरुत	
१७३	२.४.१३–१५	”	त्रिष्टुभ्	इंद्र	
१७४	२.४.१६–१७	”	”	”	
१७५	२.४.१८	”	१स्कंधोग्रीवी बृहती २.५ अनुष्टुभ् ६ त्रिष्टुभ्	”	
१७६	२.४.१९	”	१-५ अनुष्टुभ् ६ त्रिष्टुभ्	”	
१७७	२.४.२०	”	त्रिष्टुभ्	”	
१७८	२.४.२१	”	”	”	
१७९	२.४.२२	१.२ लोपामुद्रा ३.४ अगस्त्य ५.६ अगस्त्याचा शिष्य	१.४ त्रिष्टुभ् ५ बृहती ६ त्रिष्टुभ्	रति	अगस्त्य लोपामुद्रा संवाद
१८०	२.४.२३–२४	अगस्त्य	त्रिष्टुभ्	अश्वी	
१८१	२.४.२५–२६	”	”	”	

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१८२	२.४.२७–२८	,,	१.५.७ जगती ६.८ त्रिष्टुभ्	,,	
१८३	२.४.२९	,,	त्रिष्टुभ्	,,	
१८४	२.५.१	,,	,,	,,	
१८५	२.५.२–३	,,	,,	द्यु आणि पृथ्वी	
१८६	२.५.४–५	,,	,,	विश्वदेव	
१८७	२.५.६–७	,,	१ अनुष्टुब्गर्भोष्णिह, २.४.८–१० गायत्री, ३.५.७ अनुष्टुभ् अथवा बृहती	अन्नस्तुति	
१८८	२.५.८–९	,,	गायत्री	आप्रीसूक्त	
१८९	२.५.१०–११	,,	त्रिष्टुभ्	अग्नि	
१९०	२.५.१२–१३	,,	,,	बृहस्पती	
१९१	२.५.१४	,,	१-९.१४-१६ अनुष्टुभ् १०.१२ महापंक्ति १३ महाबृहती	आप्तृणसूर्य	विषावर तोडगा

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर

मंडळ दुसरें.

भाषांतरकार

विद्यानिधि **सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.**

मुद्रक व प्रकाशक

शंकर रामचंद्र दाते, बी. ए.

चिटणीस, वैदिक वाङ्मय प्रसारक मंडळ.

‘ लोकसंग्रह ’ छापखाना, २७ बुधवार पेठ, पुणें.

शके १८५०

किंमत बारा आणे

द्वितीयमंडळपरिचय.

दुसऱ्या मंडळांत ४३ सूक्तें असून ४२९ ऋचा आहेत. अनुवाक चार आहेत.
हें मंडळ गृत्समदानें पाहिलें आहे.

छंद.

दुसऱ्या मंडळांत १८ त्रिष्टुभ छंदांतील सूक्तें असून ६ जगती, २ गायत्री, १ अनुष्टुभ आणि १६ वेगवेगळया छंदांतलि सूक्तें आहेत.

देवता

१२ सूक्तें इंद्राचीं, ९ अग्नि, २ विश्वेदेव, कपिंजल इंद्र व ब्रह्मणस्पति, १ आदित्य, १ वरुण, १ अपांनपात, १ रुद्र, १ मरुत १ सविता, १ अश्विदेव, १ सोमापूषन आणि मिश्र देवतांचीं ७ सूक्तें आहेत.

आप्रीसूक्त

ह्या मंडळांत तिसरें सूक्त आप्रीसूक्त आहे. यामध्यें अकरा ऋचा असून तनूनपातची ऋचा नाहीं.

वाचनीय सूक्तें

इंद्रासंबंधीं उत्कृष्ट आणि त्याच्या पराक्रमांचें संग्रहात्मक वर्णन करणारी जीं कांहीं प्रसिद्ध सूक्तें आहेत. त्यापैकीं कांहीं ह्या मंडळांत आहेत. नेहेमीच्या सूक्तापेक्षां त्यांत विशेष हें आहे कीं त्यांना पालुपदें लावलेलीं आहेत. त्या दृष्टीनें ‘ स जनास इंद्र (११) सोमस्य ता मद इन्द्रश्चकार (१५), यस्ताकृणोः प्रथमं सास्युक्थ्यः (१३) हीं सूक्तें अत्यंत वाचनयि असून त्यांमध्यें इंद्राचे सर्व पराक्रम एकत्र आणण्यांत आले आहेत. त्यावरून इंद्राची चांगली कल्पना येते.

सामाजिक गोष्टी

व्यभिचारिणींचें लपून छपून गर्भपात करण्याचें काम वैदिक आहे असें दिसतें. (२९.१)

सूर्य अस्ताला गेल्यावर युद्ध करणारे वीर, घराच्या बाहेर पडलेले लोक व काम करणारे कारागीर यांचें लक्ष कसें वेधतें हें वर्णन सुंदर आहे. (३८.३.६)

पक्ष्याच्या शकुनासंबंधीं शेवटलीं दोन सूक्तें आहेत. (४२.४३) त्यामध्यें कपिंजलपक्षी कोणत्या बाजूस ओरडला असतां शुभ व कोणत्या बाजूस अशुभ हें दर्शविलें आहे. त्याची सामगायकाशीं तुलना केली आहे व तो मंगलकारक आहे असें सांगितलें आहे. हें सूक्त लग्नांत वाङ्‌निश्चयाला जातांना म्हणतात. कपिंजल म्हणजे भारद्वाजपक्षी होय.

दशमानपद्धति.

दशमान पद्धतीचा अठराव्या सूक्तांत उल्लेख असून (१८) शिवणकलेचाहि उल्लेख आहे. (३२)

वैशाख वद्य १२
१८५०

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर.

दुसरें मंडळ.

सूक्त पहिलें.

ऋषिः—गृत्समद; देवता–अग्नि; छंदः—जगती.

१. हे लोकाधिपते अग्ने, तूं दररोज तेजानें रसरसलेला, पाण्यापासून, दगडापासून, लांकडापासून, व औषधीपासून उत्पन्न होतोस. तूं अत्यंत पवित्र आहेस.

२. हे अग्ने, आमच्या घरामध्यें यज्ञांतील हौत्रकर्म तुझें आहे. पौत्र कर्म आणि ऋत्विजाचें कामहि तुझ्याकडेच आहे. नेष्टृकर्महि तुझेंच असून तूंच आमचा अग्निध आहेस. यज्ञ इच्छणाऱ्या तुझ्याकडेच प्रशास्तृ कर्महि सोपविलें असून तूंच आमचा अध्वर्यू आहेस. आमच्या यज्ञगृहांतील ब्रह्माहि तूंच असून गृहपतिहि तूंच आहेस.

३. हे अग्ने, तूं सज्जनांचा पुढारी इंद्र आहेस. तूं अनेकांनीं स्तविलेला व नमस्काराई विष्णु आहेस. हे ब्रह्मणस्पते, तूं ऐश्वर्ययुक्त ब्रह्मा आहेस. हे सर्वाधारा, तूं बुद्धिमानांकडून स्तविला जातोस.

४. हे अग्ने, तूं नियमांचा आधार राजा वरुण आहेस. तूं पराक्रमी आणि प्रशंसनीय मित्र आहेस. धन वाटून देणारा सज्जनसंरक्षक अर्यमा तूंच आहेस. तूं अंश नांवाचा देव आहेस. यज्ञांत फल देणाराहि तूंच आहेस.

५. हे अग्ने, तूं भक्ताला पराक्रमी पुत्र देणारा त्वष्टा आहेस. सर्व स्तोत्रें तुझींच चालूं आहेत. हे अनुकूल तेज असणाऱ्या अग्ने, तूंच आमचा बांधव आहेस. उत्तेजक आसणारा तूंच आम्हांला चांगल्या घोड्यांनीं युक्त अशी संपत्ति देतोस. हे अग्ने, संपत्तिमान असणारा तूंच लोकांचें सामर्थ्य आहेस.

६. हे अग्ने, तूं त्रैलोक्यामध्यें श्रेष्ठ असा बलवान रुद्र आहेस. तूं मरुतांचें सामर्थ्य आहेस. तूं अन्नाचा अधिपति आहेस. म्हणून तांबड्या रंगाच्या व वायुवेगानें जाणाऱ्या घोड्यांनीं अगदीं घरांतल्या सारखा जात असतोस. तूं पूषन् देव आहेस, व आपणहून भक्तांचें ताबडतोब रक्षण करतोस.

७. हे अग्ने, जो तुझी घरामध्यें सेवा करतो, त्याचें तूं संरक्षण करतोस. तूं भक्तांना द्रव्य देणारा आहेस. तूं उत्कृष्ट संपत्ति देणारा सवितृदेव आहेस. हे लोकाधिपते अग्ने, तूं भगदेव असून संपत्तीचा अधिपति आहेस.

८. हे अग्ने, सर्व लोक तुला घरांत सुशोभित करतात. तूं लोकाधिपति उदार राजा आहेस. हे प्रज्वलित अग्ने, तूं विश्वाचा अधिपति आहेस. तूं दहांनीं शंभरांनीं आणि हजारांनीं देणारा आहेस.

९. हे अग्ने, संरक्षक असणाऱ्या तुझी यज्ञ करून लोक आराधना करतात. तसेंच शरीरांत प्रकाशित असणाऱ्या तुझी भ्रातृत्वाकरतां लोक पूजा करतात. जो तुझी सेवा करतो त्याचा तूं पुत्र होतोस. तसेंच धैर्यशाली असणारा तूं सुखदायक सखा होऊन रक्षण करतोस.

१०. हे अग्ने, तूं तेजस्वी असूनहि जवळ जाऊन स्तुति करण्यासारखा आहेस. तूं सर्व प्रसिद्ध संपत्तीचा आणि समृद्धीचा धनी आहेस. तूं लांकडें जाळतोस. आणि प्रकाशतोस. तूं भक्तांकरतां यज्ञ पार पाडतोस आणि फळ देतोस.

११. हे अग्ने, तूं अदिति आहेस. तूं हवनीय भारती आहेस. तूं स्तुतीनें वृद्धिंगत होतोस. तूं शेकडो

---

१. टीपः गृत्समद आंगिरस गोत्रांतील शुनहोत्राचा पुत्र होय. तो यज्ञ करीत असतां त्यास असुरांनीं पकडलें. पण पुढें इंद्रानें त्याची मुक्तता केली. तोच पुढें इंद्राच्या वचनानुसार भृगुकुलामध्यें शुनकाचा पुत्र गृत्समद या नांवानें प्रसिद्ध झाला.

२. टीपः—ह्या मंत्रांत यज्ञांतील सात ऋत्विजांचीं नांवें व त्यांच्या यज्ञांतील कृत्यांचा उल्लेख स्पष्ट रीतीनें आलेला आहे. यज्ञांतील ऋत्विजांचीं हींच नांवें सध्यांहि प्रचलित आहेत. हीच ऋचा १०–९१–१० येथें आली आहे. सप्त होत्यांची विशेष माहिती प्रस्तावनेंत दिली आहे.

वर्षें टिकणारी इळा आहेस. तूं दान देण्यास समर्थ आहेस. हे धनाधिपते, तूं शत्रुहन्ता असून सरस्वती तूंच आहेस.

१२. हे अग्ने, तूं चांगलें पोषण करणारें उत्कृष्ट अन्न आहेस. तुझ्या स्पृहणीय व प्रेक्षणीय कान्तींत ऐश्वर्य आहे. तूं अन्नसमृद्धि देणारा आणि संरक्षक असा थोर आहेस. तूं संपत्तिमान आणि सर्व बाजूनें मोठा आहेस.

१३. हे अग्ने, तुला देवांनीं मुख केलें आहे. हे कवे, तेजस्वी देवांनीं तुला आपली जिव्हा केलें आहे. देणग्या देणारे देव यज्ञांत तुझा आश्रय करतात. तुझ्यांत अर्पण केलेले हवि देव भक्षण करतात.

१४. हे अग्ने, सर्व अमर व अद्रोही देव तुझ्यांत हवन केलेला हवि भक्षण करतात. मर्त्य लोक तुझ्यामुळेंच अन्नाचा आस्वाद घेतात. तूंच शुद्ध असणारा लतादिकांच्या पोटांत राहून सर्व उत्पन्न करतोस.

१५. हे अग्ने, तूं सामर्थ्यानें सर्व देवांत असतोस आणि वेगळाहि असतोस. हे सुजन्म अग्निदेवा, तूं सामर्थ्यानें सर्वांपेक्षा अधिक आहेस. कारण, तुला जें अन्न अर्पण करावें तें सर्व द्यावापृथ्वीभर पसरतें.

१६. हे अग्ने, जे भक्त स्तोत्यांना गाई, घोडे दक्षिणा देतात, त्या आम्हा भक्तांना तूं श्रेष्ठ स्थानीं ने. चांगल्या मुलाबाळांनीं युक्त असणारे आम्ही मोठालीं स्तोत्रें म्हणूं.

सूक्त दुसरें.

ऋषिः—गृत्समद; देवता–अग्नि; छंदः—जगती.

१. हे यज्ञ करणारांनो, यज्ञानें सर्वज्ञ अग्नीचा तुम्ही उत्कर्ष करा. हवि देऊन आणि मोठालीं स्तोत्रें म्हणून तुम्ही अग्नीची पूजा करा. तो अग्नि प्रज्वलित, चांगल्या अन्नानें युक्त, स्वर्गाला नेणारा, तेजस्वी, होमनिष्पादक आणि बलाचा आधार आहे.

२. हे अग्ने, गोठ्यांत गाई वासराची अपेक्षा करतात त्याप्रमाणें भक्त रात्रंदिवस तुझी अपेक्षा करतात. हे बहुपूज्य अग्ने, व्यवस्थित असणारा तूं जणूं काय द्युलोकांत व्यापलेला आहेस. मनुष्यांच्या सर्व वेळां तूं व्यापलेला आहेस आणि तूं रात्रीं प्रज्वलित असतोस.

३. देखणा, द्यावापृथ्वींत व्यापलेला, रथाप्रमाणें संपत्ति आणणारा, दीप्तवर्ण, पृथ्वीवर मित्राप्रमाणें प्रशंसनीय असणाऱ्या त्या अग्नीला लोकांच्या मूळस्थानीं लोक स्थापन करतात.

४. सोन्यासारखा कांतिमान, अन्तरिक्षांत जाणारा, ज्वालांनीं जागृति देणारा, उदकाप्रमाणें संरक्षक, द्यावापृथ्वींत व्यापून असणारा असा तो पाऊस पाडणारा अग्नि त्याला लोक स्वतःच्या घरांत एकान्तस्थलीं स्थापन करतात.

५. तो होता अग्नि सर्व यज्ञांत असो. लोक हवि देऊन आणि स्तुति करून त्याचीच आराधना करतात. सुंदर पागोटें घातलेला तो ज्वालांनीं व्यापलेला असतो आणि नक्षत्रांनीं द्युलोक व्यापलेला असतो त्याप्रमाणें त्यानें द्यावापृथ्वी व्यापलेली असते.

६. हे अग्ने, आमच्या कल्याणाकरतां समृद्धि देणारा आणि प्रज्वलित होणारा तूं आम्हांला धन दे. द्यावापृथ्वी आम्हांला सुख देणाऱ्या कर. हे अग्ने लोकाचे हवि देव भक्षण करोत.

७. हे अग्ने, तूं आम्हांला विपुल संपत्ति दे. तूं आम्हांला हजारांनीं वैभव दे. आमची कीर्ति होण्याकरितां आम्हांला समृद्धीचीं द्वारें मोकळीं कर. आमच्या स्तोत्रानें तूं आम्हांला द्यावापृथ्वी अनुकूल कर. सूर्याप्रमाणें तेजस्वी उषा तुला प्रज्वलित करतात.

८. तो अग्नि रम्य उषःकालीं प्रज्वलित होऊन तेजस्वी किरणानें सूर्याप्रमाणें प्रज्वलित होतो. लोकांच्या स्तोत्रांनीं स्तुति केलेला, यज्ञाला चांगुलपणा आणणारा, लोकांचा राजा अग्नि लोकांना अतिथीप्रमाणें रमणीय आहे.

९. हे पुरातन अग्ने, तेजस्वी देवांमध्यें तुला मनुष्यातील आमची स्तुति वृद्धिंगत करते. गाय दूध देते त्याप्रमाणें यज्ञांत स्तोत्याला तूं आपणहून इच्छेप्रमाणें अनेक स्वरूपाची शतावधि संपत्ति दे.

१०. हे अग्ने, आम्ही अन्न व घोडे यांनीं लोकांपेक्षां सामर्थ्यसंपन्न म्हणून प्रसिद्ध व्हावें. म्हणून सर्व लोकांत अप्राप्य असणारी सूर्याप्रमाणें आमची उत्कृष्ट संपत्ति प्रकाशित होवो.

११. हे बलपुत्र अग्ने, भक्त लोक मुलेबाळें व्हावींत म्हणून स्वतःच्या घरांत असणाऱ्या ज्या यजनीय अग्नीला प्रज्वलित करून हवि देतात, तो आम्हांला प्रशंसनीय असणारा तूं आमची स्तोत्रें ध्यानांत घे, कीं ज्या अग्नीची चांगले स्तोते स्तुति करतात.

---

११ टीपः—तूं अदिति, भारती, इळा आणि सरस्वती आहेस.

१२. हे सर्वज्ञ अग्ने, तुझी स्तुति करणारे आणि तुला हवि देणारे असें दोघे आम्हीं तुझ्या सुखांत असावें. तूं आम्हांला अत्यंत आल्हादक, विपुल, चांगलीं मुलेबाळें आणि नोकर चाकर यांनीं युक्त असणारी संपत्ति देण्यास समर्थ आहेस.

१३. हे अग्ने, जे भक्त स्तोत्यांना गाई, घोडे यांनीं युक्त दाक्षिणा देतात त्या आम्हा भक्तांना तूं श्रेष्ठ स्थानीं ने. चांगल्या मुलाबाळांनीं युक्त असणारे आम्ही मोठालीं स्तोत्रें म्हणूं.

सूक्त तिसरें.

ऋषिः—गृत्समद; देवता-आप्रीसूक्त;* छंदः—७ जगती, बाकी त्रिष्टुभ.

१. पृथ्वीवर स्थापन केलेला समिद्ध अग्नि सर्व त्रैलोक्याच्या पुढें आहे. होता, पावक,पुरातन, बुद्धिमान आणि तेजस्वी अग्नि योग्य प्रकारें देवांचें यजन करो.

२. हे नराशंस अग्नि प्रज्वलित होऊन महत्वानें आहुति पोंचविण्याचीं तीन द्युलोकांचीं स्थानें प्रगट करतो. मनःपूर्वक हवि घृतयुक्त करून यज्ञाच्या मुख्य ठिकाणीं देवांना अर्पण करो.

३. हे अग्ने, मनःपूर्वक स्तुति केलेला, योग्य असणारा व मनुष्याच्या अग्रभागीं असणारा तूं आज देवांना हवि पोंचीव. तो तूं मरुतांच्या संघाला,अच्युत व यज्ञांत असणाऱ्या इंद्राला आण आणि त्याची पूजा कर.

४. हे बर्हिरग्ने, वाढणारा, चांगले वीर देणारा, पोषक आणि वेदीवर पसरलेला असा तूं संपत्तीकरतां हो. हे सर्व देवांनो, वसूंनो आणि आदित्यांनो, यज्ञार्ह असणारे तुम्ही तुपानें मऊ केलेल्या ह्या दर्भावर बसा.

५. विस्तृत, स्तोत्रें म्हणून बोलावल्या जाणाऱ्या गमनीय द्वारदेवता उघडल्या जावोत. विस्तृत, अहिंस्य, चांगल्या मुलांनीं युक्त कीर्ति आणि कांति निर्मळ करणाऱ्या अशा प्रख्यात होवोत.

६. आमच्या चांगल्या कर्मानें रात्रंदिवस सत्कार केल्या जाणाऱ्या, विणकराप्रमाणें स्तुति केलेल्या, यज्ञ करण्याकरतां यज्ञांतील वेगवेगळे भाग पार पाडणाऱ्या, फळ उत्पन्न करणाऱ्या आणि वृष्टि उत्पन्न करणाऱ्या उषसानक्त आहेत.

७. अत्यंत ज्ञाते, भव्य असे दैव्या होतार प्रथम ऋचा म्हणून सरळ यज्ञ केले जातात. हे प्रत्येक ऋतूंत देवांना यजन करणारे पृथ्वीच्या वेदीवर तीनहि उच्च स्थलीं असतात.

८. आम्हांला बुद्धि देणारी सरस्वती, देवी इळा आणि सर्वव्यापक भारती ह्या तीन देवी यज्ञगृहांत बसून हवीनें ह्या यज्ञाचें अव्यंगपणें संरक्षण करोत.

९. सुवर्णकांति, पोषण करणारा, अन्नदाता, चलाख, प्रेरक आणि देवभक्त असा पुत्र होवो. त्वष्टा आम्हांला कुलसंरक्षक पुत्र देवो. देवांचेंहि अन्न आम्हांला प्राप्त होवो.

१०. वनस्पाति आमचें कर्म ध्यानांत घेऊन आमच्या समीप असो. अग्नि विशेष प्रकारें हवि शिजवतो. देवांचा शमिता अग्नि तीन प्रकारानें संस्कृत करून तयार केलेले हवि देवांकडे पोंचवो.

११. मी ह्याच्यावर घृत सिंचन करतों. कारण, ह्या अग्नीचें उत्पत्तिस्थान घृत आहे. तो तुपांत राहतो आणि त्याचें तेज म्हणजे घृत होय. तूं प्रत्येक हवीकरतां देवांना आण आणि त्यांना आनंदित कर. हे कामपूरक अग्ने, तूं स्वाहा म्हणून अर्पण केलेले हवि घेऊन जा.

सूक्त चवथें.

ऋषिः—सोमाहुति भार्गव; देवता-अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे यजमानहो, तुम्हाकरतां सुप्रज्वलित, सुस्तुत, लोकांना आतिथिप्रमाणें पूज्य असणारा, चांगले हवि दिलेला अशा अग्नीचा मी धांवा करतों, कीं जो सर्वज्ञ अग्नि आदित्याप्रमाणें देवांपर्यंत सर्वांचा आधार आहे.

२. ह्या अग्नीची सेवा करणारे भृगु अन्तरिक्षांत आणि पृथ्वीवर अशा दोन ठिकाणीं अग्नि ठेवते झाले. देवांचा देव आणि चलाख घोडे असलेला हा अग्नि सर्व प्राण्यांत श्रेष्ठ आहे.

३. प्रवासाला जाणारे लोक मित्राला ठेवतात त्याप्रमाणें देवांनीं प्रिय अग्नीला मनुष्य लोकांत ठेवलें. जो दात्या भक्ताच्या घरीं उदारपणें असणारा तो स रात्रीं प्रकाशित करीत असतो.

४. ह्या अग्नीची पुष्टि स्वतःच्या पुष्टीप्रमाणें रमणीय आहे. तसेंच पेटून वाढलेल्या अग्नीची आकृतिहि

---

* टीप—१-१३ वरील टीप पहा.

रमणीय आहे. जो अग्नि आपली जिव्हा ओषधीवर चालवितो तो रथाचा घोडा शेपूट हलवतो त्याप्रमाणें दिसतो.

५. ज्याचा मोठेपणा स्तोते वर्णन करीत असतात त्या स्तोत्यांना आपली कांति देतो. तो रमणीय हवि दिले असतां आश्चर्यकारक कान्तीनें प्रकट होतो. जो जीर्ण होतो तोच पुनः तरुण होतो.

६. जो अरण्यें वसवसल्याप्रमाणें पेटवतो, जो उतरत्या मार्गानें जाणाऱ्या पाण्याप्रमाणें जातो आणि जो रथाच्या घोड्याप्रमाणें शब्द करतो तो नक्षत्रांनीं प्रकाशणाऱ्या द्युलोकाप्रमाणें रमणीय, कृष्णमार्ग आणि त्रासदायक असा प्रकाशित होतो.

७. जो सर्व व्यापतो, ज्यानें विस्तृत पृथ्वी धारण केली आहे, तो अग्नि पशूप्रमाणें स्वतःच्या इच्छेनें आणि संरक्षक नसतां फिरत असतो. अत्यंत तेजस्वी असणारा तो काळे व्यथाकर अनेक पदार्थ खातो आणि नीरस पदार्थहि जाळून टाकतो.

८. हे अग्ने, तुझ्या पूर्वीच्या कर्माचें स्मरण झालें असतां अद्यापि तृतीय सवनांत माझ्याकडून स्तोत्र म्हटलें जातें. हे अग्ने, तूं आम्हांला वीर सज्ज असलेलें, महान आणि प्रसिद्ध अन्न व चांगलीं मुलेबाळें असलेलें धन दे.

९. हे अग्ने, चांगल्या मुलाबाळानें युक्त असणारे आणि शत्रूंचा पराभव करणारे आणि तुझ्यामुळें संपत्ति प्राप्त करणारे गृत्समद ऋषि गुहेंतील संपत्ति प्राप्त करतील असें कर आणि यजमानांना आणि स्तोत्यांना तें अन्न दे.

सूक्त पांचवें.

ऋषिः—सोमाहुति; देवता–अग्नि; छंदः—अनुष्टुभ.

१. पितरांकरतां आणि त्यांच्या रक्षणाकरतां होता, उत्तेजक आणि पालक अग्नि उत्पन्न झाला. अन्नसमृद्ध असणारे आम्ही अत्यंत श्रेष्ठ, जिंकण्यासारखें आणि रक्षणीय असें धन मिळवूं शकूं.

२. ज्या यज्ञनेत्या अग्नीचे ठिकाणीं सात किरणासारखे होते व्यापलेले असतात, तो पावक, मनुष्याप्रमाणें आठवें स्थान घेऊन सर्व काम करतो.

३. जे यज्ञांत हवि देतात, जो स्तोत्र म्हणतो, तें सर्व ह्याचेंच आहे. चाकाच्या भोंवतीं धांव असते त्याप्रमाणें यज्ञांतील सर्व कृत्यें हाच करतो.

४. पवित्र प्रशास्ता पवित्र यज्ञासहच उत्पन्न झाला. ह्या अग्नीची अढळ कर्मे जाणणारा विद्वान झाडांच्या फांद्याप्रमाणें क्रमानें जातो.

५. ज्या बाहिणी हें कर्म करतात ती प्रेमळ हालचाल करणारी बोटें नेष्ट्याची किंवा तीन अग्नीची फार चांगल्या प्रकारें सेवा करतात.

६. जर मातृभूत वेदीची बाहिण जुहू तूप घेऊन अग्नीकडे येईल तर पावसानें गवत जसें टवटवीत होतें त्याप्रमाणें त्या आल्या असतां अध्वर्यु आनंदित होतो.

७. स्वतः अग्नि स्वतःच्या संरक्षणाकरतां ऋत्विज होऊन कर्म करो. आम्ही त्यानंतर स्तुति आणि यज्ञ पुरेसा करूं आणि हवि देऊं.

८. हे अग्ने, त्यायोगें ज्ञाता सर्व देवांचीं कृत्यें परिपूर्ण करो. आम्ही जो यज्ञ करतो तो तुझ्याकरतांच होय.

सूक्त साहवें.

ऋषिः—सोमाहुति; देवता–अग्नि; छंदः—गायत्री.

१. हे अग्ने, माझ्या ह्या दिल्या जाणाऱ्या यज्ञांतील आहुतीचा तूं स्वीकार करावास. आणि आमचीं हीं स्तोत्रें ऐकावीस.

२. हे अग्ने, ह्या आहुतीनें आम्ही तुझी सेवा करीत आहोंत. हे व्यापक यज्ञ व सुजन्म अग्ने, ह्या उत्कृष्ट सूक्तानें आम्ही तुझी सेवा करीत आहोंत.

३. हे धनदात्या अग्ने, स्तुतिप्रिय आणि द्रव्येच्छु अशा त्या तुझी स्तुति करूं इच्छिणारे आम्ही स्तोत्रांनीं सेवा करतो.

४. हे धनपते, धनवान, धन देणारा व ज्ञाता असणारा तूं आमचें स्तोत्र ध्यानांत घे. आणि आमच्या शत्रूंना दूर कर.

५. तो अग्नि आमच्याकरतां द्युलोकांतून वृष्टि करतो. तो आम्हांला दृढ सामर्थ्य देवो. तसेंच तो आम्हांला हजार प्रकारचें अन्न देवो.

६. हे अत्यंत तरुण असणाऱ्या दूता आणि देवांना बोलावणाऱ्या व यज्ञार्ह अग्ने, साहाय्याची अपेक्षा करणाऱ्या आणि रक्षणाची इच्छा करणाऱ्या माझ्याकडे तूं ये.

७. हे ज्ञात्या अग्ने, लोकांतील मित्रासारख्या असणाऱ्या दूताप्रमाणें देव व मनुष्यांना जाणणारा तूं जगांत संचार करीत असतोस,

८. हे अग्ने, ज्ञाता असणारा तूं आमच्या इच्छा पूर्ण कर. हे उत्तेजक अग्ने, तूं सतत देवांना हवि पोंचीव. ह्या पसरलेल्या दर्भांवर बैस.

सूक्त सातवें.

ऋषिः—सोमाहुति; देवता-अग्नि; छंदः—गायत्री.

१. हे अत्यंत तरुण असणाऱ्या भारत अग्ने, हे उदारा, श्रेष्ठ, तेजस्वी आणि अनेकांना स्पृहणीय असणारी संपत्ति तूं घेऊन ये.

२. हे अग्ने, देवांचा व मनुष्यांचा शत्रू आमचा पराभव करण्यास समर्थ न होवो. ह्या शत्रूंतून आम्हांला तूं पार पाड.

३. हे अग्ने, आम्ही सर्व शत्रू पाण्याच्या झऱ्याप्रमाणें तरून जाऊं.

४. हे पावक अग्ने, शुद्ध आणि वंद्य असणारा तूं अत्यंत प्रज्वलित होतोस. कारण, तुला तुपाच्या आहुति दिल्या आहेत.

५. हे भारत अग्ने, आम्ही तुझी वांझ गायांनीं, बैलांनीं आणि गाभण गाईंनीं आराधना करीत आहोंत.

६. लांकडें भक्षण करणारा, तूप अर्पण केलेला, पुरातन होता, श्रेष्ठ, बलपुत्र आणि आश्चर्यकारक अग्नि आहे.

सूक्त आठवें.

ऋषिः—गृत्समद; देवता-अग्नि; छंदः—१-५ गायत्री, ६ अनुष्टुभ.

१. हे मना, तूं अत्यंत कीर्तिमान व वीर्यवान अग्नीची, लूट इच्छिणारे जोडलेल्या रथाची करतो त्याप्रमाणें स्तुति कर.

२. चांगला नेता, जराहीन, अनभिभाव्य, सुंदर असा जो आहे तो शत्रूंचा नाश करणारा आहे आणि आराधन केला जातो.

३. जो अग्नि घरांत प्रज्वलित करून रात्रीं आणि उषःकालीं स्तविला जातो, ज्याच्या कर्माचा नाश केला जात नाहीं.—

४. किरणानें सूर्य शोभावा त्याप्रमाणें ज्वालांनीं सर्व प्रकाशित करीत जो विशेष शोभत असतो,—

५. ज्या शत्रुनाशक आणि स्वयंप्रकाशक अग्नीला सामगानें वृद्धिंगत करतात तो अग्नि सर्व शोभा धारण करतो,

६. सुरक्षित असणारे आम्ही इंद्र, सोम आणि देवांच्या साहाय्यानें युक्त आहोंत. आम्ही शत्रूंचा पराभव करूं.

सूक्त नववें

ऋषिः--गृत्समद; देवता-अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. ज्ञाता, उग्र, दीप्तिमान, चांगला बलवान, अखंड कर्म करण्याची बुद्धि असलेला, अत्यंत उदार, हजारोंचा पोषक आणि तेजस्वी जिव्हा असलेला होता अग्नि होत्याच्या स्थानीं अधिष्ठित होवो.

२. हे कामपूरक अग्ने, तूं आमचा दूत हो. तूंच आमचा संकटांतून संरक्षण करणारा हो. संपत्ति देणारा तूंच हो. हे अग्ने, तूं आमच्या मुलाची न चुकतां वृद्धि करणारा हो. शोभायमान असणारा तूं आमच्या शरीराचा रक्षणकर्ता हो. म्हणून तूं जागृत हो.

३. हे अग्ने, तुझी उच्च द्युलोकांत आम्ही सेवा करूं, अन्तरिक्षांत असणाऱ्या तुझी आम्ही स्तोत्रें म्हणून सेवा करूं. ज्या स्थानापासून (पृथ्वीपासून) तूं उत्पन्न झालास तेथें मी तुझी पूजा करतों. प्रज्वलित झालेल्या तुझे ठिकाणीं होते हवि अर्पण करतात.

४. हे अग्ने, अत्यंत यज्ञार्ह असणारा तूं हवीनें देवाचें यजन कर. तूं देण्यासारखें धन आम्हांस ताबडतोब दे. खरोखर तूं धनाचा धनपति आहेस. तूं आमच्या उज्वल स्तोत्राचा ज्ञाता आहेस.

५. हे दर्शनीय अग्ने, प्रत्यहीं उत्पन्न होणाऱ्या तुझे उभय धन क्षीण होत नाहीं. हे अग्ने, तूं स्तोत्याला अन्नसमृद्ध कर. चांगल्या मुलाबाळांनीं युक्त असणाऱ्या संपत्तीचा धनी कर.

६. हे अग्ने, तूं ह्या ज्वालासह आम्हाला चांगलें धन देणारा हो. तूं अत्यंत यज्ञ केला जाणारा देवांना हवि पोंचविणारा, सुखदायक, अविनाशी, आणि संरक्षक आहेस. पापापासून संरक्षण करणारा तूं कांति आणि धन यांनीं युक्त होऊन कल्याणकारक असा प्रकाश.

सूक्त दहावें.

ऋषिः—गृत्समद; देवता-अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. जो हवनीय मुख्य अग्नि आहे, तो पित्याप्रमाणें असणारा जेव्हां वेदीवर लोकांकडून प्रज्वलित

केला जातो, तेव्हां शोभायुक्त, अमर, विशेष ज्ञानी आणि प्रसिद्ध असणारा बलवान अग्नि सर्वांना उपास्य होतो.

२. अमर, ज्ञानी, चित्रकान्ति असा अग्नि सर्व प्रकारच्या स्तोत्रांनीं केलेला धांवा ऐको. त्याचा रथ काळे घोडे ओढतात किंवा तांबडे घोडे ओढतात. तेजस्वी घोड्यांकडून तो अनेक ठिकाणीं नेला जातो.

३. चांगल्या प्रकारें उत्पन्न होणाऱ्या अग्नीला उताण्या अरणींत उत्पन्न केलें. तो अनेक स्वरूपाच्या ओषधींत अन्तर्भूत असतो. रात्रींहि अंधारांनीं वेष्टिला न जाता तेजानें तळपत असतो.

४. सर्व जगांत राहणाऱ्या अग्नीला मी घृत आणि हवि अर्पण करतों. पृथु, वाकड्या धुरानें मोठा, व्यापक आणि अन्नानें वेगशाली दिसणारा असा हा आहे.

५. विश्वव्यापक अग्नीला मी हवि अर्पण करितों. तो हवि प्रेमळ मनानें अग्नीनें स्वीकारावा. तो तारुण्यानें मुसमुसलेला, स्पृहणीय कान्तीचा आणि प्रज्वलित झाल्यावर शरीरानें स्पर्श करतां येत नाहींत.

६. तेजानें शत्रूंचा पराभव करणारा तूं स्तोत्र लक्षांत घे. तुझे भक्त असणारे आम्ही मनूप्रमाणें स्तोत्र म्हणत आहोंत. संपत्तिमान असणारा मी जुहूनें मधुर फल देणाऱ्या परिपूर्ण अग्नीला स्तोत्र म्हणून पुनः पुनः बोलावीत आहें.

सूक्त अकरावें.

ऋषिः—गृत्समद; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, आमचा धांवा ऐक. आमचा अव्हेर करूं नको. तुझ्या संपत्तीच्या देणगीस आम्ही पात्र असावें. आमचें हे संपत्तीच्या इच्छेनें दिले जाणारे हवि नद्यांच्या प्रवाहाप्रमाणें तुझा उत्कर्ष करीत आहेत.

२. हे शूर इंद्रा, जें पुष्कळ पाणी तूं वृद्धिंगत केलेंस तें सर्व अहीनें अडवलें. आणि तें तूं मोकळें केलेंस. सामगानानें वृद्धिंगत होणारा तूं अमर समजणाऱ्या दासाला पालथा घालून ठार केलेस.

३. हे शूर इंद्रा, ज्या सामगानांची, स्तोत्रांची आणि रुद्रपुत्र मरुतांच्या स्तोत्रांची तुला आवड आहे आणि ज्या स्तोत्रांनीं तूं आनंदित होतोस तीं तेजस्वी स्तोत्रें आमच्या यज्ञांत येणाऱ्या तुझ्याकरतांच आहेत.

४. हे इंद्रा, तुझें उज्वल सामर्थ्य वाढविणारें आणि तुझ्या दोन्ही हातांत तेजस्वी वज्र आम्ही देत आहोंत. हे इंद्रा, पवित्र व वृद्धिंगत होणारा तूं वज्रानें दासलोकांचा पराभव कर.

५. हे शूर इंद्रा, आकाशकुहरांत असलेल्या, अप्रकाशित आणि गूढ स्थलीं पाण्यांत झाकून बसलेल्या, मायावी, द्युलोकांत राहून पाणी अडवून बसलेल्या अहीला तूं शौर्यानें ठार केलेस.

६. हे इंद्रा, तुझ्या पुरातन कृत्याचें आम्ही वर्णन करीत आहोंत आणि नवीन कृत्याचें आम्ही वर्णन करीत आहों. लढाई इच्छिणाऱ्या तुझ्या हातांतील वज्राचें आम्ही जसें वर्णन करूं तसें सूर्याचे ध्वज अशा तुझ्या घोड्याचेंहि आम्ही वर्णन करूं.

७. हे इंद्रा, तुझे दोन घोडे जेव्हां जोरानें चालूं लागतात. तेव्हां पाऊस पाडणारा मेघाचा ध्वनि झाला. पृथ्वी सपाट झाली आणि हलणारे पर्वत स्थिर झाले.

८. न चुकतां मेघ स्थिर झाला, पाण्यासह शब्द करणारा मेघ फिरूं लागला. दूरदूर देशीं स्तुति करणाऱ्या स्तोत्यांनीं इंद्रप्रेरित शब्दाची प्रसिद्धी केली.

९. इंद्रानें विपुल उदकाला अडवा पडलेल्या कपटी अहीला फोडले. वर्षाव करणाऱ्या व गर्जना करणाऱ्या ह्या इंद्राच्या वज्राच्या भयानें द्यावाभूमि कापूं लागली.

१०. जेव्हां अमानुष राक्षसाला मनुष्यहितकारक इंद्रानें ठार केलें तेव्हां ह्या बलिष्ठ इंद्राचें वज्र गर्जना करूं लागले. सोम पिणाऱ्या इंद्रानें मायावी दानवाच्या कपटांचा नाश करून टाकला.

११. हे शूर इंद्रा, तूं सोम पीव. पिळून तयार केलेला मदकर सोम तुला आनंदित करो. तुझ्या पोटाचे दोन्ही भाग भरून सोम तुला उत्कर्षित करो. अशा प्रकारें उदकपूरक भरपूर सोम इंद्राला तृप्त करो.

१२. हे इंद्रा, बुद्धिवर्धक असणारे आम्ही तुझ्या उदरांत असावें काय ? कर्मफल मिळण्याच्या इच्छेनें सेवा करणारे आम्ही तुझी सेवा करूं. तुझ्या साहाय्याची अपेक्षा करणारे आम्ही तुझी स्तुति करीत आहोंत. आम्ही तुझ्या धनाच्या देणग्यांस तात्काळ पात्र व्हावें.

१३. हे इंद्रा, जे तुझ्या साहाय्याची अपेक्षा करणारे आम्हीं हविरन्न देत आहोत ते आम्ही तुझ्या कृपेंत असावें. हे इंद्रदेवा, ज्या सामर्थ्यसंपन्न संपत्तीची आम्ही इच्छा करीत आहोंत ती मुलाबाळांनीं युक्त असणारी संपत्ति आम्हांस दे.

१४. हे इंद्रा, आम्हाला घर दे. मित्र दे. आणि आम्हाला मरुतांचें सामर्थ्य दे. जे प्रेमळ, आनंदित असणारे प्रथम सोम पिणारे वायु आहेत त्याचें सामर्थ्य आम्हांत दे.

१५. हे इंद्रा, ज्याच्यामध्यें तूं आनंदांत असतोस ते सत्वर सोम भक्षण करोतच. बळकटी आणणारा आणि तृप्त करणारा सोम तूं पी. हे शत्रुहिंसक इंद्रा, बलवान मरुतांसह असणारा तूं लढाईंत आमचा आणि (आमच्यामुळें द्युलोकाचा) उत्कर्ष कर.

१६. हे संरक्षक इंद्रा, जे लोक सुखेच्छेनें सामगायन करून तुझी उपासना करतात ते खरोखर थोरच होत. जे दर्भ अंथरून तुझी सेवा करतात तें तुझ्या साहाय्यानें ऐश्वर्य प्राप्त करतात.

१७. हे शूर इंद्रा, विस्तृत त्रिकद्रुक यागांत आनंदानें तूं सोम पी. आणि प्रसन्न होऊन दाढीमिशा हलव. आणि दोन घोड्यांनीं पिळलेला सोम पिण्याकरतां जा.

१८. हे शूर इंद्रा, तूं तसें बल धारण कर कीं ज्यामुळें कोळ्याप्रमाणें वृत्र दानवाला तूं ठार करशील. त्यामुळें आर्यांकरतां तूं प्रकाश मोकळा करशील आणि उजव्या बाजूला दस्यूला डांबून टाकशील.

१९. जो तुझ्या साहाय्यानें सर्व शत्रूंच्या पार जातो आणि आर्यांकडून दस्यूंचा पराभव करतो. मैत्री संभाळण्याकरतां त्रिताकारणें त्या त्वाष्ट्र विश्वस्वरूपाला तूं आमच्या ताब्यांत आण. त्याची आम्ही उपासना करूं.

२०. हा आनंदकारक सोम पिऊन उत्साहित झालेल्या इंद्रानें त्रिताकरतां अर्बुदाला ठार केलें. अंगिरासहित असणाऱ्या इंद्रानें सूर्याप्रमाणें चक्र फिरवून वलाला ठार केलें.

२१. हे इंद्रा, जी तुझी उत्साहवर्धक धनसंपन्न देणगी स्तोत्याला इष्ट वस्तु देते ती दक्षिणा आम्हास दे. दुसऱ्यास देऊं नकोस. आम्ही चांगल्या मुलांबाळांनीं युक्त होऊन ह्या यज्ञांत मोठें स्तोत्र म्हणूं.

सूक्त बारावें.

ऋषिः—गृत्समद, देवता–इन्द्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. ज्या सर्व-श्रेष्ठ ज्ञात्यानें उपजतांच देवांचें आपल्या पराक्रमानें रक्षण केलें, ज्याच्या बलाला आणि महान पराक्रमाला द्यावापृथ्वी भिऊन कापल्या तो हे लोकहो, इंद्र होय.

२. ज्यानें हलणाऱ्या पृथ्वीला स्थिर केलें, ज्यानें चंचल पर्वतांना स्थिर केलें, ज्यानें विस्तीर्ण अन्तरिक्षाची व्यवस्था लावली आणि द्यूला आधार दिला, तो हे लोकहो इंद्र होय.

३. ज्यानें अहीला मारून सप्तसिंधूना मोकळें सोडलें, ज्यानें वलाच्या अटकेंत असणाऱ्या गाईंना मुक्त केलें, ज्यानें मेघांत अग्नि उत्पन्न केला, आणि जो युद्धांत शत्रूंचा नाश करतो, तो हे लोकहो, इंद्र होय.

४. ज्यानें हें नश्वर जग स्थिर केलें, निकृष्ट दासवर्णाला ज्यानें गुहेंत टाकलें, ज्यानें व्याधाप्रमाणें लक्ष जिंकलें आहे, आणि ज्यानें शत्रूंची समृद्धि जिंकली, तो हे लोकहो, इंद्र होय.

५. ज्याविषयीं ‘ तो भयंकर इंद्र आहे कोठें? तो नाहींच, असे पृच्छपूर्वक उद्गार काढतात, तो शत्रूंची संपत्ति त्यांना त्रासच देऊन हरण करतो, त्यावर श्रद्धा ठेवा. तो हे लोकहो, इंद्र होय.

---

१ टीप—गृत्समदाला तपानें इंद्राचें स्वरूप प्राप्त झालें. तेव्हां तो इंद्रच आहे असे समजून पराक्रमी धुनि व चुमुरीनें हातांत हत्यारें घेऊन त्याच्या भोवतीं वेढा दिला. त्याचा भाव जाणून त्यानें इंद्राचे पराक्रम वर्णन करण्यास सुरवात केली. तें हें सूक्त होय.

२. पूर्वीं इंद्रादिक देव वैन्याच्या यज्ञांत गेले. गृत्समदहि तेथें होता. दैत्य इंद्राला ठार करण्याच्या इच्छेनें तेथें आले होते. त्यांना पाहून इंद्रानें गृत्समदाचें रूप घेतलें आणि तेथून निघून गेला. गृत्समदाचा वैन्यानें सत्कार केला आणि तो निघून जाऊं लागला, तेव्हां हाच इंद्र असे समजून असुरांनीं त्याला वेढा दिला. तेव्हां त्यानें ह्या सूक्तानें मी इंद्र नव्हे; इंद्र असा आहे असें ह्या सूक्तानें सांगितलें.

३. गृत्समदाच्या यज्ञांत आलेल्या एकट्या इंद्राला पाहून असुरांनीं त्याला वेढा दिला. तेव्हां इंद्रानें गृत्समदाचें रूप घेतलें आणि तो स्वर्गाला गेला. तेव्हां असुरांना वाटलें कीं इंद्र उशीर करतो आहे. तेव्हां ते आंत शिरलें त्यांनीं गृत्समदाला तेथें पाहून तर्क केला कीं गृत्समद तर पूर्वींच गेला. हें गृत्समदाचें रूप इंद्रानेंच आमच्या भीतीनें घेतलें असलें पाहिजे. असे समजून त्याला पकडलें. त्यानें मी इंद्र नव्हे हें ह्या सूक्तानें सांगितलें आहे. अशा तीन आख्यायिका आहेत.

६. जो समृद्धास, जो स्तुति करणाऱ्या ब्राह्मणास आणि जो गरिबास धन देतो, ज्यानें दगड जोडून सोमरस काढला आहे त्याचें जो सुवदन रक्षण करतो, तो हे लोकहो, इंद्र होय.

७. ज्याच्या आज्ञेंत सर्व गाई, अश्व आणि रथ आहेत, ज्यानें सूर्य आणि उषा उत्पन्न केल्या, जो उदकांचा प्रेरक, तो हे लोकहो, इंद्र होय.

८. ज्याला सिंहनाद करणाऱ्या, भिडलेल्या लहान मोठ्या दोन्ही बाजूच्या सेना हाका मारतात, सारख्या रथांत बसलेल्या दोन्ही बाजूचें लोक बोलावतात, तो हे लोकहो, इंद्र होय.

९. ज्याच्याशिवाय लोकांना जय मिळत नाहीं, त्याला युद्ध करणारे रक्षणासाठीं बोलावतात, जो विश्वाचा प्रतिनिधि झाला आहे, जो अच्युतांना च्युत करणारा आहे, तो हे लोकहो, इंद्र होय.

१०. जो मोठें पाप करणाऱ्यांना, आणि नास्तिकांना वज्रानें मारतां झाला, जो फुशारकी मारणारांना फुशारकी मारूं देत नाहीं आणि जो दस्यूंना ठार करणारा आहे, तो हे लोकहो, इंद्र होय.

११. जो पर्वतांत राहणाऱ्या शंबराला चाळिसाव्या वर्षीं शोधून काढता झाला आणि ज्यानें पराक्रमी अहीला निजला असतां ठार केलें, तो हे लेकहो, इंद्र होय.

१२. ज्या बलवान सप्तमेघयुक्त वृष्टि करणाऱ्या इंद्रानें सप्तसिंधूंना वाहण्यासाठीं खालीं सोडलें, ज्या वज्रबाहूनें द्युलोकावर आरोहण करणाऱ्या रौहिणाला ठार केलें, तो हे लोकहो, इंद्र होय.

१३. ज्याला द्यावापृथ्वी नमून असतात, ज्याच्या प्रतापाला पर्वतहि भितात; जो सोम पिणारा, बळकट, वज्रबाहु आहे, आणि जो वज्रहस्त आहे, तो हे लोकहो, इंद्र होय.

१४. जो सोम तयार करणारांचें रक्षण करतो, जो (हवि) शिजविणारांचें, जो सामगान करणारांचें व स्तुति करणारांचें रक्षण करतो, ज्यास स्तोत्र उत्साह देणारें, ज्यास सोम आणि ज्यास हें अन्न उत्साहप्रद आहे, तो हे लोकहो, इंद्र होय.

१५. जो तूं दुर्धर आहेस व जो सोमसवन करणारा व हवि शिजविणारा यांना बल देतोस, तो तूं सत्य आहेस हें अगदीं खरें आहे. आम्ही तुला सर्वदा प्रिय असावें, व आम्ही शूर पुत्रपौत्रांसह तुझीं स्तोत्रें गात असावें.

सूक्त तेरावें.

ऋषिः—गृत्समद–देवताः–इंद्र; छंदः–१–१२ जगती, १३ त्रिष्टुभ.

१. ज्या पाण्यांत सोम वाढतो, त्या पाण्यांत सोम ताबडतोब शिरला. (वर्षा) ऋतु सोमाची माता आहे. जी सोमलता पाण्यानें रसरसलेली असते ती पिळण्यास योग्य असते. तें इंद्राचें प्रशंसनीय पेय होय.

२. सर्व बाजूंनीं उदकानें भरलेल्या नद्या वहात आहेत. ह्या समुद्रांत पाणी भरीत आहेत. वहाणाऱ्या नद्यांचा मार्ग एक आहे. ज्यानें तीं कृत्यें प्रथम केलीं तो तूं प्रशंसनीय आहेस.

३. जे एक देतो त्याचा दुसरा अनुवाद करतो. आकार नष्ट करणें हें काम करणारा (मृत्यु) सर्वत्र हिंडत असतो. प्रत्येकाच्या बऱ्यावाईट गोष्टी (पृथ्वी) सहन करते. ज्यानें हीं कृत्यें केलीं तो तूं प्रशंसनीय आहेस.

४. हे इंद्रा, याचकांना पाठीला ओझें होईल इतकें धन द्यावें त्याप्रमाणें लोकांना यजमान धम वाटून देत आहेत. जगपित्यानें दिलेलें (अन्न मूल)दातांशिवाय खाऊं शकतें. ज्यानें हीं कृत्यें केलीं तो प्रशंसनीय आहे.

५. हे इंद्रा, ज्यानें त्या सूर्याला प्रकाशण्यासारखी पृथ्वी केली, ज्यानें नद्यांचें पाणी मोकळें केलें, त्या देव असणाऱ्या तुला पाण्यानें समृद्धि करावी त्याप्रमाणें स्तोत्रांनीं जन्म दिला तो तूं प्रशंसनीय आहेस.

६. हे इंद्रा, जो तूं आम्हाला अन्न देतोस आणि धन देतोस, ओल्यातून शुष्क आणि मधुर धान्य उत्पन्न करतोस, आणि आपला साठा सूर्याचें ठिकाणीं ठेवतोस. तो तूं जगाचा सत्ताधिश आहेस आणि तो तूं प्रशंसनीय आहेस.

७. हे इंद्रा, ज्यानें फलपुष्पशाली वृक्ष शेतांत सृष्टिनियमानें धारण केले, ज्यानें विषम विद्युल्लता निर्माण केली, ज्यानें नक्षत्रें उत्पन्न केलीं, ज्या थोर असणाऱ्या त्वा भोंवतीं समुद्र निर्माण केले तो तूं प्रशंसनीय आहेस.

८. हे अनेक पराक्रम असणाऱ्या इंद्रा, तूं अन्नसमृद्धि करण्याकरतां आणि दासांचा नाश करण्याकरतां नार्मर व सहवसु यांना ठार करण्याकरतां तेजस्वी वज्राची धार लखलखित केली, तो तूं प्रशंसनीय आहेस.

९. हे इंद्रा, ज्या तुझे एकाच्या सुखाकरतां हजार घोडे एकदम जोडले जातात, जो सर्वांना उपजीव्य

आहे, जो भक्तांचें संरक्षण करतो, ज्यानें तुरुंगांत दभीतीकरतां दस्यूंना ठार केलें, जो सर्वांना साहाय्यकर्ता झालास तो तूं खरोखर प्रशंसनीय आहेस.

१०. सर्वच नद्यांनीं ह्या इंद्राला पराक्रमी केले आहे. भक्तांनीं ह्याचीं कर्में करण्याकरतांच धन धारण केले आहे. तूं विस्तीर्ण (पृथ्वीचे) सहा भाग स्थिर केलेस. पंचजनांचा तूं सर्व तऱ्हेनें संरक्षणकर्ता आहेस. तो तूं प्रशंसनीय आहेस.

११. हे वीर इंद्रा, तूं एका पराक्रमानें सर्व धन मिळवतोस हा तुझा पराक्रम वर्णनीय आहे. बलवान जातूष्ठिराला तूं अन्न दिलेस. हे जे सर्व तूं पराक्रम केलेस त्यामुळेंच तूं प्रशंसनीय आहेस.

१२. तुर्वीति आणि वय्य यांना तरून जातां यावें म्हणून जोरानें वाहणाऱ्या नद्यांचा प्रवाह थांबविलास. अंध आणि पंगु परावृजाला तूं नीच स्थितीतून उच्च स्थितीला नेलेंस आणि कीर्तिमान केलेंस तो तूं प्रशंसनीय आहेस.

१३. हे उदार इंद्रा, तूं आम्हाला दान देण्याकरतां उत्कृष्ट संपत्ति दे. तुझेजवळ खरोखर धन विपुल आहे, कीं ज्याची दररोज अत्यंत वाखाणणी होईल. आम्ही चांगल्या मुलाबाळांनीं युक्त होऊन यज्ञांत मोठालीं स्तोत्रें म्हणूं.

सूक्त चवदावें.

ऋषि—गृत्समद; देवता–इंद्र; छंद–त्रिष्टुभ.

१. हे अध्वर्यूहो, इंद्राकरतां सोम घेऊन या. भांड्यांनीं तें आनंददायक पेय द्या. हें पिण्याविषयीं शूर इंद्राला नेहेमींच इच्छा असते. म्हणून त्या पराक्रम्याला तें अर्पण करा. हा तेंच इच्छित असतो.

२. हे अध्वर्यूहो, ज्या इंद्रानें पाण्याला अडवून पडलेल्या वृत्राला, विजेनें झाड तोडावें त्याप्रमाणें ठार केलें, त्या सोमाची इच्छा करणाऱ्याला हा सोम द्या. हा इंद्र सोम पिण्याला योग्य आहे.

३. हे अध्वर्यूहो, ज्यानें दृभीकाला ठार मारले, ज्यानें गाईना बाहेर काढले, ज्यानें वलाला ठार केलें, त्या इंद्राकरतां अन्तरिक्षांतलि वाऱ्याप्रमाणें सोमरस उत्पन्न करा. म्हातारा वस्त्रानें अंग झाकतो त्याप्रमाणें सोमांनीं इंद्राला आच्छादून टाका.

४. हे अध्वर्यूहो, ज्यानें नव्याण्णव बाहू उगारून येणाऱ्या उरणाला ठार केले, ज्यानें अर्बुदाला पालथे घालून ठार केले त्या इंद्राला सोम पिऊन झाल्यावर प्रसन्न करा.

५. हे अध्वर्यूहो, ज्यानें अश्नाला ठार केलें, ज्यानें खादाड शुष्णाला, तसेंच व्यंसाला, ज्यानें पिप्रु आणि नमुचीला, आणि ज्यानें रुधिक्राला ठार केले त्या इंद्राला सोम अर्पण करा.

६. हे अध्वर्यूहो, ज्यानें जणूं काय वज्रानें शंबराचे शेंकडो पुरातन किल्ले फोडलें, ज्यानें वर्चीच्या एक लाख सैन्याला धुळीला मिळवलें अशा ह्या इंद्राला सोम द्या.

७. हे अध्वर्यूहो, ज्यानें लाखो शत्रूंना ठार करून पृथ्वीवर पाडले, ज्यानें कुत्स, आयु आणि अतिथिग्व यांच्या वीरांना ठार केले, त्याला तुम्ही सोम द्या.

८. हे शूर अध्वर्यूहो, ज्या तुमच्या इच्छा आहेत त्या इंद्राला सोम देऊन तुम्ही तावडतोब प्राप्त कराल. हे यज्ञ करणारांनो, तुम्ही हातांनीं शुद्ध केलेला सोम ह्या प्रसिद्ध इंद्राकरतां अग्नींत अर्पण करा.

९. हे अध्वर्यूहो, ह्या इंद्राकरतां सुखकर सोम तयार करा. पाण्यांत स्वच्छ केलेला सोम भांड्यांत ओता. प्रसन्न असणारा इंद्र तुमच्या हातांनीं काढलेल्या सोमाची इच्छा करतो. तुम्ही इंद्राला मदकर सोम अर्पण करा.

१०. हे अध्वर्यूहो, गाईची कास जशी दुधानें भरलेली असते त्याप्रमाणें ह्या उदार इंद्राला तुम्ही सोमानें भरून टाका. मला हें माहीत आहे, नव्हे माझा हा निश्चय आहे कीं वरचेवर देणाऱ्या भक्ताची तो नक्की ओळख ठेवतो.

११. हे अध्वर्यूहो, जो दिव्य संपत्तीचा आणि पार्थिव संपत्तीचा राजा आहे त्या इंद्राला धान्ययुक्त कणसाप्रमाणें सोमांनीं संतुष्ट करा. असें कर्म आमच्याकडून होवो.

१२. हे उदार इंद्रा, तूं आम्हांला दान देण्याकरतां उत्कृष्ट संपात्ति दे. तुझेजवळ खरोखर धन विपुल आहे, कीं दररोज ज्याची वाखाणणी चालूं असते. आम्ही चांगल्या मुलाबाळांनीं युक्त होऊन यज्ञांत मोठालीं स्तोत्रें म्हणावी.

सूक्त पंधरावें.

ऋषिः—गृत्समद; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. आतां मी ह्या थोर व सत्यस्वरूप इंद्राचीं

सत्य व मोठीं कृत्यें वर्णन करीत आहें. त्रिकद्रुक यागांत इंद्र सोम प्याला. आणि ह्या सोमाच्या मदांत अहीला ठार केलें.

२. द्युलोकाला निराधार आकाशांत स्थिर केलें. आकाश आणि द्यावापृथ्वी आपल्या पराक्रमानें भरून टाकल्या. त्यानें पृथ्वीला धारण केलें आणि तिला वाढविली. हीं कृत्यें इंद्रानें सोमाच्या मदांत केलीं.

३. माप घेऊन घर करावें त्याप्रमाणें समोर असणारी सृष्टि त्यानें निर्माण केली. नद्यांचे मार्ग त्यानें वज्रानें तयार केले. लांबलचक मार्गांनीं वाहणाऱ्या नद्या त्यानें सहज निर्माण केल्या. हीं कृत्यें इंद्रानें सोमाच्या मदांत केलीं.

४. दभीतीला घेऊन जाणाऱ्या शत्रूंना वेढा देऊन पेटलेल्या अग्नींत त्यांचीं सर्व आयुधें जाळून टाकलीं. नंतर त्याला गाई, घोडे आणि रथ दिले. हीं कृत्यें इंद्रानें सोमाच्या मदांत केलीं.

५. त्या इंद्रानें विशाल परुष्णीला तरून जाण्यास योग्य केलें. पाण्यांत न भिजतां त्यांना सुखानें पार पाडलें. त्यांनीं नदी तरून संपत्ति प्राप्त केली. हीं कृत्यें इंद्रानें सोमाच्या मदांत केलीं.

६. त्यानें आपल्या महत्वानें (पूर्वेस वाहणाऱ्या) सिंधूला उदङ्मुख वाहते केले वज्रानें उषेच्या रथाचा चुराडा केला. दुर्बल सेना प्रबल सेनेशीं लढवल्या. हीं कृत्यें इंद्रानें सोमाच्या मदांत केलीं.

७. कुमारिकांचें गूढ स्थान जाणणारा परावृज प्रकट झाला आणि त्यांच्यापुढें उभा राहिला. पांगळा असून उभा राहिला आणि अंधळा असूनहि पाहूं लागला. हीं सर्व कृत्यें इंद्रानें सोमाच्या मदांत केलीं.

८. अंगिरांच्याकडून स्तवन केला जाणारा इंद्र बलाला ठार करता झाला. पर्वताचीं बळकट द्वारें उघडता झाला. ह्या पर्वतांचीं कृत्रिम द्वारें त्यानें मोकळीं केलीं. हीं सर्व कृत्यें इंद्रानें सोमाच्या मदांत केलीं

९. तूं दस्यु चुमुरि आणि धुनि यांना झोंपेंत ठार मारलेस. आणि दभीतीचें संरक्षण केलेस. त्याच्या रंभी नांवाच्या सेवकाला ह्या युद्धांत पुष्कळ धन मिळालें. हीं सर्व कृत्यें इंद्रानें सोमाच्या मदांत केलीं.

१०. आतां तुझी ती समृद्ध दक्षिणा धेनु स्तोत्याला उत्कृष्ट संपत्ति देवो. मला दे आणि स्तोत्यांना वगळूं नकोस. आम्ही मोठे भाग्यशाली व्हावें. आणि यज्ञांत चांगल्या मुलाबाळांनीं युक्त असें आम्ही तुझें स्तवन करावें.

सूक्त सोळावें.

ऋषिः—गृत्समद; देवता–इंद्र; छंदः—१–८ जगती, ९ त्रिष्टुभ.

१. हे यज्ञ करणारांनो, तुम्ही मोठ्यांतल्या मोठ्या इंद्राकरतां प्रज्वलित अग्नींतच हवि द्या. अक्षीण, सर्वांचा पराभव करणाऱ्या, सोम अर्पण केलेल्या सनातन आणि नित्य तरुण अशा इंद्राला साहाय्याकरतां आम्ही बोलावतों.

२. ज्या थोर इंद्राशिवाय कांहींहि नाहीं, ज्या इंद्रांत सर्व सामर्थ्यें साठविलेलीं आहेत, तो आपल्या पोटांत सोम धारण करतो, शरीरांत बल आणि तेज धारण करतो, हातांत वज्र धारण करतो आणि डोक्यांत चातुर्य धारण करतो.

३. हे इंद्रा, तुझें सामर्थ्य द्यावापृथ्वींना कमी करतां येत नाहीं. तुझ्या रथाला समुद्रांना किंवा पर्वतांना सुद्धा अडथळा करतां येत नाहीं. तुझ्या वज्राला कोणीहि पराभूत करूं शकत नाहीं, कीं जेव्हां तूं घोड्यांनीं अनेक योजनें जातोस.

४. हे यजमाना, सर्व लोक ह्या यज्ञार्ह, बलिष्ठ, धैर्यशाली आणि सर्वांशीं मिळून असणाऱ्या तुला उद्देशून कर्म करतात. तर अत्यंत ज्ञाता आणि बलवान असा तूं हवीनें यजन कर. हे इंद्रा तेजस्वी अग्नीसह सोम पी.

५. हे इंद्रा, बलप्रद अन्न भक्षण करणाऱ्या बलवान इंद्राला पिण्याकरतां बलप्रद सोमाचा रस वाहूं लागला. बलिष्ठ अध्वर्यू सोमरस पिळणाऱ्या दगडांनीं बलिष्ठ इंद्राकरतां सोम पिळीत आहे.

---

४. टीपः—पूर्वीं चुमुरिधुनि वगैरेंनीं दभीतीच्या नगराला वेढा दिला आणि त्याला पकडून नगरांतून बाहेर पडले. त्यानंतरची हकीगत सूक्तांत ग्रथित केली आहे.

७. टीपः—पूर्वीं अंध आणि पंगु परावृज नांवाचा ऋषि मुलींची इच्छा करूं लागला तेव्हां त्या सर्व पळाल्या आणि लपून बसल्या. नंतर इंद्राची प्रार्थना केल्यावर त्याच्या कृपेनें परावृजाला दृष्टि आली आणि पायहि मिळाले. ही कथा वर आली आहे.

६. हे कामपूरक इंद्रा, तुझें वज्र बळकट आहे. तुझा रथ बळकट आहे, तुझे दोन घोडे बळकट आहेत आणि तुझीं आयुधें बळकट आहेत. बलप्रद सोमाचा तूं मालक आहेस. तूं ह्या बलवर्धक सोमानें तृप्त हो.

७. शत्रूंचा पराभव करणारा, मी युद्धांत नौकेसारख्या असणाऱ्या आणि स्तुति इच्छिणाऱ्या तुझ्याकडें तीनहि सवनांत स्तोत्रानें येत आहे. हें आमचें स्तोत्र इंद्र ऐकेल काय? आम्ही द्रव्याच्या विहिरीप्रमाणें असणाऱ्या इंद्राला सोम अर्पण करीत आहोत.

८. हे इंद्रा, गवत खाऊन पुष्ट झालेली गाय (भूक लागण्यापूर्वींच) वासराकडे वळते त्याप्रमाणें शत्रूंचा त्रास होण्यापूर्वींच तूं आमच्याकडे वळ. हे शतक्रतो इंद्रा, वीरपुरुष पत्नींना भेटावेत त्याप्रमाणें तुझ्या चांगल्या स्तोत्रांनीं आम्ही एकदां तरी युक्त व्हावें.

९. आतां तुझी ती समृद्ध दक्षिणाधेनु स्तोत्याला उत्कृष्ट संपत्ति देवो. मलाहि दे आणि स्तोत्याला वगळूं नकोस. आम्ही मोठे भाग्यशाली व्हावें. आणि यज्ञांत चांगल्या मुलाबाळांनीं युक्त असे आम्ही तुझें स्तवन करावें.

सूक्त सत्रावें

ऋषिः—गृत्समद; देवता—इंद्र; छंदः—१–७ जगती, ८–९ त्रिष्टुभ.

१. हे स्तोत्यांनो, ज्या ह्या इंद्राचें सामर्थ्य उत्पन्न झाल्याबरोबर पुरातन कालाप्रमाणें बाहेर पडतें त्या ह्या इंद्राकरतां अंगिरसाप्रमाणें तूं नवीन स्तोत्र कर. कारण वृत्रानें व्यापिलेले सर्व बळकट मेघ सोमाच्या मदांत सामर्थ्यानें तूं मोकळे करतोस.

२. जो सोमरस प्रथम पिण्याकरतां पराक्रम करीत आपला महिमा प्रकट करतां झाला, त्या इंद्राचा उत्कर्ष होवो. जो शूर इंद्र युद्धांत शरीरावर कवच घालतो, तो आपल्या महिम्यानें मस्तकावर द्युलोकाला धारण करतो.

३. हे इंद्रा, ह्या स्तोत्याच्या पुढें स्तोत्रामुळें जेव्हां तूं सामर्थ्य प्रकट केलेंस तेव्हां तूं प्रथम मोठा पराक्रम केलास. रथांत बसलेल्या इंद्रानें स्थानच्युत केलेले राक्षस एकत्र आणि वेगवेगळे धावूं लागतात.

४. जो पुरातन इंद्र सामर्थ्यानें सर्व जगाचा सत्ताधिश होऊन विजयी होतो तो लोकाधार इंद्र तेजानें द्यावापृथ्वी व्यापतो आणि कुट्ट अंधार व्यापून झाकून टाकतो.

५. त्या इंद्रानें हलत्या पर्वतांना स्थिर केले आणि पाण्याला खालीं वहातें केलें. विश्वाधार पृथ्वीला धारण केले आणि कुशलतेनें द्युलोकाला पडूं न देतां आपल्या बाहूंनीं स्थिर केले.

६. जगत्पालकानें सर्व लोकांच्या ज्ञानापेक्षांहि श्रेष्ठ अशा ज्या वज्राला निर्माण केलें,आणि ज्या वज्रानें क्रिवीला ठार करून जमिनीवर पाडले व ठार केले तो हा इंद्र ह्या जगाचा स्वामी होय.

७. हे इंद्रा, आईबापांच्या येथें उपवर झालेली मुलगी बापाच्या घरीं राहून आपला भाग मागते त्याप्रमाणें तुझ्याजवळ मी धन मागत आहें. तर तूं धन इतकें म्हणून प्रसिद्ध कर. ज्या धनानें तूं स्तोत्यांचा सत्कार करतोस तें धन आम्हांकरतां आण आणि दे.

८. हे इंद्रा, उदार असणाऱ्या तुझा आम्ही धांवा करीत आहोंत. हे इंद्रा, तूं कर्तृत्व आणि समृद्धि देणारा आहेस. हे इंद्रा, तूं आपल्या अद्भुत सामर्थ्यानें आमचें संरक्षण कर. आणि हे शूर इंद्रा, आम्हांला अत्यंत संपत्तिमान कर.

९. आतां तुझी ती दक्षिणाधेनु स्तोत्याला उत्कृष्ट संपत्ति देवो. मलाहि दे आणि स्तोत्यालाहि वगळूं नको. आम्ही मोठें भाग्यशाली व्हावें. आणि यज्ञांत चांगल्या मुलाबाळांनीं युक्त असें आम्ही तुझें स्तवन करावें.

सूक्त अठरावें.

ऋषिः—गृत्समद; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. (यज्ञरूपी) नवा रथ प्रातःकालीं जोडला आहे. हा शुद्ध, चार घोडे असलेला, तीन चाबकाचा, आणि सात लगाम असलेला आहे. दहा दारें असलेला लोकहितकारक, स्वर्गदाता आणि तो आहुतींनीं चालूं लागतो.

२. तो सोम प्रातःसवनांत ह्या इंद्राला पुरेसा होतो. तो माध्यंदिन सवनांत पुरेसा होतो आणि तो

---

१ टीपः—यज्ञावर रथाचें रूपक केलेले दिसतें. घोडे चार म्हणजे ऋत्विज किंवा दगड; तीन चाबूक म्हणजे मंद्र, मध्यम आणि उत्तम अशी तीन प्रकारची वाणी किंवा तीन सवनें; सात लगाम म्हणजे छंद; दहा दारें म्हणजे यज्ञपात्रें होत.

तृतीय सवनांत पुरेसा होतो. तो मनुष्यांचा (देवांना बोलावणारा) होता आहे.

३. इंद्राचे दोन घोडे सुखानें जाण्याकरतां सुंदर नव्या सूक्तानें मी रथाला जोडतो. ह्या यज्ञांत पुष्कळ स्तोते आहेत. दुसरे स्तोते तुला (दुसरीकडे) न रमवोत.

४. हे इंद्रा, धांवा केल्यावर दोन घोड्यांनीं ये, चार घोड्यांनीं ये. सोम पिण्याकरतां सहा घोड्यांनीं ये. किंवा आठ घोड्यांनीं ये. हे सुयज्ञ इंद्रा, हा सोम तुझ्याकरतां पिळला आहे. यज्ञ निरर्थक करूं नकोस.

५. हे इंद्रा, सोम पिण्याकरतां आमच्याकडे वीस घोड्यांनीं ये, तीस घोड्यांनीं ये, चाळीस घोड्यांनीं ये, चांगल्या चालणाऱ्या पन्नास घोड्यांनीं ये, साठ किंवा सत्तर घोड्यांनीं ये.

६. ऐंशी नव्वद किंवा शंभर घोड्यांनीं वाहिलेला तूं आमच्याकडे ये. शुनहोत्र पात्रांतील हा सोम तुझा आहे. हे इंद्रा, तुला प्रसन्न करण्याकरतां सोम ओतला आहे.

७. हे इंद्रा, माझ्याच स्तुतीकडे तूं ये. मोठाले घोडे तूं आपल्या रथाच्या धुरेला जोड. अनेक लोकांकडून तुझा धांवा केला जातो. हे शूरा, ह्या यज्ञांत तूं आनंदित हो.

८. इंद्राशीं असणारें माझें सख्य नष्ट न होवो. इंद्राची देणगी आम्हाला मिळो. श्रेष्ठ व संकटनिवारक अशा तुझ्या हातांत आम्ही असावें. प्रत्येक युद्धांत आम्ही विजयी व्हावें.

९. आतां तुझी ती दक्षिणाधेनु स्तोत्याला उत्कृष्ट संपत्ति देवो. तूं मलाहि संपत्ति दे आणि स्तोत्यालाहि वगळूं नकोस. आम्ही मोठे भाग्यशाली व्हावें. आणि यज्ञांत चांगल्या मुलांबाळांनीं युक्त असे आम्ही तुझें स्तवन करावें.

सूक्त एकोणिसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता–इंद्र, छंदः—त्रिष्टुभ.

१. सोम पिळणाऱ्या ज्ञात्याचें हें सोमरूपी प्रीतिकर अन्न इंद्र प्रसन्नतेकरतां पिवो. ह्या पुरातन सोमांत आनंद पावणाऱ्या इंद्रानें स्थान केलें आहे. स्तोत्र करूं इच्छिणाऱ्या भक्तांनींहि स्थान केलें आहे.

२. ह्या मधुर सोमानें आनंद पावणाऱ्या वज्रधारी इंद्रानें पाण्याला आडवून पडलेल्या अहीला ठार केलें. पहा पक्षी घरट्यांत जातात त्याप्रमाणें नद्यांचें पाणी सरळ वाहूं लागलें.

३. त्या महनीय अहिहन्त्या इंद्रानें पाण्याचा प्रवाह समुद्राकडे वहाता केला. त्यानें सूर्य उत्पन्न केला, गाई मिळविल्या, आणि तेजानें दिवसाचें ज्ञान करून दिलें.

४. जो इंद्र सूर्य मिळविण्याविषयीं स्पर्धा करणाऱ्या लोकांना ताबडतोब आश्रय करण्यासारखा आहे, तो इंद्र दात्या मनुष्याला पुष्कळ उत्कृष्ट संपत्ति देतो आणि वृत्राला ठार करतो.

५. स्तुति केल्या जाणाऱ्या त्या इंद्रदेवानें सोम तयार करणाऱ्या माणसांकरतां एतशाला सूर्यापेक्षां अत्यंत सामर्थ्यवान केलें. कारण, बाप मुलाला वाटणी देतो त्याप्रमाणें उदार एतशानें ह्या इंद्राला गूढ आणि निर्दोष अशी संपत्ति दिली.

६. त्या तेजस्वी इंद्रानें सारथ्य कर्म करणाऱ्या कुत्साकरतां खादाड शुष्णाला आणि कुयवाला ताब्यांत घेतले. इंद्रानें दिवोदासाकरतां शंबराचीं नव्याण्णव नगरें भग्न केलीं.

७. हे इंद्रा, कीर्तिमान व्हावें म्हणून समृद्धि इच्छिणारे आम्ही तुलाच आपणहून स्तोत्र अर्पण करीत आहोंत. आम्ही तुझ्या सख्याचा अनुभव घ्यावा. तूं हिंसक राक्षसाचें शस्त्र खालीं करावेस.

८. हे शूर इंद्रा, जाऊं इच्छिणारे मार्ग करतात त्याप्रमाणें आम्ही गृत्समद तुझेंच स्तोत्र करूं. हे इंद्रा, स्तोत्र करूं इच्छिणारे आम्ही चांगल्या घरानें युक्त अन्न, बल आणि उत्कृष्ट अभिनव सुख उपभोगूं.

९. आतां तुझी ती दक्षिणाधेनु स्तोत्याला उत्कृष्ट संपत्ति देवो. तूं मलाहि संपत्ति दे आणि स्तोत्यांनाहि वगळूं नकोस. आम्ही मोठे भाग्यशाली व्हावें. आणि यज्ञांत चांगल्या मुलाबाळांनीं युक्त असे आम्ही तुझें स्तवन करावें.

सूक्त विसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता–इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, ऐश्वर्येच्छु मनुष्य रथ मिळवितो त्याप्रमाणें आम्ही तुझ्याकरतां सोम तयार करीत आहोंत. तर आम्हांला तूं ध्यानांत घे. आम्ही स्तुति करणारे, भक्तीनें ध्यान करणारे, तुझ्यासारख्या श्रेष्ठ नायकाकडे सुखाची याचना करणारे आहोंत.

२. हे इंद्रा, तुझ्या साहाय्यानीं तूं आमचें रक्षण कर. तुझी भक्ति करणाऱ्या लोकांचें तूं शत्रूपासून संरक्षण करणारा आहेस. जो तुला शरण येतो त्या हवि देणारांचा तूं धनी आहेस, त्याचें संरक्षण करणारा आणि संकटनिवारक आहेस.

३. जो स्तोत्याला, कर्म करणाऱ्याला, हवि शिजवणाऱ्याला,सामगान करणाराला साहाय्य करून पार नेतो. तो सदातरुण, आव्हानयोग्य आणि कल्याणकारक सखा आमच्या लोकांचा संरक्षणकर्ता होवो.

४. ज्या इंद्रामुळें स्तोते उत्कर्ष पावले आणि त्यांनीं शत्रूंचा पराभव केला त्याचींच मी स्तुति करतों, त्या इंद्राचेंच मी गुण गातों. स्तुति केलेला इंद्र नवीन स्तुति करूं इच्छिणाऱ्या भक्ताची धनाची इच्छा पूर्ण करो.

५. अंगिरसांच्या स्तोत्रांचा स्वीकार करणारा तो इंद्र स्तोत्र स्वीकारून त्याच्या स्तोत्राचा उत्कर्ष करतो. स्तुति केलेल्या त्यानें सूर्याकडून उषेचा अपहार केला आणि अश्नाचीं अनेक नगरें उध्वस्त केलीं.

६. तो देदीप्यमान प्रख्यात आणि अत्यंत पराक्रमी इंद्र मनुष्यांच्या इच्छा पूर्ण करण्याकरतां सज्ज असो. विजयी आणि बलवान इंद्र त्रासदायक दासाचे प्रिय मस्तक खालीं पाडो.

७. तो वृत्रहन्ता व नगरभेत्ता इंद्र हलक्या जातीच्या दास लोकांची दाणादाण करून टाकतो. त्यानें मनुष्याकरतां पृथ्वी आणि पाणी उत्पन्न केलें. तो यज्ञ करणाऱ्या भक्ताचें स्तोत्र नेहेमीं वृद्धिंगत करो.

८. स्तोत्यांकडून उदक प्राप्त व्हावें म्हणून त्या इंद्राला नेहेमीं बलवर्धक हवि दिलें जातात. जेव्हां ह्या इंद्राच्या खांद्यावर स्तोते वज्र ठेवतात तेव्हां तो दस्यूंना ठार करून त्यांचीं लोखंडी नगरें नष्ट करून टाकतो.

९. आतां तुझी ती समृद्ध दक्षिणाधेनु स्तोत्याला उत्कृष्ट संपत्ति देवो. तूं मलाहि संपत्ति दे आणि स्तोत्यांनाहि वगळूं नकोस. आम्ही मोठें भाग्यशाली व्हावें. आणि यज्ञांत चांगल्या मुलाबाळांनीं युक्त असे आम्ही तुझें स्तवन करावें.

सूक्त एकविसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता—इंद्र; छन्दः—१–५ जगती, ६ त्रिष्टुभ.

१. हे अध्वर्यो, सर्व जिंकणाऱ्या, धन जिंकणाऱ्या, स्वर्ग जिंकणाऱ्या, मोठ्यांना जिंकणाऱ्या, शूरांना जिंकणाऱ्या, सुपीक प्रदेश जिंकणाऱ्या, घोडे जिंकणाऱ्या, गाई जिंकणाऱ्या, उदक जिंकणाऱ्या पूजनीय इंद्राला तूं रमणीय सोम अर्पण कर.

२. सर्वांचा पराभव करणाऱ्या, भंजक, जेता, अजिंक्य, जयशील, कर्ता, बहुस्तुत, नायक, दुस्तर, मोठ्यांचा पराजय करणारा अशा इंद्राचे हे स्तोत्यांनो, तुम्ही स्तोत्र म्हणा.

३. मोठ्यांना जिंकणारा, लोकसेवक, लोकांना जिंकणारा, (शत्रूंना) हलवणारा, योद्धा, यथेच्छ सोम दिलेला, शत्रूंचा पाडाव करणारा, पराभव करणारा असा इंद्र लोकांत आश्रयणीय आहे. त्या इंद्रानें केलेले पराक्रम आम्ही गातों.

४. अनुपम वीर, दुष्टांचा संहारकर्ता, गंभीर, महान, असामान्य कुशल, समृद्धांना प्रेरणा देणारा, शत्रूंचा नाश करणारा, बळकट, व्यापक आणि सुयज्ञ इंद्रानें उषा आणि सूर्य उत्पन्न केले.

५. स्तुति करणारे ज्ञाते भक्त यज्ञानें इंद्रापासून (गाईंचा) मार्ग जाणते झाले. साहाय्य मिळावें म्हणून इंद्राची स्तुति करणारे स्तोत्रानें आणि उपासनेनें धन प्राप्त करते झाले.

६. हे इंद्रा, तूं आम्हांला उत्कृष्ट संपत्ति दे. ज्ञान आणि सामर्थ्याचा भाग्यशालीपणा दे. धनाची समृद्धि, शरीराचें आरोग्य, वाणीचा मधुरपणा आणि चांगले दिवस आम्हांला दे.

---

६. टीपः—हा मंत्र अनेक संस्कारांत येत असतो.

सूक्त बाविसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता—इंद्र; छन्दः—१ अष्टि, २–३ अतिशक्करी, ४ अतिशक्करी किंवा अष्टि.

१. महान, महाबल इंद्र त्रिकद्रुकांत यवाशिर सोम विष्णूसह तृप्ति होईपर्यंत यथेच्छ प्याला. तो सोम महान कर्म करण्याकरतां थोर व व्यापक अशा त्याला मद आणता झाला. तो सत्यस्वरूप पाझरणारा तेजस्वी सोमरस ह्या सत्यस्वरूप इंद्रदेवाला प्रबळ करो.

२. नंतर तेजस्वी इंद्रानें सामर्थ्य गाजवून युद्धानें क्रिवीला पराभूत केलें. तो ह्या (सोमाच्या) सामर्थ्यानें उत्कर्ष पावला आणि द्यावापृथ्वी व्यापून टाकिली. इंद्रानें सोमाचा एक भाग पोटांत धारण केला आणि हा

दुसरा भाग देवांना दिला. सत्यस्वरूप तेजस्वी सोम सत्यस्वरूप इंद्रदेवाचा उत्कर्ष करो.

३. हे इंद्रा, तूं बुद्धीसह उत्पन्न झालास, बलानें युक्त होऊन वाढलास आणि पराक्रमांनीं उत्कर्ष पावलास. तूं शत्रूंचा पराभव करणारा आणि लोकद्रष्टा आहेस. तूं स्तोत्याला रमणीय धन आणि ऐश्वर्य देणारा आहेस. तो सत्यस्वरूप तेजस्वी सोमरस सत्यस्वरूप इंद्रदेवाला उत्कर्षित करो.

४. हे नेत्या इंद्रा, तुझें तें लोकहितकारक पहिलें पुरातन कृत्य स्वर्गात वाखाणण्यासारखे आहे कीं तूं तेजस्वी शत्रूंचा प्राण घेतला आणि पाणी वहावयास लावलेस. शतक्रतु इंद्र सामर्थ्यानें सर्व देवहीनांचा पराभव करो, सामर्थ्यवान होवो आणि हविरन्न प्राप्त करो.

सूक्त तेविसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता–बृहस्पति व ब्रह्मणस्पति *
छन्दः—१५.१९ त्रिष्टुभ, अवशिष्ट जगती.

१. हे ब्रह्मणस्पते, गणांचा गणपति, ज्ञात्यांमधील अत्यंत प्रख्यात ज्ञाता आणि ज्येष्ठराज अशा तुझा आम्ही धांवा करतों. आमचीं स्तोत्रें ऐकून साहाय्य करण्याकरतां तूं आमच्या यज्ञगृहांत येऊन बैस.

२. हे बलवान बृहस्पते, ज्ञात्या देवांनींहि तुझ्याकडून यज्ञांतील भाग प्राप्त केला. तेजानें मोठा असणाऱ्या सूर्यापासून जसे किरण उत्पन्न होतात त्याप्रमाणें सर्व स्तोत्रांचा उत्पन्न कर्ता तूं आहेस.

३. हे बृहस्पते, तूं राक्षस आणि अंधार नाहींसा करून यज्ञाच्या तेजस्वी, भयंकर, शत्रुनाशक, राक्षसघातक, गोठे फोडणाऱ्या आणि स्वर्गव्यापक अशा रथांत बसावेस.

४. हे बृहस्पते, तूं लोकांना सन्मार्गानीं नेतोस आणि तारतोस. जो तुला हवि देतो त्याला दुःख प्राप्त होत नाहीं. तूं ब्रह्मद्वेष्ट्यांना तापदायक आणि क्रोध नष्ट करणारा आहेस. तुझें तें माहात्म्य मोठें आहे.

५. हे ब्रह्मणस्पते, उत्तम रक्षण करणारा तूं ज्याचें संरक्षण करतोस त्याला दुःख व त्रास देत नाहींस. त्याला पाप लागत नाहीं, त्याला शत्रू कुठूनहि त्रास देत नाहींत, त्याला दुटप्पी लोक त्रास देत नाहींत, त्याच्यापासून सर्वच दुष्ट लोकांना तूं हाकून देतोस.

६. हे बृहस्पते, विचक्षण असा तूं आमचा सन्मार्गदर्शी आणि संरक्षण करणारा आहेस. तुझ्या यज्ञाकरतां आम्ही स्तोत्रें म्हणून स्तुति करीत आहोंत. जो आमच्याशीं कुटिलता करील त्याला त्याची दुर्बुद्धि हटकून मारो.

७. आणि जो चालून येणारा, गर्विष्ठ आणि लुबाडणारा मनुष्य निरपराधी असणाऱ्या मला त्रास देईल त्याला तूं हे बृहस्पते, वाटेंतून दूर कर. आणि ह्या उपासनेकरतां आमचा मार्ग सुगम कर.

८. हे संकटांतून पार नेणाऱ्या बृहस्पते, आमचा रक्षणकर्ता, कैवारी आणि आमचा कनवाळू अशा तुला आम्ही बोलावतों. हे बृहस्पते, तूं देवांच्या निंदकांना ठार मारून टाक. दुष्ट बुद्धीच्या लोकांना उत्कृष्ट सुख प्राप्त न होवो.

९. हे ब्रह्मणस्पते, चांगला उत्कर्ष करणाऱ्या तुझ्यामुळें आम्ही स्पृहणीय संपत्ति लोकांकडून प्राप्त करूं. जे शत्रु आम्हांला दुरून त्रास देतात किंवा जे जवळून त्रास देतात त्या कर्महीनांना तूं नष्ट कर.

१०. हे बृहस्पते, कामपूरक आणि शुद्ध अशा साहाय्य करणाऱ्या तुझ्यामुळें आम्ही उत्तम अन्न मिळवावें. आम्हावर चढाई करूं इच्छिणाऱ्या दुर्भाषण करणाऱ्याची सत्ता न चालो. स्तोत्रांनीं चांगले बोलणाऱ्या तूं आमचा उत्कर्ष कर.

११. हे ब्रह्मणस्पति, अनुपम वीर, युद्धाकडे धांवणारा, शत्रूंचा संहार करणारा, युद्धांत शत्रूंचा पराजय करणारा तूं खरा ऋण फेडणारा आहेस. आणि ओजस्वी नास्तिकाचाहि तूं दमनकर्ता आहेस.

१२. हे बृहस्पते, जो नास्तिक मनानें आम्हा स्तोत्यांना त्रास देतो आणि आपल्याला मोठा मानून स्तोत्यांना ठार करूं इच्छितो, त्याचें आयुध आम्हांला स्पर्श न करो. प्रबळ दुष्टाच्या क्रोधाला आम्ही नष्ट करूं.

१३. युद्धांत धांवा करण्यासारखा, स्तोत्रानें उपासनीय, युद्धामध्यें जाणारा, सर्व प्रकारचें धन देणारा असा श्रेष्ठ बृहस्पति त्रास देणाऱ्या सर्व शत्रूंना रथाप्रमाणें खिळखिळ करो.

---

* टीपः—जेथें खुद्द बृहस्पति शब्द आला आहे ती ऋचा बृहस्पतीची आणि जेथें बृहस्पति शब्द आला नाहीं ती ऋचा ब्रह्मणस्पतीची, असें अनुक्रमणींत म्हटलें आहे. ह्या दोन देवता वेगळया समजण्यास जास्त आधार नाहीं.

१४. हे बृहस्पते, तुझा पराक्रम स्पष्ट दिसत असतांहि जे तुझी निंदा करतात. त्या राक्षसांना तूं अत्यंत तेजस्वी शस्त्रानें त्रास दे. जें तुझें प्रशंसनीय सामर्थ्य असेल तें तूं प्रगट कर. निंदकांचा तूं नाश कर.

१५. हे बृहस्पते, श्रेष्ठ मनुष्य जें तेज इच्छिल, जें लोकांत तेजस्वी आणि ज्ञानयुक्त आहे, जें सामर्थ्यानें सर्वांना प्रकाशित करते तें हे यज्ञाकरतां उत्पन्न झालेल्या, आश्चर्यकारक धन आम्हास दे.

१६. हे बृहस्पते, जे द्रोह्याच्या स्थानीं निर्धास्तपणें राहणारें शत्रु परक्याच्या अन्नाची इच्छा करतात, जे देवांचीं कर्मे न करावीत असें मनांत आणतात, त्या चोरांच्या ताब्यांत मला देऊं नकोस. भक्त सामापेक्षां उत्कृष्ट कांहीं जाणत नाहींत.

१७. हे ब्रह्मणस्पते, त्वष्ट्यानें तुला सर्व प्राण्यापेक्षां श्रेष्ठ निर्माण केलें. तूं सर्व स्तोत्रांचा कवि आहेस. तो तूं ब्रह्मणस्पति महान यज्ञाचा आधार अशा यजमानाचें ऋण घेणारा, ऋण फेडणारा आणि शत्रुहन्ता असा आहेस.

१८. हे अंगिरा, तूं जेव्हां गाईना झाकणारा पर्वत मोकळा केलास तेव्हां तो गाईचा पर्वत तुझ्याकरतां मोकळा झाला. हे बृहस्पते, वृत्रानें वेढलेला जो पाण्याचा साठा तो तूं इंद्राच्या साहाय्यानें पालथा घातला.

१९. हे ब्रह्मणस्पते, सर्व जगाचा नियामक असणारा तूं माझें हें सूक्त ध्यानांत घे. आणि आमच्या मुलांना प्रसन्न कर. देव ज्याचें रक्षण करतात, त्याचे सर्व कल्याण होतें. चांगल्या मुलाबाळांसह असणारे आम्ही तुझी मोठी स्तुति म्हणावी.

सूक्त चोविसावें.

ऋषि:—गृत्समद; देवता–१२ इंद्र व ब्रह्मणस्पति, अवशिष्ट ब्रह्मणस्पति; छंद:—१२–१६ त्रिष्टुभ, अवशिष्ट जगती.

१. हे ब्रह्मणस्पते, जो तूं ह्या जगाचा धनी आहेस तो तूं ही अर्पण केलेली स्तुति ध्यानांत घे. आम्हास ह्या नव्या महान स्तोत्रानें तुझी उपासना करूं दे. तसेंच आम्हांपैकीं स्तुति करणारा तुझा मित्र ज्याकरतां स्तुति करीत आहे त्या तऱ्हेनें तूं आमचें स्तोत्र निर्माण होऊं दे.

२. ज्यानें नमवावयास योग्य असणारास तेजानें नमविलें, ज्यानें क्रोधानें मेघांना विदीर्ण केलें, त्या ब्रह्मणस्पतीनें अचलांना पाडले (पाऊस पाडला) आणि संपन्न पर्वतांत प्रवेश केला.

३. सर्व देवांपेक्षां श्रेष्ठ देव जो ब्रह्मणस्पति त्याचाच हा पराक्रम, कीं जें अचल होतें तें शिथिल केलें आणि घट्ट होतें तें मृदु केलें. तो स्तोत्रानें वलाला मारता झाला आणि गाई मोकळ्या करतां झाला. अंधार नाहींसा केला आणि सूर्य दिसता केला.

४. ब्रह्मणस्पतीनें आपल्या तेजानें घट्ट तोंडाच्या आणि मधुर धारेच्या मेघाला फोडलें. त्यालाच सूर्याचे सर्व किरण पितात. त्या पाणी शिंपडणाऱ्या मेघाला एकदम पुष्कळ वर्षाव करावयास लावतात.

५. हे ऋत्विग्यजमानांनो, ब्रह्मणस्पति जीं स्तोत्रें करतो तीं कांहीं पुरातन स्तोत्रें भात्री उदकांचीं द्वारें तुमच्याकरतां महिन्यांनीं किंवा वर्षांनीं मोकळीं करतात. नंतर प्रयत्न न करतां द्यावापृथ्वी परस्परांचें उदक उपभोगितात.

६. जे विद्वान अंगिरस जात असतां पणींच्या परम गूढ साऊ्याकडे गेले, ते असुरांचें कपट पाहून ते आंत शिरण्याकरतां जिकडून आले होते तिकडे परत गेले.

७. ते सत्यनिष्ठ कवि कपट पाहून येथून पुनः मोठ्या मार्गास लागले. त्यांनीं दोन हातांनीं उत्पन्न केलेला अग्नि त्या पर्वतावर फेकते झाले. तो दुःखदायक अग्नि तेथें नव्हता.

८. ब्रह्मणस्पति जे इच्छितो ते सत्याची दोरी असलेल्या वेगयुक्त धनुष्यानें व्यापतो. ज्या बाणांनीं तो ठार करतो त्यांना पाहण्यास मनुष्याचे डोळे असतात, कानापासून ते उत्पन्न होतात आणि त्याचे बाण लक्षवेधक असतात.

९. तो पुरोहित ब्रह्मणस्पति (हवे ते) प्राप्त करून देणारा आहे, आणि (नको तें) विलग करणारा

टीप:—पणींनीं गाई चोरल्या नंतर पणींचें ठिकाण सरमेनें शोधून काढलें. ब्रह्मणस्पतीनें उत्पन्न केलेल्या अंगिरसांनीं तिकडे जाऊन पणींचीं कारस्थानें ध्यांनांत घेऊन तें स्थान स्वतःच्या हातांतुन निघालेल्या अग्नीनें जाळून टाकलें या कथेला उद्देशून ६।७ ह्या ऋचा आहेत.

टीप:—यज्ञावर धनुष्याचें सुंदर रूपक असून श्लेष अलंकारहि चांगला आहे.

आहे. तो चांगलें स्तवन केलेला आणि तो युद्धांत साहाय्यक होय. जेव्हां सर्वद्रष्टा ब्रह्मणस्पति स्तुतीसह अन्न आणि धन देवांना अर्पण करतो म्हणूनच धगधगणारा सूर्य अनायासें प्रकाशत असतो.

१०. उदार बृहस्पतीच्या चांगल्या संपत्तीच्या देणग्या श्रेष्ठ व्यापक आणि मिळवण्यासारख्या आहेत. ज्यायोगें उभय लोक उपभोग घेतात त्या सर्व बलवान आणि सुंदर बृहस्पतीच्या देणग्या होत.

११. जो उदार, आणि रमणीय थोर बृहस्पति दुर्बल स्थितींत असणाऱ्या महान स्तोत्याला सामर्थ्यवान करूं इच्छितो तो देव सर्व देवांमध्यें अत्यंत प्रख्यात होतो. ब्रह्मणस्पति सर्व जगांत श्रेष्ठच आहे.

१२. हे धनवान इंद्राबृहस्पतींनों, तुमचेंच सर्व (स्तोत्र) खरें आहे. उदकहि तुमच्या कामाला नष्ट करीत नाहीं. जोडलेले घोडे जातात त्याप्रमाणें तुम्ही हवीकडे जोरानें या.

१३. शीघ्रगामी घोडे बृहस्पतीची आज्ञा ऐकतात. सभाधीट स्तोता स्तोत्रें म्हणून संपत्ति प्राप्त करतो. प्रबळांशीं द्वेष करणारा ब्रह्मणस्पति कर्जासारखे हवि घेतो. संग्रामांत तो ब्रह्मणस्पतीच बलवान ठरतो.

१४. महापराक्रम करणाऱ्या बृहस्पतीचा खरा क्रोध (मंत्र) इच्छेप्रमाणें घडवतो. ज्यानें गाई (गुहेंतून) बाहेर काढल्या त्या त्यानें देवांना वाटून दिल्या. गाईंचा संघ मोठ्या नदीप्रमाणें जोरानें वेगवेगळा गेला.

१५. हे ब्रह्मणस्पते, चांगली संभाळावी लागणाऱ्या समृद्ध संपत्तींचे आम्ही नेहेमीं मालक असावें. तूं आमच्या शूर मुलांना शूर मुलें होऊं दे, कारण, सत्ताधीश असणारा तूं हवीसह माझें स्तोत्र इच्छीत असतोस.

१६. हे ब्रह्मणस्पते, सर्वांचा नियामक असणारा तूं हें माझें सूक्त लक्षांत घे आणि मला मुलगा दे. ज्याचें देव रक्षण करतात तें सर्व चांगलें होतें. आम्ही चांगल्या मुलाबाळांनीं युक्त होऊन यज्ञांत मोठें स्तोत्र म्हणावें.

सूक्त पंचाविसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता–ब्रह्मणस्पति; छंदः—जगती.

१. ब्रह्मणस्पति ज्याला ज्याला मित्र करतो, तो अग्नीला प्रज्वलित करणारा मनुष्य दुष्ट शत्रूंना जिंकतो, तो स्तोत्रें करणारा व हवि देणारा उत्कर्षाला पावतो, तो मुलापासून झालेल्या नातवाच्या पलीकडे जगतो.

२. ब्रह्मणस्पति ज्याला ज्याला मित्र करतो, तो शूर पुत्रांच्या योगानें दुष्ट शत्रूंना जिंकतो, तो गाईंनीं संपत्तीची वृद्धि करतो, आपणहून ज्ञाता होतो, त्याच्या मुलाचा आणि नातवाचा ब्रह्मणस्पति उत्कर्ष करतो.

३. ब्रह्मणस्पति ज्याला ज्याला आपला मित्र करतो तो कुशल भक्त नद तीराला किंवा पुरुष नपुंसकाला जिंकतो, त्याप्रमाणें शत्रूला शौर्यानें जिंकतो, आणि अग्नीच्या ज्वालेप्रमाणें त्याला मागें सारता येत नाहीं.

४. ब्रह्मणस्पति ज्याला ज्याला आपला मित्र करतो, त्याकरितां द्युलोकांतील पाणी अप्रतिहितपणें वहात येतें, पराक्रमी लोकांसह असणारा तो प्रथम गाई प्राप्त करतो, अबाधित सामर्थ्य असणारा तो पराक्रमानें शत्रूंना ठार करतो.

५. ब्रह्मणस्पति ज्याला ज्याला मित्र करतो, त्यासाठींच सर्व नद्या वहातात, त्यालाच अनेक अक्षय सुखें प्राप्त होतात, तोच भाग्यशाली देवांच्या सौख्यांत उत्कर्ष पावतो.

सूक्त सव्विसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता–ब्रह्मणस्पति; छंदः—जगती.

१. सरळ मनाचा स्तोताच शत्रूंना जिंकू शकतो. आस्तिक (देवेच्छु) मनुष्यच नास्तिकांचा पाडाव करूं शकेल. सुरक्षित मनुष्यच युद्धामध्यें दुस्तर शत्रूंना जिंकू शकेल. यजन करणारा मनुष्यच यजन न करणाऱ्याचें धन उपभोगील.

२. हे वीरा, तूं यजन कर. आणि शत्रूच्या टोळधाडीला तोंड दे. लढाईत मनाला धीर दे. चांगलें भाग्य मिळावें म्हणून ब्रह्मणस्पतीला हवि अर्पण कर. आम्ही त्याच्या कृपेची इच्छा करतों.

३. जो भक्त श्रद्धायुक्त मनानें देवांचा पिता जो ब्रह्मणस्पति त्याला हविरन्न देऊन तोषवितो, तोच लोकांनीं, बांधवांनीं, पराक्रमी पुत्रांनीं, धन आणि बल संपादन करतो.

४. जो घृतयुक्त हवि ह्या ब्रह्मणस्पतीला अर्पण करतो, त्यालाच तो चांगलें फल देतो. पापापासून त्याचें संरक्षण करतो, शत्रूपासून आणि दुःखापासून संरक्षण करतो. त्याच्यासाठीं तो अद्भुत आणि मोठें पराक्रम करतो.

सूक्त सत्ताविसावें.

ऋषिः—गृत्समदपुत्र कूर्म किंवा गृत्समद; देवता—आदित्य; छंदः—त्रिष्टुभ.

१. ह्या घृतानें थबथबलेल्या स्तुति मी नित्य जिव्हेनें राजा आदित्याला अर्पण करीत असतों. मित्र, अर्यमा, भग, बलशाली वरुण, दक्ष आणि अंश हे माझ्या स्तुति ऐकोत.

२. सारखाच पराक्रम करणारे मित्र,अर्यमा आणि वरुण हे माझें स्तोत्र आज स्वीकारोत. शुचिर्भूत,निष्पाप निर्दोष आणि अविनाशी असे आदितीचे पुत्र, तेहि माझें स्तोत्र स्वीकारोत.

३. ते आदित्य विशाल, गंभीर, अहिंस्य, शत्रूंचा नाश करणारे, आणि अनेक डोळ्यांनीं युक्त असे आहेत. ते चांगलें आणि वाईट सर्व नीट पहात असतात. त्या राजा आदित्यांना दूर असलेलें सर्व समीपच होय.

४. देव आदित्य सर्व स्थावरजंगम पदार्थांचे धारण करणारे आहेत. सर्व भुवनांचे जे रक्षणकर्ते, बलसंरक्षक, दूरदर्शी, सत्यवान आणि ऋण फेडणारे असे ते आहेत.

५. हे आदित्यहो,हे अर्यमन,ज्या तुमचा आधार असला म्हणजे भयकारक प्रसंगहि सुखकारक वाटतात, तो तुमचा आधार मला मिळो. हे मित्रावरुणांनो,तुमच्या नेतृत्वानें, खांचखळगे असलेली जागा टाकून द्यावी त्याप्रमाणें मी दुष्कृत्यें टाकून देईन.

६. हे अर्यमा, हे मित्रा, हे वरुण, तुमचा मार्ग सुगम, आणि चांगला आहे. हे आदित्यहो, त्या मार्गानें तुम्हीं आमचे पुरस्कर्ते व्हा. आणि आम्हांस अविनाशी अक्षय सुख द्या.

७. राजे आदित्य जिचे पुत्र आहेत अशी अदिति आणि अर्यमा आम्हांला चांगल्या मार्गांनीं द्वेष्ट्यांच्या पार पाडोत. मित्राचा आणि वरुणाचा आश्रय मोठा आहे. त्यांच्या आश्रयाखालीं आम्ही अहिंस्य आणि बहुपुत्रांनीं संपन्न असें व्हावें.

८. ते तीन भूमि आणि द्युलोक यांचें धारण करतात.यज्ञामध्येंहि ह्यांची तीन कृत्यें आहेत. सत्याच्या योगानें हे आदित्यहो, तुमचा महिमा मोठा आहे. हे अर्यमा, हे मित्रा, हे वरुणा, तो तुमचा महिमा उत्तम आहे.

९. सुवर्णमय, कांतिमान, पवित्र, न निजणारे, अनिमिष, अहिंस्य, आणि सर्वप्रसिद्ध असे आदित्य सरळगामी मानवांसाठीं तीन दिव्य लोक धारण करतात.

१०. हे सामर्थ्यवान वरुणा, देवांचा आणि मानवांचा, सर्वांचा तूं राजा आहेस. आम्हीं शंभर वर्षें पाहूं असें कर. आरंभापासूनच भाग्यपूर्ण आयुष्य आम्हीं उपभोगावें.

११. मला उजवीकडे दिसत नाहीं किंवा डावीकडे दिसत नाहीं, हे आदित्यहो, मला पुढेंहि दिसत नाहीं आणि मागेंहि दिसत नाहीं. हे वसूनो, अज्ञानामुळें भयभीत झालेला मी तुमच्या नेतृत्वाखालीं निर्भय होईन आणि तेजस्वी बनेन.

१२. जो सत्यमार्गाच्या पुरस्कर्त्या आणि राजा आदित्यांना हवि देतो, ज्याला पुष्टिकारक आणि अविनाशी आदित्य मोठा करतात, तोच धनवान, दानशूर आणि यज्ञांत प्रशंसिला जाणारा रथांत बसून जातो.

१३. जो आदित्यांच्या नेतृत्वाखालीं असतो, त्याला कोणीहि जवळून किंवा दुरूनहि ठार करीत नाहीं. तो पवित्र, अहिंस्य, वीर पुत्रपौत्रींनीं युक्त, धनसंपन्न आणि अन्न व उदक यांच्या संनिध असा होऊन राहातो.

१४. हे अदिते, हे मित्रा, आणि हे वरुणा, आम्हीं जो कांहीं तुमचा अपराध केला असेल, त्याची तुम्हीं क्षमा करा. हे इंद्रा, भयरहित आणि विशाल तेज मला प्राप्त व्हावें. मोठमोठ्या रात्री आम्हांप्रत न येवोत.

१५. आदित्यांच्या कृपाछत्राखालीं असलेल्या मानवाचें मनोरथ दोघी द्यावापृथिवी पूर्ण करतात. तो भाग्यशाली स्वर्गीय वृष्टीनें पुष्ट होतो. युद्धामध्यें दोन्हीं द्यावापृथ्वींना तो आपल्या ताब्यांत आणीत जातो. चर व अचर असे सृष्टीचे दोन्हीं भाग त्याचें कल्याण करतात.

१६. हे यजनशील आदित्यहो, तुमच्या ज्या माया आणि जे पाश द्वेष करण्याऱ्या शत्रूंसाठीं पसरलेले असतात, त्यांस घोड्यावरून जावें, त्याप्रमाणें रथानें मी तरून जावें. आणि शत्रुभयरहित होत्साते आम्हीं तुमच्या संरक्षणाखालीं असावें.

१७. हे वरुणा, धनवान व दानशूर आप्ताला माझें दारिद्र्य न समजेल असें कर. हे राजा, सुलभ अशा धनापासून मी दूर न होईल असें कर. चांगल्या वीरांनीं युक्त होत्साते आम्हीं यज्ञांत तुमची मोठी स्तुति गाऊं.

Jendenee

सूक्त अठ्ठाविसावें.

ऋषिः—कूर्म किंवा गृत्समद; देवता—वरुण; छंदः—त्रिष्टुभ.

१. कवि व स्वयंशास्ता, अशा आदित्याचें हें स्तोत्र आहे. तो आपल्या पराक्रमाच्या योगानें सर्व लोकांना जिंकतो. जो भक्ताला अतिशय संतोषकारक होतो, त्या श्रेष्ठ वरुण देवाची मी सत्कीर्ति गातों.

२. हे वरुणा, तेजःसंपन्न उषा उदय पावतांच जसे अग्नि पेटविले जातात, त्याप्रमाणें आम्ही दररोज तुझी प्रार्थना करींत असतों. चांगल्या प्रकारें ध्यान करणारे आणि स्तुति करणारे आम्ही तुझ्या सेवेंत राहून चांगलें भाग्य मिळवावें.

३. हे श्रेष्ठ नायका वरुणा, बहुवीरसंपन्न आणि महाप्रलयांत अशा तुझ्या आश्रयाखालीं आम्ही असावें. हें अहिंस्य देवहो, हे आदितिपुत्रहो, तुम्ही आम्हांला क्षमा करून आमचे मित्र व्हा.

४. धारणकर्त्या आदित्यानें द्यावापृथ्वी निर्माण केली. वरुणाच्या नद्या सत्य मार्गानें जातात. त्या थकत नाहींत किंवा थांबत नाहींत. तर पक्ष्याप्रमाणें वेगानें धांवत असतात.

५. दोरी सोडावी त्याप्रमाणें हे वरुणा, तूं मला पापासून मोकळा कर. आणि तुझें सत्यस्वरूप आम्हांस मिळूं दे. स्तोत्ररूप वस्त्र विणीत असतां मध्येंच तंतुच्छेद होऊं देऊं नको. आणि यज्ञकर्म पुरें होण्यापूर्वीं माझीं इंद्रियें विगलित न होवोत.

६. हे वरुणा, तूं माझी भीति पार घालवून टाक. हे सत्यवंता, हे सम्राटा, माझ्यावर अनुग्रह कर. वासराला दाव्यांतून सोडावें, त्याप्रमाणें मला पापापासून मुक्त कर. कारण, तुझ्याशिवाय येथें कोणाचीहि निमिषमात्र हि सत्ता चालत नाहीं.

७. हे बलशाली वरुणा, पाप करणाऱ्याला जे मारक शस्त्रांनीं तुझ्या आज्ञेवरून ठार करतात, ते आम्हांला ठार न करोत. प्रकाशापासून दूर असलेल्या स्थानीं आम्हीं न जावें. आम्ही जगावें म्हणून तूं आमच्या शत्रूंना दूर कर.

८. हे वरुणा, आम्ही तुला पूर्वीं नमस्कार केला आहे, आतांहि करतों आहोंत आणि पुढेंहि करूं. हे प्रबला, आम्ही तुझी स्तुति करीत आहोंत. हे दुर्दम्य वरुणा, पर्वताप्रमाणें तुझीं व्रतें कधींहि स्थानभ्रष्ट होत नाहींत.

९. तसेंच हे राजा वरुणा, मीं केलेलीं ऋणें नाहींशीं कर. दुसऱ्यानें मिळविलेल्या अन्नाचें मी भक्षण न करावें. अजून उगवल्याच नाहींत अशा ज्या (या पुढें येणाऱ्या) उषा आहेत, त्यांत आम्ही पुष्कळ जगूं असें कर.

१०. हे राजा वरुणा, जो माझा स्नेही किंवा मित्र स्वप्नांत पाहिलेलें भय मला भितऱ्याला घालील, किंवा जो चोर किंवा हिंसक माझी हानि करूं इच्छिल, त्यांच्यापासून तूं आमचें रक्षण कर.

११. हे वरुणा, धनवान, दानशूर आप्ताला माझें दारिद्र्य न समजेल असें कर. हे राजा, सुलभ अशा धनापासून मी दूर न होईन असें कर. चांगल्या वीरांनीं युक्त होत्सातें आम्ही यज्ञांत तुमची मोठी स्तुति गाऊं.

एकोणतिसावें.

ऋषिः—कूर्म किंवा गृत्समद; देवता—विश्वेदेव; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे धृतव्रत आणि वेगवान आदित्यहो, व्यभिचारिणी स्त्री ज्याप्रमाणें गुप्त रीतीनें गर्भ पाडते, त्याप्रमाणें तूं माझें पाप दूर कर. हे वरुणा, हे मित्रा, हे देवहो, प्रार्थना ऐकणाऱ्या तुम्हांला, चांगलें समजणारा मी रक्षणार्थ बोलावीत आहे.

२. हे देवहो, तुम्ही बुद्धिवान आहां, तुम्ही बळ आहां, दुष्ट शत्रूंना तुम्ही नाहींसे करा. शत्रूंना ठार करणारे तुम्ही आम्हांला क्षमा करा. आणि आम्हाला आतां आणि पुढेंहि क्षमा करा.

३. हे वसूंनो, तुमच्या आमच्या जुन्या आणि नव्या आप्तपणानें आम्ही तुमच्यासाठीं काय बरें करावें? हे मित्रावरुणांनो, हे अदिते, हे इंद्रामरुतहो, तुम्ही आमचें कल्याण करा.

४. हे देवहो, तुम्ही आमचे आप्त आहांत. तुमची याचना करणाऱ्या मला तुम्ही सुख द्या. तुमचा रथ आमच्या यज्ञाकडे येताना मदगामी न होवो. तुम्हांसारखे बांधव असल्यावर आम्हांस कांहींच श्रम नाहींत.

५. ज्याप्रमाणें बाप मुलाला उपदेश करतो, त्याप्रमाणें तुम्ही मला उपदेश केला असल्यामुळें तुमच्या अशा मी एकट्यानें मोठें पाप नाहींसें केलें. हे देवहो, पाश दूर जावोत. पापें दूर जावोत. पिलासमक्ष पक्ष्याला धरावें, त्याप्रमाणें तुम्ही मला पकडूं नका.

६. हे यज्ञार्ह देवहो, तुम्ही आमच्याकडे आज संमुख व्हा. भ्यालेल्या मला तुमच्या अंतःकरणांत आसरा मिळो. हिंसकांच्या माऱ्यापासून आमचें संरक्षण करा. हे पूजनीय देवांनो, तुम्ही आमचे त्रास दणाऱ्यापासून संरक्षण करा.

७. हे वरुणा, धनवान व दानशूर, आप्ताला माझें दारिद्र्य न समजेल असें कर. हे राजा, सुलभ अशा धनापासून मी दूर न होईन असें कर. चांगल्या वीरांनीं युक्त होत्साते आम्ही या यज्ञांत तुमची मोठी स्तुति गाऊं.

सूक्त तिसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता-१-५ इंद्र, ६ इंद्रसोम, ७ इंद्र, ८ चा पूर्वार्ध सरस्वती व उत्तरार्थ इंद्र, ९ बृहस्पति, १० इंद्र, ११ मरुत; छन्दः—जगती.

१. उदक वृष्टि करणाऱ्या, तेजस्वी, सविता, अहीला मारणाऱ्या, अशा इंद्रासाठीं नद्या थांबत नाहींत. दररोज पाण्याचा प्रवाह चालू असतो. त्या प्रथम केव्हां निर्माण झाल्या बरें ?

२. ज्यानें वृत्राकरतां येथें धन आणिलें, त्याचें नांव (व कृत्य) आईनें आपल्या जाणत्या मुलाला सांगितलें. त्याच्या इच्छेनुरूप मार्ग करीत जाणाऱ्या नद्या दररोज इष्ट स्थळीं (समुद्राकडे) जात असतात.

३. नंतर इंद्र अंतरिक्षांत उभा राहिला आणि त्यानें वृत्रावर प्राणघातक शस्त्र टाकलें. नंतर मेघाचें आच्छादन घेऊन इंद्र त्याच्यावर चालून गेला. आणि अत्यंत तीक्ष्ण आयुधानें इंद्रानें शत्रूला जिंकिलें.

४. हे बृहस्पते, हिंस्र द्वारपालांची योजना करणाऱ्या असुराच्या वीरांना तीक्ष्ण वज्रानें तूं ठार कर. हे इंद्रा, तूं पूर्वीं धैर्यानें जसें शत्रूंना ठार केलेंस तसेंच तूं आतांहि कर.

५. तुला हर्ष झाला म्हणजे तूं ज्या वज्रानें शत्रूवर प्रहार करतोस, तेंच आकाशाचें वज्र तूं उंचावरून खालीं फेक. हे इंद्रा, तूं आम्हांला पुष्कळ मुलेंबाळें आणि गोधन दे.

६. हे इंद्र आणि सोमहो, जो यज्ञ तुम्हांला आवडतो, त्याचा तुम्ही उत्कर्ष करतां. हविर्युक्त यजमानाला तुम्ही प्रेरणा देता. तुम्ही ह्या भयंकर प्रसंगांत पडलेल्या आमचें संरक्षण करा. आणि आम्हांला निर्भय करा.

७. जो आमचे मनोरथ पूर्ण करतो, जो आम्हांला देतो, जो आमचें ऐकून घेतो, आम्ही सोमरस काढला असतां जो गाई घेऊन येतो, त्या इंद्राच्या सेवेचा मला कंटाळा न येवो. श्रम न वाटोत. त्रास न वाटो. किंवा सोमरस काढूं नका असें आमच्या तोंडावाटें न निघो.

८. हे सरस्वती, तूं आमचें रक्षण कर. धैर्यशाली आणि मरुतांसहवर्तमान अशी तूं शत्रूंना जिंकतेस. आणि तो बलवान आणि शूर असा शंडिकांचा मल्ल, त्यास इंद्र ठार करतां झाला.

९. जो आमचा गुप्त शत्रू असेल अथवा जो आम्हांस मारण्यास उद्युक्त झाला असेल, त्याला तूं लक्षांत घेऊन तीक्ष्ण शस्त्रानें ठार मार. हे बृहस्पते, तूं शत्रूंना आयुधांनीं जिंक. हे राजा, शत्रूंवर प्राणघातक शस्त्र टाक.

१०. हे शूरा, आमच्या रगदार शूरांच्या साह्यानें तुला जे पराक्रम करावयाचे असतील ते तूं कर. आमचे शत्रू पुष्कळ दिवस गर्विष्ठ झाले आहेत. तर त्यांना तूं मार आणि आम्हांला त्यांची संपत्ति आणून दे.

११. (हे मरुतांनो) तुमचा जो मरुद्गण आहे, त्याला सुखेच्छु असा मी स्तुतीनें स्तवितों. त्या दैवी लोकांना मी नमस्कारपूर्वक स्तवितों. अशाकरतां कीं अनेक वीरांनीं युक्त, मुलाबाळांनीं युक्त, प्रसिद्ध अशी संपत्ति दररोज आम्हांला मिळावी.

सूक्त एकतिसावें.

ऋषिः—गृत्समद; देवताः-विश्वेदेव; छंदः-१-६ जगती, ७ त्रिष्टुभ.

१. मित्रावरुणहो, आदित्य, रुद्र आणि वसु यांच्यासहवर्तमान तुम्ही आमच्या रथाचें संरक्षण करा. कारण अन्नेच्छु, आणि आनंदी, वृक्षांवर राहणारे पक्षी आपल्या घरट्यांतून जसे उडतात, तसे आमचे घोडे उडत आहेत.

२. हे प्रेमळ देवहो, जेव्हां टापांनीं धूळ उडवीत पळत जाणारे घोडे पृथ्वीच्या उच्चभागीं पायांनीं थयथय नाचतात, तेव्हां आमचा अन्नानें भरलेला रथ तुम्ही लोकवस्तींत सुरक्षित आणा.

३. त्याचप्रमाणें सर्वज्ञ आणि महापराक्रमी, द्यूच्या मरुद्गणांच्या सामर्थ्यानें युक्त असा इंद्र, आम्हांला मोठें

धन आणि संपत्ति प्राप्त व्हावी म्हणून आमच्या रथांत द्युलोकावरून येऊन संरक्षक साहाय्यानें अधिष्ठित होवो.

४. त्याचप्रमाणें हा जगताचा प्रभु, तेजस्वी, असा त्वष्टा देवपत्न्यांसहवर्तमान रथ हाकारो. इळा, भग, अत्यंत देदीप्यमान द्यावापृथिवी, मेधावी पूषा, आणि अधिपति अश्वी हे रथ हाकारोत.

५. त्याचप्रमाणें त्या सौभाग्यवती, जोडीनें दृष्टीस पडणाऱ्या, जगताला प्रेरणा करणाऱ्या अशा उषा आणि रात्र त्या आमचा रथ हाकारोत. हे द्यावापृथिवीहो, ज्याअर्थी आम्ही तुमच्या संतोषासाठीं नवें स्तोत्र तयार केलें आहे, आणि त्रिविध हवि अर्पण केला आहे, (त्याअर्थी तुम्ही आमचा रथ हाकारा.)

६. त्याचप्रमाणें तुम्ही स्तुतिप्रिय असल्यामुळें आम्ही तुमचें स्तोत्र करतों. अहिर्बुध्न्य, अज एकपाद, त्रित, ऋभुक्षा, सविता आणि शीघ्रगामी अपांनपात हे या यज्ञांत आम्हांला स्तुतीच्या योगानें अन्न देवोत.

७. हे पूजनीयहो, तुम्हांला उद्देशून तयार केलेलें स्तोत्र मला आवडतें. स्तुत्य अशा तुम्हाकरतां लोकांनीं स्तोत्र तयार केलें आहे. धनाची आणि हविरन्नाची इच्छा करणारे तुम्ही रथास जोडलेल्या घोड्याप्रमाणें येऊन आमच्या प्रार्थनेचा स्वीकार करा.

सूक्त बत्तिसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता-१ द्यावापृथिवी, २-३ इंद्र किंवा त्वष्टा, ४-५ राका, ६-७ सिनीवाली, ८ गुंगू, सिनीवाली, राका, सरस्वती, इंद्राणी व वरुणानी; छन्दः—१-५ जगती, ६-८ अनुष्टुभ.

१. हे द्यावापृथिवीहो, सत्यधर्मानें वागणारा तुमचा उपासक जो मी त्या माझे हे शब्द (प्रार्थना) तुम्ही रक्षण करा. ज्याचें बल अधिक श्रेष्ठ प्रकारचें आहे, त्यांच्यापुढें ही धनेच्छु अशा माझी प्रार्थना आहे. तुम्हांला मी मोठें मानतों.

२. शत्रुभूत मनुष्यांचीं गुप्त कारस्थानें आम्हांला न मारोत. किंवा त्रास न देवोत. तसल्या दुष्टांच्या तावडींत आम्हांस देऊं नका. आमची तुमच्याशीं असलेली मैत्री तोडून टाकूं नका. सुखाच्या इच्छेनें आम्ही तुमच्या सख्याची इच्छा करतों हें ध्यानांत असूं द्या.

३. संतुष्ट मनानें तूं आम्हांला सुखकारक, लठ्ठ, सतत धार देणारी अशी दुभती गाय घेऊन ये. हे बहुस्तुता, जलद जाणाऱ्या पायांनीं चलाख वेगशाली अशा तुला शब्दांनीं मी दररोज बोलावणें धाडतों.

४. चांगल्या प्रकारें बोलविण्याजोगी जी राका तिला मी बोलावतों. सुस्तुत आणि सौभाग्यशाली अशी ती आमची प्रार्थना ऐको आणि मनानें जाणो. न मोडणाऱ्या सुईनें आमची स्तुति ती शिवो, आणि शेंकडो संपत्ति मिळविणारा आणि प्रशंसनीय पुत्र ती आम्हांला देवो.

५. हे सौभाग्यशाली राके, तुझ्या ज्या चांगल्या मोहक देणग्या आहेत, ज्यांनीं तूं भक्तांना धन देतेस, त्या देणग्यांसह प्रसन्न होत्साती आणि हजारो प्रकारें वाढ करणारी तूं आज आमच्याकडे ये.

६. हे देवी सिनीवाली, हे बहुस्तुते, जी तूं देवांची बहीण आहेस, ती तूं आम्ही तुला अर्पण केलेला हवि भक्षण कर. आणि आम्हांला चांगली संतति दे.

७. चांगले बाहू असलेली, चांगल्या अंगुली असलेली, चांगल्या प्रकारें (विनाकष्ट) प्रसूत होणारी, पुष्कळ मुलें प्रसवणारी, अशी सकल विश्वाची अधिपत्नी सिनीवाली तिला हवि अर्पण करा.

८. ती गुंगू, ती सिनीवाली, ती राका, ती सरस्वती, इंद्राणी आणि वरुणानी, या सर्वांना रक्षणार्थ आणि कल्याणाकरतां मी बोलावतों.

सूक्त तेहेतिसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता-रुद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे मरुतांच्या पित्या रुद्रा, तुझें सुख आम्हांकडे येवो. आम्हांला सूर्याच्या दृष्टिपथांतून दूर करूं नका. आमचा वीर शत्रूंवर मात करो. आम्हांला चांगल्या प्रकारचीं मुलेंबाळें होऊन आमची वाढ होवो.

२. हे रुद्रा, त्वां दिलेल्या सुखकारक औषधांच्या योगानें आम्ही शंभर हिवाळे सुखानें काढूं. आमच्यापासून द्वेष नाहींसे कर. पाप अगदीं नाहींसें कर. रोग नाहींसे कर, आणि सांथीचे रोग नाहींसे कर.

३. हे वज्रबाहो रुद्रा, तूं आपल्या यशाच्या योगानें सर्व प्राणिमात्रांत श्रेष्ठ आहेस. तूं बळवानांतला बळवान आहेस. तूं आम्हांस सुखरूपपणें पापाच्या पार ने. आणि सर्व प्रकारच्या रोगांना नाहींसे कर.

४. हे रुद्रा, आम्ही तुला नमस्कार करतों. तुजसंबंधीं चूक आम्ही न करावी. तुझी स्तुति टाकाऊ

झाली असली किंवा तुला दुसऱ्यांबरोबर (गौणपणा देऊन) बोलाविलें असलें, तरी तूं रागावूं नकोस. उलट आम्हांला वीर दे. औषधें दे. कारण तूं धन्वंतरी वैद्यांतला वैद्य आहेस असें मी ऐकतों.

५. ज्या रुद्राला आव्हानांनीं आणि हविर्दानांनीं आळवितात, त्या रुद्राला स्तोत्रांनीं शांत करूं या. कोमल मनाचा, बोलाविण्यास सुलभ, सुरूप, असा तो आम्हांला क्रोधाच्या स्वाधीन न करो.

६. मरुद्युक्त, बलशाली रुद्र आपल्या तेजस्वी अन्नानें याचना करणाऱ्या मला संतुष्ट करता झाला. उन्हानें तापलेला मनुष्य ज्याप्रमाणें सावलीचा आश्रय करतों, त्याप्रमाणें निष्पाप होत्साता मी रुद्राच्या सुखाचा उपभोग घेवो.

७. हे रुद्रा, तुझा तो सुखकारक हात कोठें आहे कीं, जो बरें करतो आणि सुख देतो ? दैवी पीडा नाहींशीं करणारा तूं हे प्रबला, मला क्षमा कर.

८. पीत वर्णाचा, शुचिर्भूत, बलशाली अशा रुद्राची मी मोठी स्तुति करतों. देदीप्यमान अशा त्या रुद्राला नमस्कारपूर्वक पुजा. त्याच्या तेजस्वी पराक्रमाची आम्ही वाखाणणी करतों.

९. बहुरूप, पीतवर्ण, उग्र, असा रुद्र दृढ, तेजस्वी आणि कांतिमान अंगांनीं शोभतो. ह्या मोठ्या भुवनांचा शास्ता जो रुद्र त्यांच्यापासून बळ नाहींसें न होवो.

१०. हे रुद्रा, तूं धनुष्यबाण धारण करतोस हें योग्यच आहे. पूजनीय आणि नानाविध रंगाचे हार तूं धारण करतोस तें तुला शोभतेंहि. हे विस्तीर्ण विश्व धारण करतोस त्याला तूं योग्य आहेस. हे रुद्रा, तुझ्यापेक्षां बलवान कोण आहे ? (कोणी नाहीं.)

११. कीर्तिमान, रथारूढ, तरुण, सिंहाप्रमाणें भयंकर, शत्रूंना ठार करणारा, उग्र अशा रुद्राची स्तुति करा. हे रुद्रा, स्तविलेला तूं स्तोत्याला सुख दे, तुझ्या सेना आम्हांहून दुसऱ्यांना ठार करोत.

१२. मुलगा ज्याप्रमाणें जवळ जाणाऱ्या आणि कुरवाळणाऱ्या बापाला नमस्कार करतो, त्याप्रमाणें हे रुद्रा आम्ही तुला नमन केलें आहे. विपुल संपत्ति देणाऱ्या सत्पति अशा तुला मी स्तवीत आहें. स्तविलेला तूं आम्हांला औषधें दे.

१३. हे बलशाली मरुतांनो, जीं तुमचीं शुद्ध औषधें आहेत, जीं गुण देणारीं आणि सुख देणारीं आहेत, जीं आमचा पिता मनु यानें पसंत केलीं, तीं रुद्राचीं सुखकर आणि गुणकर औषधें मी याचितों.

१४. रुद्राची प्राणघातक आयुधें आम्हांला सोडून देवोत. क्रुद्ध अशा त्याची महा कठोर बुद्धि दुसरीकडे जावो. हे उदारा, तूं हविर्दात्या उपासकासाठीं धनुष्य सैल सोड. आणि आमच्या मुळाबाळांना सुख दे.

१५. हे पीतवर्ण, बलशाली आणि ज्ञात्या रुद्रदेवा, तूं रागावूं नकोस आणि आम्हांला मारूं नकोस. हे रुद्रा, हाक ऐकणारा तूं येऊन आमची हाक ऐक. चांगल्या धीरशाली पुत्रांनीं युक्त होत्साते आम्ही यज्ञांत तुझी मोठी कीर्ति गाऊं.

सूक्त चौतिसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता–मरुत; छंदः––१–१४जगती, १५. त्रिष्टुभ.

१. वृष्टिधारेनें आच्छादणारे, शत्रूंना पराभूत करणाऱ्या बळानें युक्त, सिंहासारखे भयंकर, अत्यंत तेजस्वी, अग्नीप्रमाणें जळजळीत, सोमपान करणारे, अशा मरुतांनीं वादळ नाहींसें करून गाई मोकळ्या केल्या.

२. हे छातीवर अलंकार घातलेल्या मरुतांनो, जेव्हां वीर्यवान् रुद्रानें तुम्हाला पृथ्वीच्या निर्मल पोटीं उत्पन्न केलें, तेव्हां नक्षत्रांनीं आकाश शोभावें तसें तुम्ही कड्यांनीं शोभलात. पाऊस पाडणारे मरुत विजेप्रमाणें जगाला प्रकाशित करते झाले.

३. मरुत शर्यतींतील घोड्याप्रमाणें लोकांना स्नान घालतात, खिंकाळणाऱ्या घोड्यांनीं ते धांवतात. हे सुवर्णमुगुट धारण केलेल्या एकविचारी मरुतांनो, सर्वांला हदरून सोडणारे तुम्ही ठिपके असलेल्या हरिणींनीं हवीकडे जा.

४. उदार, ठिपकेदार अश्व असलेले, अक्षय संपत्ति, सरळ धांवणाऱ्या घोड्याप्रमाणें धांवणारांत अग्रभागी असणारें असे मरुत हविर्दात्यासाठीं ह्या सर्व जगाचा मित्राकरतां करावें त्याप्रमाणें नेहमीं उत्कर्ष करतात.

५. हे तेजस्वी भाले घेतलेले व सारखे दिसणाऱ्या मरुतांनो, तुम्ही प्रकाशयुक्त, आनंददायक, विपुल उदक असलेले, आणि सुरक्षित मार्गांनीं हंस घरट्यांत जातात त्याप्रमाणें तुम्ही सोम पिण्याकरतां या.

६. हे एक विचाराच्या मरुतांनो, तुम्ही आमचीं स्तोत्रें ऐकण्याकरतां या. घोड्याप्रमाणें गाईची कास पुष्ट करा. स्तोत्याचें कर्म अन्नसमृद्ध करा.

७. हे मरुतांनो, आम्हाला बलवान, तुम्ही आला असतां प्रत्यहीं स्तोत्र करणारा प्रख्यात पुत्र

द्या. स्तोत्यांना अन्न द्या. युद्धांत स्तोत्याला बुद्धि, धन आणि आजिंक्य आणि अविनाशी सामर्थ्य द्या.

८. उरःस्थलावर सुवर्णालंकार घातलेले उदार मरुत जेव्हां आपल्या सुंदर रथाला घोडे जोडतात तेव्हां हवि देणाऱ्या भक्ताला घरीं गाय वासराला पान्हा सोडते त्याप्रमाणें विपुल अन्न देतात.

९. हे उदार मरुतांनो, जो मनुष्य आमचा अपहार करणारा होऊन शत्रू होतो, त्या दुष्टांपासून आमचें रक्षण करा. त्याला तुमच्या त्रस्त करणाऱ्या भाल्यांनीं परत फिरवा. हे रुद्रपुत्रांनो, त्या निंदकाचें आयुध मोडून खालीं पाडा.

१०. हे मरुतांनो, जेव्हां बांधव असणारे तुम्ही पृश्नीच्या कासेचे दोहन करतां, हे रुद्रपुत्रांनो, जेव्हां स्तोत्याच्या निंदकाकडे जातां आणि हे अविनाशिहो, त्रिताच्या शत्रूंचा नाश करण्याकरतां जेव्हां जातां तेव्हां तुमचें आश्चर्यकारक जाणें सर्व जाणतात.

११. हे मरुतांनो, जलद जाणाऱ्या थोर अशा तुम्हाला व्यापक व उत्कृष्ट सोम पिण्याकरतां आम्ही बोलावतों. सुवर्णवर्णाच्या श्रेष्ठ अशा तुम्हाला आम्ही स्तोत्रें म्हणून आणि हवि देऊन उत्कृष्ट धन मागतों.

१२. ते प्रथम दशग्व (मरुत) यज्ञ करते झाले. ते उषःकालीं आम्हांला प्रेरणा करोत. उषा अरुणकान्तीनें रात्रीला नष्ट करते त्याप्रमाणें महान, तेजस्वी, किरणसंपन्न, प्रकाशानें (सूर्यानें) अंधार नाहींसा होतो.

१३. रुद्रपुत्र मरुत वाद्यांनीं आणि झकझकीत अलंकारानीं अन्तरिक्षांत वाढतात. सततगामी बलानें पर्जन्यवर्षाव करणारे मरुत अत्यंत आल्हादक आणि सुरूप कान्ति धारण करतात.

१४. ज्या पांच मुख्य भाले घेतलेल्या होत्यांना त्रित इष्टसिद्धीकरतां आणि साहाय्याकरतां आपणाकडे वळविता झाला, त्यांची रक्षणाकरतां याचना करणारे आम्ही हें स्तोत्र म्हणून स्तुति करीत आहोंत.

१५. हे मरुतांनो, जिच्या योगें भक्ताला पार पाडता, जिच्या योगें स्तोत्यांला निंदेंतून सोडावतां, ती तुमची मदत आमच्याकडे वळो. हंबरणारी गाय वासराकडे जाते त्याप्रमाणें तुमची कृपा आमच्याकडे वळो.

सूक्त पास्तिसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता—अपांनपात; छंदः—त्रिष्टुभ.

१. अन्नाची इच्छा करणारा ही स्तुति करीत आहे. तर नदीसंबंधीं तो मज स्तोत्यास विपुल अन्न देवो. चलाख अपांनपात आम्हाला सुरूप करो. कारण, त्याला आमचें स्तोत्र आवडत असतें.

२. हा अन्तःकरणापासून चांगला तयार केलेला मंत्र आम्ही चांगला म्हणूं. त्याला तो अनेक वेळा ध्यानांत घेवो. श्रेष्ठ अपांनपात बलसामर्थ्यानें सर्व जग उत्पन्न करता झाला.

३. कांहीं नद्या एकत्र होतात आणि कांहीं वेगळ्या वहातात. (पण) नद्या एकत्र समुद्राला मिळतात. त्याच निर्मल आणि तेजस्वी अपांनपातला स्वच्छ नद्या उदकानें वेष्टितात.

४. नटून सजून तरुणी गर्व न करतां तरुणाकडे जातात त्याप्रमाणें उदक त्या अपांनपातला वेष्टितें. तो इंधनरहित तेजस्वी अग्नि संपन्न होत्साता स्वच्छ तेजानें प्रकाशतो.

५. दुःख न देणाऱ्या ह्या अपांनपात देवाला तीन नेत्या देवी (इळा, भारती, सरस्वती) अन्न धारण करतात. त्या पाण्यांतल्याप्रमाणें पुढें सरसावतात. तो पूर्वीं उत्पन्न झालेल्या उदकांचें सार (सोम) पितो.

६. जेथें अश्वाचा जन्म होतो, ज्याच्यापासून सर्व जग उत्पन्न होतें, हे अपांनपात, तो तूं द्रोही दुष्ट शत्रूंपासून स्तोत्यांचें संरक्षण कर. मेघमंडळाच्या पलीकडे न आढळणाऱ्या देवाला शत्रु प्राप्त करीत नाहींत. आणि कपटी लोकहि प्राप्त करीत नाहींत.

७. ज्याच्या स्वतःच्या घरीं चांगली धार देणारी गाय आहे, जो उदक विपुल करतो, जो चांगलें तयार झालेलें अन्न खातो, तो बलवान अपांनपात उपासकाला संपत्ति देण्यासाठीं अन्तरिक्षांत प्रकाशतो.

८. सत्यस्वरूप अपांनपात विस्तीर्ण अन्तरिक्षांत दैवी तेजानें सतत प्रकाशत असतो. सर्व भुवनें ह्याच्या शाखाच होत. ओषधी फलपुष्पांनीं (ह्याच्यामुळेंच) वाढतात.

९. वक्र (वहाणाऱ्या) उदकामध्यें उभा असणारा आणि वीज पांघरलेला अपांनपात अन्तरिक्षांत उभा असतो. त्याचा श्रेष्ठ महिमा वाहणाऱ्या सुवर्णकान्ति नद्या व्यापून टाकतात.

१०. तो अपांनपात सुवर्णशरीर आणि सुवर्णेन्द्रिय आहे. तोच हिरण्यवर्ण होय. तो सोन्यासारख्या आकाशाच्या वर शोभतो. अशा अपांनपातला सुवर्णदान करणारे लोक हविरन्न अर्पण करतात.

११. ज्या सुवर्णकान्ति अपांनपातला (उदक देवतारूपी) तरुणी प्रज्वलित करतात ह्या अपांनपातचें तें प्रज्वलित शरीर सुंदर आहे आणि नांव चांगलें आहे. तो गूढ असा वृद्धिंगत होतो. ह्याचें अन्न उदक होय.

१२. अनेकांमध्यें जवळचा असणाऱ्या मित्रभूत देवाची आम्ही हवींनीं, यज्ञांनीं आणि नमस्कार करून सेवा करावी. मी उच्चस्थलीं त्याला भूषित करतों, मी लांकडांनीं त्याला धारण करतों, मी त्याला अन्नांनीं धारण करतों आणि मंत्र म्हणून वंदन करतों.

१३. बलवान असणारा तोच त्या उदकांत आपणाला उत्पन्न करतो, तो (अग्निरूपी) त्यांचें थान पितो, त्या त्याला चाटतात. तो अक्षीण कान्ति अपांनपात येथें (पृथ्वी) जणूं काय दुसऱ्याच्या (अग्निच्या) शरीराशीं एकरूप होतो.

१४. ह्या उच्चस्थानीं राहणाऱ्या, अविनाशी तेजांनीं सदोदित प्रकाशणाऱ्या अपांनपातकरतां उदकरूप अन्न वाहून आणीत विपुल उदक आपणहून आपल्या रूपांनीं एकरूप होतें.

१५. हे अग्ने, आमच्या लोकांकरतां सुस्थित असणाऱ्या तुझ्याकडे मी आलों आहें. समृद्ध भक्तासाठीं मी तुला चांगलें स्तोत्र अर्पण केलें आहे. देव ज्याचें रक्षण करतात ते सर्व कल्याणप्रदच होय. आम्ही चांगल्या मुलाबाळांनीं युक्त होऊन यज्ञांत मोठें स्तोत्र म्हणावें.

सूक्त छत्तिसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता–इंद्र व मधु, २ मरुत् व माधव, ३ त्वष्टा व शुक्र, ४ अग्नि व शुचि, ५ इंद्र व नभस, ६ मित्रावरुण व नभस्य; छंदः–जगती.

१.* हे इंद्रा, तुझ्याकरतां तयार होणारा सोम गोरसांत आणि पाण्यांत मिसळला जातो. भक्तलोक त्याला दगडांनीं (कुटून) गाळण्यांनीं गाळतात. हे इंद्रा, जो तूं सर्वसत्ताधीश आहेस तो तूं प्रथम स्वाहा म्हणून अर्पण केलेला आणि वषट् म्हणून दिलेला सोम होत्याच्या पात्रांतून पी.

२. यज्ञांनीं युक्त, ठिपक्याच्या हरिणी जोडलेल्या रथांत बसलेले, आयुधांनीं शोभणारे आणि आभरणप्रिय असे हे भरतपुत्र व स्वर्गनेत्या मरुतांनो, तुम्ही यज्ञांत बसून पोत्याच्या पात्रांतून सोम प्या.

३. हे सुखानें बोलावल्या जाणाऱ्या देवांनो, तुम्ही आम्हाकडे मिळूनच या. यज्ञांत बसा आणि प्रसन्न व्हा. नंतर हे त्वष्ट्या, तूं देव आणि देवपत्न्या यांचे चांगले गण बरोबर असलेला (सोमरूपी) अन्न सेवन करून तृप्त हो.

४. हे ज्ञात्या अग्ने, तूं देवांना येथें घेऊन ये. आणि पूज. हे होत्या तूं प्रेमानें तीन ठिकाणीं बैस. पुढें ठेवलेल्या मधुर सोमरसाची इच्छा कर आणि आग्नीध्र पात्रांतून सोम पी. तुझा भाग पिऊन तृप्त हो.

५. हे इंद्रा, पुरातन कालीं तुझ्या दोन्ही हातांत ज्यानें बल व तेज उत्पन्न केलें, तो हा तुझ्या शरीरांत बल वाढवणारा सोम तुझ्याकरतां पिळला आहे आणि तुझ्या पुढें ठेवला आहे. तूं ह्या ब्रह्माच्या पात्रांतून सोम पी.

६. हे मित्रावरुणांनो, माझा यज्ञ स्वीकारा. माझा धांवा ध्यानांत घ्या. आमचा बसलेला होता पुरातन निवित्स्तोत्रें म्हणत आहे. भक्तांनीं वेष्टिलेला सोम शोभायमान असणाऱ्या तुम्हाकडे येत आहे. तूं प्रशास्त्याच्या पात्रांतून मधुर सोमरस पी.

---

* टीपः—प्रत्येक ऋचेच्या दोन देवता आहेत, त्यांपैकीं पहिलें नांव देवतेचें असून दुसरें ऋतूचें आहे. सहा ऋतूंच्या सहा ऋचा आहेत. तसेंच शेवटीं खालील क्रमानें सहा ऋत्विजांचा व त्यांच्या पात्रांचा उल्लेख आहे. सायणाचार्यांनें पात्र असा अर्थ केला नाहीं. पात्र असा अर्थ श्री. पंडितांनीं केला आहे. त्याला आधार (२–३७–४) हा मंत्र त्यानीं दिला आहे. तो बरोबर वाटतो. सध्या यज्ञांत प्रत्येक सोम पिणाऱ्या ऋत्विजाचें पात्र वेगळें असते त्याला अनुसरून हा उल्लेख आहे.मात्र त्यांचीं नांवे भिन्न आहेत. तरीहि अशा प्रकारें पात्रांचा निर्देश करणें अयोग्य नाहीं.

ऋत्विजांचा क्रम असा धरला आहे—१ होता, २ पोता, ३ अग्नीध, ४ ब्रह्मा किंवा ब्राह्मणाच्छंसी, ५ प्रशास्ता. तिसऱ्या ऋचेंत कोणाचाच उल्लेख नाहीं, याच्या क्रमासंबंधें मोठ्या प्रस्तावनेंत विचार केला आहे. ऋतूंशीं कांहींच संबंध दिसत नाहीं.

सूक्त सदतिसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता–१–४ द्रविणोदस, ५ अश्वी, ६ अग्नि; छंदः—जगती.

१. हे द्रविणोदसा, तूं आपल्या इच्छेप्रमाणें होत्याच्या पात्रातून सोम पी. हे अध्वर्यूहो, तो संपूर्ण आहुतीची इच्छा करतो. त्याला हा सोम अर्पण करा. त्याची इच्छा करणारा तो उदार आहे. होत्याच्या पात्रांतून ऋतुदेवतांसह तूं सोम पी.

२. हे द्रविणोदसा, ज्याला मी पूर्वीं बोलावीत होतों त्यालाच मी आतां बोलावीत आहें. जो सर्वश्रेष्ठ आहे तोच धांवा करण्यासारखा उदार आहे. तूं अध्वर्यूंनीं तयार करून ठेवलेला मधुर सोमरस ऋतुदेवतांसह पी.

३. हे द्रविणोदसा, तूं ज्या घोड्यांनीं जातोस ते तृप्त होवोत. हे वनस्पते (रथा), तूं न मोडतां बळकट रहा. हे धैर्यवन्ता, तूं येऊन उत्सुकतेनें ऋतुदेवतेसह नेष्ट्याच्या पात्रांतून सोम पी.

४. द्रविणोदा होत्याच्या पात्रांतून सोम प्याला, पोत्याच्या पात्रांतून पिऊन प्रसन्न झाला आणि दिलेला हवि नेष्ट्याच्या पात्रांतून सेवन करतां झाला. तो द्रविणोदा ऋत्विजांचें अहिंस्य आणि अमर असें चवथें पात्र पितो.

५. हे आश्विहो, आज वेगवान आणि वीरवाहक रथ आम्हाकडे येण्याकरतां जोडा आणि तुम्ही आमच्या येथें सोडा. हवि मधानें युक्त करा. या आणि हे समृद्धिघन हो, सोम प्या.

६. हे अग्ने, तूं समिध सेवन कर. आहुति भक्षण कर. लोकहितकारक गाणें ऐक. स्तुति स्वीकार. हे उदार अग्ने, सर्व थोर देवांची इच्छा करणारा तूं ऋतुदेवतासह सर्व देवांना सोम पाज.

सूक्त अडतिसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता–सवितृ; छंदः—त्रिष्टुभ.

१. लोकांना प्रेरणा देणें हेंच काम असलेला जगन्नायक सवितृदेव लोकांना प्रेरणा देण्याकरतां प्रत्यहीं उगवत आहे. तो स्तोत्यांना धन देत असतो. आणि यज्ञ करणाराचें कल्याण करतो.

२. लांब हाताचा सविता जगाच्या कल्याणाकरतां हात पसरतो. याच्या प्रेरणेनें पाणी शुद्ध वहातें आणि हा वायूहि अन्तरिक्षांत खेळतो.

३. सविता जात असतां जेव्हां तेजोविहीन होतो तेव्हां वाटसरू जाणें थांबवितो. शत्रूवर चालून जाणाऱ्याचा आवेश तो थांबवतो. सवित्याच्या कृत्याला अनुसरून रात्र येते.

४. पडदा पसरणारी रात्र पुनः पडदा टाकते. शहाणाहि मनुष्य शक्य असूनाहि कर्म मध्यें थांबवितो. तो (निद्रा) टाकून उदयाला येतो. ऋतूंचा आधार होतो. न थांबतां चालणारा सवितृदेव येत आहे.

५. अग्नीचें विपुल तेज अनेक घरावर आणि घरांतल्या अनेक अन्नावर सत्ता चालवतें. माता (उषा) सवित्यानें दिलेला श्रेष्ठ भाग मुलाकरतां धारण करते.

६. दूर गेलेला विजयेच्छु वीर परत येतो. बाहेर फिरणाऱ्या सर्वांचें मन घराकडे लागते. काम करणारा अर्धे काम टाकून घरीं येतो हें सर्व अन्तारिक्षांत असणाऱ्या सवित्याला अनुसरून होतें.

७. हे सवितृदेवा, तूं अन्तरिक्षांत जें उदक ठेवलें आहेस, तें निर्जल प्रदेशांतील मृग प्राप्त करतात. पक्ष्यांना अरण्यें दिली आहेत. सवितृदेवांचीं हीं कृत्यें कोणीहि जाणूं शकत नाहींत.

८. वरुण प्रवाश्यांना इष्ट, प्रापणीय आणि सुखकर असें स्थान सूर्यास्तानंतर देतो. सर्व पक्षी आणि पशू आपल्या स्थानीं जातात. सविता जागोजाग प्राण्यांना वेगळें करतो.

९. ज्या सवित्याच्या कृत्याला इंद्र, वरुण, मित्र, अर्यमा आणि रुद्र नष्ट करीत नाहींत आणि शत्रुहि नष्ट करीत नाहींत, त्या ह्या सवितृदेवाला मी नमस्कार करून कल्याणासाठीं बोलावतों.

१०. पूज्य, ध्यानयोग्य, सर्वाधार, सवित्याला बलिष्ठ करणाऱ्या आमचें लोकांना प्रशंसनीय असणारा देव रक्षण करो. संपत्ति आणि पशु प्राप्त व्हावेत म्हणून आम्ही सवितृदेवाचे आवडतें व्हावें.

११. हे सवित्या, आम्हांला तूं दिलेलें कमनीय धन द्युलोक, अन्तरिक्ष आणि पृथ्वीपासून येवो. स्तोत्यांना आणि त्याच्या बांधवाला जें सुखकारक धन आहे तें पुष्कळ स्तुति करणाऱ्या मला दे.

---

६ टीपः—सूर्य अस्ताला गेल्यावर काय होतें त्याचें वर्णन आहे.

सूक्त एकूणचाळिसावें.

ऋषिः--गृत्समद; देवता-अश्वी; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे अश्विहो, तुम्ही दोन दगडाप्रमाणें एकच स्थानीं जाता. दोन गिधाडे झाडाकडे जातात त्याप्रमाणें तुम्ही हविर्युक्त भक्ताकडे जाता. यज्ञांत स्तोत्र करणाऱ्या दोन ब्राह्मणाप्रमाणें किंवा लोकांतल्या दोन दूताप्रमाणें तुम्ही अनेकांनीं बोलावण्यास योग्य आहांत.

२. हे अश्विहो, प्रातःकालीं गमन करणारे, रथांत बसलेल्याप्रमाणें वीर, बकऱ्याप्रमाणें जुळें, स्त्रियाप्रमाणें शरीरानें सुंदर आणि नवराबायकोप्रमाणें जगांत कार्यज्ञ असणारे तुम्ही या.

३. हे अश्विहो, दोन शिंगाप्रमाणें प्रथम आमच्याकडे या. खुराप्रमाणें वेगानें धांवत आमच्याकडे या. हे समर्थ अश्विहो, तुम्ही दोन चक्रवाकासारखे आणि दोन रथांत बसलेल्या वीराप्रमाणें आमच्याकडे प्रत्यहीं या.

४. हे अश्विहो, तुम्ही दोन नौकेप्रमाणें आम्हांला पार न्या. तुम्ही दोन जोखडाप्रमाणें, दोन आखाप्रमाणें, दोन तुंब्याप्रमाणें आणि दोन चाकाच्या धांवेजवळच्या फळीप्रमाणें आम्हांला पार न्या. दोन कुत्रे शरीराचें रक्षण करतात त्याप्रमाणें आणि चिलखताप्रमाणें म्हातारपणापासून आमचें रक्षण करा.

५. हे अश्विहो, तुम्ही वाऱ्याप्रमाणें अक्षय, नद्याप्रमाणें शीघ्रगामी, आणि डोळ्याप्रमाणें पहात आमच्याकडे या. हाताप्रमाणें आणि पायाप्रमाणें शरीराला सुख देणारे तुम्ही आम्हांला उत्कृष्ट धनाप्रत न्या.

६. हे अश्विहो, दोन ओठाप्रमाणें तोंडानें मधुर बोलणारे तुम्ही स्तनाप्रमाणें आम्हांला जगण्याकरतां पुष्ट करा. नासिकेप्रमाणें आमच्या शरीराचे रक्षककर्ते व्हा आणि कर्णाप्रमाणें आमचे ऐकणारे व्हा.

७. हे अश्विहो, दोन हाताप्रमाणें आम्हांला शक्ति देणारे व्हा, द्यावापृथ्वीप्रमाणें आम्हांला उदक द्या. हे अश्विहो, तुम्हांकरतां केलेलीं हीं स्तोत्रें सहाणेवर तलवार तीक्ष्ण करावी त्याप्रमाणें तीक्ष्ण करा.

८. अश्विहो, हीं तुम्हांला जोर आणणारीं मंत्र आणि स्तोत्रें गृत्समदांनीं केलीं आहेत. त्याकडे हे नेत्यांनो, तुम्ही प्रेमानें या. चांगल्या मुलाबाळांसह आम्ही यज्ञांत मोठें स्तोत्र म्हणावें.

सूक्त चाळिसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता-सोमापूषन; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे सोमापूषनहो, तुम्ही संपत्तीचे जनक, द्युलोकाचे उत्पादक आणि पृथ्वीचे संपादक आहांत. तुम्ही उत्पन्न होताच सकळ जगाचा संभाळकर्ते आहांत. देवांनीं तुम्हांला अमरपणाचे मुख्य ठिकाण केलें आहे.

२. ह्या दोघा देवांना उपजतांच इतर देवांनीं सेविलें. हे दोघे अप्रिय अंधार नष्ट करते झाले. ह्या इंद्र व पूषन देवांनीं अपक्व गाईंत पक्व दूध उत्पन्न केलें.

३. हे पराक्रमी सोम व पूषनहो, अन्तरिक्षाचें माप घेणारा, सात चाकाचा, जगापेक्षां मोठा, सर्वत्र फिरणारा, इच्छेनें जोडला जाणारा आणि पांच लगाम असलेल्या त्या रथाला आम्हांकडे हाका.

४. त्यापैकीं एकाचें स्थान उच्च द्युलोकीं आहे आणि दुसऱ्याचें अन्तरिक्षांत आणि पृथ्वीवर आहे. ते दोघे आम्हांला अनेकांना हवेसे वाटणारे अन्नसमृद्धि, धनसमृद्धि (गुरे) आणि आम्हांला संतति देवोत.

५. हे सोमापूषनहो, तुम्हांपैकीं एकानें सर्व जग निर्माण केलें आणि दुसरा सर्व जग पहात जातो. तुम्ही आमच्या स्तोत्राचा स्वीकार करा. तुमच्या साहाय्यानें आम्ही सर्व सेना जिंकूं.

६. सर्वव्यापी पूषा आमची उपासना सफल करो. धनाधिपति सोम आम्हांला संपत्ति देवो. अप्रतिहत देवी आदिति आमचें रक्षण करो. चांगल्या मुलाबाळांनीं युक्त असणारे आम्ही यज्ञांत मोठें स्तोत्र म्हणूं.

सूक्त एकेचाळिसावें.

ऋषिः—गृत्समद; देवता-१.२ ३ इंद्र आणि वायु, ४-६ मित्र व वरुण, ७-९ अश्वीवायु, १०-१२ इंद्र, १३-१५ विश्वेदेव, १६-१८ सरस्वती, १९ पहिले दोन चरण द्यावापृथ्वी अथवा हविर्धान, तिसरा चरणाचा अधिक अग्नि २०-२१ द्यावापृथ्वी अथवा हविर्धान; छंदः—१-१५ गायत्री, १६-१७ अनुष्टुभ, १८ बृहती, १९-२१ गायत्री.

१. हे वायो, तुझे हजारो रथ आहेत. त्यांनीं तूं आपल्या नियुत घोड्यासह सोम पिण्याकरतां ये.

२. हे वायो, तूं आपल्या नियुत घोड्यासह ये. हा तेजस्वी सोम तुला अर्पण केला आहे. तूं सोम काढणाऱ्यांच्या घरीं जाणारा आहेस.

३. हे शूर इंद्रवायूंनो, आज अश्वयुक्त असणारे तुम्ही या आणि गाईचें दूध मिसळलेला तेजस्वी सोम प्या.

४. हे मित्रावरुणांनो, तुमच्याकरतां हा सोम पिळला आहे. हे यज्ञवर्धकहो, तुम्ही माझाच धांवा ऐका.

५. द्रोह न करणारे हे दोन राजे मित्रावरुण स्थिर आणि उत्कृष्ट हजार खांबी घरांत बसलेले असतात.

६. ते साम्राज्यकर्तें, घृत पिणारे, अदितिपुत्र आणि धनपति असणारे मित्रावरुण निष्कपट उपासकाला उपयोगी पडतात.

७. हे सत्यस्वरूप विजयी अश्विहो; तुम्ही वीरांनीं संरक्षण केलेल्या गाई आणि घोडे यांनीं युक्त असलेल्या आमच्या घरीं या.

८. हे धनाचा वर्षाव करणारे अश्विहो, जे धन जवळचा किंवा दूरचा दुर्भाषण करणारा मर्त्य शत्रू हिरावून घेणार नाहीं—

९. हे स्तुत्य अश्विहो, तें सोन्यासारखें उत्कर्षप्रद धन आम्हाकरतां तुम्ही घेऊन या.

१०. इंद्रच मोठें पराभव करणारें भय नाहींसें करो. कारण, तो अचल लोकद्रष्टा आहे.

११. इंद्र आम्हांला सुख देवो, म्हणजे आम्हाला मागून त्रास होणार नाहीं आणि आमचे पुढूनहि कल्याण होईल.

१२. शत्रूंना जिंकणारा आणि लोकद्रष्टा इंद्र सर्व दिशा आम्हाला निर्भय करो.

१३. हे विश्वेदेवांनो, तुम्ही या. माझा हा धांवा ऐका. दर्भासनावर बसा.

१४. हे विश्वेदेवांनो, हा तीव्र आणि मधुर सोम शुनहोत्राच्या घरीं केला आहे. तुम्ही हा सुंदर सोम प्या.

१५. इंद्र ज्यामध्यें श्रेष्ठ आहे, मरुद्गण असलेले, पूषा ज्यांच्यामधील दाता आहे असे विश्वेदेव माझा धांवा ऐकोत.

१६. हे श्रेष्ठ माते, हे श्रेष्ठ नदी, हे श्रेष्ठ देवि सरस्वति, आम्ही अप्रसिद्धासारखे आहोंत, तर हे मातें, तूं आम्हाला प्रख्यात कर.

१७. हे सरस्वति, देवि अशा तुझ्यापाशीं सर्व उत्कृष्ट अन्न (चैतन्याचें अधिष्ठान—पावगी) आहे. तूं शुनहोत्राच्या येथें सोम पिऊन आनंदित हो. हे देवि, तूं आम्हाला मुलें दे.

१८. हे अन्नसमृद्ध व उदकयुक्त सरस्वति, हीं हविर्द्रव्यें तूं स्वीकार, कीं जी मननीय आणि देवांमध्यें प्रिय असणारी तुला अर्पण केलीं जात आहेत.

१९. यज्ञास सुखानें पार पाडणाऱ्या अशा तुम्ही दोघी द्यावापृथ्वी चालू लागा. तुमचीच आम्ही प्रार्थना करीत आहों. हव्यवाहन अग्नीला आम्ही प्रार्थित आहों.

२०. द्यु आणि पृथिवी ह्या आमच्या साधक आणि स्वर्गस्पर्शी यज्ञाला देवांकडे पोंचवोत.

२१. हे द्रोह न करणाऱ्या द्यावापृथ्वीहो, तुमच्या जवळ यज्ञार्ह देव सोम पिण्याकरतां आज येथें बसोत.

सूक्त बेचाळिसावें.

ऋषि–गृत्समद; देवता–कपिंजलरूपी इंद्र; छंद–त्रिष्टुभ.

१. सुकाणूवाला नाव हाकारतो, त्याप्रमाणें पुनः पुनः भविष्य उच्चारीत शब्द करीत आहे. हे पक्ष्या, तूं मंगलदायक हो. कोणतेंहि संकट तुझ्यावर कोणत्याहि बाजूनें न येवो.

२. श्येन तुझा वध न करो, किंवा गरुड तुझा वध न करो. तुला बाणयुक्त धनुर्धारी वीर न धरो. तूं पितरांच्या दिशेला (दक्षिण) पुनः पुनः शब्द करणास, मंगलकारक आणि शुभ शब्द करणारा येथें शब्द कर.

३. हे पक्ष्या, मंगल करणारा आणि बोलणारा तूं घरांच्या दक्षिणेला शब्द कर. चोराची सत्ता आम्हांवर न चालो. दुष्टाची सत्ताहि न चालो. आम्ही चांगल्या मुलाबाळांनीं युक्त होऊन यज्ञांत मोठें स्तोत्र म्हणावें.

सूक्त त्रेचाळिसावें.

ऋषिः—गृत्समद; देवताः—कपिंजलरूपी इंद्र; छंदः–२ अष्टि किंवा अतिशक्वरी, अवशिष्ट जगती.

१. वेळोवेळीं अन्न सूचित करणारे पक्षी स्तोत्याप्रमाणें उजव्या बाजूस शब्द करोत. तो सामगायकाप्रमाणें गायत्री आणि त्रिष्टुभ अशा दोन्ही वृत्तांतील सामें गातो आणि शोभतो.

२. हे शकुने, तूं उद्गात्याप्रमाणें सामगायन करतोस. तूं ब्राह्मणाच्छंसीप्रमाणें यज्ञांत गातोस. तरुण घोडा शिंगरें असलेल्या घोड्यांत जाऊन जसा शब्द करतो तसा तूं हे पक्ष्या, सर्व बाजूंनीं कल्याणकारक शब्द कर. हे शकुने, तूं सर्व बाजूंनीं पुण्यकारक शब्द कर.

३. हे पक्ष्या, तूं शब्द करीत असतां शुभ शब्द कर. तूं स्वस्थ बसलास तर आमचें चांगलें स्तोत्र ध्यानांत घे. जेव्हां तूं उडत असतां बोलत असतोस तेव्हां कर्करिवाद्याप्रमाणें बोलत जा. आम्ही चांगल्या मुलाबाळांसह यज्ञांत तुझें मोठें स्तोत्र म्हणावें.

येथें दुसरें मंडळ संपलें.

मंडळ दुसरें.

कोष्टक दुसरें

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	देवता
१	२.५.१८-१९	गृत्समद	जगती	अग्नि	
२	२.५.२०-२१	,,	,,	,,	
३	२.५.२२-२३	,,	७ जगती अवशिष्ट त्रिष्टुभ्	आप्रीसूक्त	
४	२.५.२४ २५	सोमाहुति भार्गव	त्रिष्टुभ्	अग्नि	
५	२.५.२६	,,	,,	,,	
६	२.५.२७	,,	अनुष्टुभ्	,,	
७	२.५.२८	,,	गायत्री	,,	
८	२.५.२९	गृत्समद	,,	,,	
९	२.६.१	,,	,,	,,	
१०	२.६.२	,,	त्रिष्टुभ्	,,	
११	२.६.३-६	,,	,,	इंद्र	
१२	२.६.७-९	,,	१–१८ विराज्	,,	
१३	२.६.१०-१२	,,	त्रिष्टुभ्	,,	इंद्रपराक्रम वर्णन
१४	२.६.१३-१४	,,	१३ त्रिष्टुम् अवशिष्ट जगती		
१५	२.६.१५-१६	,,	त्रिष्टुभ्	,,	
१६	२.६.१७-१८	,,	,,	,,	
१७	२.६.१९-२०	,,	९ त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती	,, ,,	
१८	२.६.२१-२२	,,	८–९ त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती		संख्याज्ञानदर्शक विशेषत: दशमानपद्धतीचा उल्लेख
			त्रिष्टुभ्	,,	
१९	२.६.२३-२४	,,	,,	,,	
२०	२.६.२५-२६	,,	त्रिष्टुभ	,,	
२१	२.६.२७	,,	१–५ जगती ६ त्रिष्टुभ्	,,	
२२	२.६.२८	,,	१ अष्टि अवशिष्ट अतिशक्करी किंवा अष्टि	,,	
२३	२.६.२९-३२	,,	१५–१९ त्रिष्टुभ् अवशिष्टजगती	बृहस्पति व ब्रह्मणस्पति	'गणानांत्वा' हा मंत्र

सूक्त	अष्टक अ व	ऋषि	छंद	देवता	महत्व
२४	२.७.१-३	गृत्समद	१२–१६ त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती	ब्रह्मणस्पति	
२५	२.७.४	”	जगती	बृहस्पति	
२६	२.७.५	”	”	”	
२७	२.७.६-८	कूर्म गृत्समद-पुत्र किंवा गृत्समद	त्रिष्टुभ्	आदित्य	
२८	२.७.९-१०	”	”	वरुण	
२९	२.७.११	”	”	विश्वेदेव	
३०	२.७.१२-१३	”	१–१० त्रिष्टुभ् ११ जगती	६ इंद्र ८ पूर्वार्ध सरस्वती ९ बृहस्पति ११ मरुत् अवशिष्ट इंद्र	
३१	२.७.१४	”	१–६ जगती ७ त्रिष्टुभ्	विश्वेदेव	
३२	२.७.१५	”	१-५ जगती ६-८ अनुष्टुभ्	१ द्यावापृथ्वी २-३ इंद्र किंवा त्वष्टृ ४–५ राका ६-७ सिनीवाली ८ गुंग वगैरे आठ देवता	कांहीं विशेष देवता शिवण कला
३३	२.७.१६-१८	”	त्रिष्टुभ्	रुद्र	
३४	२.७.१९-२१	कूर्म गृत्समद	१.१४ जगती १५ त्रिष्टुभ्	मरुत्	
३५	२.७.२२–२४	”	त्रिष्टुभ्	अपांतपात्	
३६	२.७.२५	”	जगती	१ इंद्र व मधु २ मरुत् व माध्व ३ त्वष्टृ व शुक्र ४ अग्नि व शुचि ५ इंद्र व नभ ६ मित्रावरुण व नभस्य	
३७	२.८.१	”	”	१.४ द्रविणोदस ५ अश्विनौ ६ अग्नि	
३८	२.८.२–३	”	त्रिष्टुभ्	सवितृ	
३९	२.८.४–५	”	”	अश्विनौ	

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
४०	२.८.६	गृत्समद.	त्रिष्टुभ	सोमापूषन ६उत्तरार्ध अदिति	
४१	२.८.७–१०	,,	गायत्रीपैकीं १६.१७ अनुष्टुभ् १८ बृहती	१.२ वायु, ३ इंद्रवायु, ४–६ मित्रावरुण, ७–९ अश्विदेव १०–१२ इंद्र, १३.१५ विश्वेदेव; १६–१८ सरस्वति, १९ पहिले दोन चरण द्यावापृथ्वी अथवा हविर्धान, तिसऱ्या चरणाचा अग्नि, २०,२१ द्यावापृथ्वी.	
४२	२.८.११	,,	त्रिष्टुभ्	कपिंजलरूपी इंद्र	पक्ष्यांचा अशुभ शब्द ऐकल्यावर हें सूक्त म्हणतात.
४३	२.८.१२	,,	२ अष्टि किंवा अतिशक्करी अवशिष्ट जगतों	,,	

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर

मंडळ तिसरें.

भाषांतरकार

विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

मुद्रक व प्रकाशक

शंकर रामचंद्र दाते, बी. ए.

चिटणीस, वैदिक वाङ्मय प्रसारक मंडळ.

' लोकसंग्रह ' छापखाना, २७ बुधवार पेठ, पुणें.

शके १८५०

किंमत बारा आणे

तृतीयमंडळपरिचय.

तिसऱ्या मंडळांत ६२ सूक्तें असून ६१७ ऋचा आहेत. अनुवाक पांच आहेत.

ह्या मंडळाचा द्रष्टा विश्वामित्र आहे.

छंद.

तिसऱ्या मंडळांत ३१ त्रिष्टुभ, ६ गायत्री, ३ जगती, २ बृहती, १ उष्णिह्, १ अनुष्टुभ व १ विराज् आणि वेगवेगळया छंदांतील १७ सूक्तें आहेत.

देवता.

तिसऱ्या मंडळांत २३ इंद्र, १८ अग्नि, ३ विश्वेदेव, २ वश्वानर अग्नि, १ पुरीष्य अग्नि, १ यूप १ अश्विदेव, १ इंद्राग्नी, १ मित्र १ उषा, १ आप्रीसूक्त आणि ९ भिन्नभिन्न देवतांचीं सूक्तें आहेत.

अरणीचा अग्नि उत्पन्न करण्याकडे उपयोग.

अरणीचा अग्नि उत्पन्न करण्याकडे हटकून उपयोग करीत. याविषयीं ऋग्वेदांत सर्वत्र उल्लेख आहेत. पण बऱ्याच स्पष्टपणें उल्लेख याच मंडळांत आला आहे (२९-१ ते ३)

त्यावरून सध्यां अरणी ज्या स्वरूपांत आढळते जवळ जवळ त्याच स्वरूपांतील अरणीचें हें वर्णन आहे कीं काय असें वाटूं लागते.

तसेंच त्याच सूक्तांत (११) तनूनपात्, नराशंस आणि मातरिश्वन् अग्नीचें जें स्वरूप सांगितलें आहे तेंहि ध्यानांत घेण्यासारखें आहे.

वैदिक धर्माचा प्रसार.

ह्या संबंधीं सर्वत्रच एक साधारण विचार दिसतो. पण अत्यंत स्पष्ट शब्दांत तिसाव्या सूक्ताच्या सहाव्या ऋचेंत उल्लेख आढळतो. तेथें स्पष्ट शब्दांत वैदिक धर्माच्या प्रसाराची कल्पना ग्रथित केलेली आढळते.

दायविभाग.

मुलीला बापाच्या स्थावर जंगम संपत्तींतील वाटणी न देण्याचा प्रघातहि बराच जुना आढळतो. मुलीचें फक्त सालंकृत कन्यादान करावें. यापेक्षां तिला जास्त कोणताहि अधिकार नाहीं. याचा स्पष्ट उल्लेख एकतिसाव्या सूक्ताच्या पहिल्या दोन ऋचांत आला आहे.

विश्वामित्र-नदीसंवाद.

तेहेतिसाव्या सूक्तांत एक जरा त्रुटितच पण सुंदर संवाद ग्रथित केला आहे. तेथें विश्वामित्र भरतांसह बरीच संपत्ति घेऊन आला आहे आणि तो उतार मागत आहे. धर्मकार्य करण्यास जाणाऱ्याला कोणीहि अडथळा करूं नये हेंहि तो एक कारण दर्शवीत आहे. नद्याहि त्याला आमचें काम आम्हांला सोडतां येत नाहीं म्हणून उत्तर देत आहेत. तथापि नाहीं होय करतां करतां नद्यांनीं त्यांना वाट दिली आणि विश्वामित्र बियास-सतलजसंगम उतरून आला असें दाखविलें आहे सुदासाच्या यज्ञांत मिळालेली संपत्ति घेऊन तो आला होता असें आख्यायिकेंत म्हटलें आहे. यानंतर सुदास येऊन दाशराज्ञ युद्ध झालें असावें असें वाटतें. हें संवादात्मक भाषण पुढल्या काळांत गाजलें पाहिजे असें एक वाक्य आहे. खरोखर

हा संवाद चिरस्मरणीय झाला आहे. या मंडळावरून सुदास व विश्वामित्र यांचा निकट संबंध असावा असें दिसतें. पण सातव्या मंडळावरून वसिष्ठ व सुदास यांचा निकट संबंध असावा असें दिसतें. यावरून पौराणिक वसिष्ठ विश्वामित्राच्या तंट्याला थोडेसें मूळ उपलब्ध होतें.

वसिष्ठविश्वामित्रवाद.

वसिष्ठ विश्वामित्राच्या पौराणिक वादाचें मूळ सातव्या मंडळांतील शेवटल्या सूक्तांत व ह्या मंडळांतील कांहीं सूक्तांत आहे. असें बृहद्देवतादि ग्रंथांत दिलें आहे. त्यावरून तें मान्य करणें भाग आहे. यापेक्षां अधिक प्रत्यक्ष पुरावा शोधावयास पाहिजे. सुदासाचे ते दोघेहि पुरोहित असावेत आणि त्यावरून वादाचा संभवहि दिसतो. यासंबंधीं बरेंच विवेचन करावयास पाहिजे तें अन्यत्र करूं.

वाचनीय सूक्तें

ह्या संहितेंत एकच असणारें मित्रसूक्त ह्याच मंडळांत आहे. (३. ५९). त्याचा मुख्य गुण हाक मारून लोकांना एकत्रित करणें आणि अनिमिष नेत्रांनीं शेत पेरणाराकडे पहात राहणें हा आहे. इतरत्रही मधूनमधून त्याचे उल्लेख आले आहेत. तसेंच ' महद्देवानामसुरत्वमेकम् । (५४) हें अनेक दृष्टींनीं अत्यंत महत्वाचें असणारें सूक्त ह्याच मंडळांत आहे.

वैशाख वद्य १२।१८५० **सिद्धेश्वरशास्त्री चित्राव**

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर.

तिसरें मंडळ.

सूक्त पहिलें.

ऋषिः--विश्वामित्र; देवता-अग्नि; छंदः--त्रिष्टुभ.

१. हे अग्ने, यज्ञांत यज्ञ करण्याकरतां ज्याला तूं सोम तयार करणारा करतोस त्याला तूं सामर्थ्यवान करावेंस. हे अग्ने, तेजस्वी असणारा मी देवांच्याकरतां सोम कुटण्याचे दगड जुळीत आहे आणि स्तुति करीत आहें. तूं आपल्या शरीराकरतां याचा स्वीकार कर.

२. हे अग्ने, आम्ही यज्ञ जोरानें करीत आहोंत. स्तुतीचा उत्कर्ष होवो. समिधांनीं आणि हवींनीं अग्नीची उपासना चालावी. कवींचीं स्तोत्रें स्वर्गावरून आलीं आहेत. म्हणून बलवान आणि प्रशंसनीय अग्नीची स्तोते स्तुति करूं इच्छितात.

३. मेधावी, शुद्धसामर्थ्य, जन्मानेंच पृथ्वीचा आणि स्वर्गाचा बांधव असणारा अग्नि सुख देतो. देवांना यज्ञाकरतां सुंदर अग्नि नद्यांच्या पाण्यांत सांपडला.

४ भाग्यशाली, शुभ्र, अशा उत्पन्न झालेल्या तेजस्वी अग्नीला सात नद्यांनीं वाढविलें. घोड्या जशा शिंगराकडे धांवतात त्याप्रमाणें देव जन्मतांच अग्नीला प्रदीप्त करतात.

५. स्वच्छ तेजांनीं आकाश व्यापणारा, भक्ताला शुद्ध तेजानें पवित्र करणारा आणि तेजोरूपी वस्त्र पांघरणारा अग्नि उपासकांना विपुल संपत्ति आणि दीर्घायुष्य देतो.

६. उपद्रव न करणाऱ्या आणि ज्यांना कोणी उपद्रव करीत नाहीं अशा स्वर्गकन्या उदकदेवता वस्त्र न नेसतांहि नागव्या नसतात. येथें एकत्र असणाऱ्या नित्य तरुण अशा त्या सात जणींनीं एक गर्भ धारण केला.

७. अन्तरिक्षांत उदकाचा वर्षाव होत असतां एकत्र असलेले पण सर्वत्र पसरलेले ह्या अग्नीचे किरण असतात. येथें बुधानें भरलेल्या गाई उभ्या आहेत, आणि देखण्या अग्नीच्या सरळगामी विशाल मातृभूत द्यावापृथ्वीहि आहेत.

८. हे बलपुत्रा अग्ने, तुझें जेव्हां पोषण केले तेव्हां तूं तेजस्वी आणि वेगशाली शरीर धारण करून विशेष रीतीनें प्रकाशलास. बलिष्ठ अग्नि स्तोत्रानें जेव्हां वृद्धिंगत होतो तेव्हां मधुर घृताच्या धारा वाहतात.

९. अन्तरिक्षांतील पाण्याचा साठा तो जन्मतःच जाणतो. पाण्याच्या धारा आणि आकाशवाणी त्यानें बाहेर सोडली. चांगल्या मित्रांसह व उदकासह गुहेंत संचार करणाऱ्या अग्नीस गूढ ज्ञानीहि प्राप्त करूं शकत नाहींत.

१०. अग्नीनें अन्तरिक्षाचा गर्भ धारण केला आणि उत्पन्नकर्त्यांचाहि गर्भ धारण केला. एकटा अनेक पुष्ट ओषधी भक्षण करतो. एकच पति असलेल्या, एकच बांधव असलेल्या आणि लोकहितकारक असणाऱ्या द्यावापृथ्वी ह्या शुद्ध व पराक्रमी अग्नीचें संरक्षण करीत.

११. महान अग्नि अनिर्बंध अन्तरिक्षांत वाढला. कारण अन्नसंपन्न असणाऱ्या उदकदेवता अग्नीला वाढवीत असतात. अन्तरिक्षांत वाहणाऱ्या बांधवभूत पाण्यांत उदार असणारा तो पडून राहतो.

१२. सर्वांना उत्पन्न करणारा, पाण्यांत अन्तर्भूत असणारा, अत्यंत शूर असा जो थोर अग्नि आहे तो युद्धांत आक्रमण करतां न येणारा, युद्धांत सैन्याचें संरक्षण करणारा, अत्यंत पाहण्यासारखा आणि कान्तिमान असणारा, भक्ताकरतां पाणी उत्पन्न करतां झाला.

१३. भाग्यशाली अरणीनें उदक आणि ओषधी यांच्या पोटांत असणाऱ्या अनेक स्वरूपाच्या अग्नीस जन्म दिला. प्रशंसनीय आणि बलिष्ठ असणाऱ्या अग्नीला उत्पन्न झाल्यावर देव मनःपूर्वक भेटले आणि त्याची उपासना करूं लागले.

१४. अपार अन्तरिक्षांत प्राणी उत्पन्न करणारा मोठा सूर्य चकाकणाऱ्या विजेप्रमाणें व तेजस्वी गुहेंत वाढल्याप्रमाणें स्वतःच्या घरीं वाढलेल्या अग्नीला प्राप्त झाला.

१५. भक्त असणारा मी तुझी हवि देऊन प्रार्थना करतों. उत्सुक असणारा मी तुझा स्नेह आणि अनुग्रह मागतों. देवांसह असणारा तूं आम्हा स्तोत्यांचें रक्षण कर. दमनीय असणाऱ्या तेजांनीं तूं आमचें संरक्षण कर.

१६. हे नेत्या अग्ने, तुझ्या अनुयायित्वामुळें सर्व संपत्तीला धारण करणारे आम्ही पुष्टिकारक अन्नाचे हवि देऊन युद्ध करणाऱ्या राक्षसांचा पराभव करूं.

१७. हे अग्ने, प्रशंसनीय असणारा तूं सर्व स्तोत्रें ध्यानांत घेणारा देवांचा दूत आहेस. उदार असणारा तूं भक्तांना स्थायिक करतोस आणि कार्यें पार पाडीत रथांत बसून देवांकडे जातोस.

१८. अमर, मर्त्यांचा राजा असणारा अग्नि यज्ञ पार पाडीत घरांत बसलेला असतो. सर्व स्तोत्रें जाणणारा आणि घृतानें प्रज्वलित होणारा अग्नि प्रज्वलित होऊन प्रकाशतो.

१९. सर्वत्र जाऊं इच्छिणारा व महान असणारा तूं मोठें साहाय्य करण्याकरतां शुभ मित्रत्वानें आम्हाकडे ये. आम्हाला संरक्षक मोठी प्रशंसनीय, आश्रयणीय आणि कीर्तिप्रद संपत्ति दे.

२०. हे अग्ने, पुरातन असणाऱ्या तुझें प्राचीन आणि नवीन असणारे जन्म मी गात आहें. पराक्रमी असणाऱ्या तुझ्याकरतां हे मोठाले यज्ञ केले आहेत आणि घरोघर सर्वज्ञ अग्नीची स्थापना झाली आहे.

२१. घरोघर स्थापन केलेला सर्वज्ञ अग्नि विश्वामित्रांकडून सतत प्रदीप्त केला जातो. आम्ही त्या यज्ञार्ह अग्नीच्या मनःपूर्वक केलेल्या कल्याणकारक कृपेंत असावें.

२२. हे बलवान व कर्तृत्ववान अग्ने, सदोदित आनंदांत असणारा तूं आमचा हा यज्ञ देवांत पोंचीव. हे देवांना बोलावणाऱ्या, आम्हांला विपुल अन्न दे. हे अग्ने, आम्हांला तूं विपुल संपत्ति दें.

२३. हे अग्ने, तुझा धांवा करणाऱ्याला चिरकाल टिकणारी सुपीक आणि गाईंची समृद्धि करणारी भूमि दे. आमचीं मुलेंबाळें वंशवृद्धि करणारी होवोत. हें अग्ने, तुझी कृपा आमच्यावर असो.

सूक्त दुसरें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता—वैश्वानर अग्नि; छंदः—जगती.

१. त्या अग्नीनें जन्मल्याबरोबर द्यावापृथ्वी प्रकाशित केली. तो मातृभूत द्यावापृथ्वींचा प्रशंसनीय पुत्र झाला. हवि वाहून नेणारा अजर अग्नि अन्न देणारा, अहिंस्य, प्रकाशधन आणि लोकांना अतिथीप्रमाणें पूज्य आहे.

२ तो अग्नि जन्मल्याबरोबर द्यावापृथ्वी प्रकाशित करतो. तो द्यावापृथ्वीचा प्रशंसनीय पुत्र होय. प्रकाशधन अग्नि, हवि वाहून नेणारा, अजर, अन्नसमृद्धि करणारा, अहिंस्य आणि लोकांचा अतिथि आहे.

३. कर्तृत्वानें आणि बुद्धिमत्तेनें बलाचा आधार असणाऱ्या यज्ञांत देवांनीं अग्नीला उत्पन्न केलें. चकचकीत तेजानें प्रकाशणाऱ्या महान अग्नीची समृद्धि प्राप्त व्हावी म्हणून मी घोड्याप्रमाणें स्तुति करतों.

४. प्रशंसनीय अग्नीचें श्रेष्ठ, प्रशंसनीय आणि अलज्जास्पद अन्न इच्छिणारे आम्ही भृगूंना इष्ट संपत्ति देणाऱ्या, बुद्धिमान आणि स्वर्गीय कान्तीनें प्रकाशणाऱ्या अग्नीची प्रार्थना करतों.

५. अन्न देणारा म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या अग्नीची सुख प्राप्त व्हावें म्हणून यज्ञ करणारे व पळीनें हवि देणारे आम्ही पुढें स्थापना करीत आहोंत. हा अग्नि सुंदर कांतीचा, सर्व देवांना हितकारक, दुःखें नाहींशीं करणारा आणि भक्तांच्या कर्मांची सांगता करणारा आहे.

६. हे शोधक कांतीच्या होत्या अग्ने, यज्ञ करून सेवा व धन इच्छिणारे भक्तजन यज्ञांतील घरांत तुझी सेवा करतात. त्यांना तूं धन दे.

७. जेव्हां कर्म करणाऱ्यांनीं अग्नि उत्पन्न केला तेव्हां त्यांनीं द्यावापृथ्वी व्यापली आणि विस्तृत अन्तरिक्ष भरून टाकलें. तो अन्न देणारा बुद्धिमान अग्नि ऐश्वर्यप्राप्तीकरतां घोडा न्यावा त्याप्रमाणें यज्ञाकरतां नेला जातो.

८. महान यज्ञाचा द्रष्टा व नेता असा अग्नि देवांचा पुढारी आहे. हवि दिलेल्या आणि यज्ञाला चांगुलपणा आणणाऱ्या अग्नीची तुम्ही सेवा करा. गृहाला हितकारक असणाऱ्या सर्वज्ञ अग्नीला तुम्ही भजा.

९. हवि इच्छिणाऱ्या अमर देवांनीं सर्वत्र पसरलेल्या महान व प्रज्वलित तीन अग्नींना पावन केलें. त्यांपैकीं एक संरक्षक अग्नीला मृत्युलोकीं ठेवलें. आणि दुसरे दोन बांधवभूत अन्तरिक्ष व द्यु लोकांत गेले.

१०. लोकांच्या ह्या ज्ञात्या लोकाधिपतीला तरवारीला धार लावण्याकरतां करावें त्याप्रमाणें अन्न देऊन तयार करीत आहेत. तो उंच आणि सखल प्रदेश व्यापीत जातो. तो ह्या जगांत उत्पादनशक्ति वाढवो.

११. तो उत्पन्न झालेला वीर अग्नि आश्चर्यकारक उदरांत, गर्जना करणाऱ्या सिंहाप्रमाणें वृद्धिंगत होवो. अत्यंत सामर्थ्यवान असणारा अमर वैश्वानर अग्नि दात्यांना रमणीय संपत्ति देतो.

१२. चांगल्या स्तोत्रांनीं स्तविलेला वैश्वानर अग्नि वृद्धासारखा द्युलोकांचें पृष्ठ जो स्वर्ग त्यावर चढला. जागरूक असणारा तो प्राण्याकरतां पूर्वीप्रमाणें धन उत्पन्न करीत सर्वसाधारण आकाशांतून जात असतो.

१३. ज्या बलवान, यज्ञार्ह, प्रशंसनीय आणि ज्ञात्या अशा अग्नीला वायूनें अन्तरिक्षांत स्थापन केलें त्या आश्चर्यगति, पिंगट ज्वाला असलेल्या प्रज्वलित अग्नीला आम्ही नवीन संपत्ति मागत आहोंत.

१४. तेजस्वी, यज्ञांत स्पृहणीय, सर्वद्रष्टा, द्युलोकाचा ध्वज, सूर्यांत असणारा, उषःकालीं जागृत होणारा, स्वर्गातील प्रमुख, अप्रतिहत बलवान आणि महान अग्नीची आम्ही स्तोत्र म्हणून प्रार्थना करतों.

१५. प्रशंसनीय, देवांना बोलावणाऱ्या, शुद्ध, सरळ, उदार, श्रेष्ठ, लोकद्रष्ट्या, अनेकरंगी रथाप्रमाणें पहाण्यासारखा आणि लोकहितकारक अग्नीची आम्ही सदोदीत संपत्तीकरतां प्रार्थना करीत आहोंत.

सूक्त तिसरें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–वैश्वानर अग्नि, छंदः—जगती.

१. अत्यंत तेजस्वी वैश्वानराला यज्ञांत गाण्याकरतां स्तोते रमणीय स्तोत्रें रचतात. कारण, अमर अग्नि देवांची सेवा करतो. म्हणूनच सनातन धर्माला कोणी दूषण देत नाहीं.

२. दूत होऊन अग्नि द्यावापृथ्वीमध्यें हिंडत असतो. भक्तजनांच्या पुढें बसलेला, देवांनीं पाठविलेला आणि बुद्धिधन अग्नि तेजानें विस्तृत यज्ञगृहाला भूषित करतो.

३. यज्ञाचा ध्वज आणि यज्ञाचें साधन असणाऱ्या अग्नीला स्तोते कर्मांनीं पूजितात. स्तोते ह्याला आपलीं कर्में अर्पण करतात आणि यजमान ह्यापासून सुखाची इच्छा करतो.

४. यज्ञाचा पिता, ज्ञात्यांना बल देणारा, भक्तांना ज्ञान देणारा आणि ज्ञानी अग्नि आपल्या विस्तृत तेजानें द्यावापृथ्वीभर व्यापला आहे. बहुप्रिय व ज्ञाता अग्नि तेजस्वीपणामुळें प्रशंसिला जातो.

५. आल्हादक रथ असलेला, पिंगट वर्णाचा पाण्यांत राहणारा, सर्वज्ञ, सर्वव्यापक, चलाख, बलानें युक्त, पोषक आणि शोभिवन्त अशा अग्नीला देवांनीं ह्या लोकीं स्थापन केले आहे.

६. देवांनीं आणि यज्ञ करणाऱ्या लोकांनीं अनेक प्रकारें यज्ञ केला जाणारा, नेता, चलाख, उदार, शत्रूंचा नाश करणारा असा अग्नि कर्माकरतां द्यावापृथ्वीभर फिरत आहे.

७. हे अग्ने, तूं चांगलीं मुलेंबाळें असलेलें आयुष्य असावें म्हणून स्तविला जा. तूं अन्नानें पुष्ट हो आणि चांगला प्रज्वलित होऊन आम्हांला अन्नसमृद्धि दे. हे जागरूक अग्ने, थोर भक्तांना तूं अन्न दे. चांगलीं कर्में करणारा तूं देवांचा आवडता आहेस.

८. स्तोते लोकाधिपति, महान, अतिथि, बुद्धीला नियमन घालणारा, ऋत्विजांमध्यें सुंदर, यज्ञांचा प्रेरक व वेगशाली अशा सर्वज्ञ अग्नीची उत्कर्षाकरतां स्तोत्र म्हणून स्तुति करतात.

९. तेजस्वी व सुंदर रथांत आरूढ झालेला तेजस्वी अग्नि सामर्थ्यानें सर्व लोकांवर छाप ठेवतो. अनेक लोकांचें पोषण करणाऱ्या व भक्ताच्या घरीं राहणाऱ्या अग्नीचीं कर्में आम्ही स्तुति करून प्रसिद्ध करतों.

१०. हे वैश्वानर अग्ने, तुझ्या तेजाची मी प्रशंसा करतों कीं ज्यामुळें हे ज्ञात्या, तूं सर्वज्ञ झालास. तूं उत्पन्न झाल्याबरोबर द्यावापृथ्वी व्यापून टाकलीस. हे अग्ने, तूं आपणहून सर्व जगांत श्रेष्ठ झालास.

११. वैश्वानर अग्नीच्या पराक्रमामुळें विपुल संपत्ति प्राप्त होते. कारण, एकटा अग्नि सत्कर्मामुळें भक्तांना धन देतो. तो अग्नि अत्यंत संपन्न असणाऱ्या मातृपितृभूत द्यावापृथ्वींना श्रेष्ठ करीत उत्पन्न झाला.

सूक्त चवथें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–आप्रीसूक्त;* छंदः—त्रिष्टुभ.

१. चांगला प्रज्वलित झालेला तूं आमच्यावर कृपा करणारा हो. तूं आपल्या उज्ज्वल कांतीनें संपत्तीची आमच्यावर कृपा कर हे देवा, तूं यज्ञासाठीं मेघांना घेऊन ये. हे अग्ने, मित्र असणारा तूं कृपेनें इतर मित्रांचें पूजन कर.

२. ज्या यज्ञाला वरुण, मित्र व अग्नि हे तीन देव दिवसांत तीन वेळां पूजितात त्या आमच्या ह्या

---

* टीप—१-१३ टीप पहा.

सेवा करणाऱ्या यज्ञाला, हे तनूनपात अग्ने, मधुयुक्त आणि घृतयुक्त कर.

३. विश्ववन्द्य असणारी स्तुति सर्वांच्या आधीं नमन करण्यास योग्य असणाऱ्या अग्नीकडे नमस्कारांसह हवि देण्याकरतां प्रथम जावो. आम्ही पाठविलेला यज्ञार्ह अग्नि देवांना हवि पोंचवो.

४. आम्हीं यज्ञाचा श्रेष्ठ मार्ग स्वीकारला आहे. तुझें तेज अन्तरिक्षाकडे जाऊं लागलें आहे. अग्नीची यज्ञगृहाच्या मध्यें स्थापना केली आहे. देवांनीं व्यापलेले दर्भ पसरले आहेत.

५. मनःपूर्वक प्रार्थना केलेले आणि उदकानें सर्व व्यापणारे देव सप्त होत्यांच्या कृत्याकडे जाऊं लागले. यज्ञामध्यें उत्पन्न झालेल्या व मनुष्यरूप धारण केलेल्या अनेक द्वारदेवता ह्या यज्ञांत येवोत.

६. एकमेकाला लागून असणाऱ्या पण भिन्न स्वरूपाच्या उषा आणि नक्त देवता स्तुति केल्यावर प्रकाशोत. मित्र, वरुण आणि इंद्र हे मरुतांसह जसे आमच्याकडे येतील तसे ते द्यावापृथ्वी प्रकाशित करोत.

७. दोन दिव्य आदिहोत्यांना मी सुशोभित करतों. उदकाची प्रशंसा करणारे सात ऋत्विज सोमरूपी अन्नानें आनंदित होतात. व्रतांचें रक्षण करणारे, विचारी ऋत्विज अग्नीलाच ऋत असें म्हणतात.

८. भारतीसहित प्रेमानें असणारी भारती, देव आणि मनुष्य यांसह इळा व अग्नि, सरस्वतीच्या आसपासच्या देवांसह सरस्वती, अशा ह्या तीनहि देवी आमच्याकडे येऊन ह्या दर्भांवर बसोत.

९. हे त्वष्टृदेवा, प्रसन्न झालेला तूं आमचें असें तारक व पोषक वीर्य पाड कीं वीर, कर्मकुशल, बलवान, ग्रावे जोडणारा आणि देवभक्त असा पुत्र होईल.

१०. हे वनस्पते, तूं देवांना घेऊन ये. शिजवणारा अग्नि हवि शिजवो. तोच अत्यंत खरा होता यजन करो. कारण, तो देवांचा जन्म जाणतो.

११. हे अग्ने, प्रज्वलित झालेला तूं त्वराशील देवांसह आणि इंद्रासह आमच्याकडे ये. चांगल्या पुत्राची माता अदिति आमच्या दर्भांवर बसो. अमर देव स्वाहा शब्दानें तृप्त होवोत.

सूक्त पांचवें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता—अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. उषांना जाणणारा, बुद्धिमान, ज्ञात्यांच्या मार्गानें जाणारा जो अग्नि प्रज्वलित केला जातो तो अत्यंत तेजस्वी व भक्तांनीं प्रज्वलित केलेला अग्नि अंधाराचीं द्वारें उघडीत आहे.

२. पूजनीय अग्नि स्तोत्यांच्या स्तोत्रांनीं, गाण्यांनीं आणि वाणीनीं फार वाढला आहे. तो देवांचा दूत आदित्याच्या कान्तीचीं इच्छा करीत प्रातःकाळीं प्रकाशला आहे.

३. भक्तांचा मित्र, यज्ञानें कार्य सिद्ध करणारा, उदकाचा गर्भ असा अग्नि मनुष्यांमध्यें देवांनीं स्थापन केला. तो स्पृहणीय आणि पूजनीय अग्नि उच्च स्थानीं अधिष्ठित झाला. ज्ञाता अग्नि स्तोत्यांनीं आळविण्यास योग्य झाला आहे.

४. जेव्हां अग्नि प्रदीप्त होतो तेव्हां तो सूर्य होतो. मित्र, होता, वरुण आणि जातवेद होतो. तो मित्र अध्वर्यु, उदार व सर्वप्रेरक वायु होतो. तो पर्वतांचा आणि नद्यांचा मित्र होतो.

५. दर्शनीय अग्नि सर्वव्यापक पृथ्वीच्या श्रेष्ठ स्थानांचें रक्षण करतो. सूर्याच्या महान स्थानाचें संरक्षण करतो. अन्तरिक्षांत सप्तशीर्ष मरुतांचें संरक्षण करतो. देवांना आनंद देणाऱ्या यज्ञाचें संरक्षण करतो.

६. सर्व पदार्थमात्राला जाणणारा ज्ञाता व महान अग्नि प्रशंसनीय व स्तुत्य जल उत्पन्न करतो. सर्व जगांत अन्तर्भूत असणाऱ्या त्याचें रूप तेजस्वी आहे. तो अग्नि त्या जलाचें न चुकतां रक्षण करतो.

७. तेजस्वी स्थानावर अग्नि अधिष्ठित झाला. हवि इच्छिणारा अग्नि तेजस्वी व प्रशंसनीय स्थानावर अधिष्ठित झाला. तेजस्वी, महान, निर्मळ आणि पावक अग्नि द्यावाभूमीला पुनः पुनः अत्यंत नवीन करतो.

८. अग्नि उपजतांच समिधांनीं वाढतो. कारण, समिधा त्याला घृतानें वाढवितात. उतरणीवरून वाहणाऱ्या सुंदर पाण्याप्रमाणें अग्नि मातृभृत द्यावापृथ्वीच्या मांडीवर माझें रक्षण करो.

९. स्तुति केलेला महान अग्नि समिधानें पृथ्वीच्या मध्यभागावरून अन्तरिक्षापर्यंत प्रज्वलित झाला आहे. प्रशंसनीय व मित्रभूत मातरिश्वा दूत होऊन देवांना यज्ञाकरतां घेऊन येवो.

१०. जेव्हां गूढ स्थलीं असणाऱ्या हविर्वाहक अग्नीला भृगूपासून आणून मातरिश्वानें प्रज्वलित केलें तेव्हां तो महान अग्नि स्वर्गाला स्थिर करता झाला. तेजस्वीमध्यें अग्नि तेजस्वी झाला.

११. हे अग्ने, तुझा धांवा करणाऱ्याला चिरकाल टिकणारी सुपीक आणि गाईची समृद्धि करणारीं भूमि दे. आमचीं मुलेंबाळें वंशवृद्धि करणारी होवोत. हे अग्ने, तुझी कृपा आमच्यावर असो.

सूक्त सहावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–अग्नि; छंदः–त्रिष्टुभ.

१. हे स्तोत्यांनो, देवभक्त असणारे तुम्ही स्तोत्रानें उत्तेजित होत्साते देवांच्याकडे पळी न्या. घृतयुक्त अन्नानें युक्त असणारी व देवांचें पोषण करणारी पळी दक्षिण बाजूला जाते.

२. हे अग्ने, तूं जन्मतांच द्यावापृथ्वी व्यापून टाकलीस. हे यज्ञार्ह, तूं महिम्यानें द्यावापृथ्वीपेक्षांहि मोठा आहेस. तुझे सप्तजिह्व आहवनीयादि अग्नि येवोत.

३. द्यु, पृथिवी आणि यज्ञार्ह देव यांनीं तुला घरांतील देवांना बोलावणारा म्हणून स्थापन केलें आहे. देवभक्त असणाऱ्या मानवी प्रजा हवि घेऊन तुझ्या स्वच्छ ज्वालाची स्तुति करतात.

४. थोर, भक्तांचा उत्कर्ष इच्छिणारा अग्नि द्यावाभूमीमध्यें अचल असा आपल्या स्थानीं महिम्यानें बसलेला असतो. अजर, अमर, अमृताचा पान्हा सोडणाऱ्या व सवतीसारख्या असणाऱ्या द्यावापृथ्वी सर्वगामी अग्नीच्या दाया होत.

५. हे अग्ने, थोर असणाऱ्या तुझीं सर्व कृत्यें मोठालीं आहेत. तूं आपल्या कर्तृत्वानें द्यावाभूमि विस्तारली आहेस. तूं दूत आहेस. हे बलवन्ता, उत्पन्न झाल्याबरोबर तूं लोकांचा नायक झालास.

६. हे देवा, तूं केसाळ, घृत उत्पन्न करणारे दोन तांबडे घोडे दोऱ्यांनीं यज्ञाच्या जोखडास जोड. आणि सर्व देवांना घेऊन ये. हे सर्वज्ञ अग्ने, आमच्या यज्ञाला चांगुलपणा आण.

७. हे अग्न, जेव्हां अरण्यांत तूं पाणी जाळून टाकतोस तेव्हां तुझ्या ज्वाला सूर्यापेक्षां प्रकाशतात. तूं प्रकाशणाऱ्या अनेक उषःकाळीं प्रकाशत असतोस आणि देव वर्णनीय अशा देवांना बोलावणाऱ्या तुझें स्तवन करतात.

८. जे देव विशाल अन्तरिक्षांत आनंद पावतात, जे देव सूर्याच्या प्रकाशांत आहेत, जे ऊमसंज्ञक पितर आहेत आणि जे यज्ञार्थ सहज बोलावतां येणारे आहेत; हे अग्ने, रथाला योग्य तुझे घोडे आहेत.—

९. हे अग्ने, ह्या सर्वांसह तूं एका रथांत किंवा अनेक रथांत बसून आमच्याकडे ये. कारण, तुमचे घोडे समर्थ आहेत. सपत्नीक तेहेतीस देवांना आहुति भक्षण करण्याकरतां तूं घेऊन ये. आणि त्यांना तूं आनंदित कर.

१०. तो होता असा आहे कीं त्याच्या प्रत्येक यज्ञांत उत्कर्षाकरतां विस्तीर्ण द्यावापृथ्वींत स्तुति चालू असते. सत्यापासून निर्माण झालेल्या अग्नीला सत्य, उदकयुक्त, सुरूप अशा द्यावापृथ्वी यज्ञाप्रमाणें अनुकूल असतात.

११. हे अग्ने, तुझा धांवा करणाराला चिरकाल टिकणारी सुपीक आणि गाईची समृद्धि करणारी भूमि दे. आमचीं मुलेंबाळें वंशवृद्धि करणारीं होवोत. हे अग्ने, तुझी कृपा आमच्यावर असो.

सूक्त सातवें.

ऋषिः— विश्वामित्र; देवता–अग्नि; छंदः–त्रिष्टुभ.

१. नीळपृष्ठ अग्नीचे जे किरण उत्पन्न होतात, ते किरण द्यावापृथ्वींत शिरतात आणि सात नद्यांत प्रविष्ट होतात. सर्वव्यापक द्यावापृथ्वींत तें संचार करतात. पुष्कळ यज्ञ करण्याकरतां त्याला दीर्घायुषी करतात.

२. कामपूरक अग्नीचे घोडे स्वर्गाला व्यापून सर्वांना प्रसन्न करीत असतात. अग्नि मधुर उदक वहावयास लावणाऱ्या नद्यांत असतो. हे अग्ने, अन्तरिक्षांत सुखानें राहणाऱ्या व प्रज्वलित असणाऱ्या तुला एक आकाशवाणी सेवित असते.

३. संपत्तीमधील विशेष संपत्ति मिळवणारा, ज्ञाता आणि धनी असणारा अग्नि सर्व तऱ्हेनें ताब्यांत ठेवतां येणाऱ्या घोड्यावर आरूढ होतो. नीलपृष्ठ व अनेक स्वरूपाचा अग्नि सतत गमन चालावें म्हणून त्यांना विश्रान्ति देत असतो.

४. बलिष्ठ करणाऱ्या नद्या लोकाधार, अविनाशी, महान् त्वष्टृपुत्र अग्नीला धारण करतात. जवळच सर्व बाजूंनीं प्रकाशित होणारा अग्नि एक स्त्रीचा उपभोग घ्यावा त्याप्रमाणें द्यावापृथ्वींत शिरतो.

५. कामपूरक आणि शत्रुरहित अग्नीचें सुख लोक जाणतात आणि त्या थोर अग्नीच्या सत्तेंत आनंदांत असतात. ज्यांची महत्त्वाची स्तुतिवाणी लक्षांत घेण्यासारखी असते ते स्वर्गाला शोभा आणणारे कान्तिमान् प्रकाशत असतात.

६. तसेंच थोर मातृपितृभूत द्यावापृथ्वीपासून अनुभवानें अत्यंत प्रसिद्ध असणारे अग्निरूपी सुख प्राप्त केलें. पाऊस पाडणारा तो अग्नि रात्रीच्या जवळ असणारे आपलें तेज स्तोत्यांच्या जवळ आणतो.

७. पांच अध्वर्यूसह सात ऋत्विज् प्रसरणशील अग्नीच्या प्रिय स्थानाचें संरक्षण करतात. प्राङ्मुख, समर्थ व अविनाशी असणारे स्तोते आनंदित होतात. आणि ते देवांचीं व्रतें अनुसरतात.

८. देवांचे दोन मुख्य होते यांना मी प्रज्वलित करतों. सप्त होते सोमानें आनंदित होतात. स्तोत्र म्हणणारे, व्रतांचें पालन करणारे आणि तेजस्वी असणारे ते यज्ञांत अग्नीलाच ऋत असें म्हणतात.

९. हे देवांना बोलावणाऱ्या अग्निदेवा, सर्वश्रेष्ठ व बलिष्ठ अशा तुझ्याकरतां अतिशय मोठ्या असणाऱ्या तुझ्या ज्वाला बैलाप्रमाणें आहेत. अत्यंत आनंददायक ज्ञाता असा तूं द्यावापृथ्वीमध्यें देवांना घेऊन येतोस.

१०. हे सतत गमनशील अग्ने, हवि दिल्या जाणाऱ्या, स्तुति चालूं असलेल्या आणि चांगल्या ओळखल्या जाणाऱ्या उषा आम्हाला संपत्तियुक्त करीत उजाडल्या. हे अग्ने, अवाढव्य व्यापकपणामुळें जें पाप झालें असेल तें ह्या थोर भक्ताकरतां नष्ट कर.

११. हे अग्ने, तुझा धांवा करणाऱ्याला चिरकाल टिकणारी सुपीक आणि गाईंची समृद्धि करणारी भूमि दे. आमचीं मुलेंबाळें वंशवृद्धि करणारीं होवोत. हे अग्ने, तुझी कृपा आमच्यावर असो.

---

७. टीपः—उद्गात्याखेरीज बारा ऋत्विज आहेत. त्यांतील सात वषट्कार करणारे आहेत आणि दुसरे पांच यज्ञ करीत असतात. त्यांना अध्वर्यू असें म्हटलें आहे.

सूक्त आठवें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–११ छिन्नयूपमूलभूत स्थाणु, ८ विश्वेदेव किंवा यूप अवशिष्ट यूप; छंदः—३–७ अनुष्टुभ, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. हे वनस्पते, यज्ञांत भक्त लोक तुला तुपाच्या आहुति देतात. जरी तूं वर असशील किंवा पृथ्वीच्या मांडीवर रहात असशील तरी तूं आम्हांला धन दे.

२. हे यूपा, प्रज्वलित अग्नीच्या पूर्वभागीं समृद्ध व चांगल्या मुलाबाळांनीं युक्त असें अन्न देणारा तूं आमच्या शत्रूंचा नाश करून आम्हांला मोठें ऐश्वर्य दे.

३. हे वनस्पते, पृथ्वीवर यज्ञांत तूं उभारला जा. चांगला तयार केलेला तूं यज्ञ करणाऱ्याला अन्न दे.

४. बळकट, चांगली दोरी बांधलेला असा यूप तयार आहे. तो तयार झाल्यावर चांगला होतो. त्याला विचारी व ज्ञाते देवभक्त उभा करतात.

५. तयार केलेला यूप मनुष्यांनीं गजबजलेल्या यज्ञात सुशोभित होऊन चांगले दिवस दाखवतो. कर्म करणारे ज्ञाते लोक त्याला बुद्धिपूर्वक शुद्ध करतात. देवभक्त स्तोता त्याची स्तुति करतो.

६. हे वनस्पते, देवभक्त लोक ज्यांना पुरतात. त्या तुला कुऱ्हाडीनें तोडलें. ते झकझकीत लांकडाच्या तुकड्याप्रमाणें उभे असणारे यूप आम्हांला मुलाबाळांसहित धन देवोत.

७. पृथ्वीवर छेदून तयार केलेले जे यूप ऋत्विजांनीं पुरले ते यज्ञसाधक यूप यज्ञांत आम्हांला उत्कृष्ट संपत्ति देवोत.

८. चांगली स्तुति केलेले द्यावापृथ्वी, विस्तीर्ण अन्तरिक्ष, आदित्य, रुद्र, वसु हे सर्व देव एकमतानें यज्ञाचें संरक्षण करोत. आणि यज्ञाचा ध्वज (यूप) उंच करोत.

९. झुळझुळीत वस्त्रें पांघरणारे, साळलेले व तयार केलेले यूप हंसाप्रमाणें आमच्याकडे आले आहेत. ज्ञात्यांनीं अग्नीच्या पूर्वभागीं उभारलेले तेजस्वी यूप देवांचें स्थान प्राप्त करतात.

१०. तासलेले, आणि साफ केलेले यूप शृंगी प्राण्याच्या शिंगासारखेच दिसतात. यज्ञांत ऋत्विजांची स्तुति ऐकणारे युद्धांत आमचें संरक्षण करोत.

११. हे वनस्पते, तूं शेंकडो फांद्यांनीं वाढ. आम्हीहि हजार शाखांनीं वृद्धिंगत होऊं. कारण, तुला ह्या तीक्ष्ण कुऱ्हाडीनें मोठ्या ऐश्वर्याला चढविलें आहे.

सूक्त नववें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–अग्नि; छंदः—१–८ बृहती, ९ त्रिष्टुभ.

१. हे अग्ने, आम्ही मित्रलोक उदकापासून उत्पन्न झालेल्या, धनवान, सुंदर कांतीच्या, संरक्षक आणि उपद्रवरहित अशा अग्नीची साहाय्य मिळावें म्हणून प्रार्थना करतों.

२. हे अग्ने, अरण्यें इच्छिणारा तूं जेव्हां मातृभूत

उदकांकडे गेलास तें तुझें जाणें आम्हांला सहन झालें नाहीं. कारण तूं दूर असूनही येथें असतोस.

३. तूं लांकडे प्राप्त केली आहेस म्हणून तूं प्रसन्न आहेस. ज्यांचे तुझ्याशीं सख्य असते त्यापैकीं कांहीं पुढें जातात आणि कांहीं तुझी उपासना करीत राहतात.

४. आपले शत्रु व आपल्या मार्गांत सदोदित येणारीं विघ्नें यांचा परिहार करणाऱ्या अग्निदेवाचा चिरंतन देवांनीं पाण्यांत लपलेल्या सिंहाप्रमाणें शोध लावला.

५. मातरिश्वानें अशा प्रकारें गुप्त झालेल्या अग्नीला स्वच्छंदानें भटकणाऱ्या मुलाप्रमाणें दुरून मंथन करून देवाकरतां आणलें.

६. हे हवि वाहून नेणाऱ्या, अत्यंत तरुण असणाऱ्या, मानवहितकर्त्या अग्ने, ज्या अर्थी तुझ्या पराक्रमामुळें सर्व यज्ञांचें तूं संरक्षण करतोस म्हणून देवांकरतां मर्त्यांनीं तुला उचलून घेतलें आहे.

७. हे अग्ने, तुझीं कृत्यें कल्याण करणारीं असून अज्ञांनाही तीं पूजा करावयास लावतात. पहा हे अग्ने, संध्याकाळीं तुला प्रदीप्त केल्यावर पशुहि तुझी उपासना करूं लागतात.

८. हे ऋत्विजांनो, यज्ञास शोभा आणणाऱ्या पवित्रकान्ति आणि सर्वत्र भरलेल्या अग्नीस आहुति द्या. चलाख, सदा तरुण, प्रशंसनीय अशा अग्निदेवाची ताबडतोब उपासना करा.

९. तीन हजार तिनशें एकूण चाळिस देवांनीं अग्नीची उपासना केली. त्यांनीं त्याला घृतांनीं सिंचित केलें. त्याकरतां दर्भासन पसरलें, नंतर त्यावर देवांनीं त्याला नेऊन बसविलें.

सूक्त दहावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–अग्नि; छंदः–उष्णिह्.

१. हे अग्ने, ज्ञाते लोक सर्व लोकांचा सम्राट् असणाऱ्या तुला यज्ञांत प्रज्वलित करतात.

२. हे अग्ने, यज्ञांतील ऋत्विज आणि होता असणाऱ्या तुला सर्व लोक स्तवित असतात यज्ञाचा संरक्षक असणारा तूं आपल्या घरांत प्रदीप्त हो.

३. हे अग्ने, जो सर्वज्ञ अशा तुला समिधा देतो तो पराक्रमी पुत्र प्राप्त करतो आणि त्याची भरभराट होते.

४. यज्ञांचा ध्वज आणि सप्त होत्यांनीं हवि दिलेला अग्नि भक्ताकरतां देवांच्यासह येवो.

५. हे स्तोत्यांनो, ज्ञात्यांचें तेज धारण करणाऱ्या, विधात्या आणि देवांना बोलावणाऱ्या अग्नीकरतां मोठें प्राचीन स्तोत्र म्हणा.

६. ज्या अर्थी प्रशंसनीय अग्नि उत्पन्न झाला आहे, जो मोठ्या धनधान्य समृद्धीकरतां दर्शनीय आहे, त्या अग्नीस आमचीं स्तोत्रें वृद्धिंगत करोत.

७. हे अग्ने, यज्ञांत तूंच पूजार्ह आहेस. तूंच भक्ताकरतां देवांना संतुष्ट कर. देवांना बोलावणारा आणि आनंददायक असणारा तूं शत्रूंचा नाश करून विशेष शोभतोस.

८. हे पावक अग्ने, तो तूं आम्हाला तेज आणि सामर्थ्य यांनीं युक्त असणारें धन दे. स्तोत्यांचें कल्याण करण्याकरतां त्यांच्या तूं अत्यंत नजीकचा हो.

९. हे अग्ने, जागरूक व स्तुति करणारे ज्ञाते आम्ही हविर्वाहक, अमर आणि सामर्थ्यानें वृद्धिंगत होणाऱ्या तुला प्रदीप्त करतों.

सूक्त अकरावें.

ऋषिः—विश्वामित्र, देवता–अग्नि; छंद–गायत्री.

१. तो यज्ञाचें अवलोकन करणारा, पुढें स्थापन केलेला होता अग्नि सतत यज्ञ ध्यानांत घेतो.

२. तो हवि वाहून नेणारा, अमर, तत्पर दूत आणि अन्नानें वृद्धिंगत होणारा अग्नि स्तुति केल्यानें प्राप्त होतो.

३. यज्ञाचा ध्वज, पुरातन असा तो अग्नि बुद्धीनें सर्व ध्यानांत घेतो. याचें तेज अंधारातून वाचविणारें आहे.

४. पुरातन कालापासून विख्यात, सर्वज्ञ व बलपुत्र अग्नीला देवांनीं हवि वाहणारा केले.

५. अविनाशीं, लोकांचा अग्रणी, त्वरायुक्त अग्नि रथासारखा सदोदित नवा आहे.

६. युद्ध करणाऱ्या सर्वांचा पराभव करणारा, देवांचा पोषक, अविनाशी आणि अत्यंत कीर्तिमान असा अग्नि आहे.

७. हवि देणारा मर्त्य अग्नीमुळें अन्न प्राप्त करतो आणि पवित्रकान्ति अग्नीपासून घर मिळवतो.

८. बुद्धि उत्पन्न झालेले ज्ञाते असें आम्ही स्तोत्रांच्यामुळें सर्व तऱ्हेची संपत्ति प्राप्त करतो.

९. हे अग्ने, सर्व उत्कृष्ट संपत्ति आम्ही युद्धांत प्राप्त करूं. कारण, सर्व देव तुझ्यांत प्रविष्ट झाले आहेत.

सूक्त बारावें.

ऋषिः—विश्वामित्र. देवता–इंद्राग्नी; छंदः—गायत्री.

१. हे इंद्रा व हे अग्ने, आम्ही स्तोत्रें म्हणून तयार केलेल्या ह्या सोमरसाकडे तुम्ही स्वर्गावरून या. आणि आम्ही बुद्धिपूर्वक इच्छा केलेले तुम्ही सोम प्या.

२. हे इंद्राग्नींनो, तुमच्या स्तोत्याच्या हा उत्तेजक सोम तुम्हा दोघाकडे येत आहे. ह्या स्तुतीसह तुम्ही हा मधुर सोम प्या.

३. सोमाच्या प्रेरणेनें मी कवींच्या इच्छा पूर्ण करणाऱ्या तुम्हाला भजतो. सोमानें इंद्राग्नी तृप्त होवोत.

४. शत्रूंचा नाश करणाऱ्या, वृत्राचा वध करणाऱ्या, विजयी आणि उदार अशा इंद्राग्नीचा आम्ही धांवा करीत आहोंत.

५. हे इंद्राग्नींनो, सामगायन करणारे आणि स्तोत्रें म्हणणारे स्तोते तुमचें अर्चन करीत आहेत. मीहि अन्न लाभाकरतां तुमची उपासना करीत आहें.

६. हे इंद्राग्नीनो, दासांच्या ताब्यांत गेलेली नव्वद नगरें एकाच हल्ल्यानें तुम्ही एकदम धुळीस मिळविलीं.

७. हे इंद्राग्नींनो, स्तोत्रें यज्ञकर्माच्या मार्गाला अनुसरून तुमच्याकडे येत आहेत.

८. हे इंद्राग्नींनो, तुमचें सामर्थ्य आणि अन्न यांचें साहचर्य आहे. पाऊस पाडण्याचें सामर्थ्य तुमच्यांतच आहे.

९. हे इंद्राग्नीनो, स्वर्गप्रकाशक असणारे तुम्ही युद्धांत नटलेले असता. तुमचें तें प्रसिद्ध सामर्थ्य तेव्हां प्रगट होतें.

सूक्त तेरावें.

ऋषिः—ऋषभ वैश्वामित्र; देवता–अग्नि; छंदः—अनुष्टुभ.

१. हे स्तोत्यांनो, तुमच्या ह्या अग्निदेवाकरतां उत्कृष्ट स्तोत्र म्हणा. तो अग्नि देवांसह आमच्याकडे येवो.

२. द्यावापृथ्वी ज्याच्या ताब्यांत आहे, रक्षण करणारे देव ज्याचें सामर्थ्य घेतात, हविर्युक्त लोक त्याचीच स्तुति करतात. धन इच्छिणारे लोक साहाय्याकरतां त्याच्याकडेच जातात.

३. हा ज्ञाता अग्नि ह्या मानवांचा नियन्ता आहे. हा यज्ञांचा नियन्ता आहे. तो उदार आणि धन देणारा आहे. अशा त्या अग्नीची तुम्ही सेवा करा.

४. तो आम्हांला सुखकारक घरें उपासना करण्याकरतां देवो. कारण आम्हा लोकांकरतां स्वर्गांतील किंवा अन्तरिक्षांतील धन तोच वृद्धिंगत करणारा आहे.

५. स्तुति करणारे लोक तेजस्वी, अपूर्व होता आणि लोकांचा लोकाधिपति अशा अग्नीला ह्याच्या प्रशस्त स्तोत्रांनीं प्रज्वलित करतात.

६. तसेंच हे अग्ने, आमच्या स्तोत्राचें तूं संरक्षण कर. देवांना अवश्य घेऊन येणारा तूं आमच्या गाण्यांचें संरक्षण कर. मरुतांनीं वृद्धिंगत केलेला आणि हजारानीं संपत्ति देणारा तूं आमचें सुख वृद्धिंगत कर.

७. हे अग्ने, हजारांनीं युक्त, मुलाबाळांनीं युक्त, समृद्धियुक्त असें तेजस्वी कधींहि क्षीण न होणारे आणि सामर्थ्यसंपन्न असें धन आम्हांला तात्काळ दे.

सूक्त चवदावें.

ऋषिः—ऋषभ; देवता–अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. होता, आनंददायक, सत्य, यज्ञ करणारा, अत्यंत ज्ञाता व कर्ता असा तो अग्नि यज्ञांत विराजत आहे. विद्युद्रथ, बलपुत्र व ज्वाला हेच ज्याचे केश आहेत असा अग्नि आपलें तेज विस्तीर्ण अन्तरिक्षांत पसरीत आहे.

२. हे यज्ञयुक्त अग्ने, तुझ्याशीं मी नमस्कारपूर्वक भाषण करीत आहें. हे बलयुक्त अग्ने, ज्ञात्या अशा तुझ्याकरतां केलेलें स्तोत्र तूं ग्रहण कर. हे यज्ञार्ह अग्ने, ज्ञाता असा तूं ज्ञात्या देवांना घेऊन ये. आणि आमचें संरक्षण करण्याकरतां दर्भावर बैस.

३. हे अग्ने, अन्नसमृद्ध असणाऱ्या अहोरात्री तुझ्याकडे येवोत. तूं वायूमार्गानीं ये. कारण, त्या पुरातन अग्नीला भक्त हवि अर्पण करतात, आमच्या घरांत अहोरात्र रथांतल्या लागून असणाऱ्या बैठकीप्रमाणें बसोत.

४. हे बलवन अग्ने, वरुण, मित्र आणि सर्व मरुत तुझी सुखानें पूजा करतात. म्हणून हे बलपुत्र अग्ने, सर्व प्रेरक असणारा तूं लोकांना उद्देशून आपले किरण पसरीत तेजानें युक्त आहेस.

५. हे अग्ने, उताणा हात केलेले आम्ही नमस्कार करून आज सुंदर हवि अर्पण करीत आहोंत. यागतत्पर मनानें तूं तो देवांना पोंचीव. तसेंच ज्ञाता असणारा तूं सतत चालूं असणाऱ्या स्तोत्रानें देवांची पूजा कर.

६. हे बलपुत्र अग्ने, तुझ्या भक्ताला तुझे अनेक प्रकारें साहाय्य होतें आणि समृद्धि प्राप्त होते. हे अग्ने, तूं आम्हांला हजारांनीं संपत्ति दे. तसेंच निष्पाप भाषणानें खरा वागणारा पुत्र मला दे.

७. हे बलयुक्त व सर्वज्ञ अग्ने, मर्त्य लोक तुझ्याकरतां हीं कर्में करीत आहेत. तूं सर्व समृद्ध लोकांचा आहेस हें ध्यानांत घे. हे अमर अग्ने, तूं त्या हवींचा आस्वाद घे.

सूक्त पंधरावें.

ऋषिः--उत्कील कतगोत्रोत्पन्न; देवता-अग्नि; छंदः-त्रिष्टुभ.

१. हे अग्ने, विस्तीर्ण तेजानें प्रज्वलित झालेला तूं शत्रूंना, राक्षसांना आणि रोगांना नष्ट कर. अत्यंत सुखदायक, थोर आणि सहज बोलावता येणाऱ्या अग्नीच्या सुखदायक अनुष्ठानांत मी असावें.

२. हे अग्ने, तूं हीं उषा उजाडल्यावर आमचा हो. तूं सूर्य उगवल्यावर आमचा संरक्षक हो. हे ज्वालांनीं चांगला उत्पन्न झालेल्या अग्ने, पिता पुत्राचें करतो त्याप्रमाणें माझ्या अविनाशी स्तोत्राचें तूं ग्रहण कर.

३. हे कामपूरक अग्ने, लोकांच्यावर नजर ठेवणारा व रात्रीं प्रकाशित होणारा तूं अनेक ज्वालांनीं प्रकाशित हो. आम्हांला पार ने आणि आमचें संरक्षण कर. हे अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, आम्हांस धनसंपन्न कर.

४. हे अग्ने, अपराजित आणि बलिष्ठ असणारा तूं ऐश्वर्य जिंकून सर्व शत्रूंचीं नगरें जाळून टाक. हे सर्वज्ञ नेत्या, तूं संरक्षक मुख्य यज्ञाचा नायक हो.

५. हे स्तोत्या अग्ने, बुद्धिपूर्वक प्रज्वलित झालेला तूं देवांकरतां अनेक अभ्यंग कर्में कर. हे अग्ने, धनवाहक रथाप्रमाणें थांबलेला तूं आमचे हवि वाहून ने. आणि द्यावापृथ्वी नीटनेटक्या कर.

६. हे बलिष्ठा, तूं आमचा उत्कर्ष कर आणि आम्हांला ऐश्वर्य दे. हे देवा, कान्तीनें चमकणारा तूं देवांसहित द्यावापृथ्वींना आम्हांला इष्ट फल देणाऱ्या कर. मर्त्यांची दुर्बुद्धि आम्हांला न कवटाळो.

७. हे अग्ने, तुझा धांवा करणाऱ्याला तूं सुपीक जमीन आणि गाईंची समृद्धि दे. आमचे पुत्रपौत्र वंशवृद्धि करणारे होवोत. हे अग्ने, तुझी कृपा आमच्यावर होवो.

सूक्त सोळावें.

ऋषिः—उत्कील; देवता-अग्नि; छन्दः—विषम-बृहती, सम-सतोबृहती.

१. हा अग्नि पराक्रमी पुत्रांनीं युक्त असणाऱ्या ऐश्वर्याचा धनी आहे. तो चांगल्या मुलाबाळांनीं युक्त आणि विपुल गाईंनीं युक्त असणाऱ्या संपत्तीचा ईश्वर आहे. तो संग्रामाचा अधीश्वर आहे.

२. हे वीर मरुतांनो, ज्याच्यापाशीं सुखवर्धक संपत्ति आहे, त्या ह्या समृद्धिकारक अग्नीला तुम्ही भजा. जे युद्धांत दुर्बुद्धि शत्रूंना जिंकतात आणि दररोज शत्रूंना ठार करीत असतात ते तुम्ही अग्नीला भजा.

३. हे अग्ने, तो तूं आम्हांला धनसमृद्ध कर. हे बहुधन व उदार अग्ने, मुलेबाळें, चांगला पराक्रम, निरोगीपणा आणि सामर्थ्ययुक्त ऐश्वर्य पुष्कळ दिवस टिकेल असें आम्हांस दे.

४. जो सर्व जगाचा कर्ता आहे, जो सर्व जगांत व्यापून आहे, तो हवि वाहून नेणारा आणि लोककर्ता अग्नि देवांच्याकडे आमची सेवा पोंचवो. तो अग्नि स्तोत्यांच्याकडे जातो, तो पराक्रमी युद्धांत जातो, आणि भक्तांचें गाणें चालूं असेल तेथें जातो.

५. हे बलपुत्र अग्ने, आम्हांला तूं दरिद्री करूं नकोस, आम्हांला तूं निपुत्रिक करूं नकोस, आम्हांला गोसंपत्तिहीन करूं नकोस आणि आम्हांला निंद्य करूं नकोस. तसेंच आम्हांपासून द्वेष्ट्यांना दूर कर.

६. हे भाग्यशाली अग्ने, तूं यज्ञांत मुलाबाळांनीं युक्त असणाऱ्या थोर संपत्तीचा धनी आहेस. हे बहुधन अग्ने, तूं आम्हांला सुखकारक आणि कीर्तिप्रद असें मोठें ऐश्वर्य दे.

---

४ टीपः—प्रथमस्य यज्ञस्य—ज्योतिष्टोम यज्ञाचा असें सायणाचार्य म्हणतात. कारण, 'एष वाव प्रथमो यज्ञो यज्ञानां यज्ज्योतिष्टोम' असें वेदांत म्हटलें आहे.

सूक्त सत्रावें.

ऋषिः—कत वैश्वामित्र; देवता-अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ.

१. सर्वाधार अग्नि प्रथम प्रज्वलित केल्यावर सर्वश्रेष्ठ, ज्वालारूपी केश असलेला, तूपाचें वस्त्र पांघरलेला, पावक आणि सुयज्ञ असा देवांना हवि पोंचविण्याकरतां तूपादिकांनीं प्रज्वलित केला जात आहे.

२. हे अग्ने, जसा तूं पृथ्वीला हवि अर्पण केलास, हे सर्वज्ञा, ज्ञाता असणारा तूं जसा द्युलोकाला हवि अर्पण केलास, तसाच तूं ह्या हवीनें देवांना तृप्त कर. मनूच्या यज्ञाप्रमाणें आमचा हा यज्ञ पार पाड.

३. हे सर्वज्ञा, तुझी जमण्याचीं साधनें तीन आहेत. हे अग्ने, तुला जन्म देणाऱ्या उषादेवता तीन आहेत. त्यांच्या साहाय्यांनीं तूं देवांना हवि पोंचीव. ज्ञाता असा तूं यजमानाला सुख देणारा हो.

४. हे सर्वज्ञ अग्ने, देखण्या, प्रज्वलित आणि प्रशंसनीय असणाऱ्या तुला तुझी स्तुति करून आम्ही पूजित आहोंत. देवांनीं अमृताचें मूलस्थान, हवि वाहून नेणाऱ्या व तत्पर अशा तुला दूत केलें.

५. हे अग्ने, जो तुझ्यापेक्षांहि पूर्वींचा, अतिशय यज्ञ करणारा, दोन ठिकाणीं (मध्यम व उत्तम) बसून हवीमुळें सुख देत असतो, तो ज्ञाता असणारा तूं त्याच्या इच्छेनुसार यज्ञ पोंचीव. आणि आमचा हा यज्ञ देव सेवन करतील असें कर.

सूक्त अठरावें.

ऋषिः—कत वैश्वामित्र, देवता-अग्नि; छंदः-त्रिष्टुभ.

१. हे अग्ने, मित्र मित्राला असतो किंवा आईबाप मुलाला असतात त्याप्रमाणें तूं आमच्या उपासनेवर प्रसन्न आणि साधक हो. कारण, मनुष्यांचा मनुष्य फार द्रोह करतात. म्हणून तूं आमच्यावर चालून येणाऱ्या शत्रूंना जाळून टाक.

२. हे अग्ने, तूं जवळच्या शत्रूंना चांगल्या प्रकारें त्रास दे. तसेंच हवि न देणाऱ्या परक्यांच्या इच्छा नष्ट करून टाक. हे सर्वव्यापक अग्ने, ज्ञाता असणारा तूं अज्ञांना त्रास दे. म्हणून तुझ्या अजर आणि सर्वगामी ज्वाला सर्वत्र पसरोत.

३. हे अग्ने, अनेक इच्छा बाळगणारा मी वेग आणि बल उत्पन्न व्हावें म्हणून लांकडे आणि घृत यांसह हवि अर्पण करतों. स्तोत्रानें स्तुति करणारा मी जितकें धन घेण्यास समर्थ आहें तितकें धन मला दे. ही स्तुति शेंकड्यांनीं संपत्ति घेण्यास योग्य कर.

४. हे बलपुत्र अग्ने, तूं तेजानें प्रज्वलित हो. स्तुति केलेला तूं स्तुति करणाऱ्या आम्हा विश्वामित्रांना संपत्तियुक्त अन्न दे. आरोग्य दे आणि निर्भयपणा दे. आम्ही तुझें शरीर अनेकवेळा प्रज्वलित करीत आहोत.

५. हे उदार दात्या, तूं आम्हाला धनांपैकीं उत्तम धन दे. हे अग्ने, जेव्हां तूं प्रज्वलित होतोस तेव्हांच तूं धन देणारा होतोस. तूं भाग्यशाली स्तोत्याच्या घरीं पसरलेले हात आणि स्वरूपें संपत्ति देतील अशा रीतीनें धारण करतोस.

सूक्त एकूणिसावें.

ऋषिः—गाथिन्; देवता-अग्नि; छंदः—त्रिष्टुभ,

१. स्तुति करणारा, मेधावी, सर्वज्ञ आणि अमूढ अशा अग्नीला यज्ञांत होता म्हणून मी स्वीकारतों. तो अत्यंतकुशल यज्ञकर्ता आमच्याकरतां देवांना पूजो. तो अग्नि आम्हांला धन आणि ऐश्वर्य देण्याकरतां हवि स्वीकारो.

२. हे अग्ने, हवींनीं भरलेली, उदार आणि हवि देणारी पळी तुला मी अर्पण करीत आहे. देवांना वाढविणारा तो संपत्तीच्या देणग्या घेऊन उजव्या बाजूनें आमच्या यज्ञाचा आश्रय करो.

३. हे अग्ने, तुझें साहाय्य असलेला मनुष्य अत्यंत तल्लख बुद्धीचा होतो, त्याला तूं चांगल्या मुलाबाळांनीं युक्त असणारी संपत्ति दे. हे अग्ने, आम्ही लोकाधिक संपत्तीच्या वैभवांत असावें. तुझी चांगली स्तुति करणारे आम्ही धनवान् व्हावें.

४. हे अग्ने, देवांचे यज्ञ करणारे लोक तुझे ठिकाणीं पुष्कळ ज्वाला उत्पन्न करतात. तो तूं देवांना घेऊन ये. कारण, हे अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, तूं स्वर्गीय देवांना हवन करीत असतोस.

५. हे अग्ने, यज्ञ करण्याकरतां बसलेल्या ऋत्विजांनीं यज्ञांत देवांना बोलावणाऱ्या तुला आहुति दिल्या. तो तूं आमचा संरक्षण करणारा जागृत हो. आमच्या मुलाबाळांना अन्न दे.

सूक्त विसावें.

ऋषिः--गाथिन्; देवता-१.५ विश्वेदेव, अवशिष्ट अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. वन्हि उजाडल्यावर अग्नि, उषा, दोघे अश्वि आणि दधिक्रा यांना सामगान करून बोलावतो. यज्ञाची इच्छा करणारे, एकत्र असणारे आणि अत्यंत तेजस्वी असणारे देव आमचा धांवा ऐकोत.

२. हे अग्ने, तुझीं तीन अन्नें आणि तीन स्थानें आहेत. हे सत्योत्पन्न अग्ने, तुझ्या पोषक असणाऱ्या तीन जिव्हा आहेत. हे अग्ने, देवांना इष्ट असणारी तुझी तीन शरीरें आहेत, त्यांनीं तूं न चुकता आमच्या स्तोत्राचें संरक्षण कर.

३. हे सर्वज्ञ व अन्नयुक्त अग्निदेवा, अमर असणाऱ्या तुझ्या विभूति अनेक आहेत. हे विश्वसंतर्पका आणि हे स्तोतृबंधो, कपटी लोकांचीं जीं कपटें तुझ्यावर उपयोजलीं जातात (तीं तूं जाणतोस)

४. ऋतूंना प्रवृत्त करणारा सत्यकर्मा अग्निदेव सूर्याप्रमाणें देवांचा नायक आहे, तो सर्वज्ञ, सनातन, वृत्रहन्ता अग्नि स्तुति करणाराला सर्व संकटांतून पार पाडतो.

५. मी ह्या यज्ञांत दधिक्रा, अग्नि, उषादेवी, बृहस्पति, सवितृदेव, अश्वि, मित्रावरुण, भग, वसु, रुद्र आणि आदित्य ह्यांना बोलावतों.

सूक्त एकविसावें.

ऋषिः--गाथिन् कौशिक; देवता-अग्नि; छंदः--१.४ त्रिष्टुभ, २.३ अनुष्टुभ, ५ सतोबृहती.

१. हे सर्वज्ञ अग्ने, ह्या हवींचा स्वीकार कर आणि देवांना हा यज्ञ पोंचीव. हे देवांना बोलावणाऱ्या अग्ने, तूं बसून प्रथम मेदाचे आणि तूपाचे थेंब भक्षण कर.

२. हे पावक अग्ने, ह्या यज्ञांत तुला भक्षण करण्याकरतां घृतयुक्त मेदाचे थेंब गळत आहेत. त्यामुळें तूं आम्हांला श्रेष्ठ धन दे.

३. हे फलप्रद अग्ने, ज्ञात्या अशा तुझ्याकरतां तुपाचे थेंब गळत आहेत. श्रेष्ठ ऋषि असा तूं प्रज्वालित केला जात आहेस, तूं आमच्या यज्ञाचा संरक्षक हो.

४. हे सततगामी बलवान अग्ने, तुजकरतां मेदाचे आणि घृताचें थेंब गळत आहेत. कवींनीं प्रशंसा केलेला तूं मोठ्या तेजासह ये आणि हे बुद्धिमन्ता, हवि सेवन कर.

५. हे अग्ने, तुझ्याकरतां (पशूच्या) मध्यभागांतून अत्यंत बलशाली मेद बाहेर काढला आहे. आम्ही तो तुला अर्पण करतों. हे उदारा, तुझ्या अंगावर थेंब गळत आहेत. ते तूं प्रत्येक देवांना दे.

सूक्त बाविसावें.

ऋषिः--गाथिन् कौशिक; देवता-पुरीष्य अग्नि, छंदः--४ अनुष्टुभ, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. हा तो अग्नि होय कीं, तृषित इंद्र ज्याठिकाणीं तयार असलेला सोम प्राप्त करतो. हे सर्वज्ञ अग्ने, वेगवान घोड्याप्रमाणें हजारांनीं संपत्ति देणाऱ्या तुझी स्तुति केली जात आहे.

२. हे अग्ने, जें तुझें तेज द्युलोकांत आहे, जें पृथ्वीवर आहे, जें ओषधींत आहे, जें उदकांत आहे आणि हे यज्ञार्ह, ज्यानें तूं अन्तरिक्षाला विस्तारलेंस, तो तूं तेजस्वी, प्रकाशणारा व लोकद्रष्टा समुद्रासारखा महान आहेस.

३. हे अग्ने, तूं द्युलोकातील उदक प्राप्त करतोस. तूं जे देव स्तुत्य आहेत त्यांची स्तुति करतोस. जीं सूर्याच्यावर उदकें आहेत आणि जीं उदकें सूर्याच्या खालीं आहेत. (त्यांजकडे जातोस)

४. खनन साधनांसह पुरीष्य अग्नि आमचा यज्ञ स्वीकारोत आणि प्रेमळ असणारे तुम्ही आम्हांला विपुल निरोगी अन्न द्यावेत.

५. हे अग्ने, धांवा करणाऱ्या मला सुपीक जमीन आणि गाईनीं भरलेले गोठे दे. आमचीं मुलेंबाळें वंशबुद्धि करणारी होवोंत आणि आमच्यावर तुझी ती कृपा असो.

सूक्त तेविसावें.

ऋषिः—देवश्रवा आणि देववात भारत; देवता-अग्नि; छंदः--३ सतोबृहती, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. मंथन करून निर्माण केलेला, आसनावर यथायोग्य बसलेला, तरुण, ज्ञाता, यज्ञाचा नायक, सर्वज्ञ, नाश पावणाऱ्या अरण्यांत अविनाशी असणारा जो अग्नि आहे तो येथें अमर अन्न देतो.

२. हे अग्ने, भरताचे पुत्र देवश्रवा आणि देववात बलवान आणि धनवान अग्नीला उत्पन्न करते झाले. तर हे अग्ने, तूं विपुल संपत्तीसह येऊन आमच्यावर विशेष लक्ष दे. तूं दररोज आम्हांला अन्न देणारा हो.

३. हे अग्ने, कुलीन, प्रिय आणि पुरातन अशा अग्नीला दहा बोटें मातेचें ठिकाणीं अरणींत निर्माण करती झाली. हे देवश्रवा, दैववात अग्नीचें तूं स्तवन कर, कीं जेणेंकरून तो भक्तजनांच्या ताब्यांत राहील.

४. हे अग्ने, उत्सवाच्या दिवशीं पृथ्वीच्या उच्च स्थानीं इळेवर तुला ठेवतों. हे अग्ने, तूं दृषद्वतीवर, आपयेवर आणि सरस्वतीवर लोकांत समृद्धि करीत प्रकाशित हो.

५. हे अग्ने, धांवा करणाऱ्या मला सुपीक जमीन आणि गाईंनीं भरलेलें उत्कृष्ट गोठे दे. आमचीं मुलेंबाळें वंशवृद्धि करणारीं होवोत. आणि आमच्यावर तुझी ती कृपा असो.

सूक्त चोविसावें.

ऋषिः—विश्वामित्र गाथिन; देवता–अग्नि; छंदः—१ अनुष्टुभ, अवशिष्ट गायत्री

१. हे अग्ने, तूं शत्रूला जिंक, तूं विघ्न करणाऱ्यांना हाकून लाव. दुर्जय असणारा तूं शत्रूंना जिंकून यज्ञ करणाऱ्या यजमानाला वैभव दे.

२. हे अग्ने, यज्ञावर प्रीति करणारा आणि अमर्त्य असा तूं हवीनें प्रज्वलित केला जातोस. आमचा यज्ञ प्रेमानें स्वीकार.

३. हे धांवा केलेल्या बलपुत्र जागरूक अग्ने, तूं संपत्तीसहित येऊन ह्या माझ्या दर्भावर बैस.

४. हे अग्ने, यज्ञांत जे देवांची आराधना करणारे आहेत त्या सर्व तेजस्वी अग्नीसह आमच्या स्तुतीचा स्वीकार कर.

५. हे बलपुत्र अग्ने, हे सर्वज्ञा, लोकांचीं घरें सुशोभित करीत साहाय्याकरतां घरांत तूं प्रज्वलित केला जातोस.

सूक्त पंचविसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–४ इंद्राग्नी, अवशिष्ट अग्नि; छंदः—विराज्.

१. हे अग्ने, तूं द्युचा ज्ञानी पुत्र आहेस आणि पृथ्वीचा सर्वसंपत्तिमान बालक आहेस. तर हे ज्ञात्या अग्ने, तूं देवांना पृथक् पृथक् भज.

२. ज्ञाता अग्नि भक्तांना सामर्थ्य देतो. सर्वांना भूषित करणारा अग्नि देवांना अन्न देतो. हे अन्नवान अग्ने, तो तूं आमच्याकडे देवांना घेऊन ये.

३. सर्वज्ञ, प्रभु आणि अत्यंत आल्हादक असणारा अग्नि अन्न आणि नमस्कार यांनीं सर्वांना उत्पन्न करणाऱ्या देवी द्यावापृथ्वींना प्रकाशित करतो.

४. हे अग्नि, तूं आणि इंद्र सोम तयार करणाऱ्या उपासकाच्या घरीं यज्ञांत या. हे देवांनो, सोम पिण्याकरतां न चुकतां या.

५. हे बलपुत्र सर्वज्ञ अग्ने, नित्य असा तूं साहाय्य करून लोकांचीं घरें सुशोभित करीत अन्तरिक्षांत चमकतोस.

सूक्त सव्विसावें.

ऋषिः—७ परब्रह्म किंवा विश्वामित्र, बाकी विश्वामित्र; देवता–१–३ वैश्वानर अग्नि, ४–६ मरुत्, ७–८ अग्नि किंवा परं ब्रह्म (आत्मा), ९ विश्वामित्रोपाध्याय; छंदः--१–६ जगती, ७–९ त्रिष्टुभ.

१. संपत्तीची इच्छा करणारे आम्ही कुशिक हवि तयार करून आणि स्तोत्रें म्हणून मनःपूर्वक रमणीय अग्नीचा धांवा करीत आहोंत. हा वैश्वानर अग्नि सत्यानुसारी, धन देणारा, रथाधिष्ठित आणि उदार आहे.

२. त्या प्रकाशणाऱ्या वैश्वानराला, प्रशंसनीय मातरिश्वाला, बृहस्पतीला; विद्वान, श्रोता, शीघ्रगामी आणि अतिथि अशा अग्नीला आम्ही रक्षणाकरतां आणि यज्ञाकरतां बोलावीत आहोंत.

३. घोड्याप्रमाणें खिंकाळणारा वैश्वानर अग्नि प्रत्यहीं कुशिकाकडून बोटांनीं प्रज्वलित केला जातो.तो देवांमध्यें जागृत असणारा अग्नि पराक्रमी मुलांनीं युक्त आणि चांगल्या घोड्यांनीं युक्त संपत्ति आम्हाला देवो.

४. (मरुतांचे) अग्निरूपी घोडे जोरानें धांवोत. शोभेकरतां मरुत एकत्र असणाऱ्या ठिपक्याच्या हरिणी जोडोत. सर्व धनसंपन्न आणि अहिंस्य मरुत अत्यंत वर्षाव करणाऱ्या मेघांना हलवोत.

५. अग्नीसारखे कान्तिमान असणारे मरुत सर्व लोकांचे अधिपति आहेत. आम्ही त्यांच्या तेजस्वी व व प्रबळ साहाय्याची अपेक्षा करतो. ते रुद्रपुत्र महागर्जना करणारे, वृष्टिस्वरूप आणि सिंहाप्रमाणें गर्जना करणारे महोदर आहेत.

६. आम्ही चांगल्या स्तोत्रांनीं प्रत्येक संघांत आणि प्रत्येक गणांत अग्नीच्या तेजाची आणि मरुतांच्या बळाची स्तुति करतों. ते मरुत ठिपक्यांच्या हरिणी

घोड्याच्या जागीं जुंपलेले, अविनाशी संपत्तीचे, विद्वान आणि यज्ञांत जाणारे आहेत.

७. मी अग्नि जन्मतः सर्वज्ञ आहें. घृत माझें चक्षु होत. माझ्या तोंडांत अमृत आहे. मी तीन प्रकारचा प्राण आहें. मी अन्तरिक्षांत फिरणारा आहे. मी अविनाशी सूर्य आहें. जो हवि म्हणून आहे तो मी आहें.

८. अग्नि मननीय तेज प्रगट करीत शुद्ध असणाऱ्या तिघापेक्षा (अग्नि, वायु आणि सूर्य ह्यापेक्षां) आपणास शुद्ध करतां झाला. लोकाधारांनीं (अग्नि, वायु आणि सूर्य) आपणांस सर्वश्रेष्ठ आणि रमणीय केले. तो नंतरच द्यावापृथ्वीचें अवलोकन करतो.

९. हे द्यावापृथ्वींनो, शेकडो धारांनीं अखंड असणाऱ्या प्रवाहाप्रमाणें अविच्छिन्न ज्ञाता, पालक अनेक वाक्यांचें मेलन करणारा, आनंदी, सत्यवादी अशा त्या (उपाध्यायाचें) जगांत तुम्ही संरक्षण करा.

सूक्त सत्ताविसावें.

ऋषिः—-विश्वामित्र; देवता–१ अग्नि किंवा ऋतु, अवशिष्ट अग्नि; छंदः—गायत्री

१. हे ऋतूंनो मास, अर्धमास आणि घृताचीनें हवि घेऊन तयार असणारे देव आणि पशु तुमचा यज्ञ करण्यास समर्थ आहेत सुख इच्छिणारे भक्त देवांच्याकडे जातात.

२. ज्ञाता, यज्ञाचें साधन, सुखकारक आणि समृद्ध अशा अग्नीला मी स्तवितों.

३. हे अग्ने, आम्ही हविर्युक्त होऊन दीप्तिमान् अशा तुला येथें ठेवण्याचें सामर्थ्य असलेले आम्ही असावें. आम्ही शत्रूंतून पार पडावें.

४. यज्ञांत प्रज्वलित केला जाणाऱ्या, तेजस्वी ज्वाला असलेल्या, पावक व प्रशंसनीय अग्नीची आम्ही स्तुति करतों.

५. तेजस्वी, अमर, झगझगीत स्वरूपाचा, सुपूजित अग्नि यज्ञाचा वाहक होय.

६. त्या अग्नीला यज्ञ करणारे ऋत्विज स्रुचा पुढें करून अन्तःकरणापासून संरक्षणासाठीं आपल्याकडे वळवितात.

७. तेजस्वी, अमर व होता अग्नि यज्ञाला प्रेरणा देत चातुर्यानें पुढें जातो.

८. यज्ञसंपादक, ज्ञाता व बलवान् अग्नि युद्धांत व यज्ञांत पुढें केला जातो.

९. जो अग्नि कर्मानें श्रेष्ठतेला गेला आहे तो सर्व प्राणिमात्रांना आपल्यांत धारण करतो. दक्षकन्या भूमि पित्याला–अग्नीला धारण करते.

१०. हे बलोत्पन्न अग्ने, हवि इच्छिणाऱ्या अत्यंत तेजस्वी आणि श्रेष्ठ असणाऱ्या तुला दक्षाच्या इळेनें –पृथ्वीनें–धारण केलें.

११. शहाणे भक्त यज्ञ करण्याकरतां वेगवान आणि नियामक अग्नीला हवींनीं प्रज्वलित करतात.

१२. बलपुत्र, द्युलोकापर्यंत प्रकाशणारा आणि कर्तृत्ववान अशा अग्नीची मी यज्ञांत स्तुति करतों.

१३. प्रशंसनीय, नमस्कारार्ह आणि अन्धकाराला नष्ट करून प्रकाशणारा बलिष्ठ अग्नि प्रज्वलित केला जातो.

१४. घोड्याप्रमाणें देवांना वाहून आणणारा बलवान अग्निच प्रज्वलित केला जातो. हविर्युक्त यजमान त्याची स्तुति करतात.

१५. हे बलवान अग्ने, तुज वीराला सामर्थ्यवान् असणारे आम्ही प्रदीप्त करतों. अत्यंत प्रकाशणाऱ्या तुला प्रदीप्त करतों.

सूक्त अठ्ठाविसावें.

ऋषिः—-विश्वामित्र; देवता–अग्नि; छंदः—१–२–६ गायत्री, ३ उष्णिह, ४ त्रिष्टुभ, ५ जगती.

१. हे सर्वज्ञ अग्ने, हे प्रज्ञाधन अग्ने, प्रातःसवनांत तूं आमचे हवि आणि पुरोडाश भक्षण कर.

२. हे अग्ने, तुझ्याकरतां पुरोडाश शिजविला आहे आणि तयार केला आहे. हे अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, तूं स्वीकार.

३. हे अग्ने, काल शिजवलेला आणि आज अर्पण केलेला हवि तूं भक्षण कर. बलपुत्र असणारा तूं यज्ञामध्यें हितकारक आहेस.

४. हे सर्वज्ञ व ज्ञात्या अग्ने, तूं येथें माध्यंदिनसवनांत पुरोडाश भक्षण कर. हे अग्ने, थोर अशा तुझा भाग यज्ञांत ज्ञाते लोक चुकवीत नाहींत.

५. हे बलपुत्र अग्ने, तृतीय सवनांत अर्पण केलेला पुरोडाश तुला आवडो. तसेंच अमर देवांकडे अविनाशी, संपन्न, जागरूक ठेवणारा हा सोम तूं पोंचीव.

६. हे सर्वज्ञ अग्ने, वृद्धिंगत होणारा तूं काल तयार केलेला पुरोडाश भक्षण कर.

सूक्त एकोणतिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता-५ अग्नि किंवा ऋत्विज, अवशिष्ट अग्नि; छन्दः—१.४.१०.१२ अनुष्टुभ, २.३. ५.७.९.१३.१६ त्रिष्टुभ, ६.११.१४.१५ जगती.

१. हें आधिमंथन आहे. प्रजनन तयार केलें आहे. तर ह्या लोकेश्वरीला आण. पूर्वीप्रमाणें आपण अग्नीचें मंथन करूं या.

२. गर्भिणींच्या पोटांत गर्भ व्यवस्थित ठेवलेला असतो. दोन अरणीमध्यें सर्वज्ञ अग्नि व्यवस्थित आहे. अग्नि जागृत असणाऱ्या हविर्युक्त लोकांनीं प्रत्यहीं स्तुति करण्यास योग्य आहे.

३. हे अध्वर्यो, ज्ञाता असणारा तूं उताण्या अरणीवर दुसरा भाग पालथा धर. ती गर्भार राहून बलिष्ठ अग्नीला उत्पन्न करते. त्याचा प्रकाश तांबूस आहे.

४. हे सर्वज्ञ अग्ने, हवि वाहण्याकरतां तुला आम्ही इळेच्या स्थानीं पृथ्वीच्या नाभीवर स्थापन करीत आहोंत.

५. हे ऋत्विजांनो, ज्ञाता, सरळ, अतिशय चतुर, अमर आणि सुंदर अग्नीला तुम्ही उत्पन्न करा. हे लोकहो, अत्यंत सुखदायक, यज्ञाचा ध्वज असणाऱ्या अग्नीला तुम्ही प्रथम उत्पन्न करा.

६. जेव्हां मंथन करून अग्नि उत्पन्न करतात तेव्हां तो तेजस्वी अग्नि प्रबळ घोड्याप्रमाणें अरण्यांत शोभतो. अश्वींच्या धांवणाऱ्या झकझकीत रथाप्रमाणें तो शोभतो. तो दगड आणि गवत जाळून पुढें जातो.

७. ज्याची विश्ववेत्ता व प्रशंसनीय हविर्वाहक म्हणून यज्ञांत स्थापना केली जाते तो अग्नि उपजताच ज्ञाता, बलवान, कवींनीं प्रशंसा केलेला आणि उदार म्हणून प्रकाशत असतो.

८. हे होत्या अग्ने, तूं स्वतःच्या स्थानीं बैस. यज्ञ करणाराला पुण्यवानांच्या स्थानीं बसव. देवांचें संरक्षण करणारा तूं देवांना हवीनें यजन कर. हे अग्ने, यजमानाला विपुल अन्न दे.

९. हे मित्रांनो, तुम्ही धूमयुक्त बलवानाला उत्पन्न करा. सामर्थ्य क्षीण न झालेले तुम्ही (मंथन) युद्धाला चला. हा अग्नि थोर योद्धा असून शत्रुसैन्याचा पराजय करणारा आहे. त्याच्या साहाय्यानें देवांनीं दस्यूंचा पराजय केला.

१०. हे अग्नि, तूं जेथून प्रकाशित होतोस तें तुझें लांकूड स्थान आहे. तें जाणून तूं बैस. आणि आमच्या स्तोत्राची भरभराट कर.

११. अरणींत गर्भरूपानें असणाऱ्या अग्नीला तनूनपात् म्हणतात. तो बलशाली जेव्हां उत्पन्न होतो तेव्हां तो नराशंस होतो. जेव्हां तो आपलें तेज अन्तरिक्षांत निर्माण करतो तेव्हां तो मातरिश्वा होतो. हा जोरानें जाऊं लागला कीं वाऱ्याची उत्पत्ति होते.

१२. हे अग्ने, चांगलें मंथन करून काढलेला आणि चांगल्या प्रकारें स्थापन केलेला असा तूं आमचे यज्ञ चांगलें कर. देवभक्ताकरतां देवांचें यजन कर.

१३. अक्षय, संरक्षक, दृढदंत आणि अमर अग्नीला मर्त्यांनीं उत्पन्न केले. हा पुत्र जन्मलेला पाहून दहा अंगुलिरूप बहिणी घोष करतात.

१४. जरी पृथ्वीच्या मांडीवर मुख्य स्थानीं तो प्रकाशित झाला आहे तरी तो सप्त होते असलेला अग्नि प्राचीन कालापासून प्रकाशत आहे. बलवानाच्या पोटांतून जरी तो उत्पन्न झाला आहे तरी रमणीय असणारा अग्नि केव्हांहि निजत नाहीं.

१५. मरुतांच्या सामर्थ्याप्रमाणें ब्रह्मयाच्या आधीं उत्पन्न झालेले आणि शत्रूंशीं युद्ध करणारे कुशिक सर्वच जाणतात. कुशिक हवीसह स्तोत्र म्हणतात आणि प्रत्येक जण आपल्या घरीं अग्नि प्रदीप्त करतात.

१६. हे देवांना बोलावणाऱ्या व ज्ञात्या अग्ने, ह्या चालूं असलेल्या यज्ञांत तुला आज येथें आम्ही बोलावीत आहोंत. तर तूं सतत देवांकडे जा आणि देवांना शान्त कर. ज्ञानी आणि ध्यानांत घेणारा तूं आमच्या सोमाकडे ये.

---

१ टीप:—अधिमंथन म्हणजे अरणींत अग्नि उत्पन्न करण्याकरतां असलेला लांकडाचा तुकडा. प्रजनन म्हणजे दर्भाची जुडी. तिचा उपयोग अरणीतून अग्नि उत्पन्न झाल्यावर जास्त वाढविण्यास करतात. अरणीला येथें विश्पत्नी लोकेश्वरी असें म्हटले आहे. कारण, तिच्यापासून अग्नि उत्पन्न होऊन सर्वांच्या उपासनादि क्रिया चालतात. अग्नि उत्पन्न करण्याकरतां अरणीचा उपयोग करीत असत. आणि मंथन करावें लागे वगैरे प्रकार अनेक ठिकाणीं स्पष्ट उल्लिखित आहेत. पुढल्याच ऋचेंत अरणीचा उल्लेख आहे.

११. टीप:—येथें तनूनपात्, नराशंस आणि मातरिश्वा अग्नीची व्याख्या आली आहे.

सूक्त तिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, तुझें सोमयाजी मित्र तुझी इच्छा करीत आहेत. सोम पिळीत आहेत आणि हविरन्नें धारण करीत आहेत. लोकांची ते निंदा सहन करतात, कारण, तुझ्याशिवाय दुसरा कोण असा प्रख्यात आहे.

२. हे अश्वयुक्ता, तुला अत्यंत दूर असणारीं स्थानेंहि दूर नाहींत. तूं आपल्या दोन घोड्यांनीं लवकर ये. हीं सवनें तुज प्रबळ वीराकरतां केलीं आहेत. आणि अग्नि प्रज्वलित करून ग्रावे जोडले आहेत.

३. हे कामपूरक इंद्रा, तूं सुंदर शिरस्त्राण घातलेला, धनवान, संरक्षक, महागण, महापराक्रमी असा भयंकर आहेस. तूं जेव्हां झालास तेव्हां लोकांत जे पराक्रम केलेंस ते कोठें आहेत ?

४. हे इंद्रा, तूं एकटाच अढळांनाहि ढळवणारा आणि शत्रूंना ठार करणारा आहेस. तुझें कार्य करण्याकरतांच पर्वत आणि द्यावापृथ्वी जणूंकाय निश्चल उभे राहिले आहेत.

५. हे पूरुहूता, सामर्थ्ययुक्त असणारा तूं एकटाच शत्रुघातक असून न भिण्याविषयीं आश्वासन देता झालास तें अगदीं खरें आहे. हे इंद्रा, ह्या अपार द्यावापृथ्वी जेव्हां तूं धरल्यास तेव्हां हे धनवन्ता, तुझ्या त्या मुठींतच राहिल्या.

६. हे इंद्रा, तुझा रथ दोन घोड्यांनीं लवकर येवो. तुझें वज्र शत्रूंना मारीत येवो. तूं तुझ्यावर चालून येणाऱ्या शत्रूंना ठार कर. बाजूंनीं येणाऱ्या शत्रूंना ठार कर आणि पळून जाणाऱ्या शत्रूंनाहि ठार कर. आणि तूं सर्व जगभर सत्यधर्माचा प्रसार कर, त्याचा सर्वत्र प्रवेश असो.

७. हे इंद्रा, ज्या मर्त्याला ऐश्वर्यवान असणारा तूं आधार देतोस तो न भोगलेलें ऐहिक ऐश्वर्य भोगतो. हे पुरुहूता, हवि देणारावरची तुझी कृपा कल्याणकारक असते. तुझ्या देणग्या हजारांनीं असतात.

८. हे पुरुहूत इंद्रा, दानूसह असणाऱ्या, त्रासदायक आणि गर्जना करणाऱ्या राक्षसाला हात तोडून तूं ठार मारलेंस. हे इंद्रा, तूं वाढणाऱ्या हिंस्र वृत्राला पाय तोडून सामर्थ्यानें नाहींसें केलेंस.

९. हे इंद्रा, सपाट, चंचल, महान व अपार असणाऱ्या भूमीला स्वतःच्या स्थानीं बसविता झालास. बलवान, इंद्रानें द्यु आणि अन्तरिक्ष यांना स्थिर केलें. तूं उत्पन्न केलेलीं उदकें पृथ्वीवर चहूकडे जावोत.

१०. हे इंद्रा, गाईचा गोठा असा हिंसक वल वज्रप्रहाराच्या पूर्वींच दुभंगला. नंतर इंद्रानें पाणी जाण्याकरतां सुगम मार्ग केलें. नंतर गर्जना करणारें उदक इंद्राकडे जातें झाले.

११. एकाटा इंद्र धनसंपन्न आणि जुळून असणाऱ्या द्यावापृथ्वी भरून टाकतां झाला. हे शूर इंद्रा, रथी असणारा तूं जोडलेले घोडे अन्तरिक्षांतून आमच्याकडे हाकार.

१२. इंद्रानें नेमून दिलेल्या ठरीव दिशा सूर्य प्रत्यही टाकीत नाहीं. तो घोड्यानीं मार्ग चालून जातो नंतरच तो घोडे सोडतो. हा ह्या इंद्राचाच पराक्रम होय.

१३. सर्व लोक रात्र आणि लखलखीत उषा गेल्यानंतर विस्तीर्ण आणि सुंदर सूर्याला पाहूं इच्छितात. जेव्हां उषा गेली तेव्हां महत्त्वानें सूर्याला लोक जाणतात. अशीं इंद्राची चांगलीं कृत्यें पुष्कळच आहेत.

१४. नद्यांत पुष्कळ पाणी उत्पन्न केलें, गाईसारखा प्राणी पक्क दूध धारण करतो, गाईमध्यें सर्व गोडी एकवटली आहे. कारण, तें सर्व इंद्रानें उपभोगाकरतां निर्माण केलें आहे.

१५. हे इंद्रा, तूं प्रबळ हो, कारण, राक्षस मार्ग अडवीत आहेत. तूं यजमानाला, स्तोत्याला आणि मित्रांना धन दे. कपटी, दुष्ट आणि भाते घेतलेले जे शत्रु आहेत ते लोक ठार करण्यासारखे आहेत.

१६. हे इंद्रा, तुझा घोष जवळच्या शत्रूकडून ऐकला जावो. तूं आपलें त्रासदायक वज्र ह्या शत्रूवर मार. तूं त्यांना मुळापासून कापून काढ. त्यांना त्रास दे. त्यांचा पराभव कर. राक्षसांना ठार कर आणि आपल्या ताब्यांत घे.

१७. हे इंद्रा, राक्षसांना मूळासहित उपटून टाक. त्यांचा मध्य तोडून टाक आणि अग्र कापून काढ.

---

६ टीपः—येथें वैदिक धर्माचा सर्वत्र प्रसार व्हावा म्हणून ऋषि इंद्राची प्रार्थना करीत आहे. वैदिक धर्माचा प्रसार करण्याविषयीं ही प्रार्थना फारच महत्वाची आहे.

१५ टीपः—हा मंत्र श्राद्धांत ब्राह्मण भोजनास बसले असतां म्हणतात.

राक्षसांना अत्यंत दुर कर. ब्रह्मद्वेष्ट्यावर त्रासदायक हत्यार फेक.

१८. हे प्रणेत्या इंद्रा, तूं घोडे दे. आमचें कल्याण कर. ज्याअर्थीं तूं आमच्या जवळ येऊन बसला आहेस त्याअर्थीं आम्ही विपुल अन्न आणि विस्तृत संपत्तीचे महान उपभोग घेणारे होऊं. तसेंच आमचें ऐश्वर्य मुलाबाळांनीं युक्त असो.

१९. हे इंद्रा, तूं आम्हांला उज्वल संपत्ति घेऊन ये. उदार असणाऱ्या तुझ्या देणगीला आम्ही पात्र असावें. आमची इच्छा वडवानलाप्रमाणें मोठी आहे. हे धनाधिपते, ती तूं पुरी कर.

२०. हे इंद्रा, ती इच्छा गाईनीं, घोड्यांनीं आणि आल्हादक संपत्तीनें पुरी कर. आणि तूं आम्हांस प्रख्यात कर. स्वर्ग इच्छिणाऱ्या शहाण्या कुशिकांनीं मनःपूर्वक त्या इंद्राकरतां स्तोत्र केलें.

२१. हे गोपते, तूं आम्हाला गोठें उघडून गाई दे. आम्हांला संपत्ति आणि अन्न प्राप्त होवो. हे बलिष्ठ इंद्रा, तूं द्युलोकाला व्यापून असणारा आणि खरा सामर्थ्यवान आहेस. हे धनवान इंद्रा, तूं आम्हांला गाई देणारा हो.

२२. हे इंद्रा, ह्या अन्नसमृद्धि प्राप्त करून देणाऱ्या युद्धांत वीर आणि धनवान अशा इंद्राला सुखाकरतां आम्ही बोलावीत आहोंत. धांवा ऐकणाऱ्या, उग्र, युद्धांत शत्रूंना ठार करणाऱ्या आणि जिंकणाऱ्या इंद्राला आम्ही साहाय्यार्थ बोलावीत आहोंत.

सूक्त एकतिसावें.

ऋषिः—कुशिक इषीरथपुत्र किंवा विश्वामित्र; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. ज्ञाता आणि शास्त्राला अनुसरणारा पिता जावयाचा सत्कार करून मुलीच्या मुलाचा स्वीकार करतो. कारण, पिता मुलीचें लग्न लावून देऊन त्या सुखानुभवानें समाधान मानतो.

२. मुलगा बहिणीला वाटणी देत नाहीं. तर तिला नवऱ्याच्या गर्भाधानाचें स्थान करतो. जरी आईबाप मुलाला जन्म देतात तरी मुलगा क्रियाकर्माचा कर्ता होतो आणि कन्या फक्त अलंकार घालून लग्न करून दिली जाते.

३. ज्वालांनीं हलणारा आग्नि तेजस्वी अशा तुझ्या यज्ञाकरतां पुष्कळ पुत्र (ज्वाला) उत्पन्न करतो. यांचा गर्भ महान आहे. ह्याचा उत्पन्न झालेला लोळहि मोठा आहे. यज्ञामुळें इंद्राचें येणें फार होतें.

४. जेते मरुत (वृत्राशीं) युद्ध करणाऱ्या इंद्राला येऊन मिळतात, ते अंधकारांतून महान तेज मुक्त करते झाले. त्याला जाणणाऱ्या उषा त्याजकडे धांवत आल्या. एकटा इंद्र गाईचा अधिपति झाला.

५. पर्वतांत असलेल्या गाई बुद्धिमान सात स्तोत्यांनीं पाहिल्या आणि सरळ स्तुतीनें परत आणल्या. यज्ञाला साधनभूत असणाऱ्या सर्व गाई मिळवल्या. ते सर्व जाणणारा इंद्र स्तोत्रानें सर्वत्र गेला.

६. जेव्हां सरमेनें पर्वताचे पाडलेले द्वार प्राप्त केलें तेव्हां तिनें विपुल व सनातन उत्कृष्ट अन्न प्राप्त केले. चांगल्या पायाच्या सरमेनें गाईचा प्रान्त प्राप्त केला आणि हंबरणें ऐकून ती तिकडे गेली.

७. मित्रत्व इच्छिणारा अत्यंत ज्ञाता इंद्र तिकडे गेला. पर्वतानें आपल्या पोटांतील गाई पराक्रमी इंद्राकरतां बाहेर टाकल्या. तरुण मरुतांच्या साहाय्यानें युद्ध करूं इच्छिणाऱ्या वीर इंद्रानें गाई प्राप्त केल्या. नंतर अंगिरसानें ताबडतोब इंद्राचा सत्कार केला.

८. जो प्रत्येक वस्तूचा प्रतिनिधि आहे, तो पुढारी इंद्र सर्व वस्तुमात्राला जाणतो. तो शुष्णाला ठार करतो. अत्यंत ज्ञाता असणारा आणि गाईची इच्छा करणारा सखा द्युलोकांतून येऊन आम्हांस पापांतून मुक्त करतो.

९. गाई इच्छिणाऱ्या मनानें स्तोत्रांनीं अमरपणाचा मार्ग प्राप्त करीत अंगिरस (सत्रांत) बसले. हे यांचें (सत्रांत) बसणें खरोखर पुरेसे आहे. कारण, त्या यज्ञामुळें त्यांनीं महिने प्राप्त करण्याची इच्छा केली.

१०. आपल्या गाई आहेत असें पाहणारे अंगिरस पुरातन पावसाचें दूध काढीत असतां आनंदित झाले. त्यांचा घोष द्यावापृथ्वींत पसरला. त्यांनीं चराचर सृष्टीवर विश्वास ठेवला आणि गाईवर (संरक्षणाकरतां) वीर ठेवले.

११. तो मरुतांच्या साहाय्यानें वृत्राला ठार मारणारा होय. त्याच इंद्रानें हवनीय आणि स्तवनीय मरुतांच्या साहाय्यानें गाई मोकळ्या केल्या. म्हणूनच घृतयुक्त मधुर हवि धारण करणारी, व्यापक आणि श्रेष्ठ गाय मधुर दुध उत्पन्न करीत आहे,

---

[१] टीपः—या दोन ऋचांत दायविभागासंबधी कांहीं कल्पना आल्या आहेत. पण, इंद्राचा व त्यांचा काय संबंध आहे हें समजत नाहीं.

१२. अंगिरसांनीं ह्या पितृभूत इंद्राकरतां स्थान तयार केलें. पुण्यवान् अंगिरसांनीं त्या महान व तेजस्वी स्थानावर दृष्टि टाकली. सत्रांत बसून द्यावापृथ्वीला अन्तरिक्षाचा आधार देत वेगशाली इंद्राला उच्च स्थानीं स्थापते झाले.

१३. द्यावापृथ्वी विभागल्यावर बलवान् व समर्थ अशा इंद्राची जेव्हां मोठी स्तुति सुरू झाली, आणि जेव्हां त्याचे ठिकाणीं निर्दोष स्तोत्रें एकत्र झालीं, तेव्हां सर्व शक्ति इंद्राला आपण हून वश झाल्या.

१४. हे इंद्रा, मी तुझें मोठें सख्य आणि देणग्या इच्छितों. वृत्रहन्त्या इंद्राकडे अनेक घोड्या येत आहेत. ज्ञाता असणाऱ्या तुझें आम्ही मोठें स्तोत्र आणि हवन करीत आहोंत तर हे धनवन्ता, तूं आमचा संरक्षक हो.

१५. इंद्रानें मोठें शेत आणि विपुल सुवर्ण आम्हां भक्ताकरतां शोधून काढलें आणि नंतरच जंगमसृष्टि उत्पन्न केली. मरुतांसह असणाऱ्या देदीप्यमान इंद्रानें सूर्य, उषा, पृथ्वी आणि अग्नि एकावेळीं उत्पन्न केलें.

१६. ह्या उदार इंद्रानें व्यापक, एकत्र असणारे आणि सर्वाल्हादक पाणी उत्पन्न केलें. पवित्र करणाऱ्या कवींकडून (अग्नि, वायु, सूर्य,) शुद्ध केलेलीं मधुर उदकें सर्वांना प्रसन्न करीत रात्रंदिवस कार्यप्रवृत्त करतात.

१७. सर्वाधार, पूज्य आणि कृष्णवर्ण अहोरात्र फिरत असते ती सूर्याच्या सामर्थ्यानेंच होय. कारण, तुझे सरळमार्गी मित्र सुंदर मरुत् शत्रूंचा पराभव करण्याकरतांच तुझ्याभोंवती असतात.

१८. हे वृत्रहन्त्या इंद्रा, पूर्णायु, कामपूरक आणि अन्नदाता असा तूं गोड स्तोत्रांचा पति हो. महान असणारा तूं कल्याणकारक सख्य करण्याकरतां मोठ्या मदतीसह वेगानें आमच्याकडे ये.

१९. हे इंद्रा, अंगिरसाप्रमाणें स्तोत्रानें सत्कार करून पुरातन असणाऱ्या तुला मी प्रसन्न व्हावेस म्हणून उत्तेजित करीत आहें. तर तूं अनेक नास्तिक द्रोह्यांना ठार कर आणि हे धनवन्ता, उपभोगाकरतां आम्हांला वैभव दे.

२०. हे इंद्रा, स्वच्छ धुकें चहूंकडे पसरलें आहे. आम्हांला तूं त्याच्या पार सुखरूपपणें ने. रथांत असलेला तूं आमचें संकटातून संरक्षण कर आणि आम्हांला लवकर गाई जिंकणारे कर.

२१. वृत्रहन्ता गोपति इंद्र आम्हांला गाई देवो. काळ्या शत्रूंस आपल्या झगझगीत तेजांनीं नष्ट करो. त्यानें यज्ञानें गाई देऊन सर्व द्वारें उघडीं करावींत.

२२. हे इंद्रा, ह्या अन्नसमृद्धि प्राप्त करून देणाऱ्या युद्धांत वीर आणि धनवान अशा तुला सुखाकरतां आम्ही बोलावीत आहोंत. धांवा ऐकणाऱ्या, उग्र, युद्धांत शत्रूंना ठार करणाऱ्या आणि धन जिंकणाऱ्या इंद्राला आम्ही साहाय्यार्थ बोलावीत आहोंत.

सूक्त बत्तिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे सोमपते इंद्रा, तूं हा सोम पी. कारण, तुला माध्यान्हीचा सवन प्रिय आहे. हे धनवन आणि सोम पिणाऱ्या, तूं येथें घोडे सोडून, त्यांचें तोबरे भरून त्यांना आनंदित कर.

२. हे इंद्रा, गोरस मिसळलेला शुक्र आणि मंथी ह्या पात्रांत असणारा सोम तूं पी. तुला मद उत्पन्न व्हावा म्हणून आम्ही अर्पण करीत आहोंत. स्तुति करणाऱ्या रुद्रपुत्र मरुतांसह तृप्ति होईपर्यंत तूं सोम पी.

३. हे इंद्रा, जे तुझें तेज वाढवितात, जे तुझें बल वाढवितात, जे तुझा सत्कार करून तुझें सामर्थ्य वाढवितात, त्या रुद्रपुत्र मरुद्गणासह हे वज्रहस्ता व सुंदर शिरस्त्राण घातलेल्या इंद्रा, माध्यंदिन सवनांतील तूं सोम पी.

४. जे मरुत इंद्राचें सैन्य झाले ते मरुत ह्या इंद्रालाच (आम्ही तुला साहाय्य करणारे आहोंत असें) मधुर भाषण बोलले, कीं ज्यांनीं उत्साह दिलेला इंद्र अमर समजणाऱ्या वृत्राचें मर्म जाणता झाला.

५. हे इंद्रा, तूं मनूच्या यज्ञाप्रमाणें आमचा यज्ञ सेवन करून सोम पी. आणि टिकाऊ सामर्थ्य प्राप्त कर. हे हर्यश्वा इंद्रा, तूं पूज्य मरुतांसह आमच्याकडे ये आणि वेगशाली मरुतांसह अन्तरिक्षापासून वृष्टि कर.

६. हे इंद्रा, ज्या तूं पाणी अडवून पडून राहिलेल्या नास्तिक वृत्राला वेगवान वज्रानें ठार केलें. त्या तूं युद्धांत घोडे मोकळे सोडावेत त्याप्रमाणें वृत्राला मारून पाणी वहावयास लावलें.

७. त्या हवीनें वाढलेल्या थोर देखणा आणि तरुण अशा तुझाच आम्ही सत्कार करूं. कारण, यज्ञार्ह आणि प्रिय अशा तुझा महिमा द्यावापृथ्वीलाहि आकलन झाला नाहीं.

८. सर्व देव इंद्राचीं कृत्यें आणि अनेक पराक्रम नष्ट करूं शकत नाहींत. कारण, ह्या महापराक्रमी

इंद्रानें ह्या पृथ्वी आणि द्युलोकाला धारण केलें आणि सूर्य व उषा उत्पन्न केली.

९. हे द्रोहरहित इंद्रा, तुझें तें महत्व खरें आहे, कारण, तूं जन्मल्याबरोबर सोम प्यालास. बलवान असणाऱ्या तुझें सामर्थ्य द्युलोक, दिवस, महिने आणि वर्षें निवारण करूं शकत नाहींत.

१०. हे इंद्रा, तात्काळ उत्पन्न होऊन स्वर्गांत असणारा तूं मद उत्पन्न होण्याकरतां सोम पी. जेव्हां तूं द्यावापृथ्वींत प्रविष्ट झालास, तेव्हांच तूं स्तोत्यांचा पुरातन संरक्षक झालास.

११. हे जन्मापासून प्रबळ असणाऱ्या इंद्रा, बलवान असणारा तूं पाण्याला अडवा पडलेला आणि बलाची ऐट मारणाऱ्या अहीला ठार केलेस. खरोखर तुझा महिमा द्यूलाहि समजत नाहीं, कारण, तूं एक कटीभागानें पृथ्वी व्यापली आहेस.

१२. हे इंद्रा, आमचा यज्ञ तुझा उत्कर्ष करणारा होतो. सोमरस तयार केलेला यज्ञ तुला प्रिय आहे. यज्ञार्ह असणारा तूं यज्ञानें यज्ञ करणारांचें संरक्षण कर. हा यज्ञ युद्धांत तुझ्या वज्राचें संरक्षण करो.

१३. यज्ञानें आणि हवीनें भक्त इंद्राला आपल्याकडे वळवितो. मी अत्यंत नवीन संपत्ति मिळावी म्हणून ह्या इंद्राला आपल्याकडे वळवितों. कारण, इंद्र पुरातन स्तोत्रांनीं, मध्यकालांतील स्तोत्रांनीं आणि अर्वाचीन स्तोत्रांनीं वृद्धिंगत होतो.

१४. जेव्हां स्तुति करण्याची इच्छा माझ्या मनांत येते तेव्हां मी स्तुति करतों. मी इंद्राची युद्धाच्या दिवसापूर्वी स्तुति करतों. ती स्तुति झाल्यावर तो इंद्र आम्हांला पापांतून पार नेतो. नावेतून जाणाऱ्या माणसाला ज्याप्रमाणें दोन्ही तीरावरील लोक बोलावतात त्याप्रमाणें इंद्राला दोन्ही बाजूकडील लोक बोलावतात.

१५. पाणी देणारा पखाल सोडतो त्याप्रमाणें तुला पिण्याकरतां सोमानें भरलेला कलश स्वाहा म्हणून अर्पण केला आहे. प्रिय सोम इंद्राला मद उत्पन्न होण्याकरतां चांगल्या रीतीनें प्राप्त होवोत.

१६. हे पुरुहूत इंद्रा, मित्राकरतां बळकट असणाराहि गाईचा गोठा जेव्हां तूं अशा प्रकारें फोडलास तेव्हां तुला अगाध समुद्र अडवूं शकत नाहीं, भोंवती पर्वतहि अडवूं शकत नाहींत.

१७. हे इंद्रा, ह्या अन्नसमृद्धि प्राप्त करून देणाऱ्या युद्धांत वीर आणि धनवान अशा इंद्राला सुखाकरतां आम्ही बोलावीत आहोंत. धांवा ऐकणाऱ्या, उग्र, युद्धांत शत्रूंना ठार करणाऱ्या आणि धन जिंकणाऱ्या इंद्राला आम्ही साहाय्यार्थ बोलावीत आहोंत.

सूक्त तेहेतिसावें.

ऋषिः—४.६.८.१० नदी, अवशिष्ट विश्वामित्र; देवता–इंद्र; छंदः—१–१२ त्रिष्टुभ, १३ अनुष्टुभ.

१. पर्वताच्या पायथ्यावरून निघून (तबेल्यांतून) स्पर्धा करीत बाहेर पडलेल्या घोड्याप्रमाणें, वासराला चाटूं इच्छिणाऱ्या दोन पांढऱ्या शुभ्र गाईप्रमाणें विपाट व शुतुद्री पाण्यानें पर्वताच्या पायथ्यावरून धांवत आहेत.

२. हे नद्यांनो, इंद्रानें प्रेरणा दिलेल्या, इंद्राची अनुज्ञा मागणाऱ्या एकमेकींत मिसळत आणि लाटांनीं भोंवतालच्या प्रदेशाला तृप्त करणाऱ्या तुम्ही रथांत बसल्याप्रमाणें समुद्राकडे जातां. स्वच्छ असणाऱ्या नद्यांनो, तुम्ही एकमेकांस मिळत आहांत.

३. ममताळू माता असणाऱ्या व वहात असणाऱ्या विपाश नदीप्रत मी आलों आहे. विस्तृत आणि भाग्यशाली विपाशेकडे मी आलों आहे. तुम्ही वासराला चाटणाऱ्या गाईसारख्या एक स्थानाकडे वहात आहांत.

४. नद्यः—आम्ही ह्या उदकानें प्रदेश सुपीक करीत देवानें नेमलेल्या स्थानाकडे वहात जात आहोंत. आमचा जाण्याचा उद्योग थांबवतां येणार नाहीं. काय म्हणून हा ब्राह्मण नद्यांना वारंवार बोलावीत आहे ?

५. विश्वामित्रः—हे नद्यांनो, सोमयज्ञ करण्याकरतां आणि स्तुति करण्याकरतां जातां यावें म्हणून मुहूर्तभर थांबा. साहाय्याची अपेक्षा करणारा कुशिकाचा मुलगा मी मोठ्या भक्तीनें वहाणाऱ्या तुझा धांवा करीत आहे

६. नद्यः—हे विश्वामित्रा, वज्रबाहु इंद्रानें आम्हांला खणलें आहे. नद्यांना अडवून पडलेल्या

---

१ टीपः—विश्वामित्र पैजवन सुदास नांवाच्या राजाचा पुरोहित झाला, तेव्हां त्याला पुरोहितवृत्तीनें पुष्कळ धन मिळालें, तें घेऊन तो विपाटशुतुद्रीच्या संगमावर आला. नद्यांना पाणी पुष्कळच होतें. तेव्हां नद्या तरून जातां याव्यात म्हणून त्यानें पहिल्या तीन ऋचांनीं नद्यांची स्तुति केली. असें असूनहि सर्वानुक्रमणीप्रमाणें सर्व सूक्ताची देवता इंद्रच आहे. विपाट व शुतुद्री या नद्या पंजाबांतील आहेत. सध्यां विपाटला रावी व शुतुद्रीला सतलज असें म्हणतात.

वृत्राला त्यानें ठार केलें. सुहस्त इंद्रदेवानें आम्हांला प्रवाहित केलें. त्याच्या आज्ञेनें विस्तीर्ण असणाऱ्या आम्ही वहात आहोंत.

७. इंद्राचा हा पराक्रम सदा वर्णन करण्यासारखा आहे कीं इंद्रानें अहीला ठार केलें, आडवे पडणाऱ्यांना त्यानें वज्रानें ठार केलें आणि वाहूं इच्छिणाऱ्या उदकांना वहाते केलें.

८. हे स्तोत्या, तूं हें (संवादात्मक) भाषण विसरूं नकोस. कारण, तें पुढल्या युगांत गाजलें पाहिजे. हे स्तोत्या, तूं आमचीं स्तोत्रें म्हणून सेवा कर. तूं पुरुषांत आमचा धिक्कार करूं नकोस. तुला नमस्कार.

९. विश्वामित्रः—हे भगिनींनो, तुम्ही मज स्तोत्याचें स्तोत्र ऐका. मी दुरून गाडींत आणि रथांत बसून आलों आहें. तुम्ही चांगल्या उथळ व्हा आणि सहज तरून जातां येण्यासारख्या असा. हे नद्यांनो, तुमचा प्रवाह आखाच्या खालीं असो.

१०. नद्याः—हे स्तोत्या, आम्ही तुझें म्हणणें ऐकतों. (कारण), तूं गाडींत आणि रथांत बसून दुरून आला आहेस. आम्ही तुझ्याकरता खालीं वाकतों. आई मुलाला पाजण्याकरतां किंवा मुलगी बापास नमस्कार करण्यास लवते त्याप्रमाणें तुजकरतां मी नमते.

११. विश्वामित्रः—हे नद्यांनो, ज्याअर्थी भरत तुम्हाला तरून जातील, गाई इच्छिणारा, इंद्रानें प्रेरणा दिलेला आणि उत्तेजन दिलला भरतांचा संघ तरून जाईल, आणि तुमचा गमनाचा उद्योग चालूंच राहील म्हणून मी यज्ञार्ह असणाऱ्या तुमची चांगली स्तुति करीन.

१२. गाई इच्छिणारें भरत पार उतरलें. स्तोत्यानें नद्यांची उत्तम स्तुति केली. अन्न उत्पन्न करणाऱ्या तुम्ही समृद्धि वाढवा. कालवे भरून टाका. लवकर वाहूं लागा.

१३. तुमच्या लाटा शिवळीवर आपटोत. हे नद्यांनो, तुम्ही दोऱ्यांना लागूं नका. कल्याणकारक, निष्पाप आणि अविनाशी असणाऱ्या तुम्ही समृद्धि पावा.

सूक्त चवतिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. शत्रूंचीं नगरें फोडणारा, संपत्ति प्राप्त करून देणारा आणि शत्रूंचा नाश करणारा इंद्र आपल्या तेजांनीं शत्रूला जिंकतो. स्तोत्रानें उत्तेजित केला जाणारा, शरीरानें वाढणारा आणि अनेक आयुधें घेतलेला इंद्र द्यावापृथ्वी व्यापून टाकतो.

२. हे इंद्रा, तुला भूषित करणारा मी बलवान आणि पराक्रमी असणाऱ्या तुझी समृद्धि प्राप्त व्हावी म्हणून स्तुति करतों. तूं मानवांचा आणि देवजनांचा नायक आहेस.

३. गणनायक इंद्रानें वृत्राला वेढा दिला. शत्रूंच्या आघातांचें निवारण करणाऱ्या इंद्रानें शत्रूंचीं कारस्थानें नष्ट केलीं. शत्रूंचा नाश इच्छिणाऱ्या इंद्रानें अरण्यांत व्यंसाला ठार केलें. नंतर रात्रींच्या गाईंना मोकळ्या करतां झाला.

४. स्वर्गप्रद इंद्रानें दिवसांना उत्पन्न करीत युद्ध इच्छिणाऱ्या अंगिरांसह शत्रूंच्या सेनाचा पराभव करून जिंकल्या. तो दिवसाचा ध्वज मानवाकरतां त्यानें प्रकाशित केला. महान युद्धासाठीं प्रकाश मिळाला.

५. इंद्र पुष्कळ संपत्ति देत क्रूर शत्रूंच्या सैन्यांत मनुष्याप्रमाणें शिरला. त्यानें स्तोत्याकरतां ह्या उषा प्रकाशित केल्या आणि त्यांचा शुक्लवर्ण वाढविला.

६. ह्या थोर इंद्राची अनेक मोठमोठालीं कृत्यें स्तोते स्तवितात. तो सामर्थ्यानें असुरांचे चूर्ण करून टाकतो. पराभव करणारें सामर्थ्य असणारा इंद्र कपटांनीं दस्यूंचा धुव्वा उडवतो.

७. देवांचा मुख्य आणि लोकांच्या इच्छा पूर्ण करणारा इंद्र मोठें युद्ध करून देवांना धन देता झाला. कवि ह्यांचीं तीं कृत्यें यजमानाच्या घरीं स्तोत्रांनीं वर्णन करीत असतात.

८. सर्वांना जिंकणारा, श्रेष्ठ, बलप्रद, स्वर्ग आणि उदक देणाऱ्या इंद्राला स्तोते प्रसन्न करतात. ही पृथिवी आणि द्युलोक देणाऱ्या इंद्राला स्तोते स्तवितात.

९. इंद्रानें अश्व दिले आणि सूर्य दिला. इंद्रानें अनेकांचें पोषण करणारी गाय दिली आणि सुवर्णमय संपत्ति दिली. त्यानें दस्यूंना ठार करून आर्य वर्णाचें संरक्षण केलें.

१०. इंद्रानें ओषधी आणि दिवस दिले. वनस्पति आणि अन्तरिक्ष दिले. त्यानें वलाचा छेद केला आणि शत्रूंना हाकून दिले. तो प्रबळ शत्रूंचा दमन करणारा झाला.

११. धनवान आणि अतिशय शौर्यवान इंद्राला सुख मिळावें म्हणून समृद्धि देणाऱ्या युद्धांत आम्ही

बोलावीत आहोंत. ऐकणाऱ्या, उग्र, शत्रूंना ठार करणाऱ्या आणि धन जिंकणाऱ्या इंद्राला युद्धांत साहाय्याकरतां आम्ही बोलावीत आहोंत.

सूक्त पसतिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता--इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, वायु आपले नियुत घोडे जोडून उभा रहातो त्याप्रमाणें तूं आपले सोनेरी घोडे रथाला जोडून तयार हो आणि ये. आम्ही दिलेला सोम तूं पी. आम्ही स्वाहा म्हणून तुला तो अर्पण केला आहे.

२. हे इंद्रा, तुझ्याकरतां सत्वर चालणारे दोन घोडे रथाच्या धुरेला मी जोडतों, कीं जेणें करून सर्व प्रकारें सज्ज असलेल्या ह्या यज्ञांत ते इंद्राला दौडत आणतील.

३. हे अन्नसमृद्ध व बलिष्ठ इंद्रा, तुझें संकटांतून तारणारे बलिष्ठ घोडे माझ्याकडे आण. आणि तूं ह्या यजमानाचें संरक्षण कर. घोड्यांना चरूं दे. तांबडे घोडे येथें सोड. तूं प्रत्यहीं सारख्या लाह्या भक्षण कर.

४. हे इंद्रा, स्तोत्रांनीं जोडले जाणारे, युद्धांत मित्र असणारे चलाख सुवर्णवर्णाचे दोन घोडे मी मंत्र म्हणून रथाला जोडतो. हें इंद्रा, तूं सुखकारक आणि स्थिर रथांत बैस. ज्ञाता विद्वान असणारा तूं आमच्या येथें सोम पिण्याकरतां ये.

५. हे इंद्रा, तुझे बळकट आणि सुंदर पाणी असलेले घोडे दुसरे यजमान न थांबवोत. अनेक उपासकांना टाकून तूं ये. आम्ही सोम तयार करून तुझी तृप्ति करूं.

६. हे इंद्रा, हा सोम तुझ्याकरतां पिळला आहे. तूं आमच्याकडे ये. तूं प्रसन्न होऊन पुष्कळ सोम पी. ह्या यज्ञांत दर्भावर बसून हा सोम तूं पोटांत धारण कर.

७. हे इंद्रा, तुझ्याकरतां दर्भ पसरले आहेत. सोम पिळला आहे. तुझ्या घोड्यांना खाण्याकरतां लाह्या केल्या आहेत. मरुतांसहित असणाऱ्या, बहुस्तुत्य आणि दर्भावर बसलेल्या तुला मी हवि दिले आहेत.

८. हे इंद्रा, मनुष्य, पाषाण आणि उदक यांनीं तयार केलेला सोम दुधांनीं मधुर केला आहे. हे दर्शनीय इंद्रा, चांगल्या मनाचा आणि विद्वान असणारा तूं आपल्या चांगल्या स्तोत्रांना ध्यानांत घेऊन ये आणि सोम पी.

९. हे इंद्रा, ज्या मरुतांना तूं सोमाचा भाग देत असतोस, जे तुझें सामर्थ्य वाढवितात आणि जे तुझें साहाय्यकारी होत, त्यांसह हा सोम मनःपूर्वक अग्नीच्या जिव्हेनें पी

१०. हे इंद्रा, तूं आपणहून हा सोम पी अथवा हे पूज्य इंद्रा, अग्नीच्या जिव्हेनें पी, अथवा हे शक्रा, अध्वर्यूनें अर्पण केलेला त्याच्या हातांतून पी, किंवा होत्याचा हविर्भाग स्वीकार.

११. धनसमृद्ध आणि अतिशय शौर्यवान इंद्राला सुख मिळावें म्हणून समृद्धि देणाऱ्या युद्धांत आम्ही बोलावीत आहोंत. ऐकणारा, उग्र, शत्रूंना ठार करणाऱ्या आणि धन जिंकणाऱ्या इंद्राला युद्धांत साहाय्याकरतां आम्हीं बोलावीत आहोंत.

सूक्त छत्तिसावें.

ऋषिः—१० घोर अंगिरस, अवशिष्ट विश्वामित्र; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, मरुतांसहित सदोदित असणारा तूं आम्हांला धन देण्याकरतां ही आहुति ग्रहण कर. जो मोठ्या पराक्रमांनीं प्रख्यात झाला तो सोम पिळल्यावर आहुतींनीं वृद्धिंगत होवो.

२. हे इंद्रा, तुला पूर्वीपासून आम्ही सोम देत आहोंत कीं ज्यामुळें तूं तेजस्वी आणि मोठा बळकट झालास. हें इंद्रा, दिलेले सोम तूं मनःपूर्वक ग्रहण कर. बळकट दगडांनीं काढलेला सामर्थ्यवान सोम तूं पी.

३. हें इंद्रा, सोम पी आणि प्रबळ हो. पुरातन आणि हे अर्वाचीन सोम तुझ्याकरतांच आहेत. हे इंद्रा, जसा तूं प्राचीन सोम पीत होतास, तसाच प्रशंसनीय असणारा तूं अगदीं नवीन सोम पी.

४. महान, युद्धांत पराभव करणारा, आणि प्रबल इंद्र उग्र बल आणि पराक्रमाचें तेज धारण करतो. हर्यश्व इंद्राला जेव्हां सोमानें आनंदित केलें तेव्हां तो द्यावापृथ्वींत मावला नाहीं.

५. अत्यंत भयंकर असणारा इंद्र पराक्रम करण्याकरतां सरसावला. त्या वीराचे पोवाडे सुरू झाले. इंद्र हा भाग्यशाली आणि समृद्धि देणारा आहे. ह्याची दक्षिणा अनेक गाई आहेत.

६. नद्या जशा समुद्राकडे जातात आणि रथ्याप्रमाणें पाणी जसें समुद्राकडे जाते, तसा जेव्हां दुधांत

मिसळलेला सोम इंद्राला प्रसन्न करतो तेव्हां ह्या अन्तरिक्षापेक्षांहि इंद्र मोठा होतो.

७. समुद्राला जशा नद्या मिळतात त्याप्रमाणें इंद्राला चांगला सोम अर्पण करणारे हातांनीं सोम पिळतात. आणि हातांनीं धार धरून गाळण्यांनीं सोम शुद्ध करतात.

८. सोम धारण करणारे इंद्राचें पोट डोहासारखें आहे. कारण, त्यांत अनेक सवनें मावतात. जेव्हां इंद्रानें प्रथम सोमरूपी अन्न भक्षण केले तेव्हां तो वृत्राला मारणारा इंद्र सोमाला प्राप्त करतां झाला.

९. हे इंद्रा, तूं लवकर धन आण. तुला कोणीहि न अडवो. खरोखर तूं धनाचा अधिपति आहेस असें मी तुला ओळखतों. हे हर्यश्वा, तुझी जी मोठी देणगी आहे ती तूं आम्हांस दे.

१०. हे सोमयुक्त व धनयुक्त इंद्रा, तूं आम्हांला सर्वश्रेष्ठ विपुल संपत्ति दे. आम्हांला शंभर वर्षे आयुष्य दे. हे सुंदर मुगुट घालणाऱ्या इंद्रा, आम्हांला पुष्कळ शूर पुत्र दे.

११. धनसमृद्ध आणि अतिशय शौर्यवान इंद्राला सुख मिळावें म्हणून समृद्धि देणाऱ्या युद्धांत आम्ही बोलावीत आहोंत. ऐकणारा, उग्र, शत्रूंना ठार करणाऱ्या आणि धन जिंकणाऱ्या इंद्राला युद्धांत साहाय्याकरतां आम्ही बोलावीत आहोंत.

सूक्त सदतिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता-अग्नि; छंदः—१-१० गायत्री, ११ अनुष्टुभ.

१. हे इंद्रा, वृत्राला ठार मारण्यासाठीं आणि शत्रुसैन्याचा धुव्वा उडवण्यासाठीं तुला बल प्राप्त व्हावें म्हणून आम्ही तुला इकडे वळवतों आहों.

२. हे शतक्रतो इंद्रा, आमचे स्तोत्रपाठक तुझें मन आणि डोळे आमच्याकडे अभिमुख करीत.

३. हे शतक्रतो इंद्रा, प्रमत्त शत्रूंशीं सामना सुरू झाला म्हणजे आम्ही सर्व प्रकारची स्तुति करून तुझ्या नांवाचा धांवा करीत असतो.

४. बहुस्तुत आणि सर्व चर सृष्टीचा नियंता अशा इंद्राच्या संपत्तीच्या योगानें आम्ही त्याचें शेंकडो पटीनें महत्त्व वाढवितों आहोंत.

५. बहुस्तुत अशा इन्द्राला लढाईमध्यें युद्धोत्तर लूट मिळावी म्हणून मी बोलावितों.

६. हे शतक्रतो इन्द्रा, लढाईमध्यें तूं शत्रुसैन्याचा धुव्वा उडव. वृत्राला ठार करण्याकरतां आम्ही तुझी प्रार्थना करीत आहों.

७. हे इन्द्रा, ज्याचे जवळ संपत्ति आहे, ज्यांनीं लढाईत विजय मिळविला आहे, ज्यांनीं कीर्ति संपादन केली आहे, जे प्रमत्त झाले आहेत, त्या शत्रूंचा तूं पराभव कर.

८. हे शतक्रतो इन्द्रा, अतिशय बलप्रद, तेजस्वी जागरूक ठेवणारा अशा सोमरसाचें तूं पान कर.

९. पंचजनामध्यें (प्रसिद्ध) असलेले तुझे जे पराक्रम, त्यांची आम्ही इच्छा करतों. (ते आम्हांस प्रिय आहेत.)

१०. हे इन्द्रा, हें हविरन्न तुला मिळो. दुस्तर व प्रचंड असें बल तूं धारण कर. तुझ्या सामर्थ्याची आम्ही वृद्धि करीत आहों.

११. हे वज्रधरा इंद्रा, तूं जवळ अस किंवा दूर अस. असशील तेथून आमच्याकडे ये. तूं आपल्या लोकीं असलास तरी तेथून येथें ये.

सूक्त अडतिसावें.

ऋषिः—प्रजापति किंवा विश्वामित्र पुत्र किंवा वाक्पुत्र, किंवा दोघेहि, किंवा विश्वामित्रच; देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे स्तोत्या, सुतार लाकूड तासून अगदीं साफ करतो, त्याप्रमाणें हें स्तोत्र अगदीं सुंदर कर. चांगलीं धूरा असलेला घोडा ज्याप्रमाणें झपाट्यानें पळत जातो, त्याप्रमाणें श्रेष्ठ आणि प्रिय अशा गोष्टींचा विचार करीत, बुद्धिमान असा मी कवींना पाहूं इच्छितों.

२. कवींना ते कवि कसे झाले ते विचार. मनस्वी आणि सत्कृत्यें करणारे असे ते कवि द्युलोक तयार करते झाले. (हे इंद्रा,) हीं आम्ही तयार केलेलीं, तुझें महत्त्व वाढविणारीं व मन प्रसन्न करणारीं अशीं स्तोत्रें तुझी धारणा करोत (तुझा श्रेष्ठपणा टिकवोत.)

३. त्यांनीं येथें सर्व तऱ्हेनें गूढ कृत्यें करीत द्यावापृथ्वींना बळकटी आणली. द्यावापृथ्वींला मापांनीं मर्यादा उत्पन्न केली. आणि द्यावापृथ्वींच्या धारणेकरतां मध्यें अंतरिक्ष उत्पन्न केलें.

४. रथारूढ इंद्राला त्यांनीं अलंकृत केले. स्वयंप्रकाशमान असा तो तेजाचें आवरण घेऊन संचार

करतो. त्या सामर्थ्यवानाचा पराक्रम फार मोठा आहे तो विश्वरूप इंद्र अमर पदार्थांचा अधिपति आहे.

५. बलिष्ठ, चिरंतन आणि सर्वश्रेष्ठ इंद्रानें पाणी उत्पन्न केलें. तें विपुल उदक ह्याची तहान भागविणारें आहे. स्वर्गपुत्र राजे इंद्रावरुण उत्कृष्ट यज्ञांतील स्तोत्रांनीं (प्रसन्न होऊन भक्ताला देण्याकरतां) संपत्ति धारण करतात.

६. हे राजांनो, तुम्ही यज्ञामध्यें तीनच काय, पुष्कळ किंबहुना सर्व स्थानें सुशोभित करतां. तुमच्या नियमांप्रमाणें वागणाऱ्या मीं वायुकेश गन्धर्वांना मनानें पाहिलें.

७. जे भक्त ह्या बलिष्ठ इंद्राकरतां गाईंच्या सडांतून दूध काढीत असतात ते नवें नवें सामर्थ्य प्राप्त करतात आणि अनेक रूपानें ह्या इंद्राचें ठिकाणीं तन्मय होतात.

८. या सूर्यानें जें हिरण्मय तेज धारण केलें आहे, त्याचें माप घेतां येत नाहीं. तो सुस्तुत आणि विश्वव्यापी अशा द्यावापृथिवीस, स्त्री आपल्या मुलाला कवटाळते, त्याप्रमाणें आलिंगितो.

९. तुम्हीं आपल्या पुरातन भक्ताचें असें कल्याण करीत होता कीं त्यायोगें त्याला दैवीं यश प्राप्त होत असे. तुम्हीं आमचें रक्षण करावें.रक्षणाची हमी देणाऱ्या आणि टिकाव धरणाऱ्या अशा इंद्राचे नानाविध पराक्रम सर्व विचक्षण लोक पहात असतात.

१०. कल्याणकर, धनसमृद्ध, नरश्रेष्ठ, अशा इंद्राला आम्ही सुखाकरतां लढाईंत आणि घनघोर संग्रामांत बोलावतों आहों. तो प्रार्थना ऐकणारा, उग्र, युद्धामध्यें शत्रूंना ठार मारणारा आणि धनाची लूट करणारा आहे.

सूक्त एकोणचाळिसावें.

ऋषिः—विश्वामित्र, देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. स्तोत्रबद्ध, अंतःकरणपूर्वक केलेली, मोठ्यानें म्हटली जाणारी अशी स्तुति अधिपति इंद्राकडे जावो, जी यज्ञांत म्हटली जात तुझें लक्ष वेधते, ती, हे इंद्रा, तुझ्याकरतां केलेली स्तुति तूं जाण.

२. दिवस उगवण्याच्या पूर्वींच उत्पन्न झालेली आणि यज्ञांत म्हटली जाऊन सर्वांचें लक्ष वेधणारी अशी ही आमची स्तुति पांढरीशुभ्र आणि सुंदर वस्त्रें जणूं परिधान केलेली आहे. ही स्तुति आमच्या पितरांपासूनची असल्यामुळें ती पुरातनच आहे.

३. जुळें प्रसवणारी ह्या वेळीं जुळ्याला जन्म देती झाली, तें पाहून (कवींची) जिव्हाग्रें (स्तोत्र करण्याकरतां) हलूं लागली. दिवस उगवण्याच्या आरंभीं आलेले हे जुळें जन्मलेले आणि अंधःकार नाहींसा करणारे क्रमें प्राप्त करतात.

४. ज्या आमच्या पितरांनीं गाईंसाठीं युद्ध केलें, त्यांची निंदा करणारा मानवांत कोणी नाहीं. कारण महत्त्वपूर्ण आणि अतिशय पराक्रमी अशा इंद्रानेंहि गच्च कोंडून ठेवलेले गोळवाडे मोकळे केले.

५. जेव्हां सखा इंद्र, आणि त्याचे शूर सखे नवग्व गुडघ्यानीं गाईंकडे गेले तेव्हां दहा दशग्वांसह इंद्रानें अंधःकारांत असलेल्या अविनाशी सूर्याला प्राप्त केलें.

६. इंद्रानें गाईंच्या ठिकाणीं मधुर (दूध) उत्पन्न केलें. त्यानें पंख असलेले पक्षी आणि खूर असलेलीं जनावरें मिळविलीं. त्या दानशूरानें आपल्या गुहेंत असलेल्या आणि पाण्यांत अदृश्य होऊन दडून बसलेल्याला आपल्या उजव्या हातांत धरलें.

७. इंद्र अंधःकारांतून प्रकट होऊन प्रकाश धारण करता झाला. आतां आम्हीं दुष्कृत्यांपासून दूर निर्भय स्थळीं असावें. हे सोमपा इंद्रा, सोमपानानें श्रेष्ठ झालेला तूं श्रेष्ठ स्तोत्याच्या स्तुतीचा स्वीकार कर.

८. द्यावापृथिवींच्या पाठोपाठ ज्योतिरूप सूर्य यज्ञासाठीं येत आहे. आतां महापातकांपासून आम्हीं दूर असावें. कारण हे वसूंनो, तुमची अतिशय भक्ति करणाऱ्या मानवाला तुम्हीं त्याचे शत्रू ठार करून त्याला संकटाच्या पार नेतां.

९. कल्याणकर, धनसमृद्ध, नरश्रेष्ठ अशा इंद्राला आम्हीं सुखाकरतां लूट मिळणाऱ्या घनघोर संग्रामांत बोलावतों. तो प्रार्थना ऐकणारा, उग्र, युद्धामध्यें शत्रूंना ठार मारणारा आणि त्यांच्या धनाची लूट करणारा आहे.

सूक्त चाळिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता-इन्द्र; छन्दः-गायत्री.

१. हे इंद्रा, सोम रस काढला असतांना आम्हीं पराक्रमी अशा तुला बोलावीत आहों. तूं हा मधुर सोम पी.

२. बहुस्तुत इंद्रा, तयार केलेला, असा हा सोमरस तूं पी. तृप्तिकारक सोमाचा तुझ्यावर वर्षाव होवो. (तूं तो पी.)

३. हे स्तुत्य, सकलाधिपते इंद्रा, आमच्या ह्या समृद्ध यज्ञांत सर्व देवांसह ये आणि तो सफल कर.

४. हे सत्पती इंद्रा, हे आल्हादकारक सोमरस तुझ्या स्थानाकडे जात आहेत.

५. हे इंद्रा, हा उत्तम सोमरस तूं आपल्या उदरांत ग्रहण कर. हे दिव्य सोम तुझेच आहेत.

६. हे स्तुतिप्रिय इंद्रा, आमचा हा सोमरस तूं पी. मधुर सोमाच्या धारानीं तुला अभिषेक केला जात आहे. हे इंद्रा, तुझ्या योगानेंच यशःप्राप्ति शक्य आहे.

७. भक्तानें दिलेले समृद्ध व अक्षय हवि इंद्राला प्राप्त होतात. इंद्र सोम पिऊन बलवान झाला आहे.

८. हे वृत्रहन्त्या इंद्रा, तूं आम्हांकडे जवळून ये आणि दुरूनहि ये. आमच्या ह्या स्तुतींचा स्वीकार कर.

९. हे इंद्रा, तुला जवळून, मधून किंवा दुरून, जेथून बोलविलें असेल तेथून तूं इकडे ये.

सूक्त एकेचाळिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता—इंद्र; छंदः—गायत्री.

१. हे वज्रधरा इंद्रा, आम्ही तुला सोमपानार्थ बोलावीत आहों. तरी तूं आपल्या हरिद्वर्ण घोड्यांनीं इकडे सत्वर ये.

२. आमचा ऋत्विज होतृकर्मार्थ बसला आहे. दर्भ जवळ जवळ अंथरले आहेत. सोमरस काढण्याकरतां सकाळींच दगडांची योजना झाली आहे.

३. हे स्तोत्रपाठकांनो, येथें हीं स्तोत्रें केलीं जात आहेत. येथें दर्भावर बसा. हे शूरा, तूं पुरोडाश भक्षण कर.

४. हे वृत्रहन्त्या स्तुतिप्रिय इंद्रा, तूं आमच्या यज्ञांत, आमच्या स्तोत्रांत आणि क्थांत रममाण हो.

५. गाई वासराला चाटतात त्याप्रमाणें विशाल आणि बलशाली आणि सोमपी इंद्राला आमच्या बुद्धिपुरःसर केलेल्या प्रार्थना आळवीत आहेत.

६. हे इंद्रा, तूं आम्हांला मोठें धन देऊन सोमरसयुक्त अन्न भक्षण करून आनंदित हो. तुझा भक्त अशा माझी निंदा होऊं देऊं नको.

७. हे इंद्रा, आम्ही तुझी इच्छा करीत हविरन्नपूर्वक तुला स्तवीत आहों. तर हे वसो, तूंहि आम्हांवर कृपा दृष्टि ठेव.

८. हे हरिद्वर्णअश्वप्रिय इंद्रा, तूं आपले घोडे आम्हांपासून दूर सोडूं नकोस. इकडे ये आणि हे आम्ही दिलेलें हविरन्न भक्षण करून येथें प्रसन्न हो.

९. हे इंद्रा, तुझे आयाळ असलेले आणि घामानें डबडबलेले घोडे तुला सुखकारक रथांतून दर्भासनावर बसण्यासाठीं इकडे आणोत.

सूक्त बेचाळिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता—इंद्र; छंदः—गायत्री.

१. हे इंद्रा, आम्हांला आपला वाटणाऱ्या अशा घोडे जोडलेल्या रथांत बसून तूं येथें गोरस मिश्रित असें सोमपान करण्याकरतां इकडे ये.

२. हे इंद्रा, दगडांनीं काढलेला आणि दर्भावर ठेवलेला मदकर सोम पिण्याकरतां तूं ये आणि हा सोम यथेच्छ पिऊन तृप्त हो.

३. येथून पाठविलेल्या आणि मनापासून केलेल्या ह्या माझ्या स्तुति इंद्राला सोम पिण्यासाठीं आणण्याकरतां त्याच्याकडे जावोत.

४. सोमपानार्थ आम्ही इंद्राला स्तोत्रें म्हणून बोलावीत आहों. त्याची प्रशंसा केली असतां तो येथें अनेकदां आला आहे.

५. हे महाबलशाली शतक्रतो इंद्रा, हे सोमरस तुझ्या पोटांत जावोत.

६. हे बुद्धिमान इंद्रा, लढाईंत तूं शत्रूंचा धुव्वा उडविणारा आणि लूट मिळविणारा आहेस असें आम्ही जाणतों. आणि म्हणून तुझ्या धनाची आम्ही याचना करतों.

७. हे इंद्रा, बळकट दगडांच्या साहाय्यानें काढलेला आणि मधुर गोरसमिश्रित आणि यवमिश्रित असा हा सोमरस पिण्याकरतां तूं ये आणि पी.

८. तुला पिण्यासाठीं म्हणून हे इंद्रा, मी हा सोमरस तुझे घरींच धाडीत आहे. तूं तो पिऊन प्रसन्न हो.

९. रक्षणेच्छु असे आम्ही कुशिक, हे इंद्रा, पुरातन अशा तुला सोमपानार्थ बोलावीत आहों.

सूक्त त्रेचाळिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. तूं रथारूढ होऊन इकडे ये. प्राचीन काळापासून तूंच सोमपान करतोस. तुझे प्रिय सखे जे घोडे त्यांना दर्भाजवळ सोड. हवि अर्पण करणारे भक्त तुला बोलावीत आहेत.

२. पुष्कळ लोकांना वगळून तूं हे इंद्रा, आमच्याकडे ये. तूं आपल्या घोड्यांनीं आमच्या कळक-

ळीच्या प्रार्थना ऐकण्याकरतां ये. स्तोत्रबद्ध अशा ह्या तुझ्या सुंदर स्तुतींनीं तुझ्या सख्याकरतां तुझा धांवा केला जात आहे.

३. हे इंद्रदेवा, आमचीं स्तोत्रें तुझें महत्व वाढवीत आहेत. तूं आपल्या हविद्वर्ण घोड्यांसह आमच्या यज्ञांत लौकर ये. कारण हविरन्नयुक्त असा तुझा भक्त मी तुला मदकर आणि मधुर सोमरसपानार्थ स्तोत्रानें बोलावीत आहें.

४. रथ सुंदर रीतिनें ओढणारे, धष्टपुष्ट, आणि बळकट असे तुझे सखे हरिद्वर्ण घोडे तुला येथें वाहून आणोत. लाह्यासह हवि भक्षण करणारा असा तो इंद्र आपल्या सख्याचें माझें स्तोत्र ऐको.

५. हे इंद्रा, तूं मला लोकांचा रक्षणकर्ता कर. हे मघवन व हे सोमयुक्ता, राजा कर. इंद्रा, तूं मला सोम पिणारा कर. ऋषि कर. आणि अक्षय धन दे.

६. हे इंद्रा, बलशाली आणि मदयुक्त होत्साते घोडें रथास जोडले जाऊन तुला इकडे वाहून आणोत. वीर्यशाली अशा त्या आपल्या हातांनीं चांगलें थापटलेलें आणि वेगवान अश्व द्युलोकांच्या सर्व दिशांना सरळ मार्गांनीं धावत असतात.

७. हे इंद्रा, मोठ्या बलानें काढलेला हा बलकर सोमरस तूं पी. सोमरस पिण्यासाठीं उत्सुक अशा तुझ्यासाठीं श्येनानें हा सोम आणिला आहे. ह्या सोमरसानें मत्त झालेला तूं शत्रूंचा धुव्वा उडवतोस आणि गौळवाडे मोकळे करतोस.

८. सुखकर, धनवान आणि नरश्रेष्ठ अशा इंद्राला आम्ही लढाई आणि घनघोर संग्रामांत रक्षणार्थ बोलावतों. तो स्तोत्रें ऐकणारा, उग्र, लढाईत शत्रूंचा निःपात करणारा आणि लूट जिंकणारा आहे.

सूक्त चव्वेचाळिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–इंद्र; छंदः—बृहती.

१. हे इंद्रा, सुवर्णवर्णाच्या दगडांनीं कुटून काढलेला हा सुंदर सोमरस तुला अर्पण असो. हे इंद्रा, तो सेवन करण्याकरतां तूं इकडे ये आणि कांतिमान रथांत आरूढ हो.

२. सुंदर सोमाची इच्छा करणारा तूं उषेला उदित करतोस आणि सूर्याला प्रकाशित करतोस. हे हरिदश्व इंद्रा विद्वान आणि बुद्धिमान असा तूं सर्व संपत्ति वृद्धिंगत करतोस.

३. इंद्र हरिद्वर्ण सोमानें युक्त असलेल्या द्युला आणि हिरवट कान्तीच्या पृथ्वीला धारण करतो कीं जेथें सुवर्णकांति घोड्यांना विपुल खाद्य आहे. आणि जेथें इंद्र संचार करीत असतो.

४. तो बलशाली आणि तेजस्वी इंद्र उदय पावतांच सर्व जग प्रकाशमान होतें. तो तेजस्वी इंद्र तेजस्वी आयुधें आणि तेजस्वी वज्र हातांत धारण करतो.

५. इंद्रानें, तेजस्वी, चकाकणारे आणि कांतिमान वज्र बाहेर काढलें. आणि सुवर्णवर्णाच्या दगडांनीं कुटून काढलेला सोमरस आणि गाई घोडे बाहेर काढले.

सूक्त पंचेचाळिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–इंद्र; छंदः—बृहती.

१. हे इंद्रा, मोरासारखा शेपटाचा पिसारा असलेल्या आणि आनंदी अशा घोड्यांनीं तूं ये. पारधी पक्ष्याची पारध करतात तशी तुझी पारध कोणी न करो. (तूं कोणाच्याही जाळ्यात न सांपडोस.) निर्जल प्रदेशाला मागें टाकून जावें त्याप्रमाणें सर्वांना टाकून तूं आम्हांकडे ये.

२. हरिद्वर्ण घोड्यांना प्रेरणा करण्यासाठीं रथारूढ होणारा इंद्र शत्रूंचा नाश करणारा, वलाला फोडून टाकणारा, नगरें विच्छिन्न करणारा, उदकांना मार्ग मोकळा करून देणारा आणि प्रबलांचाही निःपात करणारा आहे.

३. गंभीर समुद्र जसा भरून असतो, किंवा गाईची कास जशी भरलेली असते, तसा तूं उपासकाला समृद्ध करतोस. चांगल्या पाळलेल्या गाई कुरणाकडे जातात किंवा ओहोळ ओढ्याकडे धांवतात त्याप्रमाणें सोमरस तुजकडे जात आहे

४. हे इंद्रा, व्यवहार जाणणाऱ्या मुलाला पिता जसा धनांश देतो, तशी तूं आम्हांला संपत्ति दे. ज्याप्रमाणें एकादा मनुष्य पिकलेलें झाड हातांत आंकडी घेऊन फळासाठीं हालवितो, त्याप्रमाणें तूं आम्हांला इच्छापूरक धन दे.

५. हे इंद्रा, तूं स्वतंत्र आणि स्वतःसिद्ध राजा आहेस. तूं उत्तम राज्यकर्ता आणि स्वतंत्र व उत्कृष्ट यश मिळविणारा आहेस. हे बहुस्तुत इंद्रा, पराक्रमानें अत्यंत प्रबळ होत्साता आम्हांला उत्कृष्ट प्रकारचें वैभव दे.

सूक्त शेहेचाळिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, तूं लढवय्या, पराक्रमी, स्वयंप्रकाशित, उग्र, सदा तरुण, शत्रुनाशक, जरारहित, वज्रयुक्त, आणि प्रख्यात असा आहेस. तुझे पराक्रम फार मोठे आहेत.

२. हे इंद्रा, तूं प्रबळ, शक्तिमान आणि श्रेष्ठ आहेस. तूं आपल्या पराक्रमानें दुसऱ्यांचा पाडाव करतोस. ह्या सर्व जगताचा तूंच एकटा राजा आहेस. तूं शत्रूंशीं लढून त्यांना हाकून दे आणि भक्तांना राहण्यास जागा दे.

३. देदीप्यमान इंद्र पर्वतापेक्षांहि मोठा आहे. देवांपेक्षांहि तो सर्व बाजूंनीं श्रेष्ठ आहे. इंद्र आपल्या सामर्थ्यानें द्यावापृथिवीपेक्षांहि मोठा आहे. सोमवान इंद्र विस्तीर्ण आणि महान अन्तरिक्षापेक्षांहि मोठा आहे.

४. विशाल, गंभीर, जात्याच उग्र, विश्वव्यापी, भक्तांचा रक्षणकर्ता, अशा इंद्राला, नद्या समुद्रांत शिरतात, त्याप्रमाणें पिळलेला सोमरस पूर्वींपासून प्राप्त होत आहे.

५. हे इंद्रा, माता गर्भ धारण करते, त्याप्रमाणें द्यावापृथिवी ज्या सोमाला धारण करतात, तो सोम अध्वर्यू तुला अर्पण करीत आहेत. तो सोम, हे वीरा, तुला पिण्यासाठीं भक्त शुद्ध करीत आहेत.

सूक्त सत्तेचाळिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, मरुद्गणांसहित बलशाली असा तूं मदयुक्त होण्याकरतां व लढण्यासाठीं सज्ज होण्याकरतां यथेच्छ सोम पी. मधुर सोमाची धार पोटांत ओत. पुरातन काळापासून तूं सोमाचा राजा आहेस.

२. हे शूर वृत्रहन्त्या इंद्रा, विद्वान, मरुद्गणानें युक्त, शूर, असा तूं सोम पी. शत्रूंना ठार मार. वैऱ्यांचा नायनाट कर. आणि आम्हांला सर्व बाजूंनीं अभय दे.

३. काल जाणणारा तूं, हे इंद्रा, योग्य काळीं सर्व मित्रभूत देवांसह आम्ही काढलेला सोमरस पी. ज्या मरुतांना तूं सोमरसाचा भाग देता झालास, त्या मरुतांनीं वृत्रहननाच्या वेळीं तुला साहाय्य केलें आणि तुझें बळ वाढविलें.

४. हे मघवन, ज्या मरुतद्गणांनीं अहीला मारण्याच्या वेळीं तुझें बळ वाढविलें, तेजस्वी अशा ज्यांनीं शंबराला मारण्याच्या वेळीं आणि गाई मिळविण्याच्या वेळीं तुला मदत केली, जे बुद्धिमान मरुत तुला अजनहि आनंदित करतात, त्या मरुद्गणासवर्तमान हे इंद्रा, तूं सोम पी.

५. मरुद्गणासहित, बलशाली, समृद्ध, सामान्य शत्रु नसलेला, स्वर्गीय, शास्ता, सर्व जगाला भारी असणारा, उग्र आणि बलप्रद अशा इंद्राला अधिक नव्या प्रकारचें संरक्षण मिळावें म्हणून आम्ही बोलावितों.

सूक्त अठ्ठेचाळिसावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. जो जन्मतःच सुंदर वीर झाला तो इंद्र, पिळून काढलेला सोमरस अर्पण करणाऱ्या उपासकाचें रक्षण करो. हे इंद्रा, दूधमिश्रित केलेल्या अशा ह्या सुंदर सोमाचें तूं यथेच्छ पान कर.

२. हे इंद्रा, तूं ज्या दिवशीं जन्मास आलाच त्याच दिवशीं तुला पर्वतस्थ सोमरस पिण्याची इच्छा होऊन तो तूं प्यालास. तुला जन्म देणाऱ्या तरुण मातेनें आपल्या थोर बापाच्या घरीं तो रस पोटभर पाजिला.

३. त्यानें आईजवळ जाऊन अन्न मागितलें. तेव्हां तिच्या कासेंत त्याला तेजस्वी सोम दृष्टीस पडला. तेव्हां चाणाक्ष अशा त्यानें दुसऱ्या सर्वांला जावयास लावलें आणि आपण एकटा संचार करीत राहिला. सर्वतोमुख इंद्रानें मोठें पराक्रम केले आहेत.

४. उग्र, शत्रुनाशक, विजयशाली, अशा त्या इंद्रानें यथेष्ट रूपें घेतलीं. जन्मतःच त्यानें त्वष्ट्याचा पराभव केला. आणि चमसपात्रांतील सोमरस तो बलत्कारानें प्याला.

५. त्या सुखकर, धनवान, नरश्रेष्ठ इंद्राला आम्हीं लढाईच्या प्रसंगीं आणि घनघोर युद्धांत संरक्षणार्थ बोलावितों. स्तुति ऐकणारा, उग्र, असा तो इंद्र युद्धांत शत्रूंना ठार करणारा आणि धनाच्या लुटी मिळविणारा आहे.

सूक्त एकूणपन्नासावें.

ऋषिः—विश्वामित्र. देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. ज्याच्या सान्निध राहून सर्व सोमपी आपल्या इच्छा तृप्त करून घेतात, द्यावापृथिवींनीं ज्याला महान पराक्रमी असा केलें, देवांनीं ज्याच्याकरतां वृत्राला ठार

मारण्यासाठीं विभुनिर्मित वज्र तयार केलें, अशा त्या श्रेष्ठ इंद्राची स्तुति करा.

२. स्वयंप्रकाशमान, नरश्रेष्ठ, हविर्द्वर्ण घोड्यावर आरूढ झालेला, संग्रामांत शत्रूंना अजिंक्य, असा हा इंद्र सामर्थ्यवान आणि शूर अनुयायांचा उत्कृष्ट सेनापति होतो. तो सर्वगामी इंद्र दस्यूंचे प्राण हरण करता झाला.

३. बलशाली, संग्रामांत घोड्याप्रमाणें विजयी, द्यावापृथिवी व्यापून टाकणारा आणि दानशूर इंद्र भक्ताला मोठ्या राजाप्रमाणें स्तवनीय होय. अन्नदायक इंद्र पित्याप्रमाणें प्रिय आणि बोलावल्याबरोबर येणारा आहे.

४. लोकांनीं स्तुति केलेला असा तो इंद्र द्युलोक आणि अंतरिक्ष यांचा धारणकर्ता आहे. तो रथासारखा आहे. नियुतांनीं वायु जसा नियमित असतो तसा तो आहे. तो रात्र पाडणारा आणि सूर्य उत्पन्न करणारा आणि येणेंप्रमाणें, श्रीमंताची वाणी धन वाटून देतें त्याप्रमाणें दिवसरात्रींची विभागणी करणारा आहे.

५. कल्याणकर, धनवान आणि नरश्रेष्ठ इंद्राला आम्ही लढाईंत आणि घनघोर संग्रामांत संरक्षणार्थ बोलावतों. स्तुति ऐकणारा, उग्र, असा तो इंद्र युद्धांत शत्रूंना ठार करो व त्यांच्या धनाच्या लुटी मिळवो.

सूक्त पन्नासावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–इंद्र; छंदः–त्रिष्टुभ.

१. बलशाली, भयंकर, मरुद्गणासहित असलेला, सोमाचा अधिपति असा हा इंद्र स्वाहा म्हणून दिलेला सोम पिवो. तो सर्वव्यापी इंद्र ह्या हविरन्नानें तृप्त होवो. हा हवि त्याच्या शरीराला सुख देवो.

२, तुझे सेवक असे दोन घोडे मी तुला येथें लौकर येण्यासाठीं जोडतो. हे संरक्षण करणारे आहेत अशी ह्यांची पूर्वकाळपासून ख्याती आहे. हे रूपवान इंद्रा, ते हरिद्वर्ण घोडे तुला येथें आणून सोडोत. ह्या चांगल्या रीतीनें काढलेल्या सुंदर सोमाचें तूं पान कर.

३. स्तुतिपाठक भक्तांना संकटापार नेणारा इंद्र सर्वांत मोठा आहे, म्हणून इंद्रानें सोम प्यावा याकरितां गोरस घालून पातळ केलेला सोमरस इंद्रास अर्पण केला आहे. हे सोमवान इंद्रा, सोमरस पिऊन आनंदित होणारा तूं अनेक प्रकारच्या गाई मिळवून दे.

४. आम्हाला गाई आणि घोडे देऊन आमची इच्छा पूर्ण कर. आणि उत्तम धन देऊन प्रख्यात कर. स्वर्गसुख इच्छिणारे, विप्र कुशिक त्यांनीं, हे इंद्रा, तुझ्यासाठीं हें स्तोत्र प्रेमानें रचिलें आहे.

५. कल्याणकर, धनवान आणि नरश्रेष्ठ इंद्राला आम्ही लढाईंत आणि घनघोर संग्रामांत रक्षणार्थ बोलावितों. स्तुति ऐकणारा, उग्र, असा तो इंद्र युद्धांत शत्रूंना ठार करो आणि त्यांच्या धनाची लूट करो.

सूक्त एकावन्नावें,

ऋषिः--विश्वामित्र; देवता–इंद्र; छंदः–१–३ जगती, ४–९ त्रिष्टुभ, १०–१२ गायत्री.

१. मनुष्यांचें धारण करणारा, धनसमृद्ध, स्तुत्य, वर्धनशील, बहुस्तुत, अमर, दररोज सुंदर स्तोत्रांनीं स्तविलेल्या, अशा त्या इंद्राला ह्या मोठ्या स्तुति प्राप्त होवोत.

२. शतक्रतु, विशाल, बलवान, दानशूर, शत्रूंचीं नगरें फोडणारा, विजयशाली, उदकांना वाट करून देणारा, स्वतःच्या स्थानावर स्थित असलेला, शत्रूंचा पराभव करणारा आणि स्वर्गप्राप्त करून घेणारा अशा ह्या इंद्राकडे माझी स्तुति सर्व बाजूंनीं जात आहे. (अशा ह्या इंद्राची मी सर्व प्रकारें स्तुति करीत आहे.)

३. धनांचा अधिपति जो इंद्र त्याच्याजवळ स्तोत्रकर्त्यांची प्रशंसा होते. निष्कपट स्तुतींची इंद्र योग्य रीतीनें संभावना करतो. भक्ताच्या घरीं तो प्रसन्न असतो. सर्व शत्रूंचा पराभव करणाऱ्या आणि गर्विष्ठ शत्रूंना ठार मारणाऱ्या इंद्राची तूं (हे विश्वामित्रा,) स्तुति कर.

४. शूरांना शूर आणि वीर्यशाली अशा तुझीं गाणीं आणि स्तोत्रें म्हणून ऋत्विग्जन पूजा करीत आहेत. तो महान कर्में करणारा सामर्थ्य देतो. त्यास नमस्कार असो. ह्या जगाचा पुरातन काळापासून तो एकटाच अधिपति आहे.

५. मानवांवर त्याचा अंमल पूर्वींपासूनचाच आहे. त्याच्याच आज्ञेनें नानाविध संपत्ति पृथ्वी धारण करीत आहे. इंद्राच्यासाठींच द्यावापृथ्वी, फार काय पण उदकें, मनुष्यें आणि अरण्यें हीं सर्व धनाचें संरक्षण करीत असतात.

६. हे हरिद्वर्ण अश्वयुक्त इंद्रा, स्तोत्रें म्हणून आणि स्तुति करून तुझी प्रशंसा सर्वत्र एकसमयावच्छेदें करून

सुरू असते. तिचा तूं स्वीकार कर. तूं आम्हांला अगदीं नव्या प्रकारचें संरक्षण दे. हे सख्या इंद्रा, तूं स्तोत्याला धन दे.

७. हे मरुतांसहित इंद्रा, शार्यातांच्या येथें तूं जसा सोमरस प्यालास तसा येथें पी. हे शूरा, चांगल्याप्रकारें यज्ञ करणारे कवि तुझ्या कृपेंत राहून आणि तुला हवि देऊन तुझी सेवा करतात.

८. हे इंद्रा, मित्रभूत मरुतांसह तूं आम्ही काढलेला हा सोमरस इच्छापूर्वक येथें येऊन पी. हे बहुस्तुत इंद्रा, जेव्हां तूं जन्मास आलास तेव्हांच तुला सर्व देवांनीं महायुद्धाकरतां सिद्ध केलें.

९. हे मरुतांनो, वृष्टि करण्याच्या कामीं इंद्र तुमचा सखा होय. ज्ञानशूर मरुतांनीं इंद्राला संतुष्ट केलें. त्यांच्या सहवर्तमान वृत्रहन्ता इंद्र, उपासकाच्या घरीं सोमरस पान करो.

१०. हे स्तुतिप्रिय इंद्रा, हे धनाधिपते, मोठ्या बळानें काढलेला हा सोमरस तूं पी.

११. हे इंद्रा, तुला अनुरूप असा हा सोम आहे. ह्या सोमरसांत तूं आपलें शरीर बुडीव. तो सोमार्ह अशा तुला आनंदित करो.

१२. हे शूर इंद्रा, सोमानें तुझें उदर भरून जावो. आणि स्तोत्रानें तुझें डोकें भरो. आणि संपत्तीकरतां तुझे बाहू स्फुरण पावोत.

सूक्त बावन्नावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–इंद्र; १–४ गायत्री, ५ त्रिष्टुभ, ६ जगती ७–८ त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, धानायुक्त, करम्भयुक्त, अपूपयुक्त आणि स्तुतियुक्त असा आमचा हवि तूं प्रातःकाळीं सेवन कर.

२. हे इंद्रा, हा पक्क पुरोडाश तूं सेवन कर आणि त्याची वाखाणणी कर. हविरन्न तुलाच अर्पण केलें जात आहे.

३. कामी पुरुष नवयुवतीला भोगतो, त्याप्रमाणें तूं आमचा पुरोडाश भक्षण कर आणि आमच्या स्तुतींचा स्वीकार कर.

४. हे पूर्वींपासून प्रख्यात असणाऱ्या इंद्रा, प्रातःसवनाच्या वेळीं तूं आमचा पुरोडाश सेवन कर. तुझा पराक्रम फार मोठा आहे.

५. माध्यंदिन सवनाच्या वेळीं धाना आणि पुरोडाश येथें तुला प्रिय होवो. त्या सवनांत स्तोत्रकर्ता व स्तुतिपाठक लगबगीनें, बलाची इच्छा करीत, स्तुतींनीं तुझी उपासना करीत असतो.

६. हे बहुस्तुत इंद्रा, तृतीय सवनामध्यें आम्ही अर्पिलेला धानायुक्त पुरोडाश तूं स्वीकार. हे कवे, ऋभु आणि वाज यांनीं युक्त अशा तुला हविरन्नयुक्त असे आम्ही स्तुतींनीं प्रार्थित आहों.

७. हे इंद्रा, पूषनसह असणाऱ्या तुझ्याकरतां करंभ तयार केला आहे. हे अश्वाधिपते, तुझ्या हरिद्वर्ण अश्वासाठीं धाना तयार केल्या आहेत. हे शूरा, हे विद्वाना, हे वृत्रहन्त्या इंद्रा, मरुतांसहवर्तमान तूं अपूप (अनरसे) खा आणि सोम पी.

८. ह्या मानवांतील वीरश्रेष्ठाला धाना आणि पुरोडाश लौकर द्या. हे विजयशाली इंद्रा, दररोज तुला अशाच धाना अर्पण केल्या जातात. त्या तुला सोमपानासाठीं उत्साहित करोत.

सूक्त त्रेपन्नावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–१ इंद्रापर्वत, २–१४ इंद्र, १५–१६ वाच्, १७–२० रथांगें, २१–२४ इंद्र; छंदः—१–९, ११, १४, १५, १७, १९, २१, २३, २४ त्रिष्टुभ, १०, १६ जगती, १२, २०, २२ अनुष्टुभ, १३ गायत्री, १८ बृहती.

१. हे इंद्र आणि पर्वतहो, तुम्ही मोठ्या रथानें सुंदर आणि चांगल्या वीरांनीं युक्त अशी संपत्ति घेऊन या. हे देवहो, तुम्ही यज्ञांत हविरन्न भक्षण करा. स्तुतींत थोरवी पावा, आणि हवीनें प्रसन्न व्हा.

२. हे धनवंता, तूं सुखानें येथें रहाच. जाऊं नकोस. चांगला पिळून काढलेला सोम मी तुला अर्पण करतों. हे पराक्रमी इंद्रा, मुलानें बापाचा पदर धरावा त्याप्रमाणें मी अत्यंत मधुर स्तुति करून तुझा पदर धरीत आहे.

३. हे अध्वर्यो, आपण दोघे स्तुति करूं या. मी म्हटलेलें तूं पुनः म्हण. इंद्रासाठीं गोड स्तोत्र करूं या. यजमानाच्या दर्भासनावर तूं येऊन बैस आणि आतां इंद्राचें स्तोत्र आपण गाऊं.

---

३ टीपः—पोवाडा म्हणतांना किंवा अभंग म्हणतांना एक जण म्हणतो तसेंच दुसरा म्हणतो तसा सूक्त म्हणण्याचा प्रकार दिसतो. (प्रतिगर, आ. ७ ११.)

४. पत्नी म्हणजेच घर होय. पतीचें निवासस्थान म्हणजे पत्नीच होय. हे मघवन, रथास जोडलेले हरिदश्व तुला येथें नेवोत. आम्ही जेव्हां केव्हां सोमरस काढूं तेव्हां तेव्हां दौत्य करण्यासाठीं अग्नि तुझ्याकडे येत जाईल.

५. हे मघवन, तूं जा. आणि ये. हे भ्रात्या इंद्रा, दोन्ही ठिकाणीं तुझें प्रयोजन आहे. जेथें तुझा महान रथ थांबावयाचा, तेथें खिंकाळणारा घोडा सुटावयाचा.

६. हे इंद्रा, तूं सोम पी. तुझ्या घरीं तुझी कल्याणी भार्या आणि सुख आहे. जेथें तुझा महान रथ थांबावयाचा, तेथेंच घोडे मोकळे सुटून समृद्ध व्हावयाचे.

७. हे इंद्रा, उदार यजमान विविधस्वरूपाचें अंगिरस, आणि प्रबळ द्युचे वीर्यशाली पुत्र मरुत विश्वामित्राला ह्या अश्वमेधांत संपत्ति देऊन त्याचें आयुष्य वाढवोत.

८. मघवा निरनिराळीं रूपें धारण करतो, आणि आपल्या शरीरापासून अनेक शरीरें निर्माण करतो. वेळोवेळीं सोम पिणारा सत्यवान इंद्र त्याची प्रार्थना केली असतां द्युलोकांहून दररोज तिनदां एकसमयावच्छेदेकरून येतो.

९. देवजात, देवप्रेरित, मनुष्यांचा नायक असा महान ऋषि विश्वामित्र अथांग पाणी असलेल्या नदीला थांबविता झाला. जेव्हां विश्वामित्रानें सुदासाकडून यज्ञ करविला, तेव्हां कुशिकांचा इंद्र आवडता झाला.

१०. हे लोकनायक ऋषीहो, हे विप्रांनो, हे कुशिकांनो, तुम्ही ग्राव्यांनीं हंसाप्रमाणें ध्वनि करा आणि यज्ञांत सोमरस काढून आनंदानें गाणें गात श्लोक तयार करा. आणि देवांसह मधुर सोमरस प्या.

११. हे कुशिकांनो, चला तयार व्हा. आणि धनप्राप्तिकरतां सुदासाचा घोडा सोडा. राजा इंद्र पूर्वेकडील, पश्चिमेकडील आणि उत्तरेकडील शत्रूंना ठार करो आणि पृथ्वीवर उत्तम ठिकाणीं यज्ञ करो.

१२. ज्यापेक्षां मी ह्या उभय द्यावापृथिवीला आणि इंद्राला स्तविलें आहे त्यापेक्षां विश्वामित्राचें हें स्तोत्र ह्या भारतीय जनांना रक्षो.

१३. विश्वामित्रांनीं वज्रधारी इंद्राकरतां स्तोत्र रचिलें आहे. तो आम्हांला चांगल्या संपत्तीनें युक्त करो.

१४. तुझ्या गाई कीकटामध्यें काय करीत आहेत? सोमांत घालण्यासाठीं लागणारें दूध गाई देत नाहींत. आणि पायसहि शिजवीत नाहींत. हे मघवन, व्याजबट्ट्याचा धंदा करणाऱ्या इसमाचें धन आम्हांला दे. आणि नैचाशाखाचेंहि धन आम्हांस दे.

१५. जमदग्नीनें दिलेली,अज्ञान नाहींसें करणारी ससर्परी मोठा नाद करती झाली. सूर्याची मुलगी देवलोकीं अजर आणि अमर अन्न पोंचविती झाली.

१६. पंचजनामध्यें असलेलें धन ससर्परी आम्हांसाठीं त्यांजपासून आणो. पंख असलेली आणि नवें आयुष्य धारण करणारी ती मला पलस्तिजमदग्नींनें दिली.

---

४. टीप:—न गृहं गृहमित्याहुर्गृहिणी गृहमुच्यते ।

९. टीप:—३.३३ सूक्त पहा.

११. टीप:—हा विश्वामित्राच्या अश्वमेधाचा उल्लेख दिसतो आहे.

१४ टीप:—कीकट म्हणजे अनार्य देश, असें सायणाचार्य व यास्काचार्य म्हणतात. वसईपासून उत्तरेला निर्मळ गांवीं कार्तिक वद्य १०–११–१२ या तीन दिवशीं यात्रा भरते. ती शंकराचार्यांची तेथें समाधि आहे त्याची यात्रा होय. ती समाधि घेतलेला देश कीकट होय, असें वेदार्थयत्नकार पंडित म्हणतात. उत्तर हिंदुस्थानांतील बिहार–मगध प्रान्त असावा असें कांहींचे म्हणणें.

राजवाडे कीकटांना कैकाडी म्हणतात.

ज्याचे पुत्रपौत्र शुद्रिणीच्या पोटीं जन्मले आहेत. त्याच्या कुळांतील लोकांस नैचाशाख म्हणतात. म्हणजे हलक्या कुळांत उत्पन्न झालेला.

यामध्यें यज्ञ न करणारे, व्याजबट्टा करणारे आणि हलक्या कुळांत उत्पन्न झालेल्या लोकावर विशेष कटाक्ष दिसतो.

प्रमगंद म्हणजे व्याजबट्टा करणारा नसून राजा होता आणि त्याचें आधिपत्य कीकटावर होतें असें म्हणणेंहि शक्य आहे.

१५–१६ टीप:— ससर्परीविषयीं पुढील इतिहास लिहिला आहे. सौदास राजाच्या यज्ञांत वसिष्ठाचा मुलगा शक्ति यानें विश्वामित्राचा भाषणांत आणि सामर्थ्यांत पराभव केला. आणि त्याला यज्ञांतून हाकून दिला. तेव्हां जमदग्नीनें सूर्यापासून ससर्परी नांवाची सौरी किंवा ब्राह्मी वाणी आणून दिली. कुशिकांची बुद्धिहीनता नाहींशी झाली. ससर्परी म्हणजे भाषणांतील विशेष प्रकारचें कौशल्य असावें असें दिसते:

१७. बैल स्थिर राहोत. आंख घट्ट राहो. ईस न तुटो. जोखड न मोडो. खिळ मोडण्याचें पूर्वींच इंद्र त्यास धरो. हे बळकट रथा, तूं आम्हांजवळ असावेस.

१८. हे इंद्रा, तूं आम्हांला आणि आमच्या लांना बळ दे. तसेंच पुष्कळ काळ जगण्याकरतां तूं आमच्या मुलाबाळांना बळ दे. कारण, तूं बलदाता आहेस.

१९. खैरांचें खांडकें जागच्या जागीं घाल. रथ जात असतां फळी भक्कम राहील असें कर. हे बळकट आणि भक्कम बसविलेल्या आखा तूं भक्कम ऐस. आम्हांस तूं या रथांतून पडूं देऊं नको.

२०. हा वनस्पति आम्हांला न टाको, न दुखवो. आमच्या घरापाशीं जाऊन रथ थांबेपर्यंत, आणि घोडे सुटेतोंपर्यंत सर्व सुरक्षित असो.

२१. हे मघवन, हे शूर इंद्रा, तूं आज आमचें बलिष्ठ संरक्षण देऊन रक्षण कर. जो आमचा द्वेष करतो, तो खाली पडो. ज्याचा आम्ही द्वेष करतो, त्याचा प्राण त्यास सोडून जावो.

२२. तो परशु लाल तापवितो आणि सावरी (शाल्मली) वृक्षाचें फुल खुडावें त्याप्रमाणें शत्रूचे सहज तुकडे करतो. फुटक्या व गळक्या मडक्याप्रमाणें शत्रू फेस बाहेर टाको. (मरून जावो.)

२३. हे लोकहो, तुम्हांला अंतकाची (विश्वामित्राची) करणी कळत नाहीं. म्हणून स्तब्ध अशा मला पशू समजून नेता. शहाणे मूर्खाला हासत नाहींत व गाढवाला घोड्याच्या पुढें नेत नाहींत.

२४. हे इंद्रा, हे भरताचे पुत्र (विश्वामित्र) वियोग जाणतात, संयोग जाणत नाहींत. ते जन्म वैऱ्याच्याप्रमाणें (वसिष्ठावर) घोडे फेकतात. ते संग्रामांत धनुष्य घेऊन फिरतात.

सूक्त चोपन्नावें.

ऋषिः—विश्वामित्रपुत्र प्रजापति; देवता–विश्वेदेव; छंदः—त्रिष्टुभ.

१. त्या श्रेष्ठ, पूज्य आणि स्तुत्य अग्नीप्रीत्यर्थ स्तोते हें स्तोत्र पुनः पुनः एकसारखें म्हणत आहेत. तो घरोघर प्रकाशणारा अमर अग्नि आमचें स्तोत्र ऐको.

२. हे स्तोत्या, महान द्यावापृथिवींना हें स्तोत्र म्हणून अर्पण कर. वस्तुस्थिति नेमकी जाणणारा आणि इष्टसिद्धि इच्छिणारा माझा मनोरथ मार्ग आक्रमण करीत आहे. ह्या द्यावापृथिवींचें स्तोत्र यज्ञांमध्यें म्हणत असतांना तेजस्वी स्तोते यजमानासह आनंद पावतात.

३. हे द्यावापृथिवीहो, तुमचे नियम सत्य आहेत. तुम्ही आमचें मोठें कल्याण करण्यासाठीं समर्थ असा. हे अग्ने, द्यावापृथिवीला हा माझा नमस्कार असो. मी हविरन्न देऊन पूजा करतों आणि धन मागतों.

४. हे नियमबद्ध द्यावापृथिवीनो, सत्यवक्त्या पूर्वऋषींना तुम्हांपासून सर्व मिळाले. हे पृथिवी, लढाईत आरंभीं तुमचा अनुग्रह पावणारे शूर लोक तुम्हांस वंदिते झाले.

५. देवाकडे नेणारा मार्ग कोणता हें खरोखर कोणी जाणिलें आहे ? कोणी येथें सांगितलें आहे ? देवांचें श्रेष्ठ प्रकारचें व गूढ असें जें वर्तन आहे, त्याचा वरवरचा भाग मात्र आमच्या दृष्टीस पडतो.

६. लोकसाक्षी आणि ज्ञानवान (सूर्यानें) अन्तरिक्षांत प्राणिमात्रासह असणारी द्यावापृथिवी पाहिली. पक्ष्याच्या घरट्याप्रमाणें एकच उद्दिष्ट साध्य करणारी द्यावापृथिवी आपापला कार्यभाग करण्याकरतां वेगवेगळीं स्थानें करती झाली.

७. वेगळेपणांत, अविनाशिपणांत, जागरूकपणांत या सर्व बाबींत सारख्या असणाऱ्या दोघी अढळ अन्तरिक्षांत राहतात. आणि अशा या दोघी द्यावापृथ्वी तरुण बहिणी उत्पन्न झाल्या तेव्हां त्यांना लोक जुळ्या नांवानें संबोधूं लागले.

८. ह्या द्यावापृथिवी सर्व भूतांना आपल्यामध्यें धारण करतात. मोठमोठ्या देवांनाहि धारण करीत असतां त्या थकत नाहींत. ह्या चराचर सर्व विश्वाचा आणि चालणाऱ्या आणि उडणाऱ्या सर्व भूतमात्रांचा हा एकच अधिपति होय.

९. महान पिता आणि जनिता जो द्यु, त्याचें आमचें पुरातन काळापासून चालत आलेलें नातें मला

---

१७. टीपः–सुदास राजाच्या यज्ञांतून परत निघाल्यावर विश्वामित्र रथ जोडून त्याची स्तुति करीत आहे.

२३. टीपः––मौनी विश्वामित्राला वशिष्ठानीं बांधून आणलें तेव्हां विश्वामित्र त्यांना म्हणत आहे.

टीपः––२० ते २४ वसिष्ठद्वेषिणी ऋचा म्हणून सर्वानुक्रमणींत दिल्या आहेत. त्या वसिष्ठगोत्रांतील लोक ऐकत नाहींत. ऐकल्यास काय होतें हें बृहद्देवतेंत पुढीलप्रमाणें सांगितलें आहे

शतधा भिद्यते मूर्धा कीर्तितेन श्रुतेन वा ।
तेषां बालाः प्रमीयन्ते तस्मात्तास्तु न कीर्तयेत ॥

अजून स्मरतें, कीं जेथें तेजस्वी स्तोते जाऊन विस्तीर्ण आणि रुंद मार्गावर उभे राहतात.

१०. हे द्यावापृथिवींनो, मी हें स्तोत्र म्हणत आहे. हें सरळ मनाचे, अग्निजिव्ह, तरुण, कवि, अतिशय प्रसिद्ध असलेले, सम्राट असे मित्र, वरुण आणि आदित्य, ते हें माझें स्तोत्र ऐकोत.

११. हे सवित्या, सुवर्णहस्त, सुजिव्ह, आणि द्युलोकांहून यज्ञामध्यें तीन वेळां उडत येणारा तूं देवामध्यें बसून आमच्या स्तोत्राचा स्वीकार कर. आणि नंतर उदयास येऊन आम्हांला सुखप्राप्ति करून दे.

१२. सुकर्मा, सुहस्त, सुरक्षित आणि सत्यनिष्ठ त्वष्टा देव आम्हांला संरक्षणार्थ जरूर तें सर्व देवो. हे ऋभूंनो, पूषा देवासह तुम्ही प्रसन्न व्हा. हे सोमरस काढण्यासाठीं ग्रावे वर उचलणारे हो, तुम्ही आमचा हा यज्ञ पूर्ण करा.

१३. विद्युद्रथ, भाले धारण करणारे, सत्यपुत्र, सर्वदा गमन करणारे आणि यज्ञार्ह असे द्यूचे पुत्र मरुत आणि सरस्वती आमचें स्तोत्र ऐकोत. हे वेगवंत मरुतांनो, तुम्ही आम्हांला वीर्यवान पुत्र व संपत्ति द्या.

१४. कल्याणकारक स्तोत्रें आणि अर्कगीतें ह्या यज्ञांत पहापराक्रमी विष्णूला स्तवोत. तो लांब चाल करणारा आणि वेगवान आहे. त्याला दिशारूपी तरुण माता प्रतिबंध करीत नाहींत.

१५. सकल वीर्यांनीं युक्त, अधिपति, असा इंद्र आपल्या महिम्यानें दोन्ही द्यावापृथिवी भरून टाकिता झाला. नगरभेत्ता, वृत्रहन्ता, विजयी सैन्याचा सेनापति, असा तो इंद्र आम्हांला पशुरूप पुष्कळ धन देवो.

१६. हे नासत्यहो, बांधवांची विचारपूस करणारे तुम्ही माझे आईबापच आहां, तुम्हां अश्वींचें बंधुत्व आणि नांव सुंदर आहे. धनदाते तुम्ही आम्हांला धन देता. अविनाशी असे जे तुम्ही ते भक्ताचें चांगल्या प्रकारें रक्षण करतां.

१७. हे ज्ञात्या देवांनो तुम्ही सर्वव्यापी इंद्र लोकांवर आहां. हा तुमचा मोठा पराक्रम आहे व ही मोठी कीर्ति आहे. हे बहुस्तुत इंद्रा, आमचा मित्रभूत असा तूं प्रिय ऋभूंसहवर्तमान येऊन आमचें स्तोत्र आमचें कल्याण करील असें कर.

१८. अर्यमा, अदिति, अविनाशी नियमांचा धारणकर्ता वरुण, असे हे यज्ञीय देव (आम्ही संसार करीत असतां) आमची अपत्यहीनता नाहींशी करोत. आमचें घर मुलेंबाळें आणि पशुसंपत्तींनीं थाटो.

१९. सर्वत्र उत्पन्न होणारा, देवांचा दूत असा हा अग्नि आम्ही सर्व प्रकारें निष्पाप आहोंत असें म्हणो. पृथिवी, द्यु, उदकें, सूर्य आणि नक्षत्रांसहित विस्तीर्ण अंतरिक्ष आमची प्रार्थना ऐकोत.

२०. बलशाली, अढळस्थानावर स्थित असलेले, आणि हविरन्नानें प्रसन्न झालेले पर्वत आमची प्रार्थना ऐकोत. आदित्यांसह अदितिहि आमचें ऐको आणि मरुत आम्हांस कल्याणकारक सुख देवोत.

२१. आमचा मार्ग सर्वकाळ सुगम आणि अन्नयुक्त असो. हे देवहो, तुम्ही वनस्पति माधुर्यानें भरून टाका हे धनदात्या अग्ने, तूं माझ्या मैत्रींत संकटें आणूं नकोस. उलट पुष्कळ अन्नयुक्त संपत्तींनें माझें घर भरून जाईल असें कर.

२२. तूं हविरन्न भक्षण कर. प्रकाशमान असा तूं आम्हांला अन्न दे. आम्हांकडे अन्न धाडून दे. हे अग्ने, त्या सर्व शत्रूंना तूं लढाईत जिंक आणि प्रसन्न होत्साता आम्हांकरतां सर्व काळ प्रकाशत राहा.

सूक्त पंचावन्नावें.

ऋषिः—विश्वामित्रपुत्र प्रजापति किंवा वाक्पुत्र प्रजापति; देवता–विश्वेदेव; (१ उषा, २–१० अग्नि, ११ अहोरात्र, १२–१४ द्यावापृथिवी, १५ द्यावापृथिवी किंवा रात्रंदिवस, १६ दिशा, १७–२२ इंद्र पर्जन्यात्मा किंवा अग्नि आणि त्वष्टा;) छंदः—त्रिष्टुभ.

१. जेव्हां पूर्वी उषा उगवून गेल्या, तेव्हां आकाशांत अविनाशी महान सूर्य उदयास आला. त्यानें देवांचे नियम पूर्णपणें सिद्धीस नेले. देवांचा हा एक अद्भुत पराक्रम होय.

२. हे अग्ने, देव आमचें वाईट न करोत. आणि मार्ग जाणणारे पितरहि आमचें वाईट न करोत. पुरातन अशा द्यावापृथिवींच्या मधून सूर्य उदयास येतो, हा देवांचा एक अद्भुत पराक्रम होय.

३. माझे मनोरथ सर्वत्र धांवत आहेत. ह्या कर्मामध्यें मी पुरातन जें आहे त्या सर्वांस सुंदर उजळा देत आहें. प्रदीप्त अग्नीमध्यें उजळा दिला जातो. आम्ही खरेंच सांगतों कीं देवांचें हें एक अद्भुत कृत्य आहे.

४. एकच राजा अग्नि अनेक ठिकाणीं व्यापून असतो. तो वेदीवर पडून असतो आणि लांकडांत विभागून असतो. अग्नीची एक माता केवळ धारण करते

आणि दुसरी त्याचें पोषण करतें. हें देवांचें एक अद्भुत कृत्य होय.

५. तो अग्नि जीर्ण वनस्पतींमध्यें वास करतो, तसा तो नव्यांमध्यें असतो. नुकत्याच उपजलेल्या तरुणींमध्येंहि तो वास करतो. कुमारिका विनारेत गरोदर होऊन त्याला प्रसवतात. देवांचें हें एक अद्भुत कृत्य होय.

६. पश्चिम दिशेस निजणारा, दोन माता (द्यावापृथिवी) असलेला असा हा बालक (सूर्य) अधांत्री स्थितींत एकटाच फिरत असतो. हे मित्र आणि वरुण यांचे पराक्रम आहेत, हें देवांचें एक अद्भुत कृत्य होय.

७. हा दोन माता असलेला, यज्ञांचा सम्राट होता व मूलभूत असणारा श्रेष्ठ हवि भक्षण करतो आणि रहातो. सुंदर स्तोत्रें म्हणणारे उपासक सुंदर स्तोत्रें म्हणत आहेत. देवांचें हें एक अद्भुत कृत्य होय.

८. युद्ध करणाऱ्या शूराप्रमाणें एकदां अग्नि धडाडून पेटला म्हणजे त्याच्याकडे अभिमुख असलेले सर्व पराङ्मुख होतात. मननीय अग्नि उदकांत तेजस्वी असा असतो. देवांचें हें एक अद्भुत कृत्य होय.

९. वृद्ध व दूत ह्या ओषधींमध्यें व्यापून असतो. आणि तो थोर द्यावापृथ्वींत सूर्यरूपानें फिरतो व निरनिराळीं शरीरें धारण करून आम्हांस पाहातो. हें देवांचें एक अद्भुत कृत्य होय.

१०. रक्षणकर्ता, विष्णु अत्यंत श्रेष्ठ मार्गांचें संरक्षण करतो आणि प्रिय आणि अविनाशी अशा स्थानांचें धारण करतो. तीं सर्व स्थानें अग्नीनें जाळली आहेत. देवांचें हें एक अद्भुत कृत्य होय.

११. जुळ्या असून दोघी निरनिराळीं रूपें धारण करतात. त्यांच्यापैकीं एक प्रकाशमान आहे तर दुसरी काळी आहे. काळी आणि प्रकाशमान अशा त्या दोघी बहिणी होत. देवांचें हें एक अद्भुत कृत्य आहे.

१२. जेथें माता आणि दुहिता, दोघी दूध देणाऱ्या, अमृताचा पान्हा सोडणाऱ्या, फिरून एक होतात, त्या अन्तरिक्षांत असणाऱ्या द्यावापृथ्वीची मी स्तुति करतों. देवांचें हें एक अद्भुत कृत्य होय.

१३. वासरूं एकीचें, आणि त्याला चाटून ओरडते दुसरीच. धेनु (द्यु) जलवर्जित भूमीनें आपली कास भरून टाकते. तेव्हां ती भूमि सत्यरूप दुधानें पुष्ट होते. (मेघ पाण्यानें भरून जातात.) देवांचें हें एक अद्भुत कृत्य आहे.

१४. भूमि अनेक रूपांचीं शरीरें धारण करते. ती दीड वर्षांच्या वत्साला चाटीत उच्च ठिकाणीं उभी राहते. विद्वान असा मी सत्याच्या स्थानामधून संचार करतों. देवांचें हें एक अद्भुत कृत्य आहे.

१५ आश्चर्यकारक अन्तरिक्षांत पाऊल ठेवावें त्याप्रमाणें त्या दोघी होत. त्यांपैकीं एक गूढ आहे आणि दुसरी प्रकट आहे. त्यांचा मार्ग जरी एकच असला, तरी तो भिन्न भिन्न प्रकारचा आहे. देवांचें हें एक अद्भुत कृत्य आहे.

१६. वासरूं नसलेल्या आणि अमृताचें सिंचन करणाऱ्या अशा निद्रिस्त पण नित्य नव्या तरुण होणाऱ्या धेनु दुधाचा वर्षाव करतात. देवांचें हें एक अद्भुत कृत्य आहे.

१७ जो कामी वीर कांहींच्या पाहून जरी कामनाद करतो, तरी तो दुसऱ्याच कळपांत रेतःसिंचन करतो. कारण तो पृथ्वीचें पालन करणारा, उदार राजा होय. देवांचें हें एक अद्भुत कृत्य आहे.

१८. हे जनहो, ह्या वीराचे घोडे चांगले आहेत. आपण त्याची स्तुति करूं. देवहि तें जाणतात. सहा सहा आणि पांच पांच असे जोडलेले घोडे त्याला वाहतात. देवांचें हें एक अद्भुत कृत्य आहे.

१९. त्वष्टृदेवानें अनेक प्रकारच्या प्रजा निर्माण केल्या आणि विश्वरूप सूर्यानें त्यांचें संवर्धन केलें. हीं सर्व भुवनें त्याचीच आहेत. देवांचें हें एक अद्भुत कृत्य आहे.

२०. मिळत्या विस्तीर्ण द्यावापृथ्वीस त्यानें एकरूप केलें. त्याच्या धनांनीं त्या परिपूर्ण भरलेल्या आहेत. तो वीर शत्रूचें धन हरण करून प्रख्यात होतो. देवांचें हें एक अद्भुत कृत्य आहे.

२१. ह्या पृथ्वीवर, आमचा सर्वाधिपति इंद्र मित्रभूत राजाप्रमाणें राज्य करतो. लढाईत पुढें पाऊल टाकणाऱ्या आणि कल्याण करणाऱ्या वीराप्रमाणें त्याचे मरुत आहेत. देवांचें हें एक अद्भुत कृत्य आहे.

---

५. टीपः--अग्नि हें अपत्य आणि वनस्पति हीं माता अशी कवीनें कल्पना केली आहे.

६. टीपः--ही ऋचा सूर्याला उद्देशून आहे.

१७. टीपः-- मेघ गर्जना करतो एके ठिकाणीं व पाऊस पडतो दुसरीकडेच या कल्पनेवर ही ऋचा अधिष्ठित केली आहे.

२२. हे इंद्रा, वनस्पति आणि आपोदेवी तुझ्या देणग्यांनीं संपन्न आहेत. पृथ्वी तुझ्याच धनाचें धारण करते. तुझे मित्र जे आम्ही तें संपत्तीचा उपभोग घेणारे व्हावें. देवांचें हें एक अद्भुत कृत्य आहे.

सूक्त छप्पन्नावें.

ऋषिः—विश्वामित्रपुत्र किंवा वाक्पुत्र प्रजापति; देवता–विश्वेदेव; छंदः—त्रिष्टुभ.

१. देवांचीं तीं प्रथम आणि शाश्वत कर्में कोणी मायावी किंवा वीर नष्ट करूं शकत नाहींत, द्वेषरहित द्यावापृथिवी नाश पावूं शकत नाहींत. किंवा स्थिर असलेले पर्वतहि वाकूं शकत नाहींत.

२. (संवत्सर) एकटाच स्थित असून सहांचा (सहाऋतू) भार धारण करतो. सत्यस्वरूप आणि अत्यंत वीर्यशाली अशा त्याला गाई (दिवस) येऊन मिळतात. तीन लोक एकावर एक आहेत. त्यांपैकीं दोन (अंतरिक्ष व द्यु) अंतर्हित असून एकच (पृथ्वी) दृष्टिगोचर आहे.

३. तीन वक्षःस्थळें असलेला विश्वरूप आणि तीन कासांचा, अनेक ठिकाणीं ज्याची प्रजा आहे असा, तीन मुखांचा आणि श्रेष्ठ असा तो येतो. बलशाली असा तो पुष्कळांच्या ठिकाणीं (औषधी) रेतःसिंचन करतो.

४. तो त्यांच्या समोर वृद्धि करीत जागृत असतो. मी आदित्यांचें प्रिय नांव उच्चारतों. त्याच्याशीं वहात्या आपोदेवीहि रममाण होतात. पृथक जाणाऱ्या त्या अपोदेवी वर्षाला (कांहीं दिवस) वर्ज्य करतात.

५. हे सिंधूंनो, कवींचीं स्थानें नऊ आहेत, यज्ञामध्यें तीन मातांचा पुत्र (सूर्य) सम्राट असतो. उदकसंबंधीं पूज्य तरुण * तिघीजणी यज्ञांत दिवसातून तीन वेळा येणाऱ्या आहेत.

६. हे सवित्या, तूं द्युलोकांहून दररोज तीन वेळां आम्हांसाठीं संपत्ति आण. आणि दिवसातून तीन वेळा आम्हांस दे. हे भजनीय संरक्षका, तूं आमच्या कल्याणार्थ आम्हांस तीन प्रकारची संपत्ति दे. हे वाग्देवते, तूं आम्हांस संपत्ति दे.

७. सवितृदेव द्युलोकांहून तीन वेळा आम्हांस धनप्राप्ती करून देवो. हे सुहस्त, व राजे मित्रावरुणहो, आपोदेवी आणि द्यावापृथिवी देखील सूर्याच्या येण्यानं आपण समृद्ध व्हावें अशीं त्याची प्रार्थना करतात.

८ तीन अत्यंत उच्च आणि नाश होण्यास कठिण अशी तेजस्वी स्थानें आहेत. त्या प्रबळाचे तीन वीर पुत्र येथें शोभायमान होतात. सत्यस्वरूप, शीघ्रगामी आणि अहिंस्य देव दिवसांतून तीन वेळ यज्ञांत येवोत.

सूक्त सत्तावन्नावें.

ऋषिः---विश्वामित्र, देवता–विश्वेदेव; छंदः---त्रिष्टुभ.

१. अरक्षित, एकटी फिरणारी, अशा माझी मनोरूपी धेनू ज्ञात्या इंद्रानें जाणली. ती तत्क्षणींच विपुल अन्नाचा पान्हा सोडते. आणि म्हणूनच इंद्र, अग्नि आणि इतर देव तिची स्तुति करतात.

२. सुहस्त व बलशाली इंद्र, तो पराक्रमी पूषा आणि इतर देव आकशांत मेघाचे दोहन करते झाले. ज्या अर्थीं माझ्या स्तुतीनें सर्व देव आनंद पावले, त्याअर्थीं हे वसूंनो, आम्हांला सुखाचा उपभोग घेतां येऊं द्या.

३. ज्या स्त्रिया शक्तिवंतापाशीं शक्तीची इच्छा करतात, त्या नम्र होत्सात्या त्याच्या अंगीं असलेलें गर्भसामर्थ्य अनुभवितात. कामवश धेनु मोठें शरीर धारण करणाऱ्या बलवान पुत्राकडे (बैलाकडे) जातात.

४. सोमरस काढण्यासाठीं ग्रावे जोडून या यज्ञांत सुरूप द्यावापृथ्वींचा मी स्तुतीनें धांवा करतों. अनेक प्रकारच्या संपत्तीनीं युक्त, सुंदर आणि पूज्य अशा अग्नीच्या ज्वाला मानवासाठीं वर जात आहेत.

५. हे अग्ने तुझी गोड, बुद्धियुक्त भाषण करणारी देवांमध्यें श्रेष्ठपणा पावलेली अशी जी जिव्हा, तिच्या योगानें तूं सर्व देवांना येथें संरक्षणार्थ आणून बसव आणि त्यास मधुर पेय पाज

६. हे अग्निदेवा, मेघांच्या वृष्टीप्रमाणें सतत वाहणारें आणि विविध प्रकारचें तुझें औदार्य लोकांना पुष्ट करतें. तरी हे जातवेदा, हे वसो, तें तुझें औदार्य आम्हांत वसूं दे आणि सार्वजनिक कल्याणाची बुद्धि आम्हांस दे.

सूक्त अठ्ठावन्नावें.

ऋषिः--विश्वामित्र; देवता–अश्वी; छंदः--त्रिष्टुभ.

१. उषा धेनु पुरातन अग्नीनें इच्छिलेली वस्तु देणारी आहे. बलवती उषेचा पुत्र (सूर्य) आंत

टीपः— *इळा, सरस्वती आणि भारती.

फिरतो. शुभ्र रथारूढ उषा सूर्याला घेऊन येते. उषेचे स्तोत्र अश्वींनींना जागृत करते.

२. (हे अश्विहो,) चांगले जोडलेले घोडे सत्यरूप रथानें तुम्हांला घेऊन येतात. पित्याप्रमाणें तुम्हांस अनुलक्षून यज्ञ सिद्ध होतात. आमची स्तुति निष्फळ करूं नका. कृपणांची निष्फळ करा. आम्ही तुम्हांकरतां हविरन्न सिद्ध केलें आहे. तुम्ही इकडे या.

३. चांगल्या जोडलेल्या घोड्यांनीं चांगल्या चाकांच्या रथानें बलशाली असे तुम्ही येऊन ग्राव्यांचा शब्द ऐका. हे अश्विहो, तुम्ही संकटांत उडी घेणारे आहांत, असे पुरातन विद्वान म्हणतात, तें काय बरें आहे?

४. तुम्ही इकडे लक्ष द्याल काय ? इकडे घोड्यांनीं याल काय ? सर्व लोक अश्वींना बोलावीत आहेत. उषेच्या पूर्वी गोरसमिश्रित हे सोमरस तुम्हांला मित्राप्रमाणें अर्पण केले जात आहेत.

५. हे धनवान व बलवान अश्विहो, देवांच्या मार्गांनीं अनेक लोक ओलांडून तुम्ही येथें या. तुम्हांला हीं मधुर सोमरसपूर्ण पात्रें अर्पण केलीं आहेत.

६. हे वीरांनो, तुमचा पुरातन अनुग्रह आम्हांस साहाय्यकारी आणि सुखकर आहे. तुमची संपत्ति जन्हूकुळांत आहे. आतां पुन्हा आपण सख्यकर आणि सुखकर मैत्री करून एकत्र सोमरसानें आनंद पावूं.

७. हे बलशाली, तरुण, अविनाशी आणि सुरूप अश्विहो, तुम्ही वायूसहित आणि नियुतांसह आघल्या दिवशीं काढलेका सोमरस प्या.

८. हे अश्विहो, स्तुतिपूर्वक व आश्रांतपणें दिलेलीं अनेक हविरन्ने तुम्हांला प्राप्त होतात. सत्यजात आणि सोमाच्या ग्राव्यानीं प्रेरणा दिलेला असा तुमचा रथ तत्क्षणींच द्यावापृथ्वीभोंवतीं फिरूं लागतो.

९. हे अश्विहो, अत्यंत मधुर सोमरस तुम्हांकरतां काढला असून तुम्ही तो आमच्या घरीं येऊन प्राशन करा. तुमचा भव्य रथ सोमरस काढणाऱ्या उपासकाच्या घरीं येत असतो.

सूक्त एकूणसाठावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–मित्र; छंदः—१–५ त्रिष्टुभ, ६–९ गायत्री.

१. मित्र लोकांना हुकूम देऊन आपापलीं कर्में करावयास लावतो. पृथिवी आणि द्युला त्यानें धारण केलें आहे. मित्र सर्वकाळ लोकांना पहात असतो; म्हणून मित्राला घृतयुक्त हवि अर्पण करा.

२. हे आदितिपुत्र मित्रा, जो मानव तुझे नियम पाळतो, तो धनवान होवो. ज्याचें तूं रक्षण करतोस तो मारला किंवा जिंकला जात नाहीं. त्याला दुःख जवळून किंवा दुरूनहि प्राप्त होत नाहीं.

३. रोगरहित, अन्नानें हर्ष पावणारे, जमिनीवर गुढगे टेकून असलेले, आदित्याचे नियम आचरणारे असे आम्ही मित्राच्या कृपेमध्यें असावें.

४. हा मित्र नमस्कारार्ह, चांगलें सुख देणारा, चांगला बलवान, आणि बुद्धिमान राजा उत्पन्न झाला आहे. त्या यज्ञार्ह मित्राच्या कृपेंत आम्ही असावें. त्याच्या कल्याणकर सद्बुद्धींत आम्ही असावें.

५. हा महान आदित्य नमस्कारपूर्वक उपास्य आहे. लोकांना आपापलीं कर्में करावयास लावणारा तो उपासनेनें चांगलें कल्याण करतो. त्या अत्यंत स्तुत्य मित्राला अग्नीमध्यें हवि अर्पण करा.

६. लोकधारक मित्रदेवाची कृपा जयशाली आहे. त्याचें वैभव अत्यंत सुंदर आणि कीर्तिसंपन्न होय.

७. जो कीर्तिमान मित्र आपल्या महिम्यानें द्युलोकाला मागें टाकिता झाला, त्यानें आपल्या कीर्तीच्या योगानें पृथ्वीलाहि मागें सारिली.

८. विजयकारक बल असलेल्या मित्राच्या हुकमतीखालीं पंचजन वागतात. तो सर्व देवांनाहि धारण करतो.

९. मित्र तेजस्वी उपासकजनामध्यें दर्भ अंथरणाऱ्या उपासकासाठीं मनोरथ सफल करणारीं अन्नें देतो.

सूक्त साठावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–ऋभु; छन्दः—जगती.

१. हे पराक्रमी ऋभूंनो, शत्रूंचा पराभव करणारे तेज धारण करणारे, सुधन्वपुत्र, ज्या मायावी कृत्यांनीं तुम्ही यज्ञीय हविर्भाग प्राप्त करून घेतला, तीं कृत्यें तुम्ही ज्ञानानें आणि चातुर्यानें येथेंच करितां झाला.

२. तुम्ही ज्या सामर्थ्यानें चमसाचे विभाग केले, ज्या बुद्धियुक्त चातुर्यानें चामड्यातून गाईला बाहेर काढलें, ज्याच्या योगानें तुम्ही मनानें हरिद्वर्ण घोडे तयार केलें, त्याच पराक्रमाच्या जोरावर, हे ऋभूंनो, तुम्ही देवत्व प्राप्त करिते झाला.

३. ऋभूंना इंद्राचें सख्यत्व प्राप्त झालें. मनुष्य असूनहि ते आपल्या कौशल्यानें अमर बनले. सदाचारी आणि सुधन्व्याचें पुत्र आपल्या कौशल्यानें आणि सत्कृत्यानें अमरत्व पावले.

४. हे ऋभूंनो, सोमरस काढला असतां तुम्ही इंद्राबरोबर त्याच्याच रथांतून येता. आणि तुम्हांला इच्छेनुरूप भोग प्राप्त होतात. हे उपासकहो, हे सुधन्वनपुत्र ऋभूंहो, तुमच्या सत्कृत्यांचें व पराक्रमाचें वर्णन करतां येत नाहीं.

५. हे बलशाली इंद्रा, वाजासह ऋभूंना घेऊन तूं ये आणि पिळलेला व ओतलेला सोमरस दोन्ही हातांनीं पी. हे मघवन, स्तुतींनें आळविलेला तूं वीर्यशाली सुधन्वपुत्रांसह उपासकाच्या घरीं येऊन आनंदित हो.

६. बहुस्तुत इंद्रा, ऋभू आणि वाज यांच्यासह आमच्या ह्या सवनांत सामर्थ्यानें आनंद पाव. हे दिवस आणि देवांचीं आणि मानवांचीं कृत्यें साहजिकपणेंच तुझ्या नियमांनीं चालत आहेत.

७. हे इंद्रा, ऋभु आणि वाज यांच्यासहवर्तमान तूं त्वरेनें स्तोत्याच्या यज्ञीय स्तोत्रांचा स्वीकार करण्यासाठीं येथें ये. हे सहस्राक्षा, शंभर वेगवान घोड्यांसह तूं उपासकाच्या यज्ञीय होमांत ये.

सूक्त एकसष्टावें.

ऋषिः—विश्वामित्र; देवता–उषा; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे अन्नानें अन्नवती उषे, हे धनवति, स्तोत्रपाठकाच्या स्तोत्राचा तूं स्वीकार कर. हे देवी, हे सर्वप्रिये देवी, तूं पुरातन, सदा तरुण, बहुस्तुतियुक्त अशी व्रतांत जातेस.

२. हे देवी उषे, तेजस्वी रथानें युक्त, आणि मधुर वाणीला प्रेरणा देणारी, अमर अशी तूं प्रकाश. महाबलशाली आणि आज्ञाधारक घोडे हिरण्यवर्ण अशा तुला येथें आणोत.

३. हे उषे, अमरत्वाचें द्योतक अशी तूं सर्व भुवनांच्या वर उंच उभी राहतेस. हे नित्य नूतन उषे, चक्राप्रमाणें एकाच स्थानावर फिरणारी तूं तशीच फिरत राहा.

४. अंधःकाररूपी वस्त्र काढून टाकीत टाकीत दिवसाची-सूर्याची-पत्नी, धनसंपन्न, सौभाग्यवती, सदाचारिणी उषा प्रकाश प्रकट करीत करीत द्यूच्या आणि पृथ्वीच्या सीमेपर्यंत पसरत जाते.

५. (हे भक्तहो) तुमच्या समोर सुंदर रीतीनें प्रकाशमान होणाऱ्या उषेची नमस्कारपूर्वक स्तुति करा. मधुर उषा आपलें तेज उंच फेंकित आहे. रमणीय आणि तेजस्वी उषा लखलखीत प्रकाशली आहे.

६. सत्यवती आणि धनसंपन्न उषा, द्युलोकावर तेजानें जागृत झाली असून द्यावापृथ्वीवर सुंदर रीतीनें आरूढ झाली आहे. हे अग्ने, तेजस्वी उषा वर येऊं लागली म्हणजे तूं तिजपाशीं अभिलषणीय धन याचीत असतेस.

७. सत्यभूत दिवसाच्या आरंभीं उषांना प्रेरणा करणारा वीर सूर्य महान द्यावापृथिवीमध्यें प्रवेश करतां झाला. मित्राची आणि वरुणाची श्रेष्ठ माया सुवर्णवर्ण उषेप्रमाणें सर्वत्र प्रकाश पसरते.

सूक्त बासष्टावें.

ऋषिः—१६–१८ जमदग्नि किंवा विश्वामित्र बाकी विश्वामित्र; देवता–१–३ इंद्रावरुण, ४–६ बृहस्पति, ७–९ पूषा, १०–१२, सविता, १३–१५ सोम, १६-१८ मित्रावरुण; छंदः—१–३ त्रिष्टुभ, ४–१८ गायत्री.

१. हीं तुमचीं फिरणारीं, आणि जोरदार शस्त्रें तुमच्या उपासकांच्या अंगावर न फेंकलीं जावोत. हे इंद्रावरुणहो, ज्या यशानें तुम्ही मित्रांना धनवान करतां तें तुमचें यश कोठें आहे ?

२. हा तुमचा उपासक तुम्हाला सदैव रक्षणासाठीं बोलावीत आहे. हे इंद्रावरुणांनो, मरुत आणि द्यावापृथिवी यांच्यासहवर्तमान तुम्ही माझी ही स्तुति स्वीकारा.

३. हे इंद्रावरुणांनो, आमच्या येथें तें धन असो, हे मरुतांनो, वीरपुत्रयुक्त संपत्ति असो. वरुत्री आमचें घरें देऊन रक्षण करो. होत्रा आणि भारती दक्षिणांनीं आमचें रक्षण करोत.

४. हे सर्व देवांसह असणाऱ्या बृहस्पते, आमच्या हवींचा स्वीकार कर आणि भक्ताला धन दे.

५. अर्क स्तोत्रांनीं पवित्र बृहस्पतीला यज्ञामध्यें नमस्कार करा. मी न नमणारें बळ याचितों.

६. मानवांतील बलश्रेष्ठ, सर्वदर्शी, अहिंस्य अशा श्रेष्ठ बृहस्पतीपाशीं मी बल याचितों.

७. हे दीप्तिमान पूषन देवा, तुला उद्देशून आम्ही हें नवीन स्तोत्र म्हणत आहोंत.

८. कामी पुरुष तरुण स्त्रीला उपभोगतो, त्याप्रमाणें धनाची इच्छा करणाऱ्या ह्या माझ्या स्तुतीचा तूं स्वीकार कर.

९. जो सर्व भुवनांना पृथक्पणानें आणि एकत्रपणानेंहि पाहतो, तो पूषा आमचा रक्षक होवो.

१०. जो आमच्या बुद्धीला प्रेरणा करतो, त्या सूर्यदेवाच्या श्रेष्ठ तेजाचें आम्ही ध्यान करतों.

११. आम्ही मोठ्या स्तुतीनें धनाची इच्छा धरून उदार सवितृदेवाच्या दानाची इच्छा करतों.

१२. बुद्धिमान आणि पराक्रमी लोक हवींनीं आणि चांगल्या स्तोत्रांनीं बुद्धिपुरःसर सवितृदेवाला नमस्कार करतात.

१३. देवांचा मार्ग जाणणारा सोम तिकडे जातो आणि सत्यस्वरूप होऊन बसलेल्या उपासकाच्या यज्ञात (त्यांना घेऊन) येतो.

१४. सोम आम्हां द्विपदांना आणि चतुष्पाद् पशूंना रोगरहित अन्न देवो.

१५ आमचें आयुष्य वाढवणारा आणि प्रमत्त शत्रूंचा धुव्वा उडवणारा असा सोम यज्ञामध्यें येऊन बसो.

१६. हे सदाचारसंपन्न मित्रावरुणहो, तुम्ही आमचा गोठा तुपानें भिजवा. आणि निवासस्थानें मधुररसानें युक्त करा.

१७. हे सदाचारसंपन्नहो, महाकीर्तिमान आणि नमस्कारांनीं श्रेष्ठ होणारेहो, तुम्ही आपल्या पराक्रमाच्या जोरावर अत्यंत श्रेष्ठ अशा बलाचे अधिपति आहांत.

१८. जमदग्नीनें स्तविले जाणारे तुम्ही सत्यस्वरूप होऊन बसा. सत्यानें श्रेष्ठ होणारे तुम्ही सोम प्या.

येथें तिसरें मंडळ संपलें.

मंडळ तिसरें

कोष्टक.

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१	२.८.१३-१६	विश्वामित्र	त्रिष्टुभ्	अग्नि	
२	२.८.१७-१९	"	जगती	वैश्वानर अग्नि	
३	२.८.२०-२१	"	"	"	
४	२.८.२२-२३	"	त्रिष्टुभ्	आप्रीसूक्त	
५	२.८.२४-२५	"	"	अग्नि	
६	२.८.२६-२७	"	"	"	
७	३.१.१-२	"	"	"	
८	३.१ ३-४	"	३-७ अनुष्टुभ् अवशिष्ट त्रिष्टुभ्	११ छिन्नयूपमूलभूत स्थाणु ८ विश्वेदेव किंवा यूप	
९	३.१.५-६	"	१–८ बृहती ९ त्रिष्टुभ्	अग्नि	
१०	३.१.७-८	"	उष्णिह	"	
११	३.१.९-१०	"	गायत्री	"	
१२	३.१.११-१२	"	"	इंद्राग्नि	
१३	३.१.१३	ऋषभ विश्वामित्र पुत्र	अनुष्टुभ् त्रिष्टुभ्	अग्नि "	
१४	३.१.१४	"			
१५	३.१.१५	उत्कील कतगोत्रोत्पन्न	"	"	
१६	३.१.१६	"	विषम–बृहती सम–सतोबृहती	"	
१७	३.१.१७	कत वैश्वामित्र	त्रिष्टुभ्	"	
१८	३.१.१८	"	"	"	
१९	३.१.१९	गाथिन	"	"	
२०	३.१.२०	"	"	१.५ विश्वेदेव अवशिष्ट अग्नि	
२१	३.१.२१	"	२-३ अनुष्टुभ् ५ विराड्रूप सतोबृहती १-४ त्रिष्टुभ्	"	
२२	३.१.२२	गाथिन् कौशिक	४ अनुष्टुभ् अवशिष्ट त्रिष्टुभ्	पुरीष्य अग्नि	
२३	३.१.२३	देववात आणि	३ सतोबृहती अव-	अग्नि	

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
		देवश्रवस् भारत	शिष्ट त्रिष्टुभ्		
२४	३.१.२४	विश्वामित्र गाथिन	१ अनुष्टुभ् अवशिष्ट गायत्री	”	
२५	३.१.२५	विश्वामित्र	विराज	४ इंद्राग्नि अवशिष्ट अग्नि	
२६	३,१.२६–२७	७ ब्रह्म अवशिष्ट विश्वामित्र	१.६ जगती ७.९ त्रिष्टुभ्	१-३ वैश्वानर अग्नि ४-६ मरुतः, ७.८ अग्नि किंवा परब्रह्म ९ विश्वामित्रोपाध्याय	
२७	३.१.२८–३०	विश्वामित्र	गायत्री	१ ऋतु किंवा अग्नि, अवशिष्ट अग्नि	
२८	३.१.३१	”	३ उष्णिह,४ त्रिष्टुभ, ५ जगती	अग्नि	
२९	३.१.३२–३४	”	१.४.१०.१२ अनुष्टुभ्, ६.११.१४.१५ जगती अवशिष्ट त्रिष्टुभ्	५ ऋत्विज् किंवा अग्नि अवशिष्ट अग्नि	अरणीचा उपयोग तनूनपात, नराशंस व मातरिश्वन् अग्नीचे स्वरूप
३०	३.२.१–४	”	त्रिष्टुभ्	इंद्र	वैदिक धर्माचा प्रसार करा.
३१	३.२.५–८	इषीरथपुत्र कुशिक किंवा विश्वामित्र	”	”	दायविभाग
३२	३.२.९–११	विश्वामित्र	”	”	
३३	३.२.१२–१४	४.६.८.१० नदी अवशिष्ट विश्वामित्र	१.१२ त्रिष्टुभ् १३ अनुष्टुभ्	”	विश्वामित्र नदी संवाद,विश्वामित्र विपाट्शुतुद्रीच्या संगमांतून भरतासह पार जात आहे.
३४	३.२.१५–१६	विश्वामित्र	त्रिष्टुभ्	इंद्र	
३५	३.२.१७–१८	”	”	”	
३६	३.२.१९–२०	१० घोर आंगिरस, अवशिष्ट विश्वामित्र	”	इंद्र	१० वी ऋचा म्हटली तर नाश होतो.
३७	३.२.२१-२२	विश्वामित्र	११ अनुष्टुभ् अवशिष्ट गायत्री	”	
३८	३.२.२३-२४	प्रजापति विश्वामित्रपुत्र किंवा प्र-	त्रिष्टुभ्	”	

सूक्त	अष्ट. अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
		जापति वाचःपुत्र किंवा दोघेही किंवा विश्वामित्रच			
३९	३.२.२५-२६	विश्वामित्र	त्रिष्टुभ्	इंद्र	
४०	३.३.१-२	”	गायत्री	”	
४१	३.३.३-४	”	”	”	
४२	३-३-५-६	”	”	”	
४३	३.३.७	”	”	”	
४४	३.३.८	”	बृहती	”	
४५	३.३.९	”	”	”	
४६	३.३.१०	”	त्रिष्टुभ्	”	
४७	३.३.११	”	त्रिष्टुभ्	”	
४८	३.३.१२	”	”	”	
४९	३.३.१३	”	”	”	
५०	३.३.१४	”	”	”	
५१	३.३.१५-१६	”	१-३ जगती ४-९ त्रिष्टुभ् १०-१२ गायत्री	”	
५२	३.३.१७-१८	”	१-४ गायत्री ६ जगती अवशिष्ट त्रिष्टुभ्	”	
५३	३.३.१९-२३	”	१०-१६ जगती, १३ गायत्री, १२ २०.२२ अनुष्टुभ् १८ बृहती अवशिष्ट त्रिष्टुभ्	१ इंद्रापर्वत १५-१६ वाचू १७-२० रथांग अवशिष्ट इंद्र	विश्वावित्र सुदामाचे अनुयांयी भरत यांस युद्धास प्रोत्साहन देत आहे व कीटकादि देशावर चालून जाण्यास प्रोत्साहन देत आहे.
५४	३.३.२४-२७	प्रजापति विश्वामित्रपुत्र किंवा वाग्पुत्र	त्रिष्टुभ्	विश्वेदेव	‘ महद्देवानामसुरत्वमेकम् ’ हे पालुपद असलेलें सूक्त
५५	३.३.२८-३१	”	”	विश्वेदेव	
५६	३.४.१	”	”	”	
५७	३.४.२	”	”	”	
५८	३.४.३-४	विश्वामित्र	”	अश्विनौ	
५९	३.४.५-६	”	१-५ त्रिष्टुभ् ६-९ गायत्री	मित्र	मित्रोपस्थान
६०	३.४.७	”	जगती	१-४ ऋभु ५-७ ऋभु व इंद्र	उषा

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्व
६१	३.४.८	”	त्रिष्टुभ्	”	
६२	३.४.९–११	१–१५ विश्वामित्र, १६–१८ विश्वामित्र किंवा जमदग्नि	१–३ त्रिष्टुभ् अवशिष्ट गायत्री	१-३इंद्रावरुण ४-६ बृहस्पति७–९पूषन् १०–१२ सवितृ १३–१५सोम १६-१८ मित्रावरुण	गायत्रीमंत्र असलेलें सूक्त

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर

मंडळ चौथें.

भाषांतरकार

विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

मुद्रक व प्रकाशक

शंकर रामचंद्र दाते, बी. ए.

चिटणीस, वैदिक वाङ्मय प्रसारक मंडळ.

'लोकसंग्रह' छापखाना, २७ बुधवार पेठ, पुणें.

शके १८५०

किंमत एक रुपाया

चतुर्थमंडळपरिचय

चवथ्या मंडळांत ५८ सूक्तें असून ५८९ ऋचा आहेत. अनुवाक पांच आहेत.

ह्या मंडळाचा द्रष्टा वामदेव गौतम आहे.

छंदः

ह्या मंडळांत २८ सूक्तें त्रिष्टुभ छंदांतील असून १९ भिन्न भिन्न छंदांची ८ गायत्री छंदांतलि, २अनुष्टुभ आणि १ जगती छंदांतील सूक्त आहे.

देवता

देवतेच्या दृष्टीनें पाहू गेल्यास १३ अग्नीचीं, १० इंद्र, १ परमात्मा, १ श्येन, १ इंद्रावरुण, १ इंद्रासोम ५ ऋभु, ३ दधिक्रा, ३ अश्वि, २ उषा, २ सवितृ, १ इंद्राबृहस्पति, १ वायु, १ विश्वेदेव, १ द्यावापृथ्वी आणि १२ वेगवेगळया देवतांचीं सूक्तें आहेत.

कथासूक्तें.

इंद्रकुत्समैत्री (१६.१०) एतशस्वश्वयुद्ध (१७.१४), अदिति-इंद्र-वामदेवसंवाद (१८) अग्नुकथा (१९) वामदेवज्ञान (२६), गर्भवामदेवभाषण (२७), त्रसदस्युजन्मकथा (४२. ८-९)

ह्या कथा अत्यंत थोडक्यांत त्रुटित अशा स्वरूपांतच ह्या मंडळांत आल्या आहेत. ह्या कथांचा मागमूसहि सांप्रदायिक ग्रंथावरूनच लागतो. कारण मंत्रांत फारच थोडक्यांत त्या आल्या आहेत. त्यामुळें त्यांच्या इत्यर्थहि सांगणें अशक्य आहे. वामदेवाच्या भाषणांत मात्र तत्वज्ञानाचा भाग स्पष्ट दिसत आहे. आणि त्याविषयीं सर्वांची एकवाक्यताहि आहे. (१८.२६)

उच्च विचार

तूं आमचें चिरंतन पाप खरोखर नाहींसें करतोसच (६.७) असे विचार अनेकत्र आलेले आहेत, पण ऐहिक साधनें मागणाऱ्या सूक्तांच्या पुढें स्वतःला निष्पाप करण्याविषयीं प्रार्थना असलेलीं सूक्तें लक्ष वेधीत नाहींत एवढें खरें. तथापि स्वतःला शुद्ध कर, निष्पाप कर, गुणदृष्ट्या श्रेष्ठतेला ने, अशाहि ऋषींनीं अनेक ठिकाणीं प्रार्थना केलेल्या आढळतात.

पर्यग्नीकरण

याज्ञिकांतील पर्यग्नीकरणाचा एका ठिकाणीं उल्लेख आलेला दिसतो (६.४) याज्ञिकादिकांत किंवा आचारांत कांहीं गोष्टी अत्यंत पुरातन कालापासून अव्याहत कशा अवशिष्ट राहिल्या आहत हें पहाणें मोठें चित्तवेधक आहे. व यावरून मनुष्याच्या मनोवृत्तीचाहि अभ्यास करण्यासारखा आहे.

नरकाची उत्पत्ति

बंधुरहित तरुण (विधवा) स्त्रियाप्रमाणें स्वैर किंवा नवऱ्याचा घात करणाऱ्या दुराचारी स्त्रियाप्रमाणें पापी, खोट्या आणि आचारहीन अशा लोकांनीं हें अगाध (नरक) स्थान उत्पन्न केलें. (५.५) अशा तऱ्हेची विचारसरणी ग्रथित केलेला वेदभाग पाहिला म्हणजे वैदिक वाङ्मयांत पापपुण्य, नरक वगैरे विषयीं काय कल्पना होत्या यांचा सुगावा लागण्यासारखा आहे.

कृषीवलसूक्त

शेतकीसंबंधी अनेक गोष्टींचा उल्लेख ह्या सूक्तांत आला आहे. (५७) ह्या सूक्तांत पहिल्या दोन ऋचांत क्षेत्रपतीचें वर्णन असून क्षेत्रपती शेत देतो, गाय व घोडें यांना पोषक गवत वगैरे पीक उत्पन्न करतो, तो सर्वांना सुखांत ठेवतो, पाऊस वेळच्यावेळीं पाडतो. आणि सर्वांत गोडी उत्पन्न करतो. त्याच्या पुढें घोडे बैल, लोक, नांगर, जुपण्या, चाबूक हे सव व्यवस्थित असोत. अशा प्रकारें शेतीसंबंधी ह्या सूक्तांत प्रार्थना केलेली आडळते.

चत्वारि शृंगा त्रयो अस्य पादा द्वे शीर्षे सप्त हस्तासो अस्य
त्रिधा बद्धो वृषभो रोरवीति महो देवो मर्त्यां आ विवेश ॥

अर्थ—ह्याला चार शिंगें, तीन पाय, दोन डोकीं आणि सात हात आहेत. तीन ठिकाणीं बांधलेला वृषभ मोठ्यांदा शब्द करतो. तो महान् देव मर्त्यांना व्यापून आहे.

यज्ञदृष्ट्या अर्थः—ह्याला चार वेद हीं चार शिंगें आहेत, प्रातःसवन, माध्यंदिन सवन आणि सायंसवन असे तीन पाय आहेत, ब्रह्मौदन आणि प्रवर्ग्य ह्या दोन इष्टि ज्यांचीं मस्तकें आहेत, सात छंद हे ज्याचे हात आहेत, मंत्र, कल्पसूत्र आणि ब्राह्मण यांनीं बांधलेला कामपूरक यज्ञ गर्जत असतो. तो महान् यज्ञ सर्व लोकांत चालूं असतो.

सूर्यदृष्ट्या अर्थः—ह्याला चार दिशारूपी चार शिंगें आहेत, तीन वेद हे ज्याचे पाय आहेत, अहोरात्र हीं दोन ज्यांचीं डोकीं आहेत, सात किरण हे ज्याचे हात आहेत, पृथ्वी, अन्तरिक्ष आणि द्युलोक यामध्यें बद्ध असलेला हा पाऊस पाडीत गर्जत असतो. तो सर्व लोकांत व्यापून आहे.

व्याकरण दृष्ट्याः— नाम, आख्यात, उपसर्ग व निपात हीं ज्याचीं शिंगें आहेत. भूत, भविष्य व वर्तमान हे ज्याचे तीन पाय आहेत, सिद्ध आणि साधित हीं ज्याचीं डोकीं आहेत, सात विभक्ति हे ज्याचे हात आहेत. उर, कण्ठ आणि शिर याठिकाणीं बद्ध असा कामपूरक शब्द करीत असतो. असा शब्दरूपी महादेव लोकांत व्यापून आहे. (व्याकरणमहाभाष्य पस्पशाह्निक) याप्रमाणें आणखीहि अर्थ लावता येतील. पण हे मंत्रद्रष्ट्याला अभिप्रेत असतील असें म्हणवत नाहीं.

असे मंत्राचे अर्थ करण्याची पद्धत ब्राह्मणकाळापासून रूढ आहे असें दिसतें. कांहीं ठिकाणीं अर्थ इच्छेनुसार लावण्याचा शक्यता तरी असते पण जेथें लौङ्गिक विनियोग असतो तेथें स्मारक शब्दाशिवाय कांहींच नसते. तशा ठिकाणींहि अर्थ इच्छेनुसार केल्याचीं उदाहरणें आढळतातच.

इंद्राची मूर्ति असावी काय ?

अनेक ठिकाणीं असे कांहीं चमत्कारिक उल्लेख येतात त्याठिकाणीं कोणताहि निश्चय करणें अत्यंत धोक्याचें होतें. ह्या चौथ्या मंडळांतील कांहीं ऋचा अशाच शंकास्पद आहेत. त्यांपैकीं एक ऋचा खालीं देतो.

क इमं दशभिर्ममेन्द्र क्रीणाति धेनुभिः ।
यदा वृत्राणि जङ्घनदथैनं मे पुनर्ददत् ॥

ऋग्वे. ४. २४. १०.

अर्थः—ह्या माझ्या इंद्राला दहा गाई देऊन कोण विकत घेईल ? जेव्हां तुमचे शत्रू ठार करील तेव्हां तुम्ही याला परत करा. खरोखर यांतील कल्पना निश्चित व्यक्त होत नाहीं. आठव्या मंडळांतहि एक अशीच ऋचा आली आहे. ती अशी—

महे चन त्वामद्रिवः परा शुल्काय देयाम् ।
न सहस्राय नायुताय वज्रिवो न शताय शतामघ ॥ ऋ. ८–१. ५

‘ वज्रधरा इंद्रा, तुला मी मोठ्या किंमतीनेंहि देऊन टाकणार नाहीं. हे वज्रधरा इंद्रा, हजाराला नाहीं, दहा हजाराला नाहीं, हे विपुलधनयुक्ता, तुला अपरिमित संपत्तीलाहि मी देणार नाहीं.

हा उल्लेख मूर्तीचा आहे असें म्हणण्यास प्रत्यक्ष शब्द नाहीं असें मानलें तरी मूर्ति मानल्याशिवाय ह्या ऋचांचा सरळ अर्थ करणें कठीण पडतें. ज्याची देवघेव संभवत नाहीं अशाबद्दल अशी भाषा वापरतां येईल किंवा काय ह्याविषयीं शंका आहे.

पुरोहित प्रशंसा

पुरोहितप्रशंसा म्हणून ऐ. ब्रा. त मानलेले मंत्रहि ह्याच मंडळांत आहेत. (५०) तेथील देवतेबद्दलहि मतभेद आढळतो.

वैशाख वद्य १२ । १८५०

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर.

चवथें मंडळ.

सूक्त पहिलें.

ऋषिः—वामदेव; देवता–अग्नि किंवा २–६ वरुण; छन्दः—१ अष्टि, २ अतिजगती, ३ धृति, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. हे अग्ने, एक विचारानें देव तुला दूत करून खालीं पाठवितात. हे पूज्य अग्निदेवा, अमर, देवांच्याकडे जाणाऱ्या आणि ज्ञानी अशा तुला लोक उत्पन्न करतात. लोक अग्नीला उत्पन्न करतात.

२. हे अग्निदेवा, तर तूं यज्ञाची इच्छा धारण करणाऱ्या आणि ज्येष्ठ बंधु वरुणाला भक्ताकडे कृपा करून वळव. सत्यनिष्ठ, लोकाधार, अदितिपुत्र आणि लोकसंरक्षक राजा वरुणाला आमच्याकडे वळीव.

३. हे पराक्रमी मित्रा (अग्ने), जलद चालणाऱ्या रथाला घोडे वेगानें आणतात त्याप्रमाणें तूं वेगानें वरुणाला आमच्याकडे आण. हे अग्ने, वरुण आणि विश्वप्रकाशक मरुतांसह तूं हवि भक्षण कर. हे तेजस्वी आणि पराक्रमी अग्ने, तूं आमच्या मुलाबाळांचें कल्याण कर आणि आमचें कल्याण कर.

४. हे अग्ने, ज्ञाता असा तूं आमच्यावरील वरुणाचा राग नाहींसा कर. यज्ञार्ह, हविर्वाहक आणि तेजस्वी असणारा तूं आमच्या सर्व शत्रूंना नष्ट कर.

५. हे अग्ने, आमचें रक्षण करण्याकरतां तूं जवळ आस. उषा उजाडल्यानंतर तूं अत्यंत जवळ आस. तूं रममाण होऊन आमच्याकरतां वरुणाला प्रसन्न कर आणि आम्हांला सुलभ हो.

६. त्या भाग्यशाली देवाची कान्ति मर्त्यलोकांत आश्चर्यकारक आहे. ह्या देवाची देणगी गाईच्या तापलेल्या स्वच्छ तुपासारखी किंवा गोप्रदानासारखी अभिलषणीय असते.

७. ह्या देवाचे अत्यंत स्पृहणीय असणारे तीन श्रेष्ठ व नित्य जन्म आहेत. शुद्ध, तेजस्वी आणि अपार अन्तरिक्षांत भरलेला, अत्यंत प्रकाशणारा प्रभु अग्नि आमच्याकडे येवो.

८. तो (देवांचा) दूत अग्नि सर्व घरांची इच्छा करतो. तो सोन्याचा रथ असलेला, सुजिव्ह, तांबडे घोडे असलेला, सुंदर, कान्तियुक्त आणि अन्नसमृद्ध घरासारखा आहे.

९. तो यज्ञांतील बांधव असणारा अग्नि मनुष्यांना ज्ञान देतो. त्याला मोठ्या दोरीनें उत्पन्न करतात. तो भक्ताच्या घरीं कार्यसिद्धि करीत राहतो. अग्निदेवाची भक्ताशीं गट्टी असते.

१०. त्या अग्नीजवळ देवांनीं दिलेलें जें धन असेल त्याकडे तो आम्हांस नेवो. कारण सर्व देवांनीं स्तुति करून त्याला दूत केलें आहे. सर्वांना उत्पन्न करणाऱ्या द्यूनें आणि देवांनीं सत्यभूत अग्नीकरतां हवींचा वर्षाव केला.

११. तो प्रथम यज्ञगृहांत उत्पन्न झाला. नंतर अन्तरिक्षाच्या मुख्य स्थानीं आणि नंतर आपल्या मूळ जन्मस्थानीं उत्पन्न झाला: ज्याच्या पायाचा आणि डोक्याचा म्हणजे दोनहि भाग गूढ असलेल्या मेघाच्या घरांत विलीन झाला.

१२. अन्तरिक्षांत मेघांत असतांना अंगिरसानें प्रथम केलेल्या स्तुतीनें त्यांत सामर्थ्य उत्पन्न झालें. ह्या बलिष्ठ अग्नीला सप्तहोत्यांनें उत्पन्न केलें. तो अग्नि सुंदर, तरुण, बलिष्ठ आणि तेजस्वी आहे.

१३. येथें आमच्या पुरातन मर्त्य पितरांनीं—अंगिरसांनीं—यज्ञ करून अग्नीला प्राप्त केलें. त्यांनीं उषांचा धांवा करीत दगडी भिंतीत अंधारांत कोंडून ठेवलेल्या गाईंना बाहेर काढले.

१४. त्यांनीं पर्वतांना फोडून अग्नीची उपासना केली. ह्या त्यांच्या कृत्याची सर्वत्र वाखाणणी झाली: गुरें मोकळीं करण्याचा उपाय करणाऱ्या अंगिरसांनीं ज्ञात्या अग्नीची स्तुति केली. त्यांना प्रकाश प्राप्त झाला आणि त्यांनीं यज्ञ केले.

---

७ टीपः—पृथ्वीवरील अग्नि, वीज आणि सूर्य हे अग्नीचे तीन जन्म होत. १०. ४५. १. पहा.

१५. गाई इच्छिणाऱ्या मनानें गाई अडवून ठेवणाऱ्या त्या बळकट पर्वताला गाईंच्या इच्छेनें त्यांनीं देवांची स्तोत्रें म्हणून मोकळे केले.

१६. अंगिरसांना प्रथम मातृभूत वाक्शक्तीचें ज्ञान झालें आणि त्यांना वीस उत्कृष्ट छंद प्राप्त झाले. तें जाणणाऱ्या उषांनीं (उदय पावून) ह्याचें अभिनंदन केलें. आणि तांबूस उषा सूर्याच्या प्रकाशासह प्रकट झाल्या.

१७. अंधार जाऊन नष्ट झाला. आकाश लख्ख प्रकाशलें. उषादेवीचा प्रकाश वर आला. सूर्य जगांतील चांगल्यावाईट गोष्टींचें निरीक्षण करीत मोठ्या पर्वतावर आरूढ झाला.

१८. नंतरच जागृत होणाऱ्या त्यांनें सर्वत्र दृष्टि फेंकली. नंतर त्यांना अन्तरिक्षांतील संपत्ति प्राप्त झाली. आपल्या सर्व ठिकाणावर सर्व देव आले. हे मित्रा, हे वरुणा, भक्ताला हें सर्व यथार्थ होवो.

१९. यज्ञकुशल, अत्यंत तेजस्वी, विश्वपोषक आणि देवांना हवि पोंचविणाऱ्या अग्नीची मी स्तुति करीत आहें. भक्तानें गाईच्या स्वच्छ कासेंतून (देवांना देण्याकरतां) दूध काढलें नाहीं किंवा सोमरसाहि काढला नाहीं. (तरी केवळ स्तोत्रानें तुझी कृपा व्हावी.)

२०. सर्व देवांना अदितीप्रमाणें (यज्ञांत) उत्पन्न करणारा, सर्व लोकांना अतिथीप्रमाणें पूज्य आणि सर्व देवांचे हवि स्वीकारणारा सर्वज्ञ अग्नि आमचें कल्याण करणारा होवो.

सूक्त दुसरें.

ऋषिः—वामदेव; देवता-अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. जो अमर अग्नि मनुष्यांत सत्यकर्मा, देवलोकीं सुखदायक देव तो यज्ञार्ह देव आमच्याकरतां देवांना बोलावीत प्रज्वलित होवो. आणि लोकांना देणारा हवि द्यावयास लावो.

२. हे बलपुत्र अग्ने, तूं आज आमच्या येथें उत्पन्न होऊन बळकट, तेजस्वी व वीर्यशाली घोडे रथाला जोडून दूत म्हणून दोनहि लोकांत जात असतोस.

३. हे अग्ने, यज्ञसंबंधी उत्कर्षप्रद, उदक वर्षाव करणाऱ्या आणि मनापेक्षांहि वेगशाली असणाऱ्या तुमच्या चलाख तांबूस घोड्यांचा मी स्तुति करीत आहें. ते तांबडे घोडे जोडून तूं तुमच्या देवांत आणि मर्त्य लोकांत हिंडत असतोस.

४. हे अग्ने, सुंदर घोडे असलेल्या सुंदर रथांत सुंदर देणग्या घेऊन चांगले हवि देणाऱ्या गृहस्थाकडे अर्यमन्, वरुण, मित्र, इंद्राविष्णू, मरुत् आणि अश्विनी यांना घेऊन ये.

५. हे बलवन् अग्ने, हा माझा यज्ञ गाई, मेंढ्या, घोडे, चांगले लोक असलेला आणि नेहमींच निर्विघ्न असो; अन्न, मुलेंबाळें, सातत्य, संपत्ति, घट्ट पायावर उभारलेला आणि चांगल्या लोकांनीं गजबजलेला असो.

६. हे अग्ने, जो तुझ्याकरतां घामाघूम होऊन लांकडें आणील किंवा जो तुझ्याकरतां मस्तक त्रस्त करील त्याचा बलवान असणारा तूं पाठीराखा हो. सर्व दुर्जनापासून त्याचें तूं संरक्षण कर.

७. हे अग्ने, अन्न इच्छिणाऱ्या तुला जो अन्न अर्पण करील, मादक सोम अर्पण करील, अतिथीप्रमाणें सन्मान करील किंवा जो देवभक्त तुला आपल्या घरीं प्रदीप्त करील त्याच्या घरीं निश्चल आणि विपुल संपत्ति असो.

८. हे अग्ने, जो तुझी रात्रीं प्रशंसा करतों, जो तुझी उषःकालीं स्तुति करतो किंवा जो हविर्युक्त भक्त हवि देऊन तुला संतुष्ट करील त्या उदार भक्ताला तूं स्वतःच्या घरच्या सोन्याचा तंग असलेल्या घोड्याप्रमाणें संकटाच्या पार ने.

९. हे अग्ने, जो भक्त अमर अशा तुला हवि देईल, जो स्रुचा हातांत घेऊन तुझी सेवा करील तो स्तोत्र म्हणणारा भक्त संपत्तिरहित होत नाहीं आणि त्याला दुर्जनापासून त्रास होत नाहीं.

१०. हे अग्ने, ज्या भक्ताच्या व्यवस्थित यज्ञाचा आनंदानें तं उपभोग घेतोस, हे अत्यंत तरुणा, तो आनंदांतच राहील. ज्याचे ऋत्विज उत्कर्षांत आहेत त्याचे आम्ही असावें.

११. ज्ञाता अग्नि चांगल्या आणि वाईट पाठीच्या घोड्याप्रमाणें ज्ञानी आणि अज्ञानी लोकांत फरक करो. हे अग्ने, आम्हांला चांगलीं मुलेंबाळें आणि संपत्ति दे. औदार्य असूं दे आणि कृपणपणापासून आमचें संरक्षण कर.

१२. हे अग्नें, लोकांच्या घरीं असलेल्या ज्ञात्या आणि अजिंक्य देवांनीं ज्ञाता म्हणून तुझी स्तुति केली आहे. म्हणून श्रेष्ठ अशा तूं आपल्या पसरणाऱ्या किरणांनीं ह्या दृश्य लोकांना आणि अदृश्य देवांना पाहूं शकतोस.

१३. हे अत्यंत तरुण व तेजस्वी अग्ने, श्रेष्ठ दर्जाचा मार्गदर्शक असणारा व लोकांच्या इच्छा पूर्ण करणारा तूं स्तुति करणाऱ्या आणि सोम पिळून आराधना करणाऱ्या भक्ताच्या रक्षणाकरतां आल्हादक व विपुल धन घेऊन ये.

१४ हे अग्ने, कुशलतेनें रथ केल्याप्रमाणें आतां आम्ही ज्याअर्थीं हातांनीं, पायांनीं आणि शरीरांनीं तुला उत्पन्न केलें आहे त्याअर्थीं कर्म करणाऱ्या अंगिरसांनीं हातांनीं तुला उत्पन्न केलें आहे.

१५. (वामदेव दुसऱ्या सहा अंगिरांशीं बोलतो आहे.) आपण आतां मातृभूत उषेपासून सात जण उत्पन्न होऊं या. प्रथम उत्पन्न झालेले आपण सेवा करणाऱ्या लोकांना उत्पन्न करूं या. आपण व आंगिरस आदित्याचे पुत्र होऊं या. तेजस्वी असणारे आम्ही धनसंपन्न पर्वताला फोडूं या.

१६. हे अग्ने, नंतर आमचे पुरातन व श्रेष्ठ पितर यथायोग्य रीतीनें यज्ञ करून आणि स्तोत्रें गाऊन शुद्धच स्थान प्राप्त करते झाले आणि तेजस्वी झाले. अंधार नाहींसा करून तांबूस गाई प्राप्त केल्या.

१७. सुकर्म, अत्यंत कांतिमान, देवभक्त आणि तेजस्वी अंगिरसांनीं सोन्याप्रमाणें जन्म पवित्र करून, अग्नीला प्रज्वलित करून, इंद्राला (स्तोत्रानें) उत्साहित करून आणि गाईंच्या संघाना वेढा देऊन त्यांना प्राप्त केलें.

१८. समृद्ध माणसाचे घरीं पशूंचे कळप दिसतात त्याप्रमाणें हे उग्र अग्ने, अंगिरसांच्या जवळ इंद्रानें गाईंचे कळप पाहिले. त्यांनीं मानवसृष्टि समर्थ झाली. गृहपति उत्पन्न होणाऱ्या प्रजेच्या पोषणास समर्थ झाला.

१९. हे अग्ने, आम्ही तुला निर्माण केलें आहें. त्यामुळें आम्ही कर्तृत्ववान झालों आहों. तें प्रकाशणाऱ्या उषांनीं तेज धारण केलें आहे. देवाच्या नेत्रभूत सुंदर तेजाची उपासना करणारे आम्ही अनेक ठिकाणीं अत्यंत आल्हादपरिपूर्ण अग्नीला धारण करीत आहोंत.

२०. हे विधात्या अग्ने, ज्ञात्या अशा तुझ्याकरतां आम्ही हीं स्तोत्रें म्हटलीं आहेत. तीं तूं सेवन कर. तूं प्रदीप्त हो. आम्हांला धनाढ्य कर. हे बहुप्रिय अग्ने, आम्हांला तूं विपुल संपत्ति दे.

सूक्त तिसरें.

ऋषि:—वामदेव; देवता–अग्नि; छंद:—त्रिष्टुभ.

१. हे लोकहो, यज्ञाचा राजा, प्रतापी, द्यावीपृथ्वीमधील खरा यज्ञकर्ता, होत्या आणि सुवर्णप्रभ अग्नीला साहाय्यासाठीं मरणापूर्वीं प्रदीप्त करा.

२. हे अग्ने, सुंदर वस्त्र नेसलेल्या व नवऱ्याविषयीं कामुक असणाऱ्या स्त्रीप्रमाणें आम्ही तुझ्याकरतां जें आसन केलें आहे तें तुझें स्थान आहे. तूं परिवारासह आम्हांकडे तोंड करून बैस. हे चांगलीं कृत्यें करणाऱ्या, तुझ्याकरतां हीं आमचीं स्तोत्रें चालूं आहेत.

३. हे स्तोत्या, ऐकून घेणारा, निगर्वी, लोकद्रष्ट्या आणि अत्यंत सुख देणाऱ्या अग्नीचें तूं स्तोत्र म्हण. तूं देदीप्यमान आणि अमर अग्नीची स्तुति कर, कीं ज्या अग्नीला मधुर सोमरस काढणारा ग्रावा जसा स्तवीत असतो.

४. हे अग्ने, तूंच आमच्या ह्या कृत्याची देवता आहेस. हे सत्यज्ञ अग्ने, तूं यज्ञसंबंधीं आमचें स्तवन ध्यानांत घे. तुझीं स्तोत्रें आनंददायक केव्हां होतील ? तसेंच आमच्या घराशीं तुझी मैत्री केव्हां होईल ?

५. हे अग्ने, तूं वरुणाजवळ आमच्या त्या पापाची कशी निंदा करशील ? द्युजवळ कशी करशील? आम्ही पाप (तरी) काय केलें आहें ? दयाळु मित्राजवळ आणि पृथ्वीजवळ कसें बोलशील ? अर्यमनला कसें सांगशील किंवा भगाला कसें सांगशील ?

६. हे अग्ने, अनेक ठिकाणीं प्रज्वलित केलेला तूं कसें सांगशील ? प्रबळ आणि कल्याणकारक वाताजवळ कसें सांगशील ? (तसेंच) हे अग्ने, लोकघातक रुद्राला तरी कसें सांगशील ?

७. हे अग्ने, अत्यंत पोषक असणाऱ्या पूषनला कसें सांगशील ? सुपूज्य आणि हवि देणाऱ्या रुद्राला कसें सांगशील ? कीर्तिमान विष्णूला पाप कसें सांगशील ? आणि थोर निर्ऋतीला तरी कसें सांगशील?

८. हे अग्ने, धांवणाऱ्या मरुत्संघाला कसें सांगशील ? विचारल्यावर थोर सूर्याला कसें सांगशील ? अदितीला आणि वायूला तरी कसें सांगशील ? म्हणून हे सर्वज्ञ अग्ने, ज्ञाता असणारा तूं देवांना अनुकूल कर.

९. यज्ञानें मी नियत स्वरूपाच्या गाईच्या दुधाची याचना करतों. हे अग्ने, गाईच्या शरीरांत मधुर पक्व दूध तूं धारण करतोस. ही गाय काळी असूनहि शुभ्र व सर्वाधार अशा अमर पेयानें प्रजेला पुष्ट करते.

१०. कारण, हा अग्निरूपी पराक्रमी बैल सर्वाधार असणाऱ्या सत्यरूपी दुधानें भरलेला आहे. पाऊस पाडून अन्नसमाद्धि करणारा अग्नि जागेवरून न हालतां फिरत असतो. आणि सूर्यरूपानें तो स्वच्छ दूध उत्पन्न करतो.

११. अंगिरसांनीं सत्यानें पर्वताला फोडलें आणि गाई मिळविल्या. त्या लोकांनीं सुखानें उषा प्राप्त केली आणि सूर्य उत्पन्न केला. अग्नि प्रज्वलित केल्यावर हें सर्व झालें.

१२. हे अग्ने, उदकदेवता मधुर उदकांनीं सतत व अखंड अशा नेहेमीं सत्यामुळें मोकळे सोडल्यावर उत्साहित केलेल्या घोड्याप्रमाणें वहात आहेत.

१३. हे अग्ने, कोणाहि शत्रूच्या यज्ञांत तूं कधींहि जाऊं नकोस. घातक शेजाऱ्याच्या यज्ञाला तूं जाऊं नकोस. तसेंच (दुष्ट अशा) आमच्या बांधवाच्या यज्ञालाहि तूं न जावस. तसेंच वाकडें वागणाऱ्या बांधवाचें ऋण (हवि) तूं इच्छू नकोस. तसेंच आम्ही मित्राच्या किंवा शत्रूच्या धनाचा उपभोग घेऊं नये. (तर केवळ तूं दिलेल्या धनाचाच घ्यावा.)

१४. हे सुयज्ञ अग्ने, रक्षण केलेंला आणि प्रसन्न झालेला तूं तुझ्या कृपेनें आमचें रक्षण कर. आम्हांकरतां प्रज्वलित हो. आमच्या कठोर पापाचा नाश कर. आणि महाप्रबळ होणाऱ्या राक्षसांना ठार कर.

१५. हे अग्ने, ह्या स्तोत्रांनीं तूं प्रसन्न हो. हे शूरा, ह्या स्तोत्रांसह आमच्या हवींचा तूं स्वीकार कर. हे अंगिरा अग्ने, तूं आमच्या स्तोत्रांचा स्वीकार कर. माझी ही देवांना आवडणारी स्तुति तुझी प्रशंसा करीत आहे.

१६. हे विधात्या अग्ने, विद्वान् व कवि अशा तुझ्याकरतां स्तोत्रें आणि सामगायनांसह गूढ अर्थांनीं भरलेली आणि इष्ट फल देणारी अशीं काव्यें मी म्हणत आहें.

सूक्त चवथें.

ऋषिः—वामदेव; देवता-रक्षोहृ अग्नि; छंदः-त्रिष्टुभ.

१. हे अग्ने, विस्तीर्ण जाळ्याप्रमाणें तूं आपलें तेज पसर. हत्तीवर बसून जाणाऱ्या बलवान राजाप्रमाणें जा. वेगयुक्त सेनेवर धांवून जाणारा तूं तिला उधळून लाव. अत्यंत तेजस्वी हत्यारांनीं तूं राक्षसांना ठार कर.

२. तुझे किरण अत्यंत वेगानें पसरत असतात. अत्यंत दीप्तिमान असणारा तूं पराक्रम करून शत्रूला जाळून टाक. हे अग्ने, अप्रातिबंध असणारा तूं उष्णता, ठिणग्या आणि उल्का ज्वालांनीं बाहेर टाक.

३. हे अग्ने, अत्यंत चपल असणारा तूं आपले हेर चहूकडे पाठीव. अविनाशी असणारा तूं ह्या आम्हां लोकांचा संरक्षक हो. जो दुर्जन आमच्या जवळ असेल किंवा जो आमच्यापासून दूर असेल तो तुझा कोणीहि आम्हाला पराभूत न करो.

४. हें तीक्ष्णज्वाल अग्ने, तूं ऊठ, आपल्या ज्वाला पसर व शत्रूंना जाळून टाक. हे प्रज्वलित अग्ने, ज्यानें आमचें शत्रुत्व केलें आहे त्या नीचाला वाळलेल्या लांकडाप्रमाणें जाळून टाक.

५. हे अग्ने, तूं उद्युक्त हो. आणि शत्रूंना आमच्याकरतां ठार कर. तुझें दैवी तेज प्रकट कर. राक्षसांचीं बळकट धनुष्यें शिथिल कर. आप्त आणि परके अशा शत्रूंना तूं ठार कर.

६. हे अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, गमनशील असणाऱ्या तुझें स्तवन जो करतो तो तुझा अनुग्रह जाणतो. तर सर्वाधीश असणारा तूं ह्या भक्ताला सर्व चांगले दिवस संपत्ति आणि वैभव देतोस आणि ह्याचें घर ऐश्वर्यसंपन्न म्हणून गाजतें.

७. हे अग्ने, जो मनुष्य आयुष्यभर आपल्या घरीं दररोज हवि देऊन आणि स्तोत्रें म्हणून तुला संतुष्ट करतो. तोच मनुष्य भाग्यशाली आणि उदार होतो. ह्या भक्ताचे सर्वच दिवस चांगलें जावेत, ही त्याची इच्छा पूर्ण होवो.

८. हे अग्ने, तुझ्या अनुग्रहाचा मी सत्कार करतों. पुनः पुनः तुझ्याकडे ही तुझी स्तुति जोरानें तुझी प्रशंसा करो. आम्ही सुंदर घोडे आणि रथ यांनीं युक्त होऊन तुझी स्तुति करूं. तूं प्रतिदिनीं आम्हांला धन दे.

९. हे अग्ने, रात्रंदिवस प्रज्वलित होणाऱ्या तुझी मी प्रत्यहीं आपणहून अत्यंत सेवा करतो. लोकांचीं संपत्ति आत्मसात करीत, क्रीडा करीत आणि आनंदानें तुझी आम्ही सेवा करूं.

१०. हे अग्ने, जो सुंदर घोडे असलेला आणि चांगल्या संपत्तीनें युक्त असणारा धनसंपन्न रथानें तुझ्याकडे येतो त्याचा तूं त्राता होतांस जो तुझें सतत आतिथ्य करण्यांत आनंद मानतो तो तुझा मित्र होतो.

११. हे देवांना बोलावणाऱ्या, कर्तृत्ववान व अत्यंत तरुण अग्ने, ज्या स्तोत्रामुळें प्राप्त झालेल्या आप्त-

पणानें मी थोर राक्षसांचा नाश करतो. तें स्तोत्र पित्या गोतमापासून मला प्राप्त झालें. हें आमचें स्तोत्र तूं लक्षांत घे.

१२ हे ज्ञात्या अग्ने, जागरूक, गमनशील, चांगलें सुख देणारे, आलस्यरहित, उपकारक, न दमणारे, एकत्र झालेले आणि संरक्षक असे तुझे जे किरण आहेत तें येथें येऊन आमचें संरक्षण करोत.

१३. हे अग्ने, तुझ्या संरक्षक किरणांनीं अंधळा आहे असें पाहून मामतेयाचें दुरितापासून संरक्षण केलें. सर्वज्ञ अग्नीनें त्या पुण्यवन्ताचें रक्षण केलें, पराभव करण्याची इच्छा करणाऱ्या शत्रूंनाहि त्याचा पराभव करतां येत नाहीं.

१४. हे प्रगट असणाऱ्या अग्ने, तुझ्या कृपेनें धनयुक्त असणारे आम्ही तुझ्या नेतेपणामुळें ऐश्वर्याचा उपभोग घेऊं. हे सत्यनिष्ठ अग्ने, तूं दोनहि शत्रूंना ठार कर. हे सर्व तूं अनुक्रमें कर.

१५. हे अग्ने, ह्या समिधेनें आम्ही तुझी सेवा करीत आहों. आम्ही पठण केलेल्या स्तोत्राचा तूं स्वीकार कर. दुर्वचन राक्षसांना ठार कर, जाळून टाक. हे अनुकूलप्रकाशा, द्रोह्यापासून, निंदकापासून आणि लोकापवादापासून तूं आमचें संरक्षण कर.

---

१३ टीपः—मामतेय १-१४७-३ वरील टीप पहा.

सूक्त पांचवें.

ऋषिः--वामदेव; देवता-वैश्वानर अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. महोदार आणि महातेजस्वी वैश्वानर अग्नीला आम्ही एक विचारानें कसा हवि द्यावा? खांब इमारतीला आधार देतो त्याप्रमाणें आपल्या परिपूर्ण व विशाल शरीरानें त्यानें द्यूला आधार दिला आहे.

२. हे स्तोत्यांनो, ज्या देदीप्यमान, समृद्ध, विद्वान, अमर, विश्वदर्शी, अतिपराक्रमी आणि महान वैश्वानर अग्नीनें मर्त्य व ज्ञात्या अशा मला धन दिलें त्याची तुम्ही निंदा करूं नका.

३. उभय लोकीं मोठा, तीक्ष्णतेजाचा, हजारोंना उत्पन्न करणारा, वीर्यवान, बलिष्ठ, ज्ञाता आणि संपत्तिमान अग्नि गाईच्या गुप्त पावलाप्रमाणें मोठें स्तोत्र मलाच सांगो.

४. चांगला संपन्न आणि तीक्ष्णदंष्ट्र अग्नि आपल्या संतापक तेजानें त्यांना जाळून टाको कीं ज्यांनीं वरुणाची आणि मित्राची प्रिय व अढळ कृत्यें नष्ट करून टाकलीं.

५. बंधुरहित तरुण (विधवा) स्त्रियांप्रमाणें स्वैर किंवा नवऱ्याचा घात करणाऱ्या दुराचारी स्त्रियाप्रमाणें पापी, खोट्या आणि आचारहीन अशा लोकांनीं हें अगाध (नरक) स्थान उत्पन्न केलें.

६. हे पावक अग्ने, लहानावर मोठें ओझें लादावें त्याप्रमाणें कर्में न सोडणाऱ्या मला हें मोठें, विपुल, अगाध आणि सात प्रकारचें धन बलवर्धक अन्नासह तूं देत असतोस.

७. ज्या वैश्वानर अग्नीचें वेगानें वर येणारें सुंदर मंडळ निश्चल अन्तरिक्षांत फिरण्याकरतां देवांनीं स्थापन केलें, त्या सर्वांकडे समदृष्टि असणाऱ्या वैश्वानर अग्नीकडेच त्याला योग्य असणारी पावक स्तुति कर्मासह जावो.

८. ह्या माझ्या बोलण्याविषयीं (तुम्हाला) काय म्हणावयाचें आहे? पहा जे गाईचें (दूध) पाण्याप्रमाणें मोकळें करतात तें दूध वैश्वानरानें गूढ स्थलीं ठेवलें आहे असें शहाणे लोक म्हणतात. व्यापक पृथ्वीच्या श्रेष्ठ व प्रिय स्थानाचा तो रक्षक आहे.

९. हेंच तें थोर देवांचें मोठें स्थान होय. ज्या पुरातन स्थानाचा दूध उत्पन्न करणारी गाय (हवनार्थ) स्वीकार करते. अन्तरिक्षांत प्रकाशणारें, गूढस्थलीं उदक उत्पन्न करणारें आणि जलदीनें मार्ग आक्रमण करणारें असें सूर्यमंडळ मी जाणलें.

१०. आणि द्यावापृथ्वीमध्यें सर्वत्र प्रकाशणाऱ्या त्यानें तोंडानें गाईच्या रमणीय व कासेंतल्या दुधाचा आस्वाद घेतला. गोमातेच्या उत्कृष्ट कासेंत असणारें दूध तेजस्वी, बलशाली व नियमित अग्नीच्या जिव्हा आस्वाद घेत आहेत.

११. मला विचारल्यावरून मी तुला नमस्कार करून खरें सांगतों कीं हे सर्वज्ञा, जें सर्व धन पृथ्वीवर आणि स्वर्गावर आहे तें तुझ्या कृपेनें आम्हांला प्राप्त झालेलें असले तरी त्याचा धनी तूंच आहेस.

१२. ह्यापैकीं कोणतें धन आम्हांला देण्यासारखे आहे? कोणतें रमणीय धन देण्यासारखें आहे? हे सर्वज्ञा, ज्ञाता असा तूं आम्हाला सांग. ह्या मार्गानें

---

५ टीपः—नरकाची प्राचीन कल्पना येथें चांगल्या प्रकारें ग्रथित केली आहे.

६. टीपः—सात प्रकारचे ग्राम्य पशु आणि सात प्रकारचे आरण्य पशु (तै. सं. ७.२.२ पहा.)

आम्हाकरतां जी उत्कृष्ट गूढ संपत्ति असेल ती तूं आम्हांला सांग. आम्ही निर्धन घराला प्राप्त होऊन निंद्य न व्हावें.

१३. मर्यादा काय, पदार्थ काय आणि उत्कृष्ट संपत्ति काय चलाख घोडे युद्धांत जातात त्याप्रमाणें आम्ही सर्वांला प्राप्त करावें. केव्हां बरें अमर सूर्याच्या पत्नी उषा प्रकाशित होऊन आमचा उत्कर्ष करतील ?

१४. नीरस, निष्फळ, कठीण आणि तोटक्या स्तवनानें लोक अतृप्त असतात. हे अग्ने, असे लोक तुझी काय स्तुति करणार आहेत ? पराक्रमहीन लोक दुःख पावतात !

१५. ह्या प्रज्वलित, व्यापक आणि पराक्रमी अग्नीचें तेज भक्तांचें कल्याण करीत घरांत प्रकाशत आहे. तेज पांघरलेला, देखणा आणि लोकप्रिय अग्नि राजाप्रमाणें ऐश्वर्यानें प्रकाशत आहे.

सूक्त सहावें.

ऋषिः--वामदेव; देवता-अग्नि; छन्दः--त्रिष्टुभ.

१. हे यज्ञहोत्या अग्ने, अत्यंत हवन केला जाणारा तूं आमच्या यज्ञांत सज्ज होऊन उभा रहा. तूंच सर्व शत्रूंच्या संपत्तींना जिंकतोस आणि भक्तांची इच्छा पूर्ण करतोस.

२. बुद्धिमान, ज्ञाता, आनंददायक आणि होमनिष्पादक अग्नि यज्ञांत भक्तजनांत बसला आहे. तो सवित्याप्रमाणें आपले किरण वर फेकतो आणि खांबाप्रमाणें धूराला द्युलोकांत स्थिर करतो.

३. घृतयुक्त हलकी पळी व्यवस्थितपणें पुढें केली आहे. देवांना प्रसन्न करणारा अध्वर्यु प्रदक्षिणा घालीत आहे. नवा तयार केलेला यूप ध्वजाप्रमाणें उभा आहे. चांगला तयार केलेला सुंदर यूप पशूंना शोभवीत आहे.

४. दर्भ पसरल्यावर आणि अग्नि प्रज्वलित केल्यावर देवांना प्रसन्न करणारा अध्वर्यु तयार आहे. पुरातन आणि श्रेष्ठ असा होमनिष्पादक अग्नि गुराख्याप्रमाणें तीन वेळां भोंवती फिरत आहे.

५. आनंददायक, मधुर शब्द करणारा, सत्ययुक्त आणि होमनिष्पादक अग्नि आपणहून भोंवती हळूहळू फिरत असतो. त्याचे किरण घोड्याप्रमाणें धांवत असतात. जेव्हां तो प्रकाशतो तेव्हां सर्व जग भयभीत होतें.

६. हे चांगल्या रीतीनें प्रज्वलित झालेल्या अग्ने, भयंकर पण सर्वव्यापक असणाऱ्या तुझी रमणीय व सुंदर कांति दर्शनीय आहे. कारण, दुष्ट लोक तुला अंधारानें आच्छादूं शकत नाहींत आणि तुझ्या शरीराला अपाय करूं शकत नाहींत.

७. ज्या उत्पादक अग्नीची देणगी कोणीहि निवारूं शकत नाहीं, ज्याच्या हूकमतींत द्यावापृथ्वीहि हालचाल करूं शकत नाहींत, तो पावक अग्नि व्यवस्थित मित्राप्रमाणें मानवासाठीं प्रकाशत असतो.

८. मानवसृष्टींत एकत्र असलेल्या दहा बहिणीसारखीं असलेलीं बोटें ज्या अग्नीला उत्पन्न करतात तो प्रातःकालीं जागृत होणारा, भक्षक, तेजस्वी, सुमुख आणि तीक्ष्ण कुऱ्हाडीसारखा आहे.

९. हे अग्ने, त्या तुझ्या तुपाचा वर्षाव करणाऱ्या तांबूस, सरळ धांवणाऱ्या, चांगलें चालणाऱ्या, तेजस्वी, बलिष्ठ, जोरदार आणि देखण्या अशा तुझ्या घोड्यांना यज्ञांत आम्ही बोलावीत आहोंत.

१०. हे अग्ने, जे तुझे ते शत्रूंचा पराभव करणारे, गमनशील तेजस्वी व भजनीय किरण श्येनाप्रमाणें, गर्जना करणाऱ्या तेजस्वी मरुत्संघाप्रमाणें फिरत असतात.

११. हे प्रज्वलित केलेल्या अग्ने, तुझ्याकरतां मी स्तोत्र केलें आहे. गाणें चालूं आहे आणि हवन होत आहे. तर आम्हास धन दे. लोकांना प्रशंसनीय आणि देवांना बोलावणाऱ्या अग्नीला अनेक इच्छा मनांत धरून नमस्कार करून स्थापिले आहे.

सूक्त सातवें.

ऋषिः—वामदेव; देवता—अग्नि; छंदः-१ जगती, २ ते ६ अनुष्टुभ, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. आप्नवान व भृगु यांनीं अरण्यामध्यें आश्चर्यकारक असणाऱ्या आणि सर्व लोकाधीश्वर अशा ज्या अग्नीला प्रज्वलित केले तो हा यज्ञामध्यें प्रशंसनीय असणारा, यजनकुशल सनातन होता ऋत्विजानीं येथें स्थापिला आहे.

२. हे अग्ने, प्रकाशणाऱ्या तुझें तेज सतत कसें टिकेल ? कारण प्रशंसनीय अशा तुला लोकांनीं स्वीकारलें आहे.

---

४. टीप:—याज्ञिकांतील पर्यग्नीकरण म्हणून जी क्रिया करतात त्याचा येथें संबंध दिसतो. कोणतेंहि हविर्द्रव्य देवांच्याकरतां अग्नींत अर्पण करावयाचें झाल्यास त्याचें पर्यग्नीकरण करावें लागतें.

३. सत्यस्वरूप, व ज्ञानी अग्नीला ग्रहनक्षत्रें अन्तरिक्षाला करतात त्याप्रमाणें सर्व यज्ञांचा प्रकाशक म्हणून घरोघर स्थापिलें आहे.

४. जो सर्व लोकांत असतो, जो उपासकांचा चलाख दूत आहे आणि जो फडकणारा ध्वज आहे अशा त्या अग्नीला लोकांनीं घरोघर आणला.

५. लोकांनीं सतत देवांना बोलावणाऱ्या, ज्ञानी, रमणीय, शोधक कांतीच्या आणि सात होत्यांच्या द्वारा यज्ञकुशल अशा त्या अग्नीला सतत स्थापन केले.

६. विविध उदकांत असणाऱ्या, लांकडांत राहणाऱ्या, जवळ घेतां न येणाऱ्या, आश्चर्यकारक, गुहेंत लपविलेला, ज्ञानी आणि हवीसाठीं कोठेंहि जाणारा हा अग्नि आहे.

७. ज्याला स्तोते उषःकालीं पर्जन्याधार यज्ञांत स्तोत्रें म्हणून रमवतात तो नमस्कार करून हवि दिलेला सत्यनिष्ठ श्रेष्ठ अग्नि यज्ञाकडे नेहेमींच जातो.

८. हे अग्ने, ज्ञाता असा तूं उभय लोकांना चांगलें जाणणारा यज्ञाचें दौत्य करूं इच्छितोस. सनातन, प्रवर्धक आणि अत्यंत विद्वान् असणारा तुं दूत होऊन स्वर्गाच्या उच्च स्थानीं जातोस.

९. हे अग्ने, तेजस्वी असणाऱ्या तुझा मार्ग काळा, तुझी प्रभा पुढें, तुझ्या ज्वाला हलत्या, असें तुझें रूप रूपवानांत श्रेष्ठ आहे. जेव्हां कुमारी (अरणी) गर्भ धारण करते तेव्हां तूं लागलीच उत्पन्न होतोस आणि दूतच बनतोस.

१०. जेव्हां उत्पन्न झाल्यावर ह्याच्या ज्वाला दिसूं लागतात, ह्याच्या ज्वालेवरून वायु वाहूं लागतो तेव्हां ह्याच्या तीक्ष्ण ज्वाला लांकडावर हल्ला चढवितात आणि कठीण अन्नहि दाढांनीं खाऊन टाकतात.

११. जेव्हां अग्नि अन्न जोरानें वाहून नेतो तेव्हां थोर अग्नि आपणाला वेगवान् दूत करतो. लांकडे खाऊन घोड्याप्रमाणें वाऱ्याचें साहाय्य घेतो. आणि अग्नि आपल्या ज्वाला बाहेर काढतो आणि जोरदार होतो.

सूक्त आठवें.

ऋषिः—वामदेव: देवता–अग्नि; छंदः–गायत्री.

१. हे अग्ने, धानिक, हवि वाहणारा, अमर आणि देवांना तृप्त करणाऱ्या दूत अग्नीला मी स्तोत्र म्हणून आळवितों.

२. तो प्रसिद्ध अग्नि संपत्ति देणें जाणतो, आणि द्युलोकावरील देवांचें स्थान जाणतो. तो देवांना येथें आणो.

३. तो देव देवांना नमस्कार करविण्याकरतां कसें आणावें ते जाणतो. आणि यज्ञगृहांत यज्ञ करणाऱ्या भक्ताला आवडतें धन देतो.

४. तो होता आहे. तोच दौत्यकर्म जाणणारा द्युलोकावर जाणें किंवा द्यावापृथ्वीमध्यें फिरणें जाणतो.

५. जे भक्त हवि देऊन अग्नीला प्रसन्न करतात आणि अग्नीला हवि देऊन प्रज्वलित करतात तसें यजमान आम्ही व्हावें.

६. जे अग्नीची सेवा करतात, ते ऐश्वर्यानें विख्यात होतात आणि ते पराक्रमी मुलाबाळांनींहि विख्यात होतात.

७. आमच्या घरीं प्रतिदिनीं अत्यंत स्पृहणीय असणारी संपत्ति चालून येवो. आणि अन्नसमृद्धि आम्हाला उत्तेजन देवो.

८. तो ज्ञाता अग्नि सामर्थ्यानें लोकांचीं पातकें फेकून दिल्याप्रमाणें नष्ट करो.

सूक्त नववें.

ऋषिः—वामदेव; देवता--अग्नि; छंदः—गायत्री.

१. हे अग्ने, जो तूं देवभक्त माणसाकडे दर्भासनावर बसण्याकरतां येतोस तो तूं आम्हांला सुख दे. तूं थोर आहेस.

२. तो मानवसृष्टींत सर्वगामी अहिंस्य व अमर अग्नि सर्वांचा दूत होवो.

३. तो अग्नि यज्ञगृहाभोंवतीं फिरविला जातो. तो यज्ञांत आनंददायक होता आणि पोता होऊन बसतो.

४. अग्नि यज्ञांत अध्वर्यु होतो, आणि ब्राह्मणाच्छंसी होऊन बसतो.

५. हे अग्ने, तूं सर्व यज्ञेच्छु लोकांचें हवि इच्छितोस. आणि सर्व कर्मांचा द्रष्टा (ब्रह्मा) आहेस.

६. ज्यांचा यज्ञ हवि वाहून नेण्याकरतां तुला आवडतो त्यांचें दौत्य तूं इच्छितोस.

७. हे अंगिरा अग्ने, तूं आमचा यज्ञ व हवि स्वीकार. तूं आमचा धांवा ऐक.

८ हे अग्ने, तूं ज्या रथानें दात्याचें संरक्षण करतोस तो तुझा अविनाशी रथ आमचेकडे सर्व बाजूनें येवो.

सूक्त दहावें.

ऋषिः—वामदेव; देवता–अग्नि;छंदः—१–३ पदपंक्ति ४, ६, ७ पदपंक्ति किंवा उष्णिह, ५ महापदपंक्ति, ८ उष्णिह.

१. हे अग्ने आज घोड्याप्रमाणें किंवा उपकारकर्त्याप्रमाणें कल्याणकारक आणि हृद्यंगम असणाऱ्या तुझी स्तोत्रें म्हणून हवि देऊन आराधना करीत आहोंत.

२. कारण, हे अग्ने, तूं आमच्या इष्टसिद्धि करून देणाऱ्या उत्कृष्ट यज्ञाचा नेता झाला आहेस.

३. हे अग्ने, तेजस्वी सूर्याप्रमाणें सर्व तेजांनीं आमचीं हीं स्तोत्रें ऐकून प्रसन्न मनानें आम्हांकडे वळ.

४. हे अग्ने, आज हीं स्तोत्रें म्हणून तुझी स्तुति करणारे आम्ही तुला हवि अर्पण करूं. मेघाप्रमाणें तुझ्या ज्वालांचा आवाज होतो.

५. हे अग्ने, तुझी अत्यंत सुंदर कान्ति रात्रंदिवस अलंकाराप्रमाणें जवळ प्रकाशत असते.

६. तर हे अन्नसमृद्ध अग्ने, शुद्ध तुपाप्रमाणें तुझें शरीर निष्पाप आहे. शुद्ध सुवर्णाप्रमाणें किंवा अलंकाराप्रमाणें तुझें तेज प्रकाशो.

७. ते यज्ञनिष्ठ अग्ने, भक्तानें केलेलें चिरंतनहि पाप तूं खरोखर नाहींसें करतोसच.

८. हे अग्ने, तुमच्याशीं आमचा मित्रपणा व आप्तपणा कल्याणकारक होवो. ती मैत्रीच गृहांत यज्ञभूमीवर तुम्हाआम्हांला बंधक होवो.

सूक्त अकरावें.

ऋषिः—वामदेव; देवता–अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे बलवान अग्ने, तुझें कल्याककारक तेज सूर्य असतां (दिवसांहि) प्रकाशते आणि दर्शनीय तेजस्वी कान्ति रात्रींहि दिसते. स्निग्ध अन्न सुंदर अग्नींत अर्पण केलें जातें.

२. हे अनेक प्रकारें उत्पन्न होणाऱ्या अग्ने, प्रयत्नानें स्तुति केला जाणारा तूं स्तुति करणाऱ्याकरतां दार खुलें कर. हें चांगल्या तेजानें प्रकाशणाऱ्या निर्मळ अग्ने, तें विपुल व उत्कृष्ट धन आम्हांस दे कीं जे सर्व देव इच्छित असतात.

३. हे अग्ने, तुझ्यापासून काव्यें, तुझ्यापासून स्तोत्रें, आणि तुझ्यापासून कार्यसिद्धि करणारीं गाणीं उत्पन्न होतात. खरें कर्म करणाऱ्या दात्या भक्तांला तुझ्यापासूनच पराक्रमानें मिळणारें धन प्राप्त होते.

४. हे अग्ने, तुझ्यामुळें बलवान, अन्नसमृद्ध, थोर यज्ञकर्ता व सत्यबल पुत्र होतो. तुजपासून देवप्रेरित सुखकर धन प्राप्त होते आणि चलाख वेगवान घोडा उत्पन्न होतो.

५. हे अमर अग्ने, देवभक्त लोक मुख्य अशा तुझींच स्तोत्रें म्हणून उपासना करतात जिव्हेनें आनंद देणारा, द्वेष्ट्यांचा नाश करणारा, उदार, गृहपीत व ज्ञाता असा तो आहे.

६. हे बलपुत्र अग्ने, रात्रीं कल्याणकारक प्रकाशणारा तूं ज्याचें कल्याण करतोस आणि ज्याचें तूं रक्षण करतोस, त्या आम्हांपासून तूं दारिद्र्य दूर कर. आमच्यापासून पाप दूर कर आणि आमच्यापासून सकळ दुर्मति दूर कर.

सूक्त बारावें.

ऋषिः—वामदेव; देवता–अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे अग्ने, जो तुला पळी सज्ज करून प्रज्वलित करील आणि जो तुला सर्व दिवसांत तिनदा हवि देईल तो हे सर्वज्ञा, तुझ्या कर्मानें ज्ञाता होऊन आपल्या वैभवानें प्रबलाचाहि पराभव करो.

२. हे अग्ने, जो कोणी मोठ्या श्रमानें तुल समिधा अर्पण करील आणि तुझ्या महान तेजाची उपासना करील तो तुला सकाळसंध्याकाळीं प्रदीप्त करणारा मनुष्य भरभराटीस पाऊन शत्रूंना ठार करतो. आणि धन मिळवतो.

३. अग्नि मोठ्या सामर्थ्याचा ईश्वर आहे. अग्नि उत्कृष्ट अन्न व धन यांचा धनी आहें. अत्यंत तेजस्वी व समृद्ध असणारा अग्नि सेवा करणाऱ्याला सतत धन देत असतो.

४. हे अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, जरी आम्ही अज्ञानानें तुझ्या भक्ताविषयीं कांहीं पाप केलें असेल तरी तूं अदितीकरवीं आम्हांला पापमुक्त कर. आमचीं पापें सर्व बाजूंनीं शिथिल कर.

५. हे अग्ने, देव किंवा मनुष्य यांच्या विषयींचें जरी आम्ही मोठें विस्तीर्ण पाप केलें असेल तरी तुझे

---

७ टीपः—केवळ ऐहिक उपभोगाकरतांच वैदिक ऋषींची प्रार्थना, आत्मशुद्धि व मोक्ष याचा वेदांत संबंध नाहीं असें म्हणणारांना वरील ऋचेसारख्या ऋचा स्पष्ट उत्तर आहे.

मित्र असणाऱ्या आम्हीं केव्हांहि दुःखांत पडतां उपयोगी नाहीं. आमच्या पुत्रपौत्रांना सुख व शांति दे.

६. हे पूजार्ह सर्वाधारांनो, तुम्ही त्या पाय बांधलेल्या गाईला जशी मुक्त केलीत त्याप्रमाणेंच आम्हांला पापापासून मुक्त करा. हे अग्ने, तूं आमचें दीर्घायुष्य अधिक दीर्घ कर.

सूक्त तेरावें.

ऋषिः—वामदेव; देवता–अग्नि किंवा त्या त्या मंत्रांत आलेल्या उषा इत्यादिक देवता; छंदः—त्रिष्टुभ.

१. उदार अग्नि प्रकाशणाऱ्या उषांच्या पूर्वीं आपलें वैभव प्रगट करतो. हे अश्विहो, तुम्ही ह्या पुण्यवानाच्या घरीं या, कारण, सूर्यदेव तेजानें उदायाला येत आहे.

२. गाई इच्छिणारा बैल धूळ उडवीत येतो त्याप्रमाणें सवितृदेव आपले किरण फेंकित येत आहे. वरुण व मित्र जेव्हां सूर्याला द्युलोकांत चढवतात तेव्हां ते नियमाला अनुसरत असतात.

३. अढळ राहणारे आणि कार्य न सोडणारे अशा देवांनीं सर्व बाजूनीं अंधार नाहींसा करण्याकरतां ज्या सूर्याला निर्माण केलें, त्या सर्व जगाला प्रेरक असणाऱ्या सूर्याला सात मोठाल्या घोड्या वहातात.

४. हे तेजस्वी सूर्या, तूं आपला प्रकाश विस्तारून अंधकाररूपी काळ्या वस्त्राला दूर करून बलिष्ठ घोड्यावर जात असतोस. सूर्याचे किरण अंतरिक्षामध्यें अंधाराला चामड्याप्रमाणें झाडून फेंकून देतात.

५. हा आधारहीन आणि बंधन नसलेला खालीं किंवा वर जातांना पडत कसा नाहीं ? तो कोणत्या शक्तीनें चालतो ? कोणी त्याला पाहिलें आहे? द्युलोकाचा खांब असा स्वर्गाला मिळून त्याचें संरक्षण करतो.

सूक्त चवदावें.

ऋषिः—वामदेव; देवता–अग्नि किंवा त्या त्या मंत्रांत सांगितलेली; छंदः—त्रिष्टुभ.

१. देदीप्यमान सर्वज्ञ अग्नि तेजस्वी उषःकालीं प्रकट झाला आहे. हे अश्विहो, अत्यंत गमन करणारे तुम्ही रथानें आमच्या या यज्ञांत या.

२. सवितृदेव सर्व जगाला प्रकाशित करीत आपले किरण वर फेंकीत आहे. सर्व न्याहाळून पहाणाऱ्या सूर्यानें आपल्या किरणांनीं सर्व द्यावापृथ्वीं व अन्तरिक्ष भरून टाकलें.

३. ऐश्वर्य आणणारी, अरुणकान्ति, अत्यंत तेजस्वी आणि सुंदर उषा आपल्या किरणांनीं सर्वत्र दृष्टि टाकीत आली. सुखाकरतां सर्वांना जागें करणारी उषादेवी चांगल्या जोडलेल्या रथानें जात आहे.

४. हे अश्विहो, उषा प्रकाशल्यावर तुमचे वहनकुशल रथ व घोडे येथें तुम्हांस आणोत. कारण, हे वीरांनो, तुम्हाला पिण्याकरतां हे सोमरस येथें आहेत, ते तुम्हांला आनंदित करोत.

५. आधारहीन आणि बंधन नसलेला हा सूर्य खालीं येतांना किंवा वर जातांना पडत कसा नाहीं ? तो कोणत्या शक्तीनें चालतो ? कोणी पाहिलें आहे ? द्युलोकाचा खांब होऊन स्वर्गाला मिळून तो स्वर्गाचें संरक्षण करीत असतो.

सूक्त पंधरावें.

ऋषिः—वामदेव; देवता–७.८ सोमक साहदेव्य, ९–१० अश्वि, अवशिष्ट अग्नि; छंदः—गायत्री.

१. देवांना बोलावणारा अग्नि आमच्या यज्ञांत घोड्याप्रमाणें भोंवती फिरविला जातो. तो देवांतला देव आणि यज्ञार्ह आहे.

२. अग्नि देवांच्याकरतां हवि धारण करून यज्ञाच्या भोंवती तीनदां रथवाल्याप्रमाणें फिरतो.

३. अन्नाधिपति ज्ञाता अग्नि दात्याला संपत्ति देत हवीच्या भोंवती फिरत असतो.

४. हाच तो अग्नि, कीं जो तेजस्वी आणि शत्रुनाशक असा दैववात सृंजयाच्या घरीं पूर्वेकडे प्रदीप्त केला जातो.

५. मर्त्य वीर ह्या गमनशील, उदार आणि तीक्ष्णदंष्ट्र अग्नीवर सत्ता चालवतो.

६. भक्त त्याची शीघ्रगामी घोड्याप्रमाणें व द्युलोकाच्या तेजस्वी व पुत्रभूत सूर्याप्रमाणें प्रतिदिनीं सेवा करतात.

७. जेव्हां कुमार साहदेव्यानें–सोमकानें–दोन घोडे मला दिले तेव्हां मी निमंत्रिताप्रमाणें उठलों.

८. आणि कुमार साहदेव्यापासून ते उत्कृष्ट घोडे मी तावडतोब विकत घेतले.

---

४ टीप—सृंजय–६–२७–७. पहा.

९. हे अश्विदेवांनो, हा तुमचा साहदेव्य कुमार सोमक राजा दीर्घायुषी असावा.

१०. म्हणून हे अश्विदेवहो, तुम्ही त्या कुमार साहदेव्याला दीर्घायुषी करा.

सूक्त सोळावें.

ऋषिः—वामदेव; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. सत्यस्वरूप आणि सोमप्रिय इंद्र आमच्याकडे धांवत येवो. त्याचे घोडे आमच्याकडे येवोत. त्याकरतां आम्ही चांगले सामर्थ्यपूर्ण सोम पिळीत आहोंत. स्तुति केलेला इंद्र आमच्या इच्छा पूर्ण करो.

२. हे शूर इंद्रा, तूं आज मुक्कामावर घोडे सोडतात त्याप्रमाणें आमच्या यज्ञांत आम्हाला आनंदित करण्याकरतां घोडे सोड. हे इंद्रा, विद्वान आणि बलशाली अशा तुझ्याकरतां उशनाप्रमाणें मननीय गाणें गात आहें.

३. कवि गूढ अर्थ उकलीत असतो त्याप्रमाणें सोम पिणारा बलिष्ठ इंद्र जेव्हां स्तुति केला जातो तेव्हां द्युलोकांतून खरोखर सात स्तोत्यांना तो उत्पन्न करतो. आणि स्तोते ज्ञानपूर्वक त्याच दिवशीं यज्ञ करतात.

४. जेव्हां शोभिवंत असणारा सूर्य स्तोत्यांना प्राप्त झाला, जेव्हां अन्तरिक्षांत सकाळीं मोठें तेज (सूर्य) दिसूं लागलें, तेव्हां लोकांना दिसावें म्हणून लोकश्रेष्ठ सूर्यानें उदय पाऊन निबिड अंधार नष्ट करून टाकला.

५. सोम पिणारा इंद्र अमर्याद वाढला. त्याच्या महिम्यानें दोन द्यावापृथ्वी दुमदुमून गेल्या. इंद्रानें सर्व जगाला मागें टाकलें म्हणून त्याचा महिमा जगांत भरून उरला.

६. सर्व लोकहितकारक कार्यें करूं जाणणाऱ्या बलवान इंद्रानें प्रेमळ मित्रांच्या द्वारा उदक उत्पन्न केलें. कारण, त्यांनीं स्तोत्रामुळें पर्वताचा भेद केला आणि गाईंनीं भरलेले गोळवाड मोकळे केले.

७. हे इंद्रा, पाण्याला अडवून बसलेल्या वृत्राला तूं ठार केलेंस. तुझें वज्र सुरक्षित राहिलें आणि पृथ्वी सचेतन झाली. हे पराक्रमी शूरा, तूं सामर्थ्यानें लोकाधिपति झालास आणि अन्तरिक्षांतल्या उदकांना गति दिलीस.

८. हे बहुस्तुत इंद्रा, जेव्हां तूं उदकाकरतां पर्वत फोडलास तेव्हां सरमेनें तुझें प्राचीन धन प्रगट केलें. तर अंगिरांनीं स्तविलेला आमचा नायक असणारा तूं मेघ फोडून समृद्धि कर.

९. हे लोकमान्य व धनवान इंद्रा, तूं ज्ञात्या कुत्साकडे धांवत गेलास. धन देण्याची वेळ आली असतां याचना करणाऱ्या त्याला तूं साहाय्य केलेंस. कपटी आणि नास्तिक दस्यूला तूं युद्धांत ठार केलेंस.

१०. हे इंद्रा तूं दस्युहनन करण्याच्या बुद्धीनें कुत्साच्या घरीं आमच्याकडे ये. कुत्स तुझ्या सख्याची अत्यंत इच्छा करणारा आहे. सारख्या स्वरूपाचे असणारे तुम्ही दोघे आपल्या स्थानीं बसा. खरें जाणणारी स्त्री (शची) तुम्हाविषयीं संशय घेती झाली.

११. हे इंद्रा, ज्या दिवशीं कवि कुत्स जिंकावयाच्या लुटीकडे एकसारखी धांव घेणाऱ्या घोड्यांप्रमाणें घोडे जोडून संकटाच्या पार जाण्यास समर्थ झाला, त्यादिवशीं वाऱ्यासारख्या चलाख घोड्यांचा धनी असणारा तूं साहाय्य करण्याकरतां कुत्साबरोबर एकाच रथांत बसून गेलास.

१२. हे इंद्रा, तूं दुःखदायक शुष्णाला कुत्साकरतां ठार केलेंस. तसेंच तूं दिवसाच्या प्रारंभीं कुयवाला ठार केलेंस. तसेंच तूं वज्रानें हजारो दस्यूंना ठार कर. तूं सूर्याचें चक्र युद्धांत मोडून टाकलेस.

१३. तूं पिप्रु आणि बलाढ्य मृगयूला वैदथिन ऋजिश्वनकरतां ताब्यांत घेतलेस. तूं शेंकडो हजारो काळ्या शत्रूंचा वध केलास. तसेंच तूं म्हातारपण रूप नाहींसें करतें त्याप्रमाणें शंबराची नगरें फोडून टाकलींस.

१४. हे इंद्रा, जेव्हां तूं सूर्याच्या जवळ उभा राहिलास आणि जेव्हां अमर असणाऱ्या तुझें रूप चमकलें, तेव्हां हत्तीप्रमाणें बल धारण करणारा आणि आयुधें धारण करणारा तूं सिंहाप्रमाणें भयंकर दिसलास.

१५. धनेच्छु सकाम व युद्धाप्रमाणें यज्ञांत प्रार्थना करणारे स्तोते इंद्राकडे जातात आणि समृद्धीच्या इच्छेनें स्तोत्रें गात असतात. तेव्हां तो स्तोत्यांना घरासारखा आणि रमणीय व देखण्या लक्ष्मीसारखा असतो.

---

१० टीपः—रुरु नांवाच्या राजर्षीला कुत्स नांवाचा मुलगा होता. त्यानें शत्रूशीं लढण्याची इच्छा करीत असतां स्वतः अशक्त म्हणून इंद्राचा धांवा केला. इंद्र कुत्साच्या घरीं आला आणि त्याच्या शत्रूला ठार केले. नंतर त्यांची अत्यंत मैत्री जमली. एकदा इंद्रानें कुत्साला आपल्या घरीं नेलें. तेव्हां शची इंद्राकडे आली असतां इंद्र कोणता आणि कुत्स कोणता याविषयीं तिला संशय आला ह्या गोष्टीस अनुसरून वरील ऋचा आहे.

१२ टीपः—सूर्याचें चक्र १. १२०. ९. पहा.

१६. त्याच तुमच्या सहज येणाऱ्या इंद्राला आपण बोलावूं कीं ज्यानें ते मोठमोठे पराक्रम केले. आणि स्पृहणीय ऐश्वर्य असणाऱ्या ज्यानें माझ्यासारख्या स्तोत्याला लुटून आणण्यासारखें धन सहज दिलें.

१७. हे शूर इंद्रा, जेव्हां एकाद्या लोकांच्या युद्धांत आम्हावर तीक्ष्ण वज्र पडेल किंवा जेव्हां घोर युद्ध होईल तेव्हां तूं आमच्या शरीराचा संरक्षक हो.

१८. हे इंद्रा, तूं वामदेवाच्या उपासनेचा संरक्षक हो. तूं युद्धांत संरक्षक मित्र हो. हे इंद्रा, ज्ञानी अशा तुला आम्ही अनुसरूं. नेहेमीं तूं स्तोत्यांच्याकडून प्रशंसा केला जा.

१९. हे धनवान इंद्रा, सर्व युद्धांत तुझी इच्छा करणाऱ्या ह्या धनवान भक्तांसह धनांनीं संपन्न असणाऱ्या लोकाप्रमाणें आम्ही अनेक रात्री आणि अनेक दिवस तुला स्तवूं.

२०. याप्रकारें पराक्रमी व बलिष्ठ इंद्राकरतां भृगूनीं रथ निर्माण केला, त्याप्रमाणें आम्ही स्तोत्र निर्माण केलें आहे, कीं, ज्यामुळें आमचें सख्य कायम टिकतील आणि तो प्रतापी आमचा शरीररक्षक होईल.

२१. हे इंद्रा, तर स्तुति केलेला आणि स्तविला जाणारा तूं नद्याप्रमाणें आम्हां स्तोत्यांना अन्नसमृद्ध कर. हे अश्वयुक्त इंद्रा, तुझ्याकरतां मी नवीन स्तोत्र तयार केलें आहे. रथयुक्त असणारे आम्ही स्तुति करून तुझी उपासना करीत असावें.

सूक्त सत्रावें.

ऋषिः—वामदेव; देवता–इंद्र; छंदः–१५ विराज्, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, तूं थोर आहेस. पृथ्वी आणि द्युलोक यांनीं महत्त्वपूर्ण असणाऱ्या तुझ्या सामर्थ्याला अनुमोदन दिलें आहे. तूं पराक्रानें वृत्राला ठार केलेस आणि अहीनें ग्रासलेल्या नद्या मोकळ्या केल्यास.

२. हे इंद्रा, तेजस्वी अशा तुझ्या जन्माच्या वेळीं तुझ्या रागाच्या भयानें द्युलोक हदरला, पृथ्वी कापूं लागली, महान् पर्वत फोडले गेले, शुष्क प्रदेश ओले झाले आणि पाणी वाहूं लागलें.

३. पराभव करणारा इंद्र आपलें तेज प्रगट करीत जोरानें वज्र फेकून पर्वत फोडता झाला. सोमानें आनंदित होऊन त्यानें वज्रानें वृत्राचा वध केला आणि उदक वेगानें अप्रतिहत वहातें केलें.

४. हे इंद्रा, तुझा पिता द्युलोक सुपुत्र असा मानला गेला. ज्यानें स्तुत्य, सुवज्र आणि भूमीप्रमाणें अच्युत अशा इंद्राला उत्पन्न केलें तो इंद्राचा निर्माणकर्ता कर्तृत्ववान ठरला.

५. जो एकटाच उत्पन्न झालेलें भय नाहींसे करतो तो बहुस्तुत इंद्र लोकांचा राजा होय. धनवान व तेजस्वी स्तोत्याला जो देणगी देतो त्या इंद्राची सर्व भक्त खरोखर स्तुति करतात.

६ खरोखर सर्व सोम ह्याचे झाले, सर्व मादक पदार्थ थोर इंद्राला अत्यंत मद उत्पन्न करणारे झाले. खरोखर हे इंद्रा, तूं धनाचा धनपति झालास. हे इंद्रा तूं सर्व लोकांना ऐश्वर्यांत ठेवतोस.

७. हे इंद्रा, तूं प्रथम उपजतांच सर्व लोकांना भीति उत्पन्न केलीस. हे धनवान इंद्रा, तूं वहाणाऱ्या पाण्याला अडवून पडलेल्या अहीला वज्रानें तोडलेस.

८. जो इंद्र वृत्राला ठार करतो, जो इंद्र अन्न देतो, जो संपन्न आणि धनवान इंद्र ऐश्वर्य देतो, त्या अनेक शत्रूंना ठार करणाऱ्या, चालून जाणाऱ्या, शत्रुहिंसक, महान, अपार, वीर्यवान आणि सुवीर्य इंद्राला आम्ही स्तवितों.

९. जो इंद्र युद्धांत प्रामुख्यानें विख्यात आहे तो एकत्र झालेल्या शत्रूंच्या सेना नष्ट करतो. हा जें देतो त्याची समृद्धि धारण करतो. आम्ही त्याला आवडते असावें.

१०. हा इंद्र विजय मिळविल्यानें आणि शत्रूंची हिंसा केल्यानें प्रसिद्ध आहे. हा युद्धानें गाई प्रगट करतो. इंद्र जेव्हां खरोखर रागावतो तेव्हां स्थावर जगहि ह्याच्या भीतीनें कापूं लागतें.

११. ज्या धनवान इंद्रानें गाई जिंकल्या, संपत्ति जिंकली, अश्वसंपत्ति जिंकली तोच अनेक शत्रूंचा पराभव करणारा होय. सामर्थ्यानें सर्वश्रेष्ठ असणारा इंद्र ह्या स्तोत्रांनीं स्तविल्यावर स्तोत्याला धन देणारा आणि संपत्तीचा आगर होय.

१२. जो इंद्र गर्जना करणाऱ्या मेघांनीं प्रेरणा दिलेल्या वाऱ्याप्रमाणें ह्या जगाला वरचेवर सामर्थ्य देतो त्या इंद्राला आईपासून किती सामर्थ्य मिळालें ? आणि जन्मदात्या बापापासून त्याला किती सामर्थ्य मिळालें ?

१३. धनवान इंद्र निराश्रिताला आश्रय देतो. विद्युल्लतायुक्त द्युलोकाप्रमाणें शत्रुभंजक इंद्र झालेलें पातक नष्ट करतो. आणि धनवान स्तोत्याला धन देतो.

१४. ह्या इंद्रानें सूर्याचें चक्र फेकून दिलें, चालून येणाऱ्या एतशाला परत फिरवले, कुटिलगामी काळ्या मेघानें त्याला तेजाच्या मूलस्थानीं अन्तरिक्षांत रक्षिले.–

१५. रात्रीं होता यजमान अग्नीचें संरक्षण करतो त्याप्रमाणें.—

१६. गाईची इच्छा करणारे, घोडे इच्छिणारे, अन्न इच्छिणारे आणि स्त्री इच्छिणारे आम्ही स्तोतें पराक्रमी, स्त्री देणारा, व सर्वदा रक्षण करणाऱ्या इंद्राला विहिरीतून पोहोरा काढावा त्याप्रमाणें आम्ही आपल्याकडे खेचतों.

१७. हे इंद्रा, तूं आमचा, सतत आपलेपणानें पहाणारा आप्त आणि संरक्षक हो. सोमयाज्यांकडे मित्रत्वानें पहाणारा आणि सुख देणारा हो. सखा, पालक आणि पितरांतला श्रेष्ठ पिता हो. तूं (स्वर्गादि) लोक इच्छिणाऱ्या भक्ताला अन्न देणारा हो.

१८. हे इंद्रा, तूं तुझें सख्य इच्छिणारांचा रक्षण करणारा मित्र हो. स्तुति केला जाणारा तूं स्तोत्याला अन्न दे. कारण हे इंद्रा, दुःखांत आम्ही ह्या कर्मांनीं तुझी पूजा करणारे तुझा धांवा करीत आहोंत.

१९. जेव्हां धनवान इंद्र स्तुति केला जातो तेव्हां तो एकटा चालून येणाऱ्या अनेक शत्रूंना ठार करतो. ह्याच्या आश्रयाला असणाऱ्याला देव दूर करूं शकत नाहींत. मनुष्य निवारण करूं शकत नाहींत. ह्याचा स्तोता अत्यंत प्रिय असतो.

२०. अशा प्रकारें स्तविलेला धनवान, गर्जना करणारा, अप्रतिहत आणि लोकसंरक्षक इंद्र आमची प्रार्थना खरी करो. हे इंद्रा, लोकांचा राजा असणारा तूं जें महत यश स्तोत्याला द्यावयाचें असेल तें तूं आम्हांस दे.

२१. हे इंद्रा, स्तुति केलेला आणि स्तुति केला जाणारा तूं नद्याप्रमाणें आम्हां स्तोत्यांना अन्नसमृद्ध कर. हे अश्वयुक्त इंद्रा, तुझ्याकरतां मी नवीन स्तोत्र केलें आहे. रथयुक्त असणोर आम्हीं स्तुति करून तुझी उपासना करावी.

सूक्त अठरावें.*

ऋषिः—इंद्र, अदिति व वामदेव यांचा संवाद; छंदः—त्रिष्टुभ.

१. इंद्र वामदेवाला म्हणतोः—हा पुरातन मार्ग सर्वांनीं प्राप्त केला आहे. कारण सर्व देव ह्या मार्गांनींच उत्पन्न झाले आहेत. ह्याच मार्गानें वाढलेला वामदेव जन्मास येवो. आईला मरावयास न लावो.

२. वामदेवः—मी ह्या मार्गानें बाहेर पडणार नाहीं. हें संकट आहे. मी बाजूच्या भागातून बाहेर पडेन. दुसऱ्यांनीं न केलेलीं पुष्कळ कृत्यें मला करावयाचीं आहेत (आणि त्याकरतां) एकाशीं मी लढेन आणि एकाशीं पृच्छा करीन.

३. इंद्रानें मला मातेची आसन्नमरण स्थिति सांगितली. बरें प्राचीन मार्गानें जाणार नाहीं असें नाहीं तर अनुसरतोच. इंद्र त्वष्ट्याचे घरीं दोन भांड्यांत तयार करून ठेवलेला शेंकडो द्रव्याच्या किंमतीचा सोम (बलात्कारानें) प्याला.

४. अदितीनें या इंद्राला हजारो महिने आणि अनेक वर्षें (पोटांत) वागविलें त्या इंद्रानें विरुद्ध काय (थोडे) केलें ?

अदितीः—हे वामदेवा, जे उत्पन्न झाले आणि उत्पन्न होणारे आहेत त्यांच्यामध्यें इंद्राच्या तोडीचा कोणीहि नाहीं.

५. इंद्राला त्याची माता निंद्य समजून बळेंच दाबून ठेवती झाली. नंतर तो स्वतःच तेज पांघरून उठला आणि जन्मल्याबरोबर द्यावापृथ्वी भरून टाकली.

६. उदकपूर्ण असणाऱ्या ह्या नद्या ‘अलला’ असा-शब्द करीत गर्जत चालल्या आहेत. हे ऋषे, हें काय म्हणतात तें ह्यांना तूं विचार. उदक कोणत्या आवरक मेघाला फोडीत आहे ?

७. ‘ निविद ’ स्तोत्रें ह्या इंद्राविषयीं काय म्हणत आहेत ? निर्दोष इंद्राची उदक स्तुति करीत आहे.

---

१४ टीपः—स्वश्व नांवाचा एक राजा होता. त्यानें पुत्र व्हावा म्हणून सूर्याची उपासना केली. तेव्हां सूर्य प्रसन्न झाला आणि त्यानें त्याच्या पोटीं स्वतःच जन्म घेतला आणि एतश ऋषीबरोबर युद्ध केलें. ज्यावेळीं जय मिळावा म्हणून इंद्राचा धांवा केला. तेव्हां इंद्रानें एतशाला स्वश्वाचा पुत्र जो सूर्य त्यापासून रक्षिलें.

* टीपः—वामदेव गर्भांत असतांनाच त्याला ज्ञान प्राप्त झालें. आणि त्याला असें वाटलें कीं आपण कांहीं इतर लोकाप्रमाणें जन्माला येऊं नये, तर आईच्या पोटांतून बाजूनें बाहेर यावें. हें आईच्या ध्यानांत आलें तेव्हां तिनें इंद्रमाता आदितीचें ध्यान केलें. नंतर अदितिसहित इंद्र गर्भाशी जेथें होती तेथें रानांत गेले. तेव्हां अदिति, इंद्र व वामदेव यांचा संवाद झाला तो ह्या सूक्तांत आहे.

माझ्या मुलानें मोठ्या वज्रानें वृत्राला ठार केलें आणि ह्या नद्या वहावयास लावल्या.

८. तुला प्रमत्तपणेंच तरुण मातेनें फेकून दिलें, प्रमत्तपणेंच कुषवेनें तुला गिळून टाकलें, बालरूप असणाऱ्या तुला प्रमत्तपणेंच उदकानें सुखी केलें, प्रमत्तपणेंच इंद्र सामर्थ्यानें एकाएकीं उभा राहिला.

९. हे धनवान् इंद्रा, चुकीनें व्यंसानें मारमारून तुझें थोबाड रंगविलें. तडाखे दिलेला तूं अधिक सामर्थ्यवान होऊन वज्रानें दास व्यंसाचें डोके उडविता झालास.

१०. अधिक वयाचा, सामर्थ्यवान, अजिंक्य, बलिष्ठ, प्रेरक, अपराभूत, आपणहून आणि स्वतःच्या शरीराची इच्छा करणारा इंद्र गाय प्रसवते त्याप्रमाणें अदितीनें उत्पन्न केला.

११. माता थोर पुत्राला विनवूं लागली कीं हे बाळा, हे देव तुला सोडीत आहेत. (पण इंद्र पुढेंच गेला) वृत्राला ठार करूं इच्छिणारा इंद्र विष्णूला म्हणाला हे सख्या विष्णो, तूं दूरवर पावलें टाक.

१२. हे इंद्रा, जेव्हां तूं पाय पकडून पित्याला ठार केलेंस तेव्हां तुझ्या आईला विधवा कोणी केलें? निजणाऱ्या किंवा फिरणाऱ्या तुला कोणी ठार केले? तुझ्यापेक्षां कोण अधिक सुख देणारा आहे?

१३. वामदेव म्हणतो–मी दारिद्र्यामुळें कुत्र्याचीं आंतडी शिजवली. तुझ्याशिवाय देवामध्यें सुख देणारा कोणी नाहीं. मीं माझ्या स्त्रीची दुर्दशा झालेली पाहिली नंतर माझ्याकरतां इंद्रानें उदक आणलें.

---

७. टीपः—इंद्रानें वृत्रासुराला मारून ब्रह्महत्या केली त्याला उद्देशून वरील वाक्य आहे.

'निविद' नांवाचीं स्तोत्राच्या संक्षेपात्मक लहान लहान वाक्यें फार पुरातन कालापासून प्रचलित आहेत. त्यांचा उपयोग स्तोत्रांच्या ऐवजीं कांहीं प्रसंगीं करीत असतात.

सूक्त एकूणिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. येथें हे वज्रधरा इंद्रा, सर्व सुलभ आणि संरक्षक देवांनीं, दोन्ही द्यावापृथ्वीनीं त्या महान, गुणशाली व दर्शनीय एकट्या इंद्रालाच वृत्रहननाकरतां निवडलें.

२. हे इंद्रा, म्हाताऱ्या माणसाप्रमाणें देवांनीं तुला उत्तेजन दिलें. सत्याचा आधार असणारा तूं पृथ्वीचा सम्राट् झाला आहेस. पाण्याला अडवून पडलेल्या अहीला तूं ठार केलेंस. आणि सर्वपोषक नद्या तूं वहावयास लावल्यास.

३. तृप्ति न पावणारा, शिथिलांग, दुर्विज्ञान, मूर्ख, निद्रासक्त आणि सात नद्यांना अडवून बसलेल्या अहीला पौर्णिमेला वज्रानें ठार केलें.

४. वारा आपल्या सामर्थ्यानें उदक पाझरावयास लावतो त्याप्रमाणें इंद्रानें उदकहीन अन्तरिक्षाला पाऊस पाडावयास लावलें. पराक्रम करूं इच्छिणाऱ्या इंद्रानें बळकट अन्तरिक्ष फोडून टाकले. आणि पर्वतांचे पंख त्यानें तोडून टाकले.

५. हे इंद्रा, माता मुलाकडे धांवतात त्याप्रमाणें तुझ्याकडे मरुत येतात. अवाढव्य असणारे ते एकदम रथाप्रमाणें जोरानें येतात. हे इंद्रा, तूं नद्यांना तुडूंब केलेंस. मेघ फोडलेस आणि अडवलेल्या नद्यांना वहावयास लावलेंस.

६. हे इंद्रा, तूं ह्या विश्वपोषक आणि उत्पादक असणाऱ्या विशाल पृथ्वीला अन्न आणि वहात्या उदकानें वंद्य आणि तुर्वीतीकरतां रमणीय केलेंस. आणि नद्यांना सुखानें तरून जाण्यासारखे केलेस.

७. इंद्रानें शत्रुघातक सैन्याप्रमाणें तीरें उध्वस्त करणाऱ्या तरुण व अन्नसमृद्धि करणाऱ्या नद्यांना समृद्ध केलें. निर्जल प्रदेशांना आणि तृषाक्रांत वाटसरूंना तृप्त केलें. राक्षसांच्या ताब्यांत असणाऱ्या वांझ गायांना वेत्या केल्या.

८. वृत्राला ठार करणाऱ्या इंद्रानें त्यानें गिळलेलीं अनेक वर्षें आणि उषा बाहेर काढल्या आणि पाणी वहावयास लावलें. कोंडलेल्या आणि अत्यंत बन्द झालेल्या नद्या पृथ्वीवरून वहात्या केल्या.

९. हे अश्वयुक्ता, तूं मुंग्यांनीं खाल्ल्या जाणाऱ्या अग्रूच्या मुलाला वारूळातून बाहेर काढलेंस. बाहेर काढतांच त्या अंधळ्यानें अहीला पाहिलें. आणि तो बाहेर आला. वारुळांत ठेचले गेलेलें त्याचें शरीर नीट केलें गेलें.

१०. हे राजा, जसजसें तूं स्वयंवर्णित आणि लोकहितकारक असे मोठाले पराक्रम केलेंस तसतसें हे ज्ञात्या, तुझीं तीं सर्व कृत्यें ध्यानांत घेऊन मी ज्ञात्या पुढें वर्णन करीत आहें.

११. आतां हे इंद्रा, स्तुति केलेला व प्रशंसिला जाणारा तूं स्तुति करणाऱ्या मला नद्यांप्रमाणें अन्नसंमृद्ध कर. हे हर्यश्वा, तुझें मी अत्यंत नवें स्तोत्र केलें आहे. तुझ्या स्तुतींमुळें आम्ही नेहेमीं जय मिळवणारे रथी व्हावें.

सूक्त विसावें.

ऋषिः—वामदेव; देवता-इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ.

१. साहाय्य करणारा बलाढ्य इंद्र मला साहाय्य करण्याकरतां दुरून येवो आणि आम्हाकडे जवळूनहि येवो. लढाईत शत्रूंना ठार करणारा वज्रपाणी व लोकरक्षक इंद्र युद्धांत बलवान मरुतांसह येवो.

२. आमच्याकडे वळलेला इंद्र आम्हाला साहाय्य व समृद्धि देण्याकरतां घोड्यांनीं आमच्याकडे येवो. वज्रधारी व समृद्ध असणारा थोर इंद्र ह्या यज्ञामुळें युद्धांत (आम्हाला साहाय्यक म्हणून) उभा राहो.

३. हे इंद्रा, तूं आमचा पुरस्कार करून आमच्या ह्या यज्ञाचा स्वीकार करावास. हे वज्रधरा, आम्हीं स्तोते तुझ्या कृपेनें पारध्याप्रमाणें युद्ध जिंकू.

४. हे समृद्ध इंद्रा, तूं प्रसन्न मनानें चांगला तयार केलेला भरपूर सोमरस मनःपूर्वक आमच्या येथें पी. पृष्ठ्य स्तोत्रासह तूं सोम पिऊन आनंदित हो.

५. पिकलेल्या फलांनीं युक्त असणाऱ्या वृक्षाप्रमाणें किंवा आयुधधारी जेत्याप्रमाणें जो नवीन ऋषींनीं अनेक प्रकारें प्रशंसिला जातो त्या पुरुहूत इंद्राला तरुण तरुणीला सन्मानपूर्वक बोलावतो त्याप्रमाणें मी विशेष रीतीनें स्तवित आहे.

६. पर्वताप्रमाणें स्वयंसिद्ध मोठा असणारा जो उग्र इंद्र शत्रूंचा पराभव करण्याकरतांच फार पुरातन कालीं उत्पन्न झाला तो भयानक इंद्र पाण्यानें भरलेल्या भांड्याप्रमाणें ऐश्वर्यानें समृद्ध असणाऱ्या थोर वज्राला स्वीकारतो.

७. हे इंद्रा, ज्याचें निवारण करणारा कोणी जन्मलाच नाहीं, आणि ज्याच्या संपत्तीचा आणि वैभवाचा कोणी नाश करणारा नाहीं, हे पुरुहूत, उग्र व बलवान इंद्रा, तो आमच्या इच्छा पूर्ण करणारा तूं आम्हांला संपत्ति दे.

८. हे इंद्रा, तूं लोकांचा, संपत्तीचा आणि गृहाचा धनी आहेस. तू गाईचा गोठा उघडणारा आहेस. लोकांना वळण लावणारा व युद्धांत प्रहार करणारा तूं विपुल संपत्तीच्या राशि देणारा आहेस.

९. अत्यंत बलवान असणारा थोर इंद्र ज्या शक्तीनें वरचेवर कांहीं पराक्रम करतो, त्यापैकीं कोणत्या शक्तीनें तो प्रसिद्ध होतो? तो हवि देणाराचें पुष्कळ पाप अगदीं नाहींसे करणारा आहे. आणि तोच स्तोत्याला धन देतो.

१०. हे इंद्रा, तूं आम्हांला मारूं नकोस. आमचें पोषण कर. जें तुझें विपुल धन दात्यांना देण्याकरतां असतें तें तूं आम्हांस दे. हे इंद्रा, आम्ही हे ताजे सुंदर हवि देऊन, स्तवून आणि गाऊन तुला प्रख्यात करूं.

११. आतां हे इंद्रा, स्तुति केलेला व प्रशंसिला जाणारा तूं स्तुति करणाऱ्या मला नद्यांप्रमाणें अन्नसमृद्ध कर. हे हर्यश्वा, तुझेकरतां मी अत्यंत नवें स्तोत्र केलें आहे. तुझ्या स्तुतीमुळें आम्ही जय मिळवणारे रथी व्हावें.

सूक्त एकविसावें.

ऋषिः—वामदेव; देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. इंद्र आमच्या रक्षणासाठीं येवो. स्तुति केलेला शूर इंद्र आम्हांसह आनंदांत असो. ज्याचें सामर्थ्य अनेक प्रकारचें आहे आणि जो उत्कर्ष पावत असतो तो पराभव करणारें सामर्थ्य सूर्याप्रमाणें वाढवो.

२. यज्ञ करणाऱ्या सम्राटाप्रमाणें वरचष्मा गाजवणारें आणि संरक्षक असें ज्याचें कर्म आहे. शत्रूंचा पराभव करणारे आहे. त्याच अत्यंत कीर्तिमान, संपत्तिमान अशा इंद्राच्याच सामर्थ्यभूत मरुतांची हे स्तोत्यांनो, तुम्ही स्तुति करा.

३. इंद्र द्युलोकावरून, पृथ्वीवरून, समुद्रावरून किंवा अन्तरिक्षांतून लवकर येवो. मरुत्वान इंद्र आमच्या रक्षणाकरतां सूर्यलोकाहून दुरून किंवा उदकाच्या स्थानावरून येवो.

४. जो विपुल आणि अगाध संपत्तीचा धनी आहे, जो वायूसह सेनावर जय मिळवतो आणि जो पराक्रमानें श्रेष्ठ धनाची प्राप्ति करून देतो, त्याच इंद्राची आम्ही यज्ञांत स्तुति करीत आहोंत.

५. जो लोकांचें धारण करणारा आणि यज्ञाकरतां जो वाणी उत्पन्न करणारा इंद्र आम्हांला अन्न देतो त्या अनेकांनीं स्तोत्रें म्हणून आळविलेल्या इंद्राला यज्ञगृहांत होता करोत.

६. स्तुति करूं इच्छिणाऱ्या भक्ताच्या घरीं बसलेले लोक जेव्हां इंद्राकडे सरसावतात, आणि जो शत्रूंच्या गराड्यांत आम्हांला महान मार्गदर्शक आहे तो दुस्तरक्रोध इंद्र भक्त बोलावील तेव्हां येवो.

७. हें खरें आहे कीं त्या भावर वीराचें बळ स्तोत्याच्या साहाय्यार्थ तयार असतें आणि यजमानाच्या घरीं गुप्तपणें असते. कारण, तें त्याच्या बुद्धीला, इष्टसिद्धीला आणि आनंदाला कारण होतें.

८. कारण, त्यानें मेघाचीं द्वारें मोकळीं केलीं, पाण्याचा वेग (विपुल) जलानें धाढविला. जेव्हां चांगलीं कर्में करणारे यजमान अन्नाकरतां इंद्राकडे जातात तेव्हां त्यांना गौर आणि गवय हे पशु प्राप्त होतात. (हें सर्व खरें आहे).

९. हे इंद्रा, तुझे सत्कर्म करणारे हात कल्याणकारक आहेत. तसेंच तुझे हात स्तोत्यांना धन देणारे आहेत. तूं कोठे बसलेला आहेस ? तूं आम्हांला कां आनंदित करीत नाहींस ? आम्हांला धन देण्यांत तुला आनंद होत नाहीं कां ?

१०. या प्रकारें संपत्तीचा खरा सम्राट असणारा इंद्र वृत्राला ठार करतो आणि लोकांना धन देतो. हे बहुस्तुत इंद्रा, पराक्रमानें तूं आम्हांस धन दे. तुझ्या दैवी अन्नाचा आम्ही आस्वाद घेऊं.

११. आतां हे इंद्रा, स्तुति केलेला व प्रशंसिला जाणारा तूं स्तुति करणाऱ्या मला नद्यांप्रमाणें अन्नसमृद्ध कर. हे हर्यश्वा, तुझेकरतां मी अत्यंत नवें स्तोत्र केलें आहे. तुझ्या कृपेमुळें आम्ही जय मिळवणारे रथी व्हावें.

सूक्त बाविसावें.

ऋषिः—वामदेव; देवता-इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ.

१. महान बलशाली इंद्र आमच्यापैकीं ज्याचा आस्वाद घेतो किंवा ज्याची इच्छा करतो तें आमचें स्तोत्र, सोम, गाणीं आणि अन्न तो स्वीकारो. कारण, इंद्र वज्र घेऊन सामर्थ्यानें येत असतो.

२. शूर, चारधारी पराक्रमी वज्राला हातांनीं फेकणारा मनुष्यश्रेष्ठ, पराक्रमी, उग्र इंद्र आच्छादक परुष्णीचा आश्रयाकरतां स्वीकार करीत असतो. ह्या नदीचे भिन्न प्रदेश तो मैत्रीकरतां रक्षण करतो.

३. जो उत्पन्न झाल्याबरोबर देवांतला श्रेष्ठ देव, जो महान ऐश्वर्यानें आणि मोठ्या सामर्थ्यानें युक्त आहे तो हातांत सज्ज वज्र धारण करणारा सामर्थ्यानें द्युलोक आणि भूमि यांना हलवितो.

४. जन्मकाळीं सर्व उच्च प्रदेश, अनेक सखल प्रदेश, द्युलोक, पृथ्वी हीं महान इंद्रामुळें कांपलीं. बलवान इंद्र गेल्या सूर्याचें आणि द्यावापृथ्वीचें पोषण करीत असतो. वायु आकाशांत मनुष्याप्रमाणें पुनः पुनः गर्जना करतो.

५. हे शूर व प्रौढ इंद्रा, धैर्यशाली असणाऱ्या तूं धैर्यानें, वज्रानें व सामर्थ्यानें अहीला ठार केलेस. तीं तुझीं थोर कृत्यें सर्व यज्ञांत वर्णनीयच आहेत.

६. हे महाबल इंद्रा, तुझीं तीं कर्में सर्व खरीं आहेत. पराक्रमी अशा तुझ्यामुळेंच गाई कासेंतून दूध पाझरतात. हे वीरमनस्का इंद्रा, नद्या तुझ्या भीतीनेंच वेगानें धांवत असतात.

७. हे इंद्रा, जेव्हां आडवलेल्या ह्या नद्यांचें बंधन तूं वाहण्याकरतां मोकळें केलेस. तेव्हां हे अश्वयुक्त इंद्रा, तुझ्या साहाय्याचें त्या नदीदेवता स्तवन करूं लागल्या.

८. हे इंद्रा, मादक सोम पिळला आहे. आतां पाझरत तो तुझ्याकडे जावो. स्तोत्याचें कर्म आणि हवि तुला आम्हाकडे वळवो कीं जसा जाणाऱ्या घोड्यांचा बळकट लगाम हाकणारा वळवतो.

९. हे पराक्रमी इंद्रा, तूं नेहमीं शत्रूंचा पराभव करणारे, उत्कृष्ट आणि महान बल व सामर्थ्य आम्हांस शत्रु सहज मारतां येतील असे करून आमच्या स्वाधीन कर. आणि घातक मनुष्याचें शस्त्र मोडून टाक.

१०. हे इंद्रा, तूं आमचींच स्तोत्रें चांगलीं ऐक. तसेंच तूं आम्हांस आश्चर्यकारक ऐश्वर्य दे. आम्हाला अनेक प्रकारची बुद्धि आणि प्रेरणा दे. तसेंच हे धनवन्ता, तूं आम्हाला गाई देणारा हो.

११. आतां हे इंद्रा, स्तुति केलेला व प्रशंसिला जाणारा तूं स्तुति करणाऱ्या मला नद्याप्रमाणें अन्नसमृद्ध कर. हे हर्यश्वा, तुझ्याकरतां मी अत्यंत नवें स्तोत्र केलें आहे. तुझ्या कृपेनें आम्ही जय मिळविणारे रथी व्हावें.

सूक्त तेविसावें.

ऋषिः—वामदेव; देवता-इंद्र किंवा ८-१० ऋत अवशिष्ट इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. सोमरूपी कासेचा आस्वाद घेऊन कोणत्या यजमानाच्या कोणत्या यज्ञाला तूं मोठेपणाला चढविलेंस?

सोम पिऊन आणि इच्छापूर्वक पुनः पुनः आस्वाद घेत थोर इंद्र तेजस्वी धन त्या भक्ताकरतां घेऊन येतो.

२. कोणत्या वीरानें ह्याचें सख्य प्राप्त केलें? ह्याची कृपा कोणाला प्राप्त होतें ? केव्हां ह्याचें आश्चर्यकारक धन प्राप्त होतें ? स्तुति करणाऱ्या यजमानाला साहाय्य आणि त्याचा उत्कर्ष हा केव्हां करील ?

३. इंद्र स्तोत्याला कसा ऐकतो ? स्तोत्रें ऐकून त्यांना रक्षण करणें कसें जाणतो ? ह्याच्या अनेक देणग्या कोणत्या ? स्तोत्याला देणारा म्हणून ह्याला कसें म्हणतात ?

४. दुःखी, स्तुति करणारा, तेजस्वी व पवित्र भक्त ह्या इंद्राची संपत्ति कशी प्राप्त करतो ? देव माझ्या स्तोत्राचा ज्ञाता होवो कीं जेणेंकरून आमचे हवि ग्रहण करून त्याचा अंगिकार करील.

५. इंद्रदेवानें ही प्रभात उजाडल्यावर मनुष्याच्या सख्याचा कसा स्वीकार केला ? ज्यांनीं इंद्राला चांगला तयार केलेला हवि अर्पण केला त्या स्तोत्याला ह्याचें सख्य कदाचित प्राप्त होतें.

६. हे इंद्रा, तुझ्या शत्रूंचा पराभव करणाऱ्या सख्याचें आम्ही केव्हां वर्णन करावें ? तसेंच तुझ्या भ्रातृत्वाचें आम्ही केव्हां वर्णन करावें. ह्या देखण्या इंद्राचें स्वरूप सर्वांना कल्याणकारक होतें. सूर्याप्रमाणें आश्चर्यकारक असणारें इंद्राचें स्वरूप सर्वांकडून इच्छिलें जातें.

७. द्रोही, हिंसक आणि नास्तिकांना ठार करण्याच्या इच्छेनें इंद्रानें आपली तीक्ष्ण आयुधें ठार करण्याकरतां पाजळलीं जेव्हां कर्जाचा आम्हांला अत्यंत त्रास झाला तेव्हां ऋणापकर्त्या उग्र इंद्रानें आमच्या त्या अपूर्व उषा दूर नष्ट केल्या.

८. ऋतदेवतेला खरोखर अनेक वेळीं सोम (दिलेला) आहे, ऋताची उपासना पापाचा नाश करते. ऋताची ऐकली जाणारी तेजस्वी स्तुति मनुष्याचे कान बहिरे करून सोडते.

९. देहधारी ऋताची बळकट, आधारभूत आणि आल्हादक असणारीं अनेक रूपें आहेत. ऋतानें विपुल अन्न भक्त इच्छितात, ऋताच्या योगानें गाई ऋतांत प्रवेश करतात.

१०. ऋताला वश करणारा ऋताचीच उपासना करतो. ऋताचें सामर्थ्य तावडतोब गाई इच्छिणारें होतें. ऋतासाठींच विस्तृत आणि गंभीर द्यावापृथ्वी आहेत. उत्कृष्ट दोन धेनु (द्यावापृथ्वी) ऋताकरतांच सर्व उत्पन्न करतात.

११. आतां हे इंद्रा, स्तुति केलेला व प्रशंसिला जाणारा तूं स्तुति करणाऱ्या मला नद्याप्रमाणें अन्नसमृद्ध कर. हे हर्यश्वा, तुझेकरतां मी अत्यंत नवें स्तोत्र केलें आहे. तुझ्या कृपेनें आम्हीं जय मिळवणारे रथी व्हावें.

सूक्त चोविसावें.

ऋषिः—वामदेव; देवता–इंद्र; छंदः—१० अनुष्टुभ, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. कोणती उत्कृष्ट स्तुति धन देण्याकरतां बलपुत्र इंद्राला आमच्याकडे वळवील ? हे लोकहो, तो गोपति असणारा शूर इंद्र शत्रूंचें धन आम्हां स्तोत्यांना देतो.

२. तो इंद्र युद्धांत शत्रूंना ठार करण्याचे वेळीं धांवा करण्यास योग्य आहे. तो स्तुत्य आहे. तो सुस्तुत आणि सत्यधन आहे. तो धनवान इंद्र स्तुति करणाऱ्या आणि सोमरस तयार करणाऱ्या मनुष्याला धन देतो.

३. लोक युद्धांत त्याचाच अनेक प्रकारें धांवा करतात. शरीराची पर्वा न करणारे भक्त त्यालाच संरक्षक करतात. जेव्हां उभय पक्षाचे लोक एकमेकाचा नाश करतात तेव्हां मुलाबाळांच्या प्राप्तीविषयीं त्याचाच आश्रय करतात.

४. हे उग्र इंद्रा, थोर लोक युद्धांत एकत्र मिळाल्यावर पराक्रम करूं इच्छितात. युद्ध करणारे जेव्हां युद्धांत परस्पराला भिडतात, तेव्हांच कांहीं लोक इंद्राची इच्छा करतात.

५. तेव्हांच कांहीं लोक इंद्राची पूजा करतात. तेव्हांच पुरोडाश शिजवून देतात. तेव्हांच सोमयाग करणारा सोमयाग न करणारांस वेगळे करील. तेव्हांच बलिष्ठ इंद्राला यज्ञ करण्याकरतां आम्ही स्वीकारतों.

६. सोम इच्छिणाऱ्या इंद्राकरतां जो सोम तयार करतो, त्याला इंद्र धन देतो. त्या भक्तालाच युद्धांत मोकळ्या मनानें आपला मित्र करतो.

७. आज इंद्राकरतां जो सोम काढील, जो पुरोडाश शिजवील आणि लाह्या भाजील त्याच्या स्तोत्राची इच्छा करून इंद्र त्याला कामपूरक सामर्थ्य देईल.

८. जेव्हां शत्रुहिंसक इंद्र युद्धाकडे लक्ष देतो, जेव्हां श्रेष्ठ इंद्र दीर्घकाल चाललेल्या युद्धाकडे पहात

असतो तेव्हां त्याची पत्नी यज्ञगृहांत सोम तयार करणाऱ्यांनीं उत्साहित केलेल्या बलिष्ठ इंद्राबद्दल आक्रोश करूं लागते.

९. पुष्कळ मालाची फार थोडी किंमत मिळाली. विकला नाहीं (म्हणून) पुनः जाऊन किंमत इच्छितो. तो पुष्कळ मालाची फार थोडी किंमत घेत नाहीं. गरीब आणि समर्थ जी बोलली असेल तीच किंमत प्राप्त करतात.

१०. ह्या माझ्या इंद्राला दहा गाई देऊन कोण विकत घेईल ? हे विकत घेणाऱ्यांनो, जेव्हां तुमचे शत्रु ठार करील तेव्हां ह्याला तुम्ही मला परत द्या.

११. आतां हे इंद्रा, स्तुति केलेला आणि प्रशंसिला जाणारा तूं स्तुति करणाऱ्या मला नद्याप्रमाणें समृद्ध कर. हे हर्यश्वा, तुझेकरतां मी अत्यंत नवें स्तोत्र केलें आहे. तुझ्या कृपेनें आम्ही जय मिळविणारे रथी व्हावें.

सूक्त पंचविसावें.

ऋषिः—वामदेव; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. आज कोण लोकहितकर्ता व देवभक्त इंद्रावरच्या प्रेमानें त्याच्या सख्याचा स्वीकार करीत आहे ? किंवा सोमयाग केलेला कोण अग्नि प्रज्वलित झाला असतां स्तोत्रें म्हणत आहे ?

२. कोणचा भक्त सोमेच्छु इंद्राकरतां स्तोत्र म्हणत आहे आणि गाई बाळगीत आहे ? कोण इंद्राचें साहाय्य, कोण मित्रत्व, कोण बंधुभाव, इच्छीत आहे ? कोण ज्ञात्या इंद्राला साहाय्य मागत आहे ?

३. आज देवांचें साहाय्य कोण मागत आहे ? आदित्यांचीं आणि उषेची कोण स्तुति करीत आहे ? कोणच्या सोमरसाचा भाग दोघे आश्विनी, इंद्र व अग्नि मनःपूर्वक यथेच्छ पीत आहेत ?

४. जो लोकहितकारक वीरांतल्या वीर इंद्राकरतां सोम काढूं असें म्हणतो त्याला भारत अग्नि सुख देवो. तो उगवत्या सूर्याला दीर्घकाल पाहो.

५. त्याला लोक त्रास देत नाहींत. त्याला एखादा दुसराहि त्रास देत नाहीं. त्याला आदिति सुख देते. तो सत्कर्में करणारा इंद्राला प्रिय होतो. स्तुति करणारा इंद्राला आवडतो. उपासना करणारा प्रिय होतो आणि सोम देणारा त्याला प्रिय होतो.

६. शत्रूंचा धुव्वा उडवणारा हा वीर इंद्र भाविक भक्ताचा हवि अगदीं (प्रेमानें) स्वीकारतो. तो सोम न देणारांचा आप्त नव्हे, स्वकीय नव्हे किंवा बांधवहि नाहीं. तो अभक्तांचा नाश करणाराच होय.

७. सोम पिणारा इंद्र सोम न पिणाऱ्या धनिक पणीशीं सह मैत्री इच्छीत नाहीं. त्यांचें धन तो हरण करतो. त्याला नागवून मारतो. तो फक्त सोम काढणारांचा आणि हवि देणारांचा आहे.

८. इंद्राला श्रेष्ठ, कनिष्ठ आणि मध्यम असे लोक बोलावतात. इंद्राला जाणारे, बसलेले आणि सुखांत असलेले लोक बोलावतात. त्याचा युद्ध करणारे आणि ऐश्वर्य इच्छिणारे वीर धांवा करतात.

सूक्त सव्विसावें.

ऋषिः—वामदेव; देवता—१-३ वामदेव किंवा इंद्र परमात्मा, अवशिष्ट श्येन; छंदः—त्रिष्टुभ.

१. मी मनु झालों. मी सूर्य आणि मेधावी कक्षीवान ऋषि आहें. मी अर्जुनीचा पुत्र कुत्स याला ताब्यांत घेतलें आणि मीच उशना कवि आहे. मला पहा.

२. मी आर्यांना भूमि दिली, मी दात्या मनुष्याला वृष्टि दिली. मी खळखळणारें पाणी आणलें. माझ्या इच्छेला देव अनुसरले.

३. मी सोमानें आनंदित होऊन शंबराचीं नव्याण्णव नगरें एकदम फोडलीं आणि शंबराचे शंभरावें नगर राहण्यायोग्य केलें. आणि अतिथिग्व दिवोदासाचें युद्धांत रक्षण केलें.

४. जेव्हां सुपर्ण श्येन बिनचाकी रथानें देवप्रिय हवि लोकांत घेऊन येतो तेव्हां तो सामर्थ्यवान असो. सर्व पक्ष्यामध्यें तो बलवान असो. तो ससाणा सर्व ससाण्यामध्यें चलाख असो.

५. जेव्हां श्येनपक्षानें सर्वांना भीति उत्पन्न करीत सोम आणला तेव्हां तो मनोजव विस्तीर्ण मार्गानें

---

८ टीप—८-९-१० ह्या ऋचांत क्रयविक्रयाच्या नियमानें इंद्राला ताब्यांत घेण्याविषयीं वामदेवानें वर्णन केलें आहे.

१ टीपः—वामदेवाबद्दल आख्यायिका (१८) पहा. गर्भांत असतांच त्याला ज्ञान झालें. तें तो पहिल्या तीन ऋचांत बोलत आहे.

निघाला. मधुर सोम घेऊन तो जोरानें निघाला आणि येथें श्येनानें कीर्ति मिळविली.

६. सोम घेऊन सरळ जाणाऱ्या व देवांसहित असणाऱ्या श्येन पक्ष्यानें ह्या दूरच्या व उच्च द्युलोकावरून मधुर व मदकर सोम आणला.

७. श्येनानें हजारो व लाखो सोम एकदम आणलें. कर्तृत्ववान आणि ज्ञात्या इंद्रानें सोमाच्या मदांत मूढ शत्रूंना ठार केलें.

सूक्त सत्ताविसावें.*

ऋषिः—वामदेव; देवताः–श्येन. ५ वीचा इंद्र किंवा श्येन; छंदः–१–४ त्रिष्टुभ शेवटली शक्करी.

१. गर्भांत राहूनच मी ह्या सर्व (ईश्वरापासून झालेले) देवांचे सर्व जन्म जाणलें. माझें शेकडो लोहमय शरीरानें रक्षण केलें आहे. आतां मी श्येन होऊन वेगानें (गर्भांतून) बाहेर पडलों.

२. त्या गर्भावस्थेनें मला पुरें ताब्यांत घेतलें नाहीं. कारण, मी तिला तेजस्वी ज्ञानसामर्थ्यानें जिंकलें. सर्वप्रेरक आणि सर्वाधार ईश्वरानें शत्रूंचा पराजय केला आणि उत्कर्ष पावणाऱ्या त्यानें वाताला जिंकलें.

३. जेव्हां श्येनानें खालीं गर्जना केली, जेव्हां बुद्धिवर्धक सोमाला सोमपालानीं ओढून घेतलें, आणि मनोवेगानें जाऊं इच्छिणाऱ्या कृशानूनीं धनुष्याची दोरी चढवली आणि श्येनावर बाण सोडला.

४. तेव्हां सरळ जाणाऱ्या श्येनानें भूज्यूप्रमाणें विशाल व इंद्रयुक्त द्युलोकावरून सोमाला आणलें. त्यावेळीं युद्धांत गुंतलेल्या श्येनाचा पंख मध्येंच तुटून पडला.

५. आतां पराक्रमी इंद्र गाईचें दूध मिसळलेला पुष्टिदायक, शुभ्र, अध्वर्यूनीं दिलेला सोमरसाचा उत्कृष्ट कलश मदयुक्त होण्यासाठीं पिण्याकरतां प्राप्त करो. शूर इंद्र मदाकरतां पिण्यास प्राप्त करो.

सूक्त अठ्ठाविसावें.

ऋषिः—वामदेव; देवता–इंद्रासोम, छंदः—त्रिष्टुभ

१. हे सोमा, तुझ्या साहाय्यानें आणि मैत्रीनें इंद्रानें मनुष्याकरतां चांगलें पाणी वहावयास लावलें. अहीला ठार केलें. सप्तसिंधूंना वाहातें केले. झाकलेलीं पाण्याचीं द्वारें उघडलीं.

२. हे सोमा, इंद्र तुझ्या साहाय्यानें सूर्याचें महान अन्तरिक्षांत असलेलें चाक सामर्थ्यानें एकदम उखडता झाला. महान शत्रूचें सर्वगामी चाक इंद्रानें ताब्यांत घेतलें.

३. हे सोमा, माध्यान्हकालाच्या पूर्वीच युद्धांत इंद्रानें दस्यूंना ठार केलें आणि अग्नीनें त्यांना जाळून टाकलें. दुर्गम प्रदेशांत किंवा घरांत पराक्रमानें लुटावें त्याप्रमाणें हजारो चालून येणारांना त्यांनीं ठार केलें.

४. हे इंद्रा, तूं ह्या दस्यूंना सर्वापेक्षा हीन केले आहेस. आणि दासांच्या लोकांना निन्द्य करून सोडले आहेस. हे इंद्रासोमांनों, तुम्ही शत्रूंना त्रस्त केलेंत आणि ठार केलेंत. आणि तुम्ही आयुधांच्या योगानें सन्मान पावला.

५. हे इंद्रासोमांनो, तुम्ही गाईचीं स्थानें आणि अश्वांचे समूह मोकळे केलेंत. यांचीं झाकलेलीं स्थानें मोकळी केलीत. शत्रूचा धुव्वा उडविणाऱ्या तुम्ही जे केलेंत तें अगदीं खरें आहे.

सूक्त एकूणतिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, स्तुति केलेला आणि आनंद पावलेला तूं अन्नांसह प्राप्त होणाऱ्या आमच्या यज्ञांत साहाय्य करण्याकरतां घोड्यांनीं ये. तूं स्तोत्यांच्याकडून स्तुति केला जात आहेस आणि सत्यधन आहेस.

२. जो चांगले घोडे असलेला निर्भय व सोम काढणाराकडून स्तुति केला जाणारा इंद्र मरुतांसह आनंदित होतोच तो लोकहितकारक आणि ज्ञानी इंद्र सोम तयार करणारांनीं बोलावल्यावर यज्ञांत प्राप्त होवो.

३. हे स्तोत्या, इंद्र ज्या दिशेला त्या दिशेला आनंदित करण्याकरतां ह्या इंद्राच्या कानावर तूं स्तोत्रें घाल. महोदार आणि महाबलवान् इंद्र आम्हाला ऐश्वर्यप्राप्तीकरतां निर्भय आणि सर्व कांहीं सुगम करो.

४. जो वज्रबाहु इंद्र धांवा करणाऱ्या आणि अशा

---

* टीपः—वामदेव योगसामर्थ्यानें श्येनाचें रूप घेऊन गर्भाचे बाहेर पडला. तेव्हां गर्भांत असतांनाच ऋषि ह्या सूक्तानें बोलत आहे.

१. टीपः—२–५–१ ऐ. आ. पहा.

४ टीपः—१–११९–४ पहा.

प्रकारें स्तुति करणाऱ्या भक्ताकडे शेंकडो आणि हजारो घोडे रथाच्या जुवाला जोडून येत असतो.

५. हे धनवान इंद्रा, त्या तुझें साहाय्य असलेले स्तुति करणारे आम्ही ज्ञाते भक्त अत्यंत उज्वल, प्रशंसनीय आणि समृद्ध संपत्तीचा उपभोग घेणारे होऊं.

सूक्त तिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता–९. १०. ११ उषा व इंद्र, अवशिष्ट इंद्र; छंदः—८. २४ अनुष्टुभ, अवशिष्ट गायत्री.

१. हे वृत्रहन्त्या इंद्रा, तुझ्यापेक्षां मोठा कोणी नाहीं आणि तुझ्यापेक्षां प्रशंसनीयहि कोणी नाहीं. जसा तूं आहेस तसा कोणीहि नाहीं.

२. हे इंद्रा, सर्व लोक चाकाप्रमाणें तुला अनुसरून असतात. खरोखरच तूं महान आणि प्रख्यात आहेस.

३. हे इंद्रा, सर्व देव तुझ्या साहाय्यानें युद्ध करतात. कारण तूं रात्रंदिवस शत्रूंना ठार करतोस.

४. हे इंद्रा, ज्या युद्धांत त्रासलेल्या लोकासाठीं आणि युद्ध करणाऱ्या कुत्सासाठीं सूर्याचें चक्र चोरलेंस—

५. इंद्रा, ज्याअर्थी देवांना त्रास देणाऱ्या सर्वांशीं तूं एकटाच लढलास आणि शत्रूंना ठार केलेंस——

६. जेथें हे इंद्रा. मर्त्यांकरतां तूं सूर्याला जिंकलेंस तेथें पराक्रम करून एतशाचें तूं संरक्षण केलेस.——

७. हे वृत्रहन्त्या व धनवान इंद्रा, तूं येथें दानूला ठार केलेंस म्हणनच्च तुला अत्यंत रागीट म्हणतात काय?

८. हे इंद्रा, तूं हाहि पराक्रम केलास कीं दुष्टांचें निर्दालन इच्छिणाऱ्या स्वर्गकन्या उषेचा तूं वध केलास.

९. हे इंद्रा, महान अशा तूं पूज्य अशा स्वर्गकन्या उषेचा धुव्वा उडविलास.

१०. वीर इंद्रानें जेव्हां उषेच्या रथाचा चुराडा उडवला तेव्हां मोडलेल्या रथापासून भिऊन ती दूर झाली.

११. तो तिचा रथ चुराडा होऊन विपाशेच्या कांठीं पडला. ती तेथून दूर पळून गेली.

१२. हे इंद्रा, विस्तृत आणि जलपूर्ण सिंधूला तूं आपल्या प्रज्ञेनें पृथ्वीवर स्थापन करतां झालास.

१३. हे इंद्रा, जेव्हां तूं ह्या शुष्णाच्या नगराचा चुराडा उडवलास तेव्हां पराक्रमानें त्याचें धन लुटलेंस.

१४. हे इंद्रा, तूं कुलितरपुत्र दास शंबराला मोठ्या पर्वतावरून खालीं लोटून ठार केलेस.

१५. दास वर्चीचे पांच लक्ष लोक चाकाच्या अऱ्याप्रमाणें तूं कापून काढलेंस.

१६. आणि शतक्रतु इंद्रानें अग्रूचा पुत्र परावृक्त याला आपापल्या स्तोत्रांत भागीदार केलें.

१७. पराक्रमी व ज्ञात्या इंद्रानें स्नान करणाऱ्या त्या यदु व तुर्वशांना पार केले.

१८. तात्काळ हे इंद्रा, त्या आर्य अशा अर्ण व चित्ररथ यांना सरयूच्या तीरावर ठार करतां झालास.

१९. हे वृत्रघ्ना, टाकून दिलेल्या दोघा आंधळ्यास आणि पांगळ्यांस तूं नेता झालास. (अंधत्व आणि पंगुत्व नष्ट केलेंस) तें तुझें सुख देण्यास कोणीहि समर्थ नाहीं.

२०. इंद्र हवि देणाऱ्या दिवोदासाकरतां शंबराचीं दगडी शंभर नगरें फोडता झाला.

२१. इंद्र आपल्या प्रभावानें दभीतीसाठीं शस्त्रांनीं तीस हजार दास निजविता झाला (ठार करता झाला.)

२२. हे वृत्रहन्त्या इंद्रा, ज्या त्वा सर्व शत्रूंना जेर केलेस, तो तूं सर्वांचा सारखाच धनी आहेस.

२३. आणि हे इंद्रा, खरोखर जें तूं पराक्रम केले आहेस ते आज कोणीहि नष्ट करूं शकत नाहीं.

२४. हे शत्रुहिंसक इंद्रा, जें तुझें अत्यंत उत्कृष्ट धन आहे तें अर्यमा मला देवो. दंतहीन पूषा संपत्ति देवो आणि भग संपत्ति देवो.

---

१६ टीपः——४.१९.९ पहा.

सूक्त एकतिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता–इंद्र; छंदः—गायत्री.

१. कोणत्या आराधनेनें सदोदित उत्कर्ष पावणारा सखा इंद्र साहाय्य देण्याकरतां आम्हांकडे वळेल? कोणत्या पराक्रमी कृत्यानें तो आमच्याकडे वळेल?

२. मादकांतला मादक असणारा सत्यस्वरूप कोणता सोमरस बळकट स्थलीं असणारें धन लुटण्याकरतां तुला उत्साह देईल?

३. हे इंद्रा, मित्रभूत स्तोत्यांचा रक्षण करणारा तूं शेंकडो प्रकारच्या साहाय्यानें आमच्याकडे ये.

४. वाटोळें चाक घोड्याच्या मागून जाते त्याप्रमाणें आम्हा लोकांच्या स्तोत्रामुळें तूं आम्हांकडे ये.

५. हे इंद्रा, उतरत्या प्रदेशावर पायानें चालत यावें त्याप्रमाणें तूं कर्मांत येतोस. हे इंद्रा, सूर्यासह तुझी मी उपासना करतों.

६. हे इंद्रा, जेव्हां आम्ही तुझीं स्तोत्रें करतों

तेव्हां तीं चाकासारखीं तुझ्याकडे धांवतात. प्रथम तीं तुझ्याकडे येतात व नंतर सूर्याकडे जातात.

७. हे शचीपते इंद्रा, तुलाच धनवान आणि देदीप्यमान दाता असें म्हणतात.

८. आणि इंद्रा, स्तोत्र करणाराला आणि सोम काढणाराला तूं एकदम पुष्कळ धन देतोस.

९. हे इंद्रा, त्रासदायक शत्रु तुझ्या शतावधि देणग्याला प्रतिबंध करूं शकत नाहींत. पराक्रम गाजवणाऱ्या तुला प्रतिबंध करूं शकत नाहींत.

१०. हे इंद्रा, आमचें तूं शेंकडो प्रकारें संरक्षण कर. तूं आमचें हजारो प्रकारें संरक्षण कर. आमचें तूं सर्व प्रकारें कल्याण कर.

११. हे इंद्रा, तूं येथें सख्याकरतां, कल्याणाकरतां आणि विपुल मूल्यवान संपत्तीकरतां आमचा स्वीकार कर.

१२. हे इंद्रा, तूं नेहमीं विपुल संपत्ति देऊन आमचें संरक्षण कर. सर्व प्रकारचें साहाय्य देऊन आमचें रक्षण कर.

१३. हे इंद्रा, तूं नवीन साहाय्य करून शूर योध्याप्रमाणें ते गाईनीं भरलेले गोठे आम्हाकरतां मोकळे कर.

१४. इंद्रा, आमचा गाई इच्छिणारा, घोडे इच्छिणारा, तेजस्वी आणि अविनाशी रथ निर्भयपणें जावो.

१५. हे सर्वप्रेरक इंद्रा, पाऊस पाडणाऱ्या द्युलोकाला तूं श्रेष्ठ केलें आहेस. त्याप्रमाणें आमचें यश देवांमध्यें श्रेष्ठ कर.

सूक्त बत्तिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता–१–२२ इंद्र, २३.२४ इंद्राश्व; छंदः—गायत्री.

१. हे वृत्रहन्त्या इंद्रा, तूं आमच्याकडे लवकर ये. थोर असणारा तूं आमच्या समीप अनेक प्रकारच्या साहाय्यासह ये.

२. हे पूज्य इंद्रा, तूं भ्रमणशील असूनहि उदार आहेस. तूं लोकांना साहाय्य करण्याकरतां आश्चर्यकारक धन देतोस.

३. हे इंद्रा, जे तुला थोडे भक्त प्राप्त होतात त्यांच्या सामर्थ्यानें गडबड करणाऱ्या प्रबळ शत्रूलाहि तूं ठार करतोस.

४. हे इंद्रा, आम्ही तुझ्याशीं एकरूप झालों आहों. आम्ही तुझी पुनः पुनः स्तुति करीत आहोंत. आमचेंच तूं संरक्षण कर.

५. हे वज्रधरा इंद्रा, तूं आश्चर्यकारक, अनिंद्य आणि अजिंक्य साहाय्यांनीं आमच्याकडे ये.

६. हे इंद्रा, तुझ्यासारख्या गाईबैलांनीं संपन्न असणाऱ्याचे आम्ही महान सामर्थ्याकरतां जिवलग मित्र असावें.

७. कारण हे इंद्रा, गाईबैलाच्या संपत्तीचा तूं एकटाच मालक आहेस. तर तूं आम्हांला विपुल अन्न दे.

८. हे स्तुतिप्रिय इंद्रा, स्तुति केल्यावर जेव्हां तूं स्तोत्यांना धन देऊं इच्छितोस तेव्हां तुला उलट कोणीहि वळवीत नाहीं.

९. हे इंद्रा, महान समृद्धि तूं द्यावीस म्हणून गोतम तुझें वर्णन करीत आहेत.

१०. हे इंद्रा, सोमानें मदयुक्त होऊन तूं दासांच्या नगरावर हल्ला चढवून तीं उध्वस्त केलीस हे तुझे पराक्रम आम्ही वर्णन करीत आहोंत.

११. हे स्तुतिप्रिय इंद्रा, सोम पिल्ल्यावर जे तूं पराक्रम केलेस ते तुझे पराक्रम शहाणे वर्णितात.

१२. हे इंद्रा, स्तुति करणाऱ्या गोतमांनीं तुला प्रसन्न केलें. तूंच त्यांना मुलाबाळांसह यश दिलेंस.

१३. हे इंद्रा, जरी तूं अनेक भक्तांचा सामान्य उपास्य आहेस तरी पण तुझाच आम्ही धांवा करतों.

१४. हे उदार इंद्रा, तूं आम्हाकडे ये. हे सोम पिणाऱ्या, तूं आमच्या सोमापानानें आनंदित हो.

१५. आम्हा स्तोत्यांचें स्तोत्र तुला आमच्याकडे वळवो. तूं आपले घोडे आमच्याकडे वळीव.

१६. हे इंद्रा, आमचा पुरोडाश खा. स्त्रीची इच्छा करणारा तरुण स्त्रीचा उपभोग घेतो त्याप्रमाणें आमच्या स्तुतीचा तूं अनुभव घे.

१७. आम्ही इंद्राला शिक्षण दिलेले चलाख हजार घोडे मागत आहोंत आणि सोमाचे शंभर हंडे आम्ही मागत आहोंत.

१८. हे इंद्रा, आम्ही तुझ्या शंभर हजार, गाई आमच्याकडे वळवितों. तुझी देणगी आमच्या घरीं येवो.

१९. तुझे सोन्याचे दहा घोडे आम्हाला प्राप्त होवोत. हे वृत्रहन्त्या इंद्रा, तूं पुष्कळ देणारा आहेस.

२०. हे पुष्कळ देणाऱ्या, तूं आम्हांला पुष्कळ दे, थोडे नको, पुष्कळ दे. इंद्रा, तूं पुष्कळच धन देऊं इच्छित असतोस.

२१. हे वृत्रहन्त्या उदार इंद्रा, तूं पुष्कळ देणारा म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहेस. आम्हांला धनाचे भागीदार कर.

२२. हे विचक्षणा, तुझ्या पिंगट घोड्यांची मी प्रशंसा करतों. हे गाई देणाऱ्या पुत्रा, त्याच्या योगें तूं आमच्या गाई नाहींशा करूं नकोस.

२३. खांबावर कोरलेल्या नव्या लहान बाहुलीप्रमाणें तुझे घोडे मार्गावर शोभत आहेत.

२४. हे इंद्रा, अहिंसक व पिंगट दोन घोडे, जात असतां बैलाच्या गाडींत बसून जाणाऱ्या माझे मनोरथ पूर्ण करोत.

सूक्त तेहेतिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता-ऋभु; छंदः—त्रिष्टुभ.

१. मी ऋभूकडे स्तुति दूताप्रमाणें पाठवितों. सोमांत मिसळण्याकरतां दुभत्या गाईची प्रार्थना करतों. कारण ते वायुवेगी व कर्तृत्ववान ऋभु आपल्या चलाख घोड्यांनीं ताबडतोब आकाश व्यापतात.

२. जेव्हां ऋभूंनीं आईबापाची सेवा करून मोठेपणानें आणि आश्चर्यकारक कृत्यांनीं संतोष केला तेव्हांच त्यांनीं देवांचें सख्य प्राप्त केलें आणि त्या लोकांनीं आपल्या मनाचा उत्कर्ष केला.

३. जे जुन्या खांबाप्रमाणें पडून राहिलेल्या आईबापांना पुनः कायमचे तरुण करते झाले, ते सोम पिणारे वाज, विभ्वा व ऋभु देव इंद्रासहित आमच्या यज्ञांत येवोत.

४. वर्षपर्यंत ऋभूंनीं गाईचें रक्षण केलें, एक वर्षपर्यंत ऋभूंनीं तिच्या मांसाचें केलें व एक वर्षपर्यंत तिच्या तेजांचें संरक्षण करते झाले. ह्या गाईच्या अद्भुत कृत्यांनींच त्यांनीं अमरपणा प्राप्त केला.

५. वडील म्हणाला कीं, दोन चमस करूं, धाकटा म्हणाला कीं तीन करूं, कनिष्ठ म्हणाला चार करूं. तें तुमचें भाषण हे ऋभुहो, त्वष्टा वाखाणिता झाला.

६. मनुष्य ऋभु खरें बोललें, कारण ते त्याप्रमाणेंच करते झाले. नंतर ऋभू त्या हवीला प्राप्त करते झाले. त्वष्ट्यानें दिवसाप्रमाणें झगझगीत असणारे चार चमस पाहिले आणि त्यांना ते आवडले.

७ झाकता न येणाऱ्या आदित्याच्या आतिथ्यांत ऋभूंनीं बारा दिवस पडून आनंदांत घालविले. तेव्हां त्यांनीं शेतें सुपीक केलीं, नद्या वाहत्या केल्या, निर्जल प्रदेशांत ओषधी उगवल्या आणि सखल जागीं पाणी उत्पन्न झालें.

८. ज्या ऋभूंनीं चांगला चालणारा आणि लोकांना बसतां येणारा रथ तयार केला, ज्यांनीं सर्वप्रेरक विश्वरूप धेनूला निर्माण केलें, ते चांगलीं कृत्यें करणारें, समृद्ध आणि कुशल ऋभु आम्हाकरतां चहूबाजूंनीं संपत्ति निर्माण करोत.

९. कारण, ह्यांचें काम कर्तृत्वानें आणि मनानें तेजस्वी असणाऱ्या देवांनीं स्वीकारलेले आहे. सुकर्मा वाज देवांचा झाला. ऋभुक्षिन इंद्राचा झाला. आणि विभ्वा वरुणाचा झाला.

१०. ज्या ऋभूंनीं स्तोत्रांनीं आनंदित होऊन बुद्धिप्रभावानें घोडे उत्पन्न केले, ज्यांनीं इंद्राकरतां चांगले जोडतां येणारें घोडे निर्माण केलें, हे ऋभूहो, ते तुम्ही मित्राचें कल्याण करूं इच्छिणाऱ्याप्रमाणें धन, समृद्धि व सर्व प्रकारची संपत्ति आम्हांस द्या.

११. दिवसाच्या ह्या भागांत पिण्याकरतां सोम व आनंद देवांनीं दिला. कष्टाशिवाय देव सख्य करीत नाहींत. हे ऋभूंनों, ह्या तृतीय सवनांत ते तुम्ही आम्हाला आतां संपत्ति द्या.

सूक्त चवातिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता-ऋभु; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे ऋभु, विभु, वाज आणि इंद्र, आम्हाला संपत्ति देण्याकरतां आमच्या ह्या यज्ञाप्रत या. कारण, तुम्हाला वाग्देवतेनें आतां दिवसा सोम पिण्यास दिला आहे. हे मदकारक सोम तुम्हाला प्राप्त होवोत.

२. हे अन्नसमृद्ध ऋभूनो, देवत्व प्राप्त झालेले तुम्ही सदोदित आनंदित व्हा. तुम्हाला मदकारक सोम प्राप्त झाला आहे. तुम्हाला स्तुति प्राप्त झाली आहे. तुम्ही आम्हांला चांगल्या मुलाबाळांनीं युक्त संपत्ति द्या.

३. हे ऋभूहो, हा यज्ञ तुमच्या करतां केला आहे. तेजस्वी असणारे तुम्ही ह्याचा मनुष्याप्रमाणें

टीपः—ऋभृ पूर्वीं मनुष्यच होते पण पुढें तपःसामर्थ्यानें देव झाले. (ऐ. ब्रा. ३. ३०.). कांहीं लोक म्हणतात ऋभु म्हणजे सूर्यरश्मी होत. १. ११० सूक्त व त्यावरील टीप पहा.

७ टीपः—बारा दिवस म्हणजे पावसाळ्यांतील आर्द्रादि बारा नक्षत्रें असा अर्थ सायणाचार्यांनीं दिलेला आहे.

स्वीकार करा. म्हणून प्रसन्न करणारा सोम तुमच्याकडे येत आहे. हे ऋभूंनो, तुम्ही सर्वश्रेष्ठ झालात.

४. हे नेते ऋभूंहो, तुमच्या संपत्तीची देणगी सेवा करणाऱ्या आणि हवि देणाऱ्या मर्त्य अशा मला प्राप्त होवो. हे वाज व ऋभूंहो, तुम्ही प्या. तुम्हाला मद उत्पन्न होण्याकरतां हा तृतीय सवनातील सोम अर्पण करीत आहें.

५. हे नेते वाज व ऋभूंनो, विपुल संपत्तिमान म्हणून वर्णन केले जाणारे तुम्ही आम्हाकडे या. नवप्रसूत गाई घरीं जातात त्याप्रमाणें हें तृतीय सवनांतलि सोमपान तुझ्याकडे जावो.

६. हे बलपुत्रांनो, स्तोत्रें म्हणून बोलावले जाणारे तुम्ही आमच्या ह्या यज्ञांत या. हे ज्ञात्यांनो. ज्याचें तुम्ही आहांत त्या इंद्रासह प्रसन्न अन्तःकरणानें उदार असणारे तुम्ही सोम प्या.

७. हे स्तुतिप्रिय इंद्रा, मरुतांसह प्रसन्न असणारा आणि वरुणासह आनंदांत असणारा तूं सोम पी. वेळोवेळीं प्रथम पिणाऱ्या देवांसह आणि संपत्ति देणाऱ्या देवपत्न्यासहित तूं सोम पी.

८. हे ऋभूंनो, आदित्यांसह आणि पर्वतासह तुम्ही सोम पिऊन आनंदित व्हा. सवितृदेवांसह आणि संपत्ति देणाऱ्या नद्यांसह तुम्ही सोम प्या.

९. ज्यांनीं अश्वींना, ज्यांनीं आईबापांना, ज्यांनीं गाईला आणि ज्यांनीं घोड्याला साहाय्य करून निर्माण केले, ज्यांनीं कवच निर्माण केलें, ज्यांनीं द्यावापृथ्वी विभागली, ज्या नेत्या ऋभूंनीं चांगलीं कृत्यें केलीं—

१०. हे ऋभूंनो, जे तुम्ही गाई, घोडे, चांगलीं मुलेबाळें, द्रव्य आणि अन्न यांनीं समृद्ध असलेली संपत्ति धारण करतां आणि ज्याच्या दानाची वाखाणणी होत असते तें धन प्रथम सोम पिणारे आनंदित असणारे तुम्ही आम्हांस द्या.

११. हे ऋभूंहो, तुम्ही परत जाऊं नका. तुम्हाला आम्ही तृषाक्रांत होऊं देत नाहीं. अनिंद्य असणारे तुम्ही ह्या यज्ञांत इंद्रासह आनंदित असा. आम्हांला धन देण्याकरतां तेजस्वी मरुतांसह आनंदांत असा.

सूक्त पसतिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता—ऋभु; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे बलपुत्र ऋभूंहो, इकडे या. हे सुधन्वनपुत्रहो, तुम्ही जाऊं नका. कारण ह्या सवनांत तुम्ही धन देत असतां. मदकारक सोम इंद्राच्या मागून तुम्हाला प्राप्त होवो.

२. ऋभूंच्या धनाच्या देणग्या इकडे येवोत. चांगला तयार केलेला सोम प्याला जावो. कारण, हे ऋभूंनो, कौशल्यानें आणि कर्तृत्वानें तुम्ही एका चमसाचे चार चमस केलेत.

३. हे ऋभूंनो, तुम्ही एका चमसाचे चार चपस केलेत. हे सख्या, अनुग्रह कर असे तुम्ही म्हणालांत. नंतर हे वाजानो, तुम्ही स्वर्गाच्या मार्गाला गेलात. कुशल असणारे तुम्ही देवांच्या संघांत गेलात.

४. ज्याला तुम्ही चातुर्यानें चार करते झाला तो हा चमस कशाचा होता ? हे ऋत्विजांनो, तुम्ही मद उत्पन्न होण्याकरतां सोम पिळा. हे ऋभूंहो, तुम्ही मधुर सोमरस प्या.

५. चातुर्यानें तुम्ही आईबापास तरुण करते झालात. चातुर्यानें देवांना पिण्याकरतां चमस तयार केलात. हे धनसमृद्ध ऋभूंहो, चातुर्यानें तुम्ही इंद्राला वाहून नेणारे शीघ्रगामी घोडे तयार केलेत.

६. हे वाजहो, जो कोणी संध्याकाळीं तुम्हाला मद उत्पन्न होण्याकरतां कडक सोम पिळतो त्याकरतां हे पराक्रमी ऋभूंहो, अनेक वीरांनीं युक्त संपत्ति निर्माण करा.

७. हे हर्यश्वा, प्रातःकाळीं तूं सोम पी. माध्यान्हीचा सोम केवळ तुझाच आहे. हे इंद्रा, सत्कृत्यामुळें ज्यांना तूं मित्र केलेस त्या धनदात्या ऋभूंसह तूं सोम पी.

८. ऋभूंहो, जे तुम्ही सत्कृत्यामुळें देव झाला तें तुम्ही द्युलोकावर जाऊन बसतां हे बलपुत्रहो, तुम्ही आम्हांस धन द्या. हे सुधन्वनपुत्रहो, तुम्ही अमर व्हा.

९. हे कुशल ऋभूंहो, ज्यापेक्षां सुकृतामुळें तृतीयसवनाला धनदायक करतां झालात, त्याअर्थी इंद्राच्या मादक सोमासह तुम्ही हा ओतलेला सोम प्या.

सूक्त छात्तिसावें.

ऋषिः--वामदेव; देवता-ऋभु; छंदः--१-८ जगती, ९ त्रिष्टुभ्.

१. हे ऋभूंहो, तुम्ही दिलेला प्रशंसनीय रथ अश्वरहित आणि लगामाची अपेक्षा नसलेला झाला आणि तीन चाकानें अन्तरिक्षभर फिरला. तसेच तुम्ही द्यूचा आणि पृथ्वीचा उत्कर्ष करतां हें महत्कृत्य, तुमच्या देवत्वाचें प्रख्यापक आहे.

२. ज्या ज्ञात्यांनीं चांगला चालणारा आणि वाकडा न जाणारा रथ मनाच्या संकल्पानें निर्माण केला, त्या तुम्हालाच हा सोम पिण्याकरतां हे वाजहो, हे ऋभूंनो, आम्ही बोलावतों.

३. हे वाज, ऋभु आणि विभूंहो, तुमच्या महत्वाची देवांत अशी प्रख्याति झाली कीं तुम्ही फार दिवसाच्या म्हाताऱ्या आईबापास तरुण, चालण्यासारखे केलेत.

४. हे ऋभूंनो, तुम्ही एका चमसाचे चार चमस केलेत. चातुर्यानें चामड्यातून गाय बाहेर काढलीत, आणि नंतर देवांमध्यें अमर झालांत. हे वाजऋभूहो, तें तुमचें कृत्य तात्काळ प्रशंसनीय आहे.

५. वाजांसह विख्यात असणाऱ्या ऋभूंनीं जी संपत्ति निर्माण केली ती सर्वांपेक्षां प्रशंसनीय असणारी संपत्ति आम्हांला मिळो. विभ्वांनीं निर्माण केलेला रथ युद्धांत वर्णनीय होय. हे देवांनो, ज्याचें तुम्ही रक्षण करतां तो विश्वविख्यात होतो.

६. ज्याला वाज, विभ्व आणि ऋभु रक्षण करतात, तो बलवान योद्धा होतो, तो काव्यशक्तीनें ऋषि होतो, तो बाण मारणारा शूर, युद्धांत दुस्तर होतो, तो धनसमृद्ध होतो आणि त्याला चांगलीं मुलेंबाळें होतात.

७. तुमचें दर्शनीय रूप उच्चस्थळीं आहे. हे वाज व ऋभूहो, तुमचें जें उत्कृष्ट स्तोत्र आहे त्याचा तुम्ही स्वीकार करा. जे तुम्ही बुद्धिमान, ज्ञाते आणि चिकित्सक आहां त्या तुम्हांला आम्ही ह्या स्तोत्रांनीं बोलावीत आहों.

८. हे ऋभूंनो, ज्ञाते असे तुम्ही आमच्या कल्पनेपेक्षां जास्त लोकहितकारक सर्व संपत्ति, देदीप्यमान ऐश्वर्यानें युक्त असणारा अधिकार, अन्न, धन आणि बल आम्हांकरतां तयार करा.

९. हे ऋभूंनो, येथें रममाण झालेले तुम्ही आम्हास प्रजा, धन आणि मुलाबाळासहित यश द्या. ज्यामुळें आम्ही दुसऱ्यांना मागें टाकूं अशी आश्चर्यकारक समृद्धि आम्हांस द्या.

सूक्त सदतिसावें.

ऋषिः--वामदेव; देवता--ऋभु; छंदः--१-४त्रिष्टुभ्, ५-८ अनुष्टुभ्.

१. हे वाजहो, हे ऋभूंनो, हे देवहो, तुम्ही देवांच्या जाण्याच्या मार्गांनीं आमच्या यज्ञांत या, कीं ज्या योगें मनूच्या ह्या लोकांत रमणीय असणारे तुम्ही दिवसापैकीं चांगल्या दिवशीं आमचा यज्ञ ग्रहण कराल.

२. आज हे अर्पण केलेले सोम तुमच्या मनाला आणि हृदयाला आनंद देणारे होवोत. तेजस्वी सोम तुम्हाकडे येवोत. भांडीं भरून सोम तुम्हाला अर्पण केलें जावोत. प्यालेले सोम पराक्रम गाजविण्याकरतां आणि बलाकरतां तुम्हांला आनंदित करोत.

३. हे वाज आणि ऋभूहो, जसें तुमचें स्तोत्र केले जातें त्याप्रमाणें देवांना हितकारक, असणारा तृतीय सवनांतील सोम तुम्हांला अर्पण केला जात आहे. मी मनूप्रमाणें तेजस्वी असणाऱ्या ह्या लोकांत तुम्हांला सोम अर्पण करीत आहें.

४. हे बलवन्त ऋभूंनो, पुष्टाश्व, दीप्तरथ, लोखंडी शिरस्त्राण घातलेले तुम्ही धनवान व्हा. हे इंद्राच्या पुत्रांनो, हे बलपुत्रांनो, हा तृतीय सवनांतील सोम तुम्हांला आनंद देवो.

५. हे ऋभूहो, तेजस्वी, संपत्तिरूप, युद्धांत अत्यंत बलवान, इंद्रयुक्त, सदा अत्यंत उदार आणि अश्वयुक्त अशा एकत्र असणाऱ्या तुमचा आम्ही धांवा करतों.

६. हे ऋभूंहो, तुम्ही व इंद्र ज्यांचें संरक्षण करतां तोच श्रेष्ठ होतो. तोच कर्तृत्वानें उपभोग घेणारा होतो. तो यज्ञांत अश्वयुक्त होवो.

७. हे वाज व ऋभूहो, यज्ञ करण्याकरतां तुम्ही आम्हांला मार्ग दाखवा. हे ज्ञात्यांनो, प्रशंसिले जाणारे तुम्ही आम्हांला सर्व दिशा तरून जाण्याकरतां मार्ग दाखवा.

८ हे वाज, ऋभु, इंद्र आणि नासत्यहो, आम्हां लोकांना धन आणि अश्व यांच्या प्राप्तीसाठीं तुम्ही पुष्कळ आशीर्वाद द्या.

सूक्त अडतिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता-१ द्यावापृथ्वी, २-९ दधिक्रा; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे द्यावापृथ्वीनो, दात्या त्रसदस्यूनें लोकांना जी संपत्ति दिली ती सर्व तुमचीच होय पृथ्वी संपादन करणारा अश्व, जमीन सुपीक करणारा मुलगा आणि दस्यूंचा पराभव करणारे उग्र हत्यार मला दिलेंत.

२. अश्वरूप, अनेक शत्रूंचा पराभव करणारा, सर्व लोकांना ताब्यांत ठेवणारा, श्येनासारखा सरळ

जाणारा, चलाख आणि तेजस्वी, शत्रूचा संहार करणाऱ्या शूर राजाप्रमाणें असणाऱ्या दधिक्राला द्यावापृथ्वीनें दिला.

३. ज्याला सर्व आनंदित झालेले लोक उतारावरून धावणाराप्रमाणें, पायानीं पुढें जाणाऱ्या संग्रामेच्छु शूराप्रमाणें, आणि रथानें जाणाऱ्या शीघ्रगामी वाऱ्याप्रमाणें स्तवितात—

४. जो युद्धांतील लूट आडवून धरतो, तो ऐश्वर्यवान असणारा गाईवर चालून जातो. साधनें सज्ज करून भक्तांच्या शत्रूंना दूर करून यज्ञाकडे लक्ष देत असतो.

५. कपडे चोरणाऱ्या चोराला पाहून लोक जसें ओरडतात त्याप्रमाणें किंवा खालीं झेप घालणाऱ्या भुकेलेल्या ससाण्याप्रमाणें अन्न आणि पशूंचे कळप यांच्याकडे जाणाऱ्या त्याला युद्धांत पाहून लोक आक्रोश करतात.

६. रथांच्या रांगांनीं सर्व सैन्यांत प्रामुख्यानें जाऊं इच्छिणारा, माळ घातलेल्या घोड्याप्रमाणें शोभणारा, लगाम चावणारा आणि धूळ चाटणारा असा (दधिक्रा) धांवतो आहे.

७. तसेंच तो बलवान, युद्धांत शत्रूंचा पराभव करणारा, जातीनें स्वतःची शुश्रूषा करणारा, समृद्ध, वेगानें जाणाऱ्या सेनावर हल्ला चढवणारा, सरळ जाणारा (दधिक्रा) धूळ उडवून भुवयावर पसरीत आहे.

८. चमकणाऱ्या आणि घातक असणाऱ्या विजेप्रमाणें ह्या चालुन येणाऱ्या दधिक्राव्यापासून सर्व लोक भितात. जेव्हां तो चहूबाजूनें हजारो लोकांशीं युद्ध करूं लागतो तेव्हां तो नटलेला भयंकर आणि दुर्निवार असतो.

९. चलाख आणि लोकांच्या इच्छा पूर्ण करणाऱ्या ह्या दधिक्राच्या वेगाची आणि प्रतापाची सर्व लोक वाखाणणी करीत असतात. युद्धांत जाणारे लोक ह्याच्याविषयीं म्हणतात कीं दधिक्रा हजारो सैनिकासह पुढें गेला आहे.

१०. सूर्य तेजानें अन्तरिक्ष व्यापून टाकतो त्याप्रमाणें दधिक्रा सामर्थ्यानें पंचजनांना व्यापून टाकतो. शंभर व हजारांनीं देणारा बलवान घोडा दधिक्रा आमचीं स्तोत्रें मधुर फलांनीं युक्त करो.

सूक्त एकुणचाळिसावें

ऋषिः—वामदेव; देवता–दधिक्रा; छंदः–१–५ त्रिष्टुभ, ६ अनुष्टुभ.

१. त्या शीघ्रगामी दधिक्रालाच आम्ही स्तवूंया. आणि द्यू आणि पृथ्वी यांची वाखाणणी करूं या. उषःकालच्या उषा मला उत्साह देवोत आणि सर्व संकटांतून पार पाडोत.

२. पराक्रम करणारा मी थोर, चलाख, पराक्रमी आणि बहुप्रिय दधिक्रावनची पुनः पुनः स्तुति करतों. हे मित्रावरुणहो, ज्या तेजस्वी अग्नीप्रमाणें तुम्ही लोकांना साहाय्य दिलेंत.—

३. ज्या भक्तानें सकाळ उजाडल्यावर आणि अग्नि प्रज्वलित केल्यावर अश्वरूप दधिक्रावनची स्तुति केली. त्याला मित्रावरुणासह आनंदांत असणारा उदार दधिक्रा निष्पाप करो.

४. बलदायक व अन्नदाएक दधिक्रावनच्या स्तोत्यांचें जें ऐश्वर्य आहे त्याची आम्ही स्तुति करतों. तसेंच वरुण, मित्र, अग्नि आणि वज्रबाहु इंद्राचा आम्ही कल्याणाकरतां धांवा करतों.

५. युद्धाला उद्युक्त झालेले आणि यज्ञ करावयास प्रवृत्त झालेले असें दोन्ही लोक इंद्राप्रमाणें दधिक्रावनचाच धांवा करतात. हे मित्रावरुणांनो, तुम्ही आम्हा मर्त्याला प्रेरक अश्वस्वरूप दधिक्रा देव दिलात

६. जयशील, व्यापक आणि बलवान अशा दधिक्रावनची मी स्तुति केली आहे. तो आमचीं मुखादि इंद्रियें निरोगी करो आणि आमचें आयुष्य वाढवो.

सूक्त चाळिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता–५ सूर्य, अवशिष्ट दधिक्रा; छंदः–१ त्रिष्टुभ, २-५ जगती.

१. दधिक्राव्याचीच आपण आतां स्तुति करूं या. मला सर्वच उषा उत्तेजित करोत. आम्ही, अप्, अग्नि, उषा, सूर्य, आंगिरस व जयशाली बृहस्पति यांची स्तुति करूं

२. गमन करणारा, पोषक, गाईची इच्छा करणारा, भक्तगणांत असणारा, घाईत असणारा, दधिक्रावा उषःकालीं हवि इच्छो. गमनशील, अत्यंत वेगशाली, उड्या मारीत जाणारा दधिक्रावा आम्हाकरतां अन्न, बल आणि स्वर्ग उत्पन्न करो.

३. ह्या अत्यंत वेगानें धावणाऱ्या दधिक्राव्याच्या मार्गी पक्ष्याच्या पंखाप्रमाणें लोभीं शत्रु जात असतात. श्येनाप्रमाणें धांवणाऱ्या आणि संरक्षण करणाऱ्या दधिक्राव्याच्या भोंवतीं सामर्थ्यानें एकत्र होतात.

४. आणि तो घोडा मान, तोंड आणि काख या ठिकाणीं बांधलेला उड्या मारूं लागतो. दधिक्रा कार्याला अनुसरून जोरानें वाकडेतिकडे मार्ग आक्रमूं लागतो.

५. द्युलोकीं बसणारा आदित्य, अन्तरिक्षांत राहणारा वायु, यज्ञवेदीवर बसणारा अग्नि, घरांत राहणारा अतिथि, मनुष्यांत असणारा, मंडळींत असणारा, सत्यांत राहणारा, अन्तरिक्षांत राहणारा, उदकांत झालेला, गाईंत झालेला, सत्यांत झालेला, पर्वतावर झालेला असा हा सत्यस्वरूप आहे.

---

५ टीप—आदित्याचें वरीलप्रमाणें वर्णन आहे म्हणूनच सर्वानुक्रमणींत ह्या मंत्राची सूर्य देवता दिली आहे. ऐ.ब्रा.त. ह्याच अर्थानें हा मंत्र लावला आहे. (ऐ. ब्रा. ४–२०)

सूक्त एकेचाळिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता–इंद्रावरुण; छंदः–त्रिष्टुभ.

१. हे इंद्रावरुणांनो, जो स्तोता बुद्धिपूर्वक आणि नम्रतेनें अन्तःकरणाला पटेल असें तुमचें स्तोत्र करील तो स्तोता अमर व हविर्युक्त अग्नीप्रमाणें तुम्हा दोघांचें सुख प्राप्त करील असा कोण आहे ?

२. जो मर्त्य हवि तयार करून सख्य प्राप्त होण्याकरतां इंद्रावरुणांना आपले बांधव करतो तो मनुष्य युद्धांत द्वेष्ट्या शत्रूंना ठार करतो. तो मोठ्या साहाय्यामुळें प्रख्यात होतो.

३. जर सखे मित्रावरुण सख्य करण्याकरतां तयार केलेल्या सोमांनीं आणि उत्तम अन्नांनीं प्रसन्न होतील तर उदार असे ते अशी स्तुति करणाऱ्या लोकांना संपत्ति देतील.

४. हे उग्र इंद्रावरुणांनो, जो आमचें वाईट करणारा, कंजूष, दुष्ट त्यावर पराभव करणारें तेज प्रगट करा. अशा शत्रूवर तेजस्वी वज्र जोरानें मारा.

५. हे इंद्रावरुणांनो, गाईवर दोन बैल प्रेम करतात त्याप्रमाणें ह्या स्तोत्रांवर तुम्ही प्रेम करा. ही (स्तुति) मोठी गाय गवतानें हजार धारांनीं दूध देते त्याप्रमाणें आमच्या इच्छा सफल करो.

६. हे इंद्रावरुणांनो, आम्हांला मुलाबाळांसाठीं, सुपीक जमीन, सूर्याचें दर्शन, बलिष्ठ अशा मला उत्तम प्रज्ञा प्राप्त व्हाव्यात म्हणून शत्रुनाशक असणारे तुम्ही रात्रीहि साहाय्य करा.

७. हे इंद्रावरुणांनो, गाईची इच्छा करणारे आम्ही प्रभावशाली व चांगले आप्त असणाऱ्या तुमच्या पुरातन साहाय्याचीच इच्छा करतों. सुखदायक मातापितराप्रमाणें शूर व पूज्य असणाऱ्या तुमच्याच आम्ही प्रिय सख्याकरतां इच्छा करतों.

८. तुमचे भक्त साहाय्याकरतां युद्धांत तुमच्याकडे येतात त्याप्रमाणें उदार असणाऱ्या तुम्हाकडे आमची ऐश्वर्यच्छु स्तोत्रें जात आहेत. सोमांत (दहि वगैरे) मिसळण्याकरतां गाई ज्याप्रमाणें तयार असतात त्याप्रमाणें इंद्रावरुणाचा आश्रय करण्याकरतां माझीं स्तोत्रें तयार आहेत.

९. हीं माझीं स्तोत्रें द्रव्याच्या इच्छेनें इंद्रावरुणाकडे जात आहेत. सेवक धनाकरतां धन्याकडे जातात किंवा भिकारी अन्नाची भिक्षा मागण्याकरतां जातात त्याप्रमाणें जात आहेत.

१०. आम्ही अश्वसमूहाचे, रथाचे, अबाधित समृद्धीचे आणि संपत्तीचे धनी व्हावें. ते येणारे देव त्या ताज्या हवींनीं आराधिलेल्या देवाबरोबर घोडे आणि संपत्ति आम्हांला प्राप्त करून देवोत.

११. हे महान इंद्र आणि वरुणहो, युद्धांत मोठें साहाय्य करण्याकरतां आमच्याकडे या. जेथें युद्धांत आयुधें बागडतात त्या युद्धांत आम्ही तुमच्या कृपेनें असावें.

सूक्त बेचाळिसावें.

ऋषिः—त्रसदस्यु पुरुकुत्सपुत्र राजा; देवता–१–६ आत्मा, ७–१० इंद्रावरुण; छंदः—त्रिष्टुभ.

१. जसे सर्व देव माझे आहेत तसेंच सर्वांवर सत्ता असणाऱ्या क्षत्रिय अशा माझें दोन्ही प्रकारचें राष्ट्र आहे. देव वरुणाच्या इच्छेप्रमाणें चालतात. मी लोकांचा आणि वस्तुमात्राचा धनी आहें.

२. मी राजा वरुण आहें. माझ्याकरतांच तें सामर्थ्य देवांनीं धारण केलें आहे. देव वरुणाच्या इच्छेप्रमाणें चालतात. मी लोकांचा आणि वस्तुमात्राचा धनी आहें.

३. मी इंद्र आहें. वरुण आहें. तुझ्या महिम्यानें विस्तारलेल्या गंभीर आणि नीटनेटक्या द्यावापृथ्वी मीच आहे. ज्ञात्या अशा मी त्वष्ट्याप्रमाणें सर्व जगाला प्रेरणा दिली आहें आणि द्यावापृथ्वीचें धारण केलें आहे.

४. मी पाऊस पाडला. मी द्यूला अन्तरिक्षांत ठेवलें. मी उदकानें सृष्टिनियमांनीं चालणारा अदितीचा पुत्र होऊन त्रैलोक्यात्मक सृष्टि विस्तारली.

५. मलाच घोड्यावर बसलेले युद्धेच्छु योद्धे अनुसरतात. वेढ्यांत सांपडलेले युद्धांत माझाच धांवा करतात. धनिक असणारा मी इंद्र युद्ध करतों आणि सामर्थ्यानें सर्वश्रेष्ठ असणारा धूळ उडवतों.

६. मी तीं सर्व कृत्यें केलीं. अप्रतिबंध असणाऱ्या मला दैवी सामर्थ्यहि प्रतिबंध करूं शकत नाहीं. जेव्हां सोम आणि सामगान मला आनंदित करतात तेव्हां अपार द्यावापृथ्वी भयभीत होते.

७. हे वरुणा, तुला सर्व जग जाणतें आहे. हे स्तोत्या, वरुणाचीं प्रसिद्ध कृत्यें तूं गात आहेस. हे इंद्रा, तूं शत्रूंना ठार केलेस असें आम्ही ऐकलें. हे इंद्रा, तूं आडवलेल्या नद्यांस वाहते केलेस.

८. येथें दुर्गहाचा पुत्र पुरुकुत्स बद्ध झाल्यावर ते सप्तर्षि आमचे पितर झाले. ते तिला (पुरुकुत्सानीला) इंद्रासारखा शत्रुजेता आणि अर्धदेव त्रसदस्यु देते झाले.

९. हे इंद्रावरुणांनो, स्तुति आणि हविर्द्रव्यें यांनीं पुरुकुत्सानीनें तुम्हाला प्रसन्न केलें. नंतर तुम्ही तिला (पुत्र म्हणून) शत्रुहन्त्या अर्धदेव त्रसदस्यु राजाला दिलेत.

१०. आम्ही संपत्तीचा उपभोग घेत आनंदांत असावें. हवीनें देव आणि चाऱ्यानें गाई आनंदांत असाव्यात. हे इंद्रावरुणांनो, ती कामधेनु तुम्ही आम्हांस कायमची द्या.

सूक्त त्रेचाळिसावें.

ऋषिः—पुरुमिह्ळ व अजमिह्ळ सुहोत्रपुत्र; देवता—अश्विनौ; छंदः—त्रिष्टुभ.

१. यज्ञिय देवापैकीं कोण ऐकेल ? कोण ऐकेल? कोणता देव स्तोत्राचा स्वीकार करील ? देवांपैकीं कोणाच्या अंतःकरणांत ही हविर्द्रव्ययुक्त असणारी उत्कृष्ट स्तुति आश्रय घेईल ?

२. कोण आम्हांला सुख देईल ? कोणता देव अवश्य येईल ? देवांमध्यें अत्यंत सुख देणारा कोण आहे ? ज्याचा सूर्याच्या कन्येनें आश्रय घेतला तो अत्यंत हलका आणि चपळ घोड्याचा रथ कोणता म्हणतात ?

३. इंद्र जसा उषःकालीं जातो त्याप्रमाणें येणाऱ्या दिवसीं लवकर या. द्युलोकावरून येणारे, स्वर्गीय आणि सुपर्ण असे तुम्हीं पराक्रमापैकीं कोणत्या पराक्रमानें पराक्रमी आहांत ?

४. तुमची स्तुति कोणती होईल ? कोणत्या स्तोत्रानें धांवा केला असतां तुम्ही येतां ? तुमच्या महान क्रोधापासून कोण संरक्षण करणार आहे ? हे मधुर उदक उत्पन्न करणारे व दर्शनीय अश्विहो, आमचें संरक्षण करा.

५. हे अश्विहो, जेव्हां तुमचा रथ अन्तरिक्षांतून येतो तेव्हां तो द्युलोकभर फिरतो. हे मधुविद्यासंपन्नहो, जेव्हां तुम्हांला तयार सोमरस चहूकडून प्राप्त होतात तेव्हां अध्वर्यु मधुर उदकासह तुम्हाला मधुर सोमरस अर्पण करतात.

६. कान्तीनें पक्ष्यासारखे लाल असणारे घोडे चहूकडे फिरतात तेव्हां तुमच्या घोड्यांना सिंधू उदकयुक्त करतों. ज्यायोगें तुम्ही सूर्येचे पति झाला तो तुमचा रथ तात्काळ ओळखतां येतो.

७. हे अश्विहो, ज्याअर्थीं सारखे असणाऱ्या तुमची येथेंच स्तुति केली आहे ती ही उत्कृष्ट स्तुति आम्हाला फल देणारी होवो. हे रमणीयान्न व सत्यस्वरूप अश्विहो, तुम्ही आमचें संरक्षण करा. आमच्या इच्छा तुम्हावर अवलंबून आहेत.

सूक्त चव्वेचाळिसावें.

ऋषिः—पुरुमिह्ळ व अजमिह्ळ, देवता—अश्विनौ; छंदः—त्रिष्टुभ.

---

८ टीपः—पुरुकुत्साला शत्रूंनीं बंदींत टाकलें. तेव्हां त्याच्या राज्यांत सर्वत्र घोटाळे माजले. अशा स्थितींत राणीनें मुलगा व्हावा म्हणून सहज आलेल्या सप्तर्षींची मनापासून पूजा केली. त्यांनीं सांगितलें कीं तूं इंद्रावरुणांची आराधना कर. तिनें इंद्रावरुणाची आराधना केल्यावर तिला त्रसदस्यु नांवाचा मुलगा झाला. त्रसदस्यूला हा इतिहास ठाऊक होता. त्यानें तो ह्या दोन ऋचांत (८.९) ग्रथित केला आहे.

१. हे अश्विहो, जो बैठकीनें युक्त असणारा तुमचा रथ सूर्येला वाहून आणतो त्या रथाला आम्ही बोलावीत आहोंत. तो रथ अत्यंत वेगशाली, गाई मिळवून देणारा, प्रशंसनीय, विस्तृत आणि समृद्ध आहे.

२. हे स्वर्गपुत्र आश्विहो, तुम्ही पराक्रमानें देवामध्यें असें ऐश्वर्य प्राप्त करतां कीं तुमचे घोडे रथांतून जेथें वाहून नेतात तेथें तुम्हांला अन्न प्राप्त होतें.

३. आज रक्षणासाठीं आणि सोम पिण्यासाठीं हवि देऊन तुम्हांला कोण स्तवीत आहे ? हे अश्विहो, नमस्कार करून पुरातन कालापासून यज्ञाचा स्वीकार करण्याकरतां तुम्हाला कोण वळवीत आहे ?

४. हे अनेक होणारे नासत्यहो, सोनेरी रथानें ह्या यज्ञांत या. मधुर सोम प्या. आणि सेवा करणाऱ्या माणसाला संपत्ति द्या.

५. चांगला चालणाऱ्या सोनेरी रथानें द्युलोकावरून किंवा पृथ्वीवरून तुम्ही आम्हाकडे या. दुसरे भक्त तुम्हांला न आवडोत. कारण, तुमच्याकरतां स्तोत्र प्रथम मी तयार केलें आहे.

६. हे दर्शनीय आश्विहो, आम्हा दोघांना तुम्ही मुलाबाळांसहित विपुल संपत्ति द्या. कारण हे आश्विहो, तुमचें ह्या लोकांनीं स्तोत्र केलें आहे. अजामिहूळच्या मुलांनीं एकत्र स्तुति केली आहे.

७. हे आश्विहो, ज्याअर्थी सारखे असणाऱ्या तुमची येथेंच स्तुति केली आहे ती ही उत्कृष्ट स्तुति आम्हांला फल देणारी होवो. हे रमणीयान्न व सत्यस्वरूप आश्विहो, तुम्ही आमचें संरक्षण करावें. आमच्या इच्छा तुम्हावर अवलंबून आहेत.

सूक्त पंचेचाळिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता—अश्विनौ; छंदः—१–६ जगती, ७ त्रिष्टुभ.

१. हा तो प्रकाश उगवत आहे. पृथ्वीच्या भोवतीं फिरणारा रथ द्युलोकाच्या शिखरावर जोडला आहे. ह्या रथांत तीन प्रकारचें अन्न आणि चवथी मधाची पिशवी शोभत आहे.

२. पसरलेला अंधार नाहींसा करीत आणि सूर्याप्रमाणें तेज पसरीत उषा प्रकाशल्यावर अन्न व मद यांनीं युक्त अश्वयुक्त अश्वी वर येत आहेत.

३. तुम्ही मध पिणाऱ्या तोंडांनीं सोमरस प्या. मध मिळविण्याकरतां तुम्ही आपला प्रिय रथ जोडा. मधानें भरलेली पखाल घेऊन या आणि घर आणि मार्ग मधानें आनंदित करा.

४. मधुमंत, कल्याणकारी, सोन्याचे पंख असलेले, वाहून नणारे, उषःकालीं जागृत होणारे, पाण्यावर पोहणारे, आनंदी, सोम चाटणारे जे आहेत ते तुम्ही मधावर माशा जातात त्याप्रमाणें सोमाकडे जातां.

५. जेव्हां हात धुवून कर्म करणारे विचक्षण यजमान दगडांनीं मधुर सोमरस पिळतात तेव्हां यज्ञाला चांगुलपणा आणणारे सुंदर अग्नि एकत्र असणाऱ्या अश्वींचीं उषःकालीं स्तुति करतात.

६. जे प्रकाशणारे, दिवसामुळें अंधार नाहींसे करणारे, सूर्याप्रमाणें स्वच्छ तेज पसरतात अशा घोड्यांना जोडून सूर्य जातो. तुम्ही स्वेच्छेनें सर्व मार्ग जाणत असतां.

७. हे अश्विहो, उपासना करणारा मी तुमची स्तुति करीत आहें. जो रथ चांगल्या घोड्यांचा आणि अजर आहे, ज्या रथानें तुम्ही अन्तरिक्षाला वेढा घालून जाता त्या रथानें हविर्युक्त, उदार आणि संरक्षक अशाकडे तुम्ही जातां.

सूक्त शेहेचाळिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता–१ वायु, २–७ इंद्र व वायु; छंदः—गायत्री.

१. हे वायो, मधुर सोमाचा रस यज्ञामध्यें तूं प्रथम पी. कारण, तूं प्रथम पिणारा आहेस.

२. हे वायो, तूं इंद्राला सारथि करून, घोडे रथाला जुंपून शेंकडो इष्टकार्याकरतां या आणि सोमरस प्या.

३. हे इंद्रावायूनो, तुम्हाला हजार घोडे सोम पिण्याकरतां अन्नाकडे आणोत.

४. हे इंद्रवायूंनो, गगनचुम्बी, यज्ञाला चांगुलपणा आणणाऱ्या आणि सोन्याची बैठक असलेल्या रथांत तुम्ही बसतां.

५. हे इंद्रवायूंनो, अत्यंत तेजस्वी असणाऱ्या रथानें तुम्ही दात्या भक्ताकडे जा. येथें या.

६. हे इंद्रावायूंनो, हा सोम तयार आहे. तो तुम्ही हविर्दात्यांच्या घरीं देवांसह प्या.

७. हे इंद्रावायूंनो, तुमचें येथें येणें व्हावें. सोम पिण्याकरतां येथें तुमचे घोडे मोकळे सुटोत.

सूक्त सत्तेचाळिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता–१ वायु, २–४ इंद्र आणि वायु; छंदः–अनुष्टुभ.

१. हे वायो, यज्ञांत मधुर सोमाचा रस शुद्ध असणारा मी प्रथम तुला अर्पण करीत आहें. हे देवा, नियुत् घोडे जोडलेल्या रथानें आवडता असणारा तूं सोम पिण्याकरतां ये.

२. हे वायो, तूं आणि इंद्र ह्या सोमाच्या पानाला योग्य आहां. सखल प्रदेशावर पाणी वाहते त्याप्रमाणें सोम एकदम तुमच्याकडे येत आहे.

३. हे बलाधिपति इंद्रावायूंनो, नियुदश्वयुक्त असणारे तुम्ही आमचें रक्षण करण्याकरतां आणि सोम पिण्याकरतां एकाच रथांत बसून या.

४. हे नेते यज्ञवाहक इंद्रवायूंनो, जे तुमचे अत्यंत स्पृहणीय घोडे आहेत ते हवि देणाऱ्या माझ्याकरतां जोडा.

सूक्त अठ्ठेचाळिसावें.

ऋषिः—वामदेव; देवता—वायु; छंदः—अनुष्टुभ.

१. हे वायो, समर्थ ऐश्वर्याचा उपभोग घेतो त्याप्रमाणें कोणीहि न आस्वादिलेल्या आहुति तूं भक्षण कर. तयार केलेला सोमरस पिण्याकरतां आल्हादक रथांत बसून ये.

२. आपल्या घोड्या रथाला जोडून आणि इंद्राला सारथि करून शत्रूंचा फडशा पाडीत ये. हे वायो, आल्हादक रथांत बसून सोम पिण्याकरतां ये.

३. कृष्णवर्ण, संपत्तिमान आणि बहुरूपी द्यावापृथ्वी तुझ्या पाठीमागें जातात. हे वायो, सोम पिण्याकरतां तूं आल्हादक रथांत बसून ये.

४. हे वायो, केवळ मनानें जोडले जाणारे नव्याण्णव घोडे तुला ओढोत. हे वायो, तूं सोम पिण्याकरतां आल्हादक रथांत बसून ये.

५. हे वायो, तूं शंभर पुष्ट घोडे रथाला जोड. हजार घोडे जोडलेला तुझा रथ जोरानें येवो.

सूक्त एकूणपन्नासावें.

ऋषिः—वामदेव; देवता–इंद्र व बृहस्पति; छंदः–गायत्री.

१. हे इंद्राबृहस्पतीनो, हा प्रिय हवि तुमच्या तोंडांत अर्पण करीत आहें. आणि उत्तेजक स्तोत्र गायलें जात आहे.

२. हे इंद्राबृहस्पतीनो, हा सुंदर सोम पिण्याकरतां आणि तुम्हांला आनंदित करण्याकरतां ओतला जात आहे.

३. हे इंद्राबृहस्पतीनो, सोम पिणारे इंद्र व बृहस्पति तुम्ही आमच्या घरीं या.

४. हे इंद्राबृहस्पतीनो, तुम्ही आम्हाला शेकडो प्रकारची आणि हजारो प्रकारची संपत्ति द्या.

५. हे इंद्राबृहस्पतीनो, सोम तयार केल्यावर आम्ही तुम्हाला सोम पिण्याकरतां स्तुति करून बोलावितों.

६. हे इंद्राबृहस्पतीनो, तुम्ही हविर्दात्याच्या घरीं सोम प्या आणि त्यांत रममाण होऊन आनंद पावा.

सूक्त पन्नासावें.

ऋषिः—वामदेव; देवता–१–९ बृहस्पति, १०–११ इंद्र व बृहस्पति; ७–८–९ पुरोहितप्रशंसा (ऐ. ब्रा.८-२६); छंदः—त्रिष्टुभ.

१. जो त्रैलोक्यांत राहणारा बृहस्पति आपल्या शब्दानें दाही दिशा भरून टाकतो त्या मधुरजिव्ह बृहस्पतीला ध्यान करणाऱ्या ज्ञात्या ऋषींनीं पुढें स्थापन केलें.

२. हे बृहस्पते, जातांना भीति उत्पन्न करणारे आणि तुला आनंदित करणारे जे आम्हांला उपद्रव करतात त्यांच्यापासून आमच्या फलप्रद असणाऱ्या अजिंक्य गोठ्याचें तूं संरक्षण कर.

३. हे बृहस्पते, जें अत्यंत उत्कृष्ट असणारें स्थान येथून दूर आहे, तेथून जवळच तुझें यज्ञाकडे जाणारे घोडे बसले आहेत. तुझ्याकरतां दगडांनीं कुटलेला सोमरस खोल विहिरीप्रमाणें शब्द करीत चहूंकडून गळतो.

४. बृहस्पति थोर आदित्याच्या उच्च अन्तरिक्षांत प्रथम उत्पन्न होऊन, सप्तमुख, अनेक प्रकारें उत्पन्न झालेला आणि सप्तरश्मि असा आपल्या शब्दानें अंधार नाहींसा करतो.

५. त्या बृहस्पतीनें चांगली स्तुति करणाऱ्या, तेजस्वी गणानें आणि शब्दानें मेघ आणि वलाला फोडिलें बृहस्पति हव्यदोहन करणाऱ्या आणि हंबरणाऱ्या गाईला शब्द करीत मुक्त करतो.

६. अशा प्रकारें सर्व देवतारूप पराक्रमी पिता बृहस्पति याला यज्ञांनीं, नमस्कारांनीं आणि हवींनीं

आपण भजूं या. हे बृहस्पते, चांगल्या प्रजेनें युक्त आणि पराक्रमी असणारे आम्ही संपत्तीचे अधिपति होऊं.

७. जो पुरोहिताचा सर्व प्रकारें चांगला व प्रथम सत्कार करतो, स्तुति करतो आणि नमस्कार करतो तोच राजा बळानें आणि पराक्रमानें सर्व युद्धें जिंकतो.

८. ज्या राजाच्या घरीं ब्राह्मण प्रथम येतो, तोच आपल्या घरीं संतुष्ट होऊन राहतो, त्याचा पृथ्वी सर्वकाल उत्कर्ष करते, त्याच्यापुढें सर्व लोक आपणहूनच नमतात.

९. जो राजा साहाय्याची इच्छा करणाऱ्या ब्राह्मणांना धन देतो तो अप्रतिहतपणें, शत्रूंची आणि लोकांची जी संपत्ति आहे ती जिंकतो, त्याला देव साहाय्य करतात.

१०. हे संपत्तीचा वर्षाव करणाऱ्या बृहस्पते आणि इंद्रा, आनंदानें तुम्ही ह्या यज्ञांत सोम प्या. सोम तुमच्या सर्व शरीरांत पसरो. आम्हाला वीरांनीं युक्त सर्व संपत्ति द्या.

११. हे बृहस्पते, हे इंद्रा, तुम्ही आमचा उत्कर्ष करा. तुमची ती कृपा आमच्यावर एकदम होवो. आमच्या कर्मांचें संरक्षण करा. आणि आमची बुद्धि जागृत ठेवा. आमच्या पळकुट्या शत्रूंचा नाश करून टाका.

सूक्त एकावन्नावें.

ऋषिः—वामदेव; देवता–उषा; छंदः—त्रिष्टुभ.

१. हें तें अत्यंत उत्कृष्ट ज्ञान देणारें तेज पूर्वेला अंधकारांतून उदय पावलें आहे. आतां तेजस्वी स्वर्गकन्या उषांनीं लोकांकरतां मार्ग केले आहेत.

२. सुंदर उषा यज्ञांत पुरलेल्या यूपाप्रमाणें पूर्वेकडे उभ्या आहेत. तेजस्वी आणि शोधक उषा उदयाला येत गोळवाड्याचीं आणि अंधाराचीं द्वारें मोकळीं करीत आहेत.

३. आज धनसमृद्ध उषा उदयाला येऊन धन देण्याकरतां उदारांना जागृत करीत. कंजूष पणी गाढ अंधारामध्यें झोप घेत तसेंच पडून राहोत.

४. हे देदीप्यमान समृद्ध उषांनो, ज्या रथानें तुम्ही नवग्व अंगिरांच्या येथें व दशग्व सप्तास्याच्या येथें संपत्तीसह प्रकाशलांत तो नवा किंवा जुना रथ आज अनेक वेळां तुमचा होवो.

५. हे देवी उषांनो, तुम्ही यज्ञाकडे जाणाऱ्या घोड्यांनीं, निजलेल्या द्विपाद आणि चतुष्पाद जीवांना संचार करण्याकरतां जागृत करीत सर्व जगभर हिंडत असतां.

६. ऋभूंचीं कामें (चमसनिर्माणादि) जिच्या बरोबर झाली ती ह्यांच्यापैकीं पुरातन उषा कुठें आहे ? जेव्हां तेजस्वी उषा शोभा प्रगट करतात, तेव्हां रोज नव्या दिसणाऱ्या आणि सारख्या दिसणाऱ्या ह्या ओळखूं येत नाहींत.

७. ज्या उषःकालीं यज्ञ करणारानीं स्तोत्रें म्हणून आणि गाणीं गाऊन प्रशंसा करीत ताबडतोब धन प्राप्त केलें, त्या यज्ञाकरतां उत्पन्न झालेल्या सत्यस्वरूप आणि केवळ आगमनानेंच समृद्धि देणाऱ्या कल्याणप्रद उषा सुप्रसिद्ध आहेत.

८. त्या सारख्या उषा पूर्व दिशेस अन्तरिक्षांतून सारख्या पसरत जात आहेत. यज्ञाच्या स्थानाला जागृत करणाऱ्या उषा पावसाच्या धाराप्रमाणें किंवा गाईंच्या खिल्लाराप्रमाणें वर्णन केल्या जातात.

९. त्याच एकेवेळीं सारख्या स्वरूपाच्या आणि सारख्या रंगाच्या उषा महान काळ्या अंधाराला नाहींसे करीत शरीरांनीं स्वच्छ पांढऱ्या प्रकाशत फिरत आहेत.

१०. हे तेजस्वी स्वर्गकन्यांनो, विशेष रीतीनें प्रकाशणाऱ्या तुम्ही आम्हांला मुलांबाळांसहित धन द्या. हे देवीहो, तुम्हांला सुखांतून जागृत करणारे आम्ही पुत्रासहित ऐश्वर्याचे मालक होऊं.

११. तर हे स्वर्गकन्या उषांनो, यज्ञाच्या मार्गानें जाणारा मी तेजस्वी असणाऱ्या तुमची स्तुति करीत आहें. आम्ही लोकांमध्यें यशस्वी व्हावें ही प्रार्थना द्यु आणि देवी पृथिवी सफल करोत.

सूक्त बावन्नावें.

ऋषिः—वामदेव; देवता–उषा; छंदः—त्रिष्टुभ.

१. ही पहा स्वर्गकन्या सुंदर उषा प्रकाशत बहिणीच्या (रात्रीच्या) मागून दिसत आहे.

२. घोडीप्रमाणें सुंदर, तेजस्वी, प्रकाश उत्पन्न करणारी यज्ञयुक्त उषा अश्वींची सखी झाली.

३. हे उषे, तूं अश्वींची सखी आहेस आणि प्रकाशाची जननी आहेस. म्हणून तूं सर्व संपत्तीची धनीण आहेस.

४. हे मधुर बोलणारे उषे, द्वेष्ट्यांना हाकून लावणारी आणि ज्ञानी अशा तुला आम्ही स्तोत्रांनीं जागृत करीत आहोंत.

५ कल्याणकारक प्रकाश गाईच्या खिल्लाराप्रमाणें दिसत आहे. उषेनें मोठ्या तेजानें सर्व भरून टाकले आहे.

६. हे तेजस्विनी उषे, तूं तेजानें सर्व व्यापून अंधार नाहींसा केलास. तूं आमच्या इच्छेप्रमाणें आमचें रक्षण कर.

७. हे उषे, तूं तेजांनीं द्युलोकाला भरून टाकतेस. तूं तेजस्वी कांतीनें विस्तीर्ण व प्रिय अन्तरिक्षाला भरून टाकतेस.

सूक्त त्रेपन्नावें.

ऋषिः—वामदेव; देवता–सवितृ; छंदः—जगती.

१. ज्यामुळें दात्याला आपणहून तो घर देतो तें घर महान सवितृदेव नेहेमीं आम्हांस देवो. बलवान आणि ज्ञात्या अशा सवितृदेवाच्या त्या उत्कृष्ट धनाची आम्ही याचना करतों.

२. द्युलोकाचा धारणकर्ता आणि जगाचा अधिपति ज्ञाता सविता पिंगट कवच धारण करतो. दूरदृष्टि सविता आपलें तेज व्यापीत आणि भरीत अत्यंत प्रशंसनीय सुखाला त्यांनीं उत्पन्न केलें.

३. सवितृदेवानें तेजानें अन्तरिक्ष, द्युलोक आणि पृथ्वी भरून टाकली आहे. स्वतःच्या कर्तृत्वाची तो प्रशंसा करावयास लावतो. सविता उदय पावल्यावर कान्तीनें लोकांना जागे करीत आणि निजवीत आपले बाहू पसरीत आहे.

४. अजिंक्य सवितृदेव जगभर प्रकाशत लोकांच्या कृत्यांचें संरक्षण करतो. नियम करणारा सविता जगांतल्या लोकांवर आपले हात पसरतो आणि विस्तृत जगावर राज्य करतो.

५. सविता अन्तरिक्षाला मोठेपणानें तिनदां व्यापतो. तो सर्वाधिक होऊन तीन लोकांना व्यापतो, तो तीन तेजस्वी स्थानांना व्यापतो. तो तीन स्वर्गास आणि तीन पृथ्वीस व्यापतो. तो तीन कर्मांनीं (थंडी, उष्णता आणि पाऊस) आमचें आपणहून रक्षण करो.

६. जो महाधन, स्थावर व जंगम अशा उभय सृष्टीला ताब्यांत ठेवणारा, उत्पन्नकर्ता आणि स्थितिकर्ता असा आहे तो सवितृदेव आम्हांला त्रैलोक्यांतील सुख देवो आणि आमच्या पापाचा नाश करणारा होवो.

टीपः—वायुविद्युद्वरुणाख्यास्त्रयो लोका अन्तःरिक्षभेदाः स वायुलोकं स वरुणलोकं (कौ. ३.१.३).

७. सवितृदेव नेमलेल्या वेळीं येवो. आमच्या घराचा उत्कर्ष करो. आम्हांला चांगली प्रजा आणि अन्न देवो. तो आम्हांला रात्रंदिवस प्रसन्न ठेवो. आम्हांला मुलाबाळांसहित संपत्ति देवो.

सूक्त चोपन्नावें.

ऋषिः—वामदेव; देवता–सवितृ; छंदः—१–५ जगती, ६ त्रिष्टुभ.

१. सवितृदेव उदयाला आला. खरोखर तो आम्हांस वंद्य आहे. जो श्रेष्ठ धन देतो, आणि आम्हांला येथें ज्याअर्थी श्रेष्ठ संपत्ति देत आहे, त्याअर्थी दिवसाच्या ह्या भागांत लोकांना तो प्रशंसनीय आहे. कारण, मानवांना तो धन देतो.

२. कारण, तूं प्रथम याज्ञिय देवांना अमरत्व देतोस आणि उत्तम हविर्द्रव्याचा भाग देतोस, नंतरच हे सवित्या, दात्यांना देणग्या देतोस आणि लोकांना क्रमानें वंशविस्तार देतोस.

३. हे सवित्या, तुझ्याविषयीं जें पाप आम्हीं अज्ञानानें, दुर्बलपणानें, मस्तपणानें, ऐश्वर्यानें किंवा मनुष्य म्हणून केलें असेल, देवांविषयीं किंवा मनुष्याविषयीं केलें असेल—त्यापासून आम्हांला निर्दोष कर.

४. ज्यायोगें सर्व जगाचें तो धारण करतो तें सवितृदेवाचें कृत्य नष्ट होणार नाहीं. कारण, ह्या कुशल सवित्यानें पृथ्वीचा विस्तार आणि द्युलोकाचा विस्तार निर्माण केला. खरोखर ह्याचेंच तें कृत्य होय !

५. हे सवित्या, इंद्राला पूज्य मानणाऱ्या आम्हांला तूं थोर पर्वतापेक्षाहि मोठें केलेंस. ह्या भक्तांना तूं गृहयुक्त ठिकाणें देतोस. जसे जसे जात असतां ते अडखळतात तसतसे तुझ्या उदयाकडे लक्ष देतात.

६. जे भक्त हे सवित्या, प्रत्येक दिवशीं दिवसांतून तीन वेळा सुंदर सोम पिळतात. त्यांच्याबरोबर आमचे इंद्र, द्यावापृथ्वी, उदकासह सिंधु, आणि आदित्यासह अदिति कल्याण करो.

टीपः—सवितृ–टीप पहा.

सूक्त पंचावन्नावें.

ऋषिः—वामदेव; देवता–विश्वेदेव; छंदः—१–७ त्रिष्टुभ, अवशिष्ट गायत्री.

१. हे वसूंनो, तुम्हांपैकीं त्राता कोण ? आणि दुःखनिवारक कोण ? हे अखंडनीय द्यावाभूमीनो, तुम्ही

आमचें रक्षण करा. हे वरुणा, हे मित्रा, बलाढ्य माणसापासून माझें संरक्षण करा. हे देवांनो, यज्ञांत तुमच्यापैकीं कोण धन देतो ?

२. जे देव स्तोत्यांना पुरातन स्थानें देतात, जे दुःख नाहींसें करीत ज्ञानप्रद होत प्रकाशतात. ते फल देणारे सतत इष्ट घडवीत असतात आणि सत्यकर्में व दर्शनीय असे प्रकाशत असतात.

३. मी पस्त्येला, अदितीला, सिंधूला आणि स्वस्तिदेवीला सख्य प्राप्त व्हावें म्हणून स्तवितों. दोन्ही द्यावापृथ्वी जसें आमचें रक्षण करतात तसें रात्र व दिवस आमचें संरक्षण करोत.

४. अर्यमा आणि वरुण मार्ग जाणतो. अन्नाधिपति अग्नि सुखकर मार्ग जाणतो. हे इंद्राविष्णूंनो, चांगले स्तुति केलेले तुम्ही माणसांनीं भरलेलें घर आणि बलासह सुख आम्हांस द्या.

५. मी पर्वतांचें, मरुतांचें आणि त्रात्या भगदेवाचें साहाय्य मागतों. पति वरुण आमचें लोकांच्या उपद्रवापासून रक्षण करो आणि मित्र आमचें मित्रांच्या उपद्रवापासून रक्षण करो.

६. हे देवी द्यावापृथ्वीहो, संपत्ति मिळविण्याची इच्छा करणारे लोक सफर करण्याकरतां समुद्राची स्तुति करतात त्याप्रमाणें अहिर्बुध्न्यासहित तुमची उत्कृष्ट हविर्द्रव्यासह मी स्तुति करतों. म्हणून खळखळणाऱ्या नद्यांना तुम्ही मोकळ्या करा.

७. देवांसहित अदिति देवी आमचें रक्षण करो. तसेंच संरक्षण करणारा इंद्र न चुकतां आमचें संरक्षण करो. आम्ही मित्राचें, वरुणाचें आणि अग्नीचें उच्च स्थान नष्ट करण्यास समर्थ नाहीं.

८. अग्नि सर्व संपत्तीचा ईश्वर होय. अग्नि महान सौभाग्याचा धनी आहे म्हणून ती तो आम्हास देवो.

९. हे ऐश्वर्यसंपन्न, हे मधुरभाषिणी, हे अन्नसंपन्न उषे, आम्हाला तूं विपुल उत्कृष्ट संपत्ति आण.

१०. तें धन घेऊन सविता, भग, वरुण, मित्र व अर्यमा आम्हाकडे येवोत. इंद्र तें धन घेऊन आम्हाकडे येवो.

सूक्त छप्पन्नावें.

ऋषिः—वामदेव; देवता–द्यावापृथ्वी; छंदः–१–४ त्रिष्टुभ, ५–७ गायत्री.

१. ज्या अर्थीं ह्या अत्यंत विस्तृत असणाऱ्या द्यावापृथ्वींना विशाल करणाऱ्या पर्जन्यानें गमनशील मरुतांसह मोठा शब्द केला आहे त्याअर्थीं महान प्रशंसनीय द्यावापृथ्वी उत्तम हवि आणि स्तोत्रांनीं युक्त होवो.

२. यज्ञार्ह, संरक्षक, बलिष्ठ, उपयुक्त, यज्ञयुक्त, प्रेमळ, देवांना उत्पन्न करणाऱ्या, यज्ञनेत्या अशा देवी द्यावापृथ्वी उत्कृष्ट स्तोत्रांनीं युक्त होवोत.

३. ज्यानें ही द्यावापृथ्वी उत्पन्न केली तोच ह्या जगामध्यें कुशल होय. विस्तीर्ण, अचल, सुंदर आणि निराधार द्यावापृथ्वींना बुद्धिमान प्रजापतीनें कुशलतेनें निर्माण केलें.

४. हे द्यावापृथ्वीहो, पत्नीयुक्त विशाल घरांसह आम्हाला अन्नसमृद्ध इच्छिणाऱ्या, परस्पराशीं प्रेमानें असणाऱ्या, जोरानें जाणाऱ्या, व्यापक व यज्ञार्ह असणाऱ्या तुम्ही आमचें संरक्षण करा. आम्ही कर्तृत्वानें विजय मिळविणारे रथी होऊं.

५. द्यावापृथ्वीहो, तेजस्वी असणाऱ्या तुम्हाकरतां आम्ही उत्कृष्ट स्तुति करीत आहोंत. शुद्ध अशा तुमची स्तुति करण्याकरतां आम्ही येत आहोंत.

६. हे देवींहो, परस्परांना स्वतःच्या शरीरानें शुद्ध करणाऱ्या तुम्ही आपल्या स्वतःच्या सामर्थ्यानें शोभत आहांत. प्राचीन कालापासून तुम्ही यज्ञ वाहून नेत आहांत.

७. थोर असणाऱ्या तुम्ही मित्राचें कार्य पार पाडता. तारणाऱ्या आणि पार पाडणाऱ्या तुम्ही यज्ञाच्या भोंवतीं असतां.

सूक्त सत्तावन्नावें.

ऋषिः—वामदेव; देवता–१–३ क्षेत्रपति, ४ शुन, ५–६ शुनासीर, ७–८ सीता; छंदः–१–४–६–७ अनुष्टुभ, ५ पुरउष्णिह्, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. मित्राप्रमाणें क्षेत्रपतीच्या साहाय्यानें आम्ही शेत जिंकूं या. तो देव गाय व घोडा यांना पोसणारें धन आणो. तो आम्हा सारख्याला सुखी करो.

२. हे क्षेत्रपते, गाय दूध देते त्याप्रमाणें तूं मधुर तुपासारखें मधुर उदक उत्पन्न कर. उदकाधिपति आम्हाला सुखी करोत.

---

१ टीपः—रुद्रं क्षेत्रपतिं प्राहुः केचिदग्निमथापरे ।
स्वतंत्र एव वा कश्चित्क्षेत्रस्य पतिरुच्यते ॥

३. औषधी, द्युलोक, उदक आणि अन्तरिक्ष आम्हाला मधुर असोत. क्षेत्रपति आम्हाला मधुर असो. सुरक्षित असणारे आम्ही ह्याचें अनुसरण करूं या.

४. घोडे आम्हाला सुखानें वाहोत. लोक आम्हाला सुख देवोत. नांगर सुती चालो. जुपण्या सुखानें बांधल्या जावोत. चाबूक सुखानें उगारला जावो.

५. हे शुनासीरांनों, हें माझें भाषण ऐका. जें द्युलोकांत पाणी उत्पन्न केलें असेल त्यानें पृथ्वी सिंचित करा.

६. हे भाग्यशालिनी सीते, तूं आमच्याकडे ये. आम्ही तुझी स्तुति करतों कीं, ज्यायोगें तूं आम्हाला चांगलें भाग्य देणारी आणि चांगलें फल देणारी होशील.

७. इंद्र तासाला आधार देवो. तिचें पूषा नियमन करो. ती वर्षोनुवर्ष आम्हाला उदकपूर्ण असो.

८. फाळ आम्हाकरतां सुखानें नांगरो. शेतकरी बैलासह सुखानें जावोत. पर्जन्य सुखानें मधुर उदकाचा वर्षाव करो. हे शुनासीरांनो, तुम्ही आम्हांला सुख द्या.

---

४. टीपः—खरोखर शुन म्हणून स्वतंत्र देव नसावा. शुन हा सुखवाचक शब्द सूक्तांत वारंवार आलेला आहे. त्यावरून ह्या मंत्राची शुन देवता मानण्याचा सांप्रदाय पडला असावा. त्याला अनुसरून सायणाचार्य म्हणतात—शुनाख्यो वाय्विंद्रयोरन्यतमः सुखकृद्देवः तदनुग्रहादेतत्सर्वं भवतु. ९-४० निरुक्त पहा.

५. टीपः—शुन=इंद्रदेव, इंद्र, सीर=वायु; (शौनक) शुन=वायु, सीर=आदित्य (निरुक्त)

७ टीपः—शेत नांगरतांना ह्या सूक्ताचा जप करावा किंवा प्रत्येक ऋचेनें होम करावा असें आश्वलायनगृह्यसूत्रांत (२-१०) सांगितलें आहे.

सूक्त अठ्ठावन्नावें.

ऋषिः—वामदेव; देवता-अग्नि, सूर्य, अप, गो, घृत ह्यांपकीं एक; छन्दः—१-१०त्रिष्टुभ, ११ जगती.

१. समुद्रापासून मधुर लाट उठली ती सोमवल्लीसहित अमरत्वाला पावली. घृताचें जें गूढ नांव आहे ती देवांची जिव्हा आणि अमृताचें मूळ आहे.

२. आम्ही घृताची स्तुति करूं. ह्या यज्ञांत नमस्कार करून धारण करूं. गायलें जाणारें तें ब्रह्म ऐको. चार शिंगाच्या गौरमृगानें हें जग उत्पन्न केलें.

३. ह्याला चार शिंगें, तीन पाय, दोन डोकीं आणि सात हात आहेत. तीन ठिकाणीं बांधलेला हा वृषभ मोठ्यांदा पुनःपुनः शब्द करतो. तो महान देव मर्त्यांत व्यापून आहे.

४. पणीनीं तीन ठिकाणीं (दूध, दहि, तूप) लपवून ठेवलेलें घृत देवांना गाईचे ठिकाणीं आढळलें. एकाला इंद्रानें उत्पन्न केले, एकाला सूर्यानें उत्पन्न केलें आणि तेजस्वी अग्नीपासून हवि देऊन एक देवांनीं उत्पन्न केलें.

५. ह्या धारा रमणीय समुद्रापासून शेंकडो मार्गांनीं शत्रूंना दृष्टीस न पडतां बाहेर येत आहेत. त्या घृताच्या धारा मी पहात आहें. ह्यांच्यामध्यें सुवर्णमय अग्नि आहे.

६. अन्तर्यामीं पूर्ण शुद्ध असणाऱ्या प्रसन्न नद्याप्रमाणें ह्या धारा चांगल्या वहात आहेत. ह्या घृताच्या लाटा पारध्याच्या तडाख्यांतून पळणाऱ्या मृगाप्रमाणें (अग्नीकडे) धांवत आहेत.

७. उतरत्या प्रदेशावर वाहणाऱ्या, नदीच्या पाण्याप्रमाणें जलद जाणाऱ्या, वाऱ्याप्रमाणें अत्यंत वेगशाली, लोटांनीं वाढलेल्या, मोठ्या घृताच्या धारा मर्यादा मोडून जाणाऱ्या तेजस्वी घोड्याप्रमाणें जात आहेत.

८. सुंदर आणि हसऱ्या स्त्रिया ठरलेल्या ठिकाणीं जातात त्याप्रमाणें घृताच्या धारा अग्नीकडे जातात. त्या प्रज्वलित करणाऱ्या अग्नीकडे जात आहेत. त्यांचा आस्वाद घेऊन सर्वज्ञ अग्नि आनंदित झाला आहे.

९. जेथें सोम पिळला जातो, जेथें यज्ञ केला जातो तिकडे घृताच्या धारा वहात आहेत. अविवाहित मुली लग्नाला जाण्याकरतां अलंकार घालून नटतात तशा धारा दिसत आहेत.

१०. हे ऋत्विजांनो, चांगली स्तुति करा. हे देवांनो, आम्हांला गाई, जय आणि कल्याणकारक धन द्या. हा आमचा यज्ञ देवांकडे न्या. मधुर घृताच्या धारा वहात आहेत.

११. तुझ्या तेजांत सर्व जगानें आश्रय घेतला आहे. जी मधुर लाट समुद्रांत, अन्तःकरणांत, प्राणिमात्रांत, पाण्यांत आणि संग्रामांत भरलेली आहे त्या मधुर लाटेचा आम्ही आस्वाद घेऊं.

---

३. टीपः—हा सुप्रसिद्ध मंत्र अग्नीच्या ध्यानाकरतां सर्वत्र म्हटला जातो. व्याकरणमहाभाष्यांत पतंजलीनें हा मंत्र व्याकरणाची प्रशंसा करणारा म्हणून दाखविला आहे. यास्काचा अर्थहि पाहण्यासारखा आहे.

येथें चवथें मंडळ संपलें.

चौथें मंडळ.

कोष्टक.

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१	३.४.१२-१५	वामदेव	१ अष्टि, २ अतिजगती ३ धृति अवशिष्ट त्रिष्टुभ्	अग्नि	
२	३.४.१६-१९	"	त्रिष्टुभ्	"	विद्वान व अविद्वानांतील फरक.
३	३.४.२०-२२	"	"	"	
४	३.४.२३-२५	"	"	रक्षोह अग्नि	गोतमापासून मंत्रप्राप्ति
५	३.५.१-३	"	"	वैश्वानर अग्नि	नरकाची उत्पत्ति, भ्रातृहीन
६	३.५.४--५	"	"	"	पर्यग्नीकरण [भगिनी
७	३.५.६-७	"	१ जगती २–६ अनुष्टुभ् अवशिष्ट त्रिष्टुभ्	" "	
८	३.५.८	"	गायत्री	"	
९	३.५.९	"	"	"	
१०	३.५.१०	"	१–३पदपंक्ति ४–६–७पदपंक्ति किंवा उष्णिह ५ महापदपंक्ति ८ उष्णिह	" " "	
११	३.५.११	"	त्रिष्टुभ्		
१२	३.५.१२	"	"	अग्नि किंवा लिंगोक्त	
१३	३.५.१३	"	"		
१४	३.५.१४	"	"	"	
१५	३.५.१५-१६	"	गायत्री	७–८ सोमकराजा ९-१० अश्विन् अवशिष्ट अग्नि	सहदेव्यपुत्र साहदेव्य सोमकाचा उल्लेख
१६	३.५.१७-२०	"	त्रिष्टुभ्	इंद्र	स्तोत्यांची रथी होऊन जय मिळविण्याची इच्छा.
१७	३.५.२१-२४	"	१५ विराज अवशिष्ट त्रिष्टुभ्	"	स्तोत्यांचा मागण्या व इंद्रपराक्रम
१८	३.५.२५-२६	इंद्रवामदेवसंवाद	त्रिष्टुभ्	इंद्र व वामदेव	वामदेवजन्मकथा
१९	३.६.१–२	वामदेव	त्रिष्टुभ्	इंद्र	वृत्रवध
२०	३.६.३–४	"	"	"	

सूक्त	अष्टक अ.व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
२१	३.६.५–६	,,	,,	,,	
२२	३.६.७–८	,,	,,	,,	इंद्रपराक्रम
२३	३.६.९–१०	,,	,,	,,	ऋतप्रशंसा
२४	३.६.११–१२	,,	१० अनुष्टुभ् अवशिष्ट त्रिष्टुभ्	,,	सोम काढणारे व न काढणारे यांची निवड
२५	३.६.१३–१४	,,	त्रिष्टुभ्	,,	
२६	३.६.१५	,, ,,	,,	परमात्मा	इंद्रानें आर्यास भूमि दिली. श्येनानें सोम आणला
२७	३.६.१६	,,	१–४ त्रिष्टुभ् ५ शक्वरी	श्येन	
२८	३.६.१७	,,	त्रिष्टुभ्	इंद्रासोम	
२९	३.६.१८	,,	,,	इंद्र	
३०	३.६.१९–२३	,,	गायत्री ८.२४ अनुष्टुभ्	९–१०–११ उषा व इंद्र, अवशिष्ट इंद्र	इंद्रापेक्षा श्रेष्ठ कोणी नाहीं.
३१	३.६.२४–२६	,,	गायत्री	,,	
३२	३.६.२७–३०	,,	,,	१–२२ इंद्र, २३–२४ इंद्राश्व	इंद्रपराक्रम.
३३	३-७.१–२	,,	त्रिष्टुभ्	ऋभु	ऋभुवर्णन
३४	३.७.३–४	,,	,,	,,	,,
३५	३.७.५–६	,,	,,	,,	,,
३६	३.७.७–८	,,	१–८ जगती ९ त्रिष्टुभ्	,,	,,
३७	३.७.९–१०	वामदेव	,,	,,	
३८	३.७.११–१२	,,	,,	दधिक्रा	
३९	३.७.१३	,,	१–५ त्रिष्टुभ् ६ अनुष्टुभ्	,,	
४०	३.७.१४	,,	१ त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती	,,	
४१	३.७.१५–१६	,,	त्रिष्टुभ्	इंद्रावरुण	
४२	३.७.१७–१८	त्रसदस्यु पुरुकुत्सपुत्र	,,	१–६ आत्मा ७–१० इंद्रावरुण	वरुणपराक्रम व पुरुकुत्सजन्म कथा.
४३	३.७.१९	पुरुमिळ्ह व अजमिळ्ह सुहोत्रपुत्र	,,	अश्विनौ	
४४	३.७.२०	,,	,,	,,	अश्विस्तुति
४५	३.७.२१	वामदेव	१-६ जगती ७ त्रिष्टुभ्	,,	

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
४६	३.७.२२	,,	गायत्री	१ वायु, अवशिष्ट इंद्रवायु	
४७	३.७.२३	,,	अनुष्टुभ्	१ केवळ वायू अवशिष्ट इंद्रवायु	
४८	३.७.२४	,,	,,	वायु	
४९	३.७.२५	,,	गायत्री	इंद्राबृहस्पति	
५०	३.७.२६-२७	,,	१० जगती बाकी त्रिष्टुभ्	१०-११ इंद्राबृहस्पति, अवशिष्ट बृहस्पति	बृहस्पति प्रथम उत्पन्न झाला व पुरोहितप्रशंसा देवतेबद्दल अनुक्रमणींत व ब्राह्मणांत मतभेद
५१	३.८.१-२	,,	त्रिष्टुभ्	उषा	
५२	३.८.३	,,	गायत्री	उषा	
५३	३.८.४	,,	जगती	सवितृ	
५४	३.८.५	,,	१-५ जगती ६ त्रिष्टुभ्	,,	
५५	३.८.६-७	,,	८-९-१० गायत्री बाकी त्रिष्टुभ्	विश्वेदेव	
५६	३.८.८	,,	५-६-७ गायत्री अवशिष्ट त्रिष्टुभ्	द्यावापृथ्वी	
५७	३.८.९	,,	१.४.६.७ अनुष्टुभ् ५ पुरउष्णिह अवशिष्ट त्रिष्टुभ्	१-३ क्षेत्रपति, ४ शुन ५-८ शुनासीर ६-७ सीता	शेत नांगरण्याची प्रार्थना
५८	३.८.१०-११	,,	१-१० त्रिष्टुभ् ११ जगती	अग्नि, सूर्य अप्, गो, घृत यांपैकीं एक	अनेक अर्थ केला जाणारा 'चत्वारि शृंगा. मंत्र.

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर

मंडळ पांचवें.

भाषांतरकार

विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

मुद्रक व प्रकाशक

शंकर रामचंद्र दाते, बी. ए.

चिटणीस, वैदिक वाङ्मय प्रसारक मंडळ.

‘ लोकसंग्रह ’ छापखाना, २७ बुधवार पेठ, पुणें.

शके १८५०

किंमत दीड रुपया

पंचममंडळपरिचय.

पांचव्या मंडळांत ८७ सूक्तें असून ७२७ ऋचा आहेत. अनुवाक सहा आहेत.

ह्या मंडळाचा द्रष्टा अत्रि किंवा अत्रिकुलांतील लोक आहत.

छंद

ह्या मंडळांत २३ त्रिष्टुभ, ८ गायत्री, ८ अनुष्टुभ, ३ पंक्ति, २ जगती, १ उष्णिह, १ अतिजगती, १ विराज, आणि ३९ वेगवेगळया वृत्तांतील सूक्तें आहेत.

देवता

२६ अग्नि, ११ मित्रावरुण, ९ विश्वेदेव व मरुत, ६ अश्वी, २ सवितृ व उषा, १ पर्जन्य, पृथ्वी, वरुण व इंद्राग्नी, १ आप्री, आणि ५ मिश्रसूक्तें आहेत.

आप्रीसूक्त

ह्या मंडळांत ५ वें आप्रसूक्त असून त्यांत अकरा ऋचा आहेत. तनूनपातची ऋचा नाहीं.

वाचनीय सूक्तें

पर्जन्यसूक्त वाचत असतां धडधडा पाऊस पडत आहे असें वाटतें. (८३), एवयामरुताची गंभीर प्रार्थना शेवटच्या सूक्तांत आपणास आढळते. (८७) स्तोत्याचें अन्तःकरण आपण निर्दोष असावें अशा बुद्धीनें कळवळत आहे असें सवितृ सूक्तांत आढळून येते. (८१-८२). उषासूक्तें नेहमींप्रमाणेंच प्रेमळ आहेत (७९.८०). ह्या मंडळांतील अश्वींचीं सूक्तें चमत्कारांनीं भरलेलीं नसून भक्तीनें ओथंबलेलीं आहेत. (७३ ते ७७) मित्रावरुणांचीं सूक्तें अत्यंत प्रासादिक असून भक्ताची श्रद्धा व्यक्त करणारीं आहेत. एका ठिकाणीं तर स्तोता अत्यंत प्रेमांत आम्ही लोकसंरक्षित स्वराज्याविषयीं प्रयत्न करीत असल्याचें सांगत आहे. (६६-६) ह्याप्रमाणें विश्वेदेव वगैरेंचीं सूक्तेंहि सुंदर आहेत.

कथासूक्तें

१. दुसऱ्या सूक्तांतील कांहीं ऋचांत विशेषतः आठव्या ऋचेंत अग्नि निघून गेल्याचा उल्लेख आहे. त्याचा संदर्भहि टीपेंत आख्यायिकेवरून आम्ही दाखविला आहे. पण एकंदर सर्व अस्पष्टच आहे.

२. श्यावाश्वाच्या विवाहाची चमत्कारिक हकीकत (६१) सूक्तांत ग्रथित केली आहे. ही सर्व आख्यायिका तेथें टीपेंत दिली आहे.

३. सप्तवध्रीची कथा चमत्कृतिपूर्ण असून त्याच्या त्रुटितपणामुळें चुटपुट लागल्याशिवाय राहत नाहीं. (७८. ५. ६)

४. गर्भस्राविणी उपनिषद् म्हणून असणाऱ्या तीन ऋचा आहेत, त्यांनीं सुखप्रसुति व्हावी म्हणून अडलेल्या बाईस पाणी मंत्रून देण्याची अद्यापिहि पद्धत आहे.

सामाजिक चाली

नमुचिदासानें स्त्रियांच्या सेनेचा उपयोग केला असा एके ठिकाणीं उल्लेख आला आहे. (३०.९). पण त्याला जास्त आधाराची जरूर आहे. अश्वींच्या पराक्रमांत विश्पलेनें आपला नवरा खेल ह्याबरोबर युद्धांत भाग घेतल्यामुळें तिचा पाय तुटला व तेथें अश्वींच्या कृपेनें लोखंडी पाय बसवला गेल्याचा एक उल्लेख आहे. (१.११६.१५) यावरून स्त्रियांच्या सामाजिक गोष्टीवर बराच प्रकाश पडण्यासारखा आहे.

सूर्यग्रहण

ह्या मंडळांत सूर्यग्रहणाचा स्पष्ट उलेख आहे. (४०. ५ ते ९) त्या पांच ऋचांवरूनहि सूर्य दिसेनासा झाला कीं लोक भयभीत होत व सूर्य पुनः परत आणण्यास मंत्रतंत्रांची आवश्यकता लागत असे. परंतु तेथें पौराणिक कथेंतलि वृत्तीचा गंधहि नव्हता असें दिसतें. स्वर्भानु हा प्रचलित संस्कृतांतील शब्दच तेथें उपयोगांत आणला असून त्यांचें स्वरूप अंधार हें तेथें सांगितलें आहे.

रस्त्यांचे प्रकार.

अपथ, विपथ, अन्तःपथ आणि अनुपथ आणि आपथ हे रस्त्यांचे प्रकार असावेत. (५२–१०)

कांहीं महत्त्वाचे उल्लेख.

एका ऋचेंत यजूचा स्पष्टपणें उल्लेख आला आहे. (६२–५)

नद्या व देश.

रसा, अनितभा, कुभा (काबुल), क्रमु, शरयु व सिंधु ह्या नद्यांचा उल्लेख आला आहे (५३–९). त्यापैकीं सध्यां अनितभेखेरीज सर्व नद्या प्रसिद्ध आहेत. तसेंच सुदुघा नांवाच्या नदीचा उल्लेखहि (३१–८) आला आहे. परुष्णी (रावी)चा उल्लेख (५२–९) आला आहे. तिच्या कांठीं स्वच्छ लोंकरीच्या वस्त्राबद्दल प्रसिद्धि दर्शविली आहे.

वरील शरयु इतर नद्यांशीं सहोच्चारित म्हणून पंजाबांत असावी पण सध्यां शरयु नांवाची प्रख्यात नदी अयोध्या प्रान्तांत आहे. तिचाच हा उल्लेख समजणें अन्य पुराव्याच्या अभावीं अवश्य आहे.

वैशाख संकष्टी चतुर्थी
१८५० }

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर.

पांचवें मंडळ.

सूक्त पहिलें.

ऋषिः—बुध व गविष्ठिर आत्रेय; देवता–अग्नि; छंदः—त्रिष्टुभ्.

१. उषःकालीं धेनु ज्याप्रमाणें जागृत होते त्याप्रमाणें लोकांच्या समिधांनीं हा अग्नि प्रज्वलित केला आहे. झाडांच्या फांद्याप्रमाणें मोठाल्या ज्वाला आकाशांत पसरत आहेत.

२. हा अग्नि देवांना हवन करण्याकरतां प्रज्वलित केला आहे. उदार मनाचा अग्नि सकाळीं वर चालला आहे, प्रज्वलित झालेल्या अग्नीचें तेजस्वी सामर्थ्य दिसतें आहे. थोर अग्निदेव अंधकारांतून बाहेर पडला आहे.

३. जेव्हां हा अग्नि लोकांना प्रतिबंधक असणारा अंधार खाऊन टाकतो तेव्हां स्वच्छ अग्नि आपल्या प्रकाशानें सर्व व्यक्त करतो. नंतर विपुल घृतधारा अर्पण केली जाते तेव्हां अग्नि प्रज्वलित होऊन जुहूंच्या द्वारा त्या अन्नाचा आस्वाद घेतो.

४. लोकांचे डोळे सूर्याकडे लागलेले असतात त्याप्रमाणें भक्तांचें मन अग्नीच्या भोंवती घोटाळत असतें. जेव्हां उषेसह विभिन्न स्वरूपाच्या द्यावापृथ्वी अग्नीला जन्म देतात तेव्हां प्रातःकालीं स्वच्छ आणि बलवान अग्नि वाढूं लागतो.

५. प्रातःकालीं अग्नि अल्प प्रमाणांत उत्पन्न झाला आणि प्रज्वलित होऊं लागल्यावर चांगल्या लाकडांत त्याला वाढविला. घरोघर सात ज्वालांनीं प्रज्वलित झालेला होमनिष्पादक अग्नि यज्ञार्ह म्हणून बसलेला असतो.

६. आईच्या मांडीवर (भूमीवर) (हविर्द्रव्याचा) सुगंध असलेल्या स्थानीं यज्ञार्ह होमनिष्पादक अग्नि बसलेला आहे. तरुण, उत्तेजक, अनेक स्थलीं असणारा, यज्ञाधार व सर्वाधार अग्नि लोकांच्या मध्यें प्रज्वलित झालेला असतो.

७. ज्यानें उदक उत्पन्न करून द्यावापृथ्वी विस्तारली आणि ज्या नित्य व बलवान अग्नीची तुपाच्या आहुति देऊन भक्त उपासना करतात, त्याच होमनिष्पादक यज्ञांत शोभणाऱ्या बुद्धिमान अग्नीचीं स्तोत्रें म्हणून स्तोते स्तुति करतात.

८. उदार मनाचा, शहाण्यांनीं स्तविलेला आणि अतिथीप्रमाणें कल्याणकारक असणारा पूज्य अग्नि सेवा केला जात आहे. तो हजारो ज्वाला असलेला, कामपूरक आणि सामर्थ्यानें प्रसिद्ध आहे. हे अग्ने, तूं आपल्या सामर्थ्यानें सर्व जगाला व्यापून टाकतोस.

९. ज्यांच्याकरतां अत्यंत सुंदर असणारा तूं प्रकट झालास त्यांना, हे अग्ने, दुसऱ्या देवांपेक्षां लागलीच श्रेष्ठ वाटूं लागतोस तूं स्तुत्य, हितकारक, कान्तिमान, आवडता आणि सर्व प्राणिमात्राला अतिथीप्रमाणें पूज्य आहेस.

१०. हे अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, दूर असोत किंवा लांब असोत सर्व लोक तुला पूजा अर्पण करतात. स्तोत्याची उत्कृष्ट स्तुति तूं ध्यानांत घे. हे अग्ने, तुझ्यापासून आम्हाला प्राप्त झालेलें विपुल सुख अत्यंत प्रशंसनीय आहे.

११. हे तेजस्वी अग्ने, आज तुझ्या तेजस्वी कातीव रथांत तूं यज्ञीय देवांसह आरूढ हो. ज्ञाता असणारा तूं यज्ञमार्गावर हवि भक्षण करण्याकरतां देवांना घेऊन येतोस.

१२. आम्ही शहाण्या, ज्ञात्या, बलशाली आणि शुद्ध ऋषीकरतां नमस्कारात्मक स्तोत्र म्हणतों आहोंत, गविष्ठिर ऋषि नमस्कार करून सर्व स्वर्ग चालून जाणाऱ्या तेजस्वी आदित्याप्रमाणें अग्नीची स्तुति करीत आहे.

सूक्त दुसरें.

ऋषिः—-कुमार अत्रिपुत्र, किंवा वृश जनपुत्र किंवा दोघेहि; २ चा वृशच; देवता–अग्नि, छंदः—१–६ त्रिष्टुभ्, ७–१२ शक्करी.

१. तरुण माता ठार झालेल्या मुलाला गुहेंत लपून ठेवते, बापाला देत नाहीं, ह्या कुमाराचें मृत शरीर लोकांना दिसत नाहीं तर वाईट स्थितींत असणारें शरीर दिसतें.

२. हे तरुणी, हिंसक असणारी तूं कोणत्या कुमाराला धारण करतेस? त्याला पट्टराणीनें जन्म दिला आहे. अनेक वर्षें गर्भ वाढत होता. आई बाळंत झाल्यावर जन्मलेल्या त्याला मी पाहिलें.

३. त्याला मी सुवर्णदन्त, तेजस्वी आणि आपल्या स्थानीं आयुधें तयार करीत असतां पाहिलें. मी त्याला अमृताप्रमाणें असणारे विपुल हवि देणारा आहे. मग माझे इंद्रहीन आणि स्तोत्रहीन (नास्तिक) काय करणार आहेत?

४. मी आपल्या स्थानीं गूढ असणाऱ्या आणि गाईंच्या खिल्लाराप्रमाणें स्वाभाविक, अत्यंत सुशोभित असणाऱ्या त्याला पाहिलें. त्यांनीं त्याला (गर्भरूपानें) धारण केलें नव्हतें, पण तो जन्मास आला. त्या जीर्ण (ज्वालाच) आतां तरुण झाल्या.

५. ज्यांना अग्नीचें साहाय्य नाहीं, ते कोण माझ्या राष्ट्राला गाईपासून विलग करणार आहेत? ज्यांनीं माझ्या राष्ट्राला जिंकलें असेल त्यांचा नाश होवो. ज्ञाता अग्नि आमचीं गुरें आम्हाकडे हाकून आणो.

६. प्राणिमात्राचा राजा आणि लोकांचा आधार अशा अग्नीला दुष्टांनीं मृत्युलोकीं डांबून ठेवलें आहे. त्याला अत्रीचीं स्तोत्रे मुक्त करोत आणि निंदक निंद्य होवोत.

७ हे अग्ने, घट्ट बांधलेल्या शुनःशेपाला तूं हजार (प्रकारच्या) यूपापासून सोडवलेंस. कारण, त्यानें तुझी स्तुति केली. म्हणून हे होत्या व ज्ञात्या अग्ने, तूं येथें बसून आम्हाला पाशांतून अवश्य मुक्त कर.

८. हे अग्ने, तूं रागावून माझ्यापासून निघून गेलास असें मला देवांचा राजा इंद्र म्हणाला. कारण, त्या ज्ञात्यानेंच तुला पाहिलें, आणि त्यानें सांगितल्यावरूनच हे अग्निदेवा, मी तुझ्याकडे आलों आहें.

९. अग्नि मोठ्या तेजानें प्रकाशत आहे. आणि आपल्या मोठेपणानें सर्व जग प्रकट करीत आहे. तो दुर्गम राक्षसी कपटांचा पराभव करतो. आणि राक्षसांचा नाश करण्याकरतां आपलीं शिंगें (ज्वाला) तीक्ष्ण करीत असतो.

१०. राक्षसांचा नाश करण्याकरतां तीक्ष्ण आयुधासारख्या गर्जणाऱ्या ज्वाला द्युलोकांत प्रगट होवोत. आनंदानें ह्या अग्नीच्या ज्वाला राक्षसांचा नाश करोत. कारण, त्यांना राक्षसी प्रतिबंध अडवूं शकत नाहींत.

११. हे अनेक स्वरूपाच्या अग्ने, कुशल सुतार रथ तयार करतो त्याप्रमाणें शहाणा आणि बुद्धिमान असणाऱ्या मी तुझें हें स्तोत्रें तयार केलें आहे. ह अग्निदेवा, जर हें स्तोत्र तुला आवडेल तर आम्ही ह्या स्तोत्रानें स्वर्गीय उदक मिळवूं.

१२. प्रज्वलित बलवान आणि उत्कर्ष पावणारा अग्नि शत्रूची संपत्ति निष्कंटकपणें मिळवून देतो, असें अग्नीला इतर देव म्हणतात. म्हणून यज्ञ करणाऱ्या आणि हवि देणाऱ्या माणसाला तूं सुख दे.

सूक्त तिसरें.

ऋषिः—वसुश्रुत आत्रेय; देवतः—अग्नि; छंदः–त्रिष्टुभ.

१. हे अग्ने, तूं जेव्हां उत्पन्न होतोस तेव्हां अंधार

---

१. टीप:—इक्ष्वाकु कुलांत त्र्यरुण त्रैवृष्ण नांवाचा राजा होता. त्याचा पुरोहित वृश जान नांवाचा होता. ते दोघेहि रथांत बसून चालले असतां वाटेंत त्र्यरुणाच्या हातांतील लगाम वशानें हातांत घेतला. वाटेंत एक मुलगा खेळत होता त्याला रथाच्या चाकाचा धक्का लागला आणि तो मेला. तेव्हां मुलाला मारल्याबद्दलचा आरोप राजा व पुरोहित एकमेकांवर करूं लागले.

' राजन् ' तूं रथाचा मालक आहेस. त्याअर्थीं तूं मुलाला ठार केलेंस '

' छट्, लगाम तुझ्या हातांत होता, त्याअर्थीं तूं मारलेंस ? असा वादविवाद करीत ते निर्णय विचारण्याकरतां इक्ष्वाकूकडे आले. इक्ष्वाकूनें निर्णय दिला. ज्याअर्थीं रथ वृश हाणीत होता त्याअर्थी वृश दोषी आहे. तेव्हां वृशानें त्या मुलाला जिवंत केलें.

पण चमत्कार असा झाला कीं त्यांच्या घरचा अग्नि तेव्हांपासून नाहींसा झाला. घरांत अन्न शिजविण्याची पंचाईत ! त्या बरोबर वृशाला दोष दिल्यापासून असें झालें हें त्याच्या ध्यानांत आलें. त्याबरोबर वृशाला त्यानें बोलावून घेतलें. व पुनः अग्नि मिळवला.

नाहींसा करतोस. जेव्हां तूं प्रज्वलित होतोस तेव्हां तूं सर्वांचा मित्र होतोस. तुझे ठिकाणीं सर्व देव आहेत. हे बलपुत्र अग्ने, तूं दात्या लोकांचा धनी आहेस. तूं सर्वांचें नियमन करणारा आहेस.

२. हे अग्ने, जेव्हां तूं कन्यकासंबंधीं अग्नि असतोस तेव्हां तूं हे अन्नवन्ता, तूं वैश्वानर असें गूढ-नांव धारण करतोस. तूं पतिपत्नींचा मनें जुळवितोस म्हणून तुला ते निकट मित्राप्रमाणें तुपाच्या आहुति देतात.

३. हे अग्ने, तुझी शोभा वाढावी म्हणून मरुतांनीं (पाऊस पाडून) स्वच्छ केलें आहे. हे रुद्रस्वरूपा तुझा जन्म सुंदर आणि आश्चर्यकारक आहे. विष्णूचें जें अगम्य स्थान (अन्तरिक्ष) आहे त्यानें तूं उदकांचें गूढपणें संरक्षण करतोस.

४. हे अग्निदेवा, तुझ्या समृद्धीनें चांगले दिसूं लागलेले देव तुझ्यावर अधिक प्रीति करीत अमृत प्राप्त करतात. भक्ताकरतां हवि देत आणि फलाची इच्छा करीत सर्व लोक होमनिष्पादक अग्नीची सेवा करतात.

५. हे अग्ने, तुझ्याशिवाय कोणीहि पूर्वकालीं होमनिष्पादक आणि यज्ञार्ह नव्हता आणि हे अन्नोत्पादनसमर्था, काव्यांनीं प्रशंसनीय असा पुढल्या काळांतहि कोणी नाहीं. ज्या लोकांना तूं अतिथीप्रमाणें पूज्य आहेस, तो तूं आमच्या शत्रूंना ठार करतोस.

६. हे अग्ने, संपत्तीची इच्छा करणारे आम्ही हवींनें तुला प्रज्वलित करून तुझ्या साहाय्यानें संपत्ति प्राप्त करूं. युद्धांत जय मिळवूं आणि यज्ञांत बल प्राप्त करूं. हे बलपुत्रा, आम्ही ऐश्वर्यानें नोकरचाकर मिळवूं.

७. जो मनुष्य आमचा अपराध करतो त्या दुष्टालाच पाप लागो. हे ज्ञात्या अग्ने, जो आम्हाला दोनहि प्रकारें त्रास देतो त्या दुष्टाला तूं ठार कर.

८. उदार भक्तांनीं प्रज्वलित केल्यावर हे अग्निदेवा, रात्र उजाडल्यावर पुरातन कालचे भक्त तुला दूत करून हवि देतात. तेव्हां संपत्तीनें भरभराटीस आलेल्या त्याच्या तूं घरीं जातोस.

९. हे बलपुत्र अग्ने, तूं संकटांतून पार कर. मुलासारखा असणारा तुझा भक्त तुला पिता समजून हवि देतात. हे ज्ञात्या अग्ने, तूं आम्हांकडे केव्हां पाहशील ? आणि सृष्टिनियमांचा संचालक असणारा तूं केव्हां (सन्मार्ग) प्रवृत्त करशील ?

१०. हे उदार अग्ने, जर तूं तो हवि स्वीकारणार असशील तर अनेक वेळां तुझें नांव घेऊन भक्त तुला अर्पण करतील. भक्ताचा विपुल हवि सामर्थ्यानें इच्छिणारा अग्नि उत्कर्ष पावत भक्तांना सुख देतो.

११. हे अत्यंत तरुण असणाऱ्या थोर अग्ने, तूं स्तोत्यावर अनुग्रह करण्याकरतां त्याला सर्व संकटांतून पार पाडतोस. कारण, येथें चोर दृष्टोत्पतीस आले आहेत. शत्रूजन, आंतल्या गाठीचे आणि दुष्ट लोकहि येथें आहेत.

१२. हे आम्ही तुझ्याकडे आलों आहोंत. उदार अशा तुझ्यापाशीं झालेला अपराध निवेदन केला आहे. हा अग्नि प्रज्वलित झाल्यावर तो आम्हांला घातकी दुष्टांच्या किंवा निंदकाच्या स्वाधीन करणार नाहीं.

सूक्त चवथें.

ऋषिः—वसुश्रुत आत्रेय; देवता–अग्नि छंदः—त्रिष्टुभ.

१. हे अग्निराजा सर्व संपत्तीचा आधिपति असणाऱ्या तुलाच यज्ञांत मी स्तवीत आहें.तुझ्या साहाय्यानें ऐश्वर्य इच्छिणारे आम्ही संपत्ति जिंकूं आणि मर्त्यांच्या सेना पराभूत करूं.

२. हा जरारहित असणारा हव्यवाह अग्नि आमचा पिता आहे. तो सर्वव्यापक आणि तेजस्वी असणारा आम्हांस अत्यंत दर्शनीय आहे. हे अग्ने, आम्हाला चांगल्या गृहव्यवस्थेंत मिळणारें अन्न दे. आणि आमची कीर्ति वाढीव.

३. हे ऋत्विजांनो, लोकांना काव्यस्फूर्ति देणारा सर्व लोकांचा अधिपति, पवित्र, शोधक, तेजस्वी शरीराचा, होम निष्पादक आणि विश्ववेत्त्या अग्नीला तुम्ही स्वीकारा. तो देवांमधील उत्कृष्ट संपत्ति आम्हांला देवो.

४. हे अग्ने, स्तुतीनें प्रसन्न होणारा आणि सूर्याच्या किरणासह (बाहेर पडण्याचा) प्रयत्न करणारा तूं आमच्या स्तुतीचा स्वीकार कर. हे जातवेद अग्ने, तूं आमच्या समिधेचा स्वीकार कर. तूं देवाकडे हवि भक्षण करण्याकरतां घेऊन जातोस.

५. तूं पूजनीय, उदार, घरांत अतिथीप्रमाणें आदरणीय, आणि ज्ञाता आहेस. तूं आमच्या ह्या यज्ञाकडे ये. हे अग्ने, तूं सर्व चालून येणाऱ्या शत्रूंना ठार करून शत्रुत्व करणारांची सर्व संपत्ति हरण कर.

६. हे अग्ने, स्वतःच्या शरीराकरतां अन्न प्राप्त करीत तूं आयुधानें दस्यूला ठार कर. कारण हे बलपुत्र अग्ने, तूं देवांना तृप्त करणारा आहेस. हे नायक श्रेष्ठा, युद्धांत तूं आमचें संरक्षण कर.

७. हे अग्ने, आम्ही स्तोत्रें गाऊन आणि हवि देऊन सेवा करतों. हे शोधक आणि कल्याणप्रकाशा अग्ने, आम्हांला विश्ववंद्य संपत्ति दे. तसेंच सर्व प्रकारचें ऐश्वर्य दे.

८. हे त्रैलोक्यनिवासी बलपुत्र अग्ने, तूं आमच्या यज्ञाचा आणि हवीचा स्वीकार करावास. आम्ही देवामध्यें पुण्यकर्में करणारे व्हावें. आम्हांला तीन मजली घर देऊन आमचें संरक्षण करावें.

९. हे अग्ने,आम्हांस भोगण्यास कठिण असणाऱ्या तुला सर्व पातकांतून नावाडी समुद्राच्या पार नेतो त्याप्रमाणें पार पाड. हे अग्ने, अत्रि ऋषीप्रमाणें स्तविला जाणारा तूं आमच्या शरीराचें संरक्षण करण्याविषयीं तत्पर ऐस.

१०. जो मर्त्य असणारा मी अमर असणाऱ्या तुला स्तुतियुक्त अंतःकरणानें बोलावतों, त्या आम्हांला हे अग्ने, यशःप्राप्ति होऊं दे. आम्हांला मुलेंबाळें होऊन आम्ही अमर व्हावें.

११. हे अग्ने, तूं ज्या सत्कर्म करणाऱ्या यजमानाला सुखी करतोस, त्याला पुष्कळ घोडे, पुत्र, सामर्थ्य गाई, बैल यांनीं युक्त असें धन प्राप्त होवो.

सूक्त पांचवें.

ऋषिः—वसुश्रुत आत्रेय; देवता–*आप्रीसूक्त; छंदः–गायत्री.

१. हे ऋत्विजांनो, प्रज्वलित झालेल्या तेजस्वी सर्वज्ञ अग्नीस विपुल तुपाची आहुति द्या.

२. नराशंस अग्नि आमच्या ह्या यज्ञाला चांगल्या प्रकारें प्रेरणा देतो. तो अहिंस्य, बुद्धिप्रेरक आणि उदकांचा वर्षाव करणारा आहे.

३. हे अग्ने, स्तुति केलेला तूं सुखकारक रथांनीं आमच्या रक्षणाकरतां प्रिय आणि आश्चर्यकारक इंद्राला घेऊन ये.

४. हे भक्तांनो, लोंकरीप्रमाणें मऊ असणारे आसन तूं पसर. कारण, स्तोते स्तुति करूं लागले. हे निर्मला, तूं आम्हांला संपत्ति देणारा हो.

५. हे द्वारदेवतांनो, तुम्ही आतां उघडल्या जा. उत्कृष्ट असणाऱ्या तुम्ही आमच्या रक्षणाकरतां यज्ञ पार पाडा.

६. सुरूप, आयुष्य वृद्धिंगत करणाऱ्या, थोर, धर्मप्रवृत्तीच्या माता अशा रात्र आणि दिवस यांची आम्ही स्तुति करतों.

७. हे दिव्य यज्ञसंपादकहो, आम्ही तुमचें स्तवन केलें आहे म्हणून तुम्ही वायुवेगानें आमच्या ह्या यज्ञाकडे या.

८. इळा, सरस्वती आणि मही अशा तीनही देवी सुख देत आणि कृपादृष्टीनें पहात दर्भासनावर बसोत.

९. हे त्वष्टृदेवा, कल्याणकारक व व्यापक असणारा तूं आमचें पोषण करण्याकरतां आमच्या प्रत्येक यज्ञांत येऊन आमचें संरक्षण कर.

१०. हे वनस्पते (यूपा), जेथें देवांची गूढ स्थानें तुला माहीत असतील तेथें तूं आमचे हवि पोंचीव.

११. मी अग्नि, वरुण, इंद्र, मरुत आणि देव यांना स्वाहा म्हणून हवि समर्पण करतों.

सूक्त सहावें.

ऋषिः—वसुश्रुत आत्रेय; देवता–अग्नि; छंदः—पंक्ति.

१. जो सर्व व्यापक आहे, ज्या सर्वाधाराकडे गाई (हवि देण्याकरतां) चलाख घोडे आणि नित्य (कर्म करणारे) समृद्ध भक्त जातात त्याची मी स्तुति करीत आहें. हे अग्ने, आम्हां स्तोत्यांना अन्न दे.

२. जो उदार म्हणून स्तविला जातो, ज्याकडे (होमाला दूध देण्याकरतां) गाई जातात. ज्याकडे चलाख घोडे जातात आणि ज्याची अभिजात स्तोते स्तुति करतात तो अग्नि होय.हे अग्ने,स्तोत्यांना अन्न दे.

३. सर्वद्रष्टा अग्निच लोकांना समृद्धि देतो. तो अग्निच प्रसन्न झाल्यावर सर्व प्रकारें उत्कृष्ट असणारी संपत्ति देतो. अशा हे अग्ने, स्तोत्यांना तूं अन्न दे.

४. हे अग्निदेवा, तेजस्वी आणि जरारहित असणाऱ्या तुला आम्ही सर्व बाजूंनीं प्रज्वलित करीत आहों. म्हणूनच ती तुझी उत्कृष्ट कांति द्युलोकांत प्रकाशत आहे. हे अग्ने, आम्हां स्तोत्यांना अन्न दे.

५. प्रकाशाधिपते अग्ने, प्रज्वलित झाल्यावर मंत्र म्हणून तुला हवि अर्पण केला जात आहे. हे अत्यंत आल्हादक असणाऱ्या, दर्शनीय व लोकाधिपते, तूं हवि वाहून नेणारा आहेस म्हणून तुझी स्तुति चालू असते. हे अग्ने, स्तोत्यांना तूं अन्न दे.

६. ते पसरलेले (अन्तर्हित) अग्नि (प्रत्यक्ष) अग्नींत सर्व संपत्तीला वृद्धिंगत करतात. ते सर्वांना

---

*टीपः—आप्रीसूक्त १.१३. पहा.

प्रेरणा देतात. ते सर्वांना प्रसन्न करतात आणि तेच हवि इच्छितात. हे अग्ने स्तोत्यांना तूं अन्न दे.

७. हे अग्ने ज्या ज्वाला आपल्या वेगानें गाईबैलांचे तांडे इच्छितात, तुझ्या त्या ज्वाला हविर्द्रव्यानें वृद्धिंगत होतात. हे अग्ने, तूं स्तोत्यांना अन्न दे.

८. हे अग्ने, तूं आम्हां स्तोत्यांना नवीन चांगलीं घरें आणि अन्न दे. जे आम्ही तुझी घरोघर स्तुति करीत आहोंत त्यांना तूं दूतासारखा प्राप्त व्हावास. हे अग्ने, तूं स्तोत्यांना अन्न दे.

९. हे अत्यंत आल्हादक अग्ने, तूं आमच्या तूपाच्या दोन पळ्या तोंडांत घेतोस. हे बलसंरक्षका, तूं आमच्या यज्ञांत आम्हांला फलप्रद हो. हे अग्ने, स्तोत्यांना अन्न दे.

१०. ह्या प्रकारें स्तोत्रें म्हणून आणि यज्ञ करून स्तोते अग्नीकडे जातात आणि यजन करतात. आम्हांला पराक्रमी संतति आणि ते चलाख घोडे प्राप्त होवोत. हे अग्ने तूं स्तोत्यांना अन्न दे.

सूक्त सातवें.

ऋषिः—इष आत्रेय; देवता-अग्नि; छन्दः—१-९ अनुष्टुभ् १० पंक्ति.

१. हे मित्रांनो, भक्ताकरतां अत्यंत पुरातन असणाऱ्या, बलपुत्र व बलिष्ठ अग्नीला चांगलें अन्न आणि स्तोत्र तयार करा.

२. जो अग्नि आला असतां लोक खूष होतात, यज्ञगृहांत ज्याला पूजा करणारे भक्त प्रज्वलित करतात आणि प्रज्वलित करण्याकरतां ज्याला प्राणी उत्पन्न करीत असतात तो अग्नि कोठें आहे ?

३. जेव्हां आम्ही इच्छा प्रगट करून स्तुति करतों व जेव्हां मनुष्यांचे हवि अग्नि स्वीकारतो तेव्हां अन्नसामर्थ्यानें पावसाचे किरण तो धारण करतो.

४. जेव्हां पावक आणि अजर अग्नि लांकडे जोरानें जाळूं लागतो तेव्हां लांबच्याहि लोकांना दिसतील अशी ज्वाला तो धारण करतो.

५. ज्याची पूजा चालू असतां स्वतःचीं मुलें पाठीवर चढावीत त्याप्रमाणें तूपाच्या आहुति अग्नीच्या ज्वालांत समर्पण केल्या जातात.

६. ज्याला मर्त्य अत्यंत स्पृहणीय मानतो तो सर्व व्यापून अन्नाला गोडी आणीत लोकांकरतां घरांत रहात असतो.

७. सुवर्णकेश, स्वच्छदंत, अजिंक्यसामर्थ्य असा महान् अग्नि (खाण्याकरतां गवत) तोडणाऱ्या पशूप्रमाणें निर्जल प्रदेशांत टाकलेलीं लांकडें जाळून टाकतो.

८. प्रज्वलित झालेला जो अग्नि खादाड पशूप्रमाणें किंवा कुऱ्हाडीप्रमाणें वनस्पतींचा फडशा पाडीत असतो व अन्न भक्षण करतो त्या कर्तृत्ववानाला सुप्रजा (अरणि) मातेनें उत्पन्न केलें.

९. हे घृतभक्षक अग्ने, जो तूं सर्वव्यापक आहेस त्या सर्वाधार अशा तुला (माझ्या स्तुतीनें) सुख होवो. तूं ह्या मर्त्यजनावर अनुग्रह कर. त्यांना अन्न आणि यश दे.

१० असें मननीय स्तोत्र करणारा भक्त तुझ्यापासून पशु मिळवील. नंतर आत्रि अभक्तांचा पराभव करील आणि दस्यूंचा आणि स्वार्थी लोकांचाहि पराभव करील.

सूक्त आठवें.

ऋषि:-इष आत्रेय; देवता-अग्नि; छंदः-जगती.

१. हे बलदात्या अग्ने, अत्यंत आल्हादक, यज्ञार्ह सर्वोत्पादक, उदार, गृहपति अशा पुरातन असणाऱ्या तुला प्राचीन, सत्याच्या मार्गी लागलेले लोक स्वतःला साहाय्य व्हावें म्हणून प्रदीप्त करीत होते.

२. हे अग्ने, आतिथीप्रमाणें पूज्य, पुरातन, प्रदीप्त ज्वाला असलेला, ध्वजा उभारलेला, अनेक स्वरूपाचा, धन देणारा, अत्यंत सुखदायक, संरक्षक, लांकडांना व्यापणारा आणि गृहपति अशा तुझी भक्त स्थापना करतात.

३. हे भाग्यशाली अग्ने, होमसाधक खऱ्याखोट्याचा निर्णय करणारा आणि संपत्तीचा दाता अशा तुझी लोक स्तुति करीत असतात. तो गूढ स्थलीं राहणारा, सर्वांना दर्शनीय, यज्ञार्ह, मोठा आवाज करणारा आणि तुपावर अवलंबून असणारा आहे.

४. हे अग्ने, सर्वाधार असणाऱ्या तुझी आम्ही अनेक प्रकारें स्तोत्रें गाऊन आणि नमस्कार करून सेवा करीत आहोंत. हे अंगिरस अग्ने, प्रज्वलित झालेला तो तूं आपल्या ज्वालांनीं त्याला यशासह संपत्ति दे.

५. हे अग्ने, अनेक स्वरूपें असणारा तूं प्रत्येक माणसाला पूर्वीप्रमाणेंच अन्न देतोस. हे बहुस्तुत अग्ने, तूं आपल्या सामर्थ्यानें अनेक अन्नाचा ईश्वर आहेस.

तेजस्वी असणाऱ्या तुझें तेज कोणी सहन करूं शकत नाहीं.

६. हे अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, प्रज्वलित झालेल्या तुला देवांनीं हविर्वाहक बनविला आहे. वेगशाली, तुपानें वाढणाऱ्या आणि आहुति दिलेल्या तुला देवांनीं केवळ इच्छेनें हालचाल करणारा डोळा करून धारण केलें आहे.

७. हे अग्ने, प्राचीन, सुख इच्छिणाऱ्या यजमानांनीं तुला तूप आणि चांगल्या समिधा अर्पण करून प्रज्वलित केलें आहे. लांकडें घालून प्रज्वलित केलेला तूं पार्थिव अन्नावर अवलंबून असतोस.

सूक्त नववें.

ऋषिः—गय आत्रेय; देवता–अग्नि; छन्दः—५–७ पंक्ति, अवशिष्ट अनुष्टुभ.

१. हे अग्ने, हविर्युक्त लोक तुझी स्तुति करीत असतात. तुला मी सर्वज्ञ मानतों. तो तूं सतत हविर्द्रव्यें वाहून नेत असतोस.

२. ज्या अग्नीकडे सर्व यज्ञ जातात आणि ज्याच्याकडे कीर्तिप्रद हवि जात असतात तो अग्नि दात्या आणि दर्भ तोडून तयार करणाऱ्या यजमानाकरतां देवांना बोलावणारा होतो.

३. सर्व मानवसृष्टीचा आधार अशा सुयज्ञ अग्नीला नूतन बालकाप्रमाणें दोन अरणींनीं उत्पन्न केलें.

४. सापाच्या पिल्लाप्रमाणें तुला पकडणें मोठें कठिण आहे. कारण हे अग्ने, पशु गवत खातो त्याप्रमाणें तूं सर्व अरण्यें जाळून टाकतोस.

५. ह्या धूम्रवेष्टित अग्नीच्या ज्वाला सारख्या वर चालल्या आहेत. कारण, एकाद्या लोहाराप्रमाणें त्रित ह्या अग्नीला सारखा प्रज्वलित करीत आहे आणि शिकलगाराप्रमाणें तीक्ष्ण करीत आहे.

६. हे अग्ने, मित्रभूत अशा तुझ्या साहाय्यानें आणि स्तुतीनें मानवी पापांतून दुष्ट शत्रूप्रमाणें आम्ही पार पडूं.

७. हे अग्ने, हे बलवन, भक्तांच्या द्वारा आम्हांला तें ऐश्वर्य प्राप्त होवो. तो शत्रूंना नष्ट करो आणि आमचें पोषण करो. तो आम्हाला अन्नाचा लाभ घडुन देणारा होवो. हे अग्ने, युद्धांत तूं आम्हाला समृद्ध कर.

सूक्त दहावें.

ऋषिः—गय आत्रेय; देवता–अग्नि; छन्दः—४·७. पंक्ति, अवशिष्ट अनुष्टुभ.

१. हे अग्ने, तूं अत्यंत बलशाली संपत्ति आम्हांस दे. हे अप्रतिगमना, आम्हांला अपार संपत्तीनें युक्त कर. तसेंच अन्नप्राप्तीचा मार्ग आखून दे.

२. हे अद्भुत अग्ने, तुझ्या संबंधीच्या कृत्यानें तूं आम्हाला सामर्थ्य देणारा हो. तुझे ठिकाणीं सामर्थ्य आहे म्हणून तूं सूर्याप्रमाणें यज्ञार्ह असणारा कर्तृत्व कर.

३. हे अग्ने, ज्या श्रेष्ठ भक्तांनीं स्तोत्रें म्हणून संपत्ति प्राप्त केली आहे त्यांच्या व आमच्या घराचा आणि समृद्धीचा उत्कर्ष कर.

४. हे आल्हादक अग्ने, जे लोक तुझी उत्कृष्ट स्तोत्रें करतात ते अश्वसमृद्ध होतात. ते बलांनीं बलवान होतात. त्या भक्तांचीच कीर्ति स्वर्गापर्यंत जाते.

५. आकाशांत चहूकडे चमकणाऱ्या, विजेप्रमाणें घडघडणाऱ्या रथाप्रमाणें आणि अनेच्छु योध्याप्रमाणें तुझ्या त्या तेजस्वी ज्वाला जोरानें चहूकडे जात आहेत.

६. हे अग्ने, आमच्या रक्षणाकरतां आणि दुःखीकष्टी लोकांना संपत्ति देण्याकरतां तूं ये. आमचे सर्व लोक आशा तरून जाण्यास समर्थ होवोत.

७. हे अंगिर अग्ने, पूर्वीच्या लोकांनीं स्तुति केलेला आणि सध्यां स्तुति केला जाणारा तूं आम्हाला सर्वश्रेष्ठ ऐश्वर्य दे. हे देवांना बोलावणाऱ्या, स्तोत्यांना स्तुति करण्याचें सामर्थ्य दे आणि युद्धांत आमचा उत्कर्ष करणारा हो.

सूक्त अकरावें

ऋषिः—सुतंभर आत्रेय; देवता–अग्नि; छन्दः—जगती.

१. लोकसंरक्षक, जागरूक आणि अत्यंत बलशाली असणारा अग्नि अत्यंत कल्याण करण्याकरतां प्रगट झाला आहे. तुपानें प्रज्वलित होणारा शुद्ध अग्नि आकाशाला स्पर्श करणाऱ्या मोठ्या ज्वालांनीं भक्तांकरतां अत्यंत प्रकाशूं लागला आहे.

२. यज्ञाचा ध्वज असणाऱ्या, पुढें स्थापन केलेल्या श्रेष्ठ अग्नीस तीन स्थलीं भक्त प्रज्वलित करतात. चांगलीं कृत्यें करणारा आणि देवांना बोलावणारा तो अग्नि इंद्र आणि देवांसह यज्ञाकरतां दर्भावर अधिष्ठित होवो.

३. हे अग्ने, तूं दोन (अरणी) आयांना त्रास न देतांच उत्पन्न होतोस. प्रशंसनीय, शुद्ध आणि

दिव्यदृष्टि असणारा तूं यजमानाकरतां उत्पन्न झालास. लोकांनीं तुला तुपाच्या आहुति देऊन वाढविलें. हे आहुति दिलेल्या अग्ने, तुझ्या धुराची पताका आकाशाला जाऊन भिडली.

४. कार्यसिद्धि करणारा अग्नि आमच्या यज्ञांत येवो. लोक अग्नीला घरोघर मिरवतात. अग्नि हवि वाहून नेणारा दूत झाला आहे. बुद्धिमान लोक यज्ञकर्त्या अग्नीची स्तुति करीत असतात.

५. हे अग्ने, ही अत्यंत मधुर असणारी स्तुति तुझ्याकरतां आहे. तुझ्या अंतःकरणाला सुखप्रद असणारें स्तोत्र चालूं आहे. मोठाल्या नद्या समुद्राकडे जातात त्याप्रमाणें आमचीं स्तोत्रें तुला समर्थ करतात. तुझें बल वाढवितात.

६. हे अग्ने, गूढ स्थलीं आणि प्रत्येक वनस्पतींत असणाऱ्या तुला अंगिरसांनीं शोधून काढलें. मोठ्या सामर्थ्यानें त्यानें तुला घुसळून उत्पन्न केले. हे अंगिरा, तुला बलपुत्र म्हणतात.

सूक्त बारावें.

ऋषिः—सुतंभर; देवता–अग्नि, छंदः—त्रिष्टुभ.

१. उदकांचा वर्षाव करणाऱ्या, बलिष्ठ कामपूरक अशा थोर अग्नीची तोंडांत स्वच्छ तूप घालावें त्याप्रमाणें सरळ स्तुति यज्ञांत करावी.

२. हे ज्ञात्या अग्ने, मी केलेलें स्तोत्र तूं लक्षांत घे. आणि अनेक उदकांच्या धारा उत्पन्न कर. मी बल आहे म्हणून हिंसा करणार नाहीं. किंवा दुटप्पीपणानेंहि मी धर्म करीत नाहीं तर तेजस्वी आणि कामपूरक अग्नीचीच मी स्तुति करीत आहें.

३. हे अग्ने, उदक उत्पन्न करीत प्रशंसनीय असणारा तूं कोणत्या तरी कृत्यानें आमच्या स्तोत्राचा ज्ञाता हो. ऋतुसंरक्षक असणारा अग्निदेव मला ध्यानांत घेवो. (अग्नीशिवाय) भक्त असणाऱ्या माझ्या ऐश्वर्याचा धनी मी जाणत नाहीं.

४. हे अग्ने, जे आपल्या शत्रूंना प्रतिबंध करतात ते लोक कसे आहेत ? जे लोकसंरक्षक आणि तेजस्वी लोक गरीबांना धन देतात त कसे आहेत? जे खोट्या लोकांचें संरक्षण करतात असे कोण आहेत ? आणि खोट्यांचें संरक्षण करणारे तरी कोण आहेत.

५. हे अग्ने, तुझे मित्र सर्वत्र पसरलेले आहेत. जे पूर्वी अभद्र होते, त तुझ्या कृपेनें शुभ झालेले आहेत. तसेंच सरळ वर्तन करणाऱ्या मला जे वाईट बोलले होते त्यांचा आपोआप नाश झाला आहे.

६. हे अग्ने, जो यज्ञार्ह असणाऱ्या तुझें स्तोत्र म्हणून स्तुति करीत असतो आणि हवि देत असतो, तो तेजस्वी आणि कामपूरक अग्नीचें यज्ञांत संरक्षण करतो. त्याला विस्तीर्ण घर प्राप्त होतें आणि त्या महाभक्ताला पुत्र होतो.

सूक्त तेरावें.

ऋषिः—सुतंभर; देवता–अग्नि; छंदः—गायत्री.

१. हे अग्ने, तुझी पूजा करणारे आम्ही तुझा धांवा करीत आहोंत. तुझें अर्चन करणारे आम्ही मदतीकरतां तुला प्रज्वलित करीत आहोंत.

२. ऐश्वर्याची इच्छा करणारे आम्ही आकाशांत व्यापून असणाऱ्या अग्निदेवाचा प्रसाद करणारें स्तोत्र आज करीत आहोंत.

३. देवांना बोलावणारा जो अग्नि जगांत आमची स्तुति ग्रहण करतो तो अग्नि देवांना हवि पोंचवो.

४. हे अग्ने, प्रसन्न आणि श्रेष्ठ असणारा तूं सर्वव्यापक आहेस. तुझ्या साहाय्यानें सर्व लोक यज्ञ करतात.

५. हे अग्ने, अत्यंत बल देणाऱ्या आणि प्रशंसनीय असणाऱ्या तुझा सर्व भक्त उत्कर्ष करतात. तो तूं आम्हाला सामर्थ्यसंपन्न ऐश्वर्य दे.

६. हे अग्ने, चाकाचा धांव अरे झांकून टाकतात त्याप्रमाणें तूं सर्व देवांना (स्वतःच्या तेजानें) मागें टाकणारा आहेस. तूं स्तोत्यांना आश्चर्यकारक संपत्ति दे.

सूक्त चवदावें.

ऋषिः—सुतंभर; देवता–अग्नि; छंदः—गायत्री.

१. हे स्तोत्या, स्तोत्र म्हणून अमर अग्नीला प्रज्वलित कर. कारण, प्रज्वलित झाल्यावर तो देवांकडे हवि नेईल.

२. लोक जगांत तेजस्वी यज्ञीय अग्नीला यज्ञांत स्तवीत असतात.

३. हवि वाहून नेण्याकरतां तुपाच्या आहुति देणारे पळी घेतलेले अनेक स्तोते अग्नीची स्तुति करतात.

४. प्रकट झालेला अग्नि दस्यूंना ठार करीत तेजानें प्रकाशला आणि त्यानें गाई, उदक आणि सूर्य मिळवला.

५. हे लोकांनों, स्तुत्य, ज्ञात्या आणि प्रज्वलित अग्नीची तुम्ही पूजा करा. अग्नि माझा धांवा ऐको.

६. तुपाची आहुति देऊन आणि स्तोत्रें म्हणून स्तुतीची इच्छा करणाऱ्या देखण्या देवांसह लोकद्रष्ट्या अग्नीनीं भक्तांचा उत्कर्ष केला.

सूक्त पंधरावें.

ऋषिः--धरुण आंगिरस; देवता-अग्नि; छंदः--त्रिष्टुभ्.

१. जो अग्नि तुपानें प्रसन्न झालेला, बलवान्, सुखीसंपत्तीचा आधार, हवि ग्रहण करणारा आणि व्यापक आहे त्या त्रिधाऱ्या, ज्ञात्या, स्तुत्य, यशस्वी आणि मुख्य अग्नीची मी प्रशंसा करतों.

२. जे भक्त द्युलोकाला आधार असणाऱ्या यज्ञांत बसलेल्या देवांना आणि न आलेल्या देवांना ऋत्विजांकडून सेवितात, ते भक्त यज्ञाधार व सत्यस्वरूप अग्नीला यज्ञ करण्याकरतां चांगल्या चांगल्या स्थानीं स्तुति करून स्थापन करतात.

३. जे लोक श्रेष्ठ अग्नीला पुष्कळ दुष्प्राप्य अन्न समर्पण करतात ते स्वतःला पापनिर्मुक्त करतात. नुकताच उत्पन्न झालेला तो अग्नि शत्रूंना नष्ट करो. प्राणी रागावलेल्या सिंहाला टाळतात त्याप्रमाणें मला शत्रूंनीं टाळावें.

४. सर्वव्यापक असणारा तूं आईप्रमाणें सर्व लोकांचें पोषण करतोस. आधाराकरतां आणि ज्ञानाकरतां सर्वांकडून तुझीच प्रार्थना केली जाते. स्थापना केलेला अग्नि जेव्हां सर्व अन्न भक्षण करतो तेव्हां आपणहून तो अनेक रूपानें सर्व व्यापून टाकतो.

५. हे अग्निदेवा, थोर, कामपूरक, द्रव्याधार, असें अन्न तुझ्या सामर्थ्यांचें शेवटपर्यंत (चोर आपली संपत्ति गुहेंत लपून ठेवून करतो त्याप्रमाणें) संरक्षण करो. संपत्ति मिळविण्याचा मोठा मार्ग प्रकाशित करीत तूं अत्रि ऋषीला प्रसन्न केलेंस.

सूक्त सोळावें.

ऋषिः—पुरु आत्रेय; देवता-अग्नि; छन्दः—१-४ अनुष्टुभ, ५ पंक्ति.

१. प्रज्वलित अग्नीला विपुल अन्न समर्पण करतात. म्हणून तूं प्रज्वलित अग्नीला अन्न समर्पण कर. कारण, लोक मित्राप्रमाणें अग्नीची प्रशंसा करून त्याला पुढें घेतात.

२. जो अग्नि देवांना हवि पोंचवतो तो बाहुबलशाली अग्नि भक्तांकरतां देवांना बोलावतो आणि भगा(सूर्या) प्रमाणें उत्कृष्ट संपत्ति देतो.

३. धनवान आणि प्रज्वलित अशा ह्या अग्नीच्या मैत्रींत आणि स्तुतींत आम्ही असावें. गर्जना करणाऱ्या ह्या सर्वाधीश अग्नींत स्तोते बल उत्पन्न करतात.

४. हे अग्ने, ह्या भक्तांना सर्वश्रेष्ठ संपत्ति देणारा हो. द्यावापृथ्वी सूर्याप्रमाणें त्या सर्व प्रसिद्ध अग्नीचीच उपासना करतात.

५. हे अग्ने, स्तुति चालूं असतां तूं लवकर ये. आणि आम्हाला संपत्ति दे. जे स्तोते आणि जे भक्त हवि घेऊन स्तुति करतात त्या आमचा तूं युद्धांत उत्कर्ष करणारा हो.

सूक्त सतरावें

ऋषिः—पुरु आत्रेय, देवता-अग्नि; छन्दः—१-४ अनुष्टुभ, ५ पंक्ति.

१. हे देवा, मनुष्य तेजांनीं वाढलेल्या अग्नीला अशा प्रकारें स्तोत्रें म्हणून तृप्त करण्याकरतां बोलावतो. मनुष्य यज्ञ केल्यावर साहाय्याकरतां अग्नीची स्तुति करतो.

२. हे स्तोत्या, अत्यंत यशस्वी असणारा तूं स्तोत्र म्हणून ह्या अग्नीची मुखानें स्तुति कर. कारण तो सुखदायक, आश्चर्यकारक, कांति असणारा आणि प्रशंसनीय आहे.

३. जो अग्नि प्रशंसा आणि सामर्थ्य यांनीं युक्त आहे, सूर्याप्रमाणें ज्याच्या तेजानें सर्व जग व्यापलेलें आहे, ज्याच्या ज्वाला प्रकाशत आहेत त्या अग्नीच्याच कांतीनें सूर्यहि तेजस्वी झाला आहे.

४ ज्ञाते भक्त ह्या दर्शनीय अग्नींतील यज्ञानें संपत्ति आणि रथ मिळवतात. यज्ञाकरतां बोलावलेला तो अग्नि उत्पन्न झाल्याबरोबर सर्व लोकांत स्तविला जातो.

५. हे अग्ने, आम्हांला उत्कृष्ट संपत्ति दे. कारण, स्तोते तोंडानें स्तोत्रें म्हणून धन मिळवतात. हे बलपुत्रा, इच्छा करणाऱ्या मला अन्न दे. आमचें संरक्षण कर. सुखसमृद्धीकरतां समर्थ कर. आणि युद्धांत आमचा तूं उत्कर्ष कर.

सूक्त आठरावें.

ऋषिः—मृक्तवाह द्वित आत्रेय; देवता–अग्नि; छंदः–१–४ अनुष्टुभ, ५ पंक्ति.

१. जो अमर अग्नि जगांत असलेल्या सर्व हवींची इच्छा करतो तो संपत्तीचा आधार असणारा लोकप्रिय अग्नि अतिथीप्रमाणें स्तुति केला जातो.

२. हे अग्ने, शुद्ध हवि देणाऱ्या द्विताला तूं उत्कृष्ट संपत्ति देणारा हो. हे अमर्त्य अग्ने, कारण, तो तुला सतत सोम देणारा आहे आणि स्तोता आहे.

३. हे घोडे देणाऱ्या अग्ने, ज्या धनिकांचा रथ युद्धांत सुरक्षित रहातो त्यांच्याकरतां लांबपर्यंत प्रकाशणाऱ्या तुझा मी स्तोत्रें म्हणून धांवा करीत आहे.

४. जे अनेक क्रिया करतात आणि जे अनेक प्रकारचीं स्तोत्रें पाठ करून ठेवतात त्या लोकांनीं पसरलेल्या दर्भावर यज्ञांत हवि ठेवले जातात.

५. ज्या धनवानांनीं मला तुझी स्तुति केल्यावर पन्नास घोडे दिले आणि हे अमर अग्ने, त्या धनवन्तांना तूं तेजस्वी आणि नोकरचाकरांनीं भरभराटीची असलेली अन्नसमृद्धि दे.

सूक्त एकोणिसावें.

ऋषिः—वव्रि आत्रेय; देवता–अग्नि; छंदः—१–२ गायत्री, ३–४ अनुष्टूभ, ५ विराज.

१. वव्रीची स्थिति मोठी वाईट होत चालली आहे. जो पृथ्वीवर सर्वत्र नजर फेकतो तो वव्रीचा अग्नि व वव्रीची स्थिति जाणत असेलच.

२. जे तुझे प्रभाव जाणून सदोदित तुझा धांवा करीत असतात आणि हवि देऊन तुझ्या सामर्थ्याचें रक्षण करतात ते बळकट नगरांत प्रविष्ट होतात.

३. लोकांनीं मधुर स्तोत्रें करून अग्नीचें सामर्थ्य वाढविलें. सामर्थ्येच्छु सुवर्णालंकारमंडित बृहदुक्थानें मधुर स्तुति केली.

४. भांड्याप्रमाणें अन्नपूर्ण, अहिंस्य शत्रूंची हिंसा करणारा आणि शाश्वत अग्नि द्यावापृथ्वींना साहाय्य करीत दुधाप्रमाणें स्पृहणीय असणारें निर्दोष स्तोत्र श्रवण करो.

५. हे कान्तिमान अग्ने, तूं क्रीडा करीत असतां वाऱ्यानें उडणाऱ्या राखेनें लक्षांत येणारा तूं आमच्याकडे लक्ष दे. अग्नींत असणाऱ्या शत्रूनाशक तीक्ष्ण ज्वाला आम्हांला त्रासदायक न होवोत.

सूक्त विसावें.

ऋषिः—अनेक प्रयस्वत् अत्रि; देवता–अग्नि छंदः–१–३ अनुष्टुभ, अवशिष्ट पंक्ति.

१. हे अन्न देणाऱ्या अग्ने, आम्ही दिलेलें जें (हवि रूपी) धन तूं ध्यानांत घेतोस तो तूं आमचें सुप्रसिद्ध स्तुतियुक्त हविर्धन देवाकडे पोंचीव.

२. हे अग्ने, जे लोक समृद्ध असूनहि हवि देत नसतील ते उत्कट बलानें हीन होतात. तसेंच भलतेच नेमधर्म पाळणारांचा द्वेष आणि त्रास आपणावर ओढून घेतात.

३. हे अग्ने, प्रयस्वत् नांवाचे आम्ही बलदायक आणि देवांना बोलावणाऱ्या तुला बोलावतों आहोंत. तसेंच यज्ञांतील प्रमुख असणाऱ्या तुझीं स्तोत्रें म्हणूनं स्तुति करीत आहों.

४ हे बलवान् अग्ने, प्रत्यहीं आम्हांला तुझें साहाय्य मिळेल असें तूं कर. धन मिळेल आणि आम्ही चांगलीं कृत्यें करूं असें तूं कर. हे चांगलीं कृत्यें करणाऱ्या अग्ने, आम्ही मुलेंबाळें आणि पशुसंपत्ति यांनीं नेहेमी आनंदांत रहावें.

सूक्त एकविसावें.

ऋषिः—सस आत्रेय; देवता–अग्नि; छंदः—१–३ अनुष्टुभ, ४ पंक्ति

१. हे अग्ने, आम्ही तुझी मनूप्रमाणें स्थापना केली आहे. आणि मनूप्रमाणें आम्ही तुला प्रज्वलित करीत आहोंत. हे अंगिरा अग्ने, देवभक्ताकरतां तूं देवांना हवि पोंचीव.

२. हे तुपाच्या आहुति दिलेल्या सुजन्म अग्ने, लोकांत तुला प्रसन्न करून प्रज्वलित केलें जातें. स्रुचा तुझ्याकडे सारख्या येत असतात.

३. एका विचारानें सर्व देवांनीं तुला दूत केलें आहे. म्हणून हे ज्ञात्या, भक्त लोक तेजस्वी असणाऱ्या तुझी यज्ञांत स्तुति करीत असतात.

४. मर्त्य देवांना तृप्त करण्याकरतां त्या अग्निदेवाची स्तुति करीत असतात. हे तेजस्वी अग्ने तूं प्रज्वलित होऊन प्रकाशत रहा. तूं यज्ञाच्या वेदीवर येऊन बैस. तूं ससाच्या यज्ञांत येऊन बैस.

---

३. श्वैत्रेय—अग्नि किंवा व्यक्तीचें नांव—सायण श्वैत्रेय व बृहदुक्थ दोन्ही नांवें नाहींत असें समजतो.

सूक्त बाविसावें.

ऋषिः--विश्वसामन् आत्रेय;देवता-अग्नि; छंदः---१-३ अनुष्टुभ, ४ पंक्ति.

१. हे विश्वसामन्, जो यज्ञांत स्तुत्य, देवांना बोलावणारा आणि लोकांना आनंददायक आहे त्या पवित्रकांति अग्नीची तूं अत्रीप्रमाणें पूजा कर.

२. हे यज्ञ करणारांनो, प्रत्येक ऋतूंत यज्ञ केल्या जाणाऱ्या सर्वज्ञ अग्नीची तुम्ही स्थापना करा. देवप्रिय यज्ञ आज देवांना सारखा पोंचो.

३. हे अग्ने, ज्ञात्या अंतःकरणाच्या तुला आम्ही भक्त लोक साहाय्याकरतां आणि श्रेष्ठ असा तूं प्रसन्न व्हावेंस म्हणून स्तवन करीत आहोंत.

४. हे बलपुत्र अग्ने,ह्या आमचें स्तोत्र तूं ध्यानांत घे. हे उत्तम शिरस्त्राण घातलेल्या गृहपति अग्ने, तुला अत्रि स्तोत्रें म्हणून वृद्धिंगत करतात आणि स्तोत्रें म्हणूम सुशोभित करतात.

सूक्त तेविसावें.

ऋषिः--द्युम्न; देवता-अग्नि; छंदः---१-१३ अनुष्टुभ ४ पंक्ति.

१. अग्निदेवा जो तुझीं स्तोत्रें म्हणून युद्धांत सर्व लोकांचा पराभव करतो तो बलशाली असणारा तूं बलिष्ठ शत्रूंचा पराभव करणारें ऐश्वर्य मला दे.

२. हे अग्ने, सत्य व अद्भूत असणारा तूं गाई, बैल व संपत्ति देणारा आहेस. तूं मला शत्रूंच्या सैन्याचा पराभव करणारा पुत्र द्यावास.

३. अग्निदेवा, एक विचारानें असणारे सर्व भक्त लोक यज्ञगृहांत देवांना बोलावणाऱ्या आवडत्या तुला मूल्यवान विपुल संपत्ति मागत आहेत.

४. लोकद्रष्टा प्रसिद्ध अग्निदेव शत्रूंचे पराभव करणारें सामर्थ्य आम्हाला देवो. हे शुद्ध अग्ने, आमच्या ह्या घरास संपत्तिपूर्ण करून प्रकाशित कर. तसेंच हे पावका, आम्हांला यशस्वी करून प्रकाशित हो.

सूक्त चोविसावें.

ऋषिः—बंधु, सुबंधु श्रुतबंधु आणि विप्रबंधु; देवता-अग्नि;छंदः—द्विपदा विराज.

१.२. हे अग्ने, संरक्षक साधनांनीं असणारा तूं अगदीं जवळचा ऐस. तूं आमचें संरक्षण करणारा आणि आम्हांला सुखकारक हो. ऐश्वर्यवान म्हणून प्रसिद्ध असणारा व्यापक अग्नि आम्हावर अनुग्रह करो आणि आम्हांला अत्यंत उज्ज्वल संपत्ति देवो.

३.४. अग्निदेवा, प्रसिद्ध असणारा तूं आम्हाकरतां जागृत हो. आणि आमचा धांवा ऐक. सर्व दुष्ट लोकांपासून तूं आमचें संरक्षण कर. हे अत्यंत प्रज्वलित असणाऱ्या तेजस्वी अग्ने, त्या तुझी आम्ही सुखाकरतां आणि मुलाबाळांकरतां प्रार्थना करीत आहोंत.

टीपः---येथें प्रत्येक ओळीची एक ऋचा समजून चार ऋचा होतात. वास्तविक दोनच ऋचा आहेत.

सूक्त पंचाविसावें.

ऋषिः—अनेक वसूयु आत्रेय; देवता-अग्नि; छंदः—अनुष्टुभ्.

१. हे वसूयूंनो, तुम्ही अग्निदेवाची साहाय्याकरतां स्तोत्रें गा. व्यापक अग्नि आम्हाला संपत्ति देवो. उदक उत्पन्न करणारा ऋषिपुत्र अग्नि आम्हाला शत्रूंतून पार पाडो.

२. पुरातन महर्षींनीं देवांना बोलावणाऱ्या आणि आनंददायक, जिव्हास्थानीं असलेल्या ज्या प्रभाधन अग्नीला चांगल्या ज्वाला उत्पन्न करून प्रज्वलित केलें, देवांनींहि ज्याला प्रदीप्त केलें, तो अग्नीच सत्यस्वरूप आहे.

३. चांगलीं स्तोत्रें म्हणून स्तुति केली जाणाऱ्या हे श्रेष्ठ अग्ने, तूं आमच्या चांगल्या स्तोत्रानें, उत्कृष्ट परिचर्येनें प्रसन्न होऊन आम्हांला संपत्ति दे.

४. जो अग्नि देवांमध्यें प्रकाशत असतो, जो लोकांमध्यें प्रविष्ट झाला आहे आणि जो आमचा हवि वाहून नेतो त्या अग्नीचीं स्तोत्रें म्हणून सेवा करा.

५. अग्नि समृद्ध, अनेक स्तोत्रें म्हणणारा, उत्कृष्ट संरक्षक, कुलाची कीर्ति वाढविणारा असा पुत्र दात्याला देतो.

६. जो मुलगा युद्ध करून लोकांसह शत्रूंना पराभूत करतों तसा सज्जनसंरक्षक पुत्र अग्नि देतो. अग्नि चलाख, न हटणारा आणि जेता घोडा मला देतो.

७. जें सामर्थ्य देणारें स्तोत्र आहे ते अग्नीकरतां केलें जातें. हे प्रभाधन अग्ने, आम्हांला विपुल अन्न दे. कारण, तुझ्यापासूनच विपुल संपत्ति उत्पन्न होते आणि तुझ्यापासूनच अन्न निर्माण होतें.

८. हे अग्ने, तुझ्या ज्वाला तेजस्वी आहेत. थोर असणारा तूं सोम कुटण्याच्या दगडाप्रमाणें स्तुति केला जात आहेस. तसेंच प्रकाशणाऱ्या तुझा शब्द मेघाप्रमाणें आपोआप बाहेर पडतो.

९. आम्ही वसूयु बलिष्ठ असणाऱ्या अग्नीची अशी स्तुति करीत आहोंत. तो पराक्रमी अग्नि नौके-प्रमाणें आम्हाला सर्व शत्रूंच्या पार नेवो.

सूक्त सव्विसावें.

ऋषि:—वसूयू; देवता–अग्नि; छंद:—गायत्री.

१. हे पावक अग्निदेवा, तूं आपल्या मादक आणि तेजस्वी जिव्हेनें देवांना घेऊन ये आणि तृप्त कर.

२. हे तुपानें उत्पन्न झालेल्या, आश्चर्यकारक प्रकाश असलेल्या अग्निदेवा, सर्वद्रष्ट्या अशा प्रसिद्ध अशा तुझी आम्ही प्रार्थना करीत आहोंत. म्हणून हवि भक्षणाकरतां देवांना घेऊन ये.

३. हे ज्ञात्या अग्ने, यज्ञाला चांगुलपणा आणणाऱ्या तेजस्वी व थोर अशा तुला आम्ही यज्ञांत प्रज्वलित करीत आहोंत.

४. हे अग्ने, सर्व देवांसह हवि देणाऱ्या यजमानाकरतां तूं ये. देवांना बोलावणाऱ्या तुझी आम्ही प्रार्थना करीत आहोंत.

५. हे अग्ने, सोम तयार करणाऱ्या यजमानाला तूं उत्कृष्ट सामर्थ्य दे. तसेंच देवांसह यज्ञांत येऊन बैस.

६. हे हजारांना जिंकणाऱ्या अग्ने, प्रज्वलित झाल्यावर प्रशंसनीय असणारा तूं देवांचा दूत होऊन आमचीं धर्मकृत्यें यथासांग करतोस.

७. हे भक्तांनो, सर्वज्ञ, हवन केलेलें वाहून नेणाऱ्या, अत्यंत तरुण आणि प्रत्येक ऋतूंत यजन केल्या जाणाऱ्या अग्नीदेवाची स्थापना करा.

८. आज स्तोत्यांनीं व्यापलेला यज्ञ देवांकडे जावो. हे ऋत्विजांनो, अग्नीला बसण्याकरतां दर्भ पसरा.

९. मरुत, दोघे अश्विन, मित्र, वरुण हे देव आपल्या सर्व लोकांसह ह्या दर्भावर बसोत.

सूक्त सत्ताविसावें.

ऋषि:—त्र्यरुण त्रैवृष्ण, त्रसदस्यु पौरुकुत्स्य, अश्वमेध भारत किंवा अत्रि; देवता–१–५ अग्नि, ६ इंद्र व अग्नि, छंद:—१–३ त्रिष्टुभ्, ४–६ अनुष्टुभ्.

१. हे वैश्वानर अग्ने, सज्जनाचें संरक्षण करणारा अत्यंत ज्ञाता, बलवान, धनवान अशा त्रैवृष्ण त्र्यरुणानें गाईसहित दोन बैल दहा हजार संपत्तीसह दिले.

२. ज्या त्र्यरुणानें शंभर भार सोनें, वीस गाई, रथाला जोडलेले व चालीवर चाललेले दोन घोडे मला दिले. हे वैश्वानर अग्ने, आम्ही चांगली स्तुति केलेला आणि प्रज्वलित केलेला तो तूं त्या त्र्यरुणाला सुख दे.

३. जो त्र्यरुण मुलेंबाळें असलेल्या माझीं अनेक स्तोत्रें ऐकून प्रसन्न होतो आणि मोकळ्या मनानें मला म्हणतो, हें घे हे घे. तसेंच हे अग्ने, अत्यंत स्तुत्य असणाऱ्या तुझें अत्यंत नवें स्तोत्र इच्छिणारा त्रसदस्युहि मला म्हणतो.

४. जो दान देणाऱ्या अश्वमेधाला मला दे म्हणतो, स्तोत्रांसह येणाऱ्या त्या याचकाला तो धन देतो. हे अग्ने, यज्ञ करूं इच्छिणाऱ्या अश्वमेधाला धन दे.

५. ज्या अश्वमेधानें दान म्हणून दिलेले सुंदर शंभर बैल मला आनंदित करतात ते त्र्याशिर (दधि-सक्तुपयमिश्रित) सोमाप्रमाणें आनंददायक आहेत.

६. हे इंद्राग्नीनो, शेकड्यानें दान देणाऱ्या अश्वमेध राजाला द्युलोकांतील सूर्याप्रमाणें सामर्थ्यसंपन्न, क्षीण न होणारें आणि विपुल धन द्या.

सूक्त अठ्ठाविसावें.

ऋषि:—विश्ववारा अत्रिगोत्रोत्पन्ना; देवता–अग्नि; छंद:—१–३ त्रिष्टुभ्, २ जगती, ४ अनुष्टुभ्. ५–६ गायत्री.

१. प्रज्वलित झालेला अग्नि अन्तरिक्षांत चमकत असतो. तसेंच प्रातःकालीं उज्ज्वल प्रकाशत असतो. स्तोत्रें म्हणून देवांची स्तुति करीत, हवि देत विश्ववारा अग्नीला सामोरी होत आहे.

२. हे अग्ने, प्रज्वलित झाल्यावर तूं उदकाचा स्वामी असतोस. हवि देणाऱ्याचें तूं कल्याण करतोस. ज्याच्याकडे तूं जातोस त्याला संपूर्ण संपत्ति देतोस. म्हणूनच आतिथ्यरूप हवि तुझ्यापुढेंच ठेवलेला असतो.

३. हे अग्ने, आम्हाला भाग्यशाली करण्याकरतां शत्रूचा पराभव कर. तुझें तेज उत्तम आहे. आमचें नवराबायकोचें नातें पक्कें राहूं दे. शत्रूंच्या सामर्थ्यावर चढाई कर.

४. हे अग्ने, प्रज्वलित होऊन प्रकाशणाऱ्या तुझी

मी स्तुति करतें. बलवान असणारा तूं संपत्तिमानहि आहेस. तूं यज्ञामध्यें प्रदीप्त केला जातोस.

५. हे आहुति दिलेल्या सुयज्ञ अग्ने, प्रज्वलित झालेला तूं देवांना तृप्त कर. कारण, हे अग्ने, तूं हवि वाहून नेणारा आहेस.

६. हे ऋत्विजांनो, यज्ञ सुरूं झाल्यावर तुम्ही अग्नींत आहुति द्या, त्याची सेवा करा आणि हव्यवाहन नांवाच्या अग्नीचा स्वीकार करा.

सूक्त एकूणतिसावें.

ऋषिः—गौरीविती शक्तिगोत्रोत्पन्न; देवता–इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ.

१. जे प्रसिद्ध तीन तेजोगोल आहेत ते तेजस्वी स्वर्गीय तेजोगोल (वायु, अग्नि आणि सूर्य) आहेत त्यांना मरुतांनीं धारण केलें आहे. शुद्धसामर्थ्य मरुत हे इंद्रा, तुझी स्तुति करीत असतात. प्रतिभावान असणारा तूं ह्या मरुतांचा द्रष्टा आहेस.

२. जेव्हां मरुत तृप्तिप्रद सोम पिण्याऱ्या ह्या इंद्राची स्तुति करतात तेव्हां तो वज्र घेतो. जेव्हां त्यानें अहीला ठार केलें तेव्हां स्वैर जाण्याकरतां मोठाले उदकाचे प्रवाह उत्पन्न केले.

३. हे थोर मरुतांनो, तुम्ही आणि इंद्र हा पिळून तयार केलेला माझा मधुर सोमरस प्या. तोच तुम्ही प्याल्यावर भक्तांना उदकरूपी धेनु प्राप्त होतात. कारण हा सोम प्याल्यावरच इंद्र अहीला ठार करतो.

४. इंद्र सोम प्याल्यावरच द्यावापृथ्वीला स्थैर्य उत्पन्न करतो. इंद्र सज्ज झाल्यावर वृताला भीति उत्पन्न करतो. इंद्रानें झाकून टाकणाऱ्या आणि (भीतीनें) धांपा टाकणाऱ्या दानव वृत्राला आवरण नाहींसे करीत ठार केलें.

५. हे धनवान इंद्रा, सर्व देवांनीं खटपट करून तुला सोम पिण्यास दिला. कारण, सूर्याचे पुढें धांवणाऱ्या सोनेरी रंगाच्या घोड्या एतशाकरतां तूं थांबविल्यास.

६. जेव्हां इंद्रानें शंबराचीं नव्याण्णव नगरें वज्रानें एकदम फोडलीं तेव्हां मरुतांनीं युद्धांत असलेल्या इंद्राची त्रिष्टुभ छंदांतील स्तोत्रांनीं स्तुति केली. आणि शंबराला स्वर्गांत त्रास दिला.

७. मित्रभूत अग्नीनें ह्या मित्रभूत इंद्राच्या कर्तृत्वाकरतां तीनशें पशु शिजवले. इंद्रानें मनूचीं तीन यज्ञपात्रें वृत्राला ठार करण्याकरतां एकदम पिऊन टाकलीं.

८. हे इंद्रा, तीनशें पशूंचें मांस जेव्हां तूं भक्षण केलेंस, जेव्हां धनवान् असणाऱ्या त्वा सोमाचीं तीन भांडीं प्यालास आणि जेव्हां तूं अहीला ठार केलेस तेव्हां धनी नोकराला बोलावतो त्याप्रमाणें सर्व देवांनीं सोम प्यालेल्या इंद्राला बोलावलें. (युद्धांत मदत करावी म्हणून सोम देऊन हक्कानें बोलावलें).

९. हे इंद्रा, जेव्हां तूं आणि बृहस्पति बलिष्ठ आणि अत्यंत चलाख घोड्यावर बसून कुत्साच्या घरीं आलास तेव्हां तूं शत्रूंचा फडशा पाडीत कुत्स आणि देव यांच्यासह एका रथांत बसून गेलास आणि शुष्णाला ठार केलेंस.

१०. हे इंद्रा, तूं सूर्याच्या रथाचें एक चाक बाजूला केलेंस. आणि दुसरें चाक कुत्साला धन प्राप्त करण्यास दिलेंस. बिन नाकाच्या दस्यूंना तूं वज्रानें ठार केलेंस युद्धांत अभद्र बोलणाऱ्या असुरांचे तुकडे उडवलेस.

११. हे इंद्रा, गौरिवीतीचीं स्तोत्रें तुला उत्साहित करोत. तूं वैदथिन ऋजिश्वाकरतां पिप्रूला ताब्यांत घेतलेस. हे इंद्रा, ऋजिश्वन नांवाचा ऋषि तुझ्या मैत्रीकरतां हविर्द्रव्य शिजवून तुला बोलावीत आहे. तूं ह्या ऋजिश्वनचा सोम पी.

१२. नवग्व आणि दशग्व आंगिरस सोम तयार करून इंद्राचीं स्तोत्रें म्हणून स्तवन करतात. स्तुति करणाऱ्या लोकांनीं आवृत्त झालेल्या गाई लपविलेला प्रदेश मोकळा केला.

१३. हे धनवान इंद्रा, तूं जे पराक्रम केले आहेस ते जाणून मी तुझी कशी बरें सेवा करीत आहे ! हे बलिष्ठा, जे तूं नवीन पराक्रम करशील ते आम्ही यज्ञांत वर्णन करूं.

१४. हे वज्रधरा इंद्रा, शत्रूंचा नाश करीत तूं जे सर्व पराक्रम करीत असतोस त्या तुझ्या पराक्रमाचें कोणीहि निवारण करूं शकत नाहीं. अजिंक्य असणाऱ्या तूं जन्मसिद्ध सामर्थ्यानें ही विविध प्रकारची सृष्टि निर्माण केली आहेस.

१५. हे बलिष्ठ इंद्रा, जी तुझी आज आम्ही नवीन स्तोत्रें केलीं आहेत त्या केलेल्या स्तोत्रांचा तूं स्वीकार करावास. कुशल आणि संपत्तीची इच्छा कर-

---

५. टीपः—एतशाकरतां ८–१. वरील टीप पहा.

णाऱ्या म्या वस्त्रांप्रमाणें किंवा रथाप्रमाणें रमणीय स्तोत्रें तयार केलीं आहेत.

सूक्त तिसावें.

ऋषिः—बभ्रु; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. वज्रधर आणि अनेकांनीं स्तविलेला इंद्र सोम तयार करून वाट पहात असलेल्या यजमानाची इच्छा करीत रक्षणाकरतां त्याच्या घरीं जातो. तो पराक्रमी इंद्र कोठें आहे ? सुखानें रथांत बसलेल्या आणि घोड्यांनीं ओढला जाणाऱ्या इंद्राला कोणी पाहिलें ?

२. ह्या इंद्राचें गूढ आणि भयानक स्थान मी पाहिलें आहे. मी शोध करीत इंद्राच्या स्थानीं गेलों. मी दुसऱ्यांना विचारलें आणि त्यांनीं मला सांगितलें. कीं ज्ञाते लोक इंद्राला प्राप्त करतात.

३. हे इंद्रा, तुझे जे पराक्रम आहेत ते आम्ही सोम पिळून तयार केल्यावर जोरानें गात असतो. जीं (पराक्रमाचीं) कृत्यें तूं केलींस तीं माहीत नसणारांना माहीत होवोत. शहाण्यांच्या कानावर जावोत. सर्व सेनांनीं युक्त असणारा हा धनवान इंद्र त्यांच्याकडे जातो.

४. हे इंद्रा, जन्माला आल्यापासून तूं बळकट अंत:करणाचा आहेस. पहा तूं एकटाच असून युद्धाकरतां अनेकांवर चालून गेलास. सामर्थ्यानें पर्वतहि फोडलास आणि दुभत्या गाईचें संघ मिळवलेस.

५. हे इंद्रा, श्रेष्ठांतला श्रेष्ठ असणारा तूं जेव्हां दूरदेशीं सुप्रसिद्ध नांव घेऊन जन्माला आलास, तेव्हांपासूनच देव इंद्राला भिऊं लागले आणि दासांच्या ताब्यांत असलेलें उदक इंद्रानें जिंकलें.

६. हे सुखी स्तोते तुमचेंच स्तोत्र करतात आणि तुमच्याकरतांच सोमरस तयार करतात. पाणी झाकून टाकणाऱ्या आणि देवांना त्रास देणाऱ्या कपटी अहीला इंद्रानें खुबीनें पराभूत केलें.

७ हे धनिक इंद्रा, जेव्हां तूं युद्धांत मनूला सुख देण्याच्या इच्छेनें दास मनुचीचें डोकें उडवलेंस तेव्हां स्तुति केला जाणारा तूं वज्रानें वृत्राला ठार करीत जन्मल्याबरोबर दुष्टांना ठार केलेंस.

८. हे इंद्रा, तूं शब्द करणाऱ्या मेघाप्रमाणें असणाऱ्या दास नमुचीचें डोकें उडवलेंस आणि माझ्याशीं मैत्री केलीस. तेव्हां (तुझ्याबरोबर असणाऱ्या) देवांना द्यावापृथ्वी चाकाप्रमाणें होती.

९. नमुचीदासानें स्त्रियांना शस्त्र बनवलें. ह्या दासाच्या स्त्रीरूपी सेना माझे काय करणार आहेत असें समजून त्यापैकीं दोन स्त्रिया घरांत ठेवल्या. आणि इंद्र दस्यूवर युद्ध करण्यास चालून गेला.

१०. जेव्हां गाई वासरांपासून वियुक्त झाल्या तेव्हां गाई तेथें भोंवती चहूकडे पसरल्या. जेव्हां चांगल्या प्रकारें पिळून तयार केलेले सोम ह्या इंद्राला प्रसन्न करते झाले तेव्हां मरुतांसह इंद्रानें त्या गाईवासरांची गांठ घालून दिली.

११. जेव्हां बभ्रूनें पिळलेल्या सोमानें ह्या इंद्राला आनंदित केलें तेव्हां बलिष्ठ इंद्रानें युद्धांत गर्जना केली. नगरभेत्ता इंद्र सोम प्याला आणि त्यानें दुभत्या गाई परत दिल्या.

१२. हे अग्ने, मला चार हजार गाई दिल्या हें सत्कृत्य रुशमांनीं केलें. मनुष्यांतला श्रेष्ठ मनुष्य ऋणंचय त्यानें दिलेली संपत्ति आम्ही ग्रहण केली.

१३. हे अग्ने, नीटनेटक्या मला हजार गाईंसह चांगलें घर (ऋणंचयाच्या) रुशमांनीं दिलें. नंतर अंधकारमय रात्रीची उषा उजाडल्यावर आम्ही तयार केलेल्या कडक सोमरसानें इंद्र आनंदित झाला.

१४. रुशमांचा राजा ऋणंचय याच्या घरी गेल्यावर जी रात्र होती ती उजाडली. तेव्हां सतत

---

१० टीपः—स्त्रियांना युद्धास पाठविण्याची प्रत्यक्ष कृति येथें दिसत असून त्याचा परिणामहि थोडक्यांत दिग्दर्शित केला आहे. ही गोष्ट इंद्राच्या विरुद्ध असणाऱ्या नमुचिदासाकडून झाल्याचा उल्लेख आहे. ही पद्धति मधल्या काळांत बंद होती, पण १९१४ च्या महायुद्धांत रशियामध्यें स्त्रीसैनिकांचा प्रत्यक्ष युद्धांत उपयोग करण्यात आला होता आणि सध्याच्या चीनच्या बंडाळींतहि चिनी स्त्रिया प्रत्यक्ष युद्धांत भाग घेत असल्याच्या बातम्या आहेत. झांशीच्या लक्ष्मीबाईसारखी उदाहरणें स्त्रीसैनिकाच्या सामान्यतेची दर्शक नव्हेत.

१२ टीपः—रुशम नांवाचा एक देश आहे. कोणता देश हें सांगतां येत नाहीं. देशाचें नांवच लोकांना लावण्यांत येतें त्याप्रमाणें येथें लावलें आहे. ऋणंचय हा त्यांचा राजा आणि रुशम हे त्यांचे नोकर. राजानें दिलें जाणारें दान नोकराकडूनच दिलें जातें. हें ध्यानांत घेतलें म्हणजे ऋणंचयाचें दान त्याचे नोकर रुशम यांनीं दिलें.

गमन करणाऱ्या घोड्याप्रमाणें चलाख व कार्य करणाऱ्या बभ्रुनें चार हजार गाई मिळविल्या.

१५. हे अग्ने, रुशम देशांत चार गाई मिळविल्या. प्रवर्ग्याकरतां तापवून घडवलेले जे सोन्याचें भांडें तेंहि शहाण्या अशा आम्हांला मिळालें.

सूक्त एकातिसावें.

ऋषिः--अवस्यु आत्रेय; देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. लुटीच्या इच्छेनें इंद्र ज्या रथावर आरूढ होतो तो इंद्रानें खालीं हाकारला. गुराखी पशूंचे कळप हाकारीत असतो त्याप्रमाणें त्यानें सैन्य हाकारलें. देवांत प्रमुख असणारा तो सुरक्षितपणें लुटीची इच्छा करीत जात आहे.

२. हे अश्वयुक्त इंद्रा, तूं माझ्याकडे धांवत ये. माझ्याविषयीं निराश होऊं नकोस. हे धनवन्ता,आमचा स्वीकार कर. हे इंद्रा, तुझ्याशिवाय आम्हांस श्रेयस्कर कांहीं नाहीं. तूं अनेक अपत्नीकांना सपत्नींक केलेंस.

३. जेव्हां उषेनंतर सूर्य उदयाला आला तेव्हां इंद्रानें सर्व भक्तांना सर्व संपत्ति दिली. पर्वतांत अडकलेल्या दुभत्या गाईंना गति मिळाली आणि तेजानें नष्ट होणारा अंधार नाहींसा झाला.

४. हे बहुस्तुत इंद्रा, मनुष्यांनीं तुझा रथ घोडे जोडण्यासारखा केला आहे. त्वष्ट्यानें तेजस्वी वज्र निर्माण केलें आहे. पूजा करणाऱ्या ब्राह्मणांनीं अहीला ठार करण्याकरतां स्तोत्रें म्हणून उत्तेजन दिलें.

५. हे इंद्रा, जेव्हां योद्ध्यांनीं, सोमपाषाणांनीं आणि अदितीनें एक विचारानें तुज वीराचें अर्क स्तोत्र गाईलें, तेव्हां जे अश्वरहित होते, ज्यांच्या जवळ रथ नव्हता, जे इंद्रानें पाठवले जात होते त्यांनीं दस्यूंचा पराभव केला.

६. हे इंद्रा, तूं जीं प्राचीनकाळीं कृत्यें किंवा नवीन केलीं आहेस तीं मी वर्णन करीत आहें. कारण हे शक्तिमंता, तूं ह्या दोन द्यावापृथ्वींना विभागलें आहेस आणि आश्चर्यकारक वहाणारें उदक मनुष्यांकरतां ताब्यांत घेतलेंस.

७. हे दर्शनीय व ज्ञात्या इंद्रा, तूं अहीला ठार मारून जें सामर्थ्य प्रकट केलेंस तें खरोखर तुझेंच सामर्थ्य होय. तसेंच शुष्णाच्या कपटांचाहि तूं स्वीकार केलास. हे इंद्रा,तूं संग्रामांत येऊन दस्यूंना त्रस्त करतोस.

८. हे इंद्रा, तूं तुर्वश आणि यदु यांच्याकरतां सुदुघा नांवाच्या नदीचें पाणी तरण्यासारखें केलेंस. जेव्हां देव आणि बृहस्पति यांनीं तुमची सेवा केली तेव्हां तुम्ही उग्र शुष्णाकडे गेलांत आणि त्याला ठार करून कुत्साला घरीं पोंचवलेंत.

९. हे इंद्राकुत्सांनो, रथानें येणाऱ्या तुम्हाला घोडे हांकेवर आणोत. तुम्हींहि त्याला पाण्यांतून बाहेर उडवा. आणि आपल्या स्थानावरून हाकून द्या. धनिक भक्ताच्या अन्तःकरणांतून पाप नाहींसें करा.

१०. हा ज्ञाता अवस्यु वायूवेगाचे आणि चांगले जोडता येणारे घोडे प्राप्त करो. हे इंद्रा, हे सर्व अवस्यूचे मित्र असणारे स्तोते स्तोत्रें म्हणून तुझें सामर्थ्य वाढवीत आहेत.

११. इंद्रानें युद्धांत वेगानें धांवणाऱ्या सूर्याच्या रथाला पूर्वीं थांबविलें आहे. एतशाकरतां इंद्रानें (दोनचाकापैकीं) एक चाक पळविलें. त्यानें इंद्र असुरांना ठार करतो. तो आमचा पुरस्कार करून आमच्या यज्ञाचा उपभोग घेवो.

१२. लोकहो, तुम्हांला पहाण्याकरतां हा इंद्र सोमरस तयार करणाऱ्या मित्रांची इच्छा करीत इकडे येत आहे. अध्वर्यु ज्याचा उपयोग करतात तो सोम कुटण्याचा दगड शब्द करीत वेदीवर आणला जात आहे.

१३. हे इंद्रा, जे आनंदात आहेत ते आनंदांत राहोत. हे अमर देवा, त्यांना पातकांचा संपर्क लागूं नेय. तूं भक्तांचा स्वीकार कर. ज्यांच्यांतील आम्ही स्तोते आहोंत त्यांच्यांत तूं सामर्थ्य असूं दे.

सूक्त बत्तिसावें.

ऋषिः---गातु आत्रेय; देवता-इंद्र; छंदः---त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, तूं मेघ फोडलास. उदकांचे मार्ग खोदलेस. तसेंच क्षुब्ध झालेल्या मेघाला मोकळें केलेंस. कारण, हे इंद्रा, तूं मोठ्या मेघाला फोडलेस, धारा वहावयास लावल्यास आणि दानवाला ठार केलेंस.

२. वज्रधरा, तूं क्षुब्ध झालेल्या मेघांना पावसाळ्यांत मोकळें केलेंस. मेघांतील साठा वहावयास लावलास. हे भयानक इंद्रा, तूं पाण्यांत पडून असणाऱ्या दक्ष अहीला ठार केलेंस. हे इंद्रा, तूं असे पराक्रम गाजवलेस.

३. जो एकटाच प्रतिस्पर्धिरहित आपल्या स्वतःला श्रेष्ठ मानीत होता, त्या वृत्रापासून दुसरा एक बलवान उत्पन्न झाला. त्या थोर शुष्णाचा इंद्रानें आपल्या सामर्थ्यानें वध केला.

४. प्राणिमात्राचें अन्न खाऊन आनंदांत राहणाऱ्या धुक्यापासून उत्पन्न झालेल्या, अत्यंत वाढलेल्या, अंधारांत राहणाऱ्या दानवांचा क्रोध अशा शुष्णाला वज्रधारी आणि मेघ फोडणाऱ्या इंद्रानें ठार केलें.

५. मर्महीन असणाऱ्या त्या शुष्णाचें मृत्युस्थान हे इंद्रा, तूं त्यांच्याच वागण्यावरून जाणलेंस. कारण, हे बलशाली इंद्रा, तूं मादक सोम प्याल्यावर त्या लढवय्याला अंधाराच्या राजवाड्यांत घालवलेंस.

६. सोम पिऊन आनंदित झालेल्या बलिष्ठ इंद्रानें वज्र उगारून (अन्तरिक्षांत) चांगल्या पाण्यांत निजणाऱ्या, सूर्यरहित अंधारांत वाढणाऱ्या त्या वृत्राला ठार केलें.

७. जेव्हां त्या मोठ्या दानवाकरतां अजिंक्य व शत्रूंचा पराभव करणारें वज्र इंद्रानें उगारलें आणि जेव्हां वज्राचा प्रहार करून ह्या वृत्राला ठार केलें तेव्हां त्यानें सर्व प्राण्यांना मागें टाकलें.

८. महान इंद्रानें पाण्याला अडवून निजलेल्या मधुर पाणी पिणाऱ्या, शत्रूंना ठार करणाऱ्या आणि सर्वांवर आवरण घालणाऱ्या त्या वृत्राला ताब्यांत घेतलें. आणि युद्धांत विशाळ वज्रानें त्याला पादरहित, परिमाणरहित आणि नष्टशब्द करून ठार केलें.

९. ह्या इंद्राचें सर्वशोषक सामर्थ्य कोण निवारण करील ? एकटा अजिंक्य इंद्रच सर्व धन जिंकतो. ह्या तेजस्वी द्यावापृथ्वी तल्लख इंद्राच्या भीतीनेंच ताबडतोब चालूं लागतात.

१०. थोर द्युलोक ह्या इंद्राच्या ताब्यांत असतो. भूमि एखाद्या कामुक स्त्रीप्रमाणें इंद्राच्या तंत्रानें चालते. जेव्हां इंद्र लोकांना सर्व सामर्थ्य देतो तेव्हां लोक बलवान् इंद्रापुढें नम्र होतात.

११. हे इंद्रा, सज्जनांचें रक्षण करणारा, सर्व लोकांचें हित करणारा आणि जन्मल्याबरोबर कीर्तिमान असणारा अशा तुला एकट्यालाच जगांत मी ऐकत आहें. स्तुति करणारे आणि इच्छा प्रदर्शित करणारे माझे लोक प्रशंसनीय असणाऱ्या तुझा रात्रंदिवस स्वीकार करोत.

१२. तसेंच हे इंद्रा, नेहमीं सर्व प्रेरक असणारा तूं स्तोत्यांना संपत्ति देतोस असें मी ऐकलें आहें. पण तुझ्यावर इच्छा अवलंबून ठेवणाऱ्या मित्रभूत स्तोत्यांनीं हे इंद्रा, तुझ्यापासून काय मिळवलें ? (मला अझून कांहींच मिळालें नाहीं त्यावरून तुझी कीर्ति खोटीच दिसते.)

सूक्त तेहतिसावें.

ऋषिः—संवरण प्रजापतिपुत्र; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ

१. ज्या इंद्रानें युद्धांत स्तुति केली असतां स्तोतृजनाला ध्यानांत घेतलें त्या अत्यंत दुर्बळ असूनहि मी बलवान इंद्राकरतां शत्रूंचा पराभव करण्याकरतां हें मोठें स्तोत्र केलें.

२. हे बलवान इंद्रा, गंभीरपणें स्तोत्रें ऐकून तूं घोड्यांचा लगाम हातांत घेतोस. हे धनवान इंद्रा, तूं जीं स्तोत्रें ऐकून प्रेमानें घोड्यांचे लगाम हातांत घेतोस त्यामुळेंच शत्रूंचा पराभव करतोस.

३. हे महान इंद्रा, जे लोक आमच्यासारखें कर्म करीत नाहींत आणि स्तोत्र म्हणत नाहींत ते तुझे कोणी नव्हेत. म्हणून हे वज्रहस्ता,सुंदर घोडे असलेला तूं ज्या रथांत बसण्याकरतां लगाम खेचतोस, त्या आमच्याकडे यज्ञांत येण्याकरतां आपल्या प्रसिद्ध रथांत तूं बैस.

४. हे इंद्रा, जेव्हां तुझीं अनेक स्तोत्रें गायलीं जात असतात तेव्हां तूं प्रतिबंध नाहींसे करून सूर्याच्या स्थानावरून सुपीक जमिनीला पाणी देतोस. युद्धांत बलिष्ठ असणारा तूं दासाचें नांवहि शिल्लक ठेवीत नाहींस.

५. हे इंद्रा, जे बल उत्पन्न करीत तुझ्याकडे येणारे आम्ही आहोंत ते तुझेच आहोंत. हे व्यापक शक्तीच्या इंद्रा, स्तुत्य, युद्धांत उमदा असा योद्धा दैवाप्रमाणें आम्हांला साहाय्य करण्याकरतां येवो.

६. हे इंद्रा,तुझेजवळच स्पृहणीय ओज आणि संपत्ति आहे. तूंच धुमाकूळ घालणारा अमर योद्धा आहेस. तो तूं आम्हाला निष्कलंक संपत्ति दे. संपन्न असा मी धन्याच्या दानाची स्तुति करीत आहे.

७. हे शूर इंद्रा, अशी स्तुति करणाऱ्या आम्हा स्तोत्यांना साहाय्य करून तूं संरक्षावेंस. युद्धांत आवेश देणाऱ्या तयार केलेल्या मनोहर सोमाला पिऊन तूं प्रसन्न हो.

८. ज्याच्या जवळ सोनें भरपूर आहे अशा ह्या गिरिक्षित गोत्रोत्पन्न पुरुकुत्सपुत्र त्रसदस्यूनें दिलेले ते

पांढरे शुभ्र दहा घोडे मला वाहून नेवोत. मी आपल्या कर्तबगारीनें चाललों आहे.

९. मारुताश्व विदथाच्या यज्ञांत मला मिळालेले ते घोडे लालबुन्ध आणि बलिष्ठ होते. तसेंच च्यवनानें मला हजार (घोडे) आणि शरीरावर धारण करण्याकरतां अलंकार दिले.

१०. तसेंच लक्ष्मण्य धन्याचे तेजस्वी चलाख घोडे मला प्राप्त झाले. दिलेली विपुल संपत्ति गाई गोठ्यांत जाव्यात त्याप्रमाणें संवरण ऋषीकडे गेली.

सूक्त चवतिसावें.

ऋषिः—संवरण प्राजापत्य; देवता-इंद्र; छंदः—१-८ जगती, अवशिष्ट त्रिष्टुम.

१. ह्या दर्शनीय अजातशत्रू इंद्राला अपरिमित आणि अक्षय्य असें स्वर्गीय अन्न प्राप्त होतें. हे ऋत्विजांनो, सोम पिळा, शिजवा आणि स्तोत्रें म्हणून बोलावल्या जाणाऱ्या बहुस्तुत इंद्राला भरपूर द्या.

२. ज्यानें आपलें पोट सोमानें तुडुंब भरलें, जो धनवान मधुर सोमरस पिऊन प्रसन्न झाला, तेव्हां वज्रधारी इंद्रानें मृगाला ठार करण्याकरतां स्वेच्छेनें हजार धारांचें वज्र उचललें.

३. जो यजमानाकरतां रात्रंदिवस सोम काढीत असतो तो तेजस्वी होतो. जो वाईट लोकांशीं मैत्री करणारा स्वार्थी आणि धर्मध्वंसक मनुष्य,त्याचा धनवान इंद्र तिरस्कार करतो.

४. ज्याच्या बापाला, आईला किंवा भावाला इंद्रानें ठार केलें असेल तरी तो त्याला सोडून जात नाहीं. तर त्यानें दिलेल्या हवींचा स्वीकार करतो. नियामक आणि संपत्तीचा आगर असणारा इंद्र प्रसंगीं दोषी कृत्य करण्यास मागें पहात नाहीं.

५. पांच दहाशीं युद्ध सुरू झालें तरी तो मदतीची इच्छा करीत नाहीं. सोमरस तयार करीत नाहीं अशा मातबराशींहि संबंध ठेवीत नाहीं. उलट त्याला जिंकतो आणि शत्रूंना कापावयास लावणारा इंद्र त्याला ठार करतो. पण देवभक्ताला गाईंनीं भरलेल्या गौळवाड्यांत पोंचवतो.

६. युद्धांत शत्रूंचा संहार करणारा, रथाचें चाक जोडणारा, अभक्तांना पाठमोरा आणि भक्तांचा उत्कर्ष करणारा, लोकनियंता, भयानक इंद्र दासाला इच्छेनुसार ताब्यांत घेतो.

७. हा इंद्र पणीची संपत्ति लुटतो. दात्या भक्तांकरतां चांगल्या लोकांना संपत्ति वाटून देतो. ह्याच्या सामर्थ्याला जो वाढवितो तो इंद्र अनेक संकटांत लोकांना तारतो.

८. जेव्हां धनवान, बलशाली, अशा उभयपक्षाच्या लोकांना इंद्र जाणतो तेव्हां तो धनवान इंद्र पांढऱ्या गाई मिळण्याकरतां यज्ञ करणाऱ्या एकाला साहाय्य करतो. आणि शत्रूंना धडकी उत्पन्न करणारा मेघसंचालक इंद्र मरुतांच्या साहाय्यानें त्या भक्ताला गाई देतो.

९. हे अग्निरूप इंद्रा, हजारो देणग्या देणाऱ्या, अनुपम आणि प्रख्यात अशा अग्निवेशाचा पुत्र शत्रीची मी स्तुति करीत आहें. त्याच्याकरतां उदक चांगलें वाहो. त्याचे ठिकाणीं सामर्थ्यासहित उज्ज्वल तेज असो.

सूक्त पस्तिसावें.

ऋषिः—प्रभुवसु आंगिरस; देवता-इंद्र; छंदः-१-७ अनुष्टुभ, ८ पंक्ति.

१. हे इंद्रा, तुझ्याजवळ लोकांना नमवणारे, शुद्ध आणि युद्धांत दुस्तर असें जें अमोघ कर्तृत्व आहे तें तूं आमच्या साहाय्याकरतां असूं दे.

२. हे इंद्रा, ज्या तुझ्या चार प्रकारच्या असतील, तीन प्रकारच्या असतील किंवा पंचजनासंबंधींच्या असतील त्या सर्व देणग्या आम्हांस दे.

३. हे इंद्रा, जोरानें पाऊस पाडणारा आणि भयानक असणारा तूं व्यापक मरुतांकडून साहाय्य देतोस, म्हणून आम्ही बलिष्ठांतल्या बलिष्ठ अशा तुझें साहाय्य मागत आहोंत.

४. हे इंद्रा, तूं समृद्धि देण्याला समर्थ आहेस. म्हणून तूं प्रगट होतोस. तुझें सामर्थ्य श्रेष्ठ आहे. तुझें मन करारी आणि तुझें बल ताब्यांत राहणारें आहे. हे इंद्रा, तुझा पराक्रम सर्वांचा पराभव करणारा आहे.

५. हे इंद्रा, हे वज्रधरा, हे बलाधिपते, तूं त्या शत्रुत्व करणाऱ्या माणसावर सर्वगामी रथानें चालून जा.

६. हे वृत्राला ठार करणाऱ्या इंद्रा, सर्व जगांत प्राचीन असणाऱ्या तुलाच सर्व भक्त लोक युद्धांत बोलावतात.

७. हे इंद्रा, आमच्या रथाचें तूं संरक्षण कर. कारण, तो युद्धांत पुढें जाणारा, दुस्तर, अनुयायांसह जाणारा, आणि सर्व युद्धांत लूट इच्छिणारा आहे.

८. हे इंद्रा, तूं आमच्याकडे ये व सद्बुद्धीनें आमच्या रथाचें संरक्षण कर. हे बलिष्ठा,श्रेष्ठ असणाऱ्या तुझी आम्ही उत्कृष्ट स्तुति करीत आहोंत. आम्ही तुझी स्तुति करीत आहोंत.

सूक्त छत्तिसावें.

ऋषिः—प्रभूवसु आंगिरस; देवता–इंद्र; छंदः—३ जगती, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. जो उदार इंद्र धन देऊं जाणतो तो आम्हाकडे धनुर्धराप्रमाणें ऐटींत येवो. आणि तान्हेलेला असा इच्छापूर्वक सोम आणि दूध पिवो. दुग्धमिश्रित सोम पिवो.

२. हे अश्वयुक्त शूर इंद्रा, पर्वतावर सोम वाढतो त्याप्रमाणें तुझे ओठ सोमावर हल्ला चढवोत. हे बहुस्तुत राजा इंद्रा, आम्ही घोड्यांप्रमाणें तुझी स्तुति करून तुला आनंदित करीत आहोंत.

३. हे बहुस्तुत व वज्रधरा इंद्रा, जमिनीवरील चाकाप्रमाणें माझें मन दारिद्र्याच्या भीतीनें कांपत आहे. म्हणून रथांत बसलेल्या तुझी, हे सदोदीत उत्कर्ष पावणाऱ्या धनवान इंद्रा, स्तोता पुरूवसु कां बरें स्तुति करणार नाहीं ?

४. हे इंद्रा, सोम कुटणाऱ्या दगडाप्रमाणें स्तोता तुझी स्तुति करीत आहे. हे धनवान इंद्रा, अत्यंत ऐश्वर्याचा उपभोग घेणारा तूं डाव्या व उजव्या हातानें संपत्ति देतोस. निराशा करीत नाहींस.

५. हे इंद्रा, वर्षाव करणारा द्युलोक बलिष्ठ असणाऱ्या तुझा उत्कर्ष करो. समर्थ असा तूं बलिष्ठ घोड्यांनीं यज्ञांत येतोस. हे किरीटधरा, पराक्रम गाजवणाऱ्या वज्रधरा इंद्रा, तूं बळकट रथांत आरूढ झालेला बलवान इंद्र माझें युद्धांत संरक्षण कर.

६. ज्या समृद्ध श्रुतरथानें दोन लाल चलाख घोडे तिनशे गाईसह मला दिले, हे देवांनो, त्या तरुण श्रुतरथापुढें सर्व लोक नम्रतेनें डोकें लववोत.

सूक्त सदतिसावें.

ऋषिः—अत्रि; देवता–इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ.

१. सूर्याच्या तेजासह बोलावला जाणारा,तुपाच्या आहुति दिलेला आणि उत्तम प्रज्वलित केलेला अग्नि प्रकाशत आहे. जो म्हणतो आपण यज्ञ करावा त्याला सुखाच्या उषा उजाडोत.

२. हा यजमान अग्नि प्रज्वलित करून आणि दर्भ तोडून अग्नीची सेवा करतो. दगड एकत्र करून आणि सोमरस तयार करून तो स्तुति करतो. ज्या भक्ताचे (सोम कुटण्याचे) दगड शब्द करतात तो अध्वर्यु हविर्द्रव्य घेऊन सिंधूकडे लवकर गमन करो.

३. ही (पहा इंद्राची) पत्नी पतीला भेटण्याच्या इच्छेनें इकडेच येत आहे. ज्यानें अशा प्रेमळ पत्नीचें पाणिग्रहण केलें आहे तोहि इकडेच येत आहे. त्याच्या रथाची कीर्ति चहूकडे पसरो आणि त्याचें नांव दुमदुमून जावो. आणि तो हजारानें विविध प्रकारचें धन आमच्याकडे आणो.

४. ज्याच्या यज्ञांत इंद्र दुग्धमिश्रित तीव्र सोम पितो त्या राजाला दुःख प्राप्त होत नाहीं. तो नोकरचाकरासह सर्वत्र संचार करतो व शत्रू ठार करतो. अशा प्रकारें तो भाग्यशाली राजा आपलें नांव गाजवून लोकांचें संरक्षण करतो.

५. जो भक्त सोमरस तयार करून इंद्राला अर्पण करतो त्याची स्वस्थतेच्या काळीं भरभराट होते आणि उपार्जनकाळीं सर्व श्रेष्ठता होते. रात्रंदिवस तो विजयी होतो. तो सूर्याला आणि अग्नीलाहि प्रिय होतो.

सूक्त अडतिसावें.

ऋषिः—अत्रि; देवता–इंद्र; छंदः—अनुष्टुभ.

१. हे कर्तृत्ववान इंद्रा, तुझ्या संपत्तीच्या दानाचा ओघ फार मोठा आहे. म्हणून हे लोकद्रष्ट्या आणि बलवन्ता आम्हाला संपत्ति दे.

२. हे बलिष्ठ इंद्रा, जें अन्न आणि सर्वप्रसिद्ध धन तुझ्याजवळ आहे त्याची हे सुवर्णकान्ते इंद्रा, सर्वत्र अत्यंत प्रसिद्धी होते आणि तें अजिंक्य आहे.

३. हे वज्रधरा, जे तुझे उदार, बलिष्ठ आणि सर्वव्यापी देव आहेत ते तुम्ही दोघेहि द्यावापृथ्वीचे सर्व प्रकारें धनी आहां.

४. हे वृत्रहन्त्या, तुझ्या कोणच्या तरी सामर्थ्यानें आम्हांला संपत्ति दे. कारण,आम्ही धनिक असावें अशी तुझी इच्छा आहे.

५. हे पराक्रमी इंद्रा, तुझ्या ह्या स्तवनांनीं आम्ही सुखी राहूं. हे शूर इंद्रा, आम्ही अत्यंत सुरक्षित असावें.

सूक्त एकूणचाळिसावें.

ऋषिः—अत्रि; देवता–इंद्र; छंदः—१–४ अनुष्टुभ, ५ पंक्ति.

१. हे आश्चर्यकारका, वज्रधरा आणि धन मिळविणाऱ्या इंद्रा, तुला देण्यासारखें जें उत्कृष्ट धन आहे तें तूं दोनंहि हातांनीं आम्हांस दे.

२. हे इंद्रा, तुझ्या मतानें जें उत्कृष्ट आणि स्वर्गीय ऐश्वर्य असेल तें तूं आम्हांस दे. तुझे असणाऱ्या आम्हांस परिणामीं सुखकर असणारी संपत्ति प्राप्त होवो.

३. हे इंद्रा, दातृत्वानें प्रशंसनीय असणारें तुझें थोर मन प्रसिद्ध आहे. त्यामुळें हे वज्रधरा, आम्हांला समृद्धि देण्याकरतां कठीणहि भागाचे (पर्वतांचें) तूं विदारण केलेंस.

४. धनिकामध्यें अत्यंत श्रेष्ठ असणाऱ्या लोकाधिप इंद्राचीं प्रशंसा करण्याकरतां पुरातन स्तोत्रें म्हणून स्तोते स्तुति करतात.

५. आमची काव्यवाणी, प्रशंसनीय गाणीं इंद्राकरतांच आहेत. त्या स्तोत्रेच्छु इंद्राकरतांच अत्रीचीं स्तोत्रें सारखीं चालूं आहेत आणि तीं सजविलीं जात आहेत.

सूक्त चाळिसावें.

ऋषिः—अत्रि; देवता–१–४ इंद्र; ५ सूर्य, ६–९ अत्रि; छंदः—१–३ उष्णिह, ५–९ अनुष्टुभ, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, ये. हे सोम पिणाऱ्या, दगडांनीं कुटून तयार केलेला सोम पी. हे बलवन्ता व शत्रुहन्त्या इंद्रा, पाऊस पाडणाऱ्या मरुतांसह ये.

२. हे वृत्रहन्त्या व इच्छा पूर्ण करणाऱ्या इंद्रा, हा पिळलेला सोम पराक्रमी आहे. त्याचा मद आणि तो कुटण्याचा धोंडा सुद्धां पराक्रमी आहे.

३. हे वज्रधरा, हे बलिष्ठा, हे वृत्रहन्त्या इंद्रा, बलिष्ठ अशा पाऊस पाडणाऱ्या तुझा मी धांवा करीत आहें. तूं आम्हांला आश्चर्यकारक साहाय्य करावेंस.

४. सोमरस पिणारा, सोमाचा चोथाहि खाणारा वज्रधर, बलवान, शत्रूंचा पराभव करणारा, साहसी असा हा वृत्रहन्ता राजा इंद्र दोन घोडे जोडून आमच्याकडे येवो. आणि माध्यंदिन सवनांत सोम पिऊन आनंदित होवो.

५. हे सूर्या, जेव्हां तुला आसुर स्वर्भानूनें (राहूनें) अंधकारानें ग्रासलें, तेव्हां सर्व लोक वेड्यासारखे झाले आणि त्यांना आपण कोठें आहोंत हेंहि कळेना.

६. इंद्रा, जेव्हां तूं आकाशांत चाललेले स्वर्भानूचे कपटप्रयोग नष्ट केलेस तेव्हां त्या व्रतभ्रष्ट अंधकारानें झाकलेला सूर्य चवथ्या मंत्रानें अत्रीनें प्राप्त केला.

७. सूर्य म्हणतो हे अत्रे अशा स्थितींत असणाऱ्या मला ह्या दुष्टानें भीतीनें किंवा भुकेनें गिळून टाकूं नये. तूं खरें ऐश्वर्य असलेला मित्र आहेस. राजा वरुण आणि तूं असे दोघे माझें संरक्षण करा.

८. स्तोत्रवेत्त्या अत्रीनें ग्रावे एकत्र करून स्तोत्रानें आणि नमस्कार करून देवाची सेवा करीत सर्वांचा नेत्र असलेल्या सूर्याची आकाशांत स्थापना केली आणि स्वर्भानूचा उपद्व्याप नष्ट केला.

९. राहूनें अंधकारानें ज्या सूर्याला ग्रासून टाकलें होतें त्याला अत्रीनें शोधून काढलें. इतर तें करूं शकले नाहींत.

---

५ टीप:–५ ते ९ ऋचांत सूर्याला लागणाऱ्या ग्रहणाचा स्पष्ट उल्लेख आहे. पुढल्या वाङ्मयांत राहूला वापरला जाणारा स्वर्भानु हा शब्दहि येथें असून त्याचें स्वरूप अंधकारमय सांगितलें आहे. आणि लोकांना तेव्हां काय वाटत असे हेंहि थोडक्यांत दाखविलें आहे.

सूक्त एकेचाळिसावें.

ऋषिः—अत्रि भौम; देवता–विश्वेदेव; छंदः—१६ १७ अतिजगती, २० विराज, अवशिष्ट त्रिष्टुभ्.

१. हे मित्रावरुणांनो, कोण तुमचा यज्ञ करूं इच्छितात. तुम्ही द्युलोकांत, पृथ्वीवर आणि अन्तरिक्षांत आमचें संरक्षण करावेत. यज्ञ करणाऱ्या आणि दात्या असणाऱ्या मला दुधतृपाप्रमाणें ऐश्वर्य दे.

२. जे बलवान रुद्रांसह असणारे देव हवीसह उत्कृष्ट स्तोत्रें प्राप्त करतात. ते मित्र, वरुण, वायु, ऋभुक्षिन् आणि मरुत आमचीं स्तोत्रें ऐकोत.

३. वायूच्या भागांत (अन्तरिक्षांत) आपल्या घोड्यांना तुंद ठेवण्यांत तत्पर असणाऱ्या कामपूरक अशा तुम्हांला हे अश्वीहो, मी बोलावित आहें. तसेंच पूजार्ह सूर्यदेवाला अन्नाप्रमाणें मननीय स्तोत्र करा.

४. यज्ञ पार पाडणारा स्वर्गीय कण्वांचा होता, आकाशाचे तीनहि भाग व्यापून टाकणारा, सूर्याशीं

एकविचारानें असणारा वायु, अग्नि, पूषन, भग आणि यज्ञांत असणारे विश्वरक्षक आणि उत्कृष्ट अश्वयुक्त असणारे देव युद्धांत येतात.

५. मरुतांनो, तुम्हीं आम्हाला अश्वयुक्त ऐश्वर्य द्या. ऐश्वर्य प्राप्त व्हावें आणि साहाय्य मिळावें म्हणून स्तोता तुमची स्तुति करतो. हे मरुतांनो, त्वराशील असणाऱ्या तुमचे जे घोडे आहेत, त्या चलाख घोड्यांनीं औशिज कक्षीवानाचा होता सुखी होवो.

६. हे ऋत्विजांनो, तुम्ही बुद्धिमान व श्रेष्ठ वायुदेवाला रथाला जोडा. आणि उत्कृष्ट स्तोत्याला स्तोत्रें म्हणावयास लावा. ईर्षेनें वागणाऱ्या, धर्मकार्यतत्पर, प्रज्ञाशालिनी आणि अप्रतिम रूपसंपन्न असणाऱ्या देवपत्न्या आमचा यज्ञ पार पाडण्याकरतां बुद्धि देवोत.

७. हे उषासानक्त (अहोरात्र देवतांनो,) तुम्ही ज्ञात्या आणि थोर आहांत. सूचक आणि सुखकर अशीं स्तोत्रें म्हणून देवांसह असणाऱ्या तुम्हांला आम्ही हवि देत आहोंत. हे देवतांनो, सर्व जाणूनच जणूं कांहीं तुम्ही लोकांना यज्ञप्रवृत्त करतां.

८. तुमच्यासाठीं थोर योध्यांचे पोशिंदे मरुत आणि गृहपति त्वष्ट यांना प्रसन्न करीत त्यांचें मी स्तवन करीत आहे. ऐश्वर्य प्राप्त व्हावें म्हणून संपत्तिप्रद आणि आनंददायक वाग्देवता, ओषधी आणि वनस्पती यांना मी हवि देत आहें.

९. वसूप्रमाणेंच जे वीर्यशाली आहेत ते स्वैरसंचारी मेघ आम्हाला मुलेंबाळें देवोत. प्रशंसनीय, यज्ञार्ह आणि लोकहितकारक असणारा आदित्य आमच्या स्तोत्रांचा इष्टसिद्धि करून उत्कर्ष करो.

१० पृथ्वीवर वृष्टि करणाऱ्या पर्जन्याचा गर्भ असून जो उदकांचा नातु आहे त्या अग्नीची मी योग्य अशा स्तोत्रानें स्तुति करतो. तो अग्नि जात असतां आपल्या सुखकर किरणांनीं त्रास देत नाहीं. मात्र प्रज्वलित होऊन अरण्यें जाळून टाकतो.

११. थोर रुद्रपुत्र मरुतांच्या करतां आम्ही कशी स्तुति करावी ? ऐश्वर्य प्राप्त्यर्थ ज्ञात्या भगाकरतां आम्हीं कोणतें स्तोत्र म्हणावें ? उदकदेवता, ओषधी द्यु, अरण्यें आणि केसांसारखे ज्यांच्यावर वृक्ष आहेत असे गिरि आमचें संरक्षण करोत.

१२. तो आकाशांत संचार करणारा सर्वगामी असून पृथ्वीभोंवती फिरणारा बलाधिपति वायु आमची स्तोत्रें ऐको. उत्तुंग पर्वतांच्या बाजूंनीं स्फटिकाप्रमाणें वहाणारीं स्वच्छ उदकें आमचीं स्तोत्रें श्रवण करोत.

१३. हे थोर मरुतांनो, तुमच्या उपासनेचे मार्ग आम्हांस अवगत आहेत. हे दर्शनीय देवांनो, ऐश्वर्याचा उपभोग घेणारे आम्ही तुमची स्तुति करीत आहोंत. क्षुब्धपणानें चालून येणाऱ्या शत्रूंचा हत्यारांनीं परिहार करीत मरुत चांगुलपणानें आमच्याकडे येत आहेत.

१४. मी स्वर्गीय आणि पार्थिव उत्पन्न झालेल्या उदकाची यज्ञ सुखानें पार पडावा म्हणून स्तुति करीत आहें. चंद्रप्रमुख ग्रह नक्षत्रें आमच्या स्तोत्राचा उत्कर्ष करोत. तुडूंब भरलेल्या नद्या आमचा उत्कर्ष करोत.

१५. पावलोपावलीं माझें काव्य भरलेलें आहे. जी रक्षक शक्ति आहे ती संरक्षक साधनांनीं आमच्या बरोबर असो. ज्ञात्या स्तोत्यांनीं प्रसन्न केलेली थोर भूमिमाता आमच्यावर कृपा करो. ती सरळ हातानें कल्याणकारक संपत्ति देवो.

१६. आम्ही उदार मरुतांचें स्तोत्र म्हणून कशी सेवा करावी ? अशीं स्तोत्रें म्हणून तरी त्या मरुतांचीं कशी सेवा करावी ? आम्ही हवि देऊन तरी कशी स्तुति करावी ? अहिर्बुध्न्य देवानेंहि आम्हाला दुष्टांच्या ताब्यांत देऊं नये, तर त्यानें आमच्या शत्रूंचा नाश करावा.

१७. देवांनो, हा मर्त्य प्राणी तुम्हांला अशा प्रकारें आपल्या पोराबाळाकरतां आणि गाईगुराकरतां आळवीत आहे. मनुष्य तुमची उपासना करीत आहे. करतां माझ्या ह्या मुलाला कल्याणकारक अन्न दे. आणि निर्ऋति माझें म्हातारपणच खाऊन टाकूं य..

१८. हे देवांनो, हे व्यापकांनो, तें तुमचें उत्कृष्ट बुद्धि देणारें आणि बल देणारें अन्न स्तुति केल्यामुळें गाईपासून आम्ही प्राप्त करूं. ती गाय आम्हांला सुख देवो. ती उदार, सुखकारक व आम्हाकडे येणारी आहे.

१९. पशूंच्या कळपाची माता इळा नद्यांच्या गर्जनेनें आमचें अभिनंदन करो. आणि ती आकाशांत प्रकाशणारी तेजस्वी उर्वशी प्राण्यांनीं दिलेलें हविरन्न स्वीकारो.

२०. आणि ऊर्जव्य राजाच्या भरभराटीकरतां देव आमच्या स्तोत्राचा स्वीकार करो.

सूक्त बेचाळिसावें.

ऋषिः —अत्रि भौम; देवता–११ रुद्र, अवशिष्ट विश्वेदेव; छंदः —त्रिष्टुभ.

१. माझी अत्यंत सुखकारक स्तुति आणि कर्म वरुण, मित्र, भग आणि अदिति यांना अवश्य पोंचो. आकाशांत उत्पन्न होणारा, पंच प्राणांचा आधार, अप्रातिहतगति, सुखाधार आणि बलप्रद वायु आमचें स्तोत्र ऐको.

२. आई मुलाला घेते त्याप्रमाणें हृव्य आणि सुखकारक असणारें माझें स्तोत्र अदिति ग्रहण करो. जे देवांना पोंचणारें आवडतें स्तोत्र आहे आणि सुखदायक आहे तें स्तोत्र मित्रभूत वरुणाला मी अर्पण करतों.

३. हे ऋत्विजांनो, कवींतल्या कविश्रेष्ठाला उत्तेजन द्या. तूप आणि सोम रसानें त्याला तृप्त करा. तो सवितृदेव आम्हाला हितकारक असणाऱ्या सोन्यासारख्या सुंदर वस्तु निर्माण करील.

४. हे इंद्रा, आम्हाला उदार मनानें गाई दे. हे अश्वयुक्त इंद्रा, आम्हांला चांगले ऋत्विज दे आणि आमचें कल्याण कर. जें देवांना हितकारक अन्न असेल तें अन्न आम्हांस विपुल दे. तसेंच यज्ञिय देवांचा आमच्यावर अनुग्रह असो.

५. भग, सवितृदेव, धनाधीश त्वष्टृ, वृत्रहन्ता, संपत्ति जिंकणारे ऋभु, वाज आणि विभु हे सर्व अमर देव आम्हाकडे त्वरेनें येत आमचें रक्षण करोत.

६. युद्धांत मागें न हटणारा, जयशील सदा तरुण अशा मरुतांच्या सहित असणाऱ्या इंद्राचे पराक्रम आम्ही वर्णन करीत आहोंत. हे इंद्रा, तुझा पराक्रम पूर्वी कोणाला करतां आला नाहीं, सध्यां कोणाला करतां येत नाहीं आणि पुढेंहि कोणाला करतां येणार नाहीं.

७. जो सामगायन करणाऱ्याला आणि स्तुति करणाऱ्याला अत्यंत सुख देणारा आहे, जो विपुल संपत्तियुक्त आहे आणि जो धांवा करणाराकडे जातो त्या संपत्तीचें आगर आणि संपत्ति देणाऱ्या बृहस्पतीची तूं स्तुति कर.

८. हे बृहस्पते, तुझ्या साहाय्यामुळें धनिक लोक सुरक्षित आणि चांगल्या संततीला प्राप्त करतात. जे घोडे देतात, जे गाई देतात आणि जे वस्त्र देतात ते भाग्यशाली होत. त्यांच्याजवळ संपत्ति असते.

९. जे आमच्या प्रार्थनांच्या बळावर न देतां उपभोग घेतात त्या नास्तिकांना, जगांत वृद्धिंगत होणाऱ्या ब्रह्मद्वेष्ट्यांना सूर्यापासून वेगळें कर. अशांचें धन क्षणभंगुर कर.

१०. जो यजमान यज्ञांत राक्षसांना बोलावतो त्याची बिनचाकी रथानें धिंड काढ. तुमच्याकरतां प्रयत्नांची शर्थ करणाऱ्या भाविकाच्या करामतीची जो निंदा करील, तो स्वतः कितीहि खपला तरी त्याचे मनोरथ शेवटीं तुच्छच होतील.

११. ज्याचें शरसंधान उत्कृष्ट जो महाधनुर्धारी, जो यच्चावत् औषधांचा प्रभु अशा त्या रुद्राची स्तुति कर.तो थोर देव प्रसन्न होण्याकरतां यजन कर.तूं स्तोत्रें म्हणून बलशाली देवाची उपासना कर.

१२. जे उदार आहेत, जे उदार आणि कुशल आहेत, ज्या पाऊस पाडणाऱ्या इंद्राच्या पत्न्या आहेत आणि ज्यांचे मार्ग परमेश्वरानें व्यापले आहेत ती आकाशांत चमकणारी सरस्वती आणि निर्मल राका आमच्या इच्छा पूर्ण करीत आम्हांला धन देवोत.

१३. एकदम स्फुरण पावणारी माझी ध्यानबुद्धि आणि माझी अपूर्व स्तुति ही त्या जगद्रक्षक इंद्राकरतां आहे. त्या उदक वर्षाव करणारानें आपल्या मुलीच्या (पृथ्वीच्या) करतां अनेक रूपें घेऊन आम्हाकरतां हे उदक निर्माण केलें.

१४. हे स्तोत्या,गर्जना करणाऱ्या आणि आवाज करणाऱ्या आणि अन्नाधीश पर्जन्याकडे ही उत्कृष्ट स्तुति पोंचो. तो मेघयुक्त आणि जलयुक्त आहे. द्यावापृथ्वीला चिंब करीत तो विद्युल्लतेसह जात असतो.

१५. माझें हें स्तोत्र मरुद्गणाच्या सामर्थ्याकडे जावो, तारुण्यशोभी रुद्रपुत्राकडे जावो. माझी इच्छा मला कल्याणकारक ऐश्वर्य देण्याविषयीं प्रेरणा देत आहे. म्हणून यज्ञांकडे जाणाऱ्या पृषदश्व मरुतांची तूं स्तुति कर.

१६. ही स्तुति ऐश्वर्य मिळण्याकरतां पृथिवी, अन्तरिक्ष, औषधि आणि वनस्पति यांना प्राप्त होवो. सर्व देव माझी प्रार्थना ऐकून घेवोत. तसेंच भूमाता मला दुर्बुद्धि न देवो.

१७. हे देवांनो, आम्हीं विस्तीर्ण आणि अनिर्बंध (सुखांत) असावें.

१८. आम्हांस नवीन कल्याणप्रद कृपेचा आणि नेतृत्वाचा लाभ घडो. हे अमर अश्विहो, संपत्ति, पुत्र आणि सर्व प्रकारचें सौभाग्य आमच्याकडे घेऊन या.

सूक्त त्रेचाळिसावें.

ऋषिः—अत्रि; देवता–विश्वदेव; छंदः—त्रिष्टुभ.

१. गाई मधुर दुधासह वेगानें संरक्षण करीत आमच्याकडे येवोत. स्तोता ब्राह्मण विपुल संपत्ति प्राप्त

व्हावी म्हणून सुखकारक सात नद्यांना सारखा बोलावीत आहे.

२. स्तोता न दमणाऱ्या द्यावापृथ्वींना उत्तम स्तुति करून आणि हवि देऊन समृद्धि प्राप्त व्हावी म्हणून माझ्याकडे वळावितो. मातृपितृभूत असणाऱ्या द्यावापृथ्वी मधुर भाषण करणाऱ्या उदार आणि कीर्तिमान् असणाऱ्या त्या युद्धांत आमचें संरक्षण करोत.

३. अध्वर्यूंनो, तुम्ही मधुर पेय तयार केलें आहे. तो सुंदर आणि स्वच्छ सोमरस वायूला अर्पण करा. हे वायो, तूं होत्याप्रमाणें ह्या सोमाचा भाग प्रथम पी. तुला आनंद व्हावा म्हणून आम्ही सोम अर्पण करीत आहोंत.

४. जे सोमाचें आलंभन करणारे आहेत ते सुंदर दोन हात दहा बोटानें सोम कुटण्याचा दगड हातांत घेतात. सोमाचा रस दगडावर आल्हादक वाटला. सोमाच्या कांड्यांतून स्वच्छ सोमरस निघाला.

५. हे इंद्रा, पराक्रम गाजवावे, बल वाढावें आणि आनंद व्हावा म्हणून तुझ्या उपभोगाकरतां सोमरस तयार केला आहे. म्हणून तुझे चांगले घोडे रथाच्या जुवाला जोडून स्तुति केला जाणारा तूं आमच्याकडें वळ.

६. हे अग्ने, आम्हावर प्रसन्न झालेला तूं नमस्कारपूर्वक जिला हवि दिला आहे अशा थोर, सर्ववंद्य देवी अरमतीला देवयान मार्गांनीं आम्हाकडे घेऊन ये. म्हणजे यज्ञाची ज्ञाती असणाऱ्या तिला सोम पिऊन आनंद होईल.

७. ज्या वपायुक्त धर्मपात्राला अग्नीवर तापवून वपा प्रसृत करतात आणि त्यावर तूप टाकतात तो धर्म बापाच्या मांडीवर मुलगा बसावा त्याप्रमाणें यज्ञेच्छु मनुष्य अग्नीवर टाकतो.

८. अश्विदेवांस पाचारण करण्याकरतां ही अत्यंत सुखकर असणारी विस्तृत स्तुति दूताप्रमाणें जात आहे. हे अश्विहो, सुखप्रद असणार तुम्ही ह्या सोमाच्या साठ्याकडे या. रथाचें जूं आणि चाकाचा तुंबा बसण्यास आणी लागते त्याप्रमाणें तुम्ही यज्ञांत आवश्यक आहांत.

९. जे हवि दिल्यानें बुद्धीला प्रेरणा देतात आणि जे तुम्ही लढाईत संपत्ति देता त्या बलशाली आणि चलाख पूषन आणि वायूची नमस्कारपूर्वक मी स्तुति करतों.

१०. हे सर्वज्ञ अग्ने, आम्ही बोलावल्यावर त्यांच्या नांवानीं आणि स्वरूपानीं प्रत्यक्ष तूं घेऊन येतोस. हे सर्व मरुतांनो, तुम्ही सर्व स्तोत्याच्या स्तुति आणि हवि यांना उद्देशून साहाय्य करण्याकरतां या.

११. द्युलोकांतून व मोठ्या पर्वतांतून पूज्य सरस्वती आमच्या यज्ञांत येवो. घृताप्रमाणें कांतीनें सुकुमार असणारी ती देवी आमच्या हवींचा स्वीकार करून उत्कण्ठित मनानें आमची भक्तिरसपूर्ण वाणी श्रवण करो.

१२. हे ऋत्विजांनो, विधाता, नीळपृष्ठ अशा थोर बृहस्पतीला तुम्ही यज्ञांत बसवा. तो आपल्या स्थानीं बसल्यावर तेजस्वी, सुवर्णकांति आणि झकझकीत बृहस्पतीची आम्ही सेवा करूं.

१३. जगदाधार, तेजस्वी, रमवणारा, सर्व प्रकारच्या साहाय्यांसह बोलावला जाणारा, अग्नि आमच्या यज्ञांत येवो. तो प्रज्वलित, ओषधी पांघरणारा, नित्य, अनेक शिंगासारख्या ज्वाला असलेला, बलिष्ठ आणि अन्नभक्षण करणारा आहे.

१४. पृथ्वीवरच्या परमोच्च व उज्ज्वल स्थानीं यजमानाचे साधनसंपूर्ण स्तोते आले आहेत. लहान मुलाला वस्त्रानें स्वच्छ करावें त्याप्रमाणें सुखकारक अग्नीला हवि देणारे स्तोते नमस्कार करून अलंकृत करतात.

१५. हे अग्ने, थोर अशा तुझीं कर्में करण्यांत आयुष्य गेलेले दंपती तुला पुष्कळ अन्न देऊन तुझी सेवा करतात. तर तशा माझी सर्व देव प्रार्थना ऐकून घेवोत. तसेंच भूमाता आम्हाला दुर्बुद्धि न देवो.

१६. हे देवांनो, आम्ही विस्तीर्ण आणि अनिर्बंध (सुखांत) असावें.

१७. नवीन व कल्याणप्रद कृपेचा आणि नेतृत्वाचा लाभ आम्हास घडो. हे अमर अश्विहो, संपत्ति, पुत्र आणि सर्व प्रकारचें सौभाग्य आमच्याकडे घेऊन या.

सूक्त चव्वेचाळिसावें.

ऋषिः—अवत्सार कश्यपगोत्र, जेथें जे ऋषि आले आहेत तेथें ते उदा० सदापृण, बाहुवृक्त; देवता-विश्वेदेव; छन्दः—१४.१५ त्रिष्टुभ, अवशिष्ट जगती.

१. पुरातन काळांतील, आमच्या सर्व पूर्वजांनीं आणि सध्यांच्या सर्वांनीं ज्याप्रमाणें फळ मिळवलें त्याप्रमाणें सर्वश्रेष्ठ, दर्भासनावर बसलेल्या सर्वज्ञ, आम्हांला अभिमुख असणाऱ्या, बलशाली व्यापक व

विजयी इंद्राला स्तवून मी आपल्या इच्छा पूर्ण करतों. ह्या स्तुतीमुळेंच तुझा उत्कर्ष होतो.

२. मेघाच्या तेजास्वितेचें कारण तूं आहेस. सूर्याला प्रकाश देणारा देव तूं आहेस. दिशांना स्थिर ठेवणारा वायु तूंच. हे पराक्रमी इंद्रा, तूं नाश करणारा नाहींस, तर सर्वांचें चांगलें संरक्षण करणारा आहेस. तूं सर्व कपटांच्या पलीकडचा आहेस, म्हणून तुझें नांव सनातन सत्यांत धरलें आहे.

३. (अग्नि) हा अग्नि अस्थिर, स्थिर आणि सत्स्वरूप असणारे हवि ग्रहण करतो. बलसंपादक असणारा अग्नि अप्रतिहतगमन आणि होमनिष्पादक आहे. हा पसरूं लागला म्हणजे पाऊस पाडीत असतो, नंतर जराविहीन तरुण असतो आणि वनस्पतींच्या पोटांत राहतो.

४. (सूर्य) तुमच्याकरतां हे सृष्टिनियमांना परिपुष्ट करणारे अश्व ह्या भक्ताकरतां, खालीं जाण्याकरतां चांगले जोडले आहेत. हा व्यवस्थित रीतीनें पसरणाऱ्या आणि सर्वांवर सत्ता चालवणाऱ्या किरणांनीं जमिनीवरील तळ्यांतील पाणी शोषून घेतो.

५. हे सरळ स्तविल्या जाणाऱ्या अग्निदेवा, लांकडी भांड्यांत पिळून भरलेला अल्पशाखायुक्त सोमाचा रस सुंदर स्तोत्रांसह स्वीकारणारा व प्रशंसनीय असणारा तूं सतत स्तुति करणाऱ्या स्तोत्यांत शोभतोस. यज्ञांत पत्नीभूत असणाऱ्या सर्वाधार ज्वालांना तूं वृद्धिंगत कर.

६. (विश्वेदेव) तो जसा दिसतो तसेंच त्याचें वर्णन केलें जातें. त्याच्या अमोघ कांतीनें त्यांनीं पाण्यांत विविध संपत्ति देणारी पृथ्वी धारण केली. तसेंच अपार आवेश, मुलाबाळांसह असणारें अखंड सामर्थ्य तूं आम्हांस द्यावेंस.

७. (सूर्य) उषारूपी स्त्रीसह असूनहि तो पुढारी आहे. ज्ञाता सूर्य युद्धाची इच्छा करून मनःपूर्वक युद्धांत जातो. तेजस्वी घराचें सर्व बाजूंनीं संरक्षण करणारा तो आम्हांला संपत्ति ताब्यांत देऊन सुख देवो.

८. हे देवा, ज्या ऋचांत तुझें नांव असतें त्यांनीं या सूर्याच्यासंबंधीं कर्में करून ऋषींनीं स्तविलेल्या सर्व श्रेष्ठाची भक्त सेवा करतो. ज्या कार्यावर मन जडतें तें कौशल्यानें त्याला साधतां येते. जो स्वतः खटपट करील तो तडीला नेईल.

९. (सूर्य) ह्या सर्व स्तुतींत श्रेष्ठ अशी आमची स्तुति समुद्रापर्यंत प्रसिद्ध झाली. जेथें विस्तृत स्तोत्रें गायिलीं जातात त्या यज्ञगृहांचा नाश होत नाहीं. ज्या यज्ञगृहांत सूर्यासंबंधीं स्तोत्र चालूं असतें तेथें स्तोत्यांच्या मानसिक इच्छांना केव्हांच धोका येत नाहीं.

१०. (सूर्य) तोच सर्व प्रसिद्ध आहे. क्षत्र, मनस, एवावद, यजत, सध्रि, अवत्सार यांच्या रमणीय स्तोत्रांनीं ज्ञात्यांनाहि स्पृहणीय अत्यंत बलपूर्ण सामर्थ्य आम्ही प्राप्त करूं.

११. (मद) विश्ववार, यजत आणि मायिन् यांचा सोमरसाचा मद सोमानें आणलेला, सुखकारक आणि उदरपूर्वक आहे. ते एकमेकाला सोम घेण्याची आज्ञा मागतात. आणि पिण्याकरतां मदकर सोम मिळतो.

१२. सदापृण, यजत, बाहुवृक्त, श्रुतवित् आणि तर्य तो तुमच्यासह येऊन शत्रूंना ठार करतो. ज्या ह्या देवगणांचीं स्तोत्रें म्हणून सेवा करतो. त्याच्या दोनहि लोकांतील इच्छा पूर्ण होतात.

१३. यज्ञ करणाऱ्या अवत्सराचा सुतंभर नांवाचा सज्जन पुरोहित होता. तोच सर्व कवनांचा साठा आणि फल देणारा होय. गाईनें बलयुक्त दूध दिलें, कारण, तसें दूध तिचेजवळ असतें. पण तें सर्व स्तुति करणाऱ्या भक्ताला होय, घोरत पडणाऱ्यास काय आहे?

१४. जो जागा असतो त्याची ऋचा इच्छा करतात. जो जागृत असतो, त्याच्याकडेच सामसूक्तें येतात. जो जागा असतो त्यालाच हा सोम म्हणतो मी तुझा आहे. तुझ्या मैत्रींत मी स्थान केलें आहे.

१५. अग्नि जागरूक असतो म्हणून त्याच्यावर ऋचा प्रेम करतात. अग्नि जागृत असतो म्हणूनच त्याच्याकडे सामसूक्तें येतात. अग्नि हाच जागृत राहतो म्हणूनच सोमरस म्हणतो कीं तुझ्या मित्रप्रेमांतच मी गृहसौख्याचा उपभोग घेत राहणार.

१.२. टीपः—पहिली व दुसरी ऋचा इंद्राच्या आहेत असें ऐतरेय ब्राह्मणांतील विनियोगावरून दिसतें. कारण, तेथें इंद्रामंथि नांवाच्या पात्राचें ग्रहण करतांना ह्या मंत्रांचा विनियोग आहे. आणि तीं पात्रें इंद्राचीं आहेत यावरून ह्या मंत्राची देवता ठरते. तथापि मंत्रकर्त्याच्या उद्देशाविषयीं संशय प्रदर्शित करतां येईलच.

सूक्त पंचेचाळिसावें.

ऋषिः—सदापृण आत्रेय; देवता–विश्वदेव; छंदः–त्रिष्टुभ.

१. स्तोत्रें म्हटल्यामुळें आकाशांतून ज्ञात्या इंद्रानें वज्र फेकलें आणि उषेचे किरण बाहेर पडले. इतक्यांत रात्र उजाडली आणि सूर्य उगवला आणि लोकांच्या घरांचीं दारें उघडलीं.

२. सूर्यानें पदार्थ दिसतील असा प्रकाश पाडला. सर्व प्रकाशाची माता उषा सर्व लक्षांत वेत उदय पावली. उदकानें तुडुंब भरलेल्या नद्या कुलंकष वाहूं लागल्या. घट्ट पुरलेल्या मेखेप्रमाणें द्युलोक स्थिर राहिला.

३. ह्या स्तोत्रामुळें मेघांत पाणी उत्पन्न झालें. थोरांचें उत्पत्तिस्थान अशा प्राचीन सृष्टीकरतां मेघानें उदक बाहेर टाकलें. आकाशांतून वृष्टि झाली. तेव्हां सेवा करणारांना अत्यंत त्रास झाला.

४. हे इंद्राग्नीहो, तुम्हाला देवांना प्रसन्न करणारीं उत्कृष्ट स्तोत्रें म्हणून मदतीकरतां मी बोलावीत आहें. यज्ञभाग संपादन करणारे, सेवा करणारे भक्त स्तोत्रें गाऊन मरुतांची पूजा करतात.

५. आज आमच्याकडे या. आम्ही चांगलीं कर्मे करीत आहोंत. तसेंच दुष्टांना आम्हीं ठार करीत आहोंत. आम्हीं गुप्त द्वेष्ट्यांना दूर करतों. आम्हीं यज्ञ करणाऱ्यांच्या नेहमीं सन्मुख असतो.

६. मित्रांनो, या. ज्यायोगें उषामातेनें प्रकाशाचा पुंज उत्पन्न केला, ज्यामुळें मनूनें विशिशिप्राला जिंकलें आणि वंकु वाण्याला उदक मिळालें, ती स्तुति आपण करूं या.

७. येथें हातांत जुळलेल्या दगडांनीं शब्द केला. अशा प्रकारें नवग्वांनीं दहा महिने इंद्राची सेवा केली. नंतर सरळ मार्गानें जाणाऱ्या सरमेला गाईचा शोध लागला. आणि अंगिरा ऋषींनीं सर्व गोष्टी खऱ्या करून दाखविल्या.

८. जेव्हां सर्व अंगिरसांनीं ही थोर उषा उजाडल्यावर गाई प्राप्त केल्या, तेव्हां ह्या गाईंचा दुधांचा साठा श्रेष्ठ यज्ञाला उपयोगी पडला. सत्य मार्गानें सरमेनें गाईचा शोध लावला.

९. सप्ताश्व सूर्य इकडे येवो. कारण, हा विस्तृत प्रदेश त्याच्या प्रवासाकरतांच आहे. चलाख श्येनानें अन्नावर झडप घातली तेव्हां हा ज्ञाता व ज्ञान देणारा सूर्य प्रकाशांत चमकूं लागला.

१०. सूर्यानें जेव्हां लखलखीत पाठीचे घोडे जोडले तेव्हां तो स्वच्छ उदकाच्या पृष्ठावर उदय पावला. शहाण्या लोकांनीं (स्तुति करून) पाण्यांतून नाव यावी त्याप्रमाणें त्याला बाहेर आणलें. त्याचें ऐकून पाणीहि खालीं आलें.

११. हे देवांनो, ज्या स्तोत्रानें नवग्वांनीं दहा महिनें सेवा केली त्या स्तोत्रानें आम्हांला देवांचें साहाय्य मिळावें. ह्या स्तोत्रानें आम्ही पापांतून तरून जावें. मी उदकवर्षाव करणारी व सर्व इष्टसिद्धि घडवणारी स्तुति करीत आहें.

सूक्त शेहेचाळिसावें.

ऋषिः—प्रतिक्षत्र; देवता–१–६ विश्वेदेव, ७–८ देवपत्नी; छंदः—२–८ त्रिष्टुभ, अवशिष्ट जगती.

१. घोड्याप्रमाणें ज्ञाता मनुष्य आपणहून यज्ञाच्या धुरेला जोडला जातो. मी संरक्षक आणि तारक जूं धारण करतो. ह्या जोखडापासून सुटण्याची मी इच्छा करीत नाहीं. किंवा पुन्हां पुन्हां घेण्याचीही मा इच्छा करीत नाहीं. कारण मार्ग जाणणारा देव माझा पुढारी आहे तो मला सरळ पोंचवील.

२. हे अग्ने, हे इंद्रा, वरुणा, मित्रा, तसेंच हे मरुतांनो, हे विष्णो, हे देवांनो, तुम्हीं आम्हांला सामर्थ्य द्या. दोन अश्वीनों, रुद्र, देवपत्न्या, पूषन, भग आणि सरस्वती आमच्या सेवेचा स्वीकार करोत.

३. इंद्राग्नी, मित्रावरुण, आदिति, सूर्य, द्यावापृथ्वी मरुत, पर्वत, उदक, विष्णू, पूषन, ब्रह्मणस्पति, भग आणि प्रशंसनीय सविता यांना मी रक्षणाकरतां बोलावीत आहें.

४. विष्णु, संरक्षक वायु द्रविणोदस्, आणि सोम आम्हांला सुखी करोत. ऋभु, अश्विनी, त्वष्टृ आणि विभु हे देव आम्हांला संपत्ति देवोत.

५. तसेंच तो पूजनीय असणारा स्वर्गांतील मरुतांचा संघ आमच्या यज्ञांत दर्भावर बसण्याकरतां येवो. बृहस्पति आम्हांला सुख देवो, तसेंच पूषाहि आम्हाला संरक्षक घर देवो. तसेंच वरुण, मित्र आणि अर्यमा आम्हांला सुख देवोत.

६. तसेंच ते पर्वत, प्रशंसनीय आणि सुंदर पाण्याच्या नद्या आमचें संरक्षण करोत. धन देणारा

---

६ टीपः— १–११२–११ वरील टीप पहा.

१. टीपः—श्राद्धविस्तार करूं नये असा निषेध आहे तसें फार यज्ञ करण्याचाहि निषेध आहे.

भग बल आणि साहाय्यासह आमच्याकडे येवो. व्यापक अदिति माझा धांवा ऐको.

७. देवपत्न्या उत्कण्ठेनें आमचें रक्षण करोत. सामर्थ्य आणि ऐश्वर्य प्राप्तीकरतां आमचें संरक्षण करोत. ज्या पृथ्वीवर आहेत, ज्या उदकसंबंधी आहेत आणि ज्या अन्तरिक्षांत आहेत त्या सहज येणाऱ्या देवता आम्हांला सुख देवोत.

८. तसेंच दिव्य स्त्रिया, देवपत्न्या म्हणजे इंद्राणी अग्नायी, तेजस्वी अश्विनी, रोदसी, वरुणानी ह्या आमची हांक ऐकोत. जो देवपत्न्यांचा काल आहे तो आमची हाक ऐको.

सूक्त सत्तेचाळिसावें.

ऋषिः—प्रतिरथ; देवता—विश्वेदेव; छंदः—त्रिष्टुभ.

१. (उषा) पृथ्वीला जागृत करून कर्मतत्पर करणारी स्वर्गकन्या उषा स्तुति चालूं असतां येत आहे. सर्व लोकांच्या उपयोगी पडणाऱ्या, तरुण आणि प्रशंसनीय उषेचा देवांसह यज्ञगृहांत धांवा चालूं आहे.

२. (रश्मी) गमनशील, प्रकाश देत पसरणारे, उदकाचें मूळस्थान (सूर्य) त्याच्या भोंवती असणारे, अगणित पसरलेले किरण द्यावापृथ्वीभर पसरलेले असतात.

३. (सूर्य) उदक वर्षाव करणारा, उदक उत्पन्न करणारा, तेजस्वी सूर्य, पूर्वेकडील आकाशांत आला. अनेक रंगाच्या उल्केप्रमाणें हा आकाशामध्यें फिरत आहे. अन्तरिक्षाच्या दोन्ही टोकांचें तो संरक्षण करीत असतो.

४. कल्याणेच्छु चौघेजण ह्या सूर्याला धारण करतात. दहा (दिशा) गर्भासारख्या याला हिंडण्याकरतां चालावयास लावतात. तीन प्रकारचे सूर्याचे किरण उदयानंतर अन्तरिक्षांत जात असतात.

५. हे लोकहो, हें मंडल आश्चर्यकारक आहे. ज्यामुळें नद्या वहात असतात आणि पाणी (समुद्रांत) अखंड असते. तसेंच अहोरात्रि, मातृभूत अन्तरिक्षापासून येथेंच जोडीनें उत्पन्न झालेल्या आणि सारख्या असणाऱ्या द्यावापृथ्वी ह्या सूर्याचें धारण करोत.

६. भक्त ह्याकरतां कर्म आणि स्तोत्रें करीत असतात. माता पुत्राकरतां वस्त्रें विणतात. बलिष्ठ सूर्याच्या संपर्कानें आनंदित झालेल्या किरणरूपी स्त्रिया आकाशमार्गानें येत आहेत.

७. हे मित्रावरुणांनो, हें स्तोत्र म्हटलें जावो. हे अग्ने, हें स्तोत्र म्हटलें जावो. आम्हाला सुख देण्याकरतां हें स्तोत्र म्हटलें जावो. आम्ही आधार आणि स्थैर्य प्राप्त करूं. सर्वाधार थोर सूर्याला नमस्कार असो.

सूक्त अठ्ठेचाळिसावें.

ऋषिः—प्रतिभानु आत्रेय; देवता–विश्वेदेव; छंदः—जगती.

१. (विद्युत) प्रिय, तेजोरूप, सामर्थ्यवान आणि स्वतःवर उपजीविका करणाऱ्या थोर अग्नीची आम्ही स्तुति कोणत्या प्रकारें करावी ? कारण, ती अपरिमित अन्तरिक्षांत आवरण घालून मेघांत पाणी उत्पन्न करीत पसरते.

२. वीरांचें धाडस वाढविणाऱ्या ज्ञानाचा त्या उषांनीं विस्तार केला. आणि एकसारख्या आवरणानें आकाशाचा पसारा केला. एक आपलें तोंड फिरवून मागें मागें हटत चालली तेव्हां भक्तजनानें पहिलीच्या साहाय्यानें आपला उत्कर्ष करून घेतला.

३. (पूर्वार्धांत इंद्र, उत्तरार्धांत इंद्रात्मा सूर्य) रात्रीं आणि दिवसा पिळलेल्या सोमानें कपटी वृत्रावर इंद्रानें श्रेष्ठ वज्र पाजळलें. त्याचे शेंकडो किरण स्वतःच्या घरांत–अन्तरिक्षांत–दिवसांचें रहाटगाडगें चालवीत फिरत असतात.

४. (अग्नि) जणूं काय परशूच असा अग्नीचा स्वभाव मी पाहिला आहे. ह्या अग्नीचे किरण ऐश्वर्य देणारे आहेत असें मी सांगतों. कारण, आम्हाला साहाय्य करणारा तो देव अन्नसमृद्ध घराप्रमाणें उत्कृष्ट धनहि युद्धांत धांवा करणारांना देतो.

५. चारहि बाजूनें प्रज्वलित झालेला, सुंदर तेज पांघरणारा, अंधार निवारून शत्रूंवर चालून जाम ज्वालांनीं स्वतःला तो सुशोभित करतो. ज्याअर्थी भाग्यवान आणि प्रेरक अग्नि आम्हाला उत्कृष्ट संपत्ति देतो त्याअर्थी त्याचा पराक्रम आमच्या ध्यानांत येत नाहीं.

सूक्त एकूणपन्नासावें.

ऋषिः—प्रतिप्रभ आत्रेय; देवता–विश्वेदेव; छन्दः—त्रिष्टुभ.

१. लोकांना ऐश्वर्य विभागून देणाऱ्या भगदेवाची व सवितृदेवाची तुमच्याकरतां मी स्तुति करीत आहें.

हे अनेक ऐश्वर्याचा उपभोग घेणारे नेते अश्विहो, तुमच्या मैत्रीची इच्छा करीत दररोज तुम्हांला मी आपणाकडे वळवीत आहें.

२. बळवान सवितृदेवाचें प्रत्यागमन केव्हां येईल हें जाणणाऱ्या, तूं चांगलीं सूक्तें म्हणून सवितृदेवाची सेवा करावीस. मनुष्याला उत्कृष्ट संपत्ति वाटून देणाऱ्या देवाची हवि देऊन आपण स्तुति करावी.

३. पूषन, भग आणि अदिति आम्हांला उत्कृष्ट संपत्ति देतात. सूर्य प्रकाशाचें आवरण घालतो. इंद्र, विष्णु, वरुण, मित्र आणि अग्नि हे दर्शनीय देव आम्हांला चांगले दिवस निर्माण करोत.

४. आम्हांला तें उत्कृष्ट धन अपराजित सविता देवो. वहाणाऱ्या नद्या देवोत. कारण, यज्ञकर्ता मी तुम्हाजवळ येऊन मागत आहें. आम्ही धनधान्यसमृद्ध असावें.

५. जे वसूंना सतत अन्न समर्पण करतात, जे मित्रावरुणांची स्तुति करतात, त्यांना विपुल संपत्ति प्राप्त होवो. हे देवांनो, त्यांना अत्यंत सुखी करा. द्यावापृथ्वींच्या साहाय्यानें आम्ही आनंदांत असावें.

सूक्त पन्नासावें.

ऋषिः—स्वस्ति आत्रेय; देवता-विश्वेदेव; छंदः—१-४ अनुष्टुभ, ५ पंक्ति.

१. सर्व लोक सर्वनेत्या (सवित्याचें) सख्य स्वीकारतात. सर्व लोक पोषणाला पुरेसें धन प्राप्त करतात आणि त्याचे धनी होतात.

२. हे नेत्या देवा, जे तुझी स्तुति करण्याला समर्थ असतात ते सर्व तुझेच होत. तेच धनसमृद्ध होतात. तेच श्रेष्ठ असून त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होतात.

३. ह्या यज्ञांत अतिथीप्रमाणें योध्यांचा आणि त्यांच्या पत्नींचा सत्कार करा. तो विघ्नविनाशक आमच्या मार्गांत जें जें आडवें येईल त्याला आणि आमच्या शत्रूंना दूर हाकलून देवो.

४. जेथें जेथें अग्नि सिद्ध असतो व द्रोणांत भरून ठेवलेला सोमरसरूपी पशु देवाकडे जाण्यास सरसावत असतो तेथें तेथें यजमानाच्या मनांत पराक्रमाचा संचार होत असतो. त्याच्या घराची भरभराट होते. तो समुद्राप्रमाणें पाहिजे तें प्राप्त करूं शकतो.

५. हे नेत्या देवा, तुझा हा सारथि संपत्तिमान आणि सुख देणारा आहे. सूर्यदेवाची स्तुति करणारे आम्ही ऐश्वर्याकरतां, कल्याणाकरतां आणि सुखाकरतां स्तुति करीत आहोंत. आम्ही पुनः पुनः स्तुति करीत आहोंत.

सूक्त एक्कावन्नावें.

ऋषिः—स्वस्ति आत्रेय; देवता-विश्वेदेवाः; छन्दः—१-४ गायत्री, ५-१० उष्णिह, ११-१३ जगती किंवा त्रिष्टुभ, १४-१५ अनुष्टुभ.

१. हे अग्ने, हवि देणाऱ्याकरतां सर्व देवांसह पिळलेला सोम पिण्याकरतां तूं ये.

२. हे यथार्थ स्तुति केले जाणारे सत्य कर्में करणारांनो, यज्ञांत या आणि अग्नीच्या जिभेनें सोम प्या.

३. हे बुद्धिमंता व पूजनीय अग्ने, सकाळीं येणाऱ्या बुद्धिमान देवांसह सोम पिण्याकरतां तूं ये.

४. हा सोम फळकटावर पिळून भांड्यांत ओतला जातो. तो इंद्र व वायु यांना आवडता आहे.

५. हे वायो, हवि देणाऱ्याकरतां प्रसन्न अंतःकरणानें हवि भक्षण करण्याकरतां तूं ये. आणि पिळलेलें सोमरसरूपी अन्न पी.

६. हे वायो, तूं आणि इंद्र अशा तुम्ही हा पिळलेला सोमरस पिणें योग्य आहे. दयाळु असणारे तुम्ही तो प्या. सोमरूप अन्नाला उद्देशून तुम्ही या.

७. पिळून दह्यांत मिसळलेला सोमरस इंद्र व वायूकरतां तयार आहे. सखल प्रदेशाकडे नद्या वहाव्यात, तसा हे इंद्रावायूंनो, तुम्हाकडे तो जात आहे.

८. हे अग्ने, तूं सर्व देव, दोन अश्विन आणि उषा यांसह एक विचारानें ये. आणि अत्रीप्रमाणें सोमांत रमून जा.

९. हे अग्ने, मित्रावरुण, सोम व विष्णु यांच्याशीं एक विचारानें तूं ये आणि अत्रीप्रमाणें सोमांत रमून जा.

१०. हे अग्ने, आदित्य, वसु, इंद्र आणि वायु यांच्यासह एक विचारानें तूं ये. आणि अत्रीप्रमाणें सोमांत रमून जा.

११. अश्वि आमचें कल्याण करोत, भग करो, देवी अदिति आमचें कल्याण करो. स्थिर राहून शत्रूंचा निरास करणारा पूषा आमचें कल्याण करो. विशेष ज्ञानी असणाऱ्या द्यावापृथ्वी आमचें कल्याण करोत.

१२. कल्याणाकरतां आम्ही वायूची स्तुति करीत आहोंत. जो जगाचा अधिपति आहे त्या सोमाची

आम्ही स्तुति करीत आहोंत. सर्व गणांसहित बृहस्पतीची आम्ही कल्याणाकरतां स्तुति करीत आहोंत. सर्व आदित्य आमचें कल्याण करणारे होवोत.

१३. सर्व देव आमचें कल्याण करणारे होवोत. सर्वव्यापक वैश्वानर अग्नि आमचें कल्याण करो. देव आणि ऋभु आमचें कल्याण करून संरक्षण करोत. रुद्र आमचें कल्याण करून पापापासून आमचें संरक्षण करो.

१४. हे मित्रावरुणांनो, हे मार्गरक्षक देवते, हे धनदेवते, तूं आमचें कल्याण करून आमचें संरक्षण कर. इंद्र व अग्नि आमचें कल्याण करो आणि हे अदिते, तूं आमचें कल्याण कर.

१५. सूर्य व चंद्राप्रमाणें मी मार्गानें सुखानें संचार करीन. दानशील, जाणत्या आणि दयाळू माणसांशींच आमची पुनः गाठ पडो.

सूक्त बावन्नावें.

ऋषिः—श्यावाश्व आत्रेय; देवता–मरुत्; छंदः—६–१७ पंक्ति, अवशिष्ट अनुष्टुभ्.

१. हे श्यावाश्व ऋषे, धैर्यशाली असणारा तूं स्तुत्य मरुतांची प्रशंसा कर. कारण, ते यज्ञार्ह मरुत दररोज हितप्रद अन्न मिळवून आनंद पावतात.

२. ते धैर्यशाली मरुत अचल सामर्थ्याचे सखे आहेत. ते गेले तरी धैर्यानें आपणाहून नेहेमीं संरक्षण करीत असतात.

३. ते मरुत पाझरत जलसिंचन करीत अनेक रात्रि ओलांडून जातात. म्हणून द्यावा आणि पृथ्वीवर असणारे मरुतांचें तेज आम्ही स्तवीत आहोंत.

४. हे यज्ञ करणाऱ्यांनो, तुम्ही त्या धैर्यशाली मरुतांना हवि द्या आणि स्तोत्रें म्हणा. कारण, हे सर्व मरुत नेहमीं मनुष्याचें नाशापासून रक्षण करतात.

५. हे होत्या, जे पूज्य, दानशील, अत्यंत बलशाली आणि नेते आहेत त्या यज्ञार्ह मरुतांना तूं हवि दे.

६. नेते व थोर मरुत आयुधांनीं आणि अलंकारांनीं प्रकाशत असतात. आणि आयुधें (शत्रूवर) टाकीत असतात. हे मरुत आणि विद्युल्लता खळखळणाऱ्या पाण्याप्रमाणें जात आहेत. तेजस्वी मरुद्गणांचा प्रकाश आपणहून बाहेर पडत आहे.

७. जे पृथ्वीवर उत्कर्ष पावतात, जे अन्तरिक्षांत भरभराटींत, जे गर्जना करणाऱ्या नद्यांत आणि जे द्युलोकांत उत्कर्ष पावतात ते पाऊस पाडण्याकरतां भाले फेंकीत असतात.

८. हे स्तोत्या, सत्यसामर्थ्य आणि उत्कर्षशाली मरुतांच्या सामर्थ्याची तूं स्तुति कर. त्या नेत्यांनीं उदक उत्पन्न करण्याकरतां आपणाहूनच चलाख हरिणी जोडल्या.

९. जे लोकरीचीं स्वच्छ वस्त्रें वापरतात तें परुष्णी नदीवर आहेत. ते आपल्या रथाच्या धांवानीं मेघांना फोडते झाले.

१०. आपथ, विपथ, अंतःपथ आणि अनुपथ अशा चार मार्गांनीं येणारे मरुत मोकळेपणानें यज्ञांत येतात.

११. ते नेते सृष्टि चालवतात असें नाहीं तर त्यांचे घोडेहि चालवतात. हे पारावत आहेत म्हणून यांचें रूप पहाण्यासारखें आश्चर्यकारक आहे.

१२. छंदोबद्ध स्तोत्रें म्हणणाऱ्या, उदकाची इच्छा करणाऱ्या, स्तोत्यांनीं तान्हेलेल्या गोतमाकरतां विहिर निर्माण केली. चोराप्रमाणें अदृश्य असणारे ते मरुत प्रगट झाले.

१३. जे प्रेक्षणीय, भाले घेतलेले ज्ञाते आणि सृष्टिकर्ते आहेत, त्या मरुत्संघाची हे ऋषे, तूं रमणीय स्तोत्र करून सेवा कर.

१४. हे ऋषे, मरुत्संघाकडे आदित्याप्रमाणें तूं स्तुति करीत जा. हे धैर्यशाली मरुतांनो, स्तोत्रें म्हणून स्तविलेले तुम्ही द्युलोकांतून किंवा जेथें असाल तेथून या.

१५. ह्या मरुतांची स्तुति करणारा भक्त गम्ते म्हणून प्रसिद्ध असलेल्या आणि अलंकार घातलेल्या मरुतांपासून नदीप्रमाणें देणग्या प्राप्त करतो.

१६. मी त्यांच्या आप्तांची चौकशी केली असतां ज्ञात्यांनीं मला उत्तर दिलें कीं पृश्नि त्यांची आई आहे आणि समर्थ असणारे लोक म्हणाले, वेगवान रुद्र त्यांचा पिता आहे.

१७. समर्थ असणाऱ्या मरुतांच्या सातासातांच्या एकेका संघानें मला शंभर शंभर देणग्या दिल्या. यमुनेवर प्रसिद्ध असणाऱ्या गाईंच्या देणग्या आणि घोड्यांच्या देणग्या मला मिळाल्या.

---

१० टीपः—आपथ, विपथ, अंतःपथ आणि अनुपथ हे रस्त्यांचे प्रकार दिसतात.

सूक्त त्रेपन्नावें.

ऋषिः—श्यावाश्व; देवता-मरुत्; छंदः—१.५.१०. ११.१५ ककुभ, ६. ७. ९. १३. १४. १६ सतोबृहती, ८. १२. गायत्री, २ बृहती, ३ अनुष्टुभ् ४ पुरउष्णिह.

१. ह्या मरुतांचा जन्म कोणाला ठाऊक आहे? पूर्वी ह्या मरुतांच्या सुखांत कोण होते? कारण, ह्यांच्या रथाला हरणें जोडलेलीं असतात.

२. रथांत बसलेल्या ह्या मरुतांचा (आवाज) कोणी ऐकला? ते कसे गेले? कोणा उदाराकरतां बांधवभूत पर्जन्यवृष्टि व अन्नासह खालीं येतील?

३. जे मरुत चांगल्या घोड्यावर बसून सोमाकरतां माझ्याकडे येतात आणि मला म्हणतात कीं आम्ही लोकहितकारक आणि निष्पाप आहोंत, असे पाहून तूं आमची स्तुति कर.

४. हे मरुतांनो, तुमचा स्वयंप्रकाश अलंकारावर, हत्यारावर, हातावर, उरोभूषणावर, शरीरालंकारावर रथावर आणि धनुष्यावर जो पसरला आहे त्याची मी स्तुति करतों.

५. हे उदार मरुतांनो, पावसाबरोबर सर्वत्र फिरणाऱ्या प्रकाशाप्रमाणें तुमच्या रथाची प्रसन्नतेकरितां मी स्तुति करीत आहें.

६. नेते आणि उदार मरुत दात्यांच्याकरतां ज्या मेघाला आकाशांतून मोकळें करतात आणि द्यावापृथ्वीवर पाऊस पाडतात, ते उदकांसह मरुत सर्वत्र जातात.

७. मेघांतून बाहेर येणारे वहाणारे मरुत गाईप्रमाणें मार्ग आक्रमण करणाऱ्या चलाख घोड्याप्रमाणें उदकानें अन्तरिक्षभर पसरतात. आणि नद्या वाहूं लागतात.

८. हे मरुतांनो, तुम्ही द्युलोकांतून या. अन्तरिक्षांतून या किंवा ह्या लोकांतून या, पण दूरदेशीं राहूं नका.

९. रसा, अनितभा, कुभा, क्रुमु किंवा सिंधु तुम्हांला थोपवून न धरोत. पाण्यानें उचंबळणारी सरयु तुम्हांला आडवी न होवो. तुमचें सुख आम्हांलाच लाभो.

१०. तुमच्या नव्या रथाचें सामर्थ्य व मरुतांचा तेजस्वी संघ यांना अनुसरून पाऊस येत असतो.

११. हे मरुतांनो, तुमचें सामर्थ्य, टोळी आणि संघ यांना उत्कृष्ट स्तुति करून आम्ही अनुसरूं.

१२. ह्या रथानें मरुत कोणा कुलीन आणि उदार भक्ताकडे गेले असावेत?

१३. हे मरुतांनो, ज्यामुळें तुम्ही मुलाबाळाकरतां अक्षय्य बीजभूत धान्य आणतां आणि ज्या सर्वश्रेष्ठ भाग्यशाली समृद्धीची आम्ही इच्छा करतों, तें तुम्ही आम्हांस द्या.

१४. हे मरुतांनो, आम्ही सुख प्राप्त करून, निंदकाचा तिरस्कार करून शत्रूंचें अतिक्रमण करून जाऊं. पाऊस पडून सुख, पवित्रपणा, उदक, दूध, तूप आणि औषधी यांना एकदम प्राप्त करूं.

१५. हे पूज्य व नेते मरुतांनो, ज्याचा तुम्ही सांभाळ करतां त्याला देवांचें साहाय्य लागतें आणि तो मुलांबाळांनीं युक्त होतो म्हणून आम्ही तुमचे व्हावें.

१६. हे स्तोत्या, तूं ह्या स्तुति करणाऱ्या भक्ताच्या यज्ञांत मरुतांची स्तुति कर. गाई गवतावर जशा रमून जातात तसा तूं रमून जा. पुरातन मित्राप्रमाणें स्तुति इच्छिणाऱ्या मरुतांना स्तोत्र म्हणून आळीव.

सूक्त चोपन्नावें.

ऋषिः—श्यावाश्व; देवता-मरुत; छंदः—१४ त्रिष्टुभ, अवशिष्ट जगती.

१. मेघांना हलविणाऱ्या, स्वयंप्रकाश व बलिष्ठ मरुत्संघाकरतां, हे स्तोत्या, तूं स्तोत्र कर. सूर्याला आवरण घालणारे, पृष्ठ नांवाच्या सामानें पूजन केलें जाणारे, द्युलोकांतून येणारे व उज्ज्वल कीर्ति असलेल्या मरुतांना विपुल हवि द्या.

२. हे मरुतांनो, तेजस्वी, उदकेच्छु, अन्नसमृद्धि करणारे असे आकाशभर पसरलेले मरुत् प्रकट होतात आणि विद्युल्लतेला मिळतात. तेव्हां ते त्रैलोक्यभर गरजतात आणि पृथ्वीवर चहूंकडून पाणी पडूं लागते.

३. हे नेते मरुत् असे आहेत कीं, विद्युल्लतेप्रमाणें त्यांची झळाळी, उल्केप्रमाणें प्रकाशणारे, वाऱ्याप्रमाणें झोतानें येणारे, आणि पर्वतांना स्थानच्युत करणारे आहेत. वरचेवर जलवृष्टि करणारे, वज्रप्रेरक, गर्जणारे वेगशाली आणि ओजस्वी असे हे मरुत् आहेत.

४. हे रुद्रपुत्र मरुतांनो, जेव्हां तुम्ही रात्री उधळून देतां, हे बलवन्तांनो जेव्हां तुम्ही दिवसांना उधळून टाकतां, हे सर्व पृथ्वीला हलवून सोडणाऱ्या मरुतांनो, तुम्ही जेव्हां पृथ्वी आणि सर्व लोकांना गोंधळून टाकतां, जेव्हां तुम्ही मेघांना खळबळून सोडतां आणि

---

९ टीपः–वरील नद्या अनितभेखेरीज प्रसिद्ध आहेत.

नावा समुद्रांत बुडवाव्यात त्याप्रमाणें नगरें उध्वस्त करतां तेव्हां आमचा नाश करूं नका.

५. हे मरुतांनो, सूर्य आपलें तेज पसरतो त्याप्रमाणें तुमचें महान् सामर्थ्य तुम्हीं प्रसृत करा, कीं जशा घोड्या वेगानें धांवत असतात. कारण असह्यतेजोयुक्त असणारे तुम्ही उदक न सोडणाऱ्या मेघाचा भेद केला आहे.

६. हे विधात्या मरुतांनो, जोरानें हालणाऱ्या वृक्षास कृमिकीटकाप्रमाणें जेव्हां तुम्ही उन्मळून टाकतां तेव्हां तुमच्या पराक्रमाची चमक दिसते, तर हे एक विचारानें असणाऱ्या देवांनो, वाटसरूला डोळे ज्याप्रमाणें योग्य मार्ग दाखवतात त्याप्रमाणें सुखाकडे तुम्हीं आम्हांस न्या.

७. हे मरुतांनो, तुम्ही ज्याला प्रेरणा देता—तो मग राजा असो किंवा ऋषि असो—त्याचा कधीं पराजय होत नाहीं, किंवा तो मारला जात नाहीं, तो कच खात नाहीं किंवा तो दुःखीकष्टी होत नाहीं, त्याचें ऐश्वर्य क्षीण होत नाहीं किंवा त्याला साहाय्याचीहि कमतरता नसते.

८. गांव जिंकणारे लोक जसे ऐटीत असतात त्याप्रमाणें नियुत अश्वयुक्त आणि पाण्याच्या पखाली घेतलेले मरुत सूर्याप्रमाणें जेव्हां प्रकाशतात आणि गर्जना करूं लागतात तेव्हां मधुर उदकानें पृथ्वी भरून टाकतात.

९. मरुतांच्या करतां ही पृथ्वी विस्तीर्ण होते. धांवणाऱ्या मरुतांच्या करतां द्युलोक विस्तीर्ण होतो. मरुतांच्या करतां अन्तरिक्षांतील मार्ग विस्तीर्ण होतात आणि ताबडतोब वृष्टि करणारे मेघहि मरुतांच्यामुळें विपुल उत्पन्न होतात.

१०. हे वेगशाली असणाऱ्या सर्व नेत्या मरुतांनो, स्वर्गनायक असणारे तुम्ही जेव्हां सोम पिऊं इच्छितां तेव्हां तुमचे चालणारे घोडे थकत नाहींत, तर ताबडतोब योग्य स्थलीं पोंचतात.

११. हे मरुतांनो, तुमच्या खांद्यावर हत्यारें, पायांत साखळ्या, वक्षःस्थलावर हार आणि रथावर शोभा असते. तुमच्या हातांत अग्नीसारखी प्रखर विद्युत आणि डोक्यावर जरीजे फेटे—सोन्याचे मुगुट झळकत असतात.

१२. हे मरुतांनो, जेव्हां तुम्ही बलयुक्त होऊन प्रकाशूं लागतां आणि जेव्हां सृष्टिनियमानें तुम्ही मोठी गर्जना करतां तेव्हां श्रेष्ठ असणारे तुम्ही असह्यकान्ति सूर्याला आणि स्वच्छ उदकाला हलवून सोडतां.

१३. हे ज्ञात्या मरुतांनो, तरुण आणि रथाधिष्ठित असणारे आम्ही तुम्ही दिलेल्या संपत्तीचे अधिपति व्हावें. ज्याप्रमाणें आकाशांतून सूर्य ढळत नाहीं तसें अचल असणारें धन हजारांनीं आम्हांस द्या.

१४. हे मरुतांनो, तुम्ही आम्हांला उत्कृष्ट संततियुक्त संपत्ति द्या. तुम्ही आम्हा सामवेत्त्या ऋषींचें संरक्षण करा. तुम्ही भरताला घोडा आणि ऐश्वर्य दिलेंत आणि सुखी व तेजस्वी पुत्र दिलांत.

१५. हे तात्काल रक्षण करणाऱ्यांनो, ज्यायोगें सूर्यासारखे तेजस्वी लोक मी उत्पन्न करीन असें ऐश्वर्य तुम्ही आम्हांस द्या. ज्या स्तोत्राच्या साहाय्यानें आम्ही शंभर वर्षें जगूं अशा ह्या माझ्या स्तोत्रानें तुमचें मन वेधून जावो.

सूक्त पंचावन्नावें.

ऋषि—श्यावाश्व; देवता–मरुत; छंदः—१० त्रिष्टुभ, अवशिष्ट जगती.

१. अत्यंत पूज्य, झगझगीत आयुधें घेतलेले आणि वक्षःस्थलावर सुवर्णालंकार धारण केलेले मरुत अन्नसंपन्न असतात. ते शिकाऊ आणि चलाख घोड्यावर बसून ऐटीत येतात. जसा त्यांना जय प्राप्त झाला तसे रथ पुढें गेले.

२. हे मरुतांनो, तुमच्या इच्छेप्रमाणें आपणहून तुम्ही पराक्रम करा. हे विभूतींनो, तुम्ही अत्यंत विस्तृतपणें शोभत असतां. तुम्ही आपल्या सामर्थ्यानें अन्तरिक्षि भरून टाकलें आहे. जसा जय प्राप्त झाला तसे त्यांचे रथ पुढें गेले.

३. ते थोर एकदम प्रकट झाले. ते एकदम वर्षाव करणारे नेते मरुत शोभा धारण करून प्रकाशणाऱ्या सूर्याच्या किरणाप्रमाणें अत्यंत उत्कर्ष पावले. त्यांना जसे जय प्राप्त झाले तसे त्यांचे रथ पुढें गेले.

४. हे मरुतांनो, तुमचा मोठेपणा प्रशंसनीय आहे. तुमचें रूप सूर्याप्रमाणें दर्शनीय आहे, तर आम्हांला अमरपणा द्या. ज्यांना जय प्राप्त झाले तसे त्यांचे रथ पुढें गेले.

५. हे मरुतांनो, तुम्ही अन्तरिक्षांतून पर्जन्यवर्षाव करा. उदकपूर्ण असणारे तुम्हीं वर्षाव करा. हे दर्शनीयहो, तुमच्या (उदकरूपी) गाई सुकत नाहींत. जय प्राप्त झाल्यावर रथ पुढें येतात.

६. हे मरुतांनो, तुम्हीं ठिपकेदार हरिणी घोडे म्हणून धुरेला जोडल्या आहेत, तुम्ही सोनेरी कवच

चढवून स्पर्धा करणाऱ्या सर्व शत्रूंचा धुव्वा उडवला. आणि जय प्राप्त झाल्यावर रथ पुढें आले.

७. हे मरुतांनो, तुम्हाला पर्वत अडवीत नाहींत आणि नद्याहि तुम्हांला अडवूं शकत नाहींत. जेथें तुम्हीं जाऊं इच्छितां तेथें तुम्हीं जातांच. जय प्राप्त झाल्यावर रथ पुढें आले.

८. हे मरुतांनो, स्तोत्र नवें असो किंवा जुनें असो, गद्य असो किंवा पद्य असो, त्या सर्वांचे तुम्ही चहाते व्हा. जय प्राप्त झाल्यावर तुमचे रथ पुढें जात असतात.

९. हे मरुतांनो, तुम्ही आम्हांला सुख द्या. आम्हांला ठार करूं नका. आम्हांला अत्यंत सुखी करा. आमच्या स्तोत्राचें आणि मैत्रीचें कल्याण करा. जय प्राप्त झाल्यावर तुमचे रथ तुमच्या मागोमाग येतात.

१०. हे मरुतांनो, तुम्ही आम्हाला उत्कृष्ट संपत्तीकडे न्या. आम्हांला पापांतून बाहेर काढा. स्तुति केले जाणारे तुम्हीं आमच्या यज्ञाचा स्वीकार करा. आम्ही सर्व प्रकारच्या संपत्तीचे अधिपति व्हावें.

सूक्त छप्पन्नावें.

ऋषिः—श्यावाश्व; देवता-मरुत्; छंदः-३-७ सतोबृहती, अवशिष्ट बृहती.

१. हे अग्निदेवा, झगझगीत अलंकारांनीं युक्त असणाऱ्या उत्साही मरुत्समूहाला तूं आणावेंस. कारण, मरुतांच्या संघांना तेजस्वी स्वर्गावरून मी खालीं बोलावीत आहें.

२. हे अग्ने, तुझ्या मनांत जे येत आहे तिकडेच माझ्या आकांक्षा लागून राहिल्या आहेत. तर जे तुझ्या अगदीं समीप तुझ्या बोलावण्यावरून आले असतील त्या भयानक दिसणाऱ्या मरुतांना तूं वृद्धिंगत कर.

३. बलशाली पृथिवीप्रमाणें कितीहि आघात केले तरी मरुत्सेना आमच्याकडे आनंदानें येत असते. हे मरुतांनो, तुमचा तडाखा तर बळकट अस्वलाप्रमाणें किंवा मस्त पोळाप्रमाणें दुर्धर आहे.

४. आपल्या सामर्थ्यानें मरुत, दुर्धर बैलाप्रमाणें सहज हुंदाडतात, कीं त्यांच्या जाण्यांनीं उल्का, मेघ आणि पर्वत कोसळून पडतात.

५. तर, हे मरुतांनो, उठा. ह्या बलिष्ठ मरुतांचीं स्तोत्रें म्हणून गाईच्या कळपाप्रमाणें मरुतांचे संघ मी बोलावतों.

६. हे मरुतांनो, तुम्ही आपल्या रथाला तांबड्या घोड्या जोडा. किंवा रथ ओढण्याकरतां तांबडा घोडा जोडा किंवा रथ ओढण्याकरतां चलाख असणारे दोन घोडे जोडा.

७. हा तुमचा तेजस्वी, खिंकाळणारा देखणा घोडा रथाला जोडला आहे. तर आतां येण्याला विलंब करूं नका. लवकर रथ भरधांव सोडा.

८. ज्या रथांत अनेक रमणीय पदार्थ घेऊन रोदसी मरुतांसह अधिष्ठित झाली आहे, त्या मरुत्संबंधीं सुप्रसिद्ध रथाला मी बोलावीत आहें.

९. ज्या सामर्थ्यामुळें चांगल्या प्रकारें उत्पन्न झालेली भाग्यशाली व बलवान असणारी रोदसी मरुतांसह सन्मान पावते, त्या तुमच्या रथांत शोभणाऱ्या झगझगीत व प्रशंसनीय सामर्थ्याचा मी धांवा करीत आहें.

सूक्त सत्तावन्नावें.

ऋषिः—श्यावाश्व; देवता-मरुत्; छंदः-७-८ त्रिष्टुभ, अवशिष्ट जगती.

१. हे रुद्रपुत्रांनो, सोनेरी रथ असलेले व इंद्राच्या सत्तेंत एक विचारानें असणारे तुम्हीं यज्ञाकरतां आमच्याकडे या. तान्हेलेल्या उदकेच्छु माणसाकडे ज्याप्रमाणें अन्तरिक्षांतील पाणी जातें त्याप्रमाणें आमचें अन्तःकरण तुमच्याकडे वेधलें आहे.

२. बरच्या, भाले, धनुष्य, बाण आणि भाते यांनीं तुम्ही सशस्त्र आहांत. तुमचे अश्व आणि रथ उत्कृष्टच आहेत. तर हे पृश्निपुत्र मरुतांनो, चांगलीं आयुधें घेऊन तुम्ही ऐटींत या.

३. द्युलोक आणि मेघ यांना तुम्हीं गदगद हलवितां व दात्या भक्तांकरतां संपत्ति उत्पन्न करतां. तुमच्या गतीच्या भीतीनें सर्व अरण्यें हदरतात. हे पृश्निपुत्रहो, जेव्हां तुम्हीं आपलीं ठिपक्याचीं हरणें जोडून वृष्टि करण्याकरतां निघतां तेव्हां पृथ्वी क्षुब्ध करतां.

४. वादळ हा तुमचा त्वेष, पाऊस हें तुमचें वस्त्र, अश्विदेवाप्रमाणें तुम्ही देखणे आणि सुस्वरूप आहांत. तुमचे घोडे पिंगट आणि तांबूस आहेत. तें निष्कलंक, शत्रूंचा धुव्वा उडविणारे आणि मोठेपणानें द्युलोकासारखे विस्तीर्ण आहेत.

५. मरुत हे अतिशय वृष्टि करणारे, अलंकार घातलेले, उदार, तेजस्वी आणि अखंड संपत्ति देणारे

आहेत. ते अभिजात, प्रगट झाल्याबरोबर वक्षःस्थलावर सुवर्णालंकार घातलेले आणि पूजनीय असून त्यांनीं अखंड कीर्ति प्राप्त केली आहे.

६. हे मरुतांनो, तुमच्या खांद्यावर भाले, बाहूंच्या ठिकाणीं झुंजार बल, ओजस्विता आणि सामर्थ्य हीं ठवलेलीं आहेत. डोक्यावर जरीचे मंदील आणि रथांत आयुधें आहेत. जगांतील सर्व शोभा तुमच्या शरीरांत एकवटली आहे.

७. हे मरुतांनो, आम्हांला गाई, घोडे, रथ आणि मुलेंबाळें यांनीं आल्हादक असणारी संपत्ति द्या. रुद्रपुत्रांनो, आम्हांला समृद्ध करा. तुमच्या दैवी साहाय्यानें त्या समृद्धीचा मी उपभोग घेईन.

८. अहो नेते मरुतहो, तुम्ही आम्हांला सुखी करा. तुम्ही अत्यंत उदार आहांत. तुम्ही अमर आहांत आणि त्रिकालाबाधित धर्म जाणणारे आहांत. तुम्ही सत्यकीर्ति, बुद्धिमान, अत्यंत स्तुत्य, तरुण आणि वर्षाव करणारे आहांत.

सूक्त अठ्ठावन्नावें.

ऋषिः—श्यावाश्व; देवता-मरुत; छंदः—त्रिष्टुभ.

१. रणधुमाळी माजविणाऱ्या त्या प्रशंसनीय मरुतांच्या संघाचीच मी आतां स्तुति करीत आहें. कारण, ते आपल्या चलाख घोड्यावर बसून जोरानें जात असतात आणि स्वयंप्रकाश असणाऱ्या त्यांची उदकावर सत्ता आहे.

२. मरुतांचा गण प्रखर, बलिष्ठ, हातांत कडी घातलेला, खळबळ उडून देण्याचा स्वभाव असलेला, ज्ञानी आणि संपत्ति देणारा आहे. हे स्तोत्या, त्या संपन्न व नेत्या मरुतांची तूं स्तुति कर. कारण, तुम्ही सुख देणारे आणि मोठेपणानें अमर्याद आहांत.

३. जे उदकाला धारण करतात आणि ते सर्व मरुत तुमच्याकरतां पर्जन्य वृष्टीला प्रेरणा देतात. जो हा अग्नि प्रज्वलित केला आहे त्या ह्याचा हे तरुण व ज्ञात्या मरुतांनो, तुम्ही अंगीकार केला आहे.

४. हे यज्ञार्ह मरुतांनो, तुम्ही भक्ताकरतां विभूनें निर्माण केलेल्या श्रेष्ठ राजाकरतां, हे मरुतांनो, तुमच्या कृपनें मुष्टियुद्ध करणारा महाबाहु आणि चांगले घोडे मिळवणारा पराक्रमी पुत्र होतो.

५. चाकाच्या अऱ्याप्रमाणें किंवा दिवसाप्रमाणें मोठेपणानें अत्यंत सारखे असणारे हे वेगशाली पृश्निपुत्र मरुत तेजानें प्रगट होत आहेत. आणि आपणहून पर्जन्यवर्षाव करीत आहेत.

६. जेव्हां ठिपकेदार हरिणी घोड्याप्रमाणें धांवा घट्ट असलेल्या रथाला जोडून, हे मरुतांनो, जातात तेव्हां पाणी पडूं लागतें अरण्यें गारद होतात. आतां पर्जन्यवृष्टि करणारा द्युलोकरूपी बैल खुशाल ओरडूं द्या.

७. हे धांवत येऊं लागले, तेव्हां त्यांच्यापुढें पृथ्वी उघडी झाली. नवऱ्याप्रमाणें मरुतांनीं स्वकीय बलरूपी गर्भ तिचें ठिकाणीं ठेवला. वायुरूपी घोडे त्यांनीं रथाला जोडले आणि आपला घामच पर्जन्य वर्षाव केला.

८. हे नेते मरुतांनो, तुम्ही आम्हांला सुखी करा. तुम्ही अत्यंत उदार आहांत. तुम्ही अमर आहांत. आणि त्रिकालाबाधित धर्म जाणणारे आहांत. तुम्ही सत्यकीर्ति, बुद्धिमान, अत्यंत स्तुत्य आणि पर्जन्य वर्षाव करणारे आहांत.

सूक्त एकूणसाठावें.

ऋषिः—श्यावाश्व; देवता-मरुत; छन्दः—१-७ जगती, ८ त्रिष्टुभ.

१. हे मरुतांनो, उदार देणगी मिळावी म्हणून होता तुमची स्तुति करीत आहे. हे स्तोत्या, तूं संपत्ति मिळविण्याकरतां स्तुति कर आणि जमीन मिळण्याकरतां यज्ञ कर. ते उदकानें घोड्यांना न्हाणीत आहेत. अन्तरिक्षातून संचार करीत आहेत आणि मेघांनीं आपलें तेज मृदु करीत आहेत.

२. मालांनीं भरलेली नौका ज्याप्रमाणें जातांना कष्टप्रद हेलकावें खात जाते त्याप्रमाणें ह्याच्या सपाट्यापुढें भूमि भीतीनें चळचळा कापते. मरुत येऊं लागले, कीं लांबूनच दिसतात आणि ओळखूं येतात. ते नेते आमच्या थोर यज्ञांत येण्याविषयीं प्रयत्न करतात.

३. हे मरुतांनो, तुम्ही बैलाच्या शिंगाप्रमाणें शोभेकरतां पागोटे घाला. धुकें नाहींसें करण्याकरतां सूर्यरूपी डोळा धारण करा. घोड्याप्रमाणें वेगशाली दर्शनीय असा. यजमानाप्रमाणें तुम्ही सुशोभित दिसत आहात.

४. हे मरुतांनो, तुमचा मोठपणा कोणाला प्राप्त होणार आहे ? तुमचीं कार्यें कोणाला माहीत आहेत ? आणि तुमच्या पराक्रमाची बरोबरी कोण करणार आहे? जेव्हां तुम्ही उदार देणगी देण्याकरतां येतां, तेव्हां तुम्ही धुळीचा कणाप्रमाणें पृथ्वीला हलवतां.

५. ते एकमेकाचे बांधव आहेत. घोड्याप्रमाणें ते तेजस्वी आणि शूर योध्याप्रमाणें युद्ध करणारे आहेत. कसलेल्या जवानाप्रमाणें ते उत्कर्ष पावतात आणि वृष्टींनीं सूर्याचा तेजःसमूह झांकून टाकतात.

६. ते मरुत प्रगट झाल्यावर ज्येष्ठ कोण, मधला कोण आणि धाकटा कोण हे कांहींच समजत नाहीं कारण ते आपल्या तेजानें वृद्धिंगत झालेले असतात. हे मरुतांनो, तुम्ही चांगल्या प्रकारें उत्पन्न झालेले आहांत, पृश्निपुत्र आहांत, तुम्ही जन्मानेंच स्वर्गीय वीर आहांत तर आमच्याकडे याना.

७. तुम्ही पक्ष्याप्रमाणें सारखे एका ओळीनें कुच करीत असतां, विस्तीर्ण द्युलोकाचीं शिखरें आणि मर्यादा यांचें उल्लंघन तुम्ही केले, देवता आणि मनुष्य अशा उभयतांना हें माहीत झालें आहे कीं त्यांच्या घोड्यांनीं मेघांतलि पाणी मोकळें केलें.

८. द्यु आणि अदिति आमच्या हवीविषयीं उत्सुकता प्रगट करोत. उदार उषाहि उत्सुकता व्यक्त करो. हे ऋषे, स्तुति केलेले रुद्रपुत्र मरुत उदकाचा दिव्य खजिना मोकळा करोत.

सूक्त साठावें.

ऋषिः—श्यावाश्व; देवता–मरुत् किंवा अग्नि व मरुत्; छंदः—७–८ जगती, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. दयाघन अग्नीचें मी नमस्कार करूनच स्तवन करतों. तो प्रसन्न होऊन आमचें स्तोत्र जाणो. समृद्धीच्या इच्छेनें केलेल्या स्तोत्रांनीं रथाप्रमाणें मी इष्ट संपादीन. प्रदक्षिणा करून मी मरुतांचें स्तोत्र म्हणतों.

२. जे रुद्रपुत्र मरुत ठिपकेदार प्रसिद्ध हरिण जोडलेल्या रथावर आरूढ झाले आहेत, हे उग्रांनो, तुम्ही जेव्हां रथावर आरूढ होता तेव्हां भीतीनें पृथ्वी हदरते, मेघ गडबडू लागतात आणि अरण्यें उलथीपालथीं होतात.

३. तुम्ही गर्जना केल्यावर पर्वत केवढाहि मोठा असो तो भिऊन जातो. अन्तरिक्षाचा उच्चप्रदेशहि हदरून जातो. हे मरुतांनो, तुम्ही भाले हातांत घेऊन जेव्हां क्रीडा करूं लागतां तेव्हां पाण्याच्या लोंढ्याप्रमाणें तुम्ही जातां.

४. धनवान नवरदेवाप्रमाणें मरुत सोन्याच्या अलंकारानीं आणि उदकांनीं आपलीं शरीरें सुशोभित करतात. ते मंगलस्वरूप आणि बलाढ्य आहेत. रथांत एकत्र बसूनच त्यांनीं आपल्या शरीरांत तेज प्रगट केलें.

५. ज्यांच्यांत कोणी मोठा नाहीं आणि धाकटा नाहीं असें हे भाऊ आहेत आणि जगाच्या सौभाग्याकरतांच याचा उत्कर्ष झाला आहे. तरुण आणि सद्व्रत रुद्र यांचा पिता. चांगलें दूध देणाऱ्या पृश्नीनें मरुतांना चांगले दिवस दाखवले आहेत.

६. हे भाग्यशाली मरुतांनो, तुम्ही द्युलोकाच्या उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अशा ज्या भागांत असाल, हे रुद्रपुत्रांनो, तेथून या आणि आम्ही जो हवि अर्पण करूं हे अग्ने, तो तूं ध्यानांत घे.

७. हे सर्वज्ञ मरुतांनो, अग्नि आणि तुम्ही स्वर्गांतील अति उच्च स्थानावरून घोड्यावर बसून भूलोकीं येतां. हे दुष्टनाशन मरुतांनो, जगाला हलवून सोडणारे तुम्ही आनंदित होऊन सोमरस अर्पण करणाऱ्या भक्ताला अमोलिक धन देणारे आहांत.

८. हे अग्ने, प्रशंसनीय, संघानें शोभणाऱ्या आणि शुभ मरुतांसह येऊन आनंदानें तूं सोम पी. हे वैश्वानर अग्ने, तूं आपल्या विश्वप्रकाशक आणि दीर्घायुषी मरुतांसह आपल्या ज्वालारूपी पुराण ध्वजानें युक्त असतोस.

सूक्त एकसष्टावें.

ऋषिः—श्यावाश्व; देवता–१–४ मरुत्, ५–८ शशीयसी तरंतभार्या, ९ पुरुमिळ्ह वैददश्वि, १० तरंत वैददश्वि राजा, ११–१६ मरुत्, १७–१९ रथवीति दार्भ्य राजा, छंदः–५ अनुष्टुभ, ९ सतोबृहती, अवशिष्ट गायत्री.

१. हे वीरांनो, अत्यंत श्रेष्ठ असणारे तुम्ही कोण आहांत ? जे तुम्ही अत्यंत दुरून एकएकटे येत असतां.

२. तुमचे घोडे कोठें आहेत ? लगाम कोठें आहेत ? तुम्ही आलात कसे ? आणि जाणार कसें ? कारण, पाठीवर खोगीर आहे. तोंडांत (नाकांत) लगाम दिसतोच आहे.

३. ह्यांच्या कमरेला चाबूक आहे. मैथुनाच्या वेळीं स्त्रियांच्या मांड्यांप्रमाणें तुमचे पाय लांब पडूं लागले आहेत.

४. हे चांगल्या प्रकारें जन्माला येणाऱ्या मर्द वीरांनो, दूरवर धांवत चला. अग्नीनें डाग दिल्याप्रमाणें चालूं लागा.

५. श्यावाश्वानें प्रशंसा केलेल्या वीराला आलिंगन

देण्याकरतां जिनें आपले हात पुढें केले तिनें मला घोडे, पशु, गाई आणि शेकडो शेळ्या दिल्या.

६. देवभक्तिहीन आणि लोभी पुरुषापेक्षां शशीयसी एक स्त्री असली तरी श्रेष्ठ आहे.

७. तिला आपला पति मारकट, लसलस करणारा आणि कामातुर आहे असें कळलें तरी ती आपलें मन देवाकडे लावते.

८. आणि तिचा अर्धा भाग म्हणजे पति अगदींच अश्लाघ्य वर्तनाचा आणि कंजूष असें मी म्हणतों तरी तो वीरांना धन देण्यांत सारखाच आहे.

९. त्या सुंदर तरुणीनें मला श्यावाला वाट दाखविली आणि मी दिगंत कीर्ति आणि विद्वान पुरुमिळ्हाकडे जाण्याकरतां दोन लाल घोडे जुंपले.

१०. त्या वैददश्वि पुरुमिळ्हानें मला शंभर गाई दिल्या, तसेंच तरंताप्रमाणें संपत्तीहि दिली.

११. मदकर सोमरस पिणारे जे मरुत चलाख घोड्यावर नसून येतात त्यांचीच ही कीर्ति आहे.

१२. ज्यांच्या रथांत आकाशांत सूर्य प्रकाशावा त्याप्रमाणें रोदसी शोभेनें झळकत असते—

१३. तो मरुतांचा संघहि तरुण, झगझगीत रथ असलेला, निष्पाप, दुर्निवार आणि थाटांत चाललेला असतो.

१४. जगाला हलवून सोडणारे, सृष्टिनियमानें उत्पन्न झालेले आणि निष्पाप मरुत जेथें आनंदांत असतात तें ठिकाण कोणाला ठाऊक आहे ?

१५. हे स्तुति इच्छिणाऱ्या मरुतांनो, नेते असणारे तुम्ही यज्ञांत अशा प्रकारें केलेलीं स्तोत्रें ऐकून घेतां.

१६. हे शत्रूंचा धुव्वा उडवणाऱ्या यज्ञार्ह मरुतांनो, अत्यंत आल्हादक असणारे तुम्ही स्पृहणीय असणारीं उत्कृष्ट संपत्ति देतां.

१७. हे देवि रात्रि, माझें हें स्तोत्र आणि इतर स्तोत्रें रथवाल्याप्रमाणें दार्भ्याकडे घेऊन जा.

१८. आणि माझा निरोप सांग कीं सोमयाग करणाऱ्या रथवीतीविषयीं माझी इच्छा नष्ट होत नाहीं.

१९. हा उदार रथवीति गोमतीच्या तीरावर पर्वतांत व्यवस्थेनें राहिला आहे.

टीपः—अर्चनानस आत्रेयाला रथवीति दार्भ्यानें ऋत्विज म्हणून आपल्या यज्ञांत योजलें. तो हौत्र करीत असतां रथवीतिच्याजवळ त्याची बसलेली मुलगी त्यानें पाहिली. तेव्हां अर्चनानसानें आपल्या मुलाकरतां तिची मागणी घातली. रथवीतीच्या मनांत मुलगी द्यावी असें होतें. त्यानें आपल्या बायकोस संमति विचारली. तेव्हां ती म्हणाली यापूर्वी आपण ऋषीला कधींच मुलगी दिलेली नाहीं. तेव्हां रथवीतीला तें पटलें आणि त्यानें अर्चनानसाला नकार दिला, आणि यज्ञांत बसलेल्या अर्चनानसाचा मुलगा श्यावाश्व याला त्यानें यज्ञांतून हाकून दिलें. तेव्हां श्यावाश्वानें ती मुलगी मिळावी म्हणून भयंकर तपाला सुरवांत केली. तो ब्रह्मचारी शांतपणें भिक्षा मागत असतां तरंताच्या पत्नीकडे—शशीयसीकडे भिक्षेला आला. तेव्हां तिनें नवऱ्यास ऋषि आल्याची बातमी दिली. तेव्हां त्यानें बायकोस सत्कार करण्याविषयीं आज्ञा दिली. बायकोनें त्यांस गाईंचें कळप आणि अनेक अलंकार दिले. तरंतानेंहि त्याला इच्छेनुसार विपुल धन दिलें. शिवाय आपला धाकटा भाऊ पुरुमिळ्ह याच्याकडे त्याला पाठविलें आणि सांगितलें तूं त्याच्याकडे जा म्हणजे तोहि तुझा सत्कार करील. त्याच्या पत्नीनें शशीयसीनें त्याला मार्ग दाखविला. जात असतां वाटेंत त्याला एकसारख्या स्वरूपाचे मरुत भेटले. ते श्यावाश्वाला पहाण्याकरतांच येत होते. त्यांना पाहिल्याबरोबर त्यानें भीतीनें रोमांचित होऊन मरुतांची विशेष अर्थानें भरलेल्या स्तोत्रानें स्तुति केली आणि त्याच्या सर्व इच्छा परिपूर्ण झाल्या. घरीं गेला आणि त्याला पुनः शंभर गाई मिळाल्या आणि राजा तरंताच्या आज्ञेवरून रथवीति दार्भ्यानें आपली मुलगी श्यावाश्वाला दिली. पुरुमिळ्ह, तरंत, तरंताची भार्या शशीयसी, रथवीति दार्भ्य आणि मरुतांचे सात गण यांनीं संतुष्ट होऊन दिले तें ह्या सूक्तांत वर्णन केलें आहे.

१९. टीपः—

कन्यां दत्त्वा कृतार्थं तं श्यावाश्वोऽथ वनं गतं।
रथवीतिं तपस्यंतं संप्रेक्ष्यार्षेण चक्षुषा ॥
रम्ये हिमवतः पृष्ठ एष क्षेतीति सोऽब्रवीत् ॥

सूक्त बासष्टावें.

ऋषिः—श्रुतविद आत्रेय; देवता--मित्रावरुण; छंदः-त्रिष्टुभ.

१. हे मित्रावरुणांनो, जेथें तुमची स्थिति आहे आणि जेथें घोडे मोकळे सोडले जातात ते अढळ असणारें सत्यस्वरूप सूर्यमंडळ उदकानें आच्छादलें

आहे. त्याचे हजार किरण असून तें तेजस्वी देवांचें एक स्थान मी पहात आहें.

२. हे मित्रावरुणांनो, आदित्य पावसाळयांत उदकाचा वर्षाव करतो हा तुमचा पराक्रम मोठा आहे. आदित्याच्या सर्व कांतीला तुम्हीच वाढविता. तुमचा एक रथ फिरत असतो.

३. मित्रांना राजा बनवणाऱ्या मित्रावरुणांनो, तुम्ही आपल्या सामर्थ्यानें द्यावापृथ्वीला धारण केलें आहे. हे उदारांनो, तुम्ही ओषधी वाढवितां, गाईंना पुष्ट करतां, आणि पाऊस उत्पन्न करतां.

४. मित्रावरुणांनो, जोडलेले घोडे तुम्हाला वाहून आणोत. लगाम खेचलेले ते आमच्याकडे येवोत. पाण्यासारखें वस्त्र तुम्ही पांघरले आहे. तुमच्या कृपेनें अन्तरिक्षांतून नद्या पाझरत आहेत.

५. यजुर्वेदानें यज्ञाचें रक्षण करावें त्याप्रमाणें पृथ्वीच्या प्रसिद्ध स्वरूपाचा उत्कर्ष करणाऱ्या आणि अन्नसमृद्ध असणाऱ्या मित्रावरुणांनो, बलवान असणारे तुम्ही यज्ञभूमींत रथांत बसलेले असतां.

६. यज्ञभूमींत ज्याचें तुम्ही संरक्षण करतां त्या चांगलें कृत्य करणारावर उदार हस्त ठेवणारे आणि सत्कृत्य करण्यापूर्वींच संरक्षण करणारे हे मित्रावरुणहो, तुम्ही आहांत. हे न रागावणारे दोन राजे सामर्थ्य आणि हजार खांबी घर (भक्ताकरतां) धारण करतात.

७. ह्याचा रथ सोनेरी आहे. ह्याचे खांब सोन्याचे आहेत. तो विद्युल्लतेप्रमाणें आकाशांत चमकत आहे. कल्याणकारक यज्ञभूमींत यज्ञाचे स्तंब पुरलेले आहेत. तेव्हां रथांतील मधुर सोमरस आम्ही प्राप्त करूं.

८. सकाळीं सूर्योदय झाल्यावर हे मित्रावरुणांनो, तुम्ही सोनेरी खांबाच्या रथांत चढा (आणि या). म्हणूनच तुम्ही पृथ्वीवर लोकाकडे नजर टाकीत असतां.

९. हे उदार व लोकसंरक्षक मित्रावरुणांनो, तुमचें घर विस्तृत आणि सुरक्षित आहे. त्यानें तुम्ही माझें संरक्षण करा. आम्ही ऐश्वर्यवान आणि जेते असावें.

सूक्त त्रेसष्टावें.

ऋषिः—अर्चनानस, देवता–मित्रावरुण; छन्दः—जगती.

१. हे मित्रावरुणांनो, उदकसंरक्षक आणि सत्यधर्मे असणारे तुम्ही परमाकाशांत रथांत अधिष्ठित व्हा. तुम्ही येथें ज्याचें संरक्षण करतां त्याकरतां मधुर पर्जन्याचा वर्षाव करतां.

२. हे मित्रावरुणांनो, यज्ञांत सम्राट असणारे मित्रावरुण ह्या जगाचे ईश्वर आहेत. तुमचे किरण द्यावापृथ्वीवर फिरत असतात. तुम्हांला पाऊस, समृद्धि आणि अमरपणा आम्ही मागत आहोंत.

३. सम्राट, उग्र, पर्जन्यवर्षाव करणारे द्यावापृथ्वीचे अधिपति, आणि लोकद्रष्टे मित्रावरुण आश्चर्यकारक मेघांसह गर्जना करीत द्युलोकांत प्राप्त होतात. बलसामर्थ्यानें वर्षाव करतात.

४. हे मित्रावरुणांनो, तुमची माया अन्तरिक्षांत दिसते आहे. (पहा) सूर्य तेजोरूपी आश्चर्यकारक आयुध घेऊन हिंडत आहे. त्याला मेघांनीं आणि पावसानें तुम्ही झांकून टाकतां. हे पर्जन्या, तुझ्यापासून मधुर थेंब उत्पन्न होतात.

५. हे मित्रावरुणांनो, तुम्ही उदक उत्पन्न करण्याकरतां सुंदर रथाला शूराप्रमाणें घोडे जोडतां. पाऊस पाडण्याकरतां जगभर पसरलेले मरुत फिरत असतात. त्यांच्या साहाय्यानें सम्राट असणारे तुम्ही द्युलोकांतून पर्जन्याचा वर्षाव करा.

६. हे मित्रावरुणांनो, (तुमच्या कृपेनें) पर्जन्य अन्नसमृद्ध, खणखणीत आणि आश्चर्यकारक गर्जना करतो. मरुत आपल्या सामर्थ्यानें मेघांनीं द्यु झांकून टाकतो आणि तांबूस निर्मळ आकाशांतून पाऊस पाडतो.

७. हे मित्रावरुणांनो, ज्ञाते असणारे तुम्ही धर्मकर्मामुळें आमचें संरक्षण करा, बलसामर्थ्यानें व यज्ञामुळें तुम्ही सर्व जगभर शोभत आहांत. तुम्हीच आश्चर्यकारक रथ आणि सूर्य यांना द्युलोकांत धारण केलें.

सूक्त चवसष्टावें.

ऋषिः—अर्चनानस; देवता–मित्रावरुण; छन्दः—१–६ अनुष्टुभ, ७ पंक्ति.

१. हे मित्रावरुणांनो, बाहुबलानें गौळवाड्यावर हल्ला चढविणाराप्रमाणें स्वर्गनायक आणि शत्रुहिंसक मित्र व वरुणांचा आम्ही धांवा करतों.

२. तुमचे हात प्रेमळ मनानें स्तुति करणाऱ्या ह्या माझ्याकडे पसरा. तुमचे प्रशंसनीय सुखाचे पोवाडे मी जगभर गाईन.

३. जेव्हां मी जाईन तेव्हां मित्राच्या मार्गानें

जाईन. ह्या प्रेमळ आणि दयाळू मित्राच्या सुखांत सर्व एकत्र होतात.

४. हे मित्रावरुणांनो, धनिक स्तोत्यांच्या घरीं ज्याच्याबद्दल स्पर्धा चालू आहे त्या तुमच्या कृपेनें प्राप्त झालेल्या संपत्तीची ऋचेनें मी स्तुति करीत आहें.

५. हे मित्रावरुणांनो, तेजोयुक्त असणारे तुम्ही धनवान मित्रांचा उत्कर्ष करण्याकरतां आमच्या घरीं यज्ञगृहांत या.

६. हे मित्रावरुणांनो, तुम्ही जें स्तोत्र म्हटल्यावर आम्हाकरतां विपुल अन्न व बल धारण करतां तें आमच्या उत्कर्षाकरतां, कल्याणाकरतां आणि समृद्धिकरतां करावेत.

७. उजाडल्यावर गाई चमकत असलेल्या यज्ञभूमींत अर्चनानसाला आधार देणारे नेते व पूज्य असे तुम्ही तयार सोमरस पिण्याकरतां हातापायांनीं धांवत या.

सूक्त पासष्टावें.

ऋषिः—रातहव्य आत्रेय; देवता–मित्रावरुण; छंदः–१–५ अनुष्टुभ, ६ पंक्ति.

१. जो देवामध्यें तुमची स्तुति करूं जाणतो तोच कुशल. तो आमच्याशीं (स्तुति करण्याबद्दल) बोलो. कारण, देखणा वरुण आणि मित्र त्याच्या स्तुतीची इच्छा करीत असतात.

२. ते तेजस्वी, ईश्वर व अत्यंत लांबचेहि स्तोत्र ऐकणारे आहेत. तेच सज्जनसंरक्षक, यज्ञानें उत्कर्ष पावणारे आणि प्रत्येक भक्ताकडे जाणारे आहेत.

३. त्या पुरातन असणाऱ्या तुमची मी एकदम स्तुति करीत आहें. सुंदर अश्व असणारे आम्ही ज्ञात्या तुमची समृद्धि प्राप्त व्हावी म्हणून स्तुति करीत आहों.

४. मित्र अत्यंत पातक्याच्याहि संरक्षणाचा मार्ग सांगतो. दुष्ट भक्ताविषयींहि मित्राची सद्बुद्धि असते.

५. आम्ही मित्राच्या व्यापक कृपाछत्राखालीं असावें. आम्ही वरुणबालकांनीं तुझ्या पवित्र संरक्षणाखालीं असावें.

६. हे मित्रावरुणांनो, तुम्ही ह्या भक्ताकडे या आणि त्याच्या इच्छा पुऱ्या करा. समृद्ध असणाऱ्या माझा त्याग करूं नका आणि आम्हां ऋषींचे यज्ञांत संरक्षण करा.

सूक्त सहासष्टावें.

ऋषिः—रातहव्य; देवता–मित्रावरूण; छंदः—अनुष्टुभ.

१. हे ज्ञात्या भक्ता, तूं कुशल आणि दयाळू देवांना बोलीव आणि उदकरूप वरुणाला तूं विपुल अन्न दे.

२. कारण, ते दोघेच अजिंक्य असणारे उत्कष्ट सामर्थ्य धारण करतात. त्यानेंच मनुष्यांत कर्तृत्व किंवा अन्तरिक्षांत दर्शनीय सूर्य त्याप्रमाणें लोकांत सामर्थ्य उत्पन्न केलें.

३. हे मित्रावरुणांनो, आमच्या ह्या रथांना विस्तृत मार्ग मिळावा म्हणून रातहव्याच्या स्तोत्रांनीं आम्ही तुमची उत्कृष्ट स्तुति करीत आहोंत.

४. हे शुद्धसामर्थ्य मित्रावरुणांनो, प्रशंनीय असणारे तुम्ही भक्ताचीं स्तोत्रें सहृदयपणें ध्यानांत घ्या.

५. हे पृथिवि, ऋषींची अन्नेच्छा पूर्ण करण्याकरतां धावणारे हे मित्रावरुण आपल्या गमनांनीं पुरेशा विपुल उदकांचा वर्षाव करतात.

६. हे व्यापक दिसणाऱ्या मित्रावरुणांनो, जे आम्ही तुमचा धांवा करीत आहोंत ते आम्ही अत्यंत विस्तृत आणि बहुसंरक्षित स्वराज्याविषयीं प्रयत्न करीत आहोंत.

---

६ टीपः—‘ व्यचिष्ठ बहुपाय्ये यतेमहि स्वराज्ये ’ असा ह्या सूक्ताचा शेवट आहे. येथील ‘ बहुपाय्य ’ शब्द फार महत्त्वाचा असून त्याचा ‘बहुभिः रक्षितव्ये’ असा एक सायणानीं अर्थ केला आहे. त्याचा प्रजासत्ताक राज्याच्या कल्पनेचा प्राचीन पुरावा म्हणून संग्रह करतां येईल काय ?

सूक्त सदुसष्टावें.

ऋषिः—यजत आत्रेय; देवता–मित्रावरुण; छंदः–अनुष्टुभ.

१. हे आदित्यदेवांनो, तसेंच वरुणा, मित्रा, आर्यमन्, खरोखर तुम्हाजवळ अत्यंत श्रेष्ठ सामर्थ्य आहे.

२. हे वरुणा व मित्रा, जर रमणीय स्थानीं तुम्ही अधिष्ठित झाला आहांत तर लोकांचे आधार आणि दुष्टांचा संहार करणारे तुम्ही आम्हांला सुखी करा.

३. वरुण, मित्र आणि अर्यमन हे सर्व समृद्ध आहेत, आपल्या स्थानाप्रमाणें व्रतांचे ठिकाणीं जातात आणि दुष्टापासून प्राण्यांचें रक्षण करतात.

४. ते सत्यस्वरूप आणि सनातन नियमांना अनु-

सरणारे आहेत. जगांत सद्धर्मनिष्ठ तेच आहेत. ते सन्मार्गानें नेणारे, उदार आणि पापी माणसासहि समृद्ध करणारे आहेत.

५. हे मित्रा, तूं किंवा वरुण भक्तांकडून स्तवन केला जात नाहीं असा तुम्हापैकीं कोणी आहे काय? कारण, आमचें मन तुमच्याकडे वेधलेलें असतें. अत्रि गोत्रांतील लोकांचें मन तुमच्याकडे असतें.

सूक्त अडुसष्टावें.

ऋषिः–यजत आत्रेय; देवता–मित्रावरुण; छंदः–गायत्री.

१. हे ऋत्विजांनो, मित्र आणि वरुणाचीं स्वयंस्फूर्तीनें केलेलीं स्तोत्रें गा. हे बलशालिहो, तुम्ही मोठालीं स्तोत्रें ऐका.

२. मित्र आणि वरुण देवांमध्यें श्रेष्ठ आहेत. ते दोघे उदक निर्माण करणारे असून सर्वाधिपति आहेत.

३. ते तुम्ही आम्हाला ऐहिक आणि स्वर्गीय ऐश्वर्य देण्यास समर्थ आहांत. हे देवांनो, देवांमध्यें श्रेष्ठ असणाऱ्या तुमच्या सामर्थ्याची मी स्तुति करतों.

४. यज्ञानें यज्ञाचा उपभोग घेणारे मित्रावरुण देव स्पृहणीय हवीचा स्वीकार करतात आणि ते दयाळु देव भक्ताचा उत्कर्ष करतात.

५. वृष्टीनें आकाश भरून टाकणारे आणि पाणी वहावयास लावणारे असे अन्नाधिपति मित्रावरुण उदार मनानें थोर रथावर आरूढ होवोत.

सूक्त एकूणसत्तरावें.

ऋषिः–उरुचक्रि आत्रेय; देवता–मित्रावरुण; छंदः–त्रिष्टुभ.

१. हे मित्रा आणि वरुणा, तुम्ही तीन स्वर्ग, तीन अन्तरिक्षें आणि तीन भूलोक धारण केले आहेत. तुम्ही क्षत्रियांच्या सामर्थ्याचा उत्कर्ष करतां आणि सतत चाललेल्या कर्माचें संरक्षण करतां.

२, हे वरुणा, मित्रा, तुमच्यामुळें गाई दुभत्या होतात आणि नद्या मधुर उदकयुक्त होतात, तसेंच तुमचे जे तीन बलशाली (अग्नि, वायु आणि आदित्य) आहेत ते तेजस्वी व उदकाधार तीनहि लोकांत असतात.

३. मी प्रातःकाळीं सूर्योदयाच्या वेळीं आणि माध्याह्नकाळीं अदिति देवीला बोलावतांं, हे मित्रावरुणांनो, समृद्धि प्राप्त व्हावी म्हणून, मुलाबाळांकरतां आणि सुख प्राप्त व्हावें म्हणून मी स्तुति करतों.

४. हे आदित्यांनो. स्वर्ग, पृथ्वी आणि अन्तरिक्ष यांचे तुम्ही आधार आहांत. हे मित्रावरुणांनो, तुमचे अढळ नियम अमर देवहि मोडीत नाहींत.

सूक्त सत्तरावें.

ऋषिः—उरुचक्रि; देवता–मित्रावरुण; छंदः–गायत्री.

१. हे मित्रावरुणांनो, तुमची कृपा अपरंपार आहे म्हणून आम्ही तुमच्या कृपेची इच्छा करतों.

२. हे द्वेषरहित देवांनो, त्या तुमची आम्ही इच्छा करतो आणि अन्नाचा उपभोग घेतो. हे रुद्रांनो, आम्ही तुमचे आहोंत.

३. हे रुद्रांनो, तुम्ही साहाय्य करून आमचें रक्षण करा. आमचें चांगलें संरक्षण करून आम्हाला तारा. आणि जातीनें आम्ही शत्रूंचा धुव्वा उडवावा.

४. हे आश्चर्यकारक पराक्रम करणाऱ्या देवांनो, आम्ही दुसऱ्या कोणाच्या अन्नावर जगूं नये. आमच्या मुलाबाळांनीं, वंशजांनीं किंवा आप्तइष्टांनीं सुद्धां जगूं नये.

सूक्त एकाहत्तरावें.

ऋषिः–बाहुवृक्त आत्रेय; देवता–मित्रावरुण; छंदः–गायत्री.

१. हे शत्रुविनाशक मित्रावरुणांनो, शत्रुहन्ते असणारे तुम्ही आमच्या ह्या सुंदर यज्ञांत आगमन करावें.

२. ज्ञात्या मित्रावरुणांनो, तुम्ही जगाचे राजे आहांत. हे समर्थांनो, आमच्या कर्मांची संगता करा.

३. हे मित्रावरुणांनो, हवि देणाराचा सोम पिण्याकरतां तुम्ही ह्या सोमरसाकडे या.

सूक्त बहात्तरावें.

ऋषिः—बाहुवृक्त; देवता–मित्रावरुण; छंदः—उष्णिह.

१. अत्रीप्रमाणें आम्ही मित्रावरुणांची स्तुति करून त्यांना बोलावीत आहोंत. तर मित्रावरुण सोम पिण्याकरतां यज्ञांत येऊन बसोत.

२. हे मित्रावरुणांनो, तुम्ही आपल्या कृत्यानें अढळ आहांत. धर्मानें तुम्ही लोकांना कार्यप्रवृत्त करतां. तर सोम पिण्याकरतां कुशासनावर बसा.

३. मित्र आणि वरुण आमच्या इष्टसिद्धीकरतां यज्ञाचा स्वीकार करोत. आणि येऊन सोम पिण्याकरतां दर्भासनावर बसोत.

सूक्त त्र्याहत्तरावें.

ऋषिः—पौर आत्रेय; देवता–अश्विनौ; छंदः–अनुष्टुभ.

१. हे यज्ञसेवक अश्विहो, तुम्ही आज जवळ असा, दूर असा, अन्तरिक्षांत असा किंवा आणखी कोठेंहि असा तेथून तुम्ही आमच्याकडे या.

२. त्याच ठिकाणीं सर्व भक्तांशीं ज्यांचा अत्यंत निकट संबंध असतो, जे अनेक प्रकारचीं मनोहर रूपें धारण करतात, जे सर्वोत्कृष्ट व अप्रतिरथ योद्धे म्हणून गाजले आहेत त्या बलाढ्यांनीं उपभोग घ्यावा म्हणून मी बोलावीत आहें.

३. हे अश्विहो, तुम्ही आपल्या रथाच्या एका चाकानें सूर्याच्या तेजस्वी शरीराला शोभा आणली आहे आणि दुसऱ्या चाकानें मानुष काळ आणि विस्तृत लोकांना अनुसरलें आहे.

४. तुमच्या स्तवनास जें आवश्यक आहे तें सर्व मी केलें आहे आणि तें सर्व तुम्हांला अनुकूल होवो. निष्पाप असणारे तुम्ही आम्हांला बांधवभूत अन्न द्या.

५. हे अश्विहो, तुमच्या जलद चालणाऱ्या रथांत जेव्हां सूर्या आरूढ झाली तेव्हां तुमची कान्ति चहूकडे पसरली.

६. हे नेते अश्विहो, अत्रि तुमची चांगल्या मनानें स्तुति करतो. कारण तो तुमच्या स्तुतीनें सुख प्राप्त करतो.

७. हे वीर अश्विदेवांनो, आपल्या आश्चर्यकारक कृत्यानें अत्रि जेव्हां तुम्हाला आपल्याकडे वळवितो तेव्हां तुमच्या त्या भयंकर परंतु उत्तुंग आणि संततगति रथाचा घोष आम्हांला वाटेंतच ऐकूं येतो.

८. हे मधुररसप्रिय रुद्रपुत्र अश्विहो, आमची मधुर स्तुति तुमची सेवा करीत असते. जेव्हां तुम्ही अन्तरिक्ष उल्लंघून येतां तेव्हां तुम्हांला परिपक्व अन्न अर्पण केलें जातें.

९. हे अश्वीनो, तुम्हांला सुख देणारे म्हणतात तें अगदीं खरें आहे. तुम्ही यज्ञांत अत्यंत प्रशंसनीय आहांत. तसेंच आमच्या यज्ञांत अत्यंत सुख देणारें व्हावेंत.

१०. हीं जीं आनंददायक स्तोत्रें आम्ही करतों आहोंत तीं अश्वींना सुखप्रद होवोत. रथाप्रमाणें तीं व्यवस्थित केलेलीं आहेत. आम्ही नमस्कार करून तुमचा जयजयकार करतों.

---

[३] टीपः—रथचक्र–१.३०.१९ पहा.

सूक्त चवऱ्याहत्तरावें.

ऋषिः—पौर; देवता–अश्विनौ; छन्दः—अनुष्टुभ.

१. हे मननीय संपत्ति असणारे आणि संपत्तीचा वर्षाव करणारे अश्विदेवांनो, तुम्ही द्युलोकाहून येऊन पृथ्वीवर कोठेंहि असला तरी आमचें स्तोत्र ऐका. अत्रि तुमची सेवा करीत आहे.

२. ते तुम्ही कोठें आहांत? विख्यात असणारे अश्विदेव स्वर्गांत कोठें आहेत? हे देवांनो, तुम्ही कोणा भक्ताच्याकरतां प्रयत्न करीत आहात? कोण स्तोता तुमच्या स्तोत्रांत गुंतला आहे?

३. तुम्ही कोणाकडे निघाला आहां? तुम्ही कोणाकडे जात आहां? कोणाकरतां तुम्ही आपला रथ जोडतां? कोणाच्या स्तोत्रांत तुम्ही रमून जातां? आम्ही तर इष्टसिद्धीकरतां तुमचा ध्यास घेतला आहे!

४. हे पौरसंबंधी अश्विहो, जे तुम्ही यज्ञ करणाऱ्या नागरिकाकरतां अरण्यांतल्या सिंहाप्रमाणें मेघाला उदकच्युत करता ते तुम्ही आम्हा भक्ताकरतां जलपूर्ण मेघांना मोकळे करा.

५. म्हाताऱ्या च्यवानाचें जीर्ण रूप वस्त्राप्रमाणें काढून टाकून तुम्ही त्यास पुनः तरुण केलें आणि त्याच्या स्त्रीचा काम जागृत केलात.

६. तुमचा स्तोता हा येथें आहे. मी समृद्धि प्राप्त व्हावी म्हणून तुझ्या नजरेखालीं आहें. माझें बोलावणें ऐकून हे समृद्ध देवांनो, साहाय्य करण्याकरतां इकडे या.

७. हे समृद्ध अश्विहो, अनेक भक्तांपैकीं तुम्हाला कोण बोलावीत आहे? मनुष्यांपैकीं तुमची कोण सेवा करीत आहे? हे शहाण्यांनीं स्तविले जाणारे हो, कोण यज्ञ करून तुमची सेवा करीत आहे?

८. हे अश्विहो, रथामध्यें अत्यंत वेगवान असणारा तुमचा रथ अनेक (अभक्तांना) मागें टाकून आम्हाकडे येवो. भक्तजनांत तुमची स्तुति चालू आहे.

९. हे सोमरसप्रिय अश्विहो, आमचें हें पुनः पुनः केलें जाणारें स्तोत्र तुम्हाला सुखदायक होवो. हे आमच्याकडे लक्ष देणाऱ्या ज्ञात्या अश्विहो, पंखानीं श्येन धांवतात त्याप्रमाणें तुम्ही या.

१०. हे अश्विहो. कोणच्याहि वेळीं तुम्ही आमची हांक ऐकाल आणि याल, तेव्हां तुम्हाला उत्तम संपत्ति आणि उपभोग घेण्यासारखे अन्न तयार असेल.

सूक्त पंचाहत्तरावें.

ऋषिः—अवस्यु आत्रेय; देवता–अश्विनौ; छन्दः–पंक्ति.

१. हे अश्विहो, तुमच्या अत्यंत प्रिय असणाऱ्या, फलप्रद आणि संपत्ति वाहून आणणाऱ्या रथाचें स्तोता वर्णन करीत आहे. म्हणून मधुविद्या जाणणारे तुम्ही माझा धांवा ऐका.

२. हे अश्विहो, ज्याप्रमाणें मी नेहेमीं सर्वांना मागें टाकतों त्याप्रमाणें तुम्ही सर्वांना मागें टाकून या. तुम्ही देखणे, सोन्याच्या धांवा असणारे, संपत्तिमान आणि नद्या वहावयास लावणारे आहांत. तुम्हीं माझा धांवा ऐका.

३. हे अश्विहो, तुम्ही आमच्याकडे अत्युत्कृष्ट संपत्ति घेऊन या. हे समृद्ध आणि भयानक अश्विहो, तुमचा रथ सोन्याचा आहे. हे मधुविद्या जाणणारेहो, तुम्हीं यज्ञ उपभोगण्याकरतां या आणि आमचा धांवा ऐका.

४. हे पर्जन्यघन अश्विहो, आम्ही स्तोत्यांनीं तुमची स्तुति केली आहें. तुमच्या शोधांत असणारा थोर यजमान हवि करीत आहे. हे मधुविद्या जाणणाऱ्या देवांनो, तुम्ही आमचा धांवा ऐका.

५. हे अश्विहो, मनोगत ओळखणारे, रथाधिष्ठित, गतिशाली आणि धांवा ऐकणारे तुम्ही घोड्यावर बसून सरळपणें जसें च्यवनाकडे गेलांत तसेंच माझ्याकडे या. हे मधुविद्या जाणणारे अश्विहो, तुम्ही माझा धांवा ऐका.

६. हे नेते अश्विहो, केवळ इषाऱ्यानें जोडले जाणारे आणि आश्चर्यकारक रूप असलेले चलाख घोडे सोम पिण्याकरतां तुम्हांस सुखासह वाहून आणोत. हे मधुविद्या जाणणारे अश्विहो, तुम्ही आमचा धांवा ऐका.

७. हे अश्विहो, येथें या. तुम्ही निराश होऊं नका. हे अहिंस्य आणि श्रेष्ठ अश्विहो, तुम्ही गुप्त स्थलाहूनहि आमच्या घरीं या. हे मधुविद्या जाणणारे अश्विहो तुम्ही आमचा धांवा ऐका.

८. हे अहिंस्य आणि उदकाधिपति अश्विहो, तुम्ही आमच्या यज्ञांत या. स्तुति करणाऱ्या अवस्यूकडे तुम्ही या. हे मधुविद्या जाणणारे अश्विहो, तुम्ही आमचा धांवा ऐका.

९. पशूंना प्रकाशित करणारी उषा उजाडली. योग्यकालीं प्रदीप्त होणारा अग्नि स्थापिला गेला. हे पर्जन्यघन व दर्शनीय अश्विहो, तुमचा ध्रुव रथ जोडला गेला. हे मधुविद्या जाणणाऱ्यांनो, तुम्ही आमचा धांवा ऐका.

सूक्त शहात्तरावें.

ऋषिः—अत्रि भौम; देवता–अश्विनौ; छंदः–त्रिष्टुभ.

१. उषकालीं अग्नि प्रदीप्त झाला आहे. ब्राह्मणांची आणि देवाकरतां केलेलीं स्तोत्रें उमटूं लागलीं. तर तुम्ही रथांत बसून आमच्या भरलेल्या सोमपात्राकडे या.

२. अश्विदेव व्यवस्थित ठेवलेल्या धर्माचा नाश न करोत. आतां ह्या यज्ञांत सोमपात्राजवळ जाणारे अश्विदेव प्रशंसनीय आहेत. तुम्ही दिवस उगवल्याबरोबर साहाय्य करण्याकरतां अन्नाप्रमाणें या. आणि दात्याला सुख द्या.

३. दिवसाच्या प्रातःकालीं, संगवकालीं, माध्याह्नकालीं, अपराह्न कालीं (व सायंकालीं) एवढेंच नव्हे तर दिवसा आणि रात्रीं सुखदायक साहाय्य करण्याकरतां या. कारण, अश्विनीशिवाय सोमपानाला आरंभ होत नाहीं.

४. अश्विहो, पुरातन कालापासून हेंच तुमचें राहण्याचें ठिकाण, हीं घरें आणि ही यज्ञशाला होय. अन्न आणि सामर्थ्य घेऊन द्युलोकाहून, मोठ्या पर्वतावरून किंवा पाण्यांतून तुम्ही आम्हाकडे या.

५. आम्ही सुखदायक, नेत्या अशा अश्वींच्या साहाय्याला प्राप्त करूं. तुम्ही आमच्याकडे ऐश्वर्य घेऊन या. आम्हांला मुलेंबाळें द्या. हे अमर देवांनो, आम्हांकरतां सर्व ऐश्वर्यें घेऊन या.

सूक्त सत्त्याहत्तरावें.

ऋषिः—अत्रि; देवता–अश्विन् ; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे यज्ञकर्त्यांनो, प्रातःकालीं प्रथम येणाऱ्या ह्यांचें यजन करा. कंजूष गिधाडापूर्वींच हे सोम पिवोत. कारण, अश्वीच सकाळीं यज्ञांत येतात. आणि प्राचीन कवि त्यांचीच प्रशंसा करतात.

२. तुम्ही प्रातःकालींच अश्वींना उद्देशून यज्ञ करा. हवि द्या. कारण, सायंकालीं हवि देवांना पोंचत नाहीं आणि तो असेव्य होतो. आमच्याशिवाय दुसरा यज्ञ करीत असतो आणि त्यांना तृप्त करीत असतो. पण सर्वांच्या आधीं यजन करणारे देवांना फार आवडतात.

३. तुमच्या रथावर सोन्याचें आस्तरण असून त्याची कांति फारच उत्तम आहे. तो उदकाचा वर्षाव करतो आणि अन्न घेऊन आमच्याकडे येतो. तो मनाप्रमाणें शीघ्रगामी आणि हे अश्वीनो, वाऱ्याप्रमाणें सोसाट्यानें जाणारा आहे. त्यामुळें तुम्ही सर्व बिकट मार्गांतून जाता.

४. जो भक्त अश्वींना विपुल अन्न तयार करतो आणि यज्ञांत समर्पण करतो तो आपल्याच मुलांबाळांचें संरक्षण करतो आणि अयाजकांचा नेहमींच नाश करतो.

५. आम्ही सुखदायक व नेत्या अशा अश्वींच्या साहाय्याला प्राप्त करूं. तुम्ही आमच्याकडे ऐश्वर्य घेऊन या. आम्हाला मुलेंबाळें द्या. हे अमर देवांनो, आम्हाकरतां सर्व ऐश्वर्य घेऊन या.

सूक्त अठ्याहत्तरावें.

ऋषिः—सप्तवध्रि आत्रेय; देवता–अश्विनौ; छंदः—१–३ उष्णिह, ४ त्रिष्टुभ अवशिष्ट अनुष्टुभ.

१. सत्यस्वरूप अश्विहो, या. निराश होऊं नका. हंसाप्रमाणें पिळलेल्या सोमाकडे या.

२. हे अश्विहो, गवतावर हरिण किंवा गौरमृग येतात त्याप्रमाणें या. हंसाप्रमाणें तुम्ही दोघे पिळलेल्या सोमाकडे या.

३. हे समृद्धिधन अश्विहो, आमच्या इच्छा पूर्ण करण्याकरतां तुम्ही आमचा यज्ञ ग्रहण करा. हंसाप्रमाणें तयार केलेल्या सोमरसावर झडप घाला.

४. तुरुंगांत पडणाऱ्या अत्रि ऋषीनें याचना करणाऱ्या स्त्रीप्रमाणें जेव्हां तुमचा धांवा केला तेव्हां श्येनाच्या वेगानें सुंदर रथांत बसून हे अश्विहो, तुम्ही आलांत.

५. हे वनस्पते (पेटिके), प्रसूत होणाऱ्या स्त्रीच्या कुसवेप्रमाणें तूं दुभंग हो. हे अश्विहो, माझा धांवा ऐका आणि सप्तवध्रीला (पेटींतून) मुक्त करा.

६. भ्यालेला आणि करुणा भाकणाऱ्या सप्तवध्रि ऋषीकरतां हे अश्वीहो, तुम्ही आपल्या खुबीनें त्या पेटीला उघडलेत.

७. वारा ज्याप्रमाणें सरोवराला सर्व बाजूनें हलवतो त्याप्रमाणें दहा महिने पोटांत असलेला गर्भ हालचाल करूं लागो आणि पोटाच्या बाहेर येवो.

८. वाऱ्यानें रान हलतें किंवा वाऱ्यानें समुद्र जसा हालतो त्याप्रमाणें हे दहा महिन्यांच्या गर्भा, तूं वारेसह हलूं लाग.

९. आईच्या उदरांत दहा महिने पडून असलेला हा मुलगा आतां सुरक्षित बाहेर येवो. आपल्या जिवंत आईच्या उदरांतून जिवंत बाहेर पडो.

---

५ टीपः- एकदा शत्रूंनीं सप्तवध्रीला पकडून प्रयत्नानें पेटींत टाकले. टाकलेल्या पेटीवर मोहोर करून पेटी घरांत सुरक्षित ठेवली. रात्रीं बायकोची आणि त्याची भेट होऊं नये अशी व्यवस्था केली. रोज सकाळीं पेटी उघडून त्याला ते त्रास देत असत. असे पुष्कळ दिवस गेले. सप्तवध्रि दुःखांत काल कंठित होता. तेव्हां त्यानें विचार करून अश्वींची स्तुति केली. त्या प्रसन्न अन्तःकरणानें केलेल्या स्तुतीनें अश्विदेव प्रसन्न झाले. आणि त्यांनीं येऊन पेटी उघडली आणि ते अदृश्य झाले. सप्तवध्रीनें बायकोशीं क्रीडा करून पुनः परत आला आणि पुनः पेटींत बसला. पेटींत बसतांना ५।६ ऋचा त्यानें पाहिल्या.

९ टीपः—वरील ७।८।९ ह्या ऋचांना गर्भस्राविणी उपनिषद् म्हणतात. ह्या तीन ऋचांनीं सप्तवध्रि आपली बायको सुरक्षितपणें प्रसूत व्हावी अशी अश्वींची प्रार्थना करीत आहे.

सूक्त एकूणऐंशीवें.

ऋषिः—सत्यश्रवस् आत्रेय; देवता–उषा; छंदः–पंक्ति.

१. हे उषे, तेजस्वी असणारी तूं आम्हाला उदार देणगी देण्याकरतां प्रकाशित हो. जसें तूं आम्हांला पूर्वीं जागृत केलेंस त्याप्रमाणें हे सुंदर रीतीनें उदयाला येणारे आणि मिळण्याकरतां स्तुति केली जाणारे उषे, सत्यकीर्ति वाय्यावर अनुग्रह कर.

२. हे स्वर्गकन्ये उषे, तूं शौचद्रथ सुनीथाकरतां अंधार नष्ट केलास. ती तूं सुंदर रीतीनें उदयाला येणारे आणि घोड्याकरतां स्तुति केली जाणारे उषे, सत्यकीर्ति वाय्याकरतां उदयाला ये.

३. हे स्वर्गकन्ये उषे, समृद्ध असणारी तूं आज प्रकाशित हो. कारण, पूर्वींहि तूं प्रकाशित झालेली आहेस. ती तूं सुंदर रीतीनें उदयाला येणारे आणि घोड्याकरतां स्तुति केली जाणारे उषे, सत्यकीर्ति वाय्याकरतां उदयाला ये.

४. हे प्रकाशयुक्त उषे, जे स्तोते स्तोत्रें म्हणून तुझी स्तुति करतात, हे भगवति, ते तुझ्या कृपेनें समृद्ध होतात. आणि हे सुंदर आणि संपत्तीकरतां प्रशंसिले जाणारे, उदार होतात.

५. हे सुंदर आणि अश्वसंपत्ति मिळण्याकरतां स्तविली जाणारे उषे, जे हे संघानें असणारे लोक ऐश्वर्यप्राप्तीकरतां तुझी प्रशंसा करतात ते सर्व विपुल संपत्ति प्राप्त करून इच्छा पूर्ण करून घेतात.

६. हे भगवति उषे, जे समृद्ध लोक आम्हाला विपुल संपत्ति देपात, हे सुजाते आणि अश्व मिळण्याकरतां प्रशंसिली जाणारे उषे, त्या स्तोत्यांना मुलाबाळासहित कीर्ति तूं दे.

७. हे सुंदर आणि घोडे मिळण्याकरतां प्रशंसिली जाणारी भगवति उषे, जे भक्त आम्हाला गाई, घोडे यांनीं युक्त समृद्धि देतात त्यांना विख्यात कीर्ति आणि धन तूं दे.

८. हे स्वर्गकन्ये उषे, सूर्याचे स्वच्छ किरण उगवले आणि अग्नीच्या ज्वाला प्रकाशूं लागल्या बरोबर प्रशंसा केलेली सुंदर उषा आम्हांला गाईसह अन्न देवो.

९. हे स्वर्गकन्ये, प्रकाशित हो. आमच्या कृत्याकरतां येण्यास उशीर करूं नकोस. हे सुंदर आणि स्तुत्य उषे, शत्रूरूपी चोराला जसा त्रास देतात तसा सूर्य आपल्या प्रकाशानें तुला त्रास न देवो.

१०. हे प्रकाशयुक्त उषे, जी तूं उदय पाऊन स्तोत्यांना त्रास देत नाहींस ती हे सुंदर आणि प्रशंसनीय उषे, आम्हाला एवढें तरी देच.

सूक्त ऐंशीवें.

ऋषिः—सत्यश्रवस; देवता—उषा; छंदः—त्रिष्टुभ.

१. तेजस्वी रथांत असलेली, थोर, साहजिकच अमृतमय, तांबूस रंगाची, तेजस्वी, प्रकाशणारी आणि सूर्याला आणणाऱ्या उषेचें सर्व भक्त स्तवन करतात.

२. लोकांना (झोंपेंतून) जागृत करणारी ही दिसणारी उषा मार्ग गमनार्ह करीत पुढें चालली आहे. सकाळीं मोठ्या रथांत असलेली विश्वव्यापक थोर उषा प्रकाश देते आहे.

३. ही तांबडे बैल जोडून जाण्यास मार्ग प्रकाशित करीत आमचें ऐश्वर्य टिकाऊ करते. ती सर्वश्रेष्ठ प्रशंसनीय उषा प्रकाशत आहे.

४. पूर्व दिशेस आपलें शरीर प्रगट करणारी पांढरी शुभ्र उषा दोनहि बाजू प्रकाशित करीत आहे. सूर्याचा मार्ग चांगल्या प्रकारें आक्रमण करीत आहे. ज्ञात्या स्त्रीप्रमाणें दिशा चुकत नाहीं.

५. आपलें निर्मळ शरीर दाखवावें म्हणूनच कीं काय न्हाऊन उठलेल्या स्त्रीप्रमाणें आमच्या नजरेसमोर उभी राहात आहे. शत्रूभूत अंधाराला नष्ट करीत स्वर्गकन्या तेजासह आली.

६. हा अभिमुख असणारी स्वर्गकन्या उषा सर्व लोकामध्यें सुंदर स्त्रीप्रमाणें आपलें रूप प्रकट करीत आहे. भक्तांना ऐश्वर्य देणारी ही तरुण उषा पूर्वीप्रमाणें आपलें तेज प्रगट करीत आहे.

सूक्त एक्यांयशीवें.

ऋषिः—श्यावाश्व; देवता—सवितृ; छंदः—जगती.

१. थोर, ज्ञात्या व बुद्धिमान अशा सवित्याकडे शहाणे भक्त आपलें मन आणि क्रिया लावीत असतात. तो एकटाच सर्व ऋत्विजांच्या क्रिया जाणणारा आहे. सवितृदेवाची स्तुति श्रेष्ठ होय.

२. ज्ञाता सविता सर्व जग निर्माण करतो. तोच द्विपाद आणि चतुष्पादांचें कल्याण करीत असतो. श्रेष्ठ सविताच स्वर्ग प्रकाशित करतो. तो सविता उषेच्या नंतर प्रकाशूं लागतो.

३. दुसरे देवहि ह्या देवाच्या महिम्याचेंच अनुसरण करतात आणि सामर्थ्यवान होतात. ज्यानें आपल्या माहात्म्यानें पृथ्व्यादि लोक निर्माण केलें तो शुभ्रवर्णाचा सवितृदेवच शोभत आहे.

४. हे सवितृदेवा, तूं तीनहि लोक फिरतोस आणि सूर्याच्या किरणाशीं मिळून जातोस. तूं रात्रीच्या दोनहि बाजूंनीं जात असतोस. हे देवा, तूं आपल्या कृत्यांनीं (जगाचा) मित्र होतोस.

५. हे सवितृदेवा, तूं एकच सर्वांचा ईश्वर आहेस. तूं आपल्या फिरण्यानीं सर्वांचें पोषण करतोस. तूंच ह्या जगाचा धनी आहेस. म्हणूनच श्यावाश्व तुझी स्तुति करीत आहे.

---

४ टीपः—सवितृ आणि सूर्य यांतील फरक लौकिक संस्कृत भाषेंत नाहीं. वैदिकभाषेंत फरक आढळतो. सायणाचार्यानें सूर्य आणि सविता यांची व्याख्या खालीलप्रमाणें केली आहे.

उदयात्पूर्वभावी सविता उदयास्तमयवर्ती सूर्यः।

५.८१.४.

सूक्त ब्यांयशीवें.

ऋषिः—श्यावाश्व; देवता–सवितृ; छंदः—१ अनुष्टुभ्, २–९ गायत्री.

१. सर्वाधार आणि शत्रूंचा फडशा पाडणाऱ्या श्रेष्ठ सवितृदेवाच्या ज्या धनाची आम्ही इच्छा करीत आहोंत, तें सवितृदेवाचें श्रेष्ठ व उपभोग्य धन आम्ही मिळवूं.

२. ह्या सवित्याचें जें सर्वप्रसिद्ध धन आहे त्या सर्वप्रिय आणि स्वयंप्रकाश धनाचा कोणीहि नाश करीत नाहीं.

३. तो पूज्य सवितृदेव दात्याला उत्कृष्ट संपत्ति देतो. त्याला मी उत्कृष्ट संपत्ति मागतों.

४. हे सवितृदेवा, आम्हांला आज मुलाबाळांसहित धन दे. आणि दारिद्र्य दूर कर.

५. हे सवितृदेवा, आम्हापासुन सर्व पातकें दूर कर आणि जें कल्याणकारक असेल तें आम्हांस दे.

६. आम्ही सवितृदेवाच्या कृपेनें पृथ्वीवर निर्दोष असावें आणि सर्व संपत्ति मिळवावी.

७. आम्ही चांगलीं सूक्तें म्हणून सर्वदेवात्मक असणाऱ्या, सज्जनांचें रक्षण करणाऱ्या आणि दिसणाऱ्या सृष्टीचा उत्पादक अशा सवितृदेवाची सेवा करतों.

८. जो सवितृदेव ह्या रात्री आणि दिवसा चांगलीं कृत्यें करीत न चुकतां उदयाला येतो त्याची आम्ही सेवा करतों.

९. जो सर्व प्राण्यांना आपली कीर्ति ऐकवितो आणि जो सविता सर्वांना उत्पन्न करतो त्याची आम्ही सेवा करतों.

सूक्त त्र्यांयशीवें.

ऋषिः—अत्रि भौम, देवता–पर्जन्य; छंदः—९ अनुष्टुभ; २–४ जगती, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. हे स्तोत्या, बलवान पर्जन्याची तूं प्रार्थना कर. हीं स्तोत्रें म्हणून तूं त्याची स्तुति कर, हवि देऊन तूं त्याची सेवा कर. जो वर्षाव करणारा उदार गर्जना करतो तोच ओषधींत गर्भभूत उदक अर्पण करतो.

२. हा वृक्षावर आघात करतो, राक्षसांना ठार करतो. ह्याच्या तडाख्याला सर्व जग भिते. पर्जन्य गर्जना करीत दुर्जनांना ठार करतो आणि वर्षाव करीत निरपराध्यांची इच्छा करतो.

३. चाबकानें घोड्यांना मारीत रथी सैन्य ज्याप्रमाणें पुढें नेतो त्याप्रमाणें पर्जन्य मेघांना प्रकट करतो. जेव्हां पर्जन्य अन्तरिक्ष वर्षावानें युक्त करतो तेव्हां लांबूनच मेघाची गर्जना बाहेर पडत असते.

४. जेव्हां पर्जन्य पावसाच्या रूपानें पृथ्वीवर येतो तेव्हां वारे वाहूं लागतात, वीज चमकूं लागते, ओषधी वाढूं लागतात, आकाश पाझरूं लागते आणि पृथ्वी सर्व जगाकरतां उपयुक्त होते.

५. ज्याच्यामुळें पृथ्वी अत्यंत वंदनीय होते, ज्याच्यामुळें प्राणी फुरफुरू लागतात आणि ज्याच्यामुळें ओषधी अनेकरूपानें वाढूं लागतात तो पर्जन्य आम्हाला अत्यंत सुख देवो.

६. हे मरुतांनो, तुम्ही अन्तरिक्षांतून पाऊस पाडा. मेघांतून मोठाल्या धारा बाहेर पडूं द्या. हे पर्जन्या, तूं उदकाचा वर्षाव करीत आणि ही गर्जना करीत आमच्याकडे ये. उदक देणारा तूं आमचा पिता आहेस.

७. ओरड, गर्जना कर. उदकयुक्त रथानें ये आणि सर्वत्र उदक टाक. तूं आपलीं पखाल खालीं तोंड करून मोकळी सोड आणि खोल आणि समप्रदेश जलमय कर.

८. हे पर्जन्या, तूं ह्या मोठ्या मेघाला वर घे आणि पाऊस पाड. ह्या वाहणाऱ्या नद्या पूर्वेकडे जोरानें वाहूं लागोत. द्यावापृथ्वी पाण्यानें भरून टाक आणि गायांना भरपूर पाणी होवो.

९. हे पर्जन्या, जेव्हां तूं गर्जत असतोस आणि गर्जत शत्रूंना ठार करतोस तेव्हां पृथ्वीवर जें कांहीं आहे तें सर्व प्रफुल्लित होतें.

१०. हे पर्जन्या, तूं अत्यंत वर्षाव केला आहेस. आतां पर्जन्य आवर. तूं अतिक्रमण करण्यास निर्जल प्रदेश व्यापलेस. ओषधी प्राण्यांच्या उपभोगाकरतां उत्पन्न केल्यास आणि लोकांच्याकडून प्रशंसा प्राप्त केलीस.

सूक्त चवऱ्यांयशीवें.

ऋषिः—अत्रि भौम; देवता–पृथिवी; छंदः—अनुष्टुभ्.

१. हे पृथिवी, खरोखर तूं अशा प्रकारें मेघाचें स्थान व्यापून टाकतेस. हे थोर सखलप्रदेशयुक्त पृथ्वी, तूं आपल्या महत्त्वानें पृथ्वीला प्रसन्न करतोस.

२. हे व्यापक पृथ्वी, स्तोते तुझी स्तोत्रें म्हणून स्तुति करतात. कारण, हे शुभ्रवर्णे, खिंकाळणाऱ्या घोड्याप्रमाणें तूं मेघांना आकाशांत उत्पन्न करतेस.

३. हे पृथ्वि, बळकट असणारी तूं पृथ्वीसह वनस्पतींना धारण करतेस. कारण तुझ्या झकझकीत मेघापासून आणि सूर्यापासून पाऊस पडतो.

सूक्त पंच्यायशीवें.

ऋषिः—अत्रि; देवता–वरुण; छन्दः—त्रिष्टुभ.

१. शमिता कातडें पसरण्याकरतां झटकतो त्याप्रमाणें ज्यानें सूर्याकरतां पृथ्वी विस्तारली त्या प्रसिद्ध सम्राज वरुणाकरतां हे अत्रे, गंभीर व प्रिय असें स्तोत्र कर.

२. ह्या वरुणानें अरण्यावर आकाश, घोड्यांत सामर्थ्य आणि नद्यांत पाणी उत्पन्न केलें. अन्तःकरणांत कर्तृत्वबुद्धि, पाण्यांत अग्नि, द्युलोकांत सूर्य आणि पर्वतावर सोम उत्पन्न केला.

३. वरुणानें द्यावापृथ्वींत आणि अन्तरिक्षांत अधोमुख मेघ उत्पन्न केले. जगाचा राजा वरुण पीक येण्याला करतात, त्याप्रमाणें पावसानें सर्व भूमि ओली करतो.

४. जेव्हां वरुण उदकाची इच्छा करतो तेव्हां लागलीच मेघानें पर्वत आच्छादितो व विस्तृत पृथ्वी आणि द्युलोकाला ओले करून सोडतो. बलिष्ठ वीर मरुत मेघांना हदरून टाकतात.

५. जो अन्तरिक्षांत राहूनच मानदंडाप्रमाणें सूर्यानें पृथ्वीचें माप काढतो त्या असुरसंबंधीं प्रसिद्ध वरुणाची ही महान माया मी वर्णन करतों.

६. ह्या अत्यंत ज्ञात्या असणाऱ्या वरुणाची महान माया कोण नष्ट करणार आहे? पहा, ह्या अनेक उदक वहाणाऱ्या नद्या पाण्यानें एका समुद्रालाहि भरूं शकत नाहींत.

७. हे वरुणा, गुरु, मित्र, भाऊ, आप्त, शेजारी आणि कंजूष यांनीं जो नेहमीं अपराध केला असेल त्याची तूं निष्कृति कर.

८. जुगाऱ्यांनींहि जुगारांत जितके फसवले नसेल तसलें जे जाणून किंवा न जाणतां केले असेल, तीं सर्व पातकें पडावयास झालेल्या फळाप्रमाणें आमच्यापासून दूर कर आणि आम्ही तुझे आवडते भक्त होऊं असें कर.

सूक्त श्याहैंशीवें.

ऋषिः—अत्रि; देवता–इंद्राग्नी; छन्दः—६ विराज, अवशिष्ट अनुष्टुभ.

१. हे इंद्राग्नीहो, ज्या माणसाचें युद्धांत तुम्ही संरक्षण करतां तो सुरक्षिताहि शत्रूची संपत्ति, त्रित अग्नि स्तोत्रें प्राप्त करतो त्याप्रमाणें प्राप्त करतो.

२. जे इंद्राग्नी युद्धांत दुस्तर आहेत, जे युद्धांत प्रसिद्ध आहेत, जे पंचजनांचें संरक्षण करतात त्यांचा आम्ही धांवा करतों.

३. पराभव करणारें सामर्थ्य त्यांचेंच आहे. समृद्ध असणाऱ्या त्यांच्याच हातांत तीक्ष्ण आयुध आहे. गाई मिळविण्याकरतां आणि वृत्राला ठार करण्याकरतां रथानें ते जातात.

४. हे इंद्राग्निदेवांनो, जंगम संपत्तीचे अधिपति, ज्ञाते आणि प्रशंसनीय असणाऱ्या इंद्राग्नीचा रथ हाकारण्याकरतां आम्ही प्रार्थना करीत आहोंत.

५. मनुष्याप्रमाणें प्रत्येक दिवशीं उत्कर्ष पावणारे, अहिंस्य आणि पूज्य असणारे इंद्राग्नी अंशाप्रमाणें घोडे मिळविण्याकरतां मी स्वीकारीत आहें.

६. दगडांनीं कुटून तयार केलेल्या बलकर सोमरसाप्रमाणें मी इंद्राग्नींना हवि अर्पण केला आहे. ते तुम्ही आम्हा स्तोत्यांना विपुल अन्न आणि संपत्ति द्या. आम्हांला अन्न द्या.

सूक्त सत्यांयशीवें.

ऋषिः—एवयामरुत; देवता–मरुत; छन्दः—जगती.

१. एवयामरुताचीं म्हटलेलीं स्तोत्रें व्यापक मरुत्संघाकडे जावोत. तो मरुत्संघ उत्साही, यज्ञार्ह, अलंकार घातलेला, बलिष्ठ, स्तुति केलेला, हलवून सोडणारा आणि धांवणारा आहे.

२. जे देव महत्त्वयुक्त उत्पन्न झाले आहेत आणि जे स्वतः ज्ञानी आहेत त्यांची एवयामरुत स्तुति करीत आहे. हे मरुतांनो, तुमचें तें सामर्थ्य अजिंक्य आहे. तुमचें सामर्थ्य उदार आणि महत्वपूर्ण आहे. पर्वताप्रमाणें तुम्ही अजिंक्य आहांत.

३. जे तेजस्वी आणि सुंदर मरुत विशाल द्युलोकावरून येऊन स्तोत्रें ऐकतात त्यांची एवयामरुत स्तुति करीत आहे. कारण, त्यांना स्वतःच्या स्थानीं असतां कोणीहि हलवूं शकत नाहीं. कारण, ते अग्नीप्रमाणें स्वयंप्रकाश आणि नद्यांना प्रवाहित करणारे आहेत.

४. तो मरुत्संघ विशाल आणि सारख्या दिसणाऱ्या अन्तरिक्षांतून बाहेर पडला. एवयामरुत आप-

णहून आपल्या स्थानावरून जेव्हां घोडे जोडता झाला तेव्हां स्पर्धाशील असणारे बलिष्ठ आणि सुख देणारे मरुत स्तोत्यांच्याकडून स्तविले गेले.

५. हे मरुतांनो, ज्या गर्जनेनें स्वयंप्रकाश, स्थिरकान्ति, सुवर्णालंकार घातलेले, सुंदर आयुधें घेतलेले आणि समृद्ध असणारे तुम्ही शत्रूंचा पराभव करीत प्रकाशत असतां तो तुमचा बलिष्ठ, वाढणारा, पसरणारा आणि पाऊस पाडणारा जोराचा आवाज एवयामरुताला भीति उत्पन्न न करो.

६. हे मरुतांनो, तुमचा महिमा अपार आहे. हे सामर्थ्यसंपन्नहो, तुमचें उत्कट सामर्थ्य एवयामरुताचें संरक्षण करो. तुम्ही संकटकालीं प्रगट व्हा. प्रज्वलित अग्नीप्रमाणें असणारे तुम्ही आमचें निन्दकापासून संरक्षण करा.

७. हे रुद्रपुत्र मरुतांनो, अत्यंत प्रज्वलित झालेल्या व यज्ञाला चांगुलपणा आणणाऱ्या अग्नीप्रमाणें तुम्ही एवयामरुताचें संरक्षण करावें. आश्चर्यकारक कृत्यें करणाऱ्या मरुतांच्या झापेंत मोठमोठालीं कृत्यें घडतात. त्या मरुतांनीं हें पृथ्वीरूपी लांबरुंद घर विस्तारलें आहे.

८. हे मरुतांनो, प्रेमळ असणारे तुम्ही आमच्या स्तोत्राकडे या व एवयामरुत जो मी त्याचें स्तोत्र ऐका. हे थोर व इंद्राशीं समान स्वभावाचे मरुतांनो, रथांत बसून युद्ध करणाऱ्या योध्याप्रमाणें आश्चर्यकारक कर्में करून द्वेष्ट्यांना दूर करा.

९. हे यज्ञार्ह मरुतांनो, तुम्ही आमच्या यज्ञांत या. कर्माला चांगुलपणा येण्याकरतां आस्तिक असणारे तुम्ही एवयामरुताचा धांवा ऐका. मोठाल्या पर्वताप्रमाणें अन्तरिक्षांत पसरलेले तुम्ही, हे ज्ञात्यांनो, निन्दकांना दुर्धर आहांत.

---

८. टीपः—उत्सर्जन व उपाकरणांत ह्या मंत्राचा आश्वलायन गृह्य सूत्रांत विनियोग आहे. (३.५.)

येथें पांचवें मंडळ संपलें.

पांचवें मंडळ.

कोष्टक

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१	३.८.१२-१३	बुधयुधिष्ठिरौ	त्रिष्टुभ्	अग्नि	
२	३.८.१४-१५	कुमार किंवा वृश किंवा दोघेहि	१.११ त्रिष्टुभ् १२ शक्करी	,,	त्र्यरुणाचा पुत्र रथाखालीं सांपडून मेला, त्यास पुरोहित वृश यानें जिवंत केल्याची आख्यायिका.
३	३.८.१६-१७	वसुश्रुत	त्रिष्टुभ्	,,	अग्नीची कळवळ्याची प्रार्थना
४	३.८.१८-१९	,,	,,	,,	
५	३.८.२०-२१	,,	गायत्री	आप्रीसूक्त	
६	३.८.२२-२३	,,	पंक्ति	अग्नि	
७	३.८.२४-२५	इष	१-९ अनुष्टुभ् १० पंक्ति	,,	
८	३.८.२६	,,	जगती	,,	
९	४.१.१	गय	५.७ पंक्ति अवशिष्ट अनुष्टुभ्	,,	
१०	४.१.२	,,	४.७ पंक्ति अवशिष्ट अनुष्टभ्	,,	
११	४.१.३	सुतंभर	जगती	,,	
१२	४.१.४	,,	त्रिष्टुभ्	,,	
१३	४.१.५	,,	गायत्री	,,	
१४	४.१.६	,,	,,	,,	
१५	४.१.७	वरुण	त्रिष्टुभ्	अग्नि	
१६	४.१.८	पुरु	१.४ अनुष्टुभ् ५ पंक्ति	,,	
१७	४.१.९	,,	,,	,,	
१८	४.१.१०	मृक्तवाहस द्वित	,,	,,	
१९	४.१.११	वव्रि	१-२ गायत्री ३-४ अनुष्टुभ् ५ विराज्	,,	
२०	४.१.१२	प्रयस्वत्	१-३ अनुष्टुभ् ४ पंक्ति	,,	
२१	४.१.१३	सस	१-३ अनुष्टुभ् ४ पंक्ति	,,	

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
२२	४.१.१४	विश्वसामन्	१-३ अनुष्टुभ् ४ पंक्ति	,,	
२३	४.१.१५	द्युम्न	,,	,,	
२४	४.१.१६	बंधु, सुबंधु श्रुतबंधु, विप्रबंधु	विराज्	,,	
२५	४.१.१७-१८	वसुयू अनेक	अनुष्टुभ्	,,	
२६	४.१.१९-२०	,,	गायत्री	,,	
२७	४.१.२१	त्र्यरुण, त्रसदस्यु अश्वमेध किंवा अत्रि	१-३ त्रिष्टुभ् ४-६ अनुष्टुभ्	१-५ अग्नि ६ इंद्राग्नी	
२८	४.१.२२	विश्ववारा स्त्री	१-३ त्रिष्टुभ् २ जगती ४ अनुष्टुभ् ५-६ गांयत्री	अग्नि	
२९	४.१.२३-२५	गौरिवीति	त्रिष्टुभ्	इंद्र	इंद्रपराक्रमवर्णन.
३०	४.१.२६-२८	बभ्रु	,,	इंद्र व क्वचित् ऋणंचय राजा	स्त्रियांचा शस्त्रासारखा उपयोग. रुशम देशाचा उल्लेख
३१	४.१.२९-३१	अवस्यु	,,	८ व्याचा दुसरा भाग कुत्स व उशनस ९ इंद्र व कुत्स अवशिष्ट इंद्र	इंद्राकडून कुत्साचें रक्षण सुदुघा नदी
३२	४.१.३२-३३	गातु	,,	इंद्र	
३३	४.२.१-२	संवरण	,,	,,	त्रसदस्युदानस्तुति मारुताश्वविदथदानस्तुति च्यवतानदानस्तुति ध्वन्यदानस्तुति
३४	४.२.३-४	,,	१.८ जगती ९ त्रिष्टुभ्	,,	इंद्रस्वभाव, अग्निवेश शत्री
३५	४.२.५-६	प्रभुवसु	१.७ अनुष्टुभ् ८ पंक्ति	,,	इंद्रवर्णन
३६	४.२.७	,,	३ जगती अवशिष्ट त्रिष्टुभ्	,,	
३७	४.२.८	अत्रि	त्रिष्टुभ्	,,	
३८	४.२.९	,,	अनुष्टुभ्	,,	

सूक्त	अष्टक अ व	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
३९	४.२.१०	,,	१.४ अनुष्टुभ् ५ पंक्ति	,,	
४०	४.२.११–१२	,,	१.३ उष्णिह ५.९ अनुष्टुभ् अवशिष्ट त्रिष्टुभ्	६.९ अत्रि ५ सूर्य अवशिष्ट इंद्र	सूर्य ग्रहणाचें वर्णन व लोक कल्पनेचें वर्णन
४१	४.२.१३–१६	,,	१६.१७ अति- जगती, २० विराज् अवशिष्ट त्रिष्टुभ्	विश्वेदेव	सुंदर काव्यमय सूक्त
४२	४.२.१७–१९	,,	त्रिष्टुभ्	११ रुद्र अवशिष्ट विश्वेदेव	दान न देणारांची निंदा. स्वभाव प्रदर्शन
४३	४.२.२०–२२	,,	,,	विश्वेदेव	
४४	४.२.२३–२५	अवत्सार व सदापृणादि	१.१३ जगती १४.१५ त्रिष्टुभ्	,,	कर्तव्यदक्षस्तुति
४५	४.२.२६-२७	सदापृण	त्रिष्टुभ्	,,	सुंदर उषावर्णन
४६	४.२.२८	प्रतिक्षत्र	८.२ त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती	१.६ विश्वेदेव ७.८ देवपती	
४७	४.३.१	प्रतिरथ	त्रिष्टुभ्	विश्वेदेव	
४८	४.३.२	प्रतिभानु	जगती	विश्वेदेव	
४९	४,३.३	प्रतिप्रभ	त्रिष्टुभ्	,,	प्रांजळ प्रार्थना
५०	४.३.४	स्वस्ति आत्रेय	१-४अनुष्टुभ् ५पंक्ति	,,	
५१	४.३.५-७	,,	१-४ गायत्री ५–-१० उष्णिह ११-१३ जगती किंवा त्रिष्टुभ् १४-१५ अनुष्टुभ्	,,	स्वस्तिवाचन
५२	४.३.८-१०	श्यावाश्व	६-१७ पंक्ति अवशिष्ट अनुष्टुभ्	मरुत्	
५३	४.३.११-१३	,,	१.५.१०.११.१५ ककुभ ६.७ ९-१३ १४·१६ सतोबृहती ८-१२ गायत्री २ बृहती ३ अनुष्टुभ् ४ पुरउष्णिह	,,	
५४	४.३.१४.१६	,,	१४ त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती	,,	मरुतांच्या पराक्रमाचें वर्णन
५५	४.३.१७-१८	,,	१० त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती	,,	

सूक्त	अष्टक अ व	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
५६	४.३.१९-२०	,,	३-७ सतोबृहती अवशिष्ट बृहती	,,	
५७	४.३.२१-२२	,,	७-८ त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती	,,	
५८	४.३-२३	,,	त्रिष्टुभ्	,,	
५९	४.३.२४	,,	८ त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती	,,	
६०	४.३.२५	,,	७-८ जगती अवशिष्ट त्रिष्टुभ्	मरुत् किंवा अग्निमरुत्	
६१	४.३.२६-२९	,,	५ अनुष्टुभ् ९ सतोबृहती अवशिष्ट गायत्री	१-४ मरुत् ५-८ तरंतस्य भार्या शशीयसी ९ पुरुमिळ्ह वैददश्वि १ तरंस वैददश्वि राजा ११-१६ मरुत १७-१८ रथवीति दार्भ्य	अर्चनानसपुत्र श्यावाश्व व रथवीति दाल्भ्य यांची कथा
६२	४.३.३०-३१	श्रुतविद	त्रिष्टुभ्	मित्रावरुण	यजूंचा उल्लेख
६३	४.४.१	अर्चनानस्	जगती	,,	मित्रावरुणांच्या नियमांनीं जगाचें धारण होत असल्याचें वर्णन
६४	४.४.२	,,	१-६ अनुष्टुभ् ७ पंक्ति	,,	
६५	४.४.३	रातहव्य	१-५ अनुष्टुभ् ६ पंक्ति	,,	
६६	४.४.४	,,	अनुष्टुभ्	,,	अनेक लोकांकडून चाललेल्या स्वराज्याविषयीं प्रयत्न चालू असल्याचें वर्णन
६७	४.४.५	यजत	,,	,,	
६८	४.४.६	,,	गायत्री	,,	
६९	४.४.७	उरुशक्ति	त्रिष्टुभ्	,,	
७०	४.४.८	,,	गायत्री	,,	
७१	४.४.९	बाहुवृक्त	,,	,,	

सूक्त	अष्टक अ व	ऋषि	छंद	देवता	महत्व
७२	४.४.१०	,,	उष्णिह्	,,	
७३	४.४.११-१२	पौर	अनुष्टुभ्	अश्विनौ	
७४	४-४.१३-१४	,,	,,	,,	
७५	४.४.१५-१६	अवस्यु	पंक्ति	,,	
७६	४.४.१७	अत्रि	त्रिष्टुभ्	,,	
७७	४.४.१८	,,	,,	,,	संध्याकाळीं दिलेला हवि पोहचत नाहीं.
७८	४.४.१९-२०	सप्तवध्रि	१-३ उष्णिह् ४ त्रिष्टुभ् बाकी अनुष्टुभ्	,,	सप्तवध्रीची कथा
७९	४.४.२१-२२	सत्यश्रवस्	पंक्ति	उषस्	उषावर्णन
८०	४.४.२३	,,	त्रिष्टुभ्	,,	
८१	४.४.२४	श्यावाश्व	जगती	सवितृ	
८२	४.४.२५-२६	,,	१ अनुष्टुभ् बाकी गायत्री	,,	सवितृस्तुति
८३	४.४.२७-२८	भौम अत्रि	९ अनुष्टुभ् २.४ जगती अवशिष्ट त्रिष्टुभ्	पर्जन्य	
८४	४.४.२९	,,	अनुष्टुभ्	पृथिवी	
८५	४.४.३०-३१	,,	त्रिष्टुभ्	वरुण	वरुणस्तुति
८६	४.४.३२	,,	अनुष्टुभ् ६ विराज	इंद्राग्नी	
८७	४.४.३३-३४	एवयामरुत्	अतिजगती	मरुत्	

~~विज्ञान महाविद्यालय~~, पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

विषय संख्या ९४ म / २

आगत पंजिका संख्या 20३५८

तिथि	संख्या	तिथि	संख्या
16 MAY 1969			
५८५/९			

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर

मंडळ सहावें.

भाषांतरकार

विद्यानिधि **सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.**

मुद्रक व प्रकाशक

शंकर रामचंद्र दाते. बी. ए.

चिटणीस, वैदिक वाङ्मय प्रसारक मंडळ.

‘ लोकसंग्रह ’ छापखाना, २७ बुधवार पेठ, पुणें.

शके १८५०

किंमत दीड रुपया

षष्ठमंडळपरिचय.

सहाव्या मंडळांत ७५ सूक्तें असून ७६५ ऋचा आहेत. अनुवाक सहा आहेत.

ह्या मंडळांतील सूक्तांचा द्रष्टा प्राय: भरद्वाज आहे.

छंदाच्या दृष्टीनें ४७ त्रिष्टुभ् छंदांतील, ४ गायत्री छंदांतील व १ जगती छंदांतील सूक्त असून बाकीचीं सूक्तें केवळ एकाच छंदांतील नाहींत.

देवतेच्या दृष्टीनें २६ सूक्तें इंद्राचीं, १९ अग्नीचीं, ५ पूषन्चीं, ४ विश्वेदेव, २ अश्वि, २ इंद्राग्नि व १ सवितृ, १ बृहस्पति, १ द्यावापृथ्वी, १ सोमरुद्र, १ इंद्राविष्णु, १ इंद्रावरुण, १ मित्रावरुण, १ सरस्वती, १ इंद्रापूषन्, १ मरुत् अशीं आहेत. बाकी केवळ एकाच देवतेचीं सूक्तें नाहींत. दोन ठिकाणीं दानस्तुति आली आहे.

अग्नीचीं नांवें.

अथर्वा अग्नि किंवा अंगिरा अग्नि अशीं नांवें कशीं पडतात याचा उल्लेख कांहीं ठिकाणीं स्पष्ट दिसतो. सध्यांहि संशोधकांचीं नांवें शोधित वस्तूला देण्यांत येतात. हा सांप्रदाय वैदिक महर्षीपासून चालूं दिसतो. त्या दृष्टीनें एकोणिसावें सूक्त पहाण्यासारखें आहे.

तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें वैश्वानर अग्नीचीं सूक्तें वैदिक महर्षींच्या विचारावर प्रकाश पाडण्यासारखीं आहेत. अग्नीचीं सूक्तें भक्तिभावांनीं नटलेलीं असतात आणि वैश्वानर अग्नीचीं सूक्तें तर तत्त्वज्ञानाशीं एकरूप झालेलीं असतात.

नवव्या सूक्तांत विणकामाचा स्पष्टरीत्या उल्लेख आलेला आहे. असें रूपक करण्याचें सूक्तकारांच्या अंगवळणीं पडल्यासारखें दिसतें.

गुडघे टेकून प्रार्थना

सूक्त बत्तीस ऋचा तीन यांमध्यें गुडघे टेकून प्रार्थना करण्याचा उल्लेख आहे.

गोसूक्तें

ह्या मंडळांत एक गोसूक्त आलें आहे. (२९). त्याचा गाईच्या प्रशंसेकरतां उपयोग करावा असें आश्वलायनगृह्यसूत्रांत (१०–७) सांगितलें आहे. सूक्ताचें सिंहावलोकन केलें असतां खालील गोष्टी त्यांत आढळतात.

(१) दूध देणाऱ्या सवत्स गाई घरीं असाव्यात. (२) गाई घरीं असणें ही ईश्वरी देणगी आहे. (३) गाय हा इंद्र आहे. (४) गाईचें दूध पौष्टिक आणि कान्तिप्रद आहे. (५) गाय मंगलकारक आहे. (६.) गाईचा शब्द शुभ आहे. (७) गाय अत्यंत हितप्रद आहे. (८) गाय अवध्य आहे.

दुंदभि व रथ.

४७ व्या सूक्तांत रथ व दुंदुभि यांचें वर्णन आहे. २६–२८ मध्यें रथाचें वर्णन केलें असून रथांत कोणते गुण असावेत हें चांगलें दिग्दर्शित केलें आहे. त्यांमध्यें रथ कातड्यानें मढविला असल्याचा एक विशेष आढळतो.

तसेंच दुंदभीचें वर्णन असून दुंदुभीच्या आवाजानें वीरांचे बाहु स्फुरण पावूं लागतात व ज्यांच्या अंगांत वीरश्री नसते त्यांच्यांतहि वीरश्री उत्पन्न करण्याचें सामर्थ्य त्यांत दाखविलें आहे.

दुंदुभीचे कांहीं शब्द सध्यांच्या बिगुलाच्या शब्दाप्रमाणें खुणेसारखे बसविले होते असें स्पष्ट आहे.

सरस्वती नदी.

सरस्वती नदीचें एक सूक्त (६१) ह्या मंडळांत आहे. त्यामध्यें सरस्वतीनें वध्र्यश्वाला दिवोदास नांवाचा पराक्रमी पुत्र दिल्याचा उल्लेख आहे. ह्या दिवोदासाचा सुदास नांवाचा मुलगा पुढें दाशराज्ञ युद्धांतील प्रमुख राजा झाला असा उल्लेख आहे. तसेंच ती अत्यंत समृद्ध असल्याचें वर्णन आहे. आणि तिच्या भोंवतालचा प्रदेश सुपीक असल्याचा निर्वाळा दिला आहे.

युद्धविषयक कल्पना.

युद्धविषयक कल्पना जरी ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं व्यक्त झाल्या आहेत तरी युद्धासंबंधीं ७५ वें सूक्त बरेंच महत्त्वाचें आहे. आश्वलायनगृह्यसूत्रातील (३.१२) ह्या सूक्ताच्या विनियोगाकडे जरीं विशेष लक्ष दिलें नाहीं तरी सूक्तांत युद्धातील खालील गोष्टींचा स्पष्ट उल्लेख आलेला आहे.

(१) कवच, (२) धनुष्य, (३) धनुष्याची दोरी, (४) भाता, (५) बाणाचें फळ व पीस, (६) चाबूक, (७) हस्तघ्न, (८) विषानें माखलेला बाण, (९) मंत्रशक्ति.

ह्यावरून युद्धसाधनाची बरीच कल्पना येते.

तसेंच पसतिसाव्या सूक्तांतील तिसऱ्या ऋचेवरून स्तोत्रकर्त्याची बलवत्तर युद्ध करण्याची इच्छा व्यक्त होते.

वैशाखी पौर्णिमा १८९०

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर.

सहावें मंडळ.

सूक्त पहिलें.

ऋषिः—भरद्वाज बार्हस्पत्य; देवता–अग्नि; छंदः–त्रिष्टुभ.

१. हे अग्निदेवा, तूं देवांचें लक्ष वेधलेला सर्वश्रेष्ठ आहेस. हे दर्शनीया, या कृत्यांत तूं देवांना बोलवावेंस. हे वीरश्रेष्ठा, सर्व बलवान शत्रूंचा पराभव करण्याकरतां तूं अजिंक्य सामर्थ्य प्रकट केलेंस.

२. आतां तूं यज्ञार्ह आणि प्रशंसनीय होत्साता हवींची इच्छा करीत होता म्हणून यज्ञांत बसला आहेस. विपुल संपत्ति देणारा म्हणून ओळखणारे भक्त लोक प्रथम प्रसिद्ध अशा तुलाच अनुसरतात.

३. मार्गानें अनेक प्रकारच्या संपत्तीसह जाणाऱ्या तेजस्वी, प्रेक्षणीय, सर्वकाळीं प्रकाशमान होणाऱ्या आणि मूलाधार अग्नीकडे दानधर्म करीत भक्त लोक जात असतात.

४. अग्निदेवाच्या स्थानाकडे स्तुति करीत कीर्ति मिळावी म्हणून जाणारे लोक अखंड कीर्ति प्राप्त करतात. हे अग्निदेवा, तुझी रमणीय आकृति पाहिल्यावर लोक रमून जातात आणि अग्नीच्या श्रेष्ठ नांवाचा जप करतात.

५. हे अग्ने, लोकांना उभयविध संपत्ति प्राप्त व्हावी म्हणून तुला लोक प्रज्वलित करतात. लोक तुला पृथ्वीवर प्रज्वलित करीत असतात. हे तारका, तुझें स्मरण केलें असतां तूं संरक्षण करतोस. तूं नेहेमींच लोकांचा आईबाप आहेस.

६. तो अग्नि पूजनीय, प्रिय, लोकांचे यज्ञ पार पाडणारा आणि यज्ञार्ह असा बसलेला आहे. घरांत प्रज्वलित केलेल्या त्या अग्नीला आम्ही गुडघे टेकून आणि स्तोत्रें म्हणून प्राप्त करीत आहोंत.

७. अग्निदेवा, सुखाच्या इच्छेनें सद्बुद्धि धारण करणारे आम्ही प्रशंसनीय अशा तुझी स्तुति करीत आहोंत. हे अग्ने, अत्यंत उज्ज्वल कांतीनें प्रकाशमान होणारा तूं लोकांना स्वर्गाला नेतोस.

८. सर्व लोकांचा धनी, शत्रुविनाशक, बलशाली, लोकांच्याकडे जाणारा, अन्न निर्माण करणारा, शोधक, तेजस्वी आणि संपत्ति प्राप्त व्हावी म्हणून यज्ञ केल्या जाणाऱ्या अग्नीची आम्ही स्तुति करीत आहोंत.

९. हे अग्ने, जो भक्त तुला समिधासह हविर्दान करतो तो भक्त यज्ञ करतो आणि तुझी स्तुति करतो. जो स्तुति करून तुला आहुति देतो तो तुझें साहाय्य असलेला भक्त सर्वच उत्कृष्ट प्रकारची संपत्ति प्राप्त करतो.

१०. हे अग्निदेवा, नमस्कार करून, समिधा देऊन आणि हवि अर्पण करून थोर अशा तुझी आम्हां सेवा करीत असतों. हे बलपुत्र अग्ने, स्तोत्रें म्हणून, गाणीं गाऊन, तुझी यज्ञभूमीवर आम्ही सेवा करीत आहोंत. तुझ्या कल्याणप्रद कृपेमध्यें आम्ही असावें.

११. हे अग्निदेवा, ज्या त्वां हीं सर्व द्यावापृथ्वी विस्तारली आणि जो तूं भक्तांना अन्न देणारा आणि संरक्षण करणारा झालास. अशा हे अग्ने, आम्हांला विपुल अन्न आणि भरपूर ऐश्वर्य देत प्रज्वलित हो.

१२. हे सर्वव्यापका अग्ने, भरपूर नोकरचाकर आणि जनावरें वगैरेंनीं सहित असणारें ऐश्वर्य आमच्या पुत्रपौत्राकरतां तूं सतत द्यावेंस. तसेंच पुरेसें उत्कृष्ट अन्न आणि उत्कृष्ट कीर्ति आम्हांला प्राप्त व्हावी.

१३. हे तेजस्वी अग्ने, आम्हांला समृद्धि प्राप्त होण्याकरतां अनेक प्रकारची विपुल संपत्ति उपभोगूं दे. हे सर्वपूज्य अग्ने, तुझी सेवा करणाऱ्या मला तेजस्वी असणारा तूं उत्कृष्ट संपत्ति दे.

सूक्त दुसरें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–अग्नि; छन्दः—१–१० अनुष्टुभ्, ११ शक्करी.

१. हे अग्ने, तूं मित्राप्रमाणें शुष्क काष्ठरूपी अन्न प्राप्त करतोस. हे सर्वद्रष्ट्या, व्यापक अग्ने, तूं अन्नानें येणारी पुष्टि वृद्धिंगत करतोस.

२. हे अग्ने, यज्ञ करून आणि स्तोत्रें म्हणून सर्व लोक तुझीच प्रशंसा करतात. लोकद्रष्टा, पाऊस पाडणारा आणि लोकसंरक्षक आदित्य तुझ्यांतच (रात्रीं) अन्तर्भूत होतो.

३. हे अग्निदेवा, जेव्हां ते मनुवंशज लोक सुखेच्छेनें यज्ञांत तुमचा धांवा करतात, तेव्हां प्रसन्न अंतःकरणानें स्तुति करणारें भक्त यज्ञाची पताका अशा तुला प्रज्वलित करतात.

४. जो भक्त उत्कृष्ट संपत्ति देणाऱ्या तुला संतुष्ट करतो, आणि तुझ्या कृत्यानें संतुष्ट होतो तो तुझ्या अत्यंत साहाय्यानें पापाप्रमाणें दुष्ट द्वेष्ट्यांच्या हातून पार जातो.

५. हे अग्ने, जो भक्त समिधांसह चांगल्या प्रकारें तयार केलेली आहुति देतो तो भक्त शंभर वर्षें आयुष्य आणि भरभराटीस येणारें गृह प्राप्त करतो.

६. हे अग्ने, तेजस्वी अशा तुझा स्वच्छ धूर आकाशांत पसरत चालला आहे. हे शोधक अग्ने, स्तुति केला जाणारा तूं कांतीनें खरोखर सूर्यासारखा आहेस.

७. जगांत तूं प्रशंसनीय आहेस आणि आम्हांला तूं अतिथीप्रमाणें प्रिय आहेस. शहरांतल्या (हितोपदेश करणाऱ्या) म्हाताऱ्याप्रमाणें तूं रमणीय आहेस आणि मुलाप्रमाणें तूं संरक्षणीय आहेस.

८. हे अग्ने, घोड्याप्रमाणें उपयोगी पडणारा तूं घर्षणानें लांकडांत उत्पन्न होतोस. वायूप्रमाणें सर्वगामी, लहान असूनहि घोड्याप्रमाणें संचार करणारा असा अग्नि अन्न आणि घर देणारा आहे.

९. गवतावर सोडलेल्या घोड्याप्रमाणें तूं तीं कठोर लांकडेंहि खाऊन टाकतोस. हे जरारहित अग्ने, प्रज्वलित झालेल्या तुझ्या ज्वाळा अरण्यें उध्वस्त करतात.

१०. हे अग्ने यज्ञ करणाऱ्या आम्हां लोकांच्या घरीं त देवांना बोलाविणारी स्तुति इच्छीत असतोस. हे लोकाधिपते, तूं आम्हांला समृद्ध कर आणि हे अंगिरा अग्ने, हविर्द्रव्याचा स्वीकार कर.

११. अनुकूलप्रकाशा अग्निदेवा, द्यावापृथ्वींत व्यापून असणारा त देवांना स्तवण्याकरतां मला सद्बुद्धि दे. स्वर्गीय अशा आम्हां लोकांचें तूं कल्याण कर. आम्ही दुष्टांच्या तडाख्यांतून आणि पापांतून पार जाऊं. तुझ्या साहाय्यानें आम्ही सर्वांतून तरून जाऊं.

सूक्त तिसरें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—अग्नि; छन्दः-त्रिष्टुभ.

१. हे अग्निदेवा, ज्या मनुष्याला मित्रावरुणांच्या सह असणारा तूं आयुधानें दुष्टापासून संरक्षितोस, हे अग्ने, सत्य नियमांचें पालन करणारा आणि त्याकरतांच उत्पन्न झालेला तो भक्त दीर्घायुषी होतो, त्या देवभक्ताला तुझें उत्कृष्ट तेज—सूर्य प्राप्त होतो.

२. जो धनसमृद्ध अशा अग्नीकरतां हवि देतो तो यज्ञांनीं देवांचें पूजन करतो आणि कर्में करून शांत होतो. त्याला पुत्र नाहीं असें कधीं होत नाहीं, त्या माणसाला पाप करण्याची वेळ येत नाहीं. आणि त्याला गर्वहि होत नाहीं.

३. सूर्याप्रमाणें ज्याचें दर्शन निष्पाप अशा तुझ्या आधारभूत असणाऱ्या झकाकणाऱ्या भयंकर ज्वाला चहुबाजूस असतात. हा अग्नि रात्रीं शब्द करणाऱ्या प्राण्याप्रमाणें अरण्यांत कोठेंहि असतां रमणीय दिसतो.

४. ह्याचा मार्ग तीक्ष्ण आहे. ह्याचें रूप फारच तेजस्वी आहे. घोड्याप्रमाणें हा तोंडानें गवत खात असतो. कुऱ्हाडीप्रमाणें आपल्या ज्वाला लांकडावर फेकणारा आणि सोनाराप्रमाणें लांकडें जाळून अरण्य रूपान्तरित करतो.

५. जो रात्रीं आश्चर्यकारक वेगानें जातो आणि सहज उडून जाणाऱ्या पक्ष्याप्रमाणें लांकडाचा आश्रय करतो, तो अग्नि बाण टाकणाऱ्याप्रमाणें आपल्या ज्वाला टाकीत असतो. पोलादाला धार लावावी त्याप्रमाणें आपले तेज उपयोगाकरतां तो तीक्ष्ण करतो.

६ जो दिवसा आणि रात्रीं स्वतः प्रकाशित होऊन लोकांना कार्यप्रवृत्त करतो तो हा अग्नि एखाद्या स्तोत्याप्रमाणें आपला प्रकाश प्रसृत करतो आणि सर्वांना अनुकूल प्रकाशून पुनः पुनः शब्द करतो.

७. तेजस्वी सूर्याप्रमाणें प्रकाशणाऱ्या अग्नीचा पुनः पुनः शब्द होतो. तो कामपूरक अग्नि प्रकाशित होऊन वनस्पतींवर शब्द करूं लागतो. जो आपल्या धडधडणाऱ्या तेजानें इकडे तिकडे फिरत असतो, तो अग्नि आमच्या शत्रूंना दडपीत उत्कृष्ट सत्तेखालीं असलेल्या द्यावापृथ्वींना संपत्तीनें भरून टाकतो.

८. जो अग्नि जोडलेल्या घोड्याप्रमाणें आपल्या तेजांनीं वावरत असतो तो विद्युल्लतेप्रमाणें आपल्या तेजांनीं सारखा चमकत असतो. जो मरुतांचें सामर्थ्य

क्रमी करतो आणि जो सूर्याप्रमाणें वेगानें प्रकाशत असतो तो हा अग्नि होय.

सूक्त चवथें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—अग्नि; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे देवांना बोलावणाऱ्या बलपुत्र अग्ने, मनूच्या यज्ञांत यज्ञांनीं देवांना जसें संतुष्ट केलें तसेंच हे अग्ने, तुझ्यासारख्या यज्ञेच्छु देवांना आमच्या यज्ञांत आज तूं संतुष्ट कर.

२. जो सर्व जगाला जगवणारा, अतिथीप्रमाणें पूज्य असणारा, सर्वज्ञ व अमर अग्नि लोकांत उषःकालीं जागृत होतो, तो दिवसा सूर्याप्रमाणें प्रकाशणारा आणि सर्वलभ्य अग्नि आम्हांला उत्कृष्ट अन्न देवो.

३. स्तोते ज्याच्या महत्कृत्याचें वर्णन करतात तो सूर्याप्रमाणें स्वच्छ प्रकाशणारा अग्नि तेजाच्या पांघरुणांत असतो. सर्वांना शुद्ध करणारा तरुण अग्नि सर्वत्र व्यापून असतो. तो विध्वंसकाचीं चिरंतन कृत्यें नष्ट करून टाकतो.

४. हे बलपुत्र अग्ने, तूं अत्यंत प्रशंसनीय आहेस. हविर्द्रव्यांत राहणारा अग्नि जन्मल्याबरोबर भक्तांला अन्न आणि घर देतो. हे अन्नदात्या, प्रसिद्ध असणारा तूं आम्हांला अन्न द्यावेंस. आणि राजाप्रमाणें शत्रूस जिंकावेस. एवढ्याकरतां तूं सुरक्षित अशा स्थळीं रहावेंस.

५. जो अग्नि आपलें तेज प्रखर करतो आणि हवि भक्षण करतो, तो वायूप्रमाणें सर्वांवर सत्ता चालवीत रात्रीं प्रकाशत असतो. जो हवि देणारांचा शत्रु आहे त्याला आम्ही ठार करतों. तूं घोड्याप्रमाणें तुटून पडणाऱ्या शत्रूंना ठार कर.

६. हे अग्ने, सूर्य आपल्या प्रकाशणाऱ्या किरणांनीं व्यापतो त्याप्रमाणें तूं आपल्या कांतीनें द्यावापृथ्वी व्यापून टाकतोस. मार्ग आक्रमण करणाऱ्या सूर्याप्रमाणें आश्चर्यकारक तेजोयुक्त अग्नि अंधःकाराला पळवून लावतो.

७. हे अग्ने, स्तुत्य आणि उत्कृष्ट कांतिमान् असणाऱ्या तुझी आम्ही सेवा करीत आहोंत. आमचें उत्कृष्ट स्तोत्र तूं श्रवण कर. वायूप्रमाणें आणि इंद्राप्रमाणें बलशाली अशा तुला आम्ही हवि देऊन प्रसन्न करीत आहोंत.

८. हे अग्ने, आम्हांला सुरक्षित मार्गांनीं आणि सुखानें संपत्ति प्राप्त होऊं दे. आणि आम्हांला पापांतून पार कर. जी भक्तांना देण्यासारखी आहे ती संपत्ति आम्हां स्तोत्यांना तूं द्यावीस. आम्ही सत्पुत्रांनीं युक्त होऊन शंभर वर्षें आनंदानें राहूं.

सूक्त पांचवें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे अग्ने, जो अत्यंत ज्ञानी, सर्ववंद्य आणि कोणाचाहि द्रोह न करणारा अग्नि आम्हांला सर्वश्रेष्ठ द्रव्य देतो, त्या बलपुत्र तरुणांतल्या तरुण आणि अत्यंत उत्कृष्ट स्तोत्रांनीं स्तविल्या जाणाऱ्या अग्नीचा मी स्तोत्रें म्हणून धांवा करीत आहें.

२. सर्व प्राणिमात्रांनीं पृथ्वीवर ठेवावी त्याप्रमाणें सर्व संपत्ति ज्या शोधक अग्नींत ठेवली आहे त्या तुझ्या मध्यें हे प्रज्वालित अग्ने, रात्रंदिवस यज्ञ करणारे लोक हवि अर्पण करीत असतात.

३. हे अग्निदेवा, तूं पुरातन कालापासून लोकांत आपल्या कर्तृत्वानें उत्कृष्ट संपत्तीचा दाता आहेस. म्हणून विद्वान् आणि सर्वज्ञ अग्ने, तूं सेवा करणाऱ्या भक्तांना भरपूर संपत्ति देतोस.

४. हे अग्निदेवा, जो शत्रु गुप्त स्थानीं राहून आम्हांला त्रास देतो, जो सुरक्षित राहून हे अनुकूलप्रकाशा, आमचा नाश करतो, त्याला हे संतप्त करणाऱ्या अग्ने, अत्यंत त्रासदायक असणारा तूं आपल्या तरुण आणि बलिष्ठ तेजांनीं त्रास दे.

५. हे बलपुत्र अग्ने, जो भक्त समिधा देऊन, यज्ञ करून, स्तोत्रें म्हणून व सामगायन करून तुझी सेवा करतो तो हे अमर अग्ने, बुद्धिमान होऊन लोकांत संपत्ति आणि उज्ज्वल कीर्तीनें प्रकाशतो.

६. हे अग्निदेवा, आम्ही इच्छा केल्याबरोबर प्रसिद्ध असणाऱ्या त्वां बलवन्तानें असें करावें कीं आपल्या सामर्थ्यानें स्पर्धाशील शत्रूंचा पराभव करावा. तेजोयुक्त असणारा तूं ज्या स्तोत्रांनीं स्तविला जातोस, स्तोत्याचें तें मननीय स्तोत्र तूं स्वीकार.

७. हे अग्निदेवा, तुझ्या साहाय्यानें आम्ही त्या इच्छा पुऱ्या करूं. हे धनवन्ता, आम्ही चांगल्या मुलाबाळांनीं युक्त संपत्तीचा उपभोग घेऊं धान्यसमृद्धि इच्छिणारे आम्ही तुझ्या कृपेनें धान्य प्राप्त करूं, हे तरुण अग्ने, आम्हीं अक्षय्य कीर्तीचा उपभोग घेऊं.

सूक्त सहावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—अग्नि; छंदः—त्रिष्टुभ्.

१. साहाय्याची इच्छा करणारा स्तोता नवीन स्तोत्र म्हणत अत्यंत प्रशंसनीय, अरण्यें जाळून फस्त करणारा, कृष्णवर्त्मा, साहाय्यार्थ बोलावला जाणारा आणि स्वर्गीय अशा बलपुत्र अग्नीला स्तवितों.

२. जो अत्यंत श्रेष्ठ असणारा पावक अग्नि अनेक मोठालीं लांकडें खात असतो तो पांढरा, कडकडणारा, अन्तरिक्षांत राहणारा उत्कृष्ट शब्द करणाऱ्या मरुतांसह तारुण्य मदानें युक्त असतो.

३. हे प्रज्वलित अग्ने, तुझ्या वाऱ्यानें हलणाऱ्या तेजस्वी ज्वाला चहूंकडे पसरत आहेत. खादाड, नवीन उत्पन्न झालेल्या आणि जोरानें प्रकाशणाऱ्या तुझ्या उत्कृष्ट ज्वाला अरण्यें खाऊन टाकतात.

४. हे दीप्तिमान अग्ने, तुझ्या ज्या तेजस्वी आणि स्वच्छ ज्वाला आहेत त्या पृथ्वीचें वपन करतात आणि भरधांव सुटलेल्या घोड्याप्रमाणें (तें केस किंवा राख) उधळतात. आतां तुझा ज्वालासमूह पृथ्वीच्या उंचवट्यावर फिरत अत्यंत प्रकाशत आहे.

५. इंद्रानें फेकलेल्या वज्राप्रमाणें बलशाली अग्नीच्या ज्वाला सर्व बाजूंना पुनः पुनः आदळत असतात. शूराच्या पकडीप्रमाणें अग्नीची ज्वाला कठीण असते. दुर्वार व भयंकर असणारा अग्नि अरण्यें फस्त करतो.

६. हे अग्निदेवा, तूं सर्व प्रेरकांतल्या प्रेरक अशा कांतीनें पृथ्वीवरील सर्व योग्य स्थानें व्यापून टाकतोस. तूं भीति नाहींशी कर आणि आपल्या तेजांनीं स्पर्धा करणारांचा पराभव करून शत्रूंना ठार कर.

७. हे आश्चर्यकारक सामर्थ्य असलेल्या आल्हादक अग्ने, आल्हादक, स्तोत्रें म्हणणाऱ्या आम्हा स्तोत्यांना आल्हादक अत्यंत चमत्कृतिजनक, अन्नद व अनेक मुलाबाळांनीं संपन्न असें विपुल धन तूं द्यावेंस.

सूक्त सातवें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—वैश्वानर अग्नि; छंदः—१–५ त्रिष्टुभ्, ६–७ जगती.

१. द्युलोकांतील मुख्य, पृथ्वीवर संचार करणारा, सर्व लोकांत असणारा, यज्ञाकरतां उत्पन्न झालेला, दिव्यदृष्टि, लोकांचें हवि वाहून नेणारा, मुखभूत आणि संरक्षक अग्निदेवाला देवांनीं उत्पन्न केलें.

२. यज्ञाचा आधार, संपत्तीचें माहेर घर आणि मोठ्यांचें एक स्थान अशा अग्नीची स्तोते स्तुति करीत असतात. लोकाधार, यज्ञ पार पाडणारा, यज्ञाची पताका अशा अग्नीला देवांनीं उत्पन्न केलें.

३. हे अग्ने, तुझ्यामुळेंच भक्त समृद्ध होतात. लोक तुझ्यामुळेंच शत्रूंचा पराभव करतात. म्हणून हे तेजस्वी वैश्वानर अग्ने, तूं अत्यंत स्पृहणीय असणारी संपत्ति दे.

४. हे अमर अग्ने, सर्व देव तूं उत्पन्न झाल्याबरोबर लहान मुलाप्रमाणें तुझें कोडकौतुक करतात. हे वैश्वानर अग्ने, तूं जेव्हां द्यावापृथ्वींत प्रदीप्त होतोस तेव्हां तुझ्या कृत्यांनीं देव अमरपणा प्राप्त करतात.

५. हे वैश्वानर अग्ने, तूं द्यावापृथ्वींमध्यें मार्गावर उत्पन्न झालास आणि दिवसाचा ध्वज जो सूर्य तो प्राप्त केलास. तुझीं तीं मोठालीं कृत्यें कोण नष्ट करणार आहे ?

६. उदकाचा ध्वज असणाऱ्या वैश्वानर अग्नीच्या तेजानें स्वर्गाचीं शिखरें प्रकाशित केलीं. त्याच वैश्वानर अग्नीच्या वरच्या भागांत सर्व जग राहतें. आणि फांद्याप्रमाणें सात नद्या त्यापासून उत्पन्न होतात.

७. ज्या वैश्वानर अग्नीनें सर्व सृष्टि निर्माण केली ज्या दिव्यदृष्टि अग्नीनें द्युलोकांतील सर्व तेजस्वी वस्तु निर्माण केल्या, ज्यांनीं सर्व प्राणिमात्र निर्माण केलें, तो अहिंस्य अग्नि सर्वांचा रक्षणकर्ता आणि उदकांचा संरक्षणकर्ता आहे.

सूक्त आठवें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–वैश्वानर अग्नि; छंदः—१–६ जगती, ७ त्रिष्टुभ

१. सर्वव्यापक, बलिष्ठ, तेजस्वी आणि सर्वज्ञ अग्नीचें सामर्थ्य आम्ही यज्ञांत वर्णितों. सोमरसाप्रमाणें वैश्वानर अग्नीकरतां माझें केलेलें हें सुंदर व शुद्ध नवें स्तोत्र बाहेर पडत आहे.

२. तो नियमांचें पालन करणारा अग्नि भव्य आकाशांत (सूर्य रूपानें) उदय पावल्याबरोबर नियमांचें संरक्षण करतो आणि त्रैलोक्य निर्माण करतो आणि कर्तृत्ववान् असणारा वैश्वानर अग्नि आपल्या महिम्यानें स्वर्गापर्यंत प्रसिद्ध होतो.

३. सर्वांचा मित्र आणि आश्चर्यकारक असणाऱ्या वैश्वानर अग्नीनें द्यावापृथ्वींना स्थिर केलें; आणि आपल्या

तेजानें अंधार नष्ट केला. दोन कातड्याप्रमाणें द्यावापृथ्वी त्यानें विस्तारली, फार काय सांगावें वैश्वानर अग्नीच सर्व सामर्थ्य धारण करतो.

४. वैश्वानर अग्नीला थोर लोकांनीं अन्तरिक्षांत जाणलें. लोक राजाची स्तुति करतात त्याप्रमाणें ह्या वैश्वानर अग्नीची स्तोते स्तुति करतात. दूर सूर्यापासून वैश्वानर अग्नीला वायुदूतानें द्युलोकीं आणलें.

५. हे अग्ने, तूं नेहमीं यज्ञार्ह अशा तुझीं नवींनवीं स्तोत्रें म्हणणाऱ्या आम्हांला धन आणि पुत्र द्यावास. हे तरुण अग्निदेवा, वीज वृक्षावर पडावी त्याप्रमाणें दुर्भाषण करणाऱ्या नीचाला तूं आपल्या तेजानें पालथें घाल.

६. हे अग्ने, आम्हां भाग्यवंतांना कधींहि न नमणारें, क्षीण न होणारें आणि उत्कृष्ट सामर्थ्य असलेलें बल दे. हे अग्निदेवा, आम्ही तुझ्या साहाय्यानें शंभर हजारांनीं धन जिंकूं.

७. हे यजनार्ह त्रैलोक्यनिवासी अग्ने, तुझ्या अजिंक्य साहाय्यानें आम्हा स्तोत्यांचें तूं संरक्षण कर. हे वैश्वानर अग्ने, हवि देणाऱ्या आम्हां लोकाचें सामर्थ्य टिकीव. आणि प्रशंसनीय असणारा तूं आमचा उत्कर्ष कर.

सूक्त नववें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—वैश्वानर अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. काळीकभिन्न रात्र आणि पांढरा स्वच्छ दिवस आपल्या पद्धतीप्रमाणें द्यावापृथ्वीभर संचार करीत आहे. वैश्वानर अग्नि उदयाला येणाऱ्या राजाप्रमाणें आपल्या तेजानें अंधार नष्ट करतो.

२. (यज्ञदुर्ज्ञानत्व) यज्ञांत मोठ्या प्रयत्नानें ज्याला विणतात त्यांतील उभा दोरा मी जाणीत नाहीं आणि आडवा दोराहि मी जाणत नाहीं. पर लोकांतील श्रेष्ठ पित्याच्या (वैश्वानर अग्नीच्या) साहाय्यानें या लोकांत अवश्य सांगण्यासारखें असणारें कोण मनुष्य आम्हांस सांगेल? (सृष्टिदुर्ज्ञानत्व) जगांत व्यवहार करणारे लोक जी सृष्टि निर्माण करतात त्यांतील सूक्ष्म आणि स्थूल पंचमहाभूतविभाग समजत नाहीं. हा सांगण्यासारखा विभाग श्रेष्ठ पित्याच्या साहाय्यानें कोण पुत्र सांगूं शकतो?

३. जो उदकाचें संरक्षण करणारा पृथ्वीवर संचार करीत असतो आणि दुसऱ्या (सूर्य) रूपानें स्वर्गावरून सर्वत्र दृष्टि टाकीत ही सर्व सृष्टि जाणत असतो. तोच उभे धागे जाणतो आणि आडवे धागे जाणतो. तोच वेळोवेळीं जें उपदेष्टव्य आहे तें सांगत असतो.

४. हा वैश्वानर अग्नि आद्य होता आहे. हे लोकांनो, ह्याच्याकडे लक्ष द्या. लोकांत हे अबाधित तेज आहे. तो हा वैश्वानर अग्नि अढळ, सर्वव्यापी, अबाधित आणि शरीरानें सारखा वाढणारा असा उत्पन्न झाला आहे.

५. सर्व प्राण्यांत व्यापून असणारें, मनापेक्षांहि वेगशाली, आणि निश्चल असणारें तेज सर्व लोकांना दिसण्याकरतां स्थापन केलें आहे. सर्व देव एक विचारानें आणि एक मनानें त्या श्रेष्ठ कर्तृत्ववन्ताची चांगल्या प्रकारें सेवा करतात.

६. माझे कान तिकडे लागले आहेत. माझी दृष्टि तिकडेच वेधली आहे. जें हें तेज आहे तेंहि मी हृदयांत ठेविलें आहे. माझें मन अनेक प्रकारें दूरवर संचार करीत आहे. मग मी आतां बोलूं काय आणि विचार तरी कसला करूं?

७. हे वैश्वानर अग्ने, अंधारांत असल्यामुळें भयभीत झालेले सर्व देव स्थापन केलेल्या तुझीच प्रशंसा करतात. तो अमर वैश्वानर अग्नि आमचें संरक्षण करो. तोच आमचें संरक्षण करणारा आहे.

सूक्त दहावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—अग्नि; छंदः—१–६ त्रिष्टुभ, बाकी विराज.

१. हे यज्ञ करणारांनो, यज्ञयाग सुरू झाल्यावर सुखदायक दिव्य आणि प्रशंसनीय अग्नीची पुढें स्थापना करा. स्तोत्रें म्हणून त्याची पुढें स्थापना करा. कारण, तो सर्वज्ञ अग्नि आपल्या तेजानें यज्ञ यथासांग पार पाडतो.

२. हे दीप्तिमन्ता, दिव्य आणि देवांना बोलावणाऱ्या अग्ने, ज्या सुखदायक तुपाप्रमाणें चांगलें स्तोत्र

---

२ टीपः—वैश्वानरस्य पुत्रौऽसौ परस्ताद्दिवि यः स्थितः।
छंदांस्यध्वरवस्त्रस्य स्तुतशस्त्राणि तंतवः ॥
यजूंषि चेष्टाश्चातुः स्याद्वस्त्रं वातव्यमध्वरः ।
परः परः स्थितः सूर्यः पिताग्निः पार्थिवो मतः ॥
सांप्रदायवेत्त्याच्या अर्थाची ही स्थिति आहे.

ममतेप्रमाणें लोक म्हणत असतात, तें स्तोत्र स्तोत्याच्या इतर अग्नीसह प्रज्वलित झालेला तूं ऐकावेंस.

३. जो तुला स्तोत्रें गाऊन आहुति देतो त्या मनुष्याच्या घरीं धनधान्य समृद्धि होते. आश्चर्यकारक प्रकाश असणारा तूं त्याला आश्चर्यकारक साहाय्य करून गाईबैलांनीं भरलेले गोळवाडे देतोस.

४. कृष्णवर्त्मा अग्नि उत्पन्न झाल्याबरोबर आपल्या दूरवर पसरणाऱ्या कांतीनें द्यावापृथ्वी भरून टाकतो. तेव्हां रात्रीचा कितीतरी अंधार आपल्या तेजानें अग्नि नाहींसा करीत असतांना दिसतो.

५. हे अग्निदेवा, भाग्यवान अशा आम्हांला साहाय्य करून विपुल अन्नासह संपत्ति दे. धनधान्य आणि संततीनें सर्वांपेक्षा श्रेष्ठ असतील तसे आम्हांस कर.

६. हे अग्निदेवा, हवि घेऊन समृद्ध भक्त तुला आहुति देत आहेत. त्या ह्या यज्ञाचा आणि हवींचा भक्तीला भुकेलल्या त्वां स्वीकार करावा. आम्हां भरद्वाजांत चांगली प्रवृत्ति ठेव. आणि आवश्यक समृद्धि मिळवतांना त्यांचें संरक्षण कर.

७. हे अग्ने, शत्रूंना नष्ट कर. अन्नाची समृद्धि कर. आणि उत्कृष्ट वीरपुरुषांसह आम्हांला शंभर वर्षें आनंदांत ठेव.

सूक्त अकरावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–अग्नि; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे देवांना बोलावणाऱ्या अग्ने,यज्ञार्ह असणारा तूं आमच्या इच्छेप्रमाणें देवांकडे हवि पोंचीव. आणि मरुतांप्रमाणें तूं शत्रूंचा फडशा पाड. तसेंच मित्रावरुण, अश्विनी आणि द्यावापृथ्वी यांना तूं आमच्या यज्ञाकडे आण.

२. हे अग्ने, सर्वव्यापक, स्तुत्य आणि मित्रभूत असणारा तूं आमच्या यज्ञांत देवांना बोलवावेंस. हे अग्निदेवा, देवांचें मुख असणाऱ्या तुझ्या ज्वालानें हवि वाहून नेणारा तूं आपल्या शरीराचें पोषण कर.

३. जेव्हां अंगिरसांपैकीं अत्यंत प्रमुख स्तुति करणारा भरद्वाज यज्ञांत मधुर स्तोत्र गात असतो तेव्हां देवांचें यजन करण्याकरतां त्याच्या जन्माचें स्तवन करणाऱ्या भक्ताकरतां धनेच्छेनें केलेली स्तुति तुझी इच्छा करीत असते.

४. हा अग्नि अत्यंत प्रज्वलित होऊन प्रकाशत आहे. हे अग्निदेवा, तूं विस्तृत द्यावापृथ्वीचें पूजन कर. कारण, उत्कृष्ट हवि देणारे सर्व जातीचे लोक अतिथीप्रमाणें सत्कारपूर्वक अन्नभक्षण करणाऱ्या अग्नीला तृप्त करीत असतात.

५. जेव्हां मंत्र म्हणून दर्भ तोडून आणले जातात आणि चांगली तुपांनीं भरलेली पळी अग्नींत ओतली जाते, तेव्हां सर्व लोक पृथ्वीवरील यज्ञगृहांत जातात आणि डोळे सूर्याचा करतात त्याप्रमाणें यज्ञाचा आश्रय करतात.

६. हे प्रज्वलित आणि देवांना बोलावणाऱ्या अग्ने, तूं इतर अग्नीसह प्रज्वलित होऊन आम्हांला धन दे. हे बलपुत्र अग्ने, तुझ्या कृपेनें समृद्ध असणारे आम्ही शत्रूप्रमाणें पापांतूनहि पार पडूं.

सूक्त बारावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. द्यावापृथ्वीचें यजन करण्याकरतां भक्ताच्या घरीं यज्ञराजा अग्नि बसलेला असतो. तो हा बलपुत्र व सत्यनिष्ठ अग्नि लांबूनहि सूर्याप्रमाणें आपल्या तेजानें प्रकाशत असतो.

२. हे प्रकाशणाऱ्या यज्ञार्ह अग्ने, स्तोता यज्ञांत ज्या शुद्ध अशा तुझे ठिकाणीं हवि देतो तो तीन कुंडांत असणारा तूं सूर्याप्रमाणें मनुष्यांनीं दिलेलीं उत्कृष्ट हविर्द्रव्यें देवांना देण्याकरतां वेगशाली हो.

३. ज्या अग्नीची प्रसरणशील अत्यंत तेजस्वी ज्वाला अरण्यांतल्या वणव्याप्रमाणें शोभत असते, तोच वाढूं लागला म्हणजे अन्तरिक्षांतील सूर्याप्रमाणें प्रकाशूं लागतो. सर्वांवर सारखें प्रेम करणाऱ्या वायूप्रमाणें अमर अग्नि अनिवारपणें ओषधीवर संचार करीत आपणहून सर्व जगाला प्रकाशत असतो.

४. तो सर्वज्ञ अग्नि भिकाऱ्याच्या गाण्याप्रमाणें अत्यंत सुखकर असणाऱ्या आमच्या गाण्यांनीं आमच्या घरांत स्तविला जातो आहे. लांकडे खाणारा आपलें काम करीत एखाद्या तरुण बैलाप्रमाणें धांवत जातांना यज्ञ करणाऱ्याकडून स्तविला जातोस.

५. जेव्हां सहजरीत्या पृथ्वी जाळून हलकी करीत अग्नि जात असतो तेव्हां ह्या अग्नीच्या ज्वालांची स्तोते स्तुति करीत असतात. जो अग्नि गाडींत बसून पळणाऱ्या अप्रतिबंध चोराप्रमाणें धांवत असतो तेव्हां आकाशांत अग्नि अत्यंत शोभत असतो.

६. हे धांवणाऱ्या अग्ने, सर्व अग्नीसह प्रज्वलित झालेला तूं निंदक लोकांपासून आमचें संरक्षण कर. आम्हांला संपत्ति दे व दुःखदायक शत्रुसेनांना हाकून दे. आम्ही चांगल्या मुलाबाळांनीं युक्त असून शंभर वर्षें जगावें.

सूक्त तेरावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे भाग्यवन्ता अग्ने, सर्व संपत्ति झाडापासून फांद्या निर्माण व्हाव्यात त्याप्रमाणें तुझ्यापासून निर्माण होते. सर्व पशु तुझ्यापासून निर्माण होतात. लढाईत सामर्थ्य तुझ्यापासूनच प्राप्त होतें. आकाशांतून पाऊस तुझ्या कृपेनेंच पडतो. म्हणून तूं अत्यंत प्रशंसनीय आहेस आणि पाणी पुरवणारा आहेस.

२. हे अग्ने, भाग्यशाली असणारा तूं आम्हांला उत्कृष्ट धन दे. दर्शनीयप्रकाश अग्नि वायूप्रमाणें सर्वांवर सत्ता चालवितो. तूं मित्राप्रमाणें विपुल उदकाचा वर्षाव करणारा आहेस. तसेंच हे प्रकाशमान अग्ने, तूं उत्कृष्ट संपत्ति देणारा आहेस.

३. हे बुद्धिदात्या, यज्ञाकरतां निर्माण झालेल्या अग्ने, अपांनपातशीं (विद्युदग्नीशीं) एकमत करून तूं ज्याला संपत्ति मिळविण्याविषयीं उद्युक्त करतोस तो सज्जनसंरक्षक सामर्थ्यानें वृत्राला ठार करतो आणि तोच बुद्धिमान भक्त पणींची संपत्ति लुटून आणतो.

४. हे बलपुत्र अग्ने, जो भक्त तुझा कडकपणा यज्ञभूमीवर यज्ञ करून, स्तोत्रें म्हणून, गाणीं गाऊन प्राप्त करतो तो मनुष्य हे अग्ने, भरपूर धान्य प्राप्त करतो आणि संपत्तिमान होतो.

५. हे बलपुत्र अग्ने, सामर्थ्यसंपन्न असणारा तूं जें विपुल अन्न आणि पशु कंजूष आणि क्रूर शत्रूंच्या जवळ असेल तें मुलाबाळांनीं आणि धनधान्यानीं समृद्ध असणारें ऐश्वर्य त्यां लोकांपासून काढून समृद्ध करण्याकरतां मला द्यावेंस.

६. हे बलपुत्र अग्ने, थोर असा तूं मला हितोपदेश करावास. तसेंच समृद्ध पुत्रपौत्र आम्हांस द्यावेस मी तुझ्या अनेक स्तोत्रांचें गायन करून समृद्धीचा उपभोग घेईन.चांगल्या मुलाबाळांनीं युक्त होऊन आम्ही शंभर वर्षें आनंदांत राहूं.

सूक्त चवदावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–अग्नि; छन्दः—१–५ अनुष्टुभ, ६ शक्करी.

१. जो मनुष्य स्तुतिपूर्वक अग्नीचें सेवारूपी कर्म करतो तो मनुष्य प्रसिद्धीस येतो आणि आपल्याला आवश्यक असणारें अन्न प्राप्त करतो.

२. अग्नीच सर्वश्रेष्ठ ज्ञानी आहे. अग्नि अत्यंत कर्तृत्ववान ऋषि आहे. मानव भक्त यज्ञांत देवांना बोलावणाऱ्या अग्नीची स्तुति करतात.

३. शत्रूंची संपत्ति तुझ्या भक्तांच्या संरक्षणाविषयीं अनेक प्रकारें स्पर्धा करीत असते. दस्यूंचा पराभव करूं इच्छिणारे लोक तुझीं व्रतें पाळून नास्तिकांचा पराभव करतात.

४. ज्याचें सामर्थ्य दिसल्यावर शत्रु भीतीनें उद्विग्न होतात असा कर्तृत्ववान, शत्रूंचा पराभव करणारा आणि सज्जनांचें संरक्षण करणारा पुत्र अग्नि आम्हांला देवो.

५. ज्याची संपत्ति सुरक्षित असते आणि जो लढाईत झुंजार असतो तोच बलवान आणि त्याचेंच आपल्या चातुर्यानें अग्निदेव निंदकापासून संरक्षण करीत असतो.

६. हे सर्वानुकूल अग्निदेवा, द्यावापृथ्वींत सर्वत्र असणारा तूं आमची स्तुति देवांना कळव. आम्हा स्तावकांचें कल्याण कर. आम्ही तुमच्या कृपेनें शत्रूंच्या तड्याख्यांतून आणि पापांतून मुक्त होऊं. तुझ्या सहाय्यानें आम्ही सर्व संकटांतून तरून जाऊं.

सूक्त पंधरावें.

ऋषिः—वीतहव्य आंगिरस किंवा भरद्वाज; देवता–अग्नि; छन्दः—१–९ जगती, ३.१५ शक्करी, ६ अतिशक्करी, १७ अनुष्टुभ, १८ बृहती, १०. ते १४.१६.१९ त्रिष्टुभ.

१. हे ऋषे, अतिथीप्रमाणें पुज्य असलेला, प्रातःकालीं प्रज्वलीत केला जाणारा, सर्व लोकांचें संरक्षण करणारा, जन्मतःच पवित्र असणारा, असा हा अग्नि केव्हां तरी स्वर्गावरून खालीं येतो. त्या ह्या अग्नीचें तूं पूजन कर. द्यावापृथ्वींत अन्तर्भूत असणारा हा अग्नि नित्य दिला जाणारा हवि चिरकाल भक्षण करतो.

२. अरणींत चांगल्या प्रकारें स्थापन केलेल्या ज्या प्रशंसनीय अग्नीची भृगूंनीं मित्राप्रमाणें घरांत स्थापना केली तो तूं हे आश्चर्यकारक अग्ने, वीतहव्यावर प्रसन्न हो. कारण, दररोज तूं उत्कृष्ट स्तोत्रें म्हणून प्रसन्न केला जात आहेस.

३. हे अग्ने, प्रसिद्ध व संरक्षक असा तूं अनुष्ठानतत्पर माणसाचा उत्कर्ष करावास. आणि दूरच्या व जवळच्या शत्रूंपासून रक्षण करावेंस. हे बलपुत्र अग्ने, तूं जगांत वीतहव्याला विपुल संपत्ति आणि घर द्यावेस. तसेंच भरद्वाजालाहि द्यावेस.

४. हे वीतहव्या, तेजस्वी, आम्हांला अतिथीप्रमाणें पूज्य, स्वर्गनेता, मनूच्या यज्ञांत देवांना बोलावणारा, यज्ञाला चांगुलपणा आणणारा, विद्वानाप्रमाणें तेजस्वी भाषण करवणारा अशा सर्वश्रेष्ठ अग्नीला तूं सुशोभित कर.

५. उषा आपल्या कांतीनें प्रकाशत असते त्याप्रमाणें जो अग्नि शोधक आणि बुद्धिवर्धक कान्तीनें पृथ्वीवर प्रकाशत असतो, जो एतशाच्या (सूर्यासह चाललेल्या) लढाईंत संहार करीत चाललेल्या पुरुषाप्रमाणें ताबडतोब प्रकाशित होतो, जो वखवखलेला आणि तारुण्यपूर्ण असतो, त्या अग्नीला तूं सुशोभित कर.

६. हे स्तोत्यांनो, तुम्ही अतिथीप्रमाणें पूज्य, सर्वांना प्रिय आणि प्रशंसनीय अग्नीचीच समिधा देऊन सेवा करा. आणि अमर अग्नीला उद्देशून स्तोत्रें म्हणा. कारण देवापैकीं अग्निजवळच उत्कृष्ट संपत्ति आहे. आणि तोच आमच्या सेवेची कदर बाळगतो.

७. प्रज्वलीत झालेल्या अग्नीची मी उत्तेजक स्तोत्रें म्हणत आहे. स्वयंशुद्ध असून दुसऱ्याला शुद्ध करणाऱ्या नित्य अग्नीची मी यज्ञांत पुढें स्थापना करीत आहे. आम्ही सुखकारक स्तोत्रें म्हणून देवांना बोलावणाऱ्या, प्रसंसनीय, अद्वेष्ट्या, दिव्यदृष्टि व ज्ञानी अग्नीची प्रार्थना करीत आहोंत.

८. हे अग्ने, नेहेमीं हवि वाहून नेणाऱ्या, प्रशंसनीय, मरणरहित आणि संरक्षक अशा तुला देव आणि माणसांनीं दूत केले आहे. सदोदीत जागृत असणाऱ्या सर्वव्यापी लोकाधिपति अग्नीला नमस्कार करून भक्त सेवित असतो.

९. हे अग्ने, देव आणि मनुष्य यांना अलंकृत करीत तूं यज्ञादिकांत देवांचा दूत होऊन द्यावापृथ्वीभर संचार करीत असतोस. ज्याअर्थीं तुला उद्देशून आम्हीं धर्मकृत्यें आणि स्तुति करीत असतों त्याअर्थीं त्रैलोक्यांत असणारा तूं आम्हाला सुखकर हो.

१०. अल्पबुद्धि आम्ही अत्यंत ज्ञात्या, सुंदर आकृतीच्या आणि सुंदर दिसणाऱ्या त्या अग्नीची सेवा करीत आहोंत. तो अग्नि देवांना तृप्त करो. सर्व ज्ञेय वस्तूंचें ज्ञान असणारा अग्नि देवांना आमच्या हवीविषयीं सांगो.

११. हे अग्ने, जो मनुष्य दिव्यदृष्टि अशा तुझ्याकरतां धर्मकृत्य करतो त्याचें तूं संरक्षण करतोस, त्याची तूं भरभराट करतोस. जो यज्ञसंबंधीं कामें करतो किंवा यज्ञ करतो त्यालाच तूं सामर्थ्य देतोस आणि धन देतोस.

१२. हे अग्ने, तूं क्रूर शत्रूंपासून माझें संरक्षण कर. हे बलवन् अग्ने, तूंच आमचें दोषापासून संरक्षण कर. तुला आमचें शुद्ध अन्न पोंचो. आणि तुझ्याकडून स्पृहणीय असणारें धन हजारांनीं आम्हांस मिळो.

१३. देवांना बोलावणारा तो तेजस्वी अग्निराजा गृहपति आहे, तो सर्वज्ञ सर्व प्राणिमात्राला जाणतो. जो अग्नि देवांमध्यें आणि मनुष्यामध्यें अत्यंत यज्ञार्ह आहे तो सत्यधर्मा अग्नि देवांना संतुष्ट करो.

१४. हे यज्ञनिष्पादका, शुद्धप्रकाशा अग्ने, लोकांचें जें यज्ञरूपी कर्म चालू आहे त्याची तूं इच्छा कर. कारण तूं देवांना तृप्त करणारा आहेस, म्हणूनच यज्ञांत तुझ्यांत हवि देतात. तूं महिम्यानें सर्वव्यापक आहेस. हे अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, आम्ही तुला जे हवि आज अर्पण करीत आहोंत त्यांना तूं घेऊन जावेस.

१५. हे अग्ने, व्यवस्थित ठेवलेले जे हवि तूं पहात आहेस ते द्यावापृथ्वींतील सर्व देवांना देण्याकरतां तुला अर्पण केले जात आहेत. हे भाग्यवन्ता, आमचें युद्धांत तूं संरक्षण करावेस. आम्ही सर्व संकटांतून तुझ्या साहाय्यानें तरून जाऊं, तुझ्या साहाय्यानें आम्ही तरून जाऊं.

१६. हे सुप्रज्वलित अग्ने, सर्व देवांसह प्रमुख असणारा तूं घरट्यासारखे मऊमऊ असलेल्या, लोंकरीचें आसन घातलेल्या आणि तूप असलेल्या स्थानीं येऊन बसावेस. आणि हवि देणाऱ्या यजमानाचा यज्ञ तूं चांगल्या प्रकारें देवांकडे पोंचवावास.

१७. नागमोडी गतीनें धांवणाऱ्या ज्या चलाख अग्नीला रात्रीपासून आणले आहे त्या ह्या अग्नीला भक्त लोक अथर्वन ऋषीप्रमाणें घर्षण करून उत्पन्न करतात.

१८. हे अग्ने, तूं यज्ञामध्यें भक्ताचें कल्याण करण्याकरतां उत्पन्न हो. यज्ञानें वृद्धिंगत होणाऱ्या देवांना तूं घेऊन ये आणि आमचा यज्ञ देवांकडे पोंचीव.

१९. हे यज्ञसंरक्षक अग्ने, सर्व लोकांमध्यें आम्हींच तुला प्रज्वलित करून मोठें कृत्य केलें आहे. म्हणून आमचीं घरें सर्व संपत्तींनीं समृद्ध होवोत. आम्हांला अत्यंत तेजस्वी कर.

सूक्त सोळावें.

ऋषि:—भरद्वाज; देवता—अग्नि; छंद:—१-६ वर्धमाना गायत्री, १७.४७.४८ अनुष्टुभ, ४६ त्रिष्टुभ, अवशिष्ट गायत्री.

१. हे अग्ने, तूं सर्व यज्ञांमध्यें देवांना बोलावणारा आहेस कारण देवांनीं तुला मनुष्यामध्यें (याकरतांच) ठेवलें आहे.

२. हे अग्ने, प्रसिद्ध असणारा तूं तुझ्या प्रशंसनीय ज्वालांनीं देवांना तृप्त कर थोर देवांना वाहून आण आणि त्यांना हवि दे.

३. हे कर्तृत्ववान अग्निदेवा, तूं यज्ञविषयक लहान मोठे मार्ग अवश्य जाणत असतोस.

४. हे अग्ने, भरतानें सुख प्राप्त व्हावें म्हणून ऋत्विजांकडून तुझी स्तुति केली. आणि यज्ञांत यज्ञार्ह अशा तुझ्यांत हवन केलें.

५. हे अग्ने, तूं ही उत्कृष्ट असणारी संपत्ति सोमरस तयार करणाऱ्या दिवोदासाला ज्याप्रमाणें दिलीस त्याप्रमाणें हवि देणाऱ्या भरद्वाजाला द्यावीस.

६. बुद्धिमान भरद्वाजाची स्तुति ऐकून मरणरहित असणारा तूं दूत होऊन देवतांना यज्ञाकरतां घेऊन ये.

७. हे अग्ने, यज्ञामध्यें देवांना तृप्त करण्याकरतां लोक तुला मनःपूर्वक बोलावतात.

८. हे अग्ने, तुझ्या उत्कृष्ट तेजाची मी पूजा करतों. उदार असणाऱ्या तुझ्या कर्तृत्वाचा आम्ही सत्कार करतों. सर्वच इच्छा पूर्ण झालेले लोक तुझी सेवा करीत असतात.

९. हे अग्ने, मनूनें होता म्हणून तुझी स्थापना केली आहे. तूं तोंडानें हवि वाहून नेण्यांत अत्यंत कुशल आहेस. म्हणून स्वर्गीय देवांना तूं तृप्त कर.

१०. हे अग्ने, हविर्भक्षण करण्याकरतां तूं ये. देवांना हवि देण्याकरतां प्रशंसा केला जाणारा तूं पसरलेल्या दर्भांवर होता होऊन बैस.

११. हे अंगिरा अग्ने, प्रसिद्ध अशा तुला समिधांनीं आणि तुपानीं आम्ही प्रज्वलित करीत आहोंत. हे तरुण अग्ने, तूं अत्यंत प्रज्वलीत हो.

१२. हे अग्निदेवा, प्रसिद्ध असणारा तूं विपुल, प्रशंसनीय आणि सामर्थ्यपूर्ण अशी संपत्ति आम्हांला दे.

१३. हे अग्ने, अथर्वा तुला सर्व जगाला आधारभूत अशा पुष्करपर्णापासून उत्पन्न करतां झाला.

१४. हे अग्ने, वृत्रहन्त्या व शत्रूंचीं नगरें उध्वस्त करणाऱ्या त्या तुलाच अथर्वनपुत्र दध्यङ् ऋषीनें प्रज्वलित केलें.

१५. हे अग्ने, शत्रूंचा फडशा पाडणाऱ्या आणि प्रत्येक युद्धांत शत्रूला जिंकणाऱ्या प्रसिद्ध अशा तुलाच पाथ्य वृषानें प्रज्वलित केलें.

१६. हे अग्ने, ये. मी अशा प्रकारें तुझी स्तुति करीत आहें तसेंच असुरहि स्तुति करीत आहेत. त्या स्तोत्रांनीं आणि सोमांनीं तूं उल्हसित हो.

१७. हे अग्ने, तुझें मन ज्या कोठें बसतें तेथें तूं उत्कृष्ट प्रकारची संपत्ति देतोस. आणि तेथें ठिकाणहि करतोस.

१८. अग्ने, तुझें तेज क्षणिक असूं नये. थोडक्याच भक्तांच्या अंतःकरणांत राहणाऱ्या तूं आमची सेवा स्वीकारावीस.

१९. भारत, दिवोदासाचे शत्रु ठार करणारा, सर्वज्ञ आणि सज्जनांचें संरक्षण करणारा अग्नि आला आहे.

२०. आपल्या महत्त्वानें सर्व जिंकणारा, दुर्निवार आणि अजिंक्य असा तो अग्नि सर्व पार्थिव संपत्तीच्या पलीकडील संपत्ति आम्हांस देवो.

२१. हे अग्ने, प्रसिद्ध असा तूं पूर्वीप्रमाणें अत्यंत

---

१३. टीप:—जलप्रलयाच्या वेळीं पिंपळाच्या पानावर बाळस्वरूपांत भगवान रहातो असें वर्णन पौराणिक वाङ्मयांत आहे. त्याचें मूळ येथें सापडतें. तै. सं. व तै. ब्रा. हि पहावा. (तै. ब्रा. १.१.३.६ तै. सं. ५.१.४.४.)

अग्नीला अथर्वन असें नांव पडल्याचें मूळ येथें सापडतें. त्याचप्रमाणें अंगिरा वगैरे नांवें पडण्याचें कारणहि यावरून उमगतें.

नवीन कांतीनें आणि उज्वल प्रकाशानें विशाल अन्तरिक्ष व्यापून टाकलें आहेस.

२२. हे मित्रांनो, तुम्ही धैर्यशाली आणि कर्तृत्ववान अग्नीचीं स्तोत्रें गा. आणि हवि अर्पण करा.

२३. जो देवांना बोलावणारा, चलाख, इतका कालपर्यंत देवांचा हवि वाहून नेणारा दूत तोच अग्नि येथें बसला आहे.

२४. हे सर्वव्यापक अग्ने, ह्या यज्ञांत त्या शुद्धकर्म्या तेजस्वी मित्रावरुणांना, आदित्यांना, मारुतगणांना आणि द्यावापृथ्वींना तूं संतुष्ट कर.

२५. हे बलपुत्र अग्ने, अमर असणाऱ्या तुझा प्रकाश उत्कृष्ट आहे. तो तुझा प्रकाश मनुष्याला अन्न देतो.

२६. हे अग्ने, तुझी सेवा करून तुला हवि देणारा भक्त खरोखर श्रेष्ठ आहे. त्याला उत्कृष्ट संपत्ति प्राप्त व्हावी आणि त्या माणसाला चांगली स्तुति करावयास लावावें.

२७. हे अग्ने, ते तुझें साहाय्य असलेले भक्त चांगल्या भावना बाळगीत संपूर्ण आयुष्याचा उपभोग घेतात. तसेंच चालून येणाऱ्या शत्रूसेनांच्या तडाख्यांतून पार पडतात. तसेंच कांहीं चालून आलेल्या शत्रुसेनांचा फडशा पाडतात.

२८. अग्नि आपल्या तीक्ष्ण तेजानें सर्व खादाड शत्रूंना ठार करतो, असा अग्नि आम्हांला संपत्ति देवो.

२९. हे लोकद्रष्ट्या अग्ने, आम्हांला पराक्रमी मुलांनीं युक्त असणारें ऐश्वर्य दे. आणि हे कर्तृत्ववन्ता, तूं राक्षसांना ठार कर.

३०. हे जातवेद अग्ने, आमचें तूं पातकांतून संरक्षण कर. हे मंत्रप्रेरक अग्ने, दुष्टबुद्धीच्या शत्रूपासून तूं आमचें संरक्षण कर.

३१. हे अग्ने, जो दुर्बुद्धि मनुष्य आमच्यावर हत्यार चालवितो त्या दुष्ट कृत्यापासून तूं आमचें संरक्षण कर.

३२. हे अग्निदेवा, जो मनुष्य आमचा घात करूं इच्छितो त्या दुष्कृत्य करणाऱ्या माणसाला तूं आपल्या ज्वालेनें दडपून टाक.

३३. हे झुंजार अग्ने, मला भरद्वाजाला विस्तृत घर आणि उत्कृष्ट संपत्ति दे.

३४. आहुति देऊन प्रज्वलित केलेला निर्मळ अग्नि द्रव्य देण्याच्या इच्छेनें भक्ताचे शत्रु नष्ट करतो.

३५. मातृभूत, पृथ्वीवरील व्यवस्थित वेदीवर प्रज्वलित झालेला पितृभूत व द्युलोकाचें पालन करणारा अग्नि यज्ञामध्यें आपल्या स्थानीं बसलेला असतो.

३६. हे लोकद्रष्ट्या सर्वज्ञ अग्ने, स्वर्गावर जें अन्न उत्कृष्ट समजलें जातें तें अन्न तूं मुलांबाळांसहीत आम्हांस दे.

३७. हे बलपुत्र अग्ने, हविर्द्रव्य घेऊन आम्ही मनोहर दिसणाऱ्या तुझीं स्तोत्रें करीत आहोंत.

३८. हे अग्ने, ज्याप्रमाणें उन्हांतून चालत आलेल्यानें सावलीचा आश्रय करावा त्याप्रमाणें प्रज्वलित होऊन सुवर्णकांति धारण करणाऱ्या तुझा आम्ही आश्रय करीत आहोंत.

३९. हे अग्ने, जो धनुर्धाऱ्याप्रमाणें किंवा तिखट शिंगाच्या बैलाप्रमाणें उग्र आहे. त्या तूंच शत्रूंचीं नगरें फोडून टाकलींस.

४०. नुकत्याच झालेल्या लहान मुलाप्रमाणें किंवा हिंस्र प्राण्याप्रमाणें ज्याला (काळजीपूर्वक) हातांत धरतात त्या लोकांचे यज्ञ उत्कृष्ट प्रकारें पार पाडणाऱ्या अग्नीची तुम्ही सेवा करा.

४१. हे भक्तांनो, त्या अत्यंत धन देणाऱ्या अग्निदेवाची यज्ञाकरतां तुम्ही उपासना करा. तो आपल्या स्थानीं येऊन बसो.

४२. हे भक्तांनो, अतिथीप्रमाणें प्राप्त झालेल्या प्रिय आणि सुखकर अशा गृहपति अग्नीची स्थापना करा.

४३. हे अग्निदेवा, जे तुझे चांगले घोडे तुला योग्य ठिकाणीं वाहून नेतात त्या घोड्यांना यज्ञाला जाण्याकरतां तूं जोड.

४४. हे अग्ने, तूं आमच्याकडे ये. हविर्भक्षणाकरतां आणि सोम पिण्याकरतां सर्व देवांना आमच्याकडे घेऊन ये.

४५. हे भारत अग्ने, तूं प्रकाशित हो. हे जराराहित अग्ने, प्रज्वलित झालेला तूं अखंड तेजानें अधिक प्रज्वलित हो.

४६. जो मनुष्य उत्कृष्ट यज्ञांत अग्निदेवाची उपासना करीत अग्नीची स्तुति करतो. तो हात जोडून द्यावापृथ्वींतील देवांना बोलावणाऱ्या चांगल्या हविर्द्रव्यांनीं यज्ञ केल्या जाणाऱ्या अग्नीला नम्रभावानें सेवीत असतो.

४७. हे अग्ने, तुला अंतःकरणपूर्वक ऋग्रूप हवि आम्हीं अर्पण करीत आहोंत. हे हवि तुला बलिष्ठ गाईबैलाप्रमाणें प्रिय होवोत.

४८. ज्यानें संपत्ति हरण केली आणि ज्या बलवन्तानें राक्षसांचा धुव्वा उडविला त्या सर्वश्रेष्ठ वृत्रहन्त्या अग्नीला लोक प्रज्वलित करतात.

---

४७. टीपः—यांत अध्ययनाची स्तुति आहे असें आश्वलायन म्हणतो.

सूक्त सत्रावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–इंद्र; छंदः–-त्रिष्टुभ.

१. हे उग्र इंद्रा, ज्या सोमाकरतां तूं मोठा गोसंघ प्रकट केलास. तो सोम स्तुति चालूं असतां तूं पी. हे धैर्यशाली वज्रधरा इंद्रा, जो तूं सामर्थ्यानें सर्वांवर आवरण घालणाऱ्या शत्रूला ठार करतोस तो तूं सोम पी.

२. हे इंद्रा, तूं उत्तम शिरस्त्राण धारण करतोस, तूं स्तोत्यांची कामना पूर्ण करणारा आहेस. असा तूं येथें ये. आणि सोम पी. जो इंद्र वज्र धारण करणारा असून पर्वतांचा भेद करीत आहे आणि घोड्यावर बसणारा आहे तो इंद्र आम्हांला आश्चर्यकारक अन्न देवो.

३. हे इंद्रा, पूर्वीप्रमाणें तूं आतां सोम पी. आणि आनंदित हो. स्तोत्र ऐक आणि स्तोत्रांनीं उत्साहित हो. सूर्याला प्रकट कर. अन्नाची भरभराट कर. शत्रूंना ठार कर आणि हे इंद्रा, गाईंना प्रकट कर.

४. हें अन्नसमृद्ध इंद्रा, तूं प्राशन केलेला मदकर सोम तेजस्वी अशा तुला उल्हासित करो.

५. हे इंद्रा, सोम पिऊन आनंदित झालेला तूं गाढ अंधार नाहींसा करून उषा आणि सूर्य यांना ज्यामुळें प्रगट करतोस त्यामुळेंच हे इंद्रा, तूं गाईंच्या भोंवती असलेल्या भरभक्कम पर्वताला फोडून टाक.

६. हे इंद्रा, तूं आपल्या कर्तृत्वानें, बुद्धिमत्तेनें आणि सामर्थ्यानें गाईंच्या शरीरांत परिणत स्वरूपाला गेलेलें दूध उत्पन्न केलेंस. तूं गाईंना मोकळें करण्याकरतां बळकट असणारीं द्वारें मोकळीं केलींस. आणि अंगिरांच्या साहाय्यानें गाईंना गोठ्यांतून मोकळे केलेंस.

७. हे इंद्रा, तूं मोठा पराक्रम करून पृथ्वीला परिपूर्णता आणली आहेस. तसेंच हें इंद्रा, महान असणाऱ्या तूंच द्युलोकाला स्थिर केलेंस. तात्पर्य देवांना उत्पन्न करणाऱ्या, प्राचीन यज्ञाच्या थोर माता ज्या द्यावापृथ्वी त्यांना इंद्रानेंच स्थिर केलें.

८. राक्षसांनीं देवांच्या वर जेव्हां हल्ला चढविला तेव्हां रणांगणांत मरुतांनीं इंद्राला साहाय्य केलें. नंतर हे इंद्रा, बलशाली असणाऱ्या तुला सर्व देवांनीं युद्धाचा पुढारी केलें.

९. समृद्ध इंद्रानें चालून येणाऱ्या अहीला जेव्हां युद्धांत ठार केलें तेव्हां द्युलोकहि त्याच्या वज्रामुळें आणि स्वतःच्या क्रोधामुळें खालीं आला.

१०. हे सोमप्रिय इंद्रा, तूं ज्या वज्रानें निश्चयी शत्रूंवर तुटून पडत असतां गर्जना करणाऱ्या अहीला धुळीला मिळविलें तें हजार धारांचें आणि शंभर टोकें असलेलें तुझें वज्र त्वष्ट्यानें तयार केलें.

११. एक विचाराचे सर्व मरुत् ज्या तुला स्तोत्रें म्हणून उल्हासित करतात हे इंद्रा, त्या तुझ्याकरतां पूषन आणि विष्णु शंभर रेडे शिजवितात आणि मदकर व शत्रूहनन करावयास उत्तेजन देणारा सोम तीन सरोवरें (भांडीं) देतात.

१२. हे इंद्रा, तूं नदीमध्यें विपुल असणारें उदक झांकून होतें तेथून बाहेर काढलेस. पाण्याच्या लाटा उत्पन्न केल्यास. त्या नद्यांचे मार्ग अनुकूल केलेस. आणि वेगानें वाहणारें पाणी समुद्राकडे वहातें केलेस.

१३. हे इंद्रा, तीं प्रसिद्ध कृत्यें करणाऱ्या, महान सामर्थ्यवान्, जरारहित, बलदात्या आणि उत्कृष्ट योद्धे भोंवतीं असलेल्या तुला उद्देशून साहाय्य मिळावें म्हणून नवीन स्तोत्र केलें जात आहे.

१४. हे इंद्रा, तूं बुद्धिमान् आणि तेजस्वी असणाऱ्या आम्हांला अन्न, कीर्ति, धन आणि बल दे. आम्हां भारद्वाजांत मुलाबाळांसहित भक्त लोक निर्माण होऊं दें. आणि हे इंद्रा, पुढील काळांत तूं आमचा उत्कर्ष करणारा हो.

१५. ह्या स्तुतीमुळें आम्हांला देवाकडून अन्नसमृद्धि प्राप्त होईल. आम्ही मुलाबाळांसहित शंभर वर्षें आनंदानें राहूं.

सूक्त आठरावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. जो शत्रूंचा धुव्वा उडवणारा, अजिंक्य, दुर्निवार आणि बहुस्तुत इंद्र आहे त्याचीच तूं स्तुति कर.

अजिंक्य, ओजस्वी, पराभव करणारा आणि जगामध्यें बलवान अशा इंद्राची हे स्तोत्या, तूं स्तुति कर.

२. युद्धांतील प्रमुख योद्धा, बलवान, मनूच्या वंशजांत असणारा, युद्ध करणारा, भक्तांसह आनंदांत असणारा, प्रेमळ, सोमप्रिय आणि गर्जना करणारा असा हा इंद्र आहे.

३. हे इंद्रा, तूं दस्यूंचें ताबडतोब दमन करतोस. सर्वश्रेष्ठ असणारा तूं भक्तजनांना मुलेंबाळें देतोस. हे इंद्रा, मी वर्णन करीत असलेले सामर्थ्य तुझ्यांत आहे कीं नाहीं, तें नेहमीं तूं आम्हांस सांगावेस.

४. हे बलवत्तम इंद्रा, अनेक ठिकाणीं प्रकट होणाऱ्या, अजिंक्य आणि जेत्या अशा तुझ्यापाशीं मी वर्णन करीत असलेलें सामर्थ्य आहेच असें मी मानतों. ओजस्वी, उत्कर्षशाली, अजिंक्य आणि शत्रूंचा धुव्वा उडवण्याचें उत्कृष्ट सामर्थ्य तुझेजवळ आहेच.

५. तुझ्याशीं आमचें पुरातन कालापासूनचें सख्य कायम टिको. हे अजिंक्यांना जिंकणाऱ्या दर्शनीय इंद्रा, तूं चालून येणाऱ्या बलाला ठार केलेस. त्याचीं नगरें ताब्यांत घेतलींस आणि नगरांचीं सर्व द्वारें मोकळीं केलीस.

६. तेजस्वी आणि सामर्थ्यप्रद इंद्राला महायुद्धांत भक्त स्तुति करून बोलावीत असतात. त्यालाच चांगलीं मुलेंबाळें व्हावीत म्हणून लोक स्तवीत असतात. आणि तोच वज्रधारी युद्धांत शत्रूंचा संहार करणारा असतो.

७. तो इंद्र अढळ आणि शत्रूंना नमावयास लावणाऱ्या सामर्थ्यानें मनुष्यांच्या संघांत प्राप्त होतो. तो वीरश्रेष्ठ कीर्ति, बल, पराक्रम आणि संपत्ति जेथें असेल तेथें असतो.

८. जो युद्धांत कधीं चुकत नाहीं किंवा दगा देत नाहीं. तो विख्यातनामा इंद्र शत्रूंचीं नगरें उध्वस्त करण्याकरतां आणि शत्रूंना ठार करण्याकरतां जोरानें प्रयत्न करीत असतो. त्यानेंच चुमुरि, धुनि, पिप्रु, शंबर आणि शुष्ण यांना ठार केलें.

९. हे इंद्रा, उसळणाऱ्या शत्रुविनाशक सामर्थ्यानें तूं वृत्राला ठार करण्याकरतां सज्ज हो. उजव्या हातांत तूं आपलें वज्र घे. हे बहुधन इंद्रा, तूं शत्रूंच्या कारस्थानांचा नाश कर.

१०. हे इंद्रा, अग्नि शुष्क अरण्य जाळतो तसें अशनिप्रमाणें भयंकर असणारे तुझें हत्यार राक्षसांना जाळून टाको. कारण, तूं भयंकर हत्यारानें शत्रूंना ठार करतोस. भयंकर गर्जना करतोस आणि दुष्टांचा फडशा उडवतोस.

११. हे बलपुत्र धनवान इंद्रा, तूं अनेक बलशाली घोड्यावर संपत्ति घेऊन आमच्याकडे ये. हे बहुस्तुत इंद्रा, तुला बलहीन करण्याला कोणीहि नास्तिक समर्थ होत नाहीं.

१२. अत्यंत संपत्तिमान आणि तेजस्वी पुराणपुरुष इंद्राचा महिमा स्वर्ग आणि पृथ्वीच्या पलीकडे गेला आहे. महापराक्रमी इंद्राला कोणी शत्रु नाहीं, याच्या बरोबरीचा कोणी नाही किंवा ह्याच्या जागीं बसणाराहि कोणी नाहीं.

१३. हे इंद्रा, जें तूं कुत्स, आयु आणि अतिथिग्वाचें रक्षण केलेंस तें तुमचें कृत्य आजहि सर्वत्र विख्यात आहे. तूं अतिथिग्वाला विपुल संपत्ति दिलीस. तसेंच तूं वज्रानें पृथ्वीवरील पराक्रमी दिवोदासाला संकटांतून पार पाडलेस.

१४. हे इंद्रा, कवींमधलाहि श्रेष्ठ कवि अशा तुझी अहीचा वध करण्याकरतां सर्व देव स्तुति करतात, तेव्हां स्तुति केल्यानंतर दुःखीकष्टी अशा स्तुति करणाऱ्या लोकांना तूं संपत्तिमान करतोस.

१५. हे कर्तृत्ववन्ता इंद्रा, तूं जीं कृत्यें अद्यापि केलीं नसशील तीं तूं कर आणि यज्ञांत अत्यंत नवीन स्तोत्रें करावयास लाव. तें तुझें सामर्थ्य अमर देव द्यावापृथ्वीभर गाववितील.

सूक्त एकोणिसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. एकाद्या थोर राजाप्रमाणें लोकांच्या इच्छा पूर्ण करणारा, दोनहि लोकांत उत्कर्ष पावलेला, केवढ्याहि सामर्थ्यानें अजिंक्य इंद्र आमच्या समोर पराक्रम करण्यास उत्सुक आहे. त्याची धिप्पाड, प्रसिद्ध आणि भक्तांकडून चांगली सेवा झाली आहे.

२. जो जन्मल्याबरोबर अत्यंत मोठा होतो त्या इंद्राचीच स्तुति धन मिळण्याकरतां चालू आहे. तो इंद्र थोर, अद्भुत, जरारहित, तरुण व अजिंक्य सामर्थ्यानें उत्कर्ष पावणारा आहे.

३. हे इंद्रा, अन्न देण्याकरतां तुझे लांबलचक कर्तृत्ववान व विपुल संपत्ति देणारे दोन हात आम्हांकडे

वळीव. गुराखी गुरांचे कळप वळवितो त्याप्रमाणें उदार मनानें संग्रामांत आमच्याकडे वळव.

४. आमच्या यज्ञांत अन्नेच्छु स्तोते बालिष्ठ आणि तुझे मदतनीस असणाऱ्या मरुतांसह शत्रूंचा पराभव करणाऱ्या त्या इंद्राची स्तुति करीत आहेत. जसे पूर्वींचें स्तोते अनिंद्य, निष्पाप आणि सुखरूप होते तसे आम्ही हे इंद्रा, तुझ्या कृपेनें असावें.

५. तो नियमानें वागणारा, संपत्ति देणारा आणि सोमानें उत्साहित होणारा आहे. तोच कमनीय संपत्तीचा धनी असून त्याचें जवळच विपुल अन्न आहे. समुद्राला नद्या जाऊन मिळतात त्याप्रमाणें ह्या इंद्रापाशीं हितकारक सर्व संपत्ति एकवटल्या आहेत.

६. हे शूरा, बलांतलें उत्कृष्ट बल तूं आम्हांस दे. हे शत्रूंचा पराभव करणाऱ्या इंद्रा, तूं अत्यंत श्रेष्ठ तेज आम्हांस दे. जी सर्व उत्कृष्ट संपत्ति मनुष्याकरतां निर्माण केली आहेस. ती संपत्ति हे अश्ववन्ता आम्हांला सुखी करण्याकरतां तूं आम्हांस दे.

७. जो तुझा शत्रुसैन्याचा पराभव करणारा अजिंक्य आनंद आहे तो सदोदित वाढणारा आनंद तूं आम्हांस दे. ज्यामुळें तुझ्या साहाय्यानें विजय मिळविणारे आम्ही पुत्रालाभामुळें तुझी स्तुति करूं तो आनंद तूं आम्हांस दे.

८. हे इंद्रा, संपत्तीचें संरक्षण करणारें तुझें वाढतें उत्कृष्ट बल तूं आम्हांस दे. ज्या तुझ्या साहाय्यानें, युद्धांत शत्रूंना आम्ही ठार करतों, बांधवभूत शत्रूंना आम्ही ठार करतों तें सामर्थ्य तूं आम्हांस दे.

९. हे इंद्रा, रसरसणारें तुझें सामर्थ्य सर्व दिशेनें आम्हांकडे येवो. सर्व बाजूंनीं आमच्याकडे येवो. हे इंद्रा, सुखकारक धन तूं आम्हांला दे.

१०. नोकर, चाकर आणि कीर्ति यांसहित उत्कृष्ट संपत्ति तुझ्या मार्गदर्शक मदतीसह आम्हांला प्राप्त होवो. कारण, तूं स्वर्गीय आणि पार्थिव संपत्तीचा ईश्वर आहेस. म्हणून खूप अथांग संपत्ति आम्हांस दे.

११. ह्या यज्ञांत त्या बालिष्ठ इंद्राला नवीन मदतीकरतां आम्ही बोलावीत आहों. मरुतांसह, बलिष्ठ, उत्कर्षशील, दिव्य, हुकमत चालवणारा, सर्व लोकांचा पराभव करणारा, ओजस्वी आणि मोठ्याशीं शत्रुत्व करणारा तो इंद्र आहे.

१२. हे वज्रधरा, मी ज्या लोकांपैकीं आहे त्या ह्या लोकांपैकीं आपल्याला मोठे समजणाऱ्या लोकांना तूं आमच्या स्वाधीन असूं दे. हे इंद्रा, जगामध्यें रणांगणावर मुलाबाळांकरतां, पशूंकरतां आणि जल मिळावें म्हणून आम्ही तुला बोलावीत आहोंत.

१३. हे बहुस्तुत इंद्रा, तुझ्या मित्रत्वानें स्वकीय किंवा परकीय शत्रूंचा घात करणारे आम्ही सर्व शत्रूपेक्षां अधिक आहोंत. हे पराक्रमी इंद्रा, तुझ्या मदतीमुळें आम्ही विपुल संपत्तिमान होऊन आनंदांत राहूं.

सूक्त विसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–इंद्र; छंदः–त्रिष्टुभ.

१. सूर्य सृष्टीचें आक्रमण करतो त्याप्रमाणें जो आपल्या सामर्थ्यानें ऐश्वर्याचें आणि शत्रूचें आक्रमण करतो, तसा हजारानें संपत्ति मिळवणारा, सुपीक जमीनींचा उपभोग घेणारा, आणि शत्रुहन्ता पुत्र हे बलपुत्र इंद्रा, तूं आम्हांस दे.

२. सूर्याप्रमाणें असणाऱ्या तुझ्याकरतांच हे इंद्रा, सर्व जग आणि सामर्थ्य देवांनीं निर्माण केलें असावें. कारण, हे सोमप्रिया, विष्णूसह असणाऱ्या तूंच उदकानें वेष्टिलेल्या दुष्ट वृत्राला ठार केलेंस.

३. उग्र, ओजस्वी, अत्यंत बलशाली स्तुति केलेल्या आणि प्रतापशाली इंद्राला सर्व शत्रूंच्या नगरींचा भेद करणारें वज्र प्राप्त झालें तेव्हां तूं मधुर सोमरसाचा राजा झालास.

४. हे इंद्रा, कवि दशोणीकरतां जेव्हां तूं युद्धांत आलास तेव्हां शेकडो कवडीचुंबक पणी पळाले. बलशाली शुष्णाचीं कारस्थानें तूं आयुधानें नष्ट केलीस. अन्नाचा लेशहि त्याचें जवळ राहिला नाहीं.

५. जेव्हां शुष्ण वज्राच्या तडाख्यांत आला तेव्हां त्या महाद्रोही शुष्णाच्या सर्व सैन्याचा धुव्वा उडाला. तेव्हां इंद्रानें सारथि झालेल्या कुत्साचे सूर्यप्राप्तीच्या झटापटींत (पुनः) आपल्या रथांत घेऊन अत्यंत रक्षण केलें.

६. श्येनानें मदकर सोम ह्या इंद्राकरतां आणला. तसेंच इंद्रानेंहि दास नमुचीचें डोकें उडवलें आणि झोंपाळू साप्य नमीचें संरक्षण केलें. त्याचें कल्याण करून त्याला अन्न व धन यांनीं युक्त केलें.

७. हे वज्रधरा,. सर्पाप्रमाणें कपटी असलेल्या पिप्रूचे बळकट किल्ले आपल्या सामर्थ्यानें तूं फोडून टाकलेस. हे दात्या इंद्रा, तूं हवि देणाऱ्या ऋजिश्वाला अजिंक्य संपत्ति दिलीस.

८. सुख देणाऱ्या इंद्रानें लबाड वेतसु, दशोणि तूतुजि, तुग्र, यांना आईला मुलगा वश करतो त्याप्रमाणें द्योतमानाकरतां वश केलें.

९. हातामध्यें शत्रुहन्त्या वज्राला घेऊन तो इंद्र, अप्रतिहपणें शत्रूंना ठार करीत असतो. तो दोन घोड्यांवर बसतो. योद्धा रथांत बसतो त्याप्रमाणें केवळ इशाऱ्यानें जोडलें जाणारे दोन घोडे देखण्या इंद्राला वाहून नेतात.

१०. हे इंद्रा, तुझ्या साहाय्यानें आम्ही अत्यंत नवीन संपत्ति मिळवूं. भक्त लोक हीं स्तोत्रें म्हणून तुझी स्तुति करतात. कारण, दासांना ठार करून पुरुकुत्साला संपत्ति देण्याकरतां शरत्कालांतील सात (आश्रयस्थानें) नगरें तीक्ष्ण वज्रानें तूं फोडलींस.

११. हे इंद्रा, तूं पुरातन आहेस. काव्य उशनसला धन देऊन त्याचा तूं उत्कर्ष केलास. नववास्त्वाला ठार करून थोर पित्याला (उशनसला) स्वतः मुलगा परत दिलास.

१२. हे इंद्रा, तूं शत्रूंचा थरकाप करणारा आहेस. धुनि नांवाचा असुर लपून बसलेलें पाणी तूं नद्याप्रमाणें वहातें केलेस. हे शूर इंद्रा, जेव्हां तूं समुद्र तरून जाशील तेव्हां तूं तुर्वश आणि यदु यांना सुखानें पार पाड.

१३. हे इंद्रा, तूं युद्धांत धुनि व चुमुरि यांना ठार केलेस आणि कायमची झोंप दिलीस. हें महत्कृत्य तुझच आहे. हे इंद्रा, तुझ्याकरतां सोमरस तयार करणारा, हवि शिजवणारा, इंधनें आणणारा दभीति सोम, अन्न व स्तोत्रें यांनीं समर्थ आहे.

सूक्त एकविसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—९-१० विश्वेदेव, अवशिष्ट इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे शूर इंद्रा, अनेक इच्छा बाळगणाऱ्या स्तोत्या भरद्वाजांचीं तुझा धांवा करणारीं हीं स्तोत्रें रथांत बसलेल्या, जरारहित व अत्यंत तरुण अशा तुला बोलावीत आहेत. कारण, प्रशंसनीय असें उत्कृष्ट धन तुझ्यापाशीं आहे.

२. जो इंद्र सर्वप्रसिद्ध आहे.त्याच यज्ञानें वृद्धिंगत होणाऱ्या प्रशंसनीय इंद्राची मी स्तुति करीत आहें. कारण, त्याचें माहात्म्य द्युलोक किंवा पृथ्वी यापेक्षांहि मोठें आहे.

३. त्या इंद्रानेंच अज्ञानमय पसरलेला अंधार सूर्यामुळें ज्ञानमय केला. हे बलवान् इंद्रा, तुझ्या लोकीं असणाऱ्या लोकाकरतां यज्ञ करूं इच्छिणारा भक्त तुझ्या स्थानाचा कधींहि नाश होऊं देत नाहीं.

४. ज्या इंद्रानें तीं कृत्यें केलीं तो आज कोठें बरें असेल ? कोणत्या देशांत आहे ? कोणत्या लोकांत रहातो? हे इंद्रा, कसा यज्ञ केला असतां तुझ्या मनाला बरें वाटतें ? तुला प्रसन्न करण्यास कोणता स्तोता आणि कोणता मंत्र समर्थ होतो ?

५. हे कर्मकर्त्या इंद्रा, पुरातन कालचे कर्मेच्छु भक्त आतांच्याप्रमाणें तुझे सखे होते. मध्यकालांत होते. आणि अलीकडेहि झाले आहेत. हे बहुस्तुत इंद्रा, अगदीं अलीकडीक अशा माझीं स्तोत्रें तूं ऐक.

६. हे शूर मंत्रवाह्य इंद्रा, अलीकडील लोक तुझी पूजा करतात आणि तुझें प्रसिद्ध प्राचीन पराक्रम स्तोत्रामध्यें ग्रथित करतात. तसें आम्हीहि तुझी पूजा करतों आणि पराक्रम जाणीत आहोंत त्यांमुळें तुझें वर्णन करतों.

७. हे इंद्रा, राक्षसांचें सैन्य तुझ्यावर चालून येत आहे. तूंहि त्या येणाऱ्या अफाट सैन्याच्यापुढें हो. आणि हे धैर्यधरा, पुरातन कालापासून तुझा सखा असलेल्या वज्रानें तूं त्या सैन्याच्या चिंधड्या उडीव.

८. हे भक्ताधार, शूर इंद्रा, स्तोत्र करूं इच्छिणाऱ्या अर्वाचीन कालांतील माझें स्तोत्र तूं ऐक. कारण, हे इंद्रा, तुझी इच्छा केली असतां सहज येणारा तूं पूर्वकालीं अंगिरसांचा बांधव होतास.

९. हे भरद्वाज, आज आम्हाला साहाय्य करण्याकरतां वरुण, मित्र, इंद्र आणि मरुत् यांना तूं आमच्याकडे वळीव. पूषन्, विष्णु, कर्तृत्ववान् अग्नि,सविता, ओषधी आणि पर्वत यांना तूं आमचेकडे वळीव.

१०. हे अत्यंत शक्तिमान् पूज्य इंद्रा, तुला हे स्तोते स्तोत्रें म्हणून स्तवीत आहेत. हे अमरा इंद्रा, प्रशंसनीय असा तूं स्तुति करणाऱ्या माझें स्तोत्र ऐक. कारण, तुझ्यासारखा दुसरा कोणी नाहीं.

११. हे बलपुत्रा, ज्ञाता असा तूं सर्व यज्ञार्ह देवांसह माझें स्तोत्र ऐकण्याकरतां ये. जे यज्ञानें उत्कर्ष पावणारे अग्निजिह्व देव आहेत आणि ज्यांनीं शत्रूंचा नाश करण्याकरतां मनूला श्रेष्ठ केलें त्यासह तुम्ही या.

---

५. टीपः—तीन कालांचा उल्लेख महत्त्वाचा आहे. ३.३२.१३ पहा.

१२. हे इंद्रा, मार्गदर्शक आणि ज्ञाता असा तूं सुख देणाऱ्या आणि दुःख देणाऱ्या मार्गावर आमचा वाटाड्या हो. जे तुझे न दमणारे आणि समर्थ असे मोठाले घोडे आहेत त्या घोड्यांनीं तूं आमच्याकडे अन्न वाहून आण.

सूक्त बाविसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. जो कामपूरक, बलवान, अविसंवादी, शत्रूंचा पराभव करणारा, कल्पक आणि अजिंक्य असा समर्थ आहे, लोकांच्याकरतां ह्या स्तोत्रांनीं जो एकटाच बोलावण्यासारखा आहे, त्या इंद्राची मी स्तुति करीत आहें.

२. जे आमचे प्राचीन, समृद्धीची इच्छा करणारे, बुद्धिमान, सात नवग्र पितर आहेत, त्यांनीं चालून यणाऱ्या शत्रूंचा नाश करणारा, तल्लख, पर्वतावर असणाऱ्या, अप्रतिहतशासन आणि बलिष्ठ अशा इंद्राची स्तोत्रें म्हणून स्तुति केली.

३. अविच्छिन्न, क्षीण न होणारें आणि सुखप्रद असें जें धन आहे तें धन हे अश्वयुक्त इंद्रा, सुखी करण्याकरतां आम्हांस दे. अनेक मुलेंबाळें असलेले, नोकरचार असलेलें असें कीर्तिप्रद धन त्या इंद्रापाशीं आम्ही मागतों.

४. हे इंद्रा, जें स्तोत्यांनीं पूर्वकालीं तुझें सुख अनुभवलें असेल तें सुख तूं आम्हांस दे. हे शत्रूंना खेद उत्पन्न करणाऱ्या, दुर्धर, अनेकांनीं स्तविलेल्या धनवन्ता इंद्रा, असुरहन्त्या तुझा यज्ञांत भाग कोणता ? आणि अन्न काय ?

५. (वरील प्रार्थनेनंतर इंद्र येऊन त्यानें ऋषींच्या इच्छा पूर्ण केल्या.) ज्या यजमानाची स्तुति रथारूढ वज्रपाणि इंद्राची पृच्छा करीत, कर्में करीत आणि गुण गात असते त्या अनेकांना ताब्यांत ठेवणाऱ्या कर्तृत्ववान आणि बलद इंद्राला गाऊन यजमान सुखी होतो आणि वरचढ शत्रूवर चालून जातो.

६. हे बलवन्ता इंद्रा, तूं आपल्या मनोजव वज्रानें कुशलतेनें उत्कर्षशील अशा वृत्राला ठार केलेस. हे अत्यंत ओजस्वी आणि महान इंद्रा, तूं अभंग आणि बळकट असें किल्ले आपल्या वज्रानें फोडून टाकतोस.

७. ह इंद्रा, अत्यंत नवीन स्तोत्रें म्हणून प्राचीन लोकाप्रमाणें त्या तुझी उपासना प्रसृत करण्याचा मी प्रयत्न करीत आहें. अनुपम आणि चांगलें वाहन असलेला इंद्र आम्हांला सर्व संकटांतून पार पाडो.

८. हे इंद्रा, तूं दुष्ट लोकांचीं पृथ्वीवरील, अन्तरिक्षांतील आणि स्वर्गांतील स्थानें संतप्त करतोस. हे बलिष्ठ इंद्रा, तूं आपल्या तेजानें त्या दुष्टांना जाळून टाक, ब्रह्मद्वेष्ट्यांना जाळून टाकण्याकरतां पृथ्वी आणि अन्तरिक्षाला पेटवून दे.

९. हे कान्तीनें प्रकाशणाऱ्या इंद्रा, तूं स्वर्गांतील आणि पृथ्वीवरील लोकांचा राजा आहेस. हे अजिंक्य इंद्रा, तूं उजव्या हातांत वज्र घे. आणि त्यानें दुष्टांचीं सर्व कारस्थानें हाणून पाड.

१०. हे इंद्रा, शत्रूंच्यापासून संरक्षण व्हावें म्हणून कल्याणप्रद एकत्र झालेली सुरक्षित विपुल संपत्ति तूं आम्हांस द्यावीस. कारण तंमुळें तूं दासांना आर्य बनवलेस आणि मानव शत्रूंना सहज उडवलेस.

११. ह बहुस्तुत विधात्या व यज्ञार्ह इंद्रा, प्रसिद्ध असा तूं सर्वश्रेष्ठ नियुत नांवाच्या घोड्यांनीं आमच्याकडे ये. राक्षस ज्यांचें निवारण करूं शकत नाहींत किंवा देव ज्यांचें निवारण करूं शकत नाहींत त्या घोड्यांनीं तूं आमच्याकडे लवकर ये.

सूक्त तेविसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. सोम पिळल्याबरोबर स्तोत्रें म्हटलीं जात असतां आणि गाणें चालूं असतां हे भगवान इंद्रा, दोनहि हातांत वज्र घेऊन दोन घोडे जोडून तूं प्रेमानें लवकर आमच्याकडे येतोस.

२. हे इंद्रा, द्युलोकांत, शूरांनीं गजबजलेल्या युद्धांत किंवा संपत्ति मिळवीत असतां जे तूं भक्तांचें रक्षण करतोस, समर्थाचें, भ्यालेल्याचें किंवा उत्साहशील दस्यूचें तूं निर्भयपणें संरक्षण करतोस तें सर्व सोम पिळून तयार केल्यावरच होय.

३. स्तोत्याला योग्य मार्गानें नेणाऱ्या, उग्र इंद्रानें सोम पिळून यज्ञ करणाऱ्या भक्ताला स्थान आणि स्तुति

---

२. टीपः—यद्वाह्वोर्धारयन्वज्रं हरिभ्यां यासि वृत्रहन् ।

यच्च रक्षसि संग्रामे नॄन् सोममभिषुण्वतः ॥
यच्च कर्म सुदक्षस्य यजमानस्याप्यपारयः ।
वशीकरोषि तांस्तस्मै बिभ्यते भीतिवर्जितः ॥
तत्सोमेऽभिषुते स्तोत्रशस्त्रयोश्च प्रवृत्तयोः ॥

करणाऱ्या स्तोत्याला धन द्यावें आणि पिळलेला सोम प्यावा.

४. वज्र धारण करणारा, सोम पिणारा, गाई देणारा, सर्वश्रेष्ठ, लोकाग्रणी पुत्र देणारा, स्तोत्याचें स्तोत्र ऐकणारा आणि स्तोत्रें म्हणून बोलावला जाणारा इंद्र चालूं असलेल्या तीनहि सवनांत घोड्यांनीं येवो.

५. ज्या पुराणपुरुष इंद्रानें आम्हांला हितप्रद कृत्यें केलीं त्या इंद्राकरतां तो जें इच्छील तें आम्हीं केलें. सोम पिळल्यावर आम्ही स्तोत्रें म्हणतों आणि सामगायन करीत जसा इंद्राचा उत्कर्ष होईल तसा हवि देत असतों.

६. हे इंद्रा, ज्याअर्थीं आमचीं स्तोत्रें उत्कर्षप्रद अशीं तूं केलीं आहेस त्याअर्थीं तुला तशीं स्तोत्रें बुद्धिपूर्वक आम्ही अर्पण करीत आहोंत. हे पिळलेल्या सोम पिणाऱ्या इंद्रा, सोम पिळून झाल्यावर सुखकारक, रमणीय आणि हविर्वाहक अशीं स्तोत्रें यज्ञासह आम्ही करावींत.

७. हे इंद्रा, प्रसिद्ध असा तूं प्रसन्न अंतःकरणानें आमचा हवि स्वीकार. आणि गाईचें दूधदहि मिसळलेला सोमरस पी. यजमानानें हें दुर्भासन दिलें आहे त्यावर बैस. आणि तुझ्या दासाची भरभराट कर.

८. हे उग्र इंद्रा, तूं मनाप्रमाणें आनंदांत ऐस. हे यज्ञ तुला पोहोंचोत. ह्या बहुस्तुत इंद्राला आमचीं हीं स्तोत्रें प्राप्त होवोत. ही स्तुति तुला आमच्या संरक्षणाकरतां आणो.

९. हे सख्यांनो, तुम्ही सोम पिळल्यावर त्या उदार इंद्राला यथेच्छ तृप्त करा. आमच्या पोषणाची त्याला काळजी नसेल कां ? सोम पिळणाऱ्या यजमानाचें संरक्षण करण्यांत इंद्र मागें घेत नाहीं.

१०. भाग्यवन्ताचा ईश्वर असणारा इंद्र सोम पिळल्यावर आम्हा भरद्वाजांच्या येथेंच स्तविला गेला. कारण, श्रेष्ठ इंद्र स्तोत्यांना सन्मार्गाला लावतो आणि सर्वश्रेष्ठ संपत्ति देतो.

सूक्त चोविसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. सोमयागांत इंद्राला उत्पन्न होणारा मद कामपूरक असतो. सामगायनासह चाललेलें स्तोत्र कामनापूर्ति करणारें होतें. सोमरस पिणारा आणि चोथाहि न टाकणारा भाग्यवान इंद्र लोकांना स्तोत्रांनीं प्रशंसनीय आहे आणि द्युलोकनिवासी स्तुतिपरमेश्वर इंद्र अक्षय्य संरक्षण करणारा आहे.

२. समृद्ध, शत्रुहिंसक, पराक्रमी, लोकहितकारक, ज्ञानी, स्तोत्र ऐकणारा, स्तोत्यांचें अत्यंत संरक्षण करणारा, सर्वव्यापक, लोकांना प्रशंसनीय आणि स्तोत्यांचा आधार असा इंद्र यज्ञांत स्तुति केली असतां आम्हाला धन देतो.

३. हे शूर इंद्रा, तुझा थोर महिमा चाकाच्या आखाप्रमाणें द्यावापृथ्वीच्या बाहेर पडला आहे. हे बहुस्तुत इंद्रा, झाडांच्या फांद्याप्रमाणें तुझें साहाय्य सर्व बाजूनीं अनेक प्रकारें अंकुरित होत आहे.

४. हे कर्तृत्ववान इंद्रा, गाईच्या मार्गाप्रमाणें सामर्थ्यवान अशा तुझीं अद्भूत कृत्यें सर्वत्र पसरलेलीं आहेत. वासरांच्या दावणीप्रमाणें हे दात्या इंद्रा, दुसऱ्यांना बंधक पण स्वतः स्वतंत्र अशीं तुझीं कृत्यें आहेत.

५. त्याचें आज एक कृत्य चालूं आहे तर उद्यां दुसरेंच. याप्रमाणें इंद्र सत आणि असत कर्मे सारखीं करीत असतो. मित्र, वरुण, पूषन, सूर्य आणि इंद्र आमची इच्छा पूर्ण करोत.

६. पर्वताच्या पृष्ठभागापासून जल प्राप्त करावें त्याप्रमाणें हे इंद्रा, स्तोत्रें गाऊन आणि यज्ञ करून आम्ही तुझ्यापासून इच्छा पूर्ण करूं. घोडे युद्धांत जातात त्याप्रमाणें हे स्तुत्य इंद्रा, ऐश्वर्येच्छू भरद्वाज त्या तुझ्याकडे हीं उत्कृष्ट स्तोत्रें म्हणत येत आहेत.

७. ज्या इंद्राला वर्षें नाहींत, महिने नाहींत व दिवस क्षीण करीत नाहींत आणि लहान करीत नाहींत त्या वृद्ध असलेल्याहि इंद्राचें शरीर स्तोत्रांनीं आणि गाण्यांनीं प्रशंसा केलें असतां फुरफुरो.

८. प्रशंसनीय इंद्र रानगठ्ठ्याला नाहीं, अढळाला नाहीं, फुगीराला नाहीं आणि धर्मभ्रष्टालाहि नमत नाहीं. मोठाले पर्वतहि इंद्राला सुगम वाटतात आणि गंभीर स्थलहि त्याला उथळ वाटतें.

९. हे बलवन्ता, सोम पिणाऱ्या इंद्रा, गंभीर आणि थोर अन्तःकरणानें तूं आम्हांस अन्न व सामर्थ्य दे. रात्रीं व दिवसा हे इंद्रा, प्रेमळ असा तूं आमच्या रक्षणाविषयीं उद्युक्तच आस.

१०. हे इंद्रा, तूं युद्धांत भक्ताचे दूरच्या किंवा जवळच्या शत्रूपासून संरक्षण करण्यास तयार ऐस. व त्याचें रक्षण कर. घरांत आणि अरण्यांत रक्षण कर. आम्ही शंभर वर्षेपर्यंत चांगल्या मुलाबाळांसह आनंदांत रहावें.

सूक्त पंचविसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे बलवान इंद्रा, जें तुझें उत्तम, मध्यम आणि आणि कनिष्ठ प्रकारचें साहाय्य आहे, त्यांनीं युद्धांत तूं माझें संरक्षण कर. हे उग्र इंद्रा, आम्हाला तूं एश्वर्यांनीं आणि बलांनीं युक्त कर.

२. हे इंद्रा, आमच्या ह्या स्तोत्रांनीं आमच्या विजयी आणि स्पृहणीय सैन्याचें संरक्षण करीत शत्रूंचा क्रोध नष्ट कर तसेंच आर्यांकरतां सर्व चालून येणाऱ्या दास लोकांना तूं ठार कर.

३. हे इंद्रा, हिंसकवृत्तीचे जे जवळचे किंवा दूरचे शत्रू आम्हाकडे येण्यास उद्युक्त झाले असतील त्या सर्व शत्रूंना तूं हीन कर. त्यांचें सामर्थ्य नष्ट कर आणि त्यांना पराङ्मुख कर.

४. जेव्हां मुलाबाळांकरतां, गाईबैलांकरतां, पाण्याकरतां किंवा सुपीक जमिनीकरतां आक्रोश करीत भांडूं लागतात आणि जेव्हां झकझकीत कवच घालून युद्ध करूं लागतात तेव्हां केवळ शरीरसामर्थ्यानें शूर तर शूराला जिंकतातच (पण तुझ्या कृपेनें शूर नसणाराहि शूराला जिंकतो.)

५. हे इंद्रा, तुझ्याशीं पराक्रमी, क्रूर, धारिष्टवान आणि गर्विष्ठ हे युद्ध करीत नाहींत. यांपैकीं कोणी तरी तुझ्या तोडीचा आहे काय ? तूं त्या सर्व लोकांचा पराभव करतोस.

६. जे मनुष्यांनीं गजबजलेल्या घरांत किंवा युद्धांत एकत्र राहून भांडत असतात त्यापेक्षां ज्याच्या यज्ञांत स्तोते इंद्राचा धांवा करतात तो मागील दोघांच्याहि संपत्तीचा मालक होतो.

७. हे इंद्रा, जेव्हां तुझे भक्त भीतीनें कापूं लागतात तेव्हां तूं त्यांचा आश्रयदाता आणि संरक्षण करणारा हो. तसेंच हे इंद्रा, जे आमचे लोक तुझ्याकडे येतात आणि ज्या स्तोत्यांनीं तुला आपला पुढारी मानलें आहे त्यांचें तूं संरक्षण कर.

८. हे इंद्रा, महान अशा तुला तूं पराक्रम करावास म्हणून जें सर्व सामर्थ्य आहे तें सर्व तुला अर्पण करतात. पराभव करण्याचें सामर्थ्य देतात. तसेंच हे यज्ञार्ह इंद्रा, तुला युद्धांत देवांकडून हें सर्व दिलें जातें.

९. हे इंद्रा, अशा प्रकारें स्तुति केलेला तूं आमच्या शत्रूंच्या सैन्याला युद्धाला प्रवृत्त कर. क्रूर राक्षसांच्या सैन्यांना ताब्यांत घे. इंद्रा, तुझी स्तुति करणाऱ्या आम्ही भरद्वाजांनीं अन्नसमृद्ध घर मिळवावें.

सूक्त सव्विसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, सोमरस समर्पण करणारे आम्ही ऐश्वर्य मिळावें म्हणून तुला बोलावीत आहोंत. तें बोलावणें–धांवा–तूं ऐकावास. जेव्हां लोक युद्धांत एकत्र होतात तेव्हां तूं शेवटल्या दिवशीं आम्हांस उत्कृष्ट प्रकारचें साहाय्य द्यावेंस.

२. हवि देणारा वाजिनेय भरद्वाज मोठी समृद्धि प्राप्त व्हावी म्हणून तुझा धांवा करीत आहे. सज्जनांचा प्रतिपाल करणारा आणि दुष्टांनाहि तारणारा अशा तुझा भरद्वाज संकटकालीं धांवा करीत आहेत. गाईकरतां युद्ध करणारा मुष्टियोद्धा भरद्वाज तुझी वाट पहातो.

३. हे इंद्रा, तूं कवीला स्तोत्रें करण्याची स्फूर्ति दिलीस. तूं दात्या कुत्साकरतां शुष्णाला ठार केलेंस. तूं आतिथिग्वाला सुखी करण्याकरतां मर्महीन शंबराचें डोकें उडवलेस.

४. हे इंद्रा, तूं दहा दिवस युद्ध करणाऱ्या दशद्यूचें संरक्षण केलेंस आणि तूं त्याला युद्धोपयोगी मोठा रथ दिलास. तूं वेतसूला ठार करून तुग्राला ठार केलेंस, तसेंच स्तुति करणाऱ्या तुजीचा तूं उत्कर्ष केलास.

५. हे शूर इंद्रा, शत्रुहिंसक अशा तूं शंबराचे शेंकडों हजारो योद्धे मारले हें फार प्रशंसनीय कृत्य केलेंस. तसेंच तूं पर्वतांतून निघालेल्या शंबर दासाला ठार केलेस आणि आश्चर्यकारक साहाय्य करून तूं दिवोदासाचें संरक्षण केलेस.

६. हे इंद्रा, श्रद्धायुक्त कर्मानें आनंद पाऊन आणि सोम पिऊन दभीतिकरतां चुमुरीला तूं ठार केलेंस. तसेंच पिठीनसाला ‘ रजि ’ नांवाची कन्या देऊं इच्छिणाऱ्या त्वा कल्पकतेनें साठ हजार शत्रूंना एकदम ठार केलेस.

७. हे वीरांच्या घोळक्यांत असणाऱ्या बलवान इंद्रा, त्रैलोक्यव्यापी आणि शत्रुनाशक अशा तुझ्याकडून मिळालेल्या ज्या सुखाची स्तोते स्तुति करतात तें तूं दिलेलें अत्यंत उत्कृष्ट सुख आम्ही स्तोत्यांसह अनुभवूं.

८. हे पूजनीय इंद्रा, तुझे स्तोते आम्ही द्रव्याकरतां चाललेल्या ह्या स्तुतींत अत्यंत प्रसन्न आहोंत. वृत्रांचा नाश करण्यांत आणि संपत्ति मिळविण्यांत प्रातर्दनि क्षत्रश्री सर्वश्रेष्ठ असो.

---

४. टीप--वेतसू १०. ४९ ४. पहा.

सूक्त सत्ताविसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—इंद्र, ८ चायमान अभ्यावार्तिनदानस्तुति; छंदः—त्रिष्टुभ.

१. (फल मिळण्यास उशीर झाला म्हणून भरद्वाज इंद्रावर आक्षेप घेतो आहे) ह्या सोमाच्या मदांत इंद्रानें काय केलें ! सोम पिऊन इंद्रानें काय केलें ? ह्या सोमाच्या सख्यामुळें तरी इंद्रानें काय केलें ? ह्या सोमाच्या घरांत जे स्तोते रमून गेले होते त्यांनीं पूर्वी काय मिळविले आणि नवीन स्तोत्यांनीं तरी काय मिळविलें ? (कांहीं नाहीं)

२. (अशी निंदा केल्यावर ऋषीनें त्याला इच्छित धन दिलें) तेव्हां त्यांनीं पूर्वींची निंदा खोडून काढली. ह्या इंद्रानें सोमाच्या मदांत चांगलें कृत्य केलें. हा सोम प्याल्यावर त्यांनीं पराक्रम गाजवले. ह्या सोमाच्या सख्यामुळें इंद्रानें चांगलीं कामें केलीं. जे स्तोते यज्ञगृहांत रममाण झाले होते. त्यांनीं तुझ्यापासून चांगला लाभ मिळविला. आणि नव्या स्तोत्यांनींहि मिळवला.

३. हे भगवन इंद्रा, तुझा सर्व महिमा आम्ही जाणत नाहीं. तुझी संपत्तिमत्ताहि जाणत नाहीं. स्तुत्य अशा तुझी संपत्ति जाणत नाहीं. हे इंद्रा, तुझें ऐश्वर्य कोणीहि पाहिलेलें नाहीं.

४. हे इंद्रा, ज्या सामर्थ्यानें वराशिखाच्या मुलांना तूं ठार केलेस तें तुझें सामर्थ्य मी जाणलें आहे. कारण, जोरानें फेकलेल्या वज्राच्या शब्दानेंच वराशिखाचा ज्येष्ठ मुलगा मेला.

५. इंद्रानें अभ्यावार्तिन चायमानाला संपत्ति देत वराशिखाचीं मुलें ठार केलीं. जेव्हां हरियूपीया नगराच्या पूर्वभागांत वृचीवानाला तूं ठार केलेस तेव्हां दुसऱ्या भागांत असणारा वराशिखाचा थोरला मुलगा भीतीनें ठार झाला.

६. हे बहुस्तुत इंद्रा, कीर्तीच्या इच्छेनें तुला ठार करण्याकरतां तुझ्यावर चालून येणारे, कवचधारी तीन हजार वृचीवत्च्या कुलांत उत्पन्न झालेले सैनिक फुटक्या भांड्याप्रमाणें निरुपयोगी झाले.

७. तेजस्वी, चांगल्या गवताची इच्छा करणारे, रवंथ करणारे, असे ज्याचे दोन बैल द्यावापृथ्वींत संचार करीत असतात त्या इंद्रानें वृचीवतांना (वरशिखाला) वश करीत दैववाताकरतां सृंजयाला तुर्वश दिला.

८. (आतां भरद्वाज आपल्याला अभ्यावर्तिन चायमानानें दिलेलें धन अग्नीला सांगतो) हे अग्ने, धनवान व सम्राट् अभ्यावर्तिन चायमानानें मला रथ व स्त्रिया यांसहित वीस गाईंच्या जोड्या दिल्या. ही पार्थवांची दक्षणा अविनाशी होय.

सूक्त अठ्ठाविसावें.*

ऋषिः—भरद्वाज; देवता—२.८ चा शेवटला चरण इंद्र, अवशिष्ट गो; छंदः-२.३.४ जगती, ८ अनुष्टुभ, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. गाई आमच्या घरीं येवोत. आमचें कल्याण करोत. गाई आमच्या गोठ्यांत असोत. आणि आमचें घरीं रमून जावोत. आमच्या गोठ्यांत अनेक स्वरूपाच्या वासरें असलेल्या अनेक गाई उषःकालीं इंद्राकरतां दूध देत असोत.

२. इंद्र यज्ञ करणाऱ्याला आणि स्तुति करून प्रसन्न करणाऱ्याला धन देतो, नेंहेमींच देतो. केव्हांहि त्यांचें धन परत घेत नाहीं. ह्या पुरुषाची संपत्ति पुनः पुनः सारखी वाढवीतच असतो आणि त्या भक्ताला सुरक्षित स्थलीं ठेवतो.

३. त्या गाई आम्हांपासून नष्ट न होवोत. चोर त्यांना न चोरो. शत्रूंचें हत्यार ह्या गाईंच्यावर न पडो. गोपति ज्या गाईंनीं देवांना उद्देशून यज्ञ करते आणि ज्यांचें दान करतो त्या गाईंसह तो चिरकाल टिको.

४. टापांनीं धूळ उडविणारा खंदा घोडा त्या गाई मिळवीत नाहीं. तसेंच बलिदानाचे संस्कारहि त्यांच्यावर केले जात नाहींत. यज्ञ करणाऱ्या लोकांच्या त्या गाई निर्भय गायरानांत संचार करोत.

५. गाईच मला धन देवो. इंद्र मला गाई देवो. उत्कृष्ट सोमाचा गाईच आधार आहेत. हे लोकांनो, ह्या ज्या गाई आहेत तोच इंद्र होय. (त्यांच्या दुधातुपांनीं इंद्राचा उत्कर्ष होतो.) श्रद्धापूर्वक अंतःकरणानें मी इंद्राचीच इच्छा करतों.

६. हे गाईंनो, तुम्ही रोड माणसालाहि पुष्ट करता आणि कान्तिरहित माणसालाहि मोठा कान्तिमान करता. तुमचा आवाज मंगलकारक आहे. तुम्ही आमचें घर कल्याणप्रद करा. ह्या तुमच्या गुणाची वाखाणणी लोकांच्या सभांतून चालूं असते.

---

*टीप—हें सूक्त गाईच्या प्रशंसेकरतां म्हणावें असें आश्वलायनगृह्यसूत्रांत (१०.७) सांगितलें आहे.

७. हे गाईनो, तुम्ही वासरांनीं युक्त असा. चांगलें गवत खा. चांगल्या पाणोथ्यावर शुद्ध पाणी प्या. चोरांची तुमच्यावर सत्ता चालूं नये. दुष्टांची तुम्हांवर सत्ता चालूं नये. संहारक रुद्राचें हत्यार तुमच्यापासून दूर राहो.

८. ह्या गाईच्या दुधांत हा मसाला मिसळा. बैलांच्या वीर्यांत सामर्थ्य वाढवा. हे इंद्रा, तुझ्या सामर्थ्याची वृद्धि होवो.

सूक्त एकोणतिसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्.

१. मोठालीं स्तोत्रें करणारे आणि कृपेची अपेक्षा करणारे तुमचे लोक इंद्राची सेवा करीत असतात. कारण तो वज्रपाणि इंद्र विपुल संपत्ति देणारा आहे. साहाय्य मिळावें म्हणून थोर व मनोहर इंद्राचें यजन करा.

२. ज्याच्या हातांत लोकहितकारक संपत्ति आहे आणि जो सुवर्णमय रथांत बसून रथांत असलेल्या संपत्तीचा वर्षाव करीत असतो, ज्याच्या पुष्ट हातांत लगाम असतात आणि ज्याचे जोडलेले बलिष्ठ घोडे मार्गावर येत असतात त्या इंद्राची आम्हीं स्तुति करीत आहोंत.

३. हे इंद्रा, तुझ्या चरणाचा आश्रय मिळण्याकरतां तुझी भरद्वाज सेवा करतात. कारण, तूं धैर्यशाली, वज्रधारी, बलशाली आणि दक्षणा देणारा आहेस. हे नेत्या इंद्रा, तूं आपलें गमनशील उत्कृष्ट रूप लोकांना दिसावें म्हणून (तेजोरूपी) वस्त्र पांघरलेल्या सूर्याप्रमाणें जात असतोस.

४. जो सोम तयार झाल्यावर पुरोडाश शिजवितात आणि लाह्या तयार करतात, स्तुति करणारे भक्त स्तुति करूं लागतात आणि गाणीं गाऊं लागतात, तो सोम पिळून तयार केल्यावर इंद्राच्या पोटांत जातो.

५. हे इंद्रा, तुझ्या सामर्थ्याचा अंत लागत नाहीं. जें तुझें सामर्थ्य द्यावापृथ्वींना त्रास देत आहे तें सामर्थ्य पाण्यावर कळपचे कळप तृप्त व्हावेत त्याप्रमाणें चांगल्या प्रकारें यज्ञ करणाऱ्या बुद्धिमान भक्तांकडून पूर्ण केलें जातें.

६. अशा प्रकारें थोर इंद्राला सहज बोलावतां येते. उत्तम शिरस्त्राण घातलेला बलवान इंद्र येऊन किंवा न येतां आम्हांला धन देवो. अशा प्रकारें प्रकट झालेला असामान्य पराक्रमी इंद्र अनेक शत्रूंचा नाश करतो आणि दस्यूंचा फडशा पाडतो.

सूक्त तिसावें.

ऋषिः--भरद्वाज; देवता-इंद्र; छन्दः--त्रिष्टुभ.

१. पराक्रम करण्याकरतां इंद्र फिरूनहि स्फुरण पावूं लागला. एकटा अजिंक्य इंद्रच संपत्ति देतो. इंद्र द्यावापृथ्वीपेक्षांहि मोठा आहे. त्याचा अर्धाच भाग दोनहि द्यावापृथ्वी भरून टाकतो.

२. आतां मी इंद्राच्या महान सामर्थ्याचें वर्णन करतों. इंद्रानीं जीं कृत्यें केलीं त्याचा कोणीहि नाश करूं शकत नाहीं. पहा प्रत्यहीं सूर्य दिसूं लागला आणि त्या पराक्रमी इंद्रानें जग विस्तृत केलें.

३. हे इंद्रा, ज्या नद्यांच्या पाण्याला तूं रस्ता खोदलास तें तुझें पुरातन कृत्य अजूनहि दिसतें आहे. तुझ्यामुळें जेवावयास बसलेल्या माणसाप्रमाणें जग अचल बसलें आहे. कर्तृत्ववन्ता, सर्व जग स्थिर झालें.

४. हे इंद्रा, तुझ्यासारखा कोणी मनुष्य नाहीं आणि देवहि नाहीं हें अगदीं खरें आहे. तसेंच तूं पाण्याला अडवून निजलेल्या अहीला ठार केलेस आणि आकाशांतून पाणी खालीं सोडलेस.

५. हे इंद्रा, तूं अडवलेलें पाणी वहातें केलेस आणि पर्वताचा अत्यंत कठीण भाग फोडलास. सूर्य, नक्षत्रें आणि उषा यांला एकदम उत्पन्न करून तूं जगातल्या सर्व लोकांचा राजा झालास.

सूक्त एकतिसावें.

ऋषिः—सुहोत्र भरद्वाज; देवता-इंद्र; छन्दः—४ शक्करी, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. हे धनाधिपते इंद्रा, तूं धनवानांतला प्रमुख आहेस. तूं आपल्या हातांत सर्व जग घेतलें आहेस. लोक मुलाबाळांकरतां आणि अन्नपाण्याकरतां तुझी प्रार्थना करीत असतात.

२. हे इंद्रा, तुझ्या भीतीनें सर्व जगावर अचलहि उदक पडतें. तसेंच हे इंद्रा, तूं आला असतां द्यावापृथ्वी, पर्वत आणि अरण्यें फार काय सर्व स्थिर जगहि भयभीत होतें.

३. हे इंद्रा, तूं कुत्साकरतां अजिंक्य शुष्णाशीं युद्ध केलेस. तसेंच युद्धांत कुयवाला ठार केलेस. युद्धांत *सूर्याच्या रथाचें एक चाक चोरलेस व दुष्टांना ठार केलेस.

४. हे इंद्रा, हे पराक्रमी सोमक्रीत इंद्रा, जेव्हां तूं सोमरस अर्पण करणाऱ्या दिवोदासाला आणि स्तुति करणाऱ्या भरद्वाजाला संपत्ति दिलीस तेव्हांच तूं शंबर दस्यूचे शंभर आजिंक्य किल्ले फोडलेस.

५. हे सत्यसामर्थ्या संपत्तिमान इंद्रा, आतां भयंकर युद्ध होणार आहे त्याकरतां रथावर आरूढ हो. हे सन्मार्गवर्ती इंद्रा, आम्हांला साहाय्य करण्याकरतां ये. आणि प्रख्यात इंद्रा, आम्हांला लोकविख्यात कर.

सूक्त बत्तिसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ.

१. ह्या महापराक्रमी, बलवान, चलाख, प्रशंसनीय आणि वज्रधारी पुराणपुरुष इंद्राची नवीन पण सुखकारक अशीं अनेक स्तोत्रें मी करीत आहें.

२. अंगिरसांनीं स्तुति केल्यावर इंद्रानें पर्वताचा भेद केला व सूर्य उत्पन्न करून द्यावापृथ्वी प्रकाशीत केली. आणि उत्कृष्ट स्तोत्रें म्हणणाऱ्या स्तोत्यांकडून प्रार्थना केल्यावरून गाईंना बंधनांतून मुक्त करता झाला.

३. त्या कर्तृत्ववान इंद्रानें गुडघे टेकून प्रार्थना करणाऱ्या अंगिरसासाठीं गाईकरतां सारखा जय मिळवला. नगरभेत्त्या इंद्रानें स्तोत्या मित्राशीं सख्य व्हावें म्हणून शहाणपणानें असुरांची बळकटहि नगरें फोडून टाकलीं.

४. हें प्रशंसनीय बलिष्ठ इंद्रा, तूं जगांतील स्तोत्यांना सुख देण्याकरतां अत्यंत ताज्या घोड्याच्या साहाय्यानें विपुल संपत्ति घेऊन सामर्थ्यासह ये.

५. शत्रूंचा पराभव करणारा इंद्र आपल्या सामर्थ्यानें घोड्यावर बसून दक्षिणायनांत पाऊस पाडतो. अशा प्रकारें पाणी उत्पन्न झाल्यावर क्षुब्ध न होतां व उलट न वहातां तें सर्वत्र पसरूं लागतें.

सूक्त तेहेतिसावें.

ऋषिः—शुनहोत्र; देवता—इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे बलिष्ठा इंद्रा, जो तुझा सामर्थ्यवान उत्साह आहे, जो उत्तम घोड्यांच्या साहाय्यानें अश्वसंपत्तिपूर्ण शत्रूंचा नाश करतो आणि जो लढाईत वृत्रशत्रूंचा पराभव करतो, तो तुझा चांगल्या भावनांचा औदार्यपूर्ण उत्साह आम्हांला दे.

२. हे इंद्रा, युद्धांत मदत करण्याकरतां तुलाच स्तुति करणारे भक्त बोलावतात. तसेंच शहाण्या भक्तांकरतां तूं पणींना ठार केलेस. तुझें साहाय्य असलेलेच लोक समृद्धि प्राप्त करतात.

३. हे शूर इंद्रा, तूं त्या दास आणि आर्य अशा दोनाहि प्रकारच्या शत्रूंना ठार केलेस. कुऱ्हाडीनें अरण्यें तोडावीत त्याप्रमाणें हे लोकनायका, युद्धांत आपल्या आयुधांनीं शत्रूंना तूं ठार करतोस.

४. हे शूरा, भयंकर युद्धांत संपत्ति मिळविण्याकरतां युद्ध करणारे योद्धे तुला जेव्हां बोलावतात, तेव्हां हे इंद्रा, तूं उत्कृष्ट साहाय्य करून आमचा उत्कर्ष करण्याकरतां संरक्षण कर. सर्वगामी असणारा तूं आमचा सखा हो.

५. हे इंद्रा, तूं आज आमचा हो आणि पुढेंहि आमचा हो. आमच्यावर चाल झाली असतां तूं आम्हांला सुख देणारा हो. अशा प्रकारें स्तुति करणारे आम्ही स्वर्गीय सुखांत राहून गाई प्राप्त कराव्यात.

सूक्त चवतिसावें.

ऋषिः—शुनहोत्र; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, तुझ्याकडे अगणित स्तोत्रें येत असतात. तुझे ठिकाणीं स्तोत्यांच्या व्यापक इच्छा लीन झालेल्या असतात. पूर्वकालीं काय आणि आतां काय ऋषींचीं स्तोत्रें व सामगानें यांची तुझ्याकडे येण्याविषयीं चढाओढ आहे.

२. असंख्य लोक ज्याचा धांवा करतात, अनंत लोक ज्याचें यश गातात, असा जो महानुभाव इंद्र आहे त्याचीच प्राधान्यें करून यज्ञ करणाऱ्यांकडून स्तुति केली जाते. विपुल सामर्थ्य संपादण्याकरतां रथ जोडावा त्याप्रमाणें आम्हांकडून तूं स्तुति केला जातोस.

३. ध्यान किंवा स्तुति ह्यांपैकीं कोणीच त्या इंद्राला उपसर्ग देत नाहींत. उलट त्याच्याजवळ जाऊन त्याला आनंदितच करतात. जर शेंकडों काय हजारो स्तोते त्या स्तुतिलालस इंद्राची स्तुति करूं लागले तर तें ह्याला सुखप्रदच होतें.

४. आकाशांत सूर्य चंद्राशीं युक्त होतो त्याप्रमाणें उदकमिश्रित सोम इंद्राकडे जातो. निर्जल प्रदेशांत मिळालेलें पाणी जसें माणसाला आनंद देतें त्याप्रमाणें यज्ञ करून अर्पण केलेलें हवि इंद्राला उत्तेजित करतात.

३*टीपः—सूर्याच्या रथाचें चाक चोरलें—१.१६४.२ वरील टीप पहा.

५. ह्या इंद्राकरतां स्तोत्यांनीं फार चांगलें स्तोत्र म्हटलें. सर्वगामी इंद्र मोठ्या लढाईंत आमचें संरक्षण करील असें स्तोत्र म्हटलें.

सूक्त पसतिसावें.

ऋषिः—नर; देवता–इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, आमचीं स्तोत्रें तुमच्या रथांत केव्हां येतील? स्तुति करणाऱ्या मला हजारो लोकांचें पोषण करणारें धन केव्हां देशील? माझें स्तोत्र संपत्तीनें केव्हां पूर्ण करशील? आमचीं कृत्यें धनसमृद्ध केव्हां होतील?

२. हे इंद्रा, आमच्या योध्याशीं शत्रूंचे योद्धे आणि आमच्या पोराशीं शत्रूचीं पोरें भिडलीं आहेत असें केव्हां होईल? तूं रणांत आम्हांला केव्हां जय देशील? तूं शत्रूजवळ तीन प्रकारच्या संपत्तीनें परिपूर्ण असणाऱ्या शत्रूजवळच्या गाई केव्हां जिंकणार? हे इंद्रा, तूं भरपूर धन आम्हांस केव्हां देणार?

३. हे बलिष्ठ इंद्रा, तूं स्तोत्याला विविध प्रकारचें अन्न दिलें आहे असें केव्हां होईल? तूं कर्म आणि स्तोत्रें यांच्याकडे केव्हां लक्ष देणार? गाई देणारीं स्तोत्रें तूं केव्हां ऐकणार?

४. हे इंद्रा, गाई देणारें, घोड्यामुळें आल्हादक, बळ देणारें म्हणून प्रसिद्ध असें अन्न आम्हा भरद्वाजपुत्रांना दे. तसें अन्न आणि दुभत्या गाईस तूं पुष्ट कर. आणि त्यांना अत्यंत तेजस्वी कर.

५. हे समर्थ इंद्रा, तूं शूर आहेस. आमच्या आजच्या शत्रूंना कांहीं वेगळेंच करून टाक (मार). ज्याअर्थी शत्रूंचा नाश करणारा म्हणून तुमची स्तुति केली जाते त्याअर्थी शुद्ध दूध देणाऱ्या गाईपासून तूं आम्हांस विलग करूं नकोस. हे बुद्धिमन्ता, अंगिरसांना तूं अन्न देऊन संतुष्ट कर.

सूक्त छत्तिसावें.

ऋषिः—नर; देवता–इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, तुझा मद खरोखर लोकहितकारक आहे. तसेंच जी तुझी त्रैलोक्यवर्ती संपत्ति आहे खरोखर तीहि लोकहितकारक आहे. तूं खरोखर ऐश्वर्य देणारा आहेस. कारण, तूं देवांनाहि बळदेणारा आहेस.

२. ह्या इंद्राच्या सामर्थ्याची सर्व लोक पूजा करतात. तसेंच पराक्रम करण्याकरतां ह्याचाच सर्व पुरस्कार करतात. शत्रूला ठार करण्याकरतां शत्रुविनाशक व हिंसक अशा चढाई करणाऱ्या इंद्राचीच सर्व लोक सेवा करतात.

३. मरुत एकत्र होऊन त्याची सेवा करतात. पराक्रमी सामर्थ्य आणि नियुत नांवाचे घोडे इंद्राचीच सेवा करतात. सामगायन केलेलीं स्तोत्रें नद्या समुद्राकडे जातात त्याप्रमाणें महान इंद्राकडे जात आहेत.

४. हे इंद्रा, स्तुति केला जाणारा तूं लोकांना आल्हाद देणाऱ्या आणि उत्कृष्ट संपत्तीची धारा सोड. अनुपम असणारा तूं सर्व लोकांचा अधिपति आहेस आणि सर्व जगाचा एक असामान्य राजा आहेस.

५. हे इंद्रा, तूं आमच्या सेवेची अपेक्षा करीत शत्रूंच्या विपुल संपत्तीला सूर्याप्रमाणें जिंकतोस. तो तूं आमची श्रवणीय स्तोत्रें ऐक. तसेंच सामर्थ्यानें प्रकाशणारा आणि वेळोवेळीं जोमानें पुढें येणारा तूं आम्हांला जसा असाधारण वाटावा तसा आस.

सूक्त सदतिसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–इंद्र, छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे उग्र इंद्रा, तुझ्या सर्वरम्य रथाला जोडलेले घोडे तुला आम्हाकडे घऊन येवोत. कारण, श्रेष्ठ स्तोता तुझा धांवा करीत आहे. आज आम्ही एकत्र आनंदानें राहून समृद्ध होऊं.

२. सुवर्णकांति सोम आमच्या यज्ञांत जोरानें येतो आहे. शुद्ध केला जात असतां सरळ भांड्यांत जात आहे. पुरातन, स्वर्गीय, मदकर व सोमाचा राजा इंद्र हा सोम पिवो.

३. चलाख व रथाला जोडलेले घोडे सरळ चालून चांगल्या रथांत बसलेल्या बलवान इंद्राला आमच्या सुप्रसिद्ध हवीकडे वाहून आणोत. नाहीं तर वाऱ्यानें सोमरस सुकून जाईल.

४. हे वज्रधरा, ज्या दक्षिणेमुळें तूं पापांतून पार पाडतोस आणि हे धैर्यशीला, संतति आणि संपत्ति ज्या दक्षिणेमुळें तूं देतोस, अत्यंत श्रेष्ठ व अनेक कर्में प्रामुख्यानें करणारा इंद्र धनवानांमध्यें भक्तासाठीं त्या दक्षिणा द्यावयास लावतो.

५. इंद्र मोठें ऐश्वर्य देवो. अत्यंत तेजस्वी असणारा तो इंद्र स्तोत्रांनीं उत्कर्ष पावो. बलशाली असणारा इंद्र शत्रूला ठार करणारा होवो. आणि सर्वप्रेरक असणारा इंद्र त्वरेनें आम्हांला ती संपत्ति देवो.

सूक्त अडतिसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ.

१. अत्यंत आश्चर्यकारक असणारा इंद्र आमच्या भांड्यांतून सोम पिवो. आणि उत्कृष्ट व ओजस्वी असणारी स्तुति प्राप्त करो. दाता इंद्र लोकांच्या यज्ञांत उत्कृष्ट सेवा, पान आणि हवि स्वीकारो.

२. ह्या इंद्राचे कान लांबूनहि स्तोत्रें ऐकतात. इंद्राचीं स्तोत्रें स्तोता मोठ्यानें म्हणूं लागतो. ह्या इंद्राचीं ही स्तुति एकदां सुरूं झाली कीं त्याला ती माझ्याकडे वळवितें.

३. हे इंद्रा, आम्ही उत्कृष्ट स्तोत्रें म्हणून आणि हवि देऊन त्या पुरातन पण जराराहित इंद्राची स्तुति करतों. ह्या इंद्राला उद्देशून स्तोत्रें म्हटलीं जात आहेत आणि हवि अर्पण होत आहेत आणि इंद्राचे ठिकाणीं तीं सारखीं वाढत आहेत.

४. ज्या इंद्राला यज्ञ, हवि, सोमरस, स्तोत्रें आणि मननीय सामगायन उल्हासित करीत असते त्या ह्या इंद्राला रात्र संपल्यावर उषा वृद्धिंगत करतात, दिवस, महिने आणि वर्षें हीं त्याचा सारखा उत्कर्ष करीत असतात.

५. हे इंद्रा, असा प्रकट होणाऱ्या शत्रूंच्या नाशाकरतां पुढें सरसावणाऱ्या थोर व भयंकर अशा तुझी आम्हीं युद्धांत कीर्ति व्हावी, संपत्ति मिळावी आणि तुझें साहाय्य असावें म्हणून सेवा करीत आहोंत.

सूक्त एकुणचाळिसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. मदकर, स्फूर्ति देणारा, स्वर्गीय, कार्यांच्या पार नेणारा, थोरांनीं प्रशंसिलेला, अशा मधुर सोमाला हे इंद्रा, तूं प्यावेस, आणि स्तुति करणाराला गाई प्रमुख असलेली समृद्धि द्यावीस.

२. पर्वतांतील गाई मिळण्याच्या इच्छेनें ह्या इंद्रानें सत्यकर्म्या अंगिराशीं संगनमत करून प्रशंसनीय अशा त्यानें अभंग असा वलाचा पर्वत फोडून टाकला. आणि पणीशीं शब्दांनींच युद्ध करीत राहिला.

३. हे इंद्रा, ह्या सोमानें तूं अंधाऱ्या रात्रि दिवस, महिने व वर्षें प्रकाशित केलींस. पूर्वीं हा दिवसांचा ध्वज (आकाशांत) रोवला म्हणून उषांचा पवित्र उदय झाला.

४. इंद्रानें (सूर्यरूपानें) प्रकाशित होऊन अंधारानें मळकट झालेल्या जगाला उज्वल केलें. तसेंच अनेक उषांना आपल्या तेजानें ह्यानें व्यापलें. केवळ इशाऱ्यानें जोडल्या जाणाऱ्या घोड्यांनीं संपत्ति मिळविणाऱ्या रथानें लोकांच्या इच्छा पूर्ण करणारा तो इंद्र सर्वत्र जात असतो.

५. हे प्राचीन राजा इंद्रा, ज्याला संपत्ति द्यावयाची असेल त्या स्तोत्याला तूं लवकर विपुल अन्न दे, तसेंच भक्ताला उदक, ओषधी, विषरहित वृक्ष, घोडे आणि माणसें दे.

सूक्त चाळिसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, तुला आनंदित करण्याकरतां सोम पिळला आहे तर मित्रभूत दोनहि घोड्यांना थांबीव, घोडे सोड आणि सोमरस पी. तसेच आमच्या संघांत बसून स्तोत्रें गावयास लाव आणि यज्ञ करणाऱ्या स्तोत्यांना अन्न दे.

२. हे पराक्रम्या, उत्पन्न झाल्याबरोबर प्रसन्नतेकरतां आणि पराक्रम करण्याकरतां जो सोमरस तूं पीत होतास तोच तुला पिण्याकरतां दुधादि पदार्थ, उदक, दगड आणि ऋत्विज लोक यांनीं तयार केला आहे तो तूं पी.

३. हे इंद्रा, सोम तयार केल्यावर आणि अग्नि प्रज्वलित झाल्यावर उत्कृष्ट घोडे तुला वाहून आणोत. मी तुला मनःपूर्वक सारखा बोलावीत आहें. हे इंद्रा, तूं आमचें आत्यंतिक कल्याण करण्याकरतां ये.

४. हे इंद्रा, आमच्यावर असलेल्या थोर अनुग्रहबुद्धीनें तूं आमच्याकडे वारंवार सोमयज्ञांत ये. आणि आमचीं हीं स्तोत्रें ऐक. नंतर तुझ्या शरीरास पोषक असणारें अन्न स्तोता देईल.

५. हे इंद्रा, जरी तूं दूर द्युलोकांत असशील, किंवा जर तूं दूसऱ्या ठिकाणीं असशील, घरीं असशील किंवा कोठेंहि असशील तर तेथूनहि नियुत घोडे जोडलेल्या आणि मरुतासह आनंदित असणाऱ्या हे स्तुत्य इंद्रा, तूं आमच्या यज्ञांत आम्हांला साहाय्य करण्याकरतां ये.

सूक्त एकेचाळिसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—इंद्र, छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रा, प्रसन्न मनानें तूं आमच्या यज्ञांत ये.

कारण, तुझ्याकरतां आम्ही सोम तयार करीत आहोंत. हे वज्रधरा इंद्रा, देवांतला प्रमुख असणारा तूं गाई गोठ्यांत येतात त्याप्रमाणें आपल्या स्थानीं ये.

२. हे इंद्रा, जी तुझी उत्कृष्ट जिव्हा आहे, जी अत्यंत लांबलचक आहे, जिनें तूं वारंवार मधुर सोमरस पितोस, त्या जिव्हेनें तुला अध्वर्यूनें अर्पण केलेला सोम पी. गाई इच्छिणारें तुझें वज्र शत्रूंवर चालूं लागो.

३. रसराशित व बलदायक असणारा अनेक प्रकारचा हा सोम बलशाली इंद्राकरतां तयार केला आहे. हे अश्वयुक्त, उग्र व सर्वश्रेष्ठ इंद्रा, हा सोम पी. कारण, आजपर्यंत ह्या सोमाचा तूं मालक आहेस आणि तो तुझें अन्न आहे.

४. हे इंद्रा, तयार केलेला सोम तयार न केलेल्या दुसऱ्या सोमापेक्षा चांगला आहे. तसेंच बुद्धि आणि सौंदर्य ह्यालाहि चांगला आहे. हे शत्रूंना ठार करणाऱ्या इंद्रा, ह्या यज्ञीय सोमाकडे ये. आणि त्यानें सर्व सामर्थ्यपूर्ण हो.

५. हे इंद्रा, तुझा मी धांवा करीत आहें, म्हणून तूं माझ्याकडे ये. हा सोम तुझ्या शरीराला पोषक होईल. हे पराक्रमी इंद्रा, तूं सोमानें प्रसन्न हो. आणि युद्धांत आमच्या लोकांचें रक्षण कर.

सूक्त बेचाळिसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–इंद्र; छंदः—१–३ अनुष्टुभ, ४ बृहती.

१. हे अध्वर्यो, सर्ववेत्त्या, गंत्या, चालून जाणाऱ्या अग्रेसर, नेत्या आणि सोम पिऊं इच्छिणाऱ्या इंद्राला तूं सोम दे.

२. सोमपानाविषयीं लालस, बलशाली अशा इंद्राकडे पिळलेल्या सोमांनीं भरलेलीं भांडी तुम्ही घेऊन जा.

३. हे अध्वर्यूनो, जेव्हां तयार केलेला सोम घेऊन तुम्ही इंद्राकडे जातां तेव्हां बुद्धिमान इंद्र, तुमच्या सर्व कामना जाणतो. तो पराक्रमी सर्व इच्छा पूर्ण करो.

४. हे अध्वर्यो, ह्या इंद्रालाच तुम्ही तयार केलेला सोम द्या. त्या चढाई करणाऱ्या जिंक्य शत्रूपासून आणि त्यांच्या त्रासापासून तूं आमचें वारंवार संरक्षण करावेस.

सूक्त त्रेचाळिसावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–इंद्र; छंदः—उष्णिह्.

१. हे इंद्रा, ज्याच्या आनंदांत दिवोदासाकरतां शंबरास तूं प्रसिद्धपणें ठार केलेंस तो हा सोम तुझ्याकरतां तयार केला आहे तो तूं पी.

२. हे इंद्रा, तूं ज्या सोमांतील कडक व मदकर सोम सकाळीं दुपारीं आणि संध्याकाळीं पीत असतोस तो हा सोमरस तुझ्याकरतां तयार केला आहे तो तूं पी.

३. ज्या सोमाच्या तारेंत दगडाच्या आंत बंदोबस्तांत ठेवलेल्या गाई बाहेर काढल्या, हे इंद्रा, तो सोम तुझ्याकरतां तयार केला आहे तो तूं पी.

४. हे इंद्रा, तूं सोम पिऊन इंद्राचें म्हणून प्रसिद्ध असलेलें सामर्थ्य धारण करतोस तो हा सोम तयार केला आहे तो तूं पी.

सूक्त चव्वेचाळिसावें.

ऋषिः—शंयु बृहस्पतिपुत्र; देवता–इंद्र; छंदः—१–६ अनुष्टुभ, ७–९ विराज, किंवा ८ वीच फक्त विराज, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. हे धनवन्ता, जो अत्यंत संपत्तिमान, जो अत्यंत उज्वल कीर्ति देणारा तो सोमरस हे अन्नाधिपते, तयार केला आहे तो तुला आनंदप्रद होवो.

२. हे अत्यंत सुखी असणाऱ्या इंद्रा, जो सोमरस अत्यंत सुखप्रद आहे, जो स्तोत्यांना संपत्ति देणारा आहे, तो सोम हे अन्नाधिपते, तुझ्याकरतां तयार केला आहे. तुला तो आनंद देणारा होवो.

३. ज्या सोमानें तुला उत्साह उत्पन्न होऊन स्वकीय मरुतांशीं सह शत्रूंचा नाश करूं लागतोस तो सोमरस तयार केला आहे हे इंद्रा, तो तुला आनंदप्रद व्हावा.

४. बलाधिपति, लोकानुग्राहक, सर्वांचा पराभव करणारा, अशा त्या लोकाधिपति इंद्राची तुम्ही स्तुति करा.

५. स्तोत्रें शत्रूंची संपत्ति अपहरण करणाऱ्या इंद्राच्या ज्या सामर्थ्याला उत्तेजन देतात त्या सामर्थ्याची द्यावापृथ्वी उपासना करीत असते.

६. ज्याचें साहाय्य शहाण्या माणसाप्रमाणें (सर्वांगीण) असतें आणि एकत्र होऊन सारखें वाढत असतें त्या तुझ्या स्तोत्राचें महत्त्व सारखें वाढलें पाहिजे.

७. अत्यंत प्रशंसनीय व मित्रभूत इंद्र चतुर माणसाला ओळखतो. सोम पिऊन भक्तांना तो उत्कृष्ट धन देतो. धष्टपुष्ट घोड्यांच्या साहाय्यानें रक्षण करण्याकरतां येऊन अन्नसमृद्ध असणारा इंद्र मित्रांचें रक्षण करतो.

८. यज्ञाच्या मार्गावर इंद्र सोम पिवो. कारण,

तेथें त्याला प्रसन्न करण्याकरतां भक्त यज्ञ करीत आहेत. त्या इंद्रानें मोठें बलिष्ठ शरीर धारण करून प्रशंसनीय होत्साते प्रत्यक्ष प्रकट व्हावें.

९. हे इंद्रा, अत्यंत उत्कृष्ट सामर्थ्य आम्हांस दे. लोकांच्या अनेक शत्रूंना नष्ट कर. आपल्या सामर्थ्यानें विपुल अन्न आम्हांस दे. संपत्तीच्या समृद्धीकरतां आमचें तूं संरक्षण कर.

१०. हे भगवन इंद्रा, दात्या अशा तुझ्याकडेच आम्ही आलों आहोंत. म्हणून हे अश्वयुक्ता, तूं वैतागू नकोस. जगांत तुझ्याशिवाय आम्हांला कोणी बांधव खरोखर दिसत नाहीं. हे थोर पुरुषा, तुला ऐश्वर्य देणारा असें लोक म्हणत नाहींत काय ?

११. हे बलिष्ठा, खाबू लोकांच्या तडाक्यांत आम्हांस देऊं नकोस. ऐश्वर्यवान अशा तुझ्या मैत्रींत आमचा नाश होऊं नये. हे इंद्रा, तूं शत्रूंना अनेक अडथळे घातले आहेस. तूं सोमविन्मुखांना ठार कर. आणि तुला संतुष्ट न करणारांचा निःपात कर.

१२. मेघांतून गर्जना करीत पाऊस बाहेर पडतो त्याप्रमाणें गाई, घोडे यांनीं युक्त असणारी संपत्ति इंद्र उत्पन्न करतो. हे इंद्रा, पुरातन असणारा तूं स्तोत्यांचा आधार आहेस. तुझा संपत्तिमान कंजूष नाश न करोत.

१३. हे हवि देणाऱ्या अध्वर्यों, ह्या इंद्राला सोम दे. तोच ह्या सोमाचा राजा आहे. तोच प्राचीन किंवा नवीन स्तोत्रांनीं स्तुति करणाऱ्या ऋषींचा उत्कर्ष करतो.

१४. ह्या सोमाच्या तारेंत अनेक रूपाच्या शत्रूंना अप्रतिहतपणें तूं ठार केलेस. मधुर असा तोच सोम शिरस्त्राण घातलेल्या त्या इंद्राला पिण्याकरतां तुम्ही अर्पण करा.

१५. इंद्र पिळून तयार केलेला सोम चांगल्या प्रकारें पिवो. तसेंच आनंदित होऊन वज्रानें वृत्राला ठार करो. लांबूनहि तो आमच्या यज्ञामध्यें येवो. कारण, तो इंद्र स्तुति करणाऱ्या भक्तांचा आधार आणि रक्षणकर्ता आहे.

१६. ज्या योगें इंद्र सद्बुद्धीनें आनंदित होईल आणि आमचे शत्रु आणि पाप नाहींसे करील त्याप्रकारें प्रसन्न करणारा, आवडता व पिण्यायोग्य असणारा सोम इंद्र पिवो.

१७. हे भगवन शूर इंद्रा, ह्या सोमानें आनंदित होऊन आप्त व परके अशा दोनहि शत्रूंना पराङ्मुख कर आणि ठार कर.

१८. हे भगवन इंद्रा, युद्धांत आम्हांला विपुल व सुखकर संपत्ति दे. तसेंच संपत्ति आणि मुलेंबाळें यांची प्राप्ति व्हावी म्हणून आमच्या स्तोत्यांना समृद्ध कर.

१९. हे इंद्रा, बलिष्ठ, जोडले गेलेले, बळकट रथाचे, बळकट लगामाचे, चलाख, आमच्याकडे येणारे व जड आयुधें ओढणारे असे सुंदर घोडे तुला बलदायक व मदकर सोम पिण्याकरतां माझ्याकडे घेऊन येवोत.

२०. हे वीर इंद्रा, बलिष्ठ, समुद्राच्या लाटांप्रमाणें चमकणारे असे तुझे उल्हसित घोडे तुझ्या लांकडी रथाला जोडले आहेत. म्हणून तूं ये. कारण, तरुण आणि बलिष्ठ अशा तुझ्याकरतां दगडांनीं कुटलेल्या सोमांतलि भाग भक्त तुला अर्पण करीत आहेत.

२१. हे इंद्रा, तूं द्युलोकाचा प्रमुख योद्धा, पृथ्वीचा आधार, नद्यांचें मूळ आणि स्थावरजंगम सृष्टीचा प्रेरक आहेस. हे कामपूरक इंद्रा, बलिष्ठ व श्रेष्ठ अशा तुझ्याकरतां अत्यंत मधुर असणारा सोमरस तयार होत आहे.

२२. ह्या सोमदेवानें इंद्राशीं एकरूप होऊन पणीला अडविलें. ह्यानें स्वतःच्या पितृभूत वलाचीं आयुधें हरण केलीं आणि त्या दुष्टाचें कपटजाल हाणून पाडलें.

२३. ह्यानें उषेला उत्कृष्ट पतीची जोड दिली. आणि सूर्यांत तेज उत्पन्न केलें. तीन प्रकारच्या ह्या सोमानेंच स्वर्गाच्या तिसऱ्या भागांत गुप्त ठेवलेलें अमृत प्राप्त केलें.

२४. ह्यानें नक्षत्रें आणि पृथ्वी ह्यांना स्थिर केलें. ह्यानेंच सप्तकिरणात्मक (सूर्याच्या) रथाची योजना केली. ह्यानेंच बुद्धिमत्तेनें गाईच्या पोटांत पक्व दूध उत्पन्न केलें. आणि ह्यानेंच *दहा यंत्रें असलेला शरीररूपी कूप राखला आहे. (ह्यानेंच दहा भांड्यांतून रस धारण केला आहे.)

सूक्त पंचेचाळिसावें

ऋषिः—शंयु बृहस्पतिपुत्र; देवता—१-३० इंद्र, ३१-३३ बृबु तक्षन्; छंदः—२२-२९ अतिनिचृत्; १-२१ पादनिचृत्, ३३ अनुष्टुभ, अवशिष्ट-गायत्री.

१. ज्यानें दूरदेशीं पडलेल्या तुर्वश आणि यदु यांना अनुग्रह करून आणले तो तरुण इंद्र आमचा मित्र होवो.

---

* टीप—खैलिक ११.१. पहा.

२. इंद्र नास्तिकालाहि अन्न देतो आणि मद्दड घोड्याकडूनहि शत्रूंची संपत्ति जिंकतो.

३. त्याचे नियम उदात्त आहेत, त्याचीं स्तोत्रेंहि अनेक आहेत. त्याचें साहाय्य कधींहि कमी होत नाहीं.

४. हे मित्रांनो, स्तुति करून बोलावल्या जाणाऱ्या इंद्राकरतां स्तोत्रें म्हणा आणि सामगायन करा. आम्हांला उत्कृष्ट बुद्धि देणारा इंद्र होय.

५. हे वृत्रहन्त्या इंद्रा, तूं एकाचा दोघाचा संरक्षण कर्ता आहेसच, पण आम्हासारख्या सर्वांचा संरक्षणकर्ता आहेस.

६. आम्हाला द्वेष्ट्या शत्रूंतून तूंच पार पाडतोस आणि आम्हाला सामगायन करवणारे भक्त बनवतोस. लोक म्हणतात कीं तुझ्याबरोबर योद्धे असतात.

७. सर्वश्रेष्ठ, स्तुति करून बोलावला जाणारा, आमचा मित्र आणि स्तुत्य अशा इंद्राला गाईला पान्हा यावा म्हणून बोलवावें त्याप्रमाणें मी बोलावतों.

८. शत्रुसैन्य पादाक्रांत करणाऱ्या ह्या वीराच्या मुठींत सर्व दिव्य व पार्थिव अशा दोन प्रकारची संपत्ति सांठविली आहे असें म्हणतात.

९. तर हे वज्रधरा, शचीपते इंद्रा, बळकट असलेलींहि शत्रूंचीं नगरें तूं फोडून टाक. तसेंच कोणासहि हार न जाणाऱ्या इंद्रा, त्यांच्या कारस्थानांचाहि फडशा पाड.

१०. हे सत्यस्वरूपा, अन्नाधिपते व सोम पिणाऱ्या इंद्रा, कीर्तीची इच्छा करणारे आम्ही तुझाच धांवा करतों.

११. हे इंद्रा, जो तूं पूर्वीं स्तुत्य होतास आणि संपत्तीकरतां आतांहि प्रशंसनीय आहेस, तो तूं आमचें स्तोत्र ऐक. आम्ही तुझीच स्तुति करीत आहोंत.

१२. हे इंद्रा, बुद्धि आणि घोडे यांच्या साहाय्यानें उत्कृष्ट घोडे, अन्न व सांठविलेलें धन आम्ही तुझ्या साहाय्यानें जिंकूं.

१३. हे प्रशंसनीय वीरा इंद्रा, प्रसिद्ध असणारा तूं युद्धांत शत्रूंची संपत्ति जिंकतोस.

१४. हे अरिमर्दना, जी तुझी अत्यंत शीघ्रगामी गति आहे त्या योगानें आमच्या रथाला गति दे.

१५. हे जयशील इंद्रा, अत्यंत मोठा रथयोद्धा असणारा तूं आमच्या पराभव करणाऱ्या रथानें तूं शत्रूंचें सांठविलेलें धन जिंक.

१६. सर्वद्रष्टा आणि पराक्रमी असा जो लोकाधिपति इंद्र आहे त्याचीच हे स्तोत्या, तूं स्तुति कर.

१७. हे इंद्रा, जो आम्हा स्तोत्यांनाच साहाय्य करून सुख देणारा असा आमचा मित्र आणिआप्त होतास तो तूं आम्हाला सुखी कर.

१८. हे वज्रधरा राक्षसांना ठार करण्याकरतां हातांत वज्र घे. आणि चालून येणाऱ्या शत्रुसैन्याचा पराभव कर.

१९. सनातन, संपत्ति देणाऱ्या, मित्र, स्तोत्यांना प्रेरणा देणाऱ्या आणि मंत्रांनीं बोलावल्या जाणाऱ्या इंद्राचा मी धांवा करतों.

२०. तो अप्रतिहतगति आणि अत्यंत प्रशंसनीय असणारा इंद्रच सर्व पार्थिव संपत्तीचा धनी आहे.

२१. हे गोपते इंद्रा, शत्रुनाशक असणारा तूं नियुत घोड्यांच्या साहाय्यानें आमच्या इच्छा पूर्ण कर. गाईबैल, घोडे आणि ऐश्वर्य देऊन आमच्या इच्छा पूर्ण कर.

२२. हे इंद्रा, शक्तिमान् इंद्राला, गाईला गवताप्रमाणें जें सुखकर होईल तें स्तोत्र अत्यंत शत्रुनाशक आणि दात्या इंद्राकरतां तुम्ही एकत्र होऊन गा.

२३. जर तो आमची ही स्तुति ऐकेल तर तो श्रेष्ठ इंद्र आम्हांला गाईबैल आणि अन्न हें देईलच.

२४. हा दस्युहन्ता इंद्र कुवित्साच्या गाईबैलांनीं भरलेल्या गौळवाड्यांत गेला. आणि पराक्रमानें त्यांना त्यानें मोकळे केलें.

२५. हे शतक्रतो इंद्रा, गाई वासराकरतां हंबरतात त्याप्रमाणें आमचीं हीं स्तोत्रें तुझ्याकरतां चालू आहेत.

२६. हे इंद्रा, तुझी आमचीं मैत्री नष्ट करणें अशक्य आहे. म्हणून हे वीरा, गाई इच्छिणाऱ्या आम्हाला गाई देणारा हो आणि घोडे इच्छिणाऱ्या आम्हाला घोडे देणारा हो.

२७. इंद्रा, आम्हाला विपुल संपत्ति देण्याकरतां सोम पिऊन शरीरानें उल्हसित हो. तुझ्या स्तोत्याला निंदकाच्या स्वाधीन करूं नकोस.

२८. हे प्रशंसनीय इंद्रा, गाई वासराकडे येतात त्याप्रमाणें सोम तयार केल्यावर हीं स्तोत्रें तुझ्याकडे धांवत येत आहेत.

२९. श्रेष्ठांतला श्रेष्ठ, आणि बलवानांतल्या बलवान अशा तुझ्याकडे यज्ञांत आमचें स्तोत्र पोंचो.

३०. हे इंद्रा, तुला उद्देशून केलेलें आमचें उत्कृष्ट स्तोत्र तुजप्रत पोंचो. तूं आम्हाला विपुल संपत्ति दे.

३१. गंगेच्या तीरावर वाढलेल्या झाडाप्रमाणें पणींच्या कुलांत बृबूनें अत्यंत उच्च स्थान पटकावलें.

३२. ज्याचें हजारांनीं होणारें कल्याणकारक दान दानेच्छु अशा माझ्याकडे वायूप्रमाणें वेगानें येतें—

३३. त्या बृबूची आमचे सर्व स्तोते नेहमीं चांगल्या प्रकारें स्तुति करीत असतात. कारण, तो शहाणा बृबु हजारांनीं संपत्ति बाळगणारा आणि हजारांनीं संपत्ति देणारा आहे.

३३टीप:——भरद्वाजः क्षुधार्तस्तु सपुत्रो विजने वने ।
बह्वीर्गाः प्रतिजग्राह बृबोस्तक्षणो महायशाः ॥
मनु १०–१०७.

बृबु हा नास्तिक व कंजूष म्हणून वर्णिलेल्या पणींचा सुतार असून त्याच्या दानाची स्तुति आहे.

सूक्त शेहेचाळिसावें.

ऋषिः--शंयु बृहस्पतिपुत्र; देवता--इंद्र; छन्दः--विषम बृहती आणि सम–सतोबृहती.

१. आम्ही स्तोते अन्न मिळण्याकरतां तुझाच धांवा करतों. हे इंद्रा, सज्जनसंरक्षक अशा तुलाच शत्रूंना जिंकण्याकरतां बोलावतात. घोड्यांच्या शर्यतींतहि तुझाच धांवा करतात.

२. हे अद्भुता, वज्रधरा व वज्रहस्ता इंद्रा, धैर्यशाली व प्रशंसा केला जाणारा थोर असा तूं विजयी वीराला अन्नाप्रमाणें बैल आणि रथाला योग्य असे घोडेहि दे.

३. मोठाल्या शत्रूंना ठार करणारा आणि लोकद्रष्टा जो इंद्र आहे त्याचा आम्ही धांवा करतों आहोंत. हे अनेक उपभोगसाधनें असलेल्या, महाबलवान सज्जनाधिपते इंद्रा, युद्धांत आमचा तूं उत्कर्ष करावास.

४. हे ऋग्वर्णिता, भयंकर युद्धांत रागानें शत्रूंना तूं बैलाप्रमाणें त्रास द्यावास. मुलेंबाळें, उदक आणि सूर्य यांची प्राप्ति व्हावी म्हणून महायुद्धांत तूं आमचें रक्षण करावेंस.

५. हे अद्भुता, वज्रहस्ता, इंद्रा, ज्या अन्नानें ह्या दोनहि द्यावापृथ्वींना तूं भरून टाकतोस तें अत्यंत उत्कृष्ट प्रकारचें बलदायक व पूरक अन्न आम्हांस दे.

६. हे राजा इंद्रा, देवांमध्यें बलशाली आणि विजयी अशा तुला आम्ही साहाय्य करण्याकरतां बोलावीत आहोंत. तूं सर्व राक्षसांना त्रास दे. आणि हे सर्वाधारा, आमच्या शत्रूंचा सहज पराभव कर.

७. हे इंद्रा, नहुषांच्या लोकांत जें धन आणि बल असेल, जें पंचजनांचें धन असेल, जे सर्व थोर पराक्रम असतील ते सर्व तुम्ही आम्हांला द्या.

८. हे भगवान इंद्रा, तृक्षु, द्रुह्यु, यांमध्यें जें कांहीं सामर्थ्य असेल तें युद्धांत शत्रूंना पराभूत करण्याकरतां तुम्ही आम्हांस द्या.

९. हे इंद्रा, थंडी, ऊन व पाऊस ह्या तिघांपासून संरक्षण करणारें असें सुखदायक, घर आम्हां भाग्यवन्तांना तूं दे. आम्हापासून शत्रूंचें पाजळलेलें हत्यार दूर ठेव.

१०. जे गाईच्या इच्छेनें शत्रूंचा नाश करतात आणि जे धैर्यानें आम्हांवर आघात करतात, त्यांच्यापासून हे स्तुत्य भगवान इंद्रा, आमच्या शरीराचें संरक्षण करणारा तूं अत्यंत जवळचा हो.

११. हे इंद्रा, जेव्हां पंख लावलेले, तिखट तोंडाचे तेजस्वी बाण माझ्यावर फेकले जातील तेव्हां तूं आम्हांला उत्साह देणारा हो. आणि आमच्या प्रतिस्पर्ध्यांचेंहि युद्धांत संरक्षण कर.

१२. शूर लोक जेव्हां शरीर (धारातीर्थीं) अर्पण करतात तेव्हां ते पितरांचीं प्रिय स्थानें प्राप्त करतात. अशा वेळीं त्यांच्या शरीराकरतां व मुलाबाळांकरतां गुप्तपणें कवच दे आणि शत्रूंना दूर कर.

१३. हे इंद्रा, युद्धांत, अवघड मार्गांत किंवा कोणत्याहि कामांत जेव्हां तूं आकाशांतील भक्षार्थी बहिरी ससाण्याप्रमाणें आमच्या घोड्यांना इषारा देतोस तेव्हां आम्हांला कवच दे.

१४. उतारावरून वाहणाऱ्या नद्याप्रमाणें भयानक शब्द झाल्यावर धांवणारे व लगामांनीं दोनहि बाजूंनीं खेचलेले घोडे मांसावर पक्षी ज्याप्रमाणें खेटे घालतात त्याप्रमाणें गाई जिंकण्याकरतां पुनः पुन पुढें जात असतात.

सूक्त सत्तेचाळिसावें.

ऋषिः—गर्ग भरद्वाजपुत्र; देवता——१–५ सोम, २० च्या चार पादाचे क्रमानें देव, भूमि, बृहस्पति, इंद्र, २२–२५ सृंजयपुत्रप्रस्तोकदानस्तुति, २६ रथ, २९ दुंदुभि ३१ चा दुसरा भाग व अवशिष्ट इंद्र; छंदः–२२ त्रिष्टुभ, २३ अनुष्टुभ, २४–२५ गायत्री, १९ बृहती २७ जगती, अवशिष्ट त्रिष्टुभ.

१. हा तयार केलेला सोम स्वादिष्ट आहे. मधुर आहे. कडक आहे आणि बल देणाराहि आहे. हा

सोम पिणाऱ्या इंद्रापुढें युद्धांत कोणीहि टिकूं शकत नाहीं.

२. जो सोम पिऊन वृत्राला ठार करण्याच्या वेळीं इंद्र बेफाम झाला, ज्यामुळें शंबराच्या अनेक सैन्याचा इंद्रानें धुव्वा उडविला आणि बळकट असणारीं नव्याण्णव नगरें फोडून टाकलीं तो हा सोम मधुर आणि मादक आहे.

३. हा सोमरस प्याल्यावर बोलावयाची स्फूर्ति होते, ह्यानेंच उत्कृष्ट कल्पना स्फुरतात. ज्याच्या बाहेर जगांत कांहींहि राहत नाहीं असे पृथ्वीचे सहा भाग ह्याच बुद्धिवर्धक सोमानें उत्पन्न केले.

४. ज्यानें पृथ्वी विस्तृत केली, आणि द्युलोकाला दृढत्व आणलें तोच हा सोम होय. ह्या सोमानेंच तीनहि रसप्रवाहांत अमृत उत्पन्न केलें आणि अन्तरिक्ष विस्तृत केलें.

५. ह्या सोमानेंच निर्मल उषांच्या मधून आश्चर्यकारक प्रकाश असलेला सूर्य उत्पन्न केला. ह्याच मरुतांसहित असणाऱ्या वीरानें मोठा धीरा देऊन द्युलोकाला स्थिर केलें.

६. हे शूर इंद्रा, वृत्रहन्ता असणारा तूं द्रव्याकरतां चाललेल्या लढाईकरतां तांब्यांतील सोम अवश्य पी. माध्यंदिन सवनांतहि सोम पी. संपत्तीचें आगर असणारा तूं आम्हांला संपत्ति दे.

७. हे इंद्रा, तूं पुढें चालणाऱ्या वाटाड्याप्रमाणें आमच्याकडे पहा. आम्हाला उत्कृष्ट संपत्ति भरपूर दे. तूं आमचा संरक्षक हो आणि आम्हाला संकटांतून पार कर. तूं आमचा नायक हो आणि आम्हाला उत्कृष्ट संपत्ति दे.

८. हे इंद्रा, ज्ञाता असणारा तूं आम्हांला उत्कृष्ट लोकांत न्यावेंस. तसेंच निर्भयपणें सुखदायक तेजाकडे पोंचवावें. हे इंद्रा, सनातन असणाऱ्या तुझे रमणीय असणारे महाबाहु संरक्षण करणारे म्हणून आम्ही त्यांची स्तुति करतों.

९. हे इंद्रा, तुझ्या रथाच्या सारथ्यस्थानीं आम्हांस घे. हे धनवन्ता, तुझ्या उत्तम रथ ओढणाऱ्या दोन घोड्यांवर आम्हांला घे. तसेंच अन्नांतलें उत्कृष्ट अन्न आम्हांस दे. हे धनवान इंद्रा, सर्वाधीश्वर असणारा तूं कोणाला आमच्या संपत्तीचा नाश करून देऊं नकोस.

१०. हे इंद्रा, आम्हांला सुखी कर. आम्हांला दीर्घायुषी करण्याची इच्छा कर. आमची बुद्धि तरवारीच्या धारेप्रमाणें तीक्ष्ण कर. तुझ्या भक्तीनें जें कांहीं बोलेन, त्याचा तूं स्वीकार करावास आणि मला साहाय्य करावेस.

११. संरक्षक इंद्राचा, साहाय्य करणाऱ्या इंद्राचा वेळोवेळीं सहज बोलावल्या जाणाऱ्या इंद्राचा आणि अनेकांनीं धांवा केलेल्या समर्थ इंद्राचा मी धांवा करीत आहे. तो भगवान इंद्र आमचें कल्याण करो.

१२. संरक्षण करणारा धनवान इंद्र साहाय्य करून आम्हांला सुखप्रद होवो. सर्वसंपत्तिमान इंद्र आमच्या शत्रूंना त्रास देवो आणि आम्हांला निर्भय करो. आम्ही उत्कृष्ट सामर्थ्याचे धनी असावें.

१३. आम्हावर त्या यज्ञार्ह इंद्राची कृपा असावी. आम्हांविषयीं त्याची कल्याणकारक बुद्धि असावी. संरक्षण करणारा आणि धनवान इंद्र द्वेष्ट्यांना दूरच नाहींसें करो.

१४. हे इंद्रा, पाणी उताराकडे धांवते त्याप्रमाणें स्तोत्यांचीं स्तोत्रें तुझ्याकडे धांवत असतात. विपुल अन्न, संपत्ति व सोमरस, हे तुझ्याकडे धांवत येतात. हे वज्रधरा, पाणी आणि दूध तूं सोमांत एकत्र करतोस.

१५. कोण ह्याचें स्तवन करणार आहे? कोण ह्याला प्रसन्न करूं शकतो? आणि ह्याचें यजन तरी कोण करील? कारण हा धनवान इंद्र नेहेमीं पराक्रम्यांचेंच संरक्षण करतो. चालतांना आपण पाय मागें पुढें करतो त्याप्रमाणें हा आपल्या कर्तृत्वानें पुढें गेलेल्यांना मागें ओढतो आणि मागें असलेल्यांना पुढें करतो.

१६. घोर कर्म करणाऱ्या प्रत्येकाची रग जिरवणाऱ्या आणि प्रत्येक भक्ताला संकटाच्या पार नेणाऱ्या इंद्राची वीर म्हणून प्रसिद्धी आहे. गर्वानें फुगलेल्यांचा तिटकारा करणारा आणि उभय लोकांचा राजा असणारा इंद्र आपल्या मानव प्रजेला साहाय्य करीत असतो.

१७. श्रेष्ठ लोकांच्या सख्याची पर्वा न करतां तो चलाख इंद्र हलक्या लोकांशीं मैत्री करतो. अभक्तांना सोडून इंद्र अनेक वर्षें घालवीत असतो.

१८. हा इंद्रच प्रत्येक स्वरूपानें वेगळा झाला आहे. ह्या इंद्राचीं तीं रूपें नांवें घेऊन सांगण्याकरतां

---

१ टीपः—ह्या ऋचेंत सोमाच्या चवीविषयीं अनुभविक उद्गार दिसतात.

३ टीपः—द्यु, पृथिवी, अहन, रात्रि, उदक, ओषधी, हे पृथ्वीचे सहा भाग होत.

४ टीपः—ओषधी, गाईचें दूध आणि पाण्याचा प्रवाह ह्या तीन प्रवाहांत सोमानें अमृत उत्पन्न केलें.

आहेत. इंद्र आपल्या इच्छेनेंच अनेक रूपें घेऊन जात असतो. कारण, ह्याचे हजार घोडे जोडलेले असतात.

१९. सोनेरी घोडे रथाला जोडणारा तेजस्वी इंद्र ह्या जगांत अनेक ठिकाणीं प्रकाशत असतो. भक्तगण स्वस्थ असतांहि नेहेमी शत्रूंचा धुव्वा कोण उडवीत असतो ? (इंद्रच)

२०. हे देवांनो आम्ही निर्जन प्रदेशांत आहोंत. विस्तृत असणारी पृथ्वी दुष्टांनाहि आनंद देते. हे बृहस्पते, तूं गाई मिळविण्याचा मार्ग दाखीव. हे इंद्रा, अशी स्तुति करणाऱ्या मला मार्ग दाखीव.

२१. इंद्रानें आपल्या घराजवळ आलेल्या एकजात काळ्या लोकांना प्रत्यहीं दुसऱ्या भागांत हकलून दिलें. त्या बलिष्ठ इंद्रानें द्रव्येच्छु दोन दास शंबर आणि वर्चिन यांना उदव्रजांत ठार केलें.

२२. हे इंद्रा, तुझी स्तुति करणाऱ्या मला प्रस्तोकानें दहा कोष आणि दहा घोडे दिले. शंबरापासून आणलेलें अतिथिग्वाचें धन दिवोदासापासून आम्ही मिळविलें.

२३. दहा घोडे, दहा कोष, दहा मूल्यवान वस्त्रें आणि दहा सोन्याचे गोळे दिवोदासाकडून मला मिळालें.

२४. ओळीनें दहा घोडे जोडलेलें रथ व शंभर गाई अथर्वांना आणि पायूला अश्वथानें दिले.

२५. सर्वश्रेष्ठ विपुल संपति मिळविणाऱ्या भरद्वाजांचा सृंजयपुत्र प्रस्तोकानें सन्मान केला.

२६. हे वनस्पतीपासून तयार केलेल्या रथा, तूं बळकट, आम्हांला साहाय्य करणारा, संरक्षक आणि उत्कर्ष करणारा हो. तुला कातड्यानें मढविलें आहे. तूं चांगला बळकट ऐस. तुझ्यांत बसणारा योद्धा शत्रूंना जिंको.

२७. द्युलोक आणि पृथ्वीपासून तुला जोम उत्पन्न केला, वनस्पतीपासून तुझ्यांत चिवटपणा उत्पन्न केला, पाण्यापासून तजेला मिळाला, चामड्यानें तुला मढवलें, तर इंद्राच्या वज्राचा भाग असणाऱ्या रथाला तुम्ही हवि द्या.

२८. जो रथ इंद्राचें वज्र, मरुतांचें सैन्य, सूर्याचा गाभा, आणि वरुणाचा निश्चल भाग आहे, हे रथा, तो तूं आमच्या बोलावण्याचा स्वीकार करून आमचे हवि गोड करून घे.

२९. हे दुंदुभे, पृथ्वी आणि द्युलोक यांना(शब्द करून) तूं धीर दे. सर्व स्थावर जंगम सृष्टीला तुझा शब्द सर्व बाजूनें ध्यानांत येवो. तूं इंद्र आणि देव यांच्यासह लांबच्या शत्रूंना पळवून लाव.

३०. हे दुंदुभे, जोरानें आवाज कर. आम्हांला ओज आणि बल दे. दुष्टांना त्रास देत तूं मोठ्यांदा गर्जना कर. आम्हांला दुःख देणारांना तूं येथून हांकून दे. तूं इंद्राची मूठ आहेस, बळकट हो.

३१. ह्यांना इकडे आण, त्या (सेनांना) परत फिरीव. दुंदुभि खुणेचा शब्द वारंवार करूं लागला आहे. हे इंद्रा, आमचे घोडेस्वार फिरूं लागले. आतां आमच्या रथी लोकांना विजय प्राप्त होवो.

---

१८ टीपः—‘एकच परमेश्वर प्रत्येक शरीरांत व्यापला आहे. ह्याचीं तीं शरीरें व्यवहारापुरती आहेत. कारण, परमेश्वरच आपल्या मायाशक्तीनें अनेक रूपानें वावरत असतो. कारण, ह्याच्याशीं संबद्ध हजारो मनोवृत्ति आहेत.’ असा वेदांतदृष्ट्या अर्थ होतो. मूळांत एकच तत्त्व असून त्यापासून नामरूपात्मक सृष्टीचा पसारा झाला हें वेदांतील तत्त्व यांत ग्राथित केलें आहे. ‘एकं सद्विप्रा बहुधा कल्पयन्ति’ पहा.

२० टीपः—या ऋचेचे चार पाद चार वेगवेगळ्या देवतांचे आहेत.

२१ टीपः—उदव्रज नांवाचा एक देश आहे असें सायणाचार्य म्हणतात. पण तो देश कोणता हें सांगतां येत नाहीं.

२२ टीपः—प्रस्तोकालाच दिवोदास, अश्वथ आणि अतिथिग्व ह्या नांवानीं संबोधण्यांत येते असें सायणाचार्य म्हणतात.

२७ टीपः—इंद्रा वृत्राय वज्रमुदयच्छत् स त्रेधा व्यभवत् वज्रस्तृतीयं रथस्तृतीयं यूपस्तृतीयमिति.

सूक्त अठ्ठेचाळिसावें.

ऋषिः—शंयु बृहस्पतिपुत्र; देवता–१–१० अग्नि, ११–१५ मरुत् किंवा १३–१५ लिंगोक्त देवता, १६–१९ पूषन, २०–२१ पृश्नि, २२ पृश्नि किंवा द्यावाभूमि; छंदः—१.३.५ बृहती, २.४ सतोबृहती, ६ महासतोबृहती, ७ महाबृहती, ८ महासतोबृहती, ९ बृहती, १० सतोबृहती, ११ ककुभ, १२ सतोबृहती, १३ पुरउष्णिह, १४ बृहती, १५ अतिजगती, १६ ककुभ, १७ सतोबृहती, १८ पुरउष्णिह, १९–२० बृहती, २१ महाबृहती, २२ अनुष्टुभ.

१. हे स्तोत्यांनो, त्या थोर अग्नीची प्रत्येक यज्ञांत

तुम्ही स्तुति करा. मी अमर आणि सर्वज्ञ अग्नीची प्रिय मित्राप्रमाणें स्तुति केली.

२. बलपुत्र अग्नीची आम्ही प्रशंसा करतों. तोहि आमच्यावर प्रेम करणारा आहे. देवांना हवि पोंचविणाऱ्या त्या अग्नीची आम्ही सेवा करावी. युद्धांत तो अग्नि आमचें संरक्षण करो व आमचा उत्कर्ष करो. तसेंच आमच्या मुलाबाळांचें तो संरक्षण करो.

३. कामपूरक, जरारहित आणि श्रेष्ठ अग्नि आपल्या तेजानें प्रकाशत आहे. हे तेजस्वी अग्ने, आपल्या अविच्छिन्न कांतीनें पुनः पुनः तळपणारा तूं उज्ज्वल कांतीनें प्रकाशित हो.

४. हे अग्ने, तूं थोर देवांना हवि पोंचवतोस. तसाच सतत पोंचीव. तुझ्या कर्तृत्वानें आणि प्रभावानें त्या सर्व देवांना आमच्याकडे आम्हाला साहाय्य करण्याकरतां वळीव.त्यांना हवि दे आणि तूंहि स्वीकार.

५. उदक,दगड आणि अरण्यें ज्या सत्यसृष्टीच्या अन्तर्भूत अग्नीला संतुष्ट करतात, जो जोरानें घर्षण केलें असतां पृथ्वीवर यज्ञभूमीवर प्रकट होतो.

६. जो अग्नि आपल्या तेजानें दोनहि द्यावापृथ्वी भरून टाकतो, जो धूरानें आकाशांत धांवतो, जो तेजस्वी व बलिष्ठ अग्नि अंधकार नाहींसा करून अंधाऱ्या रात्रीं दिसूं लागतो.

७. हे तरुण व तेजस्वी अग्निदेवा, तो निर्मळ तेजानें भरद्वाजाच्या येथें प्रज्वलित झालेला तूं मोठाल्या ज्वालांनीं संपत्तियुक्त होतसाता प्रज्वलित हो. हे शोधक अग्ने, तेजानें प्रकाशूं लाग.

८. हे अग्ने, सर्व मानव सृष्टीचा तूं गृहपति आहेस. हे अत्यंत तरुण अग्ने, प्रज्वलित करणाऱ्या मला तूं शंभर वर्षेंपर्यंत शेंकडों प्रकारें साहाय्य करून पापापासून संरक्षण कर. आणि जे स्तोत्यांना धन देतात त्याचें संरक्षण कर.

९. हे सर्वव्यापक अग्ने, तूं संरक्षणाबरोबर विपुल संपत्तिहि आम्हांस दे. कारण, दिसणाऱ्या संपत्तीचा तूं धनी आहेस.तसेंच आमच्या मुलाबाळांना सुस्थिति दे.

१०. हे अग्ने, तूं अजिंक्य आणि संहत अशा साधनांनीं आमध्या मुलाबाळांचें संरक्षण कर. देवांचा राग आणि माणसांचा दुष्टपणा आमच्यापासून दूर कर.

११. हे मित्रांनो, अश्रुतपूर्व स्तुतीनें अमृतस्राविणी धेनूला आमच्याकडे वळवा. त्या निरुपद्रवी धेनूला मोकळी सोडा.

१२. जी उत्साही आणि स्वयंप्रकाश मरुत्संघाकरतां अन्न उत्पन्न करते, जी चलाख मरुतांना सुख देणारी आहे, जी सुखसंपत्ति घेऊन धांवत येत असते,–

१३. हे मरुतांनो तिच्यापासून भरद्वाजाकरतां सर्व संपत्ति देणारी धेनु आणि विश्वपोषक अन्न अशा दोन प्रकारची संपत्ति उत्पन्न करा.

१४. हे मरुतांनो,त्या तुमची धन प्राप्त व्हावें म्हणून मी स्तुति करतो. तूं इंद्राप्रमाणें कर्तृत्ववान, वरुणाप्रमाणें चतुर, अर्यमनप्रमाणें प्रशंस्य, आणि विष्णूप्रमाणें धन देणारा आहेस.

१५. ज्यायोगें मरुत आम्हा लोकांना शंभरांनीं संपत्ति देईल, ज्या योगें मरुत मला हजारांनीं संपत्ति देईल, त्या प्रकारें बलशाली, गर्जना करणाऱ्या, तेजस्वी, पोषक आणि अजिंक्य मरुतांची मी स्तुति करतों.

१६. हे पूषन, माझ्याकडे ये. हे तेजस्विन्, चालून येणाऱ्या दुष्ट शत्रूंना त्रस्त कर. तुला ऐकूं येईल अशी तुझी प्रशंसा मी करीन.

१७. हे पूषन्, पक्ष्यांचें पोषण करणाऱ्या वनस्पतिरूप मला त्रास देऊं नकोस. दुष्ट लोकांना ठार कर. शिकार करणारा पक्षी जाळ्यांत पकडतो त्याप्रमाणें दुष्ट शत्रु आम्हाला न पकडो.

१८. न गळणाऱ्या आणि घट्ट दह्यानें रेचून भरलेल्या हंडीप्रमाणें तुझा कृपालोभ आम्हास केव्हाहि हानिकारक न होवो.

१९. हे पूषन, तूं लोकामध्यें सर्वश्रेष्ठ आहेस आणि संपत्तीनें देवांच्या बरोबरीनें आहेस. जसें तूं पूर्वी आमचें संरक्षण केलेंस त्याप्रमाणें हे पूषन, युद्धांत तूं आमच्याकडे लक्ष ठेव.

२०. हे यज्ञार्ह चलनशील मरुतांनो, देव आणि माणसांचें जें मधुर भाषण आहे त्यामुळें आम्हांला मूल्यवान संपत्ति प्राप्त होवो.

२१. ज्या मरुतांचें अद्भुत कृत्य सूर्यदेवाप्रमाणें द्युलोकांत असतें. ते तेजस्वी, यज्ञार्ह आणि मरुतांना शत्रूंना नमवणारें सामर्थ्य देतें. तेंच शत्रूंचा नाश करणारें सामर्थ्य आहे. आणि तेंच सर्वश्रेष्ठ आहे.

२२. एकदाच द्युलोक उत्पन्न झाला. भूमि उत्पन्न झाली. (मरुतांना उत्पन्न करणारे) तें पृश्नीचें दूध एकदाच उत्पन्न झालें. तसा दुसरा पदार्थ निर्माण झाला नाहीं.

---

१७. टीप—हा मंत्र श्राद्धांत माक्याकरतां म्हणतात, पण ‘ माका ’ असें लिंगाहि फार चमत्कारिक रीत्या घेतलें जातें. वास्तास्विक ‘मा काकंबीरम्’ अशी येथें पदें आहेत.

सूक्त एकूणपन्नासावें.

ऋषिः—ऋजिश्वन् भारद्वाज; देवता–विश्वेदेव; छंदः–१–१४ त्रिष्टुभ, १५ शक्करी.

१. सुकर्मा अग्नीची मी नवीन स्तोत्रें करून स्तुति करतों.तसें सुख देणाऱ्या मित्रावरुणांची मी स्तोत्रें गातों. बलशाली वरुण, मित्र आणि अग्नि आम्हाकडे येवोत आणि आमचीं स्तोत्रें ऐकोत.

२. सर्व लोकांच्या यज्ञांत प्रशंसनीय, गंभीर, द्यावापृथ्वीभर फिरणारा, स्वर्गशिशु, बलपुत्र, यज्ञप्रमुख अशा तेजस्वी अग्नीला संतुष्ट करण्याकरतां मी स्तवितों.

३. सूर्यकन्या, वेगळ्या स्वरूपाच्या, एकमेकाला घालवणाऱ्या, गमनशील आणि शोधक अशा अहोरात्री आहेत. त्यापैकीं एक सूर्ययुक्त असते आणि दुसरी नक्षत्रयुक्त असते. त्या आमचीं मननीय स्तोत्रें ऐकोत.

४. ऐश्वर्यवान, विश्ववंद्य आणि रथाला व्यापून असणाऱ्या वायूला आमचें मोठें स्तोत्र आमच्याकडे आणो. हे यज्ञार्ह वायो, तेजस्वी रथ असलेला नियुत् नांवाच्या घोड्यांना अनुसरणारा दिव्यदृष्टि वायु स्तोत्याला धनपूर्ण करो.

५. जो रथ तेजस्वी आणि केवळ इच्छेनें जोडला जाणारा आहे, हे सत्यस्वरूप नायकहो, ज्या रथानें मुलाची किंवा भक्ताची इच्छा पूर्ण करण्याकरतां तुम्ही त्याच्या घरीं जातां तो अश्वीनींचा रथ माझ्या शरीरावर आच्छादन घालो.

६. हे पर्जन्य आणि वायो, तुम्ही आकाशांतून येणारें उदक खालीं सोडा. हे स्तोत्रें ऐकणाऱ्या शहाण्या मरुतांनो, ज्याच्या स्तोत्रांनीं तुम्ही स्तविले जाता, हे जगताला स्थिति देणाऱ्यांनो, त्याला जग तुम्ही अनुकूल करा.

७. जमिनीला सुपीक करणारी वीरपोषक सुंदर सरस्वती आमचें संरक्षण करो. वेगवेगळ्या छंदांत स्तुति केल्यानें ती स्तोत्याला अजिंक्य, भक्कम आणि संरक्षक घर देवो.

८. प्रत्येक भागाचा धनी अशा पूज्य पूषनला कामनिक स्तोता स्तवीत असतो. तो पूषा आम्हाला आनंददायक आणि शिंगें सोन्यांनीं मढविलेल्या गाई देवो. तसेंच तो आमचें प्रत्येक कर्म सिद्धीला नेवो.

९. प्रथमच विभाग करणारा, यशस्वी, अन्नप्रद, कुशल हाताचा, सुबाहु, तेजस्वी, गृहस्थांना यज्ञार्ह, सहज येणारा, अशा या त्वष्ट्याला देवांना बोलावणारा तेजस्वी अग्नि हवि पोंचवो.

१०. हे स्तोत्या, जगत्पित्या परमेश्वराला ह्या स्तोत्रांनीं तूं प्रसन्न कर. त्या रुद्राला तूं दिवसा व रात्रीं प्रसन्न कर. शहाण्यांच्या प्रेरणेनें आम्ही त्या समृद्ध, थोर, सुखदायक आणि दर्शनीय अशा ईश्वराचा धांवा करतो.

११. हे नित्य तरुण,शहाण्या व यज्ञार्ह मरुतांनो, स्तोत्याच्या स्तुतीकडे तुम्ही या. आणि हे नेत्यांनो, अशा प्रकारें वाढणारे आणि सर्वव्यापक असणारे तुम्ही प्रकाशाप्रमाणें नावीक भागाकडे जा.

१२. पशुपाल संध्याकाळीं कळप लवकर हाकारतो त्याप्रमाणें बलवान आणि प्रेरक मरुतांचीं जोरानें स्तुति सुरू करा. मरुद्गण ऐकलेलीं स्तोत्रें आकाशांनीं नक्षत्रें पोटांत घेतलीं आहेत त्याप्रमाणें मनांत घेवो.

१३. ज्या विष्णूनें त्रस्त झालेल्या मनूकरतां तीनच पावलांत सर्व लोक आक्रमण केले, अशा तुझ्या कृपेनें प्राप्त झालेल्या घरांत आम्ही संपत्तीनें, मुलाबाळानें आणि शरीरानें आनंदांत असावें.

१४. ह्या स्तोत्रामुळें अहिर्बुध्न्य अग्नि तें अन्न आम्हांस देवो. पर्वत देवो आणि सवितृदेवहि आम्हास देवो. विश्वेदेव ओषधींसह तें अन्न आम्हास देवोत. आणि बुद्धिमान भगहि आम्हाला संपत्ति देवो.

१५. हे देवांनो, रथयुक्त, लोकांच्या इच्छा पूर्ण करणारें आणि वीरसमृद्धि असलेलें ऐश्वर्य आम्हास द्या. तसेंच घरहि आम्हांस द्या. तें घर यज्ञरक्षक आणि टिकावूं असावें. कारण, त्यामुळें आम्ही स्पर्धा करणाऱ्या शत्रूंचा पराभव करावा आणि तेथें आम्ही सर्व देवांची सेवा करावी.

सूक्त पन्नासावें.

ऋषिः—ऋजिश्वन्; देवता–अनेक;छंदः–त्रिष्टुभ.

१. हे देवहो, तुमची माता देवी अदिति, वरुण, मित्र आणि अग्नि यांना स्तोत्रें म्हणून सुख प्राप्त व्हावें म्हणून आम्ही बोलावतों. तसेंच शत्रुहन्त्या व सुखदायक अर्यमन्, सवितृ आणि भग यांना आणि त्रात्या देवांना स्तोत्रें म्हणून मी बोलावीत आहें.

२. हे अत्यंत तेजस्वी सूर्या, दक्षापासून उत्पन्न झालेले आणि अत्यंत प्रकाशमान असणारे देव आम्हांविषयीं प्रेमानें असावेत असें तूं करावेस. कारण, ते देव दोनहि लोकांत प्रगट होणारे, सत्यनियमांनीं वागणारे,

सत्यस्वरूप, भाग्यवान आणि अग्निजिव्ह असे आहेत.

३. हे द्यावापृथ्वीनो, तुम्ही आम्हांला उत्कृष्ट सामर्थ्य द्या. अत्यंत सुख देणाऱ्या द्यावापृथ्वी आम्हांला घर देवोत. तसेंच ज्यायोगें आम्हांला विपुल संपत्ति प्राप्त होईल तसें करा. आणि हे सर्वाधार द्यावापृथ्वीहो, आम्हांला जगांत निष्पाप करा.

४. ज्याअर्थी लहान किंवा मोठ्या युद्धांत हितेच्छेनें आम्ही मरुत देवांचा धांवा करतो त्याअर्थी सर्वव्यापक आणि सामर्थ्यवान् धांवा केलेले रुद्रपुत्र मरुत आम्हांकडे येवोत

५. ज्या मरुतांचें वर द्यावापृथ्वी तन्मय झालेली असते, भक्तांना समृद्ध करणारा पूषा ज्यांची सेवा करतो, हे मरुतांनों, ते तुम्ही आमचा धांवा ऐकून जेव्हां येतां, तेव्हां तुम्ही मार्ग चालत असतां सर्व प्राणिमात्र हदरत असतात.

६. हे स्तोत्या, त्या पराक्रमी व प्रशंसनीय इंद्राचें नवीन स्तोत्र म्हणून तूं स्तुति कर. कारण, प्रशंसा चालूं झाल्यावर तो आमचीं स्तोत्रें ऐकेलच. आणि प्रशंसनीय इंद्र आम्हांला विपुल समृद्धि देईल.

७. हे उदक देवतांनों, तुम्ही आमच्या मुलाबाळांना अखंड साहाय्य द्या आणि सुख देऊन दुःखवियुक्त करा. कारण, तुम्ही आईपेक्षांहि श्रेष्ठ औषध आहांत. सर्व स्थावर सृष्टीला तुम्हीच उत्पन्न केलें आहे.

८. जो धनवान उषेची जणूं काय मूर्तीच असा सविता दात्यांना उत्कृष्ट संपत्ति देतो. तो यजनीय आणि रक्षण करणारा सुवर्णहस्त सवितृदेव आमच्याकडे येवो.

९. हे बलपुत्र अग्ने, तूं आज आमच्या यज्ञांत देवांना आमच्याकडे आण. मी तुला धन देण्याविषयीं नेहमींच तयार असावें आणि हे अग्ने, तुझ्या कृपेनें मी मुलाबाळांनीं युक्त असावें.

१०. हे बुद्धिमान अश्विदेवांनो, सर्वप्रसिद्ध असणारे तुम्ही सेवेसह चालूं असलेलें माझें स्तोत्र ऐकून माझ्याकडे लवकर यावें. आणि महान अंधारांतून (तुरुंगांतून) तुम्ही अत्रीला सोडवलेत त्याप्रमाणें हे नायकहो, लढाईत मोठ्या दुःखांतून मला सोडवा.

११. हे देवांनो, तुम्ही आम्हांला तेजस्वी, बलशाली, मुलेबाळें असलेल्या आणि लोकांनीं चांगले म्हटलेल्या संपत्तीचे दाते व्हा. आमच्या इच्छा पूर्ण करणारे स्वर्गीय आणि पार्थिव पृश्निपुत्र मरुत आणि अन्तरिक्षांतील मरुत आम्हाला सुखी करोत.

१२. रुद्र, सरस्वती, विष्णु आणि वायु हे समर्थ असणारे देव आम्हाला सुखी करोत. ऋभु, विभु, वाज’ देवहितकारक प्रजापति, पर्जन्य आणि वात आम्हाला अन्नसमृद्ध करोत.

१३. तो सवितादेव, भग आणि योग्य धन देणारा अपांनपात आमचें संरक्षण करो. देव आणि देवपत्न्यासहित असणारा त्वष्टा, समुद्रदेवासह प्रसन्न मनानें असणारी द्यावा आणि पृथिवी आमचें संरक्षण करोत.

१४. अहिर्बुध्न्य अग्नि, अजएकपात, पृथिवी आणि समुद्र आमचें स्तोत्र ऐकोत. यज्ञानें वृद्धिंगत होणारे, धांवा केलेले, स्तुत, मंत्रानें वर्णन केलेले असे मोठ्या लोकांनीं वर्णिलेले सर्व देव आमचें संरक्षण करोत.

१५. अशी स्तुति करणाऱ्या त्या माझे पुत्र भरद्वाज स्तोत्रें म्हणून व साम गाऊन देवांची स्तुति करतात. हे यज्ञार्ह देवांनो, हवन केलेले, सर्वव्यापक आणि अजिंक्य सर्व देव व देवपत्न्या आम्हाकडून स्तुति केल्या जावोत.

सूक्त एक्कावन्नावें.

ऋषिः--ऋजिश्वन्; देवता–विश्वेदेव; छंदः—१–१२ त्रिष्टुभ्, १३–१५ उष्णिह, १६ अनुष्टुभ्.

१. मित्रावरुणांचा अदम्य आणि प्रिय असणारा प्रसिद्ध डोळा उघडला जात आहे. आदित्याचें दर्शनीय तेज उदयाला आलें असतां अन्तरिक्षाला दागिना घातल्याप्रमाणें शोभा येते.

२. जो सूर्य त्रैलोक्य जाणतो आणि ह्या देवाची गूढ उत्पति ज्या ज्ञात्याला माहीत आहे तो सूर्य लोकांची चांगलीं वाईट कृत्यें पहात सर्व जग प्रकाशित करतो आणि सामर्थ्यानें लोकांच्या इच्छा परिपूर्ण करतो.

३. हे देवांनो, थोर यज्ञसंरक्षक अशा तुमची मी स्तुति करीत आहें. अदिति, मित्र, वरुण, अर्यमन, भग आणि शुद्धप्रभव अहिंस्य कृत्यें करणारा धनयुक्त अग्नि यांची मी प्रशंसा करीत आहें.

४. देव हे दुष्टांना भयंकर, सज्जनांचे संरक्षक, मोठे सुशोभित, चांगलीं वस्त्रें देणारे आहेत तरुण बलिष्ठ, सर्वव्यापक स्वर्गांतील देवांची आणि अदितीचीहि मी उपासना करीत आहें.

५. हे पितृभूत द्युलोका, प्रेमळ पृथ्वीमाते, बंधो अग्ने आणि हे वसूंनो, तुम्ही आम्हाला सुखी करा. हे

सर्व आदित्यांनो आणि अदिते, एक विचारानें तुम्ही आम्हाला अत्यंत सुख द्या.

६. हे यज्ञार्ह देवांनो, तुम्हीं लांडगा किंवा लांडगीं किंवा अशा उपद्रव देणाऱ्या दुष्टांच्या स्वाधीन आम्हांला करूं नका. तुम्हीच आमच्या शरीराचे नेते व्हा. आमच्या वक्तृत्वाचे आणि चातुर्याचे तुम्हीच धनी आहांत.

७. हे देवांनो, दुसऱ्याच्या पातकाचें फळ भोगण्याचा प्रसंग आम्हा भक्तावर येऊं नये. हे वसूंनो, जें कर्म आम्हांला त्रासदाक होईल तें कर्म आमच्या हातून होऊं नये. हे सर्व देवांनो, तुम्ही सर्व जगाचे धनी आहांत म्हणून आमचा शत्रु आपला आपण नाश करून घेवो.

८. देवाला केलेला नमस्कारच अत्यंत श्रेष्ठ आहे म्हणून मी नमस्कार करतों. नमस्कारच द्यावापृथ्वींचें धारण करतो. मी देवांना नमस्कार करतों. ह्या देवांना केलेला नमस्कार समर्थ आहे. प्रत्यक्ष आचरलेलें पापहि नमस्कारानें नाहींसे होतें.

९. हे यज्ञार्ह देवांनो, सनातन धर्माचे रथी, शुद्धसामर्थ्य, यज्ञगृहांत राहणारे, अपराजित, व्यापक दृष्टि, नेत्या अशा त्या सर्व थोर देवांना मी नमस्कार करतों.

१०. ते देव तेजानें अत्यंत उत्कृष्ट आहेत. ते आम्हाला सर्व पापांच्या पार नेतात. कारण, वरुण, मित्र व अग्नि हे देव बलशाली सत्यकर्मे व उत्कृष्ट स्तोत्रांत यथातथ्य वर्णन केले जातात.

११. इंद्र, पृथिवी, पूषन, भग, अदिति आणि पांच जातीचे लोक आमच्या भूमीची अभिवृद्धि करोत. ते आम्हाला चांगले सुख देणारे, उत्कृष्ट अन्न देणारे, चांगल्या वस्तु देणार, संरक्षण करणारे आणि शत्रुनिरोधक असे होवोत.

१२. हे देवांनो, तुमचें दिव्य स्थान आम्हास प्राप्त होवो. स्तुति करणारा भरद्वाज तुमच्या अनुग्रहबुद्धीची मागणी करीत आहे. बसलेल्या दुसऱ्या भक्तासह भक्त लोक द्रव्येच्छेनें देवांच्या संघाचें वर्णन करीत आहेत.

१३. हे अग्ने, तूं घातक, पापिष्ठ व दुष्टबुद्धीच्या शत्रूला दूर हकलून दे. हे सज्जनसंरक्षका, आम्हाला सुखी कर.

१४. हे सोमा, आमचे सोम कुटण्याचे धोंडे तुमच्या मैत्रीची इच्छा करीत आहेत. तूं लुबाडणाऱ्या पणीला ठार कर. कारण, तो अगदीं लांडगा आहे.

१५. हे दानशील देवांनो, इंद्रप्रमुख असे तेजस्वी देव समर्थ आहेत. तुम्ही मार्गांत आणि घरीं आमचें सारखें रक्षण करावेंत.

१६. ज्या मार्गानें गेले असतां दुष्ट लोक टाळले जातात आणि संपत्ति मिळते तो सुखानें जातां येणारा आणि निष्पाप मार्ग आम्हाला प्राप्त व्हावा.

सूक्त बावन्नावें.

ऋषिः—ऋजिश्वन; देवता—विश्वेदेव; छन्दः—१-६ त्रिष्टुभ, ७-१२ गायत्री १३ त्रिष्टुभ, १४ जगती, १५-१७ त्रिष्टुभ.

१. अतियाजाच्या त्या यज्ञांत देव किंवा लोक आले असतील असें मला वाटत नाहीं. माझ्या यज्ञासारखा त्याचा यज्ञ नाहीं. आणि माझ्या कर्तृत्वासारखें त्याला कर्तृत्व नाहीं. त्याचा मोठमोठाले पर्वत नाश करोत आणि अतियाजाचा पुरोहित हीन दशेला जावो

२. हे मरुतांनो, जो मनुष्य मी मोठा आहे असें मानतो आणि जो आम्हीं केलेल्या स्तुतीची निंदा करूं इच्छितों त्यांना तुमचें तेज त्रासदायक होवो. त्या स्तोत्रद्वेष्ट्या पुरुषाला सूर्य जाळून टाको.

३. हे सोमा, तुला स्तोत्यांचे संरक्षक म्हणतात ना ? तसेंच तुलाच दुष्टांच्या शिव्याशापापासून बचाव करणारा म्हणतात ना ? मग आमची निंदा तुला कशी पहावते ? मग ब्रह्मद्वेष्ट्यावर तूं आपलें तीक्ष्ण शस्त्र फेक.

४. उदय पावणाऱ्या उषा माझें संरक्षण करोत. दुथडी भरलेल्या नद्या माझें संरक्षण करोत. अढळ पर्वत माझें संरक्षण करोत. यज्ञांत पितर माझें संरक्षण करोत.

५. हे देवांनो, आम्ही नेहेमीं प्रसन्न मनानें असावें आणि उगवत्या सूर्याला पहात असावें. धनवानांतला धनवान देवांना आम्हांकडे साहाय्य करण्याकरतां घेऊन येणारा अग्नि आम्हाला वरीलप्रमाणें करो.

६. इंद्र साहाय्य करण्याकरतां धांवत आम्हाला येऊन मिळो. उदकानें फोंफावलेली सरस्वती येवो. ओषधीसहित पर्जन्य आम्हाला सुख देणारा होवो. अग्नि पित्याप्रमाणें सहज बोलावता येणारा आणि पूज्य असो.

७. विश्वेदेवांनो, या. माझें हें स्तोत्र ऐका. आणि या दर्भासनावर बसा.

८. हे देवांनो, जो तुम्हाला घृतयुक्त आहुति देतो त्याच्याकडे तुम्ही जा.

९. अमरदेवाचे पुत्र देव आमचीं स्तोत्रें ऐकोत आणि आम्हाला सुख देणारे होवोत.

१०. यज्ञानें उत्कर्ष पावणारे आणि वेळोवेळीं आमचीं स्तोत्रें ऐकणारे विश्वेदेव योग्य रीतीनें अर्पण केलेलें दूध सेवन करोत.

११. मरुतांच्या सहित असणारा इंद्र आणि त्वष्ट्यासहित मित्र, व अर्यमा आमचे हे हवि स्वीकारोत.

१२. हे देवांना बोलावणाऱ्या अग्ने, देवसंघांना ओळखणारा तूं आमच्या यज्ञांत योग्यतेनुसार देवतांना हवि पोंचीव.

१३. हे विश्वेदेवांनो, तुम्ही आमचा हा धांवा ऐका. तुम्हांपैकीं जे अन्तरिक्षांत असतील, जे द्युलोकांत असतील, जे अग्निजिव्ह असतील किंवा यज्ञार्ह असतील ते सर्व तुम्ही ह्या दर्भावर बसून तृप्त व्हा.

१४. यज्ञार्ह विश्वेदेव आमचें मननीय स्तोत्र ऐकोत. दोनहि द्यावापृथ्वी आणि अपांनपात आमचीं स्तोत्रें श्रवण करोत. हे देवांनो, तुम्हांला न आवडणारे शब्द आमच्या तोंडून बाहेर न पडोत. आम्ही तुम्ही दिलेल्या सुखामध्येंच रहावें.

१५. अतिश्रेष्ठ आहिप्रज्ञ असे जे कोणी देव पृथ्वीवर प्रगट झाले आहेत आणि जे कोणी द्युलोकापासून उत्पन्न झाले आहेत आणि जे अन्तरिक्षांत आहेत ते सर्व मुलाबाळासहित आम्हाला पूर्णायुष्य, आणि रात्र व दिवस (सुखाचे) देवोत.

१६. हे अग्नि व पर्जन्य देवतांनो, माझ्या यज्ञकर्माचें संरक्षण करा. हे भक्तसुलभ देवांनो, माझ्या मनःपूर्वक केलेल्या स्तुतीवर लक्ष ठेवा. तुमच्यापैकीं एक अन्न उत्पन्न करतो, दुसरा गर्भधारण करतो. तर मला संततिसहित धान्यसमृद्धि द्या.

१७. हे विश्वेदेवांनो, तुमची मी पसरलेल्या दर्भावर आणि प्रज्वलित अग्नीवर उत्तम सूक्तें म्हणून आणि नमस्कार करून सेवा करीत आहें. हे यज्ञार्ह देवांनो, ह्या आमच्या यज्ञांत हवि देऊन तुम्ही आम्हाला तृप्त करा.

सूक्त त्रेपन्नावें.

ऋषिः--भरद्वाज; देवता--पूषन; छंदः--८ अनुष्टुभ, अवशिष्ट गायत्री.

१. हे मार्गरक्षक पूषन, आम्ही अन्न मिळविण्याकरतां रथ जोडावा त्याप्रमाणें यज्ञकर्माशीं तुला जोडीत आहोंत.

२. हे पूषन तूं आम्हाला अशा यजमानाकडे पोंचीव कीं जो दारिद्र्य नष्ट करणारें उत्कृष्ट प्रकारचं लोकहितकारक धन आम्हांस देईल.

३. हे तेजस्वी पूषन, अत्यंत कवडीचुंबकालाहि तूं दानप्रवृत्त कर. पणींच्याहि मनाला तूं मऊ कर.

४. हे उग्र पूषन, संपत्ति मिळण्याचे मार्ग तूं शोधून काढ. दुष्टांना ठार कर. तशींच आमचीं कृत्यें सिद्धीस जावोत.

५. हे महाज्ञानी पूषन, कंजूष लोकांच्या हृदयाला अंकुशानें तूं टोंचणी लाव. आणि त्यांना आमच्या स्वाधीन कर.

६. हे पूषन, आरानें पणींच्या हृदयाला टोंचून तूं त्रास दे. आणि त्यांना आमच्या स्वाधीन कर.

७. हे ज्ञानी पूषन, तूं पणींचीं अंतःकरणें पोखर. आणि तीं आमच्या स्वाधीन कर.

८. हे तेजस्वी पूषन, जी अन्नदाती आरा (अंकुश) तुझ्या हातांत तूं धरतोस तिनें तूं कंजूष लोकांचीं हृदयें पोखर आणि पोकळ कर.

९. हे तेजस्वी पूषन, तुझा अंकुश कातड्याची म्यान असलेला आणि पशुसंपत्ति देणारा आहे. तिच्यापासून आम्ही सुखाची मागणी करतों.

१०. हे पूषन, ऐश्वर्य प्राप्त व्हावें म्हणून गाईबैल, घोडे आणि संपत्ति देणारें कृत्य त्वा करावेंस.

सूक्त चोपन्नावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—पूषन; छंदः—गायत्री.

१. हे पूषन, जो प्रामाणिकपणानें हें (धन) येथें आहे असें सांगतो त्या विद्वानाशीं आमची गांठ घाल.

२. जो आम्हाला (हरवलेल्या पशूंचीं)घरें दाखवतो आणि हींच तीं असें सांगतो त्या माणसाशीं पूषनच्या कृपेनें आमची गांठ पडो.

३. पूषनचें चक्र मोडत नाहीं, तुंबा निखळत नाहीं आणि ह्याची धार बोथट होत नाहीं.

४. जो भक्त हवि देऊन पूषनची सेवा करतो.

त्याचें पूषा थोडेंहि नुकसान करीत नाहीं. तो भक्तच आधीं संपत्ति मिळवितो.

५. पूषा (रक्षणाकरतां) गाईच्या पाठोपाठ जावो. पूषन देव घोड्याचें संरक्षण करो आणि आम्हांला संपत्ति देवो.

६. हे पूषन, सोमरस तयार करणाऱ्या भक्तांच्या गाईचें तूं अनुसरण कर. तसेंच स्तुति करणाऱ्या आम्हां भक्तांचेंहि तूं अनुसरण कर.

७. हे पूषन, आमच्या गोधनाचा कोणी नाश करूं नये आणि तें नष्ट होऊंहि नये. त्या विहिरींत पडून नष्ट होऊं नयेत. सुरक्षित गाईसह तूं ये.

८. आमचीं स्तोत्रें ऐकणाऱ्या, सर्वांवर सत्ता चालवणाऱ्या अखंड संपत्तिमान पूषनला आम्ही संपत्ति मागत आहोंत.

९. हे पूषन तुझी सेवा करणाऱ्या आमचा कधीं नाश न होवो. आम्ही तुझे स्तुति करणारे भक्त आहोंत

१०. पूषन देव आपला उजवा हात आडवा घालो आणि नष्ट झालेलें गोधन परत आणो.

सूक्त पंचावन्नावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—पूषन; छंदः—गायत्री.

१. हे प्रजापतिपुत्र तेजस्वी पूषन, तूं आम्हांकडे ये. आपण एकत्र होऊं या. तूं आमच्या यज्ञाचा नेता हो.

२. अतिशय वेगवान जटाधारी, विपुल संपत्तीचा अधिपति अशा मित्रभूत पूषाला आम्ही संपत्ति मागत आहोंत.

३. हे तेजस्वी पूषन, तूं संपत्तीचा प्रवाह आहेस. मेंढे रथाला जुंपलेल्या पूषन, तूं संपत्तीचा ढीग आहेस आणि स्तुति करणारांचा मित्र आहेस.

४. मेंढ्या घोडे असलेल्या बलिष्ठ पूषनची आम्ही स्तुति करीत आहोंत. त्या पूषनलाच उषेचा जार असें म्हणतात.

५. मातृभूत रात्रीच्या जाराची मी स्तुति करीत आहे. बहिणीचा (उषेचा) जार पूषा आमचीं स्तोत्रें ऐको. इंद्राचा भाऊ पूषा माझा मित्र असो.

६. रथाला जोडलेले मेंढे स्तोत्यांच्या आश्रयभूत असणाऱ्या पूषन देवाला रथांत घेऊन येवोत.

सूक्त छप्पन्नावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–पूषन् ; छंदः–१–५ गायत्री ६ अनुष्टुभ.

१. जो करंभ भक्षण करणारा भक्त पूषनची स्तुति करतो त्याच्याकडून दुसऱ्या कोणाहि देवाची स्तुति केली जात नाहीं

२. तो महारथी आणि सज्जनसंरक्षक इंद्र मित्रभूत पूषनच्या साहाय्यानें शत्रूंना ठार करतो.

३. वीरशिरोमणि व सर्वप्रेरक अशा पूषननें खडबडीत आकाशांतून सूर्याच्या रथाचें सुवर्णमय चाक जोरानें बाहेर काढलें.

४. हे अनेकांनीं स्तविलेल्या, ज्ञानमय आणि दर्शनीय पूषन्, ज्या उद्देशानें आम्ही तुझी स्तुति करीत आहोंत तें उत्कृष्ट धन आम्हांस दे.

५. हे पूषन, आम्हाला धन प्राप्त व्हावें म्हणून गाई इच्छिणाऱ्या मनुष्यसंघावर तूं कृपा कर. हे पूषन, तुझी लांबवर प्रसिद्धी आहे.

६. हे पूषन, कल्याण कर. तुझी पापाचें उच्चाटन करणारी कृपादृष्टि नेहमीं कल्याण व्हावें म्हणून आम्ही मागत आहोंत.

सूक्त सत्तावन्नावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–इंद्र व पूषन; छन्दः—गायत्री.

१. हे इंद्रापूषनहो, आम्ही तुमचें सुखप्रद सख्य प्राप्त व्हावें आणि बलप्राप्ति व्हावी म्हणून स्तुति करीत आहोंत.

२. दोन फलकावर पिळलेला रस पिण्याकरतां तुम्हापैकीं एक येतो. आणि दुसरा करंभ भक्षण करण्याची इच्छा करतो.

३. एकाचे घोडे बोकड आहेत. दुसऱ्याचे बलिष्ठ घोडे आहेत. त्यांच्या साहाय्यानें तो शत्रू ठार करतो.

४. जेव्हां बलिष्ठ इंद्र विपुल व वहातें उदक पृथ्वीवर आणतो तेव्हां पूषनदेव इंद्राला साहाय्य करतो.

५. पूषनच्या आणि इंद्राच्या कृपेवर आम्ही झाडाच्या फांदीप्रमाणें अवलंबून आहोंत.

६. सारथि लगाम खेचतो त्याप्रमाणें पूषन व इंद्र यांना आमच्या अत्यंत कल्याणाकरतां आम्ही आपल्याकडे खेचतों आहोंत.

सूक्त अठ्ठावन्नावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–पूषन; छंदः—१–३ त्रिष्टुभ, ४ जगती.

१. हे पूषन, तझें रूप एक स्वच्छ (दिवस) आहे. आणि दुसरें केवळ पूजनीय (रात्रि) आहे असा तूं रात्र व दिवसात्मक विषमरूप आहेस. तूं सूर्यासारखा तेजस्वी आहेस. हे अन्नयुक्त पूषन, तूं सर्व प्रकारच्या क्लृप्त्या जाणतोस. तुझी कल्याणकारक देणगी येथें आम्हाला प्राप्त होवो.

२ अज हेच त्याचे घोडे आहेत. तो पशूंचें पालन करणारा, अन्नसमृद्ध आणि बुद्धीला प्रेरणा देणारा आहे. सर्व जगावर त्याचीच प्रेरणा असते. तो पूषा आपला तळपणारा अंकुश परजीत सर्व जग निरखून पहात जात असतो.

३. हे पूषन्, तुझ्या ज्या सुवर्णमय नौका अन्तरिक्षासारख्या विस्तृत समुद्रांत संचार करीत असतात त्या नौकांनीं तूं सूर्याचें दौत्य करण्यास जातोस. कीर्ति इच्छिणाऱ्यानें तुला ताब्यांत घेतलें आहे.

४. देवांनीं ज्या पूषनला सूर्येच्या ताब्यांत दिलें आणि इच्छेप्रमाणें उत्कृष्ट पराक्रम गाजविले तो पूषन द्यावापृथ्वीचा बांधव आहे आणि अन्नधनसमृद्ध असून अत्यंत देखणा आहे.

---

३. टीपः—देवांसह सूर्य असुरवधार्थ गेला असतां त्याच्या बायकोस नवऱ्याविषयीं उत्कण्ठा उत्पन्न झाली तेव्हां सूर्यानें पूषन्ला तिच्याकडे पाठवलें. त्यावेळीं सूर्य पूषन्चीं स्तुति करीत आहे ती ह्या ऋचेंत आहे.

सूक्त एकूणसाठावें.

ऋषिः:—भरद्वाज; देवता—इंद्राग्नि; छंद–१–६ बृहती, ७–१० त्रिष्टुभ्.

१. हे इंद्राग्नीनो, तुम्ही जे पराक्रम केले आहेत ते पराक्रम सोमरस तयार करून आमच्या येथें वर्णन केले जात आहेत. देवांच्या विरुद्ध असणाऱ्या दुष्ट लोकांना तुम्ही ठार केलेंत आणि सुरक्षित झालांत.

२. हे इंद्राग्नीहो, तुमचा हा महिमा सत्य आहे. अत्यंत प्रशंसनीय असा तुमचा जनकहि एकच आहे. म्हणून तुम्ही जुळे भाऊ आहांत आणि तुमची आई सर्वत्र पसरलेली (पृथ्वी) आहे.

३. हे इंद्राग्नीनो, चलाख घोडे जसे खाण्याला एकत्र होतात तसें सोम पिळल्यावर तुम्ही एकत्र व्हा. हे इंद्राग्नी देवांनो, वज्रधारी अशा तुम्हाला साहाय्य करण्याकरतां आम्ही बोलावीत आहोंत.

४. हे यज्ञानें वृद्धिंगत होणारे इंद्राग्नीनो, सोमरस देऊन जो तुमचें स्तवन करतो त्याच्याशीं तुम्ही संतोषकर भाषा बोलता, हे वज्रांचे हवि स्वीकारणाऱ्या देवांनो, तुम्ही त्याचा नाश करीत नाहीं.

५. हे इंद्राग्नी देवांनो, तुमचें हें कृत्य कोण जाणं शकेल? अनिरुद्धपणें धांवणाऱ्या घोड्यांना तुमच्या रथाला जोडून तुम्हांपैकीं एक जात आहे.

६. हे इंद्राग्नीनो, पादरहित असणारी ही उषा प्रथम लोकांच्याकडे जाते. डोक्याला प्रेरणा देऊन जिव्हेनें स्तुति करावयास लावते आणि तीस पावलें (एक दिवस) पुढें जाते.

७. हे इंद्राग्नीनो, योध्यांनीं दोनहि हातांत धनुष्यें सज्ज केलीं आहेत. तुम्ही ह्या महायुद्धांत गाई मिळविण्यासाठीं आम्हांला सोडूं नका.

८. हे इंद्राग्नीनो, चालून येणाऱ्या दुष्ट शत्रुसेना मला त्रास देत आहेत. त्यांना दूर कर. सूर्यापासून त्यांना वियुक्त कर. (मार)

९. हे इंद्राग्नीनो, स्वर्गीय आणि पार्थिव सर्व संपत्ति तुझीच आहे. येथें आम्हांला सर्व आयुष्यभर पोषण करणारें धन तुम्ही द्या.

१० हे स्तोत्रांनीं बोलावले जाणारे आणि धांवा ऐकणारे इंद्राग्नीहो, सर्व प्रकारचीं स्तोत्रें आणि गाणीं ऐकून तुम्ही आमचा सोम पिण्याकरतां या.

४.टीपः—निरुक्ताप्रमाणें होणारा अर्थ–हे इंद्राग्नीनो, सोम पिळल्यावर जो तुमची स्तुति करतो त्याचा सोम तुम्ही स्वीकारतां. आणि यज्ञभोक्ते देवांनो, जे तुमचा जप करित राहतात त्यांचा तुम्ही हवि भक्षण करीत नाहीं. सायणाचार्यांचा अर्थ यापेक्षांहि वेगळा आहे.

सूक्त साठावें.

ऋषिः–भरद्वाज; देवता-इंद्राग्नी; छंदः–१–३ त्रिष्टुभ्, ४–१२ गायत्री, १३ त्रिष्टुभ्, १४ बृहती; १५ अनुष्टुभ्.

१. जो मनुष्य शत्रुहिंसक इंद्राग्नीची सेवा करतो, तो शत्रूंना ठार करतो आणि संपत्ति मिळवतो. ते इंद्राग्नी विपुल संपत्तीचे ईश्वर, सामर्थ्यानें शत्रूला पराभूत करणारे, आणि संपत्ति देऊं इच्छिणारे असे आहेत.

२. हे इंद्राग्नीनो, प्रसिद्ध अशा तुम्ही गाई, उदक, उषा आणि सूर्य यांकरतां युद्ध केलेंत. हे इंद्रा, तूं दिशा, सूर्य, उषा, आश्चर्यकारक उदक आणि गाई ह्या लोकीं आणल्यास. हे अग्ने, नियुत नांवाचे घोडे रथाला जोडलेल्या तूंहि हेच केलेंस.

३. हे वृत्रहन्त्या इंद्राग्नीनो, वृत्रहनन करणाऱ्या सामर्थ्यासह आणि अन्नासह तूं आमच्याकडे ये. हे इंद्रा व अग्ने, तुम्ही उत्कृष्ट प्रकारची विपुल संपति घेऊन आमच्याकडे या.

४. ज्या इंद्राग्नींनीं पूर्वी केलेलें हे सर्व विश्व स्तोत्याकडून वर्णन केलें जातें, त्या इंद्राग्नीना मी बोलावतों. ते इंद्राग्नी स्तोत्यांचें संरक्षण करतात.

५. उग्र शत्रूंचा संहार करणाऱ्या इंद्राग्नीला आम्ही बोलावतों. ते अशा लढाईत आमचें संरक्षण करोत.

६. सज्जनांचें संरक्षण करणारे आणि आर्यांचे अभिमानी असणारे तुम्ही शत्रूंना ठार करा, दासांचा धुव्वा उडवा आणि सर्व द्वेष्ट्यांना नाहींसे करा.

७. हे इंद्राग्नीनो, तुमची हे स्तोते स्तुति करतात. हे सुखदात्यांनो, पिळलेला सोम तुम्ही प्या.

८. हे नेते इंद्राग्नीनो, तुमचे स्पृहणीय, भक्ताकरतांच उत्पन्न झालेले नियुत नांवाचे घोडे आहेत त्या घोड्यांनीं तुम्ही या.

९. हे नेते इंद्राग्नीनो, ह्या सोम यज्ञांत सोम पिण्याकरतां नियुत घोड्यांनीं तुम्ही यावें.

१०. हे स्तोत्या, जो अग्नि आपल्या ज्वालांनीं सर्व अरण्याला वेष्टित करतो आणि जिव्हारूपी ज्वालांनीं कृष्णवर्ण करतो त्या अग्नीची तूं स्तुति कर.

११. जो भक्त प्रज्वलित अग्नींत इंद्राला हवि देतो त्या भक्ताच्या उत्कर्षाकरतां सहज तरून जातां येणारें उदक तो देतो.

१२. हे इंद्राग्नीनो, इंद्राग्नीना हवि देण्याकरतां वलशाली अन्न व शीघ्रगामी घोडे तुम्ही आम्हाला द्या.

१३. हे इंद्राग्नीनो, ह्या इंद्राग्नीना हवन करण्याकरतां आणि दोघांना अन्न देऊन एकदम तृप्त करण्याकरतां मी बोलावीत आहें. कारण ते दोघं अन्न व संपत्ति देणारे आहेत. त्या दोघांना बल देण्याकरतां मी बोलावीत आहें.

१४. हे इंद्राग्नींनो, तुम्ही गाईबैल घोडे आणि संपति घेऊन या. त्या कल्याणकारक असणाऱ्या मित्रभूत इंद्राग्नींना आम्ही बोलावीत आहोंत.

१५. हे इंद्राग्नीनो, ह्या यजमानाचें स्तोत्र ऐका. त्याच्या हविर्द्रव्याची इच्छा करा. आणि येऊन तृप्त मधुर सोम प्या.

सूक्त एकसष्टावें.

ऋषिः--भरद्वाज; देवता-सरस्वती; छंदः—१-३.१३ जगती, १४ त्रिष्टुभ, अवशिष्ट गायत्री.

१. ही सरस्वती नदी दात्या वध्यश्वाला तल्लख आणि ऋणापकर्ता दिवोदासपुत्र देती झाली. हे सरस्वति, जिनें अत्यंत आपमतलबी पणींना ठार केलें त्या तुझ्या ह्या देणग्या मोठ्या आहेत.

२. कमलाचें मूळ उपटणाऱ्याप्रमाणें सरस्वती आपल्या सामर्थ्यांनीं आणि महत्तर लाटांनीं पर्वताचे कडे फोडून टाकते. दुरूनहि आघात करणाऱ्या सरस्वतीचीं उत्कृष्ट स्तोत्रें म्हणून आणि ध्यान करून आम्ही सेवा करूं.

३. हे सरस्वति, देवांच्या निंदकांना तूं ठार कर. तसेंच व्यापक आणि कपटी बृसयाच्या—त्वष्ट्याच्या मुलाला—वृत्राला तूं ठार कर. हे अन्नयुक्त देवते तूं लोकांच्या करतां पृथ्वी मिळविलीस आणि ह्यांच्याकरतां उदक वहावलेंस.

४. अन्नसमृद्ध आणि स्तोत्यांचें संरक्षण करणारी सरस्वती देवी अन्न देऊन आमचें संरक्षण करो.

५. हे सरस्वति देवि, युद्ध सुरू झालें असतां वृत्राला ठार करण्याकरतां इंद्राला बोलावतात त्याप्रमाणें जे तला बोलावतात त्याचें तूं संरक्षण कर.

६. हे समृद्ध सरस्वति देवि, युद्धामध्यें तूं आमचें संरक्षण कर. पूषन प्रमाणें तूं आम्हांस धन दे.

७. ती शत्रूंना भयंकर असणारी शत्रुहंत्री आणि सोनेरी रथाच्या धावा असलेली सरस्वती देवी आमच्या सुंदर स्तोत्राची इच्छा करो.

८. ज्या सरस्वतीचें सामर्थ्य अपरिमित आणि अजिंक्य आहे, जी तेजस्वी, प्रसरणशील आणि उदक पूर्ण अशी खळखळत जाते.

९. ती सरस्वती आमच्या सर्व द्वेष्ट्यांना दूर करो. दुसऱ्या नद्या आणि उदकयुक्त ही नदी सूर्य दिवसांचें आतिक्रमण करतो त्याप्रमाणें शत्रूंचें आतिक्रमण करो.

१०. सर्व आवडत्यांतली आवडती, सात नद्यांची बहीण आणि पुरातन ऋषींनीं सेवलेली सरस्वती आम्हालाहि प्रशंसनीय आहे.

११. पृथ्वीवरील सर्व भाग आणि अन्तरिक्ष यांना व्यापून असणारी सरस्वती देवी निंदकापासून माझें संरक्षण करो.

१२. त्रैलोक्यांत असणाऱ्या तुझें तत्त्व सात प्रकारचें असूनहि पांचहि जातींचा उत्कर्ष करणाऱ्या तुझा प्रत्येक युद्धांत धांवा केला जातो.

१३. जी दुसऱ्या वेगवानांतली वेगवान, रथाप्रमाणें वेगानें अत्यंत थोर अशी निर्माण झालेली सरस्वती ज्ञात्या स्तोत्यांना प्रशंसनीय अशी आहे, ती माहात्म्यानें, तेजानें, आणि समृद्धीनें सर्व नद्यांत श्रेष्ठ म्हणून ओळखली जाते.

१४. हे सरस्वति, आम्हांला विपुल संपत्ति दे. हीनतेला नेऊं नकोस. उदकानें आम्हांला त्रास देऊं नकोस. आमचें सख्य आणि तुझ्यांतील प्रवेशाचा तूं स्वीकार कर. आम्ही तुझ्यापासून निकृष्ट शेती प्राप्त करणार नाहीं.

सूक्त बासष्टावें.

ऋषिः—भरद्वाज बार्हस्पत्य; देवता–अश्विनौ; छन्दः–त्रिष्टुभ.

१. द्युलोकाचे नायक आणि ह्या लोकांचे ईश्वर अशा अश्विनींची स्तोत्र म्हणून मी स्तुति करीत आहें. कारण, ते शत्रूंचें निवारण करणारे आणि उषा आल्यावर पृथ्वीच्या अन्तापर्यंत असलेला अंधार नाहींसा करून टाकणारे आहेत.

२. यज्ञाकडे निघालेले आश्विदेव आपल्या निर्मळ कांतीनें रथांच्या शोभेंत भर टाकतात. आणि आपलें अपरिमित तेज प्रगट करीत पाण्याची भरभराट व्हावी म्हणून निर्मल प्रदेशाकडे जाण्याकरतां घोडे हाकारतात.

३. जें दरिद्री घर आहे तिकडे तुम्ही (समृद्धि करण्याकरतां) जातां ह्याप्रमाणेंच स्तोत्याकडे तुम्ही नेहेमीं भक्तेच्छु आणि मनोजव घोड्यांनीं नेले जातां. आणि दात्या भक्तांचा शत्रु तुम्ही ठार करतां.

४. अत्यंत नवीन स्तोत्रें करणाऱ्या भक्तांच्या स्तोत्राकडे घोडे जोडून आणि उत्कृष्ट अन्न व पोषक रस घेऊन तुम्ही या. नित्य तरुण आश्विदेवांना प्रेमळ व प्राचीन अग्नि संतुष्ट करो.

५. जे स्तोत्रें म्हणणाऱ्याचें आणि सामगायन करणारांचें कल्याण करतात. त्या आश्चर्यकारक संपत्ति देणाऱ्या, अत्यंत समर्थ, प्राचीन आणि दर्शनीय आश्विदेवांची अत्यंत नवीन स्तोत्रें करून मी सेवा करतों.

६. तुग्रपुत्र भुज्यूचें संरक्षण करणाऱ्या तुम्ही निर्मळ आकाश मार्गानीं लांबलचक वल्ह्यांनीं त्याला पाण्यांतून बाहेर काढलेत.

७. हे रथारूढ आश्विनो, तुम्ही आपल्या रथानें पर्वत फोडलेत. हे कामपूरकांनो, (पुत्रेच्छु) वध्रिमतीचा धांवा ऐकलात. उदार असणाऱ्या शयूची वांझ गाय वीती केलीत. अशा प्रकारें भक्ताच्याकडे जाणारे तुम्ही आमचें पोषण करा.

८. हे द्यावापृथ्वी, आदित्य, वसु आणि मरुतांनो, भक्त जनांवर देवांचा जो अत्यंत राग असेल तो त्रासदायक क्रोध राक्षसांच्या मुख्यावर करून त्याला ठार करा.

९. जो मनुष्य सकल लोकांचे अश्वीश्वर अशा अश्वींची सेवा करतो त्याला मित्र व वरुण ध्यानांत धरतात. तो आपलें शस्त्र बलिष्ठ राक्षसावर टाकतो व द्वेष्ट्या मनुष्याच्या भाषणावरहि आपलें शस्त्र टाकतो.

१०. हे आश्विहो, उत्कृष्ट चाकें लावलेल्या, चकचकीत व सारथियुक्त रथानें तुम्ही मुलगा देण्याकरतां आमच्या घरीं या. आणि मनांतील रागानें लोकांच्या शत्रूंचीहि डोकीं तोडा.

११. हे आश्विहो, उत्तम, मध्यम आणि कनिष्ठ अशा सर्व प्रकारच्या घोड्यांच्या साहाय्यानें तुम्ही आमच्याकडे या. बळकट असणारीहि गाईंनीं भरलेल्या गौळवाड्याचीं द्वारें मोकळी करा आणि स्तुति करणाऱ्या मला आश्चर्यकारक धन द्या.

सूक्त तेसष्टावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–अश्विन छंदः—त्रिष्टुभ.

१. जीं स्तोत्रें आश्विनींना आमच्याकडे वळवतात तीं कुठेंहि असलेल्या, व अनेकांनीं स्तविलेल्या मनोहर अश्वींना हविर्युक्त होऊन एखाद्या दूताप्रमाणें शोधून काढतील. कारण हे आश्विदेवानो, ह्या स्तोत्यांचीं स्तोत्रें तुम्हाला फार प्रिय आहेत.

२. हे स्तुत्य अश्वीनो, माझ्या स्तुतीनें संतुष्ट होऊन तुम्ही या आणि सोम प्या. तुम्ही आल्यामुळें दूरचा किंवा जवळचा कोणीहि शत्रु त्या घराचा नाश करूं शकणार नाहीं.

३. तुम्हाकरतां सोमयागांतील सर्व कृत्यें केलीं आहेत. मऊ दर्भ पसरले आहेत. तुमचा भक्त हात जोडून स्तुति करीत आहे. तुम्हांकरतां मारवलेले दगड सोमरस काढीत आहेत.

४. जो अत्यंत उत्सुक मनानें सत्यस्वरूप अश्वींच्या स्तोत्याकडे जाण्यास उद्युक्त झाला आहे. तो तुमचा अग्नि यज्ञांत प्रदीप्त झाला आणि दिला जाणारा घृतपूर्ण हवि स्वीकारूं लागला.

५. हे उदार अश्वीनो, सूर्यकन्येनें आश्रयाकरतां तुमच्या सुरक्षित रथ वर आरोहण केलें. हे कुशल व नृत्यशील देवांनो, आपल्या कौशल्यानें यज्ञांतील देवांना येथें आणण्यास तुम्ही समर्थ आहांत.

६. हे अश्वीनो, तुम्ही आपल्या उत्कृष्ट शोभेनें सूर्याच्या शोभेंत भर टाकता. तुमच्या घोड्यांनीं इकडे येण्याकरतां उडी मारली. हे स्तुत्य अश्विहो, तुमची उत्कृष्ट स्तोत्रानें स्तुति होऊं लागली.

७. हे सत्यस्वरूप अश्वीहो, तुमचे वाहून नेणारे चलाख घोडे अन्न वाहून नेवोत. तुमचा मनोवेगानें धांवणारा रथ विपुल व स्पृहणीय अन्नाकडे हाकारला गेला.

८. हे बहुतांचें संरक्षण करणारे आश्विहो, तुम्हाजवळ देण्यासारखें धनहि पुष्कळ आहे; तर आम्हाला दुसऱ्याकडे न जाणारी स्पृहणीय गाय द्या. तुमचे स्तोते तुमची उत्कृष्ट स्तुति आणि तुमच्या देणगीला उद्देशून तयार केलेलें हे सोमरस तयार करीत आहेत.

९. पुरयाच्या चलाख दोन घोड्या, सुमिळ्हाच्या शंभर गाई, पेऊकाचीं पक्वानें, मला द्या. तसेंच शांड हिरण्यालंकार मंडित, हंसतमुख अनुरूप, अजिंक्य आणि देखणे दहा पुरुष देता झाला.

१०. हे सत्यस्वरूप अश्वीहो, तुम्ही स्तुति करणाऱ्या मला शेकडो (च काय पण) हजारो घोडे द्यावेत. हे वीरांनो, आम्हा भरद्वाजांना तुम्ही द्यावेत आणि हे कर्तृत्ववन्तांनो, राक्षसांना ठार करावेंत.

११. हे अश्वीहो, तुम्ही दिलेल्या विपुल व सुखकारक संपत्तींत आम्ही मुलाबाळांसह सुखानें रहावें.

सूक्त चवसष्टावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–उषस; छंदः—त्रिष्टुभ.

१. अहो, ह्या प्रकाशणाऱ्या स्वच्छ उषा पाण्याच्या लाटाप्रमाणें जगाला सुशोभित करीत वर येऊं लागल्या. उषा सर्व सन्मार्ग सुगम करते आणि विपुल संपत्ति दक्षणा देते.

२. हे उषे, तूं फार चांगली दिसतेस. तूं जगभर प्रकाशतेस: तुझ्या तेजस्वी किरणांनीं द्युलोकावर उडी मारली आहे. हे देवि उषे, लखलखणाऱ्या तजांनीं प्रकाशणारी तूं आपलें वक्षःस्थल उघड करतेस.

३. तांबूस तेजस्वी किरण व्यापक व सुप्रसिद्ध अशा त्या उषेला वाहून आणतात. ती शूर तिरंदाजाप्रमाणें शत्रूंना नष्ट करते आणि चलाख घोडेस्वाराप्रमाणें अंधकाररूपी शत्रूंना त्रास देते.

४. हे देवि उषे, पर्वतावरील किंवा निर्वात प्रदेशांतील सर्व सन्मार्ग तुझ्या कृपेनें आतां सुगम होतात. हे स्वयंप्रकाश उषे, तूं (जणूं काय समुद्राच्या) पाण्यावरून तरून जातेस. हे विशाल रथ असलेले, दर्शनीय उषे, हे स्वर्गकन्ये, तूं आम्हांला समृद्ध करण्याकरतां धन घेऊन ये.

५. हे उषे, जी अप्रतिबंध असणारी तूं प्रेमानें बैलांनीं चांगल्या प्रकारें ओढली जातेस आणि हे स्वर्गकन्ये, तेजस्वी असणारी जी तूं प्रातःकालीं पूज्य आहेस, ती तूं अत्यंत देखणी असून आम्हांला उत्कृष्ट प्रकारची संपत्ति दे.

६. हे उषे, तुझा उदय झाल्याबरोबर जे हविर्द्रव्याचा उपभोग घेणारे आहेत ते व त्याच्याप्रमाणें पक्षीहि आपल्या घरट्यांतून बाहेर पडतात. तूं जवळ असणाऱ्या भक्तजनांना विपुल संपत्ति देतेस.

सूक्त पासष्टावें.

ऋषि—भरद्वाज; देवता–उषस; छंदः—त्रिष्टुभ्.

१. ती ही द्युलोकांतून उत्पन्न झालेली स्वर्गकन्या उषा अंधार नष्ट करीत जगांत प्रकट होत आहे. तेजस्वी असणारी ती रात्रींचा अंधार नाहींसा करून प्रकट होत आहे.

२. आल्हाद रथ असलेल्या उषा अरुणवर्ण घोड्यांनीं सकाळीं मोठमोठ्या यज्ञाकडे जोरानें चालल्या आहेत. आश्चर्यकारक रीतीनें प्रकाशत आहेत. आणि रात्रीचा अंधार नाहींसा करीत आहेत.

३. हे उषांनो, हवि देणाऱ्या भक्ताकडे कीर्ति, अन्न, बल आणि ऐश्वर्य आणणाऱ्या भाग्यवान व धांवत येणाऱ्या तुम्ही भक्ताला संततीसहित धनधान्यसमृद्धि द्या.

४. हे उषांनो, आतांच तुमच्याजवळ सेवा करणारांना देण्याकरतां धन आहे. आतांच तुमच्या जवळ दात्या वीरांनाहि देण्याकरतां संपत्ति आहे. तसेंच स्तुति करणाऱ्या ज्ञात्यालाहि देण्याकरतां संपत्ति आहे. आतां सामगायन करणाऱ्या माझ्या सारख्यालाहि तूं संपत्ति द्यावीस. पूर्वींहि दिली आहेस.

५. हे पर्वताच्या शिखरावर उदय पावलेले उषे, तुझ्या कृपेनें अंगिरस गाईंचे संघ मोकळे करीत आहेत. आणि उत्कृष्ट स्तोत्रें म्हणून अंधार नाहींसा करीत आहेत. त्या लोकनायक अंगिरसाची स्तुति खरी झाली.

६. हे स्वर्गकन्ये उषे, पूर्वींप्रमाणेंच आम्हाकरतां तूं अंधार नाहींसा कर. हे भगवति, भरद्वाजाप्रमाणें सेवा करणाराला आणि स्तुति करणाराला पराक्रमी मुलाबाळांनीं युक्त ऐश्वर्य दे. आम्हांला प्रशंसनीय अन्न दे.

सूक्त सहासष्टावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—मरुत; छंदः—त्रिष्टुभ.

१. संतोषप्रद, शत्रूंना नमवणारे आणि सतत धांवत असणारे एकसारख्या स्वरूपाचे मरुत स्तोत्यांच्या पुढें एकदम प्रकट होवोत. तसेंच ते जगांत लोकांच्या इच्छा पूर्ण करण्याकरतां सृष्टींत पदार्थमात्रांची भरभराट करतात आणि (वर्षांतून) एकदां (पावसाळ्यांत) स्वच्छ पाणी निर्माण करतात.

२. जे मरुत प्रज्वलित अग्नीप्रमाणें प्रकाशत असतात आणि दुपटीतिपटीनें वाढत असतात त्यांचे रथ धूळ न उडवणारे आणि सोन्याचे असतात. ते पराक्रम आणि संपत्तीसह प्रकट होत असतात.

३. जे मरुत उदक वर्षाव करणाऱ्या रुद्राचे पुत्र आहेत, त्यांचें सर्वाधार अन्तरिक्ष पोषण करतें. सर्वप्रसिद्ध असणारी ती थोर माता, तिनें लोकांच्या कल्याणार्थ उदकरूपी गर्भ धारण केला.

४. जे लोकांच्याकडे जाऊं इच्छित नाहींत आणि जें अंतःकरणांत असणारें पाप शुद्ध करतात, आणि स्तोत्यांच्या इच्छेनुसार तेजस्वी असणारे जे मरुत उदक वर्षाव करतात आणि शोभेनें प्रकाशत पृथ्वीवर सिंचन करीत असतात. —

५. ज्यांचे प्रभावशाली स्तोत्र म्हणणारे भक्त तात्काल इष्ट प्राप्त करण्यास समर्थ होतात. आणि जे स्तोत्यांची समृद्धि नाहींशी करतात आणि ज्यांचें माहात्म्य फार मोठें आहे त्या उग्र देवतांना दाता भक्त शांत करतो.

६. ते उग्र दिसणारे मरुतच धैर्यशाली सैन्यानें सुंदर द्यावापृथ्वीचा संबंध उत्पन्न करतात. खरोखर ह्यांच्यावरच द्यावापृथ्वी अवलंबून आहे. ह्या बलवानांपैकीं तिला कोणीहि विरोध करीत नाहीं.

७. हे मरुतांनो, तुमचा रथ निर्दोष असो. ज्याला सारथ्याशिवाय वेग प्राप्त होतो तो अश्वरहित, पाथेयरहित लगाम नसलेला असा उदक वर्षाव करणारा रथ इच्छा पूर्ण करीत द्यावापृथ्वीमधील मार्गांनीं धांवत असतो.

८. हे मरुतांनो, युद्धांत ज्याचें तुम्ही संरक्षण करतां त्याला कोणी त्रास देत नाहीं किंवा ठार करीत नाहीं. ज्याचे पुत्रपौत्र उदक आणि गाईंचें संरक्षण करतात तो युद्धांत पराक्रमी शत्रूंचाहि गौळवाडा फोडतो.

९. हे अग्ने, तूं आणि भक्तांनीं स्तोत्याला आणि चलाख व बलवान मरुत्संघाला उत्कृष्ट प्रकारचें अन्न द्यावें. कारण मरुत आपल्या शक्तीनें बलिष्ठ शत्रूंचा पराभव करतात. आणि थोर मरुतांच्या मुळेंच पृथ्वीच हदरते.

१०. यज्ञाप्रमाणें तेजस्वी, चलाख, अग्नीच्या ज्वालाप्रमाणें प्रकाशणारे, पूज्य शत्रूंचा थरकाप करणारे योद्धे मरुत कुलीन आणि अजिंक्य आहेत.

११. त्या प्रसिद्ध, उत्कर्षशील, ज्यांच्या हातांत भाले चमकत आहेत, अशा रुद्रपुत्र मरुतांचीं मी स्तोत्रें म्हणून सेवा करतों. पर्वतावर पाण्याला वेग उत्पन्न होतो त्याप्रमाणें स्तोत्यांनीं मोकळ्या मनांनीं केलेलीं स्तोत्रें मरुतांच्या सामर्थ्याला भरती आणतात.

सूक्त सदुसष्टावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—मित्रावरुण; छंदः—त्रिष्टुभ.

१. सर्वांत अत्यंत श्रेष्ठ असणाऱ्या ह्या मित्रावरुणांना मी स्तुति करून उत्साहित करतों. वेगवेगळ्या स्वरूपाचे असणारे ते दोघे-नियामक लगामानें घोड्यांचें नियमन करावें त्याप्रमाणें सर्व जगाचें नियमन करीत असतात.

२. हे प्रेमळ मित्रावरुणांनो, माझी ही तुम्हांला उद्देशून केलेली स्तुति तुमच्या कानावर पडत आहे. आणि हविर्द्रव्यासह तुमच्या यज्ञांत येत आहे. हे मित्रावरुणांनो, आम्हांला सुरक्षित घर द्या. आणि हे दात्यांनो तुम्ही आम्हांला जें घर द्याल तें दुःखनिवारक असूं द्या.

३. हे मित्रावरुणांनो, अधिकाऱ्यांप्रमाणें आपल्या मोठेपणानें समृद्धि इच्छिणाऱ्या भक्तांना तुम्ही कर्मप्रवृत्त करतां. ते तुम्ही आलांत, फार चांगलें झालें. आतां जवळ येऊन सप्रेम नमस्काराचा व आहुतीचा स्वीकार करा.

४. जे घोड्याप्रमाणें बलवान कुलीन आणि सत्यस्वरूप आहेत आणि ज्याचें पोषण अदितीनें गर्भांत असतांच केलें आहे, जे जन्मल्याबरोबर मोठ्यांतले मोठे मित्रावरुण, त्यांना मर्त्य शत्रूकरतां तिनें भयंकर बनविलें.

४. जो अत्यंत उत्सुक मनानें सत्यस्वरूप अश्वींच्या स्तोत्याकडे जाण्यास उद्युक्त झाला आहे. तो तुमचा अग्नि यज्ञांत प्रदीप्त झाला आणि दिला जाणारा घृतपूर्ण हवि स्वीकारूं लागला.

५. हे उदार अश्वींनो, सूर्यकन्येनें आश्रयाकरतां तुमच्या सुरक्षित रथ वर आरोहण केलें. हे कुशल व नृत्यशील देवांनो, आपल्या कौशल्यानें यज्ञांतील देवांना येथें आणण्यास तुम्ही समर्थ आहांत.

६. हे अश्वींनो, तुम्ही आपल्या उत्कृष्ट शोभेनें सूर्याच्या शोभेंत भर टाकता. तुमच्या घोड्यांनीं इकडे येण्याकरतां उडी मारली. हे स्तुत्य अश्विहो, तुमची उत्कृष्ट स्तोत्रानें स्तुति होऊं लागली.

७. हे सत्यस्वरूप अश्वीहो, तुमचे वाहून नेणारे चलाख घोडे अन्न वाहून नेवोत. तुमचा मनोवेगानें धांवणारा रथ विपुल व स्पृहणीय अन्नाकडे हाकारला गेला.

८. हे बहुतांचें संरक्षण करणारे अश्विहो, तुम्हाजवळ देण्यासारखें धनहि पुष्कळ आहे; तर आम्हाला दुसऱ्याकडे न जाणारी स्पृहणीय गाय द्या. तुमचे स्तोते तुमची उत्कृष्ट स्तुति आणि तुमच्या देणगीला उद्देशून तयार केलेलें हे सोमरस तयार करीत आहेत.

९. पुरयाच्या चलाख दोन घोड्या, सुमिळहाच्या शंभर गाई, पेऊकाचीं पक्वानें, मला द्या. तसेंच शांड हिरण्यालंकार मंडित, हंसतमुख अनुरूप, अजिंक्य आणि देखणे दहा पुरुष देता झाला.

१०. हे सत्यस्वरूप अश्वीहो, तुम्हीं स्तुति करणाऱ्या मला शेकडो (च काय पण) हजारो घोडे द्यावेत. हे वीरांना, आम्हा भरद्वाजांना तुम्ही द्यावेत आणि हे कर्तृत्ववन्तांनो, राक्षसांना ठार करावेंत.

११. हे अश्वीहो, तुम्हीं दिलेल्या विपुल व सुखकारक संपत्तींत आम्ही मुलाबाळांसह सुखानें रहावें.

सूक्त चवसष्टावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–उषस; छंदः—त्रिष्टुभ.

१. अहो,ह्या प्रकाशणाऱ्या स्वच्छ उषा पाण्याच्या लाटाप्रमाणें जगाला सुशोभित करीत वर येऊं लागल्या. उषा सर्व सन्मार्ग सुगम करते आणि विपुल संपत्ति दक्षणा देते.

२. हे उषे, तूं फार चांगली दिसतेस. तूं जगभर प्रकाशतेसः तुझ्या तेजस्वी किरणांनीं द्युलोकावर उडी मारली आहे. हे देवि उषे, लखलखणाऱ्या तजांनीं प्रकाशणारी तूं आपलें वक्षःस्थल उघड करतेस.

३. तांबूस तेजस्वी किरण व्यापक व सुप्रसिद्ध अशा त्या उषेला वाहून आणतात. ती शूर तिरंदाजाप्रमाणें शत्रूंना नष्ट करते आणि चलाख घोडेस्वाराप्रमाणें अंधकाररूपी शत्रूंना त्रास देते.

४. हे देवि उषे, पर्वतावरील किंवा निर्वात प्रदेशांतील सर्व सन्मार्ग तुझ्या कृपेनें आतां सुगम होतात. हे स्वयंप्रकाश उषे, तूं (जणूं काय समुद्राच्या) पाण्यावरून तरून जातेस. हे विशाल रथ असलेले, दर्शनीय उषे, हे स्वर्गकन्ये, तूं आम्हांला समृद्ध करण्याकरतां धन घेऊन ये.

५. हे उषे, जी अप्रतिबंध असणारी तूं प्रेमानें बैलांनीं चांगल्या प्रकारें ओढली जातेस आणि हे स्वर्गकन्ये, तेजस्वी असणारी जी तूं प्रातःकालीं पूज्य आहेस, ती तूं अत्यंत देखणी असून आम्हांला उत्कृष्ट प्रकारची संपत्ति दे.

६. हे उषे, तुझा उदय झाल्याबरोबर जे हविर्द्रव्याचा उपभोग घेणारे आहेत ते व त्याच्याप्रमाणें पक्षीहि आपल्या घरस्यांतून बाहेर पडतात. तूं जवळ असणाऱ्या भक्तजनांना विपुल संपत्ति देतेस.

सूक्त पासष्टावें.

ऋषि—भरद्वाज; देवता–उषस; छंदः—त्रिष्टुभ्.

१. ती ही द्युलोकांतून उत्पन्न झालेली स्वर्गकन्या उषा अंधार नष्ट करीत जगांत प्रकट होत आहे. तेजस्वी असणारी ती रात्रींचा अंधार नाहींसा करून प्रकट होत आहे.

२. आल्हाद रथ असलेल्या उषा अरुणवर्ण घोड्यांनीं सकाळीं मोठमोठ्या यज्ञाकडे जोरानें चालल्या आहेत. आश्चर्यकारक रीतीनें प्रकाशत आहेत. आणि रात्रीचा अंधार नाहींसा करीत आहेत.

३. हे उषांनो, हवि देणाऱ्या भक्ताकडे कीर्ति, अन्न,बल आणि ऐश्वर्य आणणाऱ्या भाग्यवान व धांवत येणाऱ्या तुम्हीं भक्ताला संततीसहित धनधान्यसमृद्धि द्या.

४. हे उषांनो, आतांच तुमच्याजवळ सेवा करणारांना देण्याकरतां धन आहे. आतांच तुमच्याजवळ दात्या वीरांनाहि देण्याकरतां संपत्ति आहे. तसेंच स्तुति करणाऱ्या ज्ञात्यालाहि देण्याकरतां संपत्ति आहे. आतां सामगायन करणाऱ्या माझ्या सारख्यालाहि तूं संपत्ति द्यावीस. पूर्वींहि दिली आहेस.

५. हे पर्वताच्या शिखरावर उदय पावलेले उषे, तुझ्या कृपेनें अंगिरस गाईंचे संघ मोकळे करीत आहेत. आणि उत्कृष्ट स्तोत्रें म्हणून अंधार नाहींसा करीत आहेत. त्या लोकनायक अंगिरसाची स्तुति खरी झाली.

६. हे स्वर्गकन्ये उषे, पूर्वींप्रमाणेंच आम्हाकरतां तूं अंधार नाहींसा कर. हे भगवति, भरद्वाजाप्रमाणें सेवा करणाराला आणि स्तुति करणाराला पराक्रमी मुलाबाळांनीं युक्त ऐश्वर्य दे. आम्हांला प्रशंसनीय अन्न दे.

सूक्त सहासष्टावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—मरुत; छंदः—त्रिष्टुभ.

१. संतोषप्रद, शत्रूंना नमवणारे आणि सतत धांवत असणारे एकसारख्या स्वरूपाचे मरुत स्तोत्यांच्या पुढें एकदम प्रकट होवोत. तसेंच ते जगांत लोकांच्या इच्छा पूर्ण करण्याकरतां सृष्टींत पदार्थमात्राची भरभराट करतात आणि (वर्षातून) एकदां (पावसाळ्यांत) स्वच्छ पाणी निर्माण करतात.

२. जे मरुत प्रज्वलित अग्नीप्रमाणें प्रकाशत असतात आणि दुपटीतिपटीनें वाढत असतात त्यांचे रथ धूळ न उडवणारे आणि सोन्याचे असतात. ते पराक्रम आणि संपत्तीसह प्रकट होत असतात.

३. जे मरुत उदक वर्षाव करणाऱ्या रुद्राचे पुत्र आहेत, त्यांचें सर्वाधार अन्तरिक्ष पोषण करतें. सर्वप्रसिद्ध असणारी ती थोर माता, तिनें लोकांच्या कल्याणार्थ उदकरूपी गर्भ धारण केला.

४. जे लोकांच्याकडे जाऊं इच्छित नाहींत आणि जें अंतःकरणांत असणारें पाप शुद्ध करतात, आणि स्तोत्यांच्या इच्छेनुसार तेजस्वी असणारे जे मरुत उदक वर्षाव करतात आणि शोभेनें प्रकाशत पृथ्वीवर सिंचन करीत असतात.—

५. ज्यांचे प्रभावशालीं स्तोत्र म्हणणारे भक्त तात्काल इष्ट प्राप्त करण्यास समर्थ होतात. आणि जे स्तोत्यांची समृद्धि नाहींशी करतात आणि ज्यांचें माहात्म्य फार मोठें आहे त्या उग्र देवतांना दाता भक्त शांत करतो.

६. ते उग्र दिसणारे मरुतच धैर्यशाली सैन्यानें सुंदर द्यावापृथ्वीचा संबंध उत्पन्न करतात. खरोखर ह्यांच्यावरच द्यावापृथ्वी अवलंबून आहे. ह्या बलवानांपैकीं तिला कोणीहि विरोध करीत नाहीं.

७. हे मरुतांनो, तुमचा रथ निर्दोष असो. ज्याला सारथ्याशिवाय वेग प्राप्त होतो तो अश्वरहित, पाथेयरहित लगाम नसलेला असा उदक वर्षाव करणारा रथ इच्छा पूर्ण करीत द्यावापृथ्वीमधील मार्गांनीं धांवत असतो.

८. हे मरुतांनो, युद्धांत ज्याचें तुम्ही संरक्षण करतां त्याला कोणी त्रास देत नाहीं किंवा ठार करीत नाहीं. ज्याचे पुत्रपौत्र उदक आणि गाईचें संरक्षण करतात तो युद्धांत पराक्रमी शत्रूंचाहि गोळवाडा फोडतो.

९. हे अग्ने, तूं आणि भक्तांनीं स्तोत्याला आणि चलाख व बलवान मरुत्संघाला उत्कृष्ट प्रकारचें अन्न द्यावें. कारण मरुत आपल्या शक्तीनें बलिष्ठ शत्रूंचा पराभव करतात. आणि थोर मरुतांच्या मुळेंच पृथ्वीच हादरते.

१०. यज्ञाप्रमाणें तेजस्वी, चलाख, अग्नीच्या ज्वालाप्रमाणें प्रकाशणारे, पूज्य शत्रूंचा थरकाप करणारे योद्धे मरुत कुलीन आणि अजिंक्य आहेत.

११. त्या प्रसिद्ध, उत्कर्षशील, ज्यांच्या हातांत भाले चमकत आहेत, अशा रुद्रपुत्र मरुतांचीं मी स्तोत्रें म्हणून सेवा करतों. पर्वतावर पाण्याला वेग उत्पन्न होतो त्याप्रमाणें स्तोत्यांनीं मोकळ्या मनांनीं केलेलीं स्तोत्रें मरुतांच्या सामर्थ्याला भरती आणतात.

सूक्त सदुसष्टावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–मित्रावरुण; छंदः—त्रिष्टुभ.

१. सर्वांत अत्यंत श्रेष्ठ असणाऱ्या ह्या मित्रावरुणांना मी स्तुति करून उत्साहित करतों. वेगवेगळ्या स्वरूपाचे असणारे ते दोघे नियामक लगामानें घोड्यांचें नियमन करावें त्याप्रमाणें सर्व जगाचें नियमन करीत असतात.

२. हे प्रेमळ मित्रावरुणांनो, माझी ही तुम्हांला उद्देशून केलेली स्तुति तुमच्या कानावर पडत आहे. आणि हविर्द्रव्यासह तुमच्या यज्ञांत येत आहे. हे मित्रावरुणांनो, आम्हांला सुरक्षित घर द्या. आणि हे दात्यांनो तुम्ही आम्हांला जें घर द्याल तें दुःखनिवारक असूं द्या.

३. हे मित्रावरुणांनो, अधिकाऱ्यांप्रमाणें आपल्या मोठेपणानें समृद्धि इच्छिणाऱ्या भक्तांना तुम्ही कर्मप्रवृत्त करतां. ते तुम्ही आलांत, फार चांगलें झालें. आतां जवळ येऊन सप्रेम नमस्काराचा व आहुतीचा स्वीकार करा.

४. जे घोड्याप्रमाणें बलवान कुलीन आणि सत्यस्वरूप आहेत आणि ज्याचें पोषण अदितीनें गर्भांत असतांच केलें आहे, जे जन्मल्याबरोबर मोठ्यांतले मोठे मित्रावरुण, त्यांना मर्त्य शत्रूकरतां तिनें भयंकर बनविलें.

५. सर्व प्रेमळ देवांनीं उत्कृष्ट महत्त्व देऊन स्तुति करीत ज्यांच्यांत सामर्थ्य उत्पन्न केलें आणि ज्यांनीं विस्तीर्ण द्यावापृथ्वीला ताब्यांत घेतलें त्या तुमचे अजिंक्य आणि उत्तेजक दूत असतात.

६. त्या मित्रावरुणांनीं दिवसांत जोर उत्पन्न केला. मेखला बांधल्याप्रमाणें अन्तरिक्षाच्या उच्च प्रदेशांत सूर्याला स्थिर केलें स्थिर आणि व्यापक असणाऱ्या सूर्यानें मनुष्याकरतां अन्न उत्पन्न करून द्यावाभूमीला विस्तृत केलें.

७. जेव्हां ऋत्विज् यज्ञशाळेंत येतात तेव्हां त्या विद्वान लोकांचें पोट भरण्याकरतां त्यांचें तो संरक्षण करतो. सृष्टीला प्रेरणा देणाऱ्या तुम्ही जेव्हां उदक उत्पन्न केलें तेव्हां सर्व नद्या तुडूंब भरल्या आणि समृद्धि झाली.

८. हे मित्रावरुणानो, ते तुम्ही यज्ञांत या. हे बुद्धिमंतांनो, जिव्हेनें आस्वाद घ्या. तुमचा निष्कपटी अनन्यभक्त यज्ञांत तत्पर आहे. हे घृतयुक्त अन्न भक्षण करणारांनो, तुमचा तो महिमा आतां प्रकट होवो. कारण, तुम्ही दात्या भक्तांला पापापासून मुक्त करतां.

९. हे मित्रावरुणांनो, तुम्ही निर्माण केलेली जी तुमचीं प्रियस्थानें आहे त्यांचा जे स्पर्धेनें नाश करतात. जे देव आणि मनुष्य भक्तिहीन आहत, जे कर्महीन यज्ञ करीत नाहींत, आणि ज्यांना मुलें नाहींत त्या सर्वांची तुम्ही पापापासून मुक्तता करा.

१०. जेव्हां स्तोते स्तोत्रें म्हणूं लागतात तेव्हां कांहीं स्तुति करणारे निविद (सूक्तें) म्हणूं लागतात, तेव्हां आम्हीहि तुमची यथार्थ वर्णन करणारी सामगानें गाऊं लागतों. (आणि म्हणतो.) ‘ तुम्ही मोठेपणानें इतर देवांच्या बरोबरीचे नाहीं काय ?

११. हे मित्रावरुणांनो जेव्हां स्तोत्रें स्फुरूं लागतात आणि जेव्हां सरळमार्गी, धैर्यदात्या आणि बलिष्ठ सोमाला यज्ञांत तयार करतात तेव्हां तुम्ही आला असतां आम्हांला सुख लागावें म्हणून खरें सुरक्षित घर द्या.

सूक्त अडुसष्टावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—इंद्रावरुण; छंदः—१–८ ११ त्रिष्टुभ्; ९–१० जगती.

१. हे इंद्रावरुणांनो, जो सोम भक्तांनी अन्न व सुखसमृद्धि देण्याकरतां यज्ञ करण्यास प्रवृत्त करतो तो सोम आनंदानें पिण्याकरतां तयार झाला आहे.

२. हे इंद्रावरुणांनो, तुम्ही यज्ञांतील श्रेष्ठ आहांत, तुम्ही प्रेरक आहांत आणि शूरामधील अत्यंत बलवान आहांत. तुम्ही दात्यामधील श्रेष्ठ दाते आहांत. अत्यंत बलशाली, खऱ्या मार्गानें शत्रूंना ठार करणारे आणि विपुल सैन्ययुक्त आहांत.

३. हे भरद्वाज, प्रशंसनीय सामर्थ्य आणि सुख मिळविण्याकरतां स्तुत्य इंद्रावरुणाची तूं स्तुति कर. कारण, त्यापैकीं एक वज्रानें वृत्राला ठार करतो आणि दुसरा वरुण संकटांत सामर्थ्य देतो.

४. जेव्हां मनुष्यापैकीं उत्सुक असणारे मनुष्य, स्त्रिया आणि सर्व देव स्तुति करून उत्साहित केले जातात, तेव्हां हे इंद्रावरुणांनो, आपल्या सामर्थ्यानें ह्या स्तोत्यांचा उत्कर्ष करतात. हे द्यावापृथ्वीनो, विस्तीर्ण असणाऱ्या तुम्ही भक्ताचें कल्याण करा.

५. हे इंद्रावरुणांनो, जो भक्त तुम्हाला आपणहून हवि देतो तोच उदार होय तोच धनवान आणि यज्ञ करणारा होय. तोच दाता अन्नानें द्वेष्ट्यांतून पार जातो आणि संपत्ति आणि संपन्न लोक प्राप्त करतो.

६. हे इंद्रावरुणदेवानो, तुम्ही हवि देणाऱ्यांना जे अन्नधनसंपन्न ऐश्वर्य देता आणि शत्रूंनीं केलेली अपकीर्ति नाहींशीं करतां तें ऐश्वर्य आम्हांला प्राप्त व्हावें.

७. हे इंद्रावरुणांनो, आम्हा स्तोत्यांना संरक्षक आणि देवांनीं रक्षिलेलें ऐश्वर्य द्या. कारण, आमचें सामर्थ्य युद्धांत शत्रूचा पराभव करणारे आणि उग्र आहे ते आम्हांला उत्कृष्ट यश देईल.

८. हे इंद्रावरुणानो, स्तुति केले जाणारे तुम्ही आमची कीर्ति व्हावी म्हणून आम्हांला ऐश्वर्य द्या. हे देवांनो, महत्त्वशाली अशा तुमची अशा प्रकारें स्तुति करणारे आम्ही संकांटतून नावेनें पाणी तरून जावें त्याप्रमाणें तरून जातो.

९. हे स्तोत्या, महान् सम्राट वरुणदेवाकरतां तूं मनोहर आणि विस्तृत स्तोत्र म्हण. कारण, हा वरुण आपल्या मोठेपणानें पराक्रम करणारा, तेजस्वी आणि जरारहित असा द्यावापृथ्वीवर प्रकाशत असतो.

१०. हे सोम पिणाऱ्या इंद्रावरुणांनो, तुम्ही मदकर असणारा हा तयार केलेला सोमरस प्या. हे नियमबद्ध देवांनो, तुमचा रथ यज्ञांत देवांना साहाय्य करण्याकरतां आणि सोम पिण्याकरतां मार्गानें येवो.

११ हे इंद्रावरुणांनो, बलिष्ठ असणारे तुम्ही अत्यंत मधुर असणारा सोमरस प्या. हें सोमरूपी अन्न तुम्हांकरतां भांड्यांत घातलें आहे. ह्या यज्ञांत बसून तुम्ही आनंदित व्हा.

सूक्त एकूणसत्तरावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता–इंद्राविष्णू; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे इंद्राविष्णूनो, तुम्हांला स्तुति करून आणि हवि देऊन उत्तेजन देतो. ह्या कर्माच्या शेवटीं यज्ञाचा उपभोग घ्या आणि आम्हाला संकटराहित मार्गांनीं पार करून धन द्या.

२. जे इंद्राविष्णू सकल स्तुतीचे जनक आहेत आणि ज्यांच्याकरतां दोन तांबे सोमानें भरलेले असतात, हे इंद्राविष्णूनो, त्या तुम्ही म्हटलेलीं स्तोत्रें ऐकावींत.

३. हे इंद्राविष्णूनो, संपत्तिमान असणारे आणि मादक सोमाचे अधिपति असणारे तुम्ही सोमाकडे या. स्तोत्यांचीं स्तोत्रें सामगायनासह म्हटलीं जात असतां तुमचें तेज वृद्धिंगत होवो.

४. हे इंद्राविष्णूंनो, शत्रूंचा पराभव करणारे आणि अबलक घोडे तुम्हाला वाहून आणोत. स्तोत्यांचीं सर्व स्तोत्रें ऐका. माझें सामगायन श्रवण करा.

५. हे इंद्राविष्णूंनो, सोमाच्या मदांत तुम्ही जे पृथ्वीचें आक्रमण केलें तें स्तुत्य आहे. जें तुम्ही आकाश विस्तारलेंत आणि सर्व लोकांना उत्पन्न केलें तें आम्हाला जगण्याकरतांच केलें.

६. हे घृतान्न भक्षण करणारे इंद्राविष्णूंनो, सोमानें आनंदित होणारे, मुख्य सोमपात्रांतील सोम भक्षण करणारे आणि नमस्कारपूर्वक हवि दिले जाणारे तुम्ही आम्हांला धन द्या. तुम्ही समुद्रासारखे आहांत. सोमानें भरलेला कलश तुम्हाकरतां आहे.

७. हे दर्शनीय इंद्राविष्णूंनो, तुम्ही मधुर असणाऱ्या ह्या सोमाचा रस प्या. आणि आपलें पोट सोमानें भरून टाका. हे इंद्राविष्णूंनो, तुम्हाकडे मदकर असणारें हे सोमरूपी अन्न जावो. तुम्ही माझीं स्तोत्रें आणि धांवा ऐका.

८. हे इंद्राविष्णूंनो, तुम्ही शत्रूंना जिंकतां. पराजय पावत नाहीं. तुम्हापैकीं कोणीच पराजय पावत नाहीं. हे विष्णो, इंद्र आणि तूं जेव्हां लढाया केल्यात तेव्हां तुम्ही हें अनंत त्रैलोक्य निर्माण केलेंत.

सूक्त सत्तरावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—द्यावापृथ्वी; छंदः–जगती.

१. हे द्यावापृथ्वींनो, तुम्ही उदकपूर्ण आहांत. सर्व प्राणिमात्रांचा आश्रय आहांत. विस्तीर्ण, प्रसिद्ध, उदक उत्पन्न करणाऱ्या, सुरूप, वरुणाच्या नियमानें चाललेल्या, जरारहित आणि अत्यंत सामर्थ्यवान अशा आहांत.

२. वेगवेगळ्या, अनेक धारा असलेल्या, उदकपूर्ण आणि पवित्र कार्य करणाऱ्या द्यावापृथ्वी पुण्यवानाकरतां उदक उत्पन्न करतात. हे द्यावापृथ्वींनो, प्राणिमात्रावर सत्ता असणाऱ्या तुम्ही मानवांना हितकारक असणारें वीर्य उत्पन्न करा.

३. हे सर्वाधार द्यावापृथ्वींनो, तुम्हांपासून सुख व्हावें म्हणून जो मनुष्य हवि देतो त्याच्या इच्छा पूर्ण होतात. मुलाबाळांनीं त्याचा वंश वाढतो. तुम्हांला उद्देशून केलेल्या कृत्यामुळें एकजात अनेक कृत्यें करणारे प्राणी निर्माण होतात.

४. द्यावापृथ्वी उदकपूर्ण आहेत. उदकपूर्ण, उदक वर्षाव करणाऱ्या आणि उदकवैपुल्य करणाऱ्या त्या आहेत. यज्ञांत त्यांचाच पुरस्कार केलेला असतो. भक्त यज्ञ करण्याकरतां द्यावापृथ्वीजवळ सुखाची मागणी करतात.

५. मधुर उदक उत्पन्न करणाऱ्या आणि आल्हादक कृत्यें करणाऱ्या, आणि यज्ञ, धन, कीर्ति व सामर्थ्य धारण करणाऱ्या द्यावापृथ्वी उदकांचा वर्षाव करोत.

६. आईबाप असणाऱ्या द्यावापृथ्वी आम्हांला अन्न देवोत. विश्ववेत्त्या, उदार, सर्वांचें कल्याण करणाऱ्या आणि एकत्र रमणाऱ्या, द्यावापृथ्वी आम्हांला मुलेंबाळें, अन्न आणि ऐश्वर्य देवोत.

सूक्त एकाहत्तरावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—सवितृ; छंदः—१–३ जगती, ४–६ त्रिष्टुभ.

१. तो सुकर्मा सवितृदेव आपले सुवर्णमय हात धन देण्याकरतां वर उचलो. उदार, तरुण आणि लोकांच्या संरक्षणाविषयीं तत्पर असणारा सविता आपले उदकपूर्ण हात वर उचलीत आहे.

२. त्या सवितृदेवांनीं उत्पन्न केलेल्या संपत्तीची देणगी आम्हांला प्राप्त व्हावी. कारण, तूं सर्व द्विपाद व चतुष्पाद प्राण्यांच्या उत्पत्तिस्थितीविषयीं समर्थ आहेस.

३. हे सवितृदेवा, संरक्षक आणि कल्याणकारक तेजांनीं आज आमच्या घराचें सर्व बाजूनें तूं संरक्षण कर. हितकारक व मधुर भाषण करणारा तूं आम्हांला नवीन सुख देणारा हो. आम्हांवर दुष्ट भाषण करणारे शत्रु सत्ता न चालवोत.

४. जो उदार सवितृदेव दात्या भक्तांना विपुल संपत्ति देतो तो कणखर हनुवटीचा सुवर्णपाणि उदार सविता मधुर वाणीनें प्रत्येक सकाळीं उषेला भेटतो.

५. जो स्वर्ग आणि पृथ्वी ह्यांच्या उच्च प्रदेशीं आरूढ होतो आणि जो गेल्यावर सर्व पदार्थ अंधारांत पडतात तो आपले सोन्यासारखे उत्कृष्ट हात एकाद्या वक्त्याप्रमाणें वर करीत उदयाला येवो.

६. हे सवितृ देवा, आम्हांला तूं आज उत्कृष्ट धन दे. तसेंच उद्यां दे. फार काय दररोज आम्हांला उत्कृष्ट संपत्ति दे. हे देवा, तूं ज्याअर्थीं विपुल संपत्तीचा आणि उत्कृष्ट घराचा दाता आहेस त्याअर्थीं ह्या स्तुतीनें आम्ही उत्कृष्ट संपत्तिमान होऊं.

सूक्त बहात्तरावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—इंद्रासोम; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे इंद्रासोमांनो, तुम्ही मोठालीं मुख्य कृत्यें केलीं आहेत. तुम्हीच सूर्याला मिळविलेंत, तुम्हीच उदक उत्पन्न केलेंत, सर्व अंधार आणि निंदक यांना तुम्हीच नष्ट केलेंत. ह्यामुळें तुमचा मोठेपणा फार मोठा आहे.

२. हे इंद्रासोमांनो, तुम्ही उषेला उदयाला आणलेंत, तुम्हीच तेजस्वी सूर्याला उदित केलेंत, तुम्हीच द्युलोकाला आधार दिलांत आणि पृथ्वीमातेला तुम्हींच विस्तारलें.

३. हे इंद्रासोमांनो, तुम्हीच पाण्याला वेढून असणाऱ्या अहीला आणि वृत्राला ठार केलें. आणि तुम्ही द्युलोकाला धीरा दिलात. नद्यांना पाणी दिलेंत आणि समुद्राला भरती आणलीत.

४. हे इंद्रासोमांनो, तुम्ही गाईच्या कासेंत पक्व दूध उत्पन्न केलेंत, विचित्र वर्णाच्या गाईमध्यें सहज बाहेर पडणारे तेजस्वी पांढरें दूध धारण करविलेंत.

५. हे इंद्रासोमांनों तुम्ही संरक्षक, मुलाबाळांनीं युक्त आणि श्रवणीय असें ऐश्वर्य मला द्या. हे उग्र इंद्रासोमांनो, शत्रूंचा पराभव करणारे आणि लोकहितकारक सामर्थ्य लोकांना तुम्हीं दिलेंत.

सूक्त त्र्याहत्तरावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—बृहस्पति; छन्दः-त्रिष्टुभ.

१. जो बृहस्पति पर्वतभेत्ता, प्रथम उत्पन्न झालेला, सत्यनिष्ठ अंगिरसांच्या मागाहून उत्पन्न झाला, तो यज्ञभागी, दोनहि लोकांत संचार करणारा आणि उज्ज्वल स्थानीं अधिष्ठित होणारा आमचा पिता आहे, तो बलशाली द्यावापृथ्वींत गर्जत असतो.

२. जो बृहस्पति यज्ञांत येणाऱ्या स्तोत्याला स्थान देतो तो अंधार नाहींसा करीत युद्धांत शत्रूंना जिंकीत आणि अमित्रांचा पराभव करित नगरांचा धुव्वा उडवितो.

३. ह्या बृहस्पति देवानें संपत्ति आणि गाईंनीं गजबजलेले मोठ्यांतले मोठे गौळवाडे जिंकले, तसेंच पूज्य आणि अजिंक्य असणाऱ्या बृहस्पतीनें स्वर्गाच्या शत्रूला मंत्रांनीं ठार केलें.

सूक्त चवऱ्याहत्तरावें.

ऋषिः—भरद्वाज; देवता—सोमारुद्र; छन्दः—त्रिष्टुभ.

१. सोम व रुद्र आम्हांला सामर्थ्य देवोत. आमच्या प्रत्येक घरीं चाललेले यज्ञ तुम्हाला संतुष्ट करोत. सात रत्नें धारण करणारे तुम्ही आम्हाला सुखकारक व्हा. तसेंच आमच्या द्विपाद (माणसांना) व चतुष्पादांना (पशूंना) सुखकारक व्हा.

२. जो रोग आमच्या घरांत शिरला असेल त्या पसरणाऱ्या रोगाला बाहेर हाकून द्या. अवदसेला दूर हाकून द्या. आणि आम्हाला कल्याणकारक कीर्ति व अन्न द्या.

३. सोम व रुद्र आमच्या शरीरांत सर्व प्रकारचीं औषधें ठेवोत. जें आमच्या शरीरांत केल्यामुळें रुजलेलें पाप असेल त्याचा नाश करा. आणि आम्हांला मुक्त करा.

४. हे सोमारुद्रांनो तीक्ष्णायुध आणि तीक्ष्णबाण असणारे तुम्ही येथें आम्हांला सुख द्या. स्तुतिप्रिय असणारे तुम्ही आम्हांला वरुणाच्या पाशांतून मुक्त करा. तुम्ही आमचें संरक्षण करा.

सूक्त पंचाहत्तरावें.

ऋषिः—पायु भरद्वाज, देवता-१ वर्म, २ धनुष्य, ३ ज्या, ४ आर्त्नी ५ इषुधि, ६ चा पहिला अर्ध सारथि, दुसरा अर्ध रश्मि, ७ अश्व, ८ रथ, ९ रथगोप, १० ब्राह्मण, पितृ, सोम्य, द्यावापृथिवी, पूषन्, ११.१२. १५.१६ इषु, १३ प्रतोद १४ हस्तघ्न, १७ युद्धभूमि, ब्रह्मणस्पति, आदिति १८ कवच, सोम, वरुण, १९ देवाः--ब्रह्म.

१. रणांगणांत जाणारा राजा जेव्हां कवच धारण करतो त्यावेळीं त्याचें रूप मेघासारखें होतें. हे राजन्, अविद्ध शरीरानें तूं शत्रूला जिंक. कवचाचें प्रसिद्ध असणारें सामर्थ्य तुझें संरक्षण करो.

२. आम्ही शत्रूंच्या गाई धनुष्यानें जिंकूं, युद्ध धनुष्यानें जिंकूं, उन्मत्त झालेल्या कडव्या सैन्याला धनुष्यानें जिंकूं, धनुष्य शत्रूंना उद्विग्न करो, आम्ही सर्व दिशा धनुष्यांनीं जिंकूं.

३. ही दोरी धनुष्यावर चढवून एकदा ओढली कीं जणूं काय पार नेण्याकरतां कानाशीं मधुर गुणगुणत येते आणि पतीला आलिंगन देणाऱ्या स्त्रीप्रमाणें शब्द करूं लागते.

४. धनुष्याचीं दोन टोकें एक विचाराच्या नवराबायकोप्रमाणें जवळ राहून आई मुलाला मांडीवर घेते त्याप्रमाणें राजाला जवळ घेतात. ही सारखी असणारी व स्फुरण पावणारी धनुष्याची दोन टोकें शत्रूंना ठार करोत.

५. भाता अनेक बाणाचा संरक्षक (पिता) आहे. कारण ह्या भात्यांत अनेक बाण (पुत्र) असतात भात्यांतून बाहेर पडणारा बाण चिश्चा शब्द करतो. पाठीवर बांधलेला भाता युद्धाकरतां बाण बाहेर टाकून गर्जना करणाऱ्या सर्व सेनांना जिंकतो.

६. चांगला सारथि रथांत बसून जेथें जेथें जाऊं इच्छितो तेथें जाण्याकरतां पुढील घोडे हाकारतो. जे लगाम मनाप्रमाणें घोड्यांचें नियमन करतात त्या लगामांचा महिमा हे स्तोत्यांनो, वर्णन करा.

७. मोठ्यांदा टापा टाकीत रथासह जाणारे घोडे मोठा घोष करतात आणि पळून न जाणाऱ्या दुष्ट शत्रूंना पायांनीं लाथाडतात.

८. ज्या रथांत ह्या राजाचें कवच आणि आयुध असतें त्या रथांत वाहून आणलेली संपत्ति ह्याचा हवीप्रमाणें उत्कर्ष करणारी होते. त्या सुखकारक रथाच्या जवळ सुखेच्छु मनानें आम्ही प्राप्त होतों.

९. रथाचे संरक्षक, शत्रूंचें मधुर अन्न लुटणारे, अन्नसंमृद्ध, मर्मस्थानीं असणारे, शक्ति नांवाचें आयुध हातांत घेतलेले, अजिंक्य, विविध सेना असलेले, अहिंस्य, सामर्थ्यवान, थोर आणि शत्रूंचा पराभव करणारे आहेत.

१० ब्राह्मण, पितर, यज्ञानें उत्कर्ष पावणारे सोमार्ह देव आमचें रक्षण करोत. निष्पाप द्यावापृथ्वी आमचें कल्याण करोत. पूषन आमचें पापांतून संरक्षण करो. अपशब्द बोलणारा शत्रूहि आमच्यावर सत्ता न चालवोत.

११. बाणाला चांगलें पीस बसविलें आहे. याचा फाळ स्वच्छ आहे. कातड्यानें धनुष्य बांधलेलें आहे. त्याला गति दिली असतां बाण पडतो. जेथें लोक इकडे तिकडे धांवत असतात तेथें आमचे बाण सुख देवोत.

१२. हे बाणा, तूं आमचा सर्व बाजूनें उत्कर्ष कर. आमचें शरीर दगडासारखें अभेद्य असो. सोम आमच्या बाजूनें बोलो, अदिति आम्हांला सुख देवो.

१३. हे प्रतोदा, ज्या तुझ्या साहाय्यानें ज्ञाते सारथि ह्या घोड्यांच्या मांड्यावर आणि ढुंगणावर तडाखे लगावतो त्यानें तूं युद्धांत घोड्यांना पिटाळ.

१४. मनगटावर बसणारा दोरीचा तडाखा शरीरानें साप वेष्टितो त्याप्रमाणें परतविणारा हस्तघ्न मनगटावर बांधला आहे. सर्व कपटें जाणणारा ज्ञाता पुरुष बाजूनें योध्याचें संरक्षण करो.

टीपः—युद्धप्रसंग उपस्थित झाला असतां पुरोहितानें पुढें सांगितल्याप्रमाणें राजाला सज्ज करावें. प्रथम रथाच्या मागें उभें राहून ‘आत्वा०’ (१) हें सूक्त जपावें. ‘जीमूतस्येव०’ (१) या ऋचेनें कवच द्यावें. ‘धन्वना०’ (२) या ऋचेनें धनुष्य द्यावें, ‘वक्ष्यंती० (३) ही ऋचा राजाकडून म्हणवावी. पुराहितानें चवथी म्हणावी, पांचवीनें राजाला भात द्यावा, ज्या दिशेस रथ जावयाचा त्या दिशेस रथ जात असतां साहावी ऋचा जपावी, सातव्या ऋचेनें अश्वांना अनुमंत्रण करावें, आठवी ऋचा राजा बाणाकडे पहात असतां त्याच्याकडून म्हणवावी. चवदाव्या ऋचेनें हातांत हस्तघ्न घालावा, सतरावीचा युद्ध चालूं असतां पुरोहितानें जप करावा. इत्यादि आश्वलायनगृह्यसूत्रांत दिलें आहे तें पहावें.

१५. जी विषानें माखली आहे, जिंचं तोंड पोलादी आणि पाणीदार आहे आहे त्या पर्जन्यानें उत्पन्न झालेल्या महान इषु देवतेला माझा नमस्कार असो.

१६. मंत्र म्हणून पाणीदार केलेल्या तीक्ष्ण बाणा, तूं सोडल्यावर जा आणि शत्रूंवर जाऊन पड, जा त्याच्यापैकीं कोणालाहि शिल्लक ठेवूं नकोस.

१७. शेंडी ठेवलेल्या कुमाराप्रमाणें जेथें आमचे बाण पडतात तेथें ब्रह्मणस्पति आणि आदिति आम्हांला सुख देवो. सदोदित सुख देवो.

१८. हे राजा तुझीं मर्मस्थानें मी कवचानें आच्छादून टाकतों. राजा सोम तुला अमृतानें आच्छादून टाको. वरुणाहि तुला उत्कृष्ट प्रकारचें सुख देवो. जेत्या अशा तुला सर्व देव आनंदित करोत.

१९. जो असंतुष्ट स्वकीय किंवा जो परकीय आमचा घात करूं इच्छितो त्याचा सर्व देव नाश करोत. हें स्तोत्र माझें अन्तरंग कवच आहे.

सहावें मंडळ संपलें.

सहावें मंडळ.

कोष्टक

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१	४.४.३६	भरद्वाज	त्रिष्टुभ्	अग्नि	
२	४.५.१-२	”	१-१० अनुष्टुभ ११ शक्करी	”	अग्नीचें सुंदरवर्णन, उपमा
३	४.५.३-४	”	त्रिष्टुभ्	”	
४	४.५.५-६	”	”	”	
५	४.५.७	”	”	”	
६	४.५.८	”	”	”	
७	४.५.९	”	”	”	७-१० वैश्वानराचें सुंदर तत्त्वज्ञानात्मक वर्णन.
८	४.५.१०	”	”	”	
९	४.५.११	”	”	”	विणकामाचा उल्लेख
१०	४.५.१२	”	७ विराज अवशिष्ट त्रिष्टुभ्	”	
११	४.५.१३	”	त्रिष्टुभ्	”	
१२	४.५.१४	”	”	”	
१३	४.५.१५	”	”	”	
१४	४.५.१६	”	१-५ अनुष्टुभ् ६ शक्करी	”	
१५	४.५.१७-२०	वीतहव्य किंवा भरद्वाज अंगिरस	१-९ जगती, ३-१५ शक्करी ६ अतिशक्करी १७ अनुष्टुभ् १८ बृहती	” ” ” ”	

सूक्त	अष्ट. अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१६	४.५.२१-३०	भरद्वाज	१०-१५-१६ १९ त्रिष्टुभ् १-६ वर्धमाना गायत्री. २७-४७ ४८ अनुष्टुभ, अवशिष्ट गायत्री		दिवोदासरक्षण, अथवा अग्नीची प्रथम उत्पत्ति.
१७	४.६.१-३	,,	त्रिष्टुभ्	इंद्र	
१८	४.६.४-६	,,	,,	,,	तुर्पयाणानें कुत्स, आयु व अतिथी यांचा पराजय [केल्याचें वर्णन.
१९	४.६.७-८	,,	,,	,,	
२०	४.६.९-१०	,,	,,	,,	कुत्साचें संरक्षण
२१	४.६.११-१२	,,	,,	९-१० विश्वेदेव बाकी इंद्र.	
२२	४.६.१३-१४	,,	,,	,,	
२३	४.६.१५-१६	,,	,,	,,	
२४	४.६.१७-१८	,,	,,	,,	
२५	४.६.१९-२०	,,	,,	,,	
२६	४.६.२१-२२	,,	,,	,,	
२७	४.६.२३-२४	,,	,,	१-७ इंद्र ८ चायमान अभ्यावर्तिनो दानस्तुति	
२८	४.६.२५	,,	२-४ जगती ८ अनुष्टुभ अवशिष्ट त्रिष्टुभ्	गो	गोवर्णन
२९	४.७.१	,,	त्रिष्टुभ्	इंद्र	
३०	४.७.२	,,	,,	,,	
३१	४.७.३	,,	,,	,,	
३२	४.७.४	,,	,,	,,	दक्षिणायनांत पाऊस
३३	४.७.५	शुनहोत्र	,,	,,	
३४	४.७.६	,,	,,	,,	
३५	४.७.७	नर	,,	,,	
३६	४.७.८	,,	,,	,,	
३७	४.७.९	भरद्वाज	,,	,,	
३८	४,७.१०	,,	,,	,,	
३९	४.७.११	,,	,,	,,	
४०	४.७.१२	,,	,,	,,	
४१	४.७.१३	,,	,,	,,	

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
४२	४.७.१४	”	४ बृहती बाकी अनुष्टुभ्	”	
४३	४.७.१५	”	उष्णिह		
४४	४.७.१६-२०	शंयु बृहस्पतीपुत्र	१–६ अनुष्टुभ्, ७–९विराज बाकी त्रिष्टुभ्	” ”	
४५	४.७.२१-२६	”	३३ अनुष्टुभ् बाकी गायत्री	१-३० इंद्र ३१ ३३ बुबृतक्षन्	
४६	४.७-२७–३०	”	विषम-बृहती सम सतोबृहती	”	
४७	४.७.३१-३५	गर्ग भरद्वाज पुत्र	२२ त्रिष्टुभ् २३ अनुष्टुभ् २४गायत्री,२५ १९ बृहती, २७ जगती, अव- शिष्ट त्रिष्टुभ्	१-५ सोम २० च्यां प्रत्येक पादाच्या क्रमानें देव; भूमी बृहस्पती व इंद्र २२-२५ सृंजयपुत्र दानस्तुति २६ रथ २९दुंदुभी ३१ चा दुसरा भाग व अवशिष्ट इंद्र	दुंदुभीचें वर्णन
४८	४.८.१-४	शंयु बृहस्पती पुत्र	१.३.५.९.१४ १९.२० बृहती २.४.१०.१२ १७ सतोबृहती ६.८महासतोबृ हती, ७-२१ महाबृहती,११. १६ककुभ,१३. १८पुरउष्णिह, १५अतिजगती २२ अनुष्टुभ्	१-१० अग्नि ११ १५ मरुत् किंवा १३-१५ लिंगोक्त देवता १६-१९ पूषन् २०-२१ पृश्नि २२ पृश्नि किंवा द्यावा- भूमी	
४९	४.८.५-७	ऋजिश्वन् भारद्वाज	१-१४ त्रिष्टुभ् १५ शाक्वरी	विश्वेदेव	
५०	४.८.८-१०	”	त्रिष्टुभ्	अनेक	
५१	४.८.११-१३	”	१३-१५उष्णि- ह १६अनुष्टुभ् अवशिष्ट त्रिष्टुभ	विश्वेदेव	
५२	४.८.१४–१६.	”	१–६ त्रिष्टुभ्	विश्वेदेव	

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
			७–१२ गायत्री १३ त्रिष्टुभ् १४ जगती अवशिष्ट त्रिष्टुभ्		
५३	४.८.१७–१८	भरद्वाज	८ अनुष्टुभ् बाकी गायत्री	पूषन्	
५४	४.८.१९–२०	”	गायत्री	”	पूषाचे उषेसंबंधीं ‘ मातुर्दिधिषु’व ‘ स्वसुर्जार’ इत्यादि वर्णन
५५	४.८.२१–२२	”	”	”	
५६	४.८.२२	”	”	इंद्रापूषन्	
५७	४.८.२३	”	२ जगती अवशिष्ट त्रिष्टुभ्	पूषन्	
५८	४.८.२४	”	२ जगती अवशिष्ट त्रिष्टुभ्	”	
५९	४.८.२५–२६	”	७-१० अनुष्टुभ् अवशिष्ट बृहती	इंद्राग्नी	
६०	४.८.२७–२९	”	१-३ त्रिष्टुभ्, ४ १२ गायत्री १३ त्रिष्टुभ् १४ बृहती १५ अनुष्टुभ्	”	
६१	४.८.३०–३२	”	१.३.१३ जगती त्रिष्टुभ्	सरस्वती	सरस्वतीनें वध्यश्वाला दिवोदास पुत्र दिला.
६२	५.१.१–२	”	त्रिष्टुभ	अश्विनौ	
६३	५.१.३–४	”	”	”	
६४	५.१.५	”	”	उषा	उषेचें सुंदर वर्णन
६५	५.१.६	”	”	उषा	
६६	५.१.७–८	”	”	मरुत्	मरुतांचें वर्णन
६७	५१.९-१०	”	”	मित्रावरुण	
६८	५.१.११-१२	”	१ ते ८ ११ त्रिष्टुभ ९-१० जगती	इंद्रावरुण	
६९	५.१.१३	”	त्रिष्टुभ	इंद्राविष्णू	
७०	५.१.१४	”	जगती	द्यावापृथ्वी	

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्व
७१	५.१.१५	”	१–३ जगती ४–६ त्रिष्टुभ	सवितृ	
७२	५.१.१६	”	त्रिष्टुभ	इंद्रासोम	
७३	५.१.१७	”	”	बृहस्पती	
७४	५.१.१८	”	”	सोमारुद्र	
७५	५.१.१९–२२	पायु भारद्वाज	६-१० जगती १३.१४.१५ १६.१८. अनुष्टुभ १७ पंक्ति बाकी त्रिष्टुभ्	१ वर्म;२ धनुष्य ३ ज्या४आत्नी५ इषुधि;६चा १ला अर्ध सारथी२रा रश्मि७ अश्व;८ रथ ९ रथ गोप;१०ब्राह्मण पितृ सोम्य; द्यावापृथ्वी पूषन् ११-१२-१५-१६ इषु १३प्रतोद १४ हस्तघ्न १७ युद्धभूमि ब्रह्मणस्पति अदिती १८ कवचसोम; वरुण १९ देवाः ब्रह्म	युद्ध; आयुधें व युद्धांतील आकांक्षांचें विशेष वर्णन

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर

मंडळ सातवें.

भाषांतरकार

विद्यानिधि **सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.**

मुद्रक व प्रकाशक
शंकर रामचंद्र दाते. बी. ए.
चिटणीस, वैदिक वाङ्मय प्रसारक मंडळ.
' लोकसंग्रह ' छापखाना, २७ बुधवार पेठ, पुणें.

शके १८५०

किंमत दीड रुपया

सप्तममंडळपरिचय.

सातव्या मंडळांत १०४ सूक्तें असून ८४१ ऋचा आहेत. अनुवाक सहा आहेत.

ह्या मंडळाचा द्रष्टा मैत्रावरुणि वसिष्ठ होय. वसिष्ठाचें मैत्रावरुणित्व ह्याच मंडळांत स्पष्टपणें आलें आहे. (पहा. ७. ३३. ११–१३).

छंद.

ह्या मंडळांत ऋचा त्रिष्टुभ छंदांतलि ५८६ असून ६४ बार्हत प्रगाथ, ६१ गायत्री, ४४ अनुष्टुभ, ४० विराज, ३९, जगती, ४ बृहती, १ उष्णिह, १ पंक्ति, १ व शक्करी अशा आहेत. सूक्तदृष्ट्या पाहिल्यास ७७ सूक्तें त्रिष्टुभ छंदांतील असून ५ सूक्तें बार्हत प्रगाथांतील आहेत व २ गायत्री छंदांतील असून बाकी संमिश्र आहेत.

देवता.

सूक्तें १६ अग्नि, १५ इंद्र, ८ विश्वेदेव व आश्वि, ७ उषा, ४ वरुण, मित्रावरुण, वायु व इंद्रावरुण, ३ मरुत, २ सवितृ, अप्, आदित्य व पर्जन्य, १ रुद्र, दाधिक्रा, वास्तोष्पति, द्यावापृथ्वी, ऋभु, इंद्राग्नि, सरस्वती, विष्णु, मरुत व मंडूक, १ आप्रीसूक्त आणि बाकी मिश्रसूक्तें आहेत.

आप्रीसूक्त.

ह्या मंडळांतील दुसरें आप्रीसूक्त असून त्यांत अकरा ऋचा आहेत. तनूनपातची ऋचा ह्या सूक्तांत नाहीं.

दाशराज्ञ युद्ध.

ह्या मंडळांत कथांचा वगैरे विशेष उल्लेख आलेला नाहीं, पण ऐतिहासिक दाशराज्ञ युद्धाच्या उल्लेखामुळें ह्या मंडळास फार महत्त्व आहे. दाशराज्ञ युद्धासंबंधीं अत्यंत महत्वाचीं असणारीं सूक्तें ह्याच मंडळांत आहेत. (१८. ३३. ८३.)

ह्या युद्धाचें महत्त्व अशा दृष्टीनें आहे कीं ह्याचा सर्व ऋग्वेदभर उल्लेख आला आहे व ऋग्वेदांत उल्लिखित असणाऱ्या अनेक व्यक्तींचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष ह्या युद्धाशीं संबंध आहे. त्यामुळें ह्या युद्धास फार महत्त्वाचें स्थान आहे. त्याचा थोडक्यांत उल्लेख करून अन्यत्र विस्तृत विवेचन करण्याचें ठरविलें आहे.

एका बाजूस सुदास व दुसऱ्या बाजूस सुमारें दहा राजे यांच्यामध्यें झालेलें एक महायुद्ध त्याचा दाशराज्ञ युद्ध असा निर्देश आम्ही करीत आहोंत. ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं दाशरज्ञ, दशभिः राजभिः, असा त्याचा उल्लेख आहे. त्या युद्धांत सुदासाच्या विरुद्ध खालील लोक आढळतात.—

१ शिम्यु, २ तुर्वश, ३ भृगु, ४ द्रुह्यु, ५ कवि, ६ अनु, ७ पुरु, ८ भेद, ९ यदु, १० अज, ११ शिग्रु, १२ विषाणिन, १३ यक्षू इत्यादि.

सुदासाला अनुकूल असणारे लोक—

१ तृत्सु, २ भरत, २ पर्शु, ४ पृथु.

युद्धाचा प्रदेश विपाद्शुतुद्रीपासून (बियास सतलज संगमापासून) यमुनेपर्यंत, सिंधूपासून गंगेपर्यंत मधला प्रदेश असावा.

हें युद्ध अनेक दिवस चाललें होतें असें दिसतें.

कांहीं वाचनीय सूक्तें

खालील सूक्तें वेगवेगळ्या दृष्टीनें वाचनीय आहेत. वसिष्ठाचा स्वभाव व तत्कालीन समाजस्थिति (१) प्राञ्जल व भावनादर्शक (९४) देवतेचें यथार्थ वर्णन करून भावना व्यक्त करणारें विष्णूचें सूक्त (९९.१००) वरुण व वायु ह्यांचीं सूक्तें त्यांच्या पराक्रमासंबंधीं निश्चित कल्पना देणारीं आणि सरळ आहेत. उषेचीं सूक्तें काव्यमय आहेत.

सामाजिक गोष्टी.

दत्तक घेण्याच्या चालीसंबंधीं कांहीं उल्लेख (४. ७–८) ह्या मंडळाच्या चवथ्या सूक्तांत सातव्या व आठव्या ऋचांत आला आहे. त्यावरून वसिष्ठाची मनोवृत्ति व्यक्त झालेली असली तरी नक्की सिद्धांत काढणें कठीण आहे. कारण, सामान्यतेनें ते विचार केव्हांहि सत्यच आहेत. तथापि औरसपुत्राविषयीं कल्पना वैदिक ऋषींचीं आणि विशेषतः वसिष्ठाची सर्वत्र व्यक्त होत असते. (१.९, ११, १९, २१ ऋचा पहा.)

वसिष्ठाची शेंडी

तेहेतिसाव्या सूक्ताच्या पहिल्या ऋचेंत वसिष्ठांच्या शेंडीचा उल्लेख आहे. ती डोक्याच्या उजव्या बाजूस आहे. येथें 'दक्षिणतः कपर्दा वसिष्ठा :' (३३.१) असा उल्लेख आहे. सायाणाचार्यांनीं येथें पुढीलप्रमाणें अर्थ केला आहे—

दक्षिणे शिरसो भागे कर्पदाश्चुडा येषा त दक्षिणतःकपर्दा :।

लिंगपूजक.

ह्याच मंडळांत लिंगपूजकाचा एक चमत्कारिक उल्लेख आला आहे. एकविसाव्या सूक्तांतील पांचव्या ऋचेंत हा उल्लेख आहे. 'मा शिश्नदेवा अपि गुर्ऋतं नः। (७. २१. ५) शिश्नदेव लिंगपूजक असा अर्थ होतो. निरुक्ताप्रमाणें ब्रह्मचर्य न पाळणारे असा अर्थ निघतो.

कथासूक्तें.

वसिष्ठाचा मुलगा शक्ति पुष्पादिक आणण्याकरतां अरण्यांत गेला. तेव्हां विश्वामित्राच्या लोकांनीं त्याला आकसानें अग्नींत टाकलें. अग्नींत टाकल्यावर 'इंद्र ऋतुं न आ भर पिता पुत्रेभ्यो यथा' (३२. २६) ही अर्धी ऋचा म्हटली. नंतर तो अग्नींत जळून गेला. मुलाला उशीर झालेला पाहून वसिष्ठ धांवत तेथें आला. त्याला अत्यंत दुःख झालें. त्यानें मुलाची अर्धी ऋचा जाणून त्याच्या पुढील भाग 'शिक्ष णो अस्मिन्पुरहूत यामनि जीवा ज्योतिरशीमहि' (३२।२६) असा मंत्र पुरा केला. नंतर पुढलाहि मंत्र वसिष्ठानें पाहिला. शाट्यायन ब्राह्मणांत पहिला अर्धा भाग शक्तीचा असें म्हटलें आहे आणि सर्वच दोन्ही वसिष्ठाच्या आहेत असें तांडकांत म्हटलें आहे. (३२)

वसिष्ठ व अगस्त्य यांच्या जन्माची कथा आली आहे व वसिष्ठाचें माहात्म्य वर्णन केलें आहे. (३३)

तसेंच ह्या मंडळांत वसिष्ठ चोरी करावयास गेल्याची जी हकीकत आली आहे (५५) ती अत्यंत चमत्कारिक जाहे. तसेंच झोंप लागावी म्हणून म्हटलेल्या ऋचाहि तशाच आहेत (५५.५–८) ह्या सूक्तांना ह्या आख्यायिका बृहद्देवतेंत जोडलेल्या आहेत. खरोखर यांत काय तत्त्व आहे हें कांहीं ध्यानांत येत नाहीं. तसेंच ह्या आख्यायिका संग्रह करण्याचें काम कितपत विश्वासनीय आहे हें सांगतां येत नाहीं. तथापि अशा वेळीं विश्वास न ठेवण्याकडेच प्रवृत्ति होते. त्या ऋचाहि अशा कांहीं संदर्भांत येतात कीं त्यांचा पूर्वापार संदर्भाहि कांहीं नीट उमगत नाहीं.

रोग व औषधी.

५० व्या सूक्तांत अनेक रोगांचा उल्लेख आलेला आहे व त्यांच्यापासून सुटका व्हावी म्हणून प्रार्थना आहे. तसेंच सापानें पायाच्या आवाजावरून ओळखूं नये असेहि तीन मंत्राचें पालुपद आहे. 'मां मा पद्येन रपसा

विद्रत्सर : ' हें तें पालुपद होय. विशेषतः अवका व शिपद रोगांचा तेथें उल्लेख आहे. पण हे रोग कोणते हें ठरवितां येत नाहीं.

महामृत्युंजयमंत्र.

' त्र्यंबकं यजामहे ' (५९–१२) हा सुप्रसिद्ध महामृत्युंजयमंत्र ह्या मंडळांत असून याला पदपाठ नाहीं. मात्र तैत्तिरीय संहितेंत हा मंत्र आलेला असून तेथें पदपाठ आहे. (तै. सं. १. ८. ६. २.)

यासंबंधीं शौनकानें ऋग्विधानांत खालीलप्रमाणें म्हटलें आहे.

> त्रिरात्रं नियतोऽपोष्य श्रपयेत्पायसं चरूम् ।
> तेनाहुतिशतं पूर्णं जुहुयाच्छंसितव्रतः ॥
> समुद्दिश्य महादेवं त्र्यंबकं त्र्यंबकेत्यृचा ।
> एतत्पर्वशतं कृत्वा जीवेद्वर्षशतं सुखी ॥

ऋग्विधान २-२७.

समुद्राला मिळणारी सरस्वती.

९५।९६ सूक्तें सरस्वतीबद्दल आहेत. त्यांमध्यें एका ऋचेंत (९५।२) समुद्राला मिळणाऱ्या सरस्वतीचाहि उल्लेख आला आहे. सध्यां समुद्राला मिळणारी सरस्वती नाहीं. पूर्वी केव्हां तरी समुद्राला मिळणारी असावी. काल व स्थल निर्णयाच्या दृष्टीनें हा उल्लेख फार महत्त्वाचा आहे. याचा विशेष विचार ऋग्वेदाच्या उपसंहारांत आम्ही करणार आहोंत तेथें जिज्ञासूंनीं पहावा.

शान्तिसूक्त.

३५ वें सूक्त सर्व शान्तिसूक्त असून त्यामध्यें कशाकशापासून शान्तीची अपेक्षा केली आहे, हें पहाण्यासारखें आहे. त्यामध्यें अनेक प्रसिद्ध देवतांचा उल्लेख आहे. आणि अप्रसिद्ध देवांचाहि उल्लेख आहे. त्यांत देवांखेरीज सत्यस्य पतयः(१६), स्वरूणां मितयः (७), पितरः (१२), वसु, रुद्र, आदित्य (१४) इत्यादिकांचा उल्लेख ध्यानांत घेण्यासारखा आहे.

पर्जन्य व मंडूक

१०१ व १०२ हीं पर्जन्य सूक्तें असून १०३ हें मंडूकसूक्त आहे. तीनहि सूक्तें स्वभावोक्तिपूर्ण असून मंडूकसूक्त फारच बहारीचें आहे. त्यांतील वर्णन चमत्कृतिजनक असून बेडकांचा आवाज, रंग व स्वभाव फार चांगला वर्णिलेला आहे. उपरोधिक वर्णन म्हणूनहि हें सूक्त चांगलें शोभेल.

राक्षोघ्नसूक्त.

१०४ वें सूक्त राक्षोघ्नसूक्त होय. हें सूक्त कांहीं विशिष्ट प्रसंगाचें द्योतक आहे असें दिसतें. सूक्तकार अत्यंत चरफडूत बोलत आहे. वशिष्ठ विश्वामित्राच्या तंट्याशीं ह्या सूक्ताचा संबंध अनुक्रमणींत दाखविलेला नाहीं. तेथें फक्त ' शापाभिशापप्रायं ' असें म्हटलें आहे. शाप म्हणजे आक्रोश आणि अभिशाप म्हणजे मिथ्यारोप. पण बृहद्देवतेंत मात्र वशिष्ठ विश्वामित्राच्या तंट्यांशीं ह्या सूक्ताचा संबंध दर्शविला आहे. बृहद्देवतेंत पुढीलप्रमाणें म्हटलें आहे.

> संवत्सरं तु मंडूकान् ऐंद्रासोमं परं तु यत् ।
> ऋषिर्ददर्श रक्षोघ्नं पुत्रशोकपरिप्लुतः ॥
> हते पुत्रशते क्रुद्धः सौदासैर्दुःखितस्तदा ।

बृहद्देवता ६–८३७–८४४.

ह्या सूक्ताचे पांच भाग पडतात. पहिल्या सात ऋचांत वशिष्ठ राक्षसांचा नाश करण्याविषयीं आवेशानें इंद्रासोमांना आग्रह करीत आहे. तो म्हणत आहे कीं,जाळा, चोपा, क्षीण करा आणि ठार करा. बिलकूल गय करूं नका.

पुढल्या दोन ऋचांत वसिष्ठावर कोणी आरोप करीत आहेत त्यांना साप व मृत्यु यांच्या तडाख्यांत देण्याविषयीं विनंति आहे. पुढें तीन ऋचांत जें शरीर, मुलेंबाळें यांचा व समृद्धीचा नाश करतात त्यांचा नाश होवो ते इंद्राच्या बंधनांत पडोत अशी प्रार्थना आहे.

चवदापासून पुढें वसिष्ठाला कोणी नास्तिक म्हटलें, राक्षस म्हटलें, हत्यारी म्हटलें त्यामुळें तो आक्रोश करीत आहे व म्हणत आहे असें असेल तर मी येथल्या येथें मरून जाईन असें म्हटलें आहे.

अशा प्रकारें शेवटपर्यंत हें सूक्त खळबळ करीत राक्षसांचा नाश करण्याविषयीं विनंति करीत आहे. दहाव्या मंडळांतील राक्षोघ्नसूक्तापेक्षां हें सूक्त जरा वेगळें आहे.

वसिष्ठ विश्वामित्रांच्या तंट्यासंबंधीं तृतीयमंडलपरिचयांत थोडा विचार केला आहे तो पहावा.

वैशाखी पौर्णिमा १८९० सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर.

सातवें मंडळ.

सूक्त पहिलें.

ऋषिः--वसिष्ठ; देवता-अग्नि; छंदः-१-१८ विराज अवशिष्ट त्रिष्टुभ्.

१. अत्यन्त स्तविला जाणारा, दूर दिसणारा, गृहांत मुख्य परंतु लवकर न येणाऱ्या अशा अग्नीला ऋत्विजांनीं हात हलवून बोटांनीं उत्पन्न केला.

२. जो अग्नि घरांत पूजा केला जाणारा असा सतत होता त्या सुंदर अग्नीला सर्व संकटांपासून आपलें रक्षण होण्याकरितां वसिष्ठांनीं आपल्या घरीं ठेविलें.

३. हे अत्यन्त तरुण असणाऱ्या अग्ने, प्रदीप्त असा तूं मोठ्या ज्वालांनीं युक्त असा माझ्यापुढें प्रकाश. तुला पुष्कळ हविर्द्रव्यें दिलीं जातील.

४. ज्यांच्याजवळ कुलीन असे यज्ञ करणारे बसतात ते लौकिक अग्नीपेक्षां श्रेष्ठ, तेजस्वी आणि बल, तेज वगैरेनीं संपन्न अशी संतति देणारे अग्नि अत्यन्त प्रकाशित होवोत.

५. हे शत्रूंचा पराभव करण्यांत कुशल असणाऱ्या अग्ने, पराक्रमी संततीयुक्त संपत्ति स्तुति करणाऱ्या आम्हांस दे कीं, ज्या संपत्तीस हिंसक शत्रूस त्रास देता येत नाहीं.

६. ज्या बलशाली अग्नीकडे हविर्द्रव्यानें युक्त व अग्नीसहवर्तमान असणारी जुहू रात्रंदिवस येत असते त्या अग्नीला स्तोत्यांना हितप्रद अशी कांति प्राप्त होवो

७. हे अग्ने, सर्व शत्रूंना आपल्या तेजानें जाळून टाक, कीं ज्या तेजानें कठोर शब्द करणाऱ्या राक्षसांना तूं जाळून टाकलेंस. तसेंच रोगाला वेदनासहित नष्ट करतोस.

८. हे श्रेष्ठ, शुभ्र, तेजस्वि आणि शुद्ध करणाऱ्या अग्ने, तुझ्या तेजाची वृद्धि करणारे जे आम्ही त्या आमच्या स्तोत्रानें तूं या यज्ञांत यावेस.

९. हे अग्ने, तुझें तेज पूर्वजांचा अभिमान बाळगणाऱ्या आणि अनेक होमहवन करणाऱ्या लोकांनीं अनेक देशांत पसरविले आहे. त्याप्रमाणें आमच्याहि स्तोत्रांनीं प्रसन्न होत्साता तूं आमच्या यज्ञांत ये.

१०. जे लोक मी केलेली ही अर्थपूर्ण स्तुति करितात ते माझ्यावर श्रद्धा ठेवणारे आणि युद्धांत शूर असणारे लोक असुरांच्या सर्व कपटांना पुरून उरोत.

११. हे अग्ने, पुत्रादिकांनीं रहित अशा घरांत आम्हांस राहण्याचा प्रसंग येऊं नये. श्रेष्ठ आणि पराक्रमी पुत्रांनीं युक्त असें मुलाबाळांनीं भरलेल्या अशा घरांतच गृहस्थांना हितप्रद असणाऱ्या अग्ने, आम्ही राहावें.

१२. ज्या यज्ञांत अश्वादि संपत्तीसहवर्तमान अग्नि जातो तें नोकर चाकरानें भरलेल्या, पराक्रमी संततीनें युक्त आणि औरस पुत्रानें भरभराटीस आलेलें घर हे अग्ने, तूं आम्हांस द्यावेस.

१३. हे अग्ने, आमचे द्वेष्ट्या राक्षसांपासून संरक्षण कर. तसेंच कवडीचुंबक पापी व हिंसक लोकांपासून आमचें रक्षण कर. शिवाय तुझ्या सहाय्यानें आम्ही सेनांची इच्छा करणाऱ्या शत्रूंचा फडशा पाडूं.

१४. ज्या अग्नीला बलवान्, महाबाहु आणि अनेक उपभोग्य वस्तु असलेला आमचा पुत्र स्तोत्रानें स्तवितो तोच अग्नि सर्व अग्नीपेक्षां श्रेष्ठ असो.

१५. जो अग्नि, प्रज्वलित करणारास घातक अशा थोर पातकापासून खात्रीनें रक्षण करितो आणि ज्या अग्नीला कुलीन असे स्तोते सेवितात तोच अग्नि सर्वश्रेष्ठ होय.

१६. ज्या अग्नीला ऐश्वर्याची इच्छा करणारा आणि हविर्द्रव्यें असलेला भक्त प्रज्वलित करितो आणि ज्याला यज्ञांत देवांना बोलवणारा सेवितो तो हा अग्नि आहुतीकरितां बोलाविला जातो.

१७. हे अग्ने, तुझ्या कृपेनें धनिक झालेले, अग्निहोत्रादि नित्यकृत्यांत दोन प्रकारची तुला बोलावणारीं शस्त्रें व स्तोत्रें करणारे आम्ही यज्ञांत अनेक प्रकारचीं हविर्द्रव्यें तुला अर्पण करितों.

१८. हे अग्ने, अखंड असणारा तूं हीं अत्यंत चांगलीं असणारीं हविर्द्रव्यें देवांच्या संघाकडे घेऊन जा. आमचीं चांगलीं हविर्द्रव्यें देवांना हवीशीं वाटोत

१९. हे अग्ने, आम्हांला निपुत्रिकता देऊं नकोस. घाणेरडीं वस्त्रें वापरण्याचा प्रसंग आमच्यावर येऊं नये. आम्हांला दुर्बुद्धि देऊं नकोस. आम्हांला अन्नाचें दारिद्र्य नसावें. आम्हांला राक्षसांच्या ताब्यांत देऊं नकोस. तसेंच हे अग्निनारायणा, आम्हांला घरांत किंवा रानांत ठार करूं नकोस (आम्हांला पराक्रमानें आणि मोठेपणानें मृत्यु दे.)

२०. हे अग्ने, आमच्याकरितां ताबडतोब अन्न तयार कर. हे तेजस्वी परमेश्वरा, हविर्द्रव्यें असलेल्या आम्हांला अन्न दे. तुझ्या यज्ञांत आम्ही स्तवन करणारे आणि उपासना करणारे होऊं. आमचें कल्याण करून आमचें संरक्षण कर.

२१. हे सहस्पुत्र अग्ने, आदरपूर्वक बोलावला जाणारा देखणा असा तूं ज्वालांनीं प्रज्वलित हो. तसेंच औरसपुत्रांना साहाय्य करणारा तूं आम्हास जाळूं नकोस. आमच्या पुत्रांची तूं उपेक्षा करूं नकोस.

२२. हे अग्ने, तुला मदत असणारे अग्नि ज्या तऱ्हेनें माझें सहज रक्षण करतील तसें बोलावेंस. तसेंच हे बलपुत्र अग्ने, तेजस्वी अशा तुझी इच्छा चुकूनसुद्धां आम्हांला दण्ड करण्यास प्रवृत्त होऊं नये.

२३. हे तेजस्वी अग्ने, अमर अशा तुला जो हविर्द्रव्यें अर्पण करितो, तो मनुष्य धनवान् होतो. ज्याला थोर लोक विचारीत येतात तोच मनुष्य देवतांना धन अर्पण करितो.

२४. हे बलवान् अग्ने, ज्या धनांनीं आम्ही, पूर्णायुषी, पराक्रमी पुत्रादिकांनीं युक्त आणि आनंदित असें होऊं, आमच्या थोर आणि कल्याणकारक अशा कुल्यांना जाणणाऱ्या अग्ने, तूं आम्हां स्तोत्याकरितां खूप धन आण.

२५. हे अग्ने, आमच्याकरितां ताबडतोब अन्न तयार कर. हे तेजस्वी परमेश्वरा, हविर्द्रव्यें असलेल्या आम्हांला अन्न दे. तुझ्या यज्ञांत आम्ही स्तवन करणारे आणि उपासना करणारे होऊं. आमचें कल्याण करून आमचें संरक्षण कर.

सूक्त दुसरें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–आप्रीसूक्त; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे अग्ने, आमची अर्पण केलेली समिधा तूं स्विकारावीस. हवन केला जाणारा धूरांनीं युक्त होऊन तूं प्रज्वलित हो. आकाशांतील उंच भागांस संतप्त किरणांनीं स्पर्श कर. आणि सूर्याच्या किरणांत मिळून जा.

२. हुषार, तेजस्वी, आणि कर्माचे आधारभूत असे जे देव, सोम आणि इतर यज्ञांतील हवि आस्वादितात त्यांच्यापैकीं स्तुति किंवा हविर्द्रव्यें यांनीं सत्कारिल्या जाणाऱ्या आणि लोकांनीं गाईल्या जाणाऱ्या अग्नीचा महिमा आम्ही गातों.

३. (हे अध्वर्यूहो,) स्तुत्य, बलवान्, बुद्धिमान्. द्यावापृथिवीमध्यें देवांना हविर्भाग पोंचाविण्याकरितां संचार करणारा दूत, सत्यवक्ता, सध्यां मनुष्य ज्याप्रमाणें अग्नि प्रज्वलित करितो त्याप्रमाणें मनूनें प्रज्वलित केलेल्या अशा अग्नीला नेहमीच तुम्ही पूजा.

४. सेवा करणारे आणि गुडघे टेकून हवि देणारे भक्त अग्नींत स्तोत्र म्हणून हवि देतात. हे अध्वर्यूहो, तूप घातलेला आणि ठिपके असलेला दर्भ हवि देऊन स्वच्छ करा.

५. चांगलीं कर्में करणारे, देवांची भक्ति करणारे आणि रथ इच्छिणारे यज्ञांत द्वाराचा आश्रय करितात. यज्ञांत पूर्वेकडे तोंड केलेले जुहू आणि उपभृत गाई वासराला चाटतात त्याप्रमाणें अग्नीला तुपाच्या धारांनीं नद्याप्रमाणें व्यापून टाकतात.

६. तरुण, स्वर्गीय, थोर, यज्ञांत असणाऱ्या, अनेकाकडून स्तविलें जाणाऱ्या, धनयुक्त आणि यज्ञार्ह असे हे रात्र आणि दिवस आम्हांला कामधेनूप्रमाणें कल्याणप्रद होवोत.

७. हे मेधाविहो, धन मिळालेले आणि यज्ञांतील कर्म करणारे तुम्हांला यज्ञ करावा म्हणून मी स्तवितों. आणि स्तुति करीत असतांना माझा यज्ञ देवाला पोंहोचेल असें तुम्ही करावें. आणि देवांच्या जवळ असणारी संपत्ति आम्हांस मिळेल असें करावें.

८. भारतींसहित भारती, देव आणि मनुष्य

टीप:—१ आप्रीसूक्त १–१३ पहा.

यांसहित इळा. आणि सारस्वतांसहित सरस्वती ह्या तीन देवी आणि अग्नि येऊन ह्या दर्भावर बसोत.

९. हे दीप्तिमान् त्वष्ट्या, तूं आमचें वीर्य असें उत्पन्न कर कीं त्यापासून पराक्रमी, बलिष्ठ आणि सोम यज्ञ करणारा शूर पुत्र होईल.

१०. हे वनस्पते, तूं देवाला घेऊन ये. हवि तयार करणारा अग्नि हवि शिजवतो. तो अत्यंत सत्य असणारा देवांना हवि पोंचवो कारण, त्याला सर्व देव ठाऊक आहेत.

११. अग्निदेवा, तूं प्रज्वलित झाल्यावर इंद्र आणि इतर चलाख देवांसह एका रथांत बसून इकडे ये. चांगल्या पुत्राची माता अदिति दर्भासनावर बसो. अमर देव स्वाहा शब्दानें तृप्त होवोत.

सूक्त तिसरें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. हे अध्वर्यूहो, तुम्ही आपल्या यज्ञांत आनुषंगिक देवतांसहित, अत्यन्त उत्साही आणि श्रेष्ठ अशा अग्निदेवाला देवाकडे निरोप पोंचविणारा दूत करा. कारण, अग्नि या जगांत अढळ, नित्य, तेजस्वी, घृतयुक्त अन्न सेवणारा आणि पवित्र करणारा असा आहे.

२. घोडा ज्याप्रमाणें फुरफुरत गवत खातो त्याप्रमाणें मोठ्या अडचणींतून हा अग्नि चहूंकडे पसरतो आहे. आणि या अग्नीला वायूहि अनुकूल आहे. अशा प्रकारें जळत जाणाऱ्या या अग्नीचा मार्ग काळा होतो.

३. हे अग्ने, नवीन पेटविलेला आणि पाऊस पाडणाऱ्या अशा तुझ्या ज्वाला वर्धिष्णु आहेत. प्रकाशणाऱ्या तुझा धूर स्वर्गांत जातो. हे अग्निनारायणा, तूं (आमचा) दूत म्हणून देवाकडे जातोस.

४. हे अग्ने, ज्या तुझें तेज पृथ्वीवरील सर्वांचा आश्रय करिते, तूं ज्यावेळीं ज्वालांनीं अन्न भक्षण करितोस त्यावेळीं मोकळ्या सोडलेल्या सैन्याप्रमाणें तुझ्या ज्वाला धडाडत असतात. हे रमणीय अग्ने, तूं ज्वालांनीं गवताप्रमाणें काष्ठादिक भक्षण करितोस.

५. अग्नीला प्रज्वलित करणारे भक्तजन, प्रज्वलित झालेल्या, व सत्कार्य करणाऱ्या अशा अग्नीलाच रात्रीं आणि दिवसा यज्ञकुंडांत चलाख घोड्याप्रमाणें सेवित असतात. हवन केलेल्या आणि पाऊस पाडणाऱ्या अग्नीची ज्वाला प्रकाशत आहे.

६. हे सुंदर तेजोयुक्त अग्ने, ज्यावेळीं सोन्यासारखा तूं आमच्याजवळ प्रकाशित होतोस, त्यावेळीं तुझें रूप फारच प्रेक्षणीय दिसतें. तुझें तेज आकाशांतून विजेप्रमाणें बाहेर पडत आहे. दर्शनीय असणारा तूं सूर्याप्रमाणें आपलें तेज प्रकट करितोस.

७. हे अग्ने, तुम्हांला हविर्द्रव्यें अर्पण असोत. आणि आम्ही जसें तुम्हाला तूपदुधांनीं युक्त हवि देतो त्याप्रमाणें तुम्हीहि आम्हाला तेजस्वी अशीं शेकडों सुवर्णमय नगरें देऊन रक्षावें.

८. हे बलपुत्र अग्ने, दात्या अशा तुझ्या ज्या ज्वाला आणि कोणालाहि अलभ्य असणारी तुझी स्तुति या योगें तूं लोकांचें रक्षण करतोस. आणि त्या दोघांच्या योगानें हविर्द्रव्यें देणारें आणि स्तोते अशा आमचें त्वां रक्षण करावेस.

९. ज्यावेळीं पवित्र अग्नि, विस्तृत तेजानें प्रकाशित होत्साता पाजळलेल्या कुऱ्हाडीप्रमाणें बाहेर पडतो. तेव्हां तो यज्ञाला उपयोगी पडतो. देखणा, कर्तृत्ववान् आणि शुद्ध असा अग्नि अरणीपासून उत्पन्न होतो, तेव्हां तो यज्ञाला उपयोगी पडतो.

१०. हे अग्ने, ही सुंदर संपत्ति आम्हाला दे. बुद्धिमान् आणि कर्तृत्ववान् असा पुत्र आम्हाला मिळावा. सर्व प्रकारची संपत्ति आम्हा स्तुति करणारांना व गाणारांना मिळो. तुझे भक्त अशा आमचें त्वां कल्याण करून सदोदित रक्षण करावेंस.

सूक्त चवथें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. (हे यज्ञ करणारे हो) तुम्ही शुभ्र व तेजस्वी अशा अग्नीस शुद्ध हविर्द्रव्यें अर्पण करा आणि स्तोत्रें म्हणा. कारण अग्नि सर्व दैवी आणि मानुष प्राण्यांत ज्ञानमार्गानें संचार करीत असतो.

२. जो अग्नि अरणीपासून अत्यंत जोरांत उत्पन्न होतो तोच तेजस्वी अग्नि तारणाग्र होतो. कारण, अग्नि दातासारख्या निर्मळ ज्वालांनीं अरण्यें आत्मसात् करितो आणि खूप अन्न खाऊन टाकतो.

३. या देवांच्या मुख्य सभेंत या अग्निदेवाची जे सेवा करितात आणि जो अग्नि मनुष्यनिर्मित स्तुति ऐकितो तो अग्नि आयूकरितां शत्रूंना अशक्य असा प्रकाशित होवो.

४. ज्ञानी, तेजस्वी व अमर असा हा अग्नि अज्ञानी आणि मर्त्य लोकांत ठेविला आहे. हे बलवन् अग्ने, तुझे ठिकाणीं आमचे मन प्रसन्न असतें. म्हणून तूं आमची हिंसा करूं नकोस.

५. देवांनीं तयार केलेल्या स्थानीं अग्नि बसतो. कारण, अग्नीनें देवांना तारिलें आहे. जगाच्या धारण-पोषण करणाऱ्या अग्नीस ओषधी, वनस्पति आणि भूमि आपल्या पोटांत धारण करितात.

६. खूप अन्नदान करणारांचा तूं धनी आहेस. सामर्थ्यशाली धन देण्यास तूं समर्थ आहेस. हे बलवन् अग्ने, आम्ही पुत्रहीन असूं नये, आम्ही कुरूप असूं नये आणि आम्ही भक्तिहीनहि असूं नये.

७. स्वतः संपादन केलेला पैसा पुरा पडतो म्हणून आम्हांला स्वसंपादित संपत्तीचे मालक कर. हे अग्निनारायणा, दुसऱ्याचा मुलगा आपला होत नाहीं. म्हणून खुळ्या लोकांचे मार्ग आम्हांला जाणण्याचा प्रसंग येऊं नये.

८. दुसऱ्याकडे ओढा असलेला परक्याचा मुलगा आवडत असतांहि मुलगा म्हणून मनानेंहि मानवत नाहीं. कसेंहि झालें तरी दुसऱ्याचा मुलगा मूळस्थानाकडेच जाणार म्हणून पराक्रमी आणि कर्तृत्ववान् असा नव्या जोमाचा आम्हांस पुत्र होऊं दे.

९. हे अग्निनारायणा, तूं दुष्ट लोकांपासून आमचें संरक्षण करावेंस, पापापासून संरक्षण करावेंस. तुला आमच्याकडून शुद्ध हविर्द्रव्यें प्राप्त व्हावीत. आणि आम्हांलाहि स्पृहणीय असें सहस्रावधि प्रकारचें धन प्राप्त होवो.

१०. हे अग्ने, हीं सुंदर संपत्ति आम्हांस दे. बुद्धिमान् आणि कर्तृत्ववान् पुत्र आम्हांला प्राप्त व्हावा. सर्व प्रकारची संपत्ति आम्हां स्तुति करणारांना व गाणारांना मिळो. तुझे भक्त अशा आमचें त्वां कल्याण करून सदोदित रक्षण करावेंस.

सूक्त पांचवें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–वैश्वानर अग्नि; छंदः—त्रिष्टुभ्.

१. (हे स्तोतेहो,) वृद्धिंगत झालेल्या, स्वर्ग आणि पृथ्वींतून संचार करणाऱ्या अग्नीची तुम्ही स्तुति करा. तो सर्व मनुष्याचें हित करणारा अग्नि सर्व देवांच्या यज्ञांत जागरूक असणाऱ्या देवांसह वृद्धिंगत होतो.

२. नद्यांना गति देणारा, पाणी उत्पन्न करणारा, तेजोयुक्त अग्नि स्वर्ग आणि पृथ्वीवर स्थापिला गेला. तो वैश्वानर अग्नि तेजानें वृद्धिंगत होणारा सर्व मनुष्य प्राण्यांत प्रकाशतो आहे.

३. ज्यावेळीं राजा पुरूकरतां प्रकाशमान झालेला तूं शत्रूंचीं शहरें उध्वस्त करून जाळून टाकता झालास त्यावेळीं हे वैश्वानर अग्ने, तुझ्या भीतीनें काळे लोक भोजन टाकून सैरावैरा पळाले.

४. हे वैश्वानर अग्ने, तुझीं व्रतें त्रैलोक्यांतील सर्व लोक करितात. आणि भव्य कांतीनें प्रकाशणारा तूंहि आपल्या तेजानें द्यावापृथ्वीचा विस्तार करितोस.

५. हे अग्निनारायणा, लोकांचा पालक, धन देणारा, प्रातःकालाचा ध्वज अशा तुला घोडे स्वेच्छेनें सेवितात. तसेंच हविर्द्रव्यांसहित पवित्र स्तोत्रें तुझी सेवा करतात.

६. हे मित्रावर अनुग्रह करणाऱ्या अग्निनारायणा, तुझें ठिकाणीं स्थितिशाली देवांनीं बल उत्पन्न केलें. त्या देवांनीं तला आवडणारीं कृत्यें केलीं. आणि तूंच आर्यांत खूप सामर्थ्य उत्पन्न करून दस्यूंना या स्थानापासून हांकून दिलेस.

७. हे वैश्वानर अग्ने, तूं दूर आकाशांत (सूर्यरूपानें) उदय पावून वायु पाणी पितो त्याप्रमाणें प्रथम सोम पितोस. तसेंच हे जातवेद अग्ने, पाणी उत्पन्न करणारा, व आपल्या मुलांची इच्छा पूर्ण करणारा तूं विजेच्या रूपानें शब्द करतोस.

८. हे जातवेद अग्ने, सर्वांना हवीशी वाटणारी तेजस्वी वृष्टि होऊं दे, कीं ज्या योगें तूं संपत्तीचें रक्षण करतोस. तसेंच हे जगन्मान्य अग्ने, दात्या मनुष्यास तूं मोठी कीर्ति देतोस.

९. हे अग्निनारायणा, धनवान् अशा आम्हांला, खूप अन्नयुक्त संपत्ति व श्रवणीय सामर्थ्य दे. तसेंच हे वैश्वानर अग्ने, तूं रुद्र आणि वसु यासह वर्तमान आम्हांला अत्यंत सुख दे.

सूक्त सहावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–वैश्वानर अग्नि; छंदः—त्रिष्टुभ्.

१. नगरांचा नाश करणारास मी नमस्कार करितो

---

[८] टीप— दत्तक घेण्याच्या विरूद्ध उल्लेख आहे.

नमस्कार करणारा मी, सम्राट, बलवान्, शूर लोकांना स्तुत्य अशा अग्नीची बलवान् इंद्राप्रमाणें स्तुति करितों.

२. ज्ञाता, सूचक, स्तोत्यांचा आधार, तेजस्वी, सुखकर आणि द्यावापृथ्वीचा राजा वैश्वानर अग्नि त्याला माझी स्तुति प्रसन्न करिते. मी पुरंदर अग्नीची जुनी मोठमोठीं व्रतें स्तुतीनें पुरीं करितों.

३. यज्ञ न करणारे, बडबडे, खोटें बोलणारे, श्रद्धाहीन, हीनस्थितीस जाणारे, यज्ञाच्या विरुद्ध असणारे, जे व्याजबट्टा करणारे, जे दस्यु, त्यांना अग्नि रसातळास नेवो. श्रेष्ठ अग्नि पूजा न करणाऱ्यांना हलके करतां झाला.

४. नेता अग्नि गाढ अज्ञानांत पडलेल्या आणि स्तुति करणाऱ्या लोकांना बुद्धि देऊन सरळमार्गानें नेतां झाला. (मार्गदर्शक अग्नि गाढ अंधकारमय असणाऱ्या उषांना प्रकाश देऊन पूर्वदिशा प्रकाशित करता झाला) त्या धनाधीश, मानी आणि युद्धेच्छूंचें दमन करणाऱ्या अग्नीला मी स्तवितों.

५. जो आसुरी विद्या शस्त्रांनीं नाहींशा करता झाला, ज्यानें उषा केली, आणि तो थोर अग्नि लोकांना सामर्थ्यानें ताब्यांत घेऊन राजांना कर देणारे करिता झाला.

६. सर्व लोक सुखाला कारण असणारी ज्याची कृपा मागण्याकरितां अनेक प्रकारच्या स्तोत्रांनीं ज्याची स्तुति करितात तो वैश्वानर अग्नि (सूर्यरूपानें) आई बापासारख्या द्यावापृथ्वीच्या मध्यावर आरूढ होतो आहे.

७. वैश्वानर अग्निदेव, अन्तरिक्षातलि अंधार सूर्याचा उदय झाला असतां ग्रहण करितां झाला. स्वर्गातलि आणि पृथ्वीवरीलहि अंधार त्यानें ग्रहण केला.

सूक्त सातवें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–अग्नि; छंदः—त्रिष्टुभ्.

१, हे अग्ने, तेजस्वी, पराक्रमी, नेता आणि घोड्याप्रमाणें वेगशाली अशा तुला स्तुतिपूर्वक पाठवितो. ज्ञाता असा तूं आमच्या यज्ञाचा दूत हो. ज्ञाता असा तूं मनानें सर्व वृक्ष जाणतो आहेस.

२. स्तुत्य, देवाशीं सख्य असलेला, पृथ्वीवरची सर्व झाडाझुडपांनीं युक्त असलेलीं रानें आपल्या ज्वालांनीं शब्द करीत खाणाऱ्या हे अग्निनारायणा, आपल्या मार्गांनीं ये.

३. यज्ञ व्यवस्थित केला, आसनहि व्यवस्थित मांडले आणि अग्नीची स्तुति केली तर अग्नी तृप्त होतो आणि होताहि तृप्त होतो. आणि ज्यावेळीं हे अत्यन्त तरुणा, तूं सुखी होतोस त्यावेळीं विश्ववन्द्य आणि मातृभूत अशा द्यावापृथिवी तृप्त होतात.

४. जो अग्नि जगाचा पालक आहे. जो मोहक, स्तुत्य आणि सत्यनिष्ठ असा गृहांत स्थापन केला जातो तो पवित्र अन्तःकरणाच्या लोकांनीं यज्ञांत ताबडतोब उत्पन्न केला.

५. ज्या अग्नीला द्यावापृथ्वी वाढविते, ज्या विश्ववन्द्य अग्नीला यज्ञ करणारे पूजितात तो यज्ञातील हविर्भाग धारण करणारा, व्यापक आणि विश्वाचा आधार असा अग्नि येऊन घरांत बसला आहे.

६. जे लोक खूप स्तुति करितात, जे लोक स्तुति ऐकत असतांना आनंद पावतात. आणि जे लोक सत्यस्वरूप अग्नीला प्रदीप्त करितात ते लोक अन्नांनीं जगाला तृप्त करितात.

७. हे बलपुत्र अग्ने, धनाधीश अशा तुझी आम्ही वसिष्ठ स्तुति करितों. तुझी स्तुति करणाऱ्या आणि हविर्भाग घेऊन असणाऱ्या आम्हा लोकांस अन्न प्राप्त होऊं दे. आमचें कल्याण करून आमचें रक्षण कर.

सूक्त आठवें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. तेजस्वी धनी स्तुति करीत प्रदीप्त केला जातो ज्यास तुपाच्या आहुति देतात, दुःखी लोक ज्याला आहुतिपूर्वक स्तवितात तो अग्नि उषःकाळच्यापूर्वी प्रकाशतो.

२. तो हा देवांना आणणारा, मोहक आणि थोर अग्नि मनुष्यांकडून अत्यंत थोर मानला जातो. तो प्रकाशतो आणि काळेपणानें आपला मार्ग सुचविणारा अग्नि पृथिवीवर उत्पन्न झाला कीं लांकडानें वृद्धिंगत होतो.

३. हे अग्निनारायणा, कोणत्या हविर्भागानें आमच्या स्तुतीस तुझा प्रसाद प्राप्त होईल ? कोणच्या स्तुतीनें तूं आम्हास प्राप्त होशील आणि हे दात्या, आम्ही अविनाशी धनाचे अधिपति आणि उपभोग घेणारे केव्हां होऊं ?

४. हा भरतांचा अग्नि मी फार ऐकला आहें.

हा सूर्यासारखा भडक प्रकाशतो. यानें लढाईत पुरूंचा पराभव केला आणि तेजस्वी असा हा देवांनाहि अतिथीसारखा पूज्य वाटतो आणि प्रकाशतो.

५. हे अग्निनाराराणा, तुला खूप हविर्द्रव्यें दिलीं जातातच. तूं अनेक प्रकारच्या मोठेपणानें थोर आहेस. तूं स्तोत्यांचीं स्तोत्रें ऐकतोस. आणि हे सुजात अग्ने, स्तुति केला जाणारा तूं आपल्या स्वतःस व आम्हांस वृद्धिंगत करतोस.

६. शेंकडों हजारो प्रकारचें धन जवळ असलेल्या आणि विद्या आणि कर्म यांनीं थोर असलेल्या वसिष्ठानें हें अग्निचें स्तोत्र केलें कीं जें स्तोत्र कीर्ति वाढविणारे, रोग नाशक, शत्रुनाशक आणि बांधवांना सुख देणारें आहे.

७. ह बलपुत्र अग्ने, धनाधीश अशा तुझी आम्ही वसिष्ठ स्तुति करितों. तुझी स्तुति करणाऱ्या आणि हविर्भाग घेऊन असणाऱ्या आम्हा लोकांस अन्न प्राप्त होऊं दे. आमचें कल्याण करून आमचें रक्षण कर.

सूक्त नववें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–अग्नि; छंदः—त्रिष्टुभ्.

१. सर्व प्राण्यास स्तुति करावयास लावणारा, देवांना आणणारा, मोहक, ज्ञाता आणि शुद्ध करणारा अग्नि सकाळीं जागा होतो आणि द्विपाद् व चतुष्पाद् प्राण्यांना ज्ञान देतो. देवांकरितां हविर्भाग घेतो आणि सत्कृत्यें करणारांना द्रव्य देतो.

२. तो अग्नि श्रेष्ठ होय. जो पणींची (गाईना लपून ठेवणारी) दारें उघडितां झाला. आणि जो दूध देणारे आणि श्रेष्ठ गाईचें संघ आमचेकरितां आणतां झाला तो देवांना बोलावणारा, मोहक, उदारमनाचा आणि रात्रींचा अंधार नाहींसा करणारा अग्निनारायण दिसतो आहे.

३. जो अमूढ, बुद्धिमान्, आनंदी, तेजस्वी, चांगल्या स्थानीं असलेला, त्राता, अतिथीसारखा पूज्य कल्याणकर, चित्रविचित्र किरणांचा अग्नि सकाळींच दिसतो तो अग्नि पाण्याच्या द्वारा औषधींत शिरला.

४. हे अग्निनारायणा, तूं मनुष्यांकडून यज्ञांत स्तविला जातोस. जो अग्नि युद्धाला जाणाऱ्याकडून प्रदीप्त केला जातो आणि सुशोभित दिसतो त्या प्रदीप्त अग्नीस आमच्या स्तुति जागृत करितात.

५. हे अग्निनारायणा, तूं आमचा दूत म्हणून देवाकडे जावेंस. संघानें स्तुति करणाऱ्या आमचा तूं नाश करूं नयेस. सरस्वती, मरुत्, अश्वी व अप् या देवांना आम्हांस संपत्ति देण्यास सांग.

६. हे अग्निनारयणा; तुला वसिष्ठांनीं प्रदप्ति केलें आहे. तूं जरूथाला ठार कर. तूं आम्हांला धन देण्याकरितां बुद्धिमान् देवांना हविर्भाग पोंचीव. हे सर्व धन उत्पन्न करणाऱ्या, अनेक मार्गगामी दुष्टांना बलहीन कर. आणि आमचें कल्याण करून आमचें संरक्षण कर.

सूक्त दहावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. अग्नि सूर्याप्रमाणें प्रकाशतो. अत्यंत तेजस्वी, कामपूरक, प्रेरक व शुद्ध असा अग्नि आमच्या कृत्यांना प्रेरक असा प्रज्वलित होतो आणि विषयी लोकांना जागृत करितो.

२. अग्नि सकाळीं सूर्यासारखा प्रकाशतो. यज्ञ करणारे मननीय स्तोत्रें म्हणतात. आणि हा शहाणा, देवांच्याकडे जाणारा दूत आणि थोर दाता अग्नि अनेक प्रकारें सहाय्य करितो.

३. देवास उद्देशून असलेल्या व द्रव्य मागणाऱ्या आमची स्तुतिरूप वाणी दर्शनीय, सुरूप गतिशाली हव्यवाह आणि मनुष्यांचा धनी अशा अग्नीकडे जाते.

४. हे अग्निनारायणा, देवांसहवर्तमान इंद्राला आमच्याकरितां बोलाव. रुद्रगणासहवर्तमान थोर रुद्राला हाका मार. स्तुत्य अशा अंगिरासहवर्तमान विश्ववन्द्य बृहस्पतीला आण.

५. सकाम लोक स्तुत्य, देवांना आणणारा, अत्यन्त तरुण अशा अग्नीला यज्ञांत स्तवितात. तो अग्नि रात्रि युक्त आहे. धनिकांच्या देवांना हवि पोंचविण्यांत हा अग्निरूपी दूत निरलस असतो.

सूक्त अकरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. हे अग्निनारायणा, तूं यज्ञातील मोठा अधिकारी आहेस. तुझ्याशिवाय देव प्रसन्न होत नाहींत. सर्व देवांसहवर्तमान रथांत बसून या ठिकाणीं देवांना बोलावणारा तूं बैस.

२. हे अग्निनारायणा, हविर्भाग देणारे लोक जाण्यास तयार असणाऱ्या तुला नेहमीं देवांकडे दौत्य

करण्याकरितां याचना करितात. ज्यांच्या आसनावर देवांसहवर्तमान तूं येऊन बसतोस त्यांना चांगले दिवस येतात.

३. हे अग्निनारायणा, तुझ्याजवळ दात्या लोकांना देण्याकरितां तीन प्रकारची संपत्ति आहे असें लोक जाणतात. मनूच्याप्रमाणें माझ्या यज्ञांत तूं दूत होऊन देवांचा सत्कार कर. आणि आमचें हिंसक लोकांपासून रक्षण कर.

४ थोर यज्ञांचा अग्नि मालक असतो. आणि तयार केलेल्या सर्व हविर्द्रव्यांचा तूं सत्ताधारी असतोस म्हणून अग्नीच्या कृत्याला सर्व हातभार लावतात आणि देव अग्नीला हविर्भाग आणणारा करितात.

५. हे अग्निनारायणा, हवि भक्षण करण्याकरितां देवांना बोलाव. या यज्ञांत इंद्रप्रमुख देव संतुष्ट होवोत. हा यज्ञ—म्हणजे यज्ञांतील हविर्भाग—स्वर्गांत देवांकडे पोंचीव. आमचें कल्याण करून आमचें रक्षण कर.

सूक्त बारावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-अग्नि; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. जो अग्नि स्वतःच्या स्थानीं प्रज्वलित होऊन प्रकाशतो त्या अत्यन्त तरुण, विस्तीर्ण स्वर्ग आणि पृथ्वी यांच्यामधील आकाशांत चित्रविचित्र ज्वालाचा, चांगल्या प्रकारें आहुति दिलेला आणि सर्व बाजूनीं प्रज्वलित झालेल्या अग्नीकडे नमस्कारपूर्वक आम्ही जातों.

२. जो अग्नि आपल्या माहात्म्यानें सर्व पातकें नाहींशीं करितो तो जातवेद अग्नि आमच्या यज्ञगृहांतील स्तुतीनें आमचें निंद्य पापापासून रक्षण करो. स्तुति करणाऱ्या आणि हविर्भाग देणाऱ्या आमचें रक्षण करो.

३. हे अग्निनारायणा, तूं तरुण आहेस. तूं मित्र आहेस. वसिष्ठ तुला स्तवितात. तुझेजवळ असलेलें धन लोभनीय असतें. तूं आमचें कल्याण करून आमचें रक्षण कर.

सूक्त तेरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-वैश्वानर अग्नि; छंद-त्रिष्टुभ्.

१. हे लोकहो विश्वदीपक, कर्माधार, असुरांना ठार करणाऱ्या, अशा अग्नीकरितां मननीय स्तोत्रें आणि सत्कृत्यें आरंभा. मी इच्छापूरक वैश्वानर अग्नीला प्रसन्न मनानें यज्ञांत हविर्भाग देतो.

२. हे अग्ने, तेजानें प्रकाशणारा तूं उत्पन्न झालास तोच सर्व द्यावापृथ्वी व्यापून टाकलीस. हे बुद्धिमान् वैश्वानर अग्ने, तूं मोठ्या पराक्रमानें देवांना हिंसक शत्रूपासून सोडविलेंस.

३. हे अग्ने, धनी असा तूं, चहूंकडे गमन करणारा गवळी पशूंचें संरक्षण करितात त्याप्रमाणें सर्व जगाकडे पहातोस. त्यावेळीं स्तोत्र गाणारे भक्त तूं मिळवतोस. तूं आमचें कल्याण करून आमचें रक्षण कर.

सूक्त चवदावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-अग्नि; छंदः—१बृहती २।३ त्रिष्टुभ्.

१. धनवान् अग्नीला आम्ही समिधांनीं व देवांच्या स्तुतीनीं सेवितों. पवित्र कांतीच्या अग्नीला हविर्द्रव्यांनीं युक्त असणारे आम्ही हवि अर्पण करून सत्कारितों.

२. हे अग्निनारायणा, समिधा अर्पण करून तुझी आम्ही सेवा करितों. हे यजन केल्या जाणाऱ्या, सुंदर स्तुतीनें तुझी आम्ही सेवा करितों. हे यज्ञांत देवांना बोलावणाऱ्या, तूपानें तुझा आम्ही सत्कार करितों, हे कल्याणप्रद ज्वाला असणाऱ्या, तुला हविर्द्रव्य अर्पण करितों.

३. हे अग्निदेवा, देवांसहवर्तमान हविर्भाग सेवन करणारा असा तूं आमचीं स्तोत्रें ऐकण्याकरतां ये. तेजस्वी अशा तुझी आम्ही सेवा करितों. आमचें कल्याण करून आमचें संरक्षण कर.

सूक्त पंधरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-अग्नि; छंदः—गायत्री.

१ हे अध्वर्यूहो, पूज्य आणि इच्छापूरक अशा अग्नीच्या मुखांत आम्ही हवि अर्पण करितों. कारण तो आमचा अत्यंत जवळचा बांधव आहे.

२. जो ज्ञानी, गृहपति आणि तरुण असा अग्नि सर्व लोकांच्या घरोघर असतो.—

३. तो अग्नि आमच्या जवळची ठेव होय. तो सर्व संकटांपासून आमचें संरक्षण करो. आणि पापापासूनहि रक्षण करो.

४. स्वर्गाकडे ससाण्याप्रमाणें वेगानें जाणाऱ्या अग्नीकरितां मी नवीन स्तोत्र केलें आहे. तो अग्नि आम्हांला पुष्कळ धन देवो.

५. यज्ञांत प्रकाशणाऱ्या अग्नीची शोभा पुत्रवान् माणसांच्या धनाप्रमाणें डोळ्यांना मोठी आकर्षक आहे.

६. अत्यंत यजनीय आणि हविर्भक्षक अग्नि आमची आहुति भक्षण करो. आणि आमची स्तुतिहि ऐको.

७. हे शरण्या, लोकनाथा, पूज्य अग्निदेवा, तेजस्वी आणि पराक्रमी अशा तुझे ठिकाणीं मी लीन झालों आहे.

८. हे अग्निनारायणा, तूं रात्रंदिवस प्रदीप्त रहा. तुझ्यामुळें आम्ही अग्नीचे उपासक म्हणून गाजावें. आम्ही तुला हवेसें वाटून त्यामुळें आमची कीर्ति वाढावी.

९. हे अग्निनारायणा, नेते आणि बुद्धिमान् लोक इच्छा पुऱ्या होण्याकरितां तुझी स्तुति करितात. तुझी टिकाऊ हजारों स्तोत्रें केलीं जातात.

१०. स्वच्छ ज्वाला असलेला, अमर, शुद्ध, पवित्र करणारा आणि स्तुत्य असा अग्नि राक्षसांना त्रास देवो.

११. हे बलपुत्रे अग्ने, सर्व जगाचा धनी असा तूं आम्हांला धन दे. भग देवहि आम्हांला धन देवो.

१२. हे अग्निनारायणा, पुत्रपौत्रादिकांनीं युक्त असें अन्न आम्हांला द्यावेस. देव सविता, भग आणि देवी आदिति आम्हाला धन देवोत.

१३. हे अग्निनारायणा, आमचें पापापासून रक्षण कर. तसेंच हे देवा, नित्य तरुण असणारा तूं शत्रूंना तीव्र तेजांनीं भस्म करून टाक

१४. आतां हे अग्निनारायणा, कोणाकडूनहि पराभव न केला जाणारा तूं लोकांच्या रक्षणाकरितां लोखंडी शतपट विस्तृत अशी नगरी हो. (भ्यालेल्या आमचें रक्षण कर.)

१५. हे रक्षका आणि अंधार नाहींसा करणाऱ्या अग्निनारायणा, पापांपासून आणि पाप करणाऱ्या शत्रूपासून नेहमीं आमचें रक्षण करा.

सूक्त सोळावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—अग्नि; छंदः—विषम–बृहती आणि सम–सतोबृहती.

१. या स्तोत्रानें बलपुत्र अग्नीला मी तुमच्याकरतां बोलावतों. हा अग्नि प्रिय, अत्यंत ज्ञाता, सत्ताधारी सुयज्ञ व जगाचा दूत आहे.

२. आकर्षक व लोकरक्षक तेजानें तो अग्नि युक्त आहे तो अग्नि देवांना बोलावण्याकरतां जातो. चांगला हवन केलेला, चांगला स्तविला जाणारा, यजनीय आणि सत्कृत्यें करणारा हा अग्नि आहे. या वसिष्ठांचा हविर्भाग त्या देवाला जाऊन पोहोंचो.

३. कामपूरक, बोलावला जाणाऱ्या अशा अग्नीचे तेज वर येत आहे. तेजस्वी आणि आकाशाला भिडणारा धूर उत्पन्न झाला आहे. त्या अग्नीला ऋत्विज् प्रदीप्त करितात.

४. हे बलपुत्र अग्ने, यशस्वी अशा ज्या तुला आम्ही दूत करितों तो तूं हविर्भक्षणाकरितां देवांना बोलाव. ज्यावेळीं तुला मागूं त्यावेळीं मनुष्यांना उपभोग्य अशी संपत्ति आम्हांला दे.

५. हे विश्ववन्द्य अग्ने, तूं आमच्या यज्ञांतील गृहपति (यजमान) आहेस. तूं देवांना बोलावणारा (होता) आहेस. तूंच पोता आहेस. म्हणून बुद्धिमान् असणारा तूं उत्तम हविर्द्रव्यें हवन केला जातोस आणि भक्षण करतोस.

६. हे शुभकर्मन् अग्ने, यज्ञ करणाऱ्या मला धन दे. कारण, तूं धन देणारा आहेस. आमच्या यज्ञांत सर्व ऋत्विजांना तेजस्वी कर. आणि जो विशेष चांगली स्तुति करितो त्याचा उत्कर्ष कर.

७. हे चांगल्या तऱ्हेनें हवन केलेल्या अग्निनारायणा, तुझी स्तुति करणारे तुला आवडोत. तसेंच जे धनिक दाते (आमच्यासारख्या स्तुति करणाऱ्या) लोकांना गायांचे कळप देतात ते तुला आवडोत.

८. ज्यांच्या घरीं घृतयुक्त अन्न भरपूर असतें त्या लोकांच्या हे बलहित अग्ने, द्वेष्ट्या आणि निंदक शत्रूपासून आमचें रक्षण कर. आम्हांला फार कालपर्यंत ऐकलें जाणारें सुख द्या.

९. हे अग्निनारायणा, आनंददायक आणि देवांचें तोंड असलेल्या ज्वालेनें हविर्भक्षण करणारा आणि अत्यंत विद्वान् असणारा सुप्रसिद्ध तूं हविर्भाग देणाऱ्या आम्हांला धन दे. यजमानाला कर्म करण्यास प्रवृत्त कर.

१०. हे तरुणतम अग्ने, जे यजमान लोक कीर्तीच्या इच्छेनें अश्वादि संपत्ति देतात त्यांना शत्रूपासून रक्षक अशा शेकडो नगरांच्या साहाय्यानें राख.

११. द्रव्य देणारा देव अग्नि घृतयुक्त स्रुचा इच्छितो, म्हणून द्या आणि तृप्त करा. तृप्त केल्यानंतरच अग्नि तुम्हाला तारील.

१२. देवांनीं बुद्धिमान् अग्नीला यज्ञांतील हवि पोंचविणारा केला. अग्निदेव शुश्रूषा करणारांना आणि दात्या लोकांना पराक्रमी धनी देवो.

सूक्त सतरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—अग्नि; छन्दः—द्विपदा त्रिष्टुभ्.

१. हे अग्निनारायणा, चांगल्या समिधानें प्रदीप्त हो. तसेंच यज्ञ मोठ्या प्रमाणांत केला जावो.

२. तसेंच देवांची इच्छा करणाऱ्या देवता यज्ञांत येवोत आणि यज्ञ इच्छिणारे देवहि यज्ञांत तूं आणावेंस.

३. हे जातवेद अग्ने, देवाकडे जा. देवांना हवि दे आणि आमचा यज्ञ चांगला कर.

४. जातवेद अग्नि अमर अशा देवांना ज्यांचें यज्ञ चांगले आहेत असें करितो. हविर्भाग पोंचवितो आणि स्तोत्रांनीं प्रसन्न करितो.

५. हे बुद्धिमान् अग्ने, सर्व सुंदर धन आम्हाला दे. आमचे आशीर्वाद खरें होवोत.

६. हे अग्निनारायणा, बलपुत्र अशा तुला आम्ही देवाकडे हवि पोंचविणारे केलें आहे.

७. (हे अग्निदेवा) तेजस्वी अशा तुला आम्ही हविर्भाग देत आहोंत. याचना करणाऱ्या आम्हांस पुष्कळ संपत्ति दे.

सूक्त अठरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता— १ ते २१ इंद्र २२ ते २५ सुदास; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, आमचे वाडवडिलहि तुझेच भक्त होते. कारण सर्व संपत्ति तुझ्यापासून त्यांनीं मिळविली. (म्हणून आम्हीहि संपत्तीकरितां तुझीं स्तुति करितों) कारण तुझ्यापाशीं धार काढावयास मोठ्या अशा गाई पुष्कळ आहेत. घोडे आहेत, संपत्ति आहे आणि तूं थोर दाता आहेस.

२. हे इंद्रा, बायकासह असणाऱ्या राजाप्रमाणें तूं आपल्या कान्तीसहवर्तमान असतोसच. हे धनाधीश इंद्रा, विद्वान् आणि दृश्य सृष्टीच्या पलीकडे पहाणारा तूं आम्हां स्तोत्यांचें संपत्ति गाई आणि घोडे देऊन रक्षण कर. भक्त अशा आम्हाला धनप्राप्तीला योग्य कर.

३. हे इंद्रा, येथें तुझ्याकरितां केलेली स्पर्धा करणारीं श्रवणीय अशीं तुझीं स्तोत्रें केलीं जात आहेत. म्हणून तुझ्या धनाचे रस्ते आम्हांला सांपडोत. तुझी स्तुति करणारे आम्ही सुखी व्हावें.

४. गवत वगैरेंनें भरपूर असलेल्या गोठ्यांत असणाऱ्या गाईंची धार काढण्याची इच्छा करणाऱ्याप्रमाणें तुझ्यापासून संपत्ति मिळविण्याची इच्छा करणारा मी वसिष्ठ वासराप्रमाणें स्तोत्रें करीत आहें. मला सर्व लोकांनीं तूंच गोपति (धनपति) असें सांगितलें आहे. आमच्या स्तुतीकडे इंद्राचें लक्ष जावो.

५. स्तुत्य व दयाळू इंद्रानें (धरणें फोडलेल्या परुष्णीचे) वाढणारे पाणी सुदासाकरितां उथळ आणि तरून जाण्यास योग्य असें केलें. आणि उत्साही शिम्यूला सिंधुमध्यें बुडविलें.

६. पुढारी आणि यज्ञकुशल असा तुर्वश (राजा) होता. पैशाकरितां माशाप्रमाणें गुंताविलेले भृगु आणि द्रुह्यु तुर्वशाला सुखकारक झाले. दोघे चालून आले असतां इंद्रानें राजाला तारिलें.

७. पक्थ, भलानस्, अलिन, विषाणी आणि शिव हे इंद्राला स्तवितात. कारण सोम प्यालेला इन्द्र आर्यांच्या गाईंचें कळप तृत्सूंपासून आणता झाला. स्वतःला गाई मिळविता झाला. आणि युद्ध करून शत्रूंना ठार करिता झाला.

८. दुष्ट आणि मूर्ख (सुदासाचें शत्रु) दुथडी भरलेल्या परुष्णी नदीस फोडते झाले (परुष्णी नदीची बांधलेलीं तीरें फोडते झाले.) त्यामुळें तो आपल्या मोठेपणानें पृथ्वी व्यापता झाला. (त्याची कीर्ति जगभर पसरली.) नंतर त्यानें चयमानपुत्र कवि पळत असतांना जनावराप्रमाणें चित केला (ठार केला.)

९. (परुष्णीच्या दुथड्या पुनः बांधून पूर्ववत् केल्या) परुष्णीचें पाणी पूर्वस्थलावरून जाऊं लागलें. भोवतालच्या प्रदेशांतून वाहीनासे झाले. राजा सुदासाचा घोडाहि योग्य स्थलीं गेला. इंद्रानें सुदासाकरितां जगांत बडबडे व पराक्रमी पुत्रयुक्त शत्रु वश केले.

१०. आईनें पाठविलेले, एकत्र झालेले, असे मरुत् पूर्वीं ठरल्याप्रमाणें मित्र इंद्राकडे गवळ्यानें न राखलेल्या गाई ज्याप्रमाणें गवत असेल तिकडे जातात त्याप्रमाणें गेले. खुष असलेले मरुतांचे घोडे वेगानें व जोरानें चालूं लागले.

११. जो सुदासराजा कीर्तिच्या इच्छेनें वैकर्ण नांवाच्या दोनहि भागांतले एकवीस लोक ठार करितां झाला, यज्ञगृहांत दर्शनीय अध्वर्यू ज्याप्रमाणें दर्भ तोडतो त्याप्रमाणें शत्रूंचा उच्छेद करण्यास या युद्धांत

शूर इंद्र मरुतांची (सुदासाला मदत होण्याकरितां) उत्पत्ति करितो.

१२. नंतर वज्रधारी इंद्रानें श्रुत, कवष आणि वृद्ध यांना आणि अनु व द्रुह्यु यांना पाण्यांत बुडविलें. जे लोक तुझ्या प्राप्तीच्या इच्छेनें तुला स्तविते झाले त्यांना तुझें सख्य प्राप्त झालें.

१३. ह्या कवषादिकांचीं सर्व बळकट (किल्ले) शहरें व त्यांचें सात तट हे इंद्रानें आपल्या सामर्थ्यानें एकदम उखडून टाकले. आणि अनुपुत्राचें धन तृत्सूंना वाटून दिलें आणि युद्धांत बडबड्या पुरूंना आम्ही जिंकिलें.

१४. गाई पळविणाऱ्या अनूंचें एकशें साठ आणि द्रुह्युचे सहा हजार सासष्ठ भक्त सुदासाकरिता ठार केले. हे सर्व पराक्रम इंद्रानें केलें.

१५. वाईट संगति करणारे, मूर्ख, इंद्राशीं युद्धाला तयार झालेले हे तृत्सु उतारावरच्या पाण्यासारखे धावूं लागले. सुदासानें त्रास दिलेले तृत्सु सर्व संपत्ति सुदासाकरितां टाकते झाले.

१६. इंद्रानें पृथ्वीवर इंद्राची भक्ति न करणारे, शिजलेलें अन्न देवांना न देतां खाणारे आणि उत्साही अशां सुदासाच्या शूर शत्रूंना नष्ट केलें. क्रोधानें हिंसक अशांचा क्रोध नष्ट केला.सुदासाचे शत्रू रस्त्यानीं जातांना पळूं लागले.

१७. दरिद्री अशाहि सुदासाकडून इंद्रानें महत्त्वाचें दानकर्म करविलें. मोठ्या सिंहाला शेळीनें मारलें. यूपाचे कंगोरे सुईनें केले (कुऱ्हाडीचें काम सुईनें करितां झाला) आणि सर्व उपभोग्य धनें सुदासाला दिलीं.

१८. हे इंद्रा, तुझे पुष्कळ शत्रू आम्ही वश केले. गर्विष्ठ भेदालाहि तूं वश कर. जो भेद तुझ्या भक्तांना त्रास देतो त्याला तूं तीक्ष्ण वज्रानें ठार कर.

१९. त्या युद्धांत इंद्र भेदाला ठार करिता झाला. यमुना व तृत्सु यांनीं इंद्राचें संरक्षण केलें. अज, शिग्रु यक्षु लोक घोड्यांचीं डोकीं इंद्राला नजर करिते झाले.

२०. हे इंद्रा, तुझी जुनी आणि नवी सद्बुद्धि आणि संपत्ति उषःकालाप्रमाणें संख्यातीत आहे.तसेंच तूं मन्यमानपुत्र देवकाला ठार करिता झालास.आणि स्वतःच मोठ्या पर्वतावरून शंबराला नाहींसें करिता झालास.

२१. हे इंद्रा, राक्षसांना ठार कराणारा पराशर वसिष्ठ तुझ्या भक्तीमुळें तुझी घरोघर स्तुति करितात. जे लोक पालक अशा तुझें सख्य विसरत नाहींत त्या थोर लोकांना चांगले दिवस प्राप्त होतात.

२२. देववताचा नातु जो पिजवनपुत्र सुदास त्यांनीं दिलेल्या दोनशे गाई व स्त्रीसहवर्तमान दोन रथ या दानांची स्तुति करणारा, योग्य असा मी वसिष्ठ, हे अग्निनारायणा, यज्ञगृहांत होत्याप्रमाणें फिरतों आहे.

२३. पिजवनपुत्र सुदासांनें दान दिलेले, श्रेष्ठ प्रतीचे अलंकार घातलेले, कठिण स्थळीं सरळ चालणारे, व जगभर नांवाजलेले चार घोडे पुत्रासारख्या मला वसिष्ठाला पुत्राच्या हिताकरतां वाहून नेतात.

२४. ज्याचें यश विस्तीर्ण द्यावापृथ्वींत भरलें आहे, जो दाता श्रेष्ठ श्रेष्ठ लोकांना धन देतो, त्याला इंद्राप्रमाणें सातहि लोक स्तवितात. नदीच्या तीरीं युध्यामधीला ठार केला.

२५. हे मार्गदर्शक मरुत्‌हो, या सुदास राजाला त्याचा पिता जो दिवोदास त्याला साहाय्य करीत होता त्याप्रमाणें साहाय्य करा. भक्त पिजवनपुत्र सुदासाच्या घराचें रक्षण करा. आणि त्याचें बळ अशिथिल आणि अविनाशी असो.

सूक्त एकोणिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-इन्द्र; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. जो इन्द्र तीक्ष्णशिंगाच्या बैलाप्रमाणें भयंकर असा एकटाच सर्व (शत्रु) लोकांना पदच्युत करतो आणि जो इन्द्र यज्ञ न करणाऱ्यांच्या अनेक गृहांचा अपहार करितो, हे इंद्रा, तो तूं (आपल्याकरितां) खूप सोम मिळणाऱ्या लोकांना धन देतोस.

२. हे इन्द्रा, तूं तर त्यावेळीं स्वतः शुश्रूषा करून युद्धांत कुत्साचें रक्षण केलेस कीं, ज्यावेळीं अर्जुनीचा मुलगा जो कुत्स त्याला धन देणारा तूं दास, शुष्ण आणि कुयव यांना वश केलेंस.

३. हे शत्रूंचा पराभव करणाऱ्या इंद्रा, पराभव करणाऱ्या सामर्थ्यवान् व हविर्भाग दिलेल्या सुदास राजाला सर्व प्रकारच्या रक्षणसाधनानें तूं रक्षिलेस. जमिनीबद्दल तंटा चालू असतां युद्धांत पुरुकुत्सपुत्र त्रसदस्यु आणि पुरु यांचें तूं रक्षण केलेंस.

४. हे स्तुत्य इंद्रा, युद्धांत तूं मरुतांच्या साहाय्यानें पुष्कळ शत्रूंना ठार करतोस. तसेंच हे हर्यश्व इंद्रा, तूं दभीतिनामक राजाकरितां दस्यु अशा चुमुरि आणि धुनि यांना वज्रानें निजविलेस (ठार केलेंस).

५. हे वज्रहस्त इन्द्रा, तुझें सामर्थ्य तशा प्रकारचें आहे कीं तूं शंबराची नव्याण्णह शहरें फोडून टाकता

झालास. तूं शंभराव्या शहरांत मुक्कामाला ज्यावेळीं गेलास त्यावेळीं वृत्राला ठार केलेंस आणि नमुचीलाहि ठार केलेस.

६. हे इन्द्रा, तुला हविर्भाग देणाऱ्या आणि याजक अशा सुदासाला तूं दिलेली संपत्ति अक्षय्य झाली. हे अनेक कृत्यें करणाऱ्या इन्द्रा, कामपूरक अशा तुला आणण्याकरितां मस्त घोडे मी जोडतों. आमचीं स्तोत्रें बलशाली इन्द्राकडे पोहोंचोत.

७. हे महासमर्था आणि सुंदर अश्वयुक्त इंद्रा, तुझ्या शोधांत असणाऱ्या आम्हाला परक्यांचें साहाय्यरूप पातक करण्याचा प्रसंग येऊं नये. निर्बाध साहाय्य करून आमचें रक्षण कर. आम्ही तुला प्रिय असावें.

८. हे धनवन् इंद्रा, तुझ्या प्राप्तीविषयीं स्तोत्रें म्हणणारे तुझे मित्र आम्ही तुला प्रिय होऊन घरींच आनंदांत राहूं. आतिथिग्व सुदासाला नांवलौकिकाला चढविणारा तूं तुर्वश आणि याद्व राजांना वश कर.

९. हे धनवन् इंद्रा, तुझ्या प्राप्तीकरितां जे स्तोत्रें म्हणणारे लोक स्तोत्रें गातात त्या स्तोत्यांनीं पणींना सुद्धां दाते केलें, त्या आम्हाला तें सख्य पुढें चालविण्याकरितां स्वीकार. (आमचें सख्य असेंच कायम टिको.)

१०. हे नायका इंद्रा, तुझ्याकरितां हें प्रमुख लोकांचे संघ द्रव्य देणारे असे आमच्याकडे आले आहेत. युद्धांत त्या लोकांचें तूं कल्याण कर. त्यांचा तूं शूर असा मित्र हो. आणि रक्षक हो.

११. हे शूर इंद्रा, स्तुति केला जाणारा आणि स्तुतीनें उत्तेजित झालेला तूं शरीरानें रक्षण करण्याकरितां वृद्धिंगत हो आणि आम्हाला अन्न दे. गृहें दे. आमचें कल्याण करून आमचें रक्षण कर.

सूक्त विसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. बलवान् आणि तेजस्वी असा इंद्र पराक्रम करण्याकरितां उत्पन्न झाला आहे. लोकांचें हित करणारा हा जे कृत्य करूं म्हणतो तें पार पाडतोच. आणि आयुधांसहवर्तमान यज्ञगृहांत जाणारा तरुण असा इन्द्र मोठ्या पातकापासून आमचें संरक्षण करणारा असा होवो.

२. उत्कर्षशाली हा इंद्र वृत्राला ठार करितो. शूर इंद्र स्तोत्यांना राक्षितो. सुदासाकरितां लोक तयार करणारा तूं आहेस. आणि दात्यांना पुनः धन देतोस.

३. योद्धा, युद्धांत पाठ न दाखविणारा, युद्ध करणारा, स्पर्धा करणारा, शूर, स्वभावतःच अनेकांचा पराभव करणारा, कोणीहि पराभव न केलेला आणि बलशाली हा इंद्र शत्रूंच्या सेना उधळून लावतो आणि शत्रुभूत अशा सर्व लोकांना ठार करितो.

४. हे धनवान् इंद्रा, तूं आपल्या माहात्म्यानें आणि बलांनीं स्वर्ग आणि मृत्यु लोक भरून टाकलें आहेस. हे अश्वयुक्त इंद्रा, शत्रूवर वज्र टाकणारा तूं यज्ञांत हवींनीं सेविला जातोस.

५. वीर्यशाली कश्यपानें वीर्यशाली पुत्र इंद्र उत्पन्न केला. लोकहितकर इंद्राला माता अदितीनेंहि जन्म दिला. जो इंद्र लोकांचा सेनापति आणि जगाचा ईश्वर आहे तो शत्रूंचा नाश करणारा, गाईंचा शोध लावणारा आणि शत्रूंवर हल्ला करणारा आहे.

६. जो मनुष्य ह्या इंद्राच्या (शत्रूंना) भयंकर मनाची यज्ञांनीं जोपासना करितो तो मनुष्य कधींच हीन स्थितीला जात नाहीं आणि क्षीणहि होत नाहीं. जो मनुष्य इंद्राची उपासना करितो त्या मनुष्याला यज्ञांत सोमपान करणारा आणि यज्ञांतच झालेला इन्द्र संपत्ति देतो.

७. हे आश्चर्यकारक इंद्रा, जें धन पहिला दुसऱ्याला देतो, जें धन थोरापासून धाकट्याला प्राप्त होतें, ज्या धनानें तू अमर होत्साता दूर राहतोस तें आश्चर्यकारक धन आम्हांला दे.

८. हे इन्द्रा, जो भक्त जन तुला हवि देईल तो प्रिजजन तुझ्या दानास पात्र होईल. दयाळु अशा तुझी कृपा असलेले आणि खायला प्यायला असलेले आम्ही मनुष्यरक्षक अशा घरांत असावें.

९. हे धानिका इंद्रा, तुझ्याकरितां पिळला जाणारा सोम शब्द करितो आहे. आणि स्तोता स्तुति करितो आहे. शिवाय हे इंद्रा, तुझी स्तुति करणाऱ्या मला धनाची इच्छा उत्पन्न झाली आहे. म्हणून तूं लवकर आम्हांला धन दे.

१०. हे इन्द्रा, तो तूं दिलेल्या अन्नाच्या उपभोगाकरतां आमचें संरक्षण कर. आणि जे धनिक स्वतः तुला हविर्द्रव्यें देतात त्यांचें रक्षण कर. तुझी अत्यंत स्तुति करण्याला मला सामर्थ्य असो. आमचें कल्याण करून तुम्ही आमचें रक्षण करा.

सूक्त एकविसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—इंद्र; छंदः— त्रिष्टुभ् .

१. तेजोवर्धक, दुग्धमिश्रित असें सोमरूप अन्न पिळून तयार आहे. हा इन्द्र पिळून तयार असलेल्या सोमाकडे स्वभावतःच येतो. हे हर्यश्व इंद्रा, आम्ही तुला स्तोत्रांनीं जागृत करूं. सोमाच्या गुंगींत आमचें मित्र तूं जाणावेंस.

२. यज्ञ करणारे दर्भ पसरतात. यज्ञांत सोम कुटणारे दगड कठोर शब्द करितात. निर्ढावलेले, टणटणीत, मनुष्यसेवक, असे सोम कुटण्याचे दगड घरांतून घेतले जातात.

३. हे इंद्रा, वृत्रानें आडविलेलें पूर्वींपासूनचें पाणी तूं वाहतें करितां झालास. रथांत बसलेल्या लोकांप्रमाणें नद्या तुझ्यामुळें वाहूं लागल्या. सर्व कृत्रिम सृष्टि तुझ्यामुळें चालते.

४. लोकहितकारक कर्में करणाऱ्या इंद्रानें आयुधें घेऊन भयंकर रीतीनें राक्षसांना घेरिलें. त्यांचीं शहरें (पराक्रमानें) हलविलीं. आनंदानें हातांत शस्त्र घेऊन पराक्रमानें त्यांना ठार केलें.

५. हे इन्द्रा, राक्षसांनीं आम्हांला ठार करूं नये. हे बलिष्ठ इंद्रा, आम्ही तुला ज्ञानपूर्वक नमून आहोंत. तो आमचा धनी दुष्ट लोकांवर सत्ता चालविण्याविषयीं उत्सुक असतो. लिंगपूजक आमच्या यज्ञांत न येवोत.

६. हे इंद्रा, तूं आपल्या कृत्यानें पृथ्वीवरील सर्वांचा पराभव केलास. तुझा महिमा सर्व लोक जाणित नाहींत. स्वतःच्या सामर्थ्यानें तूं वृत्राला ठार केलेंस. शत्रूला युद्धानें तुझा नाश करितां आला नाहीं.

७. असुरहि बल आणि सामर्थ्यामध्यें हे इंद्रा, तुझ्यापेक्षा कमी आहेत. इंद्र शत्रूंचा पराभव करून भक्तांना द्रव्य देतो. आणि भक्तहि अन्नप्राप्तीकरितां इंद्राला स्तवितात.

८. हे इंद्रा, स्तोता वसिष्ठ, समर्थ अशा तुला रक्षणाकरितां बोलावतो. आणि हे शेकडोशें भक्तांचें संरक्षण करणाऱ्या इंद्रा, आमच्या विपुल संपत्तीचें संरक्षण तूं कर. तसेंच तुझ्याशीं स्पर्धा करणाऱ्या दुष्ट शत्रूंचें निवारण कर.

९. हे इंद्रा, तुझी स्तुति केल्यामुळें उत्कर्षाला जाणारे आम्ही नेहमीं तुझे मित्र असावें. स्वसामर्थ्यानें रक्षिणाऱ्या हे इंद्रा, तुझ्या साहाय्यानें युद्धांत शत्रूंवर निर्भयपणें चालून जाणारे तुझे भक्त शत्रूंचें सामर्थ्य नष्ट करोत.

१०. हे इन्द्रा, तो तूं दिलेल्या अन्नाच्या उपभोगाकरितां आमचें संरक्षण कर. आणि जे धनिक स्वतः-तुला हविर्द्रव्यें देतात त्यांचें रक्षण कर. तुझी अत्यंत स्तुति करणाऱ्या मला सामर्थ्य असो. आमचें कल्याण करून आमचें रक्षण कर.

सूक्त बाविसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—इंद्र; छंदः—१–८ विराज्; ९ त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, सोमरस पी. हे सुंदर अश्व असलेल्या इंद्रा, सारथ्यानें आवरून धरलेल्या घोड्याप्रमाणें दोनहि हातांनीं घट्ट धरलेल्या दगडानें कुटून जो रस तुझ्याकरितां काढला आहे, तो हा सोमरस तुला आनंदित करो.

२. हे अश्वधन इन्द्रा, जो तुला अवडणारा, मदकर आणि योग्य असा सोमरस आहे, आणि जो प्याल्यानें तूं वृत्राला ठार करतोस तो सोमरस हे धनिक इंद्रा, तुला प्रसन्न करो.

३. हे धनिक इंद्रा, तुझी ही जी स्तुति वसिष्ठ करितो आहे ती ध्यानांत घे. तूं आमचीं स्तोत्रें यज्ञांत ऐकावींस.

४. कुटतांना सोम पिणाऱ्या या दगडांचा शब्द ऐक. ज्ञात्या आणि स्तावक अशा आमची स्तुति जाण. ही आमची सेवा तुझ्या कृपेनें अन्तःकरणपूर्वक होवो.

५. हे इंद्रा, शत्रूंना ठार करणाऱ्या अशा तुझें बल जाणणारा मी तुझी स्तुति करणें केव्हांहि सोडणार नाहीं. असाधारण यश असणाऱ्या तुझें नांव मी नेहेमींच घेत राहीन.

६. हे मघवन् इन्द्रा, तुझ्याकरितां आम्ही नेहेमीं सोम पिळतो. स्तोता तुलाच अत्यंत स्तवितो. म्हणून आमच्यापासून दूर तूं फार काल राहूं नयेस.

७. हे शूरा, तुझ्याकरितांच सर्वत्र सोम पिळला जातो. तुझ्याकरितांच मोठीं स्तोत्रें मी करितों. तूंच नेहेमीं मनुष्यांना स्तुत्य आहेस.

८. हे मनोहरा, स्तुत्य अशा तुझा मोठेपणा कोणालाहि प्राप्त होत नाहीं. हे उग्रा, तुझें ऐश्वर्यहि कोणाला प्राप्त होत नाहीं.

---

५. टीपः—लिंगपूजक आमच्या यज्ञांत न येवोत. लिंगपूजा कोणाची ? वैदिक आर्यांची नसावी ?

९. जे पूर्वींचे ऋषि आणि जे अलीकडचे ब्राह्मण तुझीं स्तोत्रें करतात, त्या आमचे ठिकाणींच तुझें मित्रत्व कल्याणप्रद होवो. तुम्ही आमचें कल्याण करून आमचें संरक्षण करावें.

सूक्त तेविसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—इंद्र, छन्दः—त्रिष्टुभ्.

१. अन्नाच्या इच्छेनें सर्व ऋषींनीं स्तोत्रें केलीं. हे वसिष्ठा, तूंहि यज्ञांत इंद्राला स्तव. तसेंच ज्या इंद्रानें सामर्थ्यानें पृथ्वी विस्तारिली तो इंद्र मी केलेली स्तुति ऐको.

२. ज्यावेळीं स्तोत्यामध्यें सोम स्तविला जातो, त्यावेळीं हे इंद्रा, देवप्रिय स्तुति म्हटली जाते. जनांत स्वतःचें आयुष्य कोणी जाणत नाहीं. (आयुष्य क्षीण करणाऱ्या) त्या सर्व पातकांतून आम्हांला पार पाड.

३. गाई मिळवून देणाऱ्या या इंद्राच्या रथाला मी दोन घोडे जोडतो. आमचीं स्तोत्रें सुसेव्य इंद्राला स्तवितात. तो इंद्र माहात्म्यानें द्यावापृथ्वी व्यापतो. इंद्र शूर राक्षसांना ठार करितो.

४. हे इंद्रा, पाणी न व्यालेल्या गाईप्रमाणें वाढो. तुझे स्तोते पाण्याला व्यापोत. आणि तूं आम्हाकडे वारा जसा येतो तसा घोड्यांनीं ये. तूं स्तुति केल्यानें अन्न देतोस.

५. हे इंद्रा, तुला हा मदकर सोम मदयुक्त करो. आणि स्तोत्यांना बलवान् आणि धनवान् पुत्र देवो. हे शूरा, देवांमध्यें तूं एकटाच मनुष्यावर दया करतोस. या यज्ञांत तूं मदयुक्त हो.

६. वज्रासारखे कठीण बाहू असलेल्या आणि कामपूरक इंद्रालाच वसिष्ठ स्तोत्रें म्हणून पूजितात. स्तुति केलेला तो इंद्र आम्हाला पराक्रमी पुत्रयुक्त आणि गाईबैलांनीं युक्त असें धन देवो. आणि आमचें कल्याण करून आमचें रक्षण करो.

सूक्त चोविसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, तुला बसण्याकरितां स्थान तयार केलें आहे. हे पुरुहूता, देवांसहवर्तमान तूं ये. ज्याप्रमाणें आमचें रक्षण करतोस आणि आमचा उत्कर्ष करतोस, तसेंच तूं आम्हाला धन दे. आणि आम्ही दिलेल्या सोमांनीं मदयुक्त हो.

२. हे इंद्रा, अन्तरिक्ष आणि स्वर्गांत असणाऱ्या तुझें मन आम्ही वेधिलें आहे. भांड्यांत सोम तयार आहे. मध्यम स्वरानें उच्चारिली जाणारी ही इंद्राला पुनः पुनः बोलवणारी स्तुति इंद्राला उल्हासित करिते.

३. हे सोम पिणाऱ्या इंद्रा, आमच्या ह्या यज्ञांत सोम पिण्याकरितां पृथ्वीवरून ये. अन्तरिक्षांतून व स्वर्गावरून ये. (जेथें असशील तेथून ये). तुझे बलवान् घोडे आमच्याकडे लक्ष असलेल्या तुला आमच्या स्तोत्रांनीं खुष होण्याकरितां तुला आणोत.

४. हे अश्वयुक्ता, आणि सुंदर शिरस्त्राण घातलेल्या, सर्व प्रकारच्या रक्षणासहित म्हाताऱ्या मरुतांसहवर्तमान, शत्रूंचा नाश करणारा, आम्हांला कामपूरक, व बलवान् असा पुत्र देणारा आणि आमचीं स्तोत्रें ऐकणारा तूं इकडे ये.

५. थोर व ओजस्वी अशा तुला वाहून आणण्याकरितां रथाला घोडा जोडावा त्याप्रमाणें हें तेजस्वी स्तोत्र केलें आहे. हे इंद्रा, तुला हा स्तोता धन मागतो आहे. तो तूं स्वर्गांतल्याप्रमाणें सुंदर धन आम्हांला दे.

६. हे इंद्रा, आम्हालाच तूं श्रेष्ठ प्रतीच्या धनानीं परिपूर्ण कर. तुझा थोर अनुग्रह आम्हावर खात्रीनें होईल. हविर्युक्त अशा आम्हांला पराक्रमी पुत्रपौत्रादिकांनीं युक्त असें अन्न दे. आमचें कल्याण करून आमचें रक्षण कर.

सूक्त पंचविसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ्

१. हे ओजस्वी इंद्रा, ज्यावेळीं सैन्यें क्रोधानें लढूं लागतात त्यावेळीं लोकहितैषी आणि थोर अशा तुझ्या हातांत असणारें शस्त्र आमच्या रक्षणाकरतां पडो आणि तुझें सर्वव्यापी मन आमचे ठिकाणींच स्थिर होवो.

२. हे इंद्रा, युद्धांत जे मर्त्य लोक आमच्या समोरासमोर युद्ध करितात त्या शत्रूंना ठार कर. आमच्या निंदकाची स्तुति आमच्यापासून दूर कर. आम्हांला विपुल धन दे.

३. हे शिरोभूषणयुक्त देवा, शेकडो वेळां तुझें साहाय्य सुदासाला प्राप्त होवो. हजारों इच्छा पूर्ण होवोत आणि धन प्राप्त होवो. हिंसक लोकांचीं आयुष्यें नष्ट कर. आम्हांला तेजस्वी अन्न आणि रत्नें दें.

४. हे इंद्रा, तुझ्यासारख्याचीं कामें करण्याकरतां मी आहें. हे शूरा, जगद्रक्षक तुझ्यासारख्याकरतां

दान देणारा मी आहें. हे बलवान् आणि उग्र इंद्रा, नेहेमीं तूं येथें यावेस. (आम्ही यज्ञ करावेत आणि तूं यज्ञाकरतां यावेस.) आणि हे अश्वयुक्ता, आम्हांला तूं नामशेष करूं नकोस.

५. हर्यश्व इंद्राकरतां सुखकर स्तोत्र करणारे, दैविक बल मागणारे आणि संकटांतून तरून जाणारे आम्ही बल मिळवूं. आणि हे शूरा, शत्रूंना ठार करण्यास समर्थ असें तूं आम्हांस करावेस.

६. हे इंद्रा, आम्हांलाच तूं श्रेष्ठ प्रतीच्या धनांनीं परिपूर्ण कर. तुझा थोर अनुग्रह आम्हावर खात्रीनें होईल. हविर्युक्त अशा आम्हांला पराक्रमी पुत्रपौत्रांनीं युक्त असें अन्न दे. आमचें कल्याण व रक्षण कर.

सूक्त साव्विसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्.

१. सोम जर काढला नाहीं तर इंद्राला कांहीं आनंद होत नाहीं. सोम काढला पण स्तोत्रें म्हटलीं नाहींत तरीहि इंद्राला आनंद होत नाहीं. आमचें स्तोत्र राजाप्रमाणें आदरानें ऐकून इंद्र जर स्वीकारील तर इंद्राकरतां अगदीं नवीन असें स्तोत्र मी करीन.

२. प्रत्येक स्तोत्रागणित सोम इंद्राला प्रसन्न करितो प्रत्येक स्तुतिगणित पिळलेला सोम इंद्राला आनंदित करितो. म्हणून एकत्र जमलेले उत्साही ऋत्विज मुलें बापाला बोलावितात त्याप्रमाणें इंद्राला (स्तोत्रें म्हणून) बोलावीत आहेत.

३. स्तोत्यांनीं सोम काढला असतां जीं कृत्यें इंद्रांनीं केलीं म्हणतात तीं कृत्यें त्यानें पूर्वीं केलीं. आणि खात्रीनें सध्यांहि तो तशीं कृत्यें करील. तसेंच सर्वांशीं समवृत्तीनें राहणारा एकटा इंद्र सर्व शत्रूंचीं नगरें नवराबायकोप्रमाणें शोधून काढील.

४. हातघाईवर आलेल्या लढाईंत रक्षणाकरतां धांवत आलेल्या इंद्राचीं जुनीं उदाहरणें पुष्कळ आहेत. आणि त्याच गोष्टी ऋषि लोक गात असतात. सध्यांहि तो एक इंद्रच धन देणारा आणि तारक आहे असें मी ऐकितों. (त्याच्या कृपेनें) आमचें कल्याण होवो.

५. वसिष्ठ लोकांच्या रक्षणाकरतां भक्तकामकल्पद्रुम इंद्रालाच अशा प्रकारें स्तवितो आणि सोम पिळतो. हे इंद्रा, तूं हजारो तऱ्हेचें अन्न आम्हांला दे आणि आमचें कल्याण करून आमचें रक्षण कर.

सूक्त सत्ताविसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्.

१. ज्यावेळीं संकटांतून पार होण्याचीं कृत्यें केलीं जातात त्यावेळीं हे नेते लोक युद्धांत इंद्राला बोलावतात. लोकांची काळजी घेणारा, बळ इच्छिणारा शूर असा तूं गाईच्या समुदायांत गौळ वाड्यांत आम्हांस पोंचीव.

२. हे अनेकाकडून बोलाविल्या जाणाऱ्या इंद्रा, तुझें बल स्तुति करणाऱ्या लोकांना दे. हे धनिका, तूं बळकट आहेस. मोकळया मनानें झाकलेलें धन आम्हांला दिसेल असें कर.

३. पशुपक्ष्यांचा, मनुष्यांचा आणि जगांत नाना प्रकारचें जें धन आहे त्याचा इंद्र राजा आहे. त्यामुळें दात्यांना तो धन देतो. स्तुति केलेला तो आम्हांकडे धन पाठवो.

४. धनवान् आणि दाता इंद्र आमच्या रक्षणाकरितां आम्हाला देवासहवर्तमान केलेल्या स्तुतीनें ताबडतोब अन्न देवो. इंद्रसंबंधीं संपूर्ण प्राप्त झालेली दक्षिणा स्तुति करणाऱ्या लोकांची इच्छा पूर्ण करिते.

५. हे इंद्रा, आम्हाला ऐश्वर्यप्राप्तीकरितां सत्वर धन दे. आम्ही तुझें मन आमच्या स्तुतीकडे ओढूं. आम्हाला गाई, बैल व रथयुक्त संपत्ति देणारा तूं आमचें कल्याण करून आमचें रक्षण कर.

सूक्त अठ्ठाविसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—इंद्र; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, ज्ञाता असा तूं आमचें स्तोत्र ऐकण्याकरितां ये. तुझे घोडे आमच्या बाजूला जोडले जावोत. हे लोकप्रिया, तुला यद्यपि सर्व लोक स्तवितात तथापि आमचेंच स्तोत्र ऐक.

२. हे बलवान् इंद्रा, ज्या वेळीं तूं ऋषींचें स्तोत्र रक्षितोस म्हणजे स्तोत्राचें फल देतोस, त्यावेळीं तुझा महिमा स्तोत्यांत पसरतो. हे ओजस्वि इंद्रा, ज्यावेळीं तूं हातांत वज्र घेतोस त्यावेळीं तूं आपल्या कृत्यांनीं भयंकर होत्साता विजयी होतोस.

३. हे इंद्रा, तुला विनयपूर्वक अत्यंत स्तवन करणाऱ्या भक्तास तूं द्यावापृथ्वींत प्रतिष्ठा देतोस. तूं उत्कृष्ट प्रकारचें धन आणि बल भक्तांना देण्याकरितां उत्पन्न झाला आहेस. न देणाऱ्याचा देणारा नाश करितो.

४. हे इंद्रा, दुष्ट मित्रांच्या सहाय्यानें लोक आमच्यावर चालून येत आहेत (त्यांचें धन लुटून) चांगल्या दिवसासहवर्तमान आम्हास दे. निष्पाप आणि बुद्धिमान् वरुण जो खोटेपणा आमचे ठिकाणीं पहातो तो खोटेपणा दुभंगून जावो.

५. जो इंद्र विपुल उपयुक्त धन आम्हांस देतां झाला आणि जो स्तुति करणाऱ्यांच्या स्तोत्रांचें रक्षण करितो त्या इंद्राची आम्ही स्तुति करतोंच. त्या तुम्ही आमचें कल्याण करून रक्षण करावेत.

सूक्त एकोणतिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, तुझ्याकरितां हा सोम पिळला आहे. हे अश्वयुक्ता, सोम असलेल्या स्थळीं ताबडतोब ये. चांगल्या तऱ्हेनें पिळलेल्या आणि सुंदर अशा सोमाला तूं पी. आणि हे धनवन्ता, आमच्याकडून याचना केलेला असा तूं आम्हांस धन दे.

२. हे थोर शूरा इंद्रा, स्तोत्रें ऐकणारा तूं घोड्यांनीं आमच्याकडे लवकर ये, आमच्याच यज्ञांत प्रसन्न हो. आणि आमचीं हीं स्तोत्रें ऐक.

३. हे इंद्रा, तुझ्यासंबंधीं आम्हीं केलेलीं स्तोत्रें तुला कशी काय आवडतात ? हे धनवन्ता, खरोखर तुला आम्ही केव्हां प्रसन्न करूं. तुझ्याकरितांच मी सर्व स्तुति करित आहें. म्हणून हे इंद्रा, माझी हीं स्तोत्रें ऐक.

४. हे इंद्रा, ज्या पूर्वींच्या ऋषींची तूं स्तुति ऐकिलीस ते सर्व लोकांचें हितकर्तेंच होते. म्हणून मी तुला स्तवितो. हे इंद्रा, तूं आमचा पित्याप्रमाणें हितकर्ता आहेस.

५. जो इंद्र विपुल आणि उपयुक्त धन आम्हांस देता झाला आणि जो स्तुति करणाऱ्यांच्या स्तोत्राचें रक्षण करतो त्या इंद्राची स्तुति केल्याविना आम्ही कधीं राहात नाहीं. त्या तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करावें.

सूक्त तिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे तेजस्वी आणि बलवान् इंद्रा, आम्हांकडे सामर्थ्यासहित तूं ये. आणि आम्हांला प्राप्त होणाऱ्या धनाची वृद्धि करणारा हो. हे वज्रधारण करणाऱ्या लोकनाथा, आम्हांला पुष्कळ बल दे. आणि हे शूरा, आम्हांला शत्रूहिंसक सामर्थ्य प्राप्त होवो.

२. हे इंद्रा, स्तुत्य अशा तुला शूर लोक दीर्घायुष्याकरितां स्तवितात. सर्व जनांत तूं सेनेला योग्य आहेस. तूं सुहंतु नांवाच्या वज्रानें आमच्या शत्रूंना वश करून दे.

३. हे इंद्रा, जेव्हां चांगले दिवस येतील, युद्धांत तूं जेव्हां आम्हांला ज्ञान देशील, तेव्हां बलवान् आणि देवांना बोलावणारा अग्नि आमच्या कल्याणाकरितां देवांना बोलावीत या यज्ञांत बसेल.

४. हे शूर इंद्रदेवा, आम्ही तुझें आहोंत. जे हविर्द्रव्य देत तुला स्तवितात तेहि आमचे लोक तुझेच होत. त्या दोनहि प्रकारच्या स्तुति करणारांना श्रेष्ठ प्रकारचें घर दे. आणि भरभराटींत राहून ते म्हातारे होवोत.

५. जो इंद्र विपुल आणि उपयुक्त धन आम्हांस देता झाला आणि जो स्तुति करणाऱ्यांच्या स्तोत्रांचें रक्षण करतो त्या इंद्राची स्तुति केल्याविना आम्ही कधीं राहात नाहीं. तर तूं आमचें कल्याण करून आमचें रक्षण करावें,

सूक्त एकतिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–इंद्र; छंदः—गायत्री.

१. हे मित्रहो, तुम्ही अश्वयुक्त आणि सोम पिणाऱ्या इंद्राकरितां आकर्षक स्तोत्रें गा.

२. तसेंच दाता आणि सत्यधन अशा इंद्राची तेजस्वी स्तोत्रें इतर लोकाप्रमाणें तूंहि गा आणि आम्ही (गाऊं) करूं.

३ हे इंद्रा, तूं आमच्यापासून (यज्ञादिद्वारा) अन्न इच्छावेस. हे शतक्रतो, तूं आमच्यापासून गाई इच्छाव्यास आणि हे स्थितिकारणा, तूं आमच्यापासून सुवर्णहि इच्छावें. (म्हणजे आम्ही या गोष्टी तुला आदरपूर्वक समर्पण कराव्यात.)

४. हे इच्छापूरका इंद्रा, तुझ्या प्राप्तीकरितां आम्ही तुला स्तवितों. हे सर्वाधारा, हें आमचें स्तोत्र मनःपूर्वक तूं लवकर ध्यानांत घ्यावेस.

५. हे इंद्रा, कठोर बोलणाऱ्या, निंदक आणि कवडीचुंबक लोकांच्या ताब्यांत धनी अशा तूं आम्हांला देऊं नयेस.

६. हे शत्रुनाशका इंद्रा, तूं आमचें कवच आहेस. तूं सर्व बाजूंनीं रक्षण करणारा आहेस आणि सरळ युद्ध करणारा आहेस. तुझ्या साहाय्यानेंच आम्ही शत्रूला प्रत्युत्तर देतों.

७. तसेंच हे इंद्रा, तूं सर्वांपेक्षां श्रेष्ठ आहेस. कारण, तुझें बल अन्नयुक्त द्यावापृथ्वींनाहि कबूल आहे.

८. अशा तुला तूं जेथें जाशील तेथें तुझ्याबरोबर येणारी, तेजस्वी अशीं स्तोत्यानें केलेली स्तुति कधींहि न सोडो.

९. हे इंद्रा, द्युलोकाजवळ असणाऱ्या दर्शनीय अशा तुला उद्देशून हे आमचे सोम वरवर चाललेत असे होतात, आणि लोकहि तुलाच नमस्कार करितात.

१०. हे लोकहो, चांगल्याची वृद्धि करणाऱ्या थोर इंद्राला सोम अर्पण करा. ज्ञानी इंद्राची सुंदर स्तोत्रें करा. हे इंद्रा, लोकांच्या इच्छा पूर्ण कराणारा तूं चहूकडे संचार कर.

११. व्यापक आणि थोर अशा इंद्राकरितां सुंदर स्तोत्रें आणि हवि शहाणे लोक तयार करितात. त्याचीं कृत्यें देवांनाहि नष्ट करिता येत नाहींत.

१२. सर्व जगाचा धनी आणि ज्याचा राग कोणासहि शान्त करितां येत नाहीं अशा त्या इंद्राला शत्रूच्या पराभवाकरितां स्तविलें जातें. म्हणून हे स्तुति करणाऱ्या, तूंहि आपल्या बांधवांना स्तुति करण्यास प्रोत्साहन दे.

सूक्त बत्तिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–इंद्र; छंदः—विषम—बृहती, सम–सतोबृहती; द्विपदा विराज्.

१. हे इंद्रा, तुझे भक्त आमच्यापासून दूर राहोत. म्हणून दूर असला तरी आमचे घरीं ये आणि येथें येऊन आमचीं स्तोत्रें ऐक.

२. हे इंद्रा, तुझ्याकरितां पिळलेल्या सोमावर हे स्तोते मधावर माशा असतात त्याप्रमाणें आहेत. द्रव्येच्छु स्तोते रथांत पाय ठेवतात त्याप्रमाणें आपल्या इच्छा तुझेवर अवलंबून ठेवतात.

३. द्रव्येच्छु मी दाता आणि वज्रपाणि इंद्राला पुत्र पित्याला बोलावितो त्यांप्रमाणें बोलावितों.

४. हे वज्रहस्ता, हा दधिमिश्र सोमरस इंद्राकरितां पिळलेला आहे. तो सोम उत्साहकारक म्हणून पिण्याकरितां या ठिकाणीं दोन घोड्यांच्या साहाय्यानें ये.

५. लोकांच्या याचना ऐकण्याकरितां ज्याचे कर्ण आहेत अशा इंद्राला आम्ही धन मागतों. तो आमची मागणी ऐको आणि मागणी अमान्य न करो. तो ताबडतोब शेंकडों हजारों (धन) आम्हांला देतो आणि देणाऱ्या त्याला कोणीहि परावृत्त न करो.

६. हे वृत्रहन्त्या, तुझ्याकरितां जो मनुष्य पुष्कळ सोम पिळतो आणि (स्तुतिपूर्वक) तुला आळवितो तो मनुष्य इंद्राच्या साहाय्यामुळें कोणाकडूनहि अवमानिला जात नाहीं. उलट लोकाकडूनहि सेविला जातो.

७. हे धनवान् इंद्रा, तुला हविभार्ग देणाऱ्यांच्या संकटांचा तूं निवारक हो. ज्याअर्थी उत्साही शत्रूंना तूं प्रेरक होतोस, त्याअर्थी तुझ्यामुळें ठार झालेल्या शत्रूंचें धन आम्हाला मिळूं दे आणि नित्य अशा तूं आम्हांला गृह द्यावेंस.

८ हे लोकहो, वज्रधारी आणि सोम पिणाऱ्या इंद्राकरितां सोम तयार करा. इंद्राच्या तृप्तीकरितां शिजविण्यास योग्य असे पदार्थ शिजवा. इंद्राला आवडणाऱ्या गोष्टी करा. कारण, इंद्र भक्तांना सुख देतांनाच स्वतः सुख घेतो.

९. हे लोकहो, सोमयागाचा नाश करूं नका उलट अशा यज्ञाविषयीं तत्पर रहा. थोर शत्रुहिंसक अशा इंद्रापासून द्रव्यप्राप्ति व्हावी म्हणून सत्कर्में करा. कर्मकुशलच शत्रूंना जिंकतो, घरीं राहतो आणि समृद्ध होतो. वाईट कृत्यें करणारांना देव सुखदायक होत नाहींत.

१०. दात्यांच्या रथांत दुसरा कोण बसणार आहे ? आणि समाधान पावणार आहे ? ज्याचे इंद्र आणि देव रक्षणकर्ते आहेत तो गाईनीं फुललेल्या गौळीवाड्यांत जातो.

११. हे इंद्रा, ज्याचा तूं रक्षणकर्ता होशील तो मर्त्य तुला हविर्भाग देत स्वतः अन्नाकडे जाईल. तसेंच आमचा तूं रक्षणकर्ता हो, आमच्या रथांचा संरक्षणकर्ता हो, आणि आमच्या लोकांचेंहि रक्षण करणारा तूं व्हावेंस.

टीपः—आख्यायिका—सुदासाच्या मुलांनीं वसिष्ठाचा मुलगा शक्ति याला अग्नींत टाकलें. तेव्हां त्यानें २६ वी ऋचा म्हटली. पुढला भाग वसिष्ठानें पुरा केला.

१२. जेत्याचें धन ज्याप्रमाणें इतरापेक्षां जास्त असतें त्याप्रमाणें हे इंद्रा, तुझा भाग यज्ञांमध्यें जास्त असतो. तसेंच इंद्र सोम देणाऱ्या यजमानाला जें बल देतो तें शत्रूंना नष्ट करितां येत नाहीं.

१३. हे लोकहो, मोठें, व्यवस्थित आणि सुंदर असें स्तोत्र देवांपैकीं इंद्राकरितां करा. जो सत्कृत्यामुळें इंद्राच्या ध्यानांत असेल त्याला सुप्रसिद्ध जुनीं बंधनें ताब्यांत घेत नाहींत.

१४. हे इंद्रा, तुझ्या कृपेंतल्या माणसास कोण पराभूत करील ? हे धनवन्ता, जो तुझ्याकरितां श्रद्धापूर्वक हविर्युक्त असतो त्याला युद्धांत बल प्राप्त होतें.

१५. हे इंद्रा, तुला जे लोक आवडतें धन देतात त्यांना युद्धांत तूं प्रेरणा दे. हे हर्यश्वा, तुझ्या प्रेरणेनेंच सर्व जाणत्या लोकांसह आम्ही सर्व संकटांतून पार पडूं.

१६. हे इंद्रा, हलकी आणि मध्यम या दोनहि प्रकारची संपत्ति तूंच वृद्धिंगत करतोच. सर्व उत्तम प्रकारच्या संपत्तीचाहि तूंच धनी आहेस. तुला गाईविषयीं कोणीहि नाकारित नाहीं.

१७. हे इंद्रा, तूं सर्वांस धन देणारा अशी तुझी प्रसिद्धि आहे. जीं हीं युद्धें होतात त्यांतहि तूंच धन देणारा आहेस. हे पुरुहूता, हे सर्व लोक तुझ्यापासून रक्षणाची अपेक्षा करणारे अन्न मागत आहेत.

१८. हे इंद्रा, जितक्या धनाचा तूं अधिपति आहेस तितक्याच धनाचा मीहि स्वामी होईन. हे द्रव्य देणाऱ्या, तूं दिलेल्या द्रव्यानें मी भक्तांचेंच रक्षण करीन, तें धन पापी लोकांना देणार नाहीं.

१९. कुठेंहि असणाऱ्या आणि पूजन करणाऱ्या लोकांना दररोज मी धन देतोंच (हें इंद्राचें वाक्य ऐकून संतुष्ट झालेला ऋषि म्हणतो) हे इंद्रा, तुझ्याविना आमचा हितकर्ता नाहीं. तूंच आमचा स्तुत्य पालन करणारा आहेस.

२०. (देवतांची स्तुति वगैरे करण्यांत) चलाख मनुष्यच स्तुतीच्या साहाय्यानें अन्न मिळवितो. अनेकांनीं स्तविलेल्या इंद्राला स्तुतिपूर्वक मी सुतार धावे जवळचे बळकट लांकूड ज्याप्रमाणें नमतें करितों त्याप्रमाणें स्वताला नमवितों.

२१. मनुष्य इंद्राशीं वाकडे वागून धन मिळवीत नाहीं. इंद्राविरुद्ध माणसाला धन प्राप्त होत नाहीं. हे धनवन्ता, तुला महत्वाच्या दिवशीं मला जें धन द्यावयाचें असेल तें धन तुझ्यामुळेंच चांगल्या कर्माला लागते.

२२. हे शूर इंद्रा, स्थावरजंगम सृष्टीचा धनी अशा तुला धारा न काढल्यामुळें कासा भरलेल्या गायाप्रमाणें सोमानें पात्रें भरून आम्ही तुझी स्तुति करीत आहोंत.

२३. हे धनवन्ता, स्वर्गीत तुझ्यासारखा दुसरा कोणी झाला नाहीं आणि पृथ्वीवरहि तुझ्यासारखा दुसरा कोणी झाला नाहीं आणि होणारहि नाहीं. अश्व, अन्न, हवि आणि गाई इच्छिणारे आम्ही तुला स्तवितों.

२४. हे श्रेष्ठ इंद्रा, अत्यंत अल्प अशा आम्हाला प्रसिद्ध असें धन दे. हे धनवन्ता, तूं फार पुरातन कालापासून धनिक आहेस आणि संग्रामांत किंवा यज्ञांत बोलावण्यास योग्य आहेस.

२५ हे धनिका, आमच्या जुन्या शत्रूंना हलीव, आम्हाला धन सुलभ कर. युद्धांत स्तुति करणाऱ्या आमचें संरक्षण कर आणि आमचा उत्कर्ष कर.

२६. हे इंद्रा, आम्हांला ज्ञान दे. तसेंच बाप मुलांना ज्याप्रमाणें धन देतो त्याप्रमाणें आम्हांला तूं धन दे. हे बहुस्तुता, यज्ञांत आम्ही लोक सूर्याला प्राप्त करितों (उत्कर्षाला जातो).

२७. हे इंद्रा अडमार्गांनीं जाणारे, हिंसक आणि दुष्ट असे लोक आम्हाला त्रास न देवोत. हे शूरा, आम्ही नम्रपणानें सर्व पाणी तरून जाऊं. (संकटाच्या पार होऊं.)

सूक्त तेहेतिसावें.

ऋषिः—१ ते ९ वसिष्ठ, १० ते १४ वसिष्ठपुत्र; देवताः—१ ते ९ वसिष्ठपुत्र, १० ते १४ वसिष्ठ; छन्दः—त्रिष्टुप्.

१. गौर वर्ण, आरंभलेलें शेवटास नेणारे आणि (थोडीशी) उजव्या बाजूस शेंडी ठेवणारे वसिष्ठ मला आनंदित करिते झाले. (भेटले) म्हणून यज्ञस्थलांतून उठतांना मी असें म्हणतों कीं माझ्यापासून दूर माझे पुत्र जाऊं नयेत.

२. चमस नांवाच्या पात्रांतील सोम पिणाऱ्या आणि तन्मय झालेल्या इंद्राला सुदासाच्या यज्ञांत पिळलेल्या सोमाकरितां पाशद्युम्नांना तिरस्कारून लांब होता तरी (मंत्रसामर्थ्यानें) वसिष्ठांनीं आणिले आणि

इंद्रहि वयतपुत्र पाशद्युम्नाला सोडून पिळलेल्या सोमाकरितां वसिष्ठाकडे येता झाला.

३. असाच वसिष्ठामुळें सुदास सुखानें नदी तरून जाता झाला. तसेंच वसिष्ठांच्या मदतीनें सुदास सहज भेदाला ठार करितां झाला. तसेंच हे वसिष्ठहो, तुमच्या स्तोत्रानें दाशराज्ञ युद्ध सुरू झालें असतां सुदासाचें इंद्र रक्षण करितां झाला.

४. हे श्रेष्ठहो, तुम्ही गाईलेल्या स्तोत्रानें तुमच्या आम्हा पितरांना अत्यंत संतोष होतो आहे. आतां स्वतःच्या आश्रमांत जाण्यास उद्युक्त झालेला मी रथ चालवितों. तुम्ही क्षीण होऊं नका. (वाईट वाटून घेऊं नका.) हे वसिष्ठहो, शक्करी छंदांतील मोठ्यानें गाइल्या जाणाऱ्या सामानें इंद्राला ज्याअर्थीं तुम्ही बल दिलें आहे त्याअर्थीं तुम्ही क्षीण होऊं नका.

५. तहान लागल्यामुळें पाणी मागणाऱ्या व तृत्सुराजांच्या सैन्यासहित असलेल्या वसिष्ठपुत्रांनीं दाशराज्ञ युद्धांत जणूं काय स्वर्गालाच बोलाविलें. स्तुति करणाऱ्या वसिष्ठाचें स्तोत्र इंद्रानें ऐकिलें. आणि विस्तीर्ण मुलूख तृत्सुंचा केला.

६. गाईला मारण्याकरितां साळून घेतलेल्या कांठीसारखे भरत म्हणजे तृत्सुलोक एकाकी होते आणि ते थोडे होते. अशा स्थितींत वसिष्ठ तृत्सूंचा पुरोहित झाला. त्यामुळें तृत्सूंची प्रजा वाढली.

७. पृथ्वी, अन्तरिक्ष आणि स्वर्ग यामध्यें अग्नि, वायु आणि सूर्य हे उदक उत्पन्न करितात. त्याची तेजस्वी अशी ही श्रेष्ठ वसुरुद्रआदित्यरूप प्रजा आहे. तो तेजस्वी अग्नि उषेला प्राप्त करितो. ह्या सर्व गोष्टी वसिष्ठ जाणतात.

८. हे वसिष्ठहो, तुमचा महिमा सूर्याप्रमाणें स्पष्ट आहे. तुमचा महिमा समुद्राप्रमाणें अगाध आहे. तसेंच तुमचा मंत्रसमुदाय वाऱ्याचा वेग ज्याप्रमाणें कोणास अनुसरतां येत नाहीं त्याप्रमाणें कोणासहि अनुसरतां येत नाहीं (इतका मोठा आहे)

९. तेच वसिष्ठ ऋषि दुर्ज्ञेय पण सहस्रशाखी अशा जगाला अंतःकरणातल्या ज्ञानानें जाणतात. सर्व नियन्त्या परमेश्वरानें एखाद्या वस्त्राप्रमाणें विणावयाला सुरु केलेल्या या जगांत (पूर्वींचा देह टाकून) अप्सराकडे (जन्म घेण्याकरतां) गेला.

१०. (हें बोलणें इंद्राचें आहे असें कांहीं व वसिष्ठपुत्राचें असें कांहीं म्हणतात) हे वसिष्ठा, ज्यावेळीं विद्युल्लतेप्रमाणें असणारें आपलें तेज टाकणाऱ्या तुला मित्रावरुण पहाते झाले. आणि ज्यावेळीं आगस्त्यांनीं इतर प्रजेंतून तुम्हांस बाहेर काढलें त्याचवेळीं तुमचा पहिला जन्म होय.

११. तसेंच हे वसिष्ठा, तूं मित्रावरुणांचा पुत्र आहेस. हे ब्रह्मन् वसिष्ठा, उर्वशीविषयक कामवासनेमुळें स्खलित झालेल्या मित्रवरूणांच्या वीर्यापासून तूं उत्पन्न झाला आहेस. दैवी ज्ञानानें म्हणजे वेदानें युक्त असणाऱ्या वसिष्ठाला सर्व देवानीं कमळांत संभाळलें.

१२. ज्ञानी, स्वर्ग आणि पृथ्वीवरचे जाणणारा, हजारो तऱ्हेची संपत्ति किंवा सर्वस्व देणारा असा तो वसिष्ठ होता. परमेश्वरानें वस्त्राप्रमाणें विस्तारलेल्या जन्ममरणाच्या फेऱ्यांत वसिष्ठ उर्वशीपासून झाला.

१३. सत्रांत मित्रावरुणांना बोलावलें आणि ते तेथें गेले. आणि स्तुति केल्यानें प्रसन्न झालेल्या त्यांनीं वासतीवर नांवाच्या कुंभांत एकेवेळीं रेतःसिञ्चन केलें. त्यापासून सन्मान्य अगस्त्य उत्पन्न झाला आणि मध्यभागापासून झालेल्यास ऋषि वसिष्ठ असें म्हणतात.

१४. हे तृत्सुहो, तुमच्याकडे वसिष्ठ येतो आहे. मोकळ्या मनानें याची स्तुति करा. आलेला वसिष्ठ प्रथम स्तोत्र म्हणणाऱ्या, सामगायन करणाऱ्या आणि सोम काढणाऱ्या अध्वर्यूला प्रसन्न करितो आणि नंतर काय बोलावयाचें तें बोलतो. (असें तृत्सूंना इंद्र म्हणतो.)

---

११. टीप—अगस्त्य आणि वसिष्ठ यांच्या उत्पत्तीबद्दल बृहद्देवतेमध्यें खालीलप्रमाणें कथा दिली आहे.

आदितीपासून मित्रावरुण झाले. त्यांच्या वासतीवर सत्रांत अप्सरा उर्वशीला पाहून मित्रावरुणांचें रेतस्खलन झालें. तें वीर्य एका कुंभांत पडलें. त्या वीर्यापासून एक मुहूर्तानें अगस्त्य आणि वसिष्ठ नांवाचे दोन सामर्थ्यवान् आणि तपस्वी असें ऋषि उत्पन्न झाले. कुंभ म्हणजेच कमळ घेतलें असावें. हें रूपक असावें त्यामुळें अर्थाचा अनिश्चय आहे.

सूक्त चवतिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—विश्वेदेव; छंदः—१–१९ द्विपदा २० अक्षरा विराज्, २२–२५ त्रिष्टुभ्.

१. तेजस्वी, इच्छापूरक, असें आमचें स्तोत्र वेगशाली ताशीव रथाप्रमाणें वेगानें पोंहोचो.

२. (या मंत्रांत पाण्याची स्तुति आहे.) खालीं पडणारें पाणी स्वर्ग आणि पृथ्वीच्या उत्पत्तीला जाणते आणि ऐकतेहि.

३. (आतां येथून दोन ऋचांत इंद्राची स्तुति आहे.) पृथ्वीपासून उद्भूत झालेलें पाणी इंद्राला पुष्ट करितें. संकटें आलीं असतां तेजस्वी योद्धे इंद्राला स्तवूं लागतात.

४. इंद्राला आणण्याकरितां रथाच्या धुरांना घोडे जोडा. सुवर्णकान्ति इंद्र वज्र घेऊन तयार आहे.

५. (ही यज्ञाची स्तुति आहे) हे लोकहो, यज्ञाला चला आणि मार्गांत स्वत: निघाल्यासारखे (उत्साहपूर्ण) चला.

६. हे लोकहो, युद्धाला आपण होऊन चला. ज्ञानद आणि पापनाशक यज्ञ लोकांकरितां करा.

७. ह्या यज्ञाच्या सामर्थ्यानें सूर्य उगवतो. पंचमहाभूतें पृथ्वीला धारण करितात त्याप्रमाणें हा यज्ञ लोकांना धारण करितो.

८. (येथून तीन ऋचांत देवांची स्तुति आहे) हे अग्ने, हिंसारहित यज्ञानें इच्छापूर्ति करून घेणारा मी देवांना पाचारितों. आणि देवांचीं सेवा करितों.

९. हे लोकहो, तुम्ही देवांना उद्देशून धर्मकृत्यें करा. आणि तुम्ही देवांची स्तुति करा.

१०. तेजस्वी आणि बहुनेत्र वरुण या नद्यांचें पाणी पहातो.

११. वरुणदेव राष्ट्रांचा राजा आहे. नदीचें रूप आहे. या वरुणाचें सामर्थ्य जयिष्णु व सर्वगामी आहे.

१२. (या दोन ऋचांत देवांची स्तुति आहे) हे देवहो, सर्व प्रजेंत आमचें रक्षण करा. आम्हाला स्तुत्य करा. व आमच्या निन्दक शत्रूंचें तोंड काळें करा.

१३. आमच्या शत्रूंचें दुःखदायक शस्त्र आमचेपासून दूर होवो. शरीराचा रोग वगैरे दुःखें नष्ट होऊं द्या.

१४. हव्यभक्षक अग्नि आमच्या नमस्कारांनीं प्रसन्न होऊन आमचें रक्षण करो. आम्ही अग्नीकरितां स्तोत्र तयार केलें आहे.

१५. अपांनपात् अग्नीला देवांसहवर्तमान स्तुति करून तुम्ही मित्र करा. तो आम्हांला सुखदायक होवो.

१६. मेघोदकांना विदारणाऱ्या (विजेच्या रूपानें), नदींच्या मूळाशीं असणाऱ्या, आणि पाण्यात राहणाऱ्या अशा जलज अग्नीला तुम्ही स्तोत्रें म्हणून स्तवा.

१७. अहिर्बुध्न्य अग्नि आम्हांला शत्रूंच्या ताब्यांत न देवो. आणि या यज्ञेच्छु यजमानाचा यज्ञ कधींहि निष्फळ होऊं नये.

१८. (या दोन ऋचांत देवांची किंवा मरुतांची स्तुति आहे) आमच्या या लोकांना देव अन्न देवोत. आमच्या धनाकरितां उत्सुक झालेले आमचे शत्रु मरोत.

१९. मोठी सेना असलेले राजे मरुतांच्या सामर्थ्याच्या जोरावर पृथ्वीला व सूर्याप्रमाणें शत्रूला त्रस्त करितात.

२०. ज्याअर्थी हाताचा घड असलेला त्वष्टा पत्नीकडे चांगल्या तऱ्हेनें जातो आहे त्याअर्थी आम्हांला चांगले पुत्र प्राप्त व्हावेत.

२१. आमचें स्तोत्र त्वष्ट्यानें ऐकावें. बुद्धिमान् त्वष्टा आमच्याकरितां धन इच्छिणारा असो.

२२. ती इच्छित संपत्ति धनयुक्त असणाऱ्या देवपत्नी आम्हांस देवोत. वरुणपत्नी आणि द्यावापृथ्वी आमचें स्तोत्र ऐकोत. दाता त्वष्टा संकटनिवारक देवपत्न्यांसहित आमचें रक्षण करो आणि आम्हांला धन देवो.

२३. आमचें धनयुक्त पर्वत संरक्षण करोत. तें पाणी धनयुक्त देवपत्नी, औषधी, स्वर्ग, आकाश आणि वनस्पतीसहित पृथ्वी आमचें रक्षण करो. त्या उभय द्यावापृथ्वीहि आमचें रक्षण करोत.

२४. आमच्या त्या मागणीस विस्तीर्ण द्यावापृथ्वी अनुमोदन देवोत. तेजाचें आगर असा इंद्राचा मित्र वरुण आमच्या मागणीस अनुमोदन देवो. महापराक्रमी मरुत् आमच्या मागणीस अनुमोदन देवोत. सर्वाधार संपत्तीच्या उपभोगाकरितां आम्ही त्या संपत्तीचें स्थान व्हावें. (या आमच्या मागणीस सर्वांचें अनुमोदन असावें.)

२५. आमचें स्तोत्र इंद्र, वरुण, मित्र, अग्नि, अप्, ओषधी आणि वृक्ष सेवोत. आणि मरुतांची स्तुति करणारे आम्ही सुखांत रहावें. आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त पस्तिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-विश्वेदेव; छंदः—त्रिष्टुभ्.

१. इंद्र आणि अग्नि आमचें रक्षण करून आम्हांला शांति देवोत. हविर्दान केलेले इंद्र आणि वरुण आम्हांला शांति देवोत. इंद्र आणि सोम आम्हांला

शांति आणि आमचें सर्वप्रकारें कल्याण करोत. इंद्र आणि पूषा आम्हाला युद्धांत सुख देवोत.

२. भगदेव आम्हांला शांति देवो. नराशंस आम्हांस शांति देवो. अत्यंत असणारी बुद्धि आम्हांला शांति देवो. धन आम्हाला शांतीनें मिळो. निग्रहपूर्वक बोललें जाणारें सत्य आम्हांला शांतिप्रद असो. अनेक स्वरूपानें प्रादुर्भूत होणारा अर्यमा आम्हांला शांतिप्रद होवो.

३. आम्हांला धातादेव शांतिप्रद होवो. सर्वाधार वरुण आम्हांला शांतिप्रद असो. आम्हांला गतिशील पृथ्वी शांतिप्रद असो. विस्तृत अशा द्यावापृथ्वी आम्हांला शांतिप्रद असोत. पर्वत आणि देवांचीं चांगलीं स्तवनेंहि आम्हाला शांतिप्रद असोत.

४. तेजाचें आगर असणारा अग्नि आम्हाला सुखदायक होवो. मित्रावरुण आम्हांला शांतिप्रद होवोत. अश्विनी, पुण्यशीलांचीं पुण्यकृत्यें आणि गमनशील वायु आम्हांला सुखशांति देणारे असोत.

५. आम्ही बोलावल्याबरोबर द्यावापृथ्वी आम्हांला शांतिप्रद होवो. आमच्या दृष्टीस आकाशहि सुखकर होवो. ओषधी, वृक्ष, जयशाली व लोकाधिप इन्द्र आम्हांला शांतिप्रद व्हावेत.

६. तेजस्वी इन्द्र देवांसहवर्तमान आम्हांला शांतिप्रद होवो. जलप्रिय रुद्र गणांसहवर्तमान आम्हांला शांतिप्रद होवो. येथें देवपत्न्यांसहित त्वष्टा आम्हांला शांतिप्रद होवो. आणि सर्व देव आमचीं स्तोत्रें एकोत.

७. सोम, स्तोत्र, सोम कुटण्याचे दगड, यज्ञ, यज्ञस्तंभाचीं परिमाणें, ओषधि आणि वेदि आमचें कल्याण करणारें होवोत.

८. महातेजस्वी सूर्य आम्हांला शांतिप्रद उदय पावो. चारहि दिशा आम्हांला सुखकर होवोत. स्थिर असणारे पर्वत आम्हांला सुखकर होवोत. नद्या आणि नद्यांचें पाणी आम्हांला सुखकर होवो.

९. कर्मासहित देवी अदिति आम्हाला सुखकर होवो. स्तुत्य मरुत, विष्णु, पूषन्, पाणी आणि वायु आम्हांला सुखकर होवो.

१०. तेजस्वी आणि रक्षक सविता, कांतिमान् उषा, आमच्या लोकांना पोषक पर्जन्य, आणि क्षेत्रपति शंभु आम्हांला सुखकर होवोत.

११. सर्वस्तुत्य देव, कर्मसहित सरस्वती, यज्ञसेवक, दानग्राहक, पृथ्वीवरचे, स्वर्गांतले आणि पाण्यांतले सर्व आम्हास सुखकारक होवोत.

१२. सत्यशील देव, अश्व, गाई, कर्तव्यशाली आणि कुशल ऋभुहि आम्हांला सुखप्रद असोत. स्तोत्रें म्हणतांना पितरहि आम्हांला सुखप्रद असोत.

१३. देव अजएकपाद्, अहिर्बुध्न्य, रोग निवारक अपांनपात्, आणि देवांची कृपा असलेली मरुतांची आई पृश्नि आमचें संरक्षण करो.

१४. हें नवीन केलेलें स्तोत्र स्वर्गांतलें आदित्य, अन्तरिक्षांतले रुद्र आणि पृथ्वीवरचे वसु ऐकोत. आणि दुसरेंहि स्वर्गांतले, पृथ्वीवरचे, पृश्निपुत्र आणि यज्ञार्ह सर्व आमचें स्तोत्र ऐकोत.

१५. यज्ञार्ह देवांनाहि पूज्य, मनूलाहि पूजनीय अमर आणि सृष्टिनियम जाणणारे जे देव ते आम्हांला कीर्तिमान् पुत्र ताबडतोब देवोत. आणि आमचें कल्याण करून आमचें रक्षण करोत.

सूक्त छत्तिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–विश्वेदेव; छंदः—त्रिष्टुभ्.

१. यज्ञस्थलापासून स्तोत्र देवांच्याकडे जावो. सूर्य किरणांनीं पाऊस (उत्पन्न करितो) पाडतो. ही विस्तीर्ण पृथ्वी पर्वतांनीं व्यापिली आहे. अग्नि विस्तीर्ण यज्ञकुंडांत पेटविला जातो.

२. हे बलशाली मित्रावरुणहो, तुमच्याकरितां अन्नाप्रमाणें नवीन असें स्तोत्र मी करितों. तुमच्यापैकीं एक समर्थ, दयाळु व धर्मकर्मांचा आधार वरुण आणि स्तविला जाणारा मित्र हे प्राणिमात्राला प्रवृत्त करितात.

३. वाहणाऱ्या वायूचा संचार सर्वत्र चालूं आहे. दूध देणाऱ्या गाई पुष्ट होता आहेत. आणि महान् सूर्याच्या आकाशांत उत्पन्न झालेला पाऊस तेथें गर्जना करतो आहे.

४. (या ऋचेच्या पहिल्या भागांत इंद्राची स्तुति आणि दुसऱ्या भागांत अर्यमन्‌ची स्तुति आहे.) हे शूर इंद्रा, तुझे आवडते, चांगल्या चालीचे आणि आधारभूत हरि नांवाचे घोडे जो मनुष्य प्रशंसा करून रथाला जोडतो (त्याच्या यज्ञांत तूं जातोस.)

५. (रुद्राची स्तुति) हविर्युक्त, स्वकीय यज्ञगृहांत असलेले, कर्मशील लोक या रुद्राच्या मैत्रीकरितां त्याची पूजा करितात. लोकांकडून स्तविला जाणारा हा स्तोत्यांना अन्न देतो. रुद्राला अत्यंत आवडणारा नमस्कार मी करितों.

६. या नद्यांमध्यें जलाचें उत्पत्तिस्थान अशी ही सरस्वती नदी सातवी आहे. कामपूरक आणि सुंदर प्रवाहयुक्त अशा नद्या वहात आहेत. स्वतःच्या उदकानें वाढणाऱ्या, अन्नोत्पादक म्हणून सर्वांना हव्याशा वाटणाऱ्या या नद्या एकदम येवोत (आमचें संरक्षण करोत.)

७. आणखी आनंदित आणि वेगशाली ते मरुत आमचें यज्ञकर्म आणि पुत्र यांचें रक्षण करोत. वाग्देवता आम्हांवर कृपा करो, वाणी आणि ते मरुत आमच्या संपत्तीची वृद्धि करोत.

८. हे स्तोतेहो, तुम्ही विपुल भूमि मागा. यज्ञार्ह, आणि सर्वप्रेरक पूषन्देवाला तुम्हीं बोलवा. आमच्या ह्या कर्माचा संरक्षक भगदेव बोलवा. तसेंच आमच्या यज्ञांत ऋभूपैकीं दानसेवक आणि नगरवासीयांना आधार अशा वाजदेवाला बोलवा.

९. हे मरुतहो, तुम्हाप्रत आमचें हें स्तोत्र प्राप्त होवो. दिलेला सोम पिणारा, रक्षक अशा विष्णूला आमचें हें स्तोत्र पोंचो. मरुत आणि विष्णु स्तुति करणाऱ्या मला प्रजा आणि अन्न देवोत. हे मरुतहो, हे विष्णो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त सदतिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—विश्वेदेव; छंदः—त्रिष्टुभ्.

१. (या व पुढील ऋचेंत ऋभूंची स्तुति आहे.) हे तेजोनिधान वाजहो, चांगल्या प्रकारें वाहून नेणारा स्तुत्य आणि अभंग असा तुमचा रथ तुम्हांला आमच्याकडे आणो. हे सुंदर हनुयुक्त देवहो, आमच्याकडे येऊन मद येण्याकरितां क्षीरदधि व सातुमिश्रित अशा खूप सोमापानानें आपले जठर पूरित करा.

२. हे ऋभूहो, स्वर्गद्रष्टे तुम्ही धनयुक्त अशा आम्हांला अविनाशी असें धन द्या. सामर्थ्यसंपन्न असें तुम्ही आमच्या यज्ञांत सोम प्या. आणि आम्हांला बुद्धिपूर्वक धन द्या.

३. (येथून पुढें पांच ऋचा इंद्राला उद्देशून आहेत.) हे धनिका इंद्रा, तूं अत्यंत अल्प अशा धनाचें दान स्वीकारतोस (भक्तानें तुला भक्तिपूर्वक थोडें दिलें तरी चालतें) आणि तुझे दोनहि हात धनानें पूर्ण असतात. तुझी उदार वाणी (धन देण्याविषयीं तुला कधींहि) प्रतिबंध करित नाहीं.

४. हे इंद्रा, असामान्य कीर्तिमान् आणि ऋभूंचा आधार असणारा तूं चांगल्या अन्नाप्रमाणेंच भक्त अशा माझ्या घरीं ये. आज आम्ही वसिष्ठ आपल्या हरि नांवाच्या घोड्यांसहवर्तमान असणाऱ्या हे इंद्रा, हविर्द्रव्य देणारे आणि स्तोत्रें म्हणत आहोंत.

५. हे हर्यश्व इंद्रा, तुझी स्तोत्रें जों वर्णन केलीं जातात तों तूं हवि देणाऱ्यांना धन देतोस. मग हे इंद्रा, तूं आम्हाला धन केव्हां देणार आहेस ? आम्ही तर सध्या तुझी योग्य स्तुति करतों आहोंत.

६. हे इंद्रा, तूं आमची स्तुति केव्हां ध्यानांत घेशील ? तुझें स्तवन करणाऱ्या आम्हाला तूं आतां स्थिर करावेस. वेगशाली तुझा घोडा सतत चाललेल्या आमच्या स्तुतीमुळें पराक्रमी पुत्रयुक्त संतति आणि अन्न आमच्या घरीं वाहून आणो.

७. देवी भूमिहि ज्या इंद्राच्या तंत्रानें वागते, अन्नानें समृद्ध असणारा संवत्सरात्मक कालहि ज्याच्या सत्तेंत वावरतो, ज्या इंद्राला मर्त्य स्तोते स्वस्थ बसूं देत नाहींत, तो त्रैलोक्याधार इंद्र अपरिमित सामर्थ्यांनीं युक्त होतो.

८. हे सवितृदेवा, स्तुत्य अशी संपत्ति आम्हांला प्राप्त होवो. (इंद्रसखा) पर्वताला धन दिलें जात असतां आम्हांला संपत्ति प्राप्त होवो. सर्वसंरक्षक स्वर्गीय इंद्र नेहेमीं आमचा रक्षक असो. (या सूक्तांत प्रतिपादित सर्व देव) तुम्हीं आमचें कल्याण करून आमचें संरक्षण करावें.

सूक्त अडतिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—७-८वाजिन्,सहाव्या ऋचेचा दुसरा भाग भग किंवा सवितृ, अवशिष्ट सवितृ; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. जो पूजनीय सवितृदेव मनुष्याकडून स्तविला जातो, जो विपुलधनयुक्त देव स्तोत्यांना रमणीय असें धन देतो, तो सवितृदेव सुवर्णकांतियुक्त आहे आणि कांति प्रकट करीत आहे.

२. हे सवितृदेवा, तूं वर ये. हे सुवर्णकांते, तूं विस्तृत आणि प्रसिद्ध अशी प्रभा फाकणारा आणि स्तोत्यांना भोगयोग्य असें धन देणारा असा आमचें स्तोत्र ऐक.

३. सवितृदेव आमच्याकडून स्तविला जावो. सर्व देव ज्या सवित्याला स्तवितात तो जगद्वन्द्य देव आमच्या स्तोत्रांनीं अन्न देवो. आणि सर्व मार्गांनीं आमचें रक्षण करो.

४. सवितृदेवाची आज्ञा पाळणारी देवी अदिति ज्या देवाची स्तुति करिते, सम्राट् वरुण, मित्र आणि प्रीतिप्रद अर्यमा ज्या देवाची स्तुति करितात तो सवितृदेव आम्हांला आमच्या स्तोत्रामुळें अन्न देवो.

५. देवांनीं दिलेले उपभोगणारे यजमान एकत्र होऊन पृथ्वी आणि स्वर्ग यांचा मित्र जो सविता त्याला स्तवितात. तो आणि अहिर्बुध्न्य आमचें स्तोत्र ऐकोत आणि वाग्देवी मुख्य गोधनासहित आमचें संरक्षण करो.

६. आम्हांकडून याचना केला जाणारा प्रजापालक सविता स्वतःचें धन आम्हांस देवो. तो तेजस्वी स्तोता भगदेवाला आपल्या रक्षणाकरितां जोरानें बोलावतो. आणि असमर्थ स्तोता भगदेवाला धन मागतो.

७. यज्ञांत मितगामी आणि सुंदर अन्नयुक्त वाजीदेव आम्हांला सुखकर होवोत. मारेकरी, चोर आणि राक्षस यांना ठार करणारे वाजिदेव जुनें रोग आमच्यापासून दूर करोत.

८. हे वाजिहो, बुद्धिमान्, अमर आणि सत्य जाणणारे असें तुम्ही सर्व युद्धांत आमचें धनसंरक्षण करा. तुम्ही हा मधुर सोम प्या. तृप्त होऊन देवयान मार्गांनीं जा.

सूक्त एकोणचाळिसावें.

ऋषिः--वसिष्ठ; देवता-विश्वेदेव; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. वर जाणारा अग्नि स्तोत्याची सुंदर स्तुति स्वीकारो. सन्मुख होऊन सर्वांना स्तुति करावयास लावणारी उषादेवता यज्ञांत जाते आहे. श्रद्धायुक्त पत्नी आणि यजमान यज्ञमार्गाला रथयुक्त माणसाप्रमाणें लागतात. यज्ञ करण्यास प्रवृत्त झालेला होता यज्ञ करो.

२. ह्या यजमानाचे चांगल्या अन्नानें युक्त दर्भ प्राप्त होतात. (हे लोक देवतांना उद्देशून दर्भावर चांगलें अन्न देतात) आतां प्रजापालक आणि वडवायुक्त वायु आणि पूषा लोकांच्या रक्षणाकरितां लोकसमूहांत राजा ज्याप्रमाणें येतो त्याप्रमाणें उषेच्यापूर्वी येवोत.

३. येथें पृथ्वीवर उत्पन्न झालेले वसु प्रसन्न होवोत. विस्तीर्ण आकाशांत प्रकाशित होणारे मरुत् सेवा केले जातात. हे वेगशाली वसु आणि मरुतहो, तुम्ही आपला रस्ता (आमच्याकडे करा.) आणि तुम्ही तुम्हाकडे येणारा जो आमचा दूत अग्नि त्याचे बोलावणें ऐका.

४. यज्ञांत ते प्रसिद्ध यज्ञार्ह, रक्षक सर्व देव एकत्र बसण्याची जागा स्वीकारतात. हे अग्ने, यज्ञांत पूजेची इच्छा करणाऱ्या देवांचें पूजन कर. ताबडतोब भग अश्विनी आणि इंद्र यांची पूजा करा.

५. हे अग्ने, स्वर्गांतून थोर देवांना आमच्या यज्ञांत बोलीव. पृथ्वी आणि अन्तरिक्ष यातूनहि बोलाव. मित्र, वरुण, इंद्र, अग्नि, अर्यमा, अदिति व विष्णु यांना आमच्या कल्याणाकरितां बोलीव. वाग्देवता सरस्वती आणि मरुत (आमच्या स्तुतीनें) प्रसन्न होवोत.

६. यज्ञार्ह देवांना स्तुतिपूर्वक आम्ही हवि देतो. आम्हा मर्त्यांच्या इच्छांना प्रतिबंध न करितां अग्नि आमच्या यज्ञांत येवो. हे देवहो, तुम्ही अक्षय आणि नेहेमीं उपयोगी असें धन आम्हांला द्या. आम्ही यज्ञांत आलेल्या देवांच्या साहाय्यानें मार्ग क्रमूं या.

७. आम्हां वसिष्ठांकडून सर्वत्र द्यावापृथ्वी स्तविली जात आहे. त्याचप्रमाणें आमच्याकडून पूजिले जाणारे वरुण, मित्र आणि अग्नि स्तविले जात आहेत. चंद्र आम्हांला उत्कृष्ट अन्न देवो. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त चाळिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-विश्वेदेव; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे देवहो, तुझ्याकडे मन लावल्यानें मिळणारे सुख आम्हांला मिळो. आम्ही वेगशाली देवांचें स्तोत्र करीत आहोंत. आज सवितादेव आम्हाला देईल त्या रमणीय धनाचें भागिदार आम्हीच व्हावें.

२. मित्र, वरुण, द्यावापृथ्वी, इन्द्र, अर्यमा, अदिति हे देव तें तेजस्वी स्तोत्यांना मिळालेलें धन आम्हांस देवोत, कीं जें भग आणि वायूनें आम्हांस दिलें.

३. पृषत् नांवाचें हरिण रथाला जोडणारे हे मरुतहो, तम्ही ज्या मर्त्याचें रक्षण करितां तोच तेजस्वी होवो. बलवान होवो. अग्नि आणि सरस्वती ह्या भक्ताला कार्यप्रवृत्त करितात. त्याच्या धनाचा कोणीहि नाश करीत नाहीं.

४. सृष्टीच्या नियमांचा धनी हा वरुण, मित्र, अर्यमा आणि समर्थ असे देव आमच्या कर्माचे आधार आहेत. स्तविली जाणारी जयिष्णु अशी देवी अदिति

आणि वरुणादिक देव सुरक्षितपणें आम्हांला संकटाच्या पार नेवोत.

५. त्रैलोक्यांत हविर्द्रव्याच्या योगानें येणारा, कामपूरक अशा विष्णूचे अन्य देव हे फांद्यासारखे आहेत. रुद्रदेव रुद्रसंसंधीं सुखें आणि मोठेपणा आम्हांला देतो. हे अश्विहो, तुम्ही आमच्याकडे अन्नपूर्ण होऊन यावें.

६. हे तेजस्वी पूषनदेवा, आमच्या दानकर्मांत विघ्न करूं नका. सर्वपूज्य सरस्वती आणि दिलेल्याचा उपभोग घेणाऱ्या देवपत्नी आमच्या दानकर्मांत विघ्न न करोत. सुखप्रद घोडे आमचें रक्षण करोत. सर्वव्यापी वायु आम्हांला पाऊस देवो.

७. आम्हां वसिष्ठाकडून सर्वत्र द्यावापृथ्वी स्तविली जात आहे. त्याचप्रमाणें आमच्याकडून पूजिले जाणारे वरुण, मित्र आणि अग्नि स्तविले जात आहेत. चन्द्र आम्हांला उत्कृष्ट अन्न देवो. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त एकेचाळिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–१ इंद्र, अग्नि, २ ते ५ भग, ७ उषस्; छंदः— १ जगती, २ ते ७ त्रिष्टुभ्.

१. आम्ही उषःकालीं अग्नि, इंद्र, मित्रावरुण, अश्विन भग, पूषन, ब्रह्मणस्पति, सोम आणि रुद्र यांना बोलावतों (यांचें स्तवन करितों.)

२. विश्वाचा आधार, जयशील, उग्र असा अदितीचा पुत्र जो भग त्याला मी प्रातःकालीं बोलावतों. दरिद्रीहि स्तोता ज्या भग देवाला स्तवून कमनीय धन मला दे असें म्हणतो, प्राप्तधन असा राजाहि ज्या भगदेवाला मला सुंदर धन दे असें म्हणतो, त्या भगाला आम्ही सकाळींच बोलावतों.

३. हे भगदेवा, तूं आमचा नेता आहेस. तूं सत्यधन आहेस. आमच्या मनःकामना पूर्ण करणारा तूं आमची स्तुति सफल कर. हे भगा, तूं गाईघोडे यांच्या योगें आम्हांस श्रेष्ठ कर. हे भगा, आम्ही लोकांच्या साहाय्यानें मनुष्यशक्तियुक्त व्हावें.

४. आम्ही धनिक व्हावें. दिवसाच्या पूर्वभागीं व मध्याह्नीं आम्ही भगदेवाच्या कृपेस पात्र व्हावें. हे धनवन भगदेवा, सूर्याचा उदय झाल्यावर आम्ही देवांच्या अनुग्रहास पात्र व्हावें.

५. हे देवहो, भगदेवच धनवान असो, त्याच्या धनिकपणामुळें आम्ही धनिक व्हावें. हे भगा, प्रसिद्ध अशा तुला सर्वच लोक पुनः पुनः बोलावतात. हे भगदेवा, तो तूं या यज्ञांत आमचा पुढारी हो.

६. गमनयोग्यस्थलीं घोडे ज्याप्रमाणें जातात त्याप्रमाणें उषोदेवता आमच्या यज्ञाकडे येवोत. वेगवान् घोडे रथाला ज्याप्रमाणें वाहून नेतात, त्याप्रमाणें उषा आम्हाकडे लक्ष देणाऱ्या धनद भगदेवाकडे आम्हाला नेवोत.

७. अश्वयुक्त, गोयुक्त, शूरलोकयुक्त, पाऊस पाडणारी आणि सर्व गुणयुक्त पूज्य उषा नेहेमीं (अंधार) नाहींसा करो.

सूक्त बेचाळिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–विश्वदेव; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. अंगिरस ब्राह्मणांचें नांव सर्वत्र पसरो. पर्जन्य आमचें स्तोत्र इच्छो. उदक पुरविणाऱ्या नद्या वाहोत. यजमान आणि पत्नी यज्ञाचें स्वरूप जुळवोत.

२. हे अग्ने, चिरकालापासून तुझ्या संबंधाचा उपलब्ध झालेला मार्ग आम्हांला सुलभ होवो. काळे तांबडे तुझे घोडे जे तुला यज्ञगृहांत वाहून नेणारे शोभतात, त्यांना तूं चांगल्या तऱ्हेनें रथाला जोड. यज्ञगृहांत बसलेला मी देवांना बोलावतों.

३. हे देवहो, तुमचा यज्ञ नमस्कारपूर्वक हे स्तोते करतात. येथें जवळ बसलेला स्तुतिशील होता सर्व होत्यापेक्षां श्रेष्ठ आहे. हे यज्ञ करणाऱ्या, तूं देवांचें चांगल्या तऱ्हेनें यजन कर. हे अत्यंत तेजस्वी अशा अग्ने, तूं यज्ञीय भूमीस व्याप.

४. सर्वांना अतिथिभूत असणारा अग्नि ज्यावेळीं स्तोत्रें म्हणावयास लावणारे आणि हविर्द्रव्ययुक्त अशा यज्ञ करणारांच्या घरांत सुखानें बसलेला दिसतो आणि चांगल्या प्रकारें स्थापन केल्यामुळें प्रसन्न होतो, त्यावेळीं तो अग्नि उपासक लोकांना सुंदर धन देतो.

५. हे अग्ने, तूं आमच्या यज्ञाचें सेवन कर. देवाकडे आणि इंद्राकडे आमचीं हविर्द्रव्यें तूं पोंचीव. रात्र आणि दिवस दर्भाच्या आसनावर बसोत. आणि हे अग्ने, यज्ञेच्छु मित्रावरुण ह्या यज्ञांत तूं पूजित कर.

६. धन इच्छिणारा वसिष्ठ वर वर्णिल्याप्रमाणें बलशाली अग्नीला अनेक प्रकारच्या धनलाभाकरितां स्तविता झाला. असा अग्नि आम्हांला धन आणि बल देवो. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त त्रेचाळिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–विश्वेदेव; छंदः—त्रिष्टुभ्.

१. देवांची कृपा व्हावी म्हणून स्तुति करून ते ब्राह्मण तुमची उपासना करितात कीं ज्याचीं स्तोत्रें झाडांच्या फांद्याप्रमाणें सर्वत्र पसरतात. अशी सव द्यावापृथ्वी तुमची उपासना करिते.

२. शीघ्रगामी घोड्याप्रमाणें हा यज्ञ देवांकडे जावो. हे ऋत्विजहो, सर्व तुम्ही सारख्या विचाराचे होऊन घृतयुक्त स्रुचा हातांत उंच धरा. तसेंच यज्ञाकरितां चांगलें दर्भ पसरा. हें अग्ने, तुझ्या देवाकडे जाऊं इच्छिणाऱ्या ज्वाला वर जाणाऱ्या असोत.

३. आईला मुलांचे ज्याप्रमाणें पालनपोषण करावे लागते त्याप्रमाणें आमच्याकडून पोषण केलें जाणारे देव दर्भाच्या श्रेष्ठ आसनावर बसोत. हे अग्ने, तुझ्या ज्वालेंत जुहू हविर्द्रव्य टाको. युद्धांत आमच्या शत्रूंना तूं मदत करूं नको.

४. यजनीय असे इंद्रादि देव पाण्याचा सहज वर्षाव करून पुरेसा पाऊस पाडते झाले. आज हे देवहो, धनांतील श्रेष्ठ आणि मननीय धन आम्हांला द्यावे. तुम्ही आम्हांकडे सारख्या बुद्धीनें यावें.

५. हे अग्ने, लोकांमध्यें आम्ही अशा प्रकारें स्तविलेला तूं आम्हांला धन दे. हे बलशाली अग्ने, तुझ्याकडून रक्षण केलेले आम्हीं अखंड धनशाली आणि सुरक्षित असावें. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करावें.

सूक्त चव्वेचाळिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–दधिक्रावन्; छंदः—१ जगती २ ते ५ त्रिष्टुभ्.

१. हे स्तोतेहो, तुमच्या रक्षणाकरितां दधिक्रा देवतेला मी बोलावतों. अश्विदेव, उषादेवता, प्रदीप्त अग्नि आणि भग या देवतांना मी बोलावतों. इंद्र, विष्णु, पूषा, ब्रह्मणस्पति, आदित्य, द्यावापृथ्वी, अप् आणि सूर्य यांना आम्ही बोलावतों.

२. दधिक्रा देवाला स्तवणारे व प्रेरक यज्ञाकडे जाणारे आम्ही दर्भांवर इळा देवीला बसविणारे, स्तुत्य आणि बुद्धिमान् अशा अश्विदेवाला स्तवितों.

३. दधिक्रा देवाला स्तुति करून प्रसन्न करणारा मी अग्नीला स्तवितों. तसेंच उषा, सूर्य, भूमि, या देवतांना मी स्तवितों. भक्तांना जाणणाऱ्या वरुणांचा पिंगट वर्णाचा मोठा घोडा आणण्याकरितां मी सांगतों. ते देव सर्व पातकें नाहींशीं करोत.

४. उषादेवता, सूर्य, आदित्य, वसू आणि अंगिरा यांच्याशीं ऐकमत्याला प्राप्त झालेला, अश्वमुख्य, शीघ्रगामी आणि गमनशील दधिक्रावन् देव मनःपूर्वक रथाचा प्रमुख होतो.

५. दधिक्रा देव यज्ञाच्या मार्गाला लागलेल्या आमचा मार्ग सिंचित करो. देवांचें बल असा अग्नि आमचीं स्तोत्रें ऐको. ज्ञानी आणि थोर असें सर्व देव आमचीं स्तोत्रें ऐकोत.

सूक्त पंचेचाळिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–सवितृ, छंदः—त्रिष्टुम्.

१. रत्नपूर्ण, तेजानें आकाश व्यापणारा, घोड्यानें वाहिला जाणारा सर्वप्रेरक सूर्यदेव येवो. मनुष्यांना हितप्रद अशी संपत्ति हातांत असलेला, सर्व भूतें योग्य जागीं स्थित करणारा आणि कामाला लावणारा सूर्य येवो.

२. या सूर्याचे पसरलेले, मोठे, सुवर्णमय असे हात आकाशाच्या शेवटापर्यंत पसरले. आज ह्या सूर्याचा महिमा आम्हांकडून स्तविला जातो. सूर्यहि ह्या सर्वप्रेरकाला कर्मेच्छा देवो.

३. तेजस्वी धनपति सविता देव आम्हांला धन देतो. सवितृदेव तेजस्वी रूप धारण करणारा असा मानवांना उपभोगयोग्य धन देवो.

४. हीं आमचीं स्तोत्रें स्तुत्य व धनहस्त सवितृदेवाला स्तवितात. तो सवितृदेव आम्हांला विविध आणि पुष्कळ अन्न देवो. आणि हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करावें.

सूक्त शेहेचाळिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता रुद्र; छन्दः—१ ते ३ जगती, ४ त्रिष्टुभ्.

१. हे स्तोतेहो, तुम्ही ही स्तुति रुद्राकरितां म्हणा. हा रुद्र बळकट धनुष्याचा, शीघ्रगामी बाण सोडणारा, अन्नयुक्त, अतिरस्कृत, शत्रूंचा पराभव करणारा, विधाता आणि तीक्ष्णशस्त्र असा आहे. तो रुद्र आमची स्तुति ऐको.

२. तो रुद्र पृथ्वीवरच्या लोकांच्या ऐश्वर्यावरून जाणला जातो. स्वर्गांतल्या लोकांच्या ऐश्वर्यावरून

जाणला जातो. हे रुद्रा, तुझीं स्तोत्रें गाणाऱ्या प्रजेचें संरक्षण करणारा तूं आमच्या घरीं ये. तसेंच तूं आमच्या घरीं रोग नाहींसे करणारा हो.

३. हे रुद्रा, तुझें आकाशांतून पडलेलें विद्युल्लतारूपी हत्यार पृथ्वीवर येते त्यावेळीं तें आम्हांवर येऊं नये. तसेंच ज्याची आज्ञा कोणीहि मोडीत नाहीं अशा रुद्रा, जी तुझी सहस्रावधि औषधें आहेत तीं आम्हांला दे तसेंच आमच्या पुत्रपौत्रांना मारूं नकोस.

४. हे रुद्रा, तूं आम्हांला ठार करूं नकोस. तसेंच आमचा त्याग करूं नकोस. तसेंच क्रुद्ध झालेल्या तुझ्या हातांत आम्ही सांपडू नये. जीवाच्यापेक्षा श्रेष्ठ अशा यज्ञांत आम्हांस भागीदार कर. हे रुद्रप्रमुख देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त सत्तेचाळिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-अप्; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. देवेच्छु अध्वर्यूंनीं हे अप् देवतांनो, प्रथम पृथ्वीपासून इंद्राला पिण्यास योग्य असा सोमरस तयार केला. शुद्ध, पवित्र, उदकपूर्ण आणि मधुर असा तो सोमरस आम्ही इच्छितों.

२. हे अप्देवहो, तुमचा अत्यंत मधुर असा तो सोम शीघ्रगति अपांनपात् देव रक्षण करो. इंद्र देवांसहवर्तमान ज्या सोमरसांत तल्लीन होतो त्या सोमरसाला देवभक्त असे आम्ही आज प्राप्त करूं.

३. अत्यंत शुद्ध, अन्न उत्पन्न करून लोकांना तृप्त करणारें, असें निर्मळ पाणी इंद्रादिकांच्या स्थानांत प्रवेश करितें. तें पाणी इंद्राला प्रसन्न करणारीं व्रतें बिघडूं देत नाहीं. हे लोकहो, जलदेवतेला घृतयुक्त हविर्द्रव्य अर्पण करा.

४. सूर्य आपल्या किरणांनीं जें जल उत्पन्न करितो, इंद्र ज्या जलाला गमनयोग्य मार्ग देतो, हे जलदेवहो, ते तुम्ही आम्हांला धन द्या. हे जलदेवतांनो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त अठ्ठेचाळिसावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता ऋभु (ऋभु, विभु वाज); छन्दः—त्रिष्टुभ्.

१. हे. धनशाली नेते आणि आकाशांत असणारे ऋभुहो, तुम्ही आम्ही पिळलेल्या सोमानें तृप्त व्हा. यावेळीं जाणाऱ्या तुमचा लोकहितकारी रथ तुमचे स्वकर्मतत्पर आणि समर्थ असणारे घोडे आमच्याकडे आणोत.

२ हे ऋभुहो, तुमच्यामुळें आम्ही मोठे होऊं. तुमच्यामुळें समर्थ होऊं आणि शत्रूंचें बल तुमच्या साहाय्यानें पराभूत करूं. युद्धांत वाज नांवाचा ऋभु आमचें रक्षण करो. आणि साहाय्यभूत इंद्राकडून आम्ही वृत्राला ठार करूं.

३. इंद्र आणि ऋभु विपुल शत्रुसैन्य आयुधानें पराभूत करितात. युद्धांत सर्व शत्रूंना ठार करितात. इंद्र, विभु, ऋभु आणि वाज हे शत्रूंवर चालून जाऊन शत्रूंचें बल नष्ट करोत.

४. हे देवहो, तुम्ही आम्हांस आज धन द्या. तसेंच तुम्ही सर्व प्रसन्न होऊन आमचें रक्षण करा. तसेंच स्तुत्य अशा तुमच्याकडून आम्हांला अन्न दिलें जावें. हे ऋभुहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करावें.

सूक्त एकोणपन्नासावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-अप्; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. समुद्रांत प्रामुख्यानें राहणारें, आकाशांतून बाहेर पडणारें, शुद्ध करणारें, सतत प्रवाहशील, असें अप् वज्रधारी आणि इच्छापूरक इंद्र जें देतो तें जल आमचें रक्षण करो.

२. जें जल आकाशांत उत्पन्न झालें असेल, जें नद्यादिकांत वहात असेल, जें उकरलेल्या स्थलीं असेल, जें स्वयंभू समुद्राकडे वहात जातें आणि जें कांतिमान् आणि शुद्ध असेल तें आमचें रक्षण करो.

३. ज्या उदकांचा राजा वरुण लोकांचा खरेंखोटेंपणा जाणत मध्य लोकांत जातो तें मधुर कांतिमान आणि शोधक जल आमचें रक्षण करो.

४. ज्या पाण्यांत राजा वरुण आहे, सोम, सर्व देव ज्या उदकांत अन्न ठेवितात, वैश्वानर अग्नि ज्यामध्यें आहे, तें जल माझें रक्षण करो.

सूक्त पन्नासावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—१ मित्रावरुण, २ अग्नि, ३ विश्वेदेव, ४ गंगादि नदी; छंदः—१ ते ३ जगती, ४ अतिजगती.

१. हे मित्रावरुणहो, तुम्ही आमचें रक्षण करा. जागा धरून बसणारें आणि पसरणारें असें विष आमचेकडे येऊं नये. तसेंच अजका नांवाच्या रोगाप्रमाणें दुर्दर्शनीय विष नाहींसें होवो. तसेंच वक्रगति सर्प मला पायाच्या आवाजावरून न जाणो.

२. वंदन नांवाचें विष विविध रीतीनें वाढणाऱ्या वृक्षांच्या विभागांत उत्पन्न होतें. जें विष गुडघे आणि घोटे यांचे सांधे धरते तें विष अग्नि तेजस्वी होऊन नाहींसें करो. पायाच्या शब्दानें सर्पानें आम्हांस जाणूं नये.

३. जें विष शल्मलिवृक्षांत असते, जें विष नदींत व औषधींत उत्पन्न होते, तें विष सर्व देव आमच्यापासून दूर करोत. पायाच्या आवाजामुळें सर्पानें आम्हांस जाणूं नये.

४. ज्या सखल प्रदेशांत वाहणाऱ्या, ज्या उन्नत प्रदेशांत राहणाऱ्या, ज्या उदकयुक्त आणि उदकरहित त्या सर्व विश्वाला तृप्त करणाऱ्या थोर नद्या आम्हाला शिपद नांवाचा रोग न होऊं देणाऱ्या, कल्याणप्रद आणि सुखकर होवोत.

सूक्त एक्कावन्नावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–आदित्य, छन्दः—त्रिष्टुभ्.

१. आदित्यांच्या मदतीनें आणि नवीन सुखप्रद गृहानें आम्ही युक्त व्हावें. त्वरायुक्त आणि आमचीं स्तोत्रें ऐकणारें आदित्य यज्ञ करणाऱ्या या भक्ताला निरपराधी आणि दीनतारहित असे ठेवोत.

२. आदित्य, अदिति, मित्र, अर्यमा व वरुण हे सर्व सरळ स्वभावाचे देव तृप्त होवोत. जगाचे रक्षक असे देव आमचें रक्षण करोत. आज आमच्या रक्षणाकरितां सोम पिवोत.

३. सर्व (द्वादश) आदित्य, मरुत, (एकोणपन्नास) विश्वेदेव, सर्व ऋभु, इंद्र, अग्नि व अश्विन हे आम्हांकडून स्तविले जावोत. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त बावन्नावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–आदित्य; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. हे आदित्यहो, आम्ही अपराभूत असावें. देवांचें रक्षण करणारे तुम्ही आमचें रक्षण करावें. हे मित्रावरुणहो, तुमच्या भक्तीनें आम्ही धन मिळवूं. हे द्यावापृथ्वीहो, तुमच्या कृपेनें आम्ही तुमचे होऊं.

२. मित्र आणि वरुण आम्हांला तें सुख देवोत. रक्षण करणारे ते पुत्रपौत्रांना सुख देवोत. हे देवहो, तुमच्या अशा आम्हांला दुसऱ्यानें उत्पन्न केलेल्या पातकाचा उपभोग घेण्याची वेळ येऊं नये. हे वसुहो, ज्या कृत्यानें आमचा नाश होईल, तीं कृत्यें आमच्याकडून होऊं नयेत.

३. त्वरायुक्त अंगिरस नांवाचे ऋषि मागत असतां सूर्याची संपत्ति मिळवोत. यजनशील, थोर असा पिता आणि सहमत असें सर्व देव आम्हाला संपत्ति देवोत.

सूक्त त्रेपन्नावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–द्यावापृथिवी; छन्दः–त्रिष्टुभ्.

१ पूज्य आणि विस्तृत अशा द्यावापृथ्वींचें यज्ञ आणि स्तोत्र यांनीं बरोबरीच्या लोकासहित आम्ही स्तवन करितों. थोर आणि देवांना प्रसवणारी अशी द्यावापृथिवी पूर्वींचे थोर लोक स्तुति करण्याकरितां अग्रभागीं ठेवीत होते.

२. हे स्तोतेहो, तुम्ही नवीन स्तोत्रांनीं यज्ञाच्या ठिकाणीं प्राचीन आणि जगाचे आईबाप अशा द्यावापृथिवींना आणा. हे द्यावापृथिवीहो, तुम्ही देवांसहित आमचेकडे या. आणि तुमचें श्रेष्ठ प्रतीचें व हवेसें वाटणारें धन आम्हांस द्या.

३. आणखी हे द्यावापृथिवीहो, तुमच्याजवळ राजा सुदासाला देण्याकरितां पुष्कळ रमणीय धन आहे. त्यापैकीं जें विपुल असेल तें आम्हांस द्या. हे द्यावापृथिवीहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त चोपन्नावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—वास्तोष्पति; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. हे वास्तोष्पते, तूं आम्हांला जाण. आणि आम्हांला चांगला आधार आणि आरोग्य करणारा हो. जें धन तुला आम्ही मागतों तें तूं आम्हांस दे. तूं आमच्या पुत्रपौत्रादिकांना आणि गवाश्वादिकांना सुखकर हो.

२. हे गृहपालका, तूं आमची वृद्धि करणारा आणि धन वाढविणारा हो. हे आल्हादका, तुझें सख्य असतांना आम्ही गाई आणि घोडे यांसहित जरारहित होऊं. पुत्राचें पित्याप्रमाणें तूं आमचें रक्षण कर.

३. हे गृहपते, तुझ्या सुखकर, रमणीय आणि स्तुत्य अशा संपत्तीनें तूं आम्हांस युक्त कर. तूं प्राप्त अप्राप्त अशा आमच्या धनाचें रक्षण कर. हे वास्तोष्पते, तूं आमचें कल्याण करून आमचें रक्षण कर.

सूक्त पंचावन्नावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—१ वास्तोष्पति, २ ते ८ इंद्र; छन्दः-गायत्री, ४-५ अनुष्टुभ्, २-३ ६-८ बृहती.

१. हे वास्तोष्पतिदेवा, रोगनाशक असा तूं अनेक रूपें धारण करतोस. तूं मित्रभूत असा आम्हांला सुखकर हो.

२. हे पांढऱ्या कुत्र्या, हे पिंगट वर्णाच्या, तूं (आम्हांला चावण्याकरितां) दांत ज्या वेळीं काढतोस. त्यावेळीं तेजस्वी हत्याराप्रमाणें चकाकणारे तुझे दांत ओठावर शोभत आहेत. असा तूं आतां निज.

३. हे मागेंपुढें सरणाऱ्या सारमेया, तूं गुप्त धन हरण करणाऱ्या आणि उघड धन हरण करणाऱ्याकडे जा. इंद्राच्या स्तोत्याकडे तूं कां जातोस? आम्हांला कां त्रास देतोस ? निज.

४. हे सारमेया, तूं डुकराला फाड. डुक्कर तुला फाडो. (मात्र तूं आम्हांला चावूं नकोस). इंद्राच्या स्तोत्याकडे तूं कां येतोस? आम्हांला कां त्रास देतोस? तूं खूप झोंप घे.

५. हे सारमेया, तुझी आई झोंपी जावो, बाप झोंपी जावो. कुत्रा निजो. घराचा मालक निजो. तुझे बांधवहि निजोत. भोंवतालचे हे लोक निजोत.

या सूक्ताविषयीं दोन आख्यायिका आहेत. त्या येणेंप्रमाणें (१.) वरुणाच्या घरीं रात्रीं वसिष्ठ निजला होता. ओरडणारा कुत्रा तेथें शिरला. वसिष्ठानें त्या चावण्याकरितां उद्युक्त होऊन ओरडत फिरणाऱ्या कुत्र्याला या दोन ऋचांनीं शान्त करून निजविलें. प्रकारें दुसऱ्या वरुणसंबंधीं माणसालाहि त्यानें निजविलें (बृहद्देवता ६–८१९-८२१)

२. या ऋचा झोंपेकरितां कल्पिल्या जातात. तीन रात्र भोजन न मिळाल्यामुळें तान्हेलेला आणि अन्नार्थी वसिष्ठ चौथ्यारात्रीं चोरी करण्याकरितां वरुणांच्या घरांत शिरला. अन्तर्गृहांत प्रवेश करण्याकरितां रक्षक कुत्रा वगैरेंना झोंप लागावी म्हणून (१–७) हें सूक्त तयार करून जप करितां झाला.)

६. जो येथें आहे, जो फिरतो, जो आम्हांला पहातो त्या लोकांचीं इंद्रियें जसा हा वाडा निश्चळ आहे तशीं निश्चळ होवोत.

७. सहस्रकर आणि कामपूरक असा सूर्य समुद्रापासून वर येतो. त्या सर्वश्रेष्ठ सूर्यामुळें आम्ही सर्व लोकांना निद्रित करतो.

८. ज्या अंगणांत निजतात, ज्या वाहनावर निजतात, ज्या अंथरुणावर निजतात, ज्या अंगाला चांगला गंध असलेल्या असतात त्या सर्वांना आम्ही निद्रित करतों.

सूक्त छपन्नावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–मरुत्; छन्दः—१–११ द्विपदा विराज्, १२–२५ त्रिष्टुभ्.

१. कांतिमान्, नेते, एकत्र राहणारे, रुद्रसंबंधी, मनुष्यहितकारक, आणि चांगले घोडे असलेले हे कोण आहेत ?

२. या मरुतांचे जन्म कोण जाणतो बरें ! ते मरुत् परस्परांचा जन्म जाणतात ! !

३. मरुत स्वतःच एकमेकांत मिसळतात. वायुप्रमाणें शब्द करणाऱ्या श्येन पक्षाप्रमाणें तुम्ही परस्परांत स्पर्धा करीत आहांत.

४. थोर पृश्नि म्हणजे मरुतांची आई ज्यांना पोटांत धारण करते त्या श्वेतवर्ण मरुतांना (फक्त) शहाणे लोक जाणतात.

५. ते लोक मरुतांच्या कृपेनें नेहमीं शत्रूंचा पराभव करणारे, धन मिळवणारे आणि सुपुत्रयुक्त असोत.

६. मरुतांच्या स्थानाकडे उत्कंठापूर्वक जाणारे अतिशय शोभायुक्त, कान्तियुक्त आणि बलयुक्त होतात.

७. हे मरुतहो, तुमचें तेज वाढो. तुमचें बल टिकाऊं होवो. आणि तुमचा समुदाय वर्धिष्णु होवो.

८. हे मरुतहो, तुमचें बल शोभणारें, तुमचीं मनें (शत्रूंविषयीं) रागीट, धैर्यशाली आणि बलशाली अशा तुमच्यापासून वेगामुळें स्तोत्याप्रमाणें (अनेक प्रकारचें) शब्द होतात.

९. हे मरुतहो जुनें शस्त्र आमच्यापासून दूर करा. तुमची क्रूरबुद्धि आमच्याकडे न येवो.

१०. हे मरुतहो, शत्रूंना ठार करणाऱ्या अशा तुम्हांला मी तुमच्या आवडत्या नांवानें बोलावतों. हीच इच्छा करणारे तुम्ही तृप्त व्हा.

११. चांगल्या आयुधानें युक्त असणारे, गमनशील, चांगले अलंकार घातलेले, आणि शरीर सुशोभित करणारे असे मरुत आहेत.

१२. हे मरुतहो, शुद्ध अशा तुम्हांला शुद्ध हवि असोत, तेजस्वी अशा तुम्हाकरितां मी शुद्ध यज्ञ करितों. उदकाला स्पर्श करणारे, सुजात, तेजस्वी आणि शोधक असे मरुत् सत्यानेंच सत्याकडे जातात.

१३. हे मरुतहो, तुमच्या खांद्यावर अलंकार घातले आहेत. तेजस्वी हार तुमच्या वक्षःस्थलावर लटकत आहेत. हे मरुतहो, पावसांत वीज चमकते त्याप्रमाणें आयुधासहित पाऊस पाडणारे तुम्ही फिरतां.

१४. हे मरुतहो, तुमचें अंतरिक्षोद्भव तेज पसरलें आहे. हे पूज्य मरुतहो, तुम्ही उदकाची वृद्धि करा. हे मरुतहो, तुम्ही सहस्रसंख्याक व गृहांत असणारे, असें तुमच्यासंबंधीं भाग तुम्ही घ्या.

१५. हविर्भागपूर्वक असलेलें माझें स्तोत्र म्हटलें असतांना हे मरुतहो, तुम्ही माझें स्तोत्र ज्याअर्थी लक्षांत घेतां, त्याअर्थी हे मरुतहो, तुम्ही सुपुत्रयुक्त धन ताबडतोब मला द्या. जें धन शत्रु नाहींसें करणार नाहीं तें धन द्या.

१६. घोड्याप्रमाणें सुंदर व सतत गमन करणारे, राजवाड्यावरून उत्सव पहाणाऱ्या लोकाप्रमाणें शोभणारे, मुलांप्रमाणें तेजस्वी आणि क्रीडा करणारे मरुत उदक देणारे आहेत.

१७. आम्हाला धन देणारे, व्यवस्थित अशा द्यावापृथ्वींत आपला महिमा गाजविणारे मरुत आम्हांला सुखी करोत.

हे व्यापक मरुतहो, उदकांचा भेद करणारें आणि शत्रूंचें हनन करणारें असें तुमचें शस्त्र आमच्यापासून दूर असो. तुम्ही आम्हाला सुखकारक असा.

१८. हे मरुतहो, बसलेला स्तोता तुमच्या देण्याची स्तुति करीत तुम्हाला मनःपूर्वक बोलावतो आहे. हे कामपूरक मरुतहो, जो स्तोता यजमानाचा रक्षक असतो, तो कपटरहित होत्साता तुमचीं स्तोत्रानें स्तुति करितों.

१९. हे मरुत जलद कर्म करणाऱ्याशीं क्रीडा करतात. हे मरुत सामर्थ्यानें सामर्थ्यवानाकडे येतात. हे मरुत शत्रूपासून स्तोत्याचें रक्षण करितात. हे मरुत न देणाऱ्यांचा द्वेष करितात.

२०. हे मरुत समृद्धालाहि समृद्ध करितात. दरिद्र्याला समृद्ध करितातः देव ज्याप्रमाणें इच्छितात त्याप्रमाणें हे कामपूरक मरुतहो, तुम्ही तम नाहींसें करा. आणि आम्हांला पुष्कळ पुत्रपौत्र द्या.

२१. हे मरुतहो, तुमच्या दानापासून आम्ही दूर होऊं नये (आम्हाला सोडून दुसऱ्याला धन देऊं नये). हे रथयुक्त मरुतहो, तुम्ही, धन देत असतां आम्ही मागें राहूं नये. स्पृहणीय अशा धनामध्यें तुम्ही आम्हाला भागीदार करा. हे पर्जन्यशीलहो. तुमचें जें चांगलें धन आहे त्यांत आम्हांस भागीदार करा.

२२. ज्यावेळीं पराक्रमी लोक मोठ्या ओषधीवर किंवा प्रजेवर रागानें चालून येतात त्यावेळीं हे रुद्रपुत्र मरुतहो, युद्धामध्यें शत्रूपासून आमचें रक्षण करणारे व्हा.

२३. हे मरुतहो, जीं तुमचीं कृत्यें गाईलीं जातात तीं आमच्या वाडवडिलासंबंधीं पुष्कळ कृत्यें तुम्ही केलीं आहेत. तेजस्वी मनुष्य युद्धांत तुमच्या साहाय्यानें शत्रूंचा पराभव करतो. तुमच्याचमुळें घोडा युद्ध जिंकतो.

२४. हे मरुतहो, आमचा मुलगा बळवान होवो. बुद्धिमान आणि लोकांना आधार असा पुत्र होवो कीं ज्या पुत्राच्या साहाय्यानें आम्ही सुखकारक स्थान मिळवून शत्रूंना ठार करूं. आणि तुमचे भक्त असें आम्हीं स्वतःच्या स्थानीं राहूं.

२५. इंद्र, वरुण, मित्र, अग्नि आणि ओषधी हे आमचें स्तोत्र ग्रहण करोत, मरुतांची स्तुति करणारे आम्ही सुखी असावें. हे मरुतहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त सत्तावन्नावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—मरुत्; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे पूजनीय मरुतहो, जे मरुत, विस्तीर्ण द्यावापृथ्वीला हलवितात. मेघाला वर्षवितात, उग्ररूपानें सर्वत्र फिरतात, त्या तुमचें नांव, मधुर गाणारे स्तोते यज्ञांत जोरानें गातात.

२. जे मरुत स्तवन करणाऱ्या भक्ताला शोधितात आणि भक्ताचे मनोरथ पूर्ण करितात, ते तुम्ही हे मरुतहो, प्रसन्न होत्साते आज आमच्या यज्ञांत सोम पिण्याकरितां दर्भासनावर बसा.

३. हे मरुत अलंकार, आयुध आणि शरीर यांनीं ज्याप्रमाणें शोभतात त्याप्रमाणें इतर देव शोभत नाहींत. आणि द्यावापृथ्वीला प्रकाशित करणारे आणि स्वयंप्रकाश असें हे मरुत शोभेकरितां सारखे अलंकार घालतात.

४. हे मरुतहो, आम्ही मनुष्यतेमुळें जरी अपराध केलेला असला तरी तुमचे प्रसिद्ध हत्यार आमचेपासून दूर असो. हे पूज्य मरुतहो, तुमच्या त्या हत्याराशीं आमचा संबंध येऊं नये. मात्र तुमची कृपा आमच्यावर असो.

५. आमच्या यज्ञांतच अनिन्द्य, तेजस्वी आणि शोधक असे मरुत रमोत. हे यजनीय मरुतहो, तुम्ही आमच कृपेनें आणि स्तुति केल्यामुळें रक्षण करावें. तसेंच आम्हाला अन्नांनीं पुष्ट होण्याकरितां वृद्धिंगत करा.

६. आम्ही असें स्तविलेलें उदकपूर्ण आणि नेते मरुत हवि भक्षण करोत. हे मरुतहो, आमच्या संततीला उदक द्या. आणि भक्तांना प्रशंसनीय धन द्या.

७. मरुतहो, स्तवन केलेले तुम्ही सर्व भक्तांचें रक्षण करण्याकरितां यज्ञांत या. जे मरुत आम्हाला शतशः वाढवितात, ते तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त अठ्ठावन्नावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—-मरुत्; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे स्तोतेहो, सतत वर्षाव करणाऱ्या मरुद्गणांची तुम्ही स्तुति करा. कारण मरुद्गण देवांच्या स्वर्गापेक्षां मोठा आहे आणि मरुतांच्या मोठेपणानें पृथ्वी आणि अन्तरिक्ष भरून गेलें आहे. पृथ्वी आणि अन्तरिक्ष यापेक्षांहि मरुतांनीं स्वर्ग व्यापून टाकला.

२. हे भयानक, बुद्धिमान् आणि गमनशील मरुतहो, तुमचा जन्म रुद्रापासून झाला. जे मरुत तेज आणि बल यांनीं प्रभावशाली आहेत त्या तुमच्या गमनाला सर्व जीवसमूह भितो.

३. हे मरुतहो, तुम्ही धनवान् अशा आम्हांला पुष्कळ अन्न द्या. आमचीं चांगली स्तुति ऐकाच. तुम्ही आक्रमिलेला मार्ग प्राण्यांना सुखकर होतो. तसेंच स्पृहणीय साहाय्य करून तो मार्ग उत्कर्ष करतो.

४. हे मरुतहो, तुम्ही रक्षण केलेला भक्त शतशः संपत्तियुक्त होतो. तुम्ही रक्षण केलेला गमन करणारा (घोडा) शत्रूंचा पराभव करणारा आणि सहस्रावधि धनयुक्त होतो. तुम्ही रक्षण केलेला सम्राट साम्राज्याधिपधि होतो आणि वृत्रासुराला ठार करतो. हें सर्व हलून सोडणारे मरुतहो, तुम्ही दिलेलें धन वाढो.

५. कामपूरक रुद्राचे पुत्र जे मरुत त्यांची मी सेवा करतो; ते मरुत आम्हांला फिरून अनुकूल होवोत. ज्या गुप्त किंवा उघड पातकानें मरुत रागावले असतील त्या जलद जाणाऱ्या मरुतांचे हे अपराध आम्ही स्तुतीनें दूर करतों.

६. धनवान मरुतांची जी स्तुति आहे ती आम्ही बोललेली आहे, मरुत हें सूक्त ग्रहण करोत. हे कामपूरकहो, तुम्ही शत्रूला आमच्यापासून ताबडतोब दूर करा. हे मरुतहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त एकूणसाठावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—१ ते ११ मरुत्, १२ रुद्र; छन्दः—१–३–५ बृहती, २–४–६ सतोबृहती, ७–८ त्रिष्टुभ्, ९–१०–११ गायत्री, १२ अनुष्टुभ्.

१. हे देवहो, तुम्ही भीतीपासून स्तोत्याचें रक्षण करा. ज्या स्तोत्याला सन्मार्गाला लावता त्याला हे अग्ने, वरुणा, मित्रा आणि अर्यमन तुम्ही सुख द्या.

२. हे देवा, तुमच्या साहाय्यानें तुम्हाला प्रिय अशा दिवशीं यज्ञ करणारा शत्रूंपासून पार जातो. जो यज्ञ करणारा तुम्ही दुसरीकडे जाऊं नये याकरितां पुष्कळ अन्न देतो, तो यज्ञ करणारा आपल्या घराचा उत्कर्ष करितो.

३. वसिष्ठ ऋषि तुमच्यापैकीं कोणालाहि न सोडतां तुमचें स्तवन करितो. आज आमचा सोम तयार असतां सोम पिऊं इच्छिणारे हे मरुतहो, तुम्ही सर्व मिळून प्या.

४. हे नायक मरुतहो, तुम्ही ज्याचें संरक्षण करितां त्याचा युद्धांतहि नाश होत नाहीं. तुमची नवी नवी अशी कृपा आमच्यावर होत असावी. तसेंच हे सोम पिऊं इच्छिणारे तुम्ही लवकर या.

५. हे ज्यांच्याकरितां सोम काढण्याचा शब्द चालू आहे असे मरुतहो, तुम्ही सोम पिण्याकरितां लवकर या. कारण हे मरुतहो, तुम्हाला हीं हविर्द्रव्यें मी देतों आहें. म्हणून तुम्ही दुसरीकडे जाऊं नका.

६. हे मरुतहो, तुम्ही आमच्या दर्भासनावर बसा. स्पृहणीय धन देण्याकरितां तुम्ही आमच्याकडे या. दयाळू असे तुम्ही मदकर सोम स्वीकारून मदयुक्त व्हा.

७. गुप्त झालेले व शरीरें सुशोभित करणारें मरुत कृष्णवर्ण हंसाप्रमाणें येवोत. सर्वत्र पसरलेला मरुद्गण माझ्या शेजारीं यज्ञांत आनंदी लोक बसतात त्याप्रमाणें बसो:

८. हे प्रशंसार्ह मरुतहो, आमचीं अन्तःकरणें दुष्ट बुद्धीनें क्रुद्ध झालेला जो नीच माणूस जखमी करूं इच्छितो, तो मनुष्य दुष्टांचा द्रोह करणाऱ्या वरुणाचे पाश आमच्यावर सोडील. तुम्ही त्याला अत्यंत तापदायक हत्यारानें ठार करा.

९. हे शत्रूंना त्रस्त करणारे मरुतहो, हें हवि आम्ही तुला देतों आहों. हे शत्रूनाशकहो, तुम्ही आमच्या रक्षणाकरितां तें हवि सेवन करा.

१०. हे गृहांत पूजिले जाणाऱ्या मरुतहो, तुम्ही रक्षणाकरितां या. मला टाकून जाऊं नका.

११. हे स्वायत्तबल, पारदर्शि आणि सूर्यप्रभ मरुतहो, तुम्हांला आमच्या यज्ञांत मी बोलावतों.

१२. कीर्तिमान आणि महाशक्ति अशा त्र्यंबकाची आम्ही पूजा करतो. तो देठापापासून काकडी तोडतो त्या मृत्यूपासून आम्हांला सोडवो आणि मोक्ष देवो.

सूक्त साठावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-१ सूर्य २ ते १२ मित्रावरुण; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे सूर्या, उदय पावणारा तूं जर आम्हांला निर्दोष म्हणशील तर मित्र आणि वरुण यांना सुद्धां आम्ही निर्दोष होऊं. हे अर्यमन, हे अदिते, देवामध्यें तुझी स्तुति करणारे आम्ही तुला प्रिय होऊं.

२. हे मित्रवरुणहो, हा प्रसिद्ध सूर्य मनुष्यावर लक्ष ठेवणारा, अन्तरिक्षांत फिरणारा, सर्व स्थिरचर जगाचें संरक्षण करणारा, मनुष्यांतील पुण्यपापें पाहणारा द्यावापृथ्वीकडे लक्ष ठेवून उदय पावतो.

३. हे मित्रावरुणहो, (तुमच्याकरतां) सूर्याच्या रथाला सात घोडे जुंपलेत. ते घोडे घामाघूम होतसाते ह्या सूर्याला वाहातात. तुमची इच्छा करणारा सूर्य पशुपाल आपल्या कळपाकडे ठेवतो त्याप्रमाणें, लोक आणि प्राणी यांचेकडे लक्ष ठेवितो.

४. हे मित्रावरुणहो, तुमच्याकरतां माधुर्ययुक्त अन्न तयार आहे. सूर्य स्वच्छ आकाशांत आरूढ झालेला आहे. सूर्याच्या गमनाकरितां आदितिपुत्र मित्र, अर्यमा आणि वरुण हे एकमनानें मार्ग तयार करितात.

५. हे मित्र अर्यमा आणि वरुण कितीहि पातकांचा संहार करणारे आहेत. हे सुखकर प्रेमळ असे आदितिपुत्र मित्रादि देव यज्ञगृहांत हवि आणि स्तुति यांनीं वृद्धि पावतात.

६. कोणासहि पराभूत करितां न येणारे हे मित्रावरुणादि देव आपल्या सामर्थ्यानें अज्ञानी माणसाला सुद्धां ज्ञानी करितात. ज्ञानी आणि कर्त्या माणसाकडे जाणारे हे पाप नाहींसें करून सन्मार्गाला नेतात.

८. स्वर्ग आणि पृथ्वीला सतत जाणणारे हे मित्रादि देव अज्ञानाला नाहींसे करितात. उतारावरहि नद्या खोल आहेत, ते थोर देव आम्हांला या विस्तृत नद्यांच्या पार करोत.

९. हे मित्रादि देवहो, तो आमचा शत्रू स्तुति करून यज्ञ करीत नाहीं. तो वरुणांकडून नष्ट केलेला पापी होवो. अर्यमा देव शत्रूंतून आम्हांला वेगळा काढो. हे कामपूरक मित्रावरुणहो, श्रेष्ठ स्थान सुदासाला द्या.

१०. ह्या मित्रादिकांची जूट गुप्त आणि कार्यशाली आहे. हे गुप्त बलानें शत्रूंचा पराभव करितात. हे कामपूरकहो, तुमच्या भीतिनें शत्रू थरथरा कापतात. तुमच्या सामर्थ्यानें आमचें रक्षण करा.

११. जो स्तोत्र करणाराला अन्न देण्याकरतां पुष्कळ पैसा देण्याविषयीं बुद्धि देतो, त्याचा स्तुत्य आणि धनवान अर्यमादि देव क्रोध नाहींसा करोत. आणि विस्तृत निवासस्थानाकरितां चांगलें स्थान तयार करोत.

१२. हे मित्रावरुण देवहो, तुमची जी पूजा यज्ञांत केली ती तुम्ही स्वीकारून सर्व संकटें दूर करा. आम्हांला पार न्या. हे मित्रावरुणहो, तुम्ही आमचें कल्याण करून रक्षण करा.

सूक्त एकसष्टावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-मित्रावरुण; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे मित्रवरुणहो, तुमचा प्रकाशक आणि सुरूप सूर्य तेज फाकीत उदय पावतो आहे. तो उदय पावलेला सूर्य सर्व भुवनें पहातो आणि मनुष्य जगांत चालूं असलेलीं स्तोत्रें म्हणतो.

२. हे कर्तृत्ववान मित्रावरुणहो ज्याचीं स्तोत्रें तुम्ही रक्षण करतां आणि ज्याचें कर्म तुम्हांला पुष्कळ वर्षें तृप्त करित आहे, तो यज्ञ करणारा, बुद्धिमान आणि बहुश्रुत वसिष्ठ तुमचीं मननीय स्तोत्रें करितों.

३. हे दानशील मित्रावरुणहो, तुम्ही विस्तीर्ण पृथ्वी गुण आणि सुरूप यांनीं अत्यंत विस्तीर्ण द्युलोकापेक्षांहि मोठें आहांत. ओषधी आणि प्रजा यामध्यें

---

१२. हा मृत्युंजय मंत्र होय. याचा येथें पदपाठ नाहीं. तै संहितेनें हा मंत्र आला आहे. तेथें पदपाठहि आहे. (तै.सं. ८-४)

सुद्धां तुम्ही स्वरूप धारण करितां आणि सत्य मार्गानें जाणाऱ्या लोकांचें सतत संरक्षण करणारे आहांत.

४. हे ऋषे, मित्र आणि वरुण यांचें तेज तूं वर्णन कर. कीं ज्यांचें बल मोठेपणानें द्यावा आणि पृथ्वी यांना वेगळें करिते. (स्तुति) यज्ञ न करणारांच दिवस पुत्रहीन स्थितींत जावोत. यज्ञ करणारांचें बल वाढो.

५. हे ज्ञानी, व्यापक आणि कामपूरकहो, तुमच्या या केलया जाणाऱ्या स्तुतींत चमत्कार आणि पूजा नाहीं. लोकांत खोटी स्तुति शत्रु करितात. तुमचीं गुप्तहि स्तुत्य कृत्यें अज्ञात नसतात.

६. हे मित्रावरुणहो, तुमचीं यज्ञांत आम्ही स्तुति करून पूजा करितों. म्हणून मी कष्ट घेऊन तुम्हाला बोलावतों. तुमच्या सेवेकरितां नवीन मननीय स्तोत्रें केलीं जावोत. मी केलेलीं हीं स्तोत्रें तुम्हाला प्रसन्न करोत.

७. हे मित्रावरुणहो, तुमची जी पूजा यज्ञांत केली, ती स्वीकारून सर्व संकटें दूर करा. आम्हांला पार न्या. हे मित्रावरुणहो, तुम्हीं आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त बासष्टावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–१–३ सूर्य, ४ ते ६ मित्रावरुण; छंदः—त्रिष्टुभ्.

१. मनुष्यांच्या सर्व संघाकरितां सूर्य आपला विस्तृत आणि व्यापक तेजःसमूह वर आणतो. दिवसां प्रकाशणारा सूर्यदेव सर्वांना सारखा दिसतो. सर्वांचा कर्ता असा हा स्तुतिमुळें फारच सुंदर झाला आहे.

२. हे सूर्या, प्रसिद्ध असा तूं आमच्या स्तुतीमुळें चित्रविचित्र घोड्यांवर बसून आमच्यापुढें ये. आणि मित्र, वरुण, अग्नि आणि अर्यमा यांना आमचें निष्पापत्व जाहीर कर.

३ सत्ययुक्त आणि दुःख नाहींसें करणारे वरुण मित्र आणि अग्निदेव आम्हाला हजारो प्रकारचें धन देवोत. चंद्र आम्हांला स्तुत्य आणि पूज्य असें धन देवो. स्तविलेल्या देवता आमच्या कामना पूर्ण करोत.

४. हे द्यावापृथ्वीहो, हे अखंडरूपिणी, हे महान देवताहो, जे तुम्हाला जाणतात त्या कुलभूषण अशा आमचें रक्षण करा. आम्हांवर वरुण देवतेचा क्रोध न होवो. वायूचा, परमप्रिय मित्रदेवतेचा आणि मनुष्यांचा आमच्यावर क्रोध होऊं नये.

५. हे मित्रावरुणहो तुम्हीं आपले हात (हविर्ग्रहणार्थ) लांब पसरा. आमच्या जीवनाकरितां गाई चरावयास जातात ती जमीन जलसिंचित करा. आम्हांला लोकांत प्रसिद्ध करा. हे नित्यतरुणहो, तुम्ही माझी ही प्रार्थना ऐका.

६. मित्र, वरुण, आणि अर्यमा आम्हांला आणि आमच्या पुत्राला धन देवोत. आम्हाला सर्व चांगल्या गमनाचें आणि चांगल्या मार्गानें जाण्याचे प्रसंग येवोत. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त त्रेसष्टावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–१–४ व पांचवीचा अर्धा भाग सूर्य देवतेचा आणि बाकी सर्व मित्रावरुण देवतेचा. छंदः—त्रिष्टुभ्.

१. दर्शनीय, विश्वदृष्टि, सर्व मनुष्यांना साधारण, मित्र आणि वरुण यांचा चक्षु असा हा तेजस्वी सूर्य कातड्याप्रमाणें अन्धकाराचें भोंवती वेष्टण घेणारा उदय पावतो आहे.

२. सर्वांना कार्यप्रवण करणारा, थोर, ज्ञान देणारा आणि पाऊस पाडणारा सूर्य उगवतो आहे. एकच चक्र फिरवूं इच्छिणारा आणि ज्याच्या जोखडाला चित्रविचित्र रंगाचा घोडा जुंपला आहे असा हा सूर्य उगवतो आहे.

३. अत्यंत तेजस्वी असा हा सूर्य उषःकाळीं स्तोत्यांनीं स्तवन केला जाणारा असा उगवतो. हा सवितृदेव माझ्या इच्छा जागृत करतो. हा देव आपलें एकरूप तेज संकुचित करित नाहीं.

४. हा आकाशाचा अलंकार, अत्यंत तेजस्वी, दूरपर्यंत गमन करणारा, त्राता, प्रकाशणारा असा हा सूर्य उगवतो आहे. खात्रीनें लोक सूर्यप्रेरित होत्साते कर्तव्यकर्में करितात.

५. ज्या ठिकाणीं अमर अशा देवांनीं सूर्याकरितां रस्ता केला त्या रस्त्यानें बहिरी ससाण्याप्रमाणें वेगानें हा जात आहे. हे मित्रावरुणहो, तुमची सूर्य उगवला असतां स्तुति आणि हविर्द्रव्यें यांनीं आम्ही सेवा करूं.

६. मित्र, वरुण, आणि अर्यमा आम्हांला आणि आमच्या पुत्राला धन देवोत. आम्हांला सर्व चांगल्या

गमनाचें आणि चांगल्या मार्गानें जाण्याचे प्रसंग येवोत. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त चवसष्टावें.

ऋषिः--वसिष्ठ; देवता-मित्रावरुण; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. आकाशांत आणि पृथ्वीवर असणाऱ्या उदकाचे तुम्ही स्वामी आहांत, तुमच्या प्रेरणेनें उदकाला रूप प्राप्त होतें. आमचीं हविर्द्रव्यें मित्र, सुजन्मा अर्यमा बलशाली राजा वरुण हे सेवन करोत.

२. हे राजा, हे थोर यज्ञांचें रक्षणकर्ते हो, हे नद्यांचे पालनकर्तेहो, हे बलशालीहो, तुम्ही आमच्याकडे या. हे मित्रावरुणहो, तुम्ही ताबडतोब दान देणारे आहांत. तुम्ही स्वर्गांतून आह्मालां अन्न व पुष्टि द्या.

३. मित्र, वरुण आणि अर्यमा हे देव अत्यंत श्रेष्ठ मार्गांनीं इष्टस्थलाप्रत मला पोंचवोत. ज्याप्रमाणें अर्यमा सुदासावर कृपाकरितां झाला त्याप्रमाणें आमच्यावर करा. देवरक्षित असे आम्ही तुम्ही दिलेल्या अन्नांनीं सर्वांसह आनंदित राहूं.

४. हे मित्रावरुणहो, तुमचा मनःपूर्वक तासलेला हा रथ आहे. तुमचीं उच्चवाणीनें स्तुति करित आहेत. तुम्ही सृष्टीचें धारण करितां आहांत. हे स्वामिन, तुह्मी जलवृष्टि करा. आणि ज्या रीतीनें लोक सुखी होतील त्या तऱ्हेनें तृप्त करा.

५. हे मित्रा, हे वरुणा, तुमची व अर्यमा यांची आम्ही स्तुति केलीं आहे. जसा कांहीं स्वच्छ सोमच अर्पण केला आहे. कर्मे रक्षा आणि स्तुति ध्यानांत घ्या. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त पासष्टावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-मित्रावरुण; छन्दः-त्रिष्टुभ्.

१. ज्या मित्रावरुणांचें अक्षीण, श्रेष्ठ असें बल सुरु झालेल्या संग्रामांत जगाला जिंकतें त्या मित्र वरुणांना आणि सूर्याला उदय प्रसंगी चांगल्या स्तोत्रांनीं मी आळवितों.

२. जे द्यावापृथ्वींत आह्मांला अहोरात्र वृद्धिंगत करितात तेच देव देवांमध्यें बलवान आहेत. तेच तुह्मी आमच्या प्रजा वृद्धिंगत करा. हे मित्रावरुणहो, आह्मालां तुमचा लाभ व्हावा.

३. मोठे पाश धारण करणारे, असन्मार्गानें जाणाऱ्यांना प्रतिबंधक, मर्त्य शत्रूंना दुरतिक्रम, असे हे मित्रावरुणहो, तुमच्या यज्ञमार्गानें नावेनें पाण्यांतून जावें त्याप्रमाणें पातकें तरून जाऊं.

४. हे मित्रावरुणहो, आमच्या हविर्युक्त यज्ञांत या आणि घृतयुक्त अन्नांनीं जमिनीवर पाऊस पाडा. तुमचीं उत्कृष्ट स्तोत्रें येथें कोण म्हणण्यास समर्थ आहे ? म्हणून तुम्हीं आह्मांला पाऊस पाडून स्वर्गीय उदक द्या.

५. मित्र, वरुण आणि अर्यमा आम्हांला आणि आमच्या पुत्राला धन देवोत. आह्मांला सर्व चांगल्या गमनाचे आणि चांगल्या मार्गानें जाण्याचे प्रसंग येवोत. हे देवहो, तुह्मी आमचें कल्याण करून आमचें रक्षण करा.

सूक्त सहासष्टावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-१-३ मित्रावरुण, ४-१३ आदित्य, १४-१६ सूर्य, १७-१९ मित्रावरुण; छन्दः—१०-१२-१४ बृहती, ११-१३-१५ सतोबृहती, १६ पुर-उष्णिह, बाकी गायत्री.

१. वारंवार उत्पन्न होणारे मित्र आणि वरुण यांचें सुखप्रद आणि हविर्युक्त स्तोत्र त्यांना पोंचो.

२. जे देव बल देणारे, बलशाली, बलयुक्त आणि तेजस्वी आहेत ते तुम्ही आमचें रक्षण करा.

३. गृहरक्षक आणि शरीररक्षक असे मित्रवरुणहो, स्तुति करणाऱ्या अशा आमचीं कृत्यें फलयुक्त करा.

४. जें आज आम्हांस जरूर असेल तें सूर्य उगवला असतांना निष्पाप मित्र, अर्यमा, सविता आणि भग हे आम्हांस देवोत.

५. हे दानशीलहो, जे तुह्मी आम्हांला पातकांतून पार करितां ते तुह्मी गेला असतां तें गृह आमचें रक्षण करो.

६. शिवाय मित्रादिक जे सर्वाधिपती आणि अदिति ते दयाळु मोठ्या कृत्यांचे धनी आहेत.

७. प्रातःकालीं मित्र, वरुण आणि शत्रूनाशक अर्यमा यांचें मी स्तवन करितों.

८. सुवर्ण वगैरे धनासहित असणारे आणि ज्यांचा पराभव करितां येत नाहीं अशा बळाला देणारी आमची स्तुति होवो. आणि हे प्राज्ञहो, या स्तुतिमुळें यज्ञलाभ होवो.

९. हे वरुण, हे मित्रा, आम्ही तुझें आहोंत. स्तोतृगणांसहवर्तमान आम्ही तमचे आहोंत. आम्ही अन्न आणि उदक मागतों आहोंत.

१०. जे त्रैलोक्यावर पराभवनशील अशा कृत्यांनीं सत्ता चालवितात ते देव सूर्यासारखे तेजस्वी, अग्निद्वारा भक्षण करणारे व यज्ञांची वृद्धि करणारे असे अनेक आहेत.

११. ज्यांनीं वर्ष, महिना तसेंच दिवस, यज्ञ, रात्रि व मंत्र निर्माण केले ते राजे वरुण, मित्र आणि अर्यमा हे अनन्यप्राप्य बलयुक्त आहेत.

१२. सूर्य उगवतांच तुम्ही आम्ही आज त्या देवाचें स्तोत्रपाठपूर्वक ध्यान करूं या. कारण,तुम्ही मित्र, वरुण व अर्यमा देव उदकाचा रस्ता म्हणून प्रासिद्ध आहा.

१३. जे तुम्ही सत्ययुक्त, सत्यापासून उत्पन्न झालेले, सत्याची वृद्धि करणारे, उग्ररूप व असत्याचा द्वेष करणारे आहांत त्या तुमच्या अत्यंत सुखमय ध्यानांत आम्ही असावें.

१४. तें दर्शनीय सूर्यमंडळ आकाशांत उगवतें. जें सूर्यमंडळ शीघ्रगामी चित्रविचित्र रंगाचा घोडा सर्व लोकांना दिसावें म्हणून वाहून नेतो.

१५. सर्व स्थावरजंगमाचा धनी जो सूर्य त्याला स्वयंस्फूर्तीनें गमन करणारे सात हरिद्वर्ण घोडे जगाच्या कल्याणाकरितां सर्व लोकासमोरून मस्तकानें वाहून नेत आहेत.

१६. तें सर्वप्रकाशक आणि देवांना हितप्रद शुभ्र सूर्यमंडळ उगवतें आहे. तें शंभर वर्षें आम्ही बघावें. परमेश्वरा, आम्ही शंभर वर्षें जगावें.

१७. हे कधींहि पराभूत न होणाऱ्या मित्रावरुणांनो, स्वाभिमानी असें तुम्ही सोमपानाकरितां आमचीं स्तोत्रें ऐकून इकडे या.

१८. हे प्रेमळ मित्रावरुणहो, तुम्ही आपल्या ऐश्वर्यासह इकडे या आणि शत्रूंचा फडशा उडविणारे तुम्ही सोमरस प्या.

१९. हे लोकनायक आणि हविर्भक्षक मित्रावरुणहो, या, आणि सत्यवर्धकहो, सोम प्या.

सूक्त सदुसष्टावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—अश्विनौ; छंदः—त्रिष्टुभ.

१ हे नरपति अश्विहो, तुमच्या रथाची स्तुति करण्याकरितां मी हविर्युक्त आणि यज्ञीय स्तोत्रांसहित जातो आहे. हे स्तुत्य अश्वीहो, जो रथ तुम्हाला एखा द्या दूताप्रमाणें जागे करतो त्या रथाबद्दल मुलगा आईबापाशीं बोलतो त्याप्रमाणें मोकळ्या मनानें मी बोलतों आहे.

२. आम्ही प्रज्वलित केलेला अग्नि प्रदीप्त झाला. अंधकाराचा पार दिसूं लागला. सूर्य स्वर्गसुंदरी उषेच्या पुढें शोभायुक्त असा दिसूं लागला.

३. हे अश्विहो, तुम्हांला उद्देशून होम करणारा आणि तुमची स्तुति करणारा मी तुमची स्तोत्रें म्हणून सेवा करित आहें. म्हणून आमच्याकडे पूर्वींच्या मार्गांनीं सोन्याच्या धनयुक्त रथांत बसून यावें.

४. हे अश्विहो, संरक्षक अशा तुमची इच्छा करणारे आम्ही आहों. कारण, सोमपान करणारेहो, तुमच्याकरतां पिळलेल्या सोमरसाकरितां धनेच्छु मी तुला बोलावतों आहे. तुम्हाला वृद्ध असे घोडे वाहून आणोत. आम्ही पिळलेला सोमरस तुम्ही प्यावा.

५. हे अश्विहो, सरळ, कोमळ आणि धनेच्छु अशी माझी स्तुति लाभदायक करा. तसेंच माझी व्यापक बुद्धि युद्धांत सुरक्षित करा. हे कर्मपालकहो, आमच्या स्तुत्यादि कर्मांनीं तुम्ही आम्हांला धन द्या.

६. हे अश्विहो, आमचें या कृत्यांत संरक्षण करा. आमचें क्षीण न होणारें वीर्य पुत्रोत्पादनयुक्त असो. तुमच्या कृपेनें प्राप्त झालेल्या पोराबाळांना अभिमत धन देणारे धनिक असे आम्ही देवप्रापक अशा यज्ञाकडे जाऊं.

७. हा तो सोम हे मधुप्रिय अश्विहो, तुमच्यापुढें निधीसारखा ठेविलेला तुम्हांला सामोरे आलेल्या मित्राप्रमाणें पुढें आलेला आहे. म्हणून हवि भक्षण करणारें आणि लोकांत वावरणारे तुम्ही आमच्यापुढें प्रेमी अन्तःकरणांनीं या.

८. हे सर्वपोषक अश्विहो, एकाकरतां किंवा सर्वांच्याकरतां सारख्या गतीनें चालणारा तुमचा रथ सात नद्यांना ओलांडून आला. देवांनीं जोडलेले तुमचे सुंदर घोडे चपळतेनें रथ वाहून नेतात. ते कधींहि दमत नाहींत.

९. हे अन्यत्र आसक्त न होणाऱ्या देवतांनो, जे संपत्तीमुळें आवश्यक दान करतात त्या धनवन्तांना तूं धन देतोस. जे बांधनांना गाईबैल, घोडे आणि संपत्ति देतात आणि गोड बोलून त्यांना उत्साहित करतात त्यांना तूं ऐश्वर्ययुक्त करतोस.

१०. हे तरुण अश्विनो, तुम्ही माझा धांवा ऐका. तुम्ही हविर्युक्त घरामध्यें येऊन उत्कृष्ट संपत्ति द्या. आणि भक्तांचा उत्कर्ष करा. हे देवांनो, तुम्ही आमचें कल्याण करून सदोदित आमचें संरक्षण करा.

सूक्त अड्डुसष्टावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-अश्विनौ; छंदः—१-७ विराज, ८-९ त्रिष्टुभ.

१. हे शोभायमान, सुंदर अश्वयुक्त व दर्शनीय अश्विनो, या. तुम्ही स्तोत्रें ऐका आणि तयार केलेलीं हविर्द्रव्यें भक्षण करा.

२. हे अश्विनो, तुम्हाला मदकर अन्न (सोम) तयार केलें आहे. तुम्ही माझें हवि भक्षण करण्याकरतां लवकर या. आमच्या शत्रूंच्या बोलावण्याकडे दुर्लक्ष करून आमचा धांवा ऐका.

३. हे सूर्येसह रथांत बसणारे अश्विहो, प्रार्थना केल्यावर शेकडों प्रकारानें आमचें रक्षण करणारा तुमचा मनोजव रथ सर्व लोकांना मागें टाकून आमच्याकडे येत आहे.

४. जेव्हां तुम्हांकरतां हा देवभक्त दगड सोम कुटीत मोठ्यानें शब्द करतो तेव्हां सुंदर असणाऱ्या तुम्हांला शहाणे लोक हवि देऊन आपल्याकडे वळवितात.

५. हे अश्विनो, तुमचें जें आश्चर्यकारक धन आहे, तें तुम्ही आम्हांला द्या. जो अत्रि तुमचा आवडता असून तुमच्या मदतीनें असतो त्या अत्रीला तुम्ही कारागृहांतून मुक्त करा.

६. हे अश्विहो, ज्या च्यवानाला मरणाजवळची वृद्धावस्था प्राप्त झाली त्या हवि देणाऱ्या आणि म्हाताऱ्या झालेल्या च्यवानाला तूं तारुण्य दिलेंस.

७. हे अश्विनो, जो भक्त आणि तुम्हाला शरण येणारा भुज्यु (मित्रभूत अशा दुष्ट लोकांनीं) समुद्रांत टाकला होता त्याचें तुम्ही संरक्षण केलेत.

८. क्षीण झालेल्या वृकाला तुम्ही सामर्थ्य देणारे धन दिलेंत. तुम्ही शयूचा धावा ऐकलात आणि पाण्याप्रमाणें (सामर्थ्यपूर्ण कर्तृत्वानें) त्याच्या वांझ गाईला दूध उत्पन्न केलेत.

९. हा प्रसिद्ध स्तोता उत्कृष्ट सूक्तें म्हणून सकाळीं तुम्हांला जागें करून तुमचें स्तवन करीत असतो. त्याची अन्नानें भरभराट करा आणि त्याच्या गाईला भरपूर दूध असूं द्या. हे देवांनो, तुम्ही आमचें कल्याण करून सदोदित आमचें संरक्षण करा.

सूक्त एकूणसत्तरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-अश्विनौ; छंदः—त्रिष्टुभ.

१. हे अश्विहो, द्यावापृथ्वीशीं संलग्न असलेला तुमचा सुवर्णमय रथ बलिष्ठ घोड्यांसह आमच्याकडे आणा. उदकमय मार्ग असलेला, धावांनीं लखलखणारा व अन्न वाहून नेणारा म्हणूनच अन्नसमृद्ध असा तो लोकश्रेष्ठ आहे.

२. हे अश्विहो, कुठेंहि जावयाचे असतां तुम्ही ज्या रथानें लोकांत जातां तो भूमीच्या पांचहि विभागांत प्रसिद्ध असलेला तीन बैठकींचा असा तुमचा रथ आमच्याकडे येवो.

३. हे सुंदर अश्व असलेले अश्विदेवहो, तुम्ही अन्नासह आमच्याकडे या. हे दर्शनीयहो, मधुर अमृताचा साठा प्या. तुमचा पत्नीसह असलेला रथ आपल्या धांवानीं द्युलोकाच्या कडेपर्यंत वेगानें धडकत आहे.

४. रात्रीं तरुण सूर्यकन्या तुमच्या शोभेचा आश्रय करते. जेव्हां देवभक्ताचें तुम्ही कर्तृत्वानें रक्षण करतां तेव्हां उत्कृष्ट अन्न भक्षण करण्याकरतां तुम्ही साहाय्य देत जातां.

५. हे रथी अश्विनो, जो तुमचा रथ आहे, तो अत्यंत तेजस्वी आहे. जो रथ जोडून तुम्ही भक्तांच्या घरीं जात असतां त्या रथानें आमच्या ह्या यज्ञांत उषेचा प्रकाश पडल्याबरोबर आम्हांला सुखी करण्याकरतां या.

६. हे नेते अश्विहो, गौरमृगाप्रमाणें उत्कृष्ट सोमाविषयीं हपापलेले तुम्ही आज आमच्या यज्ञांत या. अनेक ठिकाणीं स्तोत्रें म्हणून तुमचा धांवा चालूं आहे. म्हणून दुसऱ्या भक्तांनीं तुम्हांला आडवूं नये (अशी माझी इच्छा आहे)

७. हे अश्विहो, तुम्ही समुद्रांत पडलेल्या भुज्यूला पाण्यांतून आपल्या अक्षय, सहज चालवत्या येणाऱ्या व सुखकर, अशा शरीर सामर्थ्यांनीं बाहेर काढलेंत.

८. हे तरुण अश्विहो, तुम्ही माझा धांवा ऐका. आणि तुमचा अन्नपूर्ण रथ माझ्याकडे आणा. तुम्ही स्तोत्याला मूल्यवान संपत्ति द्या. हे देवांनो, तुम्ही आम्हां भक्तांचे सदोदित कल्याण करून आमचें रक्षण करा.

---

७ टीपः—भुज्यु-१. ११६ पहा.

सूक्त सत्तरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–अश्विनौ; छंदः—त्रिष्टुभ.

१. सर्वश्रेष्ठ अश्विनो, तुम्ही आमच्या यज्ञांत या. तुमच्या त्या पृथ्वीवरील स्थानाचा निर्देश आम्ही केला आहे. स्थिर बसण्याकरतां ज्यावर तुम्ही नेहमीं बसतां तो सुखकारक पृष्ठभाग असलेला बलवान घोडा आतां तुमच्या सान्निध असो.

२. प्रसिद्ध असणारी आमची स्तुति तुमची सेवा करीत आहे. भक्ताच्या यज्ञांत (दुधाचें) भांडें तापून तयार होत आहे. चांगल्या घोड्याप्रमाणें तुम्हांला यज्ञाला जोढणारा हा घर्म (भांडे) तुमच्याद्वारा समुद्र आणि नद्या यांना कांठोकांठ भरून टाकतो.

३. हे अश्विहो, तुम्ही द्युलोकांतून येऊन मोठाल्या ओषधींत आणि भक्तगणांत रहात असतां ते तुम्ही पर्वतांच्या शिखरावरून हवि देणाऱ्या भक्ताकरतां अन्न वाहून आणता.

४. हे देवांनो, ज्याअर्थीं ऋषींच्या योग्य असणाऱ्या वस्तूंचा तुम्ही उपभोग घेता, त्याअर्थी औषधि व उदक यांचा तुम्ही उपभोग घ्यावा. आम्हांला विपुल रत्नें देणारे तुम्ही पूर्वकालापासून फार प्रसिद्ध आहांत.

५. हे अश्विहो, प्रसिद्ध असणारे तुम्ही ऋषींचीं अनेक कृत्यें पहात असतां. तुम्ही आम्हां पामराच्या यज्ञांत या. तुमची प्रसिद्ध असणारी अनुग्रहबुद्धि आमच्यावर असो.

६. हे अश्विहो, जो तुमचा यज्ञ अनेक लोकांनीं युक्त, हविर्युक्त आणि स्तोत्र चालूं असलेला असा आहे तेथें श्रेष्ठ वसिष्ठाकडे तुम्ही या. कारण हीं स्तोत्रें तुम्हाकरतां चालूं आहेत.

७. हीं स्तुति, हें स्तोत्र, हे अश्वीनो, तुम्हाकरतां चालूं आहे. हे बलिष्ठांनो, ह्या उत्कृष्ट स्तुतीचा तुम्ही स्वीकार करा. हीं स्तोत्रें तुमची इच्छा करीत तुम्हाकडे येत आहेत. हे देवांनो, तुम्ही आमचें कल्याण करून नेहेमीं आमचें रक्षण करा.

सूक्त एकाहत्तरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–अश्विनौ; छंदः—त्रिष्टुभ्.

१. भगिनी उषेपासून रात्र दूर चालली. कृष्णवर्ण रात्र तेजस्वी दिवसाला मार्ग मोकळा करीत आहे. हे अश्वधन गोधन अश्वींनो, तुमचा मी धांवा करीत आहें. रात्रीं व दिवसा तुम्ही आमच्या दुष्ट शत्रूंना दूर करा.

२. हे अश्विहो, दात्या लोकांकरतां उत्कृष्ट धन घेऊन रथांत बसून तुम्ही या. आमची अन्नहीनता नष्ट करा. रोगीपणा नष्ट करा. हे मधुप्रिय देवांनों, तुम्ही रात्रंदिवस आमचें संरक्षण करा.

३. उषा प्रकाशल्यावर तुमचा सुखकारक रथ ओढणारे बलिष्ठ घोडे आम्हाकडे वळवोत. सुखकारक आणि धनसंपन्न रथाला तुमचे यज्ञाकडे जाऊं इच्छिणारे घोडे आम्हांकडे वाहून आणोत.

४. हे लोकपालक अश्वींनो, तुम्हांला वाहून आणणारा जो तुमचा रथ आहे तो तीन बैठकींचा, धनयुक्त आणि दिवसां जाणारा आहे. त्याच रथानें तुम्ही आमच्याकडे या. कारण, वसिष्ठ तुम्हांला बोलावीत आहे.

५. हे अश्वीनो, तुम्ही च्यवनाला वृद्धपणापासून सोडवलेत. पेदूला शीघ्रगामी घोड्यावर बसविलें. अत्रीला अंधाऱ्या तुरुंगातून सोडवलेंत. आणि जाहूष्याला नष्ट झालेल्या राज्यावर पुनः स्थापिलेंत.

६. हीं स्तुति, हें स्तोत्र, हे अश्वीनो, तुम्हाकरतां चालूं आहे. हे बलिष्ठांनो, ह्या उत्कृष्ट स्तुतीचा तुम्ही स्वीकार करा. हीं स्तोत्रें तुमच्या इच्छेनें तुम्हाकडे येत आहेत. हे देवांनो, तुम्ही आमचें कल्याणं करून नेहेमीं आमचें रक्षण करा.

सूक्त बहात्तरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–अश्विनौ; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे अश्वींनो, गाईबैल, घोडे आणि आल्हादक इतर संपत्ति यांसहित रथांत बसून तुम्ही या. हे स्पृहणीय कान्तीनें तेजस्वी शरीर धारण करणाऱ्या अश्वींनो, तुमचीं अनेक स्तोत्रें सेवा करीत आहेत.

२. हे सत्यस्वरूप देवांनो, सर्व देवांसहित परस्पराशीं प्रेमानें वागणारे तुम्ही रथांत बसून आमच्याकडे या. तुमची आमची मैत्री बापजाद्यापासून आहे. तुमचा आमचा बांधव एक, व आपलें नातेहि सारखेंच आहे.

---

२. टीपः—अश्विनी कुमारांच्या जन्माची कथा खालीलप्रमाणें बृहद्देवतेंत दिली आहे—

सरण्यु आणि त्वष्टृ यांचें दांपत्य होतें. त्वष्ट्यानें सरण्यूला स्वखुषीनें विवस्वानाला दिलें. तेव्हां विवस्वानापासून सरयूला यम व यमी झाले. ते जुळे होते. एकदां तिनें आपल्यासारख्या एकीला तेथें ठेवून आपण घोडीचें रूप घेऊन निघून गेली. विवस्वानाच्या तें ध्यानांत आलें

३. स्तोत्रें अश्विदेवांचीं चांगली ओळख पटवून देतात. तेजस्वी उषेचीं स्तोत्रें बांधवभूत आहेत. मेधावी वसिष्ठ ह्या स्तुत्य द्यावापृथ्वीची सेवा करीत अश्विदेवांची स्तुति करीत आहे.

४. हे अश्वीनो, उषा प्रकाशत असतांनाच स्तोते तुम्हांला उद्देशून स्तोत्रें म्हणत असतात. सविता देवाचे किरण वर दिसूं लागले. अग्नीला प्रज्वलित करून चांगली स्तुति सुरूं झाली.

५. हे सत्यस्वरूप अश्वीनो, तुम्ही पूर्वेकडून किंवा पश्चिमेकडून, दक्षिणेकडून किंवा उत्तरेकडून या. किंवा चहुंकडून पंचजनांना हितकारक अशी संपत्ति घेऊन या. हे देवांनो, तुम्ही आमचें कल्याण करून नेहेमीं आमचें संरक्षण करा.

सूक्त त्र्याहत्तरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–अश्विनौ; छंदः—त्रिष्टुभ्.

१. देवभक्तीनें स्तुति करणारे आम्ही अज्ञानाच्या पार तरून गेलो. कर्तृत्ववान, श्रेष्ठ, प्राचीन आणि अमर अशा अश्विनींना स्तोता बोलावीत आहे.

२. तुमचा आवडता मानव स्तोता येथें बसला आहे. हे सत्यस्वरूप अश्वीनो, जो यज्ञ करतो आणि स्तुति करतो त्याचा मधुर सोमरस जवळ जाऊन तुम्ही पिता. यज्ञांत हविर्युक्त होऊन मी तुम्हाला बोलावीत आहें.

३. स्तुति करणारें आम्ही येणाऱ्या देवांच्याकरतां यज्ञ करीत आहोंत. हे बलिष्ठांनो, तुम्ही आमची उत्कृष्ट स्तुति स्वीकारा. स्तोत्रें म्हणून तुमची स्तुति करणारा वसिष्ठ जलद जाणाऱ्या दूताप्रमाणें तुम्हाला जागृत करीत आहें.

४. राक्षसहन्ते, पुष्ट, महाबाहू आणि हवि नेणारे ते सुप्रसिद्ध अश्वि आमच्या लोकांत येवोत. आणि मादक अन्न भक्षण करोंत. ते आमचा नाश कधींहि न करोत. तो कल्याणप्रद धन घेऊन आमच्याकडे येवो.

५. हे सत्यस्वरूप अश्वीनो, तुम्ही पूर्वेकडून किंवा पश्चिमेकडून, दक्षिणेकडून किंवा उत्तरेकडून या. किंवा चहूकडून पंचजनांना हितकारक अशी संपत्ति घेऊन या. हे देवांनो. तुम्ही आमचें कल्याण करून नेहेमीं आमचें संरक्षण करा.

सूक्त चवऱ्याहत्तरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—अश्विनौ; छंदः—१.३.५ बृहती, बाकी सतोबृहती.

१. हे अश्वीनो, सर्वव्यापक असणाऱ्या तुम्हांला स्वर्गेच्छु लोक स्तवीत असतात. हे पराक्रमधन अश्वीनो, मी तुम्हांला संरक्षणाकरतां बोलावीत आहें. कारण, तुम्ही प्रत्येक ठिकाणीं जाता.

२. हे अश्वीनो, तुम्ही आश्चर्यकारक धन देता. तुम्ही स्तुति करणाऱ्या भक्तांना धन देत असता. तुम्ही एक विचारानें रथ माझ्याकडे हाणा. आणि मधुर सोम प्या.

३. हे अश्वीनो, तुम्ही या. जवळ बसा आणि मधुर सोमरस प्या. हे बलशाली धनदात्यांनो, तुम्ही पाऊस पाडा. आमचा नाश करूं नका. लवकर या.

४. जे घोडे तुम्हांला हवि देणाऱ्याच्या घरीं पोंचवितात त्या शीघ्रगामी घोड्यांनीं, हे नेते अश्वीनो, तुम्ही आम्हांकडे या.

५. अश्वीकडे स्तोत्रें म्हणत जाणारे भक्त विपुल अन्न प्राप्त करतात. हे सत्यरूप अश्वीनो, ते तुम्ही आम्हा भाग्यवंतांना टिकाऊ कीर्ति आणि घर द्या.

६. जे भक्त रथाप्रमाणें अपहार न करतां लोकांचें संरक्षण करीत तुम्हाकडे येतात, ते भक्त आत्मसामर्थ्यानें उत्कर्ष पावतात. आणि चांगलें घर प्राप्त करतात.

सूक्त पंचाहत्तरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–उषा; छंदः—त्रिष्टुभ्.

१. द्युलोकांत निर्माण झालेली उषादेवी प्रकाशत आहे. ती सृष्टिनियमानुसार आपलें महत्त्व प्रकट करीत आली. येऊन दुष्ट व अप्रिय अंधकाराला तिनें पळवलें आणि जाण्याचे उत्कृष्ट मार्ग तिनें दाखविले.

२. तूं आज आम्हांला महान सुखोपभोगाकरतां जागृत केले आहेस. हे उषे, आम्हांला महद्भाग्य दे. तसेंच आम्हांला कीर्ति आणि आश्चर्यकारक धन दे,

---

नाहीं. त्यानें तिचें ठिकाणीं मनु उत्पन्न केला. पुढें त्याच्या ती गोष्ट ध्यानांत आली तेव्हां त्यानेंहि घोड्याचें रूप घेतलें आणि ती होती तिकडे गेला. मैथुनेच्छेनें तिच्यावर आरोहण करणार इतक्यांत वीर्य भूमीवर पडलें. त्याचा गर्भ रहावा म्हणून तिनें वास घेतला. त्यावेळीं ती गर्भार राहिली आणि तिनें दोन कुमारांना जन्म दिला. त्यापैकीं एकाचे नांव नासत्य आणि दुसऱ्याचें नांव दस्र त्यांनाच अश्विन् म्हणतात.

हे मनुष्य हितकारिणि देवि, आम्हांला जगांत खाऊन पिऊन सुखी कर.

३. दैवीं कार्यें करणारे आणि अन्तरिक्ष भरून टाकणारे हे सुबक उषेचे आश्चर्यकारक आणि टिकाऊ किरण पृथ्वीवर येऊं लागले.

४. सर्व जगाचें पालन करणारी, सर्व लोकांच्या ज्ञानाला प्रेरणा देणारी आणि सर्व लोकांना उद्योगतत्पर करणारी ही स्वर्गकन्या उषा पांचहि लोकांना (आपल्या प्रकाशानें) ताबडतोब व्यापीत आहे.

५. अन्नपूर्णा, सूर्यप्रिया, आश्चर्यकारक संपत्ति असलेली अशी उषादेवी सर्वांच्या संपत्तीवर सत्ता चालवीत आहे. ऋषींनीं स्तविलेली, कोणालाहि स्तुति करण्यास भाग पाडणारी, अशी यजमानांकडून प्रशंसली जाणारी ऐश्वर्यवान उषा प्रकाशत आहे.

६. तेजस्वी, उषेला वाहून नेणारे, विविध व लखलखीत घोडे दिसूं लागले. ती तेजस्वी उषा अनेक प्रकारच्या रथांतून सर्वत्र फिरत असते आणि उपासना करणारांना संपत्ति देते.

७. सत्यस्वरूप व यज्ञार्ह असणारी महान उषादेवी सत्यस्वरूप व यज्ञार्ह देवांसह निबिड अंधार नाहींसा करते. ऐश्वर्योपभोग देणाऱ्या उषेची सर्व प्राणी मनापासून इच्छा करतात.

८. हे उषे, आम्हांला गाईबैल, मुलेबाळें, घोडे आणि विपुल अन्न यांसह संपत्ति दे. तसेंच आमची यज्ञांत लोकामध्यें निंदा होऊं नये.

सूक्त शहात्तरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—उषा; छंदः—त्रिष्टुभ्.

१. लोकनायक सवितृदेवानें अविनाशी व लोकहितकारक तेज प्रकट केले. कर्तृत्वानें देवांचा डोळा उघडला आणि उषेमुळें सर्व जग प्रकट झाले.

२. संरक्षक आणि स्पष्ट दिसणारे देवांकडे जाणारे मार्ग मला दिसूं लागले. पूर्व दिशेला उषेचा ध्वज फडकूं लागला. उषादेवी महालांतून आम्हाकडेच येत आहे.

३. हे उषे, सूर्याच्या उदयापूर्वीं असणारे ते उषःकालच आम्हांला पुष्कळ प्राप्त होवोत. कारण सूर्याच्या भोंवती नवऱ्याच्या भोंवती असणाऱ्या साध्वीप्रमाणें तूं मला दिसते आहेस. एखाद्या छिनाल रांडेप्रमाणें दिसत नाहींस.

४. ज्या सत्यनिष्ठ प्राचीन व संरक्षक ज्ञात्यांनीं गूढ (सूर्यरूपी) तेज प्राप्त केलें, त्या मंत्रसिद्ध असणारांनींच उषा उत्पन्न केली व तेच देवांच्यासह आनंदांत असतात.

५. समान साध्याविषयीं एक विचारानें ते एकचित्त होतात. अपसांत ते भांडत नाहींत. संरक्षक आणि उषेच्या प्रकाशाबरोबर संचार करणारे ते देवांचे नियम मोडीत नाहींत.

६. हे भगवती उषे, उषःकालींच जागे होऊन स्तुति करूं लागणारे वसिष्ठ तुझीं स्तोत्रें गात आहेत. हे आकर्षकपणें उत्पन्न होणारे उषे, गाईना मार्ग दाखविणारी आणि अन्नस्वामिनी अशी तूं आम्हांकरतां प्रकाशित हो. तूं लवकर प्रकट हो.

७. हीं मधुर स्तोत्रें उत्पन्न करणारी आणि प्रकाशणारी उषा वसिष्ठांच्याकडून स्तविली जात आहे. सर्वप्रसिद्ध धन आम्हांला देत तूं ये. हे देवतांनो, सदोदित कल्याण करून तुम्ही आमचें संरक्षण करा.

सूक्त सत्त्याहत्तरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—उषा; छंद—त्रिष्टुभ्.

१. सर्व जगाला उद्योगाला प्रेरणा देणारी उषा देवी एखाद्या तरुण स्त्रीप्रमाणें सूर्याच्याजवळ मुरडत आहे. लोकांनीं अग्नि प्रदीप्त केला आहे. अंधार नाहींसा करीत ज्योति प्रकट झाली आहे.

२. ती उषा सर्व जगाकडे पहात व्यापक स्वरूपांत प्रकट झाली. चमकदार शुभ्र वस्त्र परिधान केलेली ती जास्त जास्त प्रकट होऊं लागली. सुवर्णकांति, प्रेक्षणीय किरण फेकणारी आणि दिवस उत्पन्न करणारी उषादेवी प्रकाशूं लागली.

३. देवांचें तेज वहाणारी, ऐश्वर्यशालिनी, दर्शनीय, प्रकाशणारें शुभ्र तेज असलेली, आश्चर्यकारक संपत्ति असलेली आणि किरणांनीं सर्व जगावर पसरलेली उषा देवी दिसूं लागली आहे.

४. हे उषे, अत्यंत कांतिमान असणारी तूं आमच्या शत्रूंना दूर करीत प्रकट हो. तसेंच ह्या विस्तृत पृथ्वीवर तूं आम्हांला निर्भय कर. आमच्या शत्रूंना आमच्यापासून दूर कर. संपत्ति आण आणि हे भगवति उषे, आम्हा स्तुति करणारांना धन दे.

५. हे उषे, आम्हांला दीर्घायुष्य देत तूं आपल्या श्रेष्ठ किरणांनीं प्रकाशित हो. हे विश्वपूज्य देवि,

आम्हांला अन्न, गाई, बैल, घोडे आणि रथ यांनीं युक्त संपत्ति देत तूं उदयाला ये.

६. हे स्वर्गकन्ये उषे, हे उगवताना आल्हाद देणारे, ज्या तुझीं स्तोत्रें म्हणून वसिष्ठ स्तुति करीत आहेत ती तूं आम्हांला विपुल धन दे. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून नेहेमीं आमचें संरक्षण करा.

सूक्त अठ्याहत्तरावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–उषा; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. ह्या उषेचे मुख्य (प्रकाश) ध्वज दिसूं लागले. तसेंच उर्ध्वगामी किरणहि पसरूं लागले. हे उषे, आमच्याकडे येणाऱ्या तेजस्वी व विस्तृत रथानें आम्हांकरतां उत्कृष्ट धन वाहून आण.

२. प्रज्वलित केलेला अग्नि सर्वत्र प्रकाशूं लागला. भक्त स्तोत्रें म्हणून स्तुति करूं लागले. उषा देवी संपूर्ण अंधार व आमचीं पापें नष्ट करीत उदयाला येऊं लागली.

३. त्या ह्या प्रकाश विखरणाऱ्या तेजोमय उषा पूर्व दिशेला दिसूं लागल्या. त्यांनींच सूर्य, अग्नि आणि यज्ञाला उत्पन्न केले. आणि खालीं पसरलेल्या अप्रिय अंधाराला नष्ट करून टाकले.

४. स्वर्गकन्या भगवती उषा सर्वांना ठाऊक आहे. कारण सर्व लोक उदयाला येत असतां तिला पहातात. ज्या रथाला चांगले जोडलेले घोडे वहात असतात त्या अन्नांनीं भरलेल्या रथांत ती आरूढ झालेली असते.

५. हे उषे, तुला आमच्या विचारी स्तोत्यांनीं आणि भाग्यवान असणाऱ्या आम्ही स्तुतीनीं वेधिलें आहे. हे प्रकाशणाऱ्या उषा देवीनो, तुम्ही जगाला प्रेमळ बनवा. हे देवांनो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें संरक्षण करा.

सूक्त एकूणऐंशीवें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–उषा; छंदः—त्रिष्टुभ.

१. मनुष्यांच्या पांचहि जातींना जागृत करीत मार्गदर्शक उषा प्रगट झाली. अत्यंत दर्शनीय अशा किरणांनीं उषा सूर्याचा आश्रय करते. आणि सूर्य आपल्या तेजानें द्यावापृथ्वी व्यक्त करतो.

२. उषेचें तेज दिगन्तापर्यंत प्रकाश पाडते. एकत्र झालेल्या लोकांप्रमाणें (उषेचे किरण अंधकार घालविण्याचा) प्रयत्न करीत आहेत. हे उषे, तुझे किरण अंधार पळवीत आहेत. आणि सूर्याच्या किरणाप्रमाणें प्रकाश देत आहेत.

३. सर्वांवर सत्ता चालवणारी भगवती उषा प्रकट झाली. जगाच्या कल्याणाकरतां ती विपुल अन्न उत्पन्न करीत आहे. अत्यंत जलद जाणारी स्वर्गकन्या उषादेवी सत्कृत्यें करणाऱ्या भक्तांना धन देते.

४. हे उषे, स्तुति केलेली तूं स्तोत्यांना जितकें धन दिलेंस तितकेंच धन तूं आम्हांला दे. बैलाला आवाजानें ओळखतात त्याप्रमाणें लोक तुला प्रकाशानें ओळखतात. तूं पर्वतांची बळकट द्वारें मोकळी केलीस.

५. प्रत्येक देवाला धन देण्यास प्रेरणा देणारी, आम्हांला मधुर स्तोत्रें म्हणावयास लावणारी आणि प्रकाशणारी तूं आम्हांला धन देण्याविषयीं बुद्धि असूं दे. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून सदोदित आमचें संरक्षण करा.

सूक्त ऐंशीवें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–उषा; छंदः—त्रिष्टुभ्.

१. द्यावापृथ्वीच्या मर्यादा वेगळ्या दाखविणाऱ्या आणि सर्व जगाला प्रकट करणाऱ्या उषेला स्तोत्यांनीं केलेल्या स्तोत्रांनीं मेधावी वसिष्ठ प्रथम जागृत करतात.

२. ती ही उषा तारुण्य धारण करीत गाढ अंधार आपल्या तेजानें घालवतांना दिसत आहे. ही सर्वांच्या पुढें न लाजणाऱ्या तरुणीप्रमाणें येत आहे. आणि सूर्य यज्ञ आणि अग्नि यांना उत्पन्न करीत आहे.

३. उदक उत्पन्न करणाऱ्या, सर्व बाजूनें उत्कर्ष पावणाऱ्या, गाईबैल, घोडे आणि मुलेंबाळें देणाऱ्या कल्याणकारक उषा आम्हांकडे सदोदित येवोत. हे देवहो, आमचें कल्याण करून सदोदित आमचें संरक्षण करा.

सूक्त एक्यांयशीवें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–उषा; छंदः—१.३.५ बृहती २.४.६ सतोबृहती.

१. अंधार नाहींसा करीत येणारी स्वर्गकन्या उषा सर्व पहात आहेत. दिसावें म्हणून तिनें गाढ अंधार नष्ट केला आणि लोकप्रेरक उषेनें तेज उत्पन्न केलें.

२. सूर्य आतां एकदम किरण बाहेर टाकूं लागला. नक्षत्रांना त्यानें प्रकाशित केलें. हे उषे, तुझ्या आणि सूर्याच्या उदयामुळें आम्ही आतां विपुल अन्न मिळवूं.

३. हे स्वर्गकन्ये उषे, स्तुति करून आम्ही तुला जागवीत आहोंत. कारण हे भाग्यशालिनी, तूं आपल्या भक्तांना रत्नाप्रमाणें स्पृहणीय धन आणि सुख देतेस.

४. हे महादेवी उषे, अंधार नष्ट करून तूं सर्व जग पहाण्याला आणि जाणण्याला योग्य करतेस. उत्कृष्ट संपत्तिमान असणाऱ्या तुला आम्ही संपत्ति मागत आहोंत, आईच्या लेंकराप्रमाणें आम्ही तुला प्रिय असावें.

५. हे उषे, जी संपत्ति अत्यंत विश्रुत आहे ती आश्चर्यकारक संपत्ति तूं आम्हांस दे. हे स्वर्गकन्ये, जे मनुष्यांना उपभोग्य धन आहे तें तूं आम्हांस दे. त्यांचा आम्ही उपभोग घेऊं.

६. हे उषे, स्तोत्यांना अविनाशी आणि ऐश्वर्यप्रद असें यश दे. तसें गाईबैलांनीं युक्त धनधान्य आम्हांस दे. भाग्यवन्तांना प्रेरणा देणारी आणि मधुर भाषण करवणारी उषा शत्रूंना दूर घालवो.

सूक्त ब्यांयशीवें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-इंद्रावरुण; छंदः—जगती.

१. हे इंद्रावरुणहो तुम्ही उपासना करणाऱ्या भक्ताला यज्ञ करण्याकरतां अत्यंत सुख द्या. जो शत्रू सावित्र उपासना करणारांला त्रास देतो, त्या दुर्बुद्धीला युद्धांत आम्ही जिंकूं.

२. हे इंद्रावरुणहो, तुम्हांपैकीं एकाला (वरुणाला) सम्राज् असें म्हणतात आणि दुसऱ्या इंद्राला स्वराज् असें म्हणतात. थोर असणारे तुम्ही दोघेहि विपुल संपत्तिमान आहांत.

३. हे इंद्रावरुणहो, तुम्हीं आपल्या सामर्थ्यानें उदकांचीं द्वारें मोकळीं केलींत आणि अन्तरिक्षांत सूर्याला समर्थ केलेत. तसेंच बुद्धिवर्धक सोमाच्या आनंदांत जलरहित नद्या तुडूंब केल्या. आतां आमचीं कर्में सफल करा.

४. हे इंद्रवरुणांनो, आपलें कल्याण व्हावें म्हणून गुडघे टेकून भक्त युद्धांत आणि शत्रूंच्या गराड्यांत तुम्हांसच बोलावतात. म्हणून उभय लोकांतल्या संपत्तीचे परमेश्वर असणाऱ्या आणि आढेवेढे न घेणाऱ्या तुम्हांला बोलावीत आहोंत.

५. हे इंद्रावरुणहो, हे सर्व लोक तुम्ही आपल्या सामर्थ्यानें उत्पन्न केले आहेत. मित्र सुखासमाधानाकरतां वरुणांची सेवा करीत असतो. आणि दुसरा उग्र इंद्र मरुतांच्याकडून भूषित केला जातो.

६. ह्या इंद्रावरुणांचें जें तेज आहे तें खरोखर विपुल संपत्तिप्रद आणि अत्यंत तेजस्वी आहे. त्यांपैकीं एक तरुण हिंसक परकीयांना नष्ट करतो आणि दुसरा इंद्र सहज अनेक शत्रूंना ठार करतो.

७. हे इंद्रावरुण देवहो, ज्या माणसाच्या यज्ञांत तुम्ही जाता त्या माणसाला त्रास होत नाहीं, त्याला पाप लागत नाहीं, पापाचें फल प्राप्त होत नाहीं किंवा कसलाहि त्रास होत नाहीं.

८. हे नेते इंद्रावरुणहो, दैवी मदत करण्याकरितां तुम्ही आमच्याकडे या. आणि आमच्यावर प्रेम असेल तर आमचीं स्तोत्रें ऐका. तुमची मैत्री आणि तुमचा सुखसाधक आप्तपणा आम्हांला प्राप्त होऊं द्या.

९. हे शत्रुसंहारक इंद्रावरुणहो, प्रत्येक युद्धांत तुम्ही आमचे पहिल्या पट्टीचे योद्धे व्हा. कारण, पूर्वीं आणि आतां युद्धांत किंवा मुलेंबाळें व्हावीत म्हणून तुमचाच धांवा करीत आले आहेत.

१०. इंद्र, वरुण, मित्र आणि अर्यमा आम्हांला धन आणि सर्व बाजूंनीं मोठें घर देवोत. तसेंच यज्ञानें उत्कर्ष पावणाऱ्या अदितीचें संरक्षक तेज आम्हांला प्राप्त होवो. म्हणूनच आम्ही सवितृदेवांचें स्तोत्र गातों आहोंत.

सूक्त त्र्यांयशीवें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—इंद्रावरुण; छंदः—जगती.

१. हे शूर इंद्रावरुणहो, तुमच्या बंधुत्वाची इच्छा करणारे आणि गोधन इच्छिणारे ते मोठाले पाठींचें कणे हातांत घेतलेले पूर्वेकडे (दर्भ आणण्याकरतां) जात आहेत. म्हणून तुम्ही शत्रूभूत असणाऱ्या दास, वृत्र आणि आर्य यांना ठार करा आणि सुदासाला मदत करून त्याचें रक्षण करा.

२. जेथें ध्वज उभारून लोक एकत्र होतात, जेथें बहुतेक सर्व अप्रिय गोष्टी घडतात आणि जेथें (मेल्यानंतर) स्वर्ग दिसत असूनहि सर्व प्राणिमात्र भितात, तशा युद्धांत हे इंद्रावरुणहो, तुम्ही आमच्या बाजूला असा.

३. हे इंद्रावरुणांनो, पृथ्वीवर सर्व भाग उजाड केलेला दिसत आहे आणि रणगर्जना आकाशाला जाऊन भिडली आहे. आमचे शत्रु माझ्यापुढें येऊन ठाकले आहेत. आतां हे हांकेला ओ देणाऱ्यांनो, साहाय्य करण्याकरतां या.

४. हे इंद्रावरुणहो, बाजूनें हल्ला करणाऱ्या भेदाला आयुधांनीं ठार करणारे तुम्ही सुदासाचें संरक्षण करा. ह्या तृत्सूंची युद्धांतील स्तोत्रें ऐका. कारण, आम्हां तृत्सूंचें पौरोहित्य इष्टफलदायी असते.

५. हे इंद्रावरुणांनो, घातक शत्रु आणि त्यांचीं आयुधें मला चहूंकडून त्रास देत आहेत. तुम्ही उभय लोकांतल्या संपत्तीचे धनी आहांत. म्हणून तुम्ही आमचें युद्धांत संरक्षण करा.

६. ज्या संग्रामांत दहा राजांनीं त्रास दिलेल्या तृत्सुसहित सुदासाचे तुम्ही संरक्षण करता ते संपत्ति मिळावी म्हणून सुदास राजा आणि तृत्सु लोक संग्रामांत इंद्रावरुणांचा धांवा करतात.

७. हे इंद्रावरुणांनो, नास्तिक असे एकत्र झालेले दहाहि राजे सुदासाशीं युद्ध करूं शकले नाहींत. हविर्युक्त स्तोत्यांची स्तुति सफळ झाली. त्यांच्या यज्ञांत सर्व देव येतात.

८. हे इंद्रावरुणांनो, जेथें निष्पाप अशा जटाधारी कर्तृत्ववान् तृत्सुंनीं स्तोत्रें म्हणून तुमची सेवा केली तेथें तुम्ही दहा राजांनीं सर्व बाजूंनीं वेष्टिलेल्या सुदासाला सामर्थ्य दिलेत.

९. हे इंद्रावरुणांनो, तुमच्यापैकीं एक इंद्र युद्धांत शत्रूंना ठार करतो आणि दुसरा वरुण नेहेमीं नियमांचें पालन करीत असतो. अशा कामपूरकांना अर्थपूर्ण स्तोत्रें म्हणून आम्ही बोलावतों. आतां तुम्ही आम्हांला सुख द्या.

१०. इंद्र, वरुण, मित्र आणि अर्यमा आम्हांला संपत्ति देवोत आणि मोठें व्यवस्थित घर देवोत. यज्ञानें वृद्धिंगत होणाऱ्या अदितीचें तेज आमचें संरक्षण करो. कारण, आम्ही सवितृदेवाची स्तुति करीत आहोंत.

सूक्त चवऱ्यांयशीवें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—इंद्रावरुण; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे राजा इंद्रावरुणांनो, यज्ञांत हवि देऊन आणि स्तोत्रें म्हणून मी तुम्हांला बोलावतों. हातांत घेतलेली घृतयुक्त अनेक रूपानें असलेली पळी आपणहून तुमच्याकडे येत आहे.

२. जे तुम्ही रज्जुविरहित बंधनांनीं पाप्यांना जखडून टाकता त्या तुमचें द्युलोकरूप विस्तृत राष्ट्र सर्वांना सुखी करो. वरुणाचा राग आम्हांवर न होवो. इंद्र ह्या लोकांना विस्तीर्ण करो.

३. हे इंद्रावरुणांनो, आमच्या घरीं चाललेले यज्ञ चांगल्या प्रकारें केलें जावोत. स्तोत्यांचीं स्तोत्रें उत्कृष्ट फल देणारी करा. आम्हांला देवांनीं दिलेलें धन प्राप्त होवो. आणि स्पृहणीय मदत करून तुम्ही आमचा उत्कर्ष करावा.

४. हे इंद्रावरुणांनो, आम्हांला सर्वश्रेष्ठ अन्नधनपरिपूर्ण ऐश्वर्य द्या. अदितिपुत्र शूर वरुण खोट्याचा नाश करतो आणि अपरिमित धन देतो.

५. ही माझी स्तुति इंद्राकडे पोंचों. तसेंच चालूं असलेली स्तुति पुत्रपौत्रांचें संरक्षण करो. संपत्तिमान् असणारे आम्ही यज्ञ करीत आहोंत. हे देवहो, आतां तुम्ही आमचें कल्याण करून आमचें संरक्षण करा.

सूक्त पंच्यायशीवें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—इंद्रावरुण; छंदः—त्रिष्टुभ्.

१. इंद्र आणि वरुण यांना सोमाच्या आहुति देणारा मी राक्षसांचा संपर्क नसलेली व देवी उषेप्रमाणें तेजस्वी असणारी स्तुति शोधित आहे. इंद्रावरुणांनीं युद्ध सुरू झाल्यावर आमचें संरक्षण करावें.

२. युद्धांत शत्रू आमच्याशीं स्पर्धा करीत आहेत. ज्या युद्धांत आमच्या निशाणावर शत्रूंचीं आयधें पडतात त्या युद्धांत तुम्ही विविध प्रकारें चालून येणाऱ्या शत्रूंना हे इंद्रावरुणांनो, पिटाळून लावा आणि तरवारीनें ठार करा.

३. आणि स्वतःचें अन्न स्वतःच कमावणाऱ्या उदकदेवता इंद्र व वरुण यांना यज्ञगृहांत प्रामुख्यानें प्राप्त करतात. त्यापैकीं एकजण (वरुण) विविध प्रकारच्या लोकांचें संरक्षण करतो आणि दुसरा (इंद्र) अपराभवनीय शत्रूंचा पराभव करतो.

४. हे अदितिपुत्र इंद्रावरुणांनो, जो हवि देऊन बलशाली अशा तुमची सेवा करतो तो कर्तृत्ववान् भक्त यज्ञांत तुम्हांला ओढून आणतो. जो हवि देऊन तुम्हांला साहाय्य करण्याकरतां आपल्याकडे वळवतो त्याला अन्न प्राप्त होऊन तो सुखाला प्राप्त करतोच.

५. माझी ही स्तुति इंद्र व वरुणांना जाऊन पोंचो. चालूं असलेली स्तुति आमच्या मुलाबाळाचें संरक्षण करो. संपत्तिमान् असणारे आम्ही यज्ञ करूं. हे देवांनो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें संरक्षण करा.

सूक्त श्यायंशीवें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—वरुण; छंदः—त्रिष्टुभ्.

१. ज्या वरुणानें जगड्व्याळ द्यावापृथ्वीला स्थिर केलें त्या वरुणाचे जन्म अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. कारण, यानेंच महान सूर्य आणि दर्शनीय नक्षत्र यांना गति दिली आणि पृथ्वीला विस्तीर्ण केलें.

२. (वरुणाला पहाण्याची घाई झालेला ऋषि तर्क करतो आहे) मी आपणहून त्याच्याशीं लगट करूं कां ? मी वरुणाशीं एकविचाराचा केव्हां होईन ? न रागवतां हा माझ्या हवीचा स्वीकार करील कां ? प्रसन्नमनानें सुखदात्या वरुणाला मी केव्हां पाहीन ?

३. हे वरुणा, तुझें दर्शन घेण्यास उत्सुक झालेला मी तुझें दर्शन ज्यामुळें होत नाहीं, त्या पापाची पृच्छा करण्याकरतां अनेक ज्ञात्याकडे जात आहे. सर्व शहाण्या लोकांनीं मला एकच सांगितलें कीं हा वरुण तुझ्यावर रागावला आहे.

४. हे वरुणा, असें काय मी मोठें पाप केलें आहे कीं, मित्रभुत स्तोत्यांचा नाश करण्यास तूं प्रवृत्त व्हावेंस. हे दुर्दम्य तेजस्वी वरुणा, तें पाप लवकर तूं मला सांग म्हणजे नमस्कार करून निष्पाप होऊन मी लवकर तुझ्या भजनीं लागेन.

५. हे वरुणा, आमच्या वाडवडिलापासून किंवा आमच्या स्वतःकडून जे दोष घडले असतील त्यांपासून तूं आम्हांला मुक्त कर. हे राजा वरुणा, पशूंना तृप्त करणाऱ्या चोराप्रमाणें किंवा दाव्यापासून वासराला सोडावें त्याप्रमाणें वसिष्ठाला तूं मुक्त कर.

६. हे वरुणा, स्वतःचें सामर्थ्य नव्हे तर ती दुर्वासना कारण आहे. दारु, क्रोध, फासे, आणि अविचार हे दुर्वासना उत्पन्न करणारे आहेत. लहानाच्या शेजारीं (उत्तेजन देणारा कोणी तरी) मोठा असतो. स्वप्नसुद्धा दुराचरणाला प्रेरक असतें.

७. मी निष्पाप आहें. तथापि कामपूरक आणि विश्वपोषक अशा वरुणाची मी एकाद्या चाकराप्रमाणें भरपूर सेवा करीन. थोर वरुणदेवानें अज्ञाला सुज्ञ करावें. अत्यंत बुद्धिमान असणारा वरुणदेव स्तोत्याला संपत्तीकडे पोंचवो.

८. हे सामर्थ्यसंपन्ना वरुणा, हे तुझ्याकरतां केलेलें स्तोत्र तुझ्या अन्तःकरणाला पटो. आमचा योग आणि क्षेम सुखकर चालो. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून नेहमीं संरक्षण करा.

सूक्त सत्त्यायंशीवें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—वरुण; छंदः—त्रिष्टुभ्.

१. वरुणानें सूर्याला मार्ग तयार करून दिला. आकाशांतील पाणी नद्यांना दिलें. घोडीकडे जाण्याकरतां सुटलेल्या घोड्याप्रमाणें अबाधित नियमाकडे जाणाऱ्या वरुणानें विशाल रात्रि दिवसापासून केल्या.

२. हे वरुणा, वायु तुझा आत्मा (श्वास) आहे. तो जगाला प्रेरणा देतो. बलिष्ठ वायु गवत खाल्लेल्या पशूप्रमाणें समर्थ असतो. तूं ह्या विस्तारलेल्या महान द्यावापृथ्वींत असतोस. तुझीं सर्व स्थानें मोठीं सुंदर आहेत.

३. चांगल्या कामाकरतां फिरणारे वरुणाचे दूत ह्या सुंदर द्यावापृथ्वीवर नजर टाकीत असतात. मग जे यज्ञनिष्ठ कर्मप्रवण ज्ञानी भक्त स्तोत्रें म्हणत असतील (त्यांच्याकडे ते पहात असतीलच मग आमच्यावर त्यांची नजर पडेलच.)

४. बुद्धिमान असणाऱ्या मला वरुणानें सांगितलें कीं गाईला एकवीस नांवें आहेत. त्या ज्ञात्या वरुणानें जवळ असणाऱ्या मला शिष्याला ज्ञान देण्याकरतां ब्रह्माचें गूढ सांगितलें.

५. ह्या वरुणामध्यें तीन द्युलोक आणि तीन भूलोक अन्तर्भूत झाले आहेत. प्रशंसनीय अशा राजा वरुणानेंच प्रकाशाकरतां हा द्युलोकांत लोंबणारा सोनेरी गोळा (सूर्य) टांगला आहे.

६. सूर्याप्रमाणें तेजस्वी असणारा वरुण समुद्राला मर्यादित करतो. धांवणाऱ्या गौरमृगाप्रमाणें बलवान, प्रशंसनीय उदकनिर्माता आणि संकटांतून पार पाडणारा असा हा ह्या जगाचा राजा वरुण आहे.

७. अपराध करणाऱ्या भक्तावरहि जो दया करतो त्या वरुणाविषयीं आम्ही निष्पाप असावें. वरुणाचे नियम आम्ही पाळीत आहोंत. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून सतत आमचें संरक्षण करा.

सूक्त अठ्यांयशीवें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-वरुण; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे वसिष्ठा, तूं बलशाली वरुणाची श्रेष्ठ व आवडणारी स्तुति कर. कारण, तो धनवान, बलशाली व श्रेष्ठ अशा सूर्याला आमच्या सन्मुख उत्पन्न करतो.

२. मी आतां वरुणाचा साक्षात्कार प्राप्त केला

आहें. वरुणाला तृप्त करण्याकरतां अग्नींच्या ज्वालासमूहाची मी स्तुति करीत आहें. जेव्हां तो ग्राव्णांना लागलेला सुखकर सोमरस प्रेमानें पिईल तेव्हां मला तो आपलें स्वरूप दाखवील.

३. जेव्हां मी आणि वरुण नौकेंत बसलों आणि समुद्रामध्यें नौका हाकारली आणि जेव्हां पाण्यामध्यें तरंगावर संचरूं लागलों तेव्हां मजेनें झोक्यावर बसल्याप्रमाणें आम्ही झोके घेऊं लागलों.

४. वरुणानें वसिष्ठाला आपल्या नौकेंत बसविलें आणि ऋषीला महत्कृत्यानें कर्तृत्ववान केले. वरुणानें जाणारे दिवस आणि उषःकाल तयार करून स्तोत्याला चांगले दिवस दाखवले.

५. हे वरुणा, ते पूर्वीचें आपलें सख्य कुठें गेलें? जें पूर्वी अत्यंत सख्य होतें तें आम्हांला पाहिजे आहे. हे संपन्न वरुणा, तुझ्या हजारो दारांच्या सर्वांचा समावेश करणाऱ्या घरांत मी येतों.

६. हे वरुणा, जो तुझा कायमचा स्वकीय आहे, आणि ज्यानें आवडता असूनहि तुझे अपराध केले आहेत त्याला तूं आपला मान. हे यज्ञार्ह वरुणा, आम्ही पातकी असून उपभोग भोगूं नयेत. आम्हां स्तुति करणाऱ्या भक्तांना ज्ञानी अशा त्वां घर द्यावेंस.

७. ह्या स्थिर भूमीवर राहाणारे आम्ही हे वरुणा, तुझी स्तुति करीत आहोंत. वरुण आम्हांला पाशापासून मुक्त करो. पृथ्वीच्या नजीकच्या भागांतून आम्हांला साहाय्य प्राप्त व्हावें. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून नेहमीं आमचें संरक्षण करा.

सूक्त एकूणनव्वदावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–वरुण; छंदः—१-४ गायत्री, ५. जगती.

१. हे उत्कृष्ट संपत्तियुक्त राजा वरुणा, मी त्या मृत्तिकेच्या घरांत जाऊं नये. दया कर बाबा, दया कर.

२. हे आयुधयुक्ता वरुणा, थरथरल्याप्रमाणें किंवा एखाद्या भरलेल्या पखालीप्रमाणें जेव्हां मी तुझ्याकडे येतो तेव्हां हे धनवन्ता, कृपा कर बाबा, कृपा कर.

३. हे धनवन्ता पवित्र वरुणा, दारिद्र्यामुळें मी उलट कृत्यें केलीं आहेत. तरी कृपा कर, हे धनवन्ता, कृपा कर.

४. पाण्यांत असूनहि मी तान्हेलेला आहें. तरी स्तोत्यावर कृपा कर, हे धनवन्ता, कृपा कर.

५. हे वरुणा, दिव्य विभूतिसंबंधीं आम्हा लोकांनीं जी कांहीं द्रोहबुद्धि धरली असेल, जो कांहीं अज्ञानानें धर्म टाकला असेल त्या पापामुळें हे देवा, तूं आमचा नाश करूं नकोस.

सूक्त नव्वदावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—वायु; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे वायो, सर्वप्रेरक अशा तुला स्वच्छ केलेला मधुर सोमरस अध्वर्यु देतात, म्हणून तुझे नियुत नांवाचे घोडे जोड आणि ये आणि सोमरूपी अन्न प्रसन्नतेकरतां प्राशन कर.

२. हे वायो, समर्थ असणाऱ्या तुला जो भक्त उत्कृष्ट आहुति देईल, तसेंच हे शुद्ध सोम पिणाऱ्या, तुला जो स्वच्छ सोम देतो त्याला तूं मनुष्यांमध्यें श्रेष्ठ करतोस. तो विख्यात होऊन सर्व प्रकारची संपत्ति प्राप्त करतो.

३. ह्या द्यावापृथ्वींनीं वैभव मिळावें म्हणून ज्या वायूला निर्माण केलें, बुद्धिदेवता त्या देवाचा उत्कर्षाकरतां आश्रय करते. दारिद्र्य प्राप्त झालें असतां, द्रव्यनिधि शुभ्र वायूला नियुत नांवाचे घोडे आपणहून सेवीत असतात.

४. चांगला दिवस उत्पन्न करणाऱ्या निर्मळ उषा प्रकट झाल्या आणि ध्यान करणाऱ्या भक्तांनीं उत्कृष्ट तेज (सूर्य) प्राप्त केलें. उशिजांना श्रेष्ठ गोधन प्राप्त झालें. त्यांच्याकरतां स्वर्गीय उदक वाहूं लागलें.

५. ते अन्तःकरणपूर्वक ध्यान करणारे आणि स्वतःचें कर्तव्य करणारे भक्त हे इंद्रवायूनो, समर्थ अशा तुमचा वीरवाह्य रथ वाहून नेतात. आणि तुम्ही अन्नाचा उपभोग घेता.

६. हे इंद्र व वायूनो, जे समर्थ भक्त गाई, बैल, घोडे, सुवर्ण आणि संपत्ति हीं सर्व आम्हाला देतात, ते ज्ञाते भक्त घोडे आणि योद्धे यांच्या साहाय्यानें युद्धांत सर्व शत्रूंचे जीव पराभूत करतात.

७. घोड्याप्रमाणें अन्न मागून वाहून आणणारे आणि सामर्थ्येच्छु असे आम्ही वसिष्ठ तुम्हांला साहाय्याकरतां बोलावीत आहोंत. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून सदोदित आमचें रक्षण करा.

सूक्त एक्याण्णवावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-वायु; छंदः--त्रिष्टुभ्.

१. जे केवळ नमस्कारानें प्रसन्न होणारे निर्दोष देव होते त्यांनीं दुःखीकष्टी लोकांकरतां आणि वायूकरतां सूर्यासह उषेला प्रकट केलें.

२ हे इंद्रवायूहो, तुम्ही दोघे देवांचे उत्साही दूत आहांत. संरक्षक अशा तुह्मांला कोणी त्रास देऊं नये. अनेक महिने आणि वर्षें तुह्मी आमचें संरक्षण करा. आमची उत्कृष्ट स्तुति चालू असतां सुख आणि उत्कृष्ट संपत्तीची मी मागणी करीत आहें.

३. अन्नधनसमृद्ध अशा लोकांना नियुत नांवाच्या घोड्यावर बसणारा चपल व शुभ्र वायु सेवितो. ते लोक एक मनानें वायूची सेवा करण्यास तयार असतात. तेच सर्व लोक उत्कृष्ट कर्में करीत असतात.

४. हे सोम पिणारे इंद्र व वायो, तुमच्या शरीरांत जेवढा कांहीं वेग व बल असेल तेवढ्यानें ज्ञानपूर्वक ध्यान केलेले तुम्ही आमचा स्वच्छ सोम प्या. दर्भासनावर आरूढ व्हा.

५. हे इंद्रवायूंनो, स्पृहणीय वीरांनाच उपयोगी पडणाऱ्या नियुत नांवाच्या घोड्या एकाच रथांत आरूढ झालेले तुह्मी दोघे आमच्याकडे हंकारा. हें मधुर सोमानें भरलेलें भांडें तुम्हाकरतां तयार केलें आहे. प्रसन्न होऊन आम्हाला (पापांतून) मुक्त करा.

६. हे इंद्र व वायो, ज्या शेंकडो किंवा सर्वश्रेष्ठ हजारो घोड्या तुमची सेवा करीत असतात, तुम्ही उत्कृष्ट संपत्तिप्रद अशा त्या घोड्यांच्या सहाय्यानें आमच्याकडे या. आणि हे नेतेहो, तयार केलेला मधुर सोमरस प्या.

७. घोड्याप्रमाणें हवि वाहून कीर्तीची भिक्षा मागणारे आणि बळ इच्छिणारे वसिष्ठ उत्कृष्ट स्तुति करून साहाय्याकरतां हे इंद्रावायूंनो, तुम्हाला बोलावीत आहेत. हे देवहो, तुम्ही माझें कल्याण करून सदोदित माझें संरक्षण करा.

सूक्त ब्याण्णवावें.

ऋषिः--वसिष्ठ; देवता-वायु; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. हे शुद्ध सोम पिणाऱ्या वायो, तूं आमच्या सन्निध ये. हे विश्ववंद्या, तुझ्या हजारो नियुत नांवाच्या घोड्या आहेत. (मग उशीर कां ?) हें मदकर पेय तुला अर्पण केलें आहे. कारण, हे देवा, तें प्रथम पिण्याचा मान तुझाच आहे.

२. हे इंद्र व वायो, अध्वर्यु लोक देवांवरच्या भक्तीनें प्रयत्न करून तुमच्याकरतां उत्कृष्ट जो मधुर सोमरस तयार करतात, तो सोम तयार करणारा चलाख भक्त इंद्र व वायूना पिण्याकरतां सोमयज्ञांत ठेवीत आहे.

३. हे वायो, यज्ञगृहांत हवि देणाऱ्या यजमानाच्या यज्ञाकरतां ज्या नियुत नांवाच्या घोड्यावर बसून जातोस त्यानें तूं ये. आणि आम्हांला उपभोग्य धन दे. तसेंच पुत्र, गोसंघ व अश्वसंयुक्त संपत्ति दे.

४. जे स्तोते इंद्राला प्रसन्न करीत देवांच्या कृपेनें शत्रूंचा निःपात करितात त्या भक्तांच्या मदतीनें युद्ध करून शत्रूंचा पराभव करीत आणि शत्रूंना ठार करीत आम्ही असावें.

५. हे वायो, शेंकडो, हजारो नियुत घोड्यांच्या साहाय्यानें तूं आमच्या यज्ञांत ये. आणि येऊन आमच्या यज्ञांत आनंदित हो. हे देवहो, तुह्मी आमचें कल्याण करून सदोदित आमचें संरक्षण करा.

सूक्त त्र्याण्णवावें.

ऋषिः--वसिष्ठ; देवता-इंद्राग्नी; छन्दः—त्रिष्टुभ्.

१. हे वृत्रहन्त्या इंद्राग्निहो, हे नूतन तयार केलेलें पवित्र स्तोत्र तुम्ही स्वीकारा. तुम्ही दोघेंहि सहज बोलावलें असतां येतां म्हणून मी तुम्हांला वरचेवर बोलावीत आहें. कारण, इच्छा करणारांना तुम्ही ताबडतोब संपत्ति देत असता.

२. हे इंद्राग्निहो, सर्वपूज्य असणारे तुम्ही बलशाली, उत्कर्ष पावणारे आणि विपुल संपत्तीचे धनी असावें. तुम्हीं विपुल शत्रूंचा संहार करण्याचें सामर्थ्य आम्हांस द्या.

३. हविर्युक्त भक्त अनुग्रहाची इच्छा करीत यज्ञांतील कृत्यें जेव्हां करूं लागतात. तेव्हां घोडे युद्धांला जातात त्याप्रमाणें इंद्राग्नींना लोक सारखे बोलावीत असतात.

४. हे इंद्राग्नींनो, तुमच्या अनुग्रहाची इच्छा करणारा ज्ञाता वसिष्ठ सर्वप्रसिद्ध व प्राचीनांनीं उपभोगलेलें धन मिळावें म्हणून स्तोत्रें म्हणून तुमची स्तुति करीत आहे. हे शत्रुहन्त्या वज्रधारी इंद्राग्निहो, अत्यंत नवीन प्रकारचें ऐश्वर्य देऊन तुम्ही आमचा उत्कर्ष करावा.

५. परस्परावर हल्ला चढवणारे, स्पर्धा करणारे, तेजस्वी असणारे महान इंद्राग्नी युद्धांत पराकाष्ठा कर-

तात तेव्हां भक्तांकडून नास्तिकांना आणि सोम पिळणाराकडून सोम न पिळणारांना तुम्ही नष्ट करतां.

६. हे इंद्राग्नीनो, आमचें समाधान व्हावें म्हणून तुम्ही ह्या पिळलेल्या सोमाकडे या. तुम्ही आमच्याशिवाय कोणाकडे लक्ष देत नाहीं. म्हणून अनेक प्रकारचे हवि देऊन तुम्हांला आम्ही बोलावतों.

७. हे अग्निदेवा, तूं आमच्या आहुतीनें प्रदीप्त होऊन मित्र, वरुण आणि इंद्र यांना आम्हांबद्दल सांग. जें कांहीं आम्हीं पाप केलें असेल त्यापासून तूं आमचें संरक्षण कर. त्या पातकापासून अर्यमा व अदिति आम्हांस मोकळे करोत.

८. हे अग्निदेवा, हे यज्ञ करणारे आम्ही तुझ्या कृपेनें एकदम पुष्कळ अन्न प्राप्त करूं. इंद्र, विष्णु आणि मरुत आमचा आव्हेर न करोत. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें संरक्षण करा.

सूक्त चवऱ्याणववें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—इंद्राग्नी; छंदः—१-११ गायत्री,१२ अनुष्टुभ्.

१. हे इंद्राग्नीनो, ही उत्कृष्ट स्तुति ह्या स्तोत्यापासून तुम्हाकरतां आकाशांतून पाऊस यावा त्याप्रमाणें बाहेर पडली आहे.

२. हे इंद्राग्नीनो, स्तोत्याचा धांवा ऐका. त्यांच्या स्तोत्रांचा स्वीकार करा. आणि समर्थ असणारे तुम्ही भक्तांच्या कर्माची परिपूर्णता करा.

३. हे नायक इंद्राग्निहो, आम्हांला पाप करण्याला प्रवृत्त करूं नका. तसेंच शिव्याशाप आणि निंदा यांच्याहि तडाख्यांत आम्हांस जाऊं देऊं नका.

४. मदतीची अपेक्षा करणारे आम्ही इंद्र आणि अग्नि यांना पोषक अन्न आणि उत्कृष्ट स्तुति अर्पण करूं या. तसेंच उपासनेसह स्तोत्रेंहि अर्पण करूं या.

५. युद्धांत मदत व्हावी म्हणून दुःखीकष्टी झालेले अनेक लोक अशा प्रकारें तुमची स्तुति करतात.

६. स्तुति करूं इच्छिणारे हविर्युक्त भक्त यज्ञांत हे इंद्राग्नीनो, तुमचा स्तोत्रें म्हणून धांवा करीत असतात.

७. हे लोकश्रेष्ठ इंद्राग्नीनो, आम्हांला साहाय्य करण्याकरतां या. कठोर बोलणाऱ्यांच्या तडाख्यांत आम्हांस कधींहि देऊं नका.

८. हे इंद्राग्निहो, कोणाहि दुष्टाचा त्रास आम्हांस न होवो. आम्हांला सुखी ठेवा.

९. हे इंद्राग्नीनो, गाईबैल, सुवर्ण, घोडे यांनीं युक्त असणाऱ्या ज्या संपत्तीची आम्ही इच्छा करीत आहोंत ती आम्हांला प्राप्त होवो.

१०. सोम तयार केल्यावर जेव्हां उपासनाप्रवण भक्त अश्वयुक्त इंद्राग्नीचा धांवा करतात तेव्हां तुम्ही या.

११. जे शत्रूहन्ते इंद्राग्नी सामगान आणि स्तोत्रें म्हणून सेविले जातात आणि आणखीहि अनेक प्रकारें ज्यांची सेवा केली जाते ते तुम्ही या.

१२. हे इंद्राग्नीनो, दुष्ट, मूर्ख पण बलवान अशा माणसाची संपत्ति लुबाडून मडक्याप्रमाणें त्यांना हत्यारानें सहज ठार करा.

सूक्त पंचाणवावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–३ सरस्वत् अवशिष्ट सरस्वती; छंदः—त्रिष्टुभ्.

१. ही सरस्वती नदी सर्वाधार उदकानें वहात आहे. एखाद्या पोलादी शहराप्रमाणें ती सर्वाधार आहे. प्रवाहशील असणारी ती सर्व नद्यांना मागें टाकीत वेगानें एकाद्या रथांत बसलेल्याप्रमाणें जात आहे.

२. पर्वतांपासून समुद्रापर्यंत वहाणाऱ्या नद्यामध्यें फक्त शुद्ध अशा एका सरस्वती नदीनें (त्याची प्रार्थना) ध्यानांत घेतली. नंतर विपुल संपत्ति देणाऱ्या सरस्वतीनें नहुषाला दूधतूप दिलें.

३. बलिष्ठ परंतु सूक्ष्म स्वरूपांत असणारा लोकहितकारक (सरस्वान्) वायु आपल्या पूज्य स्त्रियामध्यें उत्साह पावत आहे. तो भाग्यशाली भक्तांना बलिष्ठ पुत्र देतो आणि लाभ व्हावा म्हणून त्यांना पवित्र करतो.

---

२. टीपः—हजार वर्षें चालणारा यज्ञ करूं इच्छिणाऱ्या नहुषानें नदीची प्रार्थना केली. तिनें त्याला हजार वर्षेंपर्यंत पुरणारे दूधतूप दिलें. ही गोष्ट ह्या ऋचेंत आली आहे.

समुद्राला मिळणाऱ्या सरस्वतीचा येथें उल्लेख आहे. अशी सरस्वती सध्यां उपलब्ध नाहीं, एवढेंच नव्हे तर राजपुतान्यांत समुद्र असल्याशिवाय ह्या गोष्टीची शक्यता नाहीं. यावरून वेदकाल कांहीं लाख वर्षांपूर्वीचा ठरवावा लागेल. याकरतां अबिनाशचंद्र दास M. A. Ph, D. यांचें पुस्तक पहावें.

४. ती भाग्यशाली सरस्वती प्रसन्नमनानें आमच्या ह्या यज्ञांतील स्तवन ऐको. गुडघे टेकून आणि नमस्कार करून केली जाणारी आणि धनप्रापक असल्यामुळें अत्यंत उत्कृष्ट अशी ती आहे.

५. हे सरस्वति, ह्या हवींचें हवन करून आम्ही तुझ्यापासून धन मिळवूं. आमच्या स्तोत्रांचा तूं स्वीकार कर. तुझ्यामुळें अत्यंत प्रिय अशा सुखाचा अनुभव घेणारे आम्ही एकाद्या वृक्षाप्रमाणें तुझ्या आश्रयाला राहूं.

६. हे भाग्यशाली सरस्वति, हा वसिष्ठ यज्ञाच्या दोन बाजूचीं द्वारें तुझ्याकरतां उघडीत आहे. हे शुभ्र सरस्वति देवि, तूं उत्कर्षित हो. आणि स्तुति करणाऱ्या भक्ताला संपत्ति दे. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून सदोदित आमचें संरक्षण करा.

सूक्त शहाण्णवावें.

ऋषिः--वसिष्ठ; देवता-१-३ सरस्वती, ४-६ सरस्वत्; छन्दः—१ बृहती, २ सतोबृहती, ३ प्रस्तारपंक्ति, अवशिष्ट गायत्री.

१. (ऋषि स्वतःलाच सरस्वतीच्या स्तुतीविषयीं प्रेरणा देत आहे) हे वसिष्ठा, नदींमध्यें श्रेष्ठ असणाऱ्या सरस्वतीकरतां तूं अत्यंत मोठेंच स्तोत्र केलें आहेस. द्यावापृथ्वीमध्यें व्यापून असणाऱ्या सरस्वतीचीच तूं उत्कृष्ट स्तोत्रें म्हणून स्तुति कर.

२. हे शुभ्रवर्ण सरस्वति, तुझ्या महिम्यानेंच लोकांना ह्या उभय द्यावापृथ्वींचें ज्ञान होतें. ती साहय्य करणारी तूं आम्हावर लक्ष ठेव. देवामित्र असणारी तूं आम्हा भाग्यवन्तांना धन दे.

३. कल्याण करणारी सरस्वती आमचें कल्याणच करो. सरळमार्गी आणि अन्न देणारी ती आमच्यावर लक्ष ठेवो. जमदग्नीप्रमाणें वर्णन केलेली तूं वसिष्ठाप्रमाणें स्तवन केली जावीस.

४. स्त्रीपुत्रांची इच्छा करणारे, दानशील व उपासना करणारे आम्ही आज सरस्वताचें स्तवन करीत आहोंत.

५. हे सरस्वत् देवा, तुझे तरंग मधुर आणि सामर्थ्य देणारे आहेत. त्यांनीं तूं आमचें संरक्षण कर.

६. जो सर्वांना दृष्टिगोचर होतो त्या गर्जणाऱ्या वर्धनशील मेघाला आम्ही प्राप्त करतों. त्याच्या कृपेनें संतति आणि संपत्ति आम्हांस प्राप्त होवो.

सूक्त सत्याण्णवावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता-इंद्र, ३-९ इंद्र व बृहस्पति, १० इंद्र व ब्रह्मणस्पति, अवशिष्ट बृहस्पति; छंदः—त्रिष्टुभ्.

१. ज्या यज्ञांत देवभक्त लोक आनंदित होतात आणि जेथें सोम पिळून तयार केला जातो त्या यज्ञांत देव स्वर्गावरून पृथ्वीवर आनंद प्राप्त करण्याकरतां येवोत आणि त्यांचे घोडे त्यांना आणोत.

२. हे मित्रहो, आम्ही दैवी साहाय्याची मागणी करीत आहोंत. बृहस्पति आमच्या हवींचा स्वीकार करो. जो बृहस्पति दूर देशाहून धन आणून पित्याप्रमाणें आम्हांला देतो त्या कामपूरक बृहस्पतीविषयीं ज्याप्रकारें निरपराधी होऊं तशी तुम्ही सेवा करावी.

३. श्रेष्ठ आणि अत्यंत सुखदायक अशा त्या बृहस्पतीचीच हवि देऊन आणि नमस्कार करून मी स्तुति करीत आहें. थोर इंद्राला आमची उत्कृष्ट स्तुति पोंहचो. कारण, देवांनीं केलेल्या मंत्रांचा तो राजा आहे.

४. जो बृहस्पति सर्वश्रेष्ठ आहे, तो आमच्या यज्ञांत येऊन बसो. ज्या सामर्थ्यसंपन्न संपत्तीची आम्हाला इच्छा आहे ती इच्छा पूर्ण करा. आणि प्राप्त झालेल्या संकटांतून तुम्ही आम्हांस पार पाडा.

५. अमरपणाला पुरेसें, वर्णनीय असें उत्कृष्ट अन्न हे पुरातन अमर देव आम्हांला देवोत. शुद्ध स्तोत्रें म्हटल्या जाणाऱ्या आणि गृहस्थांना पूजनीय व अपराभवनीय बृहस्पतीला आम्ही बोलावतों आहोंत.

६. ज्याचें बल घराप्रमाणें स्थिर आहे आणि ज्याचे घोडे सूर्यासारखे तेजस्वी रूप धारण करणारे आहेत अशा त्या बृहस्पतीला सुखकर, चलाख आणि जुटीनें असणारे घोडे वाहून आणोत.

७. तो बृहस्पति शुद्ध आणि अनेक वाहनें असलेला आहे. तसेंच सर्वांना पवित्र करणारा, सुवर्णाची आयुधें असलेला चालून जाणारा आणि स्वर्गीय सुखाचा उपभोग घेणारा आहे. उत्कृष्ट ठिकाणीं राहणारा तो बृहस्पति अत्यंत देखणा असून मित्रांना तो अन्नसमृद्धि देणारा आहे.

८. बृहस्पतीला जन्म देणाऱ्या देवी द्यावापृथ्वीनीं बृहस्पतीला आपल्या मोठेपणानें वाढविलें. हे देवहो, तुम्हीहि वर्धनीय बृहस्पतीला वाढवा. तो अन्न उत्पन्न व्हावें म्हणून तरून जाता येईल असें उथळ पाणी निर्माण करो.

९. हे ब्रह्मणस्पते, वज्रधारी इंद्राकरतां आणि तुझ्याकरतां ही मंत्ररूप उत्कृष्ट स्तुति मी तयार केली आहे. तुम्ही आमच्या कृत्याचें संरक्षण करा आणि अनेक प्रकारची स्तुति ऐका आणि आमच्यावर चालून येणाऱ्या आमच्या शत्रूंच्या सेनांचा नाश करा.

१०. हे बृहस्पते, तूं आणि इंद्र असे दोघे स्वर्गीय व पार्थिव संपत्तीचे धनी आहांत. म्हणून स्तोत्र करणाऱ्या भक्ताला धन द्या. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून सदोदित आमचें रक्षण करा.

सूक्त अठ्याण्णवावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता–इंद्र, ७ इंद्र व बृहस्पति; छन्दः—त्रिष्टुभ.

१. हे अध्वर्यूनो, बलशाली इंद्राला तयार केलेला स्वच्छ सोम अर्पण करा. नेहेमींच सोम तयार करणाऱ्या भक्ताची इच्छा करणारा इंद्र प्यावयास तयार केलेला सोम गौरमृगापक्षांहि लवकर जाणतो आणि तिकडे जातो.

२. हे इंद्रा, जो उत्कृष्ट सोम प्रत्यहीं तूं पितोस तोच सोम पिण्याची तुझी इच्छा असते. हे इंद्रा, हृदयानें आणि मनानें सेवन करणारा आणि इच्छिणारा तूं तयार ठेवलेला सोम पी.

३. हे इंद्रा, तूं जन्मल्याबरोबर सामर्थ्य यावें म्हणून सोम प्यालास. तुझा महिमा अदिति मातेनें सांगितला आहे. हे इंद्रा, तूं विस्तृत आकाश व्यापलें आहेस. युद्ध करून देवांना धन दिलें आहेस.

४. हे इंद्रा, जर तूं थोर घमेंडखोराशीं आम्हांला युद्ध करावयास लावणार तर त्या दुष्टांना केवळ हातांनींच आम्ही पराभूत करावें. जर हे इंद्रा, मरुतांनीं गराडा दिलेला तूंच युद्ध करणारा असशील तर अन्नसमृद्धि देणारा संग्राम आम्हीं तुझ्या साहाय्यानें जिंकू.

५. इंद्राचीं जुनीं कृत्यें मी तुम्हांस सांगतों आणि भाग्यशाली इंद्राचीं नवीनहि कृत्यें सांगतों. जेव्हां राक्षसी कपटांचा त्यांनीं धुव्वा उडविला तेव्हांपासूनच सोमाशीं इंद्राचा अद्वितीय संबंध जडला.

६ हे इंद्रा, सूर्याच्या प्रकाशांत ज्या जगावर तूं नजर टाकतोस तें सर्व प्राणिमात्रानें गजबजलेलें जग तुझेंच आहे. हे इंद्रा, तूंच एकटा सर्व गाईबैलांचा गोपति आहेस. म्हणून तूं दिलेल्या संपत्तींचा आम्ही उपभोग घेत आहोंत.

७. हे बृहस्पते, तूं आणि इंद्र असे तुम्ही दोघे स्वर्गीय आणि पार्थिव संपत्तीचे धनी आहांत. तुम्ही दोघे स्तोत्याला धन द्या. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करूल सदोदित आमचें संरक्षण करा.

सूक्त नव्याण्णवावें.

ऋषिः—वसिष्ठ; देवता—४–६ इंद्राविष्णू, अवशिष्ट विष्णु; छंदः—त्रिष्टुभ.

१. शरीरानें मर्यादेच्या पलीकडे वृद्धिंगत होणाऱ्या विष्णो, तुझा महिमा कोणीहि जाणूं शकत नाहीं. आम्ही फक्त पृथ्वीच्या आसपास असलेले दोन लोक म्हणजे पृथ्वी आणि अन्तरिक्ष जाणीत आहोंत. यापेक्षांहि श्रेष्ठ असणारे लोक हे विष्णो, तूं जाणतोस.

२. हे विष्णुदेवा, तुझ्या महिम्याचा परमपार सध्याचे किंवा पूर्वीचे कोणीहि जाणत नाहींत. दर्शनीय स्वर्ग तूं अन्तरिक्षांत स्थिर केलास आणि पृथ्वीच्या पूर्व दिशेला म्हणजे पृथ्वीला स्थिर केलेंस.

३. हे द्यावापृथ्वीनो, लोकांना देण्याच्या इच्छेनें तुम्ही गाईबैल, अन्न आणि धान्य यांनीं परिपूर्ण आहांत. हे विष्णो, तूं ह्या द्यावापृथ्वींना स्थिर केलें आहेस. तसेंच पर्वतांनीं (उष्णतेनें) पृथ्वीच्या भोवतालचा भाग दृढ केला गेला.

४. हे इंद्राविष्णूंनो, सूर्य, उषा आणि अग्नि यांना उत्पन्न करणाऱ्या तुम्हीच यज्ञाकरतां पृथ्वी मोकळी केलीत. हे नेत्या इंद्राविष्णूंनो, वृषशिप्र नांवाच्या दासाचीं कारस्थानें तुम्ही युद्धांत जमीनदोस्त केलींत.

५. हे इंद्राविष्णूंनो, बळकट असलेली शंबराचीं नव्याण्णव नगरें तुम्ही फोडून टाकलींत. बलशाली असुरांचे शेंकडों हजारों योद्धे तुम्ही युद्ध न करतां एकदम ठार केलेत.

६. ही उत्कृष्ट मननीय स्तुति थोर आणि आक्रमणशील इंद्राविष्णूंना उत्साहानें उत्तेजित करीत आहे. हे विष्णो व हे इंद्रा, यज्ञांत तुमचें हें स्तोत्र केलें आहे. तुम्ही आम्हांला युद्धांत अन्न द्या.

७. हे विष्णो, मी तुम्हांकरतां तोंडानें वषट्कार करीत आहे. हे किरणमालिन विष्णो, आमच्या हविर्द्रव्यांचा स्वीकार कर. आमचीं उत्कृष्ट स्तुत्यात्मक स्तोत्रें

---

३ टीपः— महिमाकथन. ४-१८-४ पहा.

तुझा उत्कर्ष करोत. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून नेहेमीं आमचें रक्षण करा.

सूक्त शंभरावें.

ऋषिः--वसिष्ठ; देवता--विष्णु; छंदः--त्रिष्टुभ्.

१. जो अनेकांनीं प्रशंसलेल्या विष्णूला हवि देतो तो धनेच्छु मनुष्य ताबडतोब धन मिळवितो. जो मननीय स्तोत्रानें विष्णूची उपासना करतो आणि अशा लोकहितकारकाची सेवा करतो तो धन मिळवतो.

२. हे इच्छापूरका विष्णो, तूं लोकहितकारक व निर्दोष अशी सद्बुद्धि आम्हांस दे, कीं ज्यायोगें प्राप्त होणाऱ्या विपुल व आल्हादक अश्वयुक्त संपत्तीचा तूं आम्हांस संबंध आणावास.

३. ह्या विष्णुदेवानें अत्यंत विस्तृत असणाऱ्या ह्या पृथ्वीचें आपल्या सामर्थ्यानें तीनदां आक्रमण केलें. असा हा विष्णु प्राचीनांतला प्राचीन आहे. ह्या पुराणपुरुषाचें नांव गाजो.

४. ह्या विष्णूनें मनुष्यांना जागा देण्याकरतां ह्या पृथ्वीचें आक्रमण केलें. म्हणूनच ह्याचे स्तोते लोक अढळ झाले आहेत. जन्माचे सार्थक करणाऱ्या विष्णूनें भक्ताकरतां पृथ्वी विस्तृत केली.

५. हे किरणमालिन विष्णो, ज्ञातव्य जाणणारा श्रेष्ठ असा मी तुझें तें नामसंकीर्तन आज करीत आहें. ह्या लोकांच्या दूर राहणाऱ्या त्या पुराणपुरुष विष्णूचें तरुण असणारा मी स्तवन करीत आहें.

६. मी शिपिविष्ट आहे असें जें तूं सांगत असतोस. त्यांत खरोखर सांगण्यासारखें काय आहे ? लढाईंत जें तूं दुसरें रूप घेतलें होतेंस तें तूं आमच्यापासून लपवूं नकोस.

७. हे विष्णो, मी तुम्हांकरतां तोंडानें वषट्कार करीत आहें. हे किरणमालिन् विष्णो, आमच्या हविर्द्रव्याचा स्वीकार कर. आमचीं उत्कृष्ट स्तुत्यात्मक स्तोत्रें तुझा उत्कर्ष करोत.

सूक्त एकशे एकावें

ऋषिः--अग्निपुत्र कुमार किंवा वसिष्ठ; देवता--पर्जन्य; छंदः--त्रिष्टुभ्.

१. (ऋषि स्वतःलाच स्तुति करण्याविषयीं म्हणतो) हे ऋषे, ज्यामुळें उदक उत्पन्न करणाऱ्या ह्या मेघांतून उदक बाहेर पडेल तीं ही तीनहि प्रकारचीं ॐकारपूर्वक स्तोत्रें म्हणा.

२. जो ओषधींना वाढवितो आणि जो पाण्याची लयलूट करतो आणि जो सर्व जगावर सत्ता चालवितो तो त्रैलोक्यव्यापी पर्जन्य आम्हांला (आश्रयाकरतां) घर आणि सुख देवो. आणि अभिलषणीय तेज देवो.

३. ह्या पर्जन्याचें एक रूप वांझ गायीसारखें आहे. आणि दुसरें रूप उत्पादक आहे. पित्यापासून माता उदकाचा स्वीकार करते आणि त्यामुळें पिता वृद्धिंगत होतो आणि त्यामुळेंच पुत्र वृद्धिंगत होतो. (पर्जन्यामुळें द्युलोक आणि पृथ्वी यांचा उत्कर्ष होतो. हवीमुळें देवांचा आणि चांगलें पीक आल्यामुळें लोकांचा.)

४. ज्यावर सर्व जग अवलंबून आहे. ज्यावर द्युवगैरे तीन लोक चालले आहेत आणि ज्यामुळें तीन बाजूनें सिंचन करणाऱ्या मेघांतून पर्जन्य रूपानें चहूंकडे उदक पाझरत आहे.--

५. हें स्तोत्र त्या स्वयंप्रसिद्ध पर्जन्याकरतां केलें आहे. ते त्याच्या अन्तःकरणाला पटो आणि त्यानें तो प्रसन्न होवो. आम्हांला सुखदायक पर्जन्य प्राप्त होवो. आणि पर्जन्यानें संरक्षण केलेल्या ओषधी फलभारयुक्त होवोत.

६. तो पर्जन्य बैलाप्रमाणें अनेक ओषधींना उत्पन्न करणारा आहे. म्हणून तोच स्थावरजंगम जगाचा मूलाधार आहे. तें उदक शंभर वर्षें जगण्याकरतां माझें संरक्षण करो. हे देवांनो, माझें कल्याण करून सदोदित माझें संरक्षण करा.

सूक्त एकशें दोनावें.

ऋषिः--अग्निपुत्र कुमार किंवा वसिष्ठ; देवता--पर्जन्य; छंदः--गायत्री.

१. हे स्तोतेहो वर्षाव करणाऱ्या स्वर्पुत्र पर्जन्याचीं तुम्ही स्तोत्रें गा. तो पर्जन्य आम्हांला अन्न देवो.

२. जो पर्जन्य औषधीमध्यें, गाई, घोड्या आणि स्त्रिया यांच्यामध्यें गर्भ उत्पन्न करतो--

३. त्याच्याच तोंडांत अत्यंत मधुर हवीचें हवन करा. तो आम्हांला चांगल्या प्रकारें अन्न देवो.

सूक्त एकशें तिनावें.

ऋषिः--वसिष्ठ; देवता--मंडूक; छंदः--१ अनुष्टुभ्, अवशिष्ट त्रिष्टुभ्.

---

१. टीपः--हें सूक्त पाऊस पडण्याकरतां म्हणतात.

१. व्रताचरण करणाऱ्या ब्राह्मणाप्रमाणें वर्षपर्यंत पडून राहिलेले मंडूक पर्जन्याला प्रिय असणारा शब्द बोलूं लागले.

२. जेव्हां स्वर्गीय उदक सुकलेल्या पखालीप्रमाणें सरोवरांत पडलेल्या ह्या बेडकाकडे आलें तेव्हां वत्सयुक्त गाईच्या शब्दाप्रमाणें ह्या मंडुकांचा शब्द येथें बाहेर पडत आहे.

३. वर्षाकाल आल्यावर तान्हेलेल्या आणि पाणी इच्छिणाऱ्या ह्या मंडूकावर जेव्हां वृष्टि होते तेव्हां मूल बापाकडे जसें बोबडे बोलत जातें तसा एक मंडूक शब्द करणाऱ्या दुसऱ्या मंडूकाकडे जातो.

४. पाऊस पडल्यावर जेव्हां परस्पर आनंदित होतात, आणि पावसानें भिजलेला जेव्हां तो चित्रविचित्र रंगाचा मंडूक दुसऱ्या हरितवर्ण मंडूकाशीं आपला आवाज मिसळतो तेव्हां एक मंडूक दुसऱ्याला जाऊन धरतो.

५. हे मंडूकांनो, शिक्षकाचा शिष्य अनुवाद करतो त्याप्रमाणें एक मंडूक दुसऱ्या मंडूकाचा जेव्हां अनुवाद करतो आणि जेव्हां पाऊस पडल्यावर शब्द करूं लागतो तेव्हां ह्यांचें सर्व शरीराचे भाग जणूं काय परिपूर्ण होतात. उन्हाळ्यांत मातीला मिळून गेलेले मंडूक पावसाळ्यांत पुन जिवंत होतात.

६. एक बेडूक गाईसारखा ओरडतो, दुसरा शेळीसारखा ओरडतो, आणि त्यांच्यापैकीं एक चित्रविचित्र रंगाचा आहे आणि दुसरा हिरवट आहे. अनेक प्रकारचे पण एक मंडूकच नांव धारण करणारे अनेक ठिकाणीं शब्द करीत उत्पन्न होतात.

७. अतिरात्र नांवाच्या सोमयागांत ज्याप्रमाणें ब्राह्मण मंत्र म्हणत असतात त्याप्रमाणें भरलेल्या सरोवराच्या भोंवती हे मंडूक शब्द करीत आहेत. जेव्हां वर्षाऋतु येतो तेव्हां वर्षाच्या त्या दिवशीं मंडूक जिकडे तिकडे उत्पन्न होतात.

८. सोम पिऊन वार्षिक स्तोत्र म्हणणाऱ्या ब्राह्मणाप्रमाणें मंडूक शब्द करीत आहेत. प्रवर्ग्य ऋत्विजाप्रमाणें धामानें डवडवलेले कांहीं बेडूक पाऊस पडल्याबरोबर बाहेर प्रकट होतात.

९. हे सर्व श्रेष्ठ मंडूक देवांच्या आज्ञेचें संरक्षण करतात. बारा महिन्यांतील ऋतूंचे नियम पाळतात. वर्षाच्या शेवटीं वर्षा ऋतु आल्यावर उष्णतेनें त्रस्त झालेले बिळाच्या बाहेर पडतात.

१०. गाईसारखा शब्द करणारा आणि शेळीसारखा शब्द करणारा किंवा चित्रविचित्र रंगाचा किंवा हरितवर्ण अशा सर्वांनीं संपत्ति दिली. वर्षा ऋतुनंतर मंडूकांनीं शेंकडो गाई आणि दीर्घायुष्य आम्हांला दिलें.

सूक्त एकशें चारावें.*

ऋषिः—वसिष्ठ; देवता–९.१२.१३ सोम, ११ देव, ८–१६ इंद्र, १७ ग्रावन्, १८ मरुत्, १०–१४ अग्नि, १९–२२ इंद्र, २३ चा पूर्वार्ध वसिष्ठाची प्रार्थना, उत्तरार्ध पृथिवी व अन्तरिक्ष, अवशिष्ट रक्षोहणौ इंद्रासोमौ; छंदः—१–६–१८–२१–२३ जगती, ७ जगती किंवा त्रिष्टुभ्, २५ अनुष्टुभ, बाकी त्रिष्टुभ.

१. हे इंद्रासोमांनो, राक्षसांना तुम्ही त्रास द्या. आणि त्यांना ठार करा. हे बलशाली देवतांनो, तुम्ही त्यांना हीन दशेला न्या. कपटानें उत्कर्ष पावणाऱ्या त्या मूर्खांना तुम्ही ठार करा. त्यांना जाळून ठार करा. हकलून देऊन त्या खादाडांना क्षीण करून टाका.

२. हे इंद्रासोमांनो, दुर्भाषण करणाऱ्या दुष्टांना तुम्ही एकदम पराभूत करा. आणि त्या त्रास देणारांना अग्नींत टाकलेल्या भाताप्रमाणें नष्ट करा. ब्रह्मद्वेष्ट्या, कच्चे मांस खाणाऱ्या, भयंकर दिसणाऱ्या आणि हपापलेल्या दुष्टांचा तुम्ही सारखा द्वेष करा.

३. हे इंद्रासोमांनो, दुष्कर्म करणाऱ्या व्यापक आणि निरालंबन अशा अंधारांत शिरून तुम्ही असें चोपा कीं पुनः एकहि दुष्ट पुढें येणार नाहीं. तें तुमचें क्रोधयुक्त सामर्थ्य शत्रूंचा पराभव करणारें असो.

४. हे इंद्रासोमांनो, द्युलोकांतून तूं आपलें आयुध उत्पन्न कर. तसेंच दुष्टांचा नाश करण्याकरतां तुम्ही आपलें आयुध पृथ्वीवरून बाहेर काढा. मेघांमधून तापदायक आयुध बाहेर पडूं द्या, कीं ज्यायोगें उत्कर्ष पावणाऱ्या राक्षसांचा तुम्ही नाश करतां.

५. हे इंद्रा सोमानो, द्युलोकांतून तुमचीं आयुधें बाहेर पडूं द्या. अग्नीप्रमाणें तापदायक, संतापक प्रहार कर-

---

१ टीपः—पाऊस पडावा म्हणून वसिष्ठानें पर्जन्याची स्तुति केली. त्याला मंडूकांनीं अनुमोदन दिलें. तेव्हां अनुमोदन देणाऱ्या मंडूकाचीहि वसिष्ठानें स्तुति केली. ती पुढील ऋचांत आहे.

*टीपः—शंभर पुत्र मेल्यानंतर दुःखीकष्टी झालेल्या वसिष्ठानें हें राक्षोघ्न सूक्त पाहिलें आहे.

णारी, बळकट आणि पोलादी बनविलेल्या आयुधांनीं तुम्ही राक्षसांच्या पार्श्वभागावर प्रहार करा. आणि त्यांना मुकाट्यानें पळावयास लावा.

६. हे इंद्रासोमांनो, ही आम्ही केलेली स्तुति सर्व बाजूंनीं घोड्याच्या ताणाप्रमाणें बलवान् अशा तुम्हाला प्राप्त होवो. जीं आमचीं स्तोत्रें मी बुद्धिपूर्वक तुम्हांकरतां करीत आहें तीं हीं स्तोत्रें राजाप्रमाणें तुम्हाला प्रसन्न करोत.

७. हे इंद्रासोमांना, वेगशाली घोड्यावर बसून तुम्ही या. आणि विध्वंस करणाऱ्या द्रोही राक्षसांना तुम्ही ठार करा. हे इंद्रासोमांनो, जो केव्हांहि दुष्टबुद्धीनें आमचा नाश करतो त्या दुष्कृत्यें करणारांना सुख होऊं नये.

८. शुद्ध मनानें वागणाऱ्या मला जो दुष्ट खोट्या भाषणानें निंदितो, मुठींत धरलेल्या पाण्याप्रमाणें हे इंद्रा, त्या असत्य बोलणारांचा नाश होवो.

९. जे दुष्ट सत्य भाषण करणाऱ्या मला दुर्भाषणानें वेडावतात, जे सामर्थ्यामुळें चांगलें वर्तन करणाऱ्या मला दूषण देतात, त्या सर्वांना सोम सर्पाच्या तडाख्यांत देवो किंवा मृत्युदेवतेच्या तडाख्यांत देवो.

१०. हे अग्ने, जो आमच्या अन्नाचा रस खाऊं इच्छितो, जो आमच्या गाईचा, घोड्यांचा व आमच्या शरीराचा सारभूत रस खाऊं इच्छितो त्या चोरी करणाऱ्या शत्रुभूत चोराचा नाश होवो. तो मुलाबाळासह नष्ट होवो.

११. तो शरीर आणि मुलेबाळें यापासून दूर असो. ह्या तीनहि लोकांच्या तो खालीं जावो. जो दिवसा खाऊं इच्छितो आणि जो आम्हांला रात्रीं खाऊं इच्छितो त्याचें हे देवांनो, यश नष्ट होवो.

१२. शहाण्या माणसांना हें सहज समजण्यासारखें आहे कीं खऱ्याखोट्या भाषणामध्यें स्पर्धा चाललेली असते, त्यापैकीं जें सत्य असतें आणि जें अत्यंत सरळ असतें त्याचेंच रक्षण सोम करीत असतो आणि असत्याचा नाश करीत असतो.

१३. सोम पापी माणसाला जाऊं देत नाहीं किंवा खोटें बोलणाऱ्या बलिष्ठालाहि जाऊं देत नाहीं. तो राक्षसाला ठार करतो आणि तो खोटें बोलणाराचाहि नाश करतो. दोघेहि इंद्राच्या बंधनांत पडतात.

१४. जर कां मी नास्तिक असेन किंवा हे अग्ने, जर मी देवांना व्यर्थ समजत असेन (तर तूं आम्हांस छळावेस.) हे सर्वज्ञ अग्ने, तूं आम्हावर कां बरें रागावतोस ? खोटें बोलणारे राक्षस तुला त्रास देत असावेत.

१५. जर कां मी राक्षस असेल तर आजच्या आज मी मरून जाईन. जर मी मनुष्याच्या जीविताचा नाश केला असेल तरी सुद्धां मी आजच्या आज ठार होईन. नाहीं तर जो दुष्ट मला उगाच यातुधान म्हणाला त्याचे दहा पुत्र नष्ट व्हावेत.

१६. जो मला राक्षस नसता राक्षस असें संबोधून बोलतो किंवा जो राक्षस मी शुद्ध आहें असें म्हणतो त्याला मोठ्या आयुधानें इंद्र ठार करो. तो सर्व प्राण्यामध्यें हलकट होऊन पडो.

१७. जी आपल्या शरीराला झाकीत दुष्ट बुद्धीनें एकाद्या घुबडीप्रमाणें रात्री माझ्याकडे येते ती खोल खड्ड्यांत पडो. सोम कुटण्याचे दगड आपल्या शब्दानेंच राक्षसांना ठार करोत.

१८. हे मरुतांनो, तुम्ही सर्व लोकांत असा, राक्षसांना ठार करण्याची इच्छा करा त्यांना पकडा. जे राक्षस पक्षी होऊन रात्रीं येतात किंवा जे मोठाल्या यज्ञांत हिंसा करतात, त्यांचें चूर्ण करून टाका.

१९. हे इंद्रा, तूं स्वर्गावरून वज्र टाक. हे भाग्यवन्ता, सोम पिऊन उत्साहित झालेल्या भक्ताला उत्साहित कर आणि चारहि बाजूंनीं येणाऱ्या राक्षसांना वज्रानें ठार कर.

२०. जे घातुक, अहिंस्य इंद्राला पराभूत करूं इच्छितात ते कुत्र्यांच्यासह चालून जाणारे पराभूत होतात. त्या घातुक राक्षसाकरतां इंद्र आपलें आयुध तीक्ष्ण करतो आणि वज्र शत्रूवर ताबडतोब फेंकतो.

२१. हवींचा नाश करणाऱ्या आणि चालून येणाऱ्या राक्षसांचा इंद्र पराभव करणारा आहे. कुऱ्हाड जसा अरण्याचा छेद करते किंवा मुद्गल जशी मडकी फोडून टाकते त्याप्रमाणें प्राप्त झालेल्या राक्षसांना तो पराभूत करतो.

---

१४. टीपः—वरील चार ऋचांत वसिष्ठाला कोणी यातुधान म्हटलें किंवा त्यावर कोणी कांहीं आक्षेप घेतले त्याबद्दल तो शपथ करीत आहे. त्याबद्दल पुढील श्लोक आढळतात.

हत्वा पुत्रशतं पूर्व वसिष्ठस्य महात्मनः ।
वसिष्ठं राक्षसोऽसित्वं वसिष्ठं रूपमास्थितः ॥
अहं वसिष्ठ इत्येवं जिघांसू राक्षसोऽब्रवीत् ।
अत्रोत्तरा ऋचो वसिष्ठेनेति नः श्रुतम् ॥

२२. हे इंद्रा, लहान आणि मोठ्या घुबडांचीं रूपें घेतलेल्या कुत्र्याची आणि चक्रवाकाचें रूप घेतलेल्या, ससाणा व गिधाडाचें रूप असलेल्या राक्षसांना दगडानें मारावें त्याप्रमाणें वज्रानें ठार कर.

२३. राक्षसांचा आम्हांला वेढा पडूं नये. जी हपापलेली राक्षसांची जोडपीं असतील तीं नष्ट होवोत. पृथिवी आमचें पृथ्वीसंबंधी पापापासून संरक्षण करो. तसेंच अन्तरिक्ष आमचें संरक्षण द्युलोकसंबंधीं पापापासून करो.

२४. हे इंद्रा, पुरुष राक्षसांना तूं ठार कर आणि कपटानें ठार करणाऱ्या स्त्री राक्षसीलाहि ठार कर. मृत्यूशीं क्रीडा करणारे राक्षस माना तुटून नष्ट होवोत. त्यांना उगवणारा सूर्य पहावयास न मिळो.

२५. हे सोमा, तूं आणि इंद्र राक्षसांना पहा आणि त्यांच्यावर तुम्ही लक्ष ठेवा. तुम्ही जागृत असा. त्या राक्षसावर आपलें शस्त्र फेकावेस आणि त्या जादुगारांवर आपलें वज्र टाकावेस.

सातवें मंडळ समाप्त.

सातवें मंडळ.

कोष्टक

सूक्त	अष्ट. अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१	५.१.२३-२७	वसिष्ठ	१-१८ विराज बाकी त्रिष्टुभ्	अग्नि	वसिष्ठांचा स्वभाव दाखणारी प्रार्थना
२	५.२.१-२	”	त्रिष्टुभ्	आप्रीसूक्त तनूनपाद्रहित	आप्रीसूक्त
३	५.२.३-४	”	”	अग्नि	
४	५.२.५-६	”	”	”	दत्तक घेण्याविषयीं वसिष्ठाचे विचार
५	५.२.७-८	”	”	वैश्वानर अग्नि	
६	५.२.९	”	”	”	
७	५.२.१०	”	”	अग्नि	
८	५.२.११	”	”	”	
९	५.२.१२	”	”	”	
१०	५.२.१३	”	”	”	
११	५.२.१४	”	”	”	
१२	५.२.१५	”	”	”	
१३	५.२.१६	”	”	वैश्वानर अग्नि	
१४	५.२.१७	”	”	”	
१५	५.२.१८-२०	”	गायत्री	”	
१६	५.२.२१-२२	”	सम-सतोबृहती विषम-बृहती	”	
१७	५.२.२३	”	त्रिष्टुभ्	”	
१८	५.२.२४-२८	”	”	इंद्र	दाशरज्ञयुद्धवर्णन. या सूक्तांत सुदासाच्या सर्व शत्रूंचें वर्णन आहे. इंद्रानें अनेक असुर मारले व सुदासाचें रक्षण केलें.
१९	५.२.२९-३०	”	”	”	
२०	५.३.१-२	”	”	”	
२१	५.३.३-४	”	”	”	लिंगपूजक निषेध
२२	५.३.५-६	”	१-८ विराज ९ त्रिष्टुभ्	”	
२३	५.३.७	”	”	”	
२४	५.३.८	”	”	”	
२५	५.३.९	”	”	”	
२६	५.३.१०	”	”	”	

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
२७	५.३.११	,,	,,	,,	
२८	५.३.१२	,,	,,	,,	
२९	५.३.१३	,,	,,	,,	
३०	५.३.१४	,,	,,	,,	
३१	५.३.१५-१६	,,	गायत्री	,,	
३२	५.३.१७-२१	२६ व्या पहिल्या अर्धाचा वसिष्ठ पुत्र शक्ति किंवा वसिष्ठ	विषम-बृहती सम सतो बृहती	,,	
३३	५.३.२२-२४	१-९ वसिष्ठ १०-१४ वसिष्ठ पुत्र	,,	१-९ वसिष्ठ पुत्र १०-१४ वसिष्ठ	वसिष्ठानें केलेल्या सुदासाचा साहाय्याचा उल्लेख वसिष्ठांची शेंडी
३४	५.३.२५-२७	वसिष्ठ	१-२१ विराज् २२-२५ त्रिष्टुभ्	विश्वेदेव	वसिष्ठ जन्म
३५	५.३.२८-३०	,,	त्रिष्टुभ्	,,	
३६	५.४.१-२	,,	,,	,,	
३७	५.४.३-४	,,	,,	,,	
३८	५.४.५-६	,,	,,	सवितृ	
३९	५.४.६	,,	,,	विश्वेदेव	
४०	५.४-७	,,	,,	,,	
४१	५.४.८	,,	१ जगती बाकी त्रिष्टुभ्	अग्नि, इंद्र आदित्य, २.५ भग, ७ उषस्	
४२	५.४.९	,,	,,	विश्वेदेव	
४३	५.४.१०	,,	,,	,,	
४४	५.४.११	,,	१ जगती २-४ त्रिष्टुभ्	दधिका	
४५	५.४.१२	,,	त्रिष्टुभ्	सवितृ	
४६	५.४.१३	,,	१-३ जगती ४ त्रिष्टुभ्	रुद्र	
४७	५.४.१४	वसिष्ठ	त्रिष्टुभ्	अप्	
४८	५.४.१५	,,	,,	ऋभु	
४९	५.४.१६	,,	,,	अप्	
५०	५.४.१७	,,	१-३ जगती ४ अतिजगती	१ मैत्रावरुण २ अग्नि ३ विश्वेदेव ४ नदी	सर्पभीतिनिवारक, अनेक रोगांचा उल्लेख
५१	५.४.१८	,,	त्रिष्टुभ्	आदित्य	
५२	५.४.१९	,,	,,	,,	
५३	५.४.२०	,,	,,	द्यावापृथ्वी	

सूक्त	अष्ट. अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
५४	५.४.२१	„	„	वास्तोष्पति	
५५	५.४.२२	„	१ गायत्री, २-४ बृहती, ५-८ अनुष्टुभ्	१ वास्तोष्पति २-८ इंद्र	वसिष्ठ रात्रीं वरुणाचे घरीं चोरी करावयास गेला असतां कुत्र्यास व मनुष्यास झोंप लागावी म्हणून म्हटलेलें सूक्त
५६	५.४.२३-२६	„	१-११ विराज् १२-२५ त्रिष्टुभ्	मरुत् „	
५७	५.४.२७	„	„	„	
५८	५.४.२९	„	„	„	
५९	५.४.२९-३०	„	१.३.५ बृहती २-३.६. सतोबृहती ७-८त्रिष्टुभ ९-१०-गायत्री १२अनुष्टुभ्	१-११ मरुत् १२ रुद्र	महामृत्युंजयमंत्र
६०	५.५.१-२	„	त्रिष्टुभ्	मित्रावरुण	
६१	५.५.३	„	„	„	
६२	५.५.५	„	„	१-३ सूर्य बाकी मित्रा वरुण	सूर्यस्तुति सुंदरसूक्त
६३	५.५.४	„	„ „	१-४॥ सूर्य बाकी मित्रावरुण	सुंदरसूक्त
६४	५.५.६	„	„	मित्रावरुण	
६५	५.५.७	„	१०.१२.१४बृहती,	„	
६६	५.५.८-११	„	११.१३.१५ सतो बृहती, १६ पुरउष्णिह बाकी गायत्री त्रिष्टुभ्	१-३ मित्रावरुण ४-१३ आदित्य १४-१६ सूर्य, १७-१९ मित्रावरुण	
६७	५.५.१२-१३	„	„	अश्विनौ	
६८	५.५.१४-१५	„	„	„	
६९	५.५.१६	„	„	„	
७०	५.५.१७	„	„	„	
७१	५.५.१८	„	„	„	
७२	५.५.१९	„	„	„	
७३	५.५.२०	„	१.३.५ बृहती	„	
७४	५.५.२१	„	बाकी सतोबृहती	„	

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
७५	५.५.२२	”	त्रिष्टुभ्	उषस्	उषेचीं सूक्तें पहाटें म्हटलीं असतां संपत्ति प्राप्त होते.
७६	५.५.२३	”	”	”	काव्यमय उषासूक्तें
७७	५.५.२४	”	”	”	
७८	५.५.२५	”	”	”	
७९	५.५.२६	”	”	”	
८०	५.५.२७	”	”	”	
८१	५.६.१	”	विषम-बृहती सम-सतोबृहती	”	
८२	५.६.२-३	”	जगती	इंद्रावरुण	
८३	५.६.४-५	”	”	”	दाशराज्ञयुद्ध वर्णन
८४	५.६.६	”	त्रिष्टुभ्	”	
८५	५.६.७	”	”	”	
८६	५.६.८	”	”	वरुण	
८७	५.६.९	”	”	”	
८८	५.६.१०	”	”	”	
८९	५.६.११	”	१-४ गायत्री ५ जगती	”	
९०	५.६.१२	”	त्रिष्टुभ्	वायु	
९१	५.६.१३	”	”	”	
९२	५.६.१४	”	”	”	
९३	५.६.१५-१६	”	”	”	
९४	५.६.१७-१८	”	१-११ गायत्री १२ अनुष्टुभ्	इंद्राग्नी	
९५	५.६.१९	”	त्रिष्टुभ्	सरस्वती	सरस्वती समुद्राला मिळाल्याचा उल्लेख
९६	५.६.२०	”	१ बृहती, २सतोबृहती, ३ प्रस्तारपंक्ति बाकी गायत्री	१-३ सरस्वती, ४-६ सरस्वत	
९७	५.६.२१-२२	”	त्रिष्टुभ्	१ इंद्र, ३.९.१० इंद्रा-बृहस्पती, बाकी बृहस्पति	
९८	५.६.२३	”	”	७ इंद्राबृहस्पति, बाकी इंद्र	
९९	५.६.२४	”	”	४-६ इंद्राविष्णू	‘ वषट् ते विष्णा ’

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
				बाकी विष्णु	हा परिचित मंत्र
१००	५.६.२५	”	”	विष्णु	
१०१	५.७.१	कुमार अग्नि किंवा वसिष्ठ	”	पर्जन्य	
१०२	५.७.२	”	”	”	
१०३	५.७.३.४	”	१ अनुष्टुभ् बाकी त्रिष्टुभ्	मंडूक	पर्जन्यस्तुति, मंडूकस्तुति. बेडकांचें वर्णन
१०४	५.७.५ ९	”	१-६.१८, २१-२३ जगती, ७ त्रिष्टुभ् किंवा जगती. २५ अनुष्टुभ् बाकी त्रिष्टुभ्	१-५.८.१६ इंद्र, ९.१२.१३ सोम, ११ देव, १७ ग्रावन् १८ मरुत् १०.१४ अग्नि.	रक्षोहन्सूक्त, यांत राक्षसांचा नाश व्हावा म्हणून इंद्रादिकांची स्तुति केली आहे. वसिष्ठाला कोणी यातुधान म्हणाले म्हणून तो संतापला आहे. विविध स्वरूपांच्या राक्षसांचा उल्लेख

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर

मंडळ आठवें.

भाषांतरकार

विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

मुद्रक व प्रकाशक

शंकर रामचंद्र दाते, बी. ए.

चिटणीस, वैदिक वाङ्मय प्रसारक मंडळ.

'लोकसंग्रह' छापखाना, २७ बुधवार पेठ, पुणें.

शके १८५०

किंमत दोन रुपये

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर.

आठवें मंडळ.

सूक्त १ लें.

ऋषिः—१-२ प्रगाथ काण्व; ३०-३३ असंग राजा, ३४ शश्वती असंगपत्नी, अंगिरससुता, बाकी मेधातिथि व मेध्यातिथि कण्वगोत्र; देवता-३०-३३ आत्मकृतदानस्तुति, ३४ असंग राजा बाकी इंद्र;छंदः-३३-३४ त्रिष्टुभ्, २-४ सतोबृहती अवशिष्ट बृहती.

१. हे मित्रहो, (इंद्राशिवाय) दुसऱ्या देवांची स्तुति करूं नका. व्यर्थ श्रम करूं नका. सोम पिळला असतां बलवान् इंद्रालाच एकत्र होऊन तुम्ही स्तवा. स्तोत्रें पुनः पुनः म्हणा.

२. बैलाप्रमाणें शत्रूनाशक, जरारहित, बैलाप्रमाणें लोकांचा पराभव करणारा, शत्रूंचा द्वेष करणारा, संरक्षक, निग्रहानुग्रह करणारा, थोर दाता, उभय लोकांतल्या धनांनीं युक्त अशा इंद्राचीच स्तुति करा.

३. जरी हे लोक तुझी नानाप्रकारें संरक्षणाकरतां स्तुति करतात,तरी हे इंद्रा,आमचें हें स्तोत्र तुला नेहमीं उत्साहवर्धक होवो.

४. हे धनवान् इंद्रा, शहाणे. प्रतापी आणि सर्वत्र फिरणारे स्तोते (मोठालीं संकटें) तरून जातात तर तूं आम्हाकडे ये आणि अनेक प्रकारचें, उत्कृष्ट अन्न आम्हांला पोषणाकरतां दे.

५. हे वज्रयुक्त इंद्रा, तुला, मी मोठ्या किंमतीनेंहि देऊन टाकणार नाहीं. हे वज्रहस्त इंद्रा, हजाराला नाहीं, दहा हजाराला नाहीं, हे विपुल धनयुक्ता, तुला अपरिमित संपत्तीलाहि मी देणार नाहीं.

६. हे इंद्रा, तूं माझ्या बापापेक्षां आणि कवडीचुंबक भावापेक्षांहि फार धनवान् आहेस. हे संरक्षका, माझी माता आणि तूं माझें धन आणि अन्नाकरतां चांगलें संरक्षण करतां.

७. हे इंद्रा, तूं कोठें गेला आहेस ? आतां कोठें आहेस ? तुझें मन अनेक ठिकाणीं फिरत असतें. हे युद्धकुशला, हे युद्धकर्त्या, हे शत्रूंचीं नगरें फोडणाऱ्या इंद्रा, ये. स्तोते तुझी स्तुति करीत आहेत.

८. नगरें फोडणारा जो सर्वांना पूज्य आहे, काण्व मेधातिथीच्या ज्या ऋचांनीं इंद्र यज्ञांत जातो, आणि ज्या स्तुतींनीं वज्रधारी इंद्र शत्रूंचीं नगरें फोडतो त्या ऋचांनीं इंद्राकरतां गायत्रसाम गा.

९. हे इंद्रा, जे तुझे दहा योजने चालणारे असे शेकडों हजारों घोडे आहेत, जे तुझे महाबलवान् आणि शीघ्रगामी घोडे आहेत त्या सर्व घोड्यांनीं आम्हांकडे लवकर ये.

१०. (यांत धेनु किंवा वृष्टि यांची इंद्राचे ठिकाणीं कल्पना केली आहे.) आज दूध देणारी, चपल आणि सहज धार काढली जाणाऱ्या गाईच्या स्वरूपानें असणाऱ्या इंद्राला मी बोलावतों. अनेक धारायुक्त वृष्टिरूप समर्थ इंद्राला मी बोलावतों.

११. जेव्हां सूर्यानें एतशाला जखम केली, तेव्हां (त्याच्या रक्षणार्थ) चाकीवर चालणारे व वायूसारखे पळणारे दोन घोडे (घेऊन) इंद्रानें अर्जुनीपुत्र कुत्साला आणलें. आणि अहिंस्य सूर्यावर चालून गेला.

१२. अत्यंत धनवान् असणाऱ्या इंद्रानें मानेमध्यें छेद (काप) घेण्यापूर्वी बंधन (पट्टी) न बांधतां त्यानें ती जखम बंद केली आणि जखमी झालेला तो भाग होता तसा केला.

१३. हे इंद्रा तुझ्या कृपेनें आम्ही हलक्या लोकाप्रमाणें होऊं नये, आम्ही दुःखी लोकांप्रमाणें

---

११ टीपः—एतश सूर्याच्या युद्धाचा उल्लेख अन्यत्र आहे.पण जास्त माहिती नाहीं.पहा १५४.६-६१.१५;

१२ टीपः—यामध्यें पूर्वकालीन शस्त्र क्रियेचा उल्लेख आहे. शिवाय शस्त्रक्रियेच्या इतर साधनांचाहि संबंध दिसून येतो.

टीप—निष्ट्या इव-हलक्या लोकाप्रमाणें—निष्ट्यः चाण्डालादिः असें सिद्धांतकौमुदींत भट्टोजी दीक्षितानें म्हटलें आहे.

असूं नये, आम्ही शाखापर्णविहीन वनाप्रमाणें असूं नये हे वज्रधारी इंद्रा, आम्ही बळकट घरांत राहणारे तुझी स्तुति करीत आहोंत.

१४. हे वृत्रहन्त्या इंद्रा, घाई न करतां नम्रपणें आम्ही तुला स्तवीत आहोंत. हे शूरा, तुझें एकदांच पुष्कळ हविर्द्रव्यांसह आम्ही स्तोत्र म्हणतां.

१५. जर माझें स्तोत्र इंद्र ऐकेल तर गाळण्यांतून गळणारा पातळ आणि पाण्यांनीं भरपूर असा सोम इंद्राला मद्युक्त करील.

१६. हे इंद्रा, सेवा करणाऱ्या मित्राची संवानें केलेली स्तुति (ऐकण्याकरतां) तूं तातडीनें ये. आम्हां धनवानांचें स्तोत्र तुला प्राप्त होवो. आतां मी तुझी स्तुति करूं इच्छितों.

१७. हे अध्वर्यूहो, तुम्ही दगडांनीं (कुटून) सोम पिळा. आणि त्याला पाण्यांत मिसळा. बैलाच्या कातड्याप्रमाणें सर्वत्र व्यापून असणारे मरुत् नद्याकरतां जल उत्पन्न करतात. (म्हणून त्यांच्याकरतां सोम पिळा.)

१८. हे इंद्रा, तूं पृथ्वी, अन्तरिक्ष किंवा महान् स्वर्ग यथून येऊन ह्या विस्तृत स्तोत्रानें उल्हासित हो. तसेंच हे कर्तृत्ववन्ता, आमच्या झालेल्या लोकांच्या इच्छा तृप्त कर.

१९. हे अध्वर्यूहो, तुम्ही इंद्राकरतां अत्यंत मादक आणि उत्कृष्ट सोम पिळा. कारण, इंद्र सर्व कृत्यानें प्रसन्न करणाऱ्या अन्नेच्छु यजमानाला उत्कर्षयुक्त करतो.

२०. हे इंद्रा, तुझ्याकरतां मी सोम गाळीत आणि स्तुति करीत आहें. मी याचना करून बलवान् सिंहाप्रमाणें बलवान् अशा तुला राग उत्पन्न करूं नये. ईश्वराला कोण याचना करीत नाहीं ?

२१. स्फूर्तिदायक स्तोत्र म्हणून दिलेला उग्र सोम अत्यंत बलयुक्त इंद्र पिवो. कारण, तो (सोम प्याल्यावर) जगज्जेता आणि शत्रूंचा अभिमान नाहींसा करणारा असा पुत्र तो आम्हांला देतो.

२२. यज्ञांत दात्या मनुष्याला इंद्रदेव पुष्कळ धन देतो. सर्व कामाला उत्साहानें प्रवृत्त होणारा आणि स्तोत्यांनीं स्तविलेला तो इंद्र सोम काढणारांना आणि स्तोत्यांना धन देतो.

२३. हे इंद्रा, तं यावेस. हे देवा, आश्चर्यकारक सोमरूपी अन्नानें तं मदयुक्त हो. सर्वांबरोबर प्यालेल्या सोमांनीं विस्तीर्ण व स्थूल उदर सरोवराप्रमाणें भरून टाक.

२४. हे इंद्रा, सुवर्णमय रथाला जोडलेले शेंकडों हजारो केसाळ व उत्कृष्ट घोडे तुला सोम पिण्याकरतां वाहून आणोत.

२५. हे इंद्रा, सुवर्णमय रथांत बसलेल्या तुला मोरासारख्या शेपटी असलेले आणि पांढऱ्या पाठीचे घोडे मधुर व प्रशंसनीय सोम पिण्याकरतां वाहून आणोत.

२६. हे प्रशंसनीय इंद्रा, तूं वाऱ्याप्रमाणें हा सोम (प्रथम) पी. शुद्ध केलेल्या, चवदार सोमाचा सुंदर रस आनंददायक असतो.

२७. जो एकटाच इंद्र पराक्रमांनीं (शत्रूंचा) पराभव करतो आणि जो महान् सामर्थ्यवान् आहे तो सरळ नाकाचा इंद्र येवो, तो आम्हांला सोडून न जावो. आमचीं स्तोत्रें ऐको आणि तो आम्हांला सोडून न जावो.

२८. जेव्हां दोनहि प्रकारें तूं बोलावला गेलास, तेव्हां हे इंद्रा, तूं शुष्णाचें हलतें नगर आयुधांनीं, धुळीला मिळवलेंस आणि यश प्राप्त केलेंस.

२९. हे व्यापक इंद्रा, सूर्य उगवला असतां सकाळीं, दिवसाच्या माध्यान्हकालीं, सायंकाळीं आणि रात्रीं माझीं स्तोत्रें तुला माझ्याकडे वळवोत.

३०. (आसंग नांवाचा राजर्षि मेध्यातिथीला पुष्कळ धन देऊन त्याला स्वतःची स्तुति करण्याविषयीं सांगतो.) हे मेध्यातिथे, तूं आमची पुनः पुनः स्तुति कर. आम्ही तुला अतिशय धन देणारे आहोंत. शत्रूंच्या घोड्यांना निन्द्य करणारा, सन्मार्गवर्ती आणि मोठमोठ्या शत्रूंना जिंकणारा मी आहे.

३१. हे मेध्यातिथे, चांगल्या घोड्यांनीं युक्त असा मी जेव्हां तुझ्या रथांत बसतों, तेव्हां तूं माझीच स्तुति कर. जो पशुमान् याद्व (आसंग) आहे तोच उत्कृष्ट सन्मानपूर्वक दाता आहे.

३२. ज्या आसंगानें सोन्यानें मढविलेल्या कातड्यासह संपत्ति मेध्यातिथीला दिली, तो हा आसंग रथाचा (जोरानें हाकून) आवाज करीत (शत्रूंची) उत्कृष्ट संपत्ति पराभूत करो.

३३. आसंग प्लायोगि दुसऱ्यापेक्षां दहा हजारपट अधिक धन देतो. बलवान् आणि तेजस्वी असे मला दिलेले दहा हजार गाईबैल सरोवराच्या तीरावरून नळ नांवाचें गवत उत्पन्न व्हावें त्याप्रमाणें उत्पन्न झाले. (अशी माझी स्तुति कर असें आसंग प्लायोगीनें मेध्यातिथीस सांगितलें.)

---

२१ टीप–'तरुतारं' वरील टीप पहा. १.११९. १.

३४. ह्या आसंगाच्या पुढल्या भागीं स्थूल लिंग दिसत आहे. तें लिंग बिनहाडाचें आणि मांड्यामध्यें लोंबत आहे. शश्वती नांवाची त्याची पत्नी तें पाहून 'हे प्राणनाथा, उपभोगाचे अत्यंत उत्कृष्ट साधन तूं धारण करतोस' असें म्हणाली.

३४. टीपः—हा आसंग देवतांच्या शापानें एकदां नपुंसक झाला. त्याची पत्नी शश्वती नांवाची होती. तिला नवऱ्याच्या नपुंसकपणामुळें फारच दुःख झालें आणि तिनें मोठी तपश्चर्या आरंभली. त्या तपश्चर्येनें त्याला पुरुषत्व प्राप्त झालें. पुरुषत्व प्राप्त झालेल्या आपल्या नवऱ्याला पाहून प्रसन्न झालेल्या शश्वतीनें त्याची स्तुति केली आहे. ती स्तुति वरील मंत्रांत आहे.

सूक्त दुसरें

ऋषिः—मेधातिथि काण्व व प्रियमेध आंगिरस, ४१–४२ यांचा मेधातिथिच; देवता–इंद्र, ४१–४२ विभिंददानस्तुति; छंदः—२८ अनुष्टुभ्, बाकी गायत्री.

१. हे सर्वाधीश्वरा इंद्रा, हा ओतलेला सोम पोट भरून पी. हे निर्भय इंद्रा, तुला आम्ही सोम देतों.

२. लोकांनीं स्वच्छ केलेल्या, दगडांनीं कुटलेल्या, लोंकरींतून गाळलेल्या आणि पाण्यांत घोड्याप्रमाणें स्वच्छ केलेल्या,—

३. त्या सोमाला, हे इंद्रा, तुझ्याकरतां गव्हाचे पदार्थ गाईचें दूध वगैरेंत मिसळून जसें मधुर करतात तसें आम्ही मधुर केलें आहे. आणि त्याकरतां ह्या यज्ञांत तुला बोलावीत आहोंत.

४. देव आणि लोक यांमध्यें इंद्रच एकटा सोम पिणारा आहे, इंद्रच पिळलेला सोम पिणारा आहे. आणि सर्व अन्नें भक्षण करणारा आहे.

५. रसभरित असणारा सोम अत्यंत बलवान् आणि रसिक अशा त्या इंद्राला प्रसन्न करीत नाहीं असें नाहीं, दुःखानें तयार केले जाणारे पदार्थहि त्याला प्रसन्न करतातच आणि तृप्त करणारे पदार्थ त्याला प्रसन्न करीत नाहींत असें नाहीं.

६. पारधी प्राण्यांना शोधतात त्याप्रमाणें जे दुसरे लोक ह्या इंद्राला गाईंच्या दूधादिकांनीं शोधतात आणि जे वाणीनीं वेडीवाकडी इंद्राची स्तुति करतात त्यांना इंद्र प्राप्त होत नाहीं.

७. पिळलेला सोम पिणाऱ्या इंद्रदेवाला पिण्याकरतां आपल्या घरांत तीन ठिकाणीं सोमरस असो.

८. एका यज्ञगृहांतच तीन सोमाचे साठे पाझरतात. आणि तीन भांडीं पुरेपूर भरलेलीं असतात.

९. हे सोमा, तूं स्वच्छ केलेला आहेस. अनेक पात्रांत ठेवलेला दुधांत मिसळलेला, (तृतीयसवनीं) दह्यांत मिसळलेला तूं इंद्राला अत्यंत मद उत्पन्न करणारा हो.

१०. हे इंद्रा, तुझे आम्ही पिळलेले, तीव्र व शुद्ध सोम ज्या मिश्रणीय द्रव्याची इच्छा करीत आहेत—

११. हे इंद्रा, त्या सोमांत मिश्रणीय द्रव्यें मिसळ. नंतर पुरोडाश आणि सोम एकत्र कर. (प्रथम भक्षण केलेल्या पुरोडाशावर सोम पी). तुला धनवान् असें मी ऐकलें आहे.

१२. हे इंद्रा, दारु प्यालावर येणाऱ्या मदाप्रमाणें प्यालेले सोम हृदयांत युद्ध करतात. स्तोते भरलेल्या कासेप्रमाणें सोमाची स्तुति करतात.

१३. हे अश्वयुक्त इंद्रा, धनवानाचा स्तोता धनवान् होतो. तुझ्यासारख्या धनवानाचा आणि कीर्तिमानाचा स्तोता श्रेष्ठ होणारच.

१४. स्तुति न करणाऱ्यांचा शत्रु इंद्र म्हटलें जाणारें स्तोत्र ऐकतो. तसेंच सध्याचें गायलें जाणारे गायत्र नांवाचें गाणेंहि तो जाणतोच.

१५. हे इंद्रा, ठार करणाऱ्या शत्रूंच्या ताब्यांत तूं आम्हांस देऊं नकोस. तसेंच पराभव करणाऱ्या शत्रूंच्या ताब्यांत देऊं नकोस. हे बलवन्ता, आमच्या कृत्यांनीं आम्हांला धन दे.

१६. हे इंद्रा, तुझी इच्छा करणारे तुझे मित्र आम्ही त्या त्या इच्छेनें स्तोत्रें म्हणत आहोंत. कण्वगोत्रोत्पन्न स्तोत्रें म्हणून तुझी स्तुति करीत आहेत.

१७. हे वज्रधारण करणाऱ्या इंद्रा, कर्तृत्ववान् अशा तुझ्या नवीन यज्ञांत तुझ्याशिवाय दुसऱ्याचें स्तोत्र मी नाहींच म्हणणार. मी केवल तुझेंच स्तोत्र जाणतों.

१८. देव यज्ञकर्त्या भक्तांची इच्छा करतात. आळशाची इच्छा करीत नाहींत. म्हणूनच निरलस देव चुका करणारांना शिक्षा करतात.

१९. हे इंद्रा, अन्नांसह तूं आमच्याकडे वेगानें अवश्य ये. तरुण बायको असलेला मोठा (वृद्ध) मनुष्य ज्याप्रमाणें बायकोकडे जातो त्याप्रमाणें तूं ये. लाजूं नकोस.

---

८ टीपः—३ साठे—द्रोणकलश, पूतभृत्, आधवनीय. नांवाचीं तीन पात्रें.

२०. कठोर हत्यारें असलेला इंद्र आतां आमच्या जवळ येवो. भिकारड्या जांवयाप्रमाणें तूं येण्यास संध्याकाळ करूं नकोस.

२१. ह्या पराक्रमी इंद्राची उदार बुद्धि आम्ही खरोखर जाणतों. तसेंच तीनहि लोकांत उत्पन्न झालेल्या लोकांचीं मनें आम्ही जाणतों.

२२. हे अध्वर्यो, कण्व गोत्रांतील लोकांनीं युक्त अशा इंद्राला ताबडतोब सोम द्या. अतिशय बलवान् आणि अनेक प्रकारचें संरक्षण असलेल्या इंद्रापेक्षां यशस्वी पुरुष आम्ही जाणत नाहीं·

२३. हे सोम काढणाऱ्या, पराक्रमी, शक्तियुक्त आणि मनुष्यश्रेष्ठ इंद्राला मुख्य पात्रानें सोम दे. तो सोम इंद्र पिवो.

२४. जो सुखकर भक्तांचीं स्तोत्रें जाणणारा आहे, तो इंद्र स्तोत्रें म्हणणाऱ्या भक्तांना गाईबैल आणि घोडे यांनीं युक्त धन देतो.

२५. हे सोम पिळणारे हो, मद उत्पन्न करण्यास योग्य, पराक्रमी व शूर इंद्राला सर्व प्रकारें उत्कृष्ट सोम पोचवा.

२६. पिळलेला सोम पिणारा व वृत्रहन्ता इंद्र अवश्य येवो. तो आमच्या दूर नसो. आणि अनेक प्रकारें सुरक्षित असणारा तो इंद्र आम्हांला धन देवो.

२७. स्तोत्रांनीं प्रसिद्ध झालेल्या स्तुतिप्रिय व मित्रभूत इंद्राला प्रशंसनीय आणि सुखकर घोडे वाहून आणोत.

२८. हे सुंदर नाक असणाऱ्या ऋषियुक्त आणि शक्तियुक्त इंद्रा, सोम मधुर आहे म्हणून ये. सोम दुधांत मिसळलेला आहे म्हणून ये. सध्यां स्तोता सर्वांसह आनंदी असणाऱ्या तुला स्तवीत आहे म्हणून ये.

२९. उत्कृष्ट धन आणि बल प्राप्त व्हावें म्हणून कर्त्याचा उत्कर्ष करणारीं जीं स्तोत्रें आणि स्तोते तुझा उत्कर्ष करतात —

३०. हे स्तुति करून बोलावल्या जाणाऱ्या इंद्रा, तुझीं जीं स्तोत्रें आणि शस्त्रें आहेत, तीं सर्व तुला एकदम सामर्थ्य देतात.

३१. हाच अनेक कृत्यें करणारा, प्रमुख, वज्रधारी व फार कालापासून पराभव न पावलेला इंद्र स्तोत्यांना अन्न देतो.

३२. इंद्र उजव्या हातानें वृत्राला चांगल्या प्रकारें ठार करितां झाला. अनेक ठिकाणीं अत्यंत स्तुति केलेला इंद्र मोठ्या कर्तृत्वानें (सर्वांत) श्रेष्ठ आहे.

३३. ज्या इंद्राधीन सर्व लोक असतात, जेथें पराभव करणारीं सर्व सामर्थ्यें असतात, तो इंद्र हविर्युक्त भक्तांचें अनुसरण करतो.

३४. हा इंद्र हें सर्व करता झाला. जो इंद्र श्रेष्ठ म्हणून ऐकला जातो, तो इंद्र हवि देणारांना अन्न देणारा आहे.

३५. प्रहरणशील इंद्र धन लुटणाऱ्या ज्या रथाचे शहाण्या व वेड्या शत्रूपासून संरक्षण करतो, तोच समर्थ होऊन धन प्राप्त करतो.

३६. शहाणा इंद्र घोड्याच्या सहाय्यानें जातो आणि मरुतांच्या साहाय्यानें वृत्राला ठार करतो आणि सत्यस्वरूप इंद्र सेवा करणाराचें संरक्षण करतो.

३७. (ऋषि आपणा स्वतःला उद्देशून म्हणतो.) हे प्रियमेध, इंद्राशीं एकरूप होऊन तं इंद्राची पूजा कर. जो इंद्र सोमांनीं खरा उत्साहित होतो—

३८. हे कण्वपुत्रहो, तुम्ही त्या वर्णनीयकीर्ति, सज्जनसंरक्षक, (यज्ञांतील) हवि इच्छिणाऱ्या, अनेक रूपें घेणाऱ्या आणि वेगशाली इंद्राचीं स्तोत्रें गा.

३९. ज्या लोकांनीं इंद्राची स्तुति केली त्या लोकांना गाईच्या पावलाशिवायहि जो कर्तृत्ववान् आणि मित्रभूत इंद्र गाई पुनः परत देता झाला (त्याचीं वर्णनें गा.)

४०. अशा प्रकारें स्तुति करणाऱ्या काण्व मेध्यातिथीकडे हे वज्रधारी इंद्रा, जो तूं मेंढ्याचें रूप घेऊन आलास त्या तुझी आम्ही स्तुति करतों.

४१. हे विभिंदुराजा, दात्या त्वा मला चाळीस हजार (नाणीं) दिलींस आणि आणखीहि आठ हजार दिलींस.

४२. तसेंच त्या प्रसिद्ध उदकवृद्धि करणाऱ्या, जनक व स्तोत्याचें पतन न होऊं देणाऱ्या द्यावापृथ्वी (पूर्वींची) संपत्ति मिळण्याकरतां मी स्तवितों.

---

३९ टीपः—पणीनीं चोरून नेलेल्या व लपवून ठेवलेल्या गाई इंद्रानें माग काढण्याला साधन नसतांहि शोधून काढल्या आणि परत आणल्या अशी कथा आहे. १०–१०८. सरमा–पणीसंवाद पहा.

सूक्त तिसरें.

ऋषिः-मेध्यातिथि काण्व; देवता-१ ते २० इंद्र, २१ ते २४ कुयाणपुत्र पाकस्थामनाची दानस्तुति; छंदः-१.३.५.७.९.११.१३.१५.१७.१९.२४ बृहती, २.४.६.८.१०.१२.१४.१६.१८.२० सतोबृहती, २१ अनुष्टुभ् २२.२३ गायत्री.

१. हे इंद्रा, आमचा मधुर, दूध मिसळलेला आणि ओतलेला सोम पी आणि (पिऊन) तृप्त हो. आम्ही तृप्त केलेला आणि बांधवभूत असणारा तूं आमच्या उत्कर्षाकरितां जागृत आस. तुझी बुद्धि आमचें संरक्षण करो.

२. हे इंद्रा, हविर्युक्त आम्हांवर तुझी अनुग्रह बुद्धि असावी. शत्रूकरतां आम्हांला ठार करूं नकोस. इष्ट आणि आश्चर्यकारक रीतीनें तूं आमचें संरक्षण कर. तसेंच आम्हांला सुखी कर.

३. हे अत्यंत धनवान् इंद्रा, माझीं हीं स्तोत्रें तुला उत्साहित करोत. तेजांनीं अग्नीसारखे, शुद्ध आणि ज्ञाते तुझे स्तोत्रांनीं वर्णन करतात.

४. हजारो ऋषींनीं बळयुक्त केलेला हा इंद्र समुद्राप्रमाणें व्यापक होतो. ह्याचा तो सत्यमहिमा आणि बल यज्ञांत स्तोत्यांच्या संघांत गायला जातो.

५. यज्ञाकरतां आम्ही इंद्रालाच बोलावतों. यज्ञ सुरू झाला असतां आम्ही इंद्राचा धांवा करतो. जय इच्छिणारे आम्ही युद्धांत इंद्राची करुणा भाकतो आणि धन मिळावें म्हणून आम्हीं इंद्राला विनवितों.

६. ह्या इंद्रानें आपल्या बलसामर्थ्यानें द्यावापृथ्वी विस्तारली आणि सूर्याला प्रकाशित केलें, हीं सर्व भुवनें इंद्रानें नियमन केली जातात आणि पिळलेला सोम इंद्राचे ठिकाणींच जातो.

७. हे इंद्रा, प्रथम सोम पिण्याकरतां लोक स्तोत्रांनीं तुला स्तवितात. एकत्र झालेले ऋभु (ऋभु, विभु आणि वाज) तुलाच वर्णितात. मरुत् प्राचीन अशा तुझीच स्तुति करतात.

८. पिळलेल्या सोमाचा व्यापक मद उत्पन्न झाला असतां त्याच भक्ताचें बल व सामर्थ्य इंद्र वृद्धिंगत करतो. आज पूर्वीप्रमाणें ह्या इंद्राचा तो महिमा लोक वर्णन करतात.

९. हे इंद्रा, धन पाहिजे असतां ज्या सामर्थ्यानें यतीपासून (लुटून) भृगूला तूं देतोस आणि ज्यामुळें प्रस्कण्वाचें तूं संरक्षक केलेस तें सामर्थ्य मी तुला मागतों. तें अन्न इतरांपेक्षां पूर्वीं मी तुला मागत आहें.

१०. हे इंद्रा, ज्या सामर्थ्यानें तूं समुद्रांत पुष्कळ पाणी उत्पन्न केलेंस तें तुझें सामर्थ्य मोठें आहे. ज्या महिम्यानें पृथ्वी चालते तो ह्याचा महिमा ताबडतोब नष्ट करण्यासारखा नाहीं.

११. हे इंद्रा, जें मूल्यवान् धन तुला मी मागतों, तें धन तूं आम्हांला दे. हे चिरंतना, उपभोग इच्छिणाऱ्या हविर्युक्ताला प्रथम दे आणि नंतर स्तुति करणाराला दे.

१२. उपभोग इच्छिणाऱ्या आमच्यापैकीं ह्या यजमानाला तें धन दे कीं, ज्यानें पुरूच्या मुलाचें संरक्षण केलेंस. हे इंद्रा, रुशम, श्यावक आणि कृप यांचें तूं संरक्षण केलेंस तसेंच हवि देणाऱ्या यजमानाला (धन देऊन) समर्थ करावेस.

१३. स्तुति करणारा नवीन कोण मनुष्य इंद्राची सतत स्तुति करील ? पूर्वकालीन सर्व स्तोते ह्या इंद्राचा असामान्य महिमा प्राप्त करूं शकले नाहींत.

१४. हे इंद्रा, स्तुति करणारे कोण बरें तुला उद्देशून यज्ञाची इच्छा करिते झाले ? कोण शहाणा ऋषि तुला स्तुति पोंचवितो ? हे धनवन्ता इंद्रा, सोम काढणाऱ्याच्या बोलावण्याबरोबर तूं केव्हां आलास आणि स्तुति करणाऱ्याच्या बोलावण्यावरून तूं केव्हां आलास? (केव्हांही नाहीं.)

१५. तीं अत्यंत मधुर आणि गानरूप आणि स्तुतिरूप स्तोत्रें हे इंद्रा तुला उद्देशून एकदम (शत्रूला) जिंकणाऱ्या, धन मिळवणाऱ्या, अक्षयीं संरक्षित आणि अन्नेच्छु रथाला गति द्यावी त्याप्रमाणें म्हटलीं जातात.

१६. कण्वगोत्रोत्पन्न ऋषींप्रमाणें व भृगु कुलांतील ऋषि सूर्याप्रमाणें सर्वव्यापक असलेल्या इंद्रालाच व्यापून असतात. प्रियमेध नांवाचे लोक इंद्राला प्रिय स्तोत्रें गातात.

१७. हे वृत्रहन्त्या इंद्रा, तूं आपले दोन घोडे जोड. आणि हे धनवन्ता, सामर्थ्यवान् असणारा तूं सोम पिण्याकरितां आमच्याकडे देखण्या मरुतांसह (द्युलोकावरून) लांबून ये.

१८. हे इंद्रा, हे स्तोते ब्राह्मण तूं यज्ञांत यावें म्हणून स्तोत्रानें पुनः पुनः तुझी स्तुति करीत आहेत. हे धनवन्ता आणि स्तुत्य इंद्रा, तूं आमची वेनाप्रमाणें (स्तुति इच्छिणाऱ्याप्रमाणें) स्तुति ऐक.

१९. हे इंद्रा, तूं वृत्राला विपुल उदकाकरतां ठार केलेंस. कपटी अर्बुद आणि मृगयाला ठार केलें आणि पर्वतांतून गाई मोकळ्या केल्यास.

२०. हे इंद्रा, जेव्हां तूं महान् वृत्राला आकाशांतून बाहेर घालवलेंस तेव्हां तूं आपलें सामर्थ्य प्रकट केलेंस. (तीनहि ठिकाणचे) अग्नि प्रज्वलित झाले. सूर्य प्रकाशला आणि इंद्राला आवडणारा सोमरस उत्पन्न झाला.

२१. (येथून चार ऋचांत कुरयाणपुत्र पाकस्थाम्यापासून मिळालेल्या दानाची स्तुति मेध्यातिथि करतो आहे.) जें (धन) मला इंद्र आणि मरुत् देते झाले, द्युलोकांत त्रावणाऱ्या सूर्याप्रमाणें सर्वांत आपल्या गुणांनीं अत्यंत शोभायुक्त तेंच (धन) कौरयाण पाकस्थामानें आम्हांला दिलें.

२२. चांगल्या पाठीचा, दोही बाजूच्या लांकडांत बरोबर बसणारा आणि द्रव्यदृष्टि देणारा तांबडा (घोडा) बैल पाकस्थामानें मला दिला.

२३. ज्याचें जोखड दुसरे दहा घोडे ओढून नेतात, जसें तुग्र्य भूज्यूला घरीं ओढून नेलें, असा घोडा त्यानें मला दिला.

२४. ह्या (गुणांनीं) बापाच्या (सारखा) मुलगा आधारभूत, सामर्थ्य देणारा, हितकारक, शत्रुहिंसक, उदार आणि दात्या पाकस्थामाची मी (अशी) स्तुति केली.

सूक्त चवथें.

ऋषिः--देवातिथि कण्वगोत्र; देवता-१९.२०.२१ कुरूंग-दानस्तुति, १५ ते १८ पूषन् किंवा इंद्र, १-१४ इंद्र; छंदः-२१ उष्णिह् १.३.५-७.९.११.१३.१५.१७. १९ बृहती,२.४.६.८.१०.१२.१४.१६.१८.२० सतो-बृहती.

१. हे इंद्रा, जेव्हां तूं पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर दिशेस लोकांकडून बोलावला जातोस, तेव्हां हे श्रेष्ठ इंद्रा, आनूकडे जाण्यास लोकांकडून आग्रह केला जात आहेस. हे शत्रूंचा पराभव करणाऱ्या, तुर्वशाकडे जाण्यासाहि लोकांकडून आग्रह केला जात आहेस.

२. जरी तूं रुम, रुशम, श्यावक आणि कृप यांच्या येथें नेहमीं प्रसन्न असतांस तथापि स्तोत्रकर्ते कण्व स्तोत्रें म्हणून तुला (घरीं) बोलावतात,म्हणून तूं ये.

३. जसा तान्हेलेला मृग पाण्यानें भरलेल्या तलावाकडे जातो तसा विशेष आपलेपणा उत्पन्न झालेला तूं आम्हांकडे लवकर ये. आणि कण्वांचा सोम एकदम पी.

४. हे धनवन्ता इंद्रा, सोम काढणाराला अन्न देण्याकरतां तुला हा सोम उल्हासित करो. तूं भांड्यांत ठेवलेला सोम बळानें घेऊनहि पितोस. खरोखर तूं अत्यंत शक्ति धारण करतोस.

५. इंद्र आपल्या सामर्थ्यानें शत्रूंचा पराभव करतो. बलानें क्रोध नष्ट करतो. हे महान् इंद्रा, तुझें युद्धेच्छु सर्व शत्रु झाडाप्रमाणें निश्चल झाले आहेत.

६. तुझी स्तुति जो मनुष्य करतो तो जणूं काय हजारों योध्यांनीं युक्त होतो. जो स्तोत्रें म्हणून हवि देतो तो शत्रुहन्ता व पराक्रमी पुत्र प्राप्त करतो.

७. हे इंद्रा, सामर्थ्यवान् अशा तुझी मैत्री असतांना आम्ही भिणार नाहीं किंवा आम्ही दुःखी होणार नाहीं. पराक्रमी अशा तुझें महान् कृत्य स्तुत्य आहे. कारण, तुर्वश व यदु यांना आम्ही पहात आहोंत.

८. सामर्थ्यवान् इंद्र डाव्या कंबरेइतक्या भागानें सर्व जग व्यापून टाकतो. याचा शत्रु ह्याला ठार करीत नाहीं (करूं शकत नाहीं) किंवा (हवि) देणारा ह्याला राग उत्पन्न करीत नाहीं. मधमाशांनीं केलेल्या मधाप्रमाणें किंवा दुधांनीं युक्त असणाऱ्या गाईप्रमाणें आमचे सोम आहेत. तर लवकर ये आणि पी.

९. हे इंद्रा, तुझा मित्र अश्वयुक्त, रथयुक्त आणि सुरूप असाच असतो. तुझ्या मित्राजवळ गाईबैल असावयाचेच. तो धन आणि अन्न यांनीं युक्त असतो. म्हणून तो सर्वांना आल्हादक असा सभेंत प्राप्त होतो.

१०. हे इंद्रा, तान्हेलेल्या अस्वलाप्रमाणें पिण्याचे जागीं ये. आणि इच्छेनुसार सोम पी. प्रतिदिवशीं पाऊस पाडणारा तूं महान् सामर्थ्यवान् आहेस.

११. हे अध्वर्यो, इंद्र पिऊं इच्छितो. तर तूं सोम काढ. बलवान् दोन घोडे आतां जोडले आहेत आणि इंद्र आला आहे.

१२. जेथें तूं सोम पिऊन तृप्त होतोस तें स्थान तो दाता आपणहून जाणतो. तुला योग्य असणारे अन्न (सोम) येथें ओतला आहे. म्हणून तूं ये,लवकर चाल आणि पी.

१३. हे अध्वर्यूहो, रथांत बसलेल्या इंद्राकरतां सोम पिळा. मूळ दगडावर (उपरावर) यज्ञ सिद्ध करणाऱ्या सोमाला कुटणारे दगड विशेष प्रकारें शोभतात.

१४. आकाशांत जोरानें चालणारे, बलिष्ठ दोन घोडे इंद्राला कर्मांत वाहून नेतात. यज्ञाची सेवा करणारे घोडे आमच्या यज्ञांत हे इंद्रा, तुला वाहून आणोत.

१५. धनवान् पूषन्शीं आम्ही मैत्री करतों. हे बहुस्तुत आणि मुक्त करणाऱ्या इंद्रा, तूं आम्हांला शत्रूंना ठार करण्याला आणि धन मिळविण्याकरतां समर्थ कर.

१६. हे इंद्र किंवा पूषन्, (न्हाव्याच्या) खांद्यावरच्या वस्तऱ्याप्रमाणें तूं आम्हांला तीक्ष्ण (बुद्धि) कर. हे मुक्त करणाऱ्या,आम्हांला तूं धन दे. जें तूं मनुष्यांना देतोस तें तुझेजवळ असलेलें गोधन आम्हांला सुलभ आहे.

१७. हे पूषन्, मी तुला प्रसन्न करूं इच्छितों. हे प्रकाशयुक्ता, मीं तुझी स्तुति करूं इच्छितों. जो दुःखदायक आहे त्याला मी (स्तवूं) इच्छित नाहीं. हे आधारभूता, स्तुति करणाऱ्या आणि सोम म्हणणाऱ्या मला कक्षीवानाप्रमाणें धन दे.

१८. हे प्रकाशिता, केव्हां तरी आमचे गाईबैल चरावयास जातात तेव्हां हे अमर्त्या, आमचें तें धन टिको. (चोरव्याघ्रादिकांपासून त्याला अपाय न होवो) तसेंच हे पूषन्,आमचें संरक्षण करणारा होऊन सुखकर हो. आणि बलप्राप्तीकरतां आम्हांला थोर दाता हो.

१९. (कुरुंगदानस्तुति) प्रसिद्ध भाग्यशाली कुरुंग राजाच्या यज्ञांत तुर्वशामध्यें आम्ही शंभर घोडे व पुष्कळ धन मिळविलें.

२०. हविर्युक्त कण्वपुत्र मेधातिथीची स्तुति करून मिळवलेला, तेजस्वी, प्रियमेधांनीं प्राप्त केला तसा एक हजार साठ गाईचा कळप मी प्राप्त केला.

२१. मला धन प्राप्त झाल्यावर वृक्षहि शब्द करूं लागले कीं, उत्कृष्ट गाई मिळाल्या, उत्कृष्ट घोडे मिळाले.

सूक्त पांचवें.

ऋषिः—ब्रह्मातिथि कण्वगोत्र; देवता-१ ते ३४ अश्विनी, ३५ ते ३९ कशु चेदिपुत्रदानस्तुति; छन्दः—१ ते ३६ गायत्री, ३७–३८ बृहती,३९ अनुष्टुभ्.

१. दूर असूनहि जवळ असल्याप्रमाणें जेव्हां तेजस्वी उषा प्रकाशली तेव्हां तिचा प्रकाश सर्वत्र पसरला.

२. हे रूपवान् अश्विहो, केवळ इच्छेनें जोडलें जाणाऱ्या बळकट रथांत बसून उषःकालीं माणसांप्रमाणें तुम्ही या.

३. हें अन्नधन अश्विहो, तुम्ही आमच्या स्तोत्रांकडे लक्ष द्या. दूत जसा निरोप पोंचवितो तसा मी तुम्हाकडे स्तुति पोंचवित आहे.

४. अनेकांना प्रिय असणारे, पुष्कळांना खूष करणारे धनवान् अश्विनी आमच्या संरक्षणाकरतां कण्व गोत्रीय आम्ही स्तवीत आहोंत.

५. उदार, अन्नवान् अन्न देणारे, धनाधिपति आणि दात्यांच्या घरीं जाणाऱ्या अश्विंची आम्ही स्तुति करतों.

६. हें अश्विहो, देवांची कृपा असलेल्या आणि (हवि) देणाऱ्या भक्ताकरतां चांगल्या प्रकारें यज्ञ केला जाणाऱ्या आणि सुखकारक गायरानावर पाऊस पाडा.

७. हें अश्विहो,शीघ्रगति श्येनासारख्या घोड्यांनीं लवकर स्तोत्राकडे (ऐकण्याकरतां) या.

८. हे अश्विहो, तीन दिवस आणि तीन रात्रींत ज्या घोड्यांनीं सर्व दिव्य प्रदेशांत तुम्ही जाता त्या घोड्यांनीं या.

९. हे दिवस उत्पन्न करणारे अश्विहो, आम्हांला गाईबैलांनीं युक्त अन्न द्या. तसेंच धन द्या आणि त्यांच्या प्राप्तीकरतां रस्ते बांधा.

१०. हे अश्विहो,तुम्ही आम्हांला गाईबैलांनीं युक्त, चांगलीं मुलेंबाळें आणि सुंदर रथ असलेलें धन द्या आणि घोड्यासह अन्न द्या.

११. हे उदकाधिपतिहो, आश्चर्यकारक,सोन्याचा रथ असलेले आणि उत्कर्ष पावणारे तुम्ही मधुर सोमरस प्या.

१२. हे यागधन अश्विहो, आम्हा धनवन्तांना सर्व तऱ्हेनें मोठे अविनाशी असें घर द्या.

१३. हे अश्विहो, जे तुम्ही लोकांनीं केलेलीं स्तोत्रें ऐकण्यास जातां ते तुम्ही त्वरेनें आम्हांकडे या. दुसऱ्याकडे जाऊं नका.

१४. हे स्तुत्य अश्विहो,तुम्ही ह्या मदकर सोमाचा दिलेला मधुर भाग प्या.

१५. हे अश्विहो, आम्हाकरतां प्रशंसनीय, सर्वाधार असें शंभर, हजारोंनीं असणारें धन आणा.

१६. हे नेते अश्विहो, स्तोते लोक तुम्हांला अनेक

ठिकाणीं बोलावीत असतात म्हणून तुम्ही घोड्यावर बसून या.

१७. हे अश्विहो, दर्भ तोडणारे, हविर्युक्त आणि सुशोभित करणारे लोक तुम्हाला बोलावतात. म्हणून या.

१८. हे अश्विहो, हें आमचें स्तोत्र तुम्हाला पोंचून तुमच्या जवळ असो.

१९. हे अश्विहो, रथांत जो मधुर सोमाचा साठा ठेवला आहे त्यांतून तूं सोम पी.

२०. हे अन्नधन अश्विहो, आमचे पशु, गाईबैल आणि पुत्र यांना सुख होईल असें विपुल अन्न आपल्या त्या रथानें आणा.

२१. हे दिवस प्राप्त करणारे अश्विहो, स्वर्गीय उदक छिद्रांतून पडावें त्याप्रमाणें (पाऊस रूपानें) पाडा. आणि नद्या वहावयास लावा.

२२. हे नेते अश्विहो, ज्याअर्थी तुमचा अश्वांनीं युक्त रथ (रक्षणार्थ) गेला त्याअर्थी समुद्रांत टाकलेल्या तुग्रपुत्र भुज्यूनीं तुमची केव्हां सेवा केली होती ?

२३. हे नित्य अश्विहो, तुम्ही घरांत अन्ध झालेल्या कण्वाला अनेक प्रकारें रक्षिलेत.

२४. हे पर्जन्यधन अश्विहो, जेव्हां मी तुम्हांला स्तुति करून बोलावलें तेव्हां तूं नव्या व प्रशंसनीय प्रकारांनीं रक्षण करीत आलास.

२५. हे अश्विहो, जसें तुम्ही कण्वाला रक्षिलेंत, जसे प्रियमेध, उपस्तुत, अत्रि आणि शिंजार यांना रक्षिलेंत—

२६. जसें धन प्राप्त करीत असतां अंशूचें रक्षण केलेंत, गाईबैल प्राप्त करीत असतां अगस्त्याचें आणि अन्न प्राप्त करीत असतां सोभरीचें रक्षण केलेंत—

२७. हे पर्जन्यधन अश्विहो, तुमची इतकी स्तुति करणारे आम्ही यापेक्षांहि अधिक सुखाची याचना करीत आहोंत.

२८. हे अश्विहो, सोन्याची सारथीची बैठक असलेल्या, सोनेरी लगामाच्या स्वर्गाला स्पर्शला करणाऱ्या अशा रथांत तुम्ही अवश्य बसा (आणि या).

२९. हे अश्विहो, तुमच्या रथाची आधारभूत जूं सोन्याची. आख सोन्याचा आणि दोन्ही चाकें (हि) सोन्याचीं आहेत.

३०. हे अन्नधन अश्विहो, त्या सोनेरी रथानें दुरूनहि आम्हाकडे या. आणि माझी ही उत्कृष्ट स्तुति स्वीकारा.

३१. हे अमर अश्विहो, दासांचीं प्राचीन नगरें भग्न करणारे तुम्ही त्यांचें अन्न वाहून आणता.

३२. हे अत्यंत आल्हादक सत्यस्वरूप अश्विहो, तुम्ही अन्न, धन व कीर्ति घेऊन आमचेकडे या.

३३. हे अश्विहो, तुळतुळीत आणि पंख असलेले घोडे चांगल्या प्रकारें यज्ञ करणाऱ्याकडे तुम्हाला वाहून नेवोत.

३४. हे अश्विहो, जो तुमचा रथ अन्नानें भरलेला आहे तो तुमचा स्तुत्य रथ सैन्याला त्रास देत नाहीं.

३५. हे मनोवेगवान् सत्यस्वरूप अश्विहो, तुम्ही धावणाऱ्या घोड्यांनीं आणि सोनेरी रथानें या.

३६. हे पर्जन्यधन अश्विहो, ज्या तुम्ही जागृत असणाऱ्या मृगाला ठार केलेत ते तुम्ही अन्नासहित धन द्या.

३७. हे अश्विहो, ज्यायोगें चेदिपुत्र कशु शंभर उंट आणि उपभोग्य धन देईल असें तुम्ही त्याला सुचवा.

३८. ज्या कशूनें सोन्यासारखे दहा राजे मला दिले. कारण त्या वैद्य कशूची सर्व प्रजा त्याच्या ताब्यांत आहे आणि भोवतालचे सर्व लोक (युद्धाकरतां) कवच घातलेले आहेत. त्याच्या राज्यामध्यें सर्वच योद्धे असल्यामुळें दहा राजे त्याला देणें शक्य आहे.

३९. या मार्गानें हे चेदि राजे जातात. ह्या मार्गानें कोणीहि जाऊं शकत नाहीं. दुसरा कोणीहि शहाणा इतकें धन देत नाहीं.

सूक्त सहावें.

ऋषिः—वत्स काण्व; देवता—१ ते ४५ इंद्र, ४६ ते ४८ तिरिंदरदानस्तुति; छंदः—गायत्री.

१. पावसाप्रमाणें इंद्र बलानें सर्वांपेक्षां अधिक आहे. तो इंद्र वत्स ऋषीच्या स्तोत्रांनीं उत्साह पावतो.

२. जेव्हां यज्ञपुत्र इंद्राला (आकाशांत) व्यापून असणारे घोडे वाहून आणतात, तेव्हां यज्ञांत आणणाऱ्या स्तोत्रानें स्तोते त्याची स्तुति करतात.

३ कण्व गोत्रांतल्या स्तोत्यांनीं इंद्राला जेव्हां स्तोत्रें म्हणून यज्ञाचें साधन बनविलें, तेव्हां शत्रूंचीं आयुधें व्यर्थ झालीं असें सर्व लोक म्हणतात.

टीपः—कण्व १. ११८. ७; ११७. ८; ११२.५ व तेथील टीपा पहा.

४. समुद्रापुढें नद्या जशा लीन होतात त्याप्रमाणें सर्वत्र पसरलेले लोक ह्या इंद्राच्या रागापुढें नमतात.

५. ज्या सामर्थ्यानें इंद्र द्यावापृथ्वीला कातडद्या-प्रमाणें (वाटेल तो) आकार देतो त्या सामर्थ्यानें इंद्र प्रकाशत असतो.

६. जगाला हलवणाऱ्या वृत्राचेंहि डोकें शंभर धारांच्या वज्रानें तोडलें.

७. अग्नीच्या ज्वालेप्रमाणें तेजस्वी असणारीं हीं स्तोत्रें स्तोत्यांच्या पुढें आम्ही वरचेवर म्हणतों.

८ गुप्तपणें केलीं असूनहि जीं आपणहून (आपल्या चांगुलपणानें) प्रसिद्ध होतात तीं स्तोत्रें सोमाच्या धारेसह कण्वगोत्रज करतात.

९. हे इंद्रा, तें गाईबैलघोड्यांनीं युक्त धन आम्हांला प्राप्त व्हावें. तसेंच सर्वापूर्वी ज्ञान होण्याकरतां आम्हांला अन्न प्राप्त व्हावें.

१०. सत्यस्वरूप व संरक्षक इंद्राची कृपा मीच प्राप्त केली. म्हणून मी सूर्यासारखा (तेजस्वी आणि प्रसिद्ध) झालों आहे.

११. ज्यामुळें इंद्र, सामर्थ्य धारण करतोच, त्या मननीय प्राचीन स्तोत्रानें कण्वाप्रमाणेंच मी आपली वाणी भूषित करतों.

१२. हे इंद्रा, जे तुला स्तवीत नाहींत आणि जे ऋषि तुझी स्तुति करतात, त्या दोघांत माझ्याचकडून चांगली स्तुति केलेला तूं उत्कर्ष पाव.

१३. जेव्हां ह्याचा राग वृत्राला जागोजाग तोडीत गर्जना करतो तेव्हां पाणी समुद्राकडे वाहूं लागलें.

१४. हे इंद्रा, घातुक शुष्णाला जेव्हां तूं हातांत धरलेलें वज्र मारलेंस, तेव्हां हे उग्र इंद्रा, ‘ कामपूरक ’ असें म्हटलेलें तूं ऐकतोस.

१५. द्युलोक नाहीं, अन्तरिक्ष नाहीं आणि पृथ्वीहि वज्रधारी इंद्राला व्यापीत नाहींत (त्यापेक्षांहि इंद्र मोठा आहे.)

१६. हे इंद्रा, जो तुझें विपुल उदक आडवून असतो त्याला तूं पाण्यांत ठार करतोस.

१७. जो वृत्र ह्या महान् एकत्र असलेल्या द्यावा-पृथ्वीला झाकून टाकतो, त्याला हे इंद्रा, तूं अंधारांनीं झाकून टाक (मार).

१८. हे इंद्रा, जे यति आणि जे भृगु तुझी स्तुति करतात, त्यामध्यें माझेंच स्तोत्र हे उग्रतेजा, तूं ऐक.

१९. हे इंद्रा, सत्यस्वरूप यज्ञाचा उत्कर्ष करणाऱ्या ह्या तुझ्या गाई हें दूधतूप उत्पन्न करतात.

२०. हे इंद्रा, सूर्य आपल्या भोंवती सृष्टि धारण करितो त्याप्रमाणें असणाऱ्या ह्या गाई, हे इंद्रा, तुला मुखानें (खाऊन) गर्भ धारण करतात.

२१. हे बलाधिपति इंद्रा, कण्वगोत्रांतील ऋषि स्तोत्रें म्हणून तुझाच उत्कर्ष करतात आणि पिळलेले सोम तुलाच उत्साह देतात.

२२. हे वज्रधारी इंद्रा, तुझ्याच दानाची अत्यंत स्तुति केली जाते आणि मोठाले यज्ञ तुझ्याकरतांच केले जातात.

२३. हे इंद्रा, आह्मांला पुष्कळ अन्न, संरक्षण आणि गाईबैलांनीं युक्त व समर्थ प्रजा दे.

२४. हे इंद्रा, नहुष राजाच्या लोकांना जे तूं शीघ्रगामी घोड्यांचे संघ दिलेस ते आम्हांला दे.

२५. आतां हे इंद्रा, जेव्हां तूं आम्हांला सुखी करतोस तेव्हां शहाणा असा तूं आमचा गोळवाडा आपल्या नजरेखालीं वाढवतोस.

२६. हे इंद्रा, तूं बलवान् आहेस आणि लोकांवर सत्ता चालवितोस. तूं बलानें अनन्त आहेस.

२७. हे इंद्रा, त्या महाबलवान् अशा तुला हविर्द्रव्य घेतलेल्या प्रजा सोम देऊन संरक्षणाकरतां स्तवीत असतात.

२८. पर्वतांच्या पायथ्यावर आणि नद्यांच्या संगमावर केलेल्या कृत्यानें शहाणा इंद्र उत्पन्न झाला.

२९. जेथें व्यापक असणारा इंद्र असतो आणि ज्या अन्तरिक्षांतून सोमाकडे खालीं पहातो—

३०. जेव्हां हा स्वर्गावर प्रकाशतो तेव्हां उदक उत्पन्न करणाऱ्या प्राचीन (सूर्य स्वरूप) इंद्राचें व्यापक तेज सर्व पहातात.

३१. हे इंद्रा, तुझी बुद्धि आणि पराक्रम सर्व कण्वगोत्रांतील लोक वाढवितात. आणि हे बलिष्ठा, तुझीं बलाचीं कृत्येंहि ते वाढवितात.

३२. हे इंद्रा, माझी ही चांगली स्तुति स्वीकार. माझें संरक्षण कर. आणि माझी बुद्धि वाढीव.

३३. हे उत्कर्षशाली वज्रधारी इंद्रा, आम्ही ब्राह्मण तुझ्याकरतां आणि जगण्याकरतां स्तोत्रें करीत आहोंत.

३४. कण्वगोत्रज इंद्राची स्तुति करतात. सखल प्रदेशावरून वहाणाऱ्या पाण्याप्रमाणें माझी स्तुति इंद्राकडे जावो.

३५. ज्याचा राग कोणालाहि नष्ट करतां येत

नाहीं अशा जरारहित इंद्राला, नद्या समुद्र वाढवितात त्याप्रमाणें, आमचीं स्तोत्रें वृद्धिंगत करोत.

३६. हे इंद्रा, दूर देशांहूनहि मनोहर अशा दोन घोड्यांनीं आम्हाकडे ये आणि हा ओतलेला सोम पी.

३७. हे वृत्रहन्त्या इंद्रा, दर्भ तोडणारे भक्त तुलाच युद्धांत मदतीकरतां बोलावतात.

३८. हे इंद्रा, रथाच्या घोड्यामागें चाक जातें त्याप्रमाणें दोन्ही द्यावापृथ्वी तुला अनुसरतात आणि पिळलेला सोम तुझ्याचकडे जातो.

३९. हे इंद्रा, शर्यणावत सरोवरांतील सोमानें तूं तृप्त हो. आणि सेवा करणाऱ्याच्या स्तुतीनें प्रसन्न हो.

४०. वाढलेल्या, वज्रधारी, वृत्रहन्त्या अत्यंत सोम पिणाऱ्या आणि बलवान् इंद्रानें आकाशांत अत्यंत मोठा शब्द केला.

४१. हे इंद्रा, सर्वांच्या प्रथम उत्पन्न झालेला तूं सर्वज्ञ आहेस. एकटाच सामर्थ्यानें सर्वांत श्रेष्ठ आहेस. वरचेवर तूं स्तोत्यांना धन देतोस.

४२. हे इंद्रा, आमच्या सोमाकडे आणि अन्नाकडे विस्तृत पाठीचें शेंकडो घोडे तुला वाहून आणोत.

४३. हें प्राचीन पाऊस पाडणारें कर्म कण्वगोत्रज वृद्धिंगत करते झाले.

४४. थोर देवामध्यें इंद्रालाच मनुष्य स्तुतीकरितां स्वीकारतो. धनेच्छु मनुष्य रक्षणारकतां इंद्रालाच बोलावतो.

४५. हे बहुस्तुत इंद्रा, प्रियमेधानें वर्णिलेले तुझे दोन घोडे सोम पिण्याकरतां तुला आम्हाकडे वाहून आणोत.

४६. (तिरिंदरदानस्तुति) परशुपुत्र तिरिंदरापासून याद्वापैकीं मी शेंकडो धन मिळविलें.

४७. तिनशें घोडे, आणि दहा हजार गाई स्तोत्रें म्हणणाऱ्या पज्राला दिलीं.

४८. चार भार सोने घातलेले उंट याद्वाला देणाऱ्याची कीर्ति सर्व दिशा व्यापून स्वर्गापर्यंत पोंचली.

सूक्त सातवें.

ऋषिः--पुनर्वत्स कण्वगोत्र; देवता-मरुत्; छंदः-गायत्री.

१. हे मरुतहो, जेव्हां तुम्हांला त्रिष्टुभ् छंदांतील स्तोत्रें म्हणून स्तोता सोम देतो तेव्हां तुम्ही पर्वतावर शोभूं लागता.

२. हे शोभणारे बलयुक्त मरुतहो, जेव्हां तुम्ही रथ तयार करतां तेव्हां पर्वतहि चालूं लागतात.

३. शब्द करणारे मरुत् वायूंच्या सहाय्यानें जेव्हां वर उडूं लागतात तेव्हां पुष्टिवर्धक अन्न उत्पन्न करतात.

४. (जेव्हां ते वायूसह रथांत बसून जातात तेव्हां.) मरुत् धुकें उत्पन्न करतात आणि पर्वतांना हलवतात.

५. हे मरुतहो, जेव्हां तुम्हाला जाण्याकरतां पर्वत आणि नद्या तुमचें सामर्थ्य वाढावें म्हणून आपल्या स्थानीं स्थिर रहातात तेव्हां मरुत् चालूं लागतात.

६. हे मरुतहो, तुम्हालाच रात्रीं संरक्षणाकरतां मीं बोलावतों आणि तुम्हालाच दिवसा संरक्षणाकरतां बोलावतों. यज्ञ चालू असतांहि तुम्हालाच आम्ही बोलावतों.

७, ते तांबूस, आश्चर्यकारक शब्द करणारे मरुत् रथांनीं द्युलोकाच्या शिखरावर उगवतात.

८. जे मरुत् आपल्या सामर्थ्यानें सूर्याला जाण्याकरतां मोठा रस्ता उत्पन्न करतात ते मरुत् तेजांनीं सर्वत्र व्यापून आहेत.

९. हे मरुतहो, ही स्तुति स्वीकारा. हे थोरहो, हें माझें गाणें ऐका. आणि बोलावणें स्वीकारा.

१०. मरुतांनीं इंद्राकरतां तीन (सोमाचीं) सरोवरें आणि मधुर, पाझरणारा आणि उदकयुक्त मेघ उत्पन्न केला.

११. हे मरुतहो, जेव्हां सुखेच्छु आम्ही द्युलोकावरून तुम्हाला बोलावतों, तेव्हां तुम्हीं लागलीच या.

१२. हे चांगले दाते थोर रुद्रपुत्र मरुतहो, तुम्ही यज्ञगृहांत सोमांनीं मद आल्यावर ज्ञानी व्हा.

१३. हे मरुतहो, शत्रूंचा मद नष्ट करणारे, अनेकांनीं स्तविलेलें आणि सर्वपोषक धन आम्हांला स्वर्गावरून आणून द्या,

१४. हे सुशोभित मरुतहो, जेव्हां पर्वतांच्यावर रथ तुम्हीं नेत असाल तेव्हां पिळलेल्या सोमांनीं मदयुक्त व्हा.

१५. मनुष्य मरुतांस स्तोत्रें म्हणून सुख मागेल तेव्हां इतक्या अविनाशी मरुतांचेंच सुख मागेल.

१६. जे मोठ्या मेघाला पाऊस पाडावयास लावणारे मरुत् पाण्याच्या थेंबाप्रमाणें पावसांनीं द्यावापृथ्वी व्यापून टाकतात—

१७. ते मरुत् शब्दांनीं प्रकट होतात, ते रथांनीं, वायूंनीं प्रकट होतात. ते पृश्निपुत्र मरुत् स्तोत्रांनीं प्रगट होतात.

१८. ज्यानें तुर्वश आणि यदु, ज्यानें धनकाम कण्व यांना राक्षिलें त्याचें संपत्तीकरतां आम्हीं ध्यान करतों.

१९. हे चांगले दाते मरुत्‌हो, तुपाप्रमाणें पोषक असणारे हें अन्न कण्व गोत्रातील माझ्या स्तोत्रांसह तुम्हाला बलशाली करते.

२०. (मरुतांना येण्याला उशीर लागला म्हणून ऋषि तर्क करतो.) हे दाते पूजनाला आरंभ केलेले हो, यावेळीं तुम्ही कोठें आनंदांत आहांत ? कोणचा ब्राह्मण तुमची पूजा करीत आहे ?

२१. हे ऋत्विजजनहो, तुम्ही आधीं स्तोत्रें म्हणून यज्ञसंबंधीं मरुतांचें सामर्थ्य वाढवा म्हणजे ते दुसऱ्यास वश होणार नाहींत.

२२. ते मरुत् पुष्कळ उदक धारण करतात. तसेंच द्यावापृथ्वी मरुत धारण करतात. सूर्याला (आकाशांत) धारण करतात. असे मरुत् आपलें वज्र वृत्राच्या सांध्यासांध्यावर टाकतात.

२३. अराजक, बलशाली, पराक्रम करणारे मरुत् वृत्राचे सांधे तोडते झाले आणि पर्वतांचा भेद करते झाले.

२४. युद्ध करणाऱ्या त्रिताचें बल मरुतांनीं खचूं दिलें नाहीं, त्यांच्या कर्तृत्वाला राखलें, आणि लढाईत इंद्राला राखलें.

२५. लखलखीत आयुधें हातांत घेतलेलें, तेजस्वी मरुत् डोक्याला सोन्याचे मुगुट शोभेकरतां धारण करतात.

२६. हे मरुत्‌हो, महत्त्व इच्छिणारें तुम्ही आकाशाच्या मध्यभागीं दूर असला तरी या. द्युलोकाप्रमाणें पृथ्वीवरील सर्व लोक तुमच्या भीतीनें कापत असतात.

२७. हे देवहो, आमच्या यज्ञांतील दानें स्वीकारण्याकरतां सोन्याचे पायांनीं आणि घोड्यावर बसून या

२८. जेव्हां ह्या मरुतांचा रथ ठिपके असलेल्या हरिणी आणि तांबूस ठिपके असलेला हरिण ओढीत असतो तेव्हां सुशोभित असणारे मरुत् पाऊस पाडीत चालूं लागतात.

२९. चांगला सोम असलेल्या आर्जिक देशांत आणि शर्यणावत् सरोवरावर घर असलेल्या जागीं खालपट चाकाच्या गाडीनें तुम्ही या.

३०. हे मरुतहो, अशी स्तुति करणाऱ्या माझ्याकडे सुखदायक संपत्ति घेऊन तुम्ही केव्हां याल ?

३१. हे स्तुतिप्रियहो, तुम्ही इंद्राला टाकलें असें कधीं झालें आहे कां ? असें तुमचे सख्य कोणाला प्राप्त होते ? (कोणालाहि नाहीं.)

३२. वज्र हातांत घेतलेले आणि सोन्याची कुऱ्हाड हातांत घेतलेल्या मरुतांसह अग्नीची हें कण्वगोत्रीय लोकहो, तुम्ही स्तुति करा.

३३. पाऊस पाडणार, पूजार्ह आणि आश्चर्यकारक सामर्थ्य असणाऱ्या मरुतांना नूतन व उत्कृष्ट धन मिळावें म्हणून मी आपल्याकडे वळवितों.

३४. मरुत येऊं लागले असतां मोठाले दगड जागा सोडूं लागतात आणि पर्वतहि दाबले जातात.

३५. चहूंकडून जाणारे घोडे स्तोत्यांना अन्न देत आकाशांतून धांवणाऱ्या मरुतांना वाहून नेतात.

३६. अग्नि प्रशंसनीय सूर्याप्रमाणें तेजानें सर्वांत मुख्य झाला. तेजांनीं मरुत् स्तुति केले जातात.

सूक्त आठवें.

ऋषिः—सध्वंस काण्व; देवता—अश्विन् ; छंदः—अनुष्टुभ्.

१. हे अश्विहो, सर्व प्रकारचें सहाय्य करण्याकरतां तुह्मी आमच्याकडे या. हे आश्चर्यकारक अश्विहो, सोनेरी रथ असणारे तुह्मी मधुर सोम प्राशन करा.

२. हे हविर्भोक्ते अश्विहो, सोन्याचे अलंकार असलेले, कर्तृत्ववान् व ज्ञानी असे तुह्मी सूर्यासारख्या रथानें या.

३. हे अश्विहो, पृथ्वीवरून आमचीं स्तोत्रें ऐकून या. अन्तरिक्षांतून या. आणि कण्वांच्या यज्ञांत पिळलेला मधुर सोम प्या.

४. हे अश्विहो, द्युलोकांतून आमचेकडे या. अन्तरिक्षांतून या. हे स्तुतिप्रियहो, येथें कण्वाचा मुलगा तुमच्याकरतां मधुर सोम पिळीत आहे.

५. हे अश्विहो, यज्ञांत सोम पिण्याकरतां तुह्मी या व कर्तृत्ववान्, स्वाहाकारानें आहुति दिले जाणारे, स्तोत्रवर्धक आणि लोकनायक अश्विहो; आमच्या स्तोत्रांनीं (प्रसन्न होऊन) या.

६. हे नायकहो, जेव्हां तुम्हांला संरक्षणाकारितां पूर्वीं ऋषींनीं बोलावलें, तेव्हां तुह्मी आलात. तसेंच माझी ही स्तुति ऐकून या.

७. हे स्वर्गपालक अश्विहो, तुह्मी स्वर्गावरून आणि अन्तरिक्षांतून या. हे स्तोत्याला जाणणारे हो, तुम्हि आपल्या बुद्धीसह या. हे स्तोत्रे ऐकणारे आश्विहो, आमच्या स्तोत्रामुळें या.

८. आमच्याशिवाय दुसरें कोण स्तोत्रें म्हणून तुमची उपासना करतात. कण्वाचा मुलगा वत्स ऋषि स्तोत्रें म्हणून तुम्हांला आनंदित करतो आहे.

९. हे आश्विहो, शहाणा भक्त स्तोत्रें म्हणून रक्षण करण्याकरतां तुम्हाला बोलावतो. हे निष्पाप व वृत्रहन्ते अश्विहो, तुह्मी आम्हांला सुख देणारे व्हा.

१०. हे यागधन अश्विहो, जेव्हां पत्नी सूर्या तुमच्या रथांत आरूढ झाली, तेव्हां तुमच्या सर्व इच्छा सफळ झाल्या.

११. हे अश्विहो, (जेथें असाल) तेथून अनेकरूपी रथानें या. कविपुत्र शहाणा वत्स तुमची अत्यंत मधुर स्तुति करीत आहे.

१२. मस्त, धनवान्, धनदाते आणि जगाला आधारभूत असें आश्वि माझ्या स्तोत्रांची प्रशंसा करोत.

१३. हे आश्विहो, सन्मानाची सर्व संपत्ति आम्हांस द्या. आम्हास योग्य वेळीं संतति असूं द्या. आणि आम्हाला निंदकाच्या स्वाधीन करूं नका.

१४. हे सत्यस्वरूप आश्विहों, जर तुम्ही दूर असाल किंवा जवळ असाल तरी तेथून अनेकरूपी रथानें या.

१५. हे सत्यस्वरूप अश्विहो, जो वत्स ऋषि स्तोत्रें म्हणून तुम्हांला आनंदित करतो, त्याला हजारो प्रकारचें विपुल तूप असलेलें अन्न द्या.

१६. हे आश्विहो, हे दानाधिपति अश्विहो, जो तुम्हांला सुख व्हावें म्हणून स्तुति करील आणि धन इच्छील, अशा त्या स्तोत्रकर्त्याला पुष्कळ तूप घातलेलें अन्न तुम्ही द्या.

१७. हे दुष्टांचें निवारण करणारे आणि विपुल हवि भक्षण करणारे आश्विहो, आमच्या ह्या स्तोत्राला ऐकण्याकरतां या. हे नायकहो, आम्हाला संपत्तिमान् करा आणि ही संपत्ति सुखाकरतां आम्हांस द्या.

१८. हे आश्विहो, दर प्रहरीं स्तोत्रें म्हटल्या जाणाऱ्या यज्ञांत प्रियमेध नांवाचे ऋषि यज्ञांतलि प्रमुख अश्वींना सर्व प्रकारच्या संरक्षणासहित बोलावीत आहेत.

१९. हे स्तुत्य आश्विहो, तुमची स्तुति आणि सेवा करून तुम्हाला मी आनंदित करतो आहे. ते सुखदायक आणि रोगनाशक आश्विदेव आम्हांकडे येवोत.

२०. हे आश्विहो, ज्यांनीं कण्व मेधातिर्थाचें तुम्ही संरक्षण केलेंत, ज्यांनीं दशव्रज वशाचें संरक्षण केलेत, ज्यांनीं गोशर्य शयूचें संरक्षण केलेंत, त्यांनीं हे नायकहो, तुम्ही आमचें संरक्षण करा.

२१. हे नायक आश्विहो, संपत्ति मिळवीत असतां त्रसदस्यूचें ज्यांनीं संरक्षण केले, त्यांनीं बलप्राप्तीकरतां तुम्ही आमचें चांगल्या प्रकारें संरक्षण करा.

२२. हे आश्विहो, चांगल्या प्रकारें म्हटलीं जाणारीं स्तोत्रें आणि गाणीं तुम्हाला आनंदीत करोत. तसेंच हे बहुसंरक्षक आणि वृत्रहन्ते आश्विहो, तुम्ही आम्हाला अत्यंत इष्ट देणारे व्हा.

२३. कर्तृत्ववान् आश्वि सत्याच्या ज्या पावलांनीं जीवमात्राच्या जवळ येतात. त्या अश्वींच्या रथाचीं तीनहि चाकें गुप्त होतीं तीं प्रकट झालीं आहेत.

---

२० टीपः—१-११६ २२ पहा.

सूक्त नववें.

ऋषिः—शशकर्ण; देवता—अश्विन्; छंदः—२. ३. २०. गायत्री, १. ४. ६. १४. १५ बृहती, ५ ककुभ्, १० त्रिष्टुभ्, ११ विराज्, १२ जगती बाकी अनुष्टुभ्.

१. हे आश्विहो, तुम्ही वत्स ऋषीच्या संरक्षणाकरतां अवश्य या. ह्याला सुरक्षित घर द्या. आणि शत्रू दूर करा.

२. अन्तरिक्षांत, स्वर्गावर आणि पंचजनांत जें धन आहे तें धन आम्हांला द्या.

३. हे आश्विहो, जे भक्त तुमची सेवा करतात त्यांची सेवा तुम्ही ध्यानांत घेता तशीच कण्वाची सेवा ध्यानांत घ्या.

४. हे आश्विहो, तुमचें हविर्द्रव्य स्तुति करून रुचकर केलें जातें. हे अन्नधन आश्विहो, ज्यानें वृत्राला तुम्ही (ठार करण्याकरतां) जाणलेंत तो हा सोम मधुर आहे.

५. हे कर्तृत्ववान् आश्विहो, पाण्यांत, औषधींत आणि वनस्पतींत जे गुण उत्पन्न केले आहांत त्यांनीं तुम्ही माझें संरक्षण करा.

६. हे सत्यस्वरूप आश्विदेवहो, तुम्ही सर्व जगाचें पोषण करतां आणि सर्व जगाचे रोग शान्त करता. त्या तुम्हांला हा वत्स ऋषि केवळ स्तोत्रांनीं प्राप्त

करीत नाहीं. कारण, तुम्ही हविर्द्रव्यें असलेल्याकडे जात असतां.

७. हे अश्विहो, जेव्हां तुम्ही याल, तेव्हां अश्वींचें स्तोत्र चांगल्या बुद्धीनें ऋषि ध्यानांत आणील आणि अत्यंत मधुर असणारा सोम आणि हवि अथर्वन् अग्नींत अर्पण करील.

८. हे अश्विहो, तुम्ही जलद चालणाऱ्या रथांत आतां बसा. हीं माझीं स्तोत्रें सूर्य आकाशांत जातो त्याप्रमाणें तुझ्याकडे प्राप्त होतात.

९. हे सत्यस्वरूप अश्विहो, सामगान आणि स्तोत्रे यांनीं तुम्हांला आणवीत आहों, तसेंच तुम्ही काण्वाचीं स्तोत्रें ध्यानांत घ्या.

१०. हे अश्विहो, तुम्हाला कक्षीवान् बोलावीत होता, तुम्हाला व्यश्व ऋषीनें बोलाविलें आणि तुम्हाला दीर्घतमा बोलावीत होता. यज्ञांत पृथ्वीनें तुम्हाला बोलाविलें, तसेंच माझें हें स्तोत्र ध्यानांत घ्या.

११. हे गृहरक्षक अश्विहो, या. आमचें संरक्षण करणारे आणि जयाचें पालन करणारे व्हा. आमच्या शरीराचेंहि संरक्षण करा. आमचें घर आमच्या पोराबाळांकडे जावो.

१२. हे अश्विहो, जर इंद्रासह एका रथांत बसून जात असशील, वायूसह एकत्र असशील, आदित्य व ऋभूसह आनंदांत असशील किंवा विष्णूनें आक्रमिलेल्या त्रैलोक्यांत असशील, तरी तेथून तूं ये.

१३. मी अश्वींना युद्धांत साहाय्य करण्यास बोलावतों. लढाईंत शत्रूंचा पराभव करण्याचें जें सामर्थ्य आहे तें श्रेष्ठ अश्वींचेंच सहाय्य होय.

१४. हे अश्विहो, तुम्ही अवश्य या. हीं हविर्द्रव्यें तुमच्याकरतां केलीं आहेत. तुर्वश आणि यदु यांनीं तुम्हांकरतां केलेले हे सोम आहेत. कण्वांच्या येथें हे सोम तुम्हांला दिले आहेत.

१५. हे सत्यस्वरूप अश्विहो, जवळ किंवा दूर जें औषध आहे, त्या औषधासह असणारें घर हे ज्ञानी अश्विहो, विमदाप्रमाणें वत्साला द्या.

१६. अश्वींच्या उत्कृष्ट स्तुतीसह मी जागृत झालों आहे. हे तेजस्वी उषे, माझी स्तुति ऐकून प्रगट हो आणि लोकांना धन दे.

१७. हे गोड देवि उषे, तूं (स्तुति ऐकण्याकरतां) अश्वींना जागृत कर. अश्वींना प्रसन्न करण्याकरतां चांगलें अन्न तयार केलें आहे.

१८. हे उषे, तूं आपल्या तेजानें ज्यावेळीं येतेस त्यावेळीं सूर्याप्रमाणें शोभतेस. आतां हा अश्वींचा रथ ऋत्विजांनीं रक्षण केलेल्या यज्ञगृहाकडे येत आहे.

१९. चहूंकडून पिवळे असणारे सोम गाईच्या कासेप्रमाणें पिळले जात आहेत. जेव्हां देवभक्त स्तुति करतात, तेव्हां अश्विदेव संरक्षण करतात.

२०. ज्ञानी अश्विदेव अन्न, बल, मनुष्ययोग्य सुख आणि उत्कर्ष हें प्राप्त होण्याकरतां आमचें संरक्षण करोत.

२१. हे अश्विहो, तुम्ही अन्तरिक्षांत जरी आपलीं कृत्यें करीत असतां आणि स्तुत्य असे तुम्ही सुखानें रहातां तथापि आम्ही स्तुति केली असतां या.

सूक्त दहावें.

ऋषिः—प्रगाथ कण्वपुत्र; देवता–अश्विनी; छन्दः—१बृहती, २ त्रिष्टुभ्, ३ अनुष्टुभ्, ४ आस्तारपंक्ति, ५ बृहती, ६ सतोबृहती.

१. हे अश्विहो, जरी तुम्ही मोठ्या यज्ञगृहांत असाल किंवा स्वर्गांतल्या तेजस्वी स्थानीं तुम्ही असाल किंवा आकाशांत तयार केलेल्या एखाद्या घरांत असाल तरी तेथूनहि तुम्ही या.

२. हे अश्विहो, तुम्ही जसा मनूकरतां यज्ञ पार पाडलात तसाच कण्वगोत्रांतील माझा यज्ञ ध्यानांत घ्या मी बृहस्पति, सर्व देव, इंद्र व विष्णु आणि सर्वत्र स्तवन केल्या जाणाऱ्या अश्वींना बोलावतों.

३. ज्यांचें सख्य आम्हांला इष्ट आहे, त्या हवि घेण्याकरतां प्रगट झालेल्या कर्तृत्ववान् अश्वींना मी बोलावतों.

४. ज्यांच्यामुळें सर्व यज्ञ चालतात, अनार्यांतहि ज्यांचे स्तोते आहेत आणि जे मधुर सोम पितात, त्या हिंसारहित यज्ञाच्या ज्ञात्यांना स्तुति करून आम्ही बोलावतों.

५. हे अश्विहो, जर तुम्ही पश्चिमेला असाल, हे अन्नधन अश्विहो, तुम्ही जर पूर्वेला असाल किंवा द्रुह्यु, अनु, तुर्वश, आणि यदु यांचेपाशीं असाल, तर मी तेथून तुम्हाला बोलावतों. ताबडतोब मजकडे या.

६. हे अनेकांचें रक्षण करणारे अश्विहो, जर तुम्ही अन्तरिक्षांत फिरत असाल, किंवा तुम्ही ह्या द्यावापृथ्वींत हिंडत असाल, किंवा आपल्या सामर्थ्यासह

---

७ टीपः—अथर्वन् अग्नि ६. १६. १३ पहा.

(लढाईकरतां) रथांत आरूढ झाला असाल तरी तेथून हे अश्विहो, या.

सूक्त अकरावें.

ऋषिः—वत्स कण्वगोत्र; देवता-अग्नि; छन्दः—१ प्रतिष्ठा गायत्री, २ वर्धमाना गायत्री, १० त्रिष्टुभ्, बाकी गायत्री.

१. हे अग्ने, तेजस्वी असणारा तूं मर्त्य सृष्टींत कर्मांचें संरक्षण करणारा आहेस. म्हणून तूं यज्ञांत स्तुति केला जातोस.

२ हे शत्रूंचा पराभव करणाऱ्या अग्ने, तूं यज्ञांतलि स्तुत्य आहेस. तूं यज्ञामधील नायक आहेस.

३. हे झालेलें जाणणाऱ्या अग्ने, तूं आम्हांपासून आमच्या द्वेष्ट्यांना दूर कर. राक्षसी शत्रुसेनांना लांब ठेव.

४. हे सर्वज्ञ अग्ने, जवळ असतांहि आमच्या शत्रूच्या यज्ञाची तूं इच्छा करीत नाहींस.

५. मर्त्य असणारे आम्ही भक्त, अमर आणि सर्वज्ञ अग्नीची पूजा व मोठालीं स्तोत्रें जाणत आहोंत.

६. मर्त्य असे आम्ही भक्त ज्ञानी अग्निदेवाला स्तुति करून रक्षणाकरतां बोलावतों आहोंत.

७. हे अग्निदेवा, तुला उद्देशून केलेल्या स्तुतीनें वत्स ऋषि तुझें मन द्युलोकांतून आपल्याकडे ओढून घेतो.

८. हे अग्ने, तूं चहूकडे सारखी दृष्टि टाकतोस, म्हणून तूं सर्व लोकांचा ईश्वर आहेस, म्हणून तुला आम्ही युद्धांत बोलावतों.

९. युद्धांत आश्चर्यकारक सामर्थ्य प्रकट करणाऱ्या अग्नीला युद्धांत सामर्थ्य इच्छिणारे आम्ही रक्षणाकरतां बोलावतों.

१०. हे अग्ने, फार प्राचीन कालापासून तूं यज्ञांत स्तुति केला जात आहेस, तसेंच पूर्वीपासून स्तुति केला जाणारा तूं यज्ञांत देवांना बोलावीत असतोस. हे अग्ने, तूं आपलें शरीर पुष्ट कर व आम्हांला ऐश्वर्य दे.

सूक्त बारावें.

ऋषिः—पर्वत कण्वगोत्र; देवता–इंद्र; छंदः—उष्णिह्.

१ हे इंद्रा, तूं अतिशय सोम पिणारा आहेस. हे बलवन्ता, (तुझा मद पराक्रम करणें) जाणतों, आणि ज्यानें हिंसकांना ठार करतोस तशा मदयुक्त तुझी आम्ही इच्छा करतों.

२. हे इंद्रा, ज्यानें दशग्व अध्रिगु, थरारणारा सूर्य आणि अन्तरिक्ष यांचें तूं संरक्षण केलेंस त्या इंद्राची आम्ही इच्छा करतों.

३. हे इंद्रा, तूं ज्या सामर्थ्यानें रथाप्रमाणें विपुल उदक समुद्राकडे वहावयास लावतोस, त्या सामर्थ्याची यज्ञाचे मार्ग आक्रमण करण्याकरतां मी इच्छा करतों.

४. हे वज्रधारी इंद्रा, ज्यामुळें तूं तात्काळ आपल्या सामर्थ्यानें आमच्या इच्छा पूर्ण करतोस, तें हें तुपाप्रमाणें शुद्ध असणारें आमचें स्तोत्र आमच्या इष्टसिद्धीकरतां तूं ध्यानांत घे.

५. हे स्तुत्य इंद्रा, ज्यामुळें अनेक प्रकारें संरक्षण करून तूं आमची इष्टसिद्धि करतोस, तो तूं आमचें हें स्तोत्र ऐक आणि समुद्राला भरती आल्याप्रमाणें वृद्धिंगत हो.

६. जो इंद्रदेव दुरूनहि येऊन आम्हास मैत्रीकरतां धन देतो, आणि जो आकाशांतून पाऊस पडावा त्याप्रमाणें आमची संपत्ति वाढवीत आम्हांला उत्कर्षाला नेतो त्या तुझी आम्ही स्तुति करतो.

७. जेव्हां हा इंद्र सूर्याप्रमाणें द्यावापृथ्वीचा उत्कर्ष करतो, तेव्हां याचे ध्वज चढतात आणि हातांत वज्र घेतलें जातें.

८. हे उत्कर्षशालिन् आणि सज्जनसंरक्षका इंद्रा, जेव्हां तूं हजारो मोठ्या शत्रूंना ठार केलेंस, तेव्हां तुझें सामर्थ्य फारच वाढलें.

९. अग्नि अरण्यें जाळतो त्याप्रमाणें इंद्र सूर्याच्या किरणांनीं त्रासदायक शत्रूंला जाळून टाकतो. अशाप्रकारें पराभव करणाऱ्या इंद्राचें सामर्थ्य वाढलें.

१०. हे इंद्रा, तुझी ही यज्ञांत केली जाणारी, सन्मानास्पद नवी व लोकप्रिय स्तुति तुझें गुणवर्णन चांगलें करते.

११. यज्ञ करणारा देवभक्त क्रमानें सोम गाळतो. स्तोत्रांनीं इंद्र उल्हासित होतो आणि त्याचें चांगलें वर्णन केलें जातें.

१२. मित्राला धन देणारा इंद्र सोम पिण्याकरतां सोम काढणाऱ्याच्या सरस स्तुतीप्रमाणें वृद्धिंगत झाला. आणि त्याचें योग्य वर्णन झालें.

१३. बुद्धिमान् आणि स्तोत्रकर्ते लोक ज्याला प्रसन्न करतात त्या इंद्राच्या तोंडांत सोम तुपाप्रमाणें मी ओततों.

१४. जें यज्ञांतील स्तोत्र आहे तें उत्कृष्ट स्तोत्र स्वयंप्रकाश इंद्राकरतां अदितीनें केलें आहे.

१५. स्तोते स्वतःच्या संरक्षणाकरतां आणि मोठेपणाकरतां इंद्राची स्तुति करतात. हे इंद्रा, आतां विशेष कार्य करणारे तुझे दोन्ही घोडे जेथें हवि असेल तेथें वाहून नेवोत.

१६. हे इंद्रा, जरी तूं विष्णूसह सोम पीत असशील, किंवा त्रित आप्त्याचा सोम पीत असशील किंवा मरुतांसह सोम पीत असशील तरी तूं आमच्या सोमानें तृप्त हो.

१७. हे इंद्रा, जरी तूं दूरदेशीं सोमांत रमला असशील, तथापि आम्हीच पिळलेल्या सोमरसानें तूं तृप्त हो.

१८. हे सज्जनांचें संरक्षण करणाऱ्या इंद्रा, सोम पिळणाऱ्या यजमानांचा तूं उत्कर्ष करतोस. ज्याच्या स्तोत्रांत तूं रमून जातोस त्याच्या सोमांतहि तूं रमतोस.

१९. हे भक्तहो, तुमच्या संरक्षणाकरतां दररोज मी इंद्राची स्तुति करतों. माझीं स्तोत्रें शत्रूंचा नाश करणाऱ्या यज्ञांत सारखीं चालूं असतात.

२०. यज्ञांनीं यज्ञफल देणाऱ्या, आणि अत्यंत सोम पिणाऱ्या इंद्राला स्तुतींनीं भक्त आनंदित करतात. आणि त्या स्तुति इंद्राला आपलासा करतात.

२१. ह्या इंद्राची संपत्ति फार मोठी आहे. तसेंच ह्याची कीर्तिहि फार प्राचीन आहे. दात्याला सर्व प्रकारची संपत्ति देण्याकरतां त्याचा प्रताप सर्वत्र असतो.

२२. देवांनीं वृत्राला ठार करण्याकरतां इंद्राला पुढें केलें. वाणी बलाकरतां इंद्राचीच स्तुति करिते.

२३. माहात्म्यानें सर्वाधिक आणि स्तुति ऐकणाऱ्या इंद्राचीं आम्ही स्तोत्रें म्हणून पुनः पुनः स्तुति करतों.

२४. ज्या इंद्राला द्यावापृथ्वी आपल्यापासून वेगळे करीत नाहींत, अन्तरिक्षहि नाहीं, त्या बलवान् इंद्राच्या सामर्थ्यानेंच सर्व जग प्रकाशत आहे.

२५. हे इंद्रा, लढाईंत देव जेव्हां तुला पुढारी करतात तेव्हां तुझे मनोहर दोन घोडे तुला वाहून नेतात.

२६. हे वज्रधारी इंद्रा, जेव्हां तूं पाण्याला झाकून टाकणाऱ्या वृत्राला ठार केलेस, तेव्हां तुझ्या मनोहर घोड्यांनीं तुला वाहून नेलें होतें.

२७. हे इंद्रा, जेव्हां तुझा (धाकटा भाऊ) विष्णु सामर्थ्यानें तीन लोक आक्रमण करतां झाला, तेव्हांच तुझ्या मनोहर घोड्यांनीं वाहून नेलें.

२८. हे इंद्रा, तुझे मनोहर दोन घोडे दररोज जेव्हां उल्हासित होतात तेव्हां लागलीच सर्व त्रैलोक्य नियमित होतें.

२९. हे इंद्रा, जेव्हां तुझ्याकरतां मरुद्रूप तुझ्या प्रजा नियमांनीं बांधल्या जातात, तेव्हां सर्व त्रैलोक्यच नियमांनीं बांधलें जातें.

३०. हे इंद्रा, हा निर्मल, तेजस्वी सूर्य आकाशांत जेव्हां तूं धारण केलास, तेव्हां सर्व जग नियमित झालें.

३१. नातेवाईकास उच्च पदाला पोंचवावें. त्याप्रमाणें, हे इंद्रा, बुद्धिमान् स्तोत्याकडून ही उत्कृष्ट स्तुति यज्ञांत तुझ्याकडे पोंचविली जाते.

३२. यज्ञांत ह्या इंद्राचें प्रिय असणाऱ्या स्थानीं स्तोते जेव्हां स्तुति करूं लागतात आणि यज्ञाच्या मध्यें सोम काढण्याच्या स्थानीं—

३३. हे इंद्रा, सामर्थ्ययुक्त, सुंदर घोडे असलेलें, चांगल्या गाई असलेलें धन आम्हांला दे. होत्याप्रमाणें प्रथम आमचें स्तोत्र ऐकावेस म्हणून तुझी मीं स्तुति करीत आहे.

सूक्त तेरावें.

ऋषिः—नारद काण्व; देवता—इंद्र; छंदः—उष्णिह्.

१. सोम पिळल्यावर इंद्र बलप्राप्तीकरतां उक्थ्य नांवाचा यज्ञ स्वतः सोम पिऊन शुद्ध करतो. खरोखर इंद्र थोर आहे.

२. तो देवांच्या मुख्य ठिकाणीं म्हणजे स्वर्गांत राहून यजमानांचा उत्कर्ष करतो, कठिण प्रसंगांतून पार पडतो, तो अत्यंत कीर्तिमान् आणि आकाशांतील शत्रूंना जिंकणारा आहे.

३. त्या बलवान् इंद्राला लूट देणाऱ्या युद्धाकरतां मी बोलावतों. हे इंद्रा, तूं सुख देण्याकरतां अगदीं आम्हांला जवळचा हो आणि उत्कर्षाकरतां मित्र हो.

४. हे स्तुत्य इंद्रा, तुझ्याकरतां ही सोम काढणाराची आहुति पडत आहे. त्यामुळें प्रसन्न झालेला तूं ह्या यज्ञांत विशेष शोभतोस.

५. हे इंद्रा, सोम पिळणारे आम्ही जें धन मागत आहोंत तें धन तूं आम्हांला अवश्य दे. तसेंच आश्चर्यकारक आणि स्वर्गप्रापक (पुत्ररूपी) धन तूं आम्हांस दे.

६. हे इंद्रा, जेव्हां ज्ञानी स्तोता तुझी स्तुति करतो आणि जेव्हां स्तुति तुला प्रसन्न करते तेव्हां फांद्याप्रमाणें तुझे गुण वाढूं लागतात.

७. हे इंद्रा, पूर्वींप्रमाणें आम्हाकडून स्तोत्रें उत्पन्न कर. स्तोत्याचें बोलावणें ऐक. तूं वरचेवर मद उत्पन्न झाला असतां चांगलीं कृत्यें करणाऱ्या यजमानाला फल देतोस.

८. ज्या स्वर्गाधिपति इंद्राची ह्या स्तोत्रानें स्तुति केली जाते, त्या इंद्राची गोड स्तुति सखल प्रदेशावरून जाणाऱ्या पाण्याप्रमाणें विहार करीत आहे.

९. नमस्कार करून आनंदविलेला आणि रक्षणेच्छु लोकांकडून सर्वांना ताब्यांत ठेवणारा, मनुष्यांचा अधिपति एक इंद्रच आहे असें म्हटलें जातें, तो तूं पिळलेल्या सोमांत रमून जा.

१०. ज्याचे घोडे शत्रूंचा पराभव करतात, हवि देणाऱ्यांच्या घरीं जातात त्या ज्ञानी व प्रख्यात इंद्राची तूं स्तुति कर.

११. हे उदार इंद्रा, तुळतुळीत आणि चलाख घोड्यांनीं तूं सत्वर आमच्या यज्ञांत ये. कारण, येथें तुला सुखच होईल.

१२. हे बलिष्ठा आणि सज्जनसंरक्षका इंद्रा, स्तुति करणाऱ्याला धन दे. स्तोत्यांना नित्य आणि व्यापक यश दे.

१३. हे इंद्रा, सूर्य उगवला असतां प्रातःकालीं तुला मी बोलावतों, माध्यान्हकालीं बोलावतों. हे इंद्रा, प्रसन्न होऊन तूं घोड्यांच्या साहाय्यानें ये.

१४. हे इंद्रा, तूं लवकर धांव. पिळलेल्या आणि गाईच्या दुधांत मिसळलेल्या सोमानें प्रसन्न हो. ज्या रीतीनें मला कळेल तसा तूं हा प्राचीन यज्ञ सिद्ध कर.

१५. हे इंद्रा, जरी तूं जवळ असशील, दूर असशील किंवा हे वृत्रहन्त्या, तूं अन्तरिक्षांत असशील तरी तूं ये आणि सोम पिऊन आमचें संरक्षणच कर.

१६. आमचीं स्तोत्रें इंद्राला उत्कर्षशाली करोत. पिळलेला सोम इंद्राला वृद्धिंगत करो. हविर्युक्त लोक इंद्राचे ठिकाणीं रमून जावोत.

१७. संरक्षणेच्छु स्तोते सारख्या चालणाऱ्या स्तुतींनीं इंद्रालाच प्रसन्न करतात. त्यामुळें सर्व पृथ्वी फांद्याप्रमाणें फोफावते.

१८. त्रिकद्रुक (ज्योतिः, गौः, आयुः) दिवशीं देव इंद्राला उद्देशून यज्ञ करतात. नेहेमीं स्तोत्यांचा उत्कर्ष करणाऱ्या इंद्रालाच आमचीं स्तोत्रें वृद्धिंगत करोत.

१९. हे इंद्रा, स्तोता कर्माला अनुसरून प्रत्येक ऋतूंत ज्या तुझीं स्तोत्रें म्हणतो, तो तूं इंद्र आश्चर्यकारक, शुद्ध आणि पावन करणारा म्हणून स्तविला जातोस.

२०. ज्याविषयीं ज्ञानी स्तोते स्तोत्रें करतात तेंच रुद्रपुत्र मरुतांचें महान् सामर्थ्य पुराण्या पृथ्वी वगैरे ठिकाणीं दिसतें.

२१. हे इंद्रा, माझी मैत्री जर प्रामुख्यानें स्वीकारली असशील तर तूं हा सोम पी, कीं ज्यामुळें आम्ही सर्व शत्रू तरून जाऊं.

२२. हे स्तुत्य इंद्रा, तुझी स्तुति करणारा अतिशय सुखी केव्हां होईल? केव्हां आम्हांला गाईबैल घोडे वगैरेंनीं युक्त संपत्ति तूं देशील?

२३. अतिशय मद्युक्त असणाऱ्या ज्या इंद्राला आम्ही धन मागतों आहोंत, त्या जरारहित इंद्राचा रथ मनोहर आणि बलिष्ठ घोडे वाहून नेतात.

२४. त्या महान् आणि स्तुत्य इंद्राला आम्ही प्राचीन अशा सोमाच्या आहुतींनीं बोलावतों. आणि तो प्रिय अशा दर्भावर बसो. आणि दोनहि प्रकारचे हविर्भक्षण करो.

२५. हे बहुस्तुत इंद्रा, ऋषींनीं केलेल्या स्तुतींनीं तूं आनंदित हो. आणि आम्हांला विपुल अन्न दे.

२६. हे वज्रधारी इंद्रा, तूं अशा प्रकारें स्तुति करणाराचा संरक्षक आहेस. मीहि यज्ञामुळेंच स्तुति करून प्राप्त होणारी तुझी अनुग्रहबुद्धि प्राप्त करतों.

२७. तुझ्यासह हवि दिले जाणारे, ऐश्वर्यवान् दोन घोडे रथाला जोडून तूं सोम पिण्याकरतां आमच्या यज्ञांत ये.

२८. हे इंद्रा, जे तुला अनुसरणारे मरुत् आहेत ते ह्या यज्ञांत प्राप्त होवोत. मरुतांचे इतरहि लोक आमच्या हविप्रत प्राप्त होवोत.

२९. ह्या इंद्राचे हे शत्रुहिंसक मरुत् स्वर्गांत स्थान मिळवते झाले, यज्ञांच्या प्रमुख स्थलींहि ते समजतील असें असतात.

३०. पूर्वभागांत विस्तारलेल्या हिंसारहित यज्ञांत हा इंद्र यज्ञाचें फल देण्याकरतां लक्षपूर्वक पहात असतो.

३१. हे इंद्रा, हा तुझा रथ इच्छा पूर्ण करणारा आहे, हे तुझे दोन घोडे मनोरथ पूर्ण करतात. हे कर्तृत्ववन्ता, तुझें स्तवन इष्टसिद्धि करते आणि तूंहि तसाच आहेस.

३२. सोम कुटण्याचा दगड, तुझा मद, हा पिळलेला सोम, जेथें तूं प्राप्त जातोस तो यज्ञ आणि तुझी स्तुति हे सर्व इच्छा पूर्ण करणारे आहेत.

सूक्त चवदावें.

ऋषिः—गोषूक्तिन् आणि अश्वसूक्तिन् कण्वगोत्रज; देवता–इंद्र; छंदः–गायत्री.

१. हे इंद्रा, जसा तूं एकटाच संपत्तीचा अधिपति आहेस तसेंच मी व्हावें. मग माझ्याकरतां स्तुति करणारा स्तोता गाईबैलांनीं संपत्तिमान् होईलच.

२. हे शक्तिमान् इंद्रा, जर मी गाईबैलांनीं संपत्तिमान् होईन, तर माझ्याकरतां स्तुति करणाऱ्या स्तोत्याला धन देऊं इच्छीन आणि देईन.

३. हे इंद्रा, स्तोत्याचा उत्कर्ष करणारी तुझी स्तुतिरूपी गाय भक्ताला गाय घोडे आदि संपत्ति देईल.

४. स्तुति केलेला तूं जें धन देऊं इच्छित असशील, तें देऊं नको असें म्हणणारा कोणी देव नाहीं आणि मनुष्यहि नाहीं.

५. यज्ञ इंद्राला पुष्ट करतो. तो आकाशांत आपलें सामर्थ्य मेघरूपानें प्रकट करीत पृथ्वीला सुपीक करतो.

६. हे इंद्रा, सर्व संपत्ति जिंकणाऱ्या आणि उत्कर्षशील अशा तुझें साहाय्य आम्ही मागतों.

७. सोम पिऊन आनंदित झालेल्या इंद्रानें वलाला ठार केलें, आणि आकाश स्वच्छ केलें.

८. गुहेंत लपून ठेवलेल्या गाई अंगिरांच्या करतां प्रकट केल्या आणि वलाला पालथा घातला.

९. इंद्रानें द्युलोकांतली तेजस्वी नक्षत्रें स्थिर केली, तीं स्थिर झालेलीं कोणासहि हालवितां येत नाहींत.

१०. पाण्याच्या लाटा सारख्या वरवर जातात त्याप्रमाणें तुझें स्तोत्र सारखें चढत जातें. स्तोत्रामुळें आलेली तुझी प्रसन्नता विशेष शोभते.

११. हे इंद्रा, तूंच स्तोत्रांनीं आनंद पावतोस आणि साम गायनांनीं तुलाच आनंद होतो. स्तुति करणारांचें कल्याण करणारा तूंच आहेस.

१२. केसाळ दोन घोडें धनवान् इंद्राला सोम पिण्याकरतां यज्ञांत आणतात.

१३. हे इंद्रा, जेव्हां तूं सर्व शत्रू जिंकलेस, तेव्हां पाण्याच्या फेसानें तूं नमुचीचें डोकें उडविलेस.

१४. हे इंद्रा, कपटांनीं चालून येणाऱ्या आणि स्वर्गावर चढूं इच्छिणाऱ्या दस्यूंना तूं खालीं ढकललेस.

१५. हे इंद्रा, सोमपान करून आणि श्रेष्ठ होऊन नास्तिक आणि भांडखोरांना तूं ठार करतोस.

---

१३. टीपः— पूर्वी इंद्रानें असुरांना जिंकलें, पण तो नमुचीला जिंकूं शकला नाहीं. उलट लढाईंत इंद्राला नमुचीनें पकडलें. आणि इंद्राला म्हणाला कीं, तुला मी सोडतों पण रात्रीं किंवा दिवसा मला तूं ओलें किंवा वाळलेलें नसलेल्या आयुधानें मारूं नकोस. इंद्रानें तें कबूल केलें. नमुचीनें इंद्राला सोडून दिलें. पुढें अहोरात्राच्या संधिकालीं फेसानें इंद्रानें नमुचीचें डोकें उडविलें. हें ह्या ऋचेंत वर्णिलें आहे. नृसिंहावताराच्या कथेशीं या कथेचें साम्य आहे.

सूक्त पंधरावें.

ऋषिः—गोषूक्तिन् आणि अश्वसूक्तिन् कण्वगोत्रज; देवता–इंद्र; छन्दः—उष्णिह्.

१. हे स्तोतेहो, पुष्कळांनीं बोलाविलेल्या आणि अनेकांनीं स्तविलेल्या इंद्राचीं स्तोत्रें गा. महान् इंद्राची स्तुति करून सेवा करा.

२. ज्या उभय लोकांत असणाऱ्या इंद्राचें महान् सामर्थ्य द्यावापृथ्वी धारण करते आणि वावरणारे मेघ आणि वाहणारें पाणी जो आपल्या शक्तीनें धारण करतो.—

३. हे बहुस्तुता इंद्रा, तो तूं शोभतोस. तसेंच धन आणि कीर्ति मिळविण्याकरितां एकटाच सर्व शत्रूंना ठार करतोस.

४. हे वज्रधारी इंद्रा, तुझ्या कामपूरक, रणांगणांत शत्रूंचा पराभव करणाऱ्या, लोकनिर्मात्या आणि मनोहर मदाची आम्ही प्रशंसा करतों.

५. हे इंद्रा, ज्या मदानें तूं आयु आणि मनूला प्रकाश दिलास, त्यानें प्रसन्न असणारा तूं ह्या यज्ञांत विशेष शोभतोस.

६. हे इंद्रा, तुझें तें सामर्थ्य पूर्वीप्रमाणें स्तोते स्तवीत असतात. तूं प्रतिदिवशीं पावसाचें पाणी आपल्या ताब्यांत घे.

७. हे इंद्रा, तें तुझें महान् सामर्थ्य स्तुतीनें वाढतें. तसेंच तुझें बल, तुला उद्देशून केलें जाणारें कर्म आणि तुझें श्रेष्ठ वज्र ह्याचें सामर्थ्य स्तुतीनें वाढते.

८. हे इंद्रा, तुझा पराक्रम द्युलोक वाढवितो, तुझें यश पृथ्वी वृद्धिंगत करते, तुला अन्तरिक्ष आणि मेघ प्रसन्न करतात.

९. हे इंद्रा, तुला सर्वाधार विष्णु, मित्र आणि वरुण स्तवितात. मरुतांचें सामर्थ्य तुला प्रसन्न करते.

१०. हे इंद्रा, पाऊस पाडणारा तूं देवांमध्यें मोठा दाता आहेस. तूं सर्व चांगलीं मुलेंबाळें एकदम देतोस.

११. हे बहुस्तुत इंद्रा, तूं एकटाच एकदम सर्व शत्रूंना ठार करतोस. इंद्राशिवाय कोणीहि हीं मोठीं कृत्यें करीत नाहीं.

१२. हे इंद्रा, तुला संरक्षणाकरतां स्तोत्रें म्हणून अनेक प्रकारें लोक जेव्हां बोलावतात तेव्हां आमच्या लोकांनीं बोलावलेला तूं शत्रूंना जिंक.

१३. हे स्तोत्या, मोठें घर मिळावें म्हणून पुरेसें इंद्राचें सर्व गुण वर्णन करणारा तूं शचीपति इंद्राला संपत्ति मिळावी म्हणून प्रसन्न कर.

सूक्त सोळावें.

ऋषिः-इरिंबिठि काण्व; देवता-इंद्र, छंदः—गायत्री.

१. हे स्तोतेहो, लोकांचा धनी, स्तुत्य, नेता, शत्रूंचा पराभव करणारा आणि थोर दाता जो इंद्र त्याची स्तुति करा.

२. समुद्रांत पाण्याच्या तरंगाप्रमाणें ज्याचे ठिकाणीं सर्व स्तोत्रें आणि हविर्द्रव्यें (देणारें) रमून जातात.—

३. देवश्रेष्ठ, युद्धांत महान् पराक्रम करणारा आणि बलवान् अशा त्या इंद्राची संपत्तीकरतां मी स्तोत्रें म्हणून सेवा करतों.

४. ज्याचा मद पुरा, गंभीर, विस्तीर्ण, संरक्षक, अणि रणांगणांत उत्साह देणारा आहे,—

५. त्या इंद्रालाच स्तुति करून स्तोते बोलावतात. ज्यांच्या पक्षाला इंद्र असतो तेच जिंकतात.

६. त्यालाच चांगल्या स्तोत्रांनीं स्तोते स्तवितात. लोक त्याला उद्देशून कर्में करतात. हा इंद्रच स्तोत्यांना धन देतो.

७. इंद्र ब्रह्मा आहे, इंद्र ऋषि आहे, इंद्र अनेक वेळां अनेकांनीं बोलावलेला आहे, तोच महान् कृत्यांनीं मोठा झाला आहे.

८. तो इंद्र स्तुत्य आहे, बोलावण्यासारखा आहे, सत्य, शत्रूंचा पराभव करणारा आणि कर्तृत्ववान् आहे. तो एकटा असूनहि शत्रूंचा पराभव करणारा आहे.

९. ज्ञानी लोक त्याची मंत्रांनीं, सामगायनांनीं आणि गायत्री छंदांतल्या मंत्रांनीं स्तुति करतात.

१०. लोक उत्कृष्ट संपत्ति प्राप्त करून देणाऱ्या, लढाईत जय प्राप्त करणाऱ्या आणि आयुधानें शत्रूंचा पराभव करणाऱ्या इंद्राला स्तवितात.

११. अनेकांनीं स्तविलेला आणि संरक्षण करणारा तो इंद्र सर्व शत्रूंतून सुखानें तारून नेवो.

१२. हे इंद्रा, तूं आम्हांला सामर्थ्यपूर्ण धन दे. मार्ग दाखीव. तसेंच आम्हांला सुख प्राप्त करून दे.

सूक्त सतरावें.

ऋषिः—इरिंबिठि काण्व; देवता-इंद्र; छंदः—१ ते १३ गायत्री, १४ बृहती, १५ सतोबृहती.

१. हे इंद्रा, तूं ये. तुझ्याकरतां आम्हीं सोम पिळला आहे. तो सोम पी. (सोम पिण्याकरतां) मी आंथरलेल्या दर्भांच्या आसनावर बैस.

२. हे इंद्रा, मंत्र म्हणून जोडलेले आणि केसाळ असे दोन घोडे तुला वाहून आणतात. तर येऊन तूं आमचीं स्तोत्रें ऐक.

३. हे इंद्रा, सोम तयार करून सज्ज असणारे आम्ही ब्राह्मण स्तोत्र म्हणून तुला बोलावतों.

४. हे इंद्रा, सोम असलेल्या आम्हांकडे तूं ये. आमचीं उत्कृष्ट स्तोत्रें ध्यानांत घे. हे उत्कृष्ट शिरस्त्राण असलेल्या इंद्रा, तूं सोमाचा भाग पी.

५. हे इंद्रा, तुझीं दोन्हीं पोटें मी सोमांनीं भरून टाकतो. तो सोम तुझ्या सर्व अवयवांत जावो. तूं जिव्हेनें मधुर सोम ग्रहण कर.

६. हे इंद्रा, दातृत्वयुक्त असणाऱ्या तुला हा सोम गोड लागो. तुझ्या शरीराला आणि तुझ्या मनाला तो गोड लागो.

७. हे दृष्ट्या इंद्रा, शुभ्र वस्त्र नेसलेल्या स्त्रियाप्रमाणें दूधांत मिसळलेला हा सोम तुझ्याकडे जावो.

८. विस्तीर्ण खांद्याचा, विशालोदर, चांगले दंड असलेला इंद्र सोमाच्या मदांत शत्रूंना ठार करतो.

९. हे इंद्रा, बलानें सर्व जगांत श्रेष्ठ असणारा तूं आम्हाकडे ये. हे वृत्रहन्त्या, आमच्या शत्रूंना ठार कर.

१०. हे इंद्रा, ज्यानें सोम काढणाऱ्या यजमानाला तूं धन देतोस तो तुझा अंकुश लांबलचक असो.

११. हे इंद्रा, तुझ्याकरतां हा सोम दर्भावर (गाळून) स्वच्छ केला आहे. आतां ह्या सोमाकडे ये, पळ आणि सोम पी.

१२. हे बळकट गाई असलेल्या आणि प्रख्यातपूजना इंद्रा, तुला सुख व्हावें म्हणून हा सोम पिळला आहे. हे शत्रूंचा नाश करणाऱ्या इंद्रा, तूं स्तुति करून बोलावला जातोस. (ये आणि सोम पी.)

१३. हे शृंगवृष ऋषीच्या मुला इंद्रा, तझें रक्षण करणारा कुण्डपाय्य नांवाचा जो ऋतु आहे, त्यावर ऋषींचें मन जडलें आहे.

१४. हे गृहपते, (आमच्या घराचे) खांब पक्के असोत. आम्हाला बल प्राप्त होवो. सोम पिऊन अनेक शत्रूंच्या नगरींचा धुव्वा उडविणारा इंद्र आम्हा मुनींचा मित्र होवो.

१५. सर्पाप्रमाणें वश करतां येणारा, यज्ञार्ह, गाई प्राप्त करून देणारा, एकटा इंद्रच अनेक शत्रूंचा पराभव करतो. स्तोता चांगल्या घोड्याप्रमाणें स्तोत्रानें इंद्राला सोम पिण्याकरतां आणतो.

---

१३. टीपः—शृंगवृष ऋषीच्या पोटीं इंद्र पुत्ररूपानें झाला अशी आख्यायिका आहे.

सूक्त अठरावें.

ऋषिः—इरिंबिठि काण्व; देवता–८ अश्विन्, ९ अग्नि, सूर्य, वायु, बाकी आदित्य; छंदः—उष्णिह.

१. आतां ह्या आदित्यांच्या प्रेरणेनें मनुष्य नूतन आणि सुखकर धन मागेल.

२. ह्या आदित्याचे मार्ग अबाधित आहेत. संरक्षक असणारे ते मार्ग सुख वाढविणारे होवोत.

३. ज्या घरांत आम्ही तुम्हाला संपत्ति मागूं असें घर सविता, भग, वरुण, मित्र आणि अर्यमा आम्हांस चांगल्या प्रकारें देवोत.

४. हे अनेकांकडून आराधन केले जाणारे, सतत सर्वांचें पोषण करणारे देवि अदिते, शहाण्या आणि खांत असलेल्या पुत्रासह तूं सुख देण्याकरतां ये.

५. आदितीचे पुत्र असणारे ते देव शत्रूंना दूर करूं जाणतात. कर्तृत्ववान् आणि संरक्षक असणारे ते आम्हांला पापापासूनहि मुक्त करूं जाणतात.

६. अदिति दिवसा आमच्या पशूंचें संरक्षण करो. सरळ मनाची अदिति रात्रीं आमच्या पशूंचें संरक्षण करो. अदिति सदोदित वाढत्या सहाय्यानें पापापासून आमचें संरक्षण करो.

७. तसेंच ती स्तुत्य अदिति दिवसा आमचें रक्षण करण्याकरतां येवो. शांति वाढविणारें सुख देवो. आणि त्रासदायक शत्रूंना दूर करो.

८. तसेंच देवांतले प्रसिद्ध वैद्य अश्वि आम्हाला सुख देवोत. आमचें पाप नाहींसें करोत आणि शत्रूंना दूर करोत.

९. अग्नि आपल्या वेगवेगळ्या स्वरूपानें आम्हांस सुख देवो. सूर्य आम्हाला सुखकारक प्रकाशो.

१०. हे आदित्यहो, तुम्ही रोग नाहींसे करा. शत्रूंना दूर करा. आमची दुर्बुद्धि नष्ट करा आणि आम्हांला पापांतून मुक्त करा.

११. हे आदित्यहो, दुष्टाला आम्हापासून दूर ठेवा. बुद्धिहीनता नष्ट करा. हे सर्वज्ञहो, आम्हांला शत्रुरहित करा.

१२. हे दानशील आदित्यहो, जें पाप्याला पापापासून मुक्त करतें तें सुख आम्हांला द्या.

१३. कोणी आम्हांला राक्षसपणामुळें मारूं इच्छितो तो स्वतःच्या कर्मानें मरो. तो दुःखी होऊन नष्ट होवो.

१४. जो आम्हांविषयीं दुष्ट बुद्धि ठेवतो आणि दुटप्पीपणानें वागतो त्या दुष्कीर्ति माणसाला पाप लागो.

१५. हे देवहो तुम्ही बुद्धिमान् आहांत. हे सर्वज्ञहो, तुम्ही आपल्या मनांत चांगल्या व वाईट लोकांना ओळखा.

१६. आम्हांला मेघापासून आणि पाण्यापासून सुख प्राप्त व्हावें. हे द्यावापृथ्वीहो, आम्हांपासून पाप दूर करा.

१७. हे सर्वव्यापक आदित्यहो, तुम्ही आम्हाला सुख देऊन सर्व प्रकारच्या संकटांतून पार पाडा.

१८. हे तेजस्वी आदित्यहो, आम्हांला पुत्रपौत्र व्हावेत म्हणून आणि जगण्याकरतां दीर्घायुष्य द्या.

१९. हे आदित्यहो, आम्ही केलेला यज्ञ तुम्हांला पोंचत आहे. तुम्ही आम्हाला सुख द्या. तुमचे बांधव असणारे आम्ही तुमचेच आहोंत.

२०. मरुतांचें संरक्षण करणारा इंद्र, अश्विन्, मित्र आणि वरुण यांना आम्ही मोठें घर मागत आहोंत.

२१. हे मित्रा, अर्यमन् व मरुत्हो, तुम्ही सुखकारक मनुष्यांनीं गजबजलेलें सुंदर जसें तीन मजलीं घर आम्हाला द्या.

२२. हे आदित्यहो, जे आम्ही लोक मृत्यूच्या तडाख्यांत आहोंत, त्या आम्हांला जगण्याकरतां दीर्घायुष्य दे.

सूक्त एकोणिसावें.

ऋषिः—सोभरि काण्व; देवता—१-३३ अग्नि, ३४. ३५ आदित्य, ३६. ३७ त्रसदस्युदानस्तुति; छंदः—१-३-५-७-९-११-१३-१५-१७-१९-२१-२३-२५-२९-३१-३३ ककुभ, २-४-६-८-१०-१२-१४-१६-१८-२०-२२-२४-२६-२८-३०-३२-३४ सतोबृहती. २७ विराज, ३४ उष्णिह, ३५ सतोबृहती, ३६ ककुभ, ३७ पंक्ति.

१. हे स्तोत्या, स्वर्गाला हवि नेणाऱ्या अग्नीची तूं स्तुति कर. कारण भक्त दात्या देवाकडे स्तुति करीत जातात. अग्नि देवाकडे हवि पोंचवितात.

२. (ऋषि स्वतःला स्तुति करण्याची प्रेरणा करतो). हे बुद्धिमान् सोभरे ऋषि, आश्चर्यकारक दान देणारा, विचित्र तेज असलेला, यज्ञाचा नायक आणि प्राचीन अशा ह्या अग्नीची तूं स्तुति कर.

३. हे अग्ने, देवदेव, देवांना बोलावणारा, अविनाशी आणि यज्ञ पार पाडणाऱ्या तुझी आम्ही सेवा करतों.

४. अन्नामुळें वाढणारा, संपत्तिवान्, अत्यंत प्रकाशक आणि उत्कृष्ट तेज असलेल्या अग्नीची मी स्तुति करतों. तो अग्नि आम्हांला स्वर्गांत मित्र आणि वरुण यांच्यापासून सुख प्राप्त व्हावें म्हणून यजन केला जातो. तो उदकदेवतांपासून सुख प्राप्त व्हावे म्हणून यजन केला जातो.

५. जो समिधा देऊन, जो आहुति समर्पून आणि जो वेद म्हणून अग्नीची सेवा करतो, आणि चांगले यज्ञ करणारा जो अन्न समर्पून अग्नीची सेवा करतो.—

६. त्याचेच घोडे शत्रूवर चालून जातात. त्याची कीर्ति उज्ज्वल होते. देवांनीं निर्माण केलेले दोष त्याचा कसाहि नाश करीत नाहींत आणि मनुष्यांनीं केलेले दोषहि त्याला ग्रासीत नाहींत.

७. हे बलपुत्र आणि अन्नाधिपति अग्ने, तुझ्या वेगवेगळ्या विभूतींनीं आम्ही अग्नियुक्त होऊं. चांगल्या अनुयायांनीं युक्त असणारा तूं आमची इच्छा करणारा हो.

८. अतिथीप्रमाणें स्तुत्य, हितकर्ता अग्नि रथाप्रमाणें आम्हांकडे प्राप्त होवो. हे अग्ने, तुझ्यामुळें सज्जन सुखरूप आहेत. तूं संपत्तींचा ईश्वर आहेस.

९. हे अग्ने, जो मनुष्य यज्ञ करतो तो खरा. हे भाग्यशाली अग्ने तोच श्रेष्ठ, आणि तोच स्तुति करून प्रशंसनीय होय.

१०. हे अग्ने, ज्याच्या यज्ञाकरतां तूं उत्सुक असतोस तो मुलाबाळांनीं घर भरलेला असा आपलें कार्य साधतो. तो घोड्यांनीं, शहाण्यांनीं आणि शूरांनीं युक्त असतो. (त्याच्याच जवळ सर्व प्रकारची संपत्ति असते.)

११. ज्याच्या घरांत सर्वश्रेष्ठ तेजस्वी अग्नि हवि व स्तुति प्राप्त करतो आणि हवि. देवांना पोंचवितो (त्याला वर वर्णिल्याप्रमाणें सर्व ऐश्वर्य प्राप्त होतें.)

१२. हे बलपुत्र अग्ने, स्तुति करणाऱ्या आणि दान करण्याविषयीं तत्पर असलेल्या शहाण्याचें स्तोत्र हे सर्वव्यापका, देवांच्या खालीं आणि मनुष्यांच्या वर आकाशांत भरून टाक.

१३. जो मनुष्य हवि देऊन आणि नमस्कार करून बलवान् अग्नीची सेवा करतो किंवा जो तेजस्वी अग्नीची स्तुति करतो तो समृद्ध होतो.

१४. जो मनुष्य सतत प्रज्वलित असणाऱ्या अग्नीला जास्त प्रज्वलित करणाऱ्या समिधा देऊन सेवा करतो, तो मनुष्य चांगलीं कर्में करीत (पाण्यांतून तारावें त्याप्रमाणें) सर्व लोकांना अन्न देऊन तारतो.

१५. जें धन घरांत असणाऱ्या कोणाहि शत्रूचा पराभव करतें, आणि दुर्बुद्धि लोकांचा क्रोध नाहींसा करतें, हे अग्ने, तें धन आम्हांला दे.

१६. ज्यामुळें वरुण, मित्र आणि अर्यमा प्रकाशित होतात, ज्यामळें दोघे अश्विनी आणि भग प्रकाशित होतात (त्या तेजाची) बलानें श्रेष्ठ आणि इंद्रानें रक्षिलेले आम्ही उपासना करतो.

१७. हे तेजस्वी अग्ने, जे लोक लोकद्रष्ट्या आणि सुकर्मा अग्नीची स्थापना करतात तेच खरोखर सुखी होत.

टीपः—हा मंत्र संहितादि स्वाहाकारास आधार म्हणून देतात. आश्व. गृ. १.१.४.

१८. हे भाग्यशाली अग्ने, जे तुझी इच्छा करतात, तेच वेदि करतात, तेच आहुति देतात, तेच योग्य दिवशीं सोम पिळतात आणि तेच पुष्कळ धन सामर्थ्यानें जिंकतात.

१९. आहुति दिलेला अग्नि आमचें कल्याण करो. हे भाग्यशाली अग्ने, आमचें दान कल्याणप्रद असो, यज्ञ कल्याण करणारा होवो आणि आम्ही केलेली स्तुति कल्याणप्रद असो.

२०. हे अग्ने, ज्यामुळें तूं रणांत शत्रूंचा पराभव करतोस तें आमचें मन तूं रणांत चांगलें कर. स्पर्धा करणाऱ्या शत्रूंचीं बळकटहि सैन्यें तूं पराभूत कर. आम्ही स्तोत्रें म्हणून तुझी सेवा करूं.

२१. ज्याला देव स्थापन करतात त्या यजनीय, हवि नेणाऱ्या, सर्वश्रेष्ठ आणि दूताचें काम करणाऱ्या अग्नीची मी स्तुति करतों.

२२. मधुर स्तुतीनें स्तविलेला आणि तुपाची आहुति दिलेला अग्नि उत्कृष्ट सामर्थ्य देतो, त्या तीक्ष्ण दाढासारख्या ज्वाला असलेल्या तरुण आणि सुशोभित अग्नीला हे स्तोत्या, तूं अन्न दे.

२३. तुपाची आहुति दिलेला अग्नि सूर्याच्या किरणाप्रमाणें आरोह–अवरोहात्मक ज्वाला जेव्हां प्राप्त करतो तेव्हां आम्ही त्याची स्तुति करतों.

२४. मनूनें स्थापन केलेला जो अग्नि आपल्या सुगंधयुक्त मुखानें हवि देवांच्याकडे नेतो. तो चांगल्या तऱ्हेनें हवन केला जाणारा, देवांना बोलावणारा अमर अग्निदेव भक्ताला उत्कृष्ट संपति देतो.

२५. हे बलपुत्रा, आहुति दिलेल्या आणि अनुकूल तेज असलेल्या अग्ने, जेव्हां मर्त्य असणारा मी तुझ्या स्वरूपाला प्राप्त होईन तेव्हां मी अमर होईन.

२६. हे सर्वव्यापक अग्ने, मी खोटी स्तुति करून तुला बोलावीत नाहीं. तसेच पूजनीय अग्ने, कांहीं वाईट कृत्याकरतांहि मी तुला हाक मारीत नाहीं. माझा स्तोता वाईट बुद्धीनें तुला न बोलवो. हे अग्निदेवा, आम्हांला शत्रू असूं नयेत आणि आमच्या मनांत वाईट बुद्धि नसावी.

२७. पित्याचें पुत्र पोषण करतो त्याप्रमाणें पोषण केलेला हा अग्नि यज्ञगृहांतून आमचा हवि देवाकडे नेवो.

२८. हे सर्वव्यापक अग्ने, तुझ्या मनापासून असणाऱ्या साहाय्यानें मी नेहमीं तुझें प्रेम संपादन करतों.

२९. हे अग्ने, तुझ्यासंबंधीं कर्मे करून तुला हवि देऊन तुझी स्तुति करून मी तुझी सेवा करतो. हे सर्वव्यापका, मला बुद्धि देणारा तूंच आहेस असें म्हणतात. हे अग्निदेवा, मला (धन) देण्याकरतां प्रसन्न हो.

३०. हे अग्ने, तूं ज्याच्याशीं सख्य करतोस त्याची तुझ्या साहाय्यानें भरभराट होते. त्याला चांगली संतति आणि उत्कृष्ट बळ प्राप्त होते.

३१. हे सोम अर्पण केलेल्या अग्ने, भांड्यांत भरलेला सुंदर व उत्तेजक व अत्यंत पातळ सोमरस तुला अर्पण केला जातो. तूं दीर्घ उषःकालांतील आवडता आहेस. तूं रात्रीं पदार्थमात्राला प्रकाशीत करतोस.

३२. आम्ही सोभरि ऋषि त्रसदस्यूनें स्थापन केलेल्या अत्यंत तेजस्वी, सुशोभित आणि अत्यंत इष्ट अग्नीकडे आलों आहोंत.

३३. हे अग्ने, दुसरे अग्नि झाडांच्या फांद्याप्रमाणें तुझ्याजवळ आहेत. मी तुझें सामर्थ्य (स्तति करून) वाढवितों आणि स्तोत्याप्रमाणें उज्वल कीर्ति प्राप्त करतों.

३४. हे द्वेषरहित आणि दानशील आदित्यहो, सर्व धनवन्तामध्यें ज्या मनुष्याला तुम्ही (आरंभलेल्या कृत्याचा) पार पाडता त्याला त्याचें फल प्राप्त होतें.

३५. हे शत्रूंचे पराभव करणारे तेजस्वी आदित्यहो, तुम्ही लोकांना त्रास देणारांचा पराभव करता. हे मित्रा, वरुण आणि अर्यमन्, आम्ही तुमच्या यज्ञांचे चालक होऊं.

३६. (त्रसदस्यूच्या दानाची प्रशंसा) सज्जनांचें संरक्षण करणारा दातृत्वशील राजा पुरुकुत्साचा मुलगा त्रसदस्यु यानें मला पन्नास स्त्रिया (दासी म्हणून) दिल्या.

३७. मी वस्त्रप्रावरण घेऊन निघालों असतां सुवास्त्वा नदीच्या उतारावर तीनशें दहा गाई आणि त्यांच्यांतील प्रमुख काळा बैल मला मिळाला. असा तो धन देणाऱ्यांत श्रेष्ठ आहे.

---

३७ टीपः—सुवास्त्वा नदी काबूल नदीपाशीं असावी· ही ऋचा त्रसदस्युची दानस्तुति आहे असें सर्वानुक्रमांत म्हटलें आहे.

सूक्त विसावें.

ऋषिः—सोभरि काण्व; देवता–मरुत् ; छंदः—१. ३. ५. ७. ९. ११. १३. १५. १७. १९. २१. २३. २५. ककुभ्, २. ४. ६. ८. १०. १२. १४. १६. १८. २०. २२. २४. २६. सतोबृहती.

१. हे गमलशील मरुत्हो, तुम्ही या. येतांना आम्हांला त्रास देऊं नका. हे तेजांनीं सारखे असणारे कंपनशील मरुत्हो, पर्वतावरहि आम्हांपासून दूर असूं नका.

२. हे महान् मरुत्हो, तेजस्वी आणि घट्ट धांवा असलेल्या रथांनीं या. हे अनेकांनीं इच्छिलेलें आणि सोभरीकडे येणारे मरुत्हो, आमच्या यज्ञांत अन्नासह या.

३. कर्तृत्ववान् आणि व्यापक रुद्रपुत्र मरुतांचें सामर्थ्य आम्ही जाणतों.

४. हे स्वयंप्रकाशहो, तुम्ही जेव्हां हलूं लागतां, तेव्हां द्वीपें हदरूं लागतात, स्थिर असणारे सर्व वस्तुजात आणि द्यावापृथ्वी दुःखयुक्त होते, आणि चकचकीत आयुधें धारण करणारेहो, उदक वाहूं लागतें.

५. हे मरुत्हो, तुम्ही चालूं लागला कीं स्थिर पर्वत आणि वनस्पतिहि कडाडूं लागतात आणि भूमि हदरूं लागते.

६. हे मरुत्हो, जेथें महाबाहु मरुत् आपल्या शरीरांवर अलंकार धारण करतात तेथें तुमच्या जोराच्या गतीमुळें द्युलोकहि आपलें स्थान सोडून वर जातो.

७. तेजस्वी, बलवान् पर्जन्यरूप आणि सरळस्वरूपाचे नेते मरुत् हवीकरतां महान् शोभा धारण करतात.

८. सोनेरी रथाच्या मध्यभागीं सोभरींच्या स्तुतीमुळें वाण नांवाचें मरुतांचें वाद्य वाजूं लागतें. गाईचे बांधवभूत असणारे ते सुजन्मे महान् मरुत् अन्नोपभोगाकरतां लवकर येवोत.

९. हे सोमदात्यानो, तुम्ही पाऊस पाडणाऱ्या मरुत्संघाला पाऊस पाडण्याचे आणि धांवण्याचें बल प्राप्त व्हावें म्हणून हवि द्या.

१०. हे नेते मरुत्हो, पाऊस पाडणारे घोडे असलेले, पर्जन्यरूप आणि पाऊस पाडणाऱ्या रथानें हविर्द्रव्याकडे या. हवि भक्षण करण्याकरतां श्येनपक्षाप्रमाणें ते सहज येतात.

११. ह्यांचे अलंकार सारखेच आहेत. तेजस्वी हार आणि हातांत आयुधें चकाकत आहेत.

१२. उत्साही आणि पाऊस पाडणारे महाबाहु मरुत् आपल्या शरीराविषयीं केव्हांहि प्रयत्न करीत नाहींत. हे मरुत्हो, तुमच्या रथावर बळकट धनुष्यें आहेत म्हणूनच तुम्हांला सैन्याच्या आघाडीवर जय मिळतात.

१३. पाण्याप्रमाणें चहूकडे पसरलेले, तेजस्वी असें अनेक मरुतांचें फक्त नांवच बापाकडून प्राप्त झालेल्या संपत्तीप्रमाणें सर्वांना उपभोगाकरतां उपयोगी पडते.

१४. हे अन्तःकरणा, तूं त्या मरुतांना नमस्कार कर. त्यांची स्तुति कर. त्या सर्वांना हलवणाऱ्या थोर मरुतांच्या चाकरासारखे आम्ही आहोंत. ह्या मरुतांच्या देणग्या फार महत्त्वाच्या आहेत.

१५. हे मरुतहो, जो मनुष्य पूर्वकालीं तुमचा भक्त असतो, तुमच्या रक्षणामुळें तो स्तोता मोठा भाग्यशाली होतो.

१६. हे नेते मरूतहो, तुम्ही ज्याचे हवि भक्षण करण्याकरतां येतां तो यजमान हें जग हलवून सोडणारे मरूतहो, उत्कृष्ट अन्न प्राप्त करून सुखी होतो.

१७. उदक निर्माण करणारे आणि तरुण रुद्रपुत्र मरूत आकाशांतून येऊन आमचीं इच्छा करतील असें आमचें स्तोत्र असो.

१८. जे दानशील लोक मरुतांची पूजा करतात, जे पाऊस पाडणाऱ्या मरुतांची सेवा करतात, त्या लोकांकडे हे तरुण मरूतहो, तुम्ही उदार अन्तःकरणानें या.

१९. हे सोभरे, तरुण आणि पाऊस पाडणाऱ्या मरुतांची, तूं अगदीं नवें स्तोत्र करून वरचेवर नांगरटी करणारा शेतकरी बैलाची करतो, त्याप्रमाणें स्तुति कर.

२०. सर्व सेनांत आणि आव्हान करणाऱ्या योद्ध्यांत आव्हान करणाऱ्या मुष्टियोद्ध्याप्रमाणें जे मरूत पराभव करणारे आहेत त्या कीर्तिमान्, आल्हादक आणि पाऊस पाडणाऱ्या मरुतांचींच आतां स्तोत्रें करून स्तुति करावी.

२१. हे क्रोधशील मरूतहो, एकजातीचे म्हणून बांधवभूत असणाऱ्या गाईप्रमाणें तुम्ही सर्व दिशांना एकमेकांना चाटत असतां.

२२. हे नाचणारे आणि सुवर्णालंकार घातलेले मरूतहो, (स्तुति करणारा) मनुष्यच तुमच्या सख्याला लवकर प्राप्त करतो. म्हणून तुम्ही आमच्या बाजूनें बोला. कारण तुमचा आप्तपणा आम्ही नेहेमीं यज्ञांत स्वीकारला आहे.

२३. हे दानशील, गमनशील व मित्रभूत मरूतहो, तुम्ही तुमचीं औषधें घेऊन या.

२४. हे मरूतहो, ज्यांनीं तुम्ही समुद्र रक्षितां, शत्रूंना ठार करतां आणि विहीर देतां, हे सुखदायक आणि शत्रुरहितहो, त्या कल्याणकारक साहाय्यांनें आम्हांला सुख द्या.

२५. हे सुयज्ञ मरुतूहो, जें सिंधुनदांत, जें असिक्नींत, आणि जें पर्वतावर औषध असेल—

२६. तीं सर्व औषधें ज्ञाते असणारे तुम्ही आमच्या शरीरांत आणा. आणि त्यांनीं आम्हांला निरोगी करा. हे मरुतूहो, आम्हांपैकीं रोग्याचे दोष नाहींसे करा आणि त्याला पुनः पहिल्यासारखा करा.

सूक्त एकविसावें.

ऋषिः—सोभरि काण्व; देवता–१ ते १६ इंद्र, १७–१८ चित्रदानस्तुति; छंद– १.३.५.७.९.११.१३.१५.१७. ककुभ्, २.४.६.८.१०.१२.१४.१६.१८ सतोबृहती.

१. हे प्रत्येक वेळीं प्रादुर्भूत होणाऱ्या इंद्रा, तुला सोम देऊन पुष्ट करणारे व संग्रामांत रक्षणाकरतां आश्चर्यकारक अशा तुझ्या सहाय्याची अपेक्षा करणारे आम्ही, गरीब श्रीमंताला बोलावतो त्याप्रमाणें तुला बोलावतों.

२. हे इंद्रा, कर्मांत संरक्षण व्हावें म्हणून आम्ही तुझ्याकडे येतों. जो शत्रूचा पराभव करतो तो पराक्रमी इंद्र आम्हांकडे येवो, तुझे बांधव असणारे आम्ही संरक्षण करणाऱ्या आणि पूज्य अशा तुझीच उपासना करतों.

३. हे अश्वपति आणि पृथ्वीपति इंद्रा, हा सोम (पिण्याकरतां) ये आणि हे सोमपते, तूं सोम पी.

४. हे इंद्रा, बंधुरहित असणारे आम्ही बांधवयुक्त अशा तुलाच बांधव म्हणून स्वीकारतों. तसें (झाल्यावर) हे कामपूरका, तुझीं जीं शरीरें आहेत त्या सर्वांसह सोम पिण्याकरतां ये.

५. हे इंद्रा, दूधदह्यांत मिसळलेला मदकर आणि स्वर्गप्रवेशक सोमाच्या घरांत पक्षी एकत्र बसतात त्याप्रमाणें एकत्र बसून आम्ही स्तुति करतों.

६. हे इंद्रा, आम्ही या स्तोत्रानें प्रामुख्यानें तुझी स्तुति करतों. तूं पुनः पुनः कसला विचार करतोस ? हे अश्वयुक्ता, आमच्या इच्छा आहेत, तूं दाता म्हणजे इच्छा पुऱ्या करणारा आहेस. आम्ही तुझ्या समीप आहोंत. आणि आमचीं कृत्यें तुला उद्देशून चालूं आहेत.

७. हे इंद्रा, तुझ्या सहाय्यामुळें आम्ही तरतरीत आहोंत. हे वज्रधारिन्, तुझा मोठेपणा आम्ही पूर्वी जाणत नव्हतों.

८. हे शूर इंद्रा, तुझा मित्रपणा आम्ही जाणतों. आणि तुझी संपत्तीहि आम्ही जाणतों. हे वज्रधारिन्, आम्ही मित्रत्व आणि संपत्ति विशेषतः मागतों. हे सर्वाधारा आणि सुंदर मुगुट घातलेल्या इंद्रा, गाईबैलांनीं युक्त अशा सर्व प्रकारच्या संपत्तींनीं आम्हांला प्रसिद्ध कर.

९. हे मित्रहो, ज्यानें पूर्वी आम्हांस उत्कृष्ट धन दिलें त्या इंद्राचीच तुम्हांला धन प्राप्त होण्याकरतां मी स्तुति करतों.

१०. ज्याची तृप्ति होते तो मनुष्य पिंगट घोडे असलेल्या सज्जनसंरक्षक आणि शत्रूंचा पराभव करणाऱ्या इंद्राची स्तुति करतों. नंतर तो धनवान् इंद्र शेंकडो गाईघोडे इत्यादि संपत्ति आम्हां स्तोत्यांना देवो.

११. हे कामपूरक इंद्रा, गाईबैलांनीं युक्त अशा लोकांच्या युद्धांत (रागानें) फूसकारणाऱ्या शत्रूस आम्ही तुझ्या साहाय्यानेंच प्रत्युत्तर देतों.

१२. हे बहुस्तुत इंद्रा, युद्धांत त्रास देणाऱ्या शत्रूंना आम्ही जिंकतों. दुष्ट बुद्धीच्या लोकांवर आम्ही चालून जातों. वृत्राला मरुतांच्या साहाय्यानें आम्ही ठार मारावयास लावतों. आणि तुझा उत्कर्ष करतों. तूं आमच्या कर्माचें संरक्षण कर.

१३. हे इंद्रा, तूं जन्मापासूनच अनियन्त्रित आणि फार कालापासून शत्रूरहित आहेस. तूं युद्ध करूनच मैत्री इच्छितोस.

१४. हे इंद्रा, तूं केवळ धनवानाशीं मैत्री करीत नाहींस. मस्त झालेले नास्तिक तुझा (नाश) त्याग करतात. जेव्हां तूं स्तुति केला जातोस, आणि तुझ्याबद्दल तर्क केला जातोस, तेव्हांच तूं पित्याप्रमाणें सर्वांकडून बोलावला जातोस.

१५. हे इंद्रा, तुझ्यासारख्याच्या मैत्रीविषयीं आम्ही अज्ञानी नसावें. आम्ही सोम न पिळणारे असूं नये. ऋत्विजांसह आम्ही सोम पिळीत बसावें.

१६. हे गाई देणाऱ्या इंद्रा, तुझ्या कृपेनें आम्ही धनरहित असूं नये. (आम्ही सर्वांना धन द्यावें) आम्ही दान घेऊं नये. धनी असणारा तूं आम्हांला अखंड संपत्ति दे. आम्हांला पुष्ट कर. तुझी दातृत्वशक्ति कोणालाहि टाळतां येणार नाहीं.

१७. हवि देणाऱ्या मला इंद्रानेंच धन दिलें, किंवा धनवान् सरस्वतीनें दिलें किंवा चित्र राजानें इतकें धन दिलें ?

१८. हजारांनीं आणि दहा हजारांनीं ही संपत्ति चित्रानेंच मला दिली. सरस्वतीच्या तीरावर थोडेच राजे आहेत. त्यापैकीं चित्रच पावसाप्रमाणें धन देतो.

१८ टीप—चित्राच्या दानाची स्तुति. चित्र नांवाच्या राजानें सरस्वतीच्या तीरावर इंद्राकरतां यज्ञ केला. तेथें ह्या मंत्राच्या द्रष्ट्याला—सोभरीला—पुष्कळ संपत्ति मिळाली तो इतकें धन मला कोणी दिलें म्हणून १७ वा १८ या मंत्रांत कल्पना करतो आहे.

सूक्त बाविसावें.

ऋषिः—सोभरि काण्व; देवता—अश्विन् ; छंदः—१.३. ५.७ बृहती, २.४.६ सतोबृहती, ८ अनुष्टुभ्, ९ ते १८ ककुभ्.

१. हे स्तुत्य आणि शत्रूंना भयंकर असलेले अश्विहो, तुम्ही सूर्या मिळविण्याकरतां ज्या रथाचा आश्रय केला होता त्या सुंदर रथाला आमच्या रक्षणाकरतां मी बोलावतों.

२. हे सोभरे, तूं चांगलीं स्तोत्रें करून अश्वींच्या रथाची स्तुति कर. तो रथ प्राचीन स्तोत्यासह उत्कर्ष करणारा, स्तुत्य, अनेकांना हवासा वाटणारा, संरक्षक, युद्धांत पुढें जाणारा, सर्वांना सहाय्य करणारा, शत्रूंचा द्वेष करणारा आणि निर्दोष आहे.

३. शत्रूंचा पराभव करणाऱ्या, हवि देणाऱ्याच्या घरीं जाणाऱ्या व स्तुत्य अश्विदेवांना स्तुति करून संरक्षणाकरतां आम्ही आमच्याकडे वळवितों.

४. हे अश्विहो, तुमच्या रथाचें एक चाक स्वर्गांत असतें. सर्वप्रेरक दुसरें चाक तुम्हापाशीं असतें. हे उदकाधिपति अश्विहो, तुमची कृपा आमच्याकडे गाय वासराकडे जाते त्याप्रमाणें धांवत येवो.

५. हे अश्विहो, सारथ्यास बसावयास तीन दांडे असलेला सोनेरी लगामाचा तुमचा लोकविश्रुत रथ द्यावापृथ्वी भूषित करते. त्यानें हे अश्विहो, या.

६. हे अश्विहो, पूर्वीपासून आकाशांत असणारें उदक तुम्ही मनूला देता आणि नांगरानें गहूं नांगरून काढतां. हे उदकाधिपति अश्विहो, त्या तुमचीं मी चांगलीं स्तोत्रें म्हणून स्तुति करतों.

७. हे अन्नधन अश्विहो, यज्ञमार्गांतील तुम्ही आमच्याकडे या. हे पाऊस पाडणारे अश्विहो, तुम्ही त्रसदस्युपुत्र तृक्षीला यज्ञामुळें पुष्कळ धन देऊन प्रसन्न केलेंत. तसें मला करा

८. हे संपत्तीचा वर्षाव करणारे नेते अश्विहो, तुम्हाकरतां दगडांनीं कुटून हा सोम तयार केला आहे. सोम पिण्याकरितां या. आणि दात्यांच्या घरीं सोम प्या.

९. धनवर्षाव करणारे अश्विहो, तुम्ही सोनेरी, रथाच्या मध्यभागीं चढा. आणि आम्हांला विपुल अन्न द्या.

१०. हे अश्विहो, तुम्ही पक्थाचें संरक्षण केलेंत. तुम्ही अध्रिगु आणि खूब करणाऱ्या बभ्रूचें संरक्षण केलेत. तसेंच साहाय्य तुं तात्काल आम्हांस देण्याकरतां ये. व जे रोगी असतील त्यांना औषधपाणी कर.

११. स्थिर बुद्धीनें आम्ही लढाईंत स्थिर असणाऱ्या तुम्हांला प्रातःकालीं स्तुति करून बोलावतों.

१२. हे पाऊस पाडणारे अश्विहो, युद्धांत अग्रेसर असणारे आणि अतिशय मोठे दाते असे नेते अश्वि ज्या साहाय्यानें विहिरींचें पाणी वाढविते झाले, त्याच साहाय्यानें तुम्ही या. आणि त्याच साहाय्यानें सर्वस्तुत्य आणि अनेकरूपी अशा माझ्या स्तुतीमुळें आमचें संरक्षण करण्याकरतां तुम्हीं या.

१३. त्या अश्वींची आम्ही दिवसा नमस्कार करून स्तुति करतों. आणि हवि देऊन धन मागतों.

१४. उदकाचें संरक्षण करणारे आणि भयंकर मार्ग असलेले अश्विदेव आम्ही रात्रीं, दिवसा आणि सकाळीं स्तवितों. हे अन्नधन व रडविणारे अश्विहो, मानव शत्रूंच्या तडाख्यांत आम्हांस देऊं नका.

१५. सेवार्ह अश्विदेवांना मला सुख मिळावें म्हणून सकाळीं पित्याप्रमाणें मी बोलावतों.

१६. हे मनोजव, पाऊस पाडणारे, (शत्रूंची) मस्ती जिरवणारे आणि मित्रांचें रक्षण करणारे अश्विहो, तुह्मा जलद प्राप्त होणाऱ्याच्या साहाय्यानें आमच्या संरक्षणाकरतां या.

१७. हे अत्यंत सोम पिणारे देखणे अश्विहो, आमचें घर घोडे, गाईबैल आणि सोनें यांनीं युक्त करीत या.

१८. हे अन्नधन अश्विहो, स्तोत्यांना आपणहून दिलेलें, सामर्थ्ययुक्त, बलवानांनाहि न लुटतां येणारें असें धन आम्ही प्राप्त करतों तुम्ही आमच्या घरीं आलें असतां आम्ही सर्व प्रकारची संपत्ति मिळवतों.

---

१ टीपः—सूर्याविवाह १०-८५ पहा.

सूक्त तेविसावें.

ऋषिः—विश्वमनस् व्यश्वपुत्र; देवता—अग्नि; छंदः—उष्णिह्.

१. हे स्तोत्या, शत्रूवर चालून जाणाऱ्या अग्नीची तूं स्तुति कर. चहूंकडे धूर पसरलेल्या, महातेजस्वी आणि सर्वज्ञ अग्नीची तूं पूजा कर.

२. हे विश्वद्रष्ट्या विश्वमनस् नामक ऋषे, स्पर्धारहित भक्तांना रथ देणाऱ्या अग्नीची तूं स्तुति कर.

३. शत्रूंना त्रासदायक आणि पूजनीय अग्नि ज्याचें अन्न आणि अन्नरस ग्रहण करतो, त्यांसच जाणून धन देतो. .

४. तेजस्वी, त्रासदायक दाढा असलेल्या, कान्तिमान् आणि भक्तगणाचा आश्रय करणाऱ्या ह्या अग्नीचें नवें तेज उत्पन्न झालें.

५. हे शोभनयज्ञ अग्ने, प्रसिद्ध कान्तीनें प्रकाशणारा, तेजस्वी आणि स्तुति केला जाणारा तूं तेजानें प्रज्वलित हो.

६. हे अग्निदेवा, सतत देवांना हवि पोंचविणारा तूं आमच्या उत्कृष्ट स्तोत्रांसह देवाकडे जा. कारण, तूं देवांच्याकडे हवि वाहून नेणारा दूत आहेस.

७. लोकांचे होम करणाऱ्या तुमच्या प्राचीन अग्नीला मी बोलावतों. त्याची ह्या सूक्तानें मी स्तुति करतों. तुमच्याकरतां त्याचीच मी स्तुति करतों.

८. आश्चर्यकारक कर्मे करणाऱ्या, भक्तांना मित्राप्रमाणें असणाऱ्या, आणि हवि देऊन तृप्त केलेल्या अग्नीप्रत यज्ञ करून यज्ञ करणाऱ्या लोकांच्या इच्छा पूर्ण होतात.

९. हे यज्ञेच्छु भक्तहो, त्या यज्ञाचें साधन आणि यज्ञयुक्त अग्नीची हवीऐवजीं स्तुति करून तुम्ही सेवा करा.

१०. जो आमचे यज्ञ पार पाडतो म्हणून प्रसिद्ध आहे त्या अंगिरसांनीं उत्पन्न केलेल्या अग्नीकडे आमचे नियमबद्ध यज्ञ जावोत.

११. . हे नूतन अग्ने, तुझा तेजस्वी आणि महान् प्रकाश घोड्याप्रमाणें बलिष्ठ आणि कामपूरक आहे.

१२. हे अन्नपते अग्ने, तूं आम्हांला पराक्रमानें धन दे. आमच्या पुत्रपौत्रांचे आणि युद्धांतील संपत्तीचें संरक्षण कर.

१३. मनुष्याचे घरीं लोकसंरक्षक अग्नि जेव्हां हवि देऊन प्रज्वलित केलेला असतो तेव्हां तो सर्व राक्षसांचा नाश करतो.

१४. हे पराक्रमी लोकाधिपते अग्ने, माझें नूतन स्तोत्र ऐकून कपटी राक्षसांना तेजानें जाळून टाक.

१५. जो हवि देणाऱ्या ऋत्विजाकडून अग्नीला हवि देतो त्याच्यावर शत्रूची कपटानेंहि मात चालत नाहीं.

१६. विपुल संपत्ति इच्छिणाऱ्या व्यश्वानें धन देणाऱ्या तुला प्रसन्न केलें. आम्हीहि पुष्कळ धन मिळावें म्हणून तुला प्रज्वलित केलें आहे.

१७. हे अग्ने, कविपुत्र उशना ऋषि मनूकरतां यज्ञ केलेल्या सर्वज्ञ अशा तुला होम करण्याकरतां स्थापिता झाला.

१८. हे अग्ने, सर्व देवांनीं एकत्र होऊन तुलाच आपला दूत केला. हे देवा, तूंच मुख्य यज्ञार्ह झालास.

१९. समर्थ अशा यज्ञ करणाऱ्या माणसानें अमर, शोधक, कृष्णमार्ग आणि महान् अशा अग्नीला देवांकडे जाणारा दूत केला.

२०. हातांत तुपांच्या पळ्या घेतलेले आम्ही सुशोभित, तेजस्वी, लोकांनीं स्तविलेल्या, सदा तरुण आणि प्राचीन अशा अग्नीची स्तुति करतों.

२१. जो मनुष्य ऋत्विजांकडून अग्नीला आहुति देतो त्याला पुष्कळ धन आणि पुत्रपौत्रांसह कीर्ति प्राप्त होते.

२२. देवांतील मुख्य, सर्वज्ञ आणि प्राचीन अशा अग्नीकडे हविर्युक्त पळी स्तोत्रासह जाते.

२३. व्यश्वाप्रमाणें आम्ही तेजस्वी अग्नीची उत्कृष्ट स्तोत्रें म्हणून स्तुति करतों.

२४. हे व्यश्वपुत्र विश्वमनस् नामक ऋषे, स्थूरयूप ऋषीप्रमाणें स्तोत्रें म्हणून घरांत स्थापन केलेल्या थोर अग्नीची तूं आतां स्तुति कर.

२५. भक्त, मनुष्यांना अतिथीप्रमाणें पूज्य असणाऱ्या वनस्पतिपुत्र प्राचीन अग्नीची, आपलें संरक्षण व्हावें म्हणून स्तुति करतात.

२६. हे अग्ने, सर्व महान् स्तोत्रकर्त्यांच्यामध्यें स्तोत्र चालू असतां तूं बैस. तसेंच लोकांचे हवि भक्षण करण्याकरतां तूं बैस.

२७. हे अग्ने, तूं उत्कृष्ट संपत्ति आम्हांस दे. तसेंच सामर्थ्य, कीर्ति आणि पुत्रपौत्र यांनीं युक्त धन तूं आम्हांस दे.

२८. हे सर्वव्यापक तरुण अग्ने, तूं चांगलें साम म्हणणाऱ्या सर्व लोकांना नेहमीं धन दे.

२९. हे अग्ने, तूंच धन देणारा आहेस. गाईबैल, अन्न आणि विपुल संपत्ति आम्हांस दे.

३०. हे अग्ने, तूं कीर्तिमान् आहेस. सत्यनिष्ठ, सुशोभित, आणि शुद्धबल अशा मित्रावरुणांना तूं येथें आण.

---

३० टपि:—यज्ञकर्मांत बहुतेक ठिकाणीं अग्नि मित्रावरुणासहित असतो.

सूक्त चोविसावें.

ऋषिः—१ ते २७ विश्वमनस् व्यश्वपुत्र, २८ ते ३० वरु सौषम्ण; देवता—१ ते २७ इंद्र, २८ ते ३० वरुदानस्तुति; छंदः—१ ते २९ उष्णिह्, ३० अनुष्टुभ्.

१. हे ऋत्विज्‌हो, मित्रभूत असणारे आम्ही वज्रधारी इंद्राकरतां स्तोत्र म्हणतों आहोंत. तुमच्याकरतां शत्रूवर चालून जाणाऱ्या इंद्राची मी स्तुति करतों.

२. हे इंद्रा, तूं बलानें प्रसिद्ध आहेस. वृत्राला ठार केल्यानें तुझीं वृत्रहा म्हणून प्रसिद्धी झाली आहे. हे शूरा, तूं धनवानांना अधिक धन देतोस.

३. हे अश्वयुक्त इंद्रा, जो तूं आयुध उपसल्याबरोबर शत्रू नष्ट करतोस आणि धन देतोस, तो स्तुति केला जाणारा तूं अनेक प्रकारच्या अन्नांनीं सहित धन आम्हांस दे.

४. हे इंद्रा, प्रिय असणारें धन आम्हांला दे. हे सहनशील इंद्रा, स्तुति केला जाणारा तूं धैर्यासह आम्हांस धन दे.

५. हे अश्वयुक्त इंद्रा, गाई शोधीत असतां त्रासदायक व मूर्ख शत्रू तुझा डावा व उजवा हात निवारण करूं शकत नाहींत.

६. हे वज्रधारी इंद्रा, गोपाळ गाईसह गोठ्यांत जातो त्याप्रमाणें स्तुति करीत मी तझ्याकडे येतो. तूं स्तोत्याची इच्छा आणि मन पूर्ण कर.

७. हे वृत्रहन्त्या, उग्र, धन देणाऱ्या आणि सर्वगामी इंद्रा, विश्वमनस्‌चीं सर्व स्तोत्रें आणि कर्में ध्यानांत घे.

८. हे अनेकांनीं स्तविलेल्या वृत्रहन्त्या शूर इंद्रा, तरुण, सुखदायक आणि स्पृहणीय अशा तुझ्यापासून आम्हांस हें धन प्राप्त व्हावें.

९. हे (सर्व जगाला) नाचविणाऱ्या इंद्रा, तुझें सामर्थ्य जसें टिकाऊं आहे तसें हवि देणाऱ्याला प्राप्त होणारी संपत्तिहि टिकाऊं असो.

१०. हे महापूज्य मनुष्यश्रेष्ठ इंद्रा, सामर्थ्य प्राप्त होण्याकरतां सोम पी. हे धनवन्ता, धनप्राप्तीकरतां शत्रूंचीं बळकटहि नगरें फोड.

११. हे वज्रधारी इंद्रा, तुझ्याहून दुसरीकडे आमच्या इच्छा पूर्वीं गेल्या होत्या, पण आतां तुझ्या साहाय्यासह संपत्ति आम्हांस दे.

१२. हे जगाला नाचवणाऱ्या (खेळवणाऱ्या) स्तुत्य इंद्रा, अन्न, धन आणि तेजस्वी कीर्ति तुझ्याशिवाय दुसऱ्याकडून आम्हांस मिळणार नाहीं.

१३. हे ऋत्विजहो, इंद्राकरतां सोम पिळा. इंद्र मधुर सोमरस पिवो. इंद्र आपल्या सामर्थ्यानें अन्नासह धन स्तोत्यांना देतो.

१४. काळसर घोड्यांचा धनी आणि बल देणाऱ्या इंद्राची मी स्तुति करतों. स्तुति करणाऱ्या व्यश्वाची आतां हे इंद्रा, तूं स्तुति ऐक.

१५. हे इंद्रा, तुझ्यापेक्षां पराक्रमी पूर्वीं कोणी जन्मास आला नाहीं. तसेंच धनवान्, रक्षण करणारा आणि स्युत्यहि तुझ्यापेक्षां अधिक कोणी नाहीं.

१६. हे अध्वर्यो, तूं उत्कर्षशील व मदकर सोमाचा मधुर रस इंद्राकरतां पीळ. इंद्राचीच स्तुति केली जात आहे.

१७. हे घोड्यावर बसणाऱ्या इंद्रा, तुझी पूर्वीच्यांनीं केलेली स्तुति कोणीहि आपल्या सामर्थ्यानें किंवा स्तुतीनें मागें टाकीत नाहीं.

१८. स्थिर बुद्धीच्या लोकांकडून केल्या जाणाऱ्या यज्ञांनीं उत्कर्षशील अन्नपति इंद्राला आम्ही बोलावतों आहो.

१९. हे मित्रहो, तुम्ही लवकर या. जो एकटाच सर्व शत्रूंचा पराभव करतो त्या लोकनायक व प्रशंससनीय इंद्राची आपण स्तुति करूं या.

२०. हे ऋत्विजहो, स्तुति करणाराचा नाश न करणाऱ्या आणि स्तुति इच्छिणाऱ्या इंद्राची नाटनेटकी आणि तूप किंवा मध यापेक्षांहि मधुर असणारी स्तुति तुम्ही करा.

२१. ज्याचे पराक्रम अमर्याद आहेत, ज्याचें धन शत्रूला प्राप्त होणें शक्य नाहीं, आणि आकाशाप्रमाणें ज्यानें दिलेलें धन सर्वांना मागें टाकतें.—

२२. हे विश्वमनस्, तूं त्या शत्रूला हार न जाणाऱ्या बलवान् आणि नियमबद्ध इंद्राची व्यश्वाप्रमाणें स्तुति कर. तो श्रेष्ठ इंद्र हवि देणाराला उत्कृष्ट घर देतो.

२३. हे व्यश्वपुत्र विश्वमनस्, मनुष्याच्या शरीरांतील दहावा, स्तुत्य, ज्ञाता आणि पुनः पुनः नमस्कार्य इंद्राची तुम्ही स्तुति करा.

२४. (आतां ऋषि इंद्राला उद्देशून म्हणतो) हे वज्रहस्ता इंद्रा, तूं पक्षांना दररोज सूर्य घराबाहेर उडवतो त्याप्रमाणें त्रासदायक शत्रूंना दूर कसें करावें हें जाणतोस.

२५. हे दर्शनीय इंद्रा, कर्म करणाऱ्या यजमानाचें ज्यायोगें संरक्षण केलेंस आणि कुत्साकरतां दोन प्रकारें तूं शत्रूचा ज्यायोगें वध केलास तें साहाय्य तूं आम्हांस दे.

२६. हे देखण्या इंद्रा, स्तुत्य अशा तुझी आम्ही द्रव्याकरतां प्रार्थना करीत आहोंत. तूं आमच्या सर्व शत्रूंचा पराभव करणारा आहेस.

२७. जो राक्षसांच्या त्रासापासून मुक्त करतो, जो सप्तसिंधुप्रान्तांतील लोकांस धन देतो, तो तूं हे धनवन्ता, दासाचा नाश करणारें आयुध फेंक.

२८. (येथून वरूच्या दानाची स्तुति) हे वरो, सुषामन् करतां तूं याचना करणारांना धन दिलेंस. तसेंच तूं व्यश्वपुत्र आम्हांलाहि दे. हे भाग्यशालिनी व अन्नवती उषे, तूं आम्हांस धन दे.

२९. (ऋषीला धन प्राप्त झालें) मनुष्यश्रेष्ठ वरूची दक्षिणा सोमयुक्त व्यश्वांना प्राप्त झाली. शेंकड्यांनीं हजारांनीं अन्न आम्हांस मिळालें.

३०. (उषसूला उद्देशून म्हणतो) कोठें म्हणून विचारले जाणारे हे उषे, जेव्हां तुला कोणी यज्ञ करणारा वरु कोठें आहे म्हणून विचारील, तेव्हां तूं हा शत्रूंचें निवारण करणारा दारें उघडीं टाकून गोमती नदीच्या तीरावर आहे असें सांग.

सूक्त पंचविसावें.

ऋषिः—विश्वमनस् व्यश्वपुत्र; देवता–१०. ११. १२ विश्वेदेव, अवशिष्ट मित्रावरुण; छंदः—उष्णिह.

१. हे मित्रावरुणहो, सर्वांचे संरक्षक, तेजस्वी, देवामध्यें यज्ञार्ह अशा रीतीनें प्रसिद्ध असणारे तुम्ही दोघे आहांत. हे विश्वमनस्, सत्ययुक्त आणि खरे सामर्थ्यवान् अशा मित्रावरुणांची तूं पूजा कर.

२. धन देणारे, रथयुक्त, सुजन्मे, कर्तृत्ववान्, पृथ्वीपासून उत्पन्न झालेले आणि नियमित अशा मित्रावरुणांची तूं पूजा कर.

३. सर्वधन व तेजस्वी अशा मित्रावरुणांना सत्यनिष्ठ आणि महान् अदितीनें असुरांना ठार मारण्याकरतां उत्पन्न केलें.

४. तेजस्वी, महान्, बलवान् आणि सत्यनिष्ठ मित्रावरुण महान् यज्ञांत रतविले जातात.

५. महान् सामर्थ्याचे नातु, वेगाचे पुत्र, कर्तृत्ववान् आणि दाते मित्रावरुण अन्नाच्या आगरांत राहतात.

६. हे मित्रावरुणहो, जे तुम्ही आम्हांला धन देतां, ते तुम्ही आम्हांस स्वर्ग, अन्तरिक्ष आणि पृथ्वीवरील विविध अन्न द्या. तुम्ही पाऊस पाडा.

७. सत्ययुक्त, तेजस्वी आणि हविःप्रिय मित्रावरुण बैल गाईंच्या तांड्याकडे पहातो, त्याप्रमाणें देवाकडे पहात असतो.

८. सत्यनिष्ठ आणि कर्तृत्ववान् मित्रावरुण सर्वांवर राज्य करण्याकरतां बसले आहेत. नियमित आणि बलवान् असणारे मित्रावरुण सामर्थ्याचे अधिपति आहेत.

९. डोळ्याच्याहि पूर्वीं मार्ग जाणणारे, सर्वांना जागृत करणारे आणि प्राचीन मित्रावरुण शान्त तेजानें सन्मान्य आहेत.

१०. देवी अदिति आमचें संरक्षण करो. दोघे अश्विदेव आमचें संरक्षण करोत. अतिशय वेगशाली मरुत् आमचें संरक्षण करोत.

११. हे दाते मरुतहो, सुरक्षित असणारे तुम्ही आमची (यज्ञरूपी) नौका रात्रंदिवस सुरक्षित ठेवा. तुमचें साहाय्य आम्हाला नेहेमीं असावें.

१२. सुरक्षित असणारे आम्ही दात्या आणि संरक्षक विष्णूची स्तुति करतों. हे आपणहून (धन) देणाऱ्या विष्णो, कर्म आरंभलेल्या भक्ताकरतां तूं स्तुति ऐक.

---

२३ टीपः—शरीरांत नऊ प्राण आहेत आणि दहावा इंद्र आहे. या अर्थाचा मंत्र पुढीलप्रमाणें आहेः—
नव वै पुरुषे प्राणा मनुष्येषु वर्तमाना इंद्रस्तेषां दशधा भवतींद्रस्यात्मानं दशधा चरन्तम् ।

१३. मित्र, अर्यमा आणि वरुण ज्या धनाचें संरक्षण करतात, तें श्रेष्ठ, सर्वांचें रक्षण करणारे आणि सर्वांना इष्ट असणारें धन आम्ही इच्छितों.

१४. पाण्याचा प्रवाह आमचें धन संरक्षण करो. मरुत्, अश्विन्, इंद्र आणि विष्णु हे सर्व कामपूरक आणि एकत्र असलेले देव आमचें धन संरक्षण करोत.

१५. जोरानें वाहणाऱ्या पाण्याप्रमाणें, भजनीय असणारे नेते देव जोरानें जाऊन कोणत्याहि शत्रूंचा नाश करतात.

१६. लोकसंरक्षक हा एक मित्र अनेक महत्त्वाचे पदार्थ असें असे म्हणून पहातो. त्या मित्राचीं कर्मे आम्ही तुमच्याकरतां करतों.

१७. सर्वांवर सत्ता चालवणाऱ्या प्रसिद्ध अशा वरुणाचीं पुरातन कालपासून चालत आलेलीं कृत्यें आम्हीं करतों. तसेंच मित्राचींहि करतों.

१८. जो मित्र आपल्या तेजानें द्यावापृथ्वींच्या आंतील भाग प्रकाशित करतो तोच द्यावापृथ्वींना आपल्या तेजानें भरून टाकतो.

१९. तो सर्वप्रेरक मित्र आपलें तेज आकाशांत प्रकट करतो. नंतर तो अग्निप्रमाणें प्रज्वलित आणि स्वच्छ असा सर्वांनीं बोलावला जातो.

२०. हे स्तोत्या, तूं मोठा मंडप घातलेल्या यज्ञांत (मित्रावरुणांची) स्तुति कर. तो वरुण सर्व पशु संपत्तीचा धनी आहे, तसेंच विपुल अन्नाचा दाता आहे.

२१. सर्वप्रेरक वरुणाचें सामर्थ्य मी द्यावापृथ्वींत रात्रंदिवस वर्णन करीत असतों. तूं नेहमीं आम्हांला दात्यांच्या पुढें कर.

२२. (सुषामन्चा मुलगा वरु यानें दिलेल्या दानाची स्तुति विश्वमनस् करीत आहे.) उक्षाच्या वंशांतील मोठ्या लुटी मिळवणारा सुषामन्पुत्र वरु दान देत असतां आम्ही चालावयास हलका असा जोडलेला चांदीचा रथ मिळविला.

२३. पिंगट घोड्यामध्यें पराक्रमी आणि युद्धांत लढवय्याला नेणारे ते घोडे मला मिळाले.

२४. सुंदर, लगाम घातलेले असे दोन चलाख घोडे त्या थोर वरूपासून स्तुति करीत असतां एकदम मला मिळाले.

सूक्त साव्विसावें.

ऋषिः—व्यश्व, वैयश्व, किंवा विश्वमनस् आंगिरस; देवता–१ ते २० अश्विन्; २१ ते २५ वायु; छंदः—१६ ते १९ व २१–२५ गायत्री,२० अनुष्टुभ्, अवशिष्ट उष्णिह्.

१. हे अतुलबलशाली,कामपूरक आणि संपत्तीचा वर्षाव करणारे अश्विहो, तुमची स्तोत्यामध्यें बसून सर्वांसह स्तुति करण्याकरतां(तुम्ही लवकर यावें म्हणून) रथाला मी बोलावतों.

२. (ऋषि वरूला म्हणतो) हे संपत्तीचा वर्षाव करणारे कामपूरक आश्विहो, तुम्ही सुषामन्ला विपुल धन देण्याकरतां जसे पूर्वीं आला होता तसें माझ्याकडे धन देण्याकरतां तुम्ही यावेत असें हे वरो, तूं म्हण.

३. हे अन्नधन आश्विहो, विपुल अन्नाची इच्छा करणाऱ्या तुम्हांला प्रातःकालीं अन्नासह आम्ही बोलावतों.

४. हे सर्वनायक आश्विहो, तुमचा तो वाहून आणणारा प्रसिद्ध रथ येवो. स्तोत्यांचीं स्तोत्रें संपत्ति देणारीं आहेत हें ध्यानांत घ्या.

५. हे धनाचा वर्षाव करणारे आश्विहो, कपटी शत्रूंना ध्यानांत घ्या. हे भयानक आश्विहो, तुम्हीच द्वेष करणाऱ्या शत्रूंचा नाश करा.

६. दर्शनीय कर्मांनीं प्रसन्न होणारे, कान्तिमान् आणि उदकाधिपति असे तुम्ही वेगानें सारखे आमच्याच यज्ञांत या.

७. हे आश्विहो, सर्वपोषक धनासह तुम्ही आम्हाकडे या. तुम्ही धनवान्, सामर्थ्यवान् आणि अच्युत आहांत.

८. हे इंद्र आणि आश्विहो, सर्वांसह असणारे तुम्ही माझ्या या यज्ञांत सर्व देवांसह या.

९. धन देणाऱ्या तुम्हाला व्यश्वाप्रमाणें आम्ही बोलावतों. हे बुद्धिमान् आश्विहो, आमच्यावर कृपा करीत तुम्ही या.

१०. हे ऋषे, तूं अश्वींची स्तुति कर. तुझी स्तुति ते आश्वि अनेकवार ऐकोत. ते जवळच्या शत्रूंना आणि पणींना ठार करोत.

११. हे नेते आश्विहो, वैयश्वाचें स्तवन तुम्ही ऐका. ह्या माझें स्तवन लक्षांत घ्या. मित्र, वरुण आणि अर्यमा हे एकत्र होऊन आम्हांला धन देवोत.

१२. हे स्तुत्य आणि कामपूरक अश्विहो, तुम्ही स्तोत्यांना दिलेलें किंवा घेतलेलें सर्व धन दररोज आम्हांस द्या.

१३. वस्त्रानें झांकलेल्या स्त्रीप्रमाणें जो तुमच्या यज्ञांनीं वेष्टिलेला असतो त्याचें पूज्य अश्विदेव कल्याण करतात.

१४. हे अश्विहो, तुम्हाला पिण्याला योग्य व भरपूर सोम जो देऊं जाणतो त्या आम्हांवर कृपा असलेले तुम्ही आमच्या घरीं या.

१५. हे धनाचा वर्षाव करणारे अश्विहो, उत्कृष्ट सोम पिण्याकरतां तुम्ही आमच्या घरीं या. बाणानें हरीण जसा इष्ट स्थलीं नेला जातो तसे तुम्ही स्तुतीनें यज्ञांत आणले जाता.

१६. हे नेते अश्विहो, स्तोत्रांतील माझें स्तोत्र दूताप्रमाणें तुम्हांला बोलावतें आहे. तें तुम्हांला प्रिय होवो.

१७. हे अश्विहो, आकाशांत जरी तुम्ही आनंदांत असाल, जरी तुम्ही भक्ताच्या घरीं प्रसन्न असाल, तरी अमर असणारे अश्विहो, तुम्ही माझें स्तोत्र ऐका.

१८. (विश्वमनस् ऋषीनें श्वेतयावरी नदीच्या तीरीं अश्वींची स्तुति केली.) सुवर्णमय असणारी पाझरणारी ही श्वेतयावरी नदी नद्यामध्यें तुम्हाकडे येणारी आहे.

१९. हे प्रकाशन जाणणारे अश्विहो, कीर्तिमान्, स्वच्छ, पोषक अशा ह्या नदीनें तुमचें चांगल्या प्रकारें स्तवन केलें आहे.

२०. हे वायो, रथाला योग्य घोडे तूंच जोड. हे शत्रूंचा पराभव करणाऱ्या, उत्तेजित केलेले घोडे युद्धाच्या गर्दींत घेऊन चल. हे वायो, नंतर आमचा मधुर सोम पी. आणि म्हणूनच आमच्या यज्ञाच्या तीनहि वेळीं ये.

२१. हे यज्ञपते, त्वष्ट्र देवाचा जांवई असणाऱ्या व आश्चर्यकारक वायो, तुझ्या सहाय्याची आम्ही इच्छा करतों.

२२. त्वष्ट्याचा जांवई आणि सर्वश्रेष्ठ असणाऱ्या वायूकरतां सोम पिळणारे आम्ही त्याच्याजवळ धन मागतों. त्या धनानें आम्ही संपत्तिमान् होऊं.

२३. हे वायो, तूं स्वर्गाला सुस्थिर ठेव. तूं चांगले घोडे जोडलेला रथ आण आणि थोर असणारा तूं (त्यापेक्षांही) बलिष्ठ दोन घोडे जोड.

२४. हे वायो, रूपवान् आणि मोठेपणानें परिपूर्ण अशा तुला आम्ही सोम कुटण्याच्या दगडाप्रमाणें स्तुति करून यज्ञांत बोलावतों.

२५. हे वायुदेवा, देवांतील मुख्य आणि प्रसन्न असणारा तूं आम्हांला अन्नपाणी देऊन यज्ञ करव.

सूक्त सत्ताविसावें.

ऋषिः—मनु विवस्वत्पुत्र; देवता–विश्वेदेव; छंदः—१.३.५.७.९.११.१३.१५.१७.१९.२१ बृहती २.४.६.८.१०.१२.१४.१६.१८.२०.२२. सतोबृहती.

१. (मनु प्रार्थना करतो.) प्रशंसनीय यज्ञांत पुढें स्थापन केलेला अग्नि, सोम कुटण्याचे दगड आणि दर्भ आहेत, तेथें मरुत्, ब्रह्मणस्पति आणि इतर देव यांना स्तुति करून सर्वत्र माझें रक्षण करावें अशी मी प्रार्थना करतों.

२. हे स्तोत्या, आमच्या यज्ञांत तूं पशु, स्थान, अरणी आणि औषधी यांची सकाळीं आणि रात्रीं स्तुति कर. हे सर्वधन आणि सर्वत्र असणारे सर्व देवहो, तुम्ही आमच्या कर्मांचे संरक्षणकर्ते व्हा.

३. पुरातन कालापासून चालू असणारा आमचा यज्ञ, अग्नि आणि सर्व देवाकडे जावो. आदित्याकडे, सत्ताधारी वरुणाकडे आणि सर्व प्रकाशक मरुतांकडे जावो.

४. सर्वधन व शत्रुहिंसक असे सर्व देव मनुष्याचा उत्कर्ष करणारे होवोत. हे सर्वधन देवहो, संरक्षक मदतीसह तुम्ही आम्हांस चोराचें भय नसलेलें घर द्या.

५. एकचित्त आणि एकत्र झालेले सर्व देव आमच्या स्तुतियुक्त ऋचांनीं आम्हांकडे येवोत. हे मरुत्हो आणि हे थोर देवि अदिति, तूं आमच्या राहण्याच्या घरीं ये.

६. हे मरुत्हो, आम्हांला आवडणारे घोडे घेऊन या. हे मित्रा, आमचें हवि खाण्याकरतां या. इंद्र, वरुण आणि त्वराशील नेते आदित्य आमच्या यज्ञांत येवोत.

७. हे वरुणा, दर्भ तोडणारे, हवि तयार केलेले, सोम पिळलेले आणि अग्नि प्रज्वलित केलेले आम्ही तुला मनूप्रमाणें सारखे बोलावीत आहोंत.

८. हे मरुत्, विष्णो, अश्विन् आणि पूषन्हो, आम्ही केलेल्या स्तवनानें तुम्ही या. जो स्तोत्यांकडून वृत्रहन्ता म्हणून वर्णन केला जातो तो देवांतील मुख्य असा कामपूरक इंद्र प्राप्त होवो.

९. हे द्रोहरहित देवहो, हे शत्रुनिवारक देवहो, ज्याला दुरून किंवा जवळून कोणी त्रास देऊं शकत नाहीं असें अखंड घर आम्हांला द्या.

१०. हे हिंसकांचा नाश करणारे देवहो, तुम्ही आमचे सजातीय आणि बांधव आहांत. तुम्हीं प्रथम अभ्युदय आणि नूतन धन आम्हांला ताबडतोब द्या.

११. हे सर्वधन देवहो, अन्नेच्छु असा मी तुमच्यापासून उत्कृष्ट धन प्राप्त व्हावें म्हणून आतां नवीनच स्तोत्र करतों.

१२. हे सुस्तुत मरुत्‌हो, तुमच्यापैकीं श्रेष्ठ सूर्य जेव्हां उदय पावतो तेव्हां इच्छुक असणारे मनुष्य, पशु आणि पक्षी सर्वच कामाला लागतात.

१३. उत्कृष्ट स्तोत्रानें स्तुति करणारे आम्हीं तुमच्यापैकीं देवश्रेष्ठाला रक्षणाकरतां आणि इष्टसिद्धीकरतां बोलावतों.

१४. समान विचाराचे सर्व देव मला मनूला एकदम बल देवोत. ते देव आज, फार काय नेहमीं आम्हांला धन देवोत. ते आमच्या मुलाबाळांना धन देणारे असोत.

१५. हे द्रोहरहित देवहो, स्तोत्रें चालूं असलेल्या यज्ञांत मी तुमची स्तुति करीत आहें. हे मित्रावरुणहो, जो मनुष्य तुमच्या तेजांना हवि अर्पण करतो त्या मनुष्याला त्रास होत नाहीं.

१६. हे मरुदादि देवहो, जो मनुष्य संपत्ति मिळण्याकरतां तुम्हांला हवि देतो, तो आपल्या घराचा उत्कर्ष करतो आणि तोच विपुल अन्न प्राप्त करतो. धर्माचरण केल्यामुळें संतति वगैरेंनीं त्याचा उत्कर्ष होतो, आणि सर्व लोक सुरक्षित राहून उत्कर्ष पावतात.

१७. एकमतानें धन देणारे अर्यमा, मित्र आणि वरुण ज्याचें संरक्षण करतात, तो युद्धाशिवाय धन प्राप्त करतो आणि चांगल्या घोड्यांच्या साहाय्यांनीं मार्ग आक्रमण करतो.

१८. हे देवहो, ह्या मनूकरतां पराभव न करतां येणाऱ्या शत्रूवरहि तुम्ही चालून जा आणि किल्यावरहि व्यवस्थितपणें हल्ला चढवा. हें वज्र मनूपासून नेहमीं दूर असो. आम्हाला त्रास न देतांच वज्र नष्ट होवो.

१९. हे बलप्रिय देवहो, जेव्हां सूर्य उगवतो; तेव्हां तूं आम्हांस घर दे. तसेंच हे सर्वधनहो, जेव्हां सर्य अस्ताला जातो किंवा माध्यान्हकाळीं—

२०. हे बलशाली देवहो, तुम्हीं जेव्हां यज्ञांत येतां तेव्हां यज्ञ करून हवि देणारांना तुम्ही घर देतां. हे सर्वव्यापक विपुल संपत्तिमान् देवहो, तुम्हीं दिलेल्या घरामध्यें मी तुमची पूजा करीन.

२१. हे सर्वधन देवहो, सकाळीं, दुपारीं आणि संध्याकाळीं हवि देणाऱ्या मनूला तुम्हीं उत्कृष्ट धन देतां.

२२. तेव्हां हे तेजस्वी देवहो, तुम्हांपासून मुलाप्रमाणें अनेकांना उपभोग घेतां येणारी संपत्ति प्राप्त करूं. ज्यामुळें आम्हीं धनवान् होऊं असें धन हे आदित्यहो, हवि देणारे आम्हीं प्राप्त करूं.

सूक्त अठ्ठाविसावें.

ऋषिः—मनु; देवता–विश्वेदेव; छंदः–४ पुर उष्णिह्, अवशिष्ट गायत्री.

१. मनु म्हणतो—जे तेहतीस देव आहेत ते आमच्या यज्ञांत दर्भांवर बसोत, आम्हाला जाणोत आणि आम्हाला पुनः पुनः धन देवोत.

२. वरुण, मित्र, अर्यमा, यजमान, देवपत्न्यासहित अग्नि, आणि वषट्कार—

३. हे देव सर्व लोकांसह सर्व बाजूंनीं आमचें संरक्षण करोत.

४. देव जशी इच्छा करतात तसें होतें. ह्या देवांची इच्छा कधींहि मोडली जात नाहीं. इच्छा केल्यावर न देणाराहि मनुष्य हवि देतो.

५. सात मरुतांचीं सात आयुधें, सात अलंकार वेगवेगळे आहेत. हे सात मरुत् सात प्रकारची शोभा धारण करतात.

---

५. टीपः—सात मरुत् १–११४–६ पहा.

सूक्त एकोणतिसावें.

ऋषिः—कश्यप मरीचिपुत्र, किंवा मनु वैवस्वत; देवता—विश्वेदेव; छंदः—विराज्.

१. पोषक, सर्वगामी, रात्रीचा मार्गदर्शक असा चंद्र सोन्याचे अलंकार धारण करतो.

२. सर्व देवामध्यें तेजस्वी आणि बुद्धिमान् असा एक अग्नि आपल्या स्थानीं बसतो.

३. देवामध्यें (युद्धांत) अढळ राहणारा त्वष्टृदेव हातांत पोलादी कुऱ्हाड धारण करतो.

४. इंद्र हातांत वज्र धारण करतो व त्यानें राक्षसांना ठार करतो.

५. उग्र आणि तेजस्वी असा सुखकारक औषधें देणारा रुद्र हातांत तीक्ष्ण हत्यार धारण करतो.

६. पूषन् देव चोराप्रमाणें मार्गावर नजर ठेवतो आणि हा पृथ्वीवरील ठेवे जाणतो.

७. जेथें देव आनंदित असतात ते तीनाहि लोक हा अनेकांनीं स्तुति केलेला विष्णु आक्रमण करतो.

८. दोन अश्वि घोड्यांच्या साहाय्यानें हिंडत आहेत. आपल्या एका स्त्रीसह (सूर्येसह) दोन प्रवाश्यांप्रमाणें ते फिरत आहेत.

९. अत्यंत तेजस्वी आणि तुपाची आहुति दिलेले दोघे मित्रावरुण एकसारखे असून स्वर्गांत राहतात.

१०. कांहींना चांगलें सामगायन आवडतें. पूज्य असणारे ते त्या सामगायनानें सूर्याला प्रकाशित करतात.

टीपः—ह्या सूक्तांत प्रत्येक ऋचेंत देवतांच्या खुणेसारखा एक शब्द वापरला आहे. त्यावरून त्या देवतेला उद्देशून तो मंत्र आहे असें समजावयाचें. शेवटल्या ऋचेची देवता मात्र एक नसून अनेक अनिश्चित देवता घ्याव्या लागतात.

सूक्त तिसावें.

ऋषिः–मनु वैवस्वत; देवता–विश्वेदेव; छंदः–१ गायत्री, २ पुरउष्णिह्, ३ बृहती, ४ अनुष्टुभ्.

१ देवहो, तुमच्यामध्यें कोणी बालक नाहीं, आणि तुमच्यामध्यें कोणी कुमारहि नाहीं, तुम्ही सर्वच थोर आहांत.

२. हे शत्रूंचा नाश करणारे मनूचे यज्ञार्ह देवहो, तुम्ही तेहतीस आहांत, तुमची मी स्तुति करीत आहे.

३ हे देवहो, तुम्ही आम्हाला संकटांतून तारा. आमचें संरक्षण करा. आम्हाला तुम्ही श्रेष्ठ व्हा असें म्हणा. आम्हांला वडिलार्जित मनूच्या मार्गावरून दूर करूं नका. आम्हांला लांबच्या मार्गानें नेऊं नका.

४. हे देवहो, जे अग्निमुख देव आहेत ते सर्व यज्ञांत येवोत तुम्ही आम्हांला उत्कृष्ट सुख द्या. आमच्या जनावरांना सुख द्या.

सूक्त एकतिसावें.

ऋषिः—मनु वैवस्वत; देवता-१ ते ४ यज्ञयजमानप्रशंसा, ५-९ दंपतीप्रशंसा, १० ते १८ दंपत्योराशिषः; छंदः—९-१४ अनुष्टुभ्, १५ ते १८ पंक्ति, १० (पाद) निचृत, अवशिष्ट गायत्री.

१. जो एकदां यज्ञ करतो तो (फलप्राप्ति झाल्यामुळें) पुनः यज्ञ करतोच. तो सोम काढतो, हवि शिजवितो आणि इंद्राचींच स्तोत्रें पुनः पुनः म्हणूं इच्छितो.

२. जो यजमान ह्या इंद्राला पुरोडाश आणि मिसळ न केलेला सोम देतो त्याचें तो संकटांतून रक्षण करतोच.

३. त्याचा देवप्रेरित तेजस्वी रथ (यज्ञरूपानें) येतो. त्यामुळें तो शत्रूंनीं उत्पन्न केलेलीं संकटें दूर करीत उत्कर्ष पावतो.

४. प्रजा आणि पशु या रूपानें टिकाऊ संपत्ति ह्या यजमानाच्या घरीं दररोज दिली जाते.

५. हे देवहो, जे सारख्या विचाराचे नवराबायको सोमरस तयार करतात आणि दुधांत मिसळून देतात—

६. त्यांना विपुल अन्न मिळते, तेच चांगले यज्ञ करतात त्यांना अन्नाचा तुटवडा कधींहि पडत नाहीं.

७. हे नवराबायको देवाशीं लबाडी करीत नाहींत. सद्बुद्धीला दडपून टाकीत नाहींत आणि चांगल्या अन्नानें देवाची सेवा करतात.

८. पोरबाळांनीं युक्त व संपत्तिमान् होऊन ते शंभर वर्षें जगतात.

९ यज्ञप्रिय, हवि देणारे आणि धन देणारे नवराबायको वंशवृद्धीकरतां संभोग करतात आणि देवांची सेवा करतात.

१०. आम्ही पर्वतांचें, आणि नद्यांचें आणि देवांसहित असणाऱ्या विष्णूचें जें सुख आहे तें इच्छितों.

११. धन देणारा भग आणि सर्वाधार पूषा यांचें कल्याण करो. तसेंच मार्ग विस्तृत व सुरक्षित असो.

१२. पूषन् देवावर श्रद्धा ठेवल्यानेंच त्याची पूर्ण स्तुति केल्यासारखें होतें. अदितिपुत्रांना उद्देशून दिलेलें दान शुद्धच असतें.

१३. मित्र, अर्यमा आणि वरुण हे आमचें संरक्षण करतील असे यज्ञाचे मार्ग सुगम होवोत.

१४. हे देवहो, तुमच्यांतील मुख्य अग्निदेवाची स्तोत्रें म्हणून मित्राप्रमाणें यज्ञसाधक अग्नीची स्तोते स्तुति करतात.

१५. शूर कोणच्याहि सेनेंत शिरतो त्याप्रमाणें देवभक्ताचा रथ कुठेंहि जातो. जो यजमान मनानेंच केवळ देवांचें पूजन करतो तो नास्तिकाचा पराभव करतो.

१६. हे यज्ञ करणाऱ्या, तुझा नाश होणार नाहीं. हे सोम तयार करणाऱ्या, तझा उत्कर्ष होईल. हे देवभक्ता, जो देवांची आराधना करूं इच्छितो, तो यज्ञ न करणारांचा पराभव करतो.

१७. जो यजमान देवांची मनानें पूजा करूं इच्छितो त्याचा कोणीहि नाश करीत नाहीं. तो स्थानभ्रष्ट होत नाहीं. तो यज्ञ न करणाऱ्यांचा पराभव करतो.

१८. जो यजमान देवांची मनानें स्तुति करूं इच्छितो त्याला पराक्रमी पुत्र प्राप्त होतात. त्यालाच लाख घोडे प्राप्त होतात. आणि तो यज्ञ न करणारांचा पराभव करतो.

सूक्त बत्तिसावें.

ऋषिः—मेधातिथि काण्व, देवता --इंद्र; छंदः—गायत्री.

१. हे कण्वांनो, सोम यज्ञांत इंद्राला प्रसन्न करण्याकरतां स्तोत्रें म्हणा.

२. पाण्याला प्रेरणा करणाऱ्या उग्र इंद्रानें सृबिंद, अनर्शनि, पिप्रु, दास आणि अहीशु यांना ठार केलें.

३. हे इंद्रा, मोठ्या मेघाला तूं तोंड पाडतोस आणि मोठा पराक्रम करतोस

४. हे स्तोतेहो, तुमचीं स्तोत्रें ऐकण्याकरतां आणि सहाय्याकरतां, तान्हेलेला मनुष्य मेघाला पाणी मागतो त्याप्रमाणें शत्रूवर चालून जाणाऱ्या सुंदर इंद्राला मी बोलावतों.

५. हे शूर इंद्रा, लोकप्रसिद्ध असा तूं प्रसन्न झालास म्हणजे सोम देणाऱ्याकरतां शत्रूंचीं शहरें उध्वस्त करतोस, त्याप्रमाणें गाईबैल व घोडे यांचे वाडे मोकळे करतोस. (देतोस)

६. हे इंद्रा, मी सोम दिला असतां किंवा स्तोत्र म्हटलें असतां तुला आनंद होत असेल आणि तूं मला अन्न देत असशील तर तूं कुठेंहि असलास तरी अन्न घेऊन ये.

७. हे स्तुत्य इंद्रा, तुझे आम्ही स्तोते आहोंत. आणि हे सोम पिणाऱ्या, तूं आम्हाला संतुष्ट करतोस.

८ हे धनवन्ता इंद्रा, प्रसन्न झालेला तूं आम्हांला न संपणारें अन्न आणि तुझ्याजवळ असलेली विपुल संपत्ति दे

९. हे इंद्रा, आम्हांला गाईबैल, घोडे आणि सोनें दे. अन्न देऊन आम्हांला संपन्न कर.

१०. लोकांच्या संरक्षणाकरतां हात पसरून असलेला आणि मदतीकरतां चांगलीं कृत्यें करणाऱ्या प्रशंसनीय इंद्राला आम्ही बोलावतों आहोंत.

११. जो इंद्र युद्धांत अनेक कृत्यें करतो, नंतरहि तशींच कृत्यें करतो आणि वृत्रहन्ता होतो तो स्तोत्यांना पुष्कळ धन देतो.

१२. समर्थ असणारा तो इंद्र आम्हांला सामर्थ्यवान् करो. दाता असणारा इंद्र सर्व प्रकारचें साहाय्य करून आमची व्यंगें झाकून टाको.

१३. जो थोर इंद्र संपत्तीचें रक्षण करतो आणि संकटांतून पार पाडतो आणि जो सोम काढणारांचा मित्र आहे त्या इंद्राची तुम्ही स्तुति करा.

१४. हे स्तोतेहो, बोलावलें असतां येणारा, थोर, लढाईंत अचाट संपत्ति जिंकणारा आणि सामर्थ्यामुळें विपुल संपत्तीचा धनी अशा इंद्राची तुम्ही स्तुति करा.

१५. ह्या इंद्राच्या चांगल्या कर्मास कोणी प्रतिबंध करणारा नाहीं. तसेंच हा देत नाहीं असेंहि कोणी म्हणत नाहीं.

१६. सोम पिणाऱ्या आणि सोम तयार करणाऱ्या लोकांना देवाचें देणें म्हणून कांहीं नसतें. तसेंच दरिद्रांना सोम पिण्यास मिळत नाहीं.

१७ हे स्तोतेहो, स्तुत्य इंद्राचीं गाणीं गा. स्तोत्रें म्हणा. आणि नवीं स्तोत्रें तयार करा.

१८. जो शेंकडों हजारों शत्रूंना ठार करतो तो शत्रूंच्या तडाख्यांत न सांपडणारा बलवान् इंद्र खरोखर स्तुत्य आहे. तोच यज्ञकर्त्यांचा उत्कर्ष करतो.

१९. हे इंद्रा, स्तुत्य असा तूं लोकांच्या हविर्द्रव्यांचा अनुभव घे आणि पिळलेला सोम पी.

२०. हे इंद्रा, स्वतःच्या गाई देऊन घेतलेला आणि पाण्यांत मिसळलेला सोम तूं पी. तुझ्याकरतां काढलेला सोम तूं पी.

२१. हे इंद्रा, रागानें सोम पिळणाराचा तूं सोम पिऊं नकोस. ब्राह्मणांना दुःखदायक असणाऱ्या प्रदेशांत तूं सोम पिऊं नकोस. हा पिळून दिलेला सोम पी.

२२. हे इंद्रा, आमच्या स्तुतीकडे लक्ष देऊन तूं चार दिशेला कोठेंहि दूर असशील तरी तेथून ये. सर्व लोकांना टाकून ये.

२३. हे इंद्रा, सूर्य किरण टाकतो त्याप्रमाणें तूं मला धन दे. सकल प्रदेशावर वहाणाऱ्या पाण्याप्रमाणें आमचीं स्तोत्रें तुमच्याकडे एकदम पोचोत.

२४. हे अध्वर्यूहो, दीर्घहनू शूर इंद्राला ताबडतोब सोम द्या. सोम पिण्याकरतां तयार करा.

२५. जो पाण्याकरतां मेघ फोडतां झाला, ज्यानें नद्या वहावयास लावल्या आणि ज्यानें गाईंचे ठिकाणीं दूध उत्पन्न केलें तो इंद्र होय.

२६. तेजस्वी इंद्रानें वृत्राला ठार केलें, तसेंच और्णवाभ व अहीशुव यांना ठार केलें आणि धुक्यानें मेघाला फोडलें.

२७. हे गाणारेहो, उग्र, निष्ठुर, पराभव करणाऱ्या आणि सहनशील इंद्राचें देवांनीं दिलेलें स्तोत्र गा.

२८. सोम प्यालयावर जो इंद्र सर्व देवांत पराक्रम करतो त्या इंद्राचें स्तोत्र गा.

२९. येथें ते मस्त व सोनेरी केस असलेले दोन घोडे हितकारक अन्न वाहून आणोत.

३०. हे बहुस्तुत इंद्रा, तुला प्रियमेधानें स्तुति केलेले दोन घोडे सोम पिण्याकरितां आम्हांकडे वाहून आणोत.

सूक्त तेहतिसावें.

ऋषिः—मेध्यातिथि काण्व; देवता-इंद्र; छंदः-१ ते १५ बृहती, १६ ते १८ गायत्री, १९ अनुष्टुभ्.

१. हे वृत्रहन्त्या इंद्रा, सोम काढणारे आम्ही पाण्याप्रमाणें तुझ्याकडे नम्रपणें येत आहोंत. गाळण्यांतून पाझरत असतां स्तोते तुझी सेवा करतात.

२. हे सर्वत्र असणाऱ्या इंद्रा, तुझ्याकरतां सोम पिळला असतां स्तोते लोक तुझी स्तुति करूं लागतात. सोमाची तहान लागलेला इंद्र मस्त बैलाप्रमाणें ओरडत केव्हां आपल्या स्थानीं गेला ?

३. हे चालून जाणाऱ्या इंद्रा, कण्वांना तूं हजारांनीं धन दे. हे धनवान् आणि सूक्ष्मपणानें अवलोकन करणाऱ्या इंद्रा, सोनें आणि पशू यांसहित आम्ही तुम्हाला धन मागतों.

४. हे मेध्यातिथे, जो आपले घोडे जोडतो, जो सोम पिऊन साहाय्य करतो, जो वज्र धारण करतो आणि ज्याचा रथ सोन्याचा आहे, त्या सोम पिऊन मदयुक्त झालेल्या इंद्राचें स्तोत्र तूं गा.

५. ज्याचा डावा व उजवा हात चांगला आहे, जो सर्वसमर्थ आहे, जो बुद्धिमान् आहे, जो हजारांना निर्माण करता, जो संपत्तिमान् आहे आणि जो शत्रूंचीं नगरें उध्वस्त करतो, त्या स्तुति चालूं असेल तेथें जाणाऱ्या इंद्राची मी स्तुति करतों.

६. जो शत्रुवर चालून जातो. जो शत्रूच्या ताब्यांत सांपडत नाहीं आणि युद्धांत उभा असतो, तसेंच जो धनवान् शत्रूला चीत करणारा आणि बहुस्तुत इंद्र, तो कर्मानें समर्थाला गाईप्रमाणें फल देणारा आहे.

७. सोम पिळल्यावर ऋत्विजांसह सोम पिणाऱ्या तुला कोण जाणतो ? सोम पिऊन प्रसन्न झालेला दीर्घहनु इंद्र सामर्थ्यानें शत्रूंचीं नगरें फोडून टाकतो, तो कोणतें अन्न खातो ?

८. शत्रूवर चालून जाणारा हत्ती जसा मद धारण करतो त्याप्रमाणें तो इंद्र अनेक यज्ञांत जातो. हे इंद्रा, तुला कोणी दडपीत नाहीं. सोम पिळला आहे. तूं ये. तूं बलानें सर्वश्रेष्ठ आहेस आणि फिरत असतोस.

९. जो इंद्र तेजस्वी, अपराभूत, अढळ आणि युद्धाकरतां सज्ज असतो तो धनवान् इंद्र जर स्तोत्याचें बोलावणें ऐकेल तर दुसरीकडे जाणार नाहीं, तिकडेच येईल.

१०. हे उग्र इंद्रा, खरोखर तूं अशा प्रकारें कामपूरक आहेस. बलवानांच्याकडे ओढा असलेला आणि पराभव न पावणारा तूं आहेस. बलवान् म्हणून तूं प्रसिद्ध आहेस. जवळच्या प्रान्तांत किंवा दूरच्या प्रान्तांत तूं बलवान् म्हणूनच प्रसिद्ध आहेस.

११. हे धनवान् इंद्रा, तुझ्या घोड्यांचे लगाम इच्छा पूर्ण करणारे आहेत, तुझी सोनेरी वादी, रथ आणि दोन्ही घोडे हे कामपूरक आहेत. हे कर्तृत्ववान् इंद्रा, तूंहि सर्व इच्छा पूर्ण करणारा आहेस.

१२. हे कामपूरक इंद्रा, सोम पिळणारा इच्छा पूर्ण होऊन सोम पिळतो. हे सरळमार्गी इंद्रा, तूं आम्हांला धन दे. हे घोड्यावर बसणाऱ्या इंद्रा, तुझ्याकरतां पाण्यांत तयार केलेला रसरशीत सोम तयार केला आहे.

१३. हे बलिष्ठ इंद्रा, सोमरूपीं अमृत पिण्याकरतां तूं ये. कारण, हा धनवान् आणि कर्तृत्ववान् स्तोता तूं आल्याशिवाय चांगलीं गाणीं किंवा स्तोत्रें म्हणत नाहीं.

१४. हे वृत्रहन्त्या आणि कर्तृत्ववान् इंद्रा, रथांत बसलेल्या समर्थ अशा तुला दुसऱ्यांच्या यज्ञाकडे न नेतां रथाला जुंपलेले घोडे आम्हांकडे वाहून आणोत.

१५. हे महापूज्य इंद्रा, आज तुला अत्यंत आवडणारें आमचें स्तोत्र तूं ऐक. हे तेजस्वी आणि सोम पिणाऱ्या इंद्रा, तुला प्रसन्न करण्याकरतां हे आमचे शेंकडो यज्ञ असोत.

१६. जो शूर इंद्र आमचें रक्षण करतो तो माझ्या किंवा तुझ्या आज्ञेंत राहणारा नाहीं.

१७. तेव्हां इंद्र असें म्हणाला, कीं स्त्रीचें मन ताब्यांत ठेवण्यास कठीण असतें, आणि तिची बुद्धि हलकी असते.

१८. सोमाकडे जाणारे दोन घोडे इंद्राचा रथ ओढून नेतात. तसेंच बलवान् इंद्राच्या रथाचें जू उत्कृष्ट आहे.

१९. हे प्लायोगे, खालीं पहा, वर पाहूं नकोस, पावलें हळूच टाक, पायाचे घोटे दिसूं देऊं नकोस, कारण तूं पुरुष असून स्त्री झाला आहेस.

---

१७. टीप:—आसंग प्लायोगि पुरुष असून स्त्री झाला, तेव्हां इंद्र त्याला वरीलप्रमाणें म्हणाला.

१९. टीप:—स्त्री असलेला पण पुरुष होऊं इच्छिणाऱ्या आसंग प्लायोगीला आकाशांतून रथांत बसून येणारा इंद्र म्हणाला.

सूक्त चवतिसावें.

ऋषि:— १६ ते १८ वसुरोचिष आंगिरस सहस्र, बाकी नीपातिथि काण्व; देवता—इंद्र; छंद:—१६ ते १८ गायत्री, अवशिष्ट अनुष्टुभ्.

१. हे इंद्रा, कण्वाची उत्कृष्ट स्तुति ऐकण्याकरतां घोड्यांनीं या. आणि नंतर हे स्वर्गांत राहणाऱ्या इंद्रा, स्वर्गावर सत्ता चालवणारा तूं परत स्वर्गाला जा.

२. हे इंद्रा, तुझ्याकडे ह्या यज्ञांत सोम कुटणारा दगड कुटण्याचा आवाज करीत गर्जत येवो. हे स्वर्गांत राहणाऱ्या, स्वर्गावर सत्ता चावणारा तूं स्वर्गांत जा.

३. या यज्ञांत दगडांना सोम लांडगा मेंढीला हलवतो त्याप्रमाणें हलवतो. हे स्वर्गांत राहणाऱ्या इंद्रा, स्वर्गावर सत्ता चालवणारा तूं द्युलोकांत जा.

४. हे इंद्रा, तुला कण्व साहाय्य करण्यास आणि अन्न प्राप्त व्हावें म्हणून बोलावीत आहेत. हे स्वर्गांत राहणाऱ्या इंद्रा, द्युलोकावर सत्ता चालविणारा तूं स्वर्गाला जा.

५. हे इंद्रा, वायूला यज्ञाच्या आरंभीं सोम देतात त्याप्रमाणें मी तुला सोम देतों, ये. आणि नंतर हे स्वर्गांत राहणाऱ्या इंद्रा, स्वर्गावर सत्ता चालवणारा तूं परत स्वर्गाला जा.

६. हे इंद्रा, स्वर्गकुटुंबी असलेला तूं आम्हाकडे ये. तसेंच सर्व जगाला आधार असणारा तूं आमच्या साहाय्याला ये. व नंतर हे स्वर्गांत राहणाऱ्या इंद्रा, स्वर्गावर सत्ता चालवणारा तूं परत स्वर्गाला जा.

७. हे महाबुद्धिमान् व हजारो प्रकारें रक्षण करणाऱ्या धनवान् इंद्रा, तूं आम्हांकडे ये व नंतर हे स्वर्गांत राहणाऱ्या इंद्रा, स्वर्गावर सत्ता चालवणारा तूं परत जा.

८. हे इंद्रा, तुला देवामध्यें स्तुत्य, देवांना बोलावणारा व मनुष्यांनीं स्थापन केलेला अग्नि वाहून आणो. व नंतर हे स्वर्गांत राहणाऱ्या इंद्रा, स्वर्गावर सत्ता चालवणारा तूं परत स्वर्गाला जा.

९. हे इंद्रा, शत्रूंची मस्ती जिरवणारे दोन (घोडे) तुला, बहिरीससाणयाला पंखांनीं न्यावें, त्याप्रमाणें वाहून नेतात. (तूं येथें) आल्यावर, हे स्वर्गावर राहणाऱ्या इंद्रा, स्वर्गावर सत्ता चालवणारा तूं परत स्वर्गाला जा.

१०. हे ईश्वरा, तूं चहूंकडून ये. तुला पिण्याकरतां आम्ही सोम अर्पण करीत आहोंत. ये व आल्यानंतर हे स्वर्गावर राहणाऱ्या इंद्रा, स्वर्गावर सत्ता चालवणारा तूं परत स्वर्गाला जा.

११. हे इंद्रा, तूं आम्हाकडे यज्ञांत स्तोत्रें चालूं असतां ये. आणि आम्हाला आणखी स्तोत्रें म्हणावयास लाव. व आल्यानंतर हे स्वर्गावर राहणाऱ्या इंद्रा, स्वर्गावर सत्ता चालवणारा तूं परत जा.

१२. हे इंद्रा, चांगले घोडे असलेला तूं सारख्या घोड्यावरून आम्हांकडे ये. व आल्यानंतर हे स्वर्गावर राहणाऱ्या इंद्रा, स्वर्गावर सत्ता चालवणारा तूं परत स्वर्गाला जा.

१३. हे इंद्रा, तूं पर्वतावरून आणि आकाशांतून ये. व आल्यानंतर हे स्वर्गावर राहणाऱ्या इंद्रा, स्वर्गावर सत्ता चालवणारा तूं परत स्वर्गाला जा.

१४. हे शूर इंद्रा, तूं आम्हांला हजारो गाई आणि घोडे दे. (आम्हाकडे ये) व नंतर हे स्वर्गावर राहणाऱ्या इंद्रा, स्वर्गावर सत्ता चालवणारा तूं परत स्वर्गाला जा.

१५. हे इंद्रा, तूं आम्हाला शेंकडो हजारो इष्ट वस्तु दे. (आम्हांकडे ये) व नंतर हे स्वर्गावर राहणाऱ्या इंद्रा, स्वर्गावर सत्ता चालवणारा तूं परत स्वर्गाला जावेस.

१६. संपत्तीनें प्रसिद्ध असणारे आम्ही हजार वसुरोचिष् इंद्रापासून (हजारो) बलवान् घोडे आणि पशू जेव्हां मिळवितों—

१७. तेव्हां जे सरळ जाणारे, वायुवेगी, तेजस्वी आणि चपळ घोडे सूर्याप्रमाणें चमकतात.—

१८. ते पारावतानें दिलेले चलाख घोडे घेतले असतां मी वनांत राहिलों. (असे सहस्र वसुरोचिष् म्हणाले).

सूक्त पसतिसावें.

ऋषिः—श्यावाश्व आत्रेय; देवता–अश्विनौ; छंदः–१ ते २१ ज्योतिः, २२–२४ पंक्ति, २३ महाबृहती.

१. हे अश्विहो, अग्नि, इंद्र, वरुण, विष्णु, अनेक आदित्य, अनेक रुद्र, अनेक वसु यांसह असणारे, तसेंच उषा आणि सूर्य यांसह असणारे तुम्ही दोघे सोम प्या.

२. हे बलवान् अश्विहो, सर्व प्रकारची बुद्धि, सर्व प्राणिमात्र, द्युलोक, पृथ्वी आणि पर्वत यांसह असणारे आणि उषा व सूर्य यांसह असणारे तुम्ही दोघे सोम प्या.

३. हे अश्विहो, सर्व तेहेतीस देव, तसेंच येथें उदक, मरुत् आणि भृगु यांसह असणारे व उषा आणि सूर्यासह असणारे तुम्ही दोघे सोम प्या.

४. हे अश्विहो, यज्ञाचा स्वीकार करा. हें माझें स्तवन ध्यानांत घ्या. येथील सर्व यज्ञ प्राप्त करा आणि उषा व सूर्य यांच्या सह असणारे तुम्ही दोघे अन्न प्राप्त करा.

५. हे अश्विहो, जसें तरुण युवतींचें बोलावणें स्वीकारतात, त्याप्रमाणें उत्सुकतेनें तुम्ही आमची स्तुति स्वीकारा. येथील सर्व यज्ञ तुम्ही प्राप्त करा.

६. हे अश्विदेवहो, तुम्ही आमची स्तुति ऐका. तसेंच यज्ञ स्वीकारा. येथील सर्व यज्ञ तुम्हांला प्राप्त होवोत.

७. हे अश्विहो, हारिद्रुपक्षी पाण्यावर जातात त्याप्रमाणें तुम्ही सोमावर या. तान्हेलेल्या रेड्याप्रमाणें तुम्ही या. उषा व सूर्य यांसह तुम्ही दोघे तीन वेळां रस्त्यानें या.

८. हे अश्विहो, तुम्ही हंसाप्रमाणें, वाटसरूप्रमाणें किंवा रेड्याप्रमाणें पिळलेल्या सोमाकडे या.

९. हे अश्विहो, तुम्ही ससाण्याप्रमाणें वेगानें पिळलेल्या सोमाकडे हवि देणाऱ्याकरितां या.

१०. हे अश्विहो, तुम्ही दोघे सोम प्या. तृप्त व्हा. उत्कर्ष करा आणि आम्हांला प्रजा आणि धन द्या. उषा आणि सूर्य यांसह तुम्ही आम्हांला बल द्या.

११. हे अश्विहो, तुम्ही शत्रूंना जिंका. स्तोत्यांचें व आमचें रक्षण करा. संतति आणि संपत्ति द्या. उषा व सूर्य यांसह असणारे तुम्ही आम्हांस बल द्या.

१२. हे अश्विहो, तुम्ही शत्रूंना ठार करा. मित्राकरतां प्रयत्न करा. संतति आणि संपत्ति द्या. उषा आणि सूर्य यांसह असणारे तुम्ही दोघे आम्हांला बल द्या.

१३. हे अश्विहो, मित्रावरुण, धर्म आणि मरुतांसहित असणारे तुम्ही दोघे स्तोत्यांच्या बोलावण्यावरून जाता. तसें उषा, सूर्य व आदित्य यांसह तुम्ही या.

१४. हे अश्विहो, अंगिरस, विष्णु आणि मरुत यांसह स्तोत्यांच्या बोलावण्याकडे जातां. तसें उषा, सूर्य व आदित्य यांसह तुम्ही या.

१५. हे अश्विहो, ऋभु, बलिष्ठ वाज आणि मरुत यांसह तुम्ही स्तोत्याच्या स्तुतीकडे जातां. तसें उषा, सूर्य व आदित्य यांसह तुम्ही या.

१६. हे अश्विहो, तुम्ही ब्राह्मणाला प्रसन्न करा. चांगलीं कृत्यें करण्यास उत्साह द्या. राक्षसांना ठार करा आणि रोगांना नष्ट करा. उषा व सूर्य यांसह भक्तांचा सोम प्या.

१७. हे अश्विहो, तुम्ही क्षत्रियांना प्रसन्न करा आणि लोकांना उत्साही करा. उषा व सूर्य यांसह भक्तांचा सोम प्या.

१८ हे अश्विहो, गाईंना आनंदित करा आणि सर्व लोकांना प्रसन्न ठेवा. उषा व सूर्य यांसह भक्तांचा सोम प्या.

१९. हे अश्विहो, मस्ती जिरवणारे तुम्ही सोम तयार करणाऱ्या श्यावाश्वाची अत्रिप्रमाणें मुख्य स्तुति ऐका. उषा व सूर्य यांसह तिरोअन्ह्य सोम प्या.

२०. हे अश्विहो, मस्ती जिरवणारे तुम्ही सोम तयार करणाऱ्या श्यावाश्वाची उत्कृष्ट स्तुति हविर्द्रव्याप्रमाणें स्वीकारा. उषा व सूर्य यांसह भक्तांचा सोम प्या.

२१. हे अश्विहो मस्ती जिरवणारे तुम्ही सोम तयार करणाऱ्या श्यावाश्वाचा यज्ञ घोड्याच्या लगामाप्रमाणें स्वीकारा. उषा व सूर्य यांसह भक्तांचा सोम प्या,

२२. हे अश्विहो, तुम्ही आपला रथ आमच्याकडे हाणा. मधुर सोमरस प्या. या, या. साहाय्य इच्छिणारा मी तुम्हाला बोलवीत आहें. हवि देणाऱ्या मला रत्नें द्या.

२३. हे नेते अश्विहो, हवन करणाऱ्या माझ्या चालूं झालेल्या नमस्कारात्मक यज्ञांत सोम पिण्याकरतां या. साहाय्य इच्छिणारा मी तुम्हाला बोलवीत आहें हवि देणाऱ्या मला रत्नें द्या.

२४. हे अश्विहो, समर्पण केलेल्या सोमानें तुम्ही तृप्त व्हा. या, या. साहाय्य इच्छिणारा मी तुम्हाला बोलवीत आहें. हवि देणाऱ्या मला रत्नें द्या.

सूक्त छत्तिसावें.

ऋषिः--श्यावाश्व आत्रेय; देवता–इंद्र; छंदः–१ ते ६ शक्वरी, ७ महापंक्ति.

१. हे कर्तृत्ववान् इंद्रा, सोम काढणाऱ्या आणि दर्भ तोडणाऱ्या भक्तांचा तूं रक्षणकर्ता आहेस. उत्साह उत्पन्न होण्याकरतां सोम पी. हे सज्जनसंरक्षका इंद्रा, सर्व देवांनीं तुझा जो भाग ठरविला आहे, तो शत्रूंच्या सर्व सेना आणि महान् आवेश यांना पराभूत करणारा व अन्तरिक्षांत लढाई जिंकणारा तूं सोमाचा भाग पी.

२. हे धनवन्ता इंद्रा, स्तोत्याचें रक्षण कर. आणि (सोम पिऊन) तूं आपलें स्वतःचें संरक्षण कर. हे सज्जनसंरक्षका इंद्रा, सर्व देवांनीं तुझा जो भाग ठरविला आहे. तो शत्रूंच्या सर्व सेना आणि महान् आवेश यांना पराभूत करणारा व अंतरिक्षांत लढाई जिंकणारा तूं सोमाचा भाग पी.

३. हे इंद्रा, तूं अन्न देऊन देवांचे रक्षण करतोस. तूं स्वतःहि आपलें सामर्थ्यानें संरक्षण करतोस. हे सज्जनसंरक्षका इंद्रा, सर्व देवांनीं तुझा जो भाग ठरविला आहे. तो शत्रूंच्या सर्व सेना आणि महान् आवेश यांना पराभूत करणारा व अंतरिक्षांत लढाई जिंकणारा तूं सोमाचा भाग पी.

४. हे इंद्रा, तूं द्युलोकांचा उत्पादक आहेस. आणि पृथ्वीचाहि आहेस. हे सज्जनसंरक्षका इंद्रा, सर्व देवांनीं तुझा जो भाग ठरविला आहे. तो सोमाचा भाग शत्रूंच्या सर्व सेना आणि महान् आवेश यांना पराभूत करणारा व अंतरिक्षांत लढाई जिंकणारा तूं पी.

५. हे इंद्रा, तूं घोडे आणि गाई यांना उत्पन्न करणारा आहेस. हे सज्जनसंरक्षक इंद्रा, सर्व देवांनीं तुझा जो भाग ठरविला आहे. तो सोमाचा भाग शत्रूंच्या सर्व सेना आणि महान् आवेश यांना पराभूत करणारा व अंतरिक्षांत लढाई जिंकणारा तूं पी.

६. हे वज्रधारी इंद्रा, तूं अत्रीचें स्तोत्र श्रेष्ठ कर. हे सज्जनसंरक्षका इंद्रा, सर्व देवांनीं तुझा जो भाग ठरविला आहे. तो शत्रूंच्या सर्व सेना आणि महान् आवेश यांना पराभूत करणारा व अंतरिक्षांत लढाई जिंकणारा तूं सोमाचा भाग पी.

७. हे इंद्रा, तूं सोम तयार करणाऱ्या श्यावाश्वाची स्तुति तुला उद्देशून कर्म करणाऱ्या अत्रीप्रमाणें ऐक. तूं एकटाच युद्धांत स्तोत्रें म्हणणाऱ्या त्रसदस्यूचें रक्षण केलेंस.

सूक्त सदतिसावें

ऋषिः—श्यावाश्व आत्रेय; देवता—इंद्र; छंदः—१ अतिजगती, २ ते ७ महापंक्ति.

१. हे शचीपते इंद्रा, तूं लढाईत सर्व प्रकारें ब्राह्मणांचें रक्षण करतोस. तसेंच सोम तयार करणाऱ्या भक्तांचें तूं रक्षण करतोस. हे अनिंद्य वज्रधारी व वृत्रहन्त्या इंद्रा, तूं माध्यंदिन सवनांतलि सोम पी.

२. हे शचीपते, उग्र इंद्रा, शत्रूंच्या द्रोह करणाऱ्या सेनांचा पराभव करणारा तूं सर्व तऱ्हेनें ब्राह्मणांचें संरक्षण करतोस. हे अनिंद्य वज्रधारी व वृत्रहन्त्या इंद्रा, तूं माध्यंदिन सवनांतील सोम पी.

३. हे शचीपते इंद्रा, तूं ह्या जगाचा मुख्य राजा शोभतोस. हे अनिंद्य वज्रधारी व वृत्रहन्त्या इंद्रा, तूं माध्यंदिन सवनांतील सोम पी.

४. हे शचीपते इंद्रा, तूंच एकटा सारखे असणाऱ्या ह्या दोन लोकांना (द्यावा व पृथ्वी यांना) वेगळे करतोस. हे अनिंद्य वज्रधारी व वृत्रहन्त्या इंद्रा, माध्यंदिन सवनांतील सोम पी.

५. हे शचीपते इंद्रा, सर्व जगाचा योगक्षेम चालविण्यास तूंच समर्थ आहेस. हे अनिंद्य वज्रधारी व वृत्रहन्त्या इंद्रा, तूं माध्यंदिन सवनांतील सोम पी.

६. हे शचीपते इंद्रा, तूं सर्व जगाला बल देतोस. रक्षण करतोस. तुझें कोणालाहि रक्षण करावें लागत नाहीं. हे अनिंद्य वज्रधारी व वृत्रहन्त्या इंद्रा, तूं माध्यंदिन सवनांतील सोम पी.

७. हे इंद्रा, स्तुति करणाऱ्या श्यावाश्वाची स्तुति, तुला उद्देशून कर्म करणाऱ्या अत्रीची ऐकतोस त्याप्रमाणें ऐक. तसेंच सामर्थ्य वाढवून युद्धांत तूंच फक्त त्रसदस्यूचें रक्षण केलेंस.

सूक्त अडतिसावें.

ऋषिः--श्यावाश्व आत्रेय; देवता—इंद्र व अग्नि; छंदः--गायत्री.

१. इंद्राग्नीहो,पवित्र असणारे तुम्ही यज्ञाचे ऋत्विज व्हा. तुम्ही त्याची युद्धांतील स्तुति ध्यानांत घ्या.

२. हे इंद्राग्नीहो, शत्रूंचा नाश करणारे, रथांत बसून फिरणारे, वृत्रहन्ते व पराभव न पावणारे असे तुम्ही दोघे स्तोत्रकर्त्याची स्तुति ध्यानांत घ्या.

३. हे इंद्राग्नीहो, तुम्हाकरतां यज्ञकर्ते दगडांनीं उत्साहवर्धक मधुर सोमरस काढोत. त्यांचीं स्तोत्रें तुम्ही ध्यानांत घ्या.

४. हे बरोबर स्तुति केले जाणारे इंद्राग्नीहो,यज्ञकर्ते दगडांनीं कुटून तुम्हाकरतां मधुर सोमरस काढीत आहेत.

५. हे नेते इंद्राग्नीहो, तुम्ही ज्या स्तोत्रांनीं हवि वाहून नेतां तीं तुम्ही स्वीकारा. या.

६. हे नेते इंद्राग्नीहो, तुम्ही माझी ही चांगल्या पद्धतीनें केलेली उत्कृष्ट स्तुति स्वीकारा. या.

७. हे शत्रूंचें धन जिंकणारे इंद्राग्नीहो, सकाळीं येणाऱ्या देवांसह तुम्ही सोम पिण्याकरतां या.

८. हे इंद्राग्नीहो, सोम काढणाऱ्या श्यावाश्वाच्या ऋत्विजांचें सोम पिण्याकरतां चाललेलें स्तवन ऐका.

९. हे इंद्राग्नीहो, तुम्हाला शहाण्या लोकांप्रमाणें मी सोम पिण्याकरतां आणि साहाय्याकरतां बोलावतों.

१०. ज्या इंद्राग्नींची मी स्तुति करतों आहे त्या स्तुत्य इंद्राग्नींचें साहाय्य मी मागतों आहे.

सूक्त एकोणचाळिसावें.

ऋषिः—नाभाक काण्व; देवता—अग्नि; छंदः—महापंक्ति.

१. स्तुत्य अग्नीची मी स्तुति करतों. अग्नींत यजन करण्याकरतां मी स्तुति करतों. आमच्या यज्ञांत अग्नि देवांकडे हवि पोंचवो. दूरदृष्टि अग्नि द्यावापृथ्वींत दौत्य करतो. दुसऱ्याहि शत्रूंना अग्नि नष्ट करो.

२. हे अग्निदेवा, तूं नवीन स्तोत्रामुळें आमच्या ह्या शत्रूंचा नाश कर. हवि देणाऱ्या या आमच्या शत्रूंचा नाश कर. आमच्यावर चालून येणारे सर्व मूर्ख शत्रू येथून जावोत. अग्नि दुसरे सर्व शत्रू नष्ट करो.

३. हे अग्ने, तुला तोंडांत सुखकारक तूप अर्पण करावें त्याप्रमाणें मी मननीय स्तोत्रें म्हणतों. देवांमध्यें तूं आमची स्तुति ध्यानांत घे. तूं अत्यंत प्राचीन आहेस. सुखकारक आहेस. आणि सूर्याचा दूत आहेस. अग्नि दुसरे सर्व शत्रू नष्ट करो.

४. जें जें अन्न मागितलें जातें तें तें अग्नि देतो. अन्नाहुति दिलेला अग्नि भक्तांना शांतिदायक सुख देतो. तसेंच तो सर्व देवांना बोलावणारा आहे. अग्नि दुसरे सर्व शत्रू नष्ट करो.

५. तो अग्नि पराभव करणाऱ्या आश्चर्यकारक तेजानें ओळखला जातो. अनेक देवतांना बोलावणारा आणि दक्षणा देण्याकरतां आणलेल्या पशूंनीं वेढिलेला तो अग्नि शत्रूवर चालून जातो. तसेंच अग्नि दुसरे सर्व शत्रू नष्ट करो.

६. देवांची उत्पत्ति अग्नि जाणतो तसेंच मनुष्याची गुप्त गोष्ट अग्नीच जाणतो. तो अग्नीच द्रव्य देणारा आहे. नवीन स्तोत्र म्हणून हवि दिलेला अग्नि (संपत्तीचीं) द्वारें मोकळीं करतो. तसेंच अग्नि दुसरे सर्व शत्रू नष्ट करो.

७. देवांमध्यें अग्नि असतो, यज्ञ करणाऱ्या सर्व लोकांतहि अग्नि रहातो. तसेंच तो अग्नि, भूमि जगाचें पोषण करते त्याप्रमाणें अनेक आश्चर्यकारक कृत्यें घडवतो. देवांमध्यें यज्ञार्ह देव अग्नि होय. अग्नि दुसऱ्या सर्व शत्रूंचा नाश करो.

८. जो अग्नि सर्व लोकांत आणि सात नद्यांत आहे,त्या तीनहि लोकांत असणाऱ्या आणि मांधात्याच्या शत्रूंचा नाश करणाऱ्या यज्ञांतील प्राचीन अग्नीकडे आम्ही (उपासनेकरतां) जात आहोंत. अग्नि दुसऱ्या सर्व शत्रूंचा नाश करो.

९. दूरदर्शी अग्नि तीनहि लोकांत रहात असतो. तो शहाणा आणि सुशोभित असणारा अग्नि दूत होऊन देवांना हवि पोंचवो आणि आमच्या इच्छा पूर्ण करो. अग्नि दुसऱ्या सर्व शत्रूंचा नाश करो.

१०. हे प्राचीन अग्ने, तूंच मनुष्यामध्यें आमच्या धनावर सत्ता चालवितोस. देवांमध्येंहि तूंच सत्ता चालविणारा आहेस. तुझ्यामुळेंच पाणी सुरक्षित चहूकडे वहात असते. अग्नि दुसरे सर्व शत्रू नष्ट करो.

सूक्त चाळिसावें.

ऋषिः—नाभाक; देवता–इंद्र व अग्नि; छंदः—२ शक्करी, १२ त्रिष्टुभ्, अवशिष्ट महापंक्ति.

१. अग्नि अरण्यें वाऱ्यानें भस्मसात् करून टाकतो, त्याप्रमाणें बळकट असणारेंहि शत्रूसैन्य ज्या संपत्तीनें आम्ही परभूत करून टाकूं, असें धन, हे इंद्राग्नीहो, शत्रूंना पराभूत करून टाकणारे तुम्ही आम्हांला द्या.

२. हे इंद्राग्नीहो, आम्ही तुम्हांला (धन) मागत नाहीं, तर केवळ नेत्यांचा नेता अशा बलवान् इंद्राचीच केवळ पूजा करतो. तो इंद्र आम्हांकडे घोड्यावर बसून अन्न स्वीकारण्याकरतां केव्हां येईल ? यज्ञ स्वीकारण्याकरतां केव्हां बरें येईल ?

३. ते इंद्र व अग्नि लढाईत असतात. हे नेतेहो, कर्तृत्वानें प्रसिद्ध असणारे व सर्वांकडून चौकशी केले जाणारे तुम्ही भक्तांचीं कर्में स्वीकारतां.

४. ज्यांचेवर हें सर्व जग अवलंबून आहे आणि ज्यांच्याकरतां द्यावापृथ्वी आपल्या ठिकाणीं सर्व प्रकारची संपत्ति धारण करते, त्या इंद्राग्नीचे हे नाभाका, यज्ञ व स्तुति करून नभाकाप्रमाणें तूं पूजन कर.

५. तुम्ही इंद्राग्नीचीं नभाकाप्रमाणें स्तोत्रें म्हणा. सात मूलस्थानें असलेलें आणि तोंडें बंद केलेल्या समुद्रावर ज्यांनीं आच्छादन घातलें त्या इंद्राग्नीपेक्षांहि इंद्र तेजानें श्रेष्ठ आहे.

६. हे इंद्रा, वेलीचीं वाळलेली व जुनी झालेली फांदी तोडावी त्याप्रमाणें दासाचें बल नष्ट कर. आम्ही ह्या दासाचें सांठविलेलें धन इंद्राकरतां आपसांत वाटून घेऊं.

७. जे लोक इंद्राग्नीला स्तुति करून व धन देऊन बोलावतात ते युद्धेच्छु आम्ही आमच्या लोकांकडून शत्रूंचा पराभव करतों आणि भक्तांचें संरक्षण करतों.

८. जे श्वेतवर्ण इंद्र व अग्नि पृथ्वीवर व स्वर्गावर आपल्या तेजांनीं प्रकाशत असतात त्या इंद्र व अग्नि यांचें हवि वाहून नेणारे यजमान कर्में करीत असतात. ह्यांनींच पाण्याला बंधमुक्त केलें.

९. हे वज्र धारण करणाऱ्या प्रेरक इंद्रा, जीं आम्ही केलेलीं उत्तेजक कर्में आहेत तीं तुला उत्साहप्रद होवोत. तूं भक्तांना सुखी करणारा, तेजस्वी आणि धन देणारा आहेस.

१०. हे स्तोतेहो, तुम्ही तेजस्वी, धनिक आणि स्तुत्य अशा इंद्राला स्तोत्रें म्हणून प्रसन्न करा. तसेंच ज्या इंद्रानें आपल्या सामर्थ्यानें शुष्णाचीं पोरें ठार केलीं तो इंद्र स्वर्गीय उदकें जिंको.

११. स्तोतेहो, सुपूजित, अविनाशी, धनिक आणि यज्ञार्ह अशा त्या इंद्राची स्तुति करा. जो इंद्र जातो आणि शुष्णाचीं पोरं ठार करतो त्यानींच स्वर्गांतील उदक जिंकिलें.

१२. अग्नी, पिता नभाक, मंधातृ आणि अंगिरस यांच्याप्रमाणें मी अगदीं नवीन स्तोत्र करून इंद्राग्नीची स्तुति केलीं आहे. ते इंद्र व अग्नि मला तिघई घर देवोत आणि माझें संरक्षण करोत. त्यांच्या कृपेमुळें आम्ही विपुल संपत्तीचे धनी होऊं.

सूक्त एकेचाळिसावें.

ऋषिः—-नाभाकः; देवता–वरुण; छंदः—महापंक्ति.

१. हे स्तोतेहो, जो वरुण आपणहून लोकांचे पशू गाईप्रमाणें राखतो, त्या संपत्तिमान् वरुणाचीं आणि ज्ञात्या मरुतांचीं तुम्ही स्तोत्रें म्हणा.

२. त्या वरुणाची त्याला योग्य अशा स्तोत्रानें मी स्तुति करतों. पितरांच्या स्तोत्रांनीं मी स्तुति करतों. जो वरुण आकाशांत उदकाबरोबर प्रकट होतो त्या अन्तरिक्षांतील सात बहिणी असलेल्या वरुणाचीं स्तोत्रें मी गात आहें. त्याच्या कृपेनें आमचे दुष्ट शत्रू नष्ट होवोत.

३. तो वरुण रात्रींना बिलगून असतो. देखणा व त्यागी वरुण आपल्या कौशल्यानें सर्व जगाची रचना करतो. त्याच्या कौशल्याची अपेक्षा करणारे लोक त्याला सकाळीं, दुपारीं आणि संध्याकाळीं उत्तेजित करतात. त्याच्या कृपेनें आमचे दुष्ट शत्रू नष्ट होवोत.

४. जो सर्व पृथ्वीवर देखणा असणारा सर्व दिशा उत्पन्न करतो, तोच वरुण सर्वांना प्राप्य असणारा प्रसिद्ध स्वर्ग निर्माण करतो. गौळी पशूंचें करतो त्याप्रमाणें आमचें तोच संरक्षण करतो. त्याच्या कृपेनें आमचे दुष्ट शत्रू नष्ट होवोत.

५. जो सर्व लोकांचा आधार आहे, जो सर्व किरणांचीं नष्ट झालेलीं नांवें जाणतो, तो कुशल वरुण अनेक कौशल्याचीं कृत्यें स्वर्गांतल्याप्रमाणें वाढवितो. त्याच्या कृपेनें आमचे दुष्ट शत्र नष्ट होवोत.

६. ज्या वरुणावर सर्व कौशल्याचीं कृत्यें चाकांतल्या तुंब्याप्रमाणें अवलंबून असतात. त्या त्रैलोक्यांत सर्वत्र असणाऱ्या वरुणाची सर्व प्रकारें उपासना करा. कारण, शत्रू आपल्यावर चालून येण्याकरतां गोठ्यांतल्या गाईप्रमाणें घोडे रथाला जोडीत आहेत. त्याच्या कृपेनें आमचे दुष्ट शत्रू नष्ट होवोत.

७. जो झग्याप्रमाणें ह्या सर्व जगाला झाकून टाकतो आणि सर्वांच्या सामर्थ्याचा विचार करणाऱ्या ज्या वरुणाला अनुसरणारे सर्व देव असतात त्याच्या कृपेनें आमचे दुष्ट शत्रू नष्ट होवोत.

८. उदक उत्पन्न करणारा वरुण गुप्तपणें सूर्याप्रमाणें झटक्यास आकाशांत जातो, तसेंच जो वरुण सर्व लोकांना संपत्ति देतो, तो दुष्टांचीं कपटें आपल्या तेजानें नष्ट करतो व आपण स्वर्गांत जातो. त्याच्या कृपेनें आमचे दुष्ट शत्रू नष्ट होवोत.

९. ज्याचें अन्तरिक्षातील निर्मळ तेज त्रैलोक्यांत प्रसिद्ध आहे, त्या वरुणाचें स्थान अढळ आहे. तोच सातहि नद्यांचा धनी आहे. त्याच्या कृपेनें आमचे दुष्ट शत्रू नष्ट होवोत.

१०. जो वरुण पांढरा झगा धारण करतो आणि रात्रीं काळा झगा घालतो, तो वरुण आपल्या रात्रि व दिवसाच्या कृत्याला अनुसरून अन्तरिक्ष निर्माण करतो. अन्तरिक्ष सूर्याला धारण करते त्याप्रमाणें द्यावापृथ्वी व द्युलोकाला जो धारण करतो तो वरुण होय. त्याच्या कृपेनें आमचे दुष्ट शत्रू नष्ट होवोत.

सूक्त बेचाळिसावें.

ऋषिः—अर्चनानस् काण्व किंवा नाभाक; देवता—१–३ वरुण, ४–६ अश्विन्; छंदः—१–३ त्रिष्टुभ्, ४–६ अनुष्टुभ्.

१. सर्व प्रकारचें सामर्थ्य असलेला बलवान् वरुण द्युलोकाला स्थिर करता झाला. तसेंच त्यानें पृथ्वी निर्माण केली. ही सर्व निर्माण करून त्यांचा तो सर्व सत्ताधारी झाला. जगातील सर्वच कृत्यें वरुणाचीं आहेत.

२. हे स्तोत्या, थोर वरुणाची तूं अशीच स्तुति कर. अमरपणा देणाऱ्या थोर वरुणाला तूं नमस्कार कर. तो वरुण आम्हाला तीन मजली घर देवो. आम्हां भक्तांचें द्यावापृथ्वी संरक्षण करोत.

३. हे वरुणदेवा, हीं कर्में करणाऱ्या माझी बुद्धि आणि ज्ञान तेजस्वी कर. ज्या (यज्ञरूपी) नावेनें आम्ही सर्व पातकें तरून जाऊं त्या तारणाऱ्या नौकेंत आम्ही आरूढ होत आहोंत.

४. हे सत्यस्वरूप अश्विहो, तुम्हाला सोम पिण्याकरतां ब्राह्मण आणि सोम कुटण्याचे दगड आपापल्या कृत्यांनीं आणतात. तुमच्या कृपेनें आमचे दुष्ट शत्रू नष्ट होवोत.

५. हे सत्यस्वरूप अश्विहो, तुम्हांला ज्ञाता अत्रि स्तुति करून सोम पिण्याकरतां जसा बोलावतो तसा मीहि बोलावतों आहे. आमचे दुष्ट शत्रू नष्ट होवोत.

६. हे सत्यस्वरूप अश्विहो, ज्याप्रमाणें ज्ञानी लोकांनीं तुम्हांला बोलाविलें आहे, त्याप्रमाणें मी तुम्हांला संरक्षणाकरतां व सोम पिण्याकरतां बोलावित आहें.

सूक्त त्रेचाळिसावें.

ऋषिः—विरूप आंगिरस; देवता–अग्नि; छंदः—गायत्री.

१. हे स्तोते शहाणा, कार्यकारी आणि यजमानांचें कल्याण करणाऱ्या अग्नीची स्तुति करीत आहेत.

२. हे धनवान् आणि द्रष्ट्या अग्ने, दात्या अशा तुझी मी चांगली स्तुति करतों.

३. हे अग्ने, तुझ्या तीक्ष्ण ज्वाला भुकेलेल्या पशूप्रमाणें दातांनीं अरण्यें भक्षण करतात.

४. हरणशील व वाऱ्यांनीं हलणारे धूमकेतु अग्नि आकाशांत वेगळेवेगळे (जळतांना) जातात.

५. हे अग्नि वेगवेगळे पेटविले म्हणजे उषांच्या ध्वजाप्रमाणें दिसतात.

६. जेव्हां अग्नि लांकडे जाळतो, तेव्हां जातांना अग्नीच्या पायांनीं धूळ काळी होते.

७. अग्नि औषधींचें अन्न करून खात असतांहि शांत होत नाहीं. उलट दुसऱ्या औषधींच्याकडे धांवत असतो.

८. अग्नि ज्वालांनींच वनस्पतींना नमवीत तेजानें जळत अरण्यांत धडकत असतो.

९. हे अग्ने, पाण्यांत राहणारा तूं औषधी खातोस. आणि फिरून तूं त्यांच्यांत उत्पन्न होतोस.

१०. हे अग्ने, तुझी तुपाच्या आहुतीनें उत्पन्न झालेली ज्वाला पळीचें तोंड चाटत असतां विशेष शोभते.

११. बैल, गाय (दूध व शेण यांच्याद्वारा) आणि

सोम खाणाऱ्या आणि कर्त्या अग्नीची स्तोत्रें म्हणन आम्ही उपासना करतों.

१२. हे देवांना बोलावणाऱ्या बुद्धिमान् अग्ने, तुला अन्न व हवि देऊन आम्ही मागणी मागतों.

१३. हे आहुति दिलेल्या शुद्ध अग्ने, तुझी भृगु, मनु आणि अंगिरस याप्रमाणें आम्ही स्तुति करतों.

१४. हे अग्ने, शहाणा व मित्रभूत असणारा तूं दुसऱ्या तशाच अग्नीनें प्रज्वलित केला जातोस.

१५. हे अग्ने, तूं ज्ञात्या व दात्या यजमानाला हजारांनीं धन आणि मुलाबाळांनीं युक्त अन्न दे.

१६. हे मातृभूत तांबडा घोडा असलेल्या, बलपुत्र व कर्तृत्ववान् अग्ने, तूं माझें हें स्तोत्र स्वीकारावेस.

१७. हे अग्ने, हंबरणाऱ्या व दूध इच्छिणाऱ्या मुलांकरतां गाई गोठ्यांत जातात त्याप्रमाणें माझीं स्तोत्रें तुझ्याकडे प्राप्त होवोत.

१८. हे अंगिरसांना पूज्य असणाऱ्या अग्ने, तुझी सर्व लोक इष्टसिद्ध्यर्थ वेगवेगळ्या प्रकारें पूजा करतात.

१९. इंद्रियनिग्रही व बुद्धिमान् असें ज्ञानी लोक कर्में करून अन्न प्राप्त होण्याकरतां अग्नीला प्रसन्न करतात.

२०. हे अग्ने, सामर्थ्यवान् व हवि वाहून नेणाऱ्या तुझी घरांत यज्ञ करणारे यजमान स्तुति करीत असतात.

२१. हे अग्ने, तूं धनी आहेस. सर्व देशांतल्या सर्व लोकांकडे तूं सारख्या दृष्टीनें पहातोस. म्हणून तुला आम्ही युद्धांत (मदतीकरतां) बोलावितों.

२२. जो अग्नि तुपाच्या आहुतीनें प्रज्वलित होतो, तसेंच जो आमचें हें स्तोत्र ऐकतो, त्या अग्नीची तूं स्तुति कर.

२३. शत्रूंना ठार करणाऱ्या आणि आमचें स्तोत्र ऐकणाऱ्या अशा बुद्धिमान् अग्नीची आम्ही स्तुति करीत आहोंत.

२४. लोकांचा राजा, आश्चर्यकारक आणि कर्मांतील मुख्य अशा अग्नीची आम्ही स्तुति करतो आहोंत. तोच स्तोत्र ऐको.

२५. सर्वव्यापक बल असलेल्या अग्नीला बलिष्ठ मनुष्याप्रमाणें किंवा हितप्रद घोड्याप्रमाणें हवि देऊन आम्ही अधिक बलवान् करतों.

२६. हे अग्ने, दुष्ट द्वेष्ट्यांना ठार करणारा आणि नेहमीं राक्षसांना जाळून टाकणारा तूं प्रखर तेजानें प्रदीप्त हो.

२७. हे अंगिरसांच्या अग्ने, ज्या तुला लोक मनूप्रमाणें प्रज्वलित करतात तो तूं माझें स्तोत्र ध्यानांत घे.

२८. हे अग्निदेवा, जो तूं स्वर्गांत उत्पन्न झालास, अन्तरिक्षांत झालास किंवा बलापासून झालास, त्या तुला आम्ही स्तुति करून बोलावतों आहोंत.

२९. हे अग्ने, तुलाच हे सर्व लोक आणि पृथ्वीवरील सर्व प्रजा हविर्भक्षणाकरतां प्रज्वलित करतात.

३०. हे अग्ने, तुझ्याकरतांच आम्ही चांगलीं कर्में करीत, चांगले दिवस पहात आणि संकटें तरून जात आहोंत.

३१. आनंददायक, अनेकांना प्रिय असणाऱ्या, यज्ञांत असलेल्या आणि पवित्रकांति अशा अग्नीला आम्ही मनोहर स्तोत्रांनीं याचना करतों.

३२. हे अग्ने, तेजस्वी असणारा तूं उगवत्या सूर्याप्रमाणें तेजस्वी होत अंधार नाहींसा करतोस

३३. हे बलवान् अग्ने, तुझें जें धन नाहींसें होत नाहीं तें तुझें देय असणारें उत्कृष्ट धन आम्ही तुझ्यापाशीं मागतों.

सूक्त चव्वेचाळिसावें.

ऋषिः—विरूप आंगिरस; देवता–अग्नि; छंदः—गायत्री.

१. हे ऋत्विजहो, अतिथीप्रमाणें प्रिय असणाऱ्या अग्नीची समिधा देऊन तुम्ही उपासना करा. तुपांनीं त्याला प्रज्वलित करा. आणि ह्या प्रज्वलित अग्नींत आहुति द्या.

२. हे अग्ने, तूं माझें स्तोत्र ऐक. ह्या स्तोत्रानें तूं प्रज्वलित हो. आणि आमच्या सूक्तांची तूं इच्छा कर.

३. हवि वाहून नेणाऱ्या व देवांचा दूत असणाऱ्या अग्नीला मी पुढें स्थापन केलें आहे. मी त्याची स्तुति करीत आहें. तो अग्नि देवांना येथें आणो.

४. हे तेजस्वी अग्ने, प्रज्वलित झालेल्या तुझ्या मोठ्या तेजस्वी ज्वाला उत्पन्न झाल्या आहेत.

५. हे हवि इच्छिणाऱ्या अग्ने, माझ्या तूप देणाऱ्या पळ्या तुझ्याकडे येवोत. आमच्या हवीचा तूं आस्वाद घे.

६. आनंद देणाऱ्या, देवांना बोलावणाऱ्या, यज्ञार्ह, आश्चर्यकारक प्रकाश असलेल्या अशा प्रकाशधन अग्नीची मी स्तुति करतों. तो अग्नि आमची स्तुति ऐको.

७. पूर्वकालापासून देवांना बोलावणारा, प्रसन्न, कर्तृत्ववान्, यज्ञाधार व स्तुत्य अग्नीची मी स्तुति करतों.

८. हे अंगिरसांच्या श्रेष्ठ अग्ने, आमचीं हीं हविर्द्रव्यें तूं सतत भक्षण कर. तसेंच प्रत्येक ऋतूंत यज्ञ देवांकडे पोंचीव.

९. हे उपभोग घेणाऱ्या तेजस्वी अग्ने, प्रज्वलित केलेला तूं देवांना ओळखून येथें घेऊन ये.

१०. आम्ही अग्नीला इष्ट गोष्टी मागतों. अग्नि हा बुद्धिमान्, देवांना बोलावणारा, अद्वेष्टा, धूम्रध्वज, प्रकाशधन आणि यज्ञाची पताका आहे.

११. हे बलपुत्र अग्निदेवा, दुष्टांपासून आमचें रक्षण कर व द्वेष्ट्यांना ठार कर.

१२. कर्तृत्ववान् अग्नि प्राचीन मननीय स्तोत्रानें स्वतःचें शरीर सुशोभित करीत स्तोत्यांकडून प्रज्वलित केला जातो.

१३. अन्नपुत्र व पवित्रकांति अग्नीला ह्या उत्कृष्ट यज्ञांत आम्ही बोलावतों.

१४. हे मित्रांना पूज्य असणाऱ्या अग्ने, तूं आपल्या तेजासह आणि देवांसह यज्ञांत येऊन बैस.

१५. जो मनुष्य धनाच्या प्राप्तीकरतां अग्निदेवाची उपासना करतो त्यालाच तो धन देतो.

१६. देवामधील मुख्य, द्युलोका इतका उंच आणि पृथ्वीचा पति असणारा अग्नि सर्व स्थावरजंगम सृष्टीला प्रसन्न करतो.

१७. हे अग्ने, तुझी निर्मळ, शुभ्रवर्ण अशी तेजस्वी कांति तुझें तेज वाढवितें.

१८. हे अग्ने, स्वर्गाधिपति असणारा तूं सर्व देय असणाऱ्या श्रेष्ठ संपत्तीचा धनी आहेस. सुखाकरतां मी तुझा झालों आहे.

१९. हे अग्ने, विद्वान् स्तोते तुला स्तवितात. कर्मे करून तुलाच प्रसन्न करतात. आम्ही केलेलीं स्तोत्रें तुझा उत्कर्ष करोत.

२०. हे अग्ने, अमर, बलवान्, देवांचा दूत असणाऱ्या आणि स्तुत्य अशा तुझें सख्य आम्ही नेहमीं इच्छितों.

२१. अत्यंत पवित्र कामें करणारा, शुद्ध, ज्ञानी, दूरदर्शी आणि आहुति दिलेला अग्नि प्रकाशतो.

२२. तसेंच हे अग्ने, तुला माझीं स्तोत्रें आणि कर्मे सदोदित प्रसन्न करोत. तूं आमचें सख्य ध्यानांत घे.

२३. हे अग्ने, जर तूं मी असशील आणि मी तूं असशील (म्हणजे तुझें माझें प्रेम असेल) तर तुझे आशीर्वाद खरे होतील.

२४. हे अग्ने, तेजोधन असणारा तूं धनपति शत्रूंना नष्ट करणारा आहेस. म्हणून आमच्यावर तुझी कृपा असावी.

२५. हे अग्ने, समुद्राकडे नद्या जातात त्याप्रमाणें सृष्टीचा चालक अशा तुझ्याकडे आमच्या स्तोत्रांचा घोष चालला आहे.

२६. नित्यतरुण, लोकाधिपति, सर्व भक्षण करणारा आणि कर्तृत्ववान् अशा अग्नीचीं स्तोत्रें म्हणून आम्ही स्तुति करतों आहोंत.

२७. यज्ञनेता, तीक्ष्ण ज्वालारूपी दाढा असलेल्या आणि बलवान् अग्नीची आम्ही स्तुति करूं इच्छितों.

२८. हे शुद्ध करणाऱ्या आणि पूजनीय अग्ने, हा तुझा स्तोता होवो. त्याला तूं सुखी कर.

२९. हे अग्ने, तूं गंभीर आहेस. हवि देण्यास बसलेल्या ब्राह्मणाप्रमाणें तूं जागरूक आहेस. तूं अन्तरिक्षांत सदोदित प्रकाशत आहेस.

३०. हे सर्वव्यापक अग्ने, पाप आणि शत्रु आम्हावर हल्ला करण्यापूर्वींच तूं आम्हांस आयुष्य दे.

सूक्त पंचेचाळिसावें.

ऋषिः—त्रिशोक काण्व; देवता—इंद्र; छंदः—गायत्री.

१. जे विशेषतः अग्नीला प्रज्वलित करतात, ज्यांचा तरुण इंद्र मित्र आहे ते क्रमानें (देवांना बसण्याकरतां) दर्भ पसरतात.

२. ज्यांचा तरुण इंद्र मित्र आहे त्यांचा अग्नि मोठा असतो आणि स्तोत्रहि मोठें असतें.

३. ज्यांचा तरुण इंद्र मित्र आहे—तो युद्ध न करतांच केवळ योद्ध्यांनीं वेष्टिलेल्या शत्रूला आपल्या सामर्थ्यानें शूरत्व गाजवून नमवतो.

४. वृत्रहन्ता इंद्र जन्माला आल्याबरोबर बाण हातांत घेतो. आणि आईला विचारतो कीं बलवान् म्हणून कोण कोण विश्रुत आहेत ?

५. हे इंद्रा, तुला बलवान् आईनें उत्तर दिलें कीं, जो तुझ्याशीं शत्रुत्वाची इच्छा करतो तो पर्वतावर हत्तीप्रमाणें युद्ध करतो आहे.

६. हे धनवन्ता, तूं आमची स्तुति ऐक. स्तोता

जें तुला मागतो तें तूं देतोस. ज्याला तूं बलिष्ठ करतोस, तो सर्वत्र बलिष्ठच होतो.

७. जेव्हां युद्ध करणारा इंद्र चांगले घोडे मिळविण्याकरतां युद्धांत जातो. तेव्हां रथीमध्यें सर्वश्रेष्ठ होतो.

८. हे वज्रधारी इंद्रा, तूं आम्हावर चालून येणाऱ्या सर्व योद्ध्यांना सर्व दिशांना हाकून लाव. आणि आमचें उत्कृष्ट अन्न भक्षण कर.

९. ज्याला दुष्ट शत्रू ठार करीत नाहींत, तो इंद्र आम्हाला इष्टप्राप्तीकरतां चांगला रथ देवो.

१०. हें इंद्रा, आम्ही तुझ्या शत्रूवर चालन जाणार नाहीं. पण तुला पशु देण्याकरतां अवश्य जाऊं.

११. हे वज्रधारी इंद्रा, आम्ही हळूहळु जाणारे अश्वयुक्त, धनयुक्त आणि आवश्यक संपत्ति वाहून नेणारे संकटरहित जावें.

१२. हे इंद्रा, तुझ्या स्तोत्यांना शेकडो हजारों वर्णनीय उत्कृष्ट संपत्ति प्रत्यहीं यजमान देतात.

१३. हे इंद्रा, आम्ही तुला धन जिंकणारा, बळकट शत्रूंचाही धुव्वा उडवणारा, ठार करणारा आणि घराप्रमाणें रक्षण करणारा जसें समजतो.

१४. हे कर्तृत्ववान् व धैर्यशाली इंद्रा, जेव्हां आम्ही स्तुत्य अशा तुझी याचना करतों, तेव्हां श्रेष्ठ अशा तुला सोम देऊन आम्ही प्रसन्न करतों.

१५. हे इंद्रा, दात्या अशा तुझ्याशीं जो कवडीचुंबक स्पर्धा करतो त्याचें धन तूं आम्हांस दे.

१६. हे इंद्रा, सोम तयार केलेले आमचे हे लोक तुझ्याकडे खाद्य हातांत घेऊन पशूकडे पहात असावें त्याप्रमाणें तुझ्याकडे पहात आहेत.

१७. हे इंद्रा, कानस अशा तुला आम्ही दुरून यज्ञांत संरक्षणाकरतां बोलावतों आहोंत.

१८. हे इंद्रा, तूं आमचें बोलावणें ऐकशील आणि तूं जर शत्रूंना दुःसह असशील तर तूं आमच्या अत्यंत जवळचा बांधव होशील.

१९. तसेंच हे इंद्रा, (दारिद्र्यानें) दुःखी आणि प्रवासी असें आम्ही जेव्हां तुझी स्तुति करूं तेव्हां तूं आम्हाला गाई देतोसच हे लक्षांत घे.

२०. हे बालिष्ठ इंद्रा, आम्ही म्हातारे कांठीचा आश्रय करतात त्याप्रमाणें तुझें साहाय्य घेतो. तशीच यज्ञांत तुझी आम्ही इच्छा करतों.

२१. ज्याला युद्धांत कोणीहि पराभूत करूं शकत नाहीं त्या दानशील आणि धनवान् इंद्राची तुम्ही स्तोत्रें गा.

२२. हे बलवान् इंद्रा, तुला सोम पिळल्यावर पिण्याकरतां आम्ही बोलावतों. तूं उत्साहवर्धक सोम पी आणि तृप्त हो.

२३. हे इंद्रा, साहाय्याची इच्छा करणारे मूर्ख लोक तुला त्रास न देवोत. लोक उपहास करणारे आणि ब्रह्मद्वेष्टे होऊं नयेत.

२४. हे इंद्रा, तुला लोक दुग्धमिश्रित सोम देऊन धनप्राप्तीकरतां प्रसन्न करोत. तूं गौर मृगाप्रमाणें सोम पी.

२५. वृत्रहन्त्या इंद्रानें पूर्वकालीं जें सनातन आणि उज्ज्वल धन दिले त्याची सभेंत प्रशंसा चालूं असतें.

२६. इंद्र कद्रूचा सोम प्याला आणि हजार हाताच्या शत्रूंला ठार केलें. ह्या वेळीं इंद्राचा पराक्रम चमकला.

२७. तुर्वश आणि यदु यांचीं लोकप्रसिद्ध कृत्यें ध्यानांत घेऊन (त्यांच्या शत्रूला) अन्हवाय्याला युद्धांत तूं ठार केलेंस.

२८. हे लोकहो, तुमच्या लोकांना सुख देणाऱ्या, शत्रूंचा नाश करणाऱ्या आणि गाईबैल देणाऱ्या इंद्राला मी नेहमींप्रमाणेंच स्तविलें.

२९. उदकवृद्धि करणाऱ्या थोर इंद्राला स्तोत्रें म्हणत सोम काढल्यावर संपत्ति मिळावी म्हणून मी स्तुति करतों.

३०. ज्या इंद्रानें उदक उत्पन्न करणाऱ्या मेघाला फोडलें तोंच पाणी वहाण्यांकरतां मार्ग करतो.

३१. हे इंद्रा, आनंदानें तूं जें अंगावर धारण करतोस, जें तुला हवेसें वाटतें आणि जें तूं भक्तांनां देतोस, तें तूं मला कां देत नाहींस ? तूं आम्हाला सुखी करावेस.

३२. हे इंद्रा, तुझ्यासारख्याचें अल्पहि कृत्य लोकप्रसिद्ध होतें. (म्हणून) तुझें लक्ष माझ्यावर असो.

३३. हे इंद्रा, तूं आम्हांला सुखी केलें आहेस, त्यामुळें तुझीच कीर्ति फार झाली आहे आणि तुझींच गाणीं लोक म्हणूं लागलें आहेत.

३४. हे शूर इंद्रा, एक, दोन, तीन किंवा आम्ही अधिकाहि अपराध केले तरी तूं आम्हांला ठार करूं नकोस.

३५. हे इंद्रा, तुझ्यासारखा पराक्रमी आणि शत्रूंचीं हड्डी नरम करणारा शत्रूंचें अपराध सहन करूं लागला कीं मला भीति वाटते !

३६. हे धनवान् इंद्रा, मी तुला मित्राचें सुख मागत नाहीं. तर केवळ तुझें मन आमच्याकडे वरचेवर वळो. (एवढीच मागणी आहे.)

३७. हे लोकहो, कोण बरें शान्त स्वभावाचा मित्र आपल्या मित्राला ठार करतो ? इंद्र म्हणतो मी कोणा निरपराध्याला ठार केलें आहे किंवा कोण माझ्यापासून भीतीनें दूर पळाला आहे ?

३८. हे बलवान् इंद्रा, एवारानें सोम पिळला असतां त्याला, शिकार करणारा दऱ्यांत पुष्कळ शिकार मिळवतो त्याप्रमाणें पुष्कळ धन दिलेस.

३९. ज्याअर्थी तूं ब्राह्मणालाच धन देतोस, त्याअर्थी तुझे मंत्र म्हणून जोडले जाणारे कल्याणकारक रथाचे दोन घोडे मी आपल्याकडे वळवितों.

४०. हे इंद्रा, तूं सर्व द्वेष्ट्या शत्रूंना ठार कर. युद्ध नष्ट कर. आणि त्यांचें स्पृहणीय धन आम्हांस दे.

४१. हे इंद्रा, जें भक्कम खजिन्यांत ठेवलें आहे, जें स्पर्श न करतां येण्यासारख्या ठिकाणीं ठेवलें आहे आणि जें जमिनींत ठेवलें आहे तें शत्रूंचें स्पृहणीय धन आम्हांस दे.

४२. हे इंद्रा, तूं दिलेलें विपुल धन सर्व जगाच्या लक्षांत आहे, तसें स्पृहणीय धन आम्हांस दे.

सूक्त शेहेचाळिसावें.

ऋषिः—वश अश्वपुत्र; देवता–२५–२८ वायु, २१–२४ पृथुश्रवोदानस्तुति, अवशिष्ट सर्वत्र इंद्र.

छंदः–१–४ गायत्री, ५ ककुक्, ६ गायत्री ७, बृहती, ८ अनुष्टुभ्, ९ सतोबृहती, १० गायत्री, ११ बृहती, १२ सतोबृहती, १३ द्विपदा, १४ बृहती, १५ ककुम्न्यंकुशिरा, १६ विराज्, १७ जगती, १८–१९ बृहती, २० विषमदा बृहती, २१–२२ पंक्ति, २३ गायत्री, २४ पंक्ति, २५–२७ बृहती, २६–२८ सतोबृहती, २९ गायत्री, ३० विराज्, ३१ उष्णिह्, ३२ पंक्ति, ३३ गायत्री.

१. हे धनवान् नेत्या व घोड्यावर बसलेल्या इंद्रा, तुझ्यासारख्याचे आम्ही आहोंत.

२. हे वज्रधारी इंद्रा, तुला खरोखर आम्ही अन्नदाता आणि धनदाता समजतों.

३. हे अपरिमित पाठिंबा असलेल्या कर्तृत्ववान् इंद्रा, तुझा महिमा स्तोते लोक स्तुति करून वर्णितात.

४. ज्याचें प्रेमळ मरुत्, अर्यमा आणि मित्र रक्षण करतात तो चांगले यज्ञ करणारा होतो.

५. आदित्यांची कृपा असलेला यजमान गाईबैल, घोडे आणि पराक्रमी संतति प्राप्त करून नेहमीं उत्कर्ष पावतो. तसेंच सर्वांना स्पृहणीय वाटणाऱ्या संपत्तीनेंहि त्याची भरभराट होते.

६. पराक्रम करणाऱ्या, निर्भय आणि सर्वसत्ताधीश त्या इंद्राला मी धनाची मागणी करता.

७. त्या इंद्रासह जाऊन निर्भयपणें सहाय्य करणाऱ्या पुष्कळ सेना आहेत. त्याला त्याचें घोडे उत्साहित करण्याकरतां अनेक वस्तुमिश्रित अशा पिळून तयार असलेल्या सोमाकडे घेऊन जावोत.

८. हे इंद्रा, तुझा उत्साह उत्कृष्ट आहे. जो लढाईत शत्रूंचा नाश करतो, जो शत्रूंपासून धन लुटतो, आणि लढाईत ज्यापुढें कोणाचेंहि कांहीं चालत नाहीं.—

९. हे सर्वश्रेष्ठ इंद्रा, ज्याचा सर्वप्रसिद्ध उत्साह युद्धांत दुस्तर आणि (शरणागतांचें) संरक्षण करणारा आहे तो तूं हे बलिष्ठ इंद्रा, आमच्या यज्ञांत ये. आम्ही गाईंनीं गजबजलेल्या गौळवाड्यांत जाऊं. (असे गौळवाडे आम्हांला प्राप्त होवोत).

१०. हे महाधन इंद्रा, आम्हांला गाई, घोडे आणि रथ देण्याच्या इच्छेनें पूर्वीप्रमाणें आतांहि तूं ये.

११. हे पराक्रमी इंद्रा. तुझ्या संपत्तीचा अन्त लागत नाहीं. वज्रधारी हे धनवन्ता, आम्हांला लवकर संपत्ति दे. तसेंच खाण्यापिण्यास देऊन आमच्या कर्तृत्वाचें संरक्षण कर.

१२. देखणा, पराक्रमी लोकांना मित्र मानणारा इंद्र आणि अनेकांनीं प्रशंसिलेला इंद्र आमचे सर्व जन्म जाणतो. त्या बलवान् इंद्राला हवि देऊन सर्व लोक नेहमीं वर्णन करीत असतात.

१३. अनेक प्रकारची संपति धारण करणारा धनवान् व वृत्रहन्ता इंद्र लढाईत आमचें संरक्षण करणारा आणि आमचा पुढारी होवो.

१४. हे स्तोतेहो, सोमरूपी अन्नानें उत्साहित होऊन ज्ञानपूर्ण, श्रवणीय आणि समर्थ अशा इंद्राचीं मोठमोठालीं स्तोत्रें जशीं कराल तशी तुम्ही गा.

१५. हे बहुस्तुत इंद्रा, तूं आम्हांला आतांच धन दे. (आमच्या मुलाबाळांना) धन दे. तसेंच लढाईत अन्नसहित धन दे.

१६. हे इंद्रा, सर्व प्रकारच्या संपत्तीचा धनी, आणि विरोध व युद्ध करणाऱ्या शत्रूंचा पराभव करणाऱ्या तुझी स्तुति करणाऱ्या आम्हांला धन दे.

१७. हे इंद्रा, तूं आमच्याकडे यावेस असें मी इच्छितों. म्हणून कामपूरक, धांवत येणाऱ्या आणि चपल अशा इंद्राची (यज्ञीय स्तोत्रांनीं) आम्ही स्तुति करीत आहोंत. जगांत सर्व माणसांना आणि देवांना तूं संतुष्ट करतोस. म्हणून मी तुझी नमस्कार करून व गाऊन स्तुति करीत आहे.

१८. जे मरुत् मेघांतल्या बलयुक्त उदकांसह खालीं पडतात त्या गर्जणाऱ्या मरुतांना उद्देशून मी यज्ञ करीत आहें. आणि गर्जणाऱ्या मरुतांपासून यज्ञांत सुख प्राप्त करीत आहें.

१९. दुर्बुद्धि (वृत्रादिकांचा) नाश करणाऱ्या तुला आम्ही मागणीं मागत आहोंत. हे बलिष्ठ इंद्रा, तूं आम्हांला योग्य धन दे. हे बुद्धीला प्रेरणा देणाऱ्या, आम्हांला उत्कृष्ट धन दे.

२०. हे दात्या, उग्र, आश्चर्यकारक, उत्तेजन देणाऱ्या, गोड बोलणाऱ्या, पराभव करणाऱ्या आणि सर्वांवर सत्ता चालविणाऱ्या इंद्रा, तूं आम्हांला चढाईचें उपभोग्य आणि वाढतें धन युद्धांत दे.

२१. (कानीत पृथुश्रवस्नें वश अश्व्याला दिलेल्या दानाची स्तुति येथून पुढील चार ऋचांत आहे.) ज्याअर्थी वशाश्व्याला पृथुश्रवस् कानीतापासून ही सकाळ उजाडल्यावर संपत्ति प्राप्त झाली आहे त्याअर्थी ज्या माणसानें इतकी संपत्ति मिळविली तो आमच्याकडे येवो.

२२. वश म्हणतो—सत्तर हजार घोडे मी मिळविलें. दोन हजार उंट मला मिळाले. एक हजार काळ्या घोड्या मला मिळाल्या. तीन ठिकाणीं पांढरे पट्टे असलेल्या दहा हजार गाई मला मिळाल्या.

२३. अत्यंत वेगवान्, बलवान्, चलाख आणि शत्रूंचा नाश करणारे काळे घोडे माझा रथ ओढून नेतात. (असा रथ मला मिळाला)

२४. पृथुश्रवस् कानीताचें दान अतिशय उत्कृष्ट आहे. मला सोन्याचा उत्कृष्ट रथ देणारा तो मोठा दाता व शहाणा आहे. त्याची अत्यंत कीर्ति झाली आहे.

२५. हे वायो, विपुल धन आणि अत्यंत सामर्थ्य देण्याकरतां तूं आमच्याकडे ये. कारण, आतां विपुल धन व बल देणाऱ्या तुझी आम्ही स्तुति करणार आहोंत.

२६. जो पृथुश्रवस् आपल्या रथाबरोबर चवदाशे सत्तर गाई व घोडे घेऊन जातो, तो हे सोम पिणाऱ्या वायो, हे तेजस्वी व शुद्ध सोम पिणाऱ्या वायो, सोमासह तुझ्यासाठीं सोम पिळणाऱ्यांना दानें देण्याकरतां तयार झाला आहे.

२७. जो पृथुश्रवस् मला हें आश्चर्यकारक धन देण्यास आपणहून उत्सुक झाला, तो कर्तृत्ववान् पृथुश्रवस्, कर्तृत्ववान् अरट्व, अक्ष आणि नहुष ह्यांपैकीं जो चांगला होता त्याला देता झाला.

२८. उचथ्य आणि वपुष यांच्यापैकीं जो चांगला होता आणि जो तुपासारखा शुद्ध होता, तो अश्व, उंट आणि कुत्रा यांनीं आणलेलें अन्न देतो.

२९. आतां धन देणाऱ्यांना आवडणारे घोड्यांच्याप्रमाणें साठ हजार बलवान् बैलाचें दान मी मिळविलें.

३०. गाई जशा कळपांत येतात त्याप्रमाणें पृथुश्रवसानें दिलेलें खच्ची केलेले बैल माझ्याकडे येतात.

३१. नंतर उंटाचा संघ निघाला असतां शंभर उंट देण्याकरतां मला बोलावलें. आणि पांढऱ्या गाईपैकीं दोन हजार गाई मला दिल्या.

३२. (बुद्धिमान् अशा) मी (गाईबैलावरचा अधिकारी) तरुक्ष व जो बल्बूथ दास त्यापासून शेंकडो पशु मिळविलें. हे वायो, तुझे ते स्तुति करणारे हे लोक इंद्र व देव संरक्षण करतात म्हणून आनंदांत आहेत.

३३. आतां अलंकार घालून नटविलेली ती उत्कृष्ट स्त्री अश्वपुत्र वशाला दिली जाते.

टीपः—२५–२८ ह्याची वायुदेवता आहे आणि सायण पृथुश्रवस्ची दानस्तुति म्हणून अर्थ देत आहे. तो चूक आहे.

सूक्त सत्तेचाळिसावें.

ऋषिः—त्रित आप्त्य; देवता १–१३ आदित्य १४–१८ उषस् व आदित्य; छंदः—महापंक्ति.

१. हे वरुणा व हे मित्रा, हवि देणाऱ्याला मोठ्या अशा तुमचा आधार मोठाच आहे. हे आदित्यहो, ज्याचें तुम्ही शत्रूपासून रक्षण करतां त्याला त्रास होत नाहीं. कारण, तुमचें साहाय्य अनुपद्रवी व निर्दोष आहे.

२. हे आदित्यहो, तुम्ही दुःखाचें निराकरण जाणतां. म्हणून पक्षी आपले पंख पिलावर धरतात

---

१९ टीप—येथें चोदयन्मते—बुद्धीला प्रेरणा देणाऱ्या—हें संबोधन दोनदां देण्यांत आलें आहे. त्याचा ती गोष्ट विशेषतः दर्शविण्याचा उद्देश आहे.

त्याप्रमाणें तुम्ही आम्हाला सुख द्या. कारण, तुमचें साहाय्य अनुपद्रवी व निर्दोष आहे.

३. हे आदित्यहो, पक्षाच्या पंखाप्रमाणें आमच्या जवळ जें सुख असेल तें तुम्ही प्राप्त करा. हे सर्वधनहो, तुम्हांला आम्ही सर्व गृहोचित संपत्ति मागतो आहोंत. कारण तुमचें साहाय्य अनुपद्रवी आणि निर्दोष आहे.

४. ज्यांनीं आदित्य ज्याला घर आणि अन्न देतात त्याकरतांच हे आदित्य सर्व लोकांच्या संपत्तीचे धनी आहेत. कारण, आदित्यांचें साहाय्य अनुपद्रवी आणि निर्दोष आहे.

५. हे आदित्यहो, सारथि वाईट मार्ग टाळतो त्याप्रमाणें आमचीं दुःखें नष्ट करा. आम्ही इंद्राच्या कृपेंत असावें, आम्हांला आदित्यांचें सहाय्य असावें. कारण तुमचें सहाय्य अनुपद्रवी आणि निर्दोष आहे.

६. धक्के चपेटे खाऊनच जगलेला मनुष्य तुम्हांकडून संपत्ति प्राप्त करतो. हे देवहो, तुम्ही ज्याच्याकडे जातां तो विपुल धन प्राप्त करतो. कारण,तुमचें साहाय्य अनुपद्रवी आणि निर्दोष आहे.

७. आदित्यहो, व्यापकबुद्धीचे तुम्ही ज्याला सुख देता, त्या मनुष्यावर तीक्ष्ण आयुध येत नाहीं, त्या माणसाला मोठें दुःख प्राप्त होत नाहीं. कामण तुमचें सहाय्य अनुपद्रवी आणि निर्दोष आहे.

८. हे आदित्य देवहो, लढणारे चिलखतांत असतात त्याप्रमाणें आम्हीहि तुमच्यां कृपेंत आहोंत. तुम्ही आमचें लहान व मोठ्या दुःखांतून संरक्षण करा. कारण तुमचें साहाय्य निरुपद्रवी आणि निर्दोष आहे.

९. अदिति आमचें संरक्षण करो, अदिति आम्हाला सुख देवो. कारण अदिति मित्र, संपत्तिमान् अर्यमा आणि वरुण यांना उत्पन्न करणारी आहे.

१०. हे देवहो, जें रक्षण करणारे, जें कल्याणकारक, जें आरोग्यकारक, जें तीनहि प्रकारचें आहे आणि जें घराला योग्य आहे, तें सुख आम्हास द्या.

११. हे आदित्यहो, तीरावरचा मनुष्य (कांहीं पहाण्याकरतां) खालीं पहातो, त्याप्रमाणें तूं खालीं आमच्याकडे पहा. घोड्यांना (पाणी पिण्याकरतां) चांगल्या पाण्याच्या जागीं ज्याप्रमाणें नेतात त्याप्रमाणें तुम्ही आम्हाला चांगल्या मार्गावर न्या. कारण, तुमचें साहाय्य निरुपद्रवी आणि निर्दोष आहे.

१२. हे आदित्यहो, बलवान् अशा आमच्या शत्रूचें कल्याण न होवो. आम्हावर चालून येणाऱ्या किंवा आम्हापासून दूर जाणाऱ्या शत्रूचें कल्याण न होवो. गाईचें कल्याण होवो, नुकत्याच प्रसूत झालेल्या गाईचें कल्याण होवो. आमच्या मुलांचें कल्याण होवो आणि अन्नेच्छु लोकांचें कल्याण होवो. कारण, तुमचें सहाय्य निरुपद्रवी आणि निर्दोष आहे.

१३. हे देवहो, जें दुःख उघड किंवा गूढ असेल तें सर्व त्रित आप्त्याला प्राप्त न होवो. तें आम्हापासन दूर ठेवा. कारण तुमचें साहाय्य निरुपद्रवी आणि निर्दोष आहे.

१४. हे स्वर्गकन्ये उषे, जें आमच्या पशूंविषयीं किंवा जें आमच्याविषयीं अनर्थसूचक दुःस्वप्न पाहिलें असशील तें सर्व हे उषे, त्रित आप्त्यापासून दूर कर. कारण तुमचें सहाय्य निरुपद्रवी आणि निर्दोष आहे.

१५. हे स्वर्गकन्ये उषे, अलंकार घडणारा व माला गुंफणारा यांनीं (तें कार्य करतांना) जें वाईट स्वप्न पाहिलें असेल तें त्रित आप्त्यापासून तूं दूर कर. कारण तुमचें सहाय्य निरुपद्रवी आणि निर्दोष आहे.

१६. (दिवसा भक्षिलेलें) तेंच अन्न (दिवसा केलेलें वाईट) तेंच कर्म (स्वप्नांत) प्राप्त करणाऱ्या त्रित व द्वित यांस हे उषा देवि, तूं दुःस्वप्नांपासून दूर कर. कारण तुमचें साहाय्य निरुपद्रवी आणि निर्दोष आहे.

१७. जसा (चंद्राचा) एक एक भाग कमी होतो, किंवा पाऊल जसें हळूहळू उचललें जातें, किंवा कर्ज जसें हळूहळू फेडलें जातें, तसें त्रित आप्त्याचें दुःस्वप्न नष्ट होईल. कारण तुमचें साहाय्य निरुपद्रवी आणि निर्दोष आहे.

१८. आम्ही आज विजय मिळवूं, सुख प्राप्त करूं, निष्पाप होंऊ. हे उषे, ज्या वाईट स्वप्नाची आम्हाला भीति वाटली होती तें दुःख नष्ट होवो.

---

१५. टीप—स्वप्न म्हणजे झोपेंत पडलेलेंच असा अर्थ पूर्वीं नव्हता. तर झोपेंत किंवा अर्धवट स्थितींत जे विचार येतात ते. खरोखर गाढ झोपेंत स्वप्न पडतच नाहीं. त्यासारखीच जागृत अवस्थेंतहि स्थिति असते व मनांत कांहीं शुभाशुभ विचार येत असतात त्यास स्वप्न म्हणतात. धर्मग्रंथांतहि दोनहि तऱ्हेच्या अशुभ स्वप्नावर उपाय सांगितलें आहेत.

सूक्त अठ्ठेचाळिसावें.

ऋषिः—प्रगाथ काण्व; देवता-सोम; छंदः-त्रिष्टुभ्, ५जगती.

१. जें अन्न सर्व देव आणि मनुष्य मधुर आहे असें म्हणत मिळवतात तें सर्व मान्य व मधुर असें सोमरूपी अन्न बुद्धिमान् व विद्या संपादन केलेल्या मी भक्षण केलें आहे.

२. हे सोमा, तूं पोटांत जातोस, आणि आनंददायक असणारा तूं देवांचा क्रोध नाहींसा करतोस. हे सोमा, इंद्राचें सख्य असलेला तूं चपळ घोडा (इष्ट स्थलीं) रथ नेतो त्याप्रमाणें तूं मला संपत्तीकडे पोंचीव.

३. आम्ही सोम पिऊं, आणि अमर होऊं, स्वर्गाला जाऊं आणि देवांना जाणूं. मग आमचा शत्रु काय करणार आहे ? आणि हे अमरा, मर्त्य अशा माझे कोणी दुष्ट मनुष्यहि काय करणार आहे ?

४. हे सोमा, पिता पुत्राला किंवा मित्र मित्राला सुखदायक होतो त्याप्रमाणें प्यालेला सोम माझ्या हृदयाला सुखकारक होवो. हे कीर्तिमान् सोमा, बुद्धिवर्धक असा तूं आम्हांला जगण्याकरतां (दीर्घ) आयुष्य दे.

५. कीर्तिप्रद आणि रक्षणेच्छु असा हा प्यालेला सोम बैल रथाच्या अग्रभागीं ओढण्याकरतां जोडतात त्याप्रमाणें माझें शरीर उत्तेजित करो. सोमानें मला चरित्रभंगापासून रक्षावें. व तसेंच रोगापासूनहि सोमानें माझा बचाव करावा.

६. हे सोमा, प्याल्यावर तूं मला पेटवलेल्या अग्नीप्रमाणें तेजस्वी करावें. माझें तेज वाढवावें. आम्हाला तूं अत्यंत धनवान् करावेस. आतां हे सोमा, तुला प्रसन्न करण्याकरतां मी स्तवीत आहें. एखाद्या धनिकाप्रमाणें तूं आमचा उत्कर्ष कर.

७. वडिलार्जित संपत्तीप्रमाणें पिळलेल्या सोमाचा भाग मी मनःपूर्वक भक्षण करीत आहें, हे सोमराजा, उन्हाळ्यांतले दिवस सूर्य मोठे करतो त्याप्रमाणें आमचें आयुष्य वाढीव.

८. हे राजा सोमा, तूं आमचा उत्कर्ष व्हावा म्हणून आम्हांला सुख द्यावेस. नियमांनीं वागणारे आम्ही तुझे आहोंत. तूं आम्हाकडे लक्ष दे. हे सोमा, आमचा शत्रु उत्कर्ष पावत आहे आणि त्याचा रागहि वाढत आहे. त्या शत्रूच्या इच्छेनुसार आम्हांला त्याच्या ताब्यांत देऊं नकोस.

९. हे सोमा, तूं आमच्या शरीराचें संरक्षण करणारा आहेस. म्हणून तूं आमच्या प्रत्येक अवयवावर दृष्टि ठेऊन असतोस. जरी आम्ही तुझ्यामुळें येणाऱ्या उत्साहाचा चांगला उपयोग करीत नाहीं तथापि हे देवा, तूं श्रेष्ठ अशा आमचा चांगला मित्र होऊन आम्हांला सुखी कर.

१०. मी पोटाला सुखकारक अशा सोमाशीं सख्य प्राप्त करतो. जो सोम प्याला असतां आम्हाला त्रास देत नाहीं हे इंद्रा, जो सोम मी प्यालों आहे, तो सोम माझ्या पोटांत पुष्कळ काल टिको असें मी इंद्राला मागणें मागतों.

११. जो आम्हांला अत्यंत त्रास देतो आणि आम्हांला भीति उत्पन्न करतो, तो जोरानें सारखा चालू असलेला त्रास दूर होवो. सोम अत्यंत गुणवान् होऊन माझ्याकडे आला आहे आणि जो प्याला असतां आयुष्य वाढते त्या सोमाला आम्ही प्राप्त केलें आहे.

१२. हे पितरहो, जो सोम पोटांत गेला आहे तो अमर होऊन (आम्हा मर्त्यांच्या) पोटांत शिरला. आम्ही हवि देऊन त्याची सेवा करतों. ह्या सोमाच्या सुखांत आणि कृपेंत आम्ही असावें.

१३. हे सोमा, पितरांसह असणारा तूं द्यावापृथ्वी तयार केली आहेस. हे इंद्रा, त्या सोमाची आम्ही हवि देऊन सेवा करतों आहोंत. त्याच्या कृपेनें आम्ही विपुल संपत्तीचे धनी व्हावें.

१४. हे रक्षण करणारे देवहो, आम्हांला तुम्ही ज्ञान द्या. आम्हाला झोंपेनें त्रास देऊं नये. तसेंच निन्दक आमची निन्दा न करोत. नेहेमीं आम्ही सोमाच्या प्रीतींत असावें. संततीनें युक्त असणारे आम्ही स्तोत्रें म्हणावींत.

१५. हे सोमा, तूं आम्हांला चहूंकडून अन्न देणारा आहेस. तसेंच तूं स्वर्ग प्राप्त करून देणारा आणि व्यापक दृष्टीचा असा आमच्या पोटांत जा. हे इंदो, मरुतासह प्रसन्न होऊन मागें पुढें (चहूंकडून) तूं आमचें संरक्षण कर.

वालखिल्य.

(परिशिष्ट)

सूक्त एकूणपन्नासावें.

(१)

ऋषिः—प्रस्कण्व; देवता-इंद्र; छंदः—सम-सतोबृहती, विषम-बृहती.

१. त्या आम्हांला चांगल्या देणग्या देणाऱ्या आणि ज्याला आम्ही जाणतों त्या इंद्राची मी स्तुति करीत आहे. तो धनवान् इंद्र स्तोत्यांना हजारो प्रकारें धन देतो.

२. हवि देणाऱ्याकरतां हजारो सैनिकासह असल्याप्रमाणें धैर्यानें शत्रूंवर चालून जातो आणि त्यांना ठार करतो. उदार असणाऱ्या इंद्रापासून पर्वताप्रमाणें अनेक देणग्यांचे प्रवाह वाहूं लागतात.

३. हे स्तोत्रांत रमणाऱ्या इंद्रा, पाण्याचे प्रवाह सरोवरांना भरून टाकतात त्याप्रमाणें पिळलेले हे मदकर सोम संपत्ति मिळण्याकरतां तुला तृप्त करतात.

४. अनुपम, बल देणारा, वक्तृत्व देणारा आणि अत्यंत मधुर असणारा सोमाचा भाग तूं पी. कीं ज्यामुळें प्रसन्न होऊन तूं आमच्यावर धैर्यानें देणग्यांचा वर्षाव करशील.

५. हे स्वधायुक्त इंद्रा, ज्या तुझ्याकरतां (सोमांत) गाई गोडी उत्पन्न करतात, त्या गाई हकारलेल्या घोड्यांप्रमाणें स्तोत्रें म्हणणाराकडे धावत येत आहेत. कण्वांच्या मुलांना देणग्या तयार आहेत.

६. सामर्थ्यवान् आणि अखंडसंपत्ति असलेल्या तुझ्याकडे आम्ही पराक्रमी वीराप्रमाणें येत आहोंत. हे वज्रधारी इंद्रा, प्रवाह सखल प्रदेशावर वहातात त्याप्रमाणें तुझ्याकडे आमचीं स्तोत्रें येवोत.

७. जरी तूं यज्ञांत असशील किंवा पृथ्वीवर असशील तरी तूं घोड्यावर बसून वेगानें आमच्याकडे ये. बलवान् असणारा तूं बलवानासह ये.

८. ज्या चपल आणि काळसर घोड्यांनीं तूं वाऱ्याप्रमाणें जय मिळवण्यास जातोस, ज्यायोगें तूं मनूच्या अपत्याकडे जातोस आणि ज्यामुळें सर्व जगावर नजर फिरवतोस—

९. हे इंद्रा, अशा संपत्ति आणि गाई मिळण्याकरतां मी प्रार्थना करतों आहें. हे धनवन्ता, जसें तूं रणांत मेध्यातिथि किंवा नीपातिथीचें संरक्षण केलेंस त्याप्रमाणें तूं माझें संरक्षण कर.

१०. हे धनवन्ता इंद्रा, जसें कण्व, त्रसदस्यु, पक्थ, दशव्रज, गोयर्श, ऋजिश्वन् यांना गाई आणि सुवर्ण यांनीं युक्त असें धन दिलेंस त्याप्रमाणें आम्हांला दे.

सूक्त पन्नासावें.

(२)

ऋषिः—पुष्टिगु; देवता-इंद्र; छंदः—सम-सतोबृहती विषम-बृहती.

१. जो त्याची स्तुति करतो, आणि सोम पिळतो त्यांना हजारांनीं जणूं काय संपत्ति देणाऱ्या प्रसिद्ध व विपुल अन्नयुक्त इंद्राची मदतीकरतां मी स्तुति करतों.

२. जेव्हां पिळलेल्या रसानें तो संतुष्ट होतो तेव्हां पर्वतांतल्या प्रवाहाप्रमाणें तो दात्यांना धनिकांत श्रेष्ठ करतो. ह्याचे महाबाहु हजार टोकाच्या हत्याराप्रमाणें असह्य आहेत.

३. जेव्हां त्या प्रिय इंद्राला पाण्यांप्रमाणें पिळलेले सोम प्रसन्न करतात तेव्हां हे सर्वव्यापक इंद्रा, तूं दात्यांना दुभत्या गाईप्रमाणें धन देतोस.

४. सर्वत्र बोलावल्या जाणाऱ्या तुझ्याकरतां अत्यंत मधुर असणारा सोमरस लोकांच्या संरक्षणाकरतां पाझरत आहे. हे दयाळो, तुला बोलावणाऱ्या सोमरसानें तुला आमच्या स्तोत्राकडे आणलें आहे.

५. हे मधुरप्रिया, ज्या तुला स्तोते आनंदित करतात तो तूं भक्तांचीं बोलावणीं इच्छित असतोस. यज्ञाला शोभा आणणाऱ्या सोमाकडे तूं घोड्याप्रमाणें घुसतोस.

६. शूर, उग्र, लूट जिंकणारा, संपत्तीवर सत्ता चालवणारा अशा त्या बलवानाला स्तवा. हे वज्रधारी इंद्रा, उतारावरून वहाणाऱ्या झऱ्याप्रमाणें खजिन्यांतून तूं दात्यांना धन दिलेंस.

७. हे इंद्रा, आतां तूं दूर ऐस, पृथ्वीवर ऐस, किंवा स्वर्गावर ऐस. हे महाबुद्धिमन्ता, आपले घोडे जोडून वीर्युक्त असणारा तूं य.

८. जे घोडे तुझा रथ ओढतात, आणि जे कोणालाहि दुखापत करीत नाहींत, जे वाऱ्याचा वेगहि मागें टाकतात, ज्यांच्यामुळं तूं मनुष्यांच्या शत्रूंना गप्प करतोस आणि ज्यांच्यामुळें तूं आकाशांत जातोस,—

९. हे उदार शूरा, अशा तुझें आम्ही नवीन ज्ञान मिळवूं. निकराच्या लढाईत तूं जसें एतशाचें संरक्षण केलेंस किंवा दशव्रजाविरुद्ध तूं वशाचें संरक्षण केलेंस तसें माझें करावेंस.

१०. हे धनवन्ता, जसें पवित्र यज्ञांत तूं कण्व, घरोब्याचा मित्र दीर्घनीथ आणि गोशर्य यांना संपत्ति दिलीस त्याप्रमाणें हे दगडांनीं युद्ध करणाऱ्या, आम्हांला सोन्यासारखे गोठे दे.

सूक्त एकावन्नावें.

(३)

ऋषिः—श्रुष्टिगु; देवता–इंद्र; छंदः—विषम—बृहती, सम–सतोबृहती.

१. हे इंद्रा, सांवरण मनूच्या येथें जसा तूं पिळलेला सोम प्यालास, किंवा हे धनवन्ता, नीपातिथि मेध्यातिथि, पुष्टिगु आणि श्रुष्टिगु यांच्या येथें सोम प्यालास (त्याप्रमाणें तूं आमच्या येथें पी.)

२. पार्षद्वाण अनाथ, जखमी आणि जवळ असलेल्या प्रस्कण्वाकडे गेला. तुझ्या साहाय्यानें ऋषि दस्यवे वृक हजारो गाई मिळवता झाला.

३. जो स्तोत्रांनीं प्रसन्न केला जातो; जो ज्ञाता आहे आणि जो ऋषींना स्फुर्ति देणारा आहे, त्या स्तुतींचा तुटवडा नसलेल्या इंद्राला नव्या स्तोत्रानें तूं आपल्याकडे वळीव.

४. ज्याकरतां उच्च स्थानीं सात ऋचाचें आणि तीन भागाचें स्तोत्र म्हटलें गेलें. त्यानेंच सर्व त्रैलोक्यांत गर्जना केली आणि आपला पराक्रम प्रगट केला.

५. जो आम्हांला संपत्ति देणारा आहे त्या इंद्राला आम्ही बोलावतों. त्याचा अनुग्रह आम्हांवर होईल काय? आम्हांला गौळवाडा प्राप्त होईल काय ?

६. हे उदारा, ज्याला तूं धन देतोस तो पोषणाकरतां व दान देण्याकरतां धनिक होतो. हे गाण्यावर प्रेम करणाऱ्या धनवान् इंद्रा, आम्ही सोम तयार करून तुला बोलावतों.

७. हे इंद्रा, तूं दात्यांना कधींहि असहाय्य सोडीत नाहींस. हे धनवन्ता, देव असणाऱ्या तुझी देणगी वरचेवर सारखी चालूं आहे.

८. हे इंद्रा, तूं आपल्या पराक्रमानें क्रिवीला महत्त्वाला चढाविलेस, शुष्णाला वज्रांनीं गप्प बसविलेंस आणि या स्वर्गाला विस्तृत करून आधार दिलास तेव्हां पार्थिवरूपानें तो उत्पन्न झाला.

९. ज्याचे हे सर्व आर्य आणि दास निधिसंरक्षक आहेत तो श्रेष्ठ आहे. रुशम आणि पवीरुपाशीं गुप्त असलेली संपत्ति तुझ्यापासूनच प्राप्त झालेली आहे.

१०. हुषार स्तोत्यानीं तुझी मधुर आहुति देत स्तोत्रें गाईली आहेत. आम्हांला संपत्ति आणि सामर्थ्य प्राप्त झालें आहे आणि आम्हांकरतां सोमाचे थेंब वहात आहेत.

सूक्त बावन्नावें.

(४)

ऋषिः—आयु; देवता–इंद; छंदः—सम–बृहती विषम–सतोबृहती.

१. हे शक्ता, विवस्वान् मनूच्या येथें ज्याप्रमाणें तूं सोम प्यालास, आणि जशी त्रिताच्या येथें स्तोत्रें ऐकलीस त्याप्रमाणें तूं आमच्या येथें आनंदांत ऐस.

२. हे इंद्रा, पृषध्र, मेध्य आणि मातरिश्वन् यांनीं सोम तयार केला असतां जसा तूं आनंदलास आणि जसा दशशिप्र, दशोण्य, स्यूमरश्मि आणि ऋजूनस् यांच्या येथें सोम पिऊन प्रसन्न झालास—

३. ज्यानें केवळ स्तोत्रें गायलीं, जो धैर्यानें सोम प्याला, आणि ज्याकडे मित्राच्या नियमानुसार विष्णूनें तीन पाऊलें आक्रमिली—

४. हे इंद्रा, ज्याच्या स्तोत्रांत तूं रमून जातोस, आणि ज्याप्रमाणें पुष्कळ दुधाच्या गाईस गौळी बोलावतात त्याप्रमाणें कीर्तिची इच्छा करणारे आम्ही त्या तुला बोलावतों.

५. जो आम्हांला धन देणारा, आमचा पिता, उग्र, थोर, सर्व सत्ता चालवणारा असा आहे, तो पराक्रमी व विपुल संपत्ति असलेला धनवान् इंद्र आम्हांला आमच्याजवळ टिकणारे गाईबैल व घोडे देवो.

६. हे उदारा, तूं ज्याला दानाकरतां संपत्ति देतोस तो संपत्तिमान् होतो. संपत्तीविषयीं उत्कण्ठित असणारे आम्ही शतक्रतु इंद्राला स्तोत्रें म्हणून बोलावतों.

७. तूं दोघांचेंहि संरक्षण करतोस आणि दोनहि जन्मांचें संरक्षण करतोस. हे चवथ्या आदित्या, स्तुत्य असा तूं इंद्राचा (प्रतिनिधि) आहेस. स्वर्गांत आदित्य स्थिर झाला आहे.

८. हे स्तुतिप्रिय, धनवान् व दात्या इंद्रा, जो तूं दात्याला धन देतोस, हे उदारा, तो तूं आमचीं स्तोत्रें व प्रशंसा कण्वाच्या स्तोत्राप्रमाणें ऐक.

९. जुनीं मननीय स्तोत्रें म्हटलीं गेलीं आहेत. तुम्हीहि इंद्राकरतां स्तोत्र म्हणा. यज्ञसंबंधीं पुष्कळ बृहती सामें म्हटलीं जात आहेत. स्तोत्याकडून स्तोत्रें तयार केलीं जात आहेत.

१०. इंद्रानें पुष्कळ संपत्ति दिली आहे. दोन्ही लोक आणि सूर्य निर्माण केला. आम्ही स्वच्छ, झकझकीत आणि दुधांत मिसळलेल्या सोमानें इंद्राला आनंदित केलें.

---

७. टीपः—१ देव आणि मनुष्य.

सूक्त त्रेपन्नावें.

(५)

ऋषिः—मेध्य; देवता—इंद्र; छंदः—क्रमानें बृहती व सतोबृहती.

१. हे धनवान् इंद्रा, धनवानांतला प्रमुख, वृषभश्रेष्ठ, दुर्गभेत्ता गाई जिंकणारा आणि संपत्तीचा धनी अशा तुझी आम्ही इच्छा करतों.

२. ज्यानें आयु, कुत्स आणि अतिथिग्व यांना जिंकलें आणि ज्याचा दररोज उत्कर्ष होत असतो, अशा पराक्रमी व काळसर घोडे असलेल्या तुला धन इच्छिणारे आम्हीं बोलावतों.

३. जे लोकांच्यामध्यें जवळ आणि दूर पिळले जातात, त्या सोमांतील संपूर्ण रस दगड बाहेर काढोत.

४. सर्व शत्रूंना तूं दूर हाकून दे व ठार कर. सर्व आपल्याकरतां धन जिंकोत. शिष्ट लोकांतहि तुला आनंद देणाऱ्या सोमाच्या कांड्या असतात कीं ज्या तुला तृप्त करतात.

५. हे इंद्रा, तूं आमच्या अगदीं जवळ निश्चित साहाय्य देण्याकरतां ये. हे अत्यंत शुभदायक असलेल्या इंद्रा, सुखदायक असा तूं ये व चांगले आप्त असलेल्या इंद्रा, चांगल्या आप्तासह ये.

६. युद्ध जिंकणाऱ्या, सज्जनाधिपति आणि लोक संरक्षक इंद्र आम्हांला संततीनें सुखी करो. जे स्तोत्रें म्हणतात आणि पराक्रम करतात अशांच्या कृत्यांना तूं साहाय्य कर.

७. आम्ही युद्धांत तुझें सहाय्य मिळवावें कीं, ज्यामुळें आम्ही देवांच्या प्रार्थना करून संपत्तिमान् होऊं.

८. हे काळसर घोडे असलेल्या इंद्रा, मी तुझा आहे. आमचें स्तोत्र लुटीकरतां चालूं आहे तुझ्या साहाय्यानें आम्ही नेहेमीं लढाईला जातो. घोडे आणि गाई यांची इच्छा करणारा मी शत्रूंच्या मस्तकावर हल्ला करीत आहें व तुलाच शरण येत आहें.

सूक्त चोपन्नावें.

(६)

ऋषिः—मातरिश्वन; देवता—३-४ विश्वेदेव बाकी इंद्र; छंदः—अनुक्रमें बृहती सतोबृहती.

१. हे इंद्रा, तुझा हा पराक्रम स्तोते स्तोत्रांनीं वर्णितात. पौष्टिक पदार्थ देणारी तुझी प्रार्थना स्तोत्रें म्हणून केली. नगरवासी लोक सूक्तें म्हणत तुझ्याकडे आले.

२. ज्यांच्या सत्कृत्यानें सोम पिऊन तूं आनंदित होतोस त्या तुझ्याकडे सहाय्य मागण्याकरतां ते लोक येतात. जसा तूं कृश आणि संवर्ताच्या येथें आनंदित झालास तसा तूं आमच्या येथें आनंदित हो.

३. सर्व देव तुझ्याशीं एकरूप होऊन तुझ्याकडे येतात. वसु आणि रुद्र आम्हांला साहाय्य करण्याकरतां येवोत. आणि मरुत आमचीं स्तोत्रें ऐकोत.

४. पूषन् आणि विष्णु आमचें स्तवन ऐकोत. सरस्वती व सप्तसिंधु आमचें संरक्षण करोत. आपदेवता वायु, पर्वत, वनस्पति आणि पृथिवी आमचें बोलावणें ऐकोत.

५. हे अत्यंत धनवान् इंद्रा, तुझ्याजवळ जें विपुल धन आहे त्यानें तूं आम्हांला आनंदित कर व हे वृत्रहन्त्या, तूं आम्हांला संपत्ति देऊन भाग्यवृद्धि कर.

६. हे लढाईतील मुख्य लोकांचें संरक्षण करणाऱ्या आणि कर्तृत्ववान् अशा इंद्रा, तूंच लढाईमध्यें आमचा पुढारी हो. जे स्तोत्रें म्हणून प्रार्थना करून आणि हवि देऊन तुझी सेवा करतात ते कीर्तिमान् होतात.

७. सर्व लोकांच्या प्राणभूत असणाऱ्या पूज्य इंद्रावर आमच्या सर्व इच्छा अवलंबून आहेत. हे धन-

वन्ता, तूं आम्हांकडे मदत देण्याकरतां ये. आणि आम्हांला विपुल अन्न दे.

८. हे शतक्रतु इंद्रा, आम्ही तुझीं स्तोत्रें म्हणून पूजा करावी. तूं आमचा असावेस तूं विपुल आणि अमूप लूट प्रस्कण्वाला दे कीं, जी वाढती आहे आणि कधींहि नष्ट होणार नाहीं.

सूक्त पंचावन्नावें.

(७)

ऋषि:—कृश; देवता-दानस्तुति; छंद:—क्रमानें बृहती व सतोबृहती.

१. खरोखर इंद्राचा पराक्रम मोठा आहे. हे दस्यवे वृक, तुझी लूट इकडे येत आहे आणि ती मी पाहिलेली आहे.

२. शंभर पांढरे शुभ्र बैल आकाशांतील ताऱ्याप्रमाणें चमकत आहेत. आणि आपल्या मोठेपणानें जणूं काय आकाशाला टेकण देत आहेत.

३. शंभर वेळू (लाठ्या), शंभर कुत्रीं, शंभर कमावलेलीं कातडीं, शंभर बल्बज गवताच्या पेंड्या आणि चारशे तेजस्वी घोडे माझे आहेत.

४. हे काण्वायनहो, तुम्हांवर देवांची कृपा आहे. घोड्याप्रमाणें तुम्ही सर्व प्रकारचें अन्न संपादित फिरा.

५. नंतर साताच्या टोळीची त्यांनीं स्तुति केली. श्रेष्ठ असणाऱ्या त्याची कीर्ति अत्यंत मोठी आहे. काळी घोडी नजर ठरत नव्हती असा मार्ग आक्रमीत गेली.

सूक्त छप्पन्नावें.

(८)

ऋषि:—पृषध्र; देवता-५सूर्य व अग्नि; छंद:—५ पंक्ति, अवशिष्ट गायत्री.

१. हे दस्यवेवृक, कधींहि न संपणारी तुझी लूट स्वत: दिसं लागली आहे. ती इतकी भरपूर आहे कीं आकाशाप्रमाणें सर्वव्यापी आहे.

२. पूतक्रतूच्या मुलानें आपल्या खजिन्यांतून मला दहा हजार दस्यवेवृक दिले आहेत.

३. मला शंभर गाढवें, शंभर लोकरयुक्त मेंढ्या, शंभर नोकर आणि शंभर माळा दिल्या.

४. पूतक्रतूच्या बायकोकरतां घोड्यांच्या कळपांतील नसलेली पण सजवलेली अशी घोडी तेथें सामोरी आणली होती.

५. ज्ञानी, हवि वाहणारा आणि चांगल्या रथांत असलेला अग्नि प्रकट झाला आहे. अग्नि आपल्या स्वच्छ कांतीनें विस्तृत आकाशांत प्रकाशला आहे. स्वर्गांत सूर्य शोभत आहे.

सूक्त सत्तावन्नावें.

(९)

ऋषि:—मेध्य; देवता-अश्विनी; छंद:—त्रिष्टुभ्.

१. हे यज्ञार्ह देवहो,तुमच्या प्राचीन कर्तृत्वासहित रथांत बसून लवकर इकडे या. हे अश्विहो, तुम्ही आपल्या सामर्थ्यासह इकडे या. हा तृतीय सवनांतील सोमरस प्या.

२. सत्याच्या अग्रभागीं असणाऱ्या सत्यस्वरूप देवता तुम्हा दोघांना पहातात. हे अग्नीप्रमाणें प्रज्वलित असणारे अश्विहो, आमची पूजा स्वीकारून तुम्ही सोम प्या.

३. हे अश्विनो, तुमचीं कृत्यें—आकाशांतील बैल (सूर्य) द्युलोक व पृथ्वी—आश्चर्यकारक आहेत. लढाईतील तुमचीं जीं हजारो वचनें आहेत त्या सर्वांसह येथें सोम पिण्याकरतां या.

४. हे यज्ञार्ह अश्विहो, तुमचा भाग येथें ठेवला आहे. ह्या चालूं स्तोत्राकडे या. आमचा मधुर सोम प्या. भक्तांना सामर्थ्यानें सुरक्षित करा.

सूक्त अठ्ठावन्नावें.

(१०)

ऋषि:—मेध्य; देवता-अश्विनी; छंद:—त्रिष्टुभ्.

१. ज्या ह्या यज्ञाला अनेक प्रकार करीत शहाणे ऋत्विज पार पाडतात, आणि जो विद्वान् ब्राह्मण याविषयीं योजला आहे, त्याविषयीं यज्ञ करणाऱ्याला काय ज्ञान आहे ?

२ अनेक ठिकाणीं प्रज्वलित केला जाणारा अग्नि एकच आहे. जगभर प्रकाश पाडणारा सूर्य एकच आहे. हे सर्व एकच उषा प्रकाशित करते. एकापासूनच हा सर्व पसारा झाला.

३. चकाकणारा, ध्वज उभारलेला, तीन चाकांचा, सुखकारक, सुखासन, संपत्तीनें भरलेला, अशा ज्या रथाला जोडण्याकरतां आश्चर्यकारक संपत्ति असलेली उषा उत्पन्न झाली, त्या रथांत बसून उरलेला सोमरस पिण्याकरतां मीं तुम्हांला बोलावतों.

सूक्त एकोणसाठावें.

(११)

ऋषिः—सुपर्ण; देवता-इंद्र व वरुण; छंदः—जगती.

१. प्रत्येक यज्ञांत सोम काढणाऱ्या यजमानाला जेव्हां तुम्ही मदत करतां तेव्हां प्रत्येक सवनांत तुम्ही हपापलेले असतां. हे इंद्रावरुणांनो, तुम्हाला तुमचा भाग दिला आहे. त्यांत मोठेपणाकरतां हे भाग घेत असतात.

२. हे इंद्रावरुणा, जे अन्तरिक्षाच्या मार्गाच्या पलीकडे आहेत आणि ज्याला कोणीहि नास्तिक शत्रू नाहींत, त्या तुमच्यामुळें उदक आणि वनस्पति जोमांत आहेत आणि जोम वाढत आहे.

३. हे इंद्रावरुणांनो, तुमचा भक्त जो कृश त्याचा शब्द खरा आहे. सात छंदांनीं सोमरस ओततात. जो भक्तिमान् तुमचें अंतःकरणपूर्वक संरक्षण मागतो अशा उदाराला हे धनाधिपति, त्यांनीं (सात छंदांनीं) तूं साहाय्य कर.

४. तुपाचे थेंब घातलेल्या, सोमांत मिसळलेल्या व वहाणाऱ्या सात बाहिणी यज्ञांत आहेत. ह्या सामर्थ्य प्रसवणाऱ्या तुमच्या आहेत. त्यांच्या साहाय्यानें हे मित्रावरुणानो, देणग्या द्या आणि संरक्षण करा.

५. उत्कृष्ट भाग्य प्राप्त व्हावें म्हणून सत्य, दोन तेजस्वी तारे, मोठें सामर्थ्य आणि राजसत्ता तुझेपाशीं आहे असें मी वर्णितों. हे वैभवाधिपति इंद्रावरुणांनो, तुपाच्या आहुति देणाऱ्या आम्हांला एकवीस वेळां मदत करावी.

६. हे इंद्रावरुणहो, जे पूर्वींच्याकालीं ऋषींना तुम्ही विचार, वक्तृत्वशक्ति, गायन आणि ज्ञान दिलेंत आणि यज्ञ करणाऱ्या शहाण्या लोकांनीं जीं स्थानें निर्माण केलीं तीं म्या तपानें जाणलीं.

७. हे इंद्रावरुणहो, भक्तांना नम्रता, उदारपणा आणि विपुल संपत्ति द्या आणि आम्हांला अन्न, ऐश्वर्य, मुलेबाळें आणि दीर्घायुष्य द्या.

येथें वालखिल्य संपलें.

सूक्त साठावें.

ऋषिः—भर्ग प्रगाथपुत्र; देवता-अग्नि; छंदः—१. ३.५.७.९.११.१३.१५.१७.१९. बृहती, २.४.६.८.१०. १२.१४.१६.१८.२०. सतोबृहती.

१. हे अग्ने, यज्ञीय अग्नीसह तूं ये. देवांना बोलावणाऱ्या तुझा, मी अंगीकार करतों. यज्ञांत येऊन आसनावर बसलेल्या यज्ञार्ह अशा तुला तुपांनीं भरलेली आम्ही धरलेली पळी प्राप्त होवो.

२. हे बलपुत्र, व अंगिरांनीं प्रथम उत्पन्न केलेल्या अग्ने, तुझ्याकडे आमच्या (आहुति देणाऱ्या तुपाच्या) पळ्या येत आहेत. म्हणून अन्नामुळें उत्पन्न झालेल्या आणि तुपामुळें ज्वाला उत्पन्न झालेल्या प्राचनि अग्नीस आम्ही स्तवीत आहोंत.

३. हे अग्ने, तूं दूरदृष्टि आणि विधाता आहेस. हे पावका, तूं देवांना बोलावणारा व यज्ञार्ह आहेस. हे तेजस्विन्, आनंददायक आणि यज्ञीय असणारा तूं यज्ञांत मननीय स्तोत्रांनीं स्तुत्य आहेस.

४. हे अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, आमची इच्छा करणाऱ्या देवांना प्रेमळ अशा माझ्याकडे तूं हवि भक्षणाकरतां दररोज घेऊन ये. हे सर्वव्यापक अग्ने, व्यवस्थित ठेवलेल्या अन्नाकडे तूं ये. आणि स्तुति करून स्थापन केलेला तूं प्रसन्न हो.

५. हे संरक्षण करणाऱ्या अग्ने, तूंच दूरदृष्टि, सत्य आणि सर्वव्यापक आहेस हे प्रज्वलित झालेल्या तेजस्वी अग्ने, ज्ञाते स्तोते तुझीच उपासना करतात.

६. हे अतिशय प्रज्वलित असणाऱ्या अग्ने, तूं आम्हांला तेजम्वी कर. तूं प्रार्थना करणाऱ्या भक्तांना सुखी कर. तूं उदार आहेस. माझी माणसें सुखांत असोत. पराभव करणारे ते अग्नीची उपासना करोत.

७. हे अग्ने, जसें तूं जामिनिवरचें वाळलेलें लाकूड जाळतोस त्याप्रमाणें हे मित्रपूजिता, जो आमचा द्रोह करणारा दुर्मति आहे त्याला तूं जाळून टाक.

८. आमच्या बलवान् मर्त्य शत्रूंना तूं ताब्यांत घे. तसेंच वाईट बोलणाऱ्या शत्रूंनाहि तूं ताब्यांत घे. हे अत्यंत तरुण असणाऱ्या अग्ने, त्रास न देतां, संकटांतून बचावून चांगल्या प्रकारें आमचें संरक्षण कर.

९. हे अग्ने, एका प्रार्थनेनें माझें संरक्षण कर. दुसऱ्या प्रार्थनेनें कर. हे अन्नपते, तिसऱ्यानें कर आणि हे सर्वव्यापका, चवथ्यानें कर.

१०. हे अग्ने, सर्व कवडीचुंबक राक्षसांपासून माझें संरक्षण कर. कारण, अत्यंत जवळचा आप्त असणाऱ्या तुझीच यज्ञाकरतां आणि आमच्या उत्कर्षाकरतां आम्ही प्रार्थना करतों.

११. हे शोधक अग्ने, आमचा उत्कर्ष करणारे प्रशंसनीय धन आम्हांस दे. तसेंच हे धन देणाऱ्या अग्ने, आमचा उत्कर्ष करून आम्हांला स्पृहणीय आणि कीर्तिप्रद असें धनुष्य दे.

१२. ज्यामुळें युद्धांत जोर करणाऱ्या आणि प्रहार करणाऱ्या शत्रूंना आम्ही ठार करूं अशी संपत्ति आम्हांस दे. हे बुद्धीला प्रेरणा देणाऱ्या, तूं आमचा अन्न देऊन उत्कर्ष कर. संपत्ति मिळवून देणारीं कृत्यें चांगल्या प्रकारें पार पडूं दे.

१३. हा अग्नि, बैल शिंगें हालवतो त्याप्रमाणें आपल्या ज्वाला हलवीत आहे. ह्या सुदंष्ट्र आणि बलपुत्र अग्नीच्या हनुवटीसारख्या ज्वाला मोठ्या कठीण आहेत.

१४. हे बलवान् अग्ने, तुझ्या (चहूकडे धावणाऱ्या) दाढासारख्या ज्वाला ताब्यांत ठेवणें मोठें कठीण आहे. कारण, तूं चहूकडून वाढत असतोस. हे हवन केल्या जाणाऱ्या अग्ने, तूं आमचे हवि स्वीकारं आणि आम्हाला विपुल उत्कृष्ट संपत्ति दें.

१५. हे अग्ने, तूं लांकडांच्या अरणींत असतोस. तुला लोक प्रज्वलित करतात. नंतर यज्ञ करणाराचे हवि नेतोस. नंतरच तूं देवांमध्यें शोभूं लागतोस.

१६. हे अग्ने, इच्छा पूर्ण करणाऱ्या आणि उत्कर्षशील अशा तुझीच सप्त होते स्तुति करतात. आपल्या तेजानें तूं मेघांना फोडतोस. हे अग्ने, तूं लोकांतून देवाकडे जातोस.

१७. हे यज्ञ करणारेहो, दर्भ तोडणारे व हवि तयार ठेवणारे आम्ही नेहमीं घरांत असणाऱ्या व सर्वत्र असणाऱ्या अग्नीला तुमच्याकरतां व लोकांच्या कल्याणाकरतां बोलावतों.

१८. हे अग्ने, सुंदर सामगायन चाललेल्या सुखदायक यज्ञांत तुझी स्तोत्यासह आम्ही स्तोत्रें म्हणतों आहोंत. म्हणून तुझ्याजवळ असलेलें अनेक प्रकारचें अन्न आमच्या संरक्षणाकरतां तूं मनापासून दे.

१९. हे अग्निदेवा, तूं लोकांचें संरक्षण करणारा आणि राक्षसांना संताप उत्पन्न करणारा आहेस. स्वर्गांचा संरक्षक, गृहरक्षक, कोठेंहि न जाणारा असा तूं थोर गृहपति आहेस.

२०. हे तेजोधन अग्ने, राक्षस आमच्या घरांत न शिरोत. तसेंच राक्षसांची पीडा आम्हांस न होवो. हे अग्ने, दारिद्र्य, भूक आणि राक्षस यांना दूर देशीं दूर हाकून दे.

सूक्त एकसष्टावें.

ऋषिः—भर्ग प्रागाथ; देवता—इंद्र; छंदः—१.३.५.७.९.११.१३.१५.१७. बृहती, २.४.६.८.१०.१२.१४.१६.१८. सतोबृहती.

१. संगीत आणि साधीं अशा दोन प्रकारचीं स्तोत्रें इंद्र लक्षपूर्वक ऐको. बलवान् इंद्र सोम पिण्याकरतां सहानुभूतीनें आमच्याकडे येवो.

२. स्वयंप्रकाश आणि बलवान् अशा त्या इंद्राला स्वतःला बल प्राप्त व्हावें म्हणून द्यावापृथ्वींनीं बलवान् केलें. म्हणून तूं सर्व देवांत मुख्य होऊन बसतोस तुझें अन्तःकरण सोम इच्छिणारें आहे.

३. हे बहुधन इंद्रा, तूं पिळलेला सोम ग्रहण कर. हे अश्वयुक्त इंद्रा, तुला आम्ही जाणतों. तुझ्यावर चालून येऊं शकत नाहीं, तूं शत्रूवर चालून जातोस आणि युद्धांत तूं शत्रूंचा पराभव करतोस.

४. हे सत्यनिष्ठ धनवान् इंद्रा, तूं जशी इच्छा करतोस, तसेंच होतें. हे हनुमान् व वज्रधारी इंद्रा, शत्रूवर तात्काल चालून जाणारे आम्ही तुझ्या कृपेनें अन्न प्राप्त करतों.

५. हे कर्मयोगी इंद्रा, सर्व देवांसह तूं आम्हांला संपत्ति दे. हे शूरा, कीर्तिमान् आणि धन देणाऱ्या तुझी आम्ही भगाप्रमाणें सेवा करतों.

६. हे इंद्रा, तूं घोडे देणारा आणि गाई देणारा आहेस. हे देवा, सुवर्णकान्ति असा तूं खजिन्याचा खा आहेस. हे इंद्रा, तुझें धन कोणीहि नष्ट करूं शकत नाहीं, म्हणून मी जें जें मागतों तें तें मला दे.

७. हे इंद्रा, तूं (दाता आहेस. म्हणून) माझ्याकडे ये. आणि आम्हांला धन देण्याकरतां तूं धन (आम्हाकडून) प्राप्त कर. हे धनवन्ता इंद्रा, गाईंची व घोड्यांची इच्छा करणाऱ्या मला तूं गाईबैल व घोडे दे.

८. हे इंद्रा, तूं अनेक शेंकडो हजारोंचे (गाई बैल वगैरेंचे) कळप आम्हांस देतोस. शत्रूंचीं नगरें फोडणाऱ्या इंद्राला उत्कृष्ट प्रकारें गाऊन आम्ही आमच्याकडे वळवीत आहों.

९. हे कर्तृत्ववान्, अप्रातिहत क्रोध आणि महत्त्व प्रगट करणाऱ्या इंद्रा, जो शहाणा किंवा मूर्ख तुमची स्तुति करतो तो तुझ्या स्तुतीनें अत्यंत आनंदित होतो.

१०. उग्रबाहु, वधकर्ता आणि नगरभेत्ता इंद्र जर माझी प्रार्थना ऐकेल तर संपत्तीची इच्छा करणारे आम्ही कर्तृत्ववान् व धनाधिपति इंद्राची प्रार्थना करूं.

११. आतां सोम पिळल्यावर बलवान् इंद्राला आम्ही मित्र करतों. आतां आम्ही आपल्याला पापी, दरिद्री आणि नास्तिक मानीत नाहीं.

१२. जो रथस्वामी इंद्र चलाख घोडा प्राप्त करतो तो हविर्युक्त यजमानाकडेच जातो. त्या युद्धांत पराभव करणाऱ्या, कर्जासारखी स्तुति असलेल्या, अहिंस्य आणि उग्र इंद्राची आम्ही स्तुति करीत आहोंत.

१३. हे इंद्रा, ज्याची आम्हांस भीति वाटते त्यापासून आम्हांस निर्भय कर. हे धनवन्ता, तूं आम्हाला निर्भय करण्यास समर्थ आहेस. तूं द्वेष्ट्या हिंसक शत्रूंना ठार कर.

१४. हे धनाधिपति इंद्रा, सेवा करणाऱ्या भक्ताच्या संपत्तीचा आणि घराचा उत्कर्ष करणारा आहेस. हे धनवन्ता स्तुत्य इंद्रा, तुला आम्ही सोम काढून बोलावीत आहोंत.

१५. जो इंद्र सर्वज्ञ आहे, वृत्रहन्ता आहे, शत्रूंपासून संरक्षण करणारा आहे, तो श्रेष्ठ इंद्र आमचें संरक्षण करो. आमच्या मधल्याचें, शेवटल्याचें संरक्षण करो. तो आमचें मागून व पुढून संरक्षण करो.

१६. हे इंद्रा, तूं आमचें पाठीमागून पुढून वरून खालून चहूंकडून संरक्षण कर. तूं दैवी आपत्ति आमच्यापासून दूर कर आणि राक्षसी आयुधापासूनहि लांब ठेव.

१७. हे इंद्रा, आज उद्यां आणि परवां तूं आमचें संरक्षण कर. हे सज्जनसंरक्षका, नेहमीं आम्हां स्तोत्यांचें तूं संरक्षण कर. रात्रंदिवस तूं आमचें संरक्षण करावेस.

१८. हा इंद्र वेगवान्, शूर, संपत्तिमान् आणि पराक्रमाला उत्तेजन देणारा आहे. हे शेंकडो पराक्रम करणाऱ्या, तुझें वज्र धारण करणारे दोन्ही हात कामपूरक आहेत.

सूक्त बासष्टावें.

ऋषिः—प्रगाथ काण्व; देवता–इंद्र; छंदः—७-९ बृहती, अवशिष्ट पंक्ति.

१. हे ऋत्विजहो, इंद्राला जर आवडत आहे तर ह्या इंद्राची उत्कृष्ट स्तुति करा. सोमप्रिय इंद्राचें उत्कृष्ट अन्न (सोम) आम्ही सामगायन करून तयार करीत आहोंत. कारण इंद्राच्या देणग्या उत्कृष्ट असतात.

२. अविनाशी, असहाय्य आणि असदृश असणारा हा एकटाच पूर्वींच्या सर्व लोकांपेक्षां उत्कर्ष पावत आहे. सामर्थ्यानें सर्व जगांत श्रेष्ठ ठरत आहे. कारण इंद्राच्या देणग्या सर्वश्रेष्ठ असतात.

३. हा उदार इंद्र घोडा भरधाव सोडून भक्ताकडे जात असतो. हे इंद्रा, पराक्रम करणाऱ्या तुझें सामर्थ्य वर्णनीय आहे. कारण इंद्राच्या देणग्या सर्वश्रेष्ठ असतात.

४. हे बलिष्ठ इंद्रा, ज्यामुळें अन्नेच्छु स्तोत्याचें तूं कल्याण करूं इच्छितोस त्या तुझी आम्ही उत्साहवर्धक स्तोत्रें करीत आहोंत. (तीं ऐकण्याकरतां) तूं ये. कारण, इंद्राच्या देणग्या सर्वश्रेष्ठ असतात.

५. हे इंद्रा, ज्याअर्थीं तूं उदारांतला उदार आहेस त्याअर्थीं तीव्र सोम देऊन पूजा करणारे व नमस्कार करून तुला भूषित करणाऱ्यांना तूं धन दे. कारण इंद्राच्या देणग्या सर्वश्रेष्ठ असतात.

६. मनुष्य विहीरींत डोकावतो, त्याप्रमाणें स्तुति केलेला इंद्र भक्ताकडे पहातो. पाहून प्रसन्न झालेला इंद्र वैभवशाली सोम देणाराला आपला प्रिय मित्र करतो. कारण, इंद्राच्या देणग्या सर्वश्रेष्ठ असतात.

७. हे बहुस्तुत इंद्रा, तुझ्या सामर्थ्यामुळेंच सर्व देव सामर्थ्य प्राप्त करतात. म्हणून तूं सर्व संपत्तीचा धनी आहेस. इंद्राच्या देणग्या सर्वश्रेष्ठ असतात.

८. पराक्रमी इंद्रा, ज्याअर्थीं तूं आपल्या सामर्थ्यानें वृत्राला ठार केलें आहेस त्याअर्थीं यज्ञांत तुझ्यापुढें आम्ही तुझ्या सामर्थ्याचें स्तवन करीत आहोंत. कारण, इंद्राच्या देणग्या सर्वश्रेष्ठ असतात.

९. मन जमलेली स्त्री उपभोग इच्छिणाऱ्या पुरुषाला वश करते त्याप्रमाणें इंद्र काल ताब्यांत घेतो. त्या लोकविश्रुत कृत्यानें तो प्रसिद्धीस आला. कारण, इंद्राच्या देणग्या सर्वश्रेष्ठ असतात.

१०. हे धनवन्ता इंद्रा, तुझ्यामुळें जे सुखांत असतात ते लोक तुझ्या जन्माचा, सामर्थ्याचा आणि पराक्रमाचा गौरव करतात आणि तुला उत्साह उत्पन्न करतात. कारण, इंद्राच्या देणग्या सर्वश्रेष्ठ असतात.

११. हे इंद्रा, संपत्ति मिळेपर्यंत तूं आणि मी

एकत्र होऊं. हे वज्रधारी इंद्रा, कवडीचुंबकहि तुझ्या दातृत्वाची प्रशंसा करतो. कारण इंद्राचें देणें सर्वश्रेष्ठ असते.

१२. आम्ही इंद्राची खरी स्तुति करींत आहोंत खोटी करीत नाहीं. इंद्राची पूजा न करणाराला फार त्रास होतो. आणि पूजा करणारावर इंद्राची अत्यंत कृपा होते. कारण इंद्राच्या देणग्या सर्वश्रेष्ठ असतात

सूक्त त्रेसाष्टावें.

ऋषिः—प्रगाथ; देवता–१२ देव, अवशिष्ट इंद्र; छंदः—१.४.५.७ अनुष्टुभ्,१२ त्रिष्टुभ्,अवशिष्ट गायत्री.

१. ज्या इंद्राकडे पोंचवणारीं कृत्यें देवामध्यें पितृभूत मनूनें केलीं, तो श्रेष्ठ व थोरांतला थोर आमच्या कर्तृत्वामुळें येत आहे.

२. सोमाला उत्पन्न करणारे दगड, ऐकवण्यासारखीं गाणीं आणि स्तोत्रें द्युलोकाला निर्माण करणाऱ्या इंद्राला कधींहि न सोडोत.

३. त्या ज्ञात्या इंद्रानें अंगिरसाकरतां पणीनीं चोरलेल्या गाई शोधून काढल्या. तो ह्या इंद्राचा पराक्रम वर्णित आहे.

४. तो पूर्वींप्रमाणें आतांहि कवींना स्फुरण देणारा, स्तोत्यांचा आधार आणि सुखकर असणारा प्रसिद्ध इंद्र सोमयज्ञांत आमच्या संरक्षणाकरतां येवो.

५. आज हे इंद्रा, स्वाहाकार करणारे यष्टे तुला उद्देशून कर्म करतात. स्तोते धन द्यावें म्हणून तुझी एकदम स्तुति करतात.

६. ज्या इंद्राला स्तोते अहिंसक (दयाळु) मानतात त्या इंद्राच्या ठिकाणीं जगांतील सर्व सामर्थ्य कर्तव्यरूपानें जागृत असतें.

७. जेव्हां सर्व जातीच्या लोकाकडून इंद्राचीं स्तोत्रें केलीं जातात तेव्हां इंद्र आपल्या महत्त्वानें शत्रूंचा फडशा पाडतो. तो श्रेष्ठ इंद्र आमच्या सन्मानाचें स्थान आहे.

८. ज्याअर्थीं तूं मोठमोठं पराक्रम करतोस त्या अर्थीं तुझी ही स्तुति आहे. हे इंद्रा, तूं आपल्या रथाचा मार्ग सुरक्षित करतोस.

९. ह्या बलशाली इंद्राला विविध प्रकारचें अन्न दिलें असतां जग जगतें. पशु गवतानें जगतात त्याप्रमाणें ह्याच्यामुळें सर्व लोक जगतात.

१०. तुझी स्तुति करीत आणि तुझें साहाय्य इच्छित आम्ही मरुतांसहित असणाऱ्या इंद्राची भरभराट करण्याकरतां अन्नपति होऊं.

११. हे शूर इंद्रा, खरोखर यज्ञांत येणाऱ्या तेजस्वी अशा तुझी आम्ही स्तुति करीत आहोंत. तुझ्या साहाय्यानें आम्ही शत्रूला जिंकूं.

१२. जो इंद्र गाणीं गाणारांकडे आणि स्तोत्रें म्हणणारांकडे वेगानें जातो, तो व आम्हाकरतां उदकवर्षाव करणारे मेघ आणि युद्धांत आव्हान चालूं असतां एकत्र होऊन येणारे प्रमुख देव आमच्या संरक्षणाकरतां यवोत.

सूक्त चवसष्टावें.

ऋषिः—प्रगाथ; देवता–इंद्र; छंदः–गायत्री.

१. हे इंद्रा, तुला स्तोत्रें प्रसन्न करोत. हे वज्रधारी इंद्रा, तूं आम्हांला अन्न दे. ब्राह्मणद्वेष्ट्यांना तूं ठार कर.

२. केवळ श्रीमंत असणाऱ्या पणींना तूं लाथा मार. तूं थोर आहेस. तुझ्यासारखा दुसरा कोणीहि नाहीं.

३. हे इंद्रा, तूं पिळलेल्या, व न पिळलेल्या सोमाचा धनी आहेस. लोकांचा तूं राजा आहेस.

४. हे इंद्रा, ये. लोकांकरतां आनंदानें शब्द करीत परत जा. तूं आपल्या तेजानें द्यावापृथ्वीला व्यापून टाकतोस.

५. हे इंद्रा, त्या विभागयुक्त व शेंकडों हजारो धारांनीं वर्षाव करणाऱ्या मेघाला तूं वज्रानें फोड.

६. हे इंद्रा, आम्ही तुला सोम पिळल्यावर दिवसा बोलावतों तसेंच रात्रीं बोलावीत असतों. तूं येऊन आमची इच्छा पूर्ण कर.

७. तो बलवान्, तरुण, विस्तीर्ण मानेचा व कोणापुढेंहि न नमणारा इंद्र कोठें आहे? (कोणाला ठाऊक). कोणता स्तोता तुझी पूजा करीत आहे?

८. कोणाचा सोमरस बलवान् इंद्र उपभोगतो? कोण बरें इंद्राची स्तुति करूं जाणतो?

९. त्यांचीं दानें कोणाची सेवा करतात? हे वृत्रहन्त्या इंद्रा, (तुझ्याशिवाय) कोणाची गाण्यांत अर्थपूर्ण स्तुति असणार आहे? (तुझ्याशिवाय) युद्धांत आम्हांस साहाय्य करणारा कोण आहे?

१०. हा सोम तुझ्याकरतां लोकांत आणि पुरुराजाच्या येथें पिळला जातो. त्या सोमाकडे तूं ये. धांव आणि सोम पी.

११. आर्जीकीय नांवाच्या देशांत शर्यणावत् सरोवरांत आणि सुषोमा नदींत उत्पन्न झालेला हा तुझा आवडता सोम अत्यंत मादक आहे. (तो तूं पी.)

१२. तूं तो मनोहर सोम संपत्ति प्राप्त होण्याकरतां आणि सामर्थ्याकरतां पी. हे इंद्रा, धांवत ये आणि सोम पी.

सूक्त पासष्टावें.

ऋषिः—प्रगाथ; देवता–इंद्र; छंदः–गायत्री.

१. हे इंद्रा, जेव्हां तूं चारहि दिशांकडील लोकांच्याकडून बोलावला जातोस तेव्हां तूं चलाख घोड्यावर बसून ये.

२. जर तूं स्वर्गाच्या (अमृत) प्रवाहावर आनंदानें विहार करीत असशील, किंवा तूं पृथ्वीवर यज्ञांत आनंदांत असशील किंवा अन्तरिक्षांत आनंदांत असशील तर तेथून मी तुला बोलावतों.

३. हे इंद्रा, गाईला (गवत) खाण्याकरतां बोलावतात त्याप्रमाणें थोर आणि कुशल इंद्राला मी स्तुति करून बोलावतों.

४. हे इंद्रा, माहात्म्यशाली तुला रथाला जुंपलेले घोडे वाहून आणोत तसेंच तेजस्वी अशा तुला रथाला जुंपलेले घोडे वाहून आणोत.

५. हे इंद्रा, तुझ्याशीं आपलेपणानें बोललें जातें. तुझीच स्तुति केली जाते. तूं थोर बलशाली आणि ऐश्वर्यकर्ता आहेस. तूं ये आणि आमचा पिळलेला सोम पी.

६. ह्या आमच्या यज्ञांत बसण्याकरतां सोम व अन्न तयार ठेऊन आम्ही तुम्हांस बोलावीत आहोंत.

७. हे इंद्रा, ज्याअर्थी तुला अनेक बोलावणारे आहेत त्याअर्थी तुला आम्ही (सर्वांच्या आधीं) बोलावतों.

८. हे इंद्रा, हा मधुर सोमरस आम्ही तुझ्याकरतां दगडांनीं पिळला आहे. तो तूं प्रसन्न मनानें पी.

९. हे इंद्रा, धनी असणारा तूं सर्वांवर नजर टाक. तूं लवकर आम्हांकडे ये आणि आम्हांला अत्यंत कीर्तिमान् कर.

१०. इंद्र मला सोन्याचे दागिनें घातलेल्या गाई देवो. हे देवहो, इंद्र माझा नाश न करो.

११. मी हजार गाईंच्यावर दिलेले विपुल, शुद्ध व आल्हादक सुवर्ण ग्रहण करतों.

१२. असहाय्य असूनहि दुःखांतून पार पडणारे माझे लोक विपुल संपत्तीनें सधन व कीर्तिमान् होवोत.

सूक्त सहासष्टावें.

ऋषिः—कलि प्रगाथपुत्र; देवता–इंद्र; छंदः–१.३.५.७.९.११.१३. बृहती, २.४.६.८.१०.१२.१४. सतोबृहती, १५ अनुष्टुभ्.

१. हे ऋत्विजहो, तुम्ही त्रास झाला असतां सहाय्यारतां चलाख घोडे असलेल्या आणि संपत्ति दाखविण्याऱ्या इंद्राची सोमयागांत बृहत्साम म्हणून सेवा करा. कुटुंब पोषकाला ज्याप्रमाणें कुटुंबांतील लोक बोलावतात त्याप्रमाणें मी इंद्राला बोलावतों.

२. युद्धांत ज्याचें असुर निवारण करूं शकत नाहींत, देव किंवा मनुष्यहि ज्याला युद्धांत हटवीत नाहींत आणि जो मद आला असतां स्तोत्यांना आणि सोम तयार करणारांना उत्कृष्ट धन देतो.–

३ जो इंद्र, धुतलेल्या घोड्याप्रमाणें आहे, जो आश्चर्यकारक आहे आणि जो सुवर्णमय शरीराचा आहे, तोच वृत्रहन्ता इंद्र अनेक गोसंघाचें आवरण हलवतो.

४. पुष्कळ सांठविलेलें आणि पुरून ठेवलेलें धन जो दात्याला देतो असा देव इंद्रच होय. तो वज्रधारी उत्तम हनुवटीचा आणि काळसर घोडे असलेला इंद्रच भक्ताच्या इच्छा पुरवणारा आहे.

५. हे अत्यंत स्तुत्य आणि शूर इंद्रा, लोकांच्यापासून पूर्वीं आणि आतांहि तूं जें इच्छितोस तीं हवि आणि स्तोत्रें आम्ही तुला देत आहोंत.

६. हे बहुस्तुत, वज्रधारी, तेजस्वी आणि सोम पिणाऱ्या इंद्रा, तूं मद उत्पन्न होण्याकरतां सोम पी. तूंच स्तोत्र करणाऱ्यांना आणि सोम पिळणारांला विपुल धन देतोस.

७. आम्ही ह्या वज्रधारी इंद्राला आतां आणि पूर्वींहि सोमानें पुष्ट करतों. त्याला तुम्ही पुनः आतां युद्धाकरतां सोम द्या. आणि आतां इंद्रहि स्तोत्यांना अनुकूल होवो.

८. चोरहि असला तरी साहाय्य करीत आणि शत्रूंना ठार करीत ह्या इंद्राच्या मार्गांत त्याला सहाय्यच करतो तूं आमचें हें स्तोत्र ऐकून प्रसन्न अन्तःकरणानें ये. हे इंद्रा, आश्चर्यकारक स्तोत्रानें लवकर ये.

९. ह्या इंद्रानें कोणता पराक्रम केला नाहीं ?

कान असलेल्या कोणी याचा पराक्रम ऐकला नाहीं ? ह्या वृत्रहन्त्याची जन्मापासून प्रसिद्धि आहे !

१०. केव्हां बरें ह्या इंद्राचें सामर्थ्य कमी पडेंल ? (केव्हांहि नाहीं.) केव्हां बरें वृत्रहन्त्या इंद्राचे शत्रु ठार केले जात नाहींत ? इंद्र सर्व व्याजबट्टा करणाऱ्या प्रत्यक्ष फलावर नजर ठेवणाऱ्यांना आणि पणींना चोपूनच वठणीवर आणतो.

११. हे वृत्रहन्त्या बहुस्तुत व वज्रयुक्त इंद्रा, आम्ही तुझीं (वेतनाप्रमाणें) नवीं स्तोत्रें म्हणतो.

१२. हे कर्तृत्ववान् इंद्रा, तुझ्यापाशीं लोकांच्या अनेक इच्छा आहेत. तुझें साहाय्य मिळण्याकरतां लोक तुझी स्तुति करतात. शत्रूंचें यज्ञ टाकून आमच्या यज्ञाकडे हे उदारा, तूं ये. आणि हे बलवान् इंद्रा, आमचें स्तोत्र ऐक.

१३. हे इंद्रा, आम्ही तुझे आहोंत. म्हणून आम्ही स्तुति करीत असावें. हे बहुस्तुत इंद्रा, तुझ्याशिवाय आम्हांला कोण सुख देणारा आहे ?

१४. हे इंद्रा, तूं आम्हांस दुर्बुद्धीपासून भुकेपासून आणि निंदेपासून सोडीव. तूं आमचें संरक्षण करण्याकरतां आश्चर्यकारक साहाय्य दे. हे बलवन्ता, तूं मार्ग जाणणारा आहेस.

१५. सोम तुम्हांकरतांच पिळलेला असो, हे कलिवंशजहो तुम्ही भिऊं नका. कारण, हा दुष्ट नाहींसा होत आहे तो आपणाहूनच जातो आहे.

सूक्त सदुसष्टावें.

ऋषिः—मत्स्य सामद किंवा मान्य मित्रावरुणपुत्र किंवा अनेक जालनद्ध मत्स्य; देवता–आदित्य; छंदः— गायत्री.

१. अत्यंत सुख देणाऱ्या त्या क्षात्रियांचें इष्ट सिद्धीकरतां आम्ही साहाय्य मागतों.

२. मित्र, अर्यमा, वरुण आणि आदित्य आपल्या ज्ञानानुसार आम्हांला संकटांतून पार पाडोत.

३. त्यांचे हवि देणारांना आणि संपूर्ण कृत्यें करणारांना देण्याकरतां आश्चर्यकारक व उत्कृष्ट धन आहे.

४. हे वरुण, मित्र आणि आर्यमन्हो, थोर अशा तुमचें रक्षण आम्हांला हवि देण्याकरतां कर्तव्य आहे. म्हणून आम्ही तुमचें साहाय्य मागतों.

५. हे आदित्यहो, आम्ही जिवंत आहोंत तोंच तुम्ही धांवत या. हें बोलावणें ऐकणारेहो, मरणापूर्वींच तुम्ही कोठेंहि असा, या.

६ श्रम करणारांना आणि सोम पिळणारांना जें धन आणि घर द्यावयाचें असेल तें तुम्ही आम्हांला द्या.

७. हे देवहो, दुष्टांचें पाप मोठें असतें. व निष्पाप असणाराचें पुण्य चांगले असतें हे आदित्यहो, आम्ही निष्पाप आहोंत.

८. आम्हाला जाळ्यानें अडकवूं नये. आम्हांला चांगलीं कृत्यें करण्याकरतां जाळ्यांतून मुक्त करावें. इंद्रच प्रसिद्ध आणि सर्वांना ताब्यांत ठेवणारा आहे. (तो आम्हांला मुक्त करो.)

९. हे रक्षणेच्छु देवहो, हिंसक शत्रूंचें जाळें आमच्यावर न पडो. हे देवहो, तुम्ही आम्हांला सोडा.

१०. हे थोर अदिति देवी, इष्टसिद्धीकरतां सुखदायक अशा तुला मी स्तुति करून बोलावतों.

११. हे अदिते देवी, तूं आमचें संरक्षण कर. ह्या खोल आणि उथळ पाण्यांत दुष्ट लोक आमच्या मुलाबाळांना न मारोत.

१२. हे विस्तीर्ण अदिते, निष्पाप असणाऱ्या आम्हांला तझा विस्तार गमनाला उपयोगी पडो. आमची मुलेंबाळें तुझ्यावर जगोत.

१३. जे प्रमुख, अहिंसक, कीर्तिमान् प्रेमानें आमच्या कृत्यांचें संरक्षण करतात—

१४. हे आदित्यहो, बांधलेल्या चोराप्रमाणें हिंसक शत्रूंच्या तोंडातून ते तुम्ही आम्हांला सोडवा.

१५. हे आदित्यहो, हें दुष्ट जाळें आमचा नाश न करतां आमच्यापासून दूर जावो. तसेंच दुर्बुद्धिहि आमचा नाश न करतां दूर जावो.

१६. हे दानशील आदित्यहो, तुमच्या साहाय्यामुळेंच पूर्वी आणि आतांहि आम्ही नेहेमीं उपभोग घेत आहोंत.

१७. हे कुशल देवहो, अनेक चालून येणाऱ्याहि शत्रूंना जगण्याकरतां पापापासून मुक्त करा.

१८ हे आदित्यहो, जें तुमचें सामर्थ्य बुद्धीला बंधनापासून मुक्त करते तें आम्हांला मुक्त केल्यामुळें स्तुत्य होवो.

१९. हे आदित्यहो, जो वेग आम्हांस मुक्त करण्यास समर्थ आहे तो वेग आम्हांपाशीं नाहीं. म्हणून तुम्हीं आम्हांस (तसा जोर देऊन) समर्थ करा.

टीप—जाळ्यांत सांपडलेले मासे सुटकेकरतां आदित्याची स्तुति करीत आहेत.

२०. हे आदित्यहो, आम्हांला यमाचे कृत्रिम व हिंसक शस्त्र पूर्वी, आतां व म्हातारपणींहि ठार न करो.

२१. हे आदित्यहो, तुम्ही शत्रूंचा नाश करा. तसेंच पातकाचा नाश करा. एकत्र झालेलें जाळें विलग करा. तसेंच पाप नष्ट करा.

सूक्त अडुसष्टावें.

ऋषिः—प्रियमेध आंगिरस; देवता-१४-१९. ऋक्ष व अश्वमेध यांची दानस्तुति, अवशिष्ट इंद्र, छंदः—१. ४.७.१० अनुष्टुभ्, अवशिष्ट गायत्री.

१. हे बलशाली आणि संपत्तिमान् इंद्रा, कर्तृत्ववान् आणि दुष्टांचा पराभव करणाऱ्या तुला रथाप्रमाणें सुख प्राप्त होण्याकरतां आणि साहाय्याकरतां मी माझ्याकडे वळवतों.

२. हे बलवन्ता आणि कर्तृत्ववान् इंद्रा, तसेंच पराक्रमी आणि पूजनीय इंद्रा, तूं आपल्या मोठेपणानें जग व्यापून टाकलें आहेस—

३. कीं ज्या मोठेपणामुळें तूं आपल्या हातांत पृथ्वीवर फिरणारें सुवर्णमय वज्र धारण करतोस.

४. सर्व शत्रूंवर चालून जाणाऱ्या व कोणापुढेंहि न नमणाऱ्या शक्तींचा अधिपति असणाऱ्या इंद्राला व मरुतांना लोकांच्या रक्षणाकरतां रथांत बसून मी बोलावतों.

५. हे भक्तहो, ज्याला लोक युद्धांत अनेक प्रकारें साहाय्याकरतां बोलावतात त्या सदोदित उत्कर्ष पावणाऱ्या इंद्राला मी साहाय्याकरतां बोलावतों.

६. अमर्याद स्वरूपाचा, स्तुतीनें कल्पना येणाऱ्या, उग्र, धनवान्, संपत्तीचा ईश्वर अशा इंद्राला मी बोलावतों.

७. जो फलदाता इंद्र लोकांच्या मुख्य स्तुतीचा धनी आहे त्याच इंद्राला विपुल संपत्ति मिळावी म्हणून मी सोम पिण्याकरतां प्रेरणा देत आहें.

८. हे बलवान् इंद्रा, ज्या तुझें सख्य मनुष्याला प्राप्त होत नाहीं आणि तुझें सामर्थ्यहि कोणाजवळ नसते.—

९. हे वज्रधारी इंद्रा, त्या त्वां रक्षण केलेले आम्ही तुझ्या साहाय्यानें पाण्यांत आणि सूर्यप्रकाशांत असलेली विपुल संपत्ति युद्धामध्यें जिंकूं.

१०. प्रसिद्ध असणाऱ्या तुला यज्ञांनीं आणि स्तवनांनीं आम्ही आपलासा करतों. हे अत्यंत स्तुतिप्रिय इंद्रा, जसें तूं युद्धांत पुरुमाय्याचें संरक्षण केलेंस (तसें तूं माझें कर.)

११. हे वज्रधारी इंद्रा, तुझें सख्य गोड आणि तुझें देणेंहि गोडच. मात्र तुझा यज्ञ केला पाहिजे.

१२. आमच्या पोराला, नातवाला आणि आम्हांला विपुल धन दे. आमच्या घराचा उत्कर्ष कर. तसेंच आम्ही जगण्याकरतां (इष्ट पदार्थ) दे.

१३. लोकांना (जिंकण्यास) विस्तृत प्रदेश गाईला मोठें गायरान आणि रथाला विस्तृत मार्ग यज्ञानें प्राप्त होतो असें आम्ही मानतों.

१४. सोम पिऊन आनंदित झालेले सहा लोक जोडीजोडीनें उत्कृष्ट देणग्या घेऊन माझ्याकडे येत आहेत.

१५. इंद्रोतापासून दोन चालीवर चालणारे, ऋक्षपुत्रापासून दोन काळसर आणि अश्वमेधापासून दोन लाल घोडे मला मिळाले.

१६. अतिथिग्वपुत्र इंद्रोताचे घोडे रथाला चांगले चालणारे, ऋक्षपुत्राचे घोडे चांगले लगाम असलेले व अश्वमेधाचे घोडे चांगले साज घातलेले देखणे होते.

१७. शुद्धाचरणी अतिथिग्व इंद्रोतापासून संपत्तीसह सहा घोडे आणि सहा घोड्या मला मिळाल्या.

१८. ह्या चालीवर चालणाऱ्या घोड्यांमध्यें एक बळकट तलख चांगला लगाम घातलेली आणि चाबकाच्या इशाऱ्यानें चालणारी दिसते आहे.

१९. हे युद्धांतील बांधवहो, निंदक असणारा मनुष्यहि निर्दोष अशा तुमची निंदा करूं शकत नाहीं.

---

१४. टीप—येथून पुढील (१४-१९) सहा ऋचांत ऋक्ष आणि अश्वमेध यांची दानस्तुति आहे.

१५. टीप—इंद्रोताकरतां १.५१.६वरील टीप पहा.

सूक्त एकोणसत्तरावें.

ऋषिः—प्रियमेध आंगिरस; देवता-११ अर्धा विश्वेदेव व दुसरा अर्ध वरुण, अवशिष्ट इंद्र; छंदः—२ उष्णिह्, ४-६ गायत्री, ११, १६, पंक्ति, अवशिष्ट अनुष्टुभ्.

१. हे अध्वर्यूहो, वीरांना आनंद देणाऱ्या इंद्राला त्रिष्टुभ् छंदांतील स्तोत्र म्हणून अन्न द्या. इंद्र सद्बुद्धि

प्राप्त व्हावी म्हणून कर्म आणि स्तुति करून सेवा केला जातो.

२. उषांना उत्पन्न करणारा, संचार करणाऱ्या नद्यांचा गर्जणारा अधिपति आणि अहिंस्य गाईचा स्वामी अशा इंद्राला तुझ्याकरतां मी बोलावतों. तूं गाईचें अन्न (दूध) इच्छितोस.

३. त्रिकाळीं स्वर्ग, आकाश आणि भूलोकावर विपुल दूध असलेल्या चित्रविचित्र रंगाच्या गाई ह्या इंद्राच्या सोमांत दूध मिसळतात.

४. स्तुतिपति, सत्यप्रिय आणि सत्पति इंद्राची तूं यथेच्छ स्तोत्रें म्हणून जोरानें स्तुति कर.

५. जेथें आम्ही इंद्राला स्तवीत आहोंत त्या यज्ञांत तेजस्वी घोड्यांनीं त्याला आणून सोडलें.

६. जेव्हां जवळ असणारा सोम इंद्राला चहूकडून मिळाला तेव्हां वज्रधारी इंद्राकरतां गाईनीं त्यांत मिसळण्याकरतां मधुर दूध उत्पन्न केलें.

७. जेव्हां सूर्य आणि मी जगाच्या मूल स्थानीं व घरीं जाऊं तेव्हां मधुर सोमरस पिऊन मित्र असलेल्या सूर्याच्या एकविसाव्या स्थानीं एकत्र होऊं.

८. हे स्तोतेहो, स्तुति करा. जोरानें स्तुति चालूं द्या. हे प्रियमेधहो, स्तोत्रें म्हणा. मुलेंहि इंद्राला स्तवोत. धैर्यशाली पुढाऱ्याप्रमाणें इंद्राचें स्तवन करावें.

९. कर्णा (गर्गर) वाजूं लागला. हातांनीं वाजविली जाणारीं वाद्यें आवाज करूं लागलीं. धनुष्याचे टणत्कार बाहेर पडूं लागले. आतां इंद्राचें स्तवन सुरू होऊं द्या.

१०. चित्रविचित्र रंगाच्या दुभत्या धष्टपुष्ट गाई ज्याअर्थी येत आहेत त्याअर्थी विपुल सोम पिण्याकरतां तयार करा.

११. इंद्र सोम प्याला, अग्निहि सोम प्याला, (सोम पिऊन) सर्व देवहि तृप्त झाले. वरुणहि येथें येऊन राहो आणि वासराकडे जाणाऱ्या गाईप्रमाणें स्तोत्रेंहि वरुणाकडे घोष करीत जावोत.

१२. हे वरुणा, तूं देवांत श्रेष्ठ आहेस. कारण, तुझ्याप्रमाणें एखाद्या बिळांत जाव्यात त्याप्रमाणें सप्त सिंधु तरंगमय समुद्राकडे वहात जात आहेत.

१३. ज्यानें अनेक चालींनीं चालणारे आणि रथाला चांगले जोडलेले घोडे हवि अर्पण करणाऱ्याकडे जोरानें दौडत नेले त्या गमनशील आणि नेत्या इंद्राचे तें स्वरूप पहा. तो श्रेष्ठ इंद्र दुष्टाकडून सोडला जातो.

१४. सर्वश्रेष्ठ इंद्रच सर्वांना तुच्छ मानतो. इंद्रच सर्व शत्रूंचें अतिक्रमण करून जातो. रमणीय व श्रेष्ठ इंद्रानें केवळ गर्जनेनेंच सळसळणाऱ्या मेघाला फोडून टाकलें.

१५. इंद्रानें धष्टपुष्ट कुमाराप्रमाणें नव्या रथावर आरोहण केलें आणि त्यानें महान् पराक्रमी मृगाला आईबापाकरतां ठार केलें.

१६. हे सुंदर शिरस्त्राण घातलेल्या व गृहपते देवा, तूं सोन्याच्या रथांत आरोहण कर. नंतर आम्ही आकाशांतून संचार करणाऱ्या, अनेककिरण, तेजस्वी, सुखानें नेणाऱ्या आणि निर्मल अशा रथांत आरूढ होऊं.

१७. त्या अशा स्वयंप्रकाश इंद्राजवळ भक्तजन नमस्कार करून बसतात, जेव्हां इंद्राकडे जाण्याकरतां आणि हवि देण्याकरतां स्तोत्रें सुरू होतात तेव्हां ह्या इंद्राचें विपुल धन प्राप्त होतें.

१८. श्रेष्ठ प्रकारच्या दानाकरतां दर्भ तोडणारे आणि हवि तयार करणारे प्रियमेध ह्या इंद्राच्या प्राचीन स्थानाकडे गेले.

सूक्त सत्तरावें.

ऋषिः--पुरुहन्मा; देवता-इंद्र; छंद--१.३.५ बृहती, २.४.६ सतोबृहती, ७-१२ बृहती, १३ उष्णिह्, १४ अनुष्टुभ्, १५ पुरउष्णिह्.

१. जो लोकांचा राजा, रथांत बसून फिरणारा, अप्रतिहत संचार करणारा, सर्व सैन्याचें संरक्षण करणारा, श्रेष्ठ व वृत्रहन्ता आहे त्याचें मी स्तवन करतों.

२. हे पुरुहन्मा, इंद्रालाच तूं साहाय्याकरतां स्तवनांनीं अलंकृत कर. त्या सर्वाधार इंद्राचे ठिकाणीं दोनहि प्रकार आहेत. महान् आकाशांतील सूर्याप्रमाणें त्यानें शत्रूंना ठार करण्याकरतां हातांत वज्र धारण केलें आहे.

३. ज्यानें यज्ञ करून इंद्राला सदोदित उत्कर्ष पावणारा, सर्व स्तुत्य, महान्, अप्रतिहत आणि अचाट सामर्थ्यानें युक्त असें केलें, त्याची बरोबरी कोणत्याहि कृत्यानें कोणीहि करूं शकत नाहीं.

४. ज्याला पराभव ठाऊक नाहीं, उग्र, शत्रुसैन्याचा पराजय करणारा असा जो इंद्र प्रकट झाला

---

७. टीप—एकवीस मरुत्.

असतां अत्यंत वेगानें वाणी त्याची स्तुति करूं लागते. द्यावापृथ्वी त्याची स्तुति करूं लागते.

५. हे इंद्रा, जरी द्युलोक शंभरपट (तेजस्वी) झाला, भूलोक शंभरपट मोठा झाला आणि जरी सूर्य हजारो निर्माण झाले तरी हे वज्रधरा, प्रकट झालेल्या तुझी द्यावापृथ्वी किंवा कोणीहि बरोबरी करूं शकत नाहीं.

६. हे बलिष्ठा आणि कामपूरका इंद्रा, तुझे सर्व पराक्रम महान् सामर्थ्यानें भरले आहेत. तर हे उदार व वज्रधरा इंद्रा, आश्चर्यकारक मदत करून द्या. गोधनयुक्त गौळवाड्यांत आमचें संरक्षण कर.

७. हे दीर्घायुषी इंद्रा, जो चित्रविचित्र रंगांचे घोडे असलेल्या इंद्राला आपले चित्रविचित्र दोन घोडे जोडावयास लावतो (आणि त्याची जो स्तुति करीत नाहीं) त्या नास्तिक मनुष्याला अन्न प्राप्त होत नाहीं.

८. हे ऋत्विजहो, जो लहान किंवा मोठ्या संकटांत आणि युद्धांत साहाय्याकरतां बोलावला जातो त्या थोरांतल्या थोर, आणि देणग्या देण्याकरतां तयार असलेल्या इंद्राची तुम्ही सेवा करा.

९. हे उदारा व शूर इंद्रा, तूं आम्हांला विपुल संपत्ति मिळविण्याकरतां उत्साहित कर, तसेंच हे धनवान् इंद्रा, दान करण्याविषयीं मला उत्सुक कर. श्रेष्ठ प्रकारची कीर्ति मिळविण्याविषयीं मला उत्सुक कर.

१०. हे इंद्रा, तूं यज्ञाची इच्छा करणारा आहेस. तुझी निंदा करणारांना तूं वठणीवर आणतोस. हे विपुलधनयुक्ता इंद्रा, तूं दासाला पायाखालीं धर आणि हत्यारांनीं ठार कर.

११. हे इंद्रा, दुसरेंच नेमधर्म करणारा, मानवांचीं कृत्यें न करणारा, अयाजक आणि नास्तिक अशाला सखा पर्वत स्वर्गावरून धुडकावून देतो. आणि पर्वत त्या दस्यूला मृत्यूच्या तडाख्यांत देतो.

१२. हे बलिष्ठ इंद्रा, लाह्याप्रमाणें आम्हांला देण्याकरतां ही संपत्ति तूं हातांत घे. आमच्याकरतां तूं दोनदा संपत्ति हातांत घे. कारण तूं आमचा उत्कर्ष इच्छितोस.

१३. हे मित्रांनो, तुम्ही कर्तृत्व करण्याची इच्छा करतां. पण तुम्हांला शराची (इंद्राची) स्तुति कशी साधेल ? इंद्र उदार, उत्साह देणारा आणि कोणापुढेंहि न नमणारा आहे.

१४. हे सर्वपूज्य इंद्रा, तूं यज्ञ करणाऱ्या अनेक ऋषीकडून स्तुति केला जातोस. अशा प्रकारें स्तुति करणाऱ्या एक एकाला हे इंद्रा, तूं वासरें देतोस.

१५. उदार इंद्रानें लढाईत जिंकलेल्या गाई वासरासुद्धां कानाला धरून आमच्याकडे आणव्यात. शेळी जशी कान धरून आणतात तशा दूध पिण्याकरतां आण.

सूक्त एकाहत्तरावें.

ऋषिः—सुदीति व पुरुमिळ्ह, किंवा त्यांपैकीं एक; देवता-अग्नि; छंदः—१-९ गायत्री, १०-१२.१४ बृहती, ११.१३.१५ सतोबृहती.

१. हे अग्ने, तूं आपल्या तेजानें सर्व प्रकारच्या शत्रूपासून आमचें संरक्षण कर आणि मनुष्याच्या द्वेषापासून आमचें संरक्षण कर.

२. हे प्रियजन्म अग्निदेवा, मनुष्याचा राग तुला त्रास देऊं शकत नाहीं. रात्रीं तूंच (प्रकाशत) असतोस.

३. हे शुभप्रकाशा बलपुत्र अग्ने, तूं सर्व देवांसह येऊन सर्वांना हवेसें वाटणारें धन आम्हांस दे.

४. हे अग्निदेवा, ज्या हवि देण्याऱ्याचें तूं संरक्षण करतोस त्याला धनापासून वियुक्त करूं शकत नाहींस.

५. हे ज्ञानी अग्निदेवा, ज्याला तूं यज्ञ करण्याची बुद्धि देतोस तो तुझ्या साहाय्यानें संपत्ति म्हणून गाई प्राप्त करतो.

६. हे अग्ने, तूंच भक्तांना मूल्यवान् धन देतोस म्हणून तूं आम्हांला धनाकडे ने.

७. हे सर्वज्ञ अग्ने, आमचें रक्षण करणारा तूं आम्हांला दुष्ट माणसाच्या तडाख्यांत देऊं नकोस.

८. हे अग्निदेवा, तुझी देणगी कोणीहि नास्तिक नष्ट करूं शकत नाहीं, सर्व उत्कृष्ट संपत्तीचा तूं धनी आहेस.

९. हे बलश्रेष्ठ उदार मित्रा, तूं स्तुति करणाऱ्या आम्हाकरतां विपुल संपत्ति निर्माण कर.

१०. प्रज्वलित आणि दर्शनीय अग्नीकडे आमचीं स्तोत्रें जावोत आणि आमच्या संरक्षणाकरतां संपत्तिमान् आणि अत्यंत स्तुत्य अग्नीकडे हवीसह आमचे यज्ञ पोंचोत.

११. जो अमर अग्नि लोकांकडून हवन केल्यामुळें आनंद देत लोकांत आणि देवांत अशा दोन ठिकाणीं असतो तो सर्वज्ञ बलपुत्र अग्नि उत्कृष्ट धन मिळण्याकरतां आम्ही स्तवितों.

१२. ह्या आरंभलेल्या यज्ञांत, देवांच्या पूजनाकरतां इतर देवतांच्या आधीं, शेत मिळावें म्हणून आणि शत्रू चालून आला असतां मी अग्नीचीच स्तुति करतों.

१३. जो उत्कृष्ट संपत्तीचा धनी आहे तो अग्निदेव आम्हांला मित्र म्हणून अन्न देवो. उदार आणि शरीरसंरक्षक अग्नीला आम्ही पुत्रपौत्राकरतां संपत्ति मागतों.

१४. हे पुरुमिळ्हा, तूं प्रज्वलित अग्नीचीं स्तोत्रें म्हणून साहाय्याकरतां स्तुति कर. प्रसिद्ध असणाऱ्या अग्नीची संपत्तीकरतां स्तुति कर. आणि सुदीतीकरतां घर माग. (असें सुदीति पुरुमिळ्हाला म्हणाला).

१५. शत्रूंचा नाश होण्याकरतां आम्ही अग्नीची स्तुति करतों. त्यानें सुखशांति द्यावी म्हणून आम्ही त्याची स्तुति करतों. सर्व लोकांच्या राजाप्रमाणें ऋषूंच्यावर उदार बुद्धि ठेवणारा आणि स्तुत्य असा तो असो.

सूक्त बहात्तरावें.

ऋषि:—हर्यत प्रगाथपुत्र; देवता–अग्नि किंवा हवि; छंद:—गायत्री.

१. हे अध्वर्यूंहो, हवि सिद्ध करा. कारण, अग्निदेव आला आहे. ह्याला हवि देऊं जाणणारा अध्वर्यु फिरून यज्ञ करूं इच्छितो.

२. मनूच्या येथें अग्नीचें सख्य उपभोगणाऱ्या स्तोत्यानें तीक्ष्ण ज्वालेच्या अग्नीची स्थापना केली.

३. दुःख नष्ट करणाऱ्या त्या अग्नीची स्थापना आपल्यापुढें करावी असें लोक मनांत इच्छितात आणि स्तोत्र म्हणून सुप्तावस्थेंत असणाऱ्या त्याला प्रज्वलित करतात.

४. अन्नदाता अग्नि सर्वव्यापक आकाशाला तप्त करीत आहे. कारण, अग्नि पाण्यांत शिरला आहे आणि तो मेघ फोडीत आहे. (दावाग्निपक्षीं अरण्यांत शिरला आहे. दगड उष्णतेनें फोडीत आहे.)

५. लहान मुलाप्रमाणें बागडणारा आणि चमकणारा अग्नि आपल्याला आडवणारा जाणत नाहीं. स्तुति करण्याकरतां तो स्वतः स्तोत्याची इच्छा करतो.

६. त्याचे मोठाल्या घोड्याप्रमाणें जोडलेले मोठें वाहन दिसूं लागलें. त्याच्या दोऱ्याहि दिसूं लागल्या.

७. सात (ऋत्विज्) एकीचें दोहन करीत आहेत. खळखळणाऱ्या नदीच्या तीरावर दोघे जन (प्रतिप्रस्थातृ व अध्वर्यु) पांच जनांना (यजमान, ब्रह्मा, होतृ, अग्नीध्र आणि प्रस्तोतृ) प्रेरणा देत आहे.

८. दहांनीं सेवा केलेल्या इंद्रानें त्रिधारी हत्यारानें स्वर्गांतील विवस्वानाचा खजिना मोकळा केला.

९ तीन वर्णांचा वेगवान् अग्नि अत्यंत रसरशीत ज्वालेनें यज्ञांत उत्पन्न होत आहे. होते त्यांत मधुर पदार्थ (आहुति म्हणून) टाकीत आहेत.

१०. नमस्कार करून खोल, उंच चाकाचे, वाटोळे फिरणारे, खालीं द्वारें असलेले आणि अक्षीण असें पात्र अग्नींत ओततात.

११. दगडांनीं जवळ जाऊनच पिळलेला मधुर रस खोलगट (महावीर) पात्र ओतण्याच्या वेळीं पुष्कर पात्रांत घातला.

१२. हे गाईनो, तुम्ही आतां खोल पात्राचें संरक्षण करा. कारण यज्ञांत हवि पुरविणारीं हींच मोठालीं पात्रें आहेत. त्याचे दोनहि कान सुवर्णमय आहेत.

१३. (दूध) पिळल्यावर त्यांत द्यावापृथ्वींत असलेले मिश्रणीय पदार्थ घाला आणि त्या रसांत अग्नीची स्थापना करा.

१४. त्या गाईनीं आपलें स्वतःचें स्थान (महावीरपात्र) जाणलें. वासरें गाईकडे जातात त्याप्रमाणें त्यांचें दूध इष्ट माणसांना जाऊन मिळालें.

१५. भांड्याच्या काठावरून भक्षण करणाऱ्या अग्नीचें अन्न, इंद्राला व अग्नीला स्वर्गांत व अन्तरिक्षांत जाऊन मिळतें.

१६. वायूनें सूर्याच्या सात किरणांनीं पोषक अन्न आणि रस सप्तपादात्मक मध्यम वाणींतून (आकाशांतून उत्पन्न) केलें.

१७. हे मित्रावरुणहो, सूर्य उगवला असतां आम्ही सोमाचा स्वीकार करतों. सोमच आतुराचें औषध होय.

१८. सोम देऊं इच्छिणाऱ्या माझ्या यज्ञांत उत्तर वेदीवर बसून अग्नि आपल्या ज्वालांनीं आकाश व्यापतो.

सूक्त त्र्याहत्तरावें.

ऋषि:—गोपवन आत्रेय किंवा सप्तवध्रि; देवता–अश्विनी; छंद:—गायत्री.

---

११. टीप:—पुष्कर पात्र सध्यां यज्ञीय पात्रांत प्रसिद्ध नाहीं.

१. हे अश्विहो, सद्धर्मानुसार वागणाऱ्या माझ्याकरतां उद्याला या. तुमचा रथ जोडा. तुमचें साहाय्य आम्हाला लवकर प्राप्त होवो.

२. डोळ्याचें पातें मिटतें इतक्या वेगशाली रथानें तुम्ही या. तुमचें सहाय्य आमच्या सन्निध असो.

३. अत्रीकरतां अग्नि पाण्यानें तुम्ही नाहींसा केलात. तसें तुमचें साहाय्य आमच्या सान्निध असो.

४. हे आश्विहो, तुम्ही कोठें आहांत ? आतां कोठें जात आहांत, बहिरससाण्याप्रमाणें तुम्ही कोठें जात आहांत ? तुमचें साहाय्य आम्हांला लवकर प्राप्त होवो.

५. ज्याअर्थीं तुम्ही आज कोठेंहि असला तरी आमचें बोलावणें ऐकता, त्याअर्थीं तुमचें साहाय्य आम्हांला लवकर प्राप्त होवो.

६. पहिल्या प्रहरांत बोलावले जाणारे आश्विदेवहो, तुम्ही माझे अगदीं जवळचे आप्त व्हावें म्हणून मी तुम्हाला याचना करतों. तुमचें साहाय्य आम्हांला लवकर प्राप्त होवो.

७. हे अश्विहो, तुम्ही अत्रीकरतां संरक्षक गृह तयार केलेंत. तसें तुमचें साहाय्य आम्हांला लवकर प्राप्त होवो.

८. हे आश्विहो, मधुर (स्तुति) बोलणाऱ्यांना उष्णतेपासून तुम्ही संरक्षिलेंत. तसें तुमचें साहाय्य आम्हांला लवकर प्राप्त होवो.

९. हे अश्विहो, सप्तवध्रीच्या स्तोत्रानें (त्याला अडकवून ठेवणारी पेटी) अग्नीच्या ज्वालांनीं जाळून टाकलीत तसें तुमचें साहाय्य आह्मांला लवकर प्राप्त होवो.

१०. हे संपत्तीचा वर्षाव करणारे आश्विदेवहो, येथें आमच्याकडे या आणि आमचें स्तोत्र ऐका आणि तुमची कृपा आमच्यावर नेहेमीं असूं द्या.

११. हे आश्विहो, तुम्हांला जुनाट म्हाताऱ्याप्रमाणें वरचेवर बोलवावें लागत आहे. काय बरें हे ? तुमची कृपा आमच्यावर नेहेमीं असूं द्या.

१२. हे अश्विहो, तुम्ही एकसारखे आहांत आणि तुमचा जातिस्वभावहि एकसारखाच आहे. तुमचें साहाय्य आमच्या सान्निध नेहेमीं असूं द्या.

१३. तुमचा जो रथ आहे तो अन्तरिक्षांत आणि द्यावापृथ्वींत फिरत असतो. (म्हणून त्या रथानें) तुमचें साहाय्य आम्हांला नेहेमीं असूं द्या.

१४. हे अश्विहो, तुम्ही आम्हांकडे हजारो गाईबैल आणि घोडे घेऊन या. व तुमचें साहाय्य आम्हांला नेहेमीं असूं द्या.

१५. हे अश्विहो, हजारो गाईबैल आणि घोडे यांनीं तुम्ही मला आतिशय प्रसिद्ध करा. तुमचें साहाय्य आम्हांला नेहेमीं असूं द्या.

१६. तांबूस वस्त्र नेसलेली उषा प्रकट झाली. चहूकडे तिचें तेज पसरलें. आतां तुमच्या कृपेचें सान्निध्य आम्हांस असूं द्या.

१७. कुऱ्हाड घेतलेला मनुष्य ज्याप्रमाणें झाडाचे तुकडे करतो त्याप्रमाणें अश्वीनीं अंधार नाहींसा केला. हे आश्विनो, तुमची कृपा आमच्यावर असूं द्या.

१८. हे धैर्यवन्ता सप्तवध्रे, काळ्या लोकांकडून त्रास झालेला तूं शत्रूंच्या नगराप्रमाणें तिला नष्ट केलीस. तशी तुझी कृपा आमच्यावर असूं द्या.

टीप—१८ वी ऋचा सप्तवध्रि स्वतःलाच म्हणतो किंवा गोपवन सप्तवध्रीला म्हणतो आहे.

सूक्त चवऱ्याहत्तरावें.

ऋषिः--गोपवन; देवता–अग्नि, १३.१४.१५ श्रुतर्वणोदानस्तुति; छंदः—१.४.७–१३.१४.१५ अनुष्टुभ्; २.३.५.६ गायत्री.

१. हे यज्ञ करणारेहो, संपत्तीची इच्छा करणारे तुम्ही सर्व लोकांना अतिथीप्रमाणें अत्यंत आवडत्या असणाऱ्या अग्नीची उपासना करा. मी मननीय स्तोत्रांनीं तुम्हांला सुख प्राप्त व्हावें म्हणून गूढ भाषेंत स्तुति करतो.

२. लोक ज्या अग्नीची हवि तयार करून मोठालीं स्तोत्रें म्हणत आणि तुपाच्या आहुति देत प्रशंसा करतात त्या अग्नीची मी स्तुति करतों.

३. जो अग्नि यज्ञांत दिलेले हवि स्वर्गांत पोंचविते त्या सर्वज्ञ आणि स्तुत्य अग्नीची मी स्तुति करतों.

४. ज्या अग्नीमुळें मोठ्या मनाचा ऋक्षपुत्र श्रुतर्वा उत्कर्ष पावतो, त्या अत्यंत पापनाशक मनुष्यांनीं निर्माण केलेल्या अग्नीपाशीं आम्ही येत आहोंत.

५. तो अग्नि अमर, सर्वज्ञ, अंधकार नष्ट करणारा तुपाचें हवन केला जाणारा आणि प्रशंसनीय आहे.

---

९. टीप—५ ७८.५ वरील सप्तवध्रि टीप पहा.

४. टीपः—श्रुतर्वणाकडे भिक्षेकरतां आलेला गोपवन अग्नीची स्तुति करतो.

६. हवन करणारे आणि हातांत स्रुचा घेतलेले दुःखी कष्टी हे लोक ज्या अग्नीला हवि देऊन स्तुति करतात त्या अग्नीकडे आम्ही जात आहोंत.

७. हे अग्निदेवा, ही तुझी नवी स्तुति आम्ही केली आहे. हे आनंददायका, तूं शुभजन्म, सुकर्मा, बुद्धिमान्, देखणा आणि अतिथीप्रमाणें पूज्य आहेस.

८. हे अग्ने, आम्ही केलेली तुझी स्तुति अत्यंत सुखकर आणि अन्नयुक्त आहे. ती तुला प्रिय होवो. अशा प्रकारें स्तवन केलेला तूं वृद्धिंगत हो.

९. ही स्तुति उत्कृष्ट अन्नांनीं संपन्न होऊन लढाईत संपादन केलेल्या कीर्तींत आणखी भर टाको.

१०. घोड्याप्रमाणें वेगवान्, रथाला व्यापून टाकणाऱ्या, तेजस्वी अग्नीची सत्पति इंद्राप्रमाणें हे लोकहो, सेवा करा. त्याच्या साहाय्यानें शत्रूंची संपत्ति व जें कांहीं चांगलें असेल तें नष्ट करा.

११. हे अग्ने, ज्या तुला गोपवनानें स्तुति करून अन्नदाता केलें तो तूं अंगिरसांना पावन करणाऱ्या अग्ने, आमचें स्तोत्र ऐक.

१२. हे अग्ने, ज्या तुला त्रस्त झालेले लोक अन्नप्राप्तीकरतां स्तवितात तो तूं शत्रूंच्या नाशाकरतां जागृत हो.

१३. ऋक्षपुत्र आणि शत्रूंची रग जिरविणाऱ्या श्रुतवर्णाच्या येथें बोलावलेला मी मेंढ्याच्या दाट लोंकरीच्या केंसाप्रमाणें मऊ असणाऱ्या चार घोड्यांच्या डोक्यावरून हात फिरविला.

१४. शविष्ठ श्रुतवर्णाच्या चलाख चार सुंदर रथाला जोडलेल्या चार घोड्यांनीं मला तुग्य भुज्यूला पंखयुक्त नांवानीं नेलें तसें इष्ट स्थलीं नेलें.

१५. हे महानदि परुष्णि, मी तुला खरें सांगतों, हे उदकांनो, तुम्हांलाहि खरें सांगतों कीं, शविष्ठाशिवाय घोडे देणारा दुसरा कोणीहि मनुष्य नाहीं.

सूक्त पंचाहत्तरावें.

ऋषिः—विरूप आंगिरस; देवता—अग्नि; छंदः—गायत्री.

१. अग्निदेवा, देवांना अवश्य आणणाऱ्या घोड्यांना कुशल रथवाल्याप्रमाणें तूं रथाला जोड. आणि मुख्य देवांना बोलावणारा होऊन तेथें बैस.

२. हे अग्निदेवा, तूं आम्हांविषयीं देवांना कांहीं तरी सांगावेंस. तूं अत्यंत ज्ञानी आहेस. आमची सर्व संपत्ति टिकाऊं कर.

३. हे अत्यंत तरुण व बोलावलेल्या बलपुत्र अग्ने, तूंच सत्ययुक्त आणि यज्ञार्ह आहेस.

४. हा अग्नि शेंकडोंच काय पण हजारो प्रकारच्या अन्नाचा धनी आहे. तोच बुद्धिमान् संपत्तीचें मस्तक आहे.

५. कारागीर रथाची धांव वाकवितात त्याप्रमाणें हे अंगिरस अग्नि, तुझ्यासह बोलावलेल्या देवाबरोबर तूं आमच्या यज्ञाला वळण लाव.

६. हे विरूपा, तूं शरणागताचें संरक्षण करणाऱ्या कामपूरक अग्नीचें अविनाशी मंत्रानें उत्कृष्ट स्तवन कर.

७. अत्यंत सूक्ष्मदृष्टि अग्नीच्या ज्वालारूपी सेनेनें गाईकरतां आम्ही कोणत्या कवडीचुंबकाचा पराभव करावा बरें ?

८. पान्हा आलेल्या गाई वासरांना सोडीत नाहींत त्याप्रमाणें देव आम्हांला न सोडोत.

९. समुद्राच्या लाटा नौका फोडतात त्याप्रमाणें अट्टल द्वेष्ट्याची दुर्बुद्धि आमचा नाश न करो.

१०. हे अग्निदेवा, लोक सामर्थ्य प्राप्त व्हावें म्हणून तुला नमस्कार करतात. (म्हणून मीहि नमस्कार करतों.) सामर्थ्यांनीं शत्रूंचा नाश तूं कर.

११. हे अग्निदेवा, आम्हाला संपत्ति प्राप्त व्हावी म्हणून आम्हाला वेढून ऐस. उत्कर्ष करणारा तूं आमची संपत्ति वाढीव.

१२. ओझें वाहणारा ओझें तोलेनासें झाल्यावर ओझें टाकतो त्याप्रमाणें ह्या युद्धांत तूं आम्हांला सोडूं नकोस. तूं शत्रूंची संपूर्ण संपत्ति जिंक.

१३. हे अग्ने, ही तुझी त्रास देण्याची शक्ति आहे ती आम्हांशिवाय दुसऱ्यांना भय उत्पन्न करो.

१४. ज्या नमस्कार करणाऱ्याचीं आणि चांगलीं कर्में करणाराचीं कर्में तूं उपभोगतोस त्याच्याच तूं उत्कर्ष करतोस.

१५. हे अग्ने, पलीकडच्या सेनेपेक्षां अलीकडे आमच्याकडे येऊन तूं आमचें संरक्षण कर. मी ज्यांच्यांत आहे त्यांचें संरक्षण कर.

१६. हे अग्ने, पित्याप्रमाणें कोड पुरविणाऱ्या तुझ्या साहाय्याची आणीव पूर्वीप्रमाणें आम्हांला आतांहि आहे. म्हणून तुझ्याजवळ आम्ही सुखाची याचना करीत आहोंत.

सूक्त शहत्तरावें.

ऋषिः—कुरुसुति काण्व; देवता--इंद्र; छंदः-गायत्री.

१. ह्या कुशल आणि सामर्थ्यानें सर्व जगावर स्वामित्व गाजविणाऱ्या इंद्राला देवांसह शत्रूंचा नाश करण्याकरतां मी बोलावतों.

२. ह्या देवसख्या इंद्रानें शंभर धारांच्या वज्रानें वृत्राचें डोकें तोडलें—

३. उत्कर्ष पावणाऱ्या देवमित्र इंद्रानें आकाशांतून पाणी उत्पन्न करीत मेघाला विदीर्ण केलें.

४. ज्यानें सोम पिण्याकरतां हें सर्व जग देवांसह जिंकलें तो हाच इंद्र होय.

५. देवयुक्त,सोमाचा चोथा घेणारा,ओजस्वी आणि महान् इंद्राला आम्ही स्तुति करून बोलावतों आहोंत.

६. जुन्या मननीय स्तोत्रानें मरुतासह असणाऱ्या इंद्राला हा सोम पिण्याकरतां बोलावीत आहोंत.

७. हे इंद्रा, तूं शतक्रतु, बहुस्तुत आणि इच्छितांचा वर्षाव करणारा आहेस. मरुतांसह असणारा तूं आमच्या ह्या यज्ञांत सोम पी.

८. हे वज्रधारी इंद्रा, मरुतासह असणाऱ्या तुझ्याकरतांच सोम पिळलेला आहे. सामगायन करणारे अन्तःकरणपूर्वक तुला बोलावीत आहेत.

९. हे इंद्रा, मरुतांचा मित्र असणारा तूं यज्ञांत सोम पी. आणि वज्र तीक्ष्ण करीत शत्रूंना ठार कर.

१०. हे इंद्रा, दोन भांड्यांत पिळलेला सोम पिऊन ऐटीनें तूं दोनहि ओठ फुरफुरविलेस.

११. हे इंद्रा, जेव्हां तूं शत्रूंचा नाश केलास, तेव्हां शत्रूंचा नाश करणाऱ्या तुला द्यावापृथ्वी अनुसरली.

१२. आठ पादांची आणि नव्या कल्पनांनीं भरलेली अशी सत्याला स्पर्शणारी स्तुति इंद्राकरतां मी करीत आहें.

सूक्त सत्त्याहत्तरावें.

ऋषिः—कुरुसुति काण्व; देवता-इंद्र; छंदः-१-९ गायत्री, १० बृहती, ११ सतोबृहती.

१. शेंकडो पराक्रम करणाऱ्या इंद्रानें जन्मल्याबरोबर आईला विचारलें कीं बलवान् कोण आहेत? आणि कोण प्रसिद्ध आहेत?

२. (आई इंद्राला सांगते) लागलीच ती बलशालिनी म्हणाली, और्णवाभ आणि अहीशुव हे आहेत. मुला, त्यांचा तुला निःपात केला पाहिजे.

३. ताबडतोब त्यांना वृत्रहन्त्या इंद्रानें (चाकाचे) अरे तुंब्यांत दोरीनें ओढतात त्याप्रमाणें ओढलें. (शत्रूंचा निःपात केला). मग त्याचा अतिशय उत्कर्ष झाला.

४. सोमाची काठोकाठ भरलेली तीस भांडीं इंद्रानें एका घोटासरशीं पिऊन टाकली. (निरुक्तांत याचा अर्थ वेगळा--तीस दिवस--केला आहे नि. ५. ११)

५. इंद्रानें निराधार आकाशांतील गंधर्वाला (मेघाला) ब्राह्मणांच्याच उत्कर्षाकरतां फोडलें.

६. इंद्रानें चांगलें तयार झालेलें धान्य घेऊन परिपक्क अन्न तयार केलें आणि मेघांना (पाण्याकरतां) फोडलें.

७. हे इंद्रा, ज्या बाणाला तूं बरोबर घेतोस तो शंभर टोकांचा हजार पिसें लाविलेला एकच तुझा बाण आहे.

८. हे ऋभूप्रमाणें (युद्धांत) स्थिर असणाऱ्या इंद्रा, ताबडतोब उत्कर्ष पावलेला तूं स्तोत्याकरतां, पुरुषाकरतां आणि स्त्रियाकरतां खाण्याला पुरेशी संपत्ति त्या बाणानें लुटून आण.

९. ही तुझी अतिशय मोठी व्यापक व जगाला धारण करणारी भयंकर कृत्यें तूं मनःपूर्वक केलीं आहेस.

१०. हे इंद्रा, तूं प्रेरणा दिलेल्या शीघ्रगामी आदित्यानें तें सर्व उदक लुटलें, तसेंच शेकडों टोणगे दुधाची खीर, भात आणि उदकानें भरलेला मेघहि मिळवला.

११. हे इंद्रा, तुझें धनुष्य अनेक चांगलीं कृत्यें करणारें व सुखकारक आहे आणि त्याचा बाण चांगला सोन्याचा आहे. तुझे दोनहि हात अत्यंत रमणीय किंवा युद्धार्ह आहेत. तसेंच ते शत्रूंना रणांत लोळवणारे आणि मर्मभेदक आहेत(निरुक्त पहा.६.३३)

१०टीपः— खरोखर विष्णु यज्ञ होय. त्यानें सर्व देवांचें रक्षण केलें. त्याला फक्त इंद्रच जाणत होता. इंद्राला तो म्हणाला 'तूं कोण?' 'मी मोठाल्या असुरांना ठार करणारा आहे. तूं कोण?' 'मी संपत्ति हरण करणारा आहे.' तूं ठार करणारा आहेस तर एकवीस दगडी किल्ल्यांच्या आंत राहणाऱ्या वराहाला तूं ठार कर. त्याच्याजवळ पुष्कळ संपत्ति आहे. ती मी आणीन. तेव्हां इंद्रानें त्याला ठार केलें आणि विष्णूनें त्याची संपत्ति आणली. ही गोष्ट चरक ब्राह्मणांत दिली आहे. ती खालील ठिकाणीं थोडथोडी आढळते. येथें तेथून संपत्ति लुटल्याचा उल्लेख आहे १. ६१. ७. वरील टीप पहा.

सूक्त अठ्ठ्याहत्तरावें.

ऋषिः—कुरुसुति काण्व; देवता—इंद्र; छंदः—१–९ गायत्री, १० बृहती.

१. हे शूर इंद्रा, आमचा हा पुरोडाश ग्रहण कर आणि शेंकडो हजारो गाई दे.

२. हे इंद्रा, आम्हांला उपभोग्य गाई, घोडे मनोहर सुवर्णालंकारासह द्या.

३. तसेंच आम्हांला कानाला शोभा देणारे अनेक अलंकार द्या. हे धैर्यशाली उदार इंद्रा, तुझीच कीर्ति चहूकडे ऐकिली जात आहे.

४. हे इंद्रा, तुझ्याशिवाय भक्ताचा उत्कर्ष करणारा दुसरा कोणी नाहीं. तुझ्याशिवाय उपभोक्ता व दाता नाहीं. तो सर्वांचीं स्तोत्रें ऐकतो आणि जगाकडे पहातो.

६. कोणाकडूनहि त्रास न पावणारा इंद्र, मानवांचा राग नष्ट करतो. निंदा सुरू होण्याच्या पूर्वींच राग नाहींसा करतो.

७. सोम पिणाऱ्या त्वराशील व वृत्रहन्त्या इंद्राचें भक्तांच्या कृत्यांनींच उदर पूर्ण होतें.

८. हे सोमयुक्त इंद्रा, तुझेपाशीं सर्व संपत्ति, सर्व ऐश्वर्य व सरळपणानें दिली जाणारी दानसंपत्ति एकवटली आहे.

९. धान्य, गाई, अश्व आणि सुवर्ण इच्छिणारी माझी इच्छा तुझ्याकडेच धांव घेत आहे.

१०. हे इंद्रा, तुझ्या आशीर्वादानें मी हातांत विळा घेत आहे. हे धनवन्ता, ह्या आजच्या गव्हाच्या राशीची पूर्तता तुझ्या मुठीनें होऊं दे.

सूक्त एकूणऐशीवें.

ऋषिः—एकदिव् नोधःपुत्र; देवता—१–९ इंद्र; छंदः—१–८ गायत्री, ९ त्रिष्टुभ्.

१. हा सोम कर्तृत्ववान्, न कळणारा, विश्वजेता, फलोत्पादक, ज्ञानी, बुद्धिवर्धक आणि काव्यानें वर्णनीय आहे.

२. हा जें उघडें असेल त्याला झांकतो, रोगी असेल त्याला औषध देतो, अंधळ्याला पहावयास लावतो आणि पांगळ्याला चालावयास लावतो.

३. हे सोमा, शरीराला क्षीण करणाऱ्या परक्यांनीं केलेल्या द्वेषापासून तूं संरक्षण करणारें कवच आहेस.

४. हे चोथा असलेल्या सोमा, तूं आपल्या बुद्धीनें आणि सामर्थ्यानें द्युलोकावरून आणि पृथ्वीवरून आमचा घात करणाऱ्या द्वेष्ट्यांना दूर कर.

५. द्रव्येच्छु लोक द्रव्यापाशीं जातात आणि दात्याकडून धन मिळवतात. तसे हपापलेले लोकहि तुझ्या कृपेनें आपल्या इच्छा पूर्ण करून घेतात.

६. (त्यामुळें) नष्ट झालेलें धन प्राप्त करतो, त्याकरतां तो यज्ञ करण्याची इच्छा करतो आणि नसलेलें आयुष्यहि प्राप्त करतो.

७. हे सोमा, तुझा परिणाम उन्मत्तपणांत होत नाहीं. तूं सुख आणि बल देणारा आहेस. तूं आमच्या मनाला सुख देणारा हो.

८. हे सोमा, तूं (प्याल्यावर) आमचा थरकांप करूं नकोस आणि हे राजा, आम्हांला भीति दाखवूं नकोस. त्वेषानें आमच्या हृदयावर घाव घालूं नकोस.

९. आमच्या घरावर देवाची अवकृपा होऊं नये. हे राजा, जेव्हां तूं आमच्याकडे पहाशील तेव्हां तूं आमच्या द्वेष्ट्यांचा नाश कर. हे रस—वर्षाव करणाऱ्या, हिंसकांचा नाश कर.

सूक्त ऐशीवें.

ऋषिः—कृत्नु भार्गव; देवता—सोम; छंदः—१–८ गायत्री, ९ अनुष्टुभ्.

१. शतक्रतो, तुझ्याशिवाय दुसऱ्या कोणालाहि सुख दे म्हणून मी कधीं बोलावलें नाहीं; तर हे इंद्रा, तूं मला सुखी कर.

२. अविनाशी अशा ज्यानें धन देण्याकरतां पूर्वी माझें संरक्षण केलें, हे इंद्रा, त्या त्वा आम्हांला सुखी करावें.

३. हे इंद्रा, इच्छा पूर्ण करणारा तूं सोम देणाराचें संरक्षण करीत नाहींस काय ? मग हे इंद्रा, तूं आम्हांला समर्थ कां करीत नाहींस ?

४. हे इंद्रा, तूं आमच्या रथाचें संरक्षण कर. हे वज्रधरा, आमचा रथ जर मागें राहिला तर त्याला तूं पुढें काढ.

५. काय बरें हें ! स्वस्थ काय बसलास. आमचा रथ सर्वांत पहिला कर. आमची विजयी कीर्ति जवळ आहे.

६. हे इंद्रा, आमच्या विजयी रथाचें तूं संरक्षण कर. तुला कांहींहि करणें शक्य आहे. म्हणून तूं मला चांगलें विजयी कर.

७. हे इंद्रा, तूं दृढ हो, तूं नगरासारखा आहेस. शत्रूंना हकलून देणाऱ्या तुझीं कालोचित अशीं स्तोत्रें चालूं आहेत.

८. निष्पाप असणाऱ्या आमची निंदा होऊं नये. रणांगण विशाल आहे. युद्ध हितकारक आहे आणि शत्रू नष्ट झाले आहेत.

९. हे इंद्रा, तूं याज्ञिय चवथें नांव धारण करावेंस हेंच आम्ही इच्छित असतों. आणि नंतरच तूं आमचा संरक्षक व्हावेस.

१०. हे अमर देवांनों आणि देवतांनो, एकद्यूनें तुम्हांला आनंदित करून तुमची महती वाढविली आहे. तुम्ही त्याला विपुल संपत्ति द्या. ध्यानधन अग्नि प्रातःकाळीं लवकर येवो.

सूक्त एक्यांशीवें.

ऋषिः—कुसीदिन् कण्वपुत्र; देवता–इंद्र; छंदः—गायत्री.

१. हे इंद्रा, महाबाहु असणारा तूं आम्हांला देण्याकरतां प्रशंसनीय, आश्चर्यकारक आणि संग्रहणीय असें धन उजव्या हातांत घे.

२. हे इंद्रा, तुला आम्ही कर्तृत्ववान्, मोठा धनिक आणि अनेक प्रकारें संरक्षण करणारा असा ओळखतों.

३. हे लोकहो, या. धनाधिपति आणि स्वयंप्रकाश इंद्राची आपण स्तुति करूं या. इंद्राच्या कृपेनें संपत्तीनें आम्हांला कोणी त्रास देणार नाहीं.

४. हे इंद्रा, धन देऊं इच्छिणाऱ्या तुला देव किंवा मनुष्य भीषण बैलाप्रमाणें कोणीहि निवारण करूं शकत नाहीं.

५. सामगानाला आरंभ करा. गाऊं लागा. तो स्तोत्रगायन ऐको व संपत्तीसहित आशीर्वाद देवो.

६. हे इंद्रा, आम्हांला संपत्ति दे. उजव्या व डाव्या अशा दोन हातांनीं आम्हांला संपत्ति दे. आम्हाला संपत्तिरहित करूं नकोस.

७. हे इंद्रा, तूं धन देण्यास आरंभ कर. हे हल्ला करणाऱ्या देवा, तूं कवडीचुंबक लोकांचें धन आण.

८. हे इंद्रा, जें धन वाटण्यासारखें असेल तें शहाण्या अशा आम्हांलाहि मागितल्यावर मिळावें.

९. हे इंद्रा, तुझें अत्यंत रमणीय असणारें धन आम्हाकडे लवकर येवो. इच्छापूर्वक लोक तुझी स्तुति करीत आहेत.

सूक्त ब्यांयशीवें.

ऋषिः—कुसीदिन् काण्व; देवता–इंद्र; छंदः—गायत्री.

१. हे वृत्रहन्त्या इंद्रा, तूं दूर आस किंवा जवळ आस. तेथून मधुर सोम पिण्याकरतां आमच्या यज्ञाकडे धांवत ये.

२. हे इंद्रा, तीव्र आणि मादक अशा तयार केलेल्या सोमाकडे तूं ये. धैर्यानें तृप्ति होईल तसे एकदम पी.

३. हे इंद्रा, तूं सोमानें मद्युक्त हो. हा सोम तुझा क्रोध नष्ट करण्यास पुरेसा होवो. सोम तुझ्या मनाला सुखकारक होवो.

४. हे अजातशत्रो इंद्रा, तूं लवकर ये. कारण, द्युलोकांतल्याहि उत्कृष्ट ठिकाणीं तुला स्तोत्रें म्हणून बोलावलें जातें.

५. हे इंद्रा, हा सोमरस दगडांनीं तुझ्याकरतां कुटून काढला आहे. दुधांत मिसळलेला सोम तुला आनंद व्हावा म्हणून अर्पण करीत आहोंत.

६. हे इंद्रा, माझें बोलावणें ऐक. दुधांत मिसळलेल्या सोमाची चव घे आणि तृप्त हो.

७. हे इंद्रा, जो चमसांत आणि चमू पात्रांत रस पिळून ठेवला आहे तो तूं पी. कारण, त्याचा तूंच मालक आहेस.

८. हे इंद्रा, जो आकाशांतल्या चंद्राप्रमाणें भांड्यामध्यें दिसतो तो तूं प्यावास. कारण, त्याचा तूंच मालक आहेस.

९. हे इंद्रा, ज्या सोमाला श्येनपक्षानें अन्तरिक्षांतील संरक्षकाची पर्वा न करतां पायांत धरून आणला आणि ज्याला कोणी अजून स्पर्शहि केला नाहीं, तो तूं पी. त्याचा तूंच धनी आहेस.

सूक्त त्र्यांयशीवें.

ऋषिः—कुसीदिन् काण्व; देवता–विश्वेदेव; छंदः—गायत्री.

१. बलशाली देवांच्याच साहाय्याची आम्ही आपल्या संरक्षणाकरतां मागणी करीत आहोंत.

२. ते वरुण, मित्र आणि अर्यमा देव आम्हांला नेहेमीं साहाय्य करणारे होवोत. प्रशंसनीय असणारे ते आमचा उत्कर्ष करोत.

३. हे यज्ञनायकहो, नौकांनीं पाण्यांतून तरून जावें त्याप्रमाणें पसरलेल्या अनेक संकटांतून तुम्ही आम्हांस पार तारून न्या.

४. हे अर्यमन् देवा, सुंदर वस्तु आम्हांला प्राप्त होवोत. हे वरुणा, सुंदर धन आम्हांला प्राप्त होवो. कारण, आम्ही प्रशंसनीय धन तुम्हाला मागत आहोंत.

५. हे ज्ञानी आणि शत्रुहिंसक देवांनो, तुम्ही उत्कृष्ट संपत्तीचे धनीच आहांत. म्हणून हे आदित्यहो, पापी लोकांचें जें धन असेल तें तुम्ही मला द्या.

६. हे उदार देवहो, घरीं असतांना किंवा मार्गांनीं जात असतां आम्ही उत्कर्षाकरतां तुम्हालांच बोलावीत असतों.

७. हे इंद्रा, विष्णो, मरुत आणि अश्विदेवहो, तुम्ही आम्हांला आमच्या ह्या आप्तइष्टामध्यें ठेवा.

८. हे उदारहो, अदितिमातेच्या उदरांत सर्व देवांचा जोडीजोडीनें असणारा भ्रातृभाव आम्ही आतां प्रसिद्ध करतो.

९. हे उदारहो, तुम्ही इंद्रप्रमुख आणि तेजस्वी आहांत म्हणून मी तुमची स्तुति करीत आहें.

सूक्त चवऱ्यांशिवें.

ऋषिः--उशनस् कविपुत्र; देवता–अग्नि; छंदः— गायत्री.

१. यज्ञ करणाऱ्यांनो, मित्राप्रमाणें आवडत्या, श्रेष्ठ, अतिथि व रथाप्रमाणें धन मिळवून देणाऱ्या अग्नीची मी प्रशंसा करतों.

२. शहाण्या माणसाला दोन कामें सांगितलीं जातात त्याप्रमाणें देव त्याला दोन ठिकाणीं स्थापन करतात.

३. हे अत्यंत तरुण अग्ने, तूं हवि देणारांचें संरक्षण कर. आमचीं स्तोत्रें ऐक. तूं आपणहून आमच्या मुलांचें संरक्षण कर.

४. हे अंगिरा अग्ने, हे बलपते, हे देवा, अत्यंत श्रेष्ठ असणाऱ्या तुझी आम्ही कोणत्या प्रकारें स्तुति करावी ?

५. (ऋषि अग्नीला म्हणतो) हे बलपुत्र अग्ने, कोणता यज्ञ करून आम्ही तुला मनोभावानें हवि अर्पण करावेत ? माझा हा नमस्कार मी तुला किती वेळां निवेदन करावा ?

६. हे अग्ने, तूंच आम्हांला स्तोत्रें, चांगलीं घरें, आणि उत्कृष्ट धन यांनीं युक्त कर.

७. हे दंपतींनीं सेवा केल्या जाणाऱ्या अग्ने, संपत्ति मिळावी म्हणून ज्या तुझी स्तुति चालू आहे तो तूं कोणाच्या परिपक्व बुद्धीला प्रसन्न करीत आहेस? (कोणा भक्ताच्या येथें गुंतला आहेस)

८. कर्तृत्ववान् व रणांगणांत अग्रेसर अशा त्या बलवान् अग्नीला भक्त घरांत सुशोभित करतात.

९. हे अग्निदेवा, जो मनुष्य लोकहितकारक तुझ्यासह घरीं राहतो. त्याचा कोणी घात करीत नाहीं उलट तोच दुष्टांना ठार करतो. तोच मुलाबाळांनीं भरभराटीस येतो.

सूक्त पंचायशींवें.

ऋषिः—कृष्ण आंगिरस; देवता–अश्विनौ; छंदः–गायत्री.

१. हे सत्यस्वरूप अश्विहो, माझ्या यज्ञांत मधुर सोमरस पिण्याकरतां या.

२. हे अश्विहो, माझें हें स्तोत्र आणि मधुर सोम पिण्याकरतां बोलावणें ऐका.

३. हे अन्नधन अश्विहो, मधुर सोमरस पिण्याकरतां हा कृष्ण तुम्हांला बोलावीत आहे.

४. हे नेते अश्विहो, मधुर सोमरस पिण्याकरतां तुम्ही स्तवनशील स्तोत्याचें बोलावणें ऐका.

५. हे नेते अश्विहो, मधुर सोमरस पिण्याकरतां शहाण्या स्तोत्याला सुरक्षित घर द्या.

६. हे अश्विहो, मधुर सोमरस पिण्याकरतां अशा प्रकारें स्तुति करणाऱ्याच्या आणि हवि देणाऱ्याच्या तूं घरीं ये.

७. हे वीर्यधन अश्विहो, तुम्ही आपल्या बळकट रथाला मधुर सोमरस पिण्याकरतां रासभ जोडा.

८. हे अश्विहो, तीन बैठकी आणि तीन विभागाच्या रथांत बसून मधुर सोम पिण्याकरतां तुम्ही या.

९. हे सत्यस्वरूप अश्विहो, तुम्ही मधुर सोमरस पिण्याकरतां आमचीं स्तोत्रें ऐकून या.

सूक्त श्याहैशींवें.

ऋषिः--विश्वक कृष्णपुत्र किंवा कृष्ण; देवता–अश्विनौ; छंदः--गायत्री.

१. हे दर्शनीय अश्विहो, रोग बरे करणारे आणि सुख देणारे तुम्ही दक्षाच्या स्तोत्रांनीं स्तविले गेलात.

त्या तुम्हांला विश्वक मुलाकरतां बोलावीत आहे. तुम्ही आपलें सख्य नष्ट करूं नका. रथ जोरानें सोडा.

२. हे अश्विहो, विमनसानें तुमची स्तुति पूर्वी केली होती. तेव्हां तुम्हीं त्याला द्रव्यप्राप्तीची बुद्धि दिलीत. त्या तुम्हांला विश्वक मुलांकरतां बोलावीत आहे. आम्हांला तुमच्या मैत्रीपासून दूर लोटूं नका. रथ जोरांत सोडा.

३. अनेकांचें पोषण करणाऱ्या अश्विहो, तुम्ही धनेच्छु विष्णापूला ही समृद्धि दिलीत. त्या तुम्हांला विश्वक मुलाकरतां बोलावीत आहे. आम्हांला तुमच्या मैत्रीपासून लोटूं नका. रथ जोरांत सोडा.

४. हे अश्विहो, शूर, धन देणारा व सोमप्रिय अशा इंद्राला दूर असला तरी आम्ही साहाय्याकरतां बोलावीत आहोंत. पित्याची मुलावर प्रीति असते त्याप्रमाणें ज्याची उत्कृष्ट स्तुति अत्यंत मधुर असते,त्याला मी बोलावतों. मला तुमच्या सख्यापासून तुम्ही दूर लोटूं नका. रथ जोरांत सोडा. (आम्हांला मुक्त करा.)

५. (सत्याची प्रशंसा) हे अश्विहो, त्रिकालाबाधित नियमानें सूर्यदेव अस्ताला जातो. सृष्टिनियमानें त्याचें शिंग जोरानें (प्रातः काळीं) प्रसिद्ध होतें. सैन्ययुक्त शत्रूंच्या महान् सैन्याचाहि सृष्टिनियमानें पराजय होतो. म्हणून तुम्ही आम्हांला तुमच्या सख्यापासून दूर लोटूं नका. रथ मोडा व या.

सूक्त सत्त्यांयशीवें.

ऋषिः—द्युम्नीक वासिष्ठ किंवा प्रियमेध आंगिरस किंवा कृष्ण; देवता—अश्विनौ; छंदः—१.३.५ बृहती, २-४-६ सतोबृहती.

१. हे अश्विहो, पाऊस पडत असतां विहीर जशी भरलेली असते तशी तुमची स्तुति अन्नधनाची समृद्धि करणारी आहे. म्हणून सोमरसाकडे या. हे नायकहो, तुम्हांला तो प्रिय आहे. गौर मृग जसे तळ्याचे काठीं जातात. त्याप्रमाणें (तुम्ही येऊन) सोमरस प्या.

२. हे आश्विनो, मधुर सोमरसानें भरलेलें घर्मपात्र प्या. हे नायकहो, दर्भासनावर बसा. मानवांच्या घरीं आनंदित झालेले तुम्ही अन्नासह सोमरस प्या.

३. हे अश्विहो, प्रियमेध तुम्हापाशीं सर्व प्रकारची मदत मागता झाला. यजमानाच्या सर्वसेवित यज्ञाकडे सकाळींच यज्ञगृहांत तुम्ही या.

४. हे अश्विहो, तुम्ही मधुर सोमरस प्या. यज्ञांत चांगल्या प्रकारें बसा. गौरमृग तटाकावर जातात त्याप्रमाणें सोम पिऊन आनंदीत झालेले तुम्ही स्तोत्रें ऐकण्याकरतां या.

५. हे अश्विहो, तुळतुळीत ठिपकेदार घोड्यावर बसून तुम्ही आतां या. हे दर्शनीय, सुवर्णरथ, उदकरक्षक आणि सद्धर्मांची अभिवृद्धि करणारहो, तुम्ही सोम पिण्याकरतां या.

६. हे अश्विहो, स्तुति करणारे बुद्धिवान् आम्ही अन्नप्राप्तीकरतां तुम्हांलाच बोलावतों आहों. तर हे रमणीय गमनशील व कर्तृत्ववान्हो, तुम्ही आमच्या धाव्यानें लवकर या.

सूक्त अठ्यांयशीवें.

ऋषिः—नोधस् गौतम; देवताः-इंद्र; छंदः-प्रगाथ.

१. हे ऋत्विजहो, आपण दर्शनीय, शत्रूंचा पराभव करणाऱ्या आणि सोम पिऊन मद्युक्त झालेल्या इंद्राला गाई वासराकरतां हंबरतात त्याप्रमाणें दिवसा स्तवूं या.

२. तेजस्वी, दानशील, मेघांनीं झांकलेल्या पर्वताप्रमाणें सामर्थ्यांनीं व्यापलेल्या आणि अनेकांचें संरक्षण करणाऱ्या इंद्राला आम्ही वर्णनीय, शेकडों हजारोंनीं युक्त आणि गाई बैल असलेलें धन लवकर मिळावें म्हणून प्रार्थना करीत आहोंत.

३. हे इंद्रा, मोठाले बळकट पर्वतहि तुला अडवूं शकत नाहींत. माझ्यासारख्या स्तोत्याला तूं धन देऊं इच्छितोस, त्याला तुला कोणीहि प्रतिबंध करत नाहीं.

४. हे इंद्रा, तूं सामर्थ्यानें आणि कर्तृत्वानें योद्धा आहेस. तूं कर्तृत्वानें आणि सामर्थ्यानें सर्व प्राणिमात्रांचा पराभव करतोस. अशा तुला हा स्तोता स्वतःच्या साहाय्याकरतां आपणाकडे वळवीत आहे. कारण गोतमांचा तो पुत्र आहे.

५. हे इंद्रा, द्युलोकभर तुझ्या पराक्रमाची कीर्ति पसरली आहे. पृथ्वी आणि अन्तरिक्ष तुला व्यापूं शकत नाहीं. म्हणून तूं आमचें अन्न स्वीकार.

६. हे धनवान् इंद्रा, जें धन तूं दात्याला देतोस त्या धनाला कोणीहि अडवा येऊं शकत नाहीं. धन देणारा अत्यंत थोर दाता असणारा तूं धन देण्याकरतां उचथ्याचें स्तोत्र ध्यानांत घे.

सूक्त एकूणनव्वदावें.

ऋषिः—वृमेध व पुरुमेध; देवता-इंद्र; छंदः-१.२ प्रगाथ, ५.६ अनुष्टुभ्, ७. बृहती.

१. हे थोडक्यांत बोलणारे स्तोतेहो, वृत्राला ठार करावयास लावणारें बृहत् नांवाचें साम तुम्हीं इंद्राकरतां गा, कीं ज्यामुळें देवांनीं इंद्राकरतां सर्वांना जागृत ठेवणारें दिव्यतेज उत्पन्न केलें.

२. शत्रुहन्त्या इंद्रानें शिव्याशाप देणाऱ्यांना फुंकाऱ्या सरसे उडवून दिले आणि यशस्वी झाला. हे महातेजस्वी मरुद्गणा, ते सर्व तुझ्या मैत्रीचा प्रयत्न करतात.

३. हे स्तोतेहो, तुमच्या थोर इंद्राकरतां स्तोत्र म्हणा. कारण,महापराक्रमी वृत्रहन्ता इंद्र शेकडों धाराच्या वज्रानें वृत्राला ठार करतो.

४. हे धैर्यशाली अन्तःकरणाच्या इंद्रा, कोणालाहि न प्राप्त झालेली थोर कीर्ति तुझींच आहे. ती कीर्ति थोर मनानें तूं आम्हाला दे. हे इंद्रा, मातृभूत उदक सर्वत्र वहात जावो. तूं वृत्राला ठार कर आणि शत्रूला जिंक.

५. हे अनादि धनवन्ता, वृत्रासुराला ठार करण्याकरतां जेव्हां तूं प्रकट झालास तेव्हांच पृथ्वीला तूं दृढ केलेंस आणि अन्तरिक्षाला स्थिर केलेंस.

६. हे इंद्रा, तुझ्याकरतां तेव्हांच यज्ञ उत्पन्न झाला, मंत्रहि उत्पन्न झाले. तसें हास्य उत्पन्न करणारें गाणें उत्पन्न झालें. उत्पन्न झालेल्या आणि होणाऱ्या सर्व जगाला तूं आपल्या महत्त्वानें व्यापलें आहेस.

७. हे इंद्रा, तूं (अपक्क) लहान दिसणाऱ्या (गाईंच्या) ठिकाणीं पक्व दूध उत्पन्न केलेस. सूर्याला आकाशांत उदयाला आणलेस.हे स्तोतेहो, घर्म नांवाच्या सामाप्रमाणें चांगलीं स्तोत्रें म्हणून तुम्हीं इंद्राला उत्साहित करा. स्तुत्य इंद्राला आवडणारें बृहत् नांवाचें साम गा.

सूक्त नव्वदावें.

ऋषिः—नृमेध व पुरुमेध; देवता-इंद्र; छंदः—१.३. ५ बृहती, २. ४. ६ सतोबृहती.

१. वृत्रहन्ता, सज्जधनुष्य, आणि सर्व युद्धांत धांवा केला जाणारा इंद्र नेहेमीं आपल्या येण्यानें आमचीं स्तोत्रें भूषित करो.

२. हे इंद्रा, तूं दात्यांतील श्रेष्ठ आहेस, तूं सत्यस्वरूप आहेस, तूं ईश्वर बनवणारा आहेस, म्हणून तुझ्या सारख्या धनवन्ताला योग्य आणि बलपुत्राला योग्य अशीं मोठी देणगी आम्ही मागत आहोंत.

३. हे स्तुत्य इंद्रा, तुझी स्तोत्रें यथार्थ असोत. हे कृष्णाश्व इंद्रा, जीं तुझ्याकरतां स्तोत्रें केलीं आहेत तीं तूं ऐक.

४. हे भगवन्ता, तूं खरोखर सत्यपराक्रमी आहेस. तूं कोणापुढेंहि न नमतां सर्व दुष्टांना वाकवतोस. हे बलिष्ठ वज्रहस्ता इंद्रा, तूं भक्तांकडे धन आण.

५. हे बलपते इंद्रा, सोम पिणारा तूं यशस्वी आहेस. चालून जातां न येणाऱ्या व अपराभवनीय अशा वृत्रांना तूं लोकसंरक्षक वज्रानें ठार करतोस.

६. हे बलवान् इंद्रा, ज्ञानी अशा तुला आम्ही वाटणीप्रमाणें हक्कानें धन मागतो. मोठ्या झग्याप्रमाणें तुझा आम्हाला आधार आहे. हे इंद्रा, तुझीं सुखें आम्हांला प्राप्त होवोत.

सूक्त एक्याण्णवावें.

ऋषिः—अपाला अत्रिपुत्री; देवता-इंद्र; छंदः—१.२ पंक्ति ३.७. अनुष्टुभ्.

१. (स्नानाकरतां) पाण्यावर जाणारी मुलगी वाटेंत सोमहि प्राप्त करती झाली. (सोमाला) घरीं आणीत असतां (सोमाला) म्हणाली. हे सोमा, तुला मी इंद्राकरतां पिळते, तुला मी समर्थ इंद्राकरतां पिळते.

---

१ टीप—अत्रीला अपाला नांवाची एक मुलगी होती. ती ब्रह्मज्ञानी होती तिच्या शरीरावर कुष्ठासारखा त्वग्रोग उत्पन्न झाला. त्यामुळें नवऱ्यानें तिला टाकली. बापाच्या घरीं येऊन त्याच्या आश्रमांत तिनें इंद्राला उद्देशून तप आरंभिलें. एकदां तिला असें कळलें कीं इंद्राला सोम फार आवडतो. तेव्हां ती सोम मिळविण्याकरतां नदीतीरावर गेली. तेथें स्नान केलें व तिला सोमहि मिळाला. तो घेऊन घरीं येत असतां तिनें तो वाटेंतच खाल्ला. ती सोम खात असतां चावतांना जो आवाज झाला तो ऐकून इंद्राला वाटलें कीं हा सोम कुटणाऱ्या दगडांचाच आवाज आहे. म्हणून तो तेथें आला. व तिला म्हणाला.

इंद्रः—काय येथें दगड सोम कुटतात ?

अपालाः—नाहीं. मी स्नानाकरतां आलें. वाटेंत

२. अपाला म्हणतेः—तो हा समर्थ असणारा तूं आपलें तेज प्रकट करीत (सोम पिण्याकरतां) घरोघर जातोस म्हणून तूं येथेंहि लाह्या, करंभ, पुरोडाश आणि स्तोत्रें यांसहित हा सोम तूं पी.

३. हे इंद्रा, मी तुला जाणूं इच्छितेच. पण येथें तुला ओळखूं शकत नाहीं. (नंतर तोंडांतल्या सोमाला म्हणते) हे सोमा, हळूहळू तूं इंद्राकरतां पाझरूं लाग.

४. तो इंद्र आम्हांला अनेकवार समर्थ करो. तसे तो आम्हाला संपत्तिमान् करो. कारण, पतीच्या रोषाला प्राप्त होऊन इकडे आली असतां इंद्राशीं अनेकवार संगत झालें.

५. (इंद्रानें वर माग असें म्हटलें असतां ती वर मागते) हे इंद्रा, हीं तीन स्थानें आहेत. तीं तूं अंकुरीत कर. बाबाची नापीक जमीन आणि माझ्या हा उदाराच्या नजीकचा भाग.

६. माझ्या बापाची नापकि जमीन, हें माझें शरीर आणि बापाचें डोकें हीं तीनहि स्थानें केशयुक्त कर.

७. रथ, गाडी आणि युग (लहान गाडी) यांच्या छिद्रावर अपालेला तीन वेळां शुद्ध करून सूर्यत्वच करतां झाला.

सूक्त त्र्याण्णवावें.

ऋषिः—श्रुतकक्ष किंवा सुकक्ष आंगिरस; देवता–इंद्र; छंदः—१ अनुष्टुभ्, २–३० गायत्री.

१. हे ऋत्विजहो, सर्व शत्रूंचा पराभव करणाऱ्या लोकांना धन देणाऱ्या, कर्तृत्ववान् व तुमचा सोम पिणाऱ्या इंद्राचीं तुम्हीं स्तोत्रें गा.

२. हे ऋत्विज् व यजमानहो, अनेक लोक ज्याला बोलावित असतात आणि बहुत लोकांनीं स्तविलेल्या त्या देवाला आहे असें तुम्ही म्हणा.

३. नेता इंद्रच आम्हांला विपुल धन आणि अन्न देवो. तो थोर इंद्र गुडघे टेकून (प्रार्थना करणाऱ्या) आम्हाकडे येवो.

४. शिरस्त्राण घातलेला इंद्र हवि देणाऱ्या सुकक्षाचा यवाशिर (गव्हाचें पिठ मिसळलेला) सोम पीवो.

५. हे ऋत्विजहो, त्या इंद्राचीच प्रामुख्यानें सोम पिण्याकरतां स्तुति करा. कारण, सोमपानच इंद्राला उत्साह देणारें आहे.

६. देवांचा देव इंद्र सोमाचा मादक रस पिऊन पराक्रम गाजवून सर्व जगाचा पराभव करतो.

७. (यजमान स्तोत्याला उद्देशून म्हणतो) हे स्तोत्या, सर्वांचा पराभव करतो म्हणून सर्व स्तोत्रांत वर्णन केल्या जाणाऱ्या त्या इंद्रालाच रक्षणाकरतां (स्तुति करून) बोलवा.

८. योद्धा पण पराभव न पावणारा, सोम पिणारा आणि अढळ, अनिवार पराक्रम करणारा आणि नेता अशा इंद्राला बोलवा.

सोम सांपडला तो खाल्ला. खातांना होणारा हा आवाज आहे. सोम कुटणाऱ्या दगडांचा हा आवाज नाहीं.

हे ऐकून इंद्र परत फिरला. तेव्हां अपाला पुनः म्हणाली.

अपालाः—इंद्रा, परत जातोस ? सोम पिण्याकरतां तूं घरोघर जातोस ! मीहि दातांनीं चावून काढलेला सोम पी. लाह्या वगैरेहि मी देतें, त्याहि खा.

इंद्राचा अपमान करीत अपाला पुनः म्हणालीः—तूं इंद्र आहेस असें मला वाटत नाहीं. इंद्र जर घरीं आला तर त्याचा मी चांगला सन्मान करीन.

आलेला इंद्रच आहे असें जेव्हां तिच्या ध्यानांत आलें तेव्हां ती आपल्या तोंडांतील सोमास म्हणाली हे सोमा, तूं आलेल्या इंद्राकरतां हळूहळू उत्पन्न हो. नंतर इंद्र तिच्यावर आसक्त होऊन तिच्या तोंडातून पिळलेला सोम प्याला. नंतर अपालेनें आपली सर्व हकीगत इंद्राला निवेदन केली. मला नवऱ्यानें कुष्ट झाल्यामुळें टाकलें आहे तेव्हां इंद्र तिला म्हणाला. जी तुझी इच्छा असेल ती मी पुरी करीन. बोल, काय इच्छा आहे ?

अपालाः—माझ्या बापाचें टक्कल नाहींसें कर. त्याच्या शेतांत पीक येत नाहीं, तें शेत सुपीक कर. तसेंच मलाहि मुलेंबाळें नाहींत तीं होऊं दे.

इंद्रानें तिच्या बापाचें टक्कल नाहींसें केलें. त्याचें शेत सुपिक केलें आणि तिचें कोड नष्ट करण्याकरतां तिला आपल्या गाडीच्या जुवाच्या भोकाशीं तिनदां घासली. त्याबरोबर तिच्या अंगाचें कातडें निघालें. त्या कातड्यापासून साळू (शल्यक), घोरपड (गोधा), करकोचा (कृकलास) उत्पन्न झालें. अपालेचें शरीर इंद्रानें, सूर्यासारखें तेजस्वी केलें. (शाट्यायनब्राह्मण) ही गोष्ट ह्या सूक्तांत आहे.

[५] टीपः—ह्या ऋचेंत थोडा अश्लील भाग आहे. त्याला थोडे रूपान्तर दिलें आहे.

९. हे वेदगोचरा इंद्रा, ज्ञाता असा तूं आम्हांला विपुल संपत्ति दे. शत्रूंचें धन आम्हांला देऊन तूं आमचें संरक्षण कर.

१०. हे इंद्रा, आमचें संरक्षण करण्याकरतांच शेंकडो हजारो प्रकारचें अन्न व अन्नरस घेऊन आम्हांकडे ये.

११. हे शक्रा, ध्यान करणारे आम्ही ध्यान करून तुझ्याकडे आलों आहोंत. हे पर्वतभेत्त्या व वज्रधारी इंद्रा, लढाईंत घोड्यांच्या साह्यानें आम्ही जय मिळवूं.

१२. हे शतक्रतो, गाई गवतांनीं बोलावतात त्याप्रमाणें स्तोत्रें म्हणून आम्ही तुला बोलावतों आहोंत.

१३. हे शतक्रतो, सर्व लोक कामनापूर्वक तुला बोलावीत असतात. हे वज्रधारी इंद्रा, सर्वांच्या इच्छा पूर्ण कर.

१४. हे बलपुत्रा, कामनापूर्वक स्तवन करणारे लोक तुझ्याकडे येतात. हे इंद्रा, तुझ्यापेक्षां कोणीहि श्रेष्ठ नाहीं.

१५. हे कामपूरक इंद्रा, धन देणाऱ्या व भयंकर (शत्रूंना) पळावयास लावणाऱ्या बुद्धीनें तूं आमचें संरक्षण कर.

१६. (सोमाची स्तुति) हे शतक्रतो इंद्रा, जो अत्यंत यशस्वी व मदकर असणारा सोम आहे त्यानें तूं आम्हांस मद उत्पन्न झाल्यावर आनंदित कर.

१७. हे इंद्रा, जो अत्यंत प्रसिद्ध आहे, जो वृत्रहननाचें सामर्थ्य देतो आणि जो अतिशय ओज देणारा आहे त्या मदकर सोमानें तूं आम्हांस आनंदीत कर.

१८. हे सोम पिणाऱ्या, देखण्या व वज्रधारी इंद्रा, सर्व लोकांस जो तूं देतोस तोच सोम फक्त आम्ही जाणतों.

१९. आनंदी इंद्राकरतां पिळलेल्या सोमाचीं आमचीं स्तोत्रें स्तुति करोत. कवि स्तोत्रें म्हणून सोमाचा सत्कार करोत.

२०. ज्याचें ठिकाणीं सर्व शोभा एकवटतात, जेथें सात होते रमून जातात, त्या इंद्राला सोम पिळण्याकरतां आम्ही बोलावतों.

२१. हे देवहो, 'त्रिकद्रुक' सत्रांत ज्ञानयज्ञाला आरंभ केला. त्याच यज्ञाची भरभराट आमचीं स्तोत्रें करोत.

२२. हे इंद्रा, समुद्राला नद्या मिळतात त्याप्रमाणें सोम तुझ्यांत प्रविष्ट होवोत. हे इंद्रा, तुझ्यापेक्षा कोणीहि श्रेष्ठ नाहीं.

२३. हे बलिष्ठ व जागरूक इंद्रा, जो सोम तुझ्या पोटांत शिरतो, त्याला तूं आपल्या महिम्यानें व्याप्त करतोस.

२४. हे वृत्रहन्त्या इंद्रा, आमचा सोम तुझ्या पोटाला पुरेसा होवो आणि सोम तुझ्या शरीरालाहि पुरेसा होवो.

२५. श्रुतकक्ष अश्वाकरतां तुझें उत्कृष्ट स्तवन करीत आहे. तो गाई प्राप्त व्हाव्यात आणि तेज प्राप्त व्हावें म्हणून इंद्राची पुरेपुर स्तुति करीत आहे.

२६. हे इंद्रा, सोम पिळून झाल्यावर येऊन तूं आम्हांला पुरेसें धन दे. हे इंद्रा, तुला धन द्यावयास हा सोम पुरेसा होवो.

२७. हे वज्रधारी इंद्रा, दुरूनहि चालूं असलेलीं आमचीं स्तोत्रें तुला येऊन पोंचोत. मग आम्ही विपुल धन प्राप्त करूं.

२८. हे इंद्रा, तूं वीरावरच चालून जाणारा आहेस. तूं शूर आहेस आणि युद्धांत अचल असतोस. तुझें मन अशा प्रकारेंच प्रसन्न केलें जातें.

२९. हे धनवन्ता इंद्रा, सर्व भक्तांकडून तुझ्या देणग्या प्राप्त केल्या जातातच. म्हणून हे इंद्रा, मलाहि तूं साहाय्यकारक हो.

३०. हे अन्नपते इंद्रा, तूं एखाद्या आळसट ऋत्विजाप्रमाणें होऊं नकोस. दुधांत मिसळलेल्या सोमानें आनंदित हो.

३१. हे इंद्रा, हत्यारें चालविणारे राक्षस दिवसा किंवा रात्रीं आमच्यावर चालून न येवोत. आले तर तुझ्या साहाय्यानें आम्ही त्यांचा नाश करूं.

३२. हे इंद्रा, तुझ्याच साहाय्यानें स्पर्धा करणाऱ्या शत्रूंचा आम्ही प्रतिकार करूं. कारण, तूं आमचा आहेस आणि आम्ही तुझे आहोंत.

३३. तुझ्यावर निष्ठा ठेवणारे, व तुझी पुनःपुनः स्तुति करणारे स्तोते भक्त तुझीच सेवा करणार.

सूक्त त्र्याणवावें.

ऋषिः—सुकक्ष; देवता—३४ इंद्र व ऋभु, अवशिष्ट इंद्र; छंद गायत्री.

१. (सुकक्ष इंद्राचें गुणवर्णन करतो.) हे सूर्यस्वरूपा इंद्रा, ज्याचें संपत्तिमत्त्व प्रसिद्ध आहे, तो काम-

पूरक, लोकांचें हित करणारा आणि दानशौंड अशांच्या यज्ञांत तूं उदय पावतोस.

२. ज्यानें बाहुबलानें शत्रूंचीं नव्याण्णव नगरें फोडलीं त्याच वृत्रहन्त्या इंद्रानें अहीला ठार केलें.

३. तो कल्याणकारक मित्रभूत इंद्र गाईबैल, घोडे आणि धान्य पाण्याच्या लोंढ्याप्रमाणें आम्हांस देतो.

४. हे वृत्रहन्त्या सूर्या, आज ज्या कांहीं उद्देशानें तूं उदय पावला आहेस तें सर्व तुझ्या स्वाधीन आहे.

५. हे उत्कर्ष पावणाऱ्या सज्जनाधिपते, मी मरणार नाहीं असें जें तूं मानतोस ते अगदीं खरें आहे.

६. जे सोम जवळ किंवा दूर पिळून तयार केले आहेत हे इंद्रा त्या सर्वांकडे तूं जातोस.

७. (यजमान म्हणतात) महान् वृत्राला ठार करण्याकरतां त्या इंद्राला आम्ही सामर्थ्यवान् बनवतों. बलवान् इंद्र कामपूरक होवो.

८. इंद्र देणग्या देण्याकरतां उत्पन्न झाला. ओजस्वी असणारा तो सोम पिण्याकरतांच उत्पन्न झाला. तो इंद्र लोकहितकारक, स्तुत्य, प्रशंसनीय आणि सोम पिणारा आहे.

९. वज्राला धार लावून तयार करावें त्याप्रमाणें स्तोत्र म्हणून आणलेला, बलशाली अपराभवनीय, महान् आणि शत्रूला आघात करतां न येणारा इंद्र धन देऊं इच्छितों.

१०. हे प्रशंसनीय व धनवान् इंद्रा, प्रशंसा केला जाणारा तूं कठीण स्थलीं आम्हांला मार्ग दाखीव आणि हे तूं आतां मनावर घेच.

११. हे इंद्रा, ज्या तुझी अशी इच्छा आहे ती कोणीहि मोडीत नाहीं. तुझी सत्ता देव मोडीत नाहीं मग अल्पसामर्थ्य मनुष्य कशी झुगारील ?

१२. हे सुंदर शिरस्त्राण धारण करणाऱ्या, ह्या दोनहि द्यावापृथ्वी तुझ्या अप्रातिहत सामर्थ्याची सतत उपासना करीत बसतात.

१३. हे इंद्रा, तूंच हें पांढरें शुभ्र दुध काळ्या आणि तांबड्या गाईच्या कासेंत उत्पन्न केलेस.

१४. जेव्हां अहीच्या रागानें सर्व देव पळून गेले होते तेव्हां त्या प्राण्याचें बल त्या सर्वांच्या ध्यानांत आलें.

१५. लागलीच माझ्या वृत्रहन्त्या इंद्रानें त्याचें निवारण केलें आणि पराक्रम गाजवला. तेव्हांपासून अजातशत्रु आणि पराभव न करतां येणारा म्हणून तो प्रसिद्ध झाला.

१६. हे स्तोतेहो, तुम्ही वृत्राचें हनन करणारें लोकाधिक सामर्थ्य ऐकलेंच असेल. तें विपुल संपत्ति मिळविण्याकरतां तुम्हांस देतों.

१७. हे बहुनामन् व बहुस्तुत इंद्रा, जेव्हां तूं आमचा प्रत्येक ठिकाणचा सोम पिण्याकरतां येतोस, तेव्हां आमच्या मनांत गाई मिळाव्यात असें असतें.

१८. अनेक ठिकाणीं ज्याच्याकरता सोम पिळला जातो तो वृत्रहन्ता इंद्र आमचें मनोगत ओळखो. तो समर्थ आमची विज्ञप्ति ऐको.

१९. हे बलिष्ठ इंद्रा, कोणाच्या स्तोत्रानें तूं आनंदित होतोस ? आणि कोणत्या स्तोत्रानें स्तोत्यांना धन देतोस ?

२०. मरुतांसह असणारा वृत्रहन्ता बलवान् इंद्र सोम पिण्यांत कोणाच्या यज्ञांत रमून जातो ?

२१. हे इंद्रा, सोमानें आनंदीत झालेला तूं आम्हांला हजारांनीं चांगलें धन दे. तूं हवि देणारांना धन देणारा आहेस हें मी जाणतों.

२२. उदकरूप पत्नीयुक्त असणारे, आपणांस देवांनीं प्यावें म्हणून इच्छा करणारे हे पिळून तयार केलेले सोमरस वाहूं लागतात आणि त्यांचा तृप्तिदायक चोथा पाण्यांत जातो.

२३. यज्ञांत यजन करीत इंद्राला वृद्धिंगत करणाऱ्या आहुति शेवटल्या दिवसापर्यंत आपल्या सामर्थ्यानें इंद्राला यज्ञांत पाठवीत आहेत.

२४. येथें ते मस्त व सोनेरी केस असलेले दोन घोडे हितकारक अन्न वाहून आणोत.

२५. हे विभावसो अग्ने, तुझ्याकरतां हे सोम तयार केले आहेत. दर्भ पसरले आहेत. तर इंद्राला सोमपानाकरतां आण.

२६. हे यज्ञ करणारांनो, हवि देणाऱ्या तुम्हांला इंद्र तेजस्वी सामर्थ्य देवो. तो स्तोत्यांना रत्नें देवो. हे स्तोतेहो, असें देणाऱ्या इंद्राची तुम्ही स्तुति करा.

२७. हे कर्तृत्ववान् इंद्रा, तुझ्याकरतां सामर्थ्यवान् सोम मी सर्व प्रकारचीं स्तोत्रें म्हणून तयार करीत आहें. तर स्तोत्यांना सुखी कर.

२८. हे कर्तृत्ववान् इंद्रा, जर आम्हांला सुखी करावयाचे असेल तर आम्हांला अत्यंत चांगलें अन्न व धन द्या.

२९. हे शतक्रतो इंद्रा, जर आम्हाला सुखी करावयाचें असेल तर आम्हांला सर्व तऱ्हेचीं सुखसाधनें द्या.

३०. हे इंद्रा, तूं आम्हाला सुख देशील म्हणूनच हे वृत्रहन्त्या, आम्ही सोमरस तयार करून तुला बोलावीत आहोंत.

३१. हे सोमनाथा, तूं आपलें काळसर घोडे जोडून आमच्या सोमरसाकडे यावें. सोमरस पिण्याकरतां यावें.

३२. जो वृत्रहन्ता इंद्र लोकांना (उग्र आणि शान्त) अशा दोन प्रकारें विदित आहे, तो काळसर घोडे जोडून आमच्या सोमरसाकडे येवो.

३३. हे वृत्रहन्त्या, ज्याअर्थी तूं आमचा हा सोम पिणारा आहेस त्याअर्थी हरिद्वर्ण घोडे जोडून आमच्या तयार केलेल्या सोमरसाकडे ये.

३४. इंद्र आम्हांला कौशल्यपूर्ण व संपन्न ऋभूचें ऐश्वर्य देवो. आणि बलवान् इंद्र आम्हांस वाजाचें ऐश्वर्य देवो.

सूक्त चवऱ्याण्णवावें.

ऋषिः —बिंदु किंवा पूतदक्ष आंगिरस; देवता--मरुत्; छंदः--गायत्री.

१. धनवान् मरुतांची मातृभूत गाय भक्तांना पान्हवते आणि रथांना जोडली असतां वाहून नेते.

२. जिच्या जवळ राहून सर्व देव आपले नियम पाळतात, सूर्यचंद्रहि सर्व जगावर दृष्टि टाकण्याकरतां तिच्या जवळ सुखानें राहतात.

३. म्हणूनच सर्व आर्य आणि स्तोते मरुतांनीं सोम पिण्याकरतां यावें म्हणून त्यांची नेहेमीं स्तुति करीत असतात.

४. हा सोम पिळून तयार आहे. ह्याला स्वयंप्रकाश मरुत् आणि अश्विनी पितात.

५. मित्र, अर्यमन् आणि वरुण गाळण्यानें गाळलेला आणि तीन भांड्यांत भरून ठेवलेला स्तुत्य सोम पितात.

६. प्रातःकाळीं होता ज्याप्रमाणें देवांना स्तवून प्रसन्न होतो त्याप्रमाणें इंद्र पिळलेल्या व दूधांत मिसळलेल्या सोमाला पिऊन आनंदित होतो.

७. (ऋषि आपल्याशींच वितर्क करतो) आमचे पुढारी पाण्याप्रमाणें वळून आमच्या येथें केव्हां प्रगट होणार ? ते शत्रुनिवारक आणि शुद्धबल आमच्याकडे केव्हां येणार ?

८. हे मरुतांनो, जातीनें सुंदर अशा महान् देवांचें साहाय्य आम्हांला केव्हां प्राप्त होणार ?

९. ज्या देवांनीं सर्व पार्थिव सृष्टि आणि स्वर्गीय तेजस्वी सृष्टि निर्माण केली ते मरुत् सोम पिण्याकरतां येवोत.

१०. हे मरुतांनो, शुद्धसामर्थ्य आणि दिव्य अशा तुम्हांला सोम पिण्याकरतां मी बोलावतों.

११. ज्या मरुतांनीं द्यावापृथ्वी स्थिर केली त्यांना मी पिण्याकरतां बोलावतों.

१२. आमचा हा सोमरस पिण्याकरतां मेघावर असणाऱ्या त्या बलवान् मरुद्गणाला मी बोलावतों.

सूक्त पंचाण्णवावें.

ऋषिः—तिरश्ची आंगिरस; देवता–इंद्र; छंदः- अनुष्टुभ्.

१. हे प्रशंसनीय इंद्रा, रथवाल्याप्रमाणें आमचीं स्तोत्रें सोम तयार केल्यावर आम्हांला तुझ्याकडे पोंचवितात. हे इंद्रा, गाई वासराकरतां हंबरतात त्याप्रमाणें तुझ्याकरतां आम्ही स्तुति करीत आहोंत.

४. हे प्रशंसनीय इंद्रा, हे तेजस्वी सोम तुला पोंचोत. हा सोम तूं लवकर पी. कारण, चहूकडे तुझ्याकरतां सोम तयार असतो.

३. हे इंद्रा, (स्वर्गावरून) श्येनानें आणलेला व तयार असलेला हा सोमरस तूं पी. कारण तूं सर्व लोकांचा संरक्षण करणारा राजा आहेस.

४. हे इंद्रा, जो तुझी सेवा करतो, त्याचा धांवा तूं ऐक. तूं पराक्रमी मुलाबाळांची आणि गाईबैलांची संपत्ति आम्हांस दे. कारण तूं थोर आहेस.

५. हे इंद्रा, जो तुझ्याकरतां अत्यंत नवीन आणि मोहक स्तोत्रें तयार करतो, तें स्तोत्र प्राचीन सद्धर्माचा उत्कर्ष करणारें, मननीय आणि ज्ञानप्रद आहे.

६. (ऋषि परस्पराला म्हणतात) ज्या इंद्राला आमचीं स्तोत्रें उत्कण्ठित करतात त्याचीच आम्ही स्तुति करतों. त्याच्या अगणित पराक्रमाचे भागीदार व्हावें असें आम्ही इच्छितों.

७. चला, निष्पाप असणाऱ्या इंद्राचीं शुद्ध

---

७. टीपः—पूर्वी इंद्रानें वृत्रासुराला ठार केलें तेव्हां त्याला ब्रह्महत्त्येचा दोष लागला. तेव्हां इंद्र ऋषींना म्हणाला मला ह्या पातकापासून सामगायन करून शुद्ध करा. तेव्हां त्याला ऋषींनीं शुद्ध केलें आणि यज्ञ करून हवि दिले. (शाट्यायन ब्राह्मण)

सामगानें म्हणून स्तुति करूं या. शुद्ध करणाऱ्या सामगायनानें उत्कर्ष पावणाऱ्या इंद्राला दुधांत मिसळलेला शुद्ध सोम आनंदित करो.

८. हे इंद्रा, सामगायनानें शुद्ध झालेला तूं शुद्ध अशा मरुतांसह ये. शुद्ध असा तूं आम्हांला संपत्ति दे. शुद्ध असा तूं सोम पिऊन आनंदित हो.

९. हे इंद्रा, शुद्ध असा तूं हवि देणारांना संपत्ति दे आणि अनेक प्रकारचीं रत्नें दे. शुद्ध असा तूं शत्रूंना ठार करतोस आणि आम्हाला अन्न देऊं इच्छितोस.

सूक्त शहाण्णवावें.

ऋषिः—द्युतान मरुत्पुत्र किंवा तिरश्ची आंगिरस; देवता—इंद्र; छंदः—४ विराज् बाकी त्रिष्टुभ्.

१. ह्याच्यासाठीं उषादेवींनीं आपला प्रवास लांबविला. रात्रीच्या उत्तरकालांत इंद्राकरतां उत्कृष्ट स्तोत्रें म्हटलीं गेलीं. ह्याच्याकरतां उदकानें तुडुंब भरलेल्या सात नद्या कायम झाल्या. आणि लोकांना समुद्रहि सहज तरून जातां येऊं लागले.

२. एकट्या वज्रानें पर्वतांची एकवीसहि शिखरें फोडून टाकलीं. त्या बलशाली व उत्साही इंद्रानें जें केलें तें देव किंवा मनुष्य कोणीहि करूं शकत नाहीं.

३. इंद्राचें वज्र पोलादी व घासून झगझगीत केलेलें आहे. इंद्राच्या हातांत बळकट सामर्थ्य आणि इंद्राच्या डोक्यांत अनेक कर्तृत्वाचे विचार म्हणून त्याचा शब्द ऐकण्याकरतां लोक तयार असतात.

४. मला असें वाटतें कीं, हे इंद्रा, तूं पूज्यांतला पूज्य आहेस. आणि अचलांनाहि हलविणारा आहेस अशी माझी भावना आहे. योध्यांतला तूं ध्वज आहेस आणि लोकांचा तूं धुरीण आहेस.

५. हे इंद्रा, अहीला ठार करण्याकरतां तूं राग जिरवणारे हत्यार हातांत घेतोस. तेव्हां मेघ आणि मेघांतले पाणी गडगडूं लागतें आणि ब्राह्मण इंद्राचीं स्तोत्रें गावूं लागतात.

६. ज्यापासून ही सर्व सृष्टि निर्माण झाली आणि ज्यापासून हे सर्व होत आहे त्याच इंद्राची आपण स्तुति करूं या. आपण स्तवनानें इंद्राला मित्र करूं आणि नमस्कार करून त्या बलवानाच्या सान्निध जाऊन बसूं या.

७. हे इंद्रा, जे सर्व देव तुझे मित्र होते त्यांनीं वृत्राच्या हुंकारानें तुझा त्याग केला. तथापि मरुतांशीं तुझें सख्य होतें त्यामुळें ह्या सर्व सेना तूं जिंकून टाकतोस.

८. तुझा उत्कर्ष करणारे त्रेसष्ट मरुत् एकत्र झालेल्या गोसंघाप्रमाणें पूजनीय आहेत. आम्ही तुला शरण आलों आहोंत. तूं आम्हांला संपत्ति दे. आम्हीहि तुला हवि देऊन सामर्थ्य उत्पन्न करूं.

९. हे इंद्रा, तुझें शस्त्र तिखट व बरोबर मरुतांची अफाट सेना, अशा स्थितींत तुझें वज्र कोण सहन करणार आहे ? हे शत्रु नास्तिक आणि चिनहत्याराचे असुर आहेत. हे सोमप्रिया, त्यांना तूं आपल्या चक्रानें हांकून दे.

१०. स्तोत्या, महान्, उग्र, बलशाली आणि हितकारी अशा इंद्राचे पशु मिळण्याकरतां सुंदर स्तोत्र कर. स्तुति करून बोलावल्या जाणाऱ्या इंद्राचीं अनेक स्तोत्रें म्हणा. त्यामुळें मुलाबाळांना विपुल संपत्ति मिळेल.

११. हे स्तोत्या, स्तुति करून धांवा केल्या जाणाऱ्या इंद्राचीं नदीपार जाण्याकरतां असलेल्या नौकेप्रमाणें स्तोत्रें करा. प्रसिद्ध आणि खूष करणाऱ्या इंद्रापासून आपल्या मुलाबाळाकरतां स्तोत्रें म्हणून धन मिळवा. तो तुम्हाला विपुल संपत्ति देवो.

१२. ज्यामुळें इंद्राला आनंद होईल तें तूं ओळख. चांगल्या स्तोत्रानें स्तुति कर आणि नमस्कार करून सेवा कर. हे स्तोत्या, जवळ आस, उगाच आक्रोश करूं नकोस. तुझा धांवा त्याच्या कानावर घाल. तो तुम्हाला विपुल संपत्ति देवो.

१३. दहा हजारासह चालून जाणाऱ्या कृष्णानें अंशुमतीवर मुक्काम केला. तेव्हां पराक्रमानें सरसावणाऱ्या कृष्णाला इंद्र भिडला आणि लोकहितकारक इंद्रानें त्याची क्रूर सेना (व त्याला) ठार केले.

---

१३ टीप—कृष्णासुरानें दहाहजार सैन्यासह अंशुमतीच्या तीरावर निवास केला. तेथें तो बेटांत रहात असतां बृहस्पतीसह इंद्र आला. आणि बृहस्पतीच्या साहाय्यानें त्याला व त्याच्या नोकरांना ठार केले.

शिवाय.

बृहद्देवतेंत एक सोमाची वेगळीच कथा दिली आहे पण सायणाचार्यांना ती त्याज्य वाटते. ती कथा अशीः—

वृत्राच्या भीतीनें देवापासून सोम पळाला. तेव्हां त्याच्या पाठोपाठ सगळेच धावूं लागले. अंशुमतीनदीवर त्यांची खूपच खडाजंगी झाली. तेव्हां बृहस्पति सोमाला

१४. इंद्र मरुतांना म्हणतो.–हे मरुतांनो, अंशुमती नदीच्या तीरावर अवघड गुहेंत फिरतांना मी द्रप्साला पाहिलें. आणि आकाशांतल्या सूर्याप्रमाणें मी कृष्णाला समोर उभा असलेला पाहिला. हे बलवन्तानो, मी तुमची इच्छा करतों. तुम्हीं रणांत माझ्याकरतां युद्ध करा.

१५. नंतर अंशुमतीच्या तीरावर द्रप्सानें झगझगीत रूप धारण केले. तेथें इंद्रानें बृहस्पतीसह चालून येणाऱ्या नास्तिक सेनेचा पराभव केला.

१६. त्या शत्रुरहित असणाऱ्या सात जणांना तूंच शत्रु निर्माण झालास. हे इंद्रा, झाकलेल्या द्यावापृथ्वींना तूं (सूर्य उत्पन्न करून) उघड केलेस. तसेंच विस्तृत त्रैलोक्याला तूं आनंदीत केलेस.

१७. हे वज्रधारा इंद्रा, तूंच तें अप्रतिम कृत्य केलेस कीं ज्यायोगें धैर्यानें वज्रानें तूं शत्रु ठार केलास. तूं हत्यारांनीं शुष्णाला ठार केलेस. आणि तूंच पराक्रमानें गाई मिळविल्यास.

१८. हे लोकांच्या वीर्यशाली नायका, तूं वृत्राचें हनन करणारा आणि बलवान् आहेस. अडवलेल्या नद्या तूंच मोकळ्या केल्यास आणि दासांच्या ताब्यांत असणारें उदक तूंच जिंकलेस.

१९. जो सोमांत रमून जातो, ज्याच्या रागापुढें कोणाचाहि टिकाव लागत नाहीं, जो सूर्याप्रमाणें वैभवसंपन्न, जो एकटाच मनुष्यांना हितकारक कृत्यें करतो, तो वृत्राचा हन्ता, तोच मोठालीं कृत्यें करणारा आहे. दुसऱ्या कोणालाहि तोच भागी आहे.

२०. तो वृत्रहन्ता इंद्र लोकाधार आहे. त्याचाच स्तोत्रें म्हणून आम्हीं धांवा करीत आहोंत. कारण, तोच भगवान् आमचें संरक्षण करणारा, तोच आमचा बहुमान करणारा आणि तोच सर्वविश्रुत धनाचा दाता आहे.

२१. तो वृत्रहन्ता ऋभूंचा पाठीराखा झाला. उत्पन्न झाल्याबरोबर प्रशंसनीय झाला. प्यालेल्या सोमाप्रमाणें अनेक लोक हितकारक कृत्यें करणारा व मित्रांना प्रशंसनीय झाला.

सूक्त सत्त्याण्णवावें.

ऋषिः—रेभ काश्यप; देवता–इंद्र; छंदः–१०.१३ अतिजगती ११.१२ बृहती, १४ त्रिष्टुभ्, १५ जगती, अवशिष्ट बृहती.

१. हे इंद्रा, जी संपत्ति सर्व सत्ताधीश असणाऱ्या तूं असुरापासून हरण केलीस, हे धनावन्ता, ती देऊन तूं स्तोत्यांचीच भरभराट कर. कीं, जे तुझी सेवा करीत आहेत.

२. हे इंद्रा, तूं गाईबैल, घोडे आणि अविनाशी संपत्ति ज्यांच्याकरतां राखून ठेवतोस त्या सोमरस तयार करणाऱ्या आणि दक्षिणा देणाऱ्या लोकांना ती संपत्ति दे. कवडीचुंबकांना देऊं नकोस.

३. हे इंद्रा, जो नास्तिक आणि धर्मकर्में न करतां निजून रहातो, तो आपल्या कर्मानींच पोषक संपत्तीचा नाश करतो. अशाला अज्ञात प्रदेशांत तूं नेऊन टाक.

४ हे शक्रा, जरी लांब असलास किंवा हे वृत्रहन्त्या, तूं अत्यंत नजीक असलास तरी स्वर्गगामी केसाळ घोड्याप्रमाणें स्तोत्रें म्हणून व सोम तयार करून हे लोक तुझी सेवा करीत आहेत.

५. हे इंद्रा, जरी स्वर्गाच्या उज्वलस्थानीं असलास किंवा समुद्राच्या आंत असलास किंवा पृथ्वीवरच्या एकाद्या वाड्यांत असलास किंवा अन्तरिक्षांत असलास तरी तूं आम्हाकडे ये.

६. हे सोम पिणाऱ्या बलाधिपति इंद्रा, तूं सोम तयार केल्यावर आम्हांला अन्न, मधुर भाषण व विपुल संपत्तीनें आनंदीत कर.

७. हे इंद्रा, आम्हांला तूं टाकूं नकोस. आम्हांला आनंद देणारा हो, तूंच आमचा रक्षक आणि तूंच आमचा आप्तइष्ट. तर तूं आम्हांला दूर लोटूं नकोस.

८. हे इंद्रा, सोम पिळून झाल्यावर आमच्यासह मधुर सोम पिण्याकरतां तूं बैस. हे भगवन्, स्तोत्याचें तूं सर्वतोपरि रक्षण कर. हे इंद्रा, आमच्यासह सोमरस तयार केल्यावर—

म्हणाला परत देवाकडे चल. तेव्हां तो नाहीं म्हणाला. तेव्हां ते त्याला बलानेंच देवाकडे घेऊन गेले. आणि खूप प्याले. राक्षसांना ठार केले व त्याचीं नव्याण्णव नगरें फोडलीं. (बृहद्देवता–६.९१८.९२५) ही हकीकत १३-१५ ऋचांत वर्णन केली आहे.

कृष्ण द्रप्स म्हणजे काळा थेंब असा अर्थ होतो. त्यावर रूपक केलें असावें.

९. हे वज्रधरा, तुझ्यावर देव पगडा ठेऊं शकत नाहींत. आणि मनुष्यहि नाहींत. कारण, सर्व प्राणिमात्रावर तुझा वरचष्मा आहे. म्हणून देव तुझ्यावर पगडा ठेवूं शकत नाहींत.

१०. एकत्र झालेल्या सर्व सेना पराभव करणाऱ्या नेत्या इंद्राला सज्ज करतात आणि त्याची स्तुति करण्याकरतां त्याला उत्पन्न करतात. पराक्रमानें सर्व श्रेष्ठ, शत्रूंना ठार करणारा, उग्र, ओजस्वी, उत्कर्षशाली आणि युद्धांत धडाडी असलेल्या इंद्राला लोक स्तवितात.

११. स्तोते ह्या इंद्राची सोम प्यावा म्हणून स्तुति करतात. जेव्हां ह्या स्वर्गाधिपति इंद्राची उत्कर्ष व्हावा म्हणून स्तोते स्तुति करतात तेव्हां ओजानें आणि साहाय्यानें सज्ज असा तो प्राप्त होतो.

१२. तेजस्वी, अद्वेषी आणि आवेशशाली ज्ञानी भक्त सर्वव्यापक मेषरूपधारी इंद्राला स्तोत्रें ऐकूं जातील अशा प्रकारें स्तवितात आणि पाहिल्याबरोबर नमस्कार करतात.

१३. त्या अप्रतिहत सामर्थ्य धारण करणाऱ्या, उग्र, सत्यस्वरूप भगवान् इंद्राचा मी पुनः पुनः धांवा करतों. दाता आणि यज्ञार्ह असणारा इंद्र स्तोत्रामुळें आमच्याकडे वळो. वज्रधर इंद्र भाग्याचे सर्व चांगले मार्ग सुगम करो.

१४. हे बलिष्ठ इंद्रा, तूं आपल्या सामर्थ्यानें नगरें फोडून टाकण्यांत कुशल आहेस. हे वज्रधरा, तुझ्या धाकानें हे सर्व लोक आणि द्यावाभूमि कांपत आहे.

१५. हे अद्भुत व शूर इंद्रा, तें तुझें सत्यस्वरूप माझें संरक्षण करो. हे वज्रधरा, तूं अनेक संकटांतून आम्हांला पार पाड. तूं आम्हांला केव्हां अनेक प्रकारची स्पृहणीय संपत्ति देशील?

सूक्त अठ्ठ्याण्णवावें.

ऋषिः—नृमेध आंगिरस; देवता–इंद्र; छंदः—७.१०.११ ककुभ, ९. १२ पुरउष्णिह्, बाकी उष्णिह्.

१. हे गाणारांनो, थोर, ज्ञानी, बुद्धिमान् व स्तुतिप्रिय धर्मकर्त्या इंद्राकरतां तुम्ही बृहत् नांवाचें सामगायन करा.

२. हे इंद्रा, तूं सर्वश्रेष्ठ आहेस. आणि तूं सूर्याला प्रकाशीत केलें आहेस. तूं थोर विश्वाचा कर्ता आणि देव आहेस.

३. हे इंद्रा, तूं तेजानें स्वर्गलोकाला प्रकाशित करून द्युलोकाच्या तेजोमय प्रदेशांत गमन केलेंस. ते सर्व देव तुझ्या मैत्रीकरतां प्रयत्न करतात.

४. हे इंद्रा, तूं प्रिय, सर्वांना जिंकणारा आणि लपवितां न येणारा असा आहेस. पर्वताप्रमाणें सर्व तऱ्हेनें मोठा आणि स्वर्गाचा अधिपति आहेस. तूं माझ्याकडे ये.

५. हे सोम पिणाऱ्या सत्यस्वरूप इंद्रा, ह्या द्यावापृथ्वीपेक्षांहि तूं मोठा आहेस. तसेंच हे इंद्रा, सोमरस देणारांचा तूं उत्कर्ष करणारा आणि स्वर्गाचा अधिपति आहेस.

६. हे इंद्रा, तूं शत्रूंच्या अनेक नगरांचा धुव्वा उडवणारा आणि दस्यूंचा घात करणारा आहेस. तूं मनुष्यांचा उत्कर्ष करणारा आणि स्वर्गाचा अधिपति आहेस.

७. हे स्तुत्य इंद्रा, जलमार्गानें जाणारे लोक पाण्यानें इष्ट स्थलीं जातात. त्याप्रमाणें, आमच्या प्रबल वासना आम्ही तुझेपाशीं पोंचवितों.

८. हे वज्रधरा शूर इंद्रा, नद्याप्रमाणें स्तोत्रांच्या प्रवाहांनीं दररोज आम्ही तुझा उत्कर्ष करीत आहोंत.

९. गमनशील इंद्राच्या महान् रथाच्या जोखडाला केवळ इषाऱ्यानें वाहून नेणारे घोडे स्तोत्रानें जोडले जातात.

१०. हे कर्तृत्ववान् द्रष्ट्या इंद्रा, तुला आम्ही बल आणि धन मागतों. ही मागणी शत्रूंच्या सेनाचा धुव्वा उडविणाऱ्या इंद्राला आम्ही मागत आहोंत.

११. हे उदारा आणि कर्तृत्ववन्ता, तूंच आमची माता आहेस. आणि पिताहि तूंच आहेस. म्हणून तुझ्याजवळ आम्ही सुखाची मागणी करीत आहोंत.

१२. हे बलवन्ता, बहुस्तुता आणि कर्तृत्ववन्ता, बलयुक्त अशा तुझी मी स्तुति करीत आहें. तूं आम्हांला चांगलें धन दे.

सूक्त नव्याण्णवावें.

ऋषिः—नृमेध; देवता–इंद्र; छंदः—१.३.५.७ बृहती, २.४.६.८ सतोबृहती.

१. हे वज्रधरा इंद्रा, तुला भक्त दररोज सोम पाजीत असतात, तो तूं स्तुति करणाऱ्या आमचीं स्तोत्रें ऐक. आणि आमच्या घरीं ये.

२. हे सुंदर शिरस्त्राण धारण करणाऱ्या आणि अश्वयुक्ता इंद्रा, स्तोते प्रार्थना करून तुला हेंच मागत असतात. तुझी कीर्ति निरुपम आहे. हे स्तुत्य इंद्रा, सोम देण्याच्या वेळीं तुझी गाणीं गायली जातात.

३. सूर्याला आश्रयून असणाऱ्या सूर्यकिरणाप्रमाणें सर्वच जग इंद्रावर अवलंबून आहे. देव झालेल्या आणि होणाऱ्या प्राण्यांना आपला भाग आतां वाटून देत आहेत आणि आम्ही त्याची इच्छा करीत आहोंत.

४. हे स्तोत्या, सुखकर दान देणाऱ्या इंद्राची स्तुति कर. कारण, इंद्राच्या देणग्या कल्याणकारक असतात. तो इंद्र इच्छा पूर्ण करण्याकरतां देणग्या देत असतां भक्ताची इच्छा मोडीत नाहीं.

५. हे इंद्रा, तूं युद्धांत स्पर्धा करणाऱ्या सर्व शत्रूंचा पराभव करतोस. हे शत्रुहन्त्या, तूं मित्रांचीं संकटें नष्ट करणारा आणि शत्रूंचीं संकटें उत्पन्न करणारा आहेस. शत्रूंचा नाश करणारा आणि त्रास देणारांना त्रास देणारा आहेस.

६. हे इंद्रा, तुझें वाढतें बळ पाहिल्यावर आई मुलाच्या पाठोपाठ जाते त्याप्रमाणें द्यावापृथ्वी तुझ्यामागें जातात. हे इंद्रा, जेव्हां तूं वृत्राला ठार करतोस तेव्हां तुझ्या क्रोधानें सर्व शत्रू खिन्न होतात.

७. लोकांनो, जरारहित, धडाडीचा, वेगवान्, जेता, चालून जाणारा, उत्कृष्ट रथी, अहिंस्य, उदकवर्धक (तुग्र्याचा उत्कर्ष करणारा)—

८. सुशोभित करणारा, पण ज्याला कोणी सुशोभित करूं शकत नाहीं, बलानें कार्य करणारा, बहुरक्षित, अनंतकर्मा, सर्वांना सारखा आणि अन्नाच्छादन देणाऱ्या इंद्राला आम्ही साहाय्य करण्याकरतां बोलावीत आहोंत.

सूक्त शंभरावें. +

ऋषि:—नेम भृगुगोत्र; देवता-१०-११ वाच् बाकी इंद्र; छंद:—६ जगती, ७ ते ९ अनुष्टुभ्, अवशिष्ट त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, तुझ्यापुढें मुलासह (शत्रूंना जिंकण्याकरतां) मी जातों. माझ्या पाठीमागें (संरक्षणाकरतां) सर्व देव येत आहेत. जर (शत्रूंच्या संपत्तींत) माझा भाग असेल तर मला शत्रूं जिंकण्याचें सामर्थ्य दे.

२. हे इंद्रा, तुला प्रथम मी मधुर सोमाचें खाद्य देतों. पिळून ठेवलेला सोम तुझ्याकरतां आहे. मित्र असणारा तूं माझ्या बाजूस (युद्धांत मदतीकरतां) ऐस. मग आपण दोघे पुष्कळ शत्रूंना ठार करूं.

३. हे लोकहो, जर खरोखर इंद्र असेल तर त्याची खरी स्तुति करा. नेमच इंद्र म्हणून कोणी नाहीं असें म्हणतो. कारण, कोणी बरें इंद्राला पाहिलें आहे? (कोणीहि नाहीं). मग आम्ही कोणाची स्तुति करावी?

४. (असें नेमाचें बोलणें ऐकून इंद्र त्याच्या जवळ आला. व स्वत:चीच ह्या दोन ऋचांनीं त्यानें स्तुति केली.) इंद्र म्हणतो—हे स्तोत्या, हा मी तुझ्या पुढें आहे. माझ्याकडे पहा. मोठेपणानें मी सर्व जगांत श्रेष्ठ आहे. सत्याचा उपदेश करणारे थोर लोक माझीच स्तुति करतात. रागावल्यावर मी सर्व जगाचा नाश करून टाकतो.

५. जेव्हां यज्ञेच्छु भक्त सुंदर स्वर्गांत बसलेल्या मला एकट्याला बोलले तेव्हां त्यांचें बोलणें माझ्या अन्त:करणांतल्या अन्त:करणाला भिडलें कीं मुलाबाळांसहित माझे मित्र ओरडत आहेत. (म्हणून मी आलों आहे.)

६. (स्वत:जवळ इंद्र आलेला पाहून ऋषि संतुष्ट झाला. आणि त्यानें त्याच्या विविध कृत्याची ह्या दोन ऋचांनीं स्तुति केली आहे.) हे धनवन्ता, तूं यज्ञांत सोम पिळणाऱ्या भक्तांकरतां जीं कृत्यें केलींस, तीं तुझीं कृत्यें वर्णनाला अपरंपारच आहेत. परावताचें पुष्कळ साठविलेलें जें धन होतें तें ऋषिबंधु शरभाला तूं देऊन टाकलेस!

७. जो पळत सुटला आहे, येथें थांबतहि नाहीं आणि तुला निवारण करूं शकत नाहीं, त्या वृत्राच्या मर्मस्थानावर जोरानें इंद्रानें वज्र टाकलें आहे.

८. गरुडानें मनोवेगानें जाऊन सुवर्णमय नगरी (सुवर्णाचा अमृतकलश) जिंकली आणि स्वर्गाला जाऊन इंद्राला सोम दिला.

९. जें वज्र समुद्रांत पाण्यानें वेष्टिलेलें आहे त्या ह्या वज्राला लढाईंत पुढें धांवत येणारे शत्रु बळी दिले जातात.

१०. अज्ञांना ज्ञानी करणारी व देवांना प्रसन्न करणारी अशी राष्ट्रीय वाणी जेव्हां प्रकट होते, तेव्हां

+ टीप:—गांवाला वगैरे निघालों असतां पक्ष्यांचा अशुभ शब्द ऐकूं आल्यास हें सूक्त म्हणावें असें आश्वलायन गृह्यसूत्रांत विवाहप्रकरणांत सांगितलें आहे.

चहूकडून अन्न आणि पाणी यांचें वैपुल्य होतें. पण वाणीला उत्पन्न करणारें श्रेष्ठ तत्त्व कुठें जातें? (त्याचा पत्ता लागत नाहीं.)

११. देवांनीं जी वाणी उत्पन्न केली तिला अनेक स्वरूपाचे प्राणी बोलतात. स्तुत्य अशी ती प्रसन्नतेनें अन्न आणि रस उत्पन्न करणारी गाईच्या रूपानें आमच्याकडे येवो.

१२. हे मित्रभूत विष्णुदेवा, तूं अत्यंत पराक्रम गाजव. स्वर्ग वज्राच्या फिरण्याला जागा देवो. हे विष्णो, तूं आणि मी वृत्राला ठार करूं. नद्या मोकळ्या करूं. व मोकळ्या केलेल्या नद्या इंद्राच्या प्रेरणेनें वाहूं लागोत.

---

१२ टीप—या ऋचेच्या अर्थाचे शौनकाचे श्लोकः—

त्रींल्लोँकानाभिवृत्यैतान्वृत्रस्तस्थौ स्वया त्विषा ।
तं नाशकद्धंतुमिंद्रो विष्णुमभ्येत्य सोऽब्रवीत् ॥
वृत्रं हनिष्ये तिष्ठस्व विक्रम्याद्य ममांतिके ।
उद्यतस्य तु वज्रस्य द्यौर्ददातु ममांतरम् ॥
यथेति विष्णुस्तच्चक्रे द्यौश्चास्य विवरं ददौ ।
तदेतदखिलं प्रोक्तं सखे विष्णो इति त्वृचा ॥

बृहद्देवता ६.९३१–९३३.

सूक्त एकशें एकावें.

ऋषिः—जमदग्नि भृगुगोत्र; देवता–६ आदित्य, ७–८ अश्विन्, ९–१० वायु, ११–१२ सूर्य, १३ उषस् किंवा सूर्यप्रभा, १४ पवमान, १५ गो; बाकी पांच मित्रावरुण; छंदः—३ गायत्री, १३ बृहती १४-१५-१६ त्रिष्टुभ्, अवशिष्ट विषम–बृहती आणि सम–सतोबृहती.

१. जो मनुष्य हवि देण्याकरतां मित्रावरुणांना आपल्याकडे वळवितो, तो मनुष्य खरोखर अशा रीतीनें देवांना प्रसन्न करतो.

२. अतिशय बलवान, देखणे, नेते, तेजस्वी आणि अत्यंत ज्ञानी असणारे ते मित्रावरुण दोन्ही हाताप्रमाणें सूर्याच्या प्रकाशांसह कर्मांत प्राप्त होतात.

३. हे मित्रावरुणहो, जो तुम्हाकडे येतो, तो देवांचा दूत अग्नि होय. तो मस्तकावर सोन्याचे अलंकार घालतो आणि आनंददायक संपत्तीकडे जात आहे.

४. ज्याला खुशालीच्या प्रश्नांत आनंद नाहीं, ज्याचें मन पुनः पुनः भक्ति करण्यांत रमत नाहीं आणि ज्याला संवाद आवडत नाहीं अशा शत्रूंपासून लढाईत आमचें संरक्षण करा. त्याच्या बाहूपासून आम्हांला तारा.

५. हे यज्ञधन स्तोतेहो, मित्र आणि अर्यमा यांना उद्देशून तुम्ही स्तोत्रें गा. वरुणाला प्रसन्न करणारे स्तोत्र गा. ह्या सर्वांची यज्ञीय स्तोत्रें गा.

६. त्रैलोक्याचा पुत्र, व्यापक, जयशील आणि तांबूस आदित्य सर्व देवांनीं उत्पन्न केला. त्यामुळें अमर व अपराभूत असणारे देव लोकांचीं सर्व ठिकाणें पहातात.

७. हे सत्यस्वरूप अश्विहो, माझी नवीन तेजस्वी स्तोत्रें आणि कर्मैं यांच्याकडे तुम्ही या. हवि भक्षण करण्याकरतां प्राप्त व्हा.

८. हे अन्नधन अश्विहो, जे तुम्ही राक्षसांशिवाय इतरांना देत असाल ते मी मागतों आहे. पूर्वेकडे तोंड करून चाललेल्या स्तुतीला उत्साह देणारे आणि जमदग्नीनें स्तविले जाणारे तुम्ही या.

९. हे वायो, तूं आमच्या ह्या जगप्रसिद्ध यज्ञांत ये. गाळण्यांत टाकून स्वच्छ केलेला हा सोम तुझ्याकरतां तयार आहे.

१०. हे नियुत् नांवाचा घोडा असलेल्या वायो तुला खाण्याकरतां, हवि देण्याकरतां अत्यंत सरळ मार्गांनीं अध्वर्यू जात आहे. आतां दुधांत मिसळलेला आणि शुद्ध असा दोन प्रकारचा सोम तूं पी.

११. हे सूर्या, खरोखर तूं (तेजानें) महान् आहेस. हे आदित्या, खरोखर तूं (बलानें) महान् आहेस. थोर अशा तुझा महिमा स्तोत्यांकडून स्तविला जातो. हे देवा, खरोखर तुं फार मोठा आहेस.

१२. हे सूर्या, तूं ज्ञानानें खरोखर सर्वश्रेष्ठ आहेस तसाच हे देवा, महत्त्वानेंहि खरोखर मोठा आहेस. तूं असुरांचा नाश करणारा आणि देवांचा हितकर्ता आहेस. तसाच तुझा प्रकाश व्यापक आणि कमी न होणारा आहे.

१३. ही पृथ्वीवर किरण टाकणारी तांबूस रंगाची रूपवती उषा उत्पन्न झाली आहे. दाही दिशांत फिरणारी ती चित्रविचित्र रंगाच्या गाईप्रमाणें दिसतें आहे.

१४. ज्या ह्या तीन लोकांतील प्रजा निर्माण झाल्या आहेत, ह्या सर्व प्रजा अग्नीचा आश्रय करतात. जगांत थोर आदित्य प्रकाशत असतो. आणि सर्व दिशांत वायु पसरला आहे.

१५. गाय ही रुद्रांची आई, वसूंची कन्या, आदित्यांची बहिण, दुधाचा सांठा आहे. मी सर्व

शहाण्या लोकांना सांगतो कीं, हे लोकहो, ह्या निरपराध गाईचा वध करूं नका.

१६. अंगांत शक्ति देऊन बोलावयास लागणारी, सर्व प्रकारें वर्णन केली जाणारी आणि देवत्व देण्याकरतां माझ्याकडे येणारी गाय अल्पबुद्धि मनुष्यच टाळतो.

सूक्त एकशें दोनावें.

ऋषिः—प्रयोग भृगुगोत्र किंवा अग्नि बार्हस्पत्य किंवा गृहपति व यविष्ठ नांवाचे दोन अग्नि सहःपुत्र किंवा त्यापैकीं एक; देवता—अग्नि; छंदः—गायत्री.

१. हे अग्निदेवा, कर्तृत्ववान्, तरुण व गृहपति असणारा तूं हवि देणारांना पुष्कळ अन्न देतोस.

२. हे प्रज्वलीत अग्ने, ज्ञाता असा तूं आमच्या सेवेनें आणि स्तुतीनें देवांना घेऊन ये.

३. हे अत्यंत तरुण अग्ने, उत्साहवर्धक अशा तुझ्या साह्याय्यानेंच आम्हीं अन्न मिळमिण्याकरतां शत्रूंचा पराभव करूं.

४. समुद्राच्या मध्यें असणाऱ्या अशुद्ध अशा तुला और्वभृगुप्रमाणें व आप्नवानाप्रवाणें मी बोलावतों.

५. वाऱ्यासारखा व पावसासारखा आवाज करणाऱ्या बलवान् व कर्तृत्ववान् अग्नीला मी बोलावतों आहे.

६. सवित्याची प्रसवशक्ति किंवा भगाचें ऐश्वर्य त्याप्रमाणें मी समुद्रांत असलेल्या अग्नीला बोलावतों.

७. यज्ञांचा बांधव, बलवान् व अत्यंत वाढणाऱ्या थोर अग्नीकडे (सेवा करण्याकरतां) तुम्ही जा.

८. हा अग्नि सुतार तासून आकार देतो त्याप्रमाणें आम्हाला बनवीत आहे. आम्ही अग्नीपासून ज्ञान प्राप्त करून प्रत्येक कामांत यशस्वी होऊं.

९. मनुष्यांची सर्व संपत्ति जो अग्नि देवांकडे पोंचवीतो, तो अग्नि अन्न घेऊन आमच्याकडे येवो.

१०. देवांना बोलावणारांत अत्यंत यशस्वी आणि यज्ञातील मुख्य अशा अग्नीची हे स्तोत्या, तूं स्तुति कर.

११. श्रेष्ठ आणि अत्यंत ज्ञाता असा अग्नि यज्ञगृहांत प्रज्वलीत केला जात आहे. त्या यज्ञांत असलेल्या पवित्रकांति अग्नीची तूं स्तुति कर.

१२. हे स्तोत्या, घोड्याप्रमाणें आवश्य आणि बलवान् मित्राप्रमाणें शत्रूंचा पराभव करणाऱ्या अग्नीची तूं स्तुति कर.

१३. हे अग्ने, भक्तांचीं स्तोत्रें बहिणीप्रमाणें तुझे गुण प्रगट करित तुझी स्तुति करतात. तुला आणि वायूच्या जवळ ठेवतात.

१४. ज्या अग्नीचें स्थान मोकळें व अनिर्बद्ध असते त्याच्या त्या स्थानीं (अन्तारिक्षांत) पाणीहि असते.

१५. त्या कामपूरक अग्नीचें स्थान कडेकोट संरक्षणांनीं युक्त आहे. आणि त्याचा प्रकाशहि सूर्यासारखा पवित्र आहे.

१६. हे तेजस्वी अग्ने, तुपानें प्रज्वलीत झालेला तूं ज्वालांनीं देवांना बोलावतोस आणि तृप्त करतोस.

१७. हे अंगिरसांच्या अग्ने, कर्तृत्ववान्, अमर आणि हवि वाहून नेणाऱ्या तुला देव आईप्रमाणें उत्पन्न करतात.

१८. हे कर्तृत्ववान् अग्ने, ज्ञानीं, श्रेष्ठ आणि हवि वाहून नेणारा देवदूत अशा तुझ्याजवळ देव बसलेले असतात.

१९. हे अग्ने, माझे जवळ गाय नाहीं आणि लाकडें तोडणारी कुऱ्हाडहि नाहीं. असा साधनहीन असणारा मी तुला प्रज्वलीत करीत आहें.

२०. हे अत्यंत तरुण अग्ने, जीं कोणचीं तरी लांकडें तुझ्यांत घालीत आहोंत तीं तूं स्वीकार.

२१. तुझ्या ज्वाला जे चाटतात किंवा ज्यांच्यावर हल्ला चढवतात ते सर्व तुला तुपासारखे असो.

२२. भक्तांकडून अग्नि प्रज्वलित केला जातो आणि अग्नि प्रज्वलित करणारा मनुष्य श्रद्धेनें सर्व कम करतो.

सूक्त एकशें तिनावें.

ऋषिः—सोभरि काण्व; देवता—१ ते १३ अग्नि १४ अग्नि व मरुत्; छंदः—५.७.९.११.१३ सतोबृहती, ८. १२ ककुभ्, १० गायत्री, १४ अनुष्टुभ्, अवशिष्ट बृहती.

१. ज्या अग्नींत (आहुति देऊन) कर्में केलीं जातात तो देवांच्याकडे जाणारे मार्ग जाणणारा अग्नि प्रकट झाला आहे. त्या आर्यांचा उत्कर्ष करणाऱ्या श्रेष्ठ अग्नीला उद्देशून आमचीं स्तोत्रें चालू आहेत.

२. दिवोदासाचा अग्नि मातृभूत पृथ्वीवर देवांना

---

१५ टीपः—ही गाईच्या महत्त्वाचें वर्णन करणारी उत्कृष्ट ऋचा आहे. यांत गाईच्या अवध्यत्वाविषयीं ऋषि घोषणा करीत आहे.

आपल्या सामर्थ्यानें बोलावतां झाला. म्हणून हा श्रेष्ठ पदवीला चढला आहे.

३. ज्याअर्थीं कर्तव्याला जागृत असणाऱ्याला इतर लोक भितात त्याअर्थीं हे लोकहो, तुम्ही हजारांनीं धन देणाऱ्या अग्नीचीं विविध कर्में करून आपणहून उपासना करा.

४. हे सर्वव्यापक अग्ने, तूं ज्याला धन देतोस, आणि जो तुला हवि देतो, त्याला देवांचीं गाणीं म्हणणारा आणि आपणहून हजारांना पोसणारा मुलगा होतो.

५. हे धनवान् अग्ने, जो तुला हवि देतो तो मनुष्य शत्रूंच्या बळकट अशा शहरांतूनहि घोड्यांच्या साहाय्यानें अन्न नष्ट करतों व स्वत: त्याच्या जवळ अक्षय अन्न असतें. तसेंच तुझ्यापाशीं असलेली सर्व उत्कृष्ट संपत्ति आम्ही प्राप्त करतों.

६. देवांना बोलवणारा प्रज्वलित अग्नि, सर्व प्रकारची संपति भक्तांना देतों, अशा ह्या अग्नीला उद्देशून स्तोते मधुर सोमाचीच जणूं काय भांडीं अशीं स्तोत्रें म्हणतात.

७. हे प्रेक्षणीय लोकाधिपति अग्ने, ज्या तुझी उदार भक्त रथाच्या घोड्यांप्रमाणें स्तोत्रें म्हणून सेवा करतात, तो तूं आमच्या मुलांनातवांना धनवानांची संपत्ति दे.

८. हे स्तोतेंहो, तुम्ही दात्यांतला दाता, यज्ञयुक्त व थोर अशा अग्नीचें स्तोत्र गा.

९. धनवान्, यशस्वी, आहुति दिलेला व प्रज्वलित अग्नि भक्तांना संपत्ति व अन्न देतो. ह्या अग्नीची कृपा दररोज अन्नांसह आमच्यावर सतत असो.

१०. हे स्तोत्या, आवडत्यांतला आवडता अतिथि व (यज्ञरूपी) रथाचा सारथि अशा अग्नीची तूं स्तुति कर.

११. जो यज्ञार्ह व ज्ञाता अग्नि गुप्त व प्रसिद्ध अशी दोनहि संपत्ति देतो, कर्तृत्वानें संग्रामेच्छु अशा ज्या अग्नीच्या ज्वाला उतारावरील समुद्राच्या लाटाप्रमाणें दुस्तर आहेत, त्या अग्नीची हे स्तोतेहो, तुम्ही स्तुति करा.

१२. व्यापक, अतिथीप्रमाणें सर्वप्रिय, अनेकांनीं स्तविलेला, देवांना बोलावणारा आणि सुयज्ञ अग्नि आमच्याकडे येत असतां कोणाकडूनहि आडवला जाऊं नये.

१३. हे व्यापक अग्ने, जे लोक तुझ्याकडे येऊन तुला सुखदायक अशी स्तुति करतात त्यांचा नाश न होवो. हवि देणारा आणि चांगले यज्ञ करणारा स्तोताहि देवांकडे दौत्य करण्याकरतां तुझी स्तुति करतो आहे.

१४. हे अग्ने, देवांचा मित्र असणारा तूं आमच्या यज्ञांत रुद्रांसह सोम पिण्याकरतां यावेस. सोभरींची उत्कृष्ट स्तुति ऐकून तूं प्रसन्न हो.

येथें आठवें मंडल संपलें.

आठवें मंडळ.

कोष्टक

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१	५-७-१०-१६	१-२ प्रगाथ ३०-३३ असंग राजा, ३४ शश्वती असंगपत्नी बाकी मेधातिथी व मेध्यातिथि	२-४सतोबृहती, ३३-३४ त्रिष्टुभ् अवशिष्ट बृहती	३०-३३ आत्मकृतदानस्तुति, ३४ असंग राजा, बाकी इंद्र	आसंगप्लायोगी यास पुरुषत्वप्राप्ति व त्याच्या शश्वती नामक स्त्रीस आनंद झाला.
२	५-७-१७-२४	मेधातिथि व प्रियमेध ४१-४२मेधातिथि	२८ अनुष्टुभ् अवशिष्ट गायत्री	४१-४२ विभिंददानस्तुति, अवशिष्ट इंद्र	
३	५-७-२५-२९	मेध्यातिथि	१-३-५-७-९-११-१३ १५-१७-१९-२४ बृहती २-४-६-८-१०-१२-१४ १६-१८-२० सतोबृहती २१ अनुष्टुभ् २२-२३ गायत्री	१-२० इंद्र, २१-२४ कुरयाणपुत्रपाकस्थामनाची दानस्तुति	
४	५-७-३०-३३	देवातिथि	१-३-५-७-९-११-१३ १५-१७-१९ बृहती २ ४-६-८-१०-१२-१४ १६-१८-२० सतोबृहती २१ उष्णिह	१९-२०-२१ कुरुंगदानस्तुति, १५-१८ पूषन् किंवा इंद्र १।१४ इंद्र	तुर्वशांच्या यज्ञांत येण्याबद्दल इंद्राची स्तुति
५	५-८-१-८	ब्रह्मातिथि	१-३६ गायत्री ३७-३८ बृहती ३९ अनुष्टुभ्	१-३४ अश्विनी ३५-३९ अशुचेदिपुत्रदानस्तुति	
६	५-८-९-१७	वत्स	गायत्री	१-४५ इंद्र ४६-४८ तिरिंदरदानस्तुति	
७	५-८-१८-२४	पुनर्वत्स	गायत्री	मरुत्	
८	५-८-२५-२९	सध्वंस	अनुष्टुभ्	अश्विन्	
९	५-८-३०-३३	शशकर्ण	२-३-२०-२१ गायत्री १-४-६ १४-१५ बृहती ५ ककुभ्, १० त्रिष्टुभ, ११ विराज् १२ जगती	अश्विन्	

सूक्त	अष्ट. अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
			बाकी अनुष्टुभ्		
१०	५-८-३४	प्रगाथ	१-५ बृहती, २ त्रिष्टुभ् ३ अनुष्टुभ्, ४ आस्तारपंक्ति, ६ सतोबृहती	अश्विन्	
११	५-८-३५-३६	वत्स	१ प्रतिष्ठा गायत्री, २ वर्धमाना गायत्री १० त्रिष्टुभ्, बाकी गायत्री	अग्नि	विष्णूनें तीन पावलें टाकली वामन अवतारांचें मूळ
१२	६-१-१-६	पर्वत	उष्णिह्	इंद्र	
१३	६ १-७-१३	नारद	उष्णिह्	इंद्र	
१४	६-१-१४-१६	गोषूक्तिन् आणि अश्वसूक्तिन्	गायत्री	इंद्र	सूक्तकार म्हणतो मी इंद्र असतो तर असें केलें असतें.
१५	६-१-१७-१९	,,	,,	,,	
१६	६.१.२०-२१	इरिंबिठि	गायत्री	इंद्र	
१७	६.१.२२-२४	,,	१-१३ गायत्री १४ बृहती १५ सतोबृहती	,,	शृंगवृषाची कथा
१८	६.१.२५-२८	,,	उष्णिह	८ आश्विनौ ९ अग्नि, सूर्य, वायु बाकी आदित्य	
१९	६.१.२९-३५	सोभरि काण्व	१.३.५.७.९.११.१३.१५.१७.१९.२१.२३ २५.२९.३१.३३.३६ ककुभ्, २.४.६.८.१०,१२.१४.१६.१८.२०.२२.२४.२६.२८.३०.३२.३४-३५सतोबृहती, २७ विराज, ३४-उष्णिह, ३७ पंक्ति	१-३३ अग्नि ३४-३५ आदित्य ३६-३७ त्रसदस्युदानस्तुति.	
२०	६.१.३६-४०	,,	समसंख्यांक सतोबृहती विषमसंख्यांक ककुभ	मरुत्	
२१	६.२.१-४	,,	समसंख्याक सतोबृहती विषमसंख्याक ककुभ्	१-१६ इंद्र १७-१८ चित्रदानस्तुति	
२२	६.२.५-८	,,	१-३-५ ७ बृहती,	अश्विनौ	

सूक्त	अष्ट. अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
			२४-६- सतोबृहती ८ अनुष्टुभ् ९ ते १८ ककुभ्		
२३	६.२.९-१४	विश्वमनस् व्यश्वपुत्र	उष्णिह्	अग्नि	
२४	६.२.१५-२०	१-२७ विश्वमनस् व्यश्वपुत्र २८-३० वरू सौषम्ण	१-२९ उष्णिह ३० अनुष्टुभ्	१-२७ इंद्र, २८-३० वरुदानस्तुति	
२५	६.२.२१-२५	विश्वमनस व्यश्वपुत्र	उष्णिह	१०-१२ विश्वेदेव अवशिष्ट मित्रावरुण	
२६	६.२.२६-३०	व्यश्व, वैयश्व, किंवा विश्वमनस आंगिरस	१६-१९-२१-२५ गायत्री २० अनुष्टुभ् अवशिष्ट उष्णिह	१-२० अश्विनौ २१-२५ वायु	
२७	६.२.३१-३४	मनु विवस्वत्पुत्र	विषमसंख्याक-बृहती समसंख्याक-सतोबृहती	विश्वेदेव	
२८	६.२.३५	मनु	४पुरउष्णिह, अवशिष्ट गायत्री	विश्वेदेव	
२९	६.२.३६	कश्यप मरीचिपुत्र किंवा मनु वैवस्वत	विराज्	विश्वेदेव	
३०	६.२.३७	मनु वैवस्वत	१ गायत्री, २ पुरउष्णिह ३ बृहती ४ अनुष्टुभ	विश्वेदेव	
३१	६.२.३८-४०	„	९-१४ अनुष्टुभ् १५-१८ पंक्ति, १० पादनिचृत अवशिष्ट गायत्री	१-४ यज्ञयजमानप्रशंसा ५-९ दंपतीप्रशंसा १०-१८ दंपत्योराशिषः	
३२	६.३.१-६	मेधातिथि काण्व	गायत्री	इंद्र	सृबिंद, अनर्शनि, पिप्रु, दास आणि अहीशु और्णवाभ
३३	६.३.७-१०	मेध्यातिथि काण्व	१-१५ बृहती, १६-१८ गायत्री १९ अनुष्टुभ्	इंद्र	
३४	६.३.११-१३	१६-१८वसुरोचिष अंगिरससहस्र अवशिष्ट नीपातिथि	१६-१८ गायत्री, अवशिष्ट अनुष्टुभ	इंद्र	

सूक्त	अ. अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्व
३५	६.३.१४–१७	श्यावाश्व आत्रेय	१–२१ ज्योतिः; २२. २४ पंक्ति, २३ महाबृहती,	अश्विनौ	
३६	६.३.१८	”	१-६ शक्करी, ७ महापंक्ति.	इंद्र	
३७	६.३.१९	”	१ अतिजगती २–७ महापंक्ति	”	
३८	६.३.२०–२१	”	गायत्री	इंद्र व अग्नि	
३९	६.३.२२-२३	नाभाक काण्व	महापंक्ति	अग्नि	
४०	६.३.२४–२५	”	२ शक्करी १२ त्रिष्टुभ् अवशिष्ट महापंक्ति.	इंद्र व अग्नि	
४१	६-३-२६-२७	”	महापंक्ति	वरुण	
४२	६.३.२८	अर्चनानस् काण्व किंवा नाभाक	१–३ त्रिष्टुभ ४–६ अनुष्टुभ्	१–३ वरुण ४–६ अश्विनौ	
४३	६-३.२९-३५	विरूप आंगिरस	गायत्री	अग्नि	
४४	६.३.३६–४१	”	”	”	
४५	६.३.४२.४९	त्रिशोक काण्व	”	इंद्र	
४६	६.४.१-६	वश अश्वपुत्र	१–४.६.१०.२३.२९. ३३ गायत्री; ५ ककुम्; ७.११.१४.१८.१९. २५–२७ बृहती, ८ अनुष्टुभ् ९,१२.२६–२८ सतोबृहती १३ द्विपदा १५ ककुम्न्यंकुशिरा,१६.३०विराज्, १७जगती, २० विषमदा बृहती, २१.२२.२४. ३२ पंक्ति, ३१ उष्णिह्	२१–२४ पृथुश्रवसो दानस्तुति २५–२८ वायु अवशिष्ट इंद्र	महत्त्व
४७	६. ४. ७–१०	त्रित आप्त्य	महापंक्ति	१–१३ आदित्य १४–१८ उषस् व आदित्य.	
४८	६. ४. ११–१३	प्रगाथ काण्व	५ जगती बाकी त्रिष्टुभ्	सोम	

वाल्यखिल्य

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्व
४९	६.४. १४–१५	प्रस्कण्व „	विषम-बृहती सम–सतोबृहती	इंद्र	कण्व, मेध्यातिथि, नीपातिथी, कण्व, पक्थ, त्रसदस्यु, गोशर्य, ऋजिश्वन्, दशव्रज.
५०	६.४. १६–१७	पुष्टिगु „	” ”	”	पौर, दस्यु, एतश,
५१	६-४-१८–१९	श्रुष्टिगु	”	”	कृत्व्य, दशव्रज, वश, कण्व, मेध, दीर्घनीथ गौशर्य
५२	६-४-२०–२१	आयु	”	”	मनु सांवरण, नीपातिथि, मेध्यातिथि, पुष्टिगु, श्रुष्टिगु, पार्षद्वाण प्रस्कण्व, क्रिवि, शुष्ण, दास, रुशम, मनु, विवस्वान्, त्रित, आयु, पृषध्र मेध्य, ऋजूनस्, यूमरश्मि, दशोणि, दशशिप्र, कण्ववत्
५३	६-४-२२–२३	मेध्य	”	”	आयु, कुत्स, अतिथिग्व, शीष्ट.
५४	६-४-२४–२५	मातरिश्वन्	”	इंद्र, विश्वेदेव	पौर, कृश, संवर्त, प्रस्कण्व.
५५	६-४–२६	कृश	३-५ अनुष्टुभ् अवशिष्ट गायत्री		काण्वायन
५६	६-४–२७	पृषध्र	५ पंक्ति अवशिष्ट गायत्री	अग्नि व सूर्य	दस्यवे वृक, पौतक्रत, दास, पुतक्रता,
५७	६-४–२८	मेध्य	त्रिष्टुभ्	अश्विनौ	
५८	६-४–२९	मेध्य	”	विश्वेदेव	
५९	६-४-३०–३१	सुपर्ण	जगती	इंद्र व वरुण	वालखिल्य संपलें
६०	६.४.३२–३५	भर्ग प्रगाथपुत्र	विषमसंख्यांक–बृहती समसंख्यांक–सतोबृहती	अग्नि	
६१	६.४.३६–३९	”	”	इंद्र	
६२	६.४.४०–४१	प्रगाथ काण्व	७–९ बृहती अवशिष्ट पंक्ति	”	
६३	६.४.४२–४३		१.४.५.७ अनुष्टुभ्	१२ देवः अवशिष्ट	

सूक्त	अष्ट. अ. व.	ऋषि	छंद	देवता	
			१२ त्रिष्टुभ् अवशिष्ट गायत्री	इंद्र	
६४	६.४.४४–४५	प्रगाथ	गायत्री	इंद्र	
६५	६.४.४६–४७	प्रगाथ	गायत्री	इंद्र	
६६	६.४.४८–५०	कलि प्रगाथ-पुत्र	विषमसंख्यांक–बृहती समसंख्यांक–सतोबृहती १५ अनुष्टुभ्	इंद्र	
६७	६.४.५१–५४	मत्स्य सांमद किंवा मान्य मित्रावरुणपुत्र किंवा अनेक जालनद्ध मत्स्य	गायत्री	आदित्य	
६८	६.५.१–४	प्रियमेध आंगिरस	१.४.७.१० अनुष्टुभ् अवशिष्ट गायत्री	१४–१९ ऋक्ष व अश्वमेध यांची दानस्तुति अवशिष्ट इंद्र	
६९	६.५.५–७	,,	२ उष्णिह ४–६ गायत्री ११–१६ पंक्ति अवशिष्ट अनुष्टुभ्	११ पहिला अर्धा विश्वेदेव दुसरा अर्ध वरुण अवशिष्ट इंद्र	
७०	६.५.८–१०	पुरुहन्मन्	१.३.५.७.१२ बृहती २.४.६ सतोबृहती १३ उष्णिह, १४ अनुष्टुभु १५ पुर उष्णिह	इंद्र	
७१	६.५.११-१३	सुदीति व पुरुमिळ्ह किंवा त्यापैकीं एक	१-९ गायत्री १०-१२-१४ बृहती ११-१३-१५ सतो बृहती	अग्नि	
७२	६.५.१४-१७	हर्यत प्रगाथपुत्र	गायत्री	अग्नि किंवा हवि	
७३	६.५.१८-२०	गोपव न आत्रेय किंवा सप्तवध्रि	गायत्री	अश्विनौ	
७४	६.५.२१-२३	,,	१४-७.१४.१५.५.अनुष्टुभ् २०.३.५.६ गायत्री	अग्नि १३-१४-१५ श्रुतर्वणो-दानस्तुति	
७५	६.५.२४-२६	विरूप आंगिरस	गायत्री	अग्नि	
७६	६.५.२७-२८	कुरुसुति काण्व	गायत्री	इंद्र	
७७	६.५.२९–३०	कुरुसुति काण्व	१-९ गायत्री १० बृहती	,,	

सूक्त	अष्ट. अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
			ती ११ सतोबृहती		
७८	६.५.३१-३२	कुरुसुति काण्व	१-९ गायत्री १० बृहती	,,	वराहासुराला मारलें
७९	६.५.३३-३४	कृत्नु भार्गव	१-८ गायत्री ९ अनुष्टुभ	सोम	
८०	६.५.३५-३६	एकदिव् नोधःपुत्र	१-९ गायत्री, १० त्रिष्टुभ	१-९ इंद्र १० देव	
८१	६.५.३७-३८	कुसीदिन् कण्वपुत्र	गायत्री	इंद्र	
८२	६.६.१-२	,,	,,	,,	
८३	६.६.३-४	,,	,,	इंद्र	
८४	६.६.५-६	उशनस कवि पुत्र	गायत्री	अग्नि	
८५	६.६.७-८	कृष्ण आंगिरस	,,	अश्विनौ	
८६	६.६.९	विश्वक कृष्णपुत्र किंवा कृष्ण	गायत्री	अश्विनौ	
८७	६.६.१०	द्युम्नीक वासिष्ठ किंवा प्रियमेध आंगिरस	१.३.५ बृहती २.४.५ सतोबृहती	,,	
८८	६-६.११	नोधस् गौतम	प्रगाथ	इंद्र	
८९	६.६.१२	नृमेध व पुरुमेध	१.२ प्रगाथ ५.६ अनुष्टुभ् ७ बृहती	,,	
९०	६.६.१३	,,	१.३.५ बृहती २.४.६ सतोबृहती	,,	
९१	६.६.१४	अपाला अत्रिपुत्री	१.२ पंक्ति३.७अनुष्टुभ्	,,	अपालेचा इतिहास व तिचा इंद्राकडून त्वग्दोषपरिहार
९२	६ ६.१५-२०	श्रुतकक्ष किंवा सुकक्ष आंगिरस	१ अनुष्टुभ् २-३० गायत्री	,,	
९३	६.६.२१-२७	सुकक्ष	गायत्रीं	इंद्र ३४ इंद्र व ऋभु	
९४	६.६.२८-२९	बिंदु किंवा पूतदक्ष आंगिरस	गायत्री	मरुत्	
९५	६.६.३०-३१	तिरश्ची आंगिरस	अनुष्टुभ्	इंद्र	
९६	६.६.३२-३५	द्युतान मरुत्पुत्र किंवा तिरश्ची आंगिरस	४ विराज् बाकी त्रिष्टुभ्	इंद्र	

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
९७	६.६.३६–३८	रेभ काश्यप	१०.१३ अतिजगती, ११-१२ बृहती, १४ त्रिष्टुभ् १५ जगती अवशिष्ट बृहती	इंद्र	
९८	६.७.–१–२	नृमेध आंगिरस	७-१०-११ ककुभ् ९-१२ पुरउष्णिह बाकी उष्णिह	इंद्र	
९९	६.७.३	”	१.३.५.७ बृहती २.४.६.८. सतोबृहती	इंद्र	
१००	६.७.४–५	नेमभृगु गोत्र	६ जगती, ७-९ अनुष्टुभ् अवशिष्ट त्रिष्टुभ्	१०.११वाच् बाकी इंद्र	नेमानें इंद्राच्या अस्तित्वाविषयीं दाखविलेला संशय व इंद्रानें त्यांस दिलेलें उत्तर नेम, पारावत शरभ.
१०१	६.७.६-८	जमदग्नि भृगू गोत्र		६ आदित्य ७.८ आश्विनौ ९-१० वायु ११-१२ सूर्य १३ उषसू किंवा सूर्यप्रभा १४ पवमान, १५ गो, बाकी मित्रावरूण	जमदग्नि
१०२	६.७.९–१२	प्रयोग–भृगुगोत्र किंवा बार्हस्पत्य किंवा गृहपति व यनिष्ठ नांवाचे दोन अग्नि	गायत्री	अग्नि	गृहपति, और्वभृगू अप्रवान अंगिरः
१०३	६.७.१३-१५	सोभरि काण्व	५.७.९.११.१३ सतोबृहती ८.१२ ककुभ् १० गायत्री १४ अनुष्टुभ् अवशिष्ट बृहती	१-१३ अग्नि १४अग्नि व मरुत	देवोदास, सोभरि

समाप्त.

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर

मंडळ नववें.

भाषांतरकार.

विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

मुद्रक व प्रकाशक

शंकर रामचंद्र दाते, बी. ए.

चिटणीस, वैदिक वाङ्मय प्रसारक मंडळ.

' लोकसंग्रह ' छापखाना, २७ बुधवार पेठ, पुणें.

शके १८४९

किंमत दीड रुपाया.

नवममंडलपरिचय.

नवममंडळांत ११४ सूक्तें असून ११७६ ऋचा आहेत. त्या प्रायः गायत्री छंदांतल्या असून फारच थोड्या जगती, त्रिष्टुभ् वगैरे छंदांतल्या आहेत.

सर्व मंडळभर पवमान सोमाशिवाय देवता नाहीं. फक्त तीन ऋचांत पवमान अग्नि देवता आहे.

एक आप्रीसूक्त (५) असून पवमान नांवाचें विष्णूला अभिषेकाकरतां म्हटलें जाणारें सूक्त पहिल्या चार अध्यायांत आहे. आणि शेवटल्या (११३–११४) दोन सूक्तांत मरणोत्तर कोठें जावें याचा उल्लेख आहे. म्हणून दोन सूक्तें मरणसमयीं व संन्याशाच्या पुण्यतिथीच्या प्रसंगीं म्हणण्याचा परिपाठ आहे. ६६ व्या सूक्तांतील १९–२१ ऋचा सर्व संस्कारांत व प्रायश्चित्तांत आहुतीकरतां सूत्रकारांनीं सांगितल्या आहेत.

सोमाची समग्र माहिती (१–२८; ४–२६–२७;) हीं तीन सूक्तें वाचलीं असतां होण्यासारखी आहे.

सोम कुटणें, पिळणें, गाळणें, वरून ओतणें, दूध वगैरे पदार्थ त्यांत मिसळणें ह्या स्वरूपांत त्याचें सर्वत्र वर्णन असतें. दोन फलक—ते बहुशः लांकडी असावेत—दगडी बत्ता, बैलाचें कांतडें, दोन मोठालीं भांडीं आणि लोंकरीचें गाळणें इतकें साहित्य त्यास लागतें.

तसेंच ओततांना सोमाच्या होणाऱ्या आवाजाचें वर्णन फारच केलें आहे. तसेंच दहा बोटें बहिणींसारखीं आणि सप्तसिंधूंचें उदक मातेसारखें अशी कल्पना वारंवार व्यक्त केलेली आहे.

सोमक्रय.

सोमयाग करावयाचा असतो तेव्हां सोमवल्ली विकत घेण्याचा विधि आहे. सोम विकणाऱ्या माणसास ‘ सोमविक्रयी ’ असें म्हणतात. पूर्वी हा एक धंदाच असावा असें पातंजल महाभाष्यांत दिलेल्या उदाहरणावरून दिसतें. सोम विकत घ्यावयास अध्वर्यू, यजमान वगैरे जातात. पण खरेदीचा सर्व व्यवहार अध्वर्यूच्या हातून चालतो. अध्वर्यू ‘ सोमविक्रयी ’ जवळ गेल्यावर सोमवल्लीच्या दहा जुडग्या मोजून घेऊन एका वस्त्रांत त्यांचें गांठोडें बांधतो व तें सोमविक्रयीजवळ देऊन त्याला विचारतो कीं मी निवडून घेतलेला सोम विकणार काय ? तो म्हणतो विकणार. नंतर सोमवल्लीची किंमत म्हणून अध्वर्यू त्याला दहा वस्तु देतो. १ गाय, २ नुकती व्यालेली गाय, ३ कालवड, ४ खोंड, ५ गाडीला चालणारा बैल, ६–७ गाईबैलांचें जोडपें, ८ वस्त्र, ९ सोनें, १० शेळी. यजमान श्रीमंत असेल तर आणखीहि २।३ गाई जास्त देतो. गरीब यजमान असेल तर एकच गाय देण्यांत येते. २१ गाई ज्या यज्ञांत दक्षिणा म्हणून दिल्या जाणार असतात त्या यज्ञांत सोमवल्लीची किंमत १ च गाय देण्यांत येते. ६० गाई दक्षिणा असल्यास ३ गाई किंमत म्हणून देत. १००० गाई दक्षिणा असल्यास २७ गाई व खेरीज सोनें, शेळी व वस्त्र अशा ३० जिनसा अगर नुसत्याच तीस गाई सोमवल्लीची किंमत म्हणून सोम विकणारास देत असत. सोम विकणारा इतक्या किंमतीवरहि नाखूष होऊन सोमवल्ली देण्यास कुरकुरेल तर त्याच्यापासून सोमवल्ली जबरीनें घेत व त्याला बैलाच्या जुंपणाच्या चामडी पट्टयानें अगर मातीच्या ढेंकळानें ठोक देऊन हांकून लावीत.

वाजपेय यज्ञांत सोम खरेदी करण्यासाठीं २७ गाई व ३ वस्त्रें, राजसूयामध्यें १९७ गाई व ३ वस्त्रें, आणि अश्वमेध यज्ञांत ९९७ गाई व ३ वस्त्रें, याप्रमाणें यजमानाच्या ऐपतीवर अगर यज्ञाच्या लहान मोठ्या प्रमाणावर किंमत देण्यांत येई, इतकेंच नव्हे तर दिलेल्या किंमतीनें सोमविक्या खूष न होईल तर आणखीहि म्हैस, घोडा वगैरे त्याला देण्यांत येई. सोमवल्लीची किंमत म्हणून सोनें व दुसरे वर लिहिलेले पदार्थ सोम विकणाऱ्यास दिल्यावर त्यांपैकीं सोनें त्याच्यापासून परत घेत असत.

सोम विकत घेण्याच्या विधीवरून आणि त्याकरतां उपयोजलेल्या ‘ सोमविक्रयी’ वगैरे शब्दांवरून त्याकालीं सोमविक्रय करण्याचा धंदा करणारे असावेत व सोम दुर्मिळ असावा असें दिसतें. गोरस विकणाऱ्याप्रमाणें

त्यांनाहि त्याकालीं निन्द्य समजत असत. सोमाची लागवड करून तो विकीत असत किंवा स्वाभाविक रीत्या तो विपुल असे हें कांहीं निश्चित सांगतां येत नाहीं. पण सोमविक्रयाविषयीं ऋग्वेदाच्या नवममंडलांत किंवा इतरहि मंडलांत उल्लेख नाहीं. पण त्याचा उपयोग मात्र सार्वत्रिक केला जात असे, इतकेंच नव्हे तर दिवसांतून तिनदां तो तयार केला जात असे असे स्पष्ट उल्लेख आहेत.

सोम तयार करण्याची रीत.

प्रथम सोमवल्ली ब्राह्मणापासून यज्ञशाळेच्या बाहेर विकत घेऊन ती यज्ञशाळेंत न्यावी. नंतर सोम सुकूं नये म्हणून त्यावर पाणी शिंपडून व्यवस्थित ठेवावा. हें झाल्यावर त्याला अभिषवणफलकावर अंथरलेल्या कृष्णाजिनावर ठेवावें. अभिषवणफलक म्हणजे सोम कुटण्याच्या दोन फळ्या होत, त्या ३६ अंगुळया लांब व १८ अंगुळया रुंद प्रत्येकी असाव्यात. म्हणजे दोन्ही मिळून जवळ जवळ अंथरल्यावर हमचौरस होऊन प्रत्येक बाजू ३६ अंगुळया होते. त्याजवर कृष्णाजिन म्हणजे काळविटाचें कांतडें अंथरावें. त्यावर सोमवल्ली ठेवल्यावर ग्रावा म्हणजे दगडी चार बत्ते असतात, त्यांचा वरील भाग बारीक आणि खालचा जाडा असतो, त्यांनीं ती वल्ली कुटावी. कुटतांना थोडें पाणी मंत्र म्हणून घालावें लागतें. मग आधवनीय या नांवाचें एक मातीचें किंवा धातूचें अनुकूल असेल तसें भांडें घेऊन त्यांत कुटलेली सोमवल्ली घालावी. पाणी पुष्कळ ओतावें, आणि ती कुसकरून पाण्यांत मिसळावी. मग सोमवल्लीचा रस पाण्यांत मिसळल्यावर चोथा पिळून बाहेर काढावा. त्याला ऋजीष असें म्हणतात. मग अधिषवणावर रंगाऱ्याच्या घडवंचीसारखी एक घडवंची गाळण्याकरतां ठेवून तिचेवर दशापवित्र या नांवाचें गाळणें म्हणजे गाळण्याचें वस्त्र बांधावें. आणि त्यांत पाण्यांत मिसळलेला सोम आधवनीयांतून घेऊन ओतावा. पवित्राला खालच्या अंगीं लहानसें भोक पाडून त्यांत लोंकरीचा दोरा ओवून तो दुणून वळून बारीक धार पडेल अशी दशा करावी, म्हणजे वरील सोम दशेवरून बारीक धारेनें खालीं गळतो. तो पात्रांत घ्यावा. पात्रें ग्रह, चमस् ह्या नांवाचीं आहेत. मग तो सोम घेऊन वेगवेगळया देवतांच्या प्रीत्यर्थ अग्नीमध्यें होमून मग सदोमंडपांत होम करणाऱ्यांनीं व वषट्कार म्हणणाऱ्यांनीं, उद्गाता, यजमान, ब्रह्मा, सदस्य इतक्यांनीं अनुक्रमें भक्षण करावा.

ह्या सोम म्हणजे कदाचित रानशेर असावा तो पुण्याच्या नजीक पुष्कळ आहे. त्याला कांटे नसतात. पानेंहि नसतात. सुमारें चार हात उंच झाड कांड्याकांड्याचें असतें. कांड्या हाताच्या बोटासारख्या मोठ्या असतात. रंग हिरवा असतो, झाड तोडून सगळेंच आणतात. रस किंचित् तुरट असतो. प्याल्यावर अंमल वगैरे कांहींच येत नाहीं. प्यावयास मधुर, रुचिकर किंवा प्यावा असें म्हणण्यासारखें त्यांत कांहींच नाहीं. हें सोमाचें झाड मूळ झाडाचा प्रतिनिधि आहे. मूळ सोमाचें झाड नव्हे असें शास्त्रांत आहे व लोक समजतात. ह्या झाडाला 'पूतिक' असें पुल्लिंगी संस्कृत नांव आहे. मूळ सोम न मिळेल तर हें पूतिकतृण घ्यावें असें श्रौतसूक्तांतून आहे. त्यावरून हें घेतात.

ह्या सोमरसांत दूध, दहि सुवर्णरज व तूप देवता–भेदानें घालून मग अर्पण करण्याचा विधि आणि चाल आहे.

सोमवल्लीच्या अभावीं ' पूतिक ' अथवा ' फाल्गुन ' या नांवाच्या वनस्पतीचा उपयोग करावा असें अनधिगमे पूतिकान् फाल्गुनानि ' (आश्वलायनश्रौतसूत्र ६. ८. ५.) या सूत्रांत सांगितलें आहे.

अशी सध्यां क्वचित होत असलेल्या सोमयागांतील सोमाची कृति आहे.

हिरण्य श्रौतसूत्रांतहि (८. ३–४) असाच प्राय: विधि दिला आहे. सोम कुटतांना बत्त्यानें किती ठोके मारावेत, पाटा कसा ठेवावा वगैरें विधीहि बारकाईनें सांगितलेले असतात.

सोमाचा रंग.

सोमलतेचा रंग हिरवट, काळसर आणि तांबूस असा वेगवेगळ्या प्रकारें वर्णन केला आहे. तसेंच त्याला सुपर्ण असेंहि म्हटलेलें आहे. त्यावरून त्याला चांगलीं पानें असावींत असें दिसतें. तसेंच त्याला कांड्या असतात असेंहि वर्णन आहे. बहुतेक वेळा त्याचा हरित शब्दानें रंग वर्णिला आहे. त्यावरून सोमरस दिसण्यांत तयार केलेल्या भांगेसारखा असावा असें दिसतें. सध्याच्या सोमयज्ञांतील सोमाचाहि रंग तसाच असतो.

सोमांतील गुण.

सोमाचें स्तवन करतांना त्यांत विविध प्रकारचे गुण असल्याचें वर्णन आहे. त्यांतल्या त्यांत उत्साह वाढविण्याची त्यांत विशेष शक्ति आहे. युद्धांत तर त्याचा अवश्य उपयोग केला जात असे. एकदा कां इंद्रानें सोमपान केलें कीं मग तो कोणालाहि हार जात नसे. इतर देवहि त्याचा उपयोग करीत असत. एकंदर वर्णनावरून त्याचा सरसहा त्यावेळीं प्रचार होता असें दिसतें. त्यांतल्या त्यांत युद्धांत वीरश्री येण्याकरतां विशेष उपयोग केला जाई. त्याच्या बुद्धिवर्धकपणाचेंहि जेथें तेथें वर्णन केलें आहे. सोम प्याल्यावर अंगांत तरतरी येऊन प्रतिभेचा विकास होत असे. वक्तृत्व आणि स्तोत्रें यांना भरती येत असे. सोमाच्या अंगांत मादकपणाहि बराचसा होता. त्याला मादकांतला मादक असेंहि बरेंच ठिकाणीं म्हटलें आहे. कुवित्सोमस्यापामिति (१०. ११९) इत्यादि सूक्तांत सोमानें किती माद येत असे याची कल्पना येण्यासारखी आहे. शिवाय वैदिक देव व ऋषि यांचा सोमाविषयीं लंपटपणा दाखविला आहे. त्यावरूनहि सोम हा कांहीं तरी भांग, गांजा सारखा मर्यादित व सुखपरिणामी कैफ असावा असें दिसतें. मात्र मद्य, सुरा व सोम यांत फरक होता यांत संशय नाहीं.

तसेंच त्यांत किरकोळ रोग बरे करण्याचीहि शक्ति असावी. तथापि त्याच्यांतील मुख्य गुण मदोत्पादकता, बुद्धिवृद्धि, आणि तरतरी उत्पन्न करणें हेच होत. अशी परिणामशक्ति असल्याशिवाय त्याविषयीं लंपटताहि उत्पन्न होणें शक्य नाहीं.

सोमांत मिसळण्याचे पदार्थ.

सोम तयार करतांना त्यांत दूध, दहीं, तूप, मध, पाणी आणि सातूचें किंवा गव्हाचें पीठ घालीत असत. त्यामुळेंच त्याला यवाशिर, गवाशिर, ज्याशिर वगैरें नांवें पडलीं होतीं. त्यायोगें त्याला विशेष प्रकारचें माधुर्यहि येत असलें पाहिजे. सोमाला अनेक ठिकाणीं मधुमत्, मधु, पीयूष असें म्हटलें आहे. कामी मनुष्य ज्याप्रमाणें आपल्या रमणीकरतां वेडा झालेला असतो व तिच्या प्रत्येक कृत्यावर किंवा वस्तूंवर आषक असतो त्याप्रमाणें हे सोमभक्त ऋषि सोमाच्या चोथ्याचें आणि गाळण्याचें सुद्धां वर्णन करण्यांत गर्क झालेले दिसतात.

सोमाची चव.

साधारणतः सोमाची चव कशी होती याचें स्पष्ट वर्णन सांगणें मोठें कठीण वाटतें. कारण अशा प्रकारच्या पदार्थांची सामान्य चव वर्णन केली जात नाहीं, तर त्याविषयीं आपला जो ओढा असतो त्याला अनुसरून वर्णन केलें जात असतें. उदाहरणार्थ, चहा, कॉफी, भांग, तांबूल वगैरे पदार्थ प्रथम भक्षण करणाराला त्याचें स्वारस्य समजत नाहीं. पण ज्याला त्याचा नाद लागलेला आहे तो त्या पदार्थांचें मोठें कौतुक करीत असतो. तशीच सोमाचीहि स्थिति असावी. प्रायः सर्वच उत्तेजक पदार्थांची अशीच स्थिति आहे. स्वादुः किलायं मधुमानुतायं तीव्रः किलायं (६–४७–१) असें जरी सोमाचें वर्णन असलें तरी सोम हा तिखट, तुरट पदार्थ असावा. त्यास भांगेप्रमाणें दूधमध वगैरे पदार्थ मिसळून विशेष माधुर्य आणीत असावेत. प्रायः असे पदार्थ उत्कट गंध असलेले व उत्तेजक असतात. आणि त्यांची चवहि विशेष चांगली नसते. तशीच सोमाचीहि स्थिति असावी. सध्यांच्या सोमाच्या प्रतिनिधीवरूनच कल्पना करावयाची म्हणजे द्रोणानें अश्वत्थाम्याला दिलेल्या पीठ घातलेल्या पाण्यावरून दूधाच्या गोडीची कल्पना करण्यासारखें होण्याचा संभव आहे. म्हणून त्याबद्दल पेक्षां जास्त विचार करणें बरें नव्हे.

सोम व सुरा.

ऋग्वेदकालींहि सोम व सुरा वेगळी असावी असें म्हणण्यास आधार आहे.

हृत्सु पीतासो युध्यन्ते दुर्मदासो न सुरायाम् । (ऋ. ८. २. १२.)

येथें प्यालेल्या सोमाला दारूचा दृष्टान्त दिला आहे. आणि दारूनें येणाऱ्या मदाला दुर्मद असें म्हटलें आहे.

सुरा मन्युर्विभीतको अचितिः ॥ (ऋ. ७. ७–८६–६)

दारू, क्रोध आणि फासे हे पापाकडे नेणारे आहेत. सुरेचे याठिकाणीं जसें वर्णन आहे तसें सोमाचें कोठेंहि नाहीं. सर्वत्र याच्या उलट सोमाचें वर्णन आहे.

यावरून त्यावेळीं सोम व सुरा हे पदार्थ वेगळे होते आणि सोमापेक्षां दारूच्या मादकपणांत कांहीं दुर्गुण होते असें दिसतें. शिवाय पुढील वाङ्मयांत व सौत्रामणीयागांत सोमाशिवाय मद्याचें वेगळें विधान आहे. यावरून सोम व सुरा भिन्न आहे असें स्पष्ट म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं.

सोमाच्या उत्पत्तीचीं ठिकाणें.

सोमाच्या उत्पत्तीचें ठिकाण पर्वतावरील पाणथळ प्रदेशांत असावें. त्यामुळेंच त्याला पर्वतावृध्, गिरिष्ठ असें म्हणतात. मौजवत, शर्यणावत, आर्जीकीया, सुषोमा, सिंधु, हीं तीं स्थलें होत.

साधारणतः हीं सोमाच्या उत्पत्तीचीं ठिकाणें म्हणून उल्लेख आलेला आहे. सर्वच ठिकाणांबद्दल निश्चित बोलतां येत नसलें तरी बहुतेक स्थळें डोंगर आणि नद्या यांशीं संबद्ध आहेत. मूजवान् हा हिमालयाच्या भागापैकीं एक पर्वत आहे. शर्यणावत् नांवाचें सरोवर हिमालयाच्या पायथ्याशीं व कुरुक्षेत्राच्या वरच्या भागांत आहे असें तैत्तिरीय आरण्यकांत दिलेल्या शर्यणावताच्या चतुःसीमेवरून दिसते. आर्जिकीया आणि सुषोमा या तर नद्याच आहेत. आणि त्याहि पंजाबांतील डोंगराळ मुलखांतीलच आहेत. त्या नद्यांना सध्यां काय नांवें आहेत हें सांगतां येत नाहीं. त्याची पैदास केल्याचा कोठेंहि उल्लेख नाहीं.

सोमाचे प्रतिनिधि.

सोमाचा प्रतिनिधि म्हणूत सध्यां जो कांडवेल किंवा रानशेर वापरण्यांत येतो, त्याचें कारण श्रौतसूत्रांत (आश्व.६–८–५) किंवा शतपथब्राह्मणांत (४.५.१०.१ ते ६) पूतिकतृण म्हणून सांगितलेली वनस्पति ती होय अशी परंपरांगत समजूत आहे. खरोखर पूतिकतृण म्हणजे सध्यां सोमाला प्रतिनिधि म्हणून घेतली जाणारी वनस्पतिच आहे कीं काय असा संशय घेण्यास जागा आहे. याविषयीं वेदार्थयत्नकार श्री. पंडित यांचा एक उतारा जरा फिरवून येथें घेतों.

‘सोमाचें झाड मिळत नाहीं म्हणून पूतिकाचा रस काढून देवांस अर्पण करावा असें सूत्रांत सांगितलें आहे. तें पूतिक झाड आणि सध्यां घेत असलेला वानशेर हीं एकच कशावरून ? पूतिक नांव नाहींसें होऊन रानशेर कसें पडलें ? आणि पूतिकाविषयीं लिहिणारा शास्त्रकार कधीं व कोठें झाला ? सूत्रवृत्तिकार गार्ग्यनारायण म्हणतोः—‘फाल्गुन (आणि पूतिक) या वनस्पति अप्रासिद्ध म्हणजे बहुत करून कोणास ठाऊक नाहींत. अशा आहेत, यास्तव त्या ज्यांस ठाऊक असतील त्यांस विचारून त्याविषयीं माहिती करून घ्यावी. तेव्हां रानशेर म्हणजे पूतिक कशावरून ? या गोष्टींचा विचार करतां सध्या सोमरस म्हणून जो अर्पण करतात त्याला माधुर्यादि आणि मदादि प्राचीन सोमाचे कांहींच गुण नसल्यामुळें आम्हांस अशी शंका येते कीं, तूर्त जे यज्ञ होत असतात, त्यांत सोमाविषयीं देवांची वंचना होते, आणि गोड, मोठा अंमल आणणारा, परम सुवासिक आणि दिसण्यांत सुंदर असा सोम प्यावयास न मिळतां, त्याऐवजीं ओंगळ एका रानटी झाडाचा, अंमलहि न आणणारा, आनंदहि न करणारा आणि पिण्याविषयीं अत्यंत कंटाळा आणणारा ओंगळ रस त्यास अर्पण केला जातो. ’

द्युलोक व सोम.

सोम द्युलोकाहून पर्जन्यद्वारां येतो असें वर्णन पुष्कळ ठिकाणीं येतें. त्याचा अर्थ उंच टांगलेल्या गाळण्यांतून सोम धारांरूपानें खालीं पडतो असाच फार ठिकाणीं असतो. शिवाय भांगेप्रमाणें उंचून ओतण्यानें त्यांतील गुण वाढत असावेत. सोम प्रथम द्युलोकांत होता नंतर तो पृथ्वीवर आला असा सोमासंबंधी उल्लेख आहे. (९. ६१. १०.) दिवःपुत्र—दिवःशिशु असें त्याला म्हटलेलें आहे. एका ठिकाणीं त्याला पर्जन्यपुत्र असें म्हटलें आहे. (९. ८२. ३.) वास्तविक सोमाचा द्युलोकाशीं संबंध लाक्षणिकच असला पाहिजे. सध्यांहि कोणच्याही चांगल्या गोष्टीचा संबंध स्वर्गाकडे लावण्याची पद्धत आहे त्याचाच हा प्राचीन नमुना आहे असें दिसतें. सोमाची लागवड त्याकालीं करण्याची पद्धत असल्याचा कोठेंहि उल्लेख नाहीं. तो नदींतल्या शेवाळासारखा पाण्यांत किंवा पाण्याच्या आसपास उत्पन्न होत असे. त्यामुळें तो कसा उत्पन्न होतो याचीहि वैदिक ऋषींना कल्पना नसावी. म्हणून सोमाचें बीज पर्जन्यद्वारां पृथ्वीवर येते असा उल्लेख आढळतो. (९.८२.३.) आणि पुढल्या काळांत नष्ट होण्याचें कारणहि हेंच असावें असें दिसतें.

गाळणें कसें असावें ?

पवित्र किंवा दशापवित्र शब्दानें सोमाच्या गाळण्याचा सर्वत्र उल्लेख येत असतो. तें गाळणें मेंढीच्या लोंकरीचें असे असें येथील अवि, अव्य, अविमय वगैरे विशेषणावरून दिसतें. तें विणलेलें असे किंवा नसे या विषयीं निश्चित कांहीं सांगतां येत नाहीं. पण त्याचा रंग पांढरा होता असा एका ठिकाणीं उल्लेख आहे. सध्यांच्या सोमयागांत लोंकरीचें गाळणें नसतें. त्यांत कापडाचें पांढरें स्वच्छ गाळणें असतें. पण त्याला थोडी लोकर लावून शास्त्रार्थ पाळण्यांत येतो. त्याला कांहीं पदर असत असें ' व्हरांशि ' शब्दावरून दिसतें.

चंद्र व सोम.

सोम म्हणजे चंद्र असा उत्तरकालीन वाङ्मयांत अर्थ केला जातो. पण ऋग्वेदांत तसा अर्थ करण्यास उपयोगी फारच थोडीं स्थळें आहेत. चंद्र हा प्रत्यहीं कमी होत जातो. त्याच्या कला देव भक्षण करतात व पुन: तो वाढतो. तेव्हां त्याला सूर्याचें साहाय्य होतें. छांदोग्य उपनिषद (५।१०।१), ऐतरेयब्राह्मण (७।११), शतपथ ब्राह्मण (१।६।४।५) यांमध्यें सोम म्हणजे चंद्र असा अर्थ केला आहे. कौषीतकी ब्राह्मणांत (७।४०।४।४) यज्ञासाठीं जी लता किंवा जो रस घ्यावयाचा तो चंद्रदेवाचा प्रतीक म्हणून घ्यावयाचा आहे. चंद्राच्या क्षयाचें कारण त्याला पितर व देव भक्षण करतात असें ब्राह्मणग्रंथांत सर्वत्र म्हटलें आहे. सोम आणि चंद्र यांचें ऐक्य ऋग्वेद (१०।८५) या सूर्याविवाह सूक्तांत स्पष्ट आहे. याच विवाहसूक्तांत (१०।८५।२) सोम नक्षत्रांच्यामध्यें बसला आहे असा उल्लेख आहे. ब्राह्मणांना माहीत असलेला सोम कोणी खात नाहीं. ब्राम्हण जो पिळतात तो वेगळाच आहे. असें पुढें म्हटलें आहे. (१०. ८५. ३.) चंद्राचें सोमत्व केवळ ब्राम्हणांनाच ठाऊक आहे. यावरून ही कल्पना त्याकालीं प्रसिद्ध नव्हती असें दिसतें.

याशिवाय समुद्राला भरती सोमामुळें येते असा कांहीं ठिकाणीं उल्लेख आहे. त्याच्यामुळें रात्रीं होतात, असहि उल्लेख आहे. त्यावरून सोमलता व चंद्र यांचें अभेदस्वरूपानें वर्णन केल्यासारखें दिसतें.

ब्राह्मणादि ग्रंथांत व पुढें दिलेल्या संहितेंतलि आख्यायिकांत सोम म्हणजे चंद्र असाच अर्थ इष्ट आहे असें दिसतें. यावरूनहि त्याकालापासूनच सोमाची दुर्मिळता असावी अशी शंका येते. मात्र सोमलतेचा स्पष्ट उल्लेख ऋग्वेदांत अनेक स्थलीं आहे. सोमलतेचें म्हणून वर्णन केलेले विशेष सर्व गुण चंद्रामध्यें आढळतात. चंद्रामुळें मनाला आल्हाद वाटून उत्साह वृद्धिंगत होतो. समुद्राला भरती येते, कामवासना उद्दीपित होते, झोंप चांगली होते, वनस्पति वाढतात, मनुष्य ताजा तवाना होऊन युद्धादि कर्में नेटानें करूं लागतो, ह्या सर्व गोष्टी सोमलतेप्रमाणें चंद्रामध्येंहि आढळून येतात. या सर्व गोष्टींचा विचार करतां सोम वनस्पति व चंद्र यांना एकमेकाचें ऐक्य मानण्याची कल्पना उत्पन्न होणें अत्यंत साहजिक आहे.

कृशानु व सोम

१ स्वान, २ भ्राज, ३ अंघारी, ४ बंभारी, ५ हस्त, ६ सुहस्त, ७ कृशानु, ८ विश्वावसु, ९ मूर्धन्वान्, १० सूर्यवर्चा, ११ कृति.

वरील एकादश गंधर्व गणांपैकीं कृशानु हा एक संरक्षक आहे. स्वर्गांतून श्येनानें सोम आणला त्यावेळीं कृशानूनें त्याला बाण मारला. त्यामुळें श्येनाचें एक पीस तुटून पडलें. कृशानु हा धनुर्धारी होता (ऋ.४—२७).

सोमाच्या कथा

सोमाला श्येनानें स्वर्गांतून पृथ्वीवर आणलें अशी अमृतासंबंधीं पुराणांत असलेल्या कथेसारखी कथा ऋग्वेदांत बरेंच ठिकाणीं उल्लिखित आहे. (३. ४३. ७; ४. २६. ६; ८. ९५. ३; ९. १००. ८.) श्येन म्हणजे बहिरससाणा.

ऋग्वेदांत अनेक ठिकाणीं सोमाला श्येनाभृत असेंहि म्हटलें आहे. (१. ८०. २; ८. ९५. ३) पण लाक्षणिक अर्थानें श्येन हा शब्द अग्नि, इंद्र यांना लावलेला आढळतो. सोमाच्या कांहीं गोष्टी नमुन्याकरतां पुढें दिल्या आहेत.

सोमास क्षय.

प्रजापतीस तेहेतीस मुली होत्या. त्या सर्वांचीं त्यानें सोमराजाशीं लग्नें लावून दिलीं. तो रोहिणीवर जास्त प्रेम करूं लागल्यामुळें इतर बहिणी रागावून बापाकडे निघून गेल्या. सर्वांवर सारखी प्रीति करीन अशी शपथ घेतल्यावर त्या सर्वांना त्यांनीं परत दिलें. पण सोमाची खोड जाईना. तेव्हां संभोगातिरेकानें त्याला राजयक्ष्मा नांवाचा रोग जडला. नंतर इतर स्त्रियांची सोमानें क्षमा मागितली. नंतर त्यांनीं त्याकडून वचन घेऊन रोग बरा होण्याकरतां आदित्याला आहुति दिल्या. तेव्हां आदित्यानें त्यांस रोगमुक्त केलें. (तै. सं. २–३–५).

शंड, मर्क व सोम.

देवांच्या बृहस्पतीप्रमाणें शंड व मर्क हे असुरांचे बुद्धिमान् पुरोहित होते. जेव्हां कोणाचाहि पराभव होईना, तेव्हां देवांनीं सोमाच्या लालचीनें शंड व मर्क यांना फितुर केलें. तेव्हां असुरांचा पराभव झाला. पुढें देवांनीं यज्ञ सुरू केल्यावर कबूल केल्याप्रमाणें शुक्र व मंथीनामक पात्रांतील सोमरस आपल्यास प्यावयास मिळेल या आशेनें शंड व मर्क त्या यज्ञांत येऊन दाखल झाले. पण फितुरांना सामील करून घेण्याच्या विरुद्ध असणाऱ्या देवांनीं त्यांना फजित करून हुसकून लावलें. (तै. सं. ६–४–१०)

सीतासावित्रीचा सोमाशीं विवाह.

प्रजापतीनें सोम उत्पन्न केला व त्याच्या पाठीमागून तीन वेद उत्पन्न केले. सोमानें ते तीन वेद आपल्या मुठींत झांकून ठेवले. प्रजापतीची ' सीतासावित्री ' नांवाची एक मुलगी होती. तिच्या मनांत आलें कीं, सोम आपला पति व्हावा. पण सोमाच्या मनांत प्रजापतीची श्रद्धा नामक मुलगी भरली होती. सीतासावित्री प्रजापतीकडे गेली व तिनें आपल्या मनांत सोमाशीं विवाह व्हावा अशी इच्छा असल्याचें त्याला सांगितलें. प्रजापतीस सोमाची मर्जी कोणावर आहे हें ठाऊक होतें. म्हणून वशीकरणाकरतां त्यानें स्थागर नांवाच्या वनस्पतीचें गंध भारून त्या मुलीच्या कपाळीं लावलें. मग सीतासावित्री सोमाकडे गेली. सोम तिला पाहतांच मोहित झाला व तिला माझ्याजवळ ये म्हणून लाडीगोडीनें बोलूं लागला. सीतासावित्री सोमाचें प्रेम आपल्यावर कितपत बसलें आहे हें पहाण्याकरतां तूं मला एकट्यालाच भोगलें पाहिजेस, तसेंच तुझ्या मुठींत काय जपून ठेवलें आहेस तें मला निष्कपटपणें सांगशील तर मी तुझेजवळ येईन असें त्यास म्हणाली तेव्हां सोम प्रेमानें वेडा होऊन गेल्यामुळें तिच्या म्हणण्यास कबूल झाला व आपल्या हातांतील तीन अमूल्य वेद त्यानें तिला खुषीनें देऊन टाकले. सोमाचें व सीतासावित्रीचें लग्न झालें व तीं उभयतां सुखानें नांदूं लागलीं. सीतासावित्रीप्रमाणेंच चतुर स्त्रियांची स्थिति होत असते. (तै. ब्रा. २–३–११.)

वृद्धकुमारी अपाला.

याशिवाय ऋग्वेदांतच सोमाविषयीं इंद्र किती हपापलेला असे याचें प्रत्यंतर वृद्धकुमारी अपालेच्या कथेवरून आपणांस दिसते. (८–९१.)

गायत्रीनें सोम आणला.

सर्व देव, ऋषि वगैरेनीं सोम आपल्या यज्ञांत कसा यावा याचा विचार केला. सोम हा गंधर्वांत रहात असे. सोमरस प्राप्त व्हावा म्हणून देवांना तीव्र इच्छा असल्यामुळें त्यांनीं प्रयत्न चालविला. तेव्हां त्यांस असें आढळून आलें कीं गंधर्व, स्त्रियांचे लोभी आहेत. तेव्हां त्यांनीं वाणीस गंधर्वाकडे पाठविलें. वाणी गायत्री वगैरे छंदांच्या रूपानें देवांकडे गेली. तेव्हां तिनें पक्ष्याचें रूप घेतलें होतें. आणि तेथून तिनें सोम आणला. श्येनानें पायांत धरून सोम आणला वगैरे आख्यायिका ह्याच स्वरूपाच्या आहेत. म्हणूनच सोमाहरण प्रतिपादक सूक्तांस सौपर्ण म्हणण्याची पद्धत आहे. सोमाहरणाकरतां जात असलेल्या गायत्रीचा पंख तुटून पडला व त्यापासून पर्णवृक्ष झाला असा उल्लेख आढळतो (ऐ. ब्रा. १. २७; ३. २५; २. २५; १. १२.)

सोमाकरतां शर्यत.

एकदा यज्ञांत सोमरस पिण्याबद्दल देवसमुदायांत तेढ पडली. तेव्हां त्यांनीं जो शर्यत जिंकील त्यानें सोम प्यावा असें ठरविलें. सरते शेवटीं वायु व इंद्र प्रथम आले व नंतर मित्रावरुण आले इत्यादि वर्णन आलें आहे. सोमापहरणास ईशान्य दिशा चांगली, कारण त्याच दिशेला देवांस असुरांवर जय मिळवितां आला.

(ऐ. ब्रा. १.२७.)

विश्वंतराचा सोमयज्ञ.

ऐतरेय ब्राह्मणांत (३५–२७) सोमासंबंधीं एक चमत्कृतिजनक आख्यायिका आहे. त्यांत चार वर्णांना वेगवेगळे सोम सांगितले आहेत. ती आख्यायिका थोडक्यांत अशी आहे:—

विश्वंतरानें श्यापर्णांना टाकून विश्यापर्णांना यज्ञाला बोलावलें. श्यापर्णहि यज्ञाची वार्ता कळल्यावरून बोलावणें नसतांहि तेथें जाऊन बसले. पण राजानें त्यांना हांकून दिलें. तेव्हां एकच गडबड झाली. श्यापर्ण म्हणाला आपल्यांत कोणी असा शूर नाहीं कां ? कीं जो राजाला ताब्यांत घेईल. राम भार्गवेय नांवाचा तरूण पुढें सरसावला. तो राजाला म्हणाला—

'माझ्यासारख्या ज्ञात्याचाहि तूं धिक्कार करतोस ?'

'वेड्या तुला काय समजतें आहे ?'

'पण तूं ऐकण्याच्या स्थितींत आहेस कोठें ?'

'आपल्यापाशीं ऐकण्यासारखें काय आहे ?'

'ऐकल्याशिवाय कसें समजणार ?'

'इंद्राला सोम देणें बंद केलें आहे हें तुला माहीत आहे ?'

'नाहीं, इंद्राला सोम देणें कां बंद केलें आहे ?'

'त्यानें पांच अपराध केले आहेत म्हणून ?'

'इंद्राला सोम नाहीं तर त्याच्या अनुयायांना—क्षत्रियांना सोम कुठला ?'

'बरोबर ! आतां कोणालाच सोम नाहीं !!'

'पण इंद्रासारखा शूर सोम प्याल्याशिवाय कसा राहणार ! तो यज्ञांत बलात्कारानें घुसून सोम पितो !'

'महाराज, ती योग्यता आम्हां क्षत्रियांना कोठली ?'

'पण सोमाशिवाय क्षत्रियांना स्फुरण कसें चढणार ?'

'क्षत्रियांचें सामर्थ्य वाढविणारा सोम मला ठाऊक आहे.'

'तर सांगा महाराज ! आम्हां क्षत्रियांचा उद्धार करा.'

'सोमवल्ली फक्त ब्राह्मणांच्याच उपयोगी आहे. तुम्ही जर सोमवल्लीचा उपयोग कराल तर तुमची प्रजा ब्राह्मणांप्रमाणें दानप्रतिग्रह घेणारी, भटकणारी, दरिद्री आणि युद्धाला निरुपयोगी होईल.'

'मग क्षत्रियांचा मोठेपणा कसा टिकणार ?'

'दहि वैश्यांचा सोम होय. तो भक्षण केल्यानें वैश्यासारखी प्रजा होईल ?'

'असा नेभळेपणा आमच्या संततीला केव्हांच येतां उपयोगी नाहीं.'

'शूद्रांना जल हा सोम होय. त्याचा उपयोग केल्यानें दुसऱ्यांच्या पुढें पुढें करणारी आणि लाथा खाणारी प्रजा होईल.'

'छे: छे: ! असा अध:पात आमचा केव्हांहि होतां उपयोगी नाहीं !'

'अस्सल क्षत्रिय जर निर्माण होऊन जगावर त्यांचें वर्चस्व व्हावयास पाहिजे असेल तर वडाच्या पारंब्या, उंबर, पिंपळ व प्लक्ष यांपैकीनें याग करावा. समजलास !'

'महाराज, हें सांगून क्षत्रिय जातीवर आपण मोठा अनुग्रह केला आहे. आतां आपण श्यापर्णासह माझ्या यज्ञांत यावें आणि माझा यज्ञ यथासांग पार पाडावा.'

नंतर श्यापर्ण यज्ञांत आले आणि त्यांनीं यज्ञ पुरा केला.

यावरूनहि सोमासंबंधी तत्कालीन परिस्थितीवर चांगलाच प्रकाश पडणारा आहे.

सोम व सुवर्ण.

सोम तयार करतांना त्यांत सोन्याचें रज सध्यां घालतात. नवममंडळांतहि सोन्याचा व सोमाचा संबंध आला आहे. तेथें सायणाचार्यानें त्याचा अर्थ वेगळ्याच पद्धतीनें लावला आहे. हिरण्मये कोशे—तस्य हिरण्मयत्वं हिरण्यपाणिरभिषुणोतीति हिरण्यसंबंधात् । असा हिरण्यसंबंध जोडला आहे. (९. १. २; ९७५. ३;) सुश्रुतसंहितेतील सोमाविषयीं जो उतारा आम्ही दिला आहे त्यांत सोमकंदाचा भेद करण्यास सुवर्ण-

शलाका आणि सोमरसास सुवर्णपात्र सांगितलें आहे. ‘ हिरण्मये कोशे, (९. ७५. ३;) असें वर्णन ऋग्वेदांतहि आलेले आहे. ‘ हिरण्यपाणिरभिषुणोति’ यावरून सोन्याची आंगठी घालणे व त्याचें पवित्र हें नांव याचा संबंध ऋग्वेदांतील सोमापर्यंत जाऊन पोंचतो असें वाटूं लागते.

सोम केव्हां नष्ट झाला असावा !

आतां हा इतका नित्यपरिचित असणारा सोम नष्ट केव्हां झाला असावा अशी कल्पना उत्पन्न होणें अत्यंत स्वभाविक आहे. ज्याचा नित्य उपयोग केला जात असे आणि ज्याची उत्पत्ति हिमालयावरील मूजवत् पर्वतावर व हिमालयाच्या पायथ्याशीं असणाऱ्या शर्यणावत सरोवरांत होत असे, तो सोम आजिबात मिळूं नये, त्याची कल्पनाहि सांगतां येऊं नये, एवढेंच नव्हे तर ऋग्वेदाच्या पुढील ग्रंथांतच त्याचा प्रातिनिधि सांगण्याचा प्रसंग यावा ही गोष्ट अत्यंत चमत्कृतिजनक व अभ्यास करण्यासारखी आहे.

सोमाचा स्पष्ट शब्दांत प्रतिनिधि शतपथ ब्राह्मणांत सांगितलेला आढळतो. (शतपथ ब्रा. ४. ५. १०. १ ते ६). परंतु ऐतरेय ब्राम्हण (३५–२७) व तैत्तिरीय संहितेंतहि त्याची दुर्मिळता पर्यायानें सूचित केलेली आहे. सोमक्रयांतलि सोम हिसकाऊन घेण्याच्या हकीगतीवरून सोम हा ब्राम्हणादि ग्रंथकालींच दुर्मिळ नव्हे तर अप्राप्य झाला होता आणि त्यामुळें सोम म्हटला कीं लोक चंद्र किंवा प्रतिनिधीकडे बोट दाखवूं लागले होते असें स्पष्ट दिसतें.

यज्ञाशिवाय सोम पिऊं नये, यज्ञांत सोमाचा तुटवडा पडला तर काय करावे, चोरीस गेला तर काय करावें वगैरेबद्दल जी तैत्तिरीयब्राह्मणांत चर्चा आढळते त्यावरून सोम त्याकाळीं विपुल असावा असें दिसत नाहीं.

ऋग्वेदांतहि प्रत्यहीं तीन वेळां सोम वैपुल्यानें उपयोगांत आणल्याचा उल्लेख असला तरी त्याची पैदास होत असे. इंद्रादि देव आणि भक्त त्याकरतां हपापलेले असत असें जे जागोजागीं वर्णन केलें आहे त्यावरून सोम सर्वांना सहज मिळण्यासारखा नव्हता असें दिसतें.

सोम व वैद्यशास्त्र.

वैद्यशास्त्रांतलि अत्यंत प्राचीन असणाऱ्या सुश्रुतसंहितेंत सोमरसायनाकरतां एक अध्याय आहे. त्यांत सोमवल्लीचें वर्णन देण्याचा प्रयत्न केला आहे. सुश्रुताचा काल इ. स. पूर्वी पांचव्या पासून दहाव्या शतकापर्यंत धरण्यांत येतो. इतक्या प्राचीन कालांतल्या ग्रंथांतील सोमवर्णनावरून त्याकाळीं तरी सोमाचा कितपत पत्ता होता याचा उलगडा होण्याचा बराच संभव आहे. सुश्रुतसंहितेचे प्रणेते आचार्य सुश्रुत काश्मीर किंवा पंजाब प्रान्तांतील असावेत व त्या संहितेवरील टीकाकार डल्डनाचार्य हेही मथुरेजवळील अंकोल्याच्या सहदेव नृपतीचे आश्रित होते.

ब्रह्मादयोऽसृजन् पूर्वममृतं सोमसंज्ञितम् ।
जरामृत्युविनाशाय विधानं तस्य वक्ष्यते ॥ ३ ॥
एक एव खलु भगवान् सोमः स्थाननामाकृतिवीर्यविशेषैश्चतुर्विंशतिधा भिद्यते ॥ ४ ॥
अंशुमान् मुञ्जवांश्चैव चन्द्रमा रजतप्रभः
दूर्वासोमः कनीयांश्च श्वेताक्षः कनकप्रभः ॥ ५ ॥
प्रतानवान् तालवृन्तः करवीरोंऽशवानपि ।
स्वयंप्रभो महासोमो यश्चापि गरुडाहृतः ॥ ६ ॥
गायत्र्यस्त्रैष्टुभः पाङ्क्तो जागतः शांकरस्तथा ।
अग्निष्टोमो रैवतश्च यथोक्त इति संज्ञितः ॥ ७ ॥
गायत्र्या त्रिपदा युक्तो यश्चोडुपतिरुच्यते ।
एते सोमाः समाख्याता वेदोक्तैर्नामभिः शुभैः ॥ ८ ॥
सर्वेषामेव चैतेषामेको विधिरुपासने ।
सर्वे तुल्यगुणाश्चैव विधानं तेषु वक्ष्यते ॥ ९ ॥

अतोऽन्यतमं सोममुपयुयुक्षुः सर्वोपकरणपरिचारकोपेतः प्रशस्तदेशे त्रिवृतमागारं कारयित्वा हृतदोषः प्रतिसंसृष्टभक्तः प्रशस्तेषु तिथिकरणमुहूर्तनक्षत्रेषु अंशुमन्तमादायाध्वरकल्पेनाहृतमभिषुतमभिहुतं चान्तरागारे

कृतमंगलः सोमकन्दं सुवर्णसूच्या विदार्य पयो गृह्णीयात् सौवर्णे पात्रेऽञ्जलिमात्रं, ततः सकृदेवोपयुंजीत नास्वादयंस्तत उपस्पृश्य शेषमप्स्ववसाद्य यमानियमाभ्यामात्मानं संयोज्य वाग्यतोऽभ्यन्तरतःसुहृद्भिरुपास्यमानो विहरेत्॥१०॥

नंतर त्याचा परिणाम वर्णन करून सोमाचें लक्षण सांगितलें आहे.

सर्वेषामेव सोमानां पत्राणि दश पंच च ।
तानि शुक्ले च कृष्णे च जायन्ते निपतन्ति च ॥ २० ॥
एकैकं जायते पत्रं सोमस्याहरहस्तदा ।
शुक्लस्य पौर्णमास्यां तु भवेत् पंचदशच्छदः ॥ २१ ॥
शीर्यते पत्रमेकैकं दिवसे दिवसे पुनः ।
कृष्णपक्षक्षये चापि लता भवति केवला ॥ २२ ॥
अंशुमानाज्यगंधस्तु कन्दवान् रजतप्रभः ।
कदल्याकारकन्दस्तु मुंजवांल्लशुनच्छदः ॥ २३ ॥
चन्द्रमाः कनकाभासो जले चरति सर्वदा ।
गरुडाहृतनामा च श्वेताक्षश्चापि पाण्डुरौ ॥ २४ ॥
सर्पनिर्मोकसदृशौ तौ वृक्षाग्रावलम्बिनौ ।
तथान्यैर्मंडलैश्चित्रैश्चित्रिता इव भान्ति ते ॥ २५ ॥
सर्व एव तु विज्ञेया सोमाः पञ्चदशच्छदाः ।
क्षीरकन्दलतावन्तः पत्रैर्नानाविधैः स्मृताः ॥ २६ ॥

—सोमाच्या उत्पत्तीचीं स्थलेंहि तेथें दिलीं आहेत.—

हिमवत्यर्बुदे सह्ये महेन्द्रमलये तथा ।
श्रीपर्वते देवगिरौ गिरौ देवसहे तथा ॥ २७ ॥
पारियात्रे च विन्ध्ये च देवसुन्दे ह्रदे तथा ।
उत्तरेण वितस्तायाः प्रवृद्धा ये महीधराः ॥ २८ ॥
पंच तेषामधो मध्ये सिन्धुनामा महानदः ।
हठवत् प्लवते तत्र चन्द्रमाः सोमसत्तमः ॥ २९ ॥
तस्योद्देशेषु चाप्यस्ति मुंजवानंशुमानपि ।
काश्मीरेषु सरो दिव्यं नाम्ना क्षुद्रकमानसम् ॥ ३० ॥
गायत्र्यस्त्रैष्टुभः पांक्तो जागतः शांकरस्तथा ॥
अत्र सन्त्यपरे चापि सोमाः सोमसमप्रभाः ॥ ३१ ॥
न तान् पश्यन्त्यधर्मिष्ठाः कृतघ्नाश्चापि मानवाः ।
भेषजद्वेषिणश्चापि ब्राह्मणद्वेषिणस्तथा ॥ ३२ ॥

सुश्रुतसंहिता अध्याय २९ चिकित्सा०

येथें सोमाचे चोवीस प्रकार सांगितले असून तीं नांवें वेदोक्त आहेत असें म्हटलें आहे. परंतु ऋग्वेदांत प्रत्यक्ष दोन आणि पर्यायानें पांच नांवें आलेलीं आहेत.

सोमाचा कंद आहे हा उल्लेख विशेष ध्यानांत धरण्यासारखा असून त्याचें केळीच्या कांद्यासारखा कांदा हें वर्णन सोमाचें स्वरूप ध्यानांत भरण्यास उपयोगी पडण्यासारखें आहे व नवीन आहे.

तसेंच सर्व सोमाच्या वेलांना पंधरा पानें असतात. आणि चंद्राच्या वृद्धिक्षयाप्रमाणें एकएक पानाचा वृद्धिक्षय क्रमानें चाललेला असतो असें वर्णन दिलें आहे. प्रत्येक सोमांत विशेष काय असतें याचें वर्णन ‘अंशुमान्’ आज्यगन्धस्तु (२३) येथून पुढें केलें आहे. त्यांत कोणत्याहि प्रकारच्या सोमाला पंधरा पानेंच असें सांगितलें आहे. चीक, कांदा आणि वेली अशा प्रकारें सोमाचें स्वरूप–कथन केलेलें दिसतें.

सोमाच्या उत्पत्तीचीं स्थळें सांगतांना (२७ ते ३१) सर्व प्रान्तांतील स्थळांचा उल्लेख केला आहे. पाण्यांत तरंगणारा, वृक्षावर लोंबणारा आणि जमिनीवर उगवणारा सोम असल्याबद्दलचा उल्लेख आहे.

पण ह्या सर्वांवर विरजण घालणारा शेवटला बत्तिसावा श्लोक आहे. श्रद्धा असल्याशिवाय गुण येत नाहीं हें म्हणणें कांहीं मर्यादेपर्यंत पटतें, पण अधार्मिक, कृतघ्न औषधद्वेषी आणि ब्राह्मणद्वेषी लोकांना सोम सांपडतच नाहीं असें म्हणणें म्हणजे सोम आपणांस ठाऊक नाहीं असें सांगण्यासारखें आहे.

सुश्रुतसंहितेंत चंद्राच्या कलाप्रमाणें वृद्धिक्षय पावणाऱ्या पंधरा पानाच्या सोमवल्लींची कल्पना आपणास आढळते. त्यावरून अडीच हजार वर्षांपूर्वी आमच्याकडील ज्ञात्या लोकांत सोमाविषयीं काय समजुती प्रचलित होत्या हें आपणास समजून येतें. सुश्रुतसंहितेचा सुप्रसिद्ध टीकाकार डल्हण यानेंहि त्यावर विशेष कांहीं प्रकाश पाडलेला नाहीं. डल्हण हा मथुरेनजीक अंकोल्याच्या सहदेवराजाचा आश्रित होता. त्याचा कालहि सुमारें बाराव्या शतकांत धरतात.

निरुक्तावरील भाष्यकार दुर्गाचार्य यांनींहि वैद्यकांतील रसायनतंत्राचा हवाला देऊन १५ पानाच्या वनस्पतीचाच उल्लेख केलेला आहे. रसायनतंत्र नांवाचा स्वतंत्र ग्रंथ नसून सुश्रुतसंहितेंतील रसायनप्रकरणांत हें सोमाचें वर्णन आलेलें असल्यामुळें या भागाला उद्देशून रसायनतंत्र शब्द दुर्गाचार्यानें उपयोगांत आणला असल्याचा संभव आहे. (निरुक्त ११–५) सोमरसाकरतां सुवर्णपात्र आणि सोमकंदाचा भेद करण्याकरतां सुवर्णसूचि या गोष्टीहि सोन्याशीं सोमाचा ऋग्वेदांत जो संबंध आढळतो त्यावर प्रकाश पाडणाऱ्या आहेत.

दूर्वा शतपथ ब्राह्मणांत सोमाच्या प्रतिनिधि म्हणून सांतितल्या आहेत. (४. ५. १०. १ते६) आणि सुश्रुतसंहितेंत त्या सोमाचा एक प्रकार म्हणून उल्लेख केलेल्या दिसतात.

सोमासंबंधीं विविध कल्पना.

तथापि अर्वाचीन लोकांत सोमासंबंधीं विविध कल्पना उत्पन्न झालेल्या दिसतात.

१. राजेन्द्रलाल मित्राच्या मतें सोमलता शण, ताग किंवा अंबाडी कोटींतील असून यापासून निघालेला रस, सुरा होय.

२. जुलियस् एगलिंग हा सोमरसाला याज्ञिय सुराच मानतो.

३. झिनेड–ए–रागोझिन सोमरसाला दैवी सुरासव समजतो.

४. वॅट् म्हणतो, सोमरस म्हणजे अफगाणिस्थानांतिल द्राक्षांचा आसव होय.

५. राइसचा असा अभिप्राय आहे कीं, सोमरस म्हणजे ऊंसाचा रस होय.

६. मॅक्समुल्लर हा सोमरसाला ताग किंवा अंबाडीचा रस– आसव मानतो.

७. तैत्तिराय संहितेच्या इंग्रजी भाषांतरांत ए बी. कीथ हा सोमरसाला सुराच समजतो असें वाटतें.

८. हिलेब्रँड म्हणतो कीं तो एक प्रकारचा मद्य आहे.

९. माधुर्याचें अमृत, सौंदर्याचा मदन, सुखाचें स्वर्ग तसें सोम हें उत्कृष्ट पेयाचें प्रतीक आहे असें कांहीं लोक मानतात.

मकरसंक्रमण
१८४९ }

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

* * *

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर.

नववें मंडळ.

सूक्त पहिलें.

ऋषिः—मधुच्छंद् वैश्वामित्र; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हे सोमा, इंद्रानें प्यावा म्हणून काढलेला तूं अत्यंत मदकर आणि मधुर अशा धारांनीं वाहूं लाग.

२. राक्षसांना ठार करण्यास सामर्थ्य देणारा, सर्वद्रष्टा सोम खिळे ठोकून पक्के केलेल्या व सोम पिण्याचें पात्र असलेल्या सोम काढण्याच्या ठिकाणीं बसतो.

३. हे सोमा, तूं आम्हांला अतिशय धन दे. सर्व कांहीं देणारा हो. शत्रुहन्ता असा तूं आम्हांला धनिक शत्रूंचें धन दे.

४. हे सोमा, तूं देवांच्या यज्ञांत अन्न घेऊन जा आणि आम्हांला बल व अन्न दे.

५. हे सोमा, आम्ही तुझी सेवा करतों. प्रत्येक दिवशीं तुझी सेवा हेंच आमचें कार्य, आमच्या इच्छाहि तुझ्यापाशींच. (दुसरीकडे नाहींत.)

६. हे सोमा, तुझ्यांतून पाझरलेल्या रसांत सूर्यकन्या श्रद्धा उत्कृष्ट व टिकाऊ सामर्थ्य उत्पन्न करते.

७. यज्ञांतील महत्त्वाच्या दिवशीं दशसंख्याक स्वरूप असणाऱ्या दहा अंगुली त्या सोमाचें ग्रहण करतात.

८. त्या ह्या सोमाला हातानें आणतात. रसानें थबथबलेल्या ह्याला पिळतात. सोमरूपी अमृत तीन ठिकाणीं ठेवलेलें असतें. (तीन ठिकाणें—द्रोण कलश, आधवनीय, पूतभृत्.)

९. हा कोमल सोम अहिंस्य अशा गाईच्या दुधांत इंद्राला पिण्याकरतां (मिसळतात.)

१०. सोमाच्या तारतच इंद्र सर्व शत्रूंना ठार करतो. (आणि भक्तांना) धन देतो.

सूक्त दुसरें.

ऋषिः—मेधातिथि काण्व; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हे सोमा, देवाकडे जाणारा तूं अत्यंत वेगानें पाझर. तसेंच हे सोमा, रसपूर्ण असणारा तूं इंद्राकडे जा.

२. हे सोमा, थोर, कामपूरक, अत्यंत तेजस्वी आणि सर्वाधार असा तूं आम्हांला पिण्याकरतां प्राप्त हो. आणि स्वतःच्या स्थानीं ऐस.

३. ज्या पिळलेल्या व इष्ट घडविणाऱ्या सोमाच्या धारा प्रिय अमृत प्रसवतात, तो कर्तृत्ववान् सोम पाण्यांत मिसळला जातो.

४. हे सोमा, तूं जेव्हां दूधांत मिसळला जातोस तेव्हां महान् अशा तुझ्यांत पुष्कळ पाणी मिसळलें जातें.

५. उदकमय, स्थिर, स्वर्गाधार आणि आमच्याकडे येणारा सोम पाण्यांत घालून पवित्रांत गाळला जातो.

६. कामपूरक, काळसर व थोर मित्राप्रमाणें भेटण्यास योग्य जो सोम शब्द करतो तो सोम सूर्यासारखा प्रसिद्ध आहे.

७. हे सोमा, मद उत्पन्न करणारा तूं स्तोत्रें म्हणून काढला जातोस, तुझ्या सामर्थ्यानें यज्ञादि कर्मांतलि स्तोत्रें शुद्ध म्हटलीं जातात.

८. हे सोमा, तुझीं मोठीं स्तोत्रें पराक्रमी पुरुषाला उत्तम लोक देणारीं आहेत, त्या तुला आम्ही मद प्राप्त व्हावा म्हणून मागत आहोंत.

९. हे सोमा, इंद्राकडे जाऊं इच्छिणारा तूं मधुर रसाचा पाऊस पडणाऱ्या मेघाप्रमाणें वर्षाव कर.

१०. हे सोमा, यज्ञाचा प्राचीन आधार असणारा तूं आम्हांला गाई, घोडे, अन्न व माणसें देणारा व्हावेंस.

सूक्त तिसरें.

ऋषिः—शुनःशेप आजीगर्ति; देवता–पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हा तेजस्वी व अमर असा सोम द्रोणांत बसण्याकरितां एखाद्या पक्ष्याप्रमाणें धांवतो.

२. अंगुलींनीं काढलेला हा पावक व अहिंस्य सोम शत्रूंवरहि (ठार करण्याकरतां) धांवतो.

३. पाझरणारा हा तेजस्वी सोम यज्ञेच्छु स्तोत्याकडून घोड्याप्रमाणें लढण्याकरतां स्तविला जातो.

४. पाझरणारा हा शूर सोम सर्व उत्कृष्ट संपत्ति सामर्थ्यानें जणूं कांहीं आक्रमण करूं इच्छितो.

५. (आमचेकडे येण्याकरतां)पाझरणारा सोमदेव रथाची इच्छा करतों. (आम्हांला धन) देऊं इच्छितो. (कुटतांना) शब्द करतो.

६. शहाण्या स्तोत्यांनीं स्तुति केलेला सोम–देव दात्यांना रमणीय धन देत पाण्यांत मिसळतो.

७. चिळकांड्या उडणारा आणि शब्द करणारा हा सोम सर्व लोकांचा तिरस्कार करीत स्वर्गाकडे धांवतो.

८. यज्ञ पुरा करणारा व कोणाकडूनहि नष्ट न केला जाणारा हा पाझरणारा सोम सर्व लोकांचा तिरस्कार करीत स्वर्गाकडे जातो.

९. हिरवट व तेजस्वी सोम देवांकरतां ऋत्विजांनीं पिळल्यावर पात्रांकडे जातो.

१०. हा अनेक कार्यें घडविणारा सोम अन्न उत्पन्न करीत पिळल्यावर धारांनीं वाहूं लागतो.

सूक्त चवथें.

ऋषिः—हिरण्यस्तूप आंगिरस; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हे श्रेष्ठ प्रकारच्या अन्ना पवमान सोमा, देवांना प्राप्त हो. शत्रूंना जिंक. नंतर आमचें कल्याण कर.

२. हे सोमा, तूं आम्हांला तेज दे. स्वर्ग दे. सर्व सौभाग्य दे आणि आमचें कल्याण कर.

३. हे सोमा, तूं बल दे, तूं ज्ञान दे. शत्रूंना ठार कर आणि आमचें कल्याण कर.

४. हे सोम काढणाऱ्यांनो, तुम्ही इंद्राला पिण्याकरितां सोम काढा आणि आमचें कल्याण करा.

५. हे सोमा, तुझ्यासंबंधीं केलेल्या कर्मानें आणि तुझ्या रक्षणानें तूं आम्हांला सूर्याप्रत पोंचीव. आणि आमचें कल्याण कर.

६. हे सोमा, तुझ्या संबंधीच्या कृत्यामुळें आणि साहाय्यामुळें मी चिरकाल सूर्य पाहीन (दीर्घायुषी होईन.) तूं आमचें कल्याण कर.

७. हे सुंदर आयुधें असलेल्या सोमा, आम्हांला दोनहि लोकांत असणारें धन प्राप्त होऊं दे. तूं आमचें कल्याण कर.

८. हे सोमा, (लढाईत) स्थानापासून न ढळणारा आणि शत्रूंचा पराभव करणारा तूं आम्हांला धन दे. तूं आमचें कल्याण कर.

९. हे पवमान सोमा, यज्ञांनीं उत्कर्ष करावा म्हणून यजमान लोक तुला (यज्ञाकरतां) वाढवितात. तूं आमचें कल्याण कर.

१०. हे सोमा, तूं आश्चर्यकारक, अश्वयुक्त आणि सर्व तऱ्हेचें धन आम्हांला दे.आणि आमचें कल्याण कर.

सूक्त पांचवें.

ऋषिः–असित काश्यप किंवा देवल; देवता–(आप्रीसूक्तम्) १ समिध्, २ तनूनपात्, ३ इळा, ४ बर्हि; ५ द्वार, ६ उषा व नक्त (रात्र), ७ देव्यौ होतारौ, ८ तिस्रो देवीः (सरस्वती, इळा, भारती), ९ त्वष्टृ, १० वनस्पति,११स्वाहा; छंदः–८–११ अनुष्टुप् बाकी गायत्री.

१. तेजस्वी, सर्वांचा स्वामी, कामपूरक व पावक सोम (कुटतांना) शब्द करीत आणि प्रसन्न करीत शोभत असतो.

२. अग्निसारखा असणारा सोम उंच जागेवरून चढवला जात आणि आकाशांतून शोभत (भांड्यांत) पडत असतो.

३. स्तुत्य, धन देणारा व तेजस्वी सोम मधुर धारांनीं पाझरत सामर्थ्यानें शोभत असतो.

४. कर्डा, चकाकणारा आणि शोधक असा सोम यज्ञांत पूर्वेकडे जोरानें जातो.

५. सोमासह स्तवन केलेल्या सुवर्णमय द्वारदेवता विस्तृत दिशांतून बाहेर येतात.

६. सुरूप, व्यापक, महान् व विशेष दर्शनीय अहोरात्र सोम इच्छितो.

७. मनुष्य ज्ञानी देवांना बोलावणाऱ्या अशा दोनहि इंद्र व सोम यांना मी बोलावतों. (कारण) तो (इंद्र व सोम) कामपूरक आहे.

८. भारती, सरस्वती आणि महती इळा या तीनहि सुंदर देवता आमच्या ह्या सोमयज्ञांत येवोत.

९. प्रथम उत्पन्न झालेला, रक्षक आणि देवांच्या अग्रभागीं असणाऱ्या त्वष्ट्र देवाला मी बोलावतों.काळसर असणारा सोम देवांतला मुख्य, कामपूरक आणि प्रजापालक आहे.

१०. हे पावक सोमा, काळसर, तेजस्वी, सोन्यासारख्या आणि हजार शाखेंच्या अशा वनस्पतिरूप सोमाला मी मधुर करतों.

११. हे विश्वेदेवहो वायु, बृहस्पति, सूर्य, अग्नि, इंद्र या सर्व देवांसह या सोमयज्ञांत या.

टीप—आप्रीसूक्त—१—१३ पहा.

सूक्त सहावें.

ऋषिः—असित काश्यप किंवा देवल; देवता—पवमान सोम; छन्दः—गायत्री.

१. हे सोमा, कामपूरक देवांकडे जाणारा आणि आमच्याकडे येणारा तूं मदयुक्त धारेनें या मेंढीच्या केंसाच्या गाळण्यांतून गळ.

२. हे सोमा, तूं समर्थ आहेस म्हणून तुझ्यांतून मदकर सोमरस बाहेर पडूं दे. आणि बलशाली घोडे आम्हांला प्राप्त होऊं दे.

३. हे सोमा, पिळला जाणारा तूं मुरलेला व मद उत्पन्न करणारा रस ह्या गाळण्यांतून बाहेर पडूं दे. बल आणि अन्न आम्हांला प्राप्त होऊं दे.

४. थेंबाथेंबानें पाझरणारा सोम सखल प्रदेशावरून वाहणाऱ्या पाण्याप्रमाणें इंद्राकडे जातो व पसरतो.

५. गाळण्यांतून खालीं पडून इकडे तिकडे वावरणाऱ्या सोमाचीं बलवान् घोड्याप्रमाणें दहा बोटें (हात) सेवा करतात.

६. देवांना पिण्याकरतां आणि मद उत्पन्न करण्याकरतां पिळून काढलेला कामपूरक सोम युद्धाकरतां दुधांत मिसळ.

७. ज्याअर्थीं सोमांत मिसळलेलें दूध इंद्राला पुष्ट करतें त्याअर्थीं पराक्रमी इंद्राकरतां पिळलेला सोम (दुधाच्या) धारांनीं वाहूं लागो.

८. यज्ञांतील मुख्य असा सोम (भक्तांच्या) इच्छा पूर्ण करीत वेगानें वहात असतो. आणि आपल्या जुन्या प्रसिद्धीचें रक्षण करतो.

९. हे मदोत्पादक सोमा, इंद्राची इच्छा करणारा व इंद्राकरतां पाझरणारा तूं यज्ञशाळेंत आवाज करीत असतोस.

सूक्त सातवें.

ऋषिः—असित किंवा देवल; देवता—पवमानसोम; छन्दः—गायत्री.

१. सुंदर आणि इंद्राशीं संबंध असणारा सोम धर्मकृत्यांत यज्ञद्वारां निर्माण केला जातो.

२. हविर्द्रव्यांत उत्कृष्ट हवि असणारा सोम पाण्यांत मिसळला जातो आणि त्याच्या मधुर व मुख्य धारा बाहेर पडतात.

३. कामपूरक, टिकाऊ, अविकारी व मुख्य सोम यज्ञगृहांत पाण्यांत मिसळल्यावर शब्द करतो.

४. दिव्य दृष्टि देणारा सोम धन देत जेव्हां स्तोत्यांचीं स्तोत्रें ऐकतो, तेव्हां स्वर्गांत बलवान् असा इंद्र यज्ञाकडे जाऊं इच्छितो.

५. जेव्हां यज्ञकर्ते लोक हा सोम तयार करतात तेव्हां पाझरणारा हा सोम स्पर्धा करणाऱ्या लोकांना एकाद्या राजाप्रमाणें नष्ट करतो.

६. हिरवट रंगाचा आणि आवडता सोम पाण्यांत घालून लोंकरीच्या फडक्यांतून गाळला जातो. तसेंच कुटतांना आवाज करणाऱ्या सोमाची स्तुति करून सेवा केली जाते.

७. जो सोमसंबंधीं कृत्यांत रमतो, तो भक्त वायु, इंद्र आणि अश्विनी यांच्यामुळें आनंदित होतो.

८. ज्यांच्या मधुर सोमाच्या लाटा मित्रावरुण व भग यांच्याकरतां वाहूं लागतात अशा ह्या सोमाला जाणणारे सुखी होतात.

९. हे द्यावापृथ्वीहो, (देवांना) मधुर सोम प्राप्त व्हावा म्हणून आम्हांला अन्न आणि धन द्या.

सूक्त आठवें.

ऋषिः—असित किंवा देवल; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. इंद्राची शक्ति वाढविणारा व आवडता सोम तयार होवो.

२. ते पिळले जाणारे, पात्रांत भरलेले, वायु आणि अश्विनी यांना दिले जाणारे सोम आम्हांला उत्कृष्ट प्रकारचें सामर्थ्य देवोत.

३. हे सोमा, पिळला जाणारा आणि मनापासून आवडणारा तूं इंद्राच्या प्रीतिकरतां यज्ञांत बैस आणि इंद्राला बोलाव.

४. हे सोमा, तुझी दहा अंगुलि सेवा करतात. सात होते तुला प्रसन्न करतात. आणि शहाणे लोक तुला प्रसन्न करतात.

५. हे सोमा, मेंढीचे केंस आणि पाणी यांत तयार केलेल्या तुला मी देवांना मद येण्याकरतां दुधांत मिसळतों.

६. गाळलेला, तांब्यांत भरलेला, तेजस्वी आणि काळसर सोम गाईच्या दहिदुधांत वस्त्राप्रमाणें गुंडाळला जातो.

७. हे सोमा, धनवान् अशा आम्हांकरतां वाहूं लाग.सर्व शत्रूंना ठार कर व मित्रभूत इंद्राला तूं प्राप्त कर.

८. हे सोमा, द्युलोकांतून पाऊस पाड. पृथ्वीवर अन्न उत्पन्न कर. आणि आम्हांला युद्धांत बल दे.

९. हे सोमा, लोकद्रष्टा, सर्वज्ञ आणि इंद्रानें प्यालेल्या अशा सोमाला पिणारे आम्ही संतति व संपत्ति प्राप्त करूं.

सूक्त नववें.

ऋषिः—असित किंवा देवल; देवताः-पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. ज्ञाता, कर्तृत्ववान्, पिळण्याच्या दोन फळकटावर ठेवलेला व पिळला जाणारा सोम स्वर्गापेक्षांहि प्रिय अशा दगडावर जातो.

२. हे सोमा, तुझा आधार, प्रेमी व स्तोता अशाला खाण्यास पुरेसा असणारा तूं अन्नयुक्त धारांनीं वहा.

३. उत्पन्न झालेला, शुद्ध व महान् हविरूप असणारा पुत्र सोम यज्ञवर्धक, मातृभूत व विस्तृत द्यावापृथ्वींना तेजस्वी करतो.

४. नद्या सोमाला जोरानें वाढवितात. तो बोटांनीं काढलेला सोम प्रेमळ अशा सप्त होत्यांना आनंदित करतो.

५. हे इंद्रा, तुझ्या कृत्यांत तरुण आणि रक्षणीय अशा सोमाला बोटांनीं पिळण्याकरतां ठेवलें आहे.

६. यज्ञाधार, अमर आणि देवांची तृप्ति करणारा सोम सप्त होतेरूपी नद्याकडे पहातो व कूपरूपानें पूर्ण होऊन नद्यांना तृप्त करतो.

७. हे सोमपुरुषा, पुढील कालांत आमचें संरक्षण कर. तसेंच हे पवित्र करणाऱ्या सोमा, तूं युद्धार्ह जे राक्षस असतील त्यांचा नाश कर.

८. हे सोमा, तूं नूतन आणि प्रशंसनीय अशा आमच्या सूक्ताकरतां ताबडतोब ये. आणि पूर्वीप्रमाणें आपलें तेज प्रकट कर.

९. हे पवमान सोमा, जो तूं पुत्रयुक्त श्रेष्ठ अन्न, गाय व घोडे आम्हांला देतोस तो तूं आम्हांला बुद्धि दे. इष्ट असें सर्व कांहीं दे.

सूक्त दहावें.

ऋषिः—असित किंवा देवल; देवता-पवमान सोम; छंदः-गायत्री.

१. रथ किंवा घोडे याप्रमाणें शब्द करणारा, आणि अन्नेच्छु सोम, भक्तांना धन मिळावें म्हणून धांवत असतो.

२. भारवाहकाच्या डोक्यावर असलेलीं ओझीं ज्याप्रमाणें दोन हातांत धरलेलीं असतात त्याप्रमाणें (योग्य स्थलीं नेणारा) सोम हातांत धरला जातो.

३. स्तुतींनीं राजे किंवा सात होत्यांनीं यज्ञ तसा सोम दुधानें संस्कार केला जातो.

४. पिळला जाणारा सोम स्तोत्र म्हणून पिळीत असतां आनंद देण्याकरतां चिळकांड्यानें सर्वत्र उडूं लागतो.

५. इंद्रास पिण्यास उपयोगी पडणारा, उषांचा भाग्यशाली काल उत्पन्न करणारा व वाहणारा सोम (खळखळ) शब्द करतो.

६. स्तुतिकर्ते व प्राचीन रसरसीत सोम काढणारे लोक यज्ञाचीं द्वारें मोकळीं करतात.

७. चांगल्या नातेवाईकांप्रमाणें सोमयाग पुरा करणारे सात होते यज्ञांत बसतात.

८. यज्ञांतील मुख्य सोम मी पितों. नंतर आमचा डोळा सूर्यावर जडतो, आम्ही ज्ञान देणाऱ्या सोमाचा रस इच्छितों.

९. पराक्रमी इंद्र डोळ्यानें आपणांस प्रिय व अध्वर्यूंनीं पोटांत घातलेला सोमहि पहातो.

सूक्त अकरावें.

ऋषिः—असित किंवा देवल; देवता-पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हे ऋत्विजहो, देवांचें पूजन करूं इच्छिणाऱ्या ह्या पवमान सोमाची तुम्ही स्तुति करा.

२. हे सोमा, तुझा देवाकडे जाणारा रमणीय रस इंद्राकरतां अथर्वन् ऋषि मधुर दुधांत मिसळोत.

३. हे तेजस्वी सोमा, तूं आमच्या गाई, लोक, घोडे आणि ओषधी यांना सुखदायक असा वाहूं लाग.

४. हे स्तोत्यांनों, पिंगट, बलवान् क्वचित् तांबूस आणि स्वर्गस्पर्शी सोमाचीं ताबडतोब स्तोत्रें म्हणा.

५. हे ऋत्विजहो, हातांत धरून (कुटण्याकरतां) आपटल्या जाणाऱ्या दगडांनीं कुटलेल्या सोमाला गाळा आणि त्या मधुर सोमांत मधुर दूध घाला.

६. हे ऋत्विजहो, नमस्कार करतिच सोमाकडे जा. त्याला दह्यांत मिसळा आणि इंद्राला तुम्ही सोम द्या.

७. हे सोमा, शत्रुहन्ता आणि विशेष खोल पाहणारा आणि देवांना इष्ट घडविणारा तूं आमच्या गाईला सुखकारक हो.

८. हे सोमा, मन जाणणारा ईश्वर असा तूं इंद्राला पिण्याकरतां (पात्रांत) घातला जातोस.

९. हे तयार झालेल्या पवमान सोमा, तूं पराक्रमानें मिळणारें धन इंद्राच्या साहाय्यानें आम्हांला दे.

सूक्त बारावें.

ऋषिः—असित किंवा देवल; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. मधुर सोम यज्ञगृहांत इंद्राकरतां पिळून तयार केले जातात.

२. ब्राह्मण सोम पिण्याकरतां देवाला, गाय ज्या प्रमाणें वासराला बोलावते त्याप्रमाणें बोलावीत आहेत.

३. मद उत्पन्न करणारा सोम (आपल्या) स्थानीं असतो.बुद्धिवर्धक सोम पाण्याच्या तरंगांत वाक्शक्तीचा आश्रय करून असतो.

४. जो बुद्धिदायक, दिव्यदृष्टि आणि सूक्ष्मदृष्टि सोम अन्तरिक्षाच्या नाभीसारखें असणारें जें गाळणें त्यांत घालून स्तविला जातो.

५. जो सोम कलशामध्यें असतो, जो गाळण्यांत घातलेला असतो त्यांत सोम सूक्ष्म रूपानें असतो.

६. सोम उदकाचा वर्षाव करणाऱ्या मेघाला आनंद देत अन्तरिक्षामध्यें शब्द करीत असतो.

७, सतत स्तुति केला जाणारा व अमृताचा वर्षाव करणारा, वनस्पति सोम मनुष्यांच्या कृत्यांना प्रेरणा देत कर्मांत बसलेला असतो.

८. अन्तरिक्षांतून प्रेरणा दिलेला कर्तृत्ववान् सोम आपल्या धारांनीं प्रिय स्थानाप्रत जातो.

९. हे पवमान सोमा, तूं हजारों प्रकारें महत्त्वाचें सुखदायक धन आम्हांला दे.

सूक्त तेरावें.

ऋषिः—असित किंवा देवल; देवता—सोम;—छंदः—गायत्री.

१. हा सोम वायु आणि इंद्र यांना शोधीत अनेक धारांनीं गाळण्यांतून पडत पात्रांत जात आहे.

२. हे सहाय्याची इच्छा करणारेहो, तुम्ही बुद्धिदायक, शोधक आणि देवांकरतां काढलेल्या सोमाची स्तुति करा.

३. अत्यंत सामर्थ्य असलेला व देवांना आणण्याकरतां स्तवन केला जाणारा सोम अन्न देण्याकरतां सारखा पाझरत आहे.

४. तसेंच आम्हांला अन्नप्राप्ति व्हावी म्हणून पुष्कळ अन्न (देणारा) तूं तेजस्वी व सामर्थ्यवान रस उत्पन्न कर.

५. पिळला जाणारा आणि तेजस्वी सोम आम्हांला हजारों प्रकारचें धन व सामर्थ्य देवो.

६. लढाईकरतां गति दिलेल्या घोड्याप्रमाणें(वेगानें) पातळ सोम अन्नलाभाकरतां गाळण्यांत ओतला जातो

७. गाई (हंबरत) वासराकडे जातात त्याप्रमाणें सोम आवाज करीत (पात्राकडे) जातो. त्याला हातांत धरतात.

८. इंद्राला प्रिय आणि तृप्ति देणारा सोम आहे. हे पवमान सोमा, तूं शब्द करीत सर्व शत्रूंचा नाश कर.

९. हे वाहणाऱ्या सोमा, कवडीचुंबकांना नष्ट करणारा व व्यापकदृष्टीचा तूं यज्ञांत ऐस.

सूक्त चवदावें.

ऋषिः—असित किंवा देवल; देवता—सोम;छंदः—गायत्री.

१. लोकांना आवडणारा, शब्द करणारा आणि पाझरणारा बुद्धिवर्धक सोम पाण्याच्या तरंगावर असतो.

२. समान नात्याचे ब्राम्हणादि सर्व कर्मेच्छु लोक पराक्रमाला आधारभूत सोमाची स्तोत्रांनीं स्तुति करतात.

३. नंतर जेव्हां तो दुधांत मिसळला जातो तेव्हां ह्या बलदायक सोमरसानें सर्व देव आनंदित होतात.

४. सोम गाळण्यांतून खालीं गळतो व गाळण्याची छिद्रें (गळतांना) बंद करतो, नंतर मित्रभूत इंद्राशीं युक्त होतो.

५. ज्या सोमाला भक्त नाती (सारख्या) बोटांनीं स्वच्छ व तरुण घोड्याला धुतात त्याप्रमाणें दुधांचा त्याला अंगरखा घालतात—

६. तो बोटानें पिळला जाणारा सोम दुधांत मिसळण्याकरतां खालीं ओतला जातो. आणि तो पडतांना आवाज करतो.

७. सोमाला पिळण्याकरतां स्पर्श करणारीं बोटें अन्नपति सोमाशीं संलग्न होतात. आणि बलवान् सोमाचे पृष्ठभाग धरतात.

८. हे सोमा, स्वर्गीय आणि पृथ्वीवरील सर्व संपत्ति घेऊन तूं आमच्याकडे ये.

सूक्त पंधरावें.

ऋषिः–असित किंवा देवल; देवता–सोम; छंदः–गायत्री

१. शीघ्रगामी रथानें इंद्राच्या स्थलाकडे जाणारा हा शूर सोम बोटानें पिळल्यावर यज्ञद्वारा इंद्राकडे जात असतो.

२. जेथें अमर देव असतात त्या थोर यज्ञांकरतां हा सोम मोठालीं कृत्यें करूं इच्छितो.

३. तेथें अध्वर्यु वगैरे जेव्हां चांगल्या मार्गानें देवांना सोम देतात तेव्हां हा ठेवलेला सोम तेथून नेला जातो.

४. आपल्या सामर्थ्यानें संपत्ति बाळगणारा हा सोम कळपांतील मुख्य बैलाप्रमाणें शिंगें (शिंगासारख्या कांड्या) हालवतो.

५. बलवान्, शुभ्र व तेजस्वी कांड्यांनीं युक्त रसश्रेष्ठ श्रेष्ठ, असा हा सोम (वाटला) जात आहे.

६. हा सोम व्यापक व पीडक अशा पर्वांचें अतिक्रमण करून राक्षसाकडे जात आहे.

७. खूप रस निर्माण करणाऱ्या ह्या मर्दनीय सोमाला लोक द्रोणपात्रांत पिळतात.

८. त्या ह्या सोमाला दहा अंगुलि पिळतात. सात ऋत्विज् त्याला तयार करतात. आयुधासारखा चांगला उपयोगी पडणारा आणि मादक असा हा सोम आहे.

सूक्त सोळावें.

ऋषिः–असित किंवा देवल; देवता—सोम; छंदः–गायत्री.

१. हे सोमा, तुझा रस इंद्राला लढाऊ सामर्थ्य प्राप्त होण्याकरतां पाण्याप्रमाणें काढीत आहेत. आणि तो घोड्याप्रमाणें (धांवत) पात्रांकडे जात आहे.

२. आम्ही बलदायक, पाण्यांत मिसळला जाणारा अन्नयुक्त आणि दूधमिश्रित सोम बोटांत धरतो.

३. हे अध्वर्यो, अप्राप्य, पाण्यांत मिसळलेला व दुस्तर सोम गाळण्यांत टाक आणि इंद्राला पिण्याकरतां शुद्ध कर.

४. स्तुति करून शुद्ध केलेल्या सोमापैकीं कांहीं सोम गाळण्यांत टाकला जातो. नंतर कर्मानुसार एकत्र पात्रांत बसतो.

५. हे इंद्रा, तुला अन्नासह मोठ्या लढाया मारण्याकरतां बल देणारा असा सोम प्राप्त होवो.

६. मेंढीच्या केसाळ वस्त्रांतून गाळला जाणारा व सर्व प्रकारची शोभा प्राप्त झालेला सोम गाईंत जसा योद्धा उभा रहातो तसा हा भांड्यांत असतो.

७. आकाशांतून जसें पाणी पडतें तसेंच ह्या बलशाली सोमाची धार सहज गाळण्यांत पडत असते.

८. हे सोमा, लोकांत विद्वान् इंद्राला प्रसन्न करण्याकरतां गाळला जाणारा तूं गाळण्याकडे धांवत जातोस.

सूक्त सतरावें.

ऋषिः–असित किंवा देवल; देवता—सोम; छन्दः–गायत्री.

१. उतारावरून नद्या वाहतात त्याप्रमाणें शत्रूंचा नाश करीत जलद वाहणारा सोम जात असतो.

२. पाऊस पृथ्वीवर वाहूं लागतो त्याप्रमाणें पिळलेला पातळ सोम इंद्राकडे वाहूं लागतो.

३. फेंसाळलेला आणि मदकर सोम राक्षसांचा नाश करीत देवाकडे जाऊं इच्छिणारा तो गाळण्याकडे जातो.

४. हा सोम भांड्याकडे जातो, गाळण्यांत घातला जातो आणि स्तोत्रें म्हणून यज्ञांत वाढविला जातो.

५. हे सोमा, तूं तीनहि लोकांचें अतिक्रमण करून द्युलोकांत प्रकाशत असतोस. तसेंच तूं सूर्यालाहि प्रेरणा देतोस.

६. चांगला सोम तयार करणारे आणि यज्ञकत स्तोते यज्ञामध्यें सोमाची स्तुति करतात.

७. हे सोमा, तुला अन्नेच्छु असे बुद्धिमान् भक्त यज्ञाकरितां शुद्ध करतात.

८. हे सोमा, तूं मधुर रस उत्पन्न कर. सुंदर

असा तूं रसयुक्त होऊन यज्ञाकरितां व देवांना पिण्याकरतां गाळण्यांत पड.

सूक्त आठरावें.

ऋषिः—असित किंवा देवल; देवता–सोम; छंदः–गायत्री.

१. पिळलेला, दगडांनीं काढलेला, हा सोम गाळण्यांतून पाझरत आहे. तो मादकांतील मुख्य आहे.

२. हे सोमा, तूं प्रसन्न करणारा आहेस. तूं दिव्यदृष्टि देणारा आहेस. तूंच अन्नांतील मधुररस देणारा आहेस. तूं मादकांतील मुख्य आहेस.

३. हे सोमा, सर्व देव तुला सारख्याच आवडीनें पितात. कारण तूं मादकांतील मुख्य आहेस.

४. जो सोम सर्व उत्कृष्ट धन भक्तांच्या हातांत देतो तो तूं मादकांतील मुख्य आहेस.

५. जो सोम ह्या दोन आयांच्याप्रमाणें द्यावापृथ्वीचें सार ग्रहण करतो तो सोम सर्व मादकांतील मुख्य आहे.

६. जो सोम ह्या दोनहि द्यावापृथ्वींना ताबडतोब अन्नयुक्त करतो तो तूं सर्व मादकांत मुख्य आहेस.

७. तो बलवान् सोम तांब्यांत गाळीत असतां आवाज करतो. तूं मादकांतील मुख्य आहेस.

सूक्त एकोणिसावें.

ऋषिः–असित किंवा देवल; देवता–सोम; छंदः–गायत्री.

१. हे सोमा, जें आश्चर्यकारक, स्तुत्य, स्वर्गीय किंवा पार्थिव धन आहे, तें पाझरत असतां तूं आम्हांला दे.

२. हे सोमा, तूं आणि इंद्र असे दोघेजण सर्वांचे अधिपति आहांत. तसेंच गोपति व सर्वसत्ताधारी असे तुम्ही आमचे पराक्रम वृद्धिंगत करा.

३. कामपूरक, पापी मनुष्यांना पवित्र करणारा आणि शब्द करणारा सोम दर्भासनावर असतो.

४. पुत्रभूत व कामपूरक सोमाचीं मातृभूत उदकें आपल्यांत पुनः पुनः सोमाची इच्छा करतात.

५ जें उदक सोमाकरतां शुद्ध पाणी देतें तें जल सोमेच्छु जलाला पवित्र करीत त्याचें विपुल सार आपल्या ठिकाणीं धारण करते.

६. हे पवमान सोमा, तूं आमच्यापासून दूर असणाऱ्या लोकांना जवळ कर. शत्रूंना भीति उत्पन्न कर. त्यांचें द्रव्य तूं मिळीव.

७. हे सोमा, तं शत्रूंचें सामर्थ्य नष्ट कर. तसेंच शत्रूंचें तेज नष्ट कर. जवळ असो किंवा दूर असो शत्रूंचें अन्न नष्ट कर.

सूक्त विसावें.

ऋषिः–असित किंवा देवल; देवताः–सोम; छंदः–गायत्री.

१. दिव्यदृष्टि देणारा सोम देवांना पिण्याकरतां दशापवित्रांतून गाळला जातो. सहनशील सोम सर्व शत्रूंचा पराभव करतो.

२. तो पवमान सोम स्तोत्यांना दूधादियुक्त आणि अपरिमित अन्न देवो.

३. हे सोमा, मनःपूर्वक सर्व धन तूं आम्हांला दे. आमच्या स्तोत्रानें तूं रस उत्पन्न कर. आम्हांला तूं सोम दे.

४. हे सोमा, आम्हांला तूं मोठी कीर्ति दे. हविर्युक्त अशा आम्हांला टिकाऊ धन दे. तसेंच आम्हां स्तोत्यांना अन्न दे.

५. हे आश्चर्यकारका आणि नेत्या सोमा, कर्तृत्ववान आणि रस पाझरणारा तूं राजाप्रमाणें आमचीं स्तोत्रें ऐक.

६. तो वाहक, अन्तराळीं गाळला जाणारा, दुस्तर, आणि शोधक सोम हातांत धरून पात्रांत ओतला जातो.

७. हे सोमा, क्रीडनशील व दान दिल्या जाणाऱ्या यज्ञांतल्याप्रमाणें स्तोत्याला सामर्थ्य देणारा तूं गाळण्याकडे जातोस.

सूक्त एकविसावें.

ऋषिः—असित किंवा देवल; देवता–सोम; छंदः–गायत्री.

१. तेजस्वी, युद्धोत्सुक करणारा, मादक व स्वर्ग देणारा सोम इंद्राकडे धांवत आहे.

२. उपयोगी पडणारे, योजक, काढणाराला धन देणारे आणि स्तोत्याला अन्न देणारे सोम इंद्राकडे धांवत जातात.

३. सहजरीत्या, क्रीडा करीत, पातळ सोम पाण्याच्या तरंगांत एकाच भांड्यांत पाझरतो.

४. रथाला जोडलेल्या घोड्याप्रमाणें हा काढलेला सोम आम्हांस सर्व तऱ्हेच्या द्रव्याकडे पोंचवो.

५. हे सोमा, जो भक्त आम्हांला हवि देतो त्याला अनेक प्रकारचें मूल्यवान् धन द्या.

६. रथपति जसा चांगला सारथि नेमतों त्या

प्रमाणें आम्हाला उत्कृष्ट ज्ञान द्या. हे सोमा, उदकासहित तेजस्वी असा तूं वहा.

७. हे सोमयज्ञाची इच्छा करतात. नंतर बलवान् असे ते आपली जागा पक्की करतात. नंतर यजमानाच्या बुद्धीला प्रेरणा देतात.

सूक्त बाविसावें.

ऋषिः-असित किंवा देवल; देवता-सोम; छंदः-गायत्री.

१. हे पिळलेले सोम युद्धांत हाणलेल्या रथाप्रमाणें किंवा घोड्याप्रमाणें जोरानें ओतले जातात.

२. जोराच्या वाऱ्याप्रमाणें किंवा पावसाच्या वृष्टीप्रमाणें किंवा अग्नीच्या ज्वालाप्रमाणें—

३. बुद्धिवर्धक आणि दहिमिश्रित आणि शुद्ध सोम ज्ञानानें आमचीं कर्में प्रवृत्त करो.

४. गाळण्यांनीं स्वच्छ केलेले, अमर करणारे व मार्गानीं लोकाकडे जाऊं इच्छिणारे हे सोम दमत नाहींत.

५. हे सोम द्यावापृथ्वी व अन्तरिक्ष यांना व्यापून असतात.

६. या यज्ञकारक सोमरसाचा सर्व लोक उपभोग घेतात. उत्कृष्ट असणारा द्युलोक सुद्धां या सोमाचा आस्वाद घेतो.

७. हे सोमा, तूं लोभी लोकांपासून गाई आणि धन आणतोस आणि मोठमोठ्या यज्ञांत गर्जत असतोस.

सूक्त तेविसावें.

ऋषिः-असित किंवा देवल; देवता-सोम; छंदः-गायत्री.

१. सर्व प्रकारचीं स्तोत्रें म्हणत आणि मधुर व मदकर धारांनीं युक्त असा सोम पातळ केला जातो.

२ प्रौढ व जलद चालणारे घोडे नवीन स्थान आक्रमण करतात. आणि सूर्याला तेजस्वी करतात. (तसा सोम आहे.)

३. हे पवमान सोमा, तूं आम्हांला कवडीचुंबक शत्रूंचें धन दे. तसेंच प्रजायुक्त अन्न दे.

४. पातळ सोम मदकर आणि माधुर्याचा साठा असा रस उत्पन्न करतो.

५. जगदाधार, इंद्रियपोषक रस धारण करणारा, सामर्थ्यवान् आणि नाशापासून संरक्षण करणारा सोम वहातो आहे.

६. हे सोमा, यज्ञार्ह असा तूं इंद्राकरतां आणि देवांच्याकरतां उत्पन्न होतोस. तसेंच हे सोमा, तूं आम्हांला अन्न देऊं इच्छितोस.

७. इंद्र मदकरांतला मदकर सोम पिऊन शत्रूवर चाल करून न जातांच शत्रूंना ठार करतां झाला आणि आतांहि ठार करीत आहे.

सूक्त चोविसावें.

ऋषिः —असित किंवा देवल; देवता-सोम; छंदः-गायत्री.

१. पातळ असणारा सोम जोरानें वाहूं लागतो. दुधांत मिसळून पाण्यांत एकजीव केला जातो.

२. उतारावरून पाणी वहाते त्याप्रमाणें पातळ सोम (गाळण्यांतून) वहात असतो. नंतर शुद्ध झालेला तो इंद्राकडे जातो.

३. हे पवमान सोमा, इंद्राला पिण्याकरतां जेथून तुला लोक नेतात तेथें तूं जातोस.

४. हे सोमा, लोकांना मद उत्पन्न करणारा तूं शुद्ध आणि स्तुत्य आहेस.तूं लोकांचा पराभव करणाऱ्या इंद्राकडे जा.

५. हे सोमा, तूं जेव्हां दगडांनीं काढल्यावर गाळण्याकडे जातोस तेव्हां तूं इंद्राला तयार होतोस.

६. हे वृत्रहन्त्या सोमा, स्तोत्रांनीं स्तवन केलेला शुद्ध, पावक आणि आश्चर्यकारक असणारा तूं तयार हो.

७. पिळलेल्या मधुर सोमाचा शुद्ध आणि शोधक रस देवसंरक्षक आणि असुरविघातक आहे.

सूक्त पंचविसावें.

ऋषिः—दृढच्युत अगस्त्यपुत्र; देवता-पवमान सोम; छंदः-गायत्री.

१. हे पापहारक सोमा, बलदायक आणि मदकर असा तूं इंद्रादिकांना पिण्याकरतां, मरुताकरतां व वायूकरतां वाहूं लाग.

२. हे पवमान सोमा, कर्मामध्यें स्वीकारलेला, शब्द करणारा, तूं सोमपात्रांत ये. वायूच्या पात्रांत ये.

३. देवासह यज्ञांत असलेला, कामपूरक, बुद्धिवर्धक, प्रिय, देवप्रिय आणि शत्रूहन्ता सोम विशेष शोभत असतो.

४. सर्व जगांत व्यापून असणारा, पावक आणि रमणीय असा सोम जेथें अमर देव आहेत तेथें जातो.

५. इंद्राकडे जाणारा, दिव्यदृष्टि व तेजस्वी सोम शब्द करीत वाहूं लागतो.

६. हे मादक आणि बुद्धिमन्ता सोमा, तूं इंद्राकडे जाण्याकरतां गाळण्यांतून गळ.

सूक्त सव्विसावें.

ऋषिः—इध्मवाहन दृह्ळच्युतपुत्र; देवता–पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. शहाणे लोक स्तोत्रें म्हणत बोटानें पृथ्वीवर त्या बलवान् सोमाला शुद्ध करतात.

२. हजार धारांचा, अक्षीण, सर्वाधार अशा तेजस्वी सोमाला लोक स्तोत्रांनीं स्तवितात.

३. सर्वाधार, अनेक कार्यकर्त्या कर्तृत्ववान् पवमान सोमाला स्तोते बुद्धीनें स्वर्गावर (देवाकडे) पाठवितात.

४. (पात्रांत) असलेला, स्तुतीला प्रेरणा देणारा व अहिंस्य अशा त्या सोमाला सेवा करणारे भक्त दोन हातांनीं पिळतात.

५. रमणीय, व्यापक दृष्टीच्या आणि काळसर अशा त्या सोमाला उंचवस्थावर बोटांनीं पिळतात.

६. ऋत्विज् स्तुतीनें वाढणाऱ्या, तेजस्वी आणि मदकर अशा सोमाला इंद्राकरतां पिळतात.

सूक्त सत्ताविसावें.

ऋषिः—नृमेध आंगिरस; देवता–सोम; छंदः–गायत्री.

१. हा स्तुति केलेला, गाळला जाणारा, शत्रूंना ठार करणारा आणि बुद्धिवर्धक सोम गाळण्यांतून वाहूं लागतो.

२. स्वर्गजेता व बलदायक सोम इंद्र व वायुकरतां गाळण्यांत घातला जातो.

३. स्वर्गांतला मुख्य, कामपूरक व पिळलेला हा सर्वज्ञ सोम भांड्यांत लोकांकडून ओतला जातो.

४. गाई व धन इच्छिणारा, तेजस्वी व अहिंस्य असणारा सोम गाळतांना आवाज करतो.

५. हा गाळलेला मदकर सोम स्वर्गांतून गाळण्यांत खरोखर सूर्याकडून टाकला जातो.

६. हा कामपूरक, गाळला जाणारा, तेजस्वी, बलवान् व हिरवट सोम गाळण्यांतून पाझरतो.

सूक्त अठ्ठाविसावें.

ऋषिः—प्रियमेध; देवता–सोम; छंदः—गायत्री.

१. हा बलवान्, लोकांनीं पात्रांत ठेवलेला, सर्वज्ञ व स्तोत्रपति सोम गाळण्यांत घातला जातो.

२. हा देवाकरतां काढलेला आणि देवशरीरांत प्रवेश करणारा सोम गाळण्यांत पाझरत आहे.

३. अमर शत्रूहन्ता आणि देवेच्छु असा हा सोम स्वतःच्या स्थानीं शोभतो आहे.

४. हा कामपूरक आणि शब्द करणारा सोम दहा बोटांनीं धरून लांकडी पात्रांकडे धांवतो.

५. पाझरणारा, द्रष्टा व सर्वज्ञ असा हा सोम सूर्याला नव्हे तर सर्व जगाला प्रकाशित करतो.

६. हा बलवान्, अहिंस्य, रस उत्पन्न करणारा, देवरक्षक आणि शत्रुहन्ता सोम पात्राकडे जातो.

सूक्त एकोणतिसावें.

ऋषिः—नृमेध आंगिरस; देवता–पवमान सोम; छंदः–गायत्री.

१. ह्या रसरशीत, पिळलेल्या, देवांच्याकडे जाणाऱ्या व सामर्थ्ययुक्त सोमाच्या धारा पाझरत आहेत.

२. आधारभूत आणि कर्मकर्ते स्तुत्य स्तोते तेजस्वी आणि वाढत्या सोमाला शुद्ध करतात.

३. हे विपुल धनवान् सोमा, ज्या अर्थीतुझे सामर्थ्य पराभव करणारें आहे त्याअर्थी सुंदर पात्राला भरून टाक.

४. हे सोमा, सर्व धनें आमच्याकरतां जिंकीत ये व सर्व शत्रूंना एकदम दूर ने.

५. हे सोमा, अदाता म्हणून होणाऱ्या निंदेपासून तूं आमचें संरक्षण कर. एवढेंच नव्हे तर ज्यायोगें आम्ही मुक्त होऊं अशा सर्व प्रकारच्या निंदेपासून आमचें संरक्षण कर.

६. हे सोमा, तूं आमच्याकरतां रसयुक्त हो. तसेंच पार्थिव व स्वर्गीय तेजस्वी धन व बल आम्हांला दे.

सूक्त तिसावें.

ऋषिः—बिंदु आंगिरस; देवता–पवमान सोम; छंदः–गायत्री.

१. बलवान् सोमाच्या धारा गाळण्यांतून सहज पाझरूं लागतात. तेव्हां तो गळणारा सोम स्तुतीला उत्तेजन देतो.

२. सोम हा काढणाराकडून काढला जाऊं लागला आणि गाळला जाऊं लागला म्हणजे तो शब्द करीत इंद्रियांनाहि प्रेरणा देतो.

३. हे सोमा, तूं लोकांचा पराभव करणारे, पुत्रयुक्त आणि स्पृहणीय असें बल रसांतून उत्पन्न कर.

४. हा सोम पात्रें भरण्याकरतां धारेनें गाळण्यांत पडतो.

५. हे सोमा, इंद्राला पिण्याकरतां अत्यंत मधुर, काळसर अशा तुला पाण्यांत घालून वाटतात.

६. हे ऋत्विजहो, सुंदर मधुर आणि मदकर सोम या बळशाली इंद्राला बल प्राप्त व्हावे म्हणून तयार करा.

सूक्त एकतिसावें.

ऋषिः—गौतम राहूगण; देवता—सोम; छंदः—गायत्री.

१. कर्तृत्ववान् आणि पाझरणारे सोम वाहूं लागतात. ते आम्हांला ज्ञान व धन देवोत.

२. हे इंदो, तूं द्युलोक आणि पृथ्वी यांच्यावरील धन वाढवणारा हो आणि आमचें श्रेष्ठ अन्न हो.

३. हे सोमा, तुझ्याकरतां वायु अनुकूल वाहो. नद्या तुझ्याकरतां वाहोत. आणि ते दोघे तुझें सामर्थ्य वाढवोत.

४. हे सोमा, तूं वृद्धिंगत हो. तुला चहूकडून बळ प्राप्त होवो. तूं युद्धांत अन्न देणाराहो.

५. हे कद्र्या रंगाच्या सोमा, तुझ्याकरतां उच्चअसणाऱ्या गाई विपूल दूध व तूप निर्माण करोत.

६. हे भुवनपते, आयुधासारखा उपयोगी पडणाऱ्या तुझ्या सख्यत्वाची आम्ही इच्छा करतों.

सूक्त बत्तिसावें.

ऋषिः—श्यावाश्व आत्रेय; देवता—सोम; छंदः—गायत्री.

१. मदोत्पादक व पिळून काढलेला सोम यज्ञांत हविर्युक्त अशा आम्हांला कीर्ति देवो.

२. इंद्राला पिण्याकरतां हिरवट रंगाच्या तेजस्वी सोमाला त्रिताचीं बोटें दगडांनीं कुटतात.

३. हा सोम हंसाप्रमाणें लोकांत प्रवेश करतो आणि सर्वांची बुद्धि ताब्यांत घेतो. घोड्याप्रमाणें सोम पाण्यांनीं भिजविला जातो.

४. हे सोमा, तूं द्यावापृथ्वीचें अवलोकन करीत व यज्ञाचा आश्रय करीत, दुधांत मिसळल्यावर हरणाप्रमाणें धावूं लागतोस.

५. हे सोमा, स्त्री प्रिय जाराची स्तुति करते त्याप्रमाणें तुला स्तोत्रांनीं स्तोते स्तवितात. सोम मित्राप्रमाणें पात्राकडे जातो

६. हे सोमा, हविर्युक्त अशा आम्हांला उत्कृष्ट अन्न, धन, बुद्धि आणि कीर्ति दे.

सूक्त तेहतिसावें.

ऋषिः—त्रित; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हा ज्ञानी सोम पाण्याच्या लाटाप्रमाणें किंवा अरण्यांतल्या म्हशीप्रमाणें जात आहे.

२. पिंगट आणि स्वच्छ असणारा सोम अन्न व गाई देत पात्राकडे वहातो.

३. पिळून तयार केलेला सोम इंद्र, वायु, वरुण, मरुत् आणि विष्णु यांच्याकरतां वहातो आहे.

४. ऋच्, यजुः आणि साम असे तीन वेद म्हटले जात आहेत. दूध देणाऱ्या गाई हंबरत आहेत. आवाज करीत सोम (भांड्याकडे)जात आहे.

५. द्युदेवतेचा मुलगा सोम याला यज्ञ निर्माण करणारीं ब्राह्मणाचीं मोठमोठीं स्तोत्रें स्तवीत आहेत. आणि त्यालाच शुद्ध करीत आहेत.

६. हे सोमा, चहूकडून धनाचे चार समुद्र आम्हांकरतां आण. आणि आमच्या हजारो इच्छा पुऱ्या कर.

सूक्त चवतिसावें.

ऋषिः—त्रित; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. पिळून काढला जाणारा सोम गाळण्याकडे जात आहे. तो बळकट अशींहि शत्रूंचीं नगरें आपल्या सामर्थ्यानें फोडून टाकतो.

२. पिळून काढलेला सोम इंद्र, वायु, वरुण, मरुत् आणि विष्णु यांच्याकडे जातो.

३. रसगृहीत व नियमित असणारा सोमाचा रस सोम कुटण्याच्या दगडांनीं कुटून काढला जातो.

४. त्रिताचा मदकर सोम शुद्ध होतो आहे तो इंद्राकरतां शुध्द केला जात आहे. रूपानें काळसर असणारा सोम शुध्द केला जात आहे.

५. यज्ञाचा आधार, सुंदर व अत्यंत आवडता हवि असणारा हा सोम मरुत् (पाऊस पाडून) उत्पन्न करतात.

६. सरळ, सारखी चालूं असणारीं आमचीं स्तोत्रें सोमाला उद्देशून म्हटलीं जात आहेत. आणि शब्द करणारा सोम प्रेमळ स्तोत्रें इच्छित आहे.

सूक्त पसतिसावें.

ऋषिः–प्रभूवसु आंगिरस;देवता-पवमान सोम;छंदः–गायत्री.

१. हे पवमान सोमा, ज्या धारेनें तूं आम्हांला स्वर्ग देतोस त्या धारेनें आम्हांला पुष्कळ धन दे.

२. हे उदक उत्पन्न करणाऱ्या आणि विश्वप्रेरका सोमा, तूं सामर्थ्यानें आम्हांला धन देणारा हो.

३. हे वीरयुक्त सोमा, शूर अशा तुझ्या साहाय्यानें आम्ही संग्रामेच्छु शत्रूंचा पराभव करूं. म्हणून आम्हांला रमणीय धन प्राप्त होऊं दे.

४. देऊं इच्छिणारा,अन्नदाता,द्रष्टा,आयुधें आणि कर्में जाणणारा सोम अन्न देवो.

५. स्तुतिप्रेरक, लोकांच्या गाईंचें संरक्षण करणारा, गाळला जाणारा व स्तुति केला जाणारा सोम आम्ही स्तवितों,

६. आधार, पालक, पवित्र आणि धनवान् अशा सोमाचीं कृत्यें सर्व लोक करतात.

सूक्त छत्तिसावें.

ऋषिः–प्रभूवसु आंगिरस; देवता–पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. वेगानें दोन फळकटावरून पिळलेला सोम गाळण्यांत ओतला जातो. वेगवान् सोमरूपी घोडा यज्ञरूपी युद्धांत धावूं लागतो.

२. हे सोमा,सर्वांचा नेता,जागरूक आणि देवेच्छु तूं मधुर रसाला पाझरणाऱ्या खजिन्याकडे (भांड्याकडे) पाझरत जातोस.

३. हे प्राचीन सोमा, आम्हांकरतां दिव्य स्थानें प्रकाशित कर. पराक्रमाचीं कृत्यें करण्यास आम्हांस प्रेरणा दे.

४. यज्ञेच्छु लोकांनीं चांगल्या प्रकारें इच्छिलेला व दोन हातांनीं पिळलेला सोम गाळण्यांतून गाळला जावो.

५. पिळलेला सोम दात्यांना पृथ्वीवरील, अन्तरिक्षांतील आणि स्वर्गीय अशी सर्व संपत्ति देवो.

६. हे अन्नाधिपति सोमा, घोडे, गाई आणि पुत्र इच्छिणारा तूं स्वर्गावर (देवांकडे) जातोस.

सूक्त सदतिसावें.

ऋषिः—रहूगण; देवता–सोम; छंदः—गायत्री.

१. राक्षसांचा नाश करणारा, देवेच्छु, इंद्राला पिण्याकरतां काढलेला बलिष्ठ सोम गाळण्याकडे जातो.

२. सर्वद्रष्टा, हिरवट आणि सर्वाधार असा सोम गाळण्यांत जातो. आणि खळखळ वाजत भांड्यांत पडतो.

३. वेगवान्, स्वर्गप्रकाशक, पाझरणारा व राक्षसहन्ता सोम मेंढीच्या केंसाच्या गाळण्यांतून धांवत जातो.

४. त्रिताच्या यज्ञांत गाळला जाणारा सोम तेजांनीं सूर्याला प्रकाशित करतो.

५. शत्रुहन्ता, रसयुक्त, पिळून काढलेला, धनदाता आणि अहिंस्य सोम लढाईंत घोडा जातो त्याप्रमाणें (भांड्यांत) जातो.

६. तो श्रेष्ठ सोम इंद्राकरतां शहाण्यानें पिळल्यावर सोमपात्रांत जातो.

सूक्त अडतिसावें.

ऋषिः—रहूगण; देवता—सोम; छंदः—गायत्री.

१. तो हा पिळून काढलेला, बलवान्, हजारांनीं धन देणारा, चलनशील सोम लोंकरींतून गाळला जातो.

२. ह्या ओलसर व हिरवट सोमाला इंद्राला पिण्याकरतां त्रिताचीं बोटें दगडांनीं कुटतात.

३. ज्या बोटांनीं इंद्राला मद उत्पन्न व्हावा म्हणून सोम पिळतात तीं पिळणारीं कर्मेच्छु दहा बोटें रस शुद्ध करतात.

४. स्त्रीकडे जाणाऱ्या जाराप्रमाणें आणि बहिरससाण्याप्रमाणें हा सोम लोकांत (अनुग्रह करीत) रहातो.

५. जो सोम गाळण्यांत जातो तो स्वर्गपुत्र (स्वर्गीय) मदकर सोम चहूंकडे पहातो.

६. तो हा पिण्याकरतां तयार केलेला हिरवट व आधारभूत सोम प्रिय अशा आपल्या स्थानाकडे झुळझुळत जातो.

सूक्त एकोणचाळिसावें.

ऋषिः—बृहन्मति आंगिरस; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हे महाबुद्धे, जेथें देव आहेत (तेथें जातों) असें म्हणत, देवांना प्रिय असणाऱ्या शरीरानें तूं लवकर जा.

२. अशुद्धाला शुद्ध करणारा, आणि लोकांना अन्न देणारा तूं अन्तरिक्षांतून पाऊस पाड.

३. तेज धारण करणारा सूक्ष्मदृष्टि आणि तेजस्वी करणारा असा पिळलेला सोम सामर्थ्यासहित गाळण्यांत जातो.

४. जो स्वर्गावर (देवाकडे) जलद जातो, तो हा सोम पाण्याच्या तरंगावर पाझरो.

५. पिळलेला मधुर सोम दूरच्या आणि जवळच्या (देवांची) सेवा करीत इंद्राकडे जावो.

६. एकत्र झालेले स्तोते स्तवन करतात. हिरवा सोम दगडांनीं काढतात. म्हणून हे देवहो, तुम्ही यज्ञांत बसा.

सूक्त चाळिसावें.

ऋषिः—प्रभूवसु आंगिरस; देवता-सोम; छंदः-गायत्री.

१. पिळलेला सूक्ष्मदृष्टि सोम सर्व शत्रूंचा नाश करता झाला. स्तोते बुद्धिवर्धक सोमाची स्तुति करून त्याला भूषवितात.

२. हा तांबूस सोम भांड्यांत जातो. नंतर इंद्राकडे जातो. नंतर पिळलेला बलिष्ठ सोम स्वर्गावर जातो.

३. हे सोमा, हे इंदो, आम्हांला पुष्कळ हजारांनीं धन चहूंकडून द्या.

४. हे पिळलेल्या तेजस्वी सोमा, तूं सर्व प्रकारचें धन आम्हांस दे. तसेंच हजारों प्रकारचें अन्न दे.

५. हे सोमा, स्वच्छ केलेला तूं सुपुत्रयुक्त धन आम्हांस दे. तसेंच आम्हां स्तोत्यांचीं स्तोत्रें उत्कर्षित कर.

६. हे इंदो, तूं दोनहि लोकांत श्रेष्ठ असणारें धन आम्हांस दे. तसेंच हे वर्षाव करणाऱ्या सोमा, तूं आम्हांला स्तुत्य असें धन दे.

सूक्त एकेचाळिसावें.

ऋषिः—मेध्यातिथि काण्व; देवता-पवमान सोम; छंदः-गायत्री.

१. उदकाप्रमाणें चपल, तेजस्वी व गमनशील असे जे सोम अंगावर तेज उत्पन्न करतात त्यांची स्तुति करा.

२. कर्तृत्वहीन शत्रूंना पराभूत करणारे आम्ही सोमाच्या रक्षक अशा सामर्थ्याची स्तुति करतों.

३. शुद्ध करणाऱ्या बलवान् सोमाचा स्वर पावसाप्रमाणें ऐकूं येतो. त्याचाच प्रकाश आकाशांत फिरत असतो.

४. हे सोमा, गाई, हिरण्य, घोडे व अन्न यांनीं युक्त असणारे पुष्कळ अन्न आम्हांला दे.

५. हे द्रष्ट्या सोमा, तूं रस उत्पन्न कर. सूर्यकिरणांनीं सकाळ जशीं भरून टाकतो तशी तूं रसानें द्यावापृथ्वी भरून टाक.

६. हे सोमा, आम्हांकडे नदी जशी चहूंकडे पसरते तसा तूं सुखकारक धारेनें चहूंकडे वाहूं लाग.

सूक्त बेचाळिसावें.

ऋषिः—मेध्यातिथि काण्व; देवता-पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हा सोम आकाशांतील तेजस्वी (ग्रह नक्षत्रें) निर्माण करीत व तसेंच आकाशांत सूर्य उत्पन्न करीत व तसेंच वहाणाऱ्या पाण्यांत मिसळत स्वच्छ होतो,

२. हा सोम प्राचीन व मननीय स्तोत्रानें पिळल्यावर देवांच्याकडे धारांनीं जातो.

३. अपरिमित सामर्थ्य असलेला सोम, वाढत्या आणि घाईच्या लढाईकडे जातो.

४. मुरलेला रस उत्पन्न करणारा सोम, गाळण्यांत घातला जातो, आणि शब्द करीत तो देवांना उत्पन्न करतो. (आपल्याजवळ आणतो.)

५. हा सोम शुद्ध करीत सर्व उत्कृष्ट धन आणतो. आणि यज्ञवर्धक देवांना बोलावतो.

६. हे सोमा, आम्हांला गाई, पुत्र, घोडे व बळ यांनीं युक्त असें पुष्कळ अन्न दे.

सूक्त त्रेचाळिसावें.

ऋषिः—मेध्यातिथि काण्व; देवता-सोम; छंदः—गायत्री.

१. जो सुंदर सोम मद उत्पन्न होण्याकरतां घोड्याप्रमाणें पाण्यांत धुतला जातो, त्याची आम्ही स्तुति करतों.

२. त्या सोमाला इंद्रानें प्यावा म्हणून आमची सर्वच वर्णनें पूर्वींप्रमाणें आतांहि प्रसन्न करतात.

३. शुद्ध करणारा सुंदर सोम स्तुतीनें भूषित झाल्यावर विप्र मेध्यातिथीच्या करतां (भांड्याकडे) जावो.

४. हे शुद्ध करणाऱ्या सोमा, तूं आम्हांस सुंदर व तेजस्वी धन दे.

५. हा सोम रणांगणांत जाणाऱ्या घोड्याप्रमाणें शब्द करतो. जेव्हां तो देवाकडे जाऊं इच्छितो तेव्हां शब्द करतो.

६. हे सोमा, स्तुति करणाऱ्या विप्र मेध्यातिथीच्या उत्कर्षाकरतां आणि अन्नप्राप्तीकरतां तूं उत्पन्न हो आणि आम्हांस पराक्रमी पुत्र दे.

सूक्त चव्वेचाळिसावें.

ऋषिः—अयास्य आंगिरस; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हे सोमा, तूं आम्हांला पुष्कळ धन देतोस. आतां अयास्य सोमाला तरंग आणून देवांकडे देण्याकरतां जात आहे.

२. स्तोत्यानें स्तुति केलेला आणि यज्ञांत स्थापन केलेला पराक्रमी सोम उंचून धार धरून ओतला जातो.

३. हा जागरून असणारा आणि देवाकरतां पिळलेला सोम पाझरत आहे. सूक्ष्मदृष्टि देणारा सोम गाळण्यांतून गाळला जात आहे.

४. हे सोमा, ज्या तुझी ऋत्विज सेवा करतात तो अन्नेच्छु तूं आमच्या यज्ञाला सुंदर व अहिंस्य करणारा असा व्हा.

५. चांगल्या लोकांनीं तयार केलेला आणि वर्धिष्णु असा सोम वायु आणि भग देवांकरतां तयार केला आहे. तूं देवांचें धन आम्हांला दे.

६ हे सोमा, कर्मकर्ता व मार्गज्ञाता असा तूं आज आम्हांला धनप्राप्तीकरतां श्रेष्ठ आणि उत्कृष्ट अन्न दे.

सूक्त पंचेचाळीसावें.

ऋषिः—अयास्य आंगिरस; देवता—सोम; छंदः—गायत्री.

१. हे सोमा, लोकद्रष्टा असा तूं यज्ञाकरतां, इंद्राला पिण्याकरतां आणि मद उत्पन्न करण्याकरतां सुखदायक असा उत्पन्न हो.

२. हे सोमा, तूं आमचा दूत हो. जो इंद्राकरतां प्याला जातोस तो तूं आम्हां मित्रांकरतां श्रेष्ठ देवांकडे वाहूं लाग.

३. तसेंच ज्या अरुणवर्ण तुला मद उत्पन्न व्हावा म्हणून सोमांत मिसळीत आहोंत तो तूं धनाचीं द्वारें आम्हांला मोकळीं कर.

४. घोडा जातांना धुरेचें उल्लंघन करतो त्याप्रमाणें सोम, गाळण्याचें उल्लंघन करतो. आणि देवांमध्यें जाऊन पडतो.

५. गाळण्यांतून पाण्यांत क्रीडा करणाऱ्या सोमाला मित्र (स्तोते) स्तवितात आणि स्तोत्रें म्हणूं लागतात.

६. हे सोमा, तुझी जी धार प्याली असतां स्तोत्याला उत्कृष्ट सामर्थ्य येते त्या धारेनें वाहूं लाग.

सूक्त शेहेचाळिसावें.

ऋषिः—अयास्य आंगिरस; देवता—सोम; छंदः—गायत्री.

१. पर्वतावर वाढलेला आणि रसरशीत सोम यज्ञाकरतां काम करणाऱ्या घोड्याप्रमाणें उत्पन्न केलें जातात.

२. तयार केलेला सोम, बाप असलेली (व नटलेली) मुलगी जशी नवऱ्याकडे जाते, त्याप्रमाणें वायूकडे जात आहे.

३. हे दोन फळयांत पिळून काढलेले तेजस्वी सोम आपल्या कृत्यांनीं इंद्राचा उत्कर्ष करतात.

४. हे सुग्रण भक्तहो, धांवत या. दह्यांत मिसळलेला स्वच्छ सोम घ्या आणि दुधांत मदकर सोम मिसळा.

५. हे शत्रूंचें धन जिंकणाऱ्या सोमा, मार्गज्ञाता आणि आम्हांला उत्कृष्ट अन्न देणारा तूं उत्पन्न हो.

६. शुद्ध करणारा आणि शुद्ध असणारा मदकर सोम दहा अंगुलींनीं इंद्राकरतां गाळला जातो.

सूक्त सत्तेचाळिसावें.

ऋषिः—कवि भृगुपुत्र; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. सोम व्यवस्थित क्रियेनें मोठमोठ्या देवाकडे जाऊन भरभराट पावतो. आणि आनंदानें बैलाप्रमाणें शब्द करतो.

२. ह्या इंद्रानें शत्रूंचा नाश करणारीं जीं कृत्यें केलीं आहेत तीं सर्व त्या धैर्यशाली इंद्रानें आमचें कर्ज फेडण्याकरतांच केलीं आहेत.

३. ज्या वेळीं ह्या इंद्राचें स्तोत्र म्हटलें जातें त्याच वेळीं इंद्रप्रिय बलवान् आणि अहिंस्य असा सोम आम्हांला अपरिमित धन देतो.

४. जेव्हां दिव्यदृष्टि सोम बोटांनीं शुद्ध केला जातो तेव्हां स्वतः इंद्राकडून धन देऊं इच्छितो.

५. हे सोमा, तूं रणांत जयशील लढाईंतल्या घोड्यांप्रमाणें धनाची वांटणी करण्याची इच्छा करतोस.

सूक्त अठ्ठेचाळिसावें.

ऋषिः—कवि भृगुपुत्र; देवता–पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. उच्च स्वर्गांत असणारा, संपत्तिमान् व कल्याणकर अशा पवमान सोमाची सेवा करून आम्ही धन मागतों.

२. हे सोमा, धैर्यवान् शत्रूंचाहि पराभव करणारा, स्तुत्य, प्रशंसनीय अशीं अनेक कृत्यें करणाऱ्या, मदकर आणि (शत्रूंच्या) शेकडों नगरांचा ध्वंस करणाऱ्या सोमाला आम्ही धन मागतों.

३. हे पवमान सोमा, धन देणारा राजा सोम आहे. त्याला स्वर्गावरून बुद्धिमान् श्येनानें सहज आणिलें.

४. उदकप्रेरक, यज्ञरक्षक, सर्व देवांना सारखाच प्रिय असणाऱ्या सोमाला श्येनानें (स्वर्गावरून) आणिलें.

५. व्यापकदृष्टीचा आणि फलोत्पादक सोम स्वतःचें सामर्थ्य प्रकट करीत मोठेपणा प्राप्त करतो.

सूक्त एकोणपन्नासावें.

ऋषिः—कवि भृगुपुत्र; देवता–पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हे सोमा, तूं द्युलोकावरून आम्हांकरतां पाऊस उत्पन्न कर. पाण्याचे तरंग स्वर्गावरून खालीं येऊं दे. निरोगी असें पुष्कळ अन्न दे.

२. हे सोमा, ज्या तुझ्या धारेनें शत्रूंच्या गाई आमच्या घरांत येतात त्या धारेनें तूं उत्पन्न हो.

३. हे सोमा, अत्यंत देवेच्छुच असणारा तूं आम्हांला खूप उदक प्राप्त होऊं दे. पाऊस पाड.

४. हे सोमा, पिळून तयार केलेला तूं, आम्हांला अन्न प्राप्त व्हावें म्हणून लोंकरीच्या गाळण्याकडे जा. देवहि तुझा गळतांना होणारा शब्द ऐकोत.

५. राक्षसांचा नाश करीत, तेजानें प्राचीनकालाप्रमाणें प्रगट होत पावक सोम पाझरतो.

सूक्त पन्नासावें.

ऋषिः—उचथ्य आंगिरस; देवता–पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हे सोमा, समुद्राच्या लाटांच्या शब्दाप्रमाणें तुझा वेग बाहेर पडतो आहे. तूं वाणवाद्याचा शब्द कर.

२. हे सोमा, जेव्हां तूं पसरलेल्या लोंकरीच्या गाळण्यांत जातोस, तेव्हां तूं तयार झाल्यावर यज्ञेच्छु लोक तीनहि वेदांतील मंत्र म्हणूं लागतात.

३. देवांना प्रिय, हिरवट रंगाचा, दगडांनीं कुटलेला, मधुर आणि पवित्र करणारा सोम लोंकरीच्या गाळण्यांत ओततात.

४. हे अत्यंत मादक असणाऱ्या आणि कर्तृत्ववान् सोमा, पूज्य असणाऱ्या इंद्राच्या उदरांत जाण्याकरतां उत्पन्न होऊन तूं गाळण्यांतून धारांनीं वाहूं लाग.

५. हे अत्यंत मादक असणाऱ्या सोमा, इंद्राला पिण्याकरतां चांगल्या दूधांत मिसळलेला तूं पाझरूं लाग.

सूक्त एकावन्नावें.

ऋषिः—उचथ्य आंगिरस; देवता–पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हे अध्वर्यो, दगडांनीं काढलेला सोम गाळण्यांत टाक आणि इंद्राला पिण्याकरतां शुद्ध कर.

२. हे अध्वर्युंहो, तुम्ही अत्यंत मधुर व स्वर्गांतलें अमृत असा अत्यंत श्रेष्ठ सोम पिळा.

३. हे सोमा, तुझें मधुर पवित्र आणि मदकर अन्न देव आणि मरुत् उपभोगितात.

४. हे सोमा, पिळलेला, देवांची भरभराट करणारा व कामपूरक असा तूं ताबडतोब मद उत्पन्न करण्याकरतां आणि रक्षणाकरतां स्तोत्याकडे जा.

५. हे चिकित्सक सोमा, पिळलेला तूं गाळण्यांत प्रवाहानें जा. आणि आम्हांला अन्न व कीर्ति दे.

सूक्त बावन्नावें.

ऋषिः—उचथ्य आंगिरस; देवता–पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. तेजस्वी आणि धन देणारा सोम आम्हांला अन्नासह बल देवो. हे सोमा, पिळलेला तूं गाळण्यांतून गळ.

२. हे सोमा, तुझा आवडता, व अनेक धारांनीं वहाणारा रस नेहेमींप्रमाणें गाळण्यांतून वाहो.

३. हे सोमा, भाताप्रमाणें असणारा तो (हवि) आम्हांला प्राप्त होऊं दे. हे कुटल्यानें पाझरणाऱ्या सोमा, तूं उत्पन्न हो.

४. हे पुरुस्तुता सोमा, जें शत्रूचें बल आम्हांवर चालून येतें त्याला तूं नष्ट कर.

५. हे सोमा, धन देणारा तूं, आमच्या संरक्षणाकरतां शुद्ध सोमाच्या शेंकडों, हजारों धारा उत्पन्न कर.

सूक्त त्रेपन्नावें.

ऋषिः--अवत्सार काश्यप; देवता--पवमान सोम; छंदः--गायत्री.

१. हे कुटून काढलेल्या सोमा, तुझें सामर्थ्य राक्षसांचा नाश करीत उत्पन्न होवो; आणि जे स्पर्धाशील शत्रू आम्हांला त्रास देतात त्यांना नष्ट करो.

२. हे सोमा, आपल्या सामर्थ्यानें शत्रूंना ठार करणाऱ्या तुला निर्भय अन्तःकरणानें रथांत ठेवलेल्या शत्रूंच्या धनाकरतां मी स्तवितों.

३. हे सोमा, रसोत्पादक अशीं तुझीं कर्में ज्या दुष्टाकडून केलीं जात नाहींत आणि जो तुझ्याशीं युद्ध करूं इच्छितो त्यांना तूं त्रास दे.

४. मदकर, हिरवट, बलवान्, आणि मादकांतले मादक सोमाला पाण्यांत मिसळतात.

सूक्त चोपन्नावें.

ऋषिः--अवत्सार काश्यप; देवता--पवमान सोम; छंदः--गायत्री.

१. ह्या सोमाचा प्राचीन, तेजस्वी, झकझकीत व अपरिमित रस शहाणे काढतात.

२. हा सोम सूर्याप्रमाणें सर्वत्र दृष्टि टाकीत, सूर्य महिनाभर फिरतो त्याप्रमाणें तीस यज्ञपात्रांत फिरतो आणि स्वर्गाला जाण्याकरतां सात नद्यांतून जातो.

३. सूर्य ज्याप्रमाणें सर्व जगाच्या वर असतो, त्याप्रमाणें हा शुद्ध करणारा सोम सर्व जगताच्या वर आहे.

४. हे सोमा, इंद्रेच्छु आणि शुद्ध करणारा तूं देवांच्याकरतां गोरसयुक्त अन्न उत्पन्न कर.

सूक्त पंचावन्नावें.

ऋषिः--अवत्सार काश्यप; देवता--पवमान सोम; छंदः--गायत्री.

१. हे सोमा, तूं अन्नासहित उत्कृष्ट रस आम्हांकरतां अवश्य निर्माण कर. तूं सर्व प्रकारची उत्कृष्ट संपत्ति निर्माण कर.

२. हे सोमा, जसें अन्नरूप असणाऱ्या तुझें आम्ही स्तोत्र केलें आहे. आणि तुझा जसा जन्म झाला आहे तसा तूं ह्या प्रिय यज्ञांत बसतोस.

३. हे सोमा, आम्हांला गाई, व घोडे देणारा तूं जलद जाणारे दिवस आणि अन्न यांसह उत्पन्न हो.

४. हे हजारोंना जिंकणाऱ्या सोमा, जो तूं शत्रूंवर चालून जाऊन शत्रूंना जिंकतोस, आणि ठार करतोस; पण स्वतः जिंकला जात नाहींस. किंवा ठार केला जात नाहींस. तो सोम हजार धारांनीं उत्पन्न होवो.

सूक्त छप्पन्नावें.

ऋषिः-अवत्सार काश्यप; देवता-पवमान सोम; छंदः-गायत्री.

१. चलाख व देवांकडे जाणारा सोम, गाळण्यांत बसून राक्षसांना ठार करीत पुष्कळ अन्न देतो.

२. जेव्हां कर्तृत्वेच्छु व शंभर धारांनीं उत्पन्न होणारा सोम, इंद्राशीं मैत्री करतो तेव्हां अन्न देतो.

३. हे सोमा, (पिता असलेली) मुलगी जाराला लावते, त्याप्रमाणें दहा बोटें तुला (पिळतांना) ओरडायला लावतात. त्या बोटांनीं धनप्राप्ति व्हावी, म्हणून तूं इंद्राकरतां पिळला जातोस.

४. हे सोमा, मधुर असणारा तूं इंद्राकरतां आणि विष्णूकरतां उत्पन्न हो, आणि कर्मकर्त्या स्तोत्याना पापांपासून मुक्त कर.

सूक्त सत्तावन्नावें.

ऋषिः-अवत्सार काश्यप; देवता-पवमान सोम; छंदः-गायत्री.

१. हे सोमा, तुझ्या वेगवेगळ्या धारा आकाशांतल्या पावसाप्रमाणें अमाप अन्न आम्हांस देतात.

२. हिरवट सोम सर्व देवांना आवडणारीं कृत्यें करीत (शत्रूंवर) आयुधें फेकित जातो.

---

२ टीप:—सरांसि-म्हणजे माध्यंदिन सवनांतील एक देवता असणारी तीस पात्रें असें याज्ञिक म्हणतात. नैरुक्तिक म्हणतात. उभयपक्षांतील तीस दिवस. (नि. ५. ११)

३. मनुष्यांकडून शुद्ध केला जाणारा कर्तृत्ववान् सोम, निर्भय राजाप्रमाणें किंवा निर्भय ससाण्याप्रमाणें उदक्रांत रहातो.

४. हे सोमा, शुद्ध करणारा तूं पृथ्वीवरची किंवा स्वर्गावरची सर्व संपत्ति आम्हांस दे.

सूक्त अठ्ठावन्नावें.

ऋषिः–अवत्सार काश्यप; देवता–पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. आनंददायक सोम पापांपासून तारतो. पिळलेल्या अन्नरूप सोमाची धार वाहूं लागते. तो आनंददायक सोम वाहूं लागतो आणि पापांपासून तारतो. (याचा निरूक्तांत दिलेला अर्थ वेगळा आहे. तो असा जो पिळलेला सोम देतो आणि स्तुति करतो तो उच्च गतीला जातो. तो शुद्ध होऊन उच्च गतीला जातो.)

२. धन उत्पन्न करणारी, स्तुत्य अशी या सोमाची धार मनुष्याचें रक्षण करूं जाणते. तो आनंददायक सोम वाहूं लागतो आणि पापांपासून मुक्त करतो.

३. ध्वस्त्र आणि पुरुषंती यांचे हजारों द्रव्य आम्हीं घेतलें. (ज्याच्या कृपेनें धन मिळालें) तो आनंददायक सोम उत्पन्न होवो आणि पापापासून तारो.

४. ज्या ध्वस्र आणि पुरुषंतीचीं शेंकडों हजारों वस्त्रें आम्हीं घेतलीं (तें ज्याच्यामुळें झाले) तो आनंददायक सोम उत्पन्न होतो आणि तारतो.

सूक्त एकूणसाठावें.

ऋषिः—अवत्सार काश्यप; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हे सोमा, गाई, बैल, अश्व, गज आणि धन यांना जिंकणारा तूं उत्पन्न हो आणि संततियुक्त संपत्ति आम्हांला दे.

२. हे सोमा, पाणी, काड्या, औषधी आणि दगड यामुळें तूं उत्पन्न हो.

३. हे सोमा, शोधक आणि सूक्ष्मदृष्टि असा तूं सर्व पातकांना नष्ट कर. आणि येथें बैस.

४. हे पवित्र करणाऱ्या सोमा, तूं सर्व धन भक्तांला दे तूं उत्पन्न झाल्याबरोबर थोर झालास. हे सोमा, तूं सर्व शत्रूंचा पराभव करतोस.

सूक्त साठावें.

ऋषिः— अवत्सार काश्यप; देवता—पवमान सोम; छंदः—३ पुरउष्णिह् बाकी गायत्री.

१. पाहणाऱ्या, अनेकरूपी व शुद्ध करणाऱ्या सोमाला गायत्रीछंदातील सूक्तांनीं हे स्तोतेहो, तुम्ही स्तवा.

२. हे सोमा, अनेक प्रकारच्या आणि अनेक प्रकारें पोषण करणाऱ्या तुला भक्त गाळण्यांतून गाळतात.

३. शोधक सोम गाळण्यांतून गळतो, तांब्यांत जातो आणि इंद्राच्या हृदयांत शिरतो.

४. हे द्रष्ट्या सोमा, तूं इंद्राला प्रसन्न करण्याकरतां रस उत्पन्न कर. तसेंच आम्हांला प्रजा उत्पन्न करणारें रेत दे.

सूक्त एकसष्टावें.

ऋषिः—अमहीयु आंगिरस; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हे सोमा, जो रस (पिऊन इंद्र) युद्धांत शत्रूंचीं नव्याण्णव नगरें फोडता झाला त्या रसानें तूं उत्पन्न हो.

२. एकाच दिवशीं सोमरसानें सत्यकर्म्या दिवोदासाकरतां त्या शंबर, तुर्वश व यदु यांना जिंकिलें आणि त्यांचीं नगरें फोडलीं.

३. हे सोमा, घोडे प्राप्त करून देणारा तूं आम्हांला गाई, बैल आणि सोनें असलेलें धन दे आणि अपरिमित अन्न दे;

४. हे सोमा, शुद्ध होणाऱ्या आणि करणाऱ्या तुझी मैत्री आम्ही इच्छितों.

५. हे सोमा, जे तुझे तरंग गाळण्यांतून धारांरूपानें पाझरतात त्यांनीं तूं आम्हांला सुख दे.

६. हे सोमा, सर्व जगांत श्रेष्ठ असणारा तूं पवित्र करीत आम्हांला धन आणि पुत्रयुक्त अन्न दे.

७. नदींत उत्पन्न होणाऱ्या सोमाला दहा बोटें शुद्ध करतात, आणि तो आदित्याशीं एकरूप होतो.

---

३ टीपः—अवत्सारानें वरील दोन राजांगासुन दक्षणा म्हणून पुष्कळ संपत्ति घेतली. तसेंच तरंत आणि पुरुमिळ्हयांनींहि त्यांच्यापासून पुष्कळ धन मिळवल्याची गोष्ट शाट्यायन ब्राम्हणांत दिली आहे.

८. पिळलेला सोम, इंद्र, वायु आणि सूर्यकिरण यांच्यांशीं एकरूप होतो.

९. हे सोमा, मधुर, सुंदर आणि पिळून काढलेला तूं आमच्या यज्ञांत मित्र, वरूण, भग व वायु यांच्याकरतां उत्पन्न हो.

१०. हे सोमा, तुझा विशेष अंश तुझ्या रसाच्यावर उत्पन्न होतो. स्वर्गीय असें तुझें उत्कृष्ट सुख आणि अन्न पृथ्वीवरील लोक मिळवतात.

११. ह्या सोमानें मनुष्यांचें सर्व अन्न, चालून जाणारे आणि उपभोगणारे आम्ही उपभोगूं.

१२. हे सोमा, अन्न देणाऱ्या व यज्ञार्ह इंद्र,वरुण आणि मरुत् यांकरतां तूं उत्पन्न हो.

१३. उत्कृष्ट, पाण्यांत मिसळलेला, शत्रूंचा नाश करणारा व दूधांत मिसळलेल्या सोमाकडे देव जातात.

१४. दूधयुक्त आया मुलांचें पोषण करतात त्याप्रमाणें जो आमच्या मनाला सामर्थ्ययुक्त करतो त्याचेंच वर्णन आमचीं स्तोत्रें करोत.

१५. हे सोमा, आमच्या गाईबैलांना सुखकारक असा तूं उत्पन्न हो वाढतें अन्न उत्पन्न कर आणि चांगलें उदक वाढीव.

१६. पवमान सोमानें वैश्वानर नांवाचें मोठें आणि स्वर्गाला आश्चर्यकारक असें तेज उत्पन्न केलें.

१७. हे तेजस्वी सोमा, पाझरणाऱ्या तुझा मदकर आणि सुखकर असणारा रस, लोंकरीच्या गाळण्यांतून गळतो आहे.

१८. हे पवमान सोमा, तुझा तेजस्वी आणि बळवान् असणारा रस शोभतो आणि सर्व व्यापक तेजाला पाहण्यायोग्य करतो.

१९. हे सोमा, तुझा देवेच्छु, राक्षसहन्ता आणि श्रेष्ठ मद्रोत्पादक जो रस आहे त्या रसानें तूं उत्पन्न हो.

२०. हे सोमा, तूं शत्रुभूत वृत्राला ठार करतोस, दररोज युद्धाला जातोस; आणि गाईबैल व घोडे देतोस.

२१. हे सोमा, सुंदर गायांच्या दूधांत मिसळलेला तूं, श्येनपक्ष्याप्रमाणें आपल्या स्थानीं येऊन बसतोस. आतां तूं तेजस्वी हो.

२२. हे सोमा, तूं पाण्याचा सांठा अडवणाऱ्या वृत्राला ठार करण्याकरतां इंद्राचें संरक्षण केलेंस तो तूं उत्पन्न हो.

२३. सुपुत्र असें आम्ही धन जिंकतों. हे बलशाली सोमा, पिळला जाणारा तूं आमच्या स्तोत्रांची भरभराट कर.

२४. हे सोमा, तुझे साहाय्यानें रक्षिलेलें आम्ही शत्रूंचा नाश करूं. आमच्या कृत्याविषयीं तूं जागरूक असावें.

२५. शत्रूंना ठार करणारा, कवडीचुंबकांना नष्ट करणारा आणि इंद्राकडे जाणारा असा सोम उत्पन्न होतो.

२६. हे पवमान सोमा, आम्हांला पुष्कळ धन दे. हिंसक शत्रूंना ठार कर व आम्हांला पुत्रयुक्त कीर्ति दे.

२७. हे सोमा, धन देणाऱ्या तुला तयार करीत असतां जेव्हां तूं धन देऊं इच्छितोस,तेव्हां अनेक हिंसक शत्रूंहि नष्ट करतोस.

२८. हे सोमा, बलवान् असा तूं धारायुक्त हो. देशांत आम्हांला कीर्तिमान् कर. आमच्या सर्व शत्रूंना ठार मार.

२९. हे सोमा, ह्या यागांत तुझें साहाय्य असल्यामुळें उत्तम अन्न प्राप्त करून युद्धेच्छु शत्रूंना आम्ही पराभूत करूं.

३०. हे सोमा, जीं तुझीं शत्रुवधाकरतां भयंकर आणि तीक्ष्ण आयुधें आहेत त्या आयुधांनीं सर्व शत्रूंच्या निंदेपासून आमचें संरक्षण कर.

सूक्त बासष्टावें.

ऋषिः—जमदग्नि भार्गव; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. पातळ असणारा हा सोमरस सर्व संपत्तीकरतां गाळण्यांतून गाळला जातो.

२. बलवान् सोम अनेक पातकें नष्ट करीत आमचीं मुलें व घोडे यांना सुख आणि धन देत गाळला जातो.

३. आमच्या गाईबैलांना आणि आम्हांला जें धन आकर्षितें तें धन देऊन अन्न देणारा सोम आम्हांस स्तुति करण्याची प्रेरणा करो.

४. पर्वतावर असणारा सोम मद उत्पन्न होण्याकरतां तयार केला. पाण्यांत वाढवला. तो श्येनाप्रमाणें येऊन आपल्या स्थानीं बसतो.

५. ज्या देवांना आवडणाऱ्या शुभ्र अन्नाला (सोमाला) गाई दूधानें गोडी उत्पन्न करतात तो सोम लोकांनीं पिळून पाण्यानें स्वच्छ केला जातो.

६. भक्त यज्ञांत ह्या मधुर सोमाच्या रसाला अमरपणा प्राप्त व्हावा म्हणून घोड्याप्रमाणें सुशोभित करतात.

७. हे सोमा, तुझ्या मधुस्रावी धारा स्वसंरक्षणाकरतां उत्पन्न केल्या जातात.त्यांनीं तूं गाळण्यांत बैस.

८. हे सोमा, पिळलेला तूं लोंकरींतून गळत इंद्राला पिण्याकरतां पात्रांत बैस.

९. हे सोमा, अत्यंत मधुर आणि धन देणारा तूं अंगिरसाकरतां दूध व तूप उत्पन्न कर.

१०. सूक्ष्मदृष्टि, (भांड्यांत) ठेवलेला, पाण्यांत तयार केला जाणारा आणि थोर सामर्थ्य देणारा हा सोम सर्वांना ठाऊक आहे.

११. बलवान्, महाकर्मा व शत्रुहन्ता हा पवमान सोम दात्यांना धन देतो.

१२. हे सोमा, बहुसंख्याक, गाईबैल व घोडे यांनीं युक्त, सर्वांना आनंददायक आणि स्पृहणीय असें धन तूं उत्पन्न कर.

१३. बहुस्तुत्य व कर्तृत्ववान् सोम लोकांकडून शुद्ध केला जातो.

१४. अमर्याद रक्षण करणारा, विपुल धनयुक्त, लोकनिर्माता, कर्तृत्ववान् आणि मदकर सोम इंद्राकरतां उत्पन्न होतो.

१५. उत्पन्न झाल्याबरोबर स्तुति केला जाणारा सोम, यज्ञांत इंद्राकरतां,पक्षी घरट्यांत असतो त्याप्रमाणें ठेवला जातो.

१६. लोकांनीं पिळून तयार केलेला सोम सामर्थ्यानें युद्धांत जावें त्याप्रमाणें भांड्यांत जातो.

१७. तीन सवनरूपी तीन पृष्ठभाग असलेला आणि तीन बैठकी असलेल्या ऋषींच्या यज्ञरूपी रथांत त्याला नेण्याकरतां सात स्तोत्रें म्हटलीं जातात (तीन सवन, तीन वेद आणि सात छंद)

१८. हे सोम तयार करणारे ऋत्विजहो, धन देणारा,बलवान् व वेगवान् अशा सोमरूपी अश्वाला लढाईस जाण्याकरतां तुम्ही प्रेरणा करा.

१९. हे सोमा,पिळून भांड्यांत भरलेला,सर्व संपत्ति प्राप्त करून देणारा तूं शत्रूंच्या गाईमध्यें असलेल्या शूराप्रमाणें यज्ञांत असतोस.

२०. हे सोमा, तुझा मधुर रस देव व लोक इंद्राला मद उत्पन्न होण्याकरतां काढतात.

२१. हे ऋत्विजहो, देवप्रसिद्ध अत्यंत मधुर सोम इंद्रादि देवांकरतां गाळण्यांतून तयार करा.

२२. स्तुत्य असा सोम उत्कृष्ट अन्नप्राप्तीकरतां अत्यंत मादक अशा धारेनें तयार केला जातो.

२३. हे सोमा, शुद्ध करणारा जो तूं खाण्याकरतां दूधादि पदार्थांत मिसळला जातोस, तो तूं अन्न देत उत्पन्न हो.

२४. तसेंच हे सोमा, जमदग्नीनें स्तुति केलेला तूं आम्हांला गोरसयुक्त व स्तुत्य सर्व अन्न दे.

२५. हे सोमा, मुख्य असा तूं आश्चर्यकारक साहाय्यासह आमच्या सर्व स्तुतिस्तोत्रामुळें उत्पन्न हो.

२६. हे विश्वकंपक सोमा तूं आमच्या स्तोत्रांना प्रेरणा देत उदकामध्यें उत्पन्न हो.

२७. हे कर्तृत्ववान् सोमा, तुझ्या सामर्थ्यानें हीं भुवनें स्थिर आहेत. तसेंच सर्व नद्या तुझ्याकडेच जातात.

२८. हे सोमा, आकाशांतून पडणाऱ्या वृष्टीप्रमाणें तुझ्या वेगवेगळ्या धारा पांढऱ्या पसरलेल्या गाळण्याकडे जात आहेत.

२९. हे ऋत्विजहो, उग्र, बलदायक, धनाधीश व धन देणारा सोम इंद्राकरतां शुद्ध करा.

३०. सत्यस्वरूप आणि कर्तृत्ववान् पवमान सोम आमच्या स्तोत्रांना सामर्थ्य देत गाळण्यांत बसतो.

सूक्त त्रेसष्टावें.

ऋषिः—निध्रुवि काश्यप; देवता--पवमान सोम; छंदः--गायत्री.

१. सोमा, तूं अपरिमित आणि बलशाली धन आम्हांस दे आणि आम्हांस अन्न दे.

२. हे सोमा, अत्यंत मादक असणारा तूं इंद्राकरतां अन्न आणि बल उत्पन्न करतोस. आणि पात्रांत असतोस.

३. इंद्र, विष्णु आणि वायु यांच्याकरतां पिळलेला सोम भांड्यांत पाझरतो तोंच मधुर होतो.

४. पिंगट व पातळ सोम पाण्यांत उत्पन्न केला जातो आणि त्यानें राक्षसांचा नाश केला जातो.

५. इंद्राला उत्साह देणारा, उदकप्रेरक, सोमाला कल्याणप्रद करणारा आणि कवडीचुंबकांना नष्ट करणारा,—

६. पिंगट व पिळून काढलेला, सोम इंद्राकडे जातांना स्वतःच्या स्थानीं जातो.

७. हे सोमा, मनुष्यांना हितप्रद व उदक उत्पन्न करणारा तूं ज्या धारेनें सूर्याला प्रकाशित करतोस त्या धारेनें उत्पन्न हो.

८. शुद्ध करणारा सोम मनुष्यांकडे अन्तरिक्षांतून जाण्याकरतां सूर्याच्या घोड्याशीं संयुक्त होतो.

९. सोम, इंद्र असें म्हणत दाही दिशांला जाण्याकरतां सूर्याच्या घोड्यांशीं युक्त होतो.

१०. हे स्तोतेहो, वायु व इंद्र यांकरतां पिळलेला मदकर सोम येथून उचलून गाळण्यांत टाका.

११. हे पवमान सोमा, जें धन दुष्ट शत्रूंना नष्ट करणें अशक्य आहे तें धन आम्हांस दे.

१२. हे सोमा, तूं अनेक गाई, बैल, घोडे यांनीं युक्त धन आम्हांस दे. तसेंच बल व अन्न आम्हांस दे.

१३. सूर्यदेवांप्रमाणें तेजस्वी व दगडांनीं कुटलेला सोम भांड्यांत पाझरतो.

१४. हा पिळलेला स्वच्छ सोम श्रेष्ठ भक्तांच्या घरीं गोरसयुक्त अन्न उदकासह निर्माण करतो.

१५. वज्रधारी इंद्राकरतां पिळलेला दधिमिश्रित सोम गाळण्यांतून गळतो.

१६. हे सोमा, तुझा जो अत्यंत मधुर आणि मदकर देवेच्छु रस आहे त्या रसाला धनाकरतां गाळण्यांतून गळूं दे.

१७. हिरवट, बलशाली व मदकर अशा ह्या सोमाला लोक पाण्यांत शुद्ध करतात.

१८. हे सोमा, सुवर्ण, घोडे व पुत्र यांनीं युक्त धन तूं आम्हांकरतां उत्पन्न कर, तसेंच पशुयुक्त अन्न आम्हांला दे.

१९. युद्धेच्छु व अत्यंत मधुर सोम दशापवित्रांत युद्धाप्रमाणें घाईनें तुम्ही सिंचन करा.

२०. रक्षणेच्छु ऋत्विज, बोटांनीं शोधनीय अशा ज्या सोमाला शुद्ध करतात तो हा बलशाली सोम शब्द करीत पाझरतो.

२१. शहाणे ऋत्विज, कामपूरक आणि उदक प्रेरक सोमाला स्तोत्रें म्हणून बोटांनीं व पाण्याच्या धारेनें उत्पन्न करतात.

२२. हे सोमदेवा, तूं तयार हो. तुझा मदकर रस इंद्राकडे जावो तूं वाऱ्यांत आपल्या सामर्थ्यानें चढ. (उंचून ओतला जा.)

२३. हे पवमान सोमा, तूं प्रसिद्ध (शत्रूंच्या) संपत्तीस अत्यंत त्रास देतोस. तूं भांड्यांत शीर.

२४. हे सोमा, तूं शत्रूंना ठार करीत आणि आम्हांला बुद्धि देत उत्पन्न होतोस. तूं देवांविरुद्ध लोकांना नष्ट कर.

२५. उज्वल, तेजस्वी व पाझरणारा सोम अनेक स्तोत्रांनीं उत्पन्न केला जातो.

२६. पातळ, स्वच्छ, पाझरणारा व तेजस्वी सोम सर्व शत्रूंना ठार करित उत्पन्न केला जातो.

२७. शुद्ध करणाऱ्या सोमाला द्युलोक, अन्तरिक्ष, आणि पृथ्वी सर्वत्र तयार करतात.

२८. हे तेजस्वी व कर्मशाली सोमा, धारेनें शुद्ध होणारा तूं सर्व द्वेषी शत्रूंना आणि राक्षसांना ठार कर.

२९. हे सोमा, तूं राक्षसांचा नाश करीत व शब्द करीत तेजस्वी आणि श्रेष्ठ असें बल आम्हांला आण.

३०. हे तेजस्वी सोमा, स्वर्गीय व पार्थिव अशी सर्व प्रकारची उत्कृष्ट संपत्ति तूं आम्हांला दे.

सूक्त चवसष्टावें.

ऋषिः—काश्यप मारिच; देवता—पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हे कामपूरक सोमा, तूं तेजस्वी आहेस. हे तेजस्वी सोमा, तू रसाचा वर्षाव करणारा आहेस. तसेंच हे सोमा, बलशाली असा तूं देव आणि मनुष्य यांना हितकारक कर्में करतोस.

२. हे कामपूरक सोमा, रसरसीत अशा तुझें बळ वर्षणशील आहे. तुझा मद व तुझा रस हे सर्व रसरसीत आहे. खरोखर तूं रसाचा वर्षाव करणारा आहेस.

३. हे सोमा, बलवान् असणारा तूं घोड्याप्रमाणें शब्द करतोस. तसेंच आम्हांला गाई, बैल व घोडे देतोस. तसेंच तूं धनाचीं द्वारें मोकळीं कर.

४. बलवान्, शुद्ध आणि तेजस्वी सोम, गाईबैल, घोडे आणि पुत्र यांच्या इच्छेनें उत्पन्न केला जातो.

५. यज्ञेच्छु लोकांनीं सुशोभित केलेला व हातांनीं शुद्ध केलेला सोम लोंकरीच्या गाळण्यांतून गळतो.

६. तो सोम, स्वर्ग, अन्तरिक्ष आणि पृथ्वी यांमध्यें उत्पन्न झालेले सर्व प्रकारचें धन हविर्दात्यांकरतां उत्पन्न करो.

७. हे विश्वद्रष्ट्या सोमा, सूर्याच्या किरणाप्रमाणें पाझरणाऱ्या तुझा रस उत्पन्न केला जात आहे.

८. हे सोमा, आम्हांला ज्ञान देणारा आणि रसपूर्ण असणारा तूं आकाशांतून सर्व रस उत्पन्न करतोस आणि अनेक प्रकारचें धन आम्हांस देतोस.

९. हे पवमान सोमा, ज्या वेळीं तुझा रस सूर्य-

देवासारखा (त्याच्या किरणांसारखा) गाळण्यांत गळतो, तेव्हां पिळीत असतां तूं स्तुति करावयास लावतोस.

१०. ज्ञान देणारा व देवांना प्रिय असणारा सोम, स्तोत्यांच्या स्तुतीनें, रथी घोड्यांला हाणतो त्याप्रमाणें उत्पन्न केला जातो.

११. हे सोमा, जो तुझा यज्ञांत देवांकडे जाणारा तरंग असतो आणि जो गाळण्यांतून गळतो तो उत्पन्न केला जावो.

१२. हे सोमा, तूं देवेच्छु आणि मदकर आहेस, तूं इंद्राला पिण्याकरतां गाळण्यांतून उत्पन्न हो.

१३. हे सोमा, ऋत्विजांनीं स्वच्छ केला जाणारा तूं आम्हांला अन्न प्राप्त होण्याकरतां धारारूपानें उत्पन्न हो. आणि तेजस्वी अन्नानें गाईकडे जा.

१४. हे स्तुत्य हरितवर्ण सोमा,दुधांत तयार केला जाणारा आणि गाळला जाणारा तूं लोकांकरतां धन व अन्न उत्पन्न कर.

१५. हे सोमा, तेजस्वी आणि बलवानांना मिळणारा आणि यज्ञाकरतां शुद्ध केला जाणारा तूं इंद्राच्या स्थानाकडे जा.

१६. पातळ आणि वेगवान् सोम बोटांनीं दाबून व ओतून तयार केला जातो.

१७. शुद्ध केलेला पातळ सोम सहज उदकाचें जें उत्पत्तिस्थान आकाश त्याकडे जातो.

१८. हे सोमा, आमचेकडे येणारा तूं आम्हांकडे सर्व संपत्ति बलासह घेऊन ये. तसेंच आमच्या पुत्रयुक्त घराचें रक्षण कर.

१९. हे सोमा, जेव्हां वाहून नेणारा घोडा (सोम) शब्द करतो, आणि ऋत्विजांसह येतो तेव्हां तो पाण्यांत मिसळला जातो.

२०. जेव्हां सोम यज्ञाच्या हिरण्मय स्थानांत येतो तेव्हां मूर्खांना टाकतो. (व शहाण्यांचा स्वीकार करतो.)

२१. स्तोते स्तुति करतात. शहाणे यज्ञ करूं इच्छितात. आणि यांविरुद्ध असणारे (नरकांत)बुडतात.

२२. हे सोमा, अत्यंत मधुर असणारा तूं, यज्ञांत बसण्याकरतां देवांसह असणाऱ्या इंद्राकरतां उत्पन्न हो.

२३. हे सोमा, तुला शहाणे व पराक्रमी स्तोते भूषित करतात आणि शुद्ध करतात.

२४. हे कर्तृत्ववान् सोमा, पाझरणाऱ्या तुझा रस मित्र, अर्यमा आणि वरुण पितोत.

२५. हे तेजस्वी सोमा, शुद्ध होणारा तूं शहाणपणाच्या व अत्यंत पोषक अशा स्तुतीला प्रेरणा देतोस.

२६. तसेंच हे तेजस्वी सोमा, शुद्ध केला जाणारा तूं हजारों प्रकारें पोषक आणि धन देणारी अशी स्तुति उत्पन्न कर.

२७. हे बहुस्तुत सोमा, शुद्ध केला जाणारा आणि लोकांना प्रिय असणारा असा तूं ह्या यज्ञांत भांड्यांत जा.

२८. तेजस्वी, कान्तिमान् आणि शब्द करणारा सोम दूधांत मिसळला जातो.

२९. स्तोत्यांनीं प्रेरणा दिलेला, व्यवस्थित आणि बलवान् असा सोम युद्धाला जाणाऱ्या योध्याप्रमाणें यज्ञाचें आक्रमण करतो.

३०. हे सोमा, शहाणा, शत्रूंना दूर करणारा, आणि प्राप्त होणारा तूं कल्याणाकरतां आणि दीर्घायुष्याकरतां स्वर्गांतून उत्पन्न हो.

सूक्त पासष्टावें.

ऋषिः—भृगु वरुणपुत्र किंवा जमदग्नि भार्गव; देवता-पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. बांधवभूत, गमनशील आणि तुझी इच्छा करणारीं बोटें सामर्थ्यवान् व सर्वाधीश सोमाला उत्पन्न करतात.

२. हे शुद्ध केल्या जाणाऱ्या सोमा, सर्व प्रकारच्या तेजानें युक्त असणारा तूं देवांपासून सर्व प्रकारचें धन प्राप्त कर.

३. हे शुद्ध केल्या जाणाऱ्या सोमा, चांगली वृष्टि देवांच्या सेवेकरतां तूं उत्पन्न कर.

४. हे पवित्र सोमा, चांगलीं कर्में करणारे आम्ही तेजोयुक्त अशा तुला बोलावतों. कारण तूं इच्छा पूर्ण करणारा आहेस.

५. हे चांगलीं आयुधें असलेल्या सोमा, आनंद देणारा तूं उत्कृष्ट सामर्थ्य दे. आणि हे सोमा, ह्याच आमच्या यज्ञांत चांगल्या प्रकारें ये.

६. हे सोमा, हातांनीं शुद्ध केला जाणारा तूं, ज्यावेळीं पाण्यांनीं सिंचन केला जातोस त्यावेळीं लांकडी भांड्यानें घेतला जाणारा आपलें स्थान प्राप्त करतोस.

७. हे स्तोतेहो, शुद्ध केला जाणारा, महान् आणि अनेक दृष्ट्या पाहण्यायोग्य सोमाची स्तुति करा.

८. हे अध्वर्यूंहो, शत्रूंचें निवारण करणारा, मधुर रस उत्पन्न करणारा व हिरवट रंगाचा सोम दगडांनीं इंद्राला पिण्याकरतां उत्पन्न करतात.

९. अन्नयुक्त असे आम्ही सर्व धन जिंकणाऱ्या सोमाची मैत्री इच्छितों.

१०. हे सोमा, इष्ट फल देणारा तूं धारेनें उत्पन्न हो. सर्व संपत्ति आपल्या तेजानें प्राप्त करून देणारा तूं इंद्राला मदकर हो.

११. हे पवमान सोमा, द्यावापृथ्वींचा आधार, स्वर्गद्रष्टा आणि बलवान् अशा तुला आम्ही युद्धांत उपयोगाला आणतों.

१२. हे सोमा, ह्या बोटांनीं उत्पन्न केलेला आणि हिरवटसर असा तूं धारेनें उत्पन्न हो. इंद्राला युद्धांत उत्साह दे.

१३. हे तेजस्वी सोमा, विश्वप्रकाशक असा तूं पुष्कळ अन्न आम्हांकरतां उत्पन्न कर, तसेंच तूं आम्हांला मार्गदर्शक हो.

१४. हे पाझरणाऱ्या सोमा, बलयुक्त अशा धारांनीं भरलेले तांबे स्तवन केले जातात इंद्राला पिण्याकरतां (भांड्यांत) तूं शीर.

१५. हे सोमा, ज्या तुझा मदकर तीक्ष्ण रस लोक दगडांनीं काढतात तो शत्रुहन्ता तूं उत्पन्न हो.

१६. यज्ञांत सोमराजा स्तुति चालूं असतां अन्तराळांतून तेथें जातो.

१७. हे तेजस्वी सोमा, हजारों गाईंनीं युक्त, गाईंना पुष्ट करणारा, उत्तम घोड्यांनीं युक्त आणि उत्तम धन देणारा तूं आमच्या रक्षणाकरतां ये.

१८. हे सोमा, देवांना पिण्याकरतां तूं पिळला आहेस. शत्रूंचा पराभव करणारें बल आणि तेजाकरतां असलेला तूं आम्हांला रूप दे.

१९. हे सोमा, अत्यंत तेजस्वी असणारा तूं शब्द करीत पात्राकडे ये. श्येनपक्ष्याप्रमाणें आपल्या स्थानीं येऊन बैस.

२०. उदकामिश्रित सोम इंद्र, वायु, वरुण, मरुत् आणि विष्णु यांकरतां येतो.

२१. हे सोमा, तूं आमच्या पुत्रांना अन्न देत आम्हांकरतां चहूंकडून सर्वप्रकारची संपत्ति वाहून आण.

२२. जे सोम जवळ आहेत, ते दूरदेशीय इंद्राकरतां काढले आहेत आणि शर्यणावत नांवांच्या सरोवरांत आहेत—

२३. जे आर्जीकदेशांत, कृत्वदेशांत आहेत जे पस्त्यानदींत आहेत आणि जे सोम पांचहि प्रकारच्या लोकांत आहेत—

२४. ते पिळलेले तेजस्वी सोम आम्हांला आकाशांतून पाऊस आणि उत्कृष्ट संतति देवोत.

२५. देवेच्छु, हिरवट, बैलाच्या कांतड्यावर काढला जाणारा आणि जमदग्नीनें स्तुति केलेला सोम उत्पन्न होवो.

२६. स्वच्छ, अन्नदाता आणि (दूध वगैरेंत) मिसळलेला सोम हांकारलेले घोडे जसे पाण्यांत धुतले जातात त्याप्रमाणें स्वच्छ केला जातो.

२७. हे सोमा, तुला सोमयज्ञांत ऋत्विज् काढतात. तूं ह्या तेजस्वी धारेनें उत्पन्न हो.

२८. हे सोमा, आम्ही आज तुझ्या सुखकारक, धनप्रापक, रक्षक आणि अनेकांना स्पृहणीय अशा बलाला या यज्ञांत स्वीकारतों.

२९. हे सोमा, मदकर, श्रेष्ठ, बुद्धिप्रद आणि स्तुत्य अशा तुला आम्ही स्वीकारतों.

३०. हे कर्तृत्ववान् सोमा, ज्ञान आणि धन आम्हांला प्राप्त होऊं दे. तसेंच आमच्या मुलांना प्राप्त होऊं दे. तसेंच रक्षक आणि स्पृहणीय अशा तुला आम्ही प्राप्त करूं.

सूक्त सहासष्टावें.

ऋषि-वैखानस शतसंख्याक; देवता–१८-१९-२०-२१ पवमान अग्नि, बाकी पवमान सोम; छंदः—१८ अनुष्टुभ्, बाकी गायत्री.

१. हे सर्वद्रष्ट्या सोमा, स्तुत्य व मित्रभूत असणारा तूं आम्हां मित्रांकरतां आमचीं सर्व प्रकारचीं स्तोत्रें ऐकून उत्पन्न हो.

२. हे पवमान सोमा, जे तुझे पूर्वापार दोन भाग उत्पन्न झाले आहेत त्यांनीं तूं सर्व लोकांचा धनी आहेस.

३. हे कव्या सोमा, जें तुझें तेज आहे, तें सर्व ऋतूंबरोबर चहूंकडे फिरवतोस.

४. हे सोमा, मित्रभूत असा तूं सर्व उत्कृष्ट स्तोत्रांना उद्देशून आमच्या रक्षणाकरतां अन्न देत उत्पन्न हो.

५. हे सोमा, तेजस्वी, तेजांनीं सहित व प्रकाश असणारा तूं द्युलोकावर व पृथ्वीवर पवित्र करणारें उदक उत्पन्न करतोस.

६. हे सोमा, ह्या तूं उत्पन्न केलेल्या सात नद्या तुझी आज्ञा अनुसरतात. गाई तुझ्याकरतांच धांवतात.

७. हे पिळलेल्या सोमा, पिळलेला, मदकर असणारा आणि अक्षय अन्न धारण करणारा असा तूं धारेनें इंद्राकडे जा.

८. हे सोमा, स्तुति करणारे, सात होते सात भक्तांच्या यज्ञांत शहाण्या अशा तुला स्तोत्रांनीं स्तवितात.

९. हे सोमा, जेव्हां (पाण्यांत) आवाज करणारा तूं पाण्यांत भिजवला जातोस तेव्हां स्वच्छ करणाऱ्या गाळण्यांतून गाळला जातोस.

१०. हे कर्तृत्ववान् आणि बलवान् सोमा, शुद्ध केल्या जाणाऱ्या तुझ्या अन्नदात्या धारा अश्वशालेंतून सोडलेल्या घोड्यांप्रमाणें बाहेर पडतात.

११. मधुर रस पाझरणाऱ्या भांड्यांत लोंकरीच्या गाळण्यांतून सोम उत्पन्न केला जातो. आणि आमचीं बोटें त्याला उत्पन्न करूं इच्छितात.

१२. दूध देणाऱ्या गाया गोठ्यांत जातात त्याप्रमाणें हे पाझरणारे सोम भांड्यांत जातात. तसेंच ते यज्ञांत जातात.

१३. हे सोमा, जेव्हां तूं दूधदह्यांत मिसळला जातोस तेव्हां ते सोम मोठ्या यज्ञाकरतां पाण्यांत मिसळले जातात.

१४. हे सोमा, तुझ्या मैत्रींत असणारे, तुझ्याकडून रक्षण केले जाणारे, असे यज्ञेच्छु आम्ही तुझी मैत्री इच्छितों.

१५. हे सोमा, गाई शोधण्याकरतां, महत्त्वाकरतां आणि लोकज्ञानाकरतां तूं उत्पन्न हो. आणि इंद्राच्या पोटांत शिर.

१६. हे सोमा, तूं मोठा आहेस. श्रेष्ठ आहेस. हे सोमा, तूं बलवानांतला बलवान् आहेस. तूं युद्ध करून नेहमीं शत्रूंना जिंकतोस.

१७. जो सोम बलवानांतला बलवान् आहे, शूरांतला शूर आहे आणि दात्यांतला दाता आहे.—

१८. हे सोमा, तो तूं बलवान् अन्न आम्हांला दे. आम्हांला पुत्र दे. तुझा मित्रत्वाकरतां आणि सहाय्याकरतां आम्ही स्वीकार करतों.

१९. हे शुद्ध करणाऱ्या अग्ने, तूं आमच्या जीविताचें रक्षण करतोस. आम्हांला बळ आणि अन्न दे. दुष्ट राक्षसांना आमच्यापासून दूर नष्ट कर.

२०. अशी मागणी आम्ही सर्वचक्षु, निषादादिक पंचवर्णांना हितकारक असणारा आणि आपणांपुढें सर्व प्रकारचीं धर्मकर्मे करण्याकरतां स्थापन केलेला अशा ह्या महाधन अग्नीला करतों.

२१. हे स्तुत्य कर्मे करणाऱ्या अग्ने, तूं मला सामर्थ्यसंपन्न करणारें धन दे.

२२. पवमान सोम हिंसक शत्रूंचें अतिक्रमण करतो. व सुंदर स्तुति प्राप्त करतो. तो सर्वद्रष्ट्या सूर्याप्रमाणें आहे.

२३. लोकांकडून शुद्ध केला जाणारा, अन्नयुक्त गमनशील, हवीला योग्य आणि सर्वद्रष्टा सोम आहे.

२४. हे पवमान सोमा, सत्य, विपुल, प्रकाशक आणि तेजस्वी अशा तुला अंधार नाहींसा करीत उत्पन्न केलें.

२५. तमोनाशक, हरितवर्ण व तेजोव्यापक अशा सोमाच्या आल्हादक धारा निर्माण झाल्या.

२६. अतिशय वेगवान् निर्मलांतला निर्मल सुवर्णकांति, देवांचें सहाय्य असलेला—

२७. अन्नदाता व स्तोत्यांला सामर्थ्य देणारा पवमान सोम तेजांनीं सर्व व्यापून टाकतो.

२८. पिळलेला सोम गाळला जातो आणि शुद्ध होऊन तो इंद्राकडे जातो.

२९. इंद्राला मदाकरतां बोलावीत हा सोम बैलांच्या कातड्यावर दगडांशीं खेळत असतो.

३०. हे स्वच्छ केलेल्या सोमा, द्युलोकांहून आणलेला व तेजोरूप असणारा तूं आम्हांला दीर्घायुष्य देणारा आणि सुखकारक हो.

सूक्त सदुसष्टावें.

ऋषिः--१ ते ३ भारद्वाज बार्हस्पत्य, ४ ते ६ काश्यप मारीच, ७ ते ९ गोतम राहूगण, १० ते १२ अत्रि भौम, १३ ते १५ विश्वामित्र गाथिन, १६ ते १८ जमदग्नि भार्गव, १९ ते २१ वसिष्ठ मैत्रावरुणि, अवशिष्ट सूक्ताचे पवित्र किंवा वसिष्ठ किंवा दोनहि; देवता—१० ते १२ पवमान पूषा किंवा पवमान सोम, २३ ते २७ पवमान अग्नि; किंवा २५ पवमान सवितृ २६ पवमान अग्नि किंवा पवमान सवितृ, २७ विश्वेदेव, ३१—३२ पवमानमंडळाध्येतृस्तुति, अवशिष्ट पवमान सोम; छंदः—१६ ते १८ गायत्री, द्विपदा, ३०—३२ पुरउष्णिह्, २७ अनुष्टुभ्, बाकी प्रगाथ.

१. हे सोमा, अत्यंत मादक आणि बलशाली असणारा तूं हिंसारहित यज्ञांत पिळला जातोस. धन देणारा तूं धारायुक्त उत्पन्न हो.

२. हे सोमा, लोकांना अत्यंत मादक, धन देणारा, बुद्धिवान् व पिळून काढलेला तूं अन्नासह इंद्राला मद उत्पन्न करणारा हो.

३. हे सोमा, दगडांनीं काढलेला, शब्द करणारा तूं उत्पन्न हो आणि तेजस्वी, उत्कृष्ट व शत्रुशोषक बल उत्पन्न कर.

४. पिळला जाणारा सोम केंसाळ गाळण्यातून बाहेर पडतो. हा हिरवा सोम अन्नाला बोलावतो.

५. हे सोपा, तूं लोंकरींतून गाळला जातोस. तसेंच तूं अन्न आणि धन मिळवतोस. तसेंच गाई बैलांनीं युक्त अन्न तूं दे.

६. हे सोमा, शेंकडों गायांनीं युक्त व अश्वांनीं युक्त असें अपरिमित धन तूं आम्हांला दे.

७. पवमान सोम, गाळण्यांतून खालीं पडत आणि भांडीं भरीत इंद्राकडे जातो.

८. व्यापक, पातळ, सकाळीं काढलेला आणि आयुष्य वाढविणारा असा हा सोम–रस सर्वगामी इंद्राकडे जातो.

९. बोटें मधुररसाला उत्पन्न करणाऱ्या व बलशाली सोमाला उत्पन्न करतात. नंतर स्तोते त्याला स्तवितात.

१०. घोड्याच्या जागीं मेंढे जोडलेला पूषा सर्वत्र जातांना आमचें रक्षण करो आणि इष्ट स्त्रियांकडे आम्हांला पोंचवो.

११. मधुर हवि जसा पूषन्कडे जातो त्याप्रमाणें हा पिळलेला सोम जटामुगुटयुक्त पूषन्कडे जावो. आणि तो आम्हांला स्त्रियांकडे पोंचवो.

१२. हे तेजस्वी पूषन्देवा, शुद्ध तुपाप्रमाणें हा पिळलेला सोम तुझ्याकडे जातो. आम्हांला स्त्रियांकडे पोंचीव.

१३. हे सोमा, स्तोत्यांच्या वाणीला प्रेरणा देणारा तूं धारारूपानें उत्पन्न हो. कारण, देवांना तूं सोम देणारा आहेस.

१४. सोम श्येनपक्षी शब्द करीत घरट्यांत शिरतो त्याप्रमाणें कलश द्रोण वगैरे पात्रांकडे धांवतो व तीं भरून टाकतो.

१५. हे सोमा, गमनशील श्येनाप्रमाणें भांड्यांत पिळलेला तुझा रस चहूंकडे पसरतो आणि देवांकडे जातो.

१६. हे सोमा, अत्यंत मधुर आणि मादक असणारा तूं इंद्राकरतां उत्पन्न हो.

१७. शत्रूंचें धन इच्छिणारे रथ जसें हाणलें जातात त्याप्रमाणें हा सोम यज्ञाकरतां उत्पन्न केला जातो.

१८. अत्यंत मादक व पिळलेला हा तेजस्वी सोम वायूकरतां उत्पन्न केला जातो.

१९. हे सोमा, दगडांनीं कुटलेला, स्तुति केलेला व स्तोत्यांला बलशाली धन देणारा तूं गाळण्यांत जावेस.

२०. हा दगडांनीं कुटलेला आणि स्तविलेला सोम लोंकरीच्या गाळण्यांतून गळतो आणि राक्षसांचा नाश करतो.

२१. हे पवमान सोमा, जें कांहीं दूरून किंवा जवळून भय प्राप्त होत असेल तें तूं नष्ट कर.

२२. तो सर्वद्रष्टा पवमान सोम, आतां पापशोधक तेजानें आम्हांला शुद्ध करो.

२३. हे अग्ने, जें तुझ्या तेजामध्यें शुद्धिसामर्थ्य आहे त्या तेजानें आमचें शरीर शुद्ध कर.

२४. हे अग्ने, शोधक आणि तेजस्वी असें जें तुझें तेज आहे, त्यानें आम्हांला तूं पवित्र कर. तूं सोम पिळण्याकरतां आम्हांला शुद्ध कर.

२५. हे सर्व प्रेरक तेजस्वी सोमा, पापशोधक तेजानें आणि सोम पिळण्यानें अशा दोनहि प्रकारें तूं आम्हांला शुद्ध कर.

२६. हे सर्व प्रेरक तेजस्वी सोमा, आणि हे अग्ने, तूं अत्यंत सामर्थ्यवान् व तेजस्वी अशा अग्नि, वायु व सूर्यात्मक तीन शरीरांनीं आम्हांला शुद्ध कर.

२७. इंद्रादि देव मला पवित्र करोत. वसु मला आपल्या कृत्यानें पवित्र करोत. सर्व देव मला पवित्र करोत आणि हे सर्वज्ञ अग्ने, तूं मला शुद्ध कर.

२८. हे सोमा, तूं आमची भरभराट कर. देवांचा उत्कृष्ट हवि असणारा तूं सर्व अंशांनीं पाझरूं लाग.

२९. आवडता, शब्द करणारा, तरुण, आहुतींनीं वाढणारा अशा पवमान सोमाकडे आम्ही नमस्कार करीत जातों.

३०. चालून येणाऱ्या शत्रूंची कुऱ्हाड त्याचाच नाश करते. हे सोमदेवा, तूं उत्पन्न हो. आणि हे सोमदेवा, त्या हन्त्या शत्रूंचा नाश कर.

३१. जो ऋषींनीं मिळविलेल्या पवमान देवताक

ऋचांचें अध्ययन करतो तो वायूनें आस्वाद घेतलेला म्हणूनच शुद्ध असणारा सर्व रस भक्षण करतो.

३२. जो ऋषींनीं संपादन केलेल्या पवमान देवताक मंत्रांचें अध्ययन करतो, त्याच्याकरतां सरस्वती दूध, तूप आणि मधुर सोमरूपी वाणी उत्पन्न करते.

सूक्त अडुसष्टावें.

ऋषिः—वत्सप्रि भलंदनपुत्र; देवता—पवमान सोम; छंदः—१० त्रिष्टुभ्, अवशिष्ट जगती.

१. मधुर सोम दूध देणाऱ्या गायांप्रमाणें देवांकरतां उत्पन्न होवो. यज्ञांत बसणाऱ्या व हंबरणाऱ्या गाया आपल्या कांसेंतून पाझरणारें शुद्ध दूध (इंद्राकरतां) धारण करतात.

२. खळखळणारा सोम स्तुति करावयास लावतो. उगवणारा हिरवा सोम पिळून काढला म्हणजे गोड लागतो. तो गाळण्यांतून गळतांना महान् वेगवान् असतो, दुष्टांना दूर करतो आणि भक्तांना श्रेष्ठ धन देतो.

३. ज्यानें आवळ्याजावळ्या आणि चिकटलेल्या द्यावापृथ्वी निर्माण केल्या, व त्यांबरोबरच वृद्धिंगत होणाऱ्या त्यांना आपल्या रसानें सामर्थ्यवान् केले, महान् आणि अपार असणारी द्यावापृथ्वी सर्वांच्या ध्यानांत आणतां झाला आणि त्या सर्वगामी सोमानें अक्षय्य बळ धारण केलें.

४. बुद्धिमान् सोम सर्वांच्या मातृस्थानीं असणाऱ्या द्यावापृथ्वींवर फिरत व उदकांना प्रेरणा देत अन्नानें आपलें महत्त्व वाढवितो आणि ऋत्विजांनीं गव्हाशीं सोम एकरूप केला जातो. सोम बोटांशीं संलग्न होतो आणि प्राणिमात्रांचें संरक्षण करतो.

५. विचारी मनामुळें उदकाच्या पोटांत असणारा आणि यमानें (सृष्टि नियन्त्यानें) ज्याला आकाशांत स्थापन केलें तो ज्ञानी सूर्य उत्पन्न झाला. तरुण असणारे ते दोघेहि सोम आणि सूर्य उत्पन्न झाल्याबरोबर ओळखले गेले. त्यांचा अर्धा भाग गूढ राहिला व अर्धा भाग (चंद्र सूर्य रूपानें) उदयास आला.

६. श्येनानें जें (सोमरूपी) अन्न दूर देशाहून आणलें तें मदकर सोमाचें रूप शहाणे जाणतात. त्या पोषक, मोहक, गमनशील आणि स्तुत्य सोमाला पाण्यांत ऋत्विज् शुद्ध करतात.

७. हे सोमा, ऋषीनीं पिळलेल्या, (भांड्यांत) ठेवलेल्या तुला स्तुति आणि कृति यांनीं दहा बोटें गाळण्यांतून शुद्ध करतात. तसेंच देवांना बोलावणाऱ्या लोकांनीं एकत्र ठेवलेला तूं दान देण्याकरतां अन्न देतोस.

८. (भांड्यांत) जाणारा, हवासा वाटणारा व चांगला ठेवलेला सोम मनाला पटणाऱ्या स्तुतीनें स्तविला जातो. तो मधुर सोम धारारूपानें आकाशांतून येतो आणि अमर व धन जिंकणारा स्तुति करण्यास प्रेरणा देतो.

९. हा सोम द्युलोकांतून सर्वत्र पाणी आणतो. तसेंच शुद्ध केलेला सोम तांब्यांत बसतो. दगडांनीं कुटून काढलेला सोम पाणी आणि दूधदहीं यांनीं सुशोभित केला जातो. तो पिळलेला आणि शुद्ध केलेला सोम प्रसन्न करणारें धन देतो.

१०. हे सोमा, (द्रव्य) देणारा, आणि ओतला जाणारा तूं आश्चर्यकारक अन्न आम्हांला दे. अद्वेष्ट्या द्यावापृथ्वींना आम्ही बोलावतों. हे देवहो, आम्हांला वीर पुत्रांनीं युक्त धन द्या.

सूक्त एकोणसत्तरावें.

ऋषिः—हिरण्यस्तूप आंगिरस; देवता–पवमान सोम; छंदः—९–१०–त्रिष्टुभ्, अवशिष्ट जगती.

१. धनुष्यावर बाण जोडावा त्याप्रमाणें आमची स्तुति इंद्राला उद्देशून केली जाते. गाईच्या कांसेला वासरूं जसें जोडलें जातें तसें इंद्राकडे आम्ही जोडले जातों. अनेक धारांनीं दूध प्रसवणारी गाय जशी वासरापुढें येऊन पान्हवूं लागते त्याप्रमाणें इंद्र इच्छा पूर्ण करणारा आहे. म्हणून ह्याच्यासंबंधींच्या कर्मांतहि सोम दिला जातो.

२. इंद्राची स्तुति केली जाते आणि सोम दिला जातो. मदजनक सोमाची धार इंद्राच्या तोंडांत ओतलीं जाते. जिकडे तिकडे व्यवस्थित ठेवलेला, मधुर आणि शुद्ध असा सोम थेंबाथेंबानें गाळण्यांत योध्यांच्या बाणाप्रमाणें जातो.

३. बायकांसारख्या उदकांत मिळूं इच्छिणारा सोम मेंढींच्या कांतड्यांतून शुद्ध केला जातो. पृथ्वीपासून उत्पन्न झालेला सोम, यज्ञांत जाणाऱ्या भक्ताला आपल्या ताब्यांत घेतो. हिरवट रंगाचा, यज्ञार्ह व्यवस्थित आणि ठेवलेला मदकर सोम (शत्रूंवर) आक्रमण करतो. आणि शत्रूंचें सैन्य क्षीण करणाऱ्या एखाद्या थोर योध्याप्रमाणें शोभतो.

४. बलवान् खोंड ओरडूं लागतो. मग त्याला गाई अनुसरतात. देवांच्या स्थानीं देवी जातात, तसा हा सोम मेंढीच्या केंसाच्या पांढऱ्या स्वच्छ गाळण्यांतून पलीकडे जातो. आणि कवचाप्रमाणें स्वच्छ उदकांत मिसळून जातो.

५. दैवी, हरितवर्ण आणि शुद्ध केलेला सोम साध्या पण पांढऱ्या वस्त्रासारख्या दुधांत मिसळला जातो. तो सोम द्युलोकाच्या पृष्ठभागीं असणारें आणि द्यावापृथ्वीला प्रकाशित करणारें सूर्यतेज पापनाशक करो.

६. सूर्याच्या किरणांप्रमाणें प्रसरणशील, मदकर, शत्रूंना ठार करणारा, जिकडे तिकडे असलेला आणि तयार केलेला सोम पसरलेल्या वस्त्रावर चहूंकडे पसरतो. तो सोम इंद्राशिवाय दुसऱ्याला उद्देशून कधीं तयार केला जात नाहीं.

७. ऋत्विजांनीं स्तविलेला व मदकर सोम नदीचें पाणी सखल प्रदेशांत जातें त्याप्रमाणें इंद्राकडे जातो. हे सोमा, आमच्या घरीं माणसांना आणि जनावरांना तूं सुखकारक हो. तसेंच आम्हांला अन्न आणि लोक प्राप्त होवोत.

८. हे सोमा, तूं धन, सुवर्ण, घोडे, गाईबैल आणि चांगलें सामर्थ्य आम्हांला दे. तसेंच हे सोमा, स्वर्गांतले प्रमुख, तत्पर आणि अन्नकर्ते असे तुम्ही आमचे पितर व्हा.

९. हे स्वच्छ केलेले सोम रथ लुटीकरतां जातात तसे इंद्राकडे वेगानें गेले आहेत. पिळून काढलेले सोम स्वच्छ लोंकरींतून जातात. तेव्हां सोन्यासारखें ते आपलें रूप टाकून पाऊस पाडतात.

१०. हे सोमा, अत्यंत सुख देणारा, निर्दोष आणि शत्रूंना नष्ट करणारा तूं महान इंद्राकरतां उत्पन्न हो. तसेंच स्तुति करणाऱ्या मला तूं आल्हादकारक धन दे. हे द्यावापृथ्वीहो, देवांच्यासह तुम्ही आमचें संरक्षण करा.

सूक्त सत्तरावें.

ऋषिः—रेणु वैश्वामित्र; देवता–पवमान सोम; छंदः–१० त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती.

१. ह्या सोमाकरतां प्राचीन यज्ञांत एकवीस गाईपासून सत्यरूप दूध काढलें. जेव्हां हा यज्ञांनीं भरभराटीस आणला तेव्हां चार प्रकारचें सुंदर उदक या सोमाला शुद्ध करण्याकरतां आणलें.

२. तो पवमान सोम आपल्या चांगुलपणाकरतां उदकगत आपल्या कृत्यानें द्यावापृथ्वी मोकळया करीत आहे. जेव्हां देवाचें हविर्युक्त स्थान हा सोम जाणतो तेव्हां सोम आपल्या मोठेपणानें निर्मळ उदक व्यापून टाकतो.

३. ह्या सोमाला जाणणारे, अमर, अहिंस्य असे सोमाचे किरण आमच्या (स्थावर जंगमात्मक अशा) दोनहि जन्मांचें संरक्षण करोत. तो सोम ज्या ज्ञानांनीं बळ आणि अन्न उत्पन्न करतो आणि नंतर त्यामुळेंच सोमराजाला उद्देशून असलेलीं मननीय स्तोत्रें प्राप्त करतो.

४. चांगलीं कामें करणारा व दहा बोटांनीं शुद्ध केला जाणारा तो सोम उदकासह लोकांकरतां आकाशांत राहतो. लोकद्रष्टा सोम सुंदर उदकाच्या वृष्टीकरतां कर्मांचें संरक्षण करीत देव आणि मनुष्य या दोघांकडेहि लक्ष ठेवतो.

५. गाळून स्वच्छ केलेला तो सोम, आधारभूत अशा इंद्राच्या बलाकरतां द्यावापृथ्वीभर सर्वत्र फिरतो. कामपूरक इंद्र आपल्या सामर्थ्यानें व हत्यारानें आघात करणाऱ्याप्रमाणें दुःख देत आणि आव्हान करीत दुर्बुद्धि शत्रूंना ठार करतो.

६. तो पवमान सोम द्यावापृथ्वींकडे पुनः पुनः पहात गाईच्या वासरांप्रमाणें किंवा मरुतांच्या शब्दाप्रमाणें शब्द करीत जातो. जें उदक सर्व लोकांचें हित करणारें, मुख्य उदकाला जाणणारें आणि कर्तृत्ववान् आहे. तें सोमरूपी उदक स्तुति करण्यास कोणाला स्वीकारणार ?

७. भयंकर, कामपूरक, विचक्षण, बलेच्छेनें सुवर्णासारखीं दोन शिंगें तीक्ष्ण करणारा (दोन धारांनीं ओतला जाणारा) सोम शब्द करतो. नंतर आपल्या, व्यवस्थित केलेल्या स्थानीं बसतो. त्याला शुद्ध करणारें बैलाचें कांतडे आणि मेंढीचें कांतडे असतें.

८. आपलें पापरहित शरीर शुद्ध करणारा, तेजस्वी आणि सोन्यासारखा सोम उंच अशा लोंकरीच्या गाळण्यांत टाकला जातो. मित्र, वरुण आणि वायु यांना पुरेसा, पाणी, दूध आणि दहीं यांत तयार केलेला आणि मधुर सोम चांगलीं कर्में करणारांकडून केला जातो.

९. हे सोमा, बलवान् असा तूं देवांना पिण्याकरतां उत्पन्न हो. आणि इंद्राच्या हृदयंगम सोमपात्रांत शिर. आम्हांला त्रास होण्याच्या पूर्वीच संकटांतून पार

---

१ टीपः—वसतीवरी ३ आणि चवथें एकधना.

पाड. खरोखर रस्ता जाणणारा रस्ता विचारणाराला दिशा दाखवतो. (तसा तूं आम्हांला मार्ग दाखीव.)

१०. हाणलेला घोडा जसा युद्धांत जातो तसा तूं भांड्याकडे जा. हे सोमा, तूं इंद्राच्या पोटांकडे वाहूं लाग. नौकेनें नदीच्या पार जातात त्याप्रमाणें ज्ञाता असा तूं, आम्हांला संकटांच्या पार ने. हे सोमा, शूराप्रमाणें युद्ध करणारा तूं निंदक शत्रूंपासून आमचें संरक्षण कर.

सूक्त एकाहत्तरावें.

ऋषिः—ऋषभ वैश्वामित्र; देवता–पवमान सोम; छंदः—९ त्रिष्टुभ् अवशिष्ट जगती.

१. यज्ञांत दक्षिणा दिली जाते. बलवान् सोम पात्रांत जातो. जागृतिशील सोम द्रोही राक्षसांपासून रक्षण करतो. सुवर्णकान्ति सोम सर्वत्र असलेलें पाणी आकाशांत भरून टाकतो. द्यावापृथ्वींवर आच्छादन घालण्याकरतां आणि जगाला प्रकाशित करण्याकरतां सूर्य उत्पन्न करतो.

२. बलवान् सोम योध्याप्रमाणें गर्जत जातो. आणि आपलें असुरघातक बल प्रकट करतो. सोम म्हातारपण टाकतो. अन्नभूत सोम भांड्यांत जातो. आणि गाळण्यांत आपलें स्वरूप गमनशील करतो. (पूर्वी वनस्पति स्वरूपांत म्हाताऱ्यासारखा होता आतां रसस्वरूपांत तरुणासारखा झाला आहे).

३. दगडांनीं आणि बाहूंनीं पिळलेला सोम भांडयांत जातो. जो बलवानासारखा वागतो आणि स्तुतीनें आकाशाप्रमाणें सर्वत्र जातो, तो सोम आनंदित होतो, बसतो आणि स्तोत्रानें कार्य करतो. पाण्यांत शुद्ध होतो आणि यज्ञांत पूजिला जातो.

४. उत्कृष्ट अन्न भक्षण करणाऱ्या गाई आपल्या श्रेष्ठ कांसेंत असलेलें उत्कृष्ट दूध ज्या सोमांत मिसळतात, तो बलवान् मदकर सोम स्वर्गस्थ मेघांना वाढविणाऱ्या आणि वाडे फोडणाऱ्या इंद्राकडे जातो.

५. दोनहि हातांचीं दहा बोटें रथाप्रमाणें ह्या सोमाला प्रेरणा देतात. तो पात्रांत जातो. गाईचें दूध त्यांत मिसळतात. जेव्हां मननीय स्तोत्रें करणारा ह्याचें पात्र तयार करतो, तेव्हां तो सोम पात्रांत जातो. आणि गाईचें दूध त्यांत मिसळतात.

६. बहिरससाणा घरट्यांत शिरतो त्याप्रमाणें तेजस्वी सोम तयार केलेल्या सुवर्णमय पात्रांत जातो. ह्या प्रिय सोमाला यज्ञांत स्तोत्रानें स्तोते वार्णितात, नंतर यज्ञार्ह सोम घोड्याप्रमाणें वेगानें देवांकडे जातो.

७. तेजस्वी, बुद्धिमान् आणि जलमय सोम वरून खालीं पडतो. बलवान् व तीनहि सवनांत असणारा सोम स्तुतीला अनुसरून शब्द करूं लागतो. हजारों द्वारांनीं नेला जाणारा, (भांड्यांत) जाणारा (तांब्यांत) परत ओतला जाणारा सोम स्तोत्याप्रमाणें सकाळीं शोभत असतो.

८. ह्या सोमाचा वर्ण तेजस्वी असतो. जेथें संग्रामांत तो असतो तेथें तो शत्रूंना नष्ट करतो. उदकमिश्रित असा तो अन्नानें देवांकडे जातो. त्याची स्तुति केली जाते आणि गाई वगैरेंशीं मुख्यत्वेंकरून तो युक्त होतो.

९. खोंड गाईच्या कळपाकडे जात ओरडतो, त्याप्रमाणें स्तुति चालूं असतां हा सोम ओरडूं लागतो, नंतर सूर्याची कांति धारण करतो, दिव्य आणि सुंदर गमन करणारा सोम पृथ्वीवर नजर टाकतो आणि आपल्या कर्तबगारीनें सर्व लोकांवर छाप ठेवतो.

सूक्त बहात्तरावें.

ऋषिः—हरिमंत आंगिरस, देवता–पवमान सोम; छंदः—जगती.

१. सुवर्णासारख्या सोमाला ऋत्विज् शुद्ध करतात. गमनशील घोड्याप्रमाणें (तो इंद्राशीं) युक्त होतो. तांब्यांतला सोम दूध दह्यांत मिसळला जातो. सोम जेव्हां शब्द करतो तेव्हां त्याची स्तुति केली जाते. तेव्हां अनेक स्तोत्रें करणाऱ्या भक्ताला प्रिय असणारी किती तरी संपत्ति मिळते.

२. जेव्हां इंद्राच्या भांड्यांत सोम भरला जातो, जेव्हां चांगल्या हाताचे कर्मकर्ते अभिलषणीय मधुर सोम दहा बोटांनीं शुद्ध करतात, तेव्हां अनेक शहाणे (स्तोत्रें) म्हणूं लागतात.

३. सोम दुधादिकांत सारखा मिसळला जातो. तेव्हां सूर्यभागिनी उषेचा प्रिय शब्द सोम आपल्या आवाजानें झांकून टाकतो. स्तोता सोमाचें स्तोत्र पुरेसें म्हणतो तेव्हां तो सोम दोन हातांच्या बांधवभूत बोटांनीं (पिण्याकरतां) धरतात.

४. हे इंद्रा, लोकांनीं शुद्ध केलेला, दगडांनीं कुटलेला, देवांना प्रसन्न करणारा, गुरांचा स्वामी, प्राचीन,

योग्य वेळीं उत्पन्न झालेला, अनेक कृत्यें करावयास लावणारा, लोकांना यज्ञोपयोगी आणि शुद्ध असा सोम तुझ्याकरतां धारारूपानें वाहूं लागतो.

५. हे इंद्रा, मनुष्यांच्या हातांनीं प्रेरणा दिलेला, व धारेनें ओतलेला सोम, तुला बल प्राप्त व्हावें म्हणून येत आहे. तूं सोम पिऊन यज्ञ पुरे करतोस. तूं यज्ञांत शत्रूंना जिंकलेंस. झाडावर पक्षी बसतो त्याप्रमाणें सुवर्णरंगी सोम, सोम पिळण्याच्या दोन फळकटांवर बसतो.

६. दीर्घदृष्टि व कर्तृत्ववान् शहाणे लोक, शब्द करणाऱ्या, अक्षीण आणि कर्तृत्वशक्ति असणाऱ्या सोमाला काढतात. दुसऱ्यांदा प्रसूत होणाऱ्या गाई आणि स्तुति एकत्र होऊन यज्ञाच्या उत्पत्तिस्थानीं सोमाला मिळतात.

७. महान्, द्युलोकाचा आधार असणारा, पृथ्वीच्या नाभिस्थानीं ठेवलेला, नदींत पाण्याच्या लाटांत असणारा, इंद्रास वज्रासारखा, कामपूरक, विपुलधनयुक्त आणि मदकर असा सोम इंद्राच्या हृदयाला सुख देतो.

८. हे कर्तृत्ववान् सोमा, धनादिक देत पार्थिव लोकांला उद्देशून तूं उत्पन्न हो. तूं आमच्या घरांत असणाऱ्या धनांपासून आम्हांला वियुक्त करूं नकोस. आम्ही तुझ्या कृपेनें अनेक प्रकारचें पुष्कळ धन प्राप्त करूं.

९. हे पवमान सोमा, आम्हांला शेंकडों हजारोंनीं अश्व, पशु आणि सोनें यांनीं युक्त असें धन दे. हे सोमा, पुष्कळ धनयुक्त अन्न आम्हांकरतां निर्माण कर. आणि आमचीं स्तोत्रें ऐकण्याकरतां ये.

सूक्त त्र्याहत्तरावें.

ऋषिः—पवित्र आंगिरस; देवता—पवमान सोम; छंदः—जगती.

१. ओठांसारख्या अशा सोम पिळण्याच्या दोन फळ्यांतून पिळलेल्या सोमाचें थेंब पाझरतात. यज्ञाच्या मूलस्थानीं सोमरस वाहूं लागतो. बलवान् सोम तीनहि लोकांना चालूं करतो. नौकेप्रमाणें सोमपात्रें पुण्यवान् भक्ताला इष्टस्थलीं पोंचवितात.

२. पूज्य, थोर आणि एकत्र झालेले ऋत्विज् सोम काढतात. इच्छुक भक्त पाण्याच्या तरंगावर सोम उत्पन्न करतो. स्तोत्र करणारे प्रिय आणि मदकर सोमाच्या धारांनीं इंद्राचें शरीर पुष्ट करतात.

३. शोधक सामर्थ्य असलेल्या सोमाच्या कांड्या (पिळतांना) शब्द करतात. प्राचीन आणि किरणजनक सोम (आपला प्रकाश देण्याचा) नियम पाळतो. आच्छादक सोम महान् आकाशाला झांकून टाकतो. आणि कुशल लोकच सर्वाधार उदकांत सोम करूं शकतात.

४. हजारों धारा पडणाऱ्या आकाशांतून खालीं चंद्रकिरण पाऊस पाडतात. स्वर्गांतल्या उच्च स्थानीं असणारे, आपल्या टोकानें मधु उत्पन्न करणारे, आणि वेगवेगळे असणारे किरण हेरांप्रमाणें नेहेमीं जागे असतात. तसेंच संबद्ध (मित्रांना) पोषक आणि (शत्रूंना) बाधक असे किरण जागोजागीं असतात.

५. पितृभूत द्यावापृथ्वीपासून जे चंद्रकिरण उत्पन्न झाले, ते स्तुतीनें शोभत आणि कर्महीनांना नष्ट करीत, इंद्रानें द्वेष केलेल्या काळ्या रात्रीं आपल्या कृत्यानें पृथ्वीवरून व स्वर्गावरून घालवितात.

६. स्तुति व वेग यांचा रस्ता दाखविणारे जे चंद्रकिरण मोठ्या आकाशांतून निर्माण झाले, त्यांना आंधळे व बहिरे टाकतात. (बाकी डोळस व कानस टाकीत नाहींत.) पापी सत्याचा मार्गभूत असणाऱ्या याला तरून जात नाहींत.

७. जे कर्तृत्ववान् व बुद्धिमान् ऋत्विज् अनेक धारायुक्त व थोर सोमाचे ठिकाणीं असणाऱ्या वक्तृत्वशक्तीला वर्णितात, त्यांस गमनशील, अहिंस्य, स्वालंकृत, दर्शनीय आणि लोकद्रष्टे मरुत् वश होतात.

८. यज्ञरक्षक आणि सुकर्मा सोम नाशक होत नाहीं. सोम, अग्नि, वायु व सूर्य ह्या तीनहि पवित्र करणारांना आपल्यांत धारण करतो. ज्ञाता सोम सर्व त्रैलोक्याकडे पहातो. अभक्त म्हणूनच अप्रिय असें करणारांना खालीं घालून ठोकतो.

९. यज्ञाला विस्तारणारा व गाळण्यांत पसरलेला, सोम वरुणाच्या जिव्हाग्रावर (पाण्यांत) आपल्या कर्तृत्वानें बसतो. शहाणे लोकच त्याला प्राप्त करतात. जो (सोमप्राप्तीचें) कर्म करण्यास असमर्थ असतो, तो खालीं (नरकांत) पडतो.

सूक्त चौऱ्याहत्तरावें.

ऋषिः—कक्षीवत् दीर्घमस्; देवता—पवमान सोम; छंदः—८ त्रिष्टुभ्, अवशिष्ट जगती.

१. पाण्यांत उत्पन्न झालेला पवमान सोम लहान मुलाप्रमाणें शब्द करतो. जेव्हां तेजस्वी व बलवान् असणारा सोम स्वर्गाचा अनुभव घेऊं इच्छितो, तेव्हां दुधादिकांची वाढ करणाऱ्या उदकासह तो द्युलोकाकडे जातो. त्याकरतां विस्तृत घर आम्ही स्तुति करून मागतों.

२. द्युलोकाला स्थिर करणारा, पृथ्वीचा धारक, सर्वत्र पसरलेला आणि भांड्यांत भरलेला सोम चहूंकडून येतो. तो सोम ह्या महान् द्यावापृथ्वीला आपल्या सामर्थ्यानें युक्त करो. तोच संयुक्त द्यावापृथ्वीला धारण करता झाला. तोच स्तोत्यांना अन्न देवो.

३. गाईंना हितप्रद, जल वर्षाव करणारा, नेता आणि जाणारा जो इंद्र स्तुत्य आहे. यज्ञाकडे जाणाऱ्या त्या इंद्राला सुसंस्कृत सोममय, विपुल आणि मधुर रस पिण्याकरतां आहे. त्यामुळें त्याला पृथ्वीवर विस्तीर्ण मार्ग प्राप्त होतो.

४. बलयुक्त दूधतूप सूर्यापासून उत्पन्न केलें जातें, यज्ञाचें मुख्य जें उदक तेंहि तेथूनच उत्पन्न होतें. चांगले दाते भक्त त्या सोमालाच प्रसन्न करतात. सर्वरक्षक आणि नायक सोम वरील पाण्याचा वर्षाव खालीं करतो.

५. पाण्यांत मिसळलेला सोम शब्द करतो. देव संरक्षक शरीर माणसांना देतो. पृथ्वीच्या ठिकाणीं आपला गर्भ ठेवतो कीं ज्या गर्भानें आम्ही कुळदीपक पुत्र प्राप्त करतों.

६. ज्या चार कला तपोविद्यातक, स्वर्गाहून खालीं ठेवलेल्या आणि उदक उत्पन्न करीत सोम व उदक उत्पन्न करतात त्या उदक वर्षाव करणाऱ्या व स्वर्गांत असणाऱ्या, वेगवेगळ्या प्रजा पृथ्वीवर येवोत.

७. सोम जेव्हां स्वर्गाला जाऊं इच्छितो तेव्हां तेजस्वी पांढरें रूप धारण करतो. कामपूरक, बलवान् असा सोम पुष्कळ धन (स्तोत्यांना देणें) जाणतो. तोच स्तोत्यांच्या चांगल्या कृत्यांत शहाणपणानें जातो. आणि मेघांला आकाशांतून उदक वर्षाव करावयास लावतो.

८. नंतर पांढरा आणि पाण्यांनीं युक्त अशा तांब्याचा उपभोग घेणारा सोम युद्धांतल्या घोड्याप्रमाणें मर्यादा ओलांडून जातो. नंतर देवेच्छु भक्त त्यांचीं मनानें स्तुति करतात. नंतर वृद्ध अशा कक्षीवानाला अनेक जनावरें दिलीं गेलीं.

९. हे पवमान सोमा, उदक मिसळलेला तुझा रस लोंकरीच्या गाळण्याकडे विविध प्रकारें धावतो. हे अत्यंत मादक असणाऱ्या सोमा, तूं कर्तृत्ववान् लोकांकडून शुद्ध केला जात इंद्राला पिण्याकरतां मधुर रसयुक्त हो.

सूक्त पंचाहत्तरावें.

ऋषिः—कवि भार्गव; देवता—पवमान सोम; छंदः—जगती.

१. ज्या पाण्यांत सोम वाढतो त्या प्रिय उदकांतच शरीरपोषक सोम तयार केला जातो. तो बुद्धिवर्धक प्रसिद्ध सोम सूर्याच्या सर्वगामी विशाळ रथावर चढतो (अग्नींत टाकलेली आहुति सूर्याकडे जाते.).

२. वक्तृत्व शक्ति देणारा, सर्व पराक्रमांचा प्रवर्तक, घाला घालता न येणारा आणि यज्ञाच्या जिभेसारखा सोम आवडता व मधुररस उत्पन्न करीत आहे. आतां आईबापांनीं ठेवलेल्या नांवाखेरीज स्वर्गीय सोमपिठींत असतां तिसरें नांव प्राप्त करतो. (सोमयज्ञ करण्यानें नाक्षत्र व व्यवहारिक नांवाखेरीज ‘ सोमयाजी ’ असें तिसरें नांव यज्ञ करणाऱ्याला मिळतें).

३. लोकांनीं सोन्याच्या भांड्यांत पिळलेला तेजस्वी सोम तांब्यांत ओततांना वाजूं लागला. यज्ञ करणारे ऋत्विज् त्याचीच स्तुति करतात. तीनहि सवनांत असणारा सोम सकाळीं विशेष शोभत असतो.

४. स्तुति करून दगडांनीं कुटलेला, पोषक, मातृभूत द्यावापृथ्वींना तेजस्वी करणारा पवित्र सोम लोंकरीच्या गाळण्यांतून धांवत आहे. पाणी घालून पातळ केलेल्या मधुर सोमाची धारा प्रतिदिवशीं पाझरत असते.

५. हे सोमा, आमच्या कल्याणाकरतां वाहूं लाग. गाळलेला तूं दूधांदिकांत मिसळला जा. शत्रूंना ठार करण्याचें सामर्थ्य देणारा विपुल सोमरस आहे. त्यायोगें धन देण्याविषयीं तूं इंद्राला उत्साह दे.

सूक्त शहात्तरावें.

ऋषिः—कवि भार्गव; देवता—पवमान सोम; छंदः—जगती.

१. सर्वाधार, शोधनीय, देवांना बलप्रद, लोकांना स्तुत्य व काळसर सोमरस घोडेस्वारांनीं सोडलेल्या घोड्यांप्रमाणें सहज पाण्यांत आपलें सामर्थ्य प्रकट करतो.

२. सोम शूर माणसाप्रमाणें हातांत आयुधें धारण करतो. यज्ञाचा उपभोग घेत भक्तांची गाईंची इच्छा तृप्त करण्याकरतां रथयुक्त होतो. पराक्रमी अशा थोर

लोकांकडून काढला जाणारा आणि इंद्राचें सामर्थ्य वाढविणारा सोम दूध वगैरेंत मिसळला जातो.

३. हे सोमा, शुद्ध केला जाणारा आणि वाढविला जाणारा तूं आपल्या तरंगासह इंद्राच्या पोटांत शिर. वीज मेघांचें दोहन करते त्याप्रमाणें तूं द्यावापृथ्वींचें दोहन कर. तूं आपल्या कर्तृत्वानें विपुल अन्न निर्माण करतोस.

४. सर्वसत्ताधारी ऋषिश्रेष्ठ सोम सर्वद्रष्ट्या इंद्राचे पराक्रम इच्छितो. जो बुद्धिजनक आणि असामान्य सोम सूर्याच्या किरणानें शुद्ध केला जातो तो सोम वहात आहे.

५. हे सोमा, ओरडत कळपांत शिरणाऱ्या बैलाप्रमाणें, वरून आवाज करीत खालीं भांड्यांत पडत असतोस. ज्यायोगें आम्ही तुझ्या सहाय्यानें लढाईत जय पावूं त्या तऱ्हेनें तो अत्यंत मादक असणारा सोम इंद्राकरतां वाहूं लागो.

सूक्त सत्त्याहत्तरावें.

ऋषिः–कवि भार्गव; देवता—पवमान सोम; छंदः–जगती.

१. इंद्राचें वज्र आणि अत्यंत वीर्यवान् करणारा हा मधुर सोम भांड्यांत ओततांना सारखा शब्द करतो. दुधाळ गाईप्रमाणें शब्द करणाऱ्या, इच्छा पूर्ण करणाऱ्या आणि उदक वर्षाव करणाऱ्या सोमाच्या धारा वाहूं लागतात.

२. जो सोम श्येनानें स्वर्गावर जाऊन आणला तो हा प्राचीन सोम पिळीत आहेत. तोच हलवला जाणारा सोम बाण टाकणाऱ्या कृशानूच्या भीतीनें मधुर रस बाहेर टाकतो.

३. जो सोम सर्व स्तोत्रें आणि हवि उपभोगतो तो नटलेल्या स्त्रियांप्रमाणें सुंदर असणारा प्राचीन सोम संपत्तिमान् असणाऱ्या मला अन्न देण्याकरतां येवो.

४. जो अग्निशालेच्या अन्तर्भागांत असतो आणि पुष्कळ दूध देणाऱ्या गाईच्या कळपांत असतो, तो जाणणारा सोम धैर्यानें आमच्या शत्रूंना ठार करो.

५. कर्तृत्ववान्, कर्मकुशल असा हा उत्कृष्ट सोमरस धारारूपानें वरून खालीं ओतला जातो. संकटांत मित्रभूत, यज्ञीय, व घोड्यांच्या कळपांमध्यें खेंकाळत शिरणाऱ्या घोड्याप्रमाणें हा सोम तयार करीत आहेत.

सूक्त अठ्याहत्तरावें.

ऋषिः–कवि भार्गव; देवता—पवमान सोम; छंदः–जगती.

१. राजा सोम शब्द करीत पाझरूं लागतो. पाण्यांत मिसळला जाऊन स्तुति केला जातो. याचा चोथा मेढींच्या केंसाचें गाळणें आपल्यांत घेतें. शुद्ध झाल्यावर तो देवांच्याकडे जातो.

२. हे सोमा, तुला इंद्राकरतां भक्त तयार करतात. लोकांवर अनुग्रह करणाऱ्या व बुद्धिवर्धक अशा तुला लोक पाण्यांत मिसळतात. कारण, तुझ्याकडे जाण्याचें अनेक प्राचीन मार्ग आहेत. आणि आमच्या सैन्यांत काळसर हजारों घोडे आहेत.

३. समुद्रांतल्या कांहीं अप्सरा यज्ञांत बुद्धिवर्धक सोमाकडे येतात. घराला सुखकारक असणाऱ्या सोमाचा आस्वाद घेतात आणि त्यापासून सुख इच्छितात.

४. ज्या मदकर, मधुर, तांबूस आणि सुखकारक सोमरसाला पिण्याकरतां देवांनीं उत्पन्न केलें, तो गाईबैल, घोडे, रथ, सुवर्ण, स्वर्ग, उदक आणि हजारांनीं संपत्ति जिंकणारा सोम तयार होत आहे.

५. हे सोमा, ही सर्व टिकाऊ संपत्ति आम्हांला देणारा तूं तयार हो. जो शत्रु आमच्याजवळ किंवा दूर असेल त्याला तूं ठार कर. तसेंच आम्हांला मोठालीं गायरानें आणि निर्भयता दे.

सूक्त एकूणऐंशीवें.

ऋषिः–कवि भार्गव; देवता–पवमान सोम; छंदः–जगती.

१. आम्हां बृहद्दिवांच्या यज्ञांत स्वतः पिळलेले सुवर्णकांति सोम वाहूं लागोत. आमच्यापैकीं अन्न न देणारांचा नाश होवो. नास्तिकांचा नाश होवो. आमचे पराक्रम विजयी होवोत.

२. ज्यामुळें आम्ही घोड्यांना शत्रूंवर नेतो तो मदकारक सोम किंवा संपत्ति आम्हांकडे धांवत येवो. कोणाहि मर्त्याच्या त्रासाला दूर करणारे आम्ही सर्व बाजूंनीं संपत्ति प्राप्त करूं.

३. तो सोम स्वतःच्या शत्रूंवर चाल करून जातो त्याप्रमाणें दुसऱ्याच्या शत्रूंनाहि ठार करतो. हे सोमा, निर्जल प्रदेशांत तहान लागते त्याप्रमाणें जे जे शत्रू चालून येतात त्यांना तूं ठार करतोस.

४. हे सोमा, जो तुझा भाग हवि देण्याकरतां ग्रहण केला जातो तो तुझा उत्कृष्ट भाग द्युलोकांत

असतो, तो पृथ्वीच्या पर्वतासारखा उंच प्रदेशीं टाकला असतां उगवतो, बैलाच्या कातड्यावर दगड त्याला कुटतात आणि शहाणे लोक हातांनीं पाण्यांत त्याला काढतात.

५. हे सोमा, अशाप्रकारें सामर्थ्यवान् आणि सौंदर्ययुक्त तुला प्रमुख लोक तयार करतात. हे पवमान सोमा, आमच्या निंदकांचा तूं नाश कर. तुझा बलदायक व मदकर असणारा आवडता रस उत्पन्न होवो.

सूक्त ऐंशीवें.

ऋषिः—वसु भारद्वाज; देवता-पवमान सोम; छंदः-जगती.

१. लोकद्रष्ट्या सोमाच्या धारा वहातात. स्वर्गावर असणाऱ्या देवांना लोक यज्ञ करून बोलावतात. बृहस्पतीच्या स्तुतीनें तो विशेष शोभूं लागतो. समुद्र पृथ्वीला व्यापून असतो त्याप्रमाणें यज्ञांनीं सर्व व्यापलें आहे.

२. हे अन्नयुक्त सोमा, ज्या तुझी, गाई ओरडून अपेक्षा करतात तो तेजस्वी तूं आपल्या सुवर्णमय स्थानीं चढ. हे सोमा, हविर्युक्त भक्तांचें आयुष्य, कीर्ति वाढविणारा, मादक व बलवान् असणारा तूं वाहूं लागतोस.

३. अत्यंत मादक, पाण्यांत मिसळलेला आणि मंगलप्रद सोम इंद्राच्या पोटांत जातो. तो सोम सर्व जगांत प्रसिद्ध आहे. नाचत चालणाऱ्या घोड्याप्रमाणें बलवान् व सोन्यासारखा सोम वाहूं लागतो.

४. भक्तांचे हात हजारों धारांनीं उत्पन्न होणाऱ्या त्या मादक सोमाला देवांकरतां तयार करतात. हे सोमा, लोकांनीं दगडांनीं कुटलेला आणि पिळून काढलेला व हजारांनीं संपत्ति जिंकणारा तूं देवांकडे वाहूं लाग.

५. हे सोमा, त्या मधुर आणि बलवान् अशा तुला लोक दगडांनीं कुटून पाण्यांत तयार करतात. हे सोमा, इंद्र आणि देवांच्या कृपेंतले लोक यांच्याकडे पाण्यांच्या लाटांप्रमाणें तूं वहात जातोस.

सूक्त एक्यांयशीवें.

ऋषिः—वसु भारद्वाज; देवता-पवमान सोम; छंदः-५ त्रिष्टुभ् बाकी जगती.

१. जेव्हां गाईच्या दह्यांत मिसळलेला सोम धन देण्याकरतां इंद्राला प्रसन्न करतो, तेव्हां पवमान सोमाचे सुंदर तरंग इंद्राच्या पोटांत जातात.

२. रथवाहक, चलाख व बलवान् घोड्याप्रमाणें सोमरस तांब्यांत जात असतो. तो सोम देवांचा येथील व स्वर्गावरील असे दोनहि जन्म जाणीत असतो.

३. हे सोमा, वाहणारा तूं आम्हांला धन दे. हे सोमा, धनवान् असणारा तूं आम्हांला पुष्कळ धन दे. हे अन्नदात्या सोमा, सेवा करणाऱ्या मला ज्ञानासह सुख दे. आमचें धन आमच्यापासून दूर करूं नकोस.

४. विपुल धन देणारे व एकत्र झालेले पूषन्, मित्र, वरुण, बृहस्पति, मरुत्, वायु, अश्विनी, त्वष्टृ, सवितृ आणि सुंदर सरस्वती आम्हांकडे येवोत.

५. सर्वव्यापक द्यावापृथ्वी, अर्यमन्, अदिति, विधातृ, प्रशंसनीय भग, प्रशस्त अन्तरिक्ष आणि सर्व देव, पवमान सोमाचा उपभोग घेवोत.

सूक्त ब्यांयशीवें.

ऋषिः—वसु भारद्वाज; देवता-पवमान सोम; छंदः-५ त्रिष्टुभ्, बाकी जगती.

१. तेजस्वी, बलवान् आणि सोन्यासारखा सोम काढला. राजाप्रमाणें अवलोकनीय असणारा सोम पाण्यांत मिसळतांना शब्द करतो नंतर तो शुद्ध होण्याकरतां गाळण्यांत जातो आणि बहिरससाण्याप्रमाणें तो आपल्या उदकयुक्त स्थानाकडे जातो.

२. हे सोमा, दूरदृष्टि असा तूं यज्ञांकरतां गाळण्यांत जातोस. नंतर घोड्याप्रमाणें शुद्ध झालेला तूं लढाईला जातोस. हे सोमा, आमचीं पातकें दूर करून आम्हांला सुख दे. तुपांत मिसळलेला तूं झगा घातल्यासारखा दिसतोस.

३. ज्या थोर पर्णयुक्त सोमाचा जनक पर्जन्य आहे तो सोम यज्ञांत दगडावर (कुटण्याकरतां ठेवलेला) असतो. तसेंट बोटें, उदक आणि गाईंचें दूधवगैरे त्याकडे जात असतें. यज्ञांत दगडांनीं कुटल्यावर तो त्यांत मिसळतो.

४. बायको नवऱ्याला देते त्याप्रमाणें सोम सुख देतो. हे पर्जन्यपुत्र सोमा, मी करतों आहे ती स्तुति तूं ऐक. आम्हांला दीर्घायुष्य देण्याकरतां तूं आमच्या स्तुतीनें प्रसन्न हो. हे सोमा, स्तुत्य असा तूं लढाईंत जागृत असावेंस.

५. हे सोमा, जसा जुन्या भक्तांना तूं शेंकडों हजारोंनीं संपत्ति देत होतास तशी आतां नवीन भक्तांकरतांहि देण्यास वाहूं लाग. तुझ्यांत उदक मिसळलें जात आहे.

सूक्त त्र्यांयशीवें.

ऋषिः—पवित्र आंगिरस; देवता–पवमान सोम; छंदः—जगती.

१. हे ब्रह्मणस्पते सोमा, तुझा शोधकपणा सर्वव्यापक आहे. शुद्ध करण्यास समर्थ असणारा तूं पिणाऱ्याच्या अंगांत सर्वत्र संचार करतोस. तुझा पवित्र रस व्रतादि न केलेला अपवित्र मनुष्य प्राप्त करीत नाहीं. याग करणारे शुद्ध लोकच सोमरस प्राप्त करतात.

२. शत्रूंना त्रासदायक असा सोमाचा शोधक भाग द्युलोकांत पसरलेला आहे. ह्या सोमाचे भाग पराक्रम करीत सर्वत्र पसरले आहेत. ह्याचा रस शुद्ध करणाराचें रक्षण करतो. नंतर द्युलोकांत देवांकडे बुद्धिपूर्वक जातो.

३. सूर्य प्रथम प्रकाशतो. पाऊस पाडून अन्न उत्पन्न करूं इच्छिणारा तो जगाचें पोषण करतो. याच्या कौशल्यानें अनेक कुशल निर्माण होतात. नंतर लोकद्रष्ट्या अंगिरसादि पितरांचा गर्भ उत्पन्न केला जातो.

४. आदित्य अशाप्रकारें द्युलोकाचें रक्षण करतो. आश्चर्यकारक असा तो देवांना जन्म देतो. पाशाधिपति सोम पाशांनीं शत्रूंना ताब्यांत घेतो. सोमाचा मधुर रस पुण्यवानांनाच प्यावयास मिळतो.

५. हे उदकयुक्त सोमा, उदकांत मिसळलेला तूं यज्ञगृहांत यज्ञाकरतां जातोस: तसेंच पवित्ररूपी रथांत आरूढ होऊन राजा सोम यज्ञरूपी संग्रामांत जातो. तसेंच तूं हजारों आयुधांच्या सहाय्यानें विपुल अन्न जिंकतोस.

सूक्त चवऱ्यांयशीवें.

ऋषिः—प्रजापति वाचःपुत्र; देवता—पवमान सोम; छंदः—जगती.

१. हे सोमा, देवांना उत्साह देणारा, सूक्ष्मदृष्टि आणि उदक देणारा तूं इंद्र, वरुण आणि वायु यांच्याकरतां वाहूं लाग. तसेंच तूं आम्हांला अविनाशी धन दे. विस्तीर्ण पृथ्वीवर देवसंघांना बोलावणारा तुझा शब्द सुरूं होऊं दे.

२. जो सोमदेव सर्व जगाला उत्पन्न करता झाला आणि सर्व जगाचें रक्षण करता झाला, तोच सोम उषःकालच्या सूर्याप्रमाणें लोकांच्या कल्याणाकरतां दुःखरहित आणि सुखयुक्त करीत यज्ञाचा उपभोग घेतो.

३. सुख देण्याकरतां देवांच्याकडे जाऊं इच्छिणारा जो सोम किरणद्वारां ओषधींत ठेवला जातो, तो सोम (शत्रूंची) संपत्ति मिळवीत व देवाधिपति इंद्राला मदयुक्त करीत आपल्या तेजस्वी धारेनें वाहूं लागतो.

४. सकाळींच सुरू झालेलीं प्रतिभाशालीं स्तोत्रें म्हणण्यास उत्साह देणारा आणि हजारांनीं संपत्ति जिंकणारा सोम तयार करीत आहेत. हा सोम वाऱ्यानें समुद्राला भरती आणतो आणि इंद्राला आवडेल अशा रीतीनें भांड्यांत बसतो.

५. जो बुद्धि देतो त्या भरती आणणाऱ्या स्वर्गवेत्त्या सोमाला गाई आपल्या दुधांत मिसळतात. धन जिंकणारा, रसरूप, ज्ञानी, कर्तृत्ववान् आणि सर्वभक्षक सोम आपल्या गुणानें शुद्ध करतो.

सूक्त पंच्यांयशीवें.

ऋषिः—वेन भृगुगोत्र; देवता—पवमान सोम; छंदः–११–१२ त्रिष्टुभ्; अवशिष्ट जगती.

१. हे सोमा, पिळलेला तूं वाहूं लाग. रोग राक्षसांसह दूर होवो. दुटप्पी लोक तुझ्या रसानें आनंदित न होवोत. (त्यांना तुझा रस न मिळो). येथें तुझा रस धन देणारा होवो.

२. हे पवमान सोमा, तूं आम्हांला युद्धांत उत्साह दे. तूं देवांमध्यें सामर्थ्यवान् आहेस. तसेंच तूं आवडता आणि मदकर आहेस. तूं आमचे शत्रु ठार कर. स्तुति करणाऱ्या आम्हांकडे तूं ये. हे इंद्रा, सोम पी, आणि आमच्या शत्रूंला ठार कर.

३. हे इंदो, मादक आणि टिकाऊ असणारा तूं उत्पन्न होतोस. तूंच इंद्राचें उत्कृष्ट अन्न आहेस. ह्या जगाच्या धन्याची सर्व शहाणे स्तुति करतात. ह्याच्याकडे जातात.

४. अनेक प्रकारें तयार केलेला, अनेक धारांनीं उत्पन्न होणारा, आश्चर्यकारक सोम इंद्राकरतां हवासा वाटणारा मधुर सोमरस उत्पन्न करतो. प्रान्त जिंकीत तूं आमच्याकडे ये. हे रसरशीत सोमा, आमचे मार्ग विस्तीर्ण कर.

५. हे सोमा, खळखळ वाजत तूं भांड्यांमध्यें दुधांत मिसळला जातोस. लोंकरीच्या गाळण्यांत जातोस. स्वच्छ केलेल्या घोड्याप्रमाणें सुंदर दिसणारा तूं इंद्राच्या पोटांत जा.

६. हे सोमा, मधुर असणारा तूं देवांच्याकरतां वाहूं लाग. शुभनामधेय इंद्राकरतां उत्पन्न हो. मित्र, वरुण, वायु आणि बृहस्पति यांच्याकरतां टिकाऊ आणि अत्यंत मधुर असणारा तूं उत्पन्न हो.

७. घोड्याप्रमाणें दहा बोटांनीं भांड्यांत लोक तुला धुतात. भक्तांतील स्तोते स्तोत्रें म्हणूं लागतात. पवमान सोम उत्कृष्ट स्तुतीनें उत्पन्न होऊं लागतो. मदकर असणारा सोम इंद्राच्या पोटांत जातो.

८. हे सोमा, तयार केला जाणारा तूं, सामर्थ्य, विस्तृत गायरान, विस्तृत आणि उत्कृष्ट घर आम्हांला दे. आमच्यावर शत्रूची सत्ता न चालो. हे सोमा, तुझ्या सहाय्यानें आम्ही विपुल धन जिंकूं.

९. बलिष्ठ आणि बुद्धिप्रद सोम द्युलोकावर रहातो, आणि स्वर्गावरील नक्षत्रें तेजस्वी करतो. आवाज होत राजा सोम पवित्रांतून गाळला जातो. स्वर्गांतलें अमृत लोकद्रष्टा सोम उत्पन्न करतो.

१०. यज्ञाच्या प्रमुखस्थानीं मधुर बोलणारे वेन जलदीनें सोम पिळीत असतात. पाण्यांत वृद्धिंगत होणारा, व भाड्यांत पाण्याच्या तरंगावर थेंबाथेंबानें पडणारा सोम गाळण्यांत घातला जात आहे.

११. द्युलोकांत असणाऱ्या आणि खालीं सुपर्ण सोमाला वेनांचीं स्तोत्रें स्तवित आहेत. शब्द करणाऱ्या, सुवर्णकांति, पक्ष्यासारखा, यज्ञगृहांत असणाऱ्या व शिशुसारख्या सोमाला स्तोते स्तवित असतात.

१२. आदित्याचीं सर्व रूपें अवलोकन करीत स्वर्गांत आदित्यावर उत्कृष्ट सोम रहातो. आदित्य तेजस्वी सोमामुळें प्रकाशतो. आणि निर्मळ असा तो मातृभूत द्यावापृथ्वींनाहि प्रकाशित करतो.

सूक्त श्यांयशीवें.

ऋषिः—१–१० आकृष्टमाष, ११–२० सिकतानीवावरी, २१–३० पृश्निअजा, ३१-४० वरील तीनही गण; ४१–४५ अत्रि, ४६–४८ गृत्समद; देवता–पवमान सोम; छंदः—गायत्री.

१. हे पवमान सोमा, तुझे मनोजव व मदकर प्रवाह घोड्यांप्रमाणें सहज धांवत जातात. गाळण्यांत घातलेले अत्यंत मादक व पर्णयुक्त मधुर सोम तांब्यांत भरले जातात.

२. मदकर सोमाचा रस घोड्यांप्रमाणें वेगवेगळा तयार होत आहे. मधुर आणि रसरशीत सोम, गाय वासराकडे दूध देण्याकरतां जाते, त्याप्रमाणें इंद्राकडे जात आहे.

३. हांकारलेल्या घोड्यांप्रमाणें तूं युद्धांत जा. सर्ववेत्ता सोम द्युलोकाहून मेघाला उत्पन्न करणाऱ्या सोमाच्या कोशांत जावो. सर्वाधार इंद्राकरतां शुद्ध केला जाणारा बलवान् सोम उंच टांगलेल्या लोंकरीच्या गाळण्यांत जावो.

४. हे ऋषींनीं उपभोगलेल्या पवमान सोमा, जे ऋषि तुला शुद्ध करतात ते कर्ते मोठाल्या धारा भांड्यांत ओततात. त्या सोमाच्या मोठाल्या मनोवेगानें वाहणाऱ्या दूधयुक्त धारा भांड्यांत सोडतात.

५. हे सर्वद्रष्ट्या सोमा, तुझें व्यापक तजे सर्व देवांना प्रकाशित करतें. हे सोमा, प्रसरणशील असणारा तूं आधारभूत रसानें वाहूं लागतोस. सर्व जगाचा ईश्वर असणारा तूं शोभतोस.

६. पिळल्या जाणाऱ्या घट्ट सोमाचे बुद्धिवर्धक तुषार चहूंकडून उडूं लागतात. जेव्हां गाळण्यांत सुवर्णकांति सोम स्वच्छ केला जातो तेव्हां तो आपल्या स्वतःच्या भांड्यांत जाऊन बसतो.

७. यज्ञाचा ध्वज आणि यज्ञाला चांगुलपणा आणणारा सोम वाहूं लागतो आणि तो देवांच्या स्थानाकडे जातो. आणि हजार धारांनीं भांड्यांत बसतो. त्याकरतां हा वाजत गाळण्याकडे जात असतो.

८. समुद्राला नद्या मिळतात त्याप्रमाणें राजा सोम पाण्यांत मिसळल्यावर पाण्याच्या तरंगांशीं एकरूप होतो. द्युलोकाचा हा थोर आधार असणारा पवमान सोम यज्ञांत गाळण्यामध्यें आरूढ होतो.

९. द्युलोकाच्या उच्चस्थानीं लोकांना स्तुति करावयास लावीतच जणूं कांहीं ओरडत असतो. ह्या सोमाच्या आधारावर द्यावापृथ्वी स्थिर राहिली आहे. इंद्राची मैत्री लक्षांत घेऊनच सोम तयार होतो आणि तयार झाल्यावर तांब्यामध्यें बसतो.

१०. देवांचें रक्षण करणारा, सर्वांचा उत्पादक, संपत्तिमान् आणि यज्ञप्रकाशक सोम आवडता व मधुर रस

उत्पन्न करतो. अत्यंत मादक आणि इंद्रियपोषक असणारा सोमरस द्यावापृथ्वींतील गुप्तधन (स्तोत्यांना) देतो.

११. बलवान्, स्वर्गावर सत्ता चालवणारा, बुद्धिवर्धक आणि अनेक धारांनीं उत्पन्न होणारा सोम शब्द करीत भांड्यांत जातो. पाझरणाऱ्या गाळण्यांनीं शुद्ध केला जाणारा, बलवान् व सुवर्णकांति सोम यज्ञांत असतो.

१२. जो पाण्याच्या तरंगावर असतो, जो वाक्शक्तीचा प्रेरक आहे, जो दुधांत मिसळला जातो, जो पराक्रमाच्या लढाईत सर्वांच्या पुढें असतो, तो सुंदर आयुधांनीं युक्त असणारा बलवान् सोम सोम काढणारा कडून तयार केला जात आहे.

१३. स्तोत्रें केला जाणारा हा पवमान सोम पक्ष्याप्रमाणें तरंगानें गाळण्यांत जाऊन बसतो. हे श्रेष्ठ इंद्रा, तुझ्या पराक्रमानें द्यावापृथ्वींत शुद्ध सोम उत्पन्न होतो.

१४. स्वर्गस्पर्शी अंगरखा घालणारा, यज्ञार्ह आणि आकाश (उदकानें) भरून टाकणारा सोम, जगांतील सर्व उदक उत्पन्न करीत त्या उदकानें सर्व व्यापून टाकतो. त्या उदक उत्पन्न करणाऱ्या इंद्राची सर्व लोक उपासना करतात.

१५. ज्या सोमानें ह्या इंद्राचें शरीर प्रथम व्यापलें ज्याचें स्थान परमोच्च आहे आणि ज्यामुळें इंद्र सर्व युद्धांत जातो तो सोम इंद्राच्या लोकांना विपुल सुख देतो.

१६. सोम इंद्राच्या पोटांत जातो. मित्रभूत सोम इंद्राच्या वचनाची अवहेलना करीत नाहीं. तरुण तरुणीकडे घाईनें जातो त्याप्रमाणें सोम शेकडों मार्गांनीं भांड्यांत जातो.

१७. हे सोमा, तुझें ध्यान करणारे, उत्साहवर्धक स्तोत्रें म्हणणारे आणि प्रशंसनीय स्तोते यज्ञगृहांत तुझ्याकडे येतात. समर्थ स्तोते सोमाची स्तुति करतात. आणि गाई सोमांत दूध मिसळतात.

१८. हे तेजस्वी सोमा, जे आम्हांला दिवसांतून तीन वेळां प्रसिद्ध, बळकट आणि गुणवान् पुत्र सहज देईल असें तूं आम्हांला संग्रह केलेलें विपुल अक्षय अन्न दे.

१९. स्तोत्यांची इच्छा पूर्ण करणारा, बुद्धिवर्धक, दिवस, सकाळ व सूर्य यांना वाढविणारा आणि उदक उत्पन्न करणारा सोम इंद्राच्या पोटांत जाण्याकरतां स्तोत्रें म्हणत शहाण्या लोकांकडून तयार केला जातो.

२०. मुरलेला, बुद्धिवर्धक सोम लोकांनीं पिळला असतां शब्द करीत भांड्यांत जातो. इंद्र व वायु यांच्याशीं सख्य करण्याकरतां त्रैलोक्यांत मधुर उदक निर्माण करीत उत्पन्न होतो.

२१. हा तयार केलेला सोम उषांना प्रकाशित करतो. हा लोककर्ता सोम नद्यांना वहावयास लावतो. हा एकवीस गाईंचें मिश्रणाकरतां दोहन करणारा पोटांत जाण्याकरतां पाझरत आहे.

२२. हे तेजस्वी सोमा, गाळण्यांत उत्पन्न केला जाणारा तूं दिव्य स्थानीं वाहूं लाग. शब्द करीत आहुति दिल्यावर इंद्राच्या पोटांत जात, तूं आकाशांत सूर्याला उत्पन्न केलेंस.

२३. इंद्राच्या पोटांत शिरणारा तूं दगडांनीं कुटल्यावर गाळण्यांतून तयार होतोस. हे बुद्धिवर्धक सोमा, तूं लोकद्रष्टा आहेस. हे सोमा, तूं अंगिरसाकरतां मेघ मोकळे केलेस.

२४. हे सोमा, शोधक अशा तुला बुद्धिमान् व सहाय्येच्छु स्तोते, स्तवीत असतात. अनेक प्रकारच्या स्तोत्रांनीं वर्णिलेल्या तुला स्वर्गावरून सुपर्ण श्येनानें आणलें.

२५. गाळण्यांत पाण्यानें शुद्ध केल्या जाणाऱ्या हिरवट सोमांत सात नद्या येतात. बुद्धिवर्धक अशा तुला शहाणे लोक आकाशांतील पाण्यांत तयार करतात.

२६. यजमानाकरतां सर्व चांगले मार्ग निर्माण करीत तयार होणारा सोम सर्व शत्रूंचें अतिक्रमण करतो. गाईच्या दुधाचा झगा घालणारा रमणीय सोमरस घोड्याप्रमाणें क्रीडा करीत गाळण्यांत जातो.

२७. दुधांत मिसळलेल्या सोमाच्या उदकेच्छु वेगवेगळ्या शेंकडों धारा इंद्राकडे जातात. द्युलोकांत राहणाऱ्या व दुधांत मिसळलेल्या सोमाला बोटें शुद्ध करतात.

२८. स्वर्गीय वीर्य अशा तुझ्यापासून सर्व प्रजा निर्माण झाल्या. तूं सर्व जगाचा ईश्वर आहेस. हे पवमान सोमा, हें सर्व जग तुझ्या ताब्यांत आहे. हे इंदो, तूंच तेजाचा मुख्य आधार आहेस.

२९. हे बुद्धिमन्ता सोमा, तूं उदकमय आणि सर्ववेत्ता आहेस. तुझ्याच स्वाधीन पांच दिशा आहेत. तूंच द्यावापृथ्वीला धारण करतोस. हे पवमान सोमा, सुर्य तुझें तेज वृद्धिंगत करतो.

३०. हे पवमान सोमा, रसांच्या आधारभूत गाळ-

ण्यांत तुला शुद्ध केलें जातें. मुख्य ऋत्विज् तुझा स्वीकार करतात. सर्व जग तुझ्याकडे वळलेलें आहे.

३१. हिरवट, बलिष्ठ, आणि स्तुत्य सोम पाण्यांत शब्द करीत गाळण्यांत जात असतो. यज्ञेच्छु ध्याते, सोमाची स्तुति करतात. शब्द करणाऱ्या सोमाची स्तोते लहान मुलांप्रमाणें जोपासना करतात.

३२. तिनदां पीळ दिलेला दोरा कसा होतो हें जाणून त्यानें सूर्याच्या किरणांनीं आपणास वेष्टून घेतलें आहे. सत्याच्या अगदीं नवीन नियमानुसार जांवयाप्रमाणें तो योग्य स्थानीं जातो.

३३. उदकांचा राजा व द्युलोकाचा स्वामी, सोम खऱ्या सृष्टिनियमानुसार शब्द करीत जातो. शब्द करीत व गुण संपादन करीत हजार धारांनीं वाहूं लागणारा सोम पात्रांत घातला जातो.

३४. हे पवमान सोमा, तूं विपुल उदकांत मिसळला जातोस. सूर्यासारखा आश्चर्यकारक असणारा तूं लोंकरीच्या गाळण्यांत जातोस. हातांनीं शुद्ध केलेला आणि लोकांनीं दगडांनीं कुटलेला तूं युद्धाकरतां आणि धन संपादन करण्याकरतां जातोस.

३५. हे पवमान सोमा, तूं अन्न आणि बल देतोस. श्येन पक्ष्याप्रमाणें तूं भांड्यांत बसतोस. द्युलोकांचा खांबासारखा आधार आणि इंद्राला मद उत्पन्न करणारा सोमरस पिळून तयार केला आहे.

३६. तो सोम सर्व जगाचा राजा व्हावा म्हणून नूतन, ज्ञानी, जयशाली, बुद्धिमान्, उदकामध्यें असणारा, उदकाधार आणि लोकद्रष्ट्या मुलासारख्या सोमाच्या भोंवतीं सात आया आणि सात बहिणी (नदी रूपानें) उभ्या राहतात.

३७. हे तेजस्वी सोमा, सुवर्णकांति तूं, चलाख घोडे रथाला जुंपून सर्व जगांत फिरत असतोस. ते घोडे मधुर व आकर्षक जल उत्पन्न करोत. हे सोमा, तुझ्या सेवेंत सर्व जग असो.

३८. हे सोमा, तूं सर्व जगांतील लोकांचें अवलोकन करणारा आहेस. हे बलिष्ठ पवमान सोमा, तूं उदकाकडे धांव घेतोस. तूं आम्हांकरतां गाईबैल व सुवर्ण वगैरेंनीं युक्त धन उत्पन्न कर. आम्ही संपत्तिमान् होऊन जगण्याला समर्थ होऊं.

३९. हे सोमा, गाईबैल, धन व सुवर्ण यांनीं युक्त आणि जगाला प्रजोत्पत्तीचें सामर्थ्य देणारा तूं उत्पन्न हो. हे सोमा, तूं सामर्थ्यवान् आहेस, सर्ववेत्ता आहेस. शहाणे लोक स्तुति करून तुझी उपासना करतात.

४०. मधुर सोमरस उत्कृष्ट स्तोत्रें उत्पन्न करतो. पाण्यांतें मिसळल्यावर तो थोर भांड्यांत शिरतो. पवित्ररूपी रथावर आरूढ झालेला सोमराजा युद्धाला जातो. आणि हजारों आयुधांच्या सहाय्यानें मोठी कीर्ति संपादन करतो.

४१. रात्रंदिवस तो सर्व प्रेरक सोम संतति आणि पुष्टि देणारी उत्कृष्ट स्तुति करण्यास उत्तेजन देतो. हे सोमा, संतति देणारें अन्न आणि घरभर संपत्ति इंद्रानें तुला प्याल्यानंतर तूं आमच्याकरतां माग.

४२. सकाळीं प्राण्यांना जागें करून हिरवट व मदकर असणारा सोम प्राण्यांना आपल्या स्तोत्रांनीं उत्साह देतो. पृथ्वीवरचें आणि स्वर्गीय असें धन दोनहि भक्तांना देत जगांत तो फिरत असतो.

४३. सोमाला लोक दुधादिकांत मिसळून तयार करतात आणि पराक्रम करण्यास उत्तेजन देणाऱ्या त्याचा देव आस्वाद घेतात. उदक पडण्याच्या उंच ठिकाणावरून पडणाऱ्या लोकद्रष्ट्या सोमाला सुवर्णयुक्त लोक पाण्यांत घालतात.

४४. हे ऋत्विजहो, तुम्ही बुद्धिदायक पवमान सोमाची स्तुति करा. तो बुद्धिवर्धक सोम मोठ्या पावसासारखा अन्नाचा वर्षाव करतो. सापाप्रमाणें जुनें झालेलें कांतडें (कांत) टाकावयास लावतो. इच्छा पूर्ण करणारा आणि हरितवर्ण सोम घोड्याप्रमाणें नाचत भांड्याकडे जातो.

४५. जो दिवसाचें प्रमाण उत्पन्न करतो आणि पाण्यांत असतो तो पाण्यांत शुद्ध केलेला सर्वांचा पुढारी राजा सोम स्तविला जात आहे. सोन्यासारखा, दर्शनीय, पाण्यांत राहणारा, पाण्यानें डबडबलेला, तेजस्वी रथ (भांडें) असलेला आणि घराला हितकारक असणारा सोम धन देण्याकरतां वहात आहे.

४६. द्युलोकाचा खांबासारखा आधार असणारा सोम उत्पन्न केला जात आहे. तीन पात्रांत ठेवला जाणारा सोम पाण्यांत मिसळला जातो. जेव्हां स्तोते त्याची स्तुति करतात तेव्हां खळखळणाऱ्या सोमाचा ते आस्वाद घेतात.

४७. शुद्ध केल्या जाणाऱ्या सोमाच्या वहाणाऱ्या धारा गाळण्याचे सुक्ष्म केश उल्लंघून जातात. हे सोमा,

जो तूं दोन भांड्यांत दुधांत मिसळला जातोस तेव्हां पिळलेला तूं भांड्यांत बसतोस.

४८. हे सोमा, कर्मज्ञ आणि स्तुत्य असणारा तूं आमच्या यज्ञाकरतां वाहूं लाग. गाळण्यांत तूं आपला आवडता मधुर रस उत्पन्न कर. हे इंदो, तूं सर्व भक्षक राक्षसांना ठार कर. उत्कृष्ट संततीनें युक्त असणारे आम्ही यज्ञांत विपुल धन मागतों.

सूक्त सत्त्यांयशीवें.

ऋषिः—उशनस् काव्य; देवता—पवमान सोम; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे सोमा, तूं लवकर उत्पन्न हो. आणि भांड्यांत बस. शुद्ध केला जाणारा तूं अन्न उत्पन्न कर. बलवान् घोड्याप्रमाणें शुद्ध करणारे भक्त तुला बोटानें यज्ञांत नेतात.

२. राक्षसांचा नाश करणारा, त्रासापासून रक्षण करणारा, देवांचा पिता, उत्पादक, बलवान्, स्वर्गाचा खांब, पृथ्वीचा आधार असणारा व उत्कृष्ट आयुधें असलेला सोम वहात आहे.

३. अतींद्रिय द्रष्टा, बुद्धिवर्धक, पुढारी, मनुष्यांना श्रेष्ठ वाटणारा, बुद्धिमान् असा उशना नांवाचा ऋषि आपल्या काव्यानें गाईंचेंहि मुळांतलें मूळ असणारें उदक प्राप्त करतो.

४. हे इंद्रा, बलवान् असणाऱ्या तुझ्याकरतां मधुर व बलवान् असणाऱ्या तुला गाळण्यांत टाकतात. शंभरांनीं, हजारांनीं विपुल संपत्ति देणारा आणि बलवान् असणारा तूं यज्ञांत असतोस.

५. हे सोम विपुल दूध वगैरेंना उद्देशून—अन्नेच्छु व लढाईंत जाणाऱ्या घोड्याप्रमाणें—गाळण्यांतून शुद्ध करीत अन्न व अमरपणा देण्याकरतां तयार केले जातात.

६. अनेकांनीं स्तविलेला आणि शुद्ध केला जाणारा सोम लोकांच्याकरतां अनेक प्रकारचें अन्न निर्माण करतो. आतां हे श्येनानें आणलेल्या सोमा, तूं अन्न आण. धन देणारा तूं अन्नरस उत्पन्न कर.

७. हा पिळल्यावर वाहणारा सोम भरधांव घोड्याप्रमाणें गाळण्याकडे धांवतो. शिंगाला धार लावणाऱ्या रेड्याप्रमाणें किंवा पुष्कळ गाई इच्छिणाऱ्या शूराप्रमाणें बलवान् असणारा तूं धांवत असतोस.

८. ही सोमधारा उच्च स्थानावरून वाहिली. आणि पर्वतांत ऊर्व नांवाच्या गूढ स्थानीं असणाऱ्या गाई तिनें प्राप्त केल्या. मेघांतून निघालेल्या आकाशांतील विद्युल्लतेप्रमाणें ही सोमधारा हे इंद्रा, तुझ्याकरतां वहात आहे.

९. हे सोमा, शुद्ध केलेला तूं इंद्रासह एका रथांत बसून गाईंच्या समूहाकडे जातोस. हे तात्काल धन देणाऱ्या व पराक्रमी सोमा, स्तुति केला जाणारा तूं आम्हांला पुष्कळ टिकाऊ अन्न दे.

सूक्त अठ्ठ्यांशीवें.

ऋषिः—उशनस् काव्य; देवता—पवमान सोम; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, हा सोम मी तुझ्याकरतां पिळला आहे. तुझ्याकरतांच हा वहात आहे. तूं ज्याला उत्पन्न केलेंस आणि तूं ज्याचा मद येण्याकरतां आणि सहाय्याकरतां उपभोग करतोस, तो सोमरस तूं पी.

२. विपुल संपत्ति आम्हांला देण्याकरतां तूं हा सोम पुष्कळ भार सहन करणाऱ्या रथाप्रमाणें उपयोगाला आणला आहेस. आतां सर्व जग मोठ्या लढाईकरतां आमच्यावर चालून येवो.

३. हे सोमा, तूं नियुत् नांवाचे घोडे जोडलेल्या वायुप्रमाणें इष्ट स्थलीं नेणारा आहेस. अश्विनीप्रमाणें स्तुति केली असतां सुख देणारा, द्रविणोदस्प्रमाणें (धनदात्याप्रमाणें) सर्व पूज्य, व पूषन्प्रमाणें बुद्धीला प्रेरणा देणारा आहेस.

४. हे सोमा, तूं इंद्राप्रमाणें मोठालीं कृत्यें करणारा वृत्रहन्ता आणि नगरभेत्ता आहेस. पैद्वाप्रमाणें अहींना ठार करणारा आणि सर्व शत्रूंचा संहार करणारा आहेस.

५. अरण्यांत वणवा लागला असतां अग्नि ज्याप्रमाणें पराक्रम करतो त्याप्रमाणें पाण्यांत सोम सहज पराक्रम करतो. युद्ध करणारा शूर ज्याप्रमाणें मोठा शब्द करतो त्याप्रमाणें पवमान सोम शब्द करीत रस बाहेर टाकीत असतो.

६. स्वर्गीय मेघांतून पडलेल्या उदकाप्रमाणें हे सोम लोंकरीच्या गाळण्यांत जातात. नद्या समुद्राकडे जशा सहज जातात त्याप्रमाणें पिळलेला सोम भांड्यांत जातो.

७. हे सोमा, बलवान् असणारा तूं मरुतांच्या सामर्थ्याप्रमाणें वाहूं लाग. मरुत् जसें अनिन्द्य असतात तसा तूं ऐस. उदकाप्रमाणें पवमान सोम आम्हांला समृद्धि देवो. अनेक स्वरूपाचा तूं सैन्याचा पराभव करणाऱ्या इंद्राप्रमाणें पूज्य आहेस.

८. हे सोमा, संकटें निवारण करणाऱ्या तुझीं कर्में मी सतत करतों. हे सोमा, तुझें तेज फार गंभीर आहे. प्रिय मित्रा (सूर्या) प्रमाणें तूं शुद्ध आहेस. आणि अर्यमन्प्रमाणें बलवान् आहेस.

सूक्त एकूणनव्वदावें.

ऋषिः—उशनस् काव्य; देवता—पवमान सोम; छंदः—त्रिष्टुभ्.

१. यज्ञमार्गांनीं वाहून नेणारा सोमरस वहात आहे. आकाशांतून पडणाऱ्या पावसाप्रमाणें पवमान सोम सर्व व्यापून टाकतो. तो सोम हजारो धारांनीं पृथ्वीवर पाण्यांत असतो त्याप्रमाणें आम्हांला प्राप्त होवो.

२. हा सोमराजा नदीमध्यें पाण्यांत राहतो. आणि अत्यंत सरळ असणाऱ्या यज्ञाच्या नौकेंत आरूढ होतो. तो श्येनानें आणलेला व अल्प प्रमाणांत असणारा सोम पाण्यांत वाढतो. अन्तरिक्षांत उत्पन्न झालेल्या त्याला यज्ञकर्ता पिळून काढतो.

३. भक्त सिंहासारख्या, उदकप्रेरक, हरितवर्ण आणि देवांचें संरक्षण करणाऱ्या सोमाला प्राप्त करतात. युद्धांतील प्रमुख योद्धा असणारा सोम गाई (कुठें आहेत असें) विचारणाऱ्याचें आपल्या शक्तीनें सर्व बाजूंनीं संरक्षण करतो.

४. मधुर पृष्ठभाग असलेला, भयानक, पातळ व दर्शनीय अशा घोड्यासारखा सोम अनेक चाकीं यज्ञरूपी रथाला जोडतात, अशा सोमाला बहिणीसारखीं बोटें शुद्ध करतात. बोटें त्याला सारखीं बलयुक्त करतात.

५. एकाच गाळण्यांत टाकलेले चारहि प्रकारचें उदक ह्या सोमांत मिसळलें जातें. तें त्यांत गेल्यावर अन्नयुक्त होतें आणि तीं अनेक प्रकारचीं उदकें सर्वांना मार्गें टाकतात.

६. हा सोम स्वर्गाचा खांब आणि पृथ्वीचा आधार आहे. सर्व लोक ह्या सोमाच्या हातामध्यें आहेत. सोम स्तुति करणारांना घोडेस्वाराप्रमाणें होवो. मधुर सोमरस इंद्राकरतां तयार होत आहे.

७. हे सोमा, यज्ञांत तूं देवांना येथें प्राप्त होतोस. तूं वृत्रहन्त्या इंद्राकरतां वाहूं लाग. मूल्यवान् विपुल संपत्ति तूं आम्हांस दे. आम्ही श्रेष्ठ पराक्रमी होऊं.

सूक्त नव्वदावें.

ऋषिः—वसिष्ठ मैत्रावरुणि; देवता—पवमान सोम; छंदः—त्रिष्टुभ्.

१. प्रेरक आणि द्यावापृथ्वीचा उत्पादक, अन्न देणारा, आयुधें तीक्ष्ण करीत, इंद्राकडे जात व सर्व प्रकारची संपत्ति हातांत घेऊन सोम जात असतो.

२. तीन ठिकाणीं असणाऱ्या, बलवान् व अन्नदात्या सोमाची स्तोत्यांची वाणी स्तुति करते. वरुण पाण्यांत असतो त्याप्रमाणें पाण्यांत झाकलेला रत्नदाता सोम स्तोत्यांना धन देतो.

३. हे सोमा शूरांचे संघ असलेला, सर्व वीरांचा अग्रणी, सहनशील, विजय मिळवणारा, धन देणारा, तीक्ष्णायुध, कुशल, धनुर्धारी, युद्धांत असहनीय आणि युद्धांत पराभव करणारा तूं वाहूं लाग.

४. हे सोमा, धोपट मार्गानें जाणारा, सर्वांना अभय देणारा आणि द्यावापृथ्वींना एकत्र करणारा तूं वाहूं लाग. उदक, उषा, आदित्य व किरण यांचा उपभोग घेत तूं आम्हांला विपुल अन्न देण्याकरतां शब्द करीत असतोस.

५. हे पवमान सोमा, तूं वरुण, मित्र, इंद्र, विष्णु, मरुतांचा संघ, देव आणि घोर इंद्र यांना मद्युक्त करून उत्तेजित कर.

६. हे सोमा, अशा प्रकारें स्तविलेला व राजाप्रमाणें पराक्रमी असणारा तूं आपल्या सामर्थ्यानें सर्व पातकें नष्ट करीत वाहूं लाग. हे तेजस्वी सोमा, तूं आमचीं सुंदर स्तोत्रें ऐकून आम्हांला अन्न दे. तूं आमचें कल्याण करून आमचें संरक्षण कर.

सूक्त एक्याण्णवावें.

ऋषिः—कश्यप मारीच; देवता—पवमान सोम; छंदः—त्रिष्टुभ्.

१. रथाच्या शर्यतीप्रमाणें मनांत भरणारा बुद्धिवर्धक व खळखळणारा सोम उत्पन्न केला जात आहे. दहा बहिणी यज्ञगृहांत उंच गाळण्यांत सोम उत्पन्न करतात.

२. जो सोम कर्म करणाऱ्या लोकांकडून दुधांत मिसळून पाण्यांत स्वच्छ होत यज्ञांत जातो. तो स्तोत्यांकडून उत्पन्न केला जाणारा सोम देवांना पिण्याकरतां यज्ञांत जात आहे.

३. जलवर्षाव करणारा आणि गर्जना करणारा पवमान सोम गाईच्या स्वच्छ दुधांत जातो. स्तुति केला जाणारा स्तोत्रज्ञ आणि उत्साहवर्धक सोम अनेक अखंड मार्गांनीं गाळण्याच्या सूक्ष्म छिद्रांतून वाहूं लागतो.

४. हे सोमा, तूं राक्षसांचीं बळकट नगरें फोडून टाक. हे तेजस्वी पवमान सोमा, त्यांचें अन्न व धन लुटून आण. जे वरून येतात, जे जवळ आहेत आणि जे दुरून येतात त्यांच्या पुढाऱ्याला तूं तीक्ष्ण हत्यारानें तोडून टाक.

५. हे सर्वमान्य सोमा, अत्यंत जुन्यासारखा असणारा तूं नवीन पण चांगली स्तुति करणाऱ्या मला उत्कर्षाचे मार्ग दाखीव. हे बहुस्तुत व अनेक प्रकारचे शब्द करणाऱ्या सोमा, जे दु:सह आणि हिंसक असे तुझे उत्कृष्ट अंश असतील ते यज्ञांत आम्ही प्राप्त करावेत.

६. हे सोमा, असा शुद्ध केलेला तूं त्रैलोक्यांतील सर्व संपत्ति आणि पुष्कळ मुलेंबाळें आम्हांला दे. आमच्या ठिकाणांना सुरक्षित कर. नक्षत्रें अनुकूल कर आणि आम्हांला सूर्य पुष्कळ दिवस पाहूं दे. (दीर्घायुषी कर).

सूक्त ब्याण्णवावें.

ऋषिः—कश्यप मारीच; देवता–पवमान सोम; छंदः—त्रिष्टुभ्.

१. रथाप्रमाणें हरितवर्ण पवमान सोम प्राप्तीकरतां गाळण्यांतून शुद्ध केला जातो. पिळलेला सोम इंद्राची स्तुति प्राप्त करतो. तसेंच तो अन्नद्वारा देवांची सेवा करतो.

२. लोकद्रष्टा बुद्धिमान् सोम पाण्यांत घातल्यावर गाळण्यांतून वाहूं लागतो. यज्ञांतल्या होत्याप्रमाणें भांड्यांत बसलेल्या सोमाला बुद्धिमान् सप्तर्षि स्तवितात.

३. बुद्धिमान्, मार्गज्ञ, सर्व देवांकडे जाणारा आणि शुद्ध केलेला सोम नेहमीं भांड्यांत जातो आणि सर्व प्रकारच्या काव्यांत रमून जातो आणि गंभीर असणारा सोम सर्व लोकांना अनुसरतो.

४. हे पवमान सोमा, तुझे ते सर्व तेहेतीस देव द्युलोकांत राहतात. अशा तुला दहा बोटें उंच टांगलेल्या लोंकरीच्या गाळण्यांत पाणी घालून शुद्ध करतात. व मोठाल्या सात नद्याहि स्वच्छ करतात.

५. जेथें सर्व स्तोते (स्तुति करण्याकरतां) एकत्र होतात तें पवमान सोमाचें अविनाशीं स्थान आमचें असो. ज्याच्या तेजानें दिवसाला प्रकाशित केलें त्यानेंच राजा मनूचें संरक्षण केलें आणि त्यानेंच दस्यूंना पळावयास लावलें.

६. राजाप्रमाणें सभागृहांत येणारा सत्यकर्मा व देवांना बोलावणारा सोम घराप्रमाणें पशूंनीं भरभराटीस आलेल्या स्थानीं जातो. अरण्यांतल्या म्हशीप्रमाणें पाण्यांत असलेला व शुद्ध केलेला सोम भांड्याकडे जातो.

सूक्त त्र्याण्णवावें.

ऋषिः—नोधस् गौतम; देवता–पवमान सोम; छंदः–त्रिष्टुभ्.

१. सोमाला प्रेरणा देणारीं दहा बोटें सारखीं सोमाला शुद्ध करतात. सोन्यासारखा सोम सूर्याच्या मुली म्हणजे सर्व दिशांना वाहूं लागतो. धांवणाऱ्या घोड्याप्रमाणें वेगानें भांडें व्यापून टाकतो.

२. इच्छुक, बलवान् आणि बहुमान्य सोम पाण्यांत आईनें मूल घ्यावें त्याप्रमाणें असतो. तरुण स्त्रीकडे जातो त्याप्रमाणें स्वस्थानीं जाणारा सोम भांड्यांतील दुधांत मिसळला जातो.

३. गाईची कांस सोम वाढवितो. बुद्धिवर्धक सोम धारांनीं एकत्र येतो. स्वच्छ वस्त्राचें पांघरूण घालावें त्याप्रमाणें गाई आपल्या दुधानें भांड्यांत भरलेल्या सोमाला झांकून टाकतात.

४. हे पवमान सोमा, जेव्हां तूं गर्जना करीत असशील तेव्हां तूं आम्हांला देवांबरोबर अश्वयुक्त धन पाठीव. लोक रथयुक्त असावेस अशी इच्छा करणारी, तूं तुझी विविध प्रकारानें विचार करणारी बुद्धि धन देण्याकरतां आम्हांकडे वळूं दे.

५. हे सोमा, शुद्ध केलेला तूं लवकर आम्हांला नोकर–चाकर ठेवतां येण्यासारखी संपत्ति दे. तसेंच सर्वांना आल्हादक पाणी दे. हे सोमा, तुझ्या स्तोत्याला आयुष्य दे. तो औषधी सोम आमच्या येथें सकाळीं लवकर येवो.

सूक्त चव्ऱ्याण्णवावें.

ऋषिः—कण्व आंगिरस; देवता–पवमान सोम; छंदः—त्रिष्टुभ्.

१. घोडयावर जसे दागिने किंवा सूर्याचे जसे किरण तशीं हीं बोटें सोमाविषयीं स्पर्धा करूं लागतात. सुंदर गौळवाड्यांत गौळी पशूंची जोपासना करण्याकरतां जातो त्याप्रमाणें पाण्यांत मिसळलेला सोम स्तुतीची इच्छा करीत भांड्यांत वाहूं लागतो.

२. सोम उदकाधार आकाशांत दोन्ही बाजूंला प्रकाश पाडीत मधून जात असतो. त्या सर्वज्ञ सोमाकरतां जग विस्तृत होतें. गोठ्यांत पान्हा आलेल्या गाई जशा हंबरूं लागतात, त्याप्रमाणें कर्मप्रेरक स्तोत्रें यज्ञांत म्हटलीं जातात.

३. शत्रूंचा पराभव करणारा रथ जसा (विजय मिळविण्यारतां) जगभर फिरतो त्याप्रमाणें बुद्धिवर्धक सोमाची जेव्हां स्तुति केली तेव्हां देवांची संपत्ति मनुष्यांना देऊं इच्छिणारा सोम संपत्तीच्या वृद्धिकरतां यज्ञांत स्तुति केला जातो.

४. तो संपत्तीकरतां उत्पन्न झाला, संपत्तिकरतांच बाहेर पडला. स्तोत्यांना तो संपत्ति आणि अन्न देतो. संपत्ति प्राप्त झालेले स्तोते अमर होतात. सोमानें होणारें युद्ध खरें युद्ध होय.

५. हे सोमा, तूं आम्हांला अन्न आणि बल दे. गाईबैल, घोडे आणि उत्कृष्ट प्रकाश (सूर्य) उत्पन्न कर. आणि देवांना उल्हासित कर. हे पवमान सोमा, तुला सर्व शत्रु सहज पराभव करतां येतात. म्हणून तूं सर्व शत्रूंना ठार कर.

सूक्त पंचाणववें

ऋषिः—प्रस्कण्व कण्वपुत्र; देवता—पवमान सोम; छंदः—त्रिष्टुभ्.

१. सुवर्णकांति सोम तयार करतांना आणि गाळून भांड्यांत भरतांना पुनः पुनः शब्द करतो. लोकांनीं तयार केल्यावर तो दुधादिकांत मिसळला जातो. म्हणून हविसह ह्या सोमाची स्तुति करा.

२. नाव वल्हविणाऱ्याप्रमाणें हरित-वर्ण सोम सत्याच्या मार्गावरील भाषा बोलतो. सोमदेव देवांचीं गुप्त शरीरें यज्ञांत स्तोत्याकरतां प्रगट करतो.

३. पाण्याच्या तरंगाप्रमाणें उत्साहानें सुरू झालेलीं आमचीं स्तोत्रें सोमाला प्रेरणा देतात. सोमाचा सत्कार करणारीं स्तोत्रें सोमाकडे जातात. आणि त्यांत एकरूप होतात. एकमेकांत प्रेमानें मिसळून असतात.

४. गोऱ्हा स्वच्छ करावा त्याप्रमाणें दगडावर ठेवलेलें सोमाचें रसरसीत देठ पिळून काढतात. त्या मनोहर सोमाचीं स्तोत्रें म्हटलीं जातात. तीन पात्रांत ठेवलेला सोम शत्रुनिवारक इंद्राला स्वर्गांत प्राप्त करतो.

५. हे इंदो, होत्याला उपवक्ता देतो त्याप्रमाणें स्तुतीला उत्तेजन देणारा आणि तयार केला जाणारा सोम उदारपणा धारण करो. इंद्र आणि तूं जेव्हां यज्ञांत असतां तेव्हां आम्ही भाग्यशाली होऊं.

सूक्त शहाणववें.

ऋषिः—प्रतर्दन दिवोदासपुत्र; देवता–पवमान सोम; छंदः—त्रिष्टुभ्.

१. गाईंची इच्छा करणारा शूर सेनापति सोम रथाच्या अग्रभागीं जातो. त्यामुळें सोमाची सेना आनंदित होते. मित्रांची इंद्रस्तुति कल्याणप्रद करणारा सोम आल्हादक वस्त्रें धारण करतो.

२. ऋत्विज् सुवर्णकांति सोम पिळतात. नंतर लोंबलेल्या व पसरट असल्यामुळें सारखें न दिसणाऱ्या रथांत (गाळण्यांत) बसतो. इंद्राचा ज्ञाता मित्र सोम रथांत बसून स्तुति करणाऱ्या भक्ताकडे जातो.

३. हे सोमदेवा, इंद्रानें प्याला जाणारा तूं आमच्या देवांनीं विस्तारेलल्या यज्ञांत पिण्याकरतां उत्पन्न हो. द्यावापृथ्वीवर पाण्याचा वर्षाव करणारा तूं वरून खालीं येत शुद्ध केला जाणारा आम्हांला धन दे.

४. पराभव होऊं नये, ठार मारलें जाऊं नये, कल्याण व्हावें, म्हणून इंद्रादिकांना स्तुत्य असणाऱ्या यज्ञाकरतां तूं उत्पन्न हो. हे सर्व स्तोते तुझ्या सहाय्याची इच्छा करतात. मीहि तुझ्या सहाय्याची इच्छा करतों.

५. स्तुति करावयास लावणारा, स्वर्ग व पृथ्वी निर्माण करणारा, अग्नि, सूर्य, इंद्र व विष्णु यांना उत्पन्न करणारा सोम वहात आहे.

६. देवांमध्यें ब्रह्मा, बुद्धिमानांमध्यें मार्गदर्शक, ब्राह्मणांमध्यें ऋषि, प्राण्यांमध्यें तरुण बैल, पक्ष्यांमध्यें बहिरससाणा हत्यारांमध्यें कुऱ्हाड असा हा सोम खळखळत गाळण्यांत जातो.

७. नदी वहात असतां ज्याप्रमाणें खळखळत लाटा उत्पन्न करते त्याप्रमाणें पवमान सोम हृदयंगम स्तोत्रांना प्रेरणा देतो. गोरूपी धन जाणणारा बलवान् सोम गुप्त शक्तींचें अवलोकन करीत संरक्षक सामर्थ्य प्राप्त करतो.

८. मदकर, युद्धांत उत्साह देणारा, अनिवारणीय, हजारों धारांनीं उत्पन्न होणारा सोम शत्रूंच्या संपत्तीवर चालून जावो. हे पवमान सोमा, बुद्धिवर्धक असणारा तूं शब्द करीत सोमाच्या कांड्यांतून इंद्राकरतां रस उत्पन्न कर.

९. बलवान् घोडा युद्धांत जातो त्याप्रमाणें हजारों धारांनीं उत्पन्न होणारा, बलवान्, रमणीय, प्रिय व देवांना हवासा वाटणारा सोम इंद्राला मद उत्पन्न व्हावा म्हणून भांड्यांत जातो.

१०. पक्व, धनप्रापक, पाण्यांत उत्पन्न होणारा आणि शुद्ध केला जाणारा, दगडांनीं पिळलेला, शत्रूंपासून संरक्षण करणारा व जगाचा राजा सोम यज्ञाकरतां गाळीत असतां भक्तांना चांगला मार्ग दाखवतो.

११. हे पवमान सोमा, आमच्या थोर प्राचीन पितरांनीं तुझ्या सहाय्यांनींच कर्में केलीं. तूं शत्रूवर चालून जाऊन त्यांना ठार कर. धनवान् असणारा तूं आम्हांला पुत्र आणि घोडे दे.

१२. हे सोमा, मनूला धन व अन्न देण्याकरतां व शत्रूंना ठार करण्याकरतां हविर्युक्त होऊन आलास त्याप्रमाणें तूं धन देण्याकरतां ये. आम्ही दिल्यावर इंद्राकडे जा आणि आयुधें प्रकट कर.

१३. हे सोमा, मधुर, यज्ञांत असणारा व पाण्यांत मिसळून उंच लोकरीच्या गाळण्यांत घातलेला तूं तयार हो. इंद्रानें प्यालेला, अत्यंत मादक आणि मोहक सोम उदकयुक्त पात्रांत बसो.

१४. हे सोमा,(यज्ञांत भक्तांना हजारांनीं संपत्ति देणारा तूं) आकाशांतून शेकडों धारांनीं पाऊस उत्पन्न कर. पाण्यांत व दुधांत मिसळलेला तूं आम्हांला आयुष्य देत भांड्यांत जा.

१५. जो सोम बलवान् घोड्याप्रमाणें शत्रूंना ठार करतो तो सोम स्तोत्रें म्हणून तयार केला जात आहे. सोम गाईच्या दुधासारखा स्वच्छ आहे. तो विस्तीर्ण रस्त्यासारखा आश्रयणीय आणि घोडयासारखा वाहून नेणारा आहे.

१६. हे सोमा, उत्तम आयुधें असलेला व सोम काढणाराकडून तयार केला जाणारा तूं तुझें गूढ व रमणीय रसात्मक स्वरूप प्रकट कर. घोड्याप्रमाणें अन्नेच्छा असलेल्या आम्हांला अन्न दे. हे सोमदेवा, आम्हांला आयुष्य आणि पशु दे.

१७. लहान मुलांप्रमाणें उत्पन्न झालेल्या गोजिरवाण्या सोमाला भक्त शुद्ध करतात. मरुत् आपल्या गणानें वाहणाऱ्या सोमाला सुशोभित करतात. बुद्धिवर्धक सोम शब्द करीत गाळण्यांतून गाळला जातो.

१८. व्यापक मनाचा, सर्वद्रष्टा, सूर्याला उत्पन्न करणारा, अनेक प्रकारें स्तविला जाणारा आणि शहाण्यांना मार्गदर्शक असणारा सोम स्वर्गावर जाऊन इंद्राला उत्साहीत करतो.

१९. भांड्यांत भरलेला, स्तुत्य, समर्थ, हलणारा, गाई देणारा, पातळ, आयुधें धारण करणारा व अन्तराळांत असणारा हा थोर सोम चवथ्या लोकांत असतो.

२०. नखरेबाज तरुणाप्रमाणें आपलें शरीर स्वच्छ करणारा, धनप्राप्तीकरतां घोड्याप्रमाणें जलद जाणारा, ओरडत बैल गाईच्या कळपांत जातो त्याप्रमाणें सोम पाटावरवंट्यावर जातो.

२१. हे इंदो, थोरांनीं गाळला जाणारा तूं उत्पन्न हो. शब्द करीत गाळण्यांत जा. पाटावरवंट्यावर क्रीडा करणारा तूं भांड्यांत शीर. मदकर असणाऱ्या तुझा रस इंद्राला आनंदित करो.

२२. ह्या सोमाचे मोठमोठे प्रवाह उत्पन्न झाले आहेत. दुधांत मिसळलेला सोम भांड्यांत भरला आहे. मित्राच्या बायकोकडे वाईट बुद्धीनें जाणाऱ्या माणसाप्रमाणें गाणें गात, बुद्धिवर्धक व शब्द करणारा सोम इंद्राकडे जात आहे.

२३. हे पवमान सोमा, जार प्रिय स्त्रीकडे जातो त्याप्रमाणें स्तुति केलेला सोम शत्रूंचा नाश करीत शत्रूवर चालून जातो. उडणारा पक्षी जसा झाडावर बसतो तसा गाळलेला सोम भांड्यांत बसतो.

२४. हे सोमा, स्त्री ज्याप्रमाणें मुलांना दूध पान्हवते त्याप्रमाणें शुद्ध केलेल्या सोमाच्या सुंदर धारा उत्पन्न होतात. हरितवर्ण आणि बहुस्तुत सोम पाण्यांत शब्द करीत भक्तांच्या भांड्यांत असतो.

सूक्त सत्त्याण्णवावें.

ऋषि:—१ ते ३ वसिष्ठ मैत्रावरुण, ४ ते ६ इंद्रप्रमति, ७ ते ९ वृषगण, १० ते १२ मन्यु, १३ ते १५ उपमन्यु, १६ ते १८ व्याघ्रपात्, १९ ते २१ शक्ति, २२ ते २४ कर्णश्रुत, २५ ते २७ मृळीक, २८ ते ३० वसुक्र, हे सर्व वसिष्ठ गोत्रज आहेत, ३१ ते ४४ पराशर शक्तिपुत्र, ४५ ते ४८ कुत्स आंगिरस; देवता—पवमान सोम; छंदः—त्रिष्टुभ्.

१. प्रेरक अशा सुवर्णयुक्त हातानें स्वच्छ केलेला तेजस्वी सोमरस देवांना मिळतो.. देवांना बोलावणारा स्तोता नव्या पशुयुक्त घरांत जातो, त्याप्रमाणें शब्द करणारा व ओतलेला सोम गाळण्यांतून जातो.

२. शुभ आणि संग्राम योग्य तेज धारण करणारा, स्तोत्रें ऐकणारा, ज्ञाता, महान्, सर्वद्रष्टा व जागरणशील सोम पिळला असतां भांड्यांत शिरो.

३. अत्यंत यशस्वी, पार्थिव आणि प्रिय सोम टांगलेल्या लोंकरीच्या गाळण्यांतून स्वच्छ केला जातो. शुद्ध केला जाणारा तूं गळत असतांना शब्द कर. सोमा, तूं आमचें कल्याण करून नेहमीं आमचें संरक्षण कर.

४. हे स्तोतेहो, सोमाची स्तुति करा. आम्ही देवांची पूजा करतों. पुष्कळ धन प्राप्त व्हावें म्हणून सोमाला पिळा. मधुर सोम लोंकरीच्या गाळण्यांतून गळतो. आणि देवांकडे जाऊं इच्छिणारा सोम भांड्यांत बसतो.

५. देवांची मैत्री करणारा, अनेक धारांनीं वहाणारा सोम (देवांना) मद उत्पन्न करण्याकरतां वहात आहे. लोकांनीं स्तविलेला सोम पूर्वीच्या स्थानीं स्वर्गाला जातो. आणि भक्ताला ऐश्वर्य देत इंद्राकडे जातो.

६. हे सोमा, सुवर्णकांति व शुद्ध केलेला असा तूं स्तुति करणाऱ्या आम्हांला धन देण्याकरतां ये. आणि मदकर असा तुझा रस युद्धाला उत्साह प्राप्त व्हावा म्हणून इंद्राकडे जावो. देवांसह एका रथांत बसून आम्हांला अन्न देण्याकरतां ये. तुम्ही आमचें कल्याण करून सदोदित आमचें संरक्षण करा.

७. बृहस्पतिप्रमाणें स्तोत्रें म्हणणारा स्तोता देवांचे जन्म विविध प्रकारें वर्णितो. मोठालीं कृत्यें करणारा, महापराक्रमी, शोधक आणि चांगल्या दिवशीं पिळला जाणारा सोम शब्द करीत आपल्या स्थानीं जातो.

८. शत्रूंनीं आघात केले जाणारे वृषगण शत्रूंवर जोरानें आघात करणाऱ्या सोमाला उद्देशून त्रस्त होत्साते (सोम पिण्याकरतां) घरांत जातात. मित्रभूत असें ते स्तुत्य आणि दुर्धर सोमाला उद्देशून वाण नांवाचें वाद्य एकदम वाजवूं लागतात.

९. तो सोम (अतिशय वेगानें) चालूं लागतो. सहज जाणाऱ्या त्या अत्यंत स्तुत्य असणाऱ्या सोमाची गति दुसरे कोणीहि अनुसरूं शकत नाहींत. अत्यंत तेजस्वी असा सोम अनेक प्रकारें प्रकाशतो. तो सोम दिवसा काळसर आणि रात्रीं प्रकाशयुक्त दिसतो.

१०. बलवान् व वाहणारा सोम इंद्राला बल देणारा रस देत आनंदाकरतां उत्पन्न होतो. राक्षसांचा नाश करतो. उत्कृष्ट धन देत बलस्वामी सोम शत्रूंना त्रास देतो.

११. दगडांनीं पिळलेला सोम मदकारक धारेनें देवांना पोंचत गाळण्यातून खालीं पडतो. इंद्राशीं सख्य असलेला तेजस्वी आणि मदकर सोम मदाकरतां उत्पन्न होतो.

१२. प्रिय आणि आच्छादक असें तेज योग्य कालीं धारण करणारा आपल्या व रसानें देवांना तृप्त करणारा सोम दहा बोटांनीं लोंकरीच्या गाळण्यांतून गाळला जातो.

१३. बैल गाईकडे जसा शब्द करीत जातो त्याप्रमाणें तांबूस सोम पृथ्वी आणि द्युलोक याकडे शब्द करीत जातो. त्याचा आवाज इंद्राच्या आवाजाप्रमाणें सर्वांनीं ऐकला जावो. नंतर आमचें हें स्तोत्र ऐकत तो येवो.

१४. हे सोमा, मधुर व दुधांत मिसळलेला असा तूं शब्द करित मधुर रसस्वरूपांत जातोस. हे सोमा, पाण्यांत मिसळलेला व गाळण्यांतून गाळलेला तूं धारेनें इंद्राकडे जातोस.

१५. हे सोमा, मदकर व उदकयुक्त मेघांना हत्यारानें पावसाकरतां खालीं आणणारा असा तूं (इंद्राला) उत्साह देण्याकरतां उत्पन्न हो. तेजस्वी आणि स्वच्छ रंग धारण करणारा आणि गाळण्यांत टाकलेला गाईच्या इच्छेनें वाहूं लाग.

१६. हे सोमा, तूं प्रसन्न होऊन आमचे मार्ग धन देणारे करीत मोठ्या भांड्यांत उत्पन्न हो. जणूं काय लोखंडी हत्यारानेंच दुष्ट राक्षस नाहींसे करीत टांगलेल्या लोंकरीच्या गाळण्यांतून धारारूपानें तूं वाहूं लाग.

१७. हे सोमा, तूं दिव्य, गमनशील, अन्नयुक्त, सुखाधार आणि तात्काल फल देणारी वृष्टि उत्पन्न कर. हे सोमा, मुलाप्रमाणें सुंदर आणि बांधवभूत अशा वायूंना शोधणारा तूं वाहूं लाग.

१८. शुद्ध करणारा तूं पापबद्ध अशा मला गाठीप्रमाणें (पापांतून) मुक्त कर. हे सोमा, तूं सरळ मार्ग आणि बळ आम्हांला दे. हिरवट असा तयार केलेला तूं घोड्याप्रमाणें शब्द करतोस. हे देवा, बलवान् व गृहयुक्त असा तं ये.

१९. हे इंदो, आनंद देण्याला पुरेसा असणारा तूं यज्ञांत टांगलेल्या लोंकरीच्या गाळण्यांतून धारारूपानें उत्पन्न हो. अनेक धारांयुक्त, सुगंधी व अहिंस्य असा तूं अन्नप्राप्तीच्या युद्धांत उत्पन्न हो.

२०. बिनलगामाच्या, बिनरथाच्या व अबद्ध अशा युद्धांत सोडलेल्या घोड्याप्रमाणें हे तेजस्वी सोम धांवत आहेत. हे देवहो, त्या सोमांना पिण्याकरतां या.

२१. हे सोमा, आमच्या यज्ञाला उद्देशून आकाशांतून उदकरूपानें भांड्यांत वहात ये. नंतर सोम स्पृहणीय, विपुल, पुत्रयुक्त आणि बलशाली धन आम्हांस देवो.

२२. जसें योगक्षेम इच्छिणाराची वाणी थोर राजाचें वर्णन करते त्याप्रमाणें इच्छुक मनुष्याची वाणी सोमाला स्तविते. नंतर श्रेष्ठ, पुरेसा, पालक आणि तांब्यांत भरलेल्या सोमाला इच्छित गाई (दूध मिसळण्याकरतां) येतात.

२३. दिव्य, धनद, दात्यांच्या इच्छा पूर्ण करणारा व सुबुद्धि सोम सत्यभूत इंद्राकरतां रस उत्पन्न करतो. राजा सोम चांगल्या सामर्थ्याचा आधार आहे. दहा बोटांनीं तो खूप उत्पन्न केला जावो.

२४. गाळण्यांनीं स्वच्छ केला जाणारा, लोकद्रष्टा, देव आणि लोक यांचा धनी, अनेक प्रकारच्या धनांचा पति असा सोम देवांत आणि माणसांत असतो. तो चांगला, रसरसलेला कल्याणकारक रस धारण करतो.

२५. हे सोमा, अन्न मिळविण्याकरतां युद्धांत घोडा जातो त्याप्रमाणें धनलाभ व्हावा म्हणून इंद्र आणि वायु यांना पिण्याकरतां तूं जा. तूं आम्हांला धन व हजारों प्रकारचें पुष्कळ अन्न दे. हे सोमा, स्वच्छ केलेला तूं आम्हांला धन प्राप्त करून देणारा हो.

२६. होत्याप्रमाणें स्वर्गांतल्या देवांचें यजन करणारा, देवांना तृप्त करणारा, (पात्रांत) ओतलेला आणि मदकर असणारा सोम आम्हांला उत्तम पुत्रांनीं युक्त असें घर देवो.

२७. हे देवा सोमा, देवांनीं प्याला जाणारा तूं यज्ञांत चांगल्याप्रकारें देवांच्या भक्षणाकरतां उत्पन्न हो. नंतर तुझ्याकडून प्रेरणा मिळालेले आम्ही युद्धांत मोठ्याहि शत्रूंना पराभूत करूं. गाळून शुद्ध केलेला तूं द्यावापृथ्वींमध्यें आम्हांला सुखकर स्थान दे.

२८. हे सोमा, सोम काढणाराशीं युक्त होऊन तूं सिंहाप्रमाणें भयंकर आणि मनापेक्षांहि वेगवान् अशा घोड्याप्रमाणें ओरडतोस. जवळच्या मार्गांतले जे सरळ मार्ग असतील, त्या मार्गांनीं आमच्यांशीं तूं मैत्रीकरतां ये.

२९. हे सोमा, देवांकरतां उत्पन्न झालेल्या तुझ्या शेंकडों धारा उत्पन्न केल्या जातात. आणि शहाणे हजारों प्रकारें ह्या धारांना शुद्ध करतात. उपभोग्य असें धन स्वर्गावरून आण. विपुल धनाच्या तूं अग्रभागीं असतोस.

३०. सूर्याचे दिवसा किरण उत्पन्न होतात त्याप्रमाणें सोमाच्या धारा उत्पन्न केल्या जातात. शहाणा राजा सोम मित्राचा नाश करीत नाहीं. कर्तव्य करणारा पुत्र बापाचा पराभव करीत नाहीं, त्याप्रमाणें तूं कर्म करणाऱ्या लोकांचा पराभव करूं नकोस.

३१. जेव्हां शुद्ध केला जाणारा तूं मेंढीचे केंसलोंकरीचें गाळणें ओलांडतोस, तेव्हां तुझ्या मधुर धारा उत्पन्न केल्या जातात. हे पवमाना, आधारभूत अशा गाईंच्या दुधांकडे तूं वहातोस आणि उत्पन्न झाल्यावर आपल्या तेजानें सूर्याला सामर्थ्य देतोस.

३२. तो सोम यज्ञाच्या मार्गावर पुनः पुनः ओरडतो. अमरपणाचें स्थान असणारा आणि स्वच्छ असा तूं विशेषप्रकारें शोभतोस. शहाण्यांच्या बुद्धीसह स्तोत्राला प्रेरणा देणारा आणि मदकर असा तूं इंद्राकरतां उत्पन्न होतोस.

३३. हे सोमा, दिव्य आणि सहज खालीं येणारा व यज्ञांत आपल्यांतील धारांनीं पाझरणारा तूं खालीं पहा. हे सोमा, तूं भांड्यांत शिर. शिरतांना शब्द करणारा तूं सूर्याची कांति प्राप्त कर.

३४. भक्त ऋग्, यजुः आणि साम अशा तीन प्रकारची स्तुति करतो. यज्ञांचा आधार आणि सोमावर सत्ता चालविणारी अशी स्तुति करवितो. बैलाकडे जशा गाई जातात, तसे इच्छुक स्तोते सोमाकडे जातात.

३५. वत्सयुक्त गाई सोमाची इच्छा करतात. तसेंच शहाणे स्तोते मनःपूर्वक सोमाची जिज्ञासा करतात. (दुधांत) मिसळलेला आणि पिळून काढलेला सोम स्वच्छ केला जातो. आणि त्रिष्टुभ् छंदांतील मंत्र सोमांत एकरूप होतात.

३६. हे सोमा, पात्रांत पिळलेला आणि शुद्ध केलेला तूं आमचें कल्याण कर. मोठा शब्द करीत तूं इंद्राकडे जा. स्तुतीची भरभराट कर. आम्हांला अत्यंत ज्ञान प्राप्त होऊं दे.

३७. इच्छुक, एकत्र असलेले, कुशल भक्त गाळण्यांत ज्या सोमाला टाकतात, तो जागरूक, खऱ्या स्तोत्रांचा ज्ञाता, सोम शुद्ध केल्यावर भांड्यांत बसतो.

३८. वर्ष सूर्यामागें जातें त्याप्रमाणें शुद्ध केलेला सोम इंद्राकडे जातो. द्यावापृथ्वी जशी सर्वत्र भरून असते त्याप्रमाणें तो सोम अंधाराला झांकून टाकतो. इष्ट देणाऱ्या सोमाच्या अत्यंत प्रिय असणाऱ्या धारा आमचें रक्षण करतात. तो ताबडतोब काम करणाऱ्याला देतो त्याप्रमाणें आम्हांला धन देवो.

३९. ज्या सोमानें गाईचीं पाऊलें जाणणारे, सर्वज्ञ, आमचे प्राचीन पितर डोंगरांत जाऊन गाई मिळवते झाले, तो वाढवणारा आणि वाढणारा, शुद्ध केला जाणारा आणि कामपूरक सोम आमचें तेजानें रक्षण करो.

४०. जलमय राजा सोम विस्तृत व उदकाचा आधार अशा अन्तरिक्षांत स्वतःला उत्पन्न करीत सर्व जगांत श्रेष्ठ ठरतो. कामपूरक व पिळलेला सोम टांगलेल्या लोंकरीच्या गाळण्यांत अत्यंत भरभराटीस जातो.

४१. पाण्याच्या पोटांत असणारा सोम देवांकडे जाता झाला. हें महान् सोमानें मोठें कृत्य केलें. शुद्ध केलेल्या सोमानें इंद्राला बल दिलें आणि सूर्यांत तेज उत्पन्न केलें.

४२. हे सोमा, तूं आमच्या इच्छापूर्तीकरतां आणि धनाकरतां वायूला मद्युक्त कर. तसेंच शुद्ध केलेला तूं मित्रावरुणांना तृप्त कर. तूं देवांचें बल वाढवितोस. देवांना प्रसन्न करतोस. आणि हे सोमदेवा, तूं द्यावापृथ्वींना मद्युक्त करतोस.

४३. हे सोमा, पातकांचा नाश करणारा, रोगांना आणि राक्षसांना नष्ट करणारा आणि सरळ जाणारा तूं उत्पन्न हो व आपला रस गाईच्या दूधांत मिसळ. तूं इंद्राचा मित्र आहेस आणि आम्ही तुझे मित्र आहोंत.

४४. हे सोमा, माधुर्य पाझरणारा आणि धनोत्पादक असा तूं उत्पन्न हो. तसेंच आम्हांला पुत्र आणि उत्कृष्ट धन दे. शुद्ध असा तूं मधुर हो. तसेंच आम्हांला आकाशांतून दूध देणारी गाय दे.

४५. धारेनें ओतल्यावर घोड्याप्रमाणें जाणारा बलवान् सोम उतारावर वहाणाऱ्या नदीप्रमाणें (वेगानें) भांड्यांत जातो. शुद्ध केलेला तो लांकडाच्या भांड्यांत बसतो. नंतर सोम पाण्यांत आणि दूधांत मिसळला जातो.

४६. सर्वदर्शक, रथयुक्त, सत्यसामर्थ्य असा जो सोम देवेच्छु भक्तांच्या इच्छेप्रमाणें उत्पन्न केला जातो, हे इंद्रा, इच्छुक अशा तुझ्याकरतां बुद्धिवर्धक, आणि वेगवान् असा तो सोम भांड्यांत पाझरतो आहे.

४७. प्राचीन, अन्नासह पाझरणारा, पृथ्वीचें रूप झांकून टाकणारा, स्वर्ग, पृथ्वी आणि अन्तरिक्ष अशा तिघई घरांत राहणारा, पाण्यांत असणारा आणि स्तोत्याप्रमाणें शब्द करणारा तो पाण्यांत जातो.

४८. मधुर, अत्यंत आस्वादनीय, सत्ययुक्त आणि सर्वप्रेरक असा तूं देवांप्रमाणें सत्यस्तुति आहेस. हे सोमदेवा, रथयुक्त असा तूं आमच्या यज्ञांत पिळण्याच्या दोन फळ्यांपासून पाण्यांत गळणारा पाझरूं लाग.

४९. हे सोमा, स्तुति केला जाणारा तूं वायूकडे पिण्याकरतां जा. शुद्ध केलेला तूं मित्रावरुणांकडे जा. तसेंच नेते, बुद्धिजव, आणि रथांत बसणाऱ्या आश्विकडे जा. तसेंच कामपूरक वज्रबाहु इंद्राकडे जा.

५०. हे सोमदेवा, तूं आम्हांला सुंदर पांघरण्यासारखीं वस्त्रें दे. शुद्ध केला जाणारा तूं दुभत्या गाई दे. तसेंच आमच्या पोषणाकरतां आल्हादक सोनें दे. तसेंच रथयुक्त घोडे आम्हांस दे.

५१. हे सोमा, दिव्य संपत्ति आम्हांस दे. तसेंच पृथ्वीवरची सर्व संपत्ति आम्हांस दे. तसेंच तुझ्या सामर्थ्यानें आम्ही धनाचा उपभोग घेऊं. असें ऋषींना योग्य असणारें धन जमदग्नीप्रमाणें तूं आम्हांला दे.

५२. हे सोमा, तुझ्या शुद्ध धारेसह तूं धन उत्पन्न कर. तूं मननीय सरोवरांत वहा. वाऱ्याप्रमाणें वेगवान् आणि अनेकप्रकारें यज्ञ केला जाणारा इंद्रहि सोमाकडे जाणाऱ्या मला पुत्र देवो.

५३. हे सोमा, कीर्तिमान् सोमाच्या प्रसिद्ध अशा आमच्या यज्ञांत शुद्ध धारेनें तूं उत्पन्न हो. शत्रूंचा नाश करणारा सोम पिकलेल्या फळांनीं युक्त असणारा वृक्ष जसा हलवतात तसा साठ हजार धन देणारा सोम आम्हांला जय प्राप्त व्हावा म्हणून हलविला जावो. (आम्हांला देवो.)

५४. घोडेस्वारांचें युद्ध व बाहुयुद्ध हीं दोन युद्धें शत्रुनाशक होतात आणि बाणांचा वर्षाव करणारीं व शत्रूंना नमवणारीं तीं युद्धें सोमाला सुखकर होतात. तो शत्रूंना (रणांत) निजवतो आणि पळून लावतो. हे सोमा, तूं शत्रूंना नष्ट कर आणि नास्तिकांना येथून नष्ट कर.

५५. हे सोमा, तूं विस्तृत अशीं तीन अग्नि, वायु आणि सूर्य अशीं स्थानें प्राप्त करतोस. शुद्ध होणारा तूं

एका गाळण्याकडे धांव घेतोस. तूं भजनीय आहेस, तूं देय धनाचा दाता आहेस. हे सोमा, तूं धनवानापेक्षां धनवान् आहेस.

५६. सर्ववेत्ता, शहाणा व सर्व जगाचा राजा असा हा सोम वहातो आहे. यज्ञांत थेंब उत्पन्न करणारा सोम लोंकरीच्या गाळण्यांतून दोन्ही बाजूनें गळत असतो.

५७. महान् आणि आहिंस्य असणारे देव सोम चाटतात. धनेच्छु स्तोत्याप्रमाणें सोमेच्छु देव सोमाच्या स्थानीं गडबड करतात.दहा बोटांनीं सोम पिळला जातो. आणि सोम पाण्यांत मिसळला जातो.

५८. हे गाळलेल्या सोमा, तुझ्या साहाय्यानें लढाईत आम्ही पुष्कळ पराक्रम केले. म्हणून आम्हांला मित्र, वरुण, अदिति, सिंधु, पृथ्वी आणि द्युलोक (धन वगैरे देऊन) सत्कृत करोत.

सूक्त अठ्याणवावें.

ऋषिः—अंबरीष वृषागिरःपुत्र; ऋजिश्वा भरद्वाजपुत्र; देवता–पवमान सोम; छंदः— ११ बृहती, बाकी अनुष्टुभ्.

१. हे सोमा, अनेक प्रकारें पोषक, अत्यंत स्तुत्य, अत्यंत बलप्रद, अत्यंत कीर्तिप्रद आणि मोठ्यांचा पराभव करणारें धन आम्हांला तूं दे.

२. रथांत बसलेला कवच घालतो त्याप्रमाणें पिळलेला तो सोम लोंकरीच्या गाळण्यांत जातो. स्तवन केलेला तो भांड्यानें ओतल्यावर धारांनीं वाहूं लागतो.

३. यज्ञांतलि मुख्य सोम दुधाची इच्छा करीत धारांरूपानें तेजाप्रमाणें जातो. तो पिळलेला सोम मद उत्पन्न करीत गाळण्यांतून गळतो.

४. हे सोमदेवा, तूं थोर आणि हवि देणाऱ्या मला हजारांनीं आणि शेंकडों प्रकारचें धन देतोस.

५. हे शत्रुहन्त्या सोमा, आम्ही तुझे आहोंत. हे आधारभूता, अत्यंत स्पृहणीय अशा संपत्तीचे आम्ही अत्यंत जवळचे आहोंत. हे चपला, आम्ही तुझ्या अन्न आणि सुखाच्या जवळचे असावें.

६. भगिनीभूत दहा बोटें ज्या स्वतः कीर्तिमान्, दगडांनीं कुटलेल्या, इंद्राचा आवडत्या, कमनीय आणि तरंगयुक्त सोमाला पाण्यानीं भिजवतात—

७. जो सोम सर्व देवांकडे आपल्या मदकर रसासह जातो, त्या हिरवट, पिंगट, आणि स्पृहणीय अशा सोमाला गाळण्यानें स्वच्छ करतातः

८. सूर्याप्रमाणें सुंदर असा जो सोम स्तोत्यांना पुष्कळ अन्न देतो, तुम्ही त्या सोमाचा बळप्रद रस पिणारे व्हा.

९. हे मनूच्या द्यावापृथ्वींहो, तुमच्या यज्ञांत तो सोम उत्पन्न केला जातो. तेजस्वी, पर्वतावर असणाऱ्या त्या सोमाला यज्ञांत काढतात.

१०. हे सोमा, वृत्रहन्त्या इंद्राला पिण्याकरतां तूं उत्पन्न केला जातोस. दक्षिणायुक्त देवांकरतां आणि यज्ञगृहांत बसणाऱ्या लोकांकरतां तूं तयार केला जातोस.

११. उषःकालीं जे सोम गुप्त, अज्ञानी अशा चोरांना दूर घालवितात ते सोम सकाळींच गाळण्यांतून गळूं लागतात.

१२. हे मित्रहो, शहाणे असे आम्ही पुढें प्रकाशणाऱ्या, बलयुक्त व गंध असलेल्या सोमाला पितो. अन्नाचें घर अशा सोमाचा आम्ही उपभोग घेतो.

सूक्त नव्याणवावें.

ऋषिः–रेभ व सूनू कश्यपगोत्र; देवता–पवमान सोम; छंदः–१ बृहती, अवशिष्ट अनुष्टुभ्.

१. स्पृहणीय आणि चालून जाण्याची शक्ति असलेल्या सोमाकरतां पराक्रमी धनुष्य (गाळणें) विस्तारलें जातें. थोर लोक देवांच्या समोर पांढरें शुभ्र वस्त्र (गाळण्याकरतां) पसरतात.

२. रात्रीनंतर सकाळीं सुशोभित सोम अन्नाला उद्देशून चाल करतो. भक्तांचीं बोटें गाळण्याकरितां हिरवट सोमाला प्रेरणा देतात.

३. जो मदकर रस इंद्राला अत्यंत आवडतो आणि ज्याला गाई आणि स्तोते, पूर्वी आणि आतां तोंडांनीं पितात त्या ह्या सोमाला आम्ही शुद्ध करतों.

४. ज्याला बोटांनीं दाबून देवांकरतां काढतात त्या शुद्ध केल्या जाणाऱ्या सोमाला स्तोते जुन्या स्तोत्रांनीं स्तवितात.

५. ओतल्या जाणाऱ्या आणि सर्वाधार सोमाला लोंकरीच्या गाळण्यांत शुद्ध करतात. शहाणे भक्त त्या ह्या सोमाची, दूताची करतात त्याप्रमाणें देवांना कळविण्याकरतां प्रार्थना करतात.

६. अत्यंत मादक असणारा सोम शुद्ध केल्यावर वीर्य टाकावें त्याप्रमाणें भांड्यांत बसतो कर्माधिपति सोमाची स्तुति केली जातेः

७. जेव्हां सोम दाता म्हणून ओळखला जातो तेव्हां तो पुष्कळ पाण्यांत घातला जातो आणि देवांकरतां पिळलेला स्तुत्य सोम ऋत्विजांकडून शुद्ध केला जातो.

८. हे सोमा, पिळलेला आणि व्यापक असणारा सोम ऋत्विजांकडून गाळण्यांत नेला जातो. अतिशय मादक असणारा तूं इंद्राकरतां भांड्यांत भरला जातोस.

सूक्त शंभरावें.

ऋषिः—रेभ व सूनु कश्यपगोत्र; देवता—पवमान सोम; छंदः—अनुष्टुभ्.

१. जसें गाई पूर्ववयांतल्या मुलांला चाटतात तसें प्रेमळ उदक इंद्राला प्रिय असणाऱ्या सोमांत मिसळते.

२. हे सोमा, शुद्ध केलेला तूं दोनोहि लोकांत पोषक असें धन दे. तूं दात्या यजमानाच्या घरांत सर्व संपत्ति वाढवतोस.

३. हे सोमा, तूं मेघ वृष्टि करतो याप्रमाणें मनोवेगांनीं वहाणारी धार उत्पन्न कर. हे सोमा, पृथ्वीवरची आणि स्वर्गीय संपत्ति तूं आम्हांकरतां वाढवतोस.

४. जेत्या वीरांच्या घोड्यांप्रमाणें पिळलेल्या तुझ्या वेगशाली धारा लोंकरीच्या गाळण्याकडे धांवोत.

५. हे सूक्ष्मदृष्टि सोमा, इंद्र, मित्र आणि वरुण यांना पिण्याकरतां पिळून तयार केलेला तूं आम्हांला ज्ञान आणि बळ देण्याकरतां धारांरूपानें उत्पन्न हो.

६. हे सोमा, अतिशय अन्न देणारा आणि पिळून काढलेला तूं धारांरूपानें उत्पन्न हो. तसेंच इंद्र, विष्णु आणि इतर देव यांना मधुर हो.

७. हे पवमान सोमा, गाई मुलाला चाटतात त्याप्रमाणें यज्ञांत मातृभूत प्रेमळ जल हिरवट सोमाचा गाळण्यांत आस्वाद घेतें.

८. हे पवमाना, महान् आकाश तूं आपल्या आश्चर्यकारक किरणांनीं फिरतोस. तसेंच वेगशाली तूं दात्या यजमानाच्या घरांतील सर्व अंधार नाहींसा करतोस.

९. हे महाकर्म्या सोमा, तूं पृथ्वी आणि द्युलोकाला चांगल्याप्रकारें धारण करतोस. हे पवमाना, तूं मोठेपणानें युक्त असें कवच घालतोस.

सूक्त एकशेंएकावें.

ऋषि—१-३ अंधीगु श्यावाश्वपुत्र, ४-६ ययाति नहुषपुत्र, ७-९ नहुष मनुपुत्र, १०-१२ मनु संवरणपुत्र, १३-१६ प्रजापति वैश्वामित्र किंवा वाक्पुत्र; देवता—पवमान सोम; छंदः—२-३ गायत्री, अवशिष्ट अनुष्टुभ्.

१. हे मित्रांनो, तुम्ही पुढें ठेवलेला मादक सोम पिण्याकरतां लांब जिभेच्या कुत्र्याला दूर हांकून द्या.

२. शूर घोड्याप्रमाणें पिळलेला सोम शुद्ध धारेनें वहात आहे.

३. लोक अहिंस्य सोमाला सद्बुद्धीनें यज्ञांत दगडांनीं कुटतात.

४. अत्यंत मधुर, पिळलेले, मदकर सोम गाळण्यांतून इंद्राकरतां पाझरूं लागतात. तुमचा मदकर सोमरस इंद्राकडे जावो.

५. सोम इंद्राकरतां वहातो आहे असें स्तोते म्हणतात तेव्हां सामर्थ्यानें सर्वश्रेष्ठ असणारा वाचस्पति सोम स्तुतीची इच्छा करतो.

६. उदकमय, स्तुतिप्रेरक, धनपति आणि इंद्रसखा सोम हजार धारांनीं वाहूं लागतो.

७. पोषक, भजनीय आणि धन देणारा सोम शुद्ध केल्यावर भांड्यांत भरला जातो. सर्व जगाचा अधिपति असणारा सोम द्यावापृथ्वीला स्वतःच्या तेजानें प्रकाशित करतो.

८. सुंदर व तेजस्वी गाई सोमाला मद प्राप्त व्हावा म्हणून हंबरत आहेत, आणि पिळलेले सोम रस्ता काढीत आहेत.

९. हे पवमान सोमा, जो तुझा तेजस्वी रस आहे, जो रस पंचजनांत व्यापून आहे आणि ज्यामुळें आम्ही धन प्राप्त करतों, तो प्रसिद्ध रस मला प्राप्त होवो.

१०. अत्यंत मार्गदर्शक असणारा तेजस्वी सोम आम्हांकरतां उत्पन्न होवो. तो मित्रभूत, निष्पाप, ध्यानार्ह आणि सर्वज्ञ आहे.

११. बैलाच्या कातड्यावर दगडांनीं पिळलेले व द्रव्य देणारे सोम आम्हांला चहूंकडून अन्न देतात.

१२. शुद्ध केलेले व दह्यांत मिसळलेले बुद्धिवर्धक सोम पाण्यांत एकजीव होऊन वाहूं लागले कीं सूर्याप्रमाणें प्रेक्षणीय असतात.

१३. पिळला जाणाऱ्या सोमाचा शब्द विघ्नकर्त्या कुत्र्याला ऐकूं जाऊं नये. मखाला भृगूंनीं ठार केलें, त्याप्रमाणें विघ्नकर्त्या कुत्र्याला तुम्ही ठार करा.

१४. आईबापांच्या हातांत मुलगा असतो त्याप्रमाणें बांधव असणारा सोम गाळण्यांत घातला आहे. जार स्त्रीकडे जातो, किंवा वर वधूकडे जातो त्याप्रमाणें सोम भांड्यांकडे जात आहे.

१५. जो सोम द्यावापृथ्वींना (आपल्या तेजानें) आच्छादितो, तो बलदायक सोम समर्थ आहे. हिरवट सोम यजमानाप्रमाणें आपल्या स्थानीं बसण्याकरतां गाळण्यांत जातो आहे.

१६. सोम लोंकरीच्या गाळण्यांतून पाझरत आहे. बैलाच्या कांतड्यावर शब्द करणारा, बलशाली व हरितवर्ण सोम इंद्राच्या स्थानीं जातो.

सूक्त एकशेंदोनावें.

ऋषिः–त्रित आप्त्य; देवता–पवमान सोम; छंदः–उष्णिह.

१. कर्ता, उत्कृष्ट उदकांचा पुत्र, यज्ञाधार व रस उत्पन्न करणारा सोम स्वर्ग आणि पृथ्वीवर असणारीं सर्व प्रकारचीं हविर्द्रव्यें कमी योग्यतेचीं करतो.

२. त्रिताच्या यज्ञांत दोन दगडांवर सोम जेव्हां बसतो तेव्हां सात छंदांनीं प्रिय सोमाची स्तुति करतात.

३. हे सोमा, त्रिताच्या यज्ञांत तीनहि वेळीं तूं धारारूपानें आस. साम चालूं असतां धन दे. शहाणा स्तोता ह्या इंद्राला आणणारीं स्तोत्रें करतो.

४. उत्पन्न झालेल्या कर्मकर्त्या सोमाप्रत सात नद्या सोम चांगला व्हावा म्हणून प्रभाव चालवतात. ज्याअर्थीं हा अढळ सोम धन जाणतो त्याअर्थीं त्याचे प्रभावानें धन मिळेल.

५. द्रोहरहित सर्व देव एकत्र सोम यज्ञांत ज्याअर्थीं आवडीनें सोम सेवन करतात त्याअर्थीं तो त्यांना आवडतो.

६. यज्ञवर्धक, उदकमूलभूत, मनोहर, कर्ता, पूज्यतम आणि सर्वस्पृहणीय सोम यज्ञांत दीर्घायुष्याकरतां उत्पन्न करतात व तो आवडता होतो.

७. जेव्हां यज्ञ करणारे पाण्यांत सोम मिसळतात तेव्हां तो सोम एकत्र असलेल्या, महान् व यज्ञनिर्मात्या द्यावापृथ्वींत आपण होऊन जातो.

८. हे सोमा, तूं ज्ञानानें आणि स्वच्छ प्रभावानें आपला यज्ञाधार रस यज्ञांत उत्पन्न करीत आकाशांतील अंधार नष्ट कर.

सूक्त एकशेंतिनावें.

ऋषिः–द्वित आप्त्य; देवता–पवमान सोम; छंदः–उष्णिह्.

१. (द्वित आपल्याला म्हणतो) शुद्ध केला जाणाऱ्या कर्त्या व स्तुतीनीं प्रसन्न केल्या जाणाऱ्या सोमाकरतां कामाच्या मोबदल्याप्रमाणें उत्कृष्ट स्तोत्र म्हणा.

२. दुधादिकांत मिसळला जाणारा सोम लोंकरींतून जातो. हिरवा व शुद्ध केला जाणारा सोम तीन (द्रोण कलश, आधवनीय, पूतभृत) स्थानें प्राप्त करतो.

३. जो सोम लोंकरीच्या गाळण्यांतून मधुरता प्रसवणारा रस उत्पन्न करतो, त्या सोमाला ऋषींची सात छंदांत असणारी वाणी वर्णन करते.

४. हिरवा, स्तुतिप्रेरक सर्व देवांचें लक्ष्य असलेला आणि अहिंस्य असा सोम शुद्ध केल्यावर भांड्यांत शिरतो.

५. हे सोमा, शुद्ध करणारा व ऋत्विजांनीं काढलेला असा तूं इंद्रासह एका रथांत बसून देवांच्या सेनेवर चालून जा.

६. घोड्याप्रमाणें युद्धाची इच्छा करणारा, तेजस्वी, देवांकरतां पिळलेला, व्यापक व गाळून स्वच्छ केलेला सोम चहूंकडे पसरतो आहे.

सूक्त एकशेंचारावें.

ऋषिः—पर्वत व नारद काण्व किंवा शिखंडिनी कश्यपाच्या दोन मुली अप्सरा; देवता–पवमान सोम; छंदः—उष्णिह.

१. हे मित्रभूत स्तोतेहो, बसा. शुद्ध केल्या जाणाऱ्या सोमाची स्तुति करा आणि लहान मुलाप्रमाणें यज्ञांनीं शोभेकरतां सोमाला भूषित करा.

२. हे ऋत्विजहो, वासरूं गाईला जोडतात. त्याप्रमाणें घराला उपयोगी अशा सोमाला पाण्यांत मिसळा. हा सोम देवांचें रक्षण करणारा, मदकर व अत्यंत बलवान् आहे.

३. बलाकरतां, पिण्याकरतां तसेंच मित्र व वरुण यांच्याकरतां बलदायक सोम शुद्ध करा.

४. हे सोमा, धनदात्या तुझी आम्ही आपल्याकरतां स्तुति करतो. आम्ही तुझा रस दुधादिकांत मिसळतो.

५. हे आम्हांला मद उत्पन्न करणाऱ्यांत श्रेष्ठ असणाऱ्या सोमा, तूं तेजस्वी आहेस. मित्र मिनाल.

ज्याप्रमाणें मार्ग दाखवितो त्याप्रमाणें तूं आम्हांला मार्गदर्शक हो.

६. हे सोमा, तूं आम्हांशीं जुनी मैत्री स्वीकार. नास्तिक, कपटी, खादाड अशा राक्षसांशीं युद्ध कर आणि आमचें पाप दूर कर.

सूक्त एकशेंपांचवें.

ऋषिः—पर्वत व नारद; देवता-पवमान सोम; छंदः—उष्णिह.

१. हे मित्रहो, तुम्ही उत्साह वाढण्याकरतां शुद्ध केलेल्या त्या सोमाला लहान मुलाप्रमाणें स्तवा. यज्ञ व स्तुति यांनीं गोड करा.

२. देवांचा रक्षक, मदकर असणारा आणि स्तुतींनीं भूषित केलेला सोम पिळल्यावर गाईंनीं वासरूं स्वच्छ करावें त्याप्रमाणें स्वच्छ केला जातो.

३. हा सोम बल देणारा होतो, हा सोम वेग आणि भक्ष्य देणारा होतो, हा पिळलेला सोम देवांना अत्यंत मधुर होतो.

४. हे बलवान् सोमा, तूं आम्हांला गाई व घोडे यांनीं युक्त धन दे. मी तुझा स्वच्छ असणारा रस दूधादह्यांत मिसळीन.

५. अश्वाधिपते सोमा, आतिशय तेजस्वी असणारा तूं मित्र मित्राला हितकर होतो त्याप्रमाणें हितकारक असा आमचें तेज वाढविणारा हो.

६. हे सोमा, तूं जुनी मैत्री आमचे ठिकाणीं कर. नास्तिक आणि खादाड अशा कोणालाहि आमच्यापासून दूर कर. हे सोमा, शत्रूंचा पराभव करणारा तूं दुष्टांना ठार कर. अन्तर्बाह्य कपट्यांना नष्ट कर.

सूक्त एकशेंसहावें.

ऋषिः—१ ते ३ अग्नि चक्षुराख्यपुत्र, ४ ते ६ चक्षु मनुपुत्र, ७ ते ९ मनु अप्सुपुत्र, १० ते १४ चाक्षुष अग्नि; देवता–पवमान सोम; छंदः––उष्णिह.

१. तावडतोब उत्पन्न झालेले, सर्वज्ञ, हरितवर्ण व पिळून काढलेले सोम कामपूरक इंद्राकडे जावोत.

२. युद्ध करण्याकरतां घेण्यास योग्य व पिळलेला हा सोम इंद्राकरतां वहातो आहे. तो ज्यायोगें जयशील इंद्र प्रसिद्ध होईल तसें (करूं) जाणतो.

३. इंद्र ह्या सोमाच्याच तारेंत घेण्यास योग्य धनुष्य ग्रहण करतो. आकाशांत शत्रूंला जिंकणारा इंद्र बलवान् वज्र धारण करतो.

४. हे सोमा, जागरूक असा तूं उत्पन्न हो. हे सोमा, इंद्राकरतां तूं उत्पन्न हो. तसेंच तेजस्वी आणि सर्वप्रापक बल प्राप्त कर.

५. हे सोमा, कामपूरक, मदकर, सर्वांना दर्शनीय, अनेकमार्गी, मार्गदर्शक आणि विचक्षण असा तूं उत्पन्न हो.

६. हे सोमा, आम्हांला आवश्यक मार्ग दाखवणारा व देवांना अत्यंत आवडता शब्द करीत तूं मार्गांनीं ये.

७. हे सोमा, देवांना पिण्याकरतां सामर्थ्यानें आणि धारांनीं तूं उत्पन्न हो. हे सोमा, मधुर असणारा तूं आमच्या भांड्यांत आस.

८. तुझा द्रुतगामी उदकयुक्त रस उत्साहानें इंद्राला वृद्धिंगत करतो. देव मृत्यु न यावा म्हणून तुला पितात.

९. हे पिळलेल्या सोमांनो आणि हे उदक उत्पन्न करणारेहो, सर्वप्रापक आणि शुद्ध केलेले तुम्ही आम्हांला धन द्या.

१०. पिळलेला आणि शुद्ध केलेला सोम स्तोत्रांपूर्वीं शब्द करीत धारेनें लोंकरीच्या गाळण्यांत जातो.

११. बलवान्, उदकांत क्रीडा करणारा, गाळण्यांतून बाहेर पडणारा व तीन पात्रांत असणारा सोम स्तोते बोटांनीं पुढें ढकलतात आणि स्तोत्रें म्हणून स्तुति करतात.

१२. युद्धांत घोडा सोडावा त्याप्रमाणें अन्नेच्छु सोम भांड्यांत उत्पन्न केला जातो. शुद्ध केला जाणारा सोम शब्द करीत पाझरतो.

१३. स्पृहणीय हिरवट सोम स्तोत्यांना पुत्रयुक्त यश देत वेगानें वांकड्या तिकड्या गाळण्यांतून खालीं जातो.

१४. हे सोमा, देवेच्छु असा तूं धारेनें उत्पन्न हो. मधुर अशा तुझ्या धारा उत्पन्न होतात. तूं शब्द करीत गाळण्यांतून चहूंकडे जातोस.

सूक्त एकशेंसातावें.

ऋषिः—भारद्वाज कश्यपादि सात; देवता–पवमान सोम, छंदः–१–८–९ बृहती, ३ एकविंशत्यक्षरा विराड्; १६ विंशत्यक्षरा द्विपदा विराड्, ४–५ प्रगाथः १०–११–१२–१७ ते २१ प्रगाथः

१. ऋत्विजहो, जो सोम देवांचा उत्कृष्ट हवि आहे, आणि जो आकाशांत जातो ज्या सोमाला आध्वर्यूंनीं दगडांनीं पिळून काढला त्याला तुम्ही सिंचन करा.

२. हे सोमा, अहिंस्य आणि अत्यंत सुगंधि असा तूं शुद्ध केला जात असतां लोंकरींतून गळ. पिळल्यावर अन्न आणि दूध यांशीं मिश्रित करणारे आम्ही पाण्यांत असणाऱ्या तुला स्तवितों.

३. पिळलेला, देवांना तृप्त करणारा, कर्ता आणि विचक्षण सोम सर्वांना जगविण्याकरतां पाझरतो.

४. हे सोमा, शुद्ध केला जाणारा तूं उदकांत शिरून गाळण्यांत जातोस. धन देणारा तूं यज्ञांत असतोस. हे तेजस्वी सोमा, प्रवाहशील असणारा तूं सोन्यासारखा आहेस.

५. मदकर, प्रिय व दिव्य अशा सोमवल्लींतून काढला जाणारा सोम आकाशांत बसतो. विचारणीय आणि आधारभूत अशा यजमानाकडे लोकांनीं स्वच्छ केलेला, विचक्षण आणि अन्नवान् सोम जातो.

६. हे सोमा, जागरूक आणि प्रसन्न करणारा तूं शुद्ध होत लोंकरीच्या गाळण्यांत जातोस. शहाणा असा तूं पितरांतला मुख्य होतोस. तूं आमच्या यज्ञांत मधुररसाचा वर्षाव कर.

७. मार्ग दाखविणारा, शहाणा, गूढज्ञ, चतुर आणि कामपूरक सोम पाझरतो आहे. शहाणा आणि अत्यंत देवेच्छु तूं आहेस. तसेंच द्युलोकांत तूं सूर्य उत्पन्न करतोस.

८. सोम पिळणाऱ्यांकडून पिळला जाणारा सोम मेंढ्यांच्या केंसांतून जातो. हिरव्या व मदकर धारेनें घोडीप्रमाणें जातो.

९. गोयुक्त सोम सखल प्रदेशांत दुधादिकांसह वहातो. सोम दुधादिकांसह वहातो. समुद्रांत पाणी जातें त्याप्रमाणें जातो. मदकर सोम मद उत्पन्न होण्याकरतां पिळला जातो.

१०. हे सोमा, दगडांनीं कुटला जाणारा तूं लोंकरीच्या गाळण्यांतून खालीं वहातोस. लोक गांवांत शिरतात त्याप्रमाणें हिरवट सोम कुटण्याच्या फळ्यांवरून भांड्यांत शिरतो. तूं लांकडाच्या पात्रांत जातोस.

११. लढाईंत जाणारा घोडा ज्याप्रमाणें भूषित केला जातो त्याप्रमाणें सर्व शहाण्या लोकांकडून शुद्ध केला जाणारा हा मदकर व अन्नेच्छु सोम मेंढीच्या लोंकरींतून सूक्ष्म छिद्रांनीं बाहेर पडत शुद्ध केला जातो.

१२. समुद्र पाण्यानें पुष्ट केला जातो त्याप्रमाणें देवांना पिण्याकरतां पाण्यानें सोम पुष्ट केला जातो. मदकर आणि जागरणशील असा तूं सोमवल्लीच्या रसानें मधुर रस उत्पन्न करणाऱ्या भांड्यांत जातोस.

१३. स्पृहणीय, प्रिय आणि मुलाप्रमाणें गोंडस सोम पांढऱ्या वस्त्रावर (गाळण्याकरतां) पसरला जातो. कर्तृत्ववान् रथ हांकारतात त्याप्रमाणें ह्या सोमाला दोनहि हातांनीं पाण्यांत घालतात.

१४. गमनशील, मदकर, सर्वप्रापक आणि चंचल सोम भांड्यावरच्या गाळण्यांत आपला मदकर रस उत्पन्न करतात.

१५. गाळलेला, तेजस्वी, सत्यभूत आणि महान् राजा सोम भांड्यांत धारेनें वहातो. ओतलेला, महान् आणि सत्यभूत असणारा सोम मित्र आणि वरुण यांच्या संरक्षणाकरतां जातो.

१६. लोकांकडून व्यवस्थित केला जाणारा, स्पृहणीय, विचक्षण, तेजस्वी, पाण्यांत तयार केलेला,—

१७. ओतलेला, मदकर, सोम इंद्राकरतां वहातो आहे. अनेक धारांयुक्त असणारा तो लोंकरीच्या गाळण्यांत जातो. त्या ह्या सोमाला लोक शुद्ध करतात.

१८. पिळण्याच्या दगडावर शुद्ध केला जाणारा व स्तुति करावयास लावणारा शहाणा सोम इंद्रादि देवांचे ठिकाणीं रमतो. पाण्यांत मिसळलेला व भांड्यांत बसलेला सोम दुधादिकांत मिसळला जातो.

१९ हे सोमा, तुझ्या मैत्रींत मी दररोज रमून जातो. हे पिंगट वर्णाच्या सोमा, पुष्कळ राक्षस मला त्रास देतात, त्या दुष्टांवर तूं चालून जा.

२०. हे कडर्च्या रंगाच्या सोमा, रात्रंदिवस तुझ्याजवळ मैत्रीकरतां मी रमून जातों. आम्ही तेजानें तळपणाऱ्या श्रेष्ठ सूर्याप्रत पक्ष्याप्रमाणें प्राप्त होतों.

२१. हे बोटांनीं पिळलेल्या सुंदर सोमा, शुद्ध केला जाणारा तूं पाण्यांत शब्द करतोस. हे पवमान सोमा, सोन्यासारखें विपुल व स्पृहणीय धन आम्हांला दे.

२२. हे सोमा, कामपूरक, शुद्ध केला जाणारा व पिळलेला तूं लोंकरीच्या गाळण्यांतून पाण्यांत शब्द करतोस. हे पवमान सोमा, दुधांत मिसळलेला तूं देवांकडे जातोस.

२३. हे सोमा, सर्व स्तोत्रें ऐकून अन्नप्राप्तीकरतां तूं उत्पन्न हो. देवांना मदकर व मुख्य असणारा तूं भांडयांत धारण केला जातोस.

२४. पृथ्वी आणि द्युलोक धारण करणाऱ्या हे सोमा, तूं सामर्थ्यासह उत्पन्न हो. हे विचक्षणा, शहाणे स्तोत्रें म्हणून बोटांनीं शुभ्र अशा तुला पिळतात.

२५. देवयुक्त, मदकर, इंद्रियांना तृप्त करणारा, अन्न आणि स्तुति स्तोत्यांना देण्याकरतां धांवणारा आणि शुद्ध केला जाणारा सोम गाळण्यांतून उत्पन्न केला जातो.

२६. पिळणाऱ्याकडून पिळला जाणारा आणि पाण्यांत मिसळलेला सोम भांड्यांत जातो. तेज उत्पन्न करणारा, दुधाचें वस्त्र धारण करणारा आतां स्तुति इच्छितो.

सूक्त एकशेंआठावें.

ऋषिः—१-२-४ गौरिवीति शक्तिपुत्र, ३ शक्ति वासिष्ठ, ४ ते ९ ऊरु आंगिरस, १० ऋजिश्वा भारद्वाज, ११ऊर्ध्वसद्मा आंगिरस, १२ कृतयशा आंगिरस, १३ ऋणंचय, १४ ते १६ शक्ति वासिष्ठ; देवता—पवमान सोम; छंदः—१-३-५-७-९-११-१५ ककुभ्, २-४-६-८-१०-१२-१४-१६-सतोबृहती, १३ यवमध्या गायत्री.

१. हे सोमा, अत्यंत मधुर, मदकर, अत्यंत कर्मकर्ता, महान् आणि अत्यंत तेजस्वी असणारा तूं उत्पन्न हो.

२. कामपूरक इंद्र तुझें पान करून बैलासारखे पराक्रम करतो, सर्वदर्शक अशा तुझें पान केलें असतां तो इंद्र, घोडा युद्धांत जातो त्याप्रमाणें अन्नावर चाल करून जातो.

३. हे पवमान सोमा, तेजस्वी असणारा तूंच देवांना अमर करण्याकरतां ताबडतोब शब्द करूं लागतोस.

४. नवग्व दध्यङ् ज्या सोमानें (गाईचें द्वार) उघडतो, ज्याच्यामुळें गाई प्राप्त झाल्या आणि देवांना आनंद झाला असतां सुंदर उदकसंबंधीं अन्नें ज्यामुळें भक्तांनीं उपभोगलीं तो तूं शब्द करतोस.

५. तो हा पिळलेला, अत्यंत मादक, उदकांच्या लाटांप्रमाणें क्रीडा करणारा सोम लोंकरीच्या गाळण्यांतून धारारूपानें वाहतो.

६. जो सोम वाहणाऱ्या व जलमय मेघांच्या आंतून पाणी आपल्या तेजानें बाहेर काढतो, तो तूं गाई आणि घोड्यांचे समूह देतोस. हे चालून जाणाऱ्या, तूं कवच घातलेल्या शूराप्रमाणें शत्रूंना ठार कर.

७. हे ऋत्विजहो, सोम पिळा, आणि त्यांत पाणी घाला. सोम घोड्याप्रमाणें वेगशाली, स्तुत्य, उदकप्रेरक, तेजःप्रेरक, भांड्यांत भरलेला आणि पाण्यांत मिसळलेला आहे.

८. जो पाण्यापासून झालेला, तेजस्वी, सत्य आणि महान् राजा सोम पाण्यानें वाढतो, हजार धारांनीं वाहणारा, कामपूरक, उदकवर्धक आणि आवडत्या त्या सोमाला देवांकरतां पिळा.

९. हे अन्नश्रेष्ठ तेजस्वी सोमा, देवेच्छु असा तूं तेजस्वी विपुल अन्न व यश आम्हांला दे आणि आकाशांतील मेघांना जल देणारें कर.

१०. हे बलिष्ठ सोमा, दोन फलकांतून पिळून काढलेला व राजाप्रमाणें लोकांचा नायक असा तूं उत्पन्न हो. तसेंच द्युलोकांतून उदक उत्पन्न कर. गाई इच्छिणाऱ्या भक्तांचीं कर्में पूर्ण कर.

११. मदकर, हजार धारांनीं उत्पन्न होणाऱ्या, कामपूरक व सर्व प्रकारची संपत्ती धारण करणाऱ्या त्या ह्या सोमाला लोक तयार करतात.

१२. उत्पादक तेजानें अंधार नाहींसा करणारा, अमर आणि कामपूरक सोम उत्पन्न होतो. शहाण्यांनीं स्तविलेला, तीन ठिकाणीं ठेवलेला तो सोम (दुधाचें) पांघरूण घेतो, आणि कर्माकरतां धारण केला जातो.

१३. जो संपत्ति आणि गाई यांना आणणारा, जो अन्न आणि चांगल्या घरांना प्राप्त करणारा तो सोम पिळला जातो.

१४. आमच्या ज्या सोमाला इंद्र पितो, ज्याला मरुत् व अर्यमासह भग पितो, ज्या सोमानें मित्रावरुणांना आम्ही आपल्याकडे वळवतों, आणि महान् संरक्षणाकरतां ज्या सोमानें इंद्राला आम्ही बोलावतों, तो सोम पिळला जातो.

१५. हे सोमा, अत्यंत मधुर, लोकांनीं तयार केलेला, उत्तम आयुधांनीं केलेला व अत्यंत मादक असा तूं इंद्राला पिण्याकरतां उत्पन्न हो.

१६. हे सोमा, तूं नद्या समुद्रांत शिरतात त्याप्रमाणें हृदयंगम पात्रांत शिर. तूं मित्र, वरुण, वायु यांना दिलेला, उत्कृष्ट आणि स्वर्गसंस्थापक आहेस.

सूक्त एकशेंनववें.

ऋषिः—अग्नि ईश्वरपुत्र; देवता—पवमान सोम; छंदः—द्विपदा विराज्.

१. हे सोमा, मधुर असा तूं इंद्र, मित्र, पूषन् आणि भग यांच्याकरतां उत्पन्न हो.

२. हे सोमा, ज्ञान आणि बल प्राप्त होण्याकरतां पिळलेल्या तुझा भाग इंद्र पिवो.

३. हे सोमा, तेजस्वी, दिव्य आणि अमृतासारखा तूं अमरपणाकरतां आणि मोठें घर प्राप्त व्हावें म्हणून उत्पन्न हो.

४. हे सोमा, महान्, रसयुक्त व देवांचा पालक असा तूं देवांच्या सर्व शरीरांना उद्देशून उत्पन्न हो.

५. हे सोमा, तेजस्वी असा तूं देवांकरतां उत्पन्न हो. द्यावा पृथ्वी आणि लोक यांना तूं सुखकर हो.

६. हे सोमा, तेजस्वी आणि पेय असणारा तूं द्युलोकाचा आधार आहेस. बलवान् असा तूं सत्यस्वरूप यज्ञांत उत्पन्न हो.

७. हे सोमा, अन्नयुक्त, धारायुक्त आणि प्राचीन असा तूं विस्तृत लोंकरींतून उत्पन्न हो.

८. ऋत्विजांनीं पिळून काढलेला, शुद्ध, मदकर व सर्वज्ञ सोम सर्व प्रकारची संपत्ति आम्हांला देवो.

९. पिळलेला आणि उत्कर्ष करणारा सोम आम्हांला मुलेंबाळें आणि सर्व प्रकारची संपत्ति देवो.

१०. हे सोमा, घोड्याप्रमाणें स्वच्छ केलेला आणि वेगवान् असा तूं ज्ञान, बळ आणि धन यांकरतां उत्पन्न हो.

११. सोम पिळणारे उत्कृष्ट अन्न प्राप्त होण्याकरतां सोमाचा रस शुद्ध करतात.

१२. मुलासारखा झालेला हिरवट सोम देवांकरतां स्वच्छ करतात.

१३. कल्याणस्वरूप व सूक्ष्मदृष्टि सोम आकाशांत मद आणि भाग्य प्राप्त व्हावें म्हणून वहातो.

१४. ज्या शरीरानें इंद्र सर्व राक्षसांना ठार करतो तो सोम इंद्राचें सुंदर शरीर पुष्ट करतो.

१५. सर्व देव, दूधादिकांत मिसळलेल्या व लोकांनीं पिळलेल्या सोमाचा रस पितात.

१६. पिळलेला आणि हजार धारांनीं वहाणारा सोम लोंकरीच्या गाळण्यांतून खालीं पाझरतो.

१७. खूप पाण्यांत मिसळलेला, पाण्यांनीं शुद्ध केलेला व गाईच्या दुधादिकांत मिसळलेला सोम पाझरतो.

१८. हे सोमा, लोकांनीं व्यवस्थितपणें दगडांनीं पिळून काढलेला तूं इंद्राच्या पोटांत जा.

१९. बलवान्, गाळण्यांतून खालीं गळणारा व हजार धारांचा सोम इंद्राकरतां उत्पन्न केला जातो.

२०. इंद्राला मद उत्पन्न व्हावा म्हणून मधुर (दूध वगैरेंत) रसांत कामपूरक सोम मिसळला जातो.

२१. हे सोमा, उदकांत मिसळलेला हिरवट अशा तुला देवांना बल प्राप्त व्हावें म्हणून ऋत्विज सहज शुद्ध करतात.

२२. उग्र, पाण्यांत मिसळलेला आणि प्रेरक असा सोम इंद्राकरतां खूप काढला जातो.

सूक्त एकशें दहावें.

ऋषिः -त्र्यरुण व त्रसदस्यु राजर्षि; देवता— पवमान सोम; छंदः -१ ते ३ अनुष्टुभ्, ४ ते ९ ऊर्ध्वबृहती, १० ते १२ विराज्.

१. हे सोमा, आम्हांला अन्न देण्याकरतां तूं वाहूं लाग. सहनशील असा तूं शत्रूंवर चालून जा. आमचें कर्ज नाहींसे करणारा तूं शत्रूंना ठार करण्याकरतां जातोस.

२. हे सोमा, पिळलेल्या तुला आम्ही स्तवितों. हे पवमान सोमा, तूं लोकांचें मोठें राज्य पालन करण्याकरतां बलवान् शत्रूंवर चालून जातोस.

३. हे पवमान सोमा, तूं उदकाधार आकाशांत सूर्य उत्पन्न केलास. तूं स्तोत्यांना गाई देणारा आणि अनेक प्रकारच्या ज्ञानानें युक्त आहेस.

४. हे मरणधर्मरहिता सोमा, लोकांच्या उपयोगी पडण्याकरतां तूं सत्य, कल्याणकारक आणि उदकाधार अशा आकाशांत सूर्य उत्पन्न केलास, तसेंच भजनीय असा तूं लढाईकडे जातोस.

५. अखंड व लोकांना पाणी पिण्याकरतां उपयोगी पडणारी विहीर पाडावी किंवा हातांच्या बोटांनीं पाणी भरतांना नासावें त्याप्रमाणें अन्नाकरतां तुझा नाश केला जातो.

६. जेव्हां तेजस्वी सूर्यानें अंधार नाहींसा केला नव्हता, तेव्हां विचारी, स्वर्गीय वसुरुच नांवांचे कांहीं लोक बांधवभूत ह्या सोमाची स्तुति करूं लागले.

७. हे सोमा, प्रमुख यजमान पुष्कळ बळ व अन्नाकरतां मन तुझे ठिकाणीं ठेवतात म्हणून हे समर्था, आम्हांला लढाईंत सामर्थ्य दे.

८. द्युलोकांत जें स्तुत्य व प्राचीन अन्न आहे तें गहन द्युलोकांतून बाहेर काढतात. त्या इंद्राला उद्देशून झालेल्या सोमाची सर्व लोक स्तुति करतात.

९. हे पवमान सोमा, जेव्हां तूं ही द्यावापृथ्वी, हें सर्व जग सामर्थ्यानें व्यापतोस तेव्हां गाईच्या तांड्यांत असलेल्या एखाद्या बलवान् बैलासारखा असतोस.

१०. पिळलेला शुद्ध केलेला अत्यंत बळी व तेजस्वी सोम लोंकरीच्या गाळण्यांतून क्रीडा करणाऱ्या लहान मुलाप्रमाणें अनेक धारांनीं पाझरतो.

११. शुद्ध केलेला, मधुर, यज्ञयुक्त, क्षरणशील, अन्नदाता, धनप्रापक आणि आयुष्यदाता असा सोम तरंगरूपानें इंद्राकरतां वाहतो.

१२. हे सोमा, संग्रामेच्छू शत्रूंना पराभूत करणारा, दुर्दम्य राक्षसांना नष्ट करणारा व उत्तम आयुधयुक्त होऊन शत्रूंचा पराभव करणारा तूं उत्पन्न हो.

सूक्त एकशें अकरावें.

ऋषिः—अनानत परुच्छेपपुत्र; देवता–पवमान सोम; छंदः—अत्यष्टि.

१. सूर्य आपल्या तेजानें अंधार नष्ट करतो त्याप्रमाणें शुद्ध केलेला हरितवर्ण सोम आपल्या तेजस्वी धारेनें सर्व द्वेष्ट्यांना नष्ट करतो. पिळलेल्या सोमाची धारा प्रकाशते. शुद्ध केलेला हिरवा सोम तेजस्वी दिसतो. कारण सोम सात प्रकारच्या तेजस्वी किरणांनीं सर्व जग व्यापून टाकतो.

२. हे सोमा, तूं तें पणीनें चोरलेलें धन मिळवलेंस. यज्ञाधार उदकांनीं यज्ञगृहांत तूं शुद्ध होतोस. साम जसा दुरून ऐकला जातो, त्याप्रमाणें तुझी स्तोत्रें मोठ्यानें म्हटलीं जातात. तेजस्वी सोम तेजस्वी तीन पात्रांत अन्न म्हणून धारण केला जातो. तो तेजस्वी धारण केला जातो.

३. ज्ञाता सोम पूर्व दिशेकडे जातो. दर्शनीय असा तुझा दिव्य रथ सूर्यकिरणांत एकरूप होऊन जातो. जय मिळविण्याकरतां इंद्राला आनंदित करीत पराक्रम वर्णन करणारी स्तोत्रें इंद्राकडे जातात. वज्र इंद्राकडे असतें तेव्हां युद्धांत तूं आणि इंद्र पराजित होत नाहीं. तेव्हां इंद्राचा गौरव होतो.

सूक्त एकशें बारावें.

ऋषिः—शिशु आंगिरस; देवता–पवमान सोम; छंदः—पंक्ति.

१. (येथून तीन ऋचांत सोम पाझरत नाहीं म्हणून तो आपल्यावर रागवला आहे अशी कल्पना करून विनोदानें ऋषि म्हणतो आहे.) हे सोमा, आमची बुद्धि अनेक प्रकारची आहे तसेंच लोकांचीं कर्में विविध आहेत. सुतार तासणें, वैद्य रोग व ब्राह्मण सोम पिळणारा यजमान इच्छितो. हे सोमा इंद्राकरतां तूं पाझरावेस.

२. वाळलेल्या लांकडांनीं, पक्ष्यांच्या पिसांनीं आणि धार लावण्याच्या दगडांनी (बाण केलें जातात) लोहार श्रीमंत माणसाची इच्छा करतो. (तसें मी तुझा प्रवाह इच्छितों) हे सोमा, इंद्राकरतां तूं पाझर.

३. मी एक कवि आहें. माझे वडील वैद्य आहेत आई कांडणारी आहे. अशा तऱ्हेनें जसें गाईच्या मागें गवळी धांवतात तसें आम्ही पैशाच्या मागें धांवतों. हे सोमा, तूं इंद्रासाठीं वहा.

४. घोडा गाडी हलकी असावी अशी इच्छा करतो, खुशामते हास्याच्या लकेरीची इच्छा करतात, बेडूक पाण्याच्या डबक्याची इच्छा करतात. हे सोमा, तूं इंद्रासाठीं वहा.

टीपः—ह्या सूक्तांत ‘ हे सोमा, तूं इंद्रासाठीं वहा,’ या पालुपदाचा मागल्या चरणाशीं कांहीं संबंध दाखवितां येत नाहीं.

सूक्त एकशें तेरावें.

ऋषिः—काश्यप मारीच; देवता—पवमान सोम; छंदः—पंक्ति.

१. आपलें ठिकाणीं सामर्थ्य धारण करणारा, आणि मोठे पराक्रम करणारा वृत्रहन्ता इंद्र शर्यणावत्सरोवरांत सोम पिवो. हे सोमा तूं इंद्राकरतां वहा.

टीपः—शर्यणावत् नांवाचें सरोवर कुरुक्षेत्राच्या उत्तर भागांत आहे त्याची उत्कृष्ट सोमाचें उत्पत्तिस्थान म्हणून प्रसिद्धी होती. सिमला आणि शर्यणावत् यांत सान्निध्य असावें.

२. हे दिशाधिपति आणि बलशाली सोमा, सत्य आणि सृष्टिनियमाला अनुसरणाऱ्या लोकांनीं श्रद्धा आणि तप यांनीं पिळलेला असा तूं आर्जीक (ऋर्जीका नदीच्या आसपासचा भाग) देशांतून ये.

३. सूर्याची मुलगी श्रद्धा पावसानें वाढलेल्या त्या महान् सोमाला (स्वर्गांतून) आणती झाली. नंतर त्याला गंधर्वांनीं स्वीकारलें. नंतर गंधर्वांनीं सोमांत तो रस ठेवला. हे सोमा, उत्कृष्ट असा तूं इंद्राकरतां वहा.

४. हे सत्यकर्म्या, सत्ययशस्का राजा सोमा, खरें बोलणारा, सृष्टिनियमाला अनुसरून बोलणारा, श्रद्धेनें बोलणारा आणि यजमानानें शुद्ध केलेला असा तूं हे सोमराजा, इंद्राकरतां वहा.

५. सत्यसामर्थ्य् आणि महान् अशा सोमाच्या धारा वहातात. रसयुक्त सोमाचे रस एकत्र होतात. म्हणून हे हरितवर्ण सोमा, मंत्रानें शुद्ध केलेला तूं इंद्राकरतां वहा.

६. हे पवमान सोमा, छंदोबद्ध स्तुति म्हणणारा, दगडांनीं कुटलेल्या सोमानें (देवांना) आनंद उत्पन्न करणारा, ब्राह्मण जेथें सोम पूजितो तेथें हे सोमा, इंद्राकरतां वाहूं लाग.

७. हे पवमान सोमा, जेथें तेज अखंड आहे आणि जेथें सूर्य स्थित आहे, त्या अमर व अक्षीण लोकांत (सोम कुटणाऱ्या) मला ठेव. हे सोमा, इंद्राकरतां वाहूं लाग.

८. जेथें विवस्वानाचा मुलगा राजा आहे, जेथें सूर्याला झांकणारी रात्र आहे, जेथें मोठमोठ्या नद्या आहेत, तेथें मला अमर कर. हे सोमा, तूं इंद्राकरतां वाहूं लाग.

९. ज्या स्वर्गांतल्या तृतीयस्थानीं सूर्य इच्छेनुसार फिरतो, जेथें लोक तेजोमय आहेत, तेथें मला अमर कर. हे सोमा, तूं इंद्राकरतां वाहूं लाग.

१०. जेथें श्रेष्ठ व कनिष्ठ देव आहेत, जेथें सूर्याचें स्थान आहे. जेथें स्वधाकारानें दिलेल्या अन्नानें तृप्ति होते, तेथें तूं मला अमर कर. हे सोमा, इंद्राकरतां तूं वहा.

११. जेथें आनंद, मोद, मुद आणि प्रमुद असें चार प्रकारचे आनंद आहेत, जेथें देवांचे देव आप्त आहेत, तेथें तूं मला अमर कर. हे सोमा, तूं इंद्राकरतां वाहूं लाग.

सूक्त एकशें चवदावें.

ऋषिः—कश्यप मारीच; देवता—पवमान सोम; छंदः–पंक्ति.

१. सोमाचीं स्थानें जो मनुष्य प्राप्त करतो, जो हे सोमा, तुझे ठिकाणीं मन ठेवतो त्याला उत्तम मुलांबाळांनीं युक्त असें म्हणतात. म्हणून हे सोमा, इंद्राकरतां तूं वाहूं लाग.

२. हे ऋषे कश्यपा, मंत्रकर्त्यांच्या स्तोत्रांनीं स्तविला जाणाऱ्या सोमराजाला तूं पूज. जो वनस्पतींचा पति आहे. त्याचा तूं सत्कार कर. हे सोमा, तूं इंद्राकरतां वहा.

३. सात दिशा, ऋतु, सात होते वगैरे ऋत्विज्, जे सात आदित्य देव आहेत, हे सोमा, त्यांनीं आमचें संरक्षण कर. हे सोमा, तूं इंद्राकरतां वहा.

४. हे राजा सोमा, तुझ्याकतां शिजवलेला जो हवि आहे. त्या हवीनें आमचें संरक्षण कर. शत्रू आम्हांला ठार न करोत, तसेंच शत्रू आमचें कांहींहि नष्ट न करोत. हे सोमा, इंद्राकरतां तूं वाहूं लाग.

नववें मंडळ समाप्त.

नववें मंडळ.

कोष्टक

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंदः	देवता	महत्त्व
१	६-७-१७	मधुच्छंद	गायत्री	पवमानसोम	पवमानसूक्त
२	६-७-१८।१९	मेधातिथि	,,	,,	
३	६-७-२०।२१	शुनःशेप	,,	,,	
४	६-७-२२।२३	हिरण्यस्तूप	,,	,,	
५	६-७-२४।२५	असित किंवा देवल	८-११ अनुष्टुभ् बाकी गायत्री	,,	आप्रीसूक्तम्
६	६-७-२६।२७	,,	गायत्री	,,	
७	६-७-२८।२९	,,	,,	,,	
८	६-७-३०।३१	,,	,,	,,	
९	६-७-३२।३३	,,	,,	,,	
१०	६-७-३४।३५	,,	,,	,,	
११	६-७-३६।३७	,,	,,	,,	अथर्वन्
१२	६-७-३८।३९	,,	,,	,,	
१३	६-८-१।२	,,	,,	,,	
१४	६-८-३।४	,,	,,	,,	
१५	६-८-५	,,	,,	,,	आयु
१६	६-८-६	,,	,,	,,	आयु
१७	६-८-७	,,	,,	,,	
१८	६-८-८	,,	,,	,,	
१९	६-८-९	,,	,,	,,	
२०	६-८-१०	,,	,,	,,	
२१	६-८-११	,,	,,	,,	
२२	६-८-१२	,,	,,	,,	पणि
२३	६-८-१३	,,	,,	,,	आयु
२४	६-८-१४	,,	,,	,,	
२५	६-८-१५	दृहळूच्युत अगस्त्यापुत्र	,,	,,	
२६	६-८-१६	इध्मवाहन	,,	,,	
२७	६-८-१७	नृमेध	,,	,,	
२८	६-८१८	प्रयमेध	,,	,,	

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छन्दः	देवता	महत्त्व
२९	६-८-१९	नृमेध	गायत्री	पवमान	
३०	६-८-२०	बिंदु	"	सोम	
३१	६-८-२१	गौतम	"	"	
३२	६-८-२२	श्यावाश्व	"	"	त्रित
३३	६-८-२३	त्रित	"	"	
३४	६-८-२४	"	"	"	त्रित
३५	६-८-२५	प्रभूवसु	"	"	प्रभूवसु
३६	६-८-२६	"	"	"	
३७	६-८-२७	रहूगण	"	"	त्रित
३८	६-८-२८	"	"	"	त्रित
३९	६-८-२९	बृहन्मति	"	"	बृहन्मति
४०	६-८-३०	प्रभूवसु	"	"	
४१	६-८-३१	मेध्यातिथि	"	"	
४२	६-८-३२	"	"	"	
४३	६-८-३३	"	"	"	मेध्यातिथि
४४	७-१-१	अयास्य	"	"	
४५	७-१-२	"	"	"	
४६	७-१-३	"	"	"	
४७	७-१-४	कवि	"	"	
४८	७-१-५	"	"	"	
४९	७-१-६	"	"	"	
५०	७-१-७	उचथ्य	"	"	
५१	७-१-८	"	"	"	
५२	७-१-९	"	"	"	
५३	७-१-१०	अवत्सार	"	"	
५४	७-१-११	"	"	"	
५५	७-१-१२	"	"	"	
५६	७-१-१३	"	"	"	
५७	७-१-१४	"	"	"	
५८	७-१-१५	अवत्सार	३ पुर उष्णिह बाकी गायत्री	"	ध्वस्त्र, पुरुषंति
५९	७-१-१६	"	गायत्री	"	
६०	७-१-१७	"	३ पुरउष्णिह बाकी गायत्री	"	
६१	७-१-१८।२३	अमहीयु	"	"	दिवोदासानें शंबर, तुर्वश व यदु यांस वश केल्याचा उल्लेख
६२	७-१-२४।२९	जमदग्नि	"	"	अंगिरस्, जमदग्नि
६३	७-१-३०।३५	निध्रुव	"	"	

सूक्त	अ. अ. वर्ग	ऋषि	छंदः	देवता	महत्व
६४	७-१-३६।४१	कश्यप	”	”	सोमाच्या उत्पत्तिस्थानाचा उल्लेख
६५	७-२-१।६	भृगु किंवा जमदग्नि	”	”	ब्यश्व, शर्यणावत आर्जीक, कृत्वन्, पस्त्य, पंचजन जमदग्नि
६६	७-२-७।१२	शत वैखानस	१८ अनुष्टुभ् बाकी गायत्री	१९-२१ पवमान अग्नि बाकी पवमान सोम	१९-२१ सर्व संस्कारांत व प्रायश्चित्तांत आहुति, पवमान माहात्म्य
६७	७-२-१३।१८		१० त्रिष्टुभ्		येथें पवमानसूक्त संपलें.
६८	७-२-१९।२०	वत्सप्रि	बाकी जगती	पवमान सोम	
६९	७-२-२१।२२	हिरण्यस्तूप	९-१० त्रिष्टुभ् बाकी जगती	”	
७०	७-२-२३।२४	रेणु	१० त्रिष्टुभ् बाकी जगती	”	
७१	७-२-२५।२६	ऋषभ	९ त्रिष्टुभ् बाकी जगती	”	
७२	७-२-२७।२८	हरिमंत	जगती	”	
७३	७-२-२९।३०	पवित्र	”	”	
७४	७-२-३१।३२	कक्षीवस	८ त्रिष्टुभ् बाकी जगती	”	कक्षीवत्
७५	७-२-३३	कवि	जगती	”	
७६	७-३-१	कवि	”	”	
७७	७-३-२	”	”	”	
७८	७-३-३	”	”	”	
७९	७-३-४	”	”	”	
८०	७-३--५	वसु	जगती	”	
८१	७-३-६		५ त्रिष्टुभ् बाकी जगती	”	
८२	७-३-७		५ त्रिष्टुभ् बाकी जगती	”	
८३	७-३-८	पवित्र	जगती	”	१ बैष्णवांचें तप्तमुद्रेचें प्रमाण
८४	७-३-९	प्रजापति	जगती	”	
८५	७-३-१०।११	वेन	११-१२ त्रिष्टुभ् बाकी जगती	”	
८६	७-३-१२।२१	१ आकृष्ट व माष ११-२० सिकता व नीवावरी २१-३० पृश्नि व अजा ३१-४० आकृ	जगती	”	अंगरस, अत्रि

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छन्दः	देवता	महत्त्व
		ष्ट व माष ४१- ४५ अत्रि ४६- ४८ गृत्समद			
८७	७-३-२२।२३	उशनस्	त्रिष्टुभ्	”	उशना काव्य
८८	७-३-२४	”	”	”	नहुष्याणि, पेदु
८९	७-३-२५	वसिष्ठ	”	”	
९०	७-३-२६	”	”	”	
९१	७-४-१	कश्यप	”	”	
९२	७-४-२	”	”	”	
९३	७-४-३	नोधस्	”	”	
९४	७-४-४	कण्व	”	”	
९५	७-४-५	प्रस्कण्व	”	”	
९६	७-४-६।१०	प्रतर्दन राजर्षि	”	”	सोमाचें सुंदर वर्णन, मनु
९७	७-४-११।२२	१-३ वसिष्ठ ४-६ इंद्रप्रमति ७-९ वृषगण १०-१२ मन्यु १३।१५ उपमन्यु १६।१८ व्याघ्रपात् १९।२१ शक्ति २२।२४ कर्णश्रुत २५।२७ मृळीक २८।३१ वसुक्र (वसिष्ठगोत्र) ३२।४५ पराशर बाकी कुत्स	त्रिष्टुभ्	”	
९८	७-४-२३।२४	अंबरिष व ऋजिश्वन्	१९ बृहती बाकी अनुष्टुभ्	”	
९९	७-४-२५।२६	रेभ व सूनु	१ बृहती बाकी अनुष्टुभ्	”	
१००	७-४-२७।२८	”	अनुष्टुभ्	”	
१०१	७-५-१।३	१-३ अंधीगु ४-६ ययाति ७-९ नहुष १०-१२ मनु १३।१६ प्रजापति	२-३ गायत्री बाकी अनुष्टुभ्	”	विघ्नकर्ता कुत्रा मख भृगु
१०२	७-५-४।५	त्रित	उष्णिह्	”	लिस

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंदः	देवता	महत्त्व
१०३	७–५–६	”	”	”	
१०४	७–५–७	पर्वत व नारद किंवा शिखंडिनी	”	”	
१०५	७–५–८	”	”	”	अत्रिन्
१०६	७–५–९।११	१–३ चक्षुस् ४–६ चक्षुस् ७–९ मनु बाकी चाक्षुष अग्नि.	”	”	
१०७	७–५–१२।१६	सप्तर्षि	१–८–९ बृहती ३–१६ द्विपदाविराट् बाकी प्रगाथ	”	अंगिरस
१०८	७-५-१७।१९	१-२ गौरिवीति ३ शक्ति ४–९ ऊरु १० ऋजिश्व ११ ऊर्ध्वसद्मन् १२ कृतयशस् १३ ऋणंचक १४-१६ शक्ति	१. ३. ५. ७. ९. ११. १५ ककुभ्, २. ४. ६. ८. १०. १२. १४. १६. सतोबृहती, १३ गायत्री	”	नवग्व दध्यङ्
१०९	७-५-२०।२१	अग्नि	विराज्	”	
११०	७-५-२२।२३	त्र्यरुण व त्रसदस्यु राजर्षि	१-३ अनुष्टुभ् ४-९ बृहती १०-१२ विराज्	”	वसुरुच
१११	७-५-२४	अनानत	अत्यष्टि	”	
११२	७-५-२५	शिशु	पंक्ति	”	कांहीं धंद्यांचा उल्लेख. काव्यमय वर्णन
११३	७-५-२६।२७	कश्यप	पंक्ति	”	शर्यणावत आर्जीक, वैवस्वत मरणसमयीं म्हणावयाचें सूक्त, कश्यप
११४	७-५-२८	”	”	”	

* * *

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर

मंडळ दहावें.

भाषांतरकार.

विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

मुद्रक व प्रकाशक

शंकर रामचंद्र दाते, बी. ए.

चिटणीस, वैदिक वाङ्मय प्रसारक मंडळ.

' लोकसंग्रह ' छापखाना, २७ बुधवार पेठ, पुणें.

शके १८४९

किंमत दोन रुपये.

दशममंडलपरिचय

ऋग्वेदाच्या दहाव्या मंडळांत १९१ सूक्तें आहेत. एकंदर १७४४ ऋचा आहेत. त्यांत १७५ ऋषि आणि सुमारें ५० देवता आहेत. ' यस्य वाक्यं स ऋषिः—या तेनोच्यते सा देवता (प. २). हींच ऋषि आणि देवता ठरविण्याची सर्वानुक्रमणीकार कात्यायनाची पद्धत आम्ही स्वीकारली आहे. त्यामुळें कांहीं ठिकाणीं ऋषि आणि देवता पाहून मनाचें समाधान होत नाहीं. कारण, ऋषि आणि देवता ह्या शब्दांचा कांहीं विशेष संकेत आपण आपल्या मनांशीं ठरविलेला असतो. पण ज्याचें भाषण तो ऋषि, आणि त्यानें जो विषय सांगितला असेल ती देवता हें एकदां ध्यानांत असलें म्हणजे देवतासदराकडे पाहून घोटाळा उडणार नाहीं.

एकशें एक्याण्णव सूक्तांत ३९ इंद्राकरतां, ३० अग्नीकरतां, २२ विश्वेदेवाकरतां आणि ६ सूक्तें अश्वीकरतां खर्चीं पडलीं आहेत. बाकीच्या देवतांकरतां यापेक्षां कमी सूक्तें आहेत. ऋचांच्या संख्येच्या दृष्टीनें सूर्यासूक्त (८५) सर्वांत मोठें म्हणजे ४७ ऋचांचें आहे.

ह्या मंडळांत वीस छंद आले आहेत. त्यांतल्या त्यांत त्रिष्टुभ् छंदातील सूक्तें ५९ आहेत. अनुष्टुभ्, जगती व गायत्री छंदांतील थोडथोडीं आहेत. याशिवाय फारच थोड्या ऋचा इतर छंदांतील आहेत.

संवाद सूक्तें.

दहाव्या मंडळांत सात संवादसूक्तें आहेत. १ यमयमीसंवाद (१०), २ देवाग्निसंवाद (५१), ३ इंद्र-इंद्राणीवृषाकपिसंवाद (८६), ४ उर्वशीपुरूरवासंवाद (९५), ५ इंद्रमुद्गलसंवाद (१०२), ६ सरमापणीसंवाद (१०८). ७ इंद्रवसुक्रसंवाद (२८) यांपैकीं १-२-४-६ हे बरेच स्पष्ट आहेत. पण बाकीचे तीन अस्फुट आहेत. यांपैकीं प्रत्येकांत कांहीं गूढ संदेश आहे असें म्हणतात. परंतु पहिल्या संवादाखेरीज बाकीच्यांतील गूढाचा अद्यापि उलगडा झालेला नाहीं. इंद्रइंद्राणीवृषाकपिसंवादावर लों. टिळकांनीं ज्योतिषाच्या दृष्टीनें प्रकाश पाडला आहे. त्याचा उल्लेख सूक्तावर आला आहेच. हे संवाद नाटकासारखे करीत असत आणि त्यांत कांहीं गद्यभागहि असावा असा अलीकडील लोकांचा तर्क आहे.

कथासूक्तें.

संवादसूक्ताप्रमाणेंच इतर बरींच सूक्तें अशीं आहेत कीं त्यांमध्यें कांहीं कथा ग्रथित केल्या आहेत त्या कथा संपूर्ण स्वरूपांत सूक्तांत आढळत नाहींत. परंतु ती कथा ध्यानांत घेतल्याशिवाय सूक्ताचा अर्थ उकलत नाहीं. म्हणून त्या कथा अवश्य ध्यानांत असावयास पाहिजेत. तशा कथा थोडक्यांत सूक्ताच्या खालीं टीपेंत दिल्या आहेत. अग्नि पळून गेला त्याबद्दलचीं सूक्तें (५१;१२४;१७१), सरण्यूसूक्त (१७), इंद्रबंधन (३८–५), वैकुंठ इंद्र (४७), अथर्वन्मस्तकछेदन (४८–२), बंधुसूक्त (५८), नाभानेदिष्ठसूक्त (६१;६२), सूर्योत्पत्तिसूक्त (६७), आत्महोम (८१–१), देवापिआर्ष्टिषणाचें पर्जन्यसूक्त (९८), जुहूसूक्त (१०९,) लबसूक्त (११९), नचिकेतसूक्त (१३५).

त्यांत कांहीं ठिकाणीं इतिहास, तत्त्वज्ञान, नीतितत्त्व ग्रथीत केलें असून कांहीं केवळ रूपकात्मक आहेत आणि कांहींत निश्चित काय सांगावयाचें आहे त्याचा बोध होत नाहीं.

संस्कार.

उपनयन (६१; ६२;), समावर्तनसंस्कार (२७; खै.) विवाह (८५;२२; खै.) अन्त्येष्टि व
श्राद्धप्रयोग (१५;१६;११७;११८;) व शान्ति वगैरे प्रकरणांत (१०६; ६९;) ह्या मंडळांतील
बरींच सूक्तें उपयोगांत आणलीं आहेत. तीं सूक्तें त्या दृष्टीनें महत्त्वाचींहि आहेत. त्या सूक्तांचे अर्थ त्या त्या
संस्कारांतील प्रकरणास शोभण्यासारखे आहेत. सूक्तांतील तुटक ऋचाहि अनेक धर्मकृत्यांत उपयोगांत आणि-
तात. संध्येंतील आपोहिष्ठा० (९) व अघमर्षणाचे मंत्र (१९०) ह्याच मंडळांतील आहेत.

अन्नदानस्तुति (११७) फारच उत्कृष्ट वर्णन केली असून त्यांत अन्नदानांतील तत्त्व फार सुंदर रीतीनें ग्रथित केलें आहे. असें वर्णन ऋग्वेदांत दुसरें नाहीं म्हटलें तरी चालेल.

तत्त्वज्ञान.

सृष्टीची उत्पत्ति कशी झाली, परमेश्वराचें स्वरूप व सामर्थ्य, सृष्टीचें मूळ, आत्मा, जीव, चेतन व अचेतन सृष्टींतील गूढ तत्त्व व भिन्न शक्तींचे आधारभूत देव वगैरे अनेक गोष्टींचा उल्लेख सारखा सर्वत्र येत असतो. अनेकस्थळीं असेंहि दिसतें कीं, बोलणारा ह्या गोष्टी सहज बोलत चालला आहे. त्यांत त्याला आपण कांहीं विशेष सांगतो आहोंत असें न वाटतां अंगवळणी पडल्याप्रमाणें उल्लेख केलेले आढळतात. त्यावरून वैदिक ऋषींच्या थोरवीबद्दल मनांत अत्यंत आदर उत्पन्न होतो. त्यादृष्टीनें नासदीयसूक्त (१२९), 'कस्मै देवाय हविषा विधेम' असें पालुपद असलेलें उत्कृष्ट प्रजापतिसूक्त (१२१), ज्ञानाच्या महतीचें वर्णन (७१), वाक्शक्तीचें वर्णन (१२५), नित्य परिचयांतलें 'सहस्राक्षः सहस्रपात्' म्हणून परमेश्वराचें वर्णन करणारें पुरुषसूक्त (९०) हीं सूक्तें त्यांतल्या त्यांत विशेष वाचनीय व मननीय आहेत.

कांहीं उत्कृष्ट सूक्तें.

दहाव्या मंडळांत उत्कृष्ट काव्यमय सूक्तेंहि बरींच आहेत. त्यांतल्या त्यांत अग्नि, इंद्र व मरुत् यांचीं बहुतेक सूक्तें वाचनीय असतात. दहाव्या मंडळांतील अगदीं आरंभींचींच सूक्तें जरी पाहिलीं तरी त्यांवरून सुद्धां कल्पना येण्यासारखी आहे. रक्षोहा अग्नीचीं सूक्तें (८७;११८;१४२) वाचण्यासारखीं आहेत. एकशें सतराव्या सूक्तांत दानस्तुतिचा उत्कृष्ट नमुना पहावयास सापडतो. इंद्राचें सोम प्याल्यावरचें भाषण (११९) प्रासादिक काव्याचें उदाहरण होईल. रात्रिसूक्त (१२७), यज्ञसूक्त (१३०), वायु व सूर्य वर्णनपर सूक्तें (१३६; १७०; १७७; १७८;) अरण्यानीसूक्त (१४६), सवितृसूक्त (१४९), श्रद्धासूक्त (१५१), वायुसूक्त (१६८) हीं सूक्तें ओजस्वी, प्रासादिक आणि अलंकारिक भाषेनें नटलेलीं आहेत. मरुतांच्या सूक्तांत सुंदर उपमा आढळतात. विश्वेदेवांचीं सूक्तें प्राञ्जल आहेत.

ओषधि व रोगनाश.

ओषधींचें माहात्म्य ओषधिसूक्तांत (९७) फार चांगल्याप्रकारें वर्णन केलें आहे. ओषधींत निरोगी करण्याची शक्ति त्यांत स्पष्टपणें वर्णिली आहे. अशा ओषधींचा संग्रह करणाऱ्या वैद्यांचेंहि त्यांत वर्णन असून त्याला भिषज् म्हणतात असा उल्लेख आला आहे. लढाईत अनेक राजे एकत्र होतात त्याप्रमाणें वैद्यांच्या घरीं अनेक गुणकारी ओषधि जमा झालेल्या असतात असें काव्यमय वर्णनहि केलेलें आढळतें. ओषधि रोगाचें मूळच उखडून टाकते असा उल्लेख असून रोग नाहींसे करण्याबरोबर वनस्पतींच्या इतरहि शक्तींचा त्यांत उल्लेख आहे. ताप आला असतां मंत्रासारखाहि ह्या सूक्तांचा उपयोग करींत असें आश्वलायनश्रौत-सूत्रावरून दिसते.

क्षयरोगासारख्या रोगापासून मुक्त व्हावें म्हणून यक्ष्मनाशनसूक्त (१६१) म्हणतात. त्यांमध्यें मनुष्याच्या आयुष्याची मर्यादा शंभर वर्षें सांगितलीं आहे. आणि जगणें म्हणजे सर्व शक्तिपरिपूर्ण असणें हेंहि म्हटलें आहे.

क्षयरोग नष्ट व्हावा म्हणून १६३ वें सूक्तहि म्हणण्यांत येतें. त्यांमध्यें रोगाची व्याप्ति दाखवणारा शरीराच्या अनेक भागांचा उल्लेख आहे.

त्याच्या मागीलच सूक्तांत (१६२) पुरे दिवस न भरतांच प्रसूति करणाऱ्या किंवा गर्भ नष्ट करणाऱ्या रोगापासून गर्भ सुरक्षित रहावा म्हणून प्रार्थना आहे.गर्भस्राव होत असल्यास हें सूक्त म्हणण्याचा परिपाठ आहे.

वाईट स्वप्नें पडत असल्यास १६४ वें सूक्त म्हणतात. यामध्यें शेवटीं 'आम्ही सर्व जिंकूं आणि उपभोगूं' अशी वैदिक धर्माची शिकवण गोविली आहे व आत्मविश्वास उत्पन्न केला आहे.

कपोतशांतीचा उल्लेख पुढील सूक्तांतच (१६५) आहे. पारवा घुबड यांना अशुभ मानींत असल्याचा ह्या सूक्तांत उल्लेख आहे. अशा प्रकारचा विधि पुढील वाङ्मयांत फारच दिसतो. पारवा घरांत शिरल्यानें घरांतील माणसांवर आणि पशूंवर रोग आणि अपमृत्यू गुदरतात अशी कल्पना दिसून येते.

सवतीबद्दल दोन सूक्तें (१४५, १५९) आलीं आहेत. दोनाहि इंद्राच्या बायकोचीं आहेत. पहिल्या सूक्तांत सवतीचा वरचष्मा नष्ट करणाऱ्या एका ओषधीचें, खणून आणल्यापासून नवऱ्याच्या उशाखालीं ठेवण्यापर्यंतचें विधान आहे. बायकांच्या स्वभावाचें त्यांत चांगलें वर्णन केलें आहे. आपल्या नवऱ्यानें सवतीचें नांवसुद्धा घेतां उपयोगी नाहीं अशी इंद्राणीची इच्छा आहे. सखल प्रदेशावरून वाहणाऱ्या पाण्याप्रमाणें नवऱ्याचें मन आपल्याकडेच लागावें अशी तिनें प्रार्थना केली आहे. १५९ व्या सूक्तांत तिचा सवतीचा त्रास नष्ट झाला असें ती म्हणत आहे. तेथें स्त्रियांचा प्रौढिवादाचा व आत्मगौरवाचा स्वभाव चांगला दिसतो.

धननाश करणाऱ्या अवदसेची विद्रूप कल्पना पुरातन कालापासून चालत आली आहे असें १५५ ह्या सूक्तावरून दिसतें. तेथें तिला ‘ काणे विकटे ’ (१) अशीं संबोधनें दिलीं आहेत. तिचा मुख्य गुण संपत्तीचा नाश करणें हा वर्णिला आहे. शिवाय संततीचा नाश करणें, कर्कश आवाज असणें ह्या गुणांनीं तिला वर्णिलें आहे. ती नष्ट झाली म्हणजे पुन: भरभराट होते असें दाखविलें आहे. परमेश्वरभक्तीशिवाय तिच्या तडाक्यांतून सुटण्यास मार्ग नाहीं असेंहि तेथें वर्णिलें आहे.

विशेषत: शत्रूंवर वैदिक ऋषींचा फारच कटाक्ष दिसतो. कोणाचीहि योग्यता शत्रूंशीं कसा वागतो यावरून ठरविण्यांत येत असावी. इंद्र, अग्नि वगैरेंचें देवत्व शत्रूंचा नाश करण्यामुळें प्राप्त झालें आहे असें अनेक ठिकाणीं उल्लेख आले आहेत. ऋषभानें आपल्या सूक्तांत म्हटलें आहे कीं ‘ अहमस्मि सपत्नहा इंद्र इव ’ (१६६–२) ‘ मी इंद्राप्रमाणें शत्रूंचा फडशा उडवणारा आहें ’ हें सूक्त स्वारीवर राजा निघाला असतां म्हणावें असें आश्वलायनगृह्यसूत्रांत सांगितलें आहे (२–६–१३.). इंद्रपुत्र अप्रतिरथानें तर अप्वा देवीची याच कामाकरतां योजना केली आहे. (१०३. १२)

राजा व राष्ट्र

राजकीय स्पष्ट कल्पना देणारीं ह्या मंडळांत दोन सूक्तें आहेत (१७३; १७४). त्यावरून राजाबद्दलची कल्पना करतां येते. राष्ट्राच्या संरक्षणाची जबाबदारी राजावर आहे. लोकांना राजा पसंत नसेल तर तो पदच्युत होत असे. राजाला जर कसली मोठी भीति असेल तर ती राज्य सोडावें लागण्याचीच, असें त्यावरून दिसतें. त्याची मुख्य परीक्षा तो शत्रूंचा पाडाव करतो कीं नाहीं यावरून ठरवीत असत. विशेषत: , ‘ राजा प्रकृतिरंजनात् । (र. ४) या कालिदासोक्तीचें मूळ ‘ विशस्त्वा सर्वा वाञ्छन्तु ’ (१७३–१) ह्या वाक्यांत सांपडतें. यावरून राजाबद्दलची कल्पना चांगली व्यक्त होते. राजाचें काम राष्ट्रांतील व्यक्तींच्या गुणाचा विकास करणें ही भावना ‘ इह राष्ट्रमु धारय ’ (१७३–२) या शब्दानें व्यक्त केली आहे.

आप्रीसूक्तें.

७० व ११० अशीं दोन आप्रीसूक्तें दहाव्या मंडळांत आहेत. पहिल्यांत तनूनपात्‌चा मंत्र नाहीं आणि दुसऱ्यांत नराशंसाचा मंत्र नाहीं. त्यामुळें दोनहि आप्रीसूक्तें अकरा ऋचांचीं आहेत. यांसंबंधी विशेष माहिती १०–७० व १–१३ वर दिली आहे ती पहावी.

सोम त्यासंबंधीं सर्व विचार नवममंडळपरिचयांत केला आहे.

वेदार्थ.

वेद व वेदार्थसंबंधाच्या प्राचीन परंपरा कशा आहेत हें पुढील आख्यायिकेवरून ध्यानांत येण्यासारखें आहे. म्हणून पुढील आख्यायिकेकडे वाचकांचें लक्ष्य वेधूं इच्छितों.

प्रजापतीला ‘क’ नांव मिळाल्याची आख्यायिका.

प्रजापतीनें देव उत्पन्न केले आणि सर्वांच्या मागाहून इंद्र उत्पन्न केला. नंतर प्रजापति आणि इंद्र यांच्यांत खालीलप्रमाणें संवाद झाला.

‘ हे इंद्रा, तूं स्वर्गांत जा. तेथें देव आहेत त्यांच्यावर तूं माझ्या आज्ञेनें आधिपत्य कर. ’

‘ बरें आहे.’

इंद्र स्वर्गावर गेल्यावर देवांनीं त्याला विचारलें,—

‘ तूं कोण ? ’

‘ मला प्रजापतीनें तुमच्यावर आधिपत्य करण्यासाठीं पाठविलें आहे. माझें नांव इंद्र. ’

‘ आम्ही तुझ्यापेक्षां मोठे आहों. आमचा अधिपति तूं कसा होणार ? व तुझ्यायोगें आम्ही आपल कल्याण तरी काय करून घेणार ? ’

देवांचें बोलणें ऐकून इंद्र ओशाळला व स्वर्गांतून परत प्रजापतीजवळ आला व देवांनीं केलेलें सर्व भाषण त्यानें प्रजापतीला निवेदन केलें.

प्रजापतीजवळ एकप्रकारचें विलक्षण तेज होतें तें लक्ष्यांत घेऊन इंद्र प्रजापतीला म्हणाला—

‘ हे प्रजापते, तुझें दिव्य तेज मला दे, म्हणजे त्यायोगें मी देवांवर आधिपत्य गाजवीन. ’

‘ वा:, हें तेज तुला जर मी देऊन बसलों तर मग माझी काय थोरवी राहणार ?

‘ तूं ‘क’ या नांवानें प्रसिद्ध होशील. ‘क’ म्हणजे प्रजापति. तूं जर मला आपलें तेज दिलेंस तरी तुझें प्रजापतित्व कायम राहील. ’

नंतर प्रजापतीनें आपल्या जवळच्या तेजाचें एक पदक तयार करून तें इंद्राच्या मस्तकांवर बांधलें. तेव्हां प्रजापतीनें पदक बांधलेला इंद्र देवांचें आधिपत्य करण्यास समर्थ झाला.

अशी प्रजापतीचे ‘क’ नांव पडण्याची आख्यायिका आहे. (तै. ब्रा. २. २. १०) म्हणून ‘क’ म्हणजे प्रजापति असा अर्थ करून ‘ कस्मै देवाय हविषा विधेम (७१) याचा अर्थ करावा लागतो. असें सायणाचार्यांच्या अर्थाचे धागेदोरे असतात.

खैलिकें.

(परिशिष्ट.)

संहितेच्या ह्या भागास खिल, परिशिष्ट किंवा पदशिष्ट असें म्हणतात. सांप्रदायिक वैदिकांत पदशिष्ट असें म्हणण्याची पद्धत आहे. पदशिष्ट म्हणजे ज्यांचा शाकल्यानें पदपाठ केला नाहीं तीं होत. परंतु संहितेंतहि पदपाठ नसलेला भाग आहे (७.५९.१२; १०.२०.१; १२१–१०; १९०;). तथापि संहितेच्या बाहेरील भागास उद्देशून हा शब्द प्रचलित आहे. परिशिष्ट म्हणजे मागून जोडलेले आणि खिल म्हणजे घुसलेले. यावरून ते संहितेच्या मागूनचे आहेत. तथापि हे बरेच प्राचीन आहेत असें म्हणावयास पुष्कळ आधार आहेत. कात्यायनानें आपल्या सर्वानुक्रमणींत पर्यायानें खिलांचा उल्लेख केला आहे. (४.३–८) तथापि त्याच्याहि पूर्वींचा आणि ऋषि, छंद आणि देवता यांच्या वेगवेगळ्या अनुक्रमाणिका करणाऱ्या शौनकानें आपल्या अनुवाकानुक्रमणीच्या प्रस्तावनेंत खिलांचा सामान्य उल्लेख केला आहे.

एकैकमनुवाकं तु खिलानि ब्राह्मणानि च । संवत्सरे संवत्सरे पठेदहरहः शुचिः ॥

त्याच अनुक्रमणींत पुनः पहिल्या मंडळाच्या तेराव्या व चवदाव्या अनुवाकांमध्यें शौनकानें म्हटलें आहे कीं, मी खैलिक अनुवाकांची गणना करीत नाहीं.

खैलिकानामनादेशोऽस्मिन् ग्रंथेऽनुवाकानाम् । यस्तु चर्चायते वेदे तस्य संख्येति न श्रुतिः ॥

शौनकाच्या आर्षानुक्रमणीमध्यें खिलांचा उल्लेख केलेला दिसतो.

अनुवाक, सूक्त, वर्ग, ऋचा, छंद आणि पदें यांचा हिशेब देतांना खिला हिशेबांत धरीत नाहींत.

सहस्रमेतत्सूक्तानां निश्चितं खैलिकैर्विना । दशसप्त च पञ्यंते—

निरुक्तांत खिलांतील ऋचांचा उल्लेख आहे (९–५,७–२९) पाणिनीच्या गणपाठांत खिलांचा उल्लेख आहे. (४.२.८०.) ज्या कांहीं ऋचा ऋग्वेदांत खिल म्हणून आहेत त्या अथर्ववेदांत मूळ म्हणून धरल्या आहेत. अशा प्रकारचें खिलवाङ्मय वेदांत व पुराणांत अनेक ठिकाणीं आहे.

खिल बहुतकरून मंडळाच्या आणि अनुवाकाच्या शेवटीं येतात. अष्टकाच्या व अध्यायाच्या शेवटीं येत नाहींत.

खिलांचा आश्वलयन गृह्यसूत्रांत (३–८–१६) विनियोग केलेला आढळतो.

आम्ही मॅक्समुल्लरच्या प्रतीला धरून खिलांचें भाषांतर केलें आहे. पण त्यांत पुढील सूक्त नाहीं.

तन्मे मनः शिवसंकल्पमस्तु—हे सात मंत्र ऋग्वेदाचें परिशिष्ट म्हणून शांतिकमलाकर व निबंधसार या ग्रंथांत भुवनेश्वरीशांतिप्रकरणांत दिले आहेत व कांहीं वैदिकांच्या पाठांतहि आहेत. मात्र सहा नसून तेथें सात आहेत. तेथें असें म्हटलें आहे:—

> न च स्वशाखायां शिवसंकल्पमंत्राभाव इति वाच्यं, प्राचीनतरपुस्तके अष्टमाष्टके अष्टमाध्याये २४ वर्गांते शिवसंकल्पसूक्तस्य परिशिष्टत्वेनोपालभात् । ऋग्विधाने तस्मिन्नेव स्थले तद्विनियोगोपलंभाच्च ॥
>
> शांतिकमलाकर भुवनेश्वरी

आठव्या मंडळांत वालखिल्य नांवाचें एक अकरा अध्यायांचें पदपाठासहित मोठें परिशिष्ट आहे. त्याचा अष्टमंडळपरिचयांत विचार केला आहे.

आज आम्ही ऋग्वेदाचें दशममंडळ प्रसिद्ध करीत आहोंत. हें ऋग्वेदाचें शेवटलें मंडल आहे. यावरून आम्ही उलट बाजूनें आरंभ केला आहे असें दिसेल. आजपर्यंत ऋग्वेदाच्या भाषांतराचे जे प्रयत्न झालें ते सर्वच अपुरे राहिले आहेत. ते सर्व विचारांत घेऊन आम्ही उलट बाजूनें सुरवात केली आहे. अशीच पुढलीं मंडळें आम्ही प्रसिद्ध करणार आहों. प्रयत्न अपुरा राहिला तरी मराठी भाषेंत भाषांतर पुरें झालें असें आमच्या प्रयत्नानें ठरेल.

मकरसंक्रमण }
१८४९. }

सिद्धेश्वरशास्त्री चित्राव.

ऋग्वेदाचें मराठी भाषांतर

दहावें मंडल

सूक्त पहिलें.

ऋषिः-त्रित आप्त्य; देवता-अग्नि; छंद-त्रिष्टुभ्.

१. हा थोर अग्नि सकाळीं प्रज्वलित केला आहे. रात्रीच्या काळोखांतून आपल्या तेजानें अग्नि बाहेर निघत आहे. प्रज्वलित झाल्यामुळें सुंदर दिसणारा हा अग्नि आपल्या तेजस्वी प्रकाशानें संपूर्ण घर भरून टाकीत आहे.

२. हे अग्ने, प्रकट झालेला तूं ओषधीमध्यें गुप्तरूपानें असतोस, (एवढेंच नव्हे तर) सर्व द्यावापृथिवींच्या अन्तर्गत असतोस. चित्रविचित्र रंग असलेला आणि गोजिरवाणा दिसणारा (असा तूं) अंधाराला शत्रूसारखा पराभूत करतोस आणि लांकडामुळें तडातडा पेटत असतोस.

३. ज्ञानी, प्रज्वलित केलेला, थोर आणि चहूंकडे भरून राहिलेला अग्नि माझें—त्रिताचें—संरक्षण करो. कारण ज्या वेळीं (उपजीविकेचें साधन म्हणून) लोक पावसाची प्रार्थना करतात त्यावेळीं सर्व थोर लोक अग्नीची मनःपूर्वक पूजा करतात.

४. हे अग्ने, म्हणूनच अन्न देऊन जगाचें पोषण करणाऱ्या औषधी, अन्नाची वृद्धि करणाऱ्या तुझ्या उपयोगी (इंधनरूपानें) पडतात. आणि तूंहि अन्नरूपानें त्यांच्यांत रहातोस. आणि त्या जीर्ण झाल्या कीं तुला अन्न म्हणून लांकडाच्या रूपानें प्राप्त होतात. खरोखर मानवसृष्टींत तूं देव आहेस.

५. यज्ञाचा देव, चित्रविचित्र रथ असलेला, सर्व यज्ञांतील मुख्य, तेजस्वी, माहात्म्यानें सर्व देवांमध्यें प्रतिइंद्र आणि सर्व लोकांना अतिथीप्रमाणें पूज्य असणारा अशा अग्नीची आम्ही संपत्तीकरतां स्तुति करतों.

६. हे अग्निराजा, तेजस्वी वस्त्रें धारण करणाऱ्या, पृथ्वीच्या नाभिस्थानीं इळा म्हणजे उत्तरवेदि येथें निर्माण केलेला, तेजस्वी व पुढें स्थापन केलेला असा तूं ह्या यज्ञांत देवांचें पूजन कर.

७. हे अग्निदेवा, मुलगा आंईबापांना मदत करतो, त्याप्रमाणें तूं द्यावापृथिवींना सदोदित मदत करीत असतोस. हे तरुणा, आम्हां भक्तांकडे तूं ये. आणि हे बलपुत्रा, तूं इंद्रादिक देवांना आमच्या यज्ञामध्यें आण.

सूक्त दुसरें.

ऋषिः-त्रित आप्त्य; देवता-अग्नि; छंदः-त्रिष्टुभ्.

१. हे अत्यंत तरुण अग्ने, हवि इच्छिणाऱ्या देवांना हविर्द्रव्य पोंचवून संतुष्ट कर. हे ऋतूंच्या अधिपा, कालज्ञ असा तूं ह्या यज्ञांत देवांची पूजा कर. हे अग्ने, ज्याअर्थीं तूं सर्व होत्यांमध्यें प्रमुख आहेस त्याअर्थीं सर्व श्रेष्ठ ऋत्विजांसह यजन कर.

२. हे अग्ने, तुला होता, पोता यांनीं केलेलीं स्तोत्रें आवडलीं आहेत. तसेंच तूं बुद्धिमान्, सत्यनिष्ठ आणि धन देणारा आहेस. आणि आम्हीहि देवांना हवि अर्पण करणारे आहोंत. म्हणून आम्ही असें इच्छितों कीं, हा श्रेष्ठ अग्नि देवांना आम्ही दिलेला हवि पोंचवो.

३. आम्ही देवांच्या मार्गानें जाऊं. जें कर्म आम्ही करूं शकूं तें आम्ही आरंभून समाप्तहि करूं. नंतर ज्ञात्या अग्नीनें तें कर्म देवांकडे पोंचवावें. तोच खरोखर आमचा होम पुरा करणारा आहे. तोच ऋतु आणि यज्ञ करो.

४. हे देवहो, अज्ञानानें आम्ही जीं कर्में, तुम्ही जाणत असतां केलीं नसतील, तीं सर्व कर्में ज्ञानी अग्नीनें परिपूर्ण करावींत. जो काल देवांना समर्थ करतो, त्या सामर्थ्यानें अग्नीनें आमच्या कर्मांतील उणेपणा काढून टाकावा.

५. जें कर्म अल्पज्ञतेमुळें व दारिद्र्यामुळें लोकांना समजत नसेल तें कर्म ज्ञाता, देव, कर्मज्ञ आणि देवांना हवि पोंचवणारा असा अग्नि पुरें करो.

६. हे अग्ने सर्व यज्ञांचें मुख, आश्चर्यकारक व ज्ञानी अशा तुला यज्ञ करणारानें उत्पन्न केलें. तूं आम्हांला नोकरादिकांनीं युक्त भूमि दे. स्पृहणीय, पचण्यास हलकी व सर्व लोकांना पुष्ट करणारीं अशीं अन्नें देवांकडे पोंचीव.

७. हे अग्ने, ज्या तुला द्यावापृथिवींनीं उत्पन्न केलें, ज्या अन्तरिक्षानें तुला उत्पन्न केलें, तसेंच कारागीर त्वष्टा यानें तुला उत्पन्न केलें, तो तूं पितृयान मार्ग जाणणारा तेजःपुंज असा प्रकाशमान हो.

सूक्त तिसरें.

ऋषिः–त्रित आप्त्य; देवता–अग्नि; छंद–त्रिष्टुभ्.

१. हे अग्निदेवा, तूं सर्वांचा ईश्वर आहेस. देवांकडे हवि पोंचविणारा, प्रदीप्त होणारा, शत्रूंना भीतिप्रद, निर्माता असा अग्नि सर्वांकडून ऐश्वर्य देणारा म्हणून पाहिला जातो. तसेंच तो आपल्या कान्तीनें विशेष शोभतो. नंतर आपलें पांढरें स्वच्छ तेज कमी होत असलेला रात्र घालवितो.

२. तो अग्नि महान् व सर्व जगाच्या पालनकर्त्या सूर्यापासून उत्पन्न होणाऱ्या उषेच्या साह्यानें काळ्या कुट्ट रात्रीचा पराजय करतो,त्या वेळीं गमनशील अग्नि आपल्या तेजानें आकाशाला व्यापून सूर्याच्या किरणांना प्रतिबंध करीत असतो. त्या वेळीं अग्नीची शोभा कांहीं अवर्णनीय असते.

३. रमणीय,उषेनें युक्त असा अग्नि आला.बाहिणीच्या मागें लागलेल्या जाराप्रमाणें अग्नि उषेच्या मागें लागला आहे. आपल्या सुंदर तेजानें युक्त असा अग्नि आपल्या शुभ्र तेजानें अंधकाराला पळवून लावतो.

४. ह्या थोर अग्नीचे तेजस्वी किरण अग्नीच्या भक्तांना त्रास देत नाहींत. यज्ञांत मित्र, कल्याणकर, स्तुत्य, कामपूरक, थोर आणि सुमुख अशा अग्नीचे तेजस्वी किरण प्रसिद्ध आहेत.

५. प्रकाशमान, थोर आणि सुंदर अशा अग्नीचे तेजस्वी किरण शब्द करीत मरुताप्रमाणें सर्वत्र पसरतात. तसेंच प्रशस्त, तेजस्वी, अल्लड आणि अत्यंत मोठ्या अशा किरणांनीं अग्नि आकाश व्यापतो.

६. दर्शनीय, आयुधें धारण केलेला, देवांकडे धांवणारा, अशा अग्नीच्या उष्ण ज्वाला वायूमुळें शब्द करतात. तसेंच देवांमध्यें मुख्य, गमनशील, वैभवशाली, असा थोर अग्नि प्रौढ, शुभ्र व कडकडणाऱ्या ज्वालांनीं शोभतो.

७. हे अग्ने, तो तूं आमच्या यज्ञांत थोर देवांना आण. तसेंच तरुण स्त्रियासारख्या द्यावापृथिवीमध्यें सूर्याच्या रूपानें संचार करणारा तूं आहेस. तो तूं आमच्यामध्यें बस. तसेंच भक्तसुलभ व वेगवान असा तूं आपल्या चपल घोड्यांसह आमच्या यज्ञामध्यें ये.

सूक्त चवथें.

ऋषिः–त्रित आप्त्य; देवता–अग्नि; छंद–त्रिष्टुभ.

१. हे अग्निदेवा, तुला मी हवि देतों. तसेंच मननीय अशीं स्तोत्रें मी तयार करतों. सर्ववंद्य असा तूं आम्ही स्तुति करीत असतां जवळ आलास कीं, तुला हवि अर्पण करूं. हे प्राचीन राजा, तूं यज्ञेच्छु पुरुषाला किंवा पुरूला निर्जल प्रदेशांतील पाणपोईसारखा आहेस.

२. हे तरुण अग्ने, थंडीनें काकडलेल्या गायी ज्याप्रमाणें उष्ण अशा गोठ्यांत जातात, त्याप्रमाणें लोक तुझी सेवा करतात. तो तूं देवांचा आणि माणसांचा दूत आहेस. हविर्द्रव्यें घेऊन तूं आकाशमार्गानें संचार करीत असतोस, त्या तुझी आम्ही स्तुति करतों.

३. हे अग्निदेवा, जयशील अशा तुला, पुत्राप्रमाणें पृथिवी माता आपलासा म्हणून वाढविते. तूं आकाशमार्गानें जातोस येतोस. तूं यज्ञ करणाऱ्याकडून हविर्द्रव्यें घेऊन, मोकळे सोडलेलें जनावर गोठ्यांत जातें त्याप्रमाणें तूं देवाकडे जाऊं इच्छितोस.

४. हे बुद्धिमान् आणि चेतन अग्ने, आम्हां मूर्खांना तुझें माहात्म्य समजत नाहीं. तुझें माहात्म्य तूंच जाणतोस. लतासारख्या पडणाऱ्या आपल्या ज्वालेनें आहुति भक्षण करतोस. लोकांचा धनी असा तूं आहुतींचा आस्वाद घेत असतोस.

५. लोक एकमतानें ज्या अग्नीला प्रसन्न करतात तो अग्नि क्वचित् जुन्या औषधींत (लाकडांत) उत्पन्न होतो. पांढरा व धूर असलेला कदाचित् अरण्यांत असतो किंवा बैल जसा पाण्याकडे जातो, तसा सदा पवित्र असणारा अग्नि पाण्याचा आश्रय केलेला असतो.

६. हे अग्निदेवा, वनचर, जीवाविषयीं बेपर्वा, असे चोर ज्याप्रमाणें अनेक दोऱ्यांनीं वाटसरूंना बांध-

तात त्याप्रमाणें माझे हात अग्नि उत्पन्न करण्याकरतां बांधले गेले आहेत. हे अग्निदेवा, हे तुझ्याकरतां मी आतां नवीन स्तोत्र करतों आहे. म्हणून तूं आपल्या पवित्र अंगांनीं, रथाला घोडे जोडतात त्याप्रमाणें, मला यज्ञाशीं युक्त कर.

७. हे अग्निदेवा, आम्हीं दिलेलें अन्न, आम्ही केलेले नमस्कार, स्तुति, सदोदित घडत असो. तसेंच हे अग्निदेवा, आमच्या पुत्रपौत्रांचें रक्षण कर. आणि न चुकतां आमच्या शरीराचें रक्षण कर.

सूक्त पांचवें.

ऋषिः–त्रित आप्त्य; देवता–अग्नि; छंद–त्रिष्टुभ्.

१. धन देणारा, धनवान, अनेक ठिकाणीं जन्म घेणारा आणि अद्वितीय अग्नि आमचीं अन्तःकरणें जाणतो. (हा अग्नि) आकाशाच्या जवळ असणाऱ्या मेघांत असतो. हे अग्नि, तूं आपल्या मेघांतील (विद्युल्लतारूपी) स्थानीं जा.

२. आहुति देणारे, अग्नीची स्तुति करणारे थोर यजमान घोडे प्राप्त करिते झाले. सृष्टिनियमांचें उत्पत्तिस्थान अशा अग्नीचें शहाणे लोक संरक्षण करतात. तसें अन्तःकरणांत अग्नीचीं नांवें जपतात.

३. सृष्टिनियम व नवीनपणा यांनीं युक्त असणारी द्यावापृथिवी अग्नीला धारण करतात. आणि थोडक्याच कालांत अग्नीला उत्पन्न करतात. सर्व चराचर सृष्टीचा आधार अशा अग्नीला उत्पन्न करणाऱ्या अंशाला मनानें उत्पन्न करणारे आम्ही, त्याची पूजा करतों.

४. यज्ञाचे प्रवर्तक, इष्ट गोष्टी प्राप्त करूं इच्छिणारे, प्राचीन लोक, चांगला प्रज्वलित अग्नि, बलप्राप्तीकरतां उपासितात. त्रैलोक्यनिवासी अग्नि, उदकाकरतां घृत व अन्न यांनीं प्रज्वलित करतात, म्हणून आम्ही त्या अग्नीची स्तुति करतों.

५. स्तोत्यांकडून स्तविला जाणारा सर्वज्ञ अग्नि, आपल्या तेजस्वी सात जिव्हा, उंच प्रकट करता झाला. प्राचीन अग्नि आकाशांत चमकला,आणि तेजानें उगवत्या सूर्याचें रूप प्राप्त करता झाला.

६. शहाण्या ऋषींनीं सात मर्यादा निर्माण केल्या. त्यांतील एकहि पापीच पुरुष उल्लंघितो. ह्या मर्यादा पाळावयास लावणारा अग्नि त्रैलोक्यांत रहात असतो.

७. स्थूल व सूक्ष्म जगत्,पृथ्वी,अन्तरिक्ष आणि जे स्वर्गांत उत्पन्न झाले त्यांत प्रथम अग्नि उत्पन्न झाला. सृष्ट्यारंभीं अग्निच बैल आणि गाय रूपानें उत्पन्न झाला.

---

६. **टीप**—पानमक्षाः स्त्रियो मृगया दंडः पारुष्यमन्यदूषणम् । (अथवा) स्तेयं गुरुतल्पारोहणं ब्रह्महत्यां भ्रूणहत्यां सुरापानं दुष्कृतकर्मणः पुनः पुनः सेवा पातकेऽनृतोद्यम् (निरुक्तम् ६–२७)

सूक्त सहावें.

ऋषिः-त्रित आप्त्य; देवता–अग्नि; छंदः–त्रिष्टुभ्.

१. ज्या अग्नीच्या साहाय्यामुळें भक्ताची स्वगृहीं उन्नति होते आणि जो सूर्यकिरणांच्या प्रशस्त तेजानें वेष्टिलेला व तेजस्वी असा सर्वत्र असतो तो हा अग्नि होय.

२. सत्य, नित्य आणि तेजस्वी अशा तेजस्वी किरणांनीं जो अग्नि शोभतो आणि जो मैत्री करण्याकरतां व भक्ताच्या कल्याणाकरतां सतत पळणाऱ्या घोड्याप्रमाणें जात असतो, (तो हा अग्नि होय.)

३. जो अग्नि सर्व जगाचा धनी आहे. जो विश्वगामी उषःकालीं होम करणारावर सत्ता चालवितो आणि शत्रूंनीं ज्यांना धक्का लावला नाहीं असे सर्वच भक्त ज्यामध्यें महत्त्वाचीं हविर्द्रव्यें समर्पण करतात, तो हा अग्नि होय.

४. सामर्थ्यानें प्रज्वलित केलेला, स्तोत्रांनीं स्तविलेला, देवांकडे मोठ्या वेगानें जाणारा, प्रशंसनीय, देवांचा दूत, यज्ञयोग्य, देवयुक्त असा तो अग्नि देवांना हविर्द्रव्यें देतो.

५. हे ऋत्विजहो, तुम्ही भोग्य पदार्थ देणाऱ्या तेजस्वी अशा अग्नीला इंद्राप्रमाणें स्तोत्रें आणि हवि यांनीं आमच्याकडे अभिमुख करा. ह्या अग्नीला मोठमोठे स्तोते शत्रुंजय देवांना बोलावणारा म्हणून आदरानें स्तवीत असतात.

६. हे अग्निदेवा, घोडेस्वार जसे युद्धांत एकत्र होतात तशी सर्व संपत्ति तुझेपाशीं एकत्र आहे म्हणून तूं आम्हांला इंद्राचें संरक्षण दे.

७. हे अग्ने,तूं उत्पन्न झाल्याबरोबर मोठेपणामुळें हवनीय होतोस,म्हणून थोर भक्त तुझें अनुसरण करतात आणि ते श्रेष्ठ लोक तुझ्या संरक्षणामुळें उत्कर्ष पावतात.

सूक्त सातवें

ऋषिः-त्रित आप्त्य; देवता-अग्नि; छंद-त्रिष्टुभ्.

१. हे अग्निदेवा, तूं स्वर्ग आणि पृथ्वी या मधून सर्व प्रकारचें अन्न आणि कल्याण यज्ञ करण्याकरतां दे, म्हणजे आम्ही तुझी सेवा करूं. हे दर्शनीय अग्ने, पुष्कळ, स्तुत्य अशा ज्ञानांनीं आमचें तूं संरक्षण कर.

२. हे अग्निदेवा, तुझ्यापासून उत्पन्न झालेली आमची बुद्धि, तुझ्या कृपेनें प्राप्त झालेले गायी घोडे वगैरे जें धन त्याची प्रशंसा करते. ज्या वेळीं मनुष्य धन प्राप्त करतो, त्या वेळीं हे तेजस्वी अग्ने, आम्ही तुझी स्तुति करतों.

३. मी अग्नीला पिता मानतों. अग्नीला बंधु आप्तइष्ट समजतों आणि माझा अग्नि हाच नेहमींचा मित्र आहे. थोर अग्नीच्या स्थानाची आम्ही उपासना करतों. (इष्टसिद्ध्यर्थ) ज्याप्रमाणें लोक सूर्याच्या तेजस्वी मंडलाची पूजा करतात तशी आम्ही अग्नीच्या स्थानाची उपासना करतों.

४. हे अग्निदेवा, आम्ही तुझी उपासना म्हणून हीं स्तोत्रें केलीं आहेत. आमच्या घरीं हवन केलेला तूं ज्याचें संरक्षण करतोस तो मी सत्यनिष्ठ, अश्वयुक्त आणि अन्नयुक्त असा होईन. अशा आम्हांला चांगले दिवस येऊन उत्तम हवि अर्पण करण्याचा प्रसंग येवो.

५. तेजस्वी, एखाद्या प्रेमळ मित्राप्रमाणें सत्कर्ता, प्राचीन, होता, आणि यज्ञाला पूर्णता आणणारा, अशा अग्नीला मनुष्यांनीं आपल्या हातांनीं निर्माण केलें. आणि लोकांत देवांना बोलविणारा म्हणून त्याची स्थापना केली.

६. तेजस्वी अग्ने, स्वर्गांतल्या देवांचें तूं स्वतः यजन कर. अल्पज्ञ आणि पूर्ण होऊं इच्छिणारा मनुष्य तुझ्या शिवाय काय करूं शकणार आहे ! तसेंच हे देवा, तूं कालविशेषीं देवांचें जसें यजन करशील तसेंच हे सुजन्म, तूं आपलेंहि यजन कर.

७. हे अग्निदेवा, दृष्ट व अदृष्ट संकटांपासून आमचें रक्षण करणारा हो. तूं आमच्याकरतां अन्न तयार करणारा व अन्न देणारा हो. हे पूज्य अग्ने, तूं हविर्द्रव्यें आम्हांला दे. तसेंच आमचें शरीर काळजीनें रक्षण कर.

सूक्त आठवें.

ऋषिः-त्वष्टृपुत्र त्रिशिर; देवता—१-६ अग्नि, ७-९ इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्.

१. मोठ्या ज्ञानानें युक्त होत्साता अग्नि द्यावापृथिवीभर जातो. आणि (देवांना बोलावण्याचे वेळीं) बैलासारखा (जोरानें) ओरडतो. स्वर्गाच्या भोवतालचे व मधले प्रदेश व्यापतो आणि अन्तरिक्षांत तर (विद्युद्रूपानें) फारच वाढतो.

२. सर्वत्र भरलेला, कामपूरक, तेजस्वी अग्नि प्रसन्न होतो. स्तुत्य, लहान मुलासारखा, देवांचें काम करणारा अग्नि शब्द करतो. तो अग्नि यज्ञ आणि उत्साहकारक कर्म करणारा आपल्या स्थानीं मुख्यत्व पावतो.

३. जो अग्नि आपल्या आईबापांचीं (अरणी) मस्तकेंहि थोडीशी जाळतो अशा तेजस्वी अग्नीचें तेज यज्ञांत स्थापन केलें जातें. ह्या अग्नीचें कुंडांतील तेजस्वी, यज्ञस्थानांत वाढलेलें असें शरीर शहाणे सेवितात.

४. हे स्तुत्य अग्ने, तूं सर्व उषांच्या पूर्वी येतोस. तूं दिवस आणि रात्रीं यांमध्यें तेजस्वी असतोस आणि स्वतःच्या शरीरापासून सूर्य उत्पन्न करून सप्त स्थानें (धिष्ण्यादि) यज्ञाकरतां निर्माण करतोस.

५. थोर सृष्टिनियमांचा तूं डोळा आहेस. तूं रक्षक आहेस. ज्या वेळीं उदकाकरितां वरुण जातो, त्यावेळीं तूंच असतोस. हे अग्ने 'अपां नपात्' तूंच आहेस. ज्या यजमानांचे हवि खातोस त्यांचा तूं दूत होतोस.

६. हे अग्निदेवा, जेथें सुंदर घोड्यांनीं युक्त अशा वायूशीं तूं मिळतोस तेथें तूं पाऊस पाडतोस. तसेंच आकाशांत तूं श्रेष्ठ व सर्वपोषक सूर्याला मदत करतोस. आणि तूं आपल्या जिभेस देवांकडे हवि नेणारी करतोस.

७. सुरक्षित 'त्रित' बल मिळावें म्हणून श्रेष्ठ व पालक अशा इंद्राला यज्ञानें आपलासा करतां झाला. द्यावापृथिवींत नांवाजलेला त्रित स्तोत्रें म्हणत आपलीं आयुधें चालवतो आहे.

८. तो त्रित आप्त्य वडिलार्जित आयुधें जाणत असल्यामुळें इंद्राच्या प्रेरणेनें खूप लढला. सूर्यासारख्या त्रिशीर्षाला ठार करता झाला. त्वष्टृपुत्र अशा माझ्याहि गाई पळवून नेल्या.

---

५. अपां नपात्=पाण्याचा नातु-अद्भ्यो हि मेघो जायते । मेघादग्निर्विद्युद्रूपो जायते । इत्यपां पौत्रत्वमुच्यते.।

९. सज्जनांचा रक्षणकर्ता असा इंद्र पुष्कळच बलाचा अभिमान बाळगणाऱ्या त्वष्टृपुत्र मन्यमानाला मारता झाला. त्वष्टृपुत्राच्याहि गाईंचा धनी विश्वरूप अशा माझीं तिन्ही डोकीं त्यांनीं गर्जना करीत तोडून टाकलीं.

सूक्त नववें.

ऋषिः–अंबरीषपुत्र सिंधुद्वीप किंवा त्वष्टृपुत्र त्रिशिर; देवता–अप्; छन्दः—१–२ अनुष्टुभ्, ३–४ गायत्री, ५ वर्धमाना, ६ गायत्री, ७ प्रतिष्ठा.

१. हे उदकांनो, ज्या अर्थीं तुम्ही (खानपानादिकानें) सुखदायक आहांत त्याअर्थीं अन्न आणि पवित्र व रमणीय अशा आत्मज्ञानाकरतां आमचें रक्षण करा.

२. आपल्या बालकाचें कल्याण इच्छिणाऱ्या माता ज्याप्रमाणें बालकास स्तनपान करवितात; त्याप्रमाणें तुम्ही आपला कल्याणकारक रस आम्हांस द्या.

३. हे उदकांनो, ज्यांचा (रोगांचा)नाश झाला असतां आम्हाला आनंद होईल, त्यांच्या नाशाकरतां आम्ही तुमचा स्वीकार करतों. आम्हांला प्रजोत्पादन समर्थ करा.

४. उदक–देवता आम्हांस सुख देवोत, आम्हांस आरोग्यकारक उदक पिण्यास मिळो, आणि रोग व अवर्षण यांची भीति नाहींशी करणारे उदकांचे प्रवाह आम्हांला पवित्र करोत.

५. रोग निवारण करणाऱ्या, आरोग्यादि देण्यास समर्थ असणाऱ्या आणि प्राणिमात्रांस आधारभूत अशा उदकांच्या जवळ मी ओषधींची याचना करतों.

६. उदकांत सर्व औषधें आणि सर्व जगताला सुख देणारा अग्नि आहे असें सोमानें मला सांगितलें.

७. हे उदकांनो, मी दीर्घायुषी होऊन चिरकाल सूर्यास पाहाण्याला समर्थ होण्याकरतां माझ्या शरीरांत औषधींचा पुरवठा करा.

८. हे उदकांनो, माझे ठिकाणीं जें कांहीं पाप असेल, मी बुद्धिपूर्वक कोणाचा द्रोह केला असेल अथवा जे कांहीं व्यर्थ शिव्याशाप दिले असतील ते सर्व वाहून धुवून टाका.

९. हे उदकांनों, आज मी तुमची उपासना केली आहे आणि तुमच्या सारभूत अशा तत्त्वांशीं संयुक्त झालों आहे. हे अग्ने, जलदेवता बरोबर असणारा तूं ये आणि मला तेजःसंपन्न कर.

सूक्त दहावें

ऋषिः–यम–यमी;देवता—यम–यमी;छंदः–त्रिष्टुभ्.

१. यमी म्हणतेः—गुप्त व प्रशस्त अशा अर्णव प्रदेशांत जाऊन माझ्या पूज्य सख्याला मी (संभोग) सौख्यासाठीं अभिमुख करूं इच्छितें. पृथ्वीवर उत्कृष्ट गुणवान् पुत्र निर्माण व्हावा म्हणून तुझा गर्भ माझे ठिकाणीं प्राप्त होवो.

२. यम म्हणतोः–तुझा सखा असलें सख्य इच्छित नाहीं. कारण जी समान नात्याची आहे, ती विषम नात्याची होईल. असुरांचे पुत्र महाबुद्धिमान् आणि शूर आहेत. द्यावादि लोक धारण करणारे आहेत, ते सर्वत्र पहातात.

३. यमी म्हणतेः—अमर असणारे देवहि एकाद्या मनुष्याला त्याज्य वाटणारें हें कृत्य करतात. म्हणून तुझें मन माझ्या मनाशीं जुळो. उत्पन्नकर्त्या प्रजापतीप्रमाणें तूं माझ्या शरीरांत प्रवेश कर.

४. यम म्हणतोः—जें पूर्वी झालें तें आम्ही करणार नाहीं. खरें बोलणारे आम्ही खोटें कसें बोलूं? अन्तरिक्षांत असणारा सूर्य आणि त्याची आमचें पोषण करणारी ती बायको (सरण्यू) आमचे (उत्पत्तिकर्ते) आईबाप आहेत. म्हणून आपलें श्रेष्ठ (भाऊ बहिणीचें) नातें आहे.

५. यमी म्हणतेः—सर्वप्रेरक आणि सर्वव्यापक आपला उत्पन्नकर्ता त्वष्टृदेव यांनीं आपणांस गर्भातच नवराबायको केलें आहे. त्या प्रजापतीची इच्छा कोणी मोडूं शकत नाहीं. आपलें नातें पृथ्वी जाणते आणि द्युलोकहि जाणतो.

६. आपला हा पहिला संबंध कोणाला कळणार आहे ? कोण हें पहातो; आणि कोण बाहेर फोडणार आहे ? मित्रावरुणांच्या विस्तृत असणाऱ्या ह्या जगांत, अधःपाताच्या कल्पनेने भारला गेलेल्या, काय बोलतोस हें ?

७. एकाच ठिकाणीं सहशयन करण्याचा यमविषयक काम यमीचे ठिकाणीं आला आहे. मी माझी तनु पती पुढें जाया करते त्याप्रमाणें त्वदधीन करते. रथ आणि चाक याप्रमाणें एकमेकांस आलिंगन देऊं.

८. यम म्हणतोः—देवांचे हेर जे येथें संचार करतात ते (कोठेंहि) थांबत नाहींत व डोळेझांक करीत नाहींत. हे टोचून बोलणारे, तूं त्वरित अन्य पुरुषाकडे जा. व त्याला रथाच्या चाकाप्रमाणें आलिंगन दे.

९. यमी म्हणतेः—रात्र आणि दिवस तुला (बुद्धि) देवोत. सूर्यरूपी डोळा पुनः प्राप्त होवो. बांधवभूत असणारी द्यावापृथ्वीची जोडी यमाची यमी बायको करोत.

१०. यम म्हणतोः—जेव्हां भाऊ बहिणींशीं लग्न करीत नाहींत असा आतां पुढील काल येत आहे. म्हणून हे सुंदर स्त्रिये, माझ्याशिवाय दुसऱ्या मनुष्याची तूं इच्छा कर. आणि त्याचा हात तूं उशाला घे.

११. यमी म्हणतेः—जो भाऊ असूनहि बहीण अनाथ होते तो भाऊ कसला ? आणि जी बहीण असतांनाहि भाऊ दुःखी होतो ती बहीण कसली ? कामवासनेनें वेडी झालेली मी हें बडबडतें आहें. माझ्या शरीराशीं संलग्न हो.

१२. यम म्हणतोः—मी तुझ्या शरीराशीं संलग्न होणार नाहीं. जो बहीणीशीं संबंध करतो तो पापी होतो असें म्हणतात. हे सुंदर स्त्रिये, माझ्याशिवाय दुसऱ्याशीं तूं आनंदाची कल्पना कर. तुझा भाऊ हें करूं इच्छित नाहीं.

१३. यमी म्हणतेः—हे यमा, तूं अति दुर्बल झाला आहेस. तुझी मला कींव येते. तुझें मन व हृदय तुझ्या ताब्यांत नाहीं. हें आम्हास ठाऊक झालें. तंग ज्या प्रमाणें अश्वाला वेष्टितो किंवा लता ज्याप्रमाणें वृक्षाला परिवेष्टून असते त्याप्रमाणें दुसरी कोणी तरी तुला खात्रीनें वेष्टून आहे.

१४. यम म्हणतोः—तर मग तूं दुसऱ्याच वृक्षाला, लता आलिंगन देते त्याप्रमाणें दृढ आलिंगन दे व तोहि तुला तसेंच आलिंगन देवो. तूं त्याचें मन ओढून घे. तो तुझे घेवो व नंतर त्यासह तूं गोड सुखाचा अनुभव घे.

टीपः—यम व यमी हे आवळे जावळे भाऊ बहीण सृष्ट्यारंभीं निर्माण झाले होते त्यांचा हा संवाद आहे. हा संवाद सृष्टीच्या प्रारंभींच्या स्थितीचा द्योतक आहे, असें कांहींचें म्हणणें आहे. कांहींच्या मतें हें द्यावापृथ्वीवर किंवा दिवसरात्रीवर केलेलें रूपक आहे. कांहीं असलें तरी यांत ग्रथित केलेली नीतीची कल्पना अनेक दृष्ट्या अत्यंत महत्त्वाची आहे.

सूक्त अकरावें.

ऋषिः—हविर्धान आंगि; देवता—अग्नि; छंदः—७–८–९ त्रिष्टुभ्, बाकी जगती.

१. पाऊस पाडणारा, थोर, अदम्य, असा अग्नि यज्ञ करणाऱ्यांकरतां आकाशांतून पाऊस पाडतो. जसा वरुण बुद्धीनें सर्व जग जाणतो तसें अग्निहि जाणतो. त्याचें लोक पूजन करोत.

२. अग्नीचे गुण बोलणारी, गाणारी आणि शुद्ध अशी अग्नीची स्त्री स्तुति करणाऱ्या माझें मन स्तवनांत गुंगून टाको. अग्नि आम्हांला यागामध्यें स्थापो. मुख्य आणि आमच्या कुलांतील वडील हें स्तवन करीत आहे.

३. ज्यावेळीं होम इच्छिणारा व होम पुरा करणारा अग्नि स्तुति करून यज्ञाकरतां उत्पन्न केला गेला, त्या वेळीं शुभ, शब्द करणारी, प्रख्यात अशी ती प्रसिद्ध उषा मनुष्याकरतां सूर्याला घेऊन उदय पावली.

४. नंतर यज्ञांत पाठविलेला श्येन नांवाचा पक्षी, चांगला आकर्षक व पुरेसा सोम आणता झाला. जेव्हां थोर लोक आकर्षक अग्नीची प्रार्थना करतात तेव्हां मग कर्म सुरू केलें जातें.

५. हे अग्निदेवा, पशूंना गवताप्रमाणें आम्हांला तूं नेहमीं सुंदर वाटतोस. तसेंच तूं मनुष्यांना यज्ञामुळें फायदेशीर हो. स्तोत्यांच्या स्तोत्राला मान देत व हविर्द्रव्यें ग्रहण करीत अनेक देवांसह तूं त्यांच्याजवळ जातोस.

६. हे अग्निदेवा, तुझें तेज सूर्याप्रमाणें सर्व द्यावापृथ्वीमध्यें पसरीव. यजमान यज्ञ करूं इच्छितो. अन्तःकरणपूर्वक यज्ञाकरतां तुझ्याकडे जातो, स्तोत्रें म्हणतो. अग्नि आपलें कर्म चांगल्या प्रकारें करूं इच्छितो. तुमचीं स्तोत्रें वाढावींत असें इच्छितो. बुद्धिमान् मनुष्य (कर्मांत न्यूनता येईल म्हणून) भीत असतो.

७. हे बलपुत्र अग्ने, जो मनुष्य तुझी कृपा प्राप्त करतो तो लोकप्रसिद्ध होतो. त्याचें नांव सर्वत्र ऐकूं येते. अन्नाची समृद्धि असलेला, घोडे असलेला, तेजस्वी आणि बलवान असा तो मनुष्य अनेक दिवस जगतो.

८. हे अग्ने, जर ही स्तुति यज्ञार्ह देवांना आवडेल आणि जर हे स्वधायुक्त अग्ने, तूं मूल्यवान् धन यज्ञ करणाऱ्यांना देत असशील तर आतां आम्हांला धन दे.

९. हे अग्ने, सर्व देवतांनीं युक्त अशा घरांतून आमचें स्तोत्र ऐक. तूं अमृत प्रसवणारा रथ जोड. आणि आमच्याकरतां देव ज्यांच्यापासून निर्माण झाले अशा द्यावापृथ्वी रथांत आण. देवांपैकीं कोणी आमच्या यज्ञांतून कदाचित् निघून जाईल म्हणून तूं येथें ऐस.

सूक्त बारावें.

ऋषिः–हविर्धान आंगि; देवता–अग्नि; छंदः–त्रिष्टुभ्.

१. सत्यवादी व मुख्य अशा द्यावापृथिवी यज्ञांत नियमांनीं असाव्यात. ज्यावेळीं तेजस्वी अग्नि यज्ञाकरतां लोकांना उद्युक्त करणारा, प्रज्वलित आणि देवांना बोलावणारा असा बसतो (त्यावेळीं अग्नि द्यावापृथिवींना बोलवो.)

२. तेजस्वी, देवांतील प्रमुख, ज्ञाता, धूम्रध्वज, समिधांनीं सरळ जळणारा, स्तुत्य, देवांना बोलावणारा, नित्य आणि मुखांत हवन केला जाणारा असा अग्नि आहे. अशा हे अग्ने, तूं देवांचा मध्यस्थ म्हणून हवि देणारा यज्ञासह आमचा हवि ग्रहण कर.

३. अग्नीपासून जेव्हां उदक उत्पन्न होतें, तेव्हां ह्या उदकामुळें उत्पन्न झालेल्या औषधी द्यावापृथिवी धारण करतात. सर्व स्तोते अग्नीपासून मिळणाऱ्या त्या उदकाची स्तुति करतात. जें तुझी प्रभा, स्वर्गीय घृत, जें पाणी उत्पन्न करते,—

४. हे अग्ने, तूं तें माझें यज्ञकर्म वृद्धिंगत कर. हे (वृष्टिरूपानें) जल प्रसरविणारे द्यावापृथिवीहो, मी तुमची स्तुति करतों. हे द्यावापृथिवीहो, माझीं स्तोत्रें ऐका. या कृत्यांत स्तोते स्तुति करतात. यांत पितृभूत द्यावापृथिवी पावसानें आम्हाला सर्व प्रकारें उपयोगी पडोत.

५. राजा अग्नि आमची सेवा ग्रहण करील. ह्या अग्नीसंबंधीं व्रतें आम्हीं कां करावींत ? हें कोण जाणतो ? प्रेमळ मित्राप्रमाणें आमचें स्तोत्र देवांप्रत सध्यां जावो. आणि (आम्ही दिलेले) हवीहि देवांना पोंहोचोत.

६. हे अग्ने, आदित्याप्रमाणें तूं आपलें तेज द्यावापृथ्वीवर प्रकट कर. भक्त यज्ञाची इच्छा करतात. अन्तःकरणपूर्वक इच्छितात. स्तुति करूं पहातात. भक्तांना आपलें कर्म करावेसें वाटतें. यज्ञकर्त्यांचा उत्कर्ष होतो. शहाणा मनुष्यहि भीत असतो. (म्हणून तूं प्रकट हो.)

७. देव यज्ञांत अग्निद्वारां आपणास तृप्त करतात. तसेंच लोकांच्या घरांत अग्नीला ठेवतात. सूर्यामध्यें अग्नीचें तेज ठेवतात. रात्री चंद्रांत ठेवतात. म्हणून नेहेमीं चंद्रसूर्य तेजस्वी असतात.

८. देव ह्या प्रकट, मननीय अग्नींत संचार करतात. गुप्त रूपांत असणारा अग्नि आम्ही जाणूं शकत नाहीं. येथें असणारा मित्र पापनिवारक अग्नीला आमचा निष्पापपणा सांगो. अदिति आणि सविताहि आमच्या पवित्रपणाची ग्वाही देवो.

९. हे अग्ने, सर्व देवतांनीं युक्त अशा घरांत बसून आमचें स्तोत्र ऐक. तूं अमृत प्रसवणारा रथ जोड. आणि आमच्याकरतां देव ज्यांच्यापासून निर्माण झाले अशा द्यावापृथिवी रथांत आण. देवांपैकीं कोणी आमच्या यज्ञांतून कदाचित् निघून जाईल म्हणून येथें ऐस.

सूक्त तेरावें.

ऋषिः–विवस्वान्‌अदितिपुत्र; देवता–शकट;

छंदः–१–४ त्रिष्टुभ्, ५ जगती.

१. हे शकटा, तुमचा पूर्वकालीन मंत्र म्हणून अन्नयुक्त अशा तुम्हाला मी जोडतों. स्तोत्यांच्या आहुतीप्रमाणें हें वर्णन सर्व देवांना पोंचो. जे देव दिव्य स्थानावर अधिष्ठित झाले आहेत ते अमर प्रजापतीचे सर्व पुत्र आमची स्तुति ऐकोत.

२. जुळया मुलाप्रमाणें बरोबर प्रवृत्त होणारे तुम्ही ज्यावेळीं यज्ञगृहांत जातां, त्यावेळीं देवभक्त लोक तुमच्यांत यज्ञाचें साहित्य भरतात. तसेंच तुम्ही आपलें स्थान ओळखून ज्या वेळीं थांबतां त्यावेळीं सोमाचें सुंदर ठिकाण बनतां.

३. यज्ञाचीं पांच स्थानें (धाता, सोम, पशु, पुरोडाश आणि आज्य) मी चढतों. तसेंच (चतुष्पदी) छंदांना कर्मांत अनुसरतों. (छंदोबद्ध मंत्र उपयोगांत आणतों) ॐ म्हणून कर्में मी करतों. यज्ञाच्या वेदीवर (सोमाला) पवित्रता आणतों.

४. देवांना मारक अशा पुरुषाची यम योजना करतो. लोकांना न मारणाऱ्या अशा पुरुषाची यम योजना करीत नाहीं. देवपालक व सूक्ष्म गोष्टींकडे पोचणारा

असा यज्ञ लोक करितात. यम आमचें शरीर मृत्यूपासून सोडवतो.

५. स्तुत्य, पितृभूत आणि गोजिरवाण्या अशा सोमाला सातछंद (स्तुति रूपानें) पाझरत असतात. तसेंच ऋत्विजहि स्तोत्रें गातात. हे दोनाहि शकट उभय लोकी शोभतात. दोघे प्रयत्न करतात. व देव मनुष्यांना पुष्ट करतात.

सूक्त चवदावें.

ऋषिः–यम विवस्वत्पुत्र; देवता—६ अंगिरःपिता अथर्वभृगु, ७-८-९ पितृ, १०-११-१२ सरमापुत्रौ श्वानौ, बाकी यमदेवताक; छंदः-१३-१५-१६ अनुष्टुभ्, १५ बृहती, १ ते १२ त्रिष्टुभ.

१. हे पुरुषा, पितरांचा राजा जो यम त्याला हवि देऊन तूं उपासना कर. तो यम पुण्यवानांना श्रेष्ठ स्थलीं पोंचविणारा आणि पुष्कळांना (पापामुळें) श्रेष्ठमार्गांनीं जाऊं न देणारा आहे. विवस्वानाच्या ह्या पुत्राकडे (पापी) लोकांना जावें लागतें.

२. सर्वांत मुख्य असणारा यम आमचें पापपुण्य जाणतो. हा नियम बदलणें शक्य नाहीं. ज्या मार्गावरून आमचे पूर्वज जाते झाले त्याच मार्गावरून आम्ही स्वकीय जातों.

३. इंद्र कव्यभुग् पितरांसह, यम अंगिरसादि पितरासह, आणि बृहस्पति ऋक्कदादि पितरासह उत्कर्ष पावतो. देव ज्यांना वाढवितात आणि जे देवांना वाढवितात त्यांपैकीं कांहीं स्वधेनें वाढतात आणि स्वाहाकारानें आनंद पावतात.

४. हे यमा, अंगिरादि पितरांपैकीं असलेला तूं ह्या भव्य यज्ञांत येऊन बैस. येथें विद्वानांनीं केलेले मंत्र तुझें आवाहन करोत. हे राजा यमा, ह्या हवींनीं संतुष्ट होऊन तूं देणारांना आनंदित कर.

५. हे यमा, विविधरूपें धारण करणाऱ्या यज्ञयोग्य अंगिरासह तूं ये. येऊन तुझा सत्कार करणारांना संतुष्ट कर. तुझा पिता जो विवस्वान् त्याला मी बोलावतों. तो ह्या यज्ञांत दर्भांवर बसून आम्हांला संतुष्ट करो.

६. अंगिरादि, अथर्वणादि आणि भृग्वादि आमचे पितर आम्हांला नेहमीं हवेसे वाटतात. यज्ञार्ह अशा त्यांचा अनुग्रह आमच्यावर असावा. त्यांची आमच्यावर नेहमीं कृपादृष्टि असावी.

७. जेथें आमचे पूर्व पितर गेले असतील त्याच प्राचीन मार्गांनीं हे माझ्या पित्या, तूंहि जा. जाऊन स्वधाकारानें तृप्त झालेल्या दोघा राजा वरुण आणि यमदेवाला तूं पहा.

८. हे पित्या, तूं स्वर्गामध्यें (पूर्व) पितरासह जाऊन मिळ. पाप नाहींसें करून घरीं ये. आणि तेजस्वी शरीरानें युक्त हो.

९. हे पिशाच्चहो, येथून दूर व्हा. जा. पळा. पितरांनीं ह्या मृत माणसाकरतां हें स्थान (दहनस्थान) आक्रमिलें आहे. यमहि दिवस, रात्री आणि जल यांनीं युक्त असणारें दहनस्थान ह्या मृत माणसाला देतो.

१०. हे अग्ने, चांगल्या मार्गानें, चित्रविचित्र रंगाचे चार डोळे असलेले, असे सरमेचे पुत्र जे दोन कुत्रे त्यांना टाळून तूं जा. नंतर जे पितर यमासह आनंदित असतात त्या ज्ञानी पितरांना प्राप्त कर.

११. हे यम राजा, तुझे जे गृहरक्षक, चार डोळ्यांचे, मार्गाचे रक्षक आणि लोकप्रसिद्ध असे तुझे दोन कुत्रे ह्या प्रेताच्या रक्षणाकरतां दे. आणि ह्या प्रेतास कल्याण आणि निरोगीपणाहि असूं दे.

१२. यमाचे दूत, लांब नाकाचे, प्राणिजीवी, आणि बलवान असे दोन कुत्रे लोकांवर लक्ष ठेवून फिरत असतात. ते कुत्रे सूर्य पहाण्याकरतां (जगण्याकरतां आज येथें चांगला प्राण आम्हांकरतां देवोत.

१३. हे ऋत्विजहो, यमाकरतां सोम पिळा. तसेंच यमाला हवि द्या. अग्नि ज्याचा दूत आहे असा आणि सुशोभित यज्ञ यमाप्रत जातो.

१४. हे ऋत्विजहो, तुम्ही घृतयुक्त हवि हवन करा. यमाची स्तुति करा. देवामधील तो यम पुष्कळ दिवस जगण्याकरितां आम्हांला दीर्घायुष्य देवो.

१५. हे ऋत्विजहो, यमराजाला अत्यंत मधुरहवि अर्पण करा. पूर्वज आणि पूर्व मार्गदर्शक ऋषींना हा नमस्कार.

१६. त्रिकद्रुक नांवाच्या यज्ञांत (ज्योतिः, गौः, आयुः) संरक्षणार्थ यम प्राप्त होवो. सहा भूमीप्रत (द्यौः, पृथिवी, आप्, औषधयः, ऋक्, सूनृता) तो यम प्राप्त होतो, एकच जणाच्या संरक्षणार्थ प्राप्त होवो. त्रिष्टुभ, गायत्री वगैरे सर्व छंद यमामध्यें आहेत.

सूक्त पंधरावें.

ऋषिः–शंख; देवता–पितृ; छंदः– ११ जगती, बाकी त्रिष्टुभ्.

१. जे पृथ्वीवर असणारे पितर ते उन्नतस्थानीं जावोत. जे स्वर्गांत म्हणजे उच्चस्थानीं आहेत, तेहि तेथून कधींहि न ढळोत. जे मध्यम स्थानाचा आश्रय करून आहेत ते उन्नत पदाला जावोत. जे सोम पिणारे आणि केवळ प्राणरूप, शत्रुशून्य आणि सत्यस्वरूप आहेत, असे हे पितर आमचें संरक्षण करोत.

२. जे पूर्वीं उत्पन्न होऊन मेले आणि जे नंतर उत्पन्न होऊन मेले, जे पृथ्वीवर राजस कार्य करीत आहेत व जे समृद्ध अशा बांधव वर्गांत आहेत त्या सर्व पितरांना हा नमस्कार असो.

३. मी ज्ञात्या पितरांना प्राप्त केलें आहे. मी यज्ञाचें फल आणि प्रवृत्ति मिळाविली आहे. जे दर्भांवर बसणारे पितर येथें आहेत ते स्वधेसह अन्न स्वीकारोत.

४. हे यज्ञस्थ पितरहो, आम्हां अलिकडच्या लोकांचें संरक्षण करावें. तुमच्याकरतां हीं हविर्द्रव्यें केलीं आहेत. यांचा आस्वाद घ्या. आस्वाद घेणारे तुम्ही आमच्या हितप्रद रक्षणाकरतां या. नंतर आम्हांला दुःखरहित सुख द्या.

५. शान्त, यज्ञार्ह, प्रिय व विपुल अशा हवीकरतां पाचारण केलेले पितर येवोत. आम्ही केलेली स्तुति ऐकोत. आमच्या स्तुतीला संमति देवोत आणि ते आमचें संरक्षण करोत.

६. हे पितरहो, तुम्ही सर्व गुडघे टेकून दक्षिण बाजूला बसून आमच्या यज्ञाचा गौरव बोला. तसेंच आम्ही तुमचा, मनुष्यस्वभावाला अनुसरून जो कांहीं अपराध केला असेल, त्या कोणत्याहि अपराधानें आमच्यावर रागावूं नका.

७. देवांच्या जवळ बसलेले तुम्ही हवि देणाऱ्या माणसाला धन द्या. हे पितरहो, तुम्ही त्याच्या (यजमानाच्या) पुत्राला धन द्या. आणि आमच्या ह्या कृत्यांत धनाचा पुरवठा असूं द्या.

८. सोम पिणारे, धनवान्, असे जे आमचे पितर ते सोमपान करिते झाले. भोग इच्छिणारा यम आमच्या हवी इच्छिणाऱ्या पितरांसह आनंदानें यथेच्छ हवि भक्षण करो.

९. देव झालेले, यज्ञ जाणणारे, स्तोत्रें म्हणून स्तुति करणारे, असे जे पितर इच्छा करतात त्या ज्ञानी; सत्य, बुद्धिमान् आणि यज्ञस्थ पितरांसह, हे अग्निदेवा, आमच्याकडे ये.

१०. हवि खाणारे, पिणारे, सत्य असे जे पितर आहेत, ते इंद्र आणि देव यांच्यासह एका रथांत बसलेले आहेत. त्या पितरांसह हे अग्ने, हजारो स्तोत्रांनीं स्तविलेला, श्रेष्ठ अशा पूर्वकालीन यज्ञस्थ लोकांनीं वर्णिलेला तूं ये.

११. हे अग्निदग्ध पितरहो, तुम्ही येथें या. हे पूज्यहो, आपआपल्या स्थानीं तुम्ही बसा. आणि पात्रांत वाढलेलीं हविर्द्रव्यें खा. तसेंच सर्व प्रकारची संपत्ति आम्हाला द्या.

१२. हे सर्वज्ञ अग्निदेवा स्तुत्य असा तूं आमचीं हविर्द्रव्यें गोड मानून वाहून नेतोस आणि पितरांना देतोस. ते पितर स्वधा म्हणून दिलेले हवि भक्षण करोत. हे देवा, तूंहि प्रयत्नांनीं मिळवलेलीं हविर्द्रव्यें भक्षण कर.

१३. जे पितर आमच्या जवळ आहेत, ज्यांना आम्ही जाणतों, आणि ज्यांना आम्ही ओळखत नाहीं, त्या सर्वांना, हे सर्वज्ञ अग्ने, तूं जाणतोस. म्हणून स्वधा म्हणून केलेला यज्ञ तूं स्वीकार.

१४. जे पितर अग्नीनें जाळले आहेत आणि नाहींत, जे स्वधा म्हणून दिलेल्या अन्नानें तृप्त आहेत त्या सर्वांसह असणाऱ्या हे अग्ने, ह्या मृत शरीराला आपल्या इच्छेप्रमाणें कर. (आपल्यांत घे.)

सूक्त सोळावें.

ऋषिः–दमन यमपुत्र; देवता–अग्नि; छंदः—१–१० त्रिष्टुभ्, ११–१४ अनुष्टुभ्.

१. हे अग्ने, ह्याला जाळूं नकोस. व संतप्त करूं नकोस. याचें कातडें आणि शरीर इकडे तिकडे उडवूं नकोस. हे सर्वज्ञ अग्ने, ज्यावेळीं तूं पूर्ण जाळशील, त्यावेळीं हा मृत मनुष्य पितरांकडे पाठीव.

२. हे सर्वज्ञ अग्ने, ज्यावेळीं हें शरीर पूर्ण जाळशील त्याचवेळीं ह्याला पितरांना देऊन टाक. ज्यावेळीं हें शरीर मृत्यु पावतें त्याचवेळीं तो देवांच्या स्वाधीन होतो.

---

[१] और्ध्वदेहिक कर्मांतिल १५ वें व १६ वें हीं दोन प्रसिद्ध सूक्तें आहेत. मृत्युदेवता यम व मृताचा आत्मा याला उद्देशून पहिलें सूक्त आहे. मृताला जाळीत असत या गोष्टिचा उल्लेख याच सूक्तांत आहे.

३. हे मृतमनुष्या, तुझा डोळा सूर्याप्रत जावो. प्राण वायूप्रत जावो. आणि तूंहि आपल्या धर्मासह पृथ्वीवर किंवा स्वर्गावर जा, अन्तरिक्षांत जा, जर तुझा फायदा असेल तर तूं (सूक्ष्म) शरीरांनीं औषधींमध्यें जा.

४. जन्मरहित असा जो भाग आहे त्यास तूं आपल्या तेजानें तप्त कर. तुझी शुचि आणि अर्चि नांवाची ज्वाला त्या भागाला तप्त करो. हे सर्वज्ञ अग्ने, जे तुझ्या शरीराचे सुखकारक भाग असतील त्यांनीं तूं ह्या मृतमनुष्याला पुण्यवानांच्या लोकाला पोंचव.

५. हे अग्निदेवा, जो (मृत) स्वधा म्हणून तुला अर्पण केला आहे, त्याला तूं पुनः पितरांकरतां उत्पन्न कर. हा पुनः जीव धारण करून शरीर प्राप्त करो. हे सर्वज्ञ अग्ने, त्याला शरीर प्राप्त होवो.

६. हे मृतशरीरा, जर तुझें शरीर कावळ्यानें तोडलें असेल; मुंगी,साप किंवा श्वापदांनीं तोडलें असेल तर सर्वभक्षक अग्नि तें निर्दोष करो. तसेंच जो सोम ब्राह्मणांत असतो तो सोम तें शरीर निर्दोष करो.

७. हे प्रेता, अग्नीचें कवच जी वेदी ती बैलाच्या कातड्यांनीं आच्छादा. तसेंच स्थूळ मांसानें अग्नीला आहुती देऊन आच्छादा म्हणजे तेजानें वाढलेला हृष्ट, प्रौढ व सर्वांना जाळणारा अग्नि तुला अस्ताव्यस्त करणार नाहीं.

८. हे अग्निदेवा, ह्या चमसपात्राला तूं हलवूं नकोस. देव व पितर यांना प्रिय असा जो हा देवाचें पिण्याचें साधन असणारा चमस आहे, त्यानें अमर असणारे देव व पितर आनंदित होतात.

९. मांस खाणाऱ्या अग्नीला मी दूर पाठवून देतों. पापवाहक अग्नि यमराजाकडे जावो. तेथेंच हा दुसरा सर्वप्रसिद्ध सर्वज्ञ अग्नि देवाकरतां हवि वाहून नेवो.

१०. जो मांसभक्षक अग्नि तुमच्या घरांत शिरला आहे, त्याला, पितृयज्ञाकरतां हा दुसरा अग्नि आहे म्हणून बाहेर घालवितो. तो उत्कृष्टस्थानीं असणारा अग्नि यज्ञ प्राप्त करो.

११. जो कव्यवाहन अग्नि देवांना व पितरांना हवि देतो तोच अग्निदेव पितराकरतां हवि निवेदन करो.

१२. हे अग्निदेवा, फलें इच्छिणारे आम्ही तुझी स्थापना करतों आणि तुला प्रदीप्त करतों. तूंहि स्वेच्छेनें येऊं इच्छिणाऱ्या पितरांना हवि खाण्याकरतां आण.

१३. हे अग्निदेवा, तूं जो भूमिभाग जाळलास तो पुनः शान्त कर. तेथें पाणी असलेल्या पुष्करिणी आणि विविध शाखा असलेल्या दूर्वा उत्पन्न होवोत.

१४. हे शैत्ययुक्त शीतिकावती नांवाच्या ओषधी आणि हे आल्हादक पृथ्वी, तूं बेटकुळ्यांनीं युक्त हो आणि ह्या अग्नीला अत्यंत आनंदित कर.

सूक्त सतरावें

ऋषिः--देवश्रवा यमपुत्र; देवता-१-२ सरण्यू ३-६ पूषा; ७-९ सरस्वती, १०-१४अप् ; छंदः-१-१२ त्रिष्टुभ्, १३-१४ अनुष्टुभ्.

१. त्वष्टा मुलीचा विवाह करतो म्हणून हे सर्व जग जमा झालें. विवस्वानाशीं विवाह केली जाणारी यमाची आई, विवस्वनाची श्रेष्ठ बायको, नष्ट झाली

२. अमर सरण्यूला मनुष्याकरतां देवांनीं गुप्त केली. तिच्यासारखी दुसरी स्त्री करून देवांनीं विवस्वानांला दिली त्या सरण्यूनें, जें पाडलें होतें त्यानें पोटांत अश्विनींना गर्भ रूपानें धारण केलें. सरण्यूनें दोघांची जोडी (यमयमी) उत्पन्न केली.

३. जगाचा संरक्षक,पशुयुक्त, विद्वान् असा पूषादेव तुला येथून उच्च लोकीं नेवो. तो पूषा पितरांना तुला देवो. तसेंच अग्नि तुला ज्ञानी देवांना देवो.

टीप:-हीं सूक्तें प्रेत जाळण्याच्या चालीबद्दल निश्चित पुरावा आहे.

१ टीप—त्वष्ट्याला सरण्यू नांवाची मुलगी व त्रिशिरा नांवाचा मुलगा झाला. त्वष्ट्यानें सरण्यू विवस्वानाला दिली. तिला विवस्वानापासून यम व यमी झाले. सरण्यूनें तीं दुसऱ्या स्वसदृश स्त्रीजवळ ठेवून आपण घोड्याचें रूप घेऊन कुरु देशाला गेली. विवस्वानाला ती स्त्री सरण्यू आहे असें वाटलें आणि तो तिच्याशीं रममाण झाला. तिला मनु नांवाचा राजर्षि मुलगा झाला. पुढें विवस्वानाच्या लक्षांत आलें कीं ही सरण्यू नव्हे. तेव्हां त्यानें घोड्याचें रूप धारण केलें आणि जिकडे सरण्यू घोड्याचें रूप घेऊन गेली होती तिकडे गेला. ते क्रीडा करीत असतां त्याचें वीर्य जमिनीवर पडलें. नंतर सरण्यूनें मुलाच्या इच्छेनें तें वीर्य ग्रहण केलें त्या वीर्यापासून नासत्य आणि दस्र नांवाचे तिला दोन मुलगे झाले.

४. सर्वगामी वायु तुमचें संरक्षण करो. उत्तम मार्गावर सर्वांच्या अग्रभागीं असणारा पूषा तुमचें संरक्षण करो. ज्या ठिकाणीं पुण्यवान् लोक असतात आणि जातात तेथें तुला सूर्यदेव ठेवो.

५. पूषा ह्या सर्व दिशा जाणतो, तो आम्हांला निर्भय मार्गानें नेवो. कल्याणप्रद, तेजस्वी, सर्वश्रेष्ठ, न चुकणारा आणि ज्ञाता पूषा आमच्यापुढें चालो.

६. मार्गांतल्या उत्कृष्ट मार्गावर तेथें पूषा उत्पन्न झाला. द्युलोकांतल्या उत्तम मार्गावर, पृथ्वीवरच्या उत्तम मार्गावर पूषा उत्पन्न झाला. असा पूषा सर्वांना इष्ट व सर्वांचें स्थान अशा द्यावापृथ्वातें अनुकूल व प्रातिकूल अशा प्रकारें ज्ञानपूर्वक फिरत असतो.

७. देवेच्छु लोक विस्तारलेल्या यज्ञांत सरस्वतीला बोलावतात. पुण्यवान लोक सरस्वतीला बोलावतात. म्हणून सरस्वती दात्याला फल देते.

८. हे सरस्वती देवि, तूं पितरांसह अन्नांनीं तृप्त झालेली एका रथांत बसून ये आणि तूं ह्या यज्ञांत बसून तृप्त हो. तसेंच निरोगी होऊन तूं आम्हांला अन्न दे.

९. दक्षिणेकडून येऊन यज्ञांत असणारे पितर ज्या सरस्वतीला बोलावतात, ती तूं या यज्ञांत हजारो लोकांना उपयोगी असा अन्नभाग आणि विपुल धन आम्हांला दे.

१०. जगाच्या मातृस्थानीं असणारें उदक आम्हाला पवित्र करो. उदकदेवता उदकानें आम्हास पवित्र करो. जल सर्व पाप वाहून नेवोत. नंतर जलांनीं पवित्र झालेला मी वर (स्वर्गाला) जाईन.

११. सोमरस पूर्वींच्या लोकांना व स्वर्गीय लोकांना उद्देशून पाझरला. आणि जो आमच्या पूर्वींचा पुरुष होता त्याच्याकडेहि तो गेला. एकाच ठिकाणीं असणारा सोम सप्त होते हवन करतात.

१२. हे सोमा, जो तुझा रस पाझरतो, जो तुझा भाग सोम कुटण्याच्या दगडापासून गळतो, अध्वर्यूपासून गळतो किंवा गाळण्याच्या वस्त्रापासून गळतो. तो रस मनःपूर्वक वषट्कार म्हणून तुला मी अर्पण करतों.

१३. हे सोमा, जो तुझा गळालेला आहे, जो तुझा भाग आहे, जो स्रुचेपासून गळालेला आहे; तो सर्व सोम हा देव बृहस्पति आम्हांला धनप्राप्ति व्हावी म्हणून गाळो.

१४. हे उदकांनों, ओषधी रसरसीत आहे. माझें भाषण सारयुक्त आहे. पाण्यामध्यें सारभूत पाण्याचा जो भाग आहे, त्यानें आम्हांस तुम्ही शुद्ध करा.

सूक्त आठरावें.

ऋषिः—संकसुक यमपुत्र; देवता—१-४ मृत्युदेवता ५ धातृदेवता, ६ त्वष्टृदेवता, ७-१४ पितृमेधप्रतिपादन किंवा १४प्रजापति; छंदः–११प्रसारपंक्ति, ३-४ गायत्री, १२–१३ जगती, १४ अनुष्टुभ्; बाकी त्रिष्टुभ्.

१. हे मृत्यो, अन्य मार्गानें जा. जो मार्ग देवयान-मार्गाहून निराळा आहे त्या दुसऱ्या मार्गानें तूं जा. डोळस आणि कानस अशा तुला माझी अशी विनंति आहे कीं, तूं आमच्या मुली आणि मुलें मारूं नकोस.

२. जे लोक मृत्यूचा मार्ग टाकून जातात ते अत्यंत दीर्घायुष्य प्राप्त करतात. हे यज्ञ करणारे हो, तुम्ही प्रजा व धन यांनीं उत्कर्ष पावलेले शुद्ध व पवित्र व्हा.

३. हे जीवंत असणारे मृतापासून वेगळे होवोत. तसेंच आज आम्ही केलेला पितृयज्ञ शुभप्रद होवो. नंतर दीर्घायुष्य असणारे आम्ही हंसण्यानाचण्याकरतां पूर्वेकडे तोंड केलेले असे जाऊं.

४. जीवंत असलेल्या लोकांच्या रक्षणार्थ हा मर्यादेचा दगड स्थापन करतों. कारण, जीवंतापैकीं दुसरा कोणी या मार्गानें लवकर जाऊं नये. लोक शंभर वर्षें जगोत. म्हणून दगडांनीं मृत्यूला मी झांकून टाकतों.

५. ज्याप्रमाणें दिवस क्रमानें असतात. ज्याप्रमाणें ऋतु एकापुढें एक जातात, ज्याप्रमाणें पूर्वींच्या (पितरा) ला अलीकडचा पुत्र (मरणानें) टाकीत नाहीं; (म्हणजे अगोदर मरत नाहीं.) असेंच, हे ब्रह्मदेवा, आम्हांला आयुष्य दे.

६. हे मृताचे पुत्रादिकहो, म्हातारे व्हा. क्रमानें तुम्ही प्रयत्न करीत रहा. कुलीन त्वष्टा तुम्हाला, मिळून जगण्याकरतां पुष्कळ आयुष्य देवो.

७. ह्या सुवासिनी, घृतयुक्त काजळ घातलेल्या, तरुण स्त्रिया घरांत शिरोत. अश्रुरहित, निरोगी आणि दागिने घातलेल्या स्त्रिया प्रथम घरांत जावोत.

८. हे स्त्रिये, ह्या तूं मेलेल्या पतीच्या समीप शयन केलें आहेस; तर हा जिवंत लोकांचा समुदाय पाहून प्रेताजवळून ऊठ आणि इकडे ये. व पुनर्विवाह करूं

इच्छिणाऱ्या पाणिग्रहण करणाऱ्या या पतीच्या भार्या त्वाप्रत मुख्यत्वेंकरून तयार हो.

९. प्रजापालनाला उपयुक्त असें बल, व तेज आम्हांला प्राप्त व्हावें म्हणून मृत मनुष्याच्या हातांतून धनुष्य घेणारा मी म्हणतों तूं येथेंच अस. आम्ही सुपुत्रयुक्त असे सर्व स्पर्धाशिल शत्रूंना जिंकूं.

१०. या विस्तीर्ण व सर्वांस सुख देणाऱ्या भूमातेच्या सन्निध तूं जा. दक्षिणा देणाऱ्या पुरुषाला लोकरीप्रमाणें मृदु असणारी व तरुण स्त्रीप्रमाणें असणारी भूमि मृत्युदेवतेपासून तुझें संरक्षण करो.

११. हे पृथिवि, याला उच्चस्थानीं ने. याला त्रास देऊं नको. याचें चांगलें स्वागत करणारी व लोभ उत्पन्न करणारी हो. माता ज्याप्रमाणें बालकाला वस्त्रानें आच्छादिते, तद्वत् तूं याला आच्छादन घाल.

१२. याला आच्छादून असणारी पृथ्वी सुस्थिर असो. व हजारो (धुळीचे कण) याच्या सभोवार असोत. आणि हे याला गृहाचे ठिकाणीं होऊन उदक पाझरणारे होवोत व नेहमीं याचें येथें संरक्षण करणारे होवोत.

१३. तुझ्यावर मी माती टाकतों. तुझ्यावर चहूंकडे हें ढेकूळ ठेवणारा मी तुला त्रास देत नाहीं. ह्या ढेकळास पितर धारण करोत. या ठिकाणीं यम तुजकरतां घरें निर्माण करो.

१४. बाणाच्या पिसाप्रमाणें देवांनीं मला चांगले दिवस दिले आहेत. लगामानें युक्त घोड्याप्रमाणें मी चांगलें स्तोत्र करीत आहे.

---

१४. **टीपः**—यावर सायणाचें भाष्य नाहीं. मात्र पदपाठ आहे. त्यामुळें हा मंत्र मागाहून घुसडला आहे असें म्हणतां येत नाहीं.

टीपः--ह्या सूक्तांत पुरणें, सती जाणें, पुनर्विवाह करणें आणि समाधि बांधणें अशा अनेक महत्त्वाच्या चालींचा उल्लेख आहे.

सूक्त एकोणिसावें.

ऋषिः—मथित यमपुत्र किंवा भृगु वरुणपुत्र किंवा च्यवन भार्गव; देवता—अप् किंवा गो; पहिल्या ऋचेचा अर्धा भाग अग्नीषोम. छंदः-६ गायत्री, बाकी अनुष्टुभ्.

१. हे गाईंनो, तुम्ही परत या. आमच्याशिवाय दुसऱ्याकडे जाऊं नका. (येऊन) हे संपत्तियुक्त गाईंनों, तुम्ही आम्हांला उपयोगी पडा. हे साहाय्य करणारे अग्नीषोमहो, तुम्ही आह्मांला धन द्या.

२. हे मनुष्या, तूं ह्या गाई परत फिरीव व आमच्या स्वाधीन कर. इंद्रही तुला साहाय्यभूत होऊन तुझ्या स्वाधीन करो. आणि अग्नि यांना उपयोजो.

३. पुनरपि ह्या गाई परत येवोत. रक्षक अशा माझ्याजवळ पुष्ट होवोत. पुष्ट झालेल्या त्या गाई, हे अग्ने, माझ्याजवळच असोत. आणि जें धन असेल तें मजजवळच राहो.

४. गोठा, नेणें ओळखणें, गाईंचें नियमानें परत येणें, राहणें, परतणें, आणि जो गुराखी आहे त्या सर्वांची मी इच्छा करतों.

५. जो गुराखी हरवलेल्या गाईंना शोधण्याकरतां फिरण्याचा अनुभव घेतो, जो त्याच्याबरोबर जाण्याचा अनुभव घेतो. जो जाणें, येणें अनुभवितो, तो गुराखी सुखानें घरीं येवो.

६. हे इंद्रा, तूं आमचे इकडे ये. गाई परत फिरीव. आणि तूं आह्मांला दे. त्यांच्या योगानें आह्मी उपभोग घेऊं.

७. हे देवहो, सर्वत्र असणाऱ्या तुह्मांला आह्मी दूध तूप देऊं. म्हणून जे कोणी यज्ञार्ह देव असतील ते आह्मांला धनयुक्त करोत.

८. हे पुरुषा, तूं गाईंना आपल्याकडे फिरीव आणि हे गाईंहो, तुह्मीहि परत फिरा. हे पुरुषा, गाई वळव. गाईंनो, परत फिरा. भूमीला चार दिशा आहेत तिकडून ह्या गाईंना परत फिरवा.

सूक्त विसावें.

ऋषिः—विमद इंद्रपुत्र किंवा प्रजापतिपुत्र किंवा वसुकृपुत्र किंवा वसुकृत्; देवता—अग्नि; छंदः-१ एकपदा दशाक्षरा विराट्, २ अनुष्टुभ्, ९विराट्, १० त्रिष्टुभ्, मधल्या गायत्री.

१. हे अग्नि देवा, तूं आमचें मन शुभ विचारानें युक्त कर.

२. देवांमध्यें सर्वांत तरुण, सल्ला देणारा मित्र, अपराजित अशा अग्नीला मी स्तवितों. कारणे अग्नीच्या यज्ञांत आईच्या थानाप्रमाणें सर्व देव आपल्या आहुति घेतात.

३. ज्या कर्माधार व तेजस्वी अग्नीला उपासनेनें उपासक वाढवितात.तो कल्याण करणारा अग्नि शोभतो.

४. ज्या वेळीं मनुष्यांना पूज्य असणारा अग्नि प्रज्वलित होतो, त्यावेळीं तो स्वर्ग आणि आकाश व्यापून टाकतो.

५. मनुष्यांच्या यज्ञांत हवि सेवन करून अत्यंत वाढलेला अग्नि जेव्हां जळतो त्यावेळीं तो आपली मर्यादा व्यापून बाहेर पडतो.

६. जो अग्नि आहे तोच कल्याण करणारा आहे. हवि व यज्ञ तोच आहे. तात्काळ हाच देवांकडे जातो. देवहि त्या स्तुत्य अग्नीबरोबर येतात.

७. देवाकडे जाणाऱ्या ज्या अग्नीस दगडाचा पुत्र म्हणतात. त्या यज्ञीय अग्नीची सेवा उत्कृष्ट सुखाकरतां मी इच्छितों.

८. जे कोणी लोक आमचे असतील ते सर्व अग्नीला हवि देऊन वृद्धिंगत करणाऱ्या सुंदर अशा सर्व प्रकारच्या संपत्तींत असोत.

९. काळा, पांढरा, तेजस्वी, तांबडा, मोठा आणि सरळ असा अग्नीचा मूल्यवान् रथ आहे. त्या सोन्यासारख्या रथाला प्रजापतींनें निर्माण केलें.

१०. हे बलपुत्र अग्ने, तन्मय झालेला विमद सद्बुद्धि प्राप्त व्हावी म्हणून हवि देऊन तुझीं स्तोत्रें म्हणता झाला. म्हणून सद्बुद्धियुक्त होऊन अन्न, बल आणि संतति अशा सर्व प्रकारचें धन तूं त्याला दे.

---

७ **टीप**—हा चकमकीचा उल्लेख आहे.

सूक्त एकविसावें

ऋषि–विमद इंद्रपुत्र किंवा प्रजापतिपुत्र किंवा वसुक्रपुत्र किंवा वसुकृत् देवता–अग्नि;छंदः–आस्तारपंक्ति;

१. यज्ञाकरतां, सर्वत्र असणाऱ्या अग्नीला वाढविण्याकरतां, आणि प्रसन्न होण्याकरतां तुमच्या स्वकृत स्तुतींनीं आम्ही त्या होमनिष्पादक अग्नीला सेवितों.

२. तेजस्वी व धनयुक्त असें यजमान तुलाच सुशोभित करतात. तसेंच तुझ्यां तृप्ती करतां क्षरणारी आहुति तुझ्याकडे जाते आणि तूं मोठा होतोस.

३. ऋत्विज, वृष्टि पृथ्वीची सेवा करिते त्याप्रमाणें जुहूपात्रानें तुला आहुती देऊन तुझी सेवा करतात. सर्व देवांच्या प्रसन्नतेकरतां, हे अग्ने, काळी, पांढरी अशी सर्व प्रकारची शोभा तूं धारण करतोस. हे अग्ने, तूं थोर आहेस.

४. हे मृत्युरहिता आणि बलवन्ता अग्ने, देवांच्या प्रसन्नतेकरतां जें तूं श्रेष्ठ प्रकारचें धन मानतोस, तें धन अन्नप्राप्तीकरतां आम्हांला दे. खरोखर हे अग्ने, तूं थोर आहेस.

५ अथर्वन् ऋषीनें निर्मिलेला अग्नि सर्व स्तुतिकाव्यें जाणतो. तो यजमानाचा (देवाकडे जाणारा) दूत होतो. नियमवान् यजमानाला तूं स्वतःच्या कल्याणाकरतां इष्ट आणि प्रार्थनीय असा आहेस. हे अग्ने, खरोखर तूं थोर आहेस.

७. हे अग्निदेवा, देवांना तृप्त करणारा, रमणीय, घृतस्वरूप, ज्वालायुक्त, तेजस्वी आणि ज्ञानी अशा अग्नीला तो तृप्त व्हावा म्हणून यज्ञ करणारे यज्ञांत स्थापितात. म्हणून खरोखर तूं थोर आहेस.

८. हे अग्निदेवा, थोर असा तूं तेजस्वी कान्तीनें अत्यंत प्रख्यात आहेस. ओरडणारा तूं बैलासारखा वागतोस. तूं मदयुक्त झाला असतां औषधींमध्यें बीज उत्पन्न करतोस. खरोखर तूं थोर आहेस.

९. हे अग्निदेवा, यज्ञ चालूं असतां यज्ञांत लोक तुझी स्तुति करतात. हे अग्ने, तूं सर्व प्रकारचें सुंदर धन दात्या यजमानाला तृप्ति होईपर्यंत देतोस.म्हणून तूं थोर आहेस.

सूक्त बाविसावें.

ऋषिः–विमद इंद्रपुत्र किंवा प्रजापतिपुत्र किंवा वसुक्रपुत्र, वसुकृत्; देवता–इंद्र;छंदः–१५ त्रिष्टुभ्, ५,७,९, अनुष्टुभ्, बाकी बृहती.

१. प्रख्यात इंद्र आज कोठें असेल ? मित्राप्रमाणें असणारा इंद्र आज कोणच्या लोकांत ख्याति पावत असेल ? जो कोणी ऋषींच्या घरांत किंवा अरण्यांत स्तुतीनें आकर्षिला जातो तो इंद्र आज कोठें आहे?

२. ह्या यज्ञांत इंद्र मुख्य आहे. आज वज्रधारी व स्तुत्य अशा इंद्राची मी स्तुति करतों. जो इंद्र मित्राप्रमाणें लोकांना असाधारण अन्न निर्माण करतो, तो इंद्र मी स्तवितों.

३. जो महान् बलाचा अधिपति आणि अमर्याद अशा महान् धनाचा दाता, शत्रुंजय, वज्र धारण कर-

णारा इंद्र, पिता प्रियपुत्राचें संरक्षण करतो, त्याप्रमाणें आमचें संरक्षण करो.

४. हे वज्रधरा, वायूपेक्षांहि वेगवान्, प्रेरक, मार्गांनीं जाणारे घोडे जोडणारा आणि मार्ग उत्पन्न करणारा अशा हे इंद्रा, तूं स्तविला जातोस.

५. ह्या घोड्यांचा सारथि देवांमध्यें किंवा मनुष्यांमध्येंहि नाहीं. ह्या घोड्यांचा वेग जाणणारा कोणीहि नाहीं. हे इंद्रा, वायूसारखे सरळ जाणारे तुझे घोडे रथ ओढण्याकरतां स्वतःच पळतात. (त्यांना सारथ्याची जरूरी लागत नाहीं.)

६. यज्ञ झाल्यावर भार्गव (परत) जाणाऱ्या दोघा (इंद्र व अग्नि) देवांना विचारतां झाला कीं, तुम्ही दोघे आमच्या घरीं स्वर्गांतून आणि पृथ्वींतून इतक्या दूरवर कशाकरतां आला होता ?

७. जो कर्महीन, आमचा अपमान करणारा, राक्षसी वृत्तीचा दस्यू आहे, त्या, हे शत्रुहन्त्या इंद्रा, दस्यूचा तूं वध कर.

८. हे इंद्रा, तूं आम्ही दिलेलें हविर्द्रव्य स्वीकार. आम्हीहि तुझ्यापाशीं अशा उत्कृष्ट बलाची याचना करतों कीं ज्या बलानें राक्षसी शुष्णाला तूं ठार केलेंस.

९. हे पराक्रमी इंद्रा, तूं शूर लोकांसह आमचें संरक्षण कर. तुझ्या साहाय्यानें आम्ही शत्रूंच्या नाशाला समर्थ होऊं. तुझे भक्त धन्याप्रमाणें तुझी अनेक स्तुतिस्तोत्रें करतात.

१०. हे वज्र धारण करणाऱ्या शूर इंद्रा, युद्धांत शत्रूला ठार करण्याकरतां तूं मनुष्यांना उत्तेजन देतोस. ज्यावेळीं बुद्धिमान्, अक्षय्य बलवान अशा लोकांची गूढ स्तोत्रें तूं ऐकतोस त्यावेळीं तूं लोकांना उत्तेजन देतोस.

११. हे वज्रधारी शूर इंद्रा, मरुतासह असणाऱ्या शुष्णाचीं सर्व मुलें जीं तूं ठार केलींस, तीं सर्व युद्धविषयक चलाखीनें केलेलीं कृत्यें ते दानशील ऋषि वर्णितात.

१२. हे पराक्रमी इंद्रा, आमच्या महत्त्वाच्या प्रार्थना निष्फळ होऊं नयेत. हे वज्रधारी इंद्रा, आम्ही स्तुतींच्या सुखांत असावें.

१३. हे इंद्रा, आमच्या त्या स्तुति खऱ्या आणि तुला प्रसन्न करणाऱ्या असोत. हे वज्रधारी इंद्रा, गाईंच्या दुधाप्रमाणें तुझ्या स्तुतींचीं फलें आम्ही मिळवूं.

१४. ह इंद्रा, ज्यावेळीं हस्तपादरहित असणारी भूमि तुझ्या संबंधीच्या कर्मांनीं (चांगलीं पिकें येऊन) वृद्धिगत झाली, त्या वेळीं पृथ्वीला वेष्टून असणाऱ्या शुष्णाला विश्वायू करतां तूं ठार मारलेंस.

१५. हे शूर इंद्रा, तूं सत्वर सोम पी. हें द्रव्य आणणाऱ्या, उदार असा तूं आम्हाला मारूं नकोस. तसेंच स्तुति करणाऱ्या धनवानांचें तूं संरक्षण कर, आणि विपुल धन आम्हांला देऊन तूं आम्हांस धनवान कर.

सूक्त तेविसावें.

ऋषिः—विमद इन्द्रपुत्र; देवता-इंद्र; छंदः—१–७ त्रिष्टुभ्, ५ अभिसारिणी, २–३–४–६ जगती.

१. उजव्या हातांत वज्र घेतलेल्या, विविध कामें करणाऱ्या, घोड्यांना हाकणाऱ्या, अशा इंद्राला आम्ही स्तवितो. तो इंद्र, (सोमपानानंतर) आपले केस पुनः पुनः हालवीत प्रकट होतो आणि सैन्यानें शत्रूंचा नाश करीत धन देतो.

२. या इंद्राचे दोन घोडे यज्ञांत (आहुतीरूपी) धन मिळवतात. धनांनीं धनवान् असणारा इंद्र वृत्राला ठार करणारा होतो. तेजस्वी, बलवान् आणि महान् असणारा इंद्र धनाचा स्वामी आहे. (त्याच्या कृपेनें) मीहि शत्रूचें नांवहि नष्ट करीन.

३. ज्यावेळीं इन्द्र तेजस्वी वज्र ग्रहण करतो, आणि ज्या वेळीं इंद्राचा रथ घोडे ओढून नेतात, त्यावेळीं विद्वानांसह सुप्रसिद्ध अशा अन्नाचा मालक असा इंद्र त्या रथांत आरूढ होतो.

४ मोठा पाऊस ताबडतोब पडतो. ज्याप्रमाणें देवतांसह असणारा इंद्र सोमानें आपलें तोंड भरून टाकतो त्याप्रमाणें पाऊस ताबडतोब पडतो. वायु अरण्य ज्याप्रमाणें हलवितो, त्याप्रमाणें इंद्र यज्ञगृहांत जातो आणि सोम पिळल्यानंतर तो पिऊन थरारून जातो.

५. जो इंद्र केवळ धमकावणीनेंच बडबड्यांना गप्प बसवून दुःख देणाऱ्या हजारो शत्रूंना ठार करतो, आणि जो इंद्र पित्याप्रमाणें जगाचें बल आणि सामर्थ्य वाढवितो तें त्या इंद्राचें सामर्थ्य आम्ही स्तवितों.

६. हे इंद्रा, तुझें अपूर्व आणि वैविध्ययुक्त स्तोत्र विमद नांवाचे आम्ही धन प्राप्त व्हावें म्हणून करीत आहोंत. कारण हे इंद्रा, आम्ही जें तुझें धन जाणीत आहोंत, तें धन आम्हांकडे यावें म्हणून, गवळी गाईविषयीं करतो त्याप्रमाणें आम्ही प्रयत्न करतों.

७ हे इंद्रा, तुझें आणि विमद ऋषींचें सख्य कधींहि नष्ट न होवो. हे देवा, तुझी आप्तस्वकीयासारखी आमच्या विषयींची बुद्धि आम्ही जाणतों. आमच्याशीं असणारें तुझें सख्य सुखकारक होवो.

सूक्त चोविसावें.

ऋषिः–विमद इंद्रपुत्र; देवता–१ ते ३ इंद्र, ४ ते ६ अश्वि; छंदः–१–३ आस्तारपंक्ति, ४ ते ६ अनुष्टुभ्.

१. हे इंद्रा, तूं मधुर आणि दोन फळ्यांवर पिळलेला सोमरस पी. हे विपुल धनयुक्त इंद्रा, तूं सोमरस पिऊन तल्लीन झाल्यावर आम्हांला हजारोंनीं धन दे. खरोखर तूं फार थोर आहेस.

२. हे इंद्रा, आम्ही यज्ञांनीं, स्तोत्रांनीं, आणि हवींनीं तुझी प्रार्थना करतों. म्हणून हे शचीपते, तूं सर्व कर्मांचा पालक आहेस. तूं सोम पिऊन आम्हांला श्रेष्ठ धन दे. खरोखर तूं अत्यंत थोर आहेस.

३. हे इंद्रा, जो तूं अभिलषणीय धनाचा स्वामी आहेस आणि स्तोत्यांना उत्साह देतोस, तसेंच जो तूं स्तोत्यांचा संरक्षणकर्ता आहेस; तो तूं सोम प्याल्यावर शत्रूपासून व पापापासून आमचें रक्षण कर. खरोखर तूं थोर आहेस.

४. हे समर्थ अश्विहो, बुद्धिमान् असणारे तुम्ही दोघे मिळून अग्नीचें मंथन केलेंत. ज्या वेळीं तुम्ही विमदाकडून स्तुति केले गेलांत त्या वेळीं तुम्ही अग्नि उत्पन्न केलात.

५. हे अश्विनीहो, अरणींतून अग्नीच्या ठिणग्या पडूं लागल्या कीं, सर्व देव तुमची स्तुति करतात. आणि देव अश्विनींना म्हणतात कीं पुनः असें करा.

६. हे आश्विनीहो, माझ्या घरांतून तुम्ही प्रेमानें जा, येतांना प्रेमानें या आणि आमच्यावर नेहेमीं आपल्या दैवीपणानें प्रेम करा.

सूक्त पंचविसावें.

ऋषिः–प्राजापत्य किंवा ऐन्द्र विमद, किंवा वासुक्र वसुकृत्; देवता–सोम; छंदः–आस्तारपंक्ति.

१. हे सोमा, तूं आमचें मन चांगल्या विचारांनीं युक्त, व्यापक आणि कर्तव्यपरायण कर. सोमांनीं तूं मदयुक्त झाला असतां, तुझ्या मैत्रींत, गाई गवतांत जातात त्याप्रमाणें आम्ही रमून जावोत. कारण तूं थोर आहेस.

२. हे सोमा, तुझी मनाला पटणारी स्तुति करणारे सर्वत्र आहेत. तुला सोमानें प्रसन्नता आली असतां धनेच्छु अशा आमच्या इच्छा बाहेर पडतात. खरोखर तूं थोर आहेस.

३. तसेंच हे सोमा, मी तुझ्यासंबंधींचीं कृत्यें समजून करीत असतों. तूं प्रसन्न होऊन शत्रूपासून होणारा आमचा वध टाळ व आम्हाला, पिता पुत्राचें पालन करून सुखी करतो त्याप्रमाणें सुखी कर. कारण तूं थोर आहेस.

४. हे सोमा, रहाटगाडगें विहिरींत जातें त्याप्रमाणें आमच्या स्तुती तुमच्याकडे जातात. तशींच आमचीं कृत्येंहि आम्हांला दीर्घायुषी करणारीं असोत. तुझ्या प्रसन्नतेकरतां चमस नांवाचीं सोमपात्रें असतात. त्याप्रमाणें खरोखर तूं थोर आहेस.

५. निग्रही व गंभीर ऋत्विज् कर्मासह बुद्धिमान व थोर अशा तुझ्या विविध स्तुती ऐकवितात. तूं प्रसन्न होऊन गाईघोड्यांनीं भरलेला गोठा आम्हांला दे. कारण तूं थोर आहेस.

६. देवतांच्या तृप्तीकरतां, सर्व जगाकडे लक्ष देत सर्वांच्या जीवनाकरतां तूं पशू रक्षितोस. तूं सर्वत्र पसरलेल्या जगाचें संरक्षण करतोस आणि सर्व जगाला जगवतोस.

७. हे सोमा, अमर असणारा तूं आमचें चहूंकडून संरक्षण कर. तसेंच हे तेजस्वी सोमा, आमच्या शत्रूंना आमच्यापासून दूर कर. आमचीं वाईट कर्में प्रसिद्ध करूं नकोस. तूं थोर आहेस म्हणून तुझ्या प्रसन्नतेकरतां आम्ही प्रार्थना करतों आहोंत.

८. हे सोमा, शुभ बुद्धीचा आक्रामक असा तूं आम्हाला अन्न देण्याविषयीं नेहमीं जागृत रहा. तसेंच तुला प्रसन्न करण्याकरतां द्रोही शत्रूपासून आणि पापापासून आमचें संरक्षण कर. तूं थोर आहेस.

९. हे वृत्रहन्त्या सोमा, ज्यावेळीं पुत्रांचे संहारक अशा महान् संग्रामांत युद्ध करणारे शत्रू आम्हांला चहूंकडून बोलावतात, त्यावेळीं तूं कल्याण करणारा मित्र असतोस. तुझ्या प्रसन्नतेनें आम्हीं हें सर्व करीत असतों. कारण तूं थोर आहेस.

१०. हा प्रसिद्ध असा आम्ही काढलेला, उत्साहवर्धक, मदकर आणि इंद्राला प्रिय असणारा सोम वृद्धिंगत होवो. हे सोम, तूं महान् आणि बुद्धिमान् कक्षीवानाची तुझ्याकरतां बुद्धि वृद्धिंगत केलीस (त्याप्रमाणें आमची बुद्धि वाढव.) कारण तूं थोर आहेस.

११. हा सोम, दाता विद्वानांना मूल्यवान् अन्न देतो. ह्या सोमानें सात होत्यांना उत्कृष्ट धन दिलें. आंधळ्या दीर्घतमसाला डोळे आणि पांगळ्या परावृजाला पाय देऊन तूं तारलेंस. खरोखर तूं थोर आहेस.

सूक्त सव्विसावें.

ऋषि:—विमद इंद्रपुत्र; देवता—पूषा; छन्द:—अनुष्टुभ्.

१. आम्ही उच्चारलेलीं स्पृहणीय स्तोत्रें तुम्हाला प्राप्त हावोत व दर्शनीय रथ जोडलेला असा पूषा देव आमचें रक्षण करो.

२. हा बुद्धिमान् मनुष्य ज्या पूषन्चें तें थोर उदक आपल्या स्तुतीनें उपभोगितो,तो पूषन् देव तुमच्या स्तुती जाणो.

३. सोमाप्रमाणेंच हा पूषाहि तुमचीं सुंदर स्तोत्रें जाणतो आणि तुमच्या इच्छा पूर्ण करतो. रूपवान् पूषा आमच्यावर व आमच्या गोठ्यावर वर्षाव करतो.

४. हे पूषन् देवा, आम्ही आमच्या बुद्धीला प्रेरणा करणाऱ्या आणि बुद्धिमानांचा आधार अशा तुला स्तवितों.

५. सर्वदर्शक तो पूषा यज्ञाचा अर्धा भाग, रथांना घोडे जोडून जाणारा, मनुष्यांचा हितकर्ता आणि स्तोत्यांना शत्रूपासून वेगळे करणारा आहे.

६. स्वत:करतां ठेवलेल्या तेजस्वी अशा स्त्रीपुरुषात्मक पशूंचा धनी असणारा पूषा देव मेंढीच्या केसांनीं विणलेलीं वस्त्रें शुद्ध करतो.

७. पूषादेव सर्व हविर्द्रव्यांचा धनी व प्राण्यांचा मित्र आहे. जो अदम्य पूषा इच्छुक यजमानाचा (सोमपीत असतां) आपले केस सहज हलवीत असतो,—

८. हे पूषा, जो तूं सर्व मागणारांचा मित्र, चिरंतन आणि स्वाधिकारापासून भ्रष्ट न झालेला आहेस, त्या तुझ्या रथाची जोखडें बोकड ओढीत असतात.

९. थोर पूषा आमचा रथ आपल्या बळानें संरक्षण करो. तसेंच तो अन्नाची लयलूट करो. आणि आमची ही प्रार्थना ऐको.

सूक्त सत्ताविसावें.

ऋषि—वसुक्र इंद्रपुत्र; देवता—इंद्र; छंद:—त्रिष्टुभ्.

१. हे स्तोत्या, माझा स्तुत्य असा तो वेग आहे कीं ज्यानें मी सोमपान करणाऱ्या यजमानाला इष्ट गोष्ट देतो आणि मला सोम न देणाऱ्या, सत्याचा नाश करणाऱ्या पापी आणि सर्वत्र पसरलेल्या अशांचा मी हिंसक आहे.

२. ज्यावेळीं माझी युद्धाकरतां देवद्वेष्ट्या आणि शरीरानें धिप्पाड अशांशीं गांठ पडते, त्यावेळीं, हे इंद्रा, तुझ्याकरतां पुष्ट पशु शिजवतो आणि दररोज तीव्र असा सोम गाळतों.

३. देवद्वेष्ट्यांना लढाईंत ठार केलें आहे असें जो म्हणतो असा (माझ्याशिवाय) मला कोणी ठाऊक नाहीं. ज्यावेळीं भयंकर युद्ध ढासळूं लागतें, त्यावेळीं माझे पराक्रम लोक वर्णू लागतात.

४. ज्यावेळीं मी युद्धांत बेहोष असतों त्यावेळीं सर्व सज्जन व थोर (ऋषि) माझ्याजवळ असतात. जगाच्या रक्षणाकरतां पराक्रमी शत्रूंचाहि मी नाश करतों. त्या महान् शत्रूचे पाय धरून मी त्याला पर्वतावर आपटतों.

५. मला युद्धांत कोणीच निवारण करूं शकत नाहीं. जें मी इच्छितों त्याला पर्वतहि हरकत करूं शकत नाहींत. माझ्या आवाजानें बहिराहि घाबरतो. आणि दररोज सूर्यहि थरथरा कांपतो.

६. मी (इंद्र) ह्या जगांत हविर्द्रव्यें (चोरून) खाणारे, इंद्रद्वेष्टे, बाहूनें नाश करणारे आणि ठार मारण्याकरतां चाल करून जाणारे अशा दुष्टांना पहात असतों. अशांवर माझीं शस्त्रें चालतात. थोर मित्रासारख्या माझी जे निंदा करतात, त्यांवर माझीं शस्त्रें जोरांत चालतात.

७. हे इंद्रा, तूं प्रकट होतोस आणि पाऊस पाडतोस. इन्द्र फार दिवस जगतो. तूं शत्रूंचें विदारण करतोस. शत्रू तुझें करीत नाहीं. जो इन्द्र सर्व त्रैलोक्यापलीकडे व्यापून आहे, त्या व्यापक इंद्राला द्यावापृथिवी व्यापूं शकत नाहीं.

८. एकत्र झालेल्या गाई गवत खातात. गुराख्यासह फिरणाऱ्या त्या गाई मी पहातों. बोलावलेल्या गाई माझ्याभोंवतीं एकत्र होतात. आलेल्या गाईंचेंपासून गाईंचा धनी किती तरी दूध काढतो.

९. गवत खाणारे आणि धान्य खाणारे या जगांत एकत्र आहेत. येथें जो जोडलेला आहे तो धानिक होऊं इच्छितो आणि जो मोकळा आहे, तो बांधला जातो. असा माझा प्रभाव आहे.

---

९ टीप:—सायणभाष्य नाहीं. अर्थ वादग्रस्त आहे.

१०. माझ्या ह्या स्तोत्रांत जें बोललें तें खरें असें तूं समज. द्विपाद् मनुष्य आणि चतुष्पाद् पशु मीं उत्पन्न करावेत. या जगांत स्त्रियांसारख्या पुरुषासह जो शूर मला सोडून लढूं इच्छितो, अशा पुरुषांचें धन युद्ध न करतांच घेऊन मी वाटून टाकतों.

११. जो इंद्र मी, या माझी न दिसणारी अशी एक कन्या आहे, तिला माझ्याशिवाय जाणणारा कोण आहे ? आणि अदृश्य अशा तिला कोण आपलीशी मानतो ? तसेंच कोण असा आहे कीं, वज्र वृत्रावर टाकतो ? खरोखरच मीच शत्रूला वाहूं शकतो आणि मी त्याचें शत्रुत्व पत्करूं शकतो.

१२. उत्तम स्तोत्रानें स्तविला जाणारा, स्त्रीची इच्छा करणारा आणि मनुष्याचे भोग इच्छिणारा अशा इंद्रावर प्रसन्न झालेल्या किती तरी स्त्रिया आहेत. पण जी कल्याणप्रद्, सुरूप अशी स्त्री आहे, ती लोकांत आपण होऊनच मी मित्र व पती व्हावा अशी याचना करते.

१३. आदित्य आपल्या किरणांनीं उदक ग्रहण करतो आणि स्वतःप्रत आलेलें उदक पितो. नंतर उदकाचा किरणांनींच सर्व जगावर वर्षाव करतों. जवळच बसलेला आपली अत्यंत तेजस्वी ऊर्ध्व दीप्ति कमी करून आपल्या किरणांनीं खालीं विस्तृत पृथ्वीवर प्राप्त होतो.

१४. थोर, तमोरहित, नित्य आणि सतत गमन करणारा असा हा आदित्य आहे. तसेंच सर्वोत्पादक व्यापक आणि मूळभूत असा हा आदित्य हवि खातो. दुसऱ्यापासून वत्साचें पोषण करणारी ही पूर्व दिशा सूर्याला उत्पन्न करते. गाईच्या कासेप्रमाणें आकाश सूर्याला धारण करते.

१५. प्रजापतीपासून सात (सप्तर्षि) पुत्र उत्पन्न झाले. आठ (वालखिल्य) उत्तर भागापासून निर्माण झाले. नऊ (भृगु) स्नानानुसार पृष्ठभागापासून निर्माण झाले. दहा (अंगिरस) अग्रभागापासून उत्पन्न होऊन आकाशाचा उच्च भाग वृद्धिंगत करतात.

१६. दहा आंगिरसांपैकीं बाकीचे मुख्य प्रजापतिसदृश कापिलाला आवश्यक अशा कार्याला प्रवृत्त करतात. प्रकृतिरूपी माता उदकांत ठेवलेल्या आणि बाहेर पडूं इच्छिणाऱ्या गर्भाला संताषानें धारण करते.

१७. प्रजापतीच्या वीर पुत्रांनीं लठ्ठ बोकड शिजविला. टाकलेले फांसे ज्याप्रमाणें एकाच्या बाजूचे पडतात त्याप्रमाणें आंगिरस प्रजापतीच्या बाजूचे आहेत. दोन आंगिरस धनुष्य आणि प्रकृति यांच्या सहाय्यानें पाण्याच्या आंत संचार करणारे शुद्ध आणि पवित्र असे आहेत.

१८. विविध तऱ्हेनें बोलावणारे, नाना तऱ्हेचे आंगिरस् आले आहेत. त्यांच्यापैकीं अर्धा भाग हवि शिजवितो आणि अर्धा शिजवीत नाहीं. हें सर्व ह्या सवितृदेवानें मला सांगितलें. खरोखर लाकूड आणि तूप खाणारा अग्निहि प्रजापतीची उपासना करतो.

१९. दुरून रथहीन अशा सेनेसह असणाऱ्या आणि संघ धारण करणाऱ्या अशा प्रजापतीला मी पाहिलें. हिंसकांना ठार करणारा, आणि सदोदित ताजातवाना असा इंद्र लोकांच्या यज्ञाच्या वेळा गांठतो.

२० शत्रूमारक अशा माझे हे दोन जोडलेले, गमनशील घोडे येथून घालवूं नकोस. पुनः पुनः तूं स्तुति कर. याच्या गतीस पाणी अडथळा करते. शोधक आणि मेघासारखा शीघ्रगति सूर्य अडथळा करतो.

२१. इंद्राच्या आत्मीय अशा सूर्याच्या थोर मंडलापासून खालीं आलेलें जे हें उदक आहे तें उदक किंवा दुसरेंहि उदक सुखानें स्तोते लोक तरून जातात.

२२. लांकडाच्या धनुष्यावर चढविलेली स्नायूची दोरी ओढल्यावर शब्द करते. त्या धनुष्यापासून मनुष्यांना ठार करणारे बाण पक्ष्यासारखे बाहेर पडतात. त्यामुळें इंद्राकरतां सोम काढणारे, ऋषींना दाक्षिणा देणारे असें हें सर्व जग भयभीत होतें. (मग इतरांची कथा काय ?)

२३. देवांच्या उत्पत्तीच्या वेळीं प्रथम मेघ उत्पन्न झाले. त्यांच्या छेदनामुळें पाणी उत्पन्न झालें. तीन गुण उत्पन्न करणारे तिघे (पर्जन्य, वायु आणि आदित्य) पृथ्वीला संतप्त करतात. आणि त्यापैकीं दोघे (वायु आणि आदित्य) सृष्टींतील उदक वाहून वर नेतात.

२४. ती आदित्यदेवता तुला जीवनाधार आहे. त्याचें हें स्वरूप यज्ञांत लक्षांत घे. झांकूं नकोस. सूर्याचें शोधक असें गमन सर्व त्रैलोक्याला प्रकाशित करतें. उदक नाहींसें करते. या दोन कारणांस्तव सूर्य आपलें गमन सोडीत नाहीं.

सूक्त अठ्ठाविसावें.

ऋषिः—१ वसुक्रपत्नी, २-६-८-१०-१२ इंद्र, ३-४ ५-७-९-११ वसुक्र; देवता–इंद्र; छंदः–त्रिष्टुभ्.

१. वसुक्रपत्नी म्हणते : इंद्राशिवाय दुसरा सर्व देवगण येथें आला आहे. पण आश्चर्य हें आहे कीं, माझा

सासराच इंद्र आला नाहीं. जर इंद्र येईल तर लाह्या खाईल, सोम पिईल आणि तृप्त होऊन फिरून घरीं जाईल.

२. इंद्र म्हणतो : कामपूरक, तेजस्वी, असा मी इंद्र पृथ्वीच्या उच्च व विस्तीर्ण स्थलीं रहातों. जो सोम काढणारा माझ्या दोनहि कुशा सोमांनीं भरून टाकतो, अशाचें सर्व युद्धांत मी संरक्षण करतों.

३. वसुक्र म्हणतो : हे इंद्रा, मदकर, दगडानें कुटून काढलेला, आणि तयार असा सोम लोक काढतात आणि ह्यांचा तूं सोम पितोस. हे धनवान् इंद्रा, तूं ज्यावेळीं हविर्द्रव्यानें हवन केला जातोस, त्यावेळीं तुझ्याकरतां लोक पशु शिजवितात, तो तूं खातोस.

४. हे इंद्रा, तुझ्या कृपेनें माझ्या ठिकाणीं असणारें हें सामर्थ्य ध्यानांत घे. नद्या पाणी उलट वाहून नेतात. हरिण चालून येणाऱ्या सिंहावर उलट चालून जातो, तसेंच कोल्हा डुकराला गहन अरण्यांतून हुसकून लावतो, असें आश्चर्यकारक सामर्थ्य माझ्यांत आलें आहे.

५. हे इंद्रा, परिपक्व असणारा मी, बुद्धिमान् आणि वृद्ध अशा तुझी स्तुति करण्याकरतां हें तुझें सामर्थ्य कसें जाणूं ? ज्ञाता असा तूंच आम्हांला वेळोवेळीं तुझें सामर्थ्य कथन कर. हे इंद्रा, जी तुझी आम्ही अर्धवट स्तुति करतों, ती तुला मान्य व्हावी.

६. इंद्र म्हणतो : थोर अशा मला स्तोते स्तवितात, त्यामुळें माझी स्वर्गावरूनहि अधिक अधिक स्तुति चालूं असते. आणि हजारो शत्रूंचा मी धुव्वा उडवीत असतो. कारण, प्रजापतीनें मला शत्रूरहित उत्पन्न केलें आहे. (माझ्यापुढें कोणाचा टिकाव लागत नाहीं.)

७. वसुक्र म्हणतो : हे इंद्रा, महान् अशा मला अशा कृत्यामुळें प्रत्येक कृत्यांत शूर आणि बलवान् असें लोक समजतात. म्हणून आनंदित होऊन मी वज्रानें वृत्रासुराला ठार केलें. आणि हवि देणाऱ्यांकरतां मी आपल्या सामर्थ्यानें मेघांना मोकळें करतों. (पाऊस पाडतों.)

८. इंद्र म्हणतो : हातांत परशु धारण करणारे देव येतात. आणि लोकांसह मेघांना फोडणारे ते उदकावर चालून जातात. नंतर नद्यांत उदक पोचवणारे ते देव मेघांतलें उदक शुष्क करून टाकतात.

९. वसुक्र म्हणतो : शश नांवाचा प्राणी चालून येणाऱ्या सिंहासारख्या प्राण्याला अंगावर घेतो. तसेंच ढेकळानें दूरच्याहि पर्वताला मी फोडून टाकतों. थोरालाहि छोट्याकडून ताब्यांत घेववितो आणि पराक्रमी वासरूं मोठ्या बैलांशीं युद्ध करण्याकरतां जातें. (हें सर्व तुझ्या कृपेमुळें होतें.)

१०. इंद्र म्हणतो : अडकवलेला सिंह ज्याप्रमाणें स्थान सोडीत नाहीं त्याप्रमाणें पक्ष्यानें आपलें नख ह्या ठिकाणीं रोवलें आहे. बांधलेला रेडा ज्याप्रमाणें तान्हेनें व्याकूळ होतो, त्याप्रमाणें तान्हेलेल्या इंद्राला गायत्री सहज सोम आणून देते.

११. वसुक्र म्हणतो : जे ब्राह्मण अन्नांनीं तृप्त होऊन शत्रूशीं लढतात, त्यांना गायत्री सहज सोम आणून देते. स्वतःच शत्रू आणि शत्रूचें सैन्य नष्ट करणारा, रसरसीत आणि अर्पण केलेला सर्व सोम देव खातात.

१२. इंद्र म्हणतो : जे आपलीं शरीरें सोमयागांत स्तोत्रांनीं परिपुष्ट करतात, ते हे चांगलीं कृत्यें करून कृतकृत्य होतात. मनुष्यासारखें बोलणारा तूं आम्हांकडे ये आणि आम्हांला अन्न दे. स्वर्गांत दानशूर असा तूं दानपति हें नांव धारण करतोस.

सूक्त एकोणतिसावें.

ऋषि—वसुक्र; देवता–इंद्र; छंदः–त्रिष्टुभ्.

१ मनुष्यांतील श्रेष्ठ, पराक्रमी आणि रात्रीं सोम पिणारा इंद्र ज्याची फार दिवसांपासून इच्छा करतो, ती स्तुति तुमच्याकडून नेहेमींच घडत असते. हे आश्विनीहो, ही शुद्ध स्तुति, पक्षी आकाशांत उडत असतां त्याचें झाडावरील कोट्यांत असलेल्या पिलांकडे ज्याप्रमाणें लक्ष असतें, त्याप्रमाणें आमचें इंद्राकडे लक्ष लावो.

२. सकाळीं मनुष्यश्रेष्ठ अशा तुझ्या स्तुतीनें आम्ही श्रेष्ठ होऊं. तसेंच हे इंद्रा, त्रिशोक नांवाच्या ऋषीनें तुझ्यापासून शंभर नोकर प्राप्त केले. तसेंच कुत्साला प्राप्त झालेला जो रथ होता, तोहि तुझ्या कृपेनेंच प्राप्त झालेला होता. (तसें आम्हीहि तुझ्या कृपेनें श्रेष्ठ होऊं.)

३. हे इंद्रा, तुला कोणत्या प्रकारचा मद उत्पन्न करणारा सोम आवडतो ? तेजस्वी असा तूं स्तुति ऐकण्याकरतां यज्ञाच्या द्वाराकडे धांव घे. केव्हां आमच्याकडे तुझा घोडा धांवेल ? मला तुझी स्तुति करण्याची स्फूर्ति केव्हां होईल ? मी अन्नासह धन घेऊन तुझ्याकडे केव्हां येऊं शकेन ?

४. हे इंद्रा, आमचे उत्कृष्ट हवि ग्रहण करून कोणतीं कर्में केल्यानें तूं मनुष्यांना तुझ्यासारखे पराक्रमी कर-

शील ? निष्कपटी मित्राप्रमाणें तूं आमच्याकडे केव्हां येशील ? हे कीर्तिमान् इंद्रा, ज्या वेळीं आमची इच्छा अन्नावर असते, त्यावेळीं तूं आमचा पोषण करणारा होतोस.

५. जे आम्ही, स्त्रियांप्रमाणें ह्या इंद्राची इच्छा जाणतों आणि जे आम्ही, हे सर्वसाक्षी इंद्रा, प्रसिद्ध स्तोत्रें म्हणतों आणि अन्न देतों, त्या आम्हांला तूं सूर्याप्रमाणें इष्टस्थलीं ने.

६. हे इंद्रा, ज्या अर्थीं तुझ्या थोर कृत्यामुळें, मोठी आणि सर्व सृष्टीला उत्पन्न करणारी ही द्यावापृथिवी निर्माण झाली आहे, त्या अर्थीं पिळलेला घृतयुक्त असा सोम तुझ्यासारख्या थोराला पिण्याकरतां गोड लागो.

७. ज्या अर्थीं इंद्रापासून निश्चितरीत्या धन प्राप्त होतें, त्या अर्थीं त्या इंद्राकरतां मधुर सोमाचें पात्र आम्ही पूर्ण भरून ठेवलें आहे. सोमपानानें तृप्त झालेला तो इंद्र पृथ्वीसारख्या विस्तीर्ण भागांत बुद्धीनें व पराक्रमानें उत्कर्ष पावो.

८. बलशाली इंद्र (शत्रूंच्या) सेना जिंकतो. उत्कृष्ट शत्रुसेना ह्या इंद्राच्या सख्याकरतां प्रयत्न करतात. हे इंद्रा, ज्या रथाला कल्याणकारक बुद्धीनें तूं हांकारतोस त्या रथांत—आमच्याकडे येण्याकरतां लढाईंत रथांत बसून येतोस तसा—ये.

सूक्त तिसावें.

ऋषिः—कवष इलूषपुत्र; देवता—अप् किंवा अपांनपात्; छंदः—त्रिष्टुभ्.

१. स्तोत्रानें स्तविलेलें, गमनशील आणि तेजस्वी उदक मनःकल्पनेप्रमाणें वाहो. उत्कृष्ट अन्न, मित्र, वरुण आणि महावेगशाली इंद्राकरतां तयार करा आणि चांगली स्तुति करा.

२. हे अध्वर्यूंहो, तुम्ही हविर्युक्त असा. हे सोम काढूं इच्छिणारेहो, तुम्ही सोमेच्छु उदकाकडे जा. तांबूस आणि पातळ असणारा सोम ज्या पाण्याकडे पहातो त्या पाण्याच्या तरंगांत हे सुहस्तहो, आज सोमाला (शुद्ध करण्याकरतां) टाका.

३. हे अध्वर्यूंहो, तुम्ही विपुल जलाकडे जा. तो अपांनपात तुम्हाला अत्यंत शुद्ध उदक देवो. तुम्ही अपांनपातचें हविर्द्रव्यानें पूजन करा. त्याकरतां तुम्ही मधुर सोम पिळा.

४. जो अपांनपात् लांकडाशिवाय आकाशांत प्रज्वलित होतो आणि ज्याला शहाणे यज्ञात स्तवितात, तो तूं आम्हांला मधुर उदक दे, कीं ज्यायोगें इंद्राचें सामर्थ्य वाढतें.

५. सुंदर व तरुण स्त्रियांनीं तरुण ज्याप्रमाणें आनंदित होते, त्याप्रमाणें ज्या पाण्यानें सोम आनंदित होतो, हे अध्वर्यो, तूं त्या पाण्याकडे जा. आणि जेव्हां त्यांनीं सोम सिंचित केला जातो, तेव्हां सोमासह त्याला शुद्ध करा.

६. तरुण स्त्रिया तरुणांपुढेंच जशा नमतात, तसा सोम पाण्यामध्यें एकरूप होऊन जातो. अध्वर्यू आणि त्यांचीं स्तोत्रें उदकदेवतेला मनानें जाणतात आणि त्याप्रमाणें करतात.

७. जो आच्छादित अशा उदकांना रस्ता करून देता झाला, आणि जो मोठ्या नाशापासून तुम्हांला मुक्त करतां झाला, त्या इन्द्राला, हे उदकांनो, तुम्ही मधुर, आणि देवांना मादक अशा सोमाकडे पाठवा.

८. हे प्रवाहशील उदकांनो, जो तुमचा मधुररसयुक्त प्रवाह आहे, तो मधुर प्रवाह इंद्राकडे पाठवा. हे अनेक औषधीरूपी धनवान् उदकांनो, तुम्ही सारयुक्त आणि प्रशंसनीय आहांत. तुम्ही माझी ही स्तुति ऐका.

९. हे स्यंदनशील उदकांनो, जो प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष फल देणारा तुमचा प्रवाह वाहतो, तो मादक आणि इंद्रास पिण्यायोग्य प्रवाह आमच्याकडे पाठवा. तो मदकर, सोमांत मिसळूं इच्छिणारा, अन्तरिक्षांत उत्पन्न होणारा, त्रैलोक्याला प्रेरक, फिरणारा आणि पाझरणारा आहे.

१०. इंद्र ज्याप्रमाणें मेघांतून अनेक धारा निर्माण करतो, त्याप्रमाणें अनेक धारांनीं सोमांत मिसळणारें, जगनिर्मातें आणि पालक, सोमाला वाढविणारें आणि एकत्र असणारें अशा उदकाची, हे ऋषे, तूं ताबडतोब स्तुति कर.

११. हे ऋत्विजहो, देवांना पूजण्याकरतां यज्ञाला सुरवात करा. आणि धनप्राप्तीकरतां स्तोत्रें आरंभा. सृष्टिनियमाला अनुसरून कासेप्रमाणें असणारे मेघ तुम्ही मोकळे करा. आणि हे उदकांनो, आम्हांला सुखदायक व्हा.

१२. हे अनेक उत्कृष्ट पदार्थांनीं युक्त असणाऱ्या उदकांनों, तुम्ही धनाचे स्वामी आहांत. तुम्ही कल्याणप्रद कृत्यें अमर करा. तसेंच तुम्ही धनाचे आणि

चांगल्या संततीचे रक्षक असा. तसेंच सरस्वतीची स्तुति करणाऱ्या मला तें उत्कृष्ट अन्न देवोत.

१३. हे उदकांनो, आमच्याकडे येणाऱ्या, घृत आणि मधुर उदकें धारण करणाऱ्या, अध्वर्यूंशीं अन्तः-करणपूर्वक एकरूप होणाऱ्या आणि चांगल्या प्रकारें पिळलेला सोम इंद्राला देणाऱ्या तुम्हाला मी पाहातों आहे आणि तुमची स्तुति करीत आहें.

१४. हें धनयुक्त आणि जीवांचें पालन करणारें असें उदक आमच्याकडे आलें आहे. हे मित्रहो, तुम्ही 'अपांनपात्' सह सहमत होऊन हें पाणी थांबवा. हे सोम तयार करणारे गृहस्थहो, तुम्ही या यज्ञांत दर्भावर ठेवलेल्या सोमांत पाणी घाला.

१५. उदक हें यज्ञाच्या इच्छेनें येथें आलें आहे. आमच्या यज्ञांत देवांच्या इच्छेनें हें उदक बसलें आहे. म्हणून हे अध्वर्यूंहो, तुम्ही इंद्राकरतां सोम पिळा. आतां देवांना उद्देशून केला जाणारा तुमचा यज्ञ सुशक्य झाला आहे.

सूक्त एकतिसावें.

ऋषि–कवष; देवता–विश्वदेव; छंदः––त्रिष्टुभ्.

१. आम्हाला स्तुत्य, यज्ञार्ह असा इंद्र, सत्वर येणाऱ्या देवांसह आमच्या रक्षणाकरतां येवो. आम्हींहि त्यांच्याशीं प्रेमळपणाची मैत्री करूं आणि सर्व संकटें तरून जाऊं.

२. मनुष्य चहूंकडून (देवाकरतां) द्रव्य मिळवूं इच्छितो. आणि यज्ञ व हवि यांनीं देवांची सेवा करतो. तसेंच स्वतःच्या बुद्धीनें देवांचें ध्यान करतो. आणि कल्याणकारक असें त्यांचें व्यापक स्वरूप मनांनीं आकलन करतो.

३. आम्ही देवांची पूजा केली. संरक्षक हवि-र्भाग शत्रुनाशक आणि श्रेष्ठ देवांकडे तीर्थांतल्या पाण्याप्रमाणें जातात. आम्ही स्वर्गाचें सुख उपभोगूं आणि देवांचे ज्ञाते होऊं.

४. ज्याला सविता देवानें उत्पन्न केलें त्याला धनपति आणि दानशील प्रजापति इष्ट देवो. तसेंच भगदेव आणि अर्यमा स्तुतीमुळें आम्हांला अनुकूल असें घडवोत.

५. स्तुति केले जाणारे देव, उषेनें दिवस होतो त्याप्रमाणें ज्या अर्थीं बलयुक्त होतात, त्या अर्थीं आमची ही स्तुति देवांना प्राप्त होवो. स्तुति करणारा जो मी ह्या माझी स्तुति इच्छिणारे, सुखकर असे ऋभु विभु आणि वाज आम्हांकडे येवोत.

६. आतां आमची देवांसंबंधीची प्राचीन, व्यापक आणि देवांकडे पोंचणारी उत्कृष्ट स्तुति स्फूर्तीनें वाढत आहे. म्हणून सर्व देव माझ्या सर्व देवांकरतां केल्या जाणाऱ्या पोषक यज्ञांत एका ठिकाणीं येवोत.

७. ज्या वृक्षापासून देवांनीं रक्षण केलेली आणि जरारहित द्यावापृथिवी उत्पन्न केली, तो वृक्ष कोणता आणि तें अरण्य कोणतें कीं जेथें तो वृक्ष उत्पन्न झाला ! दिवस व रात्र निर्माण केली त्या देवांची लोक स्तुति करतात.

८. द्यावापृथिवी निर्माण केली एवढेंच देवांचें सामर्थ्य नाहीं. यापेक्षांहि तें जास्त आहे. तो उत्पन्नकर्ता द्यावापृथिवींचें धारणाहि करतो. ज्या वेळीं सूर्याला घोडे ओढीत नव्हते, त्या वेळीं बळवान् हिरण्यगर्भ तेजस्वी शरीर ग्रहण करतां झाला. (सूर्याच्या पूर्वीं तो उत्पन्न झाला.)

९. सूर्य विस्तीर्ण पृथ्वीचें अतिक्रमण करीत नाहीं. वायूहि पृथ्वीला पावसानें वाहवीत नाहीं. उत्पन्न होणारे मित्र आणि वरुण, अग्नि वनांत आपला प्रकाश करतो त्याप्रमाणें प्रकाश करतात. अशांना निर्माण करणाऱ्या प्रजापतीची मी स्तुति करतों.

१०. जेव्हां वासरूं न होणारी गाय फळून विते, त्यावेळीं दुःख भोगूनहि ती आपल्या प्रजेस सुखी करते. पुरातनपुत्र (अग्नि) ज्या वेळीं अरणीपासून उत्पन्न होतो आणि ज्या वेळीं ऋत्विज त्याचा शोध करतात त्यावेळीं पृथ्वी अरणींतून त्याला बाहेर काढते.

११. कण्वाला नृषदाचा पुत्र असें म्हणतात. तसेंच हवि देणाऱ्या कण्वानें काळा रंग धारण करून अग्नीपासून धन घेतलें. काळ्या कण्वाला अग्नीपासून तेजस्वी रूप प्राप्त झालें. अग्नीशिवाय या कण्वाला कोणीहि देवांनीं यज्ञाचें फल दिलें नाहीं.

सूक्त बत्तिसावें.

ऋषिः–कवष; देवता–विश्वदेव; छंदः–१–५ जगती, ६–९ त्रिष्टुभ्.

१. इंद्र भक्ताच्या यज्ञांत गमन करणाऱ्या घोड्यांना हांकारतो. तो चांगल्या मार्गानें आनंदी

भक्ताच्या उत्कृष्ट सेवेला उद्देशून येवो. आणि येऊन तो इंद्र आमची स्तुति आणि हवि स्वीकारो. सोमरूपी अन्नाचा आस्वाद घेवो.

२. हे इंद्रा, तूं स्वर्गीय व देदीप्यमान स्थानीं असतोस. हे बहुस्तुत इंद्रा, तूं पृथ्वीवरच्या उत्कृष्ट स्थानीं असतोस. जे घोडे तुला पुनः पुनः यज्ञाकडे नेतात ते घोडे, स्तोते पण दरिद्री अशा आम्हांला धन देववोत.

३. इंद्र अत्यंत उत्कृष्ट यज्ञकर्म माझ्यापासून इच्छो. पुत्र आईबापांचें धन मिळवितो किंवा स्त्री नवऱ्याला त्याच्या कल्याणानें ताब्यांत घेते किंवा चांगला पुरुष स्त्रीच्या ताब्यांत जातो, त्याप्रमणें इंद्र आमच्या ताब्यांत येवो.

४. गाई घराची इच्छा करतात त्याप्रमाणें जेव्हां स्तोते इंद्राची इच्छा करतात, तेव्हां पूजक अशा माझीं स्तोत्रें—ही स्तोत्यांचीं पहिलीं स्तोत्रें म्हटलीं—जातात. सात छंदांत स्तोत्रें करणारा हा मनुष्य ज्यावेळीं तुझी स्तुति करीत असतो, त्या वेळीं हे इंद्रा, तूं आमचें यज्ञगृह तेजस्वी कर.

५. हे भक्तहो, देवभक्त स्तोता तुमचें घर देवांनीं भरून टाकतो. रुद्रासह इंद्र त्वरित यज्ञांत येतो. स्तुति अमर देवांपासून धन देण्यास समर्थ होते. म्हणून तुम्ही रक्षक देवांना सोम द्या.

६. उदकांत गूढ असा अग्नि आहे असें देवांचीं कर्मे रक्षण करणारा इंद्र मलां म्हणाला. हे अग्ने, ज्ञात्या इंद्रानें तुझ्याबद्दल मला सांगितलें म्हणून या मार्गानें मी गेलों.

७. रस्ता माहित नसलेला मनुष्य रस्ता माहित असलेल्यास विचारतो व त्यानें सांगितल्याप्रमाणें तो मग जातो. हा उपदेशाचा उत्कृष्ट मार्ग आहे. या प्रकारानें जलद पोंचणारा मार्ग मनुष्य मिळवितो.

८. आजच हा अग्नि उत्पन्न झाला. तेव्हांच त्यांनीं यज्ञाच्या दिवसांना मान्यता दिली. आणि तेजस्वी होऊन आईचें थान (सोम) प्याला. नंतर तरुण आणि देवांना हवि पोंचविणाऱ्या अग्नीला स्तुति प्राप्त झाली. नंतर धन देणारा हा अग्नि श्रेष्ठ मनाचा ठरला.

९. हे कुरुश्रवण कलशा, हें सुंदर धन देणाऱ्या, तुझी आम्ही स्तुति करतों. हे धनवंतहो, ज्याला मी प्यालों आहे, असा हा सोम तुम्हाला दाता होवो. तो कुरुश्रवणहि तुम्हांला देणारा होवो.

सूक्त तेहतिसावें.

ऋषिः—कवष ऐलूष; देवता– १ विश्वदेव, २–३ इंद्र, ४–५ कुरुश्रवणदान, ६–९ उपमश्रवसशोकनिवृत्ति; छंदः— १ त्रिष्टुभ्, २ बृहती, ३ सतोबृहती, ४–९ गायत्री.

१. लोकांची योजना करणाऱ्या देवांनीं माझी योजना कुरुश्रवणाकडे केली आहे. मार्गामध्यें मी पूषनलाहि वाहून नेलें आहे. वाटेंत सर्व देवांनीं माझें संरक्षण केलें. कोणालाहि शिक्षा करतां न येणारा ऋषि येत आहे असा वाटेंत शब्द झाला.

२. पर्शु लोक चहूकडून मला सवतीसारखा त्रास देत आहेत. बुद्धीचा सुन्नपणा मला त्रास देत आहे. वस्त्रहीनता आणि क्षीणता भयभीत पक्ष्याप्रमाणें मला कापायला लावते आहे.

३. हे इंद्रा, तुझा भक्त अशा मला मानसिक दुःखें, उंदीर खळ लावलेल्या दोऱ्या तोडतात त्याप्रमाणें तोडीत आहेत. हे धनवान् इंद्रा, आम्हांला एकवार चांगलें सुखी कर. तसेंच आम्हांला पित्याप्रमाणें रक्षण करणारा हो.

४. मी कवष ऋषि,त्रसदस्युपुत्र, दाता अशा राजा कुरुश्रवसाला ऋत्विजांना देण्याकरतां द्रव्य मागतों.

५. ज्या कुरुश्रवणाचे तीन घोडे रथांत बसवून मला चांगल्या प्रकारें नेतात, त्या कुरुश्रवणाला हजारो रुपये दिले जाणाऱ्या या यज्ञाकरतां मी स्तवितों.

६. हे राजा, तुझा बाप जो उपमश्रवस त्याचीं भाषणें दरिद्र्याला देऊं काढलेल्या रमणीय शेताप्रमाणें मधुर असतात.

७. हे मित्रातिथीच्या पुत्रा, पुत्रा उपमश्रवसा, तूं माझ्याजवळ ये. तुझ्या पित्याचा मी स्तोता आहे. (म्हणून शोक करूं नकोस.)

८. जर मी देवांचा आणि माणसांचा ईश्वर असतों तर धनवान् मित्रातिथि जगला असता.

९. देवांचे नियम उल्लंघून कांहीं लोक शंभर वर्षें जगतात,कांहीं मरतात. (म्हणून तूं शोक करूं नकोस)

सूक्त चवतिसावें.

ऋषिः–कवष ऐलूश किंवा मूजवत्पुत्र अक्ष; देवता–७-८–९–१२ अक्षस्तुति, १३ कृषि बाकी कितवा-अक्षनिंदा; छंदः—जगती, अवशिष्ट त्रिष्टुभ्.

१. मोठाले, उतारभूमीवर उत्पन्न झालेले, टाकलें कीं सरकत जाणारे, आणि खुळखुळणारे फांसे मला बेभान करतात. मूजवत् पर्वतावर उत्पन्न झालेल्या सोमपानाप्रमाणें जागृत ठेवणारा बिभ्याचा फांसा मला अत्यंत आनंदित करतो.

२. माझ्या पत्नीनें माझा कधीं धिक्कार केला नाहीं, ती कधींहि माझ्यावर चरफडली नाहीं, उलट माझ्या मित्राबद्दल व माझ्याबद्दल तिच्या मनांत आदर असे. अशी जरी ती गुणवती होती, तरी फांशाच्या नांदानें मी तिला घालवून दिलें. कारण फांशावाचून मला कांहींच प्रिय वाटत नाहीं.

३. माझी सासू माझा द्वेष करिते, माझी बायको मला विचारीत नाहीं. उघडच आहे, जुगाऱ्याच्या विनवणीला कोण भीक घालतो. जुगाऱ्याचा उपयोग काय होऊं शकेल हें समजतच नाहीं. म्हातारा झालेल्या घोड्याप्रमाणें तो निरुपयोगीच ठरतो.

४. फांशानीं खेळण्याकरतां हा जेव्हां बाहेर निघतो, तेव्हां याच्या बायकोचा हात परके धरतात, याचे भाऊ, बाप, आई म्हणतात, ‘ आम्ही याला ओळखीत नाहीं. याला बांधून घेऊन जा. ’

५. आणि जरी मी आपल्या मनाशीं निश्चय केला कीं, अतःपर फांशांनीं खेळावयाचें नाहीं, कां कीं त्यामुळें माझे मित्र माझा धिक्कार करतात, तरी देखील फांशांचा आवाज ऐकल्याबरोबर, व्यभिचाराला चटावलेल्या बाईप्रमाणें मी त्यांच्याकडे धांव घेतों.

६. तेजःपुंज फांसे खेळणारा, मी कोणाला जिंकूं ? असें म्हणत मी खेळाडूंच्या सभेंत शिरतों. प्रतिस्पर्ध्याशीं डाव करणाऱ्याचे फांसे सारखे जोरानें पडत असतात.

७. हे फांसे म्हणजे मांसापर्यन्त रुतणारे गळ आहेत, हे कपटी आणि फसवे आहेत, ह्यांच्यायोगें शरीराचा दाह होतो, त्याचे तुकडे होतात. थोड्याशा लाभाचें आमिष दाखवून ते जुगारी माणसाला नादीं लावतात. इतकें असूनहि जुगाऱ्यांना त्यांचाच मोह पडतो.

८. सत्यधर्मा सूर्याप्रमाणें याच्या त्रेपन्न फांशांचा संघ सारखा फिरत असतो. उग्र माणसाच्या रागालाहि ते नमत नाहींत. राजा सुद्धां फाशांना खेळतांना नमस्कारच करतो.

९. फांसे खालीं पडतात, ते वर हवेंत खेळतात. त्यांना स्वतःला हात नसले तरी दुसऱ्यांच्या हातांना ते आपणाकडे ओढून घेतात. फांसे जादूच्या कोळशाप्रमाणें होत. ते स्वतः मृत असले तरी दुसऱ्यांचीं अंन्तःकरणें जाळतात.

१०. जुगाऱ्याची विरही पत्नी बिचारी एकटीच झुरत असते. आपला मुलगा कोठें भटकतो तें समजत नाहीं, म्हणून त्याची आई सुद्धां दुःख करीत असते. हा स्वतःकर्जबाजारी व भीतिभीत होऊन धनाची इच्छा करीत हिंडता व रात्रीचा परक्यांच्या घरांत दडून राहतो.

११. दुसऱ्यांच्या बायका सुखानें नांदतांना पाहून व त्यांची गृहव्यवस्था पाहून याला अतोनात दुःख होतें. सकाळीं उजाडतांच हा पश्चात्तापानें फांसे फेंकून देतो, पण पश्चात्तापाची लहर मावळली कीं, हा गरीब बिचारा पुनः मोहवश होतो.

१२. हे फांशांनो, तुमच्या गणाचा जो मुख्य सेनापति असेल, तसेंच जो व्राताचा मुख्य असेल त्याला मी नमस्कार करतों. आतां माझे जवळ पैसा नाहीं. मी माझ्या दहा अंगुली उघड्या करतों. मी खोटें सांगत नाहीं.

१३. मला सन्माननीय सवितृदेवानें आज्ञा केली आहे कीं फांशांनीं जुगार खेळूं नको. शेती कर, संपत्तीचा उपभोग घे, त्यांत गाई व स्त्री यांची प्राप्ति होईल.

१४. हे फांश्यांनो, तुम्ही आमच्याशीं मैत्री करा. आम्हांला सुखी करा. आम्हांवर भयंकर आघात करूं नका. तुमचा राग आमच्या शत्रूंवर जावो. आमचा शत्रु पिंगटवर्णाच्या तुमच्या बंधनांत तात्काळ पडो.

सूक्त पसातिसावें.

ऋषिः–लुश धनाकपुत्र; देवता—विश्वदेव; छंदः– १३–१४ त्रिष्टुभ्, बाकी जगती.

१. इंद्रसंबंधीं तो अग्नि सकाळीं प्रज्वलित होत आहे. विस्तृत द्यावापृथ्वी आपल्या कर्तव्याला लागो. आम्ही आज देवापाशीं संरक्षणाची याचना करतों.

२. द्यावापृथ्वीपासून आम्ही संरक्षण इच्छितों. तसेंच लोकांना उत्पादक समुद्र, शर्यणावत्सरोवर, पर्वत, सूर्य आणि उषा यांना, आम्हांला पापरहित करा अशी आम्ही याचना करतों. तसेंच आज हा पिळलेला सोम आमचें कल्याण करो.

३. थोर आणि मातृभूत अशा द्यावापृथिवी निरपराधी अशा आमचें आज सुखाकरतां संरक्षण करोत.

अंधार नाहींसा करणारी उषा आमचें पाप नाहींसें करो. तसेंच प्रज्वलित झालेल्या अग्नीस मी कल्याणाची याचना करतों.

४. अनेक उत्कृष्ट गुण धारण करणारी, पापाचें मुख्यतः निवारण करणारी उषा, इष्ट फळ देणारा उत्कृष्ट काळ आम्हां भजकांना देवो. दुष्ट लोकांच्या रागापासून आम्हांला दूर ठेवो. प्रज्वलित अशा तुझ्यापाशीं आम्ही कल्याणाची मागणी करतों.

५. ज्या तुम्ही सूर्याच्या किरणांशीं मिळून जातां, अंधार नाहींसा करून तेजानें भरून जातां, त्या तुम्ही (ज्वाला)आज आम्हांस अन्न देऊन कल्याणकारक व्हा व अंधार नाहींला करा. आम्ही प्रज्वलित अग्नीपाशीं कल्याणाची याचना करतों.

६. आम्हांला आरोग्यकारक प्रातःकाल लाभोत. अग्नि मोठ्या तेजानें प्रकट होवो. हे अश्विनीहो, जलद धांवणाऱ्या रथांत आरूढ व्हा. आम्ही प्रज्वलित अग्नीपाशीं कल्याणाची याचना करतों आहोंत.

७. हे सवितृदेवा, तूं आज आम्हांला उत्कृष्ट प्रकारचें धन दे. कारण तूं उत्कृष्ट धन देणारा आहेस. मी द्रव्योत्पादक स्तुति करतों आहें. आम्ही प्रज्वलित अग्नीपाशीं कल्याणाची याचना करतों.

८. यज्ञांत केली जाणारी देवांची स्तुति आम्ही जाणतों. ती आमचें संरक्षण करो. सूर्य हा सर्व उषांचा अनुभव घेत उदय पावत असतो. आम्ही प्रज्वलित अग्नीपाशीं कल्याणाची याचना करतों.

९. आज यज्ञांतील वेदीवर उत्कृष्ट फळ देणारे असे, सोम कुटणारे दगड सोम कुटित असतां मी प्रेमळ आदित्यापाशीं याचना करतों. हे स्तुति करणाऱ्या पुरुषा, तूं आदित्यांना सुख दे. कर्तव्य कर. आम्ही प्रज्वलित अग्नीपाशीं कल्याणाची याचना करतों.

१०. आमच्या महान् भरभराटीच्या यज्ञांत सात होते, इंद्र, मित्र, वरुण, भग आणि इतर देवांना, हे अग्ने, तूं आणून बसव. तेथें आणलेल्या देवांना धनप्राप्तीकरतां मी स्तवितों. प्रज्वलित अशा अग्नीपाशीं आम्ही कल्याणाची याचना करतों.

११. हे आदित्यहो, ज्यांचीं आम्ही स्तोत्रें गात आहोंत, ते तुम्ही आमच्या यज्ञाकरितां या आणि एकत्र झालेले तुम्ही आमच्या उत्कर्षाकरतां यज्ञाचा स्वीकार करा. आम्ही बृहस्पति, पूषन्, अश्वि, भग आणि प्रज्वलित अग्नि यांची कल्याणाकरतां प्रार्थना करतों.

१२. हे आदित्यहो, तुम्ही अत्यन्त प्रशस्त, समृद्ध, मनुष्यरक्षक असें घर आमचे पशू, मुलेंबाळें यांच्या संरक्षणाकरतां आम्हाला द्या. आम्ही प्रज्वलित अग्नीची कल्याणाकरतां प्रार्थना करीत आहोंत.

१३. आज सर्व देव आमचें रक्षण करोत. सर्व अग्नी प्रज्वलित होवोत. सर्व देव आमच्या संरक्षणाकरितां येवोत. तसेंच आम्हांला सर्व प्रकारचें धन प्राप्त होवो.

१४. हे त्वराशिल देवहो, तुम्ही युद्धांत ज्याचें संरक्षण करतां, ज्याचें शत्रूपासून संरक्षण करतां, ज्याचें पापापासून संरक्षण करून मनोरथ पूर्ण करतां, जो तुमच्या कार्यांत भयाची पर्वा करीत नाहीं, ते सर्व आम्ही तुमच्याकरतां आहोंत.

सूक्त छत्तिसावें.

ऋषिः—लुश धानाक; देवता—विश्वदेव; छंदः—१-१२ जगती, १३-१४ त्रिष्टुभ्.

१. थोर आणि सुरूप अशा रात्र, सकाळ, द्यावापृथिवी, वरुण, मित्र, अर्यमा, इंद्र, मरुत, पर्वत, उदक, आदित्य, आकाश व स्वर्ग या सर्व देवांना मी बोलावतों.

२. बुद्धिमान्, नियमबद्ध अशा द्यावापृथिवी आमचें हिंसक पापांपासून संरक्षण करोत. दुष्ट मृत्युदेवता आमच्यावर सत्ता न चालवोत. तसेंच आज आम्ही देवांच्या रक्षणाची मागणी करीत आहोंत.

३. सामर्थ्यवान् मित्रावरुणांची माता अदिति आमचें सर्व पापांपासून संरक्षण करो. संरक्षक सर्व तेज आम्ही प्राप्त करूं. म्हणून आज आम्ही देवांच्या रक्षणाची मागणी करतों आहोंत.

४. कुटतांना शब्द करणारा सोम कुटण्याचा दगड राक्षसांना दूर करो. वाईट स्वप्नामुळें उत्पन्न होणारें संकट, मृत्युदेवता आणि सर्व पिशाचादिक दूर होवोत. आदित्यसंबंधीं आणि देवसंबंधीं सुख आम्हाला प्राप्त होवो, म्हणून आम्ही देवांच्या संरक्षणाची मागणी करतों.

५. इंद्र यज्ञांत प्राप्त होवो. इळा म्हणजे वाणी किंवा पृथ्वी आह्मांला फलदायी होवो. सामांनीं गायला गेलेला बृहस्पति आम्हांकडून पूजिला जावो. तसेंच आम्ही मननीय स्तोत्रें जीवनाकरतां म्हणत असावें.

म्हणूनच आह्मी देवांच्या संरक्षणाची याचना करीत असतों.

६. हे अश्विनीहो, आमचा यज्ञ स्वर्गांत पोंचणारा करा. तसेंच तो आमचा संरक्षकहि असो. तसेंच आमची इष्टसिद्धि सुखानें होऊं दे. घृताच्या आहुति दिलेला अग्नि देवाकडे जाणारा कर. याकरतां आह्मी देवांपासून संरक्षणाची याचना करतों.

७. चांगल्या प्रकारें बोलावल्या जाणाऱ्या, शोधक, रमणीय, सुखकर, धनपोषक अशा देवांना सख्याकरतां मी बोलावतों. आणि त्यांचें चांगलें अन्न आणि यज्ञ यांकरतां आम्ही ध्यान करतों. म्हणून आज आम्ही देवांच्या संरक्षणाची याचना करतों.

८. उदकांचा संरक्षक, प्राण्यांना संतोषप्रद, देवांचा संरक्षक, स्तुत्य, यज्ञांतील मुख्य आणि रमणीय असा सोमरस आम्ही पितों. आणि त्याच्यापाशीं आम्ही बळकट इंद्रियें मागतों. म्हणूनच आज आह्मी देवांच्यापासून संरक्षणाची याचना करतों आहोंत.

९. पुत्र जिवंत असलेले आणि निरपराध असणारे आम्ही उपभोग्य वस्तूंनीं आणि चांगल्या रीतीनें सेवा करूं. तसेंच देवद्वेष्टे सर्व प्रकारें आमचें पाप धारण करोत. म्हणून आज आम्ही देवांच्या संरक्षणाची याचना करीत आहोत.

१०. हे देवहो, जे तुम्ही मनुष्यांच्या यज्ञाला अर्ह आहांत, ते तुम्ही ऐका. हे देवहो, तुमच्याकडे आम्ही जर याचना करीत आहोंत, तर तुम्ही जयशील ज्ञान, धन व पुत्रयुक्त यश द्या. म्हणून आज तुमच्या संरक्षणाची याचना करतों.

११. आज थोर, व्यापक आणि माघार न घेणारे अशा देवांपासून आम्ही संरक्षण मागतों आहोंत. तसेंच आम्हांला धन आणि संतति प्राप्त करावी म्हणून आम्ही देवांपाशीं संरक्षण मागतों आहोंत.

१२. प्रदीप्त अग्नीपासून आम्हांला सुख मिळावें. आम्ही निरपराध असावें. मित्र, वरुण आणि सवितृ यांच्या उदयकाळीं आम्ही सुखी असावें. म्हणूनच आम्ही देवांच्यापासून रक्षणाची याचना करतों.

१३. जे देव सत्योत्पादक सविता, मित्र व वरुण यांच्या कृत्यांत असतात, ते तुम्ही ऐश्वर्य, पुत्रयुक्त, पशुयुक्त उत्कृष्ट धन आणि कृत्यें आम्हांला द्या.

१४. पूर्व, पश्चिम, खालीं आणि वर असणारा सविता आम्हांला सर्व प्रकारचें धन देवो. सविता आम्हांला दीर्घायुष्य देवो.

सूक्त सदतिसावें.

ऋषिः—अभितपस्—सूर्यपुत्र; देवता—सूर्य; छंदः—जगती, १० त्रिष्टुभ.

१. हे ऋत्विजहो, तुम्ही मित्र व वरुण यांना पहाणारा, महान्, तेजस्वी, दूरूनहि पहाणारा, देवांकरतां उत्पन्न झालेला, विश्वप्रकाशक, स्वर्गाच्या पुत्रासारखा अशा सूर्याला नमस्कार करा आणि त्याची स्तुति करा आणि सृष्टीचे नियम पाळा.

२. ज्यामुळें सर्वत्र दिवस आणि रात्र उत्पन्न झाली, ज्यांत जग आणि प्राणी विश्रान्ति घेत आहेत व ज्यामुळें ही हालचाल चालूं आहे, सर्वदा पाणी वहात आहे आणि सूर्य उगवतो आहे, ती सत्योक्ति चहूंकडून माझें संरक्षण करो.

३. ज्यावेळीं तूं वेगवान् घोड्यांनीं युक्त असा रथ इच्छितोस, ज्या वेळीं तुझें प्राचीन दुसरें तेज जें उदकांत असतें तें दुसऱ्या तेजासह (चंद्रासह) उगवतें, त्या वेळीं हे सूर्या, तुझ्याजवळ कोणी प्राचीन राक्षस राहात नाहींत.

४. हे सूर्या, ज्या तेजानें तूं अंधार नाहींसा करतोस, ज्या तेजानें तूं सर्व जग व्याप्त करतोस, त्या तेजानें आमचा अन्नरहितपणा, अधार्मिकपणा आणि रोगराई नाहींशीं कर. वाईट स्वप्नामुळें उत्पन्न झालेलीं अरिष्टेंहि दूर कर.

५. हे सूर्या, तूं फिरत फिरत शांतपणें सर्व जगाचे नियम राखतोस आणि हवि असेल तेथें जातोस, त्यावेळीं तुझी आम्ही स्तुति करूं. त्यावेळीं आमच्या प्रसिद्ध कृत्यांना देव संमति देवोत.

६. द्यावापृथिवी, इंद्र आणि इतर देव तें आमचें बोलावणें आणि आमचीं स्तुतिस्तोत्रें ऐकोत. आम्हांला सूर्यदर्शनानंतर दुःख होऊं नये. आम्ही पुष्कळ दिवस जगून कल्याण व म्हातारपण प्राप्त करावें.

७. हे सूर्या, आम्ही सुविचारी, व्यवस्थित, पुत्रयुक्त, निरोगी आणि निरपराधी होत्साते तुझें सर्वदा पूजन करावें. तसेंच हे मित्रांचा सन्मान करणाऱ्या, प्रतिदिवशीं उदय पावणाऱ्या तुला आम्ही सतत पहावें.

८ हे विशेषरीत्या पहाणाऱ्या सूर्या, मोठें तेज धारण करणाऱ्या, कांतिमान्, प्रत्येकाच्या डोळ्याला सुख देणाऱ्या, महान् बलवान्, उदकांच्या वर उदय पावणाऱ्या तुला आम्ही दीर्घकाल पहावें.

९. हे नीलकेश सूर्या, तुझ्या तेजानें सर्व जग जागें होतें आणि रात्रीची विश्रान्ति घेतें. तूं आमच्या करतां अत्यंत श्रेयस्कर अशा दिवसांनीं त्रास न देतां सारखा उदय पावत जा.

१०. हे सूर्या, तेज, दिवस, किरण, शान्तता उष्णता यांनीं तूं आम्हांला सुखकर हो. जसा तूं आम्हांला मार्गांत सुखकर होतोस,त्याप्रमाणें तूं आम्हांला घरांतहि सुखकर हो. आम्हांला उत्कृष्ट धन दे.

११. हे देवहो,तुम्ही आमच्या माणसांना व जनावरांना अशा दोघांनाहि सुख द्या. तसेंच आम्हांला खाणें, पिणें व बळ सुखकारक होवो. तसेंच आम्हांला निष्पाप करा.

१२. हे देवहो, तुमच्यासंबंधीं आम्ही जिव्हेनें, मनानें, क्रोधजनक जें पाप केलें असेल, तें आमचें पाप जो आमचा शत्रू आमच्याबद्दल वाईट वागतो त्यावर नेऊन घाला.

सूक्त अडतिसावें

ऋषिः–मुष्कविशिष्ट इन्द्र (तांडव शाट्या-यनमते लुश ऋषि,इंद्र देवता); देवता–इन्द्र; छंदः–जगती.

१. ज्या वेळीं मनुष्यांचा पराभव करीत आणि पशू जिंकीत योद्धे एकमेकांना खाऊं का गिळूं असें करीत असतात, आयुधें सारखीं पडत असतात, त्यावेळीं, हे इंद्रा, तूं प्रसिद्ध आणि आघातक अशा युद्धांत सिंहनाद करतोस आणि (यशः) प्राप्तीकरतां आमचें संरक्षण करतोस.

२. हे इंद्रा, सर्वविख्यात असा तूं आम्हांला अन्नयुक्त, पाण्यासारखे गाई बैल असलेलें, असें सुप्रसिद्ध धन दे. तसेंच हे आच्छादक इंद्रा, शत्रूला जिंकणाऱ्या तुझ्या कृपेनें आम्ही बलिष्ठ व्हावें. फार काय आम्ही इच्छा करूं त्याप्रमाणें आम्हांला कर.

३. हे बहुस्तुत इंद्रा, जे दास, आर्य किंवा देवव्यतिरिक्त आमच्याशीं युद्धाकरतां येतात, ते सर्व शत्रू तुझ्या कृपेनें आम्ही सहज पराभव करून टाकूं असे होतील. आम्ही तुझ्या कृपेनें शत्रूंना लढाईंत ठार करूं.

४. भयंकर, भक्षक अशा युद्धांत द्रव्यप्रापक इंद्र जो थोड्यांनीं किंवा फारांनीं बोलावला जातो, त्या प्रख्यात आणि शुद्ध इंद्राला आमच्या संरक्षणाकरतां आम्ही बोलावतों.

५. हे कामपूरक इंद्रा, स्वतः हत्यार चालवणारा, अनपेक्षित बल देणारा, भक्तप्रेरक अशी तुझी आम्ही कीर्ति ऐकिली आहे. कुत्सापासून तूं आपली मुक्तता करून घेतलीस. बांधला असलास तरी तूं येथें ये. दोनहि अंडांना बांधलेला असा तुझ्यासारखा कधीं राहील कां ?

५टीप–कुत्स आणि लुश असे दोघेहि इंद्राला एकदम बोलावीत होते. त्यांत कुत्साकडे पूर्वीच्या स्नेहसंबंधांमुळें इंद्र गेला. कुत्साला असें वाटलें कीं कदाचित् आपला प्रतिस्पर्धी लुश याकडे इंद्र जाईल म्हणून शंभर बाधांनीं अंडाचे ठिकाणीं त्यानें इंद्राला बांधून ठेवलें. ह्या गोष्टीस उद्देशून ही ऋचा आहे.

सूक्त एकोणचाळिसावें.

ऋषिः–घोषा कक्षीवानाची कन्या; देवता–अश्वि; छंदः—१-१३ जगती, १४ त्रिष्टुभ्.

१. हे अश्विहो, तुमच्या भोंवतीं फिरणारा, सुंदर रथ अहोरात्र भक्त बोलावतात आणि तुम्ही त्या सुंदर रथांत बसलेले असतांनाच प्राचीन असे आम्ही पित्याप्रमाणें तुम्हांला बोलावतों.

२. हे अश्विहो, आमच्या गोड वाणीला प्रेरणा द्या. आणि आमच्या कृत्याला पूर्णता आणा. आम्हांला व्यापक बुद्धि द्या. हें आह्मी इच्छित आहोंत. तसेंच आह्मांला यशस्वि आणि उपभोग्य धन द्या. ज्याप्रमाणें पेयांत सोम मुख्य आहे, त्याप्रमाणें धनवानांत आह्मांला मुख्य करा.

३. हे सत्यस्वरूप अश्विहो, बापाच्या घरीं खितपत पडलेल्या वयातीत घोषेला तुह्मी भाग्य प्राप्त करून दिलेंत. उपाशी अशांचें संरक्षण करणारे तुह्मी आहांत. हलक्यांचेंहि तुह्मी संरक्षण करतां. अंधळ्याचें तुह्मी संरक्षण करतां. अशक्तांचे तुह्मीच रक्षणकर्ते आहांत आणि यज्ञांतील वैद्य असें तुम्हांला विद्वान् लोक म्हणतात.

४. हे अश्विहो, जुन्या रथाला पुनः नवें करावें. त्याप्रमाणें म्हाताऱ्या च्यवनाला पुनः तुह्मी तरुण केलेंत तसेंच तुग्रपुत्र भुज्यूला तुह्मी पाण्यांतून बाहेर काढलेंत. तुमचीं तीं सर्व कृत्यें यज्ञसमारंभांत (गाण्यासारखीं आहेत.) विशेष प्रकारें बोलण्यासारखीं आहेत.

५. हे अश्विहो, तुमचे प्राचीन पराक्रम लोकांत आम्ही बोलतों. हे सत्यस्वरूप अश्विहो, तुह्मी सुखदायक

वैद्य आहांत. तुम्हा दोघांची आह्मी आमच्या रक्षणाकरितां स्तुति करतों. हा भक्त ज्या प्रकारें श्रद्धाळू होईल तसें करा.

६. हे अश्विहो, घोषा तुमची स्तुति करीत आहे. माझें स्तवन ऐका आणि आईबाप पुत्राला देतात त्याप्रमाणें मला शिक्षण द्या. बांधवांना सोडावयास लावणारी, मूर्खपणाची आणि अयोग्य बुद्धि माझ्यांत उत्पन्न होते आहे, तिच्यापूर्वींच मला तारा.

७. हे अश्विहो, तुह्मी पुरुमित्राची मुलगी शुंध्यु हिला, (तिचा पति) विमद, त्याकडे रथानें पोचविते झालांत. तसेंच वध्रिमतीच्या बोलावण्याबरोबर आलांत (आणि तिला सोन्यासारखा हात देऊन) बुद्धिमान् वध्रिमतीला ऐश्वर्य देते झालांत.

८. हे अश्विहो, म्हातारा झालेला जो कलि नांवाचा ब्राह्मण त्याला पुनः तरुण वय तुम्ही प्राप्त करून दिलेंत. तुम्ही दोघे (बायकोच्या वियोगानें त्रासून विहिरींत पडलेल्या) वंदनाला विहिरींतून बाहेर काढते झालांत. आणि (युद्धांत पाय तुटलेल्या) विश्पलेला चालण्यास समर्थ करते झालांत.

९. हे कामपूरक आश्विहो, गुहेंत ठेवल्यामुळें मरावयास टेकलेल्या रेभाला तारलेंत. तसेंच तुम्ही तापलेल्या कुंडांत पाऊस पाडून अग्नीचें संरक्षण केलेंत. आणि सप्तवध्रीला (पेटी उघडून) वांचविलेंत. (सप्तवध्रीला त्याच्या शत्रूंनीं पेटींत कोंडून ठेवलें होतें त्याला अश्वीनें सोडवलें)

१०. हे अश्विहो, तुह्मी पेदूराजाला पांढरा, बलवान्, नव्याण्णव घोड्यांनीं युक्त, युद्धतत्पर, शत्रूंचा धुव्वा उडवणारा, स्तुत्य आणि सुखकारक घोडा धनाप्रमाणें दिलांत.

११. हे समर्थ, अदीन; सुस्तुत आणि स्तुतीनें प्रसन्न होणाऱ्या अश्विहो, तुह्मी ज्याला, पत्नीसह पुढें आहे रथ ज्याचा, असे करतां, त्याला कोणतेंहि विघ्न आड येत नाहीं व त्याला कसलीहि भीति रहात नाहीं.

१२. हे अश्विहो, ज्या रथाचा संयोग झाला असतां उषा प्रकट होते, आणि सूर्यामुळें होणारे सुंदर अहोरात्र उत्पन्न होतात, त्या रथांत बसून मनापेक्षांहि जास्त वेगानें तुह्मी या.

१३. हे अश्विहो, तुह्मी दोघांनीं शयूकरतां (म्हाताऱ्या गाईला) तरणी केलीत. तसेंच तुह्मी वृकानें तोंडांत पकडलेली चिमणी शहाणपणानें सोडविलीत. ते तुह्मी जयशाली रथानें पर्वतावरच्या मार्गानें या.

१४. हे आश्विहो, तुमचें आम्ही असें स्तोत्र करीत आहोंत. आम्ही सुताराप्रमाणें तुमचा रथ तासून तयार केला. आम्ही मुलांप्रमाणें किंवा स्त्रीप्रमाणें तुमच्या स्तोत्रांची व्यवस्था लोकांत करीत आहोंत.

सूक्त चाळिसावें.

ऋषि:—घोषा कक्षीवानाची मुलगी; देवता—अश्वि; छंद:—जगती.

१. हे नेते अश्विहो, तेजस्वी, यज्ञांत सकाळीं जाणारा, मोठा, सर्व लोकांत दररोज धन वाहून नेणारा अशा रथाला कोठें कोण बरें यजमान यज्ञांत स्तोत्रें म्हणून अभ्युदयाकरतां (मध्येंच) भूषित करतां झाला ? (थांबविता झाला. ज्यामुळें येथें येण्यास उशीर होत आहे. ?)

२. हे अश्विहो, आज तुमचा दिवस कोठें आहे? आज तुमची रात्र कोठें आहे ? आज तुम्ही कोठें आहांत आणि आज तुमची वस्ती कोठें आहे ? विधवा शयनावर दिराला बोलावते, किंवा स्त्री पुरुषाला बोलावते त्याचप्रमाणें तुम्हांला कोण बोलावीत आहे ?

३. हे नेते अश्विहो, सकाळीं भाटांचीं कवनें राजाची स्तुति करतात, त्याप्रमाणें दररोज प्रातःकाळीं स्तोत्यांकडून तुम्ही स्तविले जातां. प्रत्येक दिवशीं यज्ञार्ह तुम्ही यजमानांच्या घरीं जातां. आज तुम्ही कोणाचें पाप नष्ट करीत आहांत ? आणि राजपुत्राप्रमाणें कोणाच्या यज्ञांत जात आहांत.

४. हे अश्विहो, शिकार करणारे ज्याप्रमाणें वाघसिंहाच्या मागें लागलेले असतात, त्याप्रमाणें रात्रंदिवस हविर्द्रव्यानें भक्त तुम्हांला बोलावीत असतात. हे नायकहो, तुम्हांला वेळोवेळीं भक्त आहुति देत असतात. तसेंच उदकाधिपति तुम्ही लोकांकरतां अन्न पोंचवीत असतां.

५. हे नेते अश्विहो, तुम्हांला तुमची सेवा करणारी राजा कक्षीवानाची मुलगी घोषा बोलावते आणि अश्वीविषयीं माहिती विचारते. तसेंच तुम्ही मला दिवसारात्रीं साहाय्यक व्हा. तसेंच रथयुक्त अश्वयुक्त शत्रूशीं लढण्यास मला समर्थ करा.

६. हे अश्विहो, बुद्धिमान् असे तुम्ही रथावर बसा आणि स्तोत्याच्या यज्ञांत कुत्स (इंद्राच्या) रथांत बसून येतो त्याप्रमाणें जा. तसेंच हे अश्विहो,

---

४१व्या सूक्ताच्या स्पष्टीकरणार्थ १.११६ वर टीपा पहा.

सांडलेला मध स्त्रिया भरतात त्याप्रमाणें तुमचा मध माशा तोंडानें भरतात.

७. हे आश्विहो, भुज्यूला तारलेत, वशाला, आणि शिंजाराला स्तुति करण्याकरतां तारलेंत. तुमच्या सख्याची भक्त वाखाणणी करतो. तुमच्या आधारानें मी सुखाची इच्छा करतें.

८. हे अश्विहो, तुम्ही, कृश, शयु, सेवक आणि विधवा यांचें संरक्षण केलेंत. तुम्ही शब्द करणारा अनेकमुखी मेघ भक्ताकरतां मोकळा केलांत.

९. हे अश्विहो, घोषला कन्येच्छु पति प्राप्त होवो. त्याकरतां तुमच्या कृपेनें पाऊस पडून उत्तम औषधी उगवोत. उतारावर नद्या वाहतात त्याप्रमाणें त्याकडे चांगल्या गोष्टी येवोत आणि त्या तरुणाकरतां तिला तारुण्य प्राप्त होवो.

१०. हे आश्विहो, जे लोक (बायकोच्या) जीविताकरितां रडतात, आणि त्यांची यज्ञांत स्थापना करतात, आणि त्यांना घट्ट आलिंगन देतात, त्या स्त्रिया पतीकरितां सुंदर अपत्यें उत्पन्न करतात. आाण त्याच स्त्रिया आलिंगन दिलें असतां नवऱ्यास सुख देतात.

११. हे आश्विहो, त्यांचें तें सुख आम्ही जाणीत नाहीं, त्या सुखाचें तुम्ही वर्णन करा. तरुण असणारा पति तरुण स्त्रियांच्या योनींत तन्मय होतो. पत्नीवर प्रेम करणाऱ्या, बलवान् आणि वीर्यवान् अशा माझ्या पतीच्या घरीं मी जाते. हे आश्वि, तें घर मला प्राप्त होऊं द्या.

१२. हे अन्नरूपी धनवान् आणि उदकाधिपति अश्विहो, तुम्हांला चांगली बुद्धि उत्पन्न होवो. मनांतल्या इच्छा दाबा आणि माझे रक्षक व्हा. मला प्रिय पतीस आवडती करून पतीचें गृह प्राप्त होऊं द्या.

१३. हे आश्विहो, आनंदित अशा तुमची मी माझ्या नवऱ्याच्या घरीं स्तुति करीत असता पुत्रयुक्त धन द्या. हे उदकाधिपति अश्विहो, तुम्ही मला पिण्याकरितां पाणी द्या. वाटेंतले आडफाटे आणि वाईट बुद्धि नष्ट करा.

१४. हे आश्चर्यकारक उदकाधिपति आश्विहो, तुम्ही आज कोठें आहांत ? कोणत्या लोकांत तुम्ही आपणांस तृप्त करीत आहांत ? कोणच्या भक्तांनीं तुम्हांला आडविलें आहे ? तुम्ही कोणत्या भक्त स्तोत्याच्या घरीं आहांत ?

सूक्त एकेचाळिसावें.

ऋषिः—सुहस्त्य घोषापुत्र; देवता—अश्वि; छंदः—जगती.

१. हे अश्विहो, एकच, प्रसिद्ध, पुष्कळांनीं बोलावला जाणारा, स्तुत्य, तीनचाकी, यज्ञाकडे जाणारा, भोंवतीं फिरणारा, यज्ञाला हितकारक, अशा रथाला सकाळीं स्तुति करून आम्ही बोलावतों.

२. हे सत्यस्वरूप व नायक आश्विहो, तुम्ही प्रातःकालीं जाणारा, अमृतवाहक रथ, ज्या रथानें यजनशील लोक जातात आणि स्तोत्यापैकीं होतृयुक्त यज्ञांत जातात त्यांत आरूढ होतां.

३. हे अश्विहो, तुम्ही सोमयुक्त अध्वर्यूकडे, तसेंच बलवान्, दानशील अग्नीध्राकडे आणि सुहस्त्याकडे तुम्ही या. जर तुम्ही या शहाण्यांच्या यज्ञांत याल तर येथून तुम्हांला सोमपान मिळेल.

सूक्त बेचाळिसावें.

ऋषिः—कृष्ण आंगिरस; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्.

१. लांब आणि वेधक बाण टाकणाऱ्या धनुर्धाऱ्याप्रमाणें आणि भूषणें धारण करणाऱ्याप्रमाणें तूं इंद्राची स्तुति कर. हे बुद्धिमन्तहो, तुम्ही स्तोत्रें म्हणून शत्रूंना नाहींसें करा. तसेंच हे स्तोतेहो, तुम्ही सोमयागांत इंद्राला रमवा.

२. हे स्तुतिकर्त्या, तूं कामतृप्त्यर्थ सख्या इंद्राला ताब्यांत घे. तसेंच स्तुत्य इंद्राला तूं जागृत कर. धनांनीं पूर्ण असलेल्या खजिन्याप्रमाणें खोल असणाऱ्या शूर इंद्राला धनदानाकरतां आपल्याकडे वळव.

३. हे धनवान् इंद्रा, (जर तूं कांहीं देत नसशील तर) तुला लोक दाता कां म्हणतात ? (खरोखर तूं धन देणारा आहेस) म्हणून तूं मला (धन देऊन) समर्थ कर. तुला आम्ही समर्थ करणारा म्हणून ऐकतों. माझी बुद्धि कर्में करावयास लागणारी असो. तसेंच आम्हांस द्रव्य मिळणारें भाग्य दे.

४. हे इंद्रा, तुला लोक युद्धांत (साहाय्याकरतां) बोलावतात. युद्धांत जयशाली लोकहि तुला बोलावतात. जो हविर्द्रव्ययुक्त असतो, त्याच्याशीं इंद्र मैत्री करतो, सोम न तयार करणाराशीं इन्द्र मैत्री करीत नाहीं.

५. हविर्द्रव्यें असणारा जो भक्त पुष्कळ जंगम धनाप्रमाणें तीव्र सोमहि या इंद्राला देतो, त्या भक्ताकरतां

सकाळीं पोराबाळांनीं युक्त,सुंदर आयुधें धारण करणाऱ्या अशा शत्रूंना इंद्र फोडतो आणि वृत्राला ठार करतो.

६. ज्या इंद्राची आम्ही स्तुति करतों, आणि जो धनवान् इंद्र आमच्या इच्छेचा आश्रय आहे, त्या इंद्राच्या शत्रूंना दुरूनच भय वाटो. ह्या इंद्राला शत्रूलोकांतलें अन्न प्राप्त होवो.

७. हे बहुस्तुत इंद्रा, तुझ्या उग्र वज्रानें आमच्या शत्रूंला तूं दूर पळीव. तसेंच आम्हांला गाईबैल व गहूं यांनीं युक्त धन दे. तसेंच स्तति करणाऱ्या माझ्याकरतां रमणीय कृत्यें कर.

८. ज्या इंद्राप्रत हवन केलेलें, तीव्र, क्षुधोत्पादक सोम प्राप्त होतात, तो धनवान् इंद्र दात्या भक्ताला विरोध करीत नाहीं, उलट पुष्कळ सोम देणाराला पुष्कळ धन देतो.

९. इंद्र शत्रूंचें अतिक्रमण करून त्याला जिंकतो. जसें फांसे खेळणारा आपला जोडीदार निवडून घेतो, त्याप्रमाणें इंद्र आपला शत्रू निवडून घेतो. तसेंच जो देवभक्त असतो त्याला धनरहित न करतां, त्याला बलवान् असणारा इंद्र धनयुक्त करतो.

१०. हे बहुस्तुत इंद्रा, दारिद्र्यामुळें प्राप्त झालेल्या दुर्बुद्धींतून आम्हीं गाईबैलांच्या साहाय्यानें तरून जाऊं. गव्हांनीं संपूर्ण क्षुधा नाहींशीं करूं. राजांपासून आम्ही उत्कृष्ट धन मिळवूं, तसेंच आमच्या बलानें आम्ही शत्रूला जिंकूं.

११. पश्चिमेकडून येणाऱ्या शत्रूंपासून बृहस्पति आमचें संरक्षण करो. तसेंच उत्तर बाजूंनीं, खालच्या बाजूंनीं येणाऱ्या शत्रूंपासून संरक्षण करो. इंद्र पूर्वेकडून, मध्याहून येणाऱ्या शत्रूपासून आमचें संरक्षण करो. तसेंच सखा इंद्र मित्रभूत अशा आम्हांला धन देवो.

सूक्त त्रेचाळिसावें.

ऋषिः–कृष्ण आंगिरस; देवता–इंद्र; छंदः–११–१२ त्रिष्टुभ्, बाकी जगती.

१. सर्व प्रापक, व्यापक आणि इच्छा करणारी अशी आमची बुद्धि इंद्राची स्तुति करीत आहे. स्त्रिया मर्द पुरुषाला संरक्षणाकरतां ज्याप्रमाणें आलिंगन देतात त्याप्रमाणें शुद्ध इंद्राला आमच्या स्तुति आलिंगन देत आहेत.

२. हे बहुस्तुत इंद्रा, तुझ्यापासून माझें मन ढळत नाहीं. तुझ्यावरच माझ्या इच्छा मी अवलंबून ठेवतों. तूं राजाप्रमाणें यज्ञांत बैस. तसेंच तूं हा सोम पी.

३. इंद्र आमची दुर्बुद्धि आणि क्षुधा नष्ट करणारा होवो. तसेंच इंद्र हा व्यापक धनाचा स्वामी आहे. तसेंच कामपूरक व बलवान् इंद्राच्या त्या सात नद्या सखल प्रदेशांत अन्न वाढवितात. (पिकें चांगलीं उत्पन्न करतात.)

४. पक्षी सुंदर पर्णयुक्त झाडावर बसतात त्याप्रमाणें मदोत्पादक आणि पात्रांत ठेवलेला सोम इंद्राकडे जातो. सोमाच्या सामर्थ्यानें युक्त असणारें सैन्य पराक्रम करतें. तसेंच इंद्र स्वतः प्रेरित केलेलें तेज (सूर्य) मनुष्यांना देवो.

५. फांसे खेळणारा जुगारांत केलेलें ज्याप्रमाणें (मागून) शोधित असतो त्याप्रमाणें ज्या वेळीं धनवान् इंद्र सूर्याला जिंकतो, त्या वेळीं इंद्र (स्वतः उत्पन्न केलेल्या) सूर्याला शोधित असतो. हे इंद्रा, तुझा तो पराक्रम तुझ्याशिवाय दुसरा कोणी अनुसरूं शकत नाहीं. जुना, नवा कोणीहि त्याचें अनुकरण करूं शकत नाहीं.

६. कामपूरक इंद्र सर्वत्र असतो. लोकांच्या स्तुति लक्षांत घेतो. इंद्र ज्याच्या यज्ञांत रमतो, त्याच्या कडक सोमांनीं संग्रामेच्छु शत्रूंना जिंकतो.

७. ज्या वेळीं इंद्राकरतां सोम पिळला जातो, पाणी समुद्राकडे जातें, किंवा पाट डोहांत जातो, त्याप्रमाणें सोम इंद्राकडे जातो, तेव्हां इंद्राचें माहात्म्य यज्ञगृहांत स्तोते, पाऊस गहूं वाढवितो, त्याप्रमाणें वाढवितात.

८. रागावलेल्या बैलाप्रमाणें लोकांत इंद्र धांवत जातो आणि लोकरक्षक उदकें जो मोकळीं करतो तो इंद्र सोम काढणाऱ्या, दानशील आणि हविर्युक्त भक्ताला तेज (उदक) देतो.

९. इंद्राचें वज्र तेजासह प्रकट होवो. सत्योत्पादक वाणी प्राचीन कालाप्रमाणें प्रकट होवो. तेजस्वी इंद्र तेजानें प्रकाशो. तसेंच सत्पति इंद्र सूर्याप्रमाणें उज्ज्वल प्रकाशो.

१०. हे बहुस्तुत इंद्रा, दारिद्र्यामुळें प्राप्त झालेल्या दुर्बुद्धींतून आम्ही गाईबैलांच्या साहाय्यानें तरून जाऊं. तसेंच गव्हाच्या साहाय्यानें संपूर्ण क्षुधा नाहींशीं करूं. तसेंच राजांच्यापासून आम्ही उत्कृष्ट धन मिळवूं. तसेंच आमच्या बलानें आम्ही शत्रूंना जिंकूं.

११. पश्चिमेकडून येणाऱ्या शत्रूपासून आमचें

बृहस्पति संरक्षण करो. तसेंच उत्तर बाजूंनीं, खालून येणाऱ्या शत्रूपासून आमचें संरक्षण होवो. इंद्र पूर्वेकडून, मध्याहून येणाऱ्या शत्रूपासून आमचें संरक्षण करो. तसेंच सखा इंद्र मित्रभूत अशा आम्हांला धन देवो.

सूक्त चव्वेचाळिसावें.

ऋषिः—कृष्ण आंगिरस, देवता–इंद्र; छंद १-३ त्रिष्टुभ्, ४-९ जगती, १०-११ त्रिष्टुभ्.

१. जो त्वराशील बलवान् इंद्र सर्व शत्रुसैन्य अलोट व मोठ्या सामर्थ्यानें क्षीण करीत असतो, तो धनपति इंद्र आम्हांला उत्साह देण्याकरितां रथांत बसून येवो.

२. हे मनुष्यसंरक्षक इंद्रा, तुझा सुंदर रथ व्यवस्थित घोडे जोडलेला आहे. हातांत वज्र घेतलेला असा तूं लवकर चांगल्या मार्गानें आमच्याकडे ये आणि सोम प्याल्यावर तुझें बळ वृद्धिंगत होऊं दे.

३. लोकपालक, वज्रबाहु, उग्र, शत्रुसैन्य क्षीण करणारा, कामपूरक व सत्य पराक्रमी इंद्राला, उग्र बलिष्ठ आणि मस्त असे घोडे आमचेकडे वाहून आणोत.

४. हे इंद्रा, तूं रक्षक, भांडें भरून असलेला उत्साहवर्धक आणि बळद असा सोम पितोस आणि आम्हांला बल देतोस. तुझ्या भक्तांत आमचा संग्रह कर. आम्हां भक्तांच्या सर्वप्रकारें उत्कर्षाला तूं कारण होतोस.

५. हे इंद्रा, आम्हांला धन प्राप्त होवो. कारण आम्ही तुझी स्तुति करीत आहोंत. सोमयुक्त अशा आमच्या यज्ञांत चांगले आशीर्वाद देत ये. कारण तूं समर्थ आहेस. तो तूं आमच्या ह्या यज्ञांत येऊन बैस. तुझीं सोमपात्रें (कोणत्याहि) कृत्यानें (कोणालाहि) आक्रमण करतां येणार नाहींत.

६. हे इंद्रा, जे प्रामुख्यानें देवांची स्तुति करणारे आहेत, ते (देवलोकांत) स्वतंत्रपणें जातात. आणि कोणालाहि अशक्य अशी कीर्ति मिळवितात. जे यज्ञरूपी नौकेंत आरूढ होऊं शकत नाहींत. ते पापी लोक कर्जातच अधोगतीला जातात.

७. ज्यांच्या रथाला मस्त घोडे जोडले जातात, (म्हणजे जे सधन आहेत) पण जे दुर्बुद्धि यज्ञ करीत नाहींत त्यांची अधोगति होते. जे प्रथमच यज्ञ करतात आणि ज्या यज्ञांत पुष्कळ उपभोग्य मौल्यवान् वस्तु दिल्या जातात त्यांचा उत्कर्ष होतो.

८. गमनशील, हलणाऱ्या मेघाला इंद्रानें स्थिर केलें. द्यु गर्जूं लागलें व क्षुब्ध झालें आहे. इंद्र परस्परसंलग्न द्यावापृथ्वींना स्थिर करतो. आणि सोम पिऊन उत्साह प्राप्त झाल्यावर सुंदर भाषणें बोलतो.

९. हे धनवान् इंद्रा, तुझीं प्रेरक वर्णनें आम्ही म्हणतों. ज्या स्तोत्रामुळें तूं शत्रुघातक ऐरावताला त्रास देतोस,त्या माझ्या यज्ञांत तुझा निवास असो. हे धनवान् इंद्रा, स्तुत्य असा तूं सोमयज्ञांत आमचीं स्तोत्रें ऐक.

१०. हे बहुस्तुत इंद्रा, दारिद्र्यामुळें प्राप्त झालेल्या दुर्बुद्धींतून आम्ही गाईबैलांच्या साहाय्यानें तरून जाऊं. गव्हांच्या साहाय्यानें संपूर्ण क्षुधा नाहींशी करूं. राजापासून आम्ही उत्कृष्ट धन मिळवूं. तसेंच आमच्या बलानें आम्ही शत्रूंना जिंकूं.

११. पश्चिमेकडून येणाऱ्या शत्रूपासून आमचें संरक्षण बृहस्पति करो. तसेंच उत्तर बाजूंनीं, खालून येणाऱ्या शत्रूपासून आमचें संरक्षण होवो. इंद्र पूर्वेकडून, मध्याहून येणाऱ्या शत्रूपासून आमचें संरक्षण करो. तसेंच सखा इंद्र मित्रभूत अशा आम्हांला धन देवो.

सूक्त पंचेचाळिसावें.

ऋषिः—वत्सप्रि भालंदन; देवता–अग्नि; छंदः–त्रिष्टुभ्.

१. अग्नि आकाशाच्यावर (सूर्यरूपानें) प्रकट झाला. नंतर अग्नि आमच्यापुढें दुसऱ्या रूपानें (पार्थिव) प्रकट झाला. नंतर लोकानुग्राहक अग्नि आकाशांत विद्युल्लतारूपानें प्रकट झाला. अशा प्रकारच्या अग्नीला सतत प्रज्वलित ठेवणारे स्तोते नेहमीं स्तवितात.

२. हे अग्ने,तुझीं तीन ठिकाणीं असणारीं (पृथ्वी, अन्तरिक्ष आणि द्युलोक) तीनहि रूपें आम्हीं जाणतों. हे अग्निदेवा, तुझी गुप्त असणारी अनेक स्थानेंहि आम्ही जाणतों. तुझें अत्यंत गूढ असणारें नांवहि आम्हांला माहीत आहे. तसेंच तूं जेथून उत्पन्न झालांस तें कारणहि आम्हीं जाणतों.

३. हे अग्निदेवा, समुद्रामध्यें पाण्यांत असणाऱ्या तुला लोकानुग्राहक वरुणानें प्रदीप्त केलें. लोकद्रष्टा आदित्य तुला द्युलोकांत उत्पन्न करता झाला. तसेंच तिसऱ्या आकाशांत विद्युद्रुपानें असणाऱ्या तुला स्तोते स्तुति करून वाढविते झाले.

४. पृथ्वीला संतप्त करणारा आणि औषधींचा

आस्वाद घेणारा अग्नि, आकाश गर्जावें त्याप्रमाणें ओरडत आहे. ताबडतोब उत्पन्न झालेला आणि प्रदीप्त असा अग्नि दग्ध वस्तु पहातो आणि आपल्या तेजानें द्यावापृथ्वींत शोभतो.

५. ऐश्वर्योत्पादक, द्रव्यनिधि, कामपूरक, सोमसंरक्षक आणि सर्वव्यापी बळपुत्र अग्नि पाण्यांत (असूनहि) सर्व सत्ताधारी असा सकाळीं प्रदीप्त केला जात आहे आणि शोभत आहे.

६. विश्वप्रकाशक, सर्व सृष्टींत असणारा, अग्नि उत्पन्न झाल्याबरोबर सर्व व्यापून टाकतो. ज्या वेळीं सर्व जातींचे लोक अग्नीची पूजा करतात त्या वेळीं व्यापतांना दृढ अशा पर्वताचाहि तो भेद करतो.

७. भक्षणेच्छु, सर्वशोधक, गंता, तेजस्वी आणि अमर अग्नि लोकांत आहे. तो धूर उत्पन्न करतो. तो तेजस्वी रूप धारण करीत तेजानें द्युलोकाला व्यापून असतो.

८. प्रत्यक्ष आणि तेजस्वी अग्नि व्यापक असा असह्य तेजानें अत्यंत प्रकाशणारा असतो. तो अन्न मिळाल्यानें अमर होतो. कारण याला बलशाली द्युलोकानें उत्पन्न केलें आहे.

९. हे कल्याणप्रकाश अत्यंत तरुण अग्निदेवा, तुझा जो भक्त आज तुला घृतयुक्त पुरोडाश देईल त्याला तूं उत्तम प्रतीचें धन दे. तसेंच त्या देवभक्ताला तूं सुख दे.

१०. हे अग्निदेवा, तूं उत्तम कर्म करणाऱ्या भक्ताला चांगलें फल दे. स्तोत्रें म्हटलीं असतां त्याला फल दे. जो भक्त सूर्य किंवा अग्नीला प्रिय होतो त्या भक्ताच्या झालेल्या किंवा होणाऱ्या पुत्राकडून शत्रूंचा नाश होवो.

११. अग्निदेवा, तुला भक्त दररोज सर्व प्रकारची संपत्ति देतात. तुझ्यासह गोरूप द्रव्य इच्छिणारे स्तोते तुझ्याकरतां गौळवाडे मोकळे करतात.(गाई दान देतात.)

१२. ऋषींकडून नायक,सोमरक्षक आणि बलिष्ठ अशा अग्नीची स्तुति केली जात आहे. प्रेमळ द्यावापृथ्वीचें आम्ही स्तवन करतों आहोंत.हे देवहो,आम्हांला उत्कृष्ट पुत्रयुक्त धन द्या.

सूक्त शेहेचाळिसावें.

ऋषिः-वत्सप्रि भालंदन; देवता-अग्नि; छंदः-त्रिष्टुभ्.

१. जो अग्नि अन्तरिक्षांत आहे तो अन्तरिक्षवेत्ता येथें होमाकरतां उत्पन्न झाला आहे. आणि या लोकांतला येथें बसला आहे. जो यज्ञाधार येथें स्थापन केला आहे तो सेवा करणाऱ्या तुला द्रव्य देवो आणि शरीराचें रक्षण करो.

२. उदकांत गूढ असणाऱ्या अग्नीची सेवा करणारे लोक, नष्ट झालेल्या पशूंचा पावलावरून ज्याप्रमाणें माग काढतात त्याप्रमाणें अग्नीला अनुसरतात. आणि गूढ संचार करणाऱ्या अग्नीला इच्छिणारे थोर भृगु अग्नीला प्राप्त करते झाले.

३. ह्या अग्नीला इच्छिणाऱ्या विभूवसाचा पुत्र त्रित जमिनीवर याला प्राप्त करता झाला. तो सुखवर्धक अग्नि घरांत उप्तन्न झाला, आणि तेजानें सूर्याला प्रतिबंध करीत आहे.

४. उत्साहवर्धक, स्तुत्य, पूर्वाभिमुख, यज्ञांतील मुख्य, शोधक, हवि नेणारा आणि लोकाधिप अग्नीला भक्त स्तुति करून स्तवितात.

५. हे स्तोत्या, तूं शत्रूंना जिंकणाऱ्या, थोर, बुद्धिमान् अग्नीला स्तवण्यास समर्थ हो. तसेंच सर्व अज्ञ लोके ज्ञानी, नगरें उध्वस्त करणाऱ्या, सर्वत्र अन्तर्भूत असणाऱ्या, स्तुत्य अशा अग्नीला सुंदर केश असणाऱ्या घोड्याप्रमाणें त्याला खाद्य देऊन त्याची वाखाणणी करतात.

६. स्थिर करणारा, त्रित अग्नि पसरत यज्ञगृहांतील आपले जागेंत असतो. तेथून लोकांचे हवि ग्रहण करून देवांना देऊं इच्छिणारा तो शत्रूंचें नियमन करीत देवांकडे जातो.

७. भक्ताचे जरारहित, शत्रूंपासून रक्षक, अर्चनीय, धूरयुक्त, शोधक, निर्मळ, तात्काळ फल देणारा, पोषक आणि अरण्यांत राहणारा अग्नि उत्साहवर्धक सोमाप्रमाणें फल देतो.

८. जो अग्नि जिव्हेनें आपलें कार्य करतो आणि जो अग्नि पृथ्वीवरचीं स्तोत्रें मनानें स्वीकारतो,त्या तेजस्वी, उत्साहवर्धक, शोधक, स्तुत्य आणि अत्यंत यजनीय अग्नीला लोक धारण करतात.

९. ज्याला द्यावापृथिवीनें उत्पन्न केलें, स्तोत्रें म्हणून भृगूंनीं ज्याला उत्पन्न केलें, ज्याला त्वष्टा आणि अन्तरिक्ष उत्पन्न करतात, वायूनें ज्या स्तुत्य अग्नीला

उत्पन्न केलें आणि ज्या यज्ञार्ह अग्नीला देवांनीं मनूकरतां निर्माण केलें,—

१०. ज्या हव्यवाह अशा तुला देवांनीं धारण केलें, अनेक इच्छा धारण करणाऱ्या लोकांनीं पूजार्ह म्हणून ज्याचा स्वीकार केला, तो तूं हे अग्ने, स्तुति करणाऱ्या आम्हांस अन्न दे. देवभक्त असा मनुष्य तुझ्या कृपेनें पुष्कळ कीर्ति प्राप्त करतो.

सूक्त सत्तेचाळीसावें.

ऋषिः—सप्तगु आंगिरस, देवता—वैकुंठ इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे धनपति इंद्रा, द्रव्येच्छु आम्ही तुझा उजवा हात धरतों. (मला दिल्याशिवाय दुसऱ्यास देऊं नको, म्हणून) हे शूर इंद्रा, अनेक गाईबैलांचा अधिपति अशा तुला आम्ही जाणतों, म्हणून मला कामपूरक आणि आश्चर्यकारक धन दे.

२. उत्तम आयुधें असलेला, अत्यंत रक्षक, नायक, चार समुद्रापर्यंत कीर्ति पसरलेला, धारक, पुनः पुनः धन संपादक, स्तुत्य, आणि दुःखनिवारक अशा तुला आम्ही जाणतों. हे इंद्रा अशा मला आश्चर्यकारक पुत्ररूपी धन दे.

३. हे इंद्रा, स्तुत्य, देवयुक्त, महान्, व्यापक, गंभीर, विस्तृत, ज्ञानी, उग्र, शत्रूंचा पराभव करणारें आश्चर्यकारक आणि बलवान् असें पुत्ररूपी धन आम्हांस द्या.

४. अन्नयुक्त, श्रेष्ठ, तारक, धन देणारें, उत्कर्षशाली, बलशाली, शत्रुहन्तें, शत्रूंचीं नगरें उध्वस्त करणारें, सत्यस्वरूप असें बलवान् कामपूरक पुत्ररूपी धन आम्हांस द्या.

५. अश्व, रथ, वीर यांनीं युक्त, शेंकडो हजारो सेवकांनीं युक्त, कल्याणकारक लोकांनीं युक्त, शहाणे आणि योद्धे यांनीं युक्त, सर्वमान्य, बलवान् आणि आश्चर्यकारक पुत्ररूपी धन आम्हांस द्या.

६. सत्यकर्मा, बुद्धिमान्, मंत्राचा उपयोग करणाऱ्या सप्तगु नांवाच्या मला बुद्धि प्राप्त होवो. जो आंगिरसकुलोत्पन्न मी नमस्कार करून देवांकडे गेलों, त्या मला आश्चर्यकारक आणि बलवान पुत्ररूपी धन दे.

७. दानशील अशा माझ्या दूताप्रमाणें माझीं स्तोत्रें इंद्राच्या सद्बुद्धीची याचना करीत त्याच्या भोंवतीं फिरत आहेत. तीं माझीं स्तोत्रें हृदयस्पर्शी आणि मनापासून म्हटलीं आहेत. हे इंद्रा, आम्हांला आश्चर्यकारक आणि बलवान् पुत्ररूपी धन दे.

८. हे इंद्रा, जें तुला आम्ही मागतों तें तूं आम्हांला दे. लोकांना असामान्य वाटणारें घर तूं आम्हांला दे. तें घर सर्व जगानें स्तवावें. आम्हांला आश्चर्यकारक व बलिष्ठ पुत्ररूपी धन दे.

सूक्त अठ्ठेचाळिसावें.

ऋषिः—इंद्र वैकुंठ; देवता—इंद्र; छंदः—७-१०-११ त्रिष्टुभ्, बाकी जगती.

१. मी धनाचा मुख्य मालक व्हावें. मी पुष्कळ शत्रूंचीं धनें एकदम जिंकतों. पित्याला पुत्र बोलावतात त्याप्रमाणें मलाच सर्व प्राणी बोलावतात. मी दात्याला अन्न देतों.

२. मी इंद्रानें अथर्वणपुत्र दधीचाचें डोकें तोडलें, मी त्रिताच्या उद्धाराकरतां मेघापासून पाणी उत्पन्न केलें. मी शत्रूपासून धन घेतलें. मातरिश्वपुत्र दधीचाकरतां मी गोरक्षक मेघांना पाऊस पाडावयास लावतों.

३. माझ्याकरतां त्वष्ट्यानें लोखंडी वज्र तयार केलें. देवहि माझ्या करतां कर्मे करिते झाले. सूर्याच्या सैन्याप्रमाणें दुस्तर असणारी माझी सेना, मला उद्देशून केलेल्या कृत्यामुळेंच लोक तरून जातात.

४. मी गाई, घोडे, पशु, उदक आणि सुवर्ण यांनीं युक्त अशा संपत्तीला आयुधांच्या साहाय्यानें जिंकतों. तसेंच मी शेंकडोंशें आयुधें धार लावून भक्ताकरतां ठेवीत असतों. ज्या वेळीं भक्त स्तोत्रें आणि सोम यांनीं मला तृप्त करतात त्या वेळीं मी तयार असतों.

५. मी आपलें धन कधींच गमावीत नाहीं. तसेंच मी मृत्यूच्या ताब्यांतहि कधींच जात नाहीं. म्हणूनच

टीपः—विकुंठा नांवाची एक असुर स्त्री होती. तिनें मुलाकरतां खूप तप केलें. माझ्यासारखा कोणी जन्माला येऊं नये म्हणून इंद्रच तिच्या पोटीं जन्माला आला अशी आख्यायिका आहे.

२ **टीपः**— अथर्वणपुत्र दध्यंचाला इंद्र म्हणाला कीं मधुविद्या तूं कोणाला सांगूं नकोस. जर सांगशील तर तुझें डोकें तोडीन. अथर्वणानें अश्वींना सांगितली. त्यामुळें इंद्रानें त्याचें डोकें तोडलें. १.८०.१६;८३.५; ११६.१२. टीपा पहा.

सोम तयार करणारे भक्त मलाच धन मागतात. हे पुरुहो, माझें सख्य तोडूं नका.

६. जे शत्रु वज्रधारी इंद्राशीं युद्ध करतात, त्या प्राणधारी शत्रूंच्या जोड्यांना मी ठार करतों. मला आव्हान करणारे, गर्विष्ठ पण नमवलेले आणि भयंकर वल्गना करणाऱ्या शत्रूंना मीं ठार केलें.

७. मी एकटाच एका शत्रूला पराभूत करतों. शत्रूरहित असा मी दोनच काय पण तीन शत्रूंनाहि एकदम पराभूत करतों. खळ्यावर तुष ज्याप्रमाणें काढतात, त्याप्रमाणें अनेक शत्रूंना मी ठार करतों. इंद्रद्वेष्टे माझी कशी बरें निंदा करतील?

८. जेव्हां मी पर्यय आणि करंज यांना ठार करणाऱ्या महान् युद्धाची बातमी ऐकली, त्यावेळीं मी गुंगुंदशाच्या रक्षणाकरतां शत्रूहिंसक आणि प्रेरक अतिथिग्व दिवोदासाला लोकांत अन्नाप्रमाणें मदतीस बोलाविलें.

९. ज्यावेळीं माझे स्तोते युद्धांत तेजस्वी शस्त्र ग्रहण करतात, त्यावेळीं माझा सर्वांचा आधार असा भक्त अन्न आणि भोग मिळविण्यास समर्थ होतो. त्या माझ्या स्तोत्यांना गाई मिळविण्याकरितां आणि मैत्रीकरतां लोक स्वीकारतात, नंतर त्यांना मी स्तुति करण्यास योग्य ठरवितों.

१०. दोघांपैकीं एकापाशीं जर इंद्रानें सोम पाहिला, तर सोम असलेल्याचें रक्षण करण्याकरतां इंद्र प्रकट होतो. तीक्ष्णशृंग बैलाप्रमाणें तो युद्धेच्छु शत्रूसमोर बांधल्यासारखा जाऊन उभा रहातो.

११. आदित्य, वसु, रुद्र आणि देव यांचीं स्थानें इंद्र मोडित नाहीं. ते देव माझ्यावर कल्याण आणि बळ देऊन अनुग्रह करोत. मी पराजय न पावलेला, उत्साही आणि दृढ आहे.

सूक्त एकोणपन्नासावें.

ऋषिः—वैकुण्ठ इंद्र; देवता-वैकुण्ठ इंद्र; छंद-त्रिष्टुभ्.

१. मी स्तुति करणाराला उत्तम धन देतों. मी माझ्या उत्कर्षाकरतां कृत्यें करीत असतों. मी भक्तांना प्रेरक होतों. मी सर्व युद्धांत माझी भक्ति न करणारांना पराभूत करतों.

२. पृथ्वी, अन्तरिक्ष आणि स्वर्ग या तीनहि लोकांतले प्राणी देवता म्हणून माझाच स्वीकार करतात. मी कडें बलिष्ठ, विशेष तऱ्हेनें चालणारे व जलद चालणारे असे घोडे रथाला जोडतों. तसेंच मी युद्धाकरितां शत्रूंचा पराभव करणारें वज्र हातांत घेतों.

३. मी कवीकरतां अनेक प्रकारच्या हत्यारांनीं अत्काला ठार केलें. आणि कुत्साच्या अनेक स्तोत्रामुळें त्यांचें संरक्षण केलें. मी शुष्णाला ठार करण्याकरितां वज्राचा उपयोग केला. मीं आर्यांच्या करितां दस्यूंना उदक दिलें नाहीं.

४. ज्याप्रमाणें पिता पुत्राला इष्ट असें घडवितो त्याप्रमाणें मी वेतसूचें कल्याण करण्याकरतां कुत्साला ताबडतोब ताब्यांत घेतो. ज्याप्रमाणें पुत्राकरितां पिता करतो त्याप्रमाणें शत्रूंचा पराभव करण्याकरितां मी तुमचें प्रिय करतों. तसेंच मी भक्तांना राजाचे ठिकाणीं आहे.

५. मी मृगयाला श्रुतर्वणाकरतां वश केला, कारण श्रुतर्वा माझ्याकडे आला आणि त्यांनीं माझी स्तोत्रें म्हटलीं. मी वेशाला आयूकरितां नमविलें, आणि सव्याकरतां पड्गृभीला ताब्यांत आणलें.

६. वृत्रानें दासांचा ज्याप्रमाणें फडशा पाडला त्याप्रमाणें मीं नववास्त्व बृहद्रथाला नष्ट केलें. ज्यावेळीं उत्साही आणि प्रसिद्ध असे शत्रु मला येऊन भिडले, त्या वेळीं त्यांना ह्या लोकांच्या पलीकडे नेऊन मीं टाकलें, (ठार केलें.) तो इंद्र मी आहे.

७. मी सूर्याच्या पिंगट रंगाच्या घोड्यांनीं ओढला जाणारा मोठ्या सामर्थ्यानें (पृथ्वीच्या) भोंवती फिरतों. ज्यावेळीं मला लोक यज्ञसिद्धीकरतां सोम घ्यावा म्हणून बोलावतात. त्यावेळीं दुष्ट शत्रूंचा मी हत्यारांनीं नाश करून टाकतों.

८. शत्रूंच्या सात नगरांचा नाश करणारा, बलवानांतला बलवान् मी यदु व तुर्वश यांना बलाविषयीं कीर्तिमान् केलें. मी दुसऱ्याहि माझ्या भक्तांना बल देऊन बलवान् केलें, नव्याण्णव उत्साही शत्रूंना नष्ट केलें.

९. बलवान् अशा मी पृथ्वीवर वाहणाऱ्या व पसरणाऱ्या सात नद्या ताब्यांत ठेवल्या. पराक्रमी असा मी जगाला पाणी पुरवतों. लोकांना जाण्याकरतां आणि इष्टप्राप्तीकरतां युद्ध करून मी मार्ग करतों.

१०. मी गाईच्या कासेंत आणि नद्यांत जें गोड आणि निर्मळ पाणी धारण करतों तें त्वष्टा किंवा इतर देव दुसऱ्या वर्षांपर्यंत धारण करूं शकले नाहींत. तें उदक गोड आणि पातळ सोमांत मिसळलें जातें.

११. स्वतःच्या सामर्थ्यानें धनवान् व सत्यधन इंद्र, देव आणि मनुष्य यांच्यापेक्षां अधिक आहे. अश्व, कीर्ति आणि कर्म यांनीं युक्त असणाऱ्या हे इंद्रा, तुझीं सर्व कृत्यें उत्साही भक्त वर्णन करतात.

सूक्त पन्नासावें.

ऋषिः—वैकुण्ठ इंद्र; देवता-वैकुण्ठ इंद्र; छंदः-१-२ जगती, ३-४ अभिसारिणी, ५ त्रिष्टुभ्, ६-७ जगती.

१. हे स्तोत्या, अन्न प्राप्त व्हावें म्हणून तूं महान्, सोमानें मद प्राप्त झालेल्या, सर्वांचा नेता आणि लोककल्याणकारक इंद्राचें स्तवन कर. कारण स्तुत्यबल, श्रेष्ठ अन्न आणि सुख यांकरितां सर्व जग इंद्राचें पूजन करीत असतें.

२. तोच इंद्र मित्रत्वाच्या नात्यानें लोकांना स्तुति करण्यास योग्य आहे, आणि माझ्यासारख्या माणसाला तोच उपास्य आहे. हे सज्जनांचें रक्षण करणाऱ्या इंद्रा, सर्व थोर लोकांत, पराक्रमांत, वृत्रासुराकरतां आणि पाण्याकरतां तूंच, हे शूरा, स्तुत्य आहेस.

३. जे लोक तुझ्यापासून अन्न मिळवूं शकतात, जे तुझ्यापासून अन्नयुक्त सुख प्राप्त करितात, हे इंद्रा, असे कोण लोक आहेत? तुला बलवान् असुरांचे ठिकाणीं पराक्रम करण्यास प्रेरणा करतात आणि स्वकीय उदक आणि सर्वप्रकारच्या धान्ययुक्त भूमींत पराक्रम करण्यास प्रेरणा करतात असे कोण थोर पुरुष आहेत?

४. हे इंद्रा, तूं आमच्या स्तोत्रानें मोठेपणा पावला आहेस, तसाच तूं सर्व यज्ञांत यजनीय झाला आहेस. तूं सर्व युद्धांत लोकांना प्रेरक होतोस, हे सर्वद्रष्ट्या इंद्रा, तूं सल्ला देणारा आणि श्रेष्ठ झाला आहेस.

५. हे इंद्रा, श्रेष्ठ असा तूं यज्ञ करणाऱ्या स्तोत्यांचें तात्काळ रक्षण कर. तुझी भक्तरक्षणाची कीर्ति सर्व लोक पृथ्वीवर जाणतात. तूं तरुण अस आणि तुझा उत्कर्ष होऊं दे. तसेंच हे सर्व यज्ञ तूं वाढते करतोस.

६. हे इंद्रा, हे बलिष्ठा, जे तुला स्वतःला उद्देशून केले जातात ते सर्व यज्ञ तूं वृद्धिंगत करतोस. शत्रुनिवारक अशा तुझें छत्र आम्हांवर असो आणि तुझी भक्ति करणाऱ्या आम्हांला धन प्राप्त होवो. यज्ञीय मंत्र, स्तोत्र असे दोनहि तुला उद्देशून असोत.

७. हे बुद्धिमान् इंद्रा, तुझ्याकरतां जे स्तोत्रें करीत असतील, जे संघानें सोम काढीत असतील आणि जे धन देऊन तुझी सेवा करीत असतील, ते भक्त पिळलेल्या सोमानें मद उत्पन्न झाल्यावर मननीय स्तोत्रें म्हणून सुख मिळविण्यास समर्थ होवोत.

सूक्त एकावन्नावें.

ऋषिः—देव व अग्नि; देवता— देव व अग्नि;
छंदः—त्रिष्टुभ्.

१. देव म्हणतात:—ज्यांत गुंडाळून घेऊन अग्नि पाण्यांत शिरला ते वेष्टण मोठें आणि जाड होतें. हे सर्वज्ञ अग्ने, तुझें सर्व शरीर एका देवानें अनेक प्रकारें पाहिलें.

२. अग्नि म्हणतो:—कोण्या देवानें मला पाहिलें? ज्या देवानें माझें शरीर अनेक प्रकारें पाहिलें तो देव कोणता? हे मित्रावरुणहो, अग्नीचे देवाकडे जाणारे तेजस्वी सर्व भाग तुम्हांला जर दिसताहेत तर ते कोठें आहेत बरें?

३. देव म्हणतात:—हे सर्वज्ञ अग्ने, उदक आणि औषधी यांत अन्तर्भूत असणाऱ्या तुला आम्ही शोधीत आहोंत. हे आश्चर्यकारक प्रकाश असणाऱ्या अग्ने, दहा ठिकाणीं राहणाऱ्या आणि अतितेजस्वी असणाऱ्या तुला यमानें जाणलें आहे.

४. अग्नि म्हणतो:—हे वरुणा, हवि वाहण्याच्या कामाला भिऊन मी आलों आहे. म्हणून त्याच कामावर देवांनीं मला योजूं नये. म्हणून माझें शरीर मी पाण्यांत लपविलें आहे. मी तें कार्य स्वीकारीत नाहीं.

५. देव म्हणतात:—हे अग्निदेवा, ये. देवभक्त मनु यज्ञ करण्याची इच्छा करीत आहे. आणि तूं मात्र तेजस्वी असून अंधारांत बसला आहेस. हे अग्ने, देवाकडे जाणारे मार्ग आम्हांला गमनयोग्य कर. आणि मोकळ्या मनानें आमचीं हविर्द्रव्यें वहा.

---

१ **टीप**—वषट्काररूप वज्रानें बांधव मेले असतां, सौचीक नांवाचा अग्नि, वषट्कार आणि हवि वाहून नेणें याला भ्याला व देवांतून निघून पाण्यांत शिरला. तेव्हां शोधावयास आलेल्या देवांना माशांनीं त्याला दाखविलें. त्यावेळीं देव आणि अग्नि यांत झालेला हा संवाद आहे.

३. पृथिवी वगैरे तीन लोक, अग्नि, वायु, आदित्य, अप्, औषधी, वनस्पति आणि शरीर, हीं अग्नीचीं दहा स्थानें आहेत.

६. अग्नि म्हणतो:—हे देवहो, रथ रस्त्याचा स्वीकार करतो त्याप्रमाणें माझ्या थोरल्या (तीन)

भावांनीं हें काम स्वीकारलें होतें. (पण हें करतांना ते मेले) म्हणून भिऊन मी दूर पळून आलों. बाण टाकणाऱ्या धनुष्याच्या दोरीपासून हरिण जसा भितो त्याप्रमाणें मी भ्यालों आहें आणि माझा थरकांप झाला आहे

७. देव म्हणतातः––हे अग्निदेवा, आम्ही तुला म्हातारपणानें रहित असें आयुष्य देऊं. तसेंच हे सर्वज्ञा, तूं ज्या योगें मरणार नाहींस तसें वागूं. हे सुजन्म अग्ने, देवांना दिलेला हवि तूं मोकळया मनानें वाहून ने.

८. अग्नि म्हणतोः––मला उद्देशून प्रयाज आणि अनुयाज करा. आणि हवींपैकीं बळ देणारे भाग द्या. हे देवहो, पाण्यापासून उत्पन्न होणारें तूप आणि औषधीपासून उत्पन्न होणारा मनुष्यरूपी भाग मला द्या आणि अग्नीला दीर्घायुष्य असूं द्या.

९. देव म्हणतातः—हे अग्ने, तुला प्रयाज, अनुयाज आणि असामान्य बल देणारे हवि असोत. हे अग्निदेवा, हा सर्व यज्ञ तुला प्राप्त होवो. तुला चारहि दिशांचे लोक नमस्कार करोत.

६. अग्नीचे तीन भाऊ भूपति, भुवनपति भूतानांपति हे होत.

सूक्त बावन्नावें.

ऋषिः–अग्नि सौचीक; देवता–विश्वेदेव; छंदः–त्रिष्टुभ्.

१. हे सर्व देवहो, येथें देवांना स्तविणारा मी, होता होऊन मनूकरतां स्तवन करीत आहे. ज्याअर्थीं मी बसून स्तवन करीत आहें त्याअर्थीं तुम्ही मला अनुज्ञा द्या. आणि माझें कार्य मला सांगा. म्हणजे त्याप्रकारें मी तुम्हांला हवि देईन.

२. उत्कृष्ट यज्ञ करणारा मी स्तुति करीत येथें बसलों आहे. सर्व देव मला (हवि पोंचाविण्याविषयीं) प्रेरणा करीत आहेत. हे अश्विहो, दररोज तुमचें आध्वर्यव म्यां करावें. तयार केलेला सोम उत्कृष्ट होवो आणि तोच तुमची आहुति होवो.

३. जो होता आहे तो कोण आहे ? तो यमाचा कांहीं एक भाग वाहून नेतो. देव जो हवि प्राप्त करतात, तो दररोज (सूर्यरूपानें) आणि महिन्यामहिन्याला (चंद्ररूपानें) प्रकट होतो. त्या अग्नीला देव हवि पोंचविणारा म्हणून स्वीकारतात.

४. सर्वांचें आक्रमण करणारा, सर्व ठिकाणीं संचार करणारा, असा अग्नि देवांनीं हवि आणणारा केला. हा ज्ञाता अग्नि पांच प्रकारचें गमन असलेला, तीन प्रकारच्या सवनामुळें तीन प्रकारचा, आणि सात छदांनीं गायला गेलेला असा यज्ञ पूर्ण करतो.

५. हे देवहो, तुम्हांला अविनाशीपणा आणि पराक्रमी पुत्र आम्ही मागतों कीं, ज्यामुळें आम्ही तुमची सेवा करूं शकूं. मी इंद्राच्या हातांत वज्र देईन. (असें झालें म्हणजे) ह्या सर्व सेना जिंकूं.

६. तीन हजार तीनशें नऊ देव अग्नीची सेवा करतात. तुपाच्या आहुती देऊन आणि दर्भ आंथरून नंतर होत्याला भक्त बसवतात.

सूक्त त्रेपन्नावें.

ऋषिः— ४ ते ६ सौचीक अग्नि, बाकी देव; देवता–अग्नि; छंदः–६।७।९।१०।११ जगती, ८ व बाकी त्रिष्टुभ्.

१. ज्या अग्नीची आम्ही मनःपूर्वक इच्छा करतों, तो हा यज्ञ जाणणारा, कठोर पदार्थांची चिकित्सा करणारा अग्नि आहे. तो यज्ञीय अग्नि यज्ञांत हवन केला जावो. तो आमच्यापूर्वीं मध्यें स्थापन केला जावो.

२. हवनीय, यज्ञार्ह आणि वेदीवर बसलेला अग्नि तयार झाला आहे. तो व्यवस्थित ठेवलेलीं (होमाकरतां) अन्नें पहातो. यज्ञार्ह देवांना तुपांनीं शीघ्र तृप्त करूं, स्तुत्य देवांना स्तवूं असें त्याचे मनांत असतें.

३. आज आमचा यज्ञ अग्नीनें चांगला केला आहे. आम्ही आज अग्नीच्या गूढ जिव्हा(अग्नीच्या ज्वालारूपी) प्राप्त केल्या आहेत. तो अग्नि चांगलें आयुष्य घेऊन आला आहे. आणि आमचा हा यज्ञ आम्हांला कल्याणकारक असा करीत आहे.

४. ज्या वचनानें देव आणि असुर यांचा आम्ही पराभव करतों. तें मुख्य वचन मी प्रथम उच्चारतों. हे अन्न भक्षण करणारे आणि यज्ञार्ह पंचजनहो, माझें हवन सेवन करा.

५. जे भूमीवर उत्पन्न झाले असतील आणि जे यज्ञार्ह असतील ते सर्व माझें हवन सेवन करोत. तसेंच पृथ्वी आणि अन्तरिक्ष, पार्थिव आणि अन्तरिक्षापासून उत्पन्न होणाऱ्या पापांपासून माझें संरक्षण करोत.

६ हे अग्निदेवा, यज्ञाच्या विस्ताराला कारण असणाऱ्या आणि लोकप्रकाशक सूर्याचें तूं अनुकरण कर.

---

४ टीप—येथें पंचजन शब्दाचा अर्थ ब्राह्मण क्षत्रिय वगैरे न घेतां, देव मनुष्य वगैरे घेतला पाहिजे.

आणि कर्मानें संपादन केलेल्या तेजस्वी अशा स्वर्गीय मार्गाचें तूं संरक्षण कर. अग्नि स्तोत्यांचें कर्म जसें असावयास पाहिजे तसें करो. तूं स्तुत्य हो आणि देवसंघाला आमच्याकरतां उत्पन्न कर.

७. (यज्ञ जिंकू इच्छिणारे लोक परस्परांशीं बोलतात.–) हे सोमार्ह देवहो, आखाला बांधलं जाणारे घोडे रथाला जोडा. लगाम व्यवस्थित करा आणि घोड्यांना सुशोभित करा. देव ज्या रथानें प्रिय अशा ठिकाणीं पोंचवितात, त्या आठ सारथ्यांच्या जागा असलेल्या रथांत बसून तुम्ही आम्हांला वाहून न्या.

८. अश्मन्वती नदी वाहते आहे. तिला तरून जाण्याकरितां उठा. तिला तरून जा. हे मित्रहो, जे आम्हांला दुःख देणारे आहेत त्यांना आम्ही ह्या नदींत टाकून देतों. आणि सुखकर अन्न प्राप्त करण्याकरतां आम्ही तरून जातों.

९. कारागिरांतला कारागीर, देवांना पिण्यायोग्य सुखकारक पात्रें तयार करणारा त्वष्टा सर्व कारागिऱ्या जाणतो. ज्या परशूनें बृहस्पति आश्चर्यकारक छेदितो, त्या पोलादी परशूला खरोखर त्वष्टा तीक्ष्ण करतो.

१०. ज्या (वाशी) कुऱ्हाडीनें सोमपानाकरतां पात्रें तासलीं, खरोखर हे बुद्धिमंतहो, तुम्ही तीं हत्यारें तीक्ष्ण करा. ज्या पात्रामुळें देवांना अमरपणा मिळाला तशीं गुह्य पात्रें हे विद्वानहो, तुम्ही तयार करा.

११. देवांनीं मृत गाईच्या पोटांत दुसरी गाय ठेवली, तसेंच तोंडांत वासरूं ठेवलें. विचारी मनानें किंवा जिव्हेनें किंवा यासारख्या लांबलचक कुऱ्हाडीनें भजनीय आणि योग्य अशा स्तुतीची याचना करतो व तो जय मिळवतो.

सूक्त चोपन्नावें.

ऋषिः—बृहदुक्थ वामदेव; देवता–इंद्र; छंदः–त्रिष्टुभ्

१. हे धनवान् इंद्रा, जेव्हां भयभीत द्यावापृथिवी म्हणजे सर्व तुला बोलावतात आणि तेव्हां लागलीच देवांचें तूं रक्षण करतोस, ह्या तुझ्या मोठेपणानें प्राप्त झालेल्या कीर्तीचें आम्ही चांगल्या प्रकारें गान करीत असतों. तसेंच हे इंद्रा, दासाला ठार करून ह्या लोकांना जें तूं बळ दिलेंस तें आम्ही वर्णन करीत असतों.

२. हे इंद्रा, उत्साह पावणारा आणि आपल्या सामर्थ्याचें वर्णन करणारा तूं फिरत असतोस, हें तुझें वर्णन खरोखर खोटें आहे. ज्ञाते लोक तुझ्या युद्धाचें जें वर्णन करतात तेंहि खोटेंच आहे. कारण तुला आतांहि शत्रू नाहीं आणि खरोखर तुला पूर्वींही शत्रू लाभला नाहीं.

३. हे इंद्रा, तुझ्या माहात्म्याचा अन्त पूर्वींच्या महर्षींपैकीं तरी कोणाला प्राप्त झाला आहे ? कारण, त्यांना तरी एकदम स्वतःच्या शरीरापासून द्यावापृथ्वीनेंच निर्माण केलें आहे.

४. हे इंद्रा, पूज्य अशा तुझीं चार, कोणालाहि आक्रमण न करतां येणारी, आणि असुरविघातीं अशीं शरीरें आहेत. हे भल्या गृहस्था, तीं तूं निर्भय मानतोस, कारण त्या शरीरांनींच त्वां सर्व पराक्रम केलेस.

५. जें प्रकट व गूढ धन आहे, तें असामान्य धन तुझ्याजवळ आहे. म्हणून हे धनवान् इंद्रा, माझ्या इच्छा मोडूं नकोस. तूं मला धन दे, कारण तूं दाता आहेस.

६. ज्यानें सूर्याला तेज दिलें, ज्यानें सोमांत मधुरपणा उत्पन्न केला, अशा इंद्राला उद्देशून प्रिय, बलवर्धक असें स्तोत्र स्तोत्रकर्त्या बृहदुक्थाकडून म्हटलें गेलें.

सूक्त पंचावन्नावें.

ऋषिः—बृहदुक्थ वामदेव; देवता–इंद्र; छंदः–त्रिष्टुभ्.

१. जेव्हां, भयभीत झालेली द्यावापृथ्वी म्हणजे सर्व जग तुला अन्नाकरितां बोलावतात, त्यावेळीं हे इंद्रा, तूं पर्जन्योदकाला प्रकट करीत जगाला स्थितियुक्त करतोस. तें तुझें लोकांना अज्ञात असणारें एक शरीर आहे.

२. तुझें तें गूढ अनेकांना स्पृहणीय, असें मोठें शरीर आहे. ज्या शरीरानें तूं भूत आणि भविष्य निर्माण केलेस, ज्यापासून प्राचीन आणि इन्द्राला प्रिय असणारें तेज उत्पन्न झालें, ज्यांना पंचजन म्हणजे सर्व लोक उपासितात, तें तुझेंच एक मोठें आणि अनेकांना स्पृहणीय वाटणारें शरीर आहे.

३. इंद्र सरूप, तेजस्वी आणि विविध कार्य करणाऱ्या शरीरानें द्युलोक, अन्तरिक्ष आणि पृथ्वी भरून टाकतो. तसेंच देव, मनुष्य, पितर, असुर, राक्षस या पांच देवांना, ऋतूला अनुसरून सात तत्त्वें आणि चवतीस देव यांना नेहमीं पहात असतों.

---

३ टीपः— ८ वसु., ११ रुद्र, १२ आदित्य १ प्रजापति, १ वषटकार, १ विराट हे चवतीस देव होत.

४. हे उषे,ज्याअर्थीं प्रकाशकामध्यें प्रथम तूं उदय पावतेस, आणि तेजस्व्यामध्यें तेजस्वी असा सूर्य तूं उत्पन्न करतेस. त्यामुळें थोर अशा तुझें नातें कमी झालें आणि तुझ्या थोरपणांतून आद्वितीय तेज प्रकट झालें.

५. कर्त्या आणि युद्धांत अनेकांना पळावयास लावण्याऱ्या तरुण पुरुषाला म्हातारपण जागें करतें. हें देवाचें महत्त्वपूर्ण काव्य पहा. जो आज मरतो, तोच उद्यां प्रकट होतो.

६. जो महान् पराक्रमी, प्राचीन आणि एकत्र घर नसणारा बलानें युक्त, तांबस, असा पक्षी येतो आहे, तो जें जाणतो तें खरेंच असतें खोटें नसतें. तो शत्रूंचें उत्कृष्ट धन जिंकतो आणि भक्तांना देतो.

७. ज्या देवांसह इंद्र लोकांचीं संकटें दूर करण्याकरितां पाऊस पाडतो आणि जे देव इंद्रास पाऊस पाडण्याच्या कामांत साहाय्यक होतात त्या देवांसह इंद्र वृष्टिरूपी पराक्रमाचीं कृत्यें करतो.

८. देवांच्या साहाय्यानें कर्में करणारा, बलवान्, शत्रूघ्न, थोर मनाचा, शत्रूंचा पराभव करणारा, स्वर्गावरून येऊन सोम पिऊन उत्साह पावणारा आणि शूर असा इंद्र युद्ध करून शत्रूंना जेरीस आणतो.

सूक्त छप्पन्नावें.

ऋषि–बृहदुक्थ वामदेवपुत्र; देव–विश्वदेव;
छंदः– ४–५–६–जगती, १–२–३–७ त्रिष्टुभ्.

१. (बृहदुक्थ आपल्या वाजि नांवाच्या मेलेल्या मुलाला म्हणतो–) तुझा एक भाग अग्नि, तसाच दुसरा भाग (वायु), हे तिसऱ्या तेजोरूप भागांत मिळून जावोत. देवांचें उत्कृष्ट उत्पत्तिस्थान जो सूर्य त्यांत तुझें सुंदर आणि प्रिय असें शरीर मिळून जावो.

२. हे वाजिन् (बृहदुक्थाचा मुलगा), तुझें शरीर आपल्यांत मिसळून घेणारी पृथ्वी, आम्हांला सुंदर धन देवो आणि तुला सुख देवो. उत्कर्षाला पावणारा तूं थोर देवांत आणि द्युलोकांत असणाऱ्या सूर्यांत आत्मीयत्वानें प्रवेश कर.

३. कान्तिमान् असणारा तूं अन्नामुळें बलवान् आहेस. स्तोत्रें म्हणणारा तूं स्वर्गाला जा. मुख्य आणि सत्य धर्माला तूं अनुसर. तसेंच हे देवांना स्तविणाऱ्या, तूं सूर्यांत मिळून जा.

४. पितरांनीं देवांचा महिमा जाणला. ते देवहि इंद्रादिकांच्या स्थानाविषयीं इच्छा धरते झाले. जीं तेजें प्रकाशतात तीं सर्व त्यांना प्राप्त झालीं. आणि त्यांच्या शरीरांत प्रवेश करतात म्हणून तूंहि तसेंच कर.

५. सामर्थ्यांनीं सर्व जग आणि प्राचीन अमर्याद असणारीं सर्व स्थानें पितरांनीं आक्रमण केलीं. तसेंच सर्व जगाचें नियमन केलें. तसेंच लोक प्रकाशयुक्त केलें. (तसेंच तूंहि कर.)

६. सूर्याचे पुत्र आंगिरस सर्वज्ञ आणि बलवान् अशा आदित्याला प्रजेचें कार्य करीत असतां उदय व अस्त अशा दोन प्रकारें स्थापना करते झाले. पितरांनीं स्वकीय प्रजा निर्माण करून तिला पित्यापासून मिळालेलें सामर्थ्य दिलें आणि वंश सतत चालाविला.

७. नावेनें उदक तरून जावें त्याप्रमाणें किंवा कल्याण झाल्यामुळें सर्व दुःखें विसरून जावींत त्याप्रमाणें बृहदुक्थ ऋषि स्वतःची प्रजा अग्नि व सूर्य यांच्या ताब्यांत देता झाला.

सूक्त सत्तावन्नावें.

ऋषिः—बंधु, श्रुतबन्धु, विप्रबन्धु; देवता—विश्वेदेव, (मन); छंदः—गायत्री.

१. हे इंद्रा, आम्ही ह्या सोमयुक्त यज्ञकर्मांतून परत जाणार नाहीं. आमच्या मार्गांत संकटें उत्पन्न न होवोत.

२. जो यज्ञाला साधक, स्तोत्रें म्हणून ज्याला प्रज्वलित केला आहे, त्याचें हवन आम्ही करूं.

३. नाराशंस पितरांना तयार केलेल्या सोमानें आणि पितरांनीं केलेल्या मननीय स्तोत्रांनीं आम्हीं सुबन्ध्वादिकांचें मन आम्हाकडे वळवतों.

४. हे सुबंधो, कर्म, बल, जीव आणि चिरंजीव होण्याकरतां तुझें मन परत माझ्याकडे येवो.

५. आमचे पितर आम्हांला पुनः जीवदान देवोत. तसेंच देवही आम्हाला जीवदान देवोत. आणि आम्ही तें प्राप्त करूं.

६. हे सोमा, आम्ही तुझ्या कर्मांत आणि शरीरांत मन घालणारे आहोंत; आम्ही संततीनें युक्त होऊं.

सूक्त अठ्ठावन्नावें.

ऋषिः—बन्ध्वादि; देवता–मन; छन्दः–अनुष्टुभ्.

१. हे मृत पुरुषा, ज्याअर्थीं तुझें मन दूर वैवस्वत यमाकडे गेलें आहे, त्याअर्थीं येथें निवास करण्याकरतां

आणि पुष्कळ काळ जगण्याकरतां तुझ्या मनाला मी परत बोलावतों.

२. हे सुबंधो, जें तुझें मन पृथ्वीहून खूप दूर स्वर्गांत गेलें आहे, त्याला येथें घर करण्याकरतां आणि पुष्कळ दिवस जगण्याकरतां मी परत बोलावतों.

३. हे सुबंधो, ज्याअर्थीं तुझें मन खूप दूर पाताळांत गेलें आहे, त्याअर्थीं जगण्याकरतां आणि राहण्याकरतां मी परत बोलावतों.

४. ज्याअर्थीं तुझें मन खूप दूर चारहि दिशेला गेलें आहे. त्याअर्थीं राहण्याकरतां आणि जगण्याकरतां मी त्याला बोलावतों.

५. ज्याअर्थीं तुझें मन उदकानें तुडुंब असलेल्या समुद्रांत लांबवर गेलें आहे त्याअर्थीं त्याला राहण्याकरतां व पुष्कळ जगण्याकरतां मी परत बोलावतों.

६. हे सुबंधो, तुझें मन गमनशील किरणांत लांबवर गेलें आहे, त्याअर्थीं त्याला राहण्याकरितां व जगण्याकतां मी परत बोलावतों.

७–११. तुझें मन उदकांत, औषधींमध्यें, सूर्यांत उषःकालांत, व मोठ्या पर्वतावर, या जगांत, दूर दशी गेलें असेल त्याला मी राहण्याकारितां आणि जगण्याकरतां परत बोलवतों.

१२. हें जें तुझें मन सर्व जगांत गेलें आहे, त्याला मी घर करून राहण्याकरतां व चिरंजीव होण्याकरतां परत बोलावतों.

सूक्त एकोणसाठावें.

ऋषिः-बंधु आदिकरून; देवता-१-३ निर्ऋति व सोम, ४-६ असुनीति, ७-१० लिंगाक्तदेवता. छंदः-१-७ त्रिष्टुभ्, ८ पंक्ति, ९ महापंक्ति, १० पंक्त्युत्तरा.

१. रथाचा सारथी कुशल असतांना रथाचें आयुष्य वाढतें. त्याप्रमाणें सुबंधूचें आयुष्य तारुण्ययुक्त आणि लांबलचक असो. मृत मनुष्याचें आयुष्य वाढत असतें. (प्राण हरण करणारी) निर्ऋति देवता दूर जावो.

२. सामगान चालूं असतांना आयुष्यप्राप्तीकरतां मी (निर्ऋतीकरतां) उच्च प्रकारचें अन्न तयार करीत आहें. खरोखर अनेक प्रकारचीं अन्नें करीत आहें. निर्ऋति आमचीं सर्वप्रकारचीं अन्नें भक्षण करो. आणि येथून दूर निघून जावो.

३. सूर्य पृथ्वीला किंवा वज्र मेघाला करतो त्याप्रमाणें आम्ही शत्रूंना पराक्रमानें चांगले पराभूत करूं. आमचीं सर्व स्तोत्रें निर्ऋति जाणो आणि येथून दूर निघून जावो.

४. हे सोमा, आम्हांला तूं मृत्यूच्या स्वाधीन करूं नकोस. आम्ही उगवत्या सूर्याला पहावें (दीर्घ काळ जगावें). अनेक दिवसांनीं प्राप्त होणारे म्हातारपण आम्हांला सुखकर होवो. निर्ऋति देवता दूर जावो.

५. हे प्राणापहरण करणाऱ्या देवते, आमच्यावर तुझें मन असूं दे. आम्ही जगावें म्हणावें, म्हणून आम्हांला दीर्घायुष्य दे. आम्हांला सूर्याच्या प्रकाशांत राहूं दे. (आम्हांला दीर्घायुष्य द्या.) तूं (आम्ही दिलेल्या) तुपानें आपलें शरीर पुष्ट कर.

६. हे प्राण घेणारे देवते, आमच्या सुबंधूला पुनः डोळे, पुनः प्राण दे. त्यामुळें आम्हांला ऐश्वर्य प्राप्त होऊं दे. आम्ही अनेक दिवसपर्यंत उगवत्या सूर्याला पाहूं (दीर्घायूषी होऊं). हे अनुमते, आम्हांला चांगल्या प्रकारें सुख दे.

७. आमच्या सुबंधूला पृथ्वी, द्युलोक आणि अन्तरिक्ष (तेथील देवता) पुनः जीवदान देवोत. सोम पुनः शरीर देवो आणि पूषा वाणी देवो, आणि जी स्वस्ति म्हणून आहे तीहि पूषा देवो.

८. महान् आणि यज्ञाची माता अशा द्यावापृथ्वी सुबंधूला सुख देवोत. जें पाप असेल तें नाहीसें करोत. हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही क्षमा केली असतां पाप (कसें राहील ?) (सुबंधूला बंधू म्हणतात) हे सुबंधो, तुझें जें कांहीं पाप असेल तें नष्ट होवो.

९. द्युलोकांतून पृथ्वीवर दोन (अश्विनीरूपानें), तीन (इळा, सरस्वती, भारती या रूपानें) औषधी संचारतात. पृथ्वीवर फिरणारें एकेक जें पाप असेल तें नष्ट होवो. हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही क्षमा केली असतां

---

१ टीप—असमाति ऐक्ष्वाक नांवाचा राजा होता. त्याला सुबंधु, श्रुतबंधु, विप्रबधु व बंधु नांवाचे चार भाऊ पुरोहित होते. ते गोपायन वंशांतले होते. त्या राजानें त्यांना टाकून दुसरे पुरोहित बोलावले, तेव्हां सुबंधु वगैरे रागावले. आणि राजावर मंत्र तंत्र करूं लागले. तेव्हां नव्या पुरोहितांनीं ह्यांपैकीं सुबंधूला ठार केलें. बाकीच्या भावांनीं नंतर नाश न व्हावा म्हणून वरील सूक्ताचा जप सुरूं केला.

पाप कसें राहील? हे सुबंधो, तुझें जें काहीं पाप असेल तें नष्ट होवो.

१०. हे इंद्रा, उशीनराणी नांवाच्या झाडाची तुझी जी गाडी आहे त्या गाडीच्या चालणाऱ्या बैलाला जरा लवकर हाण. पृथ्वीवर फिरणाऱ्या एकेका पापाचा नाश होवो. हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही क्षमा केली असतां पाप कसें राहील? हे सुबंधो तुझें जें कांहीं पाप असेल तें नष्ट होवो.

सूक्त साठावें.

ऋषिः–बंधु वगैरे; देवता–१ ते ४ असामाति राजा, ५ इंद्र, ६ अगस्त्याची बहीण बंध्वादिकांची आई व असामाति, ७ ते ११ जीवितान्हान, १२ सुबुंघजीवितागमनम् ; छंदः—१. ५. गायत्री, ८. ९. पंक्ति, ६. ७. १०. ११. १२. अनुष्टुभ्

१. नमस्कार करणारे आम्ही, तेजस्वी आणि स्तुत्य अशा देशांत गेलों आहोंत.

२. शत्रूंचा संहारकर्ता, तेजस्वी, रथाप्रमाणें सर्वत्र जाणारा, भजेरथराजाच्या वंशांत झालेला आणि सज्जनांचा रक्षणकर्ता अशा असमाति राजाला आम्ही स्तवितों.

३. जो असमाति राजा रेड्याचा सिंह करतो त्याप्रमाणें हातांत खड्ग घेऊन शत्रूंचा पराभव करतो. हातांत खड्ग न घेतां लढूनहि पराजय करतो.

४. ज्या देशाचा धनवान्, शत्रूंचा नाश करणारा असा इक्ष्वाकु राजा आपल्या कर्तव्याकरतां पुढें सरसावतो, तेथील सर्वजातीचे लोक स्वर्गातल्याप्रमाणें (संकल्पसिद्ध असल्याप्रमाणें) सुखी आहेत.

५. हे इंद्रा, द्युलोकांत दिसेल अशा ठिकाणीं सूर्य ज्याप्रमाणें आहे. त्याप्रमाणें रथाच्या अग्रभागीं असमाति राजा असतांना त्याचें सैन्य असूं दे.

६. (या ऋचेंत अगस्त्याची बहीण, बंधु वगैरेंची आई असमातीची स्तुति करीत आहे.) हे राजा, तूं अगस्त्याला आनंद देणाऱ्या बंधूवगैरेंकरतां आपलें तांबडे घोडे जोड आणि सर्व कवडीचुंबक पणींचा पराभव कर.

७. हा अग्नि माझी माता, पिता, फार काय जीवदान देणारा आला आहे, म्हणून हे सुबंधो, तुझें हें शरीर आहे. ये (आणि शरीरद्वारां) बाहेर पड.

८. ज्याप्रमाणें जूं दोऱ्यांनीं रथ ओढण्याकरितां बांधतात, त्याप्रमाणें तुझें मन मृत्यू नेऊं नये, जीव प्राप्त व्हावा आणि रक्षण व्हावें म्हणून शरीरांत ठेवलें जात आहे.

९. ज्याप्रमाणें ही थोर पृथ्वी ह्या वनस्पतींना धारण करते. त्याप्रमाणें—

१०. मी वैवस्वत यमापासून सुबंधूचें मन मृत्यु येऊं नये, जीव प्राप्त व्हावा आणि रक्षण व्हावें म्हणून आणलें आहे.

११. वायु खालीं वहातो. सूर्य खालीं ऊन पाडतो. गाय खालीं दूध देते. तसेंच तुझें पाप खालीं होवो.

१२. हा माझा भाग्यवान हात फारच भाग्यशाली आहे. हा माझा हात सर्व ओषधींनीं युक्त आहे, हा माझा हात मंगलकारक आहे. (कारण जीव प्राप्त झालेल्या सुबंधूला स्पर्श करीत आहे.)

---

७. **टीप**:-याबद्दल शाट्यायन सूत्रांत आणि शौनकांनीं बृहद्देवतेंत (७. १०७२; १०७६) खालीलप्रमाणें आख्यायिका दिली आहे.

असमाति राजांनीं अग्नीची स्तुति केली. अग्नि प्रकट झाला आणि त्यानें कां बोलावलें म्हणून विचारलें. सुबंधूचा जीव पुनः प्राप्त व्हावा अशी मागणी केली. हा सुबंधूचा जीव शरीरांत आला, घ्या असें अग्नि म्हणाला. नंतर पुढील ऋच्या म्हटल्या गेल्या.

सूक्त एकसष्टावें.

ऋषिः–मनु नाभानेदिष्ठ; देवता–विश्वेदेव, छंदः–त्रिष्टुभ्.

१. स्तोत्रें म्हणण्यास उत्सुक असा नाभानेदिष्ठ, हें बुद्धि खर्चून केलेलें रुद्रदेवतेचें सूक्त अंगिरसाच्या संघांत सत्रामध्यें म्हणत आहे. जें स्तोत्र वाटण्या करणारे पितर आणि वाटणी घेणारे भाऊ यांनीं केलें आणि ज्या स्तोत्रानें सत्राच्या सहाव्या दिवशीं सात होत्यांना पार पाडलें, तें सूक्त नाभानेदिष्ठ म्हणत आहे.

२. तो रुद्र दान करण्यास आणि शत्रूंचा नाश करण्यास (भक्तांना) प्रेरणा करणारा शस्त्रांनीं दुष्टांना च्युत करीत वेदीवर चढतो. जलद जाणारा आणि स्तुत्य रुद्र पाण्याप्रमाणें आपल्या सामर्थ्याचा चालतां चालतां वर्षाव करीत असतो.

३. हे अश्विहो, तुम्ही मनाप्रमाणें अत्यंत वेगानें स्तोत्याच्या ज्या यज्ञांत बुद्धिपूर्वक धांवत जातां आणि जो धनवान् असूनहि माझ्या बोटांनीं तुम्हांला हातांत धरून मला दाखवतो, त्या तुम्हांला मी बोलावतों.

४. ज्या अर्थीं उषा तांबड्या गाईवर बसली आहे (म्हणजे उषःकाल झाला आहे) त्या अर्थीं

द्युलोकापासून उत्पन्न झालेल्या अश्वींना आम्ही बोलावतों. माझ्या हवीकरतां तुम्ही माझ्या यज्ञांत गवताच्या मागें लागलेल्या (घोड्या) प्रमाणें या. आणि तुम्ही द्वेष विसरून जा.

५. ज्या प्रजापतीचें इच्छाशक्तियुक्त वीर्य प्रसिद्ध आहे, (कीं ज्यामुळें वीरच उत्पन्न व्हावयाचे) त्या उपयोग केलेल्या रेतापासून लोकांचा हितकर्ता उत्पन्न झाला. एकनिष्ठ असा प्रजापति जें स्वतःची सुंदर कन्या उषा तिचे ठिकाणीं ठेवतो, आणि फिरून तें (वास्तोष्पती पुत्ररूपानें) बाहेर टाकतो.

६. उपभोग घेणारा प्रजापति आणि उषा यांनीं आकाशांत एकत्र होऊन जें केलें आणि जें थोडें सामर्थ्य खर्च केलें, तें उच्चस्थानीं टाकलें, तें यज्ञाच्या प्रमुखाविषयीं उपयोगाला आलें (म्हणजे त्यापासून रुद्र उत्पन्न झाला.)

७. ज्यावेळीं पिता (प्रजापति) स्वतःच्या कन्येशीं (उषेशीं) संगत झाला. त्यावेळीं पृथ्वीशीं संगत होऊन त्यानें वीर्यसिंचन केलें, तेव्हांच कुशल देवांनीं ब्रह्म उत्पन्न केलें. म्हणजे कर्मरक्षक असा वास्तोष्पति निर्माण केला.

८. (अंगिरसांचें सत्र संपल्यावर गाई आडवणाऱ्या वास्तोष्पतीला नाभानेदिष्ठ म्हणतो.–) जो हा इंद्र (नमुचीच्या वधाकरतां) लढाईंत फेस फेकता झाला, त्याप्रमाणें करूं इच्छिणारा वास्तोष्पति मला आडवा आला आहे. आणि दक्षिणा म्हणून दिलेल्या गाई घेण्याकारितां एक पाऊलहि हलत नाहीं. खरोखर त्या माझ्या गाई मार्गरक्षक रुद्र (परत) घेणार नाहीं.

९. अग्निसारखा त्रासदायक राक्षस येथें दिवसा सहज येत नाहीं. आणि रात्रींहि प्रजेला त्रास देणारा वस्त्रहीन असणारा दुष्ट अग्नीजवळ येत नाहीं. भक्ष्य उत्पन्न करणारा, अन्न देणारा, रक्षक आणि सामर्थ्यानें शत्रूशीं लढणारा असा तो अग्नि (रुद्रामुळें) उत्पन्न झाला आहे.

१०. नवग्व अंगिरस यज्ञांतील स्तोत्रें म्हणत सहज सुंदर स्तोत्रें म्हणूं लागले. जे उभय लोकांत असणारे अंगिरस नाभानेदिष्ठाकडे गेले. ते दक्षिणारहित आणि स्थिर झाले.

११. तात्काल द्युलोकांशीं मैत्री करून अत्यंत नव्या संपत्तीप्रमाणें उदकाचा वर्षाव करणारे भक्त, ज्यावेळीं हे इंद्रा, तुला अमृत प्रसवणाऱ्या गाईस योग्य असें पाणी अर्पण करून तुझी पूजा करतात, त्यावेळीं तूं पाऊस पाडतोस.

१२. ज्यावेळीं भक्त आपले गोठे गाईरहित पहातो त्यावेळीं तो पुढीलप्रमाणें म्हणतो. स्तोत्रांत रमणारा आणि धनवानांतला धनवान् इंद्र सर्व (गोरूप) धन ताबडतोब वेढून टाकतो. (इंद्र चोरांनीं नेलेलें धन आडवतो.)

१३. तेथेंच तात्काल इंद्राला वेष्टणारे आले. अनेक प्रकारें असणारे ते नार्षदाला मारूं लागले. इंद्र ज्याप्रमाणें असुरांचें मर्म जाणतो, त्याप्रमाणें बहुरूपी शुष्णाचें मर्म स्थिर अशा इंद्रानें जाणलें.

१४. तें तेज मोठें कल्याणकारक आहे. ज्या अग्नीच्या त्रैलोक्यांतील तेजांत देव राहतात. ते स्वर्गांतल्याप्रमाणें तेथें राहतात. त्या तेजालाच अग्नि असें म्हणतात. त्यालाच जातवेदस् असें म्हणतात. हे अग्ने, यज्ञनिष्पादक असा तूं प्रेमानें आमचें बोलावणें ऐक.

१५. हे इंद्रा, ते तेजस्वी, रुद्रपुत्र आश्विदेव, माझी स्तुति ऐकोत व यज्ञाकरतां येवात. तसेंच मनूप्रमाणें

---

१ **टीपः**–नाभानेदिष्ठ गुरुगृहीं असतांनाच बाकीच्या तीन भावांनीं आपली वाटणी करून घेतली. नाभानेदिष्ठानें वडलांना विचारलें माझी वाटणी ? तेव्हां ते म्हणाले या वांटणीतच काय मोठें आहे ? अंगिरस स्वर्गाला जाण्याकरतां सत्र करीत आहेत पण सहाव्या दिवसांपर्यंत अनुष्ठान केलें कीं ते भ्रमतात. करतां तूं इंद्रमित्था० (१०. ६१.) हें सूक्त म्हण, म्हणजे त्याचें सत्र पुरें होऊन ते स्वर्गाला जातील आणि हजार गाई देतील. असें बापांनीं सांगितल्यावरून नाभानेदिष्ठ तेथें गेला. यज्ञांतील अवशेष हजार गाई आपणास मिळणार या आशेवर त्यांनीं वरील सूक्त म्हणून यज्ञ पुरा केला, व याला स्वर्गाला जातांना त्यांनीं हजार गाई दिल्या. त्या गाई हा घेणार तों कोणी रुद्रपुरुष तेथें आला आणि माझा भाग तूं घेऊं नको असें म्हणाला. तो म्हणाला मला पित्यानें सांगितलें आहे. रुद्रपुरुष म्हणाला पित्यालाच विचार. पित्याला विचारल्यावर त्यानें सांगितलें कीं हा त्याचाच भाग आहे. नाभानेदिष्ठानें खरें सांगितल्यामुळें तो पुरुष संतुष्ट झाला आणि त्यानें त्याला त्या गाई दिल्या ऐ. ब्रा. ५–१४—तै. सं. ३–१–९–४

१० **टीपः**—सत्रांत दक्षिणा देत नाहींत.

सेवा करणाऱ्या मला प्रसन्न होऊन आनंदानें धन देणारे आमच्या यज्ञांत येवोत.

१६. हा सर्वप्रेरक व स्तुत्य असा राजा सोम आम्हांकडून स्तविला जात आहे. शुद्ध आणि स्वावलंबी सोम (चंद्र) आकाश उल्लंघित आहे. घोडे सहज चाकांच्या धांवाला गति देतात, त्याप्रमाणें त्यानेंच कक्षीवानाला उत्कण्ठा उत्पन्न केली, त्यानें अग्नीला उत्तेजन दिलें.

१७. ज्या वेळीं नाभानेदिष्ठानें मित्रावरुणाची आणि आर्यमनची मोठ्या आणि उत्कृष्ट स्तोत्रांनीं स्तुति केली त्या वेळीं त्या उभयलोकांचा बंधु, हविर्योग्य आणि देवयाजक अग्नीनें न प्रसवणाऱ्या गाईला अमृतासारखें दूध देणारी आणि प्रसवणारी केली.

१८. एका आईचा, स्तुति करणारा, स्वर्गांत असणाऱ्या तुझा, कर्मकर्ता, आणि हजार गाईंची इच्छा करणारा नाभानेदिष्ठ स्तुति करीत आहे. ह्या आदित्याचें द्युलोक हें बंधनस्थान आहे. मी त्या आदित्याच्या कितीतरी मागून झालों आहे.

१९. ही वाणी (सूर्य) मला बंधक आहे. ह्या सूर्यमंडळांत माझें स्थान आहे. हे सर्व प्रकाशणारे किरण माझे आहेत. हा सर्व मी आहे. तसेंच, हे ब्राह्मण सत्य स्वरूप ब्रह्माच्या पूर्वीं उत्पन्न झाले आहेत. पृथ्वीदेवता उत्पन्न झाली आणि तिनें हें सर्व उत्पन्न केलें.

२०. चारहि दिशांना आनंद करणारा, गमनशील, तेजस्वी, दोनहि लोकांत जाणारा, काष्ठभक्षक अग्नि आला आहे. जो सन्मुख असलेला अग्नि आळीनें उभे असलेल्या प्रशंसनीय सेनेप्रमाणें शत्रूंचें दमन करतो, त्या निश्चल, सुखवर्धक अग्नीला अरणी उत्पन्न करते.

२१. आतां कोणा एका दमलेल्या (नाभानेदिष्ठाचीं) सुंदर स्तोत्रें उपमानभूत इंद्राकडे जात आहेत. हे धनवान् अग्ने, तूं तीं ऐक. व इंद्राकडे पोंचीव. अश्वमेध करणाऱ्या मनूच्या स्तोत्रानें तूं वृद्धिंगत होतोस.

२२. हे इंद्रा, आतां वज्र धारण करणारा तूं आम्हांला विपुल धन दे. हे इंद्रा, धनवान् अशा आमचें रक्षण कर. हे अश्वयुक्त इंद्रा, तुझ्या स्तुतीनें आम्ही निष्पाप होऊं.

२३ हे तेजस्वी मित्रावरुण हो, आतां ज्याअर्थीं गाई इच्छिणारा आणि स्तुति इच्छिणारा सरण्यु अंगिरसाकडे जातो, त्याअर्थीं नाभानेदिष्ठ यांना आवडता होवो. आणि त्याचें कर्तव्य त्याच्यावर टाको, आणि अंगिरस याला पार पाडोत.

२४. (वरुणस्तुति) ताबडतोब जयशील अशा धनाच्या वृद्ध्यर्थ मनःपूर्वक स्तुति करणारे आम्ही तुझ्याकडे मागणी करतों आहोंत. सरण्यु अश्व हा वरुणाचा पुत्र होय. हे वरुणा, तूं शुद्ध आहेस. आम्हांला अन्न देण्यास तूं प्रवृत्त होतोस.

२५. हे मित्रावरुणहो, तुम्हांला बल प्राप्त होण्याकरतां, आणि आमच्याशीं सख्य व्हावें म्हणून अन्नयुक्त अध्वर्यु स्तुति करतो, जें सख्य झालें असतां जगांत आंगिरसाची स्तुति होईल, गाणाऱ्याला पूर्व दिशा ज्याप्रमाणें आनंद देते, त्याप्रमाणें गोड स्तुति करणारांना सुख देवो.

२६. देवताकडून देवांची कृपा असलेला, नियम चांगल्या प्रकारें पाळणारा, तो वरुण, नमस्कार आणि स्तोत्रें यांनीं प्रसन्न होवो. आमच्या भव्य स्तुतीमुळें तो आमच्याकडे येवो. त्याकरतां गाईचे सड पाझरत आहेत.

२७. हे यज्ञीय देवहो, तुम्ही आमच्या रक्षणाकरतां एकत्र व्हा. आम्हांला अन्न द्या. तुम्ही ज्ञानी आहांत. (तुम्हांला सहाव्या दिवशीं भ्रम पडत नाहीं.) आणि तुम्ही गाईचा निर्णय करणारे व्हा.

सूक्त बासष्टावें.

ऋषिः—नाभानेदिष्ठ मानव; देवता–१–७ विश्वेदेव ८–११ सावर्णिदान; छंदः–१ ते ४ जगती, ५ अनुष्टुभ्, ६ बृहती, ७ सतोबृहती, ८–९ अनुष्टुभ्, १० गायत्री, ११ त्रिष्टुभ्.

१. हे बुद्धिमंत अंगिरस ऋषीहो, पुष्कळ दाक्षिणायुक्त यज्ञकर्मानें तुम्ही इंद्राशीं सख्य संपादन केलें; तुमचें कल्याण असो. ‘ नाभानेदिष्ठ ’ नामक जो मी मनूचा पुत्र, या मला तुम्ही तुमच्यांत घ्या.

२. हे ऋषीहो, मजपेक्षां वयानें तुम्ही पुष्कळ अधिक असल्यामुळें मला आपण पितरांप्रमाणें आहां. पणी नामक असुरांनीं तुमचें धेनुरूपी धन, पर्वतांत लपवून ठेविलें असतां, आपलें सत्रकर्म संपतांच तुम्ही तें गोधन पर्वतांतून शोधून बाहेर काढिलें, आणि आपल्या सत्याच्या बलानें बल नांवाच्या राक्षसास ठार मारिलें त्या तुम्हांस दीर्घ आयुष्य असो. तुम्ही मला तुमच्यांत घ्या.

३. स्वतःच्या सत्याच्या सामर्थ्यानें जे आकाशांत सूर्याला स्थापन करिते झाले, व ज्यांनीं स्वतःच्या

यज्ञकर्मांनीं पृथ्वीला " कर्मभूमि " अशा संज्ञेनें प्रसिद्धीला आणिलें, त्या तुम्हांस चांगली संतति होवो. मला तुमच्यांत घ्या.

४. अग्निदेवाचे पुत्र ऋषीहो ! हा नाभानेदिष्ठ तुमच्या यज्ञमंडपांत येऊन तुम्हांस तुमचेंच हितकारक वचन सांगत आहे, तें तुम्हीं आदरानें ऐका. तुम्हांस वेदाध्ययनाचें तेज असो. तुम्ही मला तुमच्यांत घ्या.

५. अंगिरसऋषि अग्नीपासून उत्पन्न झाले म्हणून हे अग्नीचे पुत्र होत. हे अंगिरस ऋषि रंगानें व रूपानें नानाप्रकारचे जरी आहेत, तरी ते सर्व यज्ञकर्म करण्यांत सारखेच पटु आहेत.

६. नानाविध स्वरूपांच्या, अग्नीपासून अंतरिक्षांत उत्पन्न झालेल्या ह्या अंगिरस ऋषींपैकीं जे एक वर्षाचें सत्रकर्म नवव्या मासांत संपवून अथवा दहाव्या मासांत संपवून उठून गेले, त्यांचा अवशिष्ट राहिलेला व देवांबरोबर बसणारा अग्नि मला धन देवो.

७. यज्ञकर्म उत्तम रीतीनें करणारे अंगिरस ऋषि, ज्यांनीं इंद्राच्या साहाय्यानें, गाईंचा व अश्वांचा असुरांनीं गुहेंत लपविलेला समुदाय बाहेर काढिला, ते अंगिरस ऋषि यज्ञांत बाकी राहिलेलें सहस्रधन व सर्वांगसुंदर गाई मला देऊन देवांमध्यें आपलें यश विस्तृत करोत.

८. जो पुष्कळ गाई व अश्व नेहेमीं ऋषींना देण्यासाठीं प्रेरणा करितो, तो हा सावर्णि मनु पाणी शिंपडलेल्या बीजाप्रमाणें पुत्र व धन यांसहवर्तमान लवकर वाढो.

९. ज्याप्रमाणें सूर्याच्या तेजाची बरोबरी कोणाच्यानेंही करवणार नाहीं, त्याप्रमाणें ह्या सावर्णि मनूच्या दातृत्वाची कोणीही बरोबरी करूं शकणार नाहीं. ज्याप्रमाणें पृथ्वीवर नदी पसरत जाते, त्याप्रमाणें यानें दिलेली दक्षिणा अतिशयत्वामुळें प्रसिद्धीला येते.

१०. ह्या सावर्णि मनूच्या दातृत्वामुळें, त्याचें आज्ञाधारक होऊन राहिलेले, यदु आणि तुर्व नामक राजर्षि प्रतिदिवशीं आपल्या पशूंच्या कळपांतून सेवकाप्रमाणें या मनूच्या भोजनासाठीं पशू पाठवितात.

११. हजारों धेनूंचें दान करणारा व देशाचें पालन करणारा अशा ह्या मनूचा कोणाकडूनही पराभव न होवो. ह्यास कोणीही पीडा न देवो. यानें दिलेली दक्षिणा तिन्ही लोकांत प्रसिद्ध होवो, आणि कर्माविषयीं मुळींच आळस न करणारे आम्ही ज्या मनूपासून धन अथवा अन्न मिळवितों त्या मनूचें इंद्रादि देव आयुष्य वाढवोत.

सूक्त त्रेसष्ठावें.

ऋषिः–गय प्लात; देवता– १५ पथ्यास्वस्तिदेवता, बाकी विश्वेदेव; छंदः–१६–१७ त्रिष्टुभ् , १५ त्रिष्टुभ् किंवा जगती, बाकी जगती.

१. जे इंद्रादिदेव दूर देशाहून येऊन यज्ञ करणाऱ्या मनुष्याशीं आम्ही सख्य करितों असें आपसांत म्हणतात, व त्याप्रमाणें सख्यही करितात, व जे यज्ञांनीं संतुष्ट होऊन मनुष्यांना धारण करितात, आणि जे नहुषाचा पुत्र ययाति राजा याच्या यज्ञांत येऊन आसनावर बसतात, ते इंद्रादिदेव आम्हांस धन वगैरे देऊन अधिक श्रेष्ठ म्हणोत व आमचा उत्कर्ष करोत.

२. हे इंद्रादिदेवहो, तुम्ही स्वर्ग, अंतरिक्ष व पृथ्वी ह्या तिन्ही लोकांपासून उत्पन्न झालां आहां, तुमचीं सगळीं नांवें नमण्यास व स्तविण्यास योग्य आहेत आणि तुमचीं शरीरेंही पूजिण्यास योग्य आहेत. असे तुम्ही, माझ्या यज्ञांत येऊन मी केलेलें तुमचें निमंत्रण ऐका.

३. ज्या देवासाठीं पृथ्वी मधुर दूध देते, व मेघमंडळानें आच्छादित अशी अन्तरिक्ष देवता घृत देते, अशा यज्ञकर्म करून बलिष्ठ झालेल्या, वृष्टि देणाऱ्या व चांगलीं कर्में करणाऱ्या देवांना आपल्या कल्याणासाठीं स्तवावें.

४. स्वकर्म करणाऱ्या मनुष्यांना पहाण्यासाठीं जे सदोदित जागृत असतात, असे हे इंद्रादि देव चहूंकडे पूज्य होऊन सहसा न मिळणाऱ्या अमरत्वाला प्राप्त झाले. आणि तेजोमय रथानीं युक्त होऊन अजिंक्य आणि पुण्यवान असे हे देव सर्व लोकांच्या कल्याणासाठीं स्वर्ग लोकाच्या मध्यभागावर राहूं लागले.

५. सर्व लोकांचे राजे व अतिशय उत्कर्षानें वाढलेले हे देव यज्ञांत येतात व पुनः कोणाच्यानेंहि पराभूत न होतां स्वर्गलोकांत जाऊन राहतात. अशा ह्या देवांना व त्यांच्या मातेला चांगलें हविर्द्रव्य देऊन नम्रतापूर्वक स्तुति करून सेवावें.

६. हे सर्वज्ञ इंद्रादि अखिल देवहो, तुम्हीं ज्या यज्ञाला आनंदानें सेवितां, तो तुमच्या प्रीतीस पात्र होणारा यज्ञ यथासांगपणें मजशिवाय अन्य कोण बरें करूं शकेल ? आणि हे देवहो, आमचें कल्याण

होण्याकरितां जो यज्ञ आमचीं पातकें दूर करितों, तो तुमचा यज्ञ मजाशिवाय अन्य कोण बरें पूर्ण करील?

७. सर्वांच्या अगोदर वैवस्वत मनूनें हविर्द्रव्यें देऊन, व अग्नि प्रदीप्त करून श्रद्धायुक्त मनानें सात ऋत्विजांसह ज्या तुम्हांस स्तविलें, ते तुम्ही आम्हांला निर्भय सुख द्या, आणि आमच्या कल्याणासाठीं बिनधोक जाण्यास योग्य असे वैदिक कर्ममार्ग प्रवृत्त करा.

८. उत्तम ज्ञानवान् व स्थिरचररूप सर्व भुवनांचे जाणते, आणि विश्वाचें नियमन करणारे हे देवहो, आमच्या कायेकडून व मनाकडून घडलेल्या पातकांपासून आम्हांला आमच्या कल्याणासाठीं तुम्ही दूर करा.

९ स्तुतीला पात्र व सर्व पातकांचा नाश करणाऱ्या इंद्रास, व पुण्यवान् अशा अग्नि, मित्र, वरुण, आणि भग, ह्या देव मंडळीला आमच्या रक्षणासाठीं आम्ही संग्रामांत बोलावितों. व त्या वेळीं अन्नाची विपुलता होण्यासाठीं आणि कल्याणासाठीं द्यावापृथिवी व वायुदेवतेसही बोलावितों.

१०. सर्वांचें रक्षण करणारी, विस्तृत, निष्पाप, सुखयुक्त, ऐश्वर्यवती, उत्तम चालणारी आणि कर्मरूप वल्हीं आहेत जिला, अशी देवाची नौकारूप द्युभूमि (म्हणजे स्वर्ग) तिजवर आमच्या कल्याणासाठीं व आम्हांस देवत्व प्राप्त होण्यासाठीं आम्ही आरोहण करूं.

११. हे पूजनीय देवहो, तुम्ही आमच्या रक्षणासाठीं आम्हांस अभिवचन द्या आणि सर्व प्रकारें नाश करणाऱ्या दुर्गतींपासून आम्हांस राखा. असें तुम्ही केल्यास आमच्या रक्षणासाठीं व कल्याणासाठीं आम्ही निर्मळ अंतःकरणानें केलेल्या स्तुतीनें तुम्हांस स्तवूं.

१२. हे देवहो, आमचे शत्रूरूपी असणारे रोग, नास्तिकबुद्धि, धनलोभीपणा व शत्रूकडून होणारा आमच्यासंबंधीं द्वेष, हे सर्व आमच्यापासून तुम्ही दूर करा व आमचे कल्याणासाठीं विपुल सुख द्या.

१३. हे देवहो, सर्व दुर्मार्गांतून दूर करून ज्या जनाला त्याच्या कल्याणाशाठीं तुम्ही सन्मार्गानें वागवितां, तो जन कोणापासून पराभव न पावतां उत्कर्षाला पात्र होतो, आणि सन्मार्गामुळें धर्माचरण घडून प्रजा व पशु यांनीं तो युक्त होतो.

१४. हे इंद्रादि देवहो, अन्नप्राप्तीसाठीं ज्या रथाचें तुम्ही रक्षण करतां, व हे मरुत्‌देवहो, शत्रूंचें द्रव्य मिळविण्यासाठीं तुम्ही ज्या रथाचें रक्षण करितां, हे इंद्रा, शत्रूवर प्रातःकालींच चाल करून जाणारा व पराभव न करणारा असा जो तुझा सुंदर रथ त्यावर आम्ही आमच्या कल्याणासाठीं आरोहण करूं.

१५. हे मितभाषण करणारे देवहो, जलयुक्त प्रदेशांत, निर्जल प्रदेशांत, समुद्रादि जलांत, सर्व आयुधांनीं युक्त अशा शत्रूंच्या सेनेमध्यें तुम्ही आमचें कल्याण करा. तसेंच प्रजोत्पादक पुरुषेंद्रियाचें व स्त्रियांच्या गर्भाशयेंद्रियाचे व आमच्या धनाचें क्षेम (कल्याण) करा.

१६. जी पृथ्वी प्रवासी जनास धन देते, व स्वतः श्रेष्ठ आणि धनपती आहे, व जी उत्तरवेदीस्वरूपानें सुंदर अशा यज्ञामध्यें प्राप्त होते, ती पृथ्वी आमच्या गृहाचें व अरण्यादि दुःखप्रद देशांत आमचें रक्षण करो व जिचें नेहेमीं देव रक्षण करितात, अशी ही पृथ्वी आमच्या निवासाला म्हणजे स्थैर्याला कारण होवो.

१७. हे देव आणि हे देवमाते, ज्या देवगणांच्या कृपेनें मनुष्य धनादिकांचे स्वामी होतात, तो देवगण प्लात ऋषीचा पुत्र जो गयनामक ऋषि, त्यानें पूर्वोक्त प्रकारें स्तविला, व तोच तुम्हां सर्वांना उद्दीपित करिता झाला.

सूक्त चवसष्टावें.

ऋषिः—गय प्लात; देवता–विश्वेदेव; छंदः–१२–१६–१७ त्रिष्टुभ्, बाकी जगती.

१. यज्ञांत (आमचीं स्तोत्रें) ऐकणाऱ्या देवांच्या पैकीं कोणत्या देवाचें मननीय नांव आम्हीं उच्चारावें? कोण आमच्यावर कृपा करील आणि कोण आम्हांला सुख देईल, आणि आमच्या रक्षणाकरतां कोण येईल?

२. हृदयांतील भावना यज्ञ करूं इच्छितात. मनोहर विचार देवांची इच्छा करतात, इच्छा देवांकडे धांव घेतात. ह्या देवाहून दुसरा सुख देणारा नाहीं. देवामध्येंच माझ्या इच्छा पूर्ण होतात.

३. नराशंस, पूषा, अगोह्य आणि देवांनीं प्रदीप्त केलेला अग्नि यांची तूं वाणीनें स्तुति कर. सूर्यचंद्र, द्युलोकांत असणारा यम, आणि त्रैलोक्यांत असणारा वायु, उषा, रात्र आणि अश्वि यांची तूं स्तुति कर.

४. ज्ञानी अग्नि कशानें पुष्कळ देवांनीं युक्त होतो? कोणच्या प्रकारच्या भाषणानें त्याची स्तुति होते? उत्कृष्ट स्तुतीनें बृहस्पति प्रसन्न होतो, सुंदर स्तोत्रांनीं अजएकपात् प्रसन्न होतो. अहिर्बुध्न्य आमची स्तुति ऐको.

५. हे अदितिदेवि, सूर्याचा जन्म झाला असतां यज्ञांत मित्रावरुण ज्याप्रमाणें असतात, त्याप्रमाणें तूं अस. सूर्य अनेक प्रकारच्या यज्ञांत शान्त, सात प्रकारचे किरण असलेला आणि उत्कृष्ट रथानें युक्त असतो.

६. बोलावणें ऐकणारे, बलवान्, मार्ग आक्रमण करणारे, यज्ञांतल्याप्रमाणें आपण होऊन हजारोंनीं देणारे असे जे युद्धांत खूप संपत्ति लुटतात ते घोडे आमचें बोलावणें ऐकोत.

७. हे स्तोतेहो, तुम्ही वायु, रथ जोडलेल्या आणि अनेक कामांत असलेल्या इंद्र आणि पूषा याला स्तुति करून मैत्रीकरतां बोलवा. कारण ते ज्ञानी, एकबुद्धि असे सवितृदेवाच्या यज्ञांत यज्ञाचा आस्वाद घेतात.

८. एकवीस नद्या, श्रेष्ठ प्रकारचें उदक, वनस्पति (पात्राकरतां), दगड (कुटण्याकरतां), अग्नि, कृशानु (नांवाचा सोमपालक गंधर्व), त्याचे धनुर्धारी नोकर, पुष्य नक्षत्र, रुद्रगणांतील रुद्र स्तुति करण्याकरतां आम्ही बोलावतों.

९. मोठ्यांतल्या मोठ्या आणि लाटांनीं युक्त अशा सरस्वती, सरयु आणि सिंधु ह्या वाहणाऱ्या नद्या आमच्या संरक्षणाकरतां येवोत. तसेंच प्रेरक आणि मातृस्थानीय अशा सुंदर उदक देवता आम्हांला बलयुक्त आणि मधुर पाणी देवोत.

१०. तसेंच तेजस्वी देवमाता आमचें बोलावणें ऐको. सर्व देव आणि देवपत्न्या यांच्यासह सर्वांचा पिता त्वष्टा आमचें (स्तुतियुक्त) भाषण ऐको. इंद्र, वाज, रथाधिपति भग, रमणीय आणि स्तुत्य असे इतर देव आम्हां भक्तांचें संरक्षण करोत.

११. दिसण्यांत रमणीय असणारा देवगण अन्नाच्या कोठारासारखा वाटतो. रुद्रदेवांची कृपा कल्याणकारक आहे. तीमुळें लोकांत गाईबैलांनीं युक्त म्हणून आमची कीर्ति होईल. हे देवहो, आम्ही नेहमीं अन्नांनीं (तुमची) सेवा करूं.

१२. हे मरुत्, इंद्र, देव, वरुण, मित्र हो, तुम्ही मला जी बुद्धि देता, ती दुधानें गाय फलयुक्त होते त्याप्रमाणें करा. आमच्या स्तवनानें तुम्ही पुष्कळ वेळा (माझ्याकडे येण्याकरितां) रथारूढ झालां आहांत.

१३. हे भले मरुतहो, ह्या सजातीयाप्रमाणें आम्हांला तुम्ही वेळोवेळीं जागे करा. नाभिस्थानीं असणाऱ्या ज्या ठिकाणीं प्रथम आम्ही तुझी सेवा करतों, त्या ठिकाणीं देवमाता अदिति आम्हाला बांधवासारखी मदत करो.

१४. जगनिर्मात्या, थोर अशा यज्ञार्ह द्यावापृथ्वी देवांना जन्म देत्या झाल्या. ह्या दोन्ही द्यावापृथ्वी अन्नांनीं (सर्वांना) पोसतात. आणि देवांच्या साहाय्यानें पुष्कळ उदकांचा वर्षाव करतात.

१५. थोरांचें संरक्षण करणारी, सर्वगामी आणि स्तोत्री अशी ती वाणी सर्व उत्कृष्ट संपत्तीचा उपभोग घेते (तिच्यामुळें मिळते). ज्या वाणीनें सोम कुटणारा दगड थोर म्हणून स्तवला जातो. स्तुति करून थोर लोक तिची इच्छा करतात.

१६. ज्ञानी, बलवान्, यज्ञवेत्ता, धनेच्छु, पश्वादि इच्छिणारा आणि बुद्धिमान् अशा गय ऋषीनें येथें अनेक प्रकारच्या स्तोत्रांनीं दिव्य देवांचें स्तवन केलें.

१७. हे सर्व देवहो आणि हे अदिते, तुमचा शहाणा स्तोता प्लतीचा मुलगा गय याचा उत्कर्ष होवो. दैवी अशा ज्या सामर्थ्यानें मनुष्य समर्थ होतात, तो दिव्य पुरुष गयाकडून स्तविला गेला.

सूक्त पासष्टावें.

ऋषिः—वसुकर्ण वसुक्रपुत्र; देवता–विश्वेदेव;
छंदः—१५ त्रिष्टुभ्, बाकी जगती.

१. अग्नि, इंद्र, वरुण, मित्र, अर्यमा, वायु, पूषा, सरस्वती, आदित्य, विष्णु, मरुत्, थोर द्यु, सोम, रुद्र, अदिति आणि बृहस्पति हे मिळून—

२. युद्धांत शरीरसामर्थ्यानें परस्परांना प्रेरणा करणारे, सज्जनांचें संरक्षक, एका ठिकाणीं राहणारे इंद्राग्नी, उदकमिश्रित महिमायुक्त सोम हे आपल्या सामर्थ्यानें महान् आकाश व्यापून टाकतात.

३. माहात्म्यानें मोठ्या, पराभव न पावणाऱ्या आणि यज्ञांनीं वाढणाऱ्या देवांचें, यज्ञ जाणणारा मी स्तवन करतों. आश्चर्यकारक, धन असलेले जे देव उत्कृष्ट उदकाचा वर्षाव करतात, ते मित्रत्वाला चांगले असणारे देव आमच्या मोठेपणाकरतां लोकांत आम्हांस धन देवोत.

४. स्वकर्मस्थापक आदित्य, तेज, द्यावापृथ्वी, विस्तृत अन्तरिक्ष, यांना देव स्वतःच्या सामर्थ्यानें धारण करतो. तसेंच दरिद्री, धनाप्रमाणें सत्कार करणारे, दानशील, आणि थोर देवमनुष्याकरतां स्तवले जातात,

५. दात्या मित्र आणि वरुणांना (हवि) देसम्राट मित्रावरुण मनानेंहि चुकत नाहीं. ज्या मित्रावरुणांचें थोर शरीर कर्मानें प्रकाशित आहे, आणि ज्यांनीं देव मनुष्ययुक्त द्यावापृथ्वी व्यापिली आहे, (त्यांच्या) स्वाधीन सर्व आहे.

६. जी ही दूध देणारी, कर्मसंपादक गाय आपण होऊनच शुद्ध अशा स्थानीं (यज्ञांत) येते, ती मीं स्तुति केली जाणारी ही गाय हवि दिलेल्या वरुणाला आणि हवीनें देवांची सेवा करणाऱ्या मला दूध देवो.

७. स्वतःच्या तेजांनीं स्वर्गाला व्यापणारे, अग्निरूपी जिव्हा असलेले, यज्ञवर्धक आणि सत्याचें स्थान शोधणारे जे असतात ते द्युलोकाला आधारून तेजानें उदक आणतात. नंतर हवि तयार करून शरीराला सुशोभित करतात.

८. सर्वव्यापक, आईबापासारख्या प्राचीन आणि एकत्र असणाऱ्या द्यावापृथ्वी यज्ञांत असतात. आणि एकच कार्य करणाऱ्या त्या दोघी पूज्य वरुणाला प्रसन्न करण्याकरतां बलयुक्त उदकांचें सिंचन करतात.

९. पर्जन्य व वात; कामपूरक, उदकयुक्त असे इंद्र व वायु; वरुण, मित्र, अर्यमा, आदित्य, अदिति आणि पृथ्वीवरील, स्वर्गांतील आणि अन्तरिक्षांतील जे असतील त्या सर्व देवांना आम्ही बोलावतों.

१०. हे ऋभुहो, जो सोम तुमच्या कल्याणाकरतां त्वष्टा, वायु, उषा, बृहस्पति, बुद्धिमान् आणि वृत्रभक्षक इंद्र आणि द्यावापृथ्वी यांना बोलावतो, त्या सोमाला धनेच्छु आम्ही धन मागतों.

११. अन्न, गाय, अश्व, औषधी, वनस्पति, पृथ्वी, पर्वत, उदक यांना उत्पन्न करणारे, आणि द्युलोकांत सूर्याला स्थापन करणारे, असे दानशील देव उत्कृष्ट आणि कल्याणकारक कर्मांचा प्रसार करीत पृथ्वीवर सर्वत्र असतात. त्यांना आम्ही धन मागतों आहोंत.

१२. हे अश्विहो, तुम्ही भुज्यूला समुद्रांतून तारलेंत. तुम्ही वध्रिमतीला श्याव नांवाचा मुलगा दिलांत. तुम्ही विमदाला कमद्यु नांवाची बायको दिलीत. विश्वकाला विष्वाप नांवाचा मुलगा दिलांत.

१३. आयुध घेतलेली, शब्द करणारी मेघगर्जना द्युलोकाचा धारक अजएकपात्, सिंधु, समुद्रांतलें जल, सर्व देव, कर्तृत्व आणि बुद्धि यांनीं युक्त सरस्वती माझीं भाषणें ऐको.

१४. कर्तृत्व आणि बुद्धि यांनीं युक्त, मनुष्याच्या यज्ञांत यज्ञार्ह, अमर, सृष्टीचें मूळ जाणणारे, दिलेले हवि खाणारे, यज्ञांत असणारे स्वर्गवेत्ते सर्व देव आमचीं सर्व स्तोत्रें आणि अन्न सेवन करोत.

१५. वसिष्ठांनीं देवांची स्तुति केली. जे देव सर्व जगांत श्रेष्ठ आहेत, ते देव आम्हांला अत्यंत उत्कृष्ट अन्न देवोत. हे देवहो, तुम्ही कल्याण करून आमचें संरक्षण करा.

सूक्त सहासष्टावें.

ऋषिः—वसुकर्ण वसुक्रपुत्र; देवता–विश्वेदेव; छंदः–१५ त्रिष्टुभ्, बाकी जगती.

१. सर्व प्रकारच्या संपत्तीनें युक्त असे इंद्रप्रमुख मरणरहित आणि यज्ञांनीं वाढणारे देव, जे देव उत्कर्षशील आहेत, त्या अत्यंत अन्नयुक्त, प्रकाश निर्माणकर्त्या आणि ज्ञानी देवांना यज्ञसिद्धीकरतां मी बोलावतों.

२. इंद्रानें उत्साह दिलेले व वरुणानें साहाय्य दिलेले जे देव तेजस्वी सूर्याचा भाग उपभोगितात, त्या शत्रुहिंसक, इंद्राधिष्ठित देवसंघाविषयीं मननीय अशीं स्तोत्रें आणि यज्ञ केले जातात.

३. वसूंसह असणारा इंद्र आमच्या घरांचें संरक्षण करो. आदित्यांसह अदिति सुख देवो. रुद्रगणांसह असणारा रुद्रदेव आम्हांला सुखें देवो. देवपत्न्यासहित असणारा त्वष्टा आम्हांला प्रसन्न करो.

४. अदिति, द्यावापृथ्वी, सत्यस्वरूप अग्नि, इंद्राविष्णू, मरुत्, आदित्य ह्या सर्व देवांना आणि वसु, रुद्र आणि कर्ता सविता या सर्वांना आम्ही संरक्षणाकरतां बोलावतों.

५. बुद्धियुक्त, सरस्वान् नांवाचा कर्मठ वरुण, पूषा, थोर विष्णु, वायु, अश्वि, हे देव अन्नदाते, मृत्यूरहित, सर्व प्रकारच्या संपत्तीनें युक्त, शत्रुहन्ते असे आहेत ते आम्हांला तिघई घर देवोत.

६. हा यज्ञ आमच्या इच्छा पूर्ण करो. यज्ञार्ह देव, इतर देव आणि हवि करणारे भक्त माझ्या इच्छा पुऱ्या करोत. नियमबद्ध द्यावापृथ्वी, आमच्या कामना पूर्ण करोत. इंद्र आणि स्तुति करणारे भक्त आमच्या इच्छा पूर्ण करोत.

७. पाऊस पाडणाऱ्या अग्नीषोमांची मी अन्नप्राप्तीकरतां स्तुति करतों. जे देव कामपूरक म्हणून यज्ञांत पूजिले जातात, ते देव आम्हांला तिघई घर देवोत.

---

१२ टीप–१ ११२. ६; ११६. ३. पहा.

८. नियमबद्ध, क्षात्रियवृत्तीचे, यज्ञाकडे जाणारे, महातेजस्वी, यज्ञसेवक, अग्नीला बोलावणारे, खरे, कोणाचाहि द्रोह न करणारे असे देव मेघाला फोडून उदक उत्पन्न करते झाले.

९. देवांनीं द्यावापृथ्वीला उद्देशून कर्म करून उदक, औषधी आणि यज्ञार्ह वृक्ष निर्माण केले. तसेंच देवांनीं संरक्षणाकरतां तेजानें सर्व आकाश भरून टाकलें आणि आपल्या शरीरांत समर्पित हवि जिरवून टाकला.

१०. द्युलोकाला धारण करणारे आणि आयुधासहित असणारे ऋभु, मोठी गर्जना करणारे वात आणि पर्जन्य, अप् देवता आणि औषधी आम्हांस स्तवन करण्यास उत्साह देवोत. दाता भग, वाजिन् म्हणजे अग्नि, वायु आणि सूर्य माझी स्तुति ऐकण्यास येवोत.

११. उदकपूर्ण समुद्र, मध्यलोक, अन्तरिक्ष, अजएकपात्, गर्जना करणारा मेघ, अहिर्बुध्न्य अग्नि हे माझीं स्तोत्रें ऐकोत. तसेंच माझीं स्तोत्रें सर्व विद्वान् देव ऐकोत.

१२. हे देवहो, मनुवंशज असे आम्ही तुमचे यज्ञ करावेत. तसेंच आमचे यज्ञ पूर्वगामी असूं द्या. हे आदित्य हो, हे रुद्रहो, हे दानशील वसुहो, हीं म्हटलीं जाणारीं स्तोत्रें तुम्हांला आवडोत.

१३. देवांना हवि पोंचविणारे, मुख्य, पुढें स्थापन केलेले, असे जे अग्नि आणि आदित्य यांना मी अनुसरतों. यांना संतुष्ट करण्याकरतां मी यज्ञमार्गाचें चांगल्याप्रकारें अनुसरण करतों. नजीकच्या क्षेत्रपतीला आणि अमर अशा सर्व देवांना मी न चुकतां धन मागतों.

१४. ऋषीप्रमाणें देवांची स्तुति करणारे वसिष्ठकुलोत्पन्न आपल्या पित्याप्रमाणें स्तुति करतात. हे देवहो, मर्जी असलेल्या बांधवाप्रमाणें आमच्या इच्छा जाणून आम्हांला धन द्या.

१५. जे देव सर्व जगांत श्रेष्ठ आहेत, त्या अमर देवांची वसिष्ठांनीं स्तुति केली. ते देव आम्हांला अत्यंत उत्कृष्ट अन्न देवोत. हे देवहो, तुम्ही आमचें कल्याण करून आमचें संरक्षण करा.

सूक्त सदुसष्टावें.

ऋषिः—अयास्य आंगिरस; देवता—बृहस्पति; छंदः—त्रिष्टुभ्.

१. कर्माधार, सात प्रमुख देवांनीं युक्त, यज्ञाकरतां उत्पन्न झालेलें, हें माझें शरीर (बृहस्पति) अंगिराऋषिला लाभलें. त्या विश्वप्रेरकाला अयास्य नांवाचा नातु झाला आणि इंद्राकरतां त्यानें स्तोत्र केलें.

२. स्तोत्रें म्हणणारें, सरळपणानें ध्यान करणारे, तेजस्वी आणि श्रेष्ठ अशा अग्नीचें बुद्धिमान् पुत्र अंगिरस, यज्ञाधार असें श्रेष्ठ स्थान ग्रहण करून प्रथमपासून देवतांचीं स्तोत्रें गातात.

३. हंसाप्रमाणें गोड बोलणारा मित्र आणि अत्यंत गडबड करणाऱ्या देवांसह दगडी बंधनें तोडणारा आणि गर्जना करणारा बृहस्पति गाई हरण करता झाला आणि ज्ञाता असा तो देवांचें स्तवन करूं लागला.

४. खालीं अंधाऱ्या गुहेंत ठेवलेल्या गाई दोन द्वारांनीं बाहेर काढल्या. तसेंच वर असणाऱ्या गाई एका मार्गानें बाहेर काढल्या. अंधारांत उजेड इच्छिणाऱ्या बृहस्पतीनें तिसऱ्या ठिकाणच्या गाई बाहेर काढल्या. अशा प्रकारें बृहस्पतीनें तीनहि द्वारें मोकळीं केलीं.

५. बृहस्पतीनें गुप्तपणानें राहून पालथी (वलाची) नगरी फोडून मेघापासून (वलापासून) एकदम तिघांना (उषा, सूर्य आणि गाय) यांना मोकळें केलें. (अंधाऱ्या जागेंत सकाळनंतर उषा, सूर्य निर्माण करून पशूंना मोकळें केलें.) बृहस्पतीनें गर्जणाऱ्या आकाशाप्रमाणें उषा, गाय आणि पूज्य सूर्याला जाणलें.

६. बृहस्पतीनें गाईचें रक्षण करणाऱ्या वलाला हातानें छेदावा त्याप्रमाणें शब्दानें छेदिला. मरुतांचा आश्रय इच्छिणाऱ्या बृहस्पतीनें पणींना रडायला लावलें आणि गाई हरण केल्या.

७. त्या बृहस्पतीनें सत्यनिष्ठ, मित्रभूत, तेजस्वी आणि धनयुक्त अशा मरुतांच्या साहाय्यानें गाई लपविणाऱ्या वलाला ठार केलें. तसेंच स्तोत्रकर्त्या बृहस्पतीनें वर्षाव करणारे, डुकरासारखे आणि तेजस्वी अशा मरुतांच्या साहाय्यानें गोरूप धनाला आपल्या ताब्यांत घेतलें.

८. गाई ताब्यांत घेणारे, आणि मनापासून प्रयत्न करणारे मरुत् आपल्या कर्तृत्वानें बृहस्पतीला गोपति करूं अशी इच्छा करिते झाले. दुष्टापासून गाईचें संर-

---

टीपः—अंगिरा ऋषींना बृहस्पति पुत्ररूपानें झाला. तो देवांना उपदेश करण्याकरतां इंद्राचा उपाध्याय झाला. एकदां त्याच्या गाई पणींनीं चोरून आणि वलपुराला पोंचवून अंधारांत ठेवून दिल्या. त्यांच्या शोधाकरतां इंद्रानें बृहस्पतीला पाठविलें. बृहस्पति देवांना घेऊन तेथें आला आणि अंधारांतल्या गाईंना पहाण्याकरतां सूर्य उत्पन्न करता झाला. नंतर वलाला व त्याचे नोकर पणी यांना ठार करून गाई परत आणल्या. ही कथा ह्या ऋचांत आहे.

क्षण करण्याकरतां एकत्र झालेल्या मरुतांच्या साहाय्यानें गाई मोकळ्या केल्या.

९. आकाशांत सिंहाप्रमाणें पुनः पुनः गर्जना करणाऱ्या, कामपूरक आणि जयशील अशा त्या बृहस्पतीला उत्साह देणारे मरुत्, शूरांनीं केल्या जाणाऱ्या संग्रामांत, उत्कृष्ट कवनांनीं बृहस्पतीची स्तुति करतात.

१०. ज्यावेळीं बृहस्पति अनेक स्वरूपाचें (गोरूप) अन्न ताब्यांत घेतो, द्युलोकांत जातो किंवा पुढचीं स्थानें आक्रमण करतो, तेव्हां मरुत् कामपूरक बृहस्पतीला तोंडानें उत्साह देतात. तसेंच अनेक ठिकाणीं राहून तेजस्वीपणानें बृहस्पतीचा उत्कर्ष करतात.

११. हे बृहस्पतिप्रभृति देवहो, अन्नप्राप्तीकरतां केलेली आमची स्तुति सत्य करा. तसेंच तुमच्या येण्यानें कोणाहि भक्तांचें तुम्ही रक्षण करा. आमचीं सर्व संकटें नष्ट होऊं द्या. आमचें म्हणणें सर्वांना प्रसन्न करणाऱ्या द्यावापृथ्वी ऐकोत.

१२. समर्थ बृहस्पतीनें उदकयुक्त मेघांचें डोकें फोडलें. अहीला ठार केलें, सात नद्यांना समुद्रांत पोंचविलें. हे द्यावापृथ्वीहो, देवांसह येऊन आमचें संरक्षण करा.

सूक्त अडुसष्टावें.

ऋषिः-अयास्य आंगिरस; देवता-बृहस्पति;
छन्दः--त्रिष्टुभ्.

१. मोटवाले किंवा पाखरांपासून राखण करणारे जसे पुनः पुनः शब्द करतात किंवा मेघाची गर्जना जशी पुनः पुनः होत असते, किंवा पर्वतावरून आपटत खालीं येणारें पाणी जसें शब्द करीत असतें, तसें स्तोते बृहस्पतीची सारखी स्तुति करीत असतात.

२. नाती जोडणाऱ्या भगाप्रमाणें अंगिरस बृहस्पतीनें स्तोत्याला गाई दिल्या. लोकांत मित्राप्रमाणें नवरा बायकोची तूं भेट करवतोस, हे बृहस्पते, संग्रामांत घोडे जसे जातात, तसें तुझे (कृपा) किरण आमचेकडे येऊं दे.

३. सुंदर दूध देणाऱ्या, गमनशील, हव्याशा वाटणाऱ्या, स्पृहणीय, चांगल्या रंगाच्या, बांधेसूद अशा गाई वलाच्या पर्वतापासून काढून वाढव्याचा धंदा करणारांना धान्य देतात, त्याप्रमाणें गाई देवांकडे पोंचविल्या जातात.

४. उदकांचा वर्षाव करणारा, पाण्याचे मेघ चहूंकडे पसरविणारा, पूज्य, बृहस्पति द्युलोकांतून उल्का पडावी त्याप्रमाणें पर्वतांतून गाई बाहेर काढीत (गाईच्या खुरांनीं) पावसाप्रमाणें जमिनीचें कातडें (धूळ) उडवतो.

५. बृहस्पति, उत्पन्न झालेलें शेवाळ वाऱ्यानें नाहींसें व्हावें, त्याप्रमाणें तेजानें अंधार नाहींसा करतो. नंतर विचार करून वलाच्या पाशीं असलेल्या गाई, वायु मेघाला नेतो त्याप्रमाणें ओढून नेतो.

६. तेव्हां बृहस्पतीनें दुष्ट वलाचें आयुध अग्नीसारख्या तेजस्वी किरणांनीं फोडलें आणि दातांनीं चावलेलें जिव्हा ग्रहण करते त्याप्रमाणें पर्णीनें वेष्टिलेल्या वलाला पकडलें आणि गाईचा सांठा मोकळा केला.

७. बृहस्पतीनें गुप्त स्थानीं ठेवलेल्या आणि ओरडणाऱ्या गाईचें तें स्थान जेव्हां जाणलें, तेव्हां पक्ष्यांचें अंडें फोडून आपणहून बाहेर पडणाऱ्या गर्भाप्रमाणें पर्वतांत असलेल्या गाई बाहेर पडल्या.

८. बृहस्पतीनें सुकलेल्या उदकांत राहणाऱ्या माशाप्रमाणें दगडानें झांकलेल्या गाई पाहिल्या आणि वृक्षापासून चमसपात्र जसें निर्माण करतात, त्याप्रमाणें विविध शब्द करून वलाला तोडून गाई बाहेर काढल्या.

९. त्या बृहस्पतीनें तेथें गाई पहाण्याकरतां उषा उत्पन्न केली, त्यानेंच सूर्य आणि अग्नि यांना उत्पन्न करून तेजानें अंधार नाहींसा केला. आणि हाडापासून स्नायू तोडून काढावेत, त्याप्रमाणें (गोरूप धारण करणाऱ्या गाईनें वेष्टिलेल्या) वलाच्या पर्वतांतून गाई बाहेर काढल्या.

१०. थंडीनें पानें चोरलीं जातात (गळून पडतात), त्याप्रमाणें गाई चोरल्या गेल्या होत्या. बृहस्पतीमुळें वल शरण आला आणि त्यानें गाई परत केल्या. पुनः करतां न येणारें आणि अनुकरण करतां न येणारें कर्म त्यानें (बृहस्पतीनें) केलें. सूर्य व चंद्र परस्परांत सारखे उच्चारित असतात असें (रात्रंदिवस वर्णन करण्यासारखें) कर्म केलें.

११. देव काळ्या घोड्याला दागिने घालून भूषवावें त्याप्रमाणें द्युलोकाला नक्षत्रांनीं सुशोभित करतात. रात्रीं अंधार आणि दिवसा उजेड त्यांनीं उत्पन्न केला. ज्या वेळीं वलाचा पर्वत फोडला, तेव्हां त्यानां गाई मिळाल्या.

१२. आकाशांत उत्पन्न झालेल्या बृहस्पतीकरितां आम्ही स्तोत्र केलें आहे. जो बृहस्पति अनेक जुनीं

स्तोत्रें पुनः पुनः म्हणतो, तोच आम्हांला गाई, घोडे, मुलें, माणसें यांच्यासहित अन्न देवो.

सूक्त एकोणसत्तरावें.

ऋषि:—सुमित्र वध्र्यश्वपुत्र; देवता–अग्नि;
छंद:—१–२ जगती, ३–१२ त्रिष्टुभ्.

१. अग्नीच्या दृष्टी वध्र्यश्वाला सुखकारक होवोत. अग्नीचें प्रणयन सुखकारक होवो. यज्ञाकडे जाणें सुखकारक होवो. सुमित्र नांवाचे जेव्हां प्रथम अग्नीला प्रदीप्त करतात तेव्हां तुपाच्या आहुती दिलेला आणि प्रज्वलित अग्नि आम्ही स्तवीत आहोंत.

२. वध्र्यश्वाच्या अग्नीला प्रज्वलित करणारें तूप आहे. त्याचें अन्न त्याला पुष्टिकारक तूपच आहे. तुपाची आहुति दिलेला अग्नि अत्यंत मोठा होतो. आणि तुपाची आहुति दिल्यामुळें सूर्यासारखा प्रकाशतो.

३. हे अग्ने, तुझ्या ज्वालांना मनु ज्याप्रमाणें प्रज्वलित करतो, त्याप्रमाणें सुमित्र नांवाचा मी प्रदीप्त करीत आहें. तुझें तेज अत्यंत नवें होवो. तूं सामर्थ्ययुक्त होऊन प्रकाश. तसेंच तूं आमचीं स्तोत्रें ऐक. शत्रूच्या बलाचा नाश कर. तसेंच तूं मला अन्न दे.

४. स्तवन करणाऱ्या वध्र्यश्वानें ज्या तुला पूर्वी प्रज्वलित केलें, त्या तूं हे अग्ने, माझें स्तोत्र स्वीकारावेंस, तो तूं आमच्या घराचें संरक्षण कर. आमच्या शरीराचें व धनाचें तूं संरक्षण कर. जें तुझें धन असेल तें आम्हांला दे.

५. हे वध्र्यश्वकुलांत उत्पन्न झालेल्या अग्ने, तूं कीर्तिमान होव आमचें संरक्षण कर. तुला कोणीहि नष्ट करूं नये. तूं शत्रूंचा पराभव करणारा आहेस. तूं शूरासारखा धैर्यशाली आहेस आणि शत्रूंचा पराभव करणारा आहेस. मी सुमित्र वाध्र्यश्व अग्नीचीं नांवें घेत आहे.

६. हे अग्ने, लोकहितकारक, पर्वतोद्भव धन तूं जिंकतोस. तसेंच लहान मोठ्यांनीं केलेले उपद्रव तूं नष्ट करतोस. तूं शूरासारखा धैर्यशाली आणि शत्रूंचा पराजय करणारा आहेस. हे अग्ने, तूं संग्रामेच्छु लोकांचा पराभव कर.

७. हे अग्ने, मोठालीं स्तोत्रें करून स्तविला जाणारा, प्रज्वलित, अनेक प्रकारें हवन केलेला, अनेक प्रकारें स्थापन केलेला, थोर, तेजस्व्यामध्यें तेजस्वी आणि लोकांनीं भूषित केलेला तूं आहेस. तो तूं देवभक्त सुमित्रांच्या घरीं प्रज्वलित हो.

८. हे सर्वज्ञ अग्ने, तुझेपाशीं चांगलें दूध देणारी आदित्याच्या साहाय्यानें अमृतासारखें दूध देणारी गाय आहे. तो तूं ऋत्विज्, दक्षिणा आणि भक्ति यांनीं युक्त असणाऱ्या सुमित्राकडून प्रज्वलित केला जात आहेस.

९. हे वध्र्यश्वानें उत्पन्न केलेल्या अग्ने, तुझा महिमा देवहि वर्णूं शकत नाहींत. ज्या वेळीं असुरांना कोण ठार मारणारा आहे, असे लोकांत प्रश्न विचारले गेले, त्यावेळीं नेत्या आणि तुझ्यामुळें उत्कर्ष पावलेल्या देवांच्या साहाय्यानें तूं शत्रूंना ठार केलेंस.

१०. हे अग्ने, पिता पुत्राचें पोषण करतो त्याचप्रमाणें वेदींत पूजा करणाऱ्या वध्र्यश्वानें ज्यावेळीं तुझें पोषण केलें, त्यावेळीं, हे अत्यंत तरुण अग्ने, ह्या वध्र्यश्वाची समिध भक्षण करणारा तूं जुन्या बाधक शत्रूंना ठार करतोस.

११. तो अग्नि सोम काढणाऱ्या लोकांच्या साहाय्यानें वध्र्यश्वाच्या शत्रूंना नेहेमीं जिंकीत असतो. हे आश्चर्यकारक किरण असलेल्या अग्ने, तूं युद्धाला जाळून नाहींसें करतोस. तूं वृद्धिंगत होऊन हिंसक शत्रूंना कापून टाकतोस.

१२. हा शत्रुहन्ता अग्नि फार दिवसांपासून हवि अर्पून प्रज्वलित केला आहे. तसेंच नमस्कारपूर्वक स्तविला आहे. हे वध्रश्वकुलांत उत्पन्न झालेल्या अग्ने, तूं आमच्या शत्रूंचा नाश करीत आमच्या अनेक शत्रूंचा पराभव कर.

सूक्त सत्तरावें

ऋषिः—सुमित्र वाध्र्यश्व; देवता–आप्री; छंदः– त्रिष्टुभ्.

१. हे अग्ने, उत्तरवेदीवर तूं आमची ही समिध ग्रहण कर. तसेंच घृतयुक्त स्रुचेचा स्वीकार कर. तसेंच

टीपः—देवता १ सुसमिद्ध, २ तनूनपात, ३ नराशंस, ४ इळा, ५, बर्हिः, ६ द्वार, ७ उषा आणि रात्र, ८ दैव्यौ होतारौ, ९ सरस्वती, इळा, भारती, १० त्वष्टा, ११ वनस्पति, १२ स्वाहाकृति.

कांहींत तनूनपात्चा मंत्र नसतो, कांहींत नराशंसाचा नसतो, कांहींत दोहींचेहि असतात. त्यामुळें कांहीं आप्रीसूक्तांत बारा मंत्र असतात. कांहींत अकरा मंत्र असतात. सध्यांच्या सूक्तांत तनूनपातचा मंत्र नाहीं.

आप्रीसूक्तें—१. १३; १४२; १८८; २. ३; ३. ४; ५. ५; ७. २; ९. ५; १०. ७०; ११०. विशेष माहिती १. १३. वर पहा.

हे सुकर्मन्, आम्हांला चांगले दिवस यावेत म्हणून वेदींत यज्ञामुळें तूं प्रज्वलित हो.

२. देवांचा पुढारी नराशंस नांवाचा अग्नि अनेक घोड्यांच्या साहाय्यानें आमच्या यज्ञांत येवो. पूज्य आणि देवांतला देव तो अग्नि यज्ञमार्गानें आणि स्तोत्रांच्या साहाय्यानें देवांना हवि पोंचवो.

३. नित्य हविर्युक्त लोक (देवाकडे) दूतपण करण्याकरतां अग्नीची स्तुति करीत असतात. असें स्तविलेला तूं उत्कृष्ट घोड्यांनीं आणि चांगल्या रथानें इंद्रादिक देवांना घेऊन ये. तूं होता हो आणि ह्या यज्ञांत बैस.

४. हे बर्हिनांवाच्या अग्ने, देवांनीं भक्षण केलेला आणि आकर्षक असा हा यज्ञ वाढो. याची कालमर्यादा वाढो आणि हा आकर्षक गंधयुक्त होवो. हे देवा, शांतमनानें हवि इच्छिणाऱ्या इंद्रप्रमुख देवांना तूं हवि पोंचीव.

५. हे द्वारदेवतांनो, द्युलोकांतलि उच्च स्थानाला स्पर्श करा. पृथ्वीची जेवढी मर्यादा असेल तेवढ्या मर्यादेचा आश्रय करा. देवेच्छु अशा तुम्हीं रथाच्या इच्छेनें सामर्थ्ययुक्त देवांनीं युक्त अशा रथाला धरा.

६. द्युलोकाच्या तेजस्वी व सुंदर मुली, उषा आणि रात्र यज्ञामध्यें येऊन बसतात. तसेंच इच्छा करणाऱ्या आणि धनयुक्त अशा हे देविहो, तुमच्या जवळ हवि इच्छिणारे देव बसोत.

७. जेव्हां सोम कुटणारा दगड वर उचलला जातो, आणि अग्नि प्रदीप्त केला जातो, आणि देवांना आवडणारीं सोमपात्रें यज्ञांत जमिनीवर ठेविलीं जातात, तेव्हां, हे हवन केले जाणारे, पुढे असलेले आणि विद्वान् दोघे देवहो, तुम्ही ह्या यज्ञांत (आम्हांला) धन द्या.

८. हे इळादि (इळा, सरस्वती, भारती) तीन देविहो, तुम्ही ह्या उत्कृष्ट आसनावर बसा. तुमच्याकरतां हें सुखकर आसन आम्ही केलें. इळा, सरस्वती आणि भारती यांनीं मनूच्या यज्ञांत जसें हविर्भक्षण केलें त्याप्रमाणें ह्या आमच्या यज्ञांतीलहि व्यवस्थित ठेवलेले हवि त्या भक्षण करोत.

९. हे त्वष्टृदेवा, ज्या त्वां उत्कृष्ट रूप प्राप्त केलें आहे, आणि जो तूं आम्हां आंगिरसांचा मित्र आहेस, तो तूं हे धनदात्या, धनवान् आहेस आणि हवि इच्छिणाऱ्या देवांना जाणणारा त्यांना हवि पोंचव.

१०. हे वनस्पते (यूपा), ज्ञाता असा तूं दोरीनें बांधून अन्न देवादिकांकडे पोंचीव. देव (वनस्पतींतील) हवींचा आस्वाद घेवोत. तसेंच हवि देवाकडे पोंचवो. आणि आमचें स्तवन द्यावापृथ्वीकडून रक्षिलें जावो. (म्हणजे द्यावापृथ्वी आमचें रक्षण करो.)

११ हे अग्निदेवा, तूं आमच्या यज्ञाकरतां इंद्र, वरुण आणि मरुत् यांना द्युलोकांतून आणि अन्तरिक्षांतून आण. यज्ञार्ह असे ते आसनावर बसोत. मरणरहित असणारे ते देव स्वाहाकारानें तृप्त होवोत.

सूक्त एक्काहत्तरावें.

ऋषिः—बृहस्पति आंगिरस; देवता-(परब्रह्म) ज्ञान; छंदः—९ जगती, बाकी त्रिष्टुभ्.

१. (वेदार्थ न जाणणाऱ्या अज्ञांना पाहून बृहस्पति स्वतःला म्हणतो) हे बृहस्पते, नांव ठेवून प्रथमच उच्चारली जाणारी वाणी हे अग्र म्हणजे आश्चर्य होय. जें यांचें शुद्ध आणि पापरहित ज्ञान आहे तें गुप्त आहे, पण तें प्रेमानें प्रकट होतें.

२. सुपानें सातु शुद्ध केल्याप्रमाणें जेथें थोर लोक काळजीपूर्वक भाषण करतात, अशा ठिकाणींच मित्र मैत्री जोडतात. अशा लोकांच्या वाणींत कल्याणकारक (पद्धत) लक्ष्मी वास करीत असते.

३. थोर लोकांना तसें भाषण करण्याची पद्धति (शैली) यज्ञानें प्राप्त झाली. त्यांना ज्ञात्या ऋषींमध्यें ती आढळली. तिला घेऊन त्यांनीं ती सर्वत्र पसरवली. ती पद्धतच त्यांनीं गायत्र्यादि सात छंदांत गोवली.

४. (अज्ञाला) मनानें विचार करूनहि समजूं शकत नाहीं. ऐकूनहि (अर्थ न कळल्यामुळें) न ऐकल्यासारखें होतें. (पण ज्ञात्याला) पतीपुढें सुंदर वस्त्र परिधान केलेल्या आणि कामुक अशा स्त्रीप्रमाणें आपलें शरीर (भाषण) मोकळें करून दाखवतें.

५. यालाच सख्य करण्यास योग्य असें म्हणतात. वाणीचें सामर्थ्य प्रकट करण्यांत याची बरोबरी कोणीच करूं शकत नाहीं. (केवळपाठकाची निंदा–) अर्थरहित वाणीचें अध्ययन करणारा म्हणजे निष्फळ अवडंबर बरोबर घेऊन फिरणारा होय.

६. ज्यानें मित्रभूत,वेत्त्या उपकारकाला (वेदाला) सोडलें त्याच्या भाषणांत कांहीं मजा नसतें. जें हा दुसरें जाणत असतो, तें सर्व व्यर्थच असतें. त्याला कल्याणाचा मार्ग जाणतां येत नाहीं.

---

१ टीपः-- ऐ- आ. १. ३. ६. पहा.

७. डोळस आणि कानस असे मित्र ज्ञानांत सारखे नसतात. त्यांत कांहीं तोंडाइतकें पाणी असलेले, कांहीं काखेइतकें पाणी असलेलें, कांहीं स्नानयोग्य डोहासारखे ज्ञानदृष्टीनें कमीजास्त असतात.

८. समान योग्यतेचे ब्राह्मण मनानें निश्चित अशा अर्थाविषयीं एकमताचे असतात. ब्राह्मणांत ज्यांना ज्ञान नसतें असे पुष्कळ ब्राह्मण ज्ञानाकरतां फिरत असतात.

९. (वेदार्थ न जाणणारे) जे हे अलीकडे नाहींत आणि पलीकडे नाहींत ते ज्ञानी नव्हेत आणि सोमयागादि कर्मै करणारेहि नव्हेत. ते हे अज्ञ लोक (लौकिक) भाषेचा आश्रय करून पापी असे नांगर घेऊन शेतकी करतात.

१०. सारख्या योग्यतेचे सर्व सभ्य लोक आणि यशस्वी सोम यांनीं संतुष्ट होतात. पापनाशक आणि अन्नप्रापक सोम ह्यांना सामर्थ्य देण्यास समर्थ आहे.

११. एक स्तोता कर्मानुकूल अनेक ऋचा म्हणत असतो. शक्करी छंदांतील साम गातो. मुख्यत्वेंकरून कर्तव्य बोलतो. आणि यज्ञाचे भाग निर्माण करतो.

सूक्त बहात्तरावें.

ऋषिः—बृहस्पति लोकपुत्र किंवा आंगिरस बृहस्पति किंवा अदिति दक्षदुहिता; देवता—देवाः, छंदः—अनुष्टुभ्.

१. जो देवसंघ पूर्वीपासून आतांपर्यंत स्तोत्रांनीं स्तवन केलेला दिसतो, त्या देवाचे जन्म कसे झाले तें आम्ही स्पष्ट प्रकारें सांगतों.

२. बृहस्पति किंवा अदितीनें कुंभाराप्रमाणें ह्या देवांना उत्पन्न केलें. देवांच्या पूर्व युगांत असतापासून सत् उत्पन्न झालें आहे. (अव्यक्त ब्रह्मापासून व्यक्त देवादिक उत्पन्न झाले.)

३. देवांच्या पूर्व युगांत असतापासून सत् झालें. नंतर दिशा झाल्या. नंतर वृक्ष झाले.

४. वृक्षापासून पृथ्वी झाली. आणि पृथ्वीपासून दिशा उत्पन्न झाल्या. अदितीपासून दक्ष उत्पन्न झाला, आणि दक्षापासून अदिति उत्पन्न झाली.

५. हे दक्षा, तुझी जी मुलगी होती तीच अदिति होती. तिला अमर आणि पूजनीय असे देव झाले.

६. (आदित्यस्तुति) ज्यावेळीं हे देवहो, ह्या पाण्यांत तुम्ही व्यवस्थित राहिलांत, तेव्हां तेथें जणुं काय नाचत आहांत, अशा तुम्हांपासून प्रखर असा एक (आदित्य) वर आला.

७. जेव्हां हे देवहो, तुम्ही मेघाप्रमाणें सर्वत्र पसरलांत तेव्हां पाण्यांत गुप्त असलेला सूर्य बाहेर पडला.

८. आठ पुत्र जे आहेत ते अदितीच्या शरीरापासून झाले आहेत. ती सात पुत्रांसह देवांकडे गेली, आणि आठवा मार्तांड म्हणजे सूर्य वर टाकला.

९. सात पुत्रांसह अदिति पूर्वकालाकडे गेली. आणि प्राण्याच्या उत्पत्तिविनाशाकरतां मार्तांडाला (आकाशांत) धारण केला.

---

८ टीपः—अदितीचे आठ पुत्र मित्र, वरुण, धातृ, अर्यमन्, अंश, भग, विवस्वत्, आदित्य—अध्वर्यु ब्राह्मण.

सूक्त त्र्याहात्तरावें.

ऋषिः—गौरिवीति शक्तिपुत्र; देवता—मरुत्; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, बलाकरतां आणि शत्रूनाशाकरतां उग्र, स्तुत्य आणि महाअभिमानी असा तूं उत्पन्न झाला आहेस. जेव्हां तुझा गर्भ मातेनें धारण केला, त्या वेळीं देवांना इंद्रामुळें स्फुरण चढलें.

२. द्रोह करणाऱ्या इंद्राची सेनाहि जवळ आली. मरुतासहित असणाऱ्या इंद्राला स्तुतीनें आतिशय उत्साह उत्पन्न केला. मोठ्या तटानें वेष्टिलेल्या गाईप्रमाणें वेढा नष्ट झाल्याबरोबर उदकें बाहेर पडलीं.

३. हे इंद्रा, तुझे पाय मोठे आहेत (तूं जलद चालतोस). पण जेव्हां तूं चालूं लागतोस, तेव्हां ऋभूंना उत्साह प्राप्त होतो. जे दुसरे देव आहेत त्यांनाहि उत्साह प्राप्त होतो. हे इंद्रा, तूं हजार लांडगे तोंडांत धरतोस, तेव्हां अश्विनींनाहि स्फुरण चढतें.

४. हे इंद्रा, लढाईच्या घाईंताहि तूं यज्ञांत येतोस, त्या वेळीं अश्विनी तुझे मित्र असतात. तुझेजवळ हजारोंनीं धन आहे. हे शूरा, अश्विनीहि आम्हांला धन देवात.

५. यज्ञांतून जाणाऱ्या मित्रभूत मरुतांसह असणारा मद्युक्त इंद्र यजमानाला धन देतो. तो लोकांसह दस्यूंचीं कपटें नष्ट करण्याकरतां दस्यूंवर चालून गेला. कारण त्या चोरानें चांगली वृष्टि नष्ट केली होती आणि अंधार उत्पन्न केला होता.

६. तूं दोघा सारख्या नांवाच्या शत्रूंना ठार करतोस. जशी उषेची गाडी तूं मोडून टाकलीस, तसेंच वृत्राला ठार केलेंस. हे इंद्रा, तूं आपल्या तेजस्वी आणि

पराक्रमी मित्रांसह वृत्ताला ठार करण्याकरतां गेलास. तूं बळकट व रमणीय शरीरें ठार केलींस.

७. दुष्ट व धन लुबाडणाऱ्या नमुचीला ऋषीकरतां सामर्थ्यहीन करणारा तूं त्याला ठार केलेंस. तसेंच देवांमध्यें मनूकरतां तूं सुखकारक व सरळ जाणारे मार्ग निर्माण केलेस.

८. हे इंद्रा, तूं हीं उदकें पुरवतोस. हे सर्वसमर्था इंद्रा, हातांत तूं (वज्र) धारण करतोस, बलयुक्त अशा तुझी सर्व देव स्तुति करतात. तूं मेघ पालथे करतोस.

९. यांचें जें चाक पाण्यांत गाडलें गेलें आहे, त्यामुळें याचें मधुर पाणी झांकलें गेलें आहे. पृथ्वीवर जें तुझें पाणी असेल तें गाईत आणि ओषधींत तूं ठेव.

१०. हा सूर्यापासून झाला असें कांहीं लोक म्हणतात. मला वाटतें हा बलापासून झाला असावा. क्रोधापासून निर्माण झाला असेंही म्हणतात. तो राजवाड्यांत असतो. इंद्र कसा झाला तें इंद्रालाच ठाऊक !

११. यज्ञप्रिय, अतींद्रियद्रष्ट्या याचक आणि प्रेरक सूर्याचे किरण इंद्रापत प्राप्त झाले. हे इंद्रा, अंधार नष्ट कर. डोळ्यांना सामर्थ्य दे. पाशांनीं बांधलेल्याप्रमाणें आम्हांला सोडीव.

सूक्त चवऱ्याहत्तरावें.

ऋषिः—गौरिवीति शक्तिपुत्र; देवता–इंद्र; छंदः–त्रिष्टुभ्.

१. द्रव्यप्राप्तीकरतां कर्मानें, यज्ञांनीं, द्यावापृथ्वीवर असणाऱ्या देवमनुष्यांकडून दाता इंद्र बोलावला जातो. युद्ध चालूं असतां धनवान् आणि वेगशाली जे असतात त्यांना बोलावलें जातें. तसेंच सुप्रसिद्ध हिंसा करणारांकडून इंद्र बोलावला जातो.

२. ह्या अंगिरसांचें इंद्रप्रेरक आव्हान आकाशांत भरून जावो. जेथें गाई शोधणारे देव सूर्याप्रमाणें आपल्या तेजानें चमकत आहेत, तेथें देव अन्नेच्छु मनानें पृथ्वीवर येवोत.

३. ज्या देवांची यज्ञांत धनाकरतां याचना केली जाते,त्या देवांची ही स्तुति आहे. आमची स्तुति आणि यज्ञ यांचा उपभोग घेणारे देव आम्हांला पुष्कळ धन देवोत.

४. हे इंद्रा, ज्यांनीं गाईचा संघ हिसकला, ज्यांनीं एकदां पिकवलेली, अनेक (औषधी वगैरे) पुत्र असलेली, हजारो तऱ्हांनीं उत्पादक आणि विस्तृत अशी पृथ्वी उत्पादक केली, ते अंगिरस इंद्राची स्तुति करूं लागले.

५. हे कर्म करणारे भक्तहो, कोणालाहि न नमणारा, शत्रूंचें दमन करणारा, महान् आणि धनवान अशा इंद्राला आपल्या संरक्षणाकरतां बोलवा. ज्यानें गर्जना करीत लोकहितकारक वज्र हातांत घेतलें आहे त्याला बोलवा.

६. जेव्हां उत्साही वृत्राला इंद्र ठार करतो, आणि नगरभेत्ता व वृत्रहन्ता इंद्र पाण्यानें(पृथ्वी)भरून टाकतो, तो इंद्र शत्रूंचा पराभव करणारा आणि धनिक म्हणून ओळखला जातो. तो इंद्र जे तुम्ही इच्छितां तें करतो.

सूक्त पंचाहत्तरावें.

ऋषिः–सिंधुक्षित् प्रियमेधपुत्र; देवता–नदी; छंदः–जगती.

१. हे उदकांनो, तुमचें मोठें उत्कृष्ट स्तोत्र स्तुतिकर्ता विवस्वानाच्या घरीं म्हणत आहे. पृथ्वी, अंतरिक्ष आणि स्वर्ग अशा तीन ठिकाणीं विभागून सात सात अशा नद्या वाहतात.वाहणाऱ्यांत सिंधु बलानें सर्वांत श्रेष्ठ आहे.

२. हे सिंधो. ज्याअर्थी सुपीक अशा प्रदेशांतून तुझा प्रवाह गेला आहे, त्याअर्थी तुझे जाण्याचेहि मार्ग वरुणानें खोदले असले पाहिजेत. तसेंच तूं जमिनीच्या उंच शिखरावरून खालीं वहात येतेस. त्यामुळें तूं ह्या जगावर सत्ता चालवितेस.

३. तुझा जमिनीवरचा आवाज द्युलोकावर जातो. आपल्या लाटांनीं ही सिंधु आपलें अनंत सामर्थ्य प्रकट करीत असते. पाऊस मेघांच्या द्वारां जसा गर्जत असतो किंवा बैल ओरडत धांवत असतो तशी सिंधु नदी खळाळत असते.

४. हे सिंधो, आई पुत्राबरोबर जाते किंवा नुकतीच प्रसूत झालेली गाय वासरामागें जाते तसें इतर नद्या शब्द करीत सिंधूच्या मागें जातात. युद्ध करणाऱ्या राजाप्रमाणें तूं आपलें कडेपर्यंत पाणी पोंचवतेस. कारण ह्या नद्यांच्या पुढें तूं असतेस.

५. हे गंगे, यमुने, सरस्वति, शुतुद्रि[1], परुष्णि[2], आणि हे आसिक्नी[3]सहित असणारे मरुद्वृधे, हे वितस्ते[4]सहित व सुषोमेसहित असणारे आर्जीकीये, तुम्ही माझें स्तोत्र ऐका.

टीपः—१ सतलज, २ रावी, ३ चिनाव, ४ झेलम बाकी अनिश्चित.

६. हे सिंधो, तूं वाहात्या गोमतीला मिळण्याकरतां प्रथम तृष्टामा नदीला मिळालीस. नंतर तूं सुसर्तु, रसा, श्वेती, कुभा आणि मेहत्नु यांना मिळालीस. यांच्यासह तूं एका रथांत आरूढ झालीस.

७. सरळ वाहणारी, स्वच्छ आणि झकझकीत अशी सिंधु खूप वेगानें वहात असते. अदम्य सिंधु वेगवानांतली वेगवान् आहे. एखादी आश्चर्यकारक वेगशाली घोडी असावी, तसेंच एखादी देखणी स्त्री असावी त्याप्रमाणें सिंधु आहे.

८. चांगले घोडे, उत्तम रथ, सुंदर वस्त्रें, सोन्याचे डागिने, पुण्यशील, अन्न आणि लोकर उत्पन्न करणारी, दोऱ्या करण्याचें गवत असलेली, अशी सुंदर सिंधु नदी निर्गुंडी वगैरेचीं झाडेंहि आपल्या तीरावर धारण करते.

९. सिंधु सुंदर खिडक्यांचा आणि घोडे जोडलेला रथ जोडते. त्या रथांत बसून येऊन आम्हांला अन्न देवो. बळकट, कीर्तिमान् आणि मोठ्या अशा सिंधूच्या रथाची युद्धांत नेहमीं स्तुति केली जाते.

---

६ **टीपः**— १ काबूल नदी.

सूक्त शहात्तरावें.

ऋषिः—जरत्कर्ण इरावत्पुत्र सर्पजाति; देवता–सोमाभिषवग्रावदेवता; छंदः—जगती.

१. (हे सोम कुटणारे दगडहो,) उषःकाल झाला असतां मी तुम्हांला भूषित करतों. तुम्ही इंद्र, देव आणि द्यावापृथ्वी यांना व्यक्त करतां. बरोबर उत्पन्न झालेल्या द्यावापृथ्वी (ग्रावारूप) यज्ञगृहांत आमच्या धनानें उपयोगी पडोत.

२. हे दगडांनो, त्या श्रेष्ठ सोमाला तुम्ही कुटा. दगड हातांत घेतला असतां सोम काढणाराला घोड्याप्रमाणें खेचीत असतो. सोम पिळणारा सोमामुळें शत्रूंना पराभव करण्याचें सामर्थ्य मिळवतो. तसेंच धन प्राप्त करून देणारे घोडेहि सोम देतात.

३. ज्याप्रमाणें त्यानें जुन्या काळीं मनूला उत्कर्ष दिला, तसें ह्या दगडाचें कुटणें आमचे दोष दूर करो. गाई आणि घोडे यांचीं सोंगें घेऊन चाललेल्या त्वष्टृपुत्राच्या युद्धांत सोम कुटण्याच्या दगडांचा आश्रय करण्यांत आला होता.

४. हे दगडांनो, तुम्ही विध्वंसक राक्षसांना नष्ट करा. मृत्युदेवता निर्ऋतीला दूर करा. दुर्बुद्धीचा निषेध करा, आम्हांला सर्व प्रकारें उत्कृष्ट धन द्या. तसेंच देवप्रिय अशी कीर्ति द्या.

५. सूर्यापेक्षांहि बलवत्तर, विभूपेक्षांहि शीघ्र कर्म करणारे, वायूपेक्षांहि सोम काढण्याविषयीं वेगवान्, आणि अग्नीपेक्षांहि अन्न जलद तयार करणारेहो, ह्या दगडांची पूजा करा.

६. सोम कुटणारे यशस्वी दगड आम्हां करतां सोमरस काढून तयार करोत. ऋत्विज लोक स्तोत्रें म्हणत घाईनें मधुर सोमरस काढतात. तो आमच्या तेजस्वी स्तोत्रानें आम्हांला तेजस्वी करो.

७. घासले जाणारे दगड सोम कुटतात, स्तुति केले जाणारे दगड सोमरस काढतात. हवनाकरतां सोम पिळतात. ऋत्विज (अवशिष्ट) हवि भक्षण करतात.

८. हे ऋत्विज आणि दगडांनो, जे तुम्ही इंद्राकरतां सोम पिळतां, ते तुम्ही चांगलें कर्म करणारे व्हा. जें तुमच्याजवळ चांगल्यांत चांगलें धन असेल तें तेजस्वी इंद्राला द्या. जें तुमच्याजवळ धन असेल ते तुम्ही यजमानाला द्या.

सूक्त सत्याहत्तरावें.

ऋषिः—स्यूमरश्मि भृगुगोत्र; देवता–मरुत्;
छंदः–५ जगती, बाकी त्रिष्टुभ्.

१. मेघांतल्या पाण्याप्रमाणें मरुत् स्तोत्रें ऐकून धन देवोत. हविर्युक्त यज्ञाप्रमाणें ते जगाचे जाणते आहेत. मी ह्या थोर मरुद्गणाची अजून स्तुति केली नाहीं. शोभेकरतां सुद्धां स्तुति केली नाहीं. म्हणून मी आतां करतों आहें.

२. मर्त्यस्वरूप असणारे मरुत् शोभेकरतां दागिने घालतात. मरुतांच्या संघाचा अनेक सेनाहि पराभव करूं शकत नाहींत. गमनशील द्युदेवतेपासून उत्पन्न झालेले हे जात नाहींत. वाढणारे असूनहि हे अदितीचे पुत्र वाढत नाहींत. (आम्ही स्तुति केल्यामुळें असें होत आहे.)

३. जे, द्युलोक किंवा पृथ्वी यांच्यापेक्षांहि अन्तरिक्षाहून सूर्य मोठा आहे, त्याप्रमाणें आपल्या सामर्थ्यानें मोठे आहेत, बलवान् वीराप्रमाणें ज्यांना स्तुतीची इच्छा आहे, आणि हिंसक माणसाप्रमाणें जे उग्र आहेत, अशा—

४. हे मरुतहो, पाण्याच्या लोटाप्रमाणें तुमचा संघ जात असतां पृथ्वीला त्रास होत नाहीं किंवा पृथ्वी

शिथिल होत नाहीं. हा सुंदर हविरूप यज्ञ तुम्हांकरतां आणला आहे. अन्न देणाऱ्याप्रमाणें तुम्हीं आम्हांला सुखप्रद व्हा.

५. हे मरुत्‌हो, तम्ही गाडीला जोडलेल्या घोड्याप्रमाणें चला. तसेंच उषःकाल झाल्यावर तेजस्वी सूर्याप्रमाणें तेजोयुक्त व्हा. बाहिरी ससाण्याप्रमाणें स्वतःच पराक्रम करणारे आणि उग्र व्हा. प्रवाश्याप्रमाणें गाडींत बसा.

६. हे मरुत्‌हो, तुम्हीं जेव्हां फार लांबून येतां, तेव्हां तुम्हीं मोठें संरक्षक धन देतां. हे वसुहो, तुम्हीं गुप्त शत्रूंना लांब असतांच नष्ट करा.

७. जो यजमान यज्ञांत स्तोत्रें म्हणून झाल्यावर (हवि) मरुताप्रमाणें ऋत्विजांना देतो, त्या यजमानाला धन, संपत्ति आणि अन्न प्राप्त होतें. तो देवांच्याहि यज्ञांत जातो.

८. ते यज्ञार्ह यज्ञांत रक्षण केले जातात. ज्यांना आदित्याकडून सुख प्राप्त होतें, ते मरुत् आमचें संरक्षण करोत. जोरानें रथ हांकणारे आणि यज्ञांत पुष्कळ हवींची इच्छा करणारे ते आमच्या स्तुतीचें संरक्षण करोत.

सूक्त अठ्ठ्याहत्तरावें.

ऋषिः--स्यूमरश्मि भृगुगोत्र; देवता-मरुत्;छंदः-२, ५ ते ७-जगती, बाकी त्रिष्टुभ्.

१. ब्राह्मणाप्रमाणें मरुत् स्तुतीनें प्रसन्न होवोत. चांगलीं कर्में करणारे देवभक्त यज्ञांनीं जसे संतुष्ट होतात त्याप्रमाणें मरुत संतुष्ट होवोत. सुंदर नटलेल्या राजाप्रमाणें देखणे व गृहपतीप्रमाणें मरुत् निष्पाप आहेत.

२. जे मरुत् तेजानें अग्नीप्रमाणें, वक्षःस्थलावर अलंकार घातलेले, वाऱ्याप्रमाणें आपण होऊन भिडणारे आणि गमनशील, ज्ञानी माणसाप्रमाणें पूज्य, सुंदर नेत्र असलेले आणि सोमाप्रमाणें सुख देणारे आहेत, ते तुम्ही मरुत् यज्ञ करणाऱ्या यजमानाकडे जा.

३. वाऱ्याप्रमाणें शत्रला कापायला लावणारे, गमनशील, अग्नीच्या ज्वालेप्रमाणें तेजस्वी, कवच धारण केलेल्या योध्याप्रमाणें शौर्य गाजविणारे, बापाच्या सांगण्याप्रमाणें दानाला उत्तेजन देणारे जे मरुत् आहेत, ते आमच्या यज्ञांत येवोत.

४. जे रथांच्या आराप्रमाणें एकत्र असलेले, जिगीषु योध्याप्रमाणें चालून जाणारे, दात्या माणसाप्रमाणें (पाऊस पाडणारे) पाणी सोडणारे आणि भाटाप्रमाणें सुंदर शब्दयुक्त स्तोत्रें म्हणणारे मरुत् आहेत ते आमच्या यज्ञांत येवोत.

५. घोड्याप्रमाणें जे सुंदर आणि चलाख आहेत, धनिकाप्रमाणें रथयुक्त आणि दाते आहेत, पाण्याप्रमाणें सखल प्रदेशावरून पाण्याबरोबर जाणारे, अनेकरूपी अंगिरसाप्रमाणें साम गाणारे मरुत् आहेत ते आमच्या यज्ञांत येवोत.

६. उदक उत्पन्न करणाऱ्या मेघाप्रमाणें नद्या निर्माण करणारे, संहारक शस्त्राप्रमाणें जगाचा संहार करणारे, चांगल्या आईच्या मुलाप्रमाणें खेळाडू, जाणाऱ्या मोठ्या संघाप्रमाणें दिवट्या घेतलेले जे मरुत् आहेत ते आमच्या यज्ञांत येवोत.

७. उषःकालच्या किरणाप्रमाणें यज्ञाचे आश्रय, कल्याणेच्छु माणसाप्रमाणें दागिन्यांनीं चमकणारे, नद्याप्रमाणें सतत जाणारे,तेजस्वी, आयुधें घेतलेल्या लांबच्या प्रवाशाप्रमाणें वेगानें मार्ग आक्रमण करणारे मरुत् आमच्या यज्ञांत येवोत.

८. हे मरुतहो, आमच्या स्तोत्रानें आनंद पावणारे तुम्ही आम्हां स्तोत्यांना धन द्या व भाग्ययुक्त करा. तुम्हांला आमचें हें मित्रत्वाचें स्तोत्र पोंचो. तुम्हांला उद्देशून आमचीं दानें फार पुरातन कालापासून आहेत.

सूक्त एकोणऐंशीवें.

ऋषिः—सौचीकगुण अग्नि, वैश्वानरगुण अग्नि किंवा सप्ति वाजंभरपुत्र; देवता-अग्नि; छंदः—त्रिष्टुभ.

१. ह्या मर्त्य सृष्टींत अमर आणि थोर अग्नीचें महत्त्व मी पहात आहें. ह्याच्या अनेक ज्वाला न चावतांच सारख्या खूप खात असतात.

२. ह्या अग्नीचें डोकें (माणसाच्या) पोटांत असतें. यांचे डोळे (चंद्रसूर्यरूपानें) वेगळेंच आहेत. असा अग्नि न चावतांच वनेंचीं वनें गट्ट करीत असतो.

३. लहान मुलांप्रमाणें (तीं ज्याप्रमाणें दूध पिण्याकरतां आईकडे जातात तसें) पृथ्वीवरच्या लता इच्छिणारा आणि त्यांची अत्यंत गाडलेलीं मुळेंहि इच्छिणारा सारखा पुढें जात असतो. शिजलेल्या अन्नाप्रमाणें पृथ्वीवर उगवलेले वाळलेले वृक्ष खात असतो.

---

१. टीप-गृहपति प्रतिग्रह वगैरे घेण्याकरतां जात नसल्यामुळें निष्पाप.

४. हे द्यावापृथ्वीहो, तुम्हांला मी खरें सांगतों. अग्नि उत्पन्न झाला कीं, गर्भस्थ आहे तोंच आईला खातो. देवांचें आम्हां मर्त्यांना कांहीं ज्ञान नाहीं. खरोखर विविध आणि उत्कृष्ट ज्ञान असलेला अग्नि आहे.

५. जो ह्या अग्नीला ताबडतोब अन्न देतो आणि चांगल्या तुपानें हवन करतो व अग्नीला प्रदीप्त करतो, त्याला तो अग्नि हजारो ज्वालांनीं पहातो. हे अग्निदेवा, तूं आम्हांला सर्व बाजूंनीं अनुकूल आहेस.

६. हे अग्निदेवा, मला समजत नाहीं म्हणून मी तुला विचारतों कीं, तूं देवाविषयीं का राग व पाप केलेंस? कुन्हाड वेलीची खांडोळी करते तसें फिरत रमत खाद्य खात तूं आपलें खाद्य छिन्नाविच्छिन्न करीत असतोस.

७. दावाग्नि सर्वगामी, व्यापक आणि सरळ चढणाऱ्या लतांनीं वेष्टिलेल्या वृक्षांना खातो किंवा दावाग्नि आपल्या सर्वगामी घोड्यांना लांबलचक लगामांनीं रथाला जोडतो. सर्वांचीं शकलें उडवणारा अग्नि ज्वालांनीं प्रदीप्त होऊन लाकडामुळें सारखा धडाडत आहे.

सूक्त ऐंशीवें.

ऋषिः–सौचीक वैश्वानर (अग्नि); देवता–अग्नि; छंदः–त्रिष्टुभ्.

१. अग्नि अन्नदाता घोडा देतो. तसेंच अग्नि पराक्रमी पुत्र आणि लोकप्रसिद्ध कर्मनिष्ठा देतो. अग्नि द्यावापृथ्वीभर हिंडत असतो. तसेंच पराक्रमी पुत्र प्रसवणारी आणि गुणवान् अशी पत्नी देतो.

२. सेवा केल्या जाणाऱ्या अग्नीला दिलेली समिध आम्हांला हितप्रद होवो. अग्नि सर्व द्यावापृथ्वींत भरलेला आहे. अग्नि युद्धांत एकट्यालाहि उत्साह देतो. तसेंच अग्नि अनेक शत्रूंना ठार करतो.

३. अग्नीनें त्या जरत्कर्णाचें संरक्षण केलें. अग्नीनें पाण्यांतून काढून जरूथाला ठार केलें. तसेंच [1]तुरुगांत पडलेल्या अत्रीचें अग्नीनें संरक्षण केलें. तसेंच ह्या अग्नीनें नृमेधाला मुलें दिलीं.

४. उत्कृष्ट ज्वाला असलेला अग्नि धन देतो. जो अग्नि ऋषीला हजारो गाई देतो, तसेंच जो अग्नि स्वर्गांत हवि पोंचवितो, त्या अग्नीचीं शरीरें अनेक ठिकाणीं स्थापन केलीं जातात.

५. ऋषि स्तोत्रें म्हणून अग्नीची स्तुति करतात. युद्धांत त्रासलेले लोक अग्नीला शरण जातात. पक्षी अन्तरिक्षांत रात्रीं अग्नीला पहातात. अग्नि हजारो गाई प्राप्त करून देतो.

६. जे मनुष्यप्राणी आहेत, ते लोक अग्नीला स्तवितात. नहूष राजाची प्रजा अग्नीला स्तविते. यज्ञाला यथासांग करणारी भाषा अग्नि ऐकतो. अग्नीचा मार्ग तुपांत आहे.

७. स्तोते अग्नीचीं स्तोत्रें करतात. आम्ही थोर अग्नीची स्तुति करतों. हे तरुण अग्ने, स्तोत्याचें संरक्षण कर. हे अग्ने, आम्हांला पुष्कळ धन दे.

सूक्त एक्यांशीवें.

ऋषिः--विश्वकर्मन् भुवनपुत्र; देवता–विश्वकर्मन् ; छंदः–त्रिष्टुभ्.

१. ज्या विश्वकर्म्यानें ह्या सर्व जगाचा होम केला आणि हवन करणारा तो विश्वकर्ताहि अग्नींत आपलें स्वतःचें हवन करतां झाला, तो आशीर्वादार्थक मंत्रानें स्वर्ग इच्छिणारा अग्नींत शिरला.

२. आधार काय होता, कशाचें निर्माण केलें, हें कसें तयार झालें असावें! ज्या अर्थीं विश्वकर्म्यानें पृथ्वी आणि स्वर्ग स्वसामर्थ्यानें निर्माण केला आहे, त्याअर्थीं हें कसें केलें असावें ?

३. सर्वत्र पाहणारा,सर्वत्र तोंड असलेला, चहूंकडे हात असलेला आणि चहूंकडे पाय असलेला असा परमेश्वर बाहूंनीं जग उत्पन्न करतो आणि पायांनीं स्वर्ग उत्पन्न करतो. अशा प्रकारें द्यावाभूमी उत्पन्न करणारा देव एक आहे.

४. ज्यापासून द्यावापृथ्वी निर्माण झाली तो वृक्ष कोणचा बरें आणि कोणच्या वनांत उत्पन्न झाला? हे विद्वान् लोकहो, तुम्ही मनःपूर्वक याचा विचार करा व जेथें जग उत्पन्न केलें त्याचाहि मनांत विचार करा.

५. हे विश्वकर्म्या, जीं तुझीं उत्तम, मध्यम आणि अधम अशीं तीन शरीरें आहेत, तीं सर्व मित्रभूत अशा आम्हांला दे. हे स्वधायुक्त देवा, तूं आपलें शरीर वृद्धिंगत करून आमच्या शरीररूपी हवीचा स्वीकार कर.

---

३ टीपः—(१)१. ११६. ८ टीप पहा.

१ टीपः--विश्वकर्म्यानें सर्व प्राण्यांचा होम केला. शेवटीं स्वतःचाहि होम केला. त्याबद्दल ही ऋचा आहे. आख्यायिका शतपथ ब्रा. पहा–१३।७।१

६. हे विश्वकर्म्या,स्वतःच्या शरीररूपी हविर्द्रव्यानें वृद्धिंगत होणारा तूं द्यावापृथ्वींना संतुष्ट कर. दुसरे लोक (यज्ञ न करणारे) सर्व तऱ्हेनें वेडे होवोत. ह्या यज्ञांत धानिक असा तो विश्वकर्मा आम्हांला फल देणारा होवो.

७. मनोवेगानें जात असतां वाचस्पति विश्वकर्म्याला आम्ही आमच्या संरक्षणाकरतां यज्ञांत बोलावतों. त्यानें आमचीं सर्व हवनें सेवावींत. तो जगाला सुख देणारा आणि चांगलीं कृत्यें करणारा आहे.

सूक्त ब्यांयशीवें.

ऋषिः—विश्वकर्मन् भुवनपुत्र; देवता-विश्वकर्मन् ; छंदः-त्रिष्टुभ् .

१. शरीरोत्पादक व मनानें गंभीर असा विश्वकर्मा उदक आणि त्यांत डोलणारी द्यावापृथ्वी निर्माण करता झाला. आणि द्यावापृथ्वींचे प्राचीन असे कडेचे भाग दृढ झाले, तेव्हां द्यावापृथ्वी लोकांत प्रसिद्ध झाली.

२. सर्वकर्ता, सर्वज्ञानी, महान्,सर्व लहान मोठ्यांचा उत्पत्तिकर्ता व सर्वद्रष्टा असा परमेश्वर सप्तर्षींच्याहि पलीकडे आणि अद्वितिय स्वरूपांत जेथें रहातो असें म्हणतात, तेथें त्याचीं इंद्रियें परमानंद प्राप्त करतात.

३. जो आमचा पालनकर्ता, उत्पादक, फार काय सर्व जगाचा उत्पादक आहे, जो आमचें तेज जाणतो एवढेंच नव्हे तर सर्व जग जाणतो, जो देवांचींहि नांवें ठेवणारा एकमेवाद्वितीय, त्याला सर्व जग (कोण ईश्वर आहे असा) प्रश्न करतें.

४. ज्या महर्षींनीं स्थावर जंगमात्मक सृष्टि निश्चल असतांना हे सर्व प्राणी निर्माण केले, ते सर्व ऋषि, स्तोतें स्तोत्रांनीं स्तवितात, त्याप्रमाणें ह्या विश्वकर्म्याकरतां सर्व प्रकारच्या चरुपुरोडाशादिक पदार्थांचा होम करतात.

५. जें द्युलोकच्याहि पलीकडे, जें ह्या पृथ्वीच्याहि पलीकडे व जें देवासरांच्याहि पलीकडे आहे तें कोणतें बरें सर्वसंग्राहक पाण्यांत होतें कीं, ज्यामध्यें सर्व देव एकत्र दिसतात.

६. त्या विश्वकर्म्याच्या गर्भाला प्रथम पाण्यानें धारण केलें कीं, ज्या गर्भांत सर्व देव एकत्र झाले होते. ज्यांत सर्व भुवनें राहतात त्या मूळकारणापासून झालेल्या उदकांत त्यानें एक (ब्रह्मांड) निर्माण केलें.

७. हे लोकहो, ज्यानें हें सर्व निर्माण केलें त्याला तुम्ही जाणीत नाहीं. खरोखर तुमच्या अन्तर्गत ईश्वरतत्त्व कांहीं वेगळेंच आहे. बर्फानें आच्छादल्याप्रमाणें जड, बडबडे, पोटभरू असे पुष्कळ स्तोत्रपाठक फिरत असतात. (त्यांना तत्त्व काय कळणार ?)

सूक्त त्र्यांयशीवें.

ऋषिः—मन्यु तपसःपुत्र; देवता-मन्यु; छंदः—१ जगती, बाकी त्रिष्टुभ्.

१. हे मन्यो, हे वज्रासारख्या बळकटा आणि हे बाणासारख्या हिंसका, जो भक्त तुझी सेवा करतो तो बल आणि सामर्थ्य प्राप्त करतो आणि पुष्ट होतो. म्हणून आम्ही (बलिष्ठ आणि साहसी अशा) तुझ्या साहाय्यानें विध्वंसक आणि बलिष्ठ शत्रूंचा पराभव करतों.

२. मन्यु इंद्र आहे, मन्युच देव आहे, मन्यु हा होता, वरुण व अग्नि आहे. जे मनुष्यप्राणी आहेत ते सर्व मन्यूचीच स्तुति करतात. हे मन्यो, तपस् नांवाच्या आमच्या बापाशीं मैत्री असलेला तूं आमचें संरक्षण कर.

३. हे मन्यो, बलवानांतला बलवान् असा तूं ये. (माझ्या पित्याच्या) साहाय्यानें शत्रूला ठार कर. तसेंच शत्रुहन्ता, वृत्रसंहारक आणि दस्यूंचा क्षय करणारा तूं सर्व प्रकारचें धन आम्हांला दे.

४. हे मन्यो, पराभव करण्याचें सामर्थ्य असलेला स्वयंभू, क्रुद्ध, शत्रूंचा पराभव करणारा, सर्वद्रष्टा, सहनशील असा तूं आम्हांला युद्धांत सामर्थ्य दे.

५. हे ज्ञानी मन्यो, तुझ्या थोरपणासंबंधीं कर्म न करणारा मी पराभव पावून वाताहात झालेलाआहे. मी तुला तुझी सेवा न केल्यामुळें क्रोध उत्पन्न केला आहे. म्हणून माझ्या शरीरांत बल उत्पन्न करण्याकरतां तूं ये.

६. हे शत्रूंचे आघात सहन करणाऱ्या, आणि विश्वाधारा मन्यो, मी तुझा आहे. म्हणून तूं आमच्याकडे ये. हे वज्र धारण करणाऱ्या, माझ्याकडे वळ म्हणजे आपण शत्रूंना ठार करूं. आमचा तूं बांधव हो.

७. हे मन्यो, ये. माझ्या उजव्या बाजूस ऐस. म्हणजे मी पुष्कळ शत्रूंना ठार करीन. मी तुला मधुर आणि उत्कृष्ट असा सोमरस अर्पण करतों. तूं आणि मी असे आपण दोघे मुकाट्यानें पिऊं.

---

२ **टीपः**—सप्तर्षि-मरीचि, अत्रि, अंगिरस, पुलस्त्य, पुलह, क्रतु, वसिष्ठ.

सूक्त चवऱ्यांशीवें.

ऋषिः--मन्यु तपसःपुत्र; देवता-मन्यु; छंदः-१-३ त्रिष्टुभ्, बाकी जगती.

१. हे देवयुक्त मन्यो, तुझ्याबरोबर एका रथांत बसून जाणारे, प्रसन्न, धैर्यवान्, तीक्ष्ण बाणांचे, आयुधें पाजळणारे, अग्नीसारखे प्रखर देव (साहाय्यार्थ येवोत).

२. हे मन्यो, अग्नीप्रमाणें तेजस्वी असणारा तूं शत्रूंचा पराभव कर. सहनशील मन्यो, आम्ही युद्धांत बोलावलेला तूं आमचा सेनापति हो. तसेंच शत्रूंना ठार करून आम्हांला धन दे. तसेंच आम्हांला बल देणारा तूं शत्रूंचा नाश कर.

३. हे मन्यो, आमच्यावर चालून येणाऱ्या शत्रूंचा पराभव कर. त्रास देऊन, चिरडून तूं शत्रूला ठार कर. तुझ्या उग्र सामर्थ्याला कोण आडवूं शकणार आहे? हे एकाकिन्, तूं शत्रूंना वश करतोस.

४. हे मन्यो, अनेक शत्रूंच्या पुढें प्रशंसनीय असा तूं एकटा असतोस. आमच्या युद्धाकरतां आमचे लोक जय्यत तयार असोत. हे अखंडकान्ति मन्यो, तुझ्या साहाय्यानें जय प्राप्त व्हावा म्हणून मी गंभीर जयघोष करतों.

५. हे मन्यो, इंद्राप्रमाणें विजय करणारा आणि स्तुत्य, असा तूं आमचें विशेषेंकरून येथें रक्षण कर. हे सहनशीला, ज्यामुळें तूं प्रकट होतोस व बल देणारा म्हणून आम्ही जाणतों, तें तुझें प्रिय असणारें स्तोत्र आम्ही म्हणतों.

६. हे वज्रासारख्या बळकट असणाऱ्या आणि बाणासारख्या तीक्ष्ण असणाऱ्या मन्यो, पराभवाबरोबरच उत्पन्न झालेला तूं अत्यंत बलवान् आहेस. हे बहुस्तुता मन्यो, आमच्या कृत्यानें तूं आमच्यावर लढाई सुरू झाली असतां कृपादृष्टि असूं दे.

७. उभय प्रकारचें धन आम्हांला वरुण व मन्यू देवोत. पराजय पावलेले व हृदयांत धडकी भरलेले शत्रू नष्ट होवोत.

सूक्त पंचाऐंशीवें.

ऋषिः--सूर्या; देवता-१, ५ सोम, ६ ते १६ सूर्याविवाह, १७ देव, १८ सोम व अर्क, १९ चन्द्रमा, २० ते २८ आशीर्वादार्थक, २९ व ३० वासोनिन्दा, ३१ क्षयरोगनाशिनी, ३२ ते ४७ सूर्यादेवता; छंदः-१४, १९, २०, २१, २३, २४, २६, ३६, ३७, ४४ त्रिष्टुभ्, १८ २७, ४३ जगती, ३४ उरोबृहती, बाकी अनुष्टुभ्.

१. सत्यानें पृथ्वीला धारण केलें आहे. सूर्यानें स्वर्गाला आधार दिला आहे. यज्ञानें देवांना जगविलें आहे. आणि सोम सर्वांच्यावर स्वर्गांत आहे.

२. सोमामुळें देव बलवान् आहेत. सोमामुळें पृथ्वीचा मोठेपणा आहे. म्हणून ह्या नक्षत्रांच्या मध्यें सोमाची स्थापना केली आहे.

३. जी ओषधी पिळून काढतात तिला पिणारे सोम मानतात. खरोखर ब्राह्मण जो सोम जाणतात त्याला कोणी खात नाहीं.

४. हे सोमा, गुप्तविधानांनीं रक्षण केलेला, बार्हत गण (स्वान, भ्राज, अंघार्य इत्यादि) यांनीं रक्षिलेला तूं, कुटणाऱ्या दगडांचा ध्वनि ऐकतच राहतोस. त्याला पृथ्वीवरचे लोक खात नाहींत.

५. हे सोमदेवा, ज्या वेळीं तुला लोक पितात त्या वेळीं तूं पुनः पुनः प्याला जातोस. जसें वर्ष पुरें करणारे महिने असतात त्याप्रमाणें वायु सोमाचा रक्षणकर्ता आहे.

६. रैभी (कांहीं मंत्र) पाठराखणी होती. नाराशंसी (ऋचा) दासी होती. सूर्येचें वस्त्र चांगलेंच होतें आणि तें गाथेनें सुशोभित केलेलें होतें तेथें ती आली.

७. ज्या वेळीं सूर्या पतीच्या घरीं गेली त्या वेळीं विचार गिर्दी होता, डोळ्याला काजळ होतें, आकाश आणि पृथ्वी तिचा खजिना होता.

८. सूक्तें उभ्या खांबाचीं आडवीं दांडकीं होतीं. कुरीर नांवाच्या छंदानें गाडी सुशोभित केली होती. दोघे अश्विनी पति होते. अग्नि यांचा पुढारी होता.

९. जेव्हां पतीची इच्छा करणाऱ्या सूर्येला सविता मनःपूर्वक पतीला देता झाला, तेव्हां सोम कन्येच्छु होता. अश्विनी पति होते.

१०. ज्या वेळीं सूर्या नवऱ्याच्या घरीं गेली त्या वेळीं सूर्येचा रथ मनाचा होता. आकाशाचें छत्र होतें आणि (सूर्यचन्द्ररूपी) तेजस्वी बैल ओढणारे होते.

११. हे सूर्ये देवि, ऋग्वेद आणि सामवेदरूपी दोघांनीं बांधलेले (हे चन्द्रसूर्यरूपी) बैल शान्त होते (मनोरथ ओढून नेत आहेत.) तुझें कान चाकें आहेत आणि रथाचा मार्ग आकाशांत अत्यंत अस्थिर होता.

---

६. **टीपः**--रैभी व नाराशंसी (१. १२५. १.) हे मंत्र आहेत.

१२. जाणाऱ्या सूर्येच्या रथाचीं चाकें (कान) होतीं आख वायु होता. पतीकडे जाणारी सूर्या मनोमय रथांत आरूढ झाली.

१३. सूर्यानें जो आहेर सोमाकरतां दिलेला होता तो सूर्येच्या पूर्वींच रवाना झाला होता. मघा नक्षत्रावर गाई हाणल्या जातात आणि फाल्गुनीवर (कन्या) पोंचविली जाते.

१४. हे अश्विनीहो, तीन चाकी रथानें सूर्येच्या विवाहाबद्दल विचारण्याकरतां तुम्ही ज्या वेळीं आला होता त्या वेळीं सर्व देवांनीं तुम्हांला संमति दिली होती. अश्विनीचा पुत्र पूषा यांनींही कबूल केलें होतें.

१५. हे अश्विनीहो, सूर्येला भेटण्याकरतां सवित्याकडे ज्या वेळीं तुम्ही आला होता, त्यावेळीं तुमच्या रथाचें एक चाक कोठें होतें आणि सूर्येच्या दानाला प्रवृत्त झालेला होता त्या वेळीं तुम्ही कोठें रहात होता?

१६. हे सूर्ये, तुझीं दोन चंद्रसूर्यात्मक चाकें प्रत्येक ऋतूंत ब्राह्मण जाणीत होते. त्यांपैकीं एक तिसरें चाक जें गुप्त होतें तें फक्त शहाणे लोक जाणीत होते.

१७. सूर्येला, देवांना, मित्राला, वरुणाला आणि जे प्राणिमात्राला हितप्रद त्यांना मी नमस्कार करतों.

१८. पूर्व व पश्चिम दिग्भागांत स्वतःच्या तेजानें मुलासारखे क्रीडा करणारे हे चन्द्रसूर्य यज्ञांत येतात. त्यांपैकीं एक सर्व जगाकडे पहातो. आणि दुसरा ऋतु निर्माण करीत पुनः उत्पन्न होतो.

१९. हा चंद्र दररोज नवानवा असा उत्पन्न होतो. दिवसांचा सूचक असा सूर्य उषेच्या पुढें येतो. आणि येणारा देवांना हविर्भाग देतो. आणि दीर्घायुष्य वाढवितो.

२०. हे सूर्ये, शाल्मलिवृक्षाचा आणि रेशमीवस्त्रानें वेष्टिलेला, नाना आकार असलेला, चांगल्या चाकाचा आणि चांगला चालणारा असा हा रथ आहे. यांमध्यें तूं बस, व अमृतरूप, सुखकर अशा सोमाला प्राप्त कर.

२१. हे विश्वावसो, ही कन्या पतीनें युक्त झाली आहे. म्हणून तूं कन्येजवळून ऊठ. विश्वावसूला नमस्कार करून आणि स्तुति करून मी स्तावितों. बापाच्या घरीं असलेली अशी अविवाहित दुसरी मुलगी पाहून तिची इच्छा कर. तो तुझा भाग आहे. ती जन्मापासून तुझी आहे असें समज.

२२. म्हणून हे विश्वावसो, येथून ऊठ. मी नमस्कार करून स्तावितों. तूं एखाद्या जास्त प्रौढ स्त्रीची इच्छा कर. मला नवऱ्याशीं युक्त कर.

२३. हे देवहो, ज्या मार्गानें आम्हां वराकडचे लोक कन्यापित्याकडे जातात ते मार्ग निष्कंटक आणि सरळ असोत. अर्यमा आणि भग आम्हाला चांगल्या प्रकारें पोंचवो. हे देवहो, हें नवराबायकोचें जोडपें चांगलें जोडपें असो.

२४. हे वधू, ज्यायोगें सुखी सविता (पाशानें) बांधिता झाला त्या वरुणाच्या पाशापासून तुला मी मुक्त करतों. यज्ञस्थान अशा भूमीवर सुरक्षित अशा तुला पतीशीं युक्त करतों.

२५. मी तुला पितृकुलांतून मुक्त करतों. पण भर्तृकुलांतून मुक्त करीत नाहीं. तुला नवऱ्याच्या घरीं सुसंबद्ध करून टाकतों. हे बलिष्ठ इंद्रा, ही स्त्री ज्यायोगें पुत्रवती आणि भाग्यशाली होईल असें तूं कर.

२६. हात धरून पूषा तुला पोंचवो. अश्विनी तुला रथानें घेऊन जावोत. तं घरीं जा आणि घराची मालकीण हो. सर्वांना ताब्यांत ठेवणारी तूं घराशीं (घरांतील लोकांशीं) आपलेपणानें बोल.

२७. हे मुली, तुझा पतिगृहीं मुलाबाळांनीं उत्कर्ष होवो. ह्या घरांत घरधनिणपणाविषयीं तूं जागृत रहा. ह्या पतीशीं तूं युक्त अस. या घरांत म्हातारी झाली असें म्हटली जा.

२८. अभिचारदेवता कृत्या तांबडीनिळी आहे. अशी कृत्या वधूच्या शरीरांत राहते. तीस मी घालवितो. ती कृत्या गेली म्हणजे वधूचा संसार वाढतो व पतीचें लक्ष संसारांत वेधतें.

२९. हें शारिरीक मलानें बळकट असणारें वस्त्र टाकून दे. (प्रायश्चित्तार्थ) ब्राह्मणांना धन दे. ही मळकट वस्त्ररूपी कृत्या पादयुक्त होऊन बायकोरूपानें नवऱ्याच्या शरीरांत प्रवेश करिते.

३०. पति जर वधूच्या वस्त्रानें आपलें अंग झाकूं इच्छील तर ह्या दुष्टेच्या (कृत्येच्या) संगतीनें त्याचें तेजस्वी शरीर निस्तेज (रोगी) होईल.

३१. वधूकडून किंवा वधूकडच्या लोकांकडून जे रोग तेजःपुंज नवऱ्याकडे येतील त्या सर्व रोगांना यज्ञीय देव जेथून आले तेथें परत नेऊन पोंचवोत.

---

१३ टीप:—अहेर म्हणून गाई प्रथम मघा नक्षत्रावर पोंचविल्या आणि नंतर फाल्गुनीवर मुलगी पोचविली असें दिसतें.

३२. जे वाटमारे नवराबायकोवर चालून येत आहेत, त्यांना नवरा बायको न सांपडोत. ते सोप्या मार्गांनीं वाईट प्रदेशांत जाऊन पडोत. शत्रू दूर पळून जावोत.

३३. ही वधू शुभप्रद आहे. हिच्याकडे या. ह्या मुलीला पहा. भेटून पाहून आशीर्वाद द्या आणि नंतर घरीं परत जा.

३४. हें वधूवस्त्र दाहक, व घाणेरडें आहे. हें वाईट स्थितींत आहे. हें विषासारखें आहे. याचा कांहीं उपयोग नाहीं. जो ब्राह्मण सूर्येला चांगल्याप्रकारें जाणील, तोच वधूवस्त्राला योग्य आहे.

३५. आशसन (झालर), विशसन (शिरोभूषण) आणि अधिविकर्तन (तीन भागांचा झगा) अशीं तीन तऱ्हेचीं वस्त्रें नेसलेलीं सूर्येचीं रूपें तूं पहा. तीं ब्राह्मणच शुद्ध करूं शकतो.

३६. हे वधू, मी तुझा हात ऐश्वर्यासाठीं ग्रहण करतों. मज पतीबरोबर तूं वृद्ध होईपर्यंत अस. भग, अर्यमा, सविता आणि पुरंधी (उषा) या देवतांनीं मला गृहस्थपणा प्राप्त व्हावा म्हणून तुला माझ्या स्वाधीन केली आहे.

३७. हे पूषन्, जी आमच्या मांड्यांच्या संभोगाची इच्छा करते आणि कामुक असणारे जिचें ठिकाणीं लिंगाघात करतात आणि जिचे ठिकाणीं मनुष्य रेतःस्खलन करतात, त्या अत्यंत सुंदर स्त्रीचें मन आमच्याकडे वळीव.

३८. हे अग्ने, गंधर्वानें सूर्या नजराण्यासह तुला प्रथम दिली, (नंतर तूं सोमास दिलीस) त्याप्रमाणें सध्यांहि फिरून ही स्त्री तूं प्रजेसह पतीला द्यावीस.

३९. अग्नीनें फिरून आयुष्य व तेज यांसह दिली. हिचा जो पति तो दीर्घायुषी होत्साता शंभर वर्षें जगो.

४०. प्रथम सोम, नंतर गंधर्व, तिसरा अग्नि, चवथा मनुष्य हा पति, तिला प्राप्त करतो आहे.

४१. सोमानें गंधर्वाला दिली, गंधर्व अग्नीला देता झाला, आणि अग्नि ही कन्या संततिसंपत्तीसह मला देवो.

४२. तुम्ही याच लोकीं असा, वियुक्त होऊं नका. संपूर्ण आयुष्य उपभोगा. पुत्रांशीं क्रीडा करणारे आणि नातवांनीं आनंदित असे तुम्ही स्वतःच्या घरीं असा.

४३. प्रजापति आम्हांला संतति देवो. अर्यमा आम्हांला म्हातारपण देवो. शुभ अशी तूं पतिसन्निध अस. आमच्या आप्तेष्टांना आणि जनावरांना सुख देणारी हो.

४४. हे वधू, तूं शांतदृष्टीची हो, पतीला घातक होऊं नकोस. पशूंना हितकर अस. तुझ्या मनांत चांगले विचार असूं दे. आणि तं तेजस्वी अस. वीर प्रसवणारी, श्रद्धाळू आणि माझ्या आप्तेष्टांना आणि पशूंना सुख देणारी हो.

४५. हे इंद्रा, तूं ह्या मुलीला पुत्रयुक्त आणि भाग्यशाली कर. हिला दहा मुलगे आणि अकरावा पति असा संसार असलेली कर.

४६. हे वधू, तूं सासूसासरे, दीरनणंदा यांच्यावर छाप ठेवणारी हो.

४७. सर्व देव तुमचीं मनें एक विचारानें युक्त करोत. उदक, वायु, धाता हे सर्व तुमचीं मनें जुळवोत आणि सरस्वतीहि तसेंच करो.

सूक्त शयांयशींवें.

ऋषिः—इंद्र, इंद्राणी व वृषाकपि; देवता-इंद्र, इंद्राणी व वृषाकपि; छंदः—पंक्ति.

१. इंद्र म्हणतो.—सोमाकरतां याग करावयास लावलेल्या स्तोत्यांनीं इंद्राची स्तुति केली नाहीं. (वृषाकपीची स्तुति केली.) जरी माझा मित्र श्रेष्ठ वृषाकपि सोम पिऊन आनंदित झाला तरी सर्वांपेक्षां इंद्र श्रेष्ठ आहे.

२. इंद्राणी म्हणते–हे इंद्रा, तूं अत्यंत त्रास घेऊनहि वृषाकपीवर चालून जातोस. दुसरीकडे सोमपानाकरतांहि जात नाहींस. खरोखर इंद्र सर्वांत श्रेष्ठ आहे.

३. हे इंद्रा, तुझें ह्या काळसर वृषाकपीनें काय हित केलें आहे कीं, ज्याला तूं एखाद्या उदार माणसाप्रमाणें धन देतोस? खरोखर तूं सर्वांत श्रेष्ठ आहेस.

४. हे इंद्रा, ज्या तुझ्या प्रिय असणाऱ्या वृषाकपीचें सर्व प्रकारें संरक्षण करतोस, त्याचा कान डुकरावर चालून जाणाऱ्या कुत्र्यानें धरावा आणि त्याला खाऊन टाकावें. कारण इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

५. मला तूप घालून दिलेलीं व प्रिय असणारीं खाद्यें वानरानें अपवित्र केलीं. म्हणून ह्याचें डोकें मी तोडीन आणि दुष्कृत्य करणाऱ्या याला सुख देणार नाहीं. इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

६. माझ्यासारखी सुंदर कोणी नाहीं आणि माझ्यासारखी सुखी कोणी नाहीं. माझ्यासारखी संभोग घेणारी आणि संभोगाच्या वेळीं मांड्या वर करणारी कोणी नाहीं. इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

७. (इंद्राणीनें अशा शिव्या दिलेला वृषाकपि म्हणतो) हे चांगला पति मिळालेले आई, जसें तूं

म्हणतेस तसें होवो. हे आई, माझ्या पित्यास तुझें भग, मांड्या आणि डोकें एखाद्या पक्ष्याप्रमाणें सुखदायक होवो.

८. (रागावलेल्या इंद्राणीस इंद्र शांत करतो.) हे सुंदर हाताचे, हे सुंदर अंगुली असलेल, हे सुकेशि, सुजघने व शूरपत्नी, तूं आमच्या वृषाकपीवर कां रागावतेस? (ज्याचा पिता मी) सर्व जगांत श्रेष्ठ आहे.

९. (पुनः इंद्राला इंद्राणी म्हणते) एखाद्या घातुक प्राण्याप्रमाणें असणारा हा वृषाकपि मला वांझेसारखी मानतो इंद्राची पत्नी असणारी मी पुत्रवती मरुतांचें साहाय्य असलेली अशी आहें. (माझा पति) इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

१०. सत्यप्रतिपादक आणि पुत्रवती असणारी इंद्राची पत्नी मी पूर्वी मोठ्या संग्रामांत गेलें आहें. म्हणूनच माझी सर्वत्र स्तुति चाललेली असते. (माझा पति) इंद्र सर्व श्रेष्ठ आहे.

११. (इंद्राणीला वृषाकपि म्हणतो.) प्रसिद्ध स्त्रियांत इंद्राणीला मी मोठी भाग्यशाली म्हणून ऐकतों आहें. कारण हिचा पति दुसऱ्याप्रमाणें म्हातारपणानें मरत नाहीं. कारण तो सर्वश्रेष्ठ आहे.

१२. इंद्र म्हणतो--हे इंद्राणि, माझा मित्र जो वषाकपि त्याशिवाय मला करमत नाहीं. कारण वृषाकपीला दिलेले हे हवि देवांमध्यें मला मिळतात. कारण मी सर्वश्रेष्ठ आहे.

१३. वृषाकपि म्हणतो.--हे वृषाकपीची आई, धनवान्, पुत्रयुक्त आणि गुणवान् हे इंद्राणि, तुझा बलवान् इंद्र पशूंना ताबडतोब खाऊन टाको. तुला हवि सुखकर आणि प्रिय होऊं दे. इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

१४. इंद्र म्हणतो --भक्त माझ्याकरतां पंधरा वीस बैल शिजवितात. मी खातों आणि लठ्ठ होतों. माझ्या दोन्ही कुशी सोमांनीं भरून टाकतात. मी सर्वश्रेष्ठ आहे.

१५. इंद्राणी म्हणते.- तीक्ष्णशिंगी बैल जसा कळपांत ओरडत (गाईंना रमवतो त्याप्रमाणें तूं मला रमव.) हे इंद्रा, तुझ्या हृदयाला घुसळणें सुखकारक होवो, तुझ्याकरतां प्रेमळ इंद्राणी जो सोम काढते, तो तुला सुखकारक होवो. इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

१६. हे इंद्रा, ज्याचें लिंग दोन्ही मांड्यांच्या मध्यें लोंबत असतें तो (मैथुन करण्यास) असमर्थ असतो. तो मनुष्य मैथुन करूं शकतो कीं निजलें असतां ज्याचें लिंग ताठतें. इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

१७. (इंद्र इंद्राणीला म्हणतो) तो मनुष्य मैथुन करूं शकत नाहीं कीं निजलें असतां ज्याचें लिंग ताठ होतें. ज्याचें लिंग दोनही मांड्यांच्या मध्यें लोंबतें तो मनुष्य मैथुन करूं शकतो. इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

१८. वृषाकपि म्हणतो.- हे इंद्रा, हा वृषाकपि अलभ्य प्राप्त करो. तसेंच शस्त्र, पळी, ताजा भात आणि लाकडांनीं भरलेली गाडी मिळवो. इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

१९. इंद्र म्हणतो.-दास आणि आर्य यांना पाहून वेगळे करणारा हा मी येत आहे. पक्का सोम पिळणाऱ्याचा सोम मी पितों. आणि बुद्धिमान् यजमानाकडे लक्ष देतों. तो मी इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

२०. पाणी नसलेलें आणि कापून तयार केलेलें तें कितीक योजनें असणार आहे! म्हणून हे वृषकपे, जवळच असणाऱ्या त्या भागांतून आमच्या घरीं ये.आणि घरांत रहा. इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

२१. (येऊन परत गेलेल्या वृषाकपीला इंद्र म्हणतो) हे वृषाकपे, तूं पुनः परत ये. आम्ही दोघे तुझी चांगली व्यवस्था करूं. जो तूं झोंप मोडणारा आहेस तो तूं पुनः (सरळ) रस्त्यानें घरीं येशील. इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

२२. (पुनः आलेल्या वृषाकपीला इंद्र म्हणतो) हे ऐश्वर्यवान् वृषाकपे, तूं उडी मारून माझ्या घरीं आलास. गोडगोड पदार्थ खाणारा तूं (आजपर्यंत) कोठें होतास ? लोकांना आनंद देणारा तूं कोणच्या देशाला गेला होतास ? इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

२३. (इंद्रानें सोडलेल्या वृषाकपीनें इच्छा प्रदर्शित केली आहे.) पर्शु नांवाची मनूची मुलगी एकदम पोरें प्रसवती झाली. जिच्या पोटांत इतकीं पोरें पोसलीं तिचें कल्याण झालें. (तसें माझें होवो.) इंद्र सर्वश्रेष्ठ आहे.

---

१ **टीप**--माधवभट्टाच्या मतानें ही ऋचा इंद्राणीचें म्हणणें आहे. तिला देण्याकरतां तयार केलेला हवि वृषाकपीनें-इंद्राच्या मुलांपैकीं एकानें-अपवित्र केला. त्यावेळीं इंद्राणी इंद्राला म्हणतेः--सोम काढून तयार आहे. पण जेथें वृषाकपि धनाढ्य झाल्यामुळें माजला आहे, तेथें इंद्राची स्तुति स्तोते करीत नाहींत. खरोखर माझा इंद्र सर्व जगांत श्रेष्ठ आहे.

वृषाकपि हें इंद्राणीचें पाळलेलें माकड होतें असें म्हणतात. ११--१२ सायणचार्यांनीं इंद्राचें म्हणणें म्हणूनहि ह्या ऋचेचा अर्थ दिला आहे.

लो० टिळकांनीं या सूक्ताचें भाषांतर निराळ्या दृष्टीनें केलें आहे. त्यांचें म्हणणें असें आहे कीं 'विश्वस्मादिंद्र उत्तरः' याचा अर्थ इंद्र सर्वश्रेष्ठ असा करणें बरोबर नसून इंद्र विश्वाच्या उत्तर भागांत राहतो हाच अर्थ युक्त होय. तसेंच वृषाकपि हें नांव सूर्याला उद्देशून घातलें आहे. ज्या वेळीं सूर्य कर्क वृत्तांत जातो, म्हणजे दक्षिणायनाला आरंभ होतो, त्या वेळीं, इंद्र विश्वाच्या उत्तर भागांत राहात असल्याकारणानें तेथील यज्ञयाग बंद पडतात. व मकरवृत्तांत सूर्य पुन्हा आला म्हणजे उत्तरायणाला सुरवात झाली कीं पुन्हा यज्ञयागास सुरुवात होते. २२ व्या ऋचेंत असें म्हटलें आहे कीं हे वृषाकपि, तूं पुन्हा परत येशील तेव्हा तो महापापी मृग कोठें असेल? याचें कारण असें कीं ज्यावेळीं सूर्य उत्तरायणांत जातो, त्यावेळीं मृगशीर्ष नक्षत्र तेथें दिसेनासें होतें. यावरून ऋग्वेदकाळीं आर्यांची मूळ वसती विश्वाच्या उत्तर भागांत होती असा लो० टिळकांनीं सिद्धांत बांधला आहे.

१६,१७ **टीप**-पूर्वींच्या ऋचेंत मैथुनाची इच्छा करणारी इंद्राणी इंद्राला म्हणत होती. आतां मैथुनेच्छा नसलेला इंद्र इंद्राणीला म्हणत आहे. असें असल्यामुळें विरोध नाहीं.

सूक्त सत्त्यांयशीवें.

ऋषिः-पायु भारद्वाज; देवता-रक्षोहा अग्नि; छंदः-२२ ते २५ अनुष्टुभ्, बाकी त्रिष्टुभ्.

१. मी राक्षसांना मारणारा व यज्ञ करणाऱ्यांचा सखा, अशा बलवान् अग्नीला, घृतानें प्रदीप्त करितों आणि विस्तृत सुखाचा अनुभव घेतों. हा अग्नि आपल्या ज्वाला प्रखर करून यज्ञांनीं अधिक प्रदीप्त होतो. हा आमचें रात्रंदिवस राक्षसांपासून रक्षण करो.

२. हे ज्ञानवान् अग्ने, तूं देदीप्यमान व तीक्ष्ण दाढांनीं युक्त होऊन राक्षसांना आपल्या ज्वालेनें जाळ आणि त्यांना जिव्हारूपी ज्वालेनें आक्रमण करून त्या मांसभक्षकांना तोंडांत टाकून झोंकून टाक, (म्हणजे गिळून टाक.)

३. वरच्या व खालच्या दाढा असणाऱ्या हे अग्ने, तूं राक्षसांचा हिंसक आहेस. म्हणून आपल्या त्या दाढा प्रखर करून राक्षसांना मारण्याकडे त्यांचा उपयोग कर आणि सांप्रत असलेल्या व पुढें होणाऱ्या जीवांचें रक्षण कर. हे प्रदीप्त अग्ने, तूं अंतरिक्षांत असलेल्या राक्षसांकडेहि जा, व त्यांना आपल्या दाढांनीं चावून टाक.

४. हे अग्ने, आमच्या यज्ञांनीं व स्तुतींनीं तूं संतुष्ट होऊन खालीं तोंडें करून ठेविलेले आपले बाण सरळ कर; आणि त्यांचीं टोकें उजळून प्रखर कर; व ते राक्षसांच्या हृदयांवर मार. त्यानंतर या राक्षसांचें जें मंडळ युद्धाला येईल त्याचेहि हात तोड.

५. हे ज्ञानवान् अग्ने! तूं राक्षसांची चामडी लोळव. तुझें वज्र आपल्या सामर्थ्यानें या राक्षसांस मारो! मग तूं त्यांचे सांधे तोड. अशा रीतीनें विच्छिन्न झालेल्या राक्षसांना, मांस खाणारा लांडगा वगैरे प्राणी खाऊन टाकोत.

६. हे बुद्धिमान् अग्ने, तूं पृथ्वीवर राहणाऱ्या व फिरणाऱ्या किंवा आकाशमार्गानें जाणाऱ्या, ज्या ज्या राक्षसाला सांप्रत पहात असशील, त्याला त्याला आपले बाण तीक्ष्ण करून मार; कारण तूं शरसंधान करणारा आहेस.

७. तसेंच हे अग्ने, स्वतः यज्ञाचा आरंभ करणाऱ्या मला मारण्यासाठीं येणाऱ्या राक्षसांपासून तूं आपल्या 'ऋष्टि' नांवाच्या आयुधांनीं माझें रक्षण कर; आणि तूं प्रज्वलित होऊन मला मारण्यासाठीं उद्युक्त झालेल्या राक्षसांस ठार मार; कारण तूं तसें करणाऱ्यांत श्रेष्ठ आहेस; आणि त्या दुष्टांस कच्चें मांस खाणारे प्राणी खाऊन टाकोत.

८. हे तरुण अग्ने, जो राक्षस अथवा पिशाच्च माझ्या यज्ञांत विघ्न करीत असेल, त्याला आपल्या तेजानें मारण्यासाठीं तूं आपल्याकडे घेऊन जाळून टाक.

९. हे ज्ञानसंपन्न व मनुष्यांना अवलोकन करणाऱ्या अग्निदेवा, आपल्या तीक्ष्ण तेजानें आमच्या यज्ञाचें रक्षण कर, व हा यज्ञ आम्हांस धनधान्य देईल असें कर. तूं प्रदीप्त असणारा व राक्षसांना मारणारा आहेस. राक्षस तुझा पराभव न करोत.

१०. हे अग्ने, तूं सर्वांना बघणारा आहेस. मनुष्यांत लपून बसलेल्या राक्षसांस हुडकून काढ व त्यांचीं तीन्ही डोकीं तोड. त्यांच्या बाजूनें साहाय्य करणाऱ्यांनाहि स्वसामर्थ्यानें मार, अशा तीन प्रकारांनीं त्या राक्षसांचें मूळ खणून टाक.

११. हे जातवेदा अग्ने, जो राक्षस आपल्या असत्य वर्तनानें खऱ्याचें खोटें करूं पाहतो, तो तुझ्या ज्वालारूपीं जाळ्यांत तीन वेळ गुंडाळला जावो; आणि

त्यास तूं तुझें स्तवन करणाऱ्या ह्या माझ्यासमोर आपल्या तेजानें रगडून मार.

१२. हे अग्ने,मोठ्यानें ओरडणाऱ्या व खुरासारख्या जाड नखांनीं ऋषींना पीडा देणाऱ्या राक्षसांना ज्या नेत्रानें तूं पाहतोस ते नेत्र त्या दुष्टांकडे वळीव, आणि आपल्या दिव्य तेजानें त्या अज्ञानी व खऱ्याचें खोटें करणाऱ्या राक्षसांस राक्षसांचा वध करणाऱ्या अथर्वाप्रमाणें तूं मार.

१३. हे अग्ने, राक्षसांच्या त्रासांनीं त्रासलेले स्त्री–पुरुष आज ज्याअर्थीं आक्रोश करीत आहेत, त्याअर्थीं तुझ्या या यज्ञांतील स्तुतीमध्यें त्या राक्षसांनीं बिघाड केला असावा. म्हणून क्रुद्ध झालेल्या तुझ्या मनांतून उत्पन्न झालेले बाण त्यांच्या हृदयांवर मार.

१४. हे अग्ने, तुझ्या तापानें, उष्णतेनें, व ज्वालेनें तूं मनुष्यांचे प्राण घेऊन तृप्त होणाऱ्या राक्षसांना मार.

१५. आज अमुक दुष्ट राक्षस नाहींसा झाला. असें वृत्त सर्व देव ऐकोत. आमचे तीव्र शाप व अग्नीचे बाण त्याच्या मर्मावर लागोत, आणि सर्वव्यापक अग्नीच्या जाळ्यांत हा सांपडो.

१६. हे अग्ने, जो राक्षस पुरुषांचें मांस खाऊन तृप्त होतो, तसेंच जो घोड्याचें आणि अन्यपशूंचें मांस खाऊन तृप्त होतो, व जो गाईचें दूध पिऊन जातो, त्या सर्वांचीं डोकीं तूं आपल्या पराक्रमानें तोड.

१७. हे अग्निदेवा, वर्षभर मिळणारें आमच्या गाईचें दूध राक्षस न पिवो. जो राक्षस गाईच्या ताज्या दुधानें तृप्त होण्याची इच्छा करितो, त्या तुझ्यासमोर येणाऱ्या राक्षसाला आपल्या तेजानें मर्मावर मार.

१८. हे अग्ने, गोठ्यांत असलेलें विष राक्षस पिवोत. अदितिनामक देवमातेच्या संतोषासाठीं हे तुझ्या हातानें मरोत, व सवितादेव यांना हिंस्र पशूंच्या तोंडीं देवो. यांना खाण्याला अन्न न मिळो.

१९. हे अग्ने, तूं पुष्कळ वर्षांपासून या राक्षसांशीं लढत आहेस व त्यांना पीडाहि देत आहेस, पण त्यांनीं तुझा युद्धांत कधींहि पराभव केला नाहीं. आतां अनुक्रमानें या मूर्खांना जाळ. तुझ्या दिव्य आयुधांपासून हे मांस खाणारे न निसटोत.

२०. हे अग्ने, तूं आमचें दक्षिण, उत्तर, पूर्व व पश्चिम या चारी दिशांस राक्षसांपासून रक्षण कर; आणि तुझीं प्रखर, उष्ण, जीर्ण न होणारी व धडधडलेलीं किरणें दुष्ट राक्षसांला मारून भस्म करोत.

२१. हे प्रदीप्त अग्ने, तूं चहूंकडे अवलोकन करणारा आहेस; म्हणून मला या तुझ्या अवलोकन करण्यानें पूर्व, पश्चिम, दक्षिण आणि उत्तर या चारी दिशांस संभाळ. हे मित्रा अग्निदेवा, तूं अजरामर आहेस; व मी तुझा सखा आहे; म्हणून मीहि पुष्कळ दिवस वांचेन असें तूं कर.

२२. हे अतर्क्या अग्ने, तूं सर्वकामना पूर्ण करणारा, बुद्धिमान्, धैर्यशाली, व नित्यशः राक्षसांना मारणारा आहेस. राक्षसांचा नाश व्हावा म्हणून आम्ही तुझें ध्यान करितों.

२३. हे अग्ने, मोडतोड करणाऱ्या राक्षसांना तीक्ष्ण तेजानें व तापलेल्या ऋष्टिनामक आयुधानें जाळ.

२४. हे अग्ने, हीं राक्षसांचीं जोडपीं, येथें काय आहे, तेथें काय आहे, असें म्हणत व शोध करीत फिरत असतात, त्यांना तूं जाळ. हे बुद्धिमान् अग्ने, कधींही पराभव न पावणाऱ्या तुला मी सूक्तांनीं स्तवितों, म्हणून तूं जागृत हो.

२५. हे अग्ने! तुझ्या सामर्थ्यानें राक्षसांचें बल नष्ट कर; व त्यांचा पराक्रमहि नष्ट कर.

सूक्त अठ्यांयशीवें.

ऋषिः—मूर्धन्वान् अंगिरसपुत्र किंवा वामदेवपुत्र; देवता—सूर्य आणि वैश्वानरगुणक अग्नि; छंदः—त्रिष्टुभ्.

१. सोमयुक्त ताजे व आवडते हवि सूर्यापासून तेज घेतलेल्या आणि प्रज्वलित अग्नींत दिले आहेत. त्या (सोमयुक्त हवींच्या) भक्षण, आवड आणि पोषणाकरतां सुखकर अग्नीस देव प्रसन्न करतात.

२. स्पष्ट असलेलें पण अंधारानें झाकलें गेलेलें जग अग्नि उत्पन्न झाल्याबरोबर पुनः प्रकट झालें. त्या अग्नीच्या मैत्रींत (इंद्रादि) देव, पृथिवी, द्यु, अन्तरिक्ष आणि ओषधी हे सर्व रमून गेले.

३. यज्ञार्ह देवांना अत्यंत इष्ट वाटणारा मी जरारहित, आणि मोठ्या अशा अग्नीला स्तवितों. कारण अग्नि आपल्या किरणांनीं स्वर्ग आणि पृथ्वी यांना उत्पन्न करतो, द्यावापृथिवी आणि अन्तरिक्ष यांची वाढ करतो.

४. देवांनीं स्वीकृत असा जो अग्नि प्रथम होता, ज्या अग्नींत भक्त तूप अर्पण करतात, त्या सर्वज्ञ अग्नीनें पक्षी, पळणारे प्राणी व स्थावर जंगम असणारें जग तात्काल उत्पन्न केलें.

५. हे सर्वज्ञ अग्ने, जो तूं जगाच्या मस्तकावर सूर्यासह राहतोस त्या तुजकडे मननीय स्तोत्रांनीं आणि गाण्यांनीं आम्ही येतों. द्यावापृथ्वींत भरून राहणारा तूं यज्ञार्ह आहेस.

६. रात्रीं अग्नि पृथ्वीच्या मस्तकासारखा मुख्य असतो. नंतर तो सकाळीं उगवणारा सूर्य होतो. जस सर्वांना ज्ञान उत्पन्न करणारा सूर्य त्वरेनें अन्तरिक्षांत संचार करूं लागतो,तसा शहाणे लोक तो देवांचें ज्ञानाचें साधनच आहे असें समजतात.

७. आपल्या महत्त्वानें जो सर्वदर्शनीय, प्रज्वलित, द्युलोकांत तेजानें तेवत असतो त्या अग्नींत सूक्तें म्हणून शरीररक्षक सर्व देव हवि देत असतात.

८. प्रथम सूक्तें म्हणतात, नंतर अग्नीला उत्पन्न करतात, नंतर देव हवि उत्पन्न करतात. तो अग्नि ह्या देवांना यज्ञार्ह होतो आणि तोच शरीराचे रक्षणकर्ता आहे. त्याला द्युलोक, पृथ्वी आणि अन्तरिक्ष (हे सर्व) जाणतात.

९. ज्या अग्नीला देवांनीं उत्पन्न केलें, ज्यांत सर्व जग हवन करतें, द्यावापृथ्वींत सरळ संचार करणारा तो अग्नि आपल्या तेजानें आणि महत्त्वानें प्रकाशत असतो.

१०. सामर्थ्यानें द्यावापृथ्वी भरून असणारा अग्नि स्तुति करून देवांनीं, स्वर्गांत (सूर्यरूपानें) उत्पन्न केला. त्या सुखकर अग्नीलाच तीन ठिकाणीं विभागला. तोच पृथ्वीवर सर्वव्यापक औषधींना तयार करतो.

११. जेव्हां आदितिपुत्र सूर्यरूप ह्या अग्नीला यज्ञार्ह देवांनीं स्वर्गांत स्थापन केलें, आणि जेव्हां गमनशील सूर्यवैश्वानराची जोडी प्रकट झाली, तेव्हांच हें सर्व जग झालें.

१२. जो अग्नि तेजस्वी उषेला उत्पन्न करतो, आणि उगवतांना आपल्या तेजानें अंधार नाहींसा करतो, देव जगाकरतां त्या अग्नीला सर्व जगाचे प्रकाशक करतात.

१३. बुद्धिमान् व यज्ञार्ह देवांनीं जरारहित अशा वैश्वानर अग्नीला उत्पन्न केलें. त्यानें फिरणाऱ्या, मोठमोठ्या, देवांवरहि सत्ता चालवणाऱ्या अशा प्राचीन नक्षत्रांना तेजानें पराभूत केलें.

१४. ज्या अग्नीच्या महिम्यानें द्यावापृथ्वी निर्माण झाली आणि जो उभय लोकांत प्रकाशत असतो त्या तेजस्वी आणि ज्ञात्या अग्नीची आम्ही मंत्रानें स्तुति करतों.

१५. देव, पितर आणि मनुष्य यांचे दोन मार्ग (देवयान आणि पितृयाण) मी ऐकले आहेत. जें हें जग द्यावापृथ्वीमध्यें अन्तर्भूत झालें आहे, तें जातांना देवयान किंवा पितृयाण मार्गानें जातें.

१६. एकत्र असणाऱ्या द्यावापृथ्वी फिरणारा, मस्तकस्थानीं असणाऱ्या सूर्यापासून झालेला, मननीय स्तोत्रें म्हणून शुद्ध केलेला, अग्नि धारण करतात. तो चूक न करतां आपलें कार्य करणारा तेजस्वी (सूर्य) अग्नि सर्व जगाच्या सन्मुख असतो.

१७. जेव्हां पृथ्वीवरचा अग्नि आणि स्वर्गीय वायु भांडूं लागतात कीं, आपणांत यज्ञमुख्यांतील मुख्य कोण ? यज्ञ विशेष कोण जाणतो? कीं ज्यांत ऋत्विज यज्ञ करूं शकतात आणि त्याप्रमाणें यज्ञ करतात? कोण हें स्पष्ट सांगेल?

१८. (असें भांडणारे ते पितराकडे गेले व विचारूं लागले.) अग्नि किती आहेत ? सूर्य किती आहेत ? उषा किती आहेत. आणि अन्तरिक्षें किती आहेत ? हे पितरहो, तुम्हांला मी स्पर्धेनें विचारीत नाहीं. तर जाणत्या अशा तुम्हांला सरळपणानें विचारीत आहे.

१९. हे वायो, जों रात्रीं उषेचा प्रकाश झांकून आहे, तोंच होत्या ब्राह्मणांपैकीं अगदीं निकृष्टही येऊन स्तुति करूं लागतों.

---

१५ टीप—भगवद्गीता ८.२४–२६. पहा.

सूक्त एकूणनव्वदावें.

ऋषिः—रेणु विश्वामित्र; देवता–इंद्र (व सोम यास्क), छंदः–त्रिष्टुभ्.

१. हे स्तोत्या, इंद्राचें महत्त्वपूर्ण सामर्थ्य शत्रूंना त्रास देतें, आणि जो दिगन्तापर्यंत सर्वांचा पराभव करतो, जो मनुष्यसंरक्षक इंद्र समुद्रापेक्षांहि मोठा, माहात्म्यानें सारखा वाढणारा आपल्या तेजानें द्यावापृथ्वी भरून टाकतो, त्या मनुष्यश्रेष्ठ इंद्राची तूं स्तुति कर.

२. सारथी वळवतांना रथाचीं चाकें फिरवतो त्याप्रमाणें सामर्थ्यवान इंद्र आपलें तेज पालटावितो. सारख्या धांवणाऱ्या आणि आपलें काम करणाऱ्या घोड्याप्रमाणें आपल्या तेजानें काळाकुट्ट अंधार नाहींसा करतो.

३. हे स्तोत्या, तूं माझ्यासह मोकळ्या अर्थाचें द्यावापृथ्वीपेक्षांहि मोठें आणि नवें स्तोत्र म्हण. कारण इंद्र यज्ञांतील पृष्ठ नांवाच्या स्तोत्राप्रमाणें आपले जन्म

शत्रूंकरतां वेचीत असतो, मित्राची (मदतीकरतां) इच्छा करीत नाहीं.

४. ज्या इंद्रानें आखानें चाकें स्थिरावतात त्याप्रमाणें आपल्या कृत्यानें पृथ्वी आणि द्युलोक सर्व तऱ्हेनें स्थिर केले, त्या इंद्राकरतां आम्ही खूप स्तुति करून आकाशांतून पाऊस पाडूं.

५. राग उत्पन्न करणारा, प्रहार करावयास लावणारा, (शत्रूंना) कापायला लावणारा, हिंसक आणि चोथट सोम सर्व विस्तृत अरण्यांत व्यापून असतो. ह्या इंद्राला स्तोत्रें वर्णन करूं शकत नाहींत, कमीच पडतात.

६. द्यावापृथ्वी इंद्राची बरोबरी करूं शकत नाहीं, उदक नाहीं, अन्तरिक्ष नाहीं, पर्वत नाहीं, त्या इंद्राचे सोम डोळे आहेत. जेव्हां ह्याचा राग शत्रूंवर होतो, तेव्हां हा जोरानें शत्रूंचा नाश करतो आणि बळकटांचा धुव्वा उडवतो.

७. कुऱ्हाडीनें रान तोडावें त्याप्रमाणें इंद्रानें वृत्राला ठार केलें; शत्रूंचीं नगरें फोडलीं आणि नद्यांना गर्जावयास लावलें. कच्च्या मडक्याप्रमाणें पर्वत फोडले, इंद्रांनीं बरोबरच्या मरुतांच्या साहाय्यानें पाणी दिलें.

८. गंभीरवृत्तीचा इंद्र भक्तांचीं तीं तीं ऋणें फेडतो. तसेंच हे इंद्रा, शस्त्रांनीं खांद्या तोडाव्यात, त्याप्रमाणें तूं दुःखें नाहींशीं करतोस. तसेंच मित्रावरुणांसंबंधींचीं मित्र म्हणून केलीं जाणारीं कृत्यें जे नष्ट करतात त्यांना तूं ठार करतोस.

९. जे दुष्ट लोक मित्र, अर्यमा, स्तुत्य मरुत् आणि वरुण यांना त्रास देतात, त्यांच्याकरतां हे कामपूरक इंद्रा, तुझें धारेचें, कामपूरक, आणि चकाकणारें वज्र तीक्ष्ण कर.

१०. द्युलोक, पृथ्वी, उदक, पर्वत, वृद्ध आणि बुद्धिमान् यांचा इंद्र हा ईश्वर आहे. संरक्षण आणि लाभ यांकरतांहि इंद्रालाच बोलावलें पाहिजे.

११. रात्र, दिवस, अन्तरिक्ष, पृथ्वी, वायूचा मोठेपणा आणि पृथ्वीचा शेवट, नद्या आणि लोक या सर्वांपेक्षां इंद्र मोठा आहे.

१२. हे इंद्रा, तुझें फेकून मारण्याचें आयुध वज्र, उषःकालीन तेजस्वी सूर्याप्रमाणें शत्रूंवर जावो. तसेंच त्रासदायक हत्यारानें उल्कापाताप्रमाणें शत्रूंना ठार कर.

१३. प्रकट होणाऱ्या इंद्राच्या मागें महिने, अरण्यें ओषधी, पर्वत, कमनीय द्यावापृथ्वी आणि उदक हे सर्व जातात. (हे सर्व इंद्रानुसारी आहेत.)

१४. जेव्हां तूं वार न लागलेल्या पण युद्ध इच्छिणाऱ्या राक्षसावर वार करतोस आणि जेव्हां मित्रांसंबंधीं वाईट वर्तन करणारे लोक रणावर मारलेल्या जनावराप्रमाणें जमिनीवर निजतात, असें तुझें हत्यार हे इंद्रा, शत्रूवर केव्हां टाकलें जाईल ?

१५. हे इंद्रा, आमच्यांशीं शत्रुत्व करणारे, आम्हांला त्रास देणारे आणि संधीभूत असणारे जे शत्रू आमच्यावर शस्त्रप्रहार करतात, ते शत्रू गडद अंधारांत सांपडोत. त्यांना दिवस आणि रात्र पराभूत करो.

१६. हे इंद्रा, लोक अनेक स्तोत्रें म्हणून तुझी स्तुति करीत असतात. स्तुति करणाऱ्या ऋषींचीं स्तोत्रें म्हणणारा मी आहें. म्हणून इतर स्तोत्यांकडे लक्ष न देतां तूं रक्षण करण्याकरतां माझ्याकडे ये.

१७. हे इंद्रा, आम्ही तुझ्यापासून उपभोग मिळवूं. तसेंच हे इंद्रा, तुझे नवे अनुग्रह आमचें रक्षण व्हावें म्हणून वर्णन करणारे आम्ही विश्वामित्र तुझ्या कृपेनें चांगले दिवस प्राप्त करूं.

१८. ह्या लढाईत थोर, धनवान्, आमचीं स्तोत्रें ऐकणारा, उग्र, आमच्या संरक्षणाकरतां शत्रूंना ठार करणारा, आणि शत्रूंचीं धनें जिंकणाऱ्या पुरुषोत्तम इंद्राला अन्नप्राप्तीकरतां आणि संरक्षणाकरतां मी बोलावतों.

सूक्त नव्वदावें.

ऋषिः—नारायण; देवता—पुरुष (परमेश्वर); छंदः—१–१५ अनुष्टुभ्, १६ त्रिष्टुभ्.

१. अनंत मस्तकें, अनंत डोळे, आणि अनंत पाद यांनीं युक्त असणारा हा परमेश्वर सर्व जगाला व्यापून जगाच्या पलीकडे व्यापून उरला आहे.

२. सध्यांचें, भूतकाळीं असलेले आणि भविष्यकाळीं होणारें जगत् तें सर्व हा परमेश्वरच आहे. हा देवांचा देव आपलें मूळचें स्वरूप सोडून ह्या जगाच्या स्थितीला प्राप्त होतो, तो केवळ प्राण्यांच्या सुखदुःखाकरितांच होय. वस्तुतः हें त्याचें स्वरूप नव्हे.

३. हें सर्व दृश्य जग ह्या परमेश्वराचा महिमा होय, एवढेंच नव्हे तर त्यापेक्षांहि ह्या परमेश्वराचें माहात्म्य जास्त आहे. दृश्य जग केवळ ह्याच्या माहात्म्याचा एक भाग असून बाकीचे तीन भाग आपल्या दृष्टीच्या टप्प्याच्या पलीकडे आहेत.

४. तो त्रिकालात्मक परमेश्वर ह्या अज्ञानमय संसाराच्या पलीकडे आहे. त्याचा एक भाग केवळ

उत्पत्ति आणि लय या तऱ्हेनें सारखा भ्रमण करीत असतो. तो भाग चेतन आणि अचेतन अशा उभय सृष्टीला व्यापून राहिलेला आहे.

५. त्या परमेश्वरापासून हें विस्तृत जग उत्पन्न झालें, आणि त्या ब्रह्मांडामध्यें जीव उत्पन्न झाला. नंतर त्या जीवांनीं वेगवेगळीं रूपें धारण केलीं. पृथ्वी, निर्माण झाली आणि वेगवेगळे शरीराचे आकारहि निर्माण झाले.

६. नंतर देवांनीं जीवरूपी हविर्द्रव्यांनीं यज्ञ केला, तेव्हां वसंत ऋतु हा त्या यज्ञांत आज्य, ग्रीष्म हा इन्धन आणि शरद् ऋतु हा हविर्द्रव्य अशी कल्पना करण्यांत आली.

७. ज्यामुळें यज्ञ झाला, त्या प्रथम झालेल्या जीवांनीं यज्ञ केल्यामुळें सृष्टि उत्पन्न करण्यास समर्थ असे देव आणि सृष्टीचें संरक्षण करण्यास आवश्यक ज्ञान देणारे ऋषि उत्पन्न झाले.

८. त्यांनींहि सर्व हवन केल्यामुळें दहि, तूप वगैरे पोषणास आवश्यक पदार्थ उत्पन्न झाले आणि वायूवर पोसणारे अरण्यांतील आणि गांवांतील पशु निर्माण झाले.

९. यज्ञामुळेंच ऋग्वेद, सामवेद, छंद आणि यजुर्वेद उत्पन्न झाले.

१०. यज्ञापासूनच अश्व, दोनहि बाजूंनीं दांत असलेले इतर पशु, गाई व शेळयामेंढया उत्पन्न झाल्या.

११. जो विराट् पुरुष उत्पन्न केला तो कोणत्या प्रकारानें केला ? त्याचें तोंड कोणतें ? हात कोणते ? मांड्या कोणत्या आणि पाय कोणते ?

१२. ब्राह्मण हे त्याचें मुख, क्षत्रिय हे त्याचे बाहू, वैश्य हे त्याच्या मांडया आणि शूद्र हे पायापासून उत्पन्न झाले.

१३. त्याच्या मनापासून चन्द्र झाला. डोळ्यापासून सूर्य झाला. तोंडापासून इंद्र व अग्नि, आणि प्राणापासून वायू उत्पन्न झाला.

१४. त्याच्या नाभीपासून अन्तरिक्ष, मस्तकापासून स्वर्ग, पायापासून भूमि आणि कानापासून दिशा उत्पन्न झाल्या.

१५. पूर्वीं वर्णन केलेल्या यज्ञाचे सात छंद हे परिधि, बारा महिने, पांच ऋतु, तीन लोक आणि सूर्य ह्या एकवीस समिधा कल्पून देव यज्ञ करूं लागले आणि विराट् पुरुषालाच (म्हणजे जीव सृष्टीलाच यज्ञीय पशु कल्पिलें) पशु म्हणून बांधलें.

१६. देवांनीं सर्वस्वाचा यज्ञ करून यज्ञांनींच श्रेष्ठ पदवीला चढलेल्या जीवाचा सत्कार केला, आणि तींच कृत्यें जगाच्या वाढीला कारण झालीं. ते जगाच्या उत्पत्तीला साधक असणारे देव ज्या ठिकाणीं असतात तें स्वर्गरूपी स्थान थोर लोक प्राप्त करतात.

सूक्त एक्याण्णवावें.

ऋषिः–अरुण वीतहव्यपुत्र; देवता–अग्नि; छंदः–१-१४ जगती १५ त्रिष्टुभ्.

१. हे अग्ने, जाणत्या स्तोत्यांनीं स्तविलेला, उदार मनाचा, उत्तर वेदींत अन्न इच्छिणारा, सर्व हवींचें भक्षण करणारा, श्रेष्ठ, व्यापक, तेजस्वी आणि मैत्रीला चांगला असणारा, तूं सख्याची इच्छा करणाऱ्या मित्राकरतां प्रदीप्त होतोस.

२. दर्शनीय, शोभा असलेला व आतिथीसारखा अग्नि प्रत्येक वनांत आणि प्रत्येक गृहांत असतो. तसेंच जनहितकारक अग्नि ससाण्याप्रमाणें सोडून जात नाहीं. तो सर्व लोकांत असतो.

३. हे अग्ने, तूं बलांनीं बलवान् आहेस. तूं कर्मानें सुकर्मा आहेस. तूं काव्यानें कवि आहेस. तूं सर्वज्ञ आहेस. तूं धनांतलें धन आहेस. तसेंच द्यावापृथ्वींत जें धन आहे तें वाढविणारा तूंच आहेस.

४. हे अग्ने, तुझें यजन केलें जाणारें घृतयुक्त भूमीवरील स्थान पाहून तूं तेथें बसतोस. तुझे किरण उषेच्या किंवा सूर्याच्या किरणाप्रमाणें निर्दोष प्रकाशतात.

५. हे अग्ने, तुझें उत्तर वेदींत प्रत्येक ऋतूंत यजन केलें जाणारें आणि घृतयुक्त असणारें स्थान जाणून तूं तेथें बसतोस. तसें सूर्याच्या रश्मीप्रमाणें तुझे निष्पाप किरण किंवा उषेच्या किरणाप्रमाणें तुझे किरण बाहेर पडतात.

६. ज्या वेळीं ओषधा आणि अरण्यें खाण्याकरतां तूं आपल्या तोंडांत घालतोस, तेव्हां मेघांतल्या विजेप्रमाणें किंवा उषेच्या प्रकाशाप्रमाणें तुझी आश्चर्यकारक शोभा पसरते.

७. हे अग्ने, जेव्हां तूं वायूनें हलत सुंदर वनस्पतींवर हल्ला चढवतोस आणि अन्न खात असतोस, तेव्हां जाळणाऱ्या तुझें तरणें तेज रथांत बसून चालल्याप्रमाणें असतें.

८. बुद्धिदाता, यज्ञसाधक, देवांना बोलावणारा,

परंतप आणि विचारी अशा ज्या अग्नीला आम्ही बोलावतों आहों, त्या अग्नीलाच साधा हवि असतांनाहि बोलावतात. आणि मोठा सोमासारखा हवि असतांनाहि त्यालाच बोलावतात.

९. हे अग्ने, कर्मकर्ते, तुझे भक्त येथें यज्ञांत देवांना बोलावणाऱ्या तुलाच बोलावतात. देवभक्त, दर्भ तोडून तयार करणारे व हवि तयार करणारे लोक तुलाच हवि देतात.

१०. हे अग्ने, तुझें होतृकर्म, तुझें ऋतूमध्यें केलें जाणारें पोतृकर्म, तसेंच तुझें नेष्टृकर्म आणि यज्ञ करणाऱ्या आमचा तूंच अग्नीध्र आहेस. तुझेंच प्रशास्तृकर्म आहे आणि तूंच आमचें यज्ञ करतोस. तूंच आमचा ब्रह्मा आहेस आणि आमच्या घरांतला गृहपति यजमान तूंच आहेस.

११. हे अग्ने, अमर अशा तुला जो कोणी समिध देतो, तसेंच जो कोणी तुला हवि देतो, त्याचा तूं होता होतोस आणि त्याचें दौत्य करण्यास तूं जातोस. तसेंच ब्रह्मच्याप्रमाणें बोलतोस. यजमान होऊन हवि देतोस आणि यज्ञांतील मुख्याप्रमाणें वागतोस.

१२. ज्या स्तोत्रामुळें अग्नि वाढतो आणि स्तोत्राची इच्छा करतो तीं सर्वज्ञ आणि संरक्षक अग्नीकरतां निघालेली आमची मननीय स्तोत्रें आम्हांला धन प्राप्त करून देणारीं अशीं होवोत.

१३. मी प्राचीन.इच्छुक अशा अग्नीकरतां अत्यंत नवीन अशीं सुंदर स्तोत्रें म्हणतों आहें. तीं स्तोत्रें अग्नि ऐको. मी अग्नीच्या मनाला बरें वाटाविणारा होईन. जशी नवऱ्याला कामुक आणि सुंदर वस्त्र नेसलेली बायको आवडते त्याप्रमाणें मी अग्नीला प्रिय होईन.

१४. ज्या अग्नीकरतां समर्थ घोडे, बैल, वांझ गाई व मेंढे देतात आणि हवन केले जातात, त्या अग्नीकरतां सौत्रामणींत व सोमयागांत मी मन:पूर्वक केलेली सुंदर स्तुति तयार करतों.

१५. हे अग्ने, पळींत तूप किंवा चम्बूंत सोम ठेवावा त्याप्रमाणें तुझ्या तोंडांत आमच्याकडून हवि समर्पण केला जातो. म्हणून तूं आम्हांला अन्नदातें, चांगला पुत्र असलेलें, कीर्ति देणारे, महान् व स्तुत्य असें रमणीय ऐश्वर्य दे.

सूक्त ब्याण्णवावें.

ऋषि:--शार्यात मनो:पुत्र; देवता-विश्वेदेव; छंद:-जगती.

१. हे देवहो, यज्ञांतील मुख्य, लोकरक्षक, देवांना बोलावणाऱ्या व रात्रीचा पाहुणा अशा अग्नीची तुम्ही सेवा करा. वाळलेल्या वनस्पतींना जाळणारा आणि ओल्या वनस्पति भक्षण करणारा, असा कामपूरक आणि ज्ञानदायक यज्ञीय अग्नि स्वर्गावर निजलेला असतो.

२. देव आणि मनुष्य तत्काल रक्षण करणाऱ्या सर्वाधार, अशा अग्नीला यज्ञाचें साधन करते झाले. गुप्तपणानें वाहणाऱ्या वायूचा पुत्र, थोर, पुढें स्थापन केलेला अग्नि सूर्याप्रमाणें उषांचें चुंबन घेतों.

३. स्तुत्य अग्नीची आमची माहिती सत्य असो अशी आम्ही इच्छा करतों. आम्ही दिलेल्या आहुति अग्नि भक्षण करो असें आम्ही इच्छितों. जेव्हां अग्नीच्या ज्वाला सारख्या जळूं लागतात, तेव्हां अग्नीकरतां आम्ही त्यांत आहुति टाकूं.

४. यज्ञांतील अग्नीला विस्तृत द्युलोक, मोठें अन्तरिक्ष, स्तुत्य आणि अनन्त पृथ्वी, नमस्कार करतात. इंद्र, मित्र वरुण, भग आणि सविता हे सर्व बलशाली देव अग्नीला मान देतात.

५. वहाणारें पाणी सतत पळणाऱ्या मरुताबरोबर जाते. तसेंच ते मरुत् अमर्याद पृथ्वीचा तिरस्कार करतात. सर्वत्र गमन करणारा इंद्र, जातांना मरुद्गणांसह खूप वेगानें धावतो. तसेंच पोटांत गर्जना करीत पाऊस पृथ्वी सिंचन करतो.

६. मेघांचें ठिकाण, द्युलोकांतले श्येनपक्षी, लोकांत सर्वत्र पसरलेले, असे हे रुद्रपुत्र मरुत् आपलीं कृत्यें करतात. त्या वेगवान् देवांसह वेगवान् इंद्र, मित्र, अर्यमा आणि वरुण जगाकडे पहात असतात.

७. जे स्तोते इंद्राची स्तुति करून सुरक्षितपणा मिळवतात, सूर्याच्या स्तुतीनें दृष्टिसामर्थ्य व इंद्रापासून बल मिळवतात आणि जे स्तोते इंद्राची पूजा नेहेमीं करतात, ते स्तोते यज्ञांत साहाय्य म्हणून इंद्राचें वज्र मिळवतात.

८. सूर्यहि घोड्यांना हाणण्यांत रमून जातो (तो ह्या इंद्राकरतां), तसेंच जो कोणी (देव) भितो तो ह्या बलवान् इंद्रापासूनच. तसेंच कामपूरक, सर्व भयंकर (परमेश्वराच्या) श्वासोछ्वास करणाऱ्या उदरस्थानीय अन्तारक्षांतून दररोज अप्रतिबंध मेघगर्जना होत असते.

---

१० टीप—यज्ञसंस्थेंतील सप्त होत्यांच्या उल्लेखामुळें ही ऋचा फार महत्त्वाची आहे. होत्यांची माहिती प्रस्तावनेंत पहा.

९. येणाऱ्या मरुतासह आत्मशक्तियुक्त, प्रसिद्ध, सुखकर, असा परमेश्वर द्युलोकावरून भक्तांना सेवीत असतो, म्हणून हे भक्तहो, तुम्ही त्या यज्ञांत थोडकी इच्छा असलेल्या, व मरुतांसह असणाऱ्या नष्टशत्रू आणि समर्थ अशा रुद्राला अन्न देऊन स्तोत्र म्हणा.

१०. ज्याअर्थी कामपूरक बृहस्पति, व सोम दिल्यामुळें बांधव बनलेले सर्व देव, संतति उत्पन्न होण्याकरतां आम्हांला अन्न देऊन पोशीत आहेत, त्याअर्थी (संततीपैकीं) पहिला अथर्वा यज्ञांनीं देवांना प्रसन्न राखो आणि बलयुक्त असणारे देव आणि भृगुकुलोत्पन्न ऋषि सेवा केले जावोत.

११. उदकपूर्ण द्यावापृथ्वी, यम, अदिति, त्वष्टृदेव, द्रव्य देणारा अग्नि, ऋभु, रुद्रपत्नी रोदसी, मरुत आणि विष्णु हे सर्व देव चार अग्नि असलेल्या नराशंस यज्ञांत स्तोत्यांकडून स्तविले जातात.

१२. आम्हां स्तोत्यांची यज्ञांत सतत चाललेली स्तुति हा तेजस्वी अहिर्बुध्न्य अग्नि श्रवण करो. द्युलोकांत संचार करणारे सूर्यचंद्र लक्षपूर्वक आमचें स्तोत्र जाणोत आणि द्यावापृथ्वीहि जाणोत.

१३. पूषादेव आमच्या जंगम मिळकतीचें संरक्षण करो. तसेंच सर्व देवांचा हितकर्ता अपांनपात् आणि वायु यज्ञ करण्याकरितां आमचें संरक्षण करो. तसेंच स्तुत्य अशा माझें संरक्षण करा. हे स्तुत्य अश्विहो, जातांना आमचें स्तोत्र ऐका.

१४. निर्भय लोकांच्या अन्तःकरणांत राहणाऱ्या ह्या अग्नीचीं आम्ही स्तोत्रें म्हणून स्तुति करीत आहोंत. सर्व देवपत्न्यासहित स्थिर असणाऱ्या अदितीचें आम्ही स्तवन करतों आहोंत. तसेंच चंद्र आणि लोकानुग्राहक आदित्याची मी स्तुति करतों.

१५. मी प्राचीन अंगिरा देवांची स्तुति करतों, ज्या दगडांनीं चतुर इंद्र प्रसन्न होतो ते सोम कुटण्याचे दगड, कुटण्याकरतां वर उचलले असतां यज्ञाकडे पाहतात. त्या इंद्राचें वज्र आकाशांतून उदक उत्पन्न करो.

सूक्त त्र्याण्णवावें.

ऋषिः—तान्व पृथुपुत्र; देवता—विश्वेदेव; छन्दः— २, ३–१३ अनुष्टुभ्, ९ पंक्ति, ११ न्यंकुसारिणी, १५ बृहती, बाकी प्रस्तारपंक्ति.

१. हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही अत्यंत विस्तृत व्हा. ह्या विस्तृत असणाऱ्या द्यावापृथ्वी आम्हांला स्त्रीसारख्या (उपयोगी पडणाऱ्या) होवोत. शत्रूच्या बलापासून आमचें संरक्षण करोत. तसेंच बलवान् शत्रूपासून तुम्ही आमचें संरक्षण करा.

२. जो अत्यंत विद्वान् असणारा मनुष्य सुखकारक हविर्द्रव्यांनीं ह्या देवांना सेवितो, तो मनुष्य प्रत्येक यज्ञांत देवांची सेवा करतो.

३. हे सर्वेश्वरहो, देवांचें जें उत्कृष्ट धन असेल तें मला द्या. मोठे तेजस्वी असें तुम्ही सर्व यज्ञांमध्यें पूजनीय आहांत.

४. अर्यमा, मित्र आणि सर्वगामी वरुण, लोकांनीं स्तविलेला रुद्र, सर्वपोषक मरुत् आणि भग हे सर्व देव स्तुत्य आहेत. ते लोकांना सुख देवोत. ते अमृतासारख्या हविर्द्रव्याचे राजे आहेत.

५. हे पर्जन्यधन अश्विहो, तुमच्याप्रमाणेंच उदकाचे धनी असणारे सूर्य आणि चंद्र आहेत, मेघांतील अग्नि आहे. यांच्यासह रात्रीं—

६. अश्विदेव आपल्या शरीरांनीं आमचें संरक्षण करोत. मित्रावरुण आमचें संरक्षण करोत. ज्याचें हे देव संरक्षण करतात ते मोठें धन प्राप्त करतात. कोरडी जमीन जशी सहज चालून जावी त्याप्रमाणें तो मनुष्य संकटें सहज तरून जातो.

७. तसेंच रुद्रपुत्र अश्वि आम्हांस सुख देवोत. तसेंच रथपति भग, ऋभु, वाज आणि सर्वगामी वायु आम्हांला सुख देवो. हे सर्वधन थोर देवहो, आम्हांला सुख द्या.

८. इंद्र यज्ञानें शोभतो. सेवा करणाऱ्याचा आनंद यज्ञानें शोभतो; अतिवेगानें येणाऱ्या तुझे घोडे अतिशय बलवान् आहेत. ज्याचीं गाणींहि मोठीं अपूर्व आहेत, त्यांचा यज्ञहि सामान्य नाहीं.

९. हे सवितृदेवा, आम्हांला लाजण्याचा प्रसंग आणूं नकोस. तूं धनवानांच्या स्तोत्याकडून स्तविला जातोस. मरुतांसह असणारा इंद्र (चाक आणि लगामाप्रमाणें आम्हांला) बल देवो.

१०. हे द्यावापृथ्वीहो, तुम्ही आमच्या ह्या मुलांना जगप्रसिद्ध यश द्या. तसेंच बलप्राप्तीकरतां अन्न द्या. तसेंच शत्रूंना जिंकण्याकरतां धनासहित अन्न द्या.

११. हे सर्वाधार आणि बलवान् इंद्रा, आमच्याकडे येणारा तूं कोठेंहि असणाऱ्या आम्हांला स्तोत्यांना इष्टसिद्धी-

करतां आणि यज्ञाकरतां नेहेमीं संरक्षण कर. तुझी स्तुति करीत असल्यामुळें मला तूं जाण.

१२. सूर्य उगवल्यावर त्याचे तेजस्वी किरण ज्याप्रमाणें लांबवर पडतात त्याप्रमाणें शत्रूंचा संहार करणारे असेंच जणूं काय असणारे माझें स्तोत्र वृद्धिंगत होवो. चांगला तयार झालेला रथ जसा सुतार बाहेर पाठवितो तसें माझें स्तोत्र प्रसिद्ध होवो.

१३. ज्यांच्या पैशानें माझी ही स्तुति चालूं आहे त्यांच्याकरतां ही सोन्यासारखी स्तुति रणांतल्या पराक्रमाप्रमाणें किंवा रहाटगाडग्याप्रमाणें पुनः पुनः सारखी चालूं आहे.

१४. जे देव पांचशे रथ जोडून आमच्याकडे (यज्ञ) मार्गानें येतात, त्या देवांचीं श्रवणीय स्तोत्रें दुःशीम, पृथवान, वेन आणि बलवान् राम यांच्यापाशीं मीं म्हटलीं आहेत व धनवानापाशीं मीं म्हटलीं आहेत.

१५. ह्या राजापाशीं तान्वानें सत्त्याहत्तर गाई मागितल्या. तसें पार्थानें आणि मायूनेंहि मागितल्या.

सूक्त चौऱ्याण्णवावें.

ऋषिः—सर्प कद्रुपुत्र; देवता–सोमाभिषवग्रावा; छंदः–५, ७, १४ त्रिष्टुभ्, बाकी जगती.

१. हे दगड शब्द करोत. आम्ही त्या शब्द करणाऱ्या दगडांची स्तुति करूं. हे ऋषीहो, तुम्हीहि स्तुति करा. जेव्हां हे घट्ट, सोम कुटणारे, दगड इंद्राकरतां श्रवणीय शब्द करतात, तेव्हां सोम पिणारे तृप्त होतात.

२. जेव्हां हे दगड शेंकडोहजारोंप्रमाणें शब्द करूं लागतात आणि आपल्या हिरव्या तोंडानें आक्रोश करतात. तेव्हां चांगल्या प्रकारें सोम कुटणारे दगड यज्ञांत येऊन आपल्या सत्कृत्यामुळें अग्नीच्यापूर्वींच हवि भक्षण करतात.

३. तांबूस रंगाची फांदी भक्षण करणारे बलिष्ठ दगड, शिजलेल्या मांसावर बसून मांस खाणारे ओरडतात त्याप्रमाणें शब्द करतात आणि मधुर सोम मिळवतात.

४. मदकर आणि पिळून काढलेल्या सोमानें इंद्राला बोलावणारे दगड खूप आवाज करतात आणि तोंडानें खूप सोम पितात. एकत्र होऊन धैर्यानें शब्द करणारे पृथ्वी गर्जून टाकतात आणि धरलेल्या बोटासह नाचतात.

५. पडणारे दगड सारखा शब्द करतात. कळपांत पळणाऱ्या काळया मृगाप्रमाणें सूर्यासारखे पांढर थेंब सारखे नाचत (उडत) असतात. दगडानें काढलेला सोम सारखा खालीं पडत असतो. दगड पुष्कळ सोम धारण करतात.

६. यज्ञाचा भार धारण करणारे, हे दगड सारखे उधळलेल्या घोड्याप्रमाणें सारखे चालत असतात. सुस्कारे टाकीत असल्याप्रमाणें जेव्हां सोम खात शब्द करतात, तेव्हां घोड्याच्या शब्दाप्रमाणें ह्या दगडांच्या तोंडून शब्द बाहेर येतो.

७. दहा बोटांशीं सर्वप्रकारें संबंध असलेल्या आणि सदा तरुण अशा वाहणाऱ्या ह्या सोमाला हे ऋत्विजहो तुम्ही स्तवा.

८. आदरणीय, जलद काम करणारे, हे दगड दहा बोटांत धरलेले असतात. त्या दगडांनीं पडून चालवलेलें कुटणें स्पृहणीय असतें. ते हे दगडच सोमरूपी अन्नाचा प्रथम अमृतरूपी अंश ग्रहण करतात.

९. सोमभक्षक ते घोंडे इंद्राच्या घोड्याचें चुंबन घेतात. ते गाळले जात असतां गाईच्या कातड्यावर जाऊन बसतात. त्या दगडांनीं काढलेला मधुर सोम पिऊन तो (इंद्र) उत्कर्ष पावतो, प्रसिद्ध होतो आणि बलवानासारखा वागतो.

१०. ज्यांचा यज्ञ हे दगडांनो, तुम्ही उपभोगीत आहांत त्यांचा सोम तुम्हांला बल देईल. तुम्ही क्षीण होऊं नका. संपन्न असलेल्या लोकांप्रमाणें तुम्ही खात रहा. धनवानाप्रमाणें तेजस्वी आणि सुंदर असे तुम्ही व्हा.

११. श्रमरहित, अपराभूत, अमर, अरोगी, जरारहित असे तुम्ही व्हा. हे दगडांनो, दुसऱ्यास फोडून स्वतः अभिन्न रहाणारे, बलिष्ठ, तृष्णारहित आणि निःस्पृह असे तुम्ही व्हा.

१२. हे दगडांनो, सर्व युगांत तुमचे पितृभूत असणारे पर्वत सुखरूप, निश्चळ आणि अभंग असतात. जरारहित, सोमभक्षक, हिरवे दगड आपला शब्द द्यावापृथ्वीला ऐकवतात.

१३. दगड वेगानें जाणाऱ्या रथाप्रमाणें कुटण्याच्या वेळेस शब्द करीत असतात. बीं पेरणाऱ्या शेतकऱ्याप्रमाणें दगड सोमाला जपत असतात. त्याचा नाश करीत नाहींत.

१४. पूज्य असणारे दगड यज्ञांत सोम काढीत असतांना आईला मारणाऱ्या आणि खेळणाऱ्या मुलाप्रमाणें शब्द करतात. सोम काढणाऱ्या दगडांची स्तुति करा. सोम काढण्याचें काम दगड थांबवोत.

सूक्त पंचाण्णवावें.

ऋषिः—पुरूरवा उर्वशी; देवता—पुरूरवा उर्वशी; छंदः—त्रिष्टुभ्.

१. पुरूरवाः—हे कठोरहृदये प्रिये,थोडा वेळ थांब. आपण परस्पर कांहीं गोष्टी बोलूं. कारण, अशा प्रकारच्या गोष्टी आपल्या गत आयुष्यकालांत आपण कधींच न बोलल्यामुळें, शेवटपर्यंत आपणांस सुखप्राप्ति झाली नाहीं.

२. उर्वशी—असल्या शुष्क संभाषणांत कसलें सुख मिळणार आहे ? मी तुझ्यापासून उषेप्रमाणें पळत आहे. तरी हे पुरूरवस्, तूं आपल्या गृहाप्रत गमन कर. मी वायूप्रमाणें दुष्प्राप्यच आहे असें समज.

३. पुरूरवा—हे उर्वशी, तुझ्या विरहानें जड झालेल्या मला मीं बलवान असतांहि, शत्रूंचा पराभव करवत नाहीं व शत्रूंची संपत्ति हरण करतां येत नाहीं. त्याचप्रमाणें एकंदर राज्यकारभारामध्येंही माझें चित्त रमत नाहीं; व रणांगणामध्यें मी मनानें किंकर्तव्यमूढ होऊन गेल्यामुळें, माझ्या सैनिकांनाहि भीति वाटून ते सिंहनाद करीत नाहींत.

४. (उर्वशी उषेला म्हणते) हे उषा देवि, श्वशुरास उत्तम जेवण घालणाऱ्या मला जेव्हां पतिविषयक इच्छा होईल तेव्हां मी श्वशुरगृहांतून पतीच्या खोलींत जात असे व तेथें रात्रंदिवस पतीबरोबर क्रीडा करीत असे.

५. (पुरूरव्यास उद्देशून) हे राजा, प्रत्यहीं तूं माझा तीनदां उपभोग घेत असस. इतर स्त्रियांस सोडून, माझी मनःकामना तुझ्याकडून अगोदर पूर्ण होईल या आशेनें मी तुजकडे आलें. हे राजन्, त्या वेळीं तूं माझ्या शरीराचा स्वामी होतास.

६. पुरूरवाः—ती (उर्वशी) सुजूर्णि, श्रेणि, सुम्नआपि व हृदेचक्षु या चार सख्यांसह एकमेकांस मिठ्या मारून निघून गेली. (परंतु परत जातांना), त्या अरुण वर्णांकित अप्सरा नवप्रसूत गाई ज्याप्रमाणें शब्द करीत जातात त्याप्रमाणें शब्द करीत नव्हत्या.

७. उर्वशीः—हे पुरूरवस्, तुझा जन्म झाल्याबरोबर देवपत्न्या तुजभोंवतीं एकत्र जमल्या. देवांनीं मोठ्या संग्रामाकरितां व दस्यूंना मारण्याकरितां तुझ्या सामर्थ्याची वाढ केली. त्याचप्रमाणें वाहणाऱ्या नद्यांनीं स्वतः तुझें संगोपन केलें.

८. हा पुरूरवस् देवतारूप अप्सरांच्या पुढें जेव्हां मनुष्यरूपानें जात असे, त्यावेळीं कामेच्छा उत्पन्न झालेली मृगी ज्याप्रमाणें (व्याधापासुन) दूर पळते, किंवा रथास जोडलेले घोडे ज्याप्रमाणें दूर पळतात, त्याप्रमाणें अप्सरा भयभीत होऊन त्याजपासून दूर जात.

९. मानव देहधारी पुरूरवस् ज्या वेळीं अप्सरांशीं कामचेष्टा करावयास जात असे, त्या वेळीं ज्याप्रमाणें क्रीडा करणारे घोडे किंवा साप मनुष्यास आपलें स्वरूप स्पष्ट दिसूं देत नाहींत, त्याप्रमाणें ह्या अप्सरा आपलें स्वरूप दिसूं देत नसत.

१०. पुरूरवा—जी उर्वशी विजेप्रमाणें प्रकाशते व मला प्रिय असे स्वर्गीय भोग संपादन करते, त्या उर्वशीपासून जेव्हां मला सुलक्षणी पुत्र होईल तेव्हां माझें आयुष्य वृद्धिंगत होईल.

११. उर्वशीः—हे पुरुरवस, तूं पृथ्वीचें पालन करण्याकरितां जन्मला आहेस व तूं माझ्या ठिकाणीं ही गर्भस्थापना केली आहेस. त्यावेळीं मी सांगितल्याप्रमाणें न ऐकतां तूं प्रतिज्ञाभंग केलास, अर्थात् आतां शोक करून काय उपयोग ?

१२. पुरूरवा-- प्रिये, तुला केव्हां पुत्र उत्पन्न होईल ? तो मला (केव्हां) सुखवील व मजजवळ रडून हट्ट घेईल ? त्याचप्रमाणें हा पुत्र केव्हां आपल्या दोघांचा वियोग करील व श्वशुराचें तेज वाढवील ?

१३. उर्वशी—राजा, तुझा पुत्र रडूं लागतांच काळजीपूर्वक त्याचें संवर्धन करण्याकरितां मी त्याला तुझ्याकडे पाठवून देईन. परंतु तूं आपल्या घरीं निघून जा. हे मूढ, आतां मी तुला प्राप्त होणें शक्य नाहीं.

१४. पुरूरवा—उर्वशी, तुझ्याबरोबर क्रीडा करणारा तुझा पति जो मी, त्या माझें शरीर येथेंच पतन पावो किंवा देशान्तरीं गमन करो, किंवा येथेंच पृथ्वीच्या अंकावर शयन करो, अथवा मला या अरण्यांतील हिंस्र लांडगे फाडून खावोत.

१५-१६. उर्वशीः—हे पुरूरवस् तूं प्राणत्याग करूं नकोस, येथें उडी टाकूं नकोस, अमंगल लांडगे तुझें शरीर न खावोत. स्त्रियांचें सख्य हें सख्यच नव्हे. कारण त्या लांडग्याच्या हृदयाच्या असतात. राजा, मानवरूप घेऊन मीं तुझ्याशीं आपलें देवत्व विसरून विविध प्रकारचीं रूपें धारण करून चार वर्षेंपर्यंत रतिसुखाचा उपभोग घेतला. परंतु आतां माझी तेवढ्यानें पूर्ण तृप्ति झाल्यामुळें मी तुझ्यापासून दूर निघून जात आहें.

१७. पुरूरवा—आपल्या तेजानें अंतरिक्ष भरून टाकणाऱ्या व स्वर्गीय उपभोग देणाऱ्या उर्वशीस मी वश करीत आहें. सुकृती असा हा पुरुरवा तुझी प्रार्थना

करितो कीं, परत फीर. कारण हें अंतःकरण वियोगानें संतप्त झालें आहे.

१८. उर्वशीः—राजा, देवांनीं तुला सांगितलें आहे कीं, सांप्रत तूं मृत्यूच्या वश आहेस, करितां देवा करितां यजन कर व स्वर्ग प्राप्त करून घे, म्हणजे तुला आमच्याबरोबर रममाण होतां येईल. अर्थात मद्विषयक अभिलाष सोडून देऊन ह्या उपायानें सुखी हो.

टीप—उर्वशी अप्सरा होती आणि पुरुरवा मनुष्य होता. पुरूरव्याशीं लग्न करावयास तयार होतांना 'अंथरुणाशिवाय तूं नग्न स्थितींत दृष्टीस पडलास तर मी परत जाईन' अशी उर्वशीनें अट घातली होती. गंधर्वांना उर्वशी परत मिळावी अशी इच्छा होती, म्हणून बरेच दिवसानंतर रात्रींच्या वेळीं उर्वशीच्या परम प्रीतींतलें व तिच्या पलंगास बांधून ठेवलेले दोन मेंढे त्यांनीं चोरून नेले. तेव्हां उर्वशी आक्रोश करूं लागली. पुरूरवा गडबडीनें नग्न स्थितींतच चोरांना धरण्यास धावला. गंधर्वांनीं ऐन वेळीं विजेचा प्रकाश पाडला व नग्न स्थितींत पुरूरवा उर्वशीच्या दृष्टीस पडला. तेव्हां उर्वशी निघून गेली. त्यामुळें राजा वेड्यासारखा होऊन भटकत एका तळ्यापाशीं आला. तेथें उर्वशी आपल्या मैत्रिणीसह क्रीडा करीत होती. तेथें झालेला संवाद वर दिला आहे (शत. ब्रा. ११-५-१.). संवादांत उर्वशी गर्भार होती व तिनें राजाकडे परत येण्याचें नाकारलें, हेंच विशेषतः आपणांस दिसतें.

सूक्त शहाण्णवावें.

ऋषिः—बरु अंगिरस किंवा सर्वहरि इंद्रपुत्र, देवता—इंद्राश्व; छन्दः—१२ । १३ त्रिष्टुभ् बाकी जगती.

१. हे इंद्रा, तुझे घोडे विस्तृत यज्ञांत मी स्तवीत आहे. उग्र अशा इंद्राचा अनुकूल उन्माद आम्हांला पाहिजे आहे. जो इंद्र घोड्यावर बसून येऊन तूपाप्रमाणें रमणीय उदकाचा वर्षाव करतो त्या मनोहर इंद्राकडे आमचीं स्तोत्रें पोंचोत.

२. देवांच्या यज्ञगृहांत ज्या वेगानें घोडे इंद्राला नेतात, त्या वेगानें घोड्याला प्रेरणा देणारे पूर्वीचे ऋषि इंद्राला आणण्याला घोड्याला स्तवितात. ज्या इंद्राला (दुधानें) गाई तृप्त करतात व सोमांनीं संतुष्ट करतात, त्या इंद्राच्या बलाचीं स्तोत्रें म्हणून आम्ही पूजा करतो.

३. ह्या इंद्राचें काळसर पोलादी वज्र आहे, तें फारच सुंदर आणि शत्रूंचें हनन करणारें आहे, तें त्याच्या हातांत असतें. धनवान्, सुंदर हनुवटीचा व शत्रूंचा बाणानें वध करणारा इंद्र आहे. त्याचें शरीरही काळसर आहे.

४. ज्याचें पोलादी वज्र अहीला तोडतें आणि जो सोम पिणारा, हजारो तऱ्हेनें चमकणारा, आणि सोम प्याल्यामुळें हिरव्या ओंठाचा असतो. तो इंद्र स्वर्गांतील सूर्याप्रमाणें दिसत असतो. इंद्राचें सुंदर वज्र वेगशाली घोड्याप्रमाणें शत्रूवर तुटून पडत असतें.

५. हे निळसर रंगाचे केश असलेल्या घोड्याचे इंद्रा, पूर्व ऋषींनीं स्तविलेला असा तूंच (स्तोत्र किंवा हवि) इच्छित असतोस, हे शत्रुवधाकरतां प्रादुर्भूत झालेल्या इंद्रा, तूं सर्व मनोहर, उत्कृष्ट आणि स्तुत्य अन्न इच्छितोस.

६. ते गमनशील आणि सुंदर घोडे आनंदी, स्तुत्य आणि वज्रधारी इंद्राला (सोम पिऊन) मद यावा म्हणून वाहून नेतात. तेथें त्या सुंदर इंद्राकरतां पुष्कळ स्तोत्रें व हिरवागार सोम तयार ठेवलेला असतो.

७. इंद्राकरतां पुरेसा ताजा सोम तयार केलाआहे. तो सोम युद्धांतून पळून न जाणाऱ्या इंद्राच्या त्वराशील घोड्यांला गति देतो. जो रथ धांवणाऱ्या घोड्यांनीं युद्धाला जातो, तो रथ इंद्रास सुंदर आणि सोमयुक्त यज्ञांत पोंचवितो.

८. काळे केस आणि काळ्या मिशा असलेला, पोलादी हृदयाचा व हिरवा सोम पिणारा जो इंद्र ताबडतोब सोम प्याला असतां उत्साह पावतो, तो चलाख घोडे असलेला सैन्यधन इंद्र दोन घोडे जोडून सर्व संकटें तरून जतो.

९. स्रुवा जशी यज्ञपात्रांत पडते त्याप्रमाणें या इंद्राचे काळसर डोळे सोमावर पडतात आणि नेहमीं सोम पिऊन हिरवे झालेले ओठ सोमाकडे पाहून फुरफुरूं लागतात. आणि जेव्हां तयार केलेल्या सोमपात्रांत असलेले मदकर सोमरूपी अन्न पिऊन तो घोड्यांना तयार करतो तेव्हां आम्ही इंद्राची स्तुति करीत आहोंत.

१०. ज्या सुंदर इंद्राचें द्यावापृथ्वीमध्यें घर आहे तो इंद्र लढाईला जाणाऱ्या घोड्याप्रमाणें घोडा घेऊन धांवतो. हे इंद्रा, तुझी अर्थपूर्ण स्तुति बलयुक्त अशी तुझी इच्छा करीत आहे. (म्हणून तूं तिकडे जातोस आणि इच्छुक यजमानांचें विपुल अन्न ग्रहण करतोस.

११. हे इंद्रा, हवासा वाटणारा तूं आपल्या महत्त्वानें द्यावापृथ्वी भरून टाकतोस. तसेंच नूतनतर, मननीय आणि प्रियकर अशा स्तोत्राची तं इच्छा कर-

तोस. हे बलवान् इंद्रा, उदकाचें रमणीय घर (मेघ) आणि रमणीय सूर्य यांना प्रकट कर.

१२. हे इंद्रा, सोम पिऊन हिरवें तोंड झालेल्या आणि रमणीय अशा तुला रथांत बसवून घोडे लोकांच्या कडे वाहून नेवोत. कीं ज्यामुळें पात्रांत भरलेला, मधुर, यज्ञसाधन व दहा बोटांनीं काढलेला, सोम इच्छिणारा तूं सोम पिशील आणि युद्धांत जय प्राप्त करशील.

१३. हे इंद्रा, पिळलेल्या पूर्वींच्या सोमापैकीं तूं सोम प्याला आहेस. पण आतां पिळलेला सोम केवळ तुझा आहे. ह्या मधुर सोमाचा तूं आस्वाद घे. हे अत्यंत पाऊस पाडणाऱ्या इंद्रा, तूं पोटांत सोमरस घाल.

सूक्त सत्त्याणवावें.

ऋषिः–भिषज् आथर्वणपुत्र; देवता–ओषधि; छंदः–अनुष्टुभ्.

१. प्राचीन असणाऱ्या ज्या वनस्पति देवापासून तिन्ही ऋतूंत पूर्वीं उत्पन्न झाल्या. त्या पिंगट वर्णाच्या वनस्पतींचीं एकशें सात (मर्म स्थानें) आहेत असें मी मानतों.

२. हे मातृभूत ओषधींहो, तुमचीं शेंकडों ठिकाणें आहेत आणि हजारो अंकुर आहेत. हे शेंकडो कार्यें करणाऱ्या ओषधीहो, तुम्ही माझा जन्म निरोगी करा.

३. हे ओषधींहो, फलपुष्पयुक्त असणाऱ्या तुम्ही प्रसन्न व्हा.तुम्ही घोड्याप्रमाणें जयशील आणि (रोगांतून) पार पाडणाऱ्या आहांत.

४. हे मातृभूत ओषधि देवींहो, तुम्हांला मी सांगतों कीं (तुमच्याकरतां) घोडा, गाय, वस्त्र फार काय मी स्वतःलासुद्धां हे वैद्यपुरुषा, तुला समर्पण करीन.

५. हे ओषधींहो, तुमची वसती अश्वत्थावर (पिंपळावर) असते. तुम्ही पळसावर रहाता, तुम्ही गाईचें आणि मनुष्यांचें पोषण करतां.

६. राजे लढाईंत एकत्र होतात त्याप्रमाणें ओषधी एकत्र असतात, त्याच ब्राह्मणाला राक्षसहन्ता आणि रोगनाशक वैद्य असें म्हणतात.

७. अश्वावती, सोमावती, ऊर्जयन्ती आणि उदोजस अशा ह्या सर्व वनस्पति मी जाणतों. रोगनाशाकरतां त्यांची मी स्तुति करतों.

८. हे पुरुषा, आपलें सामर्थ्य तुला देऊं इच्छिणाऱ्या ओषधींचें सामर्थ्य, गोठ्यांतून गाई बाहेर याव्यात त्याप्रमाणें तुझ्या स्वतःकडे पाठविलें जात आहे.

९. हे ओषधींहो, तुमची आई इष्कृती नांवाची आहे. तुम्ही रोग नाहींसे करणाऱ्या व्हा. तुम्ही चहूंकडे पसरा आणि वाढा, व जो रोगी असेल त्याला बरें करा.

१०. चोर गौळवाड्यावर हल्ला करतो त्याप्रमाणें तुम्ही सर्व ओषधी रोगांचे वर हल्ला चढवा, जें कांहीं शरीराचें (रोगरूपी) पाप असतें तें सर्व ओषधी शरीरांतून बाहेर काढतात.

११. जेव्हां (रोग्याला) बल देणारा मी ओषधी हातांत घेतों त्या वेळीं शिकार करणारा जीव घेतो त्याप्रमाणें प्रथम मी रोगाचें मूळ नाहींसें करतों.

१२. हे ओषधींहो, ज्या रोग्याच्या अंगाचा किंवा सांध्याचा तुम्ही आश्रय करतां तेथील रोगाचा, बलशाली आणि उंचोस्थावर असलेल्या राजाकडून शत्रूचा नाश केला जातो त्याप्रमाणें तुम्ही नाश करतां.

१३. हे रोगा, तूं एकदम बाहेर पड. चास, किकिदीवि, वाऱ्याची वावटळ आणि (निहाक) गिधाड ह्यांच्या योगानें तूं नष्ट हो.

१४. हे औषधींहो, तुम्हांमध्यें एक दुसरींत जावो. दुसरी तिसरीच्या जवळ जावो. (ज्या येथें वनस्पति आहेत) त्या सर्व एकमताच्या होऊन माझें वचन राखोत.

१५. ज्या फलयुक्त आहेत, ज्या निष्फल आहेत, ज्या पुष्पयुक्त आहेत, आणि ज्या पुष्परहित आहेत त्या सर्व बृहस्पतीनें निर्माण केलेल्या वनस्पति आमचें पातकांपासून (रोगांपासून) संरक्षण करोत.

१६. औषधी मला शपथोद्भव पातकापासून सोडवोत. वरुणाच्या पाशांतून, यमाच्या बेड्यांतून आणि देवांसंबंधीं जें कांहीं पातक झालें असेल त्यांतून मुक्त करोत.

१७. जो जीव आमच्या ताब्यांत येतो तो मरत नाहीं. असें द्युलोकांतून पडणाऱ्या ओषधी बोलल्या.

१८. ज्या सोममुख्य असंख्यात आणि सुंदर ओषधी आहेत त्यामध्यें हे सोमा, तूं सर्वोत्कृष्ट आहेस. त्या अर्थी आमच्या सुंदर हृदयास तूं सुख दे.

१९. ज्या सोममुख्य ओषधी पृथ्वीवर आहेत त्या बृहस्पतीनें निर्माण केलेल्या आम्हाला सामर्थ्य देवोत.

२०. हे ओषधींहो, तुम्हांला आम्ही खणून काढतों, त्या तुम्ही आम्हांला मारूं नका. आमचे पुत्र आणि पशू हे सर्व निरोगी असोत.

२१. ज्या वनस्पति हें आमचें स्तोत्र ऐकतात आणि ज्या येथून दूर आहेत त्या सर्व ओषधींहो,

येथें येऊन आमच्या रोगी शरीराला सामर्थ्य द्या.

२२. ओषधी सोमासह बोलतात कीं हे सोमा, ज्याची ब्राह्मण चिकित्सा करतो त्याला तूं वांचवतोस.

२३. हे ओषधी, तूं ओषधींतील उत्तम आहेस. सर्व वृक्ष तुझ्या खालीं आहेत. जो आमचा नाश करतो, तो तुझ्या ताब्यांत असतो.

सूक्त अठ्याण्णवावें.

ऋषिः—देवापि ऋष्टिषेणपुत्र; देवता-बृहस्पति-मित्र इत्यादि; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे बृहस्पते, माझ्याकडे (पाऊस पाडणाऱ्या) देवतेला पाठीव. जर मित्र, वरुण, पूषा, आदित्य किंवा वसु यांनीं युक्त कोणीहि असशील तरी तूं शंतनूकरतां पाऊस पाड.

२. दूतासारखा जो वेगशाली आणि तल्लख देव असेल तो हे देवापे, तुझ्याकडून माझ्याकडे येवो. हे बृहस्पते, माझ्याकडे वळ. तुझ्याकरतां मी अर्थपूर्ण स्तोत्र करीत आहें.

३. हे बृहस्पते, तूं आमच्या स्तोत्रांत निर्दोष आवाज, सारखा प्रवाह व ओज उत्पन्न कर. ज्या स्तुतीनें आम्ही शंतनूकरतां पाऊस पडण्याची मागणी करीत आहोंत, त्या स्तोत्रांत स्वर्गांतून मधुर पाझर प्रविष्ट होवोत.

४. आमच्यांत मधुर पावसाचे अंश प्रविष्ट होवोत. हे इंद्रा, रथांत वाहून आणलेलें व हजारोंनीं मोजलें जाणारें धन आम्हांला दे. हे देवापे, यज्ञांत बैस, आणि वेळोवेळीं देवांचें पूजन कर आणि हवि देऊन त्यांचा सत्कार कर.

५. देवांची स्तुति (करूं) जाणणारा आर्ष्टिषेण देवापि ऋषि (स्तुति करण्याकरतां) बसला आहे. तो वरच्या (अन्तरिक्षा) खालीं असणाऱ्या जलमय भागांतून उत्कृष्ट पावसाचें पाणी उत्पन्न करो.

६. ह्या जलमय भागावर वरचा जलमय भाग देवांनीं अडवून ठेवला आहे. तें उदक देवापि आर्ष्टिषेणानें उत्पन्न केल्यावर त्याच्या इच्छेनुसार योग्य भूमीवर पर्जन्यरूपानें पडेल.

७. ज्यावेळीं देवापि शंतनूनें स्तुति करण्याकरतां पुरोहित म्हणून आर्ष्टिषेण स्वीकारला आणि तो देवप्रसिद्ध आणि पाऊस पाडणारा म्हणून बृहस्पतीचें ध्यान करूं लागला, त्यावेळीं प्रसन्न झालेल्या बृहस्पतीनें देवापीला धीर दिला.

८. हे अग्ने, ज्या तुला स्तोत्र म्हणून प्रज्वलित करतों तो देवांनीं अनुमोदन दिलेला तूं पाऊस पाडणाऱ्या मेघाला प्रेरणा कर.

९. हे अग्ने, तुला पूर्वऋषींनीं स्तविलें आहे. तसेंच हे बहुस्तुत अग्ने, सध्यांहि सर्व लोक यज्ञामध्यें स्तवीत असतात. आम्हांला रथांत भरलेली आणि हजारोंनीं मोजली जाणारी (दक्षणा मिळो.) हे तांबड्या घोड्याच्या रथांत बसणाऱ्या अग्ने, आमच्या यज्ञांत ये.

१०. हे अग्ने, नव्याण्णव गाई आणि रथांत हजारांनीं मोजली जाणारी संपत्ति तुझ्याकरितां समर्पण केली आहे. त्यायोगें तूं आपलीं अनेक शरीरें पुष्ट कर. तसेंच द्युलोकाहून आमच्या इच्छेनुसार पाऊस पडूं दे.

११. हे अग्ने, ह्या नव्वद हजार गाई पाऊस पाडणाऱ्या इंद्राला त्याचा भाग म्हणून दे. तसेंच देवयान मार्गाला जाणणारा तूं प्रत्येक ऋतूंत यज्ञ करणाऱ्या औलानाची देवामध्यें स्थापना कर.

१२. हे अग्ने, शत्रूंचे किल्ले फोड. रोग दूर कर. राक्षसांना लांब सार. ह्या अफाट पसरलेल्या अन्तरिक्षांतून विपुल उदक पर्जन्यरूपानें सोड.

सूक्त नव्याण्णवावें.

ऋषिः—वम्र वैखानस; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, आमच्या उत्कर्षाकरतां वाढतें आणि प्रशंसनीय असें उत्कृष्ट धन, ज्ञानी, असा तूं आम्हांस देतोस. वृत्रघातक वज्र तयार केलें आणि तुला दिलें, त्याचें सामर्थ्य व्यक्त करावेस म्हणून आम्ही काय दान द्यावें?

---

१ टीप.—देवापि आर्ष्टिषेण आणि शन्तनु हे दोघे भाऊ होते. धाकटा शंतनु राज्यावर बसला आणि देवापि तप करूं लागला. शंतनूच्या राज्यांत बारा वर्षें पाऊस पडला नाहीं. ब्राह्मण त्याला म्हणाले तूं धाकटा असून राज्यावर बसलास, त्यामुळें देव पाऊस पाडीत नाहीं. तेव्हां शंतनूनें देवापीला राज्यावर बोलाविलें. त्याला देवापि म्हणाला मी पुरोहित होतों व यज्ञ करतों, म्हणजे पाऊस पडेल. तेव्हां त्यानें पावसाकरतां म्हटलेलें हें सूक्त आहे,

२. तो इंद्र तेजस्वी (विद्युल्लतेसह) विद्युत नांवाच्या आयुधासह स्तोत्रें ऐकण्याकरतां येतो. तसेंच बलशाली, विस्तीर्ण आणि फलोत्पादक यज्ञांत बसतो. तो विमानांत बसलेल्या मरुतासह पराभव करीत असतो. त्या सातव्यां भ्रातृभूत इंद्राची गडबड येथें यज्ञांत नाहीं.

३. युद्धाला जाणारा इंद्र सरळपणानें चालून जात आणि शत्रूंना लुटीत युद्ध करीत असतो. युद्धांतून मागें न फिरणारा आणि लिंगपूजकांना ठार करणारा इंद्र शंभरद्वारांचीं नगरें फोडून धन लुटतो.

४. जेथें पादरहित आणि रथरहित असूनहि वेगानें सर्वत्र पसरणाऱ्या आणि जोरानें वाहणाऱ्या नद्या उदकाला वाहून नेत असतात त्या सुपीक भूमीवर चाल करणारा आणि जीवाचें रक्षण करणारा इंद्र खूप पाऊस पाडतो.

५. स्वयंदाता, अनिन्द्य, थोर आणि रुद्रासह असणारा इंद्र आपलें घर सोडून येवो. वम्राचे आईबाप दुखःरहित झाले. वम्र शत्रूंचें अन्न गाठून लुटतो आणि शत्रूला रडावयास लावतो.

६. तोच सर्वांचा धनी व गर्जना करणारा, इंद्र सहा डोळयांच्या आणि तीन डोक्यांच्या (त्रिशीर्ष) दासाला ठार करता झाला, इंद्राच्या साहाय्यानें उत्कर्ष पावणारा त्रित वाघनखें घातलेल्या बोटानें वराहाला ठार करता झाला.

७. जो इंद्रद्रोही आणि घातक माणसाला (ठार करण्यास) उद्युक्त होत्साता वज्र टाकतो, तो लोकांचा पुढारी होऊन आमच्याकरतां प्रकट होणारा पूज्य इंद्र युद्धांत शत्रूंना ठार करतो.

८. मेघाप्रमाणें गवतांना पाणी देणारा, तसेंच आम्हांला घराचा रस्ता दाखविणारा, असा इंद्र जेव्हां आपण होऊन सोमाकडे जातो, तेव्हां ससाण्याप्रमाणें चपळ असणारा तो वाघनखें हातांत घालून शत्रूला ठार करतो.

९. जो ह्या इंद्राच्या रूपाचा अनुभव घेतो आणि जो ज्ञाता मरुतांना जाणतो तो हा स्तोता स्तुत्य व ज्ञात्या अशा इंद्राला स्तुतीनें आणतो. तो इंद्र आपल्या बलशाली आयुधानें मोठ्या शत्रूंना दूर करतो. आणि स्तुति करणाऱ्या कुत्साकरतां शुष्णाला पराभूत करतो.

१०. मरुतांसह असणारा हा इंद्र स्तोत्यांना धन देत असतो. तसेंच तेजानें मनोहर असणाऱ्या वरुणाप्रमाणें तो कुशल आहे. तसेंच हा देखणा आणि सर्वकालीं संरक्षक असे याला लोक समजतात. यानें चार पायाच्या अररूला ठार केलें आहे.

११. जेव्हां सोम पिळून यज्ञ करणाऱ्या औशिजानें स्तुति केली, तेव्हां इंद्राच्या स्तोत्रांनीं (सामर्थ्य आलेल्या) उशिजपुत्र ऋजिश्वानें पिप्रूचा गौळवाडा फोडला. आणि शहरावर चाल करून (शत्रूंचा) पराभव केला.

१२. हे बलशाली इंद्रा, तुझ्याकडे पुष्कळ हवि देण्याकरतां वम्रक पायांनीं येत आहे. येणाऱ्या ह्या वम्राचें कल्याण होवो. त्याला अन्न, बळ आणि चांगलें घर हें सर्व प्राप्त होवो.

सूक्त शंभरावें.

ऋषि—दुव वंदनपुत्र; देवता–विश्वेदेव; छंदः—१२ त्रिष्टुभ्, बाकी जगती.

१. हे धनवान् इंद्रा, आमच्या यज्ञांत स्तविलेला आणि सोम प्यालेला तूं आमच्या उत्कर्षाकरतां आणि उपभोगाकरतां आम्हांला तुझ्यासारखें बल दे. देवासह असणाऱ्या आमच्या यज्ञाचें सर्वप्रेरक इंद्र संरक्षण करो. सर्वोत्पादक अदितीचीहि आम्ही प्रार्थना करतों आहोंत.

२. पोषण करणाऱ्या इंद्राला भाग द्या. जो पांढऱ्या पशूचें दूध पितो त्या शुद्ध करणाऱ्या व आवाज करीत जाणाऱ्या अशा वायूला भाग द्या. आम्ही सर्वांना उत्पन्न करणाऱ्या अदितीलाहि प्रार्थना करतों.

३. सर्वप्रेरक सूर्य आम्हां सरळ इच्छा करणाऱ्या व सोम काढणाऱ्या भक्ताला शिजलेलें अन्न देवो, कीं ज्यायोगें आम्ही देवांना भूषण होऊं.

४. इंद्र आम्हांला प्रसन्न होवो. सर्वदा राजा सोम आमचीं स्तोत्रें ऐको, कीं ज्यायोगें आम्हांला प्रिय असणारी संपत्ति प्राप्त होईल. आम्ही सर्वोत्पादक अदितीची प्रार्थना करीत आहोंत.

५. इंद्र प्रशंसनीय सामर्थ्यानें जागोजाग संरक्षण करतो. हे बृहस्पते, तूं माझें आयुष्य वाढविणारा आहेस. तसेंच यज्ञीय, विचारी आणि बुद्धिमान् इंद्र आमचा पिता आहे. तो आम्हांला सुख देवो. आम्ही सर्वोत्पादक अदितीची प्रार्थना करीत आहोंत.

६. इंद्राचा चांगल्या तऱ्हेनें तयार केलेला आणि दैवी बळ असलेला अग्नि आमच्या घरांत आहे. तो अग्नि (देवांची) स्तुति करणारा, हविर्युक्त आणि यज्ञार्ह आहे. तो यज्ञार्ह आणि रमणीय असणारा अग्नि

आमचा शेजारी आहे. आम्ही सर्वोत्पादक आदितीची प्रार्थना करतों आहोंत.

७. हे सर्वत्र असलेले देवहो, तुमच्या संबंधीं मी गुप्त पाप केलें नाहीं आणि तुम्हांला राग येईल असें उघडहि कांहीं केलें नाहीं. आम्हांला मरणारा देह प्राप्त होऊं नये. आम्ही सर्वोत्पादक अदितीची स्तुति करतों.

८. जेथें मधुर सोमाला कुटणारा दगड खूप स्तविला जातो तेथें सर्वप्रेरक सवितृदेव आमचा रोग दूर करो. व ते दगड आम्हाला पापांत न ढकलोत. आम्ही सर्वोत्पादक आददीची स्तुति करीत आहोंत.

९. हे सर्व व्यापक देवहो, सोम कुटीत असतां माझा दगड वर होवो. त्यामुळें माझे सर्व गूढ शत्रू दूर होवोत. स्तुत्य सवितृदेव आमचा पालक आहे आम्ही सर्वोत्पादक आदितीची स्तुति करीत आहोंत.

१० हे गाईनो, तुम्ही तृणयुक्त प्रदेशांत वाढलेलें गवत खा जें यज्ञगृहांत आहे आणि जें गोठ्यांत ठेवलेलें आहे तें खा.तुझें दूधच आमच्या शरीराला पोषक होवो. आम्ही सर्वोत्पादक आदितीची स्तुति करीत आहोंत.

११. कर्माला परिपूर्णता आणणारा आणि सर्वांकडून स्तुति केला जाणारा इंद्रच सोम काढणारांचा संरक्षक आणि अत्यंत स्तुत्य आहे. कारण, इंद्राला पिण्याकरतांच पात्र सोमानें भरलेलें असतें. आम्ही सर्वोत्पादक आदितीची स्तुति करतों.

१२. हे इंद्रा, तुझा प्रकाश आश्चर्यकारक आहे. तसेंच तो आमच्या कर्माला पूर्तता आणणारा व इष्ट आहे. हे इंद्रा, स्तोत्यांना धन देणाऱ्यांना आणि अन्यांना अशक्य अशी आमची स्पर्धा आहे.म्हणून सरळ दोरीनें गाईला बांधून आणावें त्याप्रमाणें मी तुझ्याकडे येत आहे.

सूक्त एकशेएकावें.

ऋषिः—बुध सोमपुत्र; देवता–विश्वेदेव किंवा ऋत्विक्स्तुति; छंदः–९ व १२ जगती, ५ बृहती बाक। त्रिष्टुभ्.

१. (अग्नीची इच्छा करणारे ऋत्विज् म्हणतात.) एकत्र झालेल्या माझ्या मित्रांनो,एकाचित्तानें उठा आणि अग्नि प्रज्वलित करा. इंद्राबरोबर असणारा अग्नि, दधिक्रा आणि देवी उषा यांना आम्हांला मदत करण्याविषयीं आम्ही बोलावतों.

२. रम्य स्तोत्रें बनवा.कर्में करा. पैलपार जाण्यासाठीं वल्ह्यांनीं सज्ज असलेली नांव तयार करा. व तयार असा. हे मित्रहो, यज्ञ पुढें न्या.

३. हे मित्रहो, आऊतें जोडा. पाळ्या पाडा. आणि पाळींत बीं पेरा. आमच्या प्रार्थनेमुळें पीक चांगलें येईल. लवकर आलेल्या पिकावर विळा चालूं लागेल.

४. देवांवर श्रद्धा ठेवणारे शहाणे लोक सुखाकरतां आऊतें जोडतात व जमीन मोकळी करतात.

५. हे मित्रहो,पिण्याचीं भांडीं बाहेर काढा आणि त्यांना वाद्यांनीं बांधा. झरे असलेली, सुंदर वहाणारी आणि न आटणारी अशी विहीर आपण उपसूं.

६. तयार केलेल्या पोहोऱ्यांनीं, आणि चांगल्या पट्ट्यांनीं विहिरींतल्या पाण्याचा अखंड, सुदंर व भरपूर असा प्रवाह वाहवूं.

७. घोड्यांना ताजेतवाने करा. तुमच्या पुढें असलेलें जिंका. रथ सुखच वाहून आणणारा करा. दगडी चाकांनीं, लांकडी पोहोऱ्यांनीं लोकांचें पेय असणारी ही विहीर द्रोण हेंच कवच करून ओता.

८. गोळवाडे तयार करा. तेच तुमच्या लोकांची पानभूमि आहेत. पुष्कळ आणि मोठे अंगरखे शिवा. हल्ल्यांपासून सुरक्षित असे लोखंडी किल्ले तयार करा. तुमचें भांडें गळूं नये म्हणून त्याला बळकट करा.

९. हे स्तोतेहो, तुमच्या यज्ञार्ह, श्रेष्ठ व पूज्य यज्ञबुद्धीला आमच्या संरक्षणाकरतां मी जागृत करतों. गवत खाऊन गोठ्यांत गेल्यावर जशी एखादी भव्य गाय हजारों धारांनीं दूध देते त्याप्रमाणें तुमची बुद्धि आम्हांला धन देवो.

१०. हे अध्यर्यूहो लांकडाच्या भांड्यांत सोन्यासारखा सोम ओता. पोलादी कुऱ्हाडींनीं (रथ) तासा. त्यांना दहा दोऱ्यांनीं घट्ट बांधा आणि दोन्ही जोखडांना एक बैल जोडा.

११. दोन बायकांचा नवरा ज्याप्रमाणें त्यांच्या मध्यें असतो त्याप्रमाणें दोन जोखडांना बलवान् एक बैल जोडला आहे. अशा रथाला रानांत उभें करा. विहीर खणल्याप्रमाणें असणारें सोमपात्र रथांत ठेवा.

१२. हे लोकहो, आपणास इंद्र सुख देणारा आहे. त्या इंद्राशीं क्रीडा करा आणि सामर्थ्य प्राप्तीकरतां त्याला विनंति करा. हे होतेहो, निष्टिग्रीअदितीचा मुलगा जो इंद्र त्याला सोम पिण्याकरतां लवकर खालीं आणा.

---

१० टीप:--सोमाच्या रथाला एकच बैल जोडतात आणि दुसऱ्या जुवाला अध्वर्यु किंवा ऋत्विजांपैकीं कांहीं ओढावयास लागतात.

सूक्त एकशें दोनावें.

ऋषिः--मुद्गल भर्म्यश्वपुत्र; देवता-इंद्र किंवा द्रुघण मुद्गर; छंदः—१-३-१२ बृहती, बाकी त्रिष्टुभ्.

१. हे मुद्गला, तुझा असहाय रथ इंद्र आपल्या सामर्थ्यानें संरक्षण करो. हे बहुस्तुता इंद्रा, त्या प्रसिद्ध युद्धांत धन लुटणाऱ्या शत्रूंपासून आमचें रक्षण कर.

२. जेव्हां रथांत बसून हजारानीं संपत्ति जिंकली तेव्हां तिचें वस्त्र वाऱ्यावर उडत होतें. गाई मिळविण्याच्या लढाईत मुद्गलाची बायको सारथि झाली होती. इंद्राचें साहाय्य असलेल्या तिनें धन गोळा केलें.

३. हे इंद्रा, कत्तल करणाऱ्या आणि चालून येणाऱ्या ह्या शत्रूंवर तूं वज्र टाक. हे धनवन्ता, दास किंवा आर्य यांचें शस्त्र माझ्यावर येऊं देऊं नकोस.

४. (वृषभस्तुति) त्या बैलानें आनंदाच्या भरांत संपूर्ण सरोवर पिऊन टाकलें. टेकाड शिंगांनीं विस्कळीत तो शत्रूंवर चालून गेला. अण्डिल आणि जयाविषयीं उत्कण्ठित झालेल्या त्यानें जोरानें पुढले पाय ताणले आणि लढाईला तयार झाला.

५. मुद्गल म्हणतोः—जवळ येणाऱ्या लोकांनीं ज्या ह्या बैलाला मोठ्यानें ओरडावयास लावलें आणि रणांत हगामुतावयास लावलें, त्याच्या साहाय्यानें पुष्ट असे शेंकडों हजारों गाईबैल मुद्गलानें रणांत जिंकले.

६. लढाईकरतां बैल सज्ज केला, सारथि मुद्गलानीनें ह्यास पुनः पुनः ओरडून उत्तेजन दिलें. गाडीसह धावणारे, भयंकर व सज्ज असे सैनिक मुद्गलानीच्या जवळ गेले.

७. शहाण्या मुद्गलानें रथाचें लांकूड काढलें आणि बैलाला वळवीत जोखडाला गुंतून टाकलें. इंद्रानें गाईच्या धन्याचें संरक्षण केलें आणि वशिंडयुक्त असा बैल जोरानें चालूं लागला.

८. वादीनें लांकूड बांधून टाकणारा, केंस असलेला आणि चाबूक घेतलेला असा तो सुखानें चालूं लागला. पुष्कळ लोकांना धन देत आणि गाईंना स्पर्श करीत बल धारण केलें (जय मिळवला.)

९. ज्याच्या साहाय्यानें लढाईत शेकडों हजारों गाईबैल मुद्गलानें जिंकले. त्या रणांगणांत (काम नसल्यामुळें) स्वस्थ असलेल्या बैलाच्या लाकडी मित्राला पहा.

१०. शत्रूंना जवळ करणारा असा कोणी पाहिला आहे, कीं जो गाडीला जोडला जातो आणि (युद्धाकरतांहि) घेतात. याच्या करतां गवत आणावें लागत नाहीं आणि पाणीहि आणावें लागत नाहीं. मात्र जय देत एक बाजूचें जोंखड वहातो.

११. (मुद्गलानीस्तुति) नवऱ्यानें टाकलेल्या स्त्रीला नवरा प्राप्त व्हावा त्याप्रमाणें उत्कर्ष पावणारी मुद्गलानी (मेघानें) पृथ्वीवर पाऊस पाडावा त्याप्रमाणें गाहिंवरली. गाई इच्छिणारी मी सारथी होऊन गाई जिंकल्यां आणि सुखप्रद अन्नाप्रमाणें पुष्कळ धन प्राप्त केलें.

१२. हे इंद्रा, ज्या अर्थी बळकट बाह्यांनीं जोडलेले दोन बैल जोडून उत्साह देणारा तूं जय देऊं इच्छितोस, त्याअर्थी तूं सर्व जगाच्या डोळयाचा डोळा आहेस.

सूक्त एकशें तिनावें.

ऋषिः--अप्रतिरथ इंद्रपुत्र; देवता-४ बृहस्पति, १२ अप्वादेवी, १३ मरुत् किंवा इंद्र, बाकी इंद्र; छंदः—१३ अनुष्टुभ् बाकी त्रिष्टुभ्.

१. चलाख व तापट बैलाप्रमाणें भयंकर, घातक, शत्रूंना क्षोभक, मोठ्यांदा गर्जना करणारा, अनिमिष व महापराक्रमी इंद्र शेंकडों सेना एकदम जिंकतो.

२. गर्जना करणाऱ्या, अनिमिष, जयशील, धैर्यशील आणि अच्युत अशा युद्ध करणाऱ्या इंद्राच्या साहाय्यानें त्या शत्रूला जिंका. हे योद्धे लोकहो, धनुर्धारी आणि बलवान् इंद्राच्या सहाय्यानें तुम्ही शत्रूंचा पराभव करा.

३. तो इंद्र धनुर्धारी लोकांसह असतो, तो तलवारी घेतलेल्या लोकांसह सर्व ताब्यांत ठेवणारा, शत्रूंच्या संघांत लढाईकरितां जाणारा, संघांना जिंकणारा, सोम पिणारा, बाहुबली, सज्जधनु आणि टाकलेल्या बाणांनीं ठार मारणारा आहे.

४. हे बृहस्पते, तूं रथानें आमच्याकडे ये. राक्षसहन्ता, शत्रूंना नष्ट करणारा, (शत्रूंच्या) सेना उधळून लावणारा, हिंसक आणि युद्धानें जिंकणारा तूं आमच्या रथांचा संरक्षणकर्ता हो.

टीप—मुद्गलाचे गाईबैल चोरांनीं चोरून नेले. मात्र एक म्हातारा बैल नेला नाहीं. त्यानें तो एक बैल आणि लांकडी भरीव मुद्गर गाडीला जुंपले आणि सरळ युद्धांत गेला. तेथें मुद्गर चोरावर टाकून चोर जिंकले आणि गाई परत आणल्या. (नि. ९-२३) ही कथा या सूक्तांत आहे.

५. सर्वाधार, महान्, महायोद्धा, बलवान्, अन्नवान्, पराभव करणारा, उग्र,पराक्रमी, अनुयायी असलेला, बलापासून निर्माण झालेला आणि गाई मिळविणारा तूं जयशाली रथांत बैस.

६. पर्वतभेत्ता, उदकलब्धा, वज्रबाहु, युद्ध जिंकणारा आणि बलानें शत्रूंचा पराभव करणारा हा इंद्र आहे. हे एकत्र झालेले योद्धेहो, तुम्ही याला अनुसरून युद्ध करा. हे मित्रहो, तुम्ही इंद्राला अनुसरून आपलीं कार्यें करा.

७. मेघांत आपल्या सामर्थ्यानें प्रवेश करणारा, निर्दय, पराक्रमी, रागीट, अच्युत, शत्रुसेनांचा पराभव करणारा व कोणासहि युद्ध करण्यास अशक्य असा इंद्र आमच्या सेना युद्धांत रक्षो.

८. ह्या सेनांचा नायक इंद्र असो, त्याच्या अग्रभागीं बृहस्पति, दक्षिणा, यज्ञ व सोम असोत. जयशील व शत्रुमर्दक देवसेनांच्या अग्रभागीं मरुत् चालोत.

९. बलशाली इन्द्राचें, राजा वरुणाचें,आदित्यांचें आणि मरुतांचें उत्कृष्ट बल आमचें असो. महोदार आणि जगच्चालक देवांचा जयघोष उत्पन्न होत आहे.

१०. हे धनवान् इंद्रा, आमचीं आयुधें आणि आमच्या लोकांचीं मनें तूं उत्सुक कर. हे वृत्रहन्त्या इन्द्रा, घोड्यांचे वेग वाढोत आणि जयशाली रथांचे घोष निर्माण होवोत.

११. इन्द्र आमच्या एकत्र झालेल्या ध्वजांचा (म्हणजे सेनांचा) रक्षणकर्ता असो. आमचे बाण शत्रूंना जिंकोत. आमचे योद्धे श्रेष्ठ ठरोत. हे देवहो, युद्धांत तुम्ही आमचें रक्षण करा.

१२. हे (पापाभिमानिनी) अप्वे, आमच्या शत्रूंचें अन्तःकरण मोहवीत त्याचें शरीर ताब्यांत घे, जा. त्यांचीं हृदयें शोकांनीं जाळून टाक. आमचे शत्रु गाढ अंधकारांत पडोत.

१३. हे लोकहो, जा. जय मिळवा. तुम्हांला इंद्र सुख देवो. ज्यायोगें पराभव होणार नाहीं असे तुमचे बाहु बलशाली असोत.

सूक्त एकशें चारावें.

ऋषिः—अष्टक वैश्वामित्र; देवता–इंद्र; छंदः–त्रिष्टुभ्.

१. हे बहुस्तुत इंद्रा,तुझ्याकरतां सोम पिळला आहे म्हणून दोन घोड्यांनीं आमच्या यज्ञाकडे लवकर ये. तुझ्याकरतां सतत चालू असलेलीं उत्कृष्ट स्तोत्रें केलीं जात आहेत. म्हणून हे इन्द्रा, येऊन पिळलेला सोम पी.

२. हे अश्वयुक्ता इंद्रा, पाण्यांत धुतलेला आणि लोकांनीं पिळलेला असा सोम पी आणि तृप्त हो. हे स्तुत्य इंद्रा, तुझ्याकरतां दगड जो सोम काढतात त्यांनीं तूं उत्साहयुक्त हा.

३. हे काळसर घोडे असलेल्या इंद्रा, उग्र आणि पिळलेला सोम पिण्याकरितां जाण्याची तुला मी प्रेरणा करतों. कर्मासह स्तुति केला जाणारा तूं स्तुति आणि कर्में यांनीं संतुष्ट हो.

४. हे शक्तिवन्ता इंद्रा,तुझ्या सहाय्य आणि सामर्थ्यानें संततियुक्त अन्न प्राप्त करणारे यज्ञवेत्ते तुझे भक्त यज्ञगृहांत स्तुति करीत आनंदांत असतात.

५. हे उदी घोडे असलेल्या इंद्रा, स्तुत्य, सुखकारक आणि श्रेष्ठ अशा तुझ्या नेतृत्वामुळें स्तोते लोक मधुर वाणीनें तुझी उत्कृष्ट कृपा वर्णन करीत असतात.

६. हे अश्वयुक्ता, तूं आपल्या दोन घोड्यांसह पिळलेला सोम पिण्याकरतां ये. हे इंद्रा, क्षमाशील अशा तुला यज्ञ प्राप्त होतो. यज्ञाचा ज्ञाता असा तूं दाता आहेस.

७. अपरिमित बळ असलेला, हल्ला करणारांचा पराभव करणारा, सोमांत रमणारा, धनवान्, सुस्तुत आणि युद्धांत माघार न घेणाऱ्या इंद्राला स्तोत्रें भूषित करतात. स्तोत्यांचीं स्तोत्रें त्याचें वर्णन करीत असतात.

८. हे इंद्रा, नगरें उध्वस्त करणारा तूं ज्या नद्यांच्या सहाय्यानें समुद्र तरलास, त्या मधुर व मनोहर सात नद्या वहात आहेत. तूं नव्याण्णव नद्यांतून देव आणि लोक यांच्या करतां मार्ग प्राप्त केलास.

९. हे इंद्रा, ज्या महान् उदकांना दुष्टांपासून तूं मुक्त केलेंस, त्या पाण्यावर तूं एकटा व पहारा करीत असतोस. हे इंद्रा, वृत्रांच्या लढाईंत जें उदक तूं मिळवलेंस त्यांनीं तूं आपलें सर्वगामी शरीर पुष्ट कर.

१०. इंद्र महायोद्धा आणि कर्तृत्ववान् आहे. म्हणून वाणी इंद्राचीच स्तुति करते. यानें वृत्राला ठार केलें, प्रकाश उत्पन्न केला, तसेंच चालून येणाऱ्या शत्रूंच्या सेनांचाहि पराभव केला.

११. ह्या अन्नप्रापक यज्ञांत श्रेष्ठ, सुखकारक धन जेत्या, वृत्रहन्त्या, उग्र आणि स्तोत्रें ऐकणाऱ्या इंद्राला युद्धांत संरक्षणाकरतां आम्हीं बोलावतों.

सूक्त एकशें पांचावें.

ऋषिः—दुर्मित्र किंवा सुमित्र ऐंद्रकुत्सपुत्र; देवता-इंद्र; छंदः—२ व ७ उष्णिह्, ११ त्रिष्टुभ्, १ गायत्री किंवा उष्णिह्, बाकी उष्णिह्.

१. हे सर्वत्र असणाऱ्या इंद्रा (आमच्या वरीं) स्तोत्रें इच्छिणाऱ्या तुला, विपुल सोमांत पाणी घालण्याकरतां पाट जसा आडवला जातो, तसें तुला केव्हां आडवलें जाईल ? तूं केव्हां निवारण केला जाशील ?

२. ज्याचे दोन घोडे शिकवलेले, कुशल, चलाख, पुल्लिंगी, द्यावापृथ्वीप्रमाणें महान् आणि केंसाळ आहेत त्याचा धनी असणाऱ्या हे इंद्रा, तूं दाता आहेस.

३. जो इंद्र वृत्राशीं लढाई करतांना माणसाप्रमाणें दमतो आणि भितो, तो इंद्र चांगल्या गोष्टींनीं युक्त होतो व बल प्राप्त करतो. तेव्हां वृत्राचा पराभव करतो.

४. लोकांना धन देण्याकरतां धनासह रथांत स्तुतींनीं सत्कार केला जाणारा आणि खेळणाऱ्या घोड्यांना हाणणारा शूर इंद्र—

५. आणि जो इंद्र केंसाळ घोड्यावर भक्तांच्या कल्याणाकरतां बसतो तो मोठ्या हनुवटीचा इंद्र शत्रूंना ठार करतो.

६. ऋभूप्रमाणें बलानें व कर्तृत्वानें आकाशांत संचार करणारा शूर इंद्र वृत्रादिकांना ठार करतो, तो मरुतासह डौलदार सामर्थ्याचा इंद्र स्तविला गेला.

७. ज्या इंद्रानें वध्य दस्यूंकरतां वज्र केलें तो काळ्या दाढीमिशा असलेला, उदी घोडे असलेला आणि बिनजखमी तोंडानें आकाशाप्रमाणें आश्चर्यकारक आहे.

८. हे इंद्रा, आमचीं पापें नष्ट कर. आम्ही स्तुतीनें स्तुति न करणाऱ्यांना नष्ट करूं. स्तुतिविरहित यज्ञ तुला आवडत नाहीं.

९. हे इंद्रा, (अग्ने) जेव्हां यज्ञगृहांत ऋत्विजांमध्यें तुझी तिप्पट मोठी ज्वाला भडकते, तेव्हां तूं सर्वांसह कीर्तिप्रद नौकेंत चढतोस.

१०. ज्या पळीनें हवि तोंडांत घातला जातो, ती पळी शुद्ध हवि देणारी होवो. हे इंद्रा, तीच चित्रविचित्र असणारी सोमाला आश्रयभूत होवो.

११. हे बलवान् इंद्रा, जेव्हां तुझ्यापासून शेकडों धनाची इच्छा केली, जेव्हां युद्धांत कुत्सपुत्र दुर्मित्र आणि सुमित्र यांचें रक्षण केलेस, तेव्हां दुर्मित्र व सुमित्र यांनीं अशी स्तुति केली.

सूक्त एकशें सहावें.

ऋषिः—भूतांश कश्यपपुत्र; देवता-अश्वि; छंदः-त्रिष्टुभ्.

१. हे जोडीनें असणाऱ्या अश्विहो, तुम्ही दोघे त्याच गोष्टींची इच्छा करतां. कोष्टी वस्त्रें विणतात त्याप्रमाणें तुमची स्थिति विस्तारली जाते. भक्त तुम्ही बरोबर यावें म्हणून तुमची स्तुति करीत आहे. सणावाराचे दिवशीं जसें चांगलें अन्न केलें जातें, त्याप्रमाणें तुम्ही चांगलें करतां.

२. नांगराला ओढणाऱ्या बैलाप्रमाणें खावयास देणाराचा तुम्ही आश्रय करतां. लढाईला निघालेल्या घोड्याप्रमाणें तुम्ही बोलावणाराकडे जातां. दूताप्रमाणें तुम्ही लोकांत यशस्वी होतां आणि रेड्याप्रमाणें डोहाकडे जातां.

३. जुळून असणाऱ्या पाखराच्या पंखाप्रमाणें तुम्ही आहांत. पशूप्रमाणें आश्चर्यकारक असे तुम्ही दोघे आमच्या यज्ञांत या. भक्ताच्या यज्ञांत अग्नीप्रमाणें तुम्ही दोघे तेजस्वी व्हा. अध्वर्यूप्रमाणें तुम्ही अनेक ठिकाणीं पूजिले जातां.

४. बांधवभूत मुलाला आईबापाप्रमाणें, तेजानें चंद्रसूर्याप्रमाणें आणि राजाप्रमाणें कर्मप्रवृत्त करणारे व्हा. धनिकाप्रमाणें पोषक आणि प्रकाशाप्रमाणें उपभोगप्रद, असें तुम्ही घोड्याप्रमाणें आमच्या यज्ञांत या.

५. तुम्ही दोघे बैलाप्रमाणें पुष्ट आणि सुखकर आहांत, मित्रावरुणाप्रमाणें यथार्थदर्शी, अपरिमित धन असणारे तुम्ही सुखी आहांत. घोड्याप्रमाणें उंच, अन्नानें पुष्ट, रूपानें चंद्रसूर्य असणारे, मेंढ्याप्रमाणें अन्नरूप, पूजनीय आणि पोषक असे तुम्ही आहांत.

६. अंकुशाप्रमाणें वाकविणारे आणि शत्रुहन्ते, घातकाप्रमाणें हिंसक आणि विदारक, रत्नाप्रमाणें निर्मळ आणि जयशील असे स्तुत्य अश्वि माझें शरीर अजर व अमर करोत.

७. हे उग्र अश्विहो, वीराप्रमाणें असणारे तुम्ही चलनशील, जरायुक्त आणि मरणशील शरीर जगामध्यें पाण्याप्रमाणें तारा. बलशाली ऋभूंप्रमाणें वेगवान् रथ तुम्हाला प्राप्त होवो, वायूप्रमाणें तो सर्वत्र जावो आणि संपत्ति आणो.

८. भांड्याप्रमाणें पोटांत मधुररस उपभोगणारे, धनरक्षक, अत्यंत शत्रुहिंसक आणि फार नांवाचें

टीपः—५-६-७-८ ह्या ऋचा लागत नाहींत. अशी प्राचीन तक्रार आहे. निरुक्त पहा.

आयुध धारण करणारे, पक्ष्याप्रमाणें उडणारे, चंद्रासारखे शुभ्र वस्त्र धारण करणारे, अक्कडबाज आणि सुंदर गमन करणारे तुम्ही आहांत.

९. श्रेष्ठ पुरुषाप्रमाणें गंभीर स्थानीं स्थान मिळवणारे, उथळ पाण्यांत पायाप्रमाणें उतार जाणणारे, कानाप्रमाणें स्तोत्याची स्तुति ध्यानांत घेणारे, अवयवां- (देहाचा आश्रय करतो त्या) प्रमाणें तुम्ही आमच्या आश्चर्यकारक कर्माचा आश्रय करा.

१०. मेघाप्रमाणें उदक देणारे, मधमाशीप्रमाणें खालीं तोंडे असलेल्या गाईच्या कासेंत दूध उत्पन्न करणारे, लठ्ठ मनुष्याप्रमाणें घाम (उदक) पाझरणारे, क्षीण गाय चांगल्या गवतामुळें जशी दुधानें युक्त होते तसे तुम्ही आहांत.

११. हे आश्विहो, आम्ही स्तोत्रें खूप म्हणावीत. अन्न द्यावें. म्हणून तुम्ही एका रथांत बसून आमचीं मननीय स्तोत्रें ऐकण्यास या. आणि गाईच्या कासेंत असलेलें मधुर व पक्क अन्नाकरतांहि या. अशाप्रकारें भूतांशानें अश्विनींची इच्छा पूरी केली. (स्तुति केली.)

सूक्त एकशें सातावें.

ऋषिः—दिव्य आंगिरस किंवा दक्षिणा प्रजापतिकन्या; देवता–दक्षिणा किंवा दाता, छंदः—४ जगती, बाकी त्रिष्टुभ्,

१. (सूर्याचें) इंद्राचें महातेज घोड्याकरतां प्रकट झालें आहे. सर्व जग अंधारांतून मुक्त झालें. पितरांनीं दिलेला मोठा प्रकाश (सूर्य) उगवला आहे. दक्षिणेचा मोठा रस्ता दिसूं लागला.

२. दक्षिणा देणारे वर स्वर्गावर जातात. जे घोडे देणारे आहेत ते सूर्यासह राहतात. जे सुवर्ण देतात ते अमर होतात. हे सोमा, जे वस्त्रें देतात ते सोम प्राप्त करतात. हें सर्व आयुष्य वाढवितात.

३. ही दैवी पूर्ति दक्षिणा जे तुला प्रसन्न करीत नाहींत, त्या अयाजकांना मिळत नाहीं. पापाच्या भीतीनें अनेक नित्य दक्षिणा देणारे लोक देवांना प्रसन्न करीत असतात.

४. ते भक्त अनेक प्रकारें वाहणाऱ्या वायूला, स्वर्गप्रापक आदित्याला आणि लोकद्रष्ट्या देवांना हवि (देण्याकरतां) पाहतात. यज्ञांत जे देवांना प्रसन्न करतात आणि हवि देतात, ते सप्त होत्यांची मातृभूत दक्षिणा प्राप्त करतात.

५. बोलावलेला दक्षिणायुक्त यजमान मुख्य समजला जातो. दक्षिणा देणारा गांवाचा पुढारी म्हणून पुढें चालतो. जो प्रथम दक्षिणा देतो त्यालाच मी लोकांचा राजा असें मानतों.

६. त्यालाच ऋषि, त्यालाच ब्रह्मा, त्यालाच यज्ञनायक, साम गाणारा आणि स्तोत्रें म्हणणारा असें म्हणतात. जो प्रमुख दक्षिणा देऊन आराधना करतो, तो तीनहि प्रकारचीं शरीरें जाणतो.

७. जो आपल्या स्वतःचें कवच दक्षिणा आहे असें जाणतो तो घोडा, गाईबैल, तसेंच सोनें, रुपें व अन्न दक्षिणा म्हणून देतो.

८. उदार मरत नाहींत, त्यांचा नाश होत नाहीं, उदारांना त्रास व कष्ट भोगावे लागत नाहींत. (एवढेंच नव्हें तर) हें सर्व जग आणि स्वर्ग हें दात्यांना दक्षिणा देतें.

९. उदार प्रथम चांगल्या गाई प्राप्त करतात. उदारांना ज्या सुंदर वस्त्रें नेसलेल्या स्त्रिया आहेत त्या प्राप्त होतात. जे आव्हान करीत येतात त्या शत्रूंना उदार लोक जिंकतात आणि (दक्षिणा देणाऱ्या) उदारांना दारु प्यावयास मिळते.

१०. उदाराकरतां चलाख घोडे नटवले जातात. उदाराकरतां तरुणी नटून सजून बसते. उदार माणसास कमलयुक्त सरोवराप्रमाणें नटलें सजलेलें, देवांच्या वाड्याप्रमाणें आश्चर्यकारक घर असतें.

११. बसावयास सुंदर असलेले घोडे उदार अशा हातानें धर्म करणारांना बसावयास मिळतात. दक्षिणा देणारांचा रथ सुंदर असतो. हे देवहो, रणांत उदाराचें संरक्षण करा. उदार युद्धांत शत्रूंना जिंकणारा असतो.

सूक्त एकशें आठावें.

ऋषिः—१–३–५–७–९ पणी, २–४–६–८–१० व ११ सरमा देवता–सरमा व पणी; छंदः—त्रिष्टुभ.

१. पणी म्हणतातः—काय इच्छेनें दुरून येणारी सरमा इकडे आली. (किती) लांब रस्ता ! हे सरमे, तुझें आमचेपाशीं काय काम आहे ? तुझी रात्र (कुठें) कशी होती ? तूं रसा नदी कशी तरलीस ?

२. सरमा म्हणतेः—हे पणीहो, इंद्राची दूती असणारी इंद्रानें पाठवल्यावरून तुमचे मोठाले सांठे इच्छिणारी मी सुरक्षित फिरते आहे ? म्हणून (पाणी) ओलांडण्याच्या भीतीपासून आलिप्त होते, यामुळें मी रसेचें पाणी तरलें.

टीप—सप्त होते १०–९१–१० वरील टीप पहा.

३. पणी म्हणतात:—ज्याची दूती असणारी तूं इतक्या दुरून येथें आलीस, तो इंद्र कसा आहे? त्याची दृष्टि कशी आहे? तो आम्हांकडे येवो. आम्ही त्याच्याशीं मैत्री करूं. तो आमच्या गोधनाचा अधिपति होवो.

४. सरमा म्हणते:—ज्याचें दौत्य पत्करून मीं इतक्या दूर आलें आहें,तो सर्वांना ठार करतो.पण त्याला कोणी ठार करूं शकत नाहीं. त्याला गंभीर असणारे पाण्याचे प्रवाह झाकूं शकत नाहींत. हे पणीहो, इंद्रानें ठार केलेले तुम्ही मरून पडाल.

५. पणी म्हणतात:—हे भाग्यवान् सरमे, स्वर्गाच्या भोंवतीं फिरणारी तूं ज्या गाई इच्छितेस त्यांना युद्ध केल्याशिवाय कोण सोडील? आमचीं हत्यारेंहि तीक्ष्ण आहेत.

६. सरमा म्हणते:—हे पणीहो, तुमचीं भाषणें सेना जमविण्यास अयोग्य आहेत आणि तुमचीं शरीरें बाण टाकण्यास योग्य नाहींत. कारण तीं पापी आहेत. तुमचा मार्ग चालून जाण्यास (असमर्थ) अयोग्य असो. बृहस्पति तुम्हांला सुख न देवो.

७. सरमा म्हणते:—हे पणीहो, सोम पिऊन मदयुक्त झालेले नवग्व अंगिरस व अयास्य येथें येतील आणि ते गाईंचे हे समूह वाटून घेतील, नंतर हें बोलणें तुम्ही सोडाल.

८. पणी म्हणतात—हे सरमे, गाई बैल,घोडे आणि संपत्ति यांनीं खचलेला असा हा दगडांनीं बांधलेला खजिना आहे. चांगले संरक्षक असणारे पणी त्याचें संरक्षण करतात. शंका घेऊन तूं येथें व्यर्थ आलीस.

९. पणी म्हणतात.—(तिला फितूर करण्याच्या उद्देशानें) हे सरमे, तूं देवांनीं त्रास दिल्यामुळेंच जर इकडे (गाई शोधण्यास) आली असशील तर तुला आम्ही बहीण मानतों. तूं पुन्हां (इंद्राकडे) परत जाऊं नकोस. हे सुभगे, आपण तुझ्या गाईंची (आपसांत) वाटणी करून घेऊं.

१०. सरमा म्हणते.—हे पणीहो, मी बहीणपणा जाणत नाहीं आणि भाऊपणाहि जाणत नाहीं. इंद्र आणि भयंकर अंगिरस (तें नातें) जाणतात. मी जेव्हां येथून इंद्राकडे जाईन, तेव्हां माझे गाई इच्छिणारे इंद्रादि देव तुमच्या (ठाण्या) वर हल्ला चढवतील. (म्हणून) हे पणीहो, दूर पळा.

११. बृहस्पति, सोम, शहाणे ऋषि आणि सोम कुटण्याचे दगड यांना गुप्त अशा ज्या गाई सांपडल्या त्या सृष्टिनियमानुसार मोकळ्या होवोत. हे पणीहो, तुम्ही अतिशय दूर पळा.

सूक्त एकशें नववें.

ऋषि:—जुहु ब्रह्मवादिनी किंवा ऊर्ध्वनाभा ब्रह्मपुत्र; देवता:-विश्वेदेव; छन्द:—६-७ अनुष्टुभ् बाकी त्रिष्टुभ.

१. सूर्य, वरुण, वायु, आणि महातेजस्वी अग्नि, सुखदायक सोम आणि ब्रह्मचानें प्रथमच उत्पन्न केलेलें उदक बृहस्पतीच्या पापाविषयीं (प्रायश्चित्त) बोलतें झालें.

२. मुख्य असा राजा सोम उघडपणें पुन्हां बृहस्पतीला बायको देता झाला. त्याला वरुणानें अनुमोदन दिलें. मित्रभूत व देवांना बोलावणाऱ्या अग्नीनें हातांत धरून नेली (दिली).

३. देव बृहस्पतीला म्हणतात.—हे बृहस्पते, हिचें शरीर हातानें धरच. (कारण) ही बृहस्पतीची बायको आहे असें ते म्हणाले. क्षत्रियाचें संरक्षण केलेलें राष्ट्र शत्रूला प्राप्त होत नाहीं, त्याप्रमाणें (शोधाकरतां) पाठविलेल्या दूताला ही प्राप्त झाली नाहीं.

४. जे सप्तर्षि तपाला बसले होते, ते प्राचीन थोर ऋषि हिच्याविषयीं (निष्पाप आहे) असें म्हणाले. बृहस्पतीच्या जवळ नेलेली (ही) स्त्री मोठी उग्र आहे. (तप:प्रभाव) पाप्यांनाहि उच्चस्थानीं पोंचवतो.

५. आपला नवरा मिळाला असें जुहू म्हणते.—हे देवहो, सर्वत्र व्यापक असणारा ब्रह्मचारी (म्हणून)

टीप—बृहस्पति इंद्राचा पुरोहित होता. त्याच्या गाई पणीनीं चोरल्या आणि गुहेंत लपवून ठेवल्या. पणी हे वलाचे योद्धे होते. बृहस्पतीच्या सांगण्यावरून इंद्रानें आपली सरमा नांवाची कुत्री गाईंच्या शोधाकरतां पाठविली. तिनें नदी ओलांडून येऊन लपवून ठेवलेल्या गाई पाहिल्या. पणीच्या ही गोष्ट ध्यानांत आली. ते सरमेशीं मैत्री करण्याकरतां तिच्याशीं बोलूं लागले. तो सरमा आणि पणी यांचा संवाद ह्या सूक्तांत आहे.

टीप—जुहू म्हणजे वाणी. ती बहस्पतीची बायको होती. एकदां बृहस्पतीचा दोष जुहूला प्राप्त झाला. तेव्हां बृहस्पतीनें जुहूला टाकली. नंतर आदित्यादि देवांनीं तिला निष्पाप केली आणि पुन: बृहस्पतीला दिली. ही गोष्ट या सूक्तांत वर्णिली आहे.

जो फिरतो, तो देवांचा एक घटक आहे. ज्यामुळें सोमाची पळी (देवांना) प्राप्त होते. त्याप्रमाणें बृहस्पतीनें बायको मिळविली.

६. अशाप्रकारें देवांनीं तिला पुनः बृहस्पतीला दिली, लोकांनीं पुन्हां दिली, यथार्थ कृत्यें करणाऱ्या राजांनींहि बृहस्पतींची बायको पुन्हां दिली.

७. देवांनीं बृहस्पतीच्या बायकोस निष्पाप करून आणि पुनः देऊन, पृथ्वीचें सामर्थ्य उपभोगून स्तुत्य यज्ञाचा आश्रय केला.

सूक्त एकशें दहावें

ऋषिः—जमदग्नि भार्गव (याचाच मुलगा परशुराम होता); देवता—(आप्रीसूक्त) १ समिध्, २ तनूनपात्, ३ इळा, ४ बर्हिः, ५ द्वार, ६ उषा आणि नक्त (रात्र), ७ देव्यौ होतारौ, ८ तिस्रो देवीः (सरस्वती,इळा,भारती.) ९ त्वष्टा, १० वनस्पति, ११ स्वाहा; छंदः—त्रिष्टुभ्.

१. सर्वज्ञ अग्ने, मनुष्यांच्या घरांत प्रज्वलित झालेला तूं देवांची पूजा करतोस. हे मित्रांचा सत्कार करणाऱ्या, ज्ञानी असा तूं देवांना आण. ज्ञानी आणि दूरदृष्टि असा तूं देवांचा दूत आहेस.

२. हे तनूनपात् आणि मधुर स्तुति केल्या जाणाऱ्या अग्ने, यज्ञाचे मार्ग गोड पद्धतीनें प्रकट करणारा तूं (हवींचा) आस्वाद घे. कर्मांसहित मननीय स्तोत्रें आणि हवि यांना वृद्धिंगत करणारा तूं आमचा यज्ञ देवांकडे पोंचीव.

३. धावा केलेला, स्तुत्य आणि वंद्य असणारा तूं देवांसह प्रसन्न मनानें आमच्याकडे ये. हे थोर देवा, तूं देवांना बोलावणारा आहेस. यज्ञार्ह व प्रार्थना केलेला तूं देवांची पूजा कर.

४. उषःकालीं जमिनीवर आच्छादन घालण्याकरतां मंत्रानें पूर्वेकडून दर्भ आणले जातात. उत्कृष्ट आणि विस्तीर्ण असे दर्भ वेदीवर पसरले जातात. ते देव आणि पृथ्वी यांना सुखकर होवोत.

५. नटलेल्या स्त्रिया नवऱ्याचा आश्रय करतात त्याप्रमाणें विस्तृत दरवाजे मोठेपणाचा आश्रय करतात. हे विस्तृत सर्वांना प्रसन्न करणाऱ्या द्वारदेवताहो, तुम्ही देवाकरतां चांगल्या प्रकारें उघडल्या जा.

६. सोन्याचे दागिने घातलेल्या, सुंदर रूप धारण करणाऱ्या, थोर, सुखानें जाणाऱ्या, यज्ञार्ह आणि जवळ असणाऱ्या दिव्य उषा आणि रात्र यज्ञांत बसोत.

७. आपल्या स्वतःच्या मार्गदर्शित्वानें पूर्वेकडचा प्रकाश दाखविणारे, सभेंत उत्तेजन देणारे, गाणारे, गोड आवाजाचे व मनुष्यांच्या पूजेकरतां यज्ञ निर्माण करणारे असे प्रमुख दैवी होते (अग्नि आणि आदित्य) येथें येवोत.

८. मनुष्यांप्रमाणें ज्ञानपूर्वक आमच्या येथें यज्ञांत इळा, भारती आणि सरस्वती येवोत. त्या तीन देवी सुखकर आणि कर्माला चांगुलपणा आणणाऱ्या अशा दर्भांवर बसोत.

९. ज्यानें (सर्व) उत्पन्न करणाऱ्या ह्या द्यावापृथ्वींना रूप दिलें आणि सर्व प्राणीमात्रांना रूपयुक्त केलें, त्या त्वष्टृदेवाचें हे होत्या, विद्वान् आणि यज्ञशील असणारा तूं आमच्या इच्छेवरून पूजन कर.

१०. हे वनस्पते, तूं आपण होऊन प्रत्येक ऋतूंत देवांच्याकरतां अन्न व हवि चांगल्या प्रकारें दे. वनस्पति, शमिता देव आणि अग्नि मधुर तुपासह हवि आस्वादोत.

११. अग्नीनें उत्पन्न झाल्याबरोबर यज्ञ निर्माण केला आणि देवांचा पुढारी झाला. ह्या होत्याच्या इच्छेनुसार यज्ञाच्या मुखस्थानीय अग्नींत देव स्वाहा म्हणून अर्पिलेला हवि खावोत.

सूक्त एकशें अकरावें.

ऋषिः—अष्ट्रादंष्ट्र वैरूप; देवता–इंद्र; छंदः–त्रिष्टुभ्.

१. हे स्तोतेहो, लोकांची जशी कल्पना आहे, त्याप्रमाणें तुम्ही स्तुति करा. ज्याअर्थीं ज्ञाता व समर्थ असा इंद्र आहे, त्याअर्थीं यथार्थ वर्णन करणाऱ्या स्तोत्रांनीं आम्ही त्याला (येण्याविषयीं) उत्साह उत्पन्न करतों.

२. अन्तरिक्षाचा आधार असणारा इंद्र प्रकाशतो. तरुण गाईच्या गोऱ्ह्याप्रमाणें गाईबैलांत गोंधळ उडवतो तसा तो मोठ्या अवाजानें गरजतो आणि विस्तृत जगाला व्यापून टाकतो.

३. ह्या स्तोत्राचें ऐकणें इंद्रच जाणतो. कारण तोच जयशील सूर्याकरतां मार्ग करतो. पराभूत न होणाऱ्या वृषणश्वाची मेना होणारा तूं यज्ञांत येत आहेस. बिनतोड आणि अढळ असा तूं स्वर्गाचा आणि गाई–बैलांचा धनी झालास.

टीप—आप्रीसूक्त १–१३ व १०–७०. पहा

टीप–मेना–१.५१. १३ वरची टीप पहा.

४. अंगिरसांनीं स्तुति केलेल्या इंद्रानें मेघाचीं महान् कृत्यें नष्ट केलीं. ज्यानें आकाशांत आपलें सामर्थ्य प्रकट केलें त्यानेंच विपुल उदक उत्पन्न केलें.

५. स्वर्ग आणि पृथ्वी यांचा प्रतिनिधी असणारा इंद्र सर्व यज्ञ जाणतो आणि शुष्णाला ठार करतो. यानें विस्तृत पृथ्वीवर सूर्याचा प्रकाश पाडला.संस्थापकांतल्या संस्थापकानें सर्व स्थिर केलें.

६. हे इंद्रा, वृत्रहन्त्या त्वां वज्रानें वृत्राला ठार केलें. हे चालून जाणाऱ्या, अप्रकाशित आणि वर्धिष्णु अशा त्याचीं कपटें बळकट वज्रानें नष्ट केलीस. हे धनवन्ता, तूं बाहूंत सामर्थ्य असलेला आहेस.

७. जेव्हां उषेशीं सूर्य मिळतो तेव्हां त्याचे किरण आश्चर्यकारक बल प्राप्त करतात. जेव्हां फिरून द्युलोकांतील नक्षत्रें दिसत नाहींत तेव्हां ह्या चालणाऱ्या सूर्याचे किरण कोण जाणत नाहीं ? हें अगदीं खरें आहे.

८. जें उदक इंद्राच्या आज्ञेनें वहातें त्यापैकीं पुढें गेलेलें उदक खूप दूर गेलें. हे उदकांनो, तुमचा अग्रभाग कोठें आहे? तुमचा मूलभाग कोठें आहे? तुमचा मध्य कोठें आहे आणि अन्त कोठें आहे ?

९. हे इंद्रा, अहीनें भक्षण केलेल्या नद्या तूं मोकळ्या केल्यास तेव्हां त्या जोरानें वाहूं लागल्या. मुक्त होऊं इच्छिणारें जें उदक इंद्रानें मोकळें केलें तें अत्यंत स्वच्छ झालेलें उदक एकत्र रमत नाहीं. (वाहूं लागतें.)

१०. कामुक स्त्रिया पतीकडे जातात त्याप्रमाणें वाहणारें उदक समुद्राकडे जातें. नगरभेत्ता आणि शत्रूंना क्षीण करणारा इंद्र फार कालापासून उदकांचा स्वामी आहे. हे इंद्रा, आम्हाला पृथ्वीवरची संपत्ति, प्राचीन मधुर स्तोत्रें आणि घर प्राप्त होवो.

सूक्त एकशें बारावें.

ऋषिः—नभःप्रभेदन विरूपगोत्र; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्,

१. हे इंद्रा, तुला वाटेल तितका पिळलेल्यांतला सोम पी. सकाळीं दिलेला सोम प्रथम तुझाच आहे. हे वीरा, शत्रूंना ठार करण्याकरतां तूं उल्हासित हो. तुझे पराक्रम स्तोत्रांनीं आम्ही वर्णन करूं.

२. हे इंद्रा, मनापेक्षांहि वेगवान् असा जो तुझा रथ आहे त्यानें तूं सोम पिण्याकरतां ये. बलवान् अशा ज्या घोड्यांनीं आनंदानें तूं जातोस ते पिंगट घोडे तुला जोरानें आणोत.

३. हे इंद्रा, सोन्यासारख्या सूर्याच्या कान्तीनें आणि उत्कृष्ट रूपानें तूं आपलें शरीर युक्त कर. आम्हां मित्रांकडून बोलावला जाणारा देवांसह तूं बैस आणि आनंदित हो.

४. हे इंद्रा, ज्या तुझ्या सोमपानांतला तो मोठेपणा ह्या द्यावापृथ्वीनाहि आकलन करतां आला नाहीं, त्या ह्या आवडत्या अन्नाला उद्देशून, तयार व आवडत्या घोड्यांवर बसून ह्या स्थानीं ये.

५. हे इंद्रा,सोम प्यालेला तूं आश्चर्यकारक हातानें शत्रूंला ठार करतोस. हे इंद्रा, तो पिळलेला सोम तुला मद उत्पन्न होण्यास पुरेसा आहे. आणि तो स्तोता तुझी चांगली स्तुति करतो आहे.

६. हे इंद्रा, तुझें फार जुनें भांडें मिळालें आहे. हे कर्तृत्ववान् इंद्रा, तूं ह्या भांड्यानें सोम पी. ज्याला सर्वच देव इच्छितात तें भांडें मदकर आणि मधुर सोमानें पुरेसें भरलें जात आहे.

७. हे कामपूरका इंद्रा, हविर्युक्त लोक अनेक प्रकारें तुलाच बोलावतात.आमचे यज्ञ तुझ्याकरतां पुष्कळ सोमानें युक्त आहेत. म्हणून तूं येथें ये.

८. हे इंद्रा, तूं पूर्वीं केलेलीं पराक्रमाचीं कृत्यें मी वर्णन करितों आहें. अत्यंत रागानें तूं पर्वत (मेघ) फोडलास आणि बृहस्पतीचें गाइबैल उघडे केलेस.

९. हे संघाधिपते, ज्याअर्थीं तुला शहाण्यांतला शहाणा म्हणतात, त्याअर्थीं तूं आमच्या संघांत बैस. तुझ्याशिवाय जगांत कांहींहि केलें जात नाहीं. म्हणून हे धनवान् व अर्चनीय इंद्रा, तुला उद्देशून महान् आश्चर्यकारक स्तोत्र केलें आहे.

१०. हे धनवन्ता, याचना करणाऱ्या आम्हाला तेजोयुक्त कर. हे मित्रा, हे धनपते, मित्रभूत अशा आमचीं स्तोत्रें तूं ध्यानांत घे. हे युद्धकर्त्या आणि सत्यसामर्थ्या, तूं युद्ध कर. तसेंच अप्राप्य अशा स्थानींहि आम्हाला धनाचे भागीदार कर.

सूक्त एकशें तेरावें

ऋषिः—शतभेदन वैरूप; देवता-इंद्र; छंदः-१० त्रिष्टुभ् बाकी जगती.

१. उत्तेजक द्यावापृथ्वी सर्व देवांसह इंद्राचें बल रक्षण करोत. जेव्हां (महत्कृत्यें) करणारा इंद्र

तेजस्वी इंद्रियें प्राप्त करतो. तेव्हां तो कर्तृत्वमान् सोम पिऊन उत्साह पावलेला असतो.

२. विष्णु मदकर सोमाला प्रेरणा देत त्याच्या सामर्थ्यानें प्राप्त झालेल्या इंद्राचें महत्त्व वर्णन करतो. बरोबर जाणाऱ्या देवांसह इंद्र वृत्राला ठार करतो आणि श्रेष्ठ होतो.

३. जेव्हां युद्धाकरतां आयुधें धारण करणारा इंद्र अहीशीं व वृत्राशीं युद्ध करूं लागतो, तेव्हां त्याच्या प्रसिद्धीकरतां मी तुझी स्तुति करतों. हे उग्र इंद्रा, येथें तुझा माहिमा आणि सामर्थ्य सर्व देव आपणहून वाढवितात.

४. इंद्र उत्पन्न झाल्याबरोबर शत्रूंना त्रास देतो. समर्थ असणारा इंद्र मर्दाला शोभण्यासारख्या युद्धाकडे लक्ष देतो. तसेंच मेघ फोडतो. नंतर पाझरणारें पाणी उत्पन्न करतो. नंतर त्यानें महान् द्युलोकाला आपल्या कर्तृत्वानें स्थिर केलें.

५. तसेंच तो मोठ्या सेनेसह आला आणि आपल्या मोठ्या सामर्थ्यानें द्यावापृथ्वीला (त्यांतल्या शत्रूंना) त्रस्त करता झाला. चालून जाणाऱ्या इंद्रानें मित्र व वरुण यांना हवि देणाऱ्यांना सुख व्हावें म्हणून हातांत पोलादी वज्र घेतलें. जेव्हां उदक आडवणाऱ्या अंधारानें वेष्टिलेल्या वृत्राला उग्र अशा इंद्रानें ठार केलें.

६. तेव्हां आतां गर्जना करीत शत्रूंना ठार करणाऱ्या इंद्राच्या सामर्थ्याच्या प्रासिद्धीकरितां (पाणी) वाहूं लागलें.

७. आपल्या महान् सामर्थ्यानें युद्ध करणारे (इंद्र व वृत्र) पहिले पराक्रम करून एकत्र आले नंतर वृत्र मेल्यावर अंधार नाहींसा झाला आणि इंद्र महत्त्वानें पाहिल्या स्थानीं गेला. (इंद्राचें महत्त्व वाढलें.)

८. हे इंद्रा, वृत्रवधानंतर सर्व यज्ञ करणारे सोमयुक्त स्तुतीनें तुझ्या सामर्थ्याला उत्तेजन देतात. इंद्राच्या हत्यारानें अहि व वृत्र मेल्यावर अग्नि ज्वालांनीं अन्न भक्षण करतो, त्याप्रमाणें लोकांनीं अन्न भक्षण केलें.

९. हे स्तोतेहो, उत्कर्ष करणाऱ्या स्तुतियुक्त व मित्र बनावणाऱ्या स्तोत्रांनीं स्तुत्य इंद्राची स्तुति करा. दभीतीकरतां धुनि आणि चुमुरि यांना ठार करणारा इंद्र श्रद्धायुक्त मनानें ती ऐकतो.

१०. हे इंद्रा, स्तोत्रें म्हणत ज्या धनांनीं मी तुझी पूजा करतो ती अश्वयुक्त विपुल संपत्ति तूं आम्हांला दे. सुखानें आयुष्य घालविणाऱ्या संपत्तीनें मी सर्व संकटें तरून जाईन. आम्ही केलेलीं स्तोत्रें बहुमानानें तूं ध्यानांत घे.

सूक्त एकशें चवदावें.

ऋषिः—सध्रि वैरूप किंवा तपःपुत्र धर्म; देवता—विश्वेदेव; छंदः—जगती बाकी त्रिष्टुभ्.

१. दिगन्तापर्यंत प्रकाशणाऱ्या अग्नि आणि आदित्य यांनीं त्रैलोक्य व्यापलें आहे. वायु त्या दोघांच्या प्रीतीतला आहे. जेव्हां सर्व प्रकारच्या तेजोयुक्त व अर्चनीय अशा सूर्यापासून सर्व देवांनीं तेज मिळविलें. तेव्हां रक्षणशील देवांनीं व द्युलोकांतील लोकांनीं पाऊस पाडला.

२. पृथ्वी, आकाश आणि द्युलोक यांची हविर्दानाकरितां भक्त उपासना करतात. नंतर दीर्घकीर्ति अग्रेसर देव ती उपासना जाणतात. शहाणे लोक सृष्ट्यादिकांचें मूलकारण निश्चित जाणतात, उत्कृष्ट व गुह्य अशा व्रतांचें जें मूळ कारण आहे तेंहि जाणतात.

३. चतुष्कोण, स्त्रीरूपिणी, सुंदर अशा वेदींत घृत अर्पिलें जातें. स्तोत्रादि सर्व कर्मज्ञान हिच्या अन्तर्भूत आहे. ज्याठिकाणीं देवहि आपले हविर्भाग घेतात अशा हिच्या संन्निध यजमान व ब्रह्मा हविर्द्रव्यें देण्यासाठीं बसतात.

४. एक पक्षी अन्तरिक्षांत संचार करून सर्वांच्या अनुभवास हें जगत आणितो, त्या पक्ष्याला उपासनेनें दृढ झालेल्या मनानें मी माझ्यामध्येंच पाहिलें. जेव्हां मातेची व त्याची भेट झाली, तेव्हां माता त्याला कुरवाळून त्याच्या मस्तकाचें अवघ्राण करूं लागली, व तो मातेच्या प्रेमांत तल्लीन झाला. (म्हणजे प्राणवायु हृदयरूप पोकळींत राहून, मनुष्यांना सजीवपणा देऊन जगाचे अनुभव दाखवितो आणि उपासनेनें जेव्हां मी त्यास आपणांमध्यें पाहिलें, तेव्हां सर्व शास्त्रवादरूप वाणी त्यांत लीन झाल्या व तो प्राणवायू वाणींत लीन झाला.)

५. हा प्राणरूप परमात्मा एक असून, विद्वान् ब्राह्मण त्याला अनेक प्रकारचा कल्पून सूक्तांनीं स्तवितात. तसेंच यज्ञामध्यें निरनिराळ्या देवतांच्या उद्देशानें निरनिराळ्या छंदांची योजना करून सोम रस देण्याचीं पात्रेंहि निरनिराळीं बारा प्रकारचीं निर्माण करतात.

६. छत्तीस आणि चार चाळीस पात्रें (सोम भरून) तयार करणारे बारा छंदांतील स्तोत्रें म्हणणारे शहाणे लोक अशा प्रकारें यज्ञ निर्माण करून ऋक् व साम यांच्या (चाकांच्या) साहाय्यानें त्या यज्ञरूपी रथाला चालवतात.

७. ह्या यज्ञाच्या दुसऱ्या चवदा विभूति आहेत. त्या यज्ञास सप्त होते स्तुति करून नेत असतात. ज्या यज्ञरूपी मार्गानें देव सोम पितात, त्या व्यापक व पावक अशा यज्ञाला कोण वर्णन करणार आहे?

८. हजारों प्राणिमात्रांत पंधरा अंगें मुख्य असतात. पण द्यावापृथ्वीचें जेवढें प्रमाण असतें तेवढेंच तें शरीर असतें. हजारों ठिकाणीं शब्दानें व्यवहार केला जातो, जितक्या स्थलीं ब्रह्मांश स्थिर होतो तेवढ्याच शब्दानें व्यवहार केला जातो.

९. छंदाचा उपयोग कोण जाणतो? कोण यज्ञार्ह वाणी (वेद) निर्माण करतो? ऋत्विजांपैकीं स्वतंत्र आठवें ब्रह्माचें स्थान कोण निर्माण करता झाला? इंद्राचें दोन घोडे (ऋग् साम) कोण जाणतो? (परमेश्वराशिवाय कोणी जाणत नसेल.)

१०. कांहीं घोडे भूमीच्या शेवटापर्यंत (द्युलोकापर्यंत) फिरतात. ते रथाच्या जोखडाखालीं जोडलेले असतात. ह्या घोड्यांना देव श्रमनाशक (गवत वगैरे) देतात. जेव्हां सूर्य रथांत बसलेला असतो तेव्हां ह्या घोड्यांना देव श्रमनाशक (गवत वगैरे) देतात.

सूक्त एकशें पंधरावें.

ऋषिः--उपस्तुत वृष्टिहव्यपुत्र; देवता-अग्नि; छंदः-८ त्रिष्टुभ्, ९ शक्करी बाकी जगती.

१. जो (अग्नि) आपल्या आयांचें दूध पिण्यासहि जात नाहीं. त्या तरुण व नाजूक मुलाची वाढ आश्चर्यकारक आहे. जर बिनथानाच्या आईनें उत्पन्न केला असता तर ठीक होतें (पण तसें नाहीं. द्यावापृथ्वी सर्व जगाची कामदुधा आहे.) हा उत्पन्न झाल्याबरोबर महान् दूतकर्म करीत देवांकरतां हवि वहातो.

२. आपल्या तेजस्वी दातानीं अरण्यें खाणाऱ्या त्या कर्तृत्ववानाचें नांव अग्नि असें ठेवलें गेलें. कुरणांत फुरफुरणाऱ्या बैलाप्रमाणें जोरदार उंच केलेल्या पळीनें हवि दिलेला जो अग्नि आहे—

३. हे स्तोते हो, तुम्ही त्या पक्ष्याप्रमाणें झाडावर बसणाऱ्या, तेजस्वी, अन्नप्रापक, शब्द करणाऱ्या, पसरणाऱ्या, उदकयुक्त, तोंडानें बैलाप्रमाणें हवि वाहणाऱ्या, तेजानें महान्, महाकर्म्या व सूर्याप्रमाणें मार्ग प्रकाशित करणाऱ्या अग्नीची स्तुति करा.

४. हे जरारहित अग्ने, गमनशील आणि दहनेच्छु असें तुझें अपराभवनीय सामर्थ्य आहे. तूं वाऱ्याप्रमाणें सर्वत्र असतोस. योध्याप्रमाणें जलद जाणारे आणि यज्ञ उपभोगूं इच्छिणारे भक्त बलवान् त्रित अग्नीची उपासना करतात.

५. अत्यंत स्तुत्य, स्तोत्यांना मित्र मानणारा तो धनी अग्नीच बाह्य आणि अन्तर शत्रूंचा नाशक होतो. तो अग्नीच आम्हां स्तोत्यांचें आणि हवि देणारांचें संरक्षण करतो. आम्हांला अग्नि अन्न देवो.

६. हे सुपित्र्य अग्ने, जो मी संकटकालीं धर्षक धनुष्यानेंच संरक्षण केल्या जाणाऱ्या थोर अग्नीला हवि देतों. तो मी अतिशय अन्नयुक्त, बलवान् अशा सर्वज्ञ अग्नीची स्तुति करण्यास उद्युक्त झालों आहें.

७. मित्राप्रमाणें प्रसन्न, यज्ञेच्छु आणि मोठेपणानें स्वर्गासारखे असणारे जे शत्रूंचा पराभव करतात त्या मर्त्य व विद्वान् अशा आम्हांकडून बलप्रेरक अग्नि स्तविला जात आहे.

८. हे बलपुत्रा बलवंता, तुला उपस्तुताची तेजस्वी वाणी स्तवीत आहे. आम्ही तुला स्तवीत आहोंत. तुझ्या कृपेनें विपुल, चांगली संतति आणि दीर्घायुष्य आम्ही प्राप्त करूं.

९. हे अग्ने, अशा प्रकारें वृष्टिहव्याचे पुत्र उपस्तुत नांवाचे ऋषि तुझी स्तुति करते झाले. त्यांचें तूं संरक्षण कर. तसेंच विद्वान् स्तोत्यांचें संरक्षण कर. वषट् वषट् म्हणून वर हात करून हवि देणारे व नमः नमः म्हणून स्तुति करणाऱ्या स्तोत्यांचें तूं संरक्षण कर.

सूक्त एकशें सोळावें.

ऋषिः--अग्नियुत स्थूरपुत्र किंवा अग्नियूप; देवता-इंद्र; छंदः--त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, महान् सामर्थ्याकरतां तूं सोम पी. हे बलवानांतल्या बलवाना, वृत्राला ठार करण्याकरतां तूं सोम पी. हे धांवा केलेल्या इंद्रा, तूं धन आणि अन्न देण्याकरतां सोम पी. मधुर सोम पी आणि तृप्त होऊन आमच्या इच्छा पूर्ण कर.

२. हे इंद्रा, स्तुतियुक्त आणि वाहूं लागलेल्या ह्या पिळलेल्या सोमाचा उत्कृष्ट भाग तूं पी. कल्याण करणारा तूं मनानें प्रसन्न हो आणि धन व भाग्य यांनीं युक्त अशा आम्हांकडे अभिमुख हो.

३. हे इंद्रा, स्वर्गीय सोम तुला आनंदित करो. जो यज्ञांत काढला जातो तो तुला आनंदित करो.

ज्यानें तूं धन देतोस आणि शत्रूंना घालवतोस, त्यानें तूं प्रसन्न हो.

४. दोनही लोकांत व्यापलेला, सर्वगामी आणि कामपूरक इंद्र ओतून तयार असलेल्या सोमाप्रत दोन घोड्यांनीं धावत येवो. हे इंद्रा, शत्रुहन्ता असणारा तूं यज्ञांत बैलाच्या कातड्यावर पिळून ठेवलेल्या मदकर सोमाच्या पानानें बैलाप्रमाणें शत्रूंचा उच्छेद कर.

५. हे इंद्रा, तीक्ष्ण आणि लखलखीत आयुधें पाजळणारा तूं राक्षसांचीं बळकट शरीरें नष्ट कर. पराक्रमी असणाऱ्या तुला मी पराभावुक बल (देणारा हवि) देतों. युद्धांत शत्रूंवर चालून जाऊन त्यांना ठार कर.

६. हे इंद्रा, धनी असा तूं आम्हांला अन्न दे. अढळ धनुष्याप्रमाणें शत्रूंवर आपलें बल प्रगट कर. आम्हांला अभिमुख होऊन बलांनीं वाढणारा आणि पराभव न पावणारा तूं शरीरानें स्फुरण पाव.

७. हे धनवन्ता, तुला दिलेले हे हवि न रागवतां तूं ग्रहण कर. हे धनवन्ता इंद्रा, तुझ्या करतांच सोम पिळला आहे आणि तुझ्या करतांच हवि शिजविले आहेत. हे इंद्रा, हवि खा. आणि उत्तेजक सोम पी.

८. हे इंद्रा, उत्साहवर्धक हीं हविर्द्रव्यें खाच. अन्न घे. शिजविलेलीं हविद्रव्यें घे आणि सोम पी. अन्नयुक्त होत्साते आम्हीं तुला (धन) मागतों म्हणून यज्ञ करणारांच्या इच्छा खऱ्या (सफळ) होवोत.

९. मी इंद्र व अग्नि यांची गोड स्तुति करतों. नदींतल्या नावेप्रमाणें स्तोत्रांनीं मी त्यांना उत्साह उत्पन्न करतों. जे देव आम्हांला धन देणारे आणि शत्रूंचा नाश करणारे आहेत, ते देव ऋत्विजांप्रमाणें माझ्या भोंवतीं हिंडत आहेत.

सूक्त एकशें सत्रावें.

ऋषिः—भिक्षु आंगिरस; देवता–धन किंवा अन्नदानस्तुति; छन्दः—१–२ जगती बाकी त्रिष्टुभ्.

१. देवांनीं प्राण्यांच्या मागें ही क्षुधा नव्हें तर एक प्रकारचें पीडा देणारें अस्त्रच लाविलें आहे. अन्न देऊन त्या क्षुधेला जो शांत करतो तो खरा दाता होय. जो भुकेल्यांना अन्न न देतां आपण एकटाच खातो, त्याजवर अनेक संकटें येऊन तो दरिद्री बनतो. जो क्षुधिताला अन्न देतो,त्याचें धन कधींही कमी होत नाहीं, व जो अन्न देत नाहीं त्याला कोणापासूनहि सुख मिळत नाहीं.

२. जो स्वतः संपन्न असून दरिद्री, दुर्बल व भुकेलेल्या अतिथीला अन्न देत नाहीं, व स्वतः खाऊन पिऊन चैन करतो, त्यालाहि कोणी सुख देणारा मिळत नाहीं.

३. भुकेनें व्याकुळ झालेला व दरिद्री असा अतिथी अन्नाची इच्छा धरून दाराशीं भीक मागण्यास आला असतां त्याला जो अन्न देतो तो खरा दाता होय. यज्ञाचें फल त्याला मिळतें व शत्रू देखील त्याचे मित्र होतात.

४. नेहमीं जवळ राहून सेवा करणाऱ्याला जो अन्न देत नाहीं तो सखा नव्हे. अशा कृपणाला सोडून बांधव दूर गेले तर मग तें घर नव्हें. तसेंच दूर झालेले लोक अन्न मिळविण्यासाठीं दुसऱ्याचा आश्रय करतात.

५. संपन्न मनुष्यानें याचना करणाऱ्यास धन द्यावें म्हणजे तो दाता स्वर्लोकाला जातो. जशीं रथाचीं चाकें एकाजागीं रहात नाहींत, तसें हें द्रव्यहि एकाजवळच रहात नाहीं. एकाजवळून दुसऱ्याजवळ जात असतें.

६. कृपण स्वभावाच्या मनुष्याला संपत्ति मिळणें व्यर्थ होय. हें मी खरोखर सांगतों. जो देवांना व पोष्य वर्गाला अन्न न देतां एकटाच खातो, तो केवळ पापरूप होय; त्याचें तें अन्नहि विषासारखेंच जाणावें.

७. निर्जीव नांगर,स्वतःला जमीनींत रोंवून घेऊन, धन्यास धान्य उत्पन्न करून देतो. चाकर स्वतः कष्ट भोगून धन्यास धान्य व धन जमवून देतो; आणि लहानपणापासून अध्ययनाचे श्रम करून विद्वान् झालेला ब्राह्मण लोकांना ज्ञान देतो; त्यामुळें हे तिघेही लोकांना प्रिय होतात, तसाच दाताहि लोकांना प्रिय असतो.

८. माझ्याजवळ द्रव्य पुष्कळ आहे व तें मी नीट सांभाळीन आणि जास्त वाढवीन, असें कोणीहि मनांत आणूं नये; कारण एकापेक्षां दुसरा, त्याच्यापेक्षां तिसरा, त्याहून अधिक चौथा, असे एकापेक्षां एक संपन्न पुष्कळ आहेत; व सगळ्यांत मोठा श्रीमान् होता तो दरिद्री बनलेला आपणांस आढळतो; म्हणून असलेल्या संपत्तींतून दान करावें; कृपणपणा ठेवूं नये.

९. संपन्न स्थितींत असलेले सख्खे बंधु जर विभक्त झाले, व त्यांतून एकाच्या दाराशीं अतिथी आला आणि कांहीं याचना करूं लागला; तर त्याला ' माझ्या बंधूकडे जा, तो तुला कांहीं देईल ' असें सांगूं नये, व तसें मनांतही आणूं नये. कारण दोन्ही हात आपलेच

आहेत; परंतु ते एकेवेळीं निरनिराळीं दोन कामें करूं शकत नाहींत. एकावेळेवर व्यालेल्या दोन गाई सारख्या प्रमाणानें दूध देत नसतात. एकाच आईपासून एका वेळेवर झालेलीं जुळीं मुलें मोठीं झाल्यावर सारखींच पराक्रमी होत नाहींत; तसेंच एका कुलांत उत्पन्न झालेले पुरुष सगळेच दानशील नसतात. म्हणून ज्यास अनूकल असेल त्यानें अवश्य दान द्यावें.

सूक्त एकशें अठरावें.

ऋषिः—उरुक्षय—महीयुगोत्र; देवता—रक्षोहा अग्नि; छन्दः—गायत्री.

१. हे देदीप्यमान अग्ने, तूं आपल्या आहवनीयादि कुण्डांत यजमानासमोर प्रदीप्त होऊन अंधःकाररूपी शत्रूला दूर कर.

२. हे अग्ने, तूं अरणींतून बाहेर ये. आणि तुला घृतादि हविर्द्रव्यें देण्यासाठीं आम्ही होमपात्रें तुझ्यासमीप जमविलीं आहेत, त्या पात्रांनीं हविर्द्रव्यें घेऊन तूं संतुष्ट हो.

३. सर्व देवांच्या अगोदर ज्याला स्रुचीनें आहुति दिली जाते; व ज्याचें स्तवन करणेंहि योग्य आहे, तो अग्नि आमच्या स्तुतीनें व आहुतीनें अधिक शोभतो.

४. हा तेजस्वी अग्नि घृतादि हविर्द्रव्यानें सिंचन केला असतां अधिक प्रदीप्त होऊन दुसऱ्याचें तेज झांकून टाकतो.

५. हे अग्ने, तुला स्तविलें असतां तूं संतुष्ट होतोस म्हणून स्तुति करणारे तुला स्तवितात. तूं देवांना हविर्भाग मिळावे म्हणून प्रदीप्त होतोस. तुला यज्ञ करणारे यजमान बोलावितात.

६. हे ऋत्विग्हो, त्या अग्निदेवाची घृताहुतीनें सेवा करा. तो अग्नि कधींहि पराभव पावत नाहीं, व तो आपल्या गृहाचा स्वामी आहे.

७. हे अग्ने, तुझ्या अजिंक्य तेजानें राक्षसाला जाळ. आणि तूं यज्ञाचा रक्षणकर्ता आहेस म्हणून प्रदीप्त हो.

८. हे अग्ने, तूं आपल्या आहवनीयादि कुण्डांत प्रदीप्त होऊन स्वतःच्या तेजानें राक्षसींना उलटच्या जाळ.

९. हे अग्ने, तुझ्या कृपेनें पुष्कळ घरेंदारें ज्यांना आहेत, असे यजमान स्तुतींनीं व हविर्द्रव्यांनीं तुला प्रदीप्त करतात.

सूक्त एकशें एकोणिसावें.

ऋषिः—इंद्र लवरूप; देवता—इंद्र लवरूप; छंदः—गायत्री

१. गाय देऊं कीं घोडा देऊं असें मन असतें. कारण, पुष्कळ वेळां मीं सोम प्यालों आहें.

२. अत्यंत वेगानें वाहणारे वारे झाडें हालवतात त्याप्रमाणें प्यालेला सोम मला झोकांड्या देत आहे. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें.

३. जलद जाणारे घोडे रथ ओढतात. त्याप्रमाणें प्यालेला सोम मला ओढीत आहे. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें.

४. हंबरणारी गाय जशी प्रिय पुत्राकडे जाते त्याप्रमाणें स्तोत्रें माझ्याकडे येत आहेत. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें.

५. सुतार रथाची बैठक मनापासून करतो, त्याप्रमाणें मी अन्तःकरणपूर्वक स्तोत्रें ऐकतों. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें.

६. पांच वर्णात्मक असणारें सर्व जग माझा दृष्टिक्षेप टाळूं शकत नाहींत. कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें.

७. द्यावापृथ्वीची जोडी माझ्या एका बाजूइतकीहि नाहीं, कारण मी पुष्कळ सोम प्यालों आहें.

८. मी आपल्या मोठेपणानें द्युलोकाला कमी केलें आहे आणि विशाल पृथ्वीलाहि कमी केलें आहे. कारण मीं पुष्कळ सोम प्यालों आहें.

९. मला असें वाटतें कीं ही पृथ्वी येथें ठेवावी किंवा तेथें ठेवावी ? कारण, मी पुष्कळ सोम प्यालों आहें.

१०. मी ह्या पृथ्वीला किंवा सूर्याला येथें नष्ट करीन किंवा तेथें नष्ट करीन. कारण, मी पुष्कळ सोम प्यालों आहें.

११. मी आपला एक भाग द्युलोकांत ठेवला आहे. आणि दुसरा खालीं पृथ्वीवर ठेवला आहे. कारण, मी पुष्कळ सोम प्यालों आहें.

१२. आकाशांत उदयाला आलेला मी महातेजस्वी सूर्य आहें. कारण, मी पुष्कळ सोम प्यालों आहें.

१३. हवि ग्रहण करणारा व सुशोभित असणारा

टीप—लवाचें रूप घेऊन सोम पीत असतां ऋषींनीं इंद्राला पाहिलें तेव्हां इंद्रानें आपण आपलीच स्तुति सुरूं केली. तें हें सूक्त आहे. यांत सोम प्याल्यावर होणाऱ्या स्थितीचें वर्णन चांगलें आहे.

मी देवांकडे हवि वाहून नेतों. कारण, मी पुष्कळ सोम प्यालों आहें.

सूक्त एकशें विसावें.

ऋषिः—बृहद्दिव अथर्वणपुत्र; देवता—इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्.

१. ज्यापासून उग्र आणि अत्यंत तेजस्वी (सूर्य) इंद्र उत्पन्न झाला तेंच ब्रह्म सर्व जगांत श्रेष्ठ आहे. सर्व प्राणी ज्याप्रत आनंद पावतात. तो उत्पन्न झाल्याबरोबर शत्रूंचा फडशा पाडतो.

२. बलानें उत्साह पावणारा, महाबलवान् आणि शत्रुनाशक इंद्र दासांना भीति उत्पन्न करतो. स्थावर, जंगम किंवा व्यक्त आणि अव्यक्त सृष्टि इंद्रानें व्यापलेली असते. तुझ्या प्रसन्नतेनें सृष्टि एकत्र धारण केली जाते.

३. हे इंद्रा, ज्याअर्थीं हे लोक (स्त्रीपुरुषरूपानें) दोन प्रकारचे होतात आणि (पुत्ररूपानें) तीन प्रकारचे होतात, त्याअर्थीं तुझेठिकाणीं सर्व लोक आपलीं कृत्यें संपवतात. हे इंद्रा, चांगल्यांतलें चांगलें (अपत्य) चांगल्या (जोडप्याला) दे. तें मधुर (अपत्य) दुसऱ्या चांगल्याशीं संयुक्त कर.

४. असेंच सोम पान करून धन जिंकणाऱ्या तुला शहाणे स्तवीत असतात. हे चालून जाणाऱ्या इंद्रा, अत्यंत बलिष्ठ आणि टिकाऊ धन आम्हांस दे. दुष्ट राक्षस तुला त्रास न देवोत.

५. हे इंद्रा, तुझ्यामुळें आम्ही अनेक युद्धाचीं साधनें ध्यानांत घेऊन युद्धांत शत्रूंना पुनःपुनः ठार करतों. तुझ्या हत्यारांना स्तुतिकरून उत्साह उत्पन्न करतों आणि तुझ्या स्तोत्रांनीं अन्न शुद्ध करतों.

६. जो इंद्र सामर्थ्यानें सात दानवांना (वृत्र, नमुचि, कुयव वगैरे) ठार करतो आणि राक्षसांचीं अनेक स्थानें प्राप्त करतो, त्या स्तुत्य, अनेकरूपी, थोर, सर्वेश्वर आणि प्राप्तव्यांतल्या प्राप्तव्य इंद्राला मी स्तवितों.

७. हे इंद्रा, ज्या घरांत अन्नानें तूं तृप्त होतोस तेथें श्रेष्ठकनिष्ठ सर्व प्रकारचें धन तूं देतोस. तूं हलणारी द्यावापृथ्वी स्थिर करतोस म्हणून तुला उद्देशून अनेक कृत्यें केलीं जातात.

८. जो सुंदर व महान् गाईंच्या संघाचा अधिपति आहे आणि ज्यांनीं स्वकीय गाईंचीं सर्व द्वारें मोकळीं केलीं. स्वर्गोपभोग घेणारा आणि सर्वश्रेष्ठ बृहद्दिव त्या इंद्राला सुख होईल अशीं हीं स्तोत्रें म्हणतो.

९. अशा प्रकारें थोर अशा अथर्वपुत्र बृहद्दिवानें इंद्राला उद्देशून स्वतः विस्तृत स्तुति केली. भागिनी सारख्या पृथ्वविर उत्पन्न झालेल्या पवित्र नद्या इंद्राला प्रसन्न करतात आणि सामर्थ्यानें त्याला उत्साह देतात.

सूक्त एकशें एकविसावें.

ऋषिः—हिरण्यगर्भ प्रजापतिपुत्र; देवता—क (प्रजापति); छंदः—त्रिष्टुभ्.

१. हिरण्यगर्भ नांवाचा परमेश्वर सृष्टीच्या पूर्वीं होता. उत्पन्न झालेल्या जगाचा तोच एक धनी आहे. त्यानेंच हें पृथ्वीपासून द्युलोकापर्यंत सर्व उत्पन्न करून संक्षरण केलें. म्हणून आम्ही त्या सुखस्वरूप परमेश्वराची उपासना करतों.

२. जो आत्मज्ञान देणारा आणि बल देणारा आहे आणि ज्याची सर्व लोक आणि देवहि आज्ञा पाळतात, ज्याच्या सावलींत अमरपणा आहे किंवा मृत्यु आहे, त्या सुखस्वरूप परमेश्वराची आम्ही सर्व प्रकारें उपासना करतों.

३. जो आपल्या महत्त्वानें श्वासोच्छ्वास करणाऱ्या आणि डोळे मिटणाऱ्या सर्व सृष्टीचा एकच ईश्वर आहे आणि जो ह्या द्विपाद आणि चतुष्पाद पशु वगैरेचा धनी आहे, त्या सुखस्वरूप परमेश्वराची आम्ही सर्व प्रकारें उपासना करतों.

४. ज्याच्या सामर्थ्यानें हिमालया—सारखे पर्वत झाले आणि ज्याच्या माहात्म्यानें पृथ्वीसह समुद्र झाले असें म्हणतात, तसेंच ज्याच्या सामर्थ्यानें दिशा झाल्या. आणि ज्याच्या सामर्थ्यानें उपदिशा झाल्या, त्या सुखस्वरूप परमेश्वराची आम्ही सर्व प्रकारें उपासना करतों.

५. ज्याच्यामुळें स्वर्ग सामर्थ्यवान् झाला आणि ज्याच्यामुळें पृथ्वी दृढ झाली, ज्याच्यामुळें स्वर्ग स्थिर झाला आणि ज्यामुळें आदित्य अन्तरिक्षांत स्थिर झाला, जो आकाशांत उदक निर्माण करतो, त्या सुखस्वरूप परमेश्वराची आम्ही सर्व प्रकारें उपासना करतों.

६. शब्द करणाऱ्या, लोकांच्या संरक्षणाकरतां स्थिर केलेल्या, तेजस्वी द्यावापृथ्वी मनानें ज्याला पहातात, जेथें सूर्य उगवल्यावर शोभतो, त्या सुखस्वरूप परमेश्वराची आम्ही सर्व प्रकारें उपासना करतों.

७. ज्या महान् अग्न्यादि सर्व जगाला उत्पन्न करणारें आणि गर्भ धारण करणारें उदक सर्व जग व्यापतें, ज्यापासून देवांचाहि प्राणभूत एक प्रजापति

निर्माण झाला. त्या सुखस्वरूप परमेश्वराची आम्ही सर्व प्रकारें उपासना करतों.

८. ज्यानें यज्ञ उत्पन्न करणारें, प्रजापतीला धारण करणारें (प्रलयकालीन) उदक उत्पन्न केलें व जो देवांतला एक मुख्य देव आहे, त्या सुखस्वरूप परमेश्वराची आम्ही सर्वप्रकारें उपासना करतों.

९. ज्यानें पृथ्वी उत्पन्न केली आणि ज्या सत्यधर्म्या प्रजापतीनें स्वर्ग उत्पन्न केला, त्यानें मला त्रास देऊं नये. ज्यानें विपुल आणि आश्चर्यकारक उदकें निर्माण केलीं, त्या सुख-स्वरूप परमेश्वराची आम्ही सर्व प्रकारें उपासना करतों.

१०. हे प्रजापते, तुझ्याशिवाय दुसरा कोणीहि उत्पन्न झालेल्या जगांत व्यापून नाहीं. ज्या इच्छेनें आम्ही तुला हवि देतो त्या आमच्या इच्छा पूर्ण होवोत. आम्ही सर्व प्रकारच्या संपत्तीचे धनी व्हावें.

टीपः—हें सूक्त अत्यंत महत्त्वाचें आहे. १ त ९ कस्मै देवाय हविषा विधेम असें पालुपद आहे. अशा क म्हणजे प्रजापति देवाला आम्ही हवि द्यावा असा याचा अर्थ होईल. किं शब्दाचें ‘कस्मै’ हें रूप घेतल्यास ‘अशा कोणत्या देवाला आम्ही हवि द्यावा ?’ असाही प्रश्नार्थक अर्थ संभवतो. कारण देव अनेक आहेत. प्रत्येक ऋचेच्या पहिल्या तीन पादांत वर्णन केलेलें कर्तृत्व कोणत्या देवतेंत आहे याविषयीं निश्चित कल्पना नसल्यामुळें अशी विवंचना उत्पन्न होणें स्वाभाविक आहे. मात्र परमेश्वराच्या अफाट सामर्थ्याविषयीं स्तोत्रकर्त्यांची कल्पना निश्चित व उच्च दर्जाची आहे. त्यामुळें क म्हणजे सुख असा अर्थ घेऊन आम्ही वर अर्थ दिला आहे. तो दयानंद स्वामींना अनुसरून आहे. शेवटला मंत्र आपल्या संस्कारादि अनेक कर्मांत उपयोजिलेला आहे.

सूक्त एकशें बाविसावें.

ऋषिः—चित्रमहस् वसिष्ठपुत्र; देवता-अग्नि; छंदः-१ ते ५ त्रिष्टुभ् बाकी जगती.

१. आश्चर्यकारक, सुखकारक, अतिथीप्रमाणें अद्वेष्य आणि सूर्याप्रमाणें आश्चर्यकारक तेजाच्या अग्नीची मी स्तुति करतों. तो देवांना बोलावणारा गृहपति अग्नि शोकनिवारक आणि सर्वपोषक गाई आणि सामर्थ्य आम्हांस देवो.

२. हे अग्ने, प्रसन्न झालेला तूं माझ्या स्तोत्राची इच्छा कर. हे सत्कर्म करणाऱ्या, तूं सर्व पदार्थमात्राला जाणणारा आहेस. हे तेजस्वी अग्ने, तूं यज्ञ करणाऱ्या करतां यज्ञांत ये. तुझ्या मागून यज्ञांत देव (येतात).

३. हे अग्ने, सात स्थानें हिंडणारा आणि अमर असणारा तूं जो हवि देतो त्या हवि देणाऱ्या कर्मकर्त्याला धन दे. हे अग्ने, जो तुला समिधा अर्पण करतो त्याला तूं चांगलीं मुलेंबाळें आणि वर्धिष्णु संपत्ति दे.

४. यज्ञाचा प्रकाशक, मुख्य, पुढें स्थापन केलेला बलवान्, (स्तोत्रें) ऐकणारा, तेजस्वी व हवि देणाराला प्रसन्न करणाऱ्या अशा सामर्थ्यवान् अग्निदेवाला हविर्युक्त लोक स्तवितात.

५. हे अग्ने, तूं देवांचा मुख्य आणि श्रेष्ठ दूत आहेस. अमर व्हावें म्हणून बोलावला जाणारा तूं प्रसन्न हो. तुला देव सुशोभित करतात. घरांत भृगु तुला स्तोत्रें म्हणून प्रज्वलित करतात.

६. हे सत्कर्मे करणाऱ्या अग्ने, यज्ञप्रिय यजमानाकरतां सर्वाधार व सहज काढता येणाऱ्या दुधाला उत्पन्न करणारा, प्रज्वलित, त्रैलोक्य प्रकाशित करणारा व सर्व यज्ञांत हिंडणारा असा तूं चांगला यज्ञ इच्छितोस.

७. हे अग्ने, सकाळीं तुलाच देवदूत करून लोक पूजितात. यज्ञांत तुझ्यांत हवि टाकणारे देवहि पूजेकरतां तुलाच प्रज्वलित करतात.

८. हे अग्निदेवा, यज्ञ करणारे आणि स्तुति करणारे वसिष्ठ बलवान् अशा तुला स्तवितात. तूं भक्तापाशीं विपुल धन असूं दे. नेहमीं आमचें कल्याण करून आमचें संरक्षण करावेंस.

सूक्त एकशें तेविसावें.

ऋषिः—वेन भार्गव; देवता-वन; छंदः—त्रिष्टुभ्.

१. प्रकाशांत जन्मलेल्या ह्या वेनानें पृथ्वीचीं वासरें (सूर्याचे किरण) आकाशांत हाकारलीं आहेत. पाणी आणि सूर्य यांचा संगम झाला असतां लहान मुलांप्रमाणें ह्याची (वेनाचीं) शहाणे स्तोत्रांनीं स्तुति करतात.

२. आकाशांत उत्पन्न झालेला वेन आकाशांतून पाणी उत्पन्न करितो आणि आकाशाचा पृष्ठभाग स्पष्ट करितो. सृष्टिनियमाच्या उच्च स्थानीं तो प्रकाशला. त्या दोघांच्या जन्मभूमीची स्तोते स्तुति करतात.

३. एका ठिकाणीं शब्द करीत व एका घरांत राहणाऱ्या लहानग्या (अग्नीच्या) मातृभूत अशा ह्या प्राचीन उदक देवता आहेत. आकाशांत उत्पन्न होणारे शब्द मधुर उदकाची (वेनाची) स्तुति करतात.

४. संशोधनीय व महान् वेनाचा शब्द प्राप्त करतात आणि बुद्धिमान् लोक रूप ध्यानांत घेऊन त्याची स्तुति करतात. स्तुति करणारे लोक उदक प्राप्त करतात. (कारण,) वेन उदकें जाणत असतो.

५. अप्सरा स्त्री (विद्युत्) हसत (चमकत) आकाशांत जाराला (वेनाला) धारण करते (खुष करते). प्रिय मित्राच्या स्थानीं ती विहार करते आणि तो वेन सुंदर मेघांत (तिच्यासह) वसती करतो.

६. हे वेना, मनःपूर्वक इच्छिलेल्या, चांगल्या प्रकारें आकाशांत फिरणाऱ्या, सोनेरी पंख असलेल्या वरुणाचा दूत, अग्नीच्या उत्पत्तिस्थानीं (अन्तरिक्षांत) पक्षीरूपानें असणाऱ्या आणि पोषक अशा तुला जेव्हां लोक जाणतात, तेव्हां तूं येतोस.

७. आपलीं आश्चर्यकारक शस्त्रें रोखून धरीत सूर्याप्रमाणें सुंदर वस्त्र देखणेपणाकरतां धारण करणारा गाईचा आधार वेन आकाशांत उच्च स्थानीं असतो. तेथें तो प्रिय उदक उत्पन्न करतो.

८. गिधाडाच्या नजरेनें आकाशाकडे पहात जेव्हां उदक युक्त वेन समुद्राकडे जातो तेव्हां स्वतःच्या स्वच्छ तेजानें तळपणारा पृथ्वीवर उत्कृष्ट पाणी उत्पन्न करतो.

सूक्त एकशें चोविसावें.

ऋषिः—२-३-४ अग्नि, बाकी अग्नि, वरुण व सोम; देवता—१-२-३-४ अग्नि ९ इंद्र, बाकी लिंगोक्त देवता; छंदः—७ जगती बाकी त्रिष्टुभ्.

१. (हवि नेतांना भाऊ मेल्यावर मरणाच्या भीतीनें पळून* जाऊन गुहेंत लपलेल्या अग्नीला म्हणतात.) हे अग्निदेवा, तूं आमच्या [1]पांचांनीं तयार केलेल्या [2]तिप्पट आणि [3]सातांनीं विस्तारलेल्या यज्ञांत ये. आणि आमचे हवि वाहणारा हो. आमचा पुढारी हो. फार कालपासून तूं या गाढ अंधारांत पडला आहेस.

२. अदेवपणा टाकून (तुमच्या) मागणीवरून देव होणारा मी मनःपूर्वक देवपणा स्वीकारतों. जरी अप्रकाशित असणाऱ्या मी तुमचा शुभ यज्ञ टाकला तरी तेव्हां मी स्वतःच्या मैत्रीमुळेंच अरणींत होतों.

३. गमनीय स्वर्गाच्या अतिथीला (सूर्याला) पाहणारा मी अनेक यज्ञ निर्माण करतों. पितृभूत देवांना सुख व्हावें म्हणून मी स्तोत्रें म्हणतों. म्हणून मी अयज्ञीय प्रदेशांतून निघून यज्ञार्ह भागांत येतो.

४. मी यज्ञांत पुष्कळ वर्षें राहिलों आहें. (मी इंद्राला स्वीकारीत बापाला (अरणीला) टाकतों. मी (गेल्यावर) ते अग्नि, सोम आणि वरुण अन्नरहित होतात. मी आलों कीं, राष्ट्र पुनः प्राप्त होतें व मी त्यांचें संरक्षण करतों.

५. (मी आल्यावर) ते असुर सामर्थ्यरहित झाले. हे वरुणा, तूं जर मला इच्छित असशील तर हे राजा, सत्यानें असत्य वेगळें करीत माझ्या राष्ट्राचा अधिपति हो.

६. हे सोमा, हा सुंदर स्वर्ग आहे. हा प्रकाश आहे आणि हें विस्तीर्ण अन्तरीक्ष आहे. (हें पहा) आपण वृत्राला ठार करूं ये. हविस्वरूप असणाऱ्या तुला आम्ही हवि अर्पण करतों.

७. सूक्ष्मदृष्टि अग्नि आपल्या कर्तृत्वानें द्युलोकांत आपलें तेज स्थापन करतो. थोडक्याच श्रमानें वरुण पाणी उत्पन्न करतो. तें पाणी कल्याण करणाऱ्या स्त्रियांप्रमाणें वाहावयास लागून शुद्ध स्वरूप धारण करतें.

८. तें उदक वरुणाचें उत्कृष्ट सामर्थ्य धारण करतें, अन्नानें प्रसन्नता देणारें उदक त्या वरुणाकडे जातें, तें उदक वरुणाची लोक राजाची करतात त्याप्रमाणें सेवा करीत बद्ध असूनहि वृत्रापासून मोकळें होतें.

९. बद्ध उदकांचा सूर्य मित्र आहे असें म्हणतात. दिव्य उदकांचा मित्र व अनुष्टुभ् छंदांतील स्तुतीनें चळवळ करावयास लागणाऱ्या इंद्राला शहाणे लोक स्तोत्रानें पूजितात.

---

*टीप—१०—५१ सूक्त व त्यावरील टीप अग्नि पळून गेला वगैरे करतां पहा.

[1] पांच—चार ऋत्विज् व पांचवा यजमान किंवा पांच प्रकारचे हवि—धाना, करंभ, पुरोडाश, सोम व चरु किंवा पंच प्रयाज.

[2] तीन—पाकयज्ञ, हविर्यज्ञ, सोमयज्ञ किंवा प्रातःसवन, मध्यंदिनसवन आणि रात्रिसवन.

[3] सात—सात होते किंवा सप्तसंस्था—१ अग्निष्टोम, २ अत्यग्निष्टोम, ३ उक्थ्य, ४ षोळशी, ५ वाजपेय, ६ अतिरात्र, ७ अप्तोर्याम.

सूक्त एकशें पंचविसावें.

ऋषिः—वाच् अंभृणदुहिता; देवता–(परमात्मा) वाच्; छंदः—२ जगती, बाकी त्रिष्टुभ्.

१, मी रुद्र आणि वसु बरोबर हिंडतें. तसेंच मी वसु आणि विश्वेदेवासह (त्यांच्या रूपानें) हिंडतें. मी दोघा मित्रावरुणांना धारण करतें. मीच इंद्राग्नीला धारण करतें आणि दोघा अश्विनींनाहि धारण करतें.

२. मी शत्रूहन्त्या सोमाला धारण करतें. मी त्वष्ट्याला, तसेंच पूषा आणि भग यांना धारण करतें. मीच हविर्युक्त सोम पिळणाऱ्या आणि तृप्त करणाऱ्या यजमानाला द्रव्य देतें.

३. मी सर्वेश्वर आहें, धन देणारी, ज्ञानी आणि यज्ञीय देवतांतली प्रमुख आहें देव त्या अनेक रूपानें असणाऱ्या आणि सर्वत्र अन्तर्गत असणाऱ्या अशा मला करतात.

४. जें अन्न खातें, जें पहातें, जें जगतें आणि जें ऐकतें तें सर्व माझे मुळेंच होतें. अशा मला जे जाणत नाहींत. ते नाश पावतात,हे प्रसिद्ध मित्रा, ऐक. मी सत्य ज्ञान सांगतें.

५. जें ज्ञान देव आणि मनुष्य यांनीं अनुभविलें आहें. मी स्वतः तें ज्ञान सांगतें. ज्याला मी इच्छितें त्याला मी श्रेष्ठ करतें, त्याला ब्राह्मण करतें, त्याला ऋषि करतें आणि त्यालाच बुद्धिमान् करतें.

६. ब्रह्मद्वेष्ट्या खाष्ट शत्रूंना ठार करण्याकरतां मी रुद्राचें धनुष्य सज्ज करतें. लोकांशीं युद्ध करतें. तसेंच द्यावापृथ्वींत मी व्यापून आहें.

७. मी द्युलोकाला उत्पन्न करतें. माझें उत्पत्तिस्थान (परमेश्वराचे ठिकाणीं असणाऱ्या बुद्धींत आहे) पाण्यांत समुद्रांत आहे. तेथून मी सर्व जगाला व्यापतें आणि मी ह्या स्वर्गाला आपल्या शरीरानें स्पर्श करतें.

८. मी सर्व जगाला (तयार करण्यास) आरंभ करणारी वाऱ्याप्रमाणें प्रवृत्त होतें. स्वर्गापेक्षां आणि पृथ्वीपेक्षांहि श्रेष्ठ असणारी मी आपल्या सामर्थ्यानेंच एवढी निर्माण झालें.

सूक्त एकशें सव्विसावें.

ऋषिः–कुल्मलबर्हिष शैलूषपुत्र किंवा अहोमुच वाम देवपुत्र;देवता–विश्वेदेव;छंदः—८ त्रिष्टुभ अवशिष्ट बृहती

१. हे देवहो, ज्याला अर्यमा, मित्र आणि वरुण एकमतानें शत्रूंच्या पलीकडे नेतात त्या मनुष्याला पाप आणि पापाचें फळ प्राप्त होत नाहीं.

२. हे मित्रा, वरुणा आणि अर्यमन्, ज्यानें तुम्ही आम्हाला पापांपासून रक्षिता आणि शत्रूंच्या पलीकडे नेता त्या संरक्षणाची आम्ही मागणी करीत आहोंत.

३. हे मित्र, वरुण आणि अर्यमा आमचे रक्षणकर्ते होवोत. आम्हांला नेण्याच्या स्थळीं न्या आणि पार करण्याच्या स्थळीं शत्रूंतून पार करा.

४. हे सत्कार केले जाणारे देवहो, तुम्ही सर्व जगाचें संरक्षण करा. तुम्ही दिलेल्या प्रियकर सुखांत आम्ही असावें आणि शत्रूंना जिंकावें.

५. वरुण, मित्र आणि अर्यमा हे अदितिपुत्र देव शत्रूंना दूर करोत. मरुतांसहित उग्र रुद्र, इंद्र आणि अग्नीला आम्ही आमचे कल्याण करण्याकरितां बोलावतों आणि आम्ही शत्रूंना जिंकतों.

६. नेते वरुणाची,मित्र आणि अर्यमादेव आमचीं सर्व पातकें नष्ट करोत. लोकांचे राजे देव आमचीं सर्व पातकें नष्ट करोत. आणि आम्हांला शत्रूंवर जय देवोत.

७. जें सुख आम्ही मागत आहोंत तें सुख वरुणादि देव आमच्या संरक्षणाकरितां आम्हांस देवोत. अदितीचे पुत्र देव आम्हांला सुख देवोत व आम्हांला शत्रूंच्या पार करोत.

८. हे संरक्षक आणि यज्ञार्ह देवहो,जशी पायाला पांढरा रंग असलेली गाय तुम्ही सोडविलीत तसेंच आम्हांला पातकांतून मुक्त करा. हे अग्ने, तूं आमचें आयुष्य वाढीव.

सूक्त एकशें सत्ताविसावें.

ऋषिः—कुशिक सौभरिपुत्र, किंवा रात्रि भारद्वाजसुता; देवता–रात्रि; छंदः—गायत्री.

१. येणारी, अनेक देशावर असणारी देवी रात्री (नक्षत्ररूपी) डोळ्यांनीं पहात असते आणि सर्व प्रकारची शोभा धारण करीत असते.

२, पुष्कळ काल टिकणारी देवी रात्र प्रथम आकाश व्यापते, नंतर सखल प्रदेश व उंच प्रदेश व्यापते नंतर (ग्रहनक्षत्रादिकांच्या) तेजानें अंधार कमी करते.

३. येणारी देवी रात्र भगिनी उषेवर परिणाम करते आणि उषःकालीं रात्रीचा अंधार नष्ट होतो.

४. ज्या रात्रीचे प्रहरीं पक्षी झाडावर वसाति

करतात त्याप्रमाणें आम्ही सुखानें राहतों ती रात्र आम्हांस प्रसन्न होवो.

५. रात्रीं सर्व लोक झोंप घेतात, गाईबैल वगैरे पशु, पक्षी आणि जलद चालणारे बहिरससाण्यासारखे प्राणीहि झोंप घेतात.

६. हे रात्रि, लांडगा आणि लांडगी (यासारखे त्रासदायक प्राणी) आम्हांपासून दूर कर.चोराला दूर कर. तसेंच तूं आम्हांला सुखकारक हो.

७. सर्वत्र चिकटलेला, स्पष्ट असा काळा अंधार माझ्याकडे आला आहे, तो अंधार हे उषे, स्तोत्यांचें कर्ज धन देऊन नष्ट करतेस त्याप्रमाणें नष्ट कर.

८. हे रात्रि, तुला गाईप्रमाणें मी आपल्याकडे वळवितों. हे सूर्यकन्ये, शत्रूंना जिंकणाऱ्या माझें स्तोत्राप्रमाणें हवि ग्रहण कर.

सूक्त एकशें अठ्ठाविसावें.

ऋषिः—विहव्य आंगिरस; देवता—विश्वेदेव; छंदः—९ जगती बाकी त्रिष्टुभ्.

१. हे अग्निनारायणा, यज्ञांत किंवा संग्रामांत तुझ्या कृपेनें माझ्यांत तेज प्राप्त होवो. तुला समिधांनीं प्रदीप्त करणारे आम्ही शरीराला पुष्ट करितों. चारहि दिशेचे लोक माझ्यापुढें नम्र होवोत. आम्ही तुझ्यामुळें शत्रूंच्या सेनेला जिंकण्यास समर्थ होऊं.

२. इन्द्र, विष्णु अग्नि हे सर्व देव युद्धांत मला मदत करणारे होवोत. त्याचप्रमाणें मला अतिशय प्रकाश—तेज प्राप्त होवो. आणि मी फलाची इच्छा करीत असतां मला वायु अनुकूल व्हावा.

३. सर्व देव मला द्रव्य देवोत. आणि श्रेष्ठ यज्ञफलहि मला प्राप्त होवो. माझे हातून देवांचे यज्ञ व्हावेत आणि देवांना होम देणारे माझे ऋत्विजांपेक्षां मानानें श्रेष्ठ असून देवांना सेवोत. आम्हीहि शरीरानें सुदृढ असणारे शूर वीर व्हावें.

४. हे ऋत्विजांनों, आमच्यासंबंधीं जीं चरुपुरोडाशादिक हविर्द्रव्यें आहेत त्या हविर्द्रव्यानें होम करा. तसेंच माझ्या मनाला प्रसन्न करणारी प्रार्थना करा. कोणचेंहि पापयुक्त कृत्य मीं करूं नये आणि हे विश्वदेवांनों, सर्व विवादाच्या वेळीं आमचा पक्षपात घेऊन बोला.

५. हे सहा उर्वीदेवींनों, आम्हाला अतिविपुल धन द्या. हे सर्व देवानों, तुम्ही त्या मिळणाऱ्या धनाविषयीं पराक्रम करा. आम्हीं पुत्रादिकांकडून टाकलें जाऊं नये. तसेंच हे राजन् सोम, ज्या रीतीनें आम्ही द्वेष करणाऱ्या शत्रूंच्या स्वाधीन जाणार नाहीं तसें आम्हाला तूं कर.

६. हे अग्ने, शत्रूंच्या क्रोधाला नाहींसें करणारा, व कोणीही पीडा न दिलेला रक्षण करणारा तूं आम्हाप्रत रक्षण कर. परत फिरलेले व अव्यक्त शब्द करणारे तुझे शत्रू स्वतःच्या स्थानाप्रत जावोत आणि जागे होणाऱ्या ह्या शत्रूंचें ज्ञानसाधन अंतःकरण एकदम नाश पावो.

७. सर्व प्राणिमात्रांना उत्पन्न करणाराचा जो उत्पन्न करणारा, व पालन करणारा इन्द्र, जो सर्वांचें रक्षण करितो, शत्रूंचा पराभव करितो, त्या सर्वांचें रक्षण करणाऱ्या इन्द्र देवाला आम्हीं स्तवितों. अश्विनीकुमार आणि बृहस्पतिप्रमुख सर्व देव ह्या यज्ञाला आणि यजमानाला पापापासून रक्षोत.

८. थोर यजमानांनीं हवन केलेला व शत्रूंचा नाश करणारा हविर्भाग दिले जाणाऱ्या ह्या यज्ञांत आम्हांला सुख देवो. हे काळसर घोडे वापरणाऱ्या इन्द्रा, तूं आमच्या प्रजेचें रक्षण कर. आम्हाला फार त्रास देऊं नकोस. आम्हाला टाकूं नकोस.

९. जे आमचे शत्रू आहेत ते हीन होवोत. त्या शत्रूंना इंद्र व अग्नीच्या साहाय्यानें आम्हीं नष्ट करूं. वसु, रुद्र व आदित्य आम्हाला श्रेष्ठ करोत. आणि मला ज्ञाता, बलवान् आणि सर्वांत श्रेष्ठ करोत.

सूक्त एकशें एकोणतिसावें.

ऋषिः—परमेष्ठी प्रजापति; देवता—परमात्मा; छंदः—त्रिष्टुभ्.

१. जेव्हां म्हणजे मूळारंभीं असत् नव्हतें आणि सत्‌हि नव्हतें. अन्तरिक्ष नव्हतें आणि त्यापलीकडेंच जें आकाश तेंहि नव्हतें. (अशा स्थितींत) कोणी (कोणाला) आवरण घातलें (म्हणावें) ? कोणाच्या सुखासाठीं ? अगाध व गहन पाणी (तरी) होतें काय?

२. तेव्हां मृत्यु म्हणजे मृत्युग्रस्त नाशवंत सृष्टि नव्हती, व म्हणून (दुसरा) अमृत म्ह. अविनाशी नित्य पदार्थ (हा भेदहि) नव्हता. (तसेंच) रात्र आणि दिवस यांचा भेद कळण्यास कांहीं साधन नव्हतें. (जें काय होतें) तें एकटें एकच स्वधेनें म्हणजे आपल्या शक्तीनें वायुशिवाय श्वासोछ्वास करीत म्हणजे

स्फुरत होतें. त्याखेरीज किंवा त्यापलीकडे दुसरें असें कांहींच नव्हतें.

३. अंधःकार होता, आरंभीं हें सर्व पाणी अंधःकारानें व्याप्त (आणि) भेदाभेद विरहित होतें. (किंवा) आभु म्हणजे सर्वव्यापी ब्रह्म (आरंभींच) तुच्छानें म्हणजे फोल मायेनें आच्छादिलेलें होतें. असें (यत्) जें (म्हणतात), तें (तत्) मूळ (ब्रह्म) एक तपाच्या महिम्यानें (रूपान्तरानें) प्रगट झालेलें होतें.

४. (याच्या) मनाचें जें रेत म्हणजे बीज प्रथमतः निघालें तोच आरंभीं काम (म्हणजे सृष्टी निर्माण करण्याची प्रवृत्ति किंवा शक्ति) झाला. (हाच) असतामध्यें म्हणजे मूळ परब्रह्मांत सताचा म्ह. विनाशी दृश्य सृष्टीचा (पहिला) संबंध होय. असें ज्ञात्यांनीं अन्तःकरणांत विचार करून बुद्धीनें निश्चित् केलें आहे.

५. (हा) रश्मि म्हणजे धागा किंवा किरण यांच्या (मध्यें) आडवा पसरला; आणि खालीं होता म्हटलें तर वरहि होता. (याच्यांतलें कांहीं) रेतोधा म्ह. बीजप्रद झालें व (वाढून) मोठेंहि झालें. त्याचीच स्वशक्ति अलीकडे व प्रयति म्ह. प्रभाव पलीकडे व्यापून राहिला.

६. (सताचा) हा विसर्ग म्हणजे पसारा कशापासून किंवा कोठून आला. हें (यापेक्षां) प्र म्हणजे विस्तारानें येथें कोण सांगणार ? कोण निश्चयात्मक जाणतो? देवहि या (सत्सृष्टीच्या) विसर्गानंतरचे. मग ती जेथून निघाली तें कोण जाणणार?

७. (सताचा), हा विसर्ग म्हणजे पसारा जेथून झाला, किंवा निर्मिला गेला, तें, परम आकाशांत असणारा या जगाचा जो अध्यक्ष (हिरण्यगर्भ) तो जाणीत असेल, किंवा नसेल ? (कोणी सांगावें ?)

टीपः—हें सुप्रसिद्ध नासदीय सूक्त आहे. ऋग्वेदकालीं तत्त्वज्ञानाबद्दल काय विचारसरणी होती हें या सूक्तावरून चांगलें समजून येतें. अशी विचारसरणी उत्पन्न करण्यामुळेंच वैदिक वाङ्मयाला अद्वितीय महत्त्व आलें आहे. असे विचाराचे उत्कृष्ट नमुने उपनिषदाप्रमाणें उपनिषदाच्या पूर्वकालीन वैदिक वाङ्मयांत भरपूर आहेत.

सूक्त एकशें तिसावें.

ऋषिः—यज्ञ प्रजापतिपुत्र; देवता—सृष्टि (उत्पत्ति); छन्दः—१ जगती, बाकी त्रिष्टुभ्.

१. शंभर उपाध्यायांनीं ताणलेला आणि दोऱ्यांनीं सर्व बाजूला पसरलेला जो यज्ञ आहे, त्याला जे पितर आले आहेत ते विणतात आणि उभ्या सुतापाशीं वीण, पुढें वीण (असें म्हणत) बसतात.

२. पुरुष ह्या यज्ञाला विस्तृत करतो. तो पुरुषच याला गुंडाळतो, प्रजापति स्वर्गांत त्याला वाढवतो. हे किरणरूप देव आसनांवर बसतात. सामसूक्तें विणण्याकरतां धोटे केले आहेत.

३. जेव्हां सर्व देवांनीं देवाला पूजिलें तेव्हां त्याची मर्यादा काय होती? देवता काय होती? मुख्य तूप काय होतें आणि समिधा काय होत्या ? छंद काय? स्तुति काय होती. आणि गाणें काय होतें ?

४. अग्नि गायत्रीशीं युक्त झाला, सविता उष्णिह छंदासह झाला. स्तोत्रांसह महान् सोम अनुष्टुभाबरोबर उत्पन्न झाला. बृहस्पतीचें वाक्य बृहतीनें रक्षिलें.

५. विराज मित्रावरुणाला मिळाला, दिवसाचा (मध्य) भाग व त्रिष्टुभ् छंद इंद्राचा झाला. जगती सर्व देवांत समाविष्ट झाली, आणि यामुळें मनुष्य आणि ऋषि उत्पन्न झाले.

६. तो प्राचीन यज्ञ झाल्यावर ऋषि, मनुष्य आणि आमचे पितर निर्माण झाले. जे प्राचीन लोक असा यज्ञ करते झाले त्यांना मनानें आणि डोळ्यांनीं पाहतों आहें असें मला वाटतें.

७. स्तोमासह, छंदासह, विधीसह व परिमाणासह सात दैवी थोर ऋषि पूर्वींच्या ऋषींचा मार्ग अनुसरून सारथि लगाम धरून चालतो त्याप्रमाणें चालले आहेत.

सूक्त एकशें एकतिसावें.

ऋषिः—सुकीर्ति कक्षीवत्पुत्र; देवता—४–५ अश्वि बाकी इंद्र; छन्दः—४ अनुष्टुभ् बाकी त्रिष्टुभ्.

१. हे पराभव करणाऱ्या इंद्रा, आमच्या पूर्वभागीं आणि पश्चिमभागीं असणाऱ्या सर्व शत्रूंना तूं हांकून दे. हे शूरा, मी अत्यंत सुखांत रहावें म्हणून तूं आमचे दक्षिणेकडील आणि उत्तरेकडील शत्रू दूर हांकून दे.

२. हे इंद्रा, गव्हाचे शेतकरी गहू क्रमानें वेगळे करून तोडतात त्याप्रमाणें जे भक्त यज्ञांतील नमस्कार टाळीत नाहींत त्यांना जागोजाग धन द्या.

३. वेळीं एकबैली गाडी योग्य स्थानीं पोंचत नाहीं

आणि लढाईंत यश मिळवीत नाहीं. पण (तसा नाहीं म्हणून)बलवान् इंद्राला गाईबैल,घोडे आणि बल इच्छिणारे आम्ही शहाणे मैत्रीकरतां बोलावीत आहोंत.

४. हे उदकसंरक्षक अश्विहो, रमणीय सोम पिणारे व एकत्र असणारे तुम्ही इंद्राला युद्धांत नमुाचे नांवाचा असुर ठार करीत असतां रक्षिलेंत.

५. हे इंद्रा, आईबाप मुलाचें संरक्षण करतात त्याप्रमाणें दोघा अश्विनींनीं आश्चर्यकारक कृत्यांनीं तुझें संरक्षण केलें. जेव्हां तूं रमणीय सोम सामर्थ्यानें प्यालास तेव्हां हे धनवन्ता, सरस्वती तुझी सेवा करिती झाली.

६. संरक्षक, धनवान् आणि सर्ववेत्ता इंद्र सुखदायक होवो.शत्रूना ठार करो आणि आम्हांस निर्भय करो. आम्ही पराक्रमानें मिळविलेल्या धनाचे धनी व्हावें.

७. त्या यज्ञार्ह इंद्राच्या मोकळया मनाची कृपा आम्हांवर असावी. सुसंरक्षक आणि धनवान् इंद्र शत्रूंना आमच्यापासून दूर करो.

सूक्त एकशें बत्तिसावें.

ऋषिः—शकपूत नृमेधपुत्र; देवता–मित्रावरुण,१द्यु–भू-अश्वि–देवता; छंदः—१ न्यंकुसारिणी,२–६ प्रस्तारपंक्ति, ७ सतोबृहती बाकी विराज.

१. धन देण्यास उत्सुक असणारी द्यौ व पृथ्वी यज्ञ करणारालाच संपत्तींनीं उत्कर्षित करतात. अश्विनी देव यज्ञ करणाऱ्याला सुखांनीं उत्कर्षित करतात.

२. हे मित्रावरुणहो, पृथ्वीचें संरक्षण करणारे आणि धनवान् अशा तुमची इष्ट म्हणून आम्ही पूजा करतों. आणि तुमच्या सख्यामुळें यज्ञ करणारांकरतां राक्षसांचा आम्ही पराभव करतों.

३. हे मित्रावरुणहो, जेव्हां आम्ही तुमची स्तुति करतों तेव्हां आम्ही प्रिय धन प्राप्त करणारे होतों. जे दातृत्वानें आपलें धन वाढवितात त्यांची संपत्ति केव्हांही नष्ट होत नाहीं.

४. हे सूर्या, तुला द्युलोक उत्पन्न करतो. हे वरुणा, तूं सर्वांचा राजा आहेस. तुमच्या रथाचा मुख्य (सारथि) शहाणा आहे. दुष्टांचा द्रोह करणाऱ्याचा यज्ञ एवढयाशाहि पातकानें युक्त होत नाहीं.

५. जेव्हां भक्तांच्या प्रिय यज्ञाचें आणि शरीराचें रक्षण करीत मित्र आणि वरुण येतात, तेव्हां ह्या शकपूताचे ठिकाणीं असणारें पाप चालून येणाऱ्या शत्रूंना ठार करो.

६. हे विशेष ज्ञानी असणारे मित्रावरुणहो, तुमची आई आदिति आहे. द्युलोकाप्रमाणें पाण्यानें पृथ्वी शुद्ध केली जाते. तुम्ही आम्हांला प्रिय धन द्या. आणि सूर्याच्या किरणांनीं आम्हांला पुष्ट करा.

७. हे मित्रावरुणहो, आपल्या कर्तृत्वानें प्रकाशणारे तुम्ही गर्जणाऱ्या आमच्या (शत्रूंकडील) लोकांचा पराभव करण्याकरितां, धुरेवर बसल्या जाणाऱ्या आणि फळीवर बसल्या जाणाऱ्या रथांत बसतात त्याप्रमाणें बसा. तुम्ही नृमेधाचें पापापासून संरक्षण केलें आहे. तसेंच सुमेधाचें पापांतून संरक्षण केलें आहे.

सूक्त एकशें तेहतिसावें.

ऋषिः—सुदास पिजवनपुत्र; देवता–इंद्र; छंदः–१ ते ३ शक्करी, ४ ते ६ महापंक्ति, ७ त्रिष्टुभ्.

१. हे स्तोतेहो, ह्या इंद्राचें सर्वांच्या पुढें रथ नेणारें सामर्थ्य तुम्ही चांगल्या प्रकारें वर्णन करा. रणांगणांत शत्रूचें सैन्य जवळ आलें असतांहि स्थिर राहणारा शत्रुहन्ता इंद्र आम्ही म्हटलेलीं स्तोत्रें ध्यानांत घेवो. शत्रूंच्या धनुष्यावरील तुटीर दोऱ्या तुटोत.

२. हे इंद्रा, (मेघांतून) खालीं वाहणारें उदक उत्पन्न होवो म्हणून तूं मेघ फोडलास. हे इंद्रा, तूं शत्रुरहित झाला आहेस. तूं सर्व प्रकारच्या धनाची वाढ करतोस म्हणून तुला आम्ही ताब्यांत घेतों. शत्रूंच्या धनुष्यावरील तुटावयास झालेल्या दोऱ्या तुटोत.

३. हे इंद्रा, आमचे सर्व कवडीचुंबक शत्रु नष्ट होवोत. आणि तुझीं स्तोत्रें प्रवृत्त होवोत. हे इंद्रा, जो आम्हांला मारूं इच्छितो त्या शत्रूवर तूं हत्यार फेकतोस. तुझा हातानें आम्हांला धन मिळो.शत्रूंच्या धनुष्यावरील तुटीर दोऱ्या तुटोत.

४. हे इंद्रा, जो लांडग्यासारखा शत्रु आमच्यावर चालून येतो त्याला तूं पायाखालीं तुडव. कारण तूं शत्रूंना त्रास देणारा आणि पराभव करणारा आहेस. शत्रूंच्या धनुष्यावरील तुटीर दोऱ्या नष्ट होवोत.

५. हे इंद्रा ! जो एका कुलांतील शत्रु आम्हांला नष्ट करतो, जो हलक्या कुलांतील आम्हांला त्रासदेतो, त्याचे द्युलोकाप्रमाणें विस्तृत असणारें सैन्य स्वतः नष्ट कर. शत्रूंच्या धनुष्यावरील तुटीर दोऱ्या नष्ट होवोत.

६. हे इंद्रा, तुझी इच्छा करणारे आम्ही तुझ्याशीं सख्य (यज्ञ) आरंभतों. यज्ञाच्या द्वारां आमचीं

सर्व पातकें नष्ट कर. शत्रूंच्या धनुष्यावरील तुटीर दोऱ्या नष्ट होवोत.

७. हे इंद्रा जी गाय स्तोत्यांना दररोज दूध देते, ती गाय आम्हांला दे. मोठ्या कासेची हजार धारांनीं दूध देणारी मोठी गाय दुधानें आम्हाला पुष्ट करील असें तूं कर.

सूक्त एकशें चवतिसावें.

ऋषिः—मांधाता युवनाश्वपुत्र, ६ व्यांतला उत्तरार्ध आणि ७ व्याची गोधा ब्रह्मवाहिनी; देवता–इंद्र; छंदः–१ ते ६ महापंक्ति, ७ पंक्ति.

१. हे इंद्रा, तूं दोन्ही द्यावापृथ्वी उषेप्रमाणें तेजानें भरून टाकतोस. त्या मोठ्यांतल्या मोठ्या आणि लोकांच्या अधिपति इंद्राला देवी अदितीनें उत्पन्न केलें, आणि ती श्रेष्ठ आई झाली.

२. हे इंद्रा, दुष्टपणें घात करणाऱ्या मर्त्य शत्रूंचें बल कमी कर. जो शत्रु आम्हांला मारूं इच्छितो त्याला तूं आमच्या पायाखालीं आण. ज्या आईनें असा पुत्र निर्माण केला आहे ती धन्य होय.

३. हे शत्रुहन्त्या इंद्रा, आपल्या कृत्यांनीं उत्कृष्ट व लोकाह्लादक असें अन्न तुझ्या मदतीसह आम्हांला दे. अशा मुलाला श्रेष्ठ आईनें जन्म दिला म्हणून ती श्रेष्ठ होय.

४. हे अनेक कृत्यें करणाऱ्या इंद्रा, सोम काढणाऱ्या भक्तास ज्या वेळीं सर्व प्रकारचें धन देतोस त्या वेळीं धनाप्रमाणें त्यांचे हजारों प्रकारें संरक्षण करतोस. ज्या उत्कृष्ट मातेनें याला उत्पन्न केलें ती खरोखर श्रेष्ठ होय.

५. स्वेदबिंदूप्रमाणें किंवा दुर्वांकुरांप्रमाणें चहूंकडून इंद्राचीं आयुधें (आमच्या संरक्षणार्थ) येवोत. दुष्ट बुद्धीचे शत्रु आमच्यापासून दूर जावोत. (बाकी पूर्वींप्रमाणें)

६. हे ज्ञात्या इंद्रा, लांबलचक अंकुशाप्रमाणें मोठी शक्तिहि तूं धारण करतोस. हे धनवान् इंद्रा, पुढल्या पायांनीं शेळी झाडाची फांदी जशी जवळ करते त्याप्रमाणें यम शत्रूंना ताब्यांत घेतो. (पूर्वींप्रमाणें)

७. हे देवहो, इंद्रादिक देव आम्हांला न मारोत. आम्हांला मोह उत्पन्न न करोत. आम्ही मंत्रांतील कर्म करीत राहूं. आम्ही स्तोत्रें आणि हवि यांनीं तुम्हांला आधार देऊं.

सूक्त एकशें पस्तीसावें.

ऋषिः—कुमार यमगोत्र; देवता–यम; छंदः–अनुष्टुभ.

१. चांगल्या पानाच्या ज्या वृक्षावर लोकाधिप यम देवांसह उपभोग घेतो, तेथें आमचे प्राचीन पितर राहोंत असें तो इच्छितो.

२. पुराण पितरांना इच्छिणाऱ्या आणि पापबुद्धीनें युक्त असणाऱ्याशीं असूया करणाऱ्या त्याला मी प्रथम पाहिलें. पुनः मी त्याला इच्छिलें.

३. हे कुमारा, अपूर्व, चाकें नसलेला, एक आखी, सर्वगामी असा रथ मनानें तूं तयार केलास आणि कसा झाला हें पाहण्याकरतां तूं रथांत बसलास.

४. हे कुमारा, ज्या रथाला तूं शहाण्या लोकांकडे हांकारलेस त्या रथास, पितरानें सांगितल्याप्रमाणें यमाकडे, नौकेंत टाकल्याप्रमाणें तूं घेऊन जा.

५. कुमाराला कोणी निर्माण केलें, आणि कोणी त्याला रथांत घालून रथ हांकारला ? कोण बरें आम्हांस सांगेल कीं हा (नचिकेत) यमाला कसा दिला गेला.

६. ज्या योगें हा (यमाकडून पित्याला) दिला गेला, आणि पुढील वृत्तान्त घडला. पूर्वीं मूलभूत (यमाच्या घरीं जाण्याची) गोष्ट घडली आणि नंतर परत आला.

७. जें देवांनीं निर्माण केलें म्हणतात तें हें यमाचें स्थान आहे. ही नाळी (नांवाचें वाद्य) यमाकरतां वाजविली जाते, आणि स्तोत्रें म्हणून याचा सत्कार केला जातो.

टीपः—वाजश्रवसाचा मुलगा नचिकेत बापानें पाठविल्यावरून यमाकडे गेला आणि यमाला प्रसन्न करून परत आला. ही हकीगत वरील मंत्रांत वर्णन केली आहे. किंवा सूर्याची स्तुति कुमार नांवाच्या कोणी ऋषीनें केली आहे, असें सायणाचार्य म्हणतात. नचिकेताची गोष्ट कठोपनिषदांत पहा.

सूक्त एकशें छत्तिसावें.

ऋषिः–१ जूति, २ वातजूति, ३ विप्रजूति, ४ वृषाणक, ५ करिक्रत, ६ एतश, ७ ऋष्यशृंग; देवता–अग्नि, सूर्य, वायु; छंदः–अनुष्टुभ्.

१. सूर्य अग्नीला धारण करतो. सूर्य उदक धारण करतो. सूर्यच द्यावापृथ्वी धारण करतो. सूर्य सर्व जग व्यक्त करतो. हा प्रकाशमय दिसणाराच सूर्य होय.

२. वातरशन मुनि पिंगट व मलीन वस्त्रें धारण करतात. ज्या वेळीं ते देवतारूप घेतात त्या वेळीं ते वायुस्वरूप स्वीकारतात.

३. मुनिवृत्तीमुळें आनंदीवृत्तीनें असणारे आम्ही वायुरूप स्वीकारतों. हें मर्त्यहो, आमचीं शरीरेंच केवळ तुम्ही पहा. (कारण आतां आम्ही वायुरूप आहोंत.)

४. सर्व पदार्थमात्राला स्वतेजानें प्रकट करणारा (वायुरूप) मुनि आकाशमार्गानें संचार करतो. सर्व देवांना मित्रभूत असणाऱ्या सत्कृत्याकरतां (त्याची) स्थापना केली जाते.

५. वायुप्रमाणें व्यापक, वायूचा मित्र फार काय, पण वायुरूप झालेला मुनि पूर्व समुद्रांत व उत्तर समुद्रांत जातो.

६. अप्सरा, गंधर्व आणि मृग यांच्या स्थलीं संचार करणारा सर्वज्ञ अग्नि मित्र, रसोत्पादक आणि आनंद देणारा आहे.

७. अग्नि, रुद्रांसह जेव्हां पाणी भांड्यानें पितो, तेव्हां वायु त्याचें मंथन करतो—म्हणजे वीज उत्पन्न करतो व भेडसवणारी गर्जना करतो.

सूक्त एकशें सदतिसावें.

ऋषिः—१ भरद्वाज, २ कश्यप, ३ गोतम, ४ अत्रि, ५ विश्वामित्र, ६ जमदग्नि, ७ वसिष्ठ; देवता–विश्वेदेव; छंदः–अनुष्टुभ्.

१. हे देवहो, खालीं गेलेल्या मला वर काढा. हे देवहो, अपराध करणाऱ्या माझें अपराधांपासून संरक्षण करा, आणि हे देवहो, पुढें मला चिरंजीव करा.

२. हे पूर्व आणि पश्चिम असे दोनहि वारे समुद्राच्या पलीकडून वाहतात (वहात येतात). त्यांपैकीं एक तुला बल देवो आणि दुसरा पाप नाहींसें करो.

३. हे वायो, आम्हांकरतां औषधासारखे हितप्रद पदार्थ आण आणि जें पाप (म्हणजे अहितकारक असेल तर) तें नाहींसें कर. सर्वांना हितकारक असा तूं देवांचा दूत सतत धावत असतोस.

४. हे स्तोत्या, संरक्षण आणि सुख घेऊन हा वायु तुझ्याकडे आला आहे. बल आणि कल्याण तुझ्याकरतां आणलें आहे. तुझा रोग आतां मी नष्ट करतों.

५. येथें आमचे देव संरक्षण करोत. मरुद्गण संरक्षण करोत. सर्व प्राणी संरक्षण करोत. ज्या योगें आमचें शरीर निष्पाप होईल असें होवो.

६. उदकच औषधासारखें आहे, उदकच रोगनाशक आहे. उदकच सर्वांचें हित करणारें आहे. असें उदक तुला हितप्रद होवो.

७. (प्रजापतीच्या) दहा बोटें असलेल्या हातांनीं तयार केलेली जिव्हा शब्द करते. त्याच आरोग्यकारक हातांनीं तुला आम्ही स्पर्श करतों.

सूक्त एकशें अडतिसावें.

ऋषिः—अंग उरुपुत्र; देवता–इंद्र; छंदः–जगती.

१. हे इंद्रा, तुझ्या सख्यामुळें ते यज्ञ करणारे आणि हवि करणारे भक्त वलाला ठार करते झाले. जेव्हां मननीय स्तोत्रें म्हणत कुत्साकरतां उदक निर्माण करतोस तेव्हां अहींचीं कृत्यें व्यर्थ होतात.

२. हे इंद्रा, जगनिर्मात्या उदकाला तूं निर्माण केलेंस. पर्वत वहावयास लावलेस. गाई बाहेर काढल्यास. नंतर मधुर आणि आवडते (हवि) प्यालास. नंतर वृक्षांना वाढविलेंस. नंतर याच्या कृत्यानें आणि सृष्टि नियमात्मक भाषणानें किंवा यज्ञांतील स्तवनानें सूर्य तेजस्वी झाला.

३. जेव्हां शहाण्या इंद्रानें दासांचा प्रतिकार केला तेव्हां द्युलोकामध्यें सूर्यानें आपला रथ हांकारला. तसेंच युक्तिबाज पिप्रु नांवाच्या असुराची बळकट नगरें ऋजिश्वाशीं सख्य करून इंद्रानें नष्ट केलीं.

४. धैर्यशाली इंद्रानें कोणीहि पराभूत न केलेलीं सैन्यें पराभूत केलीं, तसेंच अयास्यानें स्तविलेल्या इंद्रानें बलशाली देवविरोध्यांना ठार केलें. सूर्य महिन्यांत भूमिवरील रस घेतो त्याप्रमाणें तूं शत्रूंच्या नगरांतील धन घेतोस. तसेंच स्तवन केला जाणारा तूं तेजस्वी वज्रानें शत्रूंना ठार करतोस.

५. विस्तृत आणि भेदक वज्रानें दाता, वृत्रहन्ता आणि अखंडसैन्य, चालून येणाऱ्या शत्रुसैन्यांना पराभूत करतो. हिंसक अशा शत्रूंच्या वज्राला सर्व भितात. नंतर सूर्य प्रकट होतो आणि उषा रथ टाकते. (मावळते)

६. हे इंद्रा, त्वां एकट्यानें यज्ञविरुद्ध राक्षसाला ठार केलें. तीं तुझीं कृत्यें अत्यंत श्रवणीय असतात. महिना उत्पन्न करणारा सूर्य आकाशांत तूं स्थापन केलास. तसेंच उदक निर्माण करून पितृस्थानीं असणारा द्युलोक सूर्याच्या रथाचीं चाकें धारण करतो.

सूक्त एकशें एकोणचाळीसावें.

ऋषिः–विश्वावसु गंधर्व; देवता–१–३ सविता, ४–६ गंधर्व; छन्दः–त्रिष्टुभ्.

१. प्रेरक किरण असलेला, काळसर सवितृदेव पूर्वेकडे आपलें अखंड तेज प्रगट करतो. त्याचा उदय झाल्यावर सर्व जगाला प्रकाशित करणारा, ज्ञाता आणि संरक्षक असा पूषा देव येतो.

२. द्यावापृथ्वी आणि अन्तरिक्ष यांना आपल्या तेजानें भरून टाकणारा लोकप्रकाशक सवितृदेव द्युलोकाच्यामध्यें असतो. सर्वव्यापक असा तो मुख्य व उपदिशा व्यापून, असतो. तसेंच तो पृष्ठभाग, अधोभाग व आकाश प्रकाशित करतो.

३. धनाचें मूल व संपत्ति देणारा असा सवितृदेव आपल्या प्रकाशानें सर्व पदार्थ पाहतो. देवाप्रमाणें सविता सत्यधर्मा आहे. इंद्राप्रमाणेंच हा द्रव्याच्या लढाईंत सज्ज असतो.

४. हे सोमा, विश्वावसु गंधर्वाला उदकानें जेव्हां जाणलें तेव्हां यज्ञद्वारां तें याच्याकडे आलें. इंद्रानें त्याला जाणलें व सूर्याभोंवतीं (कोठें यज्ञ चालला आहे हें पाहण्याकरतां) दृष्टि फिरविली.

५. स्वर्गीय व उदकनिर्माता विश्वावसु गंधर्व जें सत्य आहे आणि जें आम्ही जाणत नाहीं तें आम्हांला सांगो. हे विश्वावसो, तूं आमच्या स्तुतींना प्रेरणा देत आमच्या कर्माचें संरक्षण कर.

६. इंद्राला आकाशांत मेघ आढळले. तेव्हां मेघांत संचार करणाऱ्या उदकांचीं द्वारें त्यानें मोकळीं केलीं. ह्यांचें अमर व उदकमय रूप इंद्र सांगतो. कारण मेघांतील जलमय मेघ तो जाणत असतो.

सूक्त एकशें चाळीसावें.

ऋषिः–पावकगुणविशिष्ट अग्नि; देवता–शुद्ध अग्नि; छन्दः– १ विष्टारपंक्ति, २–४ सतोबृहती, ५–६ जगती.

१. हे अग्ने, तुझें अन्न सर्वश्रेष्ठ आहे. हे प्रभाधन अग्ने, तुझ्या ज्वाला अत्यंत प्रकाशित होतात. हे प्रौढकान्ति आणि सर्वज्ञ अग्ने, तूं बलयुक्त व स्तुत्य अन्न हवि देणाऱ्यांना देतोस.

२. हे अग्ने, शुद्ध करणारी कांति धारण करणारा, निर्मल आणि अत्यंत तेजस्वी असणारा तूं तेजानें उदयास येतोस. अरणींत संचार करणारा पुत्रभूत तूं आमचें रक्षण करतोस आणि द्यावापृथ्वीचा संबंध जडवतोस. (म्हणजे पृथ्वीवरचे लोक हवि देऊन देवांना संतुष्ट करतात आणि पाऊस पाडून देव पृथ्वीला संतुष्ट करतात.)

३. हे अन्नोत्पन्न सर्वज्ञ अग्ने, आमच्या स्तोत्रांनीं संतुष्ट हो आणि आमच्या कर्मांनीं तृप्त हो. अनेकरूपी आश्चर्यकारक व स्तुत्य अशीं अन्नें तुला भक्त अर्पण करतात.

४. हे अग्ने, आपल्या तेजानें समर्थ होणाऱ्या अमरा, तूं आम्हांला धन दे. तूं आपल्या तेजस्वी शरीरानें अतिशय झळकतोस. म्हणूनच तूं आमच्याकडून उत्कृष्ट कर्में करून सेविला जातोस.

५. यज्ञाचा संस्कर्ता, अत्यंत ज्ञानी, विपुल धनाचा अधिपति व उत्कृष्ट धनाचा दाता, अशा तुझी मी स्तुति करतों. तूं उत्कृष्ट अन्न आणि उपभोग्य धन आम्हांला दे.

६. सत्यनिष्ठ, पूजनीय व सर्वांना दर्शनीय, अशा अग्नीला सुखाकरतां आम्ही पुढें स्थापन केलें आहे. हे अग्ने, स्तुति ऐकणारा, प्रख्यात आणि दैवी अशा तुला पतिपत्नी स्तोत्रें म्हणून स्तवितात.

सूक्त एकशें एकेचाळीसावें.

ऋषिः–तापसगुणविशिष्ट अग्नि; देवता–विश्वेदेव; छन्दः–अनुष्टुभ्.

१. हे अग्ने, येथें आम्हांविषयीं तूं प्रिय बोल. तसेंच आम्हांकडे येणारा तूं चांगल्या मनाचा ऐस. हे लोकपते, आम्हांला धन दे. कारण, आम्हांला तूं धन देणारा आहेस.

२. अर्यमा, भग आणि बृहस्पति आम्हांला धन देवोत. तसेंच गोड वाणी, सरस्वती आणि देव आम्हांला धन देवोत.

३. सोम राजाला आणि अग्नीला आम्ही स्तोत्रें म्हणून रक्षणाकरतां बोलावीत आहोंत. तसेंच आदित्य, विष्णु, सूर्य, प्रजापति आणि बृहस्पति यांना आम्ही बोलावितों.

४. ज्यायोगें आम्हांवर लोक प्रसन्न होतील त्या तऱ्हेनें आम्ही स्तुत्य इंद्र, वायु व बृहस्पति यांना बोलावतों.

५. हे स्तोत्या, अर्यमा, बृहस्पति आणि इंद्र यांना आम्हांला धन देण्याकरतां तूं प्रेरणा कर. वायु, विष्णु, सरस्वती आणि बलवान् सवितृदेव यांना प्रेरणा कर.

६. हे अग्ने, तूं इतर अग्नींच्यासह आमच्या स्तोत्रांना वृद्धिंगत कर. तसेंच आमच्या यज्ञाकरतां धन देण्यास (दात्यांना) प्रेरणा कर.

सूक्त एकशें बेचाळीसावें.

ऋषिः–१–२ शार्ङ्गजरितृ; ३–४ द्रोण; ५–६ सारिसृक्क, ७–८ स्तंबमित्र; देवता–अग्नि; छन्दः–१–२ जगती, ३–६ त्रिष्टुभ्, ७–८ अनुष्टुभ्.

१. हे अग्ने, हा जरिता तुझा झालेला आहे. हे बलपुत्र अग्ने, तुझयाशिवाय दुसरें आम्हांला प्राप्तव्य नाहीं. तीनाहि प्रकारचें कल्याणकारक सुख तुझ्याजवळ आहे म्हणून त्रस्त झालेल्या आमच्यापासून तुझ्या ज्वाला दूर कर.

२. हे अग्ने, अन्नेच्छु अशा तुझा जन्म उत्कृष्ट आहे. तूं राजाप्रमाणें सर्व प्राणिमात्रांला ताब्यांत घेतोस. घोड्याप्रमाणें आमची स्तुति तुझी सेवा करिते. पशुपालाप्रमाणें आम्ही स्वतःच नेहेमीं तुझ्यापुढें फिरतों.

३. हे तेजस्वी अग्ने, गवताळलेलें वन तूं खाऊन नष्ट करतोस. तसेंच सुपीक जमिनी (तुझ्या कृपेनें आम्हांस) प्राप्त होतात. आम्ही तुझ्या मोठमोठ्या ज्वालांना त्रासविणार नाहीं.

४. हे अग्ने, जेव्हां खालवर असणाऱ्या (वनस्पतींना) खात जातोस तेव्हां (ज्वालासंघानें) लुटारू सेनेप्रमाणें जात असतोस. जेव्हां वायु तुझ्या ज्वालांला अनुकूल असतो तेव्हां न्हावी केंस काढतो त्याप्रमाणें भूमीचें तूं मुंडण करतोस.

५. हे अग्ने, तूं ज्वालारूपी बाहूंनीं (वनाला) शोधणारा खालून वर भूमीकडे जातोस तेव्हां एका रस्त्याला अनेक रथ चालावे त्याप्रमाणें ह्याअग्नीच्या ज्वाला दिसत आहेत.

६. हे अग्ने, तुझ्या ज्वाला बाहेर पडोत. तुझा प्रकाश बाहेर पडो. सर्व आक्रमण करणाऱ्या तुझा वेग प्रकट होवो. वाढणारा तूं ऊंच जा. खालीं ये (ऊंचवृक्षावर जा आणि खालील वृक्षावर ये). आज तुझ्या प्रत सर्व देव प्राप्त होवोत.

७. (आतां स्तंबमित्र आपलें घर जाळूं नये म्हणून प्रार्थना करतो) आमचें हें घर पाण्याचा डोह आहे. समुद्राचें ठिकाण आहे. तूं याहून दुसरा रस्ता स्वीकार आणि त्या रस्त्यानें यथेष्ट जा.

८. हे अग्ने, तूं आला असतां किंवा गेला असतां आमच्या येथें पुष्पयुक्त दूर्वा उगवोत. डोह असोत. कमळें होवोत. हीं घरें समुद्राचीं होवोत. (जळण्यास अयोग्य असोत.)

सूक्त एकशें त्रेचाळीसावें.

ऋषिः—अत्रि संख्यपुत्र; देवता–अश्वि; छंदः–अनुष्टुभ्.

१. हे आश्विहो, त्या कर्मठ अत्रीला तुम्ही घोड्याप्रमाणें बाहेर जाण्यास समर्थ केलेंत. जुन्या रथाप्रमाणें कक्षीवानाला पुनः तरुण केलेंत.

२. बलवान् असुरांनीं वेगशाली घोड्याप्रमाणें असणाऱ्या अत्रीला बंधनांत[1] टाकलें. त्या अत्यंत तरुण अत्रीला घट्ट गाठ सोडावी त्याप्रमाणें ह्या जगांत तुम्ही मोकळे केलेंत.

३. हे नेते, दर्शनीय आणि निर्मल असे आश्विहो, मला अत्रीला बुद्धि द्या. हे नायकहो, नंतर मी स्तोत्रें पुनः म्हणेन.

४. हे दाते म्हणून प्रसिद्ध असणारे आश्विहो, आमची स्तुति व दान तुमच्या ज्ञानाकरतां आहे. ज्याअर्थीं घरांत आणि विस्तीर्ण यज्ञांत हे आश्विहो, तुम्ही आमच्या इच्छा पूर्ण करीत आहांत, त्याअर्थीं आमची सेवा तुम्ही जाणली आहे असें दिसतें.

५. हे अश्विहो, तुम्ही समुद्रांत उदकांच्या वर बुडूं लागलेल्या भुज्यूला[2] (तारण्याकरतां) पंखांचीं नाव घेऊन आलांत व त्याला तारलेंत.

६. हे सर्वधन व नायक अश्विहो,तुम्ही राजाप्रमाणें सुखी व श्रेष्ठ आहांत. तुम्ही आमच्याकडे सुख घेऊन या आणि दुधांनीं वाढलेली कास शोभते तसे आम्हांला भूषित करा.

सूक्त एकशें चव्वेचाळीसावें.

ऋषिः—सुपर्ण तार्क्ष्यपुत्र किंवा ऊर्ध्वकृशन यमगोत्र; देवताः–इंद्र; छंदः–१ गायत्री,२ बृहती, ३–४ गायत्री, ५ सतोबृहती, ६ विष्टारपंक्ति.

१. हे इंद्रा, सर्वकर्त्या तुझ्याकरतां, सर्वांना हवासा वाटणारा, शक्तिवर्धक व अमर करणारा, हा सोम घोड्याप्रमाणें तुझ्याकडे येतो आहे.

---

[1] टीपः—अत्रिबंधन–१.११६.१०–टीप पहा.

[2] टीपः—भुज्यू–१.११६ पहा.

२. आम्हांकडून स्तोत्रांत गाईला जाणारा इंद्र तेजस्वी होत्साता दात्या गृहस्थाचें वज्राप्रमाणें संरक्षण करतो, ऋभु जसा कर्मकर्त्याला आनंद देतो त्याप्रमाणें हा ऊर्ध्वकृशनाला आनंद देतो.

३. तेजस्वी, स्वकीय प्रजेंत स्तुत्य, इंद्र कर्मनिष्ठ श्येनाकरतां त्याच्या मुलाला तेजस्वी करो.

४. श्येनाचा पुत्र सुपर्ण ज्या धनदात्या सोमाला दुरून आणता झाला. आणि जो सोम अहीकडे नेतो.

५. आणि हे इंद्रा, सुंदर,बांधारहित,तांबूस आणि अन्न निर्माण करणाऱ्या अशा ज्या सोमाला श्येनानें—सुपर्णानें पायानें आणलें,त्या सोमामुळें आम्हांला जगण्याकरतां आयुष्य आणि अन्न दे. आणि त्यामुळेंच आमच्या बांधवांना जागृत कर.

६. आम्ही तुझ्याकरतां सोम पिळला आहे. त्या सोमामुळेंच देवांकडून इंद्र आमच्या दुःखांचें निवारण करतो. हे सुकर्म इंद्रा, आमच्या कृत्यांनीं प्रसन्न होऊन तूं आम्हाला आयुष्य आणि अन्न दे.

सूक्त एकशें पंचेचाळीसावें.

ऋषिः—इंद्राणी; देवता–सपत्नीनाश; छंदः–६ पंक्ति, बाकी अनुष्टुभ्.

१. जीमुळें सवतीला त्रास होतो आणि तिला पति प्राप्त होतो, ती ही बलवानांतली बलवान् असणारी लतारूप ओषधी मी खणतें.

२. हे उताणी पानें असलेले, भाग्यदाते, देवांनीं निर्माण केलेले आणि पराभव करणारे ओषधि, माझ्या सवतीला घालव आणि नवरा केवळ माझा कर.

३. हे उत्कृष्ट ओषधि, मी उत्कृष्टांतलें उत्कृष्ट व्हावें आणि जी (माझी) सवत आहे ती निकृष्टांतील निकृष्ट व्हावी.

४. मी ह्या सवतीचें नांवहि घेणार नाहीं. तिच्याबरोबर कोणी खेळत नाहीं. मी सवतीला अत्यंत दूर देशालाच घालवितें.

५. हे ओषधि, मी पराभव करणारी आहें. तूं पराभव करणारी हो. आपण दोघीहि पराभव करणाऱ्या होऊन सवतीचा पराभव करूं.

६. हे पतिदेवा, सवतीचा पराभव करणारी ही वनस्पति तुझ्या (डोक्या) जवळ मी ठेवतें. पराभव करणाऱ्या ओषधीनें तुला धारण केलें आहे. गाय वासराकडे किंवा पाणी उतरत्या मार्गानें जातें त्याप्रमाणें तुझें मन माझ्याकडे धावो.

सूक्त एकशें शेचाळीसावें.

ऋषिः—देवमुनि इरंमदपुत्र; देवता-अरण्यानी; छंदः–अनुष्टुभ्.

१. हे अरण्यदेवते,तूं अरण्यांतच नाहींशी होतेस! तूं गांवाची कशी विचारणा करीत नाहींस ? तुला भीति नाहीं वाटत ?

२. मोठा शब्द करणाऱ्या प्राण्याकडे जेव्हां चींची शब्द करणारा प्राणी येतो, त्या वेळीं अरण्यानी घंटा वाजवीत असल्याप्रमाणें गढून जाते.

३. येथें गाईप्रमाणें प्राणी चरत आहेत. घराप्रमाणें आकार दिसतो आहे. आतां संध्याकाळीं अरण्यदेवता गाड्या (घराकडे) पाठवीत आहे. (संध्याकाळ झाल्यामुळें लाकडाकरतां आलेले गाडीवाले परत जात आहेत.)

४. हे अरण्यदेवते, हा गाईला बोलावतो आहे.हा लांकूड फोडतो आहे. सायंकाळीं अरण्यांत राहणारा मनुष्य (कोणाचा तरी शब्द ऐकून) ओरडत आहे असें (भीतीनें) मानतो आहे.

५. (तेथें राहणाऱ्या माणसाला) अरण्यदेवता ठार करीत नाहीं, किंवा दुसरेंहि कोणी त्यावर चालून येत नाहीं. मधुर फळ खाऊन तो सुखानें राहतो.

६. अनेक तऱ्हेचा वास येणारी, सुगंधी, विपुल अन्नयुक्त पण शेतकरी नसलेली आणि मृगांची जन्मदात्री अशा अरण्यानीला मी स्तवीत आहें.

सूक्त एकशें सत्तेचाळीसावें.

ऋषिः—सुवेदस् शिरीषपुत्र; देवता-इंद्र; छंदः– ५ त्रिष्टुभ्, बाकी जागती.

१. हे इंद्रा, ज्या रागानें श्रेष्ठ वृत्राला तूं ठार केलेंस आणि पाणी मोकळें केलेंस त्या तुझ्या मुख्य (अशा) रागावर माझी श्रद्धा आहे. जेव्हां द्यावापृथ्वी तुझ्या तंत्रानें चालते तेव्हां हे वज्रधारी इंद्रा, अन्तरिक्ष तुझ्या सामर्थ्यानें कांपूं लागतें.

२. हे निर्दोष इंद्रा, तूं कपटांनीं फसव्या वृत्राला अन्न उत्पन्न करण्याच्या बुद्धीनें ठार करतोस, आणि थोर लोक गाई प्राप्त होण्याकरतां सर्व देवांना बोलावल्या जाणाऱ्या यज्ञांत तुलाच बोलावतात.

३. हे बहुस्तुत इंद्रा, ह्या विद्वानांत तूं ये. हे धनवान् इंद्रा, जे लोक तुझ्यामुळें उत्कर्ष पाऊन धन मिळवतात ते बलवान् लोक पुत्रपौत्र व इतर इष्ट गोष्टी प्राप्त करण्याकरतां आणि अलज्जास्पद धन मिळावें म्हणून तुझीच पूजा करतात.

४. जो ह्या इंद्राचा वेग आणि उत्साह जाणतो तोच स्तोता चांगल्यप्रकारें संपादन केलेल्या धनाची इच्छा करतो. हे धनवान इंद्रा, तुझ्यामुळें उत्कर्ष पावलेल्या आणि यज्ञ करणाऱ्या भक्त लोकांच्या सहाय्यानें अन्न आणि धन ताबडतोब संपादन करतो.

५. हे इंद्रा, मोठीं स्तोत्रें म्हणून स्तुति केला जाणारा तूं आम्हांला पुष्कळ बल दे. तसेंच धन दे. हे सुंदर इंद्रा, धन देणारा तूं मित्र व वरुणाप्रमाणें युक्तिवान् होऊन आम्हांला अन्न दे.

सूक्त एकशें अठ्ठेचाळीसावें.

ऋषिः—पृथु वेनपुत्र; देवता–इंद्र; छंदः–त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, सोम पिळणारे आम्ही तुझी स्तुति करतों. हे बहुधनयुक्ता इंद्रा, अन्नाचा उपभोग घेणारे आम्ही तुझी स्तुति करतों. म्हणून जें धन आवडतें तें उत्कृष्ट धन तूं आम्हाला दे. तुझी स्तुति करणारे आम्ही आपण होऊनच उत्कृष्ट धन मिळवूं.

२. हे शूर इंद्रा, सुंदर असणारा तूं उगवल्याबरोबर सूर्यरूपानें दासांची प्रजा पराभूत करतोस. गुहेंत व पाण्यांत गुप्तपणानें राहणाऱ्या शत्रूंना तूं पराभूत करतोस. आम्ही आतां पाऊस पडल्यावर सोम (तुझ्याकरतां) तयार केला आहे.

३. हे इंद्रा, शहाणा, ऋषींचीं स्तोत्रें इच्छिणारा, ज्ञाता आणि धनी असा तूं आहेस. तूं स्तुति ग्रहण कर. जे सोमानें तुला प्रसन्न करतात ते आम्ही आहोंत. हे रथांत बसून जाणाऱ्या इंद्रा, भक्षणीय वस्तूंसह हीं स्तोत्रें आम्ही तुझ्याकरतां करीत आहोंत.

४. हे इंद्रा, हीं स्तोत्रें तुझ्याकरतां म्हटलीं जात आहेत. हे शूरा, तूं मनुष्यांपैकीं (स्तुति करणाऱ्या) लोकांना बल दे. ज्या स्तोत्यांपासून तूं (स्तोत्रें) इच्छितोस त्यांच्या इच्छेप्रमाणें करणारा तूं हो. तसेंच स्तोत्यांचें तूं संरक्षण कर आणि संघानें असणाऱ्या यजमानांचेंहि तूं संरक्षण कर.

५. हे शूर इंद्रा, पृथूचें स्तोत्र तूं ऐक. वेनपुत्र पृथूकडून तूं स्तवन केला जात आहेस. जे उदकपूर्ण अशा तुझ्या घराचें वर्णन करतात, ते सर्व स्तोते सखल प्रदेशावरून उदक जातें त्याप्रमाणें तुझ्याकडे येतात.

सूक्त एकशें एकोणपन्नासावें.

ऋषिः–अर्चत् हिरण्यस्तूपपुत्र; देवता–सवितृ ; छन्दः–त्रिष्टुभ्.

१. सविता पृथ्वीला प्रतिबंधक साधनांनीं स्थिर करता झाला. निराधार स्थलीं सवित्यांनीं द्युला निश्चल केलें. घोड्याप्रमाणें अंग हलविणाऱ्या निराधार आकाशांत स्थिर असलेल्या आणि पसरलेल्या मेघांपासून सविता (जल) दोहन करतो.

२. हे अपांनपात् अग्ने, जो पसरलेला मेघ पृथ्वीला भिजवितो, त्याचें स्थान तुला प्रेरणा करणारा सविता देव जाणतो. सवित्यापासूनच पृथ्वी झाली, याच्यापासूनच अन्तरिक्ष निर्माण झालें; आणि यापासूनच द्यावापृथ्वी विस्तृत झाली.

३. सवित्याशिवाय दुसरे यज्ञीय देव स्वर्गीय सोमामुळें मागाहून झाले. हे भक्ता, सुंदर उडणारा हा गरुडपक्षी सवित्यापासून प्रथम उत्पन्न झाला. म्हणून तो सवितृला अनुसरून असतो.

४. गाई गांवाकडे जातात, योद्धा घोड्याकडे जातो, चांगली दूध देणारी आणि हंबरणारी गाय वासराकडे जाते आणि नवरा बायकोकडे जातो त्याप्रमाणें द्युलोकाचा आधार आणि सर्ववन्द्य सविता आम्हांकडे येवो.

५. हे सवितृदेवा, तुला आंगिरस हिरण्यस्तूप या अन्नाकरतां ज्याप्रमाणें बोलावता झाला त्याप्रमाणें अर्चत् नांवाचा मी स्तुति करून तुला रक्षण करण्याकरतां बोलावतों. सोमाच्या कांड्याप्रमाणें मी तुझ्या सेवविषयीं जागृत आहे.

सूक्त एकशें पन्नासावें.

ऋषिः—मृळीक वसिष्ठपुत्र; देवता—अग्नि; छंदः—४ जगती, बाकी बृहती.

१. हे हविर्वाहक अग्ने, तूं (सर्वत्र) प्रदीप्त असूनहि देवाकरतां (यज्ञांत) प्रदीप्त केला जातोस. तूं आदित्य, रुद्र आणि वसु यांच्यासह आमच्याकडे ये. मृळीकाकडे ये.

२. हे अग्ने, हा यज्ञ आणि हें स्तोत्र स्वीकारणारा तूं ये. हे प्रज्वलित अग्ने, आम्ही मर्त्य लोक तुला बोलावीत आहोंत. मृळीकाकरतां बोलावीत आहोंत.

३. हे अग्ने, विश्ववंद्य आणि सर्वज्ञ अशा तुझी मी स्तोत्रानें स्तुति करीत आहें. यज्ञप्रिय देवांना तूं आण. मृळीकाकरतां प्रियव्रत देवांना घेऊन ये.

४. देवांचा देव अग्नि पुढें स्थापन केला आहे. ह्या अग्नीला ऋषि आणि लोक प्रदीप्त करतात. पुष्कळ धन प्राप्त व्हावें म्हणून मी अग्नीला बोलावतों. तो मृळीकाला धन देवो.

५. अत्रि, भरद्वाज, गविष्ठिर, कण्व आणि त्रसदस्यु यांचें संग्रामांत अग्नि संरक्षण करो. पुरोहित वसिष्ठ अग्नीची स्तुति करतो आहे. तो मृळीकाला देवाच्या कृपेंतला करो.

सूक्त एकशें पक्कावन्नावें.

ऋषिः—श्रद्धा कामगोत्रजा; देवता—श्रद्धा; छंदः—अनुष्टुभ्.

१. श्रद्धेनें अग्नि प्रज्वलित केला जातो, श्रद्धेनें हवन केलें जातें. दैवाच्या डोक्यावर असणाऱ्या श्रद्धेची आम्ही स्तुति करीत आहोंत.

२. हे श्रद्धे, दान देणाराचें प्रिय कर. दान देऊं इच्छिणारांचें प्रिय कर. माझ्या धार्मिक नातेवाईकांचें मी म्हटल्याप्रमाणें प्रिय कर.

३. ज्याप्रमाणें देव (आम्ही यांना ठार करूंच करूं) अशी उद्भट असुराविषयीं श्रद्धा करिते झाले, त्याप्रमाणें माझ्या धार्मिक नातेवाईकांना तूं मला प्रिय कर.

४. आकाशांत राहणारे देव व धार्मिक लोक श्रद्धेची उपासना करतात. अन्तःकरणपूर्वक संकल्पानें सर्व लोक श्रद्धेचीच उपासना करतात. कारण श्रद्धेनें धन मिळतें.

५. आम्ही प्रातःकालीं श्रद्धेला बोलावतों, आम्ही माध्यान्हकालीं श्रद्धेचें आवाहन करतों. आणि सूर्याच्या अस्तमान कालींहि आम्ही श्रद्धेचीच उपासना करतों. म्हणून हे श्रद्धे देवि, तूं आम्हांला श्रद्धाळू कर.

सूक्त एकशें बावन्नावें.

ऋषिः—शासनामन् ; देवता–इंद्र; छंदः– अनुष्टुभ्.

१. शास नांवाचा मी तुझी स्तुति करीत आहें. शत्रूंचा नाश करणारा आश्चर्यकारक असा तूं आहेस· ज्याचा मित्र मारला जात नाहीं किंवा जिंकला जात नाहीं असा तूं सर्वश्रेष्ठ आहेस.

२. कल्याण करणारा, लोकपालक, वृत्रहन्ता, युद्ध करणारा, निग्रही, बलिष्ठ आणि सोमपान करणारा इंद्र आम्हांला भयरहित करीत आमच्याकडे येवो.

३. हे इंद्रा, राक्षसाला ठार कर. युद्ध करणाऱ्या शत्रूंना ठार कर. वृत्राचे ओठ तोड. हे वृत्रहन्त्या, आमचा नाश करणाऱ्या शत्रूचा क्रोध नाहींसा कर.

४. हे इंद्रा, आमच्या युद्ध करणाऱ्या शत्रूंना ठार कर. आमच्याशीं युद्धेच्छूंना अधोगतीला ने. जो आमचा नाश करावयास येतो, त्याला अत्यंत अंधारांत पोंचव.

५. हे इंद्रा, शत्रूंचें मन मार. आम्हांला नष्ट करूं इच्छिणाराचें आयुध नष्ट कर. शत्रूंच्या रागापासून आमचें संरक्षण कर. आम्हांला सुख दे. आणि आमचा मृत्यु टाळ.

सूक्त एकशें त्रेपन्नावें.

ऋषिः—इंद्रमातृ देवाची बहीण; देवता–इंद्र; छंदः-गायत्री.

१. इंद्राकडे जाणाऱ्या आणि पराक्रम इच्छिणाऱ्या इंद्रमाता उत्पन्न झालेल्या इंद्राची उपासना करतात. आणि सामर्थ्यवान् धन प्राप्त करतात.

२. हे इंद्रा, तूं पराभव करण्याच्या सामर्थ्यामुळें व धैर्यामुळें (प्रसिद्ध) झाला आहेस. हे बलिष्ठा, तूं कामपूरक आहेस.

३. हे इंद्रा, तूं वृत्रघ्न आहेस. तूं अन्तरिक्ष मोकळें केलेंस आणि द्युलोक सामर्थ्यानें स्थिर केलास.

४. हे इंद्रा, तूं बरोबर असणारें, स्तुत्य आणि तेजस्वी वज्र धार लावून हातांत धरतोस.

५. हे इंद्रा, तूं सर्व उत्पन्न झालेल्या प्राण्यांचा पराभव करतोस. तसेंच तू सर्व पृथ्वी व्यापतोस.

सूक्त एकशें चोपन्नावें.

ऋषिः—यमी विवस्वानाची मुलगी; देवताः–मृतयजमानवर्तन; छंदः–अनुष्टुभ्.

१. कांहीं एकांकरतां सोम वाहतो, कांहीं तुपाचा उपभोग घेतात. आणि ज्यांच्याकडे मध धांवतो त्यांच्याकडे (हे मृत पुरुषा,) तूं जावेंस.

२. जे तपानें निष्पाप आहेत, जे तपानें स्वर्गाला गेले आहेत आणि ज्यांनीं महान् तप केलें आहे त्यांच्याकडे तूं जा.

३. जे रणांत लढतात, जे शूर तेथें शरीर टाकतात आणि जे हजारो रुपये दक्षणा देतात ते जेथें आहेत तेथें जा.

४. जे पूर्वपुरुष यज्ञ करणारे, यज्ञांनीं वाढणारे आणि सत्यनिष्ठ आहेत त्या तपस्वी पितरांकडे हे यमा (मृतपुरुषा), तूंहि जावेंस.

५. हजारो दृष्टींनीं पहाणारे जे शहाणे लोक सूर्याचें रक्षण करतात, त्या तपस्वी आणि तपांनीं उत्पन्न झालेल्या ऋषींकडे हे यमा (मृतपुरुषा), तूं जावेंस.

सूक्त एकशें पंचावन्नावें.

ऋषिः—शिरिंबिड भरद्वाजपुत्र; देवता—१–४ अश्रीनाशकर, २–३ ब्रह्मणस्पति, ५ विश्वेदेव; छंदः—अनुष्टुभ्.

१ हे धनाचा नाश करणारे, काण्या डोळयाचे, वेडेंवाकडें अंग असलेले, आणि सदोदित आक्रोश करणारे देवते, तूं पर्वतावर जा. शिरिंबिडाच्या प्रसिद्ध कृत्यांनीं तुझा आम्ही नाश करतों.

२. येथून नष्ट केलेली ती ह्या लोकांतूनहि नष्ट होवो. जी सर्व गर्भावस्थेंत असलेल्यांचा नाश करते, त्या धननाशक देवतेला हे प्रखर तेज असलेल्या, ब्रह्मणस्पते, तूं येथून घालवीत जा.

३. जें हें अपौरुषेय लांकूड समुद्राच्या तीरावर तरंगत आहे त्या लांकडाचा हे दुर्दम्य स्तोत्या, तूं आधार घे आणि परतीराला जा.

४. हे बेडकासारखा कठोर शब्द करणारे अवदसे, जेव्हां नाश करीत जाणारी तूं येथून जातेस त्यावेळीं बुडबुड्याप्रमाणें नाश पावणारे इंद्राचे सर्व शत्रु नष्ट होतात.

५. सर्व देवांनीं गाई परत नेल्या. अग्नीची स्थापना केली. अन्न उत्पन्न केलें. कोण ह्या देवांचा पराभव करूं शकतो ? (कोणीहि नाहीं.)

सूक्त एकशें छप्पन्नावें.

ऋषिः—केतु अग्निपुत्र; देवता—अग्नि; छंदः—गायत्री.

१. योद्धे जलद चालणाऱ्या घोड्याला जसें उत्तेजित करतात त्याप्रमाणें आमचीं स्तोत्रें अग्नीला प्रज्वलित करोत. त्यायोगें आम्ही सर्व धन जिंकूं.

२. हे अग्ने, ज्या सेनेसारख्या स्तुतीनें आम्ही गाई मिळवूं ती स्तुति धनप्राप्तिकरतां आम्हांला येऊं दे.

३. हे अग्ने, विपुल, वाढते आणि गाई घोड्यांनीं युक्त असें धन आम्हांला दे. आकाश मोकळें कर (पाऊस पाड) आणि पणीला घालव.

४. हे अग्निदेवा, सर्वांना प्रकाश मिळेल अशा बेतानें जरारहित आणि गन्ता सूर्य तूं द्युलोकावर चढवला आहेस.

५. हे अग्ने, स्तोत्याला अन्न देणारा असा तूं यज्ञगृहांत बसून आमचें स्तोत्र ऐक. तूं अत्यंत प्रिय आणि श्रेष्ठ आहेस. तसेंच लोकांना ज्ञान देणारा आहेस.

सूक्त एकशें सत्तावन्नावें.

ऋषिः—भुवन अप्त्यपुत्र किंवा साधन भुवनपुत्र; देवता—विश्वेदेव; छंदः—त्रिष्टुभ् (द्विपदा).

१. हें सर्व जग आम्ही वश करूं. इंद्र आणि विश्वेदेव आम्हांला साहाय्य करोत.

२. आम्हांला देवांसह असणारा इंद्र यज्ञ, शरीर आणि प्रजा देवो.

३. देव आणि मरुतांसह असणारा इंद्र आमच्या शरीरांचें संरक्षण करो.

४. देव असुरांचा नाश करून जेव्हां आले तेव्हां त्यांच्या देवत्वाचें रक्षण झालें.

५. जेव्हां कर्माबरोबर देवांकडे जाणारीं स्तोत्रें म्हटलीं जातात तेव्हांच वहाणारें पाणी लोकांना दिसतें.

सूक्त एकशें अठ्ठावन्नावें.

ऋषिः—चक्षुष सूर्यपुत्र; देवता—सूर्य; छंदः—गायत्री.

१. सूर्य स्वर्गांतील, वायु अन्तरिक्षांतील आणि अग्नि पृथ्वीवरील शत्रूपासून आमचें संरक्षण करो.

२. हे सर्वप्रेरक सूर्या, आमच्या स्तुतीचा स्वीकार कर. ज्या तुझ्या तेजाचे शेंकडो तऱ्हेनें पूजन करावयास पाहिजे, तो तूं आमच्यावर पडणाऱ्या झकझकीत आयुधापासून आमचें संरक्षण कर.

---

[1] टीपः—ज्यांच्या वंशजाकडून ब्रह्मयज्ञकालीं साम म्हटला जातो, त्यांच्या पितरांना सोम मिळतो. जे यजुर्वेद म्हणतात त्यांच्या पितरांना तूप आणि अथर्ववेद म्हणतात त्यांच्या पितरांना मध मिळतो अशी इतर वेदांत वाक्यें आहेत. त्याला जुळणारी ही ऋचा आहे. (आश्वला गृ.सू. १.१.२; ३.३.२ पहा.)

३. सर्वप्रेरक सूर्य आमचे डोळे चांगले ठेवो. पर्वतदेव आमचे डोळे तेजस्वी ठेवो. आणि धातृदेव डोळे सुरक्षित ठेवो.

४. हे सूर्या, तूं आमच्या डोळ्यांना तेज दे. आमच्या शरीरांना अवलोकनाची शक्ति दे. म्हणजे आम्ही हें सर्व न्याहाळून पाहूं.

५. हे सूर्या, दृष्टीला सामर्थ्य देणाऱ्या तुला आम्ही पाहूं. मनुष्याला पहातां येणारे सर्व पदार्थ पाहूं.

सूक्त एकशें एकूणसाठावें.

ऋषिः—शची पुलोमतनया; देवता—शची पुलोमतनया; छंदः—अनुष्टुभ्.

१. हा माझा पति सूर्यरूपानें उदय पावला आहे. त्याला जाणणारी आणि पतीला ताब्यांत घेणारी मी (सवतीचा) पराभव करते.

२. मी शहाणी, मी मुख्य, मी रागीट आणि मी नवऱ्याला बोलावयास लावणारी आहे. माझ्याच मनाप्रमाणें माझा पति चालेल.

३. माझे मुलगे शत्रुहन्ते आहेत, माझी मुलगी चांगली, मी सर्वांवर छाप ठेवणारी आणि माझें (च) नवऱ्यावर उत्तम वजन आहे.

४. ज्या हवीनें इंद्र माझा नवरा झाला, आणि जगांत प्रसिद्ध झाला, हे देवहो, तो हवि मी तयार केला आहे. म्हणूनच मी सवतीनें रहित झालें आहे.

५. सवतीनें रहित, सवतीचा नाश करणारी, जयशाली आणि छाप ठेवणारी मी धांवत्या शत्रूच्या धनाप्रमाणें सवतींचें धन नष्ट करतें.

६. जशी मी ह्या वीरास आणि त्या लोकांत शोभते तशीच छाप ठेवणारी मी ह्या सवतीचा पराभव करते.

टीप:--सपत्नीनाश, सूक्त १०. १४५ पहा.

सूक्त एकशे साठावें.

ऋषिः—पूरण वैश्वामित्र; देवता-इंद्र; छंदः—त्रिष्टुभ्.

१. हे इंद्रा, ताबडतोब मद उत्पन्न करणारा अन्नयुक्त सोम तूं पी. त्याकरतां रथाला जोडलेले घोडे तूं सोड. आमच्याहून दुसरे यजमान तुला (आमच्या इतके) न रमवोत. तुझ्याकरतां काढलेला हा सोम आहे.

२. हे इंद्रा, तुझ्याकरतां सोम पिळलेला आहे. (येथून पुढेंहि) तुझ्या करतांच पिळला जाणार आहे. सतत चालूं असलेली स्तुति तुलाच बोलावीत आहे. हे इंद्रा, आमचें स्तोत्र ऐकणारा आणि सर्वज्ञ असा तूं आमच्या यज्ञांत सोम पी.

३. जो देवभक्त कामुक अशा सर्वांच्या अन्तःकरणानें ह्या इंद्राकरतां सोम पिळतो त्याच्या गाई इंद्र नष्ट करीत नाहीं. उलट ह्याला सुंदर आणि प्रशंसनीय धन देतो.

४. जो धनिक ह्या इंद्राकरतां सोम पिळतो, त्याच्या इंद्र हा दृष्टिगोचर होतो. इंद्र त्याला हाताशीं धरतो आणि त्यांनीं न सांगतांच त्याचे ब्राह्मणद्वेष्टे शत्रू ठार करतो.

५. अश्व, गाई आणि अन्न इच्छिणारे आम्ही हे इंद्रा, तुझ्याकडे येण्याकरतां तुला बोलावीत आहों. हे इंद्रा, तुझ्या कृपेंतले आम्ही सुखकर अशा तुला बोलावीत आहों.

सूक्त एकशें एकसष्टावें.

ऋषिः-यक्ष्मनाशन प्रजापतिपुत्र; देवताः-इन्द्र;
छन्दः-५ अनुष्टुभ्, बाकी त्रिष्टुभ्.

१. हे रोगी गृहस्था, निश्चित रीतीनें न समजणाऱ्या राजयक्ष्मा नांवाच्या रोगापासून जगण्याकरतां हविर्द्रव्यानें मी तुला मुक्त करतों. जर ह्या वेळीं ह्याला देवतांनीं पछाडलें असेल तर त्यापासून इंद्र आणि अग्नि ह्याला मुक्त करोत.

२. जर रोगी क्षीणायुष्य होईल, जर तो मरेल किंवा जर तो मृत्यूच्या निकट जाईल तर त्याला मृत्युदेवता निर्ऋति त्यापासून परत आणील आणि त्याला शंभर वर्षें जगण्याकरतां बल देईल.

३. हजार दृष्टींचा, शंभर वर्षें आयुष्य असलेला, ज्यायोगें शंभर वर्षें याला इंद्र सर्व दुःखांच्या पार करील असें मी याला करीन.

४. हे रोगमुक्ता, आरोग्य पावणारा तूं शंभर शरद् ऋतू, शंभर हेमंत आणि शंभर वसंत ऋतू जग. इंद्राग्नि, सविता, व बृहस्पति हे देव हविर्द्रव्यानें शंभर वर्षांच्या आयुष्यानें पुनः हा आम्हांला देत आहेत.

५. हे रोगी गृहस्था, तुला मी मृत्यूपासून ओढून आणलें आहे. म्हणूनच तूं आम्हांस मिळाला आहेस. हे पुनः नवा झालेल्या गृहस्था, तूं आमच्याजवळ ये. हे सर्वांगपरिपूर्णा, तुला पूर्ण दृष्टि व सर्व आयुष्य प्राप्त झालें आहे.

सूक्त एकशें बासष्टावें.

ऋषिः–रक्षोहा ब्रह्मपुत्र; देवता–गर्भरक्षकदेवता;
छन्दः–अनुष्टुभ्.

१. हे स्त्रिये, राक्षसांचा वध करणारा हा अग्नि आमच्या वेदमंत्रानें संतुष्ट होऊन, तुझ्या शरीरांत रोगरूपानें संचार करून गर्भाला पीडा देणाऱ्या व तुझ्या गर्भाशयांत अर्शोरोग (मूळव्याध) रूपानें राहणाऱ्या राक्षसाला त्रास देवो.

२. वर सांगितल्याप्रमाणें पिडा देणाऱ्या व मांस खाणाऱ्या राक्षसाला वेदमंत्राच्या साहाय्यानें हा अग्नि निःशेष मारो.

३. हे स्त्रिये, तुझ्या गर्भाशयांत रेतोरूपानें नुकताच आलेल्या गर्भाचा किंवा पुढें कठीण होऊन स्थिर होणाऱ्या अथवा पोटांत चलनवलन करूं इच्छिणाऱ्या गर्भाचा जो राक्षस नाश करूं पहातो; व कदाचित् पूर्ण दिवस होऊन जन्मास आलेल्या बालकाला मारून टाकितो, त्या राक्षसाला आम्ही येथून नाहींसा करतों.

४. हे स्त्रिये, जो राक्षस गर्भनाशासाठीं तुझ्या मांड्यांचा आश्रय करून राहतो; किंवा स्त्रीपुरुषांमध्यें निजतो; अथवा स्त्रीच्या गर्भाशयांत पुरुषानें केलेल्या रेतोविसर्गाबरोबर त्वरित आपल्या जिभेनें तें रेत चाटून जातो; त्याला आम्ही येथून नाहींसा करतों.

५. हे स्त्रिये, जो राक्षस तुझ्या भावाच्या रूपानें अथवा पतीच्या रूपानें, किंवा जाराच्या रूपानें तुझ्याशीं वागून तुझी प्रजा मारण्यासाठीं टपून रहातो, त्याला येथून आम्ही नाहींसा करतों.

६. हे स्त्रिये, जो तुला गाढ निद्रारूप अज्ञानांत अडकवून तुझ्या गर्भाचा नाश करूं पहातो त्याला येथून आम्हीं नाहींसा करतों.

सूक्त एकशें त्रेसष्टावें.

ऋषिः—विवृहा कश्यपगोत्रोत्पन्न. देवता—रोगनाश; छंदः–अनुष्टुभ्.

१. हे रोगी गृहस्था, तुझे डोळे, नाक, कान, हनुवटी, डोकें, जिव्हा आणि मेंदू यांच्यांतून मी रोग बाहेर काढतों.

२. तुझ्या मानेचे स्नायु, हाडें, हाडांचे सांधे, खांदे, बाहू आणि त्यांतील अन्तर्भागांतून मी रोग दूर करतों.

३. तुझी आंतडी, गुद, स्थूल आंतडी, हृदय, मूत्राशय, यकृत् आणि पांथरी यांपासून मी रोग बाहेर काढतों.

४. हे रोगी गृहस्था, तुझ्या मांड्या, गुडघे, चवडे आणि टांचा, मांडीचे सांधे, कटिप्रदेश आणि गुदाचा अन्तर्भाग यांतून रोग दूर करतों.

५. उदक टाकणारें लिंग, केंस, नखें आणि तुझ्या सर्व शरीरापासून त्या ह्या रोगाला बाहेर काढतों.

६. अंगाअंगांतून, प्रत्येक केंसांतून, प्रत्येक सांध्यांतून आणि तुझ्या सर्व शरीरांतून मी त्या ह्या रोगाला दूर करतों.

सूक्त एकशें चवष्टावें.

ऋषिः—प्रचेतस् आंगिरस; देवता—दुःस्वप्ननाशन; छंदः—१.२.४ अनुष्टुभ्, ३ त्रिष्टुभ्, ५ पंक्ति.

१. हे स्वप्नांतील मनाच्या अधिदेवते, दूर हो. दूर जा. दूर देशांत यथेष्ट फीर. पापदेवतेला (त्रास देऊं नको म्हणून) सांग. जीवंत असणाऱ्या माझें मन सर्वत्र फिरत आहे. (म्हणून मला वाईट स्वप्न पडूं नये.)

२. सर्व लोक चांगल्याच फलाची इच्छा करतात. आणि चांगलें शुभ फल मिळवतात. यमाच्या शुभ दृष्टीची मी इच्छा करतों. विविध विषयांत माझें मन रमो.

३. ज्या वाईटाच्या शंकेनें आम्ही जागे रहातों आणि चांगल्या इच्छेनें आम्ही निजतों, तीं वाईट व असेव्य कृत्यें तूं आमच्यापासून दूर ठेव.

४. हे इंद्रा, हे बृहस्पते, तुमच्याविषयीं जें आम्हीं पाप केलें असेल (त्याबद्दल आम्हांला क्षमा करा.) ज्ञानी अंगिरस द्वेष्ट्यांच्या पातकापासून आमचें संरक्षण करो.

५. आम्ही सर्व जिंकूं आणि उपभोगूं. आम्ही निरपराधी होऊं. जागृत आणि स्वप्नावस्थेमध्यें जें वाईट मनांत येईल तें शत्रूकडे जावो. जो आमचा द्वेष करतो त्याकडे जावो.

टीप—दुःस्वप्ननाश. सूक्त ८-४७ पहा.

सूक्त एकशें पासष्टावें

ऋषिः–कपोत निर्ऋतिपुत्र; देवता–विश्वेदेव; छन्दः–त्रिष्टुभ्.

१. हे देवहो, प्राप्त झालेला हा मृत्युदेवतेचा दूत

पारवा ज्या इच्छेनें येथें आला आहे त्याच्या निवारणाकरतां आम्ही तुमची पूजा करतों. तसेंच त्या पापाची निष्कृति करतों. आतां आमच्या मुलांबाळांना सुख होवो आणि गाईघोड्यांनाहि सुख होवो.

२. हे देवहो, आमच्या घरांत आलेला पारवा नांवाचा पक्षी आम्हांला सुखकर आणि निष्पाप करणारा असो. हा तेजस्वी अग्नि आमचा हवि भक्षण करो. आणि मृत्यूला कारण होणारा हा पक्षी आम्हांला सोडो.

३. हे पंखयुक्त शस्त्र आमचा नाश न करो. अग्नि अग्निगृहांत अरणींत राहो. आमच्या गाईमाणसांना सुख होवो. हे देवहो, येथें कपोत आमचा नाश न करो.

४. घुबड जें बोलत आहे तें निष्फल होवो. पारवा अग्निगृहांत रहातो तेंहि निष्फल असो. ज्या यमाचा हा कपोत दूत आहे, त्या मृत्युस्वरूप यमाला नमस्कार असो.

५. हे देवहो, मंत्रानें स्तुति केलेले तुम्ही पारव्याला घालवा. हवींनीं प्रसन्न होणाऱ्या आणि सर्व पापें नाहींशीं करणाऱ्या आम्हांला गाय प्राप्त होऊं द्या. तसेंच हा उडणारा पक्षी आमचें अन्न टाकून उडो.

सूक्त एकशें सहासष्टावें.

ऋषिः—ऋषभ वैराज किंवा शाक्वर; देवता—सपत्ननाशन; छन्दः—५ महापंक्ति बाकी अनुष्टुभ.

१. हे शत्रुनाशक इंद्रा, मला तूं आमच्या कुलांत श्रेष्ठ कर. आणि शत्रूंचा पराभव करणारा कर. शत्रूंचा हन्ता कर आणि विशेष प्रकारें गाईंचा संरक्षक कर.

२. मी शत्रूंचा हन्ता आहे. आणि इंद्राप्रमाणें (कोणीहि) जखमी न केलेला आणि अहिंस्य असा आहे. हे सर्व शत्रू माझ्या पायावर पडोत. (शरण येवोत.)

३. धनुष्याचीं दोनहि टोकें दोरीनें जशी बांधून टाकतात त्याप्रमाणें तुम्हांला मी येथेंच बांधून टाकतों. हे वाचस्पते, यांचा निषेध कर आणि माझ्यापेक्षां कमी प्रतीचे बोलणारे कर.

४. हे शत्रूंहो, पराभव करणारा मी सर्वसमर्थ तेजानें आलों आहे म्हणून मी तुमचें (धैर्यशाली) मन, तुमचें कृत्य, आणि तुमचें युद्ध (कौशल्य) स्वीकारतों.

५. हे शत्रूहो, तुमचा योगक्षेम घेऊन मी श्रेष्ठ होईन. तसेंच तुमच्या डोक्याचें मी (पायानें) आक्रमण करीन. पाण्यांतून बेडूक जसें ओरडत असतात त्याप्रमाणें तुम्ही माझ्या पायाखालून ओरडत रहा.

सूक्त एकशें सदुसष्टावें.

ऋषिः—विश्वामित्र आणि जमदग्नि; देवता—इंद्र; छंदः—जगती.

१. हे इंद्रा, हा सोम तुझ्याकरतां काढला आहे. तूंच पिळलेल्या सोमाचा धनी आहेस. तूं पुष्कळ मुलांनीं युक्त अशी संतति आम्हांला दे. तसेंच तूं तप करून स्वर्ग जिंकला आहेस.

२. स्वर्गाला जिंकणाऱ्या, महान्, सोमानें मदयुक्त असणाऱ्या, इंद्राला आम्ही पिळलेल्या सोमाकरतां बोलावतों आहोत. हे इंद्रा, तूं आमच्या ह्या यज्ञांत मनःपूर्वक ये. लढाऊ सेना जिंकणाऱ्या इंद्राला आम्ही धन मागतों आहोंत.

३. राजा सोम आणि वरुण यांच्या यज्ञांत आणि बृहस्पति आणि अनुमति यांच्या यज्ञगृहांत असणारा मी हे इंद्रा, आज तुझी स्तुति करीत आहें. हे धातृ आणि विधातृहो, (यज्ञशेष) सोम मी पितों.

४. हे इंद्रा, तुझ्या प्रेरणेनें मी यज्ञांत भक्ष्य तयार केलें आहे. मुख्य स्तोता मी हें स्तोत्र करीत आहें. हे विश्वामित्रजमदग्नीहो, तुमच्या यज्ञगृहांत सोम काढल्यावर धन घेऊन जेव्हां मी येईन, तेव्हां तुम्ही स्तोत्रें म्हणा.

सूक्त एकशें अडुसष्टावें.

ऋषिः—अनिल वातगोत्र; देवता—वायु; छंदः—त्रिष्टुभ्.

१. आतां मी वाताच्या रथाचा महिमा सांगतों. याचा आवाज धडधड शब्द करतो व तो मोडतोड करीत जातो. हा पृथ्वीवर धूळ उडवीत (व) तिच्या योगानें दिशांना रक्तवर्ण करीत, अन्तरिक्षमार्ग व्यापून चालतो.

२. ज्याप्रमाणें स्त्रिया साहसी पुरुषाकडे जातात, त्याप्रमाणें विशेष स्थिर असे तरूगुल्मादि वाताकडे जातात (आणि) त्यांसह एका रथांत बसून हा सर्व भुवनांचा राजा वायुदेव जातो.

३. अन्तरिक्षांतील मार्गीनीं जाणारा (हा वायु) एकहि दिवस (स्वस्थ) बसत नाहीं. हा जलांचा

---

१ टीप:—पारवा घरांत शिरला असतां शान्ति करण्याचा विधि सध्यांहि प्रचलित आहे.

मित्र, सर्वांच्या पूर्वीं जन्मलेला, व सत्याचा पालक कोठें उत्पन्न झाला ? कोठून आला ?

४. हा देवांचा आत्मा व भुवनाचा गर्भ, इच्छेप्रमाणें संचार करतो. याचा आवाज केवळ ऐकूं येतो, याचें रूप दिसत नाहीं. त्या वायुदेवाची आम्ही हविर्नीं सेवा करतों.

सूक्त एकशें एकोणसत्तरावें.

ऋषिः–शबर कक्षीवद्गोत्र; देवता–गो; छंदः–त्रिष्टुभ्.

१. वायु सुख देत गाईकडे जावो. गाई बलवान् ओषधी खावोत. चांगलें आणि आनंददायक पाणी पिवोत, हे रुद्रा, पायानें फिरणाऱ्या दूधरूप असणाऱ्या गाईला सुख दे.

२. ज्या सारख्या, वेगळ्या, एक रंगाच्या आणि ज्यांचीं नांवें अग्नि यज्ञानें जाणतो, ज्यांना अंगिरसानें तप करून उत्पन्न केलें, त्या गाईंना, हे पर्जन्या, तूं अत्यंत सुख दे.

३. ज्या गाई देवांना आपलें दूध देतात, ज्यांचें दूध सोम जाणतो, त्या गाई आम्हांला दूधानें पुष्ट करीत व आम्हांला संतति देणाऱ्या आमच्या गोठ्यांत, हे इंद्रा, तूं पोंचीव.

४. आम्हांला गाई देणारा प्रजापति सर्व देव आणि पितर यांच्या संमतीनें आमच्या गोठ्यांत चांगल्या गाई पोंचवो. त्यांच्या वासरांनीं आम्हीं संपन्न होऊं.

सूक्त एकशेसत्तरावें.

ऋषिः–विभ्राट्संज्ञक सूर्यपुत्र; देवता-सूर्य; छन्दः-१–३ जगती, ४ आस्तारपंक्ति.

१. वायूनें गति दिलेला सूर्य आपणहून प्रजेचें रक्षण करतो, प्रजेचें पोषण करतो आणि अनेक प्रकारें शोभत असतो. तो यज्ञपतीला सरळ आयुष्य देणारा तेजस्वी सूर्य, व्यवस्थित तयार केलेला व मधुर सोम पिवो.

२. तेजस्वी, मोठें, व्यापक, बलप्रद, द्युलोकाचा आधार जो सूर्य त्यांत असलेले, अविनाशी, शत्रुघातक, मेघनाशक, दस्युघातक, असुरघातक आणि स्वाभाविक शत्रूंचा नाश करणारें असें तेज उत्पन्न होत आहे.

३. तेजांचें तेज, सर्व जगाला जिंकणाऱ्या, सर्व प्रकाराचें धन प्राप्त करून देणाऱ्या, श्रेष्ठ आणि व्यापक अशा सूर्यप्रकाशाचें वर्णन केलें जातें. जगप्रकाशक आणि तळपणारा महान् सूर्य सर्व लोकांना दिसावें म्हणून कोणालाहि कमी करतां न येणारें असें व्यापक आणि बलिष्ठ तेज प्रकट करतो.

४. हे सूर्या, आपल्या तेजानें सर्व जगाला प्रकाशित करीत तूं आकाशांत उदय पावतोस. कारण विश्वसंरक्षक आणि विश्वाला उत्पन्न करणाऱ्या तेजानें हें सर्व त्रैलोक्य पोसलें जातें.

सूक्त एकशें एकाहत्तरावें.

ऋषिः—इट भृगुपुत्र; देवता–इंद्र; छंदः—गायत्री

१. हे इंद्रा, सोमयुक्त इटाचा तो रथ तूं राखलास आणि सोमयुक्त अशा त्याचें स्तोत्रहि तूं ऐकलेंस.

२. हे इंद्रा, (देवापासून) पळून[1] जाणाऱ्या यज्ञाचें डोकें आणि कातडें तूं हरण केलेंस. आणि सोमयुक्त अशा माझ्या घरीं आलास.

३. हे इंद्रा, तूं त्या मर्त्य वेनपुत्राला मानी आस्त्रबुध्नाकरतां वारंवार चेचलेंस.

४. हे इंद्रा, अस्तानंतर आणि उदयापूर्वीं देवांनाहि (कोठें आहे हें) माहीत नसलेला आणि तेजस्वी सूर्य अस्ताला गेल्यानंतरहि तूं जाणतोस.

सूक्त एकशें बहात्तरावें.

ऋषिः—संवर्त आंगिरस; देवता—उषस्; छंदः–विराज्.

१. हे उषोदेवते, ज्यांना उत्तम कास आहे अशा गाई रथाला जोडल्या आहेत (त्या रथांत बसून) धन घेऊन तूं आमच्याकडे ये.

२. हे उषे, दात्यांचा अत्यंत श्रेष्ठ आणि यज्ञांत स्तुति केला जाणारा असा हा काल आहे. त्यावेळीं अत्यंत कृपा करणारी तूं आमच्याकडे ये.

३. अन्नदानाप्रमाणें उत्कृष्ट स्तुति करणारे आम्ही लांबलचक अशा उषःकालाची स्तुति करीत आहोंत, आणि उषेचा सत्कार करीत आहोंत.

४. उषा आपली भगिनी जी रात्र तिचा अंधार नाहींसा करते आणि आपला रथ योग्य ठिकाणीं आणते.

---

[1] **टीप**—देवापासून पुरुषाचें रूप घेतलेला आणि हातांत धनुष्य घेतलेला यज्ञ जाऊं लागला तेव्हां इंद्रानें धनुष्यानें त्याचें डोकें तोडलें अशी कथा आहे.

सूक्त एकशें त्र्याहत्तरावें.

ऋषिः—ध्रुव आंगिरस; देवता—अभिषिक्तराजस्तुति; छंदः—अनुष्टुभ्.

१. हे राजा, तुला आम्ही उदयाला आणलें आहे. तूं आमचा राजा हो. तूं नित्य आणि स्थिर रहा. सर्व लोक (राजा म्हणून) तुझी इच्छा करोत. तुझ्यापासून राज्य नष्ट होऊं नये.

२. हे राजा, येथेंच तूं अस. च्युत होऊं नकोस. पर्वतासारखा स्थिर ऐस. (स्वर्गांतल्या) इंद्राप्रमाणें तूं (पृथ्वीवर) स्थिर रहा. आणि राष्ट्राचें संरक्षण कर.

३. ह्या अभिषेक केलेल्या राजास ह्या निश्चित हविर्द्रव्यानें इंद्र स्थिर करो. त्याला सोम आणि ब्रह्मणस्पति आपले असें म्हणोत.

४. आकाश, पृथ्वी, पर्वत आणि हें सर्व जग ज्याप्रमाणें अचल आहे त्याप्रमाणें लोकांचा हा राजा कायम टिको.

५. राजा वरुण, बृहस्पतिदेव, इंद्र आणि अग्नि तुला (राज्यावर) स्थिर करोत. आणि तुझें राष्ट्रहि स्थिर करोत.

६. निश्चित हविर्द्रव्यानें आम्ही कायमचा सोम उत्पन्न करूं. इंद्र प्रजा केवळ तुलाच कर देणाऱ्या करो.

सूक्त एकशें चवऱ्याहत्तरावें.

ऋषिः—अभीवर्त आंगिरस; देवता—राजस्तुति; छंदः—अनुष्टुभ्

१. देवांना आणणाऱ्या ज्या हविर्द्रव्यानें इंद्र येतो, त्या हविर्द्रव्यानें आम्हांला हे ब्रह्मणस्पते, राष्ट्राकरतां तयार कर.

२. जे आमचे शत्रू असतील त्या शत्रूंवर चालून जाऊन आणि जो आमच्याशीं स्पर्धा करीत असेल त्याच्याशीं युद्ध करण्यास मला तयार कर.

३. हे राजा, सवितादेव तुला राष्ट्र प्राप्त करून देवो. सोम आणि सर्व प्राणिमात्र तुला राष्ट्र प्राप्त करून देवोत, कीं ज्या योगें तूं सर्वसत्ताधारी होशील.

४. ज्या हविर्द्रव्यामुळें इंद्र कर्तृत्ववान् आणि श्रेष्ठ झाला तें हविर्द्रव्य मी तयार केलें आहे. आणि हे देवहो, म्हणूनच मी शत्रूरहित झालों आहे.

५. जसा मी ह्या सर्व प्राण्यांचा आणि लोकांचा धनी झालों आहे तसाच शत्रुहन्ता मी अशत्रु झालों आहे. राष्ट्रयुक्त आणि शत्रूंचा पराभव करणारा झालों आहे.

सूक्त एकशें पंचाहत्तरावें.

ऋषिः—अर्बुद सर्प; देवता—ऊर्ध्वग्रावा; छंदः—सोमाभिषवग्रावा.

१. हे सोम कुटणाऱ्या दगडांनो, तुम्हांला सवितृदेव आपल्या सामर्थ्यानें सोम कुटण्याची प्रेरणा देवो. तुम्ही कुटण्याच्या स्थळीं जा आणि सोम काढा.

२. हे दगडांनो, दुःख देणाऱ्या लोकांना आमच्यापासून दूर करा. आमची दुर्मति नाहींशी करा. आणि सुखदायक गाई आम्हांला द्या.

३. सोमाला गोडी आणणारे आणि एकत्र असणारे दगड उपर नांवाच्या दगडाच्या भोंवती फार चांगले शोभतात.

४. हे दगडांनो, तुम्हांला सवितृदेव सोम काढणाऱ्या यजमानाकरतां आपल्या सामर्थ्यानें सोम काढण्यास लावो.

---

३ टीपः— उपर म्हणजे सोम कुटण्याच्या दगडांतील मधला दगड.

सूक्त एकशें शहात्तरावें.

ऋषिः—सूनु ऋभुपुत्र; देवता— १ऋभु, २-४ अग्नि;
छन्दः—२ गायत्री, बाकी अनुष्टुभ्.

१. जे विश्वाधार ऋभु, दूध देणाऱ्या धेनूंचीं मुलें घेतात त्याप्रमाणें पृथ्वीचा उपभोग घेतात, ते ऋभु जोरानें लढाईंत जातात.

२. हे भक्तांनो, उत्कृष्ट स्तोत्र आणि उपासना यांच्या द्वारां आपलीं हविर्द्रव्यें वाहून न्यावींत म्हणून अग्नीची उपासना करा.

३. देवेच्छु आणि देवांना बोलावणारा असा हाच तो अग्नि यज्ञाकरतां स्थापिला जातो. रथाप्रमाणें देवांच्याकडे हवि पोंचविणारा, तेजस्वी आणि भक्तांनीं वेष्टिलेला अग्नि आपणहून देवांना हवि पोंचविणें जाणतो.

४. हा अग्नि देवाप्रमाणें मनुष्यापासून (सर्वांचें) रक्षण करतो. बलवानांतला बलवान् असणारा हा देव जीवनाकरतां उत्पन्न केला आहे.

सूक्त एकशें सत्याहत्तरावें.

ऋषिः—पतंग प्रजापतिपुत्र; देवता—मायाभेद; छंदः—
१ जगती, २-३ त्रिष्टुभ्.

१. ईश्वराच्या मायेनें व्यापिलेल्या सूर्याला शहाणे

लोक हृदयस्थ मनानें जाणतात. सूर्यमंडलांत शहाणे अवलोकन करतात. आणि उपासक सूर्यमंडलाची इच्छा करतात,

२. सूर्य मनानें वेदरूपी वाणी धारण करतो, तिलाच शरीरांत असणारा प्राणवायु उच्चारतो आणि त्याच स्वर्गीय, तेजस्वी आणि मनावर सत्ता चालविणाऱ्या वाणीचें शहाणे लोक यज्ञांत संरक्षण करतात.

३. वर जाऊन आपल्या मार्गांनीं खालीं येणाऱ्या आणि खालीं न पडणाऱ्या अशा रक्षण करणाऱ्या सूर्याला आम्ही जाणतों. तो सर्वत्र जाणारा, सर्व दिशा व्यापणारा आणि प्रकाशित असणारा असा प्रकट असतो.

सूक्त एकशें अठ्याहत्तरावें.

ऋषिः–अरिष्टनेमि तार्क्ष्यपुत्र; देवता–तार्क्ष्य;छंदः–त्रिष्टुभ्.

१. त्या बलवान, देवांनीं (सोम आणण्याकरतां) पाठविलेल्या, सामर्थ्यवान्, रथांना जिंकणाऱ्या, अखंड आयुधें असलेल्या, सेना जिंकणाऱ्या, आणि चलाख अशा तार्क्ष्याला–गरुडाला माझ्या कल्याणाकरतां आम्ही बोलावतों.

२. इंद्राच्या प्रमाणें गरुडाच्या दानाची स्तुति करणारे आम्ही कल्याणाकरतां,समुद्र तरण्याकरतां नौकेंत आरूढ व्हावें त्याप्रमाणें दुःखपार होण्याकरतां तुझ्या दानावर अवलंबून असावें. हे विस्तृत, गंभीर आणि प्रख्यात असणारे द्यावापृथ्वीहो, तुमचा तार्क्ष्य आला असतां आमचा नाश होऊं नये.

३. ज्या तार्क्ष्याला सूर्य आपल्या तेजानें निर्माण करतो त्याप्रमाणें पंचजन आणि उदक निर्माण केलें. त्या तार्क्ष्याची गति शेंकडों हजारों तऱ्हेनें धन देणारी होते. बाणाच्या गतीप्रमाणें याच्या गतीचें कोणीहि निवारण करूं शकत नाहीं.

सूक्त एकशें एकोणऐंशीवें.

ऋषिः—१ शिबि उशीनरपुत्र, २ प्रतर्दन काश्यधिपति, ३ वसुमनस् रोहिदश्वपुत्र; देवता–इंद्र; छंदः–१ अनुष्टुभ् , २–३ त्रिष्टुभ्.

१. हे ऋत्विजहो, उठा. आणि प्रत्येक ऋतूंत दिला जाणारा इंद्राचा भाग अवलोकन करा. जर तो शिजला असेल तर हवन करा, नसेल तर स्तोत्रें म्हणा.

२. हे इंद्रा, हवि शिजला आहे. तूं लवकर ये. सूर्य रस्त्याच्या मध्यावर गेला आहे. (मध्याह्न झाला आहे.) ऋत्विज सोमांनीं,कुलीन लोक काम करणाऱ्या गृहपतीची सेवा करतात,त्याप्रमाणें तुझी सेवा करीत आहेत

३. कासेंत दूध पक्व झालें आहे असें मी मानतों. तसेंच (हवन केल्यावर तें पुनः) अग्नींत पक्व होईल. तसेंच तें अत्यंत नवीन आणि सृष्टिनियमाला अनुसरून आहे असें मी समजतों. हे वज्रधारी आणि अनेक पराक्रम करणाऱ्या इंद्रा, प्रसन्न होऊन तूं माध्याह्नकालीं केलेल्या यज्ञांतील दहि प्राशन कर.

सूक्त एकशें ऐंशीवें.

ऋषिः—जय इंद्रपुत्र; देवता–इंद्र; छंदः–त्रिष्टुभ्.

१. हे बहुस्तुत इंद्रा, तूं शत्रूंचा पराभव करतोस. तुझें सामर्थ्य श्रेष्ठ आहे. तूं आम्हांला धन दे. हे इंद्रा, तूं उजव्या हातानें धन घेऊन ये. तूं धनाच्या नद्यांचा अधिपति आहेस. (तुझ्या जवळ द्रव्याच्या नद्या वाहात असतात.)

२. वाईट रीतीनें संचार करणाऱ्या आणि पर्वतांत राहणाऱ्या सिंहाप्रमाणें हे इंद्रा, तूं भयंकर आहेस. तो तूं अतिशय दुरूनहि ये. (येऊन) चांगलें चालणाऱ्या तिखट वज्राला धार लावून हे इंद्रा, आमच्या शत्रूंना नष्ट कर. आणि हिंसकांना दूर कर.

३. हे इंद्रा, संरक्षक व स्तुत्य असें बल घेऊन तूं उत्पन्न झाला आहेस. हे कामपूरका, आमच्याशीं शत्रुत्व करणारांना तूं दूर कर. देवांच्या द्वारा तूं हें विस्तीर्ण जग निर्माण केलें आहेस.

सूक्त एकशें एक्यांशीवें.

ऋषिः–१ प्रथ वासिष्ठ, २सप्रथ भारद्वाज, ३ घर्म सूर्यपुत्र; देवता–विश्वेदेव; छन्दः–त्रिष्टुभ्.

१. ज्यास प्रथ व सप्रथ नांवें होतीं आणि ज्यांनीं अनुष्टुभ् वृत्तांनीं हवि दिला, तें हवि देण्यास उपयोगी पडणारें रथंतर नांवाचें साम वशिष्ठानें तेजस्वी धाता, सविता व विष्णु यांपासून मिळविलें.

२. जें यज्ञाचें आधार आणि जें गुप्त होतें तें धातृ वगैरेंना प्राप्त झालें. तें बृहत् नांवाचें साम तेजस्वी धातृपासून, सवितृपासून, विष्णूपासून आणि अग्नीपासून भरद्वाजानें मिळविलें.

३. ध्यान करणाऱ्या धातृवगैरेंनीं देवाकडे हवि पोंचविणारें, उत्कृष्ट, साधनीभूत असणारें यजुः, बुद्धीनें मिळविलें. तेजस्वी धाता, सविता, विष्णु आणि सूर्य यांच्यापासून घर्म नांवाचा हवि ह्यांनी मिळविला.

सूक्त एकशें ब्यांयशीवें.

ऋषिः–तपुर्मूर्धा बृहस्पतिपुत्र; देवता–बृहस्पति; छंदः–त्रिष्टुभ्.

१. वाईट कल्पनांचा नाश करणारा बृहस्पति पाप नाहींसें करो. आमच्यासंबंधीं वाईट बोलणाऱ्यावर आपलें तीक्ष्ण शस्त्र टाको. आमच्यावर अयशस्वी शत्रु पाठवो. आमची दुर्बुद्धि नाहींशी करो. तसेंच रोगनाश आणि भयनाश करो.

२. प्रयाज नांवाच्या यज्ञभागांत नराशंस अग्नि आमचें रक्षण करो. आम्हीं स्तुति करीत असतां अनुयाजांतील अग्नि आम्हांला सुख देवो. बृहस्पति आमच्यावर अयशस्वी शत्रु पाठवो. आमची दुर्बुद्धि नाहींशी करो. तसेंच रोगनाश आणि भयनाश करो.

३. त्रासदायक बृहस्पति दुष्ट राक्षसांना ठार करण्याकरतां प्रथम जे ब्रह्मद्वेष्टे राक्षस असतील त्यांना त्रस्त करो, आमच्यावर बृहस्पति अयशस्वी शत्रु पाठवो. आमची दुर्बुद्धि नाहींशी करो. तसेंच रोगनाश आणि भयनाश करो.

सूक्त एकशें त्र्यांयशीवें.

ऋषिः—प्रजावान् प्रजापतिपुत्र; देवता–आशिष, छंदः—त्रिष्टुभ्.

१. (यजमानास आशीर्वाद) हे यजमाना; तूं ज्ञानी, तपामुळें झालेला, तपामुळें सर्वप्रसिद्ध आहेस असें मनानें तुला मीं ओळखलें आहे. हे पुत्रेच्छु गृहस्था, तूं पुत्रांना खेळवणारा आणि पैसा बाळगणारा असा हो.

२. (यजमानपत्नीस आशीर्वाद) हे पत्नी, सुंदर असणाऱ्या तुला ऋतुकालीं नवऱ्याचा संबंध इच्छिणारी अशी मनानें मी जाणत आहे. हे पुत्रेच्छु स्त्रिये, माझ्याजवळ येऊन तूं उत्कृष्ट तरुणी हो. आणि उत्कृष्ट प्रजेनें युक्त हो.

३. (होत्यांना आशीर्वाद) मी औषधींत गर्भ ठेवतों, मी सर्व प्राण्यांत गर्भ ठेवतों, मी पृथ्वविर सर्व मनुष्यांस उत्पन्न करतों. मी बायकोहून अन्य स्त्रियांचे ठिकाणीं पुत्र उत्पन्न केले आहेत (सर्व सृष्टि मीच निर्माण करतों.)

सूक्त एकशें चवऱ्यांयशीवें.

ऋषिः–त्वष्टा किंवा विष्णु प्रजापतिपुत्र; देवता–विष्णु, त्वष्टृ, सिनीवाली, सरस्वती, अश्विन्; छंदः–अनुष्टुभ्.

१. विष्णु गर्भाचें स्थान तयार करो. त्वष्टा अवयव करो. प्रजापति रेतःसेक करो आणि हे स्त्रिये, धाता तुझें गर्भधारण करो.

२. हे सिनीवालि, तूं गर्भाचें संरक्षण कर. हे सरस्वति, तूं गर्भाचें संरक्षण कर. हे कमलमाला धारण करणारे अश्विदेवहो, तुम्हीं गर्भाचें संरक्षण करा.

३. अश्विदेव ज्या अग्नीकरतां सुवर्णमय अरणींचें मंथन करतात (तशा तेजस्वी) गर्भाला दहाव्या महिन्यांत उत्पन्न होण्याकरतां मी तुझे ठिकाणीं बोलावतों.

सूक्त एकशें पंच्यांयशीवें.

ऋषिः—सत्यधृति वरुणपुत्र; देवता–आदित्य; छंदः–गायत्री.

१. मित्र, अर्यमा आणि वरुण यांचें अबाध्य असें मोठें साहाय्य आम्हांस प्राप्त होवो.

२. त्यांच्या घरांतहि वाईट भाषण करणारा शत्रु आमचा नाश करण्यास समर्थ होत नाहीं. मार्गांत किंवा निवारणीय स्थानीं शत्रु आमचें निवारण (त्यांच्या कृपेनें) करूं शकत नाहीं.

३. अदितीचे पुत्र (मित्र, वरुण आणि अर्यमा) ज्या मनुष्यास जगण्याकरतां अजस्र तेज देतात त्यावर शस्त्र कांहीं करूं शकत नाहीं.

सूक्त एकशें श्यांयशीवें.

ऋषिः—उल वातगोत्र; देवता–वायु; छंदः–गायत्री.

१. वायु आमचे रोग नष्ट करीत आणि सुख देत औषधासारखा वाहो. आणि आमचें आयुष्य वाढवो.

२. हे वायो, तूं आमचा पिता, भाऊ आणि मित्र आहेस. तूं आमचें जीवित टिकविणारा हो.

३. हे वायो, तुझ्या येथें जो अमृताचा साठा आहे. त्यांतून आमच्या जीवनाकरितां दे.

सूक्त एकशें सत्त्यांयशीवें.

ऋषिः—वत्स अग्निपुत्र; देवता–अग्नि; छंदः–गायत्री.

१. हे स्तोत्या, तूं लोकांच्या इच्छा पूर्ण करणाऱ्या अग्नीची स्तुति कर. कारण, तो अग्नि शत्रूंचा नाश करतो.

२. जो अत्यंत दूरहि असलेल्या निर्जल प्रदेशांत प्रज्वलित होतो तो आमच्या शत्रूंचा नाश करतो.

३. जो कामपूरक अग्नि आपल्या निर्मल तेजानें राक्षसांचा नाश करतो, तो अग्नि आमच्या शत्रूंना नष्ट करील.

४. जो अग्नि सर्वांना प्रकाशित करतो आणि सर्व प्राणिमात्र पहातो तो अग्नि आमच्या शत्रूंचा नाश करतो.

५. जो आकाशांत तेजस्वी रूपानें (विद्युद्रूपानें) प्रकट होतो, तो आमच्या शत्रूंचा नाश करतो.

सूक्त एकशें अठ्यांयशीवें.

ऋषि:—श्येन अग्निपुत्र; देवता—अग्नि; छंद:-गायत्री.

१. हे भक्तहो, सर्वज्ञ, व्यापक आणि अन्नयुक्त अग्नीला ह्या पसरलेल्या आसनावर बसण्याकरितां तुम्ही अवश्य प्रज्वलित करा.

२. सर्वज्ञ, सुपुत्र आणि बलिष्ठ अशा त्या अग्नीची उत्कृष्ट स्तुति मी करीत आहें.

३. सर्वज्ञ अग्नीच्या ज्या जिह्वा देवांना हवि पोंचविणाऱ्या आहेत, त्यांनीं तो आमचा यज्ञ पोंचवो.

सूक्त एकशें एकोणनव्वदावें.

ऋषि:—सार्पराज्ञी; देवता—[1]सार्पराज्ञी किंवा सूर्य छंद:—गायत्री.

१. हा गमनशील तेजस्वी सूर्य उदयाला आला. हा स्वर्ग आणि पृथ्वीवरून जात असतां सुंदर दिसतो.

२. ह्या सूर्याची कान्ति जगांत उदय पावून अस्ताला जात असतां आकाशांत स्पष्ट दिसते.

३. तीस दिवस सूर्याच्या तेजानें शोभत असतात, त्या सूर्याची वाणीनें स्तुति केली जाते.

सूक्त एकशें नव्वदावें.

ऋषि:—अघमर्षण मधुच्छंदस्पुत्र; देवता:—सृष्ट्युत्पत्ति; छंद:—अनुष्टुभ्.

१. सर्वत्र प्रकाशमान असणाऱ्या परमेश्वरापासून सृष्टिनियम, व्यावहारिक नियम, सर्व जग, नंतर रात्रि, दिवस तदनन्तर जलमय समुद्र उत्पन्न झाला.

२. जलमय समुद्र उत्पन्न झाल्यानंतर सर्व प्राणिमात्रास नियमित वागावयास लावणारा आणि अहोरात्र निर्माण करणारा संवत्सरात्मक काल उत्पन्न झाला.

३. पूर्व कल्पांत धात्यानें सूर्य, चंद्र, स्वर्ग, पृथ्वी, व आकाश हे वरचे आणि खालचे सात लोक उत्पन्न केले.

सूक्त एकशें एक्याण्णवावें.

ऋषि:—संवनन; देवता—१ अग्नि, बाकी संज्ञान; छंद:—३ त्रिष्टुभ्, बाकी अनुष्टुभ्.

१. हे कामपूरक अग्ने, ईश्वर असणारा तूं सर्व जगांत व्यापलेला आहेस. उत्तर वेदींत तूंच प्रदीप्त केला जातोस. तूं आम्हांला धन दे.

२. हे लोकहो, तुम्ही एक विचाराचे व्हा. तसेंच एक विचार बोला. तसेंच तुमचीं मनें निश्चित ज्ञान प्राप्त करोत. ज्याप्रमाणें पूर्वींचे लोक एकमतानें आपलीं कार्यें पार पाडीत, त्याप्रमाणें तुम्ही आपलीं कार्यें एकमतानें करा.

३. आपल्या सर्वांची प्रार्थना एक असावी. आपल्या विचाराचें स्थान एक असावें. आपलीं मनें एकाच विचारानें भरलेलीं असोत. तसेंच आपणा सर्वांचें ज्ञानहि एकसारखें असो. मी तुम्हांला हें एकच उत्कृष्ट रहस्य सांगतों कीं, आपण एकाच सामुग्रीनें देवतांचें पूजन करूं.

४. तुमचा अभिप्राय एकसारखा असावा. तुमचीं अन्त:करणें एकसारखीं असावींत, तुमचें मन एक असावें, कीं जेणेंकरून तुमच्या संघशक्तीची बळकटी होईल.

येथें ऋग्वेदाचें दहावें मंडळ संपलें.

ऋग्वेद समाप्त.

टीप—१ ऐतरेय ब्राह्मणांत ‘ सर्पराज्ञी ’ असें म्हटलें आहे (ऐ. ब्रा. २४.४)

खैलिक सूक्तें.

(परिशिष्ट)

(१)

१. सर्वश्रेष्ठ अदितिपुत्र सूर्यासह मी कीर्तिमानांची कीर्ति आणि विद्यावन्ताची विद्या मिळवितों.

२. हे उगवत्या सूर्या, बाप मुलांना संपत्ति वाटून देतो, त्याप्रमाणें तूं मला वाटून दे. तूं दीर्घायुष्य देणारा आहेस. हे सूर्या, आम्हांला दीर्घायुष्य दे.

३. हे सूक्ष्म बुद्धि देणाऱ्या आणि सर्वांना हितकारक प्रकाश असलेल्या सूर्या, उगवून वरवर जाणाऱ्या तुला आम्ही शंभर वर्षें पाहूं. आम्ही शंभर वर्षें जगूं.

टीपः—याची संहितेतील जागा १-५० च्या पुढें आहे. हें वैदिकांच्या पाठांत नाहीं.

परिशिष्टाची माहिती दशममंडल परिचयांत दिली आहे.

(२)

१. तूं भिऊं नको. तूं मरणार नाहींस. कारण, तुझें मी सर्व बाजूंनीं संरक्षण करीत आहें. भरीव काठीनें, आलेल्या विंचवाला मी ठार करतों.

२. प्रसिद्ध असणारा तूं, सूर्याच्या रथाच्या वेगानें, विष्णूच्या बाहुबलानें आणि गरूडाच्याप्रमाणें पंख हलवित भूमीवर जा.

३. गरुडाच्या पंख हलविण्यानें तीन लोक आणि पर्वत, पाणी अरण्य यांसह पृथ्वी हदरूं लागली.

४. आकाशांत चंद्रसूर्य दिसेनासे झाले ! ग्रहनक्षत्रांचा प्रकाश पडेना ! ! सर्व देवता भयभीत झाल्या ! ! ! आणि वायू सरळ वाहीनासा झाला.

५. हे भल्या सर्पा, तुझें कल्याण असो, प्रसिद्ध असणारा तूं दूर जा, जनमेजयाच्या यज्ञाच्या शेवटीं झालेलें अस्तिकाचें भाषण आठव.

६. अस्तिकाचें वचन ऐकून जो साप परत फिरत नाहीं, त्याच्या डोक्याच्या पिकलेल्या शिताफळाप्रमाणें चिंधड्या होतात.

७. जो साप जरत्कारूपासून जरत्कन्येचें ठिकाणीं झाला तो दूर जावो. त्याचें कल्याण होवो. प्रसिद्ध असणारा तो आपल्या जागीं जावो.

८. [1]असित, [2]आर्ति अनंत आणि [3]सुनीथ यांचें जो स्मरण करील त्याला दिवसा किंवा रात्रीं सापांचें भय नाहीं.

९. अगस्ति, माधव, मुचुकुंद, कपिल आणि आस्तिक हे पांच महामुनि सुखानें झोंप घेऊं देणारे आहेत.

१०. सकाळीं नर्मदेला नमस्कार असो. रात्रीं नर्मदेला नमस्कार असो. हे नर्मदे, माझे विषारी सापांपासून संरक्षण करावेस. मी तुला नमस्कार करतों.

८ टीपः—१ असिति, २ अर्थसिद्धि, ३ सुनीति.

टीपः—याचें स्थान १-१९१ च्या नंतर आहे.

(३)

१. हे भारद्वाज पक्ष्या, तूं दक्षिणेकडे शुभ शब्द कर. तूं उत्तर बाजूस शुभ शब्द कर. आमच्या पुढें आणि मागेंहि तूं शुभ शब्द कर.

२. आमच्या मुलांबाळांविषयीं शुभबोल. आमच्या घरांविषयीं शुभ शब्द कर. आम्हांविषयीं शुभ आणि अभय देणारें असें बोल.

३. आमच्या खालीं आणि वर शुभ बोल. शुभच बोल. चहूंकडून आम्हांविषयीं शुभ बोल.

४. आमच्या पुढील प्रदेश शत्रूंरहित कर. आमचें दक्षिण बाजूस कल्याण कर. पश्चिमेला आम्हांला निर्भय कर. आणि उत्तर बाजूस आमचें कल्याण कर.

५. लढवय्यांचा उत्साह दुंदुभि (रणवाद्य) वाढविते, त्याप्रमाणें आमच्यांत तूं उत्साह उत्पन्न कर. हे पक्ष्या, माझ्या उजव्या बाजूस जात तूं शुभ शब्द कर.

६. हे पक्ष्या, तूं बोलूं लागलास म्हणजे शुभ बोलावेंस. आणि स्वस्थ असशील तेव्हां तूं आम्हांला चांगली बुद्धि द्यावीस.

टीपः—याचें स्थान दुसऱ्या मंडळाच्या शेवटीं आहे.

(४)

१. हे अग्ने, तूं जगांत सर्वत्र असतोस. जेथें तूं जागृत असतोस तेथें हविर्युक्त लोक तुझें यजन करतात.

टीपः—ह्याचें स्थान ५-४४ च्या शेवटीं आहे.

(५)

१. सूक्तांच्या शेवटीं, गवतांत, अग्नींत, अरण्यांत किंवा उदकांतहि जें अध्ययन नष्ट झालें असेल तें पुनः प्राप्त होवो. प्राप्त होवो. विहीर, आड आणि तळें यांचें उदक समुद्रांत जावो, अग्नींत जावो.

टीपः—५-५० नंतर. पारायणादि प्रसंगीं दर्भ आणि पाणी जवळ घेऊन बसतात व अध्ययन झाल्यावर दर्भ व पाणी टाकून देतात.

(६)

१. कल्याणकारक, सुखकारक, तारक, श्रेष्ठ, देवतांचा आधार, असुरांना ठार करणाऱ्या इंद्राचा मित्र आणि युद्धांत कीर्ति देणाऱ्या गरुडावर नौकेप्रमाणें आम्ही आरूढ होऊं.

२. पाप नाहींसें करणारा आंगिरस, गय, कल्याणकारक आत्रेय आणि गरूड यांच्याकडे हात जोडून मी शरण जातों आप्तइष्टांचें कल्याण होवो. आम्हांला अभय असो.

टीपः—५-५१ नंतर.

(७)

१. हे रात्रिदेवते, रात्रीं आकाशांतून व मेघांतून विजा चमकत, पाऊस पडो. सर्व बीजें अंकुरित होवोत आणि ब्रह्मद्वेष्टे तं् ठार करावेंस.

टीपः—५-८४ नंतर.

(८)

श्रीसूक्त.

१. हे अग्ने, सुवर्णकांति, मनोहर आणि सोन्याचांदीचे दागिने घातलेलीं, आल्हादकारक, सुवर्णरूप शोभेला तूं बोलाव.

२. हे अग्ने, नष्ट न होणाऱ्या संपत्तीला माझ्याकडे आण. कारण, तिच्यापासून मी सोनें, गाई, घोडे आणि माणसें मिळवीन.

३. अश्वयुक्त, रथयुक्त आणि हत्तींच्या ओरडण्यानें जागी होणारी अशी जी लक्ष्मी आहे तिला मी बोलावतों. देवी लक्ष्मी मला प्राप्त होवो.

४. अगोचर, सास्मित, सुवर्णवेष्टित, स्निग्ध, झगझगीत, प्रसन्न, भक्तांना तृप्त करणाऱ्या कमलकांति कमलांत असलेल्या अशा लक्ष्मीला मी बोलावतों.

५. आल्हादक, तेजस्वी, कीर्तीनें प्रसिद्ध स्वर्गांतील देवांनीं अंगीकारलेली, उदार अशा पद्मलतास्वरूपी त्या लक्ष्मीला मी शरण आहें. माझें दारिद्र्य नाहींसें होवो. म्हणून मी तुझा स्वीकार करतों.

६. हे सूर्याप्रमाणें तेजस्वी असणारे देवी, तुला उद्देशून तप केल्यामुळें बिल्व नांवाचा वनस्पति उत्पन्न झाला. तुझ्या कृपेनें त्या बिल्ववृक्षांचीं फळें अन्तर आणि बाह्य असें सर्व दारिद्र्य नष्ट करोत.

७. हे लक्ष्मीदेवी, चिंतामणीसह महादेव व कीर्ति मला प्राप्त होवो. मी ह्या राष्ट्रांत उत्पन्न झालों आहें. मला कीर्ति आणि समृद्धि प्राप्त होवो.

८. भूक आणि तान्हेनें मलीन झालेलें जुनें दारिद्र्य मी नष्ट करून टाकतों. हे श्री देवी, सर्व दारिद्र्य आणि चणचण माझ्या घरांतून घालव.

९. सुगंधी, अपराभवनीय, पुष्ट आणि पशुयुक्त अशा सर्व प्राण्यांवर सत्ता चालवणाऱ्या श्रीला आम्ही आपल्याकडे बोलावतों.

१०. हे लक्ष्मीदेवी, इच्छा, संकल्प, सत्यभाषण पशूंचें दूध वगैरे अन्न, कीर्ति आणि संपत्ति मला प्राप्त होवो.

११. तुला कर्दम नांवाचा उत्कृष्ट पुत्र आहे. हे कर्दमा, तूं माझें घरीं उत्पन्न हो. आणि कमलाच्या माला धारण करणारी तुझी आई जी लक्ष्मी तिला माझें घरीं असूं दे.

१२. जल प्रेमळपणानें वागो. चिक्लीत नांवाचा श्रीचा मुलगा माझें घरीं राहो. आणि आई श्रीदेवीला माझ्या घरीं रहावयास लावो.

२३. ओलसर, हत्तीच्या सोंडेंतील जलांनीं स्नान करणारी, कमलें धारण केलेली, पोषण करणाऱ्या, आल्हादकारक सुवर्णकांति आणि पिंगट अशा श्रीला हे अग्ने, माझ्याकडे आण.

१४. हे अग्ने, तुळतुळीत काठी हातांत घेतलेली, सुवर्णकांति, सोन्याच्या माळा घातलेली, तेजस्वी, आणि सुवर्णमय अशा लक्ष्मीला आम्ही बोलावतों.

१५. हे अग्ने, न जाणारी लक्ष्मी तूं आम्हांकडे आण. जिच्यामुळें पुष्कळ सोनें, गाईबैल, घोडे आणि नोकर माणसें मी मिळवीन.

१६. जो मनुष्य शुद्ध होऊन वरील मंत्रानें दररोज तुपाचा होम करील त्याला संपत्ति प्राप्त होईल. संपत्तीची इच्छा करणाऱ्या माणसानें ह्या मंत्राचा सतत जप करावा.

१७. हें कमलानने, मांड्या व डोळे कमलांसारखे असलेले आणि कमलांतूनच उत्पन्न झालेले हे कमलनयने लक्ष्मी तूं मला प्राप्त हो. यामुळें मी सुखी होईन.

१८. हे विपुल धन असलेले देवी, अश्व, गाई-बैल आणि धन देणारी तूं आम्हांला धन दे आणि माझ्या सर्व इच्छा पूर्ण कर.

१९. मुलेंबाळें, धनधान्य, हत्तीघोडे, गाईबैल आणि रथ वगैरे तूं देतेस. सर्वांची तूं माता आहेस. मला तूं आयुष्मान् कर.

२०. अग्नि, वायु, सूर्य, वसु, इंद्र, बृहस्पति आणि वरुण हे सर्व धन प्राप्त करतात.

२१. हे गरुडा, तूं सोम पी. वृत्रहन्ता इंद्र सोम पिवो. सोमयुक्त धन असलेल्या मला सोम व धन द्या.

२२. जो मनुष्य श्रीसूक्ताचा जप करतो त्या पुण्यवान् भक्तांना क्रोध नाहीं, मत्सर नाहीं लोभ नाहीं किंवा त्याला दुर्बुद्धि उत्पन्न होत नाहीं.

२३. हे कमलनिवासिनि, कमलहस्ते, गंध व फुलें यांनीं सुशोभित असलेले, हरिप्रिये, त्रैलोक्याला ऐश्वर्य-संपन्न करणारे हे भगवति लक्ष्मि देवि, मला प्रसन्न हो.

२४. विष्णुपत्नी, क्षमाशील, माधवाला प्रिय, विष्णूची प्रियसखी, अच्युतवल्लभा अशा लक्ष्मीला मी नमस्कार करतों.

२५. महालक्ष्मीला आम्ही प्राप्त करतों, विष्णुपत्नीचें आम्ही ध्यान करतों. म्हणून आम्हांला लक्ष्मी प्राप्त व्हावी.

२६. हे कमलानने, पद्मयुक्ते, पद्मासने, कमलप्रिये, पद्मपत्रांप्रमाणें विशाल नेत्र असलेले, लोकप्रिये आणि सर्वांच्या अन्त:करणांला अनुकूल असणारे लक्ष्मीदेवि, तुझे चरण आमच्या अन्त:करणांत असूं दे.

२७. आनंद, कर्दम, श्रीत, च्क्लीत आणि विश्रुत हे ऋषि श्रीचे पुत्र होत. श्रीदेवी आणि श्रीसहित इतर देवता आम्हांला संपत्ति देवोत.

२८. विपुल संपत्ति, आयुष्य, आरोग्य आणि यांच्या अनुष्ठानानें पावित्र्य प्राप्त होतें. धान्य, धन, पशु, पुष्कळ पुत्र आणि शंभर वर्षें आयुष्य प्राप्त होवो. कर्ज, रोग इत्यादि, दारिद्य, दु:ख, भूक तहान, अपमृत्यु, भय, शोक आणि मनाला होणारा त्रास मला कधींहि न होवो.

टीप:—श्रीसूक्त ५–८७ नंतर.

(९)

१. हे विश्वेश्वरा, त्रिनेत्रा, विश्वरूपा, सदाशिवा, करुणाकरा, भूतेशा, शंकरा, तूं आमचें संरक्षण कर.

२. हे हरा, शंभो, महादेवा, जगदीशा, अमरवल्लभ शिवा, शंकरा, सर्वव्यापका आणि नीलकंठा तुला नमस्कार असो.

३. मृत्युंजय, रुद्र, नीलकंठ, शंभु, अमृतेश, शर्व आणि महादेव यांना नमस्कार असो.

४. ही शंकराचीं नांवें जो नियमानें एकवेळ म्हणेल त्याला मृत्यूचें भय नाहीं आणि त्याला पाप लागत नाहीं आणि रोग जडत नाहींत.

टीप:—कांहीं ठिकाणीं प्रत्येक मंडलाच्या शेवटीं म्हणतात.

(१०)

१. यज्ञेश, अच्युत, गोविंद, माधव, अनंत, केशव, कृष्ण, विष्णु, हृषीकेश, वासुदेव, यांना नमस्कार असो.

२. कृष्ण, गोपिनाथ, चक्रिन्, मुरवैरिन्, अमृतेश, गोप, गोविंद यांना नमस्कार असो.

३. हीं विष्णूचीं नांवें मंडलांच्या शेवटीं नेहमीं म्हणावींत.

टीप:—कांहीं ठिकाणीं प्रत्येक मंडलाच्या शेवटीं म्हणतात.

(११)

१. डोळे, कर्ण, मन, वाणी, प्राण व अपान, दोन उलटसुलट विसर्गद्वारें, असा हा दहा यंत्रांचा शरीररूपी कूप आहे.

२. ऊर, पाठ, दोन हात, दोन बाहू, दोन मांड्या उदर, मस्तक, केंस, मांस, रक्त, हाडें, मज्जा असें हें शरीर पाण्यांतल्या बुडबुड्यासारखें आहे.

३. दोन भ्रुकुटी, कपाळ, दोन कर्ण, दोन हनुवटी, दोन गाल, गालांच्या शेजारचा भाग, ओठ, दांत, जिव्हा असें हें शरीर उत्कृष्ट रत्नांचा खजिना आहे.

टीप:—६–४४ नंतर.

(१२)

१. जें अध्ययन मी झांकून टाकीत आहे तें अध्ययन आम्हांला पुन: प्राप्त होवो.

२. विहीर, आड, तळें आणि समुद्र यांमध्यें हें अर्पण असो. सूक्ताच्या शेवटीं हें मी अग्नींत टाकतों.

टीप:—६–४८ नंतर. परिशिष्ट ५ पहा.

(१३)

याचा अर्थ चांगला समजत नाहीं.

टीपः—७–३५ नंतर. वैदिकांच्या परंपरेंत प्रचारांत नाहीं.

(१४)

१. झोंप झोंपेच्या वेळीं सर्वांना गाढ झोंप उत्पन्न करो. माझ्याशिवाय सर्वांना सूर्योदयापर्यंत झोंप लागो. मी उषःकालापूर्वींच जागा होवो.

२. अजगर नांवाचा सरपटत चालणारा मोठा साप अगदीं निर्विष असतो. तो आपल्या जागीं व्यवस्थित आहे. त्यामुळें तुला मी झोंप उत्पन्न करतों.

३. अजगर नांवाचा साप अत्यंत निर्विष आहे. त्याच्या साहाय्यानें समुद्रहि उथळ होतात.

४. काळिक नांवाच्या सापाला नऊ हजार हत्तींचें बळ आहे. जो नारायणाचा वाहन होता, तो यमुनेच्या डोहांत उत्पन्न झाला.

५. काळिकाच्या दूताला जर काळीकाचें भय असेल तर काळीक निर्विष होऊन मूळ ठिकाण टाकून जातो.

६. हे इंद्रा, स्तुत्य अशा मार्गांनीं ये. आणि आम्ही अर्पण केलेला हा यज्ञ तूं स्वीकार. मामाच्या मुलीप्रमाणें किंवा भाचीप्रमाणें ही तृप्त करणारी वपा तुझा भाग आहे.

७. कीर्तिप्रद आणि बलशाली मनुष्य प्रतापीपणामुळेंच सर्वांचा राजा होतो. अनेक हत्ती घोडे यांचा तो अधिपति होतो आणि मनुष्याचें सतत चांगल्या कामांत व्यतीत होणारें आयुष्य प्राप्त करतो.

८. कर्कोटक नांवाचा जो साप आहे त्याची डोळ्यांतल्या विषानें मारणारा—पाहूनच ठार करणारा—अशी प्रसिद्धि आहे. हे सर्पा, त्या सर्पाच्या सर्पत्वाला माझा नमस्कार असो.

९. जे अन्तराळांत असतात किंवा जे सूर्याच्या किरणांत असतात त्यांचीं ठिकाणें पाण्यांतहि असतात. अशा सापांना माझा नमस्कार असो.

१०. जे पृथ्वीवर साप आहेत त्यांना नमस्कार असो. जे अन्तरिक्षांत आणि द्युलोकांत असतात त्या सर्पांना माझा नमस्कार असो.

११. हे इंद्रा, भयंकर हत्यारें घेतलेले, हिंसक, पराक्रमी, कपटी, बलवान् आणि हापापलेले अशा शत्रूंना असुरांचा पराभव करणारा तूं पराभूत कर.

टीपः—७–५५ नंतर. ११ वी ऋचा प्रचारांत नाहीं.

(१५)

१. ज्यांचा पराक्रम पशु जाणतात आणि ज्यांचा पराक्रम उदकदेवता स्तवितात, ज्यांच्या पराक्रमांत बलवानांतला बलवान् इंद्र अन्तर्भूत आहे, त्या उदकयुक्त पर्जन्याला संरक्षणाला आम्ही बोलावतों.

टीपः—८–९६ नंतर.

(१६)

१. हे (पाऊस आणणारे) बेडकाचे स्त्रिये, उडी मार. हे तादुरि, पावसाकरतां ओरड. डोहाच्यामध्यें चारहि पाय पोटाशीं धरून तरंगून रहा.

टीपः—७–१०३ नंतर. याचा निरुक्तांत उल्लेख आहे (९-७.)

(१७)

१. पावमानी ऋचा कल्याणकारक, सर्व इच्छा पूर्ण करणाऱ्या आणि पाऊस पाडणाऱ्या आहेत. ऋषींनीं पावमानी ऋचेंत सर्व रस साठविलेले आहेत आणि पावमानी ऋचा म्हणणाऱ्या ब्राह्मणांना अमरत्व दिलें आहे.

२. पावमानी ऋचा मला हा लोक आणि स्वर्गलोक देवोत. देवांनीं आम्हांकरतां उत्पन्न केलेल्या पावमानी ऋचा आमच्या इच्छा संपूर्ण करोत.

३. ज्या दशापवित्रानें देव आपल्याला नेहमीं शुद्ध करतात त्या हजार धारांच्या पवित्रानें पावमानी ऋचा मला पवित्र करोत.

४. प्रजापतीनें तयार केलेलें, शेंकडों तऱ्हेनें गुंफलेलें हे सोन्याचें पवित्र आहे. ब्रह्मवेत्ते आम्ही त्यामुळें पवित्र ब्रह्म प्राप्त करूं.

५. सुनीतीसह इंद्र मला पवित्र करो. सोम व वरुण स्वस्तीसह माझें कल्याण करो. राजा यम पितरांसह मला पवित्र करो. अग्नि कल्याणकारक ऊर्जयन्ती देवतेसह मला पवित्र करो.

६. सर्व स्वर्गेच्छु ऋषींनीं तप केलें. आणि तपांतपांच्या शेवटीं त्यांनीं पावमानी ऋचा म्हटल्या.

७. गर्भांत असतांना झालेलें जें पाप असेल, जन्मतांना, जन्माला आल्यानंतरचें जें कांहीं असेल, किंवा वाढत असतांना जें कांहीं झालें असेल तें पाप पावमानी ऋचांनीं मी शुद्ध करतों.

८. आईबापांची आज्ञा न ऐकल्यामुळें किंवा स्थावरजंगम सृष्टिसंबंधीं आणि सर्वांना उत्तेजन देणारें जें पाप असेल तें पाप पावमानी ऋचांनीं मी शुद्ध करतों.

९. गोहत्या, चोरी आणि स्त्रीवध यांपासून जें पातक झालें असेल आणि जें कांहीं पापाचरण झालें असेल तें सर्व पावमानी ऋचा म्हणून मी शुद्ध करतों.

१०. ब्रह्महत्या, सुरापान, सोन्याची चोरी, शूद्र स्त्रीशीं मैथुनादि संबंध ठेवणें व गुरुस्त्रीशीं संबंध ठेवणें ह्या सर्व पातकांपासून पावमानी ऋचा मला शुद्ध करोत.

११. बालहत्या, आईबापांचा वध, जमीन चोरणारा, सर्व वर्णांतील स्त्रियांशीं मैथुनादि व्यवहार करणें, पापी माणसांपासून दानें घेणें, ह्या सर्व पातकांना नष्ट करतात अशा पावमानी ऋचांनीं मी आपणांस शुद्ध करतों.

१२. अग्नींत जें कांहीं मंत्ररहित मीं हवन केलें असेल तें पातक पावमानी ऋचा म्हणून मी घालावतों.

१३. क्रयविक्रय, योनिदोष, भक्षण, उपभोग, प्रतिग्रह, अयोग्य भोजन यांपासून जें पाप झालें असेल तें पावमानी ऋचा म्हणून मी शुद्ध करतों.

१४. अयोग्य केलेलें यजन, चुकीचें केलेलें अध्ययन आणि जें अज्ञानानें पाप केलें असेल आणि जें अयोग्य यजन किंवा याजन केलें असेल त्यांपासून पावमानी ऋचा म्हणून मी शुद्ध होतों.

१५. सृष्टिनियमाचे उत्पादक, अमरपणाचें स्थान असें हें देवांपासून उत्पन्न झालेलें उत्कृष्ट उदक आमचें पाप धुवून नेवो. शुद्ध झालेला मी पुण्यवानांच्या लोकालाच जाईन. कारण मी पावमानी ऋचांनीं शुद्ध झालों आहें.

१६. ज्यामुळें मनुष्य आनंदी होतो, हितप्रद असें अन्नपाणी प्राप्त करतो आणि अमरपणा मिळवतो अशा ह्या पावमानी ऋचा कल्याणकारक आहेत.

१७. पावमानी ऋचा, पितर, देव आणि सरस्वती यांचें जो ध्यान करतो, त्याला ऋषींची कृपा प्राप्त होते, त्याला दूधतूपांसारखें मधुर अन्न प्राप्त होतें.

१८. पवमान हें श्रेष्ठ ब्रह्म आहे. तें उत्कृष्ट सनातन तेज आहे. तें सर्व पितरांना प्राप्त होतें आणि त्यामुळें दुधतुपासारखें अन्न प्राप्त होतें.

१९. पवमान नांवाचें उत्कृष्ट स्तोत्र जे थोर लोक म्हणतात तो सात जन्म ब्राह्मण, धनाढ्य आणि वेदपारग होतो.

२०. या सहाशें दहा ऋचा म्हणून जो होम करील-त्याचें भयंकर मृत्युभयहि नष्ट होतें.

टीप—९-६७ नंतर.

(१८)

टीप:—९-८६ नंतर. वैदिकांच्या परंपरेंत प्रचारांत नाहीं.

(१९)

१. जें ब्रह्मपद विष्णुलोकांत आहे म्हणून वर्णन केलें जातें आणि जें पुण्यवान् देवांना मिळतें तेथें मला तूं अढळ कर. हे सोमा, तूं इंद्राकरतां उत्पन्न हो.

२. जेथें तें परम संरक्षक आहे, जेथें सर्व प्राणिमात्रांचा अधिपति असतो आणि ज्ञानी व योगी जातात तेथें हे इंद्रा, तूं मला अढळ कर. हे सोमा, तूं इंद्राकरतां उत्पन्न हो.

३. जेथें लोक आत्मत्याग करतात, जेथें श्रद्धेनें आणि तपानें सर्व कांहीं जिंकलें आहे, आणि जेथें ब्रह्म आणि तेज आहे तेथें तूं मला अढळ कर. हे सोमा, तूं इंद्राकरतां उत्पन्न हो.

४. जेथें देव, महात्मे, इंद्रासहित मरुद्गण, ब्रह्मा आणि विष्णु आहे तेथें मला अढळ कर. हे सोमा, इंद्राकरतां तूं उत्पन्न हो.

५. जेथें गंगा, यमुना आणि पूर्वगामिनी सरस्वती आहे आणि जेथें सोमेश्वर महादेव आहे तेथें तूं मला अढळ कर. हे सोमा, तूं इंद्राकरतां उत्पन्न हो.

टीप:—९-११४ नंतर.

(२०)

१. इंद्राच्या पराक्रमामुळें रात्रंदिवस आकाशांतून पाझरणारें जळ कर्तृत्ववान् असणारा मी संरक्षणाकरतां आणीत आहें.

टीप:—१०-९ नंतर.

(२१)

१. पांढऱ्या पाण्याची गंगा आणि काळ्या पाण्याची यमुना ज्याठिकाणीं मिळाल्या आहेत तेथें स्नान करणारे स्वर्ग प्राप्त करतात. आणि जे तेथें देहविसर्जन करतात ते लोक (मोक्षाला जाऊन) अमर होतात.

टीप:—१०-७५ नंतर.

(२२)

१. तूं शंभर वर्षें आरंभापासून शेवटपर्यंत नेमिष्ठ पतिव्रता असावीस. तेजस्वी, कीर्तिमान् आणि धर्मपत्नी असावीस.

२. तुला अनेक पुत्र होवोत, आणि तुला केव्हांहि दुःख प्राप्त होऊं नये. तसेंच तुझा पति सदोदित धर्मपरायण आणि सोम पिणारा असो.

३. तुला पराक्रमी आठ पुत्र असोत. तसेंच भाग्यशाली पतिव्रता अशी तूं हो. नवरा, बाप आणि भाऊ यांना तूं नेहेमीं आनंद देणारी ऐस.

४, इंद्राची जशी इंद्राणी, विष्णचीं जशी लक्ष्मी आणि शंकराची जशी पार्वती तशी तूं नवऱ्याला प्रिय हो.

५. अत्रीची जशी अनुसूया, वसिष्ठाची जशी अरुंधती आणि कौशिकाची जशी सती तशी तूं नवऱ्याला प्रिय हो.

६. तुझा सतत उत्कर्ष होवो. माझाहि तूं उत्कर्ष कर. बृहस्पतीनें तुला मला दिली आहे. पति आणि पुत्र यांसह तूं आनंदानें शंभर वर्षें जग.

टीपः—१०·८५ नंतर.

(२३)

१. ही जी मरुतांची सेना आणि शत्रूंची सेना आमच्याशीं स्पर्धा करीत आमच्यावर चालून येत आहे त्या सेनेला गाढ अंधारानें झांकून टाका कीं ज्यामुळें ह्यांच्यापैकीं एक दुसऱ्याला ओळखणार नाहीं.

२. डोकें नसलेल्या सापाप्रमाणें हे शत्रू अंधळे होवोत. त्या तुमच्या अग्नीनें जाळलेल्या आणि अग्नीनें वेढलेल्या शत्रूंना इंद्र पुनः पुनः ठार करतो.

टीपः—१०-१०३ नंतर.

(२४)

१. कांहीं भक्त हवि देऊन येथून स्वर्गाला जातात, कांहीं यज्ञांत सोम काढून जातात, कांहीं पराक्रमानें संपत्ति मिळवून, कांहीं दक्षिणा देऊन स्वर्गाला जातात. कांहीं एक न करतां वांकड्या मार्गानें जाणारे आम्ही नरकांत पडूं.

टीपः—१०-१०६ नंतर.

(२५)

रात्रीसूक्त.

१. हे रात्रि, पृथ्वी,अन्तरिक्ष आणि द्युलोक हे तूं आपल्या तेजानें भरून टाकतेस. तूं आकाशाच्या सभागृहांत उभी असतेस. आणि अंधारानें प्रकाश झांकून टाकतेस.

२. हे रात्रि, तुझे लोकांना आढळणारे नियमित असे (२६४) दोनशें चवसष्ट भाग असोत.

३. सर्वांना आईसारखी, सर्व प्राण्यांना आधार, कल्याणकारक, सामर्थ्यवान् आणि काळसर अशा सर्व जगाला झांकणाऱ्या रात्रीला मी शरण जातों.

४. सर्वांना आधार देणारी, नियमबद्ध, ग्रह आणि नक्षत्रांनीं शोभणाऱ्या अशा शुभ रात्रीला मीं शरण गेलों आहें. हे कल्याणप्रद रात्रि आम्हांला पार पोंचव.

५. नियमानें वागणारा मी हजारोंना मान्य असणाऱ्या, बह्वृचांना प्रिय असणाऱ्या रक्षणकर्त्या दुर्गादेवीची स्तुति करतों.—जातवेदसे सुनवाम सोमम्——

७. हे देवि, हव्य वाहून नेणाऱ्या तुला ज्ञानी किंवा अज्ञानी जो शरण येतो तो सर्व संकटांच्या पार जातो ‘ स नः पर्षदति दुर्गाणि विश्वा ’

८. अग्निसारखी तेजस्वी अशा ह्या सौम्य देवीची जे लोक उपासना करतात त्यांना अग्नि संकटांतून पार पाडतो किंवा नौका समुद्रांतून तारते त्याप्रमाणें—ही देवी संकटांतून पार पाडते. ‘नावेव सिंधुं दुरित्यात्यग्निः ’

९. किल्ल्यांत, अत्यंत घोर युद्धांत, शत्रूंकडून आलेल्या संकटांत, अग्नि व चोर यांच्यांतून आणि सर्वग्रहांची पीडा निवारण करणारे देवि, तुला नमस्कार असो.

१०. भयंकर किल्ल्यांत, लढाईत आणि अरण्यांत जे मूर्खपणानें माझ्यावर हल्ला करतात त्यांच्यापासून मला निर्भय कर. मला निर्भय कर.

१२. त्या अग्निवर्ण, तपानें जळजळीत, तेजस्वी आणि कर्माचें फल देणारी जी दुर्गादेवी आहे तिला मी शरण आहे. × × × ×

१३. जो हा दुर्गास्तव दररोज रात्रीं नेहमीं म्हणेल, त्याचें भयंकर स्थानीं दुर्गा देवी कल्याण करो व त्या आम्हांला सुख देवोत.

१४. रात्रि सूक्तांचा कुशिक सौभरि ऋषि, गायत्री छंदः—आणि रात्रि देवता होय.

रात्रीसूक्ताचा रोज पाठ करावा. तात्काल फल मिळतें.

टीपः—१०–१२७ नंतर.

(२६)

१. जो इंद्र, गाईबैल, धन आणि घोडे जिंकतो त्या इंद्राला आम्ही आम्हांकडे वळवतों. युद्धांत आमची ही पूजा तूं स्वीकारावीस. हे अश्वयुक्ता इंद्रा, तुला आम्ही आमचा सहाय्यकर्ता करतों.

टीपः—१०–१२८ नंतर.

टीपः—दोनशें चवसष्ट भाग कसे होतात हें सांगतां येत नाहीं.

(२७)

१. आयुष्य, तेज व धन वाढविणारें आणि स्वर्ग देणारें असें जें सुवर्ण तें सर्व जगांत महत्त्व मिळवून देण्याकरितां माझ्या शरीरावर राहो.

२. हें सुवर्ण मोठें चंचल, युद्ध व सभा यांत जय देणारें, गाई वगैरे धन देणारें असें आहे. एवढेंच नव्हें तर सर्व तऱ्हेची समृद्धि यांत एकवटली आहे.

३. पित्याचें माता ज्याप्रमाणें सुख घेते त्याप्रमाणें मी सोन्याचें सुख घेईन. आणि त्यायोगें मी तेजःपुंज आणि लोकप्रिय होईन.

४. चांगली व विशेष शोभा देणारी, मनाच्या इच्छा पूर्ण करणारी आणि पराक्रमी राष्ट्रांतल्या लोकांच्या तोंडावर असणारी अशी कांति, हे इंद्रा, आम्हांला दे.

५. जें सुवर्ण अग्नीमुळें चहूंकडे उत्पन्न झालें तें मनुष्यांस अतिशय आनंद देणारें असल्यामुळें अमृतच उत्पन्न झालें आहे. ज्याला ज्याला सोन्याची किंमत कळते तोच खरोखर सोनें धारण करण्यास योग्य आहे. जो सोनें शरीरावर धारण करतो त्याचें म्हातारपण नष्ट होतें.

६. वरुणराजा, सरस्वतीदेवी व वृत्राला ठार करणारा इंद्र ज्या सोन्याला चांगलें ओळखतात, तें हें सुवर्ण माझ्या आयुष्याला व तेजाला कारण असो.

७. हे दक्षकुलोत्पन्न ऋषिहो, राक्षस व पिशाच्च ह्या सोन्याला घेऊं शकत नाहींत. कारण हें देवांचें उत्कृष्ट सामर्थ्य आहे. देवांमध्यें किंवा मनुष्यांमध्यें जे कोणी सोनें धारण करतात ते दीर्घयुषी होतात.

८. जें सोनें दाक्षयणांनें सद्बुद्धीनें शतानीकाच्या हाताला बांधल्यामुळें तो दीर्घयुषी झाला तें मी शंभरापेक्षां जास्त आयुष्य प्राप्त व्हावें म्हणून स्वशरीरावर धारण करीत आहें.

९. अग्नीपासून उत्पन्न झालेलें, मनाला समाधान देणारें, इतर संपत्ति देणारें, स्थैर्यप्रद, उपभोग्य, चंचल, शत्रूंचा पराभव करणारें व माझ्या कान्तींत भर घालणारें असें हें सुवर्ण माझ्या शरीरावर राहो.

१०. हे सुवर्णा, मला देवांमध्यें, राजांमध्यें व सर्व सामर्थ्यसंपन्नांमध्यें प्रिय कर व मला कांति दे.

टीपः—१०.१२८ नंतर. या सूक्ताचा आश्वलायन गृह्यसूत्रकारानें उल्लेख केला आहे. (आश्वलायन गृह्यसूत्र ३-८-१६)

११. अग्नि, सूर्य व पृथ्वी हे सर्व ज्या सुवर्णानें शोभतात, त्या सुवर्णानें हे जगच्चालका, तूं माझा उत्कर्ष कर.

(२८)

१. थंड वेष्टनानें तुला मी वेष्टून टाकतों. आमचीं घरें सरोवरांसारखीं थंड असोत. आणि अग्नि आपलें सहाय्य त्यांना देवो.

२. माझे येथें अग्नि उत्पन्न झाला आहे. दुर्वा खाणारा तो लहान आहे. संतति न झालेल्या माझें अंतःकरण दुःखी झालें आहे.

३. हे अग्ने, अरण्य विस्तृत आहे. अवकाशहि विस्तृत आहे, माझी इच्छा पूर्ण कर. मी तुला शरण आलों आहें, माझें आणि माझ्या मुलाबाळांचें संरक्षण कर.

४. हे पिंगाक्ष, लोहितग्रीव आणि कृष्णवर्ण अग्ने, तुला नमस्कार असो. समुद्राच्या लाटांप्रमाणें आतां आम्हांला सुखी कर.

५. इंद्र सामर्थ्य देवो, वरुण राज्याभिषेक करो, आणि शत्रू ठार होवोत. तूं ब्रह्मतेजानें विजयी हो.

६. पिंगटरंगाच्या ज्वाला असलेला सर्वभक्षक अग्नि हा प्रत्यक्ष दैवत आहे. मी वरुणाला प्रसन्न करतों. माझ्या मुलांचें अग्नि संरक्षण करो—माझ्या मुलांचें संरक्षण अग्नि करो.

७. संपूर्ण शंभर वर्षें जग. खा. पी आणि आनंद कर. दुःखितांचें, द्विजांचें, मुलांबाळांचें आणि पशूंचें तूं संरक्षण कर.

८. जोंपर्यंत सूर्य प्रकाशतो आणि जोंपर्यंत चंद्र शोभतो आहे, जोंपर्यंत वायु वहातो आहे तोंपर्यंत विजयी होऊन तूं जग.

९. कसा तरी कोणीहि जगतो. दुसऱ्यांवर उपकार करण्याकरतां जो जगतो तो खरा होय.

१०. त्याला चोर, साप, वाघ यांचें भय नाहीं. त्याला अपमृत्यु प्राप्त होत नाहीं. आणि मृत्युचें भयहि नसतें. त्याला सर्व कांहीं प्राप्त होतें. त्याला सर्वत्र जय प्राप्त होतो.

टीपः—१०.१४२ नंतर.

(२९)

मेधासूक्त.

१. अंगिरस ऋषि, सप्तर्षि, इंद्र, अग्नि आणि ब्रह्मदेव हे सर्व कधीं विस्मृति न होईल अशी स्मरणशक्ति मला देवोत.

२. वरुणराजा, सरस्वतीदेवी व कमलांच्या माला धारण करणारे अश्विनीकुमार मला स्मरणशक्ति देवोत.

३. जी अप्सरोगणांमध्यें व गंधर्वलोकांत मनोरूपानें असते व जी देवांमध्यें व मनुष्यांत असते ती माझ्या बुद्धिप्रत प्रविष्ट होवो.

४. मी जरी पठण केलें नसेल अथवा वारंवार आवृत्ति करीत नसेल तरी हा वेद माझ्या अंतःकरणांत स्थिर राहो, आणि प्रसंगास निःसंदेह म्हणेल असा मला आठवो. जें मी कानांनीं ऐकेन तें माझे ठिकाणीं टिको. माझे वेदाचें व्रत कोणाहि वेदज्ञाशीं बरोबरी करणारें असो.

५. माझें शरीर तरतरीत असो, मनाला मोह पाडणाऱ्या गोष्टींचा द्रोह करणारी माझी वाणी, सदोदित उत्साही असणारा मी, हा सूर्य, हे सर्व, ज्ञानावर माझी आसक्ति जडवून एकदा कानांवर पडलेलें कधींहि न विसरेल असें करोत.

६. मनाला शोभा न देणारी आणि विशेष सामर्थ्य संपन्न लोकांजवळ असणारी स्मरणशक्ति मला दे. मला बुद्धि व कांति असो, असें तूं म्हण.

७. दिवसोंदिवस क्षीण होणारें हें शरीर जरेनें युक्त न होतां मला बुद्धिमान् कर.

८. ज्या मेधादेवीची देवगण व पितर उपासना करतात त्या मेधादेवीच्या योगानें मला हे ब्रह्मवृक्षा, तूं मेधावी कर.

९. अंन्तकरणांत चांगले विचार बाळगणारा, सुदृढ हस्तपायांदि अवयव असलेला, आस्तिक्यबुद्धि मनांत धरणारा, एकनिष्ठ, सुस्वरूप, मोठा कीर्तिमान, धैर्यसंपन्न व प्रवचन करणारा असा मेधावी मी होईन आणि कोणत्याहि विद्येच्या चर्चेच्या वेळीं मी आपल्या बुद्धीचा प्रभाव दाखवीन.

टीप:—१०.१५१ नंतर.

(३०)

१. पुरुषानें आपल्या स्त्रीपाशीं प्रेमानें जावें. आणि पुत्ररूपानें पुनः उत्पन्न व्हावें. ह्या स्वतःच्या पुत्रेच्छु स्त्रीचें ठिकाणीं पुरुषानें गर्भ ठेवावा.

२. जशी ही विस्तृत पृथ्वी आपल्या ठिकाणी (पावसानें पीक) गर्भ धारण करते, त्याप्रमाणें दहाव्या महिन्यांत उत्पन्न होण्याकरतां गर्भ स्त्रीच्या उदरांत ठेवा.

३. विष्णू सारखा उत्कृष्ट रूपवान् पुत्र ह्या सुंदर स्त्रीचें ठिकाणीं दहाव्या महिन्यांत उत्पन्न होण्याकरतां गर्भरूपानें ठेव.

टीप:——१०-१८४ नंतर.

(३१)

सेनेसह असणाऱ्या अग्नीला मदतीकरतां, स्तोत्रें म्हणून मी बोलावीत आहें. तो सर्व शत्रूंतून आम्हांला पार नेईल.

टीप:—१०–१८७ नंतर.

(३२)

१. बृहस्पतीनें उपदेश केला. वरुणानें उपदेश केला. इंद्राग्नीनें उपदेश केला. सवित्यानें उपदेश केला.

२. तुम्हांला आणि आमच्या स्वकीयांना उपदेश असो. जें दुःखीकष्टी आहेत त्यांना हा उपदेश असो. ते दोघे अश्विदेव आमच्या मनांत उपदेश ठसवोत.

३. जो उपदेश अंगिरसांचा पुत्र कक्षीवान् संवनन जाणता झाला त्यामुळें सर्व देव आमचें कल्याण करोत.

४. आमच्या मनांतील विचार ध्यानांत घ्या. ते सर्व एक आहेत. जो आमच्या विचारांहून वेगळ्या विचाराचा असेल त्याला आम्ही आमच्या विचाराचा बनवूं.

५. यज्ञ व यज्ञपति यांची प्रशंसा करण्यासाठीं आम्ही आरोग्याची इच्छा करतों. देव आणि लोक, यांचें कल्याण असो. आमचा पुत्रपौत्रादिपरिवार आणि पशु यांचें कल्याण असो.

टीप:—ऋग्वेदाच्या शेवटीं.

दहावें मंडळ.

कोष्टक.

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छन्द	देवता	महत्त्व
१	७–५–२९	त्रित	त्रिष्टुभ्	अग्नि	पूरु
२	७–५–३०	त्रित	त्रिष्टुभ्	अग्नि	
३	७–५–३१	त्रित	त्रिष्टुभ्	अग्नि	
४	७–५–३२	त्रित	त्रिष्टुभ्	अग्नि	
५	७–५–३३	त्रित	त्रिष्टुभ्	अग्नि	सुंदर अग्निवर्णन
६	७–६– १	त्रित	त्रिष्टुभ्	अग्नि	
७	७–६– २	त्रित	त्रिष्टुभ्	अग्नि	
८	७–६–३।४	त्रिशिरस्	त्रिष्टुभ्	१-६ अग्नि, ७-९इंद्र	त्रित, आप्त्य ,त्रिशीर्षाण, त्वाष्ट्र
९	७–६–५	सिंधुद्वीप किंवा त्रिशिरस्	१-२अनुष्टुभ् ३-४ गायत्री ५ वर्धमाना ६ गायत्री ७ प्रतिष्ठा	अप्	उदकगुणवर्णन; आपोहिष्ठावगैरे मार्जनमंत्र
१०	७–६–६।८	यम व यमी	त्रिष्टुभ्	यम व यमी	त्वष्टृ, यम, यमी, यमयमी-संवाद
११	७–६– ९	हविर्धान	८–९ त्रिष्टुभ् बाकी जगती	अग्नि	मनु
१२	७–६–१०	हविर्धान	७–८–९ त्रिष्टुभ् बाकी जगती	अग्नि	
१३	७–६–११।१२	विवस्वत्	१–४ त्रिष्टुभ् ५ जगती	शकट	
१४	७–६–१३।१६	यम	१–१२ त्रिष्टुभ् १३–१६ अनुष्टुभ् १५–बृहती	६ अथर्व भृगु ७–९ पितृ १०–१२ श्वन् बाकी यम	वैवस्वतयम, अंगिरसः, कव्य, बृहस्पति, भृगु, अथर्वाण, उत्तर क्रियेंतील मंत्र. चार डोळ्यांचा कुत्रा.
१५	७–६–१७।१९	शंख	११ जगती बाकी त्रिष्टुभ्	पितृ	उत्तरक्रिया, दहन, श्राद्ध व उत्तरक्रियेंत म्हणतात
१६	७–६–२०।२२	दमन	१–१० त्रिष्टुभ् ११–१४ अनुष्टुभ्	अग्नि	मृतास त्रास देऊं नको म्हणून अग्नीची प्रार्थना
१७	७–६–२३।२५	देवश्रवस्	१–१२ त्रिष्टुभ् १३–१४अनुष्टुभ्	१–२सरण्यू ३–६ पूषन् ७–९ सरस्वती १०–१४ अप्	यम, विवस्वत, त्वष्टृ, सरण्यू

सूक्त	अ.अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१८	७–६– २६।२८	संकमुक	३–४ गायत्री ११ प्रस्तारपंक्ति १२–१३ जगती १४ अनुष्टुभ् बाकी जगती	१–४ मृत्यु ५ धातृ ६ त्वष्टृ ७-१४ पितृमेध किंवा १४ प्रजापति	पुनर्विवाह, सती जाणें, पुरणें, समाधि बांधणें वगैरेंचा उल्लेख
१९	७– ७– १	मथित, भृगु च्यवन	६ गायत्री बाकी अनुष्टुभ्	अप् किंवा गो १लीचा अर्धा भाग अग्नीषोम	
२०	७-७-२।३	विमद	१ विराज् २ अनुष्टुभ् ९ विराज् १० त्रिष्टुभ् बाकी जगती	अग्नि	बिमद चकमक
२१	७-७-४।५	विमद	आस्तारपंक्ति	अग्नि	अथर्वन्
२२	७-७-६।८	विमद	१५ त्रिष्टुभ् ५-७-९ अनुष्टुभ् बाकी बृहती	इंद्र	शुष्ण, दस्यु, दास
२३	७-७-९	विमद	१-७ त्रिष्टुभ् ५ अभिसारिणी २-३-४-६ जगती	इंद्र	दास
२४	७–७–१०	विमद	१-३ आस्तारपंक्ति ४–६ अनुष्टुभ्	१-३ इंद्र ४-६ अश्वि.	विमद
२५	७-७-११।१२	विमद	आस्तारपंक्ति	सोम	कक्षीवान्
२६	७-७-१३।१४	विमद	अनुष्टुभ्	पूषन्	
२७	७-७-१५।१९	वसुक्र	त्रिष्टुभ्	इंद्र	कपिल
२८	७-७-२०।२१	१ वसुक्रपत्नी २-६-८-१०-१२ इंद्र ३-४-५-७-९ ११ वसुक्र	त्रिष्टुभ्	इंद्र	
२९	७-७-२२।२३	वसुक्र	त्रिष्टुभ्	इंद्र	कुत्स, त्रिशोक
३०	७-७-२४।२६	कवष	त्रिष्टुभ्	अप् किंवा अपांनपात्	
३१	७-७-२७।२८	कवष	त्रिष्टुभ्	विश्वेदेव	कण्व, नृषद, श्याव
३२	७-७-२९।३०	कवष	१–५ जगती ६–९ त्रिष्टुभ्	विश्वेदेव	कुरुश्रवण, कलश,
३३	७-८-१।२	कवष	१ त्रिष्टुभ्	१ विश्वेदेव	पर्शवः

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्व
			२ बृहती	२–३ इंद्र	कुरुश्रवण त्रासदस्यव,
			३ सतोबृहती	४–५ कुरुश्रवण दान	उपमश्रवस
					मित्रातिथी उपमश्रवस,
			४–९ गायत्री	६–९ उपमश्रवस-	कवषाची केविलवाणी स्थिति
				शोकनिवृत्ति	
३४	७-८-३।५	कवष	७ जगती	७–८–९–१२	मौजवत सोम
		किंवा अक्ष	अवशिष्ट	अक्षस्तुति	जुगाऱ्याच्या स्थितीचें
			त्रिष्टुभ्	१३ कृषि बाकी	सुंदर वर्णन
				कितवाक्षनिंदा	
३५	७-८-६।८	लुश	१३– १४ त्रिष्टुभ्	विश्वेदेव	शर्यणावत
			बाकी जगती		
३६	७-८-९।११	लुश	१–१२ जगती,	विश्वेदेव	
			१३–१४ त्रिष्टुभ्		
३७	७-८-१२।१३	अभितपसू	जगती, १० त्रिष्टुभ्	सूर्य	
३८	७-८-१४	इंद्र किंवा लुश	जगती		
३९	७-८-१५।१७	घोषा	१. १३ जगती	इंद्र	दास, कुत्स
			१४ त्रिष्टुभ्	अश्विन्	अत्रि, सप्तवध्रि,पेदु, शयु तौग्र्य
४०	७-८-१८	घोषा	जगती	अश्विन्	विमद, शुंध्यु, भृगु, पुरुमित्र,
					वध्रिमती, बंदन, विश्पला,
					रेभ, घोषा, कुत्स, भुज्य,
४१	७-८-१९।२१	सुहस्त्य	जगती		वश, शिजार, कृश.
४२	७-८-२२।२३	कृष्ण	त्रिष्टुभ्	अश्विन्	अश्विनींचे पराक्रम
४३	७-८-२४।२५	कृष्ण	११-१२ त्रिष्टुभ्	इंद्र	
			बाकी जगतो	इंद्र	
४४	७-८-२६।२७	कृष्ण	१-३ त्रिष्टुभ्		
			४-९ जगतीं	इंद्र	ऐरावत
			१०-११ त्रिष्टुभ्		
४५	७-८-२८।२९	वत्सप्रि	त्रिष्टुभ्		
४६	८-१-१।२	वत्सप्रि	त्रिष्टुभ्	अग्नि	मनु, भृगु
४७	८-१-३।४	सप्तगु	त्रिष्टुभ्	अग्नि	
४८	८-१-५।६	इंद्र	७-१०-११ त्रिष्टुभ्	इंद्र	दधीचाचें डोकें तोडलें.मधुविद्या.
			बाकी जगती		
४९	८-१-७।८	इंद्र	त्रिष्टुभ्	इंद्र	नववास्त्व बृहद्रथ, कुत्स,यदु, तुर्वश
५०	८-१-९	इंद्र	१-२ जगती	इंद्र	
			३-४अभिसारिणी	इंद्र	
			५त्रिष्टुभ्६-७जगती		
५१	८-१-१०।११	देव व अग्नि	त्रिष्टुभ्	देव व अग्नि	अग्नि हवि वाहण्यास कंटाळून

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
					पळून गेला. अग्नि–देव संवाद.
५२	८-१-१०।१२	अग्नि	त्रिष्टुभ्	विश्वेदेव	
५३	८-१-१३।१४	४-६ अग्नि बाकी देव	६-७-९-१०-११ जगती ८ व बाकी त्रिष्टुभ्	अग्नि	अश्मन्वती नदी.
५४	८-१-१५	बृहदुक्थ	त्रिष्टुभ्	इंद्र	दास, बृहदुक्थ
५५	८-१-१६।१७	बृहदुक्थ	त्रिष्टुभ्	इंद्र	
५६	८-१-१८	बृहदुक्थ	१-२-३-७ त्रिष्टुभ् ४-५-६ जगती	विश्वेदेव	सात ऋतु, चवतीस देव.
५७	८-१।१९	बंधु, श्रुतबंधु, विप्रबंधु	गायत्री	विश्वेदेव	असमातीनें आपले बंधु इत्यादि जुने पुरोहित टाकून नवे पुरोहित केले. तेव्हां अभिचार करणाऱ्या बंधूंपैकीं सुबंधूस नवीन पुरोहितानें ठार मारलें. तेव्हां इतर तीन बंधूंनीं मंत्र म्हणून त्याला जिवंत केलें.
५८	८-१-२०।२१	„	अनुष्टुभ्	मन	
५९	८-१-२२।२३	„	१-७ त्रिष्टुभ् ८पंक्ति ९ महापंक्ति, १०पंक्त्युत्तरा	१-३ निर्ऋति व सोम ४-६ अनुनीति ७-१० लिंगोक्तदेवता	
६०	८-१-२४।२५	„	१-५ गायत्री ८-९ पंक्ति ६-७-१०-११ १२ अनुष्टुभ्	१-४ असमाति राजा५इंद्र ६ अगस्त्याची बहीण बंध्वादिकाचीआई व असमाति ११ जिविताव्हान १२ सुबंधुजीवितागमन	
६१	८-१-२६।३०	मनु	त्रिष्टुभ्	विश्वेदेव	
६२	८-२-१।२	नाभानेदिष्ठ	१–४ जगती ५ अनुष्टुभ् ६बृहती ७ सतोबृहती ८–९ अनुष्टुभ् १० गायत्री११त्रिष्टुभ्	१–७ विश्वेदेव ८–११ सावर्णिदान	नाभानेदिष्ठाची कथा उपनयन संस्कारांत म्हणतात.
६३	८-२-३।५	गयल्पात	१६–१७ त्रिष्टुभ् १५ त्रिष्टुभ् किंवा	१५ पथ्यास्वस्ति देवता बाकी विश्वेदेव	नहुषपुत्र ययाति, गयप्लात

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
			जगती बाकी जगती		
६४	८-२-६।८	गयप्लात	१२–१६–१७ त्रिष्टुभ् बाकी जगती	विश्वेदेव	एकवीस नद्या, पुष्य, सरस्वती सरयु, सिंधु, कृशानु.
६५	८-२-९।१२	वसुकर्ण	१५ त्रिष्टुभ् बाकी जगती	विश्वेदेव	वसिष्ठ.
६६	८-२-१३।१४	वसुकर्ण	१५ त्रिष्टुभ् बाकी जगती	विश्वेदेव	
६७	८-२-१५।१६	अयास्य	त्रिष्टुभ्	बृहस्पति	सूर्य उत्पन्न केला.
६८	८-२-१७।१८	अयास्य	त्रिष्टुभ्	बृहस्पति	गाई मिळवल्या
६९	८-२-१९।२०	सुमित्र	१–२ जगती ३–१२ त्रिष्टुभ्	अग्नि आप्रीसूक्त	
७०	८-२-२१।२२	सुमित्र	त्रिष्टुभ्		
७१	८-२-२३।२४	बृहस्पति	९ जगती बाकी त्रिष्टुभ्	ज्ञान	ज्ञात्याचें वर्णन
७२	८-३-१।२	बृहस्पति किंवा अदिति	अनुष्टुभ्	देवाः	सृष्टीची उत्पत्ति.
७३	८-३-३।४	गौरिवीति	त्रिष्टुभ्	मरुत	इंद्राची उत्पत्ति
७४	८-३-५	„	„	इंद्र	
७५	८-३-६।७	सिंधुक्षित	जगती	नदी	नदीवर्णन.पंजाब अफगाणिस्थान मधील नद्यांचा उल्लेख.
७६	८-३-८।९	जरत्कर्ण	जगती	सोमाभिषवग्रावा	
७७	८-३-१०।११	स्यूमरश्मि	५ जगती बाकी त्रिष्टुभ्	मरुत्	
७८	८-३-१२।१३	„	२, ५ व ७ जगती बाकी त्रिष्टुभ	„	
७९	८-३-१४	अग्नि किंवा सप्ति	त्रिष्टुभ्	अग्नि	
८०	८-३-१५	वैश्वानर अग्नि	त्रिष्टुभ्	अग्नि	
८१	८-३-१६	विश्वकर्मन्	त्रिष्टुभ्	विश्वकर्मन्	सृष्ट्युत्पत्तिवर्णन
८२	८-३-१७	विश्वकर्मन्	त्रिष्टुभ्	विश्वकर्मन्	सृष्ट्युत्पत्ति वर्णन
८३	८-३-१८	मन्यु	१ जगती बाकी त्रिष्टुभ्	मन्यु	
८४	८-३-१९	मन्यु	१–३ त्रिष्टुभ् बाकी जगती	मन्यु	

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
८५	८-३-२०।२८	सूर्या	१४,१९,२०,२१ २३,२४,२६,३६ ३७,४४, त्रिष्टुभ् १८,२७,४३ जगती ३४ उरोबृहती बाकी अनुष्टुभ्	१–५ सोम, ६–१६ सूर्याविवाह १७ देव, १८ सोम व अर्क, १९ चंद्रमस, २०–२८ आशिर्वादार्थक, २९व ३० वासोनिंदा, ३१ क्षयरोग नाशिनी, ३२–४७ सूर्यादेवता.	सूर्यासोम विवाह सूक्त. विवाह सूक्त म्हणून प्रसिद्ध असलेलें.
८६	८-४-१।४	इंद्र, इंद्राणी व वृषाकपि	पंक्ति	इंद्र, इंद्राणी व वृषाकपि	इंद्र इंद्राणी वृषाकपि संवाद लो. टिळकांनीं ज्योतिषपर लावले आहे.
८७	८-४-५।९	वायु	२२–२५ अनुष्टुभ् बाकी त्रिष्टुभ्	अग्नि	राक्षसांचा नाश व्हावा म्हणून म्हणावयाचें सुंदर सूक्त
८८	८-४-१०।१२	मूर्धन्वान्	त्रिष्टुभ्	सूर्य व अग्नि	अग्निवायूचें भांडण
८९	८-४-१४।१६	रेणू	त्रिष्टुभ्	इंद्र (व सोम यास्कमतें)	
९०	८-४-१७।१९	नारायण	१–१५ अनुष्टुभ १६ त्रिष्टुभ्	पुरुष	पुरुषसूक्त सप्त होतें
९१	८-४-२०।२२	अरुण	१–१४ जगती १५ त्रिष्टुभ्	अग्नि	
९२	८-४-२३।२५	शार्यात	जगती	विश्वेदेव	
९३	८-४-२६।२८	तान्व	२.३–१३ अनुष्टुभ, ९ पंक्ति ११ न्यंकुसारिणीं १५ बृहती बाकी प्रस्तारपंक्ति	विश्वेदेव	
९४	८-४-२९।३१	सर्प	५,७,१४ त्रिष्टुभ् बाकी जगती	सोमाभिषवग्रावा	
९५	८-५-१।४	पुरुरवा उर्वशी	त्रिष्टुभ्	पुरूरवाउर्वशी	पुरुरवा उर्वशा। संवाद
९६	८-५-५।७	बरु किंवा सर्वहरि	१२–१३ त्रिष्टुभ् बाकी जगती	इंद्राश्व	
९७	८-५-८।११	भिषज्	अनुष्टुभ्	ओषधि	ओषधिस्तुति, ज्वरमार्जनमत्र
९८	८-५-१२।१३	देवापि	त्रिष्टुभ्	बृहस्पति, मिल इत्यादि	पर्जन्यसूक्त, देवापि
९९	८-५-१४।१५		त्रिष्टुभ्	इंद्र	त्रिशीर्ष, त्रित
१००	८-५-१६।१७	वम्र	१२ त्रिष्टुभ्	विश्वेदेव	

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छन्द	देवता	महत्त्व
		दुव	बाकी जगती.		
१०१	८-५-१८।१९	बुध	९–१२ जगती ५ बृहती बाकी त्रिष्टुभ्	विश्वेदेव किंवा ऋत्विक्स्तुति	
१०२	८-५-२०।२१	मुद्गल	१–३-१२ बृहती बाकी त्रिष्टुभ्	इंद्र व मुद्गर	मुद्गरकथा
१०३	८-५-२२।२३	अप्रतिरथ	१३ अनुष्टुभ् बाकी त्रिष्टुभ्	४ बृहस्पति १२ अप् १३ मरुत किंवा इंद्र बाकी इंद्र	
१०४	८-५-२४।२५	अष्टक	त्रिष्टुभ्	इंद्र	
१०५	८-५-२६।२७	दुर्मित्र किंवा सुमित्र	२-७ उष्णिह ११ त्रिष्टुभ् १ गायत्री व उष्णिह, बाकी उष्णिह	इंद्र	
१०६	८-६-१।२	भूतांश	त्रिष्टुभ्	अश्विन्	सुंदर उपमा दिलेलें क्लिष्ट सूक्त
१०७	८-६-३।४	दिव्य किंवा दक्षिणा	४ जगती बाकी त्रिष्टुभ्	दक्षिणा किंवा दाता	दात्यांची स्तुति
१०८	८-६-५।६	१-३-५-७-९ पणी २-४-६-८-१० ११ सरमा.	त्रिष्टुभ्	सरमा व पणी	गाई शोधण्याकरितां गेलेल्या सरमेचा पणीशीं संवा
१०९	८-६-७	जुहु किंवा ऊर्ध्वनाभ.	६-७अनुष्टुभ्. बाकी त्रिष्टुभ्	विश्वेदेव	जुहूची गोष्ट
११०	८-६-८।९	जमदग्नि	त्रिष्टुभ्	आप्रीसूक्तम्	
१११	८-६-१०।११	अष्ट्रादंष्ट्र	त्रिष्टुभ्	इंद्र मेना	
११२	८-६-१२।१३	नभःप्रभेदन	त्रिष्टुभ्	इंद्र	
११३	८-६-१४।१५	शतभेदन	१० त्रिष्टुभ् बाकी जगती	इंद्र	
११४	८-६-१६।१७	सध्रि किंवा धर्म	४ जगती बाकी त्रिष्टुभ्	विश्वेदेव	
११५	८-६-१८।१९	उपस्तुत	८ त्रिष्टुभ् ९ शक्करी बाकी जगती	अग्नि	
११६	८-६-२०।२१	अग्नियुत किंवा	त्रिष्टुभ्	इंद्र	

सूक्त	अ. अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
११७	८-६-२२।२३	अग्नियूप भिक्षु	१-२ जगती बाकी त्रिष्टुभ्	धन किंवा अन्नदानाची स्तुति	दानाचें उत्कृष्ट वर्णन
११८	८-६-२४।२५	उरुक्षय	गायत्री	अग्नि	
११९	८-६-२६।२७	इंद्र	गायत्री	इंद्र	सोमपानानंतरचें इंद्राचें भाषण
१२०	८-७-१।२	बृहद्दिव	त्रिष्टुभ्	इंद्र	
१२१	८-७-३।४	हिरण्यगर्भ	त्रिष्टुभ्	क (प्रजापति)	परमेश्वरवर्णन.
१२२	८-७-५।६	चित्रमहस्	१-५ त्रिष्टुभ् बाकी जगती	अग्नि	
१२३	८-७-७।८	वेन	त्रिष्टुभ्	वेन	
१२४	८-७-९।१०	२-४अग्नि बाकी अग्नि वरुण व सोम	७ जगती बाकी त्रिष्टुभ्	१-४ अग्नि, ९ इंद्र बाकी लिंगोक्त देवता	
१२५	८-७-११।१२	वाच्	२ जगती बाकी त्रिष्टुभ्	वाच्	
१२६	८-७-१३	कुल्मल बर्हिष्	८ त्रिष्टुभ् अवशिष्ट बृहती	विश्वेदेव	
१२७	८-७-१४	कुशिक किंवा रात्रि	गायत्री	रात्रि	रात्रिसूक्त
१२८	८-७-१५।१६	विहव्य	९ जगती बाकी त्रिष्टुभ्	विश्वेदेव	
१२९	८-७-१७	परमेष्ठी प्रजापति	त्रिष्टुभ्	परमात्मा	नासदीयसूक्त, सृष्ट्युत्पत्तिवर्णन
१३०	८-७-१८	यज्ञ	१ जगती बाकी त्रिष्टूभ्	सृष्टि	यज्ञोत्पत्तिवर्णन
१३१	८-७-१९	सुकीर्ति	४ अनुष्टुभ् बाकी त्रिष्टुभ्	४-५ अश्वि बाकी इंद्र	
१३२	८-७-२०	शकपूत	१ न्यंकुसारिणी २-६ प्रतारपंक्ति ७ सतोबृहती बाकी विराज्	मित्रावरुण १ द्यु-भू-अश्वि.	
१३३	८-७-२१	सुदास	१-३ शक्करी ४-६ महापंक्ति ७ त्रिष्टुभ्	इंद्र	
१३४	८-७-२२	मांधातृ ६ व्याचा	१-६ महापंक्ति	इंद्र	

सूक्त	अष्टक अ. व.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
		उत्तरार्थ व ७ गोधा	७ पंक्ति		
१३५	८-७-२३	कुमार	अनुष्टुभ्	यम	नचिकेतची कथा
१३६	८-७-२४	१ जूति, २ वातजूति ३ विप्रजूति ४ वृषाणक ५ करिक्रत ६ एतश ७ ऋश्यशृंग	अनुष्टुभ्	अग्नि सूर्य वायु	
१३७	८-७-२५	१ भरद्वाज २ कश्यप ३ गोतम ४ अत्रि ५ विश्वामित्र ६ जमदग्नि ७ वशिष्ठ	अनुष्टुभ्	विश्वेदेव	
१३८	८-७-२६	अंग	जगती	इंद्र	
१३९	८-७-२७	विश्वावसु	त्रिष्टुभ्	१-३ सवितृ ४-६ गंधर्व	
१४०	८-७-२८	अग्नि	१ विष्टारपंक्ति २-४ सतोबृहती ५-६ जगती	अग्नि	
१४१	८-७-२९	अग्नि	अनुष्टुभ्	विश्वेदेव	
१४२	८-७-३०	१-२ जरितृ, ३-४ द्रोण, ५-६ सारिसूक्त ७-८ सांबमित्र	१-२ जगती ३-६ त्रिष्टुभ् ७-८ अनुष्टुभ्	अग्नि	
१४३	८-८-१	अत्रि	अनुष्टुभ्	अश्वि	अत्रि, कक्षीवान्, भुज्यु
१४४	८-८-२	सुवर्ण ।कवा ऊर्ध्वकृशन	१ गायत्री २ बृहत। ३-४ गायत्री ५ सतोबृहती ६ विष्टारपंक्ति	इंद्र	ऊर्ध्वकृशन सुपर्ण
१४५	८-८-३	इंद्राणी	६ पंक्ति बाकी त्रिष्टुभ्	सपत्नी नाश	सवतीचा नाश व्हावा म्हणून म्हणावयाचें सूक्त

सूक्त	अष्टक अ. वर्ग.	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१४६	८-८-४	देवमुनि	अनुष्टुभ्	अरण्यानी	अरण्यवर्णन
१४७	८-८-५	सुवेदस्	५ त्रिष्टुभ् बाकी जगती	इंद्र	
१४८	८-८-६	पृथु	त्रिष्टुभ्	इंद्र	दासी; पृथु वैन्य
१४९	८-८-७	अर्चंत	त्रिष्टुभ्	सवितृ	हिरण्यस्तुप, आंगिरसः अर्चत्
१५०	८-८-८	मृळीक	४ जगती बाका बृहती	अग्नि	अत्रि,भरद्वाज, गविष्ठिर,कण्व, त्रसदस्यु, वसिष्ठ, मृळीक.
१५१	८-८-९	श्रद्धा	अनुष्टुभ्	श्रद्धा	श्रद्धावर्णन
१५२	८-८-१०	शासनामन	अनुष्टुभ्	इंद्र	युद्धास निघालेल्या राजाचें रक्षण व्हावें म्हणून म्हणतात.
१५३	८-८-११	इंद्रमातृ	गायत्री	इंद्र	
१५४	८-८-१२	यमी	अनुष्टुभ्	मृतयजमानवर्तन	मृत माणसास प्रार्थना
१५५	८-८-१३	शिरिंबिड	अनुष्टुभ्	१.४ अश्रीनाशकर २.३ ब्रह्मणस्पति. ५ विश्वेदेव	अवदसा वर्णन
१५६	८-८-१४	केतु	गायत्री	अग्नि	
१५७	८-८-१५	भुवन किवा साधन	त्रिष्टुभ्	विश्वेदेव	
१५८	८-८-१६	चक्षुष्	गायत्री	सूर्य	
१५९	८-८-१७	शची	अनुष्टुभ्	शची	सवतीचा नाश व्हावा म्हणून म्हटलेलें सूक्त
१६०	८-८-१८.	पूरण	त्रिष्टुभ्	इंद्र	
१६१	८-८-१९	यक्ष्मनाशन	५ अनुष्टुभ् बाकी त्रिष्टुभ्	इंद्र	क्षयरोग घालविणारें सूक्त
१६२	८-८-२०	रक्षोहान्	अनुष्टुभ्	गर्भरक्षक	गर्भाचें रक्षण व्हावें म्हणून म्हटलें जाणारें सूक्त
१६३	८-८-२१	विवृहन्	अनुष्टुभ्	रोगनाशक	
१६४	८-८-२२	प्रचेतस्	१-२-४ अनुष्टुभ्, त्रिष्टुभ्, पंक्ति.	दुःस्वप्ननाशन	
१६५	८-८-२३	कपोत	त्रिष्टुभ्	विश्वेदेव	कपोतशांति
१६६	८-८-२४	ऋषभ	५ महापंक्ति बाकी अनुष्टुभ्	सपत्ननाशन	सवतीचा नाश करणारें सूक्त
१६७	८-८-२५	विश्वामित्र जमदग्नि	जगती	इंद्र	विश्वामित्र, जमदग्नि
१६८	८-८-२६	अनिल	त्रिष्टुभ्	वायु	वायु महिमा वर्णन गाईचें
१६९	८-८-२७	शबर	त्रिष्टुभ्	गो	महत्त्व वर्णन करणारें सूक्त

सूक्त	अष्टक अ. वर्ग	ऋषि	छंद	देवता	महत्त्व
१७०	८-८-२८	विभ्राज्	१-३ जगती ४ आस्तारपंक्ति.	सूर्य	
१७१	८-८-२९	इट	गायत्री	इंद्र	इट, आस्त बुध्न, वेन्य यज्ञ पळूं लागला.
१७२	८-८-३०	संवर्त	विराज	उषस्	
१७३	८-८-३१	ध्रुव	अनुष्टुभ्	अभिषिक्त राजस्तुति	
१७४	८-८-३२	अभीवर्त	अनुष्टुभ्	राजस्तुति	
१७५	८-८-३३	अर्बुद	गायत्री	ग्रावन्	
१७६	८-८-३४	सूनु	२ गायत्री बाकी अनुष्टुभ्	१ ऋभु २-४ अग्नि	
१७७	८-८-३५	पतंग	१ जगती. २-३ त्रिष्टुभ्	मायाभेद	
१७८	८-८-३६	अरिष्टनेमि	त्रिष्टुभ्	तार्क्ष्य	आरिष्टनेमी तार्क्ष्य
१७९	८-८-३७	१ शिबि २ प्रतर्दन ३ वसुमनस्	१ अनुष्टुभ् २-३ त्रिष्टुभ्	इंद्र	
१८०	८-८-३८	जय	त्रिष्टुभ्	इंद्र	
१८१	८-८-३९	१ प्रथ २सप्रथ ३ धर्म	त्रिष्टुभ्	विश्वेदेव	प्रथ, सप्रथ, वसिष्ठ, भरद्वाज, घर्म
१८२	८-८-४०	तपुर्मूर्धन्	त्रिष्टुभ्	बृहस्पति	तपुर्मूर्धन्
१८३	८-८-४१	प्रजावतु	त्रिष्टुभ्	आशिषः	
१८४	८-८४२	त्वष्टृ किंवा विष्णु	अनुष्टुभ्	विष्णु वगैरे	गर्भधारणाची प्रार्थना
१८५	८-८-४-३	सत्यधृति	गायत्री	आदित्य	पैसे मिळावेत म्हणून प्रवास करणाऱ्या शिष्याचें संरक्षण व्हावें म्हणून गुरु म्हणतो.
१८६	८-८-४४	उल	गायत्री	वायु	
१८७	८-८-४५	वत्स	गायत्री	अग्नि	
१८८	८-८-४६	श्येन	गायत्री	अग्नि	
१८९	८-८-४७	सर्पराज्ञी	गायत्री	सर्पराज्ञी किंवा सूर्य	
१९०	८-८-४८	अघमर्षण	अनुष्टुभ्	सृष्ट्युत्पत्ति	ह्या सूक्तास पदपाठ नाहीं—संध्येंतील अघमर्षण मंत्र.
१९१	८-८-४९	संवनन	३ त्रिष्टुभ् बाकी अनुष्टुभ्	१ अग्नि बाकी संज्ञान	संघटन सूक्त

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी